महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

(शरीरखंड.)

हा ग्रंथ

श्रीधर व्यंकटेश केतकर; एम्. ए. पीएच्. डी.

यांनीं

मंडळांतील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केला.

विभाग अकरावा.

---:*:---

काव्य—खतें

—*—

ज्ञानं राष्ट्रधनं महत्तमामिदं ब्राह्मण्यसंरक्षकम् ।
लोके क्षत्रियवैश्यकार्यघटनासौकर्यसंस्थापकम् ॥
कर्तृत्वागमबोधको ननु भवेज्ज्ञानार्थयत्नोऽधुना ।
ज्ञात्वा नागपुरे सुपण्डितजनैःसंघःशुभो निर्मितः ॥

१९२४

मुद्रक—डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं ज्ञानकोश छापखाना ८४१ सदाशिव पेठ पुणें येथें छापला.

प्रकाशक:—महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लिमिटेड नागपूर, तर्फे श्रीधर व्यंकटेश केतकर,
८४१ सदाशिव पेठ, पुणें.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

रचना परिचय

ज्ञानकोशाच्या रचनेविषयीं कांहीं गोष्टींचा पुनरुच्चार केला पाहिजे. कां कीं, ज्ञानकोशाचा उपयोग करितांना त्या गोष्टी सतत लक्षात पाहिजेत.

अनुक्रमविषयक पद्धति—ही आम्हीं अलीकडील संस्कृतशब्दकोशकारांपेक्षा निराळी ठेवली आहे. प्राचीन शब्दकोशकार हे अक्षरानुक्रमानें ग्रथरचना करीत नसत. अक्षरक्रम कसा असावा याविषयीं शास्त्रसिद्ध नियम कोणतेच नाहींत त्यामुळें वाचकास संवय कशी आहे आणि त्यास सोयीच काय जाईल हेंच मुख्य रचनातत्व होय. या दृष्टीनें आम्हीं उपयोगात आणलेलीं रचनातत्वें येणेंप्रमाणें आहेतः—

अक्षरानुक्रम—अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः, क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, ज्ञ असा ठेविला आहे. म्हणजे अं, क्ष, ज्ञ, यास मराठी वाचकास सोईस्कर जाईल असेंच स्थान ठेविलें आहे.

अनुस्वारापुढें कोणतेंहि व्यंजन आले व अगोदर व्यंजन-विरहित अ नसला तर ते शब्द अनुस्वाराच्या पुढील अक्षरांप्रमाणें लावणें. म्हणजे अनुस्वार नाहीं अशी कल्पना करून त्या शब्दास स्थान दिलें आहे. निरनुनासिक व सानुनासिक हे दोन शब्द जवळजवळ येतील तेव्हा निरनुनासिक प्रथम घेतला आहे. व्यंजनविरहित अं आला म्हणजे मात्र तो औच्या पुढें घातला आहे. 'क्ष' आणि 'ज्ञ' हीं अक्षरे स्वतंत्र धरलीं आहेत व तीं ह आणि ळ यानंतर घेतली आहेत. अर्धानुस्वार पूर्णानुनासिकाच्या अगोदर घेतला आहे. विसर्गाविषयीं नियम हाच कीं तो नाहीं असें धरून रचना केली आहे व विसर्गयुक्त शब्दांचें स्थान तशाच विसर्गविरहित शब्दांनंतर ठरविलें आहे. अनुस्वार आणि विसर्ग यात अनुस्वारास अग्रगामित्व दिलें आहे. "ॲ" "ऑ" हीं "अ" "आ" सारखीं धरलीं आहेत. मात्र त्यांचें स्थान अनुस्वार व विसर्ग याच्यानंतर ठरविलें आहे.

यूरोपीय देशांचीं आणि माणसांचीं नावें मराठींत लिहितांना उच्चार नेहेमीं इंग्रजी उच्चाराच्या जवळ जवळ ठेवला आहे. याशिवाय आणखीहि काहीं गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. "ए" प्रारंभी असलेल्या इंग्रजी शब्दांचा उच्चार मराठींत लिहितांना तो कांहीं प्रसंगीं "अ," "आ," किंवा 'ए" केला आहे त्यामुळें मनात असलेला शब्द निरनिराळ्या ठिकाणीं पहावा लागेल.

ज्याप्रमाणें काहीं शब्द वाचक 'अ' खालीं पहावयास लागतील पण ते 'आ" खालीं किंवा 'ए' खालीं असतील हें स्वराच्या बाबतींत झालें, त्याप्रमाणें तें व्यंजनात सुद्धा सापडणार. एखादें इंग्रजी स्पेलिंग ओळखले जाणारे नाव मराठींत "क" "का" किंवा "के" याखालीं सापडेल. का कीं, लिंगावरून दोन तीन प्रकारचे उच्चार प्रचलित असतात. तसेंच इंग्रजींत 'यू' चा उच्चार 'अ' आणि 'उ' असा असल्यामुळें कधीं कधीं घोटाळा होण्याचा संभव आहे. व्यंजनांत देखील उच्चारभेद आहेतच. आज आपलें माहितीचें मुख्य साधन इंग्रजी भाषा असल्यामुळें व इंग्रजीची स्पेलिंगपद्धति उच्चारदर्शनाच्या दृष्टीनें फार सदोष असल्यामुळें वाचकाच्या उच्चारांत व ज्ञानकोशामध्यें वापरलेल्या उच्चारात फरक होणें शक्य आहे ही गोष्ट लक्षात ठेवून विशिष्ट लेख दोन चार ठिकाणीं धुंडाळावा लागेल. पण त्यास इलाज नाहीं. शास्त्रीय विषयावरील लेखांमध्यें काहीं लेख देशी नांवाखालीं आले आहेत व कांहीं परकीय नावाखालीं आले आहेत.

विभागान्तर्गत ग्रंथनामसंक्षेपांचे स्पष्टीकरण—

अ. ओ. सो. नि.का.पु.	अमेरिकन ओरिएंटल सोसायटीचें नियत कालिक पुस्तक.
अ. को.	अर्वाचीन कोश.
आर्कि. सर्व्हे.	आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया रिपोर्ट.
आफ्रेक्ट	आफ्रेक्टचे कॅटलॉगस कॅटलॉगोरम.
इं. अँ.	इंडियन अँटिक्वरी.
इं. गॅ. किंवा ग्या.	इंपीरियल गॅझेटियर.
इं. गाइड	इंडियन गाइड.
इति. संग्र.	इतिहाससंग्रह मासिक.
ए. इं.	एंपिग्राफिका इंडिका.
एन्थोवेन	एन्थोवेनचे ट्राइब्स अँड कास्ट्स ऑफ बॉबे.
एन. जी. जी. डब्ल्यु.	नारव्रिख्टन फॉन डेर कनिख लिखेन गेझेलशाफ्ट डेर विसनशाफ्टेन त्सु गटिंगेन.
एपि. कर्ना.	एपिग्राफिका कर्नाटका.
ए.ब्रि.किंवा ब्रिटानिका	एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका.
ए. रि. ए.	एनसायक्लोपीडिया ऑफ रिलिजन अँड एथिक्स.
एस्. डब्ल्यू. ए.	झित्सुंगबेरिख्टे डेर बर्लीना अकाडेमी डेर विसनशाफ्टेन.
ऐ. ब्रा.(ऐतरेय ब्रा.)	ऐतरेय ब्राह्मण.
ऐ. ले. सं.	ऐतिहासिक लेखसंग्रह.
कॅट कॅट	कॅटलोगस कॅटलोगोरम.
कविच.	कविचरित्र.
का. इ. सं.	काव्येतिहाससंग्रह.
कात्या.	कात्यायन श्रौतसूत्र.
कौशि. किंवा कौ. सू.	कौशिकसूत्र.
क्रूक.	दि ट्राइब्स् अँड कास्टस् ऑफ दि नॉर्थ वेस्टर्न प्राव्हिन्सेस अँड औंध.
गो. ब्रा.	गोपथ ब्राह्मण.
गॅ. किंवा ग्या.	गॅझेटियर.
ज. अ. ओ. सो. ग्रं.	जर्नल ऑफ दि अमेरिकन ओरिएंटल सोसायटी ग्रंथ
ज. रा. ए.सो.	जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी.
जी. जी. ए.	गटिंग गेलेर्टे अन्त्सायगन.
जे. आर. एम.	जर्नल ऑफ दि रॉयल एशिआटिक सोसायटी ऑफ ग्रेटब्रिटन अँड आयर्लंड.
जे. ए. एस. बी.	जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसा. आफ बँगाल.
जेधे.	जेधे शकावली.
जे. पी. टी. एस्.	जर्नल ऑफ दि पाली टेक्स्ट सोसायटी.
जै. अश्वमेध	जैमिनीय अश्वमेध.
झेड. डी. एम. जी.	त्साइटश्रिफ्ट डेर डॉइटश्चेन मॉर्गेन्लेंडिशेन गेझेल शाफ्ट.
टॉ. टॉड.	ॲनल्स ऑफ राजस्तान.
डब्ल्यु. झेड. के. एम्.	वीना त्साईटश्रिफ्ट फ्यूर डी कुंड डेस मॉर्गेन लाडेस.
डि. गॅ.	डिस्ट्रिक्ट गॅझेटियर.
तै. सं.	तैत्तिरीय संहिता.
थर्स्टन	कास्टस् अँड ट्राइब्स ऑफ इंडिया.
पदे.	पदेकृत वनौपधिगुणादर्श.
पीटर्सन.	पीटर्सनचे संस्कृत हस्तलिखित ग्रंथांसंबंधीं रिपोर्ट.
प्रा. को.	प्राचीन कोश.
प्रा. हिंदु.	अय्यरकृत एन्शंट इंडिया.
बॉं. गॅ. किंवा ग्या.	बॉबे गॅझेटियर
बॉ. ब्रॅ. रॉ. ए.सो.ज.	बॉबे ब्रॅंच रॉयल एशियाटिक सोसायटीज जर्नल.
बील	बीलची ओरिएंटल बायाग्राफिकल डिक्शनरी.
बृ. सं (हिता)	बृहत्संहिता.
बे. गॅ.	बेळगांव गॅझेटियर.
भ.	भरत नाट्यशास्त्र.
भा.	भावप्रकाश.
भा. भू.	दीक्षितकृत प्राचीन भारतीय भूवर्णन
भा. व.	भारतवर्ष मासिक.
भा. इ. सं. मं.	भारत इतिहास संशोधक मंडळ.
भाग. दश.	भागवत दशमस्कंध.
भार.	भारत = महाभारत.
म. क. च.	महाराष्ट्र कविचरित्र.
म. प्रां. ग्या.	मध्यप्रांत ग्याझेटियर.

म. भा. किंवा महा.	महाभारत.
म. रि. म. वि.	मराठी रियासत, मध्यविभाग.
मा.	माधवनिदान.
मुं. गॅ.	मुंबई (बॉम्बे) गॅझेटियर.
मु. रि.	मुसुल्मानी रियासत.
रंगभूमि.	कुळकर्णीकृत मराठी रंगभूमि.
रसेल व हिरालाल.	कास्टस् अँड ट्राइब्स ऑफ दि सेंट्रल प्राव्हिन्सेस.
रा. खं.	राजवाडे खंड.
वनौ. (गु.)	वनौषधि गुणादर्श.
वा.	वाग्भट.
वाट (वॅट).	वॅटचें कमर्शिअल प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया.
वाड.	वाडसंपादित पेशव्यांच्या रोजनिशा.
वा. रा.	वाल्मीकि रामायण.
वि. च.	विल्हणकृत विक्रमांकदेव चरित.
विंटरनित्झ	विंटरनित्झचें हिस्टरी ऑफ इंडियन लिटरेचर.
विनय.	विनयपिटक.
वि. विस्तार	विविधज्ञानविस्तार.
वैद्य	वैद्यकृत मध्ययुगीन भारत.
वै. सू.	वैतान सूत्र.
श. ब्रा.	शतपथ ब्राह्मण.
श्रौ. सू.	श्रौतसूत्र.
सं. क. का. सू.	संत कवि काव्य सूचि.
सभासद.	सभासद कृत शिवाजीची बखर.
सा. द.	साहित्य दर्पण.
सु.	सुश्रुत.
सेंद्रि. र. पू. भा.	सेंद्रिय रसायनशास्त्र पूर्वविभाग.
से. रि.	सेन्सस रिपोर्ट.
स्मिथ	स्मिथचा हिंदुस्थानचा इतिहास.
हिं. वै. को.	हिंदी वैज्ञानिक कोश.

कित्येक प्रसंगी संक्षेपांतील विरामचिन्हें गाळलीं आहेत.

या भागांत जेव्हां ब्रिटानिका किंवा एरिए (एनसाक्लोपिडिआ ऑफ रिलिजन ॲण्ड एथिक्स) यासारख्या समुच्चयग्रंथाचें नांव दिलें आहे तेव्हां त्या ग्रंथांत दिलेल्या बऱ्याच आधारांचा उल्लेख वगळण्यात आला आहे.

जेव्हां आधारग्रंथाचें नाव दिलें असतें तेव्हां त्यातील सर्व माहिती किंवा मतें आम्हांस मान्य आहेत असें समजूं नये. उदाहरणार्थ थर्स्टन सारख्यांच्या जातिविषयक लेखाविषयीं अत्यंत साशंक बुद्धि बाळगीत आम्हीं ते लेख वापरले आहेत.

जेव्हां जुन्या ग्याझेटिअरसारख्या ग्रंथातून माहिती घेतली असते व आंतील आंकडे मात्र नवीन खानेसुमारीच्या साहाय्यानें बदललेले असतात तेव्हां नवीन खानेसुमारीचें नांव प्रत्येक ठिकाणीं घातलें नाहीं.

शुद्धिपत्र.

पृ. ५३० ओळ ३४ ' शेणवी ' गाळावा.

पृ. ७३९ मधील ' कोण्णूर ' व पृ. ७४४ मधील 'कोन्नूर' हीं नांवें एकाच गांवाचीं आहेत.

पृ. ७८५ ' कोणार्क लोक ' या ऐवजीं ' कोऱ्याक लोक' वाचावें.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश

अंतरंगपरिचय.

काव्य—केटा.

हिंदुस्थान—

इतिहास—वैदिक.—काश्यप, कीकट, कुंताप, कुंति, कुत्स, कुरु, कूर्म, कौषीतकी ब्राह्मण.

पौराणिक.—काश्यप, किंकर, किन्नर, किरीटि, किर्मीर, कीचक, कुकुर, कुंति, कुंतिभोज, कुंती, कुबेर, कुब्जा, कुंभकर्ण, कुमार, कुरु, कुरुयुद्ध, कुवलयापीड, कुश, कुशध्वज, कुशनाभ, कुशान, कुशावर्त, कूर्म, कूर्मपुराण, कृतवर्मा, कृति, कृप, कृष्ण, कृष्णद्वैपायन, केशी, केसरी, केसीध्वज, कैकेयी, कैटभ, कौण्डिन्य, कौरव, कौसल्या, क्रतु.

बौद्ध.—कीकट, कुशिनगर, कौशांबी, केक.

प्राचीन हिंदुस्थान.—किलकिल यवन, कुकुर,कुमारदेवी, कुमारराज, कुशान, कोसल.

उत्तर हिंदुस्थान व रजपूत इतिहास.—कुंभ, कुंभराणा, कुमारपाल, कृष्णाकुमारी.

दक्षिण हिंदुस्थान.—किमेदि जमीनदार, किरीटि, कुडाळसंगम, कुब्ज विष्णुवर्धन, कुलशेखर, कृष्णदेवराय, कृष्णदेव होयसळ, कृष्णनाईक वरंगळकर, कोकण, कोंगाळव, कोंडवीडू गाणदेव, कोरकई.

मुसुलमानी.—कुत्बमिनार, कुत्बशहा, कुत्बशाही, कुत्बुद्दीन-ऐबक, कैकुबाद.

मराठे.—काशीबाई पेशवे, काशीराज पंडित, कुरुंदवाड, कुसाजी भोसले, कुळकर्णी, कृपाराम, कृष्णराव खटावकर, कृष्णराव बल्लाळ काळे, कृष्णाजी कंक, कृष्णाजी त्रिमल, कृष्णाजी नाईक जोशी, कृष्णाजी भास्कर, केसो भिकाजी दातार, कोठी, कोतवाल, कोन्हेरराम कोल्हटकर, कोन्हेरराव फांकडे, कोप्पळ.

इंग्रजी अमदानी.—क्लाइव्ह.

इतिहास साहित्य.—कीर्तने, कृष्णाजी विनायक सोहोनी.

जातीतिहास—काश्मीरी, काश्मीरी ब्राह्मण, कासार, काहूत, किरात, किरार, किसान, कीचक, कीर, कुकी, कुंजा, कुडवक्कल, कुडाळदेशकर ब्राह्मण, कुडुमी, कुणबी, कुंभार, कुरमवार, कुरमी, कुरबा, कुसवन, कूटमाळी, कृष्णान्वक, केलसी, केवट, कैकाडी, कैकोलन, कैवर्त, कोइरी, कोकू, कोल, कोलघा, कोलन, कोलायन, कोल्हाटी, कोष्टी, कोह्ली, कोळी, क्युरेपी, क्रमवंत.

वाङ्मय—

संस्कृत.—काशीनाथोपाध्याय, किलहॉर्न, कुमारिलभट्ट, कूर्मपुराण, कृष्णकवी, कृष्णदत्त, केदारभट्ट, कैय्यट, कोलब्रुक, कौटिल्य, कौषीतकी.

मराठी.—कूर्मदास, कृष्णदशार्णव, कृष्णदासमुद्गल, कृष्णयाज्ञवल्की, केसरीनाथ, क्यान्डी.

बौद्ध.—कुमारजीव.

जैन.—कुंदकुंदाचार्य.

बंगाली.—कृत्तिवास.

फारशी.—किशनचंद, कृष्णदास.

मुसलमानी.—कुराण.

इंग्रजी.—कीट्स, कोलेरिज, कौपर.

रशियन.—क्रोपॉटकिन.

सामान्य.—काव्य, कोश.

भाषा—काश्मीरी भाषा, कोंकणी भाषा.

प्रादेशिक इतिहास व भूगोल—

मुंबई इलाखा, महाराष्ट्रः—कासारबारी, कासेगाव, किक्ली, किन्हई, कुकरमुंडे, कुंडल, कुडें, कुंदगोळ, कुंभोज, कुरकुंब, कुरंगगड, कुरुंदवाड, कुर्ला, कुऱ्हाडखुर्द, कुलाबा, कुलाबा किल्ला, कृष्णानदी, केंजळगड, केंदूर, केळवे माहीम, कोंकण, कोटूर, कोंडाणें, कोंडाणें किल्ला, कोंदिवटी लेणीं, कोपरगांव, कोल्हापूर.

क र्ना ट क.—काळहोळ, कित्तुर, किरगेरी, किरवळे, कुडची, कुडला, कुणकुंबी, कुंतनहसहळ्ळी, कुंभारडी डोंगर, कुमठा, कुर्तकोटी, कुसुगल, केरूर, केळवाडी, कोकटनुर, कोंगनोली, कोटुमचगी, कोड, कोडमगी, कोण्णूर(कोन्नूर).

गु ज रा थ.—कासलपुरा, कुतियान, कूबा, केसरिया, कोटेश्वर, कोंट्रा.

ब डो दे सं स्था न.—कोडीनार.

सिं ध.—काश्मोर, केटी, कोत्री, कोहिस्तान.

म ध्य प्रां त.—किबमरो, कुत्रु, कुरुप्पाल, कुलुइन्सूर, केळोद, कोटगळ, केटा, केटापल्ली, कोंडका, कोंडगाव, कोरिया-संस्थान.

व ऱ्हा ड.—किनवत कुटासा, कुऱ्हा, केळापुर, कौण्डिन्यपुर.

रा ज पु ता ना.—किशनगड, कुंचावन, कुंभळगड, कुंभेर, कुरावर, कुरौलगड, कूादयन, ककरी, केरवली, केराढी, केशोर-इ-पाटण, केळवाडा, कोकणपूर, कोटपुतळा, कोटा, कोठा-रिया, कोत्रा.

म ध्य हिं दु स्था न.—काळीसिंध, कुक्शी, कोठी, कोर्वइ.

सं यु क्त प्रां त.—काशी, काशीपूर, कासगंज, कासिया, काळी नदी, किच्चौचा, किराकत, किरौली, कीरतपूर, कुंच, कुंदा, कुमाऊन, कुलपहार, केदारनाथ, केन, कैमगंज, कैमूर, कैराण, कैसरगंज, कोटद्वार, कोपागंज, कोरा, कोन्हा, कोझी, कोसम.

पं जा ब.—कासूर, काळाबाग, किउंथल, किलसोभसिंध कुंचपुर, कुंजा, कुठार, कुनिहार, कुलू, कुंहरसेन, कैथल, कोट, कोटकपुरा, कोटगड, कोटी.

का श्मी र सं स्था न.—काश्मीर.

ति बे ट.—कैलास.

बं गा ल.—कासीमबझार, किशोरगंज, कुचबिहार, कुतुब-दिया, कुमारखली, कुर्सेंग, कुरिग्राम, कुलुहा, कुष्टिया, कृष्णगर, केंदूली, केशवपूर, कोकोबेटें, कोटचांदपुर, कोश्रंग, कोमिल्ल, कोलगांग, कोशी.

बि हा र-ओ रि .—किशनगंज, केओंझर, केंद्रापारा, केसरीय, कोनारक, कोल्हाण.

वा य व्य स र ह द.—काळा पहाड, काळाबाग छावणी, कुरम एजन्सी, कुरम नदी, कुलाची, कोहाट.

ब्र ह्म दे श.—किंडन, किनगिन, किनु, कुंग्ययोन, कुन्हळ, कोडौंग, क्यबिन, क्यवक्कू, क्यैकटो, क्यैकमराव, क्योनपि-आव, क्यौकपदौग, क्यौकप्यू, क्यौकश्यी, क्यौक्तन, क्यौक्ता, क्यौक्से, क्यौगोन.

आ सा म.—कोहीम.

है द रा बा द सं स्था न.—काळाचौतरा, किनवत, कुष्तगी, कोंडगल, कोप्पल, कोसगी, कोहीर.

म्है सू र सं स्था न व कू र्ग.—किग्गतनाड, कुढलगी, कुनिगल, कुमारधारी, कूर्ग, कृष्णराजपेठ, केलडी, कोडचाद्री, कोप्प, कोलार, कोळ्ळीप्पाकई, क्लाजपेट.

त्रा व ण को र सं स्था न.—किलिमनूर, कोट्टारु, कोला-चल.

म द्रा स.—कासरगोड, कीलकरै, कुडवासल, कुंडापूर, कुडालोर, कुत्तालम, कुदरेमुख, कुंदा टेकडी, कुन्नमकुलम्, कुन्नूर, कंबुम्, कुंभकोणम्, कुरुंब्रनाड, कुलशेखरपट्टणम्, कुलि-त्तलइ, कुलम, कूडलगी, कृष्णागिरी, कृष्णा जिल्हा, कोइंबतूर, कोइलकुंतल, कोकनाडा, कोचीन, कोटगिरी, कोट्टापट्टम्, कोट्टा-यम्, कोट्टूर, कोंडपल्ली, कोंडविडु, कोडैकानल, कोनोली, कोरपूट, कोरिंग, कोलकइ, कोलार सरोवर, कोलेगल, कोलेरून, कोळगड, कोल्लैमलई, कोवेलंग, कोसीगी, क्विलान, क्वीलहानी.

पो र्तु गी ज व सा ह त.—कुडाळ.

प्रा ची न.—किंपुरुषवर्ष, किष्किंधा, कुट्टापरांतक, कुंतल, कुरुजांगल, कुरुपांचाल, कुरुवर्ष, कुरुक्षेत्र, कुशद्वीप, कुशस्थली, केकय, केरल, कोंगू देश, कोसल, कौशांबी, क्रौंच-द्वीप.

आशिया (हिंदुस्थानेतर)—

जा त.—कार्याक लोक.

प्रा दे शि क.—काश्गर, किओटो, किलसैफुल्ल, कीर-थर, कीलिंग बेटें, कुत उल आमारा, कुम, कुर्दिस्तान, केईद्वीपसमूह, केला, कैफेंगफु, कोकोनॉर, कोरिया, कोलंबो कोहइबाब, कोहलू, क्वेटा, केटापिशीन.

आफ्रिका—

ऐ ति हा सि क.—कूगर.

प्रा दे शि क—कासाला, किंबर्ले, किलिमांजारो, केनिया, केनिया पर्वत, केपकोस्ट, केपटाउन, केपप्रॉव्हिन्स, केरो, कोर्डोफान, कून्स्टाड

यूरोप—

ऐ ति हा सि क—काव्हूर, किचनेर, किर्गी, केटो, कोलंबस, कोलबेर, क्रोपॅटकिन.

प्रा दे शि क.—काव्हूर, कांव्हेंट्री, कॅस्टेलो ब्रंको, कास्पियन समुद्र, काळा समुद्र, किंग्जटाउन, किंग्जलिन, किलार्ने, कीफ, कील, कुक्सहॅवन, केडीझ, केनिलवर्थ, केन्सिंग्टन, केंब्रिज, कोइंब्रा, कोनिग्जबर्ग, कोपनहेगन, कोबर्ग, कोरूना, कोर्टरॉय, कोलचिस, कोलचेस्टर, कोलोन, कोलोफोन, कोवनो क्यूमी, क्रॅको, क्रॉस्टाट, किसा, क्रीट, क्रेसी, क्रोन्स्टौन.

अमेरिका—

प्रा दे शि क.—किंग्स्टन, किंट्सर्सेट, कौचाबंबा, कोलंबस, कोलंबिया, कोलोरॅडो, कोस्टारिका, क्यूबा, क्रॉयसेट, क्विटो, क्विबेक.

आस्ट्रेलिया—क्वीन्सलंड.

वैद्यक शास्त्र—कास, काळपुळी, काळा आजार, कुष्ठ, कृष्णमूत्र ज्वर, क्लोरोफार्म,

च रि त्र.—कोलिकेर.

वनस्पतिशास्त्र—काश, काशीफळ, किंकरी, किराईत, कुंकमवृक्ष, कुचला, कुंजर, कुंजुरी, कुटकी, कुडा, कुंभा, कुयली, कुरडु, कुसुंबा, कुळिथ, केकती, केणी, केवडा, केशर केळ, कोकंब. कोका, कोको, कोथिंबीर, कोद्रु, कोळी, कोरफड, कोशिंब, कोष्ठ, कोहळा, कोलिंजन.

कृषिशास्त्र—कृषिकर्म.

रसायनशास्त्र –काष्टिन, कायसीन, क्रोमाइट, क्लोरोफार्म

च रि त्र.— केकुल,

पदार्थविज्ञान—केशाकर्षण.

च रि त्रे–किर्चाफ, कुन्डट, केटर, केल्व्हिन, कोहनिग, कोलंब, क्युरी, क्लासिअस,

तत्वज्ञान—क्रियावाद.

च रि त्रे—कुमारिलभट्ट, कांट,

ज्योतिषशास्त्र—कृत्तिका, कोल्लम शक.

च रि त्रे—कृष्ण, केप्लर, केशव, कोपर्निकस.

गणितशास्त्र—कोस.

च रि त्रे–कृपाराम, कृष्ण.

धार्मिक व सांप्रदायिक--कीर्तन, कुराण, कूका, कोकिलाव्रत

च रि त्रे--कूर्मदास, केशव चंद्रसेन, केशवस्वामी, केकरपंथ.

सांस्कृतिक व सामाजिक—कुटुंब, कुल, कौल.

च रि त्रे--किड बेंजामिन.

औद्योगिक व कलाविषयक—कुकू, कुंभारकाम, कुरुंद, केशर, कोको, कोचिनील, कोंबड्या, कोळंमा, क्रोमाइट.

च रि त्रे—कीन, क्रप.

शासन व अर्थशास्त्र--कुळकर्णी, कोटी, कोतवाल

च रि त्रे—केअर्नस, कौटिल्य.

कायदेशास्त्र—कोर्ट.

खनिजशास्त्र—कोळसा.

प्राणिशास्त्र—कासव, कीटक, कुत्रा, कृमिसमूह, कोकिल, कोचिनील किडे, कोंबड्या, कोल्हा, कोळी.

अध्यापनशास्त्र—किंडरगार्डन.

नाट्यशास्त्र, च रि त्रे—किर्लोस्कर, कीर्तने, कोल्हटकर

युद्धशास्त्र—किल्लेकोट व तटबंदी, क्रप.

अर्थनिश्चय—कोम.

ख—खतें

हिंदुस्थान—

इ ति हा स पौराणिकः—खट्वांग.

म रा ठे—खंडेराव गायकवाड, खंडेराव गुजर, खंडेराव दाभाडे, खंडेराव हरि, खंडेराव होळकर, खंडोजी माणकर, खंडो बल्लाळ.

जातीतिहास—खंगार, खंडायत, खंडेवाल.

प्रादेशिक इतिहास व भूगोल—

मुं ब ई ई ला खा, महाराष्ट्रः—खटाव, खडकवासले, खडकी, खंडाळा.

गु ज रा थ—खंडाल.

रा ज पु ता ना.—खंडेला.

म ध्य हिं दु स्था न—खजुराहो.

बि हा र ओ रि सा.—खगारिया, खगोल, खंडगिरी, खंडेपरा.

सं यु क्त प्रा त.—खजुहा, खटौली.

प्राचीन—खज्जर, खंड.

वनस्पतिशास्त्र—खजुवा, खजूर.

कृषिशास्त्र—खतें.

खनिजशास्त्र—खडक, खडीचा दगड.

औद्योगिक व कलाविषयक—खडीचा दगड, खडीचें काम.

धार्मिक व सांप्रदायिक—खंडोबा.

अक्षरविकास—ख.

वाढ होण्यास बराच तयारीचा काल गेला असावा. इ. स. च्या दुसऱ्या शतकातील बुद्ध कवि अश्वघोष याच्या काव्यावरून व नाटकावरूनहि असें अनुमानता येतें कीं, या कवीनें पूर्वापर नमुन्याबरहुकूम आपल्या कृतीस मूर्तस्वरूप दिलें असावें

अलंकारशास्त्र व काव्य यांच्या अन्योन्य संबंधाकडे पाहिलें तर प्रथम एवढें म्हणतां येईल कीं, भारतीय नाट्यशास्त्र किंवा भामहकृत काव्यग्रंथ या दोहोंचा काल ठरविणें अशक्य आहे. भामहाचा ग्रंथहि अत्यंत जुना असला पाहिजे असें दिसतें.

काव्याचें अभिजात युग.—पूर्वअभिजातयुग म्हणजे इ. स. तिसरें व चवथें शतक होय. तंत्राख्यायिका हेंच पंचतंत्राचें अत्यंत जुनें स्वरूप असावें. चवथ्या शतकात भासाची नाटकें पुढें आलीं. वरील दोन ग्रंथ, अश्वघोष व त्याचे समकालीन याच्या कविता, हालाची सप्तशति व गुणाढ्यकृत बृहत्कथा इत्यादि ग्रंथ, भारतीय काव्याच्या पूर्वअभिजात युगांतील मुख्य ग्रंथ म्हणून गणण्यास हरकत नाहीं. आंध्रराजे, पश्चिमेकडील क्षत्रप, कुशान राजे व त्याचे समकालीन, या सर्वांच्या दरबारीं वरील वाङ्मयास बहर आला होता असें म्हणावयास हरकत नाहीं.

इ. स. ३२० मध्यें पहिल्या चंद्रगुप्तानें स्थापिलेल्या गुप्त घराण्याच्या राजवटींत काव्याचें सुवर्णयुग सुरू झालें. इ. स. ३४५ मध्यें असलेल्या समुद्रगुप्तावर राजकवि हरिसेन यानें एक प्रशस्ति लिहिलेली आहे व ती अलाहाबाद येथील एका स्तंभावर कोरलेली आहे. तिसरा गुप्तराजा म्हणजे दुसरा चंद्रगुप्त होय. याचें काव्यावर फार प्रेम असे त्याच्यानंतर इ. स. ४१३ मध्यें पहिला कुमारगुप्त गादीवर बसला. या राजाच्या ४० वर्षांच्या अमदानींत लक्ष्मी व सरस्वती याच्यातील वैर नाहींसे झालें होतें असा लौकिक आहे.

पुढें स्कंदगुप्तानें हूणाचा पराभव केला त्यावेळीं, गाझीपूर जिल्ह्यातील भिलारी गावीं एका स्तंभावर एक शिलालेख कोरण्यांत आला. परंतु इ. स. ४८० मध्यें स्कंदगुप्त वारल्यामुळें गुप्त घराण्याचें वैभव लयाला गेलें. त्याचे सर्व शिलालेख इ. स. ३५० ते ५५० या काळातील असून कालिदासाच्या ग्रंथाचाहि त्यात उल्लेख आहे. सौमिल व रामिल यांचा काल अनिश्चित असून ते कालिदासाचे समकालीन होते कीं नव्हते हें अज्ञात आहे. मेन्था (भर्तृमेंथा हस्तिपक) नांवाच्या कवीनें काश्मीरच्या मातृगुप्त राजाकरितां 'हयग्रीववध' नावाचें काव्य लिहिलें आहे. अमरु हा सहृदय व प्रसिद्ध कवि कालिदासाच्या कालाहून फार दूरच्या कालात झाला नसावा. शूद्रक व विशाखदत्त या नाटककाराचा काल अनिश्चित आहे. भट्टी, भारवीप्रभृति महाकाव्याचे जनक आणि शतकत्रयकर्ता भर्तृहरि हे इ. स. ६५० च्या पूर्वींच प्रसिद्धीस आले होते, एवढेंच या कवींबद्दल म्हणता येईल. वराहमिहीर नावाचा कवि व ज्योतिषी इ. स. ५८७ त वारला हें मात्र निश्चित आहे. सहाव्या शतकाच्या उत्तरपादात सेतुबंध नावाचें प्राकृत महाकाव्य लिहिणारा किंवा लिहविणारा दुसरा प्रवरसेन राजा, हा काश्मिरास राज्य करीत असे. इ. स. सातव्या शतकाच्या आरंभीं दंडी व सुबंधू असे दोन कवी होऊन गेले यात शंका नाहीं.

ऐतिहासिक पुराव्याच्या क्षेत्राकडे वळल्यास प्रथम एका नाटककाराचें नाव सुचतें व हा नाटककार म्हटला म्हणजे इ. स ६०६ ते ६४७ मध्यें होऊन गेलेला व ठाणेश्वर आणि कनोजचा राजा हर्षदेव अथवा हर्षवर्धन हाच होय. कादंबरीकर्ता बाण व वीगार्गीतात्मक रचना करणारा भावनाप्रधान मयूर कवी हे त्याच्या समकालीन होते. सातव्या शतकाच्या उत्तरार्धात 'शिशुपालवध' कर्ता माघ हा होऊन गेला असावा. कारण इ. स. ६२५च्या शिलालेखात उल्लेखिलेला राजा वर्मलाट, याचा पहिला प्रधान हा माघाचा आजा सुप्रभदेव हा होय. त्यानंतरचा कनोजाधिपति यशोवर्मन् हा वाङ्मयाचा आश्रयदाता होताच. शिवाय 'रामाभ्युदय' नावाचें नाटक त्यानें लिहिलें आहे असें म्हणतात. नाट्याचार्य भवभूति व 'गौडवाह' कर्ता प्राकृत कवी वाक्पतिराज हे यशोवर्मन्च्या दरबारीं होते. वामनानें उल्लेख केलेला भट्ट नारायण नावाचा नाटककार फारसा उत्तरकालीन नसावा.

अर्वाचीन युगातील प्रसिद्ध काव्यलेखक.—चिप्पट जयपीड(८०६-८३८) व अवन्तिवर्मन् (८५५-८८३) नावाच्या काश्मिरी राजाच्या अमदानींत राजानक रत्नाकर म्हणून एक महाकवि होऊन गेला. हरिविजय, वक्रोक्तिपंचाशिका इत्यादि अनेक काव्यें त्यानें लिहिलीं आहेत. नवव्या शतकाचा अस्त व दहाव्या शतकाचा उदय, अशा वाङ्मयीन संधिकालात नाटककार राजशेखर होऊन गेला. तो आपणास महेंद्रपाल राजाचा शिक्षक व कृष्णशंकरवर्मन् याचा समकालीन म्हणवितो. ११ व्या शतकात माळव्यातील धारानगरीनें वाङ्मयासंबंधीं मोठें काय केलें आहे. मुंज राजा (९७४-९९५) हा स्वतःच कवि होता. 'नवसाहसांकचरित' हा ग्रंथ लिहिणारा पद्मगुप्त राजकवि होता. मुंजाचा पुतण्या भोज (१०१८-१०६०) याचाहि काव्यास चांगला आश्रय असे. हा राजा बऱ्याचशा काव्याचा जनक असून त्याच्या दरबारचा कोणीहि प्रसिद्ध कवि आज आपणास माहीत नाहीं हे आश्चर्यच आहे! ११ व १२ व्या शतकात 'वाङ्मयभूमि' म्हणून काश्मिरचा मोठा लौकिक असे. दृश्य काव्य, महाकाव्य व भावनात्मक काव्य लिहिणारा बिल्हण (१०७०-१०९०) यानें १०६५ त बहुधा काश्मीर सोडलें असावें. अनेक दरबारात प्रवेश करून सरतेशेवटीं तो पश्चिमेकडील चालुक्य घराण्यातील सहाव्या विक्रमादित्य राजाच्या दरबारीं कवि झाला. पुढें त्याच्याकरिता बिल्हणानें 'विक्रमांकदेव चरित' नावाचा ग्रंथ लिहिला; यावेळीं

काश्मिरचा राजा हर्ष (१०८९–१०८९) हा गादीवर होता. क्षेमेंद्र कवि काश्मिरातच होऊन गेला त्यानें महाकाव्यें व नाटकें लिहिलीं, रामायणमहाभारतांस संक्षिप्त स्वरूप दिलें आणि बृहत्कथा व कादंबरी यांनां छंदोबद्ध संक्षिप्त स्वरूप देऊन धर्मपर व उपदेशपर अशीं अनेक स्फुट काव्यें लिहिलीं आहेत. त्यानंतर १०६३ व १०८१ च्या दरम्यान सोमदेवानें कथानकात्मक काव्यें लिहिलीं. काश्मिरचा राजा जयसिंह (११२८–११४९) याच्या राजवटींत मंख कवि होऊन गेला व त्यानें ११३५ ते ११४५ च्या दरम्यान श्रीकंठचरित हें महाकाव्य लिहिलें. ११४८ च्या सुमारास प्रसिद्ध इतिहासकार कल्हण यानें 'राजतरंगिणी' नावाचा काश्मिरचा वृत्तात संकलित केलेला ग्रंथ लिहिला. बाराव्या शतकांतील काश्मीरसारखे काव्याचें दुसरें केंद्र म्हणजे बंगालचा राजा लक्ष्मणसेन याचा दरबार हे होय. त्याच्या आश्रयानें, उमापतिधर, धोई, गोवर्धन आणि गीतगोविंदकर्ता प्रसिद्ध जयदेव हे सर्व कवी उदयास आले. नैषधचरित लिहिणारा श्रीहर्षकवि हा बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात कनोजच्या जयचंद्र व विजयचंद्र या राजाच्या दरबारीं आश्रित म्हणून राहिलेला असावा.

आधुनिक भारतीय वाङ्मयातील काव्यः— भरतखंडाच्या आधुनिक सर्व भाषाप्रकारात गाणीं व कथा असलेलें भरपूर वाङ्मय आढळतें. लौकिक अथवा रुढ कविता आणि काव्य या दोहोंतील सूक्ष्म भेद समजणे हें मात्र सर्वदाच सोपे नसते. द्रविडी बहुजनसमाजातील सुंदर रूढ गाण्यापैकीं कांहीं गाणीं अशीं आहेत कीं, ज्याना रूढ अथवा लौकिक असें नाव देता येणार नाहीं. तुळशीदास (इ. स. १५३२–१६२४) यानें हिंदी भाषेत स्वतंत्र रीतीनें वाल्मिकीच्या आधारे रामायण लिहिलें आहे. तुळशीदासकृत रामायण हें विशिष्ट काव्यपद्धतीचे एक उत्कष्ट उदाहरण आहे. कारण त्यातील सृष्टिवर्णनें, काव्यशास्त्रातील ठराविक उदाहरणें पुढें ठेऊन न करिता, प्रत्यक्ष निसर्गावलोकनानेंच केलेलीं आहेत.

काव्याचें आणखी थोडेसें विवेचनः—क्षेमेन्द्रकृत सुवृत्ततिलकामध्यें काव्य, शास्त्रकाव्य व काव्यशास्त्र यासंबधी भेद केलेला आहे. कालिदासाच्या नावावर प्रसिद्ध असलेलें 'नलोदय' हें काव्य, काव्यरीतिचें परिणत स्वरूप दिग्दर्शित करितें. त्यातील कृत्रिम वृत्तें व शब्दच्छल पाहिला कीं, ते कालिदासाचे काव्य नव्हे ही गोष्ट स्पष्ट होते तें रविदेवानें लिहिलें असावें. रावणवध अथवा सेतुबंध हें प्राकृत महाकाव्य, काव्यरीतीचें दुसरें उदाहरण होय. प्राकृतातहि या काव्यरीतीचा अवलंब करतां येतो, हे ग्रंथकर्त्यास दाखववायाचें होतें असें दिसतें. रामकृष्णकृत गोपाळकेलीचंद्रिका या नाटकात रंगभूमिनिर्देशांच्या ऐवजीं काव्यवर्णनेंच फार आहेत.

प्रशस्तिः—ही स्तुतिगीतें म्हणजे ऐतिहासिक कागदपत्रेंच होत; एवढेंच नव्हे तर कृत्रिम वृत्तांत रचलेलीं व कधीं कधीं कृत्रिम गद्यांत लिहिलेलीं तीं घोटीव काव्येंच होत. देवालयाचें समर्पण व धार्मिक स्मारकें याचा वृत्तांत त्यांत सागितलेला असतो. प्रथम आशीर्वचन, संस्थापकाची वंशावळ व स्तुति, नंतर स्मारकाचें वर्णन, त्याचे हेतु, नंतर शिलालेखक व उपाध्याय यांचा निर्देश व शेवटीं, केव्हां केव्हां मितीचा उल्लेख इतक्या सर्व गोष्टी प्रशस्तिकाव्यात सांपडतात.

काव्यरीतींतलिहिलेलीं स्तोत्रेंः—बरीचशीं स्तोत्रें क्लिष्ट रीतीनें लिहिलेलीं असतात व तीं सर्व बहुधा आधुनिकच आहेत.इ.स.१५९०त पूर्ण झालेलें नारायणभट्टकृत नारायणीय हें एक स्तोत्रहि आहे व मोठें काव्यहि आहे. त्याचे दशक पाडले असून विषय भागवतपुराण हा आहे. केरळ देशात हा भक्तिग्रंथ म्हणून मानला जातो; व कृष्णस्तव केल्यानें एका ब्राम्हणाचा संधिवात नाहींसा झाला, अशी लोकसमजूत आहे. १७ व्या शतकात रामभद्र दीक्षितानें परिणत काव्यरीतींत कांहीं स्तोत्रें केलीं आहेत. रामचयस्तव, रामवनस्तव, अष्टप्रास अथवा रामाष्टप्रास व वर्णमालास्तोत्र इत्यादि स्तोत्रें त्यापैकींच आहेत. या काव्यपद्धतीचें चिनी व जपानी कवितेशीं बरेंच सादृश्य आहे.

महाराष्ट्रींतील काव्य.—महाराष्ट्रीला 'उत्कृष्ट प्राकृत' असे नाव दंडी देतो. हालकृत 'सत्तसाइ' हा या भाषेतील सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. 'सेतुबंध' (किंवा 'रावणवध') हें सुंदर काव्यपद्धतीनें लिहिलेले एक प्राकृत महाकाव्य, बहुधा दुसऱ्या प्रवरसेनाचे किंवा त्याच्या सभेंतील एखाद्या कवीचें असेल. महाराष्ट्रीमध्यें लिहिलेल्या एका ग्रंथाचे उदाहरण म्हणून दंडी याचा उल्लेख करतो (काव्यादर्श, १. ३४). नाटकामधील पद्यें (गाथा) नेहमीं याच भाषेंतली असतात. गाथाकरितां मुख्यतः महाराष्ट्री योजीत.

महाराष्ट्रींचा विचार करताना हेमचंद्रानें जैन महाराष्ट्रीकडे लक्ष पुरविलें आहे व तो 'सत्तसाइ' आणि 'सेतुबंध' यातून महाराष्ट्रीचीं उदाहरणें निवडतो.

या हाल सातवाहनकृत सत्तसाइ (सप्तशती) मध्यें प्राकृत भाषेंतील ७०० भावगीताचा संग्रह आहे. या ग्रंथावरून प्राचीन भारतीयाची प्रेमभाषा चागली कळून येते. वास्तविक हीं गीतें लोकप्रिय दिसत नाहींत. तथापि लौकिक काव्याला अनुसरून काव्यकारांनीं हीं रचिलीं असावींत. हाल हा केवळ संग्राहक दिसत नसून त्यानें या गीतांची मोठया कौशल्यानें निवड करून त्यांना काव्याची सुंदर छटा दिली असली पाहिजे; त्यानें आपल्याहि कांहीं कविता या संहितेंत घातल्या असाव्यात. एक अशी आख्यायिका आहे कीं, राजा हाल व त्याचा परिवार यांना काव्यदेवी जी भारती तिनें स्फूर्ति दिल्यावर हालानें उपलब्ध असणाऱ्या कवितांतून ७०० कविता निवडून काढल्या.

पुराणांतून आलेल्या आंध्र किंवा आंध्रभृत्य राजांच्या वंशावळींत हाल हा १७ वा राजा म्हणून दाखविला आहे.

आंध्र राजघराण्याला सातवाहन किंवा शालिवाहन असें नांव असून खि. पू. १ ल्या शतकाच्या मध्यापासून इ. स. ३ ऱ्या शतकाच्या आरंभापर्यंत हें घराणे दक्षिणेत राज्य करीत होतें. हाल हा वंशावळीच्या मध्यभागीं येतो, त्या अर्थी तो इ. स शतकात राज्यावर असावा. तसेंच वरील आख्यायिका खरी दिसते. कारण आंध्र राजाचे बहुतेक सर्व अंकित लेख प्राकृतात आहेत. विंध्यगिरी व गोदावरी याचा वारंवार उल्लेख सत्तसाईत येतो. त्यावरून ज्या ठिकाणीं आंध्रानीं राज्य केलें त्या दख्खनच्या ईशान्य भागांत हा संग्रह निर्माण झाला असला पाहिजे असें दिसतें.

सत्तसाईच्या कमीत कमी ६ निरनिराळया प्रती उपलब्ध आहेत. या सर्व प्रतींतून फक्त ४३० कविताच आढळतात. थोडया फार प्रमाणात एकीकृत स्वरूपात असलेला याचा मूळग्रंथ कदाचित् पुढील नकलनवीसाच्या हातून केवळ संकलित स्वरूपाचा ब .ला असेल. मूळ ग्रंथाचा काल इ. स. २ ऱ्या शतकापासून धरता येईल. म्हणजे सर्व प्रतींत आढळणाऱ्या कवितानाच फक्त हा काल लागू पडेल. इतर भाग पुढील काळचा असला पाहिजे यात संशय नाहीं. तथापि महाराष्ट्री भाषेतील हा सर्वांत जुना ग्रंथ होय.

सत्तसाईतील प्रत्येक खंड सामान्यतः एक पूर्णपद म्हणता येईल; काहीं काहीं ठिकाणीं २।३ खंड मिळून एक पद बनलें आहे. यात अगदीं थोड्या शब्दात एखादी मनःस्थिति चित्रित केली आहे; किंवा एखादी तक्रार सांगितली आहे किंवा प्रेमानंद वर्णिला आहे. प्रवासाला गेलेल्या नवऱ्याबद्दल शोक करणारी स्त्री तर वारंवार दिसते; तसेंच नवरा किंवा बायको मरण पावल्याबद्दलचा शोक, गुप्त प्रेम, प्रणयीजनाचीं भांडणे, मुलाला पहिल्यानें दात आल्याचे पाहून झालेला आनंद इत्यादि निसर्गाचें वर्णनहि मधून मधून येतें. "भटकणाऱ्याला जसा त्याच्या सावलीचा उपयोग त्याचप्रमाणें कृपणाला त्याच्या संपत्तीचा उपयोग असतो," यासारख्या बोधप्रद म्हणी या ग्रंथात आढळतात. [विंटरनिझ]

म रा ठी का व्य व प्रा ची न क वि:—मराठी भाषा उत्पन्न झाली तरी तिच्या प्रथमकाळात कोणत्याहि प्रकारची भारदस्त ग्रंथरचना करणें तीं संस्कृतात करीत. त्याकाळीं सार्वलौकिक भाषा ही संस्कृत असल्यानें असें होणे साहाजिकच होतें. देशी भाषाचा पुरस्कार प्रथम ब्राह्मणानीं किंवा देशी राजानींहि केला नाहीं. का कीं, ते सार्वराष्ट्रीय ब्राह्मणी संस्कृतीचे अभिमानी असत. बंगाल्यांत बंगाली भाषेचा पुरस्कार मुसुलमानी राजांनीं केला. निरनिराळीं संप्रदाय व पाखंडें ब्राह्मणाच्या तावडींतली जनता आपल्या तावडींत घेण्यासाठीं देशी भाषाचा आश्रय करीत त्यामुळें बौद्धांनीं पाली, जैनानीं अर्धमागधी व महानुभावांनीं मराठी भाषाचा आश्रय केला. त्यापूर्वींहि कदाचित् मराठी भाषेत पद्य ग्रंथ झाले असतील, कारण ज्ञानेश्वराच्या पूर्वी मराठी ही निदान २०० वर्षे तरी अस्तित्वात आली असली पाहिजे; त्याशिवाय एकाएकीं ज्ञानेश्वरीसारखा अभिजात भाषेत ग्रंथ निर्माण होणेंच शक्य नाहीं परंतु आज त्यांपैकीं मुकुंदराजाच्या नावावर खपणाऱ्या ग्रंथाशिवाय इतराचे ग्रंथ उपलब्ध नाहींत. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, चोंभा, तुकाराम, रामदास, मोरोपंत या संतकवींनीं संस्कृतातील अगम्य ज्ञान खालच्या वर्गांतील समाजास सरसकट खुलें केलें. या मंडळीनें "मराठी भाषा ही संस्कृतपेक्षा हलकी नसून तिच्या बरोबरीची आहे, मग मराठींत ग्रंथरचना का करूं नये" अशा अर्थाचे प्रश्न विचारलेले आहेत. त्याच्या कालींहि पंडिताचा एक वर्ग असून तो मराठींत काव्यरचना करणें हलकें समजत असे. अशा पंडितांची निर्भत्सना या संतकवींनीं केलेली आहे. "दूध सुवर्ण चषकांतून प्राशन केलें काय किंवा तांब्याच्या भांड्यातून प्यालें काय, दुधाच्या गोडींत काय फरक पडणार ? माझा मराठा बेल पैजेनें अमृतासहि जिंकेल, त्यास नांवें ठेवणार मत्सरी व आग्रही होत, भल्यानें हं मराठी पाहों नये असें म्हणणारे मूर्ख असून त्यानां या परमार्थसुखाची सोय कशी समजणार, इत्यादि अभिमानाचे उद्गार याच्या ग्रंथात आढळतात.

काव्यग्रंथाचें विवेचन आणि पद्यमयग्रंथाचा इतिहास या दोन्ही गोष्टींचे पृथक्करण येथील काव्यविवेचकानीं चागलें केले नाहीं. धार्मिक किंवा भक्तिपर काव्य वगळले असता मराठी भाषेत चागलें काव्य फारच थोडें आहे. ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी, किंवा अमृतानुभव, वामन पंडिताची यथार्थदीपिका यानां काव्यग्रंथ म्हणणे म्हणजे काव्यग्रंथाच्या स्वरूपाचेंच अज्ञान प्रदर्शित करणे होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मराठींत कांहीं भक्तिपर काव्य आहे, संस्कृत काव्याचीं रूपांतरे झालीं आहेत. तीं रूपांतरें तयार करताना काव्योत्पादन हा मुख्य हेतु नसून धार्मिक लोकशिक्षण हा मुख्य हेतु होता; आणि काव्य केवळ गाड्याबरोबर नळ्याला यात्रा या न्यायानेंच आलें आहे. काव्येतर ग्रंथात काव्य उत्पन्न झाले असेंच ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथातील काव्यस्वरूपी सुंदर स्थलाविषयीं म्हणता येईल. रामदासाच्या मनाच्या श्लोकांत काव्य आहे. पण दासबोधात ते थोडेंच आहे. महिपतीचीं भक्तचरित्रें वाचलीं असता त्यात काहीं काव्यस्थळें सापडतील. पण त्या चरित्रात काव्य म्हणण्यास जर जागा असेल तर ती मुख्य ही कीं जे दोष चरित्रांत चालावयाचे नाहींत पण जे काव्यात चालतात, ते दोष ज्या अर्थी महिमतीच्या चरित्रसमुच्चयांत आहेत त्या अर्थी महिपतीच्या कृतीस काव्यच म्हटलें पाहिजे.

इंग्रजीपूर्वीच्या मराठींतील खरी स्वतंत्र काव्यरचना म्हणजे लावण्या, पोंवाडे वगैरे होत. जेथें धार्मिक विषय परंतु धार्मिक बुद्धिहि अप्रधान आहे अशा कृतींनाहि काव्य म्हणता येईल. अशांमध्यें राधाविलास, राधाभुजंग, चंद्रावलीवर्णन इत्यादि काव्यें मोडतील. भाषांतरें करतांना काव्यहेतु मनात धरून करताना केलेल्या दुसऱ्या कृती म्हटल्या म्हणजे

बिल्हणचरित्र (चोरपंचाशिकेचें रूपांतर) व विठ्ठलाची रसमंजरी ह्या होत. एकंदरीनें पहातां मराठींतील काव्यवाङ्मय म्हणजे उष्टें आणि भिकार होय यांत शंका नाहीं सुशिक्षित श्रृंगारिक वाङ्मय अलीकडच्या मासिकांतील भंत भंत प्रसिद्ध केलेल्या पद्याशिवाय मराठींत नाहीं. आणि अहृ ते अगदीं कनिष्ठ प्रतीचें आहे. भावना सुशिक्षित होऊन त्यांचा विकास ज्या समाजांत नाहीं त्या समाजांत खरें प्रेमवाङ्मय कोठून दृष्टीस पडणार. पोंवाडे देखील निर्बुद्ध अशा लोकांनींच लिहिले असल्यामुळें त्यांत कवित्व जरी मधून मधून दृष्टीस पडले तरी तें आजच्या वाङ्मयप्रेमी वर्गावर छाप टाकील असे नाहीं, आणि मोठमोठालीं चांगलीं काव्यें मराठींत झालींच नाहींत. इंग्रजी राज्यांतील ज्या मराठी काव्यांत कांहीं कवींचें कौशल्य दृष्टीस पडतें, आणि ज्या कवींचा दम जरा जास्त वेळ टिकला असें दिसतें अशीं नांव घेण्याजोगीं मराठी काव्यें आमच्या मतें दोनच आहेत. एक चिंतामणिपेठकराचें गंगावर्णन आणि दुसरें टिळकाचें एक वनवासी फूल हीं होत. काव्यांचे विषय शोधण्यांत स्वातंत्र्य, जन्मभर काव्याचा हव्यास विविध प्रकारचा अनुभव या गोष्टींचा लाभ महाराष्ट्रीय कवितेस कधींच प्राप्त झाला नाहीं. आणि आजपर्यंत झालेलें मराठी वाङ्मय सर्व जळून जरी गेलें तरी जगाचें काव्यनाश या दृष्टीनें कांहीं एक नुकसान व्हावयाचें नाहीं. झालें तर तें भाषेचा इतिहास, खुंटलेल्या राष्ट्राच्या मनःस्थितीचें व ज्ञानमर्यादेचें उदाहरण व स्त्रीशूद्रांच्या धार्मिक शिक्षणासाठीं झालेल्या प्रयत्नांचा इतिहास या नात्यानेंच होईल. मराठींतील बरीचशी प्रसिद्ध झालेली अर्वाचीन कविता पंचविशीच्या आतल्या पोरांनीं लिहिलेली आहे व त्याच मंडळींनीं प्रौढ वयांत कवितारचनेचा क्रम टाकून दिला आहे.

आतां पद्यरूपी ग्रंथांची व कृतींची थोडीशी हजेरी घेऊं व ती घेतांना ज्या ग्रंथामध्यें थोडथोडें काव्य स्वरूप आलें आहे त्याचा व त्या स्थलाचा उल्लेखहि करूं.

प्रथम पंचतंत्रादिक लौकिक कथा बऱ्याच प्राचीन काळीं मराठींत काव्यरूपानें उतरल्या असाव्यात असें दिसतें. पुढें दहाव्या शतकांत श्रीपतीनें रत्नमाळ ग्रंथ तयार केला. हा मराठी आद्यकवि होय. त्यानंतर मुकुंदराज यानीं विवेकसिंधु व परमामृत वगैरे ग्रंथरचना केली. मुकुंदराजानीं संस्कृतांतहि (दशोपनिषद्भाष्य, विवेकसिंधु, ग्रंथराज वगैरे) काव्यरचना केली आहे. मराठींत ग्रंथरचना करणें हें आपण एक धाडस करीत आहों असें खुद्द मुकुंदराजासहि वाटत असावें. मुकुंदराजाची कविता साधी आहे. यानंतर हेमाद्रीनें मेस्तकें रचिलीं. कामराज नांवाच्या एका कवीच्या उल्लेखावरून तीं पद्यांत असावीं असें दिसतें. या सुमारासच ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी निर्माण झाली. मराठी वाङ्मयांत ज्ञानेश्वरीची योग्यता विशेष आहे. पुष्कळशा विद्वानांच्या मतें तिच्यासारखा गीतेचा अर्थ सुलभ करणारा दुसरा ग्रंथ अद्याप निर्माण झाला नाहीं. जुन्या शब्दांचें दुर्बोधत्व एकीकडे ठेविल्यास सरस दृष्टांत व भाषेचें मधुर स्वरूप यांहींकरून ग्रंथ इतका खुलविला आहे कीं, तो वाचीत असतां, वाचकांचीं आपोआप ग्रंथाशीं तन्मयता होते. सहाशें वर्षे झालीं तरी अद्यापि याची छाप महाराष्ट्रावर बसलेली आहे. ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव ग्रंथहि उत्तम आहे. मात्र भाषा थोडी जास्त कठीण आहे. मुक्ताबाईचे ताटीचे अभंग मधुर म्हणून प्रसिद्ध आहेत. नामदेवाचें सारें कुटुंबच कवी होतें. त्याचे व जनाबाईचे अभंग लडिवाळपणाचे आहेत. व त्यांत वात्सल्यरस बराच आढळतो. याच्या अभंगांनीं विठ्ठलभक्ति समाजांत जास्त पसरली. नामदेव व तुकाराम यांचे अभंग वारकऱ्यांच्या तोंडीं फार आहेत. तुकारामाच्या अभंगांत सडेतोडपणा व कवीस शोभण्यासारखा आवेश जास्त आढळतो. लोकांना शिकवणूक देतांना शिव्या देण्याची खोडहि तुकोबांना होती. खरोखर पाहिले तर, आमच्या कवींच्या या प्रेमळ भक्तीच्या जोरावर मराठींत उत्तम काव्य निर्माण झालें आहे. चोंभा कवीची भाषा ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्या दरम्यानची असल्यानें तिला टाकठिकपणा येत चालल्याचें व संस्कृताचें सांनिध्य सुटून तिनें मराठीस विशेष जवळ केल्याचें आढळतें. एकनाथांची भाषा अधिक सुशिक्षित आहे. ते स्वतः पंडित होते. त्यांच्याच प्रमाणें वामनाची व मोरोपंतांची भाषा आहे फरक काय तो तत्कालीन भाषेच्या जुन्या व नव्या वळणाचा आहे. मोरोपंत व मुक्तेश्वर यांत मोरोपंताची भाषा जास्त टाकठिकीची आहे. मोरोपंतांना, त्यांच्या आधींच्या सर्व कवींच्या काव्याचा भरपूर उपयोग करून घेतां आला त्यामुळें त्यांचें काव्य टाकठिकीचें वठलें आहे. मोरोपंतांना स्वराज्यांत काव्य करण्याचें भाग्य लाधलें होतें हें विशेष आहे. पारतंत्र्यांत इतर वृत्तींप्रमाणें काव्योत्पादनशक्ति अगर वृत्तीहि जोमानें उदय पावत नाहीं. सारांश मोरोपंत म्हणजे मराठी साम्राज्यांतील एक नमुनेदार कवि होय असें म्हटल्यास वावगें दिसणार नाहीं. एकनाथांची भाषा ज्ञानेश्वरानंतरच्या तीनशें वर्षांची असल्यानें बरीच ओळखीची दिसते. नाथांच्या भागवताच्या व भावार्थरामायण वगैरे कथानकविषयक काव्यांच्या भाषेत थोडा फरक आहे. पहिल्यांत भाषा सोपी आहे तर दुसऱ्यांत ती अवघड आहे. याचें कारण कदाचित् असें असूं शकेल कीं, वेदांताचें लोण अगदीं खालच्या वर्गापर्यंत नेण्याचें काम करावयाचें असल्यानें भागवत सोप्या भाषेंत रचिलें गेलें असावें. मराठी निरूपणात्मक काव्यांत ओंवी हा छंद विशेष रूढ आहे. याचें कारण तो सुलभ असून (संस्कृतांतील अनुष्टुपप्रमाणें) सहज समजणाराहि आहे. अध्यात्मवाङ्मयांत बहुतेक संत कवींनीं हाच छंद उपयोगांत आणिला आहे. ओंवीछंदांत काव्याचें चमत्कारित्व फारसें दृष्टीस पडत नाहीं; त्यास निरनिराळ्या वृत्तांची जरूरी असते. तरी

पण मुक्तेश्वर, श्रीधर, वामन व एकनाथ यांनीं ओंवीबद्ध काव्यात चमत्कारित्व व मनोहारित्व आणिलें आहे. एकनाथानें आख्यानवाङ्मयावर विशेष भर दिला, त्यानेंच याचा पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच्या वेळच्या चिंतामणी कवीचें ध्रुवाख्यान गोड आहे. असलीं त्रोटक परंतु रसाळ काव्यें वामन, रघुनाथ पंडित वगैरे कवींचींहि आहेत. एकनाथकालीन एक ख्रिस्त-पुराण म्हणून (स्टीफनचा) ग्रंथ आहे. त्याची भाषा एकनाथापेक्षा सोपी आहे यांचें कारण विषय कथेचा व ग्रंथ साधारण लोकांकरिता लिहिलेला हें असावें. मुक्तेश्वरास काव्य करण्यास वेदान्तपंथ किंवा वारकरीपंथ वगैरे कारणीभूत न होता स्वयंस्फूर्तीनें त्यानें काव्यास प्रारंभ केला. तो कोणत्याहि संप्रदायाचा नव्हता. कवीचें काम लोकशिक्षण-विषयक किंवा मनोरंजक विचार अगर कथा, सृष्टींतील विषयाशीं तादात्म्य पावून स्वयंस्फूर्तीनें गौरवून सांगण्याचें असतें. त्या दृष्टीनें मुक्तेश्वर हा उत्तम कवि होऊन गेला. त्याची भाषासरणी प्रौढ, मनोरम, प्रासादयुक्त आणि व्यवस्थित आहे. त्यानें सृष्टिवर्णनें चांगलीं केलेलीं आहेत. याच्या वेळेपासून मराठी भाषा काव्यांगणात जोरानें पुढें सरसावली. यानें सरस व विपुल अलंकार योजून मराठी कवितेच्या अंगावर बहुत अलंकार चढविले. याच्या काव्यात महाकाव्यें, आख्यानें व वीणाकाव्यें हीं दृष्टोस पडतात. श्रीधराला रूपकाची फार आवड होती; याचें व महिपतीचें काव्य मुक्तेश्वराच्या खालच्या दर्जाचें असूनहि लोक तें फार वाचतात याचें कारण तें लहान लहान कथात्मक आहे हें होय. रामदासस्वामी याचा काहीं निराळाच पंथ होता. वास्तविक ते कोणत्याच पंथाचे अनुयायी नसल्यानें त्याचे ग्रंथ बहुतेक स्वतंत्र वृत्तीचे आहेत. रामायणादि थोडे अपवाद सोडल्यास, त्याची सारी कविता लोकशिक्षण विषयक आहे. कोमल, मधुरपणा वगैरे त्यात न आढळता निसर्गाचा व सत्याचा नितांत कठोरपणा व तेजस्वितेचा अनुभव त्यात सापडतो. असल्या राजकारणी पुरुषाच्या काव्यातून विचार आढळतात पण भाव थोडेच आढळतात! तरी पण कारुण्य, वात्सल्य, अद्भुत, भक्ति व रौद्र हे रस त्याच्या काव्यात काहीं ठिकाणीं आढळतात. त्यांनीं घालून दिलेल्या कित्यांचें वळण वळवून काव्य उत्पन्न करणारा कवि त्याच्या पश्चात् अद्यापपर्यंत एकहि झाला नाहीं असें काहींचें म्हणणें आहे. पण कवि या नात्यानें रामदासांची किंमत फारशी मोठी नाहीं. आनंदतनय याची भाषा साधी आहे. अमृतरायाची कविता चटकदार व मनोहर असून भाषा प्रौढ दिसते. याचा कटाव जर एखाद्या उत्तम हरिदासाच्या तोंडून ऐकला तर श्रोते तन्मय होऊन जातात. वामन हा संस्कृत पंडित असल्यानें त्याच्या काव्यावर संस्कृताची व पांडित्याची छाया पडलेली आहे. याचीं पौराणिक आख्यानें चांगलीं रसभरित आहेत; वाणी जोरदार, ओजस्वी व प्रौढ आहे. स्वभावोक्ति सर्वत्र आढळते. मोरोपंतानीं मराठी भाषेवर जितके उपकार केले तितके दुसऱ्या कवानें केले नाहींत. त्यानें कथानकें जरी जुनीं घेतलीं, तरी त्यांतील कोट्या, विचार व त्यास लाविलेलें वळण नवीन आहे. मराठी कवितेंत संस्कृत शब्दाचा उपयोग करताना कधीं कधीं अतिरेक केला आहे. त्याची कविता म्हणजे एखाद्या राजाची सर्वांगसुंदर, नाजूक, बहुमोल अलंकारादि आभरणानीं युक्त व बहुविधकलाकुशल प्रौढ वयाची तरुणी होय. शब्दगौरव, भाषेची प्रौढी, रसानुकूलता भरपूर अलंकार, काल–व्यक्ती–प्रसंग याना अनुसरून वर्णनें, मुख्य सूत्र न सोडता थोडक्यात पुष्कळ अर्थ आणणें हें याच्या काव्याचें विशेष आहे. अर्थगौरव, पदलालित्य, माधुर्य, ओजस्विता हे याच्या कवितेचे मुख्य गुण आहेत.

मोरोपंतानंतर लक्ष्यात घेण्यासारखे कवी म्हणजे शाहीर होत यात रामजोशी, परशुराम, अनंतफंदी, होनाजीबाळा व प्रभाकर हे मुख्य होत. याच्या लावण्या देवावर, उपदेशपर व अध्यात्मिक अशा थोड्या असून शृंगारपरच जास्त असत. भाषेच्या दृष्टीनें या चांगल्या आहेत कित्येकांची भाषा अत्यंत गोड व उदात्तवर्णनपर आहे. या लोकानीं पोवाडेहि केले आहेत. ते बहुतेक ऐतिहासिक प्रसंगावरील असल्यानें वीररसप्रधान असतात. मराठी पद्यवाङ्मयाला (समर्थ रामदास सोडून) राजकीय उलाढालींची वार्ताहि नाहीं; ती उणीव पोवाड्यांनीं भरून काढिली आहे. पोवाडे व लावण्या हें उत्तानकाव्य होय. काव्यात पदें म्हणून जो भाग आहे त्याचा उपयोग कीर्तनात व मनोरंजनार्थ गाण्यात किंवा प्रसंगविशेषीं मनाच्या प्रक्षुब्ध स्थितींत होतो. मनोवृत्ती हालवून सोडणारें हें एक काव्याचें छोटेंसें अंग आहे. नायकांचीं गाणीं ही काव्याची एक बाजू आहे. या बाजूनें मराठी भाषेचें जुनें स्वरूप व त्यांतील कोमल रसाचा सांठा आजपर्यंत कायम ठेविला आहे

संस्कृत काव्यात सर्वसाधारण वृत्त म्हणजे अनुष्टुप छंद होय तसें मराठी काव्यात ओवी व अभंग होत. ज्ञानेश्वरीची ओवी साडेतीन चरणी आहे तर एकनाथाची ओवी साडेचार चरणी (क्वचित पाच चरणी) आहे. पुढील कवींनी एवढी लांब ओवी न ठेविता चार चरणी योजलेली आहे. ओवी व अभंग यात फार थोडा फरक आहे. घनाक्षरी हें वृत्त तालावर म्हणण्याचें आहे; हें चार ओव्यांचें मिळून बनतें. कटाव हे सुद्धा तालावर म्हणतात; याला नियमितपणा नाहीं. जवळ जवळ हें एक लांब गद्यच होय. हरिदासाच्यामुळें हे कटाव फार लोकप्रिय झाले. श्लोक या वृत्तांत पुष्कळ प्रकार आढळतात; पैकीं समर्थांचें आवडतें (मनाच्या श्लोकात योजिलेलें) भुजंगप्रयात हें एक होय; तें मुसुलमानी करिमा वृत्तासारखेंच आहे. दिंडी व साकी हीं वृत्तें गायनाच्या

अनुरोधानें मुद्दाम बसविलेली आहेत. ही अभंग व ओवी यासारखींच शुद्ध मराठी वृत्तें आहेत.

मानभावी पंथात ज्ञानेश्वराच्या नंतर काहीं ओवीबद्ध ग्रंथ तयार झालेले आढळतात परंतु ते थोडे आहेत व आहेत तेहि प्रसिद्ध झालेले नाहींत त्यामुळें त्याबद्दल काहीं विधान करिता येत नाहीं. [महाराष्ट्र सारस्वत; मराठी भा. घटना.]

आ धु नि क क वी —रा.न.चि.केळकर यानीं बडोदें येथील दहाव्या मराठी साहित्यसंमेलनात (स. १९२१) अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणावरून पुढील मजकूर घेत आहों. 'एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, इंग्रजी अंमल महाराष्ट्रात दृढ झाल्यावर समाजांत विलक्षण क्रांति घडून येऊन नानातऱ्हेचे स्थितिभेद, मतभेद व रुचिभेद अस्तित्वात आले. या बहुविध परिवर्तनाचें पूर्ण निदर्शक असेंच आधुनिक कवितेंचे स्वरूप आहे. साप्रतच्या कवींपैकीं काहींची कविता जुन्या धर्तीची व काहींची (इंग्रजी) भाषातराची व रूपातराची बनली; हे प्रयत्न बरच सफल झाले. या कारणामुळें भाषारचना व विषय यांचें वैचित्र्य आधुनिक कवितेत अतिशय दिसून येतें. पुराणकथाचें विवेचन व अध्यात्माचें निरूपण याबरोबरच आगगाडींतील प्रवास व उडणारी म्हातारी देखील या कवितात आढळते. कुरुंदवाडकर, लेंभे व दासगणू यांची कविता जुन्या थाटाची आहे, तर मोगरे, टिळक व केशवसुत याची कविता पोप, वर्डस्वर्थ किंवा ब्राउनिंग या इंग्रज कवींच्या वळणाची आहे. मुजुमदार, भिडे, लेले, पागारकर, आगाशे व अनंततनय याच्या रचनेचें मोरोपंती वळण; मोगरे, चंद्रशेखर व लेंभे याची काहींशी संस्कृतप्रचुर परंतु डौलदार व रमणीय श्लोकपद्धति; माधवानुज, सुमंत, नागेश व माधव याची सफाईदार रचना, चिपळूणकर, विनायक यांची सहजमधुर साकी, तुकारामी व श्रीधरी थाटाचे टिळकाचे अभंग, ओंवी, केशवसुत व ठोमरे याची विषयानुरूप तुटक, ओजस्वी व परिणामकारक नवीन वृत्तयोजना; तांबे व दत्त यांची लावणी पदाच्या धर्तीवरील हृदयंगम कवनं गोविंदाग्रज व रेंदाळकराची ललित नादमधुर पण कृत्रिम भाषा आणि टेंकाडे व बेहरे याच्या वाणींतील तडफ हे सर्व विशेष आधुनिक कवितेला शोभादायकच आहेत. तिचें हें स्वरूप जसे वैचित्र्यपर तसेंच चमत्कृतिजनक व आनंददायकहि आहे. या कवींपैकीं भाषांतरकार कवि बरेच आहेत. केवळ स्वतंत्र अशी कविता फक्त लेंभे, खरे, चंद्रशेखर विनायक कोल्हटलर, गोविंदाग्रज व ठोमरे यांचीच म्हणता येईल. संस्कृत व इंग्रजीप्रमाणेंच आतां बंगाली, ऊर्दू व क्वचित् गुजराथी आणि फ्रेंच या कवितांचींहि भाषातरें होऊं लागलीं परंतु यांत दोष असा आहे कीं, याचा परिणाम कवींच्या प्रतिभेवर होतो. स्वतंत्र कृति प्रसवावयाला समर्थ असलेली या कवींची प्रतिभा परावलंबनाची दुष्ट सवय जडल्यामुळें पुष्कळदा शिथिल किंबहुना नष्ट झाल्याचें आढळून येतें. सध्या चालू असलेला हा भाषांतराचा प्रघात पाहिला म्हणजे प्राचीन कवींप्रमाणें अर्वाचीन कवीहि कोणत्या ना कोणत्या तरी सारस्वताचे भक्त बनून नेहमीं परभृतच रहाणार कीं काय असें भय वाटतें.

"वीणाकाव्य" हा आधुनिक कवितेचा एक अत्यंत महत्त्वाचा विशेष आहे. ही अभिनव पद्धति केशवसुतांनीं मराठींत प्रथम सुरू केली गल्यो वीस पंचवीस वर्षात जो मराठी कविता लिहिली गेली, ती बहुतेक या केशवसुती वळणाचीच आहे. त्यामुळें या काळाला केशवसुताचें युग असें काहीं जण म्हणतात. या काळातील ही कविता बरीच त्रुटित व स्फुटगीतात्मक अशी आहे. हृदयंगमता हा काव्याचा मुख्य गुण या वीणागीतात जसा आढळतो तसेंच त्यात थोडेंबहुत नादमाधुर्यहि आढळतें. केशवसुत, टिळक व विनायक यांचीं काव्यें भावनोद्दीपक जास्त आहेत. हल्लींची दुसरी महत्वाची रचना चतुर्दशक ही होय. परंतु हा प्रकार मराठी वाचकाना फारसा रुचलेला अगर कवींना साधलेला असा दिसत नाहीं. हल्लींच्या कवींत काहीं दोषहि आढळतात. वृत्तशैथिल्य, गावढळ शब्दांची योजना, ग्राम्य रचना व विचार, अर्थशून्य शब्दरचना, अनिवार निरंकुशपणा वगैरे हे दोष होत. यामुळें मराठी कवितेंत ही सदोष व शिथिल रचना रूढ होण्याचें भय वाटत आहे. होतकरू कवींना भाषासौंदर्याची व रचनेच्या ठाकठिकीची परवा वाटेनाशी झाली आहे. आधुनिक कवितेच्या या दोषांची छाननी रसिक टीकाकाराकडून अवश्य झाली पाहिजे.

टी का त्म क वा ङ्म य.—मराठी कवितेवर हे बरेच उत्पन्न झालें आहे तथापि त्यातल्या त्यात महत्वाचे ग्रंथ थोडेच आहेत. संतकवींची मराठी यादी सं त क वि का व्य सू चि ही होय. टीकात्मक वाङमयाची बरीचशी नोंद म हा रा ष्ट्री य वा ङ्म य सू चीमध्यें सापडेल संतचरित्रें महिपतीने प्रथम गाइलीं. याशिवाय अनेक कवींनीं समकालीन किंवा पूर्वकालीन कवींच्या प्रशस्ती लिहिल्या आहेत. कविचरित्राचा एक संग्रह रा.ज. र. आजगावकर यानीं लिहिला आहे.पण तो बराच काळजीपूर्वक पुन्हा तपासला पाहिजे.

ज्ञानेश्वर, एकनाथ, मोरोपंत, तुकाराम व रामदास या कवींच्या चरित्रावर इतर कवींपेक्षा अधिक वाङ्मय उत्पन्न झालें आहे. ज्ञानेश्वरावर भिंगारकराचा व मोरोपंतांवर पांगारकरांचा व्यासंग विशेष आहे. वामन पंडितावर विद्याधर वामन भिडे यांचे परिश्रम झाले आहेत. त्यांत त्यांनीं यथार्थदीपिकेचा कर्ता वामन व राधाभुजंगाचा कर्ता वामन या दोन निरनिराळ्या व्यक्ती आहेत असें मांडलें आहे. राजवाडे यानीं दासबोधाचें पृथक्करण चागलें करून त्यातील विचारप्रणालि सुलभ तऱ्हेनें खुली करण्याचा प्रयत्न केला आहे. देशाभिमान महाराष्ट्रीय कवींस होता असें सिद्ध करण्यासाठीं पागारकरांनीं एक लेख १९०३च्या सुमारास केसरींत प्रसिद्ध केला होता; मोरोपंतावर चिपळूणकर व हंस यांचे निबंध प्रसिद्ध आहेत. अनेक टीकालेख पहातां असें दिसून येईल कीं, मराठी कविकृतीचें काव्य या

दृष्टीनें परीक्षण करण्याच्या बाबतींत टीकाकारांनी फारसें काशल्य दाखाविलें नाही. व विशिष्ट ओळी उद्धृत करून, "अहाहा ! या किती मजेदार आहेत" असे उद्गार काढण्यापलीकडे टीकाकारांची मजल फारशी गेली नाही.

एकंदर जगाचा काव्योदधि पहाण्यास येथें अवकाश नाहीं. तथापि येथें एवढेंच सांगतां येईल कीं निरनिराळ्या देशांत व निरनिराळ्या काळांत आत्म्योत्पत्ति प्राचीन कथावर्णन, भक्ति देशभक्तिप्रवर्तन, इत्यादि हेतूंनें झालीं आहे व अनेक काव्यें एकीकृत होऊन अनेक प्रसंगीं महाकाव्यें निर्माण झालीं आहेत (महाकाव्य पहा)

काव्हूर—हा प्रसिद्ध इटालियन मुत्सद्दी ता. १८।१८ ० रोजीं टयूरीन येथें जन्मला. याचें घराणें फार जुनें असून याचा मूळपुरुष १२ व्या शतकातला कोणी सॅक्सन योद्धा होता असें म्हणतात. काव्हूरच्या बापाचें नाव मार्किस मिचेल असें होतें. काव्हूरची आई जिनेवाकडील एका सरदार घराण्यातील होती. हीं दोघेंहि पिडमॉटचा गव्हर्नर प्रिन्स बोर्जेस याच्या खासगीकडे असत (प्रिन्स बोर्जेस हा नेपोलियनचा मेहुणा होय). काव्हूर हा दहा वर्षांचा असताना टयूरिन येथील लष्करी शिक्षणाच्या शाळेंत दाखल झाला. तो वयाच्या सोळाव्या वर्षी कॉलेजातून बाहेर पडला. यापुढें त्यानें पाच वर्षे लष्करी नोकरींत घालविलीं. फुरसतीच्या वेळीं यानें इंग्रजी भाषेचा अभ्यास केला. उदारमतवादी असल्यानें एकतंत्री राज्यपद्धति आणि भिक्षुकशाहीविरुद्ध तो होता. मतप्रदर्शनाच्या कामीं तो धोरणी नसल्यामुळे प्रथम प्रथम त्याच्यावर पोलिसचा डोळा असे. तो अद्यापि लष्करी अधिकारी असल्यानें मंडळाचा सभासद नव्हता. शिवाय बंडाळी करण्यास त्या वेळचा काळ योग्य नव्हता असे त्याला वाटे, परंतु चार्लस आल्बर्ट हा गादीवर आल्यानंतर त्यानें १८३१ सालीं आपल्या जागेचा राजीनामा दिला; कारण चार्लस आल्बर्टावर त्याचा विश्वास नव्हता. या वेळेपासून तो सरकारविरोधी पक्षाला मिळाला. परंतु त्या विरोधांत गुप्त कट वगैरेंचा गंधहि नव्हता. या पुढचीं कांहीं वर्षे त्याने राजकीय व सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करण्यात घालविलीं; व परदेशांत प्रवास करून तेथील माहिती मिळविली. फ्रान्स देशात जी राज्यक्रांति झाली तिचा पगडा काव्हूरच्या राजकीय मतांवर बराच बसला. त्यामुळें काव्हूरची खात्री झाली कीं, अनियंत्रित जुलमी राज्यपद्धति व बारभाईची खेती या दोन्ही गोष्टींपेक्षा कांहीं तरी विशिष्ट घटनेनें नियंत्रित झालेल्या राजसत्तेपासून देशाला बरेच फायदे होतील. तसेंच त्यानें ब्रिटिश राज्यपद्धतीचें जें सूक्ष्म अवलोकन केलें त्यामुळेंहि त्याचीं वरील मतें दृढ झालीं.

अशा प्रकारें काव्हूरच्या विचारांचा विकास होत गेला, व इटली देशास परकीयांच्या बंधनापासून अजीबात मुक्त करण्याचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. १८४७ सालीं नववा पायस या पोपनें उदारमतवाद्याकडे आपला ओढा दाखविला व ऑस्ट्रियाच्या विरुद्ध पक्षाचें आधिपत्य स्वीकारण्यास तो तयार झाला. यामुळे उदारमतवाद्याच्या मताना जोराचें चालन मिळालें. १८४८ मध्यें सिसलीमध्यें प्रथम बंड उपस्थित झालें. त्यावेळीं वर्तमानपत्रकारांतर्फे मंडळाच्या वतीनें बोलताना काव्हूर म्हणाला कीं, ' राजानें आता कांहींतरी निश्चित धोरण स्वीकारून लोकाना हक्क दिले पाहिजेत.' त्याच सुमारास राजालाहि चोहोंकडून सर्व लोकांनीं भीड घातली व अखेरीस हक्काची सनद देण्यास तो मोठ्या मारामुटीनें तयार झाला. सिसली व मिलान्स येथील बंडाच्या हकीकती जेव्हा काव्हूरला समजल्या, तेव्हां पिडमॉटनेहि चळवळ करण्याची वेळ हीच आहे असे जाणून त्यानें ऑस्ट्रियाशीं लढाई करावी असा उपदेश चालविला. यावेळीं पिडमॉटची बिकट परिस्थिति झाली होता. ब्रिटिश सरकारचें व पिडमॉटचेंहि मोठेंसे बरें नव्हते. काव्हूर या परिस्थितीला भ्याला नाहीं. त्यानें आपल्या एका लेखांत प्रसिद्ध केले कीं, इंग्लंड पिडमॉटला खरी मदत करणार नाही तरी ऑस्ट्रियालाहि मदत करीलसे वाटत नाहीं. आणि जर इंग्लडनें ऑस्ट्रियाला मदत केली तर इंग्लडाविरुद्ध राजा जरी उठला नाहीं, तरी इटलीची प्रजा इंग्लंड विरुद्ध उठेल. काव्हूरच्या या लेखाचा एवढा परिणाम झाला कीं, थोड्याच काळात पिडमॉटनें ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई पुकारली. ऑस्ट्रियाचें सैन्य व पिडमॉटचें सैन्य याजकडे पाहिलें तर पिडमॉटच्या सैन्याचा ऑस्ट्रियापुढे टिकाव लागणें शक्य नव्हते. तेव्हा कांहीं किरकोळ चकमकी झाल्यानंतर तात्पुरता तह करण्यात आला. मध्यंतरीं पिडमॉटमध्यें निवडणुकीची गडबड चालू असता तींत काव्हूर हा निवडून आला. यावेळीं तो पार्लमेंटमध्यें हुजुर पक्षाच्या लोकांत बसत असे. पार्लमेंटमधील काव्हूरचें काम प्रथम प्रथम नीट होईना. त्याला फ्रेंच भाषेंत बोलण्याचा सराव असल्यानें तो इटालिअन भाषेंत बोलतांना अडे. लढाई चालू ठेवावयाची कीं नाहीं असा प्रश्न नवीन पार्लमेंटपुढे आला; कारण तहाची मुदत संपली होती. तेव्हा निर्वाणीचा उपाय म्हणून राजानें लढाई चालू करण्याचेंच ठरविलें. लढाई झाली, परंतु पिडमॉटच्या लोकांचा तींत पराभव झाला. दुसरा व्हिक्टर इमॅनुअल हा गादीवर आला.

यावेळीं क्रीमिअन वॉर सुरू झाली होती; तेव्हां काव्हूरनें आपली मुत्सद्देगिरी चांगली प्रत्ययास आणून दिली. या लढाईंत पिडमॉटनें भाग घेण्याचीं काव्हूरचीं कारणें पुढीलप्रमाणें होतीं: पिडमॉटसंबंधाचा प्रश्न सर्वराष्ट्रीय करणे जरूरीचें होतें. शिवाय काव्हूरची दृष्टी नुसत्या पिडमॉटपुरती नसून सर्व इटालीपुरती होती. तेव्हा स्वातंत्र्य संभाळून इटालीला शिस्त पाळतां येते, हे यूरोपाला दाखवावयाचें होतें. परंतु याच्या मोबदल्यांत त्याच्या अपेक्षेप्रमाणें पिडमॉटला मदतीचें अभिवचन पाश्चात्य राष्ट्राकडून मिळवून देणें अशक्य

होतें. कारण तसें केल्यास आस्ट्रिया रशियाशीं संगनमत करील ही त्यास भीती होती. शिवाय पिडमॉटमधील हुजूर पक्ष व राष्ट्रीयपक्ष हे दोन्हीहि परकीय राजकारणास प्रतिकूल होते. परराष्ट्रीय प्रधान जनरल दार्नोर्मिआ यानें या कामास नापसंती दर्शवून राजीनामा दिला. तेव्हां राजाने काव्हूरला ती जागा दिली. नंतर लौकरच पिडमॉटचें सैन्य क्रिमीआस रवाना झालें. लढाई संपल्यानंतर पॅरिस येथें जी परिषद् बोलाविण्यात आली, तींत पिडमॉटच्या वतीनें काव्हूरला तेथं जावे लागलें. यावेळीं ऑस्ट्रियाच्या विरोधास न जुमानता काव्हूरनं पिडमॉटला जगाच्या राजकारणात मोठ्या राष्ट्राचा दर्जा मिळवून दिला. त्यानें त्यावेळीं स्वतःच्या मुत्सद्दीगिरीच्या जोरावर इटलीच्या प्रश्नासंबंधाने नेपोलिअनचेंहि मत थोडेंबहुत वळविलें.

पुढें काव्हूरनें पिडमॉटचें लष्करी सामर्थ्य वाढविलें. परंतु त्याला हें माहीत होतें कीं, एकट्या पिडमॉटच्या हातून ऑस्ट्रियाशीं टक्कर देण्याचें काम होणार नाहीं. म्हणून त्यानें नेपोलिअनपाशीं मदत मागितली. तेव्हां ऑस्ट्रियानें पिडमॉटवर प्रत्यक्ष हल्ला केल्याशिवाय नेपोलिअननें या भानगडींत न पडण्याचें ठरविलें. अशा स्थितींत ऑस्ट्रियाला लढाई करावयास लावण्याखेरीज काव्हूरला दुसरा उपायच नव्हता. इटालीमध्ये लहान लहान बंडे उपस्थित झालीं. परंतु ऑस्ट्रियाशीं झगडण्याच्या बाबतींत इंग्लंड अजून नाखूष होतें व नेपोलिअनहि काकूं करीत होता. अखेर नेपोलिअननें कॉंग्रेस बोलावून इटलीच्या प्रश्नाचा निकाल लावावा, अशी योजना काढली. यावर ऑस्ट्रियाहि म्हणाला कीं, पिडमॉटने शस्त्रसंन्यास करावा. इंग्लंडनेंहि या योजनेस संमति देऊन आणखी सुचविलें कीं इटलींतील प्रत्येक प्राताचा या कॉंग्रेसमध्यें प्रतिनिधी असावा. इंग्लंडचें न ऐकल्यास सर्वच राष्ट्रें पिडमॉटला सोडून देतील अशी काव्हूरला भीति वाटल्यामुळें त्यानें ती योजना मोठ्या नाखुषीनें कबूल केली. परंतु ऑस्ट्रियानेंच ही गोष्ट नाकबूल करून पिडमॉटनें शस्त्रसंन्यास करावा अशाबद्दल निर्वाणीचा खलिता पाठविला. ते हा खलित्याच्या बाबतींत सर्वांनाच राग येऊन फ्रान्स व इंग्लंड या दोन्ही राष्ट्रांनीं इटलीची बाजू पत्करिली. मात्र यापुढें लढाईंत फ्रान्सने, एकाएकीं काव्हूरला कळूं न देता आस्ट्रियाशीं तात्पुरता तह केल्यामुळे त्यालाहि तात्पुरता तह करावा लागला.

झूरिच येथील तह झाल्यानंतर पुन्हां १८५९ मध्यें काव्हूर मुख्य प्रधान झाला. तेव्हां त्यानें इटलीच्या एकीकरणाचा प्रश्न काढला; परंतु याला नेपोलियन संमति देईना. शेवटीं नाईस व सॅव्हाय हे प्रांत फ्रान्सला देण्याचें कबूल करून नेपोलियनला संतुष्ट करावें लागलें. अखेर एप्रिल महिन्यांत पिडमॉट, पारमा, मॉडेना, टस्कनी व रोमाग्ना इतक्या संस्थानांची पार्लमेंट भरली.

नाईस प्रांत ही गॅरिबाल्डीची जन्मभूमी होती. हा प्रांत काव्हूरच्या कृतीने हातचा गेल्यामुळें काव्हूर व गॅरिबाल्डी यांच्यात वितुष्ट आलें. नेपोलियनला काव्हूरनें पोपचें रक्षण करण्याबद्दल वचन दिलें असल्याकारणानें रोमवर स्वारी करणें काव्हूरच्या दृष्टीनें इष्ट नव्हतें. परंतु गॅरिबाल्डीची तयारी पाहून काव्हूरनें पोपच्या सत्तेखालील संस्थानें आपल्या राज्यास जोडावयाचीं; मात्र रोमला हात लावावयाचा नाहीं असें ठरविलें. अखेर सप्टेंबर १८५९ त व्हिक्टर इम्यान्युअलनें नेपल्सचें राज्य घतलें.

यानंतर गॅरिबाल्डी व काव्हूर याच्यांत पुन्हा तेढ उत्पन्न झाली. कारण गॅरिबाल्डी दक्षिण इटलींतील संस्थानांवरील आपली सत्ता सोडावयास तयार नव्हता व त्याच्या मनातून रोमवर स्वारी करण्याचें होतें. काव्हूरनें पार्लमेंट सभा बोलावून या प्रश्नावर मतें घेतलीं. मते काव्हूरच्या बाजूनें पडल्यामुळें गॅरिबाल्डीनें राष्ट्राच्या इच्छेला मान देऊन आपण जिकलेले सगळे प्रांत उदारपणे व्हिक्टर राजाला देणगी म्हणून दिले.

यापूर्वी काहीं वर्षे रोमच्या पोपची सत्ता परकीय लोकांच्या जिवावर चालली होती. अशी स्थिति असेपर्यंत ' संयुक्त इटली ' हें आपलें ध्येय साध्य होणें अशक्य आहे असें काव्हूरला वाटलें. म्हणून त्यानें १८६१ च्या जानेवारींत रोम ही इटलीची राजधानी व्हावी असा ठराव पार्लमेंटमध्यें आणला व तो पासहि झाला. परंतु नेपोलियनमुळें त्याला ही गोष्ट दिरंगाईवर टाकावी लागली. शिवाय पोपची सत्ता अबाधीत ठेवण्याचें वेडहि त्याच्या मनात होतें. रोम व व्हेनीस हीं शहरें वगळून काव्हूरची बाकीची ' संयुक्त इटली ' स्वतंत्र झाली होती. काव्हूरचीं आयुष्याचीं शेवटचीं वर्षे फार कष्टाचीं गेलीं. गॅरिबाल्डीला उदारपणें वागविण्याचें त्याच्या मनात होतें. गॅरिबाल्डींशीं झालेल्या प्रसंगानें त्याचें आयुष्य काहींसें कमी केलें यात शंका नाहीं. तारीख ६ जून १८६१ रोजीं तो मरण पावला. त्याचा दफनविधि सॅन्टेना येथें झाला.

काव्हूरच्या मृत्यूनें इटलीची फार भयंकर हानी झाली. त्याच्यासारख्या बुद्धिमान् व मुत्सद्दी पुरुषाची इटलीला अद्यापिहि गरज होती. टी आर्टम्, हा काव्हूरचा खाजगी कारभारी, लिहितो कीं " काव्हूरला राजकीय बाबतींत उच्च उच्च ध्येयांचीं स्वप्नें कधीं पडत नसत. त्याच्या मताचा विकास क्रमाक्रमानें होत जाई. सत्य व साध्य असेल तें करण्यापलीकडे काव्हूरने आपल्या प्रयत्नांचा संचार जाऊं दिला नाहीं. " मुत्सद्दीपणा व दूरदर्शित्व हे काव्हूरच्या अंगचे ईश्वरदत्त गुण होते. विचारानें तो नेमस्त व उदार होता. लष्कर थोडे असल्यानें ऑस्ट्रियाच्या विरुद्ध इतर राष्ट्रांशीं संगनमत करण्यात त्याला आपला बुद्धि खर्चावी लागे. नेपल्सशीं झालेलें काव्हूरचें वर्तन राजकीयदृष्ट्या अनीतीचें होतें असें कित्येक टीकाकार म्हणतात. तसेंच यानें

आपलीं मतें बदललीं असाहि याच्यावर आरोप आहे. काव्हूरचें ध्येय, इटली स्वतंत्र करून तिची पुनर्घटना करणें हें होतें व त्याच्या प्रीत्यर्थ त्यानें आपलें आयुष्य व बुद्धिमत्ता हीं खर्ची घालून तें गाठलें.

काव्हूर शहर—हें शहर इटलीमध्यें ट्यूरिन देशात नैर्ऋत्येस ३२ मैलावर आहे. लोकसंख्या (१९०१) ८९३४. मध्ययुगांत बाधलेल्या किल्ल्यांचे मोडकळीस आलेले भाग अजून दृष्टीस पडतात. काव्हूर या प्रसिद्ध मुत्सद्याच्या धराण्याचे नाव याच गावावरून पडलें.

कॉव्हेंट्री.—इंग्लंडमध्यें वॉरविक शायरमधील म्युनिसिपल व पार्लमेंटरी बरो. हें लंडन आणि नॉर्थवेस्टर्न रेल्वेने लंडनच्या वायव्येस ९४ मैलांवर आहे. लोकसंख्या (१९२१) १,२८,२०५. हें शहर उंचवटयाच्या प्रदेशावर असून त्याला शेरबोन व रॅडफर्डब्रूक या नद्यांचे पाणी मिळते येथें बरींच प्रार्थनामंदिरें आहेत. सेंट मेरी दिवाणखाना व ऑक्सफोर्डच्या सेंट जॉन कॉलेजचा स्थापक व लंडनचा लॉर्ड मेअर थॉमस व्हाइट याचा पुतळा येथे आहे येथे मोफत व्याकरण शाळा, धंदेशिक्षणाची शाळा, कलाभुवन व मुलींकरिता शाळा व बालगुन्हेगारांची शाळा ह्या संस्था आहेत. बॉन्ड व फोर्ड ही धर्मार्थ रुग्णालयें येथें आहेत तसेच सुंदर बागाहि आहेत. मोटारी, सायकली, शिवणकामाचीं यंत्रे, सतरंज्या, रंग, धातुकाम, घड्याळें वगैरेंचे कारखाने येथ आहेत. इ. स. १८८८ सालीं हें कौंटीबरो झालें. येथील कार्पोरेशनमध्यें एक मेअर, सनदी शहरचे १० अधिकारी व ३० सभासद असतात. येथून पार्लमेंटात एक प्रतिनिधि पाठविला जातो. शहरचें क्षेत्रफळ ४१४९ एकर आहे.

अर्ल लिऑफ्रिक व त्याची पत्नी गॉडिव्हा यांनीं येथें बेनिडिक्टाइन मठ स्थापिल्यामुळें हें शहर अस्तित्वांत आलें. १३४५ सालीं तिसऱ्या एडवर्डनें येथें कार्पोरेशन स्थापिली. १६२२ सालीं पहिल्या जेम्सनें हें संघटित केले १२९५ सालीं पार्लमेंटात तेथून दोन सभासद जात असत कॉर्पस ख्रिस्तीनंतरच्या शुक्रवारपासून ८ दिवस येथे जत्रा भरते. १२१६ पासून हें लोकरीच्या कपड्याच्या व टोप्याच्या व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. १७ व्या शतकातील युद्धामुळें येथील व्यापाराचा नाश झाला. १६ व्या शतकाच्या मध्यकालीं येथें निळ्या सुताचा कारखाना होता. १८ व्या शतकात येथें फीत तयार होत असे.

काश—या झाडास लॅटिनमध्यें सॅक्चारम् स्पॉन्टेनिअम, संस्कृतमध्यें काश किंवा चामरपुष्प, मराठींत कांसेगवत, हिंदींत कास व गुजराथींत कासडो इत्यादि नावें आहेत

हिंदुस्थान व सिलोनमधील ६,००० फूट उंचीच्या उष्णप्रदेशांत हें गवत सांपडतें. ओलसर व सखल अशा प्रदेशांत हीं झाडें फार उंच वाढत असून यांच्या फुलाचे दांडे १२ फूट उंच असतात. याचीं बरींचशीं रोपें एकत्र सांपडत असून असून तुऱ्याच्या बुडाशीं असणाऱ्या पाढऱ्या कुसळांमुळें तीं सहज ओळखता येतात. पावसाळा संपल्यावर रोपाना फुलें येतात.

याची वाढ फार जोराची असल्यामुळे हीं रोपें समूळ उपटून काढता येत नाहींत विशेषतः आसाम व बंगालमधील चहाच्या मळ्यांत याचा बराच उपद्रव होतो. हें गवत मोठें जाड व राठ असून घराची शाकारणी करण्यास याचा उपयोग होतो पानें, देठ वगैरेंपासून दोर व चटया करतात. परंतु या कामीं हें मुंज गवतापेक्षा हलक्या प्रतीचें समजतात. मुंज गवतापेक्षा याचा चारा चांगला असतो हें गवत म्हशी व रेडे याना विशेषकरून घालतात. देशी लेखण्यासाठीं बोरूसारखीं याचीं काडीं फार उपयोगी पडतात [वॅट. पदे; वैद्यक शब्दसिंधु; सेन—आयुर्वेदिक सिस्टिम ऑफ मेडिसिन.]

काशी—हें संयुक्त प्रांतातील बनारस जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. हें गंगेच्या कांठीं वसलेलें असून संयुक्त प्रांतांत लोकसंख्येच्या मानानें लखनौच्या खालोखाल आहे. हें कलकत्त्यापासून ४७९ व मुंबईपासून ९४१ मैल दूर आहे. येथें यात्रेकरू नेहमीं येत जात असल्याकारणानें, येथील लोकसंख्या नेहमीं बदलत असते. इ. स. १९[illegible]१ सालीं या शहराची एकंदर लोकसंख्या १,९८,४४७ होती व इ. स. १९११ मध्ये १,९९,८३८ असून त्यापैकीं हिंदूंची लोकसंख्या १,४२,७५६, मुसलमानांची ५५,४०४ व ख्रिस्त्यांची ९८१ होती. गावाजवळच कंटोनमेंट असून तेथें इ. स. १९११ सालीं ३९३६ लोक रहात होते.

काशी हें भरतखंडातील अत्यंत प्राचीन शहरांपैकीं एक शहर होय. याला हिंदुस्थानचें अथेन्स अगर रोम असें म्हणता येईल काशीचा इतिहास म्हणजे हिंदुधर्माचाच इतिहास असे म्हटल्यास वावगे होणार नाहीं आर्यांच्या संस्कृतीचें, विद्येचें व तत्वज्ञानाचें माहेरघर म्हणून या शहराची ख्याति असून अद्यापिहि ती थोड्या फार फरकानें तशीच कायम आहे. वैदिक धर्म व बौद्ध धर्म या ठिकाणाहून सर्व भरतखंडात विस्तार पावले. सर्व भरतखंडात हें शहर अत्यंत पवित्र असें यात्रेचें ठिकाण मानलें जातें.

या शहराला काशी नावाच्या प्राचीन वेदकालीन राष्ट्रावरून हें नाव पडलें असावें असें दिसतें. या काशी लोकांच्या राजाला काशीराज असें म्हणत असत व या काशीराजासंबंधीं पुष्कळ दंतकथा या प्रांतात प्रचलित आहेत. काशी याचा धात्वर्थ (काश) चकाकणें असा असून सर्व शहरात चकाकणारें शहर या नात्यानें त्याला काशी हें नाव पडलें असावें असें कांहींचें मत आहे पण तें बरोबर असेल असें वाटत नाहीं. प्रसिद्ध व्याकरणकार पाणिनी यानें काशी लोकांचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केलेला आहे व त्याचप्रमाणें ख्रिस्तीशकापूर्वी पुष्कळ संस्कृत व पाली ग्रंथांतीहि या लोकांचा उल्लेख आढळतो. बृहत्संहितेंत काशी या शब्दाचा जनवाचक व स्थलवाचक, असा दोन्ही तऱ्हेनें उपयोग केलेला आहे. अर्थातच बृहत्संहिताकालीं 'काशी' हें नाव स्थलालाहि लावण्यात

येत असावें असें सिद्ध होतें. भरतखंडांतील सोळा संस्थानां-पैकीं काशी हें एक संस्थान होतें असें बौद्धग्रंथांत म्हटलेलें आढळतें.

पण काशी शहराला काशी हें नांव पडण्यापूर्वी 'वाराणशी' हें नांव असावें असें दिसतें. वरणा व असि या दोन नद्यामधील प्रदेशांत हें शहर वसलें असल्यानें या शहराला वाराणशी हें नांव पडलें असावें अशी समजूत आहे. बौद्धांच्या जातक ग्रंथांत व कांहीं संस्कृत ग्रंथांत 'वाराणशी' या नांवानें काशी शहराचा उल्लेख आढळतो. बनार राजा या शहरावर राज्य करीत होता, त्यावरून त्याला 'बनारसी,–वाराणशी' असें नाव पडलें असावें असाहि कित्येकांचा तर्क आहे. याशिवाय या शहराला 'अविमुक्त' हें नांव पुराणांत दिलेलें आढळतें. तसेंच या शहराला जातकग्रंथात सुदस्तन, पुष्पावती वगैरे उपनामें दिलेलीं आहेत. अठराव्या शतकांत दिल्लीच्या महंमदशहानें या शहराचें नांव 'महंमदाबाद' ठेवण्याचा यत्न केला, पण त्यात त्याला यश आलें नाहीं.

इतिहास.—राजा दिवोदासानें हें काशी शहर वसविलें अशी दंतकथा प्रचलित आहे. पण त्यासंबंधीं खात्रीलायक पुरावा मिळत नाहीं. ख्रि. पू. ६०० च्या पूर्वी कोसल राजांनीं हें शहर व त्याच्या आसपासचा मुलूख जिंकून घेतला. पुढें ख्रि. पू. ५०० च्या सुमारास मगधराजाची सत्ता प्रबळ होऊन कोसलांच्या ताब्यातील सर्व प्रदेश मगधदेशच्या शैशुनाग राजाच्या ताब्यांत गेला. त्याबरोबर काशी हें मगधाच्या ताब्यात गेलें. यानंतर अनुक्रमें मौर्य, शुंग, गुप्त इत्यादि राजांनीं या शहरावर आपला अंमल बसविला होता. ख्रिस्ती शकाच्या सातव्या शतकांत काशी शहर हर्षवर्धनाच्या ताब्यांत गेलें. पुढें बाराव्या शतकात कनोजच्या गहरवार राजाच्या ताब्यात हें शहर आलें. या राजघराण्यांतील शेवटचा राजा जयचंद याचा ११९३ मध्यें महंमद घोरीनें पराभव केला. तेव्हांपासून काशी हें मुसुलमानी सत्तेखालीं आलें.

महंमद घोरी हा काशीस लुटालूट करण्यास आला होता. तेथील विश्वेश्वराचें देऊळ औरंगझेबानें १६६९ च्या सप्टेंबरात मोडलें. काशी व प्रयाग हीं क्षेत्रें मुसुलमानाकडून परत घेण्याबद्दल पेशव्यानीं अखेरपर्यंत खटपट केल्याचें प्रसिद्धच आहे.

श्री. थोरले माधवरावसाहेब हे स्वर्गवासी होण्याच्या आधीं सरासरी १॥ महिन्यापूर्वी त्यांनीं राज्यांतील मुख्य प्रतिष्ठित मुत्सद्यांकडून जिच्या अंमलबजावणीबद्दल शपथा घेवविल्या होत्या त्या नऊ कलमी यादींत काशीक्षेत्राचा संबंध पुढीलप्रमाणें आला आहे. "श्रीकासीप्रयाग हीं दोन्ही स्थळें सरकारात (मराठी साम्राज्यांत) यावीं, असा तीर्थरूपांचा (नानासाहेबाचा) हेत होता त्यास प्रस्तुत (प्रयत्न) करावयाजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देऊन दोन्ही स्थळें हस्तगत करावीं (असा) प्रयत्न करावा." श्री. मा. गोपिकाबाई यांची इच्छा काशीयात्रा करण्याची होती असें या यादींतच म्हटलें आहे. "ती. मातुश्री बाईसाहेबांचा हेत कासीस जावयाचा आहे. त्यास सुपथा पडल्यावर यात्रा घडवावी." पेशवे यांच्या घराण्याचा उत्कर्ष व्हावा म्हणून नारायण दीक्षित पाटणकर यानीं अनुष्ठान केलें होतें. तदंगभूत प्रतिवर्षी एक लक्ष ब्राह्मणभोजन व एक कोटी दूर्वादलसमर्पण करण्याचें व्रत थोरले बाजीराव याच्या वेळेपासून पेशवे यांनीं पत्करिल्याचें प्रसिद्ध आहे. त्यास अनुलक्षून यादींत पुढील कलमें आहेतः "कासीस दोन लक्ष ब्राह्मणभोजन करावें, दक्षणा दोन पैसे प्रमाणें ावी. कासीचे ब्राह्मणास वर्षासनें आहेत ती(पिढी दर) पिढी देऊन वर्षास पावती करीत जावीं"

श्री. नानासाहेबांच्या वेळेस काशी घेण्याच्या खटपटीस चांगलेंच तोंड लागलें होतें. इ. स. १७६४ पूर्वी काशी देण्याचें सफदरजंगानें कबूल केल होतें. तेव्हा पेशव्यांनीं बाबूराव महादेवास अंमल बसविण्यास तेथें धाडलें. त्यावेळीं मात्र सफदरजंग (अयोध्येचा नबाब) काशी देण्यास अळंटळं करूं लागला. याच वेळीं जयाप्पा शिंदे यांनींहि काशी घेण्याबाबत फार खटपट केली होती. परंतु ते १७५५ त वारल्यामुळें ही मसलत तहकूब राहिली. पुढें १७५८-५९ त दत्ताजी शिंद्यानीं पुन्हां प्रयत्न सुरू केला. इतक्यात अबदालीचें बंड व पानिपत प्रकरण होऊन त्यामुळें हाहि यत्न मागें पडला. यानंतर केव्हांहि हें क्षेत्र मराठयांनां मिळालें नाहीं. श्री. नानासाहेबांनीं १७४३ च्या सुमारास हिंदुस्थानात स्वारी केली. त्या वेळीं ते काशीजवळ येऊं लागले असतां, सफदरजंग यानें काशीच्या ब्राह्मणाना भीति घातली कीं, तुम्ही आपले ब्राह्मण राजास मागें फिरवा, नाहीं तर तुम्हांस बाटवून मुसुलमान करूं. त्यावर नारायण दीक्षित (पाटणकर) यानां पुढें करून काशीकर ब्राह्मण श्रीमंताकडे अर्ज करण्यास आले. तेव्हां "ब्राह्मणांस माझ्यामुळें त्रास होत असेल तर मी काशीस येत नाहीं. मात्र मला गंगास्नान घडावें" असें त्यांनीं त्यांनां उत्तर दिलें व ब्राह्मणांबरोबर जाऊन गंगास्नान करून परत आले.

रघुनाथराव दादा पेशवे यांचे चिरंजीव चिमणाजीपंत (ज्याना यशोदाबाई यांनां दत्तक दिले होतें.) यांनां पेशवाईनंतर इंग्रजानें पेनशन देऊन ठेविलें होतें. ते तेथेंच वारले.

शहाअलमशहा दिल्लीकर हा इंग्रजांच्या गोटांत काशीस कांहीं दिवस होता, नंतर तेथून महादजी शिंदे यांच्या आश्रयास आला. येथें स्नानसंध्या करुन राहण्याचा बेत रघुनाथरावदादांनीं अनेकवार केला होता [मुस. रिया; मरा. रिया. मध्य वि; इति. संग्रह; राज. खं. १; ४;१२.].

पुढें इसवी सन १७७५ च्या नंतर इंग्रजांचा अम्मल या शहरावर सुरू झाला, तो अद्यापिहि चालू आहे.

इंग्रज गव्हर्नर हेस्टिंग्ज याच्या राजवटींत काशी संस्थानचा नबाब वझीर अल्लीनें मध्यें बंडें केलीं पण तीं निष्फळ ठरलीं व संस्थान अयोध्येच्या नबाबाच्या राज्यांतून निघून कंपनीच्या मुलुखात पडलें. पुढें हेस्टिंग्ज व राजा चेतसिंगाचें भांडण होऊन काशी शहर कंपनीकडे आलें.इंग्रजाच्या अंमलाखालीं काशी शहराला पुन्हा बरे दिवस प्राप्त झाले. धार्मिक बाबतींत ढवळाढवळ न करण्याचें धोरण इंग्रजानीं ठेवल्यामुळें, काशी हें पुन्हा धर्माचें पीठ होऊन बसलें. येथें अनेक देवळें बाधण्यांत आलीं, व हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन होऊं लागलें.

दे व ळें, ती र्थें व घा ट.—चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा ७ व्या शतकांत हिंदुस्थानात आला होता त्यावेळीं काशीमध्यें ३० बुद्धविहार व १०० हिंदूंचीं देवालयें होतीं असें त्याच्या प्रवासवृत्तावरून समजतें. आजमितीस काशींत १५०० हून अधिक देवळें आहेत. यांपैकीं जवळजवळ निम्म्याहून अधिक देवळें ब्रिटिशांच्या अमदानींत बाधलीं गेलीं. नदीच्या कांठीं उभें राहिल असतां आपल्याला घाटांची गंगेच्या रांग दृष्टीस पडते हे घाट फार सुंदर बाधलेले आहेत. हे घाट फार पवित्र मानले जातात. या घाटाची संख्या ४० हून अधिक आहे. त्यातल्या त्यात प्रसिद्ध घाट म्हणजे, असिसंगम, दशाश्वमेध, मणिकर्णिका, पंचगंगा व वारणासंगम हे होत. याशिवाय इतर घाटहि प्रेक्षणीय आहेत. पुष्कळ हिंदू राजांनीं आपआपल्या खर्चानीं आपल्या नावाचे घाट बाधविले आहेत. जयपूरचा राजा मानसिंग यानें एका दिवसांत एक लाख छोटीं देवळें बाधलीं असें म्हणतात. प्रत्येक घाटासंबंधानें कांहीं दंतकथा प्रसिद्ध आहेच. दशाश्वमेध व मणिकर्णिका या घाटासंबंधीं तर असंख्य दंतकथा प्रसिद्ध आहेत. दशाश्वमेध घाटासंबंधीं अशी दंतकथा सागतात कीं, राजा दिवोदासानें आपल्या धर्मबळाच्या जोरावर काशींतून सर्व देवानां हांकलून लावलें. शिवाला पुन्हां काशींत येण्याची इच्छा झाल्यामुळें त्यानें ब्रह्मदेवाला दिवोदासाकडून तशी परवानगी मिळविण्याची विनंति केली. ब्रह्मदेवानें एका वृद्ध ब्राह्मणाचा वेष धारण करून तो दिवोदासाकडे आला. त्याची पूजा करून त्याला काय इच्छा आहे तें मागण्यास राजानें सांगितलें.ब्रह्मदेवानें दिवोदासाजवळ एका यज्ञाचें साहित्य पुरविण्याबद्दल विनंति केली. यज्ञसाहित्य जमा करणें अत्यंत भानगडीचें काम असल्यामुळें, दिवोदास हा कांहीं तरी चूक करील व अशा रीतीनें आपली अयोग्यता प्रस्थापित करील असें ब्रह्मदेवाला वाटत होतें. पण दिवोदास हा लेचापेचा नव्हता त्यानें एका यज्ञाचेंच नव्हे तर दहा यज्ञांचें सर्व साहित्य त्या वृद्ध ब्राह्मणाला पुरविलें. त्या साहित्याच्या योगानें त्या ब्राह्मणानें दशाश्वमेध केला. अशा रीतीनें या दशाश्वमेध घाटाला अत्यंत पवित्रता प्राप्त झाली. कार्तिक अमावस्येच्या दिवशीं दशाश्वमेधघाटावर देवताविसर्जनाचा समारंभ होतो व तो फार प्रेक्षणीय असतो.

दशाश्वमेधाच्या दक्षिणेस शीतलाघाट आहे. नंतर चौकीघाट लागतो. या घाटावर एक मोठा अश्वत्थवृक्ष असून त्याच्या खालीं एक लिंग असून भोंवती पुष्कळ सपाकृती व इतर मूर्ती आहेत. नंतर केदारघाट येतो. या केदारघाटावर सर्व रोगनिवारक गौरीकुंड आहे. त्यानंतर थोडेंसें चालून गेल्यावर शिवाल घाट लागतो. अशा रीतीनें पुष्कळ घाट लागल्यावर मानमंदिर घाटाचा देखावा दिसूं लागतो. या घाटाच्या वरच्या बाजूस एक मोठी इमारत आहे. हा घाट व ही इमारत अंबेरचा राजा मानसिंग यानें बाधविली. हा राजवाडा पुढें राजा जयसिंग या प्रसिद्ध ज्योतिष्यानें वेधशाळेसाठीं उपयोगांत आणिला. या घाटानंतर नेपाळी घाट लागतो. पण सर्वात महत्वाचा घाट म्हणजे मणिकर्णिका घाट होय. कार्तिक महिन्यात अगर एखाद्या उत्सवाच्या प्रसंगीं या घाटावर जो देखावा दृष्टीस पडतो तसा देखावा जगामध्यें इतर ठिकाणीं क्वचितच दृष्टीस पडतो असें हॅवेलनें म्हटलें आहे. या घाटासंबंधीं काशीखंडात पुढील कथा आहेः— " विष्णूनें या ठिकाणीं आपल्या चक्रानें विहीर खणली व ती आपल्या घामानें भरून काढली. नंतर तो तेथून उत्तरेच्या दिशेस थोड्या अंतरावर जाऊन तपश्चर्या करीत बसला. कांहीं वेळानें त्या ठिकाणीं शंकर आले व त्यानीं त्या विहीरींत डोकावून पाहिलें, तों त्याना त्या विहीरींत कोट्यावधि सूर्यांचें तेज दृष्टीस पडलें. त्यामुळें ते अत्यंत प्रसन्न होऊन विष्णूची स्तुति करूं लागले व वाटेल तो वर मागण्यास त्यानीं विष्णूला आज्ञा केली. विष्णूनें त्याना या कुंडांत निरंतर रहाण्याचा प्रार्थना केली. या मागण्यानें शंकराना फार आनंद झाला व त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यामुळें त्याच्या कानातून मणिकर्णिका(जल)विहिरींत पडले व त्यावरून या कुंडाला मणिकर्णिका हें नाव पडलें. हें कुंड अत्यंत पवित्र मानलें जातें. या घाटावरील आणखी एक महत्वाचें स्थळ म्हणजे ' चरणपादुका ' हें होय. या चरणपादुकाचेंहि प्रत्येक भक्त भक्तिभावानें पूजन करतो. यानंतर शिंदेघाट, बाजीरावघाट, भोंसलेघाट, रामघाट, चोरघाट हे लागल्यावर पंचगंगाघाट लागतो. या ठिकाणीं धूतपापा, सरस्वती, किरणा, यमुना व गंगा याचा अदृश्य संगम झाला आहे असें मानतात. कार्तिकांत येथील देखावाहि पाहण्यालायक असतो. यानंतर गायघाट वगैरे बरेच घाट लागतात पण ते विशेष महत्वाचे नाहींत.

काशीमधील सर्व देवळाचें यथार्थ वर्णन करावयाचें म्हणजे एक मोठा ग्रंथच होईल म्हणून त्यातल्या त्यात महत्वाच्या देवळांचेंच अगदीं थोडक्यात वर्णन लिहिलें आहे. त्रिलोचनघाटावर त्रिलोचनाचें देवालय आहे. वैशाख महिना या देवाचें सतत पूजन करण्यांत घालविल्यास त्याला मोक्ष मिळतो अशी समजूत आहे. रामनगरभागांत व्यासेश्वर नावाचें एक देवालय आहे. रामनगरभागात राहणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें या व्यासेश्वराचें माघांत दर्शन घेतलें असतां त्याला पुनर्जन्माची

भीति नाहीं अशी दंतकथा प्रचलित आहे. अन्नपूर्णेचें देवालय तेथें होणाऱ्या अगणित अन्नदानासाठीं प्रसिद्ध आहे. हें देवालय बाजीराव पेशवे यांनीं बांधलें. या देवालयाच्या भोंवतीं भिक्षेसाठीं असंख्य भिक्षेकरी जमलेले असतात. या देवालयाच्या नजीक गणेश अगर विनायकपालचें देऊळ आहे. प्रत्येक यात्रेकरूनें या देवालयाचें दर्शन घेतलेंच पाहिजे, त्याशिवाय त्याची यात्रा पुरी झाली नाहीं असें मानण्यात येतें. सर्वांत प्रमुख देऊळ म्हणजे विश्वेश्वराचें देऊळ होय. हे सोन्यानें मढविलेलें आहे. विश्वेश्वररूपी शिवाची मूर्ति या देवळांत असून ही मूर्ति सर्व शहराचें संरक्षण करतें असें मानण्यांत येतें. विश्वेश्वर हा काशीशहराचा राजा आहे असें तेथील लोक समजतात. हें स्थान फार पवित्र मानलें जातें. हे देऊळ फारसें सुंदर नाहीं व विशेष मोठेंहि नाहीं. लाहोरचा राजा रणजितसिंग यानें या देवळाला सोन्याचा मुलामा दिला. हें देऊळ इंदोरच्या अहिल्याबाई राणीनें बांधलेलें आहे. विश्वेश्वराच्या खालोखाल भैरवनाथाचें देऊळ महत्वाचें मानलें जातें. भैरवनाथ यास शहराचा कोतवाल समजतात. राक्षस अथवा दुष्ट लोकांपासून हा शहराचें रक्षण करतो अशी समजूत आहे. याशिवाय बिंदुमाधव, दुर्गा इत्यादि देवतांचीं पुष्कळच देवालयें आहेत. ज्ञानवापी, नागकूप, पिशाचमोचन कुंड इत्यादि प्रमुख कुंडेंहि प्रसिद्ध आहेत.

काशीच्या भोंवतालची कांहीं मैल जागा अत्यंत पवित्र मानली जाते. प्रत्येक यात्रेकरूला काशीभोंवतीं प्रदक्षिणा घालावी लागते. याला पंचक्रोशीची यात्रा असें म्हणतात. या पंचक्रोशी यात्रेला मणिकर्णिका घाटापासून सुरुवात होते. तेथून निघून, यात्रेकरू पहिल्या दिवशीं आसिसंगम घाटापर्यंत जातो व तेथून जवळच असलेल्या एका खेडेगांवात विश्रांति घेतो. दुसऱ्या दिवशीं तो धूपचंडीपर्यंत जातो; तेथून तिसऱ्या दिवशीं तो रामेश्वर येथें येतो. चौथ्या दिवशीं शिवपूर येथपर्यंत त्याची यात्रा होते. पांचव्या दिवशीं शिवपुराहून तो कपिलधारेला येऊन पोहोंचतो व सहाव्या दिवशीं कपिलधारेहून वर्णा–संगम येथें येऊन मणिकर्णिकेला परत येतो. वाटेंत त्याला जवळ जवळ ६०० देवालयें लागतात. प्रत्येक ठिकाणीं त्याला पुष्कळ दानधर्म करावा लागतो.

फार प्राचीन काळापासून काशी शहराची तीर्थस्थान या नात्यानें प्रसिद्धि आहे. आपल्या धर्माचीं तत्वें लोकांना पटवून देण्याकरितां, बुद्धानें या शहराजवळ असणाऱ्या सारनाथ या ठिकाणीं वास्तव्य केलें. त्यावरून बुद्धकाळीं काशी हें धर्माचें केंद्र होतें असें सिद्ध होतें. बुद्ध धर्माचा जरी काशीच्या आसपास पुष्कळ प्रसार झाला होता तरी काशी शहरात ब्राह्मणीधर्माचेंच वर्चस्व होतें ! ह्युएनत्संग ज्यावेळीं काशी येथें आला त्यावेळीं देखील काशीमध्यें शिवभक्तांची संख्या पुष्कळ होती, असें त्याला आढळून आलें.

जैनाचा सातवा तीर्थंकर सुपार्श्वनाथ याचा जन्म काशींतच झाल्यानें हें स्थान जैनानींहि पवित्र मानिलें आहे. बच्छराज व असिसंगम या घाटांच्या दरम्यान पुष्कळ जैन देवालयें आहेत. मुसुलमानाच्याहि मशिदी या ठिकाणीं पुष्कळ आहेत; व मुसुलमानी पिराची पूजा करणारेहि कित्येक हिंदू लोक आढळतात.

काशी हें ज्याप्रमाणें फार प्राचीन काळापासून धर्माचें माहेरघर होतें त्याचप्रमाणें तें इतर विद्यांचेंहि पीठ होतें. निरनिराळ्या शास्त्रांचें या ठिकाणीं अध्ययन केलें जात असे. इ. स. १८०७ मध्यें वेदाचें अध्ययन करणारे ८९३ विद्यार्थी असून वेदशास्त्रपारंगत असे ४८ आचार्य होते, असें वॉर्डनें म्हटलेलें आहे. तसेंच पाणिनीच्या व्याकरणाचें अध्ययन करणारे २९८ विद्यार्थी असून, त्यांना शिकविणारे १८ गुरु होते असेंहि त्यानें लिहिलें आहे. यांशिवाय धर्मशास्त्र, न्यायशास्त्र इत्यादि इतर शास्त्रांचेंहि अध्ययन केलें जात असे. विज्ञानेश्वर हा मिताक्षरेवरील प्रसिद्ध भाष्यकार येथें अध्यापनाचें काम करीत असे. एखाद्या नवीन धर्मप्रवर्तकाला आपलें तत्व प्रचलित करावयाची इच्छा असल्यास त्यानें काशी येथें येऊन तेथील पंडितांची खात्री पटवून देण्याचा प्रघात असे. त्याप्रमाणें, आद्यशंकराचार्य हे आपल्या शिष्यगणांसमवेत या ठिकाणीं आपल्या तत्वज्ञानाची माहिती देण्याकरतां आले होते. याशिवाय, कबीर चैतन्य, व भाचार्य, तुळशीदास इत्यादि महान् साधु हेहि काशींत येऊन आपल्या मतप्रसारार्थ राहिले होते. १८।१९ व्या शतकात या शहरांत पुष्कळच शास्त्रींपंडिताचा भरणा होता १८१० च्या सुमारास हटी "विद्यालंकारा" नावाची एक वंगपंडिता काशींत शास्त्रांचें अध्यापन करीत असे, असें ग्रीयरसननें म्हटलें आहे. अद्यापि देखील संस्कृत भाषेंचें अध्ययन व अध्यापन या ठिकाणीं चाललेलें आढळतें. ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यापासून या ठिकाणीं पाश्चात्य शिक्षणाच्या शाळाहि स्थापन झाल्या आहेत. इ. स. १७९१ मध्यें बनारस कॉलेज स्थापन झालें. हें सरकारी असून त्याला संस्कृत कॉलेजहि जोडलेलें आहे. इ.स. १८९८ मध्ये,डॉ. ॲनी बिझांट बाईच्या खटपटीनें सेंट्रल हिंदुकॉलेजची स्थापना झाली. या कॉलेजमध्यें बी. ए. पर्यंतचा अभ्यास करून घेण्यांत येत असून ते अलाहाबाद येथील विश्वविद्यालयास जोडलेलें होतें या कॉलेजात धार्मिक व नैतिक शिक्षणहि दिलें जात असे. शिवाय या कॉलेजला जोडून एक मुलींची शाळा उघडण्यांत आली होती. हल्लीं हें कॉलेज नवीनच स्थापन झालेल्या हिंदु विश्वविद्यालयास जोडलें आहे. १७ व्या शतकात राजा जयसिंगानें जें महाविद्यालय स्थापिलें तें हल्लीं मिशनरी संस्थेच्या ताब्यात आलें आहे. याशिवाय मिशनरी सोसायटीच्या व म्युनिसिपालिटीच्याहि पुष्कळ शाळा असून पाच सहा वाचनालयेंहि आहेत.

उ द्यो ग धं दे.—येथें पितळेचें सामान चांगल्या प्रकारचें तयार होतें. किनखाप, रेशीम, जर, मोती व लाखेचें सामान

उत्कृष्ट प्रकारचें तयार केलें जातें. येथें दोन बर्फाचे कारखाने, सात विटांच्या भट्टया, दोन रसायनशास्त्रीय संस्था, दोन लोखंडाचे, चार चुन्याचे, एक गालिचाचा असे बरेच कारखाने व कांहीं छापखाने आहेत. सुमारें १५ नियतकालिकें येथें निघतात. पण तीं महत्त्वाचीं नाहींत. संस्कृत कॉलेजतर्फे, येथें 'पंडित' नांवाचें मासिकपुस्तक पूर्वी प्रसिद्ध होत असे.

पु रा ण व स्तु सं शो ध न—काशीच्या आसपास व खुद्द काशी शहरात पुराणवस्तुसंशोधनाला पुष्कळच क्षेत्र आहे. काशीच्या आसपास लहान लहान अशीं असंख्य देवळें आहेत व तीं राजा मानसिगाने एका दिवसात बांधविलीं अशी दंतकथा आहे. पण त्या देवालयाच्या शिल्पाकडे पाहिलें असता, तीं मानसिंगाच्याहि पूर्वीचीं दिसतात. त्यापैकी बरीचशीं बौद्धकालीन दिसतात. हल्लीं सारनाथाच्या आसपासचीं देवळें खणून बाहेर काढण्याचे काम चालू आहे. मुसलमानानीं उध्वस्त केलेल्या अशा बऱ्याच इमारती येथें आहेत. औरंगझेबाच्या मशीदीच्या मागे एका देवळाचा अवशेष आहे. या अवशेषावरून त्या ठिकाणीं पूर्वी एखादं भव्य ब्राह्मणाचें अगर जैनाचें देवालय असावें असें वाटतें. कदाचित तेथे एखादं धर्माची चर्चा करण्याचें मंदिर असावें असेंहि मानण्याला जागा आहे. तसेंच अढ्इ कंगुरा नावाची एक मशीद असून तेथें पूर्वी एक बुद्धाचे अगर हिंदूंचें धर्ममंदिर असावें असें दिसते. राजघाटाच्या पश्चिमेस 'भैरव का तलाव' म्हणून एक तलाव असून त्या ठिकाणीं जुन्या इमारतीचे अवशेष सापडतात. त्या तलावाजवळील एका मोठ्या इमारतीच्या वरच्या भागावर एक लाटभैरवाची मूर्ति आहे. ही मूर्ति व तीवरील शिल्प पाहिलें असता ती अशोककालीन असावी असें दिसतें. बकरीच्या कुंडाच्या आसपासहि पुराणवस्तुसंशोधनाला योग्य अशीं पुष्कळ स्थळें आहेत.

क ला.—काशीमध्यें शिल्पकला, चित्रकला, वगैरे कलाचे उत्कृष्ट नमुने पहावयाला मिळत नाहींत. देवळाच्या भिंतीवर जीं चित्रें काढलेलीं आढळतात तींहि सुंदर नाहींत. मुसुलमाना मशीदी अगर ब्रिटिश अमदानींत बांधलेलीं देवळे जरा बरीं बांधलेलीं दिसतात. तरी पण कलेच्या दृष्टीनें त्यात विशेष प्रेक्षणीय असें कांहीं आढळून येत नाहीं.

कॅ न्टो न में ट—काशी शहराच्या पश्चिमेस यूरोपियन लोकांचें रहाण्याचें ठिकाण आहे. त्याला कॅंटोनमेंट असें म्हणतात. या ठिकाणीं टांकसाळ, प्रिन्स ऑफ वेल्स हॉस्पिटल, टॉऊन हाल इत्यादि मोठ्या इमारती आहेत.

काशी संस्थानची माहिती ' बनारस जमीनदारी ' या लेखाखालीं येईल

[संदर्भग्रंथ—ई. बी, हॅवेल–बनारस १९०६, शेरिंग–दि सेक्रेड सिटी ऑफ दि हिंदूज (१८६८); इं. गॅ. ७. तीर्थ यात्रा–प्रबंध.].

काशीनाथोपाध्याय—काश्युपाध्यायाचा नातू, यज्ञेश्वराचा पुतण्या व अनंतोपाध्यायाचा ज्येष्ठपुत्र. यास लोक बाबापाध्ये म्हणतात. धर्मशास्त्रावर धर्मसिंधु म्हणून जो ग्रंथ आहे तो यानें लिहिला (१७९१). हा जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण व पंढरपूर येथील रहाणारा होता. वारकरींहि यास बरेच मानीत असत. कर्नाटकातील बहुतेक कृष्णाचार्यादिक आचार्य याचेच शिष्य होते असा समज आहे.

धर्मसिंधुशिवाय प्रायश्चित्तेंदुशेखर, वेदस्तुति–टीका हे याचे दुसरे ग्रंथ होत. रत्नागिरी जिल्ह्यातील गोवली नांवाचा गांव याच्या वंशजास अग्रहार म्हणून दिला गेला आहे.

काशीपूर, त ह शी ल.—संयुक्तप्रात नैनिताल जिल्ह्या-नैऋत्येकडील तहसील व पोटविभाग. क्षे. फ. १८९ चौ. मै. लो. सं. (१९११) ६१,६८४. या तहसिलींत १३८ खेडीं व काशीपूर (तहशिलीचें मुख्य ठिकाण) व जयपूर हीं दोन मोठीं गावें आहेत सर्व भाग सपाट असून तराईइतका दलदलीचा नाहीं.

गा व.—संयुक्त प्रातात नैनिताल जिल्ह्यामध्यें, असलेल्या याच नांवाच्या तहसिलीचे मुख्य ठिकाण. हे गाव मुरादाबादकडून येणाऱ्या रस्त्यावर आहे. लो. सं. (१९११) १२७७३. गांवाजवळ प्राचीन किल्ल्याचे व देवालयाचे पुष्कळ अवशेष आहेत. त्यावरून सातव्या शतकातील गोविसान राज्याची राजधानी येथें पूर्वी होती असे कनिंगहॅम यानें ठरविलें आहे. आसपास पुष्कळ तळीं असून त्यापैकीं एकाला पाडवाचा गुरु द्रोण याचे नाव दिलेलें आहे. सोळाव्या किंवा सतराव्या शतकांत परगण्याचा सुभेदार काशिनाथ यानें हें गाव वसविलें; व गावच हल्लींचे नांव त्याच्या नावावरून पडलेलें आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात येथील सुभेदार नंदराम हा अलमोऱ्याच्या चंदराजापासून बहुतेक स्वतंत्र झाला. इ. स. १८०१ त हें गांव इंग्रजांकडे गेलें. त्यावेळी ते चंदराजाचा पुतण्या शिवलाल याच्या ताब्यात होतें. गांवात एक मध्यम प्रतीचे मार्केट असून मार्केटाखेरीज इतर घरें मातीचीं आहेत. राजवाडा (चंदराजाच्या घराण्यांतील एका शाखेचा राजा येथे असतो.) ही सर्वांत मोठी इमारत होय. सरकारी कचेऱ्याखेरीज येथें एक शाळा व दवाखाना आहे. म्युनिसिपालिटीचे उत्पन्न १९०३–४ सालीं १४००० रु. होतें. कापड, भांडीं व इतर जिन्नसांचा व्यापार येथें भरभराटींत आहे.

काशीफळ—ही भोपळ्याची जात आहे. या फळास ' चक्की ' असेंहि म्हणतात. हे फळ फार मोठें नसतें. तें चसकट व कर्वेदार असतें. याचा रंग हिरवा, पांढरा व शेंदरी असतो. याचे वेल व फुलें भोपळयासारखींच असतात; पण वाढ कमी असते. याची लावणी भोपळयासारखीच असते. बीं भोपळयाच्या बियांपेक्षां लहान असतें भोपळ्यापेक्षा

काशीफळाची भाजी कमी गोड असते. कांहीं जातींची भाजी फिकी लागते. [वनौ. गु. भा. ४].

काशीबाई पेशवे—ही थोरल्या बाजीरावसाहेबाची पत्नी व चासकर जोशी यांच्या घराण्यांतील महादजीपंत यांची मुलगी. पंताचा व बाळाजी विश्वनाथाचा स्नेह फार होता. ही पतीबरोबर स्वाऱ्यात जात असे. हिचा स्वभाव शांत व गरीब असे. ही सासू (राधाबाई) सारखी राजकारणकुशल नव्हती. बाजीरावावर हिचें वजन बेताचेंच दिसतें. कदाचित् त्यामुळेंच मस्तानीचें प्रस्थ जास्त माजलें असावें. बाजीराव हे माळव्यात शेषटच्या स्वारीस गेले असतां ही त्याच्याबरोबर होती. बाजीराव हे नर्मदाकाठीं रावेर येथें वारले. नंतर सैन्यासह बाई पुणें येथें (३।६।१७४०) परत आल्या. दमाजी गायकवाडनें पुण्यावर स्वारी केली त्यावेळीं पेशव्याची मंडळी सिंहगडास गेली होती, त्यावेळीं (८।३।१७५१) काशीबाई व तिची सासू राधाबाई याहि त्यांत होत्या असा उल्लेख सांपडतो. काशीबाईचा अंत कधीं झाला तें नक्की आढळत नाहीं. (म. रि. म. वि. ११२).

काशीराज पंडित—काशीराज शिवाजी हा महाराष्ट्रीय ब्राह्मण असून दिल्लीच्या बादशहाचा वजीर सफदरजंग याच्या पदरीं प्रथम नोकरीस राहिला. सफदरजंग हा मराठयांचा पुरस्कर्ता व चहाता असल्यानें त्यानें बरेच मराठे पदरीं बाळगले होते. सफदरजंगाची काशीराजावर विशेष मेहेरबानी होती. त्यामुळें त्याचा मुलगा अयोध्येचा नवाब सुजाउद्दौल यानें त्यास आपल्या बापाच्या वेळचा जुना व माहितगार माणूस समजून आपल्या दरबारांत वकिलातीचें काम दिलें; व वेळोवेळीं मोठमोठ्या राजकारणांत त्याची तो सल्ला मसलत घेत असे. काशीराजाची या दरबारांत मोठी प्रतिष्ठा व वजन असे. इ. स. १७६१ मध्यें पानिपत येथें जें मराठे व दुराणी यांचें घनघोर युद्ध झालें त्यावेळीं पंडित काशीराज हा तेथें हजर होता. त्यानें या प्रसंगीं युक्तीनें व शहाणपणानें मराठयांस शक्य तितकी मदत केली. परंतु दुदवानें या युद्धांत मराठयांचे मुख्य सेनापति भाऊसाहेब व विश्वासराव पेशवे हे रणभूमीवर पतन पावले.

त्यावेळीं काशीराज यानें त्यांचीं प्रेतें शोधून काढून त्यांस त्यानें चंदनादि काष्ठें जमवून अग्नि दिला व त्यांची उत्तरक्रिया हिंदु धर्माप्रमाणें उत्तम प्रकारें केली व या प्रकारानें मराठयावर उपकार केले. स्वतः काशीराज म्हणतो "आणीक सेवा न घडली ! ईश्वरें हाच आम्हांस नेमला होता! भगवदिच्छेस उपाय काय ! " पानिपतच्या लढाईचा वृत्तांत (नकाशा देऊन) यानें फारशी भाषेंत सविस्तर लिहिला आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर जेम्स ब्राउन यानें इ. स. १७९१ मध्यें "एशियाटिक रिसर्चेस" या ग्रंथांत प्रसिद्ध केलें. तें ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचें आहे. [इतिहाससंग्रह ३. १; राजवाडे खं. ६].

काश्गर—काश्गर हें चिनी तुर्कस्तानांतील एक महत्वाचें शहर आहे. ह्याचे उत्तर अक्षांश ३९° २४' व पूर्वरेखांश ७६° २४' आहेत. काश्गरचे कुह्ना शहर व यांगी शहर म्हणजे जुनें व नवें शहर असे दोन भाग आहेत. दोन्ही भागात ५ मैल अंतर असून मधून किझिलसू नदी वहाते. खोकंद, समरकंद व हिंदुस्थान येथून येणाऱ्या रस्त्यांवर काश्गर असल्यामुळें ह्याचें राजकीय व व्यापारी महत्व पूर्वीपासूनच आहे. मध्य आशियांतील इतर शहराप्रमाणें बऱ्याच लोकांच्या हातांत हें शहर गेलें. इ. स. १८६४–१८७७पर्यंत अमीर याकुब बेग यानें येथें छोटेखानी राज्य स्थापिलें. परंतु त्याच्या मरणानंतर हें शहर चिनी लोकांनीं जिंकून घेतलें.

कुह्ना शहर मजबूत तटबंदीचें असून तें टुमान नदीवर आहे. पुलापलीकडे कांहीं अंतरावर जुन्या काश्गर शहराचा अवशेष दृष्टीस पडतो, ह्याला आस्की शहर (जुनें शहर) असे सध्यांचें नांव आहे.कुह्ना शहराच्या उत्तरेस दोन मैलांवर या देशचा साधु श्रेष्ठ हजरत हफक याची मशीद आहे.

यांगी शहर इ. स. १८३८ त बांधलें गेलें. याच्या भोंवतीं रुंद व खोल असा एक खंदक आहे. याकुब बेगच्या अगोदर चिनी अमलात येथें 'अंबन' म्हणजे इलाखाधिपति रहात असे.

कुह्ना शहराची लोकसंख्या ६०,००० व यांगी शहराची लोकसंख्या २,०००आहे.इ.स.१८६५साली चिनी सत्ता संपुष्टात आल्यानंतर काश्गरचे पक्का माल तयार करण्याचे कारखाने हळू हळू बंद पडले.

इ. स. पूर्वी ७६ वर्षी हॅान घराण्याच्या वेळेस चिनी लोकांनीं युटीएन, सुलेई (काश्गर) वगैरे जिंकिलें. त्यापूर्वी काश्गरचा उल्लेख सापडत नाहीं. ह्युएनत्संग हिंदुस्थानातून परत चीन देशांत याच शहरावरून (काशा असें त्यानें दिलेलें नाव) गेला. आठव्या शतकांत अरब लोकांच्य स्वारीविरुद्ध काश्गरच्या लोकांनीं बुखाऱ्याच्या राणीला मदत दिली. उइघर राजाच्या अमदानींत दहाव्या शतकांत काश्गर येथें इस्लामी धर्माचा पगडा बसला.

तैमूरनें इ. स. १३८९–९० सालीं काश्गर शहर बेचिराख केलें. खान सुलतान सय्यदची स्वारी झाल्याबरोबर मिर्झा अबूबकर यानें इ. स. १५१४ त या शहराचा नाश केला.

काश्गर शहरावर चिनी अंमल १७५९ नंतर चालू झाला. लहान सहान बंडें होऊन शेवटीं चिनी अंमल कायम झाला. १८६२ त चिनी मुसुलमानानीं बंड केलें तेव्हां काश्गरच्या लोकांनीं देखील बंड केलें. या बंडांत सादीक बेगनें काश्गरच्या लोकांनां मदत केली. परंतु सादिक बेगला सहाय्य करण्याकरितां आलेल्या याकुब बेगानें काश्गर येथें आपला अंमल सुरू केला. तो १८७७ सालीं मरण पावल्यावर चिनी सरकारचा अंमल तेथें पुन्हां बसला.

काश्मीर संस्थान—काश्मीर हें हिंदुस्थानांतील एक पहिल्या प्रतीचें संस्थान असून तें हिमालय पर्वताच्या पश्चिम

भागांत वसलेलें आहे. याच्या उत्तरेस चीनच्या ताब्यांतील तुर्कस्तानचा भाग व काराकोरान पर्वत असून दक्षिणेस पंजाबचा प्रदेश आहे. पूर्वेस तिबेटचें संस्थान असून पश्चिमेस 'सरहद्दीवरील प्रांत' आहेत. चिनाब, झेलम व सिंधु या नद्यांच्या खोऱ्यांत हें संस्थान वसलेलें आहे असें ठोकळ रीतीनें म्हणतां येईल.

काश्मीर संस्थानचा बहुतेक भाग डोंगराळ आहे. हिमालय पर्वताचें पश्चिम टोंक, शिवालिकपर्वताच्या रांगा, पंजाल पर्वत, ननकन, कजनग, हरमुख, नंगा, कारकोरान, इत्यादि अनेक लहान मोठे पर्वत या प्रदेशांत आहेत. सपाट मैदान फारच थोडें आढळून येतें. काश्मीर संस्थानचा आकार साधारण चौकोनी असून, त्याचे जम्मू, काश्मीर, लहान तिबेट व गिलजीत हे मुख्य चार प्रांत आहेत. काश्मीर संस्थान हें अनेक मजली घरासारखें आहे असें पुष्कळ लेखकांनीं म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. दुसऱ्या तऱ्हेनें हें संस्थान म्हणजे चिनाब, झेलम व सिंधु या नद्यांच्या एकावर एक उंच असणाऱ्या दऱ्यांनीं बनलेलें आहे असें म्हणतां येईल. कारण संस्थानच्या खालच्या पायरीमधून चिनाब नदी गेली आहे. दुसऱ्या पायरीमधून झेलम (वितस्ता) नदी व तिसऱ्या पायरीमधून सिंधु नदी गेली आहे. या तीनहि नद्या संस्थानच्या पूर्वभागातील दक्षिणेकडच्या हिमालयाच्या प्रचंड पर्वतराजींमधून उगम पावून प्रथमतः उत्तरेकडे वहात जाऊन नंतर दक्षिणेकडे वहात जातात. व अशा रीतीनें पश्चिमभागाकडून खालीं उतरत येत पंजाबच्या सपाट प्रदेशांत वहात येतात. अनेक मजली घराची उपमा घेतल्यास असें म्हणता येईल कीं, जम्मू हा पहिल्या मजल्याच्या घराचा दरवाजा आहे. त्यांतील कांहीं भाग सपाटीवर बसलेला आहे. त्यानंतर दुसऱ्या मजल्यावर जाण्याकरितां ८,००० फूट उंचीची हिमालयपर्वताची पहिली रांग ओलांडावी लागते. हा प्रदेश समशीतोष्ण असून ओक, देवदारु इत्यादि वृक्षांचीं बनेच्या बनें आहेत. या टप्प्यात भदरवाह किस्तवार हे प्रांत आहेत. तिसऱ्या मजल्यावर जाण्याकरतां, हिमालयाची पीरपंजाल नावाची शाखा ओलांडावी लागते. या ठिकाणींच काश्मीरची सुंदर दरी आहे. या दरीलाच कोणी 'नंदनवन' म्हणतात. या दरीच्या चारी बाजूंनां शुभ्र मोत्यासारख्या बर्फानें आच्छादिलेल्या पर्वतांचीं शिखरें आहेत व अशा मुक्ताहारांत काश्मीरची दरी म्हणजे पाचूप्रमाणें शोभते. त्याच्याहिवर चौथ्या मजल्यावर जाण्याकारतां १४।१५ हजार फूट उंच पर्वताची ओळ ओलांडावी लागते. ही ओळ ओलांडून गेल्यावर उत्तरेस अस्तर व बाल्तिस्तानचा प्रांत व पूर्वेस लडखचा प्रांत लागतो. वायव्येस गिलजित प्रांत असून त्याच्या आसपास हिंदुकुशपर्वताच्या रांगा पसरल्या आहेत. त्यानंतर सर्वांत वरचा मजला चढून जावयास बरीच चढ चढून जावें लागतें. त्यानंतर सर्व जगांत उंच असलेले २०००० फूट उंचीचे काराकोरान पर्वत लागतात.

काश्मीर संस्थानची भौगोलिक दृष्टया सविस्तर रीतीनें माहिती देणें अत्यंत अवघड आहे. कित्येक भाग असे आहेत कीं, त्या ठिकाणीं जाणेंहि अवघड आहे; व खुद्द काश्मीर सरकारनेंहि अद्यापि अशा प्रदेशांचें पूर्ण संशोधन केलें नाहीं. काश्मीर हा डोंगराळ प्रदेश असल्याकारणानें तेथें अनेक पर्वत असून कित्येक पर्वतांचीं शिखरें फारच उंच आहेत. उत्तरेस पर्वताची माळच्या माळ पसरली असून सर्वांत नंगा पर्वत हा एखाद्या भल्या धिप्पाड राक्षसाप्रमाणें उभा राहिला आहे. या पर्वताची उंची २६६५६ फूट आहे, जगांतील पर्वतांमध्यें याचा चौथा नंबर लागतो. पूर्वेस हरमुख नावाचा पर्वत असून त्याची उंची १६९०३ फूट आहे. दक्षिणेस महादेव, ग्वाश बारी (१७८०० फूट) व अमरनाथ (१७३२१) हे पर्वत आहेत. काश्मीर संस्थानातील सर्वांत उंच असें पर्वतशिखर म्हटलें म्हणजे गॉडविन ऑस्टेन हें होय. या शिखराची उंची २८२६५ फूट असून याचा जगांतील पर्वतात दुसरा नंबर लागतो.

न द्या व स रो व रें.—नद्या व सरोवरें यांची काश्मीरमध्यें समृद्धि आहे. किंबहुना, काश्मीर हें निरनिराळ्या लहान मोठया नद्यांचें व सरोवरांचें जाळेंच आहे असें म्हटलें असता वावगें होणार नाहीं. सर्व नद्यांचीं नांवें सांगणें देखील अशक्य होईल. सर्वांत महत्वाच्या नद्या म्हणजे, चिनाब, रावी, झेलम व सिंधु या होत. रावीनदी काश्मीरच्या आग्नेयभागाला चिकटून वहात गेली आहे. चिनाब ही किस्तवार परगण्यांतून वहात जाऊन वळणें घेत, रामबन, उधमपूर, रैसी इत्यादि परगण्यातून पंजाबमध्यें गेली आहे. झेलम नदी व्हेरनागजवळ उगम पावून काश्मीर दरीमधून वहात गेली आहे. व सिंधु ही लडख व गिलजित प्रांतांमधून शेंकडो मैल वहात जाऊन नंतर पंजाबमध्यें गेली आहे. याशिवाय, नुब्रा, शियाक, झंस्कर, सुरू, द्रस, गिलजीत, कृष्णगंगा, सिंध, लिद्दर, पंच, तवी, उझ इत्यादि किरकोळ नद्या आहेत.

नद्यांप्रमाणेंच सरोवरांनाहि काश्मीरमध्यें तोटा नाहीं. हीं सरोवरें निरनिराळ्या आकाराचीं व प्रकाराचीं आहेत. त्यापैकीं सर्वांत मोठीं सरोवरें म्हणजे दल व उलर हीं होत. याशिवाय मंसबल, अंचर, शिवसंगर, कंसनाग, पद्मी, शतपूर इत्यादि छोटीं सरोवरें आहेत. लडखच्या पूर्वेस, पंगकॉंग, पंगूर, सोमोरिरी, हीं मोठालीं खाऱ्या पाण्याचीं सरोवरें आहेत. व्हेरनाग, कोकारनाग, अचबल इत्यादि झरे प्रसिद्ध आहेत. अनंतनाथ हें स्थान तर तेथें असलेल्या अगणित झऱ्यांबद्दल विख्यात आहे. कोकारनाग व चष्मशाही हे झरे उत्कृष्ट पाण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. मलिकनाग नांवाचा झरा गंधकयुक्त पाण्याचा असून त्याचें पाणी बागांना फार मानवतें.

व न स्प ती.—काश्मीरमध्यें पुष्कळ दऱ्या व विपुल पाणी असल्यामुळें त्या ठिकाणीं हरतऱ्हेचीं झाडेंझुडपें आहेत निरनिराळे रंग ज्यापासून तयार करता येतील अशा वनस्पती, पुष्कळ आहेत. अस्टर तहसिलीमध्यें हिंगाचीं झाडें मुबलक आहेत. भूर्जवृक्षाच्या रांगा पसरलेल्या आहेत. भाग वनस्पतीचीहि समृद्धि आहे. सुगंधी वनस्पतींचीहि येथें पैदास होते. निरनिराळ्या प्रकारचीं फळें काश्मीरमध्यें विपुल सापडतात. देवदारु, अक्रोड, तुती इत्यादि झाडांचीं जंगलेंच्या जंगलें आहेत. निरनिराळीं मनोहर कमळेंहि या ठिकाणीं उगवतात.

प क्षी व प्रा णी.—काश्मीरच्या डोंगराळ प्रदेशांत निरनिराळ्या प्रकारचे प्राणी आढळून येतात. हंगळ नावाचे काळवीट, काळीं अस्वलें, कस्तुरीमृग, इत्यादि प्राणी या ठिकाणीं पुष्कळ आढळतात. त्याचप्रमाणें, पाढऱ्या कोंबड्या, कुकण पक्षी, काळे तित्तिरपक्षी, लावीपक्षी, बदकें, कोकिळा, राघू, कावळे इत्यादि अनेक प्रकारचे पक्षी काश्मीरमध्यें सापडतात. सर्पांच्या अनेक जाती येथें असून त्यांत गुण व पेहर या जातीचे सर्प विषारी आहेत.

भू स्त रः--वायव्य व आग्नेय भागांत पर्वतांच्या रांगांना समांतर असे पाषाणांचे थरच्या थर पसरले आहेत. नैर्ऋत्य भागांत तृतीय युगांतलि पाषाणथर उपलब्ध आहेत. झन्स्कर, धौलधर व पीरपंजाल पर्वतांच्या रांगांत, वज्रतुंड, जंबूर इत्यादि दगड सांपडतात. बाल्तिस्तान व लडख या प्रांतांतील पर्वतांच्या रांगांतहि वज्रतुंड दगड सांपडतात. सरप दरींत, खडूच्या दगडाचे थरच्याथर आहेत. श्रीनगरच्या दरींत प्लीस्टोसीन युगांतील पाषाणांचे थर सापडतात.

ह वा मा न व प र्ज न्य.—काश्मीरची दरी पीरपंजाल ओळीच्या योगानें संरक्षित असल्यानें, या दरींमध्यें पर्जन्य नियमित पडत नाहीं. बर्फ वितळल्यामुळें, उन्हाळ्यामध्यें या ठिकाणीं पर्जन्य पडतो. काश्मीर दरीच्या आसपासच्या पर्वतराजींमध्यें आक्टोबर ते मार्च महिन्यांत अतोनात बर्फ पडतें. जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर अर्धा या महिन्यांत काश्मीरमध्यें बराच उन्हाळा असतो. विशेषतः श्रीनगरमध्यें तर उष्णमान ९५° इतकें असतें. जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यांत कडक थंडी पडते.

नै स र्गि क सं क टें.—दुष्काळ, पूर, धरणीकंप, आगी इत्यादि नैसर्गिक संकटें काश्मीरला सोसावीं लागतात. जम्मू प्रांतात दुष्काळाची बाधा वरचेवर होते; पण त्याच्या उलट काश्मीरमध्यें पुरानें पिकांची खराबी फार होते. इ. स. १८९३ १९०३, १९०७, व १९०९ या सालीं मोठा पूर आल्यामुळें पिकें नासून गेलीं. १८९३ च्या पुरामुळें तर झेलमनदीवरील सात पूल वाहून गेले व त्यामुळें अतोनात नुकसान झालें. धरणीकंपहि मधून मधून असतातच. लडख प्रांतांत या धरणीकंपाची नेहमीं बाधा होते. तसेंच काश्मीरमध्येंहि या धरणीकंपाची भेट वरचेवर होते. इ.स. १९१० मध्यें काश्मीरला दोन वेळां धरणीकंपाचे धक्के बसले व १९१३ सालीं तर पांच धक्के बसले.

प्रे क्ष णी य स्थ ळें.—काश्मीरमध्यें प्रेक्षणीय स्थळें पुष्कळच आहेत. काश्मीरला हिंदुस्थानचें 'नंदनवन' असें जें नांव देण्यात येतें तें अगदीं यथार्थ होय. सोनामार्ग, गुलमार्ग, यासारखीं शीतल निवासस्थानें; नंगापर्वत, हरमुख, शंकर, अमरनाथ वगैरेसारखी पंधरा हजार फुटांवर असलेलीं हिमाच्छादित शिखरें; उलर, मानसबल, डाल यासारखीं रमणीय सरोवरें; बानिहल, पीरपंजाल, झोझिला यासारखे नयनरम्य घाट; सुखनाग, नीलनागासारखे मन शांत करणारे झरे, निसर्गरम्य वनराजि अशीं एक ना दोन, हजारों स्थळें काश्मीरमध्यें पहाण्यासारखीं आहेत व तीं सर्व पहाण्याला निदान सहा महिने तरी लागतील. सर्व काश्मीरच एकजात पहाण्यासारखें आहे. पण त्यातल्या त्यात कांहीं प्रेक्षणीय स्थळें विशेष पहाण्यासारखीं असल्याकारणानें त्यांचा थोडक्यात परिचय करून देणें अत्यंत जरूर आहे.

श्रीनगरमध्यें व त्याच्या आसपास अनेक बाग पहाण्यासारखे आहेत. त्यापैकीं शालीमार, निषात व चष्मशाही ऊर्फ बादशाही बाग हे विशेष प्रसिद्ध आहेत. शालीमार बाग प्रचंड असून त्याची लांबी ५९० यार्ड व रुंदी २६० यार्ड आहे. याचे एकावर एक असे चार टप्पे आहेत. बागेच्या मधोमध प्रत्येक टप्प्यात एकेक तलाव असून हे तलाव पाटानें जोडलेले आहेत. चवथ्या मजल्यावर एक सुंदर ६५ फूट लांब व रुंद असा चवुतरा असून त्यावर दगडी मंडप उभारला आहे. याचे खांब काळ्या संगमरवरी दगडाचे असून त्यावर सुबक नक्षीकाम केलेलें आहे. या बागेसभोंवार पाण्याची पुष्करणी असून त्यांत १४० कारंजीं आहेत. ही बाग १६१९ सालीं जहांगीर बादशहानें बांधविली.

निषातबाग ही डाल तलावाच्या अगदीं नजीक असल्यामुळें, येथील देखावा फारच रमणीय आहे. या बागेला सात टप्पे असून या बागेची लांबी ५९५ यार्ड व रुंदी ३६० यार्ड आहे. ही बाग नूरजहानचा भाऊ असफशहा यानें बांधविली. चष्मशाही बागहि याच धर्तीची असून तींतील झऱ्यातील पाण्यासारखें पाचक पाणी सर्व जगांत नाहीं असें म्हणतात.

श्रीनगरच्या उत्तरेस ११ मैलांवर हारवान नावाचा एक तलाव आहे. या तलावाच्या तीन बाजूंना प्रचंड पर्वत आहेत. या पर्वतांवरील बर्फाचें वितळलेलें पाणी या तलावांत सांठतें. येथील देखावा फारच सुंदर आहे. या ठिकाणीं अनेक प्रकारच्या गुलाबांच्या रांगांच्या रांगा असलेल्या दृष्टीस पडतात. श्रीनगरमध्यें जुम्मामशीद ही फार प्रेक्षणीय आहे. ही मशीद शिकंदर लोदीनें १४०४ सालीं बांधली. ही मशीद तनिदां अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडली पण ही मशीद पुन्हां दुरस्त करण्यांत आली. ही सर्व मशीद लांकडी आहे.

काश्मीर.

शंकराचार्यांचें देऊळ.

बर्फाच्छादित मार काळ्याचा देखावा, श्रीनगर.

काश्मीर

काश्मीरच्या महाराजाचा वाडा.

किल्ल्याचा देखावा, श्रीनगर.

व त्यावरील नक्षीकाम फारच सुंदर केलेलें आहे. श्रीनगरच्या ईशान्येस शंकरपर्वत असून त्या पर्वतावर शंकराचें देऊळ आहे. हें देऊळ विशेष मोठें नसलें तरी त्याचें काम फार सुबक आहे. या देवळांत शंकराची पिंडी असून ती काळ्या दगडाची व कमरेइतकी उंच आहे. या ठिकाणचा देखावा फारच रमणीय आहे. हें देऊळ अशोकाचा पुत्र जलौक यानें ख्रिस्तपूर्व २० सालीं बांधलें असें म्हणतात. शंकरपर्वताच्या बाजूनें दक्षिणेस उतरून बरेंच लांब चालून गेल्यावर पनरतन नावाचें देवालय आहे. हें अति जुनें पुराणें देवालय असून, हें हिरवट–निळसर रंगाच्या दगडांनीं बांधलेलें आहे. देवळाच्या चारहि बाजूंना कमानीचे दरवाजे असून देवळावर जिकडे तिकडे घडीव मूर्ती आहेत. या मूर्तींकडे पाहिल्यावर त्या मूर्ती मोठ्या कौशल्यानें घडविलेल्या आहेत हें चटकन ध्यानात येतें. हें देऊळ पार्थ नावाच्या काश्मीरच्या राजाच्या कारकीर्दीत त्याचा प्रधान मेरु यानें ९१२–९२१ च्या दरम्यान बांधलें असें म्हणतात. श्रीनगर येथील अजबखानाहि पहाण्यासारखा आहे. या अजबखान्यात जुनीं नाणीं, हत्यारें, जुन्या मूर्ती व शिल्पकलेचे नमुने पहावयाला मिळतात. काश्मीरसंस्थानातील उत्कृष्ट शालींचे नमुने या ठिकाणीं दृष्टीस पडतात.

अवंतिपूर नावाच्या गावांत बराचशा जुन्यापुराण्या इमारती होत्या; पण त्या सर्व काळाच्या ओघात लुप्तप्राय झाल्या आहेत. अद्यापिहि अवंतीश्वर व अवंतिस्वामी या देवाचीं देवळें मोडक्यातोडक्या स्थितींत शिल्लक आहेत. हीं दोन्हीं देवळें हिरवट काळसर दगडाचीं असून देवळाच्या मुख्य दरवाजावर सुबक नक्षीचें काम केलेलें दृष्टीस पडतें. या देवळावरून एक वेळ काश्मीर हें मूर्तिकलेच्या व शिल्पकलेच्या बाबतींत किती पुढें होतें हें दिसून येतें.

वितस्ता उर्फ झेलम नदीच्या उगमापाशीं व्हरनाग नावाचा एक झरा आहे. या झऱ्याच्या आसपासचा प्रदेश फारच प्रेक्षणीय आहे. या ठिकाणीं जहांगीर बादशहानें एक सुंदर बाग बांधविली. या बागेंत अष्टकोनी पुष्करिणी असून या पुष्करिणींत एक झरा आणून सोडलेला आहे. या पुष्करिणीभोंवती अष्टकोनाकृति इमारत असून, त्या इमारतीवर दोन फारसी भाषेंतील शिलालेख आहेत.

या झेलमच्या दरींत एका लहानशा उंचवट्याच्या टेंकडीच्या पायथ्याशीं मार्तंड देवाचें भव्य देवालय आहे. या देवालयाचें प्रवेशद्वार प्रचंड असून, त्यावरील नक्षीचें काम अवर्णनीय आहे. सात आठ फूट उंचीचे एकसंधी दगड दरवाजाला लावलेले आहेत. प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर एक मोठें चौकोनी पटांगण असून त्याच्या मध्यभागीं सूर्य देवतेचें देऊळ आहे. या पटांगणासभोंवतीं कमानदार दरवाजाच्या ओळी बांधल्या आहेत. देवळाच्या बाहेरच्या चौकाला दर्शनीखांब व कमानी यांची रांगच्या रांग आहे. हें देऊळ ललितादित्य नांवाच्या राजानें बांधलें असें म्हणतात. वास्तुकलेचा व मूर्तिकलेचा एक उत्कृष्ट मासला म्हणून हें देवालय प्रसिद्ध आहे व या शास्त्रांतील तज्ज्ञ गृहस्थांनीं या देवालयाची फारच तारीफ केली आहे.

झेलम नदीला सात पूल असून ते दृष्टिपथात चालण्यासारखे आहेत. यापैकीं तिसऱ्या व चौथ्या पुलाच्या दरम्यान शहामहादन नावाची लाकडी प्रचंड इमारत आहे. ही ज्या साधूनें काश्मीरमध्यें मुसुलमानी धर्माचा प्रसार केला त्या साधूच्या स्मरणार्थ बांधलेली आहे. याच्या समोर व नूरजहाननें बांधलेली मोठी दगडी मशीद आहे. चवथ्या पुलाच्या खालीं महाश्री नावाचें पाचमजली देवालय आहे. सहाव्या पुलाच्या नजीक स्कंदभवन नावाचें जीर्ण देवालय आहे. सातव्या पुलाच्या खालीं दूधगंगा व झेलम नदीचा संगम असून त्याठिकाणीं क्षेमगौरीश्वर नावाचें एक देवालय आहे.

याशिवाय, अनंतनाग, अच्छाबल, चिनारबाग इत्यादि कित्येक स्थळें व कितीतरी रम्य देखावे काश्मीरमध्यें पहाण्यास सापडतात. सृष्टिदेवतेनें आपलें सर्व कौशल्य खर्च करून काश्मीर देश निर्माण केला आहे कीं काय असें मनाला वाटल्यावाचून रहात नाहीं. व मोठमोठ्या चिप्पाड व अजस्र पर्वतांचीं बर्फानें श्वेत बनलेलीं शिखरें, प्रचंड दऱ्या, भयंकर घाट वगैरेंचें अवलोकन केलें असता, परमेश्वरी कर्तृत्वाची अंधुक कल्पना का होईना, मनाला पटल्यावाचून रहात नाहीं.

का श्मी र म धी ल लो क.––काश्मीर संस्थानचें क्षेत्रफळ ८४,४३२ चौरस मैल आहे. हिंदुस्थानातील इतर कोणत्याहि संस्थानापेक्षा काश्मीरचें क्षेत्रफळ अधिक आहे. १९११ सालीं केलेल्या खानेसुमारींत काश्मीर संस्थानची लोकसंख्या ३१,५८,१२६ इतकी भरली. त्यापैकीं १६,७४,३६७ पुरुष व १४,८३,७५९ स्त्रिया होत्या. १९०१ च्या लोकसंख्येच्या मानानें १९११ मधील लोकसंख्या जवळजवळ शेकडा ९ या प्रमाणात वाढली. प्रांतवार खानेसुमारी पुढीलप्रमाणें आहे. जम्मू प्रांत १५,९७,८६५; काश्मीर प्रांत १२,९५,२०१; सरहद्दीवराल प्रांत २,६५,०६०. जिल्हेवार खानेसुमारींत दक्षिणकाश्मीरचा नंबर पहिला लागतो. त्याची लोकसंख्या ६,३९,२१० असून, उत्तर काश्मीर ४,२०,७८६, जम्मू ३,२६,६९१ मिरपूर ३,२४,९२३ गिलजित २३,५५९ अशी आहे. सर्व तहशिलींत उत्तर मच्छिपुर तहशीलीची लोकसंख्या मोठी आहे (२,००,६०९). काश्मीर संस्थानात मोठीं शहरे अशीं दोनच आहेत. एक श्रीनगर (लो.सं.१२६४४०) व दुसरें जम्मू (लो.सं. ३१७२६). बाकी शहरें लहान लहान आहेत. अशा लहान शहराची संख्या ५९ आहे. त्यापैकीं सात शहरें ५००० वर वस्तीचीं आहेत; वीस शहरें २–५ हजार लोकसंख्येचीं आहेत. तीस ५०० ते १००० इतक्या लोकसंख्येचीं आहेत. काश्मीर हा कृषिप्रधान देश असल्याकारणानें त्यामध्यें खेड्यांची संख्या फार आहे. १९११ च्या खानेसुमारींत काश्मीरमध्यें ८८६५ इतकीं खेडीं होतीं. काश्मीरचा प्रदेश डोंगराळ असल्यानें सपाट व शेतीला उपयोगी अशी

जमीन एकसारखी आढळून येत नाहीं. त्यामुळें ज्या ज्या ठिकाणीं शेतीला उपयुक्त अशी जमीन असेल त्या त्या ठिकाणीं चार पांच खोपटया अशा तऱ्हेनें या खेडेगांवांची स्थिति असते.

काश्मीरमधून बाहेर वस्ती करण्यास जाणाऱ्या लोकांची संख्या फार आहे. जुलमी राजांच्या जुलुमाला कंटाळून, काश्मीरमध्यें जन्मलेले कित्येक लोक बाहेर जात असत. पण शांतता प्रस्थापित झाल्यापासून हा ओघ थांबत चालला आहे. बाहेर गेलेले लोक परत येत चालले आहेत. तरी पण अद्यापिहि बाहेर जाणारे लोक बरेच आहेत. १९०१ सालीं काश्मीरमधून ८६,१५७ लोक बाहेर गेले तर १९११ सालीं ८१,९४८ लोक बाहेर गेले. १९०१ सालीं ८५,५९७ लोक काश्मीरमध्यें रहाण्यास आले तर १९११ सालीं ७३,२७५ लोक आले.

ध र्म, जा ती व पं थ.—काश्मीर संस्थानांत मुख्यतः हिंदू, बौद्ध, इस्लाम हे धर्म प्रचलित आहेत. फारशी व ख्रिश्चन या धर्मांचे विशेष विचारात घेण्याजोगें प्राबल्य नाहीं. या तीन धर्मांच्या दृष्टीनें काश्मीरातील लोकसंख्येचें वर्गीकरण केलें असता असें आढळून येतें कीं हिंदु (शीख धरून) ७,२१,९४३, मुसुलमान २३,९८,३२०, बौद्ध ३६,५१२ अशी लोकसंख्येची वर्गवारी होती. त्याशिवाय जैन लोकाची संख्या ३४५, पारशी ३१, ख्रिस्ती ९७१ अशी होती. हिंदुधर्मांतील पोटभेद, ब्राह्मणी, आर्य, शीख असे पाडले असता, ब्राह्मणधर्मीयाची संख्या ६,८९,३४२, आर्यांची १०४७ व शीखाची ३१५५३ इतकी होती. ब्राह्मोपंथाचा एकच माणूस आढळून आला. अशा रीतीनें, काश्मीरमध्यें शेकडा ७६ मुसलमान, व २२ हिंदु हें प्रमाण पडतें.

जा ती.—जातीसंबंधानें समग्र विवेचन करता येणें शक्य नाहीं. तरी पण हिंदूंमध्ये जातिभेदाचें अतिशय महत्व असल्याकारणानें त्यासंबंधानें थोडें विवेचन करणें जरूर आहे. काश्मीर संस्थानचे जम्मू, काश्मीर, व सरहद्दीवरील प्रांत असे तीन भाग पडतात; व त्या प्रांतास अनुसरून जातींचे विवेचन केल्यास सोईचें होईल. यासाठीं तशा रीतीनें विवेचन करीत आहों.

जम्मू.—जम्मू प्रांताचे, दुगर, चिभल, पूर्व पर्वतप्रदेश व पश्चिम पर्वतप्रदेश असे चार पोटभेद आहेत. जम्मू प्रांतामध्यें जे हिंदू आहेत त्यांमध्यें, मुख्यतः ब्राह्मण, रजपूत, खत्री व ठक्कर अशा चार जाती आहेत. या जातींच्या उपजाती पुष्कळच आहेत. डोम, गुजर, जाट, डोग्रा, इत्यादि प्रमुख पोटजाती आहेत. चिभल इलाख्यात चिभ नांवाची एक रजपुताची पोटजात आहे. ही जातच्या जात बाटून मुसलमान झालेली आहे. तरी पण तिच्यामध्यें अद्यापिहि जातिभेदाचें बरेंच प्रस्थ आढळून येतें. विवाहविषयक निर्बंध याच्यामध्यें पुष्कळच आढळून येतात. पूर्व टेंकडीवरील मुलखात ब्राह्मणधर्माचा व्हावा तितका प्रसार न झाल्यानें तेथील लोकांनां धर्मनिर्बंधाचें नांव देखील ठाऊक नाहीं असें म्हटलें तरी चालेल. या लोकांमध्यें देखील ब्राह्मण, रजपूत, क्षत्रिय इत्यादि जाती आहेत. पण काश्मीर अगर जम्मूच्या इतर भागांतील लोक यांनां कमी लेखून यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार करीत नाहींत. अगदीं खालच्या जातींत मेघ नावांची एक जात असून ती शरीराच्या ठेवणीवरून आर्यन वंशाची दिसते. येथील बटवल नांवाची एक जात मात्र अनार्य असावी असें आढळून आलें आहे. पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशात रहाणाऱ्या लोकात मुसुलमान झालेले लोक फार आहेत. तरी पण त्याच्यांतहि हिंदू चालीरीती आढळून येतात. यात भट्टी, बुधान, धुंड, डोमल इत्यादि जाती मूळच्या रजपूत असून बाटलेल्या दिसतात. यांशिवाय बंब व खख यांहि पोटजाती मूळच्या रजपूतच आहेत. खोजा, मोची, इत्यादि जाती मात्र मुसुलमान आढळतात.

काश्मीर.—ज्या ज्या परकीय लोकांच्या स्वाऱ्या काश्मीरावर झाल्या, त्या त्या लोकांचे वंशज काश्मीरमधील अनेक जातींच्या लोकामध्यें आढळतात, तरी त्या सर्वांचा येथें उल्लेख करणें शक्य नाहीं. काश्मीरमध्यें मुख्यतः दोन भेद दृष्टीस पडतात. एक काश्मीरी ब्राह्मणांचा व दुसरा काश्मीरी मुसुलमानाचा; काश्मीरी मुसुलमानांमध्यें शेख, सय्यद, मोगल व अफगाण अशा चार मुख्य जाती आहेत. याशिवाय आणखी डोम, गलवान, वाटल, भंड, डंगर, उर, मल, इत्यादि अनेक पोटजाती आहेत. मुसुलमानाची सत्ता काश्मीरावर पसरण्यापूर्वी या सर्व जाती ब्राह्मणच होत्या असें दिसतें. काश्मीरी ब्राह्मणाचे ज्योतिषी, गुरू व कारकून हे उपवर्ग आहेत.

स र ह द्दी व री ल प्रां त.—लदख प्रांतात बुद्धांचा भरणा फार आहे. धंद्यावरून या बुद्धांच्या, अनेक जाती आहेत. रिगझंग, मंग्रिक व रिमेन या तीन मुख्य जाती असून त्याचे अनेक पोटभेद आहेत. लदख येथील मुसुलमानामध्यें तरकछोस, मघमी व कामिन या जाती आहेत. गिलजित प्रांतांत मुसुलमान झालेल्या बौद्धाचाच भरणा अधिक आहे. या मुसुलमानाच्या या प्रांतांत शिन व यस्कन या दोन मुख्य जाती आहेत.

पं थ.—काश्मीरमधील हिंदुधर्मीयामध्यें कोणाच्या मतें शैव, वैष्णव व शाक्त असे तीन, तर कोणाच्या मतें ईश्वर, शैव, वैष्णव, शाक्त व गाणपत्य असे पाच पंथ आहेत. पण सर्वांत मुख्य पंथ म्हणजे शैव पंथ होय. काश्मीरी पंडित हे एकजात शैव असून जम्मूमधील बहुतेक हिंदु लोक शैवच आहेत. इतर पंथाचे लोक देखील थोडे फार आहेत, पण शैवांमध्यें व त्यांच्यामध्यें वैरभाव वगैरे आढळून येत नाहीं.

बौद्ध लोकांमध्यें लामांचा धर्म प्रचलित आहे. या लामांचेहि दोन पंथ आहेत. एक रक्तवस्त्री लामांचा पंथ व दुसरा पीतवस्त्री लामांचा पंथ. यांतला पहिला पंथ हा मूळचा पंथ असून पीतवस्त्री पंथ हा त्यानंतरचा आहे.

काश्मीर संस्थानांत रक्तवस्त्री पंथाचाच प्रसार अधिक आढळतो.

मुसुलमानाचे शिया व सुनी असे मुख्य दोन पंथ आहेत. पण काश्मीर संस्थानमध्यें उपपंथहि पुष्कळच आहेत. (१) वहाबी पंथ.—लदख प्रांतांत याचा प्रसार बराच असून जम्मू प्रांतांत या प्रांतांतलि लोक थोडे आहेत. महंमद हा अद्यापि जिवंत आहे हें तत्व या पंथाला मान्य नाहीं (२) अहमदीः—या पंथाचा गुरु मिरझा गुलाम अहमद हा असून, हा शेवटचा इमाम होय व निकालाच्या शेवटच्या दिवशीं याचा अवतार होणार अशी मुसुलमानांची समजूत आहे. या पंथाचा प्रसार काश्मीरमध्यें फारच थोड्या ठिकाणीं झाला आहे. (३) नूरबक्षीः—या पंथाचा संस्थापक सय्यद नूरबक्षी खुरासानी हा होय. या पंथाचे लोक लदख प्रांतांत विशेष आढळतात. पण या पंथाच्या अनुयायांची संख्या हळुहळू कमी होत चालली आहे, व यांतील बरेच लोक वहाबी पंथाचें अनुयायित्व पत्करूं लागले आहेत. (४) मौलवीः—हे सर आगाखानाचे अनुयायी आहेत. या पंथाचा मूळ पुरुष हजरत इस्मायल होय. (५) नक्षबंदीः—या पंथाचा संस्थापक सय्यद जमत अली शाह असून अद्यापि हा जिवंत आहे. या पंथाचीं तत्वें वहाबी पंथाच्या अगदीं विरुद्ध आहेत.

शि क्ष ण.—शिक्षणाच्या बाबतींत मात्र काश्मीर संस्थान अगदीं मागसलेलें आहे. एकंदर३१,०३,५०१ लोकसंख्येपैकीं ६३,२५१पुरुष व १६८०स्त्रिया मिळून६८,२३६ इतकी संख्या शिकलेल्यांची आहे. म्हणजे शेकडा २ हें प्रमाण पडत असून ते अगदींच कमी आहे यांत शंका नाहीं. यात पंजाब अगर इतर प्रांत यांच्यामधून नोकरीकरता आलेल्या लोकांचीच संख्या पुष्कळ आहे. खुद्द काश्मीरमधील लोकांत, काश्मीरी पंडिताचाच वर्ग काय तो सुशिक्षित दिसतो. लदख येथील बौद्धधर्मीय लोकांत काहीं लोकानां तात्पुरतें तिबेटी लिहिता बोलता येतें. बाकी सर्व काश्मीर संस्थान शिक्षणाच्या दृष्टीनें पूर्ण अंधारांतच आहे असें म्हटलें असतां हरकत नाहीं. मुसुलमान लोकांत मुलांशिवाय ज्याना लिहिता वाचतां येतें अशाची संख्या फारच कमी आहे. मातृभाषेचें ज्ञान ज्यांना आहे अशाचे वरील आंकडे पाहिले कीं, मग इंग्लिश जाणणारे लोक किती थोडे असतील हें सांगण्यास नकोच. शिक्षणाच्या बाबतींत काश्मीर सरकारानें थोडें अधिक लक्ष्य देण्यास सुरवात केली आहे हें स्तुत्य आहे. १९०१ सालीं काश्मीरमध्यें एकंदर २८७ शाळा होत्या, त्या १९११ मध्यें ३७९ पर्यंत वाढल्या आहेत. त्यांपैकीं कॉलेजें २, हायस्कुलें८, नॉर्मलस्कूल१,मिडलस्कुलें २७, प्राथमिक शिक्षणाच्या शाळा १९७, बायकाच्या शाळा ९ व खासगी शाळा १३५ आहेत. अशा रीतीनें १९०१ पेक्षा १९११ मध्यें शिक्षणसंस्थांची वाढ बरीच समाधानकारक झाली यांत शंका नाहीं; पण प्राथमिक शिक्षण काश्मीर सरकारनें मोफत व सक्तीचें केल्यास फार कायदेशीर होण्याचा संभव आहे. शिक्षणसंस्थांची प्रांतवार विभागणी केल्यास जम्मूमध्यें १६५, काश्मीरमध्यें १८५ व सरहद्दीवरील प्रांतांत २९ इतक्या शिक्षणसंस्था आहेत.

इतर शैक्षणिक चळवळींकडे लक्ष्य दिलें असतां हाच शोचनीय प्रकार आढळून येतो. काश्मीर संस्थानांत एकंदरींत ८ छापखाने आहेत. त्यांपैकीं जम्मूमध्यें चार, काश्मीरमध्यें तीन व सरहद्दीवरील प्रांतात एक आहे. या छापखान्यांत नाव घेण्याजोगा छापखाना म्हणजे जम्मू येथील सरकारी छापखाना होय. पण या छापखान्यात सरकारी कामाशिवाय इतर खासगी छपाईकाम क्वचितच केलें जातें. 'काश्मीर स्टेट गॅझेट' हें एकच नियतकालिक असून त्याचा खप ३७५ आहे. १९०१–११ या कालात १० उर्दू व १ इंग्लिश एवढींच पुस्तकें काश्मीरमध्यें प्रसिद्ध झालीं.

प्र च लि त भा षा.—'दर बारा कोसांवर भाषा बदलते' असें म्हणतात व याचा अनुभव हिंदुस्थानांतील इतर भागाप्रमाणेंच काश्मीरमध्येंहि आढळून येतो. काश्मीरमध्यें अनेक प्रकारच्या भाषा प्रचलित आहेत. काश्मीरमध्यें बाहेरून आलेले लोक आपापल्या भाषा बोलतात; त्या सोडून दिल्या तरी खुद्द काश्मीरच्या अशा भाषा दहा बारा आहेत व त्यांचेहि पोटभेद पुष्कळ आहेत. काश्मिरी, पहाडी व डोग्री या भाषा बोलणारे लोक पुष्कळ आहेत. काश्मिरी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ११,६५,००० असून पहाडी व डोग्री बोलणाऱ्यांची संख्या अनुक्रमें ५,८४,००० व ५,१७,००० आहे. त्याशिवाय. गुजरी, पंजाबी बाल्टि, पोथबारी, चिमलि, लदखी, शिन या भाषाहि प्रचलित आहेत. ल्हासी, नारकंदी, चंबा, कांग्रा, मंडी, दर्दी या भाषाचाहि प्रसार थोड्या ठिकाणीं आढळतो. यूरोपीय भाषात इंग्लिश भाषेचाच प्रसार अधिक आहे. राजभाषा उर्दू असल्यामुळें त्या भाषेचें ज्ञान असणाऱ्या प्रवाशाला काश्मीरमध्ये कोणत्याहि ठिकाणीं सहज जाता येतें. पण त्यांतल्यात्यांत पहाडी भाषा ही डोंगराळ प्रदेशात विशेष प्रचलित आहे. झेलमच्या दरींत काश्मीरी व सिंधु नदीच्या दरींत तिबेटी या भाषा रूढ झाल्या आहेत. पंजाबीचाहि प्रसार बराच आढळून येतो. महाराजा रणवीरसिंह यांनीं आपल्या कारकीर्दींत डोंगरी ही दप्तरी भाषा करण्याचा प्रयत्न केला होता पण तो सिद्धीस गेला नाहीं.

लि पि.—काश्मीरमध्यें ६१७ लिपी प्रचारात आहेत. त्या म्हणजे उर्दू, फारशी, अरबी, डोग्री, हिंदी, बोधि, गुरुमुखी या होत. उर्दू ही दरबारभाषा असल्यामुळें व शाळेंत ऐच्छिक भाषा म्हणून तिचा प्रवेश असल्याने तिचा प्रसार लेखनाच्या कामीं फार होतो. काश्मिरी भाषा पूर्वी शारदा लिपींत लिहिली जात असे पण ती हल्लीं फारसी लिपींतून लिहिली जाते. बोधि लिपी ही तिबेटियन लिपीचा एक

प्रकार आहे व लदख येथील बौद्ध ही लिपी प्रचारांत अणतात. डोग्रा जातीचे हिंदू लोक डोग्री लिपी सामान्यतः वापरतात व जम्मू प्रांतांत गुरुमुखीचा प्रसार आढळून येतो. या निरनिराळ्या भाषांमध्यें फारच थोडें वाङ्मय आढळून येतें. महाराजा रणवीरसिंहाच्या कारकीर्दीत डोग्री भाषेत जीं काय सरकारी पुस्तकें प्रसिद्ध झालीं तेवढीच. त्यांशिवाय डोग्री भाषेंत व डोग्री लिपींत लिहिलेलीं अशीं पुस्तकें फारच थोडीं आहेत. बौद्ध लामांनीं बोधि भाषेंत जेवढीं कांहीं धर्मविषयक पुस्तकें लिहिलीं असतील तेवढींच. त्यांपलीकडे या भाषेंत दुसरें वाङ्मय आढळत नाहीं. उर्दू भाषेंत मात्र बरींच पुस्तकें आढळून येतात. काश्मीरी भाषा ज्यावेळीं शारदा लिपींत लिहिली जात असे त्यावेळीं काश्मीरी भाषेंत थोडे फार धार्मिक व इतर स्वरूपाचें वाङ्मय तयार झालें असेल पण त्यापलीकडे हल्लीं त्या भाषेंतील वाङ्मय विशेषसें आढळत नाहीं. पण त्या भाषेंत वाङ्मय निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत काश्मीरी भाषेसंबंधाची विशेष माहिती 'काश्मीरी भाषा' या लेखांत दिलेली आहे. काश्मीरमधील लोक जात्याच शिक्षणाच्या बाबतींत मागसलेले असल्यानें वाङ्मयाची गोडी त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेली नाहीं व त्यामुळें काश्मीरमध्यें वाङ्मयाचें दुर्भिक्ष आढळून येतें. कांहीं सुशिक्षित लोक, ज्यांनां पुस्तकांची व वाङ्मयाची हौस असेल ते पंजाबमधून उर्दू वर्तमानपत्रें व पुस्तकें विकत आणून तीं वाचतात.

सा मा जि क चा ली री ति.—सामाजिक चालीरीतींमध्यें, विवाहपद्धतीचा नंबर पहिला लागतो. तेव्हां त्यासंबंधीं प्रथमतः विचार करणें जरूर आहे. हिंदुस्थानामध्यें सर्वसाधारण जे विवाहविषयक निर्बंध दृष्टोस पडतात त्याची छटा काश्मीरच्या बाबतींतहि आढळून येते. विवाहविधीच्या बाबतींतहि काश्मीर व हिंदुस्थानचा इतर भाग यामध्यें पुष्कळच साम्य आहे. तरी पण देशाच्या विशिष्ट रचनेमुळें थोडे फार फरकहि आढळून येत नाहींत असें नाहीं. विवाहसंस्थेचा इतिहास पाहिल्यास आपल्याला असें आढळून येतें कीं, समाज बाल्यावस्थेंत असतांना विवाहविषयक निर्बंध कडक रीतीनें पाळले जात नाहींत. पण ज्या ज्या मानानें समाजाची सुधारणा होत जाते त्या त्या मानानें विवाहाना एकप्रकारची नियमबद्धता प्राप्त होते. अशा प्रकारची नियमबद्धता प्राप्त होण्यापूर्वी विवाहसंस्थांनां कांहीं अवस्थांमधून संक्रमण करावें लागतें. अशा अवस्था म्हणजे बहुपतित्वाची चाल,बहुपत्नीत्वाची चाल व एकपत्नीत्वाची चाल या होत.या सर्वेहि अवस्था काश्मीरमध्यें अद्यापीहि आढळून येतात. उदाहरणार्थ, किस्तावर परगण्यांतील कांहीं डोंगराळ जातींत लग्न होण्याच्या अगोदरच एखाद्या कुमारीला जर मूल झालें तर तें मूल अनौरस ठरत नाहीं. लदख तालुक्यांतील व पदर इलाख्यांतील बौद्ध लोकांत बहुपतीत्वाची चाल अद्यापीहि आढळते. एखाद्या कुटुंबांतील चारपांच भावांनां मिळून एकच बायको असते. या सर्वांपासून त्या बायकोला जी संतति होईल ती थोरल्या भावाची समजली जाते. या चालीच्या अस्तित्वाचें एक कारण म्हणजे या प्रांतांत उपजीविकेचीं साधनें फार कमी असल्यामुळें, प्रत्येकानें स्वतंत्र बायको करून प्रजोत्पत्ति केल्यास त्यांनां खाण्यास पुरेसें अन्न मिळत नाहीं हें होय. एखाद्या घरांत एकच पुरुष असला तर तो एखाद्या पाहुण्याला आपल्या घरीं बोलावून त्याला भावासारखा मानतो व ते दोघेहि मिळून एकाच स्त्रीचा उपभोग घेतात. अर्थात या बहुपतित्वाचा परिणाम स्त्रिया धीट व निर्लज्ज होण्यांत होतो. या बौद्ध लोकांतील स्त्रिया एखाद्या मुसुलमानावर त्यांचें प्रेम बसल्यास राजरोसपणें त्या धर्मांत जाऊन त्याच्याबरोबर लग्न लावतात. तरी पण अलीकडे या बौद्धामध्यें एकपत्नीत्वाची व एकभर्तृत्वाची चाल हळू हळू रूढ होत चालल्याचें दिसतें. तसेंच लग्नानंतर एखाद्या स्त्रीचें दुसऱ्यावर प्रेम जडल्यास ती त्याच्याबरोबर लग्न करते व नूतन पति हा पूर्वीच्या नवऱ्याला कांहीं रक्कम नुकसानभरपाई म्हणून देतो. ही चाल जम्मू प्रांतांतील ठक्कर, मेघ, चमियार, या खालच्या जातींत आढळून येते.

काश्मीरमध्यें मुसुलमानाची लोकसंख्या अधिक असल्यानें येथें बहुपत्नीत्वाची चाल अतिशय रूढ असावी असें सकृद्दर्शनी वाटतें; पण तसा प्रकार विशेष आढळून येत नाहीं. याचें कारण येथील शेतकरी वर्ग फार गरीब असतो. दोन तीन बायकांचा सांभाळ करणें त्याला जड जातें. अर्थात विशेष अडचणींशिवाय येथील लोक एकाहून अधिक बायका करून घेत नाहीं. एखादी बायको वांझ असेल, अगर एखादीला जात्याच शरीरात व्यंग असेल तर मात्र दुसरी बायको करण्याची चाल आढळते. उच्च जातींत मात्र ही चाल प्रायः आढळते. सवर्णविवाह, असपिण्डविवाह इत्यादि निर्बंध काश्मीरी पंडीत अगर वरिष्ठ वर्णाचे लोक पाळतात. खालच्या वर्गांत हें बंधन पाळलें जात नाहीं. काश्मीरी मुसुलमानांमध्यें हीं बंधनें अजीबातच पाळलीं जात नाहींत. गिलजितमध्यें सजातीय विवाह होतात. मामेबहिण अगर चुलतबहिण यांच्याशीं विवाह करण्याची जी पद्धत आहे ती गिलजितमधील मुसुलमानांत विशेष रूढ आहे.

हिंदुधर्मशास्त्रांत आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत. तशाच स्वरूपाचे विवाह, थोड्या फार फरकानें इतर देशांतहि कोणत्या ना कोणत्या काळीं प्रचलित असत. पण त्याशिवाय प्रत्येक देशाच्या कांहीं विशिष्ट पद्धती म्हणून असतातच. काश्मीरमध्येंहि अशा कांहीं पद्धती आढळून येतात. जम्मूमध्यें अशी चाल आढळते कीं एखाद्या मनुष्यानें आपल्या मुलाचें लग्न एखाद्याच्या मुलीशीं ठरविलें असेल तर त्या मनुष्यानें आपली मुलगी मुलीच्या भावाला दिली पाहिजे. याला दानप्रतिग्रहपद्धति असें म्हणतात.

एखाद्याला फक्त मुलगा असला व मुलगी नसली तर दुसऱ्याची मुलगी विकत घ्यावी लागते अगर मुलगी नसल्याबद्दल आपल्या व्याह्याला पैशानें भरपाई करावी लागते. लदखमधील मुसुलमानांतहि ही पद्धत आढळून येते. रामपूर जिल्ह्यांतील मेघ, ठक्कर, डोम वगैरे जातींत भावी नवऱ्याला आपल्या सासऱ्याच्या घरीं मोफत चाकरी करावी लागते. या परिचर्येच्या अवधींत आपल्या भावी पत्नीशीं त्यानें प्रणयचेष्टा केल्या तरी त्यांनां बंदी करण्यांत येत नाहीं. उलट ती चांगलीच गोष्ट मानतात. हीच चाल या जेल्ह्यांतील पहाडी व जाट लोकांत व भदरवह येथील मेघ व गद्दी या लोकांत आढळते. पुढें होणाऱ्या मुलींचें लग्न ठरवून ठेवण्याचीहि चाल क्वचित् आढळून येते. कृत्रिम विवाहाची एक चाल यांच्यांत आढळते. मुलीचें लग्न एका झाडाशीं अगोदर लावून नंतर तिचें नेहमींप्रमाणें लग्न करण्यांत येतें. पण हीच चाल विधवांच्या बाबतींतहि कांहीं ठिकाणीं आढळते. एखाद्याच्या दोन बायका लागोपाठ मेल्या तर तिसरा विवाह अशुभ मानला जात असल्यानें तो करण्यापूर्वी तो अक (अर्क) अगर मदर (मांदार) नांवाच्या झाडाशीं विवाह लावतो व नंतर चौथा विवाह म्हणून (खरा विवाह तिसराच) एखाद्या मुलीशीं लग्न होतें. सुमारें तीस चाळीस वर्षांपूर्वी जम्मूप्रातांतील रैसी, रामनगर, बसोली, किस्टवर, भदरवह इत्यादि ठिकाणीं मुलींचा व्यापार करण्याची चाल फार प्रचारात होती. या ठिकाणच्या चांगल्या चांगल्या मुली, पंजाब, सिंध या ठिकाणीं नेऊन विकावयाच्या व नंतर त्या मुलींनी एकदोन वर्षे आपल्या नवऱ्याच्या घरीं राहून पळून परत आपल्या मालकाकडे यावयाचें अशी पद्धत होती. पण हल्लीं त्या पद्धतीला आळा घालण्याचे प्रयत्न काश्मीर सरकार करीत आहे.

बौद्ध व मुसुलमान लोकांत व बाल्तिस्तानच्या लोकांत घटस्फोटाची चाल सरसहा आढळून येते. नवराबायकोनीं एक फडकें दोघांमध्यें धरून तें दोघांनीं ओढून फाडण्याची चाल आहे; व त्या योगानें नवरा व बायको यांचे परस्परांचें नातें नाहींसें होतें. बायकोच्या अपराधामुळें हा घटस्फोट घडून आला असेल तर त्याबद्दल बायकोनें नवऱ्याला भरपाईदाखल, एक घोडा अगर २० रुपये द्यावयाचे व नवऱ्याकडे चूक असेल तर नवऱ्यानें १२ रुपये अगर एक गाय बायकोला द्यावयाची चाल आहे. अनेक नवऱ्यापैकीं एका नवऱ्यानें बायकोशीं घटस्फोट करावयाचें मनांत आणलें तर तोच आपले चंबूगबाळें घेऊन दुसऱ्या घरीं रहावयास जातो.

काश्मीरसारख्या मागसलेल्या देशात बालविवाहाची पद्धत जारीनें अमलांत असली पाहिजे असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे, पण हिंदुशिवाय इतर धर्मीयांत व शिखांत ही चाल आढळून येत नाहीं. यांच्यामध्यें मुलींचें लग्न १६ ते २० च्या दरम्यान करतात व मुलांचें १८–२२च्या दरम्यान होतें. साधारणतः मुलांपेक्षां मुलगी तीन चार वर्षांनीं तरी लहान असते. लदखमध्यें मुलींचें वय मुलापेक्षां अधिक असतें. एखादा बौद्ध इसम म्हातारा झाला असला व त्याचीं मुलें अज्ञान असलीं तर त्या अज्ञान मुलांचें तो एका वृद्ध बाईशीं लग्न लावतो व तीं मुलें सज्ञान होईपावेतों ती वृद्ध बाई त्यांचें परिपालन करते.

मूल जन्माला आलें म्हणजे कोणकोणते विधी करावयाचे, त्यांचा नामकरण विधि केव्हां करावयाचा इत्यादि विधींविषयीं निरनिराळ्या जातींत निरनिराळ्या तऱ्हा आहेत पण त्या विशेष महत्वाच्या नाहींत.

अविभक्त कुटुंबपद्धति—ही पद्धत, डुगर, लदख, झन्सकर इलाख्यात व काश्मीरप्रांतात दिसून येते चिमल, बाल्तिस्तान व सरहद्दीवरील टेकड्यांमधील प्रदेशात हिचा मागमूसहि नाहीं. हिंदूमध्यें या पद्धतीचें अस्तित्व पूर्वापारच आहे व तें अद्यापीहि चालू आहे. चरक रजपुतामध्यें देखील हिचें आस्तित्व आहे, पण ठक्करलोकात ही पद्धत विशेष रीतीनें पाळली जात नाहीं. ब्राह्मण व क्षत्रिय या वर्णात ही पद्धत आढळते, तर मेघ, डोम, चमियर इत्यादि खालच्या वर्गात विभक्त रहाण्याचीच चाल आढळून येते. शेतकरी वर्गामध्यें ज्या त्या माणसाच्या परिस्थितीप्रमाणें विभक्त अगर अविभक्त राहाण्याची पद्धत आहे. लडखच्या बौद्धांत अविभक्तकुटुंबाची पद्धत आहे. मुसुलमानांमध्यें या पद्धतीचें अस्तित्वच नाहीं. हल्लींच्या यूरोपीय संकृतीचा परिणाम हळू हळू येथेंहि दृग्गोचर होऊं लागला आहे व सुशिक्षित लोकानां विभक्त रहाण्याची आवड लागत चालली आहे.

धार्मिक चाली रीती.—काश्मीरमध्यें हिंदूधर्मीयांत मूर्तिपूजेचें फारच स्तोम आहे. हिंदुधर्माच्या ज्या ज्या देवता आहेत त्यांची येथें पूजा होतेच पण जम्मूप्रातांतल्या कांहीं कांहीं भागांत ग्रामदेवता व कुलदेवता यांचीहि पूजा करण्यात येंत ज्या घराण्यांतील बायका सति गेल्या असतील त्यांचीहि देवता समजून पूजा करण्यांत येते. पण त्यातल्यात्यात जम्मू, जसोत्रा, रैसी, मिरपूर, इत्यादि प्रदेशांत शिव, रघुनाथ, कृष्ण, महावीर, भैरवनाथ, राम इत्यादि देवतांची प्रामुख्यानें उपासना करण्यांत येते. डोंगराळ प्रदेशांत नाग व काली यांची उपासना अधिक प्रचारात आहे. काश्मीरप्रांतांत गणेशजी, गजधर, शारदादेवी यांची उपासना रूढ आहे. प्राचीन वीर व सग्दुणी पुरुषांचीहि देवता म्हणून पूजा करण्यांत येते. उदाहरणार्थ, मंडलीक राजा मेर राजपुत्र, कलिवीरप्रधान, गोगराजा, बावा जेनाथ, सिद्धगौरिया जोगी इत्यादि. देवतांच्या प्रीत्यर्थ असंख्य यात्रा व उत्सवहि साजरे करण्यात येतात. पण त्यांतल्यात्यांत अमरनाथाची जत्रा, त्रिकूटतीर्थ अगर विष्णु देवीची जत्रा, चनेनीमधील शिवजीची जत्रा या जत्रा फार प्रसिद्ध आहेत. होळी, दिवाळी, दसरा या सणांचें महत्व जम्मू शहराशिवाय इतरत्र फारसें दिसून येत नाहीं. ऋतूत्सव

सर्वत्र साजरे करण्यात येतात.उदाहरणार्थ लोहरी,वसंतोत्सव, वैशाखी उत्सव इत्यादि.

मुसुलमानांमध्यें साधूंची पूजा फार प्रचारात आहे. सय्यद अबदुल कादर जिलानी हा काश्मीरी मुसुलमानांचा राष्ट्रीय संत होय. त्याशिवाय पीर, मिय्या, पंजापीर इत्यादि पीरांची पूजा जम्मूमध्यें थाटांत करण्यात येते. येथें पुष्कळ मशीदी प्रसिद्ध असून श्रीनगरची जुम्मामशीद फार प्रसिद्ध आहे. मुसलमानांतहि पुष्कळ यात्रा व सण साजरे केले जातात. महंमदाची जयंति फारच थाटाने साजरी करण्यात येते. काश्मीरमधील बहुतेक मुसुलमान मूळचे रजपूत असल्याने त्याच्यामध्यें अद्यापि पुष्कळ हिंदु चालीरीतींचें अस्तित्व आढळतें.

पो षा ख.—काश्मीरी पंडित हे अंगात पैरण घालतात. काश्मीरी मुसुलमान तशाच स्वरूपाचा पोषाख परिधान करतात. काश्मिरी पंडित पागोटें घालतात. काश्मिरी शियापंथाचे मुसुलमानहि अशाच प्रकारचें शिरोवस्त्र धारण करतात. बौद्ध लोक लोकरी कानटोपी वापरतात. फक्त या कानटोपीची खालची टोंकें वर वळविलेलीं असतात. काश्मिरी पंडिताच्या बायका, आपल्या झग्यावर कमरपट्टा बांधतात. सुनी जातीचे मुसुलमान फकीर पांढरा झगा व पांढरें पागोटे वापरतात तर शिया धर्मगुरू काळा झगा व काळे पागोटे वापरतात. हिंदू लोक शेंडी ठेवतात. शीख लोकांनीं लांब केस ठेवलेले आढळतात. बाल्तिस्तानामधील शियापंथी मुसुलमान लोक दाढी व मिशा राखतात व त्या नेहमीं विंचरून स्वच्छ ठेवतात. त्यांची प्रार्थना करण्याचीहि पद्धत निराळी आहे. सुनी व मौलवी बेंबीपाशीं हात जोडून प्रार्थना करतात. नूरबक्षी लोक छातीजवळ हात जोडतात व शिया लोक यापैकीं कांहींच प्रकार करीत नाहींत.

घ रें.—डोंगरपठारावरील प्रदेशांतील घरें, आपल्या इकडील माळवदी घरासारखींच असतात. घरें गारांचीं बांधलेलीं असून त्यावरील छप्पर अगदीं सपाट असतें. उन्हाळ्यामध्ये या छपरावर निजण्याची पद्धत आहे. घराला एक धाकटासा दरवाजा असतो. डोंगरावरील प्रदेशांतील घरें थोडीशीं प्रशस्त बांधलेलीं दिसतात. प्रत्येक घराला देवडी असून अंगणहि ठेवलेलें असतें. बाकी घराची रचना डोंगरपठारावरील घराप्रमाणेंच असते. पावसाळ्यात छपरावर मुद्दाम गवत वाढेल अशी तजवीज करण्यांत येते. काश्मीरमधील घरें लांकडांचीं बांधलेलीं असतात. या लाकडाच्या आत माती भरलेली असते व त्यामुळें पावसाळ्यामध्ये घरात पाणी शिरत नाहीं. काश्मीरमधील घरें एकजात तिमजली असतात. क्वचित् चौमजली, पाचमजलीहि असतात. तळमजल्यात गुरढोरें बांधण्याची सोय केलेली असते. दुसऱ्या मजल्यावर स्वयंपाकगृहाची सोय असते. तिसऱ्या मजल्यावर दिवाणखाना व इतर धान्य वगैरे ठेवण्याची व्यवस्था केलेली असते. घराभोंवतीं बागबगीचा क्वचितच आढळून येतो. पायखाने श्रीमंतांच्या घरांतच दृष्टीस पडतात. काश्मीरमधील लोकांत विशेषशी स्वच्छता आढळून येत नाहीं. धान्य ठेवण्यासाठीं कांहीं लोक एक स्वतंत्र घरच बांधतात. लदख वगैरे सरहद्दीवरील प्रांतांत मातीचींच घरें बांधण्याची वहिवाट आहे तेथील घरांनां लांकूड वापरलेलें आढळत नाहीं. प्रत्येक घराला एक पटांगण असतें. घरें फार लहान व खुजीं असतात. ही खेडेगावातील घराची स्थिति झाली पण शहरांतील घरें मात्र विटांचीं, दगडांचीं व चुनेगच्ची बांधलेलीं असतात. श्रीनगर येथील श्रीमंत लोकांच्या घरात बरेंच नक्षीकाम केलेलें दृष्टीस पडतें काश्मीर व जम्मू येथील राजवाडे उत्कृष्ट तऱ्हेचे बांधलेले आहेत व त्या ठिकाणीं वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना पहावयास मिळतो.

शा स न प द्ध ति.—राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीनें काश्मीर संस्थानाचे तीन भाग पाडलेले आहेत. जम्मू, काश्मीर व सरहद्दीवरील प्रांत आणि मांडलिक संस्थानें असे ते तीन भाग अगर सुभे होत. या प्रत्येक सुभ्याचा कारभार सुभेदाराकडे असतो. या तिन्ही सुभ्याचे मिळून दहा जिल्हे पाडण्यात आले आहेत. जम्मू प्रांताचे जम्मू, जसरोटा, उधमपूर, रैसी व मिरपूर हे पाच जिल्हे आहेत. काश्मीर प्रांताचे उत्तरकाश्मीर, दक्षिण काश्मीर व मुझफराबाद हे तीन जिल्हे आहेत व सरहद्दीवरील प्रांताचे लदख व गिलजित हे दोन जिल्हे आहेत. या प्रत्येक जिल्ह्यावर एक जिल्हाधिकारी नेमण्यात आलेला आहे. याशिवाय प्रत्येक जिल्ह्याचे पुष्कळ पोटविभाग उर्फ तहशीली केलेल्या आहेत. मांडलिक संस्थानांची संख्या ६ असून तीं संस्थानें म्हणजे पुनिग्रल, इकोमन, यसीन, हुंझा, नगर व छिलस हीं होत. या संस्थानांवर ब्रिटिश सरकारनें नेमलेल्या एका अधिकाऱ्याची देखरेख असते. पंच, भदरवह व चनेनि या तीन जहागिरी आहेत. तिबेट सरकारच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांतील मनसर नावाचे एक खेडें हे काश्मीर संस्थानच्या सत्तेखालील असून लदखचा अधिकारी व ब्रिटिश कमिशनर हे दोघे मिळून त्याच्यावर देखरेख करतात.

महाराजा गुलाबसिंगाच्या कारकीर्दींत काश्मीर संस्थान अगदीं स्वतंत्र होतें म्हटलें तरी चालेल. पुढें महाराजा रणवीरसिंगाच्या कारकीर्दींत काश्मीरमध्यें जाऊं इच्छिणाऱ्या यूरोपीयन लोकांना पासपोर्ट देण्याकरिता एक खास अधिकारी ब्रिटिशसरकारनें नेमला व याच्याकडे काश्मीरदरबार व ब्रिटिशसरकार याच्यामधील हितसंबंधाचें रक्षण करण्याचें काम देण्यात आलें. इ.स.१८८५मध्यें हल्लींचे महाराजा गादीवर बसल्यानंतर पासपोर्ट देणाऱ्या अधिकाऱ्याच्या ऐवजीं ब्रिटिश सरकारनें एका रेसिडेंटची नेमणूक केली. इ.स.१८८८ मध्यें महाराजांच्या खास इच्छेवरून काश्मीरची राज्यव्यवस्था महाराजांचे बंधु, राजा सर अमरसिंग व दोन गोरे सिव्हिलियन यांचें कौन्सिल नेमून त्याच्याकडे सोंपविण्यांत आली. या कौन्सिलचा अध्यक्ष रेसिडेंट हा असावा असें ठरलें.

१८९१ मध्यें या रेसिडेंटच्या बदली स्वतः महाराज हेच अध्यक्ष झाले. सन १९०५ सालीं कौन्सिल मोडण्यात येऊन महाराजांनींच सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. आपल्या हाताखालीं तीन अधिकारी व एक प्रधान नेमून त्यांच्याकरवीं त्यांनीं राज्यकारभार चालविण्याचा उपक्रम केला. पुढें तीन अधिकाऱ्यांएवजीं दोनच अधिकारी ठेवण्यांत आले व तीच व्यवस्था हल्लीं चालू आहे.

न्यायखात्याच्या कामासाठीं प्रत्येक तहशिलीमध्यें एक कोर्ट स्थापण्यांत आलें आहे. १९००–१९०१सालीं काश्मीरमध्यें ८१ कोर्टें होतीं. गुन्ह्याच्या बंदोबस्तासाठीं व तपासासाठीं पोलिसखातें निर्माण करण्यांत आलें आहे.

१८८० पर्यंत सरकारी सारा पैशाच्या रूपाने देण्याची वहिवाट नव्हती. १८८७ मध्ये सर्व जमिनींची मोजणी होऊन साऱ्याचा आकार ठरविण्यांत आला. काश्मीरमध्यें इतर ठिकणांप्रमाणें रयतवारी पद्धतीच अस्तित्वात आहे. संस्थानचे उत्पन्न सुमारें ९३ लाख रुपये आहे.

वै द्य क खा तें:—श्रीनगर व जम्मू येथें दोन दोन दवाखाने असून शिवाय जम्मू येथें लष्करी लोकासाठीं एक स्वतंत्र रुग्णालय आहे. सत्वारी कँटोनमेंट याठिकाणींहि एक लष्करासाठीं रुग्णालय आहे. श्रीनगर येथें एक महारोग्यासाठीं दवाखाना आहे. इ.स. १९०१साली काश्मीरमध्यें एकंदरींत ५७ लहान मोठीं रुग्णालयें होतीं. याची व्यवस्था जम्मू व काश्मीर येथील वैद्यकखात्याच्या अधिकाऱ्याकडे असते. देवी काढण्याचें खातेंहि येथें स्थापन झाले आहे. काश्मीरमध्यें पटकीची साथ फार मोठ्या प्रमाणात आढळून येते. एकदा का ही साथ आली कीं ती तीन चार महिने सारखी टिकून रहाते व अशा वेळीं मृत्यूचे प्रमाण फारच वाढते. इ. स.१९११सालीं १८,४४८ लोकाना पटकीचा आजार होऊन ९,२१८ लोक मरण पावले. पटकीच्या खालोखाल प्लेगचाहि येथें बराच प्रसार आहे व काश्मीरच्या लोकसंख्येची खच्ची करण्याच्या कामात त्याचा बराच वाटा आहे. उपदंश, खरूज, गलग्रंथि हे रोग काश्मीरी लोकात मोठ्या प्रमाणात आढळून येतात. इ. स.१९११ च्या खानेसुमारींत, वेडे, आंधळे, मुके, बहिरे व कुष्टी यांचे प्रमाण लाखास अनुक्रमें ७८, ३०६, १९४ व ८५ असें पडलें. वेड्याचें इस्पितळ काश्मीरमध्ये नसल्याकारणाने फार गैरसोय होते व अशा लोकांना पंजाबमध्यें जावें लागतें.

द ळ ण व ळ ण.—काश्मीरमध्यें दळणवळणाची सोय चांगल्या तऱ्हेनें होणें फार अवघड काम आहे तरी पण काश्मीरसरकारनें या कामीं शक्य ती खटपट चालू ठेवली आहे. अद्यापिहि असे कित्येक भाग आहेत कीं, पावसाळ्यामध्यें ज्या ठिकाणीं दळणवळणाचें कोणतेंच साधन रहात नाहीं. श्रीनगरपासून बारमुळापर्यंत व तेथून झेलम दरींतून अबटाबादपर्यंत व पंजाबमधील मरी शहरापर्यंत बैल गाडीचा रस्ता असून आतां श्रीनगर ते उधमपूरपर्यंतहि रस्ता झालेला आहे. विष्णुदेवीच्या यात्रेला जाण्याकरता काट्रापर्यंत टांगा जाण्याजोगा रस्ता झालेला आहे. झेलम नदींतून जलमार्गाची सोय करण्यात आली आहे. इ. स १९०९ सालीं काश्मीरसंस्थानात जवळ जवळ २,६०० मैल चांगला रस्ता तयार होता तो इ. स. १९११ सालीं ३,२०० मैलपर्यंत झाला आहे. काश्मीरसंस्थानच्या मालकीची आगगाडी अवघी १६ मैल असून ती नॉर्थवेस्टर्न रेल्वेच्या हद्दींत आहे. तारायंत्राची सोय सर्व काश्मीरभर झाली असून १३०० मैलापैकीं जवळ जवळ ५७० मैल तारायंत्राची मालकी संस्थानची आहे. पोस्टखात्याची मालकी ब्रिटिशसरकारनें आपल्या हातीं ठेवली असून बहुतेक काश्मीरभर पोस्टाचें जाळें पसरलें आहे. तरी अद्यापि बऱ्याच ठिकाणीं पोस्टाची वाण भासत आहे

उ द्यो ग धं दे.—काश्मीरमधील लोकाचा मुख्य धंदा म्हणजे शेतीचा होय. शेतीचा धंदा करणारे लोक, लोकसंख्येच्या ⅘ वर आहेत. इ. स. १९११ मधील खानेसुमारींत ३१ लाख लोकसंख्येपैकीं केवळ शेतकीचा धंदा करणारे लोक जवळ जवळ ११ लाख आढळून आले. याशिवाय शेतात मजुरी करणाऱ्यांची संख्या निराळीच व हीहि काहीं कमी नाहीं. काश्मीरसंस्थानात निरनिराळ्या भागात मोठमोठीं जंगलें आहेत विशेषतः झेलम दरींतून तर फारच मोठीं व नयनरम्य जंगलें आहेत. या जंगलामध्यें निरनिराळ्या प्रकारचीं झाडें व वनस्पती यांची समृद्धि असल्यानें या जंगलांमध्यें राहून पुष्कळ लोक आपली उपजीविका करतात. काश्मीरसरकारनें या जंगलांवर एक स्वतंत्र अधिकारी नेमला आहे. इ. स.१९११ सालीं या अधिकाऱ्याच्या ताब्यांत ४,२१४ चौरस मैल इतकें जंगल होतें. जंगलसाऱ्याचें उत्पन्न दरवर्षी १७ लाख पर्यंत होते व खर्च वजा जातां या खात्यांत सरकारला चांगलीच बचत करता येते. खानेसुमारीवरून पहाता काश्मीर प्रांतात शेकडा ६० व जम्मू प्रांतांत शेकडा ५० लोक या जंगलावर आपली उपजीविका करतात असें आढळून आलें. या जंगलात इमारतीला लागणारें सागवानी लाकूड, मुबलक गवत व चारा, शेतकीचीं औतें करण्याला व भांडीं करण्याला लागणारें लाकूड, औषधींना उपयुक्त अशा वनस्पती, कोळशाला लागणारें लाकूड, तरवडीची साल, इत्यादि अनेक वस्तू उपलब्ध होतात. सागवानावर मात्र सरकारी कर आहे. बाकीच्या सर्व वस्तू वाटेल त्यानें सरकारी परवानगी घेऊन नेण्यास मुभा आहे.

शेतीचें उत्पन्न म्हणजे तांदूळ, मका, कापूस, केशर, तंबाखू, गहूं, कडधान्यें तीळ इत्यादि जिन्नस हिंवाळ्यात व गहूं, जोंधळा, इत्यादि धान्यें उन्हाळ्यांत होतात सर्वांत मुख्य पीक तांदुळाचें असून शेतकरी याकडे विशेष लक्ष पुरवतात. त्याच्या खालोखाल मक्याचें पीक होय. केशराचेंहि उत्पन्न दांडगें आहे. श्रीनगरच्या आसपास तंबाखूचें उत्पन्न होतें. डाल सरोवराच्या आसपास तर त्या बागाच्या

रागाच्या रांगा आहेत. या बागामधून विविध प्रकारच्या भाज्या व वनस्पती पेरलेल्या आढळतात. नवलकोल ही काश्मीरी लोकांची आवडती भाजी होय. काश्मीरमध्यें अनेक प्रकारचीं फळें उत्पन्न होतात. काश्मीर हा फळांचा देश आहे असें म्हटलें तरी चालेल. अंब्रू नावाचीं फळें या ठिकाणीं मुबलक होतात व तीं काश्मीरबाहेर मोठ्या प्रमाणावर जातात. काश्मीर हे पूर्वी द्राक्षासाठीं फारच प्रसिद्ध होतें पण हल्लीं येथें द्राक्षाची लागवड फारशी होत नाहीं.

काश्मीरमधील गुरें खुजी पण मोठीं काटक असतात. त्याचा रंग सर्वसाधारण काळा अगर करडा असतो. मेंढ्याची येथें समृद्धि आहे. या मेंढ्यापासून पुष्कळच लोकर तयार होते. खेंचरेंहि पुष्कळ असून तीं फार खुरटीं पण दमदार असतात. लोलाब दरीमध्यें व इतरत्रांहि कोंबडीं पुष्कळ आहेत. बदकें, पारवे, हंस, हे पक्षी या ठिकाणीं आढळतात.

काश्मीर हें रेशमासाठीं फार प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं हवें तितकें व उच्च प्रकारचें रेशीम उत्पन्न करता येण्यासारखें आहे. या बाबतींत महाराजा रणवीरसिंगाच्या कारकीर्दीत सरकारनें लक्ष देण्यास सुरुवात केली व हल्लीं सरकारनें जवळ जवळ हा धंदा आपल्याच ताब्यांत घेतला आहे. श्रीनगर येथें सरकारी रेशमाचा कारखाना असून त्यात २४७६ माणसें काम करतात. काश्मीरची रेशमी शालीबद्दल अत्यंत प्रसिद्धि आहे. काश्मीरमध्ये उत्तम शाली तयार करणारी १४८ माणसें खानेसुमारींत आढळून आलीं. गालिचे तयार करण्याचा कारखाना श्रीनगरमध्यें असून तो यूरोपीयन लोकांच्या ताब्यात आहे.

खनिज संपत्ति.—काश्मीरमध्यें खनिज पदार्थांची वाण आहे अशी अगदीं अलीकडील काळापर्यंत समजूत होती पण ती समजूत चुकीची ठरून काश्मीरमध्यें पुष्कळ खनिज संपत्ति सांपडेल असें तज्ज्ञांना वाटूं लागलें आहे. सोनें, तांबें व लोखंड या धातूंच्या खाणी लडख प्रांतांत आहेत असें तज्ज्ञांचें मत आहे. पण चांगल्या दळणवळणाच्या अभावीं अद्यापि या खाणी खणण्याचें काम लांबणीवर पडलें आहे. गिलजितच्या आसपासच्या मुलुखांतून सोनें काढण्याचा धंदा सुरू झाला आहे. पदर इलाख्यात नीलमण्याची खाण १८८२ मध्यें सापडली असून ती सरकारनें आपल्या ताब्यात ठेवली आहे. उधमपूर जिल्ह्यांतील लड व अंजी याठिकाणीं कोळशाच्या खाणी सांपडल्या असून तेथें ११ दशलक्ष टन कोळसा निघतो. दक्षिण काश्मीरमध्यें उत्तम लोखंड उपलब्ध होतें. येथें चुन्याच्या खाणीहि पुष्कळ सांपडल्या आहेत.

कारखाने.—रेशीम, गालीचे तयार करण्याचे कारखाने, तेलाचे कारखाने व दारू तयार करण्याचे कारखाने काश्मीरमध्यें आहेत. लोंकरीच्या व ब्लॅकेट तयार करण्याच्या गिरण्याहि काश्मीरमध्यें निघाल्या आहेत. नक्षीकाम करण्याचे कारखाने काश्मीरमध्यें पुष्कळ आहेत.

आयात व निर्गत.—१९०४-५च्या दरम्यान काश्मीरमध्यें ११५ लाख रुपयांची आयात झाली, तर १९११ मध्यें १,८७,०८,४६० रुपयांची आयात झाली. आयात मालामध्यें धातु (२६०००), मीठ (३११०००), साखर (६१६०००), चहा (१५३०००), तंबाखु (११३०००), कापुस, व कापड (१६४८०००) हे जिन्नस होत. १९११ मध्यें १,५८,९३,८३ रुपयांच्या मालाची निर्गत झाली. निर्गत मालात गुरेंढोरें (१६५०००), धान्य (४०१५००), लोंकर व लोकरी कपडा (१४६०००), सागवान (२५२९००), अफू (८५००) व कातडीं (२११०००) रु. किं. हे जिन्नस होते.

प्राचीन कालचा इतिहास.—प्राचीन काळीं हिंदुस्थानात सुसंगत रीतीनें इतिहास लिहिण्याची कला हिंदूंनां अवगत नव्हती असें अर्वाचीन विद्वानांचें म्हणणे आहे. त्या म्हणण्यात कितो तथ्यांश आहे हें पहाण्याचें आपल्याला प्रयोजन नाहीं; पण काश्मीरच्या बाबतींत मात्र तें म्हणणें लागू पडत नाहीं हें निर्विवाद आहे. काश्मीरचा प्राचीनकाळचा इतिहास कल्हण नांवाच्या एका १२ व्या शतकातल्या पंडितानें आपल्या 'राजतरंगिणी' नामक सुप्रसिद्ध ग्रंथांत लिहिलेला आज उपलब्ध आहे. त्यावरून आपल्याला काश्मीरच्या प्राचीन इतिहाससंबंधींची बरीच विश्वसनीय अशी माहिती मिळते. राजतरंगिणीच्या प्रस्तावनेंत कल्हणानें आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या सुव्रत, क्षेमेंद्र, नीलमुनि, पद्ममिहिर व हेलराज या नृपावलीकारांचीं नावे सांगितलीं आहेत; व त्यांच्या ग्रंथांच्या व तसेंच दानलेख, शिलालेख व इतर प्रशस्ति-पत्रें यांच्या आधारें आपण 'राजतरंगिणी' उर्फ काश्मीरचा इतिहास हा ग्रंथ लिहिला असें म्हटलें आहे. अर्थात इतक्या परिश्रमानें लिहिलेला ग्रंथ विश्वसनीय मानण्यास मुळींच हरकत नाहीं. कल्हणानें या ग्रंथात इ.स.११४८ पर्यंतची काश्मीरची माहिति दिली आहे. त्याच्यानंतरचा १४२० पर्यंतचा इतिहास जोनराज नांवाच्या कवीनें लिहिला. श्रीधर कवीनें या इतिहासाचा धागा इ.स.१४८६ पर्यंत आणून भिडविला व प्रज्ञाभट्ट नावाच्या कवीनें अकबरानें काश्मीर आपल्या ताब्यांत आणीतोंपर्यंतचा म्हणजे १५८८ पर्यंतचा इतिहास आपल्या राजवलिपट्टक ग्रंथांत लिहिला. त्यानंतरचा इतिहास आपल्याला फारसी व इंग्लिश ग्रंथकाराच्या ग्रंथातून वाचावयास मिळतो.

राजतरंगिणीच्या प्रारंभीं असें म्हटलें आहे कीं, कल्पारंभापासून सहा मन्वंतरांच्या काळांत हिमालयाच्या पोटांतील भूमि पाण्यानें तुडुंब भरली असल्यामुळें तिच्यामधून शंकरांची प्रिया पार्वती ही आपल्या करमणुकीसाठीं नेहमी नौका वल्हवीत असे. तिला हें स्थान फार प्रिय वाटल्यामुळें या सरोवराला 'सतीसरोवर' असें नांव पडलें. या सरोवरांत जलोद्भव नांवाचा राक्षस रहात असे. तो या सरोवराच्या आसपासच्या भागाला फार उपद्रव देऊं लागल्यामुळें प्रजापती कश्यपानें या जलोद्भवाचा वध करून त्या ठिकाणीं

काश्मीर हा देश निर्माण केला. पुढें या राक्षसाचा त्रास नाहींसा झाल्यामुळें त्या ठिकाणीं लोकवस्ती होऊं लागली व नंतर छोटीं राज्यें निर्माण झालीं.

अशा या पवित्र व निसर्गरमणीय प्रदेशावर गोनर्द नांवाचा राजा फार प्राचीन काळीं राज्य करीत असे. या राजाच्या वंशजांनीं काश्मीरावर कित्येक शतकें राज्य केलें. काश्मीरमध्यें यावेळीं नाग नावाचे लोक रहात असत. हे नागाची म्हणजे सर्पाची पूजा करीत असत. त्याचप्रमाणे गंधारी, खस, दरद इत्यादि लोकांचीहि या ठिकाणीं वस्ती असे. या ठिकाणीं ब्राह्मणीधर्म प्रचलित होता. पुढें ख्रि. पू. २४५ च्या सुमारास सम्राट अशोकानें काश्मीर येथें बौद्धधर्माचा उपदेश करण्याकरिता भिक्षुमंडळ पाठविलें. या भिक्षूंनीं त्या ठिकाणीं बौद्धधर्माचा बराच प्रसार केला. पण अशोकाच्या मरणानंतर बौद्धधर्माला उतरती कळा लागून काश्मीरमध्यें ब्राह्मणी धर्मानें पुन्हा वर डोकें वाढण्यास सुरवात केली. ख्रिस्ती शकाच्या आरंभीं काश्मीरवर कुशान घराण्याची सत्ता चालू होती. या कुशान घराण्यातील हुविष्क, जुष्क व कनिष्क या राजाच्या अमदानींत काश्मीरमध्यें पुनः बौद्ध धर्माची चलती झाली. तरी पण ब्राह्मणी धर्महि एकसमयावच्छेदेंकरून या ठिकाणीं चालूच होता. अशीच स्थिति काश्मीरमध्यें बरीच शतकें चालू होती.

मध्यकाल कर्कोटक घराण्याचा उदय.—गोनर्दानें चालू केलेल्या गोनर्दीय वंशाचा बालादित्य नांवाचा शेवटचा राजा निपुत्रिक मरण पावल्यामुळें त्याचा वंश लयास गेला त्याच्या पाठीमागून त्यानें ठरवून ठेवल्याप्रमाणें त्याचा जावई दुर्लभवर्धन हा ६०२ मध्यें गादीवर बसला. हा दुर्लभवर्धन कर्कोटक वंशाचा होता. या कर्कोटक घराण्याचें राज्य सुरू होण्यापूर्वी (सु. ५ वें शतक) बौद्धधर्माला उतरती कळा लागली होती. गोनर्दीय वंशाचा राजा प्रवरसेन यानें हिंदुशाहीचें काश्मीरांत पुनरुज्जीवन करून शिवोपासनेची स्थापना केली होती. दुर्लभ वर्धनाच्या कारकीर्दींत प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा काश्मीरात आला होता. त्यावेळीं त्याला देखील बौद्धधर्माला उतरती कळा लागली असल्याचें आढळून आलें. अशी स्थिति असल्यामुळें बौद्धधर्मांतील अहिंसादि तत्वांचा नायनाट झाल्यामुळें क्षात्रतेज लोकात झळकूं लागलें होते. या संधीचा फायदा घेऊन दुर्लभवर्धनानें आपल्या राज्याचा विस्तार वाढविण्यास सुरवात केली. हिमालयाच्या पायथ्यापासून तो मिठाच्या डोंगरापर्यंतचा पंजाबचा बहुतेक भाग त्यानें आपल्या सत्तेखालीं आणिला. दुर्लभवर्धन हा ६३१ त मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा दुर्लभक हा गादीवर आला. त्यानें प्रतापादित्य हें नवीन नांव धारण केलें. हा अत्यंत न्यायप्रिय व प्रजाहिततत्पर असा राजा होता. याच्या संबंधीं राजतरंगिणीमध्यें पुष्कळच कथा आल्या आहेत. त्यानें आपल्या अमदानींत पुष्कळ मंदिरें बांधलीं. दुर्लभकाच्या निधनानंतर त्याचा वडील मुलगा चंद्रापीड हा राज्यावर आला. त्यानें सातआठ वर्षें राज्य केलें. पुढें त्याचा धाकटा भाऊ तारापीड यानें त्याचा वध करवून राज्य बळकाविलें तारापीड हा फार जुलमी राजा होता. त्यानें अवघीं चार वर्षें राज्य केलें. त्याच्यानंतर चंद्रापीडाचा सर्वांत धाकटा भाऊ मुक्तापीड हा गादीवर आला.

राज्यारूढ होतांच मुक्तापीड आपणाला 'ललितादित्य' म्हणवून घेऊं लागला. तो अत्यंत महत्त्वकांक्षी असल्यामुळें त्यानें दिग्विजय करण्याचें ठरविलें. कनोजचा महापराक्रमी राजा यशोवर्मा याचा त्यानें पराजय केला. त्यानंतर त्यानें गौडराजावर स्वारी करून त्याला जिंकले त्याचप्रमाणे कलिंग, कर्णाट, कावेरी, कोंकण, सौराष्ट्र, द्वारका, अवन्ती इत्यादि प्रदेशावर स्वाऱ्या करून ते सर्व प्रदेश अंमलाखालीं आणिले. नंतर त्यानें उत्तरेकडे आपलें लक्ष्य वळावलें. उत्तरेकडील दरद व तिबेट हे देश त्यानें सहजरीतीनें जिंकून तुर्कांवर स्वारी केली व त्याचा तीनदा पराभव केला ! अशा रीतीनें दिग्विजय केल्यामुळें त्याला अपार संपत्ति मिळाली व तिचा त्यानें फार चांगल्या रीतीनें उपयोग केला आपल्या अमदानींत मोठमोठीं देवालयें बांधलीं भूतेश नामक एका शिवमंदिरासाठीं त्यानें ११ कोट रुपये खर्च केले. अद्यापीहि वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिद्ध असलेलें मार्तंडाचें (सूर्याचें) मंदिर, वितस्ता नदीवरील पूल, परिहासपूर नावाचे नगर, ५४ हात उंचीच्या अखंड पाषाणाच्या स्तम्भावर उभारलेला गरुड इत्यादि अनेक मंदिरें त्यानें बांधल्याबद्दलचा राजतरंगिणीमध्यें उल्लेख आढळतो. त्याची शासनपद्धतिहि संस्मरणीय होती. आपल्या प्रचंड साम्राज्याच्या कारभारासाठीं त्यानें महाप्रतिहारी, महासंधिविग्रहक (परराष्ट्रमंत्रि), महाश्वबल, महाभाण्डागार व महासाधनिक असे पांच अधिकारी नेमले होते. त्यानें अनाथासाठीं अन्नछत्रे व पाणपोया जागोजागीं चालू केल्या होत्या. हा उत्तरेकडे स्वाऱ्या करावयास गेला असतां मध्येंच मरण पावला.

ललितादित्यामागून त्याच्या गादीवर अनुक्रमें कुवलयापीड व वज्रादित्य हे राजे बसल्यानंतर जयापीड हा गादीवर आला. हा ललितादित्याचा नातू होता आपल्या आजाप्रमाणेंच यानेंहि दिग्विजय करण्याचें ठरवून तो पार पाडला. जयापीड हा स्वतः मोठा पंडित असून विद्वानाचा आश्रयदाता होता अमरकोशाच्या प्रसिद्ध टीकाकार क्षीरस्वामी, साहित्यग्रंथाचा कर्ता उद्भट, व्याकरण व साहित्यशास्त्रावरील टीकाकार वामन, कुट्टणीमताचा कर्ता दामोदर गुप्त इत्यादि अनेक विद्वान् त्याच्या पदरीं होते. अशा रीतीनें आपल्या प्रथमारंभींच्या कारकीर्दीत तो फार चांगला राजा म्हणून प्रसिद्ध होता. पण कोणत्या कारणानें असेल तें असो, त्याच्या स्वभावांत पुढे फार फरक पडून त्यानें आपल्या प्रजेवर जुलूम करण्यास सुरुवात केली. त्यामुळें सर्व प्रजा त्याच्यावर फार असंतुष्ट झाली. तो ७८२ मध्यें मरण पावला. त्याच्या पाठीमागें त्याच्या

घराण्यांत दोन तीन राजे होऊन, नंतर उत्पल घराण्याची सत्ता काश्मीरवर चालू झाली. कर्कोटक वंशाचे एकंदर १७ राजे काश्मीरच्या राज्यावर बसले व त्यांनी एकंदर २५० वर्षे काश्मीरवर राज्य केलें. कर्कोटक घराणें शिवोपासक होतें. त्याच्या अमदानींत काश्मीरच्या राज्याचा मोठा विस्तार होऊन काश्मीर हें बलाढ्य राज्य बनलें. तसेंच त्याच्या कारकीर्दींत काश्मीरनें विद्येविषयींचा आपला नांवलौकिक कायम ठेवला. त्यांनीं आपल्या अमदानींत नाना प्रकारचीं देवालयें, विहार व इमारती बांधून काश्मीरला मनोहर सौंदर्य आणिलें.

उत्पल घराण्याची कारकीर्द:—कर्कोटक घराण्याची सत्ता नष्ट झाल्यानंतर उत्पल घराण्याची सत्ता काश्मीरवर सुरु झाली. या उत्पल घराण्याचा आद्यपुरुष अवन्तिवर्मा हा होय. हा मोठा पराक्रमी व कर्तृत्वशील होता. त्याचा स्वभाव फार परोपकारी व धर्मशील होता. सुय्य नामक बुद्धिमान मंत्र्याच्या मदतीनें त्यानें वितस्ता व काश्मीरातील इतर नद्या यांना बंधारे घालून त्यापासून अनेक ठिकाणीं कालव्यांचीं कामें करून घेतलीं. त्यामुळें शेकडों गांवें नवीन अस्तित्वात येऊन हजारों एकर पडीक जमीन लागवडीखालीं आली. याच्या कारकीर्दींत काश्मीरमध्यें सुकाळ झाला असें कल्हणानें म्हटलें आहे. भगवद्गीतेचें पारायण करीत असतां त्यानें आपला देह ठेवला. त्याच्यामागून त्याचा मुलगा शंकरवर्मा हा गादीवर बसला. त्यानें दिग्विजय करावयाचा निश्चय करून निरनिराळ्या देशावर स्वाऱ्या केल्या. गुर्जर, दार्वाभिसार, त्रिगर्त, इत्यादि देशावर स्वाऱ्या करून ते देश पादाक्रांत केले. दिग्विजयाच्या स्वारींत त्याच्याबरोबर ९ लक्ष पायदळ व ३०० हत्ती होते असें कल्हणानें म्हटलें आहे. शंकरवर्मा हा आपल्या बापाप्रमाणें न्यायी व उदार नव्हता. तो दुर्वर्तनी असून लोकांनां त्यानें फार त्रास दिला. तो ९०२ सालीं मरण पावला.

शंकरवर्म्याच्या मरणानंतर त्याच्या विधवा राणीनें आपल्या लहान मुलाच्या नांवानें राज्यकारभार चालविला. त्या कामीं तिनें तंत्री नामक सैनिकांचें साहाय्य घेतलें. या तंत्री नामक सैनिकांनीं पुढें शिरजोर होऊन चक्रवर्मा नांवाच्या एका राजाला काश्मीरच्या गादीवर बसविलें पुढें या चक्रवर्म्यानें तंत्रींच्या त्रासाला कंटाळून डामर लोकांच्या मदतीनें त्यांना हांकून लाविलें. पण या डामर लोकांनीं त्याला जी मदत केली होती तीबद्दल कृतज्ञ न रहातां त्यांनांहि त्रास देण्यास त्यानें सुरवात केली. पुढें तो मरण पावल्यानंतर तंत्री व डामर या लोकांमध्यें यादवी माजून तंत्री लोक विजयी झाले. तंत्रींचा पुढारी कमलवर्धन यानें ब्राह्मणांना काश्मीरच्या सिंहासनावर एक राजा निवडण्यास सांगितलें. तेव्हां सर्व ब्राह्मणांनीं मिळून यशस्कर नांवाच्या एका गृहस्थाला राज्यावर बसविण्याचें ठरविलें व तो राजा झाला.

यशस्कर हा कर्तृत्ववान् राजा होता. याच्या कारकीर्दींत प्रजेला फार सौख्य प्राप्त झालें. कल्हणानें याच्या कारकीर्दीचें फार वर्णन केलें आहे. याच्या राज्यात कार्तांतिक, वैद्य, मंत्रि, गुरु, पुरोहितदूत, न्यायाधिकारी इत्यादि सर्व लोक चांगले शिकलेले असत व त्यामुळें, राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालण्याला राजाला मदत होत असे, असें कल्हण म्हणतो. यशस्कर हा फार वर्षे जगला नाहीं. तो इ.स. ९४८ त मरण पावला त्याच्या मागून संग्रामदेव व नंतर क्षेमगुप्त हा गादीवर बसला. या क्षेमगुप्तानें सिंहराजनामक लोहाराधिपतीच्या दिद्दा नांवाच्या प्रसिद्ध मुलीशीं विवाह केला. क्षेमगुप्त मरण पावल्यानंतर या दिद्दा राणीनेंच राज्यकारभार चालविला. ही राणी फार वाईट चालीची होती. तिनें आपल्या भावाचा मुलगा संग्रामराज याला आपल्यामागें गादीचा वारस ठरविलें व ती इ. स. १००३ त मरण पावली.

लोहर घराण्याची कारकीर्द:—लोहर घराण्याचा पहिला राजा संग्रामराज हा कर्तबगार असल्यामुळें त्याच्या कारकीर्दींत काश्मीरला भरभराटीचे दिवस लाभले. त्यानें तुर्कांविरुद्ध काबूलचा राजा त्रिलोचनपाल याच्या मदतीकरता आपला सेनापति तुंग यास पाठविलें. पण त्रिलोचनपाल व तुंग या दोघांचाहि पराभव झाला. त्यामुळें तुर्कांना प्रोत्साहन मिळून त्यांनीं भरतखंडावर व काश्मीरवर स्वारी करण्याची महत्वाकांक्षा धरली. संग्रामराजानंतर हरिराज व व त्याच्या पश्चात अनंतदेव हा राजा झाला. हा अनंतदेव व त्याची राणी सूर्यमती हीं फार धार्मिक होतीं. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत पुष्कळ शिवालयें बांधलीं. अनंतदेवानें वानप्रस्थाश्रम स्वीकारून आपला मुलगा कलश यास राज्यावर बसविलें. पण या कलशानें त्यानां त्यांच्या म्हातारपणीं अतिशय वाईट तऱ्हेनें वागविलें. कलशाच्या मागून हर्ष हा गादीवर आला. हा अत्यंत विद्वान असून विद्वानांचें आश्रयस्थान होता. पण अंतःस्थ यादवीमुळें त्याचे शेवटचे दिवस अत्यंत दुःखात गेले. तो ११०१ मध्यें मरण पावला.

सातवाहन घराण्याची कारकीर्द.—हर्षानंतर सातवाहन घराण्याचा संस्थापक उच्छल हा गादीवर आला. त्यानें इ. स. ११०१ ते १११० पर्यंत काश्मीरावर राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा भाऊ सुस्सल हा गादीवर आला. सुस्सलच्या कारकीर्दींत काश्मीरची पुन्हां भरभराट झाली. त्याच्यानंतर जयसिंह नांवाचा त्याचा मुलगा गादीवर बसला हा फार सच्छील व सद्गुणी होता. याच्याच कारकीर्दींत राजतरंगिणीकार कल्हण हा झाला. या राजाच्या अमदानींत खान दलखा या तार्तर सरदारानें काश्मीरवर स्वारी करून श्रीनगर बेचिराख करून टाकलें होतें जयसिंहाच्या मागून त्याच्या सैन्याचा अध्यक्ष रामचंद यानें गादी बळकाविली, पण

थोड्या वर्षांनींच त्याच्या हाताखालील रैंवछनशाहानें त्याचा वध करून काश्मीरचें राज्य हिरावून घेतलें.रामचंद याच्या कोटाराणी नामक मुलीशीं त्यानें लग्न केलें. त्यानें इस्लामी धर्माची दीक्षा घेतली होती. त्याच्या मरणानंतर जयसिंहाचा भाऊ उदयनदेव यानें काश्मीरवर आपली सत्ता स्थापन केली. त्यानें कोटाराणीशीं पुनर्विवाह लावला.उदयनदेवानें काश्मीरवर १५ वर्षे राज्य केलें. त्याच्या मरणानंतर कोटाराणीनें कांहीं काळ काश्मीरचा राज्यकारभार चालविला. पण त्यानंतरहि सुलतान इ काश्मीर या घराण्याच्या शमसुद्दिन नावाच्या एका शूर पुरुषानें काश्मीरचें तख्त बळकावलें. अशा रीतीनें इ. स.१३२९पासून काश्मीरवर मुसुलमानी घराण्याची सत्ता चालू झाली. इ. स. १३९४मध्यें सुलतान शिकंदर नावाचा एक जुलमी राजा काश्मीरवर राज्य करीत होता. हा मूर्तिभंजक असल्यामुळें आपल्या धर्मवेडाच्या भरात काश्मीरच्या हिंदू राजांनीं बांधलेल्या अनेक देवालयांचा व रमणीय स्थानांचा त्यानें उच्छेद केला. एवढेंच नव्हे तर त्यानें काश्मीरमधील प्रजेला जुलमानें बाटविण्यासहि सुरवात केली. इ. स.१४२०मध्यें शिकंदराच्या मागून झैन उलआबिदीन हा गादीवर आला. हा धोरणी व धर्मसहिष्णु राजा होता. त्यानें ब्राह्मणांनां फारशी भाषेचा अभ्यास करण्याला प्रोत्साहन दिलें. व हिंदूंचीं नष्ट देवालयें दुरुस्त करून दिलीं. त्याच्या शांततामय कारकीर्दीनंतर चक्र नावाच्या घराण्यातील लोकांनीं काश्मीरवर अंमल चालविला. पण याच्या हातूनहि शेवटीं अकबर बादशहानें काश्मीर प्रांत जिंकून इ. स.१४८६ मध्यें तो आपल्या राज्याला जोडला. अकबराच्या कारकीर्दींत तोडरमल्ल यानें काश्मीरची मोजणी केली. अकबराचा मुलगा जहांगीर याला काश्मीर देश फारच आवडत असे. त्यानें काश्मीरमध्ये ७७७बागा बनविल्या. औरंगझेबाची स्वारी एकदाच या प्रांताला आली होती. पण तेवढ्यात त्यानें हिंदु लोकांनां बाटविण्याचें कार्य शक्य तितकें साधून घेण्याचा यत्न केला.

औरंगझेबाच्या पश्चात् मोगलशाहीस उतरती कळा लागली. त्या समयीं १७५१ मध्यें काश्मीर हें पुन्हां स्वतंत्र झालें. पण थोड्याच काळांत त्यावर अफगाणी व दुराणी लोकांनीं आपला अंमल बसविला. त्यांच्या अंमलाखालीं काश्मीरच्या प्रजेवर फारच जुलूम झाला. तेव्हां तेथील लोकांनीं नुकतेंच उदयास येत असलेल्या शीख राज्याचा संस्थापक रणजितसिंग याच्याकडे मदत मागितली. रणजितसिंगानें त्यांना मदत करण्याचें कबूल करून काश्मीरवर इ. स. १८१४ मध्यें स्वारी केली; पण ती सिद्धीस गेली नाहीं. पुन्हां १८१९ मध्यें त्यानें आपला सेनापति मिसर दिवाणचंद याला काश्मीरवर पाठविलें. या स्वारींत रणजितसिंगाला जय मिळून काश्मीर हें शीखांच्या सत्तेखालीं आलें.

इ. स. १८१९ पासून तों १८४५पर्यंत काश्मीरवर पुष्कळ शीख सुभेदार येऊन गेले. १८४१ त इमामउद्दीन हा तेथील सुभेदार होता. याच सुमारास आणखी एक व्यक्ति उदयास आली होती. या व्यक्तीचें नाव गुलाबसिंग असें होतें. गुलाबसिंग हा डोग्रा जातीचा रजपूत होता. त्याचें जम्मू येथें लहानसें संस्थान होतें. तो अत्यंत कर्तृत्ववान असल्यानें त्यानें आसपासच्या डोंगराळ प्रदेशावर स्वाऱ्या करून तेथील लहान लहान संस्थानें आपल्या अंमलाखालीं आणलीं होतीं. १८४० च्या सुमारास त्यानें किस्तावर, लडख, बाल्तिस्तान इत्यादि परगणे ताब्यात आणून काश्मीरच्या आजूबाजूस आपली सत्ता स्थापन केली होती. १८४५ सालच्या इंग्रज व शीखांच्या युद्धात गुलाबसिंग तटस्थ राहिल्यानें इंग्रजांनां जय मिळाला. याबद्दल इंग्रजांनीं गुलाबसिंगाला काश्मीर प्रांत दिला. तरी पण काश्मीर संस्थानातील गिलजित हा प्रांत अद्यापि शीखांच्या ताब्यांत होता. त्या प्रांतावर स्वारी करून तोहि प्रांत त्यानें आपल्या ताब्यात आणला. नंतर त्यानें महाराजा हा किताब धारण केला. पण इ. स. १८५२ मध्यें त्याच्या सैन्यात फितुरी झाल्यामुळें गिलजित प्रांत हा गुलाबसिंगाच्या ताब्यातून गेला पुढें गुलाबसिंग १८५७ मध्यें मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा रणवीरसिंग हा गादीवर आला. त्यानें १८५७ सालच्या बंडात इंग्रजाना मदत केली. १८६० मध्यें त्यानें गिलजित प्रांत पुन्हा ताब्यांत आणला. रणवीरसिंग हा १८८५ सालीं मरण पावला. त्याच्यानंतर त्याचा पुत्र प्रतापसिंग (जी. सी. एम. आय. इत्यादि) हा गादीवर बसला. हेच हल्लीं काश्मीर व जम्मू संस्थानचे अधिपति आहेत.

[संदर्भग्रंथ—बर्नियर-व्हॉयेजेस (१६९९); व्हिग्ने-ट्रॅव्हल्स इन काश्मीर, लदख, इस्कर्डो (१८४२), कनिंगहम-—ॲन एसे ऑन दि अरियन ऑर्डर ऑफ आर्किटेक्चर, ॲज एक्झिबिटेड इन दि टेम्पलस ऑफ काश्मीर (१८४८); जे बिडुल्फ-ट्राइब्स ऑफ हिंदुकुश (१८८०); ड्र्यू-जम्मू ॲंड काश्मीर टेरीटरीज (१८७५); नाईट-व्हेअर थ्री एम्पायर्स मीट (१८८३); लॉरेन्स-दि व्हॅली ऑफ काश्मीर (१८९५); लिडेकेर-रेकार्ड्स ऑफ दि जीऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (१८९३); ड्यूक-काश्मीर हॅंडबुक (१९०३); कल्हण-राजतरंगिणी; गो. चिं. भाटे-हिंदुस्थानचें नंदनवन (१९१९)].

काश्मीरी—काश्मीर, पंजाब, व वायव्य सरहद्दप्रांत यांतून आढळणाऱ्या मुसुलमानांची जात. यांची खुद्द काश्मीरमधील लोकसंख्या ७,६५,४४२ असून या जातींतील लोक मुसुलमानी धर्माचे आहेत. या जातीचें नाव जरी स्थलावरून पडलेलें आहे तरी निरनिराळ्या जातींतील व समाजांतील फरक इस्लामी धर्मानें नाहींसा केल्यामुळें ही एक निराळी जात बनली आहे. काश्मीरमध्यें जुन्या तऱ्हेचें समाजवैचित्र्य जरी असलें तरी काश्मीरच्या बाहेर येथील लोकाना सरसकट 'काश्मीरी' म्हणतात आणि इतर कोणत्याहि जातींत न येणारे मुसुलमान 'काश्मीरी' याच सदराखालीं मोडतात.

पंजाबांतील काश्मीरींची लो. सं. १,७८,२४१ आहे. पंजाबांत काश्मीरी लोक मुख्यतः मुसुलमान आहेत. हिंदू तेवढे काश्मीरी ब्राह्मण आहेत. काश्मीरी शीख हे मुळचे ब्राह्मण असून शीख लोकांचें राज्य असताना काश्मीरमध्यें गेलेल्या पंजाबी लोकांशीं रोटीबेटीव्यवहार करून भ्रष्ट झालेले हे लोक होत. काश्मीरी मुसुलमान मुख्यतः सर्व पंजाबमध्यें पसरलेले आहेत. तथापि ते रावळपिंडी व लाहोर प्रांतांत जास्त प्रमाणात आढळतात. वायव्य सरहद्दप्रांतात काश्मीरांची संख्या (१९११) २८,६३१ आहे. [सेन्सस रिपोर्ट १९११. पु. १४ व २०; रोजची ग्लॉसरी, पु. २].

काश्मीरी ब्राह्मण—काश्मीरातील सर्व हिंदू बहुधां ब्राह्मणच आहेत. या ब्राह्मणांना 'पंडित' असें म्हणतात. भिक्षुक ब्राह्मणानां बचबत व गृहस्थ ब्राह्मणांनां करकून असें म्हणतात. या दोन वर्गांत लग्नसंबंध होत नाहींत. काश्मीरी ब्राह्मण पूर्ण मांसाहारी आहेत. त्यांच्या शरिराची ठेवण व त्यांची चेहेरेपट्टी उच्च आर्यवंशीय आहे. ते दिसण्यातहि गोरे व सुंदर असतात. पण या ब्राह्मणाची फारशी चलती नाहीं कारण महाराष्ट्रीय ब्राह्मणाप्रमाणें हे कधीं राज्यकर्ते नव्हते; शिवाय काश्मीरात ब्राह्मणांच्या खालचे वर्ण नसल्यानें यांना महाराष्ट्रीय ब्राह्मणाप्रमाणें कोणाकडून मान व द्रव्यप्राप्ति होत नाहीं.

काही लोक यांना सारस्वत समजतात, पण यांच्यातीलच एक पंडित (पंडित राधाकिसन) म्हणतो कीं, काश्मीरी सारस्वत नाहींत. ते कठ शाखेचे असून त्यांचें सूत्र लौगाक्षी आहे (विल्सन–इंडियन कास्ट, पु. २ पा. १४२). यांचे २६१ निरनिराळे वर्ग किंवा कुलें विल्सननें नावनिशीवार दिलीं आहेत. यांच्यात रोटीबेटीव्यवहार होतात. कौल नावाचा वर्ग सर्वांत उच्च मानला जातो. काहीं वर्ग तर मुसुलमान संस्कृतीचे वाटतात. मुसुलमानांचा काश्मीरात प्रवेश झाल्यापासून हिंदूंत जो पूर्वी फक्त एक वर्ण (ब्राह्मण) होता त्याचे धंद्याप्रमाणें चार वर्ण झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं. काश्मीरी ब्राह्मणाचा धंदा म्हणजे बहुधा लेखकाचा किंवा पुस्तक विक्याचा होय. हे लोक फारशी उत्तम जाणतात.

काश्मिरी भाषा—काश्मीर खोरें व त्याच्या आजूबाजूचे डोंगर यातून ही भाषा चालते. काश्मीरी भाषा बोलणारे एकंदर ११,८०,६३२ लोक आहेत; त्यापैकीं खुद्द काश्मीर संस्थानांतच ११,७२,४८७ आहेत व पंजाबांत ६४८० आणि राहिलेले इतर प्रांतातून आहेत. या भाषेचा समावेश पिशाच भाषेच्या दर्द संघात होतो. पिशाच भाषेच्या निरनिराळ्य शाखांमध्यें जिला वाङ्मय किंवा लिपि आहे अशी एक काश्मीरी भाषाच होय. शीना लोकांनीं काश्मीरमध्यें येऊन काश्मीरी भाषेचें मूळचें पिशाच स्वरूप घालविलें व तिला भेसळ करून टाकिली. शिवाय काश्मीरमध्यें पुष्कळ शतकें पर्यंत संस्कृत भाषेचा अभ्यास चांगला चालू असे, त्यामुळें काश्मीरी शब्दसंग्रह व व्याकरण ही अलीकडे पुष्कळांशीं भारतीय बनलीं आहेत. हा फरक एवढा दांडगा आहे कीं, आज पुष्कळसे भाषापंडित काश्मीरीला पिशाचभाषावंशामध्यें न घालतां, भारतीय–आर्य भाषाच्या वायव्यसंघामध्यें ढकलितात. तथापि कोणत्याहि वंशामध्यें काश्मीरी भाषा ठेविली तरी ती चूक म्हणून गणण्याचें कारण नाहीं.

काश्मीरींमध्यें पोटभाषा फार थोड्या आहेत. काश्मीरच्या नैर्ऋत्येकडील डोंगरांतून प्रचलित असणारी कि श्त वा री एक प्रमुख पोटभाषा म्हणता येईल. पो गु ल आणि रा म ब नी या लहान लहान पोटभाषाहि येथें उल्लेखिण्यायोग्य आहेत. मूळ काश्मीरी भाषा फार जुनी आहे. कल्हणाच्या संस्कृत राजतरंगिणीनें शुद्ध काश्मीरी शब्द संरक्षिले आहेत. त्यांशीं तुलना करिता कल्हणानंतर भाषेंत म्हणण्यासारखा बदल मूल घटनेंत झालेला दिसत नाहीं. भाषाशास्त्राभ्यासकाच्या दृष्टीनेंहि ही भाषा फार महत्वाची आहे. शब्दात एखादें अक्षर किंवा एखादा ध्वनि घालून स्वरव्यंजनांचे केलेले अनेक फरक व सर्वनामाच्या प्रत्ययांची योजना या दोन गोष्टी अभ्यासकाला नवीन वाटतील. भारतीय आर्य भाषांचा अभ्यास करिताना भाषा व वैशिष्टयें व त्यांचा इतिहास समजण्यास येणाऱ्या अडचणी या भाषेच्या अभ्यासानें दूर होण्यासारख्या आहेत. शीना, संस्कृत, फारशी व पंजाबातील भाषा यांतील शब्द काश्मीरी शब्दसंग्रहात शिरले आहेत. काश्मीरी बोलणारे बहुतेक मुसुलमान असल्यानें ते फारशी व अरबी शब्द सररहा वापरतात व जे काहीं थोडे हिंदू पंडित आहेत ते काश्मीरी लिहितां बोलताना बरेचसे संस्कृत किंवा तद्भव शब्द घेतल्यावांचून राहात नाहींत. सुशिक्षित वर्ग बहुधां हिंदूच असल्यानें एकंदरीत काश्मीरी वाङ्मय सामान्य जनसमूहाची नेहमीची बोलण्याची भाषा मुळींच दर्शवीत नाहीं असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. तथापि काहीं मुसुलमानांनींहि थोडे चांगले काश्मीरी ग्रंथ लिहिले आहेत.

मुसुलमान लोक लिहितांना फारशी लिपी वापरतात व हिंदू शारदा लिपींत लिहितात. काश्मीरी स्वरांचे उच्चार शारदा लिपीद्वारें चांगले वठतात. शारदा टाईप नसल्यानें काश्मीरी पुस्तकें नागरी लिपींत छापवितात.

वा ङ्म य.—काश्मीरींत बरेंच मोठें साहित्य आहे, पण तें कोणी फारसें अभ्यासिलेलें दिसत नाहीं. १८२१ त विल्यम केरे या मिशनऱ्यानें शारदा लिपींत जो नवा करार प्रसिद्ध केला तेंच काश्मीरी भाषेंतलें पहिलें मुद्रित पुस्तक होय. १८८५त रेव्ह. जे. हिंटन नॉवेल्स यानें मुंबईत काश्मीरी वाक्प्रचार व म्हणी याचा एक संग्रह प्रसिद्ध केला व १८९५ त के. एफ्. बर्क हार्डनें यूसुफ आणि झुलैखा यासंबंधीं महमुदगामीचें काव्य छापून काढिलें. हीं व इतर किरकोळ पुस्तकें हेंच कायतें प्रकाशित वाङ्मय होय. मुसुलमानांची काश्मीरी पाहणें झाल्यास गामीचें काव्य वाचावें. हिंदू

वाङ्मयाच्यासंबंधात दीननाथ कृष्णाचा इतिहास उल्लेखितां येईल. 'लल्लादेवींचें लल्ला वाक्य' हा या भाषेतील उपलब्ध असा सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. यात शैवपंथाचा वेदात भरलेला आहे. दुसरा महत्वाचा ग्रंथ म्ह णजे कृष्णराजानक या विद्यमान लेखकाचा 'शिवपरिणय' ग्रंथ होय. वर उल्लेखिलेली व इतर बहुतेक पुस्तकें स्वतंत्र प्रतिभेचीं नसून संस्कृत ग्रंथाच्या नकला होत. बहुतेक ग्रंथकाराचा काळहि माहीत नाहीं.

[संदर्भग्रंथः—काश्मीरीचा शास्त्रीय अभ्यास नुकता सुरू झाला आहे. हींतील प्रकाशित कोश एकच असून तो डब्ल्यू. जे. एल्म्स्ली (लंडन, १८७२)नें केला आहे. रॉयल बव्हेरियन अकेडमी ऑफ सायन्स ' (१८८७–१८८९) च्या अहवालामध्यें बर्कहार्डनें मुसलमानी पद्धतीचें व्याकरण दिलें आहे तें ग्रीयर्सननें 'इंडियन ॲंटिक्वेरी'मध्यें (१८९५–९७) इंग्रजींत भाषांतरिलें आहे; ईश्वर कौलानें संस्कृतात काश्मीरशब्दामृत नावानें जें व्याकरण लिहिलें आहे तें ग्रीयर्सननें १८८८ त कलकत्यास प्रसिद्ध केलें.]

काश्मोर—मुंबई इलाख्यात सिंधमध्यें अमरसिंध फ्राँटियर (वरच्या सिंध सरहद्दीवरील) जिल्ह्यातील तालुका. क्षे. फ. ५३१ चौ. मै. लो. सं. (१९११) ४३,२६८. यात ६२ गांवें आहेत. तालुक्याचें मुख्य ठिकाण काश्मोर.

काश्यप (१).—एक ऋषि.

काश्यप (२)—मांत्रिक ब्राह्मण. परीक्षित् राजास सर्पदंश होऊन तो मरणार असें याने ऐकून, यानें आपल्या मंत्रसाथ्यानें त्यास सजीव करून द्रव्य संपादन करावे असें मनात आणिलें व तो हस्तिनापुरास जाण्यास निघाला. हें वर्तमान तक्षकास कळून त्यानें यास मनुष्यरूपानें मार्गांत गाठून त्याच्या मंत्रसामर्थ्याची परीक्षा पाहिली. तेव्हा तक्षकाची खात्री झाली कीं, परीक्षित् राजास हा खचित सजीव करील. नंतर तक्षक यास म्हणाला, ऋषिपुत्रानें परीक्षितास दिलेला शाप मिथ्या करून तुला जो लाभ होणार त्याहून अधिक द्रव्य घे आणि परत जा; तक्षक तो मीच आहे. त्यावरून याने तें द्रव्य घेतलें व तेथूनच माघारा फिरला. [महाभारत आदि. ४३.]

काष्ठिन (झायलीन) $क_8उ_{10}$ ($कउ_3$)$_2$—याचे दुसरें नाव द्विमथिल ऊदिन (डायमेथिल बेंझिन) असे आहे. याचीं तीन समघटक रूपें (अयसोमर्स) आहेत. कोळशाच्या डामराचे पातन (डिस्टिलेशन) केलें म्हणजे जो हलक्या तेलाचा (लाइट ऑईल) भाग येतो त्यात हे काष्ठिन असतात. या हलक्या तेलाचा १३६° ते १४१° श वर जो पात भाग येतो त्यात मितकाष्ठिन (मेटाझायलीन) सुमारें शेंकडा ७० भाग, परकाष्ठिन शेकडा २०भाग आणि आसन्न(ऑर्थो) काष्ठिन शेंकडा १० भाग असतो. याच्या मिश्रणाचा द्रावक या नात्यानें उपयोग करितात.

हें मिश्रण शेंकडा८०भाग गंधकाम्लाच्या द्रवानें हालविलें म्हणजे त्यांत मितकाष्ठिन (मेटाझायलिन) विद्रुत होतो. बाकी जो शेष राहतो त्यात सामान्य तीव्र गंधकाम्ल घालून हलविलें म्हणजे आसन्न(ऑर्थो)काष्ठिनचें निष्कासन होतें, आणि खाली पर(पॅरा)काष्ठिन राहतो. गंधकाम्लाच्या क्रियेनें काष्ठिनचें रूपांतर गंधाम्लिकाम्लात (सल्फोनिक ॲसिड) $क_6उ_3(कउ_3)_2गप्र_2प्रउ$ असें होतें. यांमध्यें पाणी घालून पातळ करून त्याचें पातन केलें म्हणजे उज्ज कर्ब पातन पावतो. आसन्न(ऑर्थो)काष्ठिन १४०° श ते १४१° श उष्णमानावर उकळतो, मितकाष्ठिन १३७° श वर उकळतो आणि परकाष्ठिन १३६° श वर उकळतो.

याचे प्राणिदीकरण केलें म्हणजे त्यातील मथिल संघाचें अनुक्रमें कप्रप्रउ संघात रूपांतर होतें व बोलाम्ल (टोलुइक ॲसिड) $क_6उ_4$($कउ_3$) (कप्रप्रउ) आणि $क_6उ_4$ (कप्रप्रउ)$_2$ क्षयिलाम्ले (फ्थालिक ॲसिड) तयार होतात. या प्रत्येक अम्लाचीं तीन समघटक रूपें असतात; ती अनुक्रमें आसन्नकाष्ठिन, मितकाष्ठिन व परकाष्ठिन यापासून झालेलीं असतात. [वॅट. कम पॉ.]

कास (खोकला) निदान—वातजन्य, पित्तजन्य, कफजन्य, क्षतापासून व क्षयापासून, असे पाच प्रकारचे खोकले आहेत. हे एकापेक्षां एक उत्तरोत्तर वलवान आहेत आणि कोणत्याहि प्रकारचा खोकला असला तरी त्याची हयगय केली असता तो क्षयावर जातो.

खोकला होण्यापूर्वी घशात कंड सुटणें, अरुची व घशांत धान्याचें कुस अडकल्यासारखें वाटणे हीं लक्षणें होतात. कोंडलेला वायु खालून वरच्या बाजूस उलटून छातींत येऊन घशात अडकून मस्तकातील शिरात भरतो. त्यामुळे अंग वर फेंकल्यासारखें वाटतें व डोळे बाहेर फेकल्यासारखें वाटते तो वायु पाठींत छातींत, व बरगड्यात पीडा करून फुटक्या काशाच्या भांड्याच्या नादासारखा शब्द करीत तोंडातून बाहेर पडतो हाच खोकला होय.

कारणभेदाप्रमाणें वेगानें बाहेर पडणाऱ्या वायूचे अघातही भिन्न भिन्न प्रकाराचे होतात. आणि म्हणूनच निरनिराळ्या खोकल्यात पीडा व शब्द निरनिराळ्या प्रकारचे होतात.

वातुळ पदार्थांनीं कुपित झालेला वायु, छाती, घसा व तोंड यांना कोरड, हृदय, बरगड्या, छाती व डोकें यांत शूळ, मोह, अंतःक्षोभ, स्वरक्षीणता व कोरडी ढास हा उत्पन्न करतो. त्या ढासेचा वेग, पीडा व शब्द हे जबर असतात, अंगावर रोमांच उभे रहातात आणि मोठया कष्टानें कोरडा कफ पडला म्हणजे वायूचा जोर कमी होतो.

पित्ताच्या खोकल्यात कफ व डोळे पिंवळे होतात. तोंड कडू होतें, ताप, भ्रम, पित्ताची व रक्ताची उलटी, तहान, स्वर बिघडणें, घशात धुरकल्यासारखें वाटणें, आंबट ढेकर येणें आणि खोकल्याची मोठी उमळ आली म्हणजे डोळ्यापुढें काजवे दिसणे हीं लक्षणें होतात.

कफाच्या खोकल्यांत छातींत किंचित दुखणें, डोकें व हृदय ओलसर, थंड व जड होणें, घशास चिकटा येणें, हातपाय गळणें पीनस, उलटी, अरुची येण, रोमांच उभे रहाणें आणि दाट, चिकट व पाढरा कफ पडणें हीं लक्षणें होतात.

कुस्ती वगैरे साहसाचीं कामें आपल्या शक्तीच्या बाहेर केल्यानें उरांत क्षत होतें; त्या योगानें वायु कुपित होऊन पित्ताच्या मदतीनें बलवान होऊन खोकला उत्पन्न करतो. त्यांत रक्तमिश्रित पिवळा, काळा, कोरडा, गांठाळलेला व कुजलेला असा पुष्कळ कफ पडतो. घसा दुखतो, छाती फाटल्यासारखी वाटते, तींत तीक्ष्ण सुया टोंचल्याप्रमाणें वेदना होतात, शूळ होतो, पेरीं फुटतात, ताप, दमा, तहान, स्वर विघडणें व कंप येणें हीं लक्षणें होतात. पारव्याच्या शब्दासारखा घशांतून आवाज निघतो; बरगड्या दुखतात, हळू हळू वीर्य, रुची, पचनशक्ति, ताकत व कांति हीं क्षीण होतात. आणि अशा तऱ्हेनें तो क्षीण झाला म्हणजे त्यास रक्तमिश्रित लघवी होते, आणि मग पाठ व कंबर धरते.

राजयक्ष्मानिदानांत सांगितलेल्या क्षयाच्या साहसादि कारणांनीं क्षयरोग्याचे कुपित झालेले वातप्रधान दोष खोकला उत्पन्न करितात. त्यांत घाणेरड्या पुवासारखा पिवळा, दुर्गंधी, हिरवा व तांबडा असा कफ पडतो. बरगड्या उपटून काढल्याप्रमाणें वाटतात, हृदय पडतेंच कीं काय असें वाटतें, कारणावांचून उष्णाची किंवा थंडाची इच्छा होते, रोगी फार खातो, शक्ति क्षीण होते, तोंड तुकतुकीत व प्रफुल्लित दिसतें आणि दांत व डोळे शोभिवंत दिसतात. त्यानंतर रोग्यावर क्षयाचीं सर्व लक्षणें दिसूं लागतात.

क्षयापासून व क्षतापासून होणारे हे खोकले क्षीण मनुष्यास झाले असतां त्यांचा नाश करितात. बलवान मनुष्यास झाले असता ते याप्य असतात, आणि नुकतेच झालेले असून जर वैद्य, औषध, रोगी व परिचारक यांची अनुकूलता असली तर साध्य होतात. एकदोषज खोकला साध्य आणि द्विदोषज व म्हातारपणामुळें झालेला खोकला याप्य होय.

खोकल्यावर औषधोपचाराची हयगय केल्यानें दमा, क्षय, वांती. आवाज बसणें इत्यादि अनेक दुर्धर रोग होतात म्हणून खोकला झाल्यास त्यावर शक्य तितका लवकर चांगला उपाय करावा.

चिकित्सा:—केवळ वाताच्या खोकल्यावर प्रथम वातघ्न औषधांनीं सिद्ध केलेले स्नेह, स्नेहयुक्त पेय, युष, मासरस वगैरे खाद्यपेय पदार्थ, लेह, धूम्रपान, अभ्यंग, घाम काढणें, परिषेक, व अवगाह हे उपचार करावे. मळाचा व वाताचा अवरोध असल्यास वातघ्न औषधाची बस्ती द्यावी.

पित्तयुक्तवातकासात जेवणानंतर तूप व दूध यांचें पान आणि कफयुक्तकासांत स्निग्ध विरेचनें द्यावीं.

भुइकोहळ्याच्या अगर उसाच्या रसांत गेळफळ व ज्येष्टमदाचा कल्क कालवून उलटी होण्याकरिता द्यावा. कफ पातळ असल्यास मधुर औषधाशीं व कफ घट्ट असल्यास कडु औषधाशीं मिळवून निशोत्तराचें चूर्ण जुलाब होण्याकरिता द्यावें. रेच होऊन दोष निघून गेल्यावर थंड, मधुर व स्निग्ध असा पेयादि क्रम सुरू करावा. आणि दाट असल्यास थंड, रुक्ष व कडु पदार्थमिश्रित पेयादि क्रम चालवावा.

कफकासात कफ पातळ असल्यास शमन व दाट असल्यास शोधनधूम प्यावा. मनशीळ, हरताळ, जेष्टमद, जटामाशी, नागरमोथे व हिंगणबेटाची साल यांचा विधियुक्त धूम प्यावा. नतर गूळ घातलेलें कोमट दूध प्यावें. हा धूम फार दिवसांचे जुने वाताधिक व कफाधिक खोकले तावडतोब नाहींसे करतो.

कफाच्या खोकल्यात पित्तासंबंधाने तमकश्वास उत्पन्न झाला असल्यास त्या त्या अवस्थेनुसार पित्तकासाची चिकित्सा योजावी. नुसत्या वातकासांत कफसंबंध असल्यास कफहारक चिकित्सा करावी. वातकासात व कफकासांत पित्ताचा संबंध असल्यास पित्तनाशक चिकित्सा करावी. वातकफात्मक खोकला कोरडा असल्यास स्निग्ध व ओला असल्यास रुक्ष चिकित्सा करावी. पित्तयुक्त कफकासांत कडू औषधांनीं मिश्रित अशी चिकित्सा करावी.

उरःक्षतावर तावडतोब लाखेचे चूर्ण दूध व मध यातून प्यावें. हें औषध जिरल्यावर साखर घालून दूधभात खावा. ज्याच्या कुशी व बस्ती वगैरेत शूळ होत असेल आणि ज्याचे पित्त व अग्नि हीं मंद असतील, त्याने मद्यातून लाख प्यावी. ज्यास शौच्यास पातळ होत असेल त्यानें नागरमोथा, अतिवीष, पहाडमूळ व इंद्रजव याच्या चूर्णातून लाख घ्यावी. निरनिराळ्या मार्गांनीं रक्त जाऊं लागल्यास ते ते मार्ग बंद करण्याची रक्तपित्तावरील चिकित्सा करावी.

ज्याचा अधोवायु बंद झाला असेल त्याने बकऱ्याची चरबी सैंधव घालून दारूंत मिळवून घ्यावी. कृश, क्षयी, उरःक्षती, ज्यास झोंप कमी आहे व ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे त्यानें दूध तापवून काढलेल्या सायीबरोबर तूप, मध व खडीसाखर घालून बकऱ्याची चरबी खावी. वातानें अंग दुखत असेल तर वातनाशक तेलें अंगास चोळावीं. प्रकृतींत पित्ताचा जोर असल्यास तूप चाटावें आणि वात अधिक असल्यास तें प्यावें. चाटलेलें तूप पित्ताची शांति करते आणि तें थोडें असल्यामुळें अग्नीस मंद करीत नाहीं. प्यालेले तूप झपाट्यासरसें वायूस जिंकून जठराग्नास शमवितें. ज्याचा अग्नी मंद आहे त्याच्या उरःक्षतावर, क्षयावर सांगितलेली दीपक चिकित्सा करावी. शौच्यास पातळ होत असल्यास स्तंभक चिकित्सा करावी.

क्षयाच्या खोकल्यात प्रथम बृंहण व अग्निदीपन करावें. दोष फार वाढलेले असल्यास स्नेहयुक्त हलकें विरेचन द्यावें. पित्त, कफ व रसादि धातू क्षीण झाले असतां क्षयकासी रोग्यानें काकडशिंगी, दूध, चिकणा व अतिबला या औषधांनीं सिद्ध केलेलें तूप प्यावें. लघवीचा रंग बदलल्यास

किंवा मूत्रकृच्छ्र झाल्यास भुइकोहळा किंवा कदंब व ताड याच्या फळानीं सिद्ध केलेलें तूप किंवा दूध प्यावें. शिश्न, गुद, ढुंगण व जांघाडे यांत सूज व वेदना असल्यास हलकी अशी तुपाची निवळी किंवा तेलतुपाचें मिश्रण याची स्निग्ध बस्ती द्यावी. यावर मांसभक्षक लांडगा, वाघ वगैरेंचें मांस खाण्यास द्यावें. हें क्रूर पशूंचें मांस स्रोतास चिकटून बसलेल्या कफास सोडवितें व त्यायोगें स्रोतें मोकळीं होऊन त्यातून अन्नरस चांगल्या रीतीनें वाहून पुष्टि देतो. कूष्मांडक रसायन (वा. चि. स्था. अ. ३) अगस्तिरसायन व च्यवनप्राशयावलेह (वा. चि. स्था. अ. ३) हीं औषधें द्यावीं. क्षयकास झालेल्या रोग्यास वातघ्न औषधाच्या काढ्यांत सिद्ध केलेले दूध, काट, किंवा विष्किर, प्रतुद व विलेशय प्राण्यांच्या मांसाचे सुर्वे द्यावे. उरःक्षताच्या खोकल्यावर जे धूम व जीं अनुपानें सांगितलीं आहेत ते धूम व तीं अनुपानें क्षयकासावरहि योजावीं. क्षयरोगावर जी बृंहण, अग्निदीपन आणि स्रोतसाची शुद्धि करणारीं औषधें आहेत तीं क्रम बदलून क्षयकासावर योजावीं. सारांश जेवढे कांहीं शक्तिवर्धक उपाय असतील ते सर्व यावर प्रशस्त आहेत. क्षयकास सन्निपातापासून उत्पन्न होतो व भयंकर असतो. म्हणून सन्निपातावरील चिकित्सा त्यावर दोषबलानुसार केली असता हितकर होते.

खोकल्यात पथ्याकरिता साठेसाळीचा भात, गहूं, उडीद, मूग, कुळीथ, शेळीचें दूध, तूप, वांगीं, मुळा, चाकवत या भाज्या; लसूण, द्राक्षें. लाह्या, ऊन पाणी, मध, हे पदार्थ द्यावे.

मैथुन, दिवसा झोप, दहीं, पिष्टमय पदार्थ, धूम्रपान व खीर हे पदार्थ कुपथ्यकारक आहेत.

लवंगादिगुटी, उन्मत्तभैरव, ताम्रपर्पटी, हेमगर्भरस आणि नागवल्लभरस हीं योगरत्नाकरातील औषधें खोकल्यावर गुणकारी आहेत. [वाग्भट; चरक; योगरत्नाकार.]

पा श्चा त्य वै द्य का ती ल मा हि ती.—पाश्चात्य वैद्यक ग्रंथांत 'रोगाचे स्वरूप,कारणे,लक्षणे, चिकित्सा'यांचाच विचार प्रायः केलेला आहे. तथापि जनतेमध्यें रोग कोणता व लक्षणें कोणतीं याविषयीं अज्ञान असते. त्यात लक्षणासच रोग मानणें असा प्रकार वारंवार घडतो. तथापि कांहीं लक्षणाचा रोग म्हणूनच विचार करणें सोयीचें असल्यामुळें अग्निमांद्य, कावीळ इत्यादि रोगलक्षणानां या ग्रंथात स्वतंत्र स्थान मिळालें आहे. अशा थोड्या परंतु महत्वाच्या लक्षणांपैकीं कास उर्फ खोकला होय.

खोकला म्हणजे घसा, कंठ, श्वासनलिका यांत दाह उत्पन्न करण्यासारखा कफ, श्लेष्मा, हे आंगतुक पदार्थ शिरतात व ते उच्छ्वासाच्या क्रियेनें बाहेर पडण्यास मदत व्हावी अशी निसर्गाची योजना आहे. म्हणून खोकला म्हणजे आगंतुक दाहकारक पदार्थ बाहेर निघेपर्यंत एकामागून एक (प्रायः रोग्याकडून दबल्या न जाणाऱ्या) अशा अनेक उच्छ्वासाची मालिकाच होय अशी याची सोपी व्याख्या आहे. खोकला म्हणजे केवळ थंडी, गारठा, वारा, पडसें इत्यादि कारणांमुळें येणारें दुखणें यापेक्षां त्याचें महत्व लोकांस माहीत नसतें. परंतु खोकल्याच्या तीव्र व जुनाट स्वरूपामध्यें कित्येकवेळा चिंताजनक व काळजी करण्यासारख्या भयंकर व चमत्कारिक रोगांचें बीज असतें व खोकला हें त्या रोगाचें केवळ बाह्य लक्षण होय. अशा भयंकर रोगांपैकीं दमा, फुप्फुसदाह, हृद्रोग अगर हृदयरोग, मलग्रंथिदाह फुप्फुसावरणदाह, डांग्या खोकला, कफक्षय अगर राजयक्ष्मा या व इतर मुख्य रोगाचें वर्णन ज्ञानकोशात त्या त्या सदराखालीं वाचावयास सांपडेल. या सर्व रोगात खोकला हे त्याच्या प्रधान लक्षणांपैकीं एक लक्षण असतें. या रोगातील खोकल्यास साध्या पडसें, सर्दीच्या खोकल्याप्रमाणें निरुपद्रवी मानून त्यावर उपचार करणें चुकीचें होईल. याखेरीज आणखी अनेक रुग्णावस्थेमध्यें खोकला हें लक्षण म्हणून आढळतें. त्याचें वर्णन त्रोटक असें पुढें दिलें आहेः—(१) दीर्घकालीन मूत्रपिंडदाहामध्यें आगतुक संकट म्हणून हृदय विकृत होते व त्यावेळीं हृद्रोगजन्य खोकल्याप्रमाणें हृदयावर व मूत्रपिंडदाहरोगावर उपचार करावेत. ही माहिती त्या लेखाखालीं वाचावयास सांपडेल. (२) घटसर्प म्हणजे यूरोपीय देशातील साथीचा म्हणून गणलेला, घसा व श्वास मार्गांत चिकट पापुद्रा उत्पन्न करून देवीप्रमाणें अतिशय प्राणहानि करणारा, पूर्वी असाध्य मानलेला परंतु हल्लीं लशीच्या तोडग्यामुळें व आधुनिक रोगप्रसारप्रतिबंधक उपायामुळे बराच सुसाध्य झालेला असा ताप होय. हिंदुस्थान देशात हा आढळत नसल्यामुळें त्याचा अधिक विचार कर्तव्य नाहीं या रोगात श्वासावरोधानें उत्पन्न होणारें गुदमरणें टळण्यासाठीं कंठनालछेद अगर श्वासनलिकाछेद या शस्त्रक्रिया एखादेवेळीं कराव्या लागतात. (३) कंठदाह, घसा व पडजीभ याच्या दाहामुळें होणाऱ्या खोकल्यास ठराविक उपाय न करितां तदनुरूप चिकित्सा केली पाहिजे. (४) जठरामध्यें पचनसंबंधीं बिघाड उत्पन्न होऊन झालेल्या खोकल्यावर मूळ रोगाची चिकित्सा करावी. (५) बाह्यकान अगर कानांतील तेलकट मळाच्या गाठी बनून कधीं खोकला उत्पन्न होतो. त्यावर नेहमींचे इलाज फुकट जाऊन केवळ मळ मऊ करून थोडे दिवस कान धुण्यानें खोकला बरा होतो. (६) बद्धकोष्ठ, दंतोद्भव, अपचन, कृमी इत्यादि दाहजनक कारणामुळें आतड्यांत दाहक्रियेस आरंभ होऊन खोकला झाल्याचीं उदाहरणें अपरिचित नाहींत. त्यावर तदनुरूप इलाज करून मूळ रोगावर प्रहार केला पाहिजे. यावर खोकल्याच्या ठराविक गोळ्या, चाटणें व मिश्रणें निरुपयोगी होत. (७) मज्जातंतुजन्य रोग व उन्माद रोग यामध्यें रोग्यास " विनाकारण रोदन, हास्य व अशाच इतर लहरींप्रमाणें दिसणाऱ्या लक्षणाबरोबर रोग्यास छातींत अगर इतर ठिकाणीं कांहीं विकृति नसून एकसारखी खोकल्याचा ढांस लागते. ती बरी होण्यास साध्या खोकल्यावरील इलाज न करिता उन्माद वातशामक उपचार करावे. अशांपैकीं बहुतेक स्त्रीरोगीच

असल्यामुळें गर्भाशय व तदनुषंगिक इंद्रियें विकृत झालीं आहेत की काय यांची परीक्षा करवून त्यांवर इलाज केल्यानें हा रोग थांबतो.

या विवेचनावरून साधा खोकला व नानाविध रोगाचा सूचक म्हणून आलेला खोकला यांची परीक्षा नज्ज्ञाकडून करण्याचें महत्व कळून येईल. दुसऱ्या प्रकारच्या खोकल्यांत चांगल्या वैद्य, डॉक्टरांच्या सल्लयानें उपचार करावे. साध्या खोकल्यासाठीं देशी अगर इंग्रजी वैद्याकांतील चाटणें, वड्या तोंडांत धरण्याच्या व ढास थांबणाऱ्या गोळ्या, घसा, पडजीभ, यांवर लावण्याचीं तुरट व गोड औषधें या सर्व अगर एखादद्सऱ्या औषधाचा उपयोग करावा. याशिवाय छातीवर मोहरी वाटून तिचा लेप फडक्यावर पसरून छाती लालसर होईपर्यंत लावावा. टरपेंटाइन, कापूर, क्लोरोफार्म, मोहरी यांचीं वैद्य व डॉक्टर याच्याकडून तयार झालेली तेलें छातीस चोळणें हाहि एक उत्तम उपाय आहे. वाफाऱ्यानें कपडा ऊन करून त्या बोळ्यानें अगर जवसाच्या पोटिसानें खोकल्याच्या तीव्रतेप्रमाणें एकदोनदा अगर अधिक वेळा छाती शेकणें हाहि एक सुलभ व उत्तम घरगुती उपाय आहे. वरचेवर खोकला येण्याची संवय जडलेल्या रोग्यानें आपली एकंदर प्रकृति सुधारण्यासाठीं पौष्टिक औषधें व लोहयुक्त औषधें घ्यावीत. जुनाट खोकल्यसाठीं कॉडमाशाच्या तेलापासून बनवलेलें श्वेतमिश्रण फार उपयोगी असतें. गरम कपडे, ताजी व मुबलक कोरडा हवा, समुद्रस्नान, समुद्रकाठची हवा यापैकीं अनकूल असतील ते इलाज रोग्यानें करावे.

कासगंज तहशील.—संयुक्त प्रांताच्या एका जिल्ह्यांतील उत्तरेकडची तहशील. हींत उलई, बिलराम, पचलान, सोरोन, सिंधपूर, सहावर–करसान व फैझपूर–बदरिया हे परगणे असून तिचें क्षे.फ ४९३ चौ मै. आहे. या तहशिलींत ४८६ खेडीं व सहा मोठीं गांवें आहेत. पैकीं कासगंज (तहशिलीचें मुख्य ठिकाण), सोरोन व सहावर हीं सर्वांत मोठीं होत. एकंदर लोकसंख्या (इ.स.१९११) २७४१९८.

शहर.—संयुक्त प्रांतांतील एका जिल्ह्यामध्ये याच नावाच्या तहशीलिचें मुख्य ठिकाण. हें कानपूर–अछनेरा रेल्वेवर व मथुरा–बरेली रस्त्यावर आहे. कासगंजपासून सोरोनपर्यंत गंगेजवळ एक लहानसा आगगाडीचा फाटा गेला आहे. इ. स. १९०८ सालीं हा फांटा बरेलीपर्यंत वाढविण्याचें काम चालू होतें. जिल्ह्यांतील व्यापाराचें हें मुख्य ठिकाण असून येथील लोकसंख्या (इ स. १९११)१६,४२९ आहे. फरुकाबादचा नबाब महंमदखान, याच्या पदरच्या याकूतखान नामक खोजानें हें गांव वसाविलें असें म्हणतात. पुढें तें मराठयांकडे चाकरीस असलेल्या कर्नल जेम्स गार्डनर याच्या हातीं गेलें. त्यानें येथें बरीच मिळकत कमावली होती, परंतु त्याच्या वंशजांनीं ती उधळून टाकली. कासगंज हें उंचवटयावर वसलेलें असून येथें एकमेकांना काटकोनांत कापणारे दोन सुंदर बाजार आहेत. टाऊन हॉल (नगरभवन), दवाखाना, तहशिली व मुन्सफी ह्या येथील मुख्य सर्वजनिक इमारती होत. येथें मिशनरी सोसायटी व अमेरिकन मेथॉडिस्ट मिशन यांच्या शाखा आहेत. म्युनिसिपालिटीचें इ. स. १९०३–४ सालांतील उत्पन्न २२,००० रु. होतें. येथें साखर स्वच्छ करण्याचा धंदा वाढत असून, गावांत कापूस पिंजण्याचे व दाबण्याचे कारखानेहि आहे.

कासरगोड, तालुका.—मद्रास इलाख्यांतील दक्षिण कानडा जिल्ह्याच्या अगदीं दक्षिणेकडचा तालुका. क्षे. फ. ७६२ चौ. मै. यांत ११४ गावें आहेत. एकंदर लो. सं. (इ.स.१९२१) २,५६,९३१. या तालुक्याचा बहुतेक भाग डोंगरसपाटीचा व निर्वृक्ष आहे; परंतु दऱ्या खोल असून तेथें जमीन सुपीक व पाणी मुबलक आहे. विशेषतः तालुक्याच्या उत्तरार्धांतील जमीन पोफळीच्या लागवडीस फार चांगली आहे.

कासलपुरा—मुंबई इलाखा. महीकांठयांतलि एक लहानसे संस्थान. हें करोसन हद्दींत आहे येथील जहागीरदार कोळी असून ते गायकवाडाला खंडणी भरतात. वडील मुलाला वारसा देण्याचा किंवा दत्तक घेण्याचा अधिकार या घराण्याला नाहीं.

कासव—कासवाची (प्राणी) शास्त्रीय माहिती उरोगामी ' या लेखात कूर्मगण सदरांत(वि. ९ पा. ८०–८३.) दिलेली आहे. सरपटत चालणाऱ्या प्राण्यात कासव हा फार विलक्षण प्राणी आहे. हा आपलें डोकें, पाय व शेंपूट प्रसंगविशेषीं आपल्या पाठीखालीं झाकून घेतो. चिलखत घातल्याप्रमाणें वरच्या व खालच्या दोन आच्छादनांनीं याचें रक्षण होतें व सर्व अवयव वाटेल त्या वेळेस आकुंचित करण्याची शक्ति या प्राण्यास असते. फार मोठया आकाराचे कासव उष्णकटिबंधातील समुद्रात आढळतात; याच्याच पाठीचा मुख्यत्वेंकरून व्यापार होतो. ही पाठ साधारणपणें वजनात १०० शेराहून जास्त नसते. हे कासव अटलांतिक व हिंदी महासागरात सापडतात. कांहीं जातींच्या कासवाच्या पाठीवरील खवले फार सुंदर असून ताबूस व पिंवळया रंगाचे असतात. हिंदुस्थानांत व इतर देशात पूर्वी कासवांच्या पाठीच्या ढाली करीत असत

पाठीवरील खवले काढण्याकरिता पाठ ऊन करून चाकूनें खरडून काढतात. खवले काढलेल्या खरबरीत पाठीस बरीच किंमत येते. चागली पाठ असल्यास ती दरशेरीं ६०।६५ रुपयांस विकली जाते. हल्लीं विलायतेस शिंगाप्रमाणें कासवाच्या पाठीचेंहि अनेक पदार्थ करितात. लाखों रुपये किंमतीच्या पाठी इंग्लंडमध्यें सिंगापुराहून जातात.

ढालीची कृति व उपयोग.-मिठाच्या पाण्यांत कासवाची पाठ शिजवून नरम करितात व थंड होईपर्यंत दाबांत घालून तिला चपटी करितात. ती खरडून व कानसून गुळगुळीत व सर्वत्र सारख्या जाडीची करितात. एका पाठीपेक्षां जास्त

आकाराचा तुकडा पाहिजे असल्यास २ किंवा ३ तुकडे शिंगाप्रमाणें सांधतात. पाठीच्या कडा सुमारें पाव इंच तिरकस तासून त्या एकीवर एक ठेवून लोखंडी चापानें एकत्र दाबतात आणि चापासकट तो भाग कढत्या पाण्यात काहीं वेळ बुडवितात.यामुळें दोन्ही तुकडे ऊन पाण्यानें नरम होऊन दाबानें असे बेमालूम होतात कीं त्याचा सांधा दिसून येत नाहीं. कानसून पडलेला चुरा, दुसरे तुकडे, व पूड गोळा करून त्यास उष्णता व दाब याच्या योगें हवा तो आकार देता येतो. कासवाच्या पाठीच्यामागें धातूचा पत्रा लावून काम करतात; तेणेंकरून ढालीस सुबकपणा जास्त दिसतो.

हिंदुस्थानातील काहीं लोक कासवाचें मास खातात; परंतु यूरोपियन लोकाना तें आवडत नाहीं. कांसवाच्या पाठी प्राचीन काळापासून शोभेकरिता ठेवतात. त्या अर्धप्रकाश, भेद्य व पिवळ्या रंगाच्या असून ज्यावर तपकिरी ठिपके असतात व ज्याना जिल्हई चागली चढते अशा पाठी उत्तम समजतात. चीनमध्यें पाढऱ्या रंगाच्या व काळे ठिपके असलेल्या पाठींची चहा विशेष होते. कासव मारल्यानंतर त्याची पाठ जोरानें ओढून काढतात, अथवा उकळत्या पाण्यात कासव टाकतात म्हणजे पाठ निराळी होते. नैसर्गिकरीत्या मेलेल्या अथवा कुजूं लागलेल्या कासवाची पाठ हलक्या प्रतीची समजली जाते. हल्लीं यूरोपात 'मुल मार्केट्री' नावाच्या जडावाच्या कामाकरिता या पाठीचा उपयोग करतात. याशिवाय पाठीच्या लहान लहान पेटया, चौकटी, चाकू, अथवा वस्तऱ्याच्या मुठी, फण्या वगैरे जिन्नसहि करतात. हिंदुस्थानात कासवाच्या पाठीवरील सुंदर काम विजगापट्टण येथें होते.

कासवाची दुसरी एक जात आहे. तिला ब्रह्मदेशात लाइक प्येन-बोन अथवा लाइकक्यो आणि इंग्रजीत एडिबल टर्टल म्हणजे खाण्याचें कासव असे म्हणतात. हा प्राणी वनस्पत्याहारी असून त्याचीं अंडीं व मास हीं खातात.

कासार—हा शब्द तांब्या पितळेचीं भांडीं करणें व विकणें हे व्यापार करणारे आणि बागड्यांच्या धंदा करणाऱ्या जाती याना लावतात.याची वस्ती मुंबई इलाखा,वऱ्हाड, मध्यप्रांत व मध्यहिंदुस्थान यातून आहे. विशेषतः मुंबई इलाख्यात कासार वस्ती अधिक आहे. धंदा दोन प्रकारचा एका शब्दानें दर्शविला जातो. त्यापैकीं एका प्रकारच्या म्हणजे भांड्याच्या धंद्याला जातिवाचक दोन शब्द; यामुळ आकडे घोटाळ्याचे झाले आहेत. इ. स. १९११ च्या खानेसुमारींत ३६,२२८ ताबट नोंदले गेले, पैकीं २६९१३ मुंबई इलाख्यात, ४५७२ वऱ्हाडमध्यप्रांतांत व ५७४३ मध्यहिंदुस्थानात होते. यांमध्यें बांगारांचा समावेश नसावा. संस्कृत कास्यकार शब्दापासून कांसार शब्द बनलेला असावा अशी व्युत्पत्ति काहीं जणानीं दिली आहे. ती खरी असल्यास अशी कल्पना सुचते कीं पूर्वी काशाचें काम करणारा एखादा वर्ग असावा, तो भांडी व बागड्या करीत असावा व पुढें बांगडी करणारे आणि भांडीं करणारे निराळे झाले असावेत आणि त्यानंतर काशाचीं भांडीं जाऊन पितळेचीं आलीं असावींत व काशाच्या बागड्या जाऊन कांचेच्या आल्या असाव्यात. जातींचें स्पष्टीकरण करण्यास थोडेंसें पृथक्करण केलें पाहिजे तें पुढीलप्रमाणें करता येईल.

(१) त्व ष्टा का सा र.—ही भांडीं करणारी जात. या जातींत समेळ, दाडेकर, कडु, लोंबर, हजारे, गोडावे हीं आडनावें येतात. लोकसंख्या निश्चित नाहीं. कदाचित् पाचपासून दहा हजारपर्यंत असावी. या जातीस तांबटहि म्हणतात. हा कारागिराचा वर्ग होय. ही जात निवृत्त मास नाहीं.

(२) बां गा र.-या जातीचा धंदा भांडीं विकणें हा होय, करणें नव्हे, हा व्यापाऱ्याचा वर्ग होय, कारागिराचा नव्हे. यातलि काहीं मंडळी जैन आहेत. काहीं वैष्णव आहेत पण दोघाचा लग्नव्यवहार होतो. याचा धंदा बागड्या विकणेंहि आहे. बागड्या विकणारास बागड म्हणतात शे नेशें वर्षे ही जात लोखंडाचाहि व्यापार करीत आहे. यात मणेरी म्हणूनहि धंदा करणारे लोक आहेत. ते स्त्रियास लागणारा माल विकतात. सुमारें दोनशें वर्षांपूर्वी यात तंटे झाले आणि त्याच्या शाखा पडल्या, व त्यामधील लग्नव्यवहार थांबला. त्यामुळें एक दुसऱ्यास " तवर " म्हणूं लागले व एक दुसऱ्यास आपले लोकवळे आहेत असे सांगूं लागले. पण आज या संबंधाचा पुरावा नाहीं. या जातींत करले, राव, रासने, डागरे, पुसलेकर, वेळापुरे, रागोळे अशीं आडनावें आहेत. ही जात निवृत्तमास आहे. ही नागपूरपासून पुण्यापर्यंत व दक्षिणेकडे सोलापूर बेळगावपर्यंत पसरली आहे. गोव्यातील कासार व हे कासार याच्यात एकी करण्याची खटपट चालू आहे.

(३) पा चा ल का सा र.-ही निवृत्तमास जात आहे. या जातीचीं घरे पुण्यामध्ये पाच पंचवीस असतील. हिचा धंदाहि त्वष्टा कासाराप्रमाणे भांडीं घडविण्याचा आहे. या जातीमध्यें पंडित, भोकरे, जितकर, दस्तुरकर अशीं आडनावें आहेत. याची वस्ती महाराष्ट्रात चार पाच हजाराहून अधिक नसावी. या तिन्ही जाती कालिकादेवीस आपली देवी समजतात. आणि कालिकापुराणात उल्लेखिलेली जात आपलीच असे मानतात.

त्व ष्टा का सा र.—हे आपणाला त्वष्टाकांसार म्हणवितात, व विश्वकर्म्यापासून आपली उत्पत्ति लावितात. कासार आपणाला ब्राह्मण म्हणवितात व पुष्कळ बाबतींत ब्राह्मणासारखे दिसतातहि. हे गळ्यात जानवीं घालतात, व ब्राह्मणी गोत्रें मानतात. आपल्या जातीचे भिक्षुक तयार करण्याचे याची खटपट ताबट धंद्याच्या मोठ्या किफायतीमुळे फारशी सिद्धीस गेलेली दिसत नाहीं.

कासारात कुळें व देवकें आहेत. एकच देवक असणाऱ्या घराण्यात परस्पर लग्नसंबंध होत नाहींत. दक्षिणेंत देवकाच्या ऐवजीं गोत्रें रूढ आहेत. व सगोत्रविवाह निषिद्ध मानिला जातो. दक्षिणी कांसारात मौंजीबंधन असतें, पण कोंकणी

कांसारांत तें नसतें. कुंकू लावणें, गडगनेर, सीमांतपूजन, घाणा, देवप्रतिष्ठा, वाङ्‌निश्चय, रुखवत व सप्तपदी या गोष्टी लग्नविधींत मुख्य होत. घटस्फोट मान्य नाहीं.

कासार हे कालीचे उपासक आहेत. बहिरीचंडिका, एकवीरा, कुमारिका, खंडोबा. महालक्ष्मी याहि यांच्या कुलदेवता असतात. सोलापुर वगैरे कांहीं ठिकाणीं जैन कासार आढळतात. याचा और्ध्वदैहिक विधि ब्राह्मणाप्रमाणेंच असतो. हे मद्यमांसाशन करितात; पण ब्राह्मणाखेरीज दुसऱ्या जातीच्या हातचें खात नाहींत.

ज्ञातीचे मुख्य वस्तीचें ठिकाण मुंबई व पुणें हीं शहरें होत. मुंबईत आजमासें तीन चार हजार किंवा अधिक वस्ती असून पुण्यात सुमारें दिड हजार वस्ती आहे. आलिबाग, भिवंडी, पेण पनवेल, वसई, नासिक व निझामचें राज्य यातूनहि वस्ती आढळते. मुंबईत, ज्ञातीच्या पंचायती आहेत आणि त्याचप्रमाणे गावोंगावींहि आहेत. मुंबईतल्या पंचायतीला विशेष महत्व आहे. पंचायतीचा अध्यक्ष मुंबईत तीन वर्षांनीं निवडला जातो. तो वंशपरंपरेनें निवडला जात नाहीं. आणि हाच नियम बहुतकरून सर्व गांवीं लागू आहे मुंबईमध्यें पायधुणीवर कालीकादेवीचें देऊळ आहे. त्याशिवाय कादेवाडींत तीन चाळी आणि सोनापुरात एक धर्मशाळा आहे. कालिकादेवीच्या सर्व चाळीच्या उत्पन्नाचा उपयोग ज्ञातीच्या धार्मिक, सामाजिक व इतर उपयुक्त बाबींकडे केला जातो. ह्या सर्व इस्टेटीची किंमत सुमारे तीन चार लाख होईल. त्याचप्रमाणें पुणे, सातारा, पनवेल, पेण, रत्नागिरी, उरण, निजामपुर, किहीम इत्यादि गावात ठिकठिकाणीं इस्टेटी आहेत. त्या सर्व इस्टेटीचें उत्पन्नाचा विनियोग लोकांच्या खासगी कामाकरिता होत नाहीं. ज्ञातीच्या हक्काचा पूर्वापार चालत आलेला (म्हणजे एक मण ताब्यामागें)अर्धा पैसा हल्लीं ज्ञातींत एकी नसल्यानें वसूल होत नाहीं. पंचायतीचे निवाडे लिहून ठेवण्याची पद्धत आहे. परंतु ते फार वर्षांचे नाहींत. मध्यंतरीं असलेले रेकॉर्ड विकून टाकिलें. पंचायतीचे निकाल अमलात आणण्याकरिता बहिष्कृत ठेवणे हें साधन ज्ञातीच्या स्वाधीन आहे. परंतु ते फार दिवस टिकत नाहीं. कारण कांहीं लोक मध्यस्थी करून ते रद्द करवितात. ज्ञातीच्या पंचायतीपुढें ज्ञातीच्या हिताचे प्रश्न येतात. ब्राह्मणाशिवाय इतर जातीबरोबर अन्नोदिक व्यवहार होत नाहीं. ज्ञातींत पोटजाती मुळींच नाहींत. ज्ञातींत मुंज, विवाह इत्यादि संस्कार कोंकणस्थ व देशस्थ ब्राह्मण करितात. ज्ञातीचे प्रश्न जातच सोडविते आणि शास्त्राधारासंबधानें ब्राह्मणाचा सल्ला घेते पण अशी वेळ फार क्वचित येते. ज्ञातीचे सर्व संस्कार वेदोक्त धर्माप्रमाणें उपाध्यायाकडून करून घेतात. कांहीं वर्षांपूर्वी आपण ब्राह्मण कीं क्षत्रिय असा प्रश्न निघाला होता पण त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. ज्ञातीच्या इतिहासासंबंधानें ज्ञातीची मंडळी येणेंप्रमाणें माहिती देतातः—ह्या ज्ञातीचा जनक त्वष्टा होता. त्वष्टा हा विश्वकर्म्याचा मुलगा होता. विश्वकर्मा हा भुवनाचा पुत्र व बृहस्पतीचा भाचा होता. तो आंगिरा वंशांतला होता. विश्वकर्मा रथकारांचा गुरु असून महातपस्वी होता. मनु, मय, त्वष्टा, शिल्पी व दैवज्ञ (विश्वज्ञ) हे पांच देवर्षी होते. हे सर्व विश्वकर्म्याच्या मुखापासून झालेले होते. काष्ठ, सुवर्ण, शिल, लोह आणि ताम्र या पाच प्रकारचें शिल्पकर्म करणाऱ्या विश्वकर्म्याच्या पांच पुत्रांस रथकार अशी संज्ञा होती. ह्यांनीं वैदिक कर्मानें संस्कार करावा व त्याच्या वंशात झालेल्याचाहि उपनयन संस्कार करावा असा अधिकार होता. चार वेद आणि त्यांचीं सहा अंगें ह्या सर्वांनां जाणणारे जे विद्वान ब्राह्मण असतात, त्यांचा जो धर्म वेदांनीं सांगितला तोच धर्म विश्वकर्म्याचा आहे, व त्याच्या वंशात उत्पन्न झालेल्यांचाहि आहे" (पंचाल ब्राह्मण्य निर्णय पुस्तक पृष्ठें ८६, ८९, १०२). ज्ञातीमधील वृद्ध गृहस्थाच्या तोंडून परंपरागत जी हकीकत सागण्यात येते तीवरून पहातां कासार श्री कालिका देवीचे उपासक व सोमवंशी क्षत्रियकुलोत्पन्न आहेत. ह्या समजुतीला पुष्टि कथाकल्पतरु ग्रंथातल्या हकीकतीवरून मिळते. हा ग्रंथ ओवीबद्ध मराठी भाषेंत असून ३०० वर्षांपूर्वी नाशिक क्षेत्रीं कृष्णयाज्ञवल्की नावाच्या ब्राह्मणानें पुराणग्रंथाच्या माहितीनें लिहिला. त्यात कार्तवीर्य सहस्रार्जुन ह्याचा पुत्र धर्मपाल व चोलराजाची कन्या चंद्रगुप्ता ह्या दोघांपासून जे पुत्र झाले तेच पुढें देवीच्या आज्ञेवरून कास्य, ताम्र वगैरे धातू बनविण्याची कला शिकून त्या कलेचे प्रचारक झाले, व तेव्हापासून ते कास्यकार व कासार ह्या नावानें लोकात प्रख्यात झाले अशी कथा दिलेली आहे, व ही कथा पद्मपुराणांतर्गत कालिकामहात्म्यावरून लिहिली आहे, असे कर्त्यानें म्हटलें आहे. त्वष्टा ब्राह्मण आहेत ह्यासंबंधानें बराच उहापोह झाला होता म्हणून आज ज्ञातीचे लोक आपणाला त्वष्टाकासार असें म्हणवितात.

गेल्या तीनचारशें वर्षांत ज्ञातीचीं स्थलांतरें धंद्यापरत्वें झालीं परंतु तीं कायमचीं झालीं नाहींत. ज्ञातीत पुनर्विवाह होतो, परंतु तो धनिक किंवा संभावित कुटुंबें करीत नाहींत ज्ञातींत पुरुषास रखेल्यापासून झालेल्या मुलाची जात झालेली नाहीं. ज्ञातींतल्या स्त्रियांस अधर्मव्यवहारानें सजातीय पुरुषापासून मूल झाल्याचें एकहि उदाहरण आढळून आलें नाहीं. यांचीं आडनावें पुढील प्रमाणें आहेत. हजारे, दाडेकर, गोडांबे (ये), आर्ते, लोंबर, कडु, पिंपळे, पुरोहित, वाडेकर, येडेकर, त्रिभुवने, शेटे, सोष्टे, ताबडे, समेळ, वडके, गोंडे, (ड्ये), मुळे, करडे, इनामदार, डेरे, कवळे, पारंगे, इश्वाद, तालीम, ताबट, शिंम्री, पोटफोडे, निजामपूरकर, सामे, खुळे, बोसलीकर, डाखणे, तांबट, पाटील, पुसलेकर, साळवी, दवणकर, मांडके, पारिंगे, लांजेकर, देशमुख, पोरे, मोरे, गंभीर, रणशिंगे, रात, बोधे व म्हशेटे.

गोत्रें. गालभ्य, अंजीरा, भृगु, काशप, अत्रीय, भारद्वज, इत्यादि यांचीं गोत्रें आहेत.

दे व कें.— एकविरा, बाहिरीभवानी, हामजाईनिमजाई, महालक्ष्मी, जमनाबाई इत्यादि कासारांची देवकें होत.

काहीं प्रसिद्ध पुरुष.—कै. नारायण भाई दाडेकर (शिक्षणखात्याचे पहिले नेटिव्ह डायरेक्टर, हे वऱ्हाडात होते). कै. बाळकृष्ण गोपाळ तालीम (कॉन्ट्रॅक्टर हैदराबाद संस्थान). कै. रामकृष्ण माणिकजी येडकर (व्यापारी). कै. रामकृष्ण पुरुषोत्तम वाकनीस (इनामदार). रा. रा. आनंदराव-वामन शेटे (ऑनररी मॅजिस्ट्रेट). भास्कर रामचंद्र आर्ते एम. ए. (प्रोफेसर बरोडा कॉलेज)

संस्था.—त्वष्टाकासार विद्योत्तेजक मंडळी को आपरेटिव्ह सोसायटी; त्वष्टाकासार ज्ञाती संस्थान मुंबई; कासार समाजोन्नति मंडळ मलकापूर (वऱ्हाड). ज्ञातीचे त्वष्टसेवक नामक मासिक (संपादक, रामकृष्ण महादेव समेळ).

या ज्ञातींतील बरेच सुशिक्षित लोक निरनिराळ्या धंद्यात व मोठ्या दर्जावरहि आहेत

बोगार.—ही जात बरीच मोठी आहे. या जातींतील जैन मंडळी; कासार जात सर्वच जैनधर्मी आहे असें भासविण्यासाठीं आणि सर्व कासारांनीं जैन बनावें यासाठीं खटपट करीत आहे. सर्व कासार मूळचे जैन पण पेशव्यांच्या जुलमामुळें ब्राह्मणानुयायी झाले अशीं मतें ते प्रतिपादन करीत आहेत. सोलापूरकर जैनकासार पंचमंडळीकडून पुढील महाराष्ट्रीय जैनकासार मंडळीची माहिती आली आहे. " खानेसुमारींत तावट लोकांनींहि कासार म्हणून लिहून दिलें आहे.सातारा, रत्नागिरी,पुणें,बेळगाव, सोलापूर,पंढरपूर, कर्नाटक, निजाम हैद्राबाद, अहमदनगर, धुळे, वऱ्हाड वगैरे प्रांतातील कासार पूर्वीपासून जैनधर्मी असल्यामुळें खानेसुमारींत आपली जात काहींजणानीं ' जैन म्हणून लिहून दिली आहे; यामुळें लोकसंख्या बरोबर कळत नाहीं. कासार लोक सोमवंशी आहेत. कासार व बोगार एकाच जातीला म्हणतात. भांडीं विकणारास बोगार म्हणतात. काकणें (बांगड्या) विकणारास कासार म्हणतात.

जातीच्या गावोगाव पंचायती आहेत. विशेष पंचायती धर्माधिकाऱ्याच्या हद्दींतील गावोगावचे पंच मिळून धर्माधिकाऱ्याच्या सल्ल्याने करितात. धर्माधिकाऱ्यास भट्टारक म्हणतात. कासारात भट्टारकाच्या तीन गाद्या आहेत. कारंजा मुक्कामीं एक गादी आहे. तेथील भट्टारकास देवेंद्रकीर्ति म्हणतात. दुसरी गादी मलखेड (निजामराज्यात) येथें आहे. तेथील भट्टारकास रत्नकीर्ति म्हणतात. तिसरी गादी हुपस (कर्नाटकात) येथें आहे. येथील भट्टारकास देवेंद्रकीर्ति म्हणतात. कांहीं ठिकाणीं जातीचा अध्यक्ष निवडला जातो. काहीं ठिकाणीं तो वंशपरंपरेनें असतो. प्रत्येक गावात जातीचीं देवळें आहेत. त्यांच्या व्यवस्थेकरिता घरे, जमीनजुमला व जंगम मालमत्ता आहे. त्याच्यावर त्या गावच्या पंचाची सत्ता आहे. त्या मालमत्तेची किंमत नक्की माहीत नाहीं. त्या त्या गावच्या व शहराच्या मानानें आहे. देवळात पूजेकरितां पूजारी नेमलेला असतो. तो देवळाच्या व्यवस्थेकरिता योग्यतेनुसार वर्गणी वसूल करीत असतो. धर्माधिकारी वर्षासन वसूल करतात. गावचे लहानसहान निवाडे लिहून ठेवण्याची पद्धत नाहीं. धर्माधिकाऱ्याच्या समक्ष मोठी पंचायत झाल्यास तिचा निवाडा मठात लिहून ठेवावयाचा पूर्वीपासून वहिवाट आहे. बहुतकरून गावचे निवाडे गावकरीच अमलांत आणतात. जर ते कोणी ऐकले नाहीत तर धर्माधिकाऱ्याकडून दंड किंवा शासन म्हणजे बहिष्कारपत्र आणून ते अमलात आणतात. धर्माधिकारी बहुमतानें नेमलेला असल्यामुळें तो जात पंचायतीच्या निवाड्याप्रमाणें शासन करण्यास पूर्ण अधिकार आहे; सरकारच्या मंजुरीची जरूरी नाहीं. धर्मनियमाविरुद्ध कोणत्याहि व्यक्तीनें वर्तन केल्यास त्याबद्दल प्रश्न येतात. महत्वाचे प्रश्न आलेले धर्माधिकाऱ्याच्या दप्तरात मिळतात. या जातीच्या सदृश अशा पंचम, चतुर्थ, सेतवाळ इत्यादि जैनधर्माप्रमाणें वागणाऱ्या जाती दक्षिणेंत आहेत. इतर भिन्न जाती पुष्कळ आहेत. जैन जातींत पुष्कळ पोटजाती आहेत. त्यापैकीं पंचम व चतुर्थाबरोबर बेटीव्यवहार सुरू झाला आहे. जैन जातीबरोबर अन्नोदक व्यवहार चालतो. जातमध्ये जैन उपाध्यायाकडून विवाहादिक संस्कार करवितात. जातीचे कोणतेहि प्रश्न धर्माप्रमाणें सोडविले जातात. वैदिकधर्मी ब्राह्मणाच्या सल्ल्याचा बिलकुल जरूरी पडत नाहीं. जातीच्या अगर व्यक्तीच्या उद्योगाप्रमाणे व्यक्तीस चातुर्वर्ण्य व्यवस्थेंत स्थान मिळतें. पूर्वी कासार ही जात क्षत्रिय होती असें पुराणांच्या आधारें जातीचें म्हणणें आहे. जातीचे कागदपत्र मलखेड, होबुज, कोल्हापूर येथील धर्माधिकारी व सातारा येथे रागोळे याजकडे आहेत. जातीचा इतिहास महापुराण, व कालिकापुराणावरून प्रमाणबद्ध आहे कालिकापुराण ग्रंथाचा शंभरसवाशें वर्षांचा हस्तलिखित पुरावा हजर आहे. गेल्या दोनतीनशें वर्षांत महाराष्ट्र व मध्यप्रांतात पेशव्यांचा अम्मल असताना ब्राह्मणाचे तेज या जातीवर पडून ही जात ब्राह्मणानुयायी झाली आहे. त्यावेळीं ब्राह्मणशाही असल्यामुळे जैनधर्माधिकाऱ्याना महाराष्ट्रात फिरणें, उपदेश करणें व आपली खंडणी वसूल करणें फारच बिकट झालें. त्यामुळें कासार लोक ब्राह्मणानुयायी झाले आहेत. याजबद्दल पुरावा साताऱ्याचे रागोळे याच्या घराण्यात मिळतो. मलखेडच्या धर्माधिकाऱ्यांनीं साताऱ्यास जाऊन कासारास " तुम्ही आमचे शिष्य आहात व आम्हास मानलें पाहिजे " असें सांगितलें. त्यानंतर सातारकरांनीं काहीं प्रश्न विचारले. त्यांनीं त्यांस समर्पक उत्तरें देऊन मानपान स्वीकार करून घेतले आहे. याबद्दल कोल्हापूर सरकारांत निवाडे झाले आहेत. याबद्दल लेखी कागदपत्र रा. रा. रामभाऊ रागोळे सातारकर (हल्लीं मुक्काम बारामती) याजकडे आहेत. इंग्रजी राज्यापूर्वी पेशव्यांच्या काळांत

जैनधर्मावर गदा आली तिचा परिणाम अद्यापि दिसून येतो. अलीकडे थोडाबहुत जैनधर्माचा प्रकाश महाराष्ट्रात कासार मंडळीवर पडत चालला आहे. १९१७ च्या कार्तिकमासीं मलकापुर (वऱ्हाड प्रांत) येथें कासार परिषद भरल्यावेळीं जैनधर्मा व अन्यधर्मी पुष्कळ कासार मंडळीमध्यें शरीरसंबंध, आप्तपणा व भाऊबंदकी जुळली. त्यावेळेस एका जातीमध्यें धर्म विरोध का ? यावद्दल विचार उत्पन्न झाला. जैनधर्मी कालिकापुराण पुष्कळ मंडळींनीं घेऊन त्याचा विचार मनःपूर्वक चालविला आहे. तारीख ८।६।१८ रोजीं पुणें मुक्कामीं शेठ शंकरराव मुरुडकर यांचे अध्यक्षतेखालीं कासार लोकांची सभा भरली त्यावेळीं कासार समाजाचा पूर्व इतिहास सांगतेवेळीं आम्ही पूर्वी जैन होतो, तोच धर्म आमचा असावा वगैरे वाटाघाट झाली.

हल्लींच्या कालमानास अनुसरून पुनर्विवाह सुरू आहे. निराश्रित विधवा व मुलांची तरतुद जातीनें कांहीं केली नाहीं.

गु ज रा थ—गुजराथेंत तांबट लोक मुख्यतः मोठ्या शहरांतून दिसतात. सिधपुरांत तांबट नाहींत. सिधपुरात तांबें वितळत नाहीं अशी म्हण आहे. अशी एक गोष्ट सांगतात कीं, पावागडास पांच बंधू राहत असत, ते कालिका मातेचे भक्त असत व ते तिची झांजा वाजवून पूजा करीत. देवी त्यांच्यावर इतकी प्रसन्न झाली कीं "तुम्हीं धातू वाजवून किंवा ठोकून पोट भराल" असा तिनें त्यांस वर दिला. पितळ ठोकण्यापासून पितळेचीं, तांब्याचीं व कांसें या धातूंचीं भांडीं तयार करण्यापर्यंत यांची प्रगति झाली आहे. बगाय, बारमेय, भट्टी, इत्यादि ६ आडनांवें त्यांच्यांत आहेत. भट्टी, गोहेल व परमार या आडनांवावरून त्यांच्यांत रजपूत रक्ताचा अंश असावा असें दिसतें. कालिकामाता ही यांची कुलदेवता होय. चाम्पानेरी, मारू, सिहोर व विसनगरा हे यांच्यात ४ पोटभेद आहेत. विसनगराशीं चाम्पानेरी तांबट रोटीबेटीव्यवहार करतात पण बाकीच्या वर्गांत रोटीबेटीव्यवहार होत नाहीं. मारू व मारवाडी लोक जानवें घालतात. दिसण्यांत, पोषाखांत व चेहेऱ्यांत कंसारा लोक वाणी व कुणबी यांच्याप्रमाणेंच आहेत. बायका देखण्या आहेत पण त्या पातिव्रत्याविषयीं फारशी दक्षता बाळगीत नाहींत असें गॅझिटियरकार विधान करितात (मुं. गॅ ९ भा. १). कच्छ मधील कांहीं तांबट मांस व बकऱ्याचें मांस खातात व मद्यपानहि करतात. बाकीचे तांबट शाकाहारी आहेत. ज्या ज्या धातूचीं भांडीं हे घडवितात त्या त्या धातूवरून यांस नांव मिळतें; उदाहरणार्थ तांबाघड, पितळघड, व सोनार इत्यादि. हे लोक बहुतेक स्वतःच्याच घरीं कामें करतात व त्यांच्या बायकाहि चाती फिरवणें, झिलई देणें वगैरे कामांत त्यांस मदत करतात तांब्याचीं व पितळेचीं निरनिराळ्या आकाराचीं भांडीं ते घडवितात. काठेवाडातील सिहोर येथील व उत्तर गुजराथेंतील कडी व वीसनगर येथील कंसारालोक आपल्या कामांत तरबेज असून नेहमींचीं भांडीं करून शिवाय टांक, दौती, पानसुपारीचे डबे, देवांच्या मूर्ती, दिवे, घंटा वगैरे वस्तूहि ते करतात. तांब्यास भांड्याच्या वजनाप्रमाणें पैसे मिळतात. कल्हई लावणें, मोडीचीं भांडीं विकत घेणें वगैरे कामांकरितां हे लोक शहरभर हिंडतात.

कंसार लोक शांत व समाधानी असून त्यास गुडगुडी ओढण्याचा नाद आहे व गाण्याचीहि आवड आहे. यांच्या बायका आश्विन शुक्लपक्षांत फेर धरून कांहीं गाणीं म्हणतात. या लोकांस समाजांत मान असून ते आपणास 'महाजन' म्हणवून घेतात. ते धार्मिक असून, रामानंदी, शैव, वल्लभाचार्य इत्यादि पंथांचे अनुयायी आहेत व सर्वजण कालिका मातेस अतिशय पूज्य समजतात. हिंदूंच्या देवांस भजतात व त्यांच्या देवळांतहि जातात. नेहमींचे उपासतापास, सणवार ते पाळतातच; त्यांचा मुख्य सण म्हणजे आश्विन शु. ९ मी या दिवशीं होम करून रात्रीं एका हातात कण्हेरीच्या फुलाची माळ व दुसऱ्या हातांत मशाल घेऊन ते नाचतात व उड्या मारतात. एखाद्याच्या अंगांत देवी येते व ती तरवारीनें आपली जीभ कापीन असें भय घालते. चेटूक, जारणमारण व शकुन यांवर त्यांचा फारसा विश्वास नाहीं. गाय, उंदीर, हत्ती, साप व चाष यास ते पूज्य समजतात.

व ऱ्हा ड—म ध्य प्रां त.—कांहीं जिल्ह्यांत यास तामेरा म्हणतात पण कांहीं जिल्ह्यांत तामेरा व कासार यांच्या भिन्न जाती आहेत. सोनाराच्या खालोखाल यांचा येथें मान आहे.

रा. ब. सदाशिव जयराम देहाडराय यांनीं कासाराच्या उत्पत्तीची अशी कथा सांगितली आहे कीं, सहस्रार्जुनाचा मुलगा धर्मपाल हा यांचा पूर्वज होता. अर्जुन हा इक्ष्वाकूचा पणतू असून तो घोडी व नाग यांच्या संयोगापासून झाला होता म्हणून मराठी कासार स्वतःला अहिहयवंशीय म्हणवितात धर्मपालाची आई परशुरामकृत क्षत्रियवधाच्या वेळीं पळाली. दुसरी एक अशी कथा आहे कीं, एका सोमवंशी राजानें कामधेनू चोरिली होती. त्याच्या चार बायकांच्या पुत्रांनीं सूड घेण्याकरितां तप करून बाण मागण्याच्या ऐवजी चुकून 'बाण' मागितलें त्यामुळें हे धातुपात्रें विकूं लागले. कांहीं कासार धर्मपालास रतनपूरच्या हैहय रजपूतांचा पूर्वज समजतात. उत्तरहिंदुस्थानांत व संयुक्त प्रांतांत थटेरा लोक आपलें मूलस्थान दक्षिणेंतील रतनपूर गांव सांगतात. यावरून रतनपूर हें काशाचीं भांडीं करण्याचें फार पुरातन काळचें स्थान असावें असें दिसतें. या लोकांत मराठी कासार देशकर, झाडे व अयोध्यावासी असे वर्ग आहेत. भरेवस वर्ग फार नीच समजला जातो त्यांच्या व गोंडाच्या चालीरितींत पुष्कळ साम्य आहे. यांच्यांत कांहीं स्वैर संबंधाच्या उत्पत्तीचे लोक आहेत. त्यास टाकले, विदुर, लौंडी, बच्चे असें म्हणतात.

कासारांत अहिहय लोकांचीं सर्व गोत्रें प्रचारांत आहेत. उत्तरेकडील जिल्ह्यांत यांचीं नांवें राहण्याच्या गांवावरून

पडली असून असगोत्रविवाहाचीच चाल तेथें रूढ आहे. यांच्यात आते, मामे व मावसभावंडांचीं लग्नें निषिद्ध आहेत. याच्यात भवानी देवीची पूजा फार महत्वाची असते. ' मंदो अमावास्या ' (फाल्गुन वद्य) हा फार महत्वाचा सण आहे.त्या दिवशीं प्रत्येक कासार ज्ञातिभोजनात जेवावयास आलाच पाहिजे; न आला तर वर्षभर तो वाळींत पडतो या अमावास्येस ते दुकान बंद करून आपल्या सर्व हत्यारांची व यंत्रांची पूजा करतात.

मंडला व दृद्दा येथें काशाचीं भांडीं अद्याप चांगलीं होतात.

संयुक्त प्रांत.—या प्रांतामधील कासार लोकांनां कासेरा असें म्हणतात. कासेरा जात संघटित दिसते. मिर्झापूरचे कासेरा लोक स्वतःस क्षत्रिय म्हणवितात. परशुरामानें क्षत्रिय-निर्दालन केलें तेव्हां हा धंदा स्वीकारणें आम्हास प्राप्त झालें असें तें सांगतात कासेराच्या सात पोट जाती आहेत.त्या पुर्बिया, च्छावन, गोरखपुरी, टाक, तंजारा, भरिया व गोलार या होत ब्रिजि,मैत्रापरा,जौनपुरी कनौजीय, मणिपुरिया, असे कांहीं प्रांतिक भेदहि आहेत. अहीरवन्सी, छत्री, टाक, सोमबन्सी इत्यादि नांवें कांहीं रानटी टोळ्यांशीं त्यांचा संबंध दर्शवितात. कासेरा लोकांत असगोत्रविवाह रूढ आहे.

प्रतिष्ठित कासेरांमध्ये बालविवाह रूढ असून साधारणपणे दहा किंवा बारा वर्षांच्या मुलींचीं लग्नें करितात. अविवाहित लोक किंवा विधवा व विधुर यामध्यें व्यभिचार झाला तर तो उपेक्षणीय गणला जातो व गुन्हेगाराला बहिष्कृत न करितां दंड करण्यात येतो. पहिली बायको वंध्या असेल तर जितक्या बायका संभाळतां येतील तितक्या करण्याची याच्यात मुभा असते.' चन्द्वावा 'व' डोला' असे यांचे लग्नाचे दोन प्रकार असून ' डोला ' गरीबांकरितां असतो. ' सगाई ' प्रकारानें विधवांना लग्नें करितां येतात व नवरा मृत झाला तर त्याच्या धाकटया भावाबरोबर किंवा अन्य पुरुषाशीं त्यांनां लग्न करितां येतें. अन्य जातीशीं व्यभिचार केला तर नवऱ्याला बायको सोडतां येते. पालन केलें नाहीं किंवा धर्मत्याग केला म्हणून बायकोहि नवरा सोडूं शकते. सोडचिठ्ठी दिलेल्या स्त्रियांनां त्याच जातींत पुनः लग्न करितां येत नाहीं.

साधारणपणें कासेरा लोक वैष्णव किंवा नानकपंथी आहेत. पाचोव्रन,पीर,दुर्गा अशा त्याच्या देवता आहेत.तिवारी ब्राह्मण हे कासाराचे पुजारी असतात. मृताची व्यवस्था नेहमींच्या रीतीनें लाविली जाते. मृतांना पिंड देण्याचीहि चाल कासेरांमध्यें आहे.

या लोकांच्या धंद्यासंबंधीं बराच मतभेद आढळून येतो. जस्त,तांबें व कथील असल्या मृदु धातूंचें मिश्रण करून पेले, वाटया व ताटें तयार करणें हा कासेरांचा मुख्य धंदा असून त्यांनीं तयार केलेल्या भांडयांवर नक्षी करणें व झिलई देणें या कला थाथेरा लोकांच्या आहेत असा नेस्फील्डचा अभिप्राय आहे. (ब्रीफ रिव्ह्यू, २९). होई म्हणतो कीं, कानपुरास पितळेचीं भांडीं करणाऱ्यांनां थाथेरा, कासेरा किंवा भरिया अशीं नावें आहेत (मोनोग्राफ १९८). मिर्झापुरास पितळ किंवा मिश्र धातूंची भांडीं करणाऱ्यांनां कासेरा म्हणतात. लखनौचा धालिया किंवा धालनेवाला हा कासेरांप्रमाणेंच एक कारागीर आहे व त्याचा धंदा म्हणजे जस्ताचे दागिने करणें हा असतो. क्षत्रियांप्रमाणें आपणहि पूर्वी जमिनदार होतो असा हे लोक बहाणा करितात. सर्व कासेरा लोक जानवें घालतात. मासे, मेंढ्या व बकरी यांचें मांस हे खातात पण दारू पीत नाहींत. अहीर, बारी, नाइ, कायस्थ व कलवार खेरीज करून ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य यांनीं शिजविलेली 'पक्की रसोई' ते खातात.

[कूक. एन्थावेन. रिस्ले आणि हिरालाल. सेन्ससरिपोर्टें, मुं. गॅ. त्वष्टा कासार ज्ञाती संस्थान (मुंबई) चे रिपोर्टें, त्वष्टासेवक मासिक. कासार मासिक (वेळापुरे)].

कांसार-वाणी-यांची संख्या सुमारें ८० हजार असून पैकीं निम्म्याहून अधिक वाणी संयुक्त प्रांतांत आढळतात. बिहार, ओरिसा आणि वऱ्हाड-मध्यप्रांत यातूनहि हे वाणी आहेत. कास्यकार वणिक या शब्दावरून त्यांना हे नाव पडलें. त्यांचे ज्ञातिविषयक दोन पोटविभाग आहेत. पूर्वेकडील लोकास पुरभैया व पश्चिमेकडील लोकांस पश्चिमवाह असें म्हणतात. याशिवाय याच्यात अनेक भेद आहेत बिहारमध्यें १६ पोटजाती आहेत असे रिस्ले म्हणतो (हिंदु कास्टस् ९६). पुरुषानें आपल्याच गोत्रात लग्न करूं नये व त्यावेळीं पाच पिढ्या विचारात घ्याव्या असा याच्यात निर्बंध आहे.पाच सहा पिढ्यांपूर्वी आपण कारा माणिकपुराहून आलों असें पूर्वभागातील कसारवाणी सांगतात. बालविवाह रूढ असून पहिली बायका हयात असतांना तिच्या संमतीवाचून नवऱ्यास दुसरें लग्न करितां येत नाहीं.सगाई विधीनें विधवेला पुनर्विवाह करितां येतो व तिला नवऱ्याच्या भावाशीं लग्न करण्याची परवानगी असते पण सक्ति नसते. यांच्यांत काडीमोड नसली तरी नवऱ्यास दुर्वर्तनाबद्दल बायको टाकतां येते.

त्याच्यापैकीं बरेचसे लोक रामानंदीसम्प्रदायाचे असून ते पांचोव्रन पीर व महावीर यांची उपासना करितात.हे लोक बहुधा वाणीच असून मांठ, धान्य, तंबाखु, इत्यादि खाण्याचे पदार्थ विकतात कांहीं पांचोव्रन पिराचे उपासक मांसाशन करितात. परंतु महावीराचे भक्त हा आहार वर्ज्य मानतात. त्यांनीं शिजविलेली कच्ची व पक्की ब्राह्मण आणि क्षत्रिय खात नाहींत. इतर बनिया लोक पक्की खातात, पण कच्ची खात नाहींत. पण त्यांच्याच पोटजातीपैकीं कोणी तरी एकानें जर कच्ची बनविलेली असेल तर ती खाण्यास हरकत नाहीं असे मानण्यांत येतें. त्यांनीं शिजविलेली कच्ची कहार व नाइ लोक खातात (कूक).

कासारबारी (द्वार)—हा घाट अथवा बारी पूर्व खानदेशात सातमाळाचे डोंगरांत आहे. पेरिप्लस (२४९) म्हणतो कीं, भडोचहून पैठण व नगर येथें जो व्यापार चाले तो खानदेशांतून चाले. खानदेशातून पैठणकडे जाण्याचे जे तीन चार घाट होते त्यांपैकीं कासारबारीचा हा एक घाट होता.खानदेशातून निजामशाहीत जाण्यास ही बारी लागते. दक्षिणेंतून उत्तरेकडे बऱ्हाणपूरच्या बाजूस जावयास हा राजरस्ता—सैन्य उतरेल असा—प्रसिद्ध होता. पेशवेकालीन कागदपत्रांत या बारीचा पुष्कळदां उल्लेख येतो. जवळच भालदीचा प्रख्यात ओढा आहे कासारबारी उतरून मोंगलाईप्रमाणें गुजराथेंतहि जाण्याचा रस्ता होता [खान ग्याझे; राजवाडे खंड. १, ६, १०, ११].

कासाला—आंग्ल-ईजिप्शियन सुदानमधील एक शहर व प्रांत. हें शहर गंश नदीवर वसलें आहे. याचे उ. अक्षांश १५°, २८′ व पूर्व रेखांश ३६°, २४′ आहेत. हें खार्टुमच्या पूर्वआग्नेय दिशेस २६० मैलांवर आहे. येथील लोकसंख्या सुमारें २०,००० आहे. मोक्रॅम आणि कासाला ह्या घुमटाकाराच्या पर्वतांनीं व विपुल उद्यानांनीं शहराला फार शोभा आलेली आहे. मुख्य मुख्य इमारती विटाच्या बांधल्या असल्या तरी तद्देशीय लोक बहुतेक गवताच्या झोपड्यांतूनच रहातात. या शहरापासून जवळच ' खाटमिया ' म्हणून एक स्थळ आहे. हें स्थळ मोरगानी कुटुंबाचे निवासस्थान होय. या कुळांतील शेख एका धार्मिक संप्रदायाचे मुख्य आहेत.

इ. स. १८४० त ईजिप्शियनांनीं कासाला शहराची स्थापना केली स १८८३ माहदीच्या सैन्यानें या शहराला वेढा दिला होता. स.१८९४ मध्यें इटालिअन सैन्यानें माहदीच्या लोकांपासून हें शहर हिसकावून घेतलें व स. १८९७ त त्यांनीं तें ईजिप्तच्या स्वाधीन केलें. येथें ' हालेंगा ' अरबाची वस्ती फार आहे. येथें पाऊस फार थोडा पडतो.

कासिया—संयुक्त प्रांतांतील गोरखपूर जिल्ह्याचा पोटविभाग; यात पद्रौना तहसिलीचा अंतर्भाव होतो. पोटविभागाचें मुख्य ठिकाण काशिया हें देवरिया-पद्रौना व गोरखपूर-गिराघाट रस्त्यावर रामभार सरोवरापासून जवळ आहे. येथून थोड्या अंतरावर बिशनपूर येथें महत्वाचे जुने अवशेष आहेत. गौतमबुद्ध ज्या ठिकाणीं मरण पावला त्या कुरुनगराचेच हे अवशेष असावेत असा पुष्कळ दिवस समज होता; परंतु चिनी प्रवाशांनीं कुरुनगराच्या इमारतींचें दिलेलें वर्णन अवशेषांतील इमारतींशीं मुळींच जुळत नाहीं.

कासीमबझार—बंगाल इलाख्याच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यांतील एका पोटविभागाचें प्रमुख ठिकाण. सध्यां मोडकळीस आलेलें हें गाव भागीरथी नदीवर वसलेलें असून बहरामपूर म्युनिसिपालिटींत ह्या गावाचा समावेश होतो. येथील लोकसंख्या (इ. स.१९०१) १२६२ आहे.

ह्या गांवाचें मुर्शिदाबादपेक्षांहि ऐतिहासिक दृष्टीनें अधिक महत्व आहे. मुर्शिदकुलिखानच्या अगोदरपासून कासीमबझार हेंच व्यापाराचें मुख्य केंद्र होतें व हिंदुस्थानाशीं व्यापार करणाऱ्या वेगवेगळ्या यूरोपीय राष्ट्रांच्या येथें वसाहतीहि होत्या. १९ व्या शतकाच्या आरंभीं तर इंग्रज लोक भागीरथी नदीस ' कासीम-बझार नदी ' म्हणत असत. भागीरथी, पद्मा व जलंगी ह्या तीन नद्यांमधील त्रिकोनी भागास कंपनीचे लोक ' कासीम-बझारचें बेट' म्हणत असत. कोणी कासीमखानानें हे गांव वसविलें असें म्हणतात. १७ व्या शतकाच्या अगोदरचा ह्या शहराचा इतिहास उपलब्ध नाहीं. तरी पण जेव्हा ह्या शहरास महत्व आले तेव्हा हें एकदम ठळकपणें पुढें आलें. कलकत्ता शहराची स्थापना होण्यापूर्वी कासीमबझार फार मोठें व महत्वाचें शहर होतें. सन १६५८ सालीं कासीमबझार येथे एक इंग्रज व्यापारी एजन्ट नेमण्यांत आला व येथील मुख्य अधिकाऱ्यानें तो कौन्सिलचा सभासद असावा असेंहि ठरविलें.

सन १६८६ सालीं नबाब शाइस्तेखानच्या हुकुमावरून बंगाल्यातील इतर वसाहतींप्रमाणें कासीमबझार येथील वसाहतहि सरकारजमा(खालसा) करण्यात आली; पण पुढें दोन वर्षांनीं ती परत देण्यात आली व ह्या शतकाच्या शेवटीं शेवटीं तर कासीमबझार हें इंग्रजाच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण झालें. सन १६८१ सालीं कलकत्याची स्थापना करणारा जॉब चॉरनाक हा जेव्हा कासीमबझार येथे मुख्य होता तेव्हा ईस्ट इन्डिया कंपनीनें खुद्द बंगालकरतां दोन लक्ष तीस हजार रुपये अगदीं वेगळे काढून ठेविले होते. तद्देशीय लोकाच्या सागण्यावरून असें दिसते कीं, त्यावेळीं कासीमबझार येथे मोठ मोठया इमारती असून शहर अगदीं भरभराटींत होतें. इंग्रजाच्या कासीमबझार येथील वखारींस एवढें महत्व येण्याचें मुख्य कारण म्हणजे जवळच मुसुलमानी राजधानी मुर्शिदाबाद इचें अस्तित्व होय. पण हेंच त्याच्या नाशासहि कारण झालें. जेव्हा कलकत्याच्या कौन्सिलशीं भाडण होई तेव्हां ही वसाहत सैन्य पाठवून नवाबास आपल्या ताब्यात घेतां येत असे.

स. १७५७ सालीं नबाब सुराज उद्दौला ह्याने इंग्रजांना बंगालच्या बाहेर हाकून देण्याचें ठरविलें व वॉरन हेस्टिंग्जला पकडून आणून मुर्शिदाबाद येथें कैदेंत ठेविलें. प्लासीच्या लढाईनंतर कासीमबझारास पुन्हां महत्व प्राप्त झालें व येथें रेसिडेंट ठेविला, पण लवकरच रेसिडेंटचा अधिकार काढून घेण्यात येऊन तो मुर्शिदाबाद येथेंच राहणाऱ्या एजंटाच्या हातीं देण्यात आला. १९ व्या शतकाच्या आरंभ पासून कासीमबझारच्या उतरत्या दशेस प्रारंभ झाला. भागीरथीच्या पात्रांत एकदम बदल होतो त्याप्रमाणें तेव्हा झालें व ती पूर्वेकडचा वळसा सोडून देऊन एकदम पश्चिमेकडून गावापासून तीन मैल दूर वाहू लागली. वॉरन हेस्टिंग्जचा हस्तक बनिया कान्त बाबू ह्याचा एक वंशज कासीमबझार येथें

असून त्यास कासीमबझारचा महाराज म्हणतात. येथें कांहीं भव्य वाडे होते; त्यांचे पडके अवशेष आहेत. वॉरन हेस्टिंग्जच्या पहिल्या बायकोचें थडगें येथें आहे.

कासूर—पंजाबांतील लाहोर जिल्ह्याचा पोटविभाग. यात कासूर व चुनियान ह्या तहशिली आहेत.

त ह शी ल.—पंजाबात लाहोर जिल्ह्यांतील आग्नेय तहशिल ही सतलज नदीच्या उत्तरतीराला असून तिचें क्षेत्रफळ ८१३ चौरस मैल आहे. पैकीं दोनतृतीयांश भागाला माझा असें नाव आहे; त्यातून बारी—दुआब कालवा जातो. इतर भाग सखल असून जुन्या बियासच्या खालच्या बाजूस आहे व त्यातून कटोर इनडेशन कॅनाल जातो. या तहशिलींत ३४२ खेडीं व कासूर (तहशिलीचें मुख्य ठिकाण), खेमकरुन व पट्टी हीं मोठीं गावें असून १९११ सालीं एकंदर लोकसंख्या २,८९,२५५ होती. सोब्रॅानचें रणक्षेत्र याच तहशिलींत आहे.

श ह र.—पंजाबांतील लाहोर जिल्ह्यामध्यें याच नावाच्या पोटविभागाचें व तहशिलीचें मुख्य ठिकाण. हें जुन्या बियासच्या उत्तरतीराला नॉर्थवेस्टर्न रेल्वे व फेरोजपूर रस्ता यावर, लाहोर शहराच्या आग्नेयास ३४ मैलावर असून आगगाडीनें कलकत्त्यापासून १२०९ मैल, मुंबईपासून १२३७ मैल व कराचीपासून ७७८ मैल आहे. लोकसंख्या (१९११) २४,७८३. पैकीं तीनचतुर्थांश हिंदु व एकचतुर्थांश मुसलमान आहेत. श्रीरामाचा जेष्ठपुत्र कुश यानें हें गांव वसावलें अशी दंतकथा आहे ती किंपत खरा आहे हें न समजले तरी, गांव बरेंच जुनें असून मुसुलमानांच्या स्वाऱ्यापूर्वी त्यात रजपुताची वस्ती होती ही गोष्ट निःसंशय आहे. तथापि मुसुलमानी अमदानींत सिंधूच्या पूर्वेकडील पठाणांची वस्ती येथें होईपर्यंत इतिहासात या गावाचा उल्लेख आलेला नाहीं. पठाण लोक या ठिकाणीं बाबरच्या अथवा अकबराच्या कारकीर्दीत येऊन त्यांनीं सतलजच्या दोन्ही तीरांमधील प्रदेश मिळविला. उदयोन्मुख शीख लोकांना कासूरच्या पठाणांपासून बराच अडथळा पोंचला; परंतु अखेर १८०७ त रणजितसिगानें शेवटला पठाण सरदार कुतुबुद्दीनखान याचा पराभव करून कासूर लाहोरच्या राज्यास जोडलें. हल्लीं गावात पठाणवस्ती बरीच कमी आहे. येथील म्युनिसिपालिटीचें इ.स. १९०३—४ सालचें उत्पन्न ६,०४,००० रु होतें कासूर हें लाहोरच्या खालोखाल जिल्ह्यांतील सर्वांत मोठें गाव असून धान्य, कापूस वगैरेंच्या स्थानिक व्यापाराचें तें केंद्र आहे. येथून दरवर्षास धान्य व कापूस मिळून १० लक्ष रुपयांचा माल बाहरदेशीं रवाना होतो. गावात घोड्याचें सामान व कातड्याचे इतर जिन्नस तयार होतात; येथें कापसाचे ४ जीन व २ प्रेस असून इंग्रजी हायस्कूल व दवाखाना वगैरे इमारती आहेत.

या गांवीं १९१९ सालीं रौलेट कायदा पास झाल्याबद्दल लोकांनीं हरताळ पाडला व तेथील रेल्वे स्टेशनचें नुकसान करून पोष्ट व तार ऑफिस व मुनसफकोर्ट जाळलें; तेव्हां त्याजवर गोळीबार करण्यात येऊन ता १६ एप्रिलपासून १५ जूनपर्यंत लष्करी कायदा पुकारण्यात आला त्यामुळे तेथील लोकांस विनाकारण बराच त्रास झाला.

कासेगांव(१)—मुंबई इलाखा.सोलापूर जिल्हा.हे सोलापूरच्या ईशान्येस८मैलांवर आहे. गांवांत कासेश्वराचें हेमाडपंती देवालय आहे. येथें ता. २६।१।१७७४ रोजीं रघुनाथराव दादासाहेब व बारभाईंचे फौजेंतील त्र्यंबकराव मामा पेठे याची लढाई होऊन तींत मामांचा पराभव झाला व मामा हे अतीशय जखमी झाले. मामाची फौज १८ कोसांची मजल चालून आल्यानें थकली होती. ' घोडीं, माणसें मांदी झालीं होतीं, (परंतु) गाठ पडल्यावर मागें सरूं नये (सरतां येत नव्हतें) ' कासेगांवच्या माळावर ही लढाई झाली. दादासाहेबांकडील गारद्यांनीं व हुजरातीनें मामाच्या हुजरातीला पळवून लाविल्यानें व त्याची फौज दमल्याभागल्यानें त्याचा मोड जाला. जरीपटक्याचा हत्ती, नौबती वगैरे दादासाहेबांनीं काबीज केलें. मामांना तीन जखमा होत्या; ते पाडाव झाले आणि लगेच दुसऱ्या दिवशीं वारले. या अपजयाचें कारण बहुतेकाच्या मतें ' मामांनीं उतावळी केली, यामुळें यश त्यास (दादासाहेबांस) आलें असें आहे[खरे–ऐ. ले. सं. भा. ५; राजवाडे खंड. ८. १०. ११].

कासेगांव—मुंबई इलाख्यापैकीं, सातारा जिल्ह्याच्या वाळवे तालुक्यातील खेडें. हें सातारा—कोल्हापूर रस्त्याजवळ कऱ्हाडच्या दक्षिणेस ११ मैलांवर व पेठेच्या उत्तरेस ४ मैलावर आहे. येथील लो. सं. (१९०१) ५४८२. आहे. तालुक्यांतील भरभराटीच्या गावांपैकीं हें एक आहे येथील व्यापारी सधन असून ते कोंकण प्रांताशीं तंबाखू, मिरची व ऊंस या जिनसाचा व्यापार करितात. येथील रहिवाशी भांडखोरपणाबद्दल व गुन्हे करण्याबद्दल प्रसिद्ध आहेत.

कॅस्टेलो ब्रँको —पोर्तुगाल देशात कॅस्टेलो ब्रँको बिशपच्या अधिकारातले एक शहर असून बैरा प्रांतांतील एका जिल्ह्याचें मुख्य शहर होतें. अब्रंटेस-गार्डा रेल्वेवर समुद्रसपाटीपासून १५६० फूट उंचीवर हें शहर वसलें आहे.येथील लोकसंख्या इ. स. १९०० सालीं ७२८८ होती. येथील बरेच रोमन अवशेष कॅस्टेलो ब्रँको फार प्राचीन शहर असल्याची साक्ष देतात. येथे एक पडित किल्ला आहे. जुनाट भिंतींनीं हें शहर वेष्टिलें असून येथील मुख्य इमारती म्हणजे बिशपच्या अधिकारातला महाल व प्रार्थनामंदिर ह्या होत. येथें कापड तयार होत असून बुचें, अर्क, दारू व ऑलिव्ह तेल ह्या वस्तूंचा स्थानिक व्यापार चालतो.

कास्पियन समुद्र.—यूरोप आणि आशिया यामधील अंतर्भौम समुद्र. उ. अ. ३६° ४०' ते ४७° २०' व पू. रे. ४६° ५०' ते ५५° १०' याची दक्षिणोत्तर लांबी ७६० मैल व रुंदी १०० ते २८० मैलांपर्यंत आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें १,६९,३३०चौरस मैल असून त्यांपैकीं ८६५चौरस मैल यांतील बेटांनीं व्यापिलें आहे. सार्मेशिअन महासागर

किंवा अरलो-कास्पियन खांच अशा नावानें कधीं कधीं संबोधिल्या जाणाऱ्या एका प्रचंड खांचेचा अतीशय खोल असा भाग हा समुद्र भरून काढतो. सध्या या समुद्राचा पृष्ठभाग महासागराच्या पातळीहून ८६ फूट खालीं आहे. व्होलगा, उरल, टेरेक, सुलाक, कुरा आणि आरस या मोठ्या नद्या कॉस्पियनला मिळतात.

या समुद्रात येणाऱ्या पाण्याचा प्रदेश पश्चिमेकडे व उत्तरेकडे फार दूरवर पसरला आहे. याला मिळणाऱ्या सर्व नद्या दरवर्षी सुमारें १७,४०५ घन मैलाइतका पाण्याचा लोट यात आणून सोडीत असल्या पाहिजेत असें का शास्त्रज्ञानें गणितानें ठरविलें आहे. जर बाष्पीभवनाची क्रिया बंद असती तर हा समुद्र दरसाल ५ १/२ फूट उंच वाढला असता.

प्राचीन युगात कास्पियन समुद्र वर असून फार विस्तृत होता. सार्मेशिअन महासागराचा एक भाग म्हणून याची गणना करण्यास हरकत नाहीं असें भूशास्त्रज्ञ म्हणतात. यांतील प्राणी आर्क्टिक समुद्रातल्याप्रमाणें वाटतात पण या दोन सागरामधील प्रत्यक्ष संबंधाचे निश्चित पुरावे अद्याप पुढें आले नाहींत महासागरांतील पाण्यापेक्षा याचे पाणी बरेंच गोडे आहे. व्होलगा, उरल व टेरेक या नद्या ज्या भागात मिळतात तेथील पाणी तर पिण्याजोगे आहे.

ऑप्शेरॉन द्वीपकल्पातला पेट्रोलचा व्यापार वाढल्यापासून व ट्रॅन्सकॅस्पियन रेल्वे सुरू झाल्यापासून (इ.स.१८८६)कास्पियन समुद्रावरचें दळणवळण फार वाढलें आहे. फक्त रशियाचेंच एक लहान आरमार या समुद्रात असतें कोणत्याहि अंतर्भौम समुद्रात यांतील माश्यांच्या समृद्धीइतकी समृद्धि नाहीं. येथील माश्यापासून चांगलीं आर्थिक द्रव्येंहि तयार होतात. काळा समुद्र व कास्पियन समुद्र प्रत्यक्ष जोडून व्यापार वाढविण्याच्या योजना बऱ्याच होऊन गेल्या, पण अद्याप त्यापैकीं कांहींच झालेलें नाहीं.

का स्पि य न स मु द्रा व री ल हिं दु दे वा ल य.—रशियांतील बकूपासून सुमारे १० मैल अंतरावर सुरखनि नामक स्थलीं एक हिंदू दवालय आहे. त्या देवालयांत हिंदूंच्या मूर्ती असून आज कित्येक (अकरा शतकांवर) शतकें ' मुलतानी ' लोक त्या देवालयाचें रक्षण व देवाची पूजा करीत आहेत. सिंधूनदावर मुलतान शहर आहे.यावरून या देवालयांत असणाऱ्या हिंदु लोकांनां मुलतानी म्हणतात. हिंदुस्थानांतून आळीपाळीनें तेथें जाऊन लोक देवालयाचें काम करतात.

या देवालयाच्या सभोंवार दगडांची एक उंच भिंत आहे. त्या भिंतीला एक लांकडी फाटक आहे व त्यांतून आंत जाण्याला मुख्य मार्ग आहे. भक्तांनां रहाण्यासाठीं भिंतींत खोल्या बांधल्या आहेत. १०० फूट व्यासाच्या वर्तुळाकार इमारतीच्या मध्यभागीं एक गाभारा आहे. या चतुष्कोनी गाभाऱ्याची बांधणी फार मजबूत आहे. तीस किंवा चाळीस फूट उंचाच्या घुमटापासून खालीं एक घाट बांधलेला आहे. गणपती, शिव व दुसऱ्या गृहदेवता यांच्या तेथें मूर्ती आहेत. गृहदेवतांच्या मूर्ती चांदीच्या अथवा मुलामा दिलेल्या धातूंच्या केलेल्या आहेत. या मूर्ती गाभाऱ्याच्या मध्यभागीं एका लहान व उंच अशा वेदीवर व्यवस्थित रीतीनें लावून ठेवलेल्या असतात.

जमीनींतून वर येणाऱ्या पवित्र ज्वाला या देवालयाला प्रकाशित करतात. देवळात सर्व ठिकाणीं नळ्या आहेत. या नळ्या जमिनीपासून १किंवा २ फुटावर आहेत.आगकाडी ओढून या नळ्यांच्या तोंडाशीं धरली म्हणजे कर्बवायूच्या प्रकाशाप्रमाणें प्रकाश पडतो.चुना जाळणें व विटा भाजणें या कामाकरिता खणलेल्या खंदकातील पेटलेल्या कर्बवायूचा प्रकाश या प्रदेशांत सर्व ठिकाणीं पडतो. ही नैसर्गिक व भव्य दीपावलि अत्यद्भुत सृष्टिचमत्कारापैकीं एक आहे. [इं. अँ. पु. ९ पा. १०९-१११].

काहूत—पंजाबातील एक जात. लो. सं. (१९११) १८,६४८. हे मुख्यतः मुसलमान असून झेलम जिल्ह्यामध्यें आढळतात. हे शेतकरी असून रजपूत लोकाचे वंशज आहेत. काहुता राजधानी असलेल्या आसपासच्या प्रदेशावर यांनीं राज्य केलें आहे. [सेन्सस रिपोर्ट, १९११ पु. १४ रोजची ग्लॉसरी, २].

काळपुळी—त्वचेमध्यें एकाच ठिकाणीं एकदम दाह उत्पन्न होऊन त्वचेच्या खालच्या पापुद्ऱ्यापर्यंत तो दाह जाऊन त्वचा कुजणें हीं या रोगाचीं मुख्य लक्षणें आहेत. एवढ्या थोड्या जागेवर जरी हें दुःख असलें तरी त्याच्यापासून होणाऱ्या वेदना व ठणका विलक्षण असतो व प्रकृतींत एकदम फार बिघाड उत्पन्न होतो. रोगाच्या आरंभीं तर हें दुःख अगदीं असह्य असतें. ही पुळी बहुधा मानेच्या मागें, पाठीवर, तोंडावर किंवा हातापायांवर असते. हिचा आकार एखाद्या चपटया व टणक गळवाप्रमाणें असतो व तिचा रंग मात्र अति लाल असतो. नंतर ही भोंवतालीं वाढत वाढत जाऊन एखादे वेळीं लहानशा ताटलीयेवढ्या घेराची होते. हिच्या मधील भागास छिद्रे पडून त्यातून रक्त, लस, वगैरे घाण झिरपत असते. यातूनच कुजलेल्या त्वचेचे तुकडे व तंतू पिंवळे झालेले दिसत असतात. ही गांठ व पुळी होण्याचें कारण कुजण्याची क्रिया उत्पन्न करणाऱ्या जंतूंचा येथें कांहीं अकल्पित रीतीनें प्रवेश होतो हें होय. मानसिक चिंतेनें अगर मूत्रपिंड फार बिघडून किंवा मधुमेहानें शरीर खंगत जाऊन मग रोग्यास ही पुळी होण्याचा संभव असतो. शेवटीं या गांठींत चोहोंकडे पू होतो आणि क्लेश व दुःख सहन करावे लागल्यानंतर हळूहळू आंतील बीं, मगज व इतर नासक्या घाणीचा निचरा होत जातो.

उ प चा र.—हल्लीं प्रघात असा आहे कीं, रोग्यास भूल देऊन ही गाठ चिरतात. व जेथपर्यंत सूज आहे तेथपर्यंत विस्तृत छेद करून ज्यात कुजविणाऱ्या जंतूंचा बुजबुजाट

झाला आहे असला भाग खरवडून काढून टाकतात. मात्र हें कृत्य गांठ उत्पन्न झाल्यावर जितकें लवकर करिता येईल तितकें चांगलें. गाभा खरवडल्यावर त्या ठिकाणीं तीव्र जंतुघ्न औषध लावून ती जागा दोषरहित करितात. यानें दुःख, ठणका हीं ताबडतोब शमतात व या जंतूंचे विषशोषण शरीरात होऊन मृत्यु यावयाचा तो टळतो व रोग्याची प्रकृति अधिक त्वरेनें पूर्ववत होत जाते.

काळहोळ—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा. गोकाकच्या ईशान्येस सुमारें सात मैलांवरील एक गांव. येथे एक जुनाट जैनमंदिर (बस्ती) असून त्यांत इ. स. १००५ सालचा एक शिलालेख आहे डिसेंबर महिन्यात येथें एक जत्रा भरते. [बेळगाव गॅ.]

काळा आजार—हा रोग हिंदुस्थान, चीन, आसाम या देशात आणि ट्यूनिस, अल्जिरिया, अरबस्तान व मिसरदेश या देशांत पहाण्यास सांपडतो.

का र णें.—माशा, डास, ढेंकूण याच्या कोठ्यात जे प्राणिज जंतू सापडतात त्यांच्या शोधकावरून नामाभिधान पावलेले लीशमन डोनोव्हन नामक जंतू या रोगाचा वरील कीटकांच्या सहाय्यानें प्रसार करतात.

ल क्ष णें —अनियमित, सतत अशा कोणत्या तरी रीतीनें तापास सुरुवात होऊन पंडुरोग उत्पन्न होऊन शरीर फार फिकट होतें. शरीर कृश होऊन शक्ति फार कमी होते आणि यकृत व प्लीहा मोठ्या होतात. नाक व हिरड्यातून रक्त कधीं कधीं येते व त्वचेखालीं ठिकठिकाणीं रक्त फुटलेले आढळतें. हातापायाच्या हाडांच्या टेकाळामध्ये दुखूं लागतें, तोंड व घोटे या ठिकाणीं कधीं सूज येते व संध्याकाळीं ती नाहींशी होते; व कधीं तर रोग्यास जलोदर होतें, व अशा वेळीं रोग्याचें यकृत फार मोठें वाढलेलें असतें. अतिसार, हगवण, कफ, श्वास, दमा, फुप्फुसदाह यापैकीं रोग बहुतकरून होतातच; व याच आगंतुक रोगांमुळें किंवा अन्य आगंतुक दोषामुळे रोग्यास मरण येतें. रक्ताची एक ठरीव विकृतस्थिति होऊन बसते. त्यांतील लाल कण जवळ जवळ निम्मे नाहींसे होतात. व त्यातील लोहाचा अंश व पाढऱ्या कणांचें प्रमाणहि बरेंच कमी होतें.

रो ग नि दा न.—हात अगर पाय यातील रक्तांतील पांढरे गोलक तपासावे पण या रीतीनें निदान करण्यास बराच वेळ लागतो. यकृतामधील रक्त सावधगिरीनें काढून तें तपासतात. या तपासामध्यें हा रोग हिंवताप अगर विषमज्वर नाहीं असें या रोगांच्या जंतूंच्या अस्तित्वावरून व त्या रोगजंतूंच्या अभावावरून खात्रीपूर्वक सिद्ध होतें.

सा ध्या सा ध्य वि चा र.—रोगी कित्येक महिने जगतो. नंतर शेकडा ९० रोगी दगावतात असें आकड्यांनीं सिद्ध झालें आहे.

उ प चा र.—कोयनेल जास्त प्रमाणांत दिल्यानें उपयोग होतो असें रॉजर्स या डॉक्टरचें मत आहे. पण दुसरे कित्येक म्हणतात कीं त्याचा उपयोग रोगप्रतिबंध करण्याच्या कामींच विशेष होतो व कित्येकांच्या मते त्याचा बिलकूल उपयोग होत नाहीं. ट्यूनिसमध्यें व मॅनसन या डॉक्टरांनीं दुसऱ्या देशात एटाक्सील हें औषध गुणावह आहे असा अनुभव घेतला आहे. ॲंटिमनी टार्ट्रेट या औषधाचा द्रव शिराद्वारा मार्गें रक्तांत घालून गुण येतो याची प्रचीति रॉजर्स व दुसऱ्या डॉक्टरांनीं घेतली आहे. यासाठीं १०० भाग पाण्यात २ भाग ॲंटिमनी टार्ट्रेट या प्रमाणात द्रव करून पहिल्या दिवशीं ४ क्यूबिक सेंटिमिटर टोंचून रक्तात घालतात. नंतर दोनतीन दिवसानीं ३ क्यूबिक सें. मा. औषध घालून पुनः दर दोनतीन दिवसानीं एक एक क्यूबिक सें. मा. औषध वाढवून त्याचें १० क्यू० सेंटिमीटर प्रमाण होईपर्यंत टोंचून घालतात. मध्येच ॲंटिमनी जास्त झाल्यानें ओकारी वगैरे झाल्याचीं चिन्हें दिसलीं तर औषध वाढविण्याचें तहकूब ठेवावें. ताप बंद होऊन पाणथरी नेहमींच्या आकारात येईतों औषध हळूहळू वाढवावें. २० क्यू० सेंटि० औषध घालण्या-शिवाय पचल्याचीं उदाहरणें आहेत. ताप कमी होण्यास पाचसहा पासून दहाबारा आठवडे लागतात. परंतु पाणथरी कमी होण्यास मात्र तीन, सहा, अगर नऊ महिनेहि लागतात. यानंतर रक्तांतील तांबड्या व पांढऱ्या गोलकांचें वाजवी प्रमाण पूर्ववत् येतें. पाणथरींतील रक्तात सापडणारे प्राणिज रोगजंतु नाहींसे होतात. हें औषध टोंचताना तें शिरेतच जाईल, बाहेर सांडणार नाहीं अशी खबरदारी घेतली नाहीं तर सांडलेल्या जागीं सूज व दुःख मनस्वी होतें. म्हणून निदान मुलांच्या बाबतींत ॲंटिमनीचा अतिबारीक केलेला पूड लॅनोलीन या मलमात खलून तें चोळावें म्हणजे बराच उपयोग होतो.

काळा चौतरा—याचें नाव काळा चबुत्रा, काळा चौत्रा असेंहि आहे. औरंगाबाद शहराबाहेर जवळच हें ठिकाण आहे. औरंगाबादेहून फौज बाहेर निघावयाची म्हणजे पहिला मुक्काम (डेरेदाखल) या ठिकाणीं होत असे. पुण्यास डेरेदाखल होण्याची जागा जशी गारपीर तशी ही असे. [राजवाडे. खंड १, खरे. ऐ. ले. सं.].

काळा पहाड—वायव्येकडील सरहद्दीवरच्या प्रांतात हजारा जिल्हा आहे त्याच्या वायव्यसरहद्दीवर ही डोंगराची रांग आहे. याच्या सीमाः—पूर्वेस अगोर व दक्षिणेस तनावाल. आहे. ही रांग दक्षिणोत्तर दिशेने पसरली असून लांबी २६ ते ३० मैल व उंची सुमारें ८००० फूट. सिंधूनद उत्तर टोंकास लागून बरोबर दक्षिणेत वळला आहे. पश्चिमेच्या उतरणीवर युसुफझाइ पठाण व इतर भागात स्वाती लोक रहातात. या रांगेपासून फाटे निघाले आहेत. व त्या फाट्यामधील सखल प्रदेशांत वस्ती आहे. ओक, सिक्यामोर व हर्सचेस्टनट ह्या झाडाचीं अरण्यें शिखरावर आहेत, पण उतरणीवर मुळींच झाडी नाहीं. इ. स १८५१ सालापासून ते १८९१ पर्यंत या

लोकांनीं खालसा मुलखांत दरवडे घालून अथवा इंग्रजी अधिकाऱ्यांनां ठार मारून इंग्रज सरकारास मधून मधून उपद्रव देण्याचा क्रम चालू ठेविला होता. प्रत्येक वेळीं सैन्य पाठवून त्यांचें पारिपत्य करण्यात आलें.१८९१ पासून यांनीं शांततेचा भंग केला नाहीं.

काळा बाग, ज मी न दा री.—पंजाब इलाखा, मिआनवाली जिल्हा व तहाशिलींतलि एक जमीनदारी. क्षेत्रफळ १०७ चौ. मै. काळाबागचे अवान मलिक यांची ही जमीनदारी आहे. सुमारें ३०० वर्षांपूर्वी हे येथें आले. शिखांनीं इ. स. १८२२ त ही जमीनदारी खालसा केली. तथापि मांडलिक या नात्यानें ती मलिक यांजकडेच राहिली इ. स. १८५८ सालच्या बंडात यांच्याकडे पेशावर शहराच्या एका दरवाजाचें रक्षण करण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें येथील जहागिरदारास इतर उत्पन्नाखेरीज तुरटी तयार करण्याबद्दल १००० रुपये मिळतात.

गां व—पंजाब. मियानवाला जिल्हा. इसाखेल तहशिलींतील एक गांव. उ. अ. ३२ ° २८′ व पू. रे. ७१ ° ३३′. लोकसंख्या (इ. स. १९११) ६६६४. सिंधु नदीच्या उजव्या तीरावर मिठाच्या डोंगराच्या पायथ्याशीं हा गाव वसलेला आहे. येथें बारा मिठाच्या खाणी आहेत. जवळपास-या डोंगरात तुरटीहि सांपडते. इ. स. १ ०४ सालीं ३'१०० मण तुरटी निघाली. उत्तरोत्तर या धंद्याचें महत्व कमी होत चाललें आहे. इ. स. १८७५ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. इ. स. १९०३–४ सालीं तिचें उत्पन्न ५६०० रुपये व खर्च ६७०० रुपये होता.

काळा बाग छावणी—वायव्येकडील सरहद्दीचा प्रांत. हजारा जिल्ह्यातील ही एक लहानशी छावणी असून अबटाबाद आणि मरी याच्या दरम्यान असलेल्या रस्त्यांवरच आहे. उ. अ. ३४ ° ६′व पू. रे.७३ ° २५′.हिंवाळयांत रावळपिंडी येथें असलेला ब्रिटिश डोंगरी तोफखाना उन्हाळ्यांत येथें असतो.

काळासमुद्र-काळ्या समुद्राच्या मर्यादा पुढीलप्रमाणें आहेतः उत्तरेस रशियाचा दक्षिणकिनारा असून पश्चिमेस रुमानिया, तुर्कस्तान व बल्गेरिया हे देश आहेत. दक्षिण व पूर्व दिशेस आशियामायनर आहे. उत्तरेस अझोव समुद्राचा भाग असून बास्फोरसमुळें काळासमुद्र व भूमध्यसमुद्र जोडले गेले आहेत. दार्दानेलीस व मार्मोराचा समुद्र याच्या द्वारा हा संयोग घडून आला आहे. मध्यानजीकची सर्वांत जास्त खोली सुमारें १०३० पुरुष आहे. काळ्या समुद्रावरचें वातावरण व स्थिति भूमध्य समुद्राहून बरीच भिन्न आहे. १०० पुरुषांखालीं आढळून येणारा गंधकयुक्त हैड्रोजन, कॅलशियम कार्बोनटचा थर, त्या खोल पाण्यांतील कुजकें पाणी व तळाशीं आढळून येणारा जीवनाभाव या सर्व गोष्टींमुळें भूमध्यसमुद्राशीं काळयासमुद्राची तुलना करणें अशक्य झालें आहे. अश्मीभूत वनस्पति (फॉसिलिफेरस), ड्रेइसेना व कार्डियम याचे अवशेष तळापासून वर काढण्यांत आले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं, काळयासमुद्रावरील परिस्थिति हल्लींच्या कॅस्पियन समुद्राप्रमाणेंच होती. एन्. अँड्र्यू सोव्हच्या मतें काळासमुद्र व भूमध्यसमुद्र यांचा बास्फोरसद्वारा संयोग झाला त्यावेळीं बरेंच क्षारजल काळ्या समुद्रात शिरलें व त्यामुळें तेथें गंधकयुक्त हैड्रोजन उत्पन्न झाला. उन्हाळ्यात हवामान व खारटपणा यांचें निरीक्षण करण्यांत आलें त्यावेळीं पृष्ठभागावरील खारेपणा शेंकडा १.७० ते २ अशा प्रमाणांत पन्नास पुरुष खोल होता व अत्यंत खोलींतील खारेपणा शेकडा २.२५ अशा प्रमाणात असतो. २५ ते ५० पुरुष खोलीच्या दरम्यान शीतल थर असल्यानें हवामानांत फरक पडतो.

काळी नदी—(पूर्व) हिचें खरें नाव कालिंदी. ही नदी संयुक्त प्रांतांतील मुझफरनगर, मिरत, बुलंदशहर, अलीगड, इटा आणि फरुकाबाद या जिल्ह्यांतून वहात जाते. ही कनोजजवळ गंगा नदीस मिळते. लोअर गॅंजेस कॅनालचें साडपाणी हींत सोडलें आहे.

काळी सिंध—राजपुताना आणि मध्यहिंदुस्थान या प्रांतातून वहात जाणारी व चंबळा नदीस मिळणारी नदी. विंध्याद्रि पर्वतात बरझिरी खेड्याजवळ उगम पावून कोटा संस्थानांतील पिपरा गावाजवळ चंबळा नदीस मिळते. तिची एकंदर लांबी २२५ मैल आहे. संस्कृत वाङमयात हिचा पुष्कळ वेळां उल्लेख आलेला असून अबुल फजलने माळव्यांतील ही एक महत्वाची नदी आहे असें लिहून ठवलें आहे.

किउंथल—पंजाब. सिमल्याच्या भागातील जीं डोंगराळ संस्थानें आहेत त्यापैकीं एक. या संस्थानचे क्षेत्रफळ ११६ चौरसमैल आहे. या संस्थानात २१२ खेडीं असून एकंदर लोकसंख्या १९११ सालीं २५३५४ होती संस्थानचें वार्षिक उत्पन्न १९०२ सालीं ६६००० रु. होतें. हल्लीं या संस्थानचा राजा रजपूतवंशी विजयसेन हा आहे. पूर्वी या संस्थानच्या राजाला ' राणा ' या नावानें संबोधले जात असे. पण १८५७ सालीं याला राजा हा किताब देण्यांत आला. ' गुरखा युद्धा 'नंतर गुरखे लोकांच्या ताब्यात या संस्थानचा जो मुलुख होता तो पत्याळच्या महाराजांच्या ताब्यांत देण्यांत अला. यामुळें या संस्थानची जी नुकसानी झाली त्याकरितां ब्रिटिशसरकारानें या संस्थानास खंडणीची सूट दिली. १८१५ सालीं थिओग, कोटी, घंड, मघान हीं छोटीं संस्थानें ह्या संस्थानच्या ताब्यांत देण्यांत आलीं व वरील संस्थानांनीं या संस्थानाला खंडणी द्यावयाचें ठरलें. सन १८२३ मध्यें पुन्नर हें देखील या संस्थानाकडेच देण्यात आलें.

किओटो-हे शहर जपानमधील यामाशिरी प्रांतांत आहे. हें जपानची जुनी राजधानी होतें. हे उत्तरअक्षांश ३५°

व पूर्व रेखांश १३५ ° ४६' वर आहे. याची लोकसंख्या १९१६ सालीं ५,३९,१५३ होती. येथें बिवा तळ्यापासून ६३ मैल लांबीचा कालवा आणला आहे. या कालव्यानें येथील कारखान्यांस मुबलक पाणी मिळूं लागलें. येथें पुष्कळ भव्य देवालयें व मंदिरें असून शिल्पकलेच्या दृष्टीनें उत्कृष्ट बांधलेलीं स्मारकेंहि बरींच आहेत. यांशिवाय या शहरांत विशाल उत्सवमंदिरें व सुंदर बागाहि आहेत. या वर निर्दिष्ट केलेल्या सर्व ठिकाणीं जपानी कलेचें मोहक स्वरूप दृग्गोचर होतें. या शहराची चिनीमातीचीं भांडीं, कपड्यावरील भरतकाम, किनखाब, पंखे, लहान मुलांचे खेळ वगैरेकरितां फार पुरातन काळापासून प्रसिद्धि आहे. येथें अलीकडे उत्तम रेशमी कापड व रंगीबेरंगी सूत तयार होतें. येथील रेशमी कापडास व सुतास यूरोपांत व अमेरिकेंत बरीच मागणी आहे.

बौद्ध संप्रदाय व जपानी संस्कृतीवर झालेला परिणाम येथें चांगला दृष्टोत्पत्तीस येऊन त्याबरोबरच शिंतो पंथाच्या शुद्धतेचें व विलक्षण साधेपणाचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. जपानी लोकांची नैसर्गिक सौंदर्याबद्दल गुणग्राहकता येथें विशेष प्रमाणांत नजरेस येते.

हें शहर इ. स. ७९३ मध्यें काम्मू बादशहानें स्थापन केलें. पुढें ११ शतकें हें त्याच्या राज्याचें मुख्य शहर होतें. या बादशहानें या शहराची केलेली रेखीव मांडणी—लांबी ३॥ मैल रुंदी ३ मैल व आडवे उभे ९, ९ रस्ते—कांहीं प्रमाणांत अद्यापहि कायम आहे. याला साईकिओ म्हणजे पश्चिम राजधानी अशीहि संज्ञा आहे. जपानांतील चार विश्वविद्यालयांपैकीं किओटो येथें एक आहे.

१९२३ सालच्या सप्टेंबर महिन्यांत जपानांत भूकंपाचा भयंकर धक्का बसला व टोकियोसारखीं मोठमोठीं शहरेंहि जमीनदोस्त झाल्यासारखीं झालीं. या भूकंपानंतर मोठी तापाची साथ उद्भवली. जपानची राजधानी अशा रीतीनें नष्ट झाल्यावर पुन्हा ती कोठें प्रस्थापित करावी यासंबंधीं निरनिराळे विचार सुरू झाले. प्राचीन राजधानीचें शहर जें किओटो त्या जागीं नवी राजधानी स्थापावी कीं काय असा एक प्रश्न उपस्थित झाला. पण बहुमत या योजनेच्या विरुद्ध आहे.

किंकर—(१) कोणी एक राक्षस. विश्वामित्रानें आज्ञा केल्यावरून कल्माषपाद राजाच्या शरीरांत यानें प्रवेश केला होता.

(२) लंकेतील ऐशीं सहस्र राक्षसांच्या समुदायविशेषास हें नांव दिलेलें आहे. [वाल्मि. रामा. सुं. का; प्रा. कोश].

किंकरी—किंकर (विलायती किंवा वेडी बाभूळ). हें झाड मूळचें अमेरिकेंतील असून बहुतेक उष्ण प्रदेशांतहि तें आढळतें. हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत याची लागवड झाली आहे. हिंदुस्थानांत या झाडास विलायती बाभूळ किंवा किंकरी, अथवा कंकरी गुजराथेंत पिशी बाभूळ, गायबाभूळ इत्यादि नांवें आहेत.

या झाडाचीं फुलें सुवासिक असल्यामुळें फ्रान्समध्यें त्याची लागवड बरीच होते. या झाडापासून गोंद व इतर पदार्थ उत्पन्न होतात, तरी गोंदापेक्षा फुलांमुळेंच याला विशेष महत्व आलें आहे. परंतु या झाडाच्या फुलांपासून अत्तर करण्याच्या प्रयत्नास अद्याप विशेष यश आलें नाहीं. कारण यापासून पोमेड तयार करण्यास लागणारी चरबी किंवा गोडें तेल खवट होऊं न देण्याविषयींची अडचण हिंदुस्थानांत उत्पन्न होते. तराई किंवा तिजजवळच्याच टेंगण्या टेंकड्यांत या झाडाची लागवड केल्यास चहा, धुंद किंवा नीळ याच्याबरोबर हेंहि आडपीक हिंदुस्थानांत काढतां येईल. [वॅटकम. प्रॉ]

किक्ली—सातारा जिल्हा. हें लहान खेडें वांईच्या आग्नेयीस ६ कोस अंतरावर आहे. येथे एका आवारांत ३।४ जुनीं देवळें आहेत. हें आवार १२० फूट चौरसचौरस आहे. बहुतेक सर्व देवळें महादेवाचींच आहेत. एकांत भैरवाची मूर्ति आहे. देवळाच्या चबुतऱ्यावर पुसट अक्षराचा एक शिलालेख आहे. तो सिंघण देवराजाचा असावा असे वाटतें. कारण तें देऊळ त्यानें बांधलें होतें असें म्हणतात. त्या आवाराच्या एका कोपऱ्यांत एक जुनी विहीर आहे. नव्या देवळातील मूर्ती औरंगझेबानें फोडल्या असें म्हणतात. मूळच्या देवळाचे दगड विजापूरचा सरदार अफझुलखान यानें वांईस आपला वाडा बांधावयास नेले असें म्हणतात. भैरवाची यात्रा दसऱ्याला भरते. या वेळीं येथील परटाच्या कुळांतील एक पुरुष भैरवाच्या भिंतीवर धडक मारून घेतो. ही चाल या परटाच्या कुळांत वंशपरंपरा आहे असें तेथील लोक सांगतात. बहुतेक देवळें पडकीं आहेत. फक्त एक जें शाबूत आहे, त्यांतील सभामंडपांत छतावरील व मधल्या चारीहि खांबावरील नकशीचें खोंदीव काम फारच चांगलें आहे. असें कोरीव काम सातारा जिल्ह्यातील कोणत्याहि देवळांत सापडत नाहीं. कृष्णलीला व मारुतीचरित्र यांतील प्रसंग यांत दाखविलेले आहेत. देवळाची मांडणी स्वस्तिकाकार आहे. दगडी खांबाची टिटवी हीं मूर्तीचीं केलेलीं आहेत हीं देवळें व गांव चंदनवंदन किल्ल्याच्या नजीक आहे [सातारा ग्या.].

किंगतनाड.—दक्षिण हिंदुस्थानांतील कुर्ग प्रांताचा दक्षिणेकडील तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ ४२९ चौरस मैल असून याची लोकसंख्या १९११ सालीं ३९,७६७ होती. या तालुक्यांत ६८ खेडीं असून पोन्नापेट हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. या तालुक्याच्या दक्षिणेस ब्रह्मगिरी पर्वताची ओळ पसरली असून या पर्वताचे मुळके या तालुक्यांत गेले आहेत. याच्या पश्चिमभागांत हिरवें गार अरण्य आहे व त्याचप्रमाणें पूर्वेसहि बरेंच मोठें अरण्य आहे. या अरण्यांतून लक्ष्मणतीर्थ नांवाचा एक ओढा वहात जातो.

किंग्जटाउन—आयर्लंड. डब्लिन परगण्यातील बंदर; हें दक्षिण पार्लमेंटरी विभागात डब्लिन उपसागराच्या आग्नेय टोकावर डब्लिनपासून डब्लिन ॲन्ड साउथ ईस्टर्न रेल्वेनें ६ मैल आग्नेयीस आहे. या शहराची लोकसंख्या (१९०१) १७३७७ होती. हें मोठें बंदर व समुद्रकिनाऱ्यावरील आरोग्यकारक ठिकाण असून इ. स. १८२१ मध्यें चौथा जॉर्ज आयर्लंडमधून परत जातांना येथें उतरला होता म्हणून याचें किंग्ज टौउन असें नाव पडलें. यापूर्वी या शहरास डनलेरी असें नाव होतें. किंग्जटाउन हें डब्लिन स्टीम पॅकेट कंपनीच्या होलीहेडला जाणाऱ्या मेल आगबोटीचें बंदर व लंडन ॲन्ड नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचें स्टेशन आहे. येथून ग्रेट ब्रिटन व दुसऱ्या देशाशीं निर्गत व आयात व्यापार बराच चालतो. येथून गुरें बाहेर देशीं फार जातात, तसेंच धान्य वगैरेहि माल बाहेरून येतो.

येथें समुद्रात मासे धरण्याचा मोठा धंदा चालतो येथें रॉयल आयरिश, रॉयल सेंट जार्ज व रॉयल आलफ्रेड हे तीन क्लब आहेत.

किंग्जलिन—इंग्लंडातील नारफोक परगण्यातले बंदर व म्युनिसिपल आणि पार्लमेंटरी बरो. हें मोठ्या औज नदीवर आहे. लोकसंख्या (१९११) २०,२०५. येथें जुन्या कोटाचे अवशेष असून १५ व्या शतकातला दक्षिण-दरवाजा अद्यापि दृष्टीस पडतो. येथें प्रार्थनामंदिरे, नगरभवन, स्टॅनले ग्रंथालय वगैरे महत्वाच्या इमारती आहेत. येथील मासे धरण्याचीं ठिकाणें महत्वाचीं आहेत. दारू गाळण्याचे कारखाने, धान्याच्या चक्क्या, लोखंड व पितळ ओतण्याचे कारखाने शेतकीची औउत, जहाजें बांधणें वगैरेचे महत्वाचे कारखाने आहेत. या बरोतर्फे पार्लमेंटात एक प्रतिनिधि निवडला जातो. याठिकाणीं १ मेयर, ६ अल्डरमेन व १८ सभासद असतात. लिनचा इतिहास सॅक्सन काळापासून सुरू होतो. इंग्लंडच्या राजांनीं वेळोवेळीं लिनला सनदा व हक्क दिलेले आहेत. प्राचीन काळापासून लिनची गणना चांगल्या इंग्लिश बंदरात होते.

किंग्स्टन—किंग्स्टन हें जमेकाची राजधानी व मुख्य बंदर आहे. याची लोकसंख्या १९११ मध्यें ५७,३७९ होती. हें शहर सरे प्रांताच्या आग्नेय किनाऱ्यावर आहे. शहरांत मुख्य मुख्य सरकारी इमारती आहेत. जमेका ज्ञानवर्धक मंडळाचें एक सार्वजनिक ग्रंथसंग्रहालय, पदार्थसंग्रहालय व कलाकौशल्यमंदिर (आर्ट गॅलरी) अशा संस्था आहेत. येथील हवा रुक्ष व निरोगी आहे. भूकंपाने पोर्ट रॉयलचा नाश झाल्यामुळें इ. स. १६९३ मध्यें किंग्स्टन शहर वसविण्यात आलें. १७०३ व १८०२ सालात हें अनुक्रमें व्यापारी व राजधानीचें शहर झालें. आगीमुळें ह्या शहराची पुष्कळदा राखरांगोळी झाली. इ स. १९०७ मध्यें भूकंपाचे भयंकर धक्के या शहरास बसले होते.

किचनेर लॉर्ड (१८५०–१९१६)—लॉर्ड किचनेर याचें नांव हरबर्ट असें असून याचा जन्म इंग्लंडात १८५० मध्यें झाला. याचा बापहि एक लष्करी अधिकारी होता. हरबर्ट हा १८७१ त सैन्यात दुय्यम लेफ्टनंट म्हणून दाखल झाला. पुढें १८८३च्या सुमारास ब्रिटिशांच्या देखरेखीखालीं ईजिप्तच्या सैन्याची पुनर्घटना होत असताना याला तिकडे नेमलें. याठिकाणीं तो पुष्कळ वर्षे राहिला. तेथें त्याला बढती मिळत मिळत तो तेथील इंग्रजी सैन्याचा मुख्य झाला. हें सैन्य महादीचें बंड मोडून खेदिवाला मदत करण्यासाठीं ठेवलें होतें. इ. स. १८८८ च्या एका लढाईत तो जखमी झाला होता. १८९२ मध्यें त्यानें खेदिवाच्या सैन्याची पुनर्घटना केली व सूदानवर स्वारी करून तेथील राज्यकारभाराची व्यवस्था उत्तम प्रकारची लावली. याला सर्व इजिप्शियन (यात इंग्रजी सैन्यहि येतें) सैन्याचा सरदार केलें होतें. यानें १८९६ मध्यें खारटुम येथें महादीचा पूर्ण पराभव केला. यामुळें त्याला खारटूमचा लॉर्ड बनविलें व ३० हजार पौंड बक्षीस दिलें. पुढें १ वर्षानें दक्षिण आफ्रिकेंतील लढायात याला लॉर्ड रॉबर्टस याच्या हाताखालीं नेमलें. तिकडील प्रिटोरिया वगैरे लढायात यानें भाग घेतला व तो १९०२ पर्यंत तेथें राहून परत आला. यावेळीं त्याला ५० हजार पौंड बक्षीस देऊन कांहीं पदव्या दिल्या. यानंतर त्याची नेमणूक हिंदुस्थानात कमॉडर-इन्-चीफ या जागेवर झाली. तो येथें ७ वर्षे होता. येथील सैन्याची त्यानें पुष्कळ दृष्टीनें सुधारणा व पुनर्घटना केली. त्यानें व्हाइसरॉयच्या कौन्सिलात मिलिटरी मेंबर हा कमॉडर-इन्-चीफ हाच असावा, म्हणजे सरकारला लष्करी माहिती देण्याचा तो जबाबदार राहील असा हट्ट धरला. या बाबतींत व सैन्यसुधारणेच्या बाबतींत याचें व तत्कालीन व्हाइसरॉय कर्झन याचें पटेना व स्टेट सेक्रेटरीनें किचनेरचा सल्ला ग्राह्य ठरविला व त्यामुळें कर्झनने राजीनामा दिला (१९०५).

लॉ. किचनेर इ. स. १९०९ सालीं इंग्लंडास परत गेला. तेव्हा त्याला फील्डमार्शल आणि भूमध्य समुद्रावरील सैन्य व आरमाराचें मुख्य केलें. तेथून त्यानें साऱ्या साम्राज्यातील सैन्याची पाहणी करण्याकरिता दौरा काढला. त्यात त्यानें कांहीं सूचना केल्या पुढें परत आल्यावर त्यानें वरील जागेचा राजीनामा दिला. इ. स. १९११ त याची ईजिप्तमध्यें कॉन्सल जनरल म्हणून नेमणूक झाली. पुढें १९१४ मध्ये महायुद्ध सुरू झालें तेव्हां याल युद्धखात्याचा सेक्रेटरी नेमिलें. त्यावेळीं यानें लष्कराची मांडणी व व्यवस्था उत्तम केली. पुढें रशियावर चढाई करून जात असतां ज्या लढाऊ बेडरजहाजात हा बसून जात होता, तें ५ जून १९१६ रोजीं जर्मनीने आपल्या टार्पेडो बोटीनें बुडविलें व त्यात हाहि बुडून मेला. [स्मिथ-ऑक्स. हिस्टरी इंडिया.]

किच्चौंचा—संयुक्त प्रांतातील फैझाबाद जिल्ह्याच्या तांडा तहशिलींतील एक गाव. हें गाव टोन्री नावाच्या एका लहानशा नदीच्या कांठीं वसलेलें आहे. येथील लोकसंख्या १९११ सालीं २२२५ इतकी होती. हें गाव चौदाव्या शतकातील मखदुम अश्रफ नावाच्या एका साधूकडे व त्याच्या वंशजांकडे होतें. स. १८५६च्या दहाव्या अॅक्टान्वये या गावचा कारभार चालविण्यात येतो. येथें एक शाळा आहे.

किट्स सेंट—सेंट किट्स अथवा सेंट ख्रिस्तोफर हें बेट ब्रिटिश वेस्ट इंडीजपैकीं एक आहे. हें नेव्हिस व अँग्विला मिळून लीवार्ड बेटांपैकीं एक इलाखा होतो. हें २३ मैल लांब असून याचें क्षेत्रफळ ६३ चौरस मैल आहे. बेटाला पाण्याचा चांगला पुरवठा असून तें सुपीक व निरोगी आहे. यांत साखर, काकवी, रम, मीठ, कॉफी व तंबाखू यांचें उत्पन्न होतें. येथें प्राथमिक शिक्षण सक्तीचें आहे. यांत ओल्डरोड व सॅंडी पॉईंट हीं मुख्य शहरें असून बासेतेरी राजधानी (लो. सं. १०,०००) नैर्ऋत्य किनाऱ्यावर आहे स्थानिक कायदेकौन्सिलांत सहा सरकारी व सहा राजनियुक्त असे सभासद असतात. कोलंबसास १४९३ त हें बेट सापडलें. स. १६२३ त येथें ब्रिटिश वसाहत झाली. पाच वर्षांनंतर फ्रेंच व ब्रिटिश या दोघांची मालकी ह्या बेटावर चालू झाली. परंतु स.१७१३ च्या युट्रेक्टच्या तहानें हें बेट ब्रिटिशास मिळालें. येथील लोकसंख्या २९७८२ असून बहुतेक निग्रो आहेत.

किंडत, पेटा जिल्हा—उत्तर ब्रह्मदेशांतील अप्पर चिंदविन जिल्ह्याचा मध्यभाग. या भागांत किंडत व टमू हे दोन पेटे आहेत.

पे टा.—अप्पर चिंदविन जिल्ह्यांतील एक पेटा. हा पेटा चिंदविन नदीच्या कांठीं पूर्वेस श्वेबो व पश्चिमेस टोम या जिल्ह्याच्या दरम्यान वसलेला आहे. या पेटयाचें क्षेत्रफळ १०८८ चौरस मैल आहे स.१९११ मध्यें या पेटयाची लोकवस्ती १५२२५ असून,पेटयांत किंडत हें गाव व २८खेडीं होतीं. हा पेटा डोंगराळ असून यांत पुष्कळ जंगलें आहेत. स.१९०३-४ सालांत २१ चौरस मैल जमीन लागवडींत होती; व तिचा महसूल व शेतसारा मिळून ४२,००० रुपयांचें उत्पन्न होते.

श ह र.—अप्पर चिंदविन जिल्ह्यातील किंडत पेटयाचें मुख्य ठिकाण. हें चिंदविननदीच्या डाव्या तीरावर वसलेलें आहे. या गावाची लोकसंख्या स १९२१ सालीं ३५९२ होती. या शहराच्या आसपास अरण्य आहे. उन्हाळयात नदीचें पाणी कमी झालें असतां या गावाच्या व नदीच्या मध्यें मोठें वाळवंट पसरतें, तर पावसाळयांत नदी गावाच्या एका बाजूला अगदीं चिकटते व दुसऱ्या बाजूला तलाव असल्यामुळें त्या ठिकाणीं दलदल होते. अशा तऱ्हेनें हें गांव चांगल्या तऱ्हेनें वसलेलें नाहीं. नदीच्या कांठावर देखील लोकांची वस्ती आहे. त्याच्या उत्तरेस पोलिसचौक्या, तुरुंग, लष्कर वगैरे ठिकाणें आहेत. पोस्ट ऑफिस व दवाखाना लोकवस्तीच्या भागांतच आहे. बर्मी लोकांच्या सत्तेखालीं किंडत गाव हें सरहद्दीवरील महत्वाचें गाव होतें; तरी पण व्यापारीदृष्टया त्याला केंव्हांहि महत्व प्राप्त झालें नाहीं. या गावला म्युनिसिपालिटी देण्यात आलेली नाहीं. रस्ते व इमारती यथातथाच आहेत. गांवात एक लहानशी अँग्लो–व्हर्नाक्युलर शाळा आहे.

किंडर गार्टन—या जर्मन शब्दाचा अर्थ 'मुलांचा बाग' असा असून फ्रेडरिक फ्रोबेलनें मुलांच्या शारीरिक, नैतिक व बौद्धिक उन्नतीकरितां एक नवीन खेळण्याची शाळा काढिली. निसर्गनिरीक्षणाची आवड व वृक्ष आणि वनस्पती यावरून सादृश्यें काढण्याचा नाद यामुळें बालपणास विशिष्ट महत्व त्यानें दिलें आहे. बालवयास अत्यंत महत्व देणारे पेस्टॅलोझीव कोमोनियस प्रभृतींना माता हीच खरी शिक्षक आहे असें वाटत असे. परंतु गरिबीमुळें मातेला मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष्य पुरविण्यासहि अवसर नसतो. हा अडचण जाणून त्यांनीं अर्भकांकरितां एक अनाथगृह काढिलें. अशा शाळाना नेदरलंडमध्यें प्लेस्कूल व इंग्लंडमध्यें इनफंट स्कूल असे म्हणतात. फ्रोबेलचें असें मत होतें कीं, मुलांना शारीरीक, नैतिक व बौद्धिक शिक्षण एकदमच दिलें पाहिजे. तसेंच शिक्षणाचें मूळ रहस्य योग्यमार्गदर्शित व स्वयंस्फूर्त अशा कृतींत असून बालवयात सर्व व्यवसाय खेळ हाच काय तो असलापाहिजे. खेळ हाच महत्वाचा व्यवसाय मुलानां असला पाहिजे याबद्दल फ्रोबेल व मॉंटेग यांचें मतैक्य होतें. 'दि मदर प्ले अँड चिल्ड्रेन्स सॉग्ज' या पुस्तकांत फ्रोबेलनें खालील तत्वें ग्रथित केलीं आहेत. पहिलें तत्व सामर्थ्य व समतोलपणाचा नियम हें होय मुलाच्या वाढीचा नियम हें दुसरें तत्व; व फ्रोबेलचें तिसरें तत्व म्हणजे चिन्हाच्या द्वारा शिक्षण देण्याचा नियम हे होय. फ्रोबेलनें जे कांहीं खेळ शोधून काढिले आहेत त्या बहुतेकांत साध्या खेळण्याचा समावेश आहे. सहा रंगीत चेंडू, एक लाकडी चेंडू, एक पंचपात्रासारखें भांडें, एक घन, आठ लहान पडतील अशा बेतानें कापलेला दुसरा एक घन, आठ तिकोन व चौकोन पडतील असा एक रंगीत लाकडाचा तिसरा घन, व नमुने तयार करण्याकरितां वर्तुळें कडीं व लाकडी पटया इतकें सामान ओळीनें मुलांच्या 'बक्षीस' संग्रहांत असे. आधुनिक पद्धतींत वाळूवरील रेखाकला, माती व कागद यांचीं चित्रें करणें, घड्या घालणें यांसारख्या गोष्टींना महत्व दिलेलें असतें.

सन१८४० मध्यें रूडोलस्टॅडनजीक ब्लॅकेनबर्ग येथें पहिली किंडरगार्टन शाळा सुरू झाली. परंतु द्रव्याभावीं ती बंद करावी लागली. १८५१ मध्यें फ्रोबेलच्या तत्वानुसार चालणाऱ्या शाळाना बंदी करण्यात येईल असें प्रशियन सरकारनें फर्माविलें. परंतु असल्या संकटास न जुमानतां फ्रोबेलचीं तत्वें चांगलीं मूळ धरून टिकलीं होतीं. पुढें १८५४ मध्यें प्रसिद्ध रॉंजेसनें फ्रोबेलची कल्पना इंग्लंडांत प्रचलित केली.

बॅरोनेस मारेन् होल्टझ् ही बाई फ्रोबेलच्या तत्वांची पुरस्कर्ती झाली व १८५५ पासून तिनें फ्रेंच सरकारचें लक्ष्य किंडरगार्टनकडे वेधून घेतलं. प्रसिद्ध मिचेलेट यानें तर असें प्रसिद्ध केलें कीं फ्रोबेलनें मानवी शिक्षणाचा प्रश्न सोडविला.

स.१८७२ नंतर फ्रोबेलपद्धतीचा झपाट्यानें प्रसार झाला; व ती आतां यूरोपांतील सर्व सार्वजनिक शाळातून सुरू करण्यांत आली आहे अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत ही पद्धति सुधारून सुरू केली आहे. इ. स.१८५४ मध्यें हेन्री बर्नार्ड यानें या पद्धतीची फार वाखाणणी करून 'जर्नल ऑफ एज्युकेशन' मध्यें फार उत्तम अभिप्राय दिला आहे. मिस एलिझाबेथ पीबॉडी नांवाच्या बोस्टन येथील एका स्त्रीनें एक किंडरगार्टन शाळा काढली. १८७१ त बोस्टान येथें अमेरिकन फ्रोबेल यूनियन नांवाची संस्था स्थापन झाली इ. स.१८८२ मध्यें डब्ल्यू. एन. हेलमन् यानें स्थापन केलेल्या फ्रोबेल इन्स्टिट्यूट ऑफ नॉर्थ अमेरिका या संस्थेंत वरील फ्रोबेल यूनियनचा अन्तर्भाव करण्यांत आला. बहुतेक किंडरगार्टन शाळा खासगी असल्यामुळें आकडेवारी देणें शक्य नाहीं. परंतु अमेरिकेंतील आकडेवारी खालीं दिल्याप्रमाणें आहे. इ.स १८६३ त ७३ शाळा होत्या, १८८२ मध्यें ३४८ होत्या, १८९२ मध्यें १३११ झाल्या व १८९८ मध्यें ४३६३ शाळा होत्या. त्यांपैकीं कमिशनर ऑफ एज्युकेशनकडून २८८४ शाळांचे अहवाल आले, त्यांवरून त्या शाळांत ५७६४ शिक्षक व १,४३,७२० मुलें होतीं.इ.स.१९०३–४ सालीं सार्वजनिक अशा २९९७ किंडरगार्टन शाळा असून त्यांत ४५३४ शिक्षक व १,९१,८८२ मुलें होतीं. १९०४–५ सालीं खासगी किंडरगार्टन शाळातून १,०५,९३२ मुलें होतीं. ही अमेरिकेंतील स्थिति झाली. जपानकडे पाहिलें तर १९०१ मध्यें २५४ किंडरगार्टन शाळा असून ६७१ शिक्षक व २३६७१ मुलें शिकत होतीं असें दिसून येतें. जगांतल्या इतर देशातली किंडरगार्टन पद्धति व तिची प्रगति 'रिपोर्ट ऑफ ए कन्सल्टेटिव्ह कमिटी अपॉन दि स्कूल अटेंडन्स ऑफ चिल्ड्रेन बिलो दी एज ऑफ फाईव्ह' या ग्रंथांत पहावयास सांपडेल. हिंदुस्थानात स्वतंत्र किंडर गार्टन शाळा नाहींत पण प्राथमिक शाळांत किंडर गार्टन पद्धतीचा बराच अवलंब करतात [लारा फिशर–दि किंडरगार्टन इ.]

किड् बेंजामिन-- (१८५८) एक इंग्रज समाजशास्त्रज्ञ. यानें "सोशल इव्होल्यूशन" या नावाचें पुस्तक इसवी सन १८९४ सालीं प्रसिद्ध केलें. नैसर्गिक निवड व जीवनार्थ कलह यांवर प्रगति अवलंबून असणें अपरिहार्य असून या कलहाशीं विरोधी असणाऱ्या मजूरवर्गाच्या आकुंचित दृष्टीमुळें उद्भूत झालेला समाजसत्तावाद टिकणें शक्य नाहीं. तो वाढत्या सरकारी नियंत्रणानें नष्ट होईल. उद्योगधंद्यांची मालकी व कारभार यांत हें सरकारी नियंत्रण दिसून न येतां सर्व हक्क दूर करून टाकण्यानें उत्पन्न होणाऱ्या स्पर्धेत तें दिसून येईल, अशीं तत्वें वरील ग्रंथांत प्रतिपादन केलीं. "प्रिन्सिपल्स ऑफ वेस्टर्न सिव्हिलिझेशन" (पाश्चात्य संस्कृतितत्वें) या पुस्तकात तो वाटेल तसा भरकटला आहे. "दि कंट्रोल ऑफ दि ट्रॉपिक्स" (उष्णप्रदेशावरील वर्चस्व) यांत उष्णकटिबंधांतील लोकास थंड प्रदेशांतील लोकांनीं राबवावें हा यानें सृष्टीचा नैसर्गिक नियम म्हणून प्रतिपादिला आहे.

कित्तुर--मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा.उ.अ. १५°३५' व पू. रे. ७४° ५१'. संपगांवच्या दक्षिणेस सुमारें ७ कोसावर हें एक जुनाट गाव आहे. येथें दर सोमवारीं आणि गुरुवारीं बाजार भरतो. बाजारांत गुरेंहि विकावयास येतात.येथें विणकामाचे व काचेच्या बांगड्या तयार करण्याचे धंदे चालतात.येथें बसवाचें देऊळ असून त्यात इ. स. ११८८ सालचा गोव्याचा राजा जयकेशी तिसरा याच्या वेळचा एक शिलालेख आहे. या शिलालेखात कित्तुरच्या एका देवस्थान जमीनीच्या भाडणाचा निकाल (दिव्य करून केलेला) खोदला आहे. येथील लोकसंख्या सरासरी ६ हजार आहे; शाळा पोष्ट वगैरे येथें आहे.

येथील किल्ला हल्लीं पडका आहे. तथापि एके काळीं तो फार महत्वाचा होता. एकात एक असे दोन किल्ले आहेत. बाहेरच्या किल्ल्याचा घेर बेळगावच्या किल्ल्याच्या घेराचा एक पष्ठांश आहे. त्याबाहेर दोन खंदक आहेत. बालेकिल्ला बेळगाव किल्ल्याच्या एक दशांश घेराचा असून फार लहान आहे. तट दगड व मातीचा आहे. इंग्रजांनीं कित्तुर खालसा केल्यानंतर या किल्ल्याची दुर्दशा झाली. आतील सारा इमारती पडून गेल्या आहेत. पैकीं तेल्याचें देऊळ साधारण उभे आहे. देवळाच्या सज्यात अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यांतच कित्तूरचा देसाई, त्याच्या दोन बायका व एक दिवाण याच्या मूर्ती आहेत. कित्तूर यास गिजगण हळ्ळी (कोष्टीगाव) असेंहि एक नाव आहे. देसायाचा वाडा फार उत्कृष्ट होता. त्याचा द्वारमंडप १०० फूट लांब व ३० फूट रुंद असून सागवानी सुंदर खांबाचा होता वाड्याचें छत कोरीव कामाचें होतें.

वर उल्लेखिलेल्या शिलालेखात कित्तूर या गांवांचा उल्लेख प्रथम आलेला आढळतो. इ. स. १५३४ सालीं कित्तुर गाव बेळगावच्या असदखानाचा नौकर युसफखान नांवाच्या तुर्क सरदाराला जहागीर होता. सोळाव्या शतकाच्या अखेरीस विजापूरकराच्या सैन्याबरोबर हिरेप्पा आणि चिकाप्पा नांवाचे दोन लिंगाईत मल्ल आडनावाचे भाऊ सावकारी करण्याकरतां या भागात येऊन संपगांवास राहिले. कित्तुरकर देसायाचे हेच मूळ पुरुष होत. या दोघा भावांपैकीं हिरेप्पानें रणांगणावर मोठें शौर्य दाखविल्यावरून त्यास हुबळी परगण्याची सरदेशमुखी व समशेर–जंग–बहादुर हा किताब मिळाला. या कुळातील पांचवा देसाई कित्तुर येथें स्थायिक झाला. संपगांव व बिडीं हीं दोन ठाणींहि

त्यांच्याच ताब्यांत होतीं. सतराव्या शतकाच्या अखेरीस साऱ्या कर्नाटकांत कित्तूरकर मुडी मल्लप्पा देसाई हाच प्रख्यात देसाई होता.

सावनूरचा नबाब रौफ खान यानें कित्तुरच्या देसायाशीं जे करारमदार केले त्यावेळीं हाच मुडी मल्लप्पा देसाई होता. इ. स. १७४६ सालीं सावनूरच्या नवाबास इतर मुलुखाबरोबर कित्तुर मराठ्यांच्या स्वाधीन करावें लागलें. इ.स.१७७८सालीं हैदरानें खंडणी व इतर नजराणा देण्याच्या कबुलीवर हा मुलूख कित्तुरकराकडे ठेवण्याचें कबूल केलें. इ. स. १७५६ सालापासून परसगड, संपगांव व बिडि हे परगणे कित्तुरकर देसायांकडे चालत आले होते. इ. स. १७७८ सालीं त्यांनीं गोकाक ताब्यात घेतलें. परंतु इ स. १७७९ सालीं परशुरामभाऊनीं गोकाक सर केलें व देसायास कैद केलें. इ. स. १७८५ सालीं टिपूनें कित्तुर, नरगुंद, रामदुर्ग वगैरे काबीज करून कित्तुर येथें आपली एक सैन्याची तुकडी ठेवली होती. पुढें टिपूचा नाश करण्याकरता मराठे व निजाम हे एकत्र झाले असता त्यांनीं कित्तुर येथें टिपूच्या बुऱ्हाणुद्दीन नांवाच्या सरदारावर गणेशपंत बेहेरे व तुकोजी होळकर यांच्या हाताखालीं २५ हजार सैन्य देऊन पाठविलें. त्यांनीं साऱ्या प्रांतातून टिपूच्या सैन्यास हांकलून दिलें. तथापि कांहीं काळ कित्तूरचा किल्ला टिपूच्या ताब्यात होता. पुढें इ. स. १७८७ सालीं टिपूस कित्तुर व इतर प्रदेश मराठयांच्या हवालीं करावा लागला.

तीन वर्षे (इ. स.१७८५-१७८७) कित्तुर टिपूच्या ताब्यात होतें. त्यावेळीं तेथील देसायाच्या जहागिरीचा सर्व कारभार टिपूचा सेनापति बद्र–उल–झमान हा पहात असे. देसायास फक्त कांहीं रक्कम तनख्यादाखल खर्चास मिळे. इ. स. १७९२ सालीं झालेल्या श्रीरंगपट्टणच्या तहान्वयें पूर्वी टिपूच्या राज्यात मोडणाऱ्या कित्तूरच्या देसायांचा हा प्रदेश पुन्हा मराठयांकडे आला. तो पुढें दरबारनें परशुरामभाऊ याना सरंजामात लावून दिला भाऊनीं कित्तुरास आपला एक मामलेदार ठेवून तें ठाणें धारवाड सुभ्यात दाखल करून तेथील देसायांस बेगमीस नेमणूक करून दिली. या देसायानीं मराठयानां अतोनात त्रास दिला होता. मराठयाचे शत्रू जे हैदर व टिपु त्याना हे मराठयाच्या विरुद्ध नेहमीं मिळत व मराठयाच्या मुलुखांत आवडाव करीत असत म्हणून वरील योजना दरबारनें केली. इ. स १८०० सालीं धोंडया वाघानें मराठयांचे सेनापति धोंडोपंत गोखले याच्या पिछाडीवर कित्तुरजवळ आकस्मिक छापा घातला व धोंडोपंतास ठार मारलें. याच धोंडोपंतांनीं इ. स. १७९१ सालीं धोंडया वाघास पराजित केलें होतें. कित्तुर परगणा धोंडया वाघाच्या ताब्यांत बरेच महिने होता. इ. स. १८०२ सालीं कित्तुरकर मल्लसरजच्या (१७८२–१८१६) देसायांच्या ताब्यांत कित्तूर सभोंवतालचा सालीना चार लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख असून तो सालीना पेशव्यास ६० हजार रुपये खंडणी देत असे. याच वर्षी जनरल वेलस्ली श्रीरंगपट्टणाहून पुण्यास बाजीराव पेशव्याच्या मदतीस जात असतां या देसायानीं त्यास मदत केली होती त्यामुळें त्यांचा सरंजाम कायम राहिला. इ. स. १८०९ सालीं या देसायांस पेशव्यांनीं पुण्यास बोलाविलें होतें.

त्यावेळीं झालेल्या ठरावांन्वयें त्याची जहागीर त्याच्याकडे रहावी असें ठरलें व त्यास ' प्रतापराव ' हा किताब देण्यांत आला याजबद्दल देसायानीं पेशव्यानां सालीना एक लाख, पाच हजार रुपये खंडणी यावी असें ठरलें. प्रतापराव किताब मिळाला याच्या स्मरणार्थ देसायांनीं नंदगडाजवळ प्रतापगड नांवाचा एक किल्ला बांधला.

इ. स. १८१७ व १८१८ सालीं झालेल्या धामधुमींत कित्तुरकर देसायानीं आपले यजमान जे पेशवे त्यांच्या विरुद्ध इंग्लिशास मदत केली. बेळगावच्या लढाईत त्यानीं इंग्रजाना लढाऊ सामान देऊन बरीच मदत केली. इ. स.१८२४ सालीं हयात असलेला देसाई निपुत्रिक मरण पावला, त्यावेळीं दत्तकाला जहागिरीची मालकी मिळावी असा प्रजेनें प्रयत्न केला. परंतु धारवाडच्या कलेक्टरच्या सांगविरून इंग्रज सरकारनें दत्तकास मानलें नाहीं. कलेक्टरच्या मनांत सर्व जहागीर जप्त करून दत्तकाची चौकशी चालवावी असें होतें. त्याच्या या म्हणण्याचा विचार सरकारात चालू असतांच कित्तूरच्या प्रजेनें २३ आक्टोबर १८२४ रोजीं बंड केलें व कलेक्टर थ्याकरे यास कैद केलें. परंतु इंग्रजांनीं वेढा घालून कांहीं दिवसांनीं किल्ला घेतला व कित्तुर संस्थान खालसा केले यावेळीं इंग्रजांनीं किल्ल्यात जी लूट केली तींत १६ लक्ष रुपये रोख व ४ लक्षाचें जवाहीर, पुष्कळ घोडे, एक हजार उंट, कित्येक हत्ती, ३६ तोफा, पुष्कळ बदुका, तरवारी व दारू गोळा वगैरे बराचसा माल होता.

इ. स. १८२९ सालीं सांगोलीच्या रायाप्पा पाटलानें देसायाच्या दत्तक मुलास पुढें करून पुन्हा बंड उभारलें परंतु लवकरच त्याचाहि मोड करण्यात आला. पहिल्या बंडात रायाप्पा सामील होता. त्यासाठीं त्याच्या इनाम जमीनी इंग्रजानीं जप्त केल्या होत्या; हे बंडाचे कारण होतें. रायाप्पाच्या सोबत्यांनींच फितूर होऊन त्याला इंग्रजांच्या स्वाधीन केलें. [ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो. पु. ९; बॉ. गव्ह. सिले. पु. १२; विल्क्स–साऊथ इंडि. पु. २; स्टोक्स–बेळगांव; डफ– हिस्टरी मराठा; खरे-ऐति. ले. सं. बेळगांव ग्याझि]

किनगिन, ता लु का.—दक्षिण ब्रह्मदेशात हेंझडा जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ २०८ चौ. मै. लो. सं (१९११) ५०३२९. यांत एक शहर व ६२ खेडीं आहेत. तालुक्याचें मुख्य ठिकाण किंगिन. १९०३–०४ सालीं लागवड क्षे. फ. ६० चौ. मै. काळींचें उत्पन्न ८२००० रुपये.

किनवत—हैद्राबाद संस्थानामधील अदिलाबाद जिल्ह्याचा एक तालुका. नरसापूर व निर्मल या तालुक्यांमधील

उत्तरेकडील खेडीं मिळून हा एक नवीनच तालुका १९०५ मध्यें करण्यांत आला. याचें क्षेत्रफळ १२१८ चौ. मै. असून लो. सं. (१९११) ९८,३६९ आहे. तालुक्यात शहर एकहि नसून खेडीं मात्र २४९ आहेत.

किनवत जंगल—वऱ्हाड. यवतमाळ जिल्ह्यांत हें आहे. याचें क्षेत्रफळ १८० चौरस मैल असून तें पुसद तालुक्यात आग्नेयास आहे. हें जंगल बरेंच मोठें आहे. [यव. ग्याझि.]

किनु—उत्तर ब्रह्मदेश. श्वेबो जिल्ह्यातील पूर्वेकडील एक पेटा. या पेटयाचें क्षेत्रफळ ३०९ चौरस मैल असून १९११ साली याची लोकसंख्या ४२,४०४ होती. या पेटयांत ८५ खेडीं आहेत. किनु गांव हें या पेटयाचें मुख्य ठिकाण आहे. १९०३-४ सालांत या पेट्यातील ३९ चौरस मैल, जमीन लागवडीखालीं होती; व त्या साली जमीनमहसूल व शेतसारा मिळून ५५,९०० रुपये भरला.

किन्नर—या नांवाचा शब्दशः अर्थ 'कोणती माणसें' असा होतो. या पौराणिक व्यक्तींची शरीररचना विचित्र, तोंड घोडयाचें पण धड माणसाचें अशी यांची ठेवण होती. हे स्वर्गीय गायक असून कैलासावर कुबेर लोकांत रहात. यक्षांबरोबर यांचीहि ब्रम्हदेवाच्या अंगठयापासून उत्पत्ति झाली असें कांहीं पुराणात लिहिलें असून दुसऱ्या कांहीं पुराणांतून काश्यपपुत्र असे म्हटलें आहे. यांना अश्वमुख, तुरंगवक्त्र, मयु अशींहि नांवें आहेत.

किन्हई.—हें पंतप्रतिनिधींच्या ताब्यातलें गांव कोरेगांवच्या उत्तरेस ३॥ कोस अंतरावर आहे. कोरेगांवापासून पंढरपूरकडे जी सडक जाते तिच्यापासून एक फाटा किन्हईकडे जातो. तो रस्ता पंतप्रतिनिधींनीं तयार केलेला आहे. वसना नदीच्या एका ओहोळाच्या तीरावर हें गाव वसलेलें आहे. येथील शेतजमीन चांगली असून सभोंवार दाट आमराई आहे. याच्या उत्तरेस व वायव्येस उंच टेंकड्या आहेत. पैकीं एकीवर नंदगिरी नांवाचा जुना किल्ला आहे (३५३७ फूट उंच). याच्या आग्नेयेस दोन लहान टेंकड्या असून त्यांच्यावर यमाई देवीचें देऊळ आहे. या टेंकडीची उंची ४०० फूट आहे. टेंकडीवर जाण्यास पायऱ्या आहेत. मंगळवार व शुक्रवार या दिवशीं देवीच्या दर्शनास फार गर्दी असते. महाद्वार पश्चिमाभिमुखी असून वर नगारखाना आहे. उत्तरेस एक दीपमाळ आहे. देवळाची बांधणी साधी आहे.

ही देवी पंतांची कुळस्वामिनी आहे. देवळास तटबंदी केली असून ह्या तटाचे बुरूज २५।३० फूट उंचीचे असल्यामुळे हे साऱ्या कोरेगांव तालुक्यांतून दिसतात. गांवांतील रस्ते रुंद आहेत. यांत पंतप्रतिनिधींचा मोठा वाडा आहे. एक मराठी शाळा व महादेवाचें देऊळ आहे. देवळासमोर नदीस घाट आहे, प्रतिनिधी हे किन्हईचे वंशपरंपरागतचे कुळकर्णी आहेत. परशुराम त्र्यंबक हे मूळचे येथलेच रहाणारे. हल्लीं हें गांव ठाण्याचें आहे. येथील वतूल पांच हजारांचा आहे. [सातारा ग्या; प्रति. घरा. इति.].

किन्हळ—रत्नागिरी जिल्हा. दापोली तालुका. दापोली-दाभोळ रस्त्यावरील एक हवाशीर खेडेगाव.

किंपुरुषवर्ष.—जंबुद्वीपाच्या नऊवर्षसंज्ञक भागांतील एक भाग. याच्या चतुःसीमा, उत्तरेस हेमकूट पर्वत दक्षिणेस हिमालय आणि पूर्व पश्चिम दिशांकडे क्षारसमुद्र, याप्रमाणें आहेत. यास हैमवतवर्ष असें नामांतर असून, येथें किन्नरांची वस्ती असे. आग्नीध्रपुत्र किंपुरुष येथील आधिपति होता. (भार. भीष्म० अ० ६).

किबमरो—मध्यप्रांतात भंडारा जिल्ह्यात भंडाऱ्यापासून दीड कोसावर वैनगंगा नदीतीरीं. सुमारें १४०० लोकवस्तीचें हें खेडें आहे. गावाजवळील टेंकडीवर एक जुने देऊळ आहे. त्याच्या दरवाजावर पूर्वी एक वाचतां न येण्याजोगा एक शिलालेख होता. परंतु दुरुस्तीच्या वेळीं गिलावा करताना तो साफ नाहींसा झाला आहे. टेंकडीच्या बाजूला व गावाच्या दक्षिणेस एक लेंणवजा महादेवाचें देऊळ आहे. देवळात जाण्याचा रस्ता इतका ठेंगणा आहे कीं, माणसास जेमतेम सरपटत आत जातां येते. आसपासचे लोक नेहमीं येथें पूजेकरिता येतात. [भंडारा ग्या. भा ग. अ.].

किंबर्ले—दक्षिण अफ्रिकेंतील केप प्रांतांतील शहर किंबर्ले हें पश्चिम ग्रीक्वालँडच्या हिऱ्याच्या व्यापाराचें केंद्रस्थान असून रेल्वेनें केपटाऊनच्या ईशान्येस ६४७ व जोहान्सबर्गच्या नैर्ऋत्येस ३१० मैल आहे. इ. स. १९०४ सालीं येथील लोकसंख्या ३४,३३१ होती. हें शहर मॉडुर आणि व्हॉल या नद्यांमध्यें असून समुद्रसपाटीपासून ४०१२ फूट उंच आहे. बाजारचौकाभोंवतीं कोर्ट, पोष्ट-तारखातें यांच्या कचे या व नगरभवन आहे. डु टॉईट्स पॅन रोडवर सार्वजनिक वाचनालय व एक इस्पितळ आहे इ स. १८९९-९०० च्या न्यूटनच्या वेढ्यात पडलेल्या लोकांचें एक स्मारक चौकांत बसविलें आहे. सार्वजनिक बगीच्यांत व्हिक्टोरिया राणी व सेसिल ऱ्होड्स याचे पुतळे आहेत.

या शहराला हिऱ्याच्या खाणींमुळें मोठें महत्व आलें आहे. बाजारचौकापासून किंबर्ले खाण जवळ आहे. किंबर्लेच्या पूर्वेस १ मैलावर डीबीयर्स खाण आहे. शिवाय बल्टफॉंटीन, डुटाइट्स पॅन व वेसेलटन या प्रमुख खाणी आहेत. बीकन्सफील्ड हें गांव हिऱ्याच्या व्यापारामुळें भरभराटींत आहे. हें शहर १८७० सालीं वसविलें गेलें. १८७१ सालीं एका शेतांत डी बायर्स व कॉलेसबर्ग कोपजे या जागीं हिरे सांपडले. कॉलेसबर्ग कोपजे खाणीसच वसाहतींचा चिटणीस किंबर्ले याच्या नांवावरून किंबर्ले हें नांव मिळालें. व त्याच सालीं किंबर्लेच्या व्यवस्थेखालीं सर्व खाणी ग्रेटब्रिटनच्या संरक्षणाखालीं आल्या. ज्या जागीं खोदकामाकरितां तळ पडला, त्या शहराला किंबर्ले म्हणूं लागले. ज्या शेतांत प्रथम हिरे सांपडले तें शेत सरकारनें इ. स. १८७५ सालीं १,००,०००

पौंडांनां विकत घेतलें.इ.स.१८८० सालीं हें शहर केपकॉलनीस जोडलें गेलें दरसाल सरासरी ४५,००,००० पौंडांचे हिरे येथील खाणींतून निघतात.

१८८५ सालीं केपटॉऊन किंबर्ले रेल्वे सुरू झाली. १८९९ सालच्या आंग्लो बोअर युद्धात बोअर लोकांनीं या शहरास वेढा दिला. पण सर जॉन फ्रेंचनें तो १९०० झालीं उठविला. वेढयांतील लोकात सेसिल ऱ्होडस हा होता. १९०८ सालापासून हें रेल्वेचें मुख्य ठिकाण झालें.

किमेदि जमीनदार-हल्लीं गंजमजिल्ह्यामध्यें पर्ले किमेदि, पेद्द किमेदि व चिन्न किमेदि अशा तीन जमीनदारी आहेत. येथील जमानदार एकाच वंशांतले आहेत. यांचा वंश फार प्राचीन असून ते आपणास ओरिसाच्या केसरी राजाचे वंशज म्हणवितात. पण यांच्याबद्दल विशेपतः पेद्द किमेदि व चिन्न किमेदि यांबद्दल मुळींच माहिती मिळत नाहीं. मि. सी. एफ. मॅककार्टि यांनीं या जमिनदारीबद्दलच्या कागदावरून तयार केलेली पर्ले किमेदि घराण्यातील पुरुपांची गादी पुढें दिली आहे. [द. हिं. घराणीं].

कपिलदेव
(१२२७-१२४५)
|
नरसिंहदेव
(१२४५-१२६५)
|
मदनदेव
(१२६५-१२९०)
|
नारायणदेव
(१२९०-१३०९)
|
आनंददेव
(१३०९-१३१७)
|
अनंतरुद्रदेव
(१३१७-१३२५)
|
जयरुद्रदेव
(१३२५-१३६७)
|
लक्ष्मीनरसिंह भानुदेव
(१३६७-१३९२)
|
मधुकर्णदेव
(१३९२-१४२३)
|
मृत्युंजय भानुदेव
(१४२३-१४५७)

पुढें चालू
|
माधवमदनसुंदर भानुदेव
(१४५७-१४९४)
|
चंद्रबेताल भानुदेव
(१४९४-१५२७)
|
सुवर्णलिंग भानुदेव
(१५२७-१५६६)
|
शिवलिंग नारायणदेव
(१५६६-१५९०)
|
सुवर्णकेसरी नारायणदेव
(१५९०-१६३०)
|
मुकुंदरुद्र नारायणदेव
(१६३०-१६५६)
|
मुकुंददेव
(१६५६-१६७४)
|
अनंत पद्मनाभ नारायणदेव
(१६७४-१६८६)
|
सर्वज्ञ जगन्नाथ नारायणदेव
(१६८६-१७०२)
|
नरसिंहदेव दुसरा
(१७०२-१७२९)
|
वीरपद्मनाभ नारायणदेव
(१७२९-१७४८)
|
वीरप्रतापरुद्र नारायणदेव
(१७४८-१७६६)
|
जगन्नाथ नारायणदेव (दत्तक)
(१७६६-१८०६)
|
गौरचंद्र गजपति नारायणदेव
(१८०६-१८३९)
|
पुरुषोत्तम गजपति नारायणदेव
(१८३९-१८४३)
|
जगन्नाथ गजपति नारायणदेव
(१८४३-१८५०)

पुढें चालू
वीरप्रतापरुद्रगजपति नारायणदेव
(१८५०)
|
गौरचंद्र गजपति नारायणदेव
(मृ. १९०५)
श्रीकृष्णचंद्र गजपति नारायणदेव
(विद्यमान)

प र्ले कि मे दि.—हें घराणें प्राचीन कलिंगराज घराण्याचे वंशांतील आहे हें वर सांगितलेंच आहे गंगा ते कृष्णा यांच्या दरम्यानचा पूर्वेकडील प्रदेश एकेकाळीं (कमजास्ती प्रमाणाने) यांच्या ताब्यात होता. या घराण्याचा जो वंशवृक्ष ११ व्या शतकात तयार झाला त्यात याचा वंश उत्तरहिंदुस्थानांतील चंद्रवंशी एका रजपूत राजपुत्रापासून सुरू झाल्याचे दिलें आहे. या राजपुत्रास गंगेच्या प्रसादानें एक पुत्र झाला, त्यामुळें त्याचें नाव गांगेय ठेविलें आणि याच्या वंशजांनां पुढें गंगराजे असें नाव पडलें. पुढें या वंशातील एका धाडशी पुरुषानें पश्चिमहिंदुस्थानात गंगवाडी नावाचें राज्य स्थापून त्याची राजधानी कोल्हालपूर ही केली. कांहीं पिढ्यानंतर कामार्णवदेव नावाच्या राजानें आपलें राज्य आपल्या चुलत्याच्या स्वाधीन करून आपल्या चार भावांसह तो मुलुखगिरीस निघाला. देश जिंकीत जिंकीत तो महेंद्र देशास आला व तेथील बालादित्यराजाचा पराभव करून त्यानें त्या कलिंगदेशावर आपलें गंगराज्य स्थापिलें. ही गोष्ट आठव्या शतकाच्या प्रारंभीची आहे. या राज्याची राजधानी कलिंगनगर होती. हल्लीचें कालिंगपट्टम् नावाचें बंदर हेंच कलिंगनगर म्हणून पुष्कळजण समजतात; परंतु ती चूक असून हल्लीं हें गांव म्हणजे या गंगवंशांतील पर्लेकिमेदि या जमीनदारांच्या ताब्यांतील वामस्तधारा नदीच्या कांठावरील मुखलिंगम् नांवाचें लहान खेडें व त्या भोंवतालची जागा होय. कलिंगनगर ही राजधानी पुढें तीन शतकें होती. तेथें त्या काळात मोठमोठ्या, सुंदर व कलाकुसरीच्या इमारती बांधल्या गेल्या; त्यांपैकीं हल्लीं तीन जीर्णावस्थेंत उभ्या आहेत; पैकीं एक नवव्याव दोन दहाव्या शतकांत बांधलेल्या आहेत. याशिवाय, राज्यात दुसरीकडेहि त्यांनीं इमारती बांधल्या. या गंग राजांनीं जे पराक्रम केले, ऐश्वर्य भोगलें, देव व ब्राह्मणांचा जो सत्कार केला व दानें दिलीं त्याची माहिती, त्या भागांत सापडणाऱ्या या राजांच्या शिलालेखांवरून व ताम्रपटांवरून बरीच समजते. या घराण्यांतील राजराजदेव या राजानें इ.स.१०७५ मध्यें राजेंद्र चोल व वेंगीराज विमलादित्य याचा पराभव केला आणि किमेदि, कोसल व ओड्रदेस यांच्या राजांनां जिंकिलें. याचा मुलगा अनंतवर्मा चोड गंगदेव यानें ११ व्या शतकाच्या अखेरीस ओरिसा प्रांत काबीज केला. हाच कलिंगनगर येथील शेवटचा अभिषिक्त राजा होय.

, यानंतर राजधानी ओरिसा प्रांतात गेली, यावेळची बहुतेक हकीकत, सर. डब्ल्यू. डब्ल्यू हंटर यांच्या अनॅलिसिस् ऑफ ओरिसा या पुस्तकात आढळते. तेथील सर्व राजे गजपती हें उपपद धारण करीत असत व आजहि पर्लेकिमेदीचा जमीनदार आपणास गजपति म्हणवीत असतो. बाराव्या शतकांत या वंशांतील कपिलेंद्रदेव नांवाच्या राजानें किमेदि प्रांतावर स्वारी केली. पुढें त्याच्या नरसिंह नांवाच्या वडील मुलानें भावांच्या भांडणामुळें ओरिसा सोडून किमेदी येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें.

ही वरील सारी हकीकत दंतकथेच्या आधारानें दिलेली आहे. परंतु किमेदीचें गजपती घराणें ही ओरिसाच्या मुख्य गंगवंशाची शाखा आहे याबद्दल, प्रतापरुद्राच्या मुलाच्या खुनानंतर ओरिसा शाखेचें तेथलें अस्तित्व नाहींसें झाल्याबद्दल व तें राज्य गोविंदविद्याधर या प्रधानानें काबीज करून इ. स. १५४३ त स्वतः राज्यपद स्वीकारल्यानंतर, हें किमेदीचें घराणेंच काय तीं गंगवंशाची अवशिष्ट शाखा राहिल्याबद्दलचा कांहीं पुरावा आढळतो. या किमेदि घराण्यानें तीनचार शतकें गंजम व विजगापट्टम् या प्रांतांवर स्वतंत्रपणें राज्य केलें. पुढें विजयानगरकर व मुसलमान यांनीं यांना मांडलिक बनविलें. यावेळीं त्यांच्याकडे जो थोडा प्रांत राहिला तो अत्यंत डोंगराळ असल्यामुळें शत्रूंचा उपसर्ग तेथें त्यांना झाला नाहीं. पुढें इंग्रजी झाल्यानंतर, या राजांनीं व त्या प्रांतांतील कांहीं जमीनदारांनीं इंग्रजांच्या विरुद्ध थोडीशी उचल केली होती. परंतु इंग्रजांनीं ती दाबून टाकून व राजाला पदच्युत करून जवळ जवळ एक शतकपर्यंत तेथील कारभार आपल्या एजन्सीमार्फत चालविला.

श्रीकृष्णचंद्र गजपती नारायणदेव (गजपती नारायणदेव हे या घराण्याचें बिरुद आहे) हे हल्लींचे जमीनदार राजे आहेत यांचा जन्म ता. २६ एप्रील१८९२ रोजीं झाला. यांचे वडील गौरचंद्र हे इ. स. १९०५ मध्यें वारले. कृष्णचंद्र यांचे शिक्षण मद्रासेस झालें. संस्थान ६१४ चौरस मैल क्षेत्रफळाचें व सहा लाख रुपये उत्पन्नाचें आहे विद्यमान राजे हे २६ एप्रिल १९१३ रोजीं गादीवर बसले. संस्थानात एक सेकंड ग्रेड कॉलेज (वसतीगृहासह), दोन मुलींच्या शाळा, एक संस्कृत पाठशाळा, एक सराई असून पर्लेकिमेदी लाईट रेल्वे आहे. हा आगगाडीचा रस्ता गौरचंद्र यांनीं बांधला. तो बंगालनागपूर रेल्वेच्या नौपाडा स्टेशनपासून सुरू होऊन पर्लेकिमेदीस संपतो; याला आठ लाख रुपये खर्च आला. या घराण्याचें ब्रीदवाक्य "विश्वास व बळ" असें आहे. महायुद्धांत संस्थानानें इंग्रजांना शक्तीप्रमाणें पैशाची मदत केली. विद्यमान राजांनां, मल्लविद्या, शिकार व मैदानी खेळ यांची आवड आहे. [रा. नित्यानंद पट्टनाईक, पर्लेकिमेदीचे राजवाड्याचे व्यवस्थापक यांनीं पाठविलेल्या माहितीवरून].

किरगेरी—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. कोडच्या आग्नेयीस सुमारें १५मैलावर तुंगभद्रेच्या वामतीरीं हें एक खेडें असून येथें सुमारें ३०० वर्षांपूर्वी बांधलेलें हनुमानाचें एक देऊळ आहे.

किरवंत— क्रमवंत ' पहा.

किरवळे—मुंबई इलाखा. बेळगाव जिल्हा. यास गोरखनाथ डोंगर असें दुसरें नाव आहे. डोंगरावर कानफाट्या साधूचा एक मठ असून तेथें काहीं कानफाटे गोसावी रहातात. डोंगरावर पाण्याचा एक झरा आहे.

किराईत—या वनस्पतीस लॅटिनमध्ये अँगॅथोटीस चेराइटा; संस्कृतमध्ये किरात, भूनिंब, किराततिक्त; मराठींत काडेचिराईत, किराईत; हिंदींत व गुजराथींत चिरायता इत्यादि नावें आहेत.

यात दोन जाती आहेत. एक काडेकिराईत व दुसरी पालेकिराईत. किराइताचीं झाडें लहान हात दीड हात उंच असून पाने लहान व लांबट असतात. पालेकिराईत हिंदुस्थानांत बागांतून होते. काडेचिराईत नेपाळकडून कलकत्याच्या मार्गानें मुंबईस येते. याची चव फार कडू असते.

उ प यो ग.—याचीं वाळलेलीं पानें, फुलें, मुळें व काष्ठें याच्या अंगीं पौष्टिक, ज्वरनाशक व सारक धर्म आहेत. बोंडें चांगलीं झाल्यावर झाडं मुळासकट काढून विक्रीकरिता पाठवितात. नेपाळांतून या झाडाचे गठ्ठे कलकत्यास जाऊन तेथून सर्व हिंदुस्थानस्थानभर व जगाच्या कित्येक भागांत त्याची रवानगी होते.

आमवात,जीर्णज्वर व सर्व प्रकारच्या ज्वरांवर किराईत,सुंठ व डिकेमाली याचा अष्टमांश काढा करून ठेवावा व सकाळीं तिसऱ्या प्रहरीं व सायंकाळीं याप्रमाणें तो तीन वेळ घ्यावा. आम्लपित्तावर किराईत व माका यांचा काढा करून त्यांत मध घालून द्यावा. हरताळाच्या विषावर किराइताचा काढा द्यावा.

किराकत—संयुक्त प्रांतातील जोनपूर जिल्ह्यांतील पूर्व भागामधील एक तहशील. या तहशिलीचें क्षेत्रफळ २४३ चौरस मैल असून हींत दर्यापार, बियालसी हे परगणे व चंडवाक, पिसारा, गुझारा हे टप्पे (पेटे?) आहेत. लोकसंख्या १९११ सालीं १९०१५८ होती. या तहशिलींत ४५९ खेडीं आहेत. किराकत गांव या तहशिलीचें मुख्य ठिकाण आहे. इ. स.१९०३–४ सालीं या तहशिलींतील जमीनीचा महसूल १,८०,००० असून इतर कर ३६००० रुपये वसूल झाला. या तहशिलीच्या अगदीं मध्यभागांतून गोमती नदी वहात जाते. १९०३–४ सालीं या तहशिलींत १६१ चौरस मैल लागवडीखालीं जमीन होती. व तीपैकीं ९५ चौरस मैलांनां पाणी मिळण्याची सोय केली होती. या तहशिलींत तळीं अगदीं थोडींच आहेत. पण विहिरी मात्र जागजागीं आढळतात.

किरात—ही एक प्राचीन अशी अनार्य जात होय. ही डोंगराच्या पायथ्याशीं रहात असे. किरात जातीसंबंधीं वैदिक माहिती विभाग ३ पृ. २५८ मध्यें पहा. हल्लींचें टिपरा संस्थान हा पूर्वीचा किरात देश होय असें म्हणतात. आर्यावर्ताच्या नैर्ऋत्येस व ईशान्येस हा प्रदेश असून तेथें या नांवाची जाति रहात असे. व त्यांच्या राजाचें नांवहि किरातराज होतें असें बृहत्संहितेंत म्हटलें आहे. विष्णुपुराणांत हे लोक भरताच्या पूर्वेस रहात असा पुरावा मिळतो. (विष्णुपुराण ७. ३०). महाभारतांत याना जागला बरोबर उल्लेखिलें आहे या लोकांचा मुख्य धंदा पारध हा असे. अर्जुन पाशुपतास्त्र मिळविण्याकरितां तपश्चर्या करीत असतां शंकरांनीं किरातांचें रूप घेऊन त्याच्याशीं लढाई केली होती हें प्रसिद्धच आहे. भारत व भागवत यांमध्येंहि किरातांचा उल्लेख येतो. इंद्रप्रस्थ मध्य धरून त्याच्या पूर्वेस, पश्चिमेस व उत्तरेस तीन किरात देश होते असें म्हणतात व त्यांपैकीं उत्तर किरातात धवलगिरी व चंद्रगिरी अशीं हिमायाचीं दोन शिखरें येत आणि पूर्वकिरातात त्रिपुरी (टिपरा?) शहर येई असा एके ठिकाणीं उल्लेख आहे. [बृ. संहि. अ. ९ ११,१४: भागवत स्कं.२, ९; इंडि. अँटि. पु. ५,अर्वा. कोश. प्रा. कोश].

किरार—किराड. एक शेतकरी जात. याची एकंदर लो. सं. (१९११) १,५१,८५२ आहे. पैकीं मध्यहिंदुस्थानात ८९९२२, वऱ्हाड–मध्यप्रांतात ४७७९३, राजपुतान्यात ११८०४ व संयुक्तप्रांतात १९३३ आहे. किरार व किरात एकच होत असें एक मत आहे. इतर दस्यू जातींबरोबर किरात हे क्रियालोपामुळे व ब्राह्मणाशीं संबंध न ठेवल्यामुळें वृषल किंवा जातिबाह्य झाले असें मनू म्हणतो. (१०. ४३–४४) आर्यांप्रमाणें त्याच्याच मार्गानें नाग, किरात व खश हे हिंदुस्थानांत आले. इ. स. च्या पहिल्या शतकात किरात यमुनेपर्यंत आले होते असें दिसते. त्यांनीं नेपाळखोऱ्यात प्राचीनकाळीं वस्ती केली होती अशी नेपाळात आख्यायिका ऐकू येते. नेपाळच्या स्थानिक इतिहासात किरातवंशीय राजांचीं २९ नावें आहेत (अटकिन्सन–हिमालयन गॅ. राईट–नेपाळ). नेपाळ सिक्किम सरहद्दीवरचे किरात मंगोलियन वंशाचे वाटतात. पण वर वर्णिलेल्या किराताशीं किराराचा कितपत संबंध आहे ते नक्की सांगता येत नाहीं.

संयुक्तप्रांतातील किरारात जादोनबन्सी, जसावत, रावत आणि सेंगर,धाकरा, जादोन इत्यादि रजपूत नांवें आढळतात; त्यावरून ते रजपूत असावे असें दिसतें.

मध्यप्रांतात नरसिंगपूर, हुशंगाबाद, बेतूल, सिवनी, छिंदवाडा व नागपूर या जिल्ह्यांत यांची वस्ती असून यांची संख्या ४८,००० आहे. हे ग्वालेरहून येथें वसाहत करण्यास आले असें सांगतात. यांची वस्ती नर्मदेच्या

खोऱ्यात औरंगझेबाच्या वेळेस झाली असावी असें पुष्कळ अंशीं वाटतें. किराड, गुजर व रघुवंशी लोक एकाच वेळेस वसाहतीस आले असावे असें त्यांच्यात एकमेकांचा उष्टा हुक्का चालतो यावरून दिसतें. किराड लोक स्वतःला पतित झालेले रजपूत म्हणवितात व यात काहीं तरी सत्यांश असावा असें वाटतें. विधवाविवाह सुरु केले म्हणून आपणास नीच स्थिति प्राप्त झाली असें हे सांगतात. किराड शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती सुचविल्या आहेत. हे नदीच्या काठावरच शेती करीत असल्यामुळे यास हें नाव पडण्याचा संभव आहे. याच्यात उपवर्ग अजून चांगल्या रीतीनें बनले नाहींत. गोलक किराडाचा एक वर्ग सावनेरिया किंवा विदुर या नांवानें छिंदवाड्यात आढळतो. धाकड किराड त्याच्याशीं विवाह करीत नाहींत. यांचीं काहीं नावें स्थानांवरून पडलीं आहेत. व काहीं धंद्यावरून पडलीं आहेत. त्या नावावरून यात कुरमी रजपूत वगैरेंचें मिश्रण झालें आहे असें दिसतें.

धाकड किरार.—ही जात आपणास क्षत्रीय सोमवंशी म्हणविते. कारुष जातींत धारष्ट्रक क्षत्रियास किरार क्षत्रिय असें म्हणतात. धारष्ट्रक शब्दाचा अपभ्रंश धाकड असा झाला. धाकड किरारात दोन भेद आहेत. दुर्मद व धारष्ट्रक; दुर्मदापासून झाले ते दशेळ किरार. धारष्ट्रक (धाकड) क्षत्रीय किरार यांचीं उपनावें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

ससनोंदिया, खाडेदिनात, प्रयार, नंदगया, दोलदह्या, भेंडोलीया, परिहारन, खुरगर्ये, मेंदोलीया, टेहरीया, चीटोरिया, रोतबार, बुराने, सोलंक्या, निमोनिया, सुलोलिया, खनुवा, उदनीया, लदनीया, तिलधरीया, गवइया, डंगरोलीया, बरोलीया, सुजनीया, खोजर, मंगरुलिया, सेडंइया, बबुरीया, सलइया, पचेपुरिया, नरेटिया, बाजोलिया, सेटया, खुटवीलीया, बासोटीया, उलडीया, लोसिंगनीया, गसोनीया, बदरटीया, रोगेर, मंगोलीया, बेटवार इ.

जातींत पंचायत आहे. दर गावचे लोक आपापल्या गांवची पंचायत करतात. पंचायतीचा अध्यक्ष नसतो. जातीचीं मंदिरें आहेत. रगबनसी (रघुवंशी) व बगेले रजपूत हे या जातीच्या सदृश पण भिन्न जाती आहेत. लग्नात सप्तपदी (भावरी) कन्यादान वगैरे ब्राह्मणाकडून होतात. लग्नात वधूवराच्या हातीं कटयार असते. लग्नांत यज्ञोपवीत देतात. याची मूळ भाषा हिंदी, त्यांत मराठी भाषेचा बराच समावेश झाला आहे. [उमरावती जिल्ह्यातील पथरोटचे प्रीथीरामसिंग बिसनसिंग किराड यांच्याकडून आलेल्या माहितीवरून].

लग्नास निघतांना नवरामुलगा हातांत कटयार किंवा आडकित्यासारखें शस्त्र घेतो. ही चाल त्यांचें क्षत्रिय बीज दाखवितें. लग्नसमारंभांत किरार फार खर्च करितात. विधवाविवाहास यांच्यांत मोकळीक आहे. विधवेनें धाकटया दिराबरोबर किंवा इतर कोणाबरोबर विवाह करावा. बायकोनें व्यभिचार केला किंवा तिचा स्वभाव नवऱ्याशीं जुळला नाहीं तर काडी मोडतात. हे देवीचे विशेष पूजक आहेत. वैशाख ज्येष्ठांत हे नागाची पूजा करतात; लग्नांत मयत मालगुजाराची पाटीलदेव म्हणून पूजा करतात व पाटिलकी करणें ही मानाची जागा समजतात.

हे जातिबाह्यास आपल्या जातींत घेत नाहींत. गुजर व रघुवंशी याच्या हातची पक्की रसई खातात. नागपुरात महाराष्ट्र ब्राह्मणाच्या हातची “ कच्ची ” रसई खातात.

विजातीय पुरुषाबरोबर व्यभिचार करणारणीस अजीबात जातीबाहेर काढतात. मध्यप्रातीय किरारांची उंची चांगली असते; दिसण्यांत ते सुंदर व गोरे दिसतात. पुरुष डोक्यास पागोटें घालतात. बायका कासोटा न घालतां उत्तर हिंदुस्थानातल्याप्रमाणें पोशाख करतात. स्त्रियानीं वडील दिराचें नाव घेऊ नये किंवा त्याच्या कपड्यास स्पर्शहि करू नये व त्याचें उष्टेंहि काढूं नये अशी समजूत आहे. नागपुरास हे चागले शेतकरी आहेत अशी ख्याती आहे. पण उत्तरेकडील जिल्ह्यात यांची तशी ख्याती नाहीं. हे बागाईत व उंसाची शेती करतात. [क्रूक, रसेल व हिरालाल; से. रि.].

किरीटी—(१) पंडुपुत्र अर्जुनाच्या दहा नावांपैकीं एक नांव [म. भा.]

(२) अनागोंदी येथें राज्य करणारा व इ. स. १५६४ मध्यें हयात असणारा आणि ज्यानें पंढरपुरचा विठोबा अनागोंदीस नेला व जो परत भानुदासानें(एकनाथाचा पणजा) परत आणिला अशी कथा आहे असा जो रामराजा त्याला किरीटी हें टोपण नाव होतें. त्याचें सबंध नाव किरीटी रामराज हें होतें [अ. कोश]. परंतु ही गोष्ट शंकास्पद दिसतें कारण यावेळीं भानुदास जिवंत नव्हता. हा किरीटी रामराजा म्हणजेच विजयानगरचा शेवटचा रामराज सालव होय (विजयानगर पहा).

(३) त्रावणकोरचा किरीटी रामराजा हा टिपूच्या वेळीं हयात होता. याचा पक्ष घेऊन इंग्रजानीं टिपूवर स्वारी केली होती (डफ).

किरौली—संयुक्तप्रातातील आग्रा जिल्ह्याच्या वायव्यभागातील एक तहशील. या तहशिलीचें क्षेत्रफळ २७२ चौरस मैल आहे. १९११ मध्यें या तहशिलीची लोकसंख्या १,१०,१८२ होती. या तहशिलींत फत्तेपूरशिक्री व अच्छेनेरा हीं मोठीं गावें असून १६८ खेडीं आहेत. तहशिलीच्या दक्षिण सरहद्दीवरून उत्तमगन नदी वहाते. या तहशीलीच्या मध्यभागांतून खारी नदी वहात जाते. या तहशिलीचा पूर्वेकडील भाग सपाट असून पश्चिमभाग डोंगराळ आहे. या भागांतील जी महत्वाची डोंगराची ओळ तिच्यावर फत्तेपूरशिक्री वसलेलें आहे. या ओळीला समांतर अशा लहान लहान ओळी खारी नदीच्या उत्तरेस पसरलेल्या आहेत. या सर्व ओळींमधून तांबड्या वाळूचे खडक सांपडतात. १९०३–४ मध्यें या तहशिलींत २१० चौरस मैल

जागा शेतीला उपयुक्त अशी होती. तीपैकीं ६७ चौरस मैल जमीनीला पाणी मिळण्याची सोय झालेली होती.

किर्घी—तुर्क राष्ट्र जातीच्या एका दूरवर पसरलेल्या मोठ्या समूहाला किर्घी म्हणतात. याच्या कारा-किर्घी (काळे) व कझाक किर्घी (रशियाच्या माळरानात रहाणारे) अशा दोन शाखा आहेत. हे पश्चिमेकडे कुलजा पासून व्होल्गा नदीच्या खालच्या भागापर्यंत व दक्षिणेकडे ओब नदीपासून पामीर व तुर्कोमन प्रदेशापर्यंत पसरलेले आहेत. मानववंशशास्त्रावरून त्याचा मंगोल महावंशाशीं संबंध होता असें दिसतें व भाषेवरून त्यांचा तार्तर राष्ट्रजातीशीं संबंध असावा असें दिसतें. शरीरानें हे मध्यम बांध्याचे व मजबूत असून त्याचे केंस काळे व लांब, नाक व तोंड पसरट व लहान असतें. त्यांच्या गालाचीं हाडें वर आलेलीं असून त्यांचे हातपाय फार लहान असतात. त्यांचा वर्ण पिंगट व क्वचित पिंवळसर असतो. या त्यांच्या गुणधर्मांवरून ते मंगोल महावंशाचे असावे असें दिसतें. त्यांच्या भाषेत मंगोलियन इराणी व अरबी शब्द बरेच असून इतर भाषेंतीलहि शब्द आढळतात.

का रा कि र्घी.—(कारा म्हणजे काळा) हें नाव त्या लोकांच्या तंबूच्या रंगावरून महावंशांतील सर्व लोकांत पडलेलें आहे. हेच विशेष शुद्ध बीजाचे असून किर्घीज हें राष्ट्रीय नाव वास्तविकरीत्या यानाच लावण्यांत येतें. दंतकथेंत वर्णिलेल्या किर्घी नामक सरदाराच्या नांवावरून ह्या जातीचें हें नाव पडलें असावें असें म्हणतात. जाफेथचा वंशज ओघझखान यापासून झालेल्या दंतकथेंतील किर्घी सरदाराच्या नांवावरून या राष्ट्रजातीचें नाव पडलेलें आहे.

कारा किर्घी लोक भटकणारे असून ढोराची पैदास हा यांचा मुख्य धंदा आहे. गहूं,जव वगैरे धान्यें ते पिकवितात. येथील लोक चीन, तुर्कस्तान, रशिया वगैरे देशांतील व्यापाऱ्यांनां गुरें देऊन त्यांच्या मोबदला इतर जिन्नस त्यांच्यापासून खरेदी करतात.

कारा किर्घी लोकातील राजांनां मनप म्हणतात. व त्याची सत्ता अमर्याद अशी असते. प्रजेपैकीं कोणालाहि विकण्याचा अगर ठार मारण्याचाहि त्यांनां अधिकार असतो. त्यांचीं धार्मिक मतें व विधी कझाक लोकांहून मुळींच भिन्न नाहींत म्हटलें तरी चालेल.

क झा क.— रशियाच्या माळरानात रहाणाऱ्या किर्घी लोकांनां बहुधा कझाक असें म्हणतात. हे लोक चांगले घोडेस्वार असून लुटारूपणाचा धंदा करीत व यावरूनच पुढें त्यांच्यासारख्या इतर लुटारू लोकानाहि कझाक असें म्हणत असत. दक्षिण रशियांत अद्यापहि हा शब्द "कोसॅक" या रूपांत प्रचलित आहे. कोसॅक व कझाक यांच्यामधील भिन्नत्व स्पष्ट करण्याकरितां १८ व्या शतकापासून रशियन लोक किर्घी-कझाक या संयुक्त नांवाचा उपयोग करूं लागले. कझाक प्रामाणिक, विश्वासू परंतु आळशी व खिन्न (दुर्मुखलेले) असतात. हे भटकणारे असून तंबूंत रहातात. घोड्यावर बसणें हा त्यांचा करमणुकीचा खेळ असून ते घोड्यावर बसण्यात पटाईत असतात. ते कांटक व दीर्घायुषी आहेत. तथापि त्याची रहाणी घाणेरडी आहे.

कझाक हे सुनी पंथाचे मुसुलमान असून फारसे धर्मवेडे नाहींत. त्यानीं मुसुलमानी धर्म १६ व्या शतकांत स्वीकारला. परंतु त्यांच्यापैकीं फारच थोडे मक्केला जाऊन आलेले आहेत. त्याऐवजीं ते पूर्व तुर्कस्तानांतील साधुसंतांच्या समाधींच्या (थडग्यांच्या) दर्शनास जातात. त्यांच्यामध्यें शिक्षणाचा इतका अभाव आहे कीं, ज्याला नुसतें लिहावयास येतें त्याला विद्वान् समजतात व मूळ कुराण वाचावयास येत असलें तर तो महापंडितच बनतो. तथापि गायनाची व कवितेची त्याना मुळचीच गोडी आहे. त्याचा धंदा गुरेंढोरें पाळण्याचा असून कातडें कमावणें, लोकर कातणें व रंग देणें हीं कामें सुद्धा ते करतात. रशियाच्या अंमलाखालीं गेल्यापासून त्याच्या बेकायदा वर्तनाला आळा बसला आहे.

किर्च्हॉफ, गुस्टाव राबर्ट (१८२४-१८७५)— या जर्मन पदार्थविज्ञानशास्त्रवेत्याचा जन्म प्रशियांतील कोनिग्स्बर्ग गांवीं झाला व तेथील विश्वविद्यालयांतील शिक्षण घेऊन त्यानें सन १८४७ सालीं पीएच्. डी. ची पदवी मिळविली. सन १८५० सालीं तो ब्रेस्ला येथें पदार्थविज्ञानशास्त्राचा प्रोफेसर झाला.पुढें त्यानें हायडलबर्ग आणि बर्लिन येथे प्रोफेसराचें काम केलें. तो बर्लिन येथें प्रोफेसराच्या जागेवर असतांनाच १८७५त वारला. किर्चॉफ यानें जे शोध लावले ते विशेषतः प्रयोगावरून लावलेले नसून गणिताच्याच आधारावर लावले. त्यानें गणितात्मक पदार्थविज्ञानशास्त्रात पुष्कळच भर घातली आहे. निरनिराळ्या आकाराच्या वाहकांतून कोणकोणत्या प्रमाणात विद्युत् जाते याविषयीं त्यानें अनेक नियम बसविले आहेत. ओहमच्या नियमाविषयीं त्याने बरीच नवीन माहिती उपलब्ध केली. सामुद्रिक तारायंत्र आणि चुंबकत्व याच्या विषयींहि पुष्कळ नवीन माहिती त्याने उपलब्ध केली. लोहांतून उष्णतावहन, स्फटिकातून होणारें वक्रीभवन आणि परावर्तन, द्रावणासंबंधानें गत्युष्णतात्मक ज्ञान इत्यादि विषयांवर त्यानें नवीन माहिती उपलब्ध केली. विसर्जनासंबंधानें त्यानें जें काम केलें आहे त्यायोगानें त्याचें नांव जास्त प्रसिद्धीस आलें आहे. विसर्जनाकरितां गणित करीत असतांना त्यानें प्रकाशपृथक्करणशास्त्रांतील एक फार महत्वाचा शोध लावला. सूर्य व इतर तारे यांच्या प्रकाशाच्या पृथक्करणाच्या योगानें त्या खस्थ ज्योतींत पृथ्वीवरलि कोणकोणती द्रव्यें असतात यासंबंधाचें ज्ञान उपलब्ध करून देणारें साधन त्यानें तयार केलें. या दिशेनें दुसऱ्यांनीं त्याच्या पूर्वी कांहीं कार्य केलें होतें. परंतु त्या झालेल्या कार्यासंबंधानें त्यालाज्ञान नसल्याकारणानें

त्यानें हें सर्व ज्ञान स्वसामर्थ्यावर उपलब्ध केलें व या योगानें त्याची बुद्धिमत्ता उत्तम प्रकारें दिसून आली.

किर्मीर—हा एक राक्षस असून तो बकासुराचा भाऊ होता. हा वैत्रकीय नावाच्या (वेताच्या) वनांत रहात असे. पाडव हस्तिनापुराहून निघून काम्यकवनात आले असता आपल्या भ्रात्यास भीमसेनानें मारलें म्हणून त्याचा सूड उगविण्याकरिता हा त्या वनात आला; व त्याने पाडवाचा मार्ग चोहोंकडून रोखून धरला. त्यावेळीं भीमसेनाशीं याचें घोर युद्ध होऊन त्यात हा भीमाच्या हातून मरण पावला [महाभा. वन. अ. ११].

किर्लोस्कर, बळवंत पाडुरंग उर्फ अण्णासाहेब—याचा जन्म सन १८४३ त मार्चच्या ३१ तारखेस धारवाड जिल्ह्यातील गुर्लासूर येथें झाला. लहानपणींच हे हनुमानजयंतीसारख्या उत्सवाच्या वेळीं खेळगडी जमवून नाटकें करीत. आण्णाचें बारा वर्षांपर्यंतचें शिक्षण मराठी व कानडी भाषेंतून घरींच करून घेण्यात आलें होतें. त्यानंतर इंग्रजी दोन इयत्ता कोल्हापुरास पूर्ण झाल्या. चौदाव्या वर्षी त्याचा विवाह झाला व पुढील अभ्यास त्यानीं धारवाडास केला व तेथें मुलकी परीक्षा दिली.

कविता करण्याचा नाद त्याना लहानपणापासून जडला. अण्णांचे वडील उत्तम संस्कृतज्ञ असल्यानें अण्णानीं त्याजवळ संस्कृत रघुवंश व शाकुंतल वाचलें होतें. हरिदासास कथेला उपयोगी अशीं पदें ते करून देत.

इ. स. १८६३ मध्यें त्याच्या आजोबानीं त्यांना पुण्यास विद्याभ्यासास पाठविलें. पुण्यास अण्णा विश्रामबागेंतील शाळेंत जात असत. पण या वेळीं त्यांनां स्वच्छंदानें राहण्याची संवय होऊन ते नाटकें पाहूं लागले व नाटकमंडळ्यांना पदें करून देऊं लागले; अशा पदापैकीं " समुद्रमंथन " " विक्रमचरित्र " हीं पदें आहेत. अभ्यास सोडून व घरच्या मंडळींना थापा देऊन त्यानीं पुण्यास आपली एक नाटककंपनी उभारण्याचा उद्योग चालविला व त्याप्रीत्यर्थ जवळचे दागिने विकून व कर्ज काढून कांहीं पैसा उभा केला. त्यांच्या मंडळींत काहीं मोठीं घरंदाज चागलीं मुलें होतीं. तेव्हां पहिला प्रयोग पुण्यास न करतां नगरास करण्याचें ठरवून त्याप्रमाणें तेथें " विक्रमचरित्र " " बाजीराव याचा फार्स" वगैरे खेळ केले. त्यांच्या कंपनीचें नाव " भरतशास्त्रोत्तेजक" असें होतें. पुढें सारी मंडळी फुटली व अण्णानांहि घरच्या माणसाचा धपटशा आला, तेव्हां ते गुर्लासुरास परत गेले. ही गोष्ट १८६६ साली म्हणजे त्याच्या २३ व्या वर्षी घडली.

घरीं बसल्या बसल्या त्यानीं " शिवाजी " वर १०० आर्या रचून त्या " दक्षिणाप्राइज कमीटी "कडे परीक्षणार्थ पाठवून दिल्या. कमीटीचा त्यांवर उत्तम अभिप्राय मात्र मिळाला; बक्षिस लाभलें नाहीं.

यापुढें अण्णा धारवाडास वकीलीच्या अभ्यासाकरितां राहिले; पण तीहि परिक्षा हुकली. तेव्हां बेळगांवास एका इंग्रजी शाळेंत शिक्षकाची जागा त्यांनीं पत्करली. पण त्याच्या नाटकी व्यवसायामुळें तें काम त्यांच्या हातून योग्य प्रकारें पार पडेना. तथापि आठ वर्षे त्यांनीं बेळगांवास काढलीं. त्या अवधींत त्यांनीं नाट्याभ्यासांत बरीच प्रगति केली. १८७३ सालीं त्यांनीं " श्री शांकरदिग्विजय " नांवाचें शंकराचार्यांवर एक गद्य नाटक लिहिलें.

शाळेच्या नोकरीला कंटाळून, त्यांनीं पोलीसखात्यांत जमादारीचा नोकरी धरली, पण लवकरच तीहि सोडून रेव्हेन्यू कमिशनरच्या ऑफिसांत ते गेले. या ऑफिसांत असता १८८० मध्यें ते फिरतीबरोबर पुण्यास आले व तेथें त्यांनां पारशी कंपनीचें उर्दू नाटक पहाण्यास मिळालें. त्यांतील ऑपेरापद्धतीचें नृत्य, गायन, अभिनय, देखावे वगैरे पाहून आपल्या भाषेंत असेंच एक नाटक वठवावें असं त्याच्या मनानें घेतलें व त्याप्रमाणे त्यानीं शाकुंतलाचें मराठी भाषातर करण्यास सुरुवात केली. याच सुमारास पुढें प्रसिद्धीस आलेली मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, नाना शेवडे यांसारखी मंडळी त्यानीं आपल्यांत ओढली व शाकुतल नाटकाची चार अंकी रंगीत तालिम १३ आक्टोबर १८८० या मुहूर्तावर केली. लवकरच हा प्रयोग नाटकगृहात झाला व उत्पन्नहि चागलें आलें. सुरुवातीला यश आलेलें पाहून आण्णांनीं सर्व शाकुंतलाचें पूर्ण भाषांतर करून संपूर्ण नाटकाची तालीम करून दाखविली.

ऑफीसच्या दौऱ्यावर ज्या वेळीं ते पुण्यास येत त्या वेळीं तेथें या नाटकाचे जाहीर प्रयोग होत. पुढें त्यांनी केवळ नाटकाकारितांच म्हणून सहा महिन्यांची रजा घेतली, व " संगीत सौभद्र " हें नाटक बसविलें. अण्णाची कंपनी इंदूर, देवास वगैरे ठिकाणीं फिरली. होळकर सरकारनें तिला चागला आश्रय दिला. त्यांनीं पुन्हां लेखणी हातात धरून " रामराज्यवियोग " हें नाटक रंगविण्यास सुरुवात केली (१८८४). पण दुर्दैवानें हें सर्वोत्कृष्ट नाटक त्यांना पुरें करता आलें नाहीं.

रेव्हेन्यू कमिशनरच्या ऑफीसातून आपली बदली करून घेऊन ते इंदूर सरकारचे कायम नोकर बनले, पण तेथें फार दिवस नोकरी करण्याचे त्यांच्या कपाळीं नव्हतें. आपल्या कंपनीला सुस्थिति आणून देण्याच्या कामात त्यांनां बरेच श्रम पडून ते आजारी झाले. तेव्हां विश्रांतीकरिता मंडळींना रजा देऊन व आपणहि रजा घेऊन ते गुर्लासुराला परत गेले. तेथें त्यांची प्रकृति अधिकच क्षीण होत जाऊन ता. २ नोव्हेंबर १८८५ रोजीं त्याचा अंत झाला.

अण्णाचा स्वभाव दिलदार व मनमिळाऊ असे. ते फारच थट्टेखोर असत असें म्हणतात. त्यांनां पाठीमागें बायकोशिवाय कोणी नव्हतें. ती नुकतीच (१९२१) मृत्यु पावली. [मासिक मनोरंजन सप्टेंबर १९२२; मराठी रंगभूमि].

या चरित्रनायकाची महती कोणती असा प्रश्न विचारणारा महाराष्ट्रीय आज आढळणार नाहीं. अण्णांची महाराष्ट्र नाट्यसृष्टींतील कृति पुढे आहेच. महाराष्ट्रनाट्याला मोहक व उच्च स्वरूप देणाऱ्यांत अण्णांचा दर्जा निःसंशय फार वरचा लागेल. वत्सलाहरण, सुरतसुधन्वा, वगैरेंसारखीं ललितस्वरूपी नाटकें १८८० च्या पूर्वी होत; त्यांत मधुर गायन, अभिनय, शृंगार यांचा पूर्ण अभाव असून रंगभूमीवर दोनतीन तास धागडधिंगा घालण्यापलीकडे व असंस्कृत मनाची निकृष्ट प्रकारची करमणूक करण्यापेक्षा त्यांचा जास्त उपयोग नसे. कला या दृष्टीनें पाहता तीं गचाळ म्हणून टाकावीं लागतील यात शंका नाहीं. तेव्हा महाराष्ट्रनाट्यसुंदरीला गावढळपणा सोडावयाला लावून अण्णांनीं तिला उत्तम प्रकारें नटविली. त्याचें पहिलें शाकुंतल नाटक भाषांतरित असलें तरी भाषा, पदें व अभिनय यांनीं त्या वेळच्या प्रेक्षकवर्गास इतकें मोहित केलें की, नाटकगृहांकडे झुंडीच्याझुंडी वळूं लागल्या. "सौभद्र" नाटक स्वतंत्र असून त्या दृष्टीनें पहाता त्याचा दर्जा फार वर लागेल. त्यांतील पद्यें इतकीं लोकप्रिय झालीं कीं, ज्याच्या त्याच्या तोंडीं, किंबहुना कथेंतूनहि तीं ऐकूं येऊं लागलीं. भाऊराव, मोरोबा, नाटेकर याच्यासारखीं एकावर एक चढ पात्रें रंगभूमीवर आलीं. शिवाय 'नच सुंदरि करुं कोपा' यासारखीं कानडी चालीवर रचलेली पदें तर प्रेक्षकाचीं अंतःकरणें थरारून सोडीत. अण्णाचें तिसरें नाटक "संगीत रामराज्यवियोग अंक ३" हें होय. हेंहि सौभद्राप्रमाणेंच स्वतंत्र पौराणिक नाटक असून त्यांतील अभिनय करावयास फार कठिण आहे. मंथरेचा नट कै. भाऊरावासारखा असल्यावाचून नाटकाला रंग चढणार नाहीं असें भाउरावाचें उर्फ भावड्याचें काम पाहिलेल्या नाट्यप्रेमींचें मत आहे. हें नाटक अपूर्ण आहे. अण्णा आपल्या मंडळींत नटाचें कामहि करीत. शाकुंतलमधील त्याचें शाङ्गरवाचें काम इतकें प्रेक्षणीय असें कीं, डॉ किलहॉर्न साहेब सुद्धां एक वेळीं ते पाहून खुष झाले होते. एकदां शकुंतलेस (भावड्यास) " भीता वेपते " करण्यासाठीं शार्ङरवाने (अण्णानीं) रंगभूमीवरच काठी मारली होती. बहुधां अण्णा मुख्य पार्टयांचीं कामें स्वतःकडे घेत नसत. अण्णांनीं नाटककंपनीची रहाणी भिकार न ठेवता एखाद्या संस्थानाप्रमाणें तिचा खर्च चालविला. तीच पद्धत हल्लीं मोठमोठ्या कंपन्यांतून दृष्टीस पडते. याप्रमाणें अण्णा किर्लोस्कर म्हणजे आधुनिक महाराष्ट्रीय नाट्याचे जनक म्हणतां येतील. अण्णा किर्लोस्करांचें एक सुंदर चरित्र रा मुजुमदारांनीं लिहिलें आहे. अण्णांची किर्लोस्कर कंपनी १९१३ सालापर्यंत विशेषतः रा. राजहंस (बालगंधर्व) यांच्या अस्तित्वामुळे महाराष्ट्रांत पहिल्या दर्जाची नाटककंपनी म्हणून चालली होती. रा. मुजुमदार यांकडे त्याचें बरेंच श्रेय येतें. पण पुढें कंपनी फुटून तिच्या अनेक शाखा झाल्या. तरी रा. मुजुमदारांनी अद्यापि मूळ किर्लोस्कर कंपनी चालविली आहे. पुणें येथील किर्लोस्कर थीएटर हें अण्णांचें स्मारकच आहे.

किलकिल यवन.—याना दुसरें नांव कैकिल यवन असेंहि आहे. मध्यकालीन युगांत हिंदुस्थानांत यवनांचें एक राज्य होतें. भाऊ दाजीच्या मतें अजिंठ्याच्या लेण्यांच्या आसपास हें राज्य असावें. ओरिसांतून या यवन राजांना ५ व्या शतकात केसरी घराण्यानें हाकून दिल्यावर तें आंध्रदेशांत आले व ६ व्या शतकांत त्यांनीं वाकाटकाचें राज्य घेऊन तेथें (मध्यप्रांतांत) आपले राज्य स्थापन केलें (५७५). तिकडे आंध्रदेशांत तर हे यवन लोक इ. स ९६३ पर्यंत म्हणजे चारशें वर्षें राज्य करीत होते. त्यावेळीं त्यांच्या राज्यांत बौद्धधर्म प्रबल होता. हे यवन म्हणजे आयोनियन ग्रीक होत. हे कोंकणांत ९८० च्या सुमारास आले असावेत हे इ. स. पू. नवव्या शतकांत प्रथमतः सिंधू नदाकडून हिंदुस्थानात घुसले. ओरिसांतील या राजांनीं जैनधर्माचा स्वीकार केला होता. एकंदरींत मध्यप्रांत व आंध्रदेश यांवर राज्य करणाऱ्या यवन घराण्यांचा उत्कर्ष इ. स. ५७६ ते ९०० पर्यंत चालू असून त्यांच्या सत्तेचा कळस ७८२ च्या वेळीं झाला होता. तुलुव व खालिमपूर येथील लेखांत याचा उल्लेख आहे. हें यवन राज्य कनोजच्या साम्राज्याचें मांडलिक होतें. भागवतांत (स्कं. १२ अ १), व विष्णुपुराणांत (भाग ४. अ. २४) या कैंकिल यवनांचा उल्लेख स्पष्ट आहे. परंतु त्यांतलि वंशावळ व अजिंठ्याच्या लेण्यांतील शिलालेखांत आलेली या यवनाची वंशावळ यांत बराच फरक आहे. मध्यप्रांतातील हे यवन राजे आठ असून ते धर्मानें बौद्ध होते. त्यानीं धर्म बदलला व काहीं शतकांनीं भाषाहि बदलली. [रा. ए. सो. ज. मुं. पु. कनिंगहॅम; हंटर; स्मिथ; ओरिसा; अ. कोश; म. भारत.].

किल सैफुल्ल—बलुचिस्तानमधील झोब जिल्ह्याच्या अप्पर झहोब पोटजिल्ह्याची एक तहशील ही तहशील झहोब नदीच्या खोऱ्याच्या मध्यभागी वसलेली आहे. या तहशिलींत काकर खोरासान पर्वताच्या तोब काकर रांगेचा काहीं भाग पसरलेला आहे. या तहशिलीचें क्षेत्रफळ २३९८ चौरस मैल व लोकसंख्या १९११ सालीं १७८२० होती. १९०३-४ च्या दरम्यान या तहशिलींतील जमीनीचा महसूल ४४००० होता. या तहशिलीचें मुख्य ठिकाणाचें किल सैफुल्ल हें गाव असून या तहशिलीत ६१० खेडीं आहेत. यातील बरेच लोक सफ्फर खेल काकर या जातीचे असून त्यांचा धंदा शेतकीचा व मेंढपाळांचा आहे. झहोबमधील जोगीझाई नांवाचें प्राचीन राजघराणें या तहशिलीत आहे. या तहशिलींत कोळशाच्या खाणी असाव्या असा भूगर्भशास्त्रवेत्यांचा तर्क आहे. कोळशाच्या कातड्याचा व्यापार येथें चालतो.

किल सोभ सिंघ-पंजाबमधील सियालकोट जिल्ह्याच्या पस्रूर तहशिलींतील एक शहर. हें शहर डेघ नदीच्या तीरावर

वसलेलें आहे. १८ व्या शतकांत भाग सिंघ अहलवालिया या शीख सरदारानें हें गांव वसाविलें; व या ठिकाणीं किल्ला बांधून त्याला सोभसिंघ या आपल्या मुलाचें नांव दिलें. या गावाची लोकसंख्या १९०१ मध्यें ३३३८ होती. या गांवांत काश्मीरी विणकऱ्यांची बरीच वस्ती असून ते पश्मीशाली विणतात. पांढऱ्या धातूंचीं भांडींहि येथें चांगलीं तयार होत असत. पण हल्लीं हा धंदा व शाली विणण्याचा धंदा हे दोन्हींहि डबघाईस आलेले आहेत. १८६७ मध्यें या गांवाला म्युनिसिपालिटी देण्यांत आली. म्युनिसिपालिटीचें उत्पन्न १९०३-४ सालांत ४४०० रुपये होतें व खर्च ३७०० रुपये होता. येथील जिल्हाबोर्डातर्फे एक व्हर्नाक्युलर मिडल स्कूल स्थापन झालेलें आहे.

किलार्ने-हें आयर्लंडच्या केरी परगण्याचें बाजारचें शहर पूर्व पार्लमेंटरी विभागांत डब्लिनपासून नैर्ऋत्येस सुमारें १८५ मैलांवर ग्रेट सदर्न ॲंड वेस्टर्न रेल्वेवर आहे. या शहराची लोकसंख्या (१९०१) ५६५६ होती. या शहराजवळील देखावा फार मनोरम असल्यामुळें येथें प्रवासी लोक बरेच येतात. येथें रोमन क्याथोलिक प्रार्थनामंदिर व बिशपचा महाल ही सर्वांत उत्तम इमारत आहे. शहराजवळ केनमेरच्या अर्लचा राजवाडा आहे. येथें शिल्पकलेची व हस्तकौशल्याची शाळा आहे. येथें मजेदार (फॅन्सी) जिनसा तयार करण्यात येतात. किलार्ने सरोवर शहरापासून सुमारें १॥ मैलावर आहे. लॉफलीनजवळ रॉस दुर्गाचे अवशेष व 'स्वीट इनिसफालनचे' अवशेष प्रेक्षणीय आहेत. यांशिवाय मॅक् गिलीकुडीज रीक्स व टार्क आणि पर्पल पर्वत, हुनलोर्न, खिंड, टोर्क आणि डेरीकुनिर्हीचे धबधबे वगैरे फार मनोरम देखावे आहेत. डनलोच्या ओघाम गुहेंत शिलालेख आहेत. जवळच्या नदींत ट्राउट व सालमन मासे सांपडतात. येथील वनस्पती वनस्पतिशास्त्रदृष्ट्या फार प्रेक्षणीय आहेत. ओडोनोघे या पौराणिक वीराचा या गांवाशीं पुष्कळसा संबंध लावितात.

किलिमनूर—मद्रास इलाख्यांतील त्रावणकोर संस्थानच्या चिरयिंकिल तालुक्यांतील एक छोटीशी जमीनदारी. हिची लोकसंख्या १९०१ सालीं ३०५३ होती ही जमीनदारी पूर्णपणें इनाम आहे. या जमीनदाराचे मालक कोइल टंपुरान घराण्यांतील आहेत. या घराण्याचा त्रावणकोरच्या राणीच्या घराण्याशीं संबंध आहे. कोइल टंपुरान नांवाच्या एका पुरुषानें त्रावणकोरच्या राणीचा व बालराजाचा शत्रूपासून बचाव केल्यामुळें, इ. स. १७२८ मध्यें त्याला हें छोटेसें राज्य बक्षीस म्हणून देण्यांत आलें.

किलिमांजारो—पूर्व आफ्रिकेंत हा एक मोठा पर्वत आहे. ह्याचा मध्यभाग द. अ. ३°५' व पू. रे. ३७°२३' यावर आहे. ह्या खंडांत ह्याचें शिखर सर्वांत उंच आहे. ३००० फुटांच्या डोंगरपठारापासूनवर याची उंची १९३२१ फूट पर्यंत गेली आहे. ह्याच्या उत्तरेस २०० मैलांवर केनिया पर्वत व पश्चिमेस ३५ मैलावर मेरु पर्वत आहे. ह्या पर्वताची ओळ पूर्वेकडून पश्चिमेकडे गेली असून पश्चिमेस किबो व पूर्वेस मावेंझी अशीं दोन शिखरें आहेत. किबो उंच आहे. किबो हें थोड्याच दिवसापूर्वी ज्वालामुखी होतें पण आतां त्याचें मुख बंद झालें आहे. त्याचप्रमाणें मावेंझीचें मुखहि बंद आहे. किबो शिखर सुमारें २०० फूट उंचीच्या वर्फाच्या थरानें आच्छादिलेलें असतें. अशींच आणखीं तीन शिखरें बर्फाच्छादित असून ह्यांतील मध्यभागाच्या सर्वांत उंच शिखराला कायसर विल्हेल्म स्पिट्झ हें नांव दिलें आहे. ह्यावर तीन बर्फाच्या नद्या असून त्यापैकीं एक ज्वालामुखीच्या तोंडास मिळाली आहे. ह्या पर्वताच्या उतारावर ४०० झाडें पासून ६०० फुटांपर्यंतच्या उतारावरील झाडी दाट असून येथें शेतीहि करितात. येथील झाडें व प्राणी बाकीच्या आफ्रिकेंतील पर्वतावरच्या, झाडांच्या व प्राण्यांच्या जातींचेच आहेत. रोंवेंझी नामक शिखराला पूर्वी रौप्यपर्वत म्हणत असें वाटतें. जोहानेस, रेबमान, बॅरन, डेकन आदिकरून बऱ्याच प्रवाशांनीं हा पर्वत संशोधिला आहे. डॉक्टर हान्समेअर यानें ह्या पर्वतावर चार वेळा प्रवास करून बरीच माहिती मिळविली आहे. इ.स. १८८८ पासून गेल्या महायुद्धापर्यंत हा पर्वत जर्मनीच्या ताब्यात होता. पण १९१८ सालापासून सबंध जर्मन पूर्वआफ्रिकेबरोबर हाहि ब्रिटिश आधिपत्याखालीं आला आहे. [जॉन्स्टन—दि किलिमाजारो एक्सपिडिशन. काफट्र्हल्स इन् ईस्ट आफ्रिका.]

किल्लेकोट व तटबंदी—देशाच्या किंवा प्रांताच्या रक्षणार्थ किल्ला अगर गड वगैरे बाधण्याची चाल बरीच जुनी आहे. वेदांमध्योंहि किल्ले या अर्थी पुर शब्द योजिला आहे; (ज्ञानकोश विभाग ३ पृ. ३४७ पहा). त्यावरून वेदकालीं किल्ले असावेत असें दिसतें. रामायणात तर लंकेचें वर्णन देतांना तिच्या तटबंदीचें, बुरुजांचें, वेशींचें वगैरे किल्ल्याच्या स्वरूपाचें वर्णन दिलेले आहे; त्यामुळें रामायणकाळीं किल्ल्याची कल्पना चांगलीच अस्तित्वांत होती असें ठरतें रामायणांतील सुवेळा, निकुंभिला, किष्किंधा हीं ठिकाणें तटबंदीचीं होतीं. महाभारतांतील कूटयुद्धाच्या वर्णनांत; किल्ल्यांचा उपयोग सांगितला आहे, तो असा:—"राजानें प्रथम आपल्या मुख्य दुर्गाचा आश्रय करावा; श्रीमंत लोक जेथें किल्ले असतील तेथें आणून ठेवावे व तेथें फौजेंतील पाहारे ठेवावे; किल्याभोंवतालचें सर्व जंगल तोडून टाकावें; किल्ल्यावर टेहळणीच्या उंच जागा कराव्या व मारा करण्यासाठीं संरक्षित जागा व छिद्रें करावीं; किल्यांतून बाहेर पडण्याचे गुप्त रस्ते असावेत; दरवाज्यावर यंत्रें व शतघ्नी रोंखून ठेवाव्यात; नवीन विहिरी पाडाव्यात; रात्रींच फक्त अन्न शिजवावें" (शांतीपर्व अ. ६९). श्रीकृष्णाच्या द्वारकेला तटबंदी फार उत्कृष्ट होती; जरासंधाच्या

राजधानीसहि तशीच होती. त्याच्या राजधानींत कृष्ण, भीम व अर्जुन या तिघांनीं प्रवेश केला तो तटावरून चढून केला व तटावरील दुंदुभी फोडल्या असें त्या वेळचें वर्णन आहे. द्वारकेवर शाल्वानें हल्ला केला त्यावेळच्या वर्णनांत तट, बुरूज, मोर्चे वगैरेंचा उल्लेख येतो. चाणक्याच्या अर्थशास्त्रांत किल्ल्यांचें महत्व वर्णिलेलें आहे. राज्याच्या सरहद्दीवर प्रत्येक दिशेस मजबूत किल्ले असावेत असें त्याचें म्हणणें आहे. त्यानेंहि औदक (जंजिरा), पार्वत (गड), धानवन (भुईकोट) व वनदुर्ग असे प्रकार सांगितले आहेत. किल्ल्यांचे आकार गोल, लंबचौरस व चौरस असून भोंवतीं खंदक, नदी किंवा कालवे असावेत; खंदक एकापुढें एक असे तीन ठेवून त्यांतील अंतर ६ फूट व खंदकाची रुंदी १०, १२, १४ फूट असावी व खोली रुंदीच्या निम्मी असावी; खंदकात सुसरी, मगर व कमळाचे वेल असावेत (यांची गुंतागुंत फार असते, त्यामुळें या वेलांत माणूस अडकल्यास लवकर बाहेर पडत नाहीं). तट व पहिला खंदक यात २४ फूट अंतर ठेवून, तटाची उंची ७२ फूट व रुंदी ३६ फूट ठेवावी आणि पायथ्याशीं निवडुंग व काटेरी झुडपांची लागवड करावी व पुढें खड्डे, उंचवटे ठेवावेत. तटावर १२ हातांगणीक जंग्या ठेवाव्यात. बुरूज चौकोनी असावेत (ख्रिस्तपूर्व व ख्रिस्ती शकांतील पहिल्या काळच्या रोमन व ग्रीशियन किल्ल्यांचेंहि बुरुज चौकोनी होते असें त्याच्या चित्रावरून दिसतें). किल्ल्यांत तटाइतकी उंच अशी एक शिडी तयार करून ठेवावी. दोन बुरुजात अंतर १८० फूट असावें. तटावरील मार्ग झाकलेला असावा. या मार्गावर इंद्रकोप म्हणून झाकलेल्या उंच बैठका असाव्यात (यावरून बहुधां तोफाचा अगर बाणांचा मारा शत्रूवर करीत असावेत). तटात एक गुप्त जिना व एक बाहेर पडण्याचें गुप्त द्वार व एक विहीर असावी (याचे प्रत्यक्ष उदाहरण पुण्याच्या शनिवारवाड्याच्या दक्षिणेच्या पहिल्या बुरुजांत दृष्टीस पडतें). किल्ल्याच्या महाद्वाराला हत्तीनें तें फोडूं नये म्हणून २४ अंगुळांचे अणकुचीदार लोखंडी इंद्रकील (खिळे) असावेत. त्याला चार अडसर असावेत, दाराची रुंदी ५ हात असावी. दारावर एक मनोरा (नगारखाना?)सुसरीच्या आकाराचा असावा. किल्ल्यास एकंदर बारा वेशी असाव्यात. तटाच्यावर कुमारीदेवीचें एक देऊळ असावें व पाण्याचे लहान लहान पाट व एक कमळानें भरलेलें कुंड असावें या पाटांत (लपवून ठेवण्यासाठीं?) शस्त्रें ठेवावीं; तीं म्हणजे कुदळी, कुऱ्हाडी, दगड, मुद्गर, सोटे, चक्र, यंत्रें, शतघ्नी (तोफा), भाले वगैरे. किल्ल्यात इमारती बाधताना प्रथम पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर असे तीन तीन राजमार्ग चोवीस फूट रुंदीचे तयार करावेत. फौजेसाठीं जे रस्ते असतात त्यांची रुंदी ४८ फूट ठेवावी. किल्ल्यांत मजबूत जागीं चारी बाजूंस इतरांचीं घरें ठेवून उत्तरदिशेस उत्तराभिमुखी अगर पूर्वाभिमुखी किल्ल्यांतील सर्व जमीनीची ? जमीन व्यापणारा असा राजवाडा बाधावा. पुरोहित, यज्ञशाळा, पाण्याचा खजिना, प्रधानाचीं घरें, मुदबकखाना, गजशाला, कोठी हीं राजवाड्याच्या डावीकडे असावीं. व्यापारी, कारागीर, योद्धे, खजीना, खजीनदारकचेरी, इतर अठरा कारखाने, दारुगोळ्याचें कोठार, सेनापतीचें घर वगैरे राजवाड्याच्या उजवीकडे असावीं. यांच्या शिवाय उग्रखाना, रथशाळा, अश्वशाळा, शस्त्रशाळा, दवाखाने, दुकानें, गोशाळा, राज्याची कुलदेवता (तिचें देऊळ) वगैरे इमारती किल्ल्यांत असाव्यात. वेशींचीं नावें ब्रह्म, इंद्र, यम, सेनापति अशीं असावीं. प्रत्येक दहा घरास एक विहीर खोदावी. सरकारी लष्करी अधिकारी, निरनिराळ्या खात्यावरचे अनेक (एकाच खात्यात अनेक) असावेत. तसे असले म्हणजे एकमेकांचा एकमेकांवर दाब असतो व ते सहसा फितूर होत नाहींत. किल्ले घेताना सुरुंगाचा उपयोग करावा खंदक भरून काढून हल्ले करावे ज्याची घरटीं किल्ल्यात असतील अशा पक्ष्यांना पकडून त्यांच्या शेपट्यांस स्फोटक द्रव्यें बांधून त्यांनां आत सोडावें. तसेंच किल्ल्यात नौकर म्हणून आपले लोक ठेवावेत अगर फितूर करून त्याच्याकडून मुंगूस, वानरें मांजरें, कुत्रीं यांच्या शेपट्याना स्फोटक द्रव्यें बांधवून आतील गवती छपराच्या घरावर सोडावीं. (येथें स्फोटक द्रव्याच्या गोळ्यात कोणतीं द्रव्ये कशीं घालून गोळे तयार करावेत तें चाणक्यानें दिलें आहे) व अग्नीचे बाणहि सोडावेत. यापुढें हल्ले कसे व केव्हा करावेत, फितूर कसा करावा व किल्ला काबीज केल्यावर काय करावें यासंबंधानेंहि चाणक्यानें बरेंच विवेचन केलें आहे.

मध्ययुगात कालंजर, कनोज, मान्यखेत दिल्ली मयुरखण्डि, कपिश, त्रैकूटक, उज्जनी, राजगृह वगैरे किल्ले अगर तटबंदीच्या राजधान्यांचीं नावें आढळतात. राजपुतान्यातील प्रसिद्ध चितोडगड याच्या नंतरच्या काळात बाधला गेला. मुसुलमानी अंमलाच्या प्रारंभीं उत्तर हिंदुस्थानात प्रख्यात किल्ले थोडे होते. मुसुलमानी अंमल झाल्यानंतर व त्याचे आणि रजपुतांचें व इतर हिंदूंचे युद्ध जुंपल्यानंतर राजपुताना, पंजाब, काश्मीर, बंगाल, बहार व ओरिसा इकडे किल्ले जास्ती बाधले गेले. उत्तरहिंदुस्थानांत डोंगर थोडे असल्यानें डोंगरी किल्ले फार थोडे असून भुईकोट किल्लेच फार आहेत. दक्षिणेंत तसे नाहींत. इकडे सह्याद्री, सातपुडा, चांदवड वगैरे डोंगर असल्यानें बहुतेक किल्ले डोंगरीच होते आणि त्याचमुळें मुसुलमानाना जितक्या लवकर सपाट उत्तरहिंदुस्थान जिंकिता आला, तितका डोंगराळ दक्षिणहिंदुस्थान जिंकितां आला नाहीं व जरी जिंकिला तरी सतत तो त्याच्या ताब्यात राहिला नाहीं. दक्षिणेंतील-त्यांतल्या त्यात महाराष्ट्रातील-किल्ले फार बळकट असत. भोजराजांनीं, शिलाहारांनीं व चालुक्यांनीं हे किल्ले बाधिले होते. सिंहगड, पन्हाळा, विशाळगड, सातारा,

माहुली, तोरणा वगैरे प्राचीन किल्ले असून शिवाजीमहाराजांनीं व इतर मराठी राजसत्ताधाऱ्यांनीं अनेक नवीन किल्ले बांधिले.

डोंगरी व भुईकोट या किल्ल्यांच्या दोन प्रकारांप्रमाणेंच जंजिरा-पाणकिल्ला-हाहि एक तिसरा प्रकार होता. शिवछत्रपतीनें सिंधुदुर्ग हा प्रख्यात पाणकिल्ला बांधिला होता. त्यास मराठे 'शिवलंका' असें मोठ्या अभिमानानें म्हणत. मराठ्यांनीं अर्नाळा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, अलिबाग व हबशानें जंजिरा हे किल्ले बांधल्याचें प्रसिद्धच आहे. हे जलदुर्ग फार थोडे होते. मराठी राज्यातील या जलदुर्गांचें व आरमाराचें आधिपत्य प्रथम आंग्रे व नंतर धुळप या सरदाराकडे होतें.

राज्यव्यवहारकोशांत दुर्ग, गड व जंजिरा असे तीन प्रकार सांगितले आहेत. किल्ल्याच्या संरक्षणासाठीं तट बांधीत. तटास मधून मधून मजबुतीसाठीं व युद्धोपयोगी सामान ठेवण्यासाठीं बुरुज बांधीत. या बुरुजांना व तटाला भोकें (याना जंगी म्हणत) ठेवून त्यांतून शत्रूंवर बंदुकाच्या गोळ्या सोडीत असत. बुरुजावर तोफा असत. कांहीं किल्ल्यांना दोन दोन तट असून किल्ल्याच्या आत बालेकिल्ला असे. किल्ल्याच्या निरनिराळ्या भागांना फाजी, रेवण, पडकोट, चर्या, जीभ, अर्गळा, मेट, सफैली वगैरे नावें असत. तटाच्या पुढें (भुईकोट किल्ला असल्यास) खंदक असे, खंदकावर एक लाकडी पूल असे; त्यास साकू म्हणत. किल्ल्यांत धान्य सांठविण्याचीं कोठारें, पाण्याचीं टाकीं, विहिरी, पागा, रहाण्याच्या कोठड्या, राजवाडा, दारूगोळा ठेवण्याचा बारुदखाना वगैरे जागा असत.

भुईकोट किल्ले गंगा व सिंधुनदीच्या काठीं बरेच आहेत. दिल्ली, आग्रा, प्रयाग, भरतपूर वगैरे किल्ले विस्तारानें फार मोठे व मजबूत आहेत, पण ते सारे भुईकोट आहेत. यांच्या भोंवतीं खंदक अगर नद्यांचें पात्र आहे. आग्र्याच्या किल्ल्यांत राजवाडे दिवाणई-खास व आम आणि माशिदी वगैरे आहेत. विजापूरच्या आर्क किल्ल्यांतहि अद्यापि मोटमोठे पडके राजवाडे पहावयास सांपडतात. हाहि भुईकोटच आहे. किल्ल्याचें महाद्वार ओलांडल्यावर, दुसरी वेस जी असे ती उजवी अगर डावीकडे ठेवीत; महाद्वाराच्या समोर केव्हांहि ठेवांत नसत. किल्ला एकाएकीं हस्तगत होऊं नये म्हणून ही खबरदारी असे. रस्तेहि नागमोडी व त्यांवर तोफा रोखलेल्या असे असत. खंदकाच्या पुढें कांटेरी निवडुंग अगर बांबूंचीं बनेंहि लावीत असत. त्यामुळें शत्रूंच्या तोफेचा मारा निकामी होई.

किल्ल्याच्या खालील १०।१५ कोसांचा भोंवतालचा मुलूख त्या किल्ल्याच्या दिमतीस असे. त्या प्रांताचा वसूल किल्लेदारानें गोळा करून आपल्या (किल्ल्याच्या फौजेच्या व इतर) खर्चाइतका ठेऊन घेऊन बाकीचा मुख्य सरकारकडे पाठविण्याची चाल असे. किल्ल्यावर मुख्य किल्लेदार हा असून त्याचे हाताखालीं जामदार, कारखाननीस, हवालदार, मुजुमदार, सबनीस वगैरे लष्करी व मुलकी अधिकारी असत. किल्ल्याच्या महत्त्वाप्रमाणें कमजास्ती फौज असे. किल्ल्यामुळें शत्रूंपासून बचाव व शत्रूला अडथळा या दोन्ही गोष्टी करितां येतात. तोफा निघण्यापूर्वी (बाणाच्या युद्धकालात) डोंगरी किल्ल्यांचें महत्त्व फार असे, कारण बाणाचा मारा इतक्या उंचीवर जात नसे. परंतु हल्लीं लांब पल्ल्याच्या प्रचंड तोफा व अगदीं अलीकडे निघालेलीं विमानें यांच्यापुढें या भुईकोट व डोंगरी किल्ल्यांचें महत्व फारसें राहिलें नाहीं हें परवाच्या यूरोपीय महायुद्धांत सिद्ध झालेंच आहे. तोपर्यंत जगांतील अजिंक्य समजले जाणारे नामूर, ॲंटवर्प, मेत्झ, वगैरे किल्ले जर्मन लोकांनीं हाविट्झर तोफांच्या व विमानांच्या साहाय्यानें अगदीं अल्पावधींत काबीज केले. सारांश यापुढील काळांत किल्ल्यांचें महत्त्व कमी होत जाईल असें दिसतें.

किल्ला बांधितांना पुढील गोष्टी लक्षांत ठेवाव्या लागतात; लढायांत उपयोगांत येणारीं हत्यारें, जमीनीची पहाणी, शत्रूची व आपली ताकत, पाण्याची व दाण्याची सोय, चोर मार्ग वगैरे लक्ष्यांत न घेतल्यास फार दिवसांच्या वेढ्यानें आंतील लोकांचें नुकसान होतें. किल्ले बांधण्यापूर्वी नुसता तटहि गांवाभोंवतीं घालीत. अशा प्रकारें निनेव्ही आणि बाबिलोन येथील तटबंदी होती. मात्र ती फक्त संरक्षणाच्या (बचावाच्या) स्वरूपाची होती. शत्रूस तोंड द्यावयाचें झाल्यास आंतील सैन्यास या तटाबाहेर जावें लागे. चीनमधील प्रचंड भिंतहि तटबंदींचें एक अलौकिक उदाहरणच होय. हिंदुस्थानांत व यूरोपमध्येंहि मध्ययुगांत जहागीरदार व सरंजामदार हे लहान लहान गढ्या बांधून आपल्या जहागिरींचें (त्यांतील रस्ते, नदींचे उतार, पूल वगैरे) संरक्षण करीत असत. तोफा उपयोगांत आल्यानंतर १७ व्या व १८ व्या शतकांत या यूरोपियन जमीदारांच्या गढ्यांचें महत्त्व संपलें. आपल्या इकडे महाराष्ट्रांत खुद्द शिवाजी महाराजांनीं, हे जमीदार गढ्या बांधून शिरजोर होतात म्हणून, त्यांच्या गढ्या पाडून टाकिल्या. मध्यवर्ती सरकारास या बंडखोरांपासून त्रास होतो म्हणून त्यांनीं कोण्याहि इनामदारास गढी बांधूं दिली नाहीं. हल्लीं लष्करीदृष्ट्या नाजूक व महत्त्वाचीं ठाणीं जेथें असतील तेथें किल्ले बांधितात. उदाहरणार्थ राजधानी, लष्करी कोठारें, दर्यावरील गोद्या, आगगाड्यांचीं जंक्शनस्टेशनें वगैरे.

किल्ल्यांच्या कल्पनेपूर्वी प्रथम कांट्यांचीं कुंपणें गांवाभोंवतीं ठेवीत असत. शिकंदरानें हिरक्यानिअन लोकांच्या खेड्यांभोंवतीं असलीं कुंपणें असल्याचें लिहिलें आहे. हल्लीं अरबस्तानांत व हिंदुस्थानांत कर्नाटकांत निवडुंगाचें कुंपण असलेलीं खेडीं आढळतात. यानंतर मातीचा तट बांधण्याची युक्ती निघाली. जर्मनींत मध्ययुगांत हे तट

मातीचे होते. आपल्याकडे जुने तट नुसत्या मातीचे बांधलेले कोठें कोठें आढळतात यांत तोफेचा गोळा घुसला तरी (दगडी बांधकामाच्या तटापेक्षां) फारच थोडें नुकसान होतें. भरतपूरच्या किल्ल्याचा प्रसिद्ध तट व कुंभेरीचा तट मातीचाच आहे असें म्हणतात. मातीच्या भिंतीनंतर दगड विटांचा बांधीव तट उपयोगांत आला. तट उंच (म्हणजे शत्रूस शिड्या लावितां येऊं नयेत इतका) व रुंद (म्हणजे आपल्याला त्यावर सामानासह सुलभतेनें फिरतां येईल असा) असावा. तटानंतर बुरूज प्रचारात आले. यांचा उपयोग शत्रूवर मारा करण्यास होई मार्गे सांगितलेल्या निनेव्हीचा तट १२० फूट उंच व ३० फूट रुंद व १५०० बुरूजांचा असून तो खि. पू. २ हजार वर्षांपूर्वी बांधलेला होता. असल्या तटांना शिड्या लावून किल्ले काबीज करीत. तें न च जमल्यास तटास सुरुंग लावीत व तट उडवून देत. क्वचित (सिंहगडसारख्या) प्रसंगी घोरपडीचाहि उपयोग करीत; अगर सभोंवार मोर्चे देऊन सतत तोफांचा मारा करून तो जमीनदोस्त करीत असत. यरूशलेमवर झालेल्या खि. पू. ८ व्या व ६ व्या शतकातील शत्रूच्या हल्ल्यांत ३०० शेर वजनाचे दगडी गोळे फेंकणारीं यंत्रें, तोफा, झुलते घण यांचा उपयोग केला होता. रोमन लोकांनीं ही कला ग्रीक लोकांपासून घेतली. रोमन किल्ले बहुधा उंच ठिकाणीं बांधिलेले असत. याचें कारण त्यांचे तट २० फूट रुंदीचे असत; त्यावेळचीं तटबंदीचीं कांहीं वर्णनें आढळतात. कारकासोने येथील बुरूज, गैलार्ड येथील किल्ला, मॉटार्जीसचा किल्ला यांचीं प्रत्यक्ष पाहून लिहिलेलीं वर्णनें आहेत; त्यावरून त्याच्या बांधणीची कल्पना येते. यानंतर १५ व्या शतकात जेव्हां तोफांचा व दारूगोळ्याचा प्रचार सुरू झाला तेव्हां किल्ल्याच्या प्राचीन बांधणींत फरक पडूं लागला. यूरोपांत प्रथम फ्रान्समध्यें या शस्त्रांचा मारा करण्यास सुरुवात झाली. स. १४२८ त इंग्रजांनीं ऑर्लिअन्सला घातेलेल्या वेढ्यांत किल्लेदारानीं तोफांच्या माऱ्यानेंच इंग्रजाचा पुरता फडशा पाडला. पुढें १४५० त सातव्या चार्लसनें तोफखान्याच्या जोरावरच नार्मंडींतील सर्व इंग्रजी किल्ले पाडाव केले.

या शास्त्रावर यूरोपमध्यें डूरर, पेगन मार्टिनी, सेबास्टियन ग्यालो, स्पेकल, म्याकिआव्हेली वगैरे लोकांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पुढें १७ व्या शतकांत रेखागणिताच्या आधारावर किल्ल्यांची बांधणी करण्यास सुरवात झाली. याचा पुरस्कर्ता मार्ची नावाचा एक इटालियन होता. अठराव्या शतकांत कॉर्मोन्टेन म्हणून एका फ्रेंच माणसानें तटबंदी व खंदक यांत कांहीं सुधारणा केल्या त्या फ्रॅंको-जर्मन युद्धापर्यंत (१८७०) अंमलांत होत्या. जर्मनींत फ्रान्सच्या सरहद्दीवरील मोठमोठ्या किल्ल्यांत जी एक नवीन (निरनिराळे १०।१२ किल्ले मिळून एक मोठा किल्ला बनविणें) रीत उपयोगांत आलेली गेल्या महायुद्धात दृष्टीस पडली, ती व्हाउबन नांवाच्या एका फ्रेंचानें मूळ शोधून काढलेली आहे (१७००). मात्र तिचा विस्तार जर्मनीनें केला. असल्या प्रकारचे किल्ले म्हणजे अँटवर्प, पोसेन, पोर्टआर्थर, मेट्झ, व्हर्डुन वगैरे होत. यांत मुख्य किल्ल्याभोंवतीं अनेक लहान लहान किल्ल्यांची एक रांग (माळ) असते. अँटवर्पच्या मुख्य किल्ल्याभोंवतीं असे सतरा किल्ले आहेत. मुख्य किल्ल्यापासून किती अंतरावर (त्रिज्या) हे छोटे किल्ले असावेत तें त्या त्या ठिकाणच्या जमीनीच्या स्वरूपावर अवलंबून असतें. पारीसच्या मुख्य किल्ल्यापासून हे छोटे किल्ले १८ हजार यार्डांवर आहेत. व्हर्डून येथील हें अंतर १२ पासून २॥ हजार यार्ड, मेट्झ येथें २॥ ते ४॥ हजार यार्ड व स्ट्रास्सबर्ग येथें ५ ते १० हजार यार्ड अंतर आहे या किल्ल्याच्या संरक्षणार्थ अर्थातच सैन्य जास्त लागतें. मात्र त्याबरोबरच शत्रूला पुष्कळ दिवस थोपवूनहि धरता येतें. पण गेल्या महायुद्धांत विमानांनीं व मोठ्या हॉविट्झर तोफांनीं व ६० शेरी गोळ्यांनीं या किल्ल्यांचा भ्रम फेडला. असे किल्ले हिंदुस्थानात कांहीं आहेत. पुरंधर, जिंजी, राजमाची, पन्हाळा, ग्वाल्हेर, पेशावर, चितोड, वगैरे किल्ले साधारणतः वरील जातीचेच (थोड्या प्रमाणांत) होत. असल्या किल्ल्यांमध्ये आंत लहान तोफा ठेवण्याची व मैदानी व महांकाळी (हॉविट्झर) तोफांच्या बातेऱ्या किल्ल्याच्या बाहेर (छपवून) ठेवण्याची चाल सांप्रत प्रचारात आहे. मुख्य किल्ल्याचा संबंध या लहान लहान किल्ल्यांशीं आगगाडी अगर पायरस्त्यांनीं (झाडांनीं आच्छादित असा)जोडलेला असतो. बॉंबपासून नुकसान होऊं नये म्हणून बातेऱ्याजवळ अगर किल्ल्यांत वाळूच्या पोत्यांचे धमधमे तयार करतात. शत्रू रात्रीं सुरुंग वगैरे खोदीत असल्यास शोधकदीप (सर्च लाइट) उपयोगांत आणतात. या शोधकदीपापासून नफ्याबरोबर तोटेहि होतात; शत्रूला आपलीहि जागा दाखविली जाते. तसेंच धुक्यात याचा कांहीं उपयोग होत नाहीं. इ. स. १८५० च्या पुढें क्रिमियन लढाई व यांत्रिक तोफा यांच्यामुळें किल्ल्याच्या बांधणींत पुन्हा सुधारणा झाली. किल्ल्याचें संरक्षण जसें इतर साधनसामुग्रीवर अवलंबून असते तसें किल्लेदारावरहि असतें. तो विश्वासू व शूर असला तर आणि अन्नपाण्याचा मुबलक पुरवठा असला तर, शत्रूस किल्ला घेण्यास फार प्रयास पडतात. मुरारबाजी (पुरंदर), विसाजीराम (धारवाड), परशुराम त्रिंबक (सातारा), राजाराममहाराज (जिंजी), चांदबिबी (नगर), मादण्णापंत (गोंवळकोंडा). लक्ष्मीबाईसाहेब (झाशी), मुरारराव घोरपडे (गुत्ती), संगराणा (चितोड), टॉडलेबेन (सेबास्तोपोल), फेनविक (कार्स), उस्मानपाशा (प्लेव्हना) हीं असल्या शूर किल्लेदारांचीं नांवें होत. यांनीं कंसात दिलेले किल्ले अनेक दिवस लढविले होते. आपल्या महाराष्ट्रांतील असल्या किल्ल्यांचीं व किल्लेदारांचीं (मराठी साम्राज्यांत) उदाहरणें अनेक आढळतील. किल्लेदाराच्या फितुरीनें अजिंक्य किल्ले शत्रूंच्या हस्तगत

झाल्याचींहि उदाहरणें आढळतात. सूर्याजी पिसाळ(रायगड), सुभानजी लावघरे (सातारा), क्रामवेलनें वेढा दिलेल्या ब्लेचिंगडचा किल्लेदार (१६४५) हीं असलीं उदाहरणें होत. किल्ल्यांतील सर्व शिपाई मरेपर्यंत शत्रूच्या हातीं किल्ला पडूं द्यावयाचा नाहीं अशा गोष्टी रजपुतान्या व मराठयांच्या इतिहासांत अनेक घडलेल्या आहेत. यूरोपमध्यें असलें उदाहरण क्वचितच आढळतें. खडें सैन्य पुष्कळ व युद्धोपयोगी सामुग्रीनें सज्यत तयार असलें तर हल्लींच्या काळीं या किल्ल्याचा फारसा उपयोग होण्यासारखा नाहीं. म्हणून कांहीं तज्ज्ञांच्या मतें किल्ल्याच्या फायद्याप्रमाणें थोडे तोटेहि (हल्लींच्या काळीं) पदरांत पडतात. किल्ले बांधण्यांत जो असंख्य पैका घातला जातो तितक्याचा उपयोग, सैन्य व साधनसामग्री सर्व सज्यत ठेवण्यांत केल्यास भागण्यासारखें आहे, असें यांचें म्हणणें आहे.

[संदर्भग्रंथ— शामशास्त्री –कौटिल्य अर्थशास्त्र; डूरर, स्पेकल, फ्रिट्च, पेगन, कार्नाट, झस्ट्रौ, ब्रिलमॉन्ट, ब्रूनर, क्लार्क, वगैरे ग्रंथकाराचे ग्रंथ; एन्सायक्लो. ब्रिटा. व्हॉ. १०; वाल्मिकिरामायण; महाभारत; भागवत; मराठी रियासत].

किल्हार्न डॉ. एफ्.—एक प्राच्य-विद्या-विशारद जर्मन पंडित. किल्हार्न इ. स. १८६२ मध्ये पुण्याच्या "डेक्कन कालेजांत" पौरस्त्य भाषांचा प्रोफेसर म्हणून आला. हिंदुस्थानांत असतांना त्यानें येथील पंडितांची मैत्री संपादन केली. त्यानें मॅक्समुल्लरला सायणटीकेसह ऋग्वेदाची पहिली आवृत्ति काढण्याच्या कामीं मदत केली. हिंदुस्थानांत यानें पंडितांजवळ व्याकरणाचा अभ्यास केला. याच्या पुस्तकावरून हा चांगला वैय्याकरणी होता असें दिसतें. यानें "पतंजलीचें महाभाष्य" व नागोजीभट्टाचें "परिभाषेंदुशेखर" ह्या पुस्तकाच्या विद्वत्तापूर्ण आवृत्त्या काढल्या व व्याकरणविषयक निबंधहि बरेच लिहिले.

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास उपलब्ध करणाऱ्या अंकित लेखाचा अर्थ लावण्याच्या कामींहि यानें बरीच मेहनत घेतली व याच्याच अविश्रांत व निःस्वार्थी श्रमामुळें प्राचीन हिंदुस्थानचा बराच इतिहास उपलब्ध झाला आहे.

हा हिंदुस्थानांतून जर्मनींत गॉटिन्जन् विश्वविद्यालयांत संस्कृतचा प्रोफेसर म्हणून गेला. व इ. स. १९०८ च्या मार्च महिन्यांत ख्रिस्तवासी झाला.

किशनगंज, पो ट वि भा ग—बिहार-ओरिसा इलाख्यांतील पूर्णिआ जिल्ह्याचा ईशान्य भाग. हा पोटविभाग नेपाळच्या सरहद्दीला चिकटला असून याचें क्षेत्रफळ १३४६ चौरस मैल आहे. हा सुपीक व वालुकामय प्रदेश आहे. याची लोकसंख्या १९११ सालीं ६०६६८८ होती. या पोटविभागांतील बहुतेक लोक मूळ राजवंशी जातीचे असून त्यांपैकीं पुष्कळसे लोक मुसुलमान झाले आहेत. किशनगंज शहर, फुलवारिया, बिबिगंज, गंधर्वगंगा व इस्लामपूर येथें मुख्य बाजारपेठा आहेत.

श ह र.—किशनगंज पोटविभागाचें मुख्य ठिकाण. या शहराची लोकसंख्या १९११ मध्यें ५५६३ होती. हें शहर महानंदा नदीच्या पूर्वेस गंगा दार्जीलिंग रस्त्यावर वसलेलें आहे. या शहराला १८८७ मध्यें म्युनिसिपालिटी देण्यांत आली. म्युनिसिपालिटीचें वार्षिक उत्पन्न १९०३–४सालीं जवळ जवळ १२०००रु. असून खर्च ८००० रुपये होता. या शहरीं एक छोटासा तुरुंग आहे. या ठिकाणीं दरवर्षी एक जत्रा भरत असून तींत लाखों यात्रेकरू जमतात. हत्ती, उंट, खेचरें, मेंढ्या, गाई, इत्यादि जनावरें विकण्याचें हें ठिकाण आहे. तांदूळ व ताग हे जिन्नस येथून मोठ्या प्रमाणांत निर्गत होतात.

किशनगड संस्थान.—राजपुतान्याच्या मध्यभागांतील एक संस्थान. या संस्थानचें क्षेत्रफळ ८६८ चौरस मैल आहे. या संस्थानच्या मर्यादाः—उत्तरेस व वायव्येस जोधपूरचें संस्थान; पूर्वेस जयपूरचें संस्थान; पश्चिमेस व आग्नेयीस ब्रिटिशांच्या ताब्यांत असलेला अजमीरचा मुलूख व दक्षिण टोंकाला शहापुरा जहागिरी. या संस्थानचे नैसर्गिक रीतीनेंच दोन भाग पडलेले आहेत. यांपैकीं उत्तरेचा भाग हा दक्षिण भागापेक्षां मोठा असून तो बहुतेक वालुकामयच आहे. या वालुकामय प्रदेशांतून अरवली पर्वताच्या तीन रांगा एकमेकांस समांतर रेषांत, नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे पसरलेल्या आहेत. या रांगांचीं पुष्कळ शिखरें असून त्यांपैकीं सर्वांत मोठें शिखर २०४५ फूट उंच आहे. दक्षिणेकडील भाग सपाट असून सुपीक आहे. या संस्थानांत तीन नद्या असून पुष्कळ ओढे आहेत. रूपनगर ही नदी ईशान्य दिशेनें वहात जाऊन सांबर सरोवराला मिळते. माशी नदी व दैन नदी या पूर्वगामी होऊन बनास नदीला मिळतात.

भू स्त र.—या पर्वताच्या रांगांमध्यें व दऱ्यांमध्यें स्फटिकांचे रंगीबेरंगी दगड सांपडतात. आग्नेय व दक्षिणेकडील सपाट प्रदेशांत जंबूर दगड आढळून येतात. सरवारजवळ अभ्रकाचे दगड विपुल सांपडतात व तसेच मोठमोठ्या सुंदर व रंगीत जातीचे चुनखडीचे दगड आढळतात. किशनगडच्या राजधानीनजीक निरनिराळ्या प्रकारचे सोडालाइटचे दगड सांपडतात. हे अंधारांत कांहीं दिवस ठेवल्यास गुलाबी रंगाचे बनतात. पण त्यांना सूर्यप्रकाश दाखवितांच ते पुन्हां रंगविहीन होतात. दक्षिणेंतील मैदानवजा भागांत वज्रतुंड दगडांची विपुलता आहे.

प्रा णी.—या संस्थानांत काळवीट, हरीण, रानडुकरें व नीलगाई हे प्राणी विशेष आढळून येतात. यांशिवाय डोंगरांत चित्ते, तरस व लांडगे हेहि पुष्कळ आहेत.

ह वा मा न.—येथील हवा कोरडी व निरोगी आहे. पण आक्टोबर—नोव्हेंबर महिन्यांत मात्र हिंवतापाची साथ पसरविणारी हवा असते. उत्तरेकडील भागांत पावसाचें प्रमाण फार कमी आहे. दक्षिण भागांत मात्र पाऊस बरा पडतो. पावसाचें सरासरी प्रमाण २०१२१ इंच इतकें आहे.

संस्थानामधील शहरें व खेडीं यांची संख्या एकंदर २२१ आहे. १९०१ मध्यें संस्थानची लोकसंख्या ९०,९७० होती. पण १८९१ मध्यें १,२५,५१६ इतकी होती. म्हणजे १० वर्षांमध्यें शेंकडा २७ या प्रमाणात लोकसंख्येचें मान उतरलें. याचें मख्य कारण म्हणजे १९०० या सालात येथें भयंकर दुष्काळ पडल्यामुळें येथील पुष्कळ लोक परस्थळीं निघून गेले व याच वर्षी तापाची साथहि जोरांत सुरू झाल्यानें पुष्कळ माणसें दगावलीं हें होय. १९११ त ८७,१९१ आणि १९२१ त ७७,७३४याप्रमाणें पुढील दोन दशकातहि झपाट्यानें वस्ती कमी झाली. संस्थानच्या उत्तर भागाचे अरैन, बादर शिंद्री, किशनगड व रूपनगर असे चार जिल्हे असून दक्षिण भागात सरवार हा एकच जिल्हा आहे. या संस्थानात किशनगड, रूपनगर व सरवार हीं तीन शहरें असून या तिन्ही शहराना म्युनिसिपालिट्या आहेत.

१९११ च्या खानेसुमारींत जी लोकसंख्या भरली तींत ७६,६४२ हिंदु, ७६८५ मुसलमान व ३१७६ जैन अशी वर्गवारी झाला. हिंदुधर्मीयामध्यें वैष्णवपंथी लोकाचाच भरणा अधिक आहे. प्रसिद्ध निंवार्क संप्रदायाचा मुख्य गुरू हा रूपनगर जिल्ह्यामधील सलीमाबाद या गावीं राहतो.संस्थानात ढुंढारी ही भाषा मुख्यतः प्रचलित आहे. पण उत्तरेकडील भागात पुष्कळ लोक मारवाडी भाषा बोलणारेहि आढळतात.

येथें हिंदूंच्या पुष्कळ जाती असून त्यापैकीं जाट, महाजन, ब्राह्मण, गुजर व रजपूत या जाती प्रमुख होत. या संस्थानच्या राजधानींत 'दि युनायटेड फ्री चर्च ऑफ स्कॉटलंड मिशन' याची एक लहानशी शाखा असून, शिवाय रूपनगर येथें 'दि अमेरिकन मेथॉडिस्ट चर्च' या मिशनचा एक नेटिव्ह धर्मगुरू रहातो.

संस्थानातील मुख्य धंदा शेतकी हा आहे. संस्थानांतील शेंकडा ८५ लोक केवळ शेतीवर उदरनिर्वाह करणारे आहेत. संस्थानच्या निरनिराळ्या भागात निरनिराळी शेतकीची स्थिति नजरेस येते. उत्तरेकडे म्हणजे ज्या ठिकाणीं पर्जन्याचें मान कमी आहे व जमीनहि विशेष सुपीक नाहीं त्या ठिकाणीं वर्षांत खरीपाचें तेवढें एकच पीक काढण्यात येतें. या खरीपाच्या हंगामांत ज्वारी, बाजरी मूग, इत्यादि धान्यांचें उत्पन्न होतें. संस्थानच्या मध्यभागात पर्जन्य उत्तरभागापेक्षां अधिक पडत असल्याकारणानें या ठिकाणीं दोन पिकें काढून घेण्यात येतात. खरीपाच्या हंगामात मका, तीळ इत्यादिकाचें पीक काढण्यात येतें व रब्बीच्या हंगामात गहूं, चणे, कापूस इत्यादींचें पीक काढलें जातें. दक्षिणेकडील भाग जात्याच सुपीक व त्यातच पर्जन्यहि पुष्कळ पडत असल्यामुळें दोन्ही हंगामांत चांगलीं पिकें येतात. १९०३–४ सालीं एकंदर १५३ चौरस मैल जमीन लागवडीखालीं होती. तींपैकीं जवळ जवळ निम्म्या जमीनीला विहीरीं, तलाव व इतर साधनांनीं पाणी मिळण्याची व्यवस्था होती. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नासंबधान योग्य ती तरतूद करण्याचे दरबारनें प्रयत्न चालविले आहेत.

गु रें ढो रें.—संस्थानातील गुरें गुजराथमधील गुरांच्या सारखीं मध्यम ठेवणीचीं पण कांटक अशीं आहेत. गुरांची निपज अधिक चागली व्हावी यासाठीं हिस्सार व नागोर येथून खोड आणविण्यात आले आहेत. गुरांची निगा ठेवण्याला उत्तेजन यावें यासाठीं दरवर्षी आगस्ट महिन्यांत रूपनगर शहराजवळ सुरसर गांवीं गुरांचें प्रदर्शन भरविण्यात येतें. खेंचरांच्या निपजीबद्दलहि १९०१ सालीं प्रयत्न करण्यात आले पण ते तितके फलद्रुप झाले नाहींत. शेळ्या, मेंढ्या यांची समृद्धि येथें असून त्याचा उपयोग, लोंकर दूध, मास याच्यासाठीं करण्यात येतो.

संस्थानात जगल असे फार थोडें आहे. अवघें ८१ चौरस मैल जंगल राखीव आहे. त्यातून सागवान गवत व इतर किरकोळ जिन्नस मिळून अंदाजें १८,००० रुपयाचें वार्षिक उत्पन्न होतें व खर्च ४००० रुपयापर्यंत होतो. किशनगड शहरनजीक सिलोरा दगडाच्या खाणी असून त्याच्या उत्तम फरशा तयार होतात. या फरशाचा तक्तपोशी व छप्पर याच्यासाठीं उपयोग करण्यात येतो. ह्या खाणी खास संस्थानच्या मालकीच्या आहेत. टोंका गावानजीक पाढऱ्या संगमरवरी दगडाच्या खाणी आहेत. नारवार नजीक तांबूस रंगाच्या व इतर काहीं ठिकाणीं काळ्या रंगाच्या संगमरवरी दगडाची पैदास होते. एका काळ्या धातूपासून रंग काढण्याचा प्रयत्न साध्य झाला असून त्या रंगाचा उपयोग जोधपूर–बिकानेर रेल्वेच्या आगगाडीच्या डब्यांना व रजपुताना माळवा रेल्वेच्या डब्याना लावण्यात येतो.

व्या पा र.—संस्थानात चिटाचे कापड, इतर निरनिराळ्या रंगाचीं कापडें, किनारी पाणी पिण्याचीं भांडीं व गवतापासून तयार होणाऱ्या बाटल्या हा माल तयार होतो. समायिक भांडवलाच्या तत्वावर गिरण्या व कारखाने काढण्यासाठीं सरकारकडून नेहमीं उत्तेजन देण्यात येतें. खुद्द संस्थानच्या मालकीच्या दोन वाफेवर चालणाऱ्या कापसाचे गठ्ठे करण्याच्या गिरण्या आहेत. शिवाय सूत काढण्याची व विणण्याची एक गिरणी व साबणाचा कारखाना हे किशनगड शहरात आहेत. कापूस, लोंकर, तूप, ओवा, जिरें वगैरे जिन्नसाची निर्गत होते व साखर, मीठ, धान्य याची आयात होते.

द ळ ण व ळ ण.—संस्थानच्या उत्तर भागातून राजपुताना माळवा रेल्वेचा फाटा गेलेला आहे. या संस्थानच्याहद्दींत या रेल्वेची १३ मैल लाबी आहे. किशनगड हे एक या हद्दींतील स्टेशन आहे. संस्थानांतील रस्ते काहीं खडीचे व काहीं साधे आहेत खडीचा रस्ता ३० मैल असून बिनखडीचा ८० मैल आहे. येथें एकंदर ४ ब्रिटिश पोस्ट ऑफिसें आहेत खुद्द दरबारनेंहि आपलें स्वतंत्र पोस्ट

खातें ठेवलें असून संस्थानांत १३ठिकाणीं पोष्टें आहेत. पोस्ट खात्याचें वार्षिक उत्पन्न अंदाजें २४०० रुपयांचें असून खर्च १००० रुपयांपर्यंत आहे.

दु ष्का ळ.—संस्थानांत दुष्काळ वरचेवर पडतात व त्यामुळें महागाई प्राप्त होते. साधारणतः दर आठ दहा वर्षांनीं एकदां तरी दुष्काळाचा प्रादुर्भाव होतोच. १८९९–१९०० या सालांत मोठा दुष्काळ पडला. त्यावेळीं दुष्काळनिवारणार्थ पुष्कळच प्रयत्न करण्यांत आले. बेकार व अन्नान्नगत झालेल्या मजुरांनां कामें देऊन त्यांनां अन्नवस्त्र पुरविण्यांत आलें. १९०१–२ या सालांतहि पुन्हां दुष्काळ पडला. यावेळींहि सरकारनें वरील उपाय अंमलात आणले.

शा स न प द्ध ति.—संस्थानचा राज्यकारभार स्वतः महाराज हे दोन दिवाणांच्या मदतीनें चालवितात. किशनगड जिल्ह्याची व्यवस्था फडर्णास नांवाच्या एका अधिकाऱ्याकडे सोंपविण्यात आली असून इतर जिल्ह्यावर स्वतंत्र आधिकारी नेमण्यात आले आहेत या अधिकाऱ्यांना हाकीम असें नांव आहे. यशिवाय प्रत्येक जिल्ह्यात करवसुली करता तहशलिदार व नायब तहशीलदार नेमण्यात आले आहेत. संस्थाननें न्यायखात्यासाठीं आपले स्वतःचे स्वतंत्र कायदे केले आहेत. हाकिमाना सेकंडक्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार दिलेले आहेत. एका हाकिमाला मात्र थर्डक्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार दिलेले आहेत. या हकीमासमोर सर्व प्रकारचे दिवाणी कज्जे चालतात. जे फौजदारी कज्जे यांच्या अधिकाराबाहेरचे असतील ते कज्जे किशनगड जिल्ह्याच्या फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटपुढें चालतात. किशनगड जिल्ह्यातलि दिवाणी काम स्मॉलकाज कोर्टांत व सदर दिवाणी कोर्टांत चालतें. अपील कोर्टाला अपिलें ऐकण्याचा अधिकार असून शिवाय सेशन्स जज्जाचे अधिकारहि या कोर्टाकडेच आहेत. कौन्सिल हें सर्वांत वरिष्ठ कोर्ट असून त्याच्यापुढें स्पेशल अपिलें चालतात. महाराजाना फाशी देण्याचाहि अधिकार आहे.

संस्थानचें वार्षिक उत्पन्न अंदाजें ८ लाख रुपये असून खर्च ५ लाख आहे. उत्पन्नाच्या बाबी म्हणजे जमीनमहसूल, जकात, न्यायखातें, स्टँप, कापसाच्या गिरण्या, व कारखाने या होत व खर्चाच्या बाबी शासनखातें, खाजगी, लष्कर, पोलिस व पब्लिक वर्क खातें या होत. यावरून संस्थानची स्थिति समाधानकारक आहे असें दिसून येतें संस्थानची टांकसाळ असून तेथें संस्थानांत चालणारीं नाणीं पाडण्यांत येतात. पण ब्रिटिश नाण्यांशीं यांचा विशेष मेळ बसत नसल्यामुळें विनाकारण अडचळा उत्पन्न होतो.

जहागिरी, मुआफी व खालसा अशा तीन तऱ्हेची जमीनदारी पद्धत येथें आहे. जहागीरदारांनां महाराजांच्या वाढदिवसाच्या प्रसंगीं, आपआपल्या सरंजामासह दरबारला हजर रहावें लागतें. या जहागिरी वंशपरंपरा चालणाऱ्या असून वारसाच्या अभावीं महाराजांच्या संमतीनें दत्तक घेण्याची जहागिरदारांनां परवानगी आहे. संस्थानला अपायकारक असें वर्तन केल्यास जहागिरी जप्त करण्याचा महाराजांना हक्क आहे. मुआफी म्हणजे खासगी इनामें होत, खालसा म्हणजे खास दरबारच्या मालकीची जमीन; याबद्दल शेतकऱ्याकडून सारा घेण्याचा दरबारला हक्क आहे. हा सारा पैशाच्या रूपानें घेण्यांत येत नसून, शेतातील धान्याच्या रूपानेंच घेण्यांत येतो. उत्पन्नाच्या ¼ ते ½ इतका सारा घेण्यात येतो. कांहीं बाबतींत मात्र पैशाच्या रूपानें सारा वसूल केला जातो.

राजपुतान्यांतील वीस संस्थानात या संस्थानाचा शिक्षणाच्या बाबतींत चौथा नंबर लागतो. या संस्थानांतील सुशिक्षितांचें प्रमाण शेकडा ४.६ आहे. येथें २९ शिक्षणसंस्था असून पैकी १५ सरकारी, दोन मिशनऱ्यांनीं चालविलेल्या व बाकीच्या खासगी आहेत. माध्यमिक शिक्षणाची अशी एकच सरकारी शाळा आहे.

संस्थानमध्यें एक मोठा दवाखाना व तीन छोटे दवाखाने आहेत. देवी काढण्याच्या बाबतींत हें संस्थान मागासलेलें आहे.

इ ति हा स. किशनगड संस्थानचे अधिपती हे रजपुताच्या राठोड कुळातील असून ते जोधपूरच्या राजा उदयसिंगाचे वंशज आहेत.

किसनसिंग कच्छवाह हा जोधपूरचा राजा उदेसिंग याचा नववा पुत्र होय. यानें किशनगड हें संस्थान इ.स. १६१३ मध्यें नवीन स्थापिलें. हा कच्छवाह कुळातील होता. हा जहांगीरच्या हाताखालीं नौकरीस होता. यानें आपली बहीण जहांगीर यास दिली होती. तिच्याच पोटीं शहाजहान झाला. खुर्रम (शहाजहान) यानें बापा(जहांगीरा)विरुद्ध बंड उभारलें असतां किसनसिंगानें त्याला सहाय्य केलें. प्रथम त्यानें जोधपुरच्या राण्याकडे–गजसिंगाकडे (हा किसनसिंगाचा पुतण्या होय) मदत मागितली, परंतु त्यानें दिली नाहीं. तेव्हा त्याचा दिवाण गोविंददास याजकडे मागितली, त्यानेंहि दिली नाहीं त्यावर किसनसिंगाकडे मागितली. प्रथम किसनसिंगानें गोविंददासाचा खून केला व मग मदत केली. त्याबद्दल तो बक्षीस मागूं लागला तेव्हां त्याला स्वतंत्र संस्थान स्थापण्याची परवानगी मिळाली. त्यानें मारवाडच्या हद्दीबाहेर स्थळ पाहून तेथें एक नवीन शहर वसविलें आणि त्याला आपलेंच नांव दिलें. याचा प्रांत ओसाड असून त्यांत जाट लोकांची वस्ती जास्त होती. याचा खून सुरजसिंग यानें केला असें म्हणतात (इसवी सन १६१५). याला साहसमल, जगमल व भारमल असे तीन पुत्र होते. भारमलचा मुलगा हरिसिंग व नातू रूपसिंग होय या रूपसिंगानें रूपनगरचें राज्य स्थापिलें. [टॉड–राज हिंदुस्थान; एतद्देशीय राज्यें इति. बील–ओरि. बॉया. डिक्श.]

किसनसिंगाच्या मृत्यूनंतर आतांपर्यंत त्याचे १६ वंशज गादीवर बसले. इ. स. १६४४ मध्यें रूपसिंग नांवाचा एक

वंशज गादीवर बसला; तो शहाजहानचा फार आवडता असून त्यानें शहाजहानला त्याच्या स्वाऱ्यांत पुष्कळच मदत केली व त्यामुळें शहाजहाननें त्याला मादलगड वगैरे बरीच जहागीर व ५००० सैन्याची सरदारकी दिली. किशनगडच्या गादीवर बसणारा सातवा राजा राजसिंग (१७०६–४८) यानें शहाअलम बहादुरशहा याला पुष्कळ मदत केल्यानें त्याला मालपूर, सखार इत्यादि जिल्हे बक्षीस मिळाले. पुढें बहादुरसिंगानें इ. स. १७६४–१७८१ पर्यंत राज्य केलें. या गादीवर बसणारा तेरावा राजा कल्याणसिंग (१७९७–१८३२) हा होय. याच्या कारकीर्दींत हें संस्थान ब्रिटिशांच्या अधिकारात आलें. कल्याणसिंग हा अर्धवट माणूस असल्यानें त्याचें व त्याच्या हाताखालील सरदाराचें बिनसून तो दिल्लीला पळाला. पुढें ब्रिटिश सरकारनें त्याला अनेक प्रकारच्या धमक्या देऊन किशनगड येथें आणलें व त्याच्यामध्यें व सरदारामध्यें कसाबसा सलोखा केला. इ. स. १८३२ मध्ये कल्याणसिंगानें आपल्या मुलाला(मोहकमसिंगाला)राज्य दिले. मोहकमसिंगाच्या मागें त्याचा दत्तकपुत्र पृथ्वीसिंग हा राज्यावर बसला. हा मोठा धोरणी राजा होता. त्यानें आपल्या कारकीर्दींत संस्थानांत पुष्कळच इष्ट सुधारणा केल्या. पुढें पृथ्वीसिंगामागून शार्दूलसिंह हा गादीवर आला व त्यानें आपल्या बापाचें स्तुत्य धोरण पुढे चालू ठेवलें. इ. स.१८९२ मध्यें त्याला जी. सी. आय. ई. हा किताब मिळाला. तो १९०० सालीं वारल्यानंतर त्याचा मुलगा मदनसिंग हा गादीवर बसला. हाच हल्लीं संस्थानाधिपति आहे. सध्याच्या किशनगडच्या महाराजाला १७ तोफांची व के. सी. एस. आय. आणि के. सी. आय. ई. या पदव्या आहेत. दत्तक घेण्याचा अधिकार त्याला आहे. इ. स. १९१४–१५ सालीं मदनसिंग फ्रान्सच्या रणभूमीवर लढण्यास गेला होता.

शहर.—किशनगड संस्थानच्या राजधानीचें शहर. हें राजपुताना-माळवा रेल्वेवरील स्टेशन असून अजमीरच्या ईशान्येस १८ मैलावर आहे. किशनसिंगानें १६११ मध्यें हें शहर वसविलें. १९११ मध्यें या शहराची लोकसंख्या १०,४१८ भरली. गुंडोलाव सरोवराच्या काठीं हें शहर व याच नावाचा किल्ला वसलेला असून या सरोवराच्या मध्यभागीं मोहकम विलास नावाचा बाग आहे. महाराजाचा राजवाडा किल्ल्यामध्यें असून तेथून आसपासच्या सर्व प्रदेशाचें निरीक्षण करता येतें. सन १८८६ सालीं या शहराला म्युनिसिपालीटी देण्यात आली. म्युनिसिपालिटीकडे शहराची दिवाबत्तीची तजवीज, आरोग्यखात्याची व्यवस्था व कत्तलखान्याची व्यवस्था सोंपविण्यात आली आहे. शहरांत एक पोष्ट व तारायंत्र ऑफिस असून, दोन तुरुंग आहेत. शहरात एकंदर ११ शाळा असून त्यांतील तीन सरकारी व २ मिशनऱ्यांनीं चालविल्या आहेत. सरकारी हायस्कूल, आलाहाबाद विश्वविद्यालयाला जोडलेलें आहे. शहरानजीक हल्लींच्या महाराजाच्या नावाची एक छोटीशी वसाहत वसली असून तिचें नांव मदनगंज आहे. या मदनगंजांत एक वाफेनें चालणारी कापसाच्या गठ्ठ्याची व कापूस वटण्याची व विणण्याची गिरणी आहे. दोन साबणाचे कारखाने आहेत. याशिवाय विणकाम, रंगकाम, रत्नांना पैलू पाडण्याचें काम, पाणी पिण्याच्या भांड्यांचा कारखाना, इत्यादि कारखाने या शहरांत चालतात.

किशनचंद—हा दिल्लीचा रहाणारा असून कवि होता. काव्यात यानें आपलें नाव इखलास असें दिलें आहे. याच्या बापाचें नांव अचलदास असून जात खत्री होती. याच्या घरीं विद्वानांची नेहमीं बैठक असे. यानें "हमेश बहार" (सततवसंत) नांवाचा तझकिर (चरित्रें)ग्रंथ इ. स. १७३३ त केला असून त्यात जहांगीरपासून महंमदशहापर्यंतच्या कारकीर्दींत झालेल्या हिंदुस्थानातील साधारण २०० कवींचीं अकारांवरुन चरित्रें दिलेलीं आहेत. याची इखलासखान अगर इखलासकेश अशींहि नावें आहेत. फारशींत हा निष्णात असून अलमगीरच्या हाताखालीं नोकर होता. त्यानेंच याला वरील पदवी दिली. फरुखसियरनें याला सातहजारी सरदार बनविलें. यानें त्या शहाची 'बादशहानामा' नावाची एक बखर लिहिली आहे. [बील–ओरि. बॉयाग्रा. डिक्श.].

किशोरगंज पोटविभाग.—पूर्वबंगाल व आसाम इलाख्यातील मैमनसिंग जिल्ह्याचा आग्नेय भाग.या किशोरगंज पोटविभागाचें क्षेत्रफळ ९८५ चौरस मैल आहे. लोकसंख्या (१९११) ८,२२,७१९ होती या पोटविभागांत किशोरगंज व बाजिटपूर हीं दोन शहरें असून १५०८ खेडीं आहेत. हा अत्यंत दलदलीचा व वालुकामय प्रदेश आहे. मेघना नदी व तिला मिळणाऱ्या नद्या यांना पूर आल्यामुळें चोहोंबाजूला गाळ साचून त्याचे थरच्याथर तयार होतात. हा गाळ फार सुपीक असतो. या पोटजिल्ह्यात भैरवबाजार, करीमगंज व कातियादी या प्रसिद्ध बाजारपेठा आहेत.

शहर.—किशोरगंज पोटविभागाचें मुख्य ठिकाण. हें कुंडालीखाल नावाच्या नदीच्या काठीं वसलेलें आहे. याची वस्ती १९११ सालीं १८०२६ होती. किशोरगंज शहरीं जुलैच्या १५ तारखेपासून पुढें एक महिनापर्यंत कृष्णाच्या स्मरणार्थ झुलनजत्रा नावाची एक मोठी जत्रा भरते. या शहराची तेथें होणाऱ्या मलमलीबद्दल फार प्रसिद्धि होती. ईस्ट इंडिया कंपनीची या ठिकाणीं एक वखार होती. १८६९ मध्यें शहराला म्युनिसिपालिटी देण्यात आली. या शहरांत एक छोटासा तुरुंग आहे.

किष्किंधा.—तुंगभद्रेवरील अनागोंदी म्हणून जे प्रख्यात राजधानीचें शहर तीच प्राचीन किष्किंधा होय असा सर्व साधारण लोकसमज आहे. परंतु सुग्रीवानें सीताशोधार्थ दक्षिणेकडे वानर पाठविले असता त्यांस सांगितलें कीं, "विंध्यपर्वत, नर्मदानदी व दशार्ण हे देश शोधा." यावरून विंध्यपर्वताच्या उत्तरेस किष्किंधा असावी असें दिसतें. परंतु

विंध्य हें सामान्य नाम तत्कालीं दक्षिणेकडील बहुतेक पर्वतास लावीत असें वाटतें. दंडकारण्याच्या शेवटीं हा देश होता हें मात्र निश्चित आहे. भारतातील सहदेव दिग्विजयावरून किष्किंधा ही माहिष्मती (नर्मदेवरील महेश्वर कीं म्हैसूर ?)च्या उत्तरेस होती असें ठरतें. येथें रामाच्या वेळीं वानराचें राज्य होतें. वाली व सुग्रीव याच्या राज्यव्यवस्थेवरून व हनुमान आणि अंगद याच्या चातुर्यावरून वानर हा एक बराच सुधारलेला लोकसमाज होतासें दिसतें. पांडवांच्या वेळीं येथें मैंद व द्विविद हे वानर राजे होते असा उल्लेख आहे. रामाच्या वेळींहि मैंद व द्विविद होतेच. कदाचित त्या कुळातील राजे पांडवकाळापर्यंत राज्य करीत असतील. ह्युएनत्संग ज्या कोंकणपुराचें नाव (कोंकण देशाची राजधानी म्हणून) देतो, तें दिशा व अंतर यावरून अनागोंदी (किष्किंधा) हेंच होय असें म्हणतात. अल्बेरूणीने किष्किंधेस वानराचा देश म्हटलें आहे. मोनिअर विल्यम्सनें, वाली राजाच्या राज्याची राजधानी किष्किंधा असून तें राज्य ओढ्र (उडिया) देशात होतें असें म्हटलें आहे. बृहत्संहितेंत, आग्नेयीकडील प्रदेशात किष्किंध नावाचा एक पर्वत होता असें म्हटलें आहे. सारांश, अनागोंदी म्हणजे किष्किंधा होय अनेकांचें मत आहे. [प्रा. कोश; बृ. संहि. अ. १४; महा. भार. सभा.प; अर्वा. कोश; भार. भूवर्णन]

किसान--यांची एकंदर संख्या (१९११) ३,९३,८३६ आहे. बहुतेक किसान संयुक्त प्रांतातच आहेत. बंगाल बिहार-ओरिसामध्यें सुमारें ८० हजार आढळतात संस्कृत कृशान म्हणजे नांगऱ्या यावरून हा किसान शब्द झाला असावा. किसानाचा धंदा शेतीचा असून संयुक्त प्रांतात ते गंगायमुनेच्या दुआबांत आढळून येतात. हे लोक कूर्मी, कोएरी व कच्छी लोकांचे संबंधी आहेत. फरुकाबाद येथें त्यांनां किसान महार म्हणतात व अयोध्या प्रांतात महातीय म्हणजे पुढारी म्हणतात. त्यांच्या एकंदर ९ पोटजाती आहेत. त्या बाथाम, गद्धार, हर्दिय,हलदी, जारिय,खागी, लोधा, पतारिया व सकसेन या होत.

पोटजातींतच लग्न केलें पाहिजे असा निर्बंध आहे. त्याच प्रमाणें बालविवाह व प्रौढविवाहहि रूढ आहेत. बहुपत्नीत्वास मुभा आहे. परंतु पहिल्या बायकोस संतति नसेल तरच ही सवड देण्यात येते. लग्नाचे एकंदर तीन विधी अथवा प्रकार आहेत. भनवार म्हणजे अग्निच्या भोंवती प्रदक्षिणा घालणें हा प्रकार उच्च मानला जातो. डोला लग्नविधींत सर्व समारंभ नवऱ्याच्या घरींच करण्यांत येतात. तिसरा प्रकार धारौण हा विधवाकरितां असतो. विधवेला नवऱ्याच्या धाकट्या भावाशींच पुनर्विवाह करतां येतो.

किसान हे हिंदु असल्यानें हिंदुदेवतांचीच पूजा करितात. परंतु आमरोहाच्या मियासाधूलाहि ते भजतात देवी व मिया यांनां बकरीं अर्पण करून मास फकिरांनां व धानुकाना वाटतात. श्राद्ध करण्याचीहि त्यांच्यांत चाल आहे. हे बकरीं,मासे व शेळ्या यांचें मांस खातात पण हे लोक अन्यजातीबरोबर अन्नव्यवहार करीत नाहींत. ऊंस, तंबाखू व इतर धान्यें पिकवून ते आपला शेतकीचा धंदा आपल्या दर्जाप्रमाणें चालवितात.

बुदाउनमध्ये आढळणाऱ्या खागी नांवाच्या पोटजातींतील लोक आपणास चौहाण रजपूत समजतात. परंतु ही गोष्ट वादग्रस्त आहे. अशी एक दंतकथा आहे कीं, कागा, व महेश असे दोन चौहाण रजपूत दिल्लीच्या बादशहाचे सुभेदार होते. सारा वसुली देण्याचें त्यांनीं नाकारल्यामुळें लढाई होऊन तींत ते मरण पावले. त्यांच्या बायकांनीं रूढी विरुद्ध पुन्हा लग्न केलीं पुनर्विवाहाला याच्यात ' काज ' असें स्थानिक नाव आहे, त्यावरून या पुनर्विवाहित संततीला खागी असें नाव पडलें. खागी हा संस्कृत खड्ग शब्दापासून झालेला शब्द आहे अशीहि कोणी व्युत्पत्ती लावितात. खेर नावाचा जुना किल्ला व लखापेरा नावाची आबराई हीं जुनीं स्मारकें या लोकाचें प्राचीन वैभव दाखवितात. खागी हे उत्तम शेती करणार असून मोठे उद्योगी आहेत [क्रूक; सेन्सस रिपोर्ट]

कीकट-एक प्राचीन राष्ट्र. ऋग्वेदात फक्त एकाच ऋचेत (३. ५३ १४) या लोकाचा उल्लेख सांपडतो. त्या ठिकाणी कीकट हे भरतशत्रू असून त्याचा अधिपति प्रमगंद होता असा काहींच्या मते अर्थ लागतो. सायणासारखे काहीं टीकाकार प्रमगंद म्हणजे व्याजखोराचा मुलगा असा अर्थ घेतात. यास्क म्हणतो कीं, कीटक हें एका अनार्य देशाचें नाव आहे (निरुक्त ६. ३२).

पुढील काळीं कीकट हें मगधाचें दुसरें नांव आहे असें समजूं लागलें. वेबरचें म्हणणें असें पडतें कीं कीकट मगधांतलें पण अनार्य नसून आर्य होत. हे कीटकआर्य इतर आर्यांपेक्षां कांहींसे निराळे व पाखंडी मताचे असावेत (इंडिश्च स्टुडिआ, १.१८९; इंडियन लिटरेचर, ७९ टीप). ओल्डनबर्ग व हिलेब्रँट यांना ही वेबरची विचारपसरणी मान्य नाहीं.

रा. शं. पा. पंडित एका निराळ्याच भागाला कीकट देश म्हणत असून आपल्या वेदार्थयत्नात (ऋ. ३. ५३, १४ वरील टीपेंत) पुढील उल्लेख करतातः ' वसईपासून उत्तरेला निर्मळ गावीं कार्तिक वद्य १०, ११ व १२ या तीन दिवशीं यात्रा भरते ती तेथें शंकराचार्यांनीं समाधि घेतल्याचें स्थळ आहे त्या स्थळीं भरते. ती समाधि घेतलेला देश कीकट होय असें म्हणतात.'' पण हें मत कोणाला पटण्यासारखें नाहीं. कीकट म्हणजे मगध हेंच मत बहुमान्य आहे. याच कीकट (मगध) देशात गौतमबुद्धाचा जन्म झाला व बौद्ध संप्रदाय विकास पावला ('मगध पहा').

कीकटांचा आचार कशा प्रकार होता हें रा. चांदोरकरांनी बुद्धाच्या चरित्रांत दिलें आहे (बुद्धोत्तर जग, पृ. १४३-४४). कीकट म्हणजे कैकाडी असें रा. वि. का. राजवाडे

कीटक

मिशा.
डोकें.
डोळे.
पायांचा पहिला जोड.
उर.
पंखांचा पहिला जोड.
पायांचा दुसरा जोड.
पंखांचा दुसरा जोड.
पायांचा तिसरा जोड.
पोट.
नडगी.
पाय.

कीटकाची रचना.

कोळी.

अ.
आ.
इ.
१
अ
आ
२

कोळयाच्या शरीरांतील विणकर.
१ विणकरीरहित पोटाचा खालचा भाग. (अ.) पूर्व, (आ) मध्य, व (इ) पार्श्वभागीय विणकर. २ मध्य-विणकरीतील एक (अ) बारीक विणण्याच्या नळ्या. (आ) नळ्यांतून बाहेर आलेले रेशमी तंतू.)

न.
म.
को.
आ.
ग.

रेशमाचा किडा.

[न-नर. म-मादी. आ-अळी. को-कोश. ग-कोशगर्भ.]

खरजेचा किडा.

कृमिसमूह

जळू.

टेपकृमि.

टेपकृमीचें डोकें.

नारू

अंत.

यांच्या प्रमाणें रा. चांदोरकरहि समजतात.कीकट हा जिप्सी लोकांचा मूळ देश असें रा. राजवाडे म्हणतात.

कीचक—पूर्वी मत्स्यदेशाचा राजा जो विराट त्याचा कीचक हा सेनापति होता. विराटाची राणी सुदेष्णा हिनें याला आपला (मानीव) भाऊ म्हणविलें होतें. हा केकय देशातील असून सूत जातीचा होता असें त्याला द्रौपदीनें सूत या नांवानें भारतांत संबोधिलें आहे त्यावरून दिसतें. याला १०५ कीचक (अनुकीचक) या नांवाचे भाउबंद होते. हा शक्तिमान् व शूर होता. अज्ञातवासात पांडव विराटाच्या घरीं होते त्यावेळीं द्रौपदीनें सैरंध्रीचा वेष घेऊन ती सुदेष्णेची दासी म्हणून राहिली होती. तिजजवळ अतिप्रसंग केल्यामुळे यास भीमानें मारलें.

कीचक जात—कीचक या नांवाची एक जात आसामात आहे. तेथील या जातीची लोकसंख्या सारी पाचशेच्या आत आहे. डाका जिल्ह्यातील भंग्याचीहि हीच जात आहे. या जातींतले लोक आरंभीं दरोडेखोर होते असें म्हणतात. त्यांचा सर्व वस्ती सिबसागरकडे असून हल्लीं ते चहाच्या मळ्यात मजुरी करतात.[सन्सस् ऑफ इंडिया १९११, पु. ३].

कीटक अथवा षट्पद- संघ संधिपाद वर्ग. सबंध प्राणिशास्त्रात हा वर्ग अत्यंत मोठा आहे. झुरळें, टोळ, चतुर, माशा, पिसवा, पतंग, पिगूळ, पोरकिडे वगैरे सर्व प्राणी या वर्गात मोडतात. सहा पाय ही या वर्गांतील प्राण्याची विशेष खूण असल्यामुळें यानां षट्पद असें नांव देण्यात आलें आहे. या वर्गांतील प्राण्याच्या मुख्य खुणा म्हटल्या म्हणजे शीर्ष, वक्ष आणि उदर असे शरीराचे स्पष्ट रीतीनें व्यक्त असलेले तीन प्रदेश होत. शीर्षावर पृष्ठभागीं शृंगें व खालीं दंष्ट्रा, प्रथम पार्श्वोष्ठ व द्वितीयपार्श्वोष्ठ असे भाग लागलेले असतात. वक्ष पृष्ठावर पंखाची एक जोडी अथवा दोन जोड्या बहुधा असतात. श्वासोच्छ्वासाकरिता वातनलिकाचा व्यूह सर्व शरीरात पसरलेला असतो.

परिपूर्णतावस्थेतील रूपांतरें या वर्गांतील प्राण्यांत सामान्यतः दिसून येतात. यांच्यात अगदीं प्रथमावस्था म्हणजे अंडीं, त्यानंतर अळी अथवा सुरवंट; (ही सुरवंटावस्था अत्यंत खादाड असते) पुढें कोश; या अवस्थेत अळी स्वतःभोंवती काहीं आवरण तयार करून त्यांत रहाते. शेवटीं पूर्णावस्था. हीं रुपांतरें सर्वच प्राण्यांत दिसून येतात असें नाहीं. झुरळ, टोळ, गवत्या (प्रेइंग मँटिस) इत्यादि प्राण्यांत याचा मागमूसहि नसतो

कीटक वर्गांतील प्राणी जल, स्थल, आकाश वगैरे सर्व ठिकाणीं असतात.

कीटक वर्गाची सामान्य शरीररचना पूर्णपणें कळण्यास झुरळ याची शरीररचना पाहिलेली बरी. कारण झुरळ हा प्राणी त्या वर्गाचा प्रतिरूप मानल्यास वावगें होणार नाहीं. झुरळाविषयीं पूर्ण विचार केल्यावर या वर्गांतील इतर प्राण्यांतील फरक सहज समजण्यासारखे आहेत.

झुरळ.—हा प्राणी सर्वत्र आढळून येतो. आपल्या इकडे स्वयंपाकघरांत, दूधदुभत्याच्या फडताळात, अडगळींत, पुस्तकें, कपडे इत्यादींच्या पेटयांत, संडासांत हा प्राणी आढळतो. झुरळाच्या निरनिराळ्या जाती आहेत. कित्येकांना पंख असतात तर कित्येकांना नसतात. कित्येक अगदीं खुरटीं असतात.

एखादें झुरळ हातांत घेऊन पाहिलें असतां असें आढळून येईल कीं झुरळात उभयागसादृश्य दिसून येतें. अवयवानां सांधे असून पाय सहाच आहेत. झुरळ वर्गाच्या प्राण्याची हीच विशेष खूण आहे म्हणून यांना 'षट्पद' असें म्हणण्यात येतें.

शीर्षाच्या पृष्ठावर एक जोड, चालावयाच्या संयुक्त पादांच्या वक्षाच्या उदरतलावर तीन जोड, उदरावर श्वसनरंध्रें आणि शरीराचे वक्ष, शीर्ष, उदर असे तीन भाग हीं याचीं सामान्य लक्षणें होत.

झुरळांच्या सुमारें हजार जातींचें वर्णन केलें गेलें आहे. यापैकीं साधारण पाच सहाच माणसाळलेल्या म्हणजे मनुष्यवस्तींत सापडणाऱ्या आहेत. झुरळाची प्रवास करण्याची शक्ति अपूर्व आहे असें म्हणतात. इलिझाबेथच्या कारकीर्दीपर्यंत इंग्लंडांत एक देखील झुरळ आढळून येत नसे. आता अमेरिकन, जर्मन व हिंदुस्थानातील अशीं सर्व प्रकारचीं झुरळें तेथें आढळून येतात.

मुंबईत या सर्व जातींची भरपूर वस्ती आढळते. पुण्यातहि हीं बरींच आहेत. रानटी जाती तर पुष्कळच आहेत. पंख नसलेली मोठी जात अथवा पंखाची जात छेदन क्रियेस चागली. अर्थात् पुढील वर्णन या जातींनाच लागू पडेल.

झुरळें हीं निशाचर आहेत. दिवसा फटींतून वगैरे लपून बसून रात्रीं भक्ष्यशोधनार्थ हीं बाहेर पडतात हीं इतकीं खादाड असतात कीं त्याना सर्वभक्षक असें नाव दिल्यास काहीं वावगें होणार नाहीं. वनस्पती, जोडे, पुस्तकें, कपडे वगैरे काहीं त्याच्या तडाक्यातून सुटत नाहीं.

झुरळ हें कीटकवर्गाचीं जीं आठ अथवा नऊ निरनिराळीं कुळें ठरविलेलीं आहेत त्यापैकीं 'ऋजुपक्ष' (आर्थोप्टेरा) या कुलांत येतें. या 'ऋजुपक्ष' कुलात कीटकसृष्टींत ज्या चार रूपांतराच्या स्थिती अथवा आश्रम असतात ते आढळून येत नाहींत. कोश, अळी वगैरे भेद याच्यात आढळून येत नाहींत. झुरळाच्या अंड्याचा एखाद्या तपकिरीच्या डबीसारखा लहान कोश असतो. या कोशांतून पांढरें परंतु पूर्ण अशा स्थितींतच झुरळ बाहेर पडतें. त्यानंतर कातीं टाकून पूर्ण असें झुरळ लालसर तपकिरी रंगाचें वाढतें.

झुरळाची अन्न वगैरे खाण्याची क्रिया पहावयाची असल्यास थोडेसें अन्न घालून एका लहानशा काचेच्या पेटींत काहीं झुरळें ठेवावींत. म्हणजे प्रथम शृंगानीं (अँटेनी) व प्रथमपार्श्वोष्ठावरील स्पर्शेंद्रियानीं (मॅक्सिलरी पल्प) ते चाचपून पहातात. यानंतर खाण्याची क्रिया दंष्ट्रानीं (मॅंडिबल)

दोन्ही बाजूंनी कशी करतात हें पहावें. ही खाण्याची क्रिया आपल्याप्रमाणें अथवा उंदीर, ससा, बेडूक यांच्याप्रमाणें वरून खालीं जबडा मिटून होत नाहीं; तर दाराच्या फळीप्रमाणें दोन्ही बाजू मिटून खेंकडा, झिंगी वगैरे प्राण्यांप्रमाणें असते.

यानंतर श्वसनक्रिया पहाण्याकरितां उदराकडे वळावें. आपली जशी छाती श्वासोच्छ्वासामुळें लहान मोठी होत असते तसें झुरळाचें उदर लहानमोठें होत असतें. उदरांतून हा श्वासोच्छ्वास होत असल्यामुळें ही उदराची खालींवर होण्याची क्रिया सुरू असते. झुरळाला हीं श्वसनरंध्रयुग्में एकंदर दहा असतात.

झुरळ मारावयाचें असल्यास त्यास प्रथम रुंद तोंडाच्या बाटलींत अथवा कांचेच्या पेल्यात घालावें. व नंतर क्लोरोफार्म, पेट्रोल किंवा मेथिलेटेड स्पिरिट् याचे थोडेसे थेंब त्या बाटलींत टाकावेत म्हणजे थोड्याच वेळांत गुदमरून तें मरतें.

मेलेलें झुरळ हातांत घेऊन पाहिले म्हणजे त्याच्या शरीराचें कवच आपल्याला कठिण असे आढळून येईल. उदराचे भाग दहा असून ते वलयांकित असल्याचें दिसेल. झुरळाचें जें वरचें कवच तेच त्याच्या अस्थी होत. झुरळ हा प्राणी अपृष्ठवंशांतील होय; आणि अपृष्ठवंशातील प्राण्यात एका माखलींशिवाय कोणालाच अंतरास्थी नसतात. खेंकडा वगैरे प्राण्यात या बाह्यास्थी चुन्याच्या द्रव्याच्या असतात; तशा मात्र त्या झुरळात नसतात.

येणेंप्रमाणें सामान्य विवेचन झाल्यावर आतां आपण झुरळाचे जे मुख्य तीन भाग त्यांपैकीं पहिल्या प्रथम उदर घेऊन तपासावयास लागूं.

उदराचे दहा वलयांकित भाग असतात हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. आता या प्रत्येक वलयाचे दोन भाग पडतात-पाठीकडील व पोटाकडील. पृष्ठाकडील भागाला पृष्ठवलयार्ध (टर्गम) व पोटाकडील भागाला अधोवलयार्ध (स्टर्नम) असें म्हणतात. हीं वलयें मागील वलयांत पुढील वलय म्हणजे थोडक्यात कौलांप्रमाणें बसलेलीं असतात. हे वलयांकित भाग जेथें एकमेकावर जातात त्या संधीमधील, त्याचप्रमाणें पृष्ठवलयार्ध व अधोवलयार्ध ज्या ठिकाणीं संलग्न होतात तेथील बाह्यास्थीचे भाग मऊ असतात. पृष्ठवलयार्ध व अधोवलयार्ध यांमधील या संधीस मृदुंग असें म्हणतात.

उदर जरा ओढून वर करून पाहिलें असता मृदुंगात असलेलीं श्वसनरंध्रें स्पष्ट दिसतील. उदरावर याचीं आठ युग्में असून वक्षावर दोन युग्में असतात.

कांहीं झुरळात हीं दहाहि वलयें स्पष्टपणें दिसून येतात. कांहीं झुरळांत विशेषतः माद्यांत आठवा आणि नववा वलयांकित भाग हे सातव्या वलयांकित भागाखालीं इतके झांकून जातात कीं छेदनाशिवाय अगर ताणून पाहिल्याशिवाय ते दिसणें जवळ जवळ अशक्य असतें. दहावा म्हणजे शेवटचा वलयांकित भाग उचलून पाहिला म्हणजे गुदद्वार दिसून येते. गुदद्वाराच्या दोन्ही बाजूस जे कठिण झालेले भाग असतात त्यानां गुदपत्रें अगर गुदपर्णे (पॉडिकलप्लेट्स) असें म्हणतात. कांहीं जीवशास्त्रज्ञ या गुदपर्णांनां अकरावा वलयांकित भाग मानतात. दहाव्या पृष्ठवलयार्धाच्या खालील बाजूनें दोन गुदस्पर्शक रोम (ॲनल सर्सी) बाहेर आलेले असतात. गुदस्पर्शक रोम नर व मादी या दोघांतहि असतात.

अधोवलयार्धांतील प्रथमवलयार्ध अगदीं आदिस्वरूपात असतें. नरात हीं नऊच दृष्टीस येतात. अधोवलयार्धांतील नवव्यास बारीक असंयुक्त असे दोन 'कंटक' झालेले असतात. हे कंटक फक्त नरांतच सापडतात. मादीला हे नसतात. गुदपर्ण व दहावा पृष्ठवलयार्ध भाग हे छेंदले म्हणजे आत सूक्ष्म आंकडे असलेला असा भाग दिसतो.तो दहाव्या अधोवलयार्धाची बाह्य वाढ असावी असे दिसून येते. या वाढीचा उपयोग संयोगीकरण होताना मादीचे जननेंद्रिय उघडण्याकडे होतो.

मादींत फक्त सातच अधोवलयार्ध दिसून येतात. बाकीचीं तीन जननविवर होण्याकरिता सातव्याखालीं झाकलेलीं असतात सातवें अधोवलयार्ध मोठें असून बोटीच्या आकाराचें असते. याचे दोन भाग उभे झालेले असतात. संयोगीकरणांत याचा उपयोग होतोच; शिवाय चिकटून बीजकोश ठेवण्यास नीट जागा सांपडेपर्यंत तो घट्ट धरून ठेवण्याकडेहि याचा उपयोग होतो. पुष्कळ माद्या हा बीजकोश जननविवरात धरून टेविलेल्या स्थितींत दृष्टीस पडतात नेहमीं झुरळांचे निरीक्षण केलें तर हा प्रकार सहज नजरेस येण्याजोगा आहे.

आठवा आणि नववा वलयांकित भाग सातव्याखालीं झांकला गेल्यामुळें त्याचे पृष्ठवलयार्धाचे भाग अत्यंत अरुंद झालेले असतात. मादींत आठव्या वलयांकित भागाच्या अधोवलयार्धावर एक उभें छिद्र असते. हेंच बाह्ययोनीछिद्र होय. नववा अधोवलयार्ध भाग म्हणजे लहानशी बांकडी तबकडी असून हिच्यावर शुक्रकोश असतो. या शुक्रकोशांत नरामधील शुक्राचा संचय केला जातो. बीजकोश बाहेर येतांना या शुक्रकोशाजवळून जातो व तो तसा जात असतांना त्यांत शुक्रातील सूक्ष्म शुक्रबीज प्रवेश करतात व नंतर फलद्रुपता होते.

अखिल कीटकवर्ग घेतला तरी त्यांत वक्षाचे तीन भाग असलेले आपणांस आढळून येतील. शीर्षाकडील प्रथम भागाला 'पूर्ववक्षवलय' असें म्हणतात. त्याच्या जवळचा भाग 'मध्यवक्षवलय' व नंतर उदराजवळचा जो वक्षाचा भाग त्याला 'अपरवक्षवलय' किंवा 'पश्चिमवक्षवलय' असें म्हणतात. उदराच्या वलयाप्रमाणें या वक्षांच्या वलयामध्यें देखील दोन भाग दिसून येतात. पाठीकडील भागाला 'अधोवलयार्ध' असें म्हणतात. पूर्ववक्षवलयाचा पृष्ठवलयार्ध

तिन्ही पृष्ठवलयार्धांमध्यें सर्वांत मोठा असून पूर्वभागीं शीर्षावर पसरलेला असतो व पश्चिमभागीं मध्यवक्षवलयाच्या पृष्ठवलयार्धाला झांकून टाकतो. मध्यवक्षाच्या पृष्ठवलयार्धाच्या बाजूस प्रथमपक्ष असतात. ही पहिली पंखाची जोडी बराच वळकट असून ती निव्वळ उडण्यास उपयोगी पडणारी अशी जी दुसरी पंखाची जोडी असते तिला झाकून तिच्या संरक्षणाचें कार्यहि ही प्रथमपक्षाचीच जोडी करते. दुसऱ्या पंखाची जोडी अपरवक्षपृष्ठवलयार्धाला चिकटलेली असते. ही पंखाची जोडी अगदीं पातळ व लिवलिवीत असून हिच्यावर 'शिरांचें' अगदीं जाळें झालेलं दिसतें. छत्रीच्या काड्या ज्याप्रमाणें छत्रीला उपयोगी पडतात, त्याचप्रमाणें हें जाळें या पंखांनां उपयोगी पडतें. उडत नसताना हे पंख घडीच्या पंख्याप्रमाणें एकमेकांवर झाकले जाऊन प्रथमपक्षाच्या जोडीखालीं ठेवले जातात.

या ठिकाणीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, या पंखावर जें आपण शिरांचें जाळें म्हटलें आहे त्याची 'सपृष्ठवंशातील' प्राण्याच्या शिराशीं अगदीं तुलना करता यावयाची नाहीं. कारण या शिरा जरी रुधिरमार्ग म्हणून उगम पावलेल्या असल्या तरी त्याच्या बहुशः वातनलिका स्थापित झालेल्या असतात.

पंखाची उत्पत्ति प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं वायुनलिकेपासून लाविलेली आहे. मुरळ चिरून पाहिले म्हणजे श्वसनरंध्राना जोडून असलेल्या ज्या वायुनलिका दृष्टीस पडतात व त्याचा जसा आकार, पोकळी इत्यादि सूक्ष्मदर्शकातून दिसतात, त्याचप्रमाणें पंखातील शिरांच्या जाळ्याची रचना स्पष्ट दिसून येते. यावरून वरील म्हणण्यास बरीचशी पुष्टि येते. शिवाय उडावयाच्या वेळीं पंखांत अशी हवा भरली गेली म्हणजे उडणें अर्थात्‌च तितकें सोपें जाणार आहे.

आता प्रत्येक पक्षाच्या अधोवलयार्धावर एक एक पायांची जोडी असते. पूर्ववक्षाचा अधोवलयार्ध फार लहान असतो. मादींमध्यें पूर्णपणें व नरामध्यें अल्पांशानें मध्यवक्षाचा अधोवलयार्ध उभा दुभागलेला असतो. अपरवक्षाचा अधोवलयार्ध मात्र दोहोंमध्येंहि विभागलेला असतो.

सर्व कीटकवर्गामध्यें फक्त सहाच पाय आढळून येतात. यावरून याला षट्पादवर्ग असें म्हणण्यात येतें. यांपैकीं प्रत्येक पायांची जोडी वक्षाच्या प्रत्येक वलयाला एक एक याप्रमाणें जोडलेली असते. या पायांना चलनवलन करता यावें म्हणून ठिकठिकाणीं सांधे असतात.

पायाचे साधारणतः पांच विभाग असतात. पहिल्या भागाला कटिसंधि (कोक्सा), दुसऱ्यास द्वितीयसंधि (टोकँटर) व तिसऱ्यास ऊरुसंधि (थाय) व चवथ्यास जंघासंधि (टिबिआ) असें म्हणतात. शेवटीं अगदीं तळवा अथवा कूर्चसंधि येतो. तळव्याचे सहा भाग असून गुळगुळीत जागेवरूनहि झुरळास चालता यावें म्हणून त्यास काटेरी गिरद्या असतात. तळव्याच्या अगदीं शेवटच्या भागास नखयाचा एक जोड असतो. व त्यामध्यें एक लहानशी गिरदी असते.

येथवर उदर व वक्ष यांविषयीं विवेचन झालें. आतां आपण राहिलेल्या भागाकडे वळूं. हा राहिलेला भाग म्हणजे शीर्ष होय.

वक्ष व उदर याचे निरनिराळे वलयांकित भाग आपणास नेत्रांनीं सहज दिसण्याजोगे असतात. त्याप्रमाणें शीर्षामध्यें मात्र ते नसतात. पूर्णावस्थेंत तर हे भाग सहज दिसून येणें शक्य नसतें. गर्भाची वाढ होत असतानाच हे भाग स्पष्टपणें दिसून येणें शक्य असतें. आणि हें निरीक्षण करूनच प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं शीर्षाचे सहा भाग ठरविले आहेत ते असेः—(१) पहिल्या भागावर म्हणजे शृंगाच्या पुढें नेत्र असतात. (२) शृंग असलेला भाग. (३) पूर्वदंष्ट्राभाग--हा भाग गर्भवाढ होत असतानाच नाहींसा होतो. (४) दंष्ट्राचा भाग. (५) प्रथमपार्श्वोष्ठाचा भाग. (६) द्वितीयपार्श्वोष्ठाचा भाग.

सदरहूप्रमाणें डोक्याला आच्छादणारा जो कठिण भाग असतो त्यास ऊर्ध्वकपालकवच (एपिक्रेनियम) असें म्हणतात. या शीर्षकवचावर इंग्रजींतील वाय् या अक्षराप्रमाणें मधोमध संधिरेषा असते. मात्र ही संधिरेषा उलटी असते. म्हणजे त अक्षर उलटें करून त्याचा जसा आकार होईल तसा त्या संधिरेषेचा आकार असतो. या संधिरेषेचे खालील जे दोन पाय अथवा फाटे असतात त्याच्या दोन्ही टोकास दोन पांढरे वर्तुलाकृति अवयव असतात. या अवयवाचें कार्य काय असावें याविषयीं निश्चित असें काहींच सांगता येत नाहीं. कित्येकांच्या मतें हे झुरळाचे साधे नेत्र असावेत तर कित्येक हें त्याचें घ्राणेंद्रिय आहे असें प्रतिपादितात.

संधिरेषेच्या खालील शीर्षाचा जो भाग असतो त्यास पुरःकपालकवच (क्लायपिअस) असें म्हणतात. या पुरःकपालकवचयाच्या खालील बाजूस एक पदर जोडलेला असतो त्यास उर्ध्वोष्ठ असें म्हणतात. नंतर नेत्राच्या मागें व खालीं असा आलेला जो भाग असतो त्यास 'कपोल' असें म्हणतात.

शीर्ष हें वक्षाला अत्यंत लहान अशा मानेनें जोडलेलें असतें. शीर्षाच्या दोन्ही बाजूस दोन काळसर भाग दिसतात ते दोन संयुक्त नेत्र होत. निरनिराळ्या नेत्राचा हा समूह असल्यामुळें यास संयुक्त नेत्र असें म्हणतात. यातील प्रत्येक नेत्र जर सूक्ष्मदर्शकातून पाहिला तर त्याचा आकार बाहेरून षट्कोनी असल्याचें दिसून येतें

वरच्या बाजूनें उर्ध्वकपालकवच, खालच्या बाजूनें पुरःकपालकवच व बाहेरील बाजूंनीं नेत्र याच्यामध्यें शृंग लागलेले असतें. याचे सत्तर ते नव्वद संधिभाग असतात.

याच्यावर पुष्कळ काटेहि असतात. यांचा उपयोग स्पर्शेंद्रियासारखा होतो. कांहीं शास्त्रज्ञ त्यांचा उपयोग घ्राणेंद्रिय व कर्णेंद्रिय यांच्याप्रमाणेंहि आहे असें म्हणतात. साधारणतः सबंध कीटकसृष्टींत या शृंगांची एकापेक्षां अधिक जोडी आढळून येत नाहीं. पुष्कळ वेळां नर कीं मादी हा भेद या शृंगावरून ठरविता येतो. ढोबळ दृष्टीनें पाहूं गेलें तर झुरळांत यावरून कांहींच ठरविता येणार नाहीं. तरी पण सूक्ष्म निरीक्षणानें हें शृंग नराला मादीपेक्षां लांब असल्याचें आढळून येईल. शिवाय या शृंगाच्या तळापासून तिसरा संधिविभाग मादींत नराच्या दुप्पट लांब असतो. शीर्ष, वक्ष व उदर या तिन्ही भागाचें बाह्य पर्यालोचन आतां संपलें. आता छेदनक्रियेकडे आपणांला वळावयाचें आहे.

प्रथमतः आपण तोंडांतील निरनिराळया भागांकडे वळूं. तोंडाची पूर्वमर्यादा दर्शविणारा भाग म्हटला म्हणजे ऊर्ध्वोष्ठ (लेब्रम) होय. त्याच्या बाजु, दंष्ट्राची जोडी व त्याच्या खालीं दबलेला प्रथमपार्श्वोष्ठाची जोडी ह्यानीं झालेल्या आहेत. त्यची पश्चिममर्यादा दर्शविणारा भाग म्हणजे द्वितीयपार्श्वोष्ठांची जोडी होय. हे भाग नीटपणें काढतां येण्यास झुरळाचें तोंड वर केलें पाहिजे. एवढ्याकरिता झुरळाचें आपण ज्या बशींत छेदन करणार (अशा बशा पॅराफिन् अथवा मेण घालून केलेल्या असतात) तींत त्याला उलटें ठेवावें व पूर्ववक्षाच्या दोन्ही बाजूंस पृष्ठवलयार्धाला दोन टांचण्या थोड्या तिरप्या (त्यांचीं वरचीं टोंकें शरीरावर येणार नाहींत अशा तऱ्हेने) टोंचाव्यात नंतर तोंड थोडें ओढून अर्थात् मानेला थोडा ताण देऊन तिच्याहि एका अगर दोन्ही बाजूंनां—ज्याप्रमाणें सोयीस्कर पडेल त्याप्रमाणें-- टाचण्या टोंचाव्यात, म्हणजे तें त्याच स्थितींत स्थिर राहील. नंतर धाकटा चिमटा घेऊन (ज्या चिमटयाचीं टोंकें बारीक असतात) त्यानें उर्ध्वोष्ठाच्या पुढून तो आंत घालून तो अवयव शक्य तितक्या सावधगिरीनें बाहेर ओढून काढावा. यापेक्षां प्रथम उर्ध्वोष्ठच चाकूच्या मदतीनें चिमटयानें सोडवून घेतल्यास चांगलें. यानंतर प्रथमपार्श्वोष्ठ (फर्स्ट मॅक्सिला) व दंष्ट्रा (मॅंडिबल्स) सोडवून घ्यावींत. हीं सोडवून घेतल्यावर करसूक्ष्मदर्शकानें अथवा छेदनसूक्ष्मदर्शकांतून यांचें निरीक्षण करावें. ह्या दंष्ट्रा (मॅंडिबल्स) म्हणजे झुरळाच्या दाढा होत. यांमध्यें निरनिराळे विभाग नसतात.त्या अत्यंत बळकट असून त्यांच्या आंतील कडेला सहा अथवा सात दांते असतात. त्या पुरःकपालकवच व ऊर्ध्वकपालकवचाच्या खालील टोंकाशीं जोडलेल्या असतात.

दोन्ही पार्श्वोष्ठ फांद्या फुटून बनलेले असतात. त्या प्रत्येकाला दोन भागांचा मूळसंधि (प्रोटोपोडाइट) असून त्याच्यापुढें अंतःप्रसर (एंडोपोडाइट) व बहिःप्रसर (एक्सोपोडाइट) मिळून त्याचे तीन विभाग असतात.

मूलसंधि म्हणून जो भाग आपण म्हणतों त्याच्याच अंतःप्रसर व बहिःप्रसर या फाद्या असल्याचें दिसतें. अंतःप्रसर भाग दोन अवयव मिळून झालेला असतो. त्यास ' गॅलिआ लॅसिनिआ ' व 'तपासीनिआ' असें म्हणतात. मूळ संधीच्या भागाचे दोन उपभाग असतात त्यांस संघसंधि (कार्डो) व ' स्तंभसंधि (स्टिपिओ) असें म्हणतात. यांतील ग्यालीआचा आकार गोल चपटा झालेला असून त्यांवर कठिण असे केंस असतात. या ग्यालिआच्या योगानें लॅसिनिआचीं तीक्ष्ण टोंकें असतात त्यांचें संरक्षण होतें. बहिःप्रसर लॅसिनिआ व गॅलिआ जेथून निघतात त्यांच्याजवळूनच म्हणजे स्तंभापासूनच निघतो. याचे फिरून पाच तुकडे असतात. प्रथमचे जे याचे भाग असतात ते फार लहान असतात. बाकीचे तीन लांब लांब असतात. या सर्व भागांवर लहान लहान केंस असतात.

द्वितीय पार्श्वोष्ठाकडे (सेकंड मॅक्सिलि) आता आपण वळूं. द्वितीयपार्श्वोष्ठ साधारणतः प्रथमपार्श्वोष्ठासारखाच असतो. याचे मूळसंधिभाग मात्र एकत्र सांधलेले असतात. त्याच्या दोन तुकड्याची एक तबकडीच झालेली असते असें म्हटल्यास चालेल. या तबकडीच्या भागाना ऊर्ध्वहनु (सबमेंटम्) व हनु (मेंटम्) अशीं नावे आहेत. हनु (मेंटम्) लहान असून त्यालाच अंतःप्रसर व बहिःप्रसर हे भाग जोडलेले असतात. दोन्ही अंतःप्रसराना कधीं कधीं एकदम जिव्हिका (लिगुला) असें नाव देण्यात येते यातहि लॅसिनिआ व पॅराग्लॉसी असे प्रथमपार्श्वोष्ठाप्रमाणेंच दोन भाग असतात. बहिःप्रसराचे तीन तुकडे असून त्या भागाला ओष्ठस्पर्शेंद्रिय (लेबिअल् पल्प) म्हणतात.

छेदनास आरंभ करण्यापूर्वी झुरळाचे पंख व पाय अजीबात कापून टाकून त्याचा पृष्ठभाग वर करावा व दोन्ही बाजूंनीं टाचण्या टोंचून मेण घातलेल्या ताटलींत अथवा बुचाच्या लांब पसरट तुकड्यावर त्याला घट्ट बसवावें. कित्येक वेळा मेण थोडें वितळवून त्यांत खालचा भाग चिकटवून बसवितात. या मेणात काजळ घातल्यास चांगलें. कारण मागील बाजू काळी झाल्यामुळें झुरळाचे भाग स्पष्ट दिसून येतात. अशा रीतीनें झुरळ घट्ट बसल्यावर मग छेदनास आरंभ करावा. पहिल्या प्रथम पृष्ठवलयार्ध व अधोवलयार्ध यांमध्यें जी कड असते ती अगदीं हलक्या हातानें चिरून घ्यावी. ही कड उदर व वक्ष यांच्या दोन्ही बाजूनें घ्यावी. नंतर हलकेंच एकामागून एक तुकडा सोडवून टाकावा. ही सर्व छेदनक्रिया पाण्यांत केल्यास फार चांगलें. पाण्यांत सर्व भाग जसेच्या तसेच राहून स्पष्ट दिसतात. शिवाय वलयाचे भाग काढून टाकतांना त्यांच्याच खालीं असलेलें हृदय जाऊं न देण्याची खबरदारी घ्यावी.

शीर्षाच्या अलीकडील म्हणजे पूर्ववक्षासकट पृष्ठाकडील सर्व अर्धवलयें काढून टाकलीं म्हणजे झुरळाचें अंतःकपाट

मोकळें झालें. हें सर्व पांढरट पदार्थानें भरून गेल्याचें आढळून येईल. ही सर्व चरबी होय.

अगदीं बाल्यावस्थेंत झुरळाच्या कवचमय वेष्टनातून हृदयाची संकोचन व प्रसरण क्रिया स्पष्टपणें पहावयास सापडते. हें हृदय म्हणजे एक लांबच लांब नळी असून ती पूर्ववक्षापासून उदराच्या शेवटापर्यंत गेलेली असते. ही स्नायूंची असते. अन्ननलिकेच्या वरील बाजूस हिचा शेवट असतो. त्याचप्रमाणें शरीराच्या इतर भागातून जाताना याला बाजूनीं फाट्या वगैरे फुटत नाहींत.

शरीराच्या सर्व पोकळींत खूप चरबी भरलेली असते. ही पांढरट असून तिच्यात तेलाचे थेंब व कांहीं टाकाऊ पदार्थ सापडतात. वातनलिकाचें जाळें या चरबींत सर्वत्र असते.

चिमटा, चाकू व कात्री यांच्या साह्यानें शक्य तितकी चरबी काढून टाकावी. यानंतर पचनेंद्रियनलिका बाजूला काढून घ्यावी. ही काढताना वातनलिका व चरबी हीं खरडून टाकावींत. मात्र असें करताना, अन्ननलिकेजवळचे लालापिंड, माल्पिघिअन नलिका व मागच्या बाजूकडील जननेंद्रिय न दुखविण्याची विशेष काळजी घ्यावी.

पचनेंद्रियाचे साधारण तीन भाग करतात ते असेः—

प्रथम भाग अथवा पूर्वपचनेंद्रिय	तोंडांतील पोकळी (मुख क्रोड) अन्ननलिका (ओइसोफॅगस) अन्नाशय (क्रॉप) मंथनिका अथवा मंथिनी (गिझर्ड)
द्वितीय भाग अथवा मध्यम पचनेंद्रिय	चिलीफिकस्टमक
तृतीय भाग अथवा पश्चिमपचनेंद्रिय	तन्वात्र (इलिअम) बृहदात्र (कोलोन) गुद (रेक्टम)

प्रथमभागावर शरीरपृष्ठावरील कवचाचें चिटीन आवरण आतून पसरलेलें असतें. मुखक्रोडात एक लहानशी जिव्हा असते. मुखक्रोडापासूनच अन्ननलिका निघते. ही अन्ननलिका डोक्याच्या वरच्या भागावरील मेंदूवत् ज्ञानकंदाच्या खालीं त्यांच्यापासून निघालेल्या पार्श्वरज्जूंचे जें एक वर्तुळ होतें त्यामधून जाते. वक्षातून पुढें जाताना ही रुंद होत जाऊन तिचा अन्नकोश अथवा आहारकोश नंतर आवळून जाऊन त्याच्यापेक्षा जाड असलेली अशी स्नायूंची मंथिनी (गिझर्ड) होते. मंथिनी (गिझर्ड)चा आडवा छेद घेऊन पाहिल्यास तींत सहा कठीण दाते असल्याचें आढळून येतें. या मुख्य दात्यामध्ये लहान लहान उंचवटेहि पुष्कळ असतात. या दात्यांच्या पुढें लहान लहान कंटकयुक्त सहा गिरद्यासारखे अवयव असतात. त्यांचा उपयोग अन्न गाळण्याप्रमाणें होतो. प्रथमभाग येथें पूर्ण होतो.

मध्यभाग म्हणजे फार अरुंद व आखूड नलिका असते. हिच्याच पुढील बाजूस यकृतअंधनलिका (हेपॅटिक कॅलिआ) असतात. या सात अथवा आठ असतात.

पश्चिमभाग अथवा तृतीय भाग मागच्या बाजूस वेष्टिलेला असून पूर्वभागाप्रमाणें तो देखील कवचानें वेष्टिलेला असतो. या पश्चिमभागाचा प्रथमभाग लहान व अरुंद असून त्यालाच माल्पिघिअन नलिका जोडलेल्या असतात. त्यांचा उपयोग मल अथवा किडन्याजकाप्रमाणें होतो. विशेषतः कीटकसृष्टींत त्या नैट्रोजनयुक्त त्याज्य द्रव्य टाकतात. त्या एकंदर साठसत्तर असतात. त्यांचा रंग पिंवळसर असतो. व लांबी एक इंच असून सर्व उदरभर त्या पसरलेल्या असतात. या पूर्वभागाला आत्र अथवा तन्वांत्र असें म्हणतात. पश्चिमभागाचा जो मध्यभाग असतो तो चांगला लांब रुंद असून त्यास बृहदात्र असें म्हणतात. यानंतरचा भाग म्हणजे 'गुद' होय व तो गुदद्वाराच्या योगानें बाहेर उघडला जातो.

झुरळाचे लालापिंड फार मोठे असतात. हे पुष्कळसे गोलक एके ठिकाणीं मिळून झालेले असतात. निरनिराळ्या स्रोतस नलिकांनीं ते एकत्र साधलेले असतात. या स्रोतसनलिकाचें पुढें एकच स्रोतस होऊन तें अन्ननलिकेच्या बाजूने जाऊन जिभेच्या जरा अलीकडे तोंडात उघडते. हे लालापिंडाचे झुबके अन्ननलिकेच्या दोन्ही बाजूंस असतात.

पुंजननेंद्रियेंः—लहान (वयानें) झुरळात त्यांच्या उदराच्या पाचव्या पृष्ठवलयाधाखालीं मुष्क असतात. हाहि एक शाबुदाण्यासारख्या गोळ्याचा झुबका असून त्यानाच पुढें स्रोतस जोडलेलें असतें. शुक्रस्रोतस म्हणजे मुष्कामधून वीर्य नेणारी नळी. ही सर्व चरबीनें पूर्ण वेष्टिलेली असल्यामुळें सापडण्यास फार कठीण जाते. वयातींत नरामध्यें याचें काम झाल्यामुळें त्या झिजून जातात व त्यामुळें त्याच्यात त्या कधींहि सापडत नाहींत. दोन्हीं बाजूंचे शुक्रस्रोतस मागें खालीं येऊन शुक्राशयाला मिळतात. झुरळ अगदीं लहान असतांना त्याचा पाढरा रंग गेला असतांना त्याच्यामध्यें हा शुक्राशय बनतो व तो प्रत्येक बाजूवर लहान दीर्घवर्तुलाकृति असतो. पुढं दोहोंबाजूवरील शुक्राशय एकवटून व फुटून त्याचा एकाद्या गोंड्याप्रमाणें किंवा तुऱ्याप्रमाणें आकार होतो. या गोंड्यासारख्या शुक्राशयाच्या बुंध्यापासून निक्षेपण स्रोतस निघतं व तें गुदद्वाराच्या खालीं बाहेर उघडतें. यानंतर संयोग आंकडे येतात. याचा उपयोग पूर्वी सांगितलाच आहे.

स्त्रीजननेंद्रियेंः-अंडकोश म्हटला म्हणजे लहान लहान होत गेलेल्या आठ नलिकांचा झालेला असून त्या नलिका अंडकोशामध्यें येऊन मिळतात. प्रत्येक नलिकेची लांबी सामान्यपणें दहा मिलिमीटर असून तींत लहानमोठ्या आकाराची अंडी एकापाठीमागें एक असल्यामुळे ती एखाद्या माळेप्रमाणें दिसते. अंडस्रोतसाच्या जवळील अंडी मोठाली असून वरील बाजूचीं बारीक असतात. लहान अंड्यांमधील केंद्र स्पष्ट दिसतें व त्यामध्यें कल्क किंवा बलक बहुधा नसतोच.परंतु तीं मोठमोठीं

होत जाताना हळूहळू त्यांच्यात कल्क अथवा बलक जमत जाऊन चैतन्यकेंद्र दिसतासें होतें. या सर्व नलिका वरच्या बाजूनीं बारीक धाग्यांशीं एकत्र मिळालेल्या असतात. अंडस्रोतसें लहान असून आठव्या अधोवलयाधारील योनींत तीं उघडतात. अंडस्रोतसें एकत्र मिळण्याच्या पुढील भागीं म्हणजे नवव्या अधोवलयावर एक लहानशी पिशवी असते. हाच शुक्रकोश होय. शेवटच्या ज्ञानकंदाच्या जोडीजवळच मागील बाजूस हा असतो.

या शुक्रकोशाच्या मागील बाजूस पुष्कळसे फाटे फुटलेले व पांढुरके असे लुकणपिंड असतात. याच्यातून बीजकोश ज्या पदार्थाचा बनलेला असतो तो पदार्थ स्रवतो. यातील डावीकडचा भाग उजव्यापेक्षा मोठा असतो.

ज्ञानेंद्रियव्यूहः—कटिकवर्गातील ज्ञानेंद्रियव्यूह सामान्यपणें गांडूळ अथवा खेंकडा या प्राण्यातील व्यूहरचनेप्रमाणेच असतो. म्हणजे प्रत्येक भागाला दोन ज्ञानकंदाचे मणी असून त्यांतून ज्ञानरज्जू जात असतात. प्रत्येक वलयाला ज्ञानकंदाचा मणी बहुशः असतोच. मात्र कित्येकवेळा कांहीं मणी एकत्र संघटित झालेले असतात.

शीर्षामध्यें अन्ननलिका पार्श्वज्ञानरज्जूंच्या कमानीनें वेष्टित असते. हे पार्श्वज्ञानरज्जू मेंदूवत शीर्षज्ञानकंदाच्या जोडीपासून निघून अन्ननलिकेच्या खालील बाजूस दोहोंबाजूनें मिळतात. हे पहाण्याकरिता पुरःकपालकवच व उर्ध्वकपालकवच हे शीर्षावरील भाग चाकूनें काढून घेतले पाहिजेत. नंतर कपोल, दंष्ट्रा व पार्श्वोष्ठाचे कांहीं भाग काढून टाकावेत. म्हणजे अन्ननलिकेसभोंवतालची कमान दिसून येईल.

हे सर्व भाग नीटपणें पहावयाचे असतील तर आल्कोहलमध्यें घालून ज्याचे सर्व भाग कठिण झाले आहेत असें झुरळ घेतल्यास चांगले

मेंदूवत शीर्षज्ञानकंदाची जोडी दोन ज्ञानकंदांचे गोलक बनून झालेली असते. या गोलकापासून नेत्र, शृंगे वगैरेंना ज्ञानरज्जू जात असतात. यातूनच खालील बाजूनें ऊर्ध्वोष्ठाला ज्ञानरज्जू जातात. एवढ्यावरून मेंदूवत शीर्षज्ञानकंदाची जोडी तीन ज्ञानकंदाच्या जोड्या संयुक्त होऊन झालेली असावी असें अनुमान निघतें.

मेंदूमधून निघणाऱ्या दोन्ही बाजूंच्या ज्ञानरज्जू अन्ननलिकेच्या खालीं येऊन एकत्र मिळतात. तेथें अन्ननलिकाधोज्ञानकंदांची जोडी असते. यांमधून तोंडाचे मागील भाग, दंष्ट्रा, पार्श्वोष्ठाच्या दोन्ही जोड्या यांना ज्ञानतंतू जात असतात. यावरून हा ज्ञानकंदांचा गोलक देखील तीन भाग मिळून झाला असावा असें शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. यानंतर वक्षाच्या ज्ञानकंदाच्या गोलकांना सुरवात होते.

छेदनानंतर ही ज्ञानकंदाची साखळी नीट दिसावी म्हणून पचनेंद्रियें व जननेंद्रियें बाजूला काढावींत. त्याचप्रमाणें चरबी, स्नायू वगैरे खरडून टाकावींत. अशा रीतीनें वक्ष व उदर यांच्या खालच्या बाजूनें जाणारी ज्ञानकंदांची साखळी स्पष्ट दिसूं लागेल.

वक्षाच्या प्रत्येक वलयात ज्ञानकंदाच्या गोलकांची एक जोडी असते. उदरांत फक्त सहाच जोड्या सांपडतात. शेवटली जोडी सातव्या अधोवलयाधावर असते. व हिच्यांतूनच मागील भागाना फांटे जातात.

उदरातील निरनिराळ्या भागांना जाणारें देखील ज्ञानरज्जूचें एक जाळें असतें.

श्वसनेंद्रियेः—झुरळाच्या उदर व वक्ष याच्यावर श्वसनरंध्रें असतात हें आपणास माहीत आहेच. या श्वसनरंध्राना जोडून असणाऱ्या वातनलिका सर्व शरीरभर पसरलेल्या असतात. या वातनलिका शरीरातून भागाभागातून गेलेल्या असल्यामुळे प्राणवायूचा पुरवठा सर्व भागास अगदीं प्रत्यक्षपणें मिळत असतो. या नलिकाहि एकमेकात मिळून त्यांचें एक सर्व शरीरभर जाळेंच पसरलेलें असतें. अशा रीतीनें प्राणवायूचा पुरवठा असल्यामुळे रुधिराभिसरणाचा व्यूह अथवा शिरा धमन्यांचें जाळें असण्याची जरूरी नाहीं आणि याच कारणामुळे हृदयाशिवाय इतर रक्तवाहिन्या झुरळात दिसून येत नाहींत.

वातनलिका परिपूर्णतावस्थतील बाह्यास्तरापासून आलेल्या असतात. अर्थात चिटिन्चें लवचिक व नागमोडी रीतीनें बनलेलें अंतरवेष्टन त्यात आलेलें असतें. याच्यामुळे त्याना ताठ उघडे रहाता येते.

सूक्ष्मदर्शकातून एखादी वातनलिका पाहिल्यास हें नागमोडी अंतर्वेष्टन स्पष्ट दिसून येतें.

जनन अथवा प्रजोत्पादनः—संयोगानंतर शुक्रमादींतील शुक्रकोशात साठवेल जातो. अंडें ३ मि. मि. लांब असून त्याला लालसर तपकिरी कवच असते; व त्याच्या कडेच्या बाजूस अत्यंत सूक्ष्म अशीं छिद्रें असतात. योनींतून अंडीं बाहेर जाताना शुक्रकोशातून शुक्रबीज येऊन या बारीक छिद्रातून आत जातात व गर्भाभिवन होतें.

एका वेळीं सोळापर्यंत अंडीं घातलीं जातात. हीं संयोगआकड्याच्या मध्यें पकडलीं जाऊन लुकणपिंडांतील लुकणाच्या स्रावानें त्याच्या भोंवतीं एक कोश बनविला जातो. प्रथम हा बीजकोश मादी जननविवरामध्यें आठवडापर्यंत धरून ठेविते. नंतर चांगलीशी निवाऱ्याची जागा पाहून तेथें तो चिकटविते.

उत्तरयूरोपात अंडीं एक वर्षपर्यंत उबलीं जात नाहींत परंतु हिंदुस्थानात बीजकोश घातल्यानंतर एक महिन्याच्या आंत झुरळें बाहेर आल्याचें दृष्टीस पडलें आहे. शैशवावस्थेंत यांचा रंग पांढरा असतो. परंतु लवकरच तीं काळसर पिंगट अथवा तांबडीं व्हावयास लागतात. पंखांशिवाय त्याचे सर्व भाग मोठ्या झुरळाशीं जुळतात. सर्व आयुष्यांत तीं सात वेळां कात टाकतात कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें हिंदुस्थानी झुरळें पूर्णावस्थेस येण्यास चार वर्षे लागतात परंतु हा सर्व परिस्थितीचा

प्रश्न आहे. थंड हवेत पूर्णावस्था प्राप्त होण्यास उष्ण हवेतील कालापेक्षां जास्त काळ लागतो.

वर्गीकरणः—कीटकवर्गाचे एकंदर आठ गण पाडलेले आहेत, ते असेः—

(१) हीनपक्ष.-(ॲप्टेरा)यास पंख नसतातः अगावर खवले अथवा केंस असतात. रूपांतर अगदीं होत नसतें. क्वचित नेत्रहि नसतात. उदराच्या शेवटीं कित्येकाना लांब दोन तीन केंस असतात. उदाहरण-कसर.

ऋजुपक्षः-(आर्थोप्टेरा) यास पंखाच्या दोन जोड्या असून पुढलीच्या खालीं मागली जोडी झाकलेली असते. पहिली जोडी कठिण असून दुसऱ्या म्हणजे उडण्याच्या उपयोगी असणाऱ्या पंखाच्या जोडीचें रक्षण करण्याचें काम तिच्याकडे असतें. रूपांतर अर्धवट होत असतें. तोंडात चावून खाण्याच्या दाढा असतात. उदा.—टोळ, झुरळ, गवत्या

(३) शिराल पक्ष (न्यूरॉप्टेरा). पातळ लवचिक पंखाच्या दोन जोड्या, पंखावर पुष्कळशा शिरा, तोंडात चावून खाण्याजोगी रचना. रूपांतर कधीं पूर्णपणं होत तर कधीं अपूर्ण असतें. उदा.-चतुर, वाळवी.

(४) कवचपक्षः—(कोलेओप्टेरा) यांची पंखाची पहिली जोडी अत्यंत कठीण झालेली असते. तोंडात चावून खाण्याची योजना केलेली असते रूपांतर पूर्णपणें होत असते. उदा. पिगळू.

(५) विरलपक्ष(हिमेनॉप्टेरा):-पंख अत्यंत पातळ. तोंडात चावून च ढण्याजोगी रचना. रूपांतर पूर्ण होते. उ. मधमाशी, गांधीलमाशी, मुंगी.

(६) अर्धकवचपक्षः-(हेमिप्टेरा) तोंडात टोंचून शोषून घेण्याजोगी व्यवस्था. पंख कधीं सारखे कधीं विषम. रूपांतर अपूर्ण. उदा. ढेकूण, उवा.

(७) द्विपक्ष (डिप्टेरा):-पंखांची एकच जोडी तोंडांत निव्वळ चाटून शोषण्याजोगी रचना. रूपांतर पूर्ण. उदा. डास, माशी, पिसू इत्यादि.

(८) सशल्क पक्ष (लेपिडॉप्टेरा):—पंखाच्या दोन जोड्या. त्यांवर चित्रविचित्र खवले. पार्श्वभागाची लांबचलांब नळीसारखी सोंडा बनणें रूपांतर पूर्ण.उ. पतंग. [लेखक— प्रो. व्ही. एन. हाटे; प्रो. टी जी. यवलेकर].

कीटस् जॉन—(इ. स. १७९५—१८२१) एक इंग्रजी कवि. कीट्स या इंग्लिश कवीचा जन्म लंडन येथें झाला. त्याने लहानपणीं थोडाबहुत वैद्यकीचा अभ्यास केला. परंतु काव्याकडे त्याचा तेव्हापासूनच फार कल होता. त्याच सुमारास त्याची लीहंट व शेले या कवींशीं ओळख झाली व या ओळखीनें त्याला काव्यस्फूर्ति होऊन तो कविता करूं लागला. त्यानें प्रसिद्ध केलेलीं पहिलीं दोन पुस्तकें लोकांना पसंत पडलीं नाहींत. परंतु त्याच्या तिसऱ्या पुस्तकाच्या प्रसिद्धीपासून त्याची उत्तम इंग्लिश कवींत गणना होऊं लागली. तरी ' एंडिमियन 'वरच ब्लॅक वुड् व कार्टर्ली रिव्हू या नियतकालिकातून फार कठोर टीका आली. त्यानें लिहिलेलें 'लॅमिआ' हें काव्य त्यांतील लहान सहान दोषाकडे दुर्लक्ष केल्यास इंग्लिश भाषेंतील काव्यांत फारच उत्तम ठरतें. हायपेरिअन हें काव्यहि लॅमिआइतकेंच सरस आहे. त्यानें लिहिलेल्या चतुर्दश चरणात्मक काव्यात ' ऑन फर्स्ट लुकिंग इन्टू च्यापमन्स् होमर ' हें सर्वात उत्तम आहे. ' ऑटम ' ' नायटिंगेल ' व 'मेलंकली ' हीं त्याच्या बोधपर लघुकाव्यात चांगलीं समजतात. त्याच्या ' ओथो दि ग्रेट ' या खेळात असलेल्या काहीं ओळीवरून या कवीला शेक्सपियरच्या बरोबरीचा म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. रसात्मक काव्यें या जगात पुष्कळ आहेत, परंतु कीटसचीं काव्यें या सर्वांत फारच मनोवेधक आहेत. हा कवि निसर्गसौंदर्यप्रिय असून ग्रीक भाषेंतील काव्याप्रमाणे याच्या काव्यांतील विषयलोलुपता मर्यादित आहे.

त्याच्या काव्यातील वैशिष्ट्य म्हणजे प्रबल वैषयिक कल्पना आणि सौंदर्यप्रेम फार चांगल्या रीतीने वर्णन करण्याची हातोटी आणि अतिशय कर्णमधुर अशी पद्यरचना हीं होत. गरीबी प्रेमसंबंधात झालेली निराशा व आनुवंशिक क्षयरोग यामुळें लहान वयातच त्याला मृत्यु आला. त्याचा कविमित्र शेले याने त्याच्या मृत्यूवर एक ॲडोनिस नावाचें काव्य लिहिले आहे.

कीन चार्लस सॅम्युएल—(इ.स. १८ ३ -१८९१) सॅम्युएल ब्राउन कीन नावाच्या सॉलिसिटरचा मुलगा चार्लस कीन हा मोठा कलाभिज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. इप्सविचच्या शाळेंत शिकत असतांनाच त्याचा कल, कलेकडे असलेला दिसून आला. बापाच्या मृत्यूनंतर लंडन येथील एका वकिलाकडे त्यास पाठविण्यांत आलें. परंतु तो धंदा त्यास कंटाळवाणा वाटला. म्हणून पिलकिंगटन नांवाच्या एका शिल्पज्ञाकडे तो शिकावयास राहिला. तेथें हा फावल्या वेळांत ऐतिहासिक व नौकाविषयक चित्रे पाण्याच्या रंगानें काढीत असे. त्याच्या आईच्या खटपटीमुळें लांकडी खोदीव कामें करणाऱ्या मंडळीकडे त्यानें पांच वर्षें उमेदवार म्हणून काढिलीं. " दि ॲडव्हेंचर्स ऑफ डिक बोल्ड हिरोइन सर्च ऑफ हिज अंकल " या नांवाच्या पुस्तकाचें दर्शनी चित्र हेंच चार्लसचें पाहिलें चित्र होय. पुढे त्यानें एक प्रकाशलेखगृह (स्टुडिओ) भाड्यानें घेतलें व " इलस्ट्रेटेड लंडन न्यूज " काढण्याच्या तो तयारीस लागला. या वेळीं तो क्लिपस्टन रस्त्यांतील कलाभिज्ञ मंडळाचा एक सदस्य होता. १८५१ सालीं " पंच " पत्रातून तो प्रथमच लोकांपुढें आला. समव्यवसायी लोकांत आनंद व नैराश्य अशा संवेदना अगदीं एकाच वेळीं उत्पन्न करणारे त्याचे सर्वोत्कृष्ट गुण तो उमेदवारीच्या स्थितींत असतानांच दिग्दर्शित होत असत. १८५१ सालीं " वन्स ए वीक " या

नांवाचें पत्र सुरू करतांच कीनच्या चित्रांची सर्वत्र मागणी होऊं लागली. वरील पत्रांतील त्याची प्रसिद्ध चित्रें म्हटलीं म्हणजे, चार्लस रीडच्या 'क्लॉयस्टर अँड दि हार्थ' आणि जॉर्ज मेरिडिथच्या 'इव्हॅन हॅरिंगटन्' नांवाच्या पुस्तकांमधील प्रसंगांची विविध चित्रें होत. कीनचा स्वरहि मधुर असल्यानें १८५८ सालीं जुन्या पद्धतीच्या गाण्याचा तो भोक्ता बनला. जेर्मिन बँड किंवा मोरेमिन्स्ट्रल्स या संस्थांचा तो या नादामुळें सभासदहि झाला. पंचवेणूवाद्य (बॅगपाइप) वाजविण्यातहि तो कुशल होता. १८६३ मध्यें आर्ट्स क्लब स्थापन झाला त्यावेळीं कीन हा उत्पादकांपैकीं एक होता. १८६७ त जॉन पील हा मोठा कलाभिज्ञ वारल्यामुळें कीनचा 'पंच' जास्त लोकप्रिय होऊं लागला. १८७२ त कीनची जोसेफ क्रॉव्हॉलशीं ओळख झाली. या गृहस्थास कोणत्याहि पाहिलेल्या किंवा ऐकिलेल्या विनोदात्मक प्रसंगांचीं टिपणें करून ठेवण्याची संवय होती. कीनला हीं टाचणें मिळालीं. पंच मधील सुमारें २५० प्रसंगचित्रें वरील स्फूर्तिजनक टिपणावरून कीननें काढलीं आहेत. १८८१ सालीं 'अवर पीपल' नांवाचा एक ग्रंथ ब्रॅड बरी अँड ॲग्न्यू कंपनीनें प्रसिद्ध केला. त्यांत कीनचीं पंचमधील प्रसिद्ध चित्रें आहेत. १८८३ सालीं कीनला अजीर्ण व संधिवात असे विकार झाले. १८८९ पर्यंत हे रोग बळावत गेल्यामुळें त्यास अति दुःख भोगावें लागलें, परंतु ते त्यानें धैर्यानें सोसलें. १८९१ च्या जानेवारीच्या चवथ्या तारखेस हा अविवाहित वृद्ध वारला. कीनला कलेचें अगदीं पद्धतशीर शिक्षण मिळालें नव्हतें. तरी सुद्धां त्यास कलाभिज्ञांचा अग्रेसर असें म्हणतां येईल. इंग्रजी कलाभिज्ञांमध्यें त्याचें उच्च स्थान आहे यांत शंका नाहीं. बहुजनसमाजाला त्याचीं कामें फारशीं आवडत नाहींत याचें खरें कारण कीनचें कलेच्या बाबतींत दिसून येणारें रूढिदास्यविमोचन हेंच होय. जगाला काय रुचतें हें न पहातां दिसेल त्याची आहे त्याच स्थितींत खुलावट करावी असें कीनचें धोरण असे. चोहोंकडे सौंदर्य व अद्भुतता पसरली आहे असें त्याला स्पष्ट दिसत असे व सृष्टींतील गूढ विनोदाची प्रासंगिक छटा 'पंच' मधील त्याच्या चित्रांत उमटलेली दिसून येते. कुंचला व पेन्सिल यांत तो प्रवीण होताच परंतु खोदकामात व ठसे करण्याच्या कामातहि त्याचें प्रावीण्य दिसून येतें

कीफ, प्रांत.—हा रशियाच्या नैर्ऋत्य भागांत आहे. याचें क्षेत्रफळ १९६८४ चौरस मैल आहे. हा प्रांत उंचवट्याचा प्रदेश असून याची उंची पश्चिम भागांत ९५० ते १०५० फूट आहे. या प्रांतांत पुष्कळ उपयुक्त खनिज द्रव्यें भूगर्भांतून काढलीं जातात. मध्य रशियांत हवामान समशीतोष्ण आहे. सन १९०४ मध्यें येथील लोकसंख्या ४०,४२,५२६ होती. येथील १,२६,००,००० एकर जमीनी पैकीं ९,११,०००,०० जमीन लागवडीखालीं आहे गहूं, राय, ओट, जव वगैरे धान्यें येथें मुख्यत्वेंकरून पिकतात. शेतीकरितां येथें उंटांचा उपयोग करितात. येथील मुख्य कारखाने साखरेचे व दारू गाळण्याचे आहेत. साखरेच्या कारखान्यांत सुमारें ८५,००० पासून ११,५०,०००टन साखर होते. आगगाडीचे दोन मुख्य रस्ते या प्रांतांतून आहेत. निपर व तिला मिळणाऱ्या दुसऱ्या नद्या यातून जहाजें येतात. येथें व्यापार फार चालतो. फक्त नद्यांवरील वार्षिक व्यापार १०,००,००० स्टर्लिंगचा आहे.

शहर.—कीफ हें रशियांतील शहर असून त्याच नांवाच्या प्रांताचें मुख्य ठिकाण आहे. हें नीपर नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेलें आहे. हे मास्कोच्या नैर्ऋत्येस आगगाडीनें ६२८ मैल आहे. या ठिकाणीं नीपर नदीची रुंदी ४०० पासून ५८० यार्ड असल्यामुळें येथें ती नाव्य आहे. या शहराच्या दक्षिण भागाच्यासमोर नीपर नदीवर एक तरता पूल असून त्याची लांबी अर्धामैल व रुंदी ५१॥ फूट आहे. कीफ हें रशियांतील अतिशय सुंदर शहरा पैकीं एक आहे. येथील शिक्षणसंस्थांची संख्या दोन राजधान्यांच्या खालोखाल आहे. येथील विश्वविद्यालय १८३४मध्ये व्हिलनाहून येथें आणण्यात आलें. यांत २५०० विद्यार्थी असून येथें प्रयोगशाळा, वेधशाळा, व वाचनालयें चांगलीं आहेत. रशियाच्या साखरेच्या धंद्याचें हे मुख्य केंद्र असून त्या प्रदेशाच्या सर्वसाधारण व्यापाराचेंहि हें ठिकाण आहे. हे स्ट्रेटेनका या यात्रेकरिता प्रसिद्ध आहे. येथें दर वर्षी सुमारें २,५०,००० यात्रेकरू येतात. सन १९०२ मध्यें येथील लोकसंख्या ३,१९,००० होती.

८६४ सालीं कीफ शहर कि, शेक व खोरीव या बंधूंनी वसविलें. त्यांच्या मृत्यूनंतर दोन व्हेरेजिअनांनी त्याच वर्षी तें घेतलें. ८८२ सालीं ओलेग यानें हें शहर घेऊन आपल्या संस्थानचे मुख्य शहर केलें. प्रिन्स व्लॅडीमिर यानें ९८८ मध्यें आपल्या लोकांना ख्रिस्ती धर्माची दिक्षा दिली. ३५० वर्षें पर्यंत तें स्वतंत्र शहर होतें. ८० वर्षें पर्यंत (१२४०–१३२०) तें मंगोल लोकाच्या ताब्यांत होतें. २४९ वर्षें (१३२०–१५६९) हें लिथुॲनिअन संस्थानच्या ताब्यांत होतें व पुढें ८५ वर्षें पोलंडच्या ताब्यात असून सन १६८६ मध्यें हें कायमचें रशियाला जोडण्यांत आलें.

कीर—एक शेतकरी जात. एकंदर हिंदुस्थानांत कीरांची जी ३५,७२९ संख्या (१९११) आहे. तींपैकीं निम्याहून जास्त राजपुतान्यांत आहे. वऱ्हाड–मध्यप्रांत व मध्यहिंदुस्थान यांतून प्रत्येकीं ६.७ हजार वस्ती आहे.

यांचा महाभारतांत उल्लेख आढळत नाहीं. बृहत्संहितेंत ईशान्य विभागांतील एक राष्ट्र म्हणून यांचा उल्लेख आहे. चंबा येथील दानपत्रांत साहिल्लदेवानें कीर लोकांना जिंकलें असा उल्लेख आहे.

मध्यप्रांतांतील कीर स्वतःस जयपुराहून आलों असें म्हणवितात. आज यांस तेथें वस्ती करून जरी अनेक पिढ्या झाल्या

तरी यांनीं आपली मारवाडी भाषा कायम ठेवली आहे. किराडाचा व यांचा निकट संबंध आहे. इ. स. १९०१ च्या खानेसुमारींत यांचा किराडांतच समावेश केला होता. यांच्यात १२ गोत्रें आहेत. तीं नमचुरिया, दैमा, बनिया, वामन, नायर, जाट, हुवाउ, गार्डी, लोहारिया, हेकज्या मोची व माळी हीं होत. भाट हें अर्थ गोत्र समजलें जातें यांच्या निरनिराळया धंद्यांच्या नांवावरून यांची गोत्रें पडलीं व जात तयार झाली स्वतःच्या किंवा आईच्या गोत्रात विवाह करूं नये असा यांच्यात नियम आहे.

यांच्यात बालविवाहाची चाल आहे अत्यंत गरीब माणसाच्या मुलींच्या लग्नास वर्गणी करून मदत देतात. यांच्या लग्नाच्या दिवशीं वर रेड्यावरून वधूकडे जातो विधुरास प्रथमवराच्या दुप्पट लग्नखर्च करावा लागतो. यांच्यात पुष्कळ बायका केल्या तरी चालतात विधवाविवाहासहि मोकळीक आहे. पंचास भोजन व विधवेस दागाने व नवीं वस्त्रें देऊन विधवाविवाह होतो.

हे भैरव व देवीची पूजा करतात. यांचे प्रत्येक गोत्र देवीच्या निरनिराळया स्वरूपाची आराधना करतें. व आपल्या देवतेची प्रतिमा ताईतात कोरून गळयात घालतात. हे गाईची व पिंपळाची पूजा करतात. कीर आपली गाय कसाबास विकीत नाहीत. यांचा मंत्र व जादू वगैरेंवर विश्वास आहे. भारणी टाकून हे देवाकडून व सर्पाकडून आपलीं कामें करून घेतात असे ऐकण्यांत आहे. दिवाळींत शीतला आठ म्हणजे अष्टमीस यांचा मोठा सण असतो. कीर लोक प्रेतें दहन करतात. मुलाचें नांव सातव्या दिवशीं ब्राह्मणाकडून ठेवतात. मूल झालें म्हणजे लहान दीर बाळंत भावजयीचा लहंगा धरून बसतो व ती त्याला कांहीं रुपये देई पर्यंत तो सोडीत नाहीं. या चालीचा जर कांहीं अर्थ असला तर तो असा असावा कीं पूर्वी सर्व भावांची एकच बायको असण्याची चाल मोडून घालली तेव्हां दिरानें हें मूल माझेंच आहे असा तंटा न करावा म्हणून त्याला संतुष्ट करण्याकरितां कांहीं तरी लांच देण्याची ही असावी. आहे. हे दुवारिया ब्राह्मणाच्या हातचेंच जेवतात व बोकडाचें मांस व मासे खातात. जातीपंचायतीकडे साधारण तंटे मोडण्याचें काम असतें. कीर लोक नदीकांठी राहतात. यांना बाजरी फार आवडते व हे रेड्यावर बसण्याचे शौकी आहेत[रसेल व हिरालाल].

कीरतपूर--संयुक्त प्रांतातील बिजनोर जिल्ह्याच्या नजीबाबाद तहशीलींतील एक गाव.बिजनोर शहरापासून हा गाव उत्तरेस दहा मैलावर वसलेला आहे. या गांवाची लोकसंख्या १९०१ सालीं १३,९०२ इतकी होती. कीरतपूर खास व कीरतपूरवसी असे या गावाचे दोन भाग असून कीरतपूर खास हा भाग १५व्या शतकात बहलोल लोदीनें वसविला व कीरतपूरवसी हा भाग १८ व्या शतकात पठाणांनी वसवून तेथें एक किल्लाहि बांधला. या किल्ल्याच्या मोडकळीस आलेल्या भिंती अद्यापिहि येथें आहेत व या भिंतींच्या आंत एक सुंदर मशीद आहे. येथें व्यापार विशेष नाहीं पण लाखेचें रोगण लावलेल्या खुर्चा व पेटया येथें तयार होतात. येथें डिस्ट्रिक्ट बोर्डातर्फे एक शाळा सुरू आहे. शिवाय सहा खासगी शाळा आहेत अमेरिकन मेथॉडिस्ट मिशन या संस्थेची येथें एक शाखा आहे.

कीरथर--ही पर्वतांची रांग असून सिंध व बलुचिस्तानांतील कलात देश यांच्यामधील सरहद्द बनलेली आहे. मूळ नदी कच्छच्या मैदानात वहात जाते त्या पर्वताची रांग आपल्या अनेक समांतर अशा शाखांसह १९० मैल दक्षिणेकडे गेलेली आहे.मधूनमधून इतर पर्वतांच्या रांग हि यांच्यापासून गेलेल्या आहेत. या पर्वतांच्या रांगेचे मुळके अमेरीकेकडे कराची जिल्ह्यात गेलेले आहेत. तरी पण कांहीं टेंकडया केप मोन्झेपर्यंत पसरलेल्या आहेत. या पर्वताची सर्वांत मोठी रुंदी म्हणजे ३० मैल आहे व याचें सर्वांत उंच शिखर ...क असून त्याची उंची ७४३०फू. आहे. दुसरें सुंदर शिखर कुत्ताकबर (कुत्र्याचें थडगें) या नावाचें असून त्याची उंची ६८७८ फूट आहे या पर्वताची मुख्य शाखा म्हणजे ' लखी ' ही होय करिथर पर्वताच्या रांगांमधून ...ची अगर गाज ही नदी वहात गेली असून त्यामुळें या पर्वताची मोठमोठी खोरीं बनलेलीं आहेत व हरबाब, फशी, रोहेल, वगैरे हे मोठमोठे घाट आहेत या पर्वताच्या टेंकडयाच्या पृष्ठभागावर नारी व गाज नद्यांच्या मधील पाषाण तृतीयुगांतील असून शिवाय येथें वाटोळे खडूचे दगड देखील भरपूर सापडतात नारी नदीमधील तृतीयुगातील पाषाण ... वाळवे बनलले आहेत व गाज नदीमधील पाषाण ... निळसर खडूच्या दगडाचे बनलेले आहेत. कीरथर ... मरी, जमाली, बलोच, जमोट, छूट जाट हे लोक ... खिद्रानी व ... जातीचे लोकहि येथें आढळतात. यांचा धंदा मेंढपाळाचा असून ... हे पर्वतामधें सापडणाऱ्या 'खन नाड' याची निर्गत करतात. सिंधमध्यें आढळणारी ' ऐबेक ' बकऱ्याची जात व ... बकरीहीं या पर्वतात पुष्कळ आहेत. तसेंच काळीं अस्वलें व चित्ते हे मधून मधून आढळून येतात.

कीर्तन--भक्तीच्या ज्या नऊ पायऱ्या (' श्रवणं कीर्तनं विष्णोः ' इत्यादि) सांगितल्या आहेत. त्यापैकीं कीर्तन ही दुसरी पायरी आहे. कीर्तन करणें ही एक उपासनाच आहे असे 'सततं कीर्तयंतोमां' या वाक्यावरून म्हणण्यास हरकत नाहीं. भगवंताची भक्ति करून त्याच्या चरित्राचें गायन करणें हें जरी कीर्तनाचें मुख्य अंग असलें तरी जगाला सन्मार्गाला लावणें, त्याला यथायोग्य उपदेश करून हें प्रवर्तीत झालेलें अनादि चक्र यापुढेंहि तसेंच चालले पाहिजे अशी व्यवस्था करणें, हाहि कीर्तनाचा एक प्रधान हेतु आहे. तो हेतु साधण्याकरितां म्हणून कीर्तनात देवाच्या व भक्ताच्या

निरनिराळया कथांचा आदर्श पुढें ठेवण्याची रीत पडली आहे.

हा संप्रदाय फार प्राचीन आहे. याचे आद्यगुरू नारद होत. प्रख्यात भगवद्भक्त ध्रुव, प्रल्हाद इत्यादिकांचे नारद हे गुरु होत. कीर्तनपरंपरा महाराष्ट्रात जितकी रुजली इतकी ती इतरत्र हिंदुस्थानात रुजलेली आढळत नाहीं. भजन करण्याची रीत मात्र सर्वत्र आहे. वारकरी संप्रदायानें ही चाल जास्त जोरानें उचलून धरिली. तत्पूर्वी मध्यकालात ती असल्याचा ऐतिहासिक दाखला आढळत नाहीं. या संप्रदायातील ज्ञानेश्वर, नामदेव, भानुदास हे पहिले कीर्तनकार होत. नामदेवाचें कीर्तन फार प्रेमळ असे. 'नामदेव कीर्तन करी, पुढें नाचे पांडुरंग' हा अभंगचरण यास आधार आहे. नामदेवाच्या पुढें तुकारामानें कीर्तनाचा प्रसार जास्त केला. श्रीसमर्थ रामदास व त्यांचे बहुतेक शिष्य कीर्तन करीत असत. इतर शिष्यांचें असो, पण खुद्द शिवछत्रपति यांनीं एकदा कीर्तन केल्याचा उल्लेख आढळतो. मराठी मुत्सद्यांत काहींनीं कीर्तन केल्याचा दाखला सापडतो. महादजी शिंदे, परशुरामपंत प्रतिनिधि, सदाशिव माणकेश्वर यांनी कीर्तन केलं होतें.

बंगालमध्यें "कीर्तन" म्हणजे एक निराळीच चीज आहे. एक पुढारी दोन चार शब्द उच्चारतो व इतर मंडळी त्याचा पुनरुच्चार करतात. महाराष्ट्रातील कीर्तनात ईश्वरस्तुति, भक्ति व वेदांत यांचे विवेचन व विशिष्ट कथेचे निरूपण हे विषय असतात. कीर्तनानें स्वतः पवित्र होऊन जगास वळण लाविता येतें सामान्य जनसमूहाला स्वकर्तव्याची जाणीव करून देण्यास उत्तम कीर्तन करणाऱ्या हरिदासाची फार जरूरी असते. कीर्तन हें एक लोकजागृतीचें अत्यंत सुलभ व सद्यःफलदायी असें साधन आहे. साप्रत वर्तमानपत्रें, मासिकें, व्याख्यानें हीं जीं लोकांना ज्ञान करून देण्याचीं साधनें आहेत तसें पूर्वीच्या काळीं कीर्तन हें एक प्रमुख साधन होतें. हल्लींहि त्याचा उपयोग वरील वर्तमानपत्रादि साधनापेक्षा जास्त होतो. वर्तमानपत्र वगैरेंचा उपयोग सुशिक्षित (परंतु अत्यंत अल्प) समाजालाच होतो; परंतु अशिक्षित समाजाला कीर्तनासारख्या व पूर्वीपासून आपल्यात असल्यामुळें परिचयाच्या असलेल्या कीर्तनसंस्थेचा फार उपयोग आहे.

हरिदास मात्र बोलण्याप्रमाणें वागणारा पाहिजे, नव्हे आधीं वागून मग तसा बोलणारा पाहिजे, म्हणजे त्याच्या सांगण्याचा परिणाम श्रोत्यावर होतो. तो अल्पसंतुष्ट असावा, व वर्तनानें अत्यंत निर्मळ असावा 'अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ' असा तो असावा. त्यानें मोलानें कीर्तन करूं नये विष्णुभक्ताला कीर्तनांतील बिदागीची जरूरी नसावी. कारण मोल घेऊन केलेल्या उपदेशाला महत्व रहात नाहीं असें सांगण्यांत येतें. पेशवाई नष्ट होण्यापूर्वी हरिदासांची साधारण प्रवृत्ति मोलाशिवाय कीर्तन करण्याकडे होती. हल्लीं परिस्थितीभेदामुळें हरिदास बिदागी घेऊं लागले आहेत. पण त्यामुळें निस्पृहता सुटते व दात्याच्या कलाप्रमाणें उपदेश करावा लागतो.

कीर्तनाला कोणत्या उपांगाची जरूरी आहे, तीं अंगें समर्थांनीं सांगितलीं आहेत: 'कथा अन्वय लापणिका। नामघोष करतालिका" तसेंच "तालमृदंग हरिकीर्तन। संगीत नृत्य तानमान। नाना कथानुसंधान। तुटोंचि नेदावें" म्हणजे कीर्तन सर्वांगपूर्ण असावें. त्यात सर्व रसांचा यथायुक्त परिपोष करावा. शृंगाररस असल्यास हरकत नाहीं, मात्र तो तारतम्य सांभाळून सभ्य रीतीचा असावा. पूर्व व उत्तररंगाची जुळणी बेमालूम असावी. श्रोते तल्लीन होतील असा रंग भरला पाहिजे. 'श्रोत्यांचीं श्रवणपुटें, आनंदे भरावीं' असा समर्थांचा आदेश आहे. तालसुरांचें ज्ञान नसणाऱ्यानें कीर्तन करूं नये. तसेंच संस्कृत भाषा, न्याय, व्याकरण, वेदांत, अलंकार, पुराणें, मराठी कवींच्या कविता, थोडेबहुत हिंदी काव्य (आणि आधुनिक हरिदासास तर) कार्लाइल, कान्ट, स्पेन्सर वगैरे पाश्चात्य तत्वज्ञांचें तत्वज्ञान, बायबल, कुराण वगैरे धर्मग्रंथांची माहिती व प्रचलित सामाजिक, राजकीय व धार्मिक विषयांची ओळख, इतिहासाचें-विशेषतः स्वदेशाच्या—ज्ञान इत्यादि बाबींची माहिती हरिदासाला आज अवश्य पाहिजे. यावरून हरिदासाचा अधिकार मोठा आहे हें उघड दिसतें. 'वक्तृत्वाचा अधिकार, अल्पाम न घडे सत्योत्तर, वक्ता पाहिजे साचार, अनुभवाचा' असें हरिदासवर्णन समर्थांनीं केलें आहे. हरिदास हा या प्रकारें एक देशाचा सेवकच असल्यानें त्यानें देशपर्यटण करण्यासाठीं स्वतःचें शरीर मजबूत ठेवलें पाहिजे. जुन्या ऐतिहासिक गोष्टी सांगून त्या वर्तमान परिस्थितींत कोठें व कशा लागू पडतात हें दाखवून चालू स्थिति कशी पालटली पाहिजे हें सुलभपणानें हरिदासानें श्रोत्यांच्या मनावर बिंबविलें पाहिजे.

श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे (शके १८४३ तील) सहाव्या कीर्तनसंमेलनाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं केलेली 'सार्वजनिक हितासाठीं सार्वजनिक खर्चानें प्रत्येक जिल्ह्यात निदान चार तरी हरिदास नियोजित करून त्यांच्या द्वारां जिल्ह्यामध्यें सर्वत्र उपदेशाचें काम करविल्यास फार मोठें कार्य होईल,' ही सूचना लक्षात घेण्यासारखी आहे.

गेल्या शतकात महाराष्ट्रांत पुढील नामांकित कीर्तनकार होऊन गेले. अनंतफंदी, रामजोशी, विठोबा अण्णा दफ्तरदार, श्रीपतीबुवा, ब्रह्मनाळकर, सांगलीकर, नाशीककर, व अगदीं अलीकडील प्रसिद्ध हरिदास गणेशशास्त्री मोडक, रामचंद्रबोवा काशीकर, रामदीक्षित अफळे माहुलीकर, नारायणबोवा फलटणकर व काशीनाथबोवा मसूरकर व चाफेकर हे होत. रामदीक्षितांचें प्रासादिक कीर्तन, नारायणबोवांचें श्रवणमधुर कीर्तन व काशीकरांचें जोड आख्यानी कीर्तन हीं महाराष्ट्रीय श्रोत्यांच्या दृढपरियाचीं आहेत ब्रह्मनाळकर

या हरिदास घराण्यापैकीं यशवंतबोवा ब्रह्मनाळकर यांनीं मुंबईस 'हरिकीर्तनालय' नावाची एक संस्था स्थापन केली होती व कीर्तन नावाचें एक मासिकहि चालू केलें होतें. परंतु यशवंतबोवा वारल्यामुळें तें बंद पडलें.

सध्या महाराष्ट्रांत एक कीर्तनसंस्था असून तिचीं संमेलनें बहुधा दरवर्षी भरत असतात. कीर्तन हें लोकसमाजास उपयुक्त कसें होईल या प्रकारचें शिक्षणहि सदर संस्थेंत देण्यात येतें. दक्षिणेकडे तेलंगणांत व कर्नाटकातहि कीर्तनांची चाल आहे. ती तिकडील आळवार या पंथातील साधूंनीं प्रचलित केली असें म्हणतात.

कीर्तने, निळकंठ जनार्दन. —हे विनायक जनार्दन कीर्तने याचे धाकटे बंधु होते. यांनीं देवास संस्थानची दिवाणगिरी केली याना मराठ्यांच्या इतिहासाची फार कळकळ असे. ग्रांट डफ साहेबाच्या इतिहासावर खरमरीत टीका यांनीं केली आहे. मल्हार रामराव कृत शिवाजीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र यांनीं प्रसिद्ध केलें. व न्या. रानडे याना मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास सामुग्री मिळवून दिली. हे मोठे विचारी लेखक होते. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात यांचे कांहीं निबंध आहेत. मृत्यु १८९६.

कीर्तने, विनायक जनार्दन.—सन. (१८४०-१८९१) कऱ्हाडे ब्राह्मण. जन्म राजुरी (पुणें जिल्हा) येथें. याचें प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथे झालें. वयाच्या १२ व्या वर्षी यांनीं एक निबंध लिहिला, व त्याची फार तारीफ झाली; १८५६ त हे मुंबईस शिकावयास आले. १८५९ त हे प्रवेशपरीक्षा पास झाले. पुढें अपयश आल्यानें यांनीं शिकणें सोडलें व शाळाखात्यात नोकरी पत्करली. यांनीं १८६० मध्यें थोरले माधवराव व दोन वर्षांनीं जयपाळ हीं नाटकें लिहिलीं. जयपाळाचें संविधानक 'ओल्ड टेस्टमेंट'मधील जोवच्या चरित्रातून घेतलेलें दिसतें. हीं दोन्हीं नाटकें मराठींत पहिलीं म्हणून गणलीं जातात. पण हें सर्वांशीं खरें नाहीं. १८६५ त कीर्तने इंदुरास जाऊन युवराज शिवाजीराव याच शिक्षक झाले; १८७२ त दिवाण सर टी. माधवराव याच्या वशिल्यानें ते दुसरे न्यायाधीश झाले. १८७५ त माधवरावाबरोबरच ते बडोद्यास नायब दिवाण म्हणून गेले. १८७७ त याना रावबहादुरची पदवी मिळाली. बडोद्यास दिवाणगिरी मिळेलसें दिसेना तेव्हा यांनीं बडोदें सोडलें. यावेळीं शिवाजीराव इंदूरच्या गादीवर बसले होते. त्यांनीं दिवाणगिरीचीं वस्त्रं आपल्या गुरुजीस देऊं केलीं. तेव्हा १८८८ त पुन्हा इंदुरास दिवाण म्हणून हे आले. १८९० त होळकराचा आणि याचा बेबनाव होऊन यांनीं इंदूर सोडलें व पुण्यास वस्ती केली. त्या ठिकाणीं शारीरिक व मानसिक दुःखानें खंगत जाऊन १८९१ च्या डिसेंबरांत ते वारले. वीस एकवीस वर्षांच्या उमेदींत जयपाळ व थोरले माधवराव हे जे ग्रंथ त्यांनीं लिहिले त्याहून सरस अशी ग्रंथरचना पुढें त्याच्या हातून झाली नाहीं. मालकमच्या ' मध्यहिंदुस्थान ' या ग्रंथाचें कीर्तन्यांचें भाषांतर अगदीं नीरस वठलें अशी टीका रा. वि. मो. महाजनी करतात. [वि. विस्तार, पु. ३८ पा. ९२.]

कील—बाल्टिक समुद्रावर असलेलें जर्मनीचें मुख्य आरमारी बंदर. लोकसंख्या (१९१०) २,११,६२७. हें कील बंदराच्या दक्षिण टोंकास रमणीय जागीं वसविलेलें असून हॅम्बर्गच्या उत्तरेस आगगाडीच्या रस्त्यानें ७० मैलावर आहे. कसब्यामध्यें १३ व्या शतकात बांधलेला एक राजवाडा आहे. त्याला १८ व्या शतकात वाढवून मोठा केला. इ. स. १८३८ मध्यें आग लागून हा जळून गेला होता, तरी हा पुन्हां बांधला. उत्तरेस उपसागराभिमुख असें १६६५ त स्थापलेलें ख्रिश्चन अल्बर्टिना नावाचें एक विश्वविद्यालय आहे. त्याला जोडून २,४०,००० ग्रंथ असलेलें एक ग्रंथसंग्रहालय, प्राणिसंग्रहालय, रुग्णालय, वनस्पतींचा बाग व जंगलखात्याची पाठशाळ हीं आहेत. विश्वविद्यालय वैद्यकीकरता प्रसिद्ध असून तेथें सुमारें १००० विद्यार्थी व १०० अध्यापक असतात. येथील इतर शिक्षणसंस्था म्हटल्या म्हणजे विश्वविद्यालयाच्या जुन्या इमारतींतील राष्ट्रीय पुरातन वस्तूंचा अजबखाना, १६ व्या व १७ व्या शतकातील लाकडावरील खोदींव कामाचें ' थॉलो ', पदार्थसंग्रहालय, आरमारी विद्यापीठ, आरमारी शाळा व शिल्पकलेची शाळा ह्या होत.

कीलला हल्लीं जें इतकें महत्व आलें आहे तें तेथें असलेल्या प्रचंड बंदरामुळें होय. पाण्याची खोली सर्वत्र जवळ जवळ ४० फूट असून किनाऱ्याजवळ ती २० फूट आहे. त्याची लांबी ११ मैल असून रुंदी उत्तरटोंकास पाव मैल, व मुखापाशीं ४॥ मैल आहे. संरक्षणाकरिता बंदराच्या मुखापासून पाच मैलावर ज्या ठिकाणीं (फ्रीडरिकसॉर्ट येथें) कालव्याचे किनारे जवळ जवळ आले आहेत तेथें पश्चिमेस २ व पूर्वेस ४ असे सहा किल्ले बांधले आहेत. ह्याशिवाय संरक्षणाच्या दुसऱ्या कित्येक सोयी असल्यामुळें ह्या बंदरास व्यूहरचनेच्या दृष्टीनें फार महत्व आलें आहे. सरकारी गोद्या ५ व जहाजें बांधण्याचे कारखाने पूर्वेच्या बाजूस नगराभिमुख आहेत. ह्याची पात्रें इतकीं मोठीं व खोल आहेत कीं, त्यात मोठमोठीं लढाऊ जहाजें सहज राहूं शकतात. सरकारी कारखान्यात ७००० मजूर काम करीत असतात. ह्याशिवाय जर्मानिआ (क्रप) व हॉवाल्डस् नावाचे जे दोन मोठे खाजगी कारखाने आहेत त्यात ७००० माणसें कामावर असतात. ज्याला आपण कील कालवा म्हणतों त्या " केसर विल्हेल्म कालव्या "चें बाल्टिक समुद्राला जोडणारें पूर्वेकडील मुख कीलपासून ३॥ मैलावर उत्तरेस विक येथें आहे. हा कालवा बाल्टिक समुद्र व उत्तरसमुद्र (ब्रुन्सबुटेल येथें) याना जोडतो. जून महिन्यात येथें जी बोटींची मोठी शर्यत होते तिच्यात सर्व देशातील लोक भाग घेतात. हें व डेन्मार्कचें कॉर्सोर याच्यामध्यें उतारूंच्या आगबोटी रात्रंदिवस जात येत असतात. येथले मुख्य उद्योगधंदे म्हटले म्हणजे

जहाजें बांधण्याचे कारखाने व त्याच्याशीं संबंध असलेलेच होत. त्याशिवाय दुसरे कारखाने म्हटले म्हणजे पिठाच्या गिरण्या, तेलाचे कारखाने, लोखंड ओतण्याचे कारखाने, मुद्रणालयें, विटाचे कारखाने, दारू गाळण्याचे कारखाने, साबूचे कारखाने व लाकडाचे तक्ते पाडण्याचे कारखाने हे होत. कोळसा, इमारती लाकूड, धान्य, मासे आणि लोणी यांचा येथें मोठा व्यापार चालतो.

कील हें नाव १० व्या शतकापासून ऐकूं येतें. ह्या नांवाचा अर्थ 'जहाजाकरितां सुरक्षित जागा' असा आहे. त्याच्याच पुढच्या शतकात कील हें शहर असल्याबद्दल उल्लेख आढळतो.

१२८४ त हें हॅनिआटिक संघास मिळाल्यामुळे १४ व्या शतकात ह्यास व्यापाराचे कित्येक हक्क मिळाले. ज्या तहाने स्वीडनला नॉर्वे मिळाले तो ग्रेटब्रिटन, डेनमार्क व स्वीडन यांमधील तह १८१४ त येथेंच झाला. कील हें १७७३ त डेनमार्ककडे आलें होतें; परंतु १८६६ त ते ज्या प्रांतात आहे तो प्रांतच्या प्रांत प्रशियास मिळाला. आरमारी युद्धविषयक सामुग्री ठेवण्याची जागा केल्यापासून कीलची बरीच भरभराट झाली आहे. लोकसंख्या हि एकंदर [illegible] आहे. कील कालव्याच्या संबंधीं माहिती कालवे या लेखात दिली आहे.

कीलकरै-मद्रास इलाखा. मदुरा जिल्ह्यामधील रामनद जहागिरीतील रामनद तहशिलीमधील एक गाव. हे मानारच्या आखाताच्या काठीं वसलेले आहे. रामनद शहरापासून दक्षिणेस १० मैलांवर हें गाव असून या गावाच्या व रामनद शहराच्या दरम्यान पावसाळ्यात फार दलदल होते व त्यामुळें रामनदपासून या गावाला जाणारा रस्ता पावसाळ्यात जवळ जवळ बंदच होतो. हें गाव फार गलिच्छ व दिसण्याला ओसाड असे आहे. १९११ मध्ये या गावाची लोकवस्ती [illegible] असून त्यामध्ये लब्बे नावाच्या मुसुलमान व्यापारी जातीच्या लोकांचा भरणा होता. या गावाचा धान्याच्या बाबतींत कोकोनाडा व सीलोन या देशाशीं व्यापार चालतो. लब्बे लोक समुद्रात बुडी मारून शंख व शिंपले काढण्यात फार पटाईत आहेत.

कीलिंग बेटें—'कोकोज' अथवा कीलिंग बेटें म्हणजे हिंदी महासागरातील पोंवळ्याच्या बेटांचा एक समुदाय होय. यांत एकंदर २३ बेटें असून वर्तुलाकार प्रवाळखडकांची रुंदी ६॥ मैल आहे. खाजणें अत्यंत उथळ असून तेथील अनेक बेटाकडे जाण्याचे मार्ग इतके उथळ आहेत कीं सहज पाण्यातून पायीं जाता येतें. उत्तरभागीं पोर्ट रेफ्यूज अथवा पोर्ट आणि आल्बिअन नावानें एक चांगलें बंदर आहे. कीलिंग बेटांत नारळाचें उत्पन्न फार होतें. तेथील सामान्य प्राणी म्हणजे नारळावर उपजीविका करणारा राक्षसी खेंकडा हाच होय. १८७८ मध्यें डॉ. फोर्ब्स हा कीलिंग येथें गेला होता. डॉ. गुप्पी, अँड्रयूज व रिडले इ. मंडळी त्या ठिकाणीं गेली होती. प्रवाळाचे खडक कसे बनतात हें पाहण्याचा त्याच्या सफरीचा उद्देश होता. खाजणाभोंवतालचे वर्तुलाकार प्रवालखडक ज्या ठिकाणीं आहेत तें क्षेत्र हवेच्या मानानें क्षयरोग्याकरितां फारच उत्कृष्ट आहे. नेहमींचें हवामान साधारणतः ७८.५ फारनहीट असून पाऊस ८० इंचापेक्षां जास्त नसल्यानें हवेंत दमटपणा अथवा सर्दी कमी असते. या बेटाजवळ वादळें होतात भूकंपानेंहि तेथें दोन तीनदां धक्के बसले होते. बटेव्हियापासून केपपर्यंत जलपर्यटन करीत असताना १६०९ साली कॅप्टन विल्यम कीलिंग यानें हीं बेटें शोधून काढिलीं. १८२३ मध्यें अलेक्झांडर हेअर हा धाडशी इंग्रज मनुष्य काहीं गुलामांस घेऊन या बेटाच्या दक्षिण दिशेस राहिला होता. पुढें दोन तीन वर्षांनीं जे. रॉस नामक एका स्कॉटिश धाडशी मनुष्यानें तेथें सहकुटुंब राहून वस्ती केली. नंतर हेअरचे नोकर असलेले पळून गेलेले गुलाम त्याच्या उपयोगी पडले व त्यामुळें त्याची लहानशी वसाहत भरभराट पावली. १८५६ साली सर्व कीलिंग बेटें इंग्रजी अमलाखालीं आलीं. १८८२ सालीं स्ट्रेट्स सेटलमेंटच्या गव्हर्नरकडे या द्वीपसंघाची व्यवस्था गेली. तथापि रॉस घराण्याचीच मालकी व देखरेख चालू आहे. त्या घराण्यातील जॉर्ज क्लूनीज रॉस हा १९१० सालीं वारला व त्यानंतर त्याचा मुलगा सिडने याजकडे सर्व मालकी व व्यवस्था आली.

कुकरमुंडे—मुंबई इलाखा पश्चिम खानदेश जिल्हा तळोदें तालुका तळोद्याच्या नैर्ऋत्येस ४ कोसावर साधारण २००० वस्तीचें गाव असून पूर्वी खानदेश व राजपिपला संस्थान यांच्या हद्दीवरचें मजबूत ठाणें होतें. खानदेश प्रांत इंग्रजांच्या ताब्यात आल्यावरोबर (१८१८) येथे भील लोकांवर वचक बसविण्याकरिता कॅ. ब्रिग्ज यांच्या हाताखालीं एक तुकडी ठेवण्यात आली होती. नंतर हें पेठ्याचें ठाणें केलें होतें. पुढें येथील रोगट हवेमुळें येथील ठाणें मोडलें. पूर्वी येथें भील लोकांस शिकविण्याकरिता एक शाळा चालविण्यात आली होती. तींत डांग संस्थानांतील भील राजाचे मुलगे शिकत असत. ही शाळा १८५७ च्या समारास बंद करण्यात आली. हल्लीं येथें मराठी शाळा आहे. येथील जोडे फार प्रसिद्ध होते. येथें एक तट असलेली पडकी गढी असून तींत जुनें देवीचें देऊळ आहे. पेशवाईत येथें ठाणेदार रहात असे. त्रिंबकजी डेंगळे या प्रांतांत आला असतां येथें काहीं दिवस मुक्कामास होता. रघुनाथरावदादासाहेब इंग्रजास मिळाले असता त्यांच्या तर्फेच्या सरदाराचा मुक्काम नंदुरबार प्रांतात स्वारी करतांना येथे होता. संतोजी महाराज या नावाचे एक वारकरी संप्रदायाचे साधू येथें रहात असून त्यांचा आधुनिक काळास अनुसरून हिंदू समाजाची व धर्मशास्त्राची रचना घडवून आणण्याचा प्रयत्न चालू आहे. हा गांव तापी नदीवर सातपुड्याच्या पायथ्याशीं वसलेला आहे [खानदेश. गॅ.; इति. संग्र; महेश्वरदरबार पत्रें.]

कुकी—आसामांतील एक जात.यांची एकंदर लोकसंख्या (१९११) ८८३३० आहे पैकीं सुमारें ११ हजार बंगालमध्यें आहेत. या डोंगरातील राष्ट्रजातीचे लोक लुशाई लोकाचे नातेवाईक असून त्यांची वस्ती काचार, मणीपूर व नागा टेंकड्यांतून आहे. बहुतेक कुकी वन्यधर्मीय आहेत त्यांच्या दोन जाती आहेत. त्या जुने कुकी व नवे कुकी या होत.

जु ने कु की.—हे शरीरानें सर्व जातींत बळकट असतात. हे पोशाख नीटनेटका करतात. आणि बराच विनय दाखवितात. हे दागिन्याचे फार शोकी आहेत. पुष्कळ आगळ्या, कडीं, दंडकडीं वगैरे अलंकार हे घालतात. ते कानाना भोकें न पाडता खालच्या पाळींतून वाटोळ्या जागेचें मांस काढून टाकतात व त्या ठिकाणीं एक लहानसें बांबूचे वाटोळे कडें करून घालतात. त्यामुळें ती जागा व त्याबरोबर कानाच्या पाळीचा घेर ४।५ इंचपर्यंत वाढतो. नंतर एक चादींचें कडें नेथें बसवून त्यामध्यें व कानामध्यें पुष्कळ मेंकली वगैरे दागिने अडकवितात. यांच्यामध्ये लग्नाची बाब धार्मिक समजली जाते. या वेळीं ' थलिम ' (गावचा पाटील) हा हजर असला पाहिजे. थलिम हा सर्व गावचे लोक जमले असता मध्यभागीं ठेवलेल्या एका दगडावर एक एक पाय ठेऊन उभ्या असलेल्या वधूवरास आशीर्वाद देतो यांच्यामध्ये व नवीन कुकींमध्ये लग्नापूर्वी सासऱ्याकडे चाकरी करण्याची चाल आहे. या लोकात प्रीतिविवाह होतात. एखादा तरुण आपल्या प्रियतमेच्या पित्याकडे आपल्या मित्रास मद्य घेऊन पाठवितो आणि तो तें प्याल्यास लग्न जमतें. मात्र त्यानें तें नाकारल्यास त्या तरुणास दुसरी तरुणी पहावी लागते. यावरून लग्नास बापाची संमति अवश्य दिसते. या लोकांच्या पुष्कळ देवता असून त्यांपैकी काहीं दुष्ट आहेत. यांच्यामध्यें बालविवाह नाहीं. ते आपल्या देवताना फार भितात.

न वे कु की. —हे लोक ठेंगणे पण मजबूत बांध्याचे असतात. यांच्या बायका याहून खुज्या पण बळकट असतात. यांचे डोळे लहान असून बदामाच्या आकाराचे असतात. यांचें नाक लहान व चपटें असून नाकपुड्या मोठाल्या असतात. यांच्या चाली जुन्या कुकींपेक्षा किंचित् भिन्न आहेत. याना लग्नाप्रीत्यर्थ कमीतकमी ३० रुपये खर्च येतो. अथवा दोनतीन वर्षे चाकरी करावी लागते. यांच्यामध्यें लग्नविधि असून त्यावेळीं श्रीमंत लोक मेजवान्या वगैरे देतात. यांचा थेंपू अथवा उपाध्याय मंत्र म्हणून वधूवरास एक मद्यपात्र देतो व पात्रांतून तीं दोघें मद्य प्राशन करतात नंतर वधूच्या गळ्याभोंवतीं दोन व वराच्या गळ्याभोंवतीं एक असे दोरे उपाध्याय बांधतो. हे दोरे पुढें आपोआप तुटून जातात; ते पुन्हां बदलीत नाहींत. नंतर उपाध्याय वधूवराच्या हातांत एक एक लहान फणी देतो व मंत्र म्हणतो. याप्रमाणें लग्नविधि होतो. या लोकामध्यें बायकोस टाकून देतां येते. मात्र अशा वेळीं तिला नवऱ्याचें नेसण्याचें वस्त्र व त्याचें पाण्याचें भांडें याशिवाय सर्व वस्तू घेऊन जाण्याचा अधिकार असतो. परंतु साधारणतः यांच्या बायका यांच्या गुलामाप्रमाणें असतात. त्यानां विकता किंवा गहाण टाकतां येतें. मरणोत्तर स्थितीची याना कल्पना आहे यांचा मुख्य देव आणि सृष्टिकर्ता थुथेन हा आहे. यांच्या बायकोस नंगी व यांच्या पुत्रास थिल म्हणतात. थिल याची बायको गमु ही असून तीं लहानसहान दुखणीं आणते यांच्या उपचारांमध्यें धार्मिक भाग असल्यामुळें यांचे वैद्य म्हणजे उपाध्यायच असतात. आणि ते औषधाबरोबर देवाचे अंगारे वगैरेहि देतात. [इं. ग्रं. सेन्सस रिपोर्ट, ३]

कुंकुमवृक्ष—या झाडास लॅटिनमध्यें मॅलोटस फिलिपिनेन्सिस; संस्कृतमध्यें कुंकुमवृक्ष, इतर भाषात कमळ, सिंदरी, शेंद्री, पुंनाग इत्यादि नावे आहेत.

या झाडापासून उत्पन्न होणारा महत्वाचा जिन्नस म्हटला म्हणजे ' कुंकुम चूर्ण ' होय. रेशमी कपड्याना नारिंगी रंग देण्याकरिता विशेषेंकरून या चूर्णाचा उपयोग करतात. याचीं पिकलेलीं फळें पिशवींत घालून त्यांच्या गाठींत असलेली पूड बाहेर येईपर्यंत त्याना झोडपून काढतात. कित्येक भागात फक्त हाताच्या तळव्यात फळें चोळून काढतात किंवा जमीनीवर पायानीं तुडवितात. पुष्कळदा बाजारात अस्सल माल मिळत नाहीं. कारण व्यापारी लोक चांगल्या मालात हिणकस मालाची भेसळ करून विकीत असतात. हे झाड पुढील ठिकाणी आढळतें:—

बं गा ल. पुरी व सिंगभुम येथील जंगलात या झाडाना काहीं तोटा नाहीं. परंतु याखेरीज इतरत्र हे झाड फारसे दृष्टीस पडत नाहीं. खुल्या जागेंत याची वाढ होण्याचा जितका संभव असतो तितका दाट जंगलात असत नाहीं. दाट अरण्यात या झाडाला फुले व फळे अल्प येतात डिसेंबर महिन्यात हे झाड फुलावऱ्यास येऊन जानेवारी ते फेब्रुवारीपर्यंतच्या काळात फळे परिपक्व होतात. संयुक्त प्रातांतील झाडापेक्षा बंगालीं फळें मोठीं असतात.

सं यु क्त प्रा त—कुमाऊन, गऱ्हवाल व गंगेकाठच्या उप-हिमालयातील अरण्य प्रदेशात हें झाड आढळतें. कित्येक भागात तर या झाडाखेरीज इतर झाडें क्वचित दृष्टीस पडतात. या ठिकाणीं या झाडाचे इतकें वैपुल्य असताहि तेथे रंगाचा मुळींच व्यापार नाहीं ही आश्चर्याची गोष्ट आहे.

पं जा ब.—नुरपूर येथील जंगलांत या झाडाचा सुकाळ आहे. दरवर्षी नुरपूर येथून सुमारें ३० मण 'कुंकुमचूर्णाची' निर्गत होते. नुरपूर येथें हे १ रुपयाला ४ शेर प्रमाणें विकण्यांत येतें. अमृतसर येथें मणाला ‥ रुपये द्यावे लागतात. या भावामध्यें वारंवार बदल होतो. होशिआरपूर जिल्ह्यांतून रावळपिंडी येथें या चूर्णाची निर्गत होत असते.

मुंबई.—रंगाचा संचय करणारा मुख्य जिल्हा म्हणजे बेळगांव होय. येथील दर वर्षाची स्थानिक विक्री सुमारें ४००० पौंडांची म्हणजे ६० मणांची असते.

मद्रास.—गंजम जिल्ह्यांतील गामसर तालुक्यांत हीं झाडें पुष्कळ सांपडतात. वर्षाला सुमारें ४०० मण चूर्ण निघतें. खुद्द मद्रासेंत याला मागणी नाहीं व म्हणून गंजम येथील सर्व रंग यूरोपमध्यें पाठविला जातो.

ब्रह्मदेश—'खालच्या' ब्रह्मदेशापेक्षां 'वरील' ब्रह्मदेशांत हीं झाडें जास्त आहेत.

कपडे रंगविण्याच्या रीती.—हूपर यानें बेळगाव येथें कोणत्या प्रकारें कापड रंगविण्यांत येतें याचें सविस्तर वर्णन लिहून ठेवलें आहे. दोन पौंड रेशीम व एक पौंड सिंधु-कर्बित (कार्बोनेट ऑफ सोडा) पाण्यानें भरलेल्या पात्रात घालून थोडा वेळ उकळूं देतात. रेशीम मऊ होताच तें काढून घेण्यात येतें. नंतर त्याच पाण्यांत २० तोळे 'कुंकुमचूर्ण' २॥ तोळे 'जिंजीली' (तिळाचें) तेल, अर्धा पौंड तुरटी व एक पौंड सिंधु-कर्बित इत्यादि पदार्थ घालतात. हें मिश्रण पाव तासपर्यंत उकळूं देतात. नंतर त्यात रेशीम घालतात. पाऊण तासपर्यंत तें उकळून झाल्यावर रेशीम काढून घेण्यात येतें. यावेळीं रेशमाचा रंग दाट पिवळा होतो. मध्यप्रातात 'तसर रेशमाला' रंग देण्याची निराळीच रीत आहे. प्रथम कुंकुमचूर्ण हिरडा, बेहडा व आवळकाठी याच्या राखेंत मिसळतात. नंतर तें मिश्रण पाण्यात घालून गाळ खालीं बसला म्हणजे पाणी दुसऱ्या भांड्यांत घालतात. या पाण्यात तसर रेशीम सहा तासपर्यंत भिजूं देतात. नंतर तें बाहेर काढून वाळवून झाल्यावर फिरून भिजत घालतात व पुनः बाहेर काढून वाळविल्यावर फिरून भिजूं देतात. कापडाला पाहिजे तशी छटा येईपर्यंत ही क्रिया चालू असते.

या कुंकुमचूर्णाचा 'नारूचा नाश करण्याकडेंहि उपयोग होतो असें म्हणतात. या झाडाच्या बियातून शेंकडा ८५.८३ इतकें मलमासारखें चोळावयाचें तेल निघतें. [वॅट.].

कुकुर—या लोकाचा अथवा राष्ट्राचा उल्लेख महाभारतात भीष्मपर्वात (अ. ९२) आढळतो. तसेंच बृहत्संहिता (१४.५) व भागवत (९.११,११) यांतहि याचा उल्लेख आढळतो. नाशिकच्या शिलालेखात व रुद्रदामन् याच्या जुनागड येथील शिलालेखातहि याचा उल्लेख आढळतो.

कुंकू—हें तांबड्या रंगाचें एक चूर्ण असून हिंदुस्थानातील पंजाबखेरीज बहुतेक सर्व प्रांतांतील सौभाग्यवती स्त्रिया व कुमारिका कपाळावर लावतात. कुंकू लावण्याचा प्रघात महाभारतकालींहि असावा असें रा. चिं. वि. वैद्य वगैरे ग्रंथकारांचें म्हणणें आहे. देवाला वहाण्यासहि बरेंच कुंकू लागतें. कुंकवाचे असे निरनिराळे उपयोग होत असल्यामुळें त्याचा खपहि फार होतो. कुंकवास पिंजर असें दुसरें नाव आहे कुंकू करण्याच्या कृती पुढीलप्रमाणें आहेतः—

कृति पहिलीः—एक शेर हळकुंडें १॥ शेर पाण्यात भिजत घालावीं. तीं बरींच भिजवल्यावर त्याच्यावरील साल किंवा त्वचा चाकूनें खरडून काढावी. नंतर पुढें दिलेल्या रसाचीं त्यास पुटें द्यावीं. विशेष तांबडा रंग करण्यास जास्त पुटें द्यावीं इच्छित पुटें दिल्यानंतर तीं हळकुंडें सुकवावींत व पूर्ण वाळल्यानंतर तीं खलबत्त्यांत बारीक कुटावीं व वस्त्रगाळ करावीं म्हणजे कुंकू तयार झालें. चार पासून सात पुटें दिल्यास गंधाचे रवे तयार होतात

पुटें देण्याचा रस तयार करण्याची कृतिः—२ तोळे पापडखार, ४ तोळे सवागी हीं एकत्र कुटून वस्त्रगाळ करावीं; व त्याचा लिंबाच्या रसात खल करावा म्हणजे पुट देण्याचा रस तयार झाला. हे मिश्रण कल्हई केलेल्या भांड्यात किंवा काचेच्या भांड्यात वापरावें.

पुटें देण्याची रीतः—साल काढून ठेवलेली हळकुंडें वर लिहिलेल्या रसात भिजवून सावलींत सुकूं द्यावीं. तीं सुकलीं म्हणजे एक पुट बसलें. त्याप्रमाणें प्रत्येक वेळीं रसात भिजवावीं व सुकवावीं. जितक्या वेळ ही क्रिया होईल तितकीं पुटें बसलीं असे समजावें. पुटें दिलेल्या हळकुंडास आपण गंधाचे रवे म्हणतो.

कृति दुसरी.—५ भाग पाण्यांत १ भाग गंधकाम्ल घालून त्या मिश्रणात भिजतील इतक्या बेताचे हळकुंडाचे लहान लहान केलेले तुकडे भिजत घालावे. दोन दोन दिवसांनीं पाणी बदलून दुसऱ्या रांजणात भिजत ठेवावे. भिजल्यानंतर तसल्याच पाण्यात बेताचा पापडखार विरवून त्यात ते शिजवून वाळवावे, म्हणजे उत्तम लाल हळकुंडे तयार होतात.

कृति तिसरी.—हलक्या प्रतीचें स्वस्त कुंकू तयार करण्यासाठीं दुसऱ्या कृतींत सांगितलेल्या पाण्याच्या मिश्रणांत खडी भिजत घालतात. नंतर ती पूर्णपणें भिजून मऊ झाल्यावर शिजवून उन्हात वाळवितात.

रंगांत हळकुंडें अगर खडी वरील कृतीप्रमाणें तयार झाल्यावर मुसलमानीं कुटून बारीक करितात नंतर ती पूड मोठ्या जात्यांतून २ वेळ दळून काढितात. म्हणजे पिंजर किंवा कुंकू तयार होतें. खडीच्या कुंकवास हलकें " राशी " कुंकू असें नाव आहे हळकुंडाचें वरील कृतीप्रमाणें केलेलें कुंकू उत्तम समजतात. हा धंदा चालविणें बरेंच खर्चाचें व मेहनतीचें आहे. [खानापूरकर—कलानिधि; वैद्य—महाभारत- उपसंहार]

कुक्षी—मध्यहिंदुस्थानांतील धार संस्थानच्या परगण्याचें मुख्य ठिकाण. हें विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं समुद्रसपाटीपासून १७४६ फूट उंचीवर आहे. लोकसंख्या (१९११) ६२४८. हें इ. स. १७४८ पासून धार संस्थानच्या ताब्यात आलें. हें गुजराथ आणि माळवा यांच्या जुन्या व्यापारी मार्गावर असल्यामुळें फार महत्वाचें होतें. पण रेल्वेमुळें जुना व्यापारी मार्ग बंद झाला व याचें महत्व

लयास गेलें. बढवींणीपासून बाग व अमझेराकडे जाणारी पक्की सडक या गांवांतून जाते.

इ. स. १८९४ त अग्निप्रलयामुळें गांवाची नासाडी झाली. येथें इस्पितळ, शाळा, डांक व तारघर, कापूस दाबून गाठी बनविण्याचा कारखाना व रेस्टहाउस (विश्रांतिगृह अथवा धर्मशाळा) आहेत.

कुक्सहॅवन—एल्ब नदीच्या मुखाच्या पश्चिम टोकास वसलेलें हॅम्बर्ग संस्थानातील जर्मनीचें एक बंदरी शहर. लोकसंख्या (१९००) ६८९८ हें बंदर चांगलें असून सुरक्षित असल्यामुळे तुफान चालले असताना पुष्कळ वेळा जहाजें येथें आश्रयाकरिता येतात. १८९१–१८९५ त येथें २६ फूट खोलीचें एक नवीन बंदर बांधलें; त्याचा पुढचा भाग १००० फूट लांब व ८०० फूट रुंद आहे. हॅम्बर्ग–अमेरिकन डाकेच्या बोटी येथपावेतों येतात व येथूनच सुटतात. हें बंदर जकातीच्या मर्यादेबाहेर आहे. येथें कोळसा, विटा व इमारती लाकूड हे जिन्नस परदेशातून येतात व येथून मासे परदेशीं रवाना होतात हॅम्बर्गचे लोक त्या ठिकाणीं समुद्र-स्नानाला येतात. येथे दीपगृह असून पाण्यात पडलेल्यांचे जीव वाचविण्याकरितां नौका व जलमार्गदर्शक तयार असतात. १८७३ मध्यें दोन खेडीं एकत्र करून हें शहर बनलें आहे. हीं खेडीं १३९४ पासून हॅम्बर्गकडेच होतीं.

कुंग्ययोन—खालच्या ब्रह्मदेशांत हंथवडी जिल्ह्यातील एक तहशील. हिचें क्षेत्रफळ ४३८ चौ. मै असून खेड्याचा संख्या १२९ आहे. मुख्य ठिकाण कुंग्ययोन. याची लो. सं. १९११ सालीं ८१३४९ होती. १९०३–०४सालीं लागवडीचें क्षेत्रफळ २६७ चौ. मै. असून कालीचें उत्पन्न ५,२५,००० होतें.

कुंच, त ह शी ल.—संयुक्त प्रांतांत जालौन जिल्ह्यातील एक तहशील. हिचें क्षेत्रफळ ३५६ चौ. मै आहे. १९११ सालीं लो. सं. १,०४,१७७ होती. तहशिलींत एक शहर व १९७ खेडीं असून जमीनमहसूल सुमारें तीन चार लाख आहे १८९५–९६ सालीं मोठा दुष्काळ पडला होता.

श ह र.—संयुक्त प्रांत. जालौन जिल्ह्यामधलि कुंच तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथें जी. आय पी. रेल्वेच्या एका शाखेचें स्टेशन आहे. याची लो. सं. १९११ सालीं १६४८० होती. अकबराच्या अमदानींत कुंच हें एका महालाचें मुख्य ठिकाण होतें. १८०४ सालीं कुंचपासून ५ मैलांवरील, "अमंत मलाय" किल्ला घेण्याकरितां इंग्रजांनीं प्रयत्न केला होता. परंतु पेंढाऱ्याची मदत किल्ल्यावरील शिबंदीला मिळाल्यामुळें तो फसला. बंडाच्या वेळीं कुंच हें गांव कित्येक वेळां बंडवाल्यांच्या ताब्यांत गेलें होतें. शहराचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग असून पश्चिम भागीं किल्ल्यांत तहशीलकचेरी व पोलिस ठाणें असतें. पूर्वभागीं एक मोठा जुना तलाव असून अलीकडे त्याची बरीच सुधारणा झाली आहे. मध्यभागीं बाजाराची जागा आहे. येथील म्यु. कमिटी इ.स. १८६८ सालीं स्थापन झाली. जालौन जिल्ह्यांत कुंच हें सर्वांत मोठें व्यापाराचें ठिकाण असून येथून धान्य परगांवीं जातें. येथें गुराचा मोठा बाजार भरतो. बाहेरून येणाऱ्या पदार्थांत साखर तंबाखु व तांदूळ हे मुख्य होत.

कुचबिहार, सं स्था न — हें उत्तर बंगालांतील एक संस्थान आहे व यात कोच जातीचें वास्तव्य असल्यामुळें या संस्थानास हें नाव मिळालें आहे. याचें क्षेत्रफळ १३०७ चौरस मैल आहे याच्या उत्तरेस जलपायगुडी जिल्हा असून पूर्वेस गोलपाडा जिल्हा आहे व दक्षिणेस रंगपूर असून पश्चिमेस रंगपूर व जलपायगुडी हे जिल्हे आहेत. या संस्थानातील प्रदेश सखल मैदानाचा असून त्यामधून पुष्कळ नद्या वहात जातात, परंतु या नद्यांचा कालव्याकडे उपयोग होत नाहीं. या नद्यांपैकीं मुख्य म्हटल्या म्हणजे, तिस्ता, सकोश, धर्ळा, तोरसा, कालजानी, रईदाक वगैरे होत. या सर्व नद्या हिमालयांत उगम पावून ब्रम्हपुत्रेस जाऊन मिळतात.

या संस्थानातील जमीन नद्यातून वाहून आलेल्या मळीची बनलेली असल्यामुळें तींत उत्तर बंगालमधील सर्व पिकें होतात. जेथें पीक काढीत नाहीं तेथें थोडीशी नैसर्गिक झाडी आहे. या प्रदेशात फारशीं झाडें नसून त्याचा बहुतेक भाग गवतानें व्यापिला आहे. या प्रदेशातील झाडांपैकीं मुख्य आंबा, शिसू बाबू, ताड व सुपारी हीं झाडें होत. या प्रदेशांत चित्ते, अस्वल, हरीण, डुकर वगैरे रानटी जनावरें आहेत.

याचें उष्णमान ९३° अंशापेक्षा कधीं अधिक नसतें. उष्णतेचें प्रमाण अगदीं कमी म्हटलें म्हणजे ४९° असतें व मध्यम ७८° असतें. येथील हवा फार दमट असल्यामुळे प्रकृतीवर तिचा अनिष्ट परिणाम होतो. या संस्थानांत दरवर्षी १२३ इंच पाऊस पडतो.

या संस्थानात १८८० सालीं तुफान होऊन बरेंच नुकसान झालें पुढें १८९७ त धरणीकंप झाला. मधून मधून पावसाळ्यात पुरानेंहि गांवांचा थोडाबहुत नाश होतो.

इ ति हा स.- पुरातन काळीं या संस्थानाचा कामरूप राज्यात समावेश होत असे. १५ व्या शतकात याच्यावर सेन घराण्याचें राज्य होतें. या घराण्याचा शेवटचा राजा नीलांबर याला गौरचा नबाब अल्लाउद्दीन हुसेन यानें १४९८ त गादीवरून काढून आपल्या मुलास गादीवर बसविलें. पण त्याचा तेथें फार दिवस टिकाव लागला नाहीं. यानंतर कांहीं दिवस या प्रदेशांत सर्वत्र अंदाधुंदी माजून राहिली होती; व जिकडे तिकडे लहान जहागिरी दृष्टीस पडत होत्या. पुढें १५१० त या संस्थानावर चंदन नांवाच्या कोच घराण्यांतील पुरुषानें आपलें राज्य स्थापन केलें चंदनाच्या पाठीमागून त्याचा चुलतभाऊ बिसवासिंग गादीवर आला यानें करतोया नदीपासून बर्नादीपर्यंतचा सर्व मुलुख काबीज केला. पुढें

१५४० त नरनारायण हा गादीवर बसला. यानें सिलराय नावाच्या आपल्या भावाच्या मदतीनें पूर्व व दक्षिणेकडील सर्व देश काबीज करून मुसुलमानावर स्वारी केली. सिलरायाच्या मरणानंतर नरनारायणानें आपल्या राज्याचे दोन भाग करून, संकोश नदीच्या पूर्वेकडील भाग सिलरायाचा मुलगा रघुनाथ यास दिला. यापुढें कोच घराणें लवकर लयास गेलें. नरनारायण १५८८ त मरण पावला, व त्याचा मुलगा लक्ष्मीनारायण हा गादीवर बसला. याने रघुनाथाचा मुलगा परीक्षित याच्या विरुद्ध लढाई पुकारून मोंगलाची मदत मागितली व त्यामुळें तो पुढ दिल्लीच्या बादशहाचा अंकित बनला. याप्रमाणें कोच घराण्यास उतरती कळा लागल्यावर राज्याचा पूर्वभाग अहोम लोकांनीं बळकाविला व पश्चिम भाग मोंगलानीं व भूतानमधील भूतिया लोकांनीं आपल्या घशांत टाकण्यास सुरवात केली. कांहीं दिवसांनीं बिसवासिंगाच्या वंशजाच्या ताब्यात फक्त कुचबिहार प्रदेश राहिला. याच सुमारास राजकुळांतील नाझिरदेव, दिवाणदेव व वैकुंठपूरचा रईकत या तीन इसमात अधिकाराबद्दल तंटा उपस्थित झाला १७७० त नाझिरदेवाला त्याच्या शत्रूंनीं राज्यातून हाकून लाविलें. त्यावेळीं त्यानें वॉरन हेस्टिंग्ज याजपाशीं कुमक मागितली. इंग्रजानीं मदत करून नाझिरदेवास पुन्हा अधिकारावर नेऊन बसविलें. यावेळीं (१७७३) इंग्रज व कुचबिहारचा राजा याच्यात तह होऊन राजानें कंपनीचें स्वामित्व कबूल केलें व आपल्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा कंपनीस खंडणीदाखल देण्याचे ठरविलें. १७८० त या खंडणीची रक्कम ६७,७०० रु. ही कायमची ठरविण्यात आली. १७८८ त संस्थानच्या बिघडलेल्या राज्यकारभाराची चौकशी करण्याकरिता इंग्रजानीं एक कमिशन नेमलें व त्याच्या सल्ल्यानें एका रेसिडेंटाची योजना झाली पुढें याच रेसिडेंटास गव्हर्नर जनरलचा एजंट हा किताब मिळाला. सध्याचे महाराज हे अज्ञान आहेत. त्यांची मातोश्री राणी इंदिरादेवी या बडोद्याचे श्री. सयाजीराव महाराज यांच्या कन्या (इंदिराराजा) होत. यांच्या पतीचे (गत महाराजाचें) नाव जितेंद्र नारायण भूप बहादुर असें होतें. हे दोन वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें वारले. संस्थानिकास १३ तोफांच्या सलामीचा मान आहे. या संस्थानांतील कमातापूर येथें राजा नीलध्वजानें वसविलेल्या शहराचे अवशेष आहेत. खास कुचबिहार हे राजधानीचें गाव तोरसा नदीच्या कांठीं असून तें टुमदार शहर आहे. येथें कॉलेज आहे.

१९२१ सालीं संस्थानची लो. सं. ५९२४८९ होती संस्थानचें उत्पन्न ३२,६१,११० रु. आहे. संस्थानांत एक आर्ट कॉलेज व ८ हायस्कुलें आणि २७२ देशी शाळा आहेत. रात्रीच्याहि शाळा ८०१५० पर्यंत व मुलींच्या शाळा ११२० पर्यंत आहेत. तुरुंग, दवाखाने वगैरे चांगले व व्यवस्थित आहेत. येथील लोकांची भाषा बंगालीची एक शाखा असून तिला रंगपुरी अथवा राजवंशी असें म्हणतात.

शेती —संस्थानांतील जमीन मळईची असून पश्चिमेकडे ती कठिण होत जाते. उंच जमीनींत तंबाखू व उन्हाळ्यांतील भाताचें पीक होतें व सखल जमीनींत पावसाळ्यांतील साळीचें पीक होतें. मुख्य पीक म्हटलें म्हणजे तांदूळ, ताग व तंबाखू हें होय याशिवाय, ऊस, चणे, मका, मूग, मसूर, मोहरी व इतर गळिताचीं धान्यें यांचें उत्पन्न होतें. संस्थानांतील मूळचीं गुरेंढोरें लहान असून तीं जातिवंत नाहींत. संस्थानाला बैल वगैरे बाहेरून आणावे लागतात. संस्थानात पुष्कळ तलाव व विहिरी आहेत. पर्जन्यवृष्टीहि बरीच होते. राज्यात दुष्काळ सहसा पडत नाहीं.

व्यापार व दळणवळण —येथें हलक्या प्रतीचे सुती व रेशमी कापड निघत. मेखलीगंज येथें उत्तम (पोत्यांचीं) तरटें होतात. पूर्वी रंगीत सतरंज्या व गालिचे याच्याकरिता या राज्याची प्रसिद्धी होती. परंतु आतां हा धंदा बुडत चालला आहे. संस्थानाच्या पश्चिम व दक्षिण भागात तूप, मोहरीचें तेल व काकवी तयार होते. या संस्थानातून बाहेर जाणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे तंबाखू, ताग, तांदूळ, मोहरी, मोहरीचें तेल साखर, काकवी, मीठ व तांबे, पितळ आणि भांडीं भांडीं हे होत. संस्थानाच्या मालकीचा ५० मैल लांबीचा आगगाडीचा रस्ता आहे. संस्थानात नद्या बऱ्याच असल्यानें जलमार्गाचा प्रवास व वाहतुक नावाच्या योगें होत. या नावातून ३ ते ११ टन पर्यंत ओझें जातें.

राज्यव्यवस्था. —राज्यकारभार पाहण्यास (माजी राजाच्या वेळचें) एक मंडळ नेमले असून त्याचा महाराजा हा अध्यक्ष असतो व दिवाण, एक सुपरिंटेंडेंट, फडणीस, मुलकी व फौजदारी न्यायाधीश, न्यायमंत्री वगैरे हे सभासद असतात संस्थानाचे कुच बिहार, दिवहाट, माताभंग, मेखलीगंज व तुफानगंज असे ५ विभाग केले आहेत. वरील मंडळास हायकोर्टाचा अधिकार असून जमीनमहसुलीसंबंधीं प्रश्नाचा विचारहि तेंच करितें. याशिवाय कायदे करून ते अमलात आणण्याचा हक्कहि या मंडळास आहे.

सुपरिंटेंडेंट या अधिकाऱ्याची नेमणूक इंग्रज सरकाराकडून होत असून त्याच्या ताब्यात फौजदारी, न्याय, पोलिस, शिक्षण, तुरुंग व इतर किरकोळ खातीं असतात दिवाणाकडे सारा व इतर कर वसूल करण्याची व त्यासंबंधीं प्रत्येक हालचालींवर देखरेख करण्याची जबाबदारी असते. त्याचा दर्जा इंग्रजी कलेक्टर व काहीं बाबतींत कमिशनर यांच्या बरोबर असतो. पोटविभागावर नायब अहलकार (अधिकारी) हा दिवाणाचा मदतगार असतो व त्याच्या ताब्यांत खजिना असतो. नायब अहलकाराच्या हाताखालीं सब(नायब) अहलकार असतात व यांच्या मदतीकरितां कानगोची नेमणूक

केलेली असते. वरील अहलकार व सेशनजज्ज हे न्यायनिवाडे करतात. अखेरचा निकाल संस्थानिक मंडळ देतें.

या संस्थानांत जोतदारामार्फत जमीनीचा सारा वसूल करण्याची वहिवाट आहे पण हल्लीं संस्थानांतील कांहीं भागांत सारा कायमचा ठरविण्यांत आला आहे. यांतील अबकारी खात्याची व्यवस्था इंग्रजी अमलखालील प्रदेशाप्रमाणें आहे. संस्थानांत आयात मालावर व मिठावर पूर्वी जकात नव्हती. कुचबिहार येथें व इतर विभागाच्या मुख्य ठिकाणीं सरकारी व बिनसरकारी सभासदांच्या गांवसभा असून त्याच्याकडे म्युनिसिपालिटीचें काम असतें. या सभावर मंडळाची (कौन्सिलची) देखरेख असते. [इंपी. ग्या. भाग १०; बंगाल ॲडमिनि. रिपोर्ट. १९२१-२२]

कुचला—हें एक मध्यम आकाराचें गळनशील झाड आहे. त्यास इंग्रजींत स्नेकवुड; लॅटिनमध्यें नक्स व्हॉमिका किंवा स्ट्रिक्नाइनचें झाड व मराठींत, काजरा, कुचला, निर्मळ वगैरे नावें आहेत. संस्कृतमध्यें त्यास विषमुष्टि व कारस्कार हीं नांवें आहेत.

उत्तरहिंदुस्थानांत गोरखपूरचीं जंगलें, बंगाल, ओरिसा, व दक्षिण हिंदुस्थानांत मद्रास इलाख्यांत व ब्रह्मदेश सिलोनमध्यें हें आढळतें.

कुचल्याच्या बिया वाटोळ्या असून चपटया किंवा एका बाजूनें खोलगट व दुसऱ्या बाजूनें फुगीर असतात. त्यावर पांढुरकी लव असल्यामुळें त्यांचा रंग रुपेरी दिसतो. कुचल्याचीं फळें गोळा करून धुवून त्यांतील बिया काढतात व उन्हांत वाळवितात. जमीनीवर पडलेल्या बिया गोळा केल्यास त्यांना बाजारात फारशी किंमत येत नाहीं. हिंदुस्थानातून मुख्यतः मद्रास, मुंबई व कोचीन येथून बियांची निर्गत होते. लंडनच्या बाजारात कुचल्याच्या बिया सामान्यतः दर हंड्रेडवेटास ६ ते १८ शिलिंग या भावानें विकतात. १९१२ सालीं ६ शिलिंग हा भाव व १९१८ त १८ शिलिंग भाव होता.

या बिया फार औषधी असून त्यापासून स्ट्रिक्नाइन व ब्रुसाइन नांवाचे दोन महत्वाचे अल्कलॉइड तयार करतात. बियांचें तेलहि औषधी आहे. शिवाय त्यापासून एक प्रकारचा रंगहि तयार होतो. त्यानें सुती कापडावर फिकट तपकिरी छटा येते. निलगिरीवरील डोंगरी लोक मासे मारण्याकरितां या विषाचा उपयोग करतात. कुचल्याची साल व लांकूडहि औषधी आहे. ब्रह्मदेशांत कुचल्याच्या लांकडाच्या गाडया, शेतकीचीं आउतें व लहान लहान पेटया करितात.

१९१८-१९सालीं६२१''८हंड्रेडवेट वजनाचा १८ शिलिंग दराचा ५७६०६ पौंडांचा कुचला परदेशीं रवाना झाला. कुचला इंग्लंड, बेल्जिअम, जर्मनी, हालंड, फ्रान्स वगैरे देशांत जातो. कोकोनाडा येथून तो माल परदेशीं पाठवितात.

कुचल्याचा मद्यार्क.—एक औंस तीव्र मद्यार्क घेऊन त्यांत ४ ग्रेन स्ट्रिक्निया विरघळूं द्यावा. नंतर ब्लॉटिंगपेपरमधून गाळून घ्यावा.हा अर्क देण्याचें प्रमाण ३ पासून१० थेंबपर्यंत शक्तिप्रमाणें ठेवावें. शुद्ध केलेल्या कुचल्याचें चूर्ण अर्ध्या पासून २॥ गुंजापर्यंत द्यावें. सूक्ष्म प्रमाणानें कुचला घेतल्यास (१ ग्रेनचा सोळावा भाग) कुचल्याचें सत्व हृदयास उत्तेजक व सूक्ष्म वाहिन्यांचा स्तंभ करणारें आहे. कुचल्याचें विषारी सत्व बियांत २ व सालींत १ या प्रमाणानें रहातें.

कुचल्याच्या विषाचीं लक्षणें—हें विष चढलें असतां बहुतकरून धनुर्वाताचीं लक्षणें होतात. विष पोटांत गेल्यापासून ५ मिनिटांपासून अर्ध्या तासाच्या आंत विषाचीं लक्षणें दिसूं लागतात. कधीं कधीं १०।२० मिनिटांच्या आंतच मृत्यु येतो. फार तर ५।६ तासपर्यंत मनुष्य वाचूं शकतो. कुचल्याची बुकी १॥ मासा किंवा स्ट्रिक्निया अर्ध्या गव्हा इतका घेतल्यानें मनुष्य मरतो. कुचल्याची बीं सालीसकट सबंध पोटांत गेल्यास तशीच शरीरास अपाय न करितां पोटांतून बाहेर पडते. कारण तिच्यावरची साल चिवट असल्यानें ती न पचता बाहेर पडून जाते.

औषधी उपयोग—जनावरांस जखम झाल्यास काजऱ्याची बी किंवा मुळी जखमेवर उगाळून लावावी म्हणजे विकार दूर होईल.

कुचल्याच्या विषावर.—कुचल्याच्या बिया तुपांत परतून त्या रोज क्रमवृद्धीनें सेवन कराव्या. संधिवात झाला तर त्याजागीं कुचल्याची बी उगाळून वर लावावी. घुशी, उंदीर कमी व्हावयास कुचल्याच्या बियांचें चूर्ण करून तें पिठात मिसळावें व त्या पिठाच्या गोळ्या करून उंदीर खातील अशा ठिकाणीं ठेवाव्यात. बाळंत रोग, हिंवताप, जाऊन शक्ति यावयास शुद्ध केलेल्या कुचल्याच्या बियाचें चूर्ण ५।२ गुंजा मधांतून द्यावें [वॅट; कॉटन. पदे.]

कुंचावन— राजपुतान्यामध्यें जोधपूर संस्थानच्या साबर जिल्ह्यातील याच नावच्या जहागिरी इस्टेटचें मुख्य ठिकाण. हें जोधपूर बिकानेर रेल्वेच्या नारायणपूर स्टेशनपासून ८ मैल उत्तरेस आहे. येथें एक मजबूत तटबंदी किल्ला असून गावात बंदुका, तरवारी वगैरे तयार करतात व त्याच्याकरिता गांवाची प्रसिद्धि आहे. जवळच साबर सरोवराचें लहान स्वरूपच कीं काय असें एक खाऱ्या पाण्याचें तळें आहे. त्यातील मीठ अगदीं वाईट असतें.

या इस्टेटींत १४ खेडीं असून तीं रजपूत राठोडच्या मर्तिया जातीच्या ठाकुराकडे आहेत. येथील ठाकूर कधीं कधीं संस्थानच्या कौन्सिलचे सभासदहि असतात.

कुंजपुर—पंजाबांत कर्नाळ जिल्हा व तहशील यातील एक जहागीर. ही मोंगल बादशहांच्या वेळीं पठाण सरदार नजाबतखान यानें स्थापिली आहे. नजाबतखानानें यमुना नदीच्या दलदलींत एक किल्ला बाधून बादशहाच्या विरुद्ध बंड

केलें. १७३९ त तो नादिरशहाच्या बाजूला असल्यामुळें नादिरशहानें त्याला कुंजपूरचा नबाब म्हणून मान्य केलें. सदाशिवराव भाऊनें दिल्ली घेतल्याबर कुंजपुऱ्यावर जाऊन अबदालीचा मार्ग रोखून धरण्याचा बेत केला. त्याप्रमाणें ता. १७।१०।१७६० रोजीं कुंजपुराचा पाडाव केला व अब्दुस्समदखाना(नजाबतखान ?)चा शिरच्छेद करविला. १७८७ सालीं शिंयानें जिंद राजाला कर्नाळहून हांकलून दिलें. पुढें १० वर्षांनीं जनरल पेरॉन यानें गुलशेरखान यास कुंजपूरचा नबाब म्हणून मान्य केलें. त्याचा मुलगा रहिमतखान हा ब्रिटिशांच्या संरक्षाणखालीं गेला. सन १८४६ त कुंजपुरच्या नबाबाची सत्ता नाहींशीं झाली. तेव्हांपासून त्याच्यामध्यें एकसारखे कज्जे सुरू आहेत. सांप्रतचे नबाब १८८६ त गादीवर बसले. ३८ खेड्यांचीं त्याना जहागीर आहे. वार्षिक उत्पन्न सुमारें ६०,००० रु. चें आहे.

कुंजर—ह्या वनस्पतीस लॅटिनमध्यें कोलोसिआ ॲरिस्टट व मराठींत कुंजर हीं नावें आहेत. ही जंगली भाजी आहे. ही बाजरी जोंधळ्याच्या शेतात, बाधाबर व ओसाड जागेंत आपोआप पडलेल्या बियापासून उगवते. हें झाड आघाड्यासारखें पण कमी उंच वाढतें. हिच्या पानाची कोंवळेंपणीं व कोंवळ्या शेड्याची भाजी करितात. [वनौ. गुणा.]

कुंजा— पंजाब प्रांत. गुजराथ तहशिलींतील एक गांव. हें गुजराथ शहरापासून ७ मैल आहे. १९११ सालीं याची लो. सं. ७०९० होती. काश्मीरचे सुभे दिवाण कृपाराम याठिकाणीं कांहीं दिवस रणजितसिंगाच्या अमदानींत रहात होते. येथें एक शाळा व दवाखाना आहे. व्यापार वगैरे कांहीं एक नाहीं.

कुंजुरी—कुंजुरी किंवा मालकांगोणी. ह्या वनस्पतीच्या वेली असतात हीचीं संस्कृतमध्यें ज्योतिष्मती, गुजराथींत मालकांगोणी,इंग्रजींत ब्लॅक ऑइल प्लॅन्ट इत्यादि नांवें आहेत. ह्या वेलीस पर्जन्यकाळीं बारीक फळाचे मोठे घोंस येतात. पहिल्यानें फळांचा रंग हिरवा असतो. परंतु पिकल्यावर पिंवळा होतो. आणि तीं उकलून फुटलीं म्हणजे त्यांचा लाल भडक रंग दिसतो. ही वेल समुद्रसपाटीपासून ४००० फूट उंचीवरील जागेंत पूर्वबंगाल, बिहार, दक्षिणहिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि सिलोन (लंका) या ठिकाणीं आढळते. झेलम व आसाम यामधील भागांतहि हे वेल आढळतात.

उ प यो ग.—या फळांच्या बियापासून गर्द शेंदरी किंवा पिंवळ्या रंगाचें तेल निघतें. या तेलाचा अंगाला लावण्याच्या औषधासारखा उपयोग करतात. तें कधीं कधीं दिव्यातहि जाळितात व कांहीं धार्मिक विधींच्या वेळीं तें उपयोगी पडतें. या तेलाचें महत्व मुख्यत्वेंकरून त्यापासून निघणाऱ्या ओलिअमनिग्रम नांवाच्या औषधामुळें आहे. बेंझोइन, लवंगा, जायफळ, वगैरे पदार्थांसह या तेलाचें ऊर्ध्वपातन केल्यास हे औषध मिळतें. दहापासून पंधरा थेंब पर्यंत या तेलाचें सेवन केल्यास तें उत्तेजक व स्वेदोत्पादक असतें. हें तेल उत्तरसरकारात तयार होतें. विजगापट्टण व एलोर येथील तेल तर फार अप्रतिम असतें. या वेलीच्या लाल बिया व पानें यांचा देशी औषधांतून उपयोग करतात. एक पौंड बियांना सुमारें दोन आणे पडून एक हंड्रेडवेट तेलाची किंमत अजमासें २० रुपये असते. बियाच्या आगीं बुद्धिवर्धनाचा गुण आहे असें कांहीं लोकांचें मत आहे.

औ ष धी उ प यो ग—अफूच्या विषावर मालकांगोणीच्या पाल्याचा रस पाजावा. खरजेवर बियाचें तेल लावावें. [वनौ. गु; पदे;].

कुंज्रा.—यांची वस्ती बिहार–ओरिसा, संयुक्त प्रांत व इतर प्रांतामध्यें आढळते. एकंदर लो. सं. (१९११) २ ७९,२५७ आहे. पैकीं ८९३ च कायते हिंदू आढळले. बिहार–ओरिसामध्यें सुमारें दोन लाख वस्ती आहे. संस्कृत कुंज शब्दावरून हा शब्द आला असावा. या जातीचा धंदा म्हणजे भाजी व फळें विकणें हा होय. मेवाफरोश, सब्झ–फरोश व सब्झी-फरोश असेंहि त्यास म्हणतात. भाजी व फळेंविक्याचा धंदा करणाऱ्याना लखनौमध्यें कुंज्रा, कबारी व खाटिक म्हणतात मुराव, कच्छी व काबुली व्यापारी हे त्यांनां माल आणून देतात. कुंज्रा जातीला अरैन अथवा बागवान असेंहि म्हणण्यात येते. बंगालच्या कांहीं भागांत कुंज्रा हा अपशब्द असून ते लोक स्वतःस मेवाफरोश, सब्झ फरोश अथवा बेपारी असें म्हणवून घेतात.

मिर्झापूर येथें त्याचे ज्ञातिविषयक दोन पोटभेद आहेत. व त्याना कलकतिया व मिर्झापुरीया म्हणतात. खानेसुमारीच्या आकड्यावरून कुंज्रा जातीचे ९४ वर्ग आहेत असें दिसतें. गोरखपुरी, जैसवारा, जैनपुरिया काश्मिरी, कोल्हापुरी, पुरभैया, सर्वाशिया, उत्तराह असे यांचे स्थानिक विभाग आहेत. बागवान, माळी, कबरिया, तंबाखूवाला असे धंद्यावरून झालेले वर्ग आहेत. भूइनहारी, चौहाण, कहारिया, लोधी, मेहतरीया, राजपूत वगैरे वर्ग प्रसिद्ध जाती वरून झाले आहेत. अशा तऱ्हेचे वर्ग असले तरी कुंज्रा लोकांत आपसात विवाह होतात. या जातींत असगोत्रविवाहच रूढ आहेत. बहुपत्नीत्वास मुभा असून दुसऱ्या लग्नास पंचाकडून परवानगी घ्यावी लागते. वधूवरांची १२व१४ व्या वर्षी लग्नें होतात. चार हौआ हा एक लग्नविधि असून त्यांत मुसुलमानी 'शराह' गायिले जातात. सगाई प्रकारामुळें विधवांना लग्नें करता येतात पण तें लग्न स्वज्ञातीयांशीं होणें जरूर असतें.

कुंज्रा हे सुनी पंथाचे मुसुलमान होत. त्यांच्या देवता, गाझीमियान व पीर अशा आहेत. या देवतांस ते फळें, मिठाई व सरबत अर्पण करतात. मृतांस ते इमामबारा येथें पुरतात. ईदच्या दिवशीं ते शेवया व दूध वाटतात व 'शबिबारात'च्या वेळीं हलवा, मिठाई व भाकर हे पदार्थ मृतात्म्यास अर्पण करण्याची त्यांची चाल आहे. असें म्हणतात कीं,

शहरांतील त्यांच्या स्त्रियांचा सौंदर्याबद्दल फार लौकिक असतो. गिऱ्हाइकांनां आकर्षिणाऱ्या सुस्वरूप स्त्रिया या आपल्या दुकानांत निर्भीडपणें मालविक्रीकरिता बसतात. हे लोक दारू पितात व गायी, शेळया वगैरेंचें मांस खातात. मेहतरखेरीज सर्व मुसुलमानांबरोबर ते जेवतात व तंबाखू ओढतात. हल्लीं त्याच्यातील कांहींजण शेती करूं लागले आहेत. साधारणपणें कुंजरा जात मोठी उद्योगी व सदाचरणी असते. [क्रूक].

मध्यप्रांतात यांनां कुंजडे म्हणतात. ही जात मुसुलमान आहे. याची संख्या १६०० आहे. पण यांच्या पुष्कळ चाली हिंदुसारख्या आहेत. मुसुलमानाप्रमाणें दुधाचा संबंध असलेल्याचा विवाह होत नाहीं. वाङ्‌निश्चयाच्या वेळीं मुलाच्या हाताला लावण्यास मेंदी पाठवितात. वर बैलावर बसून लग्नमंडपात जातो. पण लग्न मुसुलमानी निकाविधीनें लागतें. लग्न सकाळीं ४ वाजतां होतें. सासरा मुलीला मेहेर म्हणून कांहीं रुपये देतो. लग्नानंतर एक पेला सरबत वरास देतात, तो अर्धे पिऊन अर्धं वधूस पिण्यास देतो. विधवाविवाह कलमा पढून खजूर वाटून करतात. घटस्फोट मुसुलमानी तलाक पद्धतीनें करतात. कांहीं मुसुलमानी सण हे लोक पाळतात. मुलाचें नाव जन्म दिवशींच ठेवतात व त्याकरता कधीं कधीं ब्राह्मणासहि बोलावतात. मुलें वाचत नसलीं तर एका मुलाला शेंडी ठेवतात. याच्या बायका फार भांडखोर असतात. दोन बायका भांडू लागल्या तर त्याच्या नवऱ्यानां निमूट बसावे लागतें. ते मध्यें पडले तर त्याना जातींतून बाहेर काढतात. हे लोक प्रेतें पुरतात. तिसऱ्या व चाळीसाव्या दिवशी जातिभोजन घालतात [रसेल व हिरालाल].

कुटकी—या वनस्पतीस संस्कृतांत कटुकी, तिक्त रोहिणी, मत्स्यपित्ता; लॅटिनमध्यें पिक्रोरिझा कुर्वा; मराठींत कुटकी, बाळकडू; हिंदींत काळी कुटकी; गुजराथींत कडू इत्यादि नावें आहे.

कुटकीची उत्पत्ति हिमालय पर्वताच्या उतरणीवरील कुमाऊन प्रातात विशेष होते. या वनस्पतीचीं मुळें तेथून हिंदुस्थानात येतात. काश्मीरपासून सिकीमपर्यंत ११००० पासून १५००० फूटाच्या उंचीवर ही वनस्पति विपुल सापडते. ही बहुवर्षायु आहे.

मुळापैकीं कांहीं भाग नरम व कांहीं भाग काष्ठमय असतो. पानें दीर्घवर्तुळ, बुडख्याकडे बारीक असून टोंकाकडे रुंदावत जाणारीं, व साधारणतः गुळगुळीत असून त्यांचे कांठ कातरलेले असतात. या झाडास गहिऱ्या निळया रंगाच्या फुलांचे दाट गुच्छ येतात. या वनस्पतींचीं मुळें औषधात वापरलीं जातात. वरील साल काढली म्हणजे आंतील भाग काळया रंगाचा असतो. त्यावरून हीस काळी कुटकी हें नाव पडलें असें दिसतें.

औ ष धी गु ण.—कुटकी हें सौम्य रेचक आहे. पित्तज्वरावर कुटकी, ज्येष्ठमध, द्राक्षें, व कडू निंबाची साल प्रत्येकी सहा मासे यांचा ३२ तोळे पाण्यात ½ काढा उरवून घेतला असतां पित्तज्वर नाहींसा होतो. पाणथरीवर ४ पासून ८ मासेपर्यंत कुटकीचें चूर्ण रोज सकाळीं किंवा रात्रीं द्यावें. जलोदरावर कुटकीचा अष्टमाश काढा दिवसांतून ३।४ वेळ दिल्यानें मलमूत्रद्वारें खूप पाणी निघून जाऊन पोट हलकें होऊन सूज उतरते.

कावीळ रोगावर कुटकीचें चूर्ण साखरेंतून द्यावें. [पदे. वैद्यक शब्दसिंधु. सेनगुप्त –आयुर्वेदिक सिस्टिम ऑफ मेडिसिन]

कुटासा—वऱ्हाड. जिल्हा अकोला. तालुका अकोट. अकोटच्या आग्नेयीस दहा मैलांवर हें खेडेगांव आहे. लोकसंख्या (१९०१) १८६३. पूर्वी हा गांवद हिवडा परगण्याचा तर्फ होता. या ठिकाणीं ४० मिठाच्या विहिरी आहेत. त्यातून दरवर्षी प्रत्येकीं १००० रुपयाचें मीठ पूर्वी निघत असे. येथें पांच पाटील असून प्रत्येकाची निरनिराळी गढी आहे. येथें एक कोटेश्वराचें (महादेवाचें) हेमाडपंती देऊळ असून यावरूनच या गावास कुटासा हें नाव पडलें आहे असें म्हणतात. या देवळाच्या एका खांबावर देवनागरी लिपींत एक लहानसा शिलालेख आहे. परंतु त्याचा अर्थ कोणाला अजून कळला नाहीं. अक्षराखालीं डोकें मागें झुकलेलें आहे, व हातात तलवार घेतलेली आहे अशा एका स्त्रीचें चित्र कोरलेले आहे. गावकऱ्याकडून देवळास ३२ एकर जमीन इनाम आहे. चैत्र वद्य ७ स उत्सव होतो पूर्वी येथें ५००० लोकाची वस्ती होती असें म्हणतात.

येथील तलावाच्या बांधावर मलंगशहा मिया याचें थडगें असून तें चागल्या स्थितींत आहे. येथें एक दादा महाराज ब्रह्मचारी याचें देऊळ नुकतेंच बांधिलें आहे हा साधू काशी व पंढपूर येथें रहात होता. याविषयीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं.

कुटुंब—या शब्दाची व्याख्या काय करावी असा प्रश्नच येतो. सापत्तिक दृष्ट्या म्हणजे कांहीं वस्तूंच्या मालकीचें अधिष्ठान या दृष्टीनें व्याख्या करूं लागलों तर विवाहित अविवाहित असा भेद करावा लागेल. शिरोगणतीकारांनीं एकत्र वस्ती हें कुटुंबाचें मुख्यत्व मानून हॉटेल हें एक कुटुंब धरलें आहे. येथें स्त्रीपुरुषाची कायदेशीर, संयुक्त, स्थिति हीच कल्पना घेऊन त्या दृष्टीनें कुटुंबसंस्थेच्या विकासाचे विवेचन करण्यात येत आहे.

या विषयासंबंधानें यूरोपमध्यें जे विचार प्रचलित होते आणि अर्वाचीन समाजशास्त्रज्ञाकडून जे विचार वदले गेले त्याचा थोडक्यात परामर्ष घेतला पाहिजे. यूरोपातील सामान्यतः प्रचलित कल्पना जेथून उगम पावल्या तीं स्थळें येणेंप्रमाणें:—

एक विचाराचा उगम बायबलापासून होय. यात सर्व मनुष्यमात्राची उत्पत्ति एका कुटुंबापासून दाखविली आहे. आणि त्या कुटुंबाचें स्वरूप सध्याच्या हिंदु कुटुंबापासून फारसें भिन्न नाहीं. म्हणजे बायबलावर भक्ती ठेवणाऱ्या

यूरोपियन लोकांची अशी कल्पना होती कीं, सध्यांचें कुटुंबाचें जें स्वरूप आहे तें जवळ जवळ अनादि व सनातन आहे. फरक येवढाच कीं, पूर्वी अनेक बायका एक नवरा करीत असत, परंतु तें सध्यां प्रचलित नाहीं.

ॲरिस्टॉटलच्या कल्पना हा यूरोपिअन विद्वान लोकांचा विचाराचा आणि माहितीचा दुसरा उगम होय. ॲरिस्टॉटलची कल्पना अशी कीं, कुटुंबापासून ग्राम झाला व ग्रामापासून राष्ट्र झालें व कुटुंबाची उत्पत्ति मालमत्ता, दासदासी इ. यांचें आश्रयस्थान या एका घटकामुळें व मनुष्याचा स्त्रीशीं संबंध या दुसऱ्या घटकामुळें झाली. थोडक्यात सांगावयाचें म्हटलें म्हणजे जवळजवळ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत म्हणजे नवीन संशोधक येऊन विचारांवर हल्ला करीपर्यंत लोकाची अशी समजूत होती कीं आज कुटुंबाचा जो प्रकार आढळून येत आहे तो पूर्वापार आहे. जुन्या कल्पनांवर ज्या शास्त्रज्ञानीं मोठे आघात केले त्यामध्यें मॅक्लेनन बाकोफन मॉर्गन आणि वेस्टरमार्क यांच्या नावाचा विशेष उल्लेख केला पाहिजे. घराण्याच्या शासनासंबंधाने शास्त्रज्ञामध्यें दोन शब्द प्रथमतः प्रचारांत आले. एक शब्द म्हणजे जनकराज्य ऊर्फ पेट्रिआर्की हा होय आणि दुसरा शब्द म्हटला म्हणजे मातृराज्य मेट्रिआर्की म्हणजे मातृकन्या परंपरा हा होय.

विवाह ही संस्था स्थापन होण्यापूर्वी सर्व पशूंप्रमाणें अनियंत्रित व्यवहार होता असें मत १८६१ पासून १८८० पर्यंत व्यक्त झालें. यात मॅक्लेनन वगैरे ग्रंथकारानीं असें दाखवून दिलें कीं, आज ज्याप्रमाणें बापाच्या मार्फत नातें ओळखतां येतें व मानलें जातें त्याप्रमाणें पूर्वी मानलें जात नसून केवळ आईमार्फत मानलें जात असे. आईमार्फत नातें मानण्याची चाल पाहून अशी कल्पना काढली गेली कीं मुलाचा बाप कोण हें जेव्हां अनिश्चित असेल तेव्हांच आईमार्फत नातें ओळखण्याची प्रवृत्ति पडावयाची. आज बऱ्याच अंशीं ही पद्धति मलबार येथें आहे हें सांगितलें पाहिजे. कारण मलबारमध्यें बापाच्यामार्फत नातें लक्षात घेत नाहींत. नंबुद्री ब्राह्मणास ब्राह्मणीपासून झालेला मुलगा आपल्या सावत्र बहिणीबरोबर म्हणजे आपल्या बापाचा ज्या बाईबरोबर 'संबंध' झाला असेल त्या बाईच्या मुलीशीं पुन्हा 'संबंध' करूं शकतो. मुलाची आई कोण याचें ज्ञान प्रत्यक्ष होणें शक्य आहे परंतु मुलाचा बाप कोण हें केवळ अनुमान आहे. अशा प्रसंगीं आई ही घराण्याची मुख्य समजली जावी हें स्वाभाविक आहे; आणि आई ज्यावेळीं घराण्याची मुख्य असेल त्यावेळेस दुरून अवलोकन करणारास ती परिस्थिति अनियंत्रित व्यवहारासारखी वाटावी यात नवल नाहीं. आणि मातृशासित घराण्यांत अनेकपतित्व हेंहि असणें स्वाभाविकच आहे. तेव्हां ज्यास अनियंत्रित व्यवहार असें म्हणतां येईल त्या परिस्थितींत आणि मातृशासितसमाजांत फारसें अंतर नाहीं. त्याअर्थी समाज मातृशासित होता असें म्हणणें काय आणि स्त्रीपुरुषव्यवहार अनियंत्रित होता असें म्हणणें काय जवळजवळ सारखेंच. स्त्रीपुरुषांचा परस्पर व्यवहार जरी पूर्णपणें अनियंत्रित असला तरी त्याच्या अस्तित्वाबरोबरच मातृशासनाची कल्पना करावयास पाहिजे. कां कीं मातृशासनाशिवाय अनियंत्रित स्त्रीपुरुषव्यवहार देखील अशक्य आहे.

ज्या विकसित संस्कृतीविषयीं आपणांस कांहीं ज्ञान आहे, त्या सर्वांत पितृशासित कुटुंबपद्धतीच चोहोंकडे अगदीं ज्ञात कालापासून प्रचलित आहे. याला फक्त मलबारचें उदाहरण अपवाद आहे. मातृशासित कुटुंबपद्धति आज केवळ प्राचीन अवशेषाच्या अनुमानानें काढली आहे. पितृसत्ताक कुटुंबपद्धतींत दिवसानुदिवस फरक एवढाच झाला कीं स्त्रियाच्या व्यक्तित्वाची जाणीव अधिकाधिक होऊं लागली व ती जसजशी होऊं लागली तसतशी अनेकपत्नीपद्धति कमी होऊं लागली. स्त्रियानां गृहव्यवहारात कसें वागवावें याविषयींच्या कल्पना अधिकाधिक उज्ज्वल होऊं लागल्या. गुलामासारखी जी स्थिति होती ती धाकट्या भागीदारासारखी झाली.

चालू कुटुंबपद्धतींत फारसा फरक पडणें शक्य नाहीं. स्त्रीपुरुष यांची समता पूर्णपणें स्थापिली जाणें शक्य नाहीं. कां कीं स्त्रियास गर्भारपण व त्यामुळें परावलंबन उत्पन्न होतें. स्त्रियांची पुरुषांपेक्षा प्राप्ती करण्याची शक्ति कमीच असते. जेव्हा ती अधिक असते तेव्हा कुटुंबात खरें पुढारीपण स्त्रियांसच येतें. तथापि केवळ द्रव्यार्जनावरून कुटुंबव्यवस्थेमध्यें अखेरचा निर्णय ठरविण्याचा अधिकार उत्पन्न होत नाहीं. ज्या स्त्रिया धंदा करीत आहेत आणि त्यामुळें जनतेस जबाबदार आहेत त्या स्त्रियास विवाह करण्यास उत्तेजन म्हणून मातृसत्ताककुटुंबपद्धतींत कांहीं सुधारणा करून ती पद्धति पितृसत्ताक कुटुंबपद्धतीबरोबरच अर्वाचीन समाजात चालू करावी अशा तऱ्हेचे विचार प्रगट होऊं लागले आहेत. पण त्या विचारांकडे स्त्रीवर्गाचेंहि लक्ष ओढलें जात नाहीं. [कुल, गोत्र, देवक, "प्रजापतिसंस्था" "मातृकन्यापरंपरा" "यूथावस्था" हे लेख पहा].

भा र ती य कु टुं ब प द्ध ती चा इ ति हा स.— भारतीय कुटुंबपद्धतीमध्यें विशिष्टपणा असा कांहीं नाहीं. आजचें भारतीय वैशिष्ट्य विवाहविषयक नियमांत आहे. कुटुंबविषयक नियमात नाहीं. वेदकालापासून आजपर्यंत सर्व समाज पितृसत्ताक कुटुंबाचाच आहे. प्राचीन धर्मशास्त्र पहाता त्यात अनेक प्रकारचे मानलेले पुत्र (पहा) यांत कदाचित् थोडें वैशिष्ट्य आढळेल. तथापि स्त्रीस्वातंत्र्यनिषेध, नवऱ्याचें महत्व, पित्राज्ञेचें महत्व इत्यादि गोष्टींमध्यें कांहीं वैशिष्ट्य नाहीं हें सर्वच ठिकाणीं दिसून येतें. आजच्या परिस्थितीसंबंधानें एवढेंच म्हणतां येईल कीं, उद्योगधंद्यांच्या विकासामुळें येणारी वैयक्तिक जबाबदारी आणि वैयक्तिक अधिकार यांचा अपूर्ण विकास ज्यांत झाला आहे, आणि व्यक्तीस मदत करणाऱ्या दानसंस्था वृद्धिंगत न झाल्यामुळें

संबंधिजनांचा अन्योन्याश्रय ज्यांत आज अधिक कायम आहे, असा आजचा समाज आहे. अजून कांहीं ठिकाणीं एका घराण्यांतील २५।३० कुटुंबें क्वचित एकाच वाड्यांत रहातात.

समाइक कुटुंबपद्धति रूढ असूनहि घराच्या संख्येशीं कुटुंबाच्या संख्येचें निकट सादृश असलेलें दिसून येतें. येथें कुटुंब म्हणजे पतिपत्नी, त्यांचीं मुलें व आश्रित असा अर्थ यूरोपीय कुटुंबपद्धतीप्रमाणें विवक्षित आहे. हिंदुस्थानांत घरांची संख्या ६३.७ लक्ष असून पंधरा किंवा अधिक वयाच्या विवाहित स्त्रियांची संख्या ६४.६ लक्ष आहे. एकंदर लोकसंख्येच्या मानानें अल्प असलेल्या उच्च जाती सोडून दिल्या तर समाइक कुटुंबपद्धति जितकी सर्वत्र रूढ आहे अशी जी जनसमजूत आहे तितकी ती नाहीं असें दिसून येईल. मुसुलमान, रानटी टोळया व हिंदूंच्या हलक्या जाती यामध्यें ही पद्धत क्वचितच आढळते. या सर्व वर्गांत अशी चाल आहे कीं, लग्नें होण्याबरोबर किंवा मुलें होऊं लागतांच तरुण पुरुष आपला स्वतंत्र संसार थाटतात; आणि एकत्र राहिलेले असले तरी कुटुंबातील कर्ता मरत होताच तावडतोब विभक्त होतात. शिवाय बायकांचे अंत कलह, आपल्या नवऱ्याच्या पैशावर इतरास आधार मिळतो, याबद्दल त्यांच्यात दिसून येणारें असहिष्णुत्व आणि सासुरवासातून मुक्त होऊन स्वतंत्र होण्याची नैसर्गिक वांछा इत्यादि कारणामुळें समाइक कुटुंबपद्धतींतहि एक प्रकारची विध्वंसक प्रवृत्ति वावरत असते. एखाद्या कुटुंबाची इस्टेट अथवा मालमत्ता समाईकच असते पण चुली मात्र वेगळया होतात. जमीनदार व व्यापारी याच्यात हा प्रकार असलेला आढळतो. एखादें कुटुंब समाइक पद्धतीचें असूनहि पुष्कळदा असें घडून येतें कीं, त्या कुटुंबातील कोणी तरी घरातून दूर जाऊन आपला संसार करतो व अशा रीतीनें त्या मूळ कुटुंबाचींच तीन किंवा ४ घरेंहि होऊं शकतात. दुकानें किंवा तसल्याच वस्ती नसलेल्या इमारतींना घरें असें खानेसुमारींत उल्लेखलें आहे. कारण त्या इमारतींची काळजी वहाणारा त्या स्थळीं रात्रीस वस्तीस असतो. दर घरटीं सरासरी लोकसंख्या ४.९ इतकी आहे. स्कॉटलंडात ती ४.८ असून इंग्लंड व वेल्स येथें ५.२ इतकी लोकसंख्या आहे.

कित्येक प्रांतिक अहवालांवरून असें मत बनतें कीं, समाइक कुटुंबपद्धतीची विभक्त व स्वतंत्र होण्याकडे दिवसेंदिवस जास्त प्रवृत्ति होऊं लागली आहे. व्यक्तिस्वतंत्रतेची प्रवृत्ति, एकंदर रहाणींत होणारी वाढ व त्यामुळें एकत्र रहाण्याची आर्थिक स्थितीमुळें अशक्यता, आगगाड्यामुळें वाढत्या प्रमाणात होणारें स्थलांतर, इत्यादि कारणामुळें समाइक पद्धति अशक्य ठरूं पहात आहे. खालील आंकड्यावरून या गोष्टीची कल्पना होईल. परंतु आंकड्यावर जास्त विश्वास ठेवणेंहि गैरच आहे. दर घरटीं सरासरी लोकसंख्या (१८८१) ५.८, (१८९१) ५.५, (१९०१) ५.२, (१९११) ४.९ होती.

[संदर्भग्रंथः—लेखांत सर्व आले आहेत.]

कुट्टापरान्तक—अपरान्तांत जे अनेक भाग प्राचीन काळीं होते त्यापैकीं एकाला कुट्टपरान्त किंवा कुट्टापरान्तक म्हणत. अपरान्त म्हणजे कोकण. कुट्ट हा शब्द कुडाळ या शब्दांतील कुड या शब्दाचा पूर्वगामी दिसतो. तेव्हा दक्षिण कोंकणांतील जो कुडाळदेश तोच कुट्ट या शब्दानें प्राचीन किंवा मध्यकालीं प्रथित होता. अन्तक हा उपशब्द आहे. यासच पुढें १३ व्या शतकात (एका ताम्रपटात) कुडवलपत्तन असें नाव आहे. मुसुलमानी (बहामनी) अमलांत कुडाळ हें नांव प्रचारात आलें (कुडाळ पहा) (भा. इ. सं. मं. वा. इ. १८३६)

कुठार—हें पंजाब प्रांतांत सिमल्यापाशी डोंगरी संस्थानापैकीं एक संस्थान आहे. क्षेत्रफळ २० चौ. मै. आहे १९२१ सालीं लो. सं. ३८४१ होती. जम्मूंनील रजपूत घराण्यापैकी एकानें हें संस्थान स्थापिलें. संस्थानचें वार्षिक उत्पन्न सुमारें २७७५० आहे. यांतून १००० रुपये इंग्रजास खंडणी म्हणून जाते. सांप्रतचे राणा जगजित चंद हे १८९६ सालीं गादीवर आले.

कुडची.—मुंबई इलाखा. बेळगाव जिल्हा. अथणीच्या नैर्ऋत्येस सुमारें १० कोसावर हा गाव आहे. येथें सत्रंज्या चांगल्या होतात. हें सदर्न मराठा रेल्वेचें स्टेशन आहे. येथून जमखिंडीला जाण्याचा रस्ता आहे. गाड्या, मोटारी वगैरे भाड्यानें मिळतात. गावाच्या पूर्वेस सुमारें अर्ध्या कोसावर कृष्णा नदींतील बेटावर बाभूळ व चिंच याच्या गर्द झाडींत शेख महमद पीर दादी या मुसुलमान फकीराचा दर्गा आहे या फकिरानें अनेक शिष्य केले. त्यात बल्खची राजकन्या मसपली ही एक होती. ही राजकन्या आपल्या गुरूबरोबर हिंदुस्थानात येऊन पुष्कळ परोपकाराची कामें करून येथें मरण पावली. हिचा दर्गा येथें आहे. पीरदादी फकीर हा कलबुर्गा येथे मरण पावला. तेथें त्याला पुरलें. परंतु त्याचा दर्गा मात्र येथें राजकन्येच्या दर्ग्याजवळ बांधला आहे. येथें दर वर्षी उरूस भरतो. महंमद तघलखानें बहामनी राज्याचा संस्थापक हसन गंगु यास जी पहिली जहागीर दिली होती तींत कुंची—कुडची—गाव होतें असे फेरिस्ता म्हणतो. येथें शाळा व पोष्ट आहे. येथें मुसुलमानवस्ती बरीच आहे. येथील इनामदार १४ व्या शतकापासून आपली वस्ती येथें झाल्याचें सांगतात. [ब्रिग्ज—फेरिस्ता. पु. २; बेळ. ग्याझि.].

कुंडल—मुंबई. सातारा जिल्हा. हा गांव पंतप्रतिनिधींच्या जहागिरींत स. म. रेल्वेचें स्टेशन आहे. हल्लीं स्टेशनचें नाव किर्लोस्करवाडी ठेविलें आहे. पुराणांत सांगितलेलें कौंडिण्यपूर हेंच असून या ठिकाणीं हिंगणदेव राजाची राजधानी होती असें म्हणतात. हिंगणदेव हा बहुतकरून देवगिरीच्या यादवराजापैकीं पहिला सिंघण (११७९) किंवा दुसरा (१२०९–१२४७) सिंघण राजा असावा. गांवास तट आहे. गांवाजवळील टेंकड्यांत १६ ब्राह्मणी लेणीं आहेत. तीं जमीनीपासून ३०० फूट उंचीवर आहेत. टेंकडीवर

चढतांना ३ दरवाजे लागतात व नंतर १५ फूट उंचीची चुनेगच्ची भिंत लागते. तिच्या पलीकडे वीरभद्र नांवाच्या महादेवाच्या गणाचें मंदीर आहे.त्याच्या पश्चिमेकडील भागांत दालिम देवीचें देऊळ असून, त्याच्या समोरच महादेवाचें एक देऊळ आहे. वीरभद्राच्या देवळाच्या पूर्वेस पाण्याचीं दोन कुंडें आहेत. पलीकडे राम, लक्ष्मण, सीता, शंकर, पार्वती व गंगा याच्या मूर्ती असलेलीं लेणीं आहेत. टेकडीचा खडक ठिसूळ व पिंगट रंगाचा आहे. याचा एक दरवाजा कुंडलच्या वाण्यानें अगदीं अलीकडे बांधला. या ठिकाणीं कार्तिकात यात्रा भरते. या देवळांपैकीं पूर्वेकडील देवळें वैष्णवाचीं व पश्चिमेकडील शैवाचीं आहेत. प्रतिनिधींच्या जहागिरींत या नांवाचा तालुका आहे व त्याचें मुख्य ठिकाण कुंडल च आहे. तालुक्याची लो. सं. १७३२० आहे. [सातारा. ग्याझे.].

कुडलगी—या गावास कुडाळ, कुडली, शृंगेरी अशींहि दुसरीं नावें आहेत. हा गाव म्हैसूर संस्थानात शिमोगा जिल्ह्यांत शिमोग्यापासून ईशान्येस ४ कोसावर तुंग व भद्रा नद्याच्या संगमावर वसलेला असून त्यास क्षेत्रत्व प्राप्त झालेलें आहे. येथें स्मार्त, माध्व, अद्वैत इत्यादि पंथाचे मठ आहेत. प्रसिद्ध शृंगेरीमठ म्हणून शंकराचार्यांचे जें दक्षिणेकडील पीठ आहे तें येथेंच आहे. स. १७९१च्या एप्रिलात परशुरामभाऊ पटवर्धन यानीं टिपूवर जी स्वारी केली त्यावेळीं त्याच्या लष्करातील पेंढाऱ्यानीं हा शृंगेरीचा आचार्यांचा मठ लुटला होता. ती बातमी भाऊंना कळताच त्यानीं पागा पाठवून लुटारू धरून आणिले. परंतु " लुटारू हे माझ्या लष्करातील आहेत, त्याच्या गुन्ह्यांची चौकशी मी करीन " असें रघुनाथराव पटवर्धन कुरुंदवाडकर यानीं म्हटल्यावरून ते त्याच्या हवालीं केले. पुढें गडबडींत हें काम तसेंच राहिलें. शृंगेरीच्या भोंवतालच्या प्रांतातल्या धनिकानीं आपलें वित्त व कुटुंबें घेऊन मठात तळ दिला होता. त्यामुळें पेंढाऱ्यानीं मठ लुटला. या पेंढाऱ्याच्या कृतीबद्दल भाऊंस सर्वांशीं जबाबदार धरणें हें त्या काळची सैन्याची शिस्त ध्यानात आणिल्यास योग्य होणार नाहीं. येथें ब्रम्हेश्वर, रामेश्वर, नृसिंह वगैरे देवाचीं देवळें आहेत. [खरे-ऐ. ले. सं. पू. ९, इंपि. गॅ. पु. १६].

कुडवक्कल—मुंबई इलाख्यातील एक शेतकरी जात. या जातीचे लोक विशेषत; बेळगाव, विजापूर, धारवाड, सोलापूर व दक्षिणमहाराष्ट्र या ठिकाणीं आहेत. १९११ सालीं त्याची संख्या २१२०९ असून पैकीं १०७५४ पुरुष व १०४५५ स्त्रिया होत्या. कुडवक्कल हा कानडी शब्द असून ह्याचा अर्थ कुदळ वापरणारा शेतकरी असा आहे.कुडवक्कल हें एका मूळ पुरुषाचें नांव असून त्याची मूळ वस्ती कुर्गांत होती असेंहि म्हणतात. रड्डी नांवाच्या एका शेतकरी वर्गाशीं या जातीचा पूर्वी एकदा संबंध आलेला असावा हेंहि शक्य दिसतें.

हिंदु व लिंगायत असे दोन भेद कुडवक्कल जातींत आहेत. लिंगायत कुडवक्कलांचें पंचमसाली लिंगायताशीं धर्म व चालीरीतींच्या बाबतींत ऐक्य असून फरक आहे तो एवढाच कीं, लिंगायत कुडवक्कल शेंडी ठेवतात व त्यांनां एखादा ब्राह्मण आपली लग्नें लावण्याकरितां जरूर बोलवावा लागतो. हिंदु व लिंगायत या दोन पंथांपैकीं लिंगायत कुडवक्कलावर लिंगायत धर्माचा बराच पगडा बसलेला आहे. का कीं, ते कोणत्याहि तऱ्हेचें अशौच पाळीत नाहींत. त्याच्या चार जाती आहेत व या चार जाती परस्परांत रोटीव्यवहार करतात. परंतु प्रत्युद्वाह करीत नाहींत. या चार जाती म्हणजे दंडावती, मिनिगडीक, तहेदि (मूर्ख) व यत्तिराक अशा आहेत.

समान गोत्रजांमध्यें लग्नें करण्याची याच्यात मनाई आहे. कुडवक्कल जातींत बहुपत्नीत्वाची वहिवाट असून विधवाविवाह व काडीमोड या गोष्टींस प्रतिबंध आहे. वयात येण्यापूर्वीच मुलींचीं लग्नें होतात. लग्नाचा मुहूर्त जंगम किंवा ब्राह्मण ठरवितो व लग्नातील धार्मिक विधी ब्राम्हणाकडून करविण्यात येतात. देवकार्य, सीमांतपूजन, लग्नकंकणधारण, वरात वगैरे सर्व समारंभ केले जातात. कुडवक्कल हिंदु व लिंगायत धर्माचे असून बसवण्णा, वीरभद्र व यल्लव्वा या त्याच्या कुलदेवता आहेत. दयामाव्वा, दुर्गाव्वा वगैरे त्याच्या ग्रामदेवता आहेत. सर्व हिंदूसण पाळून तुळजापूर व विजापूर जिल्ह्यातील गोलागिरिलिंग वगैरे ठिकाणीं हे लोक यात्रेला जातात. गुलकव्वा व चंगलकव्वा या देवींची पुजा मुख्यतः स्त्रियाच करतात. ज्येष्ठी पौर्णिमेस ' करहनवी ' नावाचा बैलाचा सण पाळला जातो. त्यावेळीं बैलास सजवून व त्याची मिरवणूक काढून शर्यतीनें ' कर ' तोडण्यात येते.

शेती हाच या जातीचा मुख्य धंदा असून काहीं जण चागले जमीनदारहि असतात. त्याच्या स्त्रिया दूध, लोणी, दहीं वगैरे विकतात. कुडवक्कल जातीचे लोक मद्यमांसाहार करीत नाहींत.

कुडवासल—मद्रास इलाख्यात तंजावर जिल्ह्याच्या नणिलम् तालुक्यात डेप्युटी तहसिदाराचें ठाणें. येथें जनानी रेशमी वस्त्रे विणलीं जातात. कुडवासल व कुम्भकोणम् हीं दोन्हीं नावें ' भाडें किंवा पात्र ' या अर्थाच्या तामिळी शब्दापासूनच निघालीं असल्याचें सागतात. (कुड = भाडें वासळ = तोंड) व दोन्हीं गावासंबंधीं दतकथा आहेत. असें सागतात कीं, विष्णुवाहन जो गरुड तो अमृतकुम्भ (पात्र) घेऊन जात असता त्या कुंभाचें तोंड येथें पडलें व पात्राचा दुसरा भाग कुंभकोणम् येथें पडला.

कुडळा—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हनगलच्या ईशान्येस १२ मैलावर धर्म आणि वरदा या नद्याच्या संगमावर हें खेडें आहे. येथील संगमेश्वराच्या देवळात एक शिलालेख असून देवाप्रीत्यर्थ मोठी वार्षिक जत्रा भरते.

कुडा.—ह्या झाडास संस्कृतमध्यें कुटज,मराठींत कुडयाचें झाड, गुजराथींत इंदरजव, हिंदींत कोरैया वगैरे नांवें आहेत. हें रानझाड सहा सात हातांपेक्षां उंच होत नाहीं. याचीं पानें लंबोडीं असतात. कोंकणांत या पानांच्या पत्रावळी करतात. याच्या फुलांची भाजी होते. या झाडाच्या शेंगा बारीक व लांब असतात. व त्या भाजी व लोणच्याच्या कामीं उपयोगी पडतात. शेंगांतून जवाच्या आकृतीच्या लाबट बिया निघतात त्यांस "इंद्रजव" म्हणतात. त्या बिया व ह्या झाडाचें मूळ हीं कडू असतात. मुळापासून पाक तयार करतात. त्यास कुडेपाक म्हणतात. कुड्याच्या पांढरा व काळा अशा दोन जाती आहेत.

कुड्याचा औषधी कामांत फार उपयोग होतो. पोटांतील कृमीवर कुड्याचें मूळ पाण्यांत उगाळून नुसतें अथवा वावडिंगाच्या चूर्णाबरोबर द्यावें. अतिसारावर कुड्याच्या सालीचा आंगरस काढून तो द्यावा. जीर्णज्वरावर कुड्याच्या मुळाची साल व गुळवेल याचा काढा द्यावा. किंवा साल रात्रीं पाण्यांत भिजत ठेवून तें पाणी सकाळीं द्यावें.

काळा कुडा.—ह्या झाडास दुधी काळा कुडा, पाळ, खिरणी वगैरे नांवें आहेत. हें गलनशील झाडांपैकीं असून दख्खन, कर्नाटक, मुंबई इलाखा, राजपुताना, बाण्डा आणि ब्रह्मदेशांत सापडतें.

ह्यापासून अशुद्ध रबर तयार करतात. त्यात पाणी गोंद वगैरे शेंकडा २५·८, राळ (रेसीन) ४५·८ कौचाकश शें.२८·८ प्रमाणानें सापडतात. दुसऱ्या कांहीं पदार्थांबरोबर रंगाच्या कामीं याचा उपयोग होतो. पुष्कळ दिवसापासून दक्षिण हिंदुस्थानातील लोक या झाडाच्या पानाचा नीळ किंवा निळा रंग करण्याकडे उपयोग करीत आहेत. ह्या झाडाचें लांकूड साधारण हस्तिदंतासारखें दिसतें; त्याच्या बाहुल्या व प्रसिद्ध चेन्नपट्टण खेळणीं तयार करतात. [पहा: वॅट].

कुंडापूर तालुका.—मद्रास इलाखा. दक्षिण कानडा जिल्हा. कुंडापूर पोटविभागातील तालुका. क्षेत्रफळ ६१९ चौरस मैल. १९२१ सालीं लोकसंख्या १३९३५० होती. ह्या तालुक्यामध्यें १०३ खेड्यांचा समावेश होत असून त्यापैकीं कुंडापूर हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. तालुक्याच्या पूर्वसीमेवर सह्याद्रि पर्वताची रांग असून तो पर्वत उत्तरेसहि ६ मैल आहे. ह्या भागातून सह्याद्रींत उगम पावलेल्या तीन नद्या वहात असल्यामुळें प्रदेश फार सुपीक आहे. ऊंस व तांदूळाचें पीक फार छान होतें. नारळीचें उत्पन्नहि बरेंच आहे. तालुक्याच्या डोंगराळ भागांत दाट जंगल आहे. तालुक्याच्या उत्तरभागांत खैराचीं झाडें पुष्कळ आहेत. जमीनमहसूल सुमारें ३॥ लाख रुपये आहे.

गांव.—कुंडापूर तालुक्याचें मुख्य ठिकाण. लोकसंख्या (१९०१) ३९८८. बेदनूरच्या राजाच्या कारकीर्दींत हें बंदर होतें. १६व्या शतकांत पोर्तुगीज लोकांनीं येथें येऊन वसाहत केली व किल्ला बांधिला. येथून जवळच एक गोड्या पाण्याचें तळें आहे व त्यांत वेगवेगळ्या तऱ्हेचे तीन तीन फूट लांबीचे मासे आहेत. टिपू सुलतान ज्यावेळीं म्हैसूरवर राज्य करीत होता त्यावेळीं त्यानें खुद्द स्वतःकरितां-स्वतः खाण्याकरितां-हे मासे पाळले होते असें सांगतात. व त्याकरिता त्यानें तें तळें मुद्दाम निर्माण केलें होतें.

कुडालोर तालुका.—मद्रास. दक्षिण अर्काट जिल्ह्याचा एक पोटविभाग व तालुका. हा बंगाल उपसागराच्या किनाऱ्यावर आहे. तालुक्याचें क्षे.फ. ४४८ चौ. मै. असून लोकसंख्या (१९२१) ३५८०२१ आहे. कुडालोर, पनरुति, व नेल्लिकुपम् हीं तीन गांवें असून शिवाय २२४ खेडीं आहेत. येथील जमीन सुपीक आहे. मध्यें एका ठिकाणीं डोंगरसपाटी असून तेथें बिनपिकाची लाल जमीन आहे. तालुक्याचा जमीनमहसूल सुमारें ६ लाख रुपयांचा आहे.

शहर.—कुडालोर तालुक्याचें मुख्य ठिकाण. रेल्वेनें मद्रासहून दक्षिणेस १२५ मैल व पाँदेचरीच्या दक्षिणेस १९ मैल पडते. हा गाव पुष्कळ पुरे मिळून झालेला आहे. कुडालोर (नवें शहर) मध्यें शिवाचें देवालय असलेला तिरुपापुलियूरचा भाग, यांत मन्जकुपम् व युरोपिअन लोकांचे बंगले ह्यांचा समावेश होतो. देवनापट्टनम् (सेन्ट-डेव्हिड्चा मोडका किल्ला येथें आहे) व कुडालोर (जुनें शहर) ह्या गावातून पोन्नेयार व गाडिलम् ह्या दोन नद्या समुद्रास जाऊन मिळतात.

लोकसंख्या (१९२१) ५०५२७. म्युनिसिपालीटीचें १३ चौ. मैल घेराचें अधिकारक्षेत्र असल्यामुळें त्यात लहान लहान १८ खेड्यांचा समावेश होतो. जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असल्या कारणानें कोर्टें व कचेऱ्या येथेंच आहेत.

दक्षिणअर्काटमध्यें कुडालूर हें पहिल्या प्रतीचें बंदर आहे. येथील हवा फारच निरोगी आहे. रेशमी व सुती कपडा येथें तयार करतात. तुरुंगामध्यें कैदी लोक सतरंज्या व टॉवेल्स तयार करतात येथें चार हायस्कूलें व एक सरकारी ट्रेनिंग स्कूल आहे. तीन मिशनरी संस्था येथें आहेत.

कुडालोरमध्यें सन १६८२ सालीं ब्रिटिशांचा प्रवेश झाला. ह्या वर्षी कंपनीनें जिंजीच्या खानाजवळून येथें वसाहत उभारण्याकरितां परवानगी मागितली. पुढें १०।१२ वर्षांत व्यापाराची इतकी वाढ झाली कीं, त्याच्या रक्षणार्थ कंपनीनें तेथें सेन्ट डेव्हिड नांवाचा किल्ला बांधला. १७४६ सालीं मद्रास हातचें गेल्यावर सेन्ट डेव्हिडचा किल्लाच इलाख्याचें १७५२ पर्यंत मुख्य ठाणें होऊन बसला होता.

कुडाळ.—पोर्तुगीज वसाहतींपैकीं गोव्याच्या वसाहतींत हा प्रांत सांप्रत मोडतो. प्राचीन कुडाळ देशाचें नांव कुट्ट अथवा कुट्टापरान्त असें होतें. व तो परान्त आणि अपरान्त या कोंकणच्या दोन भागांपैकीं अपरान्तांत होता. यापैकीं

कांहीं भाग हल्लीं सावंतवाडी संस्थानांत सामील झाला आहे; व कुडाळ या नांवाचें एक शहरहि संस्थानातील एका भागाचें मुख्य ठिकाण आहे. प्राचीन कुडाळ प्रांतापैकीं कांहीं भागाला इ. स. च्या १८ व्या शतकापासून सावंतवाडी संस्थान असें म्हणूं लागले. पूर्वीच्या कुडाळ प्रांतात १२ तर्फा (जिल्हे), २ कर्याती (तालुके) एक विलायत (विलायत = मूळ प्रदेश, जिल्हा) व एक बंदर (वेंगुर्ले)हीं होतीं. सांप्रतच्या देवगड तालुक्यांतील साळशीमहाल, मणेरी, पेडर्णे, डिचोली, फोंडा, सांखळी हे पाच महाल, इतक्या प्रदेशाचा समावेश होत होता. सांप्रत वरील पंचमहाल पोर्तुगीजांच्या ताब्यांत आहे. साळशीमहाल व वेंगुर्ले बंदर इंग्रजांच्या मुलुखांत आहेत. कर्यात पाटगांव हा कोल्हापूरकरांकडे आहे व बाकीचा सारा मुलूख सावंतवाडीकरांकडे आहे; तो मुलुख म्हणजेच सारें वाडीसंस्थान होय.

या प्राचीन कुडाळ प्रांतावर ११ व्या शतकापूर्वी कदंब व चालुक्य यांची सत्ता होती.११व्या शतकापासून १५ व्याच्या मध्यापर्यंत ब्राह्मण (कुडाळ देशकर) सावंत घराण्याची प्रथम अनुक्रमें कदंब (बनवासीचे) व यादव (देवगिरीचे) यांचे मांडलिक या नात्यानें आणि नंतर स्वतंत्रपणें सत्ता होती. या सामंतांनीं १३ व्या शतकांत त्या प्रातास कारवार, अंकोला व मिरजन हा भाग जोडला. कदंबाच्या वेळचा ‘ नऊशें इरिदिगे ’ नांवाचा प्रांत हाच वरील कुडाळ प्रात असावा. पंधराव्या शतकाच्या पुढें मुसुलमानी झाली. तेव्हां सामंताच्या राजवटींत अधिकारी असलेल्या त्यांच्याच जातीच्या प्रभु घराण्याची सत्ता मांडलिक म्हणून सरदेसाई या अधिकाराखालीं बहामनी व आदिलशाही राजवटींत या प्रांतावर झाली. या प्रभु सरदेसायाच्या हाताखालीं वरील बारा महालांचे बारा देसाई अगर नाईक होते. सतराव्या शतकाच्या मध्यांत वरील बारा नाइकांपैकीं माणगांव महालचा लखम सावंत नावाचा नाईक यानें तत्कालीन ब्राह्मण प्रभु सरदेसायाच्या दुर्बळपणाचा फायदा घेऊन कुडाळ प्रांताच्या बऱ्याच भागावर दाडगाईनें अंमल बसविला. एवढेंच नव्हे तर सरकारी दप्तरावरून असेंहि दिसतें कीं, त्यानें समकालीन प्रभु सरदेसायाला ठार मारिलें. पुढें या लखमाच्या वंशांतील खेम सावंतानें प्रभु घराण्यांतील जोगण प्रभु नांवाच्या सरदेसायाला लढाईत ठार मारून त्याचा सर्व कुडाळ प्रांत पूर्णपणें हस्तगत करून घेतला (१६९६).

इ. स. १५८० च्या सुमारास वरील प्रभुसरदेसायांनीं गोव्यांतील कांहीं शेणवी ब्राह्मणांस आणून त्यांना कुडाळ प्रांतांत कुळकर्णपणावर नेमिलें होतें. याच वेळीं शेणवी ब्राह्मणांचा कुडाळ देशांत प्रवेश झाला. ‘ याच शेणवी लोकांनीं प्रभुसरदेसायांविरुद्ध वाडकरसावंताला मदत केली. या कारणावरून त्या दोन जातींमध्यें द्वेष उत्पन्न झाला. ” कुडाळकर ब्राह्मण (प्रभु) सरदेसायांचें मूळ वतनी गांव वालावली आहे, व तेथील नारायणदेव हें त्यांचें कुलदैवत आहे. या गांवीं वाडकर (मराठे) सावंत रात्रीं वस्तीस रहात नाहींत असें म्हणतात. “ तसेंच वाडकरसावंत हे आपल्याला सरदेसाई म्हणवीत असूनहि तसा त्यांचा अधिकारदर्शक शिक्का आढळत नाहीं, व जे इतर शिक्के आहेत ते स्वतः सावंत सरदेसाई आपल्या हातानें न करतां एखाद्या ब्राह्मणाच्या हातून करवितात व आपलें राज्य देवाब्राह्मणांचें आहे असें म्हणतात; ” असें ऐकण्यांत आहे. वरील ब्राह्मण प्रभुघराण्यातील जोगणप्रभु हा वाडकर (मराठे) सावंतांस प्रखर (ब्रह्मसमंध) रूपानें त्रास देई, म्हणून त्याच्या (शारीरूपी) मूर्तीची पूजाअर्चा हे वाडकर सावंत ब्राह्मणाकडून करवितात असें एका कैफियतींत म्हटलें आहे.

मुसुलमानी अमलांत या प्रांताची राजधानी गोव्यास गेल्यानें कुडाळ गावाचें महत्व थोडें कमी झालें; तथापि प्रभुसरदेसायांनीं आपलें ठाणें कुडाळासच ठेविल्यामुळें तें बरेंच टिकून राहिलें. वाडकर सावंत हे अद्यापि आपल्या नावापुढें ‘ सरदेसाई प्रांत कुडाळ व महालानिहाय ’ असा मायना जोडतात.

कुडाळांत वरील ब्राह्मणकालीन राजवटींतील पुढील अवशेष आहेत. (१) शहराच्या पश्चिमेचा भुईकोट किल्ला; (२) त्यांतील घोडबाव. या पायविहिरीची खोली ४० फूट व घेर १०० फूट असून घोडेस्वार (घोड्यावरून न उतरता) थेट वरून खालीं पाण्यापर्यंत जाऊं शकतो. ही अद्यापि सुस्थितींत आहे; (३) नदीवरील संध्याघाट; (४) गावाभोंवतालचा पडका कोट. कुडाळ व गोमातक हे दोन्ही प्रांत जरी एकमेकाशेजारीं आहेत तरी त्यांची भाषा भिन्नभिन्न आहे. कुडाळ प्रांतातील भाषेला कुडाळी भाषा म्हणतात. तसेंच कुडाळी माप कुडाळी शिरस्ता हेंहि स्वतंत्र आहेत. याबद्दलची जास्त माहिती जर्व्हिस यानें लिहिलेल्या कोंकणावरील पुस्तकांत आढळेल.[हचिन्सन-मेमॉयर्स ऑन सावंतवाडी; पिंगुळकर-सावंतवाडीचा इतिहास;जर्नल अँथ्रापॉलाजिकल सोसायटी. व्हॉ. ८; रा. वासुदेव अनंत बांबर्डेकर यांचा लेख].

कुडाळदेशकर ब्राह्मण—यांचें दुसरें नांव आद्यगौड ब्राह्मण असें आहे. मूलतः हे उत्तरेकडील असून कोंकणांत केव्हां व कसे आले याबद्दल जी माहिती मिळते ती पुढें दिल्याप्रमाणें:—

महंमुद गिझनीकरानें उत्तरहिंदुस्थानांत स्वाऱ्या करून धुमाकूळ घातला. त्या सुमारास (इ. स. १०१७) गंगा किनाऱ्याच्या प्रदेशावर गोडेश्वरपाल राजांचें साम्राज्य होतें. त्यांच्या मांडलिकांत गंगाकिनाऱ्यालगतच्या भागांत ‘ सामंत ’ नांवाचे एक ब्राह्मण संस्थानिक होते. यांच्या राज्याची वाताहत महंमुदाच्या वेळीं झाल्यामुळें हें घराणें तेथून निघून दक्षिणेस कोंकणांत

घोडबाव [पृष्ठ ५२८].

१

२

३

४

५

(१) शके १३१७ चा मठगांवचा शिलालेख. (२) नागदेव सामंत याची मुद्रा व लेखनावधि. (३) भानजी प्रभु सरदेसाई यांची मुद्रा. (४) वालावली येथील श्रीनारायणदेव याची मुद्रा. (५) भानजी प्रभु याची मोडी सही (पृष्ठ ५२८–५३२).

सध्यांच्या देवगड तालुक्यांतील " हिंदवे " या गावीं तत्कालीन कोंकणच्या कदंब राज्याच्या आश्रयास येऊन राहिले. यांचें गोत्र काश्यप असून त्यांच्या बरोबर आणखी तेरा गोत्रांचीं दुसरीं ब्राह्मण घराणीं कोंकणांत आलीं होतीं. येथून कुडाळदेशकर ब्राह्मण ज्ञातीच्या इतिहासास सुरुवात होते.

यापूर्वी निदान १०० वर्षे तरी प्रांतभेदानें तत्कालीन ब्राह्मणांचा नामनिर्देश होऊं लागला असावा असें वाटतें. तत्पूर्वी शिलालेखांत अगर ताम्रपत्रात गोत्रभेदानें ब्राह्मणांचा उल्लेख येतो. त्यानंतर प्रांतवाचक उल्लेख येऊं लागला. आणि त्यामुळें पुढील काळांत या प्रांतवाचक निरनिराळ्या ब्राह्मणांत विवाहसंबंध होईनासा झाला असावा. उत्तरेकडील सर्व ब्राह्मण यजुर्वेदी असल्यानें वरील सामंत घराणें व बाकीचीं तेरा घराणीं हीं सारीं यजुर्वेदीच होतीं. सामंत हें नांव प्रथम मांडलिक राजसत्तादर्शक होतें. परंतु पुढें आडनावांचा प्रघात पडल्यावर तें तद्दर्शी झालें. (तत्पूर्वी आडनांवें प्रचारात नसावीं). कुडाळदेशकर ब्राह्मण हे मूळचे यजुर्वेदी असून हल्लीं त्यांच्यांत ऋग्वेदी कसे आढळतात असा एक प्रश्न आहे. त्यास उत्तर असें कीं, ते दक्षिणेंत आल्यानंतर त्यांची वसाहत जेथें झाली त्या भागांत कऱ्हाडे ब्राह्मणांचें साहचर्य त्यांस निकट असल्यानें व ते ऋग्वेदी असल्यामुळें हेहि ऋग्वेदी बनले. यास पुढील उदाहरण आहे. चित्पावन ब्राह्मण हे मूळचे हिरण्यकेशी यजुर्वेदी असून पुढें त्यांच्यापैकीं बरेच ऋग्वेदी बनले.

आडनावांचा प्रघात पडल्यानंतर तो कुडाळ देशकर ब्राह्मणांतहि सुरू झाला. त्यांच्यांतील जुनीं व नवीं आडनांवें अशीं आहेत. सामंत प्रभु, नायक, ठाकूर, पंडित, पाटील, जोशी, महाजन, सरदेसाई, देसाई, नाईक, देशपांडे, सरनाईक, मतकरी, जुवळे, बोंद्रे, टिकल्ये, नगारे, गिते, गोसावी, डिंगे, कोले, साठकुंभे, वेर्वे, वाघ, संत इत्यादि.

याशिवाय धंद्यावरून व गांवांवरून पडलेलीं अनेक नांवें आहेत. ब्राह्मण ज्ञातींत ' सामंत ' हें नांव कुडाळ प्रांतांतच नव्हे तर सबंध महाराष्ट्रात फक्त याच (कुडाळ देशकर) जातींत आढळतें; दुसऱ्या कोणत्याहि ब्राह्मण जातींत तें आढळत नाहीं. ' प्रभू ' उपनांवहि कुडाळ प्रांतांत मुख्यत्वेंकरून याच जातींत आढळतें. त्या प्रांतांतील शेणवी ब्राह्मण-जातींत तर मुळींच आढळत नाहीं; कऱ्हाडे ब्राह्मणांत (प्रभुदेसाई) फारच विरळ आढळतें; चांद्रसेनीय कायस्थ प्रभु (ही जात " प्रभु " हें उपनांव म्हणून कधींच लावीत नाहींत)त्या प्रांतांत कधींहि नव्हते व सध्यां नाहींत. (कुडाळ प्रांताबाहेर ' प्रभु ' हें उपनांव कांहीं जातींत क्वचित आढळतें; पण तें बहुतांशीं " परब " या अपभ्रंशाच्या रूपानें.) यावरून कुडाळ प्रांतांतील प्रभु हे नामांकित राज्याधिकारी या कुडाळ देशकर जातीचेच होत असें विद्वानांचें म्हणणें आहे. त्यांचे वंशज आज अस्तित्वांत आहेत.

कदंबांच्या राजवटींत या जातीला राजाश्रय होता. या जातींतील बहुतेक घराणीं पुढें तत्कालीन परिस्थितीमुळें क्षात्रवृत्तीचीं बनलीं. यादवाच्या वेळीं या जातींतील कांहीं घराणीं त्यांचीं मांडलिक बनलीं. या मांडलिकांत ' जोगदेव ' उगीदेव, मायीदेव, (माइन्देव) वगैरे नावाजण्यासारखे पुरुष झाले. सम्राट सिंघण यादवाच्या काळीं माइन्देव हयात असून त्याला महाप्रधान, सर्वाधिकारी, महापरम विश्वासी अशा उपाधी होत्या. या माइन्देवाच्या हाताखालीं हेम्म (हेम्मेय) नायक नावाचा एक सुंकाधिकारी (सुंक—एककर) बनवासी प्रांतावर होता. माइन्देव फार शूर असल्यानें त्याला रणलक्ष्मविधूवर व मंगमहीपति असें म्हटलेलें आहे. त्यानें बरेच प्रांत जिंकल्याचें आढळतें. ' माग्लाख्य-महेश्वर ' असाहि त्याचा उल्लेख एका शिक्यात आहे. त्यावरून सिंघणाच्या पश्चात माइन्देव हा स्वतंत्र झाला असावा असें वाटतें. यापेक्षा त्याला खात्रीचा पुरावा मिळत नाहीं. या घराण्यात देम, भैरवदेव, काई(काइन)देव आणि नागदेव या राजांचीं नावें प्रामुख्यानें पुढें येतात. या नागदेवाचा एक ताम्रपट प्रसिद्ध आहे. तसेंच हेमराजाचाहि एक ताम्रपट उपलब्ध झाला असून अद्यापि अप्रकाशित आहे.

पुढें १५ व्या शतकाच्या पूर्वी बहामनीराजांनीं कोंकण घेतलें त्यावेळीं हे सामंत घराणें नष्ट झालें. या घराण्यापैकीं आज फक्त दोन शाखाचाच शोध लागतो. पैकीं एका शाखेंत त्याच्या पूर्वजाच्या पाषाणाच्या मूर्ती पूजेत ठेविल्या आहेत. परंतु त्याना आपल्या घराण्याच्या इतिहासाची फारशी ओळख नाहीं. या मूर्ती राजाच्या पालखींत बसविलेल्या अशा दाखविलेल्या आहेत. यादव राजे राज्य करीत असता पूर्वीच्या जैन व लिंगायत धर्माचा त्यांनीं उच्छेद करून पुन्हां वैदिक धर्माची आपल्या राज्यात सर्वत्र स्थापना केली. त्या कामात माइन्देव, देमदेव व भैरवदेव यानींहि भाग घेतला होता. त्यामुळें या धर्मप्रस्थापक सम्राट (यादव) व मांडलिक (सामंत) राजाच्या मूर्ती पालखींत बसलेल्या अशा कुडाळ प्रांतात बऱ्याच आढळतात.

मुसुलमानी अमदानींत सामंत घराण्याचें प्रधानकीचें किंवा सेनापतीचें काम करणाऱ्या जामदग्न्यवत्सगोत्री प्रभु उपनावाच्या ब्राह्मण घराण्याकडे (ते कदंबाच्या वेळेपासून देशमुखीहि करीत असल्यामुळें व त्यावेळीं या ब्राह्मण जातींत हेच प्रमुख असल्यानें त्याच्याकडेच) बहामनी शहांनीं कोंकणातील या प्रांताची व्यवस्था सोंपविली. हे प्रभु त्यावेळीं जहागीरदार बनले. या काळींच कुडाळाचें महत्व जाऊन तें गोंव्यास प्राप्त झालें (गोवें बंदरांत किंवा जवळच सामंताची एखादी राजधानी असावी असें इ. स. १३९१ च्या विजयनगरताम्रपटातील ' गोंवाभिधा कौंकण राजधानी ' या पदावरून वाटतें). त्यावेळीं गोवें बंदराचें महत्व फार असल्यानें बहामनी शहांनीं तें जिंकण्यासाठीं बरेच प्रयत्न केले. या प्रभु घराण्यात (बखरीच्या आधारें) चंद्रभान व सूर्यभान

हीं दोन जुनीं नांवें आढळतात. त्यांचा नक्की काळ समजत नाहीं. परंतु १४ व्या शतकाच्या सुरुवातीस हे असावेत असें जैन वाङ्मयांतील उल्लेखावरून म्हणतां येतें. हें प्रभु घराणें शेवटपर्यंत मुसुलमानांचें व मध्यंतरीं कांहीं काळ विजयानगरकरांचें मांडलिक होतें. कारवार, अंकोला व मिरजन हा भाग या घराण्याकडे प्रथमतः विजयानगरकरांतर्फे आला असें दिसतें. या घराण्याकडे गोमप्रभु, रामप्रभु, बायाजीप्रभु, भानजीप्रभु, बाबाजीप्रभु, भोगणप्रभु हे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले. इ. स. १४६० ते १६४० पर्यंत हें घराणें सुस्थितींत होतें. इ. स. १६९६ सालीं प्रस्तुतच्या वाडकर (मराठे) सावंतांच्या पूर्वजांनीं या प्रभूस जिंकून या घराण्याचा शेवट केला. शिवाजीमहाराजांची स्वारी होण्यापूर्वी कांहीं वर्षे या प्रभु सरदेसायांच्या अमलाखालीं पंचमहाल कुडाळ (४१३ गांवें), साळशीमहाल (८४ गांवें) व कारवार, अंकोला आणि मिरजन हे महाल इतका प्रदेश होता. शिवाय तर्फ चांदगड परगण्याचा कांहीं भागहि होता असें दिसतें.

या प्रभु घराण्यानें विहिरी, घाट, देवळें वगैरे बांधून व ब्राह्मणांना व अग्निहोत्र्यानां वगैरे उत्तेजन देऊन ब्राह्मणी धर्माचें संरक्षण केलें. पुढें शिवाजीमहाराजांच्या वेळीं या जातींतील लोकांनीं त्यांनां थोडेफार साहाय्य केलें. यांनीं कोल्हापूरकर व सातारकर छत्रपति आणि पेशवे, आंग्रे, बावडेकर वगैरे दरबारांचा आश्रय केला होता. याच्या आश्रयामुळेंच पुढील अवनत काळांत ही जात जिवंत राहूं शकली व वाडीच्या सावंतांनीं या जातीच्या जमिनी, इनामें व देवस्थानें काबीज करून त्यांच्यावर "बामणदंड" नावाचा कर जुलमानें लादला. यामुळें व वरील इतर परिस्थितीमुळें कुडाळ प्रांतांतील शेकडो कुटुंबें तो देश सोडून दुसरीकडे गेलीं असें या जातीचें म्हणणें आहे. या वसाहती विशेषतः आजरें, वसई, अर्नाळा, बेळगांव, धारवाड, विजापूर, गोकर्ण, मोगरनाड, बारकोर येथें झाल्या आहेत वाडीच्या सावंतांच्या पदरीं या जातीचे लोक नोकर म्हणून फारसे नाहींत. शेणवी ब्राह्मणाना कुडाळदेशकर ब्राह्मणांनीं पूर्वी ते त्यांचे नोकर असतांना जमीनी वगैरे दिल्या होत्या. परंतु उलट "या जातीचा त्यानीं छळ केला" असें शेणवी म्हणतात. इंग्रजी अंमलांत हा छळ कमी झाला. याबद्दल कै. रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांनींहि आपला अनुभव विविधज्ञानविस्तारांत लिहिला आहे. या जातींत शिक्षणप्रसार बरा झाला असून सरकारी व एतद्देशीय संस्थानांतील मोठया दर्जाच्या नोकऱ्या या लोकांनीं केल्या आहेत. व्यापाराच्या क्षेत्रांतहि त्यांचें पाऊल पुढें पडत आहे. तरी ही ज्ञाति म्हणण्यासारखी सधन नाहीं.

या ज्ञातीच्या हल्लीं पुढील पांच संस्था आहेतः-(१) कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज, (२) गौड ब्राह्मण सभा, (३) कुडाळ देशकर आद्य गौडब्रह्ममंडळ, (४) कुडाळदेशस्थ गौडब्राह्मण निराश्रित साहाय्यकारी फंड, (५) कुडाळदेशकर आद्य गौडब्राह्मण महामंडळ. पहिल्या संस्थेचें भांडवल आज एक लाख रुपयांवर आहे व ती ३०।३२ वर्षे विद्यार्थ्यांना मदत करीत आहे. दुसरीचें काम वाङ्मयात्मक व सामाजिक (ज्ञातीचें) कार्य करणें हें होय. तिसरी ज्ञातिसंघटण करणारी. चौथीचें भांडवल १५ हजार असून पांचवी सर्व ज्ञातीची प्रातिनिधिक संस्था आहे. ज्ञातींतील धनाढ्य गृहस्थ कै. वा. अनंत शिवाजी देसाई, टोपीवाले यानीं परदेशीं जाऊन विद्या शिकण्याऱ्याकरिता तीन लाखाचा फंड उभारला आहे.

या जातीचे शंकराचार्यान्वयी गुरुपीठ ५१६ शें वर्षांचें जुनें असून तें या ज्ञातीच्या राजवटींत कुडाळ शहराच्या कोटापासून ३ मैलावर सोनवडें (स्वर्णवट) गावीं स्थापन करण्यांत आलें. हा प्राचीन मठ नंतर (वाडकर) सावंताच्या अमदानीच्या सुरुवातीस शेणवी ज्ञातीनें ताब्यांत घेतला (या मठासंबंधीं प्रकरणात कै. वा. गणपतराव परुळेकर वकील, यांनीं आपल्या 'कुडाळदेशकर' नामक पुस्तकात ३ ऱ्या प्रकरणांत विस्तृत आणि मार्मिक विवेचन केलें आहे, तें वाचनीय आहे). मध्यंतरीच्या काळांत चिंदर व गोळवण हे मठ स्थापन होऊन शेवटीं सुमारें १७५ वर्षांच्या पूर्वी सध्याचें दाभोली हें मठसंस्थान स्थापन करण्यात आलें.

या जातींत गोपाळ बोध गोसावी मळगांवकर, पूर्णानंद चिदानंद, विमलानंद, श्रीधर स्वामी उर्फ मौनीबुवा, शुकदेव, हरिचरण गिरी, भगवान गिरी, दत्तगिरी, रखमाजी बुवा, उमाजी बुवा, अंबरनाथ, गंबरनाथ, काननाथ, रामदासी संप्रदायातील रघुनाथ बुवा आणि अनंत बुवा (याचे कुडाळ प्रांतांत दोन मठ आहेत), केशवबुवा द्वादशकिर, वारकरी संप्रदायांत गेल्या ६०।७० वर्षांपूर्वी प्रसिद्ध असलेले अजरेकर संतबाबा महाराज, गोविंददादा, पद्मनाभतीर्थ (बाडमठ) इत्यादि साधू संत होऊन गेले. यांत गोपाळ बोध, चिदानन्द, पद्मनाभतीर्थ हे कवी म्हणूनहि प्रसिद्ध आहेत.

या जातीची एकंदर लोकसंख्या सुमारें ३५ हजार आहे. यांची नोंद धर्मगुरूंच्या संस्थानात मिळते. जातींत पूर्वी पंचायत होती, हल्लीं महामंडळ स्थापन झालें आहे. याचा कायमचा अध्यक्ष धर्मगुरु (शंकराचार्यान्वयी मठपति) असून लोकनियुक्त उपाध्यक्ष बहुतेक कामें करितो. ज्ञातीचा कर वसूल करण्यासाठीं मंडळ्या (कमिटया) नेमलेल्या आहेत. ज्ञातींत शरीरसंबंधानें किंवा इतर कोणत्याहि तऱ्हेनें बाहेरचीं माणसें समाविष्ट होत नाहींत. आजकालच्या मानानें ज्ञातीचीं पूर्वीचीं शास्त्रविहित कर्में शिथिल होत चाललीं आहेत. त्यामुळें धर्मगुरु व पंचायत यांच्या शासनाधिकाराचा उपयोग क्वचितच होतो. या जातींत पूर्वी १४ गोत्रें होतीं, परंतु त्यांपैकीं चार नाहींशीं झालीं. बाकीच्या १० गोत्रांतीलहि कित्येक घराणीं जीं बाहेर गेलीं, त्यांच्या दोन जाती बनल्याची समजूत जुनीच आहे.

पैकीं एक पेडणेकर ही होय. अर्थातच ते आपल्यास गौड ब्राह्मणच म्हणवितात. यांची वसाहत गोव्यांतील पेडणें महालात (हा महाल पूर्वी कुडाळ प्रांतात मोडत असे)जास्त आहे. या भेदास ३५० वर्षें झालीं असावीं. त्यांत सध्यां प्रभु उपनांवाचें एक धनाढ्य घराणें पोर्तुगीजांचे व्हायकाउंट आहे.

या ज्ञातीचे उपनयनादिविवाहादि धार्मिक संस्कार याच ज्ञातीचे अगर कऱ्हाडे ज्ञातीचे उपाध्याय करितात. जातीचे प्रश्न जात सोडविते. शंकराचार्यांचा किंवा इतर कोणत्याहि ब्राह्मण जातीचा सल्ला घेण्यांत येत नाहीं. चातुर्वर्ण्यांत या ब्राह्मणांना इतर दशविद्यांचेंच स्थान आहे. ज्ञातीसंबंधीं कागद धर्मगुरूंच्या संस्थानांत व पंचांच्या प्रमुख घराण्यांत आहेत. ज्ञातीचीं स्थलांतरें (वरील कारणांमुळे झालेलीं) गेल्या तीनचारशें वर्षांतील आहेत. एकंदर बहुजनसमाज पुराणमताभिमानी असा आहे. ज्ञातींत विधवेचा पुनर्विवाह झाल्याचें एकहि उदाहरण आढळत नाहीं. विधवा व निराश्रितांची तरतूद ज्ञातिफंडांतून होते. या जातींतील पुरुषास रखेल्यापासून झालेल्या मुलाची गणना सर्वसाधारण शूद्र वर्गांत करितात; अशा ज्ञातीपासून उत्पत्ति झाली ही गोष्ट दर्शविणारें असें स्वतंत्र नांव त्यानां नाहीं. देवळी या नावाचा एक बराच मोठा वर्ग त्या प्रांतांत महशूर आहे. त्या वर्गातील स्त्रियांस भावणी (संस्कृत भाविनी) म्हणतात पण या जातीवर आतां कोणत्याहि विशिष्ट जातीला हक्क सांगता येईल असें वाटत नाहीं.

ज्ञातीचें मूळचें नाव गंगाकिनाऱ्यावरील गौडप्रांतातील राहणारे म्हणून आद्य गौड अगर गौड असें आहे; पण कोंकणात सर्वसाधारण लोक अलीकडे या जातीला "कुडाळदेशकर ब्राम्हण" असें म्हणतात. हें नांव क्वचित १७ व्या शतकाच्या सुरुवातीपासून व सन १६९६ पासून पुढील कागदांत विशेषतः रूढ झाल्याचें आढळतें. कुडाळ देश यांनीं वसविला म्हणून हे कुडाळदेशकर होत अशी जी व्युत्पत्ति एका पुस्तकात आढळते ती बरोबर नाहीं. कारण हे कुडाळाकडे येण्यापूर्वीपासून कुडाळ (कुट्टापरान्तक) प्रांत अस्तित्वांत होताच. दुसरा असा एक विचित्र तर्क आहे कीं, देशावरील (वाईजवळच्या) कुडाळामध्यें यांनीं प्रथम वसाहत केली आणि दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या सुमारास (कदाचित् दुष्काळामुळें) त्यांनीं कोंकणात येऊन वसाहत केल्यानंतर 'देशावरील कुडाळाहून' आले म्हणून त्यास 'कुडाळदेशकर' असें नांव पडून त्या नवीन वसाहतीस 'कुडाळ'असें नांव पडलें. पण हा तर्क जितका विचित्र आहे तितकाच तो निखालस खोटाहि आहे असें रा. वा. अ. बांबर्डेकर म्हणतात. कारण दुर्गादेवीचा दुष्काळ सन १३९६ त पडलेला नसून, तो रा. राजवाडे यांनीं अस्सल कागदांवरून सन १४६८–१४७५च्या दरम्यानच्या काळांत पडल्याचें निर्विवाद सिद्ध केलें आहे (सरस्वतिमंदिर मा. पु.). आणि या सालापूर्वी (१४३६), रा. बांबर्डेकर यांच्या पूर्वजांनीं कुडाळ प्रांतांतील त्यांच्या गांवच्या देवस्थानासंबंधीं दिलेल्या इनाम जमिनींचा त्यांनीं स्वीकार केल्याचा उल्लेख ज्यांत आहे, असा एक कागद रा. बांबर्डेकरांपाशीं आहे. त्यावरून ही जात दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या पूर्वीपासूनच या प्रांतीं आहे हें उघड होते. त्याला इतिहासाचा इतर पुरावा आहे तो वेगळाच. तसेंच या प्रांताचें नाव दुर्गादेवीच्या दुष्काळापूर्वीच 'कुडाळ' असें होतें हें त्यापूर्वीच्या एका बहामनी शहाच्या फर्मानांत 'कुडाळ' असें नांव असल्यावरून सिद्ध होतें.

या ज्ञातींतील लोकसंख्येची वाढ असावी त्या मानानें बरीच कमी दिसते. यास पुढील कारणें असावीं:—(१) बामणदंडादि आपत्तींमुळें भर पडलेली सतत दोन अडीच शतकांची अवनत स्थिति. (२) तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळें स्वार्थाला बळी पडून कांहीं घराण्यांनीं परजातींत स्वतःस समाविष्ट करून घेतलें. पण यातूनहि शिल्लक राहिलेली सर्व लोकसंख्या मठांतील गादीप्रमाणें सुमारें ३५ हजार असतां आणि त्यांतील मोठा भाग मुंबईइलाख्यांत असतां १९२१ च्या सरकारी खानेसुमारीमध्यें मुंबई इलाख्यांतील संख्या ५।६ हजारच दाखविली गेली आहे. याचें कारण, या जातींतील कांहीं माणसें चुकीनें गौडसारस्वत या जातींत समाविष्ट झालीं असावीं हें होय.

हल्लीं प्रसिद्ध झालेल्या (१९२०) एन्थॉवेनकृत 'ट्राइब्ज ॲंड कॅास्टस् ऑफ बॉबे' या पुस्तकात दाक्षिणात्य गौडब्राह्मण म्हणून समजल्या जाणाऱ्या जातींनां 'सारस्वत, गौडसारस्वत आणि शेणवी' अशा त्रिविध नांवाच्या एकाच प्रमुख सदरांत गोंविलें असून माहिती देतांना फक्त शेणवी ब्राह्मणांच्या मूळ कथा सांगून त्यांतच सर्वांचा समावेश केला आहे. याबद्दल रा बांबर्डेकर म्हणतातः—"ह्या मूळ कथा सह्याद्रि खंड आणि मंगेश महात्म्यांतल्या म्हणून कोणी तरी साहेबमजकुरास पुरविलेल्या आहेत. पण मुळीं त्या तशा वरील महात्म्यांत आणि सह्याद्रिखंडात नाहींतच. परशुरामानें 'सारस्वत उर्फ शेणवी' ब्राह्मणांस आणिलें असें या ग्रंथांत म्हटलेलें नसून नुसतें 'गौडब्राह्मण' आणिले असें म्हटलें आहे. तसेंच या ग्रंथात ब्राह्मणांचीं नुसतीं ६६ कुलें (कुलं पट् षष्टिकं) आणिलीं असें आहे. पण एन्थॉवेन हे त्यांत ९६ कुलें दिलीं आहेत असे सांगून त्यावरून शाहाण्णवै = शेणवी हें नांव पडल्याचें नमूद करितात. ग्याझेटिअर व शेणव्याच्या ज्ञातिसंबंधाच्या पुस्तकांतून शिळी झालेली शेणवी शब्दाची ही व्युत्पत्ति १९२० सालीं एन्थॉवेनच्या पुस्तकांत नमूद व्हावी ही आश्चर्याची गोष्ट होय ! शिवाय परशुरामाच्या वेळीं (४१५ हजार वर्षांच्या सुमारास) ब्राह्मणांत ज्ञाती नव्हत्या वगैरे गोष्टी सह्याद्रीखंडकारांस कदाचित् माहीत नसतील. परंतु या साहेबासारख्या ज्ञातिविषयावर लिहिण्यास प्रवृत्त झालेल्यांनीं व त्यांनां वरील माहिती पुरविणाऱ्यांनां तरी त्या माहीत असल्या

पाहिजेत. तसेंच परशुरामानें आपणांस आणिलें असें कोंकण आणि मलबार किनाऱ्यावरील कित्येक ब्राह्मणजाती सांगतात. त्यात ऐतिहासिकपणाचा अंश कांहीं नाहीं हें या एथ्नॉग्रफीकार एन्थॉवेन साहेबांस कळावयास हवें. सह्याद्रीखंड हें इतिहासकारांस आतां विश्वसनीय वाटत नाहीं. या खंडाच्या उत्तर खंडांतले पहिले तीन चार अध्याय वाचून असें निश्चित म्हणतां येतें कीं, गोव्याची, तेथील देवतांची व ब्राह्मणांची त्यांत दिलेली माहिती ही अगदीं अलीकडे म्हणजे दीड पावणेदोनशें वर्षांच्या आंत किंवा इ. स. १८७७ सालाच्या पूर्वी कांहीं वर्षे, डॉ. ड कुन्जानीं तें काम हातीं घेतल्यावर, शेणवी म्हणविणाऱ्या लोकांपैकीं कोणी तरी त्यात घुसडून दिलेली दिसते. शेणवी या ज्ञातिवाचक बनलेल्या नावात कांहीं हीनत्व आलें असें ज्यावेळीं त्या लोकास वाटलें त्या वेळेपासून त्यांनीं असल्या कथा रचण्यास सुरुवात केलेली दिसते. आणि एथ्नॉग्रफीशास्त्रज्ञतेचा टेंभा मिरविणाऱ्या एन्थॉवेनसाहेबानीं असल्या गोष्टी खुशाल प्रसिद्ध कराव्या यापेक्षा त्या पुस्तकाची (या बाबीपुरती तरी) अनुपयुक्तता आणखी ती काय सिद्ध करावयास पाहिजे? वरील दहा ब्राह्मणांचीं ६६ कुळें झालीं असें लिहिणारा व हे श्लोक घुसडणारा कोणी तरी साष्टीकर असला पाहिजे असें सह्याद्रीखंडाच्या त्या (१८७७ च्या) प्रतींतील प्रस्तावनेंत जीं त्यांचीं नांवें दिलेलीं आहेत त्यावरून अनुमान काढतां येतें. त्यापैकीं एक केणी उपनांवाचे शास्त्री (हे गौडसारस्वत म्हटलेल्या जातींतील साष्टीकर या भेदाचे) यांनीं इ. स. १८७१ सालीं हुबेहुब सह्याद्रीखंडांतील भाषेप्रमाणें 'दशप्रकरण' नावाचें एक श्लोकबद्ध संस्कृत पुस्तक शाणवी सारस्वत उर्फ कोंकणे ब्राह्मण या नांवाच्या ज्ञातीच्या माहितीचें रचिलें होतें. त्यांत सुद्धां स्वज्ञाति(साष्टीकर आणि शेणवी हे आतां रोटीबेटीव्यवहारानें एक झाल्यासारखे आहेत)संबंधीं बनावट माहिती दिली आहे. एन्थॉवेन यांनीं आधारभूत म्हणून स्वीकारिलेले हे ग्रंथ(सह्याद्रि खंड आणि मंगेशमाहात्म्य)मुळींच विश्वासास पात्र नाहींत. त्याना आधारास घेऊन सारस्वत, गौडसारस्वत उर्फ शेणवी या लांबलचक नांवाच्या जातीच्या दिलेल्या कथा निव्वळ खोटया आहेत. त्या इतिहासाच्या कसोटीला टिकण्यासारख्या नाहींत. असल्या भाकड कथा ज्या जातीच्या म्हणून लिहिल्या त्या पुस्तकात कुडाळदेशकर ब्राह्मणाच्या नांवाचा संबंध साहेब मजकुरांनीं विनाकारण जोडलेला आहे. मात्र एथ्नॉग्रफीच्या दृष्टीनें कुडाळदेशकराची जात वर लिहिलेल्या त्रिविध नावाच्या जातींहून भिन्न दिसत असल्याचेंहि साहेब मजकुरानीं आपल्या पुस्तकांत नमूद केलें आहे."

कै. वा. गणपतराव परुळेकर वकील यांनीं आपल्या "कुडाळदेशकर" पुस्तकांत पर्यायानें आपल्या ज्ञातीचा संबंध सह्याद्रीखंडांतील मागें सांगितलेल्या गौडब्राह्मणांशीं जोडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु रा. बांबर्डेकर यांनां तो मुळींच मान्य नसून हास्यास्पद वाटतो. त्यांच्या मतें सह्याद्रिखंडाच्या रचनेचा काळ त्यास जोडलेल्या परिशिष्टावरून व त्यांतील अत्यंत विसंगत कथानकांवरून सन १५००ते१५५० पर्यंतचा असून सध्यां उपलब्ध असलेल्या खंडाच्या प्रतींत ज्यांनां संधि मिळाली त्यांनीं घुसडाघुसड केल्यामुळें पुराणाची शुद्ध प्रत मिळूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें रा. परुळेकरांनीं आपल्या पुस्तकात 'कोंकणाख्यान' या ज्या एका पोथीचा उपयोग केला होता तीहि पोथी कुचकामाची आहे."

[संदर्भग्रंथः-सिलेक्शन बॉं. ग्व्ह. रेकार्ड पु.१०; हचिन्सनकृत सावंतवाडी मेमॉयर्स, जर्नल ॲंथ्रा. सो. बां. पु. ८,१०; देमनृपतीचा ताम्रपट; मठगांवचा शिलालेख; मालवणच्या प्रभुदेसायांची जुनी कैफियत; रिपोर्ट वेस्ट्राप म्युझिअम जार्ड्सि-कोंकण, बॉं. ग्याझेटिअर पु. १०; पिंगुळकरकृत सावंतवाडी संस्थानचा इतिहास; परुळेकरकृत 'कुडाळदेशकर' पुस्तक; रा. वासुदेव अनंत बांबर्डेकर याचा लेख].

कुडाळसंगम—कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या संगमाला कुडाळसंगम असें म्हणतात. या ठिकाणीं पूर्वीपासून अनेकवार लढाया झाल्या आहेत. चोल व चालुक्यांच्या झटापटी येथेंच होत. वीरराजेंद्र चोल व विक्रमादित्य चालुक्य यांच्यांत येथें तीन वेळां लढाया होऊन चोलांच्या पक्षपाती लिखाणांत त्यांनीं चालुक्यांचा प्रत्येक वेळीं पराभव केला व चालुक्यांच्या पक्षपाती वाङ्मयांत विक्रमादित्यानें चोलांचा पराभव केला असे उल्लेख आढळतात. वीरराजेंद्रानें तर तुंगभद्राकाठीं आपल्या विजयाचा एक स्तंभ उभारला आहे. या लढायांचें साग्र वर्णन एका शिलालेखांत आलें आहे. तसेंच वीरसोळीयम् या तामीळ व्याकरणग्रंथात त्याच्या कर्त्या(बुद्धमित्रा)नें वीरराजेंद्राचा व या कुडाळसंगमावरील लढायांचा उल्लेख केलेला आहे. सारांश लढायांसाठीं ही जागा फार सोईची आहे [अय्यर-प्रा. हिंदुस्थान; बिल्हण-वि. च; द. हिं. शिला. पु. ३०,२०].

कुंडिनपुर—कौण्डिण्यपूर पहा.

कुडुमी—लो. सं. ८२०७. हे कोंकणातील शूद्र होत. हे गोव्याकडून पोर्तुगीजांच्या छळामुळें इकडे आले. अम्बलवासी लोकांप्रमाणें हे देवालयांतील कामें करितात. व विशेषतः कोंकणी ब्राह्मणांचे नोकर म्हणून राहातात. कांहीं मजूर व नावाडीहि आहेत. यांची वस्ती कोचीन (१२,३७१) व त्रावणकोर (४०२७) या संस्थानांतून आहे. तेथें त्यांस कुडुमीचेट्टी म्हणतात. त्यांची मल्याळीमिश्रित कोंकणी भाषा म्हणजे कांहीं विलक्षण आहे. मुप्पन व इतायन असे यांचे दोन पोटवर्ग आहेत. यांतील मुप्पन लोकांचा उडवावयाची दारू तयार करण्याचा धंदा आहे व इतायन लोकांचा तांदूळ सडण्याचा आहे. मक्कथायम (पिता-पुत्र) वारसाहक्काचा कायदा हे पाळतात. बालविवाहपद्धति चालू आहे. १६ वर्षांच्या वरील मृत मनुष्यास दहन

करतात. सुतक १५ दिवस पाळिलें जातें. कोंकणी ब्राह्मण यांचे उपाध्याय असतात. यांचीं वेगळीं देवालयें नाहींत. स्थानिक शूद्र व कुडुमी यांच्यांत अन्नव्यवहार होत नाहीं. कुडुंमी हे मराठीची जी कोंकणी पोटभाषा तीच वेडीवाकडी बोलतात.

कुडें—मुंबई इलाख्यांतील कुलाबा जिल्ह्यापैकीं माणगांव तालुक्यामध्यें, माणगावापासून ६॥ कोसांवर हें ५०० लोकवस्तीचें खेडें, राजपुरी खाडीपासून १ कोसावर आहे. येथें साधारण २५० फू. उंचीच्या एका टेंकडींत बौद्धांचीं २६ लेणीं व ११ पाण्याचे हौद (कुंडें) आहेत. पहिलीं १५ लेणीं खालीं असून त्याच्यावर ४० फू. उंचीवर दुसरीं ११ लेणीं आहेत. लेण्याच्या समोर २॥ कोस रुंदीची राजपुरी खाडी असून तिच्या दोन्ही भागास २०० ते ६०० फूट उंचीच्या टेंकड्या आहेत. पूर्वेस तळें व उत्तरेस घोसाळें हे किल्ले आहेत. फक्त ६ व्या लेण्याशिवाय बाकीचीं सारीं लेणीं साधीं व विन नकशीचीं आहेत. या २६ पैकीं ५ चैत्य असून त्यात दागोबा आहेत. बाकीचीं २१ हीं रहाण्याचीं आहेत. त्यात असलेल्या शिलालेखात त्याना लेणीं हा शब्द लाविला आहे. प्रत्येक लेण्यात साधारणतः पुढील गोष्टी असतातः— एक पडवी व दार, पाठीमागील भिंतींत एक खिडकी, आंतील खोली (एक अथवा दोन, तीन) व त्यात निजण्याचे दोन तीन दगडी ओटे. दाराच्या दगडी चौकटींना भोकें, नरमाद्या वगैरे ज्या खुणा शिल्लक आहेत त्यावरून तेथें लाकडाचीं दारें होतीं व हीं लेणीं केव्हा तरी वापरण्यात होतीं असें ठरतें. खोल्यातील बहुतेक दगडी भिंतींना मातीचा व भाताच्या तुसाचा गिलावा केलेला आहे. एवढेंच नव्हे तर, काहीं भिंतींवर त्यावेळीं काढलेलीं चित्रें अद्यापीहि शाबूत आहेत. पुष्कळ लेण्यात शिलालेख आहेत. एकट्या सहाव्या लेण्यांत तर सहा लेख आहेत. यापैकीं ५ लेख हे इ. स. च्या ५ व्या अगर ६ व्या शतकातील असून, बाकीचे बहुतेक खि. पू. १ ल्या शतकातील आहेत. त्यांत दात्याचें नाव व देणगीचें (लेणें अगर हौद किंवा चैत्य यांचें) नांव दिलेलें आहे. बहुतेक दात्याचीं नांवें बायकाचीं आहेत. त्यातीत एक तर ब्राह्मणाची स्त्री आहे दात्याच्या नांवामध्यें पुष्कळ ठिकाणीं शिव हा शब्द आलेला आहे हें आश्चर्यकारक आहे. लेणें नंबर १ याचा उपयोग हल्लीं गोठ्यासारखा होतो. येथील पडवींत दोन अष्टकोणी व चौकोनी खांब असून त्यांवर चंद्र किंवा दोन शिंगें कोरलेलीं आहे. ही खूण (अगर दागिना) फार प्राचीन (खि. पू. १००-इ. स. २००) काळचा असून, ती कान्हेरी व इतर पश्चिम हिंदुस्थानांतील लेण्यांत आढळते. आंत एक खोली आहे व एक दिवाणखाना आहे. त्यापलीकडे एक गाभाऱ्याची खोली असून तिच्या भिंतीचा गिलावा शाबूत आहे. येथें १५×१४॥चौ. फुटाचा साधा असा दागोबा आहे. या लेण्यांतील पडवीच्या डाव्या अंगास खोलीच्या दारावर एक ठळक अक्षरांचा शिलालेख आहे. त्यांत ' महाभोज सदगेरी विजय याचा मुलगा जो महाभोज खंडपालित मंडव त्याचा लेखक व सुलसदत आणि उतरदता यांचा पुत्र शिवभूति यानें व त्याची बायको नंदा हिनें हें लेणें बांधिलें' असा मजकुर आहे. दुसरें लेणें पहिल्यासारखेंच आहे; फक्त यांत दागोबा व लेख नाहीं. तिसरें दुसऱ्यासारखेंच असून डाव्या हाताच्या भिंतीवर पुढील खंडलेख आहे ' भूतीचें लेणें '. चवथ्या लेण्यात पहिल्या लेण्याप्रमाणें दोन अष्टकोणी व दोन चतुष्कोणी नकशीचे खांब आहेत. यांत एक लहानशी गच्ची व एक ३४ फूट औरसचौरस दिवाणखाना आहे. पांचव्या लेण्यांतील भिंतीचा व छताचा गिलावा शाबूत आहे. पुढील पडवींत एक मोठें कुंड (पाण्यानें भरलेलें) आहे. आत काहीं दगडी ओटे व पांच खोल्या आहेत. यांत एकंदर तीन लेख आहेत. पटागणांत उजव्या बाजूस पुढील अस्पष्ट लेख आहे ' दोन कुंडाची देणगी '. यांतच दुसरा लेख आहे, त्यांत शिवदत व सातिमिता हीं दात्यांचीं नावें आलीं आहेत. तिसऱ्या लेखात पदुमनिका, नागनिका, थेर भदंत, पाटिमित, भदंत आगीमिता, बोधी व अशाल्हमिता हीं नांवें येतात. सहाव्यात प्रथम एक पटागण व दोन हत्ती आहेत. त्याची उंची ११ फूट आहे. डावीकडील हत्तीच्या मागें एक लहान बुद्धमूर्ति कमळावर पाय ठेवून बसलेली आहे. खालीं (धर्म) चक्र, सहा हरिणें व नागाच्या मूर्ती आहेत. या बुद्धाच्या दोहोंबाजूस चवरी वारणारे आहेत. डावीकडचा अवलोकितेश्वर आहे. बुद्धाच्या डोक्यावर मुकुट धरलेले दोन विद्याधर आहेत. खालीं अगदीं अस्पष्ट असा एक संस्कृत लेख आहे. संस्कृत लेखावरून असे दिसते कीं हे लेख महायानपंथियांनीं कोरलेले असावेत. पडवींत दोन अष्टकोनी खाब आहेत. डावीकडील खाबावर एक बुद्धमूर्ति, चौरंगावर बसलेली (बाकी बहुतेक वर दिल्याप्रमाणें) आहे. खाबाच्या खालीं एक लेख आहे, त्यात व्याघ्रका हें दान करणाऱ्या बाईचें नाव आहे. याच खाबाच्या मागील बाजूस वरील व खालील नकशीकामांत एक ८ इंची व दुसरी ११ इंची अशा दोन बुद्धाच्या मूर्ती आहेत. उजव्या खांबावरहि, माथ्यावर २ बुद्धमूर्ती साध्या आसनावर वसलेल्या व त्यांखालीं तिसरी सिंहासनावर बसलेली (वर सागितल्याप्रमाणें चवरीवाले, विद्याधर, हरिणें कमळे वगैरेसहित) अशा आहेत. याखालींच एक लेख आहे. त्यातलि दात्याचेंच नांव अस्पष्ट असल्यानें लागत नाहीं. पडवींतील डाव्या बाजूस एक सात ओळींचा शिलालेख आहे. हा जुना असून पालीभाषेतील आहे. यांत आलेलीं नांवें शिवम्, शिवभूति, विजया, शिवपालित, शिवदत, सपिल, सपा, शिवपालिता, शिवदता व सुलसदता हीं असून, शिवाय पहिल्या लेण्यांत आलेलीं(लेखांतील)हि सर्व नांवें आहेत. या पडवीच्या पलीकडे चौकोनी दिवाणखाना आहे. त्यच्या भिंतीवर ५ व्या किंवा ६ व्या शतकांत

खोदलेलें खोदकाम आहे. डावीकडील भिंतींत वरती चार बैठ्या बुद्धमूर्ती आहेत. त्या ध्यानस्थ (ज्ञानमुद्रेच्या) आहेत. त्याखालीं आणखी २ मूर्ती याच लेण्यांतील (पटांगणांतील हत्तीच्या मागें असलेल्या) मूर्तींप्रमाणें आहेत. येथेंच आणखी एक २८ इंच उंचीची कमळावर बसलेली बुद्धाची मूर्ती आहे; तिच्याभोंवतीं नागांशिवाय बाकीच्या मूर्ती वर सांगितल्याप्रमाणें आहेत. याच्यावर एका उठावदार नकसकामांत एक दाघोबा व एक ज्ञानमुद्रांकित (ध्यानस्थ) बुद्ध आहे. या डाव्या भिंतींतील बहुतेक (तिन्हींहि) खोदकामात लाविलेला रंग अद्यापि थोडा फार शाबूत आहे. उजव्या भिंतीवर डाव्या बाजूला कमळासनावर बसलेला २॥ फूट उंचीचा बुद्ध आहे. त्याच्या जवळ चवरीवाले, विद्याधर व नाग हे आहेत. त्याच्या खालीं डाव्या बाजूस एक संस्कृत भाषेंतील ५ व्या ६ व्या शतकांतील शिलालेख आहे; त्यांत बुद्धसंघाचें दाता म्हणून नांव आहे. जवळच बरीचशीं नागांचीं व चवरीवाल्यांचीं चित्रें आहेत. त्याखालीं असलेल्या लेखांत संतदेवाचें नाव येतें. पुढें आणखी एक बुद्धाची मूर्ति कोरलेली आहे. दिवाणखान्याच्या पाठीमागें असलेल्या अष्टकोणी खांबावर मागें सांगितल्याप्रमाणें चंद्र कोरलेले आहेत. जवळच आंतील खोलींत जाण्याचा रस्ता आहे. त्याच्या कटिंजनावर पुढील आकृती कोरलेल्या आहेत. शार्दूल, माणसाळलेला वाघ, वाघाचा पेटा, बैल, जंगली वाघ, हत्ती, काळवीट वगैरे. या बहुतेकाच्या मागें एक बटुमूर्ति यांना हांकीत आहे असें दाखविणारी आकृति कोरलेली आहे. या भिंतीवर दोन स्त्रीपुरुषाच्या (द्वारपाळाप्रमाणें) मूर्ती आहेत. डाव्या कोपऱ्यात अशींच स्त्रीपुरुषाचीं आणखी चित्रें आहेत याचीं डोक्यावरील आच्छादनें व हात, पाय, कान वगैरेमधील अलंकार पाहण्यासारखे आहेत. पुष्कळाना कमरपट्टेहि आहेत. आतल्या खोलींत दगडी ओटे आहेत. या खोलीच्या आत दुसरी खोली असून तींत अगदीं साधा असा दाघोबा आहे. त्याच्यावर एक छत्री कोरलेली आहे. या लेण्यातील भिंती, छत व खांब वगैरेवर सर्वत्र गिलाव्याच्या व रंगाच्या खुणा आढळतात. सातव्या लेण्यात एक पाण्याचें कुंड व दोन अष्टकोणी खांब पडवींत आहेत. येथील भिंतीवर थोडा गिलावा आहे. भिंतीच्या डाव्या शेवटास एक लेख आहे. त्यात एका वैद्य घराण्यातील सोमदेव, मामकवेजीय, इसिरखित, नाग, सिवघोष, इसिपालिता, पुसा, धम्मा व सपा इतकीं नावें येतात. या लेण्याच्या बाहेर दुसरें एक कुंड असून त्यावर एक अस्पष्ट लेख असून कुंडव कुमाराचा त्यांत उल्लेख आहे. लेणें ८ यात दगडी ओटे, दार व खोल्या वगैरे नेहमींसारखेंच आहे, विशेष काहीं नाहीं. लेणें ९ यांत एक साधा दाघोबा आहे. भिंतीवर गिलावा दिसतो. पडवीच्या उजव्या टोंकास असलेल्या लेखांत ब्राह्मण उपासक अयीतिलु याची बायको ब्राह्मणी भयिला इच्या देणगीचें चेतियघर (चैत्यगृह) हा मजकूर आहे. लेणें १० यांतील खिडकीजवळील लेखांत वधुक माळ्याचा मुलगा शिवपिरित याचें नांव आहे. हें लेणें साधें आहे. लेण ११ हेंहि साधें आहे. याच्या आंतल्या खोलींत एक लेख आहे. त्यांत मंडवच्या महाभोजाच्या मुलीचें नांव आहे. लेणें १२ हेंहि साधें आहे. याच्या पडवींत भिंतीवर एका सिंहाच्या चित्राजवळ राजमंत्री हालची मुलगी गोयम्मा हिचें नाव असलेला लेख आहे. १३ व्या लेण्यांत पडवीच्या मागील भिंतीवर महाभोज सदकर सुदमसन याचें नाव असलेला एक लेख आहे. चौदावे लेणें साधें असून डाव्या बाजूच्या भिंतीवर खिडकीपाशीं लेख असून त्यात करहाकड (कऱ्हाड) च्या महिक लोहाराचा उल्लेख आहे. जवळच कुंड असून त्यावरील लेखात वासुलचें नाव कोरलें आहे. याच्याहि पुढें पडकीं अशीं दोन कुंडें आहेत. त्यापैकीं एकावर एक लेख आहे, तो अस्पष्ट असल्यानें लागत नाहीं. लेणें १५ यात ४ अष्टकोणी खांब आहेत. याच्या आत एक दाघोबा आहे. भिंत, छत व खांब यावरील रंग व गिलावा अजून थोडा बहुत आहे. पाठीमागील भिंतींत डाव्या हाताच्या दरवाजावर एक लेख आहे, रामदत, अधगछक, अहिल, वेलिदत, कोची, वेलिदता या चैत्य कोरणाराचीं नावें आहेत. १६ व्यांत दोन कुंडें व दोनचार खोल्या आहेत. येथें तीन लेख आहेत. दरवाजा व खिडकी याच्यामध्यें (मागील भिंतीवर) एक लेख आहे, यांत सपिला, विजय, लोहिता, वेनहुया व बोधी हीं नावें येतात. दुसरा लेख डावीकडील कुंडावर व तिसरा उजवीकडील कुंडावर असून त्यात मुगुदा माळ्याचें नाव येतें. १७ वे लेणें बहुतेक १६ व्या सारखेंच आहे. पुढील खोलींत मागील भिंतीवरील लेखांत व्यापारी नागाचे नाव येतें. लेणें १८ च्या भिंतीवर गिलावा आहे. पडवींत लेख आहे, त्यात व्यापारी वसुलनक असे नाव आहे. लेणे १९ यात विशेष काहीं नाहीं. लेणें २० वें हें बहुतेक पडलें आहे. लेणें २१ यांतील काम अपुरें आहे. त्याच्या दाराच्या डावीकडील कुंडावर लेख आहे, त्यांत १८ व्या लेण्याच्या लेखांतील वसुलनकचें नांव आहे. लेणें २२ यांत पाण्याचें कुंड आहे. बाकी साधें आहे. २३वें यात एका खोलींत डावीकडील खिडकीवर लेख असून त्यांत पुसनक, वेहमित व सिवदता हीं नांवें येतात. लेणें २४ हें १३ व्या लेण्याप्रमाणें आहे. याच्या दाराच्या उजव्या बाजूस असलेल्या लेखांत अचलदास व असालमित हीं कोरणाराचीं नांवें आहेत. २५ वें लेणें पडकें आहे. विशेष काहीं नाहीं. लेणें २६ हें २५ ला लागून आहे. दोहोंतील भिंत पडली असून पडवींतील उजव्या बाजूस एक ओटा आहे मागील भिंतींत दरवाजा व एक खिडकी असून त्यापलीकडे एक साधी लहान खोली आहे. याप्रमाणें या लेण्यांची माहिती आहे. [बर्जेस–आर्किऑलॉजिकल सर्व्हे, वेस्ट. इंडिया व्हा. ४; केव्ह टेंपल्स; कुलाबा ग्या.].

कुणकुंबी—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा. खानापूरच्या वायव्येस सुमारें १९ मैलांवर हें खेडें आहे. तेथें कुणकुंबेश्वर व माहुली देवी याचीं देवळें आहेत. मलप्रभेच्या उगमाजवळ माहुली देवीचें देऊळ असल्यामुळें तें स्थान पवित्र मानलें जातें. दर बारा वर्षांनीं गंगा नदी मलप्रभेची भेट घेण्याकरितां येथें येते असा समज असल्यामुळें यावेळीं दूरदूरचे लोक भक्तिभावाने या ठिकाणीं येतात

कुणबी—कुणबी, कणबी किंवा कुळंबी अशींहि या जातीचीं नावें आढळतात. मनुस्मृतिच्या ७ व्या अध्यायात ११९ वा श्लोक व त्यावरील कुल्लूकाची व्याख्या यांच्या आधारें कुळंबी याची फोड पुढीलप्रमाणें होते. एकेक नागरास सहा बैल लागतात याला षड्ग व नागर म्हणतात.अशा दोन नागरानीं जेवढी जमीन वाहिली जाईल तेवढीला कुल अशी संज्ञा आहे. यावरून कुल हा शब्द मनुसंहितेपासून भारतवर्षांत प्रचलित आहे. या कुल शब्दाचा उच्चार मराठींत आदेशप्रक्रियान्वये कुळ असा होतो. एका कुळाचा म्हणजे १२ बैलानीं वाहिलेल्या जमीनीचा जो कर्ता त्याचें नाव कुळपति. कुळपति-कुळवइ-कुळंबी-कुणबी असा हा शब्द बनला असावा. पूर्वी कुणबी ही जात नव्हती तर नुसता धंदा होता. तो सध्या जात झाला आहे.

गुजराथी कुणब्यात मूळ गुजर जातीचाच भरणा जास्त आहे. आणि दक्षिणी व कोंकणी कुणब्यात मराठा जातीचा भरणा आहे. अहमदाबादेकडे बहुतेक कुणब्याना (गुजराथींत कुणब्याना कणबी असें म्हणतात.) पाटीदार (पाटील) अशी संज्ञा आहे. खेडा जिल्ह्यात फक्त लेवा कुणब्याना पाटीदार म्हणतात व बाकीच्या सर्वांना कणबी म्हणतात. याशिवाय देसाई, अमीन आणि पटेल याहि अधिकारदर्शक पदव्या तिकडे प्रचलित आहेत. यांचा परस्परात बेटीव्यवहार होतो. अशा कुणब्याच्या खालील कुळ्या आहेत. (१) अंजना, (२) डांगी, (३) गुजर, (४) कडवा, (५) लेवा, (६) मातिया, (७) मोमना, (८) पट्टाणी, (९) उड. यांपैकीं लेवा आणि कडवा या दोन जातींमध्यें रोटीव्यवहार आहे पण बेटीव्यवहार मात्र नाहीं. उड हे इतर कोणत्याहि कुळीशीं रोटी व बेटीव्यवहार करीत नाहींत. पट्टाणी हे लेवा आणि कडवा यांच्याबरोबर जेवतात पण लग्न करीत नाहींत. लेवा आणि कडवा हे मतिया, अंजना, मोमना आणि डागी यांच्याशीं फारसा संबंध ठेवीत नाहींत. धर्माच्या आणि चालीरीतींच्या बाबतींत लेवा, कडवा, अंजना, डांगी, उड आणि पट्टाणी याच्यांत फारसा भेद नाहीं. मतिया, मोमना या अर्धवट मुसुलमान असल्यामुळें इतर कुळ्यापेक्षां त्यांचा विधि निराळा असतो. मोठया गांवांतील कुणबी हे साधारणतः वाण्याप्रमाणें पोषाख वगैरे बाबतींत दिसतात. खेड्यांतील कुणबी हे वर्णानें जास्त काळे पण मजबूत असतात.

गुजराथी कुणबी हे गुजराथी भाषा बोलतात. याच्यांत सर्वसाधारण पुढील नावें आढळतात. अम्रा, भीमो, छोटा, दलसुक, हिरा, पुंजा, वाला वगैरे. अलीकडे या नावाच्या पुढें जी, भाई, दास, लाल आणि चंद हीं उपपदें लावण्याची चाल पडली आहे; जसें मिमजी इत्यादि. बायकामध्यें पुढील नावें सर्वसाधारण आहेत. अंबा, बेणा, दाही, दिवाळी, कुनवर, लाडू, मेघा, रुपाळी, तेजा वगैरे. या नावानाहि अलीकडे बाई हा शब्द जोडूं लागले आहेत. आईकडून चवथ्या अथवा ५ व्या पिढीपूर्वी एकच पूर्वज असेल तर दोन घराण्यात शरीरसंबंध होत नाहीं. सख्या बहिणी सख्या जावा होऊं शकतात. बालविवाहाची चाल सर्रास प्रचारात आहे. तसेंच बहुपत्नीत्वाची चालहि प्रचारात आहे. मात्र पाटीदार लोक ती फारच क्वचित उपयोगांत आणतात. नवऱ्यानें बायकोला काडी मोडून दिली तर बायकोस कांहीं एक पैसा द्यावा लागत नाहीं. पण बायकोनें फारकत मागितली तर तिला मात्र नवऱ्याच्या दुसऱ्या लग्नाचा खर्च द्यावा लागतो. मोठीं झालेलीं मुलें हीं बापाजवळ रहातात, व लहान मुलें आईबरोबर जातात. बाईच्या पहिल्या गर्भारपणामध्यें ७ महिन्यांत ज्योतिषानें ठरविलेल्या दिवशीं खोळोभरणाचा (ओटीभरण) विधि करतात. जिचीं सर्व मुलें जिवंत आहेत अशा स्त्रीकडून गर्भारबाईची ओटी तादुळ, केळीं, सुपाऱ्या, नारळ आणि कुंकूं यांनीं भरतात. ही ओटी सात वेळ भरतात आणि आठव्या खेपेस ओटीमधलें तादुळ मडक्यामध्यें ठेवतात. त्याच मडक्यामध्यें बकऱ्याच्या सात लेंड्या, उंदराच्या सात लेंड्या, कच्च्या सुताच्या सात गुंड्या, वडाचीं सात फळें, सात सुपाऱ्या, सात खारका, ताब्याचीं सात नाणीं आणि एक रुपया हीं ठेवतात. मडक्याच्या तोंडाभोंवतीं सुताचा दोरा गुंडाळून त्यावर एक नारळ ठेवतात. नंतर कुलोपाध्यायानें सागितल्याप्रमाणे ती गर्भार बाई त्या नारळाची आणि सुगडाची पूजा करते. नंतर त्या सुगडामधील तांब्याचे सात पैसे भिक्षुकास देतात. व इतर जिनसाचे व सुगडाचें मोठ्या काळजीनें रक्षण करतात. गर्भारबाईची नणंद तिच्या उजव्या मनगटाला एक चादीची राखडी बांधते.

ही राखडी ती बाई प्रसूत होईपर्यंत हातात बाधलेली असते. प्रसूतिनंतर ती राखडी पुन्हा तिच्या नणंदेला परत करतात; व त्याच वेळीं मुलगा झाल्यास आणखी कांहीं नजराणा करतात. गर्भारशीस तिच्या नातेवाईकाकडे डोहाळजेवणास बोलवतात. तेव्हा एक रुपयापासून पांच रुपयांपर्यंत रोख अगर वस्त्राचा आहेर करतात. याला वायन् असें म्हणतात. पहिलटकरीण स्त्री ही आपल्या माहेरीच बाळंत होते. मूल झाल्यानंतर न्हावी अथवा दुसऱ्या कोणत्याहि जातीचा माणूस ती बातमी मुलाच्या बापास कळविण्यास पाठवितात. त्याच्या बरोबर नूतन मुलाच्या पायाचा कुंकवाचा ठसा कागदावर उठवून पाठ-

वितात. याबद्दल त्याला दोनपासून पांच रुपयापर्यंत देणगी मिळते. पांचव्या दिवशीं संबंध नाळ कापतात. षष्ठीची पूजा नेहमींप्रमाणें सर्वसाधारणच असते. दहाव्या दिवशीं जरी सोहेर फिटला तरी मुलाच्या बाबतींत २५ दिवस व मुलीच्या बाबतींत ३० दिवसपर्यंत अशुद्ध मानतात. ३५ व्या अथवा ४०व्या दिवशीं बाळंतीण शुद्ध होते. मुलीचा बाप आपल्या नातवास पाळणा वगैरे देतो. नांव ठेवण्याचा विधि याच्यांत नसतो. ब्राम्हण उपाध्याय सांगेल यावेळीं, सहाव्या किंवा बाराव्या दिवशीं किंवा पहिल्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यांतील शुभ दिवशी नाव ठेवतात. बहुतेक कुणब्यांच्या गळ्यांत तुळशीच्या मण्याची माळ असते. अलीकडे खेडा आणि भडोच जिल्ह्यातील पाटीदार लोक जानवीं घालूं लागले आहेत. सात पासून अकराव्या वर्षाच्या आत लहान मुलाच्या गळ्यांत जातिच्या गुरूकडून माळ बाधवितात. लग्नामध्यें मागणीचा प्रकार दोन्हीकडून होतो. वाङ्निश्चय वराच्या बापाकडून जर मोडला गेला तर वधूच्या बापानें जो पैसा पूर्वी दिलेला असतो तो त्याला परत मिळतो. परंतु मुलीच्या बापानें वाङ्निश्चय मोडला तर मात्र पैसा परत मिळत नाहीं. हुंडा हा कुळिआ अथवा अकुळिआ (कुलवान अथवा अकुलवान) घराण्यावर अवलंबून असतो. वर कुलवान असला तर १ हजारापासून २ हजारापर्यंत हुंडा मिळतो, आणि अकुलवान असेल तर पाचशें पासून हजारापर्यंत मिळतो. पाटीदार लोक अकरा वर्षाच्या आत, आणि साधे कुणबी ११ ते १६ च्या आत लग्नें लावितात. लग्न ठरल्यानंतर मुलीचा बाप उपाध्यायाबरोबर लग्नपत्रिका देऊन मुलीच्या बापाकडे पाठवितो. व त्याच्या आईला देण्यासाठीं एक रुपया देतो. लग्नापूर्वी तिसऱ्या अथवा चवथ्या दिवशीं गणपतिपूजन आणि दोन दिवसांपूर्वी ग्रहशांति हीं दोन्ही घरीं करतात. लग्नदिवशीं नवऱ्याचा मामा त्याला आणि नवरीचा मामा तिला दागदागिन्यांचा आहेर करितात. मुलीच्या घरीं शमीचा माडव घालतात. नवरदेव लग्नाला निघण्यापूर्वी त्याच्या डोळ्यांत काजळ घालून आणि कपाळाला कुंकवाचा टिळा लावून त्याच्या ओंजळींत तांदूळ, सात सुपाऱ्या, दोनतीन विड्याचीं पानें आणि एक रुपया देतात. ज्वारी, विड्याचीं पानें, मीठ व पैसे वगैरेंनीं त्याची दृष्ट काढतात. पाटीदार लोकांमध्यें नवरदेवाच्या मार्गे बायका (खुद्द त्याची आईसुद्धां) नसतात. इतर कुणब्यांमध्यें या मिरवणुकींत बायका असतात. वरमाईच्या हातांत दिवा असतो, सीमांतपूजनाच्या नवरदेवाला व त्याच्या वऱ्हाडाला गूळ पाणी देण्याचा हक्क न्हाव्याचा असतो. लग्नमंडपापाशीं नवरदेव आल्यानंतर नवरीची आई त्याला आंत घेऊन जाते व नांगर, बाण, रवी ह्या तेथें ठेवलेल्या वस्तू त्याला दाखविते व मंडपांत घेऊन जाते. नंतर दोन्हीकडील गणपतिपूजन झाल्यावर नवरदेवाच्या उजव्या आंगठ्याची पूजा वधूचे आईबाप करतात. नवरा आणि नवरी यांच्या गळ्यांमध्यें तांबड्या दोऱ्यांच्या माळा घालतात. त्याचे हात जोडून त्यावर एक कापडाचा तुकडा घालून परस्परांच्या वस्त्रांची गांठ मारतात. नंतर वधूच्या आईनें केलेली गुळपापडी ही वर आणि वधू यांना खाऊ घालतात. त्यानंतर नवरदेव हा आपल्या सासूचा पदर धरतो व कांहीं देणगी मिळाल्याशिवाय तो सोडीत नाहीं. यानंतर वधूवर गणपतीची पूजा करतात व येथें लग्नविधि संपतो. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं नवरीकडील पुरुषमंडळीं नवरदेवाच्या घरीं जाऊन कुसुंबा (अफूचें पाणी) पानविधि करितात. जे कुसुंबा पीत नाहींत त्यांनां केशराचें पाणी प्यावयास देतात. पुढें मुलीचा बाप उपाध्याय, न्हावी, माळी आणि कुंभार यांना बक्षिसें देतो. त्यानंतर तिसऱ्या दिवशीं नवरीच्या घरच्या मांडवाची पूजा करून नवरदेव नवरीला घरीं घेऊन जातो.

नात्र अथवा पाटाची चाल सर्व कुणब्यात आहे; पण खानदानीच्या लोकामध्यें ती क्वचितच उपयोगांत येते. खंबायत प्रातांत लेवा, कडवा आणि पट्टाणी या कुळयांमध्यें धाकट्या दिराशीं पाट लावण्याची चाल आहे. विधवेच्या बापाला २५ पासून ७५ रुपयापर्यंतची रक्कम भावी (दुसरा) नवऱ्याकडून मिळते. रविवार आणि मंगळवार याच दिवशीं रात्रीं पाट लावितात. विधवेला तिच्या घरून नवऱ्याच्या घरीं नेण्यासाठीं पाच आप्त लोक येतात. वधूवर एकमेकांकडे तोंड करून बसल्यानंतर दोहोंच्यामध्यें मातीच्या परळांत एक दिवा टेवतात, आणि त्यांनां त्या परळाकडे खालीं पहाण्यास सांगतात. ते तसे पाहूं लागले असतां एकमेकाचीं डोकीं लागलीं म्हणजे हा विधि संपतो. त्यानंतर नवऱ्यानें दिलेल्या बांगड्या ती बाई हातांत घालते. यानंतर कांहीं ठिकाणीं पाण्यानें भरलेली पितळेची घागर डोकीवर ठेवून ती बाई आपल्या नवऱ्याच्या घरांत प्रवेश करते.

वाण्याप्रमाणें आणि इतर पांढरपेशा वर्गाप्रमाणें याच्यांतहि पुढील अनेक धार्मिक पंथ आहेत. बीजमार्गी, दादूपंथी, कबीरपंथी, माधवगणी, प्रणामी, रामानंदी, स्वामीनारायण आणि वल्लभाचार्यी. काहीं थोडे फार जैनहि आहेत. मुसुलमान अवलियांनांहि हे मानतात. आपापल्या पंथाच्या देवांची हे पूजा करतात. हे ब्राह्मणाला श्रेष्ठ मानून त्याचा मान ठेवितात. हे आपल्या धर्मगुरूला लग्न वगैरे प्रसंगीं एक रुपया, आणि कंठी(माळ)धारण प्रसंगीं सव्वा रुपया दक्षणा देतात. यांचा जादूटोणा आणि पिशाच्चादिकांवर भरंवसा असल्यामुळें आजारीपणांत अथवा संकटप्रसंगीं कोळी, वाघ्री अथवा ब्राह्मण जातीच्या देवर्षीचा सल्ला वगैरे घेतात. हे अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं शेतीच्या कामाला प्रारंभ करतात. विहीर खणतांना किंवा पहिली नांगरट करताना हळदी कुंकुवांनीं जमिनीची

पूजा करतात. बागांस प्रथम पाणी देतांना विहिरींतल्या पाण्याची पूजा करून विहिरीजवळ एक दिवा ठेवून तींत खोबरें टाकतात. पक्ष्यांमध्यें नीळकंठ (चास) याला ते पवित्र मानतात. आश्विनातील वसुबारशीच्या दिवशीं कुणब्यांच्या बायका गाईची पूजा करून गाईच्या शेणांत सांपडणरें धान्य गाईच्या दुधात मिसळून खातात. यांचीं तीर्थयात्रेचीं ठिकाणें इतर प्रख्यात हिंदू क्षेत्रें आहेतच पण त्याशिवाय त्या प्रातातील आंबाजी, बहुचराजी, डाकूर, द्वारका आणि उनाई या तीर्थांना ते पवित्र मानतात.

मनुष्य मृत्युपंथास लागला म्हणजे कुलोपाध्यायाच्या (हा बहुधा औदीच्य ब्राह्मण असतो) हातून अथवा इतर ब्राह्मणाच्या हातून तुपाचा दिवा त्या माणसाच्या अंथरुणाजवळ ठेवतात. प्रेताची हजामत करण्याची चाल याच्यात आहे.प्राण गेल्यानंतर जवळचे नातेवाईक मोठयानें शोक करतात. त्याला प्राणपोक (मृत जीवाला परत बोलावणें) म्हणतात. अहमदाबादकडील पाटीदार लोकामध्यें मेलेल्या माणसाचें नाव कोळशानें कौलावर लिहून भंग्याच्या हातीं मेलेल्याच्या आप्तांकडे(तो प्रसंग कळविण्यासाठीं)पाठवितात.मृताच्या तिरडीला चारी कोपऱ्याला चार नारळ बाधतात.तिरडीपुढें चालणाऱ्याच्या हातात मडकें किंवा ताब्याचें भाडें असतें. प्रेतामागून बायकाहि काहीं अंतरापर्यंत जाऊन एके ठिकाणीं थाबून आपली छाती बडवितात व नंतर घरीं येऊन स्नान करतात. चितेवर प्रेताचें डोकें उत्तरेकडे करतात. सर्व प्रेत जळून गेल्यानंतर अग्नीमध्यें थोडेसे तूप ओततात. तिसऱ्या दिवशीं राख भरल्यानंतर चितेच्या जागीं पाण्यानें भरलेलें एक मडकें ठेवतात. नंतर घरीं आल्यावर एक पाण्याचें मडकें त्यात थोडेसें दूध घालून तें घराच्या छपरावर ठेवतात. दहाव्या दिवशीं सर्व पुरुष क्षौर करतात. १२ व्या व १३ व्या दिवशीं होणारें श्राद्ध कायतिया ब्राह्मणाच्या हातून करवितात. दहाव्या दिवसापासून तेराव्यापर्यंत भाऊबंद व मित्र यांनां आणि बाराव्या व तेराव्या दिवशीं सर्व जातीला जेवण घालतात. मेलेला माणूस जर वृद्ध असेल तर जातींतील बायका त्याच्या घरीं सकाळ आणि संध्याकाळ रडण्यासाठीं म्हणून एक महिना जातात, आणि तरुण असेल तर सहा महिने जातात.

अंजना कुणब्यांशिवाय बाकीचे कोणतेहि कुणबी मद्यमास खात नाहींत.

सर्वसाधारण कुणब्याचा धंदा शेतीचाच आहे. काहींजण मात्र कोष्टयाचा, कापड आणि धान्य विकण्याचा, सरकारी नोकरीचा, व्यापाराचा आणि सावकारीचा धंदा करतात. पुष्कळजण खेड्याचे मुखीया (पोलीस पाटील) असून त्यांनां त्याबद्दल रोख अथवा जमीनीच्या रूपानें मुशाहिरा मिळतो. मुखी हे मातादार अगर वतनदार या वर्गातून नेमतात. गुजराथी कणबी हे लष्करांत नोकरी करीत नाहींत. कणब्यापैकीं कडवा आणि लेवा हे दोन वर्ग मालगुजारी करतात.

अंजना कुणबी:—यांच्यासंबंधीं माहिती ज्ञानकोश विभाग ७ पान ७७ मध्यें पहा.

डंगी कणबी.—यांचें ठिकाण महीकांठा. मूळचे अंजनाच आहेत त्यांचीं यांची पंगत होते पण लग्नें होत नाहींत. भिल्लांची भाषा आणि पोषाख यांनीं उचलल्यामुळें यांचा दर्जा कमी झाला आहे.

गुजर कणबी.—हे पूर्व आणि पश्चिम खानदेशांत आढळतात. यांच्यात आठ पोटभेद आहेत. ते(१) अनाल, (२) दाळे, (३) दोरे, (४) गरी, (५) कडवा (६) कापर, (७) लोंढारी, किंवा बाड. (८) रेवा अथवा लेवा. दाळे यांची वस्ती तापीच्या काठीं शहादे, तळोदे आणि रावेर या तालुक्यात व बऱ्हाणपूरकडे आहे. जामनेरचा देशमूख हा गरी गुजर आहे असे म्हणतात. परंतु तो स्वतःस रेवा गुजर असें म्हणवितो. इकडील रेवा अथवा लेवा हे गुजराथेंतील लेव्यांपैकींच असावे.ते आपल्याला श्रेष्ठ म्हणवितात आणि फक्त ब्राम्हणाच्या हातचे खातात. कडवा, अनाल आणि दाळे हे लोक खानदेशात फार थोडे आहेत कडवा हे गुजराथेंतील कडव्यापैकींच असून त्यांच्याप्रमाणेंच बारा वर्षांतून एकदां लग्न करण्याची चाल याच्यात आहे. जे कापूस लोंढतात (कापसातली सरकी चरकातून काढतात) त्यांनां लोंढारी असे म्हणतात. कापर ही कुळी थोडीशी हलकी मानतात.

कडवा.—अमदाबाद आणि कडी (बडोदे संस्थानातील एक तालुका) या दोन प्रांतात याची वस्ती आहे. लेव्याचा व ह्यांचा निकटचा संबंध आहे. एका दंतकथेवरून कडव हे सीता आणि राम याचा मुलगा कुश याचे अनुयायी किंवा वंशज होत व दुसऱ्या दंतकथेवरून पार्वतीनें केलेल्या मातीच्या चित्रात शंकरानें जीव घालून सजीव केलेल्या प्राण्यापासून याची उत्पत्ति मानतात. शंकरानें यांना अहमदाबादेच्या उत्तरेस २० कोस असलेला उंज गाव वस्तीस दिलें. त्या ठिकाणीं एक पार्वतीचें देऊळ बाधलेलें आहे. सर्व कडवा कुणबी या देवळाला आणि खेड्याला आपल्या जातीचें मूलस्थान मानतात आणि आपले नवस फेडण्यासाठीं दूरदूर ठिकाणाहून येथें येतात. त्याच्या शाखाच्या काहीं नावावरून त्याचें म्हणणें असें आहे कीं, आपण काबूलहून पंजाबामधून गुजराथेत आलों. याच्यात लालचुडावाला (याच्या बायका लाल बागडया वापरतात), काळाचुडावाला आणि अहमदाबादी असे तीन भाग आहेत. लेवा कुणब्याप्रमाणेंच याच्यातहि कुळी आणि अकुळी असे दोन भेद आहेत. उत्तरगुजराथेंत मूल झाल्यानंतर अथवा नवऱ्याची संमति घेतल्याशिवाय बायकोला फारकत मागता येत नाहीं. याच्यात ९।१० अथवा ११ वर्षांनीं एकदा लग्न करण्याची चाल आहे. अलीकडे ही चाल मोडून पाच अथवा एक वर्षावर आणून ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण सर्व जात ह्या सुधारणेस अद्याप कबूल नाहीं.

यांच्यामध्यें मूळच्या ५२शाखा असून त्यांचीं नांवें पंजाबांतील त्या त्या गांवावरून पडलीं आहेत. या शाखांमध्यें गावांतल्या गांवांत परस्पर बेटीव्यवहार होत नाहीं. हल्लीं सुद्धा हे कडवे आपल्या गांवाच्या बाहेरील दुसऱ्या शाखेशीं लग्न करितात, आणि आपल्याला गावाचेंच नांव धारण करितात; जसें नरोद गावचे ते नरोदिया.

याप्रमाणें नव्या नव्या शाखा उत्पन्न होणें सुरूच आहे. या एकंदर शाखांचीं नांवें ज्याना पहावयाचीं असतील त्यानीं तीं एन्थोवेन याच्या ट्राइब्स् ॲन्ड कास्टस् ऑफ बॅंबे या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाच्या १४६, १४७, १४८ या पृष्ठांवर पहावीं. याच्यांत सामाजिक चालीरीती पुष्कळ आहेत. थोडया वर्षांपूर्वी ११ महिन्याच्या, एवढेंच नव्हे तर गर्भांतीलहि मुलाचे वाङ्‌निश्चय लावीत असत. गर्भारशा बायका खरोखरच माडवातील बोहल्याभोंवतीं प्रदक्षणा घालून वाङ्‌निश्चयाचा विधि पार पाडीत. यांच्यांत लग्नें वर सांगितल्याप्रमाणें वार्षिक मुदतीचीं असल्यानें योग्य नवरा मिळण्यास पंचाईत पडते. त्यासाठीं पुढील प्रकार उपयोगात आणतात. सामान्य लग्नाच्या मुहूर्तावर मुलीचें लग्न एका फुलाच्या गुच्छाशीं लावतात व मग तो गुच्छ विहिरींत अथवा नदींत फेंकून देतात. यावर ती मुलगी विधवा बनते. यानंतर सवडीप्रमाणें मग तिचें दुसरें (नांवाचे) लग्न किंवा नात्र (पाट) करितात. एखाद्या विवाहित पुरुषाशीं, त्याला थोडेसे पैसे देऊन तिचें लग्न लावितात; परंतु त्याच्याकडून लागलीच तिचा घटस्फोट करून घेतात. लग्नापूर्वी उंजा येथील उमेची पूजा प्रथम करितात. नंतर जोशी लग्नासाठीं मुहूर्त पहातो. तो फाशानें पाहतो. ज्या वर्षावर फांसा पडेल तें अथवा त्यापुढील वर्ष लग्नासाठीं ठरवितात. या वर्षात बहुधां वैशाख तच लग्न लावतात.

ले वा.—हे गुजराथी कुणब्यात सर्वात जास्त आहेत. हे सर्वत्र गुजराथेंत (विशेषतः आनंद, नडियाद व बोरसल इकडे) पसरलेले आहेत. कच्छमध्येंहि हलाई व वाघदिआ या नावाखालीं ते आहेत. गुजराथेंत याचे पाटीदार व व कणबी असे दोन भाग आहेत. पाटीदार हे आपल्या मुली कणब्यांना देत नाहींत, त्याच्या मात्र करतात. पुन्हां पाटिदारात कुळी व अकुळी असून कुळी हे अकुळयांना मुली देत नाहींत; याच्या बायका बाहेर (बुरख्याशिवाय) पडत नाहींत, तसेंच यांच्यांत पाटाची चाल नाहीं. यांच्यांत लग्नास,वाण्याप्रमाणें गोल (खेड्यांचा समूह) आहेत. एकाच गोलात लग्नव्यवहार होतो. पूर्वी हे कुळी पाटीदार शेतकरी व सरकार याच्यात मध्यस्त असून कर वसूल करण्यात रयतेस फार त्रास देत असत. याच्यांतील लग्नांत अतीशय खर्च करण्याच्या पद्धतीमुळें हे कर्जबाजारी असत. उत्तम कुळाशीं संबंध जोडण्यासाठीं फार चढाओढ लागे व पुष्कळ पैसा खर्च होई.

म ति आ.—मत या शब्दापासून मतिआ हें नांव पडलें. हे लोक जलालपूर आणि बार्डोली या तालुक्यांत असून धर्मानें अर्धवट हिंदू व अर्धवट मुसुलमान आहेत. यांच्यातील अडनावांवरून व पूर्वीच्या लेवा कणब्यांशीं आढळलेल्या नात्यावरून हे मूळचे हिंदू लेवा कणबी होत असें ठरतें. सरासरी तीनशें वर्षांपूर्वी लेवा कणब्यांची एक टोळी काशीयात्रा करण्यास जात असतां अहमदाबादजवळील गरमठ या गावीं मुक्कामास राहिली. तेथें इमामशहा नांवाचा एक मुसुलमान फकीर होता. त्यानें चमत्कार करून काशीचें दर्शन त्या टोळीला बसल्या जागींच करून दिलें. त्यामुळें तिच्यापैकीं पुष्कळांनीं त्या फकिराला आपला गुरू केलें अशी दंतकथा आहे. हल्लीं यांच्यांत वैष्णव व पिरान असे दोन भेद आहेत. वैष्णव मतिआनीं रामानंदी व दादूपंथी हे दोन पंथ स्वीकारले आहेत. हे सामान्य हिंदू उपास तापास पाळतात व यात्रा करतात. वैष्णव मतिआ यानीं सर्व मुसुलमानी चालीरिती सोडून ते लेवाप्रमाणें वागतात. परंतु लेवा हे त्यांच्याबरोबर भोजन करीत नाहींत. आणि लग्नेंहि लावीत नाहींत. पिरान हे भाषा व पोषाख लेवा यांच्याप्रमाणें करितात. यांच्यात विधवा ही धाकट्या दिराशीं पाट लावते. पहिल्या वराला प्रथम शमीशीं लग्न लावल्याशिवाय घटस्फोट केलेल्या स्त्रीशीं अथवा विधवेशीं लग्न करतां येत नाहीं. यांच्या लग्नांत मोध ब्राह्मण लागतात. मतिआ बाईला मूल झाल्यानंतर १२ व्या दिवशीं ती जवळच्या विहिरीची पूजा करून तिच्याजवळ दोन गवऱ्या एका दोरीला बांधून ठेवते. ती बाई ४० दिवस अशुद्ध असते व घरातील कोणत्याहि वस्तूस शिवत नाहीं. ४० व्या दिवशीं बाळंतिणीच्या खोलींतील जमीनसुद्धा खरडून काढितात, आणि त्याच दिवशीं मुलाचें नांव ठेवितात.

हे स्वतःस अथर्ववेदी म्हणवितात.हे सत्पंथी मताचे अनुयायी आहेत. पिरान, अहमदाबाद वगैरे ठिकाणच्या मुसुलमानी पिरांची पूजा करितात. पिरानचा इमामशहा याचें शिक्षापत्री हें धार्मिक पुस्तक ते पूज्य मानतात, आणि ते ज्यांनां पाठ येतें त्यांना काका म्हणतात. हे काका ह्या पंथाचीं सर्व धार्मिक कृत्यें करितात. यांच्यात पंचिआ (सुरभाईचे अनुयायी). सतिआ (महमूदचे अनुयायी,) आटिया (बाकर अलीचे अनुयायी) असे तीन भेद आहेत. पाप नाशार्थ 'लाहेउतारणी' हा विधि करतात. या विधीची साग्र माहिती वर दिलेल्या एन्थॉवेनच्या पुस्तकांत आहे. प्रत्येक मतिआ शेतकरी या काकांच्या तर्फे आपल्या गुरूला अर्धामण धान्य व एक रुपया दर एक नांगरापाठीमागें पाठवितात. हे लोक रमजानचे उपवास व इतर मुसुलमानी सण पाळतात. मतिआ लोक आपलीं प्रेतें पुरतात. ते प्रेताला मुसुलमानी धरतीच्या तिरडीमधून नेतात आणि मुसुलमानांप्रमाणेंच त्या प्रेताचें मातींत दफन करतात.

नंतर देवाची प्रार्थना हिंदु व मुसुलमान दोन्ही पद्धतीची करितात. हे हिंदूंप्रमाणें दहा दिवस सुतक पाळतात. तेराव्या दिवशीं मेलेल्याचा निकट आप्त बऱ्हाणपूर, नवसरी वगैरे ठिकाणच्या त्यांच्या पंथांच्या मुख्य पीरांना कपडेलत्ते वगैरेंचे नजराणे पाठवितो. हे मद्यमांसनिवृत्त आहेत.

मो म ना.—यांची मुख्य वस्ती कच्छमध्यें आहे. हे मूळचे हिंदू असून वर आलेल्या इमामशहानें यांनां मुसुलमान केलें. इ. स. १६९१ तील मोमनांचे गुजराथेंत बंड झाल्यानंतर कच्छ प्रांतामध्यें रहावयास गेले. यांनां मोमीन असेंहि म्हणतात. याच्यांतील एका पंथाचा इमाम सद्रुद्दिन होता. हे लोक शेंडी ठेवितात व गुजराथी भाषा बोलतात, पण यांचा पेहराव मुसुलमानी असतो. हे लोक शेती आणि मजुरी करितात हे नावाचे शिया पंथी आहेत. याच्या सर्व चालीरीती व आचारविचार हिंदूप्रमाणेंच आहेत. हे गोकुळअष्टमी, दिवाळी वगैरे सण पाळतात व एकमेकाना भेटण्याच्या वेळीं रामराम करतात. यांच्या जातींतील सर–पंच भुजजवळच्या मानकुव गांवीं रहातो. यांचे जातिविषयक सर्व तंटे तोच तोडतो. हे लोक मुसुलमानात मिसळत नाहींत, मांस खात नाहींत आणि रमजानचे उपास पाळीत नाहींत. हे आपल्या स्वतःला लेवा कणबी असें म्हणवितात. यानां मुसुलमान म्हटललें खपत नाहीं. यापैकीं हल्लीं पुष्कळ स्वामीनारायणपंथी बनले आहेत. याच्या लग्नात बोहोलें किंवा होम वगैरे नसून वधूवराच्यामध्यें एका चौरंगावर तीन दिवे ठेवितात. त्याना ब्रह्मा, विष्णु व महेश मानून त्यांच्यासमक्ष जातीचा मुखी (मुख्य) हा लग्न लावितो. या विधीला दुव असें म्हणतात. पाटहि याच रीतीनें लावतात. घटस्फोट फक्त नवऱ्यालाच करतां येतो. यांच्या देवळाला खान असें म्हणत असत परंतु हल्लीं ते धर्मशाळा म्हणूं लागले आहेत. या धर्मशाळेंत एका पाटावर एक मातीचा घट ठेविलेला असून त्यात पिरान येथील माती व पाणी भरलेलें असतें. हे लोक प्रेतें पुरतात; जाळीत नाहींत. भाद्रपदमासीं इतर हिंदूप्रमाणें पितृपक्ष करितात. हे शाकाहारी असून मुसुलमानावरोबर जेवात नाहीत. रजपूत दर्जी व लोहार हे याच्या हातचें खातात.

उ दा.—उदा नावाच्या एका भगताचे हे अनुयायी असल्यानें याना उदा असें म्हणतात. हे कवीरपंथी आहेत. या एकंदर गुजराथी कणब्यांची संख्या सव्वा नऊ लाख आहे. [बडोदा सेन्सस रिपोर्ट १९०१].

म रा ठी कु ण बी—यांची एकंदर लो. सं. वीस लाखांपर्यंत आहे. मराठी कुणबी हे जातीनें बहुतेक मराठे व कांहीं क्षत्रिय आहेत. मराठे म्हणजे तत्रस्थ, त्या त्या गावच्या जातीचे होत. तळहेरी किंवा कोंकणी कुणबी हे आपल्यास क्षत्रिय न म्हणवितां शूद्र म्हणवितात.

यांच्यांत (१) मराठा, (२) कोंकणी, (३) खानदेशी (४) तळहेरी म्हणजे ठाणे जिल्ह्यांतील व (५) कानड्यांतील काळे; असे पांच भेद आहेत. या सर्वांत अकरमाशे ही एक स्वतंत्र शाखा आहे. हल्लीं मल्हारी कोळीहि आपल्यास कुणबी म्हणवूं लागले आहेत.

कुणब्यांपैकीं थोडेसे लोक दक्षिणेंत पाटील व देशमुख आहेत; कांहीं जण सरकारी नोकर आहेत; पुष्कळजण सैन्यांत शिरले आहेत. हे लोक पैशाच्या दृष्टीनें सुखी आहेत. मात्र जे शेतकरी आहेत ते गरीब आहेत. हे बागाईत उत्कृष्ट करितात. कामात त्यांना त्यांच्या बायकामुलांची मदत होते. पुष्कळजण शेतीवर मजुरी करतात. त्याना साला(वर्षा)वर पगार ठरवितात. दूध, दहीं, तूप वगैरे विकण्याचाहि धंदा हे करतात. हल्लीं या जातींतील पुष्कळ लोक मुंबईंत गिरण्यांत मजूर म्हणून राहूं लागले आहेत.

मराठा कुणबीः—याच्या देवकावरून हे मराठे जातीचे आहेत असें दिसतें. याच्यात ५ या अंकाला फार शुभ मानतात. मराठा व मराठा कुणबी यांत फारसा भेद नाहीं; व असला तरी तो सागतां येत नाहीं इतका सूक्ष्म आहे. पुण्याकडे " कुणबी माजला, मराठा झाला " अशी एक म्हण आहे. त्यावरून चागला ऐपतदार कुणबी व मराठा एकच अशी समजूत दिसते. गरीब मराठा व श्रीमंत कुणबी यांच्यांत सोयरीक होते. कुणब्यातील अगदीं खालचा गरीब वर्ग हा मूळच्या जातींपैकीं असावा असें काहींचें म्हणणें आहे. या जातींतील पुरुष व स्त्रिया शरीरानें धट्टे कट्टे असतात. घराबाहेर याचा पोषाख चागला असतो. पावसाळ्यात हे घोंगडी वापरतात. याची भाषा मराठी आहे. बहुतेक प्रत्येक कुणब्यास एक उपाध्यायाने ठेविलेलें (रासनाव), एक घरातील माणसांनीं ठेविलेलें व एक टोपण अशी तीन नावें असतात. राशीनावें अशीं:—अमृत्या, बाबाजी, रावजी, सखु, भागु इ. घरातील नावें वडील माणसें ठेवतात तीं, खंडु, पांडु, रघु, काशी, पार्वती अशीं असतात. टोपण किंवा आवडतीं नावें बाप अगर मामा ठेवितो. तीं अप्पा, बापू, बाई, ताई अशीं ठेवितात. याच्यांत जातगंगा असते व तिचा मुख्य व तीं जातिविषयक तंटे तोडतात हा सरपंच लोकनियुक्त असतो. पैशाचा दंड व जातीस जेवण ही शिक्षा असते. एकाच कुळात व देवकवाल्यात सोयरीक होत नाहीं. मावसबहिणीशीं लग्न लावीत नाहींत; मात्र मामेबहिणीशीं लावितात. सख्या बहिणी सख्या जावा होतात. मुलींचीं लग्नें ३ ते १२ व मुलाचीं १६ ते २५ वयाच्या दरम्यान करतात. ऋतुप्राप्त झाल्यावर सुद्धा मुलीचे लग्न होतें. बहुधा विधुरच विधवेशीं पाट लावतो. पाटाच्या मुलाना लग्नाच्या मुलांइतका हिस्सा मालमत्तेंत मिळत नाहीं. मूल जन्मल्यानंतर व त्याची नाळ कापल्यावर ती त्याच्या तोंडांत घालून मग ती पुरतात. पांचवी, सहावी व सातवीची पूजा इतरांप्रमाणेंच असते. बाळंतिणीस १२ दिवस कोण्याहि पुरुषाचें

तोंड पाहूं देत नाहींत. सहावीच्या दिवशीं जातीस जेवणहि घालतात. बाराव्या दिवशीं सर्व घर झाडून सारवून स्वच्छ करतात. एक बकरें मारून त्याच्या रक्तात ऊन पाणी व मसाला मिसळतात, याला रक्ती म्हणतात. हाडें व मांस एका भांड्यात व काळीज दुसऱ्या एका भांड्यात शिजवितात. नंतर बाळंतीण गावाबाहेर जाऊन त्याचा नैवेद्य सटवाईस दाखविते मुलाचें नाव ठेवण्यास ब्राह्मण जोशी लागतो. बाळंतिणास तिसऱ्या महिन्यात मुलानें मान सावरावी म्हणून एक बकऱ्याचें मुंडकें शिजवून घालतात व मुलाच्या गळ्यात बजरबट्टु व ताईत बांधतात. बाळ चालतें ग देवांच्या दर्शनास जातात तेव्हां दलितपैकी महार किंवा मांगाकडून एक बकरें मारवितात. त्याच मुंडकें व चार तंगड्या देवीपाशीं ठेवून बाकीचा भाग प्रसाद म्हणून शिजवून खातात. मुलाचें जावळ एक वर्षानंतर काढतात. मुलगा दहाव्या वर्षी आपल्या बापाबरोबर गुरें चारावयास व शेतात काम करावयास जाऊं लागतो. लग्नाचा मुहूर्त जोशी ठरावतो. मुलाचा बाप गरीब असेल तर त्याला १०० ते १५० रु. वधूदक्षणा द्यावी लागते. लग्नविधि बहुतेक मराठ्याप्रमाणेंच होतो. हळद दळावयाच्या कामात स्त्रियाप्रमाणेंच पुरुषहि भाग घेतात. वराला स्नान घालण्याच्या वेळीं जोशी हजर रहातो. लग्नापूर्वी नवरदेवाचा निकटचा आप्त व त्याची बायको हीं एक कुऱ्हाड व १२ ते १५ हात लांबीचा दोर व जें देवक असेल तें घेऊन मारुतीच्या देवळात जाऊन पाच पालवीचा विधी करतात. लग्न लावण्यास ब्राह्मण लागतात. लग्न झाल्यानंतर सुतवर्णे हा विधि करितात व त्यानंतर कन्यादान होतें; तें मामा करतो. लग्नाच्या तिसऱ्या चवथ्या दिवशीं वराचा बाप गांवांतील बलुतेदारांच्या बायकानां खण किंवा पैसा देतो. पुढें वर व वधु यांचे आईबाप परस्परास पोटझांकणीचा अहेर करितात. झालीच्या वेळीं नवरदेवाच्याकडील एक माणूस झाल पळवून नेतो, त्यास वधूकडील माणसें कांदे फेंकून मारतात. यावेळीं वर वधूच्या देवघरांतील एखादा देव चोरून घेतो व सासऱ्याने कांहीं बक्षिस दिल्यांखेरीज तो परत करीत नाहीं. नवरीला घरीं आणल्यानंतर वराच्या घरीं खंडोबाची तळी भरतात व झेंडानाच करितात. पाटाची चाल हलकी मानतात. पाट लावणाऱ्या नवऱ्यासहि कमी लेखतात. पाट शेतात व अंधाऱ्या रात्रीं लागतो. त्यावेळींहि तो ब्राह्मण लावतो. वधूवर पश्चिमेकडे तोंडें करून उभीं रहातात व ब्राह्मण मंगलष्टकें म्हणून पाट लावितो. त्या रात्रीं तें जोडपें शेतांतील झोंपडींतच राहतें. ब्राह्मण त्यानंतर सचैल स्नान करतो. बहुतेक कुणबी माळकरी अगर वारकरी आहेत. सर्व हिंदू देवतांची ते पूजा करितात. शिवाय ग्रामदेवताचे टाक करून ते पूजतात. हे भैरवाला कौल लावून बरेंवाईट पाहतात. वर्षांतून दोनदां पेरणी–कापणीच्या वेळीं हे भैरवाची पूजा करितात व कोंबडें अगर बकरें मारितात. याचप्रमाणें देवीचीहि पूजा करितात व भग(बळी)देतात. गुरावर अगर माणसांवर रोग पसरविणाऱ्या जखाई, जोखाई अशा कांहीं देवी आहेत व त्यांनां संतुष्ट ठेवल्यास त्यांच्या पासून भीति नसते असें हे मानतात. खंडोबा हेंहि यांचें एक प्रमुख दैवत आहे. कोण्या शत्रूवर रोग घालवावयाचा असेल अगर त्याचें वाईट व्हावें असें वाटल्यास, हे लोक म्हसोबास तसें संकट घालतात व हेतु पुरा झाल्यावर कोंबडें अगर बकरें कापतात. म्हसोबाप्रमाणेंच वेताळालाहि शत्रूच्या मागें लावतात. त्यांची जत्रा महाशिवरात्रीस असते. सर्व हिंदू सण हे पाळतात. कुणबी बायांचा नागपंचमी हा मोठा सण आहे त्या दिवशीं त्या सापाच्या वारुळापाशीं जाऊन त्याची पूजा करून त्याभोंवती फेर धरून नाचतात व गातात. पुरुषात पोळ्याचा सण मोठा असतो. नांगरण्यापूर्वी जमीनीची पूजा करितात. भाताच्या पेरणीच्या वेळीं भैरोबाची पूजा करून जातिभोजन घालतात. पेरणीपूर्वी प्रत्येक मंगळवारीं एखादें कोंबडें मारून शेतांत त्याचें रक्त शिंपडतात. तसेंच तिवड्याच्या खालीं ते आपापलीं देवकें पुरतात. आणि सात दगड (पांच पांडव व दोन वनदेव) मांडून त्याची पूजा करितात. भात कापण्यापूर्वीं, त्याची गरी घातल्यावर व तें झोडल्यावर अशा प्रत्येक वेळीं, या सात देवांना कोंबड्या बकऱ्याचा बळी देतात. धान्य मोजण्याच्या वेळीं व वरील सर्व वेळीं बहुधा उपाध्याय हजर असतो व त्याला त्यावेळीं दक्षणा देण्यांत येते. जोतिबा, नरसोबाची वाडी, पंढरपूर वगैरे ठिकाणीं हे यात्रेस जातात. यांचा मंत्र, जादु टोणा, भुतेंखेतें मुहूर्त, शकुन यांवर विश्वास आहे. सार्थी दुखणीं हीं त्यामुळें येतात असें ते मानतात. त्याबद्दल देवास कौल लावणें जाणत्या (मंत्रज्ञा)ची आज्ञा ऐकणें, कोळयाच्या हातचें पाणी पिणें वगैरे उपाय करितात. भूत, झोटिंग व हडळ यांची याना (आपल्या गुराढोरांस व बायकांमुलांस त्रास होईल म्हणून) फार भीति वाटते. कुणबी केव्हांहि दुसऱ्या कुणब्याच्या ऐश्वर्याची, गुराढोरांची किंवा सुंदर स्त्रियांची स्तुति करीत नाहीं; कारण, तसें केल्यास नेहमीं वावरणारीं भुतेंखेतें ती ऐकून त्याच्या पाठीस लागून त्याचा नाश करितील. याचा उपाध्याय देशस्थ ब्राम्हण व गुरु बहुधा गोसावी असतो. हे प्रेतें जाळतात. प्रेताच्या तोंडावर गुलाल व विड्याचीं पानें ठेवतात. आणि शेजारीं भात, एक पैसा व चतकोर भाकरी ठेवून मग नेहमीं प्रमाणें प्रेत स्मशानांत नेतात; विसाव्याच्या जागीं प्रेत ठेविल्यावर वरील भात, पैसा व भाकरीचा तुकडा सर्व दिशांस फेंकतात व एक दगड उचलून त्यास जीवखडा म्हणतात. बाकीचा विधि सर्वसाधारण असतो. दुसऱ्या दिवशीं हे लोक राख भरतात व तेथें २ भाकऱ्या व दोन मडकीं पाण्यानें भरून ठेवितात. तिसऱ्या दिवशीं खांदेवाल्यांना खोबरें खावयास देऊन त्यांच्या खांद्यास तेल चोळतात. दहाव्या दिवशीं व पुढें मराठ्याप्रमाणें सर्व क्रिया करतात. ब्राह्मणांत जसा अश्मा असतो तसा यांच्यात वरील जीवखडा असतो.

तेराव्या दिवशीं उपाध्यायास दक्षिणा देऊन कावळयास भात खाऊं घालतात. दर महिन्यास एक माणूस (पितर म्हणून) पाच महिन्यापर्यंत जेवावयास घालून पाचव्या महिन्यानंतर आप्तेष्टांस जेवणावळ देतात. हे मांसाहारी व मद्यपी असून बकरीं, मेंढ्या, ससा, हरिण व मासे वगैरे खातात. यांचें मुख्य अन्न म्हणजे ज्वारी, तांदूळ व शाकभाजी हें होय.

कों क णी कु ण बी.—मुख्यतः रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांत हे आहेत यांना सामान्यत्वें तिळोरी असें म्हणतात. ते आपण क्षत्रिय असल्याची प्रौढी मिरवत नाहींत; क्षुद्रत्वातच समाधान मानतात. यांच्या बायका जास्त बळकट असतात. भाषा कोंकणी मराठी. यांच्यात कुळें नाहींत. एकाच आडनांवाच्या घराण्यात लग्नें होत नाहींत. हे पाटाची चाल कमी मानीत नाहींत; मात्र घटस्फोटाची चाल बंद आहे. लग्न मराठा कुणब्याप्रमाणेंच होतात. पाट मात्र भावी नवऱ्याच्या घरीं लागतो. यांच्या बहिरी, झुगाई, नवलाई वगैरे कोंकणी मुख्य देवता आहेत. भूतपिशाच्चावर यांचा भरंवसा आहे. यांचे उपाध्याय चित्पावन, कऱ्हाडे अगर देवरुखे ब्राह्मण असतात. ह्यांचें मुख्य अन्न नागली व वरी होय. हेहि मराठा कुणब्यांप्रमाणें मद्यमांसाहारी असून त्यांच्याच सारखे बकरीं मासे वगैरे खातात.

का ळे कु ण बी—हे वर्णानें काळे असल्यानें याना हें नाव मिळालें असून हे बेळगाव व कानडा जिल्ह्यात आहेत. याना कोंकणी असेंहि म्हणतात. हे मूळचे गोंव्याकडील असून पोर्तुगीजाच्या धर्मच्छळामुळें हे या प्रांतात (१६ व्या शतकात) आले असें सांगतात. यांची भाषा कोंकणी आहे. यांच्या वस्तीच्या प्रत्येक गांवीं एक मिराशी व एक गावडा असतो. मिराश्याचें काम धार्मिक व गावड्याचें सामाजिक असतें. प्रथम मिराशी आपल्या शेतात नांगर घालील तेव्हां बाकीचे गावांतील सारे कुणबी नांगर घालतात व त्यापूर्वी मिराशाला नारळ वगैरे देतात. तसेंच कुणब्यानें मारावयाच्या प्राण्याची मान कापण्याचा हक्क या मिराशाचा असतो. गावड्याच्या वर (१०।१५ खेड्याचे गावडे मिळून) एक करियदी गावडा असतो. या करियदी गावड्यावर एक प्रधान गावडा व दुसरा सर किंवा राजगावडा असे २ अधिकारी असतात. किरकोळ सामाजिक गोष्टी जातसभा करियदी गावड्याच्या अध्यक्षतेखालीं भरवून निश्चित करतात. मोठ्या भानगडीच्या गोष्टी व तंटे मोठी सभा राजगावड्याच्या अध्यक्षत्वाखालीं भरवून निकालात काढतात. राजगावडा हा निकालाच्या बाबतींत अखेरचा अधिकारी आहे. त्यानें दिलेला निकाल वादीप्रतिवादींना कळविण्याचें काम प्रधानगावड्याचें असतें. यांच्यात पुष्कळ कुळें आहेत. त्या प्रत्येकाची देव देवता निराळी आहे. एका कुळात सोयरीक होत नाहीं. यांच्यात लग्नात लिंगायत किंवा ब्राह्मण उपाध्याय असतो. वराचा बाप वधूच्या बापास १२ रु. २० मण धान्य व पोषाख देतो. वधूवरांनीं जोडलेल्या हातावर पाण्याची धार सोडली म्हणजे त्याला धारे म्हणतात व हाच लग्नातील मुख्य बंधनकारक समारंभ होय. हे पाटाला कमी लेखतात. घटस्फोटाची बंदी आहे. यांचा धर्म बहुतेक पिशाचपूजेवर अवलंबून आहे स्वर्गनरकादि कल्पना त्याना ठाऊक नाहींत. मृत्यूनंतर प्रत्येक माणूस त्याच्या पापपुण्याप्रमाणें वाईट अगर चांगलें भूत बनतो असें त्यांचें मत आहे. याना नैवेद्य देणें झाल्यास मिराशी व घाडी यांच्या हातून दाखवितात. सर्व दुःखें या भूतांपासून होतात असें ते मानतात. यांच्यापैकीं कांहींवर लिंगायतपंथाचा पगडा बसला असल्यानें ते जंगम उपाध्ये नेमतात व बसव आणि नंदी यांची पूजा करतात. प्रेतें बहुधा पुरतात. गर्भारशी अगर बाळंतीण मेल्यास तिला रहात्या खेड्याच्या बाहेर दूर पुरतात: कारण तिचें भूत जबरदस्त असतें. तिला पुरल्या जागेपासून घरापर्यंत भाजलेले तांदूळ अगर दुसरें धान्य फेंकतात. याचें कारण त्या भुताला सांगतात कीं जोंपर्यंत हे धान्य उगवणार नाहीं तोंपर्यंत तूं खाड्यातून उठूं नको.' वास्तविक तें धान्य भाजलेलें असल्यानें केव्हांच उगवणार नाहीं व त्या जबरदस्त भुतानेंहि आपल्या खाड्यातून केव्हांच उठूं नये असा हेतु असतो. यांचें सुतक ३ दिवसच असतं. हे वन्यपशुपक्षी यांचें मांस खातात; पाळीव जनावरांचें खात नाहींत. बदकें, कोंबडीं वगैरेंना हे फार अशुद्ध मानतात. त्याना स्पर्श झाला तर हे स्नान करतात किंवा अंगावर गोमूत्र शिंपडतात. हे मद्यपान मुळींच करीत नाहींत. फक्त ब्राह्मणाच्या हातचें हे खातात.

त ळ हे र कु ण बी.—ठाणें जिल्ह्यात तळघाटाखालीं यांची मुख्य वस्ती आहे. तळचे ते तळहेरी होत. यांच्यांत कांहीं स्थानिक, व कांहीं गुजराथेंतून व महाराष्ट्रांतून आलेले असे दोन वर्ग आहेत. स्थानिक कुणबी यांच्यात व सोनकोळ्यात फारसा फरक नाहीं. देवकावरून व चालीरीतींवरुन मराठे व कुणबी ओळखूं येतात. यांच्यांत रोटीबेटीव्यवहार होतो.

खा न दे शी कु ण बी.—यांच्यांत सात शाखा आहेत. (१) घाटोळे, हे अजंठाघाटावरून आले. हे तिरोळेबरोबर जेवतात पण लग्नें लावीत नाहींत. (२) लोणी, याना मूळचे रहिवासी (अनार्य) मानतात व ते गिरणा व तापी कांठीं रहातात. हे तिरोळे, पांजणे, गुजर व वाणी यांच्या हातचें खातात. मात्र आपआपल्यातच लग्नें करतात. (३) कुंभार, ही शाखा फार थोडी व अतिशय दरिद्री आहे. (४) वंजारी, हे मूळचे चारण वणजारी जातीचे होते पण हल्लीं बरींच वर्षे त्यांनीं इकडे वस्ती करून व शेती करून आणि यांच्या चाली रीती उचलून स्वतःस कुणब्यात गणून घेतलें आहे. (५) पांजणे, यांच्यात चार पोटभेद आहेत ते कंडारकर, नवघरी, रेवे व थोरगव्हाणे हे होत. यात मुख्य रेवेच असून बाकींच्या तिघांची उत्पत्ति भाडणतंट्यामुळें झाली आहे. सावदे

तालुक्यांतील थोरगव्हाण या गांवचे ते थोरगव्हाणे व भुसावळ तालुक्यांतील कंडारीगांवचे ते कंडारकर होत. मुख्य जातीतून फुटलेल्या नऊ घरांच्या वंशजांपासून नवघरी निघाले. हल्लीं ते या जिल्ह्यांत सर्वत्र थोडथोडे आहेत. (६) तिडोळे किंवा तिरोळे, हे मूळचे उत्तरहिंदुस्थानांतील असून दादर पवार या जातीचे वंशज होत असें म्हणतात. (७) मदराज ही सातवी शाखा आहे. या सातीहि शाखा एकमेकाच्या हातचें खातत, पण आपलीच शाखा इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे असें मानून परस्परांत लग्नें मात्र लावीत नाहींत. ज्ञानेश्वरींत ' कुणवट कुळवाडी ' हा शब्द येतो.

व ऱ्हा डी कु ण बी—मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत याची लो. सं. १४ लाखावर असून गोंडाच्या खालोखाल यांचीच वस्ती त्या प्रांतांत फार आहे. हे गुजराथेंतून खानदेश व खानदेशांतून या प्रांतात पुष्कळ वर्षांपूर्वी आले (१८ वें शतक). मराठी राज्य झाल्यावर यांची भरती फारच झाली. इकडील कुणब्यांत पुढील शाखा आहेत. (१) झाडे, हे अगदीं प्रथम आलेले असून यांच्यांत गोंड रक्ताचें मिश्रण आढळतें. (२) मानवा, हे चांद्याकडे आढळतात, यांच्यांत माना लोकांचें मिश्रण सांपडतें. हे लग्नकार्यांत ब्राह्मणास बोलावीत नाहींत. याच्या बायकांचा पोषाख गोंड बायकांप्रमाणें असतो. (३) खैरे व (४) धानोरे (धनगरापासून झालेले) यांनां इकडे हलके समजतात. (५) तिरोळे, हे उच्च जातीचे असून यांच्यांतच देशमुखादि वतनदार आहेत. (६) छिंदवाड्यांत गाढव जातीचे कुणबी आहेत. हे पूर्वी गाढवें पाळीत. नेमाडांत गुजर कुणबी आहेत. या कुणब्यांत लग्नप्रसंगीं न्हावी व धोबी यांचें फार महत्व असतें. न्हावी वधूवरांचे पाय धुवून सर्व वऱ्हाडाला कुंकू लावतो. तिरोळे जातींत हगरे, आगलावे वगैरे ६६ कुळें आहेत. नवरदेव लग्नास निघाला म्हणजे त्याच्या हातीं शिंदोरी बांधलेली एक कुदळ असते. थाटाच्या लग्नास लालव्याह व गरीबीच्या लग्नास सफेदव्याह म्हणतात. नेमाडमधील कारवा कुणबी हेहि गुजराथी कुणब्यांप्रमाणें १२ वर्षांनीं एकदाच घरांतील व जातींतील सारी लग्नें उरकून घेतात. सिंहस्थातच लग्नें झालीं पाहिजेत असा त्यांचा नियम आहे. लग्नाच्या दिवशींच एखादी बाई बाळंत होऊन तिला मुलगी झाली तर त्या जन्मलेल्या मुलीचें लग्न तिच्या १२ व्या दिवशींच करतात. कुमारीनें व्यभिचार केल्यास प्रायश्चित्तानें ती शुद्ध होते. तिरोळ्यांत व वांदेकरांत राख ठेवण्याची चाल आहे. पाट लावण्याच्या वेळीं भार्या वर आपल्या उजव्या पायानें चौरंगावर (विधवेच्या पहिल्या नवऱ्याच्या नांवानें) ठेवलेली एक सुपारी उडवितो व मग न्हावी ती अडकित्त्यानें फोडतो. यानें पहिल्या नवऱ्याच्या पिशाच्याचा कांहीं अडथळा होत नाहीं असें म्हणतात. मूल होईनासें झाल्यास यांच्या बायका अनेक जादूटोणे करतात. हे लोक प्रेतें जाळतात व पुरतातहि. विधवा आपलें मंगळसूत्र तोडते. मात्र १२ व्या दिवशीं पुन्हां बांगड्या भरते. पोळ्याचा सण हा यांच्यांत मुख्य आहे यांच्यांत मुसुलमानी चाली बऱ्याच शिरल्या आहेत. यांचीं घरें बहुधा कुडाचीं असतात. हे पावसाळ्याचे ४ महिने खेरीजकरून बहुधां नेहमीं शेतांत निजतात. हे मांसभक्षक आहेत. मध्यप्रांतांतील पोटजाती आपापसांत बेटीव्यवहार करीत नाहींत. [बाँबे ग्याझे. पु १८ ट्राईब्स अँड कास्ट्स् ऑफ बाँबे व्हा. २; सी. पी. इ.]

कुतउलआमारा—मेसापोटेमिया. अमारा व कुत अशीं वेगवेगळीं गावें आहेत. या दोन गांवांमध्यें तैग्रीस नदी आहे. बसरा व बगदाद या दोन्ही शहरामध्यें जाणायेणाऱ्या आगबोटींचें कोळसा घेण्याचें हें एक ठिकाण आहे. तैग्रीसच्या खालील भागावर हुकमत ठेवणारें असें हें एक महत्वाचें ठाणें आहे. अमाऱ्यास घरें फार सुंदर बांधलेलीं आहेत. येथें एक दोन सुरेख मशिदी व प्राचीन ख्रिस्ती देवालय आहे. कुत हें लहानसें खेडें आहे. येथें गेल्या महायुद्धांत इंग्रजाचा सेनापति टौनशेंड हा वेढ्यांत सांपडून त्यास तुर्कांस शरण जावें लागलें (१९१६). या जयाबद्दल तुर्कांनीं कुत येथें एक स्मारक उभारलें. पण पुढच्याच वर्षी ब्रिटिशांनीं हें काबीज केलें.

कुंतनहसहळ्ळी—मुंबई इलाखा; धारवाड जिल्हा. हनगलच्या ईशान्येस सुमारें दोन मैलावर असलेलें एक खेडें. येथील बसप्पाच्या देवळांत इ. स. ११४७ सालचा एक शिलालेख आहे.

कुंतल—दक्षिणापथांतील एका प्राचीन देशाचें नांव. महाभारतांत कुंतल हें नांव उत्तरेकडील व दक्षिणेकडील अशा दोन्ही देशांच्या यादींत आलेलें आहे; म्हणजे आर्यांच्या अंमलाखालील प्रांतांच्या यादींत तें असून शिवाय दक्षिणेकडील अनार्यदेशांतहि तें होतें. कदाचित तें दोघांच्या सरहद्दीवर असल्यामुळें असा प्रकार झाला असेल. कृष्णेच्या उगमाजवळ कुंतलदेश होता असें दुसऱ्या ठिकाणीं आढळतें. कुंतल देशापर्यंत म्हणजे कृष्णानदीपर्यंत आर्यांचा दक्षिणेंत प्रवेश झाल्यावर येथें त्यांना अटकाव झाला. तुंगभद्रेपलीकडे त्यानां जाता आलें नाहीं. कारण तुंगापार द्रविड, चोल, पाण्ड्य वगैरे महाभारतकालीन देश होते. राजकेसरी वर्मन् राजेंद्रचोलदेव यानें(१०७५) कुंतल (कोंडल) येथील राजाचा (सोमेश्वर दुसरा याचे सेनापती विक्रमादित्य आणि जयसिंह यांचा) पराभव केल्याचा उल्लेख एका शिलालेखांत आढळतो. कुंतलवंशीय (पश्चिम चालुक्य) राजांवर विक्रमादित्य चालुक्यानें जय मिळविल्याचें विक्रमांकदेवचरितांत आढळतें. पश्चिम चालुक्यांचें नेहमीं " कुंतल प्रभु " असें वर्णन येत असतें. बृहत्संहितेंतहि या देशाचा नामनिर्देश येतो

बाराव्या शतकांतील बंदनिके (शिकारपुर तालुका, म्हैसूर राज्य) शिलालेखांत कुंतलदेशावर मौर्यांचें राज्य

असल्याचा उल्लेख आहे. तत्कालीन कुंतल म्हणजे हल्लींचा साधारण भीमा व वेदवती यांच्यामधील व पश्चिमेकडे घाटापर्यंतचा शिमोगा, चितळदुर्ग, बल्लारी, धारवाड, विजापूर इत्यादि हा प्रांत होय. याच्या नैर्ऋत्येस केरल देश होता. चंद्रहास राजा येथील होता असें भारतात म्हटलें आहे. अजिंठ्याच्या शिलालेखात याचा उल्लेख आहे. अदवानी जवळचा दक्षिणेंतील हा भाग होता असें डौसन लिहितो. [बृ. संहिता १६; आर्कि. सर्व्हे. पु. ४; म. भा. भीष्म पर्व. फ्लीट–द. हिं. शिला; अय्यर–एन्शन्ट इंडिया, म्हैसूर ग्या. स्मिथ, वैद्य; डौसन–हिंदु क्लासिकल डिक्शनरी].

कुंताप—ऋग्वेदापैकीं परिशिष्टासारख्या निगदसंग्रहास कुंताप अध्याय असेंहि म्हणतात. पृष्ठ्यषळह, द्वादशाह इत्यादि क्रतूंच्या सहाव्या दिवशीं ब्राह्मणाच्छंसी नामक ऋत्विजानें पठण करावयाच्या वृषाकपि नामक शस्त्रात या निगदांचा समावेश श्रौतसूत्रकारानीं केला आहे. अथर्ववेदातील विसाव्या काडात ब्राह्मणाच्छंसी नामक ऋत्विजाच्या शस्त्रसंबंधीं मंत्राचा संग्रह असल्यामुळें तेथें कुंताप निगदाचा संग्रह केलेला आहे (अथर्व २०. १२०).

कुंति—एक राष्ट्र. कुंति लोकानीं पाचालाचा पराभव केल्याचा उल्लेख काठक संहितेत आहे (२६. ९). महाभारतात याचा बरेच वेळा उल्लेख आहे (२. १४, ५९०; ७. ७०, २४३५; ८. ६ १५२). कुंति या नावाच्या बऱ्याच पौराणिक व्यक्ती दिसतात. उदा. यदुपुत्र सहस्राजिताच्या वंशातील हैहय कुलात जन्मलेल्या नेत्र राजाचा पुत्र. याचा पुत्र सोहंजि होता. यदुपुत्र क्रोष्टा, त्याच्या ज्यामघकुलोत्पन्न क्रथ राजाचा पुत्र, याचा पुत्र धृष्टि. यदुकुलोत्पन्न कृष्णास सत्यभामपासून झालेला पुत्र.

कुंतिभोज—कुंतिदेशाचा राजा. हा यदुकुलोत्पन्न शूर राजाचा परम मित्र असून अनपत्य असल्यामुळें, शूराचे प्रथम अपत्य दत्तक घ्यावें असा यानें निश्चय केला होता. त्याप्रमाणें शूरास प्रथम झालेली पृथा नामक कन्या यानें दत्तक घेतली (म. भा. आदि. अ. ६७) व तिचें नाव कुंती असें ठेवलें. पुढें यास पुरुजित नांवाचा औरसपुत्र झाला. हा भारतीयुद्धात पुत्रासहवर्तमान पांडवाकडे होता (उद्योग. अ. १७२) पुढें याच युद्धात हा द्रोणाचार्याशीं युद्ध करीत असतां मरण पावला (कर्णपर्व अ. ६). यास भोज असेंहि म्हटलें आहे.

कुतियान—मुंबई. काठेवाड, जुनागड संस्थानांतील एक गांव. हें भादर नदीवर असून पोरबंदरपासून २४ मैल दूर आहे. येथील लो. सं. १९११ सालीं ११,३६६ होती. येथें एक किल्ला असून पूर्वी येथें सुभ्याचें मुख्य ठाणें होतें. जुनें गांव सध्याच्या गांवच्या पश्चिमेस असून किल्ल्याचे कांहीं अवशेष अद्याप त्या ठिकाणीं सांपडतात. सरासरी १२०० सालपर्यंत तें बेचिराख होतें. नंतर साप्रतचें शहर वसलें. हेंच कुंडिनपूर असून कृष्णाचा सासरा भीष्मक या गावीं रहात होता अशी कथा सांगतात. येथील जमीन अतिशय सुपीक असून शिवाय पाण्याखालची आहे. चारण जातीची कुंती नावाची स्त्री होती. म्हणून या गांवाचें नांव कुंतियान असें पडलें. कुंतियानाचें अपभ्रष्टरूप सध्याचें कुतियान असें पडलें. येथें भाट व कवी पुष्कळ होऊन गेले अशी प्रसिद्धि आहे. मुसलमान या गावाला मुझफ्फराबाद म्हणत.कारण गुजराथचा सुलतान मुझफ्फर याला हे गाव फार आवडे. येथील लोक फार स्वतंत्र असून आपला अधिकारी निवडीत किंवा वाईट राजाला दूर करून त्याच्या जागीं दुसरा नेमीत. इ. स.१८०२ मध्यें हें अखेरीस जुनागडच्या ताब्यांत आलें. गावांत नागनाथ महादेवाचें एक देवालय असून श्रावण वद्यात येथें २ दिवस यात्रा भरत असते.

कुंती—यदुकुलोत्पन्न शूर राजाची कन्या पृथा, तिलाच कुंतिभोजानें दत्तक घेतल्यावरून हें नाव पडलें होतें. ही कुमारी असतां कोणी ऋषि (दुर्वास असावा) कुंतिभोज राजाच्या घरीं आला होता; तेव्हां राजानें त्यास राहून घेऊन हिला त्याच्या सेवेंत ठेवलें. कुंतीनें उत्तम प्रकारें त्याची सेवा केली. त्यावरून त्यानें जाताना प्रसन्न होऊन सूर्य, यमधर्म, वायु, इंद्र आणि अश्विनीकुमार या देवताचे हिला मंत्र देऊन सांगितलें कीं,तुला जेव्हां पुत्र असावेत असे वाटेल तेव्हा तूं यातून ज्याचा जप करशील तो देव प्रगट होऊन तुला पुत्र देईल. एकदा हिच्या मनात या मंत्राचा प्रत्यय पहावा असें येऊन हिन पहिला सूर्याचा मंत्र जपून त्याचें आव्हान केलें तों सूर्य लागलाच हिच्यापुढें मूर्तिमान उभा राहून भोग मागूं लागला. तेव्हा नाइलाजास्तव कुंतीला सूर्याशीं रत व्हावें लागलें. पुढें हिला गर्भ राहिला व ती कवचकुंडलयुक्त अशा दैदिप्यमान पुत्रास प्रसवली. तेव्हां लोकलज्जेस्तव तो पुत्र हिनें पेटींत घालून नदीमध्यें सोडून दिला. तोच पुढें कर्ण या नावानें प्रख्यात झाला. (' कर्ण ' पहा).

कांहीं कालानें स्वयंवरात हिनें पंडुराजाला वरलें. परंतु तो शापामुळें स्त्रीसंग करण्यास असमर्थ होता. कुंतीनें पंडु राजाच्या आज्ञेने पूर्वी ऋषीच्या वरामुळें प्राप्त झालेल्या मंत्रांच्या योगानें एकेका देवाचें आव्हान करून युधिष्ठिरादिक पुत्र निर्माण केले. तिची सवत माद्री हिच्या मृत्यूनंतरहि कुंतीनें नकुल सहदेवाचें चागलें रक्षण केलें. पुढें पाडवांचा द्वेष दुर्योधन करूं लागला. ही पाडवासमागमें वनवासांत नव्हती. कुरुयुद्धानंतर विदुर, धृतराष्ट्र आणि गांधारी महाप्रस्थानास निघाली त्यासमागमे हीहि गेली व एका वणव्यांत जळून मेली. [महाभारत. वन. ३०३–३०८ आदि. ११२].

कुतुबदिया—बंगाल. चितगांव जिल्ह्यांतील एक बेट. याचें क्षेत्रफळ ३५ चौ.मै. लो.सं.(१९०१)१०,६९३.या बेटाचें संरक्षण व्हावें म्हणून सरकारनें आपल्या खर्चानें बेटाच्या

सभोंवार धक्का बांधला होता. परंतु १८९७ साली जें भयंकर वादळ झालें त्या योगानें त्या धक्क्याचा नाश झाला व पुष्कळ मनुष्य मेलीं. हल्लीं बहुतकरून सर्व बेट सरकारी मालकीचें झालेलें असून याच्या पश्चिम किनाऱ्याला एक दीपगृह आहे.

कुत्तालम—हें मद्रास इलाख्यांत तिनेवेल्ली जिल्ह्यामध्यें तेनकासी तालुक्यांतील एक हवा खाण्याचें ठिकाण असून शिवाय येथें प्रसिद्ध धबधबा आहे. हें तिनेवेल्लीपासून ३६ मैल व तेनकासीहून ३ मैल दूर आहे. येथील लो.सं.१९०१ सालीं ११९७ होती.कुत्तालम समुद्रसपाटीपासून ४५०फूट उंच असून येथील हवा उत्तम व सृष्टीचा देखावा मनोहर आहे. चित्तार नदीचा धबधबा याच ठिकाणीं आहे. हिंदू लोक या स्थळाला फार पवित्र मानतात. कुत्तलनाथ स्वामींचें एक देवालय जवळच असून जिल्ह्याचे अधिकारी व इलाख्यातील लाब रहाणारे पुष्कळ सधन लोक येथें येतात. येथें बंगले व आरामगृहें पुष्कळ असून हिंदू लोकांची चांगलीच सोय होते. त्रावणकोरचे महाराज व त्रावणकोर कोचीनचे रेसिडेंट याचे बंगले येथ आहेत.

कुत्बमिनार—ही गगनचुंबित इमारत दिल्लीपासून ११ मैलावर आहे. या इमारतीस भूकंप व विद्युत्घात यांच्या योगानें थोडासा धक्का पोहोंचला आहे. पॅरिस येथें ' एफेल टॉवर ' नामक जो प्रचंड लोखंडी मनोरा पॅरिस प्रदर्शनाच्या वेळीं तयार करण्यात आला होता तो सोडून दिला असता जगामध्ये इतका उंच मनोरा दुसरा कोणताहि नाहीं. ही इमारत जमीनीपासून २३८ फूट व १ इंच आहे. तिच्या पायाचा व्यास ४७ फूट २ इंच आहे आणि शिरोभागाचा व्यास ९ फूट आहे. या मनोऱ्याचा अगदीं तळमजला दोन फूट उंचीच्या जोत्यावर असून मधली इमारत २३४ फूट १ इंच आणि शेवटचा घुमटाचा पाया दोन फूट उंच मिळून वर लिहिलेली एकंदर उंची येते. हा मनोरा पूर्वी ३००फूट उंच असून त्यावर एकंदर सात मजले होते असें म्हणतात. परंतु साप्रत त्याच्या अगदीं शेवटच्या मजल्यासह एकंदर पाच मजले आहेत.

' कुत्बमिनार' ही इमारत मुसुलमान बादशहांनीं बांधली हें खरें, परंतु तिच अवाढव्य काम मुसुलमान कारागिरानीं केलें किंवा हिंदू कारागिरानीं केले हा मोठा प्रश्न आहे. मिनारचें पुष्कळ नकशीकाम हिंदूंच्या देवालयाचें असण्याचाहि फार संभव आहे. कलकत्याचे प्रसिद्ध पुराणवस्तुसंशोधक पंडित डॉ. राजेंद्रलाल मित्र यांनीं याबद्दल मागें वाद उपस्थित केला होता, व त्यानीं ही लोकोत्तर इमारत हिंदू लोकाचें स्मारक आहे असें सिद्ध केले होते. या मिनारवर काहीं नागरी भाषेंत अक्षरें कोरलेलीं आहेत. त्यांवरून या इमारतीच्या रचनेंत हिंदू शिल्पकाराचा हात होता असें म्हणण्यास पुष्टि येते.

कुत्बमिनार इ. स. १३२५ मध्यें पूर्ण झाला. कुत्बमिनार या अत्युच्च मनोऱ्यावर उभें राहून त्याच्या समंतात भागीं दृष्टि फेंकली म्हणजे दहा कोस विस्ताराचें जें प्राचीन दिल्ली शहर होतें, त्यातील विध्वंस पावलेल्या सहस्रावधि इमारती दृष्टीस पडतात. सर्व जगातील कबरींमध्यें ज्याप्रमाणें ताजमहाल सर्वश्रेष्ठ,त्याप्रमाणें सर्व मनोऱ्यांमध्यें कुत्बमिनारहि सर्वश्रेष्ठ आहे.

याचा पहिला (तळ) मजला मात्र कुत्ब-उद्दीन ऐबक यानें बांधला व त्यावरील सर्व मजले इलतुतमिश (अलतमश) यानें बांधले (१२३२) असें स्मिथ म्हणतो. काहींच्या मतें (मिनारवरील शिलालेखावरून) सर्व मिनार कुत्ब ऐबक यानेंच बांधला. [स्मिथ—ऑ. हि. इं.].

हा मनोरा जरी इतका उंच आहे तरी त्याच्या आंतील जिना फार चांगला आहे. पाच मजल्यांपर्यंत मिळून त्यास एकंदर ३७६ पायऱ्या आहेत. आतील बाजूस हवा व उजेड याची सोय चांगली असल्यामुळें व प्रत्येक मजल्यावर वेगवेगळी ग्यालरी असल्यामुळें प्रेक्षकांस जागोजाग विश्रांति घेण्याची सोय आहे. प्रत्येक मजल्यावरील ग्यालरीच्या योगानें ह्या इमारतीच्या सभोंवती जागोजाग कंबरबंद बांधले आहेत असें वाटतें. त्यामुळें इमारतीस अप्रतिम शोभा आली आहे. ह्याशिवाय ह्या इमारतीवर अनेक शिलालेख असून त्यामध्यें कुराणातील वाक्यें व परमेश्वराची नाममालिका लिहिलेली आहे [पारसनीस—दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ.].

कुत्बशहा—(सन १४५१–१४५८)—गुजराथचा शहा महंमदशहा हा मरण पावल्यावर त्याचा पुत्र कुत्बउद्दीन तख्खनशीन झाला. माळव्याचा सुलतान महंमद खिलजी यानें कुत्बशहावर स्वारी करून त्याचा पराभव केला. पुढें उभयतांनीं तह करून दोघांनीं मिळून मुसुलमानी धर्म वाढविण्याची खटपट करण्याचे ठरविलें. परंतु हा ठराव अंमलांत आला नाहीं. मेवाडचा कुंभ राणा त्यावेळीं हिंदु राजात अत्यंत शूर,प्रबळ व चतुर होता. त्यानें राजपुतान्यांत अनेक किल्ले बांधिले. कुंभराण्याच्या प्रतापापुढें या आसपासच्या मुसुलमानी राजकर्त्यांचें कांहीं चाललें नाहीं. तथापि कुंभराण्यास बुडविण्यास सर्व मुसुलमान टपून बसले होते. नागोर येथें कुत्बशहानें कुंभराण्याचा स. १४५८ त पराभव केला असें म्हणतात. नंतर कुत्बशहाहि त्याच वर्षी मरण पावला. (मे १४५९). [मु. रि. बील ३२२].

कुत्बशाही—हें राज्य म्हणजे प्राचीन वरंगळचें काकतीयाचेंच राज्य होय. तें १४२३ मध्यें अहमदशहा बहामनी यानें बुडविलें. हा प्रदेश गोदा व कृष्णा यांच्यामधील होय. पूर्वेस बंगालचा उपसागर व पश्चिमेस बेदरीराज्य ही त्याची हद्द होती. प्रदेश मूळचा फार सुपीक होता, हिंदू व मुसुलमान राजानीं कालवे खणून जास्त सुपीक केला. याच्यावर इराणांत जन्मलेल्या एका तुर्की सरदाराला महंमद गवान यानें सुभेदार नेमिलें. याचें नांव कुत्बुद्दीन (कुत्बउल मुलक,) याला इराणांतून इकडे आल्यानंतर प्रथम महंमदशहा बहामनीनें आश्रय दिला. पुढें वाढत

वाढत कुत्ब उल् मूल्क हा वर सांगितल्याप्रमाणें सुभा झाला. याला १४९३ त जामकोंडाचा किल्ला घेण्यास पाठविलें असतां तेथें तो मेला. त्यानंतर त्याचा मुलगा सुलतान कुली याला याच्या पदव्या व अधिकार मिळाले व गोवळकोंड्याची जहागीर मिळाली. गवानला अन्यायानें फाशावर चढविल्यावर यानें बेदरचा संबंध सोडला आणि १५१८ त स्वतंत्र होऊन सुलतान कुलिकुत्बुशहा ही पदवी घेतली व कुत्बशाहीचा संस्थापक झाला. हा पराक्रमी व महत्त्वाकांक्षी होता. यानें राज्यविस्तार बराच केला. गोवळकोंडा येथें त्यानें राजधानी केली. प्रथम हें लहान खेडें होतें तें त्यानें वाढविलें. मुसुलमानी धर्माचा तो अभिमानी होता व त्यामुळें तो हिंदु प्रजेस त्रासहि देई. त्यावरून कमामेत कंडापिली व ओढ्या या प्रांताच्या हिंदू राजाशीं त्याच्या लढाया होत. विजयानगरच्या कृष्णाने याचा १५१६ त पराभव करून त्याचा पुष्कळ देश काबीज केला होता. बेरिदशहा व आदिलशहा याच्याशींहि त्यानें लढाया मारल्या. होत्या. शेवटीं शेवटीं त्याचा मुलगा जमशीद यानें बंड केलें असता त्यास यानें कैदेत ठेविलें. एकदा शहा एका मशीदीची बांधणी पहात असता जमशीदच्या सांगण्यावरून कोतवाल हमदानी यानें जंबियानें त्याचा खून केला. त्यावेळीं तो ९० वर्षांचा होता; त्याने साठ वर्षे (१६ वर्षे सुभेदारी व ४४ वर्षे स्वतंत्र) राज्य केलें. याची कारकीर्द १५१२–१५४३ च्या दरम्यानची होय.

ज म शी द.—(१५४३–१५५०) यानें वडील भावास कैदेंत टाकून व त्याला आधळें करून तख्त बळकाविलें. यानें आदिलशहावर स्वारी केली तींत याचा पराभव झाला; त्यामुळें पुढें तो स्वाऱ्याच्या भानगडींत पडला नाहीं. तो बहुधा विलासात निमग्न असे. शेवटीं हा १५५० त मेला. याच्या कारकीर्दीत जगदेवराव (निंबाळकर ?) हा मराठा सरदार फार पुढें आला. जमशीदनंतर त्याचा मुलगा सुभान गादीवर आला. परंतु थोडक्याच दिवसांत तो पदच्युत झाला.

इ ब्रा हि म.—(१५५०–१५८०) हा जमशीदचा भाऊ; जमशीदच्या धाकानें विजयानगरच्या राजाजवळ आश्रयास होता. याला जमशीदच्या मरणानंतर दरबारी मंडळीनें (सुभानला काढून) गादीवर बसविलें. हा कृतघ्न होता. ज्या विजयनगरकरांनीं त्याला आश्रय दिला त्याच रामराय राजाविरूद्ध हा इतर मुसुलमान शहांनां सामील होऊन त्यानें विजयनगर बुडविलें. व उपकारकर्त्यांचें ऋण अशा रीतीनें फेडलें. हुसेन निजामशहाचा हा स्नेही होता.

यानें १५६४ त राजमहेंद्रीवर चढाई केली. परंतु तेथील हिंदु राजांनीं त्याचा पराभव केला. प्रथम रामराजाचा व आदिलशहाचा स्नेह होता, पण तोहि शेवटीं रामराजांच्याविरुद्ध गेला. इब्राहिमनें बेरिदशहावर अपराधापासून स्वारी केली असतां रामरायानें त्याचा निषेध केला होता. तें शल्य त्याच्या मनात सलत होतें. मागें सांगितलेल्या जगदेवरायानें याला गादीवर बसविण्यात श्रम केल्यानें त्याला यानें दिवाण केलें. त्याच्या हाताखालीं रायाराव नावाचा एक प्रख्यात मराठा सरदार होता. यावेळीं राज्यात मराठ्यांचें प्रस्थ फार माजलें होतें तें मुसुलमान लोकांना न रुचून त्यांनीं जगदेवाबद्दल शहाचे कान भरले. तेव्हां शहाची त्याच्यावर गैरमर्जी झाली. जगदेव गोवळकोंड्याहून निघून शहाचा प्रांत उध्वस्त करीत वऱ्हाडपर्यंत गेला. बुऱ्हाणच्या निजामानें त्याला आश्रय दिला; परंतु पुढें तेथून तो निघाला व पुन्हा कुत्बशाहींत लुटालूट करूं लागला. त्याच्या पदरीं आरबी, इराणी, हबशी, मराठे वगैरे फौज होती. इब्राहिमला त्याच्याशीं सामना देववेना. इब्राहिम व हुसेन निजाम यांनीं आदिलशहावर स्वारी केली. तेव्हा जगदेव व विजयानगरकर रामरायाचा भाऊ व्यंकटाद्रि हे आदिलशहाला मिळून त्यांनीं या स्वारी करणाऱ्याचा पराभव केला. जगदेवानें पुढें तर कुत्बशहाचे बहुतेक किल्ले व प्रांत घेतले. तेव्हा नाइलाजानें इब्राहिमनें त्याच्याशीं तह केला. इब्राहिमनें यानंतर ओढ्या, चंद्रबार व कंडदेव पल्ली येथील हिंदु जमीनदारांना आपले मांडलिक बनविलें. याचा दिवाण मुरारराव म्हणून होता. त्यानें प्रजेस फार त्रास दिला. शहा १५८० त मेला. त्याला एकंदर तीस मुलें झालीं. त्यानें लढाया बऱ्याच मारल्या. तो विद्वान होता व प्रजाहिततत्पर होता. त्यानें बऱ्याच सुंदर इमारती बांधल्या. गोवळकोंड्याचा तट इब्राहिमबाग, फुलबाग, इब्राहिमतला, हुसेनसागर, वडवलचा बंधारा, पाठशाळा वगैरे कामें यानें केलीं. व्यापारास यानें चांगलें उत्तेजन दिलें. न्यायहि तो बरा करी. यानें वडील मुलास वीष देऊन मारलें होतें.

म हं म द.—(१५८०–१६११) हा इब्राहिमचा तिसरा पुत्र. १२ व्या वर्षी गादीवर बसला. यानें विजयानगरकराची एक शाखा पेनकोंड्यास होती ती बुडविण्याकरिता पुष्कळ मोहिमा केल्या; पण त्या व्यर्थ गेल्या. यानें आपली बहीण आदिलशहास देऊन या दोन राज्यात सख्य केलें. याच्या वेळीं गोवळकोंड्याची वस्ती दाट होऊन पाणीपुरवठा चांगला नसल्यामुळे पांच कोसावर चांगली जागा पाहून यानें तेथें एक नवीन शहर वसविलें. याची भागावती (भागमती) नावाची एक आवडती स्त्री होती. तिचें नाव त्यानें या नव्या राजधानीस ठेविलें. त्याचा मुलगा हैदर यानें भागानरचें हैद्राबाद असें नांव पुढें बदललें. महंमदनें भागानरास पाणीपुरवठा उत्तम केला. जुम्मामशीद, चार मिनार, दवाखाने, हमामखाने, बगीचे वगैरे त्यानें तयार केले. यानें फारशीं युद्धें केलीं नाहींत. याच्या दरबारीं इराणचा वकील राहिला होता. इराणचा शहा अब्बास यानें आपली मुलगी याच्या मुलास देण्याचा विचार केला होता. याच्या कारर्तीदींत प्रख्यात मीर जुम्ला किंवा अमीर उलमुल्क हा दिवाण होता (मीरजुम्ला पहा). हा शहा चौतीस वर्षे राज्य करून १६२६ त मेला. यानें लोको-

पयोगी कामांत अडीच कोटी रुपये खर्च केले. हा विद्वान होता. यानें 'कुलिआत् कुत्बशाह' म्हणून एक फारशी, हिंदी व दक्षिणी कवितांचें मोठें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे.

अब्दुल्ला हुसेन.-(१६२६-१६७२) हा महंमदचा पुत्र. यानें शांततेनें राज्य केलें. या वेळीं शहाजहाननें निजामशाही बुडविली आणि आदिलशहापासून खंडणी घेतली.नंतर याच्यावर शहाजहान चालून आला असतां यानेंहि खंडणी कबूल केली (१६३४). याचाहि वजीर मीरजुम्ला होता. औरंगझेब हा दक्षिणचा सुभेदार झाला असता व मीरजुम्ल्याचें व शहाचें वांकडें आलें असता मीरनें औरंगझेबचा आश्रय घेतला. औरंगझेबास गोवळकोंड्याची संपत्ति पाहिजे होती. आणि औरंझेबानें काहीं तरी निमित्त काढून व मागण्या मागून त्या नाकारल्याबद्दल गोवळकोंड्यास वेढा दिला.

अखेरीस शहाजहानच्या सक्तीच्या हुकुमावरून नाइलाजानें औरंगझेबनें वेढा उठविला व तह केला; कुत्बशहाची मुलगी सुलतान महंमदला दिली. त्यानें अमीनला बंधमुक्त करून जुम्ल्याची संपत्ति व जहागीर सोडली. मोंगलाला थकलेली खंडणी देऊन रामगीर जिल्हाहि दिला. या स्वारींत मोंगलाला फारसा फायदा झाला नाहीं असें औरंगझेबानें बापास कळविलें. मात्र सारी लूट स्वतः दाबून ठेवून उलट २० लाखांचें कर्ज त्यानें बापास दाखविलें. यानंतर १६६६ त कुत्बशहानें समदुःखी जाणून औरंगझेबाविरुद्ध आदिलशहास मदत केली. या सुमारास शिवाजी छत्रपति याचा धुमाकुळ सुरू झाल्यानें यानें त्यांच्याशीं सालीना पांच लक्ष खंडणी देण्याचें ठरवून तह केला (१६६८). पुढें त्यानें मराठ्यानां त्रास दिल्यामुळें महाराजांनीं १६७२ त ह्याच्यावर स्वारी केली व बरीच संपत्ति काबीज करून त्याचा मोड केला (अबदुल्ला कुतबशहा पहा ज्ञानकोश विभाग ६). याच वर्षी शहा मरण पावला.

अबू हसन.—अबदुल्ला निपुत्रिक होता म्हणून त्याचा जांवई अबु हसन (१६७२-१६८७) हा गादीवर आला. हा गादीवर येण्यापूर्वी बराच विषयासक्त व मद्यपी होता. गादीवर बसविण्यांत याला मादण्णा(मदन)पंतानें बरीच मदत केल्यानें त्याला यानें दिवाणपद व त्याचा भाऊ अकण्णा(एकनाथ)पंतास सेनापतिपद दिलें. मादण्णाच्या कारकीर्दींत राज्यांत फार सुधारणा झाल्या. यावेळीं आदिलशाही दुर्बळ झाल्यानें व मोंगल आपल्या नाशावर टपलेला पाहून यानें मादण्णाच्या संमतीनें शिवाजी महाराजांशीं प्रथम मैत्रीचा व नंतर मांडलिकीचा तह केला (१६७६). संभाजी छत्रपतीशींहि तोच तह त्यानें कायम ठेवला. शिवाजी छत्रपती हे कर्नाटकांत मोहिमेवर गेले असतां यानें त्यांनां सैन्याची मदत दिली होती. पुढें (१६७७) मोंगलांचा दिलेलखान व विजापूरकरांचा अबदुल करीम हे एकत्र होऊन गोवळकोंड्यावर आले, तेव्हां मादण्णानें त्यांचा पराभव केला. पुढें १६८३ त खासा औरंगझेब दक्षिणेंत चालून आला. या वेळीं हसनशहाची तयारी चांगली होती. त्याचें सैन्य व संपत्ति पुष्कळ होती. मादण्णाची कारकीर्द सर्व हिंदूंनां प्रिय झाली होती. मात्र मुसुलमान सरदार त्याच्या विरुद्ध शहाचे कान भरीत, परंतु त्यानें तिकडे, लक्ष दिलें नाहीं. नंतर (१६८५) संभाजी छत्रपतीस शहानें खंडणी दिली. एकमेकांचे दोस्त व शत्रू एकच व परस्परानीं परस्परांस सहाय्य करावें असा तह शिवाजी महाराजांपासून अंमलांत होताच. औरंगझेबाच्या मनांत आता गोवळकोंडें खालसा करावयाचें आलें. कारण कुत्बशहा हा वेळीं आदिलशहास मदत करतो, तेव्हां आधीं गोवळकोंडें घेतल्याशिवाय विजापूर पडत नाहीं. असें ठरवून कांहीं कुरापती काढून त्यानें स्वारी केली. त्यापूर्वी आपल्या वकिलाकडून त्यानें कुत्बशहाचे अनेकदां अपमान केले होते. त्याची त्याला सांगीच होती कीं,"तूं कुत्बशहाचा नेहमीं अपमान करीत जा. म्हणजे केव्हा तरी तो तुझा अपमान करील व असें झालें म्हणजे मला लढाईस करण सापडेल." साराश, शहानें १६५६ चा तह पाळला नाहीं. "खंडणी वेळेवर देत नाहीं, शिवाजी संभाजी सारख्या काफरांना खंडण्या देतो" वगैरे बाह्य कारणें दाखवून औरंगझेबानें लढाई पुकारली.

त्याचे सरदार सादतखान व खानजहान गोवळकोंड्यावर आले (१६८६). मादण्णानें सेनापति इब्राहिमला त्यांच्यावर पाठविलें. मलखेड येथें लढाई होऊन तींत मोंगलांचा पराभव झाला; तेव्हां औरंगझेबानें सुलतान मुअज्जमला मदतीस पाठविलें. त्यावेळीं इब्राहिमनें फितूर होऊन त्यांना अडविलें नाहीं. मोंगल हैद्राबादेस आला. तेव्हां मादण्णाचा सल्ला न ऐकतां भिऊन शहा गोवळकोंड्यास गेला. तिकडे इब्राहिमला औरंगझेबानें लाच देऊन फोडलें त्यामुळें मोंगलांचा सुखासुखीं हैद्राबादेंत प्रवेश झाला. या गडबडींत मादण्णाचा खून त्याच्या मुसुलमान शत्रूंनीं केला. परंतु सैन्याची तयारी चांगली करून ठेविली होती. त्यामुळें विजापूरला मदतीची अपेक्षां असल्यानें औरंगझेबानें हैद्राबाद पडलें तरी दोन कोटींची खंडणी घेण्याचें ठरवून कुत्बशहाशीं तह केला व खंडणीवसुलीस मुअज्जमला तेथें ठेविलें(१६८६). यानंतर विजापूर पडलें तेव्हां गोवळकोंडें घेण्याचें नक्की ठरवून व कुलबुर्ग्याच्या एका फकीराच्या थडग्याच्या दर्शनाचें निमित्त करून तो कुत्बशाहींत उतरला. तत्पूर्वी कर्नाटक, अदवानी इकडील मदत गोवळकोंड्यास येऊन पोहोंचूं नये म्हणून त्या बाजूस त्यानें गाझीउद्दीन यास पाळतीवर ठेविलें (१६८७) व सादतखानाकडून गोवळकोंड्याच्या सैन्यांत फितुरी चालविली. तसेंच वाटेल त्या नीच युक्त्या अंमलांत आणून व धाकदपटशहा दाखवून त्यानें कुत्बशहाचा पैसा उपटण्याचा क्रम अव्याहत चालविला. शेवटीं तर शहानें आपल्या बायकोच्या अंगावरील दागिने सुद्धा दिले तरी औरंगझेबाला त्याची दया आली नाहीं. शेवटीं बदफैलीपणा, कारभारी ब्राह्मण नेमणें व मूर्तिपूजक संभाजी छत्रपतीशीं दोस्ती

करणें वगैरे आरोप त्याच्यावर उघडपणें ठेवून औरंगझेबानें लढाईस सुरुवात केली. कुत्बशहा या कृत्यामुळें चिडला. अगदीं विश्वासू लोकांसह तो हैद्राबादहून गोवळकोंडयाच्या किल्ल्यांत गेला. यावेळीं मादण्णाची त्याला फार आठवण झाली. औरंगझेबानें किल्ल्याला वेढा दिला. त्याचे सारे अंमलदार फितूर झाले. खजिना आधींच औरंगझेबानें रिता केला होता. आठ दहा महिने वेढा दिला असतांहि शहानें मोठ्या शौर्यानें किल्ला लढविला. अखेर वरील सर्व कारणें एकवटून व विश्वासघात होऊन मोंगलानें किल्ला घेतला. अबुहसन कुत्बशहा औरंगझेबाच्या हातीं पडला (१६६७ सप्टेंबर). त्याला त्यानें कैद करून दौलताबादेच्या किल्ल्यावर कैदेंत टाकिलें; तेथें तो मरेपर्यंत होता. याच्या बदफैलीपणाबद्दल मोंगल इतिहासकारांनीं अवास्तव वर्णनें दिलीं आहेत. राज्यावर आल्यानंतर यानें आपलें वर्तन सुधारलें. त्याला पकडून नेल्यानंतर त्याच्यासाठीं त्याची प्रजा फार हळहळली. त्याच्या शौर्याच्या व न्यायाच्या अनेक गोष्टी अद्यापि त्या प्रांतीं ऐकूं येतात. या घराण्यानें १७५ वर्षे राज्य केलें. त्यांत सहा सुलतान झाले. त्यांनीं बांधलेल्या इमारती व कामें अद्यापि शिल्लक आहेत. हे सुलतान रयतेची काळजी घेणारे होते यामुळें दंगेधोपे झाले नाहींत. या घराण्यांतील शहांच्या कबरी बहुधा गोवळकोंडयास आहेत [मुसलमानी रियासत; काफीरखान; द. हिं. घराणीं; मोडक; बील.]

कुत्बुद्दीन-ऐबक (१२०६-१२१०) याचें नांव मूळ ऐबक; हा जातीचा तुर्क. निशापूर (खुरासान) मध्यें प्रथम हा एका श्रीमंताचा गुलाम होता. तेथें हा विद्या शिकला. मालक मेल्यावर याला शहाबुद्दीन घोरीस नजर करण्यात आलें. याच्यावर शहाबुद्दीनची मर्जी फार बसली. हा प्रामाणिक व युद्धचतुर होता. शहाबुद्दीनची रायपिठोरवरील स्वारी(अजमेर ११९२) झाल्यावर याला त्यानें हिंदुस्थानांत आपला प्रतिनिधि म्हणून ठेविलें.

यानें ११९२ त मीरत, दिल्ली, बनारस, कालिंजर, बीना, ग्वालेर वगैरे ठिकाणें काबीज करून दिल्लीस आपलें वास्तव्य केलें. तेव्हांपासून आजपर्यंत दिल्ली हें राजधानीचें ठिकाण म्हणून चालूच आहे. शहाबुद्दीन १२०६ त मेल्यावर त्याचा पुतण्या गियासुद्दीन महंमद यानें कुत्बुद्दीन याला राजचिन्हें (छत्र, मुगुट, तख्त वगैरे) पाठवून देऊन सुलतान ही पदवीहि दिली. तेव्हां कुत्बनें २७ जून १२०६ रोजीं दिल्लीस तख्तारोहण केलें. यानें गझनीच्या मोठमोठया सरदार घराण्यांशीं संबंध जोडले. यानें यापुढें जास्त मुलूख काबीज न करतां न्यायानें व शांततेनें राज्य केलें. हा या गुलाम घराण्याचा मूळ पुरुष होय. यानें चार वर्षे राज्य केलें; हा १२१० त लाहोर येथें घोड्यावरून पडून मेला. हा हिंदुस्थानाचा पहिला मुसुलमान शहा होता. याच्या वेळीं उत्तरहिंदुस्थानात नाना प्रकारचीं बंडें व दंगधोपे चालू होते व स्वस्थता फारशी नव्हती. याच्या मागून याचा मुलगा आराम गादीवर आला. कुत्बमिनारजवळील जामामशीद (उर्फ कुवत्-उल्-इस्लाम) हें पूर्वीचें हिंदु देऊळ असून यानें त्याची मशीद बनविली व तिचा मझिना म्हणून कुत्बमिनार बांधण्यास प्रारंभ केला. हा मिनार आल्तमश व अल्लाउद्दीन खिलजी यांनीं पुढें पुरा केला असें म्हणतात (कुत्बमिनार पहा). [मु. रियासत; बील पृ. ३२०].

कुत्रा—हा माणसाळलेला प्राणी लांडग्याच्या कुलांतला असावा असें कांहीं श्वानशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. पण प्राणिशास्त्रांतील तज्ज्ञ अजून याविषयीं साशंक आहेत. कुत्र्याचा इतिहास मानवेतिहासाइतकाच प्राचीन असेल कारण कुत्रा व मनुष्य यांची सांगड फार पूर्वीपासूनची दिसते. यासंबंधांत वैदिक वाङ्मय चाळल्यास पुढील माहिती लागते. श्वान हा माणसाळलेला प्राणी होता (ऋ. २ ३९, ४). तो चोर व परकी माणसे यांच्यापासून घराचें रक्षण करी(७. ५५, ५); डुकराची शिकार करण्यास याचा उपयोग होई (१०. ८६, ४) पण सिंहाशीं टक्कर देण्यास हा असमर्थ ठरे (अथर्व ४. ३६, ६); यास यज्ञांत अपवित्र मानीत (ऋ. ९. १०१, १) अगदीं अन्नान्न दशा आली म्हणजेच कुत्र्याचें मांस खात (ऋ. ४. १८, ३). इंद्राची सरमा नावाचा प्रख्यात कुत्री असे. पुराणातून तर कुत्र्याच्या अन्याच कथा सांपडतात. युधिष्ठिराबरोबर स्वर्गद्वारापर्यंत एकटा कायतो कुत्राच उरला असे महाभारतांत दाखवून कुत्र्याचा इमानीपणा वर्णिला आहे. ईजिप्ती लोक कुत्र्याला फार मान देत. घरात कुत्रा मेल्यास कुटुंबातील माणसें सुतकाचें चिन्ह म्हणून श्मश्रू करवीत असें हिरोडोटस सांगतो. एथिओपियांत कुत्र्याला राजा म्हणून निवडीत. ज्यू लोक कुत्र्याचा तिरस्कार करीत जुन्या व नव्या करारांत कुत्र्यासंबंधीं आलेले उल्लेख चांगले नाहींत. ग्रीकलोक कुत्र्याचा शिकारीस उपयोग करीत.

शिवाजी महाराजांपाशीं एक विश्वासू कुत्रा होता असें म्हणतात व रायगडास त्याची एक समाधि दाखवितात. शाहु छत्रपतींचा एक आवडता खंड्या नांवाचा कुत्रा होता. त्याला पोषाख व जडजवाहीर घालीत. त्याला पालखीची तैनात होती असें म्हणतात. त्याचें कारण त्यानें एकदा महाराजांचे प्राण वाचविले होते. त्यांना शिकारीचा फार नाद असे. एके वेळीं ते शिकारीसाठीं गेले असतां, शिकारी लोकांची व त्यांची चुकामूक होऊन ते एकटेच पुढें गेले. तेव्हां लपून बसलेल्या वाघानें त्याच्यावर उडी घातली. त्यांनीं उडी चुकविली व इकडे खंडयानें वाघाशीं झोंबी घेऊन त्याला ठार केलें. महाराजाची स्वारी निघाली कीं खंडयाची पालखी बरोबर असे. पुढें महाराज वारल्यावर त्यांचें दहन केलें. तेव्हां या इमानी प्राण्यानें चितेंत उडी टाकून आपला प्राण अर्पण केला. हल्लीं संगममाहुलीस जेथें महाराजांची समाधि आहे तेथेंच याचीहि एक समाधि असून त्याची एक प्रतिमा बसविलेली आहे. ' ही गोष्ट बखरींत आढळते;

कुत्र्याचें डोकें लांबोळें असतें. त्याला आपला जबडा बाजूला हालवितां येत नसून वरखालीं मात्र हालवितां येतो. छाती रुंद असते. त्याला चांगलें पोहतां येतें. अंग झाडलें कीं पाणी सर्व निघून जातें. याचे पाय बारीक पण बळकट असतात. त्यामुळें त्यास जलद चालतां येतें. त्याचीं बहुतेक सर्व ज्ञानेंद्रियें तीक्ष्ण असतात आणि झोंपहि गाढ नसते. याच्या नाकावर दोन कल्ले असतात. शेपूट वांकडें असतें. त्यामुळें त्यास चटकन वळण्यास मदत होते. शेपटी हालवून तो राग, दुःख इ. मनोविकार व्यक्त करतो. हा पुढील पाय उभे करून बसतो.

त्याच्या प्रत्येक जबड्यांत पुढचे ६–६ दात असतात. वर खालीं २।२ लांब, वळकट व तीक्ष्ण असे सुळे असतात व मागें २६ दांत असतात. त्यांनीं तो हाडें फोडतो व चघळीत बसतो. सुळ्यांनीं मासाचे तुकडे तोडून गिळून टाकतो व स्वस्थ झोंप घेत पडतो. याची जीभ मऊ असते. थकला म्हणजे हा जीभ बाहेर काढतो व त्यामधील घाम बाहेर निघतो.

त्याच्या पायाचे तळवे मऊ असतात. पुढच्या पायास ४ नखें असतात. नखें आत ओढून घेता येत नाहींत, त्यामुळें चालतांना थोडा आवाज होतो. चपलता, बल व घ्राणेंद्रियाची तीक्ष्णता या गुणांमुळें कुत्रा हा मनुष्याचा पक्का दोस्त बनला आहे व तो मनुष्याला इतर प्राण्यांविरुद्ध मदत करतो. कुत्र्यानें मालकाचा जीव वाचविल्याचीं अनेक उदाहरणें आहेत.

सर्व कुत्रें मूळ एकाच कुळातले पण हवामान, अन्न व संकरजनन यामुळें त्याचे निरनिराळे वर्ग पडले हें म्हणणें असंभवनीय नाहीं. मानवसंस्कृतीच्या प्रगतीमुळेंहि कुत्र्यामध्यें भेद पडतात. रानटी जातींत एकाच जातीचे कुत्रे आढळतात व सुधारलेलीं माणसें आपआपल्या गरजांप्रमाणें नवीन नवीन जाती उत्पन्न करतात. याच कारणामुळें सर्व देशातील रानटी कुत्रे बहुधा सारखेच दिसतात; पण पाळलेल्या कुत्र्यांत फार फरक असतात. कुत्र्यांचे वर्गीकरण निरनिराळ्या पद्धतींनीं केलें जातें. मुख्य वर्ग दोन. शिकारी व बिनशिकारी. पुढील वर्गीकरणहि लक्षांत घेण्याजोगें आहे.

(अ) मनुष्याला शिकार पाहून देणारे पण स्वतः न मारणारे कुत्रे; उदा. पाइंटर, सेटर, स्पॅनिएल. (आ) माणसानें शिकार पाहून दिल्यावर मग मारणारे; उदा. इंग्लिश ग्रे हाऊंड. (इ) शिकार पहाणारे व मारणारे कुत्रे. उदा. ब्लड-हाऊंड फॉक्स हाऊंड, टेरिएर. (ई) मनुष्यानें विद्ध केलेली शिकार हुडकून आणणारे उद. रिट्रीव्हर, डीयरहाउंड. (उ) मनुष्याचे उपयुक्त सहवासी—मॅस्टिफ, न्यूफाउंडलंड, सेंट-बर्नार्ड, बुलडॉग, शीपडॉग इ. (ऊ) स्त्रियांचें खेळणें होऊन रहाणारे कुत्रे उदा. किंग चार्लस स्पॅनिएल, ब्लेनहीम, पग, माल्टीज, चायनीज, जपानीज स्पॅनिएल इ. पाश्चात्त्य देशांत कुत्र्यावर स्वतंत्र ग्रंथ व नियतकालिकें निघतात व वार्षिक प्रदर्शनें भरतात. इंग्लंडातील केनेल क्लब नांवाची श्वानसंस्था कुत्र्यांचीं प्रदर्शनें भरवून व कुत्र्यांच्या जोपासनेचा प्रश्न पुढें मांडून या प्राण्याला बरेंच महत्त्व आणून देते. निरनिराळ्या प्रदेशांतूनहि या संस्थेच्या अनेक शाखा आहेत. संस्थेचें गॅझीट आहे. व त्याच्या अध्यक्षानें एक कुत्र्यावर ज्ञानकोशहि रचिला आहे. यूरोपांतील बरींच पत्रें आपले कांहीं रकाने कुत्र्यासंवर्धनाच्या बातम्यांकरितां राखून ठेवितात. याप्रमाणें यूरोप व अमेरिकाखंडांतून श्वप्रेमी लोकांची संख्या मोठ्या झपाट्यानें वाढत आहे. हिंदुस्थानांत मात्र हिंदू व मुसुलमान लोकांत कुत्र्यावरील प्रेम फारसें आढळून येत नाहीं. कुत्रा हा गलिच्छ व अस्पृश्य असा प्राणी आहे असें पुष्कळ हिंदू मानतात. सोंवळ्यांत कुत्रा चालत नाहीं एवढेंच नव्हे तर बायकानां त्याचा विटाळ होतो म्हणून पुष्कळ हिंदू कुत्रा पाळीत नाहींत. प्रत्येक हिंदू व मुसुलमान देशात ख्रिस्ती किंवा यूरोपियन लोकाना अगदीं घाणेरडी शिवी द्यावयाची झाल्यास 'कुत्रा कुत्ता' म्हणतात असें ब्रिटानिका सांगते.

कुत्रु—बस्तर संस्थानांतील सर्वांत मोठी जमीनदारी. उत्तर अक्षांश १८ ° ८५' ते १९ ° २८'व पूर्वरेखांश ८० ° २५' ते ८१ ° १५'. क्षेत्रफळ १३६२ चौ. मै. लोकसंख्या सुमारें १२ हजार. टाकोळी ४६०० रु. हिचा ईशान्येकडील भाग डोंगराळ आहे. या भागातून इंद्रावती व तिला मिळणाऱ्या कोकी व बेरुडी नद्या वहातात. मुख्य गांव कुत्रु. येथें पोलिसचौकी, शाळा व डाकघर हीं आहेत. जंगलात साग विपुल आहे.

कुत्स.—एक वैदिक ऋषि व सूक्तद्रष्टा. ऋग्वेदांत या द्रष्ट्याचें नांव पुष्कळदा आढळतें. पण त्यासंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं. यावरून हा वेदकालापूर्वीचा असून वैदिक ऋषींना बराच अज्ञात असावा. कुत्साला बऱ्याच वेळां आर्जुनेय म्हटलें असून (ऋ. ४. २६, १; ७. १९, २; ८. १, ११), शुष्ण दैत्याचा पराभव करण्याच्या कामीं व सूर्याला जिंकण्यांत हा इंद्राबरोबर आढळतो (१. ६३, ३, १२१, १९; १७४, ५; १७५, ४; ४. ३०, ४; ५. २९ ४; ६. २०, ५; ७. १९, २; १०. ९९, ९). स्मदिभ, तुग्र व वेतसू यांनां कुत्सानें जिंकिलें (१०. ४९, ४); पण अतिथिग्व आणि आयु यांच्याबरोबर इंद्रानें यालाहि जिंकिलें असें बरेच वेळां सांगितलें आहे (१. ५३, १०; २. १४, ७; ८. ५३, २.). तूर्वयाणामुळें कुत्साचा पराभव झाला असें एका ऋचेंत आहे (१. ५३, १०). इतर कांहीं स्थलांवरून अतिथिग्वाबरोबर कुत्सहि इंद्रमित्र होता असें दिसतें (१. ५१, ६; ६. २६, ३). याची आणखी माहिती 'बुद्धपूर्व जग' या विभागांत (पा. ७२ आणि ४८०) आली आहे. पुढील वाङ्मयांतून कुत्साचा क्वचितच उल्लेख येतो (अथर्व. ४. २९, ५; पंचविंशब्राह्मण १४. ११. २६).

ब्राह्मण ग्रंथांतून कुत्सानें इंद्राला बांधल्याची कथा आढळते (पंचविंश ब्रा. ९. २, २३; जैमि. ब्रा. १.२२८). इंद्र व कुत्स यांच्या रूपात इतकें साम्य होतें कीं, एकदा इंद्रानें याला आपल्या घरीं नेलें असता शचीला आपला पति कोणता हें ओळखितां आलें नाहीं.

कुंदकुंदाचार्य—सरस्वतीगच्छांतील जैन यति. हा वीरसंवत् ४९ मध्यें जन्मून ११ वर्षे गृहस्थ, ३३ वर्षे यति व ५१ वर्षे, १० महिने १० दिवस सूरी होऊन वयाच्या ९५ व्या वर्षी मृत्यु पावला. यानें कांहीं ग्रंथरचना केली आहे त्यांपैकीं शिवकुमार महाराजाकरिता पंचास्तिकाय हा ग्रंथ यानें लिहिला असें त्यावरील टीकेवरून दिसते. यानें षट्प्राभृत हा एक ग्रंथ केला असून त्यावर श्रीश्रुतसागरानें टीका लिहिली आहे. याच्या गुरूचें नाव विद्यानंदिन् असें होतें. याचा तिसरा ग्रंथ तत्वार्थदीपिका हा होय.

कुंदगोळ—मुंबई इलाख्यांत जमखिंडी संस्थानांतील याच नावाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण. याची लोकसंख्या सुमारें अडीच हजार. येथें सभोंवतालीं कापूस पिकतो. कुमठा, कारवार व हुबळी या ठिकाणीं येथून कापूस जात असतो.

कुदरेमुख—" अश्वमुख " (कानडी भाषेंत कुदरे = घोडा) पश्चिमघाट ऊर्फ सह्याद्रि पर्वताचें प्रसिद्ध शिखर. हें मद्रासच्या दक्षिणकानडा जिल्ह्याच्या व म्हैसूरच्या कडूर जिल्ह्याच्या सरहद्दीवर ६२१५ फूट उंच आहे. याच्या समुद्रबाजूकडील आकाराचें हें वर्णनात्मक नाव असून हे नाविकास प्रसिद्ध मार्गदर्शक आहे. म्हैसूरकडील बाजूनें यावर जाण्याचा रस्ता सामसेजवळून असल्यामुळें यास सामसेपर्वत असेंहि म्हणतात. दक्षिणकानडातील अधिकारी उन्हाळ्यात या शिखरावर रहाण्यास जातात.

कुंदा टेंकडी-मद्रास इलाख्यात निलगिरी जिल्ह्यातील डोंगराची रांग. निलगिरी पठाराच्या नैर्ऋत्येस कुंद टेंकडया सरहद्द बनलेल्या आहेत. पहाडी प्रदेशाच्या दोन्ही बाजूनें हिरवेंगार जंगल असून उत्तरेकडील उतरणीवरून कुंदा नदी वाहात जाते. कुंदा नदीपलीकडे भवानी नावाची दरी आहे. उटकमंडपासून कुंदा टेंकडया फार रमणीय दिसतात.

कुंदा तहशील-संयुक्त प्रांतांत, प्रतापगड जिल्ह्यातील एक तहसिल. या तहसिलींत रामपूर, माणिकपूर, बिहार व पिंगबस परगण्याचा समावेश होतो. हिचें क्षेत्रफळ ५४४ चौ. मै. असून लो. सं. १९११ सालीं ९,१४,६४४ होती. तहसिलींत ६९२ खेडीं असून माणिकपूर हें तहसिलीचें मुख्य ठिकाण आहे. १९०३-०४ सालीं जमीनमहसूल ४,८०,००० रु. होता. गंगानदीच्या ईशान्येस ही तहसील असून गंगेच्या कांठचा उंच प्रदेश सुपीक आहे. १९०३-०४ सालीं लागवडीचें क्षेत्रफळ २८१ चौरस मैल होतें.

कुनिगल—म्हैसूर संस्थान. तुमकूर जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ३८२ चौ. मैल असून १९११ सालीं लो. सं. ८३८१२ होती. यात एक शहर व २८४ खेडीं आहेत. मुख्य गांवें कुनिगल (तालुक्याचें ठिकाण) व हुलियूदुर्ग. अम्मयेस भद्दशिद्दि नांवाचा डोंगर असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून ३०८० फूट आहे. उत्तर व पश्चिम भागाची जमीन सुपीक असून लागवडीस येते. बाकी सर्व भाग खडकाळ व जंगली आहे नवव्या शतकांत राष्ट्रकूट राजाच्या अमदानींत या तालुक्याचें नांव कुनिगल असेंच होतें.

कुनिहार—पंजाबात सिमल्याच्या डोंगरी संस्थानांपैकीं एक संस्थान. हे सिमल्यापासून पश्चिमेस १५ मैलांवर असून याचें क्षेत्रफळ ८० चौ. मै. आहे. १९२१ सालीं लो. सं. १९४५ होती. जम्मू येथील रजपूत रघुवंशी घराण्यांतील एका पुरुषानें सदरहू संस्थानची स्थापना केली. सांप्रतचे महाराज ठाकूर हरदेवसिंग नावाचे आहेत. संस्थानचें उत्पन्न सुमारें ६००० रुपयांचें असून इंग्रजसरकारास १८० रुपये खंडणी द्यावी लागते.

कुन्डट -या जर्मन शास्त्रज्ञाचा जन्म १८३९ मध्यें श्वेरीन येथें झाला. त्याचें शिक्षण लायप्झीग आणि बर्लिन येथें झालें. बर्लिनच्या विश्वविद्यालयांतून पदवी घेताना त्यानें विद्युत्‌भवनावर एक उत्तम निबंध लिहिला. त्यानें झ्युरिक, वुर्झबर्ग, स्ट्रासबर्ग आणि बर्लिन इतक्या स्थळीं पदार्थविज्ञानशास्त्राच्या प्रोफेसरचें काम केलें. मे १८९४ मध्यें त्याचा मृत्यु झाला कल्पकशास्त्रज्ञ या नात्यानें त्यानें शास्त्रीय क्षेत्रांत पुष्कळ काम केलें आहे. विशेषतः ध्वनिशास्त्र आणि प्रकाशशास्त्र या दोन शास्त्रांत त्यानें पुष्कळच परिश्रम घेतले आहेत. एखाद्या नलिकेंत ध्वनीचीं प्रकंपनें उत्पन्न झालीं असतां त्या नळींत अगोदर पसरून ठेवलेल्या सूक्ष्म बुकणीवर त्या प्रकंपनांचा परिणाम होऊन कांहीं विशिष्ट अंतरावर त्या बुकणीच्या रेषा पडतात, व त्यायोगानें कंपनक्षेत्रातर (लहऱ्यन्तर) मापता येतें; व याचाच उपयोग करून भिन्न वायूंतील ध्वनीची गति मापता येते. कुन्डट यानें प्रकाशशास्त्रांत विकिरणा (डिस्पर्शन)संबंधानें बरीचशी नवीन माहिती उपलब्ध केलेली आहे. चुंबकप्रकाशशास्त्रासंबंधानें त्यानें पुष्कळ परिश्रम घतले आहेत; व फाराडे याला जें चुंबकत्वकृत द्रवीभूत लहऱ्यन्तर प्रकाशपरिवर्तन शोधून काढतां आलें नाहीं ते त्यानें शोधून काढलें. कित्येक वायू आणि बाष्प यांच्यात बलवत्तर चुंबकक्षेत्र त्यानें शोधिलें ध्रुवीभूत प्रकाशाचें परिवर्तन होतें असं त्यान अनेक प्रयोग करून दाखवून दिलें.

कुन्ननकुलम्—मद्रास इलाख्यात कोचीन संस्थानांतील तलपिल्ली तालुक्यातलें एक गाव. १९११ सालीं याची लो. सं. ८३३६असून त्यांत ५५६१ख्रिस्ती आहेत. कोचीन संस्थानांतील ख्रिस्ती मिशनऱ्यांचें हे एक प्रमुख ठिकाण आहे. सब-

मॅजिस्ट्रेटची कचेरी, एक दुय्यम शाळा, ख्रिरियन (वरिष्ठ) हायस्कूल इत्यादि संस्था याठिकाणीं असून सुपाऱ्याचा व्यापार थोडया प्रमाणांत चालतो.

कुन्नूर, ता लु का.—मद्रास इलाख्यात नीलगिरी जिल्ह्यामधील एक पूर्वेकडील तालुका. ह्यांत जुन्या परंगीनाद व मेकानाद भागाचा समावेश होतो. याचे क्षेत्रफळ २४१ चौ. मै. व लोकसंख्या (१९२१) ५८,३४१. कुन्नूर हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. वेलिंगटन येथें छावणी आहे. ह्या तालुक्यात १९ खेडीं आहेत. कुन्नूरच्या नैर्ऋत्येस ६ मैलांवर रमणीय कार्टेरीचा धबधबा आहे व जवळच अरवण घाट येथें विजेचा कारखाना आहे. ईशान्येकडील पावसाचे वारे ज्यावेळीं वहातात त्यावेळीं ह्या तालुक्यांत खूप पाऊस पडतो. कुन्नूर व कोटगिरी येथें काफीची लागवड करितात. त्याचप्रमाणें पूर्वेस व कोटगिरी येथें चहाचे मळे आहेत. बार्लियार येथें सरकारी बगीचा आहे.

गां व.—मद्रास इलाख्यांत नीलगिरी जिल्ह्यामधील हें कुन्नूर तालुक्याचें मुख्य ठाणें व हवा खाण्याचें ठिकाण असून निलगिरीच्या डोंगराच्या सपाटीच्या आग्नेयास आहे. हे मद्रासपासून रेल्वेनें ३४५ मैल दूर आहे. लोकसंख्या (१९२१) १२५१५. उटकमंडच्या खालोखाल थंड हवेचें ठिकाण कुन्नूर हेंच आहे. जकताल्याच्या खोऱ्यांत हें गाव वसलेलें असून भोंवताली टेंकाडें व जंगली प्रदेश आहे. हवा थंड व मनाला आल्हाद देणारी अशी आहे. पाऊस सरासरी ५६ इंच पडतो. उष्णमान ६०°—७०° अंश असतें. लेडी कॅनिंन सीट, लॅब्स रॉक, पाश्चूर इन्स्टिटयूट व सिम्स पार्क हीं येथील पाहुण्यासारखीं स्थळें आहेत. सेंट जोसेफ कॉलेज, स्टेनीज यूरोपियन हायस्कूल, सेंट जोसेफ कान्व्हेंट व हेबार्न गर्ल्स स्कूल या शिक्षणसंस्था आहेत. येथें म्युनिसिपालिटी आहे. चहा, कॉफी, भाजी, बटाटे व फळें हीं येथील पिकें व उद्योगधंद्याचें जिन्नस होत. जंगली लोकांस काम देण्यासाठी म्हणून जाम व लोणचीं करण्याचा सरकारी कारखाना अलीकडे येथें निघाला आहे.

कुन्हूळ—उत्तर ब्रम्हदेशात श्वेबो (स्वेबो) जिल्ह्यातील वायव्येकडील तहशील. ही मू नदीपासून चिंदविन जिल्ह्यांपर्यंत पसरलेली आहे. इचें क्षेत्रफळ ९८८ चौ. मै. आहे. लो. सं. (१९११) १३७४२. खेडीं ३९. तहशिलीचें ठाणें कुन्हूल.१९०३—०४ सालीं लागवडीचें क्षेत्रफळ ९८ चौ. मैल व काळीचें उत्पन्न २५२०० रु. होतें.

कुंबुम्, ता लु का.—मद्रास इलाख्यांतील कर्नूल जिल्ह्याचा अगदीं पूर्वेकडचा तालुका. क्षेत्रफळ १०६० चौ. मै. लो. सं. (१९२१) ११९९३१. तालुक्यामध्यें कुम्बुम नांवाचें एकच गाव असून १०१ खेडीं आहेत. तालुक्याचा बहुतेक भाग डोंगराळ आहे. डोंगरांच्या खोऱ्यांतून गंडलकम्पा, जम्पलेरु आणि सगिलेरु ह्या नद्या वहातात व त्या पेन्नर नदीस जाऊन मिळतात. येथील व मुख्यत्वेंकरून पुल्ललचेरुवू धबधब्याचें सृष्टीसौंदर्य फारच मनोवेधक आहे. दोन्हीं बाजूस डोंगर असलेल्या नदीस बांध घालून पाणी अडविण्याची व अशा रीतीनें तलाव तयार करण्याची येथें फारच उत्तम सोय आहे, व गंडलकम्मा नदीचें पाणी अडवून असें तळें तयार केलेंहि आहे. जमीन बहुतेक लालसर रंगाची;हवा रोगकारक असून मलेरिया ज्वराची सांथ गांवांत असते. पाऊसपाणी २५ इंच अर्ध्यो अधिक तालुक्यांत राखून ठेवलेलीं जंगले असून कुरणेंहि पुष्कळ .आहेत. रस्त्यापासून तालुका दूर असल्यामुळें दळणवळणाची सोय फारशी नाहीं. तालुक्याच्या पश्चिम व उत्तर भागांत तर पावसाळ्यात जाण्याची सोय नसते.

गा व.—मद्रास इलाख्यामध्यें असलेल्या कर्नूल जिल्ह्यांतील कुम्बुम तालुक्याचें मुख्य गांव. लो. सं. (१९११) ६३४४. पूर्वी येथें मदतनीस कलेक्टर व तहशीलदार रहात असत व येथें छावणीहि होती. येथील हवामान फारच रोगकारक आहे. येथें उत्तम पक्क्या रंगाच्या सतरंज्या तयार होतात. गंडलकम्मा नदीस बांध घालून तयार केलेलें तळें महर्षि जमदग्नि यानीं बांधलें अशी आख्यायिका आहे. १५ व्या शतकात कलिंगाच्या गजपतीनें त्यात सुधारणा केली असे सांगतात. विजयानगरच्या राजकन्येनें (नांव वरदराजम्मा) त्याची पूर्णता केली असें सांगतात.

कुबेर—दुष्ट प्राण्याचा अथवा पिशाचाचा पुढारी म्हणून वेदात कुबेराचा उल्लेख केलेला आहे. हा ग्रीक प्लुटोप्रमाणें पृथ्वीवरील संपत्तीचा अधिपति असून वैश्रवण असें त्याचें पैतृकनाम आहे. गुह्यक व यक्ष याचा अग्रणी आणि संपत्तीचा स्वामी या उभयअर्थी त्यास देव असें म्हणण्यांत येतें. विश्रवस व इडाविडा यांचा पुत्र असूनहि यास कधीं कधीं पुलस्त्य (विश्रवसचा पिता) याचा पुत्र म्हणून संबोधिला जातो. महाभारताप्रमाणें पाहिलें तर कुबेर हा पुलस्त्याचाच मुलगा होय. पण ब्रह्मस्तुति केल्यावरून तो ऋषि कुबेरावर रागावला व विश्रव्यास जन्म दिला. या विश्रवसचे पुत्र रावण वगैरे होत. अलका, प्रभा, वसुधरा व वसुस्थली अशीं कुबेराच्या हिमाचलांतील नगरींचीं नावें आहेत. मेरु पर्वताच्या शृंगापैकीं मंदर नावाच्या स्थलीं चैत्ररथ नांवाची त्याची उद्यानवाटिका असून त्याठिकाणीं किन्नरगण त्याची मार्गप्रतीक्षा करीत असतात. कांहीं आधारावरून असेंहि दिसतें कीं, त्याचें निवासस्थान कैलास पर्वतावर विश्वकर्मा निर्मित राजमंदिरांत असावें. कुबेर हा रावणाचा सावत्र बंधु होता. रामायण व महाभारतावरून असें दिसतें कीं, सिंहलद्वीपातील विश्वकर्मारचित लंका नगरी त्याच्या ताब्यांत प्रथम होती व तेथून त्यास पुढें रावणानें घालवून दिलें. हजारों वर्षें उग्र तपश्चर्या केल्यावरून ब्रह्मदेवापासून आपण अमर व्हावें, जगाचा रक्षक व्हावें व आपण सर्व संपत्तीचा स्वामी व्हावें अशा तीन वरांची त्यास प्राप्ति झाली. तो

उत्तर दिशेचा अधिपति आहे. सोनें, रुपें, माणिक, मोतीं आणि पृथ्वीचें सर्व भांडार व नवनिधी यांचाहि तो मालक आहे. ब्रह्मदेवानें त्याला पुष्पक विमान दिलें आहे. यक्षी चार्वी अथवा कौवेरी अशीं त्याच्या पत्नीचीं नांवें असून ती मुर दैत्याची कन्या होय. मणिग्रीव, अथवा वर्णकवि आणि नलकुबेर अथवा मयुराज असे त्याचे दोन पुत्र असून मीनाक्षि नावाची कन्या आहे. कुबेराचा श्वेतवर्ण असून तो शरीरानें व्यंगी आहे. त्याला तीन पाय व आठ दांत आहेत. कुबेर (कुत्सितं बेरं यस्य सः अथवा कुत् नु) हा शब्द त्याच्या कुरूपतेलाच अनुलक्षून आहे. धनपति, इच्छावसु, यक्षराज, मयुराज, राक्षसेंद्र, रत्नगर्भ, राजराज व नरराज अशीं त्याचीं नावें आहेत. वैश्रवण, पौलस्त्य, ऐड-विड अथवा ऐलविल असेंहि त्यास म्हणतात. शिवाचा विशेष मित्र म्हणून त्यास ईशसखि' असें अभिधान आहे. हॉप्किन्सनें ग्रीक कॅबीरॉस व भारतीय कुबेर यांची तुलना करण्याचा प्रयत्न केला आहे [ए. ओ. एस्. पु. ३३]

कुब्ज विष्णुवर्धन—हा बदामीच्या चालुक्यघराण्या-तील पहिल्या कीर्तिवर्म्याचा पुत्र व या वंशांतील अत्यंत पराक्रमी सम्राट जो दुसरा पुलकेशी त्याचा धाकटा भाऊ असून याला विषमसिद्धि व बिट्ट अशीं दुसरीं नावें होतीं. कुब्ज या टोपण नांवावरून हा कदाचित् कुबडा असावा (कुब्ज याचा अर्थ जेबिया असाहि आहे, त्यावरून याचे मुख्य शस्त्र तें होतें कीं काय?). पुलकेशीनें याला आपला युवराज केलें होतें (६१५). पुढें याला सातारा-पंढपूर या प्रांताचा सुभेदार नेमिलें (६१७). नंतर पुलकेशीचें साम्राज्य फार वाढल्यानें व बदामी येथून सर्व साम्राज्यावर देखरेख ठेवणें अशक्य झाल्यानें पुलकेशीनें याला युवराज या अधिकारावर असतानाच पूर्वेकडील (कृष्णा व गोदा दुआबातील) वेंगी प्रांतावर सुभेदार म्हणून पाठविलें. नंतर दोघा भावात पूर्वी ठरल्याप्रमाणें म्हणा किंवा विष्णु-वर्धनानें बंड केलें म्हणून म्हणा (काय होतें तें नक्की समजत नाहीं), इ. स. ६३२ च्या पूर्वी विष्णुवर्धनानें वेंगी येथें आपलें स्वातंत्र्य पुकारलें आणि बदामीचें आधिपत्य झुगारून देऊन तो स्वतंत्र राजा बनला. याचा काल सातव्या शत-काचा मध्यकाल होय. याच्या वंशजांनीं पुढें केव्हांहि बदा-मीशीं आपला संबंध न ठेविता स्वतंत्र राज्य चालविलें. ही शाखा 'पूर्व चालुक्य शाखा' म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. हिनें (बदामीच्या) पश्चिम चालुक्यशाखेपासून अगदीं शेवटपर्यंत वेगळें राहून, पांच शतकें आपलें स्वातंत्र्य राखिलें [इंडियन अँटिक्वारि. व्हा. १२, १९, २०; जर्नल बॉंबेब्रँच रॉ. ए. सोसायटी. व्हा. २; बॉंबे प्रेसिडेन्सी ग्याझे. व्हा. १. पार्ट २].

कुब्जा—कंसाची दासी. ही तीन ठिकाणीं वाकडी होती. कृष्ण आणि बलराम या दोघांस ज्या वेळेस मथुरेस धनु-र्यागार्थ कंसानें आणविलें, त्या वेळेस कृष्णप्रसादानें ही सरळ झाली. (भागवत. स्कंध १० अ. ४२ व ४८) कैकयीची दासी मथरा. हिलाहि कुब्जा म्हणत असत.

कुंभ—दिल्लीकर शेरशहा (सूर घराण्यातील) यानें रज-पुतावर मोहीम केली (१५४३-४५) त्यावेळीं मारवाडच्या मालदेवाशीं तो लढत असता मालदेवाच्या पुढें त्याचा कांहीं टिकाव लागेना. सर्व रजपूत राजे तेव्हां एकदिलानें लढत होते. त्यावेळीं शेरशहानें एक बनावट पत्र तयार करून त्या सर्व राजात आपापसात फूट पाडली, तेव्हां मालदेवास हें कपट न समजल्यानें तो युद्ध सोडून गेला, पण त्याचा सरदार कुंभ यानें हा कावा समजून रणांगण सोडलें नाहीं. त्यानें मालदेवाची पुष्कळ समजूत केली, पण त्याची खात्री होईना. अखेर एकट्यानें लढून रजपुतांचें नाव राखण्याचा कुंभाने निश्चय केला. शेरशहाजवळ ऐंशी हजार तर कुंभा-जवळ सारी बारा हजार फौज होती. तरी त्यानें जिवावर उदार होऊन इतक्या निकरानें हल्ला केला कीं, शहाचा बहु-तेक पराभव झाला. इतक्यात त्याला नवीन मदत आल्यानें कुंभाचा पराभव झाला.परंतु शहाचे या लढाईत अत्यंत नुक-सान झालें. त्याने स्वतःच म्हटलें आहे कीं ' मूठभर दाणे मिळविण्याच्या कामात सर्व राज्य गमावण्याचा प्रसंग आला होता होता " [तारीखी शेरशाही. इ. डॉ. पु. ४; मु. रि.].

कुंभकर्ण—पुलस्त्यपुत्र जो विश्रवा ऋषि त्यास केकसी नामक भार्येपासून झालेला पुत्र. हा रावणाचा कनिष्ठ भ्राता होता. आपणास अपार ऐश्वर्य व बल प्राप्त व्हावें या उद्देशानें त्यानें उग्र तपश्चर्या आरंभली. दहा सहस्र वर्षे तप झाल्यानंतर ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन कुंभकर्णास वर माग-ण्याची आज्ञा केली. इंद्रपद मागण्याचें कुंभकर्णाच्या मनात आलेलें समजून देवांनीं कुंभकर्णाच्या जिव्हाग्रीं सरस्वतीची योजना करून वराचा उच्चार होताना इंद्रपदाच्याऐवजीं निद्रापद असा उच्चार करविला. या वराप्रमाणें कुंभ-कर्ण सहा सहा महिने निद्रिस्त असे. म्हणून हल्लीं फार झोपाळू माणसाला कुंभकर्णाची उपमा देतात. याचें शरीर फार प्रचंड व आहार अतिशय मोठा असे. निद्रेंतून जागा झाल्यावर त्यास अन्नाच्या राशीच्या राशी व मद्याचे असंख्य कुंभ भक्षावयास लागत असत, असें वर्णन आहे. रामचंद्रानें एकदा रावणाचा पराभव केला असता रावण लंकेस परत आला. तेव्हां त्यास कुंभकर्णाचें स्मरण होऊन त्यास उठविण्याची त्यानें राक्षसांना आज्ञा केली.महत्प्रयासानंतर तो जागा झाला व आपणास उठविण्याचें कारण विचारूं लागला. रावणास एक भयंकर संकट आलें आहे असें त्यास कळताच तो त्वरेनें रावणाच्या सभेंत गेला. तेव्हा रावणानें त्याचा गौरव करून आलेलें संकट त्यास कथन केलें. तेव्हां कुंभ-कर्णानें ' मी राम-लक्ष्मणास ताबडतोब ठार करतो. ' अशी प्रतिज्ञा केली व तो युद्धाकरितां निघाला. बराच काळपर्यंत

त्यानें घनघोर युद्ध केलें व असंख्य वानरांचा धुव्वा उडविला. हें पाहतांच वानर भयभीत होऊन पळूं लागले. परंतु रामचंद्रानें उत्तेजनपर भाषणानें त्यांना परत वळविलें व कुंभकर्ण आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहून रामानें त्याचे भुज व मस्तक तोडलें [वा. रामायण, युद्धकांड; महाभारत वन. अ. २६८-८७].

कुंभकोणम्, ता लु का.—मद्रास इलाख्यातील तंजावर जिल्ह्यांतील एक पोटविभाग व तालुका. याचें क्षेत्रफळ २११ चौरस मैल असून लोकसंख्या १९२१ सालीं ३६९५६५ होती. तालुक्याचें मुख्य ठाणें कुंभकोणम् आहे. खेड्यांची संख्या ३०७ आहे. तालुक्याचा बराच भाग कावेरी नदीमुळें सुपीक झाला असून लोक सुस्थितींत आहेत. या तालुक्यांत तांदूळ, केळीं व सुपारी हीं मुख्य पिकें असून तांबे पितळेचीं भांडीं आणि रेशमी व सुती कापड तयार होतें.

श ह र.—मद्रास इलाख्यांत तंजावर जिल्ह्यामध्यें कुंभकोणम् तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें कावेरी नदीच्या कांठीं मद्रासपासून १९४ मैलावर साउथ इंडियन रेल्वेवर आहे. १९२१ सालीं याची लोकसंख्या ६०७०० होती. उत्तरोत्तर कुंभकोणम् आकारानें वाढत असून हल्लीं तें मद्रास इलाख्यात ६ वें शहर आहे. कुंभकोणम् हें दक्षिण हिंदुस्थानांतील अगदीं जुन्या शहरांपैकीं एक आहे. सातव्या शतकात चोलांची राजधानी कुंभकोणम् येथें होती. हें ब्राह्मणीधर्माचें व संस्कृतीचें माहेरघर होतें. शंकराचार्यांनीं येथें एक मठ स्थापन करून हस्तलिखित संस्कृत ग्रंथांचा मोठा संग्रह येथें ठेवलेला आहे. नागेश्वर व सारंगपाणी यांचीं देवालयें प्राचीन असून प्रेक्षणीय आहेत. येथें दरवर्षी होणाऱ्या ' महामघम् ' उत्सहाच्या वेळेस गंगेचें पाणी जमिनींतून महामघम् टाक्यात येतें असें म्हणतात.

शिवाचीं १२ व विष्णूचीं ४ अशीं १६ मोठीं देवळें कुंभकोणास आहेत. व्यवस्था पहाण्यास देवस्थान कमिटी आहे. येथें इंग्रजी शाळा, संस्कृत शाळा, वेदशाळा, औद्योगिक शाळा व कॉलेज या शिक्षणसंस्था आहेत. दोन नियतकालिकें निघतात.

तांबें, पितळ, शिसें यांचीं भांडीं, रेशमी व सुती कापड, त्याप्रमाणेंच साखर, नीळ व मातीचीं भांडीं वगैरे जिन्नस येथे तयार होतात. पैकीं धातुकाम जास्त प्रसिद्ध आहे.

कुंभराणा—हा मेवाडचा महाराणा होय. याच्या बापाचें नांव मोकलसिं (मुकुलसिंह). त्याचा खून कुंभाच्या सावत्रभावांनीं (लेकवळे) केला. त्याचा सूड यानें प्रथम घेतला. आणि त्यानंतर (१४१९) हा गादीवर बसला. त्यावेळीं भावांत भांडणें वगैरे कांहीं झालीं नाहींत. याचा व मारवाडच्या राजाचा स्नेह होता यावेळीं मेवाडचा भाग्यसूर्य माध्यान्हीं तळपत होता. त्याचे बहुतेक सारे शत्रू नामोहरम झाले होते; अल्लाउद्दिनानें केलेल्या लुटारूपणास शंभरावर वर्षें होऊन गेलीं होतीं; चितुरानें पुन्हां आपलें वैभव धारण केलें होतें; तेथें जोहार केलेल्या कुळांत नवीन वीर पुन्हा उत्पन्न झाले होते. हमीरची धडाडी, लाखाची कलाप्रियता व मुत्सद्दीपणा हे गुण अंगीं असल्यामुळें प्रत्येक कार्यांत यश आलेल्या कुंभाचें शेंदरी निशाण सर्व राजपुतान्यात नाचूं लागलें. दिल्लीच्या सुभेदारांनीं बंडें उभारून ते स्वतंत्र झाले होते. त्यापैकीं माळवा व गुजराथचे शहा हे त्यावेळीं प्रबळ झाले. त्या दोघांनीं एकजुटीनें कुंभावर (१४४०) स्वारी केली. तेव्हां माळव्यात उतरून कुंभानें एक लाख घोडदळ व पायदळ आणि चौदाशें गजदळासह त्याचा पुरा पराभव केला व माळव्याच्या खिलजी शहास कैद करून चितोडास पाठविलें. परंतु पुढें सहा महिन्यांनीं कांहीं एक खंडणी न घेता मोठ्या औदार्यानें त्यानें त्याला सोडलें. याबद्दल अबुलफझल यानें त्याची स्तुति गायली आहे. कुंभानेंच चितोडचा जयस्तंभ (वरील प्रसंगानंतर अकरा वर्षांनीं) बांधला. त्यास पुरा होण्यास दहा वर्षें लागलीं. या खांबावर कुंभाच्या जयाबद्दलचे लेख कोरलेले आहेत. यानंतर दिल्लीच्या घोर बादशहाविरुद्ध माळव्याच्या सुलतानानें कुंभास मदत केली आणि दोघांनीं मिळून दिल्लीकराचा झूंझून येथें मोठा पराभव केला. मेवाडातील ८४ किल्ल्यांपैकीं एकट्या कुंभानें ३२ किल्ले बांधले आहेत. त्यांपैकीं चितोडच्या खालोखाल कुंभोमेर (कोमल-कुमळ मीर) चा किल्ला मजबूत आहे. कुंभानें मुसलमानांपासून नागोर काबीज केलें. अबूच्या शिखरावर त्यानें बांधलेल्या एका किल्ल्यात कुंभाची एक तांब्याची मूर्ति असून तिची पूजा नेहमीं होत असते; इतकी त्याच्याबद्दल लोकांत भक्ति होती. मारवाड मेवाडच्या सरहद्दीवरहि यानें किल्ले बांधले. अबूवरील कुंभोशाम व सद्री घाटातील ऋषभदेव हीं दोन मंदिरेंहि त्यानें बांधलीं. हीं अत्यंत कुसरीचीं कामें असून यातील दुसऱ्यास आठ लाख रु. खर्च आला. यात जैनधर्मीय प्रसिद्ध पुरुषाच्या मूर्ती आहेत. कुंभ हा कवि होता. यानें गीतगोविंदावर एक टीका केली आहे. याची बायको मैर्त येथील राहटोर घराण्यांतील प्रख्यात मीराबाई होय. ती सुंदर, दयाळू, भक्तिमान व कृष्णभक्त होती. तिनें भक्तिरसपर पुष्कळ कविता केलेल्या आहेत. कुंभानें झालवाडाच्या राजकन्येस राक्षसविधीनें पळवून नेऊन तिच्याशीं लग्न केलें. तेव्हा तिच्या पूर्वीच्या वाग्दत्त वरानें (मंदोरचा राठोड) त्याच्यावर स्वारी केली परंतु तींत त्यांचा पराभव झाला. कुंभानें जवळजवळ ५० वर्षें राज्य केलें व प्रजेस सर्व तऱ्हेनें सुख दिलें. त्यानें आपले सारे शत्रू नामोहरम केले. देशात किल्ले बांधून त्याला सुरक्षितपणा आणला व मंदिरे बांधून सुशोभितपणा आणला. अखेरीस आपल्या राज्यारोहणाचा पन्नासावा समारंभ करीत असतां त्याच्या उदयसिंह नांवाच्या मुलानेंच खंजीर खुपसून त्याचा अंत केला (१४६९). या उदयसिंहाला पुढें ' हत्यारा ' असें जोडनांव पडलें. मीराबाईच्या भक्तियोगाच्या आड कुंभराणा येत असे. एकदां त्यानें तिला विष दिलें (व तें तिच्या ठाकूरजीच्या अंगीं भिनलें) वगैरे दंतकथा

प्रचलित आहेत. परंतु त्या खऱ्या नसाव्यात. [टॉड; मु. रि.].

कुंभळगड—राजपुतान्यांत उदेपूर संस्थानाच्या पश्चिम सीमेवरील एक किल्ला. हा उदेपूर शहरापासून ४० मैल दूर असून समुद्रसपाटीपासून ३५६८ फूट उंच आहे. मारवाड व अरवली पर्वताचा देखावा या किल्ल्यावरून फार मनोहर दिसतो. किल्ल्याच्या सभोंवती तट असून आंत कित्येक घुमटांचीं घरें आहेत. पैकीं 'बादलमहाल' नांवाची इमारत सर्वांत उंच आहे. इ. सन १४४३त राणा कुंभ यानें हा किल्ला बांधला व त्याचेंच नांव किल्ल्यास देण्यांत आलें आहे. १५७६ साली अकबराचा सरदार शाबासखान यानें कुंभळगड किल्ला सर केला असें म्हणतात. मराठ्यांच्या धामधुमीच्या वेळीं कुंभळगडच्या सशस्त्र गोसाव्यांनीं बंड केलें. परंतु राजपुतान्यातील कॅप्टन टॉड नावाच्या रेसिडेंटनें तें मोडून हा किल्ला महाराण्याच्या स्वाधीन केला.

कुंभा—या झाडास लॅटिन कारिया अरबोरिया; संस्कृत कुंभी, कभुदिका; गुजराथी कायफळ अशीं नांवें असून मराठींत या झाडाच्या सालीस कायफळ म्हणतात व झाडास कुंभा किंवा बायकुंभा म्हणतात.

हें एक मोठें व जलद वाढणारें झाड असून तें यमुनेच्या पूर्वेस बंगाल, ब्रह्मदेश, मध्यहिंदुस्थान, दक्षिण व पश्चिम हिंदुस्थान व सिलोनमधील दमट भागांतून आढळतें. सुमारें ५००० फूट उंचीपर्यंतच्या प्रदेशात हें आढळतें. या झाडाचा विस्तार मोठा असून तोड्याच्या बंदुकीचे दस्ते बनविण्यास याचें लांकूड फार उपयोगी पडतें. त्याचीं पानें हिवाळ्यांत तांबडीं होतात. या झाडांपासून गोंद निघतो व सालींच्या तंतूपासून दोऱ्या व तरटें करतात. कातडी कमाविण्यांत व एक प्रकारचा रंग तयार करण्यांत सालीचा उपयोग होतो. स्तंभक औषध म्हणूनहि सालीचा उपयोग करितात.

या झाडाचीं फुलें बाळंतपणानंतर बायकांनां शक्तिवर्धक म्हणून खावयास देतात. या फुलांचे बाह्यकोश बाजारात खोकल्यावर व सर्दीवर औषध म्हणून विकतात.

याचें लाकूड फार टिकाऊ व मजबूत असल्यामुळें इमारती करतां व शेतीचीं आउतें करण्यात त्याचा उपयोग करितात. पाण्यांत हें लांकूड कुजत नाहीं. चाकाच्या आसांकरतां तें फार उपयोगी पडतें. गंजम जिल्ह्यातील विशेष सोंवळे लोक याच्या सालींचीं वस्त्रें नेसतात. रानटी डुकरांना या साली फार आवडतात व त्यांना पकडण्याकरतां पारधी या सालींचा उपयोग करितात.

औ ष धी उ प यो ग.—खोकल्यावर कुंभ्याच्या सालीचा रस व मध एकत्र करून ७ दिवस देतात. व्रणाच्या शुद्धीकरतां कुंभ्याच्या सालीचा काढा करून त्यांत तो व्रण धुतात. दंतरोगांवर कुंभ्याच्या सालीचा काढा करून त्याच्या गुळण्या कराव्या म्हणजे दंतशूळ दूर होऊन शांत मजबूत होतात असें ह्मणतात[वॅट; वनौषधिगुणा.].

कुंभार—मातीचीं भांडीं घडविणारी ही धंदेवाईक जात हिंदुस्थानांतलि सर्व प्रांतांतून व संस्थानांतून आढळते. इ. स. १९११ च्या खानेसुमारींत याची एकंदर संख्या ३४,२४,८१५ भरली. सर्वांत जास्त संयुक्तप्रांतात (७,२६,३६१), त्याखालीं पंजाबात,त्याच्या खालोखाल बिहार–ओरिसामध्यें,त्याहून कमी राजपुतान्यांत (३,०९,२३४) अशी ती उतरत गेलेली संख्या दृष्टीस पडते. कुंभारांत सर्व धर्मांचे लोक सांपडतात. सुमारें ३० लाख हिंदू व ४लाख मुसलमान कुंभार आहेत व २५००० पर्यंत शीख असून जैन सारे दहा वीस सांपडतील.

संस्कृत कुंभकार शब्दावरुन कुंभार, कोंहार व कोनहार असे शब्द बनले आहेत. मातीचीं भांडीं करणाऱ्या या जातीच्या कुळासंबंधीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत. ब्रह्मवैवर्तपुराणांत त्याची उत्पत्ति वैश्य स्त्री व ब्राह्मणपिता यांपासून झाली आहे असें लिहिलें आहे. पराशरसंहितेवरून मालकार (माळी) पुरुष व चमार (चांभार) स्त्री यांकडे त्यांचे जनकत्व जातें. कुंभारांची उत्पत्ति. तेली स्त्री व पट्टिकार (विणकर)यांच्यापासून झालेली आहे असें पराशरपद्धति सांगते मॉनियर विल्यम्सच्या संस्कृत कोशावरून पाहता ब्राह्मण व क्षत्रिय स्त्री हेच या जातीचे उत्पादक मांडलेले दिसतात. प्रचलित असलेल्या अनेक दंतकथा सोडून दिल्या तरी ऋग्वेदात मातीच्या भांड्यांचा उल्लेख आहे त्यावरून कुंभारांचा धंदा अत्यंत प्राचीन काळींहि होता एवढी गोष्ट सिद्ध आहे. महाराष्ट्रांतील कुंभार अनेक प्राचीन राष्ट्रांतून आले आणि त्यांचे पूर्वीचें राष्ट्रीय पृथक्त्व हल्लीं भिन्नपोटजाती या स्वरूपात आहे. यांची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या सुमारें २ लाख ४० हजार आहे. यांच्यांत पुढील २३ कुळया आहेत. अहीर किंवा लहानचाके, बळदे, भांडु, चागभैस, गरेते, गुजर, गोरेमराठे, हातघडे, किंवा भोंडे किंवा भोंडकर, हातोडे, कडु, कन्नड, कर्नाटक अथवा पंचम किंवा लिंगायत, खंभाटी, कोंकणी, लाड किंवा थोरचाके, लाडभुजे, माळवी, मराठा किंवा घाटी, परदेशी, रजपूत, सोरठिआ, वरिआ आणि वाटलिआ. हे मराठा, कोंकणी, गुजराथी, व परदेशी या चार प्रकारांत समावतात. २३ कुळांत आपापसांत रोटीबेटीव्यवहार मुळींच होत नाहीं काहींचीं नावें कोंकणी, खंबाटी इत्यादि प्रांतांवरून पडलीं आहेत. परदेशी, रजपूत व माळवी हे त्या त्या प्रांतातून इकडे आले आहेत. लहान चाकावर काम करणारे म्हणून अहीर कुंभाराना (अहीर हे मोठ्या अहीर जातींतील होत) लहानचाके म्हणतात. हातानें जे काम करितात (चाकानें नव्हे) ते हातघडे होत. दक्षिण गुजराथचे (लाट देशचे) ते लाड. हे थोर (मोठया) चाकावर काम करतात. पंचम हे गळयात लिंग बाळगतात व लिंगायतपंथी आहेत; हे बहुधा कर्नाटकी असतात. वाटलिआ हे ब्राह्मण बाप व कुंभार आई या जोडप्यापासून उत्पन्न झाले असें म्हणतात. कडिया म्हणजे गवंडीकाम करणारे. मराठा कुंभार हे बहुतेक साऱ्या

दख्खनमध्यें पसरलेले आहेत. कोंकणी हे कोंकण व कानडा, लिंगायत हे सोलापूर, धारवाड व बेळगांव येथें; खानदेशांत अहीर व लाड; कानड्यांत कन्नड व परदेशी हे पुणें, नाशिक, सोलापुर आणि बेळगांव येथें; भाडु हे कोल्हापूर—पन्हाळा व बाकीचे गुजर, कडिया वगैरे जाती गुजराथ व कोंकणांत आढळतात. यांचा मुख्य धंदा म्हणजे कौलें, विटा, मडकीं व प्राण्यांचीं चित्रें वगैरे करणें हा होय. कानडा जिल्ह्यांत मातीच्या देवांच्या मूर्ती हे लोक करितात. पुण्याकडे हे लहान मुलांचीं मातीचीं खेळणी बनवितात अहमदाबाद—पाटण येथील मडकीं, लाखलोटे फार सुरेख, चकचकीत, नकशीदार व निरनिराळ्या नमुन्याचे असतात. कुंभार हा एक बारा बलुत्यापैकीं असून तो ग्रामसंस्थेस मडकीं वगैरे पुरवितो व ह्याबद्दल त्याला इनाम जमीन असते, अगर कापणीच्या वेळी धान्य मिळतें. हल्लीं याचे उपाध्याय ब्राह्मण आहेत. पूर्वी कोंकणी व कानडी कुंभार उपाध्याय होते व अद्यापिहि कांहीं ठिकाणी आहेत. कांहीं स्थानिक देवतांचे हे पूजारी आहेत. अस्पृश्याशिवाय बाकीच्या साऱ्या शूद्रांचें अंत्येष्टिकर्म कानडी कुंभार करितात, त्यास कुंभारक्रिया म्हणतात.

हिंदुस्थानात पुढीलप्रमाणें निरनिराळ्या प्रांतातून कुंभार आढळतातः—

पं जा ब.—येथील कुंभार हिंदु, शीख व मुसुलमान आहेत. ते पंजाबात सर्वत्र आढळतात व विटा तयार करणें वगैरे कुंभाराचीं कामें करितात. पश्चिम व मध्यपंजाबात ज्या ठिकाणीं जमिनीला पाणी मुबलक आहे त्या ठिकाणीं रहाटाकरिता हे मातीचीं भांडीं पुरवितात व म्हणून तेथें शेतकी कामाकरितां यांची फार जरूरी आहे.

सं यु क्त प्रां त.—येथें त्यांच्या अनेक पोटजातींपैकीं बर्डिया व बर्धिया या मुख्य जाती आहेत. चाकबैस, गधेरे, गोला, कनौजिया, कासगर, महार व माथुरीय या पोटजाती प्रसिद्ध आहेत.याशिवाय, सौरिह, चुरिह, अधारिह, हातेलिया चौहुनियमिश्र, परोडिय, पहारिय, दक्षिणाह, चमारिय इत्यादि पोटजाती आहेतच. अशा तऱ्हेचे हिंदूंचे व मुसुलमानाचे पोटवर्ग सपाटून आढळून येतात.

आपआपल्या वर्गातच लग्नें करण्याची त्यांची चाल असून ते एकपत्नीव्रतावर जोर देतात. कांहीं अटीवर विधवाविवाहास मोकळीक असून दोळा, सगाई वगैरे लग्नविधी पाळण्यांत येतात. पाचोनपीर, भवानी व हर्दिया वगैरे त्याच्या देवता असून त्यांस निरनिराळ्या महिन्यांत प्रसाद पुष्पें अर्पण करण्यांत येऊन अजापुत्रांचे बलीहि देण्यांत येतात. लग्नकार्यांत व मुहूर्त पाहाण्यास ब्राह्मणांनां बोलावण्यांत येतें. पितृपक्ष व पिंडदान वगैरे त्यांच्यांत करण्याची चाल आहे. चक्र हें श्रीकृष्णाचें व प्रजापतीचें निदर्शक असून उत्पत्तीचें तें एक चिन्हच होय असें श्रद्धेनें मानण्यांत येतें. कोपाभगत् नांवाच्या साधूला ते मान देतात व सीतळा, समाई वगैरे देवताना भजतात.

खेडेगांवांतील कुंभार मडकीं देऊन धान्य वगैरे मोबदला घेतात. गाढवें पाळून ते सामानाची नेआण करितात. त्यांचा सामाजिक दर्जा चांभाराच्या वरचा व लोहारांच्या खालचा असा असतो. पावसाळ्यांत काम नसल्यामुळें ते शेती वगैरे इतर किरकोळ धंदेहि करतात. कांहीं कुंभार भांडीं करण्यांत मोठे कसबी असतात. बकऱ्याचें मांस व मासे हे लोक खातात. कुंभार हे मोठे उद्योगी व शांतताप्रिय असल्यानें कोर्टाची पायरी ते क्वचितच चढतात.

आ सा म.—येथें याजातीची लो. सं. (१९११) २७,९१३ आहे. या लोकाचा धंदा बहुधा कुंभारकामाचा असून बंगालमधील या जातीचे लोक नवशा लोकापैकीं आहेत. सिलहट व कामरूप येथें ह्याची वस्ती दाट असून तेथील त्यांची लोकसंख्या अनुक्रमें १२,१४६ व ७४४१ होती. ब्रह्मपुत्रा खिंडींत मातीचीं भांडीं करणाऱ्या कलिता जातीच्या लोकानाच कुम्हार म्हणत असावेत असें गेट साहेबांचें मत आहे.

म ध्य प्रां त.—यांच्यात निरनिराळ्या उपजातींचीं नावे स्थानावरून पडलीं आहेत. यांच्यातील कांहीं जाती केवळ धंद्यावरूनच झाल्या आहेत जसें:—कोणी केवळ हातानेंच मडकें करणारांची हातघडिया जात. पांढरी किंवा लाल मडकीं करणाराची गोरिया जात व चाकावर भांडीं करणारांची चक्रे जात असे ते भेद झाले आहेत. लुटकिया व रखोटिया हे गोलक वर्ग आहेत. मुलींचीं लग्नें लहानपणींच करतात. चादा येथें ऋतु प्राप्त झाल्यावर लग्नें करतात. लग्नें ब्राह्मणांकडूनच करवितात. पण बेतूलात वधूच्या आतेचा नवरा लग्न लावतो. लग्न झाल्यावर वधूवराच्या हातात कणकीचे गोळे देतात व ते एकमेकास हिसकण्यास सांगतात.

कुंभारांत घटस्फोट व पुनर्विवाह होतात. कुमारिकेनें स्वजातीयाबरोबर व्यभिचार केला तर सवा रुपया दंड, ५ केस तोडण्याची शिक्षा आणि जातीस जेवण घालतात.

हे लोक गाढवें पाळतात म्हणून नीच समजले जातात. पण बंगाल्यात याची इतकी नीच स्थिति नाहीं. सागर जिल्ह्यांत लग्नाच्या वेळीं वधू कुंभाराकडे जाते व कुंभारीण तिला चाकावर बसवून सात वेळ फिरविते आणि सात नवी भांडीं देते. या भांड्यांचा विवाहांत उपयोग करतात. उत्तर संस्काराच्या वेळीं कुंभारानें १३ मडकीं स्मशानात आणलीं पाहिजेत. यांच्यांपैकीं कांहीं जाती डुकर पाळतात व त्यामुळें ते फार अपवित्र समजले जातात.

म रा ठा कुं भा र.—हे दिसण्यांत मराठा कुणब्यांप्रमाणें असून तसाच पोषाख करितात; यांची भाषा मराठी. बेकायदेशीर संततीला ते कडू असें म्हणतात. यांच्यांत बरेचसे कडू आहेत. यांच्यांत पुढील आडनांवें आहेत. अढाव, भालेराव, बुद्धिवान, चौगुले, दळवे, देशमूख, देवत्रासे, दिवटे, गाढवे, गाईकवाड, जाधव, जगदळे, जोधळे, जोरवेकर, काळे, कापडे, लोणकर, मानमोडे, म्हेत्रे, पवार, रोकडे, सासवडकर,

शिरसाट, शिंदे, सोनवणे, वागचौरे, वागुळे, वाघमारे इ. यांचीं देवकें प्रांतवारीनें पुढीलप्रमाणें आहेतः —

पुणें जिल्हाः—मर्यादवेल, कुंभाराचें थापटणें किंवा फळ, कुदळ. सातारा जिल्हाः-आंबा, जांभूळ, वड. सोलापूर जिल्हाः-थापटणें, पाचपालवी. नगर, खानदेश व नाशिक हे जिल्हेः-पांचपालवी. पांचपालवी पूर्वी यांचें एकच देवक असे. परंतु ही जात जशी सुधारत गेली व एकच आडनांवाची सोयरीक जसजशी बंद होत गेली तसतशी ही पाचपालवीची रीत पडली. अहीर कुंभारात प्रत्येक कुटुंबाचें देवक स्वतंत्र असतें. उदा० हिवरकरांचें हिवराचें झाड; मोन्यांचें मोराचें पीस व वाघांचे अंजनाचें झाड होय. एकाच देवकवाल्यात सोयरीक होऊं शकते. परंतु एकाच आडनाववाल्यांत होत नाहीं. मुलांचें लग्न ५ ते २० व मुलींचं ५ ते १२ वर्षांच्या आंत करितात. पाटाची चाल आहे. विधवेला आतेभाऊ, मावसभाऊ व मामेभावाशीं पाट लाविता येत नाहीं. प्रथमवराला विधवेशीं पाट लावावयाचा असेल तर प्रथम रुईशीं लग्न लावावें लागतें. यांचीं कुलदेवतें, शिगणापुरचा महादेव, सातारा किल्ल्यांतील जगदंबा, सोनारीचा भैरोबा, तुळजापुरची देवी व जेजुरीचा खंडोबा हीं आहेत. सोलापूर जिल्ह्यांतील कुंभार आपलीं प्रेतें लिंगायत पंथाच्या धर्तीवर पुरतात. यांचे बाकीचे (जन्म—लग्न—और्ध्वदेहिकादि) संस्कार मराठा कुणब्यांप्रमाणेंच असतात. हे मद्यमांससेवक असून कोष्टी, धनगर, न्हावी, कोळी, मराठे व कुणबी याच्या हातचें खातात व हे वरील लोकहि या मराठा कुंभाराच्या हातचें जेवतात असें म्हणतात.

को क णी कुं भा र.—हे आपणास मूळचे मराठे म्हणवितात. यांच्यापैकीं पुष्कळजण पूर्वी ग्रामदेवतांचे पुजारी असत. अशीं देवळें (हल्लीं हि) कारवार जिल्ह्यांतील असनोटी गांवचे रामनाथाचें व दुसरें कद्रिनबिर गावांतील हीं होत ठाणें जिल्ह्यात खालच्या वर्गात कुंभारांना देवर्पीचा व चेटक्याचा मान आहे. तसेंच एखादा कुणबी आपल्या नातलगापासून दूरच्या गांवीं मेला असेल तर त्याची और्ध्वदेहिक क्रिया हा कुंभार करतो. हा वैद्यकीचाहि धंदा करतो. या लोकांची आबा, उंबर, जांभूळ, (ठाणें जिल्हा), कळंब, कोच, वारुळाची माती, मोराचीं पिसें (रत्नागिरी जिल्हा) हीं देवकें आहेत. याच्यांत अष्टीकर, कल्याणकर व निगवेकर हीं आडनांवें आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांत एकाच गांवीं राहणाऱ्या कुंभाराचा एक एक गट मानतात. त्यांच्या परस्परात सोयरीक होत नाहीं. सख्ख्या बहिणी सवतीसवती होऊं शकतात. ठाणें जिल्ह्यांत घटस्फोटाची चाल नाहीं; इतरीकडे आहे. मात्र घटस्फोट झालेल्या स्त्रियास पहिल्या घरचा नवरा जिवंत असेपर्यंत पाट लावितां येत नाहीं. व्यभिचारास जातिबहिष्कृत ही शिक्षा आहे. जातीचा मुख्य असेल त्याच्या परवानगीशिवाय पाट लाविता येत नाहीं. दरएक पाटामागें भावी नवऱ्याकडून सात रुपये कर वसूल करतात. गांवाबाहेर आंब्याच्या झाडाखालीं रात्रीं पाट लागतो. विधवा स्नान करून व पांढरें पातळ नेसून उपाध्यायाच्या मदतीनें गणपति व वरुण यांची पूजा करीते; नंतर एका पांढऱ्या कापडाच्या दुपट्टयानीं तिचा पाट लावितात. नंतर ती तो दुपट्टा भावी नवऱ्यास देते व नवरा तो आपल्या पागोटयाभोंवती गुंडाळतो. पुढें ती त्याच्या कपाळास कुंकू लावते व त्याला ओवाळते. नंतर उपाध्याय दोघाच्या पदरास गांठ देतो. याप्रमाणें हा विधि येथें संपतो. हा ठाण्याकडील विधि झाला. रत्नागिरीकडे निराळी चाल आहे. प्रथम भावी नवऱ्यानें पाठविलेली साडीचोळी नेसून व बांगड्या लेऊन विधवा तयार होते. नंतर तिच्या मेलेल्या नवऱ्याच्या घरीं तिचा भावी नवरा १०ते१२ रुपये पाठवितो. व मग तिच्या मेलेल्या नवऱ्याची भूतबाधा तिला होऊं नये म्हणून तिच्या तोंडावरून एक कोंबडा ओवाळतो, व मग तीं दोघे शेजारी बसतात. नंतर दुसरी एक विधवा त्या विधवा नवरीच्या कपाळीं व नवरदेवाच्या गुडघ्याला कुंकू लाविते म्हणजे हा विधी संपतो. यांच्या सुतकानंतरच्या ११ व १२ व्या दिवशींच्या क्रियामध्यें ठाणें व रत्नागिरी जिल्ह्यांतील रीतींत फरक आहे. या क्रियेला डाकक्रिया म्हणतात. डाक म्हणजे एक ढोलासारखें वाद्य. ठाण्याकडे पुढील रीत आहे:—एका खुंटीस एक फुलाचा हार टांगतात, त्याच्या खालीं पाण्यानें भरलेली व तोंडावर नारळ ठेवलेली एक तांब्याची घागर ठेवतात. तिच्या शेजारीं कापसाच्या झाडाच्या काठ्या(पळहकाठया)ची एक लहान तिरडी करून तीवर मेलेल्या माणसाची एक कणिकेची प्रतिमा ठेवतात. नंतर दुसरा एक कुंभार जवळ बसून तें डाकवाद्य वाजवून गणपति व इतर साधुसंतांचें भजन करतो. नंतर तिरडी नेऊन नदींत बुडवितात. रत्नागिरी जिल्ह्यात पुढील रीत आढळतेः— तिकडे हा विधि बाराव्या रात्रीं होतो. ज्याच्या घरीं मर्तिक झालें असेल त्याच्या घरी सहा सात कुंभार जमतात. माजघरात गाईच्या शेणानें जागा सारवून, तेथें एक केळीचें पान मांडतात. त्यावर तांदूळ पसरून वर पाण्याची घागर ठेवतात. तिच्या तोंडात आंब्याचीं पानें व त्यावर नारळ ठेऊन त्यावर फुलाची माळ लोंबती बांधतात. घागरीशेजारीं तेरा विड्याचीं पानें व १३ सुपाऱ्या मांडतात. शेजारीं दुसरे एक केळीचें पान मांडून त्याच्यावर पंडु, गणपति, नारायणस्वामी (दोन प्रतिमा), हरिण, वैतरणा (गाय), मोर, गरुड, फूल, चंद्रसूर्य, नाग, इत्यादि कणिकेचे केलेले लहान पुतळे ठेवितात. या प्रतिमांच्या चाऱ्ही दिशाना कणकीचे चार दिवे लावितात. नंतर जमलेल्यापैकीं एक कुंभार त्या घागरीची व प्रतिमांची पूजा करून कांहीं मंत्र म्हणतो. त्याला पंडुक्रिया असें म्हणतात. हे आटोपल्यावर मेलेल्याचा मुलगा किंवा क्रिया करणारा हा तेथें जवळच ठेवलेल्या मेलेल्या माणसाच्या कणिकेच्या प्रतिमेच्या तोंडांत पाणी सोडतो व ती प्रतिमा वैतरणा

पुतळयाच्या शेपटीकडे सरविकतो. त्यावेळीं तो तोंडानें वैतरण नांवाचें गाणें म्हणतो व दुसरीकडे डाक वाद्य वाजविलें जातें. ही वैतरणा (गाय) त्या मेलेल्या माणसाला स्वर्गांत नेते असा याचा अर्थ आहे. यानंतर त्या सर्व प्रतिमा नदींत किंवा समुद्रांत विसर्जन करतात. कोंकणी कुंभारांचे उपाध्याय ब्राह्मण असतात कुणबी, न्हावी, आगरी, ठाकूर व कोळी वगैरे लोकें यांच्या हातचें खातात.

क न ड कुं भा र.—हे कानडा जिल्ह्यांत मुख्यतः आहेत याची राहणी व आचारविचार बहुतेक कोंकणी कुंभाराप्रमाणें आहेत. अम्मा (माता) व जतग किंवा जत्तिग (एक मल्ल) यांची हे फार करून पूजा करतात. यांच्या कुलदेवता कुमठे येथील दुर्गा व हळदीपूरची देवी या होत. याचे उपाध्याय हविक ब्राह्मण असतात. हे मद्य पीत नाहींत; मांसाशन मात्र करतात.

गु ज रा थी कुं भा र.—याना घडघडे, ओझा किंवा प्रजापति असेंहि म्हणतात. हे आपल्याला दक्षप्रजापतीचे वंशज म्हणवितात. कांहींजण स्वतःस क्षत्रिय समजात. हे तिकडील कणब्यासारखे दिसतात. यांच्यांत यादव, चुडासमा, चोहान, भट्टी, राठोड वगैरे रजपुतासारख्या कुळया आहेत, यांच्यापैकीं सोराठिया कुळींत धाकटया दिराशीं पाट लावितात. यांच्यात नवरदेव लग्नाच्या वेळीं कटयार किंवा खंजीर हातांत घेतो. हे बहुतेक सारे वैष्णवपंथी आहेत. यांच्यापैकीं कांहीं कुळींत अकालीं मेलेल्या माणसाची पिंपळाच्या लाकडाची प्रतिमा करून घरांत एका कोनाड्यांत ठेवितात. त्याला सुरधन म्हणतात. सोराठिया यांच्यात लाकडाऐवजी एक खंबी नावाचा दगड ठेवितात.

प र दे शी कुं भा र.—याना गवंडी असें दुसरें नाव आहे. याच्यापैकीं पुष्कळजण गवंडी काम करितात. हे पुणें, सातारा व नगर जिल्ह्यांत बरेच आहेत. हे उत्तरेकडून २० वर्षांपूर्वी इकडे आले. हे घरात हिंदी भाषा बोलतात व उपाध्याय उत्तर हिंदुस्थानी ब्राह्मण नेमतात यांच्यांत वलदे गरे वगैरे चार पोटभेद असून वसनीवाल, वलवाल, जलिंद्रे करोळे पिपुडे इ. ११ आडनांवे आहेत. प्रत्येक कुळाची निरनिराळी कुलदेवता असून तिला धीरदी असें म्हणतात. हीच धीरदी त्यांचे देवकहि असते. शेंदरानें माखलेला मातीचा नाग, बेलफळ, नारळ, सुपारा, वगैरे या धीरदी होत. या देवात ठेऊन त्यांची पूजा करितात. दरवर्षी दसऱ्यास व लग्नकार्यांत या बदलतात. मुलींचें लग्न १६ वर्षांच्या आत करितात. कुमारीनें जातींतील माणशाशीं जारकर्म केल्यास दंड किंवा जातीस जेवण दिलें व त्या व्यभिचारी माणसानें त्या कुमारीशींच लग्न लाविलें कीं, तिची शुद्धि होते. बहुपत्नीत्वाची चाल याच्यात आहे. लग्नापूर्वी गावांतील १५सवाष्णी गावाबाहेर जाऊन उकिरड्याची पूजा करून त्यातील माती आणतात. व मग लग्नमंडप घालतात आणि त्यात ती माती मंडपांत फेंकतात. माडवाच्या मुहूर्तमेढीस गुरु असें म्हणतात. मांडवाला लांकडी पांच चिमण्या बांधतात. यांचीं लग्नें रात्रींच होतात. वर हा वधूच्या मांडवांत गेल्यावर व सासूनें त्याला ओंवाळल्यावर, तो त्या लांकडी चिमण्यांना काठीनें मारतो. मग होम करतात आणि त्याभोंवतीं वधूवर प्रदक्षिणा घालतात म्हणजे लग्न आटोपलें. यांच्यांत घटस्फोटाची चाल नाहीं. [एन्थॉवेन—ट्राइब्ज अँड कास्टस ऑफ बाँबे व्हा. २] महाराष्ट्रांतील परदेशी कुंभार आपणांस कुमावत क्षत्रिय म्हणवितात. रजपूत चव्हाण शाखेपैकीं राजकुमार नांवाची जी शाखा तीच पुढें कुंभार या अपभ्रष्ट नांवानें ओळखण्यात येऊं लागली असें सांगतात. किंवा मेवाडच्या कुंभ राण्याचे वंशज ते कुंभोज. कुंभोजपासून कुंभावत व नंतर कुमावत अशी कुमावत जाति नामाची व्युत्पत्ति लावण्यात येते. आपण अस्सल रजपूत असल्या विषयीं कुमावत सिद्ध करूं पाहतात (रा. नाइक यांचें ' आमची जात ' हें पुस्तक पहा. पा. ५२ ५६). कुंभापासून वंशवृद्धि होऊन आज माणसे किती होतील याचाहि हिशोब असली कल्पना मांडतांना केला नाहीं. कुमावतांतील कांहीं आडनावें व रजपूत कुलनामें सारखी आहेत. लग्नांतल्या कांहीं चालीहि रजपुती दिसतात. या ज्ञातींतील कै. जी. बी. नाईक यांनीं आपल्या ज्ञातिसंबंधानें पुढील माहिती थोडक्यांत दिली आहे. जातीची मुख्य वस्ती मेवाड व राजपुताना. मुख्य ठिकाण जयपूर व त्याच्या आसपास. या ठिकाणीं सुमारें ३५०० वस्ती आहे. जातींत ठिकठिकाणीं स्थानिक पंचायती आहेत. सर्वसामान्य अशी मुख्य पंचायत नाहीं. पंचायतीचा अध्यक्ष साधारणतः वंशपरंपरेन असतो परंतु अलीकडे कोठें कोठें निवडणुकीची प्रवृत्ति दिसत आहे. मेवाड, राजपुताना व डेक्कन वगैरे ठिकाणीं मिळून जातींतील गृहस्थांनीं सुमारें ५० देवळें बांधिलीं आहेत. त्यास खर्च अजमासें रु. १,५०,००० वर झाला असावा. वरील देवालयांची मालकी सार्वजनिक आहे. कांहीं ठिकाणीं जातीच्या ताब्यात कांहीं कांहीं घरें आहेत पण उत्पन्न म्हणण्यासारखें नाहीं. जातीचा कर लग्नावर ठरविलेला आहे व तो लग्नप्रसंगीं वसूल केला जातो. पंचायतीचे निवाडे लिहून ठेवण्याची वहिवाट नाहीं. पंचायतीचे निकाल अंमलात आणण्यासाठीं वाळींत टाकणें हेंच शासन आहे. पंचायतींतील नित्य प्रश्न म्हटले म्हणजे खाण्यापिण्यासंबंधानें, रुढिबाह्य आचरण अगर एखाद्यानें दुसऱ्याचें आमंत्रण बंद करणें, हे होत. महत्वाच्या नैमित्तिक प्रश्नांचा दाखला नाहीं. स्वजातीशिवाय अन्य वर्गाशीं अन्नोदक व्यवहाराची वहिवाट नाहीं. या जातींत पोटजाती नाहींत. जातींतील विवाहादि संस्कार राजपुतान्यांकडील गौड ब्राह्मण चालवितात. परंतु त्यांच्या अभावीं स्थानिक ब्राह्मणाकडून ही ते चालविले जातात. साधारणतः सामाजिक प्रश्न पूर्व रूढीनुरूप जातच सोडविते व धर्मसंबंधी प्रश्न ब्राह्मणाचा सल्ला घेण्यांत येतो. या जातींत मोठमोठे बांधकाम करणारे कांट्राक्टर झाले आहेत.

मद्रास इलाखा.—यांना तेलगूंत कुमार, उरियांत कुंबारो व कानडींत कुंबार म्हणतात. यांचें समाजात स्थान उच्च शूद्र म्हणून आहे. तेलगू कुम्मर प्राचीन राजांजवळ स्वयंपाकी म्हणून असत. अद्यापहि शूद्रांच्या घरांतून पुष्कळसे कुम्मर स्वयंपाकी आहेत. कुम्मरांनाच कुसवन म्हणतात. उरिया कुंबारो शुद्ध वैष्णव आहेत. याच्यातच फक्त विधवाविवाह निषिद्ध नाहीं. कुंबारांत कानडी व तेलगू असे दोन भेद आहेत. तेलगू कुंबार हे आपणाला शालिवाहनचे वंशज समजतात व गळयांत जानवें घालतात. हे मास खात नाहींत. याच्यांत शैव व वैष्णव असे दोन्ही पंथ आहेत. लिंगायत कुंबारांचे उपाध्याय जंगम असतात. म्हैसुरी कुंबारात नीलवर (रंगारी जात) ही पोटजात येते. दक्षिण कानडांतील कुंबारांत पुष्कळसे तुळुभाषा बोलतात वारसा अलियसंतान (मातृकन्यापरंपरा) पद्धतीनें जातो. तामिळी कुंभाराप्रमाणें हे लोक जानवें घालीत नाहींत. [कूक; रसेल व हिरालाल. थर्स्टन: एन्थोवेन; सेन्सस रिपोर्ट; जी. वी. नाईक—आमची जात; कुमावत—क्षत्रिय-मित्र मासिक, वगैरे].

कुंभारकाम—वेदकालापासून कुंभारकामाची माहिती आर्यांना होती हें प्रसिद्ध आहे. श्रौतप्रकरणांतील अग्निचयन विधीमध्यें निरनिराळ्या आकृतींच्या विटांच्या वेदींची वर्णनें आली आहेत. विटाप्रमाणेंच शेगड्या बोळकीं, मडकीं, माठ, परळ, वगैरे कुंभारकामें त्यावेळीं प्रचारात होतीं (ज्ञानकोश-प्र. खं. वि. दुसरा वेदविद्या, पृ. १२४–२५–२६ पहा). हिंदूच्या अनेक धार्मिक विधींत मातीच्या पात्रांची गरज लागते. मुंज, विवाह, व और्ध्वदेहिकप्रसंगीं हीं पात्रें लागतात.

असुरिय प्रमाणें बाबिलोनियातहि ६ हजार वर्षांपूर्वीच्या प्राचीन लेख कोरलेल्या विटा सापडतात.त्या मातीच्या वाळवून भाजलेल्या असून फार मजबूत व टिकाऊ आहेत. या शहराच्या जुन्या (तट, मनोरे, राजवाडे वगैरेंच्या) अवशेषात या विटाचे ढीगच्याढीग आढळतात. आसपासचे लोक आपापलीं घरें बांधण्यास या विटा आज अनेक शतकें नेत आहेत. बाबिलोनियन व असुर लोक रंगीत व मिना कामाच्या विटा करण्यात प्रख्यात होते. त्याचा उपयोग ते शोभेसाठीं करीत असत. चिनी लोक आपल्याला या असुर लोकांच्याहि पूर्वीचे वीट कामात दर्दी म्हणवितात. पण कांहींचें म्हणणें ही कला चिनी लोकांनीं हिंदुलोकांपासून घेतली असें आहे. प्रख्यात चिनी अजस्र भिंत ही भाजलेल्या व कच्च्या अशा दोन्ही विटांची बांधलेली आहे. परंतु ही अलीकडे (सुमारें खि. पू. २२०) बांधलेली आहे. इस्रायल लोकांतहि विटाचें काम प्राचीन काळीं होत होतें. मात्र ते विटा न भाजतां उन्हांत सुकवीत. यांची माती नदीच्या गाळाची असे. त्यात गवत किंवा लव्हाळे घालीत. हल्लीहि ईजिप्तमध्यें असल्या विटा पाडतात. ग्रीक लोक तीन प्रकारच्या विटा पाडीत असें प्लिनीनें म्हटलें आहे. रोमन लोक ही कला पौरस्त्यापासून शिकले; आणि त्यांनींच ती सर्व पश्चिम यूरोपमध्यें पसरविली. इंग्लंडमध्यें १५ व्या शतकांत विटा उपयोगात येऊं लागल्या. फ्ल्याडर्समधून ही कला इंग्लंडमध्यें या सुमारास आली परंतु १६६६ च्या प्रख्यात प्लेगापर्यंत विटांचीं घरें अगदींच थोडीं असत. यापुढें मात्र विटांचा उपयोग बराच होऊं लागला. तेथील सरकारनें इ. स. १७८४ मध्यें प्रत्येक हजार विटामागें ४ शि. ५ पे. चा कर बसविला होता. अमेरिकेंत पहिली विटांची इमारत १६३३ त झाली. मध्ययुगात यूरोपमध्यें मुख्यतः डच व जर्मन हेच विटा तयार करणारे होते. इटालियनानीं १५ व्या शतकात रंगीत विटा तयार केल्या.

मडकीं, विटा, कौलें वगैरे स्वस्त पदार्थांना चिकणमाती लागते. अधिक उंची भांडीं करण्यास (बरण्या, चहाचे पेले, बशा व चित्रें वगैरे) चांगल्या प्रकारची चिनी माती लागते. मूस करण्याची माती गोंडवनाच्या ज्या भागात दगडी कोळशाच्या खाणी आहेत त्या भागात सांपडते.

विटा, कौलें करण्याचे कारखाने अलीकडे यूरोपियन लोकांनीहि इकडे काढले आहेत. इ. स. १८६६ राणीगंज येथें एक कारखाना निघाला व तेथें विलायती धर्तीच्या विटा पाडूं लागले. पण थोड्याच दिवसात तो धंदा बुडाला यूरोपियन लोकांनीं या कामात आपल्यापेक्षां जास्त लक्ष घातलें आहे. न्हाणीघरांत वापरण्यांत येणाऱ्या झिलईच्या सपाट विटा व दुसऱ्या आर्द्रतारोधक निळ्या व अनेक रंगाच्या विटा या यूरोपीयन कारखान्यांत तयार होतात. मुसुलमानी अंमलात आपल्याकडेहि अशा मिन्याचें काम केलेल्या विटा तयार करीत असत, हें ठठ्ठाची मशीद, विजापूरच्या जुम्मामशिदींतील प्रसिद्ध रंगीत कमान वगैरे इमारती पाहिल्या म्हणजे समजतें. किल्ल्यांच्या व प्राचीन इमारतींच्या विटा लांब, रुंद पण कमी जाडीच्या असत. असुरिया देशांत तर या विटांवरच इतिहासलेखन करीत असत. त्या विटा खि. पू. तीन चार हजार वर्षांच्या आहेत असें म्हणतात. त्या एक हात औरस चौरस असत. डॉ. स्टीननें हिंदुस्थानांतील कांहीं जुन्या विटा (इ. स. च्या ७ व्या, ८ व्या शतकांतील) शोधून काढिल्या होत्या. दक्षिणेंत तिनवेल्ली, मदुरा व मलबार भागात डॉ. पोप याला जमीनींत थडगीं खोदताना इ. स. च्या ८ व्या शतकातील मातीचीं निरनिराळ्या प्रकारचीं भांडीं आढळलीं. अकबरानें आपल्या कारकीर्दीत कच्या, पक्क्या विटांच्या किंमती निरनिराळ्या ठरविल्या होत्या. हल्लीं गरीब लोकांचीं घरें कच्च्या विटांचीं असतात. पूर्वीं बंगाल्यात नक्षीदार विटा तयार होत असत. दिनाजपुरजवळील कंतनगड, चंद्रनगर व हुगळी येथील देवळात विटा आढळतात. लाहोरकडेहि या नकशीच्या विटा होत असत.कलकत्याकडे विटाचे कारखाने बरेच आहेत. तिकडील अकरा गांवचा कारखाना सर्व हिंदुस्थानांत मोठा

आहे असें म्हणतात. हल्लीं महाराष्ट्रांतहि बऱ्याच ठिकाणीं कारखाने काढले आहेत. बडोद्यासहि एक कारखाना आहे. विटांत साध्या, कमानींच्या, वाटोळ्या वगैरे प्रकार असतात. विटांप्रमाणेंच कौलांचाहि खप असल्यानें त्यांचे कारखाने हिंदुस्थानांत लहानमोठ्या प्रमाणावर सर्वत्र आहेत. मात्र मंगलोरकडील कौलांचे कारखाने जास्त भरभराटले आहेत. याचें कारण तिकडील माती मूळचीच चिकणी असल्यानें साध्या मातींत चिकणाई उत्पन्न करण्याला इतर भागांतील कारखान्याला जो प्रारंभींचा बुडितखर्च करावा लागतो, तो तिकडे वांचतो. त्या प्रांतांत पूर्वी यूरोपियन लोकांनीं कारखाने काढले होते. परंतु हल्लीं हिंदी भांडवलाचे व व्यवस्थेचे कांहीं कारखाने सुरू झाले आहेत. हिंदुस्थान देश साधारण उष्ण असल्यानें छपरावर घालण्यांत येणाऱ्या कौलांत पुढील गुण असले पाहिजेत. त्याच्यांत उष्णता सांचवून ठेवण्याची व ती खालीं वाहून न जाईल अशी शक्ति पाहिजे. तसेंच कौल हलकें पाहिजे व मजबूत पाहिजे. त्याचे सांधे एकमेकांत घट्ट बसले पाहिजेत म्हणजे चुकूनहि एखादी फट रहाता कामा नये, नाहींतर पावसाळ्यांत त्यांतून गळण्याचा संभव असतो. असलीं कौलें हातानें तयार केल्यास तीं परवडत नाहींत म्हणून यंत्रानें तीं पाडावीं लागतात. त्यांच्यांतहि साधीं, ढाण्याचीं, कोंपऱ्यावरचीं, खालीं उजेड व हवा जाणारीं वगैरे निरनिराळ्या आकारांचीं व आकृतींचीं कौलें असतात. पूर्वीचीं साधीं नळीच्या आकाराचीं व चापट आकारांचीं कौलें असत. अद्यापिहि खेड्यांत व शहरांत हीं कौलें बरींच प्रचारांत आहेत. मंगलोरी कौलें फार महाग पडत असल्यानें त्यांचा प्रसार सर्वत्र होत नाहीं. टिकाऊपणाच्या बाबतींत तीं साध्या कौलांपेक्षां जास्त सरस असतात. टिकाऊ सबक व हलकीं आणि एक साचाचीं कौलें करण्यास यंत्राचें साहाय्य अवश्य आहे. अद्यापिहि उत्तम कौलें, फरशीचीं कौलें व विटा यूरोपमधून इकडे येतात. इकडे राणीगंज, जबलपूर, अलीगड, बरेली, मंगलोर, ग्वालेर, बडोदें, कल्याण वगैरे ठिकाणीं विटा, कौलें व चिनीमातीचीं भांडीं, खेळणीं इत्यादि तयार करण्याचे कारखाने आहेत. या धंद्यांत कोठें कशी माती मिळते त्याचा व तिच्या गुणधर्मांचा शोध ठेवणें जरूर असतें. हूपरनें ३३ प्रकारच्या मातींची परीक्षा केली होती. मुशीची माती निर्मळ पाहिजे तिच्यांत क्षारयुक्त द्रव्य (अलकलाईन) नसावें. असल्यास ती लवकर वितळते. चिलमीची माती (पाईप क्ले) ही वाळूच्या कणाविरहित असल्यास फार चिकणी असते. अशी माती तेराणी व करई या प्रदेशांच्या दरम्यान सांपडते, असें मूर म्हणतो. मद्रासेकडील जंगलांतहि ही आढळते.

चिनीमातीचीं भांडीं वगैरेस लागणाऱ्या मातींचे तीन वर्ग आहेत. (१) चिनी (केऑलिन) माती, (२) साधी पांढरी माती किंवा झिलईचीं भांडीं करण्याची व (३) लाल माती. कौलें किंवा कुंड्या करण्याच्या चिनी मातीचा उपयोग कागदांच्या कारखान्यांत कागद तयार करितांना होतो. हिचे पांढरे किंवा पिंवळट रंगाचे गोळे बाजारांत मिळूं शकतात. फेल्स्पार नांवाच्या दगडावर हवा व पाणी यांची क्रिया होऊन ही माती तयार होते. हिच्यांत मुख्यत्वें करून अल्युमिनम सिलिकेट असतो ही हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं सांपडते.

मातीच्या ज्या भांड्यांत द्रव पदार्थ ठेवावयाचा असेल त्यानाच फक्त झिलई देण्यापासून फायदा असतो. झिलईपेक्षां लाख लावणें स्वस्त पडतें. हिंदुस्थानांतहि झिलईचीं मडकीं वगैरे फार पूर्वींपासून वापरीत असत. पेशावर, वेलोर, अर्कोटकडे प्राचीन काळचीं भांडीं सापडलीं आहेत. हा काल म्हणजे बौद्धकाल होय. उत्तरहिंदुस्थानांत कुंभार मडकीं वगैरे तयार करतो व कुझगार (हा मुसुलमान असतो) त्यावर नकशीकाम खोदतो. चिनीमातीचीं भांडीं परदेशांतून बरींच येतात. ही आयात इंग्लंड, बेल्जम, जर्मनी येथून होते त्यांत इंग्लंड शेंकडा पन्नासप्रमाणें माल पुरवितें. हिंदुस्थानांतून विटा, कौलें, भांडीं वगैरे माल थोडा फार सीलोन व स्ट्रेटसेटलमेंटमध्यें जातो. सिंध प्रांतांत ठठ्ठा व हाला येथें नकशीच्या विटा व चिनीमातीच्या वरण्या प्रख्यात आहेत. गुजराथेंत पट्टण येथें मातीचे खुजे व हुक्के होतात. दिल्ली, मुलतान येथें चिनी नकशीदार भांडीं होतात. तसेंच भांड्यांवर नाना तऱ्हेचे रंग व रोगण इकडे चांगलें चढवितात. गुजराणवाला व भावलपूर येथें कागदासारखी पातळ मडकीं तयार होतात. अजमगड येथील (वायव्यप्रांत) खुजे; लखनौच्या बशा, पेले, सुर्जा (बुलंद जिल्हा) येथील मडकीं, अलीगड, अमरोहा सहारणपुर येथील पातळ व वर्ख चढविलेलीं भांडीं हीं नांवाजण्यासारखीं आहेत. हल्लीं पुणें जिल्ह्यांत तळेगांव दाभाडें येथें पैसाफंड कांचकारखान्यानें हें काम हातीं घेतलें आहे ग्वालेर येथील काम नुकतेंच सुरू झालें आहे.

विटांच्या मजबुतीचें एक कोष्टक पुढील प्रमाणें आढळतें. हातानें तयार केलेल्या विटा दर चौरस इंचावर ०.४ ते ०.९ टन वजन ठेवल्यास फुटतात तर यंत्रानें तयार केलेल्या विटा दर चौ. इंचावर ०.७ ते १.३ टन वजन ठेवल्यास फुटतात; आणि खंगर विटा दर चौ. इंचावर २.९ ते ३.४ टन वजनानें चुरडतात. [रिपोर्ट जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया. १९०५; अकबरी; वॅट-कमर्शि. प्रॉडक्ट्स्;]

कुंभारडीं डोंगर—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा. खानापूरच्या आग्नेयीस सतरा मैलांवर असलेला एक डोंगर. डोंगरावर कानफाटा साधु हंडीभडगनाथ याचा मठ आहे.

कुंभेर—हें राजपुतान्यांतील भरतपूर संस्थानामधील एका तहसिलीचें मुख्य ठिकाण असून तें भरतपूरच्या उत्तरेस ५ कोसांवर आहे. लोकसंख्या जवळजवळ ७ हजार आहे. येथें डाक व तारहपीस, प्राथमिक शाळा, दवाखाना वगैरे संस्था आहेत. भरतपूरचा जाट राजाच येथील मालक आहे. एके

काळीं जाटांची राजधानी येथें होती. बदनसिंग नांवाच्या जाट राजानें येथें किल्ला बांधिला. याला २६ मुलें होतीं. पैकीं सुरजमल हा गादीवर असतां, त्यानें सफदरजंगास दिल्लीच्या पातशहाविरुद्ध (म्हणजे मराठयांविरुद्ध) मदत केल्यानें, त्याच्यावर श्री. रघुनाथरावदादा हे शिंदेहोळकरांसह १७५४ त चालून गेले. सुरजमल कुंभेरीस होता मराठयांनीं कुंभेरीस वेढा दिला. हें युद्ध जानेवारी ते मे पर्यंत चाललें. जाट ४० लक्ष खंडणी देण्यास तयार होता. दादासाहेब एक कोट रुपये मागत होते; तें जमलें नाहीं. परस्परें मारा होऊं लागला. रेतीचे रानामुळें सुरुंगास यत्न नाहीं. मोहरा इरेस पडला. आंतून कोणी सलयास येईना. दीड महिना आला. एके दिवशीं खंडेराव होळकर (अहल्याबाईचा नवरा व मल्हाररावाचा पुत्र) केवळ बेहोष होता. तो भोजन करून मोर्चांत निशाणापाशीं आला; तो एकाएकीं जेजलाची गोळी लागून मोर्चांत ठार झाला. " एकुलता एक मुलगा गेल्यानें मल्हाररावास दुःख होऊन त्याने प्रतिज्ञा केली कीं. "सुरजमल्लाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन नाहीतर प्राणत्याग करीन." हें ऐकून जाट घाबरला; तीन महिने झाले; सर्व सरंजाम (लढाईचा) संपला. तेव्हां जयाप्पा शिंद्याच्या मार्फत जाटानें ६० लक्ष खंडणी देऊन मराठयांशीं तह केला (१९ मे १७५४). कुंभेरचा किल्ला फार बळकट होता.त्याचा तट मातीचा असून पुढें खंदक आहे. हें गांव मूळ एका कुंभ नांवाच्या जाटानें बसविलें होतें. अहल्याबाईनें कुंभेरीच्या उत्तरेस दीडकोसावर गंगरसोली येथें खंडेरावाची छत्री बांधिली आहे [मरा. रिया. म. वि; इंपी. ग्या. पु. १६]

कुंभोज—कोल्हापूर संस्थानांतील अळतें पेटयांत कोल्हापूरच्या ईशान्येस९कोसांवर वारणाकांठीं हा गांव आहे. या गांवीं कुंभेश्वर महादेवाचें देऊळ असून, त्याच्यावरून या गावास कुंभोज नांव पडलें. येथें जैनांची वस्ती फार आहे. येथील तंबाखू फार प्रसिद्ध आहे. दरसाल पंचवीस हजाराची तंबाखू येथें पिकते. जैनाचे बाबलांचें व हिंदूंचें बनशंकरीचें अशीं दोन देवळें येथें आहेत. [कोल्हापूर ग्या.]

कुम—कुम हें याच नांवाच्या इराणांतील प्रांताचें राजधानीचें शहर हें उत्तर अक्षांश ३४°५५' यांच्यावर अनदबार नदीतीरावर ३१७० फूट उंचीवर आहे. या शहराला इमाम रेझाची बहीण फतिमा ही येथें ८१६ मध्यें मेली म्हणून हिच्या थडग्यामुळें महत्व प्राप्त झालें आहे. वर्षांतून सहा सात महिने येथें पुष्कळ यात्रेकरू येतात. कायमची लोकसंख्या २५००० व ३००००यांच्या दरम्यान आहे.१८९०-१८९३ मध्यें बांधलेल्या गाडीच्या रस्त्यानें हें शहर तेहरानशीं जोडलेलें आहे. येथें डाकघर व तारघर आहे.

कुमठा, तालुका.—मुंबई इलाख्यांतील उत्तर कानडा जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ २२४ चौ. मै. असून यांत कुमठा (तालुक्याचें ठिकाण) व गोकर्ण हीं दोन मोठीं गावें आहेत. १९११ सालीं तालुक्याची लोकसंख्या ६४४९६ होती. काळींचें उत्पन्न एक लाखावर असतें. समुद्रकिनाऱ्यालगतच्या पट्टींत तांदुळाचें पीक येतें. या तालुक्यात पाणी मुबलक व जमीन लाल रेताड आहे. कुमठ्यास नारळ, तांदुळ, सुपारी, मिर्च्यें ऊंस आणि कडधान्यें यांचे चागलें पीक होतें. दरसाल पावसाचें मान १३३ इंच असते.

गांव—मुंबई इलाख्यांत उत्तर कानडा जिल्ह्यातील कुमठा तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें कारवारपासून ४० मैल व मंगलोरपासून उत्तरेस ११३ मैल लांब आहे. येथील लो. सं. (१९११) १०,३४३ होती. येथील म्यु. क. १८६७ सालीं स्थापन झाली. पूर्वी कुमठ्यास फार व्यापारी घडामोड होत असे. परंतु रेल्वे झाल्यानें गांवचें महत्व राहिलें नाहीं. समुद्रात ६ मैलावर, एका टेकडीवर दीपगृह बांधलेलें आहे. हवा शुद्ध असून आकाश निरभ्र असलें तर १२ मैलांवरून सदरहू दिवा दिसतो. येथें सबजज्जाचें कोर्ट, दवाखाना व काहीं प्राथमिक शाळा आहेत.

कुमठा गांव पूर्वी थोडें बहुत महत्वाचें असावें. या गावाजवळ दोन वेळ टिपूची छावणी पडली होती त्या दोन्ही वेळीं हें गाव जाळण्यात आलें होतें. येथील व्यापार मुख्यत्वेंकरून कापूस, मसाले व धान्य याचा असून येथें चंदनाच्या लाकडाच्या पुष्कळ कोरींव जिनसा बनवितात.

कुमाऊन—संयुक्त प्रांताचा अगदीं उत्तरेकडील विभाग. हा बहुतेक भाग हिमालयावर असून तिबेटच्या सरहद्दीपासून तराई पर्यंत गेलेला आहे.याच्या उत्तरेस तिबेट, पूर्वेस नेपाळ, दक्षिणेस बरेली जिल्हा व रामपूर संस्थान आणि पश्चिमेस डेराडून जिल्हा व तेहरी संस्थान आहे. येथें समुद्रगुप्ताच्या वेळीं (इ. स. ३४०) कर्तृपुरचें राज्य होतें. याचें क्षेत्रफळ १३७२५ चौरस मैल असून लो. सं. १९२१ सालीं १२,९२,३९९ होती.

कुमाऊनचा कमिशनर नैनीताल येथें राहत असून उन्हाळयांत तें संयुक्त प्रांताच्या राजधानीचें ठिकाण असतें. नैनीताल, गढवाल व अल्मोरा असे या विभागात तीन जिल्हे आहेत. नैनीताल हिमालयाच्या बाहेरील उततरणीवर आहे. परंतु त्याचा बराच भाग पायथ्याच्या भावर नावाच्या रुक्ष प्रदेशात व तराईमध्यें आहे कुमाऊन प्रातांत १०४१ खेडीं असून १२ गावें आहेत, पैकीं नैनीताल, काशीपूर व अलमोरा हीं सर्वात मोठीं आहेत. काशीपूर हल्दवानी, श्रीनगर, कोट्द्वार व द्वाराहाट हीं व्यापाराचीं मुख्य ठिकाणें आहेत व बदरीनाथ व केदारनाथ हीं यात्रेचीं मुख्य ठिकाणें आहेत.

कुमार(१)-सनकादिक ब्रम्हमानसपुत्र. यांचीं वयें अजून पाचच वर्षांचीं असल्यानें त्यांस असें नांव आहे. (२) शिवपुत्र स्कंदानें लग्न केलें नाहीं म्हणून त्यासहि कुमार नाव आहे. (३)अनल वसूचा एक पुत्र कुमार नामक होता. (४) मंगल नामक ग्रहास हें नांव आढळतें.

कुमारखली—बंगाल प्रांत. नदिया जिल्हा कुष्टिया पोट विभागांतील गांव. हें गराय नदीच्या डाव्या तीरावर वसलेलें आहे. याची लो. सं. इ. स. १९११ सालीं ३७६९ होती. हें पूर्व बंगाल रेल्वेवर स्टेशन असून येथें व्यापाराची घडामोड चांगली होते. ईस्ट इ. कंपनीच्या अमदानींत कंपनीचा प्रेसिडेंट कुमारखली येथें राहत असून येथें रेशमाचा मोठा व्यापार चालत होता. त्यावेळच अवशेष म्हणजे एक स्मशानभूमि व कांहीं थडगीं हे आढळतात.

कुमारजीव—एक बौद्ध ग्रंथकार. हा चौथ्या शतकाच्या प्रारंभीं होऊन गेला. वसुबंधूचा हा समकालीन होता, असें म्हणतात. यानें इ. स. ४०४ च्या सुमारास शतशास्त्र आणि बोधिचित्तोत्पादनशास्त्र या दोन ग्रंथांचें भाषांतर केलें. मात्र दंतकथा असें म्हणते कीं, याचा भाषांतरकर्ता वसुबंधु होता; परंतु तें खरें नव्हे असें विद्वानांचें मत आहे. खुद्द वसुबंधूचेंच चरित्र कुमारजीवानें लिहिलें आहे; पण डॉ. टाकाकुसू यास तें कबूल नाहीं. चीनच्या सिन् या राजघराण्याच्या वेळीं हयात असलेल्या लु कॉंग् या सेनापतीनें कच्छ देश जिंकल्यानंतर कुमारजीवास चीनमध्यें नेलें. तिकडे कुमारजीव हा लु कॉंग् जवळ इ. स. ४०१ पर्यंत राहिला होता. त्यानें ४०२ पासून ४१२ पर्यंत बऱ्याच ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. त्यात सुखावतीव्यूह व वज्रच्छेदिका या छोटया ग्रंथांचाहि समावेश होतो. त्याचा मृत्युकाल निश्चित नाहीं; परंतु यान ती राजाच्या कारकीर्दींत सुमारें ४१५ च्या सुमारास तो मेला असावा. [बौद्ध वाङ्मय; जर्नल रॉयल ए. सो. १९०५; वॉटर्स. १; स्मिथ].

कुमारदेवी—ही लिच्छवी घराण्यांतील राजकन्या व गुप्तघराण्यांतील पहिल्या चंद्रगुप्ताची राणी. हिचें लग्न चंद्रगुप्तशीं झाल्यामुळें (३०८) तो पूर्वी जो एक साधारण जहागीदार होता, तो तिच्या प्राप्तीमुळें पुढें एक मोठा राजा बनला. हा लिच्छवीवंश बौद्ध धर्मांत पूर्ण प्रख्यात होता. त्यांनीं नेपाळांत राज्य स्थापिलें होतें (१११). चंद्रगुप्त हा मूळचा पाटलीपुत्राच्या जवळील एका लहान प्रांताचा राजा होता, या लग्नामुळें महत्वाचा राजकीय फेरफार झाला. यावेळीं लिच्छवीराज कुमारदेवीचा बाप हा पाटलीपुत्राचा अधिकारी होता हुंड्यामध्यें हें शहर चंद्रगुप्ताला मिळालें. आणि त्यामुळें पुढें तो साऱ्या मगधदेशाचा सम्राट झाला. [स्मिथ. लेव्ही—नेपाळ].

कुमारधारी—दक्षिण हिंदुस्थांनांत कुर्गच्या वायव्यभागातील एक नदी. इचा उगम सुब्रह्मण्य टेंकडीवर होऊन पश्चिमेकडे वाहत गेल्यावर दक्षिण कानडयांत ही नेत्रवती नदीला मिळते व नेत्रवतीनदी मंगलूर जवळ समुद्रास मिळते.

कुमारपाल—हा चालुक्य (साळुंखी) वंशीय अनहिलपट्टणचा राजा. प्रख्यात सिद्धराज जयसिंह यास संतति नसल्यानें त्याच्या पश्चात कन्हरदेव प्रधानाच्या मदतीनें हा गादीवर बसला. सिद्धराजाचा दत्तकपुत्र बाहड म्हणून होता, त्याला गादीवर बसविण्याची कुमाराविरुद्ध खटपट सिद्धराजाचा जावई सपादलक्ष(अजमीर)चा राजा अर्णवराज यानें केली; परंतु पुढें झालेल्या लढ ईंत अर्णवचा पराभव झाला असावा. कारण पुढें दोघांत संधि होऊन बाहड हा अर्णव राजाच्या आश्रयास गेला व कुमारपालानें आपली बहीण देवलदेवी ही अर्णवराजास दिली. कुमारपाल हा सिद्धराजाचा चुलतभाऊ जो त्रिभुवनपाल, त्याचा पुत्र होय. याचा राज्यारोहण समारंभ काल मेरुतुंगाचार्यानें शके १०६४ कार्तिक शु. १० (इ. स. ११४३) हा दिला आहे. यानें अर्णवराजाचा पहिला पराभव अबूच्या पहाडांत केला (११४३). पुन्हा एकदां या दोघांची लढाई झाली (११५०), तिचें कारण अर्णवाची राणी देवला हिला तो वाईट रीतीनें वागवी व एकदा तिच्या देखत त्यानें भापणात कुमारपालाचा अपमान केला होता, त्याबद्दल सूड म्हणून कुमारपालानें त्याच्यावर चढाई केली होती गुजराथचे इतिहासकार यापैकीं फक्त पहिलीच लढाई देतात; परंतु अलीकडे सांपडलेल्या शिलालेखावरून या दोन लढाया झाल्या असें स्पष्ट ठरतें. अबूचा परमारराजा विक्रमसिंह हा कुमारपालाचा मांडलिक असून या लढायात होता. पुढे याला राजद्रोहामुळें काढून टाकून, कुमारपालानें आपला पुतण्या यशोधवल याला अबूच्या (चंद्रावती) गादीवर बसविलें (११४६). कुमारपालानें शाकंभरीच्या राजाचा पराभव केल्यानंतर तो शालीपूर व चित्रकूट (चितोड) इकडे केला. नंतर तेथून मेवाड, मोरवन इकडे तो गेला. माळव्याचा राजा बल्लाळ याच्यावरहि त्यानें स्वारी केली होती. अर्णवराजाची मुलगी जल्हाणा ही कुमारपालाची राणी होती (?) कुमारला गादीवर बसविण्यांत अनेक जैन धर्मीयांनीं मदत केल्यामुळें पुढें त्यानें त्या धर्माला राजाश्रय देऊन आपणहि स्वतः जैनधर्मी झाला त्याचा गुरु हेमचंद्रसूरि हा होता. कुमारपालानें आपल्या प्रजेस बलात्कारानें जैनधर्मी करण्याचा प्रयत्न केला. या कृत्यामुळें राणीला फार वाईट वाटलें. त्याबद्दल पुढील एक गोष्ट ऐकण्यात येतेः—राजमहालाच्या रस्त्याकडील खिडकीस चिकाचा पडदा लावून त्याच्या आड उभी राहून ती नेहमीं पुढील अर्धा श्लोक म्हणे "किं करोमि क्व गच्छामि को वेदानुद्धरिष्यति "; याप्रमाणें क्रम चालू असतां, एके दिवशीं तिनें हा अर्धा श्लोक म्हणण्यास व जैन वेषानें शहरांत फिरणारा वेदप्रबोध नांवाचा वेदमतानुयायी विद्वान गौड ब्राह्मण तिच्या खिडकीखालीं येण्यास गांठ पडून त्यानें तो श्लोकार्ध ऐकिला. त्यावरून त्याला आनंद होऊन, त्यानें खालून पुढीलप्रमाणें तिला उत्तर दिलें " मा विषीद वरारोहे भट्टाचार्योऽस्ति भूतले". हें तिनें ऐकतांच त्याला बोलावून त्याचा सत्कार करून, राजाचें कृत्य त्यास सांगितलें. त्यावर त्यानें तिला आश्वासन देऊन तत्काळ राजसभेंत जाऊन जैनपंडितांचा

वादात पराभव करून, राजास पुन्हां वैदिक धर्मी बनविलें. कुमारपालानें आसपासच्या राजाशीं पुष्कळ युद्धप्रसंग केले. कोंकणावरहि त्यानें स्वारी केली होती. त्यानें पुष्कळ जैन मंदिरें व इमारती बांधिल्या; विद्वानांस आश्रय दिला व पुस्तकालयें स्थापिलीं. पाटण येथें हीं पुस्तकालयें अद्यापि कायम आहेत. हेमचंद्रसूरीचा व याचा काल थोड्याच दिवसाच्या अंतरानें झाला. याला याचा पुतण्या अजयपाल यानें विष घालून ठार मारिलें (११७३). याची साग्र माहिती द्व्याश्रयकाव्य व प्रबंधचिंतामणी यांत पहावयास सांपडेल. यानें प्राणिहिंसा बंद केली व मांसविक्रीहि बंद केली आणि त्यांऐवजीं नुकसानीदाखल ३ वर्षांचें उत्पन्न आगाऊ दिलें. बेवारशी माल सरकारजमा करण्याची त्याची रीत नव्हती. त्यानें केदारेश्वर व सोमनाथ या देवळांचा जीर्णोद्धार केला. यानें अनहिलपट्टण येथें पार्श्वनाथाचीं देवळें बांधलीं आणि राजधानींत कुमारपालेश्वराचें देऊळ बांधलें. अहिंसाधर्माचे नियम मोडणारास तो देहदंड करीत असे. तो विद्वान, शूर व साहसी होता.

[संदर्भग्रंथ.—द्व्याश्रय, काव्य प्रबंध चिंतामणि आर्यविद्यासुधाकर; रासमाला; जिनमंडन; अजारी, चितोड व पालरीखेड येथील शिलालेख; टॉड, भा. २; पृथ्वीराजविजय; इं. अँ. भा. ४१. स्मिथ]

कुमारराज—हा आसामचा प्राचीन राजा होय. ह्युएनत्संगच्या वेळीं कामरूप (आसाम) देशचा हा राजा होता. याला भास्करवर्मा असेंहि म्हणतात. हा हर्षाचा सहकारी मित्र होता. याच्या संबंधानें बाणकवि व ह्युएनत्संग या समकालीन लेखकांनीं लिहून ठेवलेलीं बारीकसारीक वर्णनें सुद्धां तंतोतंत जुळतात. ह्युएनत्संग म्हणतोः " येथील गादीवरचा राजा ब्राह्मण असून नारायणदेवाचा वंशज आहे याच्या वंशाकडे कामरूपचें राज्य एक हजार पिढ्यांपासून चालत आलें आहे. हा विद्येचा मोठा भोक्ता असल्यानें येथें विद्याभ्यास करण्यासाठीं लांबलांबून बुद्धिमान लोक येतात. हा स्वतः बौद्ध नाहीं परंतु विद्वान बौद्ध श्रमणांनां तो मानतो. " याच्या बापाचें नांव सुस्थितवर्मा. वर्मा या नांवावरून हा क्षत्रिय असावा असें वाटतें. परंतु तसे नसून तो ब्राह्मण होता. तत्कालीन क्षत्रियाचा धंदा स्वीकारणारे ब्राह्मण क्षत्रिय नांवें धारण करीत असें आढळून येतें. हर्षानें कर्णसुवर्ण (मुर्शिदाबाद) येथील राजा शशांक हा मेल्यानंतर तें (बंगालचें) राज्य कुमारपालाला दिलें [ढाका रिव्ह्यू १९१३; म. भा; हर्षचरित्र.]

कुमारिलभट्ट—पूर्वमीमांसा शास्त्रावरील वार्तिककार व कर्ममार्गाचा प्रवर्तक विद्वान गृहस्थ. यानें बौद्ध मतास विरोध करून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें. विद्यारण्य कृत शांकरदिग्विजयांत हा स्कंदाचा अवतार म्हणून पृथ्वीवर येऊन त्यानें सौगतांचें म्हणजे बौद्धांचें खंडन केल्यावर प्रत्यक्ष शिव शंकराचार्य या रूपानें अवतार घेईल इत्यादि वर्णन उपोद्घातांत केलें आहे. यानें बौद्धांचा पराजय करून कर्ममार्गाचें प्रवर्तन केलें. याचाच फायदा घेऊन पुढें प्रख्यात आद्य शंकराचार्यांनीं अद्वैत मताचा प्रसार केला. भट्टाच्या चरित्राची खरी माहिती फारच अल्प आहे. यांनां भट्टपाद असेंहि म्हणत. यांच्या कालाबद्दलहि एकवाक्यता नाहीं. याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु त्यांत त्यांचे स्वतःविषयीं चरित्रपर असे उल्लेख आढळत नाहींत इतकेंच नव्हे तर हे आपल्या मतविवेचनांत इतके गढून गेलेले दिसतात कीं, तत्कालीन सामाजिक,नैतिक व राजकीय परिस्थितीचा गंधहि त्यांच्या लेखांत स्पष्ट आढळून येत नाहीं. तत्कालीन शिलालेख, ताम्रपटादिकांचे आधारहि यांच्या बाबतींत सांपडत नाहींत म्हणून त्यांच्या असामान्य कामगिरीची खरी कल्पना आणून देतां येत नाहीं. याची अतिशय महत्वाची कामगिरी म्हणजे, बौद्ध मताचा पाडाव व वैदिक मताची पुन्हा स्थापना होय. शंकराचार्यापेक्षा वरील कामगिरीचें खरें श्रेय भट्टांनांच दिलें पाहिजे. एका दंतकथेप्रमाणें खुद्द शंकराचार्यांनीं भट्टांची भेट, ते अग्निप्रवेश करीत असतांना घेतली असतां, त्यांनां " श्रुत्यर्थधर्मविमुखान् सुगतान् निहन्तुं " (वैदिक धर्मोच्छेदिक पाखंडी बौद्धांचा नाश करणारे) असें विशेषण दिलें आहे. हर्षवर्धनाच्या काळीं बौद्धधर्माचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला होता. तो पुरा करण्याचें श्रेय भट्टांनीं घेऊन पुढील वैदिक धर्मस्थापनेच्या कामगिरीचा मार्ग आचार्यांस सुलभ करून ठेविला. वेद व वेदविषयक आचारावरील समाजाचा उडालेला विश्वास भट्टांनीं पुन्हा बसविला; या कारणावरून त्यांचा काल हर्षानंतर (इ.स. ७००) मानतात व तो बरोबर असावा. रा. चिंतामणराव वैद्यांच्या मतें भट्ट व आचार्य हे समकालीन नसून त्यांच्यांत एका शतकाचें अंतर होतें; आणि इ. स. ७००हा भट्टाचा निधनकाल होय. भट्टाच्या कालाप्रमाणें त्याच्या वसतीच्या देशाबद्दलहि भिन्न मतें आहेत. आसाम,द्रविड व आर्यावर्त हे तीन देश त्यांची जन्मभूमि सांगण्यात येतात. त्यांच्या तंत्रवार्तिकांत फक्त आर्यावर्त देशाचीच महती जास्त गायिली आहे व इतर प्रांतांची निंदा केली आहे. यावरून ते तिकडचे रहाणारे होते असें वाटतें. आर्यावर्त म्हणजे भट्टांच्या मतें, हिमालय व विन्ध्य यांमधील प्रांत होय. त्यांनां संस्कृताखेरीज द्राविडादि इतर भाषा अवगत होत्या. द्राविड, पारसिक, बर्बर, रोमक आणि यवन इत्यादि भाषांच्या त्यांनीं केलेल्या उल्लेखावरूनहि ते ७ व्या शतकात झाले असावेत असें दिसतें. कारण द्राविडीशिवाय बाकीच्या वरील भाषांचा लोप, हिंदुस्थानात ७ व्या शतकानंतर झालेला आहे.तत्पूर्वी ह्युएनत्संगासारखे बाह्यदेशीय इकडे येत व आपल्या देशची भाषाहि बोलत. असल्या परकीय बौद्धांच्या परकीय म्लेच्छ भाषा त्यावेळीं इकडे बऱ्याच प्रचलित होत्या; अर्थात् दुभाष्येहि बरेच असत भट्टांनीं या दुभाष्यांचा (द्वैभाषिक) उल्लेख केला आहे. त्यांनीं बौद्ध धर्माचा अभ्यास बौद्ध भिक्षूपाशीं केला होता.

महाराष्ट्रांतील मातुलकन्याविवाहाचा त्यांनीं निषेध केला असल्यानें ते महाराष्ट्रीय नसावेत असें म्हणतात; तसेंच त्यांनीं स्त्रियांच्या पोषाखाच्या बाबतींत अन्तरीय व उत्तरीय अशा दोन वस्त्रांचा निर्देश केला आहे तो महाराष्ट्रीय स्त्रियांना लागू पडत नसून उत्तरेकडील स्त्रियांनां अनुरूप आहे; त्याशिवाय यज्ञक्रियेंतील ब्राह्मणांच्या पशुहिंसेचा त्याचा उल्लेखहि उत्तरेकडील ब्राह्मणांचा वाचक खात्रीपूर्वक नाहीं. दक्षिणेंत पशुहिंसा (यज्ञांतील) कधींच बंद झाली नव्हती. सारांश, भट्ट हे उत्तरेकडील रहिवासी होते. त्याच वेळीं राजे लोक चारहि वर्णांचे होते, असें भट्ट म्हणतात. साधारणतः इ. स. ६५० ते ७५० हा भट्टांचा काल असावा. हे न्यायमीमांसाशास्त्रांत अत्यंत पारंगत होते. वार्धक्यांत त्यांनीं आपला देह अग्नीस समर्पण केला. यावरून त्यावेळीं वृद्धपणीं अग्निकाष्ठें भक्षण करण्याचा प्रघात असावा असें दिसते. पुढें पुढें तो मोडल्यामुळें या भट्टांच्या कृतीला पुढील भ्रामक कारण सांगण्यांत येऊं लागलें: त्यांनीं छद्मवेषानें परधर्मीय बौद्ध भिक्षूंजवळ परधर्माचा (बौद्ध धर्माचा) अभ्यास केला, म्हणून पुढें त्याची निष्कृति म्हणून त्यांनीं स्वतःस जीवंतपणीं जाळून घेतलें. यांचें कर्मप्राधान्य पुढें शंकराचार्यांनीं मोडून काढिलें. यांची सारी भिस्त वेदांवर असून अग्निहोत्र व यज्ञादिकर्में हेच उपासनामार्ग ते प्रवर्तन करीत. त्याना संन्यासमार्ग मुळींच पसंत नसे. परंतु लोकांत जैन-बौद्धधर्मानें हिंसेविषयीं तिटकारा व संन्यासाविषयीं आवड उत्पन्न झाल्यामुळें भट्टांचा हिंसाक्रियान्वित कर्ममार्ग फारसा रूढ झाला नाहीं. त्यातल्या त्यांत दक्षिणेंत हीं मतें मुळींच रुजलीं नाहींत. ज्या दाक्षिणात्यांनीं पुष्कळ काळापासून मासाशन वर्ज केलें होतें त्याच्यांतूनच शंकराचार्य निर्माण होऊन त्यांनीं भट्टांचा अनुयायी जो मंडनमिश्र त्याचा पराभव करून त्याला आपला शिष्य केले; येथें यज्ञसंस्थेच्या उत्कर्षासाठीं शेवटचा प्रयत्न लुप्त झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

माधवाचार्यांनीं शांकरदिग्विजयांत यांचा उल्लेख केला आहे. आत्मपुराणाच्या प्रस्तावनेंतहि यांच्याबद्दल थोडीशी माहिती आहे. यांनीं प्रथम जैमिनिसूत्रभाष्य व मग जैनमतभंजन हे ग्रंथ लिहिले असें म्हणतात.

जैन लोकांच्या ग्रंथांत यांची माहिती पुढीलप्रमाणें मिळते असें अर्वाचीन कोषकार ग्रंथाधार न देतां सागतात. "आंध्र व उत्कल या देशांच्या सरहद्दीवर महानदीकांठच्या जयमंगल गांवीं, तैत्तिरीय यजुर्वेदी घराण्यांत, तैलंग जातीच्या यज्ञेश्वरभट्ट नांवाच्या ब्राह्मणाच्या पोटीं यांचा जन्म झाला. यांच्या आईचें नांव चंद्रगुणा असून, यांचा जन्म वैशाखी पौर्णिमेस रविवारीं, माध्यान्हीं, युधिष्ठिर शक २११० या वर्षी झाला. हा कार्तिकस्वामीचा अवतार होता व वेदोक्त कर्मकांडाचा वादी, श्रुत्यभिमानी व जैन लोकांचा साक्षात यम होता. यांनीं निकेतन या जैनाचार्य (बौद्धाचार्या) जवळ छद्मवेषानें राहून जैनमत समजावून घेतलें, व पुढें त्या गुरूचा घात केला. यांचा साह्यकर्ता सुधन्वा राजा हाहि प्रथम जैन होता, परंतु पुढें यांच्या शिकवणीवरून त्यानें जैनांचा फार छळ केला. कुमारीलभट्ट यांनीं अग्निप्रवेश केला. तो प्रमाथी संवत्सरीं माघी पौर्णिमेस वयाच्या ६३ व्या वर्षी केला". या जैनकथेवरून आचार्यांनीं सुधन्व्याकडून वैदिक कर्ममार्गाचा स्वीकार व प्रसार करविला असावा. शांकरविजयांत जी कथा आहे, तिचा सारांश असा:—सुधन्व्याच्या सभेंत भट्टानीं बौद्ध व जैन पंडितांचा पराभव केला, व राजानें सांगितल्यावरून पर्वतावरून 'जर वेद खरे असतील, तर मला कांहीं एक होणार नाहीं' असें म्हणून उडी मारली; परंतु ते सुखरूप राहिले. पुढें आणखी परीक्षा घ्यावी म्हणून एका घागरींत सर्प घालून राजानें प्रश्न केला असता, बौद्ध जैनांनीं आत सर्प आहे असें सांगितलें, परंतु भट्टांनीं शेषशायीची मूर्ति आहे असें सांगून देवाची प्रार्थना केली. घागर मोकळी केल्यावर आंतून शेषशायीचीच मूर्ति निघाली. त्यामुळें राजाने आपल्या पदरच्या व राज्यांतील बौद्ध व जैन या पंडितांचा व धर्मानुयायांचा नाश केला (विद्यारण्यकृत शा. दि. सर्ग १). भट्टांच्या तामिळ भाषेशीं परिचयाबद्दल बर्नेलनें एक आधार दिला आहे. तंत्रवार्तिकात एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'आन्ध्रद्राविड भापायाम्' या शब्दांतील समस्यंत प्रत्ययावरून गोंधळून, हा तामीलभाषानिदर्शक कांहींतरी शब्द असावा, असा त्यानें शेरा मारला आहे. डॉ. स्टेन कोनो म्हणतो कीं, हा शब्द आन्ध्र व द्राविड या दोन्हीं भाषांकरिता घातला असावा. परंतु हा सारा व्यर्थ वाद आहे. कारण तंत्रवार्तिकाच्या (हस्तलिखित व छापीलहि) तेलगु प्रतींत 'अथ द्राविडादि भाषायाम्' असा प्रयोग आहे.

म्लेच्छशब्दग्रहणाबद्दल भट्ट म्हणतात:—आर्य लोक जेव्हा म्लेच्छ शब्द संस्कृतांत घेतात, तेव्हां त्याचें मूळ रूप बदलून व त्याला नवीन स्वर जोडून किंवा असलेला स्वर गाळून दुसरें रूप देतात. याचीं पुढील पांच उदाहरणें त्यांनीं दिलीं आहेत.

मूळ तामीळ	भट्टमतें तामीळ	संस्कृतकिरण	अर्थ
चोरु, शोरु	चोर	चोर	अन्न
पांबु	पाप्	पाप	सर्प
वयिरु	वैर	वैरि	पोट
अम्माळ	माल्	माला	स्त्री
अदर	अतर	अतर	रस्ता

यावर पी.टी. श्रीनिवास आय्यंगार (विजगापट्टणकर) यांचें म्हणणें असें आहे की कुमारिलांनीं घेतलेले हे तामीळ शब्द बरोबर नाहींत अदर हा जुन्या तामीळ भाषेंत आहे. हल्लीं तो प्रचारांत नाहीं. माल् शब्दहि चुकीचा घेतला आहे. बर्नेलच्या उताऱ्यांत अतरं शब्दाऐवजीं नडै शब्द आहे. द्रविडादिभाषा

या पदांतील आदि हा उपसर्ग कुमारिलांनीं कोठून घेतला हें अय्यंगार यांनां समजत नाहीं. [शांकरदिग्वि; आत्मपुराण; अर्वाचीनकोश; मध्य. भारत; लिंग्विास्टिक सर्व्हे. इंडिया. व्हा.४; इंडि. अँटि. व्हा. ४२]

कुयली—या वनस्पतीस लॅटिनमध्यें मुकुना प्रूरिएन्स; मराठींत कुहिरी, कुयली, कांटेकुयली, खाजकुयली, संस्कृतांत मर्कटी; गुजराथींत कौचो वगैरे नांवें आहेत. ही कोंकणांत व मावळांतील जंगलांत सांपडते. हिचे वेल दुसऱ्या झुडुपाच्या आधारानें वाढतात. ते घेवडयासारखे असतात. त्यांस निळीं फुलें येतात. शेंगांचें झुपके (घड) येतात. शेंगांवर केंसासारखी लव असते; ती अंगास लागल्यास अंगास खाज सुटून अंगाची आग होते. कांटेकुयलीची भाजी खाण्याकरिता करीत नाहींत. परंतु औषधाकरिता तिच्या शेंगाची भाजी करतात. हीस रेडेकुयलीहि म्हणतात.

कुयलीची सुधारलेली दुसरी जात आहे. तिला "व्हेलव्हेट-बीन" (मखमालीशेंगा)किंवा गोडी कुयली अशा संज्ञा आहेत. या जातीचे वेल घेवडयाप्रमाणें झुडपावर अगर मांडवावर वढवितात. हिची घेवडयाप्रमाणेंच मशागत करितात. वेल उगवल्यापासून दोन महिन्यांत नीळसर फुलांचे झुबके येतात व मग त्यांस शेंगा धरतात. त्या प्रथम हिरव्या असून पुढें काळ्या होतात. कोंवळ्या शेंगांची भाजी होते. त्या जून झाल्या म्हणजे आंतील दाण्यांची उसळ होते. बीं घेवडयासारखें पण मोठें व वाटोळें असतें. कित्येक देशांत जनावरांस चाऱ्याकरिता या जातीचे वेल मोठया प्रमाणावर लावितात. महाराष्ट्रांत ही जात फारशी माहीत नाहीं. पण त्या जातीचा फैलाव होणें इष्ट आहे. खाजकुयलीच्या शेंगांवरील कुशीचा जंतावर फार चांगला उपयोग होतो. कुयलीच्या बियांस "कवचबीज" असें म्हणतात [पदे].

कुरकुंब—पुणें जिल्ह्यात जेजुरी जवळील एक गाव. थोरले बाजिराव पेशवे मधून मधून येथें रहावयास येत. एकदां नानासाहेब व चिमाजीआप्पा यांनीं मस्तानीला जबरदस्तीनें श्रीमंतापासून दूर करून ठेविली असता श्रीमंत या गावीं रागानें येऊन राहिले होते. येथें फिरंगाई नांवाची देवी असून तिचे भक्त बरेच आहेत. तिची यात्रा भरत असते. थोरले माधवरावांहि या देवीच्या दर्शनास जात असत. [राजवाडे खं. ६]

कुरंगगड-अलंगगड—हे किल्ले नाशिक जिल्ह्यात नाशीक-अहमदनगर यांच्या सरहद्दीवर इगतपुरी स्टेशनच्या आग्नेयीस ५ कोसांवर आहेत. हे दोन्ही किल्ले एकमेकापासून औंध व पट्टा किल्ल्याप्रमाणें एक कोस अंतरावर असून अलंग हा किल्ला अहमदनगर जिल्ह्यांत आहे. याच्यावर जाण्याची वाट मोडून टाकल्यामुळें याच्या माथ्यावर जाणें कठिण झालें आहे. या दोहोंच्यामध्यें मदनगड नांवाचा किल्ला असून त्याच्यावर जाण्याचाहि मार्ग (सन १८१८) पाडून टाकण्यात आला आहे. तो एका उभ्या खडकांत पायऱ्या खोदून केलेला होता. अलंग किल्ल्यावर नाशीक जिल्ह्यातील कुलंगवाडी गांवाकडून महत्प्रयासानें व धोक्याच्या मार्गानें चढतां येतें. या पर्वताच्या रांगेचे सर्वच माथे नीट सुळक्यासारखे आहेत. अलंग किल्ल्याच्या पूर्वेस नवरानवरी नांवाचा दोन अगदी उभ्यासुळक्यांतून गेलेला एक घांट आहे. या वाटांतून पायरस्ता आहे पण तो फार बिकट आहे. वरील दोन सुळक्यांच्या दोन्ही बाजूस नगर व नाशिक जिल्हे आहेत हे किल्ले कोणी बांधिले याबद्दल कांहीं आधार सांपडत नाहीं. हे १७६० मध्यें कावनई किल्ल्यावरोबरच निझामाकडून पेशव्यांस मिळाले असावेत. जव्हारकरांनीं अलंगगड पेशव्यांना दिला असाहि एक उल्लेख आहे [ट्रान्झ्या; बॉम्बे जिऑ. सोसा. पु. १;नाशिक ग्या.].

कुरडू—या वनस्पतीस लॅटिनमध्यें कोलोसिआ अर्जेंटिआ; संस्कृतमध्यें भुरुंडा; मराठींत कुरडू हीं नांवें आहेत.

ही एक माठाच्या वर्गातील जंगली भाजी आहे.हिचें झाड बाजरीजोंधळ्यांच्या शेंतात व गवती रानांत तसेंच ओसाड जागेंत पावसाळ्यांत उगवतें. हें झाड, आघाडा अथवा राजगिऱ्यासारखें वाढतें. तें तीन ते पांच फूट उंच होतें. फुलें शोभिवंत, पांढरा, गुलाबी, व तांबडा रंग असलेलीं लांब तुऱ्यासारखीं असतात. बीं काळें राजगिऱ्यासारखें चकचकित असते. कोंवळया पाल्याची व शेंड्याची रुचकर पालेभाजी होते. ही भाजी मूत्रविकारानें व्यथित माणसास वैद्य लोक खाण्यास सांगतात. बियांचें चूर्ण करून खाण्यापासूनहि भाजी सारखाच गुण येतो.

" नव्याच्या पुनवेस " म्हणजे आश्विन शुद्ध पौर्णिमेस कुर्डूचीं फुलें व नव्या झालेल्या धान्याचे (कोंकणांत भात व देशावर बाजरी) तुरे व कुर्डुच्या फुलांचें तोरण करून देव घरावर व घरातील मुख्य दारावर शोभेकरितां बांधतात.

मुतखड्यावर-कुरडूचें बीं एक मासा व खडीसाकर एक मासा एकत्र करून घ्यावें मूत्र बंद झाल्यास २ किंवा ३ वेळ हे औषध प्यावें. [वनौ. गुण. भाग २].

कुरम एजन्सी—हा प्रदेश वायव्य सरहद्दीवरील प्रांतात असून कुरम नदीच्या थडीवरील प्रदेशाचा यात समावेश होतो. याचें क्षेत्रफळ १२७८ चौ. मै. आहे. याच्या उत्तरेस सफेत कोह (श्वेत पर्वत); दक्षिणेस उत्तर वझिरिस्तान; नैर्ऋत्येस व पश्चिमेस खोस्ट जिल्हा व पूर्वेस झैमुस्ट या जंगली लोकाची वस्ती आहे.

कुरम जहागिरींत मुख्य पर्वत 'सफेत कोह.' त्याचें सर्वात उंच टोंक शिखरम् नावाचें असून समुद्रसपाटीपासून ते १५,६२० फूट उंच आहे. या एजन्सींत कुरम ही एकच नदी आहे. तिला उत्तरेकडून व दक्षिणे कडून लहान लहान पुष्कळ नद्या मिळतात. उत्तर कुरम व दक्षिण कुरम असे या प्रदेशाचे दोन भाग केलेले आहेत. दक्षिण भागचा नदींकाठ खेरीज करून, बाकीचा प्रदेश नापीक, खडकाळ आहे. नदीकाठचा भाग लागवडीस

आणलेला आहे म्हणून हिरवा दिसतो. उत्तरकुरम हा प्रदेश बाह्यतः फार सुंदर असून जरी त्यावर लागवड नाहीं तरी जंगलांतील हिरवीं झाडें व सपाट विस्तीर्ण कुरणें याच्या योगानें निसर्गतः तो प्रदेश फार रमणीय दिसतो. हिवाळ्यांत दक्षिणकुरमची हवा अतिशय थंड असून वारा फार वाहतो व उन्हाळ्यात हवा उष्ण असून कोरडी असते. उत्तर कुरमची हवा उन्हाळ्यात असह्य उष्ण असून हिवाळ्यांत कित्येक आठवडेपर्यंत जमीन बर्फमय असते.

इ ति हा स.—येथील प्रदेशाचा इतिहास वास्तविक ११४८ पासून सुरू होतो. सैफुद्दीन घोरीनें गिझनीच्या बहराम शहाचा पराभव केल्यानंतर तो (बहराम) कुरमकडे निघाला व तेथून कुमक घेऊन त्यानें गझनी घेतली. महंमद घोरी ज्या ज्या वेळीं हिंदुस्थानात येत असे त्या त्या वेळीं किरमान येथें मुक्काम केल्याशिवाय रहात नसे. ताजुद्दीन गादीवर असेपर्यंत राजधानी किरमान येथेंच होती. शेवटीं सुलतान महंमुदनें त्याला किरमान शहरांतून हाकून दिलें. पुढें लवकरच तो प्रदेश मोंगलांच्या ताब्यांत आला. पुढें इ. सन १२३५ सालीं सैफुद्दीन हसन यानें गझनी, किरमान व बन्नु हस्तगत केलें. परंतु १२३९ त मोंगलानीं त्याला हाकून लाविलें. अकबराच्या अमदानींत बंगष लोकांचे टाणें येथें असून सांप्रत त्यांत कोहत जिल्हा मोडतो. जहांगीरनें बंगष लोकांनां जरी हांकून लाविलें तरी कुरम प्रांत मोंगलाच्या अंमलांत पूर्णपणें केव्हांच आला नाहीं. तो बंगष लोकांच्याच ताब्यांत होता. व मोंगल बादशाही नष्ट झाल्यावर कुरम अफगाणिस्तानचा भाग होऊन राहिलें होतें. कोहत जिल्हा ब्रिटिश मुलुखास जोडल्यानंतर मिराझी सरहद्दीवर तुरी लोक फार उपद्रव देऊं लागले. व १८५४ मध्यें जरी त्यांजबरोबर करारमदार झाले तरी दंगेधोपे चालू होते. इंग्रजांनीं त्याच्या प्रदेशात लष्कर पाठवून पाहिलें तरी कांहीं परिणाम झाला नाहीं. अफगाणिस्तानच्या अमीरानें खंडणीची मागणी केली असतां पहाडी भागांतून त्यानीं पळ काढला. १८७८ सालीं जनरल राबर्ट्सनें कुरममधील लोकास कांहीं शिस्त लावली व १८९२ त इंग्रजांकडे ह्या सर्व प्रदेशाचा राज्यकारभार तुरी लोकांनीं आपण होऊन दिला.

यांत खेडीं १६६ असून पारचिनार हें मुख्य शहर आहे. १९११ सालीं लो. सं. ९८,२९२ होती. लोकसंख्येंत पठाण लोकांचा भरणा विशेष आहे. लोकांची सामान्य भाषा पश्तु(स्तु) असून हिंदु लोक हिंदी भाषा बोलतात. धंद्यांत शेतकी हा मुख्य धंदा आहे. येथें अजूनहि रेशीम पुष्कळ उत्पन्न होत असून त्याचे पुष्कळ जिन्नस तयार होतात.

ज्या ठिकाणीं पाण्याचा पुरवठा आहे त्या ठिकाणीं शेतीचें उत्पन्न चांगलें निघतें. परंतु येथें शांतता असावी तशी नाहीं; म्हणून राज्यकारभार सुयंत्र चालत नसून एकंदर जमिनीची पद्धतशीर लागवड होत नाहीं. पावसाळ्यांत तांदूळ मका व गळिताचीं धान्यें उत्पन्न होऊन हिवाळ्यांत गहूं, जव, हीं पिकतात. शिवाय फळझाडें उत्पन्न करण्यांत येथील लोकांची पूर्वापार प्रसिद्धि चालत आलेली आहे. कुरम प्रांताला दुष्काळ कसा असतो हें माहीत नाहीं. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचा एक फांटा खुशालगड–कोहतवरून गेला आहे. त्यामुळें कोहतपासून कुरमला सहज जातां येतें. रेल्वेवरील अखेरच्या स्टेशनापासून पारचिनार ७८ मैल आहे. तेथपर्यंत टांग्याची सोय आहे. मध्यें सडकेवर किरमान नदी असून तिजवर पूल बांधलेला आहे. पारचिनारपासून पुढें कच्ची सडक लागते.

रा ज्य व्य व स्था.—कुरम प्रांताचे दोन भाग आहेत म्हणून वर सांगितलें आहे. वरचें कुरम व खालचें कुरम या भागांवर एकेक नायक 'कमीम' असून ते अनुक्रमें पारचिनार व सद्द येथें रहातात. पोलिटिकल एजंट सर्वांवर मुख्य असून त्याच्या हाताखालीं एक रेव्हिन्यु अधिकारी दिलेला आहे. अफगाण राजाच्या वेळीं जमीनमहसुलाचा दर सुमारें अर्ध्या एकरला 'जरीब' रु. १ते २ रुपये असे. याशिवाय इतर कर पुष्कळ आहेत. साऱ्याचा वसूल इंग्रज सरकार अफगाण पद्धतीवर करीत असून जमाबंदी १० वर्षांकरता केलेली आहे. एकंदर उत्पन्न काबुली ६७,३०० रुपये होतें. अलीकडे साऱ्याचें उत्पन्न वाढलेलें आहे.

एकंदर लोकसंख्येंत ९८७ पुरुष व २१ स्त्रिया साक्षर होत्या. शिक्षण शाळेंतून देत असून शिवाय काजी लोक मशिदींत निमाज पढण्याच्या अगोदर अगर नंतर एक–अर्धा तास मुलांनां शिक्षण देत असतात. शिक्षणात एकंदर हा प्रदेश मागसलेला आहे.

कुरम नदी—वायव्य सरहद्दीवरील प्रांतांतील एक नदी. ही अफगाणिस्तानांत रोखियन दरींत उगम पावून अफगाणिस्तानांतील खोस्ट जिल्हा ओलांडल्यानंतर उगमापासून ८० मैलांवर तुरी प्रदेशात शिरते व ५५ मैल वहात येऊन मियानवालासमोर सिंधुनदाला मिळते. कुरम प्रदेशातून वाहत असता सफेतकोह पर्वतावरून येणारे पुष्कळसे नाले कुरम नदीला मिळतात. त्यांत किरमान व कुरमान हे मुख्य होत.

कुरमवार—याची वस्ती वऱ्हाड मध्यप्रांतांत असून तेथें लोकसंख्या (१९११) ३७९२ आहे. हे चांदा जिल्ह्यात तामीळ व तेलगू धनगराचेच भाईबंद म्हणून रहातात. हे आपणांस जुन्या पल्लव घराण्याचे वंशज समजतात. यांची एकंदर संख्या सुमारें ४१०० असावी. यांची भाषा कानडीचें एक स्वरूप आहे. यांच्यांत मुलीचें लग्न ऋतुप्राप्तीपूर्वीच झालें पाहिजे असें आहे पूर्वी तसें न झाल्यास नदीकांठीं झोंपडींत तिला नेऊन ठेवीत व पूर आला म्हणजे तिला नदीला अर्पण करीत. पण आतां झोंपडींत ठेवण्याचें सोंग करून नदी देवतेला कांहीं नैवेद्य दाखवून परत आणतात. वधूची निवड नेहमीं डोक्यावरील केसांतील भोंवरे पाहून करतात. चांगले

शुभ भोंवरे असले तर मुलगी पसंत करतात. वर्षांत लग्नें होण्याचे दिवस फक्त चार ठरले आहेत, ते फाल्गुनातील दोन्ही चतुर्थ्या, फाल्गुन वद्य १० व वैशाख शुद्ध तृतीया हे होत काबळे विणण्याच्या धोटयावर बसून लग्नें होतात. एका लहान बाहुलीला झोंका देऊन ती वधूजवळ देतात. वधू ती नवऱ्यास देते. नंतर ती म्हणते कीं, हिला संभाळ मी स्वयंपाक करतें. नवरा कधीं कधीं ती परत तिला देतो व म्हणतो कीं, मी कावळे विणतो तूंच संभाळ. यांच्यात बायकोनें व्यभिचार केला तरी घटस्फोट होत नाहीं. बायको जर माहेरीं जाऊन बसली तर तिला परत आणण्याचा मात्र नवऱ्याचा कोणताच उपाय चालत नाहीं. हे आपल्या धंद्याच्या सामानाची गणेश चतुर्थीस पूजा करतात. मल्लाना देव व मल्लानी देवीची वर्षास पूजा करतात. हे प्रवासास निघाले म्हणजे पानावर अन्न ठेवून तें चाटून खातात. व पाणी पितानां नदींतून किंवा तळयातून तोंड लाऊन बैलासारखें पितात. हे कावळयाच्या टोप्या घालतात व काळ्या लोकरीचा दोर कंबरेस धोतरावरून बांधतात.

कुरमी—शेती करणारी ही कुरमी अथवा कुणबी जात आहे. एकंदर हिंदुस्थानांत यांची वस्ती २७,२५,६११ आहे. मुंबई इलाखा सोडून सर्व प्रांतांतून ती विखुरलेली दिसते. संयुक्तप्रांत व बिहार-ओरिसा यातून ती फारच आहे. कुटुंब व कृषि या संस्कृत शब्दांवरून कुरमींची व्युत्पत्ति लावण्यात येते. पृथ्वीस धारण करणाऱ्या कूर्मावतारातील, कूर्म म्हणजे कासव या शब्दावरून कुरमी शब्द झाला असावा असेंहि कोणी अनुमानितात. पश्चिमेकडील कुरमी लोक आपण भारतीय युद्धातील कौरवकुलोत्पन्न आहों, असे समजतात. कांहीं कुरमी आपण ब्राह्मण आहों असें समजून यज्ञोपवीत धारण करितात. कर्नल डाल्टन म्हणतो कीं, बिहारचे कुरमी हे बंगालमधील पहिले आर्यवसाहतवाले असावे; परंतु रिस्लेच्या मतें, छोटानागपूर व ओरिसामधील कुरमी हें नाव धारण करणारी जात भिन्न असून चेहऱ्यावरून हे द्राविडी जातीपैकींच असावे असें आहे. एकंदरींत या कुरमी लोकाच्या कुळासंबंधीं तीन समर्थनीय पक्ष म्हणजे (१) कुरमी ही जात आर्य किंवा द्राविडी वंशापासून झालेली आहे, (२) सर्वच जाती आर्यांपासून झालेल्या असून भिन्न कर्मे व संकर यामुळे त्याच्यांत बदल झाला व (३) तिसरा पक्ष असा कीं, सर्वच जाती द्रविडी वंशापासून झाल्या असून ज्याचा आर्यांशीं संबंध आला ते सुधारले व बाकीचे मूळ रानटी अवस्थेंतच राहिले. निरनिराळे धंदे करणारी कुरमी ही एक जात असून कोइरी, कच्छी, साहुणी व माळी अशा जाती तिच्यापासून झाल्या आहेत.

खानेसुमारीवरून पाहता कुरमी लोकांचे ज्ञातिविषयक एकंदर ११ मुख्य वर्ग आहेत. बाईश्वर, बार्डिया, गंगापारी, गुजराथी, जईश्वर, कनौजिया, खरेबिंध, पट्टारिया, राह, सेंटवार, सिंगरार या जाती प्रमुख आहेत. याशिवाय माल, पाटनवार, लाकारिया, संकाटवा, उमरान, भंडारी, हरिद्वार, मन्वा, कोरी, इत्यादि अनेक जाती आहेत. पाचशें वर्षांपूर्वी झाबाजी नावाच्या एका फकीराचे बनिया, अहीर व कुरमी लोक अनुयायी झाले व त्यामुळे त्याना जातिबहिष्कृत व्हावें लागलें असें म्हणतात. या अनुयायाच्या बऱ्याच चाली रीती मुसलमानासारख्या आहेत.

बहुपत्नीत्वाची मुभा याच्यात चालू असली तरी अलीकडे पुष्कळ बायका करण्याची चाल बंद पडत चालली आहे. बालविवाह रूढ असून, वयात आल्यानंतर कुमारिकेचें लग्न न करणें हा मोठा दोष मानला जातो. हुंड्याची चाल फारशी प्रचारात नाहीं. तथापि देणगी म्हणून उभयपक्षांत बरीच देवघेव होते. दुराचारी स्त्रीला समाजाकडून शासन केलें जातें. परंतु सगाई विधीनें तिला लग्नहि करता येते. पुनर्विवाह करण्याची व नवऱ्याच्या धाकट्या भावाबरोबर लग्न करण्याची विधवेला मोकळीक असते. एखाद्या गतभर्तृकेस मूल असल्यास ते दुसऱ्या नवऱ्याच्या घरीं, त्याच्या कुटुंबातीलच एक व्यक्ति म्हणून मानलें जाते. प्रत्यक्ष लग्नसभारंभात फारसे विधी नाहींत. तथापि वधूचे प्रथम पिंपळ वृक्षाशीं लग्न लावण्यात येतें. पायपुजा, कन्यादान, सेंदुरदान वगैरे सभारंभ लग्नात करण्यात येतात.

सर्व धार्मिक विधी ब्राह्मणद्वारा करण्यात येतात. साधारणतः सरयुपारी व कनौजिया ब्राह्मण हे याचे उपाध्याय असतात. महावीर, ठाकुरजी व सीतलादेवी अशा त्याच्या देवता आहेत. कांहीं लोक गुरुमंत्राची दीक्षा घेतात. महावीराशिवाय बाबीपीर याचीहि उपासना हे करतात.

कुरमींचा सामाजिक दर्जा मान्यतेचा आहे. काहीं ब्राह्मणाच्या हातचीहि कच्ची खात नाहींत. रजपुतांच्या स्वारीच्या पूर्वी आपण जमीनदार होतों असें हे म्हणतात. काहीं लोक महादेवाची व कुर्मायानीनाथ याची पूजा करितात. टिका नावाच्या एका खेडेगांवातील तलावानजीक कुरमी स्त्रिया सती जात असत असे सागतात. या जातीपैकीं पुष्कळजण भगत असल्यानें मद्यमांसाशन करीत नाहींत. त्यांचा प्रमुख धंदा शेती हाच असतो. कुरमी स्त्री अत्यंत कष्टाळू असते अशी प्रसिद्धि आहे. स्त्रियांच्या उद्योगनिरततेवरून त्यांच्या समाजात काहीं म्हणीहि पडून गेल्या आहेत.

बिहारमधील ह्या जातीच्या लोकांचा समाजांतील दर्जा उच्च आहे, परंतु छोटा-नागपुरमधील हे लोक पक्षिभक्षक व शेतातील उंदीर खाणारे आहेत. ते मद्यपी असल्यामुळे ब्राह्मण त्याच्या हातचे पाणी घेत नाहींत. ते आसामांत मजुरी करितात.

मध्यप्रांतांत यांच्या रक्तात बरीच भेसळ झाली आहे. कारण एक तर यांपैकीं मराठी प्रांताजवळ राहणाऱ्या लोकांचें व कुणबी लोकाचें मिश्रण झालेलें आहे व होत आहे. शिवाय याच्यात अगारिया, लोन्हारे, खैरा इत्यादि इतर जातींची

कुळें आहेत. यावरून या नांवाचे लोक पूर्वी आपल्या जातींतून कुरमी जातींत शिरले हे स्पष्ट आहे.

कुरमी लोकांत पूर्वी हवेलिया नावाची एक श्रेष्ठ जात होती. हे लोक गोंड राज्यात उत्कृष्ट शेतकरी असून फार संपन्नस्थितींत असत. पण आता हे लोक सांपडत नाहींत. उच्छेदे म्हणून आतां जी जात आहे ती या जागीं स्थापन झाली आहे किंवा होऊं पहात आहे. हे लोक मद्यमांसास स्पर्श करीत नाहींत छत्तीसगडांत व जबलपुरास चंदनाहे हा एक मोठा वर्ग आहे. शिओरे हे प्रयागाच्या शिमूर गांवचे आहेत. प्रत्येक उपजातींत आणखीहि पोटभेद आहेत. ते परस्पर विवाह करतात. या लोकांमध्यें आदरातिथ्य पुष्कळ असतें. हे लोक ब्राह्मणास किंवा बैराग्यास गुरु करतात. धर्म बदलला, नीच माणसाशीं संभोग केला, किंवा गोमास भक्षिलें तर अजीबात बहिष्कार घालतात. (' कुणबी ' पहा.) [क्रूक; रसेल व हिरालाल; सेन्सस रिपोर्ट]

कुरवा—कोरवा, कोरजा, कोरमा याची (जात). लो. सं. (१९११) २,२४२,२१.पैकीं मद्रास इलाख्यांतच १,१०,१५७ कुरवा आहेत. बाकी त्रावणकोर, म्हैसूर व मुंबई या भागांतून आहेत. महाराष्ट्रांत या लोकानां कैकाडी म्हणतात. हे लोक निरानिराळया नावांनीं ओळखले जातात. अर्काट जिल्ह्यांत कोरवा, कोरचा आणि येद्रकाला या तीन नांवानीं ते ओळखले जातात. कलकत्ता येथें ते ' वैदूं'चा धंदा करतात. कांहीं कोरवा लोक वेल्ला म्हणून समजले जातात. पल्ली, कवराइ, इडाइयन् व रड्डी अशींहि त्यांचीं नावें आहेत. कटक, मिदनापूर, पुरी, तिनेवेल्ली, मुंबई, पाटणा, तंजावर वगैरे ठिकाणीं कांहीं कोरवा जातीचे लोक वस्ती करून राहिले आहेत. केपमारीप्रमाणेंच कोरवा जातीपैकीं कांहींचा धंदा चोऱ्या करणें, घरें फोडणें, दरवडे घालणें अशा प्रकारचा आहे. साधारणतः मूळव्याधीसारखे रोग बरे करण्यासंबंधीं त्यांची प्रसिद्धि आहे. कांहीं लोक शेती व मजुरी करतात, कांहीं ज्योतिष सांगतात. ते एकमेकास कुरु अथवा कुरा असें संबोधतात. कोरवा व येरुकाला यांच्या भाषेंत कानडी, तेलगू व तामीळ या शब्दांचाच मुख्यतः भरणा असतो. येरुकाला जातीच्या भाषेस ओड्रा अथवा ओरिया म्हणतात. यावरून ते उत्तरेकडून आले असावे असें दिसतें. परैयन, यानाडी, मंगला, व साकल या जातींखेरीज इतर जातींच्या लोकांना कोरवा लोक आपल्यांत घेतात. सातेपाटी, कावडी, मुद्रागुट्टि व मानपाटी असे कोरवा जातीचे चार मुख्य वर्ग आहेत व त्यापैकीं पहिले दोन श्रेष्ठ दर्जाचे आहेत. पट्टापू व धूरपू असे दोन वर्ग येरुकाला जातीचे आहेत. कोरवा जातीमध्यें नानाविध पंथ असून प्रत्येक पंथाचीं निरनिराळीं देवकें असतात. कोनेटी व समुद्राल असेहि पंथ असून शंख हें समुद्रालांचे देवक असतें. रामेश्वरी पंथाचे लोक कासव खात नाहींत. परंतु कित्येक कोनेटी लोक विशिष्ट प्रसंगीं तें मुद्दाम खातात.

पूर्वी कोरवा व्यापारी चिंच, गूळ, मीठ इत्यादि पदार्थांच्या गोण्या बैलांच्या किंवा गाढवांच्या पाठीवर लादून फिरस्तेगिरी करीत असत. मिठाचा व्यापार करणाऱ्यांनां उप्पू कोरवा म्हणतात. कुंचू नांवाचे लोक जंगलांतील मुळया गोळा करून त्यांचे कोष्टयांच्या उपयोगाकरिता कुंचले तयार करतात. हे लोक शिकारी म्हणूनहि फार प्रसिद्ध आहेत कांहीं लोक जंगलांतील वेळू तोडून आणून दुसऱ्यास विकतात. त्यांच्या स्त्रिया गोंदण्याचाहि धंदा करतात. मासे, विंचू, किल्ले, घरें इत्यादि आकृती शरीरावर मोठया कौशल्यानें हे गोंदतात. भविष्य वर्तविण्याच्या कामीं कोरवा स्त्रिया फार वाकबगार असतात कोणातेंहि भविष्य सागण्यापूर्वी त्या व्यक्तीचा स्वभाव व इतर माहिती हेरून ठेवण्याच्या कामीं त्या फार चतुर असतात. यूर अथवा खेडेगांवातील कोरवा लोकांनीं रानटीपणा सोडून देऊन शेती करण्याचें अलीकडे मनावर घेतलें आहे असें दिसतें. यापैकीं बरेच लोक हल्लीं पोलीस, जंगल वगैरे खात्यांत आहेत. पामुला नावाचे लोक गारुड्याचा धंदा करतात. कांहीं टोपल्या विणतात.पुसलवाडू, उटलबाडू, काडुकुट्टकिरावर इत्यादि अनेक नावें निरनिराळया धंद्यांवरून पडलीं आहेत. कुट अथवा कोर्‍हा लोक नीतिबाह्य मार्गानें उपजीविका करतात. त्याच्यातील स्त्रियांची नर्तनाबद्दल प्रसिद्धि आहे. मुलींना पळवून नेण्याचीहि प्रवृत्ति त्याच्या आहे.

कोरवांचे घरगुती देव विष्णु व शिव हेच होत. शिव, कुमार, सुब्रह्मण्य यांचीहि कोरवा उपासना करतात. लक्ष्मीव्यंकटेशस्वरूपी विष्णूची उपासना येरुकाला लोक करतात. मारिअम्मा कोल्हापुरी अम्मा, पेरुमालस्वामी अथवा तिरुपतीचा व्यंकटेश्वर या देवताचीहि उपासना करण्यांत येते. गुन्हेगार कोरवा जातीची मुख्य देवता मोथेवी नावाची असते. पुष्कळ लोक या निद्रादेवतेला दरवडेखोरींत यश यावें म्हणून आळवितात. भविष्य सागतांना कोल्हापुरी अम्मा व पोलेरम्मा या देवतांची प्रार्थना करण्यांत येते.

लग्नाचा मुहूर्त ठरविण्याचें काम ब्राह्मणावर सोंपविण्यांत येतें आणि जातिभ्रष्टांची शुद्धि चेट्टी लोक करतात. पंचायतीची सभा अशा प्रसंगीं भरते व तेथें गुन्हेगारास क्षौर करावयास लावतात व त्याची गाढवावरून धिंड काढतात. नंतर त्यानें दिलेल्या दक्षिणेपैकीं कांहीं भाग चेट्टी घेतो. गुन्हेगारास भोजनार्थ जातीस बोलवावें लागतें. विधवेशीं किंवा परजातीशीं गमन करणाऱ्या अपराध्यालाच वरील शासन करण्यांत येतें.

कोरवा जात जुन्या वेडगळ समजुतींना चिकटून राहणारी असून तिच्यात अनेक धर्मभोळेपणाचे मासले असलेले आढळतात. चोरी करण्यास निघण्यापूर्वी बरेवाईट शकून पाहण्यांत येतात. एखादें बकरें कोल्हापुरी अम्मा किंवा पेरमाल यांस बळी देऊन नारळ फोडण्यात येतात. बकरें मारण्यापूर्वी तें कांपूं लागलें तर तो शुभशकून समजला जातो. कोंबडें मारण्याचाहि त्यांचा प्रघात आहे. गुन्हेगारीस बाहेर पडतांना विधवादर्शन, दुधाची भांडीं; कुत्र्याचा मूत्रोत्सर्ग, बैलवाहक

आणि वृषभगर्जना इत्यादि गोष्टी अपशकुन म्हणून मानल्या जातात. प्रत्यक्ष घर फोडतांना बैल डुरकला तर तो शुभ शकुन होतो. चोरीस निघतांना बैलास झोडपीत असलेला मनुष्य पाहिला तर तो शुभशकुन होतो. घरें फोडण्यापूर्वी त्यावर मूत्र शिंपडण्यांत येतें. दुष्ट भाषेनें होणारा अपशकुन टाळण्यास चिखलाचा एक मनुष्य करून त्याच्या तोंडांत काटे भरण्यांत येतात. सात हा अंक अपेशी असा मानला जातो. रविवार, सोमवार, बुधवार व शनिवार हे वार अशुभ मानले जातात.

वडील माणसाकडून साधारणपणें लग्नें ठरविण्यांत येतात. वराचा बाप वधुसंशोधन करितो व त्यास योग्य अशी वधू सांपडल्यास उभय पक्ष प्रथम ताडीच्या दुकानात प्रवेश करतात व त्याठिकाणीं भावी व्याही वधूवरांचें कल्याण चिंतून यथेच्छ सुरापान करतात. लग्नात वधूच्या मामाचा मोठा मान असतो व कन्याविक्रयाची रकम त्यासच द्यावयाची असते.

वधूवराना एका कांबळ्यावर उभे करून वराकडून काळ्या मण्याची माळ वधूच्या गळयात घालवितात व अक्षता टाकून धार्मिक समारंभ पूर्ण होतो. तालीबंधन, कंकणबंधन, मिरवणूक व मेजवानी वगैरे गोष्टी करण्यात येतात. उत्तर अर्काटमध्यें अविवाहित मुलींना गहाण टाकण्यांत येते असें म्हणतात. (कास्टस अँड ट्राइब्ज ऑफ इंडिया, पान ४८७). चिंगलपेट व तंजावर येथेंहि ही चाल आहे. मद्रास येथें कोरावा लोक आपल्या बायका गहाण ठेवून कर्ज काढितात. (कित्ता पान ४८८) वारंवार विधवा होऊन किंवा काडीमोड करून एकाच जन्मात सात नवरे करणाऱ्या स्त्रीस 'बेड्डाबोयिसानी' असें म्हणतात व ती प्रतिष्ठित बाई म्हणून लग्नकार्यांत मानली जाते.

नामकरणप्रसंगीं मुलाच्या खांद्याच्या जवळ डाग देतात. अल्बेरूणी यानें इ. स. १०३९ मध्यें त्यांची ही चाल नमूद करून ठेविली आहे. तो म्हणतो कीं, जेव्हां मूल जन्मतें तेव्हा त्याच्या बापाकडे कोरवा लोकांचें जितकें लक्ष्य जातें तितकें तें आईकडे जात नाहीं. रेव्हरंड. जे. केन साहेब म्हणतो कीं, जेव्हां एखाद्या स्त्रीस प्रसववेदना होऊं लागतात त्यावेळीं तिचा नवरा कपाळास मळवट फासून व लुगडें पांघरून बाजेवर जाऊन पडतो. मूल जन्मतांच तें बापाच्या बाजेवर ठेवितात. बाळंतिणीप्रमाणें बापासहि सर्व औषधें घ्यावीं लागतात. बापानें हे सोहाळे का भोगावे याबद्दल कोरवा जातींत बऱ्याच दंतकथा आहेत. कोरवा मुलांस लहानपणीं ' मला माहीत नाहीं. ' या वाक्याचा ओनामा शिकवितात. नंतर चोरीच्या विविध पद्धतींचे त्यास शिक्षण देऊन भिंतीतून, खिडतींतून व दारांतून घरांत प्रवेश कसा करावा ही विद्याहि त्यांस शिकवितात.

तामील भाषेंत अशी म्हण आहे कीं, मृत वानर व मृत कोरवा हे अद्याप कोणीच पाहिलेले नाहींत. वानराप्रमाणें कोरवा लोक मृतांची तत्काल व्यवस्था लावितात. त्यांच्यांत सुतक पाळणे, पिंड देणें वगैरे प्रकार आहेत असें म्हणतात. म्हैसूर येथील कोरवा जातीच्या लोकांत अशी चाल आहे कीं, विधवेशीं त्याच दिवशीं कोणी तरी प्रथम लग्न करून नंतर तिच्या नवऱ्याचें प्रेत जाळण्यास न्यावयाचें असतें.

मलबार, कोचीन, त्रावणकोर येथें रहाणारे कोरवा. मलयालम् भाषा बोलणारे आहेत. कांहीं लोक दोरावर नाच करून पैसे मिळवितात. काहीं शेती करितात. कित्येक गवताच्या टोपल्या तयार करतात. त्यांच्या स्त्रिया ज्योतिषपणा व मुलींचे कान टोंचण्याचा धंदा करतात. १८८५ सालीं या जातीला सुधारण्याचे प्रयत्न करणाऱ्या कामी स्टीव्हन्सन यानें फार मेहनत घेऊन त्यांची एक वसाहतहि स्थापिली. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. १९०७ च्या पोलीस खात्याच्या रिपोर्टावरून दिसतें कीं, असल्या फिरत्या गुन्हेगार टोळ्यांना जमीनी देऊन सुधारण्याचा यत्न करून पाहण्यांत येत आहे. [थर्स्टन. से. रि.]

मुंबई इलाख्यांत कोरवा हे बेळगांव, विजापूर, धारवाड या जिल्ह्यात मुख्यत्वेंकरून आढळतात. यामध्यें रजस्वला बायकाचा विटाळ कानडी लोकाप्रमाणें मानीत नाहींत. प्रेतें पुरलीं जातात. हे लोक फक्त मोठाले हिंदुसण पाळतात. दिव्यें करून गुन्हा शाबित करण्याची चाल यामध्यें आहे. यांच्या भाषेंत तेलगु, तामीळ व कानडी या भाषांचें मिश्रण आहे. याचे ९ पोटभाग असून त्यांमध्यें कानडी पोटभागांतील लोक सर्वांत श्रेष्ठ मानिले जातात. यामध्यें चार कुळें आहेत. काहीं परिस्थितींत पुनर्विवाहहि करिता येतो. घटस्फोट मात्र करितां येत नाहीं असें म्हणतात. हे मांस खातात व दारूहि पितात. मारुती, यल्लामा, मारायाम्मा, व हुलीगेव ह्या त्यांच्या देवता आहेत.

प्रत्येक खेड्यांत व शहरच्या प्रत्येक पेठेस एक पंचायत असून या पंचायतींत ४ सभासद व सरपंच हे असतात. सामाजिक खटल्यांचे निकाल पंचायतींत दिले जातात. एका पंचायतींत एकमतानें निकाल न झाल्यास तो खटला दुसऱ्या पंचायतीकडे जातो. [सेन्सस रिपोर्ट (मुंबई) १९११. एन्थावेन].

कुरसेंग, पो ट वि भा ग.— बंगाल इलाख्यांत दार्जिलिंग जिल्ह्यांतील एक पोटविभाग व तालुका. याचें क्षेत्रफळ १८५ चौ.मै. असून १९११ सालीं लो.सं. एक लक्ष १५ हजारांवर होती. खेड्यांची संख्या ४९ आहे. यांत कुरसेंग हें एकच शहर आहे. याठिकाणीं पूर्व बंगाल रेल्वे व दार्जिलिंग हिमालय रेल्वे मिळतात.

श ह र.—कुरसेंग पोटविभागाचें मुख्य ठिकाण. दार्जिलिंगच्या दक्षिणेस २० मैलांवर हें असून समुद्रसपाटीपासून ४८६० फूट उंच आहे. १९११ सालीं येथील लोकसंख्या ५५७४ होती. हें दार्जिलिंगसारखें पाहाडी स्थळ असून येथील हवा उत्तम नसते. दार्जिलिंग-हिमालय रेल्वेवर

कुरसेंग हे एक स्टेशन असून येथें चहाचा व्यापार फार मोठा चालतो. १८७९ सालीं येथें म्यु. कमिटी स्थापन झाली. येथें मामुली सार्वजनिक कचेऱ्या आहेत, शिवाय एक लहान तुरुंग, दवाखाना, यूरोपियन व युरेजियन मुलाकरितां व मुलींकरितां शाळा आहेत, संट मेरीज कॉलेज व डौहिल ट्रेनिंग कॉलेज येथें आहे.

कुराण, प्रा स्ता वि क.—कुराण हा जगातील कमींत-कमी वीस कोट मुसुलमान लोकांच्या इस्लाम धर्माचा मूलभूत धर्मग्रंथ असून त्यास ते परमेश्वराची प्रत्यक्ष वाणीच समजतात व ख्रिस्ती राष्ट्रांतून होत असलेल्या बायबलच्या प्रसारालाहि मागें टाकणारा याचा सामाजिक प्रार्थनामंदिरात व शाळांमधून होणारा व होत असलेला प्रसार पाहून या ग्रंथास जगांत सर्वांत जास्त वाचक लाभलेला ग्रंथ असें मानण्यांत येतें. निदान एवढ्या कारणासाठीं तरी तो आपल्या धार्मिक अगर तात्विक दृष्टीस कितपत उतरतो हा विचार बाजूस ठेवून देखील आपणांस त्याकडे लक्ष्य दिले पाहिजे. शिवाय हा महंमदानें लिहिलेला असून त्या अत्यंत यशस्वी व धर्मसंस्थापक अशा सत्पुरुषाच्या अध्यात्मिक उन्नतीवर प्रकाश पाडणारा आहे. हा ग्रंथ जरी फारसा मोठा नाहीं तरी पहिल्या निरीक्षणाच्यावेळीं परक्या वाचकाला यात सर्वत्र सावळा गोंधळ आहेसें वाटतें यात शंका नाहीं परंतु अरबी संस्कृतीच्या साहाय्यानें याची पृथक्करणपूर्वक परीक्षा केली असता हें मत थोडेंसें बदलतें.

कुराणाला मुसुलमान लोक प्रत्यक्ष परमेश्वराचा शब्द मानतात व ग्रंथातहि तोच प्रकार आढळतो. कारण स्वतः महंमदानें अगर देवदूतानें केलेल्या प्रथमपुरुषवाचक विवक्षित भाषणांखेरीज इतर सर्व ठिकाणीं स्वतः परमेश्वरच बोलणारा असून त्यानें कांहीं ठिकाणीं ' मी ' अशा एकवचनाचा तर दुसऱ्या कांहीं ठिकाणीं 'आम्हीं' या बहुमानाच्या शब्दाचा उपयोग केला आहे ईश्वरी स्फूर्ति मिळालेल्या वेळीं मानवी व्यक्तित्वाची जाणीव ईश्वरी आदेशाच्या भावनेआड अदृश्य होते. पण मोठमोठ्या हिब्रु ज्ञानी पुरुषांचा वाणी लवकरच मानवी ममत्वाचा आश्रय करिते, पण कुराणांत मात्र दैवी ममत्वच उमटलेलें दिसतें. एकंदरींत महंमदाला आपण ईश्वराचे प्रेषित आहों असें वाटत असे. ही त्याची भावना प्रथम जितकी स्पष्ट दिसते तितकी पुढें दिसत नाहीं हें खरें असलें तरी ती कायमची नष्ट कधींच झाली नाहीं. कसेंहि असलें तरी नैतिकदृष्ट्या त्याच्या कृत्यांत उणीव दिसून येणाऱ्या स्थळांच्या बाबतींत देखील आपल्याला त्याच्या शुद्ध श्रद्धेविषयीं शंका घेतां येणें शक्य नाहीं. सर्वांत महत्वाची सांगावयाची गोष्ट ही कीं, शेवटपर्यंत तो आपल्या ईश्वराविषयीं तसेंच आपल्या लोकांच्याच काय पण सर्व मानव जातीच्या मुक्तीविषयीं आस्था बाळगणारा होता व आपल्या दैवी अवतारकृत्याच्या आजिंक्य निश्चयापासून तो लवमात्रहि कधीं ढळला नाहीं.

ग्रंथाच्या आविष्करणाची उपपत्ति कुराणातच जी आहे ती अशीः—

"मूळ संहिता स्वर्गांत आहे (ग्रंथमाता,—गूढग्रंथ, संरक्षित पत्रिका). ' अधःप्रवर्तनाच्या ' पद्धतीनें एकामागून एक उतारे प्रेषितास सांगण्यात आले. मध्यस्थ एक देवदूत असून त्याला कधीं 'पिशाच्च' तर कधीं 'जिब्रिल' असें म्हटलें आहे. हा देवदूत ईश्वरी आदेश महंमदास कथन करीत असे. विचाराचा प्रादुर्भाव मनांत कसा झाला याच्या या घोंटाळयाच्या वर्णनाचा वस्तुस्थितीशीं अगदीं पूर्ण मेळ बसत नाहीं यात नवल नाहीं. हे नेहमीं लक्षात ठेवलें पाहिजे कीं, महमदाची ईश्वराविषयींची अत्युच्च कल्पना ही प्रेषिताच्या ईश्वराविषयीं प्रत्यक्ष मुलाखतीच्या विचारास सोडून आहे.

ईश्वरानें कुराण सर्व एकदम न सांगता सावकाश थोडथोडें सांगितलें असे पुस्तकाच्या प्रत्यक्ष रचनेवरूनहि दिसतें. या प्रत्येक भागास कुराण (पाठ, वाचन अगर पाठसंग्रह ग्रंथ), किताब (लेखन) किंवा सुर (लेखमाला) असें म्हणत. यापैकीं शेवटचं नाव हें महंमदाच्या हयातींतच संकलित ग्रंथापासून विवक्षित भागाचें पृथक्त्व दाखविण्याकरिता उपयोगात येऊं लागलें व तें कुराणातील भिन्न भिन्न अध्यायांचे वाचक होऊन बसलें. यांपैकीं कांहीं अध्याय लहान व कांहीं मोठे आहेत. लहान अध्याय अथवा सुरापैकीं कांहीं पूर्ण आहेत. यावरून जे मोठे आहेत ते अनेक प्रकटीकरणाच्या संमिश्रणानें बनलेले असावेत अशी साहजिक कल्पना होते. या कल्पनेस पुढील गोष्टींनीं बळकटी येते. निरनिराळ्या परंपरांतून मोठ्या सुरातील विचाराची माला ठिकठिकाणीं तुटलेली दिसते. आणि वास्तविक मोठ्या सुरांतील अनेक भाग मुळांत वेगळे होते असें दाखवावयास पाहिजे. लहान सुरात देखील कांहीं भाग मुळात नसताना आलेले आहेत. परंतु हें मत चोंहोकडे लावतां कामा नये. कारण १२ व्या अध्यायात आरंभीं थोडी प्रस्तावना, नंतर जोसेफच्या इतिहासाचा भाग, त्यानंतर उपसंहारात्मक थोडासा भाग अशी सुंदर रचना व विसाव्या अध्यायात मोझेसच्या इतिहासाविषयीं स्वयंपरिपूर्ण भाग पाहून हे अध्याय प्रथम पासूनच इतके लांब होते असे दिसतें. अठराव्या अध्यायांत प्रथम "सात निद्रित" मोझेसची हकीकत वगैरे. निरनिराळया विषयांचा उपक्रम केलेला दिसतो. पण शेवटीं ते सर्व जोडले जातात. पृथक कथाभागांत देखील कुराणांत एका विषयावरून दुसऱ्यावर कशा उड्या मारलेल्या आहेत, विचारांचा संदर्भ राखण्यांत किती निष्काळजीपणा दाखविला आहे, अगदीं आवश्यक असलेले भागचे भाग कसे गाळलेले आहेत हे आपणांस चांगलें पाहतां येतें. यासाठीं कुराणांत कोठेंहि असंबद्धता दिसल्यास आपणांस असें म्हणतां येणार नाहीं कीं येथें तें तुटलें आहे व मागाहून कोणी तरी ठिगळ देण्याचा प्रयत्न केला आहे. जुन्या अरबी

कवितेंत हा नेहमींचाच प्रकार आहे. नव्या विषयास सुरुवात केल्यानंतर मध्यें हळूच अगर एकाएकी जुन्या विषयावर येणें ही गोष्ट कुराणात फार आढळते. थोडक्यांत सांगावयाचें तर रचनेच्या दृष्टीनें कुराणांत किती उणीवा असल्या तरी बहुतेक ह्यांचे सूर मूळ सुरांनां धरून आहेत.

महंमदाच्या मनामध्यें प्रकटीकरण कसें झालें याचा विचार करणें म्हणजे कवीच्या मनःप्रवृत्तीचें पृथक्करण करण्यासारखें आहे. त्याच्या प्रथम वयांत व क्वचितप्रसंगीं पुढेंहि हीं प्रकटीकरणें मनाच्या आवेगाबरोबर एकदम उसळून बाहेर आलीं असलीं पाहिजेत, व त्यामुळें तीं दैवी स्फूर्तीशिवाय अन्यथा असतलिसें त्याला वाटणें शक्य नसावें. शांत चित्तानें पद्धतशीर शुद्ध विचार करणारा तो नसून बौद्धिक वळण नसलेला व धर्मभोळेपणांत वाढलेला असा कल्पनाविहारी होता; शिवाय धाडशी वृत्तीची उणीव त्याच्या स्वभावात नसल्यामुळें विरोध उत्पन्न होतांच, चिडणारा व ज्याचे नितांत विचारांमुळें विशिष्ट भावनांचें प्राबल्य वाढलें आहे असा होता. यामुळें धार्मिक कल्पनाचित्रें डोक्यांत भरताच देव दूत आपणास अमुक अमुक म्हणावयास सागतो आहे असें त्यास साहजिकच वाटे. कांहीं भाग त्याच्या खेरीज कोणीच ऐकिला नाहीं तर कांहीं तो विसरला असें कुराणांतच म्हटलें आहे. यातील बराच मोठा भाग भावनाप्रधान आहे व कांहीं भाग शुद्ध बौद्धिक स्वरूपाचा आहे.

कु रा णा चें ले ख न.—कुराण कसें लिहिलें गेलें हें निश्चित नाहीं. महंमदानें स्वतः कांहींच लिहिल्याचें माहीत नाहीं. त्यास आधीं लिहितां वाचतां येत होतें किंवा नाहीं याविषयीं मुसुलमान लोकांत अद्याप वाद चालतो. पण तो जरी लेखनाच्या बाबतींत अगदींच अज्ञ नव्हता तरी संवयीच्या अभावीं कोणी लेखक नेमणें सोयीच्या दृष्टीनें अधिक बरें असें त्यास वाटलें असावें असें मानण्याकडे लोकाचा कल हल्लीं होत आहे. इ. स. ६२२ मध्यें मदिनेस पळून जाण्याच्यावेळीं कांहीं तुकडे विशेषतः खटल्यांचे निकाल ताबडतोब मुद्दाम नेमलेल्या लेखकाकडून लिहिण्यात आले. यावरून मक्केत असतानाच त्यानें आपलीं वचनें लिहिण्यास सुरुवात केल्याचा संभव दिसतो. तसेंच जुन्या अध्यायांत नवीन भर घालणें वगैरे गोष्टीवरून कुराणाचे मोठमोठे भाग पूर्वीपासून लिहिले गेले होते असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण जरी कांहीं अध्याय त्यानें निरनिराळ्या प्रसंगीं थोडयाशा फरकानें निरनिराळ्या लोकांनां सांगितले तरी सगळे लांब लांब अध्याय त्याला अगदीं बिनचुक पाठ येत असतील असें समजतां कामा नये. असे पाठभेद उत्पन्न करण्यांत जुन्यांत सुधारणा करण्याचा त्याचा हेतु असेल व अर्थास न दुखवितां जेथपर्यंत नुसत्या भाषेचा फरक पडत असतो तेथपर्यंत त्याच्या अनुयायांत घोटाळा उडत नाहीं; कारण दैवी संदेशाच्या भाषेच्या सुसंबद्धतेविषयीं शंका उपस्थित करण्याची प्रवृत्ति त्याच्यांत नाहीं. तरी कित्येक ठिकाणीं हा फरक उपेक्षा करण्यासारखा नाहीं. म्हणून कुराण स्वतःच कबूल करतें कीं नास्तिक लोक उपहासानें महंमदास, ईश्वर कधीं कधीं एका कवितेच्या जागीं दुसरी कविता दडपून देतो असें म्हणतात (१६.१०३). एका प्रसंगीं खुद्द महंमदाच्या दोघा अनुयायात महंमदानेंच सांगितलेल्या दोन भिन्न पाठांपैकीं खरा कोणता याविषयीं वाद चालला असतां कुराण सात पाठांत प्रकट झालें असा महंमदानें खुलासा केला असें म्हणतात. या अस्सल वचनांतील सात हा शब्द फक्त मर्यादित संख्येचा निदर्शक आहे. परंतु यामुळें मुसुलमान धर्मशास्त्रयाना आपल्या हटवादी मताशीं त्याचा मेळ घालतांना केवढे प्रयास पडले असतील! पाठभेदांबद्दल अनेक उपपत्ती आढळतात. व त्यांपैकीं कांहीं खुद्द प्रेषिताचा आधार दाखवितात; आणि कुराणाच्या विवरणात महंमदाच्या कल्पना बोधणाऱ्या वचनास अग्रस्थान देण्यात येतें. एक अगदीं लाडकें पण तितकेंच असमर्थनीय समर्थन आहे तें असें कीं, हे सात पाठ म्हणजे अरबी भाषेचे सात पाठभेद होत.

र द्द झा ले ले पा ठ भे द.—अशा परिस्थितींत साहजिकच महंमदाला एकच सर्वमान्य पाठ असावा असें वाटत असावें, पण तसें करण्यात त्यानें श्रम घेतले नाहींत इतकेंच. व त्याच्या व्यावहारिक बुद्धीला पुढच्या काळांतील धर्मशास्त्रयांच्या इतका काटेतोलपणा ग्राह्य वाटला नाहीं. तथापि क्वचित कांहीं प्रकरणें किंवा कविता रद्द समजून विसरून जावयास त्यानें आपल्या अनुयायांस सांगितलेलें आहे. एक ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण म्हणजे ५३ व्या अध्यायांतील दोन कविता होत. यांत तीन पाखंडी देवताना त्याचें ईश्वराजवळ वजन असल्यामुळें महंमदानें मोठी मान्यता दिली आहे. यात अल्लाचा मोठेपणा कायम राहून शिवाय आपल्या देशबांधवांवर छाप बसविता येणार होती. हा त्याचा उद्देश सिद्धीस गेला परंतु पुढें त्याचें मन खाऊं लागलें तेव्हां त्यानें हे शब्द सैतानाच्या प्रेरणेमुळें निघाले असें प्रसिद्ध केलें.

र द्द ठ र ले ले नि य म.—कुराणात वारंवार आढळणाऱ्या मुसुलमानासंबंधींच्या कायद्याच्या व नियमांच्या बाबतींत निराळाच प्रकार आढळून येतो. महंमदाच्या ईश्वरविषयक कल्पनेस तफावत पडण्यासारखें यात कांहीं नाहीं. त्याच्या दृष्टीनें ईश्वर म्हणजे सर्वसत्ताधारी, कोणत्याहि गोष्टाचा बरेवाईटपणा बेफिकीरपणें स्वतःच्या जबरदस्तीच्या हुकुमानें ठरविणारा, स्वेच्छेनुसार आज्ञा फिरविणारा, ख्रिस्ती, ज्यू व मुसुलमान यांनां वेगवेगळे कायदे लावणारा असा आहे. उदाहरणार्थ कुराणांत निरनिराळ्या प्रसंगांस अनुसरून मूर्तिपूजकांनां मुसुलमानाकडून मिळणाऱ्या प्रायश्चित्तासंबंधीं भिन्न भिन्न आज्ञा आढळतात. त्या रद्द करण्याचा विचार महंमदास शिवला असल्याचें दिसत नाहीं. पुढील पिढ्यांतील लोकांनां यांतील रद्द भाग सहज निश्चित करतां

येणार नाहींत. ही गोष्ट महंमदाच्या ध्यानांत आली नसावी कारण साहजिकच त्याची नजर आपल्या धर्माच्या लोकांच्या भविष्यकालापर्यंत पोंचूं शकली नाहीं. प्रकटीकरणांत प्रासंगिक गोष्टी तशाच कायम राखण्यात आल्या आहेत. मदिनेंत असताना अत्यंत जरूरीच्या प्रश्नावर ईश्वराकडून ताबडतोब उत्तर मिळण्याचे प्रसंग इतके वारंवार आले कीं श्रद्धाळू लोकाना त्याबद्दल सानंदाश्चर्य वाटतें. खलीफ (उस्मान)नें देखील एकदा असें म्हटलें आहे कीं, 'जर प्रवक्ता आज हयात असता तर या मुद्द्यासंबंधीं कुराणात नवी आज्ञा प्रकट झाली असती' तसेंच महंमदाच्या पट्टशिष्यानीं सुचविलेल्या विचाराशीं ईश्वरी आज्ञा मिळत्या झाल्याचीं उदाहरणेंहि थोडीं नाहींत. एक आख्यायिका अशी आहे कीं, पुष्कळदां उमरचें एक प्रकारचे मत असें व नंतर त्यास अनुसरून कुराण प्रकट होई.

कुराणात काय काय आहे :—कुराणाच्या निरनिराळ्या भागात अगदीं भिन्न भिन्न विषय आलेले आहेत. पुष्कळ प्रकरणातून धार्मिक व नैतिक विषयाचा ऊहापोह केलेला आहे. ईश्वराचा मोठेपणा, भलेपणा व पुण्यशीलता यांचें भक्तांस वारंवार स्मरण दिलें आहे. ईश्वर हा एक असून सर्वशक्तिमान आहे. अशी त्याची श्रेष्ठता दर्शविली आहे. प्रवक्ता ख्रिस्त अशासारख्या मनुष्यास अगर मूर्ति वगैरेंना देवत्व देण्याची कल्पना अत्यंत निंद्य मानिली आहे. स्वर्गीय सौख्यें व नरकातील क्लेश यांचें अगदीं स्पष्ट शब्दचित्र काढलें असून शेवटचा जगाच्या न्यायाचा दिवस येण्याच्या प्रसंगींच्या सर्व विश्वाच्या भयप्रद स्थितीचेंहि वर्णन आहे. आस्तिक लोकांच्या करता त्यात नैतिक नियमाचे पाठ असून विशिष्ट प्रसंगीं उपयोगीं पडणाऱ्या सूचनाहि आहेत. निरुत्साह्यांची निर्भर्त्सना केली आहे; शत्रूंना भयंकर शिक्षेची धमकी दिली आहे व नास्तिकास इस्लामाचें सत्यत्व पटविण्याचा प्रयत्न केला आहे. कुराणात काहीं ठिकाणीं उपदेशाची भाषा आहे व काहीं ठिकाणीं सामान्य आज्ञा केल्याप्रमाणें अथवा एखादी गोष्ट जाहीर केल्याप्रमाणे भाषायोजना आहे. दिवाणी कायद्यापासून तो महंमदाच्या जनानखान्यापर्यंत व्यवस्था करणाऱ्या आज्ञा बऱ्याच मोठया भागात आहेत. एका अध्यायांत प्रार्थना आहे, दोहोंत जादूचें तंत्र आहे, कांहींत एकच विषय प्रतिपादिलेला आहे तर बाकीच्यांत अनेक विषय आणले आहेत.

कथाभाग.—कुराणांतील ऐतिहासिक भाग सांगण्यांत महंमदाचा हेतु दुष्टानां शासन व शिष्टांना लाभ कसा होतो हें दाखविण्याचा दिसतो. महंमदाच्या वेळीं अरब लोक ज्या देवताची पूजा करीत त्यांच्या नांवाचा उल्लेख करून कुराणांत नोहाला त्याविरुद्ध भांडावयास लाविलें आहे. अब्राहामच्या तोंडीं घातलेलें भाषण स्वतः महंमदाचें अगर "ईश्वराचें" असावें असें वाचकांस वाटतें. दुसऱ्या कांहीं कथा केवळ मौजेखातर दिल्या आहेत. कुरेश लोक या कथांनां फारसा मान देत नसत.

जुन्या व नव्या करारांशीं कुराणाचें नातें.—वरील कथा पुराणांतील व विशेषतः जुन्या करारांतील व्यक्तींच्या आहेत. पण ग्रंथ नुसता ऐकून त्यांतील कथा घेतांना होणाऱ्या फरकासारखे फरक पुष्कळ झाले आहेत. अगदीं अज्ञानी ज्यूचा देखील हामन हा कोणाचा प्रधान ही गोष्ट, अगर मोझेसची बहीण (मीरिआमा) व ख्रिस्त माता मेरी यांविषयीं घोंटाळा झाला नसता. या चुकाना भर घालण्यासाठींच कीं काय दुसरेहि पुष्कळ तऱ्हेवाईक फरक महंमदाच्या अज्ञानामुळें झाले आहेत. १२. ४९ मध्यें तो ईजिप्तची सुपिकता पावसावर अवलंबून आहे असें म्हणतो.

यातील अलेक्झांडरचा वृत्तांत ज्यू अगर ख्रिस्ती ग्रंथातून घेतला गेला हें निश्चित नाहीं. यांतील त्याच्या शिंगांचा उल्लेख अगदीं अलीकडील शोधाप्रमाणें इ. स. ५१४-१५ च्या सीरियन दंतकथेशीं जुळविता येईल. ज्यू व ख्रिस्ती इतिहासाखेरीज यात अरबी प्रवक्त्याच्या कथा असून त्याच्यात याहूनहि अधिक फेरफार करण्यात आला आहे.

लिखित माहितीपेक्षा ऐकीव माहितीवरच महंमदाची भिस्त आहे असें वर म्हटलेंच आहे. जुन्या किंवा नव्या करारांशीं क्वचित् जेथें प्रत्यक्ष साम्य सापडूं शकतें तेथें म्हणजे जुना करार (२१. १०५ तसेंच साम ३७. २९; १. ५ व २७. ११ पहा) किंवा नवाकरार (७. ४८ व ल्यूक १६. २४; ४६. १९ व ल्यूक १६. २६). याठिकाणीं एखाद्या ज्यूचा अगर ख्रिस्त्याबरोबर झालेल्या संभाषणातील सहज लक्षात ठेवलेल्या गोष्टींपेक्षा अधिक सापडत नाहीं. ज्यास वरील परिस्थितीचें यत्किंचित ज्ञान असेल त्यानें हे तोंडी भाषणातील उतारे मानूं नये तथापि जेथें पाणी मिळणार नाहीं तेथे वाळूचा उपयोग करा अशी तलमुदशीं जुळणारी आज्ञा पाहून आपणास महंमदाला तालमुद देखील माहित असलें पाहिजे असें म्हणावें लागेल. बाकीच्या बाबतींत असें म्हणता येईल कीं, ग्रंथ या संज्ञेस शोभेल असें कुराणाच्या पूर्वी अरबी भाषेंत वाङ्मय असणें अगदीं असंभवनीय आहे.

भाषाशैली.—भाषाशैलीच्या दृष्टीनें कुराणाचे निरनिराळे भाग निरनिराळ्या योग्यतेचे आहेत. निर्विकार मनाच्या वाचकास त्याची सौंदर्यग्राहकतेची तृषा शमविण्यासारखा फारच थोडा भाग आढळेल, तरी त्यास मनोविकारांचा जोर व कल्पनाशक्तीचा प्रभाव दिसून येतो. स्वर्गाच्या वगैरे वर्णनांत कवित्व दिसून येत असून ९३ अध्यायामध्यें तर भरपूर प्रसाद दिसून येतो. कुराणाचा बराच मोठा भाग गद्यात्मक आहे, व त्याची भाषा बोजड आहे. वारसासंबंधीच्या वगैरे नियमांची भाषा गद्यात्मक असावी हें ठीक आहे, पण महंमदानें स्वतःच्या व श्रोत्यांच्या आवडीस अनुसरून प्रथमतः

पतकारलेल्या गद्यपद्यात्मक मेसळीच्या भाषापद्धतीस चिकटून राहण्याचा त्याचा हट्ट चुकीचा आहे. कारण गद्य भाषेस योग्य असे विषय त्यानें कवितेंत व्यक्त केल्यामुळें ग्रंथांत विरूपता आढळून येते. कदाचित् जे दोन तीन पाठ एकदांच वाचतांना आज आपणांस त्रासदायक असे वाटतात ते मक्केच्या तरुहवेंत उपदेशपद्धतीनें म्हणून दाखविले जात असतां त्यांचा श्रोत्यांवर अगदीं निराळा परिणाम होत असेल. कारण आपल्या ध्यानात सुद्धा न येणाऱ्या अनेक गोष्टी त्यांनां सार्थ अशा असतील. तीन चार वर्षांत पावसाचें दर्शनहि ज्यांनां लाभत नाहीं अशा अरबानां महंमदानें केलेले मेघ उत्पन्न करून ते रखरखीत प्रदेशावर पाडून त्यास फलपुष्पांनी समृद्ध करणाऱ्या ईश्वराच्या थोरपणाचें वर्णन खास हृदयस्पर्शी वाटत असेल.

अ लं का र यु क्त स्व रू प व क वि ता.—पहिल्यापहिल्या अध्यायात कवित्वविषयक शब्द असल्यामुळें मक्केतील लोक महंमदास प्रासादिक कवि म्हणत असले तरी महंमद स्वतःस दैवी स्फूर्तीचा प्रवक्ता समजत असल्यामुळें त्याला ती पदवी सोडावी लागली. पण आपण सुद्धा त्याला कवित्वाच्या आरोपातून मुक्त करूं. कट्टया धार्मिक लोकाप्रमाणें त्यासहि काव्यसौंदर्याची ग्राहकता मुळींच नव्हती. यावरून कुराणाची भाषा काव्यमय नसून अलंकारिक आहे असें ठरतें. व त्याचा जो विलक्षण परिणाम आपणावर होतो तो काव्यामुळें नसून अलंकारिक भाषेमुळें होतो. स्वाभाविक यमकें फार थोड्या ठिकाणीं आढळतात. तरी यमकें साधण्याचा सर्वत्र प्रयत्न केलेला आहे. यमकाची कविता त्यावेळच्या अरबाना फार आवडे, व म्हणून महंमदानें ती पतकरली होती. याने जरी थोडी शोभा आली तरी कित्येक ठिकाणीं ती निवळ ओझ्यासारखी भासते. कांहीं कांहीं ठिकाणीं यमकासाठीं क्रियापदाचीं भलतींच रूपें घातलेलीं मुसुलमानाना देखील कबूल आहेत अर्थहानीहि कित्येक ठिकाणीं केलेली आहे. एरवीं ईश्वराच्या सिंहासनासभोंवार देवदूतांची संख्या सागताना (६९. १७) केवळ यमकास जुळल्यामुळें घातलेला आठाचा आकडा त्यानें घातला असता असें नाहीं. तसेंच ४५ व्या अध्यायात स्वर्गांतील दोन बागा, त्यात दोन कारंजीं, दोन प्रकारचीं फळें हीं सर्व या सबंध अध्यायात प्रामुख्यानें असलेल्या यमकास शोभणारा द्विवचनाचा प्रत्यय असल्यामुळेंच घातलेलीं असावींत. पुढील पुढील भागात नुसतें यमक पूर्ण करण्यासाठीं महंमद असंबद्ध धार्मिक वाक्यें घालतो.

नि र्जी व भा षा स र णी.—भाषासौंदर्याच्या दृष्टीनें बराच भाग जरी उत्तम आहे तरी साहित्यदृष्ट्या पुस्तक पहिल्याप्रतीचें वाटत नाहीं. घडलेल्या हकीकतींतील किंवा प्रवचनांतील अगदीं जरूर असलेले दुवे गाळले गेले आहेत; यामुळें त्या हकीकती ज्यांनीं पूर्वी ऐकिल्या त्यांच्यापेक्षा आम्हास त्या दुसरीकडून माहीत झाल्यामुळें चांगल्या कळतात.

वे ग वे ग ळ्या भा गां चा का ळ.—हल्लींच्या कुराणापैकीं कांहीं मक्केच्या वेळचें (इ. स. ६२२ पूर्वी) व कांहीं मदिनेच्या पलायनानंतरचें (इ. स. ६२२ च्या सुगीपासून ८ जून ६३२ पर्यंत) आहे. मक्केंत महंमद एका लहानशा समाजाचा आचार्य म्हणून होता पण मदिनेंत प्रथम तो एका जेरदार पक्षाचा पुढारी होता व पुढें सर्व अरबस्तानचा शास्ता झाला. या फरकाची छाया कुराणावर पडलेली असून मदिनेंतील अध्याय मक्केच्या अध्यायाशीं मिसळलेले असतांहि स्पष्ट उघडकीस येतात. मदिनेंतल्या प्रकटकिरणाचा आपल्यास माहीत असलेल्या गोष्टींशीं संबंध आल्यामुळें व त्यांच्या तारखा साधारणतः बरोबर माहीत असल्यामुळें त्याचा काळ आपल्यास निश्चित ठरवितां येतो. मुसुलमानांच्या परंपरेचाहि येथें बराच उपयोग होतो. तरी बऱ्याच भागाविषयीं अनिश्चितता रहाते. डॉ. स्नूक हुर्ग्रोंजे यानें आपल्या निबंधांत दर्शित केलेली इब्राहिमची दंतकथा ही एक मक्केंतील वेगवेगळे अध्याय केव्हां झाले याची उत्तम कसोटी आहे. त्या दंतकथेंत ज्यू लोकांशीं झालेल्या वादानंतर इब्राहिम सर्वांत पहिला महंमदाचा मदिनेंतील पुरस्कर्ता झाला, नंतर पहिला मुसुलमान व नंतर 'काबा'चा संस्थापक झाला. एक परंपरा सर्व अध्यायांची कालाच्या दृष्टीनें संगति लावणारी आहे. पण ती परंपरा हल्लींच्या अध्यायांतील फुटकळ भाग वेगवेगळ्या काळीं झाले असें मानीत नसल्यामुळें व दुसरीं अनेक शंकास्थानें असल्यामुळें तितकी ती विश्वासार्ह वाटत नाहीं. एक तर महंमदाच्या वेळची कोणी अशी यादी तयार करीलसें वाटत नाहीं; व कोणी प्रयत्न केला असल्यास मक्केंतील अध्यायाची विश्वासनीय माहिती त्यास मिळाली असणेंहि अशक्य आहे. तेव्हां यात खरी परंपरा नसून महंमदाच्या काळानंतर शेंकडों वर्षांनीं झालेल्या एखाद्या सत्शील मुसुलमान शोधकानें तयार केलेली असावी.

म क्कें तील अ ध्या य.—मक्केंत व्यक्त झालेल्या प्रकटीकरणात बहुतेक अगदीं लहान लहान अध्याय असून त्यांची रचना किंवा रोख मदिनेंतील अध्यायाहून अगदीं भिन्न आहे. यातील विशिष्ट भाषासरणी पूर्णपणें एकसारखी असल्यामुळें त्याचा वेगळा वर्ग आपण मानूं. याच्या उलट दुसरा एक वर्ग असा पडतो कीं, त्याचें मदिनेंतील अध्यायाशीं पूर्ण साम्य आहे. यावरून पहिल्या वर्गास आपण जुना वर्ग व या दुसऱ्या वर्गास नवा वर्ग असें मानूं. या दोन वर्गांच्या दरम्यान तिसरा एक वर्ग असून त्यांतील अध्याय पहिल्या वर्गांतून अखेरच्या वर्गात झालेल्या फरकाचे निदर्शक आहेत. प्रोफेसर बीलनें दर्शविलेल्या या पृथःकरणांत स्पष्ट अंतर दिसून येणें शक्य नाहीं. व कांहीं अध्याय कोणत्या वर्गांत पूर्णपणें पडतील याचा ठाम निश्चय होत नाहीं, किंवा या वर्गांतील अध्यायांचा कालाच्या दृष्टीनें क्रम लावणेंहि तसेंच अशक्य आहे. याकरितां योग्य पुराव्याच्या

अभावीं आपण महंमदाच्या मानसिक प्रगतीच्या अनुरोधानें या अध्यायांचा क्रम लावावा. अर्थात् असें करतांना कल्पनेवर जास्त भिस्त ठेवावी लागेल. वस्तुस्थिति अशी आहे कीं, महंमदाच्या पलायनापूर्वीची कांहींच माहिती नाहीं,तो प्रवक्ता बरोबर कधीं झाला हें देखील उपलब्ध नाहीं. बहुधा हा काळ इ. स. ६१० असावा. तिसऱ्या वर्गापैकीं अध्याय ३०.१ पासून पुढील भागांत आलेला उल्लेख इ. स. ६१४ च्या वसंतऋतूंत दमास्कसपासून जवळच पर्शियनांनीं बिझान्शिअम वर मिळविलेल्या जयाचा असावा अशी एक परंपरा मानतें. यावरून पाहतां हा तिसरा वर्ग मक्केतील कारकीर्दीचा बराच भाग व्यापून असावा. आवेशयुक्त स्वरूपाचा पहिला वर्ग थोड्याच काळांतील असावा हेंहि असंभाव्य नाहीं. व इ. स. ६१५—१६ मध्यें उमर मुसुलमान झाला त्यावेळीं दुसऱ्या वर्गांत मोडणारा २० वा अध्याय लिहून तयार होता या म्हणण्यासहि वरील विधानानें बाध येत नाहीं. तथापि कालाच्या दृष्टीनें क्रम लावण्यासारख्या खुणांच्या अभावीं आपणांस मक्केतील अध्यायाच्या या तीन मोठ्या वर्गांचा तरी निश्चित क्रम लावतां आला येवढ्यांत आपण समाधान मानलें पाहिजे.

म क्के ती ल जु न्यां त जु ने अ ध्या य.—पहिल्यानें महंमदाच्या क्षुब्ध मनःप्रवृत्तींचा जोर इतका वाढत असे कीं त्यास शब्द सुचत नसत.यावेळच्या त्याच्या वचनावरून आपणांस जुन्या रानटी भविष्यवाद्यांची आठवण होते. कारण त्यांच्या भाषापद्धतीच्या नकला हल्लीं आपणांस पहावयास मिळतात. त्यांच्याशीं यांचें बरेंच साम्य आहे. यावेळेचे अध्याय लहान, त्यांतील वाक्यें लहान व साधारण शुद्ध पण सारखी बदलणारी वृत्तरचना यांनीं युक्त असून, कांहींच्या आरंभीं असणाऱ्या शपथा भविष्यवाद्यांच्या शपथा प्रमाणेंच आहेत. कांहीं शपथांचे अर्थ समजत नाहींत व कांहींनां समजण्यासारखा अर्थच नसावा. कारण सर्व प्रकारचे चमत्कार या अध्यायांतून भरलेले आहेत. ठिकठिकाणीं महंमदास साक्षात्कार झालेले आहेत व त्याच्या डोळ्यापुढें देवदूत प्रत्यक्ष दिसलेले आहेत. शेवटच्या दिवसांची व पुनरुत्थानाचीं स्पष्ट वर्णनें आहेत, तर दुसरीकडे स्वर्गांतील सुखांचीं व नरकातील दुःखाचीं वर्णनें आहेत. तथापि सगळेच जुने अध्याय असे नसून कांहीं अधिक शांत अवस्थेमध्यें प्रकट झालेले आहेत. सगळ्या कुराणाचा जुन्यांत जुना भाग ९६ व्या अध्यायाच्या प्रारंभास असलेला होय असें एका सुप्रसिद्ध परंपरेचें मत आहे. या परंपरेचा संबंध महंमदाच्या आवडत्या बायको (आयेषे)कडे पोहोंचतो. परंतु ज्यावेळीं हा अध्याय झाला त्यावेळीं ती जन्मली नव्हती व ही गोष्ट महंमदानें तिला मागाहून कित्येक वर्षांनीं आठवण म्हणून सांगितलेली असावी. शिवाय ही श्री इतकी विश्वासार्ह नसून दुसरेहि कांहीं भाग सर्वांत जुने असल्याबद्दल अनेक मतें आहेत. एकंदरींत ज्यांत महंमदास देवदूतानें सांगितलेलें प्रकटकिरण पाठ म्हणावयास आज्ञा झालेली आहे तो ९६.१ पासून पुढील भाग सर्वांत जुना असला पाहिजे. यांत ईश्वराचें सार्वशक्तिमत्व व कृपादृष्टि यांचें उदाहरण म्हणून मांसाच्या गोळ्यापासून मनुष्याची उत्पत्ति व लेखनकला या दोन गोष्टी येऊन चुकल्या आहेत. या आवेशयुक्त अध्यायांतून ईश्वराचें एकत्व वगैरेची थट्टा करणाऱ्यांनां भयंकर धमक्या महंमदानें दिल्या आहेत. १११ व्या अध्यायांत त्यानें आपल्या अबू लाहाब नांवाच्या चुलत्याला व त्याच्या बायकोला त्यानें दांडगाईनें प्रतिकार केल्याबद्दल नरकांत घालविलें आहे. या काळीं झालेल्या अध्यायांपैकीं बहुतेक हल्लींच्या कुराणाच्या शेवटास आहेत. व प्रथमतः ते पुष्कळच असून नंतर त्यांतील कांहीं लुप्त झाले असावेत असें वाटतें.

महंमदाचा सर्व जोर व्यवस्थित तत्वविवेचनापेक्षां आवेशयुक्त कल्पनाशक्तीवर अधिक असल्यामुळें तीच ज्यांत अधिक दृष्टीस पडते अशा या भागावर आपली नजर असणें अधिक योग्य होय. दुसऱ्या वर्गांतील अध्यायात कल्पनेचा ओघ कमी कमी होत जाऊन त्यांतील ध्वनि नीरस होत गेला आहे. नवीन तत्वाची सिद्धता जुन्याच उत्तरांनीं केलेली आहे; अध्याय लांब लांब झाले आहेत, प्रतिस्पर्ध्यांच्या थट्टेच्या टीकेला देखील पुळचट उदाहरणांनीं उत्तरें दिलीं आहेत. ज्या जुन्या तत्ववेत्याचे पूर्वी उल्लेख आलेले होते त्याचाच लांबलचक इतिहास सांगितला आहे व एकंदरींत भाषापद्धतीची मौज गेली आहे असें म्हणावें लागतें.

फा ते हा.—दुसऱ्या कालांतील अगर पहिल्या कालाच्या अखेरचा असा कुराणाचा पहिला अध्याय असून हा फार महत्वाचा आहे. त्यांत मुसुलमानांची ईश्वरास प्रार्थना असून त्याची मदत व (हुदा) योग्य मार्गाची जाणीव या गोष्टी मागितल्या आहेत. अल् फातेहा अध्यायातील वाक्यें खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

"(१) परम दयाळू (व) कृपाळू ईश्वराच्या नांवानें (मी आरंभ करितों), (२) सर्व जगाचा पालनकर्ता जो ईश्वर त्यालाच सर्व स्तुति (योग्य होय), (३) (तो) परम दयाळू (आणि) कृपाळू (आहे) ,(४) निर्णयाच्या दिवसाचा धनी आहे (५) (हे परमेश्वरा) तुझेंच पूजन आम्ही करतों व तुझेंच साह्यय मागतों. (६) तूं आम्हांस सन्मार्गास लाव, (७) ज्या (लोकां)वर तूं कृपा केली आहेस त्यांचा मार्ग (दाखीव) ज्यांच्यावर तुझा अनुग्रह पण ज्यांच्यावर (तुझा) कोप झालेला आहे त्यांचा(मार्ग) नको आणि आडमार्गी भटकणाऱ्यांचाहि नको.

वरील विधानांत याची एकहि नवी कल्पना नाहीं. यांतील सात वाक्यांपैकीं पांच वाक्याचा ख्रिस्ती व ज्यू उपासनापद्धतींतील नेहेमींच्या उक्तींशीं उघड संबंध पोहोंचतो. सहावी उक्ति साम २७. ११. शीं शब्दशः जुळते. ईश्वराच्या

दयालुत्वाचें दर्शक ' रहमान ' हें नांव ज्यूच्या ' रहमाना ' याहून भिन्न नाहीं. दक्षिण अरबस्तानात महंमदापूर्वी ईश्वराबद्दल हें नांव बराच काळ अस्तित्वांत होतें (उदा. साबिअन इन्स्क्रिप्शन्स ग्लेसर, ओळ ३२; ६१८ ओळ २)

मूर्तिपूजकांनीं ' अल्ला ' या उपयोगात आणलेल्या नांवाऐवजीं ' रहमान ' हें नांव ईश्वराबद्दल योजावें असा महंमदाचा कांहीं काळ हेतु असावा असें दिसतें. हा उद्देश पुढें त्यानें सोडून दिला. तरी दुसऱ्या काळांतील अध्यायांत'रहमान' या नावाचा वारंवार उपयोग केला गेला आहे. यावरून जरी आपणांस हा अध्याय दुसऱ्या काळांत घालतां येतो तरी तो मक्केंतील कारकीर्दीच्या आरंभाचा होता किंवा त्यातील ' ईश्वराच्या नांवानें ' हें प्रारंभवाक्य मूळचें त्यातील होतें किंवा कसें हें आपणांस ठरवितां येत नाहीं. अर्थात् जुन्या परंपरेच्या दृष्टीला कालविषयक विकल्प दिसत नाहीं व ' फातेहा ' हा कुराणाचा अत्युच्च भाग मानला जाऊन प्रत्येक मुसुलमान पाच प्रार्थनात मिळून वीस वेळां त्याचा उच्चार करतो.

म क्कें ती ल अ खे र चे अ ध्या य.—हल्लींच्या कुराणांतील मोठा भाग व्यापून टाकणारे तिसऱ्या काळांतील अध्याय अगदीं नीरस आहेत. बहुतेक प्रकटीकरणे लांब लांब आहेत; व त्यांतील उक्तीहि लांब आहेत. त्यांची भाषा प्रवचनवजा आहे. हे अध्याय अगोदरच वश झालेल्या मनाची धर्मबुद्धि वाढविणारे असतील पण नवख्या मनुष्यावर त्यांचा कांहीं परिणाम होणार नाहीं. परंतु इस्लामाचा प्रसार होण्याच्या कामीं हेच लांब अध्याय विलक्षण परिणामकारक झालेले आहेत. कारण महंमदाचे अनुयायी तार्किक विचाराची ओळख नसलेले व जुना धर्म टाकून दिलेले असे होते.

म दि नें ती ल अ ध्या य.—मदिनेंतील अध्यायाचा ऐतिहासिक क्रम लावणें सोपें आहे. कारण मदिनेंतील महंमदाच्या इतिहासाचें आपणांस पुरेसें ज्ञान असून कांहींचे ऐतिहासिक प्रसंग स्पष्ट आहेत तर कांहींच्या परिस्थितीवरून त्याचा काळ ठरवितां येणें शक्य आहे. तथापि थोडा भाग राहतो तो मदिनेंतील आहे येवढेंच आपणांस म्हणता येतें.

मक्केंतील अखेरच्या अध्यायाप्रमाणें याचीहि भाषा गद्य असून मधून मधून अलंकारिक व कांहीं प्रसंगीं तेजस्वी अशी आहे. लढाईस आमंत्रण करणें, पूर्वीच्या जयापजयाबद्दल विचार प्रकट करणें, श्रद्धाहीनत्वाबद्दल कानउघाडणी करणें वगैरे अनेक वेगवेगळ्या बाबतींत महंमदाला मुसुलमानांनां निरोप सांगावयाचे असत. कांहीं लोक श्रद्धा व अश्रद्धा यांच्या दरम्यान असत, अशा लोकांनां तो स्वतः 'शंकेखोर' म्हणत असे. या सर्वांचा एक मेळ नसे व प्रसंग प्राप्त झाल्यावर सगळेच मार्गे रहात. मदिनेंतील ज्यू लोकांबरोवर त्यांच्या नेहमीं कलागती होत व त्या विकोपास जात असत. मक्केंतील इतर अध्याय सामान्य कायदेकानूंविषयीं व प्रासंगिक प्रश्नाविषयीं असून ते प्रथम लहान होते तरी मागाहून कमी अधिक महत्वाच्या माहितीची भर पडल्यामुळें ते आतां मोठ्या अध्यायांत मोडतात. सगळ्या कुराणांत मोठया वादाचा भाग म्हणजे महंमदाचें स्त्रियांसंबंधीं नातें दाखविणारा होय.

वरील माहितीवरून कुराणाचें बरेचसें अंतरंग कळून येईल. हे एक अठरा धान्यांचें कोडबोळे आहे. यांतील धर्मविषयक, तत्वज्ञानविषयक व मुसुलमानाच्या कायद्याविषयींचा भाग येवढे भाग एकत्र केले असतांहि पुरण्यासारखें आहे. सर्वच भाग एकत्र गोळा केले गेले ही लोकांच्या दृष्टीनें सुदैवाची गोष्ट आहे. योग्य धार्मिक बुद्धि ठेवून वाचणारा वाचक मक्केंतील चालीरीतींवर टीकात्मक असलेला भाग उच्च नीतिविषयक भागांपेक्षाहि अधिक मन:पूर्वक वाचतो. कारण त्यास याच्या इतके ते भाग समजत नाहींत.

गू ढ अ क्ष रें —एकोणतिसाव्या अध्यायाच्या आरंभीं कांहीं प्राथमिक अक्षरें असून त्यांचा अर्थ लावण्याचा अनेक विद्वानांनीं प्रयत्न केलेला आहे. परंतु निश्चित असा निकाल युरोपीय अगर मुसुलमान विद्वानांनांहि अद्याप पर्यंत देता आला नाहीं. सामान्य लोक त्या अक्षरांचा अर्थ फक्त ईश्वरासच माहीत आहे अशी दूरदर्शीपणाची समजूत करून घेऊन संतुष्ट असतात.

कु रा णा चे प्र व र्त न —ईश्वरी आज्ञा लोकास पोहोंचविण्याचें आपलें कर्तव्य आहे असें वाटल्यानंतर महंमदानें मक्केंतच प्रगटीकरणें लिहून ठेवण्यास सुरवात केली असली पाहिजे. महंमदाच्या मरणानंतर कुराण विस्कळित तुकड्याच्या स्वरूपात होतें. निरनिराळे भाग अनेक मुसुलमानाना तोंडपाठ येत असत पण सबंध ग्रंथ कोणासच माहीत नव्हता. तोंडातोंडीं असलेल्या भागांत नवीन भर पडणें अगर त्यातील कांहीं गहाळ होणें फार संभवनीय होतें. तशांत महंमदाच्या मृत्यूनंतर अरब लोकांशीं झालेल्या मोठमोठया झगड्यात कुराण पाठ म्हणणारे अनेक मुसलमान बळी पडूं लागल्यामुळें उमर यास काळजी पडून त्यानें अबूबकर नावाच्या पहिल्या खलीफास कुराणाचे निरनिराळे भाग एकत्र करावयास लावलें. त्यानें तें काम महंमदाच्याच एका मदिनेंतील सय्यद इब्न थाबित नावाच्या लेखकावर सोंपविलें. त्यानें सपाट दगडावर, चर्मपत्रावर, ताडपत्राच्या दांड्यावर व अशाच दुसऱ्या पदार्थांवर लिहिलेल्या मजकुरावरूनच पण मुख्यतः 'माणसाच्या हृदयापासून ' म्हणजे लोकांच्या तोंडीं असलेल्या माहितीवरून एक प्रत तयार करून ती अबूबकर यास दिली व त्याजकडून पुढें ती उमर याजकडे आली. त्यानें ती आपली हफसा नावाची मुलगी—जी महंमदाची विधवा स्त्री—तिला दिली. या कुराणाच्या मूर्त स्वरूपाला प्रारंभापासून धर्मशास्त्रविषयक प्रामाण्य नव्हतें व त्याची अंतस्थ रचनाहि केवळ तर्कगम्यच होती.

उस्मानचें कुराण.—कुराणाच्या प्रती सर्वत्र एकप्रकारच्या नसल्यामुळें विद्वान लोकांत मतभेद उत्पन्न झाले व त्यामुळें त्यांच्या अनुयायांत भांडणें सुरू झालीं. अशीं भांडणें होणें घातक आहे ही गोष्ट ६५०-५१ मध्यें झालेल्या युद्ध प्रसंगीं नेहावींदचा वीर होधैफ याच्या ध्यानांत येऊन त्यानें उस्मान यास सर्वमान्य अशी एकच निश्चित प्रत करण्याविषयीं विनविलें. हेंहि काम सय्यदावरच सोपविण्यांत आलें व त्यानें तीन कुरेश लोकांच्या साहाय्यानें मिळण्यासारखीं सर्व पुस्तकें एकत्र करून सर्व मुसुल्मानानां प्रमाण अशी एक प्रत पुनः तयार केली व पुनः घोंटाळा होऊं नये म्हणून बाकीचे सर्व पाठभेद जाळून टाकले. यांतून हफसाच्या जवळची प्रत उरली होती तीहि पुढें मदिनेचा सुभेदार मेरवान यानें जाळून टाकली. यामुळें संशोधनाच्या दृष्टीनें जरी बरेंच नुकसान झालें असलें तरी राजकीय व सामाजिक सोयीकरिता ही गोष्ट अपरिहार्य होती.

याप्रमाणें मोठया मेहनतीनें तयार केलेला हा कुराणाचा भाग आपल्या हातीं असून त्याच्या पूर्वतयारीची मात्र आपणांस फारशी माहिती नाहीं. अरब लोकातच चिकित्सक पंडितवर्ग निघेपर्यंत संशोधनहि शक्य नाहीं. सय्यदानें पूर्वीच्या प्रतींवरून वाचावें व त्याच्या सहकाऱ्यांनीं लिहावें अशा तीन प्रती एका विश्वसनीय परंपरेच्या माहिती प्रमाणें दमास्कस, बसरा व कुफा येथें खलिफानें मुख्य प्रती म्हणून पाठविल्या असाव्या व एक मदिनेस राहिली असावी.

वेगवेगळ्या प्रकरणांच्या रचनेत विषयवारी लावणें अशक्य आहे. कारण एकाच अध्यायात अनेक विषय आलेले आहेत. कालानुक्रम ठरविणें ही गोष्ट तर बोलावयासच नको, कारण जुन्या अध्यायाचा काल अनिश्चित आहे. वरील व्यवस्थित पद्धतीकडे दुर्लक्ष्य करून फक्त मोठे अध्याय प्रथम व लहान अध्याय मागाहून अशी रचनेची दृष्टी ठेविली असून तीस देखील क्वचित् फांटा दिला आहे. ११३ व ११४ या जादुगारीच्या अध्यायानां त्यांच्या विषय-वैशिष्टयाबद्दल शेवटीं स्थान मिळालें आहे. तसेंच पहिला अध्याय देखील त्यांतील विषयासच अनुसरून आरंभास आला आहे. सय्यदानें ज्याच्या मूळ प्रतीवरून आपली रचना केली त्यांना अनुसरून व कांहीं स्वेच्छेनें अशी निरनिराळ्या तुकडयाची रचना करण्यांत आली आहे. अध्यायांची विभागणी फक्त "ईश्वराच्या नांवें" वगैरे वाक्यांनीं करण्यात आली आहे व तीं वाक्यें फक्त नवव्या अध्यायात नाहींत. अध्यायांचीं नांवें व उक्तींची संख्या वगैरे दुसरे मथळे आद्य प्रतींत नव्हते व ते कुराणाचा महत्वाचा भागहि नव्हेत.

पूर्ण झालेलें कुराण-उस्मानचें कुराण अपूर्ण आहे. मूळच्या कुराणांतील कांहीं भाग सय्यदानें न घेतलेले असे आहेत. स्वतः महंमदानें त्यापैकीं कांहीं क्वचितच टाकले असते. सय्यदानें हे भाग मुद्दाम गाळले असतील असें वाटत नाहीं. महंमदाच्या शत्रूंच्या नांवांपैकीं कांहीं नांवें त्यांचे वंशज चांगले निघाल्यामुळें त्यानें गाळलीं असावींत असा तर्क आहे. पण आपला दत्तक पुत्र सय्यद व शत्रू (चुलता) अबू लाहाब यांच्या नांवाशिवाय दुसरीं नावें महमदानें कुराणांत घातलींच नाहींत. उलट नवीन कांहीं भाग कुराणांत घुसडण्याचा प्रयत्न सय्यदानें केल्याचेंहि दिसत नाहीं. यावरून उस्मानचें कुराण अगदीं शुद्ध असून पाश्चात्य पंडितांचा त्यांतील प्रक्षिप्त भाग शोधण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले आहेत.

उस्मानच्या कुराणाच्या चार निरनिराळ्या प्रतींत 'व' 'आणि' यांसारखे लहानसान फरक आहेत. पण कोठेंहि अर्थास बाध येत नाहीं. मागील सर्व प्रती त्याच्याच नकला होत.

कुराणाच्या इतर आवृत्ती.—परंतु कुराणाचे दुसरे पाठ एकदम नाहींसे झाले नाहींत. उबय इब्न काबची एक अशी प्रत आहे. तींतील अध्यायाच्या अनुक्रमाची यादी जर बरोबर असेल तर त्यावरून हल्लींच्या कुराणातील बहुतेक तोच विषय त्यातहि आलेला दिसतो. यानें सय्यदाच्या मूल संग्रहाचा उपयोग केला असावा. इब्न मसऊद याच्या संग्रहाचा देखील तोच प्रकार आहे. मोठे अध्याय लहान अध्यायाच्या आधीं घालण्याचें तत्व सय्यदपेक्षा यानें अधिक चांगले पाळलें आहे. पहिला व शेवटचा हे दोन अध्याय यानें गाळलेले आहेत. उलट उबयनें आणखी दोन लहान प्रार्थना अधिक घातलेल्या आहेत; त्या महंमदाच्या मानाव्यात. कुराणात असे सिद्धात असावेत किंवा नाहीं याबद्दल मतभेद असणें साहजिक आहे, असें कोणासहि वाटेल. हे दोन्ही पाठ व इतरहि अनेक प्राचीन पाठभेद संभाळून ठेवण्यात आले आहेत. त्यातील कांहीं नीरस तर कांहीं सामान्य व कांहीं सरस असे आहेत.

इब्न मसऊद.—उस्मानच्या कुराणाच्या सामान्य उपोद्घातास मनापासून विरोध करणारा इब्नमसऊद हाच एकटा होय. तो महंमदाचा जुना शिष्य असून त्याच्या तैनातीस होता. तो जरी मुसुल्मानी धर्मशास्त्राच्या बाबतींत प्रमुख होता, तरी त्याची दृष्टि संकुचित होती. त्याच्या विरोधास यश मिळालें नाहीं. महंमदाच्या तोंडून प्रत्यक्ष कुराण ऐकलेले मुसुलमान त्याकाळीं होते ही गोष्ट लक्षात घेतां, व इतर बाबतींत उस्मानला झालेला विरोध व त्रास पाहता, कुराणाच्या बाबतींत कोणाच्यानेंहि त्यास दोष देववला नाहीं किंवा सय्यदानें जुळविलेल्या कुराणास कोणासहि अमान्य करतां आलें नाहीं ही गोष्ट उस्मानच्या कुराणाचें महत्व सिद्ध करते.

पुढील इतिहास.—अरबी भाषेंतील उच्चारवैचित्र्यामुळें कुराणाचे अनेक वाचनसंप्रदाय उत्पन्न झाले. पुढें त्यातील सात मुख्य ठरून बाकीचे लुप्त झाले. त्यांतहि हफस व नाफी हे दोनच सध्या आफ्रिकेमध्यें ईजिप्तच्या पश्चिमेस प्रसिद्ध आहेत.

कुराणाच्या पोथ्या.—यूरोपीयन लायब्रऱ्यांतून कुराणाचीं कांहीं जुनी पानें सांपडतात. उस्माननें स्वतः लिहिलेल्या म्हणून कांहीं पोथ्या दाखविण्यांत येतात. अशी एक प्रत इंडिया ऑफिसच्या लायब्ररींत आहे. या जरी जुन्या काळच्या असल्या तरी स्पष्ट बनावट आहेत. तसेंच वरील लायब्ररींत असलेली अलीच्या हातची म्हणून दाखविली जाणारी प्रत देखील त्याच वर्गातील होय. अलीकडे कुराणाच्या प्रती शिळाप्रेसवर छापण्यात आलेल्या आहेत.

कुराणावरील टीकाकार.—महंमदानंतर लौकरच कुराणाचे अर्थ लावण्यास सुरवात झाली. यावेळीं शब्दाचे अर्थ न लावता संबंध वाक्याचा अर्थ लावण्यात येत असे व अर्थ लावणारे फारसा योग्यतेचे नसत. व त्याच्या अर्थात असत्य गोष्टींचा भरणा असे. ह्या टीका किरकोळ भागावर झालेल्या होत्या. पहिली संपूर्ण टीका (इ. स. ८३९ ते ९२३) मधील ताबरीची होय. ही वरीच विस्तृत आहे. परंतु अनेक गोष्टींचा खुलासा अपेक्षेप्रमाणें तींत झालेला नाहीं.

दुसरी मोठी टीका झमखशरी याची इ. स. १०७५–११४४ मधील होय. ही १८५९ त कलकत्यास नेसौलीज यानें छापली. तिसरी फ्लाश्चेर यानें (लिपझिक १८४६–१८४८) छापलेली बैदावी याची इ. स. १२८६ मध्यें तयार केलेली होय. याशिवाय आणखी अनेक टीका झालेल्या असून त्याना जरी फारसे महत्व नाहीं. तरी यूरोपीय पंडिताना अर्थ लावण्याच्या कामीं त्या फार उपयोगी पडलेल्या आहेत.

कुराणाचीं भाषांतरें.—आज जसें पाहिजे तसें कुराणाचे भाषांतर एकाहि यूरोपीय भाषेंत झालेलें नाहीं. त्यांतल्यात्यात इंग्रजींतील भाषांतरें उत्कृष्ट असून त्यात अनेकदा छापलेलें जार्ज सेल याचे, १८६१ त झालेलें राडवेलचें व १८८० तील पामरचें याचा अंतर्भाव होतो. याशिवाय जर्मन भाषेंत झालेलें उलमानचे तसेंच हेनिंगचें (लिपझिक) वगैरे भाषांतरें साधारण आहेत. किरकोळ भागांचीं भाषांतरेंहि कांहीं आहेत त्याचा उल्लेख येथें करीत नाहीं. डॉ. मीर मोहंमद याकुबखान या विद्वान मौलवी साहेबांनीं १९१६ त कुराणाचें मराठी भाषांतर करून प्रसिद्ध केलें याच भाषांतरातील उतारे बुद्धोत्तर जग या विभागांत आलेच आहेत. आणखी कांहीं उतारें पुढें देत आहों.

कुराणातील उतारे.—इस्लामी धर्म हें खूळ नव्हे असें पुढील वाक्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे.—

"(मुसलमानांनो ! या लोकास सांगा कीं आम्हीं तर) परमेश्वराच्या रंगांत (रंगले गेलों) आणि परमेश्वराचे (रंगा) पेक्षां आणखी कोणाचा रंग अधिक उत्तम होणार? आणि आम्हीं त्याचीच भक्ती करित आहों. (हे पैगंबरा! तूं या लोकांस) सांग कीं तुम्हीं कां परमेश्वराचे संबंधीं आम्हाशीं झगडतां! आणि खरें पाहता, तोच आमचाहि पालनकर्ता व (तोच) तुमचाही पालनकर्ता होय. आणि आम्हाला आमचीं कर्में व तुम्हांला तुमचीं कर्में; व आम्हीं निखालस त्यालाच मानितो. अगर तुम्हीं असें म्हणतां कीं इब्राहीम व इस्माईल व इस्हाक व याकुब आणि (याकुबचीं) कुलें (हे लोक) यहुदी वा ख्रिस्ती होते. (हे पैगंबरा! तूं त्यास) सांग कीं (बरें,) तुम्हीं अधिक जाणणारे आहा कीं परमेश्वर? आणि जो कोणी परमेश्वराकडून (आलेली) ग्वाही त्याच्या पाशीं (हजर असून तो ती) लपवील त्याच्यापेक्षाहि अधिक जुलमी (आणखी) कोण होणार? आणि जें कांहींहि तुम्हीं करीत आहा, परमेश्वर त्याकडून गाफिल नाहीं. हे लोक (आपआपल्या वेळीं) होऊन गेले; त्याचें केलें सवरलें त्याना, व तुमचें केलें सवरलें तुम्हाला. आणि जे कांहीं ते करून गेले आहेत तुम्हांस त्याची विचारपूस केली जाणार नाहीं.

ज्या लोकाची अक्कल मारली गेली आहे ते तर म्हणतीलच कीं मुसुलमान ज्या किबल्याकडे (पूर्वी) होते (म्हणजे पालेस्टाईन) त्यापासून त्यांच्या (काबागृहाकडे) वळण्यास काय कारण झालें? (हे पैगंबरा! तूं हा) जबाब दे कीं पूर्व व पश्चिम (सर्व) परमेश्वराचीच होय. तो ज्याला इच्छितो त्याला (धर्माचा) सरळ मार्ग दाखवितो" (अ. २ १३७–१४१).

ईसा–येशूची माता कुमारी मर्यम (मेरी) हिच्या जननाची कथा.—एके काळीं इमरानच्या पत्नीनें(परमेश्वरा हुजूर) विनवणी केली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! माझ्या पोटीं जें (मूल) आहे ते मीं (संसार–) मुक्त करून तुला समर्पण करित्यें. तर तूं मजकडून (हें समर्पण) मान्य कर; कीं तूं (सर्वांचें) ऐकतोस (व सर्वांचे मनोगत) जाणतोस. मग जेव्हा ती मुलगी प्रसवली आणि परमेश्वराला हें खूप ठाऊक होतें कीं, ती कोण योग्यतेची (मुलगी) प्रसवली आहे (व ती तिच्या हकीकतीशीं वाकब नव्हती) तेव्हां ती म्हणूं लागली कीं हे माझ्या पालनकर्त्या ! (आता मी काय करूं ?) मीं तर ही मुलगी प्रसवली आहे; आणि मुलगा हा मुलगीप्रमाणें (दुर्बळ) नसतो. आणि मीं तिचें नाव मर्यम ठेविलें आहे; व मी तिला व तिच्या संततीस धोंडमार केलेल्या सैताना (च्या बहकविण्या) पासून तुझ्या आश्रयात देते. तर तिच्या पालनकर्त्यानें (तिचें समर्पण म्हणजे) मर्यम इला चांगल्या मान्यतेनें स्वीकारिलें व तिला चांगल्याप्रकारें वाढवून मोठी केली व तिनें तिला जकरीयाच्या हवालीं केलें. जेव्हां जेव्हां जकरिया मर्यम (ला पाहण्यास्तव तिच्या) जवळ (तिच्या राहत्या) खोलींत जाई तेव्हा तेव्हा मर्यमजवळ (फळफळादि पैकीं काहींना कांहीं) खाण्याचा पदार्थ त्याला आढळून येई. (म्हणून त्यानें एके दिवशीं मर्यमला) विचारिलें कीं अगे मर्यम हा (खाण्याचा पदार्थ) तुजजवळ कोठून (येतो)? (मर्यम) म्हणाली, हा परमे-

श्वराकडून (येतो). परमेश्वर ज्याला इच्छितो त्याला बेसुमार देतो. (अ. ३; ३४–३६)

ख्रि स्ता ची सा मा न्य ता—मरयमचा पुत्र ख्रिस्त हा तर केवळ एक पैगंबर होय एवढेंच. याच्या पूर्वींहि (अनेक) पैगंबर होऊन गेले आहेत. आणि याची मातोश्री (मर्यमही परमेश्वराची एक) सात्विक (सेविका) होती. (इतर मनुष्यांप्रमाणें हीं) उभयता (मायलेंकरें) अन्न खात होतीं. (हे पैगंबरा !) पहा तर खरें, कीं आम्हीं (आपलीं) प्रमाणें या लोकांस कशीं स्पष्ट करून सागतों ! व नंतरहि पहा कीं (सैतानाचे बहकाविण्यानें) हे लोक कोठेंच उलटे भटकत चालले जात आहेत ! [अध्याय ५ वा. ७४–७५]

ख्रि स्ती व य हु दी लो कां चा पा खं डी प णा.—अहो मुसुलमानांनो ! ज्यांनीं तुमच्या धर्माला हंशी व खेळ बनवून ठेविला आहे, म्हणजे (यहुदी व ख्रिस्ती) कीं ज्यानां तुमच्यापूर्वी पुस्तक दिलें जाऊन चुकलें आहे त्यानां व नास्तिकाना (आपले) मित्र बनवूं नका. आणि जर तुम्ही (खरे) मुसलमान आहा तर परमेश्वराला भीत रहा. आणि जेव्हां तुम्हीं (नमाजीची बाग पुकारून लोकांस) नमाजीसाठीं बोलविता तेव्हां हे लोक नमाजीला हंशी व खेळ बनवितात. (आणि) हें (गैरशिस्त काय यांच्या-हातून) त्यासाठीं (घडून येते) कीं हे असे (बेवकूब) लोक होत कीं (बिलकुल) समजत नाहींत. [अध्याय ५ वा. ५६—५७].

बेवकूब व आत्मविश्वास नसलेल्या मुसुलमानाना परकीयांशीं लढण्याला उत्तेजन देणारा पुढील भाग आहेः-"आणि (मुसुलमानांनों !) तुम्हाला झालें तरी काय कीं तुम्हीं परमेश्वराच्या मार्गांत व (तसेंच) दुर्बल पुरूष व स्त्रिया व मुलें यांच्या प्रीत्यर्थ शत्रूंशीं लढत नाहीं, कीं तीं (अगदीं काकुळतीस येऊन परमेश्वरास) प्रार्थना करतात कीं हे आमचे पालनकर्त्या ! आम्हाला ह्या वस्तीं (म्हणजे मक्के)तून (कोठें) बाहेर ने, कीं येथील रहिवाशी (आम्हांवर) जाच जुलूम करीत आहेत. आणि तूंच (खुद्द) आपल्याकडून कोणालाहि आमचा पुरस्कर्ता बनीव व (खुद्द) आपल्याकडून कोणालाहि आमचा मदतगार बनीव."

जे विश्वास बाळगतात ते तर परमेश्वराच्या मार्गांत लढतात; आणि जे (इस्लाम धर्मास) नाकारतात ते सैतानाचे मार्गांत लढतात. तर (मुसुलमानांनों !) तुम्हीं सैतानाच्या पक्षकारांशी लढा; (आणि त्याच्या बहुसंख्येची काहीं पर्वा करूं नका; कां कीं,) सैतानाचे (जितके) डावपेंच असतात (तितके सर्व) पोंचट. [अध्याय. ४. ७४–७५].

ऐ हि क मा र्गा ला व ळ ले ल्या लो का ची अ व स्थाः— आणि (हे पैगंबरा! तूं) या लोकांस आम्ही ज्या मनुष्याला आपले चमत्कार दिले होते व मग त्यानें ती कात फेंकून दिली, तोंच सैतान त्याच्या पाठीस लागला (व त्यानें त्याला बहकवलें), तेव्हा तो बहकलेल्या (लोकां)त जाऊन सामील झाला. अशा त्या मनुष्याची हकीकत वाचून ऐकीव. आणि जर आम्हीं इच्छितों तर त्याच (चमत्काराच्या) प्रतापानें आम्ही त्याला उच्च पद देतो. परंतु तो भूलोका(च्या अधोगतीं)कडेच झुकुन राहिला व आपल्या मनोवासनेच्या नादीं लागून गेला तर त्याची उपमा कुत्र्याच्या उपमेसारखी होऊन गेली. कीं जर तूं त्याला खिदडशील तर तो जीभ बाहेर काढील; अगर तूं त्याला (त्याच्याच स्थितीवर) सोडून देशील तरीहि तो जीभ बाहेर काढील. ज्या लोकांनीं आमच्या निशाण्यांस पाखंड म्हटलें त्याचीहि (किती तरी) वाईट गत होय! आणि (त्याच्या या पाखंड म्हणण्याने) ते आपणच आपलें नुकसान करीत राहिले आहेत." (अ. ७–१७४–१७६).

पु ण्य वा न व पा पी लो कां ना मृ त्यू नं त र मि ळ णा रें शु भा-शु भ फ ळ -"परमेश्वराचे खास निःसीम सेवक;हे असे(सुदैवी) असतील कीं त्यांचा रतीब बांधलेला असेल. आणि रतीबहि असलेतसले नाहींत, (तर) मेवे; आणि त्यांचें आदरातिथ्य केलें जाईल. (ते) ऐषआरामाच्या बागांत (ठेवले जातील) (आणि ते) तख्तांवर समोरासमोर (बसलेले) असतील. त्याच्यात स्वच्छ मद्याचा पेला (चौंफेर) फिरविला जात असेल. (तें मद्य) पांढरें शुभ्र (असून) पिणारास (फार) रुचि देईल. त्यांत बुद्धिविभ्रम होणार नाहीं व व त्यानें निशाधुंद होऊन ते बडबडणारहि नाहींत. आणि याच्यापाशीं खालीं नजर राखणाऱ्या मोठमोठ्या डोळ्यांच्या (अप्सरा) असतील. त्यांच्या गोऱ्यागोऱ्या रंगांत हलका हलका पिवळेपणा असा झळकत (असेल) कीं जणूं त्या (शहामृगाचीं) अंडीं होत कीं तीं (संभाळून) पडद्यांत ठेवलेलीं होत. मग हे (स्वर्गवासी) एकमेकांकडे वळून (व संबोधून) आपसांत प्रश्न करतील. याच्यांतून एक बोलणारा बोलेल कीं (जगात) माझा एक जिवाचा सोबती होता. (तो आश्चर्यानें) विचारांत होता कीं जे लोक (पुनरुत्थानास) खरें म्हणून मानतात. कां तूंहि त्यांजपैकींच आहेस? कां खरोखरीच आम्ही मरून जाऊं आणि माती व हाडें होऊन जाऊं, तेव्हा कां (खचितच आम्ही पुन्हा उठवून उभे केले जाऊं व) आम्हाला (आपल्या कर्मांचा) बदला मिळेल? (मग तो आपल्या इतर सोबत्यांस) म्हणेल (कीं मी तर त्या सोबत्यास पाहूं इच्छितो) कां तुम्हींहि (त्याला खालीं) डोकावून पाहूं इच्छिता? असें म्हणून तो (वरून नरकांत) डोंकावील तों, तो (आपल्या) त्या (सोबत्या)स पाहील (कीं) नरकाच्या मधोमध (पडलेला आहे). (तो त्याला त्या स्थितींत पाहून) असे उद्गार काढील कीं परमेश्वराची शपथ ! तूं माझा जवळजवळ घातच केला होतास ! आणि जर माझ्या पालनकर्त्याची कृपा (मजवर) नसती तर (आज) मीहि (शिक्षेंत) पकडून हजर केलेल्या लोकांपैकींच असतो. कां आम्ही (स्वर्गवासांची ही स्थिति) नाहीं.

कीं पहिल्यादा मरावयाचें होतें (तें मरून चुकलों); आतां पुढें आम्हाला मरावयाचें नाहीं व शिक्षेंतहि पीडित राहणार नाहीं. (अध्याय ३७. ३९–५७).

नरकपुरी व स्वर्गपुरी.- "यात संशय नाहीं कीं (परलोकीं) 'जक्कूम' निवडुंगाचें झाड (महा) पापी (म्हणजे नास्तिक) याचा आहार होईल; जसें वितळलेलें तांबें (व) तें पोटात असें उकळेल. जसें कढ आलेलें पाणी उकळतें. (याशिवाय आम्हीं, दूतांस आज्ञा करूं कीं,) याला धरा आणि ओढीत ओढीत याला नरकाग्नीच्या मधोमधपर्यंत घेऊन जा. मग [याला ही शिक्षा या कीं याच्या डोक्यावरून उकळी आलेलें पाणी ओता. [मग आम्ही त्या नरकवासाच्या क्लेशाची वृद्धि करण्यासाठीं त्याला हिणवून म्हणूं कीं घे या शिक्षेची गोडी] चाख; [कारण] तूंच तर तो सामर्थ्यवान [व] अब्रूदार होतास. हाच तर तो [नरकाग्नी] होय कीं ज्याविषयीं शंका करीत होता. [राहिले परमेश्वराला] भिऊन वागणारे [तर ते] अभयाच्या स्थलीं [म्हणजे बागांत] व झऱ्यांत असतील; ते तलम रेशमाचीं व साटीनचीं वस्त्रें परिधान करून [एकमेकाच्या] समोरासमोर बसलेले असतील. [होईलहि] असेंच. आणि [या व्यतिरिक्त] मोठमोठ्या व काळ्या डोळ्यांच्या अप्सरांशीं आम्हीं त्यांचे जोड लावून दिलेले असतील. ते तेथें निश्चिंत होऊन हरतऱ्हेचे मेवे मागवून [मागवून खात] असतील. पहिला मृत्यु [जो ते या लोकीं चाखून चुकले] त्याशिवाय तेथें त्याना मृत्यू [चा कटु स्वाद] चाखावाच लागणार नाहीं; आणि परमेश्वर त्याना नरकाग्नीच्या शिक्षेंतून वाचवून घेईल. [अध्याय ४४. ४२–५६].

आस्तिक्याचें फळ.–नास्तिकां(च्या बोध घेण्या)साठीं परमेश्वर, 'नूह' ची बायको व 'लूत' ची बायको यांचा दृष्टांत सांगतो कीं, या (दोघी स्त्रिया) आमच्या सेवकापैकीं दोन पवित्राचरणी सेवकांच्या विवाहात होत्या. मग त्या दोघींनीं त्यास दगा दिला (कीं आपल्या पतीच्या विरुद्ध नास्तिकांशीं मिळून राहिल्या); तर दोघींचे पती (पैगंबर असूनहि) परमेश्वरापुढें त्याच्या काहींहि कामा आले नाहींत; आणि (या दोघी स्त्रियांस) हुकूम दिला गेला कीं (जेथें) आणखीहि लोक ('जहन्नमीं' त) दाखल झाले आहेत (तेथें) त्यांच्याबरोबरच तुम्हींहि नरकाग्नींत (दाखल) व्हा. आणि (खऱ्या) मुसुलमानां(च्या सांत्वना)साठीं परमेश्वर (एक तर) 'फिरऔन' ची बायको ('आसिया') इचा दृष्टांत देतो कीं त्या बाईनें प्रार्थना केली कीं हे माझ्या पालनकर्त्या! माझ्याकरिता स्वर्गांत आपल्यापाशीं एक घर बनीव; आणि मला 'फिरऔन' व त्याच्या (दुष्ट) कर्मांपासून सुटका दे व (तशीच) मला (या) जालीम लोकांपासून सुटका दे. आणि (दुसरा दृष्टांत) 'इमरानची' मुलगी 'मरयम' इचा; कीं, जिनें आपली लाज संभाळली. तर आम्हीं तिच्या (पोटां) त आपल्या आत्म्या(म्हणजे सामर्थ्या)नें फुंक मारली; व ती पालनकर्त्याच्या शब्दांचें व त्याच्या पुस्तकाचें सत्यत्व पटवीत राहिली; आणि ती (आमच्या) आज्ञाधारक (सेविकांपैकीं होती.) (अध्याय ६६. १०-१२.)

पुनरुत्थानाचा दिवस.—ज्यावेळीं सूर्या (च्या प्रकाश पटला)स गुंडाळलें जाईल,व जेव्हां तारे झडून पडतील; आणि ज्या वेळा पर्वत (आपल्या जागेवरून) चालविले जातील, व जेव्हा दहा महिन्यांच्या गर्भिणी सांडण्या मोकळ्या फिरतील; (व कोणीहि त्यांचा राखणदार नसेल;) आणि ज्यावेळीं रानटी जनावरें (भयानें वस्तींत) येऊन भरतील व जेव्हां समुद्रांस ऊत येऊन ते एक होऊन जातील; आणि ज्यावेळीं आत्मे (आपापल्या शरीराशीं) जोडले जातील; व जेव्हां जिवंत पुरून टाकलेल्या मुलीस विचारिलें जाईल; कीं जिला कोणत्या अपराधाबद्दल ठार केलें गेलें? आणि ज्यावेळीं (लोकाचे) कर्मपट उघडले जातील; व जेव्हा आकाशाचें कातडें काढलें जाईल आणि ज्यावेळीं नरकाग्नि धगधगविला जाईल आणि जेव्हा स्वर्ग जवळ आणिला जाईल; (त्यावेळीं) प्रत्येक जीवाला त्यानें जें काहीं (पुढच्या सामुग्रीदाखल) आणून हजर केलें आहे ते (प्रत्यक्ष) कळून येईल. (अ. ८१; १–३).

पैगंबराच्या शत्रूचा नाश कसा होतो हे पुढील अध्यायांत पैगंबराचा चुलता अबुलहब याचें उदाहरण घेऊन सांगितलें आहे. "(जसें 'अबुलहबने' पैगंबरास गालिप्रदान केलें होतें तसे उलट) 'अबुलहब' चेच दोन्ही हात तुटून गेले. आणि तो (आपणहि) नाश पावला. त्याची धनदौलत व त्यानें जें काहीं संपादन केलें तें काहींच त्याच्या कामा आलें नाहीं. तो लवकरच (नरकाच्या) डोंब घेणाऱ्या अग्नींत जाऊन दाखल होईल; आणि (त्याच्या संगतीं) त्याची बायकोहि, कीं जी लाकडें वाहून आणिते; तिच्या गळ्यात खजुरीच्या तंतूंची पीळ दिलेली दोरी असेल."

[संदर्भग्रंथ.—यूरोपात कुराणावर लिहिलेल्या ग्रंथाची यादी व्ही. चौव्हिननें १९०७ सालीं लीज येथें प्रसिद्ध केली आहे. कुराणाचें विवेचन करणारे वील, नोलडेके वगैरे जर्मन पंडिताचे बरेच ग्रंथ आहेत. ब्रिटानिका, ए. रि. ए. यांसारख्या कोशांतून कुराणावर टीकात्मक लेख आहेत. ज्ञानकोश, विभाग ४ यांतलि १३ व्या प्रकरणांत महंमदाचा कुराणाशीं येणारा संबंध व्यक्त केला आहे व कुराणांतील काहीं उतारेहि दिले आहेत.]

कुराबर—राजपुतान्यांत उदेपूर संस्थानात कुराबर जहागिरीचें मुख्य ठिकाण.हें गोडी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर बसलेलें असून उदेपूर शहरापासून २० मैलांवर आहे. १९०१ सालीं येथील लोकसंख्या १७६३ होती. जहागिरींत एकंदर खेडीं ६९ आहेत. जहागीरदार मेवाडचे पहिल्या वर्गाचे सरदार असून रजपूत (सिसोदिया) या घराण्यातील

चोंडावत कुळांतले राऊत या उपनांवाचे आहेत. जहागिरीचें (कुल) एकंदर उत्पन्न ५०,००० वर असून ब्रिटिश दरबाराला खंडणी द्यावी लागत नाहीं.

कुरिग्राम, पो ट वि भा ग.—बंगाल. रंगपूर जिल्ह्यांतील एक पोटविभाग. हा ब्रह्मपुत्र नदीच्या उजव्या किनाऱ्यावर असून याचें क्षेत्रफळ ९२४ चौरस मैल आहे. या विभागात कुरिग्राम व आणखी तीन तालुके आहेत. १९११साली लोकसंख्या ५,८९,५२० होती. खेड्यांची संख्या २००५ आहे. मोठे गाव कुरिग्राम. ब्रह्मपुत्र नदीवर चिलमारी येथें मोठी यात्रा भरते.

श ह र.—पोटविभागाचें मुख्य ठाणें. हें धरला नदीच्या काठीं वसलेलें असून १९११ साली याची लोकसंख्या ३४१९ होती. ईस्टर्न बंगाल स्टेट रेल्वेचे हें स्टेशन असून येथें कांहीं सरकारी कचेऱ्या आहेत. शिवाय एक लहानसा तुरुंग आहे.

कुरु—एक प्राचीन राष्ट्र. कुरुवंशाबद्दलची वैदिक माहिती ज्ञानकोश विभाग ३ मधील 'दाशराज्ञ युद्ध' या प्रकारणात आलीच आहे. ऋग्वेदांत कुरुवंशाचें स्मरण करून देणारे फक्त दोनच शब्द दिसतात ते कुरुंग व कुरुश्रवण हे होत. पुरु, तृत्सु, भरत व कुरु ही राष्ट्रें पुढें मार्गे एकच झालीं असावीत असें वैदिक वाङ्मयावलोकनानें वाटूं लागतें. महाभारतांत वर्णिलेल्या कुरुवंशांतील पुरु, भरत, देवापि, शन्तनु यासारखे प्राचीन पुरुष ऋग्वेदात सुद्धां उल्लेखिलेले आहेत असें एक मत प्रदर्शित झालें आहे पण तें आमच्या मतें चुकीचें आहे. अथर्ववेद (२०. १२७, ९), शाखायनसूत्र (कांहीं प्रतींत १२. १४,१) इत्यादि वैदिक ग्रंथात ज्याला कौरम म्हटलें आहे त्याचेंच प्रतिरूप कौरव आहे. ज्ञा. विभाग ३ यांत वेदकालातील शब्द सृष्टि या प्रकरणात (पा. ३६७-३६८) ब्राह्मण-उपनिषद्-वाङ्मयात कुरु व कुरुपांचाल याची जी माहिती मिळते ती सविस्तर दिलेली आहे. तींत भारतकथांतील अनेक बीजें सापडतील. कुरूंचा पांचालांशीं निकट संबंध असल्यानें त्यांचे एकत्र उल्लेख आढळतात.

महाभारतांत कुरुवंशीय संवरणपुत्र जो कुरुराजा त्याच्या वंशजानां सामान्यतः कुरु हें नांव देतात. पण विशेषतः पांडवशत्रू जे धृतराष्ट्राचे पुत्र व त्याचे अनुयायी यांनांच कुरु किंवा कौरव म्हणण्यांत येतें. कुरुराजापासून जनमेजयापर्यंत कौरव वंशांत किती पिढ्या झाल्या व प्रत्येक पिढीचे समकालीन असे इतर घराण्यांतील राजे कोणकोणते होऊन गेले तें 'बुद्धपूर्व जग' विभागांतील सूतसंस्कृति-प्रकरणांत कोष्टकानुरोधानें दाखविलें आहे.

कुरु देशाची राजधानी हल्लींच्या दिल्लीजवळ असलेलें इंद्रप्रस्थ शहर होय. याच्या पूर्वेस पांचाल व दक्षिणेस मत्स्य लोकांची वस्ती होती.

कुरुजांगल—कुरुदेशाच्या पश्चिमेस असलेला अरण्यमय प्रदेश. याचा महाभारत, भागवत व इतर पुराणांत अनेक ठिकाणीं उल्लेख आढळतो. याच देशांत काम्यकवन होतें.

कुरुंद—यास लॅटिनमध्यें कोरंडम, इंग्रजींत एमरीस्टोन, मराठींत कुरुंद इत्यादि नांवें आहेत. नैसर्गिक स्फटयुक्त व कठिणपणाबद्दल प्रख्यात असलेले दगड, सुंदर रंगाचीं व पारदर्शक अशीं माणिक व इंद्रनील मणी हीं रत्नें कुरुंदाच्याच जातीचीं होत. कुरुंदाचे स्फटिक षट्कोनी पद्धतीचे असतात.

हिऱ्याच्या खालोखाल कुरुंद हें सर्वांत कठिण खनिज आहे. त्याच्या काठिण्याचें मान साधारणपणें ९ आहे. सामान्य कुरुंदापेक्षा माणिक व माणिकापेक्षा इंद्रनीलमणी जास्त कठिण असतो. घड्याळातील खड्यांकरितां व वैद्युत् यंत्रांतील आवणे करण्याकरिता कुरुंदाचा (माणिक किंवा इंद्रनीलमण्याचा) उपयोग करितात.

रत्नांकरिता योग्य असा रंगीत कुरुंद सिलोन, ब्रह्मदेश, सयाम व मोटाना येथें सांपडतो. नेहमीचा कुरुंद हिंदुस्थानात, मद्रास इलाख्यात, सालेम जिल्ह्यांत व म्हैसूर आणि रेवा या संस्थानात सापडतो. कुरुंदाची भुकटी लाखेंत मिसळून जवाहिऱ्ये लोक जवाहीर घासण्याकरिता त्याच्या कांड्या करितात. अमेरिकेंत व दुसऱ्या कित्येक ठिकाणी कुरुंद पुष्कळ सापडतो.

पूर्वी धातूच्या पदार्थास झिलई देण्याच्या कामीं कुरुंदाचा उपयोग करीत असत; परंतु हल्लीं त्याच्या ऐवजी कृत्रिम कुरुंदाचा उपयोग होऊं लागला आहे. अमेरिकेतील संयुक्त-संस्थानात विद्युत् शक्तीनें प्रतिवर्षी १७०० टन कुरुंद कारबोरंडम् तयार करतात. तेथील नैगारा प्रांतांत कृत्रिम कुरुंद तयार करण्याकडे बॉक्साईटचा उपयोग करितात. त्याचप्रमाणें कुरुंदाच्या ऐवजीं कोठें कोठें पोलादाच्या किसाचाहि उपयोग केला जातो. हिंदुस्थानात नैसर्गिक कुरुंद, खडकांच्या सांध्यामध्यें कोठें कोठें सापडतो. पूर्वी शस्त्रकार व जवाहिरवाले लोक या कुरुंदाचा उपयोग फार करीत असत. परंतु अलीकडे कृत्रिम कुरुंद फार थोड्या किमतीत मिळूं लागल्यामुळें नैसर्गिक कुरुंदाचा उपयोग पूर्वीइतका केला जात नाहीं. कुरुंदाचा दगड मुख्यत्वेंकरून म्हैसूर व मद्रास या प्रदेशांत सांपडतो. १८९८ मध्यें म्हैसूरमध्यें २९३७ हंड्रेडवेट कुरुंद निघाला व त्याची किंमत ६९८ पौंड होती. १९०२ मध्यें याच प्रांतात ५७४ हंड्रेडवेट कुरुंद निघून त्याची किंमत १०८ पौंड झाली. आसाम, द. हैदराबाद, पंजाब इ. प्रांतांतहि कुरुंद सांपडतो. ब्रह्मदेशांतील कुरुंदामध्यें लाल सांपडतात. काश्मीरमध्यें १८८२ पासून कुरुंदाच्या दगडांत पुष्कळ इंद्रनील मणी सांपडले. कुरुंदाच्या विक्रीचे आंकडे बरोबर मिळत नाहींत. कारण खेड्यापाड्यांतील लोक सुद्धां याचा व्यापार करतात.

हिंदुस्थान देशांत गंध उगाळावयाच्या सहाणा; धान्य दळण्याचीं जातीं; चाकू, वस्तारे वगैरे हत्यारांस धार देण्याचीं चाकें इत्यादि जिन्नस शुद्ध कुरुंदाचे करितात. तसेंच कुरुंदाची फार बारीक पूड करून वस्त्रगाळ करितात व तींत

सरस, चपटालाख किंवा गंधकमिश्रित रबर घालून तें मिश्रण साच्यांत खालून त्याची धार लावण्याचीं चाकें, शाई काढण्याचें रबर, हिरे कापण्याची चाकें, पॉलिश करण्याचे कागद, पालिश कापड इत्यादि उपयुक्त जिन्नस तयार करितात. [वॅट. कम र्शी. प्रॉ.]

कुरुंदवाड—कोल्हापूरच्या पो. एजंटच्या देखरेखीखालचें एक संस्थान. येथील संस्थानिक पटवर्धन आडनांवाचे कोंकणस्थ ब्राह्मण असून संस्थानच्या थोरली पाती व धाकटी पाती अशा दोन शाखा आहेत. थोरल्या पातींत कुरुंदवाड हें शहर व इतर ३७ गावें आहेत. सदरहु जहागीर पेशव्यांनीं लष्करी सरंजामासाठीं पटवर्धनांस दिली होती. इ. स. १८११ सालीं कुरुंदवाड व शेडबाळ असे या संस्थानचे दोन विभाग झाले होते; पैकीं शेडबाळला वारस नसल्यानें तें इ.स. १८५७ त खालसा झालें. थोरल्या पातीचें क्षेत्रफळ १८५ चौ. मै. असून लोकसंख्या ४३ हजारांपर्यंत आहे. संस्थानांत मका, तांदूळ, गहूं, हरभरा व कापूस यांचें उत्पन्न असून हातमागाचा धंदा चालू आहे. इंग्रजसरकारास सालिना ९६१९ रु. खंडणी द्यावी लागते. संस्थानास न्यायदानाचे सर्व अधिकार आहेत. संस्थानिक हे दक्षिणेंतील पहिल्या वर्गाचे सरदार आहेत. उत्पन्न अडीच लाखांचें आहे धाकट्या पातीचें क्षे. फ. ११४ चौ. मै. असून लो. सं. ३४ हजार व उत्पन्न पावणे दोन लक्ष आहे. कुरुंदवाडास पंचगंगा नदी असून जवळच तिचा कृष्णेशीं संगम झाला आहे. शहरची लो. सं. साडेदहा हजार आहे. येथेंच दोन्ही पातींचे अधिपती रहातात. सरकारी वाड्याखेरीज पहाण्यासारखें असें एक विष्णूचें देऊळ व नरसिंहवाडी जवळील कृष्णेचा घाट होय.

पटवर्धन घराण्याचे मूळ पुरुष हरभटबाबा याचे तिसरे पुत्र त्रिंबकपंतआप्पा हे या संस्थानचे संपादक होत. हे प्रथम अक्कलकोटकर भोंसले यांच्या पदरीं होते. पुढें कापशीकर राणोजी घोरपड्यानें आप्पाकडून कर्ज घेऊन फेडीस कुरुंदवाड गांव लावून दिला (इ. स १७३६). तेव्हांपासून आप्पा व त्याचे पाचहि भाऊ (सर्व पटवर्धन मंडळी) येथेंच राहूं लागले. स. १७५१ नंतर निरनिराळ्या गावीं ही मंडळी रहावयास गेली. तरी पण सरदारी वडील माणसाच्याच तंत्रानें चालत असे. पुढें कापशीकरानीं दिलेल्या कुरुंदवाड गावाची इनामाची सनद करवीरकर छत्रपतींकडून स. १७८४ त पटवर्धनांनीं करून घेतली.

त्रिंबकरावास नीळकंठराव व कोन्हेरराव नांवाचे दोन शूर पुत्र होते. नीळकंठराव हैदरवरील १७७१ च्या स्वारींत आणि कोन्हेरराव सांवशीच्या लढाईंत इ. स. १७७७ त सरकारकामास आले. सरकारी सरंजाम नीळकंठरावाच्या नांवें होता. नीळकंठरावास रघुनाथराव व शिवराव हे दोन मुलगे होते. या दोघांनींहि बऱ्याच लढायांत काम केलें. रघुनाथराव हे तर परशुरामभाऊंच्या बरोबर दरेक लढाईंत हजर असत. यांनां अनेक जखमा झाल्या होत्या यानींच वरील विष्णूचें देऊळ इ. स. १७९५ त बांधिलें व घाटहि बांधिला. शिवराव यांनां (तसेंच कान्हेरराव यानांहि) सुभेदार म्हणत असत. रघुनाथरावास त्रिंबकराव नांवाचा मुलगा होता.रघुनाथराव याच्या नावानें कोल्हापूरकर छत्रपतींनीं कुरुंदवाड गांवची सनद करून दिली होती. दरम्यान रघुनाथराव व शिवराव यांच्यात तंटा लागून पेशवे सरकारानीं त्यानां जहागीर वाटून दिली. शिवराव यांच्याकडे शेडबाळ वगैरे पाच हजारांचीं गावें गेलीं. कोन्हेररावाच्या मुलानांहि वांटणी मिळाली व या मूळच्या जहागिरीचे वांटे पुढीलप्रमाणें झाले त्रिंबक रघुनाथ हे कुरुंवाडकर (सरंजाम १ लक्ष २८ हजार), गणेश कोन्हेर हे कागवाडकर (१ लक्ष ७० हजार रुपये) व कृष्णाजी शिवराव हे वाडीकर शाखेचे मुख्य बनले त्रिंबकराव यांच्या नावें स १८०० मध्यें २,४७,२८४ रु. चा सरंजाम कायम झाला. शिवराव यांच्या कृष्णराव व कोन्हेरराव या दोन मुलात १८८२ मध्यें वांटणी झाली. त्रिंबकराव याचा मुलगा केशवराव यानें इंग्रजाशीं तहनामा केला.हा मिरजकरांशीं झालेल्या तहाप्रमाणेंच होता. त्रिंबकराव१८२७त वारला.त्याला चार पुत्र होते, ते रघुनाथ, हरिहर, विनायक व त्र्यंबक.हे होत. हे अज्ञान असतां याच्या मातोश्रींनीं मोठ्या दक्षतेनें कारभार केला. मातोश्रींचें नांव लक्ष्मीबाई. त्याच्याबद्दल इंग्रज सरकारनें स्तुतिपर उद्गार काढले होते रघुनाथरावांना १८३७ त अधिकार मिळाला. यांच्यावेळीं संस्थानास कर्ज वगैरे झालें. तेव्हां या चार भावांत स. १८५६ त जहागिरीच्या वाटण्या झाल्या. एकंदर पांच वाटण्या केल्या. दोन हिस्से रघुनाथराव यास व बाकीचे तीन तिघाकडे. हे त्रिवर्ग एकत्र एके ठिकाणीं राहूं लागल्यानें या तिघाच्या जहागिरीस धाकटी पाती व रघुनाथरावांच्या घराण्यास थोरली पती म्हणूं लागले, याना शिकारीचा फार नाद होता. रघुनाथराव वारल्यानंतर त्याचे पुत्र चिंतामणराव हे गादीवर आले. ते स १९०८ मध्यें वारले. हेहि बापासारखे धिप्पाड व व्यायामशास्त्राचे अभिमानी होते त्याच्या मागें त्याचे वडील पुत्र श्री. भालचंद्रराव अण्णासाहेब हे राज्यावर आले असून हल्लीं तेच संस्थानिक आहेत. धाकटे पुत्र श्री. केशवराव बाबासाहेब हे मिरज मळयाचे (दत्तक जाऊन) अधिपति आहेत.

पटवर्धनांचें दैवत गणपति आहे. कुरुंदवाडास गणेश चतुर्थीचा उत्सव थाटाचा होतो. चिंतामणरावानीं प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचा फैलाव करून दवाखाने, पोलीस, न्याय, जमीनमहसूल वगैरे खात्यांची रचना चागली केली. त्याचें वक्तृत्व उत्तम होते त्यानीं एकदा कुरुंदवाडास पुनर्विवाहाच्या संबंधीं झालेल्या व्याख्यानसत्रात पुनर्विवाहाचें खंडण केलें होतें. औद्योगिक बाबतींतहि त्यानीं संस्थानात कामें सुरू केलीं होतीं. यांचें दातृत्व प्रख्यात होतें. हे मुंबई कायदेकौन्सिलांत स. १८९५ व स. १९०३ मध्यें दोन वेळा

(दक्षिणेंतील संस्थानिकांतर्फे) सभासद झाले होते. हल्लींचे संस्थानिक श्री. अण्णासाहेब हे बी. ए. असून संस्कृत भाषेच्या प्रावीण्याबद्दल त्यांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत. यांनीं आपल्या राज्यांत प्राथमिक शिक्षण मोफत केलें आहे. हजार वस्तीच्या गांवीं प्राथमिक मुला–मुलींची शाळा, व पांच हजार वस्तीच्या गांवीं इंग्रजी तीन इयत्तेच्या शाळा त्यांनीं उघडल्या आहेत. लोकलफंडांतील [1] रक्कम शिक्षण व आरोग्य खातीं खर्च होते. प्रजेनें वर्गणी करून व श्रीमंतांनीं पुष्कळशी भर घालून एक 'भालचंद्र मेमोरियल हॉल' म्हणून इमारत बांधिली आहे. सार्वजनिक वाचनालयास श्रीमंतांनीं बरीच मदत केली आहे. परस्पर सहाय्यकारक संस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेतीकरितां पाण्याची योजना वगैरे सुधारणा संस्थानांत झाल्या आहेत. पूर्वीपेक्षा संस्थानात असल्या सुधारणा पुष्कळ झाल्या आहेत. श्री. अण्णासाहेब हेहि वडिलांप्रमाणें १९१२ सालीं मुंबई कायदे कौन्सिलचे नामदार झाले होते.

धाकट्या पातीमधील हरिहरराव हे वारल्यानंतर त्याचे पुत्र बापूसाहेब हे गादीवर आले. त्यांनीं संस्कृत व प्राकृत ग्रंथांचा संग्रह फार केला. हे कवि होते. यांचें गणेश-पुराण, आर्याभट्टवंशकाव्य व गंगावर्णना हे काव्यग्रंथ प्रसिद्ध आहेत. पंचवटी स्थलनिर्णयासंबधानें कै. वामन दाजी ओक यांच्याशीं यानीं दोन हात केले होते. यांनीं इंग्रजी नाटकांचाहि अभ्यास केला होता व कांहींचें भाषांतरहि केलें. त्यांनीं देशी व्यापार व उद्योगधंदे यांना मदत केली होती. कुरुंदवाडास रेशमी व सुती कापडाचे हातमाग त्यांनींच सुरू केले होते व एक ज्योतिषशाळाहि स्थापिली होती. ते चित्रकारहि होते. हल्लीं यांचे पुत्र श्री. माधवराव भाऊसाहेब हे धाकटया पातीचे अधिपति आहेत.

धाकटया पातीबद्दल दुसरे विनायकराव हे इंग्रज सरकारचे सरकारदरबारीं काम करीत असत. संस्थानचे दिवाणी फौजदारी अधिकार हेच चालवीत. हे इ. स. १८६८ मध्यें मुंबई कायदे कौन्सिलचे नामदार सभासद होते. सरदारांचें एक कौन्सिल असावें व त्यामार्फत सर्व जहागिरदार, संस्थानिक यांनीं आपले हक्क वगैरेंचें संरक्षण करावें अशी त्यांनीं एक योजना तयार केली होती. त्यांनां व्यायामाचा नाद होता. त्यांचे पुत्र हरिरराव; यांनां पांच पुत्र झाले. पैकीं वडील श्री. विनायकराव हे हल्लीं सर्व कारभार पाहतात.

धाकट्या पातींतील तिसरे त्रिंबकराव हे निपुत्रिक होते. त्यांनीं आपण होऊन आपला हिस्सा आपल्या दोघा बंधूंस (हरिहरराव व विनायकराव यांस) दिला.

वाडीकर घराणें.—रघुनाथ नीळकंठ व शिवराव नीळकंठ यानीं १७९२ त परशुरामभाऊंच्या विद्यमानें वांटण्या केल्या. त्यावेळीं पेशव्यांनीं दिलेल्या सरंजामावरील हक्कांचा शिवरावांनीं राजीनामा देऊन अक्कलकोटकरांकडून प्रारंभीं मिळालेला गांव व कांहीं नेमणूक घेऊन वडील भावाचा पोटसरंजामदार म्हणून रहाण्याचें कबूल केलें व कुरुंदवाडाजवळ वाडी या गांवीं ते राहूं लागले. यांच्या वंशजास वाडीकर म्हणूं लागले. इ. स. १८२१ त शिवराव यांच्या मुलांनीं कुरुंदवाड जहागिरींतील हिस्सा मिळविण्याची खटपट केली होती. पण ती फुकट गेली हे तीन भाऊ कृष्णराव, नीळकंठराव व कोन्हेरराव नांवाचे होते. पैकीं नीळकंठराव हे निपुत्रिक होते, त्यांचा हिस्सा इंग्रजांनीं खालसा केला. कृष्णरावास चिंतामण व त्र्यंबक हे दोन पुत्र होते. चिंतामणराव वारल्याबर त्यांचाहि हिस्सा इंग्रजांनीं खालसा करून फक्त इनाम गांवें वंशजाकडे चालू ठेविलीं. शिवरावांचे तिसरे पुत्र कोन्हेरराव हे मिरजेस रहात. त्यांनां तीन मुलगे; वडील नीळकंठराव, हे कोन्हेररावांच्या पश्चात दोन वर्षांनीच वारले. यांचे चिरंजीव गंगाधरराव हे वारल्यानंतर याचे पुत्र श्री. गणपतराव हे गादीवर आले. हल्लीं हेच वाडीचे संस्थानिक आहेत हे वाडीकर मिरज येथेंहि रहातात. वाडी संस्थानचें उत्पन्न अगदीं थोडें आहे व संस्थानहि लहान आहे, तरी पण याना दिवाणीफौजदारीचा अधिकार आहे. कोन्हेर शिवराव यांचे दुसरे पुत्र श्री. विनायकराव हे पुण्यास असतात. यानीं वाडी संस्थानात वांटा न मागतां नक्त नेमणूक मागितली, ती त्यांना मिळते.

कागवाडकर घराणें.—(कागवाड या लेखाखालीं थोडीशी माहिती दिली आहे ती पहा, तिच्या शिवाय जास्त माहिती येथें देतों) त्रिंबक हरि याचे पुत्र कोन्हेरराव यास गणपतराव नांवाचा मुलगा होता. तो पेशवाई बुडाली तेव्हां हयात होता. यास व कुरुंदवाडकर केशवराव रघुनाथ या उभयतांस कुरुंदवाडचा सरंजाम वाटून दिला होता. त्यात कागवाडची वाटणी गणपतरावाकडे आल्यानें ते येथें राहूं लागले. इंग्रजानीं केशवरावाशीं ज्या प्रकारचा तह केला होता तसाच गणपतरावाशींहि केला होता. यांना २० हजार रुपयाची जातीची तैनात मिळाली होती. तसेंच नौकरीच्य स्वाराबद्दल ९६१२ रु. ची नेमणूक ठरली होती. स. १८२१ त गणपतरावानीं कृष्णराव वाडीकराचा मुलगा त्रिंबकराव यास चापलीनच्या संमतीनें दत्तक घेतलें त्यास आपल्या पश्चात् जहागिरदार करण्याबद्दल इंग्रजांस त्यानीं थैली पाठविली होती. परंतु त्यावेळीं इंग्रजसरकारनें तें कबूल केलें नाहीं. गणपतराव १८४५ त वारले. त्रिंबकराव अज्ञान, म्हणून संस्थानचे कारभारी व त्र्यंबकरावांचे जनक वडील कृष्णराव यांनां कारभार पहाण्यास नेमून इंग्रजांनीं त्रिंबकरावास जहागिरदार मान्य केले. पुढें कारभार चागला चालला नाहीं. कृष्णरावानें कर्ज करून, गांव सावकाराकडे गहाण टाकलें. त्रिंबकराव प्रौढ झाल्यावर व त्यांच्या हातीं कारभार आल्यावर त्यांच्यानेंहि कारभार चांगला चालेना. संगत वाईट लागल्यानें उधळपट्टी होऊं लागली. त्यांना गाण्याचा व कविता करण्याचा नाद होता. कर्ज जास्त झालें, रयतेवर जुलूम होऊं लागला. त्यांनीं दत्तकाची परवनगी मागितली असतां

इंग्रजानें दिली नाहीं. ते इ. स. १८५७ त वारले; तेव्हां सर्व दौलत इंग्रजसरकारनें खालसा केली; ते (नरगुंदकरांच्या) बंडांत सामील होते असें ठरवून जहागीर खालसा केली असा एक तत्रस्थ लोकापवाद आहे; मात्र त्यांच्या दोन बायकांकडे ८८ हजारांची जिंदगी ठेवून त्यांनां नक्त ११ हजाराची नेमणूक करून दिली. सन १८६१ त याची धाकटी बायको वारली तेव्हां इंग्रजांनीं तिची नेमणूक खालसा केली. याप्रमाणें १ लक्ष १२ हजार वसुलाचा मुलुख खालसा झाला. या मुलुखांत ५६ गांवें बेळगांव जिल्ह्यांतील, १५ सोलापूर जिल्ह्यांतील व ३ पुणें जिल्ह्यातील होती. कागवाडचा वाडा गणपतरावांनीं बांधिला, गणपतीचें देऊळ त्र्यंबकरावांनीं बांधिलें व त्याचा सभामंडप त्यांच्या कुटुंबा(पार्वतीबाई)नें बांधिला. त्र्यंबकराव हे गाणपत्य होते. त्यांना दृष्टांत झाल्यावर (व २१ वर्षें सेवा केल्यावर) त्यांनीं मांदाराचे मुळाशीं सापडलेल्या गणपतीची स्थापना सदर देवळात केली. देवळाला व देवाच्या सर्व सेवेकऱ्यांना त्यांनीं इनामें दिलीं आहेत. श्री. सवाई माधवरावसाहेबांनीं दिलेलें इनामगांव बोरगांव हें याच्या वांटणीस आलें होतें. यांनां नारायणराव म्हणून औरस पुत्र होते, परंतु ते निवर्तल्यामुळें यानीं गणपतराव म्हणून एक दत्तक पुत्र घेतले. हे गणपतराव १८९१ त वारले. त्यांचे पुत्र श्री. त्र्यंबकराव हे हल्लीं विद्यमान आहेत. सभामंडप बांधणाऱ्या पार्वतीबाई हल्लींच्या त्र्यंबकरावांची आजी होय. यांचें माहेर रामदुर्ग होतें. त्यांनां चोळीबांगडीकरितां रामदुर्गकरानीं गोणागर हें गाव इनाम दिलें होत. तो गाव हल्लीं श्री त्र्यंबकराव यांच्याकडे चालत आहे. यांनीं वाचनालयें वगैरेस मदत केली आहे.

कागवाडची देणगी इ. स. १७४५च्या पूर्वीची आहे. असे म्हणतात कीं, इंग्रजसरकारानें सरंजामासंबंधीं जे नियम केलेले आहेत त्यात असा स्पष्ट उल्लेख आहे कीं, स. १७५१ च्या पूर्वीं जे सरंजाम बहाल झालेले आहेत, ते वंशपरंपरेनें चालवावेत; असा प्रकार असता व हा सरंजाम १७४५ ते १८५७ पर्यंत चालला असता पुढें बंद कां केला तें स्पष्ट समजत नाहीं. [इंपि. ग्याझे. पु. १६; गो. वि. आपटे—पटवर्धन घराण्याचा इतिहास].

कुरुंदवाडकर घराण्याची वंशावळ खालीं दिली आहे. तींत ज्या व्यक्तीचा वंश खुंटला त्या व्यक्तीच्या खालीं ० अशी खूण दिली आहे.

कुरुंदवाडसंस्थानची वंशावळ

- हरभट-(मूळ पुरुष)
  - त्र्यंबक
    - नीळकंठ
      - रघुनाथ
        - त्र्यंबक
          - केशव
            - रघुनाथ
              - चिंतामणराव
                - श्री. भालचंद्रराव उर्फ अण्णासाहेब (विद्यमान)
                - श्री. केशवराव उर्फ बाबासाहेब (विद्यमान)
            - हरिहर
              - बापूसाहेब
                - श्री. माधवराव उर्फ भाऊसाहेब (विद्यमान)
            - विनायक
              - हरिहरराव
                - श्री. विनायकराव (विद्यमान)
      - शिवराव
        - कृष्णाजी
          - चिंतामणराव
            - त्र्यंबक
              - ०
          - त्र्यंबकराव
            - नीळकंठ
              - गंगाधरराव
                - श्री. गणपतराव (विद्यमान)
        - कोन्हेर
          - श्री. विनायकराव (विद्यमान)
        - नीळकंठ
          - ०
    - कोन्हेर
      - गणेश
        - त्र्यंबक (दत्तक)
          - नारायण
            - ०
          - गणपतराव (दत्तक)
            - श्री. त्र्यंबकराव (विद्यमान)

कुरुनेगॅला— कुरुनेगॅला हें सीलोनच्या वायव्य प्रांतांतील मुख्य शहर आहे. याची लोकसंख्या ६४८३ व जिल्ह्याची लोकसंख्या १,४९,४२९ आहे. इ. स. १३१९ पासून १३४७ पर्यंत हें शहर सीलोनच्या राजाचें रहाण्याचें ठिकाण होतें. हें तांदूळ, नारळ, चहा, कॉफी व कोको यांच्या लागवडीचें मुख्य ठिकाण आहे.

कुरुपांचाल—कुरुदेशास पूर्वदिशेकडून लागून असलेला प्रथम देश जो पांचाल त्यासच हें नांव आहे. त्यास हें नांव देण्याचें कारण आणखी दुसरा एक पांचाल आहे त्याशीं याचा संकर होऊं नये. [ज्ञानकोश वि. ४, पा. १७७ व वि. ३. पा. ३६७ पहा].

कुरुंबा – कुरुबा, कुरमा. मद्रास, म्हैसूर हैदराबाद व कुर्ग या भागातून यांची वस्ती आहे. एकंदर लो. सं. (१९११) ९४७६१९. कांचीच्या पल्लव राजांच्या सैन्यांत याचा विशेष भरणा असे. जंगलात रहाणारे कुरुंबा आणि धनगराचा व कोष्टयाचा धंदा करणारे कुरुंबालोक यांमध्यें असलेल्या संबंधाविषयीं वाद असला तरी खानेसुमारीच्या रिपोर्टांवरून कुरुंबा, कुरुबा व कुम्मा हीं सर्व नांवे थोड्या फरकानें बहुधा एकाच जातीचीं वाचक होत असें दिसून येतें. म्हैसूरच्या रानटी कुरुंबा लोकांचे दोन वर्ग आढळतात. बेट्टा अथवा डोंगरावर राहणारे कुरुंबा आणि जेनू अथवा मध काढणार कुरुंबा. बेट्टा वर्ग जेनूपेक्षा जास्त सुखी दिसतो. बेट्टा जातीचा धंदा शेती करणें हा आहे. बेट्टा लोक केस वाढवितात, जेनू केस काढतात. बेट्टा स्त्री अंगभर वस्त्र धारण करिते, पण गरीब जेनू त्या बाबतींत दरिद्री असलेली आढळते. बेट्टा व जेनूमध्यें विवाहसंबंध होत नाहींत. बेट्टा जात माहुताच्या धंद्यांत प्रवीण असते. काडु कुरुंब हे झोंपड्या बांधून रहातात. ते शेती करितात तथापि हत्ती पकडण्याच्या कामीं ते फार प्रवीण आहेत. सच्चेपणा हा गुण या जातीचा विशेष असल्यामुळें ते विश्वासार्ह झाले आहेत.

वायनाड, कालिकत व मलबारचे एरनाड तालुके येथें असणाऱ्या कुरुंबांचे मुल्लु, जेन व ऊराळी असे तीन विभाग असून मुल्लूंचा धंदा शेती आहे व जेनांचा धंदा टोपल्या तयार करणें हा आहे. हे सर्व लोक धनुष्यबाण वापरतात. जेन कुरुंबांची देवता मस्ति नावाची आहे. धर्म व वागणूक यांसंबंधीं ऊराळी जातीचे लोक मुल्लू व जेन याहून थोडे भिन्न आहेत.

निलगिरी व वायनाड येथील कुरुंबांत मुल्लु, बेट्टा, ऊराळी, टेन व टच्चनादन, मूप्पन अशा पोटजाती आहेत. यांपैकीं पहिली व शेवटची जात मल्याळी भाषा बोलणारी आहे. इतर जातीचे लोक कानडी बोलतात. निलगिरी डोंगरानजीक असलेलीं कुरुंबांचीं खेडीं म्हणजे चार पांच झोंपड्यांचा एक एक गटच होय. जमिनींत धान्याची लागवड करून शिवाय जंगलांतील मध, डिंक इत्यादि वस्तू देऊन व्यापारी लोकांशीं ते फेरमोबदल्याचा व्यवहार करतात. कांहीं लोक कॉफीच्या कारखान्यांत काम करून मजुरी मिळवितात. कांहीं वाजंत्र्यांचाहि धंदा करितात. कांहीं लोक पिल्या विणून उपजीविका करितात. त्यांच्या स्त्रिया घरगुती कामांशिवाय अन्य व्यवसाय करीत नाहींत.

कांहीं कुरुंबा लोक शिवाची उपासना करितात, व त्यांच्या स्त्रिया कपाळास शिवाचा तिलक लावितात. कांहीं कुरिबन नावाच्या देवतेची उपासना करितात. मुरुनी नांव धारण करणाऱ्या शिवपत्नीचीहि उपासना करण्यांत येते. हिरीयादेव नावाच्या पाषाणमूर्तीस कांहीं भजतात. या देवास बकरें अर्पून प्रसाद पुजाऱ्यास दिला जातो. पोनी येथील डोंगरावर एक देवता असून त्या ठिकाणीं प्रतिवर्षी लोक यात्रेस जातात.

निलगिरी येथील कुरुंबामध्यें कित्येक भावांत एकच समाईक बायको करितात अशी माहिती सांपडते (कास्ट्स ॲन्ड ट्राइब्ज ऑफ इंडिया, पान १६९). त्यांच्यांत लग्नसंस्कार असा नाहींच असेंहि सांगण्यांत येतें. तथापि नवरा बायको यांनीं परस्परांवर जलसिंचन करणें, मेजवान्या होणें व सोळा नामकर जातींत रूढ असल्याप्रमाणें वधूनें तंबाखूच्या पानाचीं विडीं उभय पक्षाकरितां तयार करणें इत्यादि प्रकार रानटी लोकांच्या लग्नसंस्कारांचें प्राथमिक स्वरूप व्यक्त करितात.

औषधी मुळ्या व वनस्पती यांचें ज्ञान कुरुंबन लोकांनां चांगलें असतें. जंगली कुरबन व नगरवासी कुरुंबन यांच्यात वैमनस्य असतें व त्यानां कुरुंबनांच्या जादुगिरीचा व भुताटकीचा मोठा धाक असतो. कोणतीहि सांथ, अपमृत्यु, रुग्णावस्था किंवा आपत्ति आली असता या सर्व गोष्टी कुरुंबनामुळें घडून येतात असा सर्वत्र समज झालेला आहे. तोडा नावाच्या जातीला तर यांची दहशतच बसली आहे. कुरुंबन जातीचा दुसरा नाद म्हणजे मधमाशाची पोळीं जमा करून मध काढणें हा होय. आपल्या तीक्ष्ण दृष्टीनें ते अगदीं अडचणीच्या जागेंतील पोवळें अचुक शोधतात व त्या ठिकाणीं दोन काठ्या पुरून ठेवतात. या काठ्या पाहिल्यानंतर त्या पोवळ्याकडे पाहण्याचीसुद्धां इतरास छाती होत नाहीं. मद्य व तंबाखू यांचें ते सेवन करितात व काळोख्या रात्रीं दिवट्या घेऊन एखाद्या गव्याचा वध करतात व त्याचें मांस खातात म्हैसूर येथील अरण्यांत राहणारे कुरुंबन हे घर्षणानें अग्नि उत्पन्न करतात तोडा जातीचे लोक ज्या रीतीनें विस्तव तयार करितात तीच रीत यांचीहि असते. चकमकीनें विस्तव करण्यास जीं उपकरणें लागतात तींच साधारणतः यांच्यांत वापरलीं जातात.

वायनाड येथील सोन्याच्या खाणींत कुरुंबन लोकांचा चांगला उपयोग झाल्याची प्रसिद्धि आहे. निलगिरीच्या आसमंतांत असलेले नायक लोक व कुरुंबन यांच्यांत फरक आहे. त्या दोन्ही वर्गांत रोटीबेटीव्यवहार होत नाहींत. नायक लोक स्वतःस कुरुंबनांपेक्षां उच्च दर्जाचे समजतात.

त्यांचीं स्वतंत्र देवळें असून धार्मिक बाबतींत कुरुंबनांशीं त्यांचा संबंध येत नाहीं. नायक जात निबिड अरण्यांत वस्ती करून रहाते. परंतु कुरुंबनाचा यूरोपीयन मेळेवाल्यांशीं संबंध येऊं लागला आहे. कुरुंबनाला नायकांचा मोठा दरारा वाटतो. दोन्हीं जातींच्या भाषा कानडीपासून झालेल्या असल्या तरी नायक व कुरुंबन यांच्या भाषांत थोडा भेद आढळून येतो. या दोन्ही जातींचे पूजारी एकच असतात. त्यांच्यातील विरोध अलीकडे कमी होऊं लागला आहे असें दिसतें. [थर्स्टन. से. रि; डुब्रेल–पल्लव; एटना. सर्व्हे. पु. १].

बनवासी कदंब लोक हेच कुरुंबा होत असे काहीं म्हणतात. कुरुंबासंबंधानें दुसरी अशी समजूत आहे कीं दक्षिण प्रातातले यादव घराणें यापैकींच होतें. दक्षिणेंतील धनगर, बगालमधील सोथल व अहीर जातीशीं यांचा संबंध होता एवढी गोष्ट विचार करण्यासारखी आहे. पण त्या बाबतींत दुसरा पुरावा नाहीं. हरगर लोकांची एक शाखा धनगरांत आढळते तींत कांहीं कुरुंबा सांपडत असून खिल्लारी नावाची दुसरी एक जात नजरेस येते. ही खिल्लारी जात आपले वकऱ्याचे कळप घेऊन एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं अशी फिरत असते

मुंबई इलाख्यातील कुरुंबाचे मुख्य २ वर्ग आहेत ते हत्ती कंकण व उनीकंकण हे होत. या दोघांत रोटीव्यवहार चालतो; बेटी व्यवहार मात्र नाहीं. हत्तीकंकण लोक सुती माल व उनीकंकण लोंकरी माल करणारे असतात. तिसरा एक वर्ग याचा आढळतो त्याला हंडे कुरुंबा किंवा हंडे वजीर असें नाव असून ते लिंगायत पंथाचे असतात व ते मास खातात. हत्तीकंकण धनगरांच्या मुलीशीं त्यांचें लग्न होऊं शकतें. परंतु लग्न झाल्यावर मुलीला पुनरपि आपल्या आईबापाच्या घरीं कधींच पाठवीत नाहींत. हत्तीकंकण धनगरांत खिल्लारी, संगर, व हटकर अशा जाती असून त्यांत रोटीबेटीव्यवहार चालतात.

कानड्यात व्यभिचारी बायका, विधवा व ज्यानां नवरे मिळत नाहींत अशा मुली हलक्या जातींतल्या मनुष्याजवळ बायको म्हणून रहातात. अशा बायकानां कटिगरु अथवा वेश्या म्हणतात. [सेन्सस रिपोर्ट मुंबई १९११]. या बायका जातींत असून त्यांच्या मुलांची लग्नें कुरुंबा धनगराच्या मुलीशीं जुळतात. लग्नाची मागणी कोणत्याहि पक्षाकडून होते. कुरुंबा धनगर गाईचें व डुकराचें खेरीज करून बाकीचें मांस खातात व दारु पितात. यांच्या देवाचें नांव बीराप्पा असून त्याचे पुजारी जरी कुरबन धनगरांपैकीं असतात तरी त्यानां वडेर म्हणतात व हे कुरबन धनगरांचे पिढीजाद गुरु होत. यांच्यांत मृतासंबंधीं विधी आहेत तेच बहुधा कुरुंब लोकांत प्रचारांत असतात. यांच्यांत जातपंचायती आहेत. [एन्थावेन].

कुरुंब्रनाड—मद्रास इलाख्यांत मलबार जिल्ह्यातील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ५०५ चौ. मै. असून यांत १०४ खेडीं आहेत. १९२१ सालीं येथील लो. सं. ३,५६,९०७ होती. १९२१–२२ सालीं साऱ्याचें उत्पन्न सुमारें ५ लाख होतें. बदगर हें तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. कुरुंब्रनाड व कालिकत तालुक्याच्या सरहद्दीवरून कोरपुळा नदी वाहत गेलेली आहे. याच्या पूर्वेस व्यानद तालुका आहे. पहाडाची रांग जवळच असल्यामुळें एकंदर प्रदेश मोठा रमणीय दिसतो. एकंदर जमीन सुपीक आहे. मात्र समुद्रकिनाऱ्यावरील जमिनीचा भाग पिकाला योग्य नाहीं.

कुरुयुद्ध—हें महायुद्ध कौरव व पांडव (पांडवहि कुरुवंशांतील असल्यानें एका प्रकारें कौरवच होत) याच्यामध्ये झालें. पांडवांचें राज्य त्यांनीं प्रतिज्ञा पुरी केल्यानंतरहि त्याच्या हवालीं करण्यास कौरव तयार होईनात म्हणून हें युद्ध उपस्थित झालें. तत्पूर्वी शिष्टाचारप्रमाणें श्रीकृष्ण हे शिष्टाई करण्यास कौरवाकडे गेले होते; परंतु ती निष्फळ झाली व त्यामुळें युद्धाशिवाय दुसरा उपाय (पांडवांनां) उरला नाहीं. महाभारताचा मुख्य विषय हें युद्ध आहे व या युद्धास भारतीयुद्धहि म्हणण्याचा प्रघात आहे [महाभारत पहा.]

यु द्धा चें स त्य त्व.—हेंच कांहींच्या मतें सिद्ध होत नाहीं. कां कीं वैदिक वाङ्मयात धृतराष्ट्र, कौरव, परीक्षिति व जन्मेजय इत्यादिकांचा उल्लेख असून कुरुयुद्धाचा तेवढा उल्लेख नाहीं. तथापि या युद्धावर जे अनेक प्रकारचे वाङ्मय निर्माण झालें त्यावरून हें युद्ध झालें असावें असं गृहीत धरता येईल. शिवाय असेंहि शक्य आहे कीं वैदिक संस्कृतींतील म्हणजे मांत्र संस्कृतींतील सुशिक्षित वर्ग भारतीयुद्धानंतर कुरुक्षेत्रीं पूर्णपणें स्थापन झाला असावा व त्यामुळें भारतराष्ट्राचा किरकोळ उल्लेखच वैदिक वाङ्मयात शिरला असावा.

कु रु यु द्ध का ल.—या युद्धाच्या काळाविषयीं अनेक मतें प्रसिद्ध आहेत. कै. मोडकाचें मत वगळून इतर मतें पाहिलीं असतां खि. पू. १५०० व खि. पू. ३००० या दोन मध्याच्या आसपासचे काल भिन्न संशोधकांनीं मांडले आहेत. मुख्य कालनिश्चयाचीं अशीं पाच मतें आहेत तीं थोडक्यात अशीं(१) कै. मोडक याचें मतः–खि. पू. ५००० वर्षे. या युद्धाच्या वेळीं ग्रहांची स्थिति निरनिराळ्या दोन नक्षत्रांवर (महाभारतात) सांगितली आहे, तेव्हा एक नक्षत्र सायन व दुसरें निरयन मानलें पाहिजे; यावरून त्यावेळीं वसंतसंपात पुनर्वसू नक्षत्रात होता. या हिशेबावरून गणित करून पाहता युद्धाचा काळ खि. पू. ५००० हा येतो. (२) आर्यज्योतिष्याचें मत–ःखि. पू. ३१०१. या वर्षी "प्राप्तं कलियुगं विद्धि" (कलियुग लागलेंच असें जाण) अशा (शल्यपर्वांतील) श्रीकृष्णांच्या वाक्यावरून युद्ध झाल्यावर लवकरच चैत्रांत कलियुग लागलें असें धरलें, आणि कलियुग सर्व आर्यज्योतिष्यांच्या मतें खि. पू. ३१०१ या वर्षी लागलें; अर्थातच तोच काल या मह,

युद्धाचा होय. (३) वराहमिहिर, काश्मीरी पंडित (विशेषतः बिल्हण) व आर्यसमाजाचे कांहीं विद्वान सभासदः-ख्रि पू. २४४८ या वर्षी त्याच्या मतें कलियुग सुरू झाल्यावर ६५३ वर्षांनीं युद्ध झालें. (४) रमेशचंद्रदत्त वगैरे पौवार्त्य व कित्येक पाश्चात्य पंडितः-ख्रि.पू. १४००. कारण पुराणांत बृहद्रथवंशातील पांडवांचा समकालीन मगधराजा याच्यापासून नंदापर्यंतचा जो काल दिला आहे त्यावरून हा काल निश्चित होतो. (५) बिलंडी अय्यरः-आक्टोबर तारीख १४, ख्रि. पू. ११९४ (कार्तिक वद्य ११ चित्रा नक्षत्र).

या पांच काळांबद्दल निरनिराळ्या विद्वानांचीं मतें काय आहेत तीं थोडक्यांत सांगतों. भारती युद्धापासून कलियुगाला प्रारंभ झाला अशीं वचनें महाभारतांत दोन तीन ठिकाणीं आलीं आहेत तीं (१)'प्राप्तं कलियुगं विद्धि'-शल्यपर्व. (२) 'एतत्कलियुगं नाम अचिराद्यत् प्रवर्तते'-वनपर्व. (३) 'अन्तरे चैव संप्राप्ते कलिद्वापरयोरभूत् । स्यमंतपंचके युद्धं कुरुपाडवसेनयोः' – आदिपर्व. यावरून हें युद्ध कलियुगारंभीं झालें ही समजूत महाभारतकार सौति याच्या वेळीं (ख्रि. पू. ३००) पक्की रूढ होती. कुरुयुद्धकाल म्हणजे जसा श्रीकृष्णाचा काळ येतो तसाच कलियुगाचा प्रारंभकालहि येतो. तेव्हां हे दोन्ही काल ठरले म्हणजे आपोआपच युद्धकाल ठरेल असें या पक्षाचें म्हणणें आहे. श्रीकृष्णाचा काळ ठरविण्यास एक महत्वाचें बाह्य साधनाचें प्रमाण उपलब्ध आहे, तें पुढील प्रमाणें मांडण्यात येतें:-चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारांत यवन (ग्रीक) मेग्यास्थिनीस हा वकील होता, त्यानें त्यावेळीं शोध करून श्रीकृष्णाच्या कालाबद्दल लिहून लेविलें आहे. ती ऐकीव माहिती खरी धरून कृष्णकाल काढण्याचें काहींनीं साहस केलें आहे. मेग्यास्थिनीस म्हणतो "सॅड्रकोट्स (चंद्रगुप्त) व डॉयानिसांस (याच्या भारतीय तुल्याचें नाव काय तें समजत नाहीं. दाक्षायण मनु ?) यांच्यामध्यें १५३ पिढ्या झाल्या व वर्षे ६०४२ झालीं. डॉयानिसॉस पासून हिराक्लीज (हरिकृष्ण; शौरीकृष्ण) हा १५ पिढ्या अलीकडे झाला." म्हणजे १५३-१५ = १३८ पिढ्या श्रीकृष्ण व चंद्रगुप्त याच्या दरम्यान झाल्या. दर पिढीस २० वर्षे धरल्यास १३८×२० = २७६० वर्षांचा हा ठोकळ काळ येतो. चंद्रगुप्ताचा काळ ख्रि. पू. ३१२ असा ठरला आहे. तेव्हां २७६०+३१२ = ३०७२ ख्रि. पू. हा काल श्रीकृष्णाचा ठरतो. हा ख्रि. पू. ३१०१ या कलियुग कालाशीं जुळता आहे. हा कलियुगारंभाचा काळ (तारीख १७ फेब्रुवारी ख्रि. पू. ३१०१, मिति फाल्गुन कृष्ण अमावास्या गुरुवार मध्यरात्र) सूर्यसिद्धांताप्रमाणें काढिला आहे. वरील मेग्यास्थिनीसचा पुरावा फार प्राचीन (ख्रि. पू. ३१२) असल्यानें त्याला विशेष किंमत आहे. रा. ब. वैद्यांनीं वरील प्रमाणें हिशोब देताना बरीच वैदुगिरी केली आहे. मेग्यास्थिनीसनें १५३ पिढ्या सांगितल्या आहेत तेवढेंच खरें धरावयाचें आणि त्यांनीं सांगितलेलीं वर्षे मात्र खरीं धरावयाचीं नाहींत या प्रकारच्या विवेचनपद्धतीची किंमत कशी ठरवावयाची? . . . . .

वराहमिहिरानें जो काल दिला आहे. तो सर्व ज्योतिष्यांच्या मताच्या विरुद्ध व महाभारतांतील प्रत्यक्ष वचनाच्या विरुद्ध गर्गाचार्यांच्या "षड्द्विकपंचद्वियुतः शककालस्तस्य राज्ञस्य" या वाक्यावरून दिला आहे. परंतु हें वचन गर्गाच्या नावावर कोणीं तरी रचिलें असावें. कारण शककालापूर्वी एवढेंच नव्हे तर (महाभारतात त्याचें नाव प्रत्यक्ष येतें, त्यावरून तर) महाभारतापूर्वीच गर्ग होऊन गेला. कदाचित् गर्गानें २५२६ हा आकडा आपल्या एखाद्या समकालीन राजातील व युधिष्ठिरातील अंतराचा निदर्शक म्हणूनहि दिला असावा. परंतु याचा समाधानकारक खुलासा होत नाहीं. मात्र हा अंक त्यानें एखाद्या राजवंशावळीवरून तयार केला असावा. कारण अशा वंशावळी त्यावेळीं सर्वत्र तयार ठेवीत असत (राजतरंगिणी पहा). "साराश इतर ज्योतिष्यांच्या मताविरुद्ध (विशेषतः खुद्द महाभारतातील वचनाविरुद्ध) या एकट्या वराहमिहिराच्या वचनास मान्यता देता येत नाहीं," असें चिंतामणराव वैद्य म्हणतात. त्याच्या मतें रोहिणी किंवा मृग नक्षत्रीं मार्गशीर्ष शुद्ध १३ या तिथीस युद्ध सुरू झालें. आम्हीं ह्या गर्गवचनाचा अनादर करण्यास तें वचन गर्गाचें नव्हे असें सिद्ध करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. गर्ग संहिताकार गर्गशकोत्तर नसेल कशावरून ? आम्हीं असें म्हणणार कीं शातवाहनकालीन मनुष्यानें हजार दोन हजार वर्षापूर्वीची झालेल्या गोष्टीची नक्की तारीख सांगितली तर त्यानें केवळ "बाबा वाक्यं प्रमाणं" म्हणून स्वीकारलेली गोष्ट आहे असें म्हणून ती अजीबाद खोटी धरणार.

रमेशचंद्र दत्तादिकांचा ख्रि. पू. १४०० चा काळ, मुख्यत्वें विष्णुपुराणावरून ठरविलेला आहे. त्यात पुढील वाक्य या काळाचें मूळ म्हणून दर्शविलें जातें:—"यावत्परीक्षितो जन्म यावन्नंदाभिषेचनम् । एतद्वर्षसहस्रं तु ज्ञेयं पंचदशोत्तरम् ॥" (असाच श्लोक भागवतातहि आहे). या श्लोकात परीक्षिताच्या जन्मापासून नंदाच्या अभिषेकापर्यंत १०१५ वर्षे झालीं असें म्हटलें आहे. परीक्षिति हा युद्धानंतर ४।५ महिन्यांनीं जन्मला तेव्हां युद्ध तों नंदाभिषेक १०१५ + त्या पुढील नऊ नंदांचीं १०० वर्षे+ चंद्रगुप्ताचीं ३१२ मिळून एकंदर = १४२७ ख्रि. पू. हा भारतीयुद्धाचा काल आला. परंतु विष्णुपुराणांतील हेंच वचन (अंश ४ अध्याय २४) विष्णुपुराणातीलच दुसऱ्या (अध्याय २३) एका वचनाच्या विरुद्ध आहे. त्यात भारतीयुद्धांतील जरासंधपुत्र सहदेव याचा वंश १००० वर्षे राज्य करील व नंतर प्रद्योतवंश १३८ वर्षे व त्यानंतर शिशुनागवंश ३६२ वर्षे राज्य करील असें म्हटलें आहे. म्हणजे एकंदर १०००+१३८+३६२ = १५०० वर्षे होतात. तेव्हां या १५०० चा व पूर्वीच्या १०१५ चा मेळ मुळींच बसत नाहीं. पुराणकारांची माहिती ठोकळ स्वरूपाची आहे. म्हणून या

विधानांकडे अधिक सूक्ष्मतेनें पाहिलें पाहिजे तथापि तेवढ्या असंगतीवरून विष्णु, भागवत वगैरेमधील या पुराणोक्त पिढ्या व वर्षे यांचा पुरावा मेग्यास्थीनीसच्या पुराव्यासमोर टिकत नाहीं असें जें चिंतामणरावांनीं मांडलें आहे त्याचा मुळींच स्वीकार करतां येणार नाहीं. मेग्यास्थीनीसच्या पुराव्याला महत्व द्यावयाचें म्हणजे त्यास आपणापेक्षां अधिक साहित्य निश्चितपणें खरें असलेलें उपलब्ध झालें होतें व त्या साहित्यावरून त्यानें केलेला हिशोब अगदीं बिनचुक होता असें धरलें पाहिजे आणि तसें धरण्यास आधार काय ?

ऋग्वेदांतील दोन उल्लेखांवरून कुरुयुद्धाचा काल ख्रि. पू. ३१०० च्या वेळचाच निघतो. असेंहि मांडण्यांत आलें आहे. ऋग्वेदांत देवापि या ऋषीचें नाव येतें तेथें त्यास वेदाचें स्पष्टीकरण करणारांनीं-वेदांनीं नव्हे—'कौरव्यशंतनु' याचा भाऊ म्हटलें आहे. महाभारतात, शंतनूचा वडील भाऊ म्हणून देवापीचें नांव येतेंच. तेव्हां शंतनु (अथवा देवापि)-विचित्रवीर्य—पंडु-पांडव मिळून १००वर्षे होतात. ऋग्वेदांत दुसऱ्या एका ठिकाणीं सोमक साहदेव्य याचा उल्लेख आला आहे. महाभारतांत द्रुपदाचा पूर्वज सोमक असें म्हटलें आहे. सहदेव–सोमक–जंतु पृषत–द्रुपद मिळून १०० च वर्षे होतात म्हणजे ऋग्वेदानंतर १००, १५० वर्षांनीं भारतीयुद्ध झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यजुर्वेदांत कुरु व पांचाल यांचीं नावें येतात. तसेंच काठक ब्राह्मणात धृतराष्ट्र वैचित्रवीर्य याचा उल्लेख येतो आणि शुक्लयजुर्वेदांतर्गत शतपथ ब्राह्मणांत जनमेजय पारीक्षिताचा उल्लेख आहे. या सर्व उल्लेखांवरून त्या त्या वेद व वेदांगांपूर्वी भारतीय युद्ध झालें हे स्पष्ट आहे. शतपथ ब्राह्मणांत कृत्तिका या थेट पूर्वेस उगवतात असें एक (वर्तमानकालवाचक) वचन आहे कै. शं. बा. दीक्षित यांनीं गणित करून कृत्तिकेचा हा काळ ख्रि. पू. ३००० असा काढला आहे. तेव्हां शतपथापूर्वी (जनमेजय-परिक्षिती-अभिमन्यु–अर्जुन) निदान ६०।७५ वर्षे तरी भारतीय युद्ध झालें. शतपथापूर्वी कित्येक वर्षे ऋग्वेद तयार होत होता. तेव्हां ख्रि. पू. ३२०० हा ऋग्वेदाचा शेवटचा काळ धरण्यास हरकत नाहीं वर सांगितल्याप्रमाणें या कालानंतर १०० वर्षांनीं युद्ध झालें म्हणजे ख्रि. पू. ३१०० हाच काल युद्धाचा येतो (याकोबी यानें ऋग्वेदाचा काळ ज्योतिषप्रमाणावरून ख्रि. पू. ४ हजार वर्षे ठरविला आहे). तसेंच यजुर्वेदाचा काळ ३००० चा धरतात; त्यावरूनहि युद्धाचा काळ वरीलच निघतो.

चांद्रमान हिशेबानें पांडवांनीं आपला वनवास पुरा केला असें महाभारतांत वर्णन आहे. ही चांद्रमानाची पद्धत (पांच वर्षांनीं दोन महिने एकदम अधिक धरण्याचा संप्रदाय) तैत्तिरीय संहिता व ब्राह्मणकाळीं होती व तीच भीष्मानें दुर्योधनाच्या शंकेस उत्तर म्हणून सांगितली. अर्थात् तै. सं. व ब्राह्मणकालीं कुरुयुद्ध झालं. या प्रकारच्या मांडणींतील गुणदोष येणेंप्रमाणें:—शतपथ ब्राह्मणापूर्वी भारतीयुद्ध झालें हें मत स्वीकारतां येईल. तथापि देवापि व शंतनु याचें बंधुत्व हें उत्तरकालीन कथाप्रमाणेंच दिसतें म्हणून धरतां येणार नाहीं. द्रुपद पूर्वज सोमक व ऋग्वेदोक्त सोमक हे एकच होते. याला आधार काय तर दोघांचेंहि नाव सोमक होतें हाच ! !

उरलेल्या कृत्तिका वादाचा परामर्श यापुढें घेतला आहे. आमच्या मतें त्या उल्लेखावरून शतपथाचें प्राचीनत्व सिद्ध होत नाहीं. वेदांगापूर्वी भारतीयुद्ध झालें हें सांगण्यांत तात्पर्य काय ? बरींचशीं वेदांगें तर फारच अर्वाचीन आहेत. मीमांसेंत तर बौद्धांचा उल्लेख येतो. एवंच रा. चिं. वि. वैद्यांची इमारत अगदीं कच्च्या पायावर उभारलेली आहे. रा वैद्य मोडकांच्या मताचें खंडण करण्यासाठीं मांडणी करतात ती अशीः—

कै. मोडक यांनीं उद्योगपर्वामध्यें व भीष्मपर्वामध्यें आलेल्या ग्रहस्थितीच्या वर्णनावरून युद्धकाल ठरविला आहे. तीं वचनें पुढीलप्रमाणें आहेत. (१) श्रीकृष्ण हे कार्तिक महिन्यांत रेवती नक्षत्रीं शिष्टाईस निघाले. (२) हस्तिनापुरास कर्णानें त्याची भेट घेतली. त्यावेळीं त्यानें, शनि हा रोहिणीस पीडा देत आहे, महापात चित्रेला पीडा देत आहे, राहू सूर्याला ग्रासतो आहे, ज्येष्ठेचा मंगळ वक्री होऊन अनुराधेशीं संगत होतो आहे, असें वर्णन केलें आहे. (३) दुर्योधनानें पुष्य नक्षत्रीं प्रयाण केलें. (४) कार्तिकात वद्य पक्षांत श्रीकृष्ण परतले. त्या पक्षांत १३ च दिवसाचा पंधरवडा होता (भीष्मपर्व) व सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण अशीं दोन्हीं ग्रहणें या महिन्यांत पडलीं. (५) युद्धारंभदिनास चंद्र मघा नक्षत्रीं होता (६) बलराम म्हणतो, मी पुष्य नक्षत्रावर यात्रेस गेलों आणि आज (युद्धाच्या शेवटच्या १८ व्या दिवशीं) श्रवणावर परतलों, इत्यादि वचनांवरून कै. मोडकांनीं काळ काढिला आहे तो ख्रि. पू. ५ हजार वर्षे हा होय. पण हें अनुमान काढताना मुख्य अडचण येते ती ही कीं, सौतीनें भारत वाढविल्यामुळें मूळातील वचनें कोणतीं तें समजणें अशक्य आहे. तसेंच कांहीं वचनें कूटार्थी असतात; हीं वचनें बहुधा संख्येवर जास्त रचिलेलीं आहेत; त्यामुळें वरील अनुमान निःशंकपणें मानता येत नाहीं. मात्र कार्तिकी अमावास्येस (शुक्रवारीं) सूर्यग्रहण पडलें होतें, असें मात्र गृहीत धरून हे गणितानें सिद्ध होत आहे व त्यावरून जो काळ निघतो तो (म्हणजे शके ३१८०) आर्यज्योतिष्याच्या नेहमींच्या काळालाच अनुसरून म्हणजे ख्रि. पू. ३१०२ येतो. तेव्हां या दृष्टीनें हा पुरावाहि मजबूत आहे. मोडकांचा पाच हजारांचा काळ जुळत नाहीं. भारतांतील ही ग्रहस्थिति इतकी अनिश्चित आहे कीं, तीवरून गणितरीत्या काळ काढणें शक्यच नाहीं असें कै. दीक्षित यांचेंहि मत आहे.

कै. त्र्यं. गु. काळे यांनीं भारतीय युद्धाची रोजनिशी म्हणून एक लेख छापला आहे (विविधज्ञान विस्तार

जुलै १९१३). त्यांत वरील ग्रहस्थितीच जमेस धरून, युद्ध मार्गशीर्षी पौर्णिमेला सुरू होऊन, पौष शुद्ध द्वितीयेला संपलें असें ठरविलें आहे. पुराणनिरीक्षण या ग्रंथांत त्यांनीं युद्धकाल ख्रि. पू. १२६३ दिला आहे.

रा. केशवराव दफ्तरी यानीं या विषयावर वि. ज्ञा. वि. च्या १९१८सालच्या अंकांत लेख लिहिले आहेत. त्यांचें म्हणणें कीं, " भारतांतील वाक्यें परस्परविरोधी असूनहि त्यापैकीं ग्राह्य कोणतीं व त्याज्य कोणतीं हें ठरविण्याचा कोणींच प्रयत्न केला नाहीं; त्यामुळे त्यांचे प्रयत्न फसले; मी तो प्रयत्न केला आहे व तो सिद्धीस गेला आहे असें वाटतें." युद्धदिनाबद्दल त्यांचें मत, गणितानें येणाऱ्या कार्तिकाच्या अमावास्येस, परंतु वास्तविक मार्गशीर्ष शुद्ध द्वितीयेस ज्येष्ठा किंवा मूळ नक्षत्रीं युद्ध सुरू झालें असें आहे. युद्धकालासंबंधीं लिहितांना, त्यानीं भारतात सांगितलेल्या उत्तरायणारंभकालावरून तो काल काढला आहे. आणि तो ख्रि. पू. ११९७ हा होय.

रा. करंदीकर हे युद्धाचा काल १५०० पूर्वी एक दोन शतकें इतका नेतात पण त्यांच्या विधानांतहि ज्योतिर्विषयक विधानांवर अवलंबून रहाणारांमध्यें सापडणारे दोष सांपडतात. युद्धाच्या कालाविषयीं इतकी अनिश्चितता असता युद्धदिननिर्णयासाठीं प्रयत्न झाले आहेत.

रा ज. स. करंदीकर यानीं भारतीय युद्धदिननिर्णय अथवा गीताजयंति या आपल्या [चित्रमयजगत्. जानेवारी १९२१च्या] लेखांत पुढील निष्कर्ष काढला आहे. यानीं रा वे. वा. केतकरांचे म्हणण कीं " मार्गशीर्ष शु. पौर्णिमा मृग किंवा आर्द्रा नक्षत्रीं युद्धास सुरुवात झाली " हें खोडून काढलें आहे. कारण हा आरंभदिवस धरल्यास जयद्रथवधाच्या दिवशीं अमावास्या येंत, परंतु भारतांत त्या दिवशीं पहाटे चंद्रोदयाचें वर्णन आहे म्हणून केतकरांचे म्हणणें चूक आहे. म्हणजे जयद्रथवधवर्णनावरून आमावास्याच निघते तर तें वर्णन किंवा त्या वर्णनावरून निघणारा निष्कर्ष अमान्य करून त्यावेळचें चंद्रोदय वर्णन हें मात्र अप्राक्षिप्त व प्रमाण असें रा.करंदीकर समजतात बिलंडी यांचें म्हणणें कीं, "कार्तिक कृ. ११ चित्रा नक्षत्रीं "आरंभ झाला हेंहि करंदीकर यानीं खोडून काढलें आहे. कारण तो दिवस धरल्यास भीष्मनिर्याणाच्या दिवशीं ५८ वा दिवस येत नाहीं व युद्धारंभ मघानक्षत्रीं व युद्धशेवट श्रवण नक्षत्रींहि येत नाहीं व इतरहि प्रसंग जुळत नाहींत. रा. दफ्तरींची वर दिलेली तिथीहि करंदीकरांनीं खोडली आहे. कारण दफ्तरी यांनीं तिथि व चंद्रोदयकाळ बरोबर ठरविलें नाहींत; तसेच दफ्तरी यांची तिथि ग्राह्य धरल्यास अश्वत्थाम्याचा छापा मार्गशीर्ष वद्य ५ ला म्हणजे लखलखीत शुभ्र चादण्यात पडल्याचें मानावें लागतें; व बलराम श्रवण नक्षत्रीं परत आल्याचेंहि जुळत नाहीं. नीलकंठ चतुर्धर व रा. चिंतामणराव वैद्य यांचें म्हणणें ' मार्गशीर्ष शु. त्रयोदशी रोहिणी किंवा मृग नक्षत्र " हेंहि जुळत नाहीं. कारण त्रयोदशीस मृग नक्षत्र येत नाहीं व घटोत्कचवधाची परिस्थिति जुळत नाहीं. व भीष्मनिर्याणाला ५८वी रात्र येत नाहीं रा. करंदीकरांचें स्वतःचें मत " मघाविषयगः सोमः " या वचनावरून मघांचे अधिपती पितर, त्यांचा विषय-वसति-यमलोक हा यम आहे विषय ज्याचा तें भरणी नक्षत्र, या भरणी नक्षत्रीं युद्ध सुरू झालें आणि त्या दिवशीं तिथि मार्गशीर्ष शु. ११ होती असें आहे. याच दिवशीं श्रीकृष्णांनीं गीता सांगितली म्हणून गीताजयंतीहि याच दिवशीं येते असें ते म्हणतात. आणि उद्योगपर्वांत व भीष्मपर्वांत जीं जीं नक्षत्रें क्रूर ग्रहांनीं विद्ध झालीं असें सांगितलें आहे त्या त्या नक्षत्रीं कौरवांचा भयंकर संहार कसा झाला हेंहि त्यांनीं वरील तिथी व नक्षत्रें धरूनच दाखवून दिलें आहे. या त्यांच्या पद्धतीनें भीष्मनिर्याण माघ वद्य ४ स येंत म्हणजे मार्गशीर्ष वद्य ५ ते माघ वद्य ४ पर्यंत ५८ दिवस होतात हल्लीं माघ शु ८ ही तिथी धरली जाते ती चांद्रमानानें धरली जाते असें त्यांचें म्हणणें आहे.

एकंदरींत या कुरुयुद्धाच्या कालाबद्दल अनेकांचीं अनेक मतें आहेत आणि त्यांची एकवाक्यता जशी आज होत नाहीं, तशी यापुढेंहि होणें शक्य नाहीं असें दिसतें. कारण अनेकक्षेपयुक्त महाभारतातील अस्पष्ट व असंदिग्ध व परस्परविरुद्ध अशा श्लोकावरून हा कालनिर्णय करावयाचा आहे;तेव्हा साहजिकच जो तो आपल्या मताप्रमाणें त्याचा अर्थ लावून काल काढणार.

लो. टिळक यानीं गीतारहस्यांत (परिशिष्ट भाग ५), हल्लींच्या गीतेचा काल या सदराखालीं पुढील माहिती दिली आहे:—(१) जावा व बली बेटात शके ४०० पूर्वी महाभारत गेलें होतें; (२) शके ३६७ च्या एका गुप्त राजाच्या शिलालेखात महाभारताचा उल्लेख आहे; (३) भासाच्या बऱ्याच नाटकाना भारताचा आधार आहे. भासाचा काल इ. स. चें २ रें शतक; (४) अश्वघोषानें बुद्धचरित्र व सौंदरानंद यात महाभारतीय कथाचा उल्लेख केला आहे. त्याचा काल इ. स. चें पहिलें शतक होय. (५) आश्वलायन गृह्यसूत्रात महाभारताचा स्पष्ट उल्लेख आहे व बौधायन धर्मसूत्रांत महाभारतांतील श्लोक आहेत. बौधायनाचा काल ख्रि. पू. चौथें शतक. (६) महाभारतात राशींचा उल्लेख नाहीं आणि नक्षत्रगणना आहे ती श्रवणादि (श्रवण नक्षत्रापासून उत्तरायणास सुरुवात होणें) आहे. हा काल गणितानें शकापूर्वी५००येतो.(७)वेदांगज्योतिषाच्या व परिक्षितीच्या जन्मापासून नंदाभिषेकापर्यंत १११५ (किंवा १०१५) वर्षे होतात. " या वचनाच्या आधारें ख्रि. पू. १४०० वर्षे श्रीकृष्ण व भारतीययुद्ध यांचा काल होय.

प्रत्येक मताचीं साधकबाधक विधानें तपासण्यास येथें अवकाश नाहीं. तथापि महत्वाच्या विधानांचा परामर्श मधून मधून घेतलाच आहे.

भारतीय युद्धाचा काल काढण्यासाठीं जे प्रयत्न संशोधकांकडून झाले त्यांचे एकंदर तीन वर्ग पडतात.

(१) ज्योतिषविषयक प्रमाणांस कमी महत्त्व देऊन आणि परीक्षितीच्या जन्मापासून नंदाभिषेकापर्यंत १११५ वर्षे होतात या विधानास व त्याचप्रमाणें पुराणातील राजाच्या यादीस महत्त्व अधिक देऊन कालनिर्णय करण्याचा मार्ग.

(२) दुसरा मार्ग असा कीं राजाच्या याद्यांकडे दुर्लक्ष करून ज्योतिर्विषयक विधानापैकीं कलियुग भारतीयुद्धाच्या अंताला सुरू झालें एवढेंच घेऊन ज्योतिष्यानीं प्रारंभविषयक कलियुग जें लिहिलें आहे तें घेऊन त्यात अत्यंत ग्राह्य मत शोधण्याचा मार्ग. या प्रयत्नांत महाभारताच्या आंत जे इतर ज्योतिर्विषयक उल्लेख आले आहेत ते अग्राह्य व अप्रमाण धरले आहेत; हा मार्ग रा. वैद्यानीं स्वीकारला आहे. व हा स्वीकारताना राजावलीचें प्रमाण दुर्लक्षिण्यास व ज्योतिषविषयक अंतर्गत विधानें दुर्लक्षिण्यास रा. वैद्य जीं कारणें माडतात तीं अपुरीं वाटतात. तें मार्गे दाखविलेंच आहे.

(३) कलियुग कुरुयुद्धातीं सुरू झालें या मतास कमी महत्त्व देऊन अंतर्गत ज्योतिर्विषयक विधानास महत्त्व देऊन त्यापासून काल काढण्याचा मार्ग. या मार्गाप्रमाणे शोधप्रयत्न करणारात अनेक मतें निघालीं आहेत. ज्योतिर्विषयक प्रमाणात परस्परविरुद्धता आल्यामुळें त्यात अनेक मतें निघणें स्वाभाविक आहे. आणि ही परस्परविरुद्धता अनेक क्षेपाच्यामुळें उत्पन्न झाली असेल. पहिल्या प्रकारचा मार्ग पतकरणाऱ्यानीं आपल्या मनास जुळतील तेवढे ज्योतिषाचेहि पुरावे घेतले आहेत.

वरील तीन पद्धतींपैकीं संशोधनास जास्त उपयुक्त कोणती तें पाहूं. या तीनहि मार्गापैकीं स्थूलपणानें एवढें सागता येईल कीं कलियुगप्रारंभाचा काल तोच कुरुयुद्धांताचा काल होय असें धरून व कलियुगविषयक ज्योतिषाची कल्पना घेऊन युद्धाचा काल काढणें अप्रयोजक आहे. कारण कीं, कलियुगविषयक कल्पना जमत जमत तयार झालेली. भारतीय युद्ध आटपल्यानंतर आता दिवस वाईट आले म्हणून केवळ कवीनें जें म्हटलें त्याचेंच युद्धातीं कलियुग सुरू झालें हें उत्तरकालीन रूपांतर होय. ज्या वेळेस युगकल्पना मुळींच वृद्धिंगत झाली नव्हती व अमुक युग संपत आलें आहे व आता दुसरें युग सुरू होणार अशा तऱ्हेची कल्पना त्या वेळच्या लोकाना असणें जरूर नाहीं. अनेक ग्रह एका राशीवर होते त्या कालापासून कलियुग सुरू झालें ही ज्योतिषाची कल्पना मागाहून तयार झालेली व ती आपल्या कालगणनेस कोणता तरी प्रारंभबिंदु असावा या भावनेनें तयार झालेली. जो काल (प्रारंभबिंदू) गणितज्ञांनीं गणिताच्या साहाय्यानें शोधून काढला त्याच कालांत नेमके युद्ध झालें अशी कल्पना करणें म्हणजे संशोधकवृत्तीस अजीबात फाटा देणें होय. आता वाईट दिवस सुरू झाले म्हणजे कलियुग सुरू झालें असें एक विधान व ज्योतिषानीं ज्योतिषशास्त्र वाढविल्यानंतर कलियुगविषयक केलेलें गणित ही अगदींच निराळी बाब. या दोन गोष्टींचा भिन्न जन्म लक्षात घेतला असतां कलियुगविषयक विधानावर कुरुयुद्धाच्या कालगणनेची तयारी करणें अप्रयोजक आहे असें दिसून येईल.

ज्योतिर्विषयक विधानें लक्षात घेतलीं असता व त्यातील एकमेकाशीं असंगति पाहिली असता आणि महाभारत हा अनेक क्षेपाची संहिता आहे ही गोष्ट लक्षात घेतली असता ज्योतिर्विषयक उतारे बरेच काळजीपूर्वक वापरले पाहिजेत. अमुक गोष्ट झाल्यानंतर रात्र झाली. पुढें अमुक गोष्ट झाल्यानंतर चंद्रोदय झाला. इत्यादि प्रकारचीं थोपट व काल्पनिक वर्णनें कवि कालविषयक विचार विशेष मनात न आणता घालूं लागतो. आणि त्या प्रकारच्या विधानाचा आधार घेऊन म्हणजे सामान्य वर्णनाशीं गुरफटलेल आधार अजीबात बाहेर काढून कालशोधन निराळें व्हावयास पाहिजे. तें तसें आज झालें नाहीं 'मासाना मार्गशीर्षोहं ऋतूना कुसुमाकरः' येवढ्यावरून त्या काळात मार्गशीर्षात वसंत येत असे एवढा उर्हा एकदम घेतां यावयाचा नाहीं. त्याप्रमाणेंच ऋतूंमध्यें वसंतास प्रामुख्य असले तरी वसंतामुळेंच मार्गशीर्षास प्रामुख्य होतं हें कोठें सांगितलें आहे. त्यावेळेस मार्गशीर्ष हा आज काहीं अज्ञात असलेल्या सामाजिक किंवा राजकीय कारणानीं प्रामुख्य पावला असेल.

कृत्तिका या थेट पूर्वेस उगवतात म्हणून वर्तमानकालवाचक जे उल्लेख आहेत त्यावरून फारसें निश्चित काहींच अनुमान काढता येत नाहीं. हें वाक्य केव्हांचें तरी जुन्या कालचें असणें शक्य आहे. याज्ञवल्क्य तर इतका खंबीर दिसतो व सामान्य लोकाच्या व श्रोत्याच्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाविषयीं त्यास इतका तिरस्कार होता कीं तो कोवळ्याच्या मंत्राचा विनियोग कुटण्याच्या कामीं करीत आहे; तर तो जुनें एखादें वाक्य त्यात वर्तमान काल वाचक प्रयोग आहे म्हणून बदलण्याच्या फिकिरींत कशास पडतो.

ज्योतिर्विषयक अन महाभारतावर निश्चित प्रकाश पाडणारे पुरावे कमीच असल्यामुळे शेवटीं पौराणिक राजावलींची यादी एवढीच कुरुयुद्धाच्या कालगणनेस ऐतिहासीक महत्वाची सामग्री आहे असें आम्ही समजतों व त्या पद्धतीनुसार काढलेला काल सुमारें खि. श पूर्वी १४०० हा ग्राह्य धरतों.

कुरुयुद्धात कोणकोणतीं राष्ट्रें सामील होतीं याचा एक नकाशा आम्ही ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडाच्या तिसऱ्या विभागांतील ५२८ व्या पृष्ठावर दिला आहे. तो पाहिला म्हणजे युद्धमान राजाचीं (देशवाचक) नावें आपोआपच लक्षांत येतील.

कुरुवर्ष—आग्नीध्रानें आपल्या जंबुद्वीपाचे नऊ भाग करून नऊ पुत्रास दिले, त्यात कुरु नावाच्या पुत्रास दिलेला वर्ष (प्रदेश). हा शृंगवान् पर्वत आणि क्षारसमुद्र यांच्यामध्यें

भरतवर्षाप्रमाणेंच धनुष्याकार आहे (" धनुर्वत्संस्थिते ज्ञेये द्वे वर्षे दक्षिणोत्तरे)" यास उत्तरकुरु व ऐरावतवर्ष अशीं नामांतरें आहेत [भारत भीष्मपर्व. अ. ६, मत्स्य. पु. अ. ११२; भागवत स्कं. ५ अ. २].

कुरुष्पाल—बस्तर संस्थानांत जगदलपूर तालुक्यांत चित्रकोट धबधब्याजवळ हें लहान खेडें असून येथें पुष्कळ शिलालेख आहेत. त्यांपैकीं बरेच इ. स. १०९७ तील नागवंशी घराण्यांतील सोमेश्वर देव याच्या वेळचे आहेत.

कुरुक्षेत्र—हिंदुस्थानांतील एक प्राचीन देश. हा ब्रह्मावर्ताच्या पश्चिमेस होता असा उल्लेख आहे. श्रीकृष्ण आनर्त देशास जात असतां प्रथम कुरुदेशांतून निघाल्यानंतर त्यास ब्रह्मवर्नांच्या पुढें व मत्स्याच्या अलीकडे कुरुक्षेत्र लागल्याचें भागवतांत म्हटलें आहे. येथें कौरवांचा मूळ पुरुष कुरु या राजानें तप केलें व इंद्र त्याला प्रसन्न झाला आणि त्याच्या प्रसादानें हें स्थळ पवित्र झालें अशी कथा आहे. याच्या चतुःसीमा एके ठिकाणीं पुढील प्रमाणें दिल्या आहेतः—"तरंतुक व अरंतुक यांच्यामधील आणि रामन्हद व मचक्रुक यांच्यामधील असा जो प्रदेश तो". येथें दिशा सांगितलेल्या नाहींत. उत्तरवेदी, अंतरवेदी, धर्मक्षेत्र, विनशनक्षेत्र अशींहि यास दुसरीं नांवें आहेत. सरस्वती व दृषद्वती यांच्या दुआबात (दृषद्वतीच्या उत्तरेस व सरस्वतीच्या दक्षिणेस) हें आहे. याचा परिघ ८० कोस आहे. ह्युएनत्संगनें हें पाहिलें होतें. त्यानें याला सुखक्षेत्र म्हटलें आहे. हल्लीं हें कर्नाळ जिल्ह्यांत आहे. महाभारतकाळीं हें व पुष्कर अशीं दोन तीर्थें फार प्रख्यात होतीं. महाभारतांत याच्यासाठीं सबंध एक अध्याय खर्ची पडला आहे. (वनपर्व अ. ८३ पहा). ' कुरुक्षेत्रांत राहीन ' असें नुसतें म्हणणारा सुद्धां निष्पाप होतो असें म्हणतात. या क्षेत्रात शेंकडो तीर्थें असून त्यांत तीन मुख्य आहेत. (१) पृथूदक;(२) स्यमन्तपंचक, हे पाच तळाव परशुरामानें क्षत्रियांचा नाश करून त्यांच्या रक्तानें भरल्याची कथा आहे; (३) सन्निहती, या तीर्थांत सूर्यग्रहणाच्या वेळीं स्नान करणाऱ्यास १०० अश्वमेधाचें पुण्य लागतें. या तीर्थांत सर्व तीर्थें आलीं म्हणून तें सन्निहती होय. येथें एका सूर्यग्रहणप्रसंगीं कौरव, पाडव, यादव व गोपाळ हे एकत्र जमा झाल्याचें वर्णन भागवतांत आहे. अजूनहि सूर्यग्रहणांत तेथें मोठी यात्रा भरते कुरुक्षेत्रांत युद्धांत मरणारा स्वर्गास जातो अशी त्यावेळीं समजूत होती; म्हणून येथें भारतीय युद्ध झालें. परंतु एवढें मोठें सैन्य येथें राहिलें असेल हें संभवनीय नाहीं. कुरुक्षेत्राला मध्य धरून दोन्ही फौजा फार विस्तीर्ण प्रदेशांत पसरल्या होत्या असें महाभारतांतच म्हटलें आहे. त्यावरून पंजाबचा कांहीं भाग सर्व कुरुजांगल, रोहितकारण्य, मरुभूमि म्हणजे अहिच्छत्र (रामपूर), कालकूट, गंगापूर, वारण, वाटधान या अर्वाचीन प्रदेशांत, शंभर कोस लांब व पन्नास ते शंभर कोस रुंद या मोठया भूप्रदेशांत हें युद्ध झालें असावें. [वैद्य—भारत उपसंहार; भागवत. स्कं. १, ३, ७, ९; इंडि. अँटि. पु. ३. ५: अ. कोश; प्रा. कोश; महाभारत, शल्य. प; इंपी. ग्याझि. पु. १६].

इ. स. १७५४ मध्यें पेशव्यांनीं क्षेत्र गया व कुरुक्षेत्र हीं दोन्ही क्षेत्रें दिल्लीच्या पातशहापासून आपल्याकडे घेतलीं होतीं (राजवाडे खं. ६ ले. ३२८).

कुर्तकोटी—मुंबई इलाखा धारवाड जिल्हा. गदगच्या नैऋत्येस सुमारें ८ मैलांवर हा एक गांव आहे. येथील गौरेश्वराच्या देवळाजवळ इ. स. १२४४ सालचा एक, केरी बसप्पाच्या देवळांत इ. स. १०८२ सालचा एक, शंकर लिंगच्या देवळांत इ. स. ११३२ आणि ११३८ सालचे दोन आणि विरूपाक्षाच्या देवळांत इ. स. १०८७ सालचा एक असे पाच शिलालेख आहेत. इ. स. १८३५ च्या सुमारास कुर्तकोटी येथील एका घराचा पाया खणीत असता एक ताम्रपट सापडला असून तो इ. स. ६१० सालचा आहे असें दिसतें. तथापि तो त्या सालचा नसून नवव्या किंवा दहाव्या शतकांतील आहे व त्यामुळें तो ताम्रपट बनावट आहे असें फ्लीटनें सिद्ध केलें आहे [इं. ॲ. पु. ७; २१७. मु. गॅ.].

कुर्दिस्तान—कुर्द लोकांच्या देशाला कुर्दिस्तान म्हणतात. बतमनसु बोहतन-सु वगैरे तैग्रीसला मिळणाऱ्या नद्या वहात असलेला प्रांत व ग्रेट व लिटल झाब नद्या वहात असणारा डोंगराळ मुलूख इतका प्रदेश कुर्दिस्तानांत मोडतो

कुर्दिस्तानमधील लोकसंख्या २५ लाख असून त्यांपैकीं १६॥ लाख तुर्की कुर्द, ८० हजार इराणी व ५० हजार रशियन आहेत. कुर्द लोक साकरिआ नदीपासून उर्मिया सरोवरापर्यंतच्या मुलखांत पसरलेले आहेत. भटकणारे कुर्द सर्वांत श्रीमंत व स्वावलंबी असून ते उन्हाळा डोंगरावर व हिंवाळा तैग्रीस नदीच्या कांठच्या मुलखांत घालवितात.

कुर्द लोकाना बाहेर रहाणें आवडतें. याची भाषा तुर्क लोकांच्या भाषेहून भिन्न असल्यामुळें व त्यांचा धर्म पर्शिअन लोकांच्या धर्माहून भिन्न असल्यामुळें त्यांनां सर्वत्र अविश्वासान वागवितात व ते सत्ताधारी लोकांशीं नेहमीं झगडत असतात. हे लोक अतिशय रानटी असून इतर लोकांवर लुटालूट करून जुलूम करतात. या लोकांनां आपल्या कुलांचा अभिमान असतो. हे लोक बुद्धिवान असतात. कांहीं सुशिक्षित कुर्द वजिराच्या जागेवरहि असत. कांहींनीं बायबलचें तुर्क भाषेंत भाषांतर करण्यास व कांहींनीं वर्तमानपत्र चालविण्यास मदत केली आहे. यांच्या बायकांनां गोषा नसून त्यांनां बरेंच स्वातंत्र्य आहे. कुर्द लोक गर्विष्ठ परंतु विश्वासू व आतिथ्यपर आहेत. त्या लोकांत क्षात्रतेज दृष्टोत्पत्तीस पडतें; परंतु लष्करी शिस्तीचा त्यांनां फार तिटकारा आहे.

कुर्द लोकांची भाषा ही जुनी अडाणी लोकांची इराणी भाषा असून उत्तर भागांत तिच्यांत खाल्डी शब्द मिसळ-

लेले आहेत व दक्षिण भागांत तुराणी शब्द मिसळलेले आहेत. बरेच कुर्द लोक सुनी व शफी पंथाचे असून कांहींचा कोणत्याच धर्मात समावेश होत नाहीं.

इतिहास.–फार प्राचीन काळीं असुरियाच्या जवळचे पर्वत गुतु नावाच्या लोकांच्या ताब्यांत होते. असुरियन भाषेत गुतूचें गर्दु अथवा कर्दु असें रूपांतर झालें होतें. गतु लोक तुराणी वंशाचे होते. सायरसनें कुर्द लोकांनां जिंकलें. पुढें ते अनुक्रमें मॅसिडोनिअन, पर्शिअन, सस्सन सत्तेखालीं आले. बगदादच्या खलीफाच्या सत्तेखालीं असता कुर्द लोक बंडाळी करीत असत.

इ. स. ८३८ व ९०५ सालीं या लोकानीं बंडें केलीं. १२ व्या शतकात सुलतान सलादीननें कुर्द लोकाना सरदाऱ्या दिल्यामुळें त्यांना थोडी ऊर्जितावस्था आली. आशियांत पुढें मोंगल व तार्तर सत्तेखालीं कुर्द लोक स्वस्थ होते.

इ. स. १५१४ सालीं सुलतान पहिला सेलिम यानें आर्मेनिया व कुर्दिस्तान हे प्रात आपल्या राज्याला जोडले व तेथील कारभार इद्रिस याजकडे दिला. त्यानें त्या प्राताचे लहान लहान भाग पाडून ते कुर्द आर्मेनियन व अरब सरदाराकडे सोंपविले. इद्रिस यानें केलेली राज्यव्यवस्था इ. स. १८२९ पर्यंत तशीच होती. राजधानीपासून दूर असल्यामुळें व तुर्क सत्तेचा न्हास होत चालल्यामुळें कुर्द लोक प्रबळ झाले व त्यांनीं तुर्क सत्तेपासून वेगळें होण्याचे प्रयत्न केले. परंतु ते निष्फळ झाले. इ. स. १८७७–७८ च्या रुसो–तुर्क युद्धानंतर शेख अबदुल्ला यानें निराळें कुर्द राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला.परंतु तोहि व्यर्थ गेला.कुर्द व आर्मेनियन लोक तुर्क सत्तेखालीं नाखुश होते. वरील युद्धानंतर आर्मेनियाला रशियाकडून उत्तेजन मिळाल्यामुळें त्याच्यांत जातिद्वेष उद्भवला. इ. स. १८९१ सालीं कुर्द लोकांचें पलटण उभारलें. यामुळें लुटालूट करण्यास व जातिद्वेष उगविण्यास त्यांनां सवड मिळाली. त्यांनीं इ. स. १८९४–९६ सालीं आर्मेनियन लोकांची कत्तल करण्यांत पुढाकार घेतला.

कुर्ला—मुंबई इलाखा. ठाणें जिल्हा. साष्टी तालुक्यातील एक गाव. साष्टी बेटाच्या पूर्व टोंकावर असून जी. आय. पी. रेल्वेचें स्टेशन आहे. येथें कापडाच्या २ मोठया गिरण्या आहेत. १९११ सालीं येथील लो. सं. १५०८१ होती. येथें म्यु. कमिटीची स्थापना १८७८ सालीं झाली

पोर्तुगीजांच्या अमलाखालीं कुर्ला गावाला बरेंच महत्व चढलें. १७४० त मराठयानीं त्यांनां हुसकावून लावियावर साष्टीच्या मुख्य उपाध्यायाकडे तें आलें.१८०८ त मुंबई सरकारनें मुंबईतील अपोलो पीयर गेटाजवळील जमीनीच्या तुकड्याच्या मोबदला होर्मसजी बम्मनजी वाडिया या पारशी गृहस्थाला इतर पांच गावांबरोबर कुर्ला देऊन टाकिलें. अर्देसर ह[illegible]जी वाडिया या मुंबईच्या व्यापाऱ्याकडे १८८२ त तें [illegible]व व कुर्ला यांस जोडणारा एक बांधाचा रस्ता १८०५ [illegible]णारे ल

त सुरू झाला व पुढें १८२६ त तो चांगला दुरुस्त करून मोठा केला.

कुऱ्हा—वऱ्हाड. उमरावती जिल्हा. चांदूर तालुक्यांतील एक गाव. लोकसंख्या ३७७६. येथें बारी, मुसुलमान, कुणबी, माळी आणि रजपूत इतक्या जातींची वस्ती आहे. येथें एक मशीद असून तिला १५० एकर जमीन इनाम आहे. येथील तलाव फार चागला आहे. चांदूर आणि तिवसा या गांवाच्या दरम्यान हा गांव आहे. हा चांदूर–तिवसा रस्ता इ. स. १९०० च्या दुष्काळांत तयार केला. प्रसिद्ध बंडखोर नंदू हा येथील रहिवासी होता.

कुऱ्हाडखुर्द—पूर्व खानदेश जिल्ह्यामध्ये माहेजींच्या आग्नेयीस ३॥ कोसावर हें गाव असून येथें एक जुनें हेमाडपंती महादेवाचें देऊळ आहे. देवळावर शिलालेख वगैरे काहीं नाहीं. देवळाची बाधणी एकांत एक असलेल्या कोनाची आहे. [खानदेश ग्या.].

कुल—ज्या जमीनीस वहाण्यासाठीं सहा बैलानीं ओढले जाणारे असे दोन नांगर लागतात त्या जमीनीस कुल असें कुल्लूकभट्ट आपल्या मनुस्मृतीवरील टीकेंत (अ. ७ श्लोक ११९) म्हणतो. यावरून सामान्यतः एका कुटुंबाच्या पोषणास लागणारी जमीन असा प्रथम कुल या शब्दाचा अर्थ असून लक्षणेनें तो शब्द पुढें कुटुंब दाखवूं लागला असावा. कुल शब्दाच्या या अर्थाशीं कुणबी या शब्दाचा संबंध लावण्यांत आला आहे. विशिष्ट जमीन एकाच कुटुंबात एकामागून एक व्यक्तींच्या हातांत गेल्यामुळें विशिष्ट जमीनीचा उपभोग घेणाऱ्या एकाच कुटुंबाच्या अनेक पिढ्यानाहि कुल ही संज्ञा प्राप्त झाली. कुटुंब हें एखाद्या कुलाची विशिष्टकालीन स्थिति दर्शवितें तर कुल हें एखाद्या कुटुंबाची परंपरा दर्शवितें.

ही परंपरा दोन प्रकारची असूं शकते. एक पितापुत्र परंपरा व दुसरी मातृकन्या परंपरा. जेथें कुटुंबातील मुख्य व्यक्ति पुरुष अथवा पिता असतो तेथें पितापुत्रपरंपरा ही कुलपरंपरा असते व जेथें स्त्रीकडे कुटुंबाचें नेतृत्व व कुटुंबाच्या संपत्तीची मालकी असते तेथें मातृकन्या परंपरा ही कुलपरंपरा असते.आपणाकडे या दोन्हीहि कुलपरंपरा दृष्टीस पडतात. मातृकन्यापरंपरा मुख्यत्वेंकरून मलबारात आढळते. इतरत्र पितापुत्र परंपरा आढळते. वधूच्या प्रथमसंभागाची अट जेव्हा रोमन क्याथोलिक पाद्र्यानीं सुरू केली तव्हांहि त्या ख्रिस्ती प्रदेशांत मातृकन्या परंपरा सुरू होत होती. मात्र हा प्रकार हिंदुस्थानांत आला नाहीं.

रोमन लोकामध्यें पिता हाच कुटुंबातील मुख्य व सर्वस्वाचा धनी असल्यामुळें रोमन लोकांत पितापुत्र परंपरा हीच कुलपरंपरा होती. ट्रेबियन लोकात प्रारंभीं मातृकन्या परंपरा असावी. पौराणिक स्त्रीराज्य, अमेझॉन स्त्रियांचें राष्ट्र यांमध्यें मातृकन्यापरंपरा असणें संभवनीय आहे.

समाजाच्या बाल्यावस्थेत विवाहसंस्था अस्तित्वात येण्यापूर्वी विशिष्ट अपत्याचा जनक कोण यासंबंधीं जेव्हां संशय असे तेव्हा अशीं मुलें आपल्या मातांच्या नावानेंच प्रसिद्ध असत. अशा वेळीं मातृकन्यापरंपरेचीं कुलें असण्याचा संभव आहे. मातेच्या नावावरून ज्ञात अशा अनेक ऋषींचीं नावें शतपथ ब्राह्मणांत आढळतात.

ज्याप्रमाणें कुल कुटुंबपरंपरा दाखवितें त्याप्रमाणेंच एकाच कुलात एकाच वेळीं अनेक कुटुंबाचा समावेश होतो. हीं कुटुंबें एकमेकांशीं सपिंड, समानोदक वगैरे संबंधानें निग डित असतात.

सध्याच्या गोत्र या संस्थेत अनेक कुलें येतात. (गोत्र पहा). कुलाचा परस्परसंबंध कृषिप्रधान आयुष्यक्रम असेल तेथें बराच काळ टिकतो. परंतु व्यापार उद्योगधंद्याची वाढ व परप्रांतात अगर परदेशात वसाहती करण्याच्या व वाहतुकीच्या सोयी वाढत गेल्यामुळें समाजामध्यें कुलाचें महत्व कमी कमी होत जातें व कुटुंब हाच मुख्य घटक बनतो.

कुलपहार, ता लु का.—संयुक्त प्रांतात हमीरपूर जिल्ह्यांतील नैर्ऋत्येकडील तालुका. क्षेत्रफळ ५५८ चौ. मै. यात कुलपहार, (तालुक्याचें मुख्य ठिकाण) व जैतपूर हीं दोन गावें व १३१ खेडीं आहेत. यात पुष्कळशा टेकड्या व मोठालीं अरण्यें आहेत. उत्तरेकडील जमीन काळी असून दक्षिणेकडील जमीन हलकी आहे तींत भूपृष्ठाच्या बराच जवळ खडक आहे.यात विहिरी व तळीं असून त्यातून लहान पाटानें पाणी देतात.

श ह र.—संयुक्तप्रांत हमीरपूर जिल्ह्यातील कुलपहार तहशिलीचें मुख्य ठिकाण. हें जी. आय्. पी. रेल्वेनजीक असून येथील लो. सं. १९११ सालीं ७२९९ होती. जैतपूरचा राजा जगत्राज यानें या शहराची स्थापना केली असें म्हणतात. जगत्राज बुंदेलखंडाचा पुढारी छत्रसालचा मुलगा होता. छत्रसाल राजाला ८ मुलगे होते. प्रत्येकानें आपापल्याकरिता एक राजवाडा बांधला होता. त्याचे अवशेष अद्याप अस्तित्वांत आहेत. १७९० सालीं बांद्याचा राजा अली बहादूर यानें येथील किल्ला सर करून घेतला;व इंग्रजांनीं १८०५ सालीं त्याचा तट पाडून टाकला. येथें तहशील-कचेरी व शाळा आहे. येथें कापूस व धान्याचा व्यापार चांगला चालतो. कापूस दाबण्याचा व गवताचे गठ्ठे बांधण्याचा असे दोन कारखाने येथें आहेत.

कुलशेखर—हा त्रावणकोरच्या राजघराण्यात जन्मला होता. यानें फार चांगल्या रीतीनें राज्य केलें व याच्या कारकीर्दीत जबरदस्तीपासून दुबळ्या लोकांस पीडा होत नसे. नंतर तो ईश्वराची सेवा करूं लागला. त्यानें धार्मिक ग्रंथाचा फार मेहनतीनें अभ्यास केला व विशेषतः त्याला रामायण फार आवडत असे. १४००० राक्षसांशीं राम लढावयास निघाला हा कथाभाग वाचून तो सैन्यासह रामाच्या मदतीस निघाला परंतु त्याच्या प्रधानानें रामाच्या विजयाचा कथाभाग वाचून दाखविल्यावर तो स्तब्ध राहिला.

या राजानें तिरुपति व श्रीरंग येथील यात्रा केल्या व नरसेवा म्हणजे ईश्वरसेवा करणें होय असें आपल्या चरित्रानें दाखविलें. यानें तामीळ व संस्कृत या दोन्ही भाषांत ग्रंथ लिहिले. याचा 'पेरुमाळ्तिरुमोळि' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे (' आळवार ' पहा).

कुलशेखरपट्टणम—मद्रास इलाख्यांत तिनेवेली जिल्ह्यातील श्रीवैकुंठम् तालुक्यातील समुद्रकाठचें गाव. येथें थोड्या प्रमाणावर चांगल्या प्रतीचें मीठ काढण्यांत येतें. येथून तेल, पेंड, गूळ व तंबाखू वगैरे माल बाहेर जातो.

कुलाची, ता लु का.—वायव्येकडील सरहद्दीच्या प्रांतातील डेराइस्माइलखान या जिल्ह्यात १५०९ चौरस मैल क्षेत्रफळाचा तालुका. साधारणतः डेराइस्माइलखान तालुक्याप्रमाणेंच याचें स्वरूप आहे. मात्र याच्या पश्चिमसरहद्दीकडे रखरखीत ओसाड डोंगराची रांग आहे. सपाट प्रदेश बहुतेक खडकाळ आहे. पण त्यातून डोंगरावरून येणारे नाले वगैरेंच्या प्रवाहाच्या पाण्याचा मोठ्या कौशल्यानें(कालव्यातून) शेतीकरिता उपयोग करून घेतला आहे. मुख्य ठिकाण कुलाची.

गा व.—वायव्येकडील सरहद्दीवरच्या प्रांतातील डेरा इस्माइलखान जिल्ह्यातील याच नावाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें लुनी नदीच्या काठावर वसलें आहे. हें संपूर्ण असें गाव नसून जवळ जवळ १६ वाड्यांचें (लहान गाव) एक गाव बनलें आहे. डोंगरी 'पोविंदा' लोकांशीं या गावचा मोठा व्यापार चालत होता. हें गाव ब्रिटिश राज्यास जोडण्यापूर्वी तो जरा खालावला होता पण त्यानंतर पुन्हा पूर्ववत् जोरात आहे.

कुलाबा, जि ल्हा.—मुंबई इलाख्याच्या दक्षिण भागातील एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ २१६९ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस मुंबई बंदर, कल्याण व मुरबाड तालुके; पूर्वेस पश्चिम घाट, पुणें, सातारा जिल्हे व भोर संस्थान, दक्षिणेस व आग्नेयीस रत्नागिरी जिल्हा व पश्चिमेस जंजिरा संस्थान व अरबी समुद्र आहे.

कुलाबा जिल्ह्याचा मुलूख खडकाळ असून पश्चिम घाट व समुद्र यांच्यामध्यें हा प्रदेश असल्यानें या ठिकाणीं पुष्कळशा टेंकड्या, शिखरें व डोंगराचे तुटलेले कडे दृष्टीस पडतात. पश्चिमघाट म्हणजे या जिल्ह्याची एक भिंतच आहे. याशिवाय बोरघाटापासून ईशान्येस, माथेरान व प्रबळपर्वतें एक टेंकड्यांची माळच लागलेली आढळते. पनवेल तालुक्याच्या मधून अशीच एक टेंकड्यांची माळ गेलेली असून ती दक्षिणेस कर्नाळा टेंकडीला भिडते. पश्चिमेस पारसिक टेंकड्यांची ओळ असून दक्षिणेस जी टेकड्यांची रांग गेली आहे तींत माणिकगड नावाचें एक तटबंदीचें शिखर आहे. या शिखराची उंची १८०० फूट आहे. मुंबई बंदराच्या [illegible] गोस

व आग्नेयीस अशीच एक रांग गेली असून त्या रांगेंतील अगदीं उत्तरेकडील शिखर म्हणजे कनकेश्वर असून (उंची १००० फूट) दक्षिणेस सागरगड (उंची १३६४ फूट) आहे. या जिल्ह्यांतील सर्वांत उंच शिखर म्हणजे रायगड हें होय. या ठिकाणीं शिवाजीनें किल्ला बांधला व आपल्या राज्याची राजधानी केली.

या जिल्ह्याचा समुद्राभिमुख भाग, नारळी पोफळींच्या झाडांनीं आच्छादिलेला आहे. याच्या पाठीमागील मुलूख सपाट असून त्यात भाताचें पीक येतें. या जिल्ह्यांतील खाड्यांच्या तीरावर पुष्कळ मिठागरे आहेत. जिल्ह्याच्या पूर्वभागात लहान लहान अशा बऱ्याच नद्या असून त्या जिल्ह्यामधून वहात जाऊन समुद्राला मिळतात. या नद्यांपैकीं महत्वाच्या न । म्हणजे उल्हास,पाताळगंगा अंबा,कुंडलिका, मादाड व सावित्री या होत. उलवे अगर पनवेल, अंबे, नागोठणा, कुंडलिका, रोहा अगर चौल, मादाड, बाणकोट, या प्रमुख खाड्या आहेत. पेणच्या खाडींतून नेहमीं ७ टनाचीं व भरतीच्या वेळेस २५ टनाचीं गलबतें जाऊं शकतात. जिल्ह्याच्या किनाऱ्याच्या बाजूने बऱ्या । ठिकाणीं धक्के बांधण्यात आले आहेत. नागोठण्याच्या जवळ अण्हेरी येथें व महाड तालुक्यात शोण व कोंडिवरी येथ ऊन पाण्याचे झरे आहेत.

या जिल्ह्यांतील खडक काळ्या फत्तराचा पण सपाट असा आहे; पण टेकड्यावरील दगड सपाट व गुंड या दोन्ही प्रकारचे आहेत. या खडकाचा पृष्ठभाग, धूसर असतो व त्यावरून त्यात लोखंडाचे कण असल्याचें दिसून येतें.

कुलाबा जिल्ह्याच्या जंगलांत निरनिराळ्या प्रकारचीं झाडे आहेत. त्यापैकीं साग, ऐन, जांब, किंजळ, हीं मुख्य होत. आपट्याचीं पानें विडीसाठीं उपयोगांत आणतात. खैराच्या झाडापासून बैलगाड्यांचीं चाकें तयार करतात. येथें चिंचेचींहि झाडें बरींच आढळतात आंब्याचें लाकूड तसेंच तिवर, फलशी, कण्हरी, कुसर, गरुडवेल, इत्यादींचीं लाकडें सरपणासाठीं उपयोगात आणतात. याशिवाय,राट्टर सापसन, मातीसूल, शिकेकाई यांचींहि झाडें बरींच आहेत.

कुलाबा जरी डोंगराळ मुलूख आहे तरी त्यात शिकारीला योग्य असे प्राणी फारच कमी आढळतात. चित्ते व वाघ हे क्वचित् आढळून येतात. पण तरस व कोल्हे हे या जिल्ह्यात पुष्कळच आहेत. याशिवाय गवा, सांबर, चितळ इत्यादि पशूहि थोडे थोडे आहेत. मृगयेला योग्य असे पक्षी बरेच आहेत, त्यापैकीं मुख्य म्हणजे पाणलावे होत. यांशिवाय बदकें, पारवे, तित्तिर, लावे इत्यादि बरेच पक्षी आहेत. साप पुष्कळ आहेत पण विविध प्रकारचे व विषारी नाहींत. बंदराजवळील खेड्यात राहणारे कोळी मासे पकडून ते खाडींमधून मुंबईस पाठवतात. या माशांवर उपजीविका करणारे लोक या जिल्ह्यात सहा ते सात हजारपर्यंत आहेत.

ह वा व प र्ज न्य मा न.—येथें जूनपासून पावसाळा सुरू होऊन आक्टोबरपर्यंत टिकतो. पावसाळ्यातील हवा फार निरोगी असें मानण्यांत येतें. आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत येथील हवा अर्धवट दमट व उष्ण असते डिसेंबर ते मार्चच्या दरम्यान थंडी पडते व मार्चपासून जूनपर्यंत येथें उन्हाळा असतो. उन्हाळ्यात कर्जत तालुक्यात तर फारच उष्णता असते. मे महिन्यात उष्णतेचें प्रमाण ९२० असतें. समुद्रकिनाऱ्यापेक्षा आतील भागांत पाऊस पुष्कळ पडतो. पण सर्वसाधारण पर्जन्याचें मान ८८ इंचांपर्यंत आहे

इ ति हा स.—कुलाबा जिल्ह्यावर आतापर्यंत पुष्कळ निरनिराळीं राज्यें झालीं.प्राचीन काळीं कुलाब्यावर छोटेंसेंस्थानिक राज्य करीत असत. ख्रिस्ती शक सुरू होण्याच्या सुमाराम व त्यानंतर आंध्रवंशीय राजानीं कुलाब्यावर आपली सत्ता बस विली. हे राजे सर्व कोंकणपट्टीवर व दख्खनवर आपला अंमल चालवीत होते. सुमारे ख्रिस्ती शकाच्या १५ च्या सुमारास ग्रीक भूगोलवेत्ता टॉलेमी हा हिंदुस्थानात आला होता. त्यानें त्यावेळीं आंध्रवंशीय राजे कुलाब्यावर अगर त्यावेळचें 'चौल' यावर राज्य करीत असत असे म्हटले आहे. सहाव्या शतकात, चालुक्य राजानीं कुलाबा व उत्तरकोंकण या भागावर आपली सत्ता प्रस्थापित केली. पुढें तेराव्या शतकात देवगिरीच्या यादवांचें राज्य या प्रदेशावर सुरू झालें. १३४७ १४८९ या अवधींत बहामनी राजानीं कुलाबा जिल्ह्यातील चौल वगैरे ठिकाणें जिंकून आपल्या ताब्यात आणली. नंतर गुजराथच्या राजानीं या प्रदेशावर आपलें वर्चस्व बसविलें. १५०७–१६६० या अवधींत पोर्तुगीज लोकांचेंहि राज्य या जिल्ह्यावर सुरू झालें. याच वेळीं कुलाबा जिल्ह्यांतील बराचसा मुलख मुसुलमानानीं बळकावला होता पुढें १६३२ सालीं शहाजीराजे भोसले यानीं मोगलांना हाकून लावून हा मुलूख आपल्या ताब्यात आणला शिवाजी महाराजानीं या जिल्ह्यातील घोसाळे व रायगड येथें मजबूत किल्ले बांधले. सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथील किल्ल्याची दुरुस्ती केली व रायगड हें राजधानीचें ठिकाण केलें. १६८० मध्यें शिवाजी महाराज वारल्यानंतर हा जिल्हा पुन्हां मोगलांच्या ताब्यात गेला. पुढें १६९० सालीं आंग्रे यानीं तो प्रदेश मुसुलमानांपासून बळकावून घेतला (आंग्रे पहा). कान्होजी आंग्रे हा अत्यंत शूर होता. त्यानें शाहू, जंजीऱ्याचा शिद्दी, ब्रिटिश लोक यांपासून मोठ्या शौर्यानें आपल्या प्रदेशाचें रक्षण केलें पण इ. स. १७३१ मध्यें कान्होजी मरण पावल्यानंतर त्याच्या दोघा मुलात कलह माजला. त्यामुळें आंग्र्यांच्या सत्तेला उतरती कळा लागण्याला सुरुवात झाली. कान्होजीचा ज्येष्ठ पुत्र संभोजी हा शूर व धाडसी होता. त्यानंतर त्याचा मुलगा तुळाजी हा गादीवर बसला. याच्या कारकीर्दीत १७५८ मध्यें ब्रिटिशांनीं विजयदुर्ग किल्ला जिंकून घेतला. पुढें हा किल्ला ब्रिटिशांनीं पेशव्यांना

दिला. १८१८ साली पेशवाईचा र्‍हास झाल्यावर ब्रिटिशांकडे कुलाबा आला व आंग्रे हे ब्रिटिशांचे मांडलीक बनले. १८४० मध्यें दुसरा कान्होजी वारल्या-नंतर, कुलाबा जिल्हा मुंबई सरकारनें आपल्या राज्यास जोडून घेतला, तेव्हांपासून आतांपर्यंत तो त्याच्याकडे तसाच चालू आहे.

ऐ ति हा सि क स्थ ळे.—या जिल्ह्यात पाल, कोंल, कुडे, कोंडाणें, अंबिवलि या ठिकाणीं बौद्धांचीं लेणीं आहेत. घारापुरी येथील "एलीफंटा" लेणीं ब्राह्मणी आहेत. पोर्तुगीज लोकांनीं या जिल्ह्यांत पुष्कळ प्रार्थनामंदिरें व किल्ले बांधले आहेत. शिवाय मराठ्यांनींहि व आंग्र्यांनींहि पुष्कळ किल्ले बांधविले. त्यांपैकीं रायगड, कुलाबा, बीरवाडी, लिंगाणें, खादेरी व उंदेरी इत्यादि प्रमुख किल्ले आहेत.

१९२१ सालीं कुलाबा जिल्ह्याची लोकसंख्या ५,६२,९४२ होती. या जिल्ह्यामध्यें अलीबाग, कर्जत, महाड, माणगाव, पनवेल, पेण, रोहा हे सात तालुके असून खालापूर, उरण, नागोठणें, हे पेटे आहेत. कुलाबा जिल्ह्यात शहरें व खेडीं मिळून १४६१ गावें आहेत. त्यापैकीं ४ शहरें ५००० वर लोकसंख्येचीं आहेत; १५ गावें २००० ते ५००० दरम्यान लोकसंख्येचीं आहेत; ७७ खेडीं १००० लोकसंख्येवर असून २१८ खेड्याची लोकसंख्या दर खेड्यास ५०० वर आहे. ५०० खालच्या लोकसंख्येचीं खेडीं ११४७ आहेत. उरण, पेण, पनवेल, अलीबाग हीं मुख्य शहरें आहेत.

कुलाबा जिल्ह्यात हिंदू, मुसुलमान, शीख, ख्रिश्चन या लोकांची वस्ती आहे. हिंदू लोकांचें प्रमाण शेंकडा ९४ असून मुसुलमान शेंकडा ३ आहेत. १९११च्या खानेसुमारींत या जिल्ह्यात हिंदू ५,६०,२२६, मुसुलमान २८८७६, जैन १४११, ज्यू २०४१, ख्रिश्चन १२५८, पारशी ३०३, व शीख ९ होते. हिंदूंमध्यें ब्राह्मणाची संख्या २२,१७६ असून त्यात ११९०८ कोंकणस्थ व ३६५२ देशस्थ आहेत. मोठाल्या बागा व ताडाचीं बनें यांच्या मालकीचीं असून ते संपन्न आहेत. दक्षिण भागात पुष्कळ खोत आहेत. याशिवाय प्रभूंची संख्या ६००० जवळ आहे. वाणी लोक ४४५४असून त्याचा व्यापार हा धंदा आहे. अगरी१२८११. हे मीठ तयार कण्याचा धंदा करतात. मराठे १५६७६० व कुणबी ४२,३७५. यांचा धंदा भात पिकवण्याचा आहे. २८६३३ कोळी लोक नावाडी असून शिवाय मासे धरून त्यावर उपजीविका करतात. भंडारी ५६३३. ह्यांचा धंदा ताडी तयार करण्याचा आहे व ११२६३ माळी लोक बागांची मशागत करतात. ठाकूर २००८८ व कातकरी ३३३११ या डोंगराळ जाती आहेत. हे लोक खुजे, कुरूप व काटक असतात. हे लोक फार प्रामाणिक असतात हे व याच्या बायका दिवसभर राबत असतात व ज्यावेळीं त्यांनां शेतीचा धंदा नसतो त्यावेळीं ते मोळीविक्याचा अगर इतर धंदा करतात. कातकरी लोक हे शेतीवर व मजूरीवर आपला उदरनिर्वाह करतात. कातकरी लोक वर्णानें इतर डोंगराळ लोकांपेक्षा अधिक काळे असून फार गलिच्छ असतात. गाय व वानर याशिवाय बाकी सर्व प्रकारचें मांस ते खातात. दारु पिण्याचें व्यसन त्याच्यात फार आढळून येतें. वडर व वंजारी या भटक्या जाती आहेत. ते जात्या उमेद असतात. जातीं व हातचक्क्या करण्यांत हे कुशल आहेत बेनी इस्रायल अगर यहुदी लोक हे तेल्याचा धंदा करतात. ते घरीं मराठी भाषा बोलतात. उरण पेट्यातील करंज बेटात किरिस्तावाची वस्ती आहे. येथें १५३५ च्या सुमारास तीन प्रार्थनामंदिरें होतीं. 'दि युनैटड फ्रीचर्च' "मिशन ऑफ स्कॉटलंड"व अमेरिकन मिशन याच्याहि येथें संस्था आहेत. पहिल्या संस्थेनें एक हायस्कूल, दोन मुलींच्या शाळा व अस्पृश्याकरितां तीन शाळा चालविल्या आहेत.

शा स न प द्ध ति.—जिल्ह्याचा मुख्य अधिकारी कलेक्टर हा असतो जिल्ह्यातील भागाचा अधिकारी असिस्टंट कलेक्टर अगर डेप्युटी कलेक्टर असतो. हा जिल्हा ठाण्याच्या सेशन्स भागांत मोडतो ठाण्याचा डिस्ट्रिक्ट जज्ज हा कुलाब्यांतील दाव्यांवरील अपीलें एकतो. पावसाळ्यात डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला सेशन्स जज्जाचे अधिकार असतात. जिल्ह्यांत पाच सबॉर्डिनेट जज्ज आहेत. प्रत्येक तालुक्यास मामलेदार, फौजदार व सबरजिस्ट्रार व प्रत्येक पट्यास महालकरी, फौजदार, सबरजिस्टर हे कामगार आहेत या जिल्ह्यांत अलीबाग, पेण, रोहाअष्टमी, महाड, पनवेल, उरण व माथेरान याठिकाणीं म्युनिसिपालिट्या आहेत. याशिवाय डिस्ट्रिक्ट बोर्ड, तालुका बोर्डेहि स्थापन करण्यात आलीं आहेत. जिल्ह्यातलि पोलिसखातें डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडटच्या ताब्यांत असतें. त्याच्या हाताखालीं एक पोलिस इन्सपेक्टर असतो. या जिल्ह्यांत एकंदर १२ पोलिस स्टेशनें आहेत. या जिल्ह्यात नऊ दुय्यम तुरुंग आहेत.

१९०३-४ सालामध्यें जिल्ह्याचा एकंदर वसूल२४६३००० इतका झाला. त्यांत १३,५८,००० इतका जमीनीचा महसूल झाला.

व्या पा र व द ळ ण व ळ ण.—पेरणीचा हंगाम ज्यावेळीं नसतो त्यावेळीं बहुतेक शेतकरी मीठ तयार करण्याचा धंदा करितात. पेण व पनवेल या तालुक्यांत मीठ बरेंच तयार होतें. जिल्ह्यांत एकंदर १५५ मिठागरें असून त्यांतून २५ लक्ष मण मीठ दरवर्षी तयार होतें. चौल येथें रेशमी कापड विणण्याचा व्यापार चालतो. पण तो हल्लीं जवळ जवळ बसलाच आहे. तीळ, भुइमूग, नारळ यांच्यापासून तेल काढण्याचा धंदाहि येथें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालतो. पनवेल येथें बैलगाडीचीं चाकें तयार करण्याचा कारखाना आहे. उरण येथें दारू तयार करण्याचा धंदा चालत असून तो पारशी लोकांच्या ताब्यांत आहे.

पेण, पनवेल, कर्जत, नागोठणें, रेवदंडा, रोहा, गोरेगांव व महाड हीं व्यापारी गांवें आहेत. येथून तांदूळ, मीठ, सरपण, गवत, सागवान, भाज्या, फळें, व सुकें मांस हीं बाहेरगांवीं जातात. मलबारी साग पितळेचीं भांडीं, खजूर, धान्य, तेल, तूप, लोणी, साखर, बटाटे, कापड, हळकुंडें इत्यादि वस्तूंची आयात होते. जिल्ह्यामध्यें पांच बंदरें आहेत. या बंदरातून १९०३-४ सालीं एकंदर १५३ लाख रुपयांच्या मालाची नेआण झाली. त्यात आयात ३२ लाख रुपयांची व निर्गत १२१ लाखांची झाली. याशिवाय या जिल्ह्यात तीस ठिकाणीं बाजार भरतो व वार्षिक जत्राहि भरतात.

या जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातून व खालापूर पेटयांतून ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वेचा फाटा गेलेला आहे. मुंबईहून धरमतर, उल्वा वगैरे ठिकाणीं बोटी चालू आहेत. तसेंच बोरघाट, फिट्झिराल्ड, व वरंधा घांटातून गाडीरस्ता गेला आहे. या जिल्ह्यांत एकंदर ८७ मैल खडीचे रस्ते आहेत, व १६० मैल साधे रस्ते आहेत.३७ मैल रस्त्याच्या बाजूनें झाडें लावण्यात आलीं आहेत. माणगाव, नागोठणा इत्यादि ठिकाणीं पूल आहेत.

जं ग ल—कुलाब्यात उत्कृष्ट प्रकारचीं जंगलें आहेत. या जंगलांत जें सागाचें लाकूड मिळतें तें मलबार सागाच्या खालोखाल आहे. येथील काहीं झाडांचा नावा बांधण्याकडे उपयोग होतो. १९०३-४ मध्ये एकंदरींत ४५८ चौरस मैल जंगल होतें. त्यापैकीं ४४९ मैल राखीव होतें. बहुतेक सर्व जंगलें डोंगरपठारावर अगर डोंगराच्या उतरणीवर आहेत. उत्तरेकडील भागांत कर्जत येथें व माथेरान–तवली या रांगेमध्यें मोठीं जंगलें आहेत. पनवेल येथेंहि जंगल आहे. तसेंच मध्यभागात पेण, अलीबाग, रोहा या ठिकाणीं व महाड व माणगाव तालुक्यातहि मोठीं जंगलें आहेत. या सर्व जंगलांतून सागाची निपज फार मोठी आहे. त्याच्या खालोखाल शिसवीचीं झाडें,ऐन, जाब, व किंजळ याची पैदास होते. याशिवाय, आपटा, आवळा, चिंच, हिरडा, महु, नारळी, इत्यादि झाडेंहि बरींच आहेत.

कुलाब्यांत फक्त लोखंड धातूच आढळते. माथेरानच्या टेंकड्यातून क्वचित, ॲल्युमिनियम आढळतें. पण तें फार नाहीं. इमारतीला लागणारा दगड मात्र सर्व जिल्ह्यांभर मुबलक सांपडतो. वाळू, चुना, हेहि विपुल आहेत.

शे त की.—या जिल्ह्यातील जमीनीचे चार प्रकार आढळतात. या जिल्ह्याचा निम्म्याहून अधिक भाग, गद्दी जमीन आहे व त्यांत चुन्याचेंहि मिश्रण झालेलें आढळतें. डोंगराच्या उतरणीवरचा अगर पायथ्याचा भाग, कुरंद व काळा फत्तर हें उखडून काढल्यानें जी जमीन तयार होते तसल्या जमीनीनें युक्त असून, या जमीनींत नागली, वरी, इत्यादि धान्यें पेरण्यांत येतात. ही जमीन फार भुसभुशीत असते. तिसरा जमीनीचा प्रकार म्हणजे 'खारपाट' हा होय. खडकावर माती सांचून जी जमीन बनलेली असते तिला खारपाट असें म्हणतात. चवथा प्रकार म्हणजे समुद्रकाठच्या जमीनीचा होय. ही जमीन बागाइतीसाठीं फार उपयुक्त आहे. जिल्ह्याचें मुख्य उत्पन्न तांदुळाचें होय. पिकाऊ जमीनीच्या ½ भागाहून अधिक जमीनींत तांदूळ पेरला जातो. तांदुळाचा तांबडा व पांढरा अशा दोन जाती आहेत. याच्या खालोखाल नागली, वरी, हरीक, वाल इत्यादि धान्यें पेरलीं जातात. महाड, माणगांव व रोहा इत्यादि ठिकाणीं तूर, मूग व उडीद यांचेंच विशेष उत्पन्न असून, चणे वगैरे माणगांव, पनवेल, कर्जत या ठिकाणीं पिकतात. ताडमाडाच्या बागांच्या बागा या जिल्ह्यांत आहेत. १९०३-४ मध्यें पेराऊ जमीनीपैकीं तीन चौरसमैलाच्या जमीनीला विहिरी व तलाव याच्यामुळें पाणी मिळत होतें. ह्या जिल्ह्यातील गुरेंढोरें साधारण खुजीच असतात. महाराष्ट्रातून, शेळ्या व मेंढया या जिल्ह्यात बऱ्याच प्रमाणावर येतात. त्याचप्रमाणें महाराष्ट्रामधूनच धनगर व वंजारी लोक खेचरें आणतात. दुधासाठीं मुसुलमान लोक शेळया पाळतात. या जिल्ह्यात रयतवारी पद्धत सुरू आहे. खोत व इजारदार यांच्या ताब्यातच जिल्ह्यातील बराचशा जमीन आहे. १९०३-४ सालीं ११७१ चौरस मैल जमीन लागवडीखालीं होती व त्यापैकीं ७५० चौरसमैल खोत व इजारदार लोकाच्या ताब्यात होती.

कुलाबा किल्ला—हा किल्ला कुलाबा(अलिबाग)जिल्ह्यांत आहे. अलिबागच्या किल्ल्याचेंच नाव कुलाबा आहे, व तेंच नांव सर्व प्रांतास लागू आहे. येथें मराठी आरमाराचें मुख्य ठाणें प्रथम शिवछत्रपतींनीं केलें. तें मराठा साम्राज्याच्या अखेरीपर्यंत कायमच होतें. येथें त्यावेळीं मोठ्या गोद्या असून त्यात मोठमोठीं गलबतें (लष्करी व व्यापारी) बांधीत असत. राजाराम छत्रपतीच्या वेळीं सर्व मराठी साम्राज्याच्या आरमाराचें आधिपत्य आंग्रयांच्याकडे आलें. हे आंग्रे कुलाब्यासच रहात असत. या किल्ल्याजवळ समुद्र खडकाळ व उथळ असून बंदरात येण्याचा मार्ग अरुंद असून सांपडण्यास कठिण असल्यामुळें आंग्र्याचें आरमार या बंदरात सुरक्षित असे.

कुलित्तलइ—मद्रास इलाख्यात त्रिचनापल्ली जिल्ह्यातील तालुका. क्षेत्रफळ. ९०१ चौ. मैल. यात २२९ खेडीं असून मुख्य ठिकाण 'कुलित्तलई' हें खेडें आहे. लो. सं. (१९११) ३,०५,१४८. यांतून अमरावती नदी वायव्येकडील भागांतून जाते. तिच्या पाण्याचा कांहीं खेडीं पाटानें उपयोग करून घेतात. कावेरी उत्तर सरहद्दीवर असून तिच्या काठचा प्रदेश फार सुपीक आहे. याशिवाय इतर भागांतील जमीन हलकी आहे. जमीनमहसूल सुमारें तीन लाख आहे. यांतील दक्षिणेकडील मरंगपुरी व कदवर ह्या दोन जमीनदाऱ्या व आणखी ३२ सरकारी खेडीं मिळून पूर्वीचा जुना मनप्पारै तालुका होता. तो मदुरा

जिल्ह्यांतून ह्या तालुक्यास इ. स. १८५६ त जोडण्यांत आला.

कुलुइन्सूर अथवा कुटेश्वर—बस्तर संस्थानांतील जगदळपूरच्या दक्षिणेस २५ मैलावरील लहान खेडें. गुमौर किंवा गुप्तेश्वर या नांवाच्या काहीं गुहा येथें सापडल्या असून त्यात एक प्रकारचे स्तंभ आढळले आहेत.कांहीं स्तंभाचा आकार शिवलिंगाप्रमाणें दिसत असल्यामुळें लोक त्यांस देव समजून त्यांची पूजा करितात. गुहेंत जाण्याकरिता ५ फूट उंच चढून जावें लागतें. गुहेत ५ वेगवेगळ्या खोल्या सर्वांस माहित असून आणखीहि कित्येक असतील. यात झाकलेल्या विहिरी आहेत.

कुलू तहशील.—पंजाब प्रांतात कांग्रा जिल्ह्यांतील एक तहशील. हिचें क्षेत्रफळ १३४३ चौ. मै. असून १९११ साली लो. सं. १,८४,८०३ होती. हृति खेडीं ६७ आहेत. तालुक्याचें मुख्य ठिकाण सुलतानपूर येथे आहे १९०३-०४ सालीं सान्याचें उत्पन्न ८२,००० होतें.

कुलू तहसिलींत लाहूल व सिटी या वजिराती आहेत. या प्रदेशातून बियास नदी वहात जाते. नदीच्या सभोंवतीं डोंगराळ प्रदेश १८००० फूट उंच आहे. बियास नदीचा उगम कुलू तहसिलींत रोहटकच्या शिखरावर १३३२६ फूट उंचीवर झाला असून ६० मैल वहात गेल्यावर ती मंदी संस्थानात शिरते. शस्सी गावाजवळ बियास नदीवर झुलता पूल असून नदीचा देखावा भव्य आहे. येथील दरसालचें पर्जन्यमान ३१ इंचापासून ४२ इंचपर्यंत असतें. रावी व सतलज नद्यामधील जीं रजपूत संस्थानें आहेत त्यांत कुलू हें एक लहानसें होतें. जालंधरच्या राजघराण्यापैकीं एक घराणें कुलूस येऊन राहिलें होते. ह्युएनत्संग हा प्रवाशी कुलूसंबंधीं बराच माहिती देतो. या प्रदेशावर अनेक राजे व राजघराण्यांनीं सत्ता चालविली. १८४६ सालीं प्रथम शीख युद्ध सुरू झालें, त्याच्या अगोदर कित्येक वर्षे गुरखा व शीख यामध्यें नेहमीं झटपटी चालू असत. शेवटचा राजा ठाकूर सिंग होता. १८९२ सालीं रायमेघसिंग नावाचे महाराज जाहागीरीवर होते. त्यानां जहागिरींत मॅजिस्ट्रेट व मुनसफीचा अधिकार दिलेला असतो.

कुलुहा—बंगाल. हजारीबाग जिल्ह्यांतील ही एक टेंकडी असून हिच्यावर बुद्धाच्या वेळच्या इमारतींचे व देवालयाचे अवशेष पुष्कळ आढळतात ब्राह्मण लोकांनीं हा भाग बौद्धाकडे सोंपविला असून टेंकडीच्या वरच्या भागावर एक कुलेश्वरी नांवाचें दुर्गेचें देवालय आहे. चैत्रमासीं व आश्विनमासीं येथें यात्रा भरते

कुवम.—मद्रास इलाख्यांतील एक नदी. चिंगलपट जिल्ह्यातील कांजीवरम् तालुक्यांत कुवम म्हणून एक खेडें आहे. त्या खेड्यातील तळ्यापासून निघणाऱ्या पाण्याचा ओघ व बंगारू खाडीच्या पाण्याचा ओघ यांचा संयोग होऊन ही नदी तयार झाली आहे. ही नदी मद्रास शहरांतून वहात जाऊन शेवटीं सेन्ट जॉर्ज किल्याजवळ बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते. मद्रास शहरांतील सर्व कचरा व घाण ह्या नदींत आणून सोडतात.

कुवलयापीड—कंसाचा हत्ती. हा सहस्र गजांइतका बलवान असे. धनुर्योगनिमित्तानें कृष्ण मथुरेस आला असतां कंसानें अंबष्ठाकडून यास त्याच्या अंगावर घालविलें. तेव्हा हा कृष्णाच्या हातून मेला. [भाग. स्कं. १. अ. ४३].

कुवलाश्व—सूर्यवंशांतील एक राजा. यास कुवलयाश्व असेंहि नाव आहे. यास २१,००० पुत्र होते असें विष्णुपुराणात सांगितलें आहे. परंतु हरिवंशांत त्यास फक्त शंभरच पुत्र होते असा उल्लेख आढळतो. उज्जालक समुद्रात राहून उत्तंक नामक सत्वशील ऋषीचा छळ करणाऱ्या अशा धुंधु नामक असुरावर त्यानें आपल्या पुत्रासह हल्ला केला आणि त्यास त्याच्या आश्रयस्थानांतून बाहेर काढून ठार मारिलें. ह्या पराक्रमाबद्दल कुवलाश्वास धुंधु-मार (धुंधुस मारणारा) असें विशेषण मिळालें. परंतु तीन पुत्राशिवाय त्याच्या सर्व पुत्राचा धुधूच्या नाकातून श्वासाबरोबर येणाऱ्या ज्वालांच्या योगें नाश झाला. [भारत वनपर्व अ. २०१-२०४].

कुश— या नांवाचे तीन चार पौराणिक राजे आहेत व या सर्वांत रामपुत्र कुशच प्रसिद्ध आहे. वाल्मीकीनें याचें रक्षा कुशमुष्टीनें केली म्हणून यास असें नाव पडलें. लहान असतानाच यानें रामाचा अश्वमेधीय घोडा हरण करून रामसेनेबरोबर मोठें युद्ध करून सर्वांना पराजित केले अशी वा. रामायण उत्तर सर्गात कथा आहे. यास चंपिका आणि कुमुद्वती अशा दोन स्त्रिया होत्या. त्यांतून पहिलीस चंपकमालिनी इ. नऊ कन्या व दुसरीस अथिति इ. आठ पुत्र होते. विंध्य पर्वतावर याने दक्षिण कोसलाची राजधानी कुशावती किंवा कुशस्थली स्थापिली.

कुशद्वीप—पृथ्वीवरील सप्तद्वीपातील चौथें. याची रुंदी आठ लक्ष योजनें असून तितक्याच रुंदीच्या घृतसमुद्रानें यास वेष्टन आहे. येथें अग्नीप्रमाणें दैदिप्यमान ईश्वरनिर्मित कुशस्तंभ असल्यामुळे ह्यास कुशद्विप असें नांव पडलें. प्रियव्रत राजाचा पुत्र हिरण्यरेता येथील अधिकारी असून त्यानें याचे वर्षसंज्ञक सात भाग वसु, वसुदान, दृढरुचि, नाभिगुप्त, स्तुत्यव्रत, विविक्त आणि वामदेव अशा सात पुत्रांस दिले. व त्यांचींच नांवें त्या त्या वर्षास क्रमानें दिलीं. या द्वीपांत चक्र, चतुःशृंग, कपिल, चित्रकूट, देवानीक, ऊर्ध्वरोमा आणि द्रविण असे सात पर्वत व रसकुल्या, मधुकुल्या, मित्रविंदा, श्रुतविंदा, देवगर्भा, घृतच्युता आणि मंत्रमाला अशा सात नद्या आहेत. [भाग. स्कं. ५ अ. २० देवीभाग. स्कं. ८अ. १२].

कुशध्वज—ऱ्हस्वरोमा नांवाच्या जनकाच्या दोन पुत्रांतील दुसरा. सीरध्वज जनकाचा कनिष्ठ बंधु. हा इंद्रदेशाच्या सांकाश्या नामक राजधानींत राज्य करीत असे. यास मांडवी आणि श्रुतकीर्ति दोघी कन्या असून, त्या यानें

दशरथपुत्र भरत आणि शत्रुघ्न यांनां दिल्या होत्या. सीरध्वजास पुत्र नव्हता म्हणून हाच पुढें मिथिलेचा राजा झाला होता, यास पुत्र होता त्याचें नांव धर्मध्वजजनक (वाल्मिकी रा. बाल. स. ७०)

कुशनाभ—(सोमवंश) विजयकुलोत्पन्न कुश अथवा कुशिक राजाच्या चार पुत्रांतील चवथा. यानें महोदय पुरी स्थापिली होती. याच्या शंभर कन्या वायूच्या कोपानें वक्र झाल्या असतां कांपिलीपुरीच्या चुलिसूनु ब्रह्मदत्त राजास दिल्यावर सरळ झाल्या. परंतु देशास कान्यकुब्ज जे नांव पडलें तें पडलेंच. (वाल्मीकी रा. बाल. स. ३२–३३).

कुशलगड—हीं राजपुतान्यांत बांसवाडा संस्थानच्या आग्नेयीस एक लहानशी जहागीर आहे. हिचें क्षेत्रफळ ३४० चौरस मैल असून खेड्यांची संख्या २८५ आहे. १९११साली खेड्यांसह लो. सं. २२००५ होती. खुद्द कुशलगडची लो. सं. २५९४ आहे. येथें एक दवाखाना, एक शाळा व एक पोस्टऑफीस आहे.

येथील जहागिरदार राठोड रजपूत असून जोधपूर शहर स्थापन करणारा जोधसिंग हा यांचा मूळ पुरुष होता. अठराव्या शतकांत राठोड रजपुतांनीं कुशलगडचा प्रदेश घेतला. यास खुशालगड असेंहि म्हणतात.

येथील मूळचे रहिवाशी भिल्ल असून खुशालसिंग नावाच्या मनुष्यानें भिल्लांपासून सदरहू प्रदेश घेतल्यामुळें याला खुशालगड हें नाव पडलें. परंतु खुशालगडची माहिती निराळी आहे ते म्हणतात कीं अखय राजानें खुशाल नावाच्या भिल्लापासून तो प्रदेश घेतला, सबब खुशालगड असें त्याला नाव दिलें आहे. तूर्त खुशालगड जहागीर बांसवाडापासून स्वतंत्र आहे. वार्षिक खंडणी वक्तशीर दिली म्हणजे झालें; परस्पर दोघांचा कांहीं संबंध नाहीं. साधारण गुन्ह्याची चौकशी महाराज स्वतः करतात. फाशी व जन्मठेप या शिक्षा देण्याकरितां एजंटाची मंजुरी जरूर असते.

कुशस्थली—सूर्यवंशोत्पन्न रैवत राजा यानें स्थापलेली नगरी. हिलाच पुढें द्वारका असें नाव पडलें. ही आनर्त राष्ट्राची राजधानी असून रैवत ब्रह्मलोकास गेला असता पुण्यजनां(यक्ष राक्षसां)नीं हें नगर उध्वस्त केलें.

कुशानें स्थापलेल्या दक्षिण कोसलाच्या राजधानीचेंहि कुशस्थली हें नाव होतें. (' कुश ' पहा).

कुशान—बाह्य यूएची हे हिंदुस्थानात आल्यानंतर कांहीं शतकें राहिले व पुढें त्यांनीं जेव्हां हिंदुत्व स्वीकारलें तेव्हां त्यांनांच कुशान हे नाव मिळालें. [बुद्धोत्तर जग पृ. २५६ पहा.] कुशानाच्या कालाबद्दल अद्यापि एकमत नाहीं. स्मिथनें दिलेली या राजांची वंशावळी हा त्याची त्यालाच संशयास्पद वाटत आहे. कडफिसेस (पहिला) हा या वंशाचा पहिला राजा (इ. स. २०) होय. याचें राज्य उत्तर हिंदुस्थानांत होतें. यूएची व मोंगल याच्या शारीरिक लक्षणांत बराच भेद आहे. त्याच्या चालीरीती हियुंगुनु यांच्यासारख्या होत्या. त्यांची एकंदर संख्या १० लक्षांपर्यंत असावी (ख्रि. पू १६०). यांचें मूळ ठिकाण वायव्य चीनातील कानसूचें होय. तेथून कांहीं काळानंतर ते तक्लमकान प्रान्तात येऊन, तेथील वूसून लोकाचा पराभव करून व थोडीं वर्षे तेथें राहून, पुढें शकाचाहि पराभव करून ते उत्तरेकडील घाटांनीं हिंदुस्थानांत उतरले (ख्रि पू. १५०). याच सुमारास त्यांनीं बॅक्ट्रिया जिंकला. त्यानंतर हे भटक्ये न रहातां स्थाईक झाले. तरी पण यांचा तत्कालीन इतिहास नक्की आढळत नाहीं. याचा प्रख्यात राजा कडफिसेस (पहिला) म्हणून झाला. तो गादीवर साधारणतः इ. स. १५ मध्यें बसला. कडफिसेस हें यूरोपियन लोकांनीं दिलेलें नांव आहे. त्याच्या नाण्यावर कोझोल कडफेस, कोझौलकडफिसेस आणि कुजुलकरकडफिसेस अशीं नांवें कोरलेलीं आहेत. चिनी ग्रंथांत कीएयू–त्सीएयू-कीओ असें नाव येतें. परंतु या सर्व नावांचा काय अर्थ होतो हें अद्यापि कोणासच समजलें नाहीं कदाचित् या पदव्याहि असतील. कुशान राजे लौकिक शक मानीत असत. खरोष्ट्री लिपींत दीर्घ स्वर नसल्यानें असें नाव असावें असें स्मिथ म्हणतो. परंतु चिनी व ससानियन पुराव्यावरून कुशान असेंच नाव होतें हे ठरतें; 'रब्बा-कुशान'असें नांव दुसऱ्या होर्मज्दच्या नाण्यावर स्पष्ट आहे.कडफिसेसनें काफिरिस्तान व काबूल प्रांत बॅक्ट्रिआ व पार्थिआ, म्हणजे इराण पासून सिंधुनदापर्यंतचा सारा प्रदेश जिंकला (स. २२). व इंडो-पार्थिअन् व इंडो–ग्रीक याना हाकलून दिलें.त्याचा मुलगा कडफिसेस दुसरा हा नंतर गादीवर आला (स.८५).यानें बहुधा पंजाब प्रातावर स्वारी करून तेथें एखादा आपला लष्करी सुभेदार कांहीं काळपर्यंत ठेवला असावा, असें तत्कालीन कांहीं नाण्यावरून दिसतें. या नाण्यावर राजाचें नाव नसून, हीं काबूलपासून काशीपर्यंत व कच्छ काठेवाडातहि आढळतात. या दुसऱ्या कडफिसेसचें नाण्यावरील नाव विम (ऊएमो) असून चिनी नाव येन-कओ–चिंग असें आहे. याच्या नंतर कनिष्क हा गादीवर आला. या कुशानवंशात कनिष्क (पहा) हाच कायतो प्रख्यात राजा झाला. यानें आपलें राज्य बरेंच वाढविलें. नंतर त्यानें चिनी बादशहाकडे त्याच्या मुलीबद्दल मागणी घातली. त्यामुळें त्याला राग येऊन त्यानें आपलें सैन्य कनिष्कावर धाडिलें (९०). कनिष्कानेंहि आपला सेनापति सी यास ७० हजार सैन्यासह त्याच्यावर धाडिलें. परंतु त्याची तागकुर्घान या पर्वतातून जाता जाता फार खराबी झाली व अखेर यारकंद प्रातात त्याचा चिनी सैन्याकडून पूर्ण पराभव झाला. त्यामुळें कनिष्कानें चिनी बादशहाला खंडणी दिली. कडफिसेस (दुसरा) यानें सोन्याचे नाणें हिंदी पद्धतीचें सुरू केलें होतें, त्यात कनिष्काने सुधारणा केली. कनिष्काचें नांव तिबेट, चीन, मंगोलिया, हिंदुस्थान यात फार प्रसिद्ध असून त्याचें चरित्र मात्र अगदींच थोडें उपलब्ध आहे. त्यातहि त्याचा कालानुक्रम तर सर्वच शंकित आहे स्मिथच्या मतें

" कनिष्क हा इ. स. ७८ मध्यें गादीवर आला; म्हणून हल्लीं जो शालिवाहन शक सुरू आहे, तो कनिष्काच्या राज्यारोहणापासूनच सुरू झाला असावा. " चिनी वाङ्मयांत याचा उल्लेख येतो, परंतु तो ऐतिहासिक दृष्ट्या येत नसून, बौद्धधार्मिक वाङ्मयातून येतो; त्यामुळें त्याची ऐतिहासिक किंमत कमी आहे. कनिष्काचा संबंध असलेले असे जवळ जवळ २० शिलालेख आतापर्यंत आढळले आहेत. व त्यांत कालनिर्देशहि आलेला आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या कालाच्या आंकड्याबद्दलच विद्वानांत मतभेद आहे. त्यावरून कोणीं त्याचा राज्यारोहणकाल ख्रि. पू. ५८ देतात, तर कोणीं इ. स. ७८ देतात. कांहींचें म्हणणें विक्रमसंवत हा त्याचा राज्यारोहणाचा काल होय. परंतु नुकतीच तक्षशिला नगरी खोदून काढल्यावर, तेथील एकंदर प्राचीन अवशेषांचें निरीक्षण करून डॉ. मार्शलनें, कनिष्क हा बहुधा ख्रि श. च्या दुसऱ्या शतकांत झाला असावा असें ठरविलें आहे. कनिष्क हा कडफिसेस (दुसरा) याचा मुलगा नव्हता. त्याच्या बापाचें नाव वझेशक (वझेशप) होय. कनिष्काचें राज्य वायव्य हिंदुस्थानात पसरलें होतें. त्या प्रदेशास तत्कालीं गांधार हे नांव होतें. ह्युएनत्संगहि हा गांधारचा राजा होता असेंच म्हणतो. यानें सन ९९ त रोम येथें आपला वकील पाठविला होता. त्यानें काश्मीरप्रांत हस्तगत करून तेथें अनेक स्तंभ उभारून आपल्या नावचें कनिष्कपूर (हल्लींचें बिहार नदीवरील बारामुला व श्रीनगर रस्त्यावरील कानीसपूर) शहरहि वसविलें. दंतकथा सांगते कीं, त्यानें अश्वघोष नावाच्या बौद्धपंडिताला आश्रय दिला होता. (याचा अर्थ ते समकालीन होते एवढाच येथें घ्यावयाचा.) महाराष्ट्रांतील नहपान क्षहराट व उज्जेनचा चष्टण सत्रप हे बहुधा कनिष्काचे मांडलिक असावेत असें वाटतें. कनिष्क हा म्हातारपणात बौद्धधर्मीय झाला. याची राजधानी पुरुषपुर (पेशावर) होती. तेथें यानें एक स्तंभ उभारला होता. त्याला तेरा मजले असून, त्याची उंची ४०० फूट होती. तो सर्व नकशीदार लांकडाचा असून त्याचें शिखर मात्र मजबूत लोखंडाचें होतें. सहाव्या शतकारंभीं संगयून हा चिनी प्रवासी इकडे आला असतां त्यानें लिहून ठेविलें आहे कीं, "हा स्तंभ तीन वेळ जळाला होता व तितकेहि वेळा श्रद्धाळू राजांनीं तो पुन्हां बांधून काढला होता " त्याच्या जवळच एक बौद्धमठ होता. तो नवव्या शतकापर्यंत चांगला भरभराटींत होता. त्यावेळीं सुद्धां तेथें बौद्धधर्माची एक पाठशाळा होती, असें नालंदविद्यापीठाचा कुलपति वीरदेव यानें म्हटलें आहे (८१०). स्तंभाबद्दल ह्युएनत्संग व अलबेरुणी हेहि माहिती देतात. अलबेरुणी त्याला कनिष्कचैत्य म्हणतो. मठाबद्दलहि ह्युएनत्संग माहिती देतो हल्लीं ही जागा उकरून काढली. त्यांत तेथें जुने अवशेष पुष्कळ सांपडले. त्यापैकीं महत्वाचा म्हणजे कनिष्काचा करंडा होय. त्यावर त्याची मूर्ति असून एक शिलालेखहि आहे. कनिष्काचा एक पुऱ्या उंचीचा पुतळा मथुरा जिल्ह्यांतील मात गावीं आहे. हल्लीं त्याचें मस्तक मात्र त्यावर नाहीं. त्याच्या अंगांत लांब पायघोळ अंगरखा असून त्याच्या आत गुडघ्याइतका दुसरा अंगरखा आहे व त्यावर कमरपट्टा बांधलेला आहे. गळ्यांत मोत्याची माळ असून, उजव्या हातांत कमरेपासून पायापर्यंत पोहोंचणारी म्यानबंद तरवार आहे. डाव्या हातांत कमरपट्टयांत अडकविलेली व घोट्यावर येईल इतक्या लांबीची दुसरी एक तरवार आहे. पायांत चढाव असून, ते टांचेखालून घोट्याजवळ बंदांनीं बांधलेले आहेत. पायांत विजार असावी असें दिसतें. असो, वर सांगितलेल्या कनिष्काच्या स्तंभाचा कायमचा निकाल महंमुद गिझनीकरानें लाविला. कनिष्कानें काशगर, यारकंद, खोतन, या चिनी साम्राज्यांतील प्रांतांवर पहिली स्वारी केली, तींत मार्गे सांगितल्याप्रमाणे त्याचा पराभव होऊन त्याला चीनच्या बादशहास खंडणी देणें भाग पडलें होतें (९०). परंतु पुढें दुसरी स्वारी करून व चिनी सैन्याचा पराभव करून हे प्रांत त्यानें काबीज केले. या प्रांतातील कांहीं चिनी राजपुत्र त्यानें ओलीस ठेऊन घेतले. त्यांच्या रहाण्यासाठीं त्यानें काबूलजवळ जे बौद्धमठ बांधिले होते तेच दिले. उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा या तिन्ही काळात त्यांनां निरनिराळ्या तीन मठात ठेवीत. या राजपुत्रांनीं मठातील बौद्ध भिक्षूंना पुष्कळ देणग्या दिल्या होत्या. कनिष्कानें बौद्धधर्म स्वीकारण्याचें कारण दंतकथा सांगते कीं, त्यानें लढायात फार माणसें मारल्यानें त्याला पुढें पश्चात्ताप झाला. व मग तो या धर्माचा अनुयायी झाला. परंतु ही गोष्ट अशोकाच्या गोष्टीची नक्कल दिसते. त्याच्या नाण्यावरून एवढें ठरतें कीं, तो राजा झाल्यानंतर पुढें बौद्ध झाला असावा. त्याच्या पहिल्या पहिल्या नाण्यावर ग्रीक लिपींत व भाषेंत लेख असून त्यावरील सूर्यचंद्राचीं नांवेंहि (हेलिओस व सेलेने अशीं) ग्रीक भाषेंतीलच दिलीं आहेत. त्यापुढील नाण्यावर ग्रीक लिपी मात्र ठेऊन भाषा जुनी इराणी योजली आहे. ग्रीक, इराणी व हिंदु लोक ज्यांची पूजा करीत आहेत असे कांहीं देव तेथें कोरले आहेत.

यापुढील नाण्यावर मात्र बुद्धाची मूर्ती असून त्याचें नांव ग्रीक अक्षरात लिहिलेलें असतें. तरी पण तो बौद्ध कधीं झाला याचा नक्की शोध लागत नाहीं. याच्या वेळीं महायान पंथाचा बराच उत्कर्ष झाला होता त्यामुळें गौतमबुद्धाला तेव्हां देवत्व प्राप्त झालें होतें. कनिष्कानें आपल्या राजवटीत एक बौद्धधर्माची मोठी समिति भरविली होती असें चिनी, तिबेटी व मंगोलियन दंतकथा सांगतात. सिंहली बखरींत अगर ग्रंथांत याबद्दल कांहींच उल्लेख केला नाहीं. या धम्मसंगीतीचा अध्यक्ष वसुमित्र व उपाध्यक्ष अश्वघोष होता. कनिष्काचा गुरू पारस्व यानें ही सर्व तयारी केली. पांचशें भिक्षु जमले होते. ते सर्व सर्वास्तिवादी (हीनयान) पंथाचेच होते. सभा काश्मीरांत कुंडलवन येथें भरली. तींत

त्रिपीटकांतील बहुतेक सर्व ग्रंथांचें शुद्धीकरण करून त्यावर " महाविभाषा " नावाच्या टीका तयार करून त्या ताम्रपटावर कोरून एका स्तूपात ठेवल्या. अद्यापि त्या स्तूपाचा शोध लागला नाहीं. पुढें मागें दैवगत्या शोध लागल्यास बौद्ध धर्माबद्दलची बरीच नवीन माहिती उजेडात येईल. ही सभा बहुधा इ. स. १०० मध्यें भरली असावी. नंतर त्यानें सर्व काश्मीर प्रांताचें उत्पन्न या धर्माच्या खात्यास लावून दिलें. त्याच्या मृत्यूसंबंधीं पुढील एक दंतकथा आहेः– त्यानें पुष्कळ प्रांत जिंकले असताहि त्याची राज्यलालसा सुटेना व लष्कर तर कंटाळून गेलें; तेव्हा लष्करानें कट करून त्याला ठार मारलें (इ. स. १२३). कनिष्काच्या नंतरच्या राजांची फारच थोडी माहिती आढळते.कनिष्काला वासिष्क व हुविष्क (हुष्क) असे दोन मुलगे होते. पैकीं वासिष्क बहुधा बापाच्या देखतच मेला असावा. त्याचें अद्यापपर्यंत एकहि नाणें सापडलें नाहीं. हुविष्काचीं नाणीं फार सापडतात. बापाच्या नंतर हा गादीवर आला. याचें राज्य काबूल, काश्मीर व मथुरा या प्रांतीं होतें. खुद्द मथुरेस त्यानें बांधलेला एक बौद्धविहार होता. हा धर्मानें बौद्धच होता. परंतु कट्टा नव्हता. याच्या नाण्यावर हिराक्लीज (हरिकृष्ण) सरपीज, स्कंद, विशाख, फरो वगैरे ग्रीक, इराणी व हिंदू देवता कोरलेल्या असतात. मात्र बुद्धाची मूर्ति मुळींच नसते. साधारण तत्कालीन हे शकराजे बुद्धाचे अगदीं कट्टे अनुयायी नसत. त्यावेळीं बौद्धधर्म फार श्रीमंत व वजनदार होता. त्यामुळें कोणाहि तत्कालीन मुत्सद्दी राजानें त्याला वरवर अनुमति देऊन त्याच्या या परिस्थितीचा फायदा घेण्याचें सोडलें नाहीं; आणि त्याप्रमाणें कनिष्क व हुविष्क हे त्याला अपवाद नव्हते. त्यानें काश्मीरात बारामूल घाटात हुविष्कपूर म्हणून एक शहर बसविलें. तें त्या काळीं व्यापाराची फार मोठी उतारपेठ होती. तिला " पश्चिमवेस " असें सार्थ नाव मिळालें होतें. ह्युएनत्संग या ठिकाणीं गेला होता त्यावेळीं तेथें एक विहार होता. हल्लीं याचें नांव उष्कूर असून तेथें प्राचीन स्तूपाचा अवशेष आहे. हुविष्काचें चित्र जें नाण्यावर खोदलें आहे त्यावरून त्याच्या स्वरूपाचा बोध होतो.हा इ.स.१८०त मेला असावा. याच्यानंतर (याचा पुत्र?) वासुदेव हा गादीवर आला. त्याच्या या हिंदु नांवावरून या बाह्यशकांवर तत्कालीन हिंदू संस्कृतीची छाप किती दाट बसली होती हें उघड दिसून येतें. त्याच्या नावाप्रमाणेंच त्याच्या नाण्याचें स्वरूपहि पूर्णपणें हिंदु आहे. त्याच्या नाण्याच्या पाठीवर नंदीसह शंकर असून शिवाय पाश व त्रिशूळ हींहि हिंदू राजचिन्हें आहेत. मथुरेस त्याचा जो शिलालेख आहे त्यावरून त्यानें २५ वर्षें राज्य केलें असें दिसतें. त्याच्या उत्तरकाळीं त्याच्या राज्यास उतरती कळा लागली व त्याच्या मृत्यूनंतरहि तें राज्य मोडलें व निरनिराळे सुभेदार स्वतंत्र झाले; तरीहि पुढें बरेच दिवस नाण्यांवर त्याचीच छाप असे. याच सुमारास (इ. स. १६७) सर्व मध्यजगांत प्लेग सुरू झाला होता. बाबिलोनिया, रोमन व पार्थियन या साम्राज्यांतहि तो चालू होता. नीबूहरच्या मतें प्राचीन जगाला या प्लेगमुळें जो जबरदस्त धक्का बसला त्यांतून तें पुन्हा धडपणें बाहेर पडलेंच नाहीं. बहुधा ही साथ ' वासुदेवाच्या वेळीं त्याच्या राज्यात पसरली असावी.

यानंतरचा पुढील इतिहास फारच अंधुक आहे. सस्सानियन लोकांचा भाग या सुमारास थोडासा उत्तरहिंदुस्थानात लागलेला (नाण्यांवरून), दिसतो. परंतु त्या लोकांनीं स्वारी केली होती कीं काय व केली असल्यास त्यांनीं इकडे किती दिवस अधिकार गाजविला वगैरे माहिती (शिलालेख, नाणीं वगैरे वरून) काहींच स्पष्ट आढळत नाहीं. एवढें खरें कीं उत्तरेकडे कुशान व दक्षिणेकडे आंध्र. या दोन्हीहि साम्राज्यांचा पत्ता एकाच वेळीं नाहींसा होऊन तेथें सर्वत्र अंधार दिसतो. बहुधा या तिसऱ्या शतकाच्या वेळीं सर्वत्र लहान लहान स्वतंत्र संस्थानें असावीत. पुराणात यावेळीं आभीर, गर्दभील, शक, यवन, बाल्हीक या लोकानीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या असा उल्लेख आहे. परंतु त्यांची साग्र व सुसंगत माहिती आढळत नाहीं. रा. द. बानर्जींच्या मतें वासुदेवानंतर दुसरा कनिष्क, दुसरा वासुदेव व तिसरा वासुदेव हे गादीवर आले. काबूलमध्यें मात्र हे कुशान राजे पाचव्या शतकापर्यंत होते. त्यानंतर त्याना श्वेतहूणानीं हाकलून दिलें. चौथ्या शतकाच्या प्रारंभीं या कुशान राजापैकीं एकानें आपली मुलगी इराणच्या (दुसऱ्या) होर्मज्दला दिली होती व इ. स. ३६०त (दुसऱ्या) शापुरला काबूलच्या एका राजाची मदत (रोमन स्वारींत) झाली होती असे उल्लेख आढळतात. पंजाबांतहि काहीं ठिकाणीं हे कुशान बरेच दिवस टिकून होते. मात्र त्याचें महत्व बरेंच कमी झालें होतें व ते इराणच्या सस्सानिअन वंशाच्या छापेखालीं बरेच गेले होतें असें दिसतें. साराश कुशान व आंध्र याचा लय(इसवी स. २२०) व गुप्ताचा उदय (इ स. ३२०) यामधील एक शतकाचा हिंदुस्थानचा इतिहास सर्व अंधारात बुडलेला आहे. जेव्हा त्याचा पत्ता लागेल तेव्हा खरें.

[संदर्भग्रंथ–स्मिथ–अर्लि हिस्टरी; वैद्य–मध्य. भारत;अय्यर –एन्शन्टइंडिया. जर्नल ज. रा. ए.सोसायटी१८८२; १०११, १९०३ ते १९०८, १९१२ ते १३; चवनेज–तुर्क; हिरोडोटस ३, ड्रुईन; ज. अ. टोम; ७: वॉटर्स; स्टीन–राजतरंगिणी कनिंगहॅम—न्यूमिस्म्याटिक क्रॉनालाजी १८९२; स्मिथ. कॉइन्स: इंडियन म्युझियम पु. १; डग्लस–चीन; स्टीन–खोतन, तुर्कस्तान: लेगी—स्याटर हूणाज्; इंडि. ॲंटि. १९०३, १९०८; एपि. इंडिका पु. ८; प्रोसिडिंग्ज एशियाटिक सोसा बंगाल. १८९६, प्रिंसेप–लेख, पु. १: रोमचा इतिहास पु. ९; मॅकक्रिंडल–एन्शन्ट इंडिया: मेरिव्हेल–रोमचा इति.; लेव्ही; फौचर–एन्शन्ट गंधार; तारानाथ; बील–रेकर्ड. पु. १; फाहीन; स्चौ–अल्बेरूणी. पु. २; रॉलिन्सन-पार्थिआ;

इलियट-हिस्टरी इंडिया. पु. १; सलेत नचफोलजर.पृ. १५५; टाकाकुसुलेख; इत्सिंग; परमार्थ-वसु. चरि.; एशियाटिक रिसर्चेस पु. २०; शिफनर; गार्डनर-ब्रिटिश म्युझि.; कॅटलॉग जर्नल एशियाटिक सोसायटी बंगाल, १९०८; ज्ञानकोश प्र. खं. वि. ४].

कुशाव—(सो. वं.) विजयकुलोत्पन्न कुश अ. कुशिक राजाच्या चार पुत्रांतील पहिला. यास कुशावु असेंहि म्हणत असत. यानें स्थापिलेल्या नगरीचें नांव कौशांबी असें असून याच्या पुत्राचें नांव गाधि असें होतें.

कुशावर्त—प्रियव्रतवंशीय ऋषभदेवास जयंतीच्या ठायीं झालेल्या शंभर पुत्रांतील जे नवखंडाधिपति पुत्र त्यांतील ज्येष्ठ याचा खंड याच्याच नावानें प्रसिद्ध आहे.

कुशिनगर—(कुशनगर किंवा कुशिनारा) या नगराचें अत्यंत प्राचीन नाव कुशावती हे असून याचा संबंध ५३१ व्या जातक कथेशीं आला आहे व याचा राजा ओक्काक (इक्ष्वाकु) याचा पुत्र कुश हा असल्याचें सांगितलें आहे. बौद्ध आख्यायिकाप्रमाणें शाक्यमुनि गौतमबुद्ध यांचें (कुशिनारा) या ठिकाणीं निर्वाण व दहन झालें व यामुळे बौद्ध यात्रेकरूंचें हें एक महत्वाचें यात्रेचें स्थान झालें आहे.

बुद्धनिर्वाणाच्या वेळीं म्हणजे खिस्तपूर्व ४८७ किंवा ४८८ च्या सुमारास 'कुशिनारा' हें एक लहान खेडें असावें असे उल्लेख आहेत. परंतु बुद्धाच्या निर्वाणप्रसंगाशीं या स्थानाचा संबंध आल्यामुळें पुढे साहजिकच त्यास जास्त महत्व प्राप्त झालें. खिस्तशकाच्या ५ व्या शतकाच्या आरंभी फाहिआन या चिनी प्रवाशानें हे स्थळ पाहिलें. यानंतर इ. स. ६३७ च्या सुमारास ह्युएनत्संग यानें या स्थळास भेट दिली. दोघा प्रवाशांनीं या स्थळासंबंधीं दिलेली माहिती बहुतेक सारखीच आहे. दोघानींहि लुंबिनी उद्यानापासून या स्थानापर्यंतचें दिलेलें अंतर सारखेंच म्हणजे १२ योजनें आहे. फक्त दोघांनीं सांगितलेल्या दहनस्तूपापासून या स्थळाच्या दिशेंत अंतर पडतें. फाहिआनच्या मतें कुशीनगर हें या स्तूपाच्या पूर्वेस व ह्युएनत्संगच्या मतें ईशान्य दिशेस आहे.

या पुराव्यावरून देखील अद्याप संशोधकांचा या स्थळाबद्दल निश्चय झाला नाहीं. स्मिथनें यावरून असा तर्क केला आहे कीं, हें स्थळ नेपाळमध्यें राप्ती व गंडकी या नद्यांच्या संगमाच्या जवळ हिमालयाच्या पायथ्याशीं आहे. परंतु या दोन्ही प्रवाशांनीं कुशिनारापासून वैशाली वाराणसी या नगरांचीं दिलेलीं अंतरें वरील (स्मिथच्या) नेपाळातील स्थानाशीं जुळत नाहींत.

कनिंगहॅम याचें म्हणणें कीं, साप्रत गोरखपुर जिल्ह्यांतील केशिया गावाजवळील प्राचीन अवशेष हे कुशिनाराचेच असावेत. ह्युएनत्संगनें वर्णन केलेली कुशिनारा येथील बुद्धाची निर्वाणकालची प्रतिमा व साप्रत केशिया येथील प्राचीन अवशेषांत सापडलेली प्रतिमा यांत बरेंच साम्य आहे.

मुकुटबंधन मठांतील मुद्रेशिवाय इतर बऱ्याच (महापरिनिर्वाण मठासंबंधीं) मुद्रा जीर्ण स्थितींत सापडल्या आहेत. त्यांत एक वेठदीप अगर विष्णुद्वीप मठांतील मुद्रा आढळून आली. तीवरून केशिया हें विष्णुद्वीप असावें अशी जबरदस्त शंका येते.

प्रख्यात सम्राट अशोक यास त्याचा गुरु उपगुप्त यानें येथें यात्रेस आणिलें होतें (इ. स. २०९-५०). खड्गसमशेरजंग बहादूर याच्या मतें नेपाळांतील अचिरावति व हिरण्यवती या दोन नद्यांच्या संगमावर हें गाव आहे. पार्गिटरनें कशिया येथील बुद्ध प्रतिमेच्या निर्वाणदेवळाच्या मागील मोठ्या स्तूपांत सापडलेल्या एका ताम्रपटांतील मजकुरावरून [(परिनि) "र्वाण-चैत्य-ताम्रपट्ट इति"] काशीआ हेंच गांव प्राचीन कुशिनगर होय असें ठरविलें आहे. या स्तूपास तेथें माथकुवारका कोट (मृत कुमार स्तूप) असें हल्लीं म्हणतात. सांप्रत हे खेडें गोरखपूर जिल्ह्यात पूर्वेकडे आहे. [स्मिथ दि रिमेन्स विअर कासिआ. जर्नल रायल एशिआटिक सोसायटी १९०२, १३: पायोनिअर-२६ । २ । १९०४: महापरिनिब्बान सुत्त. जातकें; फाहियान-ट्रव्हेल्स; ह्युएनत्संग-बुद्धिस्ट रेकार्ड्स ऑफ दि वेस्टर्न वर्ल्ड; मार्टिन-ईस्टर्न इंडिया. कनिंगहॅम-आर्किआ. सर्व्हे].

कुष्ठ-पाश्चात्य विवेचन—या स्पर्शसंचारी रोगामध्यें त्वचा, श्लेष्मावरणत्वचा व मज्जातंतु याच्या ठिकाणीं बारीक गाठींच्या रूपाची विकृति उत्पन्न होते. हॅन्सन यानें या रोगाच्या जंतूंचा शोध लाविला आहे. ते जंतू विकृत शरीराच्या भागांत सापडतात. दिसण्यांत ते क्षयाच्या जंतूंप्रमाणें पण अधिक सरळ दिसतात. या जंतूंची ज्यांत वाढ केली आहे असें मिश्रण माकडाच्या शरीरांत टोंचून घातल्यानें थोडे दिवस टिकणारा त्वचेचा रोग उत्पन्न होतो. पण तसा इतर प्राण्यांना होत नाहीं. मानवी रोग्यामध्यें रोगजंतू रक्त, त्वचा, श्लेष्मावरण, मज्जातंतू, अन्नरसग्रंथि, कंठ, यकृत, प्लीहा, वृषण, मूत्रपिंड व क्वचित् वेळीं फुफ्फुसें इतक्या ठिकाणीं सापडतात. परंतु अस्थी, स्नायु व सांधे याठिकाणीं मात्र सापडत नाहींत. एक प्रकारचा पूयजंतूंचा शोध-जे या रोगांत होणाऱ्या पुटकुळ्यांत आढळतात.-कांहीं मोठ्या जंतुशास्त्रज्ञांकडून लावला गेला आहे व त्याच्या मतें या मूळजंतूचें हॅन्सन यानें शोधून काढलेला जंतू हें रूपांतर असावें असा तर्क करणें गैरवाजवी होत नाहीं.

रोगाचीं कारणें:—हा रोग आपल्या देशांत बराच पष्ठ्यांत येत असून शिवाय ब्रह्मदेश, सयाम, चीन, जपान, आफ्रिकेचा ईशान्य भाग, केप ऑफ गुड होप, वेस्ट इंडीज बेटें, मध्य व दक्षिण अमेरिका, मेक्सिको व पासिफिक

महारोगारांतील कांहीं बेटें इतक्या ठिकाणीं आढळतो. यूरोपमध्यें नार्वे देशाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि देशांत हा रोग आढळत नाहीं. मात्र इंग्लंडांतील जे लोक आशिया अगर वर सांगितलेल्या ठिकाणीं जाऊन आलेले असतील व त्यास स्पर्शसानिध्य दोषानें कारण होऊन हा रोग होत असल्याचीं उदाहरणें क्वचित् घडतात. परंतु हा रोग अमुक देशात वृद्धि पावतो अगर अमुक प्रकारची हवा त्याच्या वृद्धीस अनुकूल व दुसऱ्या प्रकारची प्रतिकूल असा कांहीं नियम या रोगासंबंधानें बाधता येत नाहीं. परंतु एवढें खचित कीं हा रोग तीस उमरीच्या अगोदर होतो. परंतु अगदीं बालवयात होत नाहीं; व त्यातल्या त्यात स्त्रियांपेक्षा पुरुषाना अधिक प्रमाणात होतो. या रोगात आनुवंशिक रोगप्रवृत्ति फारशी दिसून येत नाहीं; व उपजतच मुलास हा रोग असूं शकत नाहीं. ज्या ज्या देशात हा रोग प्रचलित आहे तेथें सर्व लोकाना याची स्पर्शसंचारी प्रवृत्ति ठाऊक झाल्यामुळें तेथें रोग्यास पृथक् ठेवण्याची थोडी फार चाल आपोआप रूढ झालेली असते. कारण हा रोग स्पर्शसंचारी आहे असें जनतेस कित्येक शतकाच्या अनुभवावरून पूर्ण परिचित झालेलें आहे. आता सावधगिरी बाळगल्याने परिचारक मंडळी या रोगाच्या आतुरालयात कित्येक वर्षे कांहीं एक विकृति न होता राहिल्याचीं उदाहरणें बरींच असलीं तरी एखादे वेळीं रोग्याच्या स्पर्शानेंच केवळ रोग झाला असें मानता येण्यासारखीं उदाहरणेंहि कित्येक घडून येतात व त्याचप्रमाणे या रोगाचें बीज एखाद्या माणसामध्यें प्रयोगाखातर टोंचून घातले तर हा रोग होतो असा अनुभव आहे. ज्या नवीन शोध लागलेल्या देशात पूर्वी मानवी वस्ती नसून तेथें नवीन वसाहत झाली आहे अशा ठिकाणीं जर कांहीं महारोगी नेऊन सोडले तर क्रमाक्रमानें अधिक महारोगी त्या देशांत आढळूं लागतात हे मारिशियस व क्यालिडोनिया या दोन वसाहतींच्या उदाहरणावरून चांगलेंच सिद्ध होतें.

या जंतूंचा प्रवेश शरीरांत इंद्रियद्वारा होत असावा याविषयीं पुढील एक किंवा अनेक स्थलें संभवनीय दिसतात तीं अशीं:—नाक, घसा इत्यादि श्वसनमार्ग, तोंड, मुख, गलग्रंथि, त्वचेंतील जखमा व कदाचित जननेंद्रियमार्ग. अलीकडे ढेंकूण, डांस असले कीटक देखील या रोगप्रसारास मदत करीत असावेत असा सयुक्तिक व शक्य कोटींतील तर्क विचाराहे समजण्यांत येतो. कारण या प्राण्याच्या शरीरांत असले कांहीं जंतू सापडतात. परंतु हे जंतू माती, धुरळा, हवा, पाणी व अन्न या पदार्थांत मिश्र झाल्याचें कधींहि आढळून आलेलें नाहीं.

रोगाचीं लक्षणें:—थोडा ताप येऊन अगर बरें वाटेनासें होऊन या रोगास आरंभ होतो. त्वचा बिघडण्यास प्रारंभ झाला आहे हें सूचित करणारें बाह्य लक्षण जे लालसर किंवा लाल पिंगट वर्णाचे डाग ते प्रथम हातावर किंवा छातीवर अगर पाठीवर दिसूं लागतात. त्याचा आकार वर्तुळ किंवा कधीं अनियमित आकृतीप्रमाणें असून त्याचा व्यास अर्ध्यापासून तीनचार इंचपर्यंत असतो व ते दिसण्यांत जरा फुगीर दिसतात. कित्येक वेळीं त्यातील मधला भाग बरा होऊन कंकणाकृति डाग तेवढे मागाहून शरीरावर रहातात. ताप बरा झाल्यावर हे कंकणाकृति डागहि कदाचित् पुष्कळ फिके तरी होतात अगर त्याचे अनेक अवशेष असे काळे किंवा कधीं पाढरे डाग मागें रहातात. याप्रमाणें पुनःपुनः ताप, नंतर असे डाग अंगावर उठणें व ते मावळून त्याचे अवशेष मागें रहाणें हा क्रम कांहीं कालपर्यंत चालू रहातो. महारोगांतील विशेष लक्षण हें कीं, हे डाग दिसूं लागण्याच्या वेळीं किंवा कधीं मागाहून त्वचेमध्यें वाटाण्यायेवढी अगर त्याहून कधीं मोठ्या आकाराची एखाद-दुसरी गाठ किंवा अनेक गाठी उत्पन्न होऊन त्वचेखाली त्या उमटलेल्या दिसतात; व बरेच दिवस राहून त्या पुढे नाहींशा होतात; पण त्या ठिकाणीं डाग रहातात किंवा त्वचा फुटून तिचे थोडा व पातळ पू येत असलेले लहान लहान व्रण बनतात. हे उंचवटे व या गाठी (व्रण) चेहरा आणि हाताचे पंजे व पावलाचे पृष्ठभाग व अन्य ठिकाणीं दिसून येतात. त्यामुळे भिवया, नाक, गाल व कानाच्या पाळी जाड व व्रणित होऊन चेहरा भेसूर दिसतो. या विकृत चेहऱ्याचें सिंहाच्या चेहऱ्याशीं थोडें साम्य असल्यामुळें रोगाच्या या अवस्थेस "केसरीमुखावस्था" असें नाव दिलें आहे. पापण्याहि जाड होऊन त्यांवर व त्यात क्षतें पडून डोळ्याच्या पापुद्र्यासहि इजा होण्याचा सुमार येतो. परंतु नेत्रांतील वीक्षणमज्जातंतु, दृष्टमज्जास्थान, डोळ्यातील सूर्यकांत कांच, व काचमय रसधातु याना मात्र बिलकुल धक्का लागत नाहीं. तोंड, हिरड्या, टाळूं व नाक इत्यादि श्लेष्मावरणयुक्त जागीं देखील वरीलप्रमाणें पुटकुळ्या येतात. म्हणून आवाजाहि घोगरा, खरबरीत पिजरा येतो. यापासून पडणारीं क्षते स्नायू, अस्थि, वगैरे स्थलें आत खोल ठिकाणापर्यंत पोखरीत जाऊन त्यामुळें सांध्यावर जे स्नायूरज्जू असतील ते झिजून साधे उकलतात. या महारोगाच्या प्रकारामध्यें पुटकुळ्या येणें हें प्रधान अंग असल्यामुळें त्यास गंडप्रधान भेद असे म्हणतात. दुसरा स्पर्शसंज्ञाहीन नांवाचा या रोगाचा एक प्रकार आहे. या भेदामध्यें मुख्यतः मज्जातंतूंच्या स्पर्शज्ञान, पोषण वगैरे शक्तींचा ऱ्हास होऊन शिवाय यांत वरील भेदाप्रमाणें पुटकुळ्या येऊन क्षतें पडणें ही शरीर पोखरण्याची क्रिया सुरू असतेच. आरंभावस्थेमध्यें हात, पाय, पाठ, छाती व पोट वगैरे ठिकाणीं निरनिराळ्या जागीं झिणझिण्या येणें, आग होणें हीं लक्षणें प्रथम होऊं लागतात. पण त्यांतल्या त्यांत कोंपरापासून खालीं व गुडघ्यापासून खालीं पावलापर्यंत हीं लक्षणें विशेष जास्त

होतात. नंतर त्याच भागांमध्यें जडत्व, बधिरत्व, वेदना, शीतोष्णस्पर्शादि ज्ञानशून्यता हीं मुख्य लक्षण स्पष्टपणें निरनिराळ्या जागीं आढळून येतात. व त्या जागीं आगीमुळे दुःख होतें. अशा स्पर्शसंज्ञाहीन जागेवर वरील भेदामुळें अगर या भेदामुळें पांढरे किंवा कधीं श्यामवर्णाचे डाग पडलेले दिसत असतात; व त्यावर केश असतील तर ते निस्तेज, वर्णहीन व बारीक असून तेथील त्वचा मऊ, तुकतुकीत व अंमळ फुगीर अशी दिसते. कांहीं कालानें रोग्याचे हात अगर पाय तपासून पाहिले असता तेथील मज्जातंतू-जाड झालेले वैद्याच्या हातास स्पष्ट लागतात. त्या भागातील इतर सर्व स्नायू व विशेषतः पावलाचे व पंजाचे स्नायू अगदीं क्षीण व रोडावत व रुक्ष होत असलेले दिसून येतात व त्यामुळें हिंस्र पक्ष्यांच्या पंजाप्रमाणें बोटें दिसतात. अगर मनगटामध्यें जडत्व अगर लुलेपणा येऊन नीच गति पायांच्या बोटयांचीहि पण होते. वरील भेदामध्यें हाडें व स्नायू पोंखरणारीं क्षतें पडतात तशीच क्षतें हाताच्या व पायाच्या बोटामधील बारीक बारीक सांध्यावर पडून ते सांधे उकलून नाश पावल्यामुळें अगोदर हातापायांचीं बोटे व नंतर मनगटें व बोटें यातील बारकीं हाडें झडून जाऊन गळतात. नखाच्या जवळील बोटांचे शेवटले भाग मात्र कधीं कधीं मोठ्या चमत्कारानें रहातात असे म्हणतात व उरलेल्या हातापायांना त्याच्या व्रणाची जखम भरून येऊन चिकटून रहातात फार विकोपास गेलेल्या रोग्याच्या रक्तांतील नानाप्रकारच्या लाल रक्तपेशींची संख्या फारच कमी होऊन रोगी पाढरा, पिंवळा, अति निस्तेज असा दिसतो.

येणेंप्रमाणे कधीं रोग कमी तर कधीं जास्ती अशीं लक्षणें होतात. परंतु रोगी खरोखर बरा होण्याची बिलकुल आशा नसते. त्यामुळें कालावधीनें रोग्याकडे नुसतें पाहिलें तरी शिसारी येईल अशी त्याची शोचनीय स्थिति बनते. यानंतर तो फार दिवस जगत नाहीं; कारण त्यानंतर त्याची भूक मंद होऊन आहारादि जीवनक्रियेंत व्यत्यय येऊन रोगारंभापासून पाच, दहा, पंधरा अगर अधिक वर्षांनंतर क्षय, मूत्रपिंडदाह, आमांश यांनीं व क्षतांतील पुवामुळे अन्य इंद्रियांस पू होऊन अगर तीं इंद्रियें सडून किंवा दुसऱ्या एखाद्या फुप्फुसदाहासारख्या आगंतुक दुखण्याचें निमित्त होऊन अगर महारोगामुळेंच कंठामध्यें क्षतें पडून श्वसनमार्ग त्यायोगें बंद होऊन रोग्यास मृत्यु येतो.

रो ग वि कृ ती चें स्व रू पः—या रोगांत पुटकुळ्या येतात त्या त्वचेखालीं उत्पन्न होऊन त्यांत निघालेले पापुद्रे खालील शरीराच्या स्नायू वगैरे भागात घुसतात. यामध्येंच महारोगाच्या रक्तांतील पांढऱ्या पेशीपेक्षा तिप्पट मोठे पेशी असून त्यांतच कांहीं रिक्तस्थानें व पुष्कळ जंतू असतात. या जंतूंचे पुंजके असतात. स्पर्शसंज्ञाविहीन भेदामध्यें मज्जातंतू बिघडतात असें वर आलेंच आहे. ते नेहमींपेक्षां दुप्पट किंवा तिप्पट मोठे होऊन त्यांतील संदेशवाहक गाभ्याचे तंतू रुक्ष किंवा क्षीण होतात पण बाहेरील वेष्टणत्वचा मात्र फुगून तंतू हातास जाड लागतात असे जाड तंतू त्वचेखालीं, कोपरें किंवा गुडघ्याच्या ठिकाणीं बोटांनीं चांचपून तपासतां येतात.

रो ग नि दा नः—शरीरांत रोग पूर्ण प्रगट झाल्यावर तो ओळखणें फार कठिण जात नाहीं. पुटकुळींतील थोडीशी लस किंवा व्रणांतील पुवाचा थेंब किंवा नाकांतील चिकट स्रावाचे थेंब घेऊन तो सूक्ष्मदर्शक यंत्रानें तपासल्यानें या महारोगाचे जंतू दृष्टीस पडतात.

उ प चा र.—वस्तुतः हा रोग बरा होत नाहीं. म्हणून जेथे हा रोग नसेल अशा गांवापासून अंमळ एकीकडच्या ठिकाणीं रोग्यास ठेऊन त्याचे मज्जातंतूंस पुष्टि आणण्यासाठीं कॉडमाशाचे तैलमिश्रित औषधें द्यावींत व क्षतें पडत गेलीं तर त्यांस साध्या मलमाची पट्टी बांधीत जावी कवठांचें तेल किंवा चौलमुग्रा तेल २० थेंब ते २ ड्राम या प्रमाणात कढत दुधात पारदर्शक वेष्टनाच्या तयार गोळ्याच्या रूपात देतात. पण त्यापासून थोडाबहुत फायदा होण्यासाठीं तें तेल निदान दोन वर्षे तरी घेतलें पाहिजे. याच्या रोगजंतूंना मारक असें नॅस्टिन नांवाचें स्निग्ध औषध या महारोगाच्या जंतूंपासूनच तयार करितात. तें औषध दर आठवड्यास टोंचल्यानें पुटकुळ्या लहान होऊन रोगाची प्रगति थांबते असें म्हणतात. विल्यम्स या शोधक डॉक्टरानें ही एक लस तयार केली आहे व तिजपासून चांगला गुण येण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

आ यु र्वे दी य नि दा न.—अयोग्य आहार व विहार केल्यानें, परस्पर विरोधी गुणाचे पदार्थ सतत सेवन केल्याने, साधूंची निंदा व वध, परद्रव्य हरण करणें इत्यादि पापकर्मांच्या योगानें प्रेरित झालेले दोष दूषित होऊन ते शरीरांतील तिर्कस जाणाऱ्या शिरांत शिरून त्वचा, लस, रक्त व मास यांस दूषित व शिथिल करून नंतर बाहेर निघून त्वचेचा रंग पालटवितात व त्वचा बिघडून टाकितात. या रोगास कुष्ठ असें म्हणतात.

याची हयगय केली असतां हें कांहीं काळानें सर्व शरीर तोडून खाऊन टाकिते आणि सर्व धातूंत शिरून त्यास व्यापून व चिघळवून स्वेद, क्लेद व कोथ (सडणें) यांनीं युक्त असे बारीक पण फार भयंकर कृमी उत्पन्न करितें. ते कृमी अनुक्रमें केंस, चामडी, स्नायु, शिरा व कोंवळीं हाडें यास खाऊन टाकितात.

श्वित्रांत हा प्रकार नसतो म्हणून त्याचा कुष्ठांत समावेश न करितां तें याहून निराळें काढलें आहे.

कुष्ठ सात प्रकारचें आहे. वात, पित्त, कफ, वातपित्त, कफपित्त, वातकफ व संनिपात असे ते ७ प्रकार होत. जरी सर्वच कुष्ठें त्रिदोषापासून होतात तरी त्यांत जो दोष अधिक असतो त्या दोषावरून त्यास नांव दिलें जातें. वातापासून कापाल; पित्तापासून औदुंबर; कफापासून मंडल व विचर्ची;

वातपित्तापासून ऋक्षजिव्ह, वातकफापासून चर्म, एककुष्ठ किटिभ, सिध्म, अलस, व विपादिका; कफ पित्तापासून दद्रू, शतारु, पुंडरीक, विस्फोट, पामा व चर्मदल, आणि संनिपातापासून काकण नांवाचें कुष्ठ होतें. त्यापैकीं कापाल, औदुंबर मंडल, दद्रू, काकण, पुंडरीक, व ऋक्षजिव्ह, हीं सात महाकुष्ठें आहेत.

अंग अतिशय मऊ लागणें किंवा खरखरीत लागणें, घाम अतिशय येणें किंवा मुळींच न येणें, चामडीचा रंग पालटणें, दाह होणें, खाज सुटणें चामडी बधिर होणें, टोंचल्यासारखी पीडा होणें, अंगावर गाधी उठणें, श्रमावांचून थकवा येणें, व्रण झाले असल्यास ते फार दुखणें, व्रण लवकर उत्पन्न होणें व फार दिवस रहाणें, ते भरून आले तरी रुक्ष असणें आणि यत्किंचितहि कारण (खाजवणे वगैरे) घडल्यास पुन्हां उमटणें, रोमांच उभे रहाणें आणि रक्त काळें होणें हीं लक्षणें कुष्ठ होण्यापूर्वी होतात.

वातापासून होणारे कापाल कुष्ठ काळ्या किंवा तांबूस खापरासारखें रुक्ष, बधिर, खरखरीत, पातळ, पसरलेल्या व वेड्यावाकड्या कडांचें, दूषित केसांनीं भरलेलें, लवकर पसरणारें असें असून त्यांत टोंचण फार असते व खाज कमी असते

ज्याच्या वरची चामडी व केस पिकलेल्या उंबराप्रमाणे तांबूस असतात, जें पाढऱ्या शिरांनीं भरलेलें असतें, जें जाड असून ज्यांतील लस व रक्त हीं दाट असतात, ज्यात आग व ठणका हीं फार असतात आणि जें लवकर उत्पन्न होऊन लवकर फुटतें व ज्यात लौकरच कृमी उत्पन्न होतात तें उदुंबरकुष्ठ जाणावें.

स्थिर, दाट, जड स्निग्ध, पाढरें किंवा तांबडें, लवकर न पसरणारें, एकमेकांस लागलेलें वर उचललेले व वाटोळें असून ज्याच्या कडा गुळगुळीत व पिंवळवट असतात आणि ज्यात खाज, स्राव, व कृमी हे फार असतात तें मंडलकुष्ठ समजावें.

विचर्चिका कुष्ठ सावळें, धूसर रंगाचें असून त्यातून लस फार वहाते आणि खाज व पुळ्या असतात. खरखरीत, पातळ व मध्यभागीं काळसर असून कडांनीं लाल असलेलें, वर उचललेलें, टोंचणी, दाह व वेदना होत असलेलें, क्लेदयुक्त, खरबरीत, पुळ्यांनीं भरलेलें, पुष्कळ कृमी असलेलें आणि ऋष्य नांवाच्या निळ्या अंडाच्या हरिणाच्या जिभेसारखें जें (आकारानें) असतें त्यास ऋक्षजिव्ह म्हणतात. हत्तीच्या चामड्यासारखें खरखरीत असतें तें चर्मकुष्ठ होय. एकाख्य कुष्ठ फार पसरलेलें, आकारानें माशाच्या अंगावरच्या खवल्यासारखें असतें व त्या जागीं घाम येत नाहीं.

किटिभ कुष्ठ रुक्ष, घट्टयाप्रमाणें खरबरीत घट्ट व काळें असून त्यास कंड सुटते. सिध्म कुष्ठ–ज्यास शिबें म्हणतात तें–बाहेरून रुक्ष व आंतून स्निग्ध असून चोळलें असतां भूस पडतें. तें हातास गुळगुळीत लागतें, पातळ असतें आणि रंगानें भोंपळ्याच्या फुलासारखें तांबस पांढरें असतें. तें बहुतकरून गळ्यापासून कंबरेपर्यंत होतें. अलसक कुष्ठांत पुष्कळशा लाल गांठी असून त्यांस कंड सुटते.

विपादिका कुष्ठांत हातापायावर चिरा पडतात, तीव्र पीडा होते, थोडी कंड सुटते आणि पुष्कळशा लाल पुळया उठतात. ज्याचे ताणे दूर्वेसारखे लांब पसरलेले असतात. ज्याचा रंग आळशीच्या फुलासारखा निळा असतो, ज्याचीं मंडलें वर उभारलेलीं व एकमेकांस लागून पसरलेलीं असून ज्यांस कंड सुटते त्यास दद्रुकुष्ठ म्हणतात. ज्याचीं मुळें मोठीं असतात, ज्यात दाह व वेदना होतात, जें तांबूस काळसर असतें, ज्यात व्रण असतात, ज्यात लस व कृमी फार असतात आणि जें बहुतकरून हाताच्या सांध्यावर होतें तें शतारु होय.

ज्याच्या कडा लाल असून मध्यभाग पांडुर असतो, ज्यांत कंड, दाह व ठणका असतो, जे उभारलेलें असतें, ज्यावर कमळाच्या पानाप्रमाणें पुष्कळशा लाल शिरा असतात, ज्यांतून दाट व पुष्कळ अशी लस व रक्त वहाते आणि जें लौकर फुटतें तें पुंडरीककुष्ठ होय. पातळ त्वचेचे पाढरे तांबूस रंगाचे फोड ज्यात पुष्कळसे असतात तें विस्फोट कुष्ठ होय.

बारीक व धूसर पिंगट रंगाच्या पुळ्या बहुतकरून कुले, हात व कोंपरें यावर पुष्कळशा येतात, त्यांस पामा म्हणतात. यात खाज, लस व ठणका हीं फार असतात. चर्मदल कुष्ठात फोड असतात. त्यास हात लाववत नाहीं, खाज सुटते, चुरचुर, टोंचण व दाह हीं होतात, तें लाल असते व फुटतें. काकणकुष्ठ प्रथम गुंजेप्रमाणें तांबडें व काळें असून त्यात कुष्ठाचीं सर्व लक्षणें उत्पन्न झालीं म्हणजे मग अनेक प्रकारचे रंग उत्पन्न होतात यांत दाह व वेदना हीं फार तीव्र असतात कुष्ठात कोणता दोष अधिक आहे हें दोषांच्या लक्षणावरून व कर्मावरून ठरवावें. सान्निपातिक, विकृतिविज्ञानीय अध्यायात सांगितलेले आणि हाडें मज्जा व वीर्य यांच्या आश्रयानें राहिलेलें कुष्ठ असाध्य समजून सोडून द्यावें. मेदोगत कुष्ठ याप्य असतें, वातपित्तज, कफपित्तज, रक्ताश्रित व मांसाश्रित हीं कुष्ठें कृच्छ्रसाध्य असतात कफ वातजन्य त्वचेंत असलेलें व एकदोषात्मक कुष्ठ सुखसाध्य असतें.

कुष्ठत्वचेंत असतां टोंचण, विवर्णता व रुक्षता उत्पन्न होते. रक्तांत गेलें असतां घाम, बधिरता, व सूज उत्पन्न होते. मांसात असतां हातांपायावर फोड उत्पन्न होतात.

सांध्यावर असतां त्यातून लस फार वहाते; मेदांत गेलें असतां हाताचीं बोटें सडतात त्या त्या अवयवांची गती बंद होते व ते फाटतात; हाडात व मज्जेंत गेलें असता नाक सडतें डोळे लाल होतात, स्वर क्षीण होतो. व क्षतांत किडे पडतात. वीर्यांत गेलें असतां बायको व मुलें यांस त्याचा उपद्रव होतो. रक्तादिकांत कुष्ठ गेलें असतां त्याच्या पूर्वीच्या धातूंत कुष्ठ गेलें असतां जी लक्षणें होतात तींहि होतात.

म्हणजे मांसाश्रित कुष्ठांत त्वचेंतील, रक्तांतील व मांसांतील कुष्ठांचीं लक्षणें होतात. मेदात गेलें असतां मेदाचीं व वरील तीनहि धातूंत कुष्ठ गेलें असतां होणारीं लक्षणें होतात.

श्वित्र म्हणजे पांढरें कोड हें कुष्ठाच्याच कारणांनीं उत्पन्न होतें. श्वित्रासच किलास व दारुण अशीं नांवें आहेत. वातिक श्वित्र, पैत्तिक श्वित्र, व कफजन्य श्वित्र असें तीन प्रकारचें श्वित्र असतें. वातिक श्वित्र रुक्ष व पिंगट रंगाचें असतें.

पित्तज श्वित्र ताबूस व कमलाच्या पानासारखें असून त्यात दाह होतो व त्यावरचे केस गळून पडतात. कफजन्य श्वित्र पांढरें दाट, जड, वर वाजणारें असतें.

हीं श्वित्रे क्रमशः रक्त, मास व मेद यात रहातात; दोष व धातु या दोहोंच्या योगानेंच याचे असे रंग होतात.

हीं श्वित्रें क्रमशः उत्तरोत्तर कष्टसाध्य होत. ज्याच्या वरचे केस पांढरे झाले नाहींत, जे फार दाट नाहीं, जे एकमेकात मिळालेले नाहीं. जे नवें एक वर्षाच्या आतलें आहे व जे विस्तवानें भाजल्यानें झालेलें नाहीं असें श्वित्र साध्य असतें. याहून निराळ्याप्रकारचें तें असाध्य समजावें.

सर्व प्रकारच्या कुष्ठात रोग्यानें प्रथम स्नेहपान करावें. त्याकरिता चरकोक्त तिक्तघृत उपयोगात आणावे. स्निग्ध झालेल्या अशा रोग्यास निशोत्तर, बाहवा वगैरे रेचक औषधें द्यावीं. कपाळ, हात व पाय यांच्या शिरा तोडून रक्त काढावें. थोडें कुष्ठ असल्यास फासण्या टाकून रक्त काढावें आणि योग्य वाटेल त्याप्रमाणें तुंबड्या, जळवा वगैरे लावाव्या.

कुष्ठ झालेल्या रोग्यांचे रक्त काढल्यानें व त्यास रेच झाल्यानें त्याचा कोठा रिकामा होऊन वायूपासून त्याच्या शरीरास विघात होण्याचा संभव असतो तो दूर व्हावा म्हणून त्यास मधून मधून कुष्ठनाशक स्नेह पाजून शक्ति लवकर आणावी.

कुष्ठी रोग्यानें ब्रह्मचर्य पाळून मध व रक्तधाबोळ यांच्याबरोबर गंधक खावा. किंवा खैर व असाण्याच्या साराच्या काढ्यातून समभाग तूप घालून गंधक खावा. हा कुष्ठनाशक आहे.

याप्रमाणें उपाय करून अंतस्थ दोषांचें शमन झालें म्हणजे मग बाह्य दोषांचें शमन करण्याकरितां लेप वगैरे लावणें हितावह होतें. कारण देह अशुद्ध असतां तीक्ष्ण लेप लावल्यानें दोष चवताळून अधिक कुष्ठ वाढतें.

ज्या कुष्ठांतील चकदळीं स्थिर व टणक असतील त्यास पुरचुंडीनें शेकून तें वर उचललें म्हणजे शस्त्रानें खरवडून वर लेप लावावे. ज्या स्पर्शज्ञान नसलेल्या भागांवर शस्त्र चालत नाहीं तेथील रक्त व दोष यांचा स्राव करून वर क्षार लावावा. अतिशय कठिण, खरखरीत, बधिर, स्थिर व जुनें अशा कुष्ठावर प्रथम विषघ्न औषधें पिऊन विषांचा समंत्रक लेप लावावा आणि नंतर विषघ्न औषधांचा लेप करावा. स्तब्ध, अत्यंत बधिर, ज्यास घाम येत नाहीं व कंड फार सुटते अशा कुष्ठाचीं चकदळें गोवरी, समुद्रफेण किंवा शस्त्र यांनीं घांसून नंतर त्यांवर लेप लावावे.

नागरमोथे, त्रिफळा, गेळफळ, करंज, बाहवा, इंद्रजव, सातवीण, कोष्ठ, गव्हला, दारुहळद व पांढरे शिरस यांच्या पाण्यानें स्नान करावें, यांचा काढा ओकारी व रेच होण्याकरितां घ्यावा व या औषधांचा लेप करावा. यांच्या अंतर्बाह्य उपयोगानें कुष्ठ बरें होतें. ज्या कुष्ठांत आग होत असेल त्यांवर तिक्तघृतें व शतधौतघृतें लावावीं. लस फार वहात असल्यास चंदन व ज्येष्ठमध यानीं तयार केलेलें तेल लावावें.

अंगाची आग, विस्फोटक व चर्मदल यावर थंड लेप, थंड व द्रव औषधानीं धुणें व घड्या ठेवणें, शिरा तोडणें, रेचकें व कडू औषधानीं तयार केलेलें तूप याचा उपयोग करावा. वातकुष्ठावर तूप, कफकुष्ठावर वमन आणि पित्तकुष्ठावर रक्त काढणें व रेचक हे सर्वोत्कृष्ट उपाय आहेत.

कोठा शुद्ध करून व रक्तदोष काढून टाकून नंतर जे लेप कुष्ठावर केले जातात त्याचा फार लौकर गुण येतो.

ज्याचे दोष फार वाढले असतील त्यास त्याची शक्ति राखून वरचेवर बेताबातानें विरेचन देत असावें. अर्थात् त्याचे दोष थोडथोडे काढून टाकावे. एकदम जबरदस्त शोधन दिल्यास अतिशय दोष निघून जाऊन त्या अशक्त झालेल्या माणसास ताबडतोब वायु होऊन तो मरेल. पंधरा दिवसांनीं वमन, महिन्यामहिन्यानें रेचक, तीन दिवसानी नस्य आणि सहा सहा महिन्यानीं रक्त काढणे या प्रमाणें हे उपाय करावे.

ज्या कुष्ठी मनुष्यास वमनविरेचन नीटपणीं लागू पडलें नसेल तो जबरदस्त: दोषानीं व्यापला जाऊन निःसंशय असाध्य होय. म्हणून दोष काढणे ते पुरतेपणीं काढावे.

व्रतें, इंद्रियदमन, मनोनिग्रह, दान, सुशीलपणा, ब्राह्मण, देव, गुरू यांची पूजा, सूर्याची उपासना हे उपाय केल्यानें दोष व पाप यापासून उत्पन्न झालेलें कुष्ठ समूळ नाहींसें होतें.

साळी, सातू, गहूं, हरीक, राळे, मूग, मसुरा, तुरी, कडूभाज्या, जांगलमांस, त्रिफळा, कडू पडवळ, खैर, कडुलिंब व बिब्बे यांनीं युक्त असें अन्नपान, औषधमिश्रित मद्यें व बावच्याचें चूर्ण घातलेला मद्य अशा प्रकारचें खाणें पिणें कुष्ठावर हितकर आहे. आंबट, खारट व तिखट अन्नपान कुष्ठावर हितकर नाहीं. आणि, दहीं, दूध, गूळ, पाण्यांतील प्राण्यांचें मांस, तीळ व उडीद हे पदार्थ सर्वथा वर्ज करावे.

याप्रमाणें जीं मोठीं सात कुष्ठें त्यांची चिकित्सा करावी. कोरडी व ओली खरूज, शिबें, गजकर्ण, नायटे, वगैरे जीं अल्पकुष्ठें तीं याच सदरांत घातलीं आहेत. त्यांच सामान्य

रेचकें देऊन गंधक, मोरचूत, शेंदूर, गुग्गुळ, वगैरे औषधांचा लेप करावा. अगर यांनीं तयार केलेली तेलें लावावीं. करंजेल अथवा शिरशेल हीं तेलें लावावीं. विशेषेकरून पू शुद्ध होऊन त्वचा मऊ राहील असे उपाय करावे. हा रोग स्पर्शसंचारी आहे म्हणून कुष्ठ झालेल्या रोग्यानें दुसऱ्यास स्पर्श करूं नये.

कोड हें कुष्ठापेक्षांहि निंद्य असून त्यापेक्षां असाध्यहि लौकर होतें. म्हणून तें बरें करण्याविषयीं ताबडतोब यत्न करावा. त्यावर विशेषेकरून प्रथमच रेचक द्यावें. यावर उत्तम रेचक म्हणजे बांबचाच्या काढ्यांतून त्रिधारी निवडुंगाचा चीक हें आहे. हें रेचक घेऊन अंगास तेल लावून बसवेल तितका वेळ उन्हात बसावें आणि रेच झाल्यावर तीन दिवसपर्यंत तहान लागली असतां कण्हेरी प्यावी. उन्हात बसल्यानें कोडाच्या जागेवर जे फोड येतील ते काट्यानें फोडून त्यांतील पाणी काढून टाकावें आणि नंतर तीन दिवसपर्यंत सकाळीं पळसाचा क्षार काकवींतून प्यावा.

याशिवाय कुष्ठावरचेहि उपाय करावे. हत्तीचें कातडें जाळून त्याची राख तेलात खलून लावावी. पेंगूळ किडा बाहव्याच्या क्षाराच्या पाण्यात खलून लावावा. मोराच्या पिसाचा लेप करावा, रेचकें, रक्त काढणें, रूक्षण, सातू खाणें या उपायांत एखाद्याच मनुष्याचें कोड बरें होतें. [वाग्भट; चरक; योगरत्नाकर]

कुष्तगी—हैदराबाद संस्थानात, रायचूर जिल्ह्यांत एक तालुका. क्षेत्रफळ ७१४ चौ. मै. लो. सं. १९११ सालीं ९२५६७. खेड्याची संख्या २१८. १९०१ सालीं सार्‍याचें उत्पन्न १०९ लक्ष. मुख्य गांव कष्तगी. तालुक्याची जमीन काळी व सुपीक आहे.

कुष्तिया पोटविभाग—बंगालइलाख्यात नडिया जिल्ह्यांतील एक पोटविभाग. हा फार सुपीक प्रदेश असून याच्या उत्तरेकडून पद्मा नदी वहाते व दक्षिणेस मातांभाग वाहते. स. १९११ सालीं याची लो. सं. ४५६६८५ होती. नडिया जिल्ह्यात कुष्तिया पोटविभागाची वस्ती अतिशय दाट आहे. यात दोन मोठीं गांवें आहेत. मुख्य ठिकाणें कुष्तिया व कुमारखली.

गांव—बंगाल इलाखा. हें नडिया जिल्ह्यांतील कुष्तिया तालुक्याचें मुख्य ठिकाण होय. हें पद्मा नदीच्या उजव्या तीरावर वसलेलें आहे. याची १९११ सालीं लो. सं. ६०९५ होती. पूर्व बंगाल रेल्वेवर हें स्टेशन असून येथें व्यापार फार मोठा चालतो. १८६९ सालीं येथें म्यु. क. स्थापन झाली. तिचें १९०३-४ सालीं १०००० रुपये उत्पन्न व ८००० रुपये खर्च झाला. येथें मामुली सरकारी कचेऱ्या असून शिवाय एक लहान तुरुंग आहे.

कुसवन:—मद्रास इलाख्यांतील एक कुंभार जात. याची कुंभार या लेखांत सामान्य माहिती दिलीच आहे. या जातीची केवळ विशिष्ट माहिती पुढें ग्रथित केली आहे. हे जानवें घालतात. त्यांचे धार्मिक समारंभ वेल्लाळ जातीप्रमाणेंच असतात. शैव व वैष्णव या दोन्ही संप्रदायांचे ते अनुयायी असून त्यांच्यात मांसाशनास मुभा आहे. परंतु विधवाविवाह मात्र वर्ज्य मानला जातो. कांहीं कुसवन पिडारी देवालयांत पुजाऱ्याचें काम करितात. उदयन व वेलाण अशीं त्यांचीं नांवें आहेत. खानेसुमारींत कुलालन व कुसवन हीं नांवें समानार्थी म्हणून देण्यांत येतात. चोल, चेर आणि पांड्य असे कुसवनांचे प्रादेशिक वर्ग असून, ब्रह्मदेवाचा मुलगा कुलालन याच्या तीन पुत्रांपासून हे वर्ग निघाले अशी समजूत आहे ब्राम्हण व शूद्री यांपासून कुंभाराप्रमाणेंच त्यांची उत्पत्ति आहे अशा तऱ्हेची एक दंतकथा सांगतात.

पुजारी नांवानें ओळखले जाणारे कित्येक कुसवन मातीचीं पेंकळ चित्रें करण्यांत व त्यास रंग देण्यांत मोठे कसबी असतात. संततीची इच्छा असणारे, पटकी, देवी वगैरे सांथींतून बरे झालेले आजारी पडूं नये म्हणून आगाऊच खबरदारी घेणारे व ग्रामाचें रक्षण व्हावें अशी इच्छा करणारे लोक हीं चित्रें घेऊन निरनिराळ्या देवतांना अर्पण करितात. (ऐयनर पहा). या लोकात काडीमोड, पुनर्विवाह, बालविवाह वगैरे प्रचलित असून वराच्या बहिणीनें नालीबंधन करण्याची चाल आहे. हाडें मोडलीं किंवा निखळलीं असल्यास त्यावर उपचार करण्यांत हे मोठे पटाइत असतात अशी प्रसिद्धि आहे. महुरा येथे कुसवन लोकाना वेलाण असें म्हणतात. ['कुंभार' पहा. शिवाय थर्स्टन, मद्रास सेन्सस रि. १८९१ मदुरा जिल्हा. गॅ.]

कुसाजी भोसले—हे शाहुमहाराजाचे लेकवळे होते. हे शूर असल्यानें याना मोहिमावर नेहमीं धाडण्यांत येई. सातारा प्रांतानजीकचा शिराळेचा सुभा याजकडे असे. पुढें कर्नाटक प्रातावर बाबूजी नाईकाची नेमणूक झाली असतां, त्यांजकडे अर्धा कर्नाटक दिला, व अर्धा या कुसाजीकडे दिला. " सारे महाल कर्नाटकाचे, त्यात निमे बाबूजी नाईक व येसाजी (हा हि शाहुछत्रपतीचा लेकवळा) व कुसाजी भोसले निमंत, शिबंदी, खर्च, रसद, मोकासा, बाबती, स्वराज्य (हे) अंमल निमे सरकार व सात लक्ष रुपये (निव्वळ) रसद भोसले यांनीं द्यावी. " शिराळे येथें हल्लीं जें भोसल्यांचें घराणें आहे त्याचे हे संस्थापक होत. या घराण्यानें स्वराज्यात बरेंच काम केलें आहे. कोल्हापूरकर व सातारकर छत्रपतींच्या राज्याच्या सरहद्दीवर (सातारा राज्यांतील) हें शिराळें गांव असल्यानें तेथें नेहमीं करवीरकरांचा उपसर्ग होई. त्यासाठीं तेथें एक लष्करी ठाणें जय्यत ठेवावें लागे व त्याचबरोबर वंशपरंपरेचा एक शूर ठाणेदारहि ठेवावा लागे. तें काम या घराण्याकडे असे [शाहुमहाराज बखर, म. रि. म. वि.].

कुसुगल—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हुबळीच्या ईशान्येस सुमारें ६ मैलावरीत एक गांव. येथील किल्ला इ. स. १७९० सालीं सुस्थितींत होता व त्याची बांधणी जरा शास्त्रीय पद्धतीवर केली होती. इ. स. १७९१–९२ सालीं धारवाड सर केल्यावर मराठ्यांनीं हाहि किल्ला लवकरच सर केला. इ. स. १८१७ च्या पुणें येथें झालेल्या तहान्वयें जो भाग पेशव्यानीं इंग्लिशास तोडून दिला त्यांत हा भाग होता. इ. स. १८७०–७५ सालीं येथें 'न्यू ऑर्लिन्स' नांवाच्या जातीचा कापूस पेरण्याचे मोठया प्रमाणावर प्रयोग केले; परंतु ते यशस्वी न झाल्यामुळें इ. स. १८७६ ते प्रयोग पुढें चालू ठेवण्याचें बंद केलें.

कुसुंबा (करडी)—या झुडुपास लॅटिनमध्यें कार्थेमस् ऑक्सिआकंथा इंग्रजींत सॅफफ्लावर, संस्कृतांत अग्निशिखा इतर भाषेंत कुसुंब, करडई, कुसुंबा, कुझबुराय, खरेझा व करर, पोलियान, पोलि, कांडियारा, मियान् कलाय वगैरे नांवें आहेत.

स्पेन. जर्मनीचा दक्षिण भाग, इटली, हंगेरी, इराण, ईजिप्त, दक्षिण अमेरिका, दक्षिणरशिया, व हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांत हीं झुडुपें होतात. पेशावरमध्ये विशेषतः हीं बरींच आढळतात.

उ प यो ग —या झुडुपाच्या फुलांपासून रंगाचें द्रव्य व बियापासून तेल निघतें. आफ्रिडी मेणकापड करण्याकरितां लागणाऱ्या वस्तूंपैकीं हें मुख्य द्रव्य आहे. फुटलेली कांच सांधण्यांत त्याचा लुकणासारखा उपयोग करितात.

लागवड केलेल्या करडईला बॅस्टर्ड सॅफ्रॉन, नकली केशर, कार्थेमाइन् रंग, कुसुंबा इत्यादि अनेक नांवें रूढ आहेत

इ ति हा स.—कुसुंब्याच्या बिया रेचक म्हणून लोक खातात. संस्कृत ग्रंथावरून कुसुंब्याचा हा उपयोग हिंदु लोकांनां माहीत होता असें सिद्ध झालें आहे. कुसुंब्याचें तेलहि औषधी असून त्याचा उपयोग इजिप्तमध्यें एरंडेलाच्या ऐवजीं करीत असत असें प्लिनीच्या ग्रंथावरून दिसतें. इजिप्त देशांतल्या मर्मींच्या शरीराचे आगावरील कपडे कुसुंबाच्या रंगानें रंगविलेले असतात असें आढळून आलें आहे चीनमधील लोकांना इ. स. पूर्वी दोन शतकांपर्यंत कुसुंबा माहीत नव्हता व चीनमधून नंतर हें झाड जपानमध्यें गेलें असा समज आहे.

करडईचें झाड फंबरेइतकें उंच वाढतें. याचीं पानें लांबट असतात. त्यांस बारीक कातरा असतो. करडईस पिंवळया रंगाचें फूल येतें. त्यात केशराप्रमाणें तंतु असतात. या फुलाच्यामागें सुपारीएवढें बोंड येते. त्यास टोंक असतें. व बोंडात करडईचे दाणे असतात. करडई देशावर फार पिकते. करडईंत दोन जाती आहेत. एक काटयाची व दुसरी बिनकाटयाची. विन काटयाच्या करडईचीं फुलें वाळवून त्यांचा कुसुंबा रंग करितात. करडी अहमदनगर, पुणें, सातारा, सोलापूर, विजापूर, धारवाड, बेळगांव येथें जास्त होतो. वऱ्हाडांत बुलढाणा, यवतमाळ व अकोला येथें हिचा पेरा होत असून निझामच्या राज्यात मराठवाड्यांत हिचें पीक पुष्कळ होतें. चीन देशांत हिचा लागवड जास्त असते व तेथील रंग नांवाजलेला आहे.

करडी रब्बी पिकांशीं मिसळून पेरितात. परंतु गुजराथेंत मात्र याची स्वतंत्र शेतें आढळतात. करडईचे शाळू, जोंधळा, गहूं व हरबरा यांत पाटे घालितात किंवा मिसळून पेरितात. याच्या स्वतंत्र पेऱ्यास दर एकरीं वीस पौंड बीं लागतें व मिसळीच्या पिकात तें दोनतीन पौंड पुरतें. पीक फेब्रुवारी व मार्च महिन्यांत कापून त्याचे ढीग (कडपे) घालितात व वाळल्यानंतर खळ्यांत नेऊन कडपे काठयांनीं झोडितात; व बीं तयार करितात.

स्वतंत्र पिकाचें सरकारी दर एकरीं उत्पन्न ६०० ते ८०० पौंड व मिसळीच्या पिकाचें द. ए. उत्पन्न१०० ते१२५ पौंड असतें. करडईचें तेल काढितात. तें स्वयंपाकांत व इतर कामीं उपयोगास येतें. करडईचें तेल लवकर खंवट होत नाहीं; म्हणून तें फार दिवस टिकतें. गुरास पेंड खाण्यास व खतासाठीं उपयोगी पडतें. करडईच्या कोंवळया पाल्याची भाजी करितात. गुजराथेंत करडईच्या पाकळयाचा रंग करितात. फुलें जानुवारी, फेब्रुवारी महिन्यात काढितात. पाकळ्या एक दोन दिवस ठेऊन त्या तिळाच्या तेलाबरोबर चोळितात. एक पौंड पाकळ्यानां एक तोळा तेल लागतें. चोळलेल्या पाकळया तीन दिवस सावलींत वाळवितात. वाळल्यावर त्या मळून अगर ठोकून त्याचें पीठ करितात व चोळतात म्हणजे रंग तयार झाला. रंगाच्या वड्या दर रुपयास दोन तीन पौंड मिळतात.

ते लः—तेल काढण्यासाठीं कुसुंब्याची लागवड मुंबई इलाख्यांत करतात. परंतु फुलासाठीं लागवड केलेल्या कुसुंब्याच्या बियाचाहि पूरक उत्पन्न म्हणून उपयोग करितात. मुंबई इलाख्यात याची लागवड अजमासें ५००००० पासून ६००००० एकर जमिनीवर करितात व गळिताच्या धान्यात करडई हें मुख्य पीक समजतात. अहमदनगर, पुणें, सातारा, विजापूर, धारवाड व बेळगांव हीं करडईच्या उत्पन्नाकरितां प्रसिद्ध आहेत. मध्यप्रांतांत तेलाकरिता कुसुंब्याच्या लागवडीचें प्रमाण कमी होत आहे.

ते ल का ढ ण्या च्या कृ ति.–बियांपासून तेल काढण्याच्या दोन तऱ्हा आहेत.–

पहिलीः—फळाचें टरफल काढून उष्णता न लावतां तेल काढणें. किंवा यंत्राच्या साह्यानें तेल काढणें. यंत्रानें तेल जास्त निघतें खरें परंतु त्यामुळें ती पेंड निकस झाल्यामुळें जनावरें आवडीनें खात नाहींत व ती जास्त द्यावी लागते.

दुसरीः—एका मडक्यांत बिया घालून तें मडकें दुसऱ्या एका जमिनींत पुरलेल्या मडक्याच्या तोंडावर पालथें ठेवतात

त्या दोन मडक्यामध्यें भोकें पाडलेला पत्रा ठेवितात. नंतर उपड्या मडक्याच्या बुडावर व सभोंवतीं जाळ करितात. कांहीं वेळानें बियांतून तेल निघूं लागतें, व तें जमिनींत पुरलेल्या मडक्यात जमा होतें. पहिल्या तऱ्हेनें काढलेलें तेल लोक खाण्याकरितां वापरितात. तीळ व कुसुंब्याचें बीं मिळून काढिलेलें तेल मुंबई इलाख्यात गोडें तेल म्हणून विकतात. याच प्रकारचें पण हलक्या प्रतीचें तेल लोक जाळतात. दुसऱ्या रीतीनें काढलेलें तेल खाण्याच्या किंवा जाळण्याच्या उपयोगी पडत नाहीं. परंतु दोरांना चरबीसारखें लावण्याकरितां व कानड्याचे पोहरे मढविण्याकरितां त्याचा चांगला उपयोग होतो. हें तेल म्हणजे एक तऱ्हेचें रोगणच होय.

जं ग ली कु सुं ब्या चें ते लः—उत्तर हिंदुस्थानात व मुख्यत्वेंकरून पेशावर येथें रोगण निराळ्याच तऱ्हेनें तयार करितात. कुसुंब्याचें बीं दाबून काढलेलें तेल मातीच्या भाड्यांतून सारखे १२ तास कढवितात. तेल कढताना त्यातून जाणारी वाफ फार असह्य असते. म्हणून हें तेल कढविण्याचें काम मनुष्यवस्तीपासून दूर करितात. तेल चांगले कढल्यावर तें कढत असतानाच थंड पाण्याच्या पसरट भाड्यातून ओततात. तें नंतर निवाल्यावर जो एक पदार्थ बनतो त्याला रोगण म्हणतात. मग तें जस्ताच्या डब्यात भरून बाजारात विकतात.

मे ण का प डः—'अग्रिकल्चरल लेजर' (१९०१. नं. १२ ३९३–४१८) व ' दि इंडियन आर्ट अॅट दिल्ली ' (१९ ३ २२१–३४) या पुस्तकांवरून येथें खनिज रंग गोठलेल्या तेलात मिसळून तऱ्हेतऱ्हेचा रंग बनवीत असें दिसतें. अशा रीतीनें तयार केलेला रंग कापडाना देऊन त्याचें मेणकापड करितात. बंगाल्यात एरंडीच्या तेलाचें व कच्छमध्ये जवसाच्या तेलाचें रोगण करितात. कलकत्ता येथील तागाच्या गिरण्यातून या पद्धतीनें मेणकापड तयार होतें.

बिया व पेंडः—कुसुंब्याच्या बिया भाजून खातात. पाळीव पक्ष्यास कुसुंब्याच्या बिया खावयास घालितात व त्याची पेंड गुराना चारतात. या पेंडीला बुरशी येत नाहीं व त्यापासून उत्तम खत तयार होतें.

कु सुं ब्या चा रं गः—या झाडाच्या फुलापासून दोन जातींचे पिंवळे रंग व एक तांबडा रंग असे तीन रंग मिळतात. या तांबड्या रंगात कारामिथिक आसिड असतें. कुसुंब्याच्या फुलात पाणी व तेल घातलें म्हणजे पहिला पिंवळा रंग निघतो. या पिंवळ्या रंगास वायव्येकडील लोक " पुजन " म्हणतात. हा रंग पाण्यांत विद्राव्य आहे. हा रंग शेकडा २६ ते ३६ प्रमाणानें फुलात सापडतो. व तांबडा रंग शेकडा ३ ते ६ या प्रमाणात सापडतो. दुसरा पिंवळा रंग अल्कलाईन दारूंत मात्र विद्रवण पावतो. पाण्यात विद्राव्य होणारा पहिला पिंवळा रंग काढून कुसुंब्यात असिटिक आसिड मिसळलेलें पाणी घालून परीक्षा करण्यासाठीं प्रथम शिशाचा क्षार व नंतर अमोनिया त्यांत घातला म्हणजे दुसरा पिंवळा रंग शिशाच्या क्षारासह तळीं बसतो. अलकलाईनच्या संयोगानें शुद्ध तांबडा रंग काढतां येतो. अलकलीच्या ऐवजीं आपल्याकडील रंगारी सज्जी मट्टी घालतात.

कुंहरसेन—पंजाबात सिमल्याच्या डोंगरी संस्थानांपैकीं एक संस्थान. याचें क्षेत्रफळ ९० चौ. मै. व लो. सं. १९२१ सालीं १२२२७ होती. संस्थानची राजधानी कुंहरसेन खेडें. हें सिमल्यापासून ४० मैलावर हिंदुस्थान-तिबेट रस्त्यावर आहे. हल्लींच्या संस्थानिकाचें नांव राणा विद्याधरसिंग आहे. संस्थानचें वार्षिक उत्पन्न ४० हजार रु. आहे. पैकीं २००० रुपये खंडणी द्यावी लागते. नार्कंद (नागकंद) नावाचें ठिकाण ९०१६ फूट उंचीवर असून सिमल्याचे रहिवासी हवा खाण्यास तेथें येतात.

कुळकर्णी—महाराष्ट्राच्या प्राचीन ग्रामसंस्थेंतील कुळकर्णी हा एक अधिकारी असून प्राचीन काळापासून सामान्यत्वें करून तो ब्राह्मणवर्गापैकीं असतो. एकंदर जमिनीचा एकपंचवीसाशावा हिस्सा पाटील, कुळकर्णी व चौघुले याना साऱ्यावाचून इनाम देण्याची तत्कालीन वहिवाट असून याशिवाय त्याना आपल्या गांवात दुसरे कित्येक हक्क असत.

गावच्या वसुलाचा हिशेब ठेवणें हें कुळकर्णीचें मुख्य काम होतें. कुळाचा जो करणीक तो कुळकरणीक (कुळकर्णी). कुळकर्ण्याच्या हिशेबात त्याच्या गावाच्या सरहद्दींतील एकंदर जमीनीच्या क्षेत्रफळाची नोंद केलेली असे. यातून लोकवस्तीनें व्यापलेली जागा, रस्ते, कुरणें,पडित व इनाम जमीनी या काढून टाकून बाकी राहिलेल्या लागवडीखालीं असलेल्या जमीनीवर, उत्पन्नाच्या मानानें सरकारसारा आकारण्यांत येई.

शिवकालीन कुळकर्ण्यांना काय हक्कबाबी असत त्या खालीं दिल्या आहेतः—

धनगराकडून वार्षिक दोन चवाळीं; चांभाराकडून एक जोडा, मोमिनाकडून एक मुंडासें; कोष्टयाकडून एक पासोडी; साळ्याकडून एक धोतरजोडा, टवणाकडून रुमाल; तेल्याकडून दर आठवड्यास दर घाण्यास तेल नऊ टाक, खाटाकाकडून एक रुका (पै); तांबोळ्याकडून पंचवीस पानें, हलवायाकडून दोन पैसे; बकालकडून एक सुपारी; माळ्याकडून मालाप्रमाणे गूळ दर बैलास सव्वाशेर, दर पाटीस पावशेर; केळीं दर बैलास पाच.

याशिवाय पुढील हक्क असत तेः—कतबा अगर तक्रारीचे अर्ज लिहिल्यानंतर वादी व प्रतिवादी याच्याकडून दोनदोन आणे. (२) गावांत लग्न किंवा पाट झाल्यास धान्य व शिधा १० रु. पर्यंत. (३) कागदाबद्दल सालिना १२ रु. याप्रमाणें या हक्काच्या रकमेची रोख किंमत ४२५ रु. येते. शिवाय मुशाहिरा असे तोः—गावांतील प्रत्येक शेतकऱ्यापासून धान्याच्या दरखंडीस दीड रु. प्रमाणें रकम. मोहतर्फा (कारागीर) लोकाकडून.

एकंदरींत मुशाहिरा व हक्कलाजिमा मिळून सालिना सहाशें रुपयापर्यंतची प्राप्ति कुळकर्ण्यास होई (भा. इ. मं. तृ. सं. वृ.). हल्लीं सरकारनें वतनदार कुळकर्णी काढून टाकून त्याच्या जागीं पगारी तलाठी नेमले आहेत व वतनाबद्दल त्यास रोख वर्षासनें ठरवून दिलीं आहेत.कोल्हापूर संस्थानात कुळकर्णीवतनें खालसा केल्यामुळें कुळकर्णी वर्गांत बरीच जागृति उत्पन्न झाली आहे. त्याच्या दरसाल परिषदा भरतात.

कुळिथ—यास संस्कृतमध्यें कुळिथ, ताम्रबीज, तालवृंत; लॅटिनमध्यें डोलिक्लॉस बायफ्लोरस; मराठींत कुळीथ हुलगे; हिंदींत कुल्ति, इंग्रजींत हॉर्सग्रॅम; गुजराथी, कुलथी; कानडींत, हुले; हिंदी–कुळथी इत्यादि नावें आहेत.

या धान्यास देशावर हुलगे असें म्हणतात. तृण धान्यात जसा हरीक केवळ गरिबाचें धान्य समजलें जातें तसें द्विदल धान्यांत हुलगा हें धान्य आहे. हें सर्वत्र होतें. याचें झाड लहान असून शेवटीं वेलासारखें वाढतें. याची उंची सुमारें एक हात उंच असते. याची शेंग किंचित् वाकलेली व चपटी असते व तीवर बारीक कुसळें असतात. कुळीथाचा रंग तांबूस काळा व पांढरा असतो. कुळीथ घोड्यास व दुभत्या गुरास खावयास घालतात.

कुळीथ हें धान्य हलक्या जमीनीवर येतें. या धान्यास फार पाऊस लागत नाहीं. हें बाजरी व कारळ्याबरोबर मिसळून पेरतात. घाटमाथ्यावर व देशावर नगर जिल्ह्यात व कोकणात व मध्यप्रांताच्या डोंगरी भागात हें पीक स्वतंत्र करतात. कोंकणात हे वालाप्रमाणें भातखाचरात रब्बींत पेरतात. कोंकणांत हातानें बीं फेंकून पेरतात. स्वतंत्र पिकास दर एकरीं १२ते१८ पौंड बीं लागतें व मिसळीच्या पिकास १॥ तें २ पौंड पुरतें. खरीफ पीक आक्टोबर, नोव्हेंबरात तयार होतें व रब्बी मार्च महिन्यात होतें. उत्पन्न सरासरी दर एकरी ५००–७०० पौंड स्वतंत्र, व ७५–१०० मिसळीचें.

या धान्याचा माणसाना व गुराना फार उपयोग होतो. कुळीथ शिजवून घोड्यानां व बैलाना खावयास घातल्यानें तीं पुष्ट होतात. कुळीथाचें पीक तागाप्रमाणें करून जमीनींत नागरून टाकल्यास जमीन सुधारते. याचें बिवडाहि चांगलें असतें.

कूका.—शीख लोकाचा एक धार्मिक पंथ. लुधियानाच्या आग्नेयीस सुमारें ७ मैलावर असलेल्या भैनी नावाच्या खेडेगावात रामसिंग या नावाचा सुतार रहात असे. त्यानें कांहीं दिवस शीख सैन्यात नोकरी केली. तें सैन्य मोडल्यावर तो घरीं आला व पुन्हा सुतारकाम करूं लागला. पुढें त्यानें रावळपिंडीपासून मरीपर्यंतच्या सडकेचें कंत्राट घेतलें. नंतर तो घरीं गेल्यावर त्यास साक्षात्कार झाला असें म्हणतात. नंतर तो शीख धर्म जास्त पवित्र करण्याकरितां गुरू झाला. प्रथम त्याच्या कल्पना व आकांक्षा फार मोठ्या नव्हत्या, व त्याप्रमाणें त्याचा शिष्यवर्गहि बेताचाच होता. शीख लोकांमध्यें दहा गुरूंप्रमाणें १० तत्वें आहेत. पैकीं पहिला पाच 'क' पुढीलप्रमाणें आहेतः—करा, कच्छ, करपाल, कोंघी, केस. (लोखंडाचे दागिने, आखूड पायजमा, हत्यार, फणी, केस).

पांचनकारार्थी तत्वें आहेत तीं:—नरिमर, कुरिमर, श्रीकत्त, सुन्नेतकत्त, धिरमलीअ. (धूम्रपान न करणें, कन्यावध न करणें, शिखानष्टाबरोबर संगति न ठेवणें अथवा त्यावर विश्वास न ठेवणे, त्याप्रमाणें सुन्ता केलेल्याबरोबर वागणें, त्याप्रमाणेंच करतरपूर येथील गुरूच्या अनुयायांबरोबर वागणें). यावरून शीखधर्मीय हिंदूंचें विशेषतः मुसुलमानधर्माशीं वैमनस्य होतें असें दिसतें. रामसिंग यास शीखधर्माची त्यावेळीं रूढ असलेली तत्वें अमान्य असून गुरू नानक याच्या वेळीं जो शीखधर्म प्रचारांत होता त्याचीं तत्वें थोड्या फार फरकानें अमलांत आणावयाचीं होतीं.

तत्वें:—कूकपंथी लोक हिंदु शास्त्रें मानित नाहींत. त्याचे लग्नविधि व मृतसंस्कार निराळे आहेत. हे मद्य पीत नाहींत, मांस खात नाहींत व स्नान करण्यापूर्वी कांहीं खात नाहींत. हे लोक फेटा कानांवर न बांधतां कान उघडे ठेवून वरच्या बाजूला बांधतात. हे दोनदा स्नान करितात. त्यांच्या धर्माप्रमाणें पूर्णपणें सत्यच बोललें पाहिजे. हे कूका लोकाखेरीज इतराच्या हातचे खात नाहींत. हे गाईला फार पूज्य मानतात. याच्या धर्माची दीक्षा देण्याचा प्रकार म्हटला म्हणजे, स्नान केल्यावर एक लोंकरीच्या दोऱ्यास गांठी मारलेली माळ देणें व एक मंत्र कानात सांगणें. हा मंत्र ते इतर कोणालाहि सांगत नाहींत. हा मंत्र आदिग्रंथातील प्रथमाक्षरें "सत्नम्कर्त पूर्ख" हीं असावीं. परंतु अद्याप कोणत्याही कूका मनुष्यानें हीं फोडलीं नाहींत. याच्या पंथात व मंडळींमध्यें स्त्रियांस येण्यास मुभा आहे, व नाचण्याचीहि पूर्ण मुभा आहे. यामुळें हे एकत्र मिळाले असतां अतिशय गोंगाट करतात.

पंथाची वाढः—प्रथम रामसिंग यास फार थोडे अनुयायी मिळाले. परंतु हळू हळू हा पंथ इतका वाढला की रामसिंग याचें महत्व फार वाढून त्यानें आपल्या मदतीकरिता कांहीं अधिकारी नेमले. तो घोड्यावर बसून फिरत असे. त्याचे अनुयायी 'अकाल' 'अकाल' म्हणून ओरडून त्यास रस्ता करून देत. शेवटीं त्याच्या मनांत शीख लोकांचा दहावा गुरू होण्याची महत्वाकांक्षा उत्पन्न झाली. त्यानें आपल्या सुभ्यांची संख्या दिल्लीच्या साम्राज्याप्रमाणें २२ पर्यंत वाढविली; आणि पंजाब व सतलज नदीच्या आजूबाजूचा प्रदेश यामध्यें धर्मप्रसार सुरू केला. याच्या धर्मांत बहुतेक सर्व सुतार, गवंडी, कोष्टी व कांहीं जाट येऊन मिळाले. परंतु सर्व शीख राजे या धर्मास प्रतिकूल होते. त्याप्रमाणें शीख समाजहि प्रतिकूल होता. कारण शीख लोकांस नाच व गाणें यापेक्षां मिळाल्यास मद्य व मांस फार आवडतें.

प्रथम रामसिंग याची प्रवृत्ति धर्माकडेच होती; परंतु पुढें त्यास सत्ता असावी असें वाटूं लागलें. पंजाब सरकारनें या धार्मिक चळवळीकडे प्रथमपासून दुर्लक्ष्यच केलें. पण पुढें त्यास असें वाटूं लागलें कीं कदाचित् या लोकांस दाबांत ठेवणें पुढें जड जाईल म्हणून सर डोनल्ड मॅकलिऑड हे ज्यावेळी शेवटीं लुधियाना येथें गेले (इ. स.१८६७) तेव्हां त्यानीं रामसिंग यास पाचारण करून त्याच्या एकंदर कृत्याचा खुलासा विचारला. त्यावेळीं त्यानें आपणास राजकीय सत्तेचा हव्यास नसून फक्त शीख धर्माचें पावित्र्य पुन्हा प्रस्थापित करावयाचें आहे असें सांगितलें व त्याप्रमाणे त्याच्या धर्माचीं तत्वेंहि आढळून येतात. सर डोनल्ड याची खात्री होऊन त्यानीं रामसिंगास निरोप दिला. पुढे त्याच्या अनुयायाचीं संख्या एक लक्षापर्यंत वाढली. परंतु सरकारास हा पंथ फ्रान्समधील 'कारबोनरी' प्रमाणे वाटून त्यानीं या पंथावर बारीक नजर ठेवली होती या लोकांस सैन्यात भरती न करण्याबद्दल हुकूम सोडण्यात आले होते. परंतु लवकरच ते परत घेण्यात आले. काश्मीरच्या राजासहि या कूक लोकापासून त्रास झाल्यामुळें त्यानें आपल्या सैन्यातून एकदम ४०० लोकास काढून टाकले.

या पंथाचे लोक आज पाच हजारापेक्षा जास्त नाहींत. १९०१ सालीं यांची संख्या सुमारें १५ हजार होती. पण राजकीय भानगडीमुळे हा पंथ वटूं लागला व 'तत् खालसा' या धार्मिक चळवळीमुळेंहि यात फुटाफूट झाली.

कूटमाळी—यांची वस्ती संयुक्त प्रांतात आढळते. मथुरा प्रांतातील जिगनगड येथून हे लोक आले; व त्याचा लालखानी मुसुलमान रजपूताशीं संबंध असल्याची एक दंतकथा आहे. जिगनगडच्या लुटीच्या वेळीं यांनीं मुसुलमानी धर्म स्वीकारला होता व पुढे लवकरच ते लालखानी झाले असें सांगतात. लुटीच्या वेळीं पळून जात असता ते एका फकिराच्या बागेंत आश्रयाकरिता थाबले व तेथें ते माळ्याचा धंदा करूं लागले. त्यानंतर त्यानीं भात (धान) कुटण्याचा धंदा केला व त्यामुळें त्यांचें नाव कुट-माळी पडले अशी आख्यायिका आहे. कूक सागतो कीं कुटणें व मळणें या भाताचे तांदूळ करण्याच्या दोन क्रियापासून हा संयुक्त शब्द बनला. हे लोक मुरादाबाद, बरेली, बिजनोर, रामपूर व नैनीताल या प्रातात असून दिल्लीनजीकहि या लोकाचीं ४४ खेडीं वसलेलीं आहेत. या लोकाची कायमची पंचायत असून ती फार व्यवस्थित आहे. पंचायतींत २ सरदार २२ पधान व २२ चक्रयात असून त्यांच्या जागा वंशपरंपरागत चालतात.

प्रत्येक खेड्यात एक पधान व एक चक्रयात नेमलेला असतो. बारीकसारीक खटल्याचा निकाल खुद्द पधान व चक्रयात देतात. या लोकांत दिराशीं लग्न लावतां येतें. हे लोक मोठे काटकसरी, उद्योगी व मेहनती आहेत. [सेन्सस रिपोर्ट १९११ (संयुक्तप्रांत). कूक].

कूडलगी—मद्रास इलाख्यांत बल्लारी जिल्ह्यातील पश्चिमेकडील तालुका. क्षेत्रफळ ८६३ चौ. मै. लो. सं. (१९२१) ९२९९१ यांत कोट्टुरु हें एक मोठें गांव व मुख्य ठिकाण कूडलगी हें लहान खेडें आहे. दुसरीं ११६ खेडीं आहेत. यातील नद्यानाल्यांच्या किनाऱ्यानें खजुरीच्या झाडांचीं वनें असून डोंगराळ भागात चिंचेचीं विपुल झाडें आहेत. या दोन्ही झाडांपासून मोठें उत्पन्न निघतें. या तालुक्यातील जमीन फक्त कोट्टूरच्या आसपास काळी कपाशीची असून इतरत्र अगदीं हलक्या दर्जाची तांबडी किंवा भेसळीची आहे. यात कित्येक ठिकाणें दलदलीमुळें हिंवतापास उत्तेजक आहेत. जमीन इतकी हलकी आहे कीं, एकरीं २ ते ५ आण्यापेक्षा जास्त सारा सरकारास मिळूं शकत नाहीं. येथला जमीनमहसूल सुमारें सव्वा लाख आहे. एक वेळ लागवड केलेल्या जमीनींत काहीं वर्षेंपर्यंत पुनः लागवड करण्याकरिता सोय नसते. अरण्यात गुरानां चरावयास मुबलक चारा व सर्व प्रदेशात पुष्कळ तळीं व विहिरी आहेत. मुख्य धान्य चोलम् व कोरा; इतर तालुक्यापेक्षां यात एरंडीची लागवड पुष्कळ जास्त आहे. ताडी व चिंचा मोठ्या प्रमाणावर बाहेर प्रान्तीं जातात.

कूंदियन—राजपुतान्यात उदेपूर संस्थानामध्यें रास्मि जिल्ह्यातील एक गाव. हें बनास नदीच्या उजव्या तीरावर उदेपूर शहरापासून ५० मैल आहे. येथें देवालयें पुष्कळ असून मातृकुंड नावाचें एक लहान तळें आहे. यात परशुरामानें स्नान करून मातृहत्येचें पातक धुवून टाकलें असें समजतात. येथ मे महिन्यात तीन दिवस यात्रा भरते.

कूबा—मुंबई इलाख्यातील काठेवाडातील लहानसें संस्थान. सोरठ जिल्ह्यातील हा स्वतंत्र खंडणी देणारा तालुका, माणिकवाडच्या नैऋत्येस ८ मैलावर आहे. तालुकदार नागर जातीचा असून गायकवाड सरकारचा मजुमदार आहे. इ. स. १८३४ त जुनागडच्या नबाबापासून मजुमदार व्रजदास यानें कूबा गाव मिळविला.

कुर्ग—दक्षिण हिंदुस्थानात म्हैसूर संस्थानच्या पश्चिमेस, पश्चिम घाटाच्या माथ्यावर व उतारावर असलेला एक लहानसा प्रांत. क्षे. फ. १५८२ चौ. मै. व लो. सं. (१९२१) १६३८३८. या प्रांताचा नकाशातील आकार लहान मुलाच्या पायमोजासारखा असून त्याची टाचेकडील बाजू वायव्येकडे व बोटाकडील बाजू आग्नेय दिशेकडे आहे.

मर्कारांचें पठार समुद्रसपाटीपासून सरासरी ३८०० फूट उंच असून पूर्वेस कावेरी नदीकडे उतरत गेलेलें आहे. फ्रेझर पेठ येथें त्याची उंची ११०० फूट आहे. कुर्गच्या उत्तरेस व पूर्वेस म्हैसूर संस्थानातील हसन व म्हैसूर हे जिल्हे; आणि दक्षिणेस व पश्चिमेस मद्रास इलाख्यातील मलबार व दक्षिण कानडा हे जिल्हे आहेत. या प्रांतांचें मूळ नांव कोडगू असें आहे; व येथील ब्राह्मणेतर मुख्य जातीला कोडगू असें म्हणतात. कुर्ग हा कोडगू याचा इंग्रजांनीं केलेला अपभ्रंश होय.

स्वा भा वि क व र्ण नः—कॉफीचे मळे, लागवडीकरिता तयार केलेला प्रदेश, व खुलीं खोरीं याशिवाय बहुतेक सर्व प्रदेश अरण्याच्छादित आहे. मोठीं गावें किंवा खेडीं मुळींच नाहींत. फक्त कोठें कोठें झाडांआड लपलेलीं व धुरामुळें काळून येणारीं गवती घरें दिसतात. साधारणपणें डोंगरमाथ्यावर गवत, खोऱ्यात हिरवें गार वन, डोंगराच्या उतारावर झाडांचीं रानें असून त्यातून लहान लहान ओढे वाहत असतात. या देशाचें स्वरूप सर्व ठिकाणीं सारखें आहे असें मात्र नाहीं. सोमवारपेठच्या जवळ उत्तरेस डोंगराच्या उतारावर मधून मधून उघडा प्रदेश व रानझाडाचे समूह असल्यामुळें तेथें एखाद्या बागेप्रमाणें शोभा दिसते. मर्कारापाशीं टेकड्या जवळ जवळ असून दऱ्या खोल आहेत. फ्रेजरपेठकडील मुलूख सपाट असून त्यात टेकड्या तुरळक आहेत. वेप्पुनाड व कयेतनाड येथील प्रदेश खुले असून तेथील जंगलहि दाट व उंच नाहीं. कावेरी व लक्ष्मणतीर्थ या नद्यांमधील पूर्व सरहद्दीवरच्या भागात एकसारखें जंगल आहे. पश्चिमघाटाची मुख्य राग वायव्येस सुब्रम्हण्यपासून दक्षिणेस ब्रम्हगिरीच्या पश्चिम टोंकावर सुमारें ६० मैल लांब पसरली आहे. या रागेपासून पूर्वेस व पश्चिमेस पुष्कळ लहान रागा गेलेल्या आहेत. त्यांचीं काहीं शिखरें येणें प्रमाणेः— सुब्रह्मण्य किंवा पुष्पगिरी (५६२६ फू.), मर्काराच्या उत्तरेस ९ मैलावर कोटियेट्टा (५३७५ फू), ताडियादमोल (५२७९ फू.).

कूर्ग प्रांतातील मुख्य नदी कावेरी ही पश्चिम घाटात ब्रम्हगिरिमध्यें उगम पावते व सिद्दपूर प्रदेशात दक्षिणेकडून वहात जाऊन सिरंगालमधून वहात गेल्यावर म्हैसूर प्रांतात शिरते. हिला हेमावती, लक्ष्मणतीर्थ, कक्कबे, कडनुरहोले, कुम्मेनहे, ले मुत्तरमुदी चिक्कहोले आणि हत्ती किंवा हारंगी या नद्या मिळतात. पावसाळ्यात नद्याना पूर येतो व होड्याशिवाय पलीकडे जाता येत नाहीं. परंतु पावसाळा संपल्यावर पाणी कमी होऊन उतार पडतो.

सर्व रानात, व विशेषतः पूर्वसरहद्दीकडे हत्ती पुष्कळ आहेत. येथील शेवटच्या राजानें जुलई १८२२ पासून एप्रिल १८२४ पर्यंत २३३ हत्ती मारल्याचा व १८१ पकडल्याचा उल्लेख एका शिलालेखात केलेला आहे. हल्लीं हत्तीची शिकार करण्याला कमिशनरचा परवाना घ्यावा लागतो. याशिवाय गवे, वाघ, चित्ते, अस्वलें, जवादी मांजरें, काळीं व रानटी मांजरें, रानटी कुत्रे वगैरे श्वापदें रानांत आढळतात. साबर व हरणाच्या निरनिराळ्या जाती, नाग, साप, माकडें हे प्राणीहि येथें आहेत,

कूर्गची हवा समशीतोष्ण व दमट आहे. मर्कारा येथें वार्षिक पाऊस सरासरी १३३ इंच पडतो. पावसाचा भर जुलई महिन्यांत असून त्यावेळीं एका महिन्यांत ४२ इंच पाऊस होतो. मर्कारा येथें मे महिन्यांत उष्णमान ७२° व जानेवारींत ६७ असतें.

इ ति हा स—कावेरीमाहात्म्य नांवाच्या पुराणात कावेरीच्या उगमाचा इतिहास दिलेला आहे. कावेर मुनीला ब्रम्हदेवानें एक मुलगी बक्षीस दिली. हिचें मूळचें नाव लोपामुद्रा असें असून ती विदर्भ राजाच्या घरीं वाढली होती. परंतु कावेर मुनीची ती कन्या झाल्यामुळें तिला कावेरी असें नाव प्राप्त झालें. सर्व लोकावर कल्याण करण्याकरिता तिनें नदी होण्याचा निश्चय केला होता. एकदा अगस्त्य मुनींच्या दृष्टीस पडली असता त्यांनीं तिला आपली पत्नी होण्याविषयीं विचारिलें; तेव्हा मुनींनीं केव्हाहि एकटें टाकल्यास आपणास वाटेल तिकडे जाण्याची मोकळीक असावी या अटीवर तिनें अगस्त्य मुनींशीं विवाह केला. दिलेल्या वचनाचा विसर पडून मुनी एकदा कनके नदीवर स्नानाकरिता गेले असता, कावेरीनें तळ्यात उडी घेतली व तेथून ती नदीच्या रूपानें बाहेर पडली. मुनीच्या शिष्यांनीं तिला अडविण्याचा प्रयत्न केल्यामुळें ती जमीनींत गुप्त होऊन भागंदक्षेत्र येथें वर आली व पुढें वलंबुरीकडे वाहूं लागली. अगस्त्य मुनी परत आल्यावर त्याना फार वाईट वाटलें. तेव्हा मुनीचें मन दुखविणें व आपला विचार बदलणें या दोन्ही गोष्टी टाळाव्या म्हणून ती अर्धभागानें मुनीजवळ राहिली, व दुसरा अर्ध नदीरूपानें कायम राहिला. या पुराणात कूर्ग लोकांना उग्राचे वंशज (म्हणजे क्षत्रियाला शूद्र स्त्रीपासून झालेली संतती) असें म्हटलें आहे. मत्स्यराज सिद्धार्थ याचा कनिष्ठ पुत्र चंद्रवर्मा (याच्या नावावरून व दुसऱ्या इतर गोष्टींवरून हा कदंब राजपुत्र असावा.) हा दक्षिणेंतील यात्रा केल्यावर ब्रम्हगिरी येथें आला. त्यानें पार्वतीची स्तुति करून तिला संतुष्ट केल्यावर देवीनें त्याला एक शूद्रपत्नी व त्या प्रदेशातील राज्य दिलें; व स्वतः नदीरूपानें तेथें अवतार घेऊन जगदुद्धार करण्याचें कबूल केलें. या शूद्र पत्नीपासून चंद्रवर्म्याला ११ पुत्र झाले. त्यांनीं विदर्भ राजाला शूद्र स्त्रियापासून झालेल्या कन्यांशीं विवाह केले. प्रत्येक राजपुत्राला शंभरापेक्षा जास्त मुलगे झाले. त्यांनीं आजूबाजूचा बराच प्रदेश साफ करून लागवड केली. जमीन तयार करण्याचें काम ते रानडुकराप्रमाणें करीत गेले म्हणून या प्रदेशाला क्रोड किंवा कोडगू म्हणजे वराह देश असें नाव पडलें.

देवकात या ज्येष्ठ पुत्राला गादीवर बसवून व पार्वती लवकर अवतार घेणार आहे असें सांगून चंद्रवर्मा निघून गेल्यावर, तूळ संक्रमणाच्यापूर्वी दोन दिवस, देवकाताला स्वप्नात पार्वतीचें दर्शन होऊन, तिनें त्याला सर्व लोकास वलंबुरी येथें जमण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्व लोक जमल्यावर दरींतून कावेरी नदीचा प्रवाह जोरानें आला, त्यात सर्व लोकांनीं स्नान केलें. प्रवाह फार जोराचा असल्यामुळें स्त्रियांच्या वस्त्रांच्या गांठी पाठीकडे गेल्या; त्या

दिवसाच्या स्मरणार्थ कूर्गमधील स्त्रिया अद्यापीहि त्याच प्रमाणें वस्त्रें नेसतात. व दरवर्षी तूळ संक्रमणाच्या वेळीं येथें मोठा उत्सव होत असतो.

ऐतिहासिक काळाकडे वळलें असता नवव्या व दहाव्या शतकात कूर्ग प्रात तळकार (कावेरीच्या काठीं) येथील गंग राजाच्या ताब्यात होता असे शिलालेखांवरून समजतें. कावेरीच्या उत्तरेकडील नंजराज (य) पट्टण येथील चांगल्व राजे त्याचे माडलिक होते. चांगल्व राजाचे शिलालेख येदवनाड व बेट्टयेरनाड येथें सांपडलेले आहेत. ते जैनधर्मी होते व त्याचे धर्माधिकारी हनसोगेपासून तले–कावेरी पर्यंत सर्व जैन देवालयांवर अधिकार गाजवीत यावरून त्याच्या राज्याची मर्यादा तेथपर्यंत असावी.

अकराव्या शतकाच्या आरंभीं चोल राजांनीं गंग राजांची सत्ता नाहींशीं करून कूर्ग प्रातहि घेतला.त्यावेळींचागल्व राजे चोल राजांचे माडलिक झाले. अकराव्या शतकांत कांगाल्व राजानीं म्हैसूरमधील अर्कगूड तालुका व कूर्गचा उत्तरेकडील येलुसावीर प्रदेश यावर राज्य केलें. हेहि जैन होते.

गंग राजांची सत्ता नाहींशी झाल्यावर, म्हैसूरमध्यें पोयसल किंवा होयसल राजांची सत्ता हळू हळू वाढत जाऊन, बाराव्या शतकाच्या आरंभीं त्यानीं चोल राजांनां म्हैसूरच्या बाहेर घालवून दिलें. त्याची राजधानी द्वोरसमुद्र येथें होती, पण ते प्रथम पाश्चम घाटातील सोसेवूर (म्हणजे हल्लींचे कोदूर जिल्ह्यातील अंगडी) येथून आलेले होते. व "मलपचे वीर" असे त्याचें बिरुद होतें.

चंगाल्व व होयसल याच्या दरम्यान पुष्कळ लढाया होऊन अखेर होयसल राजाचा विजय झाला. दोघेहि सोमवंशी यादवांचे वंशज असल्यामुळें चोल राजे गेल्याबरोबर चंगाल्व राजानीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. ११४१ पर्यंत पहिला नरसिंह या होयसल राजानें चंगाल्व राजाला लढाईत ठार मारून हत्ती वगैरे पुष्कळ लूट जमा केली. त्यानंतर चंगाल्व कूर्गमध्यें गेले असावे असें दिसतें; कारण ११७४ त दुसऱ्या बल्लाळ राजानें त्यांच्या विरुद्ध आपला सेनापति बेट्टरस याला पालपरे (या किल्ल्याचे अवशेष हटगटनाद येथें अद्यापि आहेत) वर पाठविलें होते. त्यानें चंगाल्वांचा पराभव करून आपल्या राजधानीकरितां गाव वसविलें. परंतु चंगाल्वाच्या मदतीला बूदगंद, नंदिदेव, उदयादित्य वगैरे आल्यामुळें कांहीं वर्षे बेट्टरसाचे चागलें चाललें नाहीं, पण शेवटीं मात्र त्याला विजय मिळाला. यानंतर लवकरच चंगाल्व राजे होयसलांच्या पूर्णपणें ताब्यांत आले. १२५२ त सोमेश्वर हा होयसल राजा त्यांना भेटण्याकरितां रामनाथपूर येथें गेला होता. त्यावेळीं त्याची राजधानी श्रीरंगपट्टण येथें होती. त्यांनीं जैनधर्म सोडून लिंगायतधर्म स्वीकारला होता; व त्यांचें कुलदैवत श्रीगिरी (बेत्ताडपूर डोंगर) वरील अन्नदानी मल्लिकार्जुन हें होतें.

चवदाव्या शतकात होयसलांच्या पाठीमागून विजयानगरचें राज्य आलें व चंगाल्व राजे त्यांच्या सत्तेखालीं गेले. सोळाव्या शतकाच्या आरंभीं नंज राजानें नंजराजपट्टण ही नवी राजधानी स्थापन केली. १५८९ त प्रिय राजानें सिंगपट्टणची दुरुस्ती करून त्याचें नाव प्रियपट्टण असें ठेविलें. विजयानगरची सत्ता मुसुलमानांनीं मोडून टाकिल्यावर हा मुलूख म्हैसूरच्या राजांच्या ताब्यात गेला. १६४४ त म्हैसूरच्या राजानें बेट्टदपूर व प्रियपट्टण काबीज केले; त्यावेळीं चंगाल्वानें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून बायका मुलांस मारून टाकिलें व राजधानीचें रक्षण करीत असता स्वतः मरण पावला. याप्रमाणें चंगाल्व घराण्याचा शेवट झाला.

सोळाव्या शतकाच्या अखेर खुद्द कूर्गचा कारभार नायकाच्या हातीं होता असें फेरिस्ता लिहितो. १६४६ त बेदनूरचा शिवप्पा नाईक यानें श्रीरंगपट्टणास वेढा दिला असतां बेदनूर किंवा इक्केरी घराण्यातील एका राजपुत्रानें जंगमाचा वेष घेऊन सर्व प्रांत आपल्या ताब्यात आणिला. त्याचे वंशज १८३४ पर्यंत कुर्गवर राज्य करीत होते. या वंशातील वीर राजेंद्र राजाने १८०७ पर्यंतचा इतिहास "राजेंद्रनामे" या ग्रंथात लिहिविला आहे.

वरील वंशातील मुद्दु राजानें राजधानी मदिकेरी किंवा मर्कारा येथें नेऊन तेथें १६ १ मध्यें एक किल्ला व राजवाडा बाधिला. त्याच्यामागें त्याचा वडील मुलगा दोड्ड वीरप्पा हा राजा झाला व त्याचे भाऊ, अप्पाजी आणि नंद हे अनुक्रमे हालेरी, व होरमस येथें राहूं लागले. १६९० त दोड्ड वीरप्पानें येलुसाविर प्रदेश कूर्ग प्रातास जोडला. बेदनूरच्या सोमशेखर नाइकाविरुद्ध चिरकल राजाला मदत करून त्यानें वायव्येकडील अमरशुल्य जिल्हा मिळविला. तो १७३६ त ७८ वर्षाचा होऊन मरण पावला (त्याचा मुलगा १७२९ त त्याच्या हयातींत मरण पावला). त्याच्या मागून त्याचा नातू चिक्कवीरप्पा गादीवर आला याच्या कारकीर्दीत म्हैसूरमध्यें हैदरअली प्रबळ होऊन त्यानें बेदनूर (१७६३) व येलुसाविर हे प्रदेश घेतले आणि वार्षिक ३ लक्ष फलम खंडणी घेऊन उर्वरित कूर्गला देण्याचे कबूल केलें. चिक्कविरप्पाला वारस नसल्यामुळें त्याचें राज्य हालेरी व होरमले येथील घराण्यांकडे गेले. दोघांनीं एकोप्याने राज्य करून हैदरला उर्विरीबद्दल पंजे आणि बेलारे हे प्रदेश देण्यास भाग पाडिलें. १७७० त दोन्ही राजे वारले. तेव्हां देवप्पा राजा गादीवर बसला. त्यानंतर हालेरीचा राजपुत्र अप्पाजी हा आपला चुलता लिंगराजा यासह हैदरकडे मदतीकरितां पळून गेला. हैदर मराठयांशीं युद्ध करण्यांत गुंतला असल्यामुळें त्यावेळीं त्याला कांहीं करितां आलें नाहीं; पण मराठे परत गेल्यावर त्यानें लिंगराजाच्या मदतीला सैन्य पाठवून दिलें. कांहीं अडथळा न होता लिंगराजा मर्कारावर चालून गेला. देवप्पा राजा

संरक्षणाकरितां कोटेच्या चिरकल राजाकडे गेला. परंतु तेथें त्याचें स्वागत न झाल्यामुळें वेष पालटून फक्त चार नोकरांसह तो उत्तरेस पळून गेला. अखेरीस हरिहर येथें तो पकडला गेला आणि हैदरानें पट्टण येथें त्याच्या सर्व कुटुंबासह त्याला ठार मारलें. याप्रमाणें होरमले शाखेचा शेवट झाला. लिंग राजाकडून २४ हजार रु. खंडणी देण्याचें कबूल करवून, कूर्ग व वायनाडचा कांहीं भाग हैदरानें त्याच्याकडे ठेवला; आणि अमरशुल्य, पंजे, बेल्लारे आणि येलुसावीर हे आपणाकडे घेतले. १७८० त लिंग राजा मरण पावल्यावर त्याचीं मुलें (वीरराज व लिंगराज) वयांत येईपर्यंत सांभाळण्याच्या मिषानें हैदरानें सबंध कूर्गचा ताबा घेतला. राजपुत्रांनां कावेरी नदीच्या कांठीं गुरूरूच्या किल्ल्यांत ठेवून कूर्गच्या सुबय्या नांवाच्या ब्राह्मण खजिनदाराला सुभेदार नेमण्यांत आलें व मर्कारांच्या किल्ल्यावर मुसुलमान शिबंदी ठेवण्यांत आली. प्रजेला हें सहन न होऊन त्यांनीं १७८२ त बंड करून मुसुलमानांना घालवून दिलें. हैदर त्या वेळीं कर्नाटकांत अर्काटकडे इंग्रजांशीं युद्ध करण्यांत गुंतला होता व पुढें लवकरच (१७८२) मरण पावला; त्यामुळें बंडाचें पारिपत्य होऊं शकलें नाहीं.

पुढें १७८४ त टिपूनें ज्यावेळीं नगर येथें इंग्रज सेनापति माथ्यू व त्याचे अधिकारी यांना पकडलें व मंगलोर घेतलें, त्यावेळी पट्टनास तो परत जाताना त्यानें कोडगु लोकांचें शांतवन केलें. त्यावेळीं वरील दोन राजपुत्र व राजकुटुंब हें पेरिया पट्टणास कैदेंत होतें. तेथें त्याचा छळ होत असे. त्यामुळें पुन्हां प्रजा खवळून तिनें बंड केलें. टिपूनें १५ हजार सैन्य त्यांच्यावर धाडलें पण तिनें त्याचा पुरा मोड केला. तेव्हा टिपू स्वतः चालून आला व तह करण्याच्या मिषानें त्यानें मुख्य सरदारांनां तलेकावेरीस बोलाविलें व ते तेथें आले असतां त्यांना विश्वासघातानें कैद करून त्यांनां व त्यांच्या बायकामुलांनां पट्टणास पाठवून दिलें. तेथें त्यांनां व पुष्कळशा (एकंदर ७० हजार) कोडगू लोकांनां त्यानें जुलुमानें बाटविलें व सापडेल तेथें कोडगू लोकांना बाटविण्याच्या किंवा ठार मारण्याच्या अटीवर सारा कूर्ग प्रांत त्यानें मुसुलमान सरदारानां जहागीर दिला, आणि मर्कारा, कुशालगड वगैरे ठाण्यांत शिबंदी ठेवली आणि नागप्पा यास दिवाण केलें. पुढें त्याच्यावर लांच खाल्याचा आरोप आल्यावरून तो पळून गेला.

याप्रमाणें देशाची स्थिति असता, १७८८ त (डिसेंबर) वीर राजेंद्र वोडेयर यानें आपली बायकामुलें व लिंग राजा आणि अप्पाजी हे दोघे भाऊ यांसह प्रियपट्टण येथून आपली (सहा वर्षांच्या तुरुंगवासानंतर) सुटका करून घेतली. लगेच कूर्ग लोक त्याच्या भोंवती जमा झाले व सर्व प्रदेश त्याच्या ताब्यांत आला. त्यानें आपलें कुटुंब कर्चो नांवाच्या एका सुरक्षित जागीं ठेविलें होतें व तो मुसुलमानांवर स्वाऱ्या करीत होता. परंतु त्याचा शत्रु कोटी आरास यानें त्या कुटुंबावर बेरड वगैरे पाठवून त्याचा सत्यनाश केला. टिपूनें कूर्गवर गुलामअलीबरोबर मोठें सैन्य पाठविलें. त्यानें तिकडे पुष्कळ जाळपोळ केली. इतक्यांत पश्चिम किनाऱ्यावर मल्याळी राजांनीं बंड केल्यामुळें गुलामअली तिकडे गेला.

परत जातांना गुलामअलीच्या सैन्याचा बराच नाश वीरराजेंद्रानें केला. तेव्हां टिपूनें बदरीजमाल याला पुष्कळ सैन्यानिशीं राजावर धाडलें. परंतु त्यालाहि अडचणीच्या मार्गांत गांठून राजानें त्याच्या सैन्याचा नाश केला. तेव्हां तो कसा तरी मर्कारा येथें जाऊन पोहोंचला. याच वेळीं टिपूवर इंग्रज–मराठे–निजाम चालून आले होते. त्यामुळें तो मोठ्या संकटांत अडकला होता. मुंबईचा इंग्रज अॅबरक्रॉबी हा जलमार्गानें पट्टणावर येत होता. घांटावरील रस्ता कुर्गच्या राजाच्या हद्दींतून होता. त्यामुळें इंग्रजाला त्याच्या सख्याची अतीशय जरूरी भासली. तसेंच वीरराजालाहि टिपूविरुद्ध कोणाची मदत पाहिजे होती. यावेळीं तेलिचेरी येथें अॅबरक्रॉबी होता व वीरराजाचा एक हस्तक मध्यभट म्हणून तेथें होता. त्याच्या बरोबर इंग्रजानें राजास आपली मैत्री असावी म्हणून विनंतीपत्र पाठविलें. राजानें तें कबूल केलें व तेलिचेरी येथें इंग्रज व राजा यांत स. १७९० च्या आक्टोबरांत तह झाला. त्यांत पुढील मजकुराचें पहिलें कलम होतें "जोपर्यंत सूर्य चंद्र आहेत तोपर्यंत तह करणाऱ्या उभय पक्षाकडून आपापलें वचन कधींहि मोडलें जाणार नाहीं." बाकीच्या कलमांचा सारांश असाः- (१) टिपूचा नाश करण्यास राजानें इंग्रजास सर्वप्रकारें मदत करावी;(२) दुसऱ्या टोपीवाल्यांशीं संबंध ठेवू नये; (३) कुर्गच्या राज्याचें स्वातंत्र्य रक्षण करण्यास कुंपनी जामीनदार आहे. टिपूशीं इंग्रजांचा सल्ला झाला तरी त्याच्यापासून राजाचें व राज्याचें रक्षण कुंपनी करील तोपर्यंत कुटुंबासुद्धा राजानें तेलिचरीस रहावें इ. इ. यानंतर राजानें इंग्रजास बरेचसे घोडे (दीड हजार) व जनावरें आणि दाणागोटा पुरवून आपल्या राज्यांतून जाण्यास परवानगी दिली; व स्वतः हेगला घाटानें सैन्य पार करून घेऊन आपण इंग्रजांबरोबर थेट पट्टणापर्यंत गेला. तेव्हां टिपूनें आपला वसूली खात्याचा अंमलदार पूरनय्या याजबरोबर स्वदस्तुरचें पत्र राजास पाठविलें कीं, इंग्रजांस सोडून आपल्याला मदत करावी. त्यास राजानें नकाराचें उत्तर पाठविलें.

यावेळीं टिपूनें बंदींत ठेविलेल्या १२००० कोडगू लोकांनीं आपली सुटका करून घेऊन आपला देश परत मिळविला. तेव्हां टिपूला मराठे, निजाम व इंग्रजांशीं तह करणें भाग पडून आपल्या राज्यांतील अर्धा मुलूख त्यांनां द्यावा लागला व कूर्गवरील त्याची सत्ता नाहींशी झाली. मात्र वीरराजा इंग्रजांचा कायमचा मांडलीक बनला. ती हकीकत अशीः-इंग्रजानें राजास सांगितलें कीं, आम्ही तुमचें टिपूपासून रक्षण केल्याबद्दल यापुढें तुम्हीं आम्हांस

दरसाल खंडणी द्यावी. हें ऐकून राजास राग आला. झालेल्या तहांत असें कलम नव्हतें. शिवाय राजा हा टिपूचा मांडलिकहि नव्हता. तेव्हां तडजोड म्हणून ऑबरक्रॉंबीनें पुढील करारपत्र कंपनीच्या तर्फे लिहून दिलें (१७९३):- " कूर्ग संस्थान स्वतंत्र असून त्यानें टिपूस खंडणी दिली नव्हती; परंतु तेथील राजा स्वतःच कंपनीनें आपलें टिपूपासून रक्षण केल्याबद्दल कंपनीस सालीना ८ हजार पागोडा (१ पागोडा म्हणजे ८ आणे) उत्पन्न देण्यास तायार आहे. कंपनीहि कुर्गच्या राज्यांत ढवळाढवळ करणार नाहीं व त्रास देणार नाहीं. " याप्रमाणें इंग्रजानें पहिला तह मोडून राजास आपला मांडलिक बनविलें व नाइलाजानें राजा त्यास कबूल झाला.

ज्या ठिकाणीं वीरराजाची इंग्रज सेनापति ऑबरक्रॉंबी याशीं प्रथम गांठ पडली त्याठिकाणीं त्यानें वीरराजेंद्र पेठ हें गांव वसविलें. नाटकनाडू येथें त्यानें राजवाडा बांधला. पुढें १७९४ त दुसरें लग्न केलें, टिपूनें वीरराजाचा खून करविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले पण ते सर्व निष्फळ झाले. टिपूशीं झालेल्या शेवटच्या युद्धांत वीरराजानें इंग्रजांस सामान पुरविण्याच्या कामीं चांगली मदत केली. कूर्गमध्यें इंग्रजानीं अजाऱ्यांसाठीं इस्पितळें उघडलीं. याबद्दल श्रीरंगपट्टण पडल्यानंतर त्याला कांहीं जयचिन्हें मिळालीं (या लढाईत तो स्वतः लढत होता). परंतु प्रियपट्टण त्याच्या हातचें गेल्यामुळें त्याला वाईट वाटलें. दक्षिणकानडामधील बेल्लारी व पंजे हे प्रदेश मात्र त्याला मिळाले. यापुढें इंग्रजानीं राजाकडून खंडणी न घेतां हत्ती घेण्याचें ठरविलें. १८०७ मध्यें त्याची बायको निपुत्रिक वारल्यामुळें, आपल्या गादीला वारस उत्पन्न होण्याची त्याची आशा खुंटून त्याचा स्वभाव चिडखोर व रागीट बनला.

त्यामुळें त्यानें पुष्कळ अमर्याद कृत्यें केलीं. आपल्याला कोणी विष घालील म्हणून तो नेहमीं सावध असे. त्यानें १८०७ मध्यें आपल्या घराण्याचा इतिहास लिहविला. त्याचें इंग्रजी भाषांतर ऑबरक्रॉंबीनें केलें आहे. राजानें रागाच्या भरांत आफ्रिकन शिपायांकडून पुष्कळांचे वध करविले; यामुळें राजवाड्याच्या रक्षकांनीं व सैन्यांतील कामगारांनीं त्याला मारण्याचा कट केला. परंतु वेळींच त्याला त्यासंबंधीं सूचना मिळून त्यानें आपल्या गादीवर लोड ठेऊन त्यावर पांघरूण घातलें व आपण दुसरीकडे गेला. इकडे मारेकऱ्यांनां राजा निजला आहे असें वाटून त्यांनीं लोड कापून काढिला. पण राजा निसटून गेला आहे असें त्यांनां कळून येतांच ते गर्भगळित होऊन गेले. मग राजानें आपल्या आफ्रिकन शिपायांकडून किल्ल्याचे दरवाजे बंद करवून तीनशे कूर्ग लोकांची कत्तल करविली. या कृत्यामुळें इंग्रजांचें आपल्यासंबंधीं मन वाईट होईल अशी राजास भीति पडली. आपल्या पाठीमागून राज्याचा वारसा आपल्या मुलीकडे जावा अशी आपली इच्छा असल्याचें त्यानें गव्हर्नर जनरलास कळविलें; परंतु तिकडून उत्तर येण्यास विलंब लागल्यामुळें मुलीनां राज्य मिळण्यास अडचण पडूं नये म्हणून त्यानें आपल्या भावास मारण्याकरितां मारेकरी पाठविले; परंतु लवकरच शुद्धीवर येऊन लिंगराजाला मारण्यापूर्वी त्यानें आपला हुकूम परत घेतला. अप्पाजी त्याच्या अगोदर मारला गेला होता. तो भ्रमिष्ट झाला असावा. कारण त्यानें स्वतः ११२ वेळ आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता व एके वेळीं विषप्राशनहि केलें. त्यावेळीं त्यानें एक वारसपत्र लिहून ठेवलें. त्यांत म्हटलें होतें कीं मी मेल्यावर माझें राज्य माझ्या लेकवळ्यांपैकीं राजशेखर व शिशुशेखर यांस द्यावें.पण त्यानंतर त्याला आणखी मुली झाल्या. त्याला एकंदर चार मुली होत्या. तेव्हां लेकवळ्यानां राज्य न देता या मुलींच्या मुलानां वडिलकीच्या अनुक्रमानें राज्य द्यावें व घराण्याचें संरक्षण इंग्रजानें करावें असें मृत्यूपत्र त्यानें तयार करून ठेविलें. शेवटपर्यंत तो अस्वस्थच होता. मृत्युपत्राची नक्कल करून त्यानें ती खजिन्यांत ठेवली होती. सरतेशेवटीं १८०९ मध्यें जूनच्या नवव्या तारखेस त्यानें आपली लाडकी मुलगी देवम्माजी हिजपाशीं राज्याचा शिक्का मोर्तब दिला. पुढें तो लवकरच मरण पावला.

मध्यंतरीं लिंगराजानें इंग्रजांच्या मदतीनें कूर्ग लोकाचें पाठबळ मिळवून देवम्माजीकडून राज्य बळकाविलें (इ. स. १८११). वास्तविक वीरराजानें मृत्युपत्रांत ठरविल्याप्रमाणें इंग्रजांनीं देवम्मा हिला गादीवर बसवावयाचें होतें परंतु तें त्यांनीं केलें नाहीं. वेल्स्लीनें तसें कबूल केलें होतें; परंतु तें कागदपत्रातच राहिलें. त्या प्रांतातील धार्मिक चालीरीतींप्रमाणें मुलीचा हक्क वारसदार म्हणून चालत असे. वीरराजानें देवम्माजीकरितां मुंबई व कलकत्ता येथें इंग्रजाजवळ ठेवलेल्या ठेवीच्या रकमा (५॥ लाख रु.) मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु इंग्रजानीं त्या रकमा न देता त्यांचें व्याज मात्र त्यास द्यावयाचें कबूल केलें. तो १८५० त मरण पावला. यानें आपला दिवाण कुशरीआपा याच्या मदतीनें प्रथम पुष्कळ मसलती केल्या. परंतु पुढें त्याला काहीं आरोप ठेवून त्याच्या आप्तेष्टांसह व बऱ्याचशा लोकांसहि राजानें ठार मारिलें. वीरराजाप्रमाणें यालाहि विषप्रयोगाची भीति वाटे. कदाचित त्याला कोणीं विषप्रयोग केलाहि असेल. कूर्गप्रांतांत जारणमारण विषप्रयोग नेहमीं होत असत. लिंगराजा कर्तेबगार असून त्यानें किल्ल्यांची डागडुजी व जमिनीची मोजणी करविली होती. त्याची प्रजा त्याला अतिशय भीत असे. त्याच्या परवानगीशिवाय त्याच्या हद्दींत कोणासहि शिरतां येत नव्हतें. इंग्रजांचें व कोडगू लोकाचें त्यानें दळणवळण बंद केलें होतें. त्याच्या राणीनें हिरकणी खाऊन आत्महत्या केली.

लिंगराजानंतर त्याचा मुलगा वीर राजा गादीवर बसला. हा दुर्व्यसनी व अत्याचारी होता. कुंतबसव या प्रधानाच्या सल्ल्यानें तो चालत असे. देवम्माजी व आपल्या घराण्यापैकीं उरलेलीं दुसरीं सर्व नातेवाईक माणसें त्यानें मारविलीं. त्यानें १८३२ त एक स्त्रियांची पलटण उभारली होती. त्याचें व इंग्रजांचें वांकडें आलें तेव्हा त्यानें आपल्या राज्यांत सर्वत्र जाहीरनामे लाविले कीं, इंग्रज हे हिंदुस्थानांत येऊन हिंदु व मुसुलमान या उभयतांच्या धर्मांचा नाश करीत आहेत; तर सर्वांनीं एकत्र होऊन हालेरीवंशाचें संरक्षण करून इंग्रजांस हांकलून द्यावें. यानंतर १८३४ त ब्रिटिश फौज कूर्ग प्रांतावर चाल करून गेली व राजा नलकनाद येथें निघून गेल्यामुळें व त्यानें लढाई तहकूब केल्यामुळें कूर्ग प्रांत इंग्रजांनीं बंदुकीचा एकहि आवाज न काढतां आपल्या राज्यास जोडला. दिवाण बापू यानें आपण होऊन राजधानी इंग्रजाच्या हवालीं केली (१८३४ एप्रिल १०). फक्त वेप्पाडच्या सुभा अप्पाचन्ना यानें इंग्रजांच्या एका फौजेचा पराभव करून तिचा मुख्य मिलर यास ठार केलें. एवढीच काय ती लढाई झाली. कूर्ग प्रांत ७ मे १८३४ रोजीं खालसा केला. वास्तविक राज्य खालसा करण्याचें काहीं कारण नव्हतें. राजा पदच्युत करून त्याचा मुलगा गादीवर बसविला असता तर चाललें असतें. ज्या वीरराजानें इंग्रजांनां टिपूच्या मोहिमेंत संकटकालीं मदत केली त्याच्या नंतर तिसऱ्या पिढींतच ती मदत विसरून इंग्रजांनीं हें राज्य खालसा केलें.

पुढें राजाला वेल्लोर येथें पाठविण्यात आलें व नंतर बनारस येथें रहाण्याची परवानगी त्यास मिळाली. १८५२ त तो आपली मुलगी गौरम्मा हिच्यासह विलायतेस गेला. तेथें त्यानें आपल्या मुलीला ख्रिस्ती धर्म देवविला व पुढें तिचा विवाहहि एका इंग्रजाबरोबर करून देण्यात आला होता. हिला एक मुलगी होऊन ही १८६४ त मरण पावली. हिच्या मुलीचें लग्न १८८२ त क्याप्टन यार्डले याच्याशीं झालें परंतु लग्नानंतर मुलगी व तिचा बाप क्याबेल हे नाहींसे झाले. याप्रमाणें या घराण्याचा शेवट झाला. काशीस ठेवलेल्या वीरराजाच्या मुलाची पुढील हकीकत समजत नाहीं. वीरराजा १८६३ त मरण पावला व त्याला लंडन येथें केन्सल ग्रीन स्मशानांत पुरण्यांत आलें.

१८३३ मध्यें वीरप्पा नांवाचा एक तोतया मनुष्य पुढें आला होता. संन्याशाच्या वेषांत अब्रबर हें नांव धारण करून लोकांना बंड करण्याला चिथावीत असल्यामुळें पकडला जाऊन, १८७० त तो बंगलोरच्या तुरुंगात मरण पावला. १८७७ त गौडांचें एक लहानसें बंड झालें होतें पण तें लवकरच शांत झालें.

१८८१ पासून कूर्ग प्रांत म्हैसूरच्या रेसिडेंटाच्या ताब्यात असून त्याला कूर्गचा चीफ कमिशनर असें म्हणतात. कूर्ग प्रांतांत पुढील तालुके, गावें व खेडीं आहेत. एकंदर प्रांताची लोकसंख्या मागें सांगितलीच आहे

तालुक्याचें नांव	क्षे. फ. चौ. मै.	लोकसंख्या(स.१९०१)
मर्कारा	२१६	२८६२०
नंजराजपट्टण	३५५	४२७२०
पादिनालकनाद	४००	२८६२०
येदेनालकनाद	२०१	४३४१२
निग्गतनाद	४१०	३७२३५
एकंदर	१५८२	१८०६०७

मर्कारा, वीरराजेंद्र पेठ, सोमवारपेठ, फ्रेजर पेठ व कोडली पेठ या ठिकाणीं म्युनिसिपालिटया असून येवढींच कायतीं मोठीं गावें आहेत. कूर्गमधील बहुतेक गांवें फार लहान असून त्यांची लोकसंख्या सरासरी ३५० ते ४०० पर्यंत पडेल.

१९०१ मध्यें बायकांचें पुरुषांशीं प्रमाण १०१ त १००० असें होतें. याचें कारण देशात पुरुष मजुरांची संख्या बरीच होती हें होय. ख्रिस्ती, मुसुलमान वगैरे लोकांत हें प्रमाण निरनिराळें आहे. कूर्ग लोकांत १००० पुरुषांस ९७९ स्त्रिया व लिंगायतांमध्यें १०३८ स्त्रिया असें प्रमाण आहे. [कोडगू लोकांच्यासंबंधीं माहितीकरितां "कोडगू" पहा.]

शेतकीः—कूर्गमधील जमीन सुपीक असून तेथें मुख्य पीक तांदुळाचें होतें. पाऊस बराच पडत असून ओढे व नाले पुष्कळ असल्यामुळें पाणी देण्याची कृत्रिम सोय करण्याची जरूरी नसते. पूर्वीं तांदुळाच्या खालोखाल वेलदोड्यांचें उत्पन्न महत्त्वाचें होतें व शेतकऱ्याकडून ठराविक दरानें सर्व माल सरकार खरेदी करीत असे. हल्लींहि शेतें सरकार खंडानें देतें. हल्लीं वेलदोड्याची किंमत फार उतरल्यामुळें जे लोक वेलदोड्याच्या मळ्यांवर अवलंबून असत, ते फार गरीब झाले आहेत. घाटमाथ्यावर व दऱ्यातील मळ्यामध्यें हीं झाडें आपोआप होतात. मोकळ्या जागेंत एखादें मोठें झाड फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यांत पाडलें असतां जमिनीच्या हादरण्यामुळें लहान झाडांना कोंब फुटून तिसऱ्या वर्षी बोंडें येतात व सप्टेंबर किंवा आक्टोबरमध्यें पीक मिळतें. या झाडांपासून ६।७ वेळ चांगलें पीक घेतां येतें. पुढें त्या झाडात जोर येण्याकरितां त्याच्यावर पूर्वीप्रमाणें मोठें झाड पाडावें लागतें.

गेल्या ५० वर्षांत कूर्ग प्रांतात कॉफीच्या लागवडीला बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. नलकनादजवळ मोपला लोकांनीं कॉफीची लागवड प्रथम सुरू केली असावी. यूरोपियन लोकांनीं पहिला मळा १८५४ त मर्कारा येथें सुरू केला. कॉफीच्या मळ्यापासून खात्रीनें व सहज पैसा मिळवितां येईल या समजुतीनें पुष्कळ लोकांनीं हा धंदा स्वीकारिला. त्यावेळीं तद्देशीय रहिवाशांपासून विकत किंवा सरकारकडून नुसतें विचारिलें असतां जमिनी मिळत; त्यामुळें कॉफीच्या लागवडीकरितां लाखो रुपये खर्च होऊं लागले. कॉफीस एक प्रकारचे किडे व दुसऱ्या नैसर्गिक अडचणीमुळें बराच त्रास

झाला, तरी पण म्हैसूर व इतर भागांतून मजुरांचा पुरवठा चांगला झाल्यामुळें या धंद्याची बरीच वाढ झाली. अलीकडे ब्राझिलमधून कॉफी येऊं लागल्यामुळें येथील कॉफीचा भाव उतरला व पुष्कळांनां आपले मळे सोडून द्यावे लागले.

केळीं व नारिंगें हीं येथील मुख्य फळें होत. पाळींव जनावरांनां येथील हवा चांगलीशी मानवत नाहीं. म्हैस, डुक्कर, गाढव, बकरा वगैरे प्राणी येथें चांगले असतात; परंतु शेळयांना मात्र हवा मानवत नाहीं.

भाताच्या जमिनीला दर एकरीं १ रु. ८ आ. ते ४ रु. ८ आ. व कॉफीच्या जमिनीला दर एकरीं ८ आ. ते २ रु. ४ आ. पर्यंत सारा पडतो.

जं ग लें:—राखलेल्या जंगलाचें क्षेत्रफळ जवळजवळ ५०० चौरसमैल असून दुसरीं संरक्षित जंगलें आहेत तीं येणें प्रमाणें:–घाट जंगलें: देवरकाडू (पवित्र रान), उरुद्वे (खेडेगांवीं जंगलें), व पैसारी (सरकारी ओसाड भाग).

धं दे व व्या पा र.—मोठे कारखाने कूर्गमध्यें मुळींच नाहींत. कूर्गमध्यें होणाऱ्या सुऱ्या साधारण बऱ्या असतात. उत्तर भागांत जाडेभरडें कापड व संटिवारसंटे येथे चांगलें कापड होतें. सोमवार पेठ व कोडली पेठ येथें थोडाबहुत व्यापार चालतो. दक्षिण कूर्गमध्यें गोणिकोप्पल, अम्मात्ति व सिद्दापूर; आणि उत्तर कूर्गमध्यें सुंटिकोप्प व संटिवारसंटे येथें मोठे बाजार भरतात. येथील मुख्य आयात मालः—रागी, हरभरा, तांदूळ, डाळी, साखर, मीठ, तेल व कापड. निर्गत मालः—कॉफी, वेलदोडे, तांदूळ, नारिंगें, चंदन, इमारती लाकूड व कातडीं.

द ळ ण व ळ णः—म्हैसूरमध्यें पेरियापट्टणपासून एक रस्ता पश्चिमेकडे फ्रेजरपेठ व मर्कारावरून, संपर्जा घाटातून मंगलोरकडे गेलेला आहे; व दुसरा रस्ता, सिद्दपूर आणि वीर राजेंद्रपेठवरून, पेर्यंबरी घाटातून तेलिचेरीपर्यंत जातो या दोन मुख्य रस्त्याशिवाय दुसरे लहान लहान रस्ते आहेत. म्हैसूरपासून मर्कारापर्यंत रोज मोटार जाते. माणसीं आठ रुपये भाडें पडतें.

रा ज्य का र भा रः—हा प्रांत प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारच्या हाताखालीं असून म्हैसूरचा रेसिडेंट हाच येथील चीफ कमिशनर असतो त्याचें मुख्य ठाणे बंगलोर येथें आहे. खुद्द कूर्गवर एक कमिशनर असून तो मर्कारा येथें रहातो. नंजराज पट्टण, मर्कारा, पादिनालकनाड, येदेनालकनाड, व कितग्गनाद असे कूर्गचे ५ तालुके असून त्यावर सुभेदार नेमिलेले आहेत. तालुक्याच्या विभागाना नाड; नाडाच्या विभागांना मागनी; व मागनीच्या विभागाला ग्राम असें म्हणतात.

शि क्ष णः—स. १९११ त येथें मुलांच्या ९१ शाळा व मुलींच्या ७ शाळा होत्या. शिवाय संस्थांपैकीं १ हायस्कूल, एक लोअर सेकंडरी स्कूल, व मर्कारा येथील ट्रेनिंग स्कूल असून बाकी सर्व शाळा प्राथमिक शिक्षणाच्या आहेत. उच्च शिक्षणाकरितां म्हैसूर, बंगलोर किंवा मद्रास येथें जावें लागतें. येथील लोकांच्या चालीरीतींत मोकळेपणा बराच आहे. कोडगूमध्ये स्त्रीशिक्षण बरेंच वाढलें आहे.

वै द्य की यः—मर्कारा व वीरराजेंद्र पेठ येथें सरकारी दवाखाने व नपोक्लू, गोनीकोप्पाळ, सोमवार पेठ, सुंटिकोप्प, सिद्दपूर आणि पोन्निपेठ येथें लोकलफंडातून चालविलेले दवाखाने आहेत.ताप व फुफ्फुसविकार हे येथील मुख्य रोग होत.

मो ज णीः—पहिली मोजणी केवळ भूगोलविषयक असून १८१७ त झाली. १८६२ ते १८७४ या वर्षांच्या दरम्यान मद्रासच्या मोजणीखात्यानें या प्रांताची स्थलवर्णनविषयक मोजणी व कॉफीच्या मळ्यांची मोजणी केली. १९०२ त या प्रांताची मोजणी व जमाबंदी झालेली होती.

[संदर्भ ग्रंथः— राईस-कूर्ग ग्याझे.; रिचलर–एथनॉग्राफिकल् कास्ट्स ऑफ कूर्ग; मेमॉयर ऑफ कोडगू सर्व्हे; म्यागलिंग–कूर्ग मेमॉयर; हार्डी–रिपोर्ट ऑन कूर्ग, कूर्ग सेन्सस् रि. १९११. स्मिथऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया; बील–ओरि. बायो. डिक्शनरी; गजेंद्रगडकर व नरगुंदकर–कूर्ग-प्रांताचा खरा इतिहास].

कूर्म.—विष्णूचा एक अवतार. या अवताराचें मूळ शतपथ ब्राह्मणात सापडतें. प्रजापतीनें कूर्मा (कासवा) चें रूप धारण करून प्रजोत्पत्ति केल्याची कथा त्या ग्रंथांत आहे. नंतरची कथा म्हणजे सत्ययुगांत विष्णूनें विश्वप्रलयाच्या वेळीं हरवलेल्या कांहीं अमोलिक वस्तू परत मिळण्यासाठीं कूर्माचा आवतार घेतला व मंदराचलाखालीं क्षीर समुद्रात अढळ राहिला. मग देवदैत्यांनीं वासुकीचा दोर मंदराभोंवतीं गुंडाळून समुद्रमंथन केलें. तेव्हां १४ रत्नें निघालीं. कूर्मावताराचें कूर्मपुराण स्वतंत्र विवेचिलें आहे. कासवासंबंधानें अर्थशास्त्रीय व प्राणिशास्त्रीय विवेचनासाठीं 'उरोगामी' विभाग ९ पृ. ८३ व 'कासव' विभाग ११ पृ. ४७२ पहा

कूर्मदास—हा पैठण येथील रहिवासी असून जातीचा ब्राह्मण होता. हा जन्मल्या दिवसापासून पागळा व थोटा असे. म्हणून याच्या मनात पंढरीस जाऊन पडावें असे आलें. पुढे हा एका कार्तिकी एकादशीस पंढरीस जाण्याच्या हेतूनें खुरडत खुरडत निघाला. अशा रीतीने जाता जाता कार्तिक शु० १० स लऊळ म्हणून करमाळें तालुक्यात त्याच्या आग्नेय दिशेस एक गाव आहे तेथें येऊन पोहोंचला. येथून पंढरपूर ९ कोस आहे. तेव्हां त्यानें पाहिलें कीं, आता एकादशीकरिता आपलें जाणें पंढरीस होत नाहीं. म्हणून यानें मनात देवाची प्रार्थना केली; आणि भक्तिपूर्वक वारकऱ्याबरोबर देवास निरोप सांगून धाडिला कीं, कृपा करून येथें येऊन मला दर्शन द्यावें. या निरोपाप्रमाणें असे सांगतात कीं, यास विठोबानें तेथे येऊन दर्शन दिलें. भक्तिविजयात (अ. १६) याची कथा वर्णिली आहे. याची समाधी हल्लीं लऊळ येथे आहे. याचा काल सुमारें शके १२३० चा होय. याची स्फुट कविता आहे. [भक्ति वि. सं. क. सू.].

कूर्मपुराण-अष्टादश पुराणांपैकीं पंधरावें.समुद्रमंथनाच्या वेळीं ज्या ऋषींनीं विष्णूची स्तुति केली त्या ऋषींनां विष्णूनीं आपल्या कूर्म (कासव) अवतारांत हें पुराण सांगितलें म्हणून याला कूर्मपुराण असें म्हणतात. कांहीं अंशीं विष्णुपुराणांतल्या प्रमाणेंच पुराणांतील मुख्य पांच विषयांची माहिती याहि पुराणांत दिली आहे. शिवाय विष्णूच्या अवतारांच्या अनेक कथा दिल्या आहेत; आणि मधूनमधून शिवाच्या कथा व स्तोत्रेंहि दिलीं आहेत. या पुराणाचे दोन भाग आहेत. पैकीं पहिल्या भागाच्या शेवटीं शिवाच्या २६ अवतारांचें वर्णन आहे. या पुराणाचें नांव व आरंभ यावरून हें वैष्णव पुराण असावें असें प्रथम एखाद्यास वाटतें, पण तसें नसून एकंदर हें पुराण शिव आणि दुर्गा यांच्या भक्तिपरच आहे. शिवाच्या शक्तींना स्त्रीदैवतें कल्पून त्यांच्या पूजाचे विधी या पुराणांत दिले आहेत.या गोष्टीवरून हें आज उपलब्ध असलेलें पुराण फार प्राचीन नाहीं असें उघड दिसतें. तसेंच अनेक पाखंडमतांपैकीं वाममार्गीय म्हणजे स्त्रीतत्वाचे पूजक आणि स्त्रीदैवतांचे पूजक यांची माहिती या पुराणांत दिली आहे. आणि या पंथाचा धार्मिक ग्रंथ 'यामलतंत्र' याचीहि माहिती यांत आहे.

पवित्र क्षेत्रें काशी (काशीमहात्म्य) व प्रयाग (प्रयागमहात्म्य) यांचें वर्णन व महत्व बऱ्याच मोठ्या प्रमाणांत पहिल्या भागांत दिलें आहे. दुसऱ्या भागाच्या आरंभीं ईश्वरगीता (भगवद्गीतेसारखी) सांगितली आहे. तांत ध्यानयोगानें परमेश्वर शिवाचें ज्ञान कसें होतें तें सांगितलें आहे. या गीतेनंतर व्यासगीता दिली आहे; तींत व्यास ऋषी सांगतात कीं, सर्व संस्कार व पवित्र आचरण केल्यानें सर्वश्रेष्ठ ज्ञान प्राप्त होतें आणि म्हणून गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यासी यांच्या धर्मा (कर्तव्यकर्मा)बद्दल विवेचन केलें आहे. कांहीं भागांत सर्व पापांबद्दलच्या प्रायश्चित्तविधींचें वर्णन दिलें आहे व पातिव्रत्यधर्माचा उल्लेख आला आहे. व त्याच्या समर्थनार्थ पुढें एक सीतेची गोष्ट (ही रामायणांत नाहीं.) सांगितली आहे. तींत अग्निदेवानें रावणाच्या हातून सीतेची कशी सुटका केली तें दिलें आहे.

या पुराणांतच सांगितलें आहे कीं, त्याच्या चार संहिता (ब्राह्मी, भागवती, सौरी, वैष्णवी) आहेत; पण ६०००० श्लोकांची ब्राह्मी संहिता मात्र आज उपलब्ध आहे. नीलमणी मुखोपाध्यायांनीं ती प्रसिद्ध केली आहे कलकत्ता(१८९०)याची श्लोकसंख्या १७००० आहे असा भागवतांत उल्लेख असून हीच संख्या १८००० असल्याचा मत्स्यपुराणांत उल्लेख आहे. [विंटरनिट्झ; विल्सन—कूर्मपुराण].

कृतवर्मा—सात्वत कुळांतील हृदिक राजाचा तिसरा पुत्र. भारती युद्धानंतर दुर्योधनाकडील जे तीन वीर वांचले व ज्यांनीं रात्रीच्या वेळीं पांडवशिबिरावर हल्ला केला त्या तिहींत हा एक होता. कृष्णाच्या अवतारसमाप्तीपूर्वी यादवांमध्यें जें परस्पर कंदन झालें त्यांत हा सात्यकीच्या हातून मरण पावला. [महाभारत स्त्रीपर्व अ. ११; मौसल. अध्याय ३].

कृति—पुरुकुलोत्पन्न हस्तिपुत्र देवमीढ अथवा द्विमीढ याच्या वंशांत जन्मलेल्या सन्नतिमान् राजाचा पुत्र. यानें हिरण्यनाभापासून प्राच्य सामाच्या सहा संहिता संपादल्या होत्या. प्राच्य सामांचा उल्लेख वैदिक ग्रंथांत आढळत नाहीं. याचा पुत्र नीपराजा [भाग. स्कं. ९, अध्याय २१].

कृत्तिका—एक नक्षत्रपुंज. यांत बारीक बारीक सात तारा आहेत. याचा एक झुबकाच दिसतो. कार्तिकांत या आवशीस उगवतात आणि त्या मावळावयास गेल्या म्हणजे पहाट होते. फेब्रुवारींत या आवशीस माध्यान्हीं येतात व तेव्हा खस्वस्तिकाच्या किंचित उत्तरेस दिसतात. कृत्तिकांची आकृति देशी वस्तऱ्यासारखी दिसते. सहावी व सातवी या तारा मिळून वस्तऱ्याच्या मुठीचें टोंक होतें आणि बाकीच्या तारांचें पातें होतें.

कृत्तिकांच्या सात ताऱ्यांचीं नांवें तै. ब्राह्मणात आलेलीं आहेत (ज्ञानकोश वि. ३ बुद्धपूर्वजग पृष्ठ १९० पहा). सांप्रत सातांपैकीं सहा तारा चांगल्या दिसतात व सातवी फार बारीक दिसते. पुराणादिकांत कृत्तिकांसंबंधानें कथा आलेल्या आहेत त्यांत त्या सहा आहेत. कालांतरानें कांहीं तारांच्या तेजांत फरक पडतो. त्याप्रमाणें वेदकालांत सातवी तारा चांगली स्पष्ट दिसत होती. पण ती पुढें बारीक झाली यामुळें पुराणग्रंथातील कथांत ती नाहींशी झाली; किंवा वेदकालापासूनच ती बारीक असावी. एक कोणास दिसते, न दिसते, म्हणून कांहीं कथांत सात आल्या व कांहींत सहा आल्या असें असेल. याविषयींच्या पौराणिक उल्लेखांत कार्तिकस्वामीची कथा फार प्रसिद्ध आहे. सहा कृत्तिका या त्याच्या माता होत म्हणून त्यास ' षाण्मातुर ' म्हणतात. सहांपासून त्यास सहा मुखें प्राप्त झालीं, म्हणून त्यास षडानन हें नांव पडलें. [ज्योतिर्विलास].

कृत्तिवास—बंगाली रामायण कर्ता. बंगाली रामायणांपैकीं अत्यंत लोकप्रिय रामायण कृत्तिवासकृत होय. आपल्या स्वतःसंबंधीं बरीच माहिती कृत्तिवासानें दिली आहे, त्यावरून त्याचा जन्म इ. स. १३४६ मध्यें चोवीस परगण्यांतील फुलिया नामक गांवीं झाला असून त्याचा आजा मुरारी ओझा हा श्रीहर्ष याच्या वंशांतील १९ वा पुरुष असून कृत्तिवासाचा बाप वनमाली नामक होता. कृत्तिवासानें आपले चुलते, भाऊ वगैरेंसंबंधीं बरीच माहिती दिली आहे. अकराव्या वर्षापासून तो एका शाळेंत जाऊन संस्कृत व्याकरण व काव्य शिकूं लागला. शिक्षण पुरें झाल्यावर गौडेश्वराकडून मान्यता मिळविण्याकरितां त्यानें संस्कृत पांच श्लोक रचून राजाकडे पाठविले. राजा खुष होऊन त्यानें कृत्तिवासास रामायण बंगाली भाषेंत आणण्याविषयीं सांगितलें व अशा रीतीनें बंगाली रामायणाचा जन्म झाला. तुळशीदासाच्या रामायणाची जशी लोकप्रियता उत्तरहिंदुस्थानांत

आहे तशी कृत्तिवासाच्या रामायणाची बंगाल्यांत आहे. [दिनेशचंद्रसेन-हिस्टरी ऑफ बंगाली लिटरेचर.]

कृप—गौतमकुलोत्पन्न शरद्वान् ऋषीचा तपोभंग व्हावा म्हणून इंद्रानें जानपदी नांवाची अप्सरा त्याच्याकडे पाठविली. तिच्या दर्शनानें त्याचें रेतपतन पावलें व त्यापासून जुळीं मुलें झालीं. या मुलांचें शंतनु राजानें कृपेकरून पालन केलें म्हणून कन्येस कृपी व कुमारास कृप (शरद्वत् ऋषीचा पुत्र) अशीं नावें पडलीं म्हणून यास शारद्वत व गौतमकुलोत्पन्न म्हणून गौतम असें म्हणत असत. कृपी द्रोणाचार्यास दिली होती. कृप हा पुढें धनुर्विद्येंत निपुण झाला, म्हणून कृपाचार्य हें नाव त्यास मिळालें. कौरवपांडवास द्रोणाचार्यापूर्वी हाच धनुर्विद्येचें शिक्षण देत असे. भारती युद्धात हा दुर्योधनाकडे होता व सर्व कौरव मरण पावल्यावर यास पाडवांनीं आपल्या जवळ आश्रय दिला होता.

हा चिरंजीवी असून पित्याच्या शरद्वान् या नावानेच सावर्णि मन्वंतरांत सप्तर्षींपैकीं एक होणार आहे [भाग. स्कं. ९ अ. २१. भारत आदिपर्व अ. १३०; कर्णपर्व. अ. ५४; सौप्तिकपर्व अ. १०; शल्य. अ. ४ वगैरे].

कृपाराम—(१)एक गणितज्ञ. बीजगणित,मकरंद,यंत्रचिंतामणि या ग्रंथावर याच्या टीका आहेत. वास्तुचंद्रिका या नांवाचा याचा एक स्वतंत्र ग्रंथ आहे. हा कृपाराम शके १४२० च्या सुमाराचा असावा [दीक्षित-भारतीय ज्योतिषशास्त्र]-

(२)लाला कृपाराम या नावाचा हा हिंदुस्थानी कायस्थ ब्राह्मण जयपूरकर सवाई जयसिंगाच्या पदरीं हुषार मुत्सद्दी म्हणून नांवाजलेला होता. यानें थोरले बाजीराव पेशवे व सवाई जयसिंग यांचा स्नेह घडवून आणला. तसेंच खानडौरान वजीर बाजीरावावर चालून आला असता(१७३७) यानें परस्परांचा कज्जा होऊं दिला नाहीं वगैरे कारणांवरून याला जयपुरास मराठ्यांतर्फे वकिलीच्या कामगिरीवर नेमलें. याचा मुलगा (तुळजाराम),नातू (सेवकराम) व पणतू (चिमणलाल व गुलाबराय) हेहि अखरपर्यंत मराठ्याचे वकील म्हणून निरनिराळ्या दरबारीं काम करीत होते. याची जात हिंदुस्थानी कायस्थ ब्राह्मण म्हणून रियासतकार देतात पण त्यांच्या या जातिनिर्देशाचा अर्थ लागत नाहीं. [मराठी रि. म. वि.]

कृमिसमूह—(वर्म्स) कृमि किंवा वळवळणारे जंतु ह्यांचा एक फार मोठा समुदाय बनलेला आहे. हा कृमिसमुदाय अनेक भिन्नजातीय कृमिवर्ग मिळून झालेला आहे व परस्पर भिन्न असे १२ वर्गांचे कृमी ह्यांचा समावेश यांत करण्यांत येतो. परंतु या वर्गांच्या प्राण्यांचा आपापसांतील संबंध अजून पूर्णपणें उलगडलेला नाहीं. ‘ कृमि ’ म्हणून संबोधिलेल्या सर्वसामान्य प्राण्यांचे दोन कृत्रिम भाग करतात. एका भागात वर निर्दिष्ट केलेले १२ वर्ग येतात. यांतील प्राण्यांच्या शरीराची ठेवण अशी बनलेली असते कीं, त्यांचें शरीर एकामागून एक अशीं लागलेलीं वलयें अथवा लहान लहान खंड यांचें झालेलें नसून तें सरसकट सपाट अथवा वर्तुलाकार अखंड असें झालेलें असतें. दुसऱ्या भागांत मोडणाऱ्या कृमिवत् प्राण्यांचें शरीर हें एकामागून एक अशी लागलेलीं वलयें अथवा लहान लहान खंड मिळून झालेलें असतें व तीं वलयें किंवा ते खंड आपणाला बाह्यतः मोजतां येतात. ह्या दुसऱ्या कृमिवत् प्राण्याचा एक स्वतंत्र वर्ग ‘ वलयांकित शरीरप्राणी ’ (ॲन्युलाटा अथवा अन्नेलिडा) असा करण्यांत येतो. कृमि ह्या प्रकरणात पहिल्या प्रतीच्या म्हणजे अखंड शरीराच्या कृमिसमूहाचा विचार करावयाचा आहे.

पृथ्वीच्या पाठीवर जे थोडे प्राणी अगदीं पहिल्यानें उदयास आले त्यांचीं शरीरें आकारशुद्ध असून त्याच्या शरीररचनेमध्यें तारकितागसादृश्य प्राधान्येंकरून आढळून येतें. परंतु ह्याच प्राण्यापैकीं काहींनीं ती आपली आकारशुद्धता गमाविली व ज्यांचें कृमींमध्यें रूपांतर झालें त्यांनीं आपल्या शरीराचा एखादा एक विशिष्ट भाग एकाच दिशेनें नेहमी पुढें पुढें सरकविण्याचा प्रयत्न केला व त्यामुळें जरी त्यांचे तारकितांगसादृश्य नाहींसे झालें तरी त्यांना दुसरा एक अमूल्य फायदा झाला तो हा कीं, त्यांच्या शरीराला शीर्ष व पार्श्वभाग हे प्राप्त झाले. या पुढच्या भागावर किंवा शीर्षावर साहाजिकच आजूबाजूच्या व सभोंवारच्या पदार्थांचा पहिल्यानें संस्कार होऊन त्या भागांत ज्ञानग्राहक ज्ञानपेशी विशेष पूर्णतेस आल्या व त्या भागांत शीर्षज्ञानकंदा(सेरिब्रल गॅंग्लिअन)चा उदय झाला. या अमल्या क्षुद्र कृमींच्या शीर्षज्ञानकंदाची उत्पत्ति व मेंदूचा आरंभ याच्यांत साम्य दिसून येतें हें सुज्ञ वाचकाच्या ध्यानांत आलेंच असेल. कारण डोकें पुढें पुढें हलविण्याची ही फायदेशीर संवय व मेंदूची घटना ह्याचा परस्पर निकट संबंध आहे असें दिसून येतें.

कृमिसमूहामध्यें आणि त्याच्या नंतरच्या सर्व वरिष्ठ प्राणिवर्गामध्यें दोन विशिष्ट गोष्टी आढळून येतात त्या दोन गोष्टी आद्यजंतु (प्रोटोझोआ), समुदित सच्छिद्र(पोरिफेरा) व शारीरांत्रिक गूहक (कोलेन्टेराटा) ह्या तिन्ही वर्गामध्यें मुळींच आढळून येत नाहींत. या दोन गोष्टी म्हटल्या म्हणजे कृमी व त्यांच्या वरिष्ठ वर्गांतील सव प्राण्यांमध्यें सांपडणारें मध्यास्तर (मेसोब्लास्ट) व शरीरगुहा (कोलोम) ह्या होत. बाह्यास्तर (एपिब्लास्ट) आणि अंतरास्तर (ह्यपोब्लास्ट) यांच्यामध्यें उत्तम प्रमाणांवर दिसणारें मध्यास्तर आणि पचनेंद्रियनलिकेपासून निराळी अशी शरीरगुहा आपणास यापुढें ह्यांच्यापेक्षा वरिष्ठ प्राण्यांच्या समुदायांत सदोदित आढळण्यांत येतील. कृमिसमूहामध्यें त्या दोन गोष्टी हळू हळू दृश्यमान होत जातात. अगदीं कनिष्ठ दर्जाच्या कृमिकुलांत मध्यास्तर आणि शरीरगुहा बहुतेक नसतातच असें म्हटल्यास चालेल. कृमिसमूहांतील दोन संघाचा

येथें विचार करूं. हे दोन संघ म्हटले म्हणजे एक पर्णकृमि (प्लॅटिहेल्मिथीस) आणि दुसरा वर्तुलाकार कृमि (नेमाथेल मिंथीम) हे होत. या दोन संघाचा वलयांकित शरीरप्राणि (अन्युलाटा)संघाशीं कांहीं संबंध नाहीं; कारण या दोन संघातील कृमी अखंडशरीर असतात म्हणजे त्यांच्या शरीरात वलयांसारखे विभाग दिसून येत नाहींत.

प र्ण कृ मि सं घ—(प्लॅटिहेलिमन्थीज) पर्णकृमि या संघांत प्राण्याचें शरीर बहुतेक चपटलेलें असतें. ह्या संघ परंपरा असलेल्या तीन मुख्य वर्गाचा मिळून झालेला आहे व ते वर्ग टर्बिलेरियन्स ट्रिम्याटोडस व सेस्टोडस हे होत. याच्यात मध्यास्तराचा भाग वरून खालीं किंवा पृष्ठोदरतलरीत्या पॅरेंकायमा नावाच्या घट्ट पेशिसमुच्चयाचा बनून झालेला आहे. याच्यांत शरीरगुहा अशी बनलेली नसते, शीर्षाच्या भागात मेंदुवत शीर्षज्ञानकंदाचा आरंभ नुकताच झालला आढळतो. मलोत्सर्गाचें इंद्रिय शरीराच्या दोन्ही अंगाला दोन नळ्याच्या रूपानें बनलेलें असून त्या नळ्याना लहान लहान असंख्य फाटे फुटलेले असतात आणि या फाट्याच्या शेवटीं चमत्कारिक पेशी बनलेल्या असतात त्याना ज्योतपेशी (फ्लेमसेल्स) म्हणतात. ह्या संघातील बहुतेक सर्व कृमी उभयलिंगी आहेत. ह्या तीन वर्गांतील कृमींविषयीं कांहीं गोष्टी लक्ष्यांत ठेवण्याजोग्या आहेत त्या या कीं, बहुतेक सर्व टर्बिलेरियन कृमी जमिनीमध्यें अगर पाण्यामध्यें स्वतंत्र पणें राहतात. परंतु सर्व ट्रिम्याटोड वर्गातील कृमी परोपजीवी आहेत. म्हणजे त्यांचें स्वतःचें पोषण व उपजीविका दुसऱ्या एखाद्या प्राण्यावर अवलंबून असते. याच्यातील कांहीं कृमी दुसऱ्या प्राण्यांच्या शरीराला बाह्यतः घट्ट चिकटून असतात तर कांहीं कृमी दुसऱ्या प्राण्याच्या शरीरांत प्रवेश करून तेथेंच आपला काळ कंठितात असले दोन्ही तऱ्हेचे बाह्य व अंतःपरोपजीवि कृमी ट्रिम्याटोड वर्गात आढळतात. सेस्टोड वर्गातील कृमी दुसऱ्या प्राण्याला बाहेरून चिकटलेले नसतात, परंतु ते त्या प्राण्याच्या शरीराच्या आंतील भागीं कायमचें ठाणें देऊन बसलेले आढळतात. म्हणून सेस्टोड कृमीनां अंतःपरोपजीवी (इन्टर्नल पॅरासाइट) कृमी म्हणतात.

विशालकृमिसंघांतील सर्व कृमींमध्यें ज्योतपेशी आढळतात. मलोत्सर्जक नळ्यांच्या बारीक फांट्यांचें प्रत्येक टोंक एका पोकळ पेशीमध्यें शेवट पावतें व त्या पेशीच्या तळाला आंतून हालणारे नाजूक केस लागलेले असून ते एकसारखे दिव्याच्या ज्योतीप्रमाणें हालत असतात. म्हणूनच ह्या पोकळ पेशीनां " ज्योतपेशी " म्हणून संबोधण्यात येतें.

वर्ग प हि ला, ट र्बि ले रि या, लक्षणें:—यांतील कृमी अखंड शरीर असतात म्हणजे त्यांच्या शरीराचे बाहेरून वलयें किंवा दुसऱ्या तऱ्हेचे खंड झालेले असे विभाग पडलेले दिसत नाहींत. त्यांच्या शरीराचा आकार पर्णासारखा अथवा पानासारखा असतो. हे कृमी गोड्या किंवा सांठलेल्या अगर खाऱ्या पाण्यांत सापडतात. दलदलीच्या ओल्या जागेंतहि हे कधीं कधीं आढळतात. हे कृमी मांसाहारी आहेत. याच्यातील क्वचितच एखादा कृमि परोपजीवी असा आढळतो. ह्या कृमींच्या शरीराच्या रचनेंत विशेषतः पहिल्यानेंच उभयागसादृश्य आढळून येतें. बाह्यत्वचेवर केंसांची लव बनलेली असून त्यात पुष्कळ वेळा पिंडपेशी बनलेल्या असतात व " ऱ्हावडाइट " नावाचे लहान लहान दांडेहि झालेले असतात.

हे दांडे कृमीला डंवचल्यास बाहेर बाणासारखे उठतात. शरीराच्या पूर्वभागात ज्ञानकंदाची (ग्यांग्लियन)जोडी बनलेली असते; व त्या ज्ञानकंदापासून दोन ज्ञानरज्जू निघून शरीरात पसरतात. पचनेंद्रिय(फूड कॅनाल)नलिकेला बाहेर पडूं शकेल असें मासल गलविवर (फॅरिंक्स) असतें व तिला पुष्कळ फांटे फुटलेले असतात. परंतु नलिकेच्या शेवटीं गुदद्वार झालेलें नसून ती बंद असते. या कृमींच्या शरीरात रक्तवाहिन्या अगर श्वसनेंद्रियें आढळून येत नाहींत. शरीरगुहा जवळ जवळ झालेली नसतेच असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मलोत्सर्गेंद्रिय (एक्सक्रीटरी सिस्टिम) दोन उभ्या नळ्याच्या रूपानें झालेलें असतें व त्या नळ्याना असंख्य फाटे फुटलेले असतात व प्रत्येक फांट्याच्या शेवटीं " ज्योतपेशी " लागलेली असते. ह्या वर्गांतील बहुतेक सर्व कृमी उभयलिंगी असतात. यांचीं अंडीं कवचीनें अगर कोशानें झाकलेलीं असतात व परिपूर्णतावस्थेंत त्यांची वाढ होत असताना त्याच्यात वेळेवर रूपांतरें होत असलेलीं आढळून येतात. याच्यांतील कांहीं प्राण्यामध्यें प्रजाजनकत्व प्राणी विभागून जाऊन होत असतें. ह्या टर्बिलेरिआ कृमींमध्यें व शारीरांत्रैक गुहकामध्यें कांहीं आप्तसंबंध असावा असें दिसतें व विशेषंकरून यांच्यात व कंकतसमगात्रजीवांमध्यें तो जास्त असावा.

व र्ग दु स रा ट्रि म्मा टो डा लक्षणें:—यांतील कांहीं कृमी पर्णाकृति असतात व कांहीं नळकंड्यासारखे गोल असून ते बाह्य किंवा अंतःपरोपजीवी कृमी आहेत. त्यांच्या या परोपजीवी राहणीमुळें त्यांच्या आंगावर केसासारखी लव आढळून येत नाहीं; पुन्हा दुसऱ्या प्राण्याना बिलगून राहता येईल अशा तऱ्हेच्या तुंबडीवजा कित्येक चोषणतबकड्या लागलेल्या असतात व कित्येक वेळां या तबकड्यांनां आंकडे बनलेले असतात. यांस जाड असें बाह्यत्वचावरण बनलेलें नसतें व बाह्यत्वचाहि पुढें बहुतेक नामशेष होते. इंद्रियबोध होणारे अवयवहि झालेले नसतात. या वर्गातील कृमी, त्यांचे पूर्वज जे टर्बिलेरिया या वर्गांतील स्वतंत्र कृमी यांच्याप्रमाणेंच असावेत असा अंदाज आहे. कारण टर्बिलेरिया कृमींप्रमाणें ट्रिमाटोड कृमींमध्यें शरीर अखंड असतें, शीर्षज्ञानकंद व त्यांच्यापासून पूर्व व पश्चिम शेवटीं जाणाऱ्या दोन ज्ञानरज्जू असतात. शरीरगुहाहि अस्पष्ट असते व मलोत्सर्जक नळ्या व त्यांचे असंख्य फांटे

फुटणें या क्रिया आढळून येतात.तसेंच ट्रिमाटोड कृमी उभय. लिंगी असून त्यांचीं जननेंद्रियें गुंतागुंतीचीं बनलेलीं असतात. तथापि यांच्यामध्यें जननेंद्रियें, मलोत्सर्ग-इंद्रियें व ज्ञानेंद्रियें टर्बिलेरिया कृमींच्यापेक्षां जास्त पूर्णत्वानें विकास पावतात. पचनेंद्रियनलिका बहुतकरून दुभागून जाते व तिला पुष्कळ वेळां फांटे फुटतात व ती पश्चिमशेवटीं बंद असते. या वर्गांतील सर्व कृमी परोपजीवी असतात हें सांगितलेंच आहे. ते बाह्यपरोपजीवी अगर अंत:परोपजीवी असतात व ते एखाद्या सपृष्ठवंश प्राण्याला किंवा अपृष्ठवंश प्राण्याला चिकटलेले आढळतात. या वर्गांतील पुष्कळ असे आहेत कीं ते स्वतः स्वतंत्र रीतीनें फलद्रुप होऊं शकतात, तर दुसऱ्यामध्यें फलद्रुपता एकमेकाचा संयोग झाल्याशिवाय घडून येत नाहीं. बाह्यपरोपजीवी कृमी परिपूर्तितावस्थेंत सरळ सारखे विकास पावत नाहींत; व बहुतकरून त्याचा दर पिढींत थोडा फार विकास होत असतो. ज्या कृमीचा सरळ सारखा विकास होत नाहीं व ज्याची वाढ पूर्ण होण्यास दोन बाहेरचे परजीव लागतात ते कृमी आपल्या आयुष्याचा परिपूर्तितावस्थेंतील थोडा काल पुष्कळ वेळा एखाद्या अपृष्ठवंश प्राण्यामध्यें घालवितात.

ह्या कृमिवर्गांत यकृत-कृमी वगैरेसारखे प्राणी मोडतात. हे यकृत-कृमी मेंढरांच्या यकृतात व पित्तस्रोतसात आढळतात. त्यांच्यामुळें मेंढरांची फार हानि होते. या कृमींच्यामुळें होणाऱ्या रोगाला नुसत्या ग्रेटब्रिटनमध्यें १० लाख मेंढरें प्रतिवर्षीं बळी पडतात. हे कृमी घोड्यांमध्यें, हरणामध्यें, उंटामध्यें व इतर गुरामध्यें देखील आढळतात.

वर्ग तिसरः—सेस्टोडा या वर्गांतील कृमी दुसऱ्या प्राण्यांच्या शरीराच्या आत रहाणारे परोपजीवी प्राणी होत. यांच्या आयुष्यक्रमात दोन स्थित्यंतरें होत असतात. पहिल्या स्थित्यतराला प्रोस्कोलेक्स म्हणजे फुग्याची अवस्था म्हणतात. या सुमाराला हा कृमि अपृष्ठवंश अथवा सपृष्ठवंश यांपैकीं एखाद्या प्राण्यामध्यें सापडतो. दुसरें स्थित्यंतर म्हटलें म्हणजे स्ट्रोबीला म्हणजे नाडीकृमि अथवा फीतकृमिअवस्था होय. ह्या अवस्थेंत असलेला कृमि एका अपवादाखेरीजकरून सपृष्ठवंशातील प्राण्यांमध्येंच तेवढा आढळतो. ह्या वर्गांतील काहीं कृमींमध्यें शरीर अखंड असलेलें आढळतें. तर दुसऱ्यात बाह्यतः शरीर अखड दिसतें तरी आतून त्यांचीं जननेंद्रियें ओळीनें क्रमशः बनलेलीं आढळतात. दुसऱ्या पुष्कळ कृमींत शरीर सांखळीप्रमाणें अनेक तुकड्यांचें बनलेलें असून त्या तुकड्यास प्रोग्लॉटीडिझ् म्हणतात व प्रत्येक प्रोग्लॉटीडमध्यें जननेंद्रियांचे जोड झालेले असतात. तेव्हां ह्या वर्गांत अखंड शरीरांतून खंडसहित शरीरांत संक्रमण होत असलेले कृमी आढळतात. तरी पण या शेवटल्या प्रकारच्या कृमींत शरीराचे खंड स्पष्ट रीतीनें बनलेले नसतात

या वर्गांतील मुख्य उदाहरण म्हटलें म्हणजे लाब जंत हें होय. हा कृमि फितीसारखा लाबलचक असतो. ह्याचें शरीर म्हटलें म्हणजे अनेक खंडाची मिळून झालेली माळ होय. या प्रत्येक खंडाला प्रोग्लॉटीड म्हणतात. व ह्या प्रत्येक खंडात जननेंद्रियें बनलेलीं असतात. ह्या फितीसारख्या दिसणाऱ्या कृमीचें शरीर उभयागसदृश असतें. शरीराच्या पूर्वशेवटीं शीर्षाप्रमाणें भाग असून त्याला आकडे अगर खाचण्या असतात. तसेंच चोपणचकत्या लागलेल्या असतात. आकड्याच्या व चकत्याच्या साहाय्यानें ह्या कृमींना दुसऱ्या प्राण्याच्या पचनेंद्रियनलिकेला चिकटून राहता येतें. शरीरावरण अथवा शरीरभित्ति ही काहीं धातूंचे थर मिळून बनलेली आहे. तिचा बाह्य थर हा ज्ञानतंतुमय बाह्यत्वचेचा बनलेला असून त्यावर पातळ त्वक्पापुद्रा (क्यूटाइड) आलेला असतो. त्याच्या आतील थर सारख्या लाब व रुंद पेशीनिर्मित संयोजक धातूचा झालेला असतो व पुष्कळ वेळा याच्या पृष्ठावर चुनखडीक्षाराचें मिश्रण झालेलें असतें. या संयोजक धातूच्या थराच्या खालीं उभे व आडवे अशा रीतीनें लागलेल्या बिनपट्टयाच्या स्नायूंचा दुहेरी थर झालेला असतो. ज्ञानेंद्रियसमूह हा दोन अगर अधिक उभ्या ज्ञान रज्जूंचा मिळून झालेला असतो व त्या रज्जू पूर्वशेवटीं आडव्या ज्ञानरज्जूंच्यामुळें जोडल्या जातात. या प्राण्यांत विशिष्ट ज्ञानेंद्रियें बनलेलीं नाहींत. ह्याला पचनेंद्रियनलिका नसते व तिची त्याला गरजहि नाहीं. कारण हा कृमि दुसऱ्या प्राण्याच्या शरीरातील पचन झालेल्या अन्नरसात तरंगत असतो, व हा आपल्या शरीराच्या सर्व भागानीं तो अन्नरस शोषून घेतो. रक्तवाहिन्यासमूह किंवा श्वसनेंद्रियें ह्या कृमींमध्यें सापडत नाहींत. या प्राण्यात शरीरगुहा म्हटली म्हणजे सारख्या लांब रुंद पेशीनिर्मित संयोजक धातूच्या त्या पेशींनील विस्कळीत अंतरविरा ह्यांचीच बनलेली आहे. या शरीरगुहेमध्यें कोठें कोठें ज्योतपेशी असलेल्या आढळून येतात. ह्या ज्योतपेशी मलोत्सर्जक इंद्रियाच्या नळ्याच्या अगदीं बारीक फाट्याच्या शेवटीं लागून असतात. ह्या मलोत्सर्गनळ्या शीर्षामध्यें एकमेकाशीं आडव्या वर्तुलाकार नालिकेनें जोडल्या जातात. तसेंच एका आडव्या नालिकेनें त्या शरीराच्या प्रत्येक खंडामध्यें जोडल्या जातात व शरीराच्या शेवटीं एक किंवा अधिक रंध्रानीं उघडतात. सर्व प्रकारचे लाब कृमी उभयलिंगी आहेत व बहुतेकामध्ये अंडीं स्वतःच्या शरीरांतच स्वतःच्या शुक्रबीजाशीं संयोग पावून फलद्रुपता पावतात. पसरट असे बनलेले मुष्क एक शुक्रस्रोतस व त्याचा बाहेर काढता येण्याजोगा अंतिम शेवटचा भाग, ज्याचा शिश्नप्रमाणें उपयोग होतो तो, असे मिळून पंचननेंद्रिय झालेलें आहे. स्त्रीजननेंद्रियामध्ये दोन अंडकोश, बलकपिंड, कवचपिंड, योनिभागज्याच्यामध्यें शुक्रबीजाचा प्रवेश होतो तो.शुक्राशय-ज्याच्या

मध्यें शुक्रबीज साठलें जातें तें-व गर्भाशयाचा भाग, ज्याच्यांत अंडी विकास पावतात तो, इतक्याचा समावेश होतो. फलद्रुप झालेल्या अंड्यापासून गर्भ तयार होतो व तो प्रोस्कोलेक्स अथवा फुग्याची अवस्था ह्यांत स्थित्यंतर पावतो. ही अवस्था त्याला दुसऱ्या विवक्षित प्राण्याच्या शरीरांत प्राप्त होते व ह्या अवस्थेंत शीर्षाचा भाग घडला जातो. ही प्रोस्कोलेक्स अथवा फुग्याची अवस्था पावलेला कृमिगर्भ ज्या प्राण्याच्या शरीरांत बनतो तो प्राणी दुसऱ्या एखाद्या प्राण्याकडून खाल्ला गेल्यास त्या दुसऱ्या प्राण्याच्या पोटांत ह्या कृमींची दुसरी मांसास येणारी अवस्था पूर्णत्व पावते. ह्या दुसऱ्या स्थित्यंतरास स्कोलेक्स म्हणतात व त्यापासून लावकृमि अथवा नाडीकृमि बनून तयार होतो. एकंदरींत हे कृमी अंतःपरोपजीवी प्राणी असल्याकारणानें यांच्यांत बाह्यवस्तूला अडकून रहाण्याची अवयवरूपी साधनें बनलेलीं असतात. तसेंच त्याच कारणामुळें यांच्यांत विशिष्ट ज्ञानेंद्रियें झालेलीं नसून ज्ञानेंद्रियसमूह थोडासा गुंतागुंतीचा बनलेला असतो. तरी तो खालच्या दर्जाचा आहे. यांची पचनेंद्रियनलिका बनलेली नाहीं व ह्या प्राण्यांत फलद्रुपता विपुलतेनें आढळून येते.

लाव जंत.--(टीनिआसोलियम) लावजंत अथवा नाडीकृमि याला इंग्रजी भाषेंत टेपवर्म म्हणतात. ह्या कृमि वर सांगितल्याप्रमाणें फितीसारखा लांबलचक असतो. याचा रंग पांढरा असतो. पूर्ण वाढ झाल्यावर याची लांबी सहा फूट भरते. ह्या कृमीनें शीर्ष मनुष्याच्या पचनेंद्रियनलिकेच्या आंत्राच्या भित्तीला रोवलेलें आढळतें. मनुष्यप्राण्याला ह्या कृमीमुळें फार त्रास पोंचतो व विशेषतः डुकराचें मांस खाणाऱ्या लोकांनां ह्याचा गुरुत्वेंकरून उपद्रव होतो. ह्या कृमीला त्याचा आयुष्यक्रम पुरा करण्यास त्याच्या आयुष्यांत दोन निराळ्या जातीच्या सस्तन प्राण्याचा आश्रय करावा लागतो. काहीं काळपर्यंत हा कृमि डुकराच्या पोटामध्यें अथवा मांसामध्यें सांपडतो व नंतर तो मनुष्याच्या पोटामध्यें पूर्णावस्थेंत आढळतो. ह्या कृमीचें शरीर सांखळीप्रमाणें असून त्या सांखळीची प्रत्येक कडी ही ह्या कृमीच्या शरीराचा एक स्वतंत्र भाग किंवा खंड होय. ह्या भागाला अथवा खंडाला प्रोग्लॉटीस म्हणतात. पूर्वेशेवटीं शीर्ष असतें. शीर्षाच्या चौहों अंगाला चोपणचकत्या असतात. व त्याच्या वरच्या अंगाला एक आकड्याचें चक्र बनलेलें असतें. या आकड्याच्यामुळें तो आपलें डोकें मनुष्याच्या अंगाच्या भिंतींत खुपसतो. प्रत्येक प्रोग्लॉटीस खंडामध्यें जननेंद्रियाचे सर्व भाग पूर्णपणें झालेले असतात. याच्या शरीराच्या पश्चिम शेवटाचीं प्रोग्लॉटीस खंडें काहीं वेळानें तुटून निराळीं पडतात व हीं निराळीं झालेलीं खंडें मनुष्याच्या पचनेंद्रिय नलिकेंतून मलद्वारावाटे बाहेर टाकलीं जातात. ह्या प्रोग्लॉटीस खंडांत लहान लहान अंडीं तयार होतात व तीं फलद्रुप होऊन त्यांपासून अपक्व गर्भ टणक अंडकवचांनीं आच्छादित असे बनले जातात; व अशा अनेक टणक अंडकवचांनीं तो प्रोग्लॉटीस फुगला जातो. जेव्हां हा फुगून ताणलेला खंड फुटतो तेव्हां हीं अपक्व गर्भानें भरलेलीं अंडकवचें मोकळीं होतात. जर हीं अंडकवचें विष्ठाहारी डुकराच्या खाण्यांत आलीं तर डुकराच्या पचनेंद्रियनलिकेंत पाचक रसाच्या क्रियेनें त्यांचीं कवचें विरघळून जाऊनें त्यांतील अपक्व गर्भ, ज्यांनां बहुतकरून सहा आंकड्यांचें चक्र लागलेलें असतें असे, तेथें मोकळे होतात. हे सहा आंकड्याचे अपक्व गर्भ लागलेच त्यांच्या आकड्यांच्या मदतीनें डुकराच्या आंत्राच्या भित्तीला आरपार भोंक पाडून त्यांतून बाहेर पडतात व डुकराच्या मांसांत अथवा स्नायूंत किंवा दुसऱ्या अवयवांत जाऊन तेथें स्थिरता पावतात, व त्याच्या सभोंवतीं एक आवरण बनतें. येथें काहीं वेळानें त्याची पुढील वाढ होण्यास सुरुवात होते. त्याचे सहा आंकडे गळून पडतात व ते आकारानें वाढूं लागतात. नंतर ते अचल राहून त्यांचेंहि फुग्याच्या अवस्थेंत स्थित्यंतर होतें व या अवस्थेंत लिंगभेद झालेला नसून ते नुसते वाढते फुगे असे झालेले असतात. ह्या फुग्याच्या अथवा 'प्रोस्कोलेक्स' अवस्थेंत त्याच्या अंतःपृष्ठापासून एका ठिकाणीं एक कोंब निघून तो फुग्याच्या पोकळींत वाढूं लागतो व त्या कोंबाचें पुढें शीर्षामध्यें रूपांतर होतें. ह्या स्थितींत त्याला फुगा असलेला कृमि म्हणतात. व अशा स्थितीप्रत पावलेले हे फुगा-कृमी डुकराच्या मांसांत वास्तव्य करून रहातात. ज्या डुकराच्या मांसांत हे फुगाकृमी आहेत अशा डुकराचें दूषित मांस नकळत एखाद्या दुर्दैवी मनुष्याच्या खाण्यांत आलें तर ह्या फुगा-कृमीला आपली वाढ पूर्ण करून घेण्यास संधि मिळते. ती अशी कीं त्या मनुष्याच्या पचनेंद्रियनलिकेंत या फुगा-कृमीचा शीर्षाचा भाग बाहेर पडतो. हा धाकटासा कृमि त्याच्या शीर्षाच्या पाठीमागें थोड्या आंखूड मानेच्या भागानें त्या मोठ्या फुग्याला चिकटलेला असतो. नंतर हा फुग्याचा भाग निराळा पडून नाहींसा होतो. कां कीं तो कोणत्याही प्रकारें महत्वाचा नसतो व शीर्षाचा भाग आंत्रांत येऊन त्याच्या आकड्यांनीं आंत्राच्या भित्तीला चिकटून रहातो. येथें त्या शीर्षाला अन्नरसाचा पुरवठा पूर्ण मिळूं लागून तो सारखा वाढूं लागतो- त्याची पुढें वाढ होते. म्हणजे शरीराचे खंड एकामागून एक शीर्षाच्या भागापासून तयार झाले असतां पाठीमागें ढकलले जातात, व हे पाठीमागें सारलेले जुने खंड जितके शीर्षापासून लांब असतील तितके ते पक्व दशेंत येऊं लागतात, व त्यांच्यांत जननेंद्रियाची वाढ होऊं लागते. वर सांगितल्याप्रमाणें हे अगदीं शेवटले खंड त्याच्यांत अंडीं फलद्रूप झाल्यावर निराळे पडतात व मनुष्याच्या विष्टेबरोबर बाहेर निघतात. ही विष्टा डुकरानें खाल्ली असतां त्याच्या शरीरांत त्यांचा प्रवेश होतो व पुढें वर वर्णन केल्याप्रमाणें त्यांची वाढ होते. ह्यांच्यापासून मनुष्याला उपद्रव होतो. म्हणून ह्यांच्या विषयींचा माहिती महत्वाची आहे. ह्या जंतांचा उपद्रव होण्यास मध्यस्थी प्राणी डुकर होय. डुकराचें मांस

शिजविल्यावर त्यांच्यांत एखादा फुगाकृमि जिवंत राहिला तर तो तें मांस खाणाऱ्या मनुष्यामध्यें हटकून वाढून त्याला उपद्रव करितो.

टीनिआ मिडीओक्यानेलाटा हा जातिविशेषहि वरच्या-प्रमाणेंच " टेपवर्म " ह्या नांवानें संबोधिला जातो, व तो मनुष्याच्या अंगामध्यें वाढतो. ह्याच्या शीर्षाला आंकडे नसतात. ह्या जंताचा उपद्रव होण्यास मध्यस्थ प्राणी म्हटले म्हणजे गाई, बैल हे होत. गाईच्या किंवा बैलाच्या मांसांत ह्याचे फुगाकृमि बनतात व गाईचें किंवा बैलाचें मास खाणाऱ्यास ह्याचा उपद्रव होतो. ग्रेटब्रिटनमध्यें ह्याचा उपद्रव फार होतो.

टीनिआ ईकायनोकॉकस म्हणजे कुत्र्यांत व लांडग्यांत सांपडणारा " टेपवर्म " होय. त्याच्या शरीराला चार खंड असतात व चवथा खंड सर्वांत लांब असतो ह्याच्यापासून मनुष्याला उपद्रव होतो. मनुष्याच्या यकृतामध्यें किंवा दुसऱ्या अवयवांत पुळीचा विकार ह्याच्या गर्भाच्या फुग्याच्या स्थित्यंतरांमुळें होतो. दूषित पाणी प्याल्यानें हे अपक्व गर्भ कवचाच्छादित अंड्याच्या रूपानें मनुष्याच्या पचनेंद्रियनलिकेमध्यें शिरतात. पाण्यांतहि अशा तऱ्हेचीं अंडीं कुत्र्यांच्या किंवा लांडग्याच्या विष्ठेंतून प्रवेश करितात. पर्वतावरील पाण्यांचे डबकें ओहोळ वगैरे अशा रीतीनें दूषित झालेले असतात तेव्हां तेथले पाणी पिणें फार धोक्याचें आहे. हा कृमि कुत्रा किंवा लांडगा ह्याच्या शरीरात विकास पावतो व मनुष्य हा त्याचें स्थित्यंतर होण्यास लागणारा मध्यस्थ प्राणी होय.

व र्तु ला का र कृ मि सं घ (नेमॅथेल्मिंथिस):—ह्यातील कृमी आकारानें बहुशः लंबवर्तुलाकार असतात. म्हणून त्यांना वर्तुलाकार कृमी म्हणतात. या संघांतील खऱ्या वर्तुलाकार कृमींचा एक वर्ग आहे त्याला वर्तुलाकारकृमि किंवा जंत म्हणतात व या वर्गांतील जंत कांहीं अंतःपरोपजीवी आहेत तर दुसरे पुष्कळ जंत स्वतंत्रपणें गोड्या किंवा खाऱ्या पाण्यांत वावरणारे कृमी आहेत.

व र्तु ला का र कृ मि व र्ग.—(नेमॅटोडा) ह्या वर्गांतील कृमी शरीरानें अखंड असून त्यापैकीं कांहीं परोपजीवी आहेत तर कांहीं स्वतंत्रपणें कालक्रमणा करणारे आहेत. ह्या कृमींच्या शरीराच्या त्वचेवरील त्वक्‌पापुद्रा पुष्कळ वेळां घट्ट किंवा जाड असा बनलेला असतो व पुष्कळवेळां तो झडून पडतो किंवा टाकिला जातो. यांच्या शरीरांतील स्नायूंची रचना लांबट मांसपेशी उभ्या बनून झालेली असते व पार्श्व-भागीं दोहोंकडे त्यांच्यामध्यें अंतर राहून दोन बहीरेषा (लॅटरल लाइन्स) झालेल्या दिसतात. अन्ननलिकेसभोंवतीं ज्ञानरज्जूंचें एक वलय झालेलें असतें, व त्यापासून सहा ज्ञान-रज्जू शरीराच्या पूर्वभागीं जातात व सहा पश्चिमभागीं जातात. पचनेंद्रियनलिका चांगली विकास पावलेली असते व तिला मुख व गुदद्वार झालेलें असून तिचे तीन विभाग आढळून येतात. रक्तवाहिनीसमूह व श्वसनेंद्रियें बनलेलीं नाहींत व शरीरातील पोकळी हा शरीरगुहा नव्हे. मलो-त्सर्गाच्या इंद्रियांची रचना विलक्षण असून तीं दोन बाजूं-वर बनलेलीं असून त्या दोन्ही वाहिन्या पूर्वशेवटीं एकच सामान्य छिद्रानें उघडतात. या कृमींमध्यें बहुशः लिंगभेद झालेला असतो, ते क्वचितच उभयलिंगी आढळतात. जननें-द्रियें जरी साध्या प्रकारचीं बनलेलीं असलीं तरी नर व मादी ह्यांमध्यें ठळक भेद दिसून येतो. ह्या कृमींचा एकंदर आयु-ष्यक्रम गुंतागुंतीचा असतो विशेष लक्षात ठेवण्यासारख्या कांहीं गोष्टी आढळून येतात त्या ह्या कीं, त्याच्यामध्यें शुक्र-बीज मंदगति कामरूप पेशीप्रमाणें असतें, केशरूपी लव मुळींच झालेली नसते व फिरत्या रक्तश्वेतपेशी (मायग्रेटरी फॅगोसाइट्स) बनलेल्या नसतात.

जं त (अस्केरिस लुंब्रिकॉइड्स):—हे जंत मनुष्याच्या तन्वा-त्रात बहुशः सापडतात. ह्याच जातीचे दुसरे जंत घोड्यामध्यें बैलामध्यें आणि डुकरामध्यें सापडतात दोन्हीं शेवटीं निमु-ळती झालेली नलिका असते त्याप्रमाण ह्याच्या शरीराची आकृति बनलेली असते. व ह्याच्या कातडीला कोणताच दुसरा रंग नसतो. फक्त तीं पाढरी असते. पकारेडी म्हणजे ग्राऊस ह्या पक्ष्यांच्या नीचात्रांत अगदीं बारीक जंत असतात. ते जिवंतपणीं पारदर्शक असल्याकारणानें दिसून येत नाहींत. यांच्यात नर मादापेक्षा लहान असतें, व त्याच्या पुच्छाचा भाग अर्धवर्तुलाकार कमानीप्रमाणें वळलेला असतो, व त्याला दोन शृंगमय कंटक लागलेले असून त्याच्या पृष्ठावर पुष्कळ इंद्रियबोधक उंचवटे झालेले असतात. मादीमध्यें अंडीं अतो-नात तयार होतात व तीं तिच्या गर्भाशयाप्रमाणें असणाऱ्या अंडस्रोतसाच्या भागात शुक्रबीजाशीं संयोग पावून फलद्रूप होतात. फलद्रूप झाल्यानंतर त्या प्रत्येक अंड्यासभोंवती एक कवच तयार होतें व अशा स्थितींत तीं मनु-ष्याच्या विष्टेबरोबर बाहेर पडतात. हीं अंडीं विकास पावून त्यापासून जंत कसे तयार होतात याबद्दल संपूर्ण निश्चित माहिती ग्रथित नाहीं. तथापि कांहीं प्रयोगाच्या परिणामा-वरून इतकें निश्चितपणें म्हणण्यास हरकत नाहीं कीं ह्याचा मनुष्याला संसर्गदोष होतो तो स्वतंत्रपणेंच होतो ह्याच्या-मध्यें व मनुष्यामध्ये ज्याच्यापासून त्याचा त्याला संसर्ग जडेल असा कोणी दुसरा मध्यस्थ प्राणी नसतो. बहुतकरून परिपूर्तितावस्थेंतील वाढ होत असलेले व ज्याच्यात अपक्व गर्भ झालेला आहे असें अंडें पाण्यातून पाणी पित असतांना किंवा मातींतून चुकून व मातीच्या बरोबर मनुष्य आपल्या पचनेंद्रियांत घेतो व तेथें तो अपक्वगर्भ कवचा-पासून मोकळा होऊन पूर्णता पावतो अशा रीतीनें जंताचा उपद्रव होतो. मुलांनां माती खाण्याची संवय असते त्यामुळें जंतांचा उपद्रव त्यांनां विशेष होतो. ह्या कृमांमुळें बहुधा प्राणहानि होत नाहीं. तरी हे जंत

श्वासनालिकेंत अगर पित्तस्त्रोतसांत जर शिरले तर त्याचा परिणाम भयंकर होतो.

ऑक्सिसरिस व्हर्मिक्युलेरिसः—ह्या सामान्यतः आढळून येणाऱ्या कृमीला तंतुकृमि (थ्रेडवर्म) म्हणतात. मादी ½ इंच व नर ⅙ इंच लांबीचे भरतात. सर्व देशांत याचा विकार होत असलेला आढळतो मुलांनां यांच्यापासून विशेष त्रास होतो हा कृमि बहुतकरून बृहदांत्रांत व विशेषेकरून गुदाभर्ध्ये वास्तव्य करून असतो. रात्रीच्या प्रहरीं याच्या इतस्ततः संचारानें मलद्वाराला अतिशय कंड सुटते तसेंच जननेंद्रियांतहि कंड सुटते.

फिलेरिया सॅंगिविनिस होमिनिस अथवा फिलॉरिया बॅन क्रॉफ्टी फी ब्यान्कॉ फ्टाय हा कृमि आस्ट्रेलिया, चीन, हिंदुस्थान, ईजिप्त आणि ब्राझिल ह्या देशांत आढळतो. परिणामीं हा फार भयंकर आहे. हा कृमि तीन किंवा चार इंच लांब असून बारीक केसाप्रमाणें असतो; व त्याचे जथे बनतात. लसिका पिंडामध्यें हे वास्तव्य करून राहतात त्याचे गर्भ कवचयुक्त असून रक्ताभर्ध्ये रात्रीच्या प्रहरीं सांपडतात. हे गर्भमच्छर रात्रीं मनुष्याला चावले असतां त्याच्या रक्ताच्या द्वारें मच्छराच्या शरीरांत शिरतात. म्हणून मच्छर हा प्राणी ह्याचा मध्यस्थ होय. ह्या कृमींच्या संसर्गामुळें हत्तिरोग, (एलिफंटिआसिस) वारूळ अथवा त्वग्रोग होतो. शिवाय लघवींतून रक्त पडतें. ह्याचा उपद्रव मुख्यतः हिंदुस्थानांत व उष्ण कटिबंधातील प्रदेशांत होतो.

ड्रया कन्क्युलस (फीलेरिआ) मेडीनेन्सी सः-ह्या कृमीला नारू म्हणजे गीनिवर्म म्हणतात. ह्याचा प्रसार हिंदुस्थानांत किंबहुना एशिया, आफ्रिका, ईजिप्त देशांत आहे. ह्या कृमींमध्यें नर बहुशः आढळून येत नाहींत. मादी १३ इंचांपासून ३० इंचांपर्यंत लांब असते. शरीर नालिकाकार गुळगुळीत असून रंग पांढरा असतो तो त्वचेच्या खालीं संयोजक धातुमध्यें व विशेषेंकरून पायाच्या भागांत वास्तव्य करून राहते. यामुळें त्या भागाला सूज वगैरे येते व पुळी होऊन भोंक पडतें व दुसरे शारिरक परिणाम घडून येतात. त्या भोंकांतून पू बाहेर पडतो त्या पुवाबरोबर मादीनें घातलेलीं अंडीं व त्यांपासून अपक्क तयार झालेले डिंब बाहेर पडतात. हे डिंब जर पाण्यांत गेले—व तसें होणें अवश्यक आहे—तर ते पाण्यांत वावरणाऱ्या सायक्लॉप्स नांवाच्या एका जातीच्या सूक्ष्म संधिपाद प्राण्यांत शिरतात. ज्याच्यांत ह्या प्रकारचे सायक्लॉप्स आहेत असें पाणी मनुष्याच्या पोटांत गेले असतां हे डिंब वाढूं लागतात व हा रोग त्यांच्यांत उद्भवतो. तेव्हां सायक्लॉप्स हा येथें मध्यस्थ प्राणी होय. हा रोग खेड्यापाड्यात विशेष होतो. ह्याचें कारण खेडेगांवचीं माणसें अशुद्ध पाणी गरम केल्याशिवाय तसेंच पितात हें होय. [ले. रा. आठाव व प्रो. हाटे].

आयुर्वेदीय कृमि विज्ञान.—कृमी (शरीराशीं संबद्ध होत असलेले जंतू) दोन प्रकाराचे स्थूलभेदानें आहेत. एक त्वचेवर होणारे व दुसरे शरीराच्या आंत होणारे. ते सर्व कृमी कारणभेदानें चार प्रकारचे मानिले आहेत. बाहेरचे (घाम वगैरे मळांत), कफांत, रक्तांत व विष्ठेत; होणारे त्यांपैकीं बाहेरचे मळांत म्हणजे घाम वगैरेंत उत्पन्न होणारे कृमी हे तिळाएवढालेच असून रंगानेंहि तिळासारखेच असतात. त्यांस पाय पुष्कळ असून अतिशय बारीक असतात. त्यांची लिखा, व ऊवा अशीं नावें आहेत. हे डोक्यांत, केसांवर व अंगावरहि होतात. यापासून गांधी, पुळ्या, कंड व मोठ्या गांठी होतात.

हे कृमी मलिन वस्त्रें पांघरणाऱ्या व घामट असणाऱ्या माणसास होतात. किंवा कांहीं शारीरिक कारणांनीं (अजीर्ण, ताप, इत्यादि) शरीरांतून बाहेर पडणारे मळ (घाम वगैरे) यांमुळें स्वच्छतेनें रहाणाऱ्या माणसासहि होतात.

कृमी होण्याचीं कारणें खालीं लिहिल्याप्रमाणें:—अन्न जिरलें नसता जेवणें, गोड व आंबट फार व नेहमीं खाणें, पातळ पदार्थ जास्त खाणें, पिठाचे पदार्थ व गूळ जास्त खाणें, दिवसा झोंप घेणें, व्यायाम न करणें, दूध व मासे असे निषिद्ध संयोगी पदार्थ खाणें, हीं सामान्यतः कृमीचीं कारणें होत. विष्ठेत होणारे कृमी उडीद, पिठाचे पदार्थ, आंबट व खारट रस व गूळ आणि भाज्या यांनीं होतात. मांस, मासे, गूळ, दूध, दहीं, आंबलेले पदार्थ यांच्या सेवनानें कृमी होतात.

विरुद्धसंयोगी जेवण, अजीर्ण, भाज्या फार खाणें इत्यादि कारणांनीं रक्तांत कृमी होतात.

ताप, तोंडाचा रंग बदलणें, पोट दुखणें, हृदयांत दुखणें, आंग गळणें, भोंवळ, भात न आवडणें, अतिसार (शौचास पातळ होणें) हीं रक्तांत कृमी झाले असतां होणारीं लक्षणें आहेत.

कफामुळें आमाशयात कृमी होऊन ते वाढले म्हणजे सर्व आंतड्यांत पसरतात. ते फार मोठे, चामड्याच्या वादीसारखे लांब किंवा कांहीं गांडुळासारखे किंवा धान्याला आलेल्या मोडाएवढे लहानहि असतात. ते रंगानें पांढरे, तांबूस असतात. अंत्राद, उदरावेष्ट, हृदयाद, महागुद, चुरु, दर्भकुसुम व सुगंध अशीं त्यांचीं अन्वर्थक नावें आहेत. मळमळणें, लाळ सुटणें, अपचन, अरोचक, बेशुद्धि, ओकारी, ताप, पोट फुगणें, कृशता, शिंक येणें, व पडसें हे विकार कफजन्य कृमींनीं होतात. रक्त वाहणाऱ्या शिरांत रक्तांतील कृमी होतात. ते फार बारीक, पाय नसलेले, वाटोळे व तांबडे असतात. त्यांपैकीं कांहीं इतके बारीक असतात कीं ते डोळ्यांनीं दिसत नाहींत.

केशाद, रोमविध्वंस, रोमद्वीप, उदुंबर, सहमातर, सौरस मातर अशीं त्यांचीं सहा नावें आहेत.

विष्ठेपासून झालेले कृमी पक्काशयांत होतात. व ते गुदद्वारांतूनच बाहेर येतात. क्वचित प्रसंगीं ते फारच वाढले

तर ते अमाशयाकडे वळतात. त्यावेळीं रोग्याचे श्वासोच्छ्वास, ढेकर यांस विष्ठेची घाण येऊं लागते. ते कृमी जाड, वाटोळे किंवा चापट असतात. त्यांचा रंग काळसर, पिंवळा, पांढरा व काळा असा असतो. ककेरुक, मकेरुक, सौसुराद, वशुल आणि लेलिह्र अशीं त्यांचीं पांच नांवें आहेत. याच्यामुळें शौचास पातळ होणें, पोट दुखणें, पोट फुगणें, कृशता, पांडुरकेपणा, तेजोहीनता, रोमांच उभे रहाणें, अग्निमांद्य, गुदद्वारास कंड सुटणें हीं लक्षणें होतात.

ज्याच्या पोटात कृमी झाले असतील त्याचें स्नेहन व स्वेदन करून त्यास गूळ, मासे, दूध वगैरे खाऊं घालून त्याचा कफ व कृमी हे चाळवून रात्रीं तसेंच निजून दुसऱ्या दिवशीं सकाळीं गोमूत्रात निम्में पाणी घालून त्यात सुरसादि गणातील औषधांचा काढा करून त्या काढ्यांत पिंपळी, गेळफळ, व वावडिंगें याचा कल्क आणि तेल व सज्जीखार हीं घालून त्याच बस्ती द्यावा. नंतर पिंपळी, निशोत्तराचें रेचक द्यावें. पोटांतील कृमी बाहेर निघून जाण्याकरिता ओकारी, रेचकें व बस्ती हे उपाय आहेत. ओकारीचें व रेचक औषध दिल्यानंतर सुंठ, पिंपळमूळ वगैरे दीपन औषधांनीं तयार केलेली कण्हेरी, भात वगैरे द्यावें. तिखट, कडू व तुरट औषधाच्या काढ्याचें पोटावर सेचन करून अग्नि प्रदीप्त झाल्यावर अनुवासन (तेलाचा) बस्ती द्यावा. उंदीरकानीचा पाला पिठात मिसळून त्याच्या पोळ्या भाजून खाव्या. सैंधवमिश्रित ताक प्यावें. पोटांतील जंत पडून गेल्यानंतरही महिना पंधरादिवस कडू, व तिखट औषधांचें सेवन करावे म्हणजे पुन्हा कृमी होत नाहींत. डोक्यांतील कृमींवर नस्यें द्यावीं. रुक्ष भोजन करावें. रक्तांतील कृमींवर कुष्ठावरील औषधें द्यावीं. सर्व प्रकारचें दूध, मासे, तूप, गूळ, दहीं, पालेभाज्या आणि गोड व आंबट पदार्थ हे वर्ज करावे. [माधवनिदान]

कृषिकर्म किंवा शेती—कृषिकर्म हा शब्द कृष् म्हणजे नागरणें या धातूपासून झाला आहे. यावरून या धंद्यास नागर हें मुख्य साधन आहे हें उघड दिसतें. फार प्राचीन काळीं रानटी स्थितींत मनुष्य असतां जंगलातील श्वापदें मारून त्यांवर तो निर्वाह करीत असावा. त्यानंतर कंद, मुळें, झाडांचीं फळें व धान्य यांच्याकडे त्याचें लक्ष जाऊन त्यावर तो उपजीविका करूं लागला. नंतर सभोंवतालीं उगवणारीं धान्यें यांचें संवर्धन कांहीं कृत्रिम उपायांनीं–जमीन नांगरून खतें वगैरे घालून–केलें असतां पीक जास्त येऊन धान्याची जात सुधारत जाते हा शोध त्यास लागला असावा. ह्या प्रवृत्तीमुळेंच विविध शेतकी, व बागायतीचीं आऊतें मनुष्याच्या कल्पक बुद्धीमुळें निर्माण झालीं. मिसरदेश, बाबिलोन व इतर प्राचीन राष्ट्रें शेतकींत प्रवीण होतीं असें इतिहासावरून दृष्टोत्पत्तीस येतें. नाइलनदीला पूर आल्यावर केवळ लांकडी नांगराच्या साहाय्यानें जमीन नांगरून ईजिप्तमध्यें पिकाची लागवड करीत असा शोध लागला आहे. आर्यांचा अतिशय प्राचीन ग्रंथ जो ऋग्वेद त्यांत कृषिविषयक पुष्कळ उल्लेख सांपडतात.

अक्षैर्मा दीव्यः कृषिमित्कृषस्व वित्ते रमस्व बहुमन्यमानः (ऋ. मं. १० सूक्त ३४ ऋचा १३)

" हे द्यूतक्रीडा करणारे जन हो, माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा, तुम्ही द्यूतक्रीडा करणें सोडून द्या आणि उत्तम प्रकारची शेती करून त्यापासून प्राप्त होणाऱ्या धान्य, गाई इत्यादि संपत्तीचा उपभोग घ्या; त्या संपत्तींत रममाण व्हा. त्याच व्यवसायामध्यें गवादि संपत्ति आणि भार्यापुत्रादि गृहसौख्य प्राप्त होतें असें सर्व जगत्प्रेरक अशा भगवान् सवित्यानें मला सांगितलें. "

तसेंच खालीं दिलेल्या ऋचेंत तर त्याहूनहि स्पष्ट शेतकामाचें व त्याकरितां लागणाऱ्या बैल, नांगर आदिकरून सामुग्रीचें वर्णन आलें आहेः—

शुनं वाहाः शुनं नरः शुनं कृषतु लांगलं। शुनं वरत्रा बध्यंतां शुनमष्ट्रामुदिंगय ॥ (मं. ४ सू. ५७ ऋ. ४)

शुनं नः फाला विकृषंतु भूमिं शुनं कीनाशा अभियंतु वाहैः।
शुनं पर्जन्यो मधुना पयोभिः शुनासीरा शुनमस्मासु धत्तम् ॥
(मं. ४ सू. ५७ ऋ. ८)

" हे नांगरास जोडलेले बैल नागर उत्तम रीतीनें ओढोत. त्याचप्रमाणें नागर हातांत धरणारे शेतकरी आणि नांगर हे जमीन नांगरण्याचें कार्य आनंदानें करोत. बैलांच्या गळ्यास बांधावयाच्या दोऱ्या त्रासदायक न होतील अशा रीतीनें बांधल्या जावोत. आणि बैलास मारण्यास घेतलेल्या प्रातेदाचा योग्य रीतीनें उपयोग केला जावो.

" हे आमचे नांगराचे फाळ जमीन उत्तमप्रकारें नांगरोत. त्याचप्रमाणे नांगर ओढणाऱ्या बैलानां शेतकरी आनंदानें हाकोत. आणि शेतीला उपयुक्त अशा प्रकारची सुखकर पर्जन्यवृष्टि होवो. शुनासीरदेवता आम्हास सुख प्राप्त करून देवोत. "

वैदिक कालानंतर तयार झालेलें कौटिल्याचें अर्थशास्त्र या ग्रंथांत शेतकीसंबंधानें उल्लेख असून त्या खात्यावर निरनिराळे अधिकारी असत असें वर्णन आहे.

महाभारतांतील सभापर्वांत नारदांनीं युधिष्ठिरास केलेल्या प्रश्नांत शेतकीसंबंधानें राजाचें कर्तव्य उत्तम रीतीनें वर्णिलें आहे.

× × × ॥ कच्चितुष्टाः कृषीवलाः ॥ ८०
कच्चिद्राष्ट्रे तटाकानि । पूर्णानिच बृहंतिच
भागशो विनिविष्टानि । न कृषिर्देवमातृका ॥ ८१

" हे राजा, तुझ्या राज्यांतील शेतकरी संतुष्ट आहेत ना? तसेंच तुझ्या राज्यांत तलाव, विहिरी, कालवे परिपूर्ण असून त्यांचें पाणी शेतीला विभागलें गेल्यामुळें केवळ नैसर्गिक पावसावरच शेतें अवलंबून नाहींत ना?

शेतकी या शब्दाचा अर्थ जमीनीची मशागत करून तींत पीक काढणें असा केला जातो. परंतु या शब्दाची अर्थमर्यादा इतकी आकुंचित नसून पाश्चात्य देशांत ती बरीच विस्तृत आहे. जीं धान्यें व फलें आपण खातों, जीं वस्त्रें प्रावरणें आपण वांपरतों, जे रंग आपण उपयोगांत आणतों अशा अनेक गोष्टी मनुष्यप्राण्यास उपयोगाच्या आहेत त्या सर्व आपणांस वनस्पती व प्राणी यांपासून मिळतात. ज्वारी,भात, गहूं, कापूस, नीळ, साखर हीं जमीनीची लागवड केल्यानें तयार होतात व दूधदुभतें, लोणी, रेशीम, लोंकर व चामडीं हीं प्राण्यांपासून पैदा होतात.म्हणून शेतीकरितां व दुधासाठीं गुरें बाळगणें, लोंकरीसाठीं बकऱ्या, मेंढ्या बाळगणें मधाकरितां मधमाशा पाळणें, रेशमाकरितां रेशमाचे किडे व त्यांच्या पोषणाकरितां तुतीची व एरंडांची लागवड करणें या सर्व गोष्टींचा शेतींत समावेश होतो. शिवाय कोंबडीं पाळणें वगैरेसारख्या बाबीहि शेतींत गणल्या जातात. एकंदरींत अंग मेहनतीनें अगर प्राण्यांच्या किंवा यंत्राच्या सहाय्यानें जमीन कसून तींत मनुष्यांच्या व पाळीव जनावरांच्या पोषणार्थ थोड्या खर्चांत फायदेशीर रीतीनें जमीनीला फारसा धक्का न बसतां पिकें तयार करणें याला शेती अथवा कृषिकर्म म्हटलें असतां वावगें होणार नाहीं.

फुलझाडें वगैरे लावून मौजेकरिता बगीचा करतात त्या गोष्टींचा शेतींत अंतर्भाव होतो. शेतींत जिराईत, बागाईत असे दोन भाग आहेत. जिराइतांत पुन्हां खरीप व रब्बी असे दोन प्रकार करतात जिराईत शेतीपेक्षां बागाईत शेतीची शेतकरी लोक जास्त काळजी घेतात. कारण या शेतीला कायमचें पाणी, जास्त खर्च, पुष्कळ खतमूत व अति मेहनत लागते व याबद्दल थोड्या क्षेत्रांत उत्पन्नहि जास्त येतें.

कृषिकर्माचें वर्गीकरण खालीं दिल्याप्रमाणें करतां येईल:—मुख्य कृषिकर्माचे दोन भाग, शेती व बागबगीचे; पैकीं शेतीचे जिराइती व बागाइती असे दोन भेद असून जिराइतीचे खरीप व रब्बी असे दोन पोटभेद आहेत. बागाइतींत विहिरीच्या किंवा पाटाच्या पाण्यावर भाजीपाला, फूलबाग, फळफळावळ हीं पिकें होतात. बागबगीच्यांत आंबराया, संत्र्यांच्या बागा, पेरूच्या बागा व फुलझाडें वगैरेंचा समावेश होतो.

शेतीचा प्राचीन इतिहास.—फार प्राचीन काळापासूनच शेती हा धंदा महत्वाचा आहे.या धंद्याचें महत्व उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी या फार जुन्या म्हणीवरून सहज लक्षांत येईल. या धंद्याविषयीं लिहितांना पुढें नमूद केलेल्या गोष्टींसंबंधीं थोडथोडी माहिती देण्याचें योजिलें आहे. पूर्वकालीं लोकांचा देश म्हणजे चराऊ रानें, संपत्ति म्हणजे गुरें व मुख्य अन्न म्हणजे दूध असें समजलें जात असे. हल्लींसुद्धां अशा पशुपालवृत्तीवर रहाणाऱ्या अनेक जाती आढळतात.गुजराथेंतील रबारी, मारवाड व चारण सातपुड्यांतील वंजारी व खिलारी; व देशावरील धनगर व कानडे लोक हे यांपैकीं होत. पुढें समाज वाढल्यानें जमीन कमण्यास सुरुवात झाली. ती पद्धत म्हणजे जंगल जाळून त्या राखेंत धान्य पेरणें ही होय. अशी पद्धत हल्लीं डोंगरकड्यावर चालू असून तिला कुमरी किंवा डाली असें म्हणतात. अशा पद्धतीनें कातवडी, वार्ली, कोळी वगैरे जाती लागोपाठ चार पांच वर्षें नाचणी, वरी, हरिक, कारळा वगैरेसारखीं पिकें घेऊन ती आपोआपच सुधारावी म्हणून ८-१० वर्षें पड टाकतात. ही झाली डोंगरी भागांतील शेतीची स्थिती. अशा प्रकारानें शेती करणारे लोक एके ठिकाणीं स्थाईक रहात नाहींत. यापुढील सुधारलेल्या शेतीची पायरी म्हणजे एके ठिकाणीं कांहीं विवक्षित क्षेत्र घेऊन त्यावरच वर्षानुवर्ष शेती करणें हें होय. निरनिराळ्या धंद्यावरून जशा निरनिराळ्या जाती झाल्या आहेत. त्याचप्रमाणें निरनिराळीं पिकें करणारे लोक देखील विशिष्ट असतात. जसें कोरडवाहू किंवा जिराईत पिकें कुणबी करतात; माळी फुलबागा, बागाइत पिकें, भाजीपाला व फळफळावळ करतात. पुणें, सातारा व सोलापुराकडे तिरगूळ लोक पानमळे करतात. हें काम मध्यप्रांतांत बारी लोक करतात या जाती आपआपल्या धंद्यांत हुषार असतात.

दिवसेंदिवस जंगलातील जमीन लागवडीस कशी येत आहे हें पुढें दिलेल्या अगदीं अलीकडील आंकड्यांवरून सहज लक्षांत येईल. इ. स. १८९१-९२ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांत १८ कोटी ७७ लक्ष एकर जमीन लागवडीस असून लोकसंख्या २४ कोटी १० लक्ष होती. तीच वीस वर्षांनंतर म्हणजे १९१०-११ सालीं २२ कोटी ३० लक्ष एकर जमीन लागवडीखालीं आली असून लोकसंख्या २४ कोटी ४० लक्ष झाली आहे व दाट अरण्याचा संहार करून जमीन लागवडींत आणण्याचा क्रम चालू आहे. मनुष्यवस्ती जसजशी वाढत गेली तसतशीं कित्येक भागांत जमीनीची फार टंचाई पडत चालली. पुढें जमीन सुधारण्याचे उपाय सुचले. कोठें समुद्र हटवून खारी तयार केल्या. कोठें तळीं, विहिरी बांधून लहान लहान ओढे अडवून शेजारच्या जमीनी बागाईत बनविल्या. हालंड देशांत फार श्रम व पैसा खर्च करून समुद्र हटवून मोठमोठ्या अजस्र ताली घालून जमीनी काढलेल्या आहेत. मुंबई इलाख्यांत कुलाबा व ठाणें जिल्ह्यांत समुद्र व खाड्या हटवून मोठमोठ्या खारी काढल्या आहेत. अशा अनेक तऱ्हेनें शेतकीची जमीन वाढवून ती सुधारण्याकरितां व उत्पन्न वाढविण्याकरितां आजपर्यंत प्रयत्न झाले आहेत व ते अद्यापि पुढें चालू आहेत.

हल्लीं जमीनीची मशागत करण्याकरितां प्रचारांत असलेलीं आउतें लांकडांच आहेत. सर्व आउतांत नांगर हा मुख्य आहे. नांगराचें उत्पत्तिस्थान काठी असावें. काठीपासून कुदळ व कुदळीचा नांगर झाला असावा. लांकडी कुदळीचा काथवडी व हेटकरी लोक डोंगरी भागांत अद्यापि

नाचणी, वरी वगैरे ठोकण्या (पेरण्या) करितां उपयोग करतात. हल्लीं उपयोगांत असलेले लहान व मोठें नांगर हे मूळ कुदळीपासून सुधारणा होऊन झाले असावे असें वाटतें.

हल्लींप्रमाणें प्राचीन काळीं खताची किंमत लोकांना पूर्ण अवगत होती. ते शेणखत, मासळी, शेळ्यामेंढ्यांच्या लेंड्या, राख, राखुंडा व टहाळ (कोंवळा झाडपाला) यांचा खताकडे उपयोग करीत असत.

मुसुलमान, रजपूत वगैरे राजाच्या कारकीर्दींत ज्यावेळीं सुस्थिति असे त्यावेळीं आपापल्या समजुतीप्रमाणें त्यानीं (राजांनीं) शेती सुधारण्याचे थोडेबहुत प्रयत्न केले होते. फिरोजशहा तघलख यानें विहिरी, तलाव, कालवे इत्यादि लोकोपयोगी कामें पुष्कळ केलीं. त्यानें यमुना नदीचा बांधलेला कालवा अद्याप चालू आहे.

मुसुलमानांपूर्वी हिंदुस्थानमध्यें तलाव, कालवे वगैरे बांधिले जात असत. पाटबंधाऱ्यांचीं कामेंहि पण त्याप्रमाणेंच कित्येक प्रांतातून केलेलीं आढळतात. नाशिक, तैलंगण, गुजराथ व कर्णाटक या ठिकाणीं तलाव व बंधारे फार जुन्या काळापासून बांधीत आले आहेत व त्यातील कित्येक अद्याप अस्तित्वात आहेत.

मध्यप्रांतात विशेषतः चांदा, भंडारा व बालाघाट या भागात मालगुजारी गावातून तेथील मालगुजारानीं मोठमोठीं तळीं बांधून त्याचें पाणी आपल्या शेतास व गावातील लोकास देण्याचा वहिवाट फार जुन्या काळापासून चालू आहे. चांदा जिल्ह्यातील नवेगांव नावाच्या गावीं टेकडीच्या मध्यभागीं एक जुना तलाव आहे. त्या तलावाचें पाणी निरनिराळ्या उंचीवर सोडण्यासाठीं पायऱ्या करून त्यामध्यें व टोलीं सुमारें ४–६ इंच व्यासाचीं भोंकें ठेविलेलीं आहेत. त्याचा उपयोग तळ्यातील पाण्याच्या खोलीप्रमाणें करण्यात येतो. हल्लीं मोठमोठ्या नद्यांना धरणें बांधून त्यातून कालवे काढून दुष्काळी भागात जमीनीला पाणी देऊन ती सुपीक करण्याचें काम चालू आहे. भात, सातू, गहू, राळ, हरभरा, उडीद, मसुर, मूग, वाल, कुळीथ, तीळ, सरसव, कारळा, सुपारी, विड्याचीं पानें, मिरीं कापूस, नीळ, ऊंस, भांग, गांजा वगैरे पिकें, नारळ, केळीं महाळुंग, डाळिंब, फणस, आंबे, संत्रीं वगैरे फळफळावळ फार जुन्या काळापासून म्हणजे सुमारें ३००० वर्षांपूर्वीपासून माहीत असावीं. कारण वरीलपैकीं काहीं नांवें वेदात आलीं असून संत्र्याखेरीज बाकी सर्व नांवें वाग्भटाच्या अष्टांगहृदयात आलीं आहेत व त्यांचे गुणदोषहि त्यात सांगितलेले आहेत. वाग्भटाचार्यांचा काळ २००० वर्षांच्या सुमारें असावा असें दिसतें. वाग्भटाचार्यांचा अष्टांग हृदय हा स्वतंत्र ग्रंथ नसून तो आकारग्रंथ म्हणजे त्यांत तत्पूर्वीच्या चरक, सुश्रुतादि ग्रंथांचा संग्रह आहे म्हणजे चरक, सुश्रुत वगैरे आचार्यांच्या वेळींहि (सुमारें ३००० वर्षांपूर्वी) वरील सर्व नांवें माहिती होतीं. इतकेंच नव्हे तर उसाचीं पेरीं खाण्यापासून तों त्याचा रस, राब, काकवी, गूळ, बारीक साखर व खडीसाखर अशा परंपरा लावून गुणामध्येंहि उत्तरोत्तर श्रेष्ठ असें वर्णनहि त्यांत दिलें आहे. यावरून हिंदुस्थानात शेतीची व तिच्या आउताची माहिती फार प्राचीन काळापासून,—म्हणजे वेदकालापासून म्हटलें तरी चालेल—होती असें सिद्ध होतें. अकबरास बागबगीचे करण्याची फार हौस होती. मुसुलमानीं अमलात फळांच्या व फुलांच्या बागा वाढून त्यात बरीच सुधारणा झाली. पोर्तुगीज राजाच्या अमदानींत पश्चिम हिंदुस्थानात उत्तम आंब्याच्या जाती व चिकू वगैरे फळें आलीं. कॉफी पहिल्यानें इ. स. १६०० सालीं अरबस्तानातून हिंदुस्थानात आली. हल्लीं कॉफीचे जे मळे म्हैसूरात आहेत. त्यांची लागवड सन १८३० सालीं सुरू झाली. तंबाखू जहांगिराच्या वेळीं पाश्चात्य देशातून आली असावी. अकबराचा मुख्य प्रधान अबुलफझल यानें १९ वर्षांच्या दमरातील माहितीवरून उत्पन्नाच्या आकड्याची सरासरी तयार केलेली आहे. या कोष्टकावरून पहाता तत्कालीन दर बिघ्यास सरासरी उत्पन्न भात १०३६ पौंड, गहूं १०३६ पौंड, ज्वारी ८२७ पौंड व कच्चा कापूस ६०० पौंड वजनाचा याप्रमाणें येत होता असा अंदाज आहे.

इ. स. १८४५ पर्यंत हिंदुस्थानातून यूरोपखंडांत साखर जात असे. इसवी सन ६२७ ते ६७० या सालाच्या दरम्यान चीनचा बादशहा टाइटसंग यानें आपले काहीं इसम साखर करण्याची कला शिकण्याकरितां बहार प्रांतात पाठविले होते असा इ. स. १५५२ सालीं लिहिलेल्या चीनच्या ज्ञानकोशात उल्लेख आहे. हिंदुस्थानातून परदेशाशीं कालिको (चिटाचें कापड) कपड्याचा मोठा व्यापार चाले व डाक्याला उत्तम तऱ्हेची मलमल तयार होई या दोन्ही गोष्टी जगप्रसिद्ध आहेत. गाई व बैल यांना पूर्वी फार महत्त्व होतें व हल्लींहि आहेच. हैदरअली हा अमृतमहाल जातीचे बैल तोफखान्यास लावीत असे असें नमूद आहे. गुराचा देवघेवींत उपयोग करीत व ती दानहि देत. गोप्रदानाची चाल अद्यापि अस्तित्वात आहे. पंचमहाल जिल्ह्यात भिल्ल लोक हल्लीं लग्नकार्यातील हुंडा बैल व गाई या रूपानें देतात. मुसुलमानी राज्यात गोशाळा, अश्वशाळा, व उष्ट्र(उंट)शाळा होत्या. पेशव्यांच्या वेळीं पुणें जिल्ह्यात आळेगांव येथें घोड्यांच्या उत्पत्तीसाठीं मोठ्या पागा होत्या. व्यापारी लोकानीं गोमातेच्या संरक्षणासाठीं पूर्वांपार जागजागीं पांजरपोळ काढिले आहेत. पूर्वी जनावराची उत्पत्ति वाढविण्यासाठीं खेडोंपाडीं पोळ सोडलेले असत व ते अद्यापिहि कोठें कोठें आढळतात.

पूर्वी वसुलाचे मक्ते देण्याची चाल होती ती अकबरानें बंद केली. अकबर बादशहाचा मुख्य प्रधान राजा तोडरमल्ल यानें शेरशहानें घालून दिलेल्या पद्धतीवर जमीनीची मोजणी करून प्रतबंदी केली व महसुलाचे निरख ठरविले. तीच पद्धत थोड्या फार फरकानें आजतागाईत हिंदुस्थानात चालू आहे.

दक्खनमध्यें मलिकंबरनें मोजणी करून धारापद्धत सुरू केली. तिला 'तनखा' अशी संज्ञा होती. जमीनींचे मक्ते देण्याची पद्धत जरी वाईट अशी मानली जात असे तरी ती इतर राजांच्या कारकीर्दीत चालू होती. ती ब्रिटिश अमदानीच्या सुरवातीस बंद झाली. लॉर्ड कार्नवालिस यानें बंगाल्यांत 'कायम धारा' पद्धत सुरू केली व इतर प्रांतात बहुतेक ठिकाणीं 'रयतवारी' पद्धत चालू आहे.

अकबराच्या वेळीं दुष्काळ वगैरे पडेल त्यावेळीं शेतकऱ्यास मदत करण्यास उपयोगी पडावे म्हणून दर बिघ्यामागें १० शेर धान्य दरसाल वसूल करून तें जागोजागीं सांठविण्यात येई असा ऐने-इ-अकबरींत उल्लेख आहे. या धान्याचा व्यय पुढें नमूद केलेल्या गोष्टींकडे होई (१) सरकारी गुराना खुराक, (२) गरीब शेतकऱ्यास बीं बियाणें, (३) दुष्काळाच्या सालीं शेतकऱ्यांनां स्वस्त दरानें धान्याचा पुरवठा करण्याच्या कामीं व (४) जागजागीं अन्न शिजवून गरीब लोकांस देणें वगैरे.

हल्लीं दुष्काळ पडल्यास बींभरणासाठीं, बैल विकत घेण्यासाठीं, विहिरी खोदण्यासाठीं आउतें विकत घेण्यासाठीं तगाई देतात व साऱ्याची सूट व तहकुबी पिकाच्या अंदाजाकडे लक्ष देऊन द्यावी असे कायदे आहेत. अशी पद्धत शिवाजीच्या वेळींहि होती. सारा वसूल करण्याचे नियम रयतेस सोइस्कर असेच होते. लोकाची फार अडचण दिसल्यास सूट देण्यात येई. शेतकीची साधनें जवळ नसल्यास शेतीचें काम नडतें असें दिसून आल्यावर सरकारातून थोड्या व्याजानें किंवा बिनव्याजानें पैसे देण्यात येत.

इंग्रजी राज्य झाल्यावर लार्ड डलहौसीच्या कारकीर्दीत सन १८५६ सालीं दुष्काळनिवारणार्थ आगगाडीच्या कामास सुरुवात झाली. सन १८७६-७७ च्या दुष्काळात बरीच प्राणहानी झाली असावी. सन १८९६ व सन १९००-१९०१ या सालांचे दुष्काळ बऱ्याच क्षेत्रावर पसरले होते. तरी आगगाडीच्या सोईमुळें धान्याचा पुरवठा इकडून तिकडे असा सहज करिता आला. हल्लीं कालव्याचा व आगगाडीचा जास्त प्रसार झाला असल्यामुळे एकंदरींत दुष्काळ कमी प्रमाणांत भासूं लागला आहे; कारण धान्य व चारा हे दोन्ही जिन्नस इकडून तिकडे सहज नेतां येतात.

सहकारिता:—जुन्या काळीं प्रत्येक खेड्यांत सहकारितेचें तत्व आढळून येई. बलुतेदार सर्व शेतकरी लोकांस सहकारितेच्या तत्वावर मदत करीत व खेड्यातील सावकार देखील खेड्याचा एक घटकावयव समजला जात असे. तसेंच जातींजातींतील लोक एकमेकांस कमी व्याजानें रकमा देत असत. हा प्रकार गुजराथेंत अद्याप आढळून येतो. पूर्वी ग्रामपंचायतीपद्धतीमुळें वसूल करणें सुद्धां सोईचें होतें. शेतीच्या कामीं गरीब शेतकऱ्याचें एखादें शेत गांवांतील बरेच शेतकरी एक दिवस जाऊन नांगरून देत. अद्यापीहि ही चाल कोठें कोठें आढळते. या पद्धतीला 'विरानिक' असें म्हणतात.

शेतीचा अर्वाचीन इतिहास.—हिंदुस्थानात शेतीचा धंदा जरी फार जुन्या काळापासून चालत आला आहे, तथापि शास्त्र या दृष्टीनें गणित वगैरे विषयाप्रमाणें या विषयावर स्वतंत्र ग्रंथ नाहींत. बहुतेक सर्व ज्ञान अनुभवानें व परंपरेनें आलेलें आहे. म्हणून येथील शेती 'शेतकी शास्त्र' या संज्ञेस पूर्णपणें पात्र नाहीं. परंतु पाश्चात्य राष्ट्रांनीं प्रयोगाच्या योगानें शेतकी पूर्णशास्त्राच्या दर्जास पोंहोचविली आहे. परंतु मुख्य गोष्ट लक्षात ठेवावयाची म्हणजे शेतकी हा धंदाच इतका व्यापक आहे कीं शेतकीचें ज्ञान म्हणजे एक लहान शास्त्र असें नाहीं. शेतकी शास्त्र पूर्णपणें बनण्यास त्यास इतर किती तरी शास्त्रांची मदत व्हावी लागते. त्यापैकीं महत्वाच्या शास्त्रांचें स्वरूप येथें देतों.(१) भूस्तरशास्त्र, (२) पदार्थविज्ञानशास्त्र, (३) वनस्पतिशास्त्र, (४) रसायनशास्त्र,(५) कीटकशास्त्र, (६)जंतुशास्त्र, (७) पशुवैद्यकशास्त्र,(८)पशुसंगोपनशास्त्र, (९) कृषियंत्रशास्त्र व (१०) वातावरणशास्त्र.

(१) **भूस्तरशास्त्र:**—याच्या साहाय्यानें कोणकोणत्या तऱ्हेचे खडक कोठें असतात व त्यांपासून जमिनी कशा तयार होतात हें समजतें. तसेंच कोणकोणतीं खनिजद्रव्यें निरनिराळ्या ठिकाणीं असतात त्याचेंहि ज्ञान मिळतेंच. त्यापैकीं कांहीं द्रव्यें खताकरिता उपयोगीं पडतात.

(२) **पदार्थविज्ञानशास्त्र.**—जमिनीवर उष्णता, थंडी, निरनिराळ्या प्रकारचे वारे व हवा यांचे परिणाम कोणत्या प्रकारचे व कसे घडतात याचें ज्ञान पदार्थविज्ञान शास्त्रानें होतें.

(३) **वनस्पतिशास्त्र:**—यानें झाडें कशीं वाढतात, निरनिराळ्या जाती कशा उत्पन्न करिता येतील, असलेल्या पिकात कोणत्या सुधारणा करिता येतील,वनस्पतींचें पोषण व त्यांची फलद्रुपता या गोष्टी कशा प्रकारें घडतात याचें ज्ञान होतें.

(४) **रसायनशास्त्र.**—या शास्त्राच्या ज्ञानानें शेतीच्या जमिनीचें पृथक्करण, तसेंच खताचें, पाण्याचें व गुरांच्या चाऱ्याचें पृथक्करण करिता येतें व यामुळें कोणकोणतीं द्रव्यें कमी अधिक प्रमाणांत आहेत तें समजतें. तसेंच खतें कोणतीं व का घालावींत, तीं किती घालावींत, झाडें कशीं पोसतात,गुरांना खाणें योग्य कोणतें व तें किती घालावें वगैरेबद्दल ज्ञान होतें.

(५) **कीटकशास्त्र.**—कीटकशास्त्रानें सर्व प्रकारें उपयोगीं पडणारे कीटक व वनस्पतींनां त्रासदायक कीटक कसे उत्पन्न होतात त्याबद्दलची माहिती व त्यावर उपाय यांचें ज्ञान होतें.

(६) **जंतुशास्त्र:**—हे दृष्टीनें न दिसणारे असे जे बारीक जीव वनस्पतींवर अगर प्राण्यांवर उत्पन्न होतात, त्यासंबंधीं बरेवाईट परिणाम व त्यांवरील उपाय याबद्दल माहिती देतें.

(७) पशुवैद्यक शास्त्र.—हें जनावरांच्या जाती, त्यांचे आहार, निगा, आरोग्य, व आजार व त्यावर उपाय या गोष्टींविषयीं सर्व माहिती देतें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या तऱ्हेच्या कामासाठीं गुरांत कोणत्या गुणधर्मांची आवश्यकता असते वगैरे माहिती या शास्त्राच्या अभ्यासानें मिळते.

(८) प्राणिसंगोपन शास्त्र.—हें जनावरांची व पक्ष्यांची निपज, निगा, वगैरेबद्दल माहिती देतें.

(९) स्थापत्य शास्त्रः—या शास्त्राच्या साहाय्यानें शेतीसंबंधीं हरएक प्रकारचीं आउतें, शेतीसंबंधीं जनावरांचे गोठे व धान्याचीं कोठारें बाधणें, शेतीच्या उपयोगीं पडणारे रस्ते वगैरे करणें यांचें ज्ञान होतें.

(१०) वातावरण शास्त्र.—या शास्त्राच्या योगानें हवेंतील फेरफार, पाऊस आणणारे अगर घालविणारे वायूंचे प्रवाह, दर्यांतील तुफानें व त्यामुळें जमिनीवर होणारे फेरफार, अतिवृष्टि, अनावृष्टि व त्यापासून वनस्पतींवर होणारे परिणाम यांचें ज्ञान होतें. या ज्ञानानें पुष्कळ वेळा नुकसान टाळता येतें.

यांशिवाय अर्थशास्त्र वगैरे शास्त्रांचा शेतकीशीं बराच निकट संबंध येतो. वर दिलेल्या सर्व शास्त्राच्या विवेचनावरून असें वाटूं लागेल कीं, शेतकी हा धंदा फायदेशीर करणें हें फार कठिण व गूढ आहे. परंतु त्यातील मुख्य मुख्य सिद्धांत कित्येक पिढ्यांच्या अनुभवानें चांगल्या शेतकऱ्यांस साधारणपणें माहीत असतात व त्या माहितीस जर वर लिहिलेल्या शास्त्राची जोड मिळाली तर या धंद्यात झपाट्यानें प्रगति होईल.चांगली जमीन,उत्तम बीबियाणें,जनावरांची नीट जोपासना व द्रव्याची अनुकूलता या गोष्टी हि पण इतर गोष्टींप्रमाणेंच साध्य झाल्या पाहिजेत व त्या सर्व असूनहि स्वतःची देखरेख शेतीवर व जनावरावर जातीनें राहून केल्याखेरीज शेती फायदेशीर होणार नाहीं एवढेंच नाहीं तर वेळप्रसंगीं थोडी थोडकी अंगमेहनताहि करण्याची मालकाची तयारी असली पाहिजे म्हणजे त्या धंद्याचें इंगित कळून हा धंदा फायदेशीर करिता येईल.

शेतींत सुधारणा होण्यास पुष्कळ अडचणी आहेत. त्यांपैकीं एक मुख्य म्हणजे शेतकरीवर्गांत शिक्षणाचा अभाव व त्याची पुराणप्रियता ही होय. परंतु हल्लीं जी शेतकींत सुधारणा दिसत आहे तिलाहि इतिहास आहे. या इतिहासाचे ठोकळ मानानें दोन भाग करिता येतील ते असेः—(१) शेतकी खातें निघण्यापूर्वी शेतीच्या सुधारणेसंबंधानें झालेले प्रयत्न व (२) त्यानंतरचे प्रयत्न. ईस्ट इंडिया कंपनीकडे हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें होतीं तेव्हा जागोजागीं ॲग्रिकलचरल व हॉर्टिकल्चरल् सोसायटीज स्थापन झाल्या. या संस्थांचे बागबगीचे असत. त्यापैकीं मुंबई इलाख्यांत पुणें जिल्ह्यात हिंवरें व दापुडी, खानदेशांत धुळें, खेडा जिल्ह्यांत नडियाद, उत्तर हिंदुस्थानांत मीरत, गोरखपूर, कुमाव, कलकत्ता वगैरे अनेक ठिकाणीं बागा होत्या. त्यांचें काम नानातऱ्हेचीं पिकें, औषधी वनस्पती, फळझाडें, फुलझाडें, भाजीपाला व इतर व्यापारोपयोगी पिकें यांचें बीं आणून त्यापासून चांगलें पीक करणें व त्या पिकाचा फैलाव संस्थेच्या मंडळामार्फत शेतकऱ्यांत करणें हें असे. खेड व जुन्नर येथें बटाट्यांचा प्रसार होण्याचें श्रेय हिंवरें येथील बागेला असावें. भुइमूग, बटाटे, रताळी, तंबाखू, मका, श्रावणघेवडा, कोबी, नोलकोल, कॉलिफ्लॉवर, टमाटो, गिनीगवत, लसूणघास, मॉरिशस (पुंड्या) ऊंस वगैरे पिकांचा इकडे विशेष प्रसार झाल्याचें श्रेय या बागाकडेसच असावें. अशा रीतीनें गेल्या शंभर दोनशें वर्षांत पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्लिश वगैरे पाश्चात्य लोकांचा सहवास घडून आल्यापासून अनेक तऱ्हेचीं पिकें परदेशातून येऊन तीं स्थानिक झालीं आहेत.

प्राचीन काळीं शेतकींत सुधारणा करण्याचे प्रयत्न एखाद्या विवाक्षित पिकासंबंधींच असत. असे प्रयत्न म्हणजे परदेशी लांब धाग्याच्या कापसाचें बीं आणून शेतकऱ्यांस वाटणें. उदाहरणार्थः—अमेरिकन, ईजिप्शियन व बोरबोन कापूस, रेशमाचे किडे वगैरे. या पूर्वीच्या प्रयत्नास यावें तसें यश आलें नाहीं. अमेरिकन कापूस मात्र थोड्या प्रमाणावर धारवाड जिल्ह्यात जीव धरून राहिला आहे.

या नवीन पिकापैकीं सांपत्तिक दृष्ट्या फार महत्वाचीं अशीं कापूस, तंबाखू, भुइमूग व ऊंस हीं पिकें होत. नंतरचें प्रयत्न सन १८८१मध्यें होऊन दुष्काळी कमिशनच्या शिफारशींवरून सर्व हिंदुस्थानात प्रांतानिहाय शेतकीखातीं स्थापन करावीं असें ठरलें. तथापि या खात्यांना मूर्तस्वरूप लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकीर्दींत आलें. पहिल्यानें सर्व हिंदुस्थानाकरिता पुसा येथें फिप्स साहेबांच्या उदार देणगीच्या व्याजातून एक मध्यवर्ती कॉलेज काढून त्यात प्रत्येक शेतकी विषयाचा एकेक तज्ज्ञ नेमून त्या सर्वांवर सन १९०१ सालीं इन्स्पेक्टर जनरल ऑफ ॲग्रिकलचर अशी नेमणूक करण्यात आली. सन १९०५ सालापासून हिंदुस्थानसरकार या खात्याच्या सुधारणेसाठीं दरवर्षी २० लक्ष रुपये प्रयोगसंशोधन, प्रात्यक्षिकें व शेतकीशिक्षण याकरितां वेगळे काढून ठेऊं लागलें, व भारतमंत्र्यानां खालीं नमूद केलेल्या शिफारशी शेतकीखात्याकरिता करण्यात आल्या.

(१) प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शेतकीकॉलेज व प्रयोगक्षेत्र असावें, (अ) या कॉलेजात शेतकी, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, कीटकशास्त्र व जंतुशास्त्र या विषयाचे तज्ज्ञ असावे; व त्यांत संशोधनाची सोय असावी. (ब) वादग्रस्त प्रश्नांचा शोध व खल प्रयोगशाळात व प्रयोगक्षेत्रात व्हावा. (क) शेतकीखात्यासाठीं स्वतंत्र डायरेक्टर असावा.

(२) प्रत्येक प्रदेशानिहाय एक प्रयोगक्षेत्र असावें.

(३) भागानिहाय प्रयोगक्षेत्राच्या देखरेखीसाठीं शेतकीचौकशी, संस्थांस सल्ला देण्याकरितां, प्रदर्शनें भरविण्यास

निवडक बीं वांटण्यासाठीं व सुधारलेल्या आउतांचा प्रसार करण्यासाठीं व शेतकीविषयक पत्रव्यवहार करण्यासाठीं एक सुपरिंटेंडेन्ट ऑफ दि फार्मस् असा अधिकारी असावा.

(४) प्रयोगक्षेत्रात उपयुक्त ठरलेल्या गोष्टी शेतकऱ्याच्या नजरेस आणण्यासाठीं जागोजाग प्रात्यक्षिकें स्थापन करावीं.

सदरहू सूचनेप्रमाणें प्रांतानिहाय शेतकीचे डायरेक्टर अशा अधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या; कांहीं कांहीं प्रांतांत पूर्वी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकलचर आणि सेटलमेन्ट अशा नेमणुका झाल्या होत्या.

इसवी सन १८८४ सालीं मुंबई इलाख्यांत शेतकीखातें स्थापन झालें असून मध्यप्रांतांत १८८३सालीं व निझामच्या राज्यांत (फसली १३२८) इ. सन १९१४—१५ सालीं स्थापन झालें. अगदीं पूर्वी या खात्याचे काम लोकस्थितीसंबंधीं आंकडे गोळा करणें हें असून शेतींत सुधारणा घडवून आणण्याकडे त्यांनां फारसें लक्ष देता येत नसे. डायरेक्टराला जास्त कामें झाल्यामुळें शेतकी कामाकरितां डेप्युटी डायरेक्टराची नेमणूक करून त्यांच्या देखरेखीखालीं जागजागीं प्रयोगशाळा स्थापन केल्या. मुंबई इलाख्यांत सन १९०५ सालीं शेतकीखातें अगदीं स्वतंत्र झालें. या वेळेपासून शेतकीखात्याचें काम ज्यास्त व्यवस्थित रीतीनें व जोरानें चालू झालें. प्रयोगाचीं शेतें व त्याचप्रमाणें अनुभवदर्शक क्षेत्रें हीं वाढलीं. याप्रमाणें सर्व दिशेनें काम वाढल्यामुळें प्रत्येक प्रदेशाकरिता वेगवेगळाले डेप्युटी डायरेक्टर नेमून प्रत्येक भागाकरिता एक डिव्हिजनल सुपरिंटेन्डेंट याची नेमणूक झाली. त्याच्या हाताखालीं जिल्हानिहाय ओव्हरसियर नेमून त्यांच्याकडे शेतकऱ्यांच्या शेतांतील चालू असलेल्या प्रयोगाची देखरेख सोंपविण्यांत आली. याप्रमाणेंच बहुतेक प्रांतोप्रांतीं व्यवस्था आहे. प्रत्येक डायरेक्टराच्या देखरेखीखालीं अनेक पोटखातीं सुरू झालीं तीं येणेंप्रमाणेः—प्रयोग क्षेत्रें आणि अनुभवदर्शनक्षेत्रें. पशुवैद्यक खातें. शेतकीशिक्षण शेतकऱ्यांना भांडवलाचा पुरवठा (परस्पर सहकारी) खातें. शेतकीसंस्था. शेतकरी वर्गांत सुधारणेचा प्रसार इत्यादि.

शेतकींत कोणतीहि सुधारणा घडवून आणण्यापूर्वी त्याविषयीं रासायनिक प्रयोगशाळेंत व प्रयोगक्षेत्रांत पूर्ण छाननी झाली पाहिजे. ही छाननी त्या त्या प्रांतांत रयतेच्या उपयोगी पडेल अशा पिकांसंबंधीं किंवा शेतीच्या पद्धतीसंबंधीं झाली पाहिजे. ही पुरी झाल्यानंतर मग सुधारणा घडवून आणणें शक्य आहे किंवा नाहीं याचा विचार करावा लागतो. निरनिराळ्या प्रांतांत हवा पाणी वगैरे निरनिराळीं असल्यामुळें तेथील बिकट प्रश्नांच्या संशोधनाकरितां रासायनिक प्रयोगशाळा व प्रयोगक्षेत्रें वेगवेगळ्या परिस्थितींत स्थापन झालीं आहेत. प्रयोगक्षेत्र स्थापन झाल्यावर तेथील प्रयोग सफळ किंवा निष्फळ आहेत हें ठरण्यास बरींच वर्षे लागतात.

हीं प्रयोगक्षेत्राची कल्पना फार वर्षांची जुनी आहे. हिंदुस्थानात पहिलें प्रयोगक्षेत्र इ. सन १८१४ सालीं कानपूरनजीक बिठूर येथें मि. राल्हेन्स क्राफ्ट कानपूरचे त्या वेळचे कलेक्टर यानीं काढिलें होतें.

निरनिराळ्या प्रांतांतील प्रयोगक्षेत्रांची संख्या सन १९१७—१८ सालीं पुढें नमूद केल्याप्रमाणें होती. बंगाल ११, बहार ओरिसा ९, संयुक्तप्रांत १९ पंजाब ४ वायव्येकडील प्रांत २, मुंबई २२, मद्रास १२, मध्यप्रांत १५, आसाम ५, ब्रह्मदेश १६, म्हैसूर ३ व बडोदें ४.

मुंबई इलाख्यात इसवी सन १८६९ सालीं खानदेश जिल्ह्यात भडगाव येथें सुमारें १२०० एकर जमीन घेऊन तेथें सरकारी शेताची स्थापना केली. हें शेत कापसाची सुधारणा करण्याकरिता घेण्यात आलें होतें. सन १८९० सालीं पुण्यानजीक खडकी येथें शेतकीखात्यानें दुधाची डेअरी काढली. ही हिंदुस्थानांतील पहिली डेअरी होय. हल्लीं सर्व हिंदुस्थानात हजारों डेअऱ्या स्थापन झाल्या आहेत. सन १८९४ सालीं माजरी येथें उंसाकरिता स्वतंत्र शेताची स्थापना झाली. सन १९१७-१८ सालीं मुंबई इलाख्यात एकंदर २२ प्रयोगक्षेत्रें होतीं. यापैकीं गुजराथेंत सुरत, नडियाद व दोहद येथें; मध्यभागात धुळें, जळगाव, कोपरगाव, गणेशखिंड, माजरी, व खडकी येथें; कर्नाटकात गोकाक, धारवाड, गदग व तेगूर येथें; सिंध प्रांतात मिरपूर खास, सक्कर, लारखाना व वलाडो येथें आहेत.

गुजराथ प्रांतातील प्रयोगशाळेंत मुख्यत्वेंकरून कापूस, जोंधळा, तंबाखू, बाजरी, मका वगैरे पिकें; मध्यभागांत कापूस; माजरी येथें उसास खत, पाणी, फेरपालटाचीं पिकें, नवीन जाती आणून लावणें, वाफेच्या यंत्रानें रस काढणें, चुलाणांत सुधारणा वगैरे; खडकी येथें दूधदुभतें, गुरांची उपज निपज वगैरे; गणेशखिंडींत फळफळावळ; कर्नाटकांत कापूस व कोंकणात भात वगैरेसंबंधीं प्रयोग चालले आहेत.

मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत एकंदर १५ प्रयोगक्षेत्रें होतीं. अकोला (मुख्यत्वेंकरून कापूस), हुशंगाबाद (पावरखेडा-गहूं); नागपूर (शेतकी कॉलेज फॉर्म) रायपूर (लंभाडी—भात). तेलंगखेडी (डेअरी—दुभत्याचें प्रयोगक्षेत्र) बोरगाव, थारसा, सिंधवाही, चांदखुरी, बिलासपूर, दग, वडशिवणी, खावर्धा, आथर्तीळ आणि खेवी. बैतुल, व दमोह येथें प्रयोग क्षेत्रें स्थापन झालीं आहेत.

निजामच्या राज्यांत महबूबनगर (मुख्यत्वेंकरून कापूस व रेशमाचे किडे), आलेर (जिल्हा नालगोंडा—कापूस व एरंडीवरील रेशमाचे किडे,) कमरेड्डी (जिल्हा निजामाबाद ऊंस) व परभणी (मराठवाडा कापूस) वगैरे मिळून नवीन चार क्षेत्रें स्थापन झालीं आहेत.

त्या प्रयोगक्षेत्रांत त्या त्या प्रदेशांतील महत्त्वाचीं पिकें व कांहीं नवीन पिकें, नवीन तऱ्हेचीं खतें, आऊतें, सुधारलेलीं पाणी काढण्याचीं साधनें, पिकें करण्याच्या सुधारलेल्या पद्धती वगैरे गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यांत येतो; व त्यांपैकीं फायदेशीर ठरतील त्या पद्धतींचा, बियांचा, खताचा, आऊतांचा वगैरे इतरत्र फैलाव होण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. सरकारनें काढलेल्या या प्रयोगशाळा लोकांनीं येऊन पाहाव्या म्हणूनच आहेत.

पशुवैद्यक खातें व गोशाळा.—या सदराखालीं शिक्षण देण्याकरिता मुंबई, मद्रास, बंगाल, पंजाब व ब्रह्मदेश या प्रातांत कॉलेजें स्थापन करण्यात आलीं आहेत. जनावराची पैदास, जोपासना व वाढयाप्रीत्यर्थ मुंबई इलाख्यांत गुजराथेंत चारोडा येथें नाथकोटगोशाळा व धारवाड जिल्ह्यात तेगुर येथें गोशाळा आहेत. मध्यप्रातात तेलंन, खेडी, चादखुरी, पावरखेडा, बोरगाव व थारसा येथें गोशाळा स्थापन झाल्या आहेत. या गोशाळेंत जे गोऱ्हे उत्तम व खात्रीचे निपजतील ते खेड्यात ठेऊन गुरांची सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. याशिवाय चागल्या जातीचे पोळ वेळोवेळी तगाईरूपानें किंवा लोकलबोर्डातून विकत घेऊन खेड्यात ठेवण्यांत येतात.

सन १९१५–१६ सालच्या पशुवैद्यक खात्याच्या रिपोर्टावरून चांगली अवलाद तयार करण्याकरितां सरकारांतून ९० व लोकलबोर्डातून ११११ सांड (पोळ) ठेविले होते असें दिसून येतें. याखेरीज सन १९१५–१६ सालीं १९३ घोडे, ११३ गाढवें अशीं या खात्यातून उत्पत्तीकरितां ठेविलीं होतीं.

शेतकी सर्वस्वीं चागल्या जनावरावर अवलंबून आहे. गुरांच्या रोगांवर उपाय करण्यासाठीं व जागोजागीं मोफत दवादारू देण्यासाठीं सर्व हिंदुस्थानांत ४१६ दवाखाने असून त्याची संख्या मुंबई इलाख्यांत सिंध प्रांतसुद्धां ६५ व मध्यप्रांत व वऱ्हाडांत ७९ होती. या सर्वांवर पशुवैद्यकखात्याची देखरेख असते. दवाखान्यांतील डाक्टर वेळोंवेळीं खेडोंखेडीं फिरतात व शेतकरी लोकाना गुरासंबंधीं योग्य सल्ला देतात. एखादे वेळीं स्पर्शजन्य रोगाचा उद्भव खेड्यात झाल्यास त्याना खबर मिळतांच ते तेथें जाऊन रोगप्रतिबंधक उपाय योजून शिवाय गुरें लशीनें टोंचतात. या खात्याचा खर्च वर्षानुवर्ष वाढत्या प्रमाणावर आहे हें खालीं दिलेल्या आकड्यावरून स्पष्ट होईल.

१९०४–५ सालीं रुपये १०८२३९३: १९१०–११ साली रुपये २०२९४९५; आणि १९१५–१६ सालीं रुपये ३१७२६२५ याप्रमाणें खर्च झाला.

शेतकीशिक्षण.—शेतकऱ्यात ज्ञानाचा प्रसार होणें हा शेतकीच्या प्रगतीचा पाया आहे. भौतिक शास्त्रें व शेती यांची सांगड कशी घालावयाची हें शेतकऱ्यामध्यें ज्ञानाचा प्रसार झाल्याशिवाय कळणें शक्य नाहीं. सदरहू शास्त्रांचे शिक्षण देण्याकरितां खालीं दिलेल्या ठिकाणीं कॉलेजें स्थापन करण्यांत आलीं आहेत. (१) पुणें मुंबई, (२) नागपूर, मध्यप्रांत, (३) कोईमतूर (मद्रास), (४) कानपूर (संयुक्त प्रांत, (५), साबूर (बहार व ओरिसा) व (६) लायलपूर (पंजाब). यांशिवाय देशी भाषेंतून या विषयाचें त्रोटक शिक्षण देण्यासाठीं कित्येक ठिकाणीं प्रयोगक्षेत्रास जोडून शेतकीचे वर्ग काढिले आहेत देशी भाषेच्या द्वारें शेतकीशिक्षण देण्यासाठीं शाळा मुंबई इलाख्यात पुण्यानजीक लोणी, धारवाड जिल्ह्यांत देवीहोसूर, ठाणें जिल्ह्यात जांभूळ, कुलाबा जिल्ह्यांत अलिबाग, पंचमहाल जिल्ह्यांत गोध्रा व सिंध प्रांतात मिरपूर खास येथें काढिलेल्या आहेत. हल्लीं मध्यप्रातात चांदखुरी व पावरखेडा येथें अशा तऱ्हेच्या शाळा काढण्याचें ठरलें आहे. या विषयासंबंधीं जास्त माहिती शेतकीशिक्षण या विषयाखालीं मिळेल.

शेतकऱ्यास भांडवलाचा पुरवठा.—शेतकरी वर्गास त्याच्या कामाकरिता भांडवलाची अतिशय जरूरी असते. तें भाडवल कमी व्याजानें मिळावें म्हणून सन १९०४ सालीं हिंदुस्थान सरकारनें सहकारी पतपेढयांचा कायदा केल्यापासून खेडोंखेडीं परस्पर सहकारी पतपेढया स्थापण्यास सुरवात झाली सदरहु संस्थेंत गांवातील कांहीं निवडक माणसें घेऊन त्याच्या हमीवर गावात मिळविलेल्या थोड्या भाडवलास सरकारमार्फत कांहीं रकम कमी व्याजानें मिळते. ह्या पेढयातून सभासदास लागणारा पैसा कमी व्याजानें मिळतो. सन १९१७–१८ सालीं अशा खेड्यातील लोकाना भाडवल पुरविणाऱ्या पतपेढयाची संख्या २३,७४२ असून त्यांत ८,५१,४०७ सभासद होते. व एकंदर भांडवल ६८९० रुपये होतें. मुंबई इलाख्यात १३९० पतपेढ्या असून सभासद १,०१,३१३ होते. भाडवल ७१९९ लाख रुपयाचें होतें. त्याचप्रमाणें मध्यप्रातात ३४१२ पतपेढया होत्या-सभासदाची संख्या ५६,०७२ असून भाडवल ५७६३ लाख रुपयाचें होतें. या रकमेपैकी शेंकडा ७४ उचल आउत, बैल, बीं बियाणें, शेतखर्च, विहिरी खणणें व ताली घालणे यासाठीं होती. मुंबई इलाख्यात २१ खत विक्रीसाठीं, ८ कापूसविक्रीसाठीं, ७ बीं बियासाठीं, १० सुधारलेलीं आऊतें विकण्यासाठीं व १० उत्तम गुराची पैदास करण्यासाठीं संस्था होत्या. याशिवाय सर्व हिंदुस्थानात गुराचा विमा उतरण्यासाठीं३९९ संस्था होत्या. त्यापैकीं ३७९ फक्त ब्रम्हदेशात असून मुंबई इलाख्यात त्याची संख्या चार होती. अशा अनेक प्रकारांनीं शेतकीच्या धंद्यांत सहकारितेचा प्रसार होऊं लागला आहे. भाडवलाप्रीत्यर्थ सरकारनें अग्रिकल्चरल रिलीफ अॅक्ट, (शेतकरी ऋणमोचन कायदा) अग्रिकल्चरल इंप्रुव्हमेन्ट अॅक्ट (शेतीच्या सुधारणेसाठीं तगाई देण्याचा कायदा) व अग्रिकल्चरल लोन्स अॅक्ट (शेतकऱ्यास तगाई वगैरे देऊन मदत करणारा कायदा)

असे कायदे केले आहेत. या कायद्यान्वयें शेतकऱ्याला ताली घालणें, विहिरी खोदणें, बैल, बीं वगैरे विकत घेणें वगैरेकरितां तगाईच्या रूपानें पैसा दिला जातो. त्याचप्रमाणें हल्लीं ऑइल एन्जिन व पंप, उंसाचे घाणे, लोखंडी नांगर वगैरे विकत घेण्यासाठीं तगाई मिळते.

शेतकी संस्था.—शेतकऱ्यांच्या अडचणी दूर कराव्या व त्यांच्या गरजा भागविण्याबद्दल त्यांस सल्ला द्यावा याकरितां जागोजागीं शेतकीसभा स्थापन झाल्या आहेत. अशा सभा सर्व हिंदुस्थानांत असून त्या महाराष्ट्रांतहि आहेत. पुणें येथील मध्यवर्ती डेक्कन आग्रिकलचरल असोसिएशन या नांवाच्या सभेच्या विद्यमानें शेत व शेतकरी या नांवाचें शेतीसंबंधीं माहितीनें भरलेलें मासिक प्रसिद्ध होत असतें. अशाच तऱ्हेचीं मासिकें गुजराथी व कानडी भाषेंत शेतकी संस्थेमार्फत भडोच व धारवाड येथें प्रसिद्ध होतात. मध्यप्रांतांत नागपूर येथें शेतकी खात्यांतून "किरसानी समाचार" नामक मासिक पुस्तक हिंदी, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषांत प्रसिद्ध होतें. निजामच्या राज्यांत अशाच प्रकारचें एक मासिक पुस्तक उर्दूंत निघत असतें. शेतकी कॉलेजांतून व पुसा येथून तिमाहि पुस्तकें शेतकी विषयावर इंग्रजींत प्रसिद्ध करण्यांत येतात.

या शेतकीसभा वेळोवेळीं सभा भरवून व्याख्यानद्वारा शेतकऱ्यांच्या शेतींत ज्ञानाचा प्रसार करीत असतात. कांहीं ठिकाणीं या सभानीं निवडक बीं, सुधारलेलीं आउतें व त्याचे भाग व खतें पुरविण्यासाठीं डेपो काढलेले आहेत. शेतकीचें ज्ञान गरजू शेतकऱ्याला वेळेवर मिळावें म्हणून शेतकी खात्यानें प्रत्येक जिल्ह्यांत फिरस्ते ओव्हरसियर नेमिले आहेत. त्याच्याबरोबर व फार्म सुपरिन्टेन्डेंट याच्याशीं पत्रव्यवहार केल्यास त्यांच्याकडून शेतीसंबंधीं ताबडतोब माहिती मिळावी अशी योजना आहे.

शेतकरी वर्गांत सुधारणेचा प्रसार.—पहिल्या सदरांत लिहिलेल्या ठिकाणीं जे शोध उपयुक्त ठरतात त्याचें ज्ञान शेतकऱ्यास मिळावें म्हणून हस्तपत्रकें प्रसिद्ध करून गांवोगांव शेतकीचीं प्रदर्शनें व प्रात्यक्षिकें भरतील त्या ठिकाणीं तीं वाटण्यांत येतात. अशीं पत्रकें मुंबई इलाख्यांत सन १९१८ अखेर १०८ निघालीं असून मध्यप्रांत व वऱ्हाडांतहि पुष्कळ निघालीं आहेत. या पत्रकांत पिकांची लागवड, त्यांस उत्तम ठरलेलीं खतें, नवीन सुधारलेलीं आउतें धान्य व जनावरांचे रोग, पिकांवरील कीड घालविण्याचे उपाय, आउतांची व दुभत्या जनावरांची जोपासना वगैरे संबंधीं माहिती दिलेली असते. याशिवाय प्रत्येक प्रयोगशाळेचे वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध करण्यांत येतात. विवक्षित विषयांवर इत्थंभूत माहितीचीं लहान लहान पुस्तकें व टिपणें काढून शेतकीखात्यांतून तीं वेळोवेळीं छापून प्रसिद्ध करण्यांत येतात.

शिवाय दरवर्षी शेतीसंबंधीं सप्रयोग ज्ञान शेतकऱ्यांनां मिळावें यासाठीं जेथें मोठे बाजार व जत्रा भरतात त्या ठिकाणीं शेतीचीं व गुरांचीं प्रदर्शनें व प्रात्यक्षिकें भरविण्यात येतात व या प्रदर्शनांत चढाओढीचीं बक्षिसें देण्यांत येतात. सन १९१५-१६ सालीं सर्व हिंदुस्थानांत घोड्यांचीं २५ व [illegible] मुंबई इलाख्यांत गुरांचीं ३, मध्यप्रांतांत ५, वऱ्हाडांत १३ व निझामच्या राज्यांत ९ प्रदर्शनें व प्रात्यक्षिकें भरविण्यांत आलीं होतीं. प्रदर्शनाच्या वेळीं उपयुक्त ठरलेलीं आउतें प्रत्यक्ष चालवून दाखविण्यांत येतात. याशिवाय जमलेल्या शेतकऱ्यांस निरनिराळ्या विषयांवर तज्ज्ञ माणसांकडून व्याख्यानें देण्यांत येतात. त्याप्रमाणें निरनिराळ्या जिल्ह्यांतून शेतकरी लोकांस सरकारी खर्चानें आणून त्यांना प्रयोगशाळेंत उत्तम ठरलेले प्रयोग, उत्तम पिकें व इतर उपयुक्त आउतें वगैरे दाखवितात.

इसवी सन १९१७-१८ सालीं शेतकी खात्याप्रीत्यर्थ सर्व हिंदुस्थानांत किती खर्च झाला त्याचा तपशील खालीं दिला आहे:—

स्थलाचें नांव	खर्च रुपये
पुसा व मध्यवर्ती कॉलेज व संशोधनशाळा	५८१७२३
मुक्तेश्वर ब्याक्टिरिऑलॉजिकल लॅबोरेटरी	३३६४८१
मुंबई शेतकी खातें	९९०८६१
मद्रास ”	७७६३३६
बंगाल ”	३९६४२९
बहार, ओरिसा ”	३६३९००
संयुक्तप्रांत ”	७८४८४८
पंजाब ”	७५६३४४
ब्रह्मदेश ”	२३९०९५
मध्यप्रांत ”	६०६७५७
आसाम ”	२४८०९३
वायव्य सरहद्दीवरील प्रांत	३६७९७
बलुचिस्तान ”	१४५७५
एकूण	६१३२२३५

शेतीचा प्रसार.—हिंदुस्थान हा देश फार प्रचंड आहे. तो जर्मनीच्या सातपट, जपानच्या दसपट व ब्रिटिश बेटाच्या पंधरापट मोठा आहे. हिंदुस्थानांत मोठाले नऊ व लहान पांच असे एकंदर १४ प्रांत आहेत. शिवाय अनेक एतद्देशीय संस्थानें आहेत. हिंदुस्थानची दक्षिणोत्तर लांबी सुमारें २००० मैल असून रुंदी १९०० मैल आहे. सन १९१४-१५ सालीं प्रसिद्ध झाल्याप्रमाणें एकंदर क्षेत्रफळ १७,९९,००० चौरस मैल अथवा १,१,५,१४,७४,००० एकर आहे. इ. स. १९११ सालीं झालेल्या खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या अदमासे ३१ कोटी ५० लक्ष आहे. याची विभागणी पुढें दिल्याप्रमाणें:—

[एकर व लोकसंख्या यांचे आंकडे हजारांचे आहेत.]

देशाचें नांव	एकर	लोकसंख्या
ब्रिटिश हिंदुस्थान (कांहीं संस्थानां सुद्धां)	७४९११६	२६७१६४
हिंदुस्थान सरकाराशीं प्रत्यक्ष संबंध असणारीं संस्थानें	३१६३८७	४४७६७
शानसंस्थानें (ब्रह्मदेश) वायव्य सरहद्दीवरील प्रांत वगैरे	५१२६५	२७३८
ब्रिटिश बलुचिस्तान	३४७०६	४१४
एकूण	११५१४७४	३१५०८३

शेतीचा प्रसार व महत्व.—राष्ट्रांतील धंदा या दृष्टीनें पण शेती महत्वाची आहे. व परदेशीं दळणवळणाचीं साधनें नसत त्यावेळीं प्रत्येक देशास स्वतःच्या निर्वाहाकरितां पुरेसें धान्य करणें भाग असे, व यूरोपखंडांतील लढायांमध्यें तुकतेंच असें अनुभवास आलें आहे कीं राष्ट्रांतील इतर उद्योगधंदेच नव्हे परंतु प्रजेचें जीवनहि शेतीवर अवलंबून आहे, व प्रत्येक राष्ट्रानें अतःपर तरी शेतीस धंदा या दृष्टीनें पूर्ण महत्व दिलें पाहिजे.

इ. सन १९१४-१५ सालीं लागवडींत व पड वगैरे असलेलें क्षेत्र प्रांतवार दाखविणारा तक्ता खुलाशासाठीं पुढें दिला आहे. कोष्टकांतील आंकडे हजारांचे आहेत व जमिनीचें मान एकरांत दिलें आहे. एकूण संख्या दिलेल्या आंकड्यांची बेरीज नसून खऱ्या आंकड्यांची बेरीज आहे व तींतील हजारांचे आंकडे वगळले आहेत.

लागवडीच्या व पडित जमीनींचें प्रांतवार कोष्टक.

प्रांत	सर्वेकागदा बरहुकूम एकंदरक्षेत्र	संस्थान चे क्षेत्र वजा	निव्वळ क्षेत्र. मोजणी प्रमाणें	निव्वळ क्षेत्र. गावकागदाप्रमाणें	लागवडींत असलेलें. निव्वळ लागवडीचें	लागवडींत असलेलें. पड टाकलेलें	लागवडीस न आलेलें. लागवडीस योग्य.	लागवडीस न आलेलें. लागवडीस अयोग्य	जंगल खातीं.
बंगाल	५३९३१	३४५२	५०४८०	५०४८०	२५२०८	४५७१	५२१५	११२७७	४२५८
मद्रास	९७८३९	६७९२	९१०४७	८९४९१	३४६९२	८४७६	१०९२०	२२३६७	१३०४१
मुंबई इलाखा	८५६१५	३६९७१	४८६४३	४८६४४	२५७११	७२९३	१३४३	६७०६	७५८९
सिंधप्रांत	३३९६१	३८७२	३००८९	३००८९	४५००	४८८४	६३२२	१३५९०	७९३
आग्रा	५७३४२	४३४५	५२९९६	५२७७९	२६८७७	१९१६	७५५६	७७०२	८७२८
अयोध्या	१५३०७	... ...	१५३०७	१५४७७	९२९०	५१४	२८५४	२२०५	६१३
बहार व ओरिसा	७१५३५	१८३३४	५३२००	५३२००	२६०२७	४३७२	८०११	१००५६	४७३२
पंजाब	८६३६७	२४५११	६१८५५	६०८८०	२६५८२	२०४९	१६८३३	१२४४३	२९७२
ब्रह्मदेश — उत्तरभाग	५७१७८	३३७५	५३८०३	५३८०३	५१२२	४२०१	१०५६६	२१३४१	१२५७२
ब्रह्मदेश — दक्षिणभाग	५५०७८	... ...	५५०७८	५५०७८	९२४१	६४७	१४६३२	२३४००	७१५७
मध्यप्रांत	७२५५२	१९९६०	५२५९१	५२५९४	१८०९१	२३३७	१३३९९	४०५८	१४७०७
वऱ्हाड	११३७४	... ...	११३७४	११३७४	७०२१	११२३	१४०	९४९	२१४२
असाम	३९२७५	७९६९	३१३०६	३१३०६	५८८९	२६९९	१४४२२	५५११	२७८४
वायव्यसरहद्दीवरील प्रांत	८५७९	१४०	८४३८	८५७३	२६२३	३२४	२६३३	२६२४	३६७
अजमीर-मारवाड	१७७१	... ...	११७०	१७७१	८७४	३०४	१४९	८४७	९६
दिल्ली	३६८	... ...	३६८	३६८	२१६	१५	६०	६९	७
कूर्ग	१०१२	... ...	१०१२	१०१२	१३९	१७१	१०	३३४	३५८
मणिपूर परगणा	३१	... ...	३१	३१	७	३	७	३/४	१६
एकूण सुमारें	७४९११६	१२९७२४	६¼ लक्ष	६½ लक्ष	२२७६११	४५८९७	११५०८०	१४५४२७	८२९३५

हिंदुस्थानांत शेतीवर अद्याप शेंकडा ८० लोक अवलंबून आहेत. शहरांत रहाणाऱ्या लोकांनां या धंद्याचें महत्व नीटसें कळत नाहीं. परंतु खेडेगांवांत हाच कायतो मुख्य धंदा असतो. एकंदर देशांत यावर किती माणसें अवलंबून आहेत हें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल. सन १९११ सालीं झालेल्या खानेसुमारीवरून पहातां सर्व हिंदुस्थानांतील शहरांतील लोकसंख्येचें खेडेगावांतील लोकसंख्येशीं प्रमाण येणें प्रमाणें आहेः—

शहरांत रहाणारे लोक.—२,९७,४८,२२८

खेड्यांत रहाणारे लोकः—२८,५४,०८,१६८

नगरस्थाचें खेड्याच्या लोकसंख्येशीं प्रमाण १:८ आहे. या प्रमाणामध्यें प्रत्यक्ष स्वतःची शेती करणारे, दुसऱ्याची खंडानें करणारे, शेतावर मजुरी करणारे, व शेतीवर ज्याचे लहान लहान धंदे अवलंबून आहेत त्या सर्वांचा समावेश होतो. यावरून या धंद्याचा निर्वाहाचें साधन म्हणून देशास किती उपयोग होतो हें दिसून येतें. इंग्लंड देशाशीं तुलना करितां असें दिसून येतें कीं इंग्लंड देश उद्योगधंद्याचें माहेरघर असल्यामुळें तेथें शेंकडा ५८ लोक निरनिराळ्या इतर धंद्यात गुंतलेले असतात व फक्त शेंकडा ८ शेतकी करितात. परंतु हिंदुस्थानांत शेतकी हा आद्य धंदा असल्यानें

तींत शेंकडा ७१ लोक गुंतलेले असून शेंकडा १२ उद्योगधंदे; ५ व्यापार; २ घरगुती नोकरी, शेंकडा अर्धा वकिली, डॉक्टरी, वैद्यकी, भिक्षुकी वगैरे धंदा व शेंकडा अर्धा सरकारी नोकरी व लष्करी नोकरी वगैरे करितात.

असून शेंकडा ७० लोकांचें पोट प्रत्यक्ष शेतीवर चालतें, आणि शेंकडा ९० जणांची धांव शेती कोणत्या रीतीनें तरी संपादन करण्याकडे जात आहे. रावापासून रंकापर्यंत सर्वांचा व्यवहार शेतीच्या साहाय्यानें सुखाचा होतो हें सर्वश्रुत आहे. सर्व धंदे, नानातऱ्हेचे उदीम व्यापार व निरनिराळे कारखाने हे देखील शेतकीवरच अवलंबून आहेत. इतकेंच नव्हे तर सर्व तऱ्हेचे भिकारी, गोसावी, बैरागी, भिक्षुक, वकील व बलुतदार वगैरे अठरापगड जाती या सर्वांचा उदरनिर्वाह शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. म्हणून शेती हा धंदा सर्वांत श्रेष्ठ व महत्वाचा मानिला पाहिजे.

शेतकी दृष्ट्या मुख्य विभाग.—शेतकी दृष्ट्या विचार करितांना हिंदुस्तानचे अगदीं तीन वेगवेगळाले भाग करितां येतात. पहिला भाग हिमालय पर्वत, दुसरा भाग हिमालय पर्वताच्या पायथ्यापासून दक्षिणेकडे पसरत गेलेला आहे. हिमालयांतून निघणाऱ्या मोठमोठ्या नद्या या भागांतून वहात गेलेल्या आहेत. तिसरा भाग वरील मैदानाच्या दक्षिण सीमेपासून पुन्हां वर चढत गेला आहे. हा एक त्रिकोणाकृति उंच सखल प्रदेश आहे.

हिमालय पर्वतांतील पाण्याचा सांठा खालील सपाटीच्या उष्ण प्रदेशांना उपयोगी पडतो. हिमालयाच्या दक्षिण बाजूस पाऊस इतका पुष्कळ पडतो कीं, तेणेंकरून नद्यांस महापूर येतात व यामुळें त्याच्या उतरणीवरील प्रदेशांत पीक फार चांगलें येतें. तेथें जव, बरग, नाचणी वगैरे किरकोळ धान्यें व बटाटे मुबलक पिकतात. हीं पिकें रानटी व डोंगरी लोक जंगलास आग लावून त्या राखेंत खोरीं व कुदळी यांच्या साहाय्यानें जमीन तयार करून जागोजागीं ताली घालून फार मेहनतीनें काढितात. हिमालयांतून निघणाऱ्या नद्या ज्या विस्तीर्ण प्रदेशांतून वाहतात तो दुसरा भाग होय. या प्रदेशाचा विस्तार बंगालच्या उपसागरापासून हिंदी महासागरापर्यंत पूर्व-पश्चिम आहे. हा भाग अत्यंत सधन व दाट वस्तीचा आहे. त्या प्रदेशाला पश्चिमेकडून सिंधु, पूर्वेकडून ब्रह्मपुत्रा व मध्यभागीं गंगा आणि तिला मिळणाऱ्या नद्या ह्यांच्या पाण्याचा पुरवठा होऊन गाळ साचून येथील प्रदेश सुपीक झाला आहे. ह्या भागांत बंगालचा खालचा प्रदेश, आसाम, संयुक्तप्रांत, पंजाब, सिंध, राजपुताना आणि इतर एतद्देशीय संस्थानें यांचा समावेश होतो.

बंगाल्यांतील नदीकांठच्या सपाट प्रदेशांत कित्येक ठिकाणीं दोन व कित्येक ठिकाणीं भाताचीं तीन पिकें एक वर्षांत घेतात. अंतर्वेदींत एकसारखीं भाताचीं शेतें व त्याच्या भोंवतीं बाजूचीं हिरवीगार बेटें, नारळी, पोफळी व दुसरे ताडमाडांचे वृक्ष दृष्टीस पडतात. या भागांत ज्यूटची लागवड विशेष आहे. उत्तरभागांत गहूं, जव, ज्वारी, गळिताचीं धान्यें, कापूस, तंबाखू, नीळ वगैरे पिकें होतात. दक्षिण बंगाल्यांत रेशमाची लागवड विशेष करितात. जंगलांत रेशमाचे कोशे उत्पन्न होतात. आसामांत मुख्यत्वेंकरून चहाची लागवड पुष्कळ आहे.

तिसरा भाग म्हणजे त्रिकोणाकृति आकाराचा हिंदुस्थानचा पठाराचा प्रदेश होय. पूर्वी याला 'दक्षिण' व हल्लीं या भागाला 'डेक्कन' असें म्हणतात. या प्रदेशाच्या उत्तरेस अरवली, विंध्याद्रि व सातपुडा हे डोंगर असून पूर्व-पश्चिम बाजू घाट या नांवानें प्रसिद्ध आहेत सबंध देश डोंगराच्या रांगा व शिखरें ह्यांनीं भरलेला आहे ह्याच्या मधून मधून मात्र लागवड केलेलीं व उंचवटयाचीं अनेक मैदानें आहेत. पूर्वघांटाचे तुटक तुटक सुळके आणि रांगा ह्या मद्रास इलाख्याकडून खालीं गेल्या आहेत. मुंबई इलाख्याला समुद्राच्या बाजूनें पश्चिमघांटाची एक मोठी भिंतच आहे. त्या घांटाच्यामध्यें व समुद्रकिनाऱ्यामध्यें फक्त चिंचोळी पट्टी आहे त्याला कोंकण म्हणतात. ह्या भागात मध्यप्रांत, वऱ्हाड, मुंबई इलाखा, मद्रासइलाखा, म्हैसूर व निझामचें राज्य व इतर मांडलिक संस्थानें ह्यांचे मुलूख येतात.

महाराष्ट्रांतील शेती या विषयांवर विचार करण्यापूर्वी महाराष्ट्रामध्यें कोणकोणत्या प्रांतांचा समावेश होतो याचा विचार करूं. महाराष्ट्र देशाची मर्यादा येणेंप्रमाणेः—

उत्तरेस नर्मदा नदी व सातपुडा डोंगरः पूर्वेस वाइन गंगा आणि प्राणहिता या दोन नद्या, त्यांच्या आग्नेय दिशेस माहूर गांवापासून गोव्यापर्यंत त्याची पूर्व मर्यादा वांकडी आहे. आणि पश्चिमेस अरबी समुद्र आहे. महाराष्ट्राचा आकार कांहींसा त्रिकोणी आहे. त्याची उत्तरेकडील बाजू सुमारें २०० कोस आहे. आणि पश्चिमेकडील व उत्तर-दक्षिणेकडील साधारण तितकीच आहे. पश्चिमेकडील भागाला कोंकण व पूर्वेकडील भागाला देश असें म्हणतात. मध्यभागीं सह्याद्रि पर्वतावरील जो प्रदेश त्याला घांटमाथा असें म्हणतात. या देशापैकीं पूर्वेकडील एक भाग मोंगल सरकाराकडे आहे. व दक्षिणेकडील एक लहानसा भाग (गोवें व भोंवतालचा प्रदेश) पोर्तुगालच्या स्वाधीन आहे. या देशांतच कोल्हापूरचें राज्य व दुसरे अनेक संस्थानिक राजे यांचे देश मोडतात. इसवी सन १८६२ सालीं महाराष्ट्र देशाचा वसूल सुमारें दीड कोट रुपये होता. महाराष्ट्रात खालील प्रांतांचा समावेश होतो.

(१) कोंकण प्रांतः—यांत ठाणें, कुलाबा, रत्नागिरी व कारवार जिल्हे.

(२) गोवें प्रांतः—यात दहा महाल आहेत—ते इलयस (जंजिरा गोवा), साष्टी, बारदेश (बारा देसायांचा गांव). भतग्राम, (डिचोली). फोंडें, पेडणें, सांगें, केपें, काणकोण व सत्तरी हे होत.

(३) देशः—यांत पश्चिमखानदेश, पूर्वखानदेश, नाशिक, अहमदनगर, पुणें, सोलापूर व सातारा.

(४) कर्नाटकः—यांत बेळगांव, धारवाड व विजापूर.

(५) निझामच्या राज्यामध्येः—मराठवाडा, औरंगाबाद, बीड, परभणी, बेदर, नांदेड, गुलबर्गा.

(६) मध्यप्रांतापैकीं नागपूरभागः—यात नागपूर, भंडारा, चांदा, वर्धा, बालाघांट.

(७) वऱ्हाडप्रांतः—यात उमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ.

एतद्देशीय संस्थानेंः—यात कोंकण—डाग, सुरगणें, जव्हार, जंजिरा सावंतवाडी. देश—यांत औंध, फलटण भोर, अक्कलकोट, जत, डफळापूर.

दक्षिणमहाराष्ट्रः—यात कोल्हापूर, सांगली, मिरज, कुरुंदवाड, जमखंडी, मुधोळ, रामदुर्ग व सावनूर.

कोंकण—सह्याद्रीपर्वताच्यायोगानें महाराष्ट्राचे दोन विभाग झाले आहेत. त्यांतील सह्याद्रि व अरबीसमुद्र यामध्यें दक्षिणोत्तर जो अरुंद पट्टी आहे तिला कोंकण असें म्हणतात. या प्रदेशाची दक्षिणोत्तर लांबी सुमारें ४५० मैल आहे व रुंदी ३०–६५ मैल पावेतों आहे. पूर्वभागातून सह्याद्रि पर्वत गेल्यानें हा फार डोंगराळ भाग आहे. व पश्चिमभाग साधारणपणें सपाट आहे. सह्याद्रिच्या घाटमाथ्यावरील भागास मावळ म्हणतात. मावळांत सरासरी १२५ इंचावर व कोंकणांत १०० इंचापावेतों पाऊस पडतो. उत्तर कोंकणात पावसाचें मान कमी व दक्षिण कोंकणात जास्त आहे. कोंकणातील हवा उष्ण व दमट आहे. येथील मुख्य पीक भाताचें होय.

कोंकणप्रांताचे क्षेत्रफळ १३६६२ चौरस मैल आहे, व लोकसंख्या ३१,१०,६६१ आहे.

गोवाप्रांतः—दक्षिणकोंकणांत गोमांतकाचा समावेश होतो. पूर्वेस सह्याद्रि व पलीकडे उत्तरकारवारातील सुपा तालुका, पश्चिमेस हिंदीमहासागर, दक्षिणेस कारवार जिल्हा, उत्तरेस तेरेखोलची नदी व सांवतवाडी संस्थान. इ. स. १५१० सालीं पोर्तुगीज लोकांचा सरदार वास्को दि गामा यानें पहिल्यानें गोंवा बेट हस्तगत केलें व १७६३ पावेतों वेळोवेळीं आणखी प्रांत काबीज केले. गोमांतकाची दक्षिणोत्तर लांबी ६१ मैल; व पूर्वपश्चिम रुंदी ४१ मैल आहे. क्षेत्रफळ सुमारें १०६२ चौरस असून लोकसंख्या ५,४१,०७४ आहे.

गोंवाप्रात समुद्रसपाटीपासून सुरु होऊन तो ३५०० फुटापर्यंत उंच उंच होत गेलेला आहे. समुद्रकांठीं हवा खारी, घाम आणून थकवा आणणारी पण डोंगराच्या बाजूला वर जावें तों साधारण बरी होत जाते. एकंदरींत हवा ओलसर, दमट व उष्ण आहे. या प्रातात पावसाळा भरपूर व खात्रीचा आहे. येथील मुख्य पिकें भात, नारळ व सुपारी हीं होत.

देश व कर्नाटक.—यांत एकंदर १० जिल्हे आहेत. हा प्रदेश उत्तरेस सातपुडा पर्वतापासून सुरू होऊन दक्षिणेस म्हैसूर संस्थानापावेतों पसरलेला आहे. याच्या पश्चिमेला दक्षिणटोंकापावेतों सह्याद्रि पर्वताची ओळ आहे. या प्रदेशाचे स्थूलमानानें तीन भाग करतां येतात.

पश्चिमपट्टीः—सह्याद्रिपर्वताला लागून असलेला २०–२५ मैल रुंदीचा प्रदेश हा अगदीं डोंगराळ आहे. यांतील मुख्य पीक भात होय.

मध्यपट्टीः—यांत पश्चिम पट्टीच्या पूर्वेकडे १५–२० मैल रुंदीचा प्रदेश मोडतो. येथें डोंगर थोडे आहेत व पाऊस सधारण ३० इंच पावेतों पडतो. हवा मध्यम प्रतीची उष्ण आहे. गहूं, बाजरी, व ज्वारी हीं मुख्य पिकें होत. कापूसहि या भागात पिकतो.

पूर्वपट्टीः—ही संज्ञा मध्यपट्टीच्या पूर्वेकडील सपाट प्रदेशास देतात. या भागांत डोंगर व टेंकड्या थोड्या आहेत. या प्रदेशात पाऊस कमी असून सुमारें २० इंच पावेतों पडतो. या पूर्वपट्टीपैकीं अगदीं पूर्वेकडील जिल्ह्यात (अहमदनगर, सोलापूर, व विजापूर येथें) पावसाचें बहुतेक दुर्भिक्ष असतें. या भागात हवा उष्ण असते. यात मुख्य पिकें ज्वारी, थोडी बाजरी, कापूस, गहूं व गळिताचीं धान्यें हीं होत. देश या विभागाचे ३७,२५१ चौरस मैल क्षेत्र असून लोकसंख्या ६३,८,७०६४ आहे.

कर्नाटकः—हा प्रदेश मुंबई इलाख्यातील दक्षिण टोंक होय याचे मुख्य दोन भाग करितां येतात. पश्चिमेकडील मलाड अगर मलनाड (मळी = पाऊस, नाड = भाग) व पूर्वेकडील देशी भाग. मलाड भाग डोंगराळ असून त्यातील हवा थंडगार असते. येथें ५०–१०० इंचांपावेतों पाऊस पडतो. तो नियमित व पुरेसा असतो. तेथील मुख्य पीक भात असून डोंगराळ भागांत नाचणी, वरी वगैरे पेरितात. या भागात लहान तळीं बरींच आहेत. पूर्वेकडील काळ्या कोरडवाहू जमीन असलेल्या भागाला देश म्हणतात. यात हवा उष्ण असून पाऊस सुमारें २३–२६ इंचांपावेतों पडतो. या भागातील महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे पाण्याचा तुटवडा ही होय. तळीं उन्हाळ्याच्या आरंभीच आटतात या भागातील मुख्य पिकें कापूस, ज्वारी, गहूं आणि गळिताचीं धान्यें होत. बहुतेक सर्व विजापूर जिल्हा या भागांत मोडतो. पूर्व व पश्चिम याच्या दरम्यान धारवाड व बेळगाव जिल्ह्यांत जो भाग आहे त्याला संक्रमणपट्टी म्हणतात. या भागाला पावसाळा जून महिन्यात सुरू होणाऱ्या पावसाचा व आक्टोबर महिन्यात सुरु होणाऱ्या मद्रासच्या पावसाचा या दोहोंचा पूर्ण फायदा मिळतो. या भागांतील हवा पाणी, पाऊस, काळी जमीन वगैरे कांहीं मलाड व कांहीं देशासारखी आहे. या भागांत सर्व तऱ्हेचीं पिकें होतात. कर्नाटकाचें क्षेत्रफळ १५९२१ चौरस मैल असून लोकसंख्या २८,३२,७९८ आहे.

निझामचें राज्य—हें राज्य विस्तारानें आणि उत्पन्नाच्या मानानें सर्व संस्थानांत जास्त आहे. हें दख्खनच्या

पठाराच्या मध्यभागीं आहे. याची सर्वात मोठी लांबी ९०२ मैल असून सर्वांत मोठी रुंदी ७६२ मैल आहे. या पठाराची उंची औरंगाबादेजवळ २००० फूट असून ती कर्नूलजवळ अवघी ९०० फूट आहे. एकंदरींत सरासरीनें या पठाराची उंची १२५० फूट आहे. या राज्याचे गोदावरी व मांजरा नदींनें दोन विभाग होतात. उत्तरेकडील व पश्चिमेकडील भागात काळा खडक असून दक्षिण व पूर्वेकडील भागांत ग्रानाइट व शाहाबादी धोंड्याच्या खाणी आहेत. पश्चिमेकडील काळ्या खडकाच्या भागाला मराठवाडा अशी संज्ञा असून पूर्वेकडील ग्रानाईटच्या बहुतेक भागाला तेलंगण म्हणतात. तेलंगणांत ओढ्याना धरणें बाधून केलले हजारों तलाव आहेत. सह्याद्रींतील बऱ्याच नद्या या भागातून वहात जातात व त्यांचा पुष्कळ फायदा त्याला मिळतो.

निझामच्या राज्यांत सरासरीच्या मानानें ३०–३५ इंचापर्यंत पाऊस पडतो. तेलंगणांत मुख्य पीक भाताचें आहे. मराठवाड्यात व कर्नाटकात गोदावरी, भीमा, कृष्णा, तुंगभद्रा या मोठ्या नद्यांच्या आजूबाजूस, गाळाच्या काळ्या खोल जमिनी असून त्यात ज्वारी (खरीप, रब्बी) कापूस, बाजरी, तूर, हरभरा, वाटाणा, लाख, तीळ, जवस, करडई इत्यादि जिन्नस विपुल पिकतात. पटारावर जेथें जमीन सपाट असते, तेथें गव्हाची लागवड जास्त होते. तंबाखू व ऊंस यांची लागवड जागजागीं आढळते. तेलंगणांत एरंडीचा पेरा पुष्कळ होतो. औरंगाबाद जिल्हा फळफळावळीच्या बागांबद्दल प्रसिद्ध आहे.

येथील हवा समशीतोष्ण आहे. दक्षिण भागाची हवा उत्तरेपेक्षां अधिक उष्ण आहे. मराठवाड्यांतील हवा शरीर प्रकृतीस जास्त मानवते. एकंदरींत मार्चपासून जून पावेतों हवा रुक्ष व गरम असते व इतर दिवसांत बरी असते.

निझामच्या राज्याचें एकंदर क्षेत्रफळ ८३,६९८ चौरसमैल असून लोकसंख्या १,३३,७४,६९६ आहे व उत्पन्न सरासरीनें तीन कोट आहे.

व ऱ्हा ड प्रां त.—ह्या प्रांताला पूर्वी विदर्भदेश म्हणत असत. हा प्रांत साधारणपणें हिंदुस्थानच्या मध्यभागीं आहे. याची पूर्वपश्चिम लांबी १५० मैल व रुंदी १४४ मैल आहे. या प्रांताच्या उत्तर सीमेवर सातपुडा पर्वत असून पश्चिम सीमेवर खानदेश व निझामचें राज्य आहे इ. स. १६६७ सालीं वऱ्हाड प्रांताचें ऐनेइ अकबरींत मोंगलाचा एक सुपीक प्रांत असें वर्णन केलेलें आहे. वऱ्हाडच्या स्वाभाविक रचनेवरून त्याचे दोन भाग करितां येतात. सखल प्रदेशास पेनघांट म्हणतात व उंच प्रदेशास मेळघाट म्हणतात. सखल प्रदेशातील जमीन उत्तम काळी व खोल आहे. ही जमीन फार सुपीक असून उत्तम जातीचा कापूस याच प्रदेशांत होतो. याशिवाय येथें गहूं, जोंधळा. हरभरा, जवस, तूर व दुसरीं कित्येक पिकें होतात. पूर्णा कांठच्या जमिनींत बराच क्षार आहे व येथें बऱ्याच लोण्याच्या जमिनी आहेत. बालाघांट (दक्षिणेकडील अजिंठ्याचे डोंगर) पट्टयांत जमिनी मध्यम प्रतीच्या आहेत. येथें खरिपांत कापूस, ज्वारी, तूर, तीळ, मुहमूग वगैरे पिकत असून रब्बींत गहूं, जवस व हरभरा, हीं मुख्य पिकें होतात.

एकंदरींत हा प्रांत उष्ण व रुक्ष आहे पेनघाट खेरीज करून हवा साधारण देशाप्रमाणेंच आहे. पेनघाटात मात्र उन्हाळ्यात हवा अति उष्ण असते. रात्रीं बहुतकरून गारठा असतो. पावसाळ्यात हवा दमट व साधारण गार असते. या प्रांतांत सरासरीनें ३३–३५ इंचांपावेतों पाऊस पडतो. पेनघाटापेक्षा बालाघाटांत पाऊस जास्त पडतो व मेळ(गावीलगड)घांट म्हणून जो साधारण जंगलमय भाग आहे तेथें पाऊस फार पडतो. या प्रांताचें क्षेत्रफळ १७७६६ चौरस मैल असून लोकसंख्या ३०,५७,१६२ आहे.

म ध्य प्रां त:—यांत डोंगर व खोरीं आहेत. उत्तरेकडील प्रदेश विशेष डोंगराळ आहे. या प्रांताचा सरासरीनें एक चतुर्थांश भाग जंगलानें व्यापिलेला आहे. येथील मुख्य नद्या नर्मदा, महानदी, वर्धा, वैनगंगा ह्या होत. या प्रांतात जबलपूर पासून हरद्यापावेतों बहुतेक भागांतील जमीन गाळाची बनलेली आहे. सागर, जबलपूर, मंडला, शिवणी, छिंदवाडा, नेमाड, नागपूर व वर्धा जिल्ह्यांतील बऱ्याच भागात काळा खडक असून गोंडवणी खडक नागपूर, वर्धा, चांदा वगैरे जिल्ह्यात सापडतो. शिवाय हा बिलासपूरच्या जमीनदारी भागांतहि आहे. वाळूचे व चुन्याचे खडक सागर व दमोह जिल्ह्यांत आहेत. नीस व ग्रानाईट, नागपूर व छत्तीसगड भागात आढळतात.

ह्या प्रांतात सरासरीनें ३५–४८ इंच पाऊस पडतो. हवा एकंदरींत उष्ण आहे. मंडला, चांदा, भंडारा, बालाघाट छत्तीसगड या जिल्ह्यात वैनगंगा नदीच्या पूर्व कांठच्या प्रदेशात मुख्यत्वेंकरून तांदुळाचें पीक फार होतें. नागपूरकडच्या पश्चिम भागात, वर्धा जिल्ह्यांत व छिंदवाड्याच्या दक्षिणेस मुख्य पिकें कापूस व ज्वारी हीं होत. उत्तरेकडील प्रदेशात गहूं पुष्कळ पिकतो. शिवाय तूर, हरभरा, गळिताचीं धान्यें वगैरे बरींच होतात. तंबाखू व ऊंस यांचेंहि थोडेंसें उत्पन्न होतें. नागपूर भागात बोरें, संत्रीं आणि केळीं चांगलीं होतात मध्यप्रांतांत पानमळे बऱ्याच ठिकाणीं आढळतात, परंतु रामटेकच्या पानांची विशेष प्रसिद्धि आहे.

ज मी नी चे प्र का र व त्यां ती ल पि कें.—शेतकी दृष्टया हिंदुस्थानातील एकंदर जमीनीपैकीं मळईच्या जमीनीचा पसारा फारच मोठा आहे. सिंध प्रांतांपैकीं बहुतेक भाग, मुंबई इलाख्याचा उत्तर भाग (गुजराथ), राजपुताना, पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल इलाखा, मद्रास इलाख्यांतील गोदावरी, कृष्णा आणि तंजावर जिल्हे व आसाम आणि ब्रह्मदेशांतील बराच प्रदेश वगैरे मळईचा आहे. दक्षिण हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरील पट्टी व पूर्वपश्चिम घांटाच्या

खोऱ्यांतील जमीनी या सर्व वरील प्रकारच्याच होत. शिवाय असल्या प्रकारच्या जमीनी मोठमोठया नद्यांच्या दोन्ही थड्यांना बनलेल्या आहेत. कृष्णा आणि गोदावरी यांच्या मुखा जवळील जमीनीचा रंग काहींसा काळसर आहे. उत्तर हिंदुस्थानांतील गंगाथडीच्या जमीनीचा रंग, भुरकट, पिंवळसर व काळसर असा असतो कित्येक ठिकाणीं जमीन वालुकामय, तर कित्येक ठिकाणीं ती इतकी चिकण व घट्ट असते कीं, पाणी बिलकुल निचरून जात नाहीं. कित्येक ठिकाणीं सोडा मॅग्नेशियाचें क्षार बसून लोणा आलेला आहे. पूर्वेकडील व मुख्यत्वेंकरून बंगाल्यातील जमीन पंजाब व संयुक्त प्रातांतील जमीनींपेक्षा फारच बारीक कणाची झालेली आहे. या बारीक कणांच्या जमीनींत कित्येक ठिकाणीं चुनखडी असून कांहीं ठिकाणीं तिच्या पोटीं चुनखडीचे थर बनलेले आहेत. बहुतेक ठिकाणीं जमीनींतील थर अगदीं खालीं वाळू, तिच्यावर चिकण जमीन व अगदीं वरील थर लापणजमीन असे असतात. गंगाकाठीं विहिरी फारशा खोल नसतात. परंतु पंजाब व संयुक्त प्रांतातील विहिरींना पाणी फार खोलीवर लागतें. ज्या मळईच्या जमीनी भुसभुशीत असून स्वाभाविक निचऱ्याच्या असतात, त्यात पाणभरती पिकें चागलीच होतात. उत्तरेकडील मळईच्या प्रदेशातील जमीनी सुपीक असून बहुतकरून पाऊस बेताचा व नियमित पडत असल्यामुळें यात अनेक तऱ्हेचीं खरीफ व रब्बी पिकें होतात. या मळईच्या जमीनींत सेंद्रिय पदार्थ व नायट्रोजन फारच थोडा सांपडतो. पोटयाश पुरेसा असून हिंदुस्थानातील इतर जमीनीपेक्षा फास्फरिक ॲसिडचें प्रमाण बरेंच जास्त असतें. चुना आणि मॅग्नेशिया हीं पुरेशीं असून लोखंड व अल्युमिना यांचें प्रमाण बरेंच जास्त असतें. हें प्रमाण मुख्यत्वेंकरून चिकण जमीनींत असतें. दक्षिणेंतील काळवथरी दगड (डेक्कन ट्रॅप) या खडकाचा प्रसार अजमासें दोन लक्ष चौरस मैल आहे. या खडकानें मुंबई इलाख्यातील बहुतेक भाग व्यापला असून शिवाय तो वऱ्हाड प्रात व मध्यप्रांताच्या पश्चिमेकडील तिसरा हिस्सा व निजामशाहीच्या पश्चिमेकडील अर्धा भाग यातहि पसरला आहे. या सर्व प्रदेशात जमीनी अनेक तऱ्हेच्या आढळत असून त्यात होणाऱ्या पिकाचें प्रमाण कमजास्त असतें. या प्रदेशातील जमिनी सारख्या सपाट नसून उंचसखल असतात. डोंगराच्या उतारावरील जमिनी उथळ व हलक्या असून यांत पाऊस वेळेवर पडल्यास पिकें चांगलीं येतात. पायथ्याकडील जमिनी खोल, काळ्या रंगाच्या असतात. या वर्षानुवर्ष डोंगरावरील गाळ येऊन सुधारत असतात. या प्रदेशांतच कापसाला योग्य अशा काळ्या, खोल व सपाट जमिनी आहेत. तापी, नर्मदा, गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या कांठच्या भारी काळ्या जमिनी कित्येक ठिकाणीं वीस वीस फूट पावेतों खोल असतात. पावसाळ्यांत या इतक्या चिकण होतात कीं त्यांत त्यावेळीं जाणें दुरापास्त होत असल्यामुळें त्यांत गहूं, जवस, हरभरा व शाळूसारखीं रब्बी पिकें करतात. ज्या काळ्या जमिनींत जोंधळा व कापसासारखीं पिकें खरीप हंगामात घेतात त्या जमिनी चार पांच फूट खोल असून त्यांत चुनखडीचे व मुरमाचे तुकडे मिसळलेले असतात. या काळ्या जमिनींची तळजमीन भुसभुशीत व चुनखडीनें मिश्रित असल्यामुळें तींतून पाण्याचा निचरा चागला होतो. काळ्या जमिनीचे रंग, रूप, पोत व सुपीकता यामध्यें जरी बराच फरक आढळतो, तरी तिच्या अंगीं ओलावा राखून ठेवण्याची शक्ति असते. उन्हाळ्यात या जमिनी आवळतात व त्यामुळें त्या फार खोलपर्यंत भेगाळतात. या जमिनी पाणभरती पिकें करण्यास फारशा उपयोगी पडत नाहींत. पण त्याच कमी खोलीच्या आणि मिसळीच्या असल्या म्हणजे त्यात २५ ते ३० फूट खोलीवर पाणी लागत असून विहिरीच्या पाण्यावर उत्तम पिके होतात. दक्षिणेंतील ट्रप प्रदेशाच्या बाहेरहि काळ्या जमिनी आढळून येतात. उदाहरणार्थ मुंबई इलाख्यातील सुरत, भडोच जिल्ह्यातील जमिनी; मद्रास इलाख्यात बल्लारी, कर्नूल व कडप्पा जिल्ह्यातहि याच प्रकारच्या काळ्या जमिनी आहेत. पण या सर्व जमिनी मळईच्या आहेत. या निराळ्या तऱ्हेच्या काळ्या जमिनींत लोखंड, अल्युमिनिअम व म्यागनेशिअम हीं बरींच असतात. चुन्याचें प्रमाण कमीजास्त असून तो कार्बोनेट व सिलीकेट या दोन्ही रूपात सापडतो. मॅग्नेशिआ जास्त प्रमाणात असून पोटयाश बहुतेक पुरेसा असतो. फास्फॉरिक ॲसिड, नायट्रोजन, व सेंद्रियपदार्थ याची बहुतेक तूट असते.

तिसरा महत्वाचा प्रदेश म्हणजे प्रस्तरीभूत (ग्रानाइट) खडकाचा होय. मद्रास इलाख्यातील बहुतेक प्रदेशात, म्हैसूर संस्थानात, मुंबई इलाख्याच्या गदगकडील भागात, निजामशाहीच्या पूर्वेकडील अर्ध्या व मध्यप्रांताच्या पूर्वेकडील दोनतृतीयांश भागात, ओरिसा व छोटा नागपूरकडे, बंगाल्यातील संताळपरगण्यात व बिरभूम जिल्ह्यात, संयुक्त प्रांतातील मिरझापूर, झाशी आणि हमीरपूर जिल्ह्यातील काहीं भागात आणि राजपुतान्यातील पूर्व भागात हा खडक आढळतो. याच प्रकारच्या खडकाची एक लांब पट्टी दक्षिण ब्रह्मदेशाच्या पूर्व भागात सापडते. या जातीच्या खडकापासून झालेल्या जमिनी भिन्न भिन्न प्रकारच्या असतात. काहीं अगदीं उथळ, खडकाळ व पाढरट रंगाच्या जमिनी डोंगरकटड्यावर सापडत असून त्यात अगदीं हलक्या दर्जाचीं पिकें होतात. अशा जमिनी म्हैसूर संस्थानांत व मद्रास इलाख्यात बऱ्याच प्रमाणावर आढळून येतात. तांबूस व तांबूसकाळसर व चिकण लापण जमिनी या पायथ्याशीं आढळत असून त्या सुपीक असतात. या दोहोंच्या मिश्रणानें झालेल्या मध्यम प्रतीच्या जमिनी पाणभरतीं पिकें करण्यास योग्य असतात. अशा जमिनींत कालव्याच्या पाण्याची सोय असलेल्या ठिकाणीं मुख्य पीक भाताचें करतात. या भागांत तळीं व विहिरी रगड असून

त्यांत अनेक तऱ्हेचीं बागाईती पिकें करतात. बेळगांव, धारवाड आणि उत्तर कानडा या जिल्ह्यांच्या पश्चिमेकडील भागांत जांभा खडक (लाटेराईट) आढळतो. त्याच्यापासून होणाऱ्या जमिनीचा रंग पिंवळा, तांबडा अथवा लालसर काळा असतो. तांबूस जमिनी चांगल्या निचऱ्याच्या असतात. तेथें पुष्कळ तऱ्हेचीं पिकें करितात. साध्या व तालीच्या जमिनींतील मुख्य पीक भाताचें होय. बेळगांव, धारवाडकडील तांबड्या जमिनींत व तशा तऱ्हेच्या म्हैसूराकडील जमिनींत सर्व जातींचीं फळझाडें चांगलीं होतात. आंबे तर उत्तमच होतात. या खडकापासून झालेल्या जमिनींत फास्फॉरिक ॲसिड, नायट्रोजन व सेंद्रिय पदार्थ यांची वाण आढळून येते.

हवामानः—साधारणपणें हिंदुस्थान देश समशीतोष्ण कटिबंधांत व अंशतः उष्ण कटिबंधांत असून तो विषुववृत्तापासून फार जवळ आहे. हिंदुस्थानांत तीन प्रकारची हवा आढळून येते. उष्ण व दमट अशी मद्रास इलाख्यांतील दक्षिण भागात, ओरिसा, बंगाल व आसाम प्रांतांत आढळते. उष्ण व कोरडी हवा राजपुताना, पंजाब, संयुक्तप्रात व सिंधचा उत्तर भाग यांत आढळते. मध्यम उष्ण व कोरडी पंजाब व संयुक्त प्रांताचा कांहीं भाग, माळवा, मुंबई इलाखा, निझामचें राज्य व मध्यप्रात यांत आढळते. सामान्य रीतीनें दक्षिणेकडून उत्तरेकडे जातांना जसजसें समुद्रापासून अंतर वाढत जातें तसतसें हिंवाळ्यांतील थंडीचें मान व उन्हाळ्यांतील उष्णतेचें मान यांत बराच फरक पडत जातो. पूर्वेकडील किनारा व उत्तरहिंदुस्थानांतील वाळवंटाचा प्रदेश यांत उन्हाळा फार कडक असतो.

हिंदुस्थानांत नैर्ऋत्य व ईशान्य अशा दोन दिशांनीं पाऊस येतो. पहिले मान्सून वारे एप्रिलपासून आक्टोबरपर्यंत वहात असतात, व हे हिंदी महासागरावरून येतात. हा पाऊस मुंबई इलाख्याच्या बहुतेक भागात पडतो. परंतु सह्याद्रीचा पश्चिम भाग सोडून जों जों पूर्वभागांत जावें तों तों पाऊस कमी होत जातो. शिवाय हा पाऊस पंजाबचा ईशान्य भाग, गंगाकांठ, पूर्वबंगाल व आसाम, सह्याद्रीच्या पश्चिमेकडील आणि पूर्व घाटाच्या पूर्वेकडील प्रदेश, पश्चिम किनारा व पूर्व किनारा यांस लागून असलेला प्रदेश व बंगाल यांत पडतो. दख्खनचा बहुतेक भाग, सिंध, राजपुताना, पंजाब येथें पाऊस अनिश्चित असतो. पूर्वबंगाल, आसाम, मध्यप्रांत, कोंकण व मावळ ह्या भागात तो खात्रीचा असतो. ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे वहाणारे मान्सून वारे आक्टोबरपासून मार्चपर्यंत वहातात. बंगालच्या उपसागरावरून वहाणारे वारे अशाच पैकीं होत. यामुळें पूर्वेकडील प्रदेशांत नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत बराच पाऊस बहुतेक निझामच्या राज्यांतील काहीं भागात, मद्रास इलाख्यांत, दक्षिण महाराष्ट्रांत (कर्नाटकांत), दख्खनच्या पूर्व भागांत, मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत पडतो. हा पाऊस गहूं, हरभरा, जवस, शाळू वगैरे रब्बी पिकांनां फार महत्वाचा आहे. उत्तर हिंदुस्थानांत नैर्ऋत्येकडील पावसानें खरीप पिकांना मदत होते व नोवेंबर ते मार्च महिन्यांतील पावसानें रब्बी पिकांस उपयोग होतो. हाच पाऊस संयुक्त प्रांतांत मार्च व मेच्या दरम्यान पुष्कळ पडतो. व त्यामुळें येथें पेरे लवकर होतात. यावेळीं केव्हां केव्हा दक्षिण हिंदुस्थानांत आंब्यांच्या हंगामांत पाऊस पडतो. निरनिराळ्या प्रांतांतील पावसाचें सारासरी मान खालीं दिलेल्या कोष्टकात नमूद केल्याप्रमाणें असतें.

प्रांताचें नांव	पाऊस इंच	प्रांतांचें नांव	पाऊस इंच
वायव्य स. ह.			
वरील प्रांत	१६·९	राजपुताना	
पंजाब-पूर्व व		पश्चिम भाग	१३·१
उत्तर भाग	२३·१	पूर्व भाग	२५·२
–दक्षिण व			
पश्चिम भाग	९·२	मुंबई–गुजराथ	३२·६
सिंध	६·५	" कोंकण	१०९·३
संयुक्तप्रांत–पूर्व-		" डेक्कन देश	३०.८
भाग	३९·२		
" पश्चिम		मध्यप्रांत—	
भाग	३७·९	पश्चिम भाग	४५·४
बहार–ओरिसा	५६ ८	पूर्व भाग	५२·१
छोटा नागपूर	५१·९	वऱ्हाड	३२·२
बहार	४८·६		
बंगाल–पूर्वभाग		हैद्राबाद उ. भा	३४·९
" पश्चिम	७४·८	" द. भा.	३०·६
आसाम	९८·८		
ब्रह्मदेश–उत्तर		मद्रास. मलबार	१२७·६
भाग	४५·२	" दक्षिण व पूर्व	३५·०
" द. भाग.	१२९·२	" डेक्कन	२४ ४
मध्य हिंदुस्थान		" उ. किनारा	३९·५
पश्चिम भाग	३३·६	म्हैसूर	३६·१
पूर्व भाग	३८·७		

सह्याद्रीवर कित्येक ठिकाणीं २५० पासून ४०० इंचांपावेतों पाऊस पडतो. आसामांतील चेरापुंजी या ठिकाणीं ४६० इंचांपर्यंत पाऊस पडतो.

वनस्पतीची पुनरुत्पत्ति करण्याचे प्रकार.—हल्लीं जीं पिकें शाकभाज्या, फळफळावळ वगैरे वापरण्यांत येतात, त्यांची पूर्वपीठिका पाहिल्यास त्यांचे मूळचे प्रकार जंगलांत आपोआप बीं, मुळें, व डोळे वगैरेनीं होत असत. मनुष्य प्राण्यानें आपल्या कल्पनेनें फांद्यांचे व खोडाचे तुकडे करून लागण करणें, कलमें करणें, डोळे बांधणें, बियांची निवड करणें, मिश्रण किंवा संकर करणें वगैरे फेरफार करून जास्त व चांगल्या उत्पन्न देणाऱ्या वनस्पती तयार करण्याचे प्रयत्न केले आहेत. ज्याप्रमाणें रानटी मनुष्य शहरांत आला म्हणजे त्याच्या स्वभावांत व चालचालणुकींत फरक होतो त्याप्रमाणें

रानांत होणारी पिकें, भाज्या, फळें, शेतांत व मळ्यांत लाविल्यास, त्यांचा रानटी निबरटपणा लोपून जाऊन तीं आकारांत मोठीं, कोमल व रुचकर होतात. भेंडी, काकडी, दोडका, वांगें, भोपळा, वगैरे अनेक भाज्या रानटी स्थितींत कांटेरी, कडु, उग्र अशा असतात; त्यांत मनुष्यानें निवड, मिश्रण, कलमें वगैरे युक्त्यांनीं सुधारणा घडवून आणिली आहे. परंपरा वाढविण्याचे जरी असले अनेक प्रकार आढळून येतात, तथापि शेतींतील बहुतेक पिकांची वाढ बियापासून केली जाते असें म्हणण्यास हरकत नाहीं. निदान तृण व कडधान्य हीं जीं खाण्याचीं मुख्य धान्यें होत त्यांची वाढ बियांपासून होते. गोराडू, बटाटे, सुरण वगैरेंची वाढ तुकडे करून ते लावून कारितात. रताळ्याची वाढ त्याच्या वेलापासून अगर रताळ्याचे तुकडे लावून करितात. पानवेलीची वाढ वेलाचे तुकडे लावून करितात. फळझाडाची वाढ करण्यांत कलमें करणें, बांधणें वगैरे पद्धतींचा जास्त उपयोग करण्यांत येतो.

पि कें.—कोणत्याहि भागांतील पिकें सर्वस्वी जमिनीच्या मगदुरावर अवलंबून असतात, पण त्यांतले त्यांत पाऊस काळ, उष्णता, दंव व हवेंतील ओलावा यांवर विशेषतः तीं फार अवलंबून असतात. पिकें करण्याचे मुख्य दोन हंगाम आहेत. एक खरीप व दुसरा रब्बी. यांचे पुन्हां दुसरे तीन भाग करतां येतात. एक जून ते सप्टेंबरपर्यंत पावसाळा, आक्टोबर ते डिसेंबरपावेतों हिंवाळा व मार्च ते मेपर्यंत उन्हाळा. खरीप हंगामाचा पेरा जून ते जुलईपर्यंत होतो; व त्याची कापणी सप्टेंबरपासून डिसेंबरपर्यंत होते. रब्बी पिकांनां खरीप पिकांपेक्षा पाऊस कमी लागतो. उत्तर हिंदुस्थानांत या पिकाना दहिंवरापासून बराच फायदा होतो. रब्बी पिकांची पेरणी आक्टोबर व नोव्हेंबरांत होऊन कापणी मार्च एप्रिलमध्यें होते. तादूळ, ज्वारी, बाजरी, व गहूं हीं हिंदुस्थानांतील लोकांच्या खाण्यांत येणारीं मुख्य धान्यें होत. यापैकीं ज्वारी, बाजरी, खाणारे लोक दक्षिण हिंदुस्थानात फार असून उत्तरहिंदुस्थानांत गहूं खाण्याची फार चाल आहे. तादूळ खाणारे लोक थोड्या बहुत प्रमाणात सर्वत्र आहेत. तथापि बंगाल, आसाम, ब्रह्मदेश व मद्रास या प्रातात तांदूळ हें खाण्याचें मुख्य धान्य होय. तांदूळ पिकण्यास उष्ण व दमट हवा, भरपूर पावसाळा किंवा पाण्याचा भरपूर पुरवठा लागतो. यामुळें बंगाल, आसाम, ब्रह्मदेश, मद्रास पूर्व व पश्चिम किनाऱ्याजवळील प्रदेश, ओरिसा व संयुक्तप्रांतांतील कांहीं भाग यात तादूळ पुष्कळ पिकतो. गहूं हें रब्बी पीक आहे. याला सुपीक जमीन व कडक थंडी किंवा कोरडी हवा लागते. म्हणून उत्तर हिंदुस्थानांत, संयुक्त प्रांत, पंजाब, सिंध, माळवा, रजपुताना व मध्यप्रांतांतील कांहीं भाग यांत गहूं पुष्कळ पिकतो. ज्वारी दोन प्रकारची असते. एक खरीप व दुसरी रब्बी जेथें उत्तम जमीन असून पहिल्या हंगामांतील पाऊस बेताचा पडतो, परंतु रब्बी हंगामांत थोडा जास्त पडतो, तेथें रब्बी शाळूचें पीक करतात. खरीप जोंधळा दक्षिण गुजराथ, खानदेश, सातारा, धारवाड व बेळगांव या जिल्ह्यांत जास्त होतो. निझामच्या राज्यात मराठवाड्यांत जोंधळा पुष्कळ पिकतो. मध्यप्रांतांतहि जोंधळयाचा पेरा पुष्कळ आहे. बाजरीला साधारणपणें हलकी जमीन व बेताचा पाऊस लागतो. बाजरी व जोंधळा हीं पिकें मुख्यत्वेंकरून मुंबई इलाखा, मध्यप्रात, निझामचें राज्य, व मद्रासपैकीं कांहीं भाग यांत होतात.

कडधान्यें.—तुरीचें पीक सर्वत्र होतें. तथापि जेथें थंडी फार व पाऊसहि फार, तेथें ती चांगली होत नाहीं. हरबरा हें रब्बी हंगामांतील पीक असून ज्या ठिकाणीं गहूं होतो तेथें हरभरा उत्तम होतो. उत्तर हिंदुस्थानांत हें पीक महत्वाचें आहे.

उंस—थोड्याबहुत प्रमाणात ऊंस सर्वत्र होतो. परंतु या पिकाला बारा महिने पाण्याचा भरपूर पुरवठा लागतो. उत्तर हिंदुस्थानांत जमीन सुपीक असून पाण्याचा पुरवठा चांगला आहे तेथें व मद्रास इलाख्यात कृष्णा, गोदावरी, या नद्यांच्या मुखाजवळील प्रदेशात व मुंबईइलाख्यांत कालव्याखाली ऊंस बराच पिकतो.

वर नमूद केलेल्या खाण्याच्या धान्याखेरीज निरनिराळ्या तऱ्हेचा भाजीपाला, निरनिराळ्या प्रकारची फळफळावळ, दूधदुभतें, अंडीं, कोंबडीं, बदकें, मेंढ्या व शेळ्या वगैरे जिनसाचा खाण्याच्या पदार्थांत समावेश होतो. याखेरीज विवाक्षित जातींच्या आहाराकरितां गाई, वासरें, म्हशी वगैरे गुरें मारिलीं जातात.

समुद्रकिनाऱ्याच्या पट्टयात नेहेमीं असंख्य मासे सांपडतात, त्यापैकीं कांहींचा उपयोग खताकडे होतो. तथापि कोळी, खारवी वगैरे बऱ्याच लोकाचा उदरनिर्वाह माशावर होतो. खारवलेल्या माशाचा घाटावर बराच व्यापार चालतो. मद्रास व बंगाल इलाख्यांत माशात सुधारणा घडवून आणण्यासाठीं व त्याचें उत्पन्न वाढविण्यासाठीं शेतकी खात्याची स्वतंत्र शाखा उघडण्यांत आली आहे.

भाजीपाला;—दररोजच्या खाण्याच्या पदार्थांमध्य शाकभाजीचा कोणता तरी पदार्थ अवश्य होऊन बसला आहे. व शाकाहारी लोकांत तर तो अवश्यच आहे. मासाहारी लोकांतहि आठवड्यातून कांहीं दिवस शाकभाजीचा उपयोग करणें अवश्य मानिलें जातें.

खेड्यापाड्यांत पावसाच्या पाण्यावरच भाज्या करतात. पाऊस संपल्यानंतर पाण्याचा सांठा असेल तर व खतहि मिळाल्यास दुसऱ्या ऋतूंतहि त्याचे दुसरे प्रकार करतां येतात. खेड्यापाड्यांत भाज्यांचा खप फारसा नसल्यामुळें त्या करण्यापासून फायदा होत नाहीं. शहरांच्या आसपास अशा भाज्या जास्त खर्च करून केल्यास त्यांचा खप होतो, म्हणून भाज्यांचे मळे बहुतकरून मोठ्या शहरांजवळ अथवा त्यांच्याशीं सोईचें दळणवळण असलेल्या गांवांतून करतात.

भाजीपाला करणें ही फायद्याची बाजू असल्यामुळें परप्रांतांतून व परदेशांतून निरनिराळ्या जातींचें बीं, प्रसंगीं पुष्कळ घस सोसून मळेवाले आणितात व त्यांतून हवापाण्यास योग्य असे प्रकार कोणते आहेत. हें अनुभवानें ठरवून त्या जातींची वाढ करितात. ही वाढ लोकांच्या अभिरुचीवर अवलंबून असणार, परंतु त्याशिवाय हवापाण्याची योग्यता हें मुख्य कारण आहे. हिंदुस्थानांत आलेल्या कांहीं विलायती भाज्या दक्षिणेकडील लोकांस फार आवडतात. परंतु त्या दक्षिणेंतील हवेंत होतच नाहींत, म्हणून त्यांचें बीं इकडे आणून लागवड करीत नाहींत. परंतु या स्थितींतहि सुधारणा होत आहे.

ज्याप्रमाणें थंड देशांतील मनुष्य व इतर प्राणी उष्ण देशांत रहाण्यास परिस्थितीच्या बदलण्यानें योग्य होतात त्याचप्रमाणें अतिशय थंड देशातील भाज्या मध्यम थंड देशांत आणिल्या असतां थोडया फरकानें तेथें तयार होऊं लागतात. मध्यम थंड देशातील बियाणें समशीतोष्ण हवेंत कांहीं दिवसांनीं व्हावयास लागतें; व अखेर पूर्ण उष्ण हवेंतहि थंड हवेच्या देशातील भाज्या तयार होऊं लागल्या आहेत. कोबी, कॉलीफ्लावर वगैरे थंड देशांतील भाज्यांच्या जाती हिंदुस्थानांतील उष्ण भागातहि होऊं लागल्या आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील वांगीं, भेंडया, बेलवांगी वगैरे भाज्या विलायतेंत हवेची परिस्थिति बदलून करतां येतात.

यूरोपच्या दक्षिण भागातील बियाणें आणिल्यास हिंदुस्थानात त्याच्यापासून भाज्या बऱ्या होतात. त्याहीपेक्षा मध्य अमेरिकेंत व उत्तर अमेरिकेंतील दक्षिण भागांतील हवामान उत्तर हिंदुस्थानांतील हवेशीं मिळते. म्हणून तिकडील मूळ अमेरिकन बेण्यापासून दक्षिणेंत झालेलें बेणे परदेशी बेण्यापेक्षां जास्त फलद्रुप होतें असाहि अनुभव आहे. अमेरिकेंत वसाहत झाल्यानंतर तिकडे यूरोपातून निरनिराळया भाज्या गेल्यावर तेथील हवेंतील परिस्थितीप्रमाणें त्यांत फरक झाला. त्याचप्रमाणें हिंदुस्थानातील हवेच्या परिस्थितीनुरूप त्यांत फरक झाला आहे.

वरील सर्व गोष्टी ध्यानांत घेतां हल्लीं भाजीपाल्याची जी स्थिति आहे, तीपेक्षां भविष्यकाली पुष्कळ निरनिराळे फेरफार दृष्टीस पडतील असें अनुमान करणें गैर होणार नाहीं. क्वचित थोडया प्रकारांचा लोपहि होत आहे. भेंडी, वांगें, दोडका व वेलवांगे, बटाटा, कोबी, फुळवर, घेवडा, श्रावणघेवडा, भोपळा, काकडया, मिरच्या, वाटाणे यांच्यांत गेल्या २५—३० वर्षांत किती फरक झाले आहेत. तसेंच गोराडु व पांढरी रताळीं कांहीं ठिकाणीं नामशेष होत चाललीं आहेत. यांचा सूक्ष्म विचार केला असता असें अनुमान निघतें कीं दळणवळणाचे प्रकार (मार्ग) सुलभ होत आहेत, त्यामुळें चारीहि खंडांत होणाऱ्या निरनिराळ्या जातींच्या भाज्यांत अधिक अधिक प्रकार निष्पन्न होतील हें साहजिकच आहे.

फ ळ फ ळा व ळ.—लहानापासून मोठयांनां फळ ही वस्तु फार प्रिय वाटते. कोणालाहि भेट पाठवावयाची असल्यास फळफळावळीचा विचार अगोदर केला जातो. मोंगल बादशहांच्या वेळीं त्यांच्याकरितां फार दूर ठिकाणाहून आंबे जात असत. फळें जरी सर्वांनां प्रिय असलीं तरी तीं सर्वांनां घेणें परवडत नाहीं; युरोपियन लोकांमध्यें फळें खाण्याची वहिवाट बरीच आहे. त्यांच्या मागून पारशी, बोहरी, मुसुलमान भाटे वगैरे लोकांनीं त्याचें अनुकरण केलें आहे. परंतु पांढरपेशे लोकांमध्यें फक्त उपासाचे दिवस खेरीज करून फळें खाण्याची वहिवाट बरीच कमी आहे. याचें मुख्य कारण त्यांना तीं घेणें परवडत नाहीं हें होय.

फळें दोन प्रकारचीं असतात. वाळलेलीं फळें म्हणजे बदाम, खारीक वगैरे; हीं महाराष्ट्रात फारशीं होत नाहींत. व ओलीं ताजीं फळें. हीं न शिजवितांच खातात, हीं लुसलुशीत, मऊ, रसाळ व मधुर असतात, व या गुणांमुळेंच तीं सर्वांस प्रिय असतात. हीं पाचक व सारक असल्यामुळें खाद्य पदार्थांमध्यें याना महत्व बरेंच देतात. लोकांच्या वाढत्या अभिरुचिबरोबर फळांनां मागणी फार येत आहे. व त्यांच्या बागाहि सर्व ठिकाणीं जास्त प्रमाणावर लाविल्या जात आहेत. सर्वच फळझाडें सर्व ठिकाणीं होणें शक्य नाहीं. कारण प्रत्येक झाडाची विशिष्ट परिस्थिति ही त्याला मिळालीच पाहिजे. उदा. पपया, अननस, संत्रा, मोसंबे, डाळिंब, अंजीर वगैरे झाडाना पाण्याचा अतिशय चांगला निचरा व कोरडी हवा पाहिजे. केळ, पेरू, द्राक्ष, यांना जरा कमी निचऱ्याच्या जमिनी चालतात. सुपारी, पपनस, नारळ, केळ वगैरेंना हवा फार दमट पाहिजे. स्ट्रॉबेरी, पीच वगैरे झाडास समुद्रसपाटीपासून बरीच उंच जागा लागते. चिकू, संत्रा, मोसंबे, द्राक्षें वगैरे झाडाच्या बागा करण्यासाठीं फार मोठें भांडवल लागत नाहीं. डाळिंब, आंबा, संत्रा, नारळ वगैरे झाडांचे कीटक शत्रू फार आहेत. पण पपया, केळ, अननस, सुपारी याना कीटकापासून फारशी भीति नसते. द्राक्षें, सुपारी, संत्रा, मोसंबे वगैरे झाडांचे वनस्पतीजन्य रोगां-(अळिंब)पासून फार नुकसान होतें अंजीर, रामफळ, सिताफळ, पेरू, द्राक्ष वगैरे फळें फार वेळ न टिकणारीं असल्यामुळें याना गिऱ्हाईक वेळेवर व जवळ मिळालें पाहिजे. आंबा, संत्रा, मोसंबे, चिकू वगैरेंचीं रोपें विकत घेतेवेळीं फार काळजी घ्यावी लागते. नाहीं तर तीं खोटीं व वाईट लागण्याचा फार संभव असतो. यावरून फळझाडांच्या लागवडीला बरेंच धोरण व त्यासंबंधीं सर्व प्रकारची माहिती मालकाला असणें अत्यंत जरूर असतें. कारण हीं बहुतेक झाडें फार वर्षे टिकणारीं असल्यामुळें एकदां झालेली चूक पुढें सुधारतां येणें बहुधां शक्य नसतें. झाडांची खणणी-खुरपणी, छाटणी, खत देणें, रोगांवर उपाय वगैरे गोष्टी मालकाला स्वतःला माहीत असून त्यानें आपल्या गडीमाणसांनां शिकवून त्यांच्याकडून वेळेवर त्या करून घेतल्या पाहि-

जेव हिंदुस्थानांत फळझाडांची लागवड वाढत असली तरी बाहेरून फळें आणावीं लागतातच. विशेषतः डाळिंबें, संत्रीं हीं इतर प्रांतांतून फार येतात. परंतु ही स्थिति जाऊन आपल्या इकडे भरपूर फळफळावळ तयार होऊन ती सर्वांना मिळाली पाहिजेत, इतकेंच नव्हे तर टिकाऊ फळें बाहेरच्या देशांत पाठवून तेथील गिऱ्हाईक पटकावण्याची हिंदुस्थानची ताकद असूनहि योग्य तीं शास्त्रीय माहिती, धाडस, भांडवल, उद्योग, व राजाश्रय याच्या अभावीं सर्व गोष्टी कल्पनासृष्टींतच रहातात.

जो माल तयार होईल त्याला पुरेसें गिऱ्हाईक मिळत नसल्यास त्यापासून रस, तेल, ॲसिडें वगैरे जिन्नस तयार करून माल खपविण्याची खटपट झाली पाहिजे. आंब्याचा रस बाटल्यात भरणें, आंब्याचें लोणचें करणें, पडीच्या आंब्याची आवेशी करणें, कागदी लिंबापासून नायट्रिक आसिड करणें, पेरूपासून जेली करणें, वगैरे रीतिनें पक्का माल तयार करणें ही फळझाडाच्या लागवडीच्या धंद्यातील परिणत स्थिति होय.

इसवी सन १९१४-१५ सालीं मुख्य खाण्याच्या धान्या-खालीं व इतर पिकाखालीं पुढें नमूद केल्याप्रमाणें क्षेत्राची वाटणी होती.

खाण्याचीं धान्यें

भातः—सात कोटी ऐंशी लक्ष एकर.

गहूंः—दोन कोटी साठ लक्ष एकर.

जंवः—ऐंशी लक्ष एकर.

ज्वारीः—दोन कोटि दहा लक्ष एकर.

बाजरीः—एक कोटि साठ लक्ष एकर.

नागली (नाचणी)—चाळीस लक्ष एकर.

मकाः—साठ लक्ष एकर.

हरभराः—एक कोटि पन्नास लक्ष.

इतर तृण व कड धान्येंः—तीन कोटी दहा लक्ष एकर.

एकूण खाण्याच्या धान्याखालीं एकंदर जमीन वीस कोटी पन्नास लक्ष एकर होती.

ऊंसः—सवीस लक्ष एकूणसाठ हजार एकर.

गळिताचीं धान्यें—पन्नास लक्ष एकर.

ज्यूटः—तेहतीस लक्ष एकर.

इतर तंतुपिकें—नऊ लक्ष शहात्तर हजार एकर.

नीळः—एक लक्ष शेचाळीस हजार एकर.

अफूः—एक लक्ष एकूणऐंशी हजार एकर.

चहाः—पांच लक्ष चौऱ्यायशी हजार एकर.

काफीः—सत्यायशी हजार एकर.

तंबाखूः—दहा लक्ष छपन्न हजार एकर.

सिंकोनाः—पांच हजार एकर.

गांजाः—दोन हजार एकर

इतर औषधी व कैफी पिकें:—एक लक्ष तेहतीस हजार एकर.

चाऱ्याचीं पिकें:—(ओट, गिनी गवत, लसूण, घास वगैरेसह). त्रेसष्ट लक्ष त्रेसष्ट हजार एकर.

फळफळावळ व भाजीपालाः—एकूणसाठ लक्ष, एकतीस हजार एकर.

सन १९१४-१५ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांत २६ कोटी १० लक्ष एकर जमीन लागवडीखालीं होती. तीपैकीं शेंकडा दहा गव्हाखालीं, शेंकडा ३० तांदुळाखालीं आणि शेंकडा ३८ तीं इतर खाण्याचीं धान्यें (डाळी साळी वगैरे) यांच्याखालीं क्षेत्र होतें. शेंकडा ६ क्षेत्र गळिताच्या धान्याखालीं असून शेंकडा ७ कापूस, ताग व इतर तंतुपिकाखालीं होतें. याखेरीज ऊंस, चहा आणि तंबाखू ह्या महत्वाच्या पिकाखालींहि बरेंच क्षेत्र होतें.

पाश्चात्य देशांतील दर एकरीं उत्पन्नाच्या आंकड्याचें निरिक्षण केल्यास येथील पिकांचें उत्पन्न वाढविण्यास अद्यापि पुष्कळ वाव आहे असें वाटतें.

इ स. १९१६-१७ सालचें दर एकरी सरासरी उत्पन्न पुढील कोष्टकांत दिलें आहेः—

प्रांताचें नांव	पिकाचें नांव	दर एकरी सरासरी उत्पन्न पौंड	एकंदर लागवडींत असलेल्या क्षेत्राशीं शेंकडा प्रमाण
		भात	
बंगाल	हिंवाळी	१०३६	२६·३
	उन्हाळी	११७९	
	पावसाळी	८७१	
मद्रास	एकंदर	१३८५	१४·१
बहार	हिंवाळी	१२३४	२०·५
ओरिसा	पावसाळी	८००	
	उन्हाळी	८००	
ब्रह्मदेश			
उत्तरभाग		१०३४	२·७
दक्षिणभाग		१०८३	१०·६
मुंबई	एकंदर	१२३०	२·३
मध्यप्रांत व वऱ्हाड	,,	६२४	६·४
		गहूं	
पंजाब	पाणभरते	९६४	३७·६
	कोरडवाहू	६०६	
संयुक्तप्रांत	पाणभरते	१२५०	२८·७
	कोरडवाहू	८५०	
मध्यप्रांत	एकंदर	६००	१४·६
मुंबई	पाणभरते	१२५०	६·३
	कोरडवाहू	५९०	
		ज्वारी	
मुंबई	पाणभरते	१५५०	३२·७
	कोरडवाहू	६७०	

(पृष्ठ ६३७ वरून पुढें चालू)

मद्रास	कोरडवाहू	६९६	२४·३
मध्यप्रांत	,,		
व वऱ्हाड	एकंदर	६६८	२९·२

बाजरी

मुंबई	एकंदर	४००	३२·९
मद्रास	,, ,,	६२४	२२·५
पंजाब	पाणभरते	५६८	१७·०
	कोरडवाहू	४१६	
संयुक्तप्रांत	एकंदर	५५०	१६·६

इतर पिकांचे दर एकरी सरासरी उत्पन्न

पिकाचें नांव	उत्पन्न पौंड	पिकाचें नांव	उत्पन्न पौंड
भात	१०६२	हरभरा	७२०
गहूं	८३०	जवस	३५७
सातू	१०४७	तीळ	२८०
ज्वारी	७९७	सरस व मोहरी	४६७
बाजरी	५०२		
नाचणी	१०५९	गूळ	२७५४
मका	१०२५	कापूस	१०२
तूर	८४०	ज्यूट (ताग)	१२९२

कीटकशास्त्र—या शास्त्रासंबंधीं थोडीबहूत माहिती प्रत्येक शेतकऱ्यास असणें जरूरीचे आहे. भातावर, ज्वारीवर व कपाशीवर पडणारे किडे, उंसातील मर, बटाट्यावरील अळी, मावा, वाळवी वगैरे किड्यांपासून दरसाल लाखों रुपयांचें नुकसान होत आहे. यासाठीं या विषयाचें शेतकीदृष्ट्या फार महत्व आहे. कारण हें शास्त्र अगदीं आधुनिक असल्यामुळें त्यासंबंधीं माहितीचा प्रसार व्हावा तसा अद्यापि झालेला नाहीं. शेतकऱ्यांनां कीटक हे प्राणी कोणते, त्यांची रचना कशी असते, त्यांची वाढ कशी होते, रूपांतर आणि जडावस्था कशा होतात, तसेंच त्यांचें अन्न कोणतें, त्याचा एकंदर आयुष्यक्रम कसा चाललेला असतो यांची माहिती झाली पाहिजे. म्हणजे हल्लीं एखाद्या पिकाला कीड पडली किंवा रोग झाला म्हणजे शेतकऱ्यांनां ही एक दैविक आपत्ति आपणावर ओढवली आहे, किंवा हे रोग देवानें आभाळांतून किंवा स्वर्गांतून पाठविले आहेत ही समजूत त्यांच्या मनांतून नाहींशी होईल. पिकावरील किडे अनेक प्रकारचे असतात. फूलपांखरें, मधमाशा, कठिण पंखाचे किडे, ढेंकूण, मुंग्या, पिसा वगैरे प्राणी जे आपल्याला आढळतात, त्याचे आकार खाणें, पिणें, वाढ वगैरे मोठ्या प्राण्यांहून अगदीं भिन्न असतात. कित्येक किड्यांना आपलें भक्ष्य खाण्याकरितां दाभाडे असतात, कित्येक तें चावून खातात. कित्येकांस सोंड असते. मावा व पिकावरील अनेक जातीचे किडे, माशा, डांस वगैरे आपलें भक्ष्य सोंडेनें शोषून घेतात.

कीटकात एकंदर चार अवस्था असतात त्या अंडें, अळी, कोश पूर्ण कीटक. ज्यांत रूपांतर नसतें त्यात कोशावस्था नसते. बहुतेक किडे अंडीं घालतात. कित्येक वेळीं तीं वेगवेगळालीं व कित्येकवेळीं त्यांचे चिकटलेले पुंजके असतात. कित्येकांचीं अंडीं चार पांच ते वीस दिवसांत फुटतात, तर कित्येकांनां अनेक महिने लागतात. अंडीं फुटून आल्या व किडी बाहेर पडल्या म्हणजे भक्ष्याचा शोध करतात व तें मिळाल्याबरोबर अधाशाप्रमाणें खाऊं लागतात. किड्यांच्या आकारमानानें ते इतर प्राण्यांपेक्षां जास्त खातात. म्हणून पिकांवर कीड पडली म्हणजे ते त्याचा फन्ना उडवितात. किडे मोठे झाले म्हणजे त्याना कोशावस्था प्राप्त होते. या स्थितींत प्राणी बहुतकरून कांहीं खात नाहींत व हालचाल करीत नाहींत. अशा स्थितींत कांहीं १०–१५ दिवस तर कांहीं महिनाभरहि रहातात. कोशेट्यांतून पतंग बाहेर पडणें यासच रूपांतर म्हणतात. म्हणजे आळीचा पतंग होतो. पण असें टोळांत होत नाहीं. अंड्यांतून बाहेर पडणारा प्राणी आळीसारखा असून लहान टोळच असतो. दिवस भरले म्हणजे तो कोशेटा फुटून त्यांतून पतंग, फुलपांखरू वगैरे बाहेर पडतें. ह्या स्थितींत ते प्राणी कांहीं खात नाहींत, व पिकाची खराबीहि करीत नाहींत. परंतु नर मादी याचा संयोग होऊन अंडीं घालतात, व दोन्ही मरून जातात. दुसऱ्या पिढीस ह्या अंड्यापासून सुरुवात होते. ह्या अंड्यापासून निघालेल्या सुरवंटासारख्या किड्याच्या अवस्थेमध्येंच पिकाची नुकसानी होते. पिकें निघाल्यानंतर किडे दुसरें पीक येईपर्यंत जडावस्थेंत पडून राहतात. त्यावेळीं त्यास खाण्यास कांहीं लागत नाहीं. ही अवस्था चार पाच महिन्यांपासून एक वर्षपर्यंत सुद्धा असते. वर नमूद केल्याप्रमाणें कीटकाचा आयुष्यक्रम व निरनिराळीं स्थित्यंतरें यांची माहिती झाली म्हणजे शेतकऱ्यांनां त्यांचें निर्मूलन करण्याकरिता कोणते उपाय व ते केव्हा योजावे हें त्याच्या लक्षात सहज येईल. उपाय तीन प्रकारांनीं करता येतात; प्रतिबंधक, निवारक व मारक. या उपायाची सविस्तर माहिती सासर्गिक व पोटात गेली असता मारक होणारीं विषें कोणतीं, तीं कोणत्या प्रमाणात व केव्हा वापरावीं, तीं शिंपडण्याचीं यंत्रें, फवारे वगैरे केव्हां व कशीं उपयुक्त आहेत वगैरेंसंबंधीं सविस्तर माहिती या विषयावरील स्वतंत्र लेखांत दिलेली आहे. होता होईतों उपद्रवी कीटकासंबंधीं उपायासह माहिती दर पिकाखालीं दिलेली आहे. याखेरीज कोठारांतील व सांठविलेल्या धान्यांना कीटकापासून किती नुकसान होतें त्याचा प्रसार कसा होतो, त्यांचा प्रतिकार करण्याकरितां कोणते उपाय योजावे, जनावरांस गोचिड, उवा, गोमाशा, वगैरेपासून कसा उपद्रव होतो हें सांगून त्यांवर उपाय सुचविलेले आहेत.

उपयुक्त किडे.—रेशमाचे किडे, मधमाशा, लाख बनविणारे किडे वगैरेसंबंधीं सविस्तर माहिती त्या त्या स्वतंत्र लेखाखालीं दिलेली आहे.

परोपजीवी वनस्पती व त्यांपासून पिकांस होणारे रोग.—मनुष्यांस व जनावरांस जसे रोग होतात तसेच

अनेक प्रकारचे रोग वनस्पतींसहि होतात. हे रोग पुष्कळ वेळां इतके अकस्मात होतात कीं ते झाल्यावर थोड्याच अवकाशांत सर्व देशभर पसरून भयंकर नुकसान होतें. पाश्चात्य देशांत परोपजीवी वनस्पतींच्या रोगासंबंधीं संशोधनास सुरुवात होऊन सुमारें ८० वर्षे झालीं; तथापि एवढ्या अवधींत मिळालेल्या ज्ञानानें तिकडे शेतकरी वर्गास पुष्कळ फायदा झाला आहे. जमीनींतील व हवेंतील दोष, किडे व परोपजीवी वनस्पती वगैरे वनस्पतींनां रोग होण्याचीं मुख्य कारणें होत.

परोपजीवी वनस्पतींचे दोन वर्ग करितां येतात. एक डोळ्यास स्पष्ट दिसणाऱ्या उदा. बाडगूळ, टारफुला अथवा टवळी, अमरवेल किंवा निमोळ वगैरे. दुसऱ्या सूक्ष्म आकाराच्या वनस्पतींच्या वर्गांत दोन प्रकार आहेत. एक शिलींध्र अगर अलिंब वर्ग; यात कुत्र्याची छत्री, बुरा, बुरसी वगैरे रोग येतात. दुसऱ्या प्रकारात जंतुजन्य रोग येतात. जसें बटाट्याची बागडी अगर चक्री.

गव्हावरील तांबेरा, ज्वारीवरील काजळ्या अगर काणी व द्राक्षावरील भुरी हे शिलींध्र वर्गांत मोडतात. बटाट्यावरील चक्री किंवा बागडी ही जंतुवर्गांत येते. प्रत्येक शिलींध्रकापासून असंख्य रेणू उद्भवतात व ते हवेंतून व पाण्यातून इकडून तिकडे वाहून जातात. जमीनींवरील व झाडावरील रेणू वाऱ्यानें, पशुपक्षी व विशेषतः कीटक यांच्या साहाय्यानें योग्य स्थानास पोंचविले जातात. कांहीं रेणू रुजून ते आपले जाळें पोषक वनस्पतीवर पसरितात व कांहींचीं शोषणेंद्रियें पोषकाच्या त्वचेंतून आंत शिरतात व अन्न शोषून घेतात. अशा रोगांची पिकास बाधा झाली म्हणजे त्यांचीं पानें पिंवळी पडतात, कित्येकावर ठिपके व डाग पडतात, कित्येक पिकांत फांद्यावर गळवासारखी वाढ होते; कित्येकांत वाढ खुंटणें, फळें न येणें किंवा गळून पडणें असें होतें. कित्येकांत धान्याऐवजीं रोग, रेणूचे झुबके येणें वगैरे प्रकार होतात. अशा या शिलींध्ररूपी रोगांनीं पिकाचें दरवर्षी अतोनात नुकसान होतें. गव्हांवरील "तांबेऱ्या" पासून हिंदुस्थानात दरवर्षी कमींत कमी चार कोटी रुपयांचें नुकसान होत असावें असें अनुमान काढलेलें आहे. दुसरें ढोबळ उदाहरण म्हणजे काणी अगर काजळ्या रोगाचें होय. या रोगापासून दरसाल फक्त मुंबई इलाख्यातच सुमारें २ कोटी रुपयांचें नुकसान होत असावें असा तज्ज्ञ माणसांचा अजमास आहे.

वरील हकीकतीवरून रोगाचें विशेषतः शिलींध्रजन्य रोगाचें अस्तित्वच आधीं रोगानें सर्व काम करून टाकिल्याखेरीज उघडकीस येत नाहीं. याकरितां नजरेस आल्यावर रोगावर उपचार करणें जवळ जवळ अशक्य असल्यामुळें तो न होऊं देण्यास प्रतिबंधक उपायांची योजना करणें हें फार सोपें आहे. प्रतिबंधक उपाय येणेंप्रमाणें:—

जमीन काळजीपूर्वक तयार करणें; पाण्याच्या निचऱ्याची सोय करणें; फाजील पाणी न देणें; पिकांत फेरफार करणें; बीं तपासून लावणें, रोगांस न जुमानणारे व निवडक बीं पेरणें, निरोगी जात प्रयोग करून उत्पन्न करून तिचेंच बीं पुढें उपयोगांत आणणें, शेत स्वच्छ ठेवणें व झाडांत दाटी न होऊं देणें; शिलींध्रघातक द्रव्यांत बीं पेरण्यापूर्वी भिजवून नंतर पेरणें; रोग झाल्यावर किंवा पूर्वी शिलींध्रघातक विषारी पदार्थांचें मिश्रण पिकांवर योग्य वेळीं शिंपडणें; जखमांस व व्रणांस रोगप्रतिबंधक औषधें लावणें वगैरे.

हल्लीं परोपजीवी वनस्पतिजन्य रोगापासून गव्हांवरील तांबेरा, ज्वारीवरील काणी, द्राक्षावरील भुरी, ऊंस गाभ्यांत रंगणें, बाजरी, ज्वारीवरील केवडया किंवा गोसावी, सुपारीवरील गळ किंवा कोळे रोग बटाट्यावरील चक्री किंवा बांगडी हे परोपजीवी वनस्पतिजन्य रोग मुख्य पिकावरील असून त्यापासून दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें नुकसान होत आहे याकरिता वर नमूद केलेल्या रोगप्रतिबंधक उपायानीं योग्य वेळीं तजवीज केल्यास शेतकऱ्यास हल्लींपेक्षा बराच जास्त फायदा होईल यात संशय नाहीं. रोगांसंबंधीं चिकित्सा व त्यावरील उपाय यासंबंधीं इत्थंभूत माहिती या विषयावरील स्वतंत्र लेखांत पहावी.

शे ता चीं ख तें:—जमीन निकस होऊ नये म्हणून शेतकी चांगली मशागत करणें, शेत पड टाकणें, पिकात फेरबदल करणें पिकें मिसळून करणें. जमीनींत खत घालणें व बेवड करणें वगैरे अनेक योजना करण्यांत येतात. त्यांपैकीं खत घालून जमीनीची सुपीकता राखणें ही बाब फार महत्वाची आहे. सर्व शेत कसणारास खतांचें महत्व अवगत आहे. हिंदुस्थानात मुख्य खत म्हणजे शेणखत होय. गुरांच्या मुताची किंमत शेणखताइतकी किंबहुना जरा जास्तच असून देखील तें राखून ठेवण्याची वहिवाट नाहीं. ते बहुतेक वाया जातें.

शहरात रस्त्यावर, गल्लींत, व जिकडे जिकडे गुरें चरत असताना किंवा फिरत असताना शेण पडेल तेवढें गोंवऱ्यासाठीं किंवा सारविण्यासाठीं गोळा करण्यांत येतें. शेतकऱ्यांच्या घरीं सुद्धा बऱ्याच शेणाच्या गोंवऱ्या लावून वाळवून त्यांचा सर्पणाकडे उपयोग करितात, किंवा त्या शहरांत नेऊन विकतात. शेणखताचा असा अपव्यय होणें म्हणजे जमीनीचें मोठें नुकसान आहे. याचें मुख्य कारण लागवडी खालीं असलेल्या क्षेत्रात सर्पणाचा तुटवडा होय. जें थोडें बहुत शेणखत राहील त्याचा उपयोग ऊंस, पानमळे, फळफळावळीच्या बागा व भाजीपाला यांसारख्या बागाईत पिकांकडे होतो. शेणखताखेरीज घरांतील केरकचरा राख, गांवठाणांतील माती, तळ्यांतील गाळ, निरनिराळ्या प्रकारच्या पेंडी, मासळी, सोऱ्याची माती, सोरा वगैरे जिन्नसांचा खताकरितां उपयोग करितात. गोव्याकडे खारी माती नारळींनां घालितात. मद्रास इलाख्यांत कांहीं ठिकाणीं जुन्या घरांतील वाघळांची शीट व डुकराची विष्ठा खतासाठीं

वापरितात. बऱ्याच ठिकाणीं गुरें शेतांत बांधतात. मोठमोठ्या शहरांत म्युनिसिपालिटी सोनखत तयार करिते त्याचा बागाइताकडे फार चांगला उपयोग होतो.

ज्या ठिकाणीं ड्रेनेज चालू आहे त्या ठिकाणीं साडपाण्यावर उत्तम पिकें येतात, असा अनुभव आहे.

हिंदुस्थानांत द्विदल धान्यें पुष्कळ आहेत. तीं बहुतेक इतर पिकांबरोबर पेरितात त्यांच्या मुळ्याचा व पाल्याचा जमीनीची सुपीकता राखण्याकडे पुष्कळ उपयोग होतो. ताग, कुळिथा, सारखीं पिकें करून तीं फुलवऱ्यांत आल्यावर किंवा पूर्वी जमीनींत गाडतात. बहार, ओरिसा व मद्रास इलाख्यात जेथें निळीची बरीच लागवड करतात, तेथें नीळ काढून घेतल्यावर जो झाडांचा भाग रहातो त्याला सीट असें म्हणतात. तो जमीनींत गाडतात. त्याचा हिरवाळ खताकरिता चांगला उपयोग होतो. भातशेतींत मद्रासेकडे धाइनच्याचें (लाल देंठाची शेवरी) पीक करून तें शेतांत गाडून टाकतात. याशिवाय तिकडे करंज, मोंगली एरंड, निरगुडी, अडुळसा, रुई वगैरे झाडांचा पाला आणून तो लावणीपूर्वी भातजमीनींत टाकतात. तो कुजला म्हणजे त्याचें चांगलें खत होतें. मुंबई इलाख्यात पुष्कळ पाऊस पडणाऱ्या भागात भाताचे रोपटे (तरवे) पेरण्यापूर्वी त्यात निरनिराळया प्रकारच्या झाडाचे टाहाळ आणून ते जाळतात. त्याला राब भाजणें असें म्हणतात.

कृत्रिम खतांचा उपयोग मुख्यत्वेंकरून चहा, कॉफी, रबर वगैरे पिकें करणारे यूरोपियन मळेवाले आज बरींच वर्षे करीत आहेत. तथापि त्यापैकीं सल्फेट ऑफ अमोनिया, नायट्रेट ऑफ सोडा, सुपर फॉस्फेट, सल्फेट ऑफ पोटॅश, हाडांची पूड, पेंडी, मासळी वगैरे खतांचा कमीजास्त प्रमाणांत बागाईत पिकांत उपयोग होऊं लागला आहे. हल्लीं साकची येथील टाटाच्या कारखान्यात थोड्या प्रमाणात सल्फेट ऑफ अमोनिया तयार होऊं लागला आहे. चांगली मशागत व भरपूर खत दिलें असतां वर्षोंवर्ष गव्हाचें उत्पन्न कसें येतें हें खालीं दिलेल्या राथमस्टेड येथील प्रयोगाच्या आंकड्यावरून लक्षांत येईल.

सन	वार्षिक सरासरी दर एकरी उत्पन्न (बुशल)		वार्षिक सरकारी बुशलांचें वजन पौंड.	
	बिन खतवलेली जमीन	दर वर्षी दर एकरी १४ टन शेणखत घातलेली ज.	खत न घातलेली जमीन	दर वर्षी दर एकरी १४ टन शेणखत दिलेली जमीन.
१८५२–६२	१५·३	३४· ५	५५·९	५९· ०
१८६३–७२	१३·३	३६· ०	५९·३	६१· ०
१८७३	११·८	२६· ८	५७·०	५७· १
१८७४	११·५	३९·२५	...	६०·२५

वरील आंकड्यावरून पहातां असें दिसून येतें कीं चांगली मशागत केली असतां दर एकरी सरासरी १२.९७ बुशल अगर ७४४·२९ पौंड उत्पन्न आलें; व खतविलेल्या जमीनींतील उत्पन्न ३४·१८ बुशेल अथवा २०३० पौंड आलेले आहे. या आंकड्यांवरून खताची जरूरी किती आहे व तें भरपूर मिळाल्यास उत्पन्न किती वाढेल हें विचार करण्यासारखें आहे.

शे तीं चीं आ उ तें.—मशागतीचे दोन भाग करता येतात. एक बीं पेरण्यापूर्वीचा व दुसरा नंतरचा. जमीन नांगरणें, कुळवणें, ढेकळें फोडणें वगैरे कामें पहिल्या प्रकारांत येतात. दुसऱ्या प्रकारात खुरपणी, कोळपणी वगैरे कामें मोडतंता. चांगल्या मशागतींत खालील मुद्दे साध्य झाले पाहिजेत.

(१) जमीन मऊ, बारीक व भुसभुशीत करणें; असें केल्यानें झाडांच्या मुळ्या पसरण्यास व त्यांनां पोषक द्रव्यें घेण्यास सोपें जातें.

(२) जमीनींत ओलावा घेऊन तो राखून ठेवण्याची शक्ति वाढविणें.

(३) जमीनींत हवा खेळवून तींतील पोषक द्रव्यें झाडास घेतां येतील अशा स्थितींत आणणें.

(४) तणांचा, किडयांचा, त्यांच्या अंड्यांचा व वनस्पतिजन्य रोगांचा नायनाट करणें.

वरील चारी मुद्दे देशी आउतांनीं साध्य करून घेतां येतात. नांगर, कुळव, मैद, पेटारी, पाभर, कोळपें हीं शेतीचीं पूर्वापार मुख्य आउतें आहेत. नांगर लहानमोठे असून ते २ ते १६ बैलांनीं ओढतात. भातशेतींत टोणग्याचा उपयोग करतात.

हिंदुस्थानांतील शेतीचीं आउतें लांकडाचीं, फारच थोडीं, साधीं, थोड्या खर्चात होणारीं व खेड्यातील कारागिरांकडून होण्यासारखीं आहेत. सर्व आउतांत नांगरास अग्रस्थान दिलें पाहिजे.

नांगराचे प्रकार:—पूर्वी कुदळ, नंतर हातनांगर नांगर, त्यानंतर बैलाच्या आकारमानानें व शक्तीच्या प्रमाणानें व जमीनीच्या मगदुराप्रमाणें देशपरत्वें (बंगाल, आसाम, गुजराथ, कोंकण, तेलगण, देश, कर्नाटक, वऱ्हाड वगैरे) नांगरांत फरक होऊन निरनिराळ्या आकारांचे नांगर प्रचारांत आले आहेत. हे निरनिराळे फरक नांगराचे भाग लहानमोठे करण्यांत झालेले नसून त्याच्या आंकड्यांत, हलसींत, रुमण्यांत, फाळांत फाळकांबींत व सुताराच्या भरणींत थोडाबहुत फरक झालेला आहे. कोंकणांत नांगर ओढण्यास दोन बैल लागतात. पण देशावर सोलापूर, धारवाडाकडे १२ ते १६ बैल लागतात. मोठया नांगराचा उपयोग जमीन खोल नांगरून कुंदा, हरळी, लव्हाळा, काशा वगैरे तणांचा नायनाट करण्याच्या कामीं मुख्यत्वेंकरून करतात. उथळ नांगरट करण्यास नांगरांचा उपयोग करतात. त्याचप्रमाणें कांहीं भागांत (तापी कांठीं, पंचमहालांत, मध्यप्रांतांतील गव्हाळी भागांत) नांगरीला नळी व चाडें बांधून तिचा बीं पेरणीकडे उपयोग करतात.

कुळवः—कुळवाचा उपयोग नांगरट झाल्यावर किंवा जेथें जेथें नागरट करणें परवडत नाहीं तेथें तेथें कुळवाच्या अगर वखराच्या पाळ्या घालून जमीन तयार करतात. बहुतेक हिंदुस्थानातील शेतांची मशागत याच आउतांवर चालते. कुळवानें जमीन बारीक भुसभुशीत होते. बारीक तणें उपटून पडतात. शिवाय कुळवाचा उपयोग बीं पेरल्यानंतर रासण्या घेण्याच्या कामींहि करतात. कुळवांतहि देशपरत्वें अनेक प्रकार आढळतात.

पाभरः—जमीन तयार झाल्यानंतर पुढें बीं पेरणीचें काम पाभरीनें करतात. पाभरींत एक फणी (नारी)पासून तों दोन फणी, तीन फणी, चार फणी, पांच फणी, सहा फणी असे प्रकार आढळतात.सहाफणी पाभरीचा कर्नाटकांत भातपेरणीस उपयोग करतात. बाकीच्या पाभरींचा खरीप व रब्बी पिकें पेरण्यास उपयोग करीत असून रब्बी पाभरी वजनात थोड्या जास्त असतात त्यांना मोघड असें म्हणतात.पाभरीच्या पेरणींत बीं कमी लागत असून तें समान अंतरावर ओळींत पेरलें जातें. एखादी ओळ वेगळ्या धान्याची पेरावयाची असल्यास मोगणीचा उपयोग केला जातो.

कोळपा.—हें आऊत लहान प्रमाणावर कुळव म्हटला तरी चालेल. यात दोन प्रकार आढळतात. एकात पासेचे दोन तुकडे असून मध्यें एक फट असते. तींतून कोळपताना पिकाची ओळ जाते. दुसऱ्या कोळण्यात कुळवाप्रमाणें सबंध पास असते. कोळप्याचा मुख्य उपयोग म्हणजे पिकाच्या ओळींतील तणझाडें काढून जमीन भुसभुशीत करणें व पिकास थोडीबहुत भर देणें होय. एका जुवावर बहुतकरून दोन कोळपीं व काहीं ठिकाणीं चारहि चालवितात. कोळप्यागणीक वेगळा इसम लागतो.

मैंदः—या आउताचें मुख्य काम म्हणजे ढेंकळें फोडून जमीन सपाट करणें होय. देशावरील हें आऊत म्हणजे तुळवंटच असतें. त्याला बैल जुंपून जमीनीवर ओढतात. कोंकण, गुजराथ, कर्नाटक व इतर भात पिकणाऱ्या भागात जमीन व चिखल सपाट करण्याचें काम खुंटेफळीनें करतात. या आउतांत एका चौकोनी फळीला बारीक बारीक खुंटे बसविलेले असतात. त्याला खुंटे(गुटे)फळी असें म्हणतात.

पेटारीः—कोंकणात ज्या ठिकाणीं दर वर्षी भात खाचराची बांधबंदस्ती करावी लागते तेथें माती इकडून तिकडे वाहून नेण्याकरितां व खांचखळगे बुजविण्याकरितां पेटारीचा उपयोग करतात. देशावरीहि पेटारीचा ताली घालण्याकडे उपयोग करतात. पीक तयार झाल्यावर मळणीचें काम बहुतकरून नुसतीं पिकें झोडून, कांठयानीं ठोकून किंवा बैलांच्या पायांखालीं मळून वाऱ्यानें उपणून धान्य तयार करितात. तथापि गुजराथेंत ओलपाड तालुक्यांत गव्हाची मळणी एका चौकटींत दांते असलेलीं चाकें बसवून त्या आउताच्या साह्यानें करितात. कर्नाटकांत, विशेषतः धारवाड जिल्ह्यांत व बल्लारींत जोंधळ्याच्या कणसाची मळणी लहानशा दगडी रुळानें करितात. त्याप्रमाणेंच खपला गहूं चुन्याच्या घाणींत मळल्यास थोड्या खर्चांत धान्य तयार होतें.

धान्य तयार झाल्यावर तें गाड्यात भरून विक्रीकरितां बाजारांत पाठवितात. गाड्यातहि प्रांतोंप्रांतीं फरक दिसून येतो. खानदेश, वऱ्हाड व कर्नाटक येथें फार मोठी भरीव चाकाची गाडी असते. तिचा उपयोग धान्य घरीं आणण्यास करितात. व ती ओढण्यास ८ बैल लागतात. मध्यप्रांतात अनेक तऱ्हेच्या गाड्या आढळतात. उत्तर हिंदुस्थान व गुजराथ या भागातील गाड्या फार ओजडबोजड असतात.

वरील मोठमोठया आउताखेरीज माती खणण्याच्या कामीं पहार, बडर, खोरें, कुदळ, टिकाव, पेंडस वगैरे आउतांचा उपयोग करितात. माती ओढण्यास व वाफे करण्यास खोऱ्याचा उपयोग होतो. गोठयात शेणखत ओढण्यास व खळयात मदन(मळलेलें धान्य) हलविण्यास दाताळ्याचा उपयोग करितात. खुरप्यानें तण काढितात व विळयानें पिकें कापितात. खळयात धान्य उपणून पाखडून तयार करण्यास तिवई, सुपे, चाळणी मोकरी हीं लागतात. धान्याचा भरडा व पीठ दळण्यास लाकडाचीं मोठीं जातीं व लहान जातीं असतात. वरील हकीकत देशी आउताची झाली. याच्या शिवाय सुधारलेल्या लोखंडी सीटी, अलींग्टन, किर्लोस्कर, मेस्टन् मन्सून वगैरे नागराचा प्रसार मुंबई, मद्रास, मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतात होऊं लागला आहे. याखेरीज कडबा कापण्याचें यंत्र, धान्य उपणण्याचे यंत्र, माती ओढण्याची लोखंडी पेटारी, मक्याच्या कणसातील दाणे काढण्याचें यंत्र, हातानें चालविण्याचें खुरपण्याचें यंत्र, पिकें कापण्याचें यंत्र, धान्य उपणण्याचें यंत्र वगैरे आउतानीं शेतीच्या सुधारणेंत बरीच भर पडलेली आहे.

पूर्वी उंसाचा रस काढण्याकरिता दगडी किंवा लाकडी घाणे असत व अद्यापिहि काहीं ठिकाणीं ते चालू आहेत. तथापि लोखंडी घाण्याचा बराच प्रसार झालेला आहे. अलीकडे ऑइल एन्जिननें चालणारे उंसाचे मोठे चरक व पाणी काढण्याकरिता ऑइल एन्जिनें व पंप प्रचारात येऊं लागले आहेत. अगदीं अलीकडे शेतकी खात्यानें दोन चार ठिकाणीं जमीन नागरण्यासाठीं वाफेनें व मोटारशक्तीनें चालणारे नागर हिंदुस्थानांत आणिले आहेत. त्याचीं कामें बरीं चाललीं आहेत. हल्लीं वॉटर फाइन्डर (पाणी दाखविणारें यंत्र) शेतकी खात्यानें आणिलें आहे. त्या यंत्रानें पाण्याचा झरा जमिनीखालीं आहे किंवा नाहीं हें पूर्वी पाहून नंतर विहिरी खोल करण्याच्या यंत्रानें त्या खणल्या जातात. अशा अनेक तऱ्हेनें शेतींत प्रगति चालू आहे.

पाण्याचा पुरवठा.—ज्या ठिकाणीं पाऊस सरासरी १०-१२ इंचांपेक्षां कमी पडतो तेथें पिकें करणें अति धोक्याचें आहे. अशीं ठिकाणें म्हणजे सिंध प्रांत, पंजाब आणि राजपुताना यांतील बहुतेक भाग होत. अशा भागात व

वायव्येकडील ओसाड मैदानांत नुसत्या गुरांनां बकऱ्या-मेंढयांनां व उंटांनां खाण्यालायख थोडासा चारा व झुडपें यांशिवाय कांहीं होत नाहीं. हल्लीं अशा भागांत व उत्तर हिंदुस्थानांत व मद्रास इलाख्यांतील गोदावरी व कृष्णा या अंतर्वेदी भागांत मोठमोठीं धरणें बांधून कालवे काढिले आहेत. दक्षिणेंत नीरा, गोदावरी, प्रवरा वगैरे नद्यांनां धरणें बांधून मोठमोठे कालवे काढिले आहेत. अशीं ठिकाणें, व ज्या ठिकाणीं विहिरींत भरपूर पाणी असतें असे भाग, व ज्या ठिकाणीं पाऊस मुबलक पडतो असे प्रदेश खेरीजकरून जवळ जवळ सुमारें दहा लक्ष एकर चौरस मैल क्षेत्रावर पावसाच्या कमतरतेमुळें दुष्काळ पडतो असें आढळतें. अशा ठिकाणीं पडतो तेव्हां एकदम पुष्कळ पाऊस पडतो व नाहीं तेव्हा पुरेसा पडत नाहीं. असा भाग म्हणजे मुख्यत्वेंकरून दक्षिणेंतलि सुमारें ३० इंच अगर त्यांहून कमी पाऊस पडणारा भाग होय. याशिवाय मध्यप्रांत माळवा व गुजराथ येथें कधींकधीं दुष्काळ पडतो. सन १९१४-१५ सालीं प्रांतवार पाणभरत्या क्षेत्राचें एकंदर लागवडीखालीं असलेल्या क्षेत्राशीं प्रमाण खालीं दिलें आहेः—

प्रांत	शेंकडा प्रमाण	प्रांत	शेंकडा प्रमाण
दिल्ली	१६	वायव्य सरहद्दी	
मुंबई	४	वरील प्रांत	३४
संयुक्तप्रांत	३१	मणिपूर	२
बंगाल	९	अजमीर,मेरवाडा	३२
बहार व ओरिसा	१८	आसाम	६
पंजाब	४३	सिंध	८२
मध्यप्रांत व वऱ्हाड	३	कुर्ग	३
मद्रास	२८	ब्रम्हदेश	८

एकंदर पाणभरत्या पिकांपैकीं शेंकडा ८४ क्षेत्र खाण्याच्या धान्यासाठीं असून बाकी शेंकडा सोळा इतर धान्याखालीं होतें. खाण्याच्या धान्यांपैकीं १०१,१९,३०० गव्हाखालीं, २,८८,६३,००० इतर तृणधान्य व कडदण या धान्याखालीं व ३७,२९,००० एकर इतर खाण्याच्या धान्याखालीं होतें.

सर्वांत पाणभरत्या क्षेत्राचें प्रमाण सिंध प्रांतांत जास्त असून अगदीं कमी मुंबई, मध्यप्रांतांत, वऱ्हाड, मणिपूर व कूर्गप्रांत यांत असतें.

पंजाबांत जेथें अगदीं उध्वस्त रान होतें, तेथें चिनाब व झेलम नद्यांचे मोठमोठाले कालवे निघाल्यापासून नवीन वसाहती झाल्या आहेत. हिंदुस्थानांत कालव्याच्या पाण्याखेरीज तळीं व विहिरी यांवर बरेंच क्षेत्र भिजविलें जातें. तळ्यांची संख्या निझामच्या राज्यांत, मद्रास इलाख्यांत व म्हैसूर संस्थानात जास्त प्रमाणांत आहे मुंबई इलाख्यांत, गुजराथेंत व कर्नाटकांत बरींच तळीं असून मध्यप्रांतांत तीं जास्त प्रमाणांत आढळतात. तळ्याचें पाणी बहुतकरून पाटानें नेण्यांत येतें. जेथें पाटांत पाणी सोडण्यापूर्वी थोडेंसें उचलावें लागतें तेथें ओकी, हरणी, डोणी, चंपारा झील, टोपली, सारस वगैरेसारख्या साधनांचा उपयोग करितात. सरासरीनें तळ्याच्या पाण्यानें ८० एकर क्षेत्र भिजविलें जातें असा अंदाज आहे.

उत्तरहिंदुस्थानांतील मळईच्या पट्टयांत पुष्कळ विहिरी आहेत व त्याचप्रमाणें कालवेहि आहेत; पण दक्षिणहिंदुस्थानांत बरेंचसें बागाईत विहिरीवरच आहे. हल्लीं विहिरी खोदण्याकरतां सरकार तगाई सढळ हातानें देत असल्याकारणानें व विहिरी खणण्यासाठीं व खोल करण्यासाठीं नवीन यंत्रें निघाल्यामुळें त्यांची संख्या वर्षानुवर्ष वाढत आहे. विहिरींतील पाणी काढण्याचें मुख्य साधन म्हणजे मोट होय. मोटा कातड्याच्या व लोखंडी असतात. कोंकणपट्टींत बहुतकरून रहाट असतात. हल्लीं पाण्याच्या संचयाप्रमाणें हातानें चालविण्याचे, बैलानें ओढण्याचे, ऑइल एनूजिन् व वाफेनें चालणारे पंप जागोजागीं प्रचारांत येऊं लागले आहेत. विहिरीच्या खोलीप्रमाणें एका मोटेवर अडीच ते ५ एकरांपर्यंत बागाईत करितात.

सन १९१४-१५ सालीं कालवे, विहिरी, तळीं वगैरेंच्या साहाय्यानें भिजविलेल्या क्षेत्राचा तपशील खालीं दिला आहे.

सन १९१४-१५ सालीं कालवे, तळीं, विहिरीखालीं भिजविलेल्या जमिनीचा (एकरांचा) तपशील (आंकडे हजारांचे आहेत.)

देशाचें नांव	लागवडीचें एकंदर क्षेत्र.	कालवे. सरकारी	कालवे. खाजगी.	तळ्यांवर	विहिरींवर	इतर रीतीनें	एकंदर भिजविलेलें क्षेत्र
ब्रिटिशहिंदुस्थान.	२६०६४१	१८८८५	२४९६	६९४३	१२५५६	६३०९	४७१९४
मध्यप्रांत	२०२२०	१८	५	५८१	८४	३१	७२१
वऱ्हाड.	७०४७	...	...	½	३२	½	३३
मुंबई इलाखा.	२६४६३	१७८	१९	१३५	५१६	९९	९४८
सिंध.	४९२४	३१९४	९०	...	२३	३७९	३६८७

कृषिशास्त्र व त्याचा शेतीकडे उपयोग.— शेतकी व कृषियंत्र अगर शास्त्र यांचा परस्परांशीं फार निकट संबंध आहे. परंतु या गोष्टीची जाणीव कृषियंत्रशास्त्र हें शास्त्र या दृष्टीनें शेतकऱ्यांनां शिक्षणाच्या अभावीं

माहीत नसल्यामुळें व शिकलेल्या लोकांनीं शेतकीकडे प्रायः दुर्लक्ष केल्यामुळें महाराष्ट्रांतील लोकांनां थोड्या वर्षांपूर्वी नव्हती. कृषिस्थापत्यशास्त्रांतील तत्वें आजपर्यंत शेतकीच्या कामाकडे मुळींच उपयोगांत आणलीं गेलीं नाहींत असा मात्र याचा अर्थ नाहीं. हीं तत्वें निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या कामीं आजपर्यंत उपयोगांत आणलीं गेलीं आहेत. उदाहरणार्थ, जमीन खणण्यास कुदळीचा किंवा टिकावाचा उपयोग करणें, जमिनीच्या मशागतीस नांगर, कुळव, कोळपें वगैरे आउतें वापरणें, शेतांतील माती वाहून जाऊं नये म्हणून ताली घालणें, बागाइती पिकें करण्याकरितां नद्यांनां व ओढ्यानां कच्चे अगर पक्के बंधारे घालून पाटानें त्यांचें पाणी शेतावर आणणें, उपळयाच्या जमिनींत चर खोदून पाण्याचा निचरा करणें, विहिरींचें पाणी काढण्यास रहाट अगर चाक वापरणें वगैरे गोष्टींवरून कृषिस्थापत्यशास्त्रांतील तत्वांचा शेतकीकडे उपयोग केलेला आढळतो. परंतु कुदळीला विवक्षित आकार कां दिला, तो आकार बदलल्यानें जास्त सुलभता येईल किंवा नाहीं, तसेंच नांगर, कुळव व कोळपें वगैरे आउतें विवक्षित आकाराचींच कां केलीं व त्यांतहि सुधारणा होणें शक्य आहे किंवा नाहीं, याचा विचार थोड्या वर्षांपूर्वी कोणीच केला नाहीं म्हटलें तरी चालेल. याचा परिणाम असा झाला कीं या आउतांनां एकदा शेंकडों वर्षांपूर्वी जो आकार मिळाला तो अद्याप बदलला नाहीं. कृषिस्थापत्यशास्त्र याची शास्त्र या दृष्टीनें लोकानां ओळख असती व त्या शास्त्राचा शेतकीकडे असलेला महत्वाचा निकट संबंध त्यानां माहीत असता तर अशी स्थिति कधींहि झाली नसता. शेतांतील माती वाहून जाऊं नये म्हणून पुष्कळ शेतकरी आपल्या शेतांनां ताली घालतात. परंतु ताल कोठें घालावी, कशी घालावी, तिची लांबी, रुंदी व उंची किती असावी, तालींत सांड ठेवावयाची ती कोठें ठेवावी व तिचा आकार केवढा असावा याबद्दलची शास्त्रीय माहिती असलेला शेतकरी अगर ही शास्त्रीय माहिती असून तिचा शेतकीकडे उपयोग केलेला शिकलेला मनुष्य बहुतकरून दुर्मिळ म्हटलें तरी चालेल. जी गोष्ट आउतें व ताली यांसंबंधाची तीच पाट व बंधारे याची होय. कृषिस्थापत्यशास्त्रज्ञांनीं पाटबंधाऱ्याचीं जीं मोठमोठीं कामें केलीं आहेत तीं वगळलीं असतां निवळ शेतकरी लोकांनीं केलेलीं व त्यांच्याच देखरेखीखालीं चालू असलेलीं लहान लहान पाटबंधाऱ्यांचीं कामें महाराष्ट्रात पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतात. परंतु या कामींहि उन्हाळ्यांत घातलेला बंधारा पावसाळ्यांत वाहून गेलेला पाहाण्याचा जो कधीं कधीं प्रसंग येतो त्याच्या मुळाशींहि शेतकरी लोकांचें शास्त्रीय गोष्टींचें अज्ञान व शिकलेल्या लोकांची शेतकीबद्दल अनास्था हेंच होय. बंधाऱ्यापासून पाट नेलेले असतात तेहि पुष्कळ वेळां जरूरीपेक्षां जास्त उतरणीच्या जाग्यांवरून नेलेले आढळतात. तसेंच पाणथळ जमिनींतील पाण्याचा निचरा करण्याकरितां खोदावयाचे चर एकमेकांपासून किती अंतरावर खोदावे, त्यांची खोली किती असावी, रुंदी किती असावी वगैरे माहिती न मिळाल्यामुळें पुष्कळ चुका होतात. केलेलें काम बरोबर झालें नाहीं असें आढळल्यावर शेतकरी चुका दुरुस्त करण्याचा यत्न करतात. अशा रीतीनें एक दोन वेळ चुका दुरुस्त केल्यानंतर हीं कामें योग्य तऱ्हेचीं होतात. परंतु अशा तऱ्हेनें चुका दुरुस्त करण्यांत गेलेला वेळ व पैशाचें नुकसान शेतकऱ्यांस सोसावें लागतें. कित्येक प्रसंगीं तर अशा नुकसानीनें शेतकरी कायमचा बुडतो. या सर्व कारणांकरतां व हल्लीं असलेल्या ज्ञानांत भर पडून या बाबतींत योग्य व शक्य त्या सुधारणा जितक्या लवकर करतां येतील तितक्या अगत्याच्या आहेत. म्हणून शेतकीकडे स्थापत्यशास्त्राचा उपयोग व त्यांचा परस्पराचा संबंध याबद्दल शेतकरी व शिकलेले लोक याच्यामध्यें शक्य तितक्या लवकर जाणीव उत्पन्न होणें जरूरीचें आहे. या कामांत पाश्चात्य राष्ट्रें व अमेरिकाखंडातील देशांनीं पुष्कळ प्रगति केलेली आहे. उदाहरणार्थ, आपल्या लांकडी व त्रिकोणाकृती तास पाडणाऱ्या नांगराऐवजीं त्यांनीं लोखंडी, चतुष्कोणी तास पाडणारे व अल्प काळांत आणि अल्प श्रमात जास्त काम करणारे नांगर बनविले आहेत. एवढेंच नसून नांगर बैलांच्या साह्यानें न चालविनां त्या कामीं ते वाफेचा अगर ज्वालाग्राही तेलांचाहि उपयोग करूं लागले आहेत. अलीकडे थोड्या वर्षांत वर सांगितलेल्या प्रकारचे बैलांच्या साह्यानें चालणारे नांगर हिंदुस्थानांतील सर्व भागांत हजारों आले असून त्याचा नित्यशः उपयोग होत आहे व अल्पावधींतच हे नांगर लाकडी नांगराना पदभ्रष्ट करून त्यांची जागा पटकावतील. हल्लीं सर्वच नांगर परदेशातून येत नाहींत. कांहीं येथेंच तयार होतात. हे तयार करण्याचे कारखाने सातारा जिल्ह्यांत पाडळी व किर्लोस्करवाडी येथें आहेत. वाफेचे नांगरहि हिंदुस्थानात लोक वापरूं लागले आहेत. परंतु त्यांचा उपयोग सार्वत्रिक झालेला नाहीं. मुंबई इलाख्यात असले कांहीं नांगर सरकारनें आणले असून पंजाबातहि या तऱ्हेचे कांहीं नांगर आहेत. नांगरांप्रमाणेंच इतर सुधारलेलीं आउतें आहेत. म्हणजे तव्याचा कुळव व इतर तऱ्हेचे कुळव, कोळपी, सोंगणी करण्याचीं यंत्रें, मळण्याचीं व उपणण्याचीं यंत्रें वगैरे आहेत. या सर्व यंत्रांच्या साह्यानें मजूर लोकांवर विशेष अवलंबून रहावें लागत नाहीं, व कामहि तडाख्यांत होऊन जातें. परंतु लोक नांगराप्रमाणें या यंत्रांचा अजून विशेष उपयोग करीत नाहींत. नांगराच्या उपयुक्ततेबद्दल लोकांची जशी खात्री झाली आहे तशी या आउतांच्या बाबतींत खात्री झाली म्हणजे त्यांचाहि प्रसार शेतकरी लोकांत वाढेल. या आउतांप्रमाणेंच विहिरींचें पाणी खेंचण्याकडे मोटांच्यापेक्षां वाफेच्या शक्तीनें अगर ज्वालाग्राही तेलाच्या साह्यानें चालणारे पंप

निःसंशय जास्त उपयोगी व कमी खर्चाचे असून त्यांचाहि उपयोग अहर्निश वाढत्या प्रमाणांत करण्यांत येत आहे. विहीर कोठें खोदली असतां पाणी लागेल हें पहाण्याकरितां 'वॉटर फाईंडर' चा उपयोग प्रचारांत येऊं लागला आहे. प्रत्यक्ष विहीर खोदण्याचें काम मस्टो साहेबाच्या यंत्रानें यशस्वीरीतीनें व अल्पायासानें होत आहे. अशा रीतीनें वर नमूद केलेल्या बाबतींत शेतकऱ्यांस शास्त्रीय मदत मिळूं लागली असून त्यांनांहि या ज्ञानाचें व मदतीचें महत्व व उपयुक्तता समजूं लागली आहे. उपळयाच्या जमिनींनां पाण्याचा निचरा करण्याच्या योजना पंजाबांत लागू करण्यांत आल्या असून त्यांपासून निरुपयोगी झालेल्या अगर ज्या थोड्या फार दिवसांत निरुपयोगी झाल्या असत्या अशा पुष्कळ जमिनी पुन्हा लागवडीस आल्या असून रयतेचा हिमज्वर(हींवताप)सारख्या रोगापासून बचाव झाला आहे. पूर्वी सरकारचें शेतीला पाणी पुरवणारें खातें मागचा पुढचा विचार न करतां वाटेल त्या जमिनीला पाणी देत असे व त्यामुळें पाणी देण्यास अयोग्य असलेल्या जमिनी लवकरच निरुपयोगी होत, व त्यामुळें खेड्यांतील आरोग्यासहि धोका येत असे. अशा तऱ्हेनें निरुपयोगी झालेल्या जमिनी निरा व गोदावरी कनॉलवर पहावयास मिळतात. परंतु या नुकसानीचा धडा मिळाल्यामुळें यापुढें होणाऱ्या मोठमोठ्या पाटावरील कोणत्या जमिनींनां पाणी द्यावें व कोणत्याना देऊं नये हें आगाऊ ठरविण्यांत येऊं लागलें आहे. ही योजना अमलांत आली म्हणजे उपळयाच्या व लोण्याच्या जमिनी कमी होऊन शेतकऱ्यांचें आरोग्यहि वाढेल.

गु रें, में ढ्या, शे ळया व घो डेः—सरकारी आंकडे प्रसिद्ध झाल्याप्रमाणें इ. स. १९१४–१५ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानांत अंदाजें १४,७३,३६,००० गुरें होतीं. पैकीं बैलांची संख्या ४,८६,६४,७१० असून गाईंची संख्या ३,७४,८१,२७३ होती, रेडे ५५,६०,३५२ व म्हशी १३४६४७२३ असून वासरें व रेडकें यांची संख्या ४,२१,८४,७९० होती. यांचें प्रांतवार शेंकडा प्रमाण पुढें दिल्याप्रमाणें आहे. संयुक्तप्रांत २२, बंगाल १७, मद्रास १५, बहार व ओरिसा १४, पंजाब ११,मध्यप्रात व वऱ्हाड ८, मुंबई व सिंध ७,बाकीचें ब्रिटिशहिदुस्थान ६. पिकाच्या क्षेत्राच्या दर शंभर एकरांमागें हें प्रमाण ६५ पडतें व लोकसंख्येच्या १०० मागें ६१ पडतें. इतर सुधारलेल्या देशांत दर शेंकडा लोकसंख्येला बैलाचें प्रमाण पुढे देतों.

देश	प्रमाण	देश	प्रमाण	देश	प्रमाण
जपान	२.८	अमेरिका.	७७·०	कान.	१४०.०
इंग्लंड व रशिया	२५.०	कोरिया.	४.०	चीन.	७.०
		जर्मनी व आस्ट्रिया	३३·०	फ्रान्स	३८.०

ही तुलना थोडी भ्रामक आहे. कां कीं, बैल हा नांगराचा प्राणी इतरत्र हिंदुस्थानाइतका नाहीं. यू. एस. अमेरिकेच्या दक्षिणेकडील कांहीं संस्थानांत मात्र बैल आहेत. असें असूनहि कानडांत व अमेरिकेंत बैलांचें प्रमाण हिंदुस्थानापेक्षां अधिक आहे.

सन १९१४–१५ सालीं मेंढरें, बकरीं , घोडीं, खेचरें वगैरेंची संख्या हिंदुस्थानांत खालीं नमूद केल्याप्रमाणें होती (यांत बंगाल प्रांताचे आंकडे नाहींत). मेंढरें २,३०,१५,८३६ बकरीं ३,३३,३८,४८७. घोडे व तट्टे १६,५३,३७९. खेचरें ७१,२०७ ;गाढवें, १५,१२,२०५, उंट ४,९७,२०१.

हिंदुस्थानांत इतर देशापेक्षां गुरांचें महत्व अधिक आहे या देशात आउतांचा मुख्य घटक बैल आहे. बैल चांगले तर शेती चांगली. पाश्चात्य देशांत शेतीला बहुतेक घोडे व खेचरांचा उपयोग करतात. पॅलेस्टाइनकडे नांगरास गाढवें लावितात. सिंधप्रांतांत जुजबी उंटाचाहि शेतकीला उपयोग करतात. परंतु स्थूलमानानें पाहिल्यास बैलांचाच शेतकींत फार उपयोग आढळतो. कांहीं कांहीं ठिकाणीं पावसाळी भागांत टोणग्यांचा उपयोग शेतकामाकडे करितात. तथापि हवा, पाणी व जमीन यांचा विचार करता बैलाशिवाय इतर जनावरांचा शेतकीकडे फारसा उपयोग होत नाहीं.

शेतकीदृष्ट्या प्रत्येक शेतकरी एक दोन गाई बैलांबरोबर ठेवीतच असतो. गाईचें दूध घरखर्चास उपयोगीं पडतें, गोऱ्हा मोठा झाला म्हणजे आउताच्या कामीं येतो, बैल आउतास, गाडीस, मोटेस व कांहीं ठिकाणीं वर बसून जाण्यासहि उपयोगीं पडतो. अर्थात बैलाची निपज होण्याकरिता गाईचेंहि तितकेंच किंबहुना जास्तच महत्व आहे. कारण आपल्या अन्नाचा जो मुख्य भाग धान्य तें पिकविण्याच्या कामीं लागणारीं गुरें उत्पन्न करणारी गायच आहे. शेताची मशागत करणें, धान्य पेरणें, त्याची मळणी करून ते घरीं आणणं वगैरे गोष्टी गाईच्या संततीवरच अवलंबून आहेत.

गाईपासून बैल व शिवाय दूधदुभतें, गोमूत्र व गोमय या मिळणाऱ्या पदार्थांचा शुद्धतेकरितां उपयोग होत असून त्याचा (गोमूत्र व गोमयाचा) खताच्या कामीं फार उपयोग होतो. अशा अनेक कारणांसाठीं गाय ही हिंदुलोकांत पूज्य मानलेली असून गोहत्या हें महत्पाप समजलें जातें. आपल्याकडे अशी एक गोष्ट रूढ आहे कीं गाय वात असतां तिजला प्रदक्षिणा केल्यास पृथ्वीप्रदक्षिणेचें फळ मिळतें. त्याचप्रमाणें शेतकरी लोकांत अशी म्हण आहे कीं "शेताचा आरा (मोड), गाईचा गोऱ्हा व पाळण्यांतील हिरा हे केव्हां तरी उदयकाळ आणतीलच आणतील." एकंदरींत बैलाच्या जातिवंत पैदाशीवर व त्यांच्या संख्येवर शेतकीची भरभराट अवलंबून असते.

यूरोप, अमेरिका व वसाहती यांमध्यें गुरांची उपज मांसाकरितां व दुधाकरितां अशा वेगवेगळ्या हेतूनीं करण्यांत येते. हिंदुस्थानांत गाई शेतकीला लागणाऱ्या बैलांकरितां पाळतात व दुधासाठीं विशेषतः म्हशी पाळतात.

हिंदुस्थानांतील निरानराळें हवामान, पाऱ्याचा कमजास्त पुरवठा, निरनिराळ्या तऱ्हेच्या कमजास्त कसाच्या जमिनी

या मानानें गाईंच्या अनेक जाती झाल्या आहेत. त्यांत कित्येक बरेंच दूध देणाऱ्या तर कित्येक कमी पण कसदार दूध देणाऱ्या व कांहीं फारच देखण्या अशा आहेत. कित्येकांची प्रजा जड ओझीं वाहण्यास व नांगर ओढण्यास बळकट, कित्येक जास्त काटक, जास्त वर्षे काम देणारी व कित्येकांची अवलाद गाडीला लावल्यास घोड्यासारखी पळणारी आहे. बहुतेक जातींत वशिंड कोळें किंवा कमी जास्त प्रमाणांत वाढलेलें असतें. बहुतेकांना शिंगें असतात. मद्रासेंतील कांहीं भागांत बिनशिंगाचीं गुरें बरींच आढळतात. म्हशीच्या जातींत रंग बहुतकरून काळा असून वशिंड नसतें. बंगाल, आसाम, बहार, ओरिसा, तेलंगण, कोंकण वगैरे भात पिकणाऱ्या भागात गुरें अगदीं लहान असतात. इतर उष्ण व समशीतोष्ण भागांत कांहीं कांहीं गुरांच्या जाती आढळतात. त्यापैकीं नेलोरी; मद्रास इलाख्यांत अमृतमहाल म्हैसूर संस्थानांत मॉंटगामेरी व हांसी पंजाबांत सिंधी दक्षिणसिंधांत; माळवी सातपुड्यांत व मध्य हिंदुस्थानांत; सोरटी अगरगीर काठेवाडांत; कांकेजी गुजराथेंत; गोळाऊ मध्यप्रांतांत; खामगांवी वऱ्हाडांत; खिल्लारी सातपुड्यात व आटपाटी महालांत; व कृष्णाकांठीं कर्नाटकांत होत. यापैकीं दूधदुभत्याला चांगल्या मॉंटगॉमेरी, हांसी, सोरटी, सिंधी, कांकेजी व नेलोरी ह्या गाईंच्या जाती असून दिल्ली जाफराबादी, सुरती, नागपुरी अगर वऱ्हाडी या म्हशींच्या जाती होत.

इ. स. १८९० सालीं सुधारलेल्या पद्धतीवर हिंदुस्थानात दूधदुभत्याचा कारखाना पुणें जिल्ह्यात खडकी येथें सुरू झाला. हल्लीं सर्व हिंदुस्थानांत दुधाचे हजारों कारखाने चालू आहेत. अलीगडला दुधाची डेअरी मोठ्या प्रमाणावर आहे. मिलिटरी (लष्करी) खात्यानें फौजफाट्यांला दूध व लोणी पुरविण्याकरितां हिंदुस्थानांत बरेच कारखाने काढले आहेत. त्यापैकीं पुणें, बंगलूर, कानपूर, अंबाला, अलाहाबाद वगैरे ठिकाणीं दूध दुभतें पुरविणारीं त्याचीं मोठीं शेतें आहेत.

सन १९१७।१८ सालीं सहकारी तत्वावर दूध दुभतें पुरविणाऱ्या २४ संस्था होत्या. त्यापैकीं ११ मुंबई इलाखा, २ नागपुरांत, ६ बंगाल्यांत, २ बहारांत, १ अलाहाबाद, १ बनारस व १ लखनौस होती. मुंबई इलाख्यात मुंबई शहराखेरीज अहमदाबाद व खेडा जिल्ह्यांत लोणी पुरविण्याचे बरेच कारखाने आहेत. सांगली, मिरज, वऱ्हाड, नागपूर, अहमदाबाद वगैरे ठिकाणांहून सर्व हिंदुस्थानांत, ब्रह्मदेशांत, सिलोन व आफ्रिका येथें लोणी, तूप वगैरे रवाना होतें.

मेंढ्या व शेळ्या—मेंढ्या व शेळ्या यांच्यावर निर्वाह मुख्यत्वेंकरून करणारे महाराष्ट्रांत धनगर लोक होत. ते मेंढ्या व शेळ्या मुख्यत्वेंकरून त्यांचें मांस व लोंकर याकरितां पाळितात. उत्तर हिंदुस्थानांत व दक्षिण हिंदुस्थानांत कांहीं मेंढ्यांच्या जाती नामांकित असून त्यांची लोंकर तलम असते. चांगल्या जाती पाश्म (काश्मीर व तिबेट), डुंबा (सिंध), राजपुतानी, पाटणा (बहार), कोइमतूर (मद्रास) व म्हैसूर ह्या होत. काश्मिरी शालजोड्या, पंजाबी गालिचे, सतरंज्या व ब्ल्यांकेटें, मारवाडी धाबळ्या, सिंधी घुरणुस व बंगलुरी घोंगड्या प्रसिद्ध आहेत. देशी मेंढयांची लोंकर व मांस सुधारण्याकरितां गेल्या पांच पन्नास वर्षे प्रयत्न चालू आहेत. तथापि त्यांत फारसें यश आलेलें आढळून येत नाहीं. हल्लीं आस्ट्रेलियांतील मरिनो जातीचे नर आणून मेंढयाच्या लोंकरींत सुधारणा घडवून आणण्याचे ब्यानटा—नहाल (मद्रास), तेलिंगखेडीं (मध्यप्रांत), लखनौ, मुरादाबाद, खेरी, मथुरा, (संयुक्त प्रांत) हिसार, (पंजाब), पुसा (बहार) व कोइमतूर येथें चालू आहेत

त्याचप्रमाणें घोड्यांचा विशेष भरणा दक्षिण काठेवाड, पंजाब, सिंध वगैरे प्रांतांत आहे. पुणें व नगर जिल्ह्यांत व निझामच्या राज्यात घोड्यांची निपज गोदावरी, भीमा, नीरा, व माण या नद्यांच्या काठीं होते. मात्र हीं जनावरें एकत्र एकाच इसमाजवळ नसून तीं प्रत्येक गांवीं कांहीं सधन लोक मात्र तयार करवितात. या नदीकाठीं तयार होणारे घोडे लहान, बांधेसूद, पाणीदार व काटक म्हणून प्रसिद्ध आहेत. या जनावरांस भिमथडी, निरथडी घोडे असें म्हणतात. हे घोडे मराठी राज्यात बरेच प्रसिद्धीस आले होते. अद्याप यांचीं प्रदर्शनें नगर, अहमदाबाद, रावळपिंडी, डेरागाझीखान वगैरे ठिकाणीं प्रतिवर्षी भरवितात व त्यांना प्रोत्साहन मिळावें म्हणून बक्षिसेंहि देतात. त्याचप्रमाणें काठेवाडांत काठीघोडे तयार करतात ते सुंदर व चपल असतात. याशिवाय ब्रिटिश राज्यांत खेचरें तयार करण्याकडे पंजाब व वायव्य सरहद्दीवरील प्रांतांत पुष्कळ लक्ष दिलें जातें. त्यांचा उपयोग अनेक प्रकारच्या लष्करी कामांकडे होतो.

पशुवैद्यकशास्त्र.—पशु हा शब्द फार व्यापक असून त्यामध्यें सर्व चतुष्पाद प्राण्यांचा समावेश होतो. पशुवैद्यक म्हणजे ज्या शास्त्रांत पशूंच्या रोगांचें निदान व त्यांची चिकित्सा (औषधयोजना) केलेली असते तें शास्त्र होय. ज्या अर्थी हिंदुस्थानांतील शेती जनावरांवर व मुख्यत्वेंकरून बैलांवर अवलंबून असतें त्या अर्थी त्यांनां होणारे मुख्य रोग व त्यावर उपाय यांसंबंधीं शेतकऱ्यास थोडीबहुत माहिती असणें जरूरीचें आहे. जनावरांच्या रोगाचे दोन प्रकार करितां येतात. एक सांसर्गिक साथीचे रोग व दुसरा इतर सर्व रोग. लाळ अथवा खुरकुत, डरंगळ्या अगर देवी, फऱ्या, फांशी व घटसर्प हे मुख्य सांसर्गिक रोग असून इतर रोगांत जनावरांच्या पायाला होणारे रोग जसें हाड किंवा सांधा निखळणें, नसा किंवा स्नायूमध्यें लचक भरणें, जखमा होऊन किडे पडणें, शरीरावरील कातडीला गजकर्ण, नायटे, इसब इत्यादि होणें, अंगावर गोचीड, धुळे, उवा वगैरे होणें, शिंगें उखळणें, मोडणें, भिरड लागणें, बैलाचा खांदा येणें वगैरे रोगांचा समावेश होतो. याखेरीज अजीर्ण, जुलाब,

पोटदुखी, पोटफुगी, दुभत्या जनावरांची कांस सुजणें, आंचळांतून पाणी, पू, रक्त अगर दुधाच्या गांठी येणें वगैरे अनेक रोग होतात. पशुवैद्यकांत पाळींव पक्षांच्या रोगांचाहि विचार केला जातो.

कृषिकमाचा आर्थिक विचार.—महाराष्ट्रांतील शेतकरी लोकांची सांपत्तिक स्थिति चांगली नाहीं हें वेळोंवेळीं निरनिराळया अधिकाऱ्यांनीं दाखविलेंच आहे. नुकत्याच डॉ. मॅन यांच्या 'व्हिलेज एकॉनमिक्स इन डेक्कन व्हिलेज' या नांवाच्या पुस्तकांत एका विशिष्ट गांवाची स्थिति आंकडे देऊन लिहिली आहे. त्यावरून आपल्या इकडला शेतकरीवर्ग कर्जांत बुडून गेला आहे व ह्या स्थितींतून डोकें बाहेर काढणें हें काम फारच दुरापास्त होऊन बसलें आहे. ह्या स्थितीचीं कारणें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत.

(१) शिक्षणाचा अभावः—हिंदुस्थानांतील शेतकरी वर्गाला बहुतेक शिक्षण नाहीं असें म्हटलें तरी चालेल. इकडील शेती फार पूर्वींपासून चालत असलेली व प्रत्यक्ष अनुभवानें ठरलेली असल्यामुळें ती फार चांगली आहे असा समज आहे, व तो जरी कांहीं अंशीं बरोबर आहे, तरी पूर्वींच्या स्थितींत व आतांच्या स्थितींत फारच फरक झाला आहे; याचा शेतकरी बंधूंनीं विचार केलेला नाहीं. पूर्वींची शेती कांहीं तत्वावर व कांहीं अनुभवावर ठरविलेली होती; व ही तत्वें अजीबात विसरून गेल्यामुळें परिस्थिति बदलल्याबरोबर इकडील शेतींत अद्यापि कांहीं एक फरक झाला नाहीं. सध्याच्या स्थितींत जगांतील शेतीशीं टक्कर देणें भाग आहे व अशा स्थितींत थोड्या खर्चांत शेतीचें उत्पन्न जितकें वाढवितां येईल तितकें तें वाढविणें भाग आहे. जुन्या खर्चाच्या पद्धती टाकून कमी खर्चाच्या व प्रत्यक्ष शास्त्रीय माहिती व अनुभवावरून श्रेयस्कर ठरलेल्या पद्धतींचा उपयोग केला पाहिजे. हें सर्व कळण्याला शिक्षणाची अत्यंत जरूर आहे. शिवाय प्रत्येक काम हिशेबी झालें पाहिजे. प्रत्येक पिकाला मजुरी, खत व इतर खर्च किती आला व प्रत्यक्ष उत्पन्न किती झालें; उत्पन्नांतून खर्च जातां निवळ फायदा किती झाला हें सर्व कळण्याला शेतकरी बंधूंनां शिक्षणाची फार जरूर आहे. त्याच्या अभावीं प्रगति होणें अतिशय कठीण आहे.

(२) मजूरः—दिवसानुदिवस मजुराची फारच अडचण भासूं लागली आहे. देशात इतर उद्योगधंदे वाढल्यामुळें पुष्कळ मजूरलोक शेतकामातून निघून इतर धंद्यात पडूं लागले. ह्यामुळें व राहाणीचा खर्च वगैरे वाढल्यामुळें साहजीकच मजुरीचा रोज वाढला व सध्यां पुष्कळ वेळां जास्त पैसे देऊन सुद्धां शेतीच्या कामास वेळेवर मजूर मिळत नाहींत. यामुळें जमिनीची मशागत वेळेवर होत नाहीं व त्यामुळें खर्च मात्र वाढत जातो व हंगामशीर मशागत न झाल्यामुळें उत्पन्न कमी येतें. ही स्थिति लक्षांत घेऊन शेतकरी वर्गानें ज्यांच्या योगानें थोड्या मजुरींत व हंगामशीर काम होईल अशा तऱ्हेच्या पद्धतीनें शेती करण्यास प्रारंभ केला पाहिजे.

(३) भांडवलाचा अभावः—भांडवलाच्या अभावामुळें शेतकरी वर्गास अतिशय अडचणी सोसाव्या लागत आहेत. भांडवल नसल्यामुळें पुष्कळ वेळां जमिनीची मशागत करतां येत नाहीं. जमिनी सपाट करणें, शेतीला ताली घालणें, विहिरी खणणें, फायदेशीर पिकें करणें, मजुरी वांचविणारीं औतें घेणें वगैरे फायद्याच्या बाबींचा विचार करतां येत नाहीं व ज्याप्रमाणें कोणत्याहि धंद्यांत भांडवल कमी पडत चाललें कीं तो धंदा बसत जातो. त्याप्रमाणें हा शेतकीचा धंदा निकृष्ट स्थितीस येत चालला आहे.

(४) जमिनीची विभागणीः—आपल्या समाजांत असा नियम आहे कीं, बापाच्या मागें वडिलोपार्जित सर्व इस्टेट त्याच्या मुलांनां सारखी मिळावयाची. हिंदुधर्मशास्त्र असें असल्यामुळें त्याचा शेतीवर मात्र अति वाईट परिणाम झाला आहे. सध्या ह्या कायद्यामुळें जमिनीचे इतके कांहीं लहान लहान तुकडे पडले आहेत कीं, पुष्कळ जमीन पड होत चालली आहे व कांहीं जमिनींत खर्च जास्त येत असल्यामुळें तींत मुळींच फायदा होत नाहीं. ह्या परिस्थितीमुळें पुष्कळ लोक शेती सोडून इतर धंद्याकडे जाऊं लागले आहेत. ह्या पद्धतीला कांहीं तरी आळा पडणें जरूर आहे.

(५) सर्वसाधारण महर्गताः—सध्यां प्रत्येक जिन्नस म्हणजे धान्य, आउतें, मजुरी, बीबियाणें खतें वगैरे जिन्नस पूर्वींपेक्षा किती तरी महाग झाले आहेत. पूर्वीं चांगल्या माणसाचें पोट ४-५ रुपयांत भरत असून आतां ८-१० रुपयापेक्षां जास्त खर्च येतो. ह्याबरोबर धान्याचा भावहि वाढला आहे. व त्याचा शेतकरी वर्गास फायदा मिळावयास पाहिजे होता परंतु तो मिळतोसें दिसत नाहीं.

(६) दुष्काळः—महाराष्ट्रांत कांहीं भागात तर दुष्काळ बहुतेक वारंवार पडतात. सह्याद्रीच्या खालीं व माथ्यांवर पुष्कळ पाऊस पडतो. परंतु जसजसें ह्याच्या पूर्वेकडे जावें तसतसा पाऊस कमी होत जातो व पुढें म्हणजे पुण्याचा पूर्वभाग, नगर, सोलापूर व विजापूर जिल्ह्यांत पहिला पाऊस अगदींच थोडा पडतो व कधीं कधीं पडतहि नाहीं; पुढील म्हणजे सप्टेंबर आक्टोबरमध्यें पाऊस पडतो परंतु पुष्कळदां हा पाऊस पुरेसा होत नाहीं. म्हणून या मुलखांत कोठेंनाकोठें तरी महर्गता असतेच. ह्यामुळें जमिनीची चांगली मशागत करणें व चांगलें पीक करणें ह्याबद्दल शेतकरी वर्गाला उमेदच रहात नाहीं. कारण पावसाच्या अभावीं त्यांची मेहनत व पैसा पुष्कळदा वाया जातो.

ही स्थिति सुधारण्याला सरकारनें पुष्कळ उपाय केलेले आहेत व लोकांनींहि कांहीं करण्याजोगें आहे. त्यांपैकीं कांहीं पुढें दिले आहेत.

(१) वर सांगितल्याप्रमाणें शेतकरी बंधूंनीं शिक्षणाचा फायदा जरूर घ्यावयाला पाहिजे. पूर्वी थोडेसें शिक्षण मिळालें म्हणजे त्यांनां शिक्षणाची गोडी लागेल व लोक जास्त शिकूं लागतील व वाचनानें निरनिराळ्या देशांच्या व ठिकाणांच्या शेतीची माहिती मिळूं शकेल व त्याचा फायदा शेतकरी लोकांस करून घेतां येईल. ठिकठिकाणीं सरकार शेतकरी वर्गाकरतां शेतकी शाळा व शेतकी कॉलेज स्थापन करीत आहे. व त्या शाळांतून शेतकीचें शास्त्रीय व अनुभवसिद्ध ज्ञान दिलें जातें. हें शिक्षण मिळालें असता शेतकरी वर्गाला शेती सुधारण्यास फार अडचण पडणार नाहीं. याकरिता प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत होणें अत्यावश्यक आहे.

(२) प्रात्यक्षिकें:—शेतकरीवर्गाच्या शेतीसंबंधाच्या अडचणी सोडविण्याकरितां निरनिराळ्या पद्धतींचा, खतांचा व औतांचा प्रयोग करण्याकरिता ठिकठिकाणीं सरकारनें प्रयोग क्षेत्रें काढिलीं आहेत. अशा ठिकाणीं शेतकरीवर्गाकरिता प्रात्यक्षिकें व प्रदर्शनें भरविलीं जातात व अनुभवानें यशस्वी ठरलेली संपूर्ण माहिती त्यांना दिली जाते. त्याचा शेतकरीवर्गानें फायदा घेतल्यास त्यांचा व शेतीचा फायदा होईल.

(३) मजुरांचा प्रश्न फारच महत्वाचा, काळजीचा व जरा कठिण आहे. मजूर थोडे व मागणी फार अशी स्थिति आज आहे. शिवाय एकंदर रहाणीचा खर्च वाढला आहे. अशा वेळीं जुन्या जास्त मजूर लागणाऱ्या पद्धती टाकून सुधारलेल्या औतांचा व यंत्रांचा उपयोग करून पिकें जास्त केल्याशिवाय फायदा होणें कठीण आहे. येथल्या अनेकपट मजूरी देऊन अमेरिकेतील शेती यंत्रांच्या साहाय्यानें फायदेशीर होऊं शकते व धान्यांच्या बाबतींत जगातील किंमतींशीं स्पर्धा करूं शकते ही गोष्ट विसरतां कामा नये.

(४) सहकारी संस्थाः—शिवाय संघशक्तीच्या तत्वावर हा प्रश्न सोडविला पाहिजे. भांडवलाच्या अभावीं शेतकरी वर्गाला शेती सुधारणा करता येत नाहीं असें वर सांगितलें आहे. ह्याकरिता भांडवल उभारण्याची तजवीज केली पाहिजे.

या कामीं सहकारी पतपेढयाचा फार उपयोग होत आहे व तो जास्त होईल अशी आशा आहे. हल्लीं पुष्कळ खेडेगांवीं पतपेढया झाल्या आहेत. व त्यामुळें शेतकामाला भांडवलाची अडचण पडणार नाहीं. शिवाय गांवाला पतपेढीच्या मार्फत पुष्कळ औतें ठेवतां येतील व ज्यांस तीं विकत घेण्याची ऐपत नसेल त्यानां तीं भाडयानें देतां येतील व संघशक्तीच्या जोरावर मजुरीची बचत करणारीं यंत्रें आणविता येतील एकंदरीत जमिनीची मशागत वेळेवर थोडया-खर्चांत व चांगल्या प्रकारें करतां येण्याचा संभव आहे. सध्यां शेतकरी वर्गाला आपला माल विकावयाच्या वेळीं दलालाकडून पुष्कळ नुकसान सोसावें लागतें. यासाठीं माल विकणाऱ्या संस्था स्थापन केल्या असतां मालाला किंमत चांगली मिळून शेतकरी वर्गहि फसला जाणार नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भांडवल लागणारीं सर्व कामें गांवाला या संस्थेच्या योगानें करता येतील.

(५) जमिनींच्या विभागणीला आळा घालणें अगदीं जरूर आहे. कारण जमिनीचे लहान लहान तुकडे झाले असल्यामुळें तींत सुधारणा करता येत नाहीं. व एखाद्याच्या मनांत तसें करावयाचें आल्यास त्यास फार खर्च येतो. याकरिता जमिनीची विभागणी अशा बेतानें झाली पाहिजे कीं त्या जमिनीच्या मशागतीपासून एका कुटुंबाचें चांगलें पोट भरून त्यास चांगल्या स्थितींत रहाता येईल. कांहीं कांहीं देशांत यासंबधानें नियम झालेले आहेत. व हिंदुस्थानांतहि तसें होऊन विभागणीला आळा पाडणे जरूर आहे. असे नियम होण्याकरिता लोकांनीं नेटाचा प्रयत्न चालू ठेविला पाहिजे.

सरकारनें दुष्काळाच्या प्रतिकारार्थ योजिलेले उपाय.—दुष्काळ पडल्यास सरकार तहकुबी किंवा साऱ्याची माफी देतें. शिवाय शेतकरी वर्गाला कर्जमुक्त करण्याकरिता 'डेक्कन ॲग्रिकलचरिस्ट्स् रिलीफ ॲक्ट' पास केल्यामुळें सावकराच्या कचाटींतून शेतकरी वर्गाची मुक्तता करण्याची सरकारनें व्यवस्था केली. ह्यामुळें भांडवलाच्या व्याजाचा दर उतरला व सावकाराच्या व्यवहारांत सचोटी वाढली. सरकारनें दुष्काळी मुलुखात मोठमोठे कालवे व तळीं बांधलीं व तीं जास्त बाधण्याचीं कामें चालू आहेत. या पाण्याच्या सोईमुळें पूर्वीचे दुष्काळी भाग अति सुपीक व फायदेशीर झालेले आहेत. आगगाडीच्या प्रसारामुळें दुष्काळाच्या वेळीं एका ठिकाणाहून धान्य व गुरांनां लागणारी वैरण दुसऱ्या ठिकाणीं नेणें फार सोपें झालें आहे. शिवाय शेतकरी वर्गाला विहिरी पाडण्याकरिता व इतर कामाकरितां कमी व्याजानें तगाई देण्याची व्यवस्था सरकारनें केली आहे. या सर्व बाबींचा विचार करून शेतकरी वर्गानें वरील सर्व सवलतींचा योग्य मार्गानें फायदा घेतल्यास त्याच्या शेतीची सुधारणा होणे सोपें जाईल.

जमीनीवरील सत्तेचे प्रकार:—हिंदुस्थानात शेतावरील सत्तेचे किंवा स्वत्वाचे (मालकीचे) तीन प्रकार आढळतात. ते:—(१) रयतवारी,(२) सर्व गांवांवर मुदतीनें ठरविलेली जमीनदारी व (३)कायम धाऱ्याची जमीनदारी. यापैकीं पहिल्या व दुसऱ्या प्रकारांत ठरविलेल्या मुदतीनें धारा बदलतो. परंतु तो तिसऱ्या प्रकारांत कधींहि बदलत नाहीं.

यांपैकीं रयतवारी पद्धत मद्रास, मुंबई, सिंध, ब्रह्मदेश, कूर्ग प्रांत, वऱ्हाड, मध्यप्रांत, व आसामातील बहुतेक भाग यांत प्रचलित आहे. कायम जमीनदारीची पद्धत बंगाल, संयुक्त प्रांत, बहार, ओरिसा, आसाम, अजमीर व मारवाडपैकीं कांहीं भाग यांत लागू आहे. मुदतीची जमीनदारी पंजाबांत, वायव्येकडील आणि प्रांतात आणि दिल्ली, बंगाल, मुंबई, संयुक्तप्रांत, बहार, ओरिसा, मध्यप्रांत, आसाम, अजमीर, मारवाड कांहीं भागांत चालू आहे.

एकंदर क्षेत्रांपैकीं शेकडा ८८ क्षेत्र रयतवारी, शेकडा २० कायम धारा व शे.४२ तूर्तच्या किंवा मुदतीच्या पद्धती-खालीं मोडतें. व एकंदर धान्याचें उत्पन्न (वसूल) इतर सेसशिवायकरून ३३$\frac{1}{3}$ कोटी रुपयांचें आहे व त्याचा दर माणशी प्रमाण एक रुपया सहा आणे पडतें. वरील हकी-कतीच्या स्पष्टीकरणार्थ इ. स. १९१६-१७ सालीं प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टावरून केलेला तक्ता पुढील दिला आहे:—

प्रत्येक प्रांतांतील कृषिक्षेत्राचें धारापद्धति, धारा, लोकसंख्या यांशीं तुलना करून वर्गीकरण

प्रांताचें नांव	रयतवारी	जमीनदारी		एकंदर	एकंदर	एकंदर	दरमाणशीं धारा		
	क्षेत्र	कायमची	मुदतीची	क्षेत्र	धारा रुपये	लोकसंख्या	रु.	आ.	पै.
बंगाल	...	३९२११	११२६९	५०४८०	२७४६७	४४५८८	०	१०	०
मद्रास	६१२८६	२९८५२	...	९११३८	६७२९४	४१४०५	१	११	०
मुंबई	४४८७६	...	३७५३	४८६२९	३०९२८	१५१३४	२	१	०
सिंध	३०२५७	...	...	३०२५७	९०९०	३५१३	२	९	०
संयुक्तप्रांत	...	७५४२	६०७९३	६८३३५	६५७६८	४७१९०	१	६	०
बहार ओरिसा	...	४१४५२	११७६०	५३२१२	१५७१३	३४४९०	०	७	०
पंजाब	...	...	६१८५६	६१८५६	३९४९५	१९५४८	२	०	
ब्रह्मदेश	१०८८८१	...	...	१०८८८१	३२४४२	१०५७७	८	१२	०
मध्यप्रांत	१२१४२	...	४०४५२	५२५९४	१०८७४	१०८७३	१	०	०
वऱ्हाड	११३७४	...	...	११३७४	८६२८	३०६७	२	१३	०
आसाम	२५८३०	३९३०	१५४६	३१३०६	७७९५	६७१४	१	३	०
अजमीर, मारवाड	...	९७४	७९७	१७७१	३६५	५०१	०	१२	०
दिल्ली	...	...	३६८	३६८	३९८	४१३	०	१५	०
कूर्गप्रांत	१०१२	...	...	१०१२	३६५	१७५	२	१	०
मानपूर	३१	...	...	३१	१६	७	२	६	०
वायव्य सरहद्दीवरील प्रांत	...	...	८४६८	८४३८	२७३७	२२५५	१	३	०
एकूण	२९५६८९	१२२९६१	२०१०३२	६१९६८२	३३४७४४	२४०४५०	३१	१३	०

दुय्यम प्रतीचे धंदे:—(१) कोंबडया पाळणें व त्यांची उपज करणें:-- ही वहिवाट शेतकरी लोकांमध्यें फार पूर्वापार आहे. परंतु हें काम धंदा या दृष्टीनें कोणीच करीत नाहीं. एक दोन कोंबडया पाळणें त्यांचें उत्पन्न अंडीं, पिलें, कोंबडया या रूपानें काढणें या पलीकडे हा धंदा अद्याप गेलेला नाहीं. कोंबड्यांचा धंदा काळजीपूर्वक केल्यास तो फायदेशीर असून शिवाय तो मन रमविणाराहि आहे. फ्रान्स, इंग्लंड वगैरे यूरोपियन राष्ट्रांत कोंबडीं व त्यांचीं अंडीं यांची आयात व निर्गत दरवर्षी लाखों रुपयांची होते. तिकडे अंडीं उबविण्याचीं कामें यंत्रानें करितात. पांख्यांना नियमित वेळीं व नियमित प्रमाणांत रोज चारा देतात व सर्व कामें धंदा या दृष्टीनें करितात. हिंदुस्थानांत कांहीं साहेब लोक, किरिस्ताव लोक व सोल्जर हौसेसाठीं निरनिराळ्या हिंदी व विलायती जाती आणून त्या स्वतःच्या घरखर्चा-साठीं पाळितात. हल्लीं त्यांचीं कोठें कोठें प्रदर्शनहि भरूं लागलीं आहेत. चितागांग, असील, बसरा व गेम या हिंदुस्थानांतील मुख्य जाती होत. या विषयाच्या विशेष माहितीकरितां कोंबडी, बदकें वगैरे लेख पहावेत.

(२) मधुमक्षिकापालनः—पाश्चात्य देशांतमध्यें शेतीच्या धंद्यांत मधमाशांची वाढ करून मध उत्पन्न करणें याचाहि समावेश होतो. मधमाशा हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत, यामुळें पाश्चात्य राष्ट्रांत ज्याप्रमाणें कृत्रिम पोळीं करून मधमाशांकडून मध तयार करवा लागतो, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत करण्यांचें कारण पडत नाहीं. मध तयार करण्याच्या कामातच आपलें सर्व आयुष्य घालविणारीं माणसें हिंदुस्थानांत तयार झालीं नाहींत याचें कारण त्या उद्योगास धंद्याचें स्वरूप आलेलें नाहीं. कांहीं रामोशी, कोळी किंवा कुणबी, वर्षांतून कांहीं दिवस ज्यावेळीं वनस्पती बहरास येऊन मधमाशांची पोळीं लागतात तेव्हां पोळीं काढून मध तयार करून विकण्याचा धंदा करितात. परंतु त्यानां मधमाशासंबंधीं शास्त्रीय माहिती नसल्यामुळें त्यांनीं पोळ्यांतून काढलेला मध कमी दर्जाचा निघतो, तो लवकर आंबतो किंवा काकवीसारखा पातळ होतो. पाश्चात्य देशांतील मध जास्त दिवस टिकतो.

हिंदुस्थानांत मधमाशांकडून मध तयार करण्यासंबंधानें एंजिनियरिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ. कुक यांनीं इ.स.१८९० सालीं प्रयत्न केला होता. त्यांनीं इटालियन मधमाशांच्या राण्या आणून त्या कृत्रिम घरांत ठेवल्या होत्या. त्यांपासून मध तयार होऊं लागला होता, परंतु कांहीं दिवसांनीं त्या मधमाशा मेल्यामुळें तें काम बंद पडलें. यासंबंधानें पुण्याच्या शेतकी कॉलेजचे शेतीविषयाचे प्रोफेसर मि. नाईट यांनीं व पुसा

येथील कीटकशास्त्रवेत्यांनीं कांहीं प्रयोग केले, पण त्यांत त्यांनां यावें तसें यश आलें नाहीं. मद्रास इलाख्यांत कृत्रिम पोळ्यांत मध उत्पन्न करण्याचा प्रयत्न झाला असून तो यशस्वी झाल्याचेंहि प्रसिद्ध झालें आहे. तथापि हा धंदा अद्यापपर्यंत प्रयोगावस्थेंतच आहे असें म्हणावें लागतें. शेतकी खात्याकडून संशोधनाचें काम चालू असतें. त्यांत याचा प्रमुखत्वानें समावेश केल्यास शेतकरी लोकास एक नवीन घरगुती धंदा होईल.

(३) रेशीमः-या विषयावरील लेख पहावा.

(४) लाखः-या विषयावरील लेख पहावा.

व्या पा र उ दी मः—पूर्वकाळीं आपल्यास पुरेसें धान्य तयार करणें हाच साधारण व्यवहार होता व तेवढी जमीन शेतीखालीं वहातुकीस होती. दळणवळणाचे मार्ग कमी व धोक्याचे असल्यामुळें प्रत्येक गांवीं लागणारा सर्व माल बहुतेक तेथेंच तयार होत असे. यामुळें धान्याचा संग्रह व जनावरांचें पालनपोषण यापेक्षां पैशाला अधिक महत्त्व नव्हतें. परंतु आतां सडका, मोटारी, आगगाड्या, आगबोटी वगैरे ने आण करण्याचीं साधनें झाल्यामुळें व तारायंत्राच्या योगानें व्यवहार लवकर करूं लागल्यामुळें आणि सरकारच्या आरमारी व लष्करी बंदोबस्तामुळें दर्यावरील व्यापार वाढून तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, गळिताचीं धान्यें, चहा, काफी, वेलदोडे, मिरीं, सिंकोना, अफू, कापूस, ज्यूट, रबर, रंग, नीळ, सोरा, हाडें, पेंडी, कमावलेली व कच्चीं कांतडीं, लोंकर वगैरे जिन्नस परदेशीं जाऊं लागले. या स्थितीमुळें खाण्याच्या धान्याखालीं क्षेत्र कमी होऊन अन्नेतर पिकाखालीं क्षेत्र वाढूं लागलें आहे. याचा परिणाम परदेशीं चढाओढ हा एक आहे. शिवाय कित्येक ठिकाणीं त्याच ठिकाणीं होऊं शकणाऱ्या व जरूरीच्या जिनसा देखील इतर ठिकाणाहून आणाव्या लागत आहेत.

हिंदुस्थानांतून परदेशास निर्गत होणाऱ्या मालांत कापूस व ताग (ज्यूट) हे जिन्नस बरेच महत्त्वाचे आहेत. निर्गत मालाची युद्धापूर्वीची पांच वर्षांची सरासरी पाहिल्यास ती साधारणपणें २२०कोटी रुपयांची भरते.त्यांत धान्य (मुख्यत्वें करून तांदूळ व गहूं) ४६ कोटी रुपये, कापूस व कापड ४५ कोटी रुपये, ताग व तागाचा कपडा वगैरे ४२ कोटी रुपये गळिताचीं धान्यें २४ कोटी रुपये, चामडीं व कांतडीं १५ कोटी रुपये आणि चहा १३ कोटी रुपये हे सहा जिन्नस निर्गत व्यापारांत प्रमुख आहेत.

सन १९१४।१५ सालीं तांदूळ व गहूं (ब्रिटिश हिंदुस्थानांत) या दोन जिनसांचें उत्पन्न ३८२३३००० टन असून त्यांपैकीं ३६६००६३१ टन हिंदुस्थानांत राहिले व १६३२३६९ टन परदेशीं रवाना झाले. निर्गत मालांत १५६१९६९ टन तांदूळ व ७०४०० टन गहूं होते. याखेरीज ज्वारी, बाजरी, जव, मका, डाळी, हरभरा वगैरे मिळून २४८००० टन जिन्नस परदेशीं गेले.आयात मालांत कपडा साखर मुख्य आहे.

आयात माल

जिनसाचें नांव.	वर्ष	सरासरी किं. रु.
(१) कपडा व सूत	१९०९-१०ते१९१३ -१४ सरासरी	५२१८०३०००
,,	१९१५-१६	४३२९५५०००
,,	१९१६-१७	५३०६४६०००
(२) साखर	१९०९ ते १९१० व १९१३ते१४ सरासरी	१३१७५८०००
,,	१९१५ ते १९१६	१६६१७८०००
,,	१९१६ ते १९१७	१५४९०३०००

निर्गत व्यापाराचा तपशील.

मालाचें नाव	सन	मालाचें वजन टन	किंमत रु. हजार
खाण्याचीं धान्यें	१९०९-१४	४४११	४५८१११
	१९१५-१६	२४३६	२९०७१२
	१९१६-१७	२९१५	३४९०४३
गळिताचीं धान्यें	१९०९-०४	१४५३	२४३६९७
	१९१५-१६	७००	१०१२२६
	१९१६-१७	९२८	१६४४३२
कापूस कपडा वगैरे	१९०९-१४		४४६८३७
	१९१५-१६		३४५३४९
	१९१६-१७		४६९४५७
ज्यूट-पोतीं वगैरे	१९०९-१४	७६४	४२४५११
	१९१५-१६		५३६२०४
	१९१६-१७		५७९४२७
चहा	१९०९-१४	२६६४९८	१३०६७८
	१९१५-१६	३३८४७०	१९९८११
	१९१६-१७	२९१४०३	१६७७१०
काफी	१९०९-१४		१३७५२
	१९१५-१६		९८६९
	१९१६-१७		१०४५८
अफू	१९०९-१४		९९६१७
	१९१५-१६		१४७०२
	१९१६-१७		२०९६५
नीळ	१९०९-१४		२९९७
	१९१५-१६		२०७८७
	१९१६-१७		२०७४४
सोरा	१९०९-१४		३४९९
	१९१५-१६		६८८७
	१९१६-१७		१०५१३
हाडें	१९१६-१७	४२	३२४४
पेंडी	१९१६-१७	७५	९९१०
कच्चीं चामडीं	१९०९-१४		१०३१६०
कमावलेली चामडीं	१९१६-१७		४२७४५
			१४४०८६
	१९१६-१७		९३१७८
लोंकर	१९०९-१४		३७८००
	१९१५-१६		३७९०८
	१९१७-१७		३७७९८

सन १९१६।१७ सालीं प्रसिद्ध झालेल्या व्यापारासंबंधीं परीक्षणरिपोर्टांवरून असें आढळून येतें कीं बाहेर जाणाऱ्या मालाचे चार पांच वर्ग करतां येतात.

१ खा ण्या चीं धा न्यें:—गहूं, गव्हाचें पीठ, भात, तांदूळ चहा, काफी, मसाल्याचें सामान वगैरे.

२ क च्चा मा ल:—कापूस, ताग, गळिताचीं धान्यें, बिन कमावलेलीं चामडीं, लोंकर, सागवानी लांकूड वगैरे.

३ अ र्ध व ट त या र के ले ले जि न्न स:—सूत, निरनिराळ्या प्रकारचीं तेलें, सोरा, कच्चें रेशीम, कमावलेलीं चामडीं वगैरे.

४ त या र के ले ले जि न्न स:—कपडा (रंगविलेला) पोतीं, गोणपाट, दोरखंडें, लाख, रेशमी कपडा वगैरे.

५ अफू, नीळ व इतर रंग निघणारे जिन्नस.

ज मि नी ची सु पी क ता—जमीनीची सुपीकता राखण्याचे मुख्य मार्ग चार आहेत ते पहिला, जमिनीला खत देणें; दुसरा, जमीन पड ठेवणें; तिसरा हिरवाळ खत देणें व चवथा पिकांत फेरपालट करणें.

जमिनीला खत देऊन व तिची चांगली मशागत करून तिची सुपीकता कायम राखणें शक्य आहे परंतु ही बाब फार खर्चाची आहे. जमीन पड ठेवणें म्हणजे ती नागरून वरचेवर कुळवून तयार करून त्यात सबंध एक हंगाम कांहीं पीक न घेतां हवेचा व उष्णतेचा वगैरे तिजवर परिणाम होऊं देणें हा होय. यामुळें तींत जास्त पोषक द्रव्यें उत्पन्न होतात, तण मरतें, व तींत जास्त पाणी मुरून रहातें. जमीन अशी अगदीं पडित ठेवण्याची चाल मुख्यत्वेंकरून गुजराथेंत भडोच जिल्ह्यांत आढळते. ज्या ठिकाणीं खरीप व रब्बी पिकें फेरपालटीनें घेतात, तेथें रब्बी पीक घेतलें म्हणजे जमिनीला तीन साडेतीन महिने विश्रांति मिळते व खरीप घेतलें तर आठ नऊ महिने विश्रांति मिळते.

कांहीं कांहीं भागांत जमीन पडित ठेवणें फायदेशीर असून ती पडित ठेवणें जरूरीचें आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम घाटांत आसामात, ब्रम्हदेशांत, मध्यप्रांतात व मध्यहिंदुस्थानात जंगली भागात जेथें नवीन वैती जमीन करतात व ज्या ठिकाणीं वर्षानुवर्ष जमीन बदलतात तेथें जमीन पड ठेवण्याची पद्धत जमिनीच्या मगदुराप्रमाणें व हवामानावर अवलंबून असते.

ही पड ठेवण्याची पद्धत कोंकणांत वरकस जमिनींत आढळते. नागली, हरीक, वरी व कारळा तीळ हीं पिकें लागोपाठ चार वर्षे घेऊन नंतर ती जमीन पांच ते दहा वर्षे पड टाकितात. तेणेंकरून तिची फलद्रूपता पुन्हां ताळ्यावर येते. या जंगली भागांत पाऊस पुष्कळ पडत असल्यामुळें व जमीन उतारावर असल्यामुळें नांगर वगैरे करून ठेविल्यास भुसभुशीत जमीन वाहून जाते याकरतां ती तशीच आठ दहा वर्षे सोडून नंतर त्यांतील जंगल तोडून व आजूबाजूच्या जंगलांतील डहाळ्या आणून व गवत हांतरून त्याला उन्हाळ्यात आग लावून देतात. ही राख लहान नांगरीनें हलवून पहिल्या वर्षी पाऊस पडल्याबरोबर नाचणी पेरितात; व पुढें वर नमूद केल्याप्रमाणें तीन पिकें घेऊन पुन्हां पूर्वीप्रमाणें पड टाकितात. याशिवाय रानटी जातीचे लोक अशाच पद्धतीनें कारांदे, कोन, कणगरें भात, मका व हलक्या प्रतीचीं तृणधान्यें वगैरे करून आपला उदरनिर्वाह करितात.

या पद्धतीला ब्रम्हदेशांत टावनग्या, आसामांत झुम, मध्यहिंदुस्थानांत डह्या, हिमालयात खिल व पश्चिम घाटांत कुमरी अगर डाली म्हणतात.

हि र वा ळ ख तें—म्हणजे ताग, गवारी, कुळीथ, कारळा वगैरेंसारखीं पिकें करून तींवर फुलवरा आला म्हणजे नांगरून जमिनींत गाडून टाकणें होय. याच्या योगानें जमिनीचा पोत सुधारतो व पोषक द्रव्याचा सांठा वाढतो. याचा उपयोग पुढील पिकांनां होतो. ही पद्धत मुख्यत्वें करून बागाइतात सर्वत्र प्रचलित आहे. याला बेवड करणें असेंही म्हणतात.

पिकांत फेरपालट करण्याची पद्धत सर्व हिंदुस्थानभर आढळते. ही पद्धत अनुभवानें जमिनीचा मगदूर, हवा, मान, पाऊसकाळ वगैरे पाहून त्यावर बसविलेली असते.

पि कां त फे र ब द ल—वनस्पतीस जीं पोषक द्रव्यें हवेंतून घ्यावयाचीं असतात, तीं हवेंत पुष्कळ असतात. परंतु जी जमीनींतून घ्यावयाचीं असतात तीं मात्र जमीनींत कांहीं नियमित प्रमाणात आढळतात. यामुळें पिकाची लागवड आळीपाळीनें करणें जरूरीचें आहे. पिकांत आळीपाळी कां असावी याचीं कारणें पुढीलप्रमाणें:—पहिलें कारण जमीनींतील द्राव्य रसापैकीं कांहीं भाग प्रत्येक वनस्पति शोषून घेते. दुसरें कारण जमीनींत जीं पोषक द्रव्यें असतात त्यांचे सारखेच भाग सर्व जातींच्या वनस्पती घेतात असें नाहीं. तिसरें कारण सर्व वनस्पती जमीनींतून एकच जातीचें द्रव्य घेतात असेंहि नाहीं. चवथें प्रमाण प्रत्येक जातीच्या वनस्पतींत त्यांत तण वाढण्याचें मान त्या वनस्पतीच्या मानानें कमजास्त असतें. वर नमूद केलेल्या कारणांअन्वयें पुढील नियम फायदेशीर दिसतात.

ज्या पिकांच्या पोषणास एकाच जातीचीं द्रव्यें लागतात अशीं पिकें एकाच शेतांत लागोपाठ घेऊं नये. धान्याचीं पिकें कंदांचीं पिकें, पाल्याचीं पिकें, फलमूळांचाच उपयोग होतो अशीं पिकें, यांचा परिणाम जमीनीवर निरनिराळ्या तऱ्हेनें होतो. म्हणून जर एक साल धान्यांचीं पिकें एका जमीनींत केलीं तर त्याच जमीनींत दुसऱ्या वर्षी कंदांचीं अगर मुळांचीं

किंवा कडधान्याचीं पिकें करावीं. धान्यांच्या (तृणधान्याच्या) पिकांस नायट्रोजन व फास्फरस या द्रव्याची विशेष जरूरी आहे. कडदणाच्या धान्यास पोटयाश व चुना यांची जरूरी असते. हीं पिकें नायट्रोजन हवेंतून घेऊं शकतात. म्हणून त्यांच्या काड्याकुड्या मुळ्या वगैरे कुजल्यावर त्यांतील नायट्रोजन जमीनीस मिळतो. व त्या शेतांत पुढील सालीं तृणधान्याचीं पिकें काढल्यास तो त्या पिकांच्या उपयोगी पडतो. यासाठीं एक तऱ्हेचें अन्न खाणारें पीक काढल्यावर दुसऱ्या तऱ्हेचें अन्न लागणारें पीक करावें, म्हणजे जमीनीची सुपीकता कायम रहाते. कापसासारख्या कांहीं पिकांच्या मुळ्या खोल जाऊन खालच्या थरांतील पोषक द्रव्यें घेतात. जोंधळा, बाजरी, गहूं वगैरेंच्या मुळ्या आंखूड असून वरच्या थरांतील पोषक द्रव्यें घेतात. याकरितां खोल व आंखूड मुळयांचीं पिकें आळीपाळीनें केल्यास वरच्या व खालच्या थरांनां आळीपाळीनें विश्रांति मिळते.

विवक्षित पिकांबरोबर विवक्षित तणें माजतात. याकरितां जमीनींत फेरपालटीनें निरनिराळीं पिकें केल्यानें व त्या पिकांनां निरनिराळ्या प्रकारच्या मशागतीची जरूर असल्यामुळें तण नाहींसें होतें. उदाहरणार्थ बाजरीमागून भुईमूग अगर बटाटे व कापसामागून हरभरा.

एका जातीच्या पिकावरील रोग अथवा कीड यांची बाधा दुसऱ्या जातीच्या पिकांस होत नाहीं. म्हणून एकाच जातीचीं पिकें लागोपाठ केल्यास किड्यांनां भरपूर पोषण मिळतें व त्याची वीण अतिशय जोरानें होते. याकरितां पिकांत फेरपालट केल्यानें किड्यांनां अन्न न मिळून त्यांचा नाश होतो. खेड व जुन्नर येथील बटाट्यांतील बांगडी व त्याप्रमाणें अळो नाहींशी करणें असल्यास तेथें कांहीं वर्षेंपर्यंत बटाटे करणें बंद झालें पाहिजे.

वर सांगितलेल्या गोष्टींचा फायदा मिळावा म्हणून पिकांची मांडणूक चांगली करावी. जमीनीची चांगली मशागत करून कीड व तण न माजण्याबद्दल योग्य उपाय योजून दर वर्षी जमिनीला खत घालून एकाच जमिनींत लागोपाठ तेंच पीक करीत गेल्यास वावगें होणार नाहीं. परंतु असें करणें हीं जास्त खर्चाची बाब असल्यामुळें दरवर्षी पिकाचीं चागली मांडणूक केल्यानें जमिनीला विश्रांति मिळून फार खर्च न येता चांगलीं पिकें येतील.

हिंदुस्थानांत मिसळीचीं पिकें करण्याची बरीच वहिवाट आहे. उदाहरणार्थ बाजरी आणि तूर; बाजरी आणि कुळीथ व मठ; बाजरी व कारळा; जोंधळा व उडीद; शाळू, जोंधळा व करडई; गहूं आणि करडई; शाळू व हरभरा वगैरे. मिसळीचीं पिकें केल्यानें पिकांत फेरबदल केल्यापासून जो फायदा होतो तो होऊन शिवाय अनेक धान्यें मिसळून पेरलीं असतां सर्वेच पिकें बुडत नाहींत. एखादें पीक बुडालें तरी इतर पिकांपासून कांहींना कांहीं तरी उत्पन्न होतें. मिसळींत कडदणाचीं पिकें असतात व तूर ही सर्वत्र आढळते. तुरीपासून अतिशय फायदा आहे. कारण तुरीचीं मुळें खोल जातात व तेथील पोषक द्रव्यें वर आणतात. तुरीचा पाला जमीनीवर पडतो व अशा योगानें जमीन सुपीक बनते. पिकांची चांगली मांडणूक केल्यास जमीन पड ठेवण्याची फारशी जरूर पडणार नाहीं. कांहीं पिकें धान्याचीं असावीं व कांहीं बिवडाचीं असावी. पिकांत फेरबदल केल्यानें व नवीन जातीचीं पिकें केल्यानें पेरणीचे, कापणीचे व मशागतीचे हंगाम वरच्यावर येऊन माणसांनां व गुरांनां भरपूर अन्न मिळून शेतकऱ्यांस व बैलांनां वर्षभर राबणूक पुरेल. पिकांत फेरपालट करणें तो बाजारच्या मागणीवर, मजुरीवर, जमीनीच्या जातीवर हवेवर व शेतापासून नजीक असणाऱ्या बाजारावर व एकंदरींत शेतांत होणाऱ्या फायद्यावर अवलंबून आहे. असें असल्यामुळें व वेगवेगळ्या प्रातांत व प्रदेशात जमीन व हवा निरनिराळी असते म्हणून पिकांची मांडणूक करण्याला निश्चित नियम सांगणें कठिण आहे. तथापि पिकांची मांडणूक करतांना ज्या पिकापासून जास्त फायदा होऊन जमिनीचें फारसें नुकसान होणार नाहीं इकडे विशेष लक्ष पोंचवावें. पिकाच्या फेरपालटींत एखादें पीक जमिनीची सुधारणा करण्यासारखें असावें. जसें ताग करून तो जमीनींत नागरून टाकणें. असें केल्यानें जमिनीची पोत सुधारतो. सोईप्रमाणें पिकें करणें ती कांहीं खोल व कांहीं उथळ जमीनींत पोषण करणारीं पिकें असावींत. नेहमीं फायद्याचीं पिकें करीत असतांना त्यांत एखादें पीक असें असावें कीं तें करतांना जमीनीची जास्त मशागत करून तींतील सर्व तण नाहींसे होईल. उदाहरणार्थ कापसाच्या फेरपालटींत सवडीप्रमाणें बटाटे, भुईमूग, हळद वगैरे पिकें करावीं. एकंदरींत पिकांची मांडणूक करताना जास्त पैसा देणारीं पिकें, बिवडाचीं पिकें, जमीन साफ ठेवणारीं पिकें, वाढींत फेर असणारीं पिकें व निरनिराळ्या जमीनीच्या थरावर पोसणारीं पिकें अशीं असावीं याबद्दल जास्त काळजी घ्यावी.

महाराष्ट्रांतील फेरपालटीच्या कांहीं पद्धती खालीं दिल्या आहेतः—(१) फार पाऊस पडणाऱ्या भागात वर्षानुवर्ष भात घेतात. ज्या भातांच्या जमीनींत ओलावा टिकतो तेथें रब्बी हंगामात वाल, पावटा, कुळीथ, वाटाणा, गहूं, एरंडी, हरभरा वगैरे पिकें घेतात. (२) वरकस जमीनींत पहिल्या वर्षी नागली, दुसऱ्या वर्षी वरी, तिसऱ्या वर्षी हरीक, चवथ्या वर्षी कारळा. परंतु कोंकणांत नागली, हरीक व तिसऱ्या वर्षी वरी अशी चाल आहे. कारण वरी केल्यानंतर तिची पाळें जमीनींत रहातात व त्या पाळांवर कारळ्याशिवाय दुसरें पीक येत नाहीं अशी समजूत आहे. सर्वसाधारण हीं पिकें दर एकरी नागलीच्या सवाई हरीक व पाऊणपट म्हणजे नागलीच्या तीनचतुर्थांश वरी अशीं असतात. या पिकानंतर जमीन कांहीं वर्षे पड टाकतात. ही जमीन कमींत कमी आठ दहा वर्षे तरी पड टाकली पाहिजे असा कोंकणांतील अनुभव आहे. (३) खानदेश, भडोच, धारवाड, वऱ्हाड,

मराठवाडा येथील काळ्या जमीनींत पहिल्या वर्षी कापूस, दुसऱ्या वर्षी बाजरी, तिसऱ्या वर्षी तीळ, हरभरा अगर गहूं.

तापीकांठः—यांत पहिल्या वर्षी गहूं, दुसऱ्या वर्षी हरबरा किंवा जवस.

दख्खनः—हलकी जमीन, हींत बाजरी व कडधान्यें.

डेक्कनः—मराठवाडा; काळी जमीन. हींत शाळू, व करडई; गहूं आणि करडई व हरभरा.

उत्तर गुजराथः—गोराडू जमीन. हींत पहिल्या वर्षी बाजरी व कडधान्यें; दुसऱ्या वर्षी कोद्रा, तूर व तीळ; तिसऱ्या वर्षी नाचणी. बेसर-जमीन. हींत पहिल्या वर्षी ज्वारी व कडधान्य; दुसऱ्या वर्षी कोद्रा, तीळ, तूर अगर तंबाखू; तिसऱ्या वर्षी नाचणी.

पंचमहालः—येथें पहिल्या वर्षी मका; दुसऱ्या वर्षी हरभरा, गहूं.

वसईपट्टी (ठाणें जिल्हा)—येथें पहिल्या वर्षी पानमळा; दुसऱ्या वर्षी आलें; तिसऱ्या वर्षी ऊंस; चवथ्या वर्षी केळीं.

खेड जुन्नर (पुणें जिल्हा):—येथें पहिल्या वर्षी बाजरी व रब्बी बटाटे; दुसऱ्या वर्षी भुईमूग; तिसऱ्या वर्षी बाजरी व रब्बी कांदे व चवथ्या वर्षी मिरची.

पाटबंधाऱ्याखालील जमीन (जिल्हा नाशिक):—हींत पहिल्या वर्षी भात; दुसऱ्या वर्षी ऊंस; तिसऱ्या वर्षी बाजरी, रब्बी गहूं किंवा हरभरा व चवथ्या वर्षी भात.

बि यां ची नि व ड:— बीं खळ्यांत न धरिता मळ्यात धरावें अशी म्हण आहे. शेतकीला आधारभूत मुख्य बींच आहे. "बीज तसा अंकूर" अशीहि म्हण आहे. व ती सार्थ आहे. बीं चांगलें असेल तर पीक चांगलें येईल; परंतु बींच जर वाईट असेल तर तें कसल्याहि जमीनींत पेरा, नंतर कशीहि मेहनत करा, तींत कितीहि खत मूत टाका तरी बीं रोगट वाईट असल्यामुळें पुढें पीक चांगलें येणार नाहीं.

असें असताहि या प्रश्नाकडे फारच दुर्लक्ष आहे. हल्लीं शेतकरी लोक बहुतेक जातीचें बीं पेरणीच्या वेळीं बाजारांतून आणतात, तें बहुतेक मिसळीचें असतें. कांहीं लोक खळ्यांतील ठळक ठळक कणसें राखून किंवा बीं पाखडून पेरणीकरितां ठेवितात. सरकी बहुतेक गिरणींतून आणितात. म्हणजे गिरणी हीं मुख्यतः बियांचीं कोठारें होत. ही निष्काळजी रीत झाली. या कामांत खालील तत्वें लक्षांत घेतलीं पाहिजेत. (१) बीं पेरलेल्या जमीनींत व हवेंत येईल असें असलें पाहिजे. (२) तें वर्षानुवर्ष निवड केलेल्या, चांगली मशागत केलेल्या व जोरदार झाडांचें असावें. (३) तें नवें, बिन भेसळीचें, वजनदार, रंगदार, मोठें ढगळ, चकचकीत, पक्कें झालेले, चांगलें उगवणारें, बिनरोगी असावें. तें किडकें असूं नये. बियांच्या अंगींच चकचकीतपणा असल्यास तें त्याच्या परिपक्वतेचें दर्शक होय. (४) बीं भिजकें, उबट किंवा कुबट असूं नये. भिजकें बीं तोंडांत घातलें असतां कुबट लागतें (५) बियांत केरकचरा, खडा माती, किंवा तणाचें बीं हीं नसावीत. (६) तें जास्त प्रमाणांत उगवणारें असावें. बियांची निवड करतांना खालील गोष्टी लक्षांत ठेवाव्या. (१) एखादें निर्मळ रोग न झालेलें असें शेत पाहून त्यांतील चांगला भाग पसंत करावा. (२) त्यांतील ओंब्या किंवा कणसें चांगली भरलेलीं व मोठीं असावीं; (३) ओंबींतील किंवा कणसांतील दाणे मोठे व वजनदार असावेत. (४) रोपावर किंवा धान्यावर कीड, तांबारा, किंवा काणी सारखे रोग नसावेत. (५) बीं धरणें तें पीक चांगलें तयार झाल्यावर धरावें. (६) बीं तयार झाल्यावर तें चाळावें. त्यांतील हलके, किडके व फुटके दाणे वेगळे करावे. बीं चांगलें असलें तरी तें पेरल्यावर उगवण्याला पुरेसा ओलावा, पुरेशी हवा व उष्णता यांची जरूरी आहे. हीं सर्व जमीनीची चांगली मशागत केल्यानें, व पाऊस न पडल्यास पाणी पाजल्यानें भागवितां येतात. पाणथळ जमीनींत बीं उगवत नाहीं. तें कुजतें. कोरड्या जमीनींत तें उगवत नाहीं व अगदीं थोडा ओलावा असल्यास तें पिठूळतें

बि यां ची प री क्षा.—बीं शेतांत पेरण्यापूर्वी त्याचें उगवण्याचें प्रमाण काय आहे हें पहाण्याची गुजराथेंतील कांहीं भागांत एक पद्धति आहे. गहू शेतांत पेरण्यापूर्वी एक मूठभर घेऊन त्याची एक पुरचुंडी बांधितात व ती चार तास पाण्यात भिजवून नंतर ती ओलसर दाण्याची पुरचुंडी जमीनींत पुरतात. पुढें चार दिवसानी ती बाहेर काढून किती बियाना मोड फुटले हें पहातात. बहुतेकांना मोड फुटले असल्यास ते पेरण्यास हरकत नाहीं असें समजतात. याहीपेक्षां शेतकऱ्याला सोपी रीत म्हणजे एका लांकडाच्या खोक्यांत अगर टिनच्या तबकांत नदींतील बारीक रेती भरावी व ती पाण्यानें ओली करावी. नंतर बियांपैकीं शंभर दाणे घेऊन ते वाळूवर टाकावे व हलूच दाबावे. रेती ओली ठेवावी, पण बियावर पाणी खेळूं देऊं नये. चार पांच दिवसांनीं बियाना मोड फुटले म्हणजे मोडाबलेले दाणे मोजून फेकून द्यावे व आणखीं चार दिवसांनीं पुन्हां मोड आलेले दाणे मोजून फेकावे. अशा रीतीनें दहा दिवसात एकंदर किती दाणे उगवलें हें आपणास कळेल शंभर पैकीं ९०—९५ दाणे उगवले तर बीं पेरण्यास चांगलें आहे असें समजावें. बाजरी, राळे, तीळ वगैरे बारीक दाण्याच्या धान्याची जास्त काळजी घेतली पाहिजे.

बीं सां ठ वि णें:— प्रत्येक शेतकऱ्यानें पुढील वर्षाच्या पेरणीकरिता बीं राखून ठेवावें. पुष्कळ बियानां विशेष करून कडदण धान्यांनां तीं फार दिवस ठेविल्यास कीड लागते व बियांची नासाडी होते. धान्याला कीड लागूं नये म्हणून हिंदुस्थानांत बीं साठविण्याचे अनेक उपाय योजण्यांत येतात. गुजराथेंत, देशावर व कर्नाटकांत बीं गाडग्यात सांठवून ठेवतात. दक्षिण कोंकणांत भात पेंढ्याच्या मुड्यांत बांधून ठेवण्याची चाल आहे. कित्येक ठिकाणीं तट्टये सारवून त्यांत अगर कणगींत किंवा फळ्यांच्या कोठारांत धान्य सांठवून

ठेवतात. गाडगें, कणगि व तट्टे यांचीं तोंडें बीं भरल्यानंतर शेण, माती व राख यांच्या मिश्रणानें लिंपतात; बियांचा किडीपासून बचाव व्हावा म्हणून बियांत राख व लिंबाचा सुकलेला पाला मिसळतात. गुजराथेत बीं टिकावें म्हणून त्याला एरंडेलाचें पूट देतात. कोंकणांत कडवे, वाल, पावटे वगैरेंना तांबडी माती लावतात. गुजराथेंत कित्येक ठिकाणीं गव्हांच्या बियात थोडा पारा घालण्याची चाल आहे व त्याच्या पासून बियाचा बराच बचाव होतो. कित्येक ठिकाणीं मोठमोठीं दाणेदार कणसें निवडून, कित्येक ठिकाणीं धान्याच्या राशींतून मोठें ठोकळ बीं पाखडून राखून ठेवतात.

उन्हांत वाळविलेले बीं रांजणांत अगर गाडग्यात भरलें म्हणजे बियाच्या मानानें त्यात कांहीं नेफ्थलाइनच्या (डाबरातील द्रव्य) गोळ्या घालाव्यात व तोंड चांगले बंद करावें. गाडगें, कणगी वगैरे ऐवजीं शेतकऱ्याला लोखंडी पत्र्याच्या हौदात बीं ठेवणें बऱ्याच अंशीं फायदेशीर पडेल. या हौदाचें तोंड वंद असून त्याचें झाकण अगदीं घट्ट बसणारें असावें. प्रत्येक पन्नास पौंड बियावर सुमारें १०-१२ डाबराच्या गोळ्या घालाव्या, म्हणजे डब्यांतील हवेंत बहुतेक कीटकाची वीण होणें बंद पडेल. त्या गोळ्या टाकलेल्या बियाचा फक्त पेरण्याच्या कामींच उपयोग होतो. त्याचा जनावरांस अगर माणसास खाण्यास उपयोग होत नाहीं. शेतकरी जीं पिके करितात, त्याना अनेक शत्रू आहेत. ते जमीनींत बीं पेरल्यापासून तों पीक तयार होऊन पदरात पडे पावेतों त्याच्या मागें लागलेले असतात. पुन्हा धान्य कोठारात साठविल्यास तेथेंहि त्याचा फन्ना उडवितात. हे शत्रू म्हणजे निरनिराळ्या तऱ्हेचीं तणझाडें किडे व वनस्पतिजन्य रोग होत. याखेरीज उंदीर, कावळे, चिमण्या, खारी, ससे, कोल्हे, रानडुकरें, सायाळ, हरणें, रानमांजरें, रोही वगैरे प्राणी पिकें उभीं असताना खाऊन नुकसान करतात.

शेतात आपणास नको असलेलें किंवा पिकाची नुकसानी अगर खराबी करणारें झाड यास तण म्हणण्यास हरकत नाहीं. तणझाडें पिकाचें अनेक तऱ्हेनें नुकसान करतात. ज्याप्रमाणें पिकें वाढण्यास पाणी, पोषक द्रव्यें, हवा, उष्णता वगैरेंची जरूरी लागते त्याप्रमाणें तणझाडांची वाढ होण्यासाठीहि या गोष्टींची अनुकूलता लागते. म्हणून तणझाडें शेतात होऊं दिल्यास तीं पिकासाठीं घातलेल्या पोषक द्रव्याचा वाटा घेतात व त्यामुळें ओलावा कमी पडतो; पिकें कमजोर दिसू लागतात. शिवाय रोपांना त्यापासून दाटी होऊन त्याची वाढ होण्यास लागणारें ऊन व हवा बंद होते. अशा दाटींत किडे, त्याचीं अंडीं व त्याचप्रमाणें वनस्पतिजन्य रोगाचा उद्भव व वाढ होण्यास चांगली जागा सापडते. तणझाडें शेतात वाढूं दिलीं व त्याना बीं येऊं देऊन त्यांच्यासहित पिकाची कापणी केली तर धान्याच्या बियांत तणाच्या बियांची आतोनात भेसळ होते व वर्षानुवर्षे असेंच बीं पेरीत गेल्यास तणझाडें आपलें वर्चस्व बसवितात. व मुख्य पिकाची वाढ बंद करतात. शेतकऱ्यांत "तण खाई धन" अशा एक म्हण आहे व ती सर्वस्वी खरी आहे. ती पूर्वजानीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानीं केलेली असून अज्ञानामुळें व आळसामुळें ती शेतकऱ्याना माहीत असूनहि त्याच्या हातून ती कृतींत येत नाहीं.

या तणझाडरूपी खादाड व आगंतुक शत्रूचा वेळींच प्रतिकार व बंदोबस्त केल्यास हल्लीं शेतात मिळणारें पीक निदान सवाई दिढीनें तरी वाढविता येईल.

तणांचें वर्गीकरणः—हें पुष्कळ तऱ्हेनें करतां येईल. तणें कांहीं वर्षायु व कांहीं बहुवर्षायु असतात. कांहींच्या मुळया खोल जातात व कांहींच्या वरच असतात व कांहीं कोरडवाहू जमीनींत आढळतात तर कांहीं पाणभरत्या व बागाईत जमीनींतच फैलावतात. कित्येक खरीप हंगामांत तर कांहीं रब्बींत व कांहीं दोन्ही हंगामात सापडतात. कांहीं तणाचा फैलाव बियापासून होतो, कांहींचा दर कांड्यास मुळ्या येऊन होतो व कांहींना ताणे फुटून त्यांच्या शेवटीं कांदा किंवा गड्डा येऊन पुन्हां त्यातून फूट होऊन जास्त जास्त क्षेत्रावर त्याचा प्रसार होत जातो.

तणाच्या बीजाचा फैलाव होणाऱ्या निरनिराळ्या तऱ्हाः—

(१) शेतातील तणाना बीं येऊन तेथल्या तेथेंच पडणें. जसें—टारफुला, कुरडू, फली, पिवळा धोतरा वगैरे.

(२) वाऱ्यानें बाहेरून बीं शेतात येऊन. उ० म्हाताऱ्या, पाथरी वगैरे.

(३) पक्ष्याच्या विष्ठेंतून बीं शेतात पडून. उ० आंब्यावरील बाडगूळ.

(४) गुरें, मेंढ्या, बकऱ्या वगैरेंकडून—बाभूळ, बांकेरी,

(५) कालव्याच्या पाण्यातून—घोळ, पाथरी, फुली, नागरमोथा वगैरे.

(६) मनुष्याकडून—तणाच्या बियानी भेसळ असलेलें बीं पेरून.

निरनिराळ्या प्रकारच्या पिकात विशिष्ट प्रकारच्या तणाचीं बीजें आढळतात तीं पुढें दिलीं आहेतः —

पिकें	तणांचीं नावें.
१ राळा, सांवा व बाजरी	कुरडू, शिपी, शेवरा पिंवळा धोतरा, माठ, तांदुळजा, चिमणचारा व टारफुला.
२ ज्वारी व कुळीथ, खरीप व रब्बी	शेवरा, बरबडा, चादवेल व टारफुला.
३ मटकी	बरबडा, शेवरा, पडवेल.
४ गहूं	शेवरा, तादुळजा, बरबडा, चांदवेल, माठ व सारमळ.
५ भात	पाकड, बरडी.
६ ताग	खांडेकुळी

बियानें फैलाव होणाऱ्या तणाचा नायनाट करणें झाल्यास तीं बीज येण्यापूर्वी निंदून (खुरपून) टाकावीं व पेरणीला निर्भेळ बीं वापरावें. जमीन खोल नांगरून कुळवून व पावसारंभीं तणांची आडीमोड करून व पीक उभें असतांना वरचेवर कोळपण्या देऊन व एक दोन खुरपण्या देऊन साधारणपणें वर्षायु तणाचा नायनाट करतां येतो. वर्षायु तण दोन पानी असताना कुळवाची एक पाळी घातल्यास तें उपटून मोकळें होतें व उन्हानें मरून जातें. परंतु याच तणाला चार पानें फुटूं दिल्यास त्याच्या मुळ्या पसरतात व खोल जातात. हें तण काढण्यास खुरपावें लागतें व तेणेंकरून खर्च जास्त येतो. याहूनहि हीं तणें मोठीं होऊं दिल्यास तीं हातांनीं उपटावीं लागतात व याला जास्त मेहनत व खर्च येतो.

मुळ्या खोल जाऊन व कांड्याकांड्यानें नवीन मुळ्या फुटून फैलावणारीं तणें बहुवर्षायु होत. कुंदा, हरियाळी (दूर्वा) वसनसडी, लव्हाळा (नागरमोथा) दर्भ व मध्यप्रांतांतलि कांसगवत वगैरे हीं या वर्गांतील होत. हीं तणें उत्तम काळ्या जमिनींतच फार होतात. याचा बीमोड करणें फार कठीण असून जास्त खर्चाचें आहे. व कांहीं कांहीं तणाचा बीमोड करणें तर दुरापास्तच आहे. पाणभरत्या जमिनींत लव्हाळा कधींहि नाहींसा होत नाहीं. एका कुंद्याच्या रोपाला एक वर्षांत नवे कोंब दहा फुटतात व त्याच्या मुळ्या सुमारें चवदा इंच खोल जातात व त्यांचा विस्तार एक चौरस फूट जागा व्यापितो. त्याच्या दोन तीन वर्षांत एक हातरीऐवढ्या पेढी बनतात. लोखंडी नांगरानें जमीन नांगरून, कुंद्याचे गड्डे वेंचून जाळल्यास कुंद्याचा नायनाट एक दोन वर्षांत होऊं शकतो. बऱ्याच ठिकाणीं कुंद्याच्या पेढी हातानें खणवितात पण त्याला फार खर्च येतो.

लव्हाळा:—बागाइतात कोरडवाहू जमिनींतहि हा कांहीं ठिकाणीं आढळतो. फळझाडाच्या व फुलझाडाच्या बागात तर बहुतेक जागा या तणानें व्यापलेली आढळते. लव्हाळा खणून, वेंचून काढून वावर अगदीं साफ करणें अगदीं अशक्य आहे. कारण जमीन खोल नागरली अगर खणून काढिली तरी नागरमोथे रंगानें काळे असल्यामुळें ते वेंचण्यास दिसत नाहींत. तागाचें पीक करून जमिनींत गाडल्यानें, रताळ्यासारखीं जमिनीवर आच्छादन करणारीं पिकें केल्यानें व पाणभरतीऐवजी कोरडवाहू पिकें केल्यानें हें तण कांहीं अंशीं कमी पडतें. उन्हाळ्याच्या एका झाडाला चार महिन्यात पांच नागरमोथे, आठ महिन्यात नऊ व बारा महिन्याच्या झाडास त्रेपन्न नागरमोथे येतात. यापैकीं बऱ्याच नागरमोथ्याना नवीं रोपें फुटतात व त्याचे ताणे खालीं जाऊन दर चार ते नऊ इंचांच्या अंतरावर खोल जमिनींत एक एक नागरमोथा याप्रमाणें येतात व वर्षअखेर शेवटचा नागरमोथा अठरा इंच खोलवर धरतो. अशा रीतीनें प्रत्येक झाड एक वर्षांत वीस चौरस फूट जागा व्यापतें.

हरियाळी:—हरियाळी(हरळी) नांगरून किंवा खणून वेंचून टाकून थोडीबहुत नाहींशी करितां येते. ती वखराच्या पाळ्या वरचेवर घालून दाबात ठेविता येते. परंतु बीमोड करणें झाल्यास दरवर्षी नांगरणें, वेंचणें अशी सतत दोन तीन वर्षें मेहनत घेतल्यास प्रयत्न बराच फलद्रूप होतो.

एका हरयाळीच्या झाडाला आठ महिन्यांत तीन ताणे फुटतात व प्रत्येकाची लांबी तीन साडेतीन फूट असते. हिचीं कांडीं फार जवळजवळ असतात. दर कांड्यास मुळ्या फुटून ती जमिनीला चिकटते. तेथें पुन्हां फूट होऊन लहान ताणा तयार होतो अशा तऱ्हेनें हरियाळी भराभर जास्त जास्त जागा व्यापीत जाते. हे ताणे जमिनीवर आढळतात तसेंच खालीं आढळतात. हरयाळीची फूट आठ महिन्यात सुमारें सतरा इंचपर्यंत खोल जाते व एका झाडानें सुमारें पाच चौरस फूट जागा व्यापिली जाते. जबलपुराकडे कांस नावाच्या तणाचा नाश शेतांत पाणी सांठवून तें कुजवून करितात. या गवताच्या मुळ्या फार खोल जातात व कुंद्याप्रमाणेंच त्याच्या शेतांत पेढी बनतात. टारफुला नांवाची एक परोपजीवी वनस्पति आहे. हा टारफुला आपल्या मुळ्या दुसऱ्या झाडाच्या मुळात गुंतवून झाडातून आपलें पोषण करितो हें तणझाड ज्वारी व ऊंस या पिकांत फार आढळतें. या तणाचीं झाडें फूल येण्यापूर्वी उपटून काढिल्यास पिकास होणारा अपाय बंद करिता येतो.

वरील हकीकतीवरून तण हा शेतकऱ्यांचा केवढा शत्रु आहे हें स्पष्टपणें लक्षांत येईल. हल्लींच्या चढाओढीच्या व अवर्षणाच्या काळांत या शत्रूस थारा देता नये. याचा शक्य त्या उपायानें नायनाट केला पाहिजे.

हिंदुस्थानात तणाचा बीमोड करण्याच्या कामीं रसायन द्रव्यांचा उपयोग करून प्रयत्न केलेले कोठें ऐकिवात नाहीं. [लेखातील संदर्भग्रंथ यावयाचे म्हणजे एक वाङ्मयशाखाच सविस्तर वर्णावयाची. कांहीं ग्रंथांचे विवेचन कृषिशास्त्राच्या पोटविभागाचें विवेचन करतांना येईल. कृषिकर्मशास्त्रावर क्रमिक पुस्तकांसारखे अनेक इंग्रजी ग्रंथ आहेत येथील शेतकीसाठीं शेतकीखात्याचे, सहकारी संस्थांचे रिपोर्ट पहावे. मुकर्जीचा भारतीय शेतकीवरचा ग्रंथ बराच सूचक आहे]

कृष्ण—(१)पुराणांतील एक व थोर विभूति व सर्व देवतांमध्यें अतिशय लोकप्रिय देवता. कृष्ण हा विष्णूचा आठवा अवतार आहे असें समजतात. कृष्ण म्हणजे प्रत्यक्ष विष्णूच असेंहि कित्येक मानतात. ज्याच्याबद्दल अनेक गोष्टी व दंतकथा प्रचारांत आहेत असा हा वीरपुरुष बहुधा महाभारताच्या काळीं होऊन गेला असावा. वेदांतून या थोर पौराणिक व्यक्तीचा उल्लेख सापडत नाहीं. ऋग्वेदांत कृष्ण नावाचा एक सूक्तकर्ता ऋषि येतो. (ऋ. ८. ८५, ३. ४). कृष्ण देवकीपुत्र याचें नांव प्रथम छांदोग्य उपनिषदांत (३. १७. ६) आलें आहे व त्याचा पौराणिक कृष्णाशीं संबंध

जोडण्याचा प्रयत्न बरेच पंडित करितात (ज्ञानकोश वि ३ पा. ४४५ पहा). महाभारतांत त्याचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला आढळतो. महाभारतांतील एक भाग म्हणून हल्लीं उपलब्ध असलेली भगवद्गीता श्रीकृष्णानेंच अर्जुनास निवेदन केली. भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें आपणांस " सर्व भूतांचे ठायीं वास करणारा ईश्वर " असें म्हटलें असून, ही सर्व सृष्टि मी उत्पन्न केली व माझ्या ठायीं सर्व वस्तू वास करतात हीं तत्वें प्रतिपादिलीं आहेत. 'जनार्दन, अनादि, अनंत, सर्वव्यापी, सर्वसाक्षी इत्यादि नांवांनीं अर्जुनानें श्रीकृष्णास संबोधिलें आहे. सर्व जनसमूहाला अत्यंत प्रिय वाटणाऱ्या अशा श्री कृष्णाच्या बाल्यावस्थेंतील लीला भागवतपुराणांत सविस्तर वर्णिल्या आहेत.

'देवकीचा आठवा गर्भ तुझा नाश करील' असें नारदानें कंसास आधींच सांगितलें होतें. ही आपत्ति टाळण्याकरतां कंसानें वसुदेव व देवकी यांनां कारागृहांत टाकले व त्यांचे पहिले सहा पुत्र उपजताच दगडावर आपटून ठार केले. सातव्या गर्भानें रोहिणीच्या उदरांत प्रवेश केला व ती प्रसूत झाली. हाच बलराम होय. आठव्यावेळीं देवकी प्रसूत होतांच वसुदेवानें त्या नूतन बालकास यमुनानदी ओलांडून यशोदेच्या घरीं नेलें. यशोदेला झालेली कन्या उचलून घेऊन व कृष्णास यशोदेच्या घरीं ठेवून वसुदेव तडक देवकीकडे आला. कंसानें ही कन्या देवकीचा आठवा गर्भ समजून मारिली.

इकडे कृष्ण गोकुळांत निर्भयपणें वाढत होता. तो आपल्या ज्येष्ठ बंधू(बलराम)सह वनांत गाई चारण्यास जाई. रामकृष्ण व गोपाळ यांचे खेळ चालू असतां एकदा कंसानें कृष्णाच्या नाशार्थ पाठविलेला अरिष्ट नामक राक्षस, वृषभाचें रुप घेऊन तेथें आला परंतु कृष्णानें त्यास मारिलें. कंसानें पाठविलेल्या केशिन आदिकरून इतर राक्षसांचाहि कृष्णानें वध केला. नंतर अक्रूराबरोबर बलराम व कृष्ण असे उभयतां मथुरेस कंसाच्या निमंत्रणावरून गेले. तेथें कृष्णानें चाणूर व बलरामानें मुष्टिक यांनां मल्लयुद्धांत ठार मारलें. अखेरीस कृष्णानें कंसाला सिंहासनावरून ओढून ठार मारिलें व उग्रसेनास त्याच्या गादीवर बसविलें.

एकदा इंद्रानें गोकुळावर प्रचंड वृष्टि केली असतां कृष्णानें आपल्या करंगुळीवर गोवर्धन पर्वत सात दिवस उचलून धरला व सर्व गोकुळाचें रक्षण केलें. या पराक्रमाबद्दल त्यास 'गोवर्धनधारी' असें नांव मिळालेलें पुराणांतून आढळतें.

महाभारतांत श्रीकृष्णाच्या जन्माबद्दल अशी एक कथा आहे कीं, श्रीविष्णूनें आपल्या मस्तकावरील एक पांढरा व व एक काळा असे दोन केस उपटले. त्या दोन केसांनीं रोहिणी व देवकी यांच्या उदरांत प्रवेश केला. व त्यापासून अनुक्रमें बलराम आणि कृष्ण अथवा केशव जन्मले. महाभारतांत श्रीकृष्णानें केलेल्या अद्भुत गोष्टी व पराक्रम वर्णिले आहेत. त्यांपैकीं कांहींचा सारांश असाः—

यमुनेच्या तीरावरील अरण्यांत राहणाऱ्या हयाधिपतीस कृष्णानें ठार केलें. वृषभाचें रूप घेऊन गोकुळांत आलेल्या अघासुरनामक दानवास त्यानें यमसदनीं पाठविलें. प्रलम्भ, नरक, जम्भ इत्यादि असुरांचाहि त्यानें वध केला. जरासंधाचें साहाय्य असलेल्या कंसास त्यानें ठार केलें व बलरामाच्या साहाय्यानें त्यानें कंसाचा भ्राता जो सुनामन्, त्याचा पराजय करून त्यास मारिलें. त्यानें गंधाराधिपतीच्या मुलीचें (रुक्मिणीचें) स्वयंवराच्या वेळीं हरण केलें. जरासंध व शिशुपाल यांचा त्यानेंच अंत केला. अंग, वंग आदिकरून असंख्य टोळयांना त्यानें जिंकून आपल्या ताब्यांत आणिलें. अद्भुत गोष्टींनें युक्त अशा सागरांत प्रवेश करून त्यानें वरुणास जिंकिलें. पाताळामध्यें जाऊन त्यानें पंचजन्याचा वध केला व पांचजन्य नामक अद्भुत शंख मिळविला. खाडववनामध्यें अर्जुनासह त्यानें अग्नीची आराधना करून त्याजकडून सुदर्शन चक्र मिळविलें. गरुडावर आरुढ होऊन अमरावती नामक इंद्राच्या राजधानीवर त्यानें चाल केली व तेथून पारिजातकवृक्ष बरोबर आणिला.

दुसऱ्या एका स्थळीं, अर्जुनानें श्रीकृष्णाच्या पराक्रमाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—भोज राजांचा युद्धामध्यें समळ नाश करून कृष्णानें रुक्मिणीचें हरण केलें. गांधाराचा त्यानें नाश केला. नागजिताच्या पुत्रांना त्यानें जिंकून त्यांनीं प्रतिबंधांत ठेवलेल्या राजा सुदर्शनाची त्यानें मुक्तता केली. दरवाजाच्या एका फळीनें त्यानें पांड्यांचा वध केला व दन्तकुरामध्यें कलिंगाचा मोड केला. कृष्णाच्या प्रयत्नामुळेंच एकेकाळीं जळालेल्या काशीपुराची पुनः स्थापना झाली. निषदाधिपति एकलव्य व जंभ नामक दैत्य यांचा त्यानें वध केला. सुनामन् नामक उग्रसेनाच्या दुष्ट पुत्राचा बलरामाच्या साह्यानें त्यानें वध करून उग्रसेनास त्याचें राज्य परत मिळवून दिलें. शाल्वाधिपतीस जिंकून त्यानें शतघ्निनामक शस्त्र प्राप्त करून घेतलें. इंद्राच्या विनंतीवरून कृष्णानें मुरु व ओघ या दानवांचा वध करून अखेरीस नरकासहि मारिलें व त्यानें हिरावून घेतलेलीं अदितीचीं कर्णभूषणें परत मिळविलीं.

द्वारकेचा राजा, कृष्ण द्रौपदीस्वयंवराच्या वेळीं हजर असून अर्जुनानें द्रौपदीचा पण उत्तम प्रकारें जिंकला असा त्यानें आपला अभिप्राय दिला, इत्यादि कथाभाग महाभारतांत आढळतो. इंद्रप्रस्थास पांडव राज्य करीत असतां कृष्ण त्यांना भेटावयास गेला व खाण्डववनामध्यें पांडवांसह तो शिकारीकरतां निघाला. तेथें गेल्यावर, खाण्डववन जाळण्यास उत्सुक झालेल्या अग्नीशीं त्याचें सख्य होऊन अग्नीला कृष्णार्जुनांचें साह्य मिळालें. त्याबद्दल अग्नीनें वज्रनाभ नांवाचें दिव्य चक्र व कौमोदकी गदा या वस्तू कृष्णाला अर्पण केल्या. पुढें इंद्राचा पराजय होऊन अग्नीनें सर्व खांडववन जाळिलें. श्रीकृष्णाची भेट घेण्याकरतां अर्जुन द्वारकेस गेला असतां श्रीकृष्णानें अर्जुनाचें स्वागत केलें. कृष्णानें कानाडोळा

केल्यामुळें अर्जुनानें बलरामास न जुमानतां; सुभद्रेला (कृष्णाची स्वसा) घेऊन पलायन केलें व तिच्याशीं लग्न केलें. राजसूय यज्ञ करण्याचें जेव्हा युधिष्ठिराच्या मनांत आलें, तेव्हा जरासंधास प्रथम जिंकलें पाहिजे असा कृष्णाने युधिष्ठिरास सल्ला दिला. तेव्हा भीमाकडून जरासंधाचा वध करून राजसूययज्ञास निर्विघ्नपणें प्रारंभ झाला. युधिष्ठिरानें केलेल्या राजसूय यज्ञाच्या वेळीं कृष्ण हजर असून शिशुपालहि यज्ञाच्या वेळीं तेथें होता. शिशुपालानें यज्ञाच्या वेळीं अत्यंत वाईट वर्तन करून श्रीकृष्णाची निर्भत्सना केल्यामुळें कृष्णानें आपलें सुदर्शन चक्र सोडून शिशुपालाचें डोकें उडविलें. कौरवपांडवामध्यें झालेल्या द्यूताच्या प्रसंगीं कृष्ण हजर होता. ज्यावेळीं द्रौपदी पणाला लावली गेली व पण हरला, त्यावेळीं दुःशासन जबरीनें भरसभेमध्यें तिला घेऊन निघाला व तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हा श्रीकृष्णाला तिची दया येऊन त्यानें तिला वस्त्रें पुरविलीं.

पांडवाचा वनवास संपल्यानंतर कृष्णानें ' भावी भारतीय युद्धाविषयीं चर्चा करणाऱ्या मंडळात भाग घेतला व शांतता प्रस्थापित होण्याविषयीं अटोकाट प्रयत्न केले. नंतर तो द्वारकेस परत गेला. भावी युद्धात त्याचें साहाय्य मागण्याकरता अर्जुन व दुर्योधन हे उभयता द्वारकेस गेले; परंतु दोन्ही पक्षाशीं त्याचें नातें असल्यामुळें युद्धात भाग घेण्याचें त्यानें नाकारलें. " मी व माझें सैन्य या दोहोंपैकीं ज्यास जें पसंत पडेल तें त्यानें घ्यावें " असें श्रीकृष्णानें उभयतांस सांगितलें. अर्जुन दुर्योधनाच्या आधीं आल्याकारणानें प्रथम मागण्याचा हक्क त्यास मिळाला व त्यान्वयें त्यानें कृष्णासच पसंत केलें. दुर्योधनानें मोठया आनंदानें यादवसैन्य पत्करलें. तदनंतर कृष्ण अर्जुनाचा सारथी झाला. नंतर पांडवांच्या विनंतीवरून शिष्टाई करण्याकरता म्हणून श्रीकृष्ण हस्तिनापुरास गेला. परंतु त्याचे शांतता राखण्याबद्दलचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन तो परत आला. नंतर रणसंग्रामाची तयारी करण्यांत येऊन सर्व सैन्य युद्धाकरता सिद्ध झालें. युद्धाच्या अगदीं आरंभीं, अर्जुनाचा सारथि या नात्यानें कृष्णानें अर्जुनास भगवद्गीता सांगितली, व त्याचा व्यामोह नष्ट केला. युद्ध चालू असता श्रीकृष्णानें अर्जुनास अमोल मदत करून त्याचें रक्षण केलें. पांडव युद्धात विजयी झाल्यावर त्याच्यासह तो हस्तिनापुरास गेला व पांडवांनीं केलेल्या अश्वमेध यज्ञास जातीनें हजर राहिला. यज्ञ समाप्त झाल्यावर कृष्ण द्वारकेस परत गेला. त्यावेळीं ' सर्व शहरवासी यांनीं समुद्रतीरीं प्रभासक्षेत्रीं जाऊन देवतेची आराधना करावी अशी त्यानें सर्वांना विनंति केली व एक दिवस मदिरेचें सेवन करण्यास त्यानें सर्वांनां परवानगी दिली. दारूनें धुंद झाल्यामुळे यादवांमध्यें खडाजंगीचें भांडण होऊन श्रीकृष्णादेखत त्याचा स्वतःचा प्रद्युम्न नामक पुत्र मारला गेला, व बहुतेक यादव सरदारांचा या कलहांत वध झाला. तेव्हां बलरामानें तेथून प्रयाण केले व शांतपणें एका वृक्षाखालीं त्यानें देहत्याग केला. जरास नामक व्याधानें मृग समजून चुकीनें कृष्णावर एक बाण सोडला व त्या बाणानेंच कृष्णाचा अंत झाला. त्याकाळीं अर्जुनानें द्वारकेस जाऊन कृष्णाचें उत्तरकार्य यथाविधि केलें. नंतर थोड्याच दिवसांनीं समुद्रानें द्वारका नगर आपल्या उदरांत घेतलें.

" कृष्ण हा शिवाचा (महादेव) उपासक होता व शिवपार्वतीकडून त्यास अनेक वर मिळाले होते असा कांहीं ठिकाणीं उल्लेख आहे " असें डॉ. मूर विधान करतो.

अष्टनायका (पहा) व भौमासुराच्या बंदीतून सोडविलेल्या सहस्र राजकन्या इतक्या कृष्णाच्या स्त्रिया होत्या. मुख्य स्त्रियांची संतति पुढील प्रमाणेः—(१) रुक्मिणी-हिचे प्रद्युम्न,चारुदेष्ण, सुदेष्ण, चारुदेह, सुचारु, चारुगुप्त, भद्रचारु, चारुचंद्र विचार आणि चार असे दहा पुत्र;व चारुमती नामक कन्या होती,तीस कृतवर्म्याच्या पुत्रानें वारिलें होतें.(२) जांबवंती हिचे पुत्र साब, सुमित्र पुरुजित्, शताजित्, सहस्र विजय, चित्रकेतु,वसुमान् द्रविड आणि क्रतु. शिवाय एक कन्या होती. (३) सत्यभामा—हिचे पुत्र भानु, सुभानु, स्वर्भानु, प्रभानु, श्रीभानु, प्रतिभानु व एक कन्या. (४) भद्रा—हिचे पुत्र संग्रामजित् बृहत्सेन, शूर, प्रहरण, अरिजित्, जय, सुभद्र, वामआयु, आणि सत्यक, व एक कन्या. (५)मित्रविंदा–हिचे पुत्र वृक, हर्ष, अनिल, गृध्र, वर्धन. उन्नाद, महाश, पावन, वन्हि, आणि क्षुधि. (६)सत्या—हिचे पुत्र वीर, चंद्र, अश्वसेन चित्रगु, वेगवान्, वृप, आम, शंकु, वसु, कुंति.(७)कालिंदी—हिचे पुत्र श्रुत, कवि, वृष, वरि, सुबाहु, भद्र, शांति, दर्श, पूर्णमास, आणि सोमक. (८) लक्ष्मणा—हिचे पुत्र प्रघोष, गात्रवान्, सिंह, बल, प्रबल, ऊर्ध्वग, महाशक्ति, सह, ओज, आणि अपराजित्. व एक कन्या.याशिवाय रोहिणी म्हणूनहि कृष्णाची एक स्त्री असल्याचें आढळते.

कृष्णाच्या पुत्रपौत्रात अठराजण महारथी होते. त्यांची नावें अशीं—प्रद्युम्न, अनिरुद्ध, दीप्तिमान, भानु, सांब, मधु, बृहद्भानु, चित्रभानु, वृक, अरुण, पुष्कर, वेदबाहु, श्रुतदेव, सुनंदन, चित्रबाहु, विरूप, कवि, न्यग्रोध.

कृष्णावतार व कृष्णभक्ति यासंबंधीं विवेचन ' अवतार ' या लेखांत आलेंच आहे. वासुदेव कृष्ण, अवतारी पुरुष कृष्ण, नारायण, गोविंद वगैरे व्यक्तींतील साम्य व भिन्नता तसेंच नारायणीय धर्माचा विकास ' बुद्धोत्तर जग ' या ज्ञानकोश प्रस्तावना खंडाच्या ६ व्या प्रकरणांत विस्तारानें दिला आहे. सध्यांच्या कृष्णभक्तीचा विचार भक्तिमार्ग या लेखांत केला जाईल [महाभारत: भागवत व इतर पुराणें; वैदिक इंडेक्स. डौसन—हिंदु क्लासिकल डिक्शनरी; ज्ञानकोश विभाग, ३, ४ व ७.]

(२)हा एका प्रसिद्ध विद्वत्कुळांतील ब्राह्मण. वऱ्हाडांत पयोष्णीतीरी :दहिगांव या नांवाच्या एक गांव आहे. या ठिकाणीं चिंतामणी नांवाचा:एक यजुर्वेदी ब्राह्मण रहात होता. बल्लाळ नांवाचा त्याचा एक पणतू होता.हा मोठा रामभक्त होता. कृष्ण

हा बल्लाळचा दुसरा मुलगा होता. भास्कराचार्यांच्या बीजाक्षर 'बीज नवांकूर' नावाची टीका यानें केली आहे. जाहांगीर बादशहाच्या दरबारीं कृष्णाचें वजन फार होतें. नूरदिन नांवाचा यवन अधिकारी कृष्णावर फार प्रीति करीत असे. श्रीपतिकृत जातकपद्धतीवर उदाहरणरूप याची टीका आहे. 'छादक निर्णय' म्हणून याचा एक ग्रंथ आहे. [भारतीय ज्योतिष शास्त्र.]

(३) हा सह्याद्री संन्निध मावळांत रहाणारा देशस्थ ब्राह्मण होता. यानें 'करण कौस्तुभ नांवाचा ग्रंथ केला. याचें गोत्र कश्यप होतें. शके १५७५ (इ. स. १६५३) त ग्रंथ लिहिण्याच्या व वेधादिकांच्या तयारीस ग्रंथकार लागला होता. यावेळीं मराठी राज्यस्थापक शिवाजी २६ वर्षांचा होता. व त्याची राज्य स्थापण्याची भानगड सुरू होती. यानें दृक्प्रत्ययास येणारा ग्रंथ करण्याविषयीं ग्रंथकारास सांगितलें ही गोष्ट महत्वाची आहे. कृष्णाचा दुसरा ग्रंथ तंत्ररत्न नांवाचा आहे. [दीक्षित-भा. ज्योतिषशास्त्र]

कृष्णकवि—नृसिंहाचा मुलगा; मुरारिविजय नाटकाचा कर्ता. यास कृष्णपंडित अथवा शेषकृष्ण अशीं भिन्न नावें आहेत तीं चुकीचीं आहेत. १६ व्या शतकाच्या शेवटीं कृष्णकवीनें मुक्ताचरित नाटक रचलें तें अल्वार ग्रंथसंग्रहात (नंबर १०१७) आहे. [पीटर्सनचा रिपोर्ट ४. (बॉ. ब्रँ. रा. ए. सो. १८९४]. उषापरिणयचंपु, कंसवध नाटक, क्रियागोपनकाव्य, पारिजातहरणचंपु, सत्यभामापरिणय नाटक, सत्यभामाविलास नाटक, असे आणखी कांहीं ग्रंथ आफ्रेक्टने कृष्णकवीचे म्हणून दिले आहेत. प्राकृत चंद्रिकेचा कर्ता जो शेषकृष्ण किंवा कृष्णपंडित तो हा नव्हे असे पीटर्सनचें म्हणणें आहे. कृष्णपंडित १२ व्या शतकांत होऊन गेला.

कृष्णगर, पो ट वि भा ग.—बंगालप्रातात नडिया जिल्ह्याचा पोटविभाग. क्षेत्रफळ ७०१ चौ. मै. यांत कृष्णगर (जिल्ह्याचें व पोटविभागाचें मुख्य ठिकाण) व नवद्वीप अशीं दोन मोठीं गावें व ७४० खेडीं आहेत. याच्या पश्चिमेस भागीरथी नदी आहे. जलंगीनदी या पोटविभागांतून जाते. इतिहासप्रसिद्ध प्लासीची रणभूमी या पोटविभागाच्या अगदीं उत्तरेस आहे.

श ह र.—बंगालप्रांतांत नडिया जिल्ह्याचें मुख्य ठिकाण व नडियाच्या राजाचें राहण्याचें ठिकाण. हें ईस्टर्न बंगाल रेल्वेचें एक स्टेशन असून जलंगी नदीच्या डाव्या तीराला आहे. याची लोकसंख्या (१९११) २३४७५. येथें नडियाचे राजे रहातात. कृष्णगर हें व्यापाराचें महत्वाचें ठिकाण असून मातीच्या रंगित चित्रांकरितां प्रसिद्ध आहे. येथील म्युनिसिपालिटीनें अंजोना नदीचा जुना पाट खोदून पाणी वाहून जाण्याच्या मार्गाची (ड्रेनेजची सुधारणा केली आहे.

येथें कलकत्ता युनिव्हर्सिटीस जोडलेलें एक कॉलेज व त्यास जोडलेलें हायस्कूल आहे. इतर दोन तीन मध्यम व उच्च इंग्रजी शिक्षणाच्या शाळा आहेत. हें चर्च मिशनरी सोसायटीचें मध्यबंगालच्या रोमनकॅथोलिक विभागाचें हें मुख्य ठिकाण असून येथें दोन्ही संस्थेच्या शाळा व प्रार्थनामंदिरें आहेत. तसेंच झनाना मिशननें चालविलेले दोन दवाखाने आहे. व एक इस्पितळ आहे.

कृष्णदत्त—सदाराम व आनंददेवीचा मुलगा. 'सांद्र कुतूहलप्रहसन' ग्रंथाचा (काल संवत् १८०९) हा कर्ता असून राधारहस्यकाव्य यानें रचलेलें आहे. वाज्जड जिल्ह्यांत भामतीय गावांत हा रहात असे. धर्मवर्मन् राजाचा तो समकालीन होता. [आफ्रेक्टः पीटर्सनचा रिपोर्ट ४.]

कृष्णदयार्णव—हा संतकवि सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड जवळील कोपरडें येथील रहाणारा माध्यंदिनशाखी देशस्थ ब्राह्मण होय. याचें खरें नाव नरहरि असून बापाचें नांव नारायण व आईचें बहिणा होतें. याचा जन्म शके १५९६ च्या अक्षय्य तृतीयेस झाला. याचें लग्न झालें होतें. या वेळीं महाराष्ट्रांत औरंगझेबाच्या स्वारीमुळें सर्वत्र धुमाकूळ माजला होता. त्यामुळें नरहरीला गांव सोडावा लागला. तो जोगाईच्या आंब्यास राहिला असता तेथें आनंदसंप्रदायी गोविंदानें त्याला शके १६१८ गोकुळ अष्टमीस उपदेश दिला. मधुकरी मागत असता "कृष्णदयार्णव" असें नरहरि सतत म्हणे. त्यावरून तेंच त्याचें टोपण नाव रूढ झालें. तीर्थयात्रा करून आल्यावर व प्रथम कुटुंब वारल्यावर अग्निहोत्र घेतल्यामुळें यानीं द्वितीय संबंध केला. परंतु तिनक्यांत त्याना महारोग झाला. त्यावर उपाय म्हणून भागवताच्या दशमस्कंधावर त्यांनीं प्राकृत टीका लिहिली. यावेळीं याचें वय ५४ होतें. या ग्रंथास आधार श्रीधरी टीकेचा आहे. पूर्वार्धाचे ४९ अध्याय संपले व रोग नाहींसा झाला. उत्तरार्धाचे ३७ अध्याय संपविले व ३८ व्या अध्यायाचे २३ श्लोक झाले आणि स्वामी पैठण येथें समाधिस्त झाले (शके १६६२ मार्गशीर्ष). पुढील साडेतीन अध्याय यांचा शिष्य उत्तमश्लोक यानें लिहिले आहेत. एकंदर ग्रंथास १६ वर्षे लागलीं. हा ग्रंथ चांगला आहे. ओवी एकनाथाप्रमाणें आहे. ज्ञानेश्वरीचीहि छाया ग्रंथावर पडलेली आहे. विद्वान लोक या "हरिवरदा" ग्रंथास फार मान देतात. यावरून कर्त्याची विद्वत्ता व बहुश्रुतपणा दिसून येतो. काव्याच्या दृष्टीनेंहि ग्रंथ चांगला वठला आहे. विस्ताराच्या मानानें हा ग्रंथ प्रचंड आहे. याची एकंदर ओवीसंख्या ४२ हजार आहे. स्वामींचा "तन्मयानंद" नांवाचा आणखी एक ग्रंथ व बरेचसे अभंग आणि पदें इतकी कृति सध्यां उपलब्ध आहे [महाराष्ट्र सा.].

कृष्णदास—विहारिकृष्णदास असेंहि कोणी यास म्हणतात. अकबर बादशहाच्या विनंतीवरून त्यानें पारसीकोश किंवा पारसीप्रकाश नांवाचा ग्रंथ लिहिला. [पीटर्सन]

कृष्णदासमुद्गल—हा कवि पैठणचा रहिवासी असून याच्या बापाचें नांव नरसिंह व याचें नांव मुद्गल होतें; याच्या गुरूचें नांव कृष्ण होतें. यानें वाल्मिकी रामायणांतील फक्त

युद्धकांडावर टीका केली आहे. त्याचे ७८ अध्याय असून तें त्यावेळीं मराठी भाषेंत फार मान पावलें होते. ' माझी देशभाषा मराठी आहे ' असें मोठ्या अभिमानानें सांगून यानें मराठी भाषेची प्रौढि गायिली आहे. मराठी साम्राज्यात या रामायणाचें पारायण तत्कालीन शूर व मुत्सद्दी करीत असत [संतकविकाव्यसूची.].

कृष्णदेवराय—हा विजयानगरचा राजा. याची कारकीर्द इ. स. १५०९–१५३० पर्यंत होती. याच्या विशेष माहितीबद्दल " विजयानगर " पहा.

कृष्णदेव होयसळ—हा (इसवी सन १२४७–१२६०) द्वारसमुद्राच्या होयसळ बल्लाळाच्या वंशांतील सुप्रसिद्ध सिंघणाचा नातू होय. त्याच्या बापाचें नाव जैत्रपाळ. तो आपल्या बापाच्या हयातींतच मरण पावल्यामुळें, सिंघणानंतर कृष्णदेव यास गादी मिळाली. कित्येक कोंकणस्थ व देशस्थ ब्राह्मणांस ह्याच्या वेळेस गावें इनाम मिळालीं. त्यात पटवर्धन, घैसास, पाठक इत्यादि नावें आढळतात. जल्हण म्हणून (लक्ष्मीदेवाच्या पश्चात्) कृष्णदेवाचा मुख्य मंत्री होता. तोहि विद्वान व हुषार असून ' सूक्तिमुक्तावली ' नामक त्यानें लिहिलेला सुभाषित ग्रंथ उपलब्ध आहे. वेदांतसूत्रावरचा टीकाकार अमलानंद हा कृष्णदेवाच्या दरबारीं होता. एकंदरींत त्या वेळेस संकृत विद्येची भरभराट होती. [हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास भा. दुसरा; मराठी रियासत प्रकरण १ लें].

कृष्णद्वैपायन—मैत्रावरुणी जो वसिष्ठऋषि त्याच्या शक्ति नावाच्या पुत्राचा पौत्र व पराशर ऋषीचा पुत्र. हा उपरिचर नामांतरानें प्रसिद्ध जो वसु राजा, त्याच्या वासवी नावाच्या धीवरानें पालन केलेल्या कन्येच्या ठायीं, तिच्या कौमारदशेंत पराशर ऋषीपासून झाला होता; आणि त्याच कारणामुळें त्यास पाराशर्य असें म्हटलेलें आहे. यास दुसरें द्वैपायन असेंहि नाव आढळतें. त्याचें कारण यमुनानदी कृष्णवर्ण असून तिच्या ठायीं असणाऱ्या द्वीपांत याचा जन्म झाला होता. म्हणून यास द्वैपायन अथवा कृष्ण द्वैपायन असें म्हटलेलें आहे. तसेंच बदरीवनांत तप केल्यामुळें बादरायण असेंहि यास म्हणत असत. यालाच वेदव्यास म्हणतात. यानें पुराणें व महाभारत नांवाचा इतिहास रचला. [व्यास पहा].

यास वेदपरंपरा चालविणारे पैलादिक चार शिष्य असून, पुराणपरंपरा चालविणारा रोमहर्ष नांवाचा एक शिष्य होता. यांशिवाय असित आणि देवल असेहि याचे दोन शिष्य होते. यानें छिन्न झालेला शंतनूचा वंश वृद्धिंगत केला. हा कल्पपर्यंत चिरंजीव असून पुढें सावर्णीच्या मन्वंतरात बादरायण नांवानें सप्तर्षींतील एक ऋषि (सावर्णिवंश पहा) होणार आहे. यास शुक म्हणून उत्तम ब्रह्मतत्त्वसंपन्न असा एक पुत्र होता. [देवी भागवत]

कृष्णनाईक वरंगळकर—महंमद तघलक यानें दक्षिण जिंकली तेव्हां वरंगळ प्रांत त्याच्या आधिराज्याखालीं गेला. पुढें महंमदानें प्रजेचा अतिशय छळ केल्यामुळें राज्यांत सर्वत्र बंडें उठलीं. त्यावेळीं दक्षिणेंत हिंदु राजांचा जो एक मोठा संघ स्थापला गेला, त्यांत होयसळ बल्लाळ राजा, अनागोंदीचा बुक्कराय व वरंगळच्या (तैलंगण) रुद्रदेवाचा पराक्रमी पुत्र कृष्णनायक हे प्रमुख होते. यांनीं एकदम उठाव करून मुसुलमानाला जो तडाखा दिला त्यामुळें साऱ्या दख्खनमधून मुसुलमान नाहींसा झाला. फक्त दौलताबाद मात्र त्यांच्याकडे राहिली (सन १३५१) [मु. रि.]

कृष्णमूत्र ज्वर—हा हिंवतापाशीं बरेंच साम्य असणाऱ्या उष्ण कटिबंधांतील प्रदेशांत आढळून येणारा ज्वर आहे. याचीं मुख्य लक्षणेंः—ताप अंगांत वरचेवर भरतो पण केव्हां भरेल याचा नियम नसतो. थंडी फार वाजून ताप येतो व ओकून ओकून रोगी घाबरा होतो. वरचेवर पित्तमय वांति होते. लघवी अतिशय लाल काळसर अशा रंगाची असते. व बहुधा कावीळहि होते. हा ताप खालील देशांत विशेष पहाण्यांत येतोः— (१)आशिया व आफ्रिका या खंडांतील उष्ण कटिबंधाच्या टापूंत असणारे देश. (२) वेस्ट इंडीज बेटें. (३) अमेरिकेंतील दक्षिण संयुक्त संस्थानें. (४) यूरोप खंडांत ग्रीस, सार्डिनिआ व सिसिली हे देश. परंतु जेथें हिंवतापाचें बिन्हाड असतें अशा ठिकाणीं हाहि ताप पण असावयाचाच अशी स्थिति नसते. रोग्याच्या रक्तांमध्यें क्वचित्कालीं हिंवतापाचे कीटक सांपडतात खरे. कांहीं विद्वानाच्या मतें (यांमध्यें कॉक हे जंतुशास्त्रज्ञ हेहि आहेत.) हा रोग हिंवतापामध्यें कोयनेलचा अतिशय व मोठया प्रमाणांत उपयोग केला असतां होतो. परंतु याच्या उलट मत दुसऱ्या अनेक विद्वानांचें आहे. ही उपपत्ति जर खरी असती तर जेथें जेथें हिंवताप फारच उसळलेले असतात, त्या प्रांतांत या रोगाचें अस्तित्व स्पष्टपणें नजरेस आलें पाहिजे होतें. किंवा जे डॉक्टर आपल्या हिंवतापाच्या रोग्यास कोयनेल जास्त प्रमाणांत देतात त्यांच्या नजरेस कोयनेलपासून होणारा हा रोग वरचेवर आढळून यावयास पाहिजे होता. पण तशी स्थिति फारशी नाहीं. या तापाचें पीतज्वर या तापाशींहि बरेंच सादृश्य आहे. पण पीतज्वरांत वांती हटकून काळ्या रंगाची होते. तशी या ज्वरांत होत नाहीं. व या ज्वरांत काळ्या लालसर रंगाची जशी लघवी होते तशी पीतज्वरांत होत नाहीं. या विशिष्ट प्रकारच्या लघवीवरून या तापास हल्लीं त्याचें रूढ असलेलें नांव पडलें आहे. अगदीं अलीकडील शोधावरून असें सिद्ध झालें आहे कीं, या तापाचा संबंध हिंवतापाशीं व कोयनेलच्या अतिसेवनाशीं खरोखरच असावा. गुरांमध्यें लाल काळसर लघवी होणारा असा ए रोग असून त्या लाल लघवींत विशिष्ट कीटक

मांपडतात त्या जातीचाच हा ताप असावा अशी कल्पना होती. पण ती आतां त्याज्य ठरली आहे.

उ प चा र.—यांत पूर्ण विश्रांति व उत्तम शुश्रूषा ह्यांची आवश्यकता फार असते. रोग्यास लघवी गढूळ न होईल व मूत्रपिंड कार्यक्षम होतील अशीं औषधें व विशेषतः पुष्कळ स्वच्छ पाणी द्यावें. शिराच्या मार्गे शरीरांत अमृतजल टोंचून घातल्यानें रक्त विलयन होऊन कार्यसिद्धि होते. कोयनेल दिल्यानें लघवीची लाली अधिक होते व रोग्यास अस्वाथ्य वाटतें म्हणून तें देऊं नये. पण रक्तांत कीटक (हिंवाचे) स्पष्ट असतील तर थोडया प्रमाणांत कोयनेल द्यावें अथवा तें स्नायूंत खोल टोंचून घालावें.

कृष्ण याज्ञवल्की—हा एक महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कवि होय. यानें कथाकल्पतरु नांवाचा एक मोठा थोरला पौराणिक ग्रंथ रचिला आहे. याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. काहींच्या मतें पूर्वार्ध फक्त यानें लिहिला. या पूर्वार्धांत सात स्तबक आहेत. पैकीं एकटया सातव्या स्तबकाचीच ग्रंथसंख्या २९४६ आहे. यावरून सर्व ग्रंथाच्या प्रचंडपणाची कल्पना येईल. याचा काळ शके १५००च्या सुमाराचा होता. हा कौंडिण्य गोत्री असून याच्या आईबापाचीं नांवें कमळा व अंबाजी होत. याच्या गुरूचें नांव अनंत असून कवीनें सदर ग्रंथ नाशिक येथें लिहिला. ग्रंथात अनेक पौराणिक कथा असून, त्यात व प्रचलित कथांत बराच फरक आढळतो. कथाशिवाय, भूगोल, खगोल, चारी वर्ण, सर्व जातींची उत्पत्ति वगैरे इतर विषयहि यांत आहेत. भाषा सरळ व साधी आहे. याचे मराठी भाषांतर ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळीनें प्रसिद्ध केलें आहे. [म. क. च.; संतकवि सू.]

कृष्णराजपेठ,(ता लु का)—म्हैसूर संस्थानात म्हैसूर जिल्ह्याच्या उत्तरेकडील तालुका. क्षे. फ. ४२५ चौरस मैल. यात किकेर व कृष्णराजपेठ हीं गांवें व ३७३ खेडीं आहेत.

कावेरीस मिळणारी हेमावती नदी या तालुक्याची दक्षिण मर्यादा असून तिच्यापासून पांच पाट काढले आहेत व पुष्कळशी मोठीं तळीं केलीं आहेत.

येथील जमीन सखल भागांत सुपीक, तांबडी आणि उंचवटयाच्या प्रदेशांत काळसर, रेताड व नापीक आहे. हींत हलका तांदूळ पिकतो. नारळीचीं व सुपारीचीं झाडें व केळीचे बगीचे वगैरेपासून पुष्कळ उत्पन्न होत असून या तालुक्यांत उंसाची लागवड योग्य प्रमाणांत करतात. सिंधुघांट येथें रेशमी कापड तयार करितात.

कृष्णराव खटावकर—हे खटावचे रहाणारे असून मराठी साम्राज्यांत धुमाकूळ घालणारे म्हणून प्रख्यात होते. यांचे पूर्वज निजामशाहींत बाराहळ्ळी येथें रहात असत. तेथील पाटिलकी त्यांची होती. वडिलांचें नांव मंबाजी. त्यांनां दोन मुलें झालीं. राघो व कृष्ण. हे धार्मिक असल्यानें व्यंकोबाचे गिरीवर त्यांनीं अनुष्ठान केलें. हे माध्वमतानुयायी देशस्थ होते. दिल्लीकर मोंगलानें कृष्ण यास खटावची ठाणेदारी दिली. परंतु त्यांचा वंश परत बाराहळ्ळी येथें गेला. राघोपंत खटावास राहिले. त्यांचा पुत्र भगवंत व त्यांचा प्रसिद्ध कृष्णराव. हे फार शूर होते. यांनीं खटाव येथील कोटांतलि मशीद पाडली व दत्ताचें मंदिर बांधलें. या मंदिरात त्यांची पुस्तकशाळा होती. ते विद्वान् होते. त्यांनीं १२ लेखक (नवीन ग्रंथ उतरून घेण्यासाठीं) पदरीं बाळगले होते. ते स्वतः न्याय व व्याकरण यांत पारंगत होते. यांचें कुलदैवत खंडोबा. त्यांनीं जेजूरीचें देऊळ बांधिलें. हल्लींचें खंडोबाचें जें मुख्य देऊळ ते याच्या हातचें असून भोंवतालचा प्राकार होळकर वगैरेंनीं बांधलेला आहे. चंपाषष्ठीच्या दिवशीं पहिला नैवेद्य यांच्याकडील असतो. शाहु महाराज दक्षिणेंत उतरले व साताऱ्यास येऊन गादीवर बसले त्यावेळीं कृष्णराव हे ताराबाईच्या बाजूस होते. त्यांनीं नांवाला मोंगलांच्या तर्फेचें निमित्त करून सर्व माणदेश हाताखालीं घातला (१७०८). संभाजी महाराजाच्या वधानंतर हे मोंगलास मिळाले होते व त्याच्या आश्रयानें मराठी साम्राज्यांत लुटालूट करीत असत. मोंगलानें यांना राजा हा किताब दिला होता. यांनीं मोंगलाचें अनुकरण गोपाच्या चालीपर्यंत केलें होतें. शेजारच्या वुध व मलवडीच्या घाटग्याचें काहीं देशमुखी उत्पन्न यांनीं दाबलें. मोंगलानें खटाव परगणा याना जहागीर दिला. स्वराज्याविरुद्ध यांनीं मोंगलास पुष्कळ वर्षे मदत केली. मुळापासून हे बंडखोरच. पुढें शाहू महाराजांनीं बाळाजी विश्वनाथ व श्रीपतराव प्रतिनिधी यांस त्यांच्यावर पाठविलें. कृष्णराव शौर्यानें लढले. परंतु अखेरीस ते व त्याचा वडील पुत्र हे दोघे लढाईंत पडले. दुसरे दोन पुत्र महाराजास शरण आले. तेव्हां त्यांनीं क्षमा करून त्यांचें वतन पुढें चालविलें. कृष्णरावांनीं संस्कृतांत लिहिलेली विष्णुसहस्रनामावली वरील द्वैतमती टीका उपलब्ध आहे. [भा. व; डफ; म. रि; भा. इ. मं. अ.].

कृष्णराव बल्लाळ काळे—हे नाना फडणीस यांचे विश्वासू असून निजामकडे पेशवे यांच्यातर्फे वकील होते. हे मूळचे काशीचे. त्यांनीं दक्षिणेंत येऊन बाबूजी नाईक बारामतीकर याच्या वशिल्यानें नानासाहेब पेशवे याच्या वेळीं दरबारांत नौकरी धरिली. दादासाहेब हे उत्तर हिंदुस्थानात स्वारीस गेले असता कृष्णराव हा त्यांच्या बरोबर होता व त्यानें त्या सुमारास कांहीं राजकारण केल्यामुळें त्याला कांहीं इनाम पेशव्यानीं दिलें. पुढें निजामाकडे वकील असता, यास पंधरा हजारांचा सरंजाम व पंधरा हजाराची जहागीर मिळून तीस हजाराची नेमणूक होती; निजामाकडूनहि दहा पंधरा हजारांची यांस जहागीर मिळाली. स. १७६४ त हैदरावरील मोहिमेंत हे होते. त्याचे चिरंजीव गोविंदराव, याना एकंदर ८५ हजाराची नेमणूक होती. पुढें पेशव्यानीं जातइनाम व सरंजाम (फौज) इनाम मिळून सव्वा लाखांची नेमणूक केली. टिपूविरुद्ध कारस्थानांत गोविंदरावांचा बराच हात

होता. इंग्रजानें त्याबद्दल त्यांनां २ तोफा बक्षीस दिल्या होत्या. खर्ड्याच्या प्रसंगांत मध्यस्थीस हेच होते. पुढें रावबाजींनीं गोविंदरावाचा कांहीं सरंजाम जप्त केला. परंतु गोविंदराव स्वामिनिष्ठ होते. बापू गोखले पडेपर्यंत ते इंग्रजांशीं लढत होते [वाड. कै. या.; ऐ. ले. सं.]

कृष्णाकुमारी.—ही मेवाडच्या भीमसिंह राण्याची मुलगी. ही अत्यंत सुंदर होती. हिच्याबद्दल त्यावेळीं साऱ्या रजपुतांत भांडणें लागलीं होती तिच्यासाठीं जयपूरकर जगसिंग व मारवाडचा मानसिंग यांच्यात चुरस लागली. शिंद्यानें मानसिंगाचा पक्ष घेतला. आठ हजार सैन्यानिशीं शिंद्यानें येऊन राजधानीजवळ मुक्काम केला तेव्हां राण्यानें जयपूरकराशीं ठरलेला वाङ्निश्चय मोडला. तेव्हां जयपूरकरानें स्वारीची तयारी केली; इकडे मानसिंगानेंहि तयारी केली.परंतु मारवाडांत त्याच वेळीं गादीच्या वारसाबद्दल तंटे उपस्थित झाले (स. १८१६) त्यामुळें राजपुतान्यात अधिकच गोंधळ माजला. यावेळीं कृष्णेचें वय १६ वर्षांचें होतें. तिची आई अनहिलवाडच्या चावडा वंशातील होती. कृष्णा अप्रतिम सुंदर असल्यानें तिला " राजस्थानचें फूल " म्हणत. होळकरानेंहि या भानगडींत भाग घेतला होता. त्यानें अमीरखान पठाणास उदेपुरीं पाठविलें. अमीरचा त्यावेळीं दरारा फार होता. त्यानें भीमसिंहास सांगितलें कीं कृष्णेला एक तर मानसिंगाला द्या नाहींतर तिला ठार मारा. भीमसिंह दुर्बळ होता. नाइलाजानें कृष्णेला मारण्याचें त्यानें ठरविलें. पुरुषांपैकीं हें काम करण्यास कोणींहि तयार होईना. दौलतसिंगानें (राण्याचा नातेवाईक) तर स्पष्ट नकार दिला. तेव्हा कृष्णेचा बंधु (?) जवानदास यास हें काम सांगितलें. तो खंजीर घेऊन कृष्णेपर्यंत पोहोचला; परंतु तिचें अप्रतिम रूप पाहून त्याच्या हातातील खंजीर गळून खालीं पडला.कृष्णेच्या आईनें तें पाहून शोकानें सारें अंतःपुर गजबजून सोडलें. परंतु अमीर यास दया आली नाहीं. कृष्णेचें मरण टळलें नाहीं. त्यानें उपाय बदलला. तिची आत्या चांदबाई हिनें विषाचे पेले तयार केले व ती ते स्वतः घेऊन कृष्णेकडे गेली व तिला बापाची आज्ञा कळविली. आपल्यासाठीं आपल्या बापाला व साऱ्या राज्याला त्रास होत आहे असें पाहून ती शूर मुलगी मरण्यास सिद्ध झाली. तिनें पेला हातात घेऊन देवीची प्रार्थना केली व बापाला सुखी ठेवण्याबद्दल विनंति केली व नमस्कार करून पेला तोंडास लाविला. तें पाहून तिच्या आईनें भीमसिंहास शाप दिला. तेव्हा कृष्णेनें डोळ्यांतून एक टिपूसहि न गाळता उलट शांतपणें आईची समजूत घातली. ती म्हणाली " आई या नश्वर देहासाठीं तूं इतकें कां दुःख करत्येस ? मी मृत्यूला भीत नाहीं. मी तुझी मुलगी आहेना ? जन्मापासूनच आम्हा रजपूत स्त्रियांच्या कपाळीं मृत्यु लिहिलेला असतो. इतके दिवस मी जगलें हा बाबांचा उपकारच आहे. " याप्रमाणे ती बोलत असता, तिला वांती होऊन पोटांतलें वीष बाहेर पडलें. तेव्हा राण्यानें दुसरा पेला पाठविला, तोहि तो प्याली; पण त्याचेंहि वीष वांती होऊन बाहेर पडलें. परंतु बाप हट्टास पेटला.त्यानें तिसरा पेला तयार केला.याचा मात्र उपयोग झाला. साध्या विषाचा उपयोग होत नाहींसें पाहून त्या (अमीर व अजितसिंह) राक्षसांनीं अत्यंत जलाल असा कुसुंब्याचा पेला (अफूचा अर्क) भरला व कृष्णेच्या हातीं दिला. त्याच्याकडे पाहून ती हसली व "यानें तरी काम होवो" असें म्हणून तो घेतला असें 'कृष्णाकुमारी' काव्यकर्ते म्हणतात. त्या पेल्यामुळें ती जी निजली ती कायमचीच.पुन्हां कांहीं ती उठली नाहीं. तिच्या पश्चात् थोड्याच दिवसांत अन्नत्याग केल्यानें व शोकानें तिची आई मेली. अमीरखानासमुद्धां कृष्णा मेल्याचें ऐकून थोडा वेळ वाईट वाटलें व त्यानें अजितची निर्भत्सना केली. भीमसिंहानें अजित यास तुझा निर्वंश होईल असा शाप दिला (अमीरखान पहा). याच भीमसिंहानें इंग्रजास मेवाडांत घेतलें (१८१७). जणूंकाय कृष्णाकुमारीच्या रूपानें मेवाडची स्वातंत्र्यश्रीच मेवाडातून नाहींशी झाली [टॉड; मालकम; डफ].

कृष्णागिरी तालुका.—मद्रास इलाख्यात सालेम जिल्ह्याचा तालुका. कर्नाटकचें सपाट मैदान व म्हैसूरचें पठार याच्या मधलि प्रदेशात हा तालुका असून याच्या सभोंवार डोंगरमाथ्यावर पूर्वकालीन किल्ले आहेत. याचें क्षेत्रफळ ६५९ चौ. मै. व लोकसंख्या (१९११) १,६७,३०२ आहे यात कृष्णागिरी हें मोठें गांव व दुसरीं ५०७ खेडीं आहेत.

गांव.—मद्रास इलाख्यांत सालेम जिल्ह्यातील कृष्णागिरी तालुक्याचें मुख्य ठिकाण. या गावापासून तिरुपतूरला २४ मैलांची सडक व मद्रास रेल्वेचा फाटा गेलेला आहे. या गावचें कृष्णागिरी, जुनें शहर व दौलताबाद उपनगर असे विभाग आहेत. दौलताबाद विभाग अलीकडे वसलेला असून तेथें सरकारी कचेऱ्या आहेत.

जवळच असलेल्या ८०० फूट उंचीच्या एका तुटलेल्या कड्यावरील डोंगरी किल्ल्याच्या माऱ्यांत हें गाव वसलें असल्यामुळें नुसत्या हल्ल्यानें कधींच काबीज केलें गेलें नाहीं. व म्हैसूर युद्धांत इंग्रजास हें गांव काबीज करण्यास दोन वेळ वेढा द्यावा लागला. जवळपासच्या प्रदेशांत उत्कृष्ट द्राक्षें होतात.

कृष्णा जिल्हा—हा जिल्हा मद्रास इलाख्याच्या ईशान्य भागात आहे. याचें क्षेत्रफळ ५९०७ चौरस मैल आहे. याच्या पूर्वेस बंगालचा उपसागर असून पश्चिमेस निजामचें राज्य व करनूल जिल्हा; दक्षिणेस नेलोर व उत्तरेस गोदावरी जिल्हा आहे. कृष्णा नदी प्रथम जिल्ह्याच्या पश्चिम भागाच्या सरहद्दीवरून वहात जाऊन नंतरें वायव्य भागातून थेट आग्नेय भागाकडे जाते. या कृष्णा नदीवरून या जिल्ह्याला कृष्णा जिल्हा हें नाव पडलें आहे. या जिल्ह्याच्या अगदीं पश्चिमेकडील भागातील मुलुख डोंगराळ आहे. उत्तरेकडील व मध्यभागांतील मुलूख सपाट असून कापसाच्या

लागवडीला योग्य आहे. पूर्वेकडील भाग हा अगदीं सपाट असून या ठिकाणीं भाताचीं शेतंच्या शेतें पसरलीं आहेत. या भागांत फार सुपीक जमीन आहे.

भू स्त र.—या जिल्ह्याच्या पूर्व भागातील मध्यकटिबंधांत पूर्व घांटाच्या पायथ्याशीं जंबूर दगडाची समृद्धि आहे. तसेंच या ठिकाणीं अभ्रक, स्फटिक, हरायित, ग्रानाइट इत्यादि दगडांचेहि थर आहेत. या मध्य कटिबंधाच्या वायव्येस जो सपाट प्रदेश आहे, त्या ठिकाणीं स्लेटासारखे दगड, खडूचे दगड व स्फटिकाचे दगड सापडतात. या कटिबंधाच्या आग्नेयीस, वाळूचे दगड, स्लेटीचे दगड, व कुरुंदाचे दगड आढळून येतात.

व न स्प ती व प्रा णी.—कारोमाडल किनाऱ्यावर ज्या वनस्पती सर्वसाधारण आढळून येतात त्याच या ठिकाणीं आढळून येतात. हा जिल्हा जरी सुपीक असला तरी या जिल्ह्यात वृक्ष व लताचा जवळ जवळ अभावच आहे. काजूचीं झाडे मात्र मधून मधून दृष्टीस पडतात. हिंस्र पशु देखील या जिल्ह्यात विशेष आढळून येत नाहींत. चित्ते, अस्वलें हे कधीं कधीं डोंगरामध्यें आढळतात. रानडुकरें येथें बरींच आहेत. पक्षी मात्र निरनिराळ्या प्रकारचे आढळून येतात. जलचर पक्षी येथें पुष्कळ आहेत.माशांचीहि येथें विपुलता आहे.

ह वा मा न व प र्ज न्य.—जिल्ह्याचें हवामान जरी उष्ण असलें तरी निरोगी आहे. मच्छलीपट्टणची हवा समशीतोष्ण आहे. पर्जन्याचें सरासरी प्रमाण ३३ इंच आहे. पण सर्व भागात हें प्रमाण सारखेंच असते असे मात्र नाहीं. मच्छलीपट्टण, तेनाली, बापताला इत्यादि ठिकाणीं पाऊस पुष्कळ पडतो, इतर ठिकाणीं कमी पडतो.

इ ति हा स.—या जिल्ह्यावर अगदीं प्रथम आंध्राचें राज्य होतें. हे आंध्र लोक बौद्धधर्मीय होते. अमरावती येथें या लोकांनीं बांधलेला एक स्तूप असून शिवाय त्यावेळचीं शिशाचीं नाणींहि या ठिकाणीं मधून मधून उपलब्ध होतात. त्यानंतर ७ व्या शतकाच्या सुमारास चालुक्याचा अंमल या प्रांतावर सुरू झाला. याच्या अमदानींत खडकामध्ये खोदलेल्या मूर्ती व खडकात बांधलेलें एक देवालय आहे. ९ व्या शतकाच्या अखेरीस याच्या सत्तेचें उच्चाटण होऊन या प्रांतावर चोलांचें वर्चस्व सुरू झालें. चोलांनीं आपली सत्ता शतक दोन शतकें गाजविल्यानंतर, वरंगळचें गणपति घराणें या प्रांतावर राज्य करूं लागलें. याच्या अमदानींतच मार्को पोलो हा या प्रांतात आला होता. पुढें या जिल्ह्याचा उत्तरभाग ओरिसाच्या राजांनीं जिंकून घेतला व दक्षिण भागावर रेड्डी घराण्याच्या राजांनीं आपला अंमल बसविला. या राजांनीं पुष्कळ ठिकाणीं किल्ले बांधले. त्यापैकीं कोंडविडु, वेल्लमकोंड व कोंडपल्ली या ठिकाणीं अद्यापि काळाच्या भक्ष्यस्थानातून अर्धे मुर्धे वाचलेले किल्ले पहाण्याला मिळतात. इ. स. १५१५ मध्यें विजयानगरच्या कृष्णदेव राजानें ओरिसाच्या राजांच्या ताब्यांत असलेला या प्रांताचा मुलूख जिंकून घेतला. पुढें विजयानगरचें साम्राज्य नष्ट झाल्यावर गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीचें वर्चस्व या प्रांतावर सुरू झालें व शेवटीं कुतुबशाहीचा शेवट झाल्यानंतर औरंगझेबाच्या मोंगल साम्राज्याच्या छत्राखालीं हा प्रांत आला. १७५२ मध्यें दक्षिणच्या सुभेदारानें (निजाम) उत्तरसरकारच्या ताब्यातील मुलूख फ्रेंचाना दिला व नंतर फ्रेंचाकडून हा प्रांत इंग्लिशाच्या ताब्यात आला.

या जिल्ह्यात प्राचीन अवशेष जे सापडले आहेत ते पुढील प्रमाणें:—

मूळ रहिवाशाच्या गुहा:—या गुहा पलनद तालुक्यांत करमपुदिपासून थोड्या मैलावर गुत्तिकोंडा व सनगल येथें आहेत. यापैकीं गुत्तिकोंडा येथील गुहा गावापासून दोन मैलावर असून तीमध्यें एक २८ हात रुंदीचें टाकें आहे. याच्या पलीकडे खडकामध्यें कठड्यासारखी वाट कोरलेली आढळते व येथून काशी व रामेश्वराकडे वाटा जातात अशी दंतकथा आहे. येनडी व येरकल लोकाचे पूर्वज या गुहामध्ये रहात असावे. यामध्यें काहीं साधु रहात होते असेंहि सांगतात. हे बौद्ध भिक्षु असावे. या गुहेचा मुचकुंद व कालयवन याच्या दंतकथेशीं संबंध जोडतात. सनगल्लु येथील गुहेमध्ये विहिरीप्रमाणें खोल वाटेंतून जावें लागतें. पलनदमध्यें आणखीहि गुहा आहेत.त्या पाहण्यास कृष्णेतून होडींत बसून जावें लागते. गंटूर तालुक्यांत मंगलगिरी व उन्दवल्ली येथें अशाच नैसर्गिक गुहा असून त्या दोहींना जोडणारी एक चोरवाट भुयारातून गेली आहे असे सांगतात; हीं भुयारें ते दृष्टीस पडतात.

शक किंवा तुराणी याच्या पूर्वी होऊन गेलेल्या तक्षक अथवा दस्यु लोकांनीं कोरलेले नाग वगैरे:—हे अतिशय जुने असून पुष्कळ देवळातून झाडासभोंवतीं दिसून येतात. यावरून पूर्वी झाड व नाग याची पूजा करीत होते असें सिद्ध होते. या नागाचें शिल्पकाम फारच ओबडधोबड व जुने दिसते. नागाच्या आकृती निरनिराळ्या व विचित्र आढळून येतात. या प्रदेशातील शिल्पकलेचें हें सर्वांत जुनें स्मारक दिसतें.

शक कालातील शिल्पावशेष:—पलनद वगैरे आसपासच्या तालुक्यामधून वीरकल, चबुत्रे व शिलावर्तुलें इत्यादि स्मारकें आढळतात. निलगिरी पर्वत व कोइंबतुर जिल्ह्यामधील वरवंड्याप्रमाणेंच यापुडिच्या आसमंतात काहीं वरवंड्या आढळतात. प्रत्येक वरवंडीखालीं एक चौकोनी तळघर असून त्यावर एक सपाट पाथर ठेवलेली आढळते. तळघरात काहीं भांडीं वगैरे ठेवलेलीं आढळतात. हें तळघर जमीनींत असून फक्त वरचा पाथर तेवढा दृष्टीस पडतो. ही पाथर दूर करून नंतर ४॥ हात वाळू अथवा दगड खणून काढावे लागतात. नंतर तळघर जर मोठें असेल तर २।४ दालनें लागतात. व प्रत्येक

दफनामध्यें मनुष्यांचीं जळकीं हाडें, त्याशेजारीं भस्मपात्र व निरनिराळ्या आकाराचीं मृत्पात्रें ठेवलेलीं आढळतात. यांपैकीं कांहीं मडकीं फार प्राचीनकाळीं प्रचारांत असलेलीं, कांहीं लाल भाजलेलीं, कांहीं काळीं व कांहीं अर्धवट काळीं, कांहीं अर्धवट तांबडीं व कांहींवर हातांनीं जिल्हई केलेली अशीं आढळतात. एका गुहेमध्यें एक हस्तिदंती अथवा दुसऱ्या कसल्या तरी हाडाचें कंकण सांपडलें होतें. परंतु हत्यारें मात्र कोठें आढळलीं नाहींत. कोइंबतुर जिल्ह्यांतील थडग्यामध्यें लोखंडी हत्यारें आढळतात. हाडांच्या आकारावरून हीं प्रेतें हल्लीं रहाणाऱ्या लोकाच्याच पूर्वजांचीं असावीं असें वाटतें. परंतु येथील लोक सांगतात कीं पूर्वी येथें ठेंगू लोकाची एक जात रहात असून त्यांनीं एक अग्निप्रलय होणार असें भविष्य ऐकून दगडाचीं तळघरें करून आपणास पुरून घेतलें. परंतु अग्निप्रलयामध्यें ते सर्व जळून जाऊन तसेच पुरले गेले. कांहीं दिवसापूर्वी एकास तेथें एक काश्याचें चाक सापडलें होतें. हें बहुतेक बौद्ध अवशेष असावें. वरील थडगीं हें शक व तुराणी लोकांचें अवशेष असावे. यांचीं हीं प्रेतें प्रथम जाळून नंतर पुरलीं असावीं असें या अस्थींवरून दिसतें. याच्या नंतरच्या काळातील कोणत्याहि जातीमध्यें, निदान हिंदुस्थानातील या भागात तरी, प्रेतें जाळून नंतर पुरण्याची चाल नव्हती. कृष्णा नदीच्या काठीं अमरावतीच्या पश्चिमेस एका टेंकडीवर पुष्कळशीं शिलावर्तुळें आहेत.

त्याच्याच नैर्ऋत्येस ४।५मैलावर आणखी पुष्कळशीं शिलावर्तुळें आढळतात. या वर्तुळाचा व्यास २४ते ३२ फूट असून याच्या खालीं अस्थिपात्रें, दग्धअस्थी व इतर वस्तू आढळतात. त्यावरून हीं स्मशानें असावीं हें सिद्ध होतें. नंदिग्राम तालुक्यामध्यें कृष्णेच्या डाव्या तिरावर सर्व बाजूंना हीं थडगीं दिसतात.

बौद्ध अवशेषः— कृष्णा जिल्ह्यात बेझवाडा गावापासून २० मैलावर सत्तनपल्ले तालुक्यात कृष्णाकाठीं अमरावती येथें कांहीं संगमरवरी दगडाचीं शिल्पकामें आहेत. यांचा शोध प्रथम १७९७ मध्यें कॅ. मॅकेंझी यानें लावला. यापूर्वी चिंतपल्लीचा राजा वसरेड्डी यानें जवळचीं कांहीं टेंकाडें खोदलीं. त्यापैकीं एकात 'दीपावलि दिन्न' या नावाचा बौद्धाच्या वेळचा एक दीपस्तंभ सापडला. (या गावाच्या आसपासचीं मातीचा टेकाडें खणलीं असता बौद्धकालीन अवशेष अद्यापीहि सांपडतात). त्यात या राजास एक दगडांचा करंडा व त्यांत एक मोती, एक सुवर्णपत्र व दुसऱ्या कांहीं किरकोळ जिनसा सांपडल्या. तसेंच या स्तूपाभोंवतीं संगमरवरी दगडी कठडा होता. त्याचे भाग कांहीं लंडनच्या ब्रि. म्यूझियममध्यें व कांहीं मद्रास व कलकत्ता येथील अजबखान्यात ठेविले आहेत. या ठिकाणीं जे शिलालेख सापडतात त्याची भाषा व लिपी गुप्तांच्या वेळची आहे. कर्नल मॅकेंझी यास तेथें कांहीं रोमन व कांहीं बॅक्ट्रिअन कडफिसेस याच्या वेळचीं नाणीं सांपडलीं असून त्यावरून हें शहर ख्रिस्ती शकारंभाच्या वेळीं फार महत्वाचें होतें असें दिसतें. येथें सोन्याचीं, व शिशाचीहि नाणीं पुष्कळ सांपडतात. या जिल्ह्यांत यांशिवाय पुढील ठिकाणीं नाणीं सापडतात.

(१) नंजिविद जमीनदारीमध्यें कोकेवलजवळ साखिनल दिब्बे.

(२) त्याच जमीनदारींत मरिवाडाजवळ दलमर्ते शेतांतील टेंकडीमध्यें.

(३) नंदिग्राम तालुक्यात पनुगंचीप्रोल गावाजवळ पटि जमीनींत.

(४) पोंड्रक मिठाच्या भागात सवतपथ व लवलपल्ली येथील खारींत.

(५) गुलिवाडा येथें.

याप्रमाणें कृष्णा नदीच्या डाव्या तीरावर उंदवल्ली येथें कांहीं बौद्ध लेणीं आहेत. बेझवाडा येथील लेणीं खोदून केलेलीं आहेत. तेथील एका दगडी देवळात गणपतीची मूर्ति दिसते. त्यावरून यानंतर ब्राह्मणाचें वर्चस्व येथें स्थापित झालें असावें असें दिसतें. यानंतर कांहीं गुहा लागतात. पुढें एक मंडप आहे. याला लागून काहीं दालनें असून याच्यावर एक गुहा व टेंकडीच्या मध्यावर आणखी एक गुहा आहे. गावातील मल्लेश्वरस्वामीच्या मंदिरामध्यें व वाचनालयात कांहीं बौद्ध मूर्ती वगैरे आढळतात. गुडीवाडा येथें याप्रमाणेंच एक भव्य मूर्ति आहे.

गुडीवाडा येथें अमरावतीप्रमाणेंच नायकिणीचा बुरूज म्हणून एक टेकडी आहे. याप्रमाणेंच घटिसलपलम् आणि कांतिप्रोल येथेंहि टेंकड्या आहेत. बुधवनी येथें कांहीं तांब्याच्या बुद्धमूर्ती सापडल्या. त्याच्या सिंहासनावर लेख आहेत. तेनाली तालुक्यांत चंडवेलू येथे एक देवालय व बौद्धकालीन अवशेषाच्या टेंकड्या आहेत. जगय्यपेट येथेंहि एक बौद्ध स्तूप आहे. चंडवेलू येथें कांहीं सोन्याचीं नाणीं सापडलीं असून शिवाय १८७४ मध्यें कांहीं सोन्याच्या ओतीव विटाहि सापडल्या. भट्टीप्रोलू येथेंहि एक प्राचीन स्तूप होता; त्यात गौतमबुद्धाचें एक हाड एका स्फटिकाच्या करंड्यात ठेवलेलें आढळलें. उंदवल्ली येथील टेंकडीच्या पायथ्याशीं व वर बऱ्याच गुहा आहेत. येथें एक मंडप व एक चार मजली मंदिर आहे. यातील तळमल्यावर एक भुयार आहे. येथून मंगलगिरी येथें चोरवाट गेली आहे असें सांगतात. या देवळास पुढें ब्राह्मणी स्वरूप दिल्याचें दिसतें. तिसऱ्या मजल्यावर रामायणांतील कथांचीं चित्रें खोदलीं आहेत. आत नरसिंहस्वामीची शेषावर निद्रिस्थ मूर्ति आहे. दुसरी बुद्धाची शिष्यांसह बसलेली एक मूर्ति आहे. परंतु हल्लीं ही विष्णूचीच आहे असें सांगतात. येथें एक तेलगू अस्पष्ट शिलालेख आहे. हा दैत्यांचा मुलूख असून करेमपुदि हें नांव खर नांवाच्या राक्षसावरून व दुर्गी हें नांव दूषण या नावाच्या राक्षसावरून पडलें आहे असें सांगतात. दचपल्ली

येथें व श्रीशैलमंदिरच्या वाटेवर दोन लेणीं असून इतिपोतुला, जतेपल्लम् व इल्लेश्वरम् येथेंहि लेणीं आहेत असें सांगतात.

बौद्ध व ब्राह्मण यामधील क्रांतिकालातील अवशेषः—या कालात पूर्वीच्या बौद्ध लेण्यांतून ब्राह्मणांनीं केलेली ब्राह्मणी शिल्पकामें आढळून येतात. अशा प्रकारचा एक मंडप निनुकोंडा येथें आहे पलनद तालुक्यातील 'पिडुगुरल्ल' व 'गुर्जल' येथील व बपतल तालुक्यातील परचुर येथील देवालयेंहि अशींच आहेत. पिडुगुरल्लानजीक कांहीं उंचवटे (बुरूज) आहेत ते पूर्वीच्या किल्लयाचे अवशेष असावेत असें म्हणतात. हे बुरूज अमरावती येथील बुरुजांप्रमाणेंच दिसतात.

ब्राह्मणी देवालयें व त्याच्यावरील इ. स. ३०० ते ८०० च्या दरम्यानचे शिलालेखः—यापैकीं विष्णूचीं देवालयें मंगलगिरि, अकिरिपल्लि, श्रीककोलम्, वेदाद्रि व गोलपल्लि, हीं आहेत. यातील अकिरिपल्लि येथील देवालयाजवळ कांहीं कोरलेल्या गुहा आहेत.

त्याप्रमाणेंच मुख्य शिवालयें कोटप्पा, कोंडा, बेझवाडा, कलपल्लि, शिवगंगा, मोपेदिवि, चेबेरला आणि मचेरला हीं आहेत. या देवालयावर शिलालेख असून ते इ. स. ३०० ते ८०० च्या दरम्यानचे आहेत असें म्हणतात.

मंगलगिरि येथील विष्णुमंदिरामध्यें नरसिंहस्वामीची मूर्ति आहे. येथें फाल्गुनात उत्सव होतो. हें मंदिर पूर्वीच्या बौद्ध लेण्यात आहे. टेकडीच्या पायथ्याशीं एक काळया पाषाणाचा स्तंभ आहे. या मंदिराच्या भुयारातून एक चोरवाट उंदवल्लि येथें गेली आहे असें म्हणतात.

पलनद तालुक्यातील मचेरला येथें एक जुनें दगडी देवालय असून त्यासभोंवतींच्या भिंतीवर महाभारत व भागवत यातील कांहीं कथातील चित्रें खोदलीं आहेत.

शंकरपुरम्, गमलपद व दशपल्लि येथील देवालयावरहि कोरींव काम आहे. कांहीं दगडी शिवालयें आहेत.

गुर्जेल येथें एक मंडप व नलगम राजा नरसिंहराय (वेलम्) यानें बांधलेलें एक मंदिर आहे. त्याचे दगड जुन्या बौद्ध इमारतींचे असावेत असें वाटतें.

किल्लेः—कोंडविड ही गंगातूरच्या पश्चिमेस १५०० फूट उंचीची १२ मैलाची एक टेंकड्याची रांग आहे. हीवर तीन किल्ले आहेत त्यांचीं नांवें.

पुत्तकोटः—हा उडिया राजांनीं बांधला असावा. येथें पडकीं देवळें, मंडप वगैरे आहेत.

दुर्गम्ः—हा टेंकडीच्या माथ्यावर आहे. याला कट्टोलदिड्डी नांवाची वेस असून तीवर चार मजली गोपूर होतें. हल्लीं त्याचे दोन मजले पडून गेले आहेत. दुसरी वेस पेड्ड दरवाजा म्हणून आहे. येथें खजिना, दारुगोळा व धान्य यांच्या कोठारांचे अवशेष आहेत. कांहीं मोडकीं देवालयें असून कांहींच्या मशिदी झालेल्या दिसतात. येथें प्रथम रेड्डी राजे रहात असून त्यांचा एक निरियल तख्त नांवाचा मंडप आहे. शेवटचा रेड्डी राजा निपुत्रिक मेल्यावर विजयानगरचा राजा कृष्णदेव रायलु यानें त्याच्या ७२ व्या सरदारास एका पुजाऱ्याकडून देवाच्या दर्शनाच्या निमित्तानें आणवून कपटानें मारून हा किल्ला बळकाविला असें सांगतात.

कोटः—याला कोलेपेल्ली व नदेल्ली अशा दोन वेशी आहेत. याचा तट अद्याप धड आहे. येथें एक गोपिनाथ स्वामींचें देवालय आहे. येथील स्तंभ प्रेक्षणीय आहेत. या कोंडाविड टेंकडीवरील किल्लयाच्या दंतकथा तेलगू भाषेंत लिहिलेल्या आहेत.

कोंडपल्लिः—हा फार प्राचीन डोंगरी किल्ला असून तो पूर्वी निझामाच्या ताब्यात होता. हा बेझवाड्याच्या पश्चिमेस १० मैलावर आहे. याला तट व तीन वेशी आणि कांहीं बराकी आहेत. मुख्य वेशीस दरगा दरवाजा म्हणतात. तेथें 'तानिष महाल' नांवाची मुसुलमानी पद्धतीची इमारत आहे. शिवाय इतर कांहीं पडक्या इमारती व तोफे, हमामखाने वगैरे आहेत.

कृष्णा जिल्ह्यात एकंदर तेरा तालुके आहेत.ते म्हणजे बंदर, बेझवाडा, भीमवरम, एलोर, दिवि, गुडिवाड, कैकलूर, नन्दिग्राम, नरसापुर, नुझविद, टनुकू, तिरुवर, यर्नगुदेम हे होत. इ. स. १९०३ सालीं नवीनच गुंटूर जिल्हा करण्यात येऊन, त्यात कृष्णा जिल्ह्यातील कांहीं तालुके समाविष्ट केले व गोदावरी जिल्ह्यातील कांहीं तालुके कृष्णा जिल्ह्यात अंतर्भूत करण्यात आले. या जिल्ह्यांत एकंदर १७०२ खेडीं असून १३ शहरें आहेत. १९२१ सालीं ह्या जिल्ह्याची लोकसंख्या २१,३३,३१८ होती. या जिल्ह्यांत एकंदर १८,४३,३४० एकर जमीन इनामी असून एकंदर जमीनमहसूल ८० लाखा पर्यंतचा आहे. या जिल्ह्यात मुख्यतः तेलगू भाषा प्रचारात आहे. येथील शासनपद्धति इतर जिल्ह्याप्रमाणेंच आहे.

मुसुलमानाच्या अमदानींत हिंदू अधिकाऱ्यांकडून जमीन महसूल जमविला जात असे पण पुढें मुसुलमानाची सत्ता ज्यावेळीं शिथिल झाली त्यावेळीं हे हिंदू अधिकारी स्वतंत्र जमीनदार बनले व त्यांनीं मुसुलमान राजांनां एकदम कांहींतरी ठरींव रक्कम द्यावयाची व नंतर आपल्या ताब्यांतील रयतेकडून आपल्याला रुचेल त्याप्रमाणें सारा वसूल करून घ्यावयाची पद्धत पाडली. ज्यावेळीं कंपनीची सत्ता या जिल्ह्यावर प्रस्थापित झाली त्यावेळीं कंपनीच्या अधिकाऱ्यांनां हे जमीनदार मुसुलमानांचे मांडलिक सरदार असावेत असें वाटून त्यांनीं जमीनदारांच्या अधिकारांत ढवळाढवळ केली नाहीं. त्यामुळें जमीनदाराचें आयतेंच फावलें व अशा रीतीनें जुलूम व अव्यवस्था माजली.

पुढें १८०२ मध्यें ज्यावेळीं या जिल्ह्यात कायम धारापद्धति सुरू झाली त्यावेळीं जमीनदाराच्या उत्पन्नाच्या एक तृतीयांश सारा जमीनदारांनीं सरकारला द्यावा असें ठरलें. पण यामुळें प्रत्यक्ष रयतेवर साऱ्याचें ओझें वाढत चाललें. अखेरीस १८६४–१८७४ यांच्या दरम्यान सर्व जमीनींची

मोजणी करण्यांत येऊन, रयतवारी पद्धत सर्वत्र चालू करण्यांत आली. कोरड्या जमीनीवर एकरापाठीमागें दोन रुपये व पाण्याखालील जमीनीवर एकरीं पाच रुपये सारा बसविण्यात आला. जिल्ह्याच्या उत्तरभागात साऱ्याचें प्रमाण अनुक्रमें १ रु. ४ आ. व ४ रुपये प्रत्येक एकरी ठरविण्यात आलें.

मच्छलीपट्टण व बेझवाडा वगैरे ठिकाणीं म्युनिसिपालिटया असून कांहीं ठिकाणीं जिल्हाबोर्डाकडून व तालुकाबोर्डाकडून सारा वसूल करण्यांत येतो.

या जिल्ह्याचें मुख्य पीक म्हणजे तांदुळाचें होय. तांदुळाचे पांढरे व काळे असे दोन प्रकार आहेत. कोरड्या जमीनींतील चोलम् व कम्बू हीं दोन मुख्य पिकें होत. याशिवाय कापूस, नीळ व तंबाखू याचें उत्पन्न आहे. या जिल्ह्यात कुरण मुबलक असल्याकारणानें गुराची जोपासना उत्तमरीतिनें होण्याला येथें पुष्कळ वाव आहे. शेळ्या व मेंढ्याचीहि निपज येथें विपुल होते.

या जिल्ह्यातील बहुतेक बागाईत बेझवाडा येथील कृष्णा नदीच्या कालव्यांनी पिकतें. तलाव व विहिरी यांच्या द्वारें फारच थोड्या जमीनीला पाणी दिले जाते.

खनिजसंपत्ति.—इमारतीला लागणारे दगड वजा केल्यास या जिल्ह्यात इतर प्रकारची खनिजसंपत्ति फारच थोडी आहे. लोखंड व तांबें फारच थोड्या प्रमाणांत सांपडतें. १६-१७ व्या शतकात गोवळकोंड्याचे सुलतान कृष्णा जिल्ह्यावर राज्य करीत असता गोलम्पल्ली व मल्लवल्ली येथें खनिजसंपत्ति शोधून काढण्याचे प्रयत्न मोठया प्रमाणात सुरू करण्यांत आले होते. कोल्लर येथं व पार्तियाला येथेंहि हे प्रयत्न चालले होते. १७ व्या शतकांत कोल्लर येथें खणण्याचे काम चालले असता फ्रेंच प्रवासी व जवाहिऱ्या टॅव्हर्नियर हा येथे आला होता. त्याने लिहिलेल्या हकीकतीवरून या कोल्लर येथील खाणींत ६०,००० माणसें राबत होतीं असें समजून येतें. याच खाणींत ९०० कॅरेटचा एक हिरा सापडला होता व तो औरंगझेबाकडे पाठविण्यात आला. याच हिऱ्याला कोणी 'कोहिनूर हिरा' असें म्हणतात.

पलनद तालुक्यात करेमपुडीजवळ शिशाच्या खाणी आहेत. परंतु हल्लीं त्या चालू नाहींत. पलनद आणि बिनूकोंडा या दोन्ही तालुक्यामध्यें तांबें सांपडतें.

व्यापार व दळणवळण.—कृष्णा जिल्हा मुख्यतः कृषिप्रधान आहे. सर्व जिल्हाभर, मेंढ्याच्या लोंकरीपासून जाडें भरडें कापड विणण्यांत येतें. मच्छलीपट्टण येथें पूर्वी उत्तम गालीचे तयार होत असत व ते इंग्लंडांत जात असत. पण हल्ली तो धंदा बसला आहे. येथें एक लहानसा चामडी रंगविण्याचा कारखाना आहे व यांतून दरवर्षी ५०,००० रुपयांचा माल परदेशी जातो. जगय्यपेट येथील रेशमाचा धंदा पूर्वी भरभराटींत होता पण हल्लीं त्यालाहि निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे. या जिल्ह्यातून बायकांच्या पातळांच्या उपयोगी असें हलक्या जातीचें कापड बाहेरगांवी बरेंच पाठविण्यांत येतें. कोंडापल्ली येथें एका हलक्या लाकडापासून खेळणीं तयार होतात. कोंडाविड येथें पूर्वी कागद केला जात असे पण तोहि धंदा हल्ली सपशेल बुडाला आहे.

कृष्णा जिल्ह्यात मच्छलीपट्टण व निजामपट्टण हीं दोनच बंदरें आहेत. त्यापैकीं दुसरें बंदर हल्ली निरुपयोगीच झालें आहे. १८६४ च्या महापुरामुळें मच्छलीपट्टण बंदराची बरीच नासाडी झाली. त्यामुळें त्या बंदरातील व्यापारासहि बराच धक्का बसला. बेझवाडा येथें कातड्याचा मोठा व्यापार चालतो. याशिवाय कृष्णा जिल्ह्यातून एरंडिच्या बिया, मिरच्या, तंबाखू हे जिन्नस बाहेरगांवी जातात. कोमटी हीच जात या सर्व वस्तूंचा व्यापार करते. लब्बे जात मात्र चामड्याचा व्यापार करते.

[संदर्भग्रंथ.—इंपीरियल ग्याझे; एडिंबरो रिव्ह्यु आक्टोबर १८६९; जेम्स फर्ग्युसन—ट्री ॲंड सर्पंट वर्शिप; मद्रास ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट १९२१-२२].

कृष्णाजी कंक—शिवाजीमहाराजाचा बाळमित्र येसाजी कंक याचा हा मुलगा. हा मोठा शूर होता. येसाजी सरनोबत होता, व कृष्णाजी हा (संभाजी राजाच्या वेळीं) पदाती नाईक होता. या दोघानीं १६८३ मध्यें फोंड्याच्या स्वारींत मोठा पराक्रम करून फिरंग्याचा पराभव केला. खुद्द संभाजी राजे म्हणतात " फिरंगी यासी गांठी पडिली तेव्हा बहुत कस्त केली आणि गर्दीस मारून काढिला ते वख्तीं दोघाना (बाप व लेक) हि जखमा लागोन चकचूर जाले. कठीण जखमा राजश्री स्वामीनीं (स्वतः) दृष्टीनें पाहिल्या आणि घरासी जावया आज्ञा दिली. त्यावरी कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटोन घरीं मयत झाला...त्यावरून स्वामी कृपाळू होऊन, हे (बाप लेक) कामाचे मर्दाने, स्वामी कार्यावरी तत्पर...स्वामी कार्यावरीं मयत जाला... म्हणून पारितोषकाची मोईन (नेमणूक)...खासा येसाजी (यास) १ हजार होन व कृष्णाजी (मयत, त्यास) १ हजार होन...नियत केली असे." या प्रमाणे छत्रपतींनीं (इ. स. १६८५) कृष्णाजीचा व त्याच्या बापाचा बक्षिसें देऊन सन्मान केला. [राज. खं. १५. ३९६; चतु. संमे. वृ. १९८]

कृष्णाजी त्रिमल—हे मोरोपंत पिंगळे पेशवे यांचे मेव्हणे. हे मथुरेस रहात असत. शिवाजी महाराज आग्र्याहून निसटले ते मार्गांत मथुरेस आले. तेथें हे कृष्णाजी, काशी व विसाजी असे तीन बंधू होते. त्यांच्याकडे संभाजीराजास ठेऊन महाराज पुढें गेले. एकदां मोंगलाचें धरणें आलें असतां या कृष्णाजीनें संभाजीस आपल्या पानांत जेवावयास घेऊन एकत्र भोजन (दूध पोहे) केलें व संभाजी आपला भाचा असें सांगून त्याचा बचाव केला. पुढें कांहीं महिन्यांनीं हे त्रिवर्ग बंधू आपल्या आईसह संभाजीस घेऊन रायगडास. आले. त्यावेळीं महाराजांनीं त्यांना नांवाजून व कृष्णाजीस

सराव " हा किताब देऊन, काशीपंतास व मानोश्रीस प्रत्येकी २५।२५ हजार रु. बक्षिस दिले (इ. स. १६७१) [रा. खं. ८. म. रि.].

कृष्णाजी नाईक जोशी—(चासकर घराणें) हा शिवकालीन मुत्सद्दी पन्हाळ्यास सुरनीस होता. त्यास महाराजांनीं तंजावरास व्यंकाजी राजाकडे जें शिष्टमंडळ पाठविलें त्यात धाडलें होतें. यास पुढें शाहुमहाराजांनीं सर्व राज्याची पोतदारी दिली. पूर्वींचे पोतदार श्रीगोंदेकर पुंडे हे ताराबाईच्या पक्षास चिकटून राहिल्यामुळें व कृष्णाजीनें " मोंगलाईतून येतेसमयीं स्वामीच्या व राजाच्या कल्याणाविषयीं बहुत श्रम साहस केलयावरून...पोतदारीचा धंदा हुजुराचा व सर कारकून व सरदार यांजकडील वंश परंपरेनें " इनाम दिला. यांचा पुत्र महादाजी. हा चासकर घराण्याचा मूळपुरुष. महादाजी याचा गोविंदा म्हणून एक भाऊ होता. या दोघांनींहि बापाप्रमाणेंच शिवाजी-संभाजी-राजाराम यांच्या वेळीं स्वराज्याची सेवा उत्कृष्ट केली. " महादाजी कृष्ण हे संभाजी व धनाजीसमवेत फौजा घेऊन गेले " त्यामुळें राजाराम यांनीं त्यांनां खवली गांव इनाम दिला. त्यानंतर वेड्या शिवाजीच्या वेळींहि यानीं व यांचा मुलगा बाळाजी महादेव यानें (भाऊ, रामचंद्र व कृष्ण यांसह) सरकार सेवा केलेली आहे असें खुद्द करवीरकर संभाजी महाराजांनीं म्हटलें आहे. महादाजीनीं रांगणा येथें बाळाजी विश्वनाथास मदत केली. तसेंच कान्होजी आंग्रे व बाळाजीपंत यांचा स्नेहहि त्यानींच जमविला. महादाजीपंताची मुलगी ही थोरल्या बाजीरावसाहेबांस दिली होती. त्यांचे नांव काशीबाई. महादाजी हे सावकार असल्यानें बाळाजीपंतांना त्यांचा बराच उपयोग झाला होता. [भा. व; रा. खं. २०; म. रि.] सातार्‍यास व्यंकटपुर्‍यांत असलेलें कृष्णेश्वराचें देऊळ या महादाजी कृष्णरावांनींच बांधल्याचा उल्लेख करणारा शिलालेख (शके १६४५ चा) तेथें आहे. या देवळाच्या पुढील हल्लीचा व्यंकटपुरा त्यावेळीं नसून तेथें महादाजीपंतानें सदाशिवपुरी नांवाची पेठ वसविली होती. महादाजीकडे लोहगड चा कारभार होता. कृष्णराव महादेवास पेशव्यांनीं चास येथें सरंजाम दिल्यामुळें या घराण्यास चासकर म्हणूं लागले. महादाजीचा पुत्र कृष्णराव हा सन १७३३ मध्यें फिरंग्यांच्या स्वारीवर गेला होता. तत्पूर्वी त्याला पेशव्यांनीं कल्याणची सुभेदारी दिली होती. त्यावेळीं (स. १७३०) त्यानें भिवंडीच्या खाडीपलीकडील कांबें हें फिरंग्याचें ठाणें काबीज केलें होतें.

कृष्णाजी भास्कर—हे वाईच्या कुळकर्ण्यापैकीं एक. शिवाजीमहाराजांच्या नौकरीस होता. महाराजांनीं १६५७ त थेट अहमदनगरपर्यंत चाल करून मोंगलांचा पराभव केला. व विजापुरकरांस सहाय्य केलें. त्यानंतर उभयतांत तह झाला. त्यावेळीं (१६५८) औरंगझेबाकडे महाराजानीं जो वकील पाठविला तो हाच कृष्णाजीपंत. पुढें कदाचित् यांनीं महाराजांची नौकरी सोडली असावी. कारण अफजल प्रकरणांत यालाच खानानें आपला वकील म्हणून दौत्य करण्यास महाराजांकडे पाठविलें होतें. खान हा वाईचा सुभा (सात आठ वर्षें) असल्यानें, या दोघांची दाट ओळख होती. महाराजाकडे पंत पूर्वी नौकर असल्यानें व त्यांनीं त्याला गौरवल्यामुळें त्यानें खानाचा खरा हेतु त्यांनां कळविला. पुढें खानाचा वध झाला. यानंतर कृष्णाजीपंत हे महाराजांचे पदरीं राहिले असावेत. कारण औरंगझेब गादीवर बसला असतां महाराजांनीं त्यावेळीं (१६५९) जो वकील दिल्लीस पाठविला तो हाच कृष्णाजीपंत होता. राजाराम महाराजांच्या वेळीं हा जिवंत असावेसें दिसतें. रामचंद्रपंत अमात्य यानीं सावंतावर ज्या सरदारास पाठविलें त्याचें नाव कृष्णाजी भास्कर असेंच आहे. सारांश हे शूर, मुत्सद्दी व शिवशाहीचे पहिले मदतगार होते [रा. खं. ८. म. रि; जेधे. सभासद]

कृष्णाजी विनायक सोहोनी—हे प्रसिद्ध " पेशव्यांच्या बखरी " चे लेखक होत. हे रत्नागिरी जिल्ह्यांतील सोमेश्वरचे रहिवासी होत. तेथून ते पुण्यास पेशवाईच्या अखेरीस आले व आपल्या कर्तबगारीनें सुभेदारीपर्यंत चढले. पुढें पेशवाई गेल्यानंतर यांचें सर्व वैभव नष्ट झालें. व त्यांनीं सर्व संसारकार्य सोडून नदीतटाकावरील वैजनाथाच्या शिवालयात पुढील आयुष्य तपस्व्याप्रमाणें घालविलें. त्यावेळीं त्यांनीं तोंडानें सांगावें व लेखकानें लिहून घ्यावें याप्रमाणें सदर बखर रचिली गेली. रावबाजींचे कारभारी चिंतोपंत देशमुख पांवसकर याचे कृष्णाजीपंत हे आप्त असल्यामुळें देशमुखांची त्याच्यावर कृपा होती. याशिवाय यांची जास्त माहिती आढळत नाहीं. बखरींत थोरले बाळाजीपंत नाना हे श्रीवर्धनहून निघाल्यापासून तों शनिवारवाड्यावर इंग्रजांचा बावटा चढेपर्यंतची सारी हकीकत आली आहे. बरीचशी माहिती ऐकीव व स्मरणीय आहे. पंतांचा काल वरील शिवालयांत इ.स. १८५४-५५ त झाला. त्यावेळीं त्यांचें वय ७० च्या सुमारास होतें. यावरून त्यांचा जन्म श्री. सवाई माधवरावसाहेब यांच्या कारकीर्दीत झाला असावा. [साने-पेश. बख. प्रस्ता.].

कृष्णा नदी—दक्षिण हिंदुस्थानांतील ही एक मोठी नदी असून, गोदावरी व कावेरी या नद्याप्रमाणेंच दक्षिण हिंदुस्थानच्या सर्व प्रदेशामधून पश्चिमेकडून पूर्वेकडे ती वहात गेली आहे. कृष्णेपेक्षां गोदावरीची लांबी अधिक असली तरी, विस्ताराच्या मानानें कृष्णा ही गोदावरीपेक्षां मोठी आहे. कृष्णाथडीचें क्षेत्रफळ एकंदर ९७००० चौरस मैल असून नदीची लांबी ८०० मैल आहे.

सह्याद्रि पर्वतांत पश्चिम घाटामध्यें महाबळेश्वराजवळ हिचा उगम होतो. सातार्‍यानजीक माहुली येथें हीच वेण्णा नदी मिळते. तेथून ती दक्षिणेकडे वहात जाऊन कर्‍हाड येथें येते. या ठिकाणीं तिला उजवीकडून कोयना येऊन मिळते. नंतर ती सांगलीजवळ वहात आल्यावर तिला

पश्चिमेकडून वारणा नदी मिळते. तेथून ती कुरुंदवाडपर्यंत वहात गेल्यावर त्या ठिकाणीं पंचगंगेचा तिच्याशीं संगम होतो. येथून ती पूर्ववाहिनी बेळगांव जिल्ह्यांतून, दक्षिण मराठी संस्थानांतून, व विजापूर जिल्ह्यांतून, असा ५०० मैलांचा प्रवास करून निजामच्या राज्यांत येते. विजापूर जिल्ह्यांत तिचा संचार असतांना तिला घटप्रभा व मलप्रभा या नद्या भेट देतात. महाबळेश्वर, येथील उगमापासून माहुलीपर्यंतचें पात्र लहान आहे. यामुळे तिच्यामधून नांवा चालविल्या जात नाहींत.

निजामच्या राज्यांत, रायचूर जिल्ह्याच्या एचाम्पेट गांवाजवळ तिचा प्रथम प्रवेश होतो. दख्खनच्या डोंगर-सपाटीवरून सोलापूर आणि रायचूरच्या दुआबांत ती ४०८ फूट उंचीवरून खालीं येते; व तिला जेव्हां पूर आलेला असतो तेव्हा एवढ्या उंचीवरून ग्रानाईट खड-काच्यामधून खालीं जोरानें ती आदळत असता तुषा-राचा समूह वर उडत असतो व तो देखावा फार बहा-रीचा दिसतो. भीमा नदी ही अहमदनगर, पुणें, सोलापूर या प्रदेशांतून वहात येऊन कृष्णेला मिळते तर तुंग-भद्रा ही म्हैसूरचा उत्तर भाग, बल्लारी व कूर्नूल या प्रदे-शांतून वहात येऊन, तिला मिळते. तुंगभद्रेचा संगम झाल्यावर ती ब्रिटिश मुलुखातून वहात असतां, हैद्रा-बाद संस्थानचा पूर्व भाग व मद्रासचे कुर्नूल व गुंटूर जिल्हे यांच्यामधून ती वहात गेल्यामुळें ती या दोन्हीं प्रदे-शांची नैसर्गिक हद्द बनली आहे. या प्रदेशांतील तिचें पात्र खोल आहे. तेथून ती ईशान्यगामी होऊन नल्लम-लइ व इतर टेंकड्या यांच्यामधून वहात जात असतां वझीराबाद येथें तिला मूसी नदी येऊन मिळते. हैद्रा-बाद संस्थानच्या मुलुखांतून, व हैद्राबादच्या बाजूबाजूनें ती एकंदर ४०० मैल वहात जाते.

यानंतर आग्नेय दिशेला तिचा प्रवाह वळतो व गुंटूर व कृष्णा या जिल्ह्यांमधून ती शंभर मैल वहात जाऊन बंगालच्या उपसागरांत दोन मुखांनीं जाऊन पडते. गुंटूर व कृष्णा जिल्ह्यातून ती वहात असतां तिचे अनेक कालवे काढण्यांत आले आहेत. बेझवाडा जिल्ह्यांतून ती जम्बूर दगडाच्या लहान टेकड्यामधून वहात जात असतां तिला एक प्रचंड धरण बांधण्यांत येऊन तेथून अनेक कालवे काढलेले आहेत. कृष्णेचें पाणी या प्रदेशांत जोरानें वहात असल्यानें तिच्यामधून नांवा वल्हविणें अवघड होतें. तथापि वर्षांतून सहा महिने या प्रदेशांतील कुशल नावाडी नांवा वल्हवीत असतातच. तिच्या अनेक कालव्यांच्या योगानें कृष्णा व गोदावरी हे जिल्हे जोडले गेले आहेत; व बकिंगहॅम कालव्यामुळें कृष्णा जिल्हा व दक्षिणे-कडील मुलुख व मद्रास हे परस्परांशीं जोडले गेले आहेत.

कृष्णा नदी ही हिंदुस्थानांतील अनेक पवित्र नद्यांत मोडते व हिच्या स्तुतिपर कृष्णाकांठच्या तीर्थांचें वर्णन करणारें कृष्णामाहात्म्यपुराण व कृष्णामाहात्म्यवर्णन काव्य वगैरे-सारखे स्तुतिपर ग्रंथ झाले आहेत. कन्ये राशीस गुरु आला असतां कृष्णानदीस भागीरथी भेटावयास येते अशी समजूत असून त्या कालांत भागीरथी तीरीं करावयाचे क्षौरश्राद्धादि धार्मिक विधी कृष्णेच्या काठीं करण्याची वहिवाट आहे. हिचे महाभारतापासून उल्लेख आढळतात.

आंध्र व कुत्बशाही राज्यांची ही दक्षिणसरहद्द होती (गोदा-कृष्णा-दुआब). इच्या कांठावरील कोप्पम गांवीं सोमेश्वर चालुक्यानें राजाधिराज चोलाशीं लढाई करून त्याला ठार मारिलें. या गांवीं चालुक्य व चोल यांच्यांत बऱ्याच वेळां लढाया झाल्या आहेत. कृष्णा-कांठीं राक्षसतागडी (रक्कसगी–तंगडगी) येथें विजया-नगरकरांचा पराभव झाला. मुजफ्फरजंगानें कृष्णा ते कन्या-कुमारीपर्यंतच्या देशाचा नबाब म्हणून डुप्लेला नेमिलें होतें. [स्मिथ–ऑ. हि ; इं. एपि. इंडि. पु. १२.; इं. गॅ.]

कृष्णान्वक—(१०४२९) त्रावणकोरमधील दक्षि-णेंतील इरानियल व कल्कुलम या दोन तालुक्यांतच हे लोक आढळतात. कांहीं मक्कथायम वारसाहक्काचा कायदा पाळितात तर कांहीं मरुमक्कथायम कायद्याला धरून वागतात. पहिल्या वर्गाचे आचारविचार वेल्लाळ लोकांसारखे आहेत व दुसऱ्याचे नायर लोकांसारखे आहेत. याच्या स्त्रीवर्गांत पूर्वी गोंदण्याची चाल फार असे. हे मूळचे कांजीवरम् येथील रहिवासी. यांच्यांत नियोगाची पद्धत आहे. मग दीर लहान असला तरी चालतो. [थर्स्टन. से. रि. (त्रावणकोर)].

केअर्नस, जॉन एलियट—(१८२३–१८७५) इंग्रज अर्थशास्त्रज्ञ. १८५० त तो एम्. ए. झाला. त्यानंतर काय-द्याची परीक्षा देऊन आयर्लंडांत वकिली करूं लागला. आय-र्लंडातील सामाजिक व अर्थशास्त्रीय प्रश्नांसंबंधानें चर्चात्मक लेख तो लिहूं लागला व अर्थशास्त्राचा अभ्यास त्यानें सांगो-पांग व काळजीपूर्वक केला. डब्लिन येथें अर्थशास्त्राच्या अध्यापकाची जागा १८५६ मध्यें केअर्नसला मिळाली. पहिल्या वर्षाचीं त्याचीं अर्थशास्त्रावरील व्याख्यानें प्रसिद्ध झालीं. त्यात जे. एस्. मिलची पद्धतीच विस्तारपूर्वक पुढें मांडलेली होती.

१८६२ त यानें 'दि स्लेव्ह पॉवर' (गुलामांची अर्थोत्पाद-नशक्ति) या विषयावर तात्त्विक विचारपरिप्लुत निबंध प्रसिद्ध केला. त्यांत त्यानें गुलाम मजूर पद्धतींत किती तोटे आहेत तें विस्तारपूर्वक व मार्मिकपणानें पुढें मांडलें असून त्यानें काढलेलीं अनुमानें आतां अर्थशास्त्रांतील ठाम सिद्धांत होऊन बसलीं आहेत. शिवाय अमेरिकेंत हें गुलामपद्धतीप्रकरण युद्धावर जाणार, हें भविष्यहि त्यानें या निबंधांत वर्तविलें होतें.

इ. स. १८६६ मध्यें लंडन येथील युनिव्हर्सिटी कॉलेजांत त्याला प्रोफेसरची जागा मिळाली. पण १८७२ मध्यें प्रकृति फार ढासळल्यामुळें त्याला राजीनामा द्यावा लागला. 'स्लेव्ह

पॉवर ' 'पोलिटिकल एसेज' ' लीडिंग प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनॉमी ' ही त्यानें लिहिलेल पुस्तकें होत. शेवटचा ग्रंथ स्मिथ, माल्थस, रिकार्डो, मिल्ल यांच्या परंपरेंतील विद्वानाला शोभण्यासारखाच होता. हा इंग्रजपंथी अर्थशास्त्रज्ञांच्या मुख्य सिद्धांतांवरील टीकापर ग्रंथ असून त्यांत केअर्नसनें मिल्लच्या बहुतेक सर्व प्रमुख सिद्धांतांसंबंधानें आपलें भिन्न मत स्पष्टपणें पुढें मांडलें आहे.

जे. एस्‌ मिल्लच्या ' अर्थशास्त्राची तत्त्वें ' या ग्रंथानंतरचे अर्थशास्त्रावरील महत्वाचे ग्रंथ म्हटले म्हणजे केअर्नेसचेच असून त्यांत मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणें आहेतः (१)अर्थशास्त्राची व्याप्ति व अनुमानपद्धति यांपैकीं व्याप्तीसंबंधीं केअर्नेस म्हणतो कीं, अर्थशास्त्र हें निव्वळ तात्विक शास्त्र असून प्रत्यक्ष सामाजिक स्थिति किंवा व्यवस्था यांच्यामुळें या शास्त्रांतील सिद्धांतांना यत्किंचित्‌हि बाध येऊं शकत नाहीं. समाजशास्त्राची किंवा गणितशास्त्राची अर्थशास्त्र ही शाखा नसून तें कांहीं अंशीं बौद्धिक व भौतिक असें मिश्र शास्त्र आहे. या मुद्यासंबंधानें एवढें सांगितलें पाहिजे कीं, समाजव्यवस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर होणाऱ्या परिणामाकडे केअर्नेसनें दुर्लक्ष केलें, हा त्याच्या विचारसरणींतील मुख्य दोष होय. (२) पदार्थ तयार करण्यास लागणारा खर्च व त्याची किंमत यासंबंधाचा पदार्थांच्या उत्पादनखर्चामध्यें मजुरी व भांडवलवाल्याचा नफा या दोहोंचा समावेश मिल्ल करीत असे. परंतु ही दृष्टि भांडवलवाल्याची असून किंमतींत केवळ मजूरीचा अन्तर्भाव होत नाहीं, असें केअर्नेसचें म्हणणें आहे. पदार्थ उत्पन्न करावयास लागणारे श्रम, मध्यंतरींची विश्रांति आणि अपघात या तिहींचा विचार किंमतीमध्ये येतो असें तो म्हणतो. (३) स्वतंत्र चढाओढ व तिच्यावरील नैसर्गिक व सामाजिक निर्बंध, समाजाचे धंदेवारीनें होणारें वर्गीकरण व भांडवलाची अडचण यामुळें एक धंदा सोडून दुसरा पत्करणें माणसाला कठिण जातें, व त्यामुळें स्वतंत्र चढाओढीचें तत्व पूर्णपणें अमलांत येऊं शकत नाहीं. म्हणून मालाच्या किंमती आतरराष्ट्रीय व्यापाराच्या तत्वानुसार म्हणजे मागणी व पुरवठा या तत्वानुसार ठरतात. केवळ उत्पादकाच्या दृष्टीनेंच केलेली ही केअर्नेसची मीमांसा मिलच्यापेक्षा अधिक व्यापक असली तरी एकांगीपणाची आहे असें म्हणावें लागतें. गिऱ्हाईकाच्या दृष्टीनें पाहता, स्वतःस तो जिन्नस तयार करावा लागू नये म्हणून तो जास्तींत जास्त जें मोल द्यावयास तयार होतो त्यावरून पदार्थांची जास्तींत जास्त किंमत ठरत असते ही गोष्ट केअर्नेसनें लक्षांत घेतलेली नाहीं. (४) मजुरीफंडाचा सिद्धांत मिल्लनें प्रथम प्रतिपादन करून पुढें सोडून दिला होता. केअर्नेसनें तो प्रश्न हातीं घेऊन त्यासंबंधाचा बराचसा गैरसमज दूर करून त्याचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडलें. शिवाय व्यापारीसंघ व संरक्षणपद्धति, तसेंच आतरराष्ट्रीय व्यापार व पदार्थांच्या किंमती यासंबंधानें फार महत्वाचें व अगदीं नवीन स्वरूपाचें विवेचन त्यानें केलें आहे.

केइ द्वीपसमूह—हा डच ईस्ट इंडीजच्या अम्बोयना रेसिडेन्सींतील एक द्वीपसमूह आहे. हीं बेटें दक्षिण अक्षांश ५° व ६°५' व पूर्वरेखांश १३१°५०' व १३३°१५' यामध्यें आहेत. मोठें केई, लहान केई, टायन्डा व कुरसमूह हा या द्वीपसमूहांत आहेत. मोठें केई हें बेट इतर बेटांपेक्षां नैसर्गिकदृष्टया इतर बेटांपासून अगदीं निराळें आहे. यांत ज्वालामुखींची ओळ पसरली असून यांतील सर्वांत उंच भाग २६०० फूट उंच आहे. या बेटाचें क्षेत्रफळ २९० चौरस मैल असून सर्व द्वीपसमूहाचें क्षेत्रफळ ५७२ चौरस मैल आहे. या बेटाची तृतीयावस्थाक नवपूर्वयुगांतील घटना असून इतर बेटें त्यानंतरचीं आहेत. येथें नारळ, साबूदाणा, मासे, ट्रेपांग इमारती लांकूड, खोबरें, मका व तंबाखू हे जिन्नस उत्पन्न होतात. येथील लोकसंख्या सुमारें २३,००० आहे. यापैकीं १४,९०० वन्य व ८३०० मुसुलमान आहेत. येथें तीन प्रकारचे लोक राहतात. ते केई, पॉपन व मलाया हे होत. केई द्वीपाचे लोक खोदींव कामांत पटाईत असून यांस उत्तमप्रकारचीं जहाजें बांधतां येतात.

केओंझर संस्थान—ओरिसामधील एक मांडलीक संस्थान. ओरिसामध्यें जीं मोठीं संस्थानें आहेत त्यांत या संस्थानचा नंबर दुसरा आहे. या संस्थानचें क्षेत्रफळ ३०९६ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस सिंगभूम जिल्हा, पूर्वेस, बॅलॅसोर जिल्हा व मयूरभंग संस्थान, दक्षिणेस कटक जिल्हा व पश्चिमेस पाललहरासंस्थान आहे. केओंझर संस्थानचे, लोअर केओंझर व अपर केओंझर असे भाग पाडण्यात आले आहेत. लोअर केओंझरमध्यें पुष्कळ दऱ्याच दऱ्या आहेत; व अपर केओंझरमध्यें पर्वताच्या रांगा आहेत. अपर केओंझर प्रदेश शत्रूपासून बचाव करण्याच्या कामीं फार उपयुक्त आहे. या पर्वतावर पुष्कळ पठारें असून तेथें बरींच कुंपणें व पेराऊ जमीनहि आहे. या पर्वतामध्येंच वैतरणी नदीचा उगम झाला आहे. गंधमादन, ठाकुराणी, टोमाक, बोलट, हीं पर्वतशिखरें असून गंधमादन शिखराची उंची ३४७९ फूट आहे.

प्राचीनकाळीं केओंझर संस्थानचा समावेश मयूरभंज संस्थानांत झाला होता. पण २०० वर्षांपूर्वीं येथील डोंगराळ जातींनीं, मयूरभंज संस्थानचें वर्चस्व झुगारून दिलें व आपलें स्वतंत्र संस्थान स्थापन केलें. या संस्थानावर आतांपर्यंत ३६ संस्थानिकांनीं राज्य केलें आहे. १८५७ च्या बंडामध्यें या संस्थानच्या राजानें इंग्रजांना मदत केली. याकरिता त्याची खंडणी कमी करण्यात येऊन त्याला महाराजा हा किताब देण्यांत आला. पुढें हा महाराजा वारल्यामुळें व याला औरस संतति नसल्यामुळें ब्रिटिश सरकारनें याचा दासीपुत्र यास राज्यावर बसविलें. त्यामुळें चिडून जाऊन, भुइया व जुभांग या जातींनीं बंड केलें. पण ब्रिटिशांनीं आपलें सैन्य संस्थानिकाच्या मदतीला पाठवून या बंडाचा मोड केला. १८९१ मध्यें या डोंगराळ जातींनीं

पुन्हां बंड केलें; पण पुन्हां ब्रिटिशांच्या मदतीनें या बंडाचें पारिपत्य करण्यांत आलें. संस्थानचें सालिना ३ लाखाचें उत्पन्न असून ब्रिटिश सरकारला यातून १७१० रुपये खंडणी द्यावी लागते. या संस्थानची लोकसंख्या १९११ सालीं १,८२,०२० होती. या संस्थानांत,१९३७ खेडीं असून, त्यात आनंदपूर नांवाचें एक महत्वाचें खेडें आहे. केओंझर नांवाचें राजधानीचें एकच शहर आहे. एकंदर लोकसंख्ये-पैकीं हिंदु चैतन्यवादी, पान, खंडैत, गौर, होस, भूइया,कुर्मी गौंड, खोंड, गौर, बाथुडी इत्यादि अनेक जातीचे लोक आहेत. राज्यकारभाराच्या सोईकरिता, आनंदपूर व चांपेश्वर असे दोन भाग पाडण्यांत आले आहेत. संस्थानांत ३ धर्मार्थ दवाखाने, २ माध्यमिक शिक्षणाच्या व ९१ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आहेत.

केकती—(घायपात)यास लॅटिन आगेव व्हीव्हीपॅरा; मराठी केकती, केकताड, पारखंड, घायाळ, घायपत व गुजराथींत घापत, इत्यादि नांवें आहेत. अननस किंवा केवड्याच्या पानासारखीं या झाडाचीं पानें असतात. परंतु अननसाच्या पानांहून तीं रुंद असून त्याच्या कांठावर बारीक वांकडे व करवतासारखे समांतर कांटे असतात व पानाच्या शेवटीं अग्रावर एक भाल्यासारखा आंखूड कांटा असतो. हीं पानें आकारानें तरवारीसारखीं फार दळदार असून त्याचा रंग कांहीं जातींत पिंवळसर हिरवा व कांहीं जातींत हिरवागार असतो. ह्याच्या आखूड बुडख्यांतून एकांत एक गुंतलेल्या पानांतून एक उंच दांडा वर निघतो व त्यास फुलें येतात. फुलाचा बार निघून गेल्यानंतर ज्या झाडापासून दांडा निघाला असेल तें मूळ झाड मरून जातें. पण त्याच्याच बुडख्यापासून कोंब फुटून नवीं झाडें उगवलेलीं असतात.

केकतीच्या अनेक जाती आहेत. त्या सर्वांचें जन्मस्थान अमेरिका खंड आहे. त्यात मेक्सिको देशात हीं झाडें विपुल सापडतात. तथापि सध्या जगांतील बहुतेक उष्ण प्रदेशात यांचा प्रसार झालेला आहे. इ. सन १५६१ त घाय-पात अमेरिकेंतून यूरोपखंडात येऊन, तेथून हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांनीं प्रथम याची लागवड केली.मद्रास इलाख्यात व हिंदुस्थानातील इतर सर्व भागात कुंपणाला घायपात लावतात. तसेंच केवळ तंतूच्या उत्पन्नाकरितां याची लागवड कांहीं ठिकाणीं हिंदुस्थानांत झाली आहे. ह्या झाडाच्या पानापासून व मुळ्यापासूनहि वाख निघतो. पानांत सरळ व उभे तंतू असतात. त्यांचीं वस्त्रें होतात व तीं फार टिकाऊ निघतात.

सदरहू झाडाच्या पाती कापून त्या पाती लांकडी साचांत ठेवून लोखंडी पकडीनें ओढतात. त्यापासून फारच उत्तम असा दोरा निघतो; व तो विलायतेंत जाऊन त्याचें कापड बनतें. पूर्वी याचा उपयोग आपल्या देशात होत नव्हता. परंतु मुंबई येथील प्रसिद्ध मेसर्स एन. फत्तेअल्ली कंपनीनें याचा उपयोग करण्याची सुरुवात केली. हल्लीं माग लोक या पाती कापून भिजवून त्यांपासून (वाख) दोरा तयार करतात. परंतु जसा साचाचा दोरा सफाईदार असतो तसा हा नसतो. शिवाय हल्लीं काहीं मुंबईच्या कंपन्या याच्या दोऱ्याकरिता काहीं जमीनी खरेदी घेऊन त्यात ह्या झाडाची, नवीन लागवड करून वाफेच्या यंत्रा-पासूनहि सूत तयार करितात.

फुलें येण्याच्या हंगामात वर निघालेल्या दांड्याला फुलें लागणारा मधला बारीक शेवट कापून टाकला म्हणजे त्यापासून आंबट रस पुष्कळ निघतो तो शिजवून "पुलक" आणि "मेक्सिकल" नावाची दारू तयार करितात. आपल्या इकडील ताडीप्रमाणें या दारूचा अमेरिकेंत फार खप होतो. रसाचा लाखों रुपयाचा व्यापार करितात. व त्यांत साब-णासारखीं काहीं द्रव्यें घातलीं असतां त्याचाहि उपयोग होतो. जुनाट झाडाच्या बुंध्याला फुटलेले कोंब काढून लाविल्यास त्यापासून नवीन झाडें उत्पन्न होतात. ह्या झाडाच्या पुऱ्या वाढीस १० । १२ वर्षे तरी लागतात.

ह्या झाडाची लागवड दोन प्रकारानें होते. एक याच्या दांड्यास फुलें आल्यानंतर बी धरतें. त्या बियापासून व दुसरी रीत म्हणजे झाडाच्या बुंध्यास लागलेल्या कोंबापासून लागवड करणें हेंच जास्त सोईचें व खातरीचें असतें. एक दोन वर्षांची कोंवळीं झाडें आणूनहि पावसाळ्याच्या आरंभीं लावावीत. कुंपणासाठीं केकती लावणें असल्यास दोन फूट अंतरानें कोंब लावावे. म्हणजे ३ । ४ वर्षांत सर्व झाडें एकत्र होऊन उत्तम कुंपण होईल. जमीन सुपीक होण्या-साठीं केकतीचें शेतच करणें असेल, तर दहा फूट अंतरानें कोंब रांगेनें लावून प्रत्येक रांगेंत पांच किंवा सहा फूट अंतर सोडावें. ह्या झाडाची लागवड करण्यास बरड, ताबडी, रेताड किंवा दगडगोटे असलेलेली जमीन सुद्धा उपयोगी पडते.

याची लागवड नवीन करणें झाल्यात जमीन दोन वेळ कुळवावी व नंतर चार फूट रुंदीचे वरंबे दोन वरंब्यांत आठ फूट अंतर ठेऊन करावे. वरंब्याला दर एकरी शेणखत सुमारें दहा गाड्यांपर्यंत देऊन ते मातींत कालवून ती माती वर चढवावी. जून महिन्यात चांगला पाऊस झाल्यावर वरंब्यावर दोन चौरस फूट अंतरानें लहान रोपाच्या दोन ओळी लावाव्या. पाण्याच्या सोयीप्रमाणें एकदोन वर्षे उन्हाळ्यात दोनदा पाणी द्यावें व मधील जागा कोळपून स्वच्छ ठेवावी. लागवड होऊन चारपाच वर्षे झालीं म्हणजे वाखासाठीं पानें कापावीं.

केकतीचे तंतू काढण्याची दुसरी रीत.—लांब व मोठीं पानें विशिष्ट प्रकाराच्या हत्यारानें कापितात. नंतर पानाच्या लांबलांब चिरण्या करून त्या एक दिवस उन्हांत वाळवितात व त्याच्या लहान लहान जुड्या बांधून पाण्यात भिजत टाकितात. याचा वाख काढण्याची सोपी रीत म्हटली म्हणजे पानाच्या चिरण्या एका फळीवर ठेऊन त्या

एका लोखंडाच्या पात्यामधून वरचेवर सर्व रस व चोथा निघून जाईपर्यंत ओढणें ही होय. अशा रीतीनें वाख काढल्यानंतर तो धुवून वाळवितात. या पद्धतीनें दर एकरीं सुमारें एक हजार पौंड वाख निघतो (तीस ते पन्नास पानांपासून सुमारें एक पौंड निघतो). पुण्यानजीक गणेशखिंडीतील बागेंत निरनिराळ्या घायपाताच्या जातींचा दोन तऱ्हेनें वाख काढिला होता. त्याचा तपशील पुढें दिला आहे:--

वाखाच्या शंभर पौंडांचें प्रमाण.

जातीचें नाव	यंत्रानें काढलेला	भिजत घालून काढलेला
गावठी केकताड	६. ४२	५. ६६
सिसल	३. ७१	३. ८५
वुरुट (आखूड पानाचा)	४. ५०	४. ४७
अमेरिकन	२. ७३	१. ६९
मोठया पानाचा	२. ०	१. ७८
युका	१९.१७	१०. ०

या अनुभवाचा परिणाम धंद्यावर आज किती झाला आहे हें सांगता येत नाहीं [वॅट].

केकय—भारतवर्षीय भरतखंडस्थ देश. हा आग्नेय कोसलच्या उत्तरेस असावा. येथील राजास केकय हें नाव सर्वसाधारण असें असे; परंतु अंतर्गत नाव प्रत्येकाचें भिन्न भिन्न आहे. दशरथाच्या वेळीं अश्वपति नावाचा येथें एक राजा असून त्याची कन्या केकयी ही दशरथाची स्त्री होती. पांडवांच्या वेळेस येथील राजा धृष्टकेतु हा होता. याची राजधानी गिरिव्रज (राजगृह) नावाचें नगर ही होती.

केकरी—राजपुतान्यात अजमेर-मेरवाड संस्थानातील एक गांव व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरचें मुख्य ठिकाण. लोकसंख्या (१९११) ५९२६. पैकीं ४४३१ हिंदू, ११२२ मुसलमान व ३६६ जैन आहेत. पूर्वी येथें व्यापारास फार तेजी होती अलीकडे या स्थलाचें व्यापरी दृष्टया महत्व फार कमी होत चाललें आहे. येथें पाण्याचा पुरवठा फार कमी असून पाणीहि वाईट आहे. येथें कापूस पिंजण्याची एक गिरणी व कापसाचे गठ्ठे बांधण्याचे तीन कारखाने आहेत.

केकुल फ्रेडरिक ऑगस्ट-(१८२९-१८९६)हा जर्मन रसायनशास्त्रज्ञ लीबिकच्या हाताखालीं रसायनशास्त्र शिकला. यानें आपली स्वतःचीच लहान प्रयोगशाळा काढली रासायनिक रंगाच्या धंद्याच्या उत्कर्षास हा कारण झाला.

कर्बयुक्त संयुक्त पदार्थांचें संशोधन हें त्याचें महत्वाचें कार्य होय. याचे परिणाम फार दूरवर पोहोंचणारे दिसून आले. बेन्झिनच्या घटनेची त्यानें दिलेली उपपत्ति इतकी महत्वाची आहे कीं, सेंद्रिय रासायनिक पदार्थांपैकीं जवळ जवळ तीनचतुर्थांश पदार्थ या बेन्झिनच्या घटनेच्या ज्ञानामुळें तयार करता येऊं लागले. तसेंच डांबरापासून रंग तयार करण्याची कृति वरील घटनेच्या ज्ञानाशिवाय अस्तित्वात येणें अशक्य आहे.

केंजळगड, अथवा घेरखेळज किल्ला—वाईच्या वायव्येस ११ मैल अंतरावर असलेल्या महादेव पर्वतश्रेणीच्या माढरदेव शिखरावर हा किल्ला असून समुद्रसपाटीपासून हा ४२६९ फूट उंच आहे. यावर जाण्यास वाईच्या बाजूस याच्या पायथ्याशीं असलेल्या असरें किंवा खवली या खेड्यांतून जावें लागतें. टेंकडीवरील चढाव फार मोठा आहे. किल्याकडे जाण्यास पायऱ्या आहेत व त्यांच्या तळाशीं एक बुरूज आहे. किल्याच्या भिंती दगडाच्या आहेत. यांतील घरें पडलेलीं आहेत. यात शाबूत असें घर म्हणजे दारूखाना होय. यात पाण्याची मोठी तीन व धान्य साठविण्यासाठीं लहान सहा टाकीं आहेत. किल्यावर पाण्याचा जिवंत झरा नाहीं. या पर्वतश्रेणीच्या उत्तरेकडील बाजूवर असलेल्या व्होहोली नावाच्या खेड्यात या किल्यातील शिबंदी रहात असे. बाराव्या शतकांत जे पन्हाळ्याचे भोजराजे उदयास आले त्यांनीं हा किल्ला बांधिला असें म्हणतात. एल्फिन्स्टन म्हणतो कीं जर हा किल्ला चांगल्या रीतीनें लढविला तर शत्रूस अभेद्य आहे. जनरल पिटझरच्या तुकडीच्या स्वाधीन होण्यापूर्वी सातारा प्रांताच्या ज्या थोड्या किल्यांनीं तोफा डागल्या होत्या त्यांपैकीं हा एक आहे.

केटर हेन्री—(१७७७-१८३५) इंग्लीश-जर्मन-पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता. प्रथमतः त्याचा विचार कायद्याचा अभ्यास करण्याचा होता. परंतु त्याच्या बापाच्या मृत्यूनंतर त्यानें सैन्यात प्रवेश केला. त्याला बाराव्या रेजिमेंटमध्यें कमिशन मिळालें व त्यामुळें तो हिंदुस्थानांत आला व त्यानें (१७९४ ते १८०८ च्या दरम्यान) हिंदुस्थनची त्रिकोणमितीच्या सहाय्यानें पहाणी केली. आरोग्याकरिता त्यानें हिंदुस्थान सोडलें. इंग्लडास जाऊन त्यानें सँढर्स्ट येथील लष्करी कॉलेजात प्रवेश केला. तेथील परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यानें कॅपटनची जागा मिळविली. पुढें सन १८१४ सालीं पेन्शन घेऊन शेषायुष्य त्याने शास्त्रीय शोधांत घालविलें. कासेग्रेनिअन आणि ग्रेगोरिअन दुर्बिणींची तुलना करून त्यानें असें ठरविलें कीं, या दोहोंपैकीं पहिली दुसरीपेक्षा ५ : २ या प्रमाणात जास्त प्रकाश देते. एक सेकंदलंबक बसवून त्याप्रमाणें लंडन आणि दुसरीं काहीं स्थळें येथील एक सेकंडलंबकाची लांबी त्यानें काढली. खगोलशास्त्रीय दुर्बिणींत त्यानें काहीं सुधारणा करून दाखविल्या. रशियातील मापाच्या तुलनेसंबंधानें अत्यंत परिश्रम घेऊन तीं मापें निश्चित केलीं. त्याच्या या कामाबद्दल राशियन सरकारनें त्याचा बहुमान (१८१४)केला. सन १८१५ सालीं त्याला रॉयल सोसायटीनें आपला सभासद करून घेतलें.

केटी—मुंबई इलाख्यातील कराची जिल्ह्याच्या घोडाबारी तालुक्यांतील एक शहर व बंदर. सिंधुनदीच्या हजाम्रो

नांवाच्या फांट्यावर समुद्राच्या लगत हें शहर वसलेलें आहे. १९०१ मध्यें या शहराची लोकसंख्या २१२० होती. हें शहर सिंधुनदीच्या खोऱ्यांतील एक प्रमुख बंदर व व्यापाराचें शहर आहे. कराचीच्या खालोखाल या बंदराचा नंबर लागतो. हें बंदर ५० वर्षांपूर्वीचें आहे. त्याच्यापूर्वी घोडाबारी बंदराची व्यापाराबद्दल ख्याती असे. या बंदरातून ज्वारी, कडधान्य, लोंकर, कापूस, इत्यादि पुष्कळ जिन्नस मुंबई, मद्रास, सोनमियानी, मकाण इकडे जातात व मुंबई, मद्रास, मकाण इत्यादि ठिकाणांहून नारळ, कापड, धातु, साखर इत्यादि जिन्नस या बंदरांत येतात. १९०३-४ मध्यें या बंदरांतून बाहेरदेशीं ५,३०,००० रुपयांचा माल गेला; व १,०५,००० रुपयांच्या मालाची आयात झाली. बाहेरच्या देशाहून आलेला माल प्रथम येथें उतरून नंतर तो कराची जिल्ह्यांतील सिंधुनदीच्या मार्गानें जातो. हें बंदर थोडेसें उंचावर वसलें असल्याकारणानें नदीला पूर आला तर त्याची फारशी नुकसानी होत नाहीं. या बंदराहून ठठ्ठा, मिरपूर, घोडावारी या शहराकडे रस्ता गेला आहे. १८५४ सालीं येथें म्युनिसिपॅलिटीची स्थापना झाली. शहरामध्यें एक दवाखाना व एक शाळा आहे.

केटो मार्कस पोर्शिअस (ख्रि. पू. २३४-१४९) हा रोमन मुत्सद्दी टस्कुलम येथें जन्मला. त्याचें कुल लष्करी कामाकरितां प्रसिद्ध होतें; व्हॅलेरियस फ्लॅकस या गृहस्थाचें त्याजकडे लक्ष गेल्यामुळें त्यास त्यानें रोम येथें आणलें. रोम येथें आल्यावर तो अनुक्रमें क्वेस्टर, एडाइल, प्रीटर व कॉन्सल झाला. मध्यन्तरीं तो आफ्रिकेंत गेला व झामाच्या स्वारींत त्यानें बराच भाग घेतला नंतर सार्डिनिया व स्पेनमधील स्वाऱ्यांत तो होता. स्पेनमधील स्वारीनें त्याची बरीच कीर्ति झाली. ख्रि. पू. १९१ सालीं त्यानें ट्रिब्यूनचें काम केलें. लष्करी दृष्टीनें त्याची कीर्ति अढळ झाली होती. आतां त्यानें स्वदेशांत राहून कामगिरी बजाविण्याचें ठरविलें. केटोचें आफ्रिकेंतील स्वारीपासून सिपियो याजबरोबर वैर उत्पन्न झालें होतें. तेव्हां लवकरच सिपियोवर लांच घेतल्याबद्दल मुकदमा सुरू झाला; यांत केटोचें प्रत्यक्ष अंग होतें असें म्हणावयास जागा नाहीं. हा सेन्सर या उपनामानें प्रसिद्ध होता.

पूर्वीच्या साध्या रोमन राहणीचा नाश करून अस्तित्वात येऊं पहाणाऱ्या नवीन हेलेनिक संस्कृतीस विरोध करण्याचें व्रत त्यानें अंगिकारिलें. या नवसंस्कृतीस आळा घालणें हेंच तो आपलें पवित्रतम कर्तव्य मानूं लागला. तो सेन्सॉर असतांना हें अंगीकृत कार्य तडीस नेण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला. सेन्सार झाल्यापासून मरेतांपर्यंत तो जरी अधिकारावर नव्हता तरी सीनेटमध्यें नवविचाराचा प्रतिस्पर्धी म्हणून तो प्रसिद्ध होता. मुत्सद्दी या नात्यापेक्षां लेखक या नात्यानें केटोचें महत्व अधिक आहे लॅटिन भाषेंत गद्य लिहिण्यास त्यानेंच प्रथम प्रारंभ केला. लॅटिन भाषेंत रोमचा इतिहास लिहिणारा हा पहिला लेखक होय. शेतकीवरहि त्यानें 'डी ॲग्रिकल्चरा अथवा डी रेरस्टिका' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. ओरिजिन्स नांवाचीं रोमच्या इतिहासाचीं सात पुस्तकं त्यानें लिहिलीं. त्याचीं भाषणेंहि संकलित आहेत.

केटो मार्कस दुसरा —(ख्रि. पू. ९५-४६) वरील केटोचा नातू. थोडा युद्धाचा अनुभव मिळाल्यावर हा ट्रिब्यून झाला. ख्रि. पू. ४९ मधील यादवींत हा पापीच्या बाजूस होता. शत्रूच्या हातीं सांपडू नये म्हणून यानें आत्महत्या केली.

केडीझ—हें स्पेनमधील केडीझ प्रांतांतील शहर व बंदर आहे. येथील लोकसंख्या (१९१७) ६६१०६ आहे. याला मुख्यत्वेंकरून भव्य आखातामुळें व्यापारी महत्व आलें आहे. जलवेष्टणामुळे येथील हवा समशीतोष्ण आहे. येथील वार्षिक सर्वसाधारण हवामान ६४ ° इतकें आहे. शहराभोंवती तट असून पांच दरवाजे आहेत. केडीझ ही धर्मोपदेशकाची जागा आहे. येथें बायकांसाठीं दवाखाना, अनाथबालकाश्रम, वेड्यांचें इस्पितळ यासारख्या अनेक धर्मार्थ संस्था आहेत. पुष्कळ मुलांनां फुकट शिक्षण दिलें जातें. गणित, व्यापार, वैद्यक वगैरे विषयांचीं विद्यापीठें येथें आहेत.

येथील बंदराचें काम जुनाट व अपुरें आहे. एक सडक व एक आगगाडीचा रस्ता ही येथील मुख्य प्रदेशाशीं दळणवळणाचीं साधनें आहेत. येथें बहुतेक मोठमोठया कंपन्यांच्या बोटी येऊन लागतात. मीठ, अंजीर, तयार केलेलीं बुचें, दारू, हे येथील निर्गत व्यापाराचे पदार्थ आहेत. जळाऊ लांकडें, लोखंड, यंत्रें, इमारतीचें सामान हा आयात माल आहे.

इ. स. १६२६ मध्यें बकिंगहॅमच्या ड्यूकनें केडीझवर स्वारी केली. इ. स. १७०२ मध्यें ब्रिटिशानींहि स्वारी केली. १८ व्या शतकात केडीझची संपत्ति अतिशय वाढली. इ. स. १७२० ते १७६५ पर्यंत स्पॅनिश अमेरिकेशीं बहुतेक व्यापार चालत असे. व तेव्हा दरवर्षी ५०,००,००० पौंड किंमतीच्या सोन्याची व चांदीची आयात होती. परंतु या शतकाच्या शेवटीं या प्रांताचे दुर्दैवाचे दिवस आले. सन १८०० मध्यें नेल्सनने हें ठिकाण घेतलें. इ. स. १८२० मध्यें झालेल्या क्रांतीच्या वेळीं सातव्या फर्डिनंडला येथें कैदेंत ठेवलें होते. इ. स. १८६८ मध्यें इसाबेला राणीला गादीवरून काढण्याकरिता झालेल्या क्रांतींत केडीझनें प्रमुख भाग घेतला होता.

केणी—ही एक जंगली भाजी आहे. ती पाणथळ जागेंत बारा महिने असते. कांहीं जाती पावसाळ्यांत ओसाड जागीं व शेतांतहि उगवतात. तिचे सरपटत जाणारे हात दोन हात वेल वाढतात. फुलें निळीं, जांभळीं व तेजदार असतात. कित्येक लोक हिचीं कोंवळेपाणी शिजवून भाजी करतात. [पदे]

केदारनाथ—संयुक्तप्रांत. गढवाळ जिल्ह्यांत महापथ नांवाच्या बर्फाच्छादित शिखरालगतचें देवस्थान. समुद्रसपाटीपासून उंची सुमारें ११७५३ फूट आहे.

चहूंकेर मोठाले उंच पर्वत असून मध्यें दोनअडीच कोसांचें मैदान आहे. त्या मैदानांत मध्यभागीं केदारनाथाचें मंदिर

आहे. आसमंतात सर्व हिमालयाचीं शिखरें आहेत त्यांवर बर्फ असल्यामुळें तीं सर्व रुप्यासारखीं चकाकतात. केदारेश्वराच्या मंदिरासभोंवतीं अष्टदिशांस ईशान्य तीर्थ, दक्षिणामूर्ति तीर्थ इत्यादि तीर्थें आहेत. केदारेश्वराचें देऊळ पांडवांनीं बांधिलें असें सांगतात. देवळावर शिखर केलेलें नाहीं. देवळाचा परिघ मोठा असून तें फार जुनाट आहे. देवळात नेहमीं घोंट्याइतकें पाणी असतें. बाहेर मंडपांत इतर देवतांचीं स्थानें आहेत. मुख्य गर्भगृहांत केदारेश्वर आहे. तो लिंगाकार नसून मोठा रेडा बसतो त्या आकाराचा आहे. त्याच्या मागच्या बाजूस पुच्छाप्रमाणें आकार दिसतो. पांडवांचा स्पर्श होऊं नये म्हणून शंकरानें रेड्याचें रूप घेऊन पाताळांत शिरण्याचा प्रयत्न केल्याचें हें द्योतक आहे असे सागतात. त्या प्रदेशीं बिल्ववृक्ष नाहींत; याकरता मार्गांत जें भिल्लकेदार स्थान आहे, तेथून यात्रेकरू बिल्वपत्रें बरोबर आणून तीं केदारनाथास अर्पण करितात.

येथील रावळ (पुजारी) म्हैसूर किंवा दक्षिण हिंदुस्थान या भागातले बहुधा नंबुद्रि ब्राह्मणापैकींच असतात. केदारक्षेत्रीं भृगुपतन (भैरवझाप) म्हणून एक हिमालयाचें शृंग आहे. त्या शृंगावरून उडी टाकून देहत्याग केला असतां त्यास आत्महत्येचा दोष नसून त्याच्या मनात ज्या फलाची वासना असेल तें फल त्याला पुढील जन्मीं प्राप्त होतें, असें क्षेत्रमाहात्म्यात लिहिलें आहे. म्हणून मागें पुष्कळ यात्रेकरू येथें उडी घेत. पण ब्रिटिश सरकारनें ही चाल बंद केली. केदार येथें देवस्थानें व तीर्थे आहेत तीं पुढीलप्रमाणें:-

काष्ठाद्रिपर्वत, कठोरग्राम, वालखिल्यगंगातीर्थ, पोवयाचा पर्वत, त्रियुगीनारायण, रुद्रकुंडतीर्थ (येथें स्नान केलें पाहिजे), विष्णुकुंडतीर्थ (येथें वंदन), वासुकीगंगा, शीलमीलपट्टण, गौरीकुंड तीर्थ, तप्तकुंडतीर्थ, गौरीश्वरमहादेव, मंदाकिनीतीर्थ, गौरीदेवी, वीरभैरव (येथें देवास वस्त्र वाहिलें पाहिजे), भीमगोडा, दुग्धगंगातीर्थ, स्वर्गद्वारतीर्थ, केदारेश्वर महादेव, ईशानेश्वर, संगमेश्वर महादेव (येथें पिंडदान केलें पाहिजे), उदककुंड, रेतोदककुंड (येथें उदकपान केलें पाहिजे), नंदीमहाकाव्य, भृगुपतनपर्वत, स्वर्गारोहण मार्ग, महापथ (म्हणजे कैलासमार्ग), इत्यादि. [अट्किनन्स—हिमालयन गॅ. २; ओकले—होली हिमालय; शेरिंग—वेस्टर्न तिबेट; मूर—नोट्स ऑफ ए ट्रिप टु केदारनाथ; तीर्थयात्राप्रबंध.].

केदारभट्ट—वृत्तरत्नाकर ग्रंथाचा कर्ता. त्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, केदार हा काश्यपगोत्री पिब्वेकाचा (पब्बेक-ऑफ्रेक्ट) पुत्र. केदारभट्टाच्या ग्रंथांतून, वासवदत्त ग्रंथावर टीका करतांना शिवराम नामक टीकारानें व मल्लिनाथ, पद्मनाभ, चित्रसेन व इतर ग्रंथकारांनीं पुष्कळ उतारे घेतलेले आहेत. वृत्तरत्नाकरावर सुल्हणाची ' सुकविहृदयानंदिनी ' नांवाची टीका आहे. [पीटर्सन रिपोर्ट १८९४]

केंदूर—पुणें जिल्ह्यांत शिरूर ताल्लुक्यांत शिरूरपासून १० कोसांवर हें गांव आहे. येथें बाजारपेठ आहे. थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांनीं हा गांव मस्तानीस इनाम दिला होता असें म्हणतात. याच्याजवळ असलेल्या पाबळ गावीं मस्तानीची कबर आहे, तिला इनाम म्हणून हें गाव दिलें असावें असें वाटतें. गांवाजवळ एक वलीबावा नांवाच्या मुसुलमान अवलियाचें थडगें आहे. त्याचा उरूस भरतो. याच केंदूरचें प्रसिद्ध पाठक घराणें होतें. त्यात कान्होपंत, पिलोपंत व नामदेव हे पुरुष होऊन गेले (कान्हो पाठक पहा). या परगण्याचा दमाजी गायकवाडाच्या सरंजामात समावेश झाला होता. [पुणें ग्या. राजवाडे खं. १२].

केंदूली—बंगाल इलाख्यामधील बीरभूम जिल्ह्यामधील एक गाव. हें अजयनदीच्या कांठीं बसलेलें आहे या गावची लोकसंख्या १९०१ मध्यें ७७४ होती. या गांवीं, गीतगोविंद या संस्कृत काव्याचा कर्ता जयदेव कवि जन्मास आला असें मानतात. जयदेवकवीच्या स्मरणार्थ येथें दरवर्षी पौष महिन्याच्या अमावास्येस प्रचंड यात्रा भरते.

केंद्रापारा, पो ट वि भा ग.—बिहार-ओरिसा. कटक जिल्हा. याचें क्षेत्रफळ ९७७ चौरस मैल आहे. १९११ साली या विभागाची लोकसंख्या ४,८५,९१८ इतकी होती. हा दलदलीचा प्रदेश असून यांतून पुष्कळ नद्या व ओढे वहात गेले आहेत. यात १३६८ खेडीं असून केंद्रापारा नावाचें एक शहर आहे. या विभागात केंद्रापारा धरून तीन तालुके आहेत.

श ह र.—केंद्रपारा तालुक्याचें मुख्य ठिकाण. हा बोटींचा धक्का असून कटकहून येणाऱ्या बोटी येथें लागतात. याची लोकसंख्या १९११ सालीं १५,११३ भरली. या शहराच्या आसपास तादूळ पुष्कळ होत असल्यानें हें शहर व्यापारी बनलेलें आहे. या शहरापासून कटक, जयपूर चादबाली या शहराकडे रस्ता गेलेला आहे. १८६९ मध्यें या शहरांत म्युनिसिपालिटी स्थापन झाली. या ठिकाणीं पुष्कळ सार्वजनिक इमारती असून शिवाय एक चांगली शाळा व दवाखाना आहे. येथें एक सार्वजनिक लायब्ररी स्थापन करण्यांत आली आहे.

केन—ही बुंदेलखंडातील एक नदी आहे. ही कैमूरच्या डोंगराच्या वायव्य भागातील उतरणीवर उगम पावून, ईशान्यगामी होऊन, संयुक्तप्रांतांतील बांदा जिल्ह्यामधील बिल्हर्की या शहराजवळून वहात जाते. अशा रीतीनें बांदा जिल्ह्यामधून शंभर मैल वहात गेल्यावर ती बांदा-फत्तेपूर या रस्त्यावरील चिल्ला नामक गांवाशेजारी यमुनेला मिळते. या नदीचें पात्र फार खोल असून हिच्यामधून लहान लहान नावा सहज जाऊं शकतात. बांदा येथील तिचें पात्र वालुकामय असून त्यांत गारगोट्या, दगड, व स्फटिकाचे तुकडे सांपडतात. या स्फटिकाचे दागिने करण्यात येतात. खरौनी येथें या नदीचें पात्र फार प्रेक्षणीय आहे. अजयगड संस्थानांतील बरियारपूर शहराजवळ या नदीस एक कालवा काढण्यांत आला आहे.

केनिया—आफ्रिका. केनियाची माहिती द्यावयाची म्हणजे ब्रिटिश पूर्व आफ्रिकेची माहिती द्यावी लागेल. ब्रिटिश पूर्व आफ्रिकेंत ईस्ट आफ्रिकन प्रोटेक्टोरेट, युगांडा, झांझिबार, व पेंबा बेटें हीं येतात. किनाऱ्याकडचा थोडा भाग सोडला तर सर्वच देश म्हणजे पूर्वआफ्रिकेचें पठार असून त्याची कमींत कमी उंची दोन हजार फूट व जास्तींत जास्त उंची ६ ते ८ हजार फूट आहे. या लेखात फक्त पूर्व आफ्रिकेच्या संरक्षित संस्थानाची माहिती दिली असून 'झांझिबार' व 'युगाडा' यांची माहिती वेगळ्या लेखात सापडेल.

स्थ ल व र्ण न—उंबा नदीपासून जुबा नदीपर्यंत व आत युगांडासरहद्दीपर्यंत हा मुलूख पसरला आहे. झांझिबारच्या सुलतानाचा कांहीं प्रदेश लामु द्वीपसमूह व किस्मायु किल्ल्याच्या भोंवतालचा १० मैलाचा टापू यांत येतो.

याचें क्षेत्रफळ २,४६,८२२ चौ. मैल असून लोकसंख्या २८,०७,००० आहे. पैकीं ५३६२ यूरोपियन व १७० आशियाटिक लोक आहेत.

समातर असणाऱ्या प्रदेशापैकीं किनाऱ्यालगतचा अथवा 'टॅबोररी' हा पहिला भाग होय. या प्रदेशाची रुंदी फार नाहीं. किनाऱ्यावर बऱ्याच खाड्या असून मोंबासा अथवा म्व्हीटा, लामू, मंडा, आणि पट्टा हीं बेटें आहेत. या प्रदेशापलीकडे 'यीका' नावाचा सपाट प्रदेश आहे. यानंतर पर्वताच्या ओळी आहेत. पुढें गवताचीं मोकळीं मैदानें असून त्यात कॅप्टे अथवा कॅपोटे आणि अॅथि हीं विशेष मोठीं आहेत. या भागात सर्वात उंच शिखरें केनिया(१७००७फू.), सॅट्टिमा (१३,२१४ फू) व नंदरुआ (१२,९०० फू.) हीं आहेत. सॅट्टिमा अथवा अॅबरडेअर पर्वताची सर्वसाधारण उंची १०,००० फूट आहे. रुबाकी व टाना या दोन मोठ्या नद्या आहेत. ग्वासोन्थिरो नदी लोरियन दलदलींत नाहींशी होते. रिफ्टव्हॅलींत बरीच तळीं आहेत. दक्षिणेस डोजिलानी मैदानें आहेत. याच्या उत्तरेस सुस्ता व लॉगोनोट हीं मृत ज्वालामुखीचीं शिखरें असून नैवाशा सरोवर आहे. याच्या उत्तरेस अनुक्रमें माउंट, वरु, आणि नॅकुरो, हॅनिंग्टन, बॅरींगो बसुगोटा हीं सरोवरें आहेत. यांच्या उत्तरेस रुडाल्फ सरोवर आहे. रिफ्टव्हॅलीच्या पश्चिमेस माऊएस्कार्पमेंट, एलजीयो एस्कार्पमेंट, कांहीं सुपीक जमीन व व्हिक्टोरियानियांझा आहेत. रुडाल्फसरोवराच्या पूर्वेस व स्टेफॅनीच्या दक्षिणेस एक मोठें निर्जल मैदान आहे. अबिसीनिया व हें संस्थान याच्यामध्यें गोरोएस्कार्पमेंट आहे.

भू स्त र व र्ण नः—ब्रिटिश पूर्वआफ्रिकेंत भूस्तररचनेत वेगळाले असे चार प्रदेश आहेत. समुद्रकांठचा भाग म्हणजे अलीकडच्या खडकाचा झालेला आहे. पायथ्याजवळचें पठार अगदीं खालच्या खडकी थराचें बनलेलें आहे. टाऊपासून डिकुयुपर्यंतचें प्राचीन पठार जुन्या स्फटिकाच्या थराचे बनलें आहेत. त्यांवर ज्वालामुखीच्या खडकाचा थर बसून त्यामुळें मध्यपूर्वआफ्रिकेच्यों ज्वालामुखीचें पठार तयार झालें आहे. ज्वालामुखी पर्वतोंचे क्षेत्रफळ १,५०,००० चौ. मैल आहे.

ह वा मा न, व न स्प ती व प्रा णीः—हवामान व वनस्पती ह्या बाबतीत सुद्धा ब्रिटिश पूर्वआफ्रिकेचे किनाऱ्याशी समातर असे भाग पडतात. किनाऱ्याजवळच्या प्रदेशाची हवा उष्ण परंतु निरोगी आहे. येथें सुमारें ३५ इंच पाऊस पडतो. यानंतरच्या प्रदेशात हवा जास्त उष्ण आहे. डोंगरांत म्हणजे ५००० फूट उंचीच्या प्रदेशात हवा फार निरोगी आहे. ५००० फूट उंचीवर हवा फार थंड असते. व्हिक्टोरिया-नियांझाच्या भोंवतालच्या प्रदेशातील हवा फार उष्ण आहे. डिसबरपासून एप्रिलपर्यंत येथें उन्हाळा असतो. मार्चपासून जूनपर्यंत व नोव्हेंबर, डिसेंबरमध्यें पाऊस पडतो. येथें कधीं कधीं अवर्षणें पडतात.

येथें नारळाचीं झाडें, मॅनग्रोव्ह, एबनी, आलीव्ह, जुनीपीअर, बाबू हीं झाडें असून कापूस व अंजीरहि होतात. कांहीं ठिकाणीं मोठाल्या झाडांचीं अरण्यें असून त्यांच्या सर्वांत खालच्या फांद्या जमिनीपासून ५० फुटावर असतात. मौल्यवान रबराच्या वेलाच्या दोन जाती येथें सापडतात.

जनावरांत उंट, हत्ती, गेंडा, रेडा, काळवीट, झिब्रा, जिराफ, पाणघोडा, सिंह व माकडाच्या पुष्कळ जाती येथें आहेत. यांत गेंड्याची संख्या जास्त असून त्यांच्यापासून फार भय असतें. मोठाल्या नद्यात व व्हिक्टोरिया नियांझात सुसरी सापडतात. येथें घोणा, विंचू व डांस बरेच आहेत. शहामृग, माळढोंक, बगळे, फ्लेमिंगो वगैरे पक्षी आहेत.

लो क.—किकुयुपठार, रिफ्टव्हॅली व केनिया भाग यात गोरे लोक असून ते बहुतेक शेतकरी आहेत. याच जिल्ह्यांत कांहीं हिंदी लोकांची वस्ती आहे. दक्षिणेस निग्रोंच्या बंटु विभागातील लोक आहेत. यांत बदुंबा, किकुयु व वन्थिका ह्या मुख्य जाती आहेत. व्हिक्टोरिया-नियांझाच्या ईशान्य किनाऱ्यावर कॅव्हिरोंडो लोक राहतात. हे लोक नग्न असतात. वायव्येस निलोटिक जाती सापडतात. याशिवाय मसाई, बोरनी व किनाऱ्याजवळ राहणाऱ्या सोमालींपैकीं हर्ती, वाडोरोबो नावाची पारध करून राहणारी जात, या जाती आहेत. समुद्रकिनाऱ्यावर स्वाहिली, अरब व हिंदी लोक सांपडतात.

प्रां त व श ह रे—केनियाचे खालील विभाग होतात. सेयीर्डी (राजधानी मोंबासा), उकंबा (राज. नैरोबी), केनिया (राज. न्येरी), टॅनालंड (राज. लामू), जुबालंड (राज. किस्मायु), नैव्हशा (राज.नैव्हशा), न्यांझांप्रांत (रा.किसुमू). या प्रांतांचे जिल्हे व पोटजिल्हे असे भाग पाडले आहेत. मोंबासा हें सर्वांत मोठें शहर असून त्याची लोकसंख्या सुमारें ३०,००० हजार आहे. मोंबासा शहराच्या समोर फ्रियरटाऊन शहरांत गुलामगिरीतून मुक्त झालेले लोक राहतात. लामू हें किनाऱ्यावरील अरबांचें प्राचीन ठाणें होतें. याशिवाय मलिंदी, पट्टा, किपीनी, व किस्मायु हीं किनाऱ्याच्या

वरील शहरें आहेत. मलिंद येथें १४९८ त वास्कोदगामानें उभारलेला स्तंभ आहे. युगांडा रेल्वेवरील नैरोबी हें संस्थान राजधानीचें शहर आहे. नैव्हशा हें त्याच नांवाच्या सरोवरा जवळ आहे. किसुम अथवा पोर्ट फ्लोरेन्स हें व्हिक्टोरियानियांझा सरोवराजवळच्या टेंकडीवर वसलेलें असून त्याचा युगांडा प्रांताशीं फार व्यापार चालतो.

द ळ ण व ळ णा चीं सा ध नें.—सडका तयार केल्यानें या संस्थानची बरीच भरभराट झाली. पूर्वी मोंबासाहून बर्कलेंबे पर्यंत (व्हिक्टोरिया नियांझावरील) मोठी सडक तयार केली होती. नंतर मोंबासाहून व्हिक्टोरियानिआंझा सरोवरापर्यंत ६१८ मैलांची रेल्वे बांधण्यांत आली. युगांडा रेल्वे ही डोंगरांतील रेल्वे आहे. रेल्वेनें गुलामांचा व्यापार बंद होऊन युगांडामध्यें ब्रिटिश सत्तेची चांगली घडी बसली. मोंबासाला बऱ्याच आगबोटींच्या कंपन्यांचीं जहाजें येतात. हिंदुस्थान व मोंबासामध्यें आगबोटीनें दळणवळण नेहमीं चालतें. देशांत तारायंत्र आहे.

शे त की व इ त र धं दे.—व्हिक्टोरियानियांझा व किनाऱ्यावरील प्रदेशांत तद्देशीय व हिंदी लोक शेतकी करतात, आणि यूरोपियन लोकांचे कांहीं मळेहि आहेत. तांदूळ, मका, इतर धान्यें, कापूस, तंबाखू, नारळ, मॅनग्रोव्ह झाडाची साल, एरंड, ऊंस ह्या वस्तू होत असून रबर गोळा करण्याकडे बरेच लोक खपतात. उंच प्रदेशांतील यूरोपियन वसाहतवाले भाज्या व त्यातल्यात्यांत बटाटे उत्पन्न करण्याकडे ज्यास्त लक्ष देतात. ओट, जंव, गहूं, कॉफी वगैरे येथें होतात. येथें जनावरांचे मोठाले कळप पाळतात.यांत मेंढ्या व शहामृग याची वाढ विशेषेंकरून करतात. इमारतीचें लाकूड व वाखांचीं झाडें किनारा व उंच प्रदेश यांमध्यें बरींच आढळतात. येथील जमीन हलकी, तांबड्या रंगाची व चिकणमातीची अशी असून कांहीं ठिकाणीं निवळ काळी जमीन आढळते.

वांख व कापूस या धंद्याखेरीज येथें डुकराचे मांस खारविण्याचा धंदा चालतो. देशी लोक कापड, चटया व टोपल्या तयार करतात. दगड, चुनखडी, तांबें यांच्या खाणी येथें असून थिका नदींत हिरे सांपडतात.

व्या पा र.—कापड, लोखंडी सामान व तयार माल हा मुख्य आयात माल असून तो विशेषतः हिंदुस्थान व यूरोपमधून येतो. हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन मिळून शेकडा ५०या प्रमाणात माल पाठवितात.येथील निर्गतींत युगांडाच्या बाह्य व्यापाराचा समावेश होतो.खोबरें, कातडीं, धान्य, बटाटे, रबर,हस्तिदंत, मिरच्या, मेण, कापूस व वांख या वस्तू परदेशी जातात. १९१७–१८ सालीं २८,०९,६८१ पौंडांची आयात असून १७,४१,९३९ पौंड निर्गत होती. संयुक्त संस्थानें व ग्रेटब्रिटननें हा माल घेतला.

शा स न प द्ध ति.—याची राज्यपद्धति क्राउन कालनीप्रमाणें असून सर्व सत्ता गव्हर्नरच्या ताब्यांत असते. त्याच्या हाताखालीं लेफ्टनंट गव्हर्नर असतो. प्रत्येक प्रांतावर कमिशनर असतो येथें कार्यकारी व कायदेकौन्सिलें आहेत.'दहा मैलांच्या पट्ट्यांत ' झांझिबारच्या सुलतानाचा अधिकार चालत असून तेथें अरब व तद्देशीय लोकांनां महंमदी कायदा लागू आहे. सुलताननें १९०७ मध्यें गुलामगिरीविरुद्ध कायदा केला. त्यापूर्वी १८९० च्या कायद्यान्वयें असें जाहीर केलें होतें कीं त्यानंतर जन्मलेल्यांना गुलाम करतां येणार नाहीं. संस्थानच्या इतर भागांत गुलामगिरी नाहीं. येथील न्यायपद्धति हिंदी न्यायपद्धतीप्रमाणें असून चालीरीती आफ्रिकन लोकांच्या प्रमाणें आढळून येतात. येथें २००० पोलीस व किंग्ज आफ्रिकन रायफलसच्या दोन पलटणी आहेत. जकात,परवाने, अबकारी, रेल्वे व पोस्ट या एकंदर उत्पन्नाच्या मुख्य बाबी होत. एतद्देशीय लोक झोपडीवर कर देतात. युगांडा रेल्वे झाल्यामुळें व्यापार व उत्पन्न यांची वाढ झाली १९१५–१६ मध्ये ११,६५,५६१ पौंड उत्पन्न व १०,७२,९१७ पौंड खर्च होता.

येथें मुख्य नाणें शिलिंग आहे. येथें मिशनरी लोकांच्या शाळा असून त्यांत धंदेशिक्षणहि देतात. मोंबासा येथें अरब शाळा आहेत. नैरोबी येथें हिंदी व यूरोपियन लोकांसाठीं सरकारी शाळा आहेत.

इ ति हा स—८ व्या शतकापासून ११ व्या शतकापर्यंत अरब व इराणी लोकांनीं किनाऱ्यावर वसाहती केल्या. पुष्कळ ठिकाणीं त्यांनीं राजकीय सत्ता स्थापन केली व लवकरच झेंज साम्राज्याचा उदय झाला. या वेळेपासून ब्रिटिश सत्तेच्या उत्कर्षापर्यंत किनाऱ्यावरील शहराचा इतिहास म्हणजे झांझिबारचा इतिहास होय ब्रिटिश पूर्व आफ्रिकेच्या आतल्या भागाचा शोध १९ व्या शतकाच्या मध्यात लुड्विग क्राफ, जोहानेस रेबमन हे जर्मन मिशनरी व बॅरन-व्हॉन डेर डेकेन यांनीं लाविला. व्हॉन् डेकेन व तीन यूरोपियन यांचे खून बर्डेरा येथे सोमाली लोकांनीं केले(१८६५). स्कॉटिश मघसी थॉंपसन यानें व्हिटोरियानियांझाचा व कांउंट टेलेकी (हंगेरियन) यानें रुडाल्फ व स्टेफॅमी सरोवरांचा शोध लाविला.

ब्रिटिश लोकांचा प्रथम झांझीबारशीं संबंध आला. येथें १९ व्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिशांचें बरेंच वजन होतें. सुलतान बर्गश हा सर जॉन कर्क या ब्रिटिश प्रतिनिधीच्या सल्ल्यानें नेहमीं वागे. इ. स.१८७७ सालीं बर्गशहानें विल्यम मॅकिनॉन (नंतर सर विल्यम मॅकिनॉन) ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हीगेशन कंपनीचा अध्यक्ष याला कांहीं सवलती व हक्क देऊं केले. परंतु परराष्ट्रीय खात्याचा पाठिंबा नसल्यानें वरील सवलती नाकारण्यांत आल्या त्याचप्रमाणें किलिमाजारो जिल्ह्यांत जॉन्सन याला मिळालेल्या सवलतीकडे दुर्लक्ष देण्यांत आलें. परंतु जर्मनांनीं १८८४–८५ त पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर कांहीं हक्क संपादन केल्यामुळें ब्रिटिशसत्तावाल्यांनीं पुन्हां उचल खाल्ली.

मोंबासाच्या मागील बाजूच्या जिल्ह्यांवर १८८८ त ब्रिटिशांनीं जर्मनीच्या अनुमतानें आपला हक्क बसविला. १८८७त बर्गशहानें मॅकिनानच्या कंपनीला जर्मन सत्ताक्षेत्राच्या बाहेर असलेल्या आपल्या प्रदेशांत कांहीं हक्क दिले. परंतु सार्वराष्ट्रीय तहान्वयें किनाऱ्यापासून दहा मैलपर्यंतच्या प्रदेशावर सुलतानचा हक्क असल्याचें ठरविण्यांत आलें. वरील प्रदेश व त्याच्या मागील भाग यांवर अंमल बसविण्याची इच्छा असल्यानें या कंपनीनें 'इंपीरियल ब्रिटिश ईस्ट आफ्रिका कंपनी' हें नांव धारण केलें व कांहीं जास्त हक्क मिळविले (१८८८). यामुळें कंपनीचें भांडवल २,४०,००० पौंड उभारण्यांत आलें. परंतु जर्मन ईस्ट आफ्रिका कंपनीच्या चढाओढीनें ब्रिटिश कंपनीला बराच त्रास झाला. नवीन कंपनीस १८८८ मध्यें सुलताननें कांहीं हक्क दिले होते. व्हिक्टोरियानियाझाच्या दक्षिणेस जर्मनीचा कारभार चालेल असें प्रिन्स बिस्मार्केच्या अभयवचनावरून वाटलें. परंतु जर्मनांनीं लामू वगैरे कंपनीच्या सत्तेखालील भागात आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली. याला जर्मन सरकारचा पाठिंबा मिळाला. परंतु ब्रिटिश कंपनीला परराष्ट्रीय खात्याकडून मदत मिळण्याऐवजीं उलट निरुत्साहजनक उत्तरें मिळत गेलीं. ब्रिटिशांनीं आक्टोबर १८८८ च्या सवलतीमुळें बंदरांतील जकातीच्या ऐवजी बरीच रक्कम सुलतानला देण्याचें कबूल केलें, परंतु लवकरच सुलतान वारला व त्याच्या नंतरच्या सुलतानाच्या जवळ जर्मनीनें लामू वगैरेची मागणी केली. त्यामुळें व्यापारांत बराच चट्ट बसला व सुलतानला मोठी रक्कम द्यावी लागत असल्यानें कंपनीला जास्त तोटा आला. परंतु तिनें साम्राज्याचे बरेच हितसंबंध सुरक्षित राखले.

जुलै १८८७ च्या जर्मनी व ग्रेटब्रिटनमधील पत्रव्यवहारांत नमूद केल्याप्रमाणें युगांडावर ब्रिटिशांचा हक्क होता. परंतु जर्मन लोकमत याविरुद्ध असून नकाशांत हा प्रदेश जर्मन अंमलाखालीं दाखविला होता. परंतु ब्रिटिश जनतेच्या मताप्रमाणें पाहिलें असतां हा प्रदेश ब्रिटिश सत्तेखालीं येत असे. इ. स. १८८९ त कार्लपीटर्स नांवाच्या जर्मन अधिकाऱ्यानें युगांडावर एक स्वारी केली. म्हणून कंपनीनें जॅक्सनला व्हिक्टोरिया नियांझाला पाठविलें. परंतु युगांडांत न जाण्याचा हुकुम मोडून युगांडांतील लोकांच्या बोलावण्यास मान देऊन जॅक्सननें आपला मोर्चा युगांडाकडे वळविला. हें पाहून पीटर्स परत फिरला व कांहीं तह केल्याचें त्यानें जाहीर केलें. जॅक्सननें सुद्धा कांहीं तह केले. इतक्यांत १८९० मध्यें आंग्लोजर्मन तहनाम्यांत युगांडावर ब्रिटिश अंमल असल्याचें जाहीर झालें. कंपनीचा अंमल तेथें बसूं न देण्याची फ्रेंच मिशनरींनीं बरीच खटपट केली परंतु त्यांचा प्रयत्न व्यर्थ गेला. १८९० मध्यें ब्रुसेल्स येथें सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं जमून गुलामगिरी मोडण्याचें ठरविलें. याला कंपनीच्या युगांडांतील चळवळीचें बरेच साहाय्य मिळालें. पुढें तिनें मोंबासा ते व्हिक्टोरियानियांझापर्यंत रेल्वे केली. एकंदर खर्च कंपनीला झेपला नाहीं म्हणून साम्राज्य सरकाराकडे मदतीची याचना केली असतां पार्लमेंटांत बिल नामंजूर झालें. पैशाची बरीच अडचण असल्यामुळें कंपनीनें युगांडांतील आपलें सैन्य परत बोलाविलें व ब्रिटिश सरकारानें संरक्षित संस्थान म्हणून देशावर आपला अंमल बसविला.

कंपनीवर बऱ्याच सांपत्तिक अडचणी येऊन पुढें ती मोडली. १८९० मध्यें झांझिबार ब्रिटिश संरक्षणाखालीं आल्यानें येथे खुला व्यापार चालू झाला. परंतु शासन वगैरेचा कंपनीचा खर्च तसाच राहून जकात, कर वगैरे वसूल करतां येईना. यामुळें बराच तोटा झाला व त्याबद्दल मोबदला कांहींच मिळाला नाहीं. कंपनीनें करासंबंधीं कांहीं ठराव पुढें मांडले होते परंतु त्याला परराष्ट्रीय खात्याची संमति मिळाली नाहीं.

मळे व व्यापार यांत तोटा आणि एतद्देशीय व्यापाऱ्यास दिलेला बुडीत पैसा अशी चोहोंकडून संकटें आलीं असतांनां सर विल्यम मॅकिनॉन हाहि १८९३त मरण पावला. अखेरीस सर्व सनदा व कारभार सरकारच्या स्वाधीन करण्याचें ठरलें. सरकारनें कंपनीचे सर्व हक्क, मालमत्ता अडीच लाख पौंडास विकत घेतली. कंपनीच्या भागीदारास फायदा मुळींच मिळाला नाहीं. परंतु कंपनीनें कामगिरी मात्र उत्कृष्ट रीतीनें बजावली. येथें ब्रिटिश अंमल होण्यास सर विल्यम मॅकिनॉन यांचे प्रयत्न कारणीभूत झाले. या गृहस्थानें व त्याच्या बरोबरच्या मंडळींनीं गुलामगिरी नाहींशी करणें व लोकास सुधारणें यासाठीं बरेच प्रयत्न केले. यासाठीं त्यांनीं मद्याचा व्यापार बंद केला, सडका बांधल्या व औद्योगिक मिशनांची स्थापना केली.

१ जुलै १८९५ रोजीं ब्रिटिश सरकारनें हें राज्य आपल्या ताब्यात घेतल्याचें जाहीर केलें. याला पूर्व आफ्रिकेचें संरक्षित राज्य असें नांव मिळालें. वितूचें सुलतानचें राज्य ब्रिटिश संरक्षित राज्यात सामील करण्यास आलें. याच सुमाराला मझरुई या प्रसिद्ध अरब घराण्यांत वारसामुळें लढा पडून अखेरीस अरबांचें बंड झालें. अखेरीस १८९६ त बंडखोर जर्मन प्रदेशात गेले व तेथें त्यांनां अडकविण्यांत आलें. या बंडानें अरबी अंमलाचा नाश होऊन त्या ऐवजीं यूरोपियन अंमल बसला.

मोंबासा-व्हिक्टोरियानियांझा रेल्वेला १८९६ त सुरुवात होऊन ती १९०३ मध्यें पुरी झाली. मसाई, सोमाली वगैरे जातीवर चांगला दरारा बसला. आतांपर्यंत किनाऱ्याच्या प्रदेशाचें महत्व युगांडाचा रस्ता म्हणून जास्त असे. परंतु रेल्वेमुळें पठारावर यूरोपियन लोकांस राहण्यायोग्य असा प्रदेश आढळला. ईस्ट आफ्रिका सिंडीकेट व इतर लोक यांनीं वसाहत करण्यास जमीनींची मागणी केली (इ. स. १९०२). बरेच वसाहतवाले आल्यानें इ. स. १९०३ मध्यें वसाहतीस जमीन

देण्याची बंदी झाली. याच सुमारास परराष्ट्रीय प्रधान लॉर्ड लॅंड्सडौन व येथील कमिशनर सर चार्लस इलियट यांच्यांत बेबनाव होऊन सर चार्लसनें राजीनामा दिला. याच्या नंतरचे सर डोनाल्ड स्टुवर्ट यांनी मसाई लोकांनां दुसरीकडे वसाहत करावयास लावून वसाहतीसंबंधीं भानगडी मिटविल्या.ता.१ एप्रिल १९०५ पासून या प्रांताचा राज्यकारभार परराष्ट्रीय खात्याकडून वसाहत खात्याकडे देण्यात आला. १९०५ च्या अखेरीस सुमारें १० लक्ष एकर जमीन मक्तयानें देण्यांत आली अथवा विकली. गोरे रहिवाश्यांनीं कॉलनिस्टस असोसिएशन म्हणून मंडळ स्थापिलें. याच्या मागणी वरून १९०७ मध्यें एक कायदे कौन्सिल स्थापण्यांत आलें. येथें गव्हर्नराची नेमणूक होऊं लागली. याच वर्षी यूरोपियन लोकास अयोग्य असलेल्या जिल्ह्यांत हिंदी वसाहतींना उत्तेजन देण्यात आलें. युद्धप्रिय मसाई लोकांकडून सरकारला फारसा त्रास झाला नाहीं. सोमाली लोकांनीं मात्र त्रास दिला. परंतु त्यांच्यावर स्वारी करून (१९०५-०६) त्याना वठणीस आणलें. येथें मजुरांचा पुरवठा नसल्यामुळें वसाहतवाल्यानां बराच त्रास झाला. त्यात एतद्देशीय लोकांना काम करण्याचा कंटाळा असल्यानें विशेष भर पडली.

ब्रिटिश सरकारचा अंमल बसला तरी उत्तरेकडच्या भागाची माहिती नव्हती.या भागावर गॅलास व अबिसीनियन सरकारचीं ठाणीं रुडाल्फ सरोवराच्या दक्षिणेपर्यंत सरकलीं व बोरान देश त्यांनीं ताब्यांत घेतला. अखेरीस अबिसीनियन सरकारशीं ठराव होऊन जुबानदी व सरोवर यांमध्यें सरहद्द ठरवण्यांत आली (१९०७). १९०८-०९ मध्यें नेमलेल्या अँग्लो-अबिसीनियन कमिशननें ती कायम ठरवून टाकली.

इ. स. १९०९ मध्ये सर पर्सी जिरौर्ड हा केनियाचा गव्हर्नर झाला. या सुमारास केनियामध्यें रहाणाऱ्या गोऱ्या लोकांमध्यें त्यांच्या मागण्या पुऱ्या न झाल्या-कारणानें असंतोष माजून राहिला होता पण अशा बिकट परिस्थितींतहि जिरौर्ड यानें आपला कारभार मोठ्या कुशलतेनें चालविला. १९११ पर्यंत या गोऱ्या लोकांमध्यें व केनियातील रहिवाशांमध्यें, फारसें वितुष्ट नव्हतें. पण १९११ मध्यें हें वितुष्ट अचानक तऱ्हेनें प्रगट झालें. यावेळीं देश्य लोकांकडून चोऱ्याचा उपद्रव फार होत असे एकदां कोल नांवाच्या एका वसाहतवाल्यानें, मेंढ्या चोरल्याच्या निमित्तावरून एक किक्यूयू जातीच्या रहिवाशाला ठार मारिलें. तेव्हा ब्रिटिश सरकारनें त्याला हद्दपारीची शिक्षा फर्मावली. त्यामुळें शेफारून गेलेल्या गोऱ्या वसाहतवाल्यांनीं एकच काहूर माजविलें व ब्रिटिशसरकारला चोरांपासून गोऱ्यांचें संरक्षण-करण्यासाठीं विशेष उपाय अंमलांत आणणें भाग पडलें. पण त्यामुळें या गोऱ्या लोकानां पुरेसे मजूर मिळेनात तेव्हा वर्षातून २ महिने तरी मजुरांनीं सार्वजनिक काम केलेंच पाहिजे असा एक जाहीरनामा सरकारनें काढला. त्यावेळ-पासून या काळ्या मजुरांच्या हालाला सुरुवात झाली.

इ. स. १९१२ च्या जुलैमध्यें जिरौर्ड यानें राजीनामा दिला व त्याच्या दली सर एच्. सी. बेलफील्ड हा नवीन गव्हर्नर आला. जूबालंडमध्यें मेहेहात जातीनें बंडखोरीचें धोरण स्वीकारल्यामुळें तसेंच अबिसिनियाच्या टापूंतल्या सोमालिलँडच्या सरहद्दीवरील प्रांतात तुरकान व इतर जातींनीं धामधूम सुरू केल्यामुळें, सरकारला त्यांच्या बंदोबस्तासाठीं तजवीज करणें भाग पडलें. १९१४ मध्यें महायुद्धाला सुरुवात झाली. तेव्हा येथील वसाहतवाल्यानी व काळ्या रहिवाशांनींहि आपापलीं पलटणें उभारलीं. १९१६ च्या मार्च पर्यंत या पलटणींनीं जर्मन लोकाच्या हल्ल्याला उत्तम प्रकारें तोंड देऊन जर्मन लोकांचा पराजय केला. पण या युद्धांत केनियांतील मूळच्या रहिवाशांनां फार त्रास सोसावा लागला मालाची व युद्धोपयोगी सामानाची नेआण करण्यासाठीं लष्कराला मास पुरविण्यासाठीं या काळ्या रहिवाशांना आप त्यातील माणसें पुरविणें भाग पडलें. तरी पण अनंत हाल सोसूनहि या रहिवाशानीं दोस्त राष्ट्रांना अमोलिक साहाय्य केलें. यातच जूबालंडमधील बंडखोर जातींनीं पुन्हा त्रास देण्यास सुरवात केली तेव्हा त्याच्या बंदोबस्तासाठींहि ब्रिटिश सरकारला तावडतोब व्यवस्था करणें भाग पडलें.

१९१७ मध्यें बेलफील्डनें राजीनामा दिल्यामुळें सर बौरिंग याची त्या जागीं नेमणूक झाली. बौरिंगच्या कौन्सिलनें नेमलेल्या कमिटीनें, राज्यकारभारांत लोकनियुक्त प्रतिनिधींना जागा द्यावी अशा प्रकारच्या सुधारणा सुचविल्या पण त्या अंमलांत आल्या नाहींत. १९१९ मध्यें बौरिंगच्या जागीं सर एडवर्ड नार्दे यानी नेमणूक झाली. याच्या अमदानींत केनियांत पुष्कळच असंतोष माजला. महायुद्धामुळें चलनी नाण्यासंबंधीं फार बिकट परिस्थिति उत्पन्न झाली होती. केनियांत मूळचें रुपया हें मुख्य चलनी नाणें होतें. पण १९१५ पासून पौंड हें नाणें सरकारनें मुख्य ठरविलें व पौंडाचा भाव १५ रुपये ठरविला. पण १९१७ मध्यें रुपयाचा भाव अंदाजाबाहेर वाढला. १९२० मध्यें रुपयाचा भाव २ शिलिंग ९ पेन्स झाला. तेव्हा ही आपत्ति टाळण्यासाठीं केनिया, युगांडा, व टांगानिका प्रदेशात रुपयाचा भाव २ शिलिंग ठरविण्यात आला. याचा परिणाम केनियांतील उद्योगधंद्यावर फार विपरीत होऊं लागला सरते शेवटीं वसाहतसरकारनें शिलिंग हें मुख्य नाणें करावयाचे ठरविलें.

चलनी नाण्यांच्या घोटाळ्यानें ज्याप्रमाणें असंतोष माजला त्याचप्रमाणें, युद्धांत भाग घेतलेल्या शिपायांनां जमिनी बक्षीस देण्याच्या बाबतींतहि यश न आल्यामुळें त्यांच्यामध्यें असंतोष माजला.

याच सुमारास ब्रिटिश ईस्ट आफ्रिका ही ब्रिटिश सरकारची वसाहत म्हणून ठरविण्यात आली. याच्यापूर्वी ब्रिटिश

ईस्ट आफ्रिकेचा दर्जा संरक्षित संस्थान म्हणून होता. पण १९१९ मध्यें तो दर्जा बदलला. १९१९ च्या जुलैमध्यें वसाहतीच्या कायदे कौन्सिलमध्यें यूरोपियन लोकांनां लोकनियुक्त प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क देण्यांत आला. या कायदेकौन्सिलमध्यें ५ हिंदी लोकातर्फे, दोन अरबांतर्फे व एक सरकारनियुक्त प्रतिनिधि घेण्याचे ठरविण्यांत आलें. गोऱ्या लोकाचा मतदानाचा हक्क विस्तृत करण्यांत आला. १९२० मध्यें ब्रिटिश ईस्ट आफ्रिका ही साम्राज्याला जोडण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें व त्याला केनियाची वसाहत असें नांव देण्यात आल. केनिया पर्वतावरून हें नांव निवडण्यात आलें. या वसाहतींत झांझिबारचा मात्र समावेश करण्यांत आला नाहीं. त्याला केनिया प्रोटेक्टोरेट असें स्वतंत्र नांव देण्यात आलें. यानंतर वसाहतीच्या संरक्षणासाठीं बंदरें बांधणें, रेल्वे बांधणें, इत्यादि सार्वजनिक कार्यासाठीं मोठें कर्ज काढण्यांत आलें.

पण राज्यकारभारामध्यें जी अदलाबदल झाली व त्यांत गोऱ्यांनां जे अधिक हक्क मिळाले त्यामुळें केनियांतील रहिवाशांमध्यें मात्र असंतोष माजण्यास सुरुवात झाली. वास्तविक पहातां गोऱ्या लोकांपेक्षा दुपटी तिप्पटीनें, काळ्याची संख्या अधिक, पण राज्यकारभारामध्यें त्यांना मज्जाव होता. ब्रिटिशांच्या नेहमींच्या धोरणाला धरूनच हें होतें, पण काळ्या रहिवाशांनां हें न खपून त्यांनीं याविरुद्ध चळवळीस सुरुवात केली. राष्ट्रीयत्वाची ज्योत त्यांच्यामध्यें हळू हळू पेटूं लागली होती. या लोकांनीं गोऱ्या लोकांच्या बरोबरीनें आपल्यास हक्क मिळावे यासाठीं चळवळ सुरू केली. पण केनियांतील गोऱ्या लोकांनां हें कसें खपणार ? आपण केनिया वसाहतीची वाढ केली तेव्हां आपणाला केनियाच्या राज्यकारभारांत अधिक हक्क असलेच पाहिजेत असा या गोऱ्या लोकांनीं कांगावा करण्यास सुरुवात केली. शिवाय आपण वर्णदृष्ट्या या काळ्या लोकांपेक्षां श्रेष्ठ आहों असेंहि त्यांनीं प्रतिपादण्यास आरंभ केला.या वर्णविषयक श्रेष्ठत्वाच्या विधानाला जरी वसाहत सरकारनें कबुली दिली नाहीं तरी राज्यकारभारांत गोऱ्या लोकांचा हक्क अधिक असणें जरूर आहे या मतास मात्र वसाहत सरकारनें दुजोरा दिला. यावेळीं लॉर्ड मिलनर हे वसाहतमंत्री होते. त्यांनीं या गोऱ्या लोकांच्या दोन्हीं विधानांनां आपली संमति दिली व गोऱ्या लोकांसाठीं केनियामधील उंचवट्याचा जो चांगला प्रदेश आहे तो वसाहत करण्यासाठीं त्यांना स्वतंत्र द्यावा अशी तोड सुचविली. पण याचा केनियांतील हिंदी रहिवाशांनीं तीव्र निषेध केला व आपल्याला गोऱ्या लोकांबरोबर समान हक्क मिळावेत अशी न्याय्य मागणी पुढें मांडली. सुदैवानें हिंदुस्थान सरकारनें व भारत मंत्र्यांनीं हिंदी लोकांची बाजू घेतली. हिंदुस्थान सरकारनें पार्लमेंटाकडे १९२०च्या आक्टोबर महिन्यांत एक खलिता पाठविला त्यात वर्णमूलक श्रेष्ठत्वाला अजीबात फांटा देण्यांत येऊन सर्वांनां मतदानाचे समान हक्क देण्यांत यावेत असा मजकूर होता. १९२१ च्या जूनमध्यें चर्चिल हे वसाहत मंत्री झाले व त्यांनीं वर्णविषयक श्रेष्ठत्वाला अजीबात फांटा दिल्याचें जाहीर केलें.

लो क सं ख्या.—१९२० मध्यें केनिया वसाहतींत गोऱ्यांची लोकसंख्या ५५७०, आशियाटिक लोकांची १७४२७ व अरबाची ८००० होती. मूळच्या रहिवाशांची एकंदर संख्या २६,२०,००० इतकी होती. मोंबासा हें केनियांतील मुख्य बंदर होय. त्याची लोकसंख्या ३२००० होती. नैरोबी राजधानीची लोकवस्ती १५,२७४ असून त्यात२०२० यूरोपियन व ५००० हिंदू होते.

व्या पा र.—१९१८–१९१९ या वर्षांत ३३,९७,००० पौंडांची आयात व२४,९८,०००पौंडांची निर्गत झाली. वसाहतीचें उत्पन्न १५,४८,००० पौंड व खर्च १५,७०,०००इतका झाला. १९२०–२१ मध्यें, उत्पन्न व खर्च ३१,९२,००० पौंड होता.

के नि यां ती ल हिं दी लो क.—सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद रा, वझे हे केनियांत जाऊन आल्यावर तेथील लोकांसंबंधीं पुढील माहिती त्यांनीं ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध केली आहे:— केनियांत सुमारें २२,००० हिंदी लोक आहेत. त्यात गुजराथी लोकाचा विशेष भरणा आहे. गुजराथी लोकांच्या खालोखाल पंजाबी लोकांची संख्या आहे. दक्षिणी अगर मद्रासी लोक केनियांत एकंदरींत फारच कमी आहेत. पंजाबी लोकाची संख्या सुमारें सहा हजार आहे. त्यांपैकीं बहुतेक लोक कारागिरी करणारे आहेत. गुजराथी लोकांत लहानमोठा व्यापार करणारे बरेच लोक आहेत.

केनियांतील डोंगरपठारावरील चांगली व सुपीक जमीन यूरोपियन लोकांनीं आपल्या मालकीची केली आहे. यूरोपियनांनीं आपल्याकडे घेतलेल्या उंच पठारावरील सुपीक जमीन एकूणऐंशी लक्ष एकर आहे. पण तींत ते सर्वत्र लागवड करतात असे नाहीं. केनियांतील लोलँड म्हणजे सखल अशा जमिनी हिंदी लोकांच्या वांट्यास बहुतेक आलेल्या आहेत. केनियांतील बऱ्याच हिंदी लोकांना स्वतःची शेतीवाडी नसल्याकारणानें तेथें कायम राहणें अशक्य होऊन जातें. बोहरी व आगाखानी जातीचे कांहीं लोक तेथें कायमची वस्ती करून राहिले आहेत. पण एकंदरीनें पाहिलें तर व्यापार व इतर धंदे यावर उपजीविका करणाऱ्या हिंदी लोकाची संख्या बरीच मोठी आहे. सरकारी वरिष्ठ नोकऱ्यांत हिंदी लोकांचा प्रवेश होणें मुळींच शक्य नसतें. कारकुनांच्या जागा हिंदी लोकांनां मिळतात. पण त्या मिळण्यास सुद्धां बरेच प्रयास पडतात. यूरोपियन लोकांनां मात्र वाटेल त्या दुय्याच्या जागा मिळूं शकतात, व त्याचें अमुक शिक्षण झालें असलें पाहिजे अशीहि कायद्यानें आडकाठी घालण्यांत आलेला नाहीं. कलोनियल सेक्रेटरींनां वाटेल त्या इसमास वाटेल तेथें नेमण्याचा अधिकार

आहे. वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळण्यास एखाद्या परीक्षेची अट ठेवण्यात येईल तर हिंदी लोकहि सदर परीक्षेत यूरोपियन लोकांशीं स्पर्धा करून वरच्या नोकऱ्या मिळवूं शकतील.

केनियांतील रेल्वेवरील नौकरीच्या जागा मात्र बऱ्याचशा हिंदी लोकांकडेच आहेत असें म्हटलें तरी चालेल. तिकडे हिंदी डॉक्टर, बॅरिस्टर वगैरे लोक आहेत. पण त्यांची संख्या फारच थोडी आहे. यूरोपियन डॉक्टराकडे कांहीं हिंदी रोगी औषध घेण्याकरितां जातात. पण हिंदी डॉक्टराकडे एक देखील यूरोपियन पेशन्ट कधींहि येत नाहीं. हिंदी लोकांकरितां बऱ्याच शाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत. धर्मशिक्षणाच्या बाबतींतहि सरकारची आडकाठी मुळींच नाहीं. मिशनरी लोकांनां धर्मशिक्षणाची मुभा द्यावी लागते म्हणून हिंदी लोकांनांहि तशी सवलत मिळते. शिक्षण खात्याच्या ग्रँट्स-इन-कोडचे नियम चांगले आहेत यांत शंका नाहीं.

शाळांतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारें १००० इतकीच आहे. तेथील हिंदी लोकसंख्येच्या मानानें हिंदी विद्यार्थ्यांची संख्या फारच कमी आहे. दुय्यम प्रतीच्या शिक्षणाच्या शाळा तेथें काढतां येण्यासारख्या आहेत. यूरोपियन लोकांच्या शाळांची संख्या तिकडे हिंदी लोकांच्या शाळांच्या संख्येपेक्षा चौपट आहे.

केनियामध्यें १९२२ पासून हिंदी मंडळींनीं यूरोपियनास मिळालेलें अधिकाराधिक्य काढून टाकण्यासाठीं चळवळ सुरू केली. या चळवळींत कर न देण्याची चळवळ होतीच. १९२३ च्या जानेवारी १२ ला हिंदी मंडळींच्या बऱ्याचशा मागण्या देणारा एक आदेश कलोनिअल सेक्रेटरीकडून आला असें नैरोबीच्या स्टँडर्ड पत्रांत प्रसिद्ध झालें व त्याच्याबरोबर यूरोपियन वसाहतीनें मोठ्या जोरानें निषेध केला व दंगे करण्याची धमकी दिली. या आदेशाची बातमी आल्यानंतर केनियांतील हिंदी लोकांनीं करबंदीची चळवळ बंद ठेवली. पुढें जानेवारी ३० ला तेथील गव्हर्नरानें कलोनिअल सेक्रेटरीची योजना पुढें ठेविली. त्या योजनेनें यूरोपियनास सात आठ प्रतिनिधी पाठविता येतील व हिंदी मंडळीस चार पाठवतां येतील अशा प्रकारच्या अटी ठेवून; एकच मतदाराची यादी असावी, हिंदी लोकांच्या आगमनास अडचणी नसाव्या पण डोंगर पठार मात्र गोऱ्यासाठीं राखून ठेवावें असें होतें. यूरोपीय नागरिक ही तडजोड स्वीकारावयास बिलकुल तयार नव्हते पण हिंदी मंडळी हें तात्पुरतें स्वीकारावयास तयार होती. यूरोपीय व हिंदी ही दोन्हीं मंडळी आपल्या मागणींत कांहीं एक कमी करावयास तयार नव्हतीं. याच सुमारास वृइकली डेमोक्राट म्हणून एका साप्ताहिक पत्राच्या सीताराम आचार्य नावाच्या संपादकास यूरोपियन स्त्रियाविरुद्ध लेख लिहिल्याबद्दल घालवून देण्याचा हुकूम सुटला. फेब्रुवारींत गव्हर्नर कलोनिअल सेक्रेटरीशीं संगनमत करण्यासाठीं गेला. त्यामुळें पुन्हां तडजोडीस वाव मिळाला. रा. श्रीनिवासशास्त्री, बाळकृष्ण सिताराम कामत, जमनादास द्वारकादास व जीवनजी यांची केनिया प्रश्नासंबंधानें इंग्लंडात जाऊन खल करण्यासाठीं मध्यवर्ति कायदेमंडळाकडून कमिटी नेमण्यांत आली आणि केनिया प्रश्नाविषयीं देशभर चळवळ करण्यांत आली.

केनियाच्या यूरोपियन लोकांनींहि डेप्युटेशन पाठविलेंच होतें. जूनच्या अंताला कलोनिअलसरकारनें कायम ठराव केला. त्यात जातीवार सभासदांचें तत्व मान्य करण्यांत आलें. लेजीस्लेटिव्ह असेंब्लींत पांच हिंदी व अकरा यूरोपियन निवडलेले सभासद असावे. पठारावरील जागा गोऱ्या आणि सखलप्रदेशातील इंडियन लोकासाठीं राखून ठेवण्यांत आली. या तऱ्हेचा निर्णय हिंदुस्थानांत कोणास आवडला नाहीं. यात नागरिकत्वाचे दोन दर्जे पाडण्याची पद्धत दिसून येते असा ना. शास्त्री यांनीं शेरा मारला. केनियाचें डेप्युटेशन ऑगस्ट १९२३ मध्यें परत आलें. त्या डेप्युटेशननें हिंदी लोकांसंबंधीं न्याय हा यूरोपियन वसाहत वाल्यांच्या दंग्याच्या भीतीमुळें दुर्लक्षिला गेला असें मत दिलें. या सुमारास हिंदुस्थानात बरीच मोठी चळवळ झाली. यानंतर इंपीरियल कान्फरन्समध्यें व राष्ट्रसंघापुढें हिंदुस्थानचें गाऱ्हाणें मांडण्याचा आशावाद कांहीं दिवस चालू होता. इंपीरियल कान्फरन्समध्यें १ दिवस याकरितां म्हणजे वसाहतींत हिंदी मंडळींचा दर्जा यासंबंधानें वादविवादासाठीं राखून ठेवला. पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. हिंदुस्थानसरकारनें वसाहतींच्या विशिष्ट सरकारास प्रत्यक्ष लिहिण्यास हरकत नाहीं एवढेंच मिळवून हिंदुस्थानचे प्रतिनिधि डॉ. सप्रू परत आले.

१९२४ मध्यें केनियात हिंदी मंडळींची काँग्रेस किलिंडिनी येथें भरली. सौ. सरोजिनी नायडू या अध्यक्ष म्हणून गेल्या होत्या. त्या प्रसंगामुळें केनियाकडे हिंदुस्थानचें लक्ष जिवंत राहिलें. त्या वेळेस मिसेस नायडूंनीं आपली रहाणी सुधारण्याकडे लक्ष ठेवण्याचा उपदेश केला. मेमध्यें केनिया कौन्सिल उघडलें, त्यावेळीं हिंदुस्थानी सभासद कौन्सिलला गेले नाहींत.

केनिया पर्वत— ब्रिटिशपूर्वआफ्रिकेंतील एक मोठा ज्वालामुखी पर्वत. हा विषुववृत्ताच्या किंचित दक्षिणेस व पूर्वरेखांश ३७°२' वर वसलेला आहे. आफ्रिकेंतील अतिशय उंच पर्वतांपैकीं हा एक असून याच्या अत्युच्च शिखराची सरासरी उंची १७,००७ फूट आहे. अनेक निमुळत्या पिरामिडाकृति डोंगरांनीं बनलेला या पर्वताच्या आतील मध्यभाग हा एका प्राचीन ज्वालामुखाचा बनलेला आहे. या जुन्या ज्वलत् पर्वताची उंची पूर्वी हल्लींच्या उंचीहून देखील २००० फुटांनीं अधिक असावी.

या पर्वताचीं खरीं तद्देशीय नांवें म्हणजे किलिनयाग, डोयेनयो एबर (श्वेत पर्वत) आणि डोयेनयो एगेरै (ठिपक्यांचा पर्वत) अशीं आहेत असें सांगतात. हा पर्वत

प्रथम लड्विग् क्राफ नामक मिशनऱ्याच्या सन १८४९ मध्यें दृष्टीस पडला नंतर जोसेफ थॅामस हा पश्चिमेकडून इ. स. १८८३ मध्यें या पर्वतापर्यंत आला. त्यानंतर काउन्ट एस्. तेलेकी (स. १८८९), जे. डब्ल्यू ग्रेगरी (१८९३)आणि जॅार्ज कोल्ब (१८९६) हे या पर्वतावर थोडेसे चढले. एच्. जे. मॅकिन्डरनें इ. स. १८९९ मध्यें पर्वतशिखरावर आरोहण केलें.

केनिलवर्थ —इंग्लंडमधील वारविकशायर परगण्यातील रुग्बी पार्लमेंटरी विभागातील एक बाजाराचें गाव.लोकसंख्या (१९११) ५७७६. हे शहर पुराणवस्तुसंशोधनदृष्टीनें फार महत्वाचें आहे. येथे प्राचीन किल्ल्याचे अवशेष आहेत किल्ल्याच्या जवळच ११२२ त स्थापलेल्या एका ऑगस्टीयन मठाचे अवशेष आहेत.

पूर्वी हे सॅक्सन राजांच्या ताब्यात होतें. पहिल्या हेन्रीनें हें शहर जॉफ्रेद क्लिंटनला दिलें. यानेंच येथील प्रसिद्ध किल्ला बांधिला. तिसऱ्या हेन्रीनें हें शहर सायमन डि मॉटफोर्ड याला दिलें. १२६६ त प्रसिद्ध 'डिक्टम द केनिलवर्थ' (केनिलवर्थ येथील जाहीरनामा) येथें जाहीर करण्यांत आला. इलिझाबेथ राणीनें १५६२ त हें गाव रॉबर्ट डडले, लीस्टरचा अर्ल याला दिलें. याच ठिकाणीं अर्लनें राणीस मेजवान्या देऊन तिचें फार आदरातिथ्य केलें. यादवींत क्रामवेलनें हा किल्ला घेऊन पाडून टाकला. ह्या ठिकाणीं कातडीं कमावण्याचा धंदा चांगला चालतो.

वाल्टर स्कॉटनें एक केनिलवर्थ नांवाची कादंबरी लिहिली आहे.

केन्सिंग्टन—हा लंडनचा पश्चिमेकडील मुख्य बरो. लोकसंख्या (१९२१) १७५८६८. तिसऱ्या विल्यमनें केन्सिंग्टन येथें दरबार भरविण्यास सुरुवात केल्यापासून याची प्रसिद्धी आहे. केन्सिंग्टन बागेच्या पश्चिम भागास केन्सिंग्टनें राजवाडा आहे. याच राजवाड्यांत विल्यम, मेरी, ॲन व जॉर्ज हे मृत्यु पावले व व्हिक्टोरिया राणीचा जन्म झाला (१८१९).

केन्सिंग्टन चौकांत, ॲडिसन, टॅलिरँड, जॉनस्टुअर्ट मिल व इतिहासकार ग्रीन वगैरे प्रसिद्ध पुरुष रहात असत. आज लंडनमधील बराच शिष्ट समजला जाणार वर्ग दक्षिण केन्सिंग्टन येथें रहातो.

व्हिक्टोरिया व आलबर्ट अथवा दक्षिण केन्सिंग्टनपदार्थ-संग्रहालयाजवळच असलेलें सृष्टिविषयक संग्रहालय हीं प्रेक्षणीय आहेत. केन्सिंग्टन बागेंत १८५१ चें प्रसिद्ध प्रदर्शन भरलें होतें. याशिवाय नगरभवन, मोफत ग्रंथालय, सार्वजनिक उपयोगासाठीं दिलेलें लॉर्ड लिटनचें गृह ह्या इमारती प्रेक्षणीय आहेत. केन्सिंग्टनतर्फे पार्लमेंटांत दोन सभासद जातात. बरो कौन्सिलांत एक मेयर, १० आल्डरमेन व ६० सभासद आहेत.

केप कोस्ट—हें ब्रिटिश पश्चिम आफ्रिकेच्या गोल्ड कोस्ट-वरील एक बंदर. हें आक्राच्या पश्चिमेस सुमारें ८० मैलांवर उ. अ. ५° ५' व पश्चिम रे. १° १३' यांच्यामध्यें आहेत. लो. सं. (१९११) ११३६४. बहुतेक फॅंटिस लोक आहेत. यांत सुमारें १०० यूरोपियन व क्रुमेन लोकांची वसाहत आहे. हें शहर नीस व मिकॅशस स्लेट यांच्या चौथऱ्यावर आहे. त्यामुळें बंदराचें लाटापासून संरक्षण होतें. समुद्राच्या समोर किल्ला आहे व तो भव्य व बराच मोठा आहे. जिल्हाकमिशनरचें वसतिगृह, धर्ममंदिरें, शाळा, सरकारी शाळा व वसाहतीचें इस्पितळ या मुख्य इमारती आहेत. श्रीमंत लोक विटांच्या घरात रहातात. रस्ते टेंकड्यावरून गेलेले आहेत. व शहराच्या पूर्वेस व उत्तरेस उंचवटयाची जागा व पश्चिमेस उथळ पाण्याचे सरोवर आहे. शहराच्या पश्चिमेस व्हिक्टोरिया किल्ला व पूर्वेस फोर्ट बुइल्यम हे आहेत.

पोर्तुगीजानीं १६१० मध्यें येथें प्रथम वस्ती केली. १६५२ मध्यें स्वीड लोकांनीं येऊन किल्ला बांधला व त्याचें नांव कॅरोलुस्बर्ग ठेवलें. १६५९ मध्यें डचांनीं ताबा मिळविला. परंतु इंग्लिशानीं १६६४ मध्यें किल्ला घेतला. व डिरुटरचा १६६५ मधील, फ्रेंचाचा १७५७ मधील व एतद्देशीयांचे कित्येक हल्ले झाले तरी सोडला नाहीं. गिनीच्या किनाऱ्यावरील एल्मिनाचे खालोखाल हा किल्ला बळकट मानला गेला आहे. या किनाऱ्या-वरील ब्रिटिश वसाहतवाल्यांची राजधानी येथेंच१८७६ पर्यंत होती. नंतर राज्यकारभार आक्राला नेला. अद्याप हें गोल्ड कोस्टवरील एक मुख्य बंदर आहे. येथूनच कुमासीला रस्ता गेला आहे.१९०५मध्यें याला स्थानिक राज्यकारभार देण्यांत आला. किल्ल्याच्या अंगणात जॉर्ज मॅक्लीन वसाहतीचा गव्हर्नर व त्याची बायको यांचीं थडगीं आहेत. शहराच्या पूर्वेकडची जमीन सोन्याच्या खाणीवाल्यांनीं टाकून दिलेल्या खाचांनीं भरलेली आहे. एतद्देशीयांच्या सात टोळ्या आहेत, व प्रत्येक टोळीवर नायक असतो. व प्रत्येकीच्या चालीरीती वस्तुपूजा निरनिराळ्या प्रकारच्या आहेत.

केप टाउन— दक्षिण आफ्रिकेंतील केप प्रांताचें राजधानीचें शहर. हे द. अ. ३३° ५६' व पूर्वरेखांश १८° ते २८' यावर आहे. केपद्वीपकल्पाच्या वायव्य टोंकास हें शहर आहे. हें जलमार्गानें लंडनहून ६१८१मैल व जोहान्सबर्गच्या नैऋत्येस रेल्वेनें ९५७ मैल आहे. उपसागराच्या पाठीमागें टेबलपर्वत आहे. पूर्वेस डेव्हिल पर्वत आहे. व पश्चिमेस सिग्नल टेंकडी आहे. शहराची डच छटा नाहींशी होऊन इंग्लिश पद्धतीचें साम्राज्य सुरू झालें आहे. येथें मलाया लोक पुष्कळ आहेत. १६६६ सालीं बांधलेल्या किल्ल्यांत केपचा पहिला सुभेदार व्हॅनरेपीक याचा पुतळा आहे. ॲडर्ली आणि गव्हर्नमेंट अव्हेनु हे येथील प्रसिद्ध राजरस्ते आहेत. यांच्या बाजूंनीं तारऑफिसें, जकातघर, पेढ्या वगैरे आहेत. प्राचीन इमारतींपैकीं फक्त घड्याळमनोरा अस्तित्वांत आहे अव्हेनु सडकेवर पार्लमेंट कचेऱ्या व यहुदी मंदिर

आहे. पश्चिमेकडील बाजूस, अँग्लिकन प्रार्थनामंदिर, व्याकरण शाळा, सार्वजनिक वाचनालय, बोटानिकल गार्डन्स व पदार्थसंग्रहालय इतक्या इमारती आहेत. वाचनालयासमोर केपचा सुभेदार जॉर्ज ग्रे याचा पुतळा आहे. व्हिक्टोरिया रस्त्यावर विद्यापीठाची इमारत आहे. सेंट जॉर्ज रस्त्याच्या पश्चिमेस ग्रीनमार्केटचा चौक आहे. रेबीक चौकात गुलामाचा बाजार असे. कवाइतीच्या मैदानासमोर असलेल्या घंटाघराजवळ सातवा एडवर्ड याचा पुतळा आहे. बंदराच्या पश्चिमेस समरसेट रुग्णालय आहे ग्रीनपॉइंट व डेव्हिल पर्वताजवळील शहरची खेडीं ट्रामगा व रेल्वेनें खास शहरास जोडलेलीं आहेत.वुडस्टॉक येथें ०६ सालीं ब्रिटिशांनीं डच लोकांचा पराभव केला. डाइप नदीच्या मुखाजवळ टेबल उपसागराच्या ईशान्येस मिलनर्टन नावाचें खेडें आहे. मेटलंडला केपटाउनची वेधशाळा आहे. शहरापासून ५ मैलावर असलेल्या रॉंडेबोश येथें डच वाडे आहेत. येथें ग्रूटस्कर नावाची प्रसिद्ध डच इमारत आहे. न्यू लँड्स हें आर्चबिशप राहण्याचें ठिकाण आहे. कॉन्स्टॅंटिआ, म्युझिनबर्ग व काल्कबे हीं खेडीं शहरापासून जरा दूर आहेत. उन्हाळयात आग्नेयीकडून वाहणाऱ्या वाऱ्याला ' केपडॉक्टर ' ही संज्ञा आहे.

बंदराचें मुख्य काम १८६० सालीं सुरू झालें. यात पुष्कळ जहाजांचा समावेश होतो आल्फ्रेड आणि व्हिक्टोरिया नावाच्या गोद्या या बंदरात आहेत. येथून इग्लंडशीं आगबोटींचें दळणवळण आहे. शहरच्या बचावाकरिता साम्राज्याचें लष्कर व स्थानिक लष्कर येथें आहे. हें शहर सायमन्स टाउन शहराशीं रेल्वेनें जोडलें आहे. नेदर्लंड ईस्ट इंडिया कंपनीनें पाठविलेल्या जॅन व्हॅान रेबेकनें १६५२ सालीं हें शहर वसविलें. १८०२ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापण्यात आली. १९०४ सालीं डॉक्टर अबदुल रहिमान येथील कौन्सिलात निवडून आला, केपटाउन येथें दक्षिण आफ्रिकेला लागू होणारे कायदे करतात.

येथें एक विद्यापीठ असून हें ॲंग्लिकन व कॅथॉलिक पंथाच्या बिशपाचें राहण्याचें ठिकाण आहे.

इ. स. १९१३ मध्यें केपटॉउन शहराची हद्द वाढवण्यांत येऊन त्यामध्यें ग्रीनपाइंट, सी पाइंट, वुडस्टॉक, मेटलंड, मौब्रे, रॉडेबाश, क्लरेमॉट, कल्कबे, मुइझेनबर्ग. इत्यादि गांवें सामिल करण्यांत आली. हीं गांवें सामील झाल्यामुळे केपटाउनची हद्द टेबलबेपासून फाल्सबे येथपर्यंत म्हणजे जवळ जवळ १७ मैल झाली व केपटाउनचें क्षेत्रफळ ५९ चौरस मैलांपेक्षा अधिक झालें. १९१८ मध्यें केपटाउनची लोकसंख्या १,८१,६९३ इतकी होती.त्यांत ९९,६९३ गोरे व ८२०४० काळे लोक होते.

केपटाउन हें व्यापारी लोकांचें व धंदेवाल्या लोकांचें केंद्र आहे. १९१०—२० च्या दरम्यान केपटाउनची भरभराट फार झाली व या कामीं म्युनिसिपालिटीनें फार पुढाकार घेतला. आक्टोबर ते मार्च या महिन्यात सॉउथ आफ्रिकेंतील लोकांचें केपटाउन हें विश्रांतीचें स्थान आहे.

दक्षिण आफ्रिकेंतील बंदरामध्यें दरबानच्या खालोखाल, केपटाऊनचा नंबर लागतो. १९१९ मध्यें २२,५३,००० टन वहनशक्तीचीं ब्रिटिश जहाजें व ४२४००० टनाचीं परराष्ट्रिय जहाजें केपटाउनमध्यें उतरलीं. केपटाउन व सॉउथवेस्ट प्रोटेक्टरेट यामध्यें सन १९१५ मध्यें रेल्वे झाली व १९१८ मध्यें, उत्तरेस लुअलबापर्यंत तिचा विस्तार झाला. १९११ मध्यें स्लॅंगकॉप येथें बिनतारी विद्युद्यंत्र स्थापण्यांत आलें. व १९१९ मध्यें विमानगृह यंगफील्ड येथें स्थापण्यात आलें.

केपटाउनच्या मध्यापासून पांच मैलांवर रॉडबाश नांवाचा एक शहराचा भाग आहे. त्या ठिकाणीं उत्तम इमारती दृष्टीस पडतात. या भागातच ग्रूटशर या इमारतींत यूनियनचा मुख्य प्रधान राहतो. याच ठिकाणीं, केपटाउनच्या विश्वविद्यालयासाठीं जागा घेण्यांत येऊन त्याठिकाणीं प्रचंड इमारत उठविण्यात आली. ग्रूटशोर येथेंच ऱ्होड्सचें स्मारक उभारण्यात आलें. रॅंडेबाशच्या जवळच सन१९१४ मध्यें नॅशनल बोटॅनिकल गार्डन्स बांधण्यांत आली. सन १९१४ मध्यें हेबलबे येथें समुद्राकडे तोंड करून एक मोठी फिरण्याची जागा बांधण्यात आली.

केप प्राव्हिन्स—' दक्षिण आफ्रिका संघा ' तील हा सर्वात मोठा प्रांत आहे. इ. स. १९११ च्या खानेसुमारींत या प्रांताची लोकसंख्या २५,६४,९६५ भरली. त्यापैकीं ५,८२,३६७ इतकी गोऱ्यांची वस्ती होती व इतर निरनिराळ्या जातींचा लोकसंख्या १९,८२,५९८भरली.इतर जातींमध्यें मुख्यतः बंटू (१५,१९,९३९)व आशियाटिक(७६९०) या जातींचे लोक होते. या प्रांतांत केपटाउन(१,६१,८५९). किंबर्ले (४४४३३), पोर्ट एलिझाबेथ (३७०६३), ईस्ट लंडन (२४६०६) व ह्यम्सडाउन (१३८३०) हीं मुख्य शहरें आहेत.

राज्यव्यवस्था.-या प्रांताचा राज्यकारभार प्रांतिक कौन्सिलमार्फत चालविला जातो. हें प्रांतिक कौन्सिल दर तीन वर्षांनीं नवीन निवडलें जातें. ॲक्ट ऑफ यूनियननें ठरविलेल्या सर्व विषयांवर तसेंच यूनियन पार्लमेंटनें ठरवून दिलेल्या सर्व विषयांवर कायदे करण्याचा या कौन्सिलला पूर्ण हक्क आहे. प्रांतिक कारभाराला लागणाऱ्या पैशासाठीं कर बसविण्याचा या कौन्सिलला अधिकार आहे. तसेंच म्युनिसिपालिटयावर देखरेख ठेवणें. प्राथमिक शिक्षणाची सर्व तजवीज करणें या गोष्टी या कौन्सिलाकडे असून तन्निमित्त लागणारा पैसा, कराच्या रूपानें उभारण्याची या कौन्सिलला पूर्ण अखत्यारी आहे. यूनियन पार्लमेंटच्या अधिकाराशीं व हितासंबधीं विरोधीं असे कायदे मात्र करण्याला या कौन्सिलला अधिकार नाहीं. तात्पर्य कौन्सिल कायदे करणारी संस्था जरी आहे तरी त्याच्यावर यूनियन पार्लमेंटची पूर्ण

हुकमत चालते. या प्रांताला स्वतंत्र न्यायखातें नाहीं. रेल्वे, बंदरें हीं सर्व यूनियन पार्लमेंटच्या ताब्यात आहेत.

या प्रातिक कौन्सिलला आपला अध्यक्ष निवडण्याचा पूर्ण अधिकार आहे. राज्यकारभाराची प्रत्यक्ष व्यवस्था पहाण्याकरता कौन्सिल चार माणसांची कमीटि नेमते. या कार्यकारी मंडळाच्या मुख्याला ॲडमिनिस्ट्रेटर असें नांव आहे. हा ॲडमिनिस्ट्रेटर दर पाच वर्षांनीं नवीन नेमला जातो. त्याचप्रमाणें एक प्रांतिक हिशेब तपासनीस व कायदेपंडितहि यूनियन पार्लमेंटतर्फे निवडण्याची पद्धत आहे.

इ. स. १९१३ व १९१७ च्या फायनॅन्शियल रिफार्म्स ॲक्टान्वयें यूनियन सरकार या प्रातिक सरकारला दरवर्षी त्या प्रांताला येणाऱ्या खर्चाचा निम्मा खर्च देतें. १९१७–१९१८ सालीं प्रांतिक सरकारला यूनियन पार्लमेंटकडून ९,९९,००० पौंड खंडणी मिळाली. प्रांतिक सरकारास खास प्रांतिक उत्पन्न ४२,६०,०० पौंड झालें. १९१७–१८ सालीं प्रांतिक खर्च १४,७७,००० पौंड झाला.त्यांत केवळ शिक्षणाकरिता ११,०५,०० पौंड खर्च झाले.

इ ति हा स —इ. स. १९१० मध्यें 'यूनियन' अस्तित्वात येईपावेतो राजकीयदृष्ट्या केप प्राव्हिन्सला स्वतंत्र इतिहास असा नव्हताच. दक्षिण आफ्रिकेंतील राजकीय पक्ष प्रांतिकदृष्ट्या बनलेले नाहींत. पण सर्व राजकीय पक्ष ब्रिटिशांशीं संबंध तोडण्याच्या बाबतींत एक मताचे आहेत. अंतर्गत राजकारभारांत प्रांतिक कौन्सिलनें आपलें धोरण पूर्णपणें प्रागतिक ठेवलें आहे. शिक्षणाच्या बाबतींत कौन्सिल तर फारच खबरदारी घेते. यूनियन अस्तित्वांत आल्यानंतर या प्रांताचा पहिला ॲडमिनिस्ट्रेटर सर एन्. एफ्. डी वाल झाला. याची ॲडमिनिस्ट्रेटर या नात्यानें दोनदा निवडणूक झाली व तिसऱ्या खेपेसहि पुन्हा त्यालाच निवडण्यात आलें.

इ. स. १९१०–२० च्या अवधींत औद्योगिक व कृषिविषयक वाढ बरीच झाली. गोऱ्या लोकांइतकीच इतर वर्गांच्या लोकांतहि सामाजिक व औद्योगिक बाबतींत प्रगति करण्याबद्दल अटोकाट प्रयत्न करण्यांत आले.

केप्लर योहान—(१५७१—१६३०) या जर्मन ज्योतिःशास्त्रज्ञाचें चरित्र व त्याचे शोध 'विज्ञानेतिहास' या विभागांत (पा. ३४३—३४५) दिले आहेत. त्या ग्रंथांत न आलेली माहिती येथें ग्रथित केलेली आहे.

आईबापाच्या दुर्दैवाचे व गैरवागणुकीचे परिणाम जोहानला लहानपणीं भोगावे लागले. एवढेंच नव्हे तर देवीच्या दुखण्यामुळें त्याच्या हाताची पूर्ण वाढ खुंटून त्याची दृष्टीहि मंद झाली

भविष्य वर्तविणारीं पंचांगें रचणें हा धंदा त्या काळांत जर्मनींत लोकप्रिय होता. ग्रहांचे परिणाम पृथ्वीवर होतात हें त्यास स्वानुभवावरूनच कळलें व प्रतिवर्षी घडणाऱ्या गोष्टी तो वर्तवूं लागला १५९५ मध्यें बारबरा व्हॉन मूहलेक नांवाच्या एका संपन्न स्त्रीशीं त्याचें लग्न झालें.

टायकोब्राहेच्या आकस्मिक मृत्यूमुळें केप्लरला पुढें येण्यास चांगली संधी मिळाली. बादशहा दुसरा रुडोल्फ यानें त्याची सरकारी गणिती म्हणून नेमणूक करून टायकोचे सर्व कागदपत्र त्याच्या स्वाधीन केले. टायकोनें आरंभिलेला रूडॉल्फाइन नावाचा अपूर्ण ग्रंथ पूर्ण करण्याचें श्रमदायक पण गोड असें काम केप्लरवर पडलें "डी फंडामेंटिस आस्ट्रोलॉजी सर्टिऑरिबस" या ग्रंथात केप्लरची कल्पनाशक्ति व सत्यनिष्ठा व्यक्त होते. स्वाभाविक कल व शक्यता यावर आधिष्ठित होऊन वर्तविलीं जाणारीं त्याचीं भविष्यें जनसम्मत होऊं लागलीं. बादशहा व इतर लोक यांच्या कुंडल्या त्यानें मांडल्या. अशा हलक्या धंद्याकडे व धर्मभोळपणाकडे आपणास वळण्यास मूळ कारण परिस्थिति होय असें त्याचें म्हणणें असे.

तरी केप्लरनें आपल्या आयुष्यांतील मुख्य उद्दीष्टाची केव्हांच हयगय केली नाहीं. त्याचा दृक्शास्त्राचा अभ्यास १६०४ मध्यें 'ॲस्ट्रोनोमिया पार्स ऑप्टिका' या पुस्तकानें मूर्त स्वरूपास आला. दृक्शास्त्रांतील शोध व वक्रीभवनाच्या खऱ्या सिद्धांताचा उगम या दोन गोष्टी उपयुक्त ग्रंथात दिसून येतात. १६०९ च्या सुमारास मंगळासंबंधीं त्याचा शोध पूर्ण झाला.

इ. स. १६११ हें वर्ष केप्लरला फार खडतर गेलें. त्याची बायको विषमज्वरानें मृत झाली. कौटुंबिक दुःखांत बाह्य आपत्तींची भर पडली. त्याच वर्षी रुडोल्फला घालवून देऊन मॅथिअसनें प्रेगची बोहिमियन राजसत्ता बळकाविली. तथापि दरबारी गणिती म्हणून केप्लरचें स्थान कायम राहिलें. बादशहा मॅथिअस याच्या साह्यानें जर्मनींत ग्रेगोरिअन पंचाग सुरू करण्याचा त्यानें १६१३ मध्यें प्रयत्न केला. कांहीं निबंधांतून त्यानें प्रसिद्ध केलें कीं, ख्रिस्तजन्मशक सर्वांनीं मान्य केलेल्या तारखेपेक्षा ५ वर्षे आधीं आहे.

सूसन्ना रुटलिंगर नांवाच्या एका निराधार बाईशीं त्याचें दुसरें लग्न लिंझ येथें १६१३ त झालें. या लग्नामुळें त्याला अनुरूप व सुखावह असें त्याचें वैवाहिक आयुष्य गेलें.भांड्यांचे घनफळ काढण्याच्या सदोष पद्धतीकडे त्याचें लक्ष वेधल्यामुळें त्यानें या विषयावर एक निबंध लिहिला व त्याच्या योगानें सूक्ष्मांचें गणित करणाऱ्यांमध्यें त्याची गणना होऊं लागली. १६१८ च्या तीन धूमकेतूंवरील आपले विचार 'डी कॉमेटीस' पुस्तकामध्यें त्यानें प्रसिद्ध केले. या ग्रंथाच्या प्रकाशनामुळें त्याचा तिसरा सिद्धांत लोकांपुढें आला. इंग्लंडचा पहिला जेम्स यास हें पुस्तक अर्पण करण्यांत आल्यानंतर त्याला दरबारी निमंत्रण आलें. परंतु केप्लर इंग्लंडास जाऊं शकला नाहीं.

'दि एपिटामी अस्ट्रॉनमी कोपर्निकन' या नांवाचें कोपर्निकसच्या शास्त्रावर सुबोध व सुंदर पुस्तक त्यानें लिहिलें. या पुस्तकात भौतिक ज्योतिषशास्त्राला महत्व दिलेलें असून ज्योन्हिअन नियमांच्या पद्धतीचाहि त्यात अंतर्भाव केलेला आहे. १६२० सालीं त्यानें प्रथम लागरिथम उपयोगांत आणिले व १६२४ मध्यें या विषयावर एक पुस्तकहि लिहिलें.

कौटुंबिक त्रासामुळें केप्लरच्या अभ्यासांत फार व्यत्यय येई. त्याची आई कॅथेराइन केप्लर हिचा स्वभाव मोठा उपद्व्यापी होता.

१६३० मध्यें जादुगारीण व चेटकी अशा आरोपांवर या ७४ वर्षाच्या म्हातारीस कोर्टाकडून पकडण्यांत आलें. तेरा महिने तुरुंगवास भोगल्यानंतर केप्लरच्या अविश्रांत खटपटीमुळें तिची सुटका झाली. नंतर लवकरच तिनें इहलोक सोडला.

यावेळीं नवीन कोष्टकें तयार करण्यांत केप्लर व्यग्र झाला होता. आर्थिक अडचणी व धार्मिक आणि आपसांतील तंटे यामुळें त्याची खरी मनीषा तृप्त होणें दूरच राहिलें. जून १६२४ ते ऑगस्ट २९सन १६२६ पर्यंत लिंझला वेढा पडून बंडाळी माजली होती यूलम येथें आपले खिळे किंवा टैप घेऊन जाण्याची परवानगी मिळताच स.१६२७मध्यें रुडोल्फाइन टेबल्स नांवाचें त्यानें आपलें पुस्तक जगापुढें आणलें.

दुसऱ्या फर्डिनन्ड बादशहानें फ्रीएडलंडच्या उमरावाकडे केप्लरला नोकरी लावून दिली व १६२८ त केप्लर सहकुटुंब सायलेशियांतील सागन येथें रहाण्यास गेला. त्या ठिकाणीं १६२९ मध्यें 'ए नोटिस टु दि क्यूरिअस इन थिंग्ज सिलेश्चिअल' या नावाचें व ज्योतिषांनां आगामी संक्रान्तीबद्दल सूचना देणारें पुस्तक त्यानें प्रसिद्ध केलें. त्यात नमूद केल्याप्रमाणें ७ नोव्हेंबर १६३१ रोजीं पॅरिसमध्यें गॅसेंडीला बुधाचें संक्रमण प्रत्यक्ष दिसलें. ६ डिसेंबरला होणारें शुक्राचें संक्रमण पश्चिम यूरोपांत मात्र अदृश्य झालें होतें. १५ नोव्हेंबर १६३० रोजीं वयाच्या ५९ व्या वर्षी केप्लर मरण पावला. पहिल्या बायकोकडून ५ व दुसरीकडून ७ अशीं १२ मुलें केप्लरला झालीं. परंतु त्यांपैकीं लहानाचीं मोठी होऊन अवघीं दोन मुलेंच जगलीं.

विश्वासंबंधीं केप्लरची कल्पना पायथॅगोरस व प्लेटोप्रमाणेंच होती. साधर्म्य व सौंदर्य यांच्या अमूर्त कल्पनेशीं अनुरूप अशीच मूर्त विश्वाच्या विभागांची योजना असली पाहिजे असें तो खात्रीपूर्वक सांगत असे. अशा रीतीनें प्रज्वलित झालेल्या त्याच्या प्रतिभाशक्तीला अनेक श्रमांनंतर नवीन शोध लावितां आले. सूर्याच्या मध्यबिंदूतून सर्व गृहांच्या कक्षांचे सपाट प्रदेश जातात या गोष्टीचें दिग्दर्शन करून सर्व ग्रहमालेची शक्ति सूर्यापासून आहे हें सिद्ध करून, केप्लरनें भौतिकशास्त्राचा संस्थापक असें सार्थ नाव जगांत मिळविलें. भूमितीच्या रचना व संगीतांतील आतरा याचा ग्रहांच्या गती व अंतर या दोहोंकडे अन्योन्य संबध आहे असें दाखविण्यात केप्लरनें आपल्या कल्पनासृष्टींतील एक चमत्कार दाखविला खरा. परंतु ज्या सिद्धान्तावर व शोधावर त्याची कीर्ति अविष्ठित झाली आहे त्या सिद्धान्ताइतकेंच महत्व तो वरील कल्पनाविलासाला देत असे. पायथॅगोरसप्रमाणेंच केप्लरची विश्वासंबंधीं कल्पना आहे. मध्यबिंदु किंवा सूर्य, अचल ताऱ्याच्या क्षेत्रानें निर्दिष्ट असा पृष्ठभाग आणि ईथर नामक वस्तूनें व्याप्त असा मधील अवकाश, असें केप्लरचें त्रिदळ विश्व आहे. ग्रहांच्या परिभ्रमणाचें कारण सूर्याचें स्वतः आसाभोंवतीं फिरणें हें आहे असा त्याचा तर्क होता व सूर्यावरील डागाच्या शोधामुळें तो दृढमूल झाला.

असंख्य अडचणींना न जुमानता केप्लरनें केलेल्या प्रचंड कामाचा मुळींच आश्चर्यमूढ न होतां नुस्ता विचार करणेंहि अशक्य आहे. त्याच्या तेजस्वी उद्योगामुळें संकटें पळून जात व यामुळें त्याला आपल्यांतील उत्कृष्ट गुणाचा फायदा मानव जातीला देता आला. त्याचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व मनमिळाऊ होता. दुसऱ्यांतील गुण जाणण्यांत त्याच्या मनाचें औदार्य प्रगट होई. यामुळें त्याला असहिष्णुतेचा कधींच बाधा झाली नाहीं. प्रक्षुब्ध मनःस्थितींतहि त्यानें प्रसन्न वृत्ति कायम राखली होती.

महाराणी दुसरी कॅथेराइन हिनें १७२७ त विकत घेतलेलें व पुलकोवाच्या वेधशाळेंत कोणाच्याहि सहसा हातास लागणारे नाहींत अशा स्थितींत पडून असलेलें केप्लरचे समग्र ग्रंथ प्रकाशात आणण्याचें काम डॉ. फ्रिसच याचे संपादकत्वाखालीं पार पडलें. या समग्र ग्रंथांत, त्याच्या निबंधाचा, चरित्राचा व पत्रव्यवहाराचा अन्तर्भाव झाला आहे. 'जोहानीस केप्लेरा ऑपेरा ऑमनिया' असा ह्या समग्र ग्रंथाचा मथळा असून तो फ्रॅंकफोर्ट येथें १८५८—१८७१ पर्यंत एकंदर आठ विभागात छापून प्रसिद्ध झाला आहे.

केंब्रिज—(१) हें इंग्लंडांतील केंब्रिजशायर नांवाच्या परगण्याचें मुख्य ठिकाण असून हें पार्लमेंटचा बरो आहे. हें लंडनच्या ईशान्येस आगगाडीनें ५६ मैल आहे. येथील लोकसंख्या १९२१ मध्यें ५९,२६२ होती. या शहराचा बराचसा भाग कॅम नदीच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. याचें क्षेत्रफळ ३२३३ एकर आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील विश्वविद्यालयांत येथील विश्वविद्यालयाचा आक्सफोर्डप्रमाणें पहिला नंबर आहे. इ. स. १२८१—८४ मध्यें येथें पहिलें कॉलेज काढण्यांत आलें. पुढें निरनिराळ्या वेळीं येथें बऱ्याच कॉलेजांची स्थापना झाली. त्यांत ख्राईस्ट पिटरहाऊस (१२८४), क्लेअर (१३२६)पेंब्रोक (१३४७),

ट्रिनिटी (१३५०), कापर्स (१३५२), गॉनविले (१३८४), किंग्स (१४४१) क्वीन्स(१४४८), जीझस (१४९६) ख्राइस्ट (१५०५),मॅक्डेलीन(१५४२),एम्यानुएल (१५८४) डाऊनिंग (१८००)वगैरे मुख्य आहेत.या कॉलेजांना जोडलेलीं प्रार्थनामंदिरें, वाचनालयें, पदार्थसंग्रहालयें, निरनिराळ्या उपयोगांकरितां प्रयोगशाळा, वेधशाळा वगैरे अनेक संस्था आहेत. या विद्यालयांत कॉलेजांत न जाणारे विद्यार्थीहि अभ्यास करितात व त्यांच्याकरितां एक वाचनालय व कांहीं व्याख्यानगृहें आहेत. येथें स्त्रियांकरितां दोन कॉलेजें आहेत.

विश्वविद्यालय (युनिव्हर्सिटी) म्हणजे या सर्व कॉलेजांचा संघ होय. या कॉलेजांना विश्वविद्यालयाच्या कायद्याप्रमाणें चालावें लागतें. एलिझाबेथ राणीच्या वेळच्या विश्वविद्यालयाच्या कायद्यांचें इ.स १८५८ मध्यें रूपांतर झालें. यांतहि पुन्हां १८७२ व १८८२ त सुधारणा करण्यांत आल्या. त्याप्रमाणें चान्सेलर हा विश्वविद्यालयाचा मुख्य असतो. हा विश्वविद्यालयाचा सभासद असून सीनेटनें निवडलेला उच्च दर्जाचा मनुष्य असतो. हा येथील रहिवासी नसला तर हा आपले अधिकार दुय्यम चान्सेलरला देतो व हाहि सीनेटनें एक वर्षाकरितां निवडलेला असतो. याच्या हाताखालीं दोन प्रॉक्टर असतात व हे क्रमाक्रमानें दोन कॉलेजें मिळून एक याप्रमाणें निवडले जातात. यांनां मदतनीस म्हणून ४ प्रो-प्रॉक्टर असतात. विश्वविद्यालयाच्या सभासदांत शिस्त राखण्याकरितां चान्सेलर व सीनेटनें नेमिलेले सहा विद्यालयाचे मुख्य अधिकारी मिळून एक सभा असते.

सीनेटला कायदे करण्याचा अधिकार असतो. या सीनेटांत चान्सेलर, दुय्यम चान्सेलर, कायदा, वैद्यकी, शास्त्र, वाङ्मय वगैरेंचे डॉक्टर व कायदा, गायनवादन, वैद्यकी व कला यांचा अभ्यास करून मास्टर (पारंगत) पदवी घेतलेले लोक यांना मत असतें. सीनेटचें कौन्सिल सर्व सूचना व ठराव सिनेटपुढें आणतें.

केंब्रिज विश्वविद्यालयांत सुमारें ३००० विद्यार्थी असतात. कालेजांतील अभ्यासाच्या तीन टर्म्स असतात व त्यांत एकंदर २२७ दिवस येतात. ९ टर्म्स राहिल्यानंतर अंडर ग्रॅज्युएटला बी. ए च्या परिक्षेला बसतां येतें.

बी. ए. च्या परिक्षेस बसण्याकरितां तीन परीक्षा द्याव्या लागतात. त्यांना लिट्लगो, जनरल् व स्पेशल अशीं नांवें आहेत. या विश्वविद्यालयाच्या अटी पाळणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यांतील कोणतेहि विद्यालय याला जोडतां येतें. विश्वविद्यालयांतील मुख्य महत्वाच्या प्रसंगास " मे आठवडा " म्हणतात व त्यावेळीं निरनिराळ्या तऱ्हेची करमणूक केली जाते.

(२) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील मॅसाचुसेट्समधील मिडलसेक्स काउंटीचें मुख्य स्थान. हें बॉस्टन जवळ चार्लस नदीवर वसलेलें आहे. पण त्याची राज्यव्यवस्था निराळी आहे. लो. सं. (१९१७) १,१४,२९३. येथें बहुतेक लोक यूरोपीय आहेत. शहरांत फक्त एकच रस्ते आहे.

हें हारवर्ड विश्वविद्यालयाचें स्थळ असून वाङ्मयविषयक व शास्त्रीय अभ्यासाबद्दल प्रसिद्ध आहे. ॲन्डोव्हर सिमिनरी नांवाची संयुक्त संस्थानांतील सर्वांत जुनी धार्मिक शाळा येथें आहे. हें ठिकाण ऐतिहासिक व वाङ्मय विषयक दृष्टीनें महत्वाचें आहे.

येथील मुख्य उद्योगधंदे म्हणजे मास बंद करून प.ठविणें, छापणें, जोडे तयार करणें, पियानो तयार करणें वगैरे होत. याला शहराचे हक्क १८४६ सात मिळाले.

केरल.—हा देश फार प्राचीन आहे. महाभारतात भीष्मपर्व (अ. ९) व सभापर्व (अ. ३१) यांमध्यें हा देश दक्षिणापथांत किष्किंधेच्या दक्षिणेस असल्याचें म्हटलें आहे. भागवतांत दहाव्या स्कंधांत याचा उल्लेख येतो, (अ. १३, १९, ७९, ८२). बृहत्संहितेमध्येंहि याचा नामनिर्देश आढळतो(१६. २). अशोकाच्या लेखांत केरलपुत्र म्हणून लहानदेशवाचक असें नाव येतें. हें छोटें राज्य पुढें पाण्ड्यराज्यांत सामील झालें. हें राज्य मलबार किनाऱ्यावर असून तामीळभाषा बोलणारें होतें. हें बहुतेक पश्चिमघांटाच्या म्हणजे सह्याद्रीच्या आसपास होतें. याच्या उत्तरेस मंगलोर व त्याच्याजवळ जिचें मुख आहे अशी चंद्रगिरी नदी होती व दक्षिणेस थेट कन्याकुमारी असून, पश्चिमेस अरबी समुद्र होता. समुद्रगुप्तानें जिंकलेल्या दक्षिणेकडील राजांमध्यें केरळ राजानें नांव आहे. या देशालाच पुढें चेर देश म्हणूं लागले. अशोकानें दक्षिणेतील ज्या पांच राजांच्या दरबारीं आपले वकील ठेविले होते त्यांत केरल राजाचा समावेश होता. दुसऱ्या शतकांतील एका केरल राजानें-याची राजधानी हल्लींचें क्रांगनोर ही होती-गंगाकांठीं कांहीं राजांचा पराभव केल्याचा उल्लेख आढळतो. चोल, पाण्ड्य, व हे केरल उर्फ चेर यांचे नेहमीं आपापसांत झगडे चालत. दुसऱ्या शतकांत, चोलानंतर हे केरल प्रबळ झाले. कांचीकर पल्लवांनीं तिसऱ्या शतकांत यांचा कांहीं प्रांत काबीज केला होता. परांतक चोल (पहिला) यानें इ. स. ९३० च्या सुमारास केरल राजाशीं शरीरसंबंध करून आपली सरहद्द केरल देशापर्यंत भिडविली होती. परंतु पुढें राजराज चोलानें (इ. स ९८५) केरलावर स्वाऱ्या केल्या आणि वीरराजेंद्र चोलानें तर उलगाई येथें केरल राजाचा पराभव केला. परंतु पुढें जेव्हां चोल साम्राज्य मोडलें तेव्हां तें मोडण्यास कारणीभूत होणाऱ्या राजांत पाण्ड्य, काकतीय यांच्याबरोबरच केरळ राजांचाहि समावेश होतो. या देशाबद्दल जास्त माहिती चेर या नांवाखाली आढळेल [अय्यर-एन्शन्ट इंडिया; बृहत्संहिता; गुप्त इन्स्क्रिप्शन्स; महाभारत; भागवत; स्मिथ-ऑक्स. हिस्टरी ऑफ इंडिया].

केरवली—राजपुतान्यांतील एक संस्थान व त्याची राजधानी.('करौली' पहा).

केरादी—जयपूर संस्थानांतील याच नांवाच्या इलाखदारीचें मुख्य गांव. हा इलाखदार रौतिया जातीचा असून त्यास 'बराईक' ही स्थानिक पदवी आहे. यांत२२ खेडीं असून टाकोळी ३७६ रु.४ आ.आहे. राजनिष्ठेच्या अटीवर ही इस्टेट इलाखदाराकडे आहे.

केरूर—मुंबई इलाख्यातील विजापूर जिल्ह्यामधील बदामी तालुक्यांतील एक खेडेंगांव. या गांवाची लोकसंख्या १९०१ सालीं ५३५१ होती. सोलापूर ते हुबळी रस्त्यावरील तटबंदीचें हें ठिकाण आहे. या खेड्याच्या नैर्ऋत्यदिशेस पाव मैलावर एका उंचवटयाच्या जागीं एक किल्ला आहे. या किल्ल्याच्या जवळच पूर्वेस एक मार्केट बांधण्यांत आलें आहे व दक्षिणेस असलेल्या जुन्या मार्केटमध्यें हल्लीं विणकऱ्यांची वसाहत झाली आहे. या खेड्यांत व किल्ल्यात पुष्कळ देवालयें असून एक पाण्याचा तलाव आहे. नगरेश्वराचें देवालय सुमारें १५०५ त बांधलें असावें. त्यात बरेच लेख असावे असें म्हणतात.

केरो—आधुनिक ईजिप्तची कायरो राजधानी. हें नाईल नदीच्या कांठीं अलेक्झांड्रियाच्या नैर्ऋत्येस १३० मैल व सुवेझच्या पूर्वेस १४८ मैल आहे. या शहराचें क्षेत्रफळ ८ चौरस मैल असून येथें एक किल्ला आहे. १९ व्या शतकाच्या मध्यापासून आतांपर्यंत याची लोकसंख्या व आकार दुप्पट झाला आहे. १९१७ मध्यें लोकसंख्या सुमारें ८ लाख होती. पैकीं मुसुलमान ६ लक्षावर होते. उच्च दर्जाचे देश्य लोक तुर्क अथवा अर्धतुर्क रक्ताचे आहेत. दुसऱ्या जाति पुष्कळ असून त्यात ग्रीक, इतालियन,ब्रिटिश, फ्रेंच व ज्यू लोक फार आहेत. येथील रोगट हवेमुळें पूर्वी मृत्युसंख्या फार होती.ब्रिटिशाच्या ताब्यात गेल्यापासून या शहरची आरोग्याच्या बाबतींत बरीच सुधारणा झाली व आतां हवा साधारणतः आरोग्यकारक आहे. सर्वसाधारण उष्णमान ६८° फ. असतें.

द ळ ण व ळ ण:-दळणवळणाचे मार्ग सुधारण्यासाठीं आरोग्य दृष्ट्या निरनिराळ्या सुधारणा करण्यासाठीं महायुद्ध सुरू होईपावेतों जारीचे प्रयत्न करण्यात आले. १९१२ मध्यें बुलाक येथें नाईल नदीवर नवीन पूल बांधण्यात आला. १९१३मध्यें व्यापारासाठीं हेलवान व केरो यांच्या दरम्यान सडक बांधण्यांत आली. तसेंच केरो येथें बिनतारी विद्युद्‌गृह उघडण्यांत आलें. वैमानिक स्टेशनहि १९१४ सालीं बांधण्यांत आलें. महायुद्ध सुरू असतांना शहराच्या पूर्व भागांतील सांचलेली माती खणण्यांत येऊन ती जागा स्वच्छ करण्यांत आली व त्या ठिकाणीं निरनिराळ्या कचेऱ्या बांधण्यांत आल्या.

१९१८ मध्यें अरबांच्या मुलूखगिरीपासून तों मेहमेत-अलीच्या कारकीर्दीपर्यंतच्या सर्व जुन्या इमारती सुरक्षित ठेवण्यासाठीं तसेंच जुनें केरो येथें असलेल्या कास्रेष शॅम हा रोमन किल्ला शाबूत ठेवण्यासाठीं एक पुराणवस्तुसंरक्षक कायदा पास करण्यांत आला. हा किल्ला खणण्याचें काम सुरू करण्यांत आलें व त्यांत पुष्कळ जुन्या वस्तू सांपडल्या. इब्न एलनची मशीद महायुद्धाच्या अमदानींत उपलब्ध झाली. बिवर्सच्या मशिदींत पूर्वी कसाईखाना होता तो तेथून काढण्यांत येऊन तेथें १९१८-१९ च्या दरम्यान सुंदर बाग करण्यांत आली. बुलाक येथें व दहेरच्या मशिदीच्या आसपास नवीन सार्वजनिक बागा करण्यात आल्या. सुलतानिया ग्रंथसंग्रहालयाची पुनर्घटना करण्यांत आली. १९२० सालीं या ग्रंथालयात १२००० पुस्तकसंग्रह होता व त्यांत पौर्वात्य देशाबद्दलची माहिती देणारीं ४०,०००पुस्तकें होती. शहररचनेच्या नव्या कल्पना महायुद्ध सुरू झाल्यामुळें मागें पडल्या. पण त्या कल्पनांना आतां हळूहळू मूर्त स्वरूप देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

केरोचा व्यापार मुख्यतः मालाची नेआण करण्याचा आहे. सुदानमधून हस्तिदंत, कातडें,उत्तरईजिप्तमधून कापूस व साखर, हिंदुस्थानांतून नीळ व शाली हे व्यापाराचे जिन्नस येतात. कागदाच्या गिरण्या व कापसाच्या गिरण्या येथें आहेत. रेशमाचा माल, बंदुकीची दारू व कमावलेलीं कातडीं येथें तयार होतात. येथें एक वस्तुसंग्रहालय असून त्यांत जुन्या वस्तूंचा मौल्यवान संग्रह आहे.

इ ति हा स.—ईजिप्त अरब लोकांच्या ताब्यात जाण्यापूर्वी येथें मोकळें मैदान होतें. हल्लींच्या शहराच्या जवळ बाबिलॉन ही अति प्राचीन वसाहत होती व ती मेंफिसच्या ताब्यांत असावी असें वाटतें. ईजिप्त जेव्हां इराणी लोकांनीं जिंकला तेव्हां बबिलॉन शहर (ख्रि. पू.५२५ च्या सुमारास) बसविलें गेलें रोमन लोकांनीं तेथें एक किल्ला बांधला. बाबिलॉन शहर नष्ट झालें तरी किल्ला राहिला आहे. केरोलाच बाबिलॉन म्हणत असत अशाबद्दलहि पुरावा सांपडतो. खुद्द केरो ईजिप्तची चौथी मुसुलमानी राजधानी आहे. नवें शहर लवकरच महत्वाचें ठिकाण झालें हें खलिफानें नेमलेल्या नायबाचें रहाण्याची जागा होती. अमिरानें एलफोस्टांट नांवाची सर्वांत जुनी राजधानी स्थापली. याला मश्र हें नांव मिळालें व तें कायरोबद्दल व मेंफिसबद्दल अरब लोक उपयोगात आणीत होते. उमईद वंशाच्या न्हासानंतर इ. स. ७५० त सुलेमाननें 'एल अस्कार' शहर बसविलें. व तें अब्बासीद खलिफाच्या प्रतिनिधीचें ठिकाण झालें. ८७३च्या सुमारास एल्. कटइ नांवाची राजधानी स्थापण्यात आली व ती राजघराण्याची राहण्याची जागा होती. परंतु लवकरच हें शहर लुटलें गेलें हल्लींचें कायरो शहर येथेंच वसलेलें आहे.

इ. स. ९६८ मध्यें ईजिप्त जिंकणाऱ्या जोहर-एल कैदनें नवीन राजधानी स्थापली, व तिला एल'काहिरा' म्हणजे विजयी असें नाव दिलें व या नावाचा अपभ्रंश केरो असा झाला. हल्लींच्या राजधानीचा ¾ भाग या शहरानें व्यापलेला

होता. हळूहळू हें एलफोस्टांटपेक्षां मोठें झालें व त्यालाच मिसर म्हणूं लागले.

इ. स. ११०६ मध्यें ख्रिस्ती धर्मयोद्धयांनीं यावर स्वारी केली परंतु त्यांनां यश आलें नाहीं. १५१७ त तुर्क लोकांनीं हें शहर जिंकलें व तेव्हांपासून याचा ऱ्हास होऊं लागला. १७९८ मध्यें हें शहर फ्रेंच लोकांनीं जिंकलें; परंतु ११०१ त त्यांनां इंग्रज व तुर्क लोकांनीं हाकलून दिलें व शहर तुर्क लोकांनां देण्यांत आलें. १८११ मध्यें तुर्कांचा प्रतिनिधि मेहमेतअली यानें मामेलुक लोकांची कत्तल करूनतो त्या देशाचा स्वतः मालक झाला. व केरो स्वतंत्र राज्याची राजधानी झाली. १८८१ मध्यें केरो ब्रिटिशांनां घेतलें व कांहीं ब्रिटिश सैन्य अद्याप किल्ल्यांत रहातें. १९१९ सालीं केरोमध्यें मोठें बंड होऊन झगलूलपाशा व त्याचे तीन सांथीदार यांना हद्दपार करण्यांत आलें. पण ईजिप्तला स्वराज्य मिळाल्यावर झगलूलला परत आणलें.

सुवेझपासून केरो २४७ मैल असून जाण्याला रेल्वे आहे. याचें जुनें केरो व न्यू केरो असे दोन भाग असून दोहोंला जोडणारी विजेची रेल्वे आहे. न्यू केरोची मांडणी फार उत्तम व रेखीव आहे. येथें जुना किल्ला, जनावरांचा बाग, म्यूझियम (पुराणवस्तुसंग्रहालय) व त्यांतील ममीज (म्हणजे रासायनिक कृतीनें बिलकूल बिघडूं न देतां राखून ठेवलेलीं ईजिप्तमधील पुरातन माणसें, कुत्रीं, मांजरें पक्षी, साप, सुसरी यांचीं प्रेतें), अरबी भाषेतील ग्रंथांचा मोठा संग्रह असलेली लायब्ररी, अरबी युनिव्हर्सिटी, एझबेके बाग, इत्यादि ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. परंतु सर्वांत महत्त्वाचें पहाण्याचें ठिकाण म्हणजे जगांतील सात आश्चर्यांपैकीं [१ ईजिप्तांतील पिरामिड २ बाबिलोन येथील सेमिरामिसचे बाग; ३ ऑलिंपिया येथील झूसचा पुतळा; ४ एफेसिस येथील आर्टेमिसचें देवालय; ५ हालिकार्नेसस येथील मॉसोलियम; ६ ऱ्होडस येथील कलोसस; ७ आलेक्झांड्रिया येथील फारोस लाईट हाऊस किंवा बाबिलोनियाच्या भिंती] एक आश्चर्य जें ईजिप्तमधील ' पिरामिड ' तें होय. शहरापासून पिरामिडपर्यंत ट्रामगाड्या असून जाण्यास १॥ तास लागतो. वाटेंत नाईल नदीच्या विस्तीर्ण पात्रावरील पूल लागतो. पिरामिड उंचवटयावर बांधलेले असून भोंवताली रुक्ष वाळवंट आहे. सर्वांत मोठा पिरामिड ४५१ फूट उंच असून बुडाशीं लांबी व रुंदी दोन्हीं सारख्याच म्हणजे ७५० फूट आहेत. या एकटयानें १३ एकर जमीन व्यापिली आहे. याच्या जवळ आणखी दोन पिरामिड असून त्यांपैकीं एकाची उंची ४४७ फूट व दुसऱ्याची २०३ फूट आहे. हे पिरामिड मोठाले ओबडधोबड दगड रचून केलेले असून त्यांवरील चुन्याच्या गिलाव्यावर अनेक चित्रें व लेख होते. पण त्यांपैकीं फार थोडे शिल्लक आहेत. तेथून थोड्या अंतरावर 'स्फिंक्स' आहे. या स्फिंक्सची आकृति पंख असलेल्या सिंहासारखी असून तोंडाकडील भाग मात्र मांच्या आकाराचा आहे. या स्फिंक्सचे नाक, डोळे वगैरे अवयव मोडून गेल्यानें सध्या ते फार विद्रुप दिसतात. तेथून जवळच जुन्या काळचीं पुरून गेलेलीं ईजिप्तमधील देवळें अलीकडे उकरून काढलेलीं आहेत. हीं ठिकाणें पहाण्यास उन्हातून रेती तुडवीत जाणें शक्य नसल्यामुळें भाड्यानें मिळणाऱ्या उंटावरून किंवा गाढवावरून जाणें सोईचें असतें.

ईजिप्तमधील तुर्क लोक शरीरानें मजबूत व बांधेसूद असून रूपानें देखणे असतात. तुर्क स्त्रिया वर्णानें गोऱ्या व फार सुरेख असतात. केरो येथें ' पियास्तर ' नांवाचें नाणें चालतें व त्याची किंमत सुमारें २॥ आणे असते. येथें थिएटरांत होणारे नाच पहाण्यासारखे असून ते मोफत पहावयास मिळतात. (" ईजिप्त ").

केळडी—म्हैसूर संस्थानांत शिमोगा जिल्ह्यात सागर तालुक्यांतील एक खेडें. हें सागरच्या पूर्वेस ४ मैलांवर वसलेलें आहे.लोकसंख्या अजमासें १६००. हैदरअल्लीनें १७६३ मध्यें स्वारी करून हाकून देईपर्यंत म्हैसूरच्या वायव्येस व घाटाच्या दक्षिणेकडील जिल्ह्यावर जे राजे राज्य करीत असत त्यांचें हें मूलस्थान होय विजयानगरचें राज्य मोडल्यानंतर या राजांनीं स्वातंत्र्य मिळविलें. या राजांची प्रथम इक्केरी येथे व नंतर बेदलूर येथें राजधानी होती.

केलसी—मद्रासेंतील एक न्हावी जात. लो. सं.(१९११) ७३१३. हें जातीचें नाव ' केलसा ' (काम) या कानडी शब्दावरून बनलें आहे. याप्रमाणेंच बल्लारी आणि धारवाड येथील कानडी न्हावी आपणाला "कष्ट माडोवरु" (कष्ट करणारे) असें म्हणवितात ही जात दक्षिणकानडांत आढळते. बोलण्याच्या भाषांवरून व ज्यांचा श्मश्रु करितात त्या लोकांवरून यांच्यात अनेक पोटजाती पडल्या आहेत, जसें:— तुळु केलसी किंवा भंडारी, कोंकणी केलसी किंवा म्हाल्लो, हिंदुस्थानी केलसी किंवा हजाम, लिंगायत केलसी किंवा हडपवड महापिल्ले (मापला), मल्याळी, तेलगु तामिळी, इत्यादि. दाढी काढणाऱ्या लोकांच्या न्हाव्यानां मार्इले म्हणत असून ते भंडारी न्हाव्यापेक्षां हलक्या दर्जाचे आहेत असें मानण्यांत येतें. कारण भंडारी उच्च लोकांची हजामत करितात. जर उच्च वर्गाच्या न्हाव्यानें नीच जातीच्या माणसाची हजामत केली तर तो जातिबाह्य होतो, व पुन्हां जातींत येण्याकरितां त्याला कांहीं दंड भरावा लागतो. या भागातील परायाचे निराळे न्हावी नाहींत. तर त्यांच्यापैकींच एखादा आपली कारागिरी दुसऱ्याच्या डोक्यावर करितो. मुसलमान फक्त माप्पिला न्हावी ठेवनात.

ही न्हावी जात समाजांत कुंभार, वाजंत्री, विणकर किंवा तेली यांच्या दर्जाचें होण्याची महत्वाकांक्षा धरीत नाहीं. कोळी किंवा भोई यांच्यापेक्षां आपली जात श्रेष्ठ आहे असें मानून स्वस्थ बसते. शूद्रांचे कांहीं धार्मिक संस्कार यांना करावे लागतात. नामकरण व और्ध्वदेहिक क्रिया या दोन प्रसंगीं तरी यांची जरूरी असते. उच्च शूद्र जातीच्य

माणसाच्या प्रेतयात्रेच्या प्रसंगीं न्हाव्यानें बरोबर अग्नि घेऊन जावयाचें असतें व ह्याडें गोळ करून ती जागा स्वच्छ करावयाची असते. मोर्ली, बंट, गट्टी आणि बोडारा या जातींचीं वरील कामें केलसी करितात.

दक्षिण कानडांतील न्हावी आपल्या मूळ पुरुषाविषयीं अनेक कथा सांगतात. शंकराला लग्न करण्याची जेव्हां इच्छा झाली तेव्हां आपला खडबडीत केसाळ चेहरा नवरीला आवडणार नाहीं म्हणून तो साफसूफ करण्याकरितां त्यानें एक न्हावी उत्पन्न केला व लग्न करण्याकरितां एक ब्राह्मण निर्माण केला अशी एक कथा आहे. दुसरी कथा म्हणजे एक गंधर्वकन्या ब्रह्मदेवाच्या शापानें समुद्रांत शिळा होऊन पडली असतां पश्चिम समुद्र मागें हटवून तेथील किनारा वस्तीस तयार करणाऱ्या परशुरामानें तिला शिलामुक्त केलें. तेव्हां तिनें त्याची स्तुति करून पुढील पिढ्यास त्याची आठवण करून देण्याकरितां एक पुत्र मागितला. तो पुत्र म्हणजे याचा मूळपुरुष होय.

यांच्यांत मूल जन्माला आल्यावर घरांतल्या पुरुषानें त्याच्या कमरेभोंवतां एक करगोटा बांधून त्याचें नांव ठेवावयाचें असतें. ज्या वारीं मूल जन्मलें असेल त्या वारावरून बहुधा नांव ठेवितात. कोणी कोणी ब्राह्मणाकडून पत्रिका करवितात व जन्मकालीं अनिष्ट ग्रह असल्यास ग्रहांस दानें देतात.

मुलाला त्याच्या वंशांतील धंद्याचें ज्ञान दहाव्या पासून चवदाव्या वर्षापर्यंत देतात हल्लीं मुलांना लहानपणीं शाळेंत घालतात. यांच्यांत मुलीला हुंडा द्यावा लागतो. विधवांना पुनर्विवाह करण्याला सवलत असते. एकाच बलींच्या (देवकाच्या) गोतांत परस्पर विवाह होत नाहींत.

यांच्यांत प्रत्येक संस्कारांत ब्राह्मणांना दर्भ लागतात त्याप्रमाणें वस्तराहि लागतो. गरीब मृतांना पुरतात व श्रीमंत मृतांना जाळतात. संसर्गजन्य रोगांनीं मेलेल्या माणसांना मात्र नेहमीं पुरण्यांत येतें.

यांची कुलदेवता उडुपीचा कृष्ण होय. मुख्य धर्माधिकारी तेथील संन्यासी असून गांवपंचायतींच्या निकालांवर यांच्याकडे अपील करावयाचें असतें. हे लोक भुताखेतांना फार भितात व कांहीं अनिष्ट झाल्यास कोणाला कोणता बळी द्यावा वगैरे विचारण्यास ज्योतिष्याकडे धांव घेतात.

ज्ञातीचा कारभार गांवपंचायतीच्या नियमानुसार चालतो. गुरुकार किंवा गांवचा अधिपति यानें जमविलेला दंडाचा पैसा उडुपी देवस्थानाकडे जातो. हल्लीं या गांवपंचायतींना फारसें कोणी मानीत नाहीं.

काळाच्या ओघाबरोबर सर्वांप्रमाणें ही ज्ञातहि बदलत चालली आहे. पूर्वींचे न मिटणारे लांकडी दाड्यांचे वस्तरे टाकून हल्लीं हे " राजश्री "(राजर्स) वस्तरे वापरूं लागले आहेत.

दिवसाचें काम आटोपल्यावर आपलें काम घाणीचें आहे अशी त्याची भावना होऊनच कीं काय ते घरीं जाऊन स्नान करितात व पहिले कपडे धुवून नवीन घालतात. [थर्स्टन]

कॅला–अथवा कॅला. हें प्राचीन शहर असून तैग्रिस व झाब या नदीकांठच्या लोकांचें वस्तीचें ठिकाण आहे. हें निनेव्हेच्या दक्षिणेस १९ मैलावर असून असुरियाची ही राजधानी होती. शिलालेखावरून असें दिसतें कीं केला हें इ. स. पूर्वी १३०० च्या सुमारास शाल्मनेसर (पहिला) यानें वसविलें. त्यानंतर शहराकडे दुर्लक्ष झालें असावें, अथवा त्याचा नाश झाला असावा. परंतु इ. स. पूर्वी ८८०मध्यें असुर नझिरपाल ह्यानें या शहराचें पुनरुज्जीवन केलें. त्यानंतर हें असुरियाच्या राजांचें रहाण्याचें ठिकाण झालें. निनेव्हेप्रमाणें सातव्या शतकाच्या शेवटीं मीड व बाबिलोनियन लोकांनीं केला शहर सर करून त्याचा नाश केला. हिब्रू दंतकथावरून केला शहर निमखेडनें वसविलें असें दिसतें. केलाची जागा पहिल्यानें सर ए. एच. लायर्डनें १८४५ मध्यें शोधून काढिली व खणली. यानंतर ह्यामझ रस्सन व जॉर्ज स्मिथ यांनीं हें खणण्याचें काम पुरें केलें. केला येथें मुख्य ७ इमारती सापडल्या त्या पुढील होतः–

(१) वायव्येकडील राजवाडा. हा सर्वांत चांगला राजवाडा पहिल्या असुर नझिरपालनें (इ. स. पूर्वी ८८५–८६०त) बांधिला. सारगननें (ख्रि. पूर्वी ७२२–७०५) हा राजवाडा दुरुस्त केला व तो त्यांत राहूं लागला. आंग्ल पदार्थसंग्रहालया(ब्रिटिश म्यूझियम)मध्यें ठेविलेले पंखाचे सिंह येथेंच सापडले. (२)मध्यवर्ती राजवाडा. हा दुसऱ्या शाल्मनेसरनें (इ. स. पूर्वी ८६०–८२५)बांधिला व तिसऱ्या तिगलथ पिलेसरनें तो पुन्हां बांधिला. शाल्मनेसरचा मनोरा व इतर वस्तू (सध्यां आंग्लपदार्थसंग्रहालयांत असलेल्या) येथेंच सापडल्या. (३) नैर्ऋत्येकडील राजवाडा (४) पश्चिमेकडील लहान राजवाडा. (५) आग्नेयेकडील राजवाडा. (६) असुरनझिरपालचीं दोन लहान मंदिरें व (७) एझिदा नावाचें देवालय. हें नेबोच्या नांवानें बांधिलें असून आग्नेयीकडील राजवाड्याजवळ आहे.

ह्या ठिकाणीं पंचरसधातूचें व हस्तिदंती सामान व ज्योतिष व फलज्योतिषास लागणारीं उपयुक्त कोष्टकें सापडलीं. केला हें प्राचीनत्व व धार्मिक बाबतींत असुरच्या खालोखाल होतें. लोकसंख्येच्या मानानें हें शहर निनेव्हेपेक्षा फार कमी दर्जाचें होतें.

केल्व्हिन, विल्यम थामसन लॉर्ड–(१८२४–१९०) प्रसिद्ध शास्त्रज्ञ जेम्स थामसन या नांवाच्या प्रोफेसरचा हा दुसरा मुलगा होय. याच्या जन्माच्या वेळेस याचा बाप रॉयल अक्याडेमिकल इन्स्टिटयूशन नांवाच्या संस्थेत गणिताचा प्रोफेसर होता. इ. सन १८३२ साली या प्रोफेसरानें ग्लासगो कॉलेजांत प्रोफेसरची जागा स्वीकारली. सन १७४१ सालीं विल्यम थामसन केंब्रिजच्या विश्वविद्यालयांत शिरला; आणि त्यानें १८४५ सालीं त्या विद्यालयांतून 'दुसरा रँगलर ' ही पदवी मिळविली व त्याबरोबरच स्मिथचें

पारितोषकहि संपादन केलें. त्याच वर्षी थामसनला पिटरहौस शाळेचा फेलो नेमण्यात आलें. त्यावेळीं इंग्लंडमध्यें भौतिक शास्त्राचें प्रयोगात्मक अध्ययन करण्याची चांगलीशी सोय नव्हती. याकरितां थामसननें पारीसचा रस्ता धरला व तेथें रेग्नोच्या प्रयोगशाळेत एकवर्षपर्यंत काम केलें. या वेळेस रेग्नो हा उष्णतेसंबंधींचे अत्यंत महत्वाचे असे प्रयोग करीत होता. १८४६ साली त्याने ग्लासगो येथील विश्वविद्यालयाच्या निसर्गशास्त्राच्या प्रोफेसरची जागा स्वीकारली. या वेळेपासून पुढें त्रेपन्न वर्षेपर्यंत त्यानें याच जागीं प्रोफेसरचें काम केलं.

यावेळीं पृथ्वीच्या आयुष्याविषयीं सिद्धांत मांडणारा एक बलवत्तर पक्ष होता. त्या पक्षाचें असें म्हणणें होतें कीं, पृथ्वीवरील मृण्मय कठिण कवच तयार होण्यास शेकडो कोटी वर्षे लागलीं असलीं पाहिजेत. परंतु थामसन याच्या विवेचनावरून असें सिद्ध होऊं लागलें कीं, दोन कोटी वर्षांपासून ते ४० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीचें कवच तयार झालें असावें. हें मत अर्थातच पहिल्या मतास अगदीं विरोधी आहे. थामसन यानें हें सिद्ध करण्याकरिता पृथ्वींतून ज्या प्रमाणात उष्णता बाहेर जाते त्या उष्णतेच्या प्रमाणाच्या आधारें ही गोष्ट त्या लेखांत विशद करून मांडली होती. थामसनच्या मतें सुमारें १० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीचें कठिण कवच तयार झालें असावें. यावर पुष्कळ वादविवाद झाला व त्यांत थामसनच्याच मताचा जय झाला. हें मत बरींच वर्षेपर्यंत टिकलें. १८४७त जेम्स प्रेस्काट, जूल व थामसन यांनीं स्वित्झरलंडमध्यें एका धबधब्याचा उपयोग करून पाण्याच्या अधःपतनानें किती उष्णता उत्पन्न होते याविषयीं प्रयोग केले. जूल याच्या उष्णतेविषयींच्या कल्पनेचा थामसनच्या मनावर अतिशय परिणाम झाला व सन १८४८ साली थामसननें या कल्पनेस परिणत स्वरूप देऊन त्यानें निरपेक्ष उष्णमानपद्धति किंवा केवल उष्णमानपद्धति शोधून काढली. या पद्धतींत हा विशेष आहे कीं, या प्रकारें उष्णतामापन करण्यास पारा, अल्कोहल इत्यादि द्रव्यांची मदत घ्यावी लागत नाहीं. पुढें सन १८५१ सालीं थामसन यानें 'रॉयल सोसायटी ऑफ एडिंबरो' नावाच्या संस्थेला एक निबंध सादर केला. या निबंधात त्यानें एन. एल. सादी कार्नो, कौन्ट रम्फोर्ड, सर. एन. डेव्ही, जे. आर. मेअर आणि जूल याच्या मताची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न केला. या निबंधात थामसन यानें शक्तिनित्यत्वाचा सिद्धान्त आणि उष्णतेचा गतिविशिष्टत्वाचा सिद्धान्त हे इतक्या उत्तम प्रकारे माडले कीं, त्या सिद्धाताना सर्व विद्वज्जनाकडून मान्यता मिळाली याच निबंधात प्रथमतः गत्युष्णतेच्या सिद्धान्ताचा दुसरा नियम लिहिला गेला ('विज्ञानेतिहास' पा. ५४३–५४४ पहा).

गत्युष्णतेचें संशोधन हें थामसनचें सर्वांत महत्वाचें कार्य आहे; तरी पण थॉमसनची प्रसिद्धि दुसऱ्याच एका महत्वाच्या कार्यामुळें झाली आहे. सामुद्रिक–तारायंत्राच्या संबंधानें त्यानें जे शोध लावले त्यामुळें तो सर्व लोकात प्रसिद्धीस आला आहे. तो इ. स. १८५४ सालापासून तारायंत्र–संशोधकांत प्रामुख्यानें गाजत होता. त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, लाब सामुद्रिक तारांतून संदेश पाठवितांना लांबीच्या वर्गाच्या व्युत्क्रम प्रमाणात संदेश पाठविण्याची शीघ्रता असेल. या सिद्धान्तास अनुलक्षून कित्येक शास्त्रज्ञांनीं असें आपलें मत दिलें कीं, खरें सामुद्रिक तारायंत्र सुरू होणें अशक्य आहे. थॉमसननें सामुद्रिक–तारायंत्रांत सुधारणा करण्याचें काम हातीं घेऊन अत्युत्तम प्रकारचें तांबें शोधून काढलें. नंतर संदेश घेण्याचें उत्तम प्रकारचें यंत्र तयार केलें. या यंत्राच्या योगानें अति अशक्त असा विद्युत्प्रवाह आला तरी त्या प्रवाहापासून संदेश घेता येतो; तसेंच एखाद्या प्रवाहाच्या विद्युद्बलांत अत्यल्प प्रमाणात फरक होऊन प्रवाह येत असेल आणि तद्द्वारा संदेश येत असेल तर तो संदेश ग्रहण करता यावा म्हणून त्यानें एक संदेशग्राही यंत्र तयार केलें. असल्या प्रकारच्या यंत्राची सुधारणा होत होत दर्पण विद्युन्मापक (मिरर गॅल्व्हानोमीटर्) आणि वक्रनलिका नोंदयंत्र (सायफन् रेकॉर्डर) हीं दोन यंत्रें तयार झालीं. थॉमसन यानें तारायंत्रावर काम करण्यास सुरुवात केल्यापासून विद्युल्लतेंतील प्रत्येक जातीची विद्युत्संख्या मापण्याचीं यंत्रें भराभर तयार केलीं; या यंत्रांच्या योगानें विद्युच्छास्त्रांतील त्या काळच्या बहुतेक सर्व अडचणी दूर झाल्या. पुढें ज्या वेळेस विद्युद्दीपाचा सार्वत्रिक उपयोग होऊं लागला त्या वेळेस दीपात खर्च होणारी विद्युच्छक्ति मापण्याचीं यंत्रें त्यानें शोधून काढलीं. विद्युच्छास्त्रावरील एंजिनिअरास ज्या ज्या गोष्टी मापाव्या लागतात त्यातील प्रत्येकीसंबंधानें थॉमसन यानें कसलें ना कसलें तरी यंत्र बनविलें आहे. एका अम्पिअरच्या एक दशसहस्रांशापासून तो दशसहस्र अम्पिअरपर्यंतचा विद्युत्प्रवाह मापता येण्यासारखें यंत्र त्यानें तयार केलं आहे. एका व्होल्टच्या अत्यल्प अंशापासून ते १००००० व्होल्टपर्यंतचें विद्युद्बलाचें मापन करणारें यंत्र याचें शास्त्रज्ञानें तयार केलें आहे.

यानंतर थॉमसन यानें डानिअलच्या सेल(घटा)चें विद्युद्बल आणि तारेंतून विद्युत्प्रवाह जात असतांना त्या योगानें जी उष्णता उत्पन्न होते तिच्या आधारें तारेच्या अंगची विद्युद्रोधक शक्तीहि मोजली. पुढें सन १८५३ सालीं विद्युद्घटातुन होणारें विसर्जन प्रकंपित स्वरूपाचें असतें याविषयीं माहिती उपलब्ध करण्याकरितां थॉमसन यानें बरीच मेहनत घेतली. असलें विसर्जन प्रकंपित स्वरूपाचें असतें ही गोष्ट फार महत्वाची आहे; कारण असल्याच प्रकारच्या घटाच्या सहाय्यानें एच. आर. हर्ट्झ यानें विद्युल्लहरींचा शोध लावला व पुढें याच लहरींचा बिनतारी संदेश पाठविण्याकडे उपयोग करण्यांत आला. या गोष्टीवरून विद्युद्घटातील विसर्जन प्रकंपित स्वरूपाचें असतें याचें महत्व सहजच कळून येईल.

सन १८७३ सालीं त्यानें सच्छन्द नांवाची लेखमालिका लिहिण्याचें काम हातीं घेतलें. या मालिकेंत खलाशाच्या होकायंत्राविषयीं विवेचन केलें होतें. मालेचा पहिला अंक काढल्यानंतर त्याच्या डोक्यांत इतके प्रश्न उद्भवले कीं, त्या प्रश्नांचा नीटपणें विचार करून त्याचा निकाल लावण्याला बरींच वर्षे लागलीं. या मालेचा दुसरा अंक सुमारें पांच वर्षांनीं जनतेपुढें आला. या अवधींत या संशोधकानें होकायंत्रात अनेक सुधारणा केल्या. जहाजावरील बराच भाग लोखंडाचा असतो त्यामुळें जहाजावरील होकायंत्रावर परिणाम घडून तें होकायंत्र योग्य दिशा दाखवीत नाहीं. असला अनिष्ट परिणाम घडूं नये म्हणून या संशोधकानें कांहीं योजना तयार केली. या योजनेमुळें जहाजावरील होकायंत्र योग्य दिशा दर्शवितें आणि या योजनेमुळें आतांपर्यंत पुष्कळ खलाशी व प्रवासी यांचे जीव बचावले आहेत. जहाजासंबंधानें दुसरी महत्वाची सुधारणा थामसन यानें शोधून काढली. ती सुधारणा म्हटली म्हणजे १०० फयादम खोलीच्या समुद्रात ५६ नाट या वेगानें जहाज जात असतां समुद्राचा ठाव काढून देणारें यंत्र त्यानें शोधून काढलें. यापेक्षां जास्त खोलीच्या समुद्रांत अल्पायासानें ठाव काढणारें यंत्र याच संशोधकानें बनविलें. भरतीचें मापन करणारें यंत्र, भरतीचे संगीतात्मक पृथक्करण करणारें यंत्र आणि भरतीचें भविष्यकथनकारी यंत्र हीं सर्व तयार करून संशोधकानें आपल्या कीर्तीत भर घातली. समुद्रात जहाजाची स्थिति कोठें आहे हें वर्तविण्याची पद्धत सम्नर नांवाच्या संशोधकानें बसविली होती. परंतु ही पद्धत बरीच क्लिष्ट होती. या पद्धतींतील क्लिष्टता दूर करून तिला बरीच सुलभता थामसन यानें आणली. या प्रसिद्ध शास्त्रज्ञानें नवीन कल्पनेनें भरलेले असे सुमारें तीनशें निबंध लिहिले. या सर्व निबंधात पदार्थविज्ञानशास्त्राच्या प्रत्येक शाखेंतलि विषय आले आहेत.

एकुणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत पदार्थविज्ञान शास्त्रांत जी प्रगति झाली तिचें श्रेय कांहीं अंशीं लॉर्ड केल्व्हिन यास दिलें पाहिजे, कारण त्याच्या संबंधांत जे विद्यार्थी आणि होतकरू गृहस्थ आले त्यास त्यानें योग्य प्रोत्साहन दिले व त्याचा उत्तम परिणाम झाला

या शास्त्रज्ञाचें पहिलें लग्न१८५२सालीं व दुसरें१८७४सालीं झालें. अटलांटिक महासागरात तार घातल्याबद्दल त्याला सर ही पदवी मिळाली. १८९२ सालीं त्याला बॅरन केल्व्हिन ऑफ लॉर्जेस ही पदवी मिळून तो लॉर्ड झाला. सन १८९० सालीं त्याला रॉयल सोसायटीचें अध्यक्ष करण्यांत आलें. सन१८९६ त याला प्रोफेसरची जागा मिळाल्याबद्दल ज्युबिली करण्यांत आली. व त्यावेळेस त्याला "ग्रँड क्रास ऑफ धी रॉयल व्हिक्टोरिअन ऑर्डर" ही पदवी देण्यांत आली व १९०२ सालीं ऑर्डर ऑफ मेरिट ही पदवी त्यास अर्पण करण्यांत आली. १८९६ सालीं त्याच्या आचार्य पदाच्या ज्युबिलीबद्दल जो समारंभ करण्यांत आला त्याचें अल्पसें शब्द-चित्र पुढें दिल्याप्रमाणें आहेः—त्या वर्षाच्या जून १५।१६ आणि १७ तारखेस शास्त्रात प्रवीण असे गृहस्थ आणि मोठमोठे पदवीधर यांचें जें मोठें संमेलन ग्लास्गो शहरीं झालें तसें संमेलन तत्पूर्वी त्या ठिकाणीं कधींहि झालें नाहीं. तेथील विश्वविद्यालय आणि त्या शहराचे अधिकारी पुरुष यांनीं आपल्या शहराच्या प्रसिद्ध नागरिकाचा सन्मान करण्यांत भाग घेतला. सुमारें २५००पाहुण्याची विश्वविद्यालयाच्या इमारतींत उतरण्याची सोय लावण्यांत आली होती. त्याच विश्वविद्यालयाच्या प्रयोगशाळेंत एक प्रदर्शन उघडलें होतें. त्या प्रदर्शनात लॉर्ड केल्व्हिननें तयार केलेलीं यंत्रें ठेविलीं होतीं. तेथेंच रांगेनें पदवीदानपत्रकें, मानपत्रें, पदकें इत्यादि लावून ठेविलें होतें. ईस्टन कंपनी, अँग्लो-अमेरिकन कंपनी आणि कमर्शल कंपनी या तीन सामुद्रिक तारायंत्र कम्पन्यांनीं या समारंभात भाग घेतला. विश्वविद्यालयाच्या प्रयोगशाळेंतून एक संदेश पाठविण्यात आला; तो न्यूफाउंडलंड, न्यूयार्क, चिकागो, सेन्फ्रान्सिसको, लासअंगेलीज, न्यू आरलिअन्स, फ्लारिडा आणि वाशिंग्टन या मार्गानें जाऊन लार्ड केल्व्हिनच्या हातात पडण्याला अवघीं साडेसात मिनिटें लागलीं; या सर्व संदेश-मार्गाची लांबी सुमारें २०,००० मैल होती. हा संदेश अटलांटिक महासागरांतून दोन वेळा गेला. यानंतर तीन वर्षांनीं त्यानें आपल्या प्रोफेसरच्या जागेचा राजीनामा दिला. १९०४ सालीं त्याला त्या विश्वविद्यालयाचें चान्सेलर नेमण्यात आलें. प्रोफेसरची जागा सोडल्यापासून त्याचें जें बहुतांशीं एकान्तवासात आयुष्य गेलें त्या काळात त्यानें शास्त्रीय विषयाशीं अगदीं पूर्णपणें संबंध ठेविला; त्यातला बराचसा काल बाल्टिमोर येथील जॉन्स हापकिन नावाच्या विश्वविद्यालयात प्रकाशाच्या लहरीविषयक सिद्धान्तावर दिलेलीं व्याख्यानें दुरुस्त करण्यात गेला; हीं व्याख्यानें दुरुस्त होऊन सन१९०४मध्यें प्रसिद्ध करण्यात आलीं. त्याचा मृत्यु होण्यास अगदीं अल्प काल राहिला होता तो त्यानें शास्त्रीय संशोधनांत भाग घेतला. हा प्रसिद्ध शास्त्रज्ञ आपल्या वयाच्या ८३ व्या वर्षी मरण पावला. [अॅड्र ग्रे(१९०८)व एस. पी. थॉमसन(१९१०) यानीं केल्व्हिनचीं चरित्रें लिहिलीं आहेत; त्यांत केल्व्हिनच्या ग्रंथकर्तृत्वाचा समग्र आढावा घेतला आहे.]

केवट—कोळी नावाची व शेतकरी या नात्यानें उपजीविका करणारी एक जात. याची लो.सं.१९११त१२,१५,६१६ होती. संयुक्तप्रांतात व त्याच्या खालोखाल बिहार-ओरिसांत यांची वस्ती जास्त आहे. संयुक्तप्रांतात बिंद व मल्हाया जातीशीं केवट हे अगदीं एकरूप झालेले आढळून येतात. कैवर्तांचे हे आधुनिक वंशज असेंहि मानण्यांत येतें. क म्हणजे पापी आणि वृत्ति म्हणजे धंदा. यावरून कैवर्त अथवा केवट या शब्दाची व्युत्पत्ति सांगण्यांत येते. किंवर्त म्हणजे हलका

धंदा करणारा, अशीहि व्युत्पत्ति या शब्दाची लावण्यात येते. धर्मशास्त्रकार आपल्या ठराविक उपपत्तींचा उपयोग करतांना कैवर्तास विसरले नाहींत. कैवर्त, भार्गव अथवा दास यांची उत्पत्ति निषाद पिता व आयोगवी माता यांपासून झालेली आहे असें मनुस्मृतींत म्हटलें आहे(अ. १०.श्लो.३४). ब्रह्मवैवर्त पुराणात, क्षत्रिय पिता व वैश्य माता याच्यापासून कैवर्तांची उत्पत्ति सांगितलेली आहे. कारण आयोगवी, हीच शूद्रपिता व वैश्य माता यांपासून झाल्यामुळें 'प्रतिलोमा' म्हणून निर्दिष्ट केली जाते.

भेदिया, बिल्व ,जोंक, खोट्टिआ,कैवर्त अथवा दास,लियारी चुडीटिया, व दोस्सा इत्यादि केवट जातीचे पोटविभाग आहेत. केवटांप्रमाणे मल्हा व बिंद जातीचेहि पोटभेद आहेत. मल्हाप्रमाणेंच या केवटाच्या पोटजातींतील घोग लोक स्वतःस निषादांचे वंशज समजतात. आगरवाला, बादम जड्धर, खारोट इत्यादि अनेक पोटविभाग केवट जातींत आहेत. नागो, मागो, कोचिपो वगैरे त्यांचीं गोत्रें आहेत.

पांचव्या किंवा सहाव्या वर्षी लग्नें करण्यात येतात. वराच्या उंचीचें प्रमाण वधूच्या पेक्षा जास्त असले पाहिजे हें मुख्यतः पहाण्यात येतें. सगाई पद्धतीनें विधवाविवाह होतो.

काली, भगवती व नौका यांची केवट लोक उपासना करतात. महाबीर व काली यांना बकरीं व फुलें अर्पण करण्यांत येतात. लग्नप्रसंगीं व धार्मिक समारंभात, सर्वारिया ब्राह्मणांना पाचारण्यात येतें. भगत्खेरीज सर्व लोक मांस, कासव वगैरे खातात व दारूहि पितात.ते कोणाच्याहि हातची कच्ची रसोई खात नाहींत. परंतु ब्राह्मण,क्षत्रिय, वैश्य याच्या हातची पक्की रसोई मात्र खातात. कोइरी व तेली लोकांप्रमाणेंच केवटाचा सामाजिक दर्जा असल्याचें दिसून येतें. यांची आसामांतहि थोडीशी वस्ती आहे.

मध्यप्रांतांमध्यें ही जात द्रुग, रायपूर व बिलासपूर या जिल्ह्यात विशेषेकरून आढळते. याची लोक संख्या १,७०,००० आहे.

मध्यप्रातात केवटाचे मुख्य वर्ग लडिया व उडिया असे आहेत. लडियाचे लाडया, कोसर्वोवा, झिंझवार, व धुरि असे उपवर्ग आहेत. विंझवार हे हिंदू झालेले बैगा लोक आहेत व भंडाऱ्यास तर यानीं इंझवार हें नाव घेऊन बैगा मूळाचा अवशेष नाहींसा करण्याचा प्रयत्न केला आहे.

यांचा व ढीमर लोकांचा फारच निकट संबंध आहे.छत्तीसगडांतलि ढीमर होड्या चालवीत नाहींत. केवट शिंगाडे पेरीत नाहींत. केवट लोक म्हणतात कीं रामानें वनवासास जातांना याच्या हातचें पाणी पिऊन यांची शिंगाडे पेरण्याची चाल बद केली. ब्राह्मणांना यांच्या हातचें पाणी पिण्यास कांहीं दोष नाहीं असें ठरविण्याकरितां ही गोष्ट निर्माण झाली असावी. यांचे अनेक असगोत्र विवाहवर्ग आहेत. आणि बरेच पशुपक्षी व झाडें हीं देवकें आहेत. जसें:—तुमा, करसथाल, भलवा, घूघू, इत्यादि. एक देवकाच्या कुटुंबांत विवाह निषिद्ध आहेत. तसेंच चुलत आतेभावाशीं व मामेभावंडाशी विवाह निषिद्ध आहेत. मुलींचीं लग्नें १० वर्षांच्या वयातच करतात पण वर मिळत नसला तर जो कोणी लग्नाचा खर्च सोसण्यास तयार होईल त्याला देतात. संबलपुराकडे तिचें लग्न फुलाबरोबर लावतात. बिहारकडे वधूपेक्षा वर उंच असला पाहिजे, तो लहान असला तरी हरकत नाहीं. अशी समजूत आहे. लग्नें लग्नस्तंभास प्रदक्षिणा घालून होतात. वर वधूचा भांग काढतो व तिला पदर घालतो. पण बंगाल्यात वधूच्या बोटाचें थोडें रक्त काढून वर त्यांत तांदूळ कालवतो व ते तादूळ वधूवर दोघे खातात. विधवाविवाह व काडी मोडण्याची चाल याच्यात आहे. संबलपुरांत १० वर्षें वयांत झालेली विधवा ही विधवा न समजतां तिचें लग्न पुन्हां कुमारिकेप्रमाणेच होतें.

हे लोक सामान्य हिंदू देवाचीच पूजा करतात. यांच्या होड्यांचें रक्षण करणारी देवता 'चौरासी देवी' म्हणून आहे असें हे समजतात. हे लोक प्रेताचे पाय दक्षिणेकडे ठेऊन पुरतात व प्रेताबरोबर तीळ, कापूस व मीठ पुढें उपयोगी पडण्याकरिता ठेवतात. कोणत्याहि सोमवारीं व शनिवारीं पितरांस एक कोंबडा बळी देतात. हे ओझ्याच्या कावडी देखील नेतात. बिलासपूर नाव बिलास केवटीण म्हणून याच्या जातीच्या एका बाईच्या नावावरून पडलें असें म्हणतात.राजाची तिच्यावर इच्छा गेली म्हणून आपला बचाव करण्याकरिता तिनें सूर्याची प्रार्थना करून त्याच्या किरणाने स्वतःस जाळून घेतलें व तिचा नवरा तिच्या बरोबर सती गेला अशी याच्यात आख्यायिका आहे [क्रूक, रसेल आणि हिरालाल].

केवडा—या झाडास लॅटिनमध्यें पँडानस ओडोरॅटिसिमस, संस्कृतमध्यें केतकी, सूचिपुष्प, चामरपुष्प, मराठींत केवडा, हिंदींत केवरा, तेलगूंत मोगली, चेट्टु इत्यादि नांवें आहेत. केवडयाचें झाड सुमारें दोन पुरुष वाढतें. हिंदुस्थानात पाणथळ जागीं व बगीच्याभोंवतीं कुंपण म्हणून याची लागवड करतात. कित्येक ठिकाणीं या झाडाचीं दाट बेटें आढळून येतात. याच्या पातीस कांटे असतात. या झाडाच्या पांढरा केवडा व पिंवळा केवडा अशा दोन जाती आहेत. पाढऱ्या जातीस केवडा व पिंवळीस केतकी म्हणतात. केतकीस फार सुवास येतो. व तिची पात फार सुकुमार असते केवडयास कणीस येतें. तें कणीस व त्याच्याभोंवतीं असणारीं कांटेरी पानें या सर्वांस केवडयाचें फूल म्हणतात. केवडा फार सुवासिक असल्यामुळें केवडयाच्या वनांत सर्प रहातात असा लोकांचा समज आहे. श्रावणांत केवडयाचा भर असतो व केतकीस माघ व फाल्गुन महिन्यांतच कणीस येते. पांढरे केवडे बारमाहा होतात. कर्नाटकांत केवडयाच्या पातीच्या छत्र्या व चटया करतात. ही पात कातारी लोकांस फार उपयोगी पडते. केवडयाचें तेल व अत्तर काढतात. केवडयाच्या पानाचा वास लावून केलेल्या कातगोळ्या फार

सुवासिक होतात. केवड्याच्या आंतील भागाची भाजी करतात. स्त्रिया आपली वेणी केवड्याने सुशोभित करतात. तसेंच केवड्याचें पान(पात)इतर सुवासिक फुलांप्रमाणें देवास वाहण्याचीहि चाल आहे. केवड्याच्या पातीचे तंतू काढून त्यापासून जाळी, कुंचल्या, चटया, लहान लहान पिशव्या वगैरे जिन्नस तयार होतात. केवड्याचे कांहीं औषधी उपयोगहि आहेत.

त्याच्या अंगीं उत्तेजक व आंचके दूरकरण्याचे धर्म आहेत. त्याचा डोकें दुखण्यावर व संधिवातावर उपयोग करतात. कानातील ठणका केवड्याच्या तेलानें रहातो. [वनौ. गुणा.]

केशर—याचें झाड लहान असून याचे कांदे असतात. त्यास लॅटिनमध्यें ओकस साटिवस, इंग्रजींत सॅफ्रन, मराठींत व संस्कृतमध्यें केशर, कुंकुम इत्यादि नांवें आहेत.

काश्मीरमधील पामपूर प्रदेशात याची लागवड फार प्राचीन काळापासून होत आहे. पूर्वी केशराच्या पिकावर त्या संस्थानाचा पूर्ण हक्क होता.

भावप्रकाशामध्यें या झाडाला कुंकुम म्हटलेलें आहे.यावरून काश्मीरात किती प्राचीन काळापासून याचा व्यापार होता याची कल्पना सहज करता येईल. बाबर व जहांगीर यांच्या वेळच्या लेखातूनहि काश्मीरमधील केशरासंबंधीं उल्लेख केलेला आढळतो.

केशराच्या लागवडीची जमीन उताराची असावी लागते. केशराचे कंद तीन वर्षांचे झाले म्हणजे ते दुसरीकडे तयार केलेल्या चौकोनी वाफ्यात दोन दोन हाताच्या अंतरावर लावतात. ज्या वाफ्यात केशराची लागवड करावयाची असेल तो सुमारें आठ वर्षे पडीत ठेवावा लागतो.या वाफ्यांत पाणी किंवा खत देत नाहींत. एकदां कंद लाविले असतां ते १४वर्षेपर्यंत टिकतात.कंदांची लागवड जुलै किंवा आगस्ट महिन्यांत करतात. लागवड करतांना जमीन थोडी भुसभुशीत करून तिला चोहोंबाजूंनी पाणी चांगलें भिनरून जाण्याकरिता चर खणावा लागतो. आक्टोबर महिन्यांत केशराच्या झाडांना जांभळीं फुलें येतात व त्यांचा सुगंध फार गोड व आल्हाददायक असतो. फुलें गोळा करून झाल्यावर त्यापासून केशर तयार केलें जातें. फुलें उन्हांत वाळवितात व त्यांमधील प्रत्येक फुलाचे तीन स्त्रीकेसराग्र काढून घेतात. यांपासून निघालेल्या केशराला शाही झाफ्रन हें नांव आहे. हें केशर पहिल्या प्रतीचें असतें. स्त्रीकेसराग्र काढून घेतल्यावर बाकी राहिलेल्या पांढऱ्या तंतूपासून 'मोंगला' नांवाचें हलकें केशर काढतात. मोंगला केशराचा भाव सामान्यतः तोळ्यास १रु. हा असतो. मोंगला केशर काढून घेतल्यानंतर वाळलेली फुलें हळूच काठीनें ठोकतात. हीं ठोकलेलीं फुलें सर्व पाण्यांत टाकतात. यामधील फुलांचा उत्तम भाग बुडाशीं जाऊन बसतो. त्याला निवळ म्हणतात. तरंगत राहिलेला फुलांचा भाग फिरून ठोकतात व पुनः पाण्यांत टाकतात. अशा रीतीनें बुडाशीं राहिलेली निवळ एके ठिकाणीं करतात. यापासून केलेलें केशर हलकें असतें. याला 'लाचा' असें म्हणतात. केशर तयार झाल्यावर तें काश्मीरमधून अमृतसर व इतर व्यापाराच्या ठिकाणीं पाठविलें जातें.

केशराचा मुख्य उपयोग म्हणजे त्याच्यापासून होणारा रंग होय. याचा पक्वान्नांत उपयोग करतात. केशरास फार किंमत पडत असल्यामुळें तें क्वचित् प्रसंगीं वापरलें जातें. मंगलप्रसंगीं याचा रंग शुभ समजतात. यूरोपखंडांत यापासून 'सॅफ्रन केक्स'(केशराच्या वड्या) तयार करतात. केशराचा रंग तांबूस असून तंतू लांब असले म्हणजे ते उत्तम प्रतीचें केशर समजलें जातें. केशर ९ वर्षांवर राहिलें म्हणजे बिघडावयास लागतें. केशर सुवासिक असून रंगास व औषधाकरिता उपयोगी पडतें. याच्या गंधाकरिता गाळ्याहि करतात. केशराचा पुष्कळसा व्यापार फ्रान्स व मुंबई यामध्यें चालतो. हॉंगकॉंग व अरेबियामधील बंदरें यांमध्यें हिंदुस्थानांतून केशराची पुनर्निर्गत होते [वाट. फार्मा. इंडिका.].

केशव—ग्रहलाघवकार गणेशदैवज्ञ यानें 'विवाहवृंदावन' नामक ग्रंथावर टीका केली आहे तो ग्रंथ केशवचा आहे. याच केशवाचा दुसरा ग्रंथ करणकंठीरव नामक आहे असें गणेश दैवज्ञ म्हणतो, अर्थात् हा करणग्रंथ असला पाहिजे. केशव भारद्वाजगोत्री औदीच ब्राह्मण होता. याची पितृत्रयी क्रमानें राणग, श्रियादित्य आणि जनार्दन अशी होती. ग्रहलाघवकार गणेशाचा पिता केशव याहून हा केशव प्राचीन आहे. प्राचीन केशवाचा काल शके १४००हून अर्वाचीन नसावा. याचा विवाहवृंदावन नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यावर कल्याणवर्मकृत टीका आहे असें आफ्रेक्टसूची वरून कळतें [दीक्षित–भारतीय ज्योतिःशास्त्र]

के श व (दुसरा)—प्रख्यात ग्रहलाघवकार गणेश दैवज्ञ याचा हा पिता. हा स्वतः मोठा विद्वान होता. ग्रहकौतुक म्हणून त्याचा एक करणग्रंथ आहे. केशवाच्या पित्याचें नाव कमलाकर होतें. तोहि मोठा ज्योतिषी होता. केशवाचा विद्यागुरु वैजनाथ नांवाचा होता आणि त्याचें राहण्याचें ठिकाण कोंकणात समुद्रतीरीं नंदिग्राम हें होतें. त्यास हल्लीं नांदगाव म्हणतात. हें गांव मुंबईच्या दक्षिणेस २० कोसांवर आहे. त्याचें गोत्र कौशिक असून पत्नीचें नांव लक्ष्मी होतें. केशवाचे जातकपद्धति व ताजकपद्धति हे ग्रंथ सांप्रत प्रसिद्ध आहेत. ते केशवी या नांवाखालीं मोडत असून त्यांचा उपयोग पुष्कळ ज्योतिषी करतात. मुहूर्ततत्व हाहि ग्रंथ केशवाचा असून हे सगळे ग्रंथ छापले गेले आहेत. वेधाविषयीं केशवाची योग्यता फार मोठी होती. ग्रहकौतुक व जातकपद्धति यांवर केशवाची टीका आहे. [दीक्षित–भारतीय ज्योतिःशास्त्र.]

केशवचंद्र सेन—ब्राह्मो समाजाचा एक पुढारी. केशव याचा जन्म कलकत्ता शहरांत इ. स. १८३८ या सालीं नोव्हेंबर महिन्याच्या १९ व्या तारखेस झाला. याचें कुल ब्राह्मणेतर वैद्य जातीचें. केशवच्या मातोश्रीचें नांव शारोदा

सुंदरी. पिता पिआरीमोहन वारला तेव्हां केशव दहा वर्षांचा होता. केशवाला एक वडिल व एक धाकटा असे दोन बंधू होते. यांनीं आपली जन्मभाषा बंगाली हिचा थोडाबहुत अभ्यास केला. नंतर सात वर्षांचें वय असतां सन १८४५ सालीं हिंदुकॉलेज नांवाच्या विद्यालयांत तो जाऊं लागला. पुढें कांहीं वर्षांनीं मेट्रापालिटन कॉलेज नांवाचें एक नवीन विद्यालय स्थापन झालें. येथें त्यानें १८५८ पर्यंत अभ्यास केला. ह्याच वर्षी केशव ह्या पाठशाळेंतून निघाला. केशवाचा विवाह सन १८५६ सालीं झाला, तेव्हां त्याचें वय १८ वर्षांचें होतें. याच्या वयास पुरीं अठरा वर्षे झालीं नाहींत तोंच त्याचा वक्तृत्वप्रभाव अनुभवास येऊं लागला. समवयी मुलांच्या सभा स्थापन करून त्यांत व्याख्यानें देण्याचा व भाषणें करण्याचा त्यास मोठा नाद असे. अशा प्रकारच्या अनेक सभा त्यानें स्थापन केल्या होत्या. त्यांत तो तासांचे तास मोठमोठ्या गहन विषयांवर आवेशानें भाषणें करी. याच्या घराजवळ पंडित राजवल्लभ नांवाच्या एका पंतोजीची एक बंगाली शाळा होती. एके दिवशीं राजवल्लभानें केशवाला ब्राह्मधर्मसंबंधीं एक पुस्तक दिलें, तें वाचून त्यास विलक्षण आनंद झाला व फार समाधान वाटलें. तेव्हांपासून केशवाचें लक्ष ब्राह्मसमाजाकडे लागलें. त्यावेळीं नुस्ता आदिसमाजच होता. त्याचें प्रमुखत्व देवेंद्रनाथ टागोर यांच्याकडे होतें. देवेंद्र हे श्रीमान असून सरदारी कुलांतील पुरुष होते. कुलीन घराण्यांतील तरुण मण्डळी ब्राह्मसमाजांत आणण्याविषयीं त्यांचा फार प्रयत्न असे. केशवहि श्रीमान व कुलीन घराण्यांतील असल्यामुळें देवेंद्रनाथांची व त्याची साधारण तोंडओळख होती. प्रत्यक्ष परिचय मात्र नव्हता. याच सुमारास केशवनें 'गुडविल फ्रॅटर्निटी' नांवाची एक मंडळी स्थापन केली होती. तींत मोठमोठ्यांचीं मुलें जात असत. तेथें देवेंद्रनाथ हेहि कधीं कधीं निमंत्रणावरून जात व अध्यक्षस्थान स्वीकारून मुलांस उत्तेजन देत. तेव्हां त्या सभेंत केशवाचें बालपणचें वक्तृत्व ऐकून व त्याचा उत्साह व आवेश पाहून त्याच्याविषयीं देवेंद्रनाथांच्या मनांत विलक्षण प्रेम उत्पन्न होई. राजवल्लभानें दिलेलें ब्राह्मधर्मविषयक पुस्तक केशवच्या हातांत पडलें तें याच संधीस. त्याच्या वाचनानें केशवचें मन ब्राह्मसमाजाकडे वळलें आणि लवकरच त्यानें ब्राह्मधर्माची दीक्षा घेतली (१८५७).

केशवचंद्र आदिसमाजाचा सभासद झाल्या दिवसापासून त्याच्यावर देवेंद्रनाथांचा विशेष लोभ जडत चालला. ह्या दोन महापुरुषांचें एकमेकांवर इतकें प्रेम होतें तरी त्यांच्या स्वभावांत व गुणांत पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें भिन्नता होती. हे दोन पुरुष परस्परभिन्न परंतु ब्राह्मसमाजांत त्यांचें ऐक्य झालें व दोघेहि भक्तिमान व धर्मशील असल्यामुळें एकमेकांवर त्यांचें अलौकिक प्रेम जडलें. केशवचंद्र ब्राह्मसमाजाचा सभासद झाला व देवेंद्रनाथांशीं त्याचा प्रेमभाव वाढत चालला हें पाहून केशवाच्या घरच्या माणसांस फारच वाईट वाटलें. तेव्हांपासून तीं त्याचा छल करूं लागलीं. हा सर्व छल केशव निमुटपणें सहन करी. इकडे देवेंद्रांच्या सहवासानें केशवच्या धार्मिक स्वभावास विलक्षण बळकटी आली. तो दिवसाचा आपला बराच काल देवेंद्रांच्या समागमांत घालवी. त्यांच्या सहवासांत राहून त्यांच्या बरोबर उपासना, संभाषण, धर्मचर्चा केल्यानें केशवाचा अधिकार वाढत चालला, तो इतका कीं त्याचा विश्वास, उत्साह व धर्मभाव पाहून देवेंद्रनाथांनीं त्यास ब्रह्मानंद हें नांव दिलें.

आदिसमाजांत केशवचा अधिकार शेवटीं इतका वाढला कीं, सन १८६२ च्या एप्रिल महिन्याच्या १३ व्या तारखेस महर्षि देवेंद्रनाथांनीं त्याला ब्राह्मसमाजाचे आचार्य नेमिलें. समाजाचे प्रधानाचार्य स्वतः महर्षीच होते. इतर कित्येक आचार्य असत, त्यांस 'उपाचार्य' ही संज्ञा होती.

देवेंद्र आणि केशव यामधील अलौकिक प्रेमभाव फार दिवस टिकला नाहीं. जातिभेद व जानवें हीं काढून टाकण्याचा केशवचंद्र व त्याचे अनुयायी याचा आग्रह असे. म्हणून ब्राह्म समाजाच्या आचार्य वर्गांत जानवें घातलेला मनुष्य असतां कामा नये असा त्यानें हेका धरिला. देवेंद्रनाथ जुन्या विचाराचे व वळणाचे असल्यानें त्यांनां या गोष्टी उघडपणें बंद करणें आवडेना तेव्हा केशव आदिसमाजातून निघाला व त्यानें भारतवर्षीय ब्राह्मसमाजाची स्थापना केली. हा नवीन पंथ निघाल्यावर देवेंद्राच्या पंथाला आदिब्राह्मोसमाज म्हणूं लागले.

भारतवर्षीय समाजांत केशवच्या धर्मबुद्धीचा एकसारखा विकास होत गेला. त्याची प्रार्थना, त्याची उपासना, त्याचे उपदेश इतके प्रेमळ असत कीं ते ऐकून त्याचा श्रोतृसमाज सद्गदित होऊन टपटप अश्रुपात करी, त्याचें आवेशयुक्त भाषण ऐकून त्याचे शत्रूहि थक्क होत असें सांगतात. त्याची निस्सीम भक्ति आणि विलक्षण वैराग्य यांच्यायोगें त्यानें एक नवीन शिष्यवर्ग तयार केला. त्याच्या भक्तिभावाची जसजशी उन्नति होत गेली तसतसें त्याच्या वैराग्यास राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें. त्यानें भगवें वस्त्र धारण केलें व हातामध्यें करताल व एकतारी घेऊन आपल्या शिष्यवर्गासह गांवांतून नगरसंकीर्तन करीत फिरण्याचा क्रम चालविला. इ. स. १८६८ सालीं सर्व हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य स्थानीं जाऊन ब्राह्म धर्माचा उपदेश करावयाच्या उद्देशानें केशव चंद्र प्रवासास निघाले.

सन १८७० मध्यें केशवनीं विलायतेस जाण्याचा निश्चय केला. ते फेब्रुवारी महिन्याच्या १५व्या तारखेस कलकत्त्याहून निघाले व त्याच वर्षाच्या आक्टोबर महिन्याच्या १५ वीस परत मुंबईस आले. इंग्लंडाहून आल्यानंतर पांच सहा वर्षेंपर्यंत सामाजिक सुधारणेच्या संबंधानें केशवांनीं फार मेहनत केली. विद्येचा प्रसार करून विचार जागृत करण्याकरितां त्यांनीं अनेक शाळा, कॉलेजें, पुस्तकालयें, सभा, मंडळ्या

स्थापन केल्या. ह्या सर्व कामीं लोकांनीं व सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांस पुष्कळ साहाय्य केलें आपल्या स्त्रियांची उन्नति होण्याकरितां त्यांनीं "भामाहितैषिणी सभा" या नांवाची एक स्त्रियांची सभा स्थापन केली व 'भामाबोधिनी' नांवाचें एक वर्तमानपत्रहि सुरू केलें. १८७३ सालीं "ब्राह्म विवाहाचा कायदा"पास झाला त्यांतहि त्यांचें अंग होतें.

सामाजिक सुधारणेच्या ह्या गोष्टी होत असतां समाजाच्या कामांत यत्किंचितहि खंड पडला नव्हता. तथापि वरील गोष्टींची व्यवस्था झाल्याबरोबर त्यांनीं समाजाच्या धर्मोन्नतीचें काम पुनः हातीं घेतलें. ह्या कार्याकरिता १८७६ सालीं कलकत्यापासून थोड्या अंतरावर एक बाग तयार करून तीस 'साधनकानन' असें नांव दिलें. ह्या ठिकाणीं ते व त्याचा निकट शिष्यवर्ग दिवसाचा बहुतेक काल भजन, भक्ति, ध्यान व उपासना यांत घालवीत.

सन १८७८ पर्यंत भारतवर्षीय ब्राह्मसमाजाची धर्मोन्नति एकसारखी चालली होती. परंतु त्याबरोबरच केशवचंद्राच्या विरुद्ध असणारा पक्ष बळावत चालला. तशांत सन १८७८ सालीं केशवाच्या मुलीचा विवाह कुचबिहारच्या महाराजांशीं झाला. आपल्या समाजाच्या मताविरुद्ध केशवचंद्रांनीं १६ वर्षांहून लहान असणाऱ्या कुचबिहारच्या महाराजाला आपली १३ वर्षांची मुलगी हिंदुविवाह संस्कार करून दिली म्हणून त्याचे बरेच अनुयायी रागावले व नवीन साधारणब्राह्मोसमाज निर्माण झाला. कुचबिहार प्रकरणाचें वावटळ शांत झालें नाहीं तोंच केशवांनीं पुनः घोर "वैराग्यसाधनास" आरंभ केला. सर्व धर्मांचें ऐक्य करणें हा जो ब्राह्मसमाजाचा मुख्य कार्यभाग तो आपण नवविधान धर्माच्या योगें पूर्ण करीत आहों अशी स्वतःची समजूत करून घेतली. हें धर्मैक्य साधारण जनांच्या देखील एकदम लक्षांत यावें म्हणून केशवनीं अनेक संस्कार व कर्में लावून दिलीं. सन १८८१ त नवविधानध्वजारोपण या नावाचा एक संस्कार त्यांनीं केला, त्यांत ह्या नवविधानांचा हेतु उत्तम रीतीनें स्पष्ट करून सांगितला. यामध्यें सर्व राष्ट्रें, सर्व लोक, सर्व धर्म सर्व लोकाचार, सर्व भक्तिमार्ग, सर्व वैराग्यसाधनें यांचें ऐक्य झालें आहे; ह्या ऐक्याचें दर्शक अशी जी ही जयध्वजा तिच्या संरक्षणार्थ हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी इत्यादि सर्व द्वेषभाव विसरावा आणि एक अंतःकरणानें, एक भावानें विश्वजननीस शरण जावें असें स्पष्ट करून सांगितलें. यांचें 'नवविधान' नावाचें पत्र ते एकटे चालवीत. कुचबिहार प्रकरणापासून त्यांच्याविषयीं लोक हवें तें बोलत व लिहीत. 'नवविधान' उदयास आल्यादिवसापासून तर या निंदात्मक लेखांचा अगदीं कहर उसळला होता. ता. ८ जानेवारी १८८४ या दिवशीं ब्रह्मानंद केशवचंद्र सेन यांनीं देह ठेविला.

केशवचंद्रांच्या अंगीं चांगले नैसर्गिक गुण होते. त्याचा लोकांवर मोठा परिणाम होत असे. विशेषतः त्यांचा धार्मिक बाणा व नैतिक आचरण लोकानां मोहून टाकी व यामुळेंच केशवांच्या अनेक चुकांकडे त्यांच्या अनुयायांनीं दुर्लक्ष्य केलें. आपलें मत दुसऱ्याला पटवून देण्यांत त्यांचा हातखंडा असे. यांचें भारतीय धर्मग्रंथांचें ज्ञान बेताचेंच होतें व गुरूपणाच्या ढोंगधत्तुऱ्यापासून व ब्राह्मणमत्सरापासून हे अलिप्त नव्हते. त्यांचे विचार, विशेषतः आयुष्याच्या अंतिम काळांतील, त्रुटित व विसंगत असत. कोठल्याहि कामात त्यांनां सुव्यवस्था करितां येत नसे. प्रत्येक कार्यांत त्यांचा प्रत्यक्ष संबंध असल्यानें ते गेल्यावर त्याच्या साऱ्या घडामोडी बंद पडल्या. त्याच्या स्वभावात मनमोकळेपणा थोडाच असल्याकारणानें त्याचे अनुयायी बरेचसे साशंक असत व त्यांचे नवीन विचार एकदम ऐकून त्यांनां सखेदाश्चर्य वाटे. पण ते विचार फार दिवस केशवचंद्राच्या मनांत घोळलेले असत.

ख्रिस्तीमताचा त्यांच्या मनावर लहानपणापासून फार परिणाम झाला होता. कलकत्ता युनिव्हर्सिटीचे माजी रजिस्टार के. सी. बानर्जी नेहमी म्हणत कीं, केशव ख्रिस्ती होऊन मेले. बानर्जी हे केशवचंद्रांचे परममित्र असल्यानें त्यांचें म्हणणें अजीबात विचाराबाहेर टाकून चालणार नाहीं. आपल्या नवविधानांत त्यांनीं बरेच ख्रिस्ती संस्कार घातले आहेत. अशा रीतीनें ख्रिस्ती संप्रदायाचें अनुकरण करून ब्राह्मसमाजांतील एक भाग केशवानीं बनविला.

केशवचंद्र व दयानंद हे जरी समकालीन होते तरी या दोहोंची तुलना कोणत्याच तऱ्हेनें करतां येणार नाहीं. केशवचंद्रांची भारतीय धार्मिक विचारविकासाच्या दृष्टीनें किंमत फारशी नाहीं व सामान्य संसारिक मोहांमुळें त्याचें चरित्र कोणास स्फूर्तिदायक झालें नाहीं ('ब्राम्हसमाज' पहा).

[स्लेटर-केशव चंद्रसेन अॅंड ब्राह्म समाज; मुझुमदार-दि लाईफ अॅंड टीचिंग्स ऑफ केशवचंद्र सेन; शिवनाथ शास्त्री-दि न्यू डिस्पेन्सेशन; ब. भ. नगरकर-नवसंहिता]

केशवपुर—बंगाल इलाख्यातील जेसोर जिल्ह्यांतील एका तालुक्यांतील खेडेगांव. जेसोरशहराच्या दक्षिणेस १८ मैलावर हें हरिहर नदीच्या काठीं वसलेलें आहे. हे गाव साखरेच्या व्यापाराकरिता प्रसिद्ध आहे. या साखरेच्या धंद्याला लागणारीं मातीचीं उपकरणें व पितळेचें काम या ठिकाणीं होतें. या गावीं बाहेरून बराच तांदूळ येतो.

केशवस्वामी—हे रामदास पंचायतनांतील एक होत. यांना भागानगरकर असें म्हणत. यांचे वडील आत्मारामपंत असून ते मोंगलाईतील कल्याणीचे कुळकर्णी होते. केशवाच्या आईचें नांव गंगाबाई. त्या ८० वर्षांच्या झाल्यानंतर त्याना केशव हा मुलगा झाला असें म्हणतात. बाईच्या वयाच्या बाबतींत बरीच अतिशयोक्ति दिसते. केशवस्वामी हे पूर्ववयांत भागानगरच्या तानशा कुत्बशहा याच्या पदरीं एक अधिकारी होते. याचे गुरु काशीराजस्वामी होत. केशवानीं एकादशीचरित्र व इतर अभंग, पदें वगैरे काव्य केलें आहे. काव्यसंग्रहांत यांचीं सुमारें ५००।६०० पदें छापिलीं आहेत. याची शिष्यशाखा बरीच मोठी होती. तिनें मराठी

भाषेची पुष्कळ सेवा केली आहे. शिष्यांतील प्रमुख शिवराम व संतराज हे असून त्यांचे ग्रंथहि प्रसिद्ध आहेत. केशवस्वामींचा समाधिकाल शके १६०४ पौष शु. १३ असून, समाधिस्थळ हैद्राबादेस सुलेमान बागेपलीकडील रंगरेजगुड्याच्या पुढें मुसानदीच्या काठीं एका शेतांत आहे [भक्त मं. चितानिवा; महासार.]

केशाकर्षण-(कॅपिलॅरिटि) ज्या नळीचें छिद्र केसाप्रमाणें अगदीं बारीक असतें तीस केशनलिका (कॅपिलरी ट्यूब) असें नाव आहे. याप्रमाणें बारीक छिद्राच्या नालिकेंतून जें आकर्षण होतें त्यास केशाकर्षण असें नांव आहे. या प्रकारची नळी पाण्यांत किंवा एखाद्या द्रवांत बुडविली असतां केशाकर्षणाच्या योगानें नळीबाहेरील द्रवाच्या उंचीपेक्षां नळींतील द्रवाची उंची कमी किंवा जास्त होते. असल्या प्रकारच्या सूक्ष्म नळींत प्रवाही द्रव्याचे जे परिणाम होतात त्याशिवाय दुसऱ्या ठिकाणीं असल्याच प्रकारचे परिणाम घडत असता त्यांसहि केशाकर्षण असें नाव आहे. उदाहरणार्थ कापसाच्या वातींत तेल चढतें ते केशाकर्षणानेंच चढतें.

केशाकर्षणांत समानप्रकृतीच्या किंवा एकाच जातीच्या द्रव्यात जें आकर्षण होतें तें आकर्षण बऱ्याच अंतरावरून होत असताना अगदीं निर्बल असतें. परंतु जर अंतर अत्यल्प असेल तरच हें आकर्षण जोरदार असतें असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. जी. एच. क्विन्के नांवाच्या शास्त्रज्ञानें या प्रकारच्या आकर्षणाचे मापन करण्याच्या हेतूनें कांहीं प्रयोग केले. जास्तींत जास्त किती अंतर असतांना या प्रकारच्या आकर्षणाचा दृश्य परिणाम होतो याविषयीं या प्रयोगावरून त्यानें अनुमानें बसविलीं आहेत. एका मिलिमिटरच्या एक वीससहस्रांश इतक्या अंतरावरून हें आकर्षण उत्तम रीतीनें होतें असें त्यानें दाखवून दिलें.

ऐ ति हा सि क मा हि ती–इ.स.१७११।१७१२च्या सुमारास फ्रान्सिस हाक्सबी यानें केशाकर्षण नळींतून होणाऱ्या केशाकर्षणाच्या बद्दल अनेक प्रयोग प्रथमतः केले; या प्रयोगांवरून त्याचें असें मत झालें कीं, हें केशाकर्षण काच आणि प्रवाही पदार्थ याच्या दरम्यान असणाऱ्या आकर्षणामुळें होतें. तसेंच त्याच्या असें निदर्शनास आलें कीं, नळीची कांच कितीहि पातळ किंवा जाड असो नळीच्या आंतील द्रवाची फाजील उंची नळीच्या आंतील छिद्राच्या व्यासावरच अवलंबून असते. कांचेच्या जाडीचा या बाबतींत कांहींच परिणाम होत नाहीं. डॉ. जेम्स ज्युरिन, सर ऐझाक न्यूटन, अलेक्सिस क्लाड क्लेरिआट जे. ए, व्हान सेग्नर, जे.जी. लिडन फ्रास्ट (१७५६), ग्यासपर्ड मांगे (१७८७), जान लेस्ली (१८०२),थामस यंग (१८०४), पिअरे सायमन लाप्लेस (१८०६), सी. एफ. गौस(१८३०), सायमन डेनिस पाइसन (१८३१) इ. शास्त्रज्ञांनीं या दिशेनें बरेच प्रयत्न केले आहेत. यांच्या प्रयत्नांच्या योगानें या विषयास असलेलें सध्याचें महत्व प्राप्त झालें आहे. इ. स. १८३१ च्या नंतर जे. ए. एफ्. प्लांटो, जी. एल व्हानडर, मेन्स ब्रुगे, अथान्से डुप्रे, एफ. एच. आर. लुइट्गे व सर डब्ल्यू. थामसन वगैरे शास्त्रज्ञांनीं यांत बरीच प्रगति केली.

केशाकर्षणाविषयीं साद्यन्त माहिती येथें देता येणें शक्य नाहीं. केशाकर्षणाच्याच गुणधर्मामुळें जे चमत्कार दृष्टीस पडतात त्याला परिस्थितीप्रमाणें भिन्न भिन्न नांवें पडलीं आहेत. पृष्ठभागावर केशाकर्षणाचा परिणाम झालेला दिसून येतो.एखाद्या भांड्यांत पाणी आणि आल्कोहोल यांचें मिश्रण योग्य प्रमाणांत करावें तें असें कीं या मिश्रणाचें विशिष्टगुरुत्व तेलाच्या विशिष्टगुरुत्वा इतकें व्हावें. नंतर यांत तेलाचे थेंब सोडल्यास ते या मिश्रणांत खालीं वर वाटेल त्या ठिकाणीं राहू शकतात. तेलास जो आकार येतो तो कसा काय असतो हें पहाण्यासाठीं तें मिश्रण काठीनें हळूच हलवावें म्हणजे त्या थेंबास निरनिराळा आकार आलेला दिसेल; परंतु त्याबरोबरच असेंहि पण निदर्शनास येईल कीं, त्या तेलासभोंवार एखाद्या रबराच्या पिशवीप्रमाणें कसला तरी पृष्ठभाग आहे. ह्या थेंबाचा आकार मोठा असल्यास त्याला मंदमंद गति दिली असतां त्या थेंबाचा आकार निरनिराळ्या रीतींनें बदलतो, परंतु त्या थेंबाचे दोन किंवा अधिक विभाग होऊं शकत नाहींत. त्या थेंबासभोंवार कसल्या तरी चिवट पदार्थाचें आवरण असल्यासारखें दिसून येतें.

अत्यंत पातळ असे पाण्याचे किंवा दुसऱ्या एखाद्या प्रवाही पदार्थांचे थर घेऊन त्यांची जाडी काढतात. त्यावर प्रकाशाच्या योगानें जे निरनिराळे रंग दिसतात त्याच्या योगानें जाडी निश्चित करतां येते. याप्रमाणें जाडी निश्चित करून त्या योगानें आपणास पदार्थाच्या अण्वात्मक रचने- (मॉलिक्युलर स्ट्रक्चर) विषयीं अनुमान बसवितां येतें. सर डब्ल्यू थामसन (लार्ड केल्व्हिन) यानें या रीतीनें प्रयोग करून त्यावरून त्यानें अणूच्या आकारमानाविषयीं कांहीं अनुमानें बसविलीं आहेत. केशाकर्षणाचें मूळ कारण अणूअणूमधील आकर्षण हे आहे. या प्रकारचें आकर्षण घडण्यास कमींत कमी किंवा जास्तींत जास्त किती अंतर असावें लागतें याविषयीं क्विन्के आणि दुसरे कांहीं शास्त्रज्ञ यांनीं प्रयोग केले आहेत. त्यावरून असें दिसून आलें आहे कीं, या प्रकारचें आकर्षण घडण्यास एक सहस्रांश मिलिमिटरपासून ते एक वीससहस्रांश मिलिमिटरपर्यंत अंतर असतें. इतक्या अंतरात केशाकर्षणाचे परिणाम उत्तम प्रकारें निदर्शनास येतात. केशाकर्षणासंबंधानें मनोरंजक माहिती देऊन हा विषय पुरा करूं.

एका कांचेच्या नळींत कर्बद्विगंधकिदा(कार्बनबायसल्फाइड) चा एक थेंब ठेवावा; आणि त्याच्या शेजारींच पाण्याचा एक थेंब ठेऊन ती नळी समान्तर ठेवावी; म्हणजे कर्बद्विगंधकिदाचा थेंब पाण्याच्या थेंबामागें लागून पाण्याचा थेंब पुढें पळूं लागेल. कांचेच्या एका सपाट तक्त्यावर अल्कोहोलच

थेंब ठेवावा आणि त्याच्या शेजारींच तेलाचा थेंब ठेवावा म्हणजे अल्कोहोलचा थेंब तेलबिंदूचा पाठलाग करतांना दिसून येईल.

पाऱ्याच्या पृष्ठभागावर पाण्याचा बिंदु टाकला असता तो सर्व पृष्ठभागावर पसरला पाहिजे. परंतु तो सर्व पृष्ठभागावर पसरलेला दिसत नाहीं. या प्रकारें पाऱ्याकडून अपवादात्मक असें वर्तन कां व्हावें याचा उलगडा कित्येक दिवसपर्यंत शास्त्रज्ञास करिता आला नाहीं. क्विन्के यानें या गोष्टीचा उलगडा करण्याचें श्रेय संपादन केलें. त्यानें असें दाखवून दिलें कीं, पाऱ्याच्या पृष्ठभागावर एक प्रकारचा चिकट असा पातळ थर असतो व त्यामुळें या प्रकारचें अपवादात्मक वर्तन पारदपृष्ठभागाकडून झाल्यासारखें दिसतें. त्याकरिता शुद्ध केलेला पारा घेतला असतां या प्रकारचा अपवाद दिसून येत नाहीं.

स्वच्छ पाण्यावर कार्बन बायसल्फाइडचा थेंब टाकला असतां तो पाण्याच्या पृष्ठभागावर पसरला पाहिजे; परंतु तो पसरत नाहीं आणि लेन्सच्या सारखा आकार धारण करून पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगत रहातो. परंतु असें कां होतें याचा खुलासा पुढें दिल्याप्रमाणें सोपासा प्रयोग करून मिळविता येतो. पाण्यावर याप्रमाणें कार्बन-बाय-सल्फाइडचा थेंब तरंगत असता त्यावर लायकोपोडिअम नावाची तरंगणारी बुकणी टाकली असता ती बुकणी त्या थेंबापासून दूर सरकते. त्या थेंबापासून एक लहानसें वर्तुल काढावें; त्या वर्तुळाच्या दरम्यान ती बुकणी त्या वर्तुळाच्या आंत राहूं शकत नाहीं. जरी वारंवार बुकणी त्या वर्तुळाच्या आत टाकली तरी ती सरकून बाजूस जाते. या एकंदर प्रकारावरून पुढें दिल्याप्रमाणें अनुमान वसविता येतेः - नियमाप्रमाणें कार्बन बायसल्फाइडचा थेंब पसरण्याचा सारखा यत्न करीत असतो; परंतु त्याचें सारखें बाष्पीभवन होत असल्यामुळें पाण्याच्या सर्व पृष्ठभागावर तो थेंब पसरलेला दिसत नाहीं; त्यामुळे टाकलेली बुकणी थेंबापासून दूरदूर सरकते.

पृष्ठाकर्षणामुळें काय परिणाम घडतात याबद्दल पुढें कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. दोन सपाट काचा घेऊन त्या ओल्या कराव्यात व नंतर त्या एकमेकीस चिकटवाव्यात. याप्रमाणें चिकटविल्या असतां काचेच्या पृष्ठभागाच्या लंबरेषेंत त्या एकमेकापासून दूर करण्याचा प्रयत्न केला असतां त्या दूर करिता येत नाहींतः याना दूर करण्यास फार मोठा जोर लागतो. हा जोर वातावरणाच्या जोरापेक्षा मोठा असतो. याचें कारण केशाकर्षण (पृष्ठाकर्षण) हें होय. बर्फाचे दोन तुकडे घ्यावेत; त्यांचा एक एक बाजू सपाट करावी व नंतर ते दोन तुकडे एकमेकास चिकटवून ठेवावेत. कांहीं वेळानें ते दोन तुकडे मिळून बर्फाचा एकच तुकडा झालेला दिसून येतो. याप्रमाणें दोन तुकड्यांचा एक तुकडा होण्याचें कारण पृष्ठाकर्षण हें होय. या प्रकारास पुनर्घनीभवन (रेजिलेशन) असें नाव आहे. याच्या उलट प्रकार पारा आणि कांच याच्या संबंधांत दिसून येतो. दोन कांचा अगदीं थोड्या अंतरावर धरल्या असतां त्यांच्या दरम्यानचा पारा त्या कांचांमधून निघून जातो व ती रिकामी जागा निर्वात होते. मात्र अशा प्रकारें निर्वात जागा होण्याकरितां त्या दोन्ही कांचा पाऱ्याच्या पृष्ठभागाखालीं असाव्यात, म्हणजे बाहेरील हवेस आत शिरण्यास अवकाश मिळणार नाहीं.

थामस टेट नावाच्या शास्त्रज्ञानें नळीचा व्यास आणि थेंबाचें वजन याविषयीं प्रयोग केले आहेत. त्यानें जे प्रयोग केले आहेत त्यावरून त्यानें पुढील नियम बसविला आहे. 'इतर गोष्टी समसमान असताना नळींतून गळणाऱ्या थेंबाचें वजन आणि नळीचा व्यास हीं एकमेकांच्या समान प्रमाणात असतात."

एका सपाट पात्रांत एक दोन मिलिमिटर उंचीचें पाणी भरावें; नंतर त्यात साधारण मध्यावर एखादा आल्कोहोलचा थेंब टाकावा; म्हणजे थेंब पडलेल्या जागीं कोरडी जागा दिसूं लागेल.

तीव्र मद्याचे अश्रु.—कांचेचा प्याला पोर्ट वाईन नांवाच्या दारूनें अर्धा भरावा व तो कांहीं वेळ तसाच राहूं द्यावा. म्हणजे ती दारू कांचेच्या बाजूनें हळू हळू वर चढेल व नंतर बिंदूच्या रूपानें अश्रूप्रमाणें खालीं पडतांना दिसूं लागेल.

कर्पूर गतिः—कापराचा तुकडा पाण्यात टाकावा म्हणजे तो तुकडा पाण्यात वेडावांकडा फिरूं लागेल.

मद्यार्कानें चालणारी होडीः—उथळ पाण्यांत एक लहानशी होडी टाकावी; त्या होडीची एक बाजू मद्यार्कानें ओली करून नंतर ती होडी पाण्यांत सोडावी. असें केल्यास ती होडी पाण्यांत आपोआप चालूं लागेल. मद्यार्क लावलेला भाग वराम (म्हणजे जहाजाचा मागचा भाग) असतो.

विद्युल्लतेच्या योगानें पृष्ठाकर्षणात काय फरक होतो हें पहाणें फार मनोरंजक आहे. पारा आणि सौम्य सल्फ्युरिक आसिड याच्या दरम्यानच्या पृष्ठाकर्षणाबद्दल विद्युल्लतेनें मनोरंजक प्रयोग करता येतो.

एक काचेचें भांडे घेऊन त्याच्या भोकात बूच बसवावें. बुचात भोक पाडून त्यातून एक धातूचा दांडा घालून त्याचें टोंक भांड्याच्या आतल्या बाजूस आणलेलें असावें.त्या धातूस आतल्या बाजूनें स्पर्श करील अशा रीतीनें एक पारद-बिंदु ठेवावा. या धातूच्या दांड्यास विद्युद्घटमालेचें (विजेच्या ब्याटरीचें) एक टोंक जोडावें. नंतर त्या भांड्यांत सौम्य गंधकाम्ल (सल्फ्युरिक ॲसिड) ओतावे व त्यांत त्या ब्याटरीचें दुसरें टोंक बुडतें ठेवावें. विद्युत्प्रवाह वहात असतांना पारद-बिंदूचा आकार कसा काय होतो याकडे लक्ष द्यावें. ज्या वेळेस पारदबिंदु धन विद्युद्ध्रुवाशीं जोडतात तेव्हां पारदबिंदु निस्तेज दिसूं लागतो आणि त्याचा गोल आकार जाऊन तो चपटा होतो. परंतु जर पारद-बिंदूशीं ऋणविद्युद्-

ध्रुव जोडला तर त्या बिंदूस पूर्ववत् आकार येऊन तो चकचकीत दिसूं लागतो.

केशी—हा एक असुर होता हा ऊर्वशी व चित्रलेखा या अप्सरांस घेऊन पळत असतां त्यास मारून पुरुरवा राजानें अप्सरांस सोडविलें होतें. (मत्स. अ. २४).

(२)कोणा एका प्रजापतीच्या देवसेना आणि दैत्यसेना नामक दोन कन्या हरण करून पळणारा असुर. त्यातून दैत्यसेना यास वश झाली; परंतु देवसेना होईना. ती रडूं लागली. त्यावरून इंद्रानें याचा पराभव करून तिला यापासून सोडविलें. (भारत. वन. अ. २२३).

(३) कंसपक्षीय एक राक्षस. हा अश्वाचें रूप धरून वृंदावनात कृष्ण आणि गोपाल यांत पीडा देण्यास गेला असता कृष्णानें यास मारिलें [भाग. १० स्कं. अ. ३७.]

केशोरइपाटण—राजपुतान्यांतील बुंदी संस्थानच्या केशोरइ तहशिलीचें मुख्य ठिकाण. बुंदीपासून आग्नेयीस २२ मैलांवर, व कोटा शहरापासून १२ मैलांवर चंबन नदीच्या उत्तर तीरावर हें वसलेलें आहे. या गावाची लोकसंख्या १९०१ साली ३७७३ होती. महाभारतकालापासून या शहराची प्रसिद्धि आहे.प्राचीनकाळीं या ठिकाणीं जंबूकरण नांवाचें एक अरण्य होतें. महेश्वरचा राजा रन्तिदेव याच्या नावावरून याला पूर्वी रंतिदेवपाटण असे नांव होते. या ठिकाणीं परशुरामानें जम्बुकेश्वराचें देवालय बांधलें अशी आख्यायिका आहे. पुढें बरींच शतकें लोटल्यावर हें देऊळ अगदीं मोडकळीस आलें. तेव्हा छत्रसाल राजानें (१६३१–१६५८) हें पुन्हां बांधलें. याच राजानें केशोरइ नावाचे एक मोठें देवालय बांधविलें व त्यावरूनच याला केशोरइ हें नाव पडलें आहे. या देवळांत विष्णूची मूर्ति असून या ठिकाणीं दरवर्षी मोठी यात्रा भरते. मूर्तिकलेच्या दृष्टीनें या देवळात कांहींच पहाण्यासारखें नाहीं. १८ व्या शतकात, केशोरइ ही तहशील मराठ्यांना बक्षीस मिळाली; व पुढें पेशव्यांनीं त्यापैकीं $\frac{2}{3}$ शिंद्यांना व $\frac{1}{3}$ होळकरांना देऊन टाकली. १८१८ च्या तहान्वयें होळकराच्या ताब्यात असलेला भाग बुंदी संस्थानच्या ताब्यात पुन्हा गेला. पुढें १८६० च्या तहान्वयें शिंद्याच्या ताब्यांत असलेला $\frac{2}{3}$ भाग ब्रिटिशसरकारनें आपल्याकडे घेऊन तो पुन्हा बुंदी संस्थानच्या ताब्यात देऊन टाकला;व त्याबद्दल दरवर्षी ८०००० रुपये बुंदीसंस्थानानें द्यावयाचें ठरलें. केशोरइपाटण गावांत नदीच्या तीरावर दोन सतींची देवालयें असून त्या देवालयांत शिलालेख आहेत. हे लेख इ. स. ३५ व ९३ या वर्षांचे आहेत

केसरिया—काठेवाडमधील एक छोटेसें संस्थान. हा स्वतंत्र खंडणी देणारा तालुका वढवाण ठाण्यांत आहे तालुक्यांत केसरिया हें एकच गाव आहे. तालुकदार झाला रजपूत आहेत.

केसरी—एक वानर. अंजनेचा पति. हा गोकर्ण पर्वतावर रहात असे. एकदां शंबसादन नांवाचा एक असुर बलाढ्य होऊन त्यानें कित्येक ऋषींस बहुत त्रास दिला, त्यावरून ऋषींच्या आज्ञेनें यानें त्याशीं युद्ध करून त्याचा वध केला. तेव्हां ऋषींनीं संतुष्ट होऊन यास आशिर्वाद दिला होता कीं, तुला एक सुस्वभावी भगवद्भक्त आणि बलाढ्य असा पुत्र होईल. त्यावरून यास पुढें मारुति हा तसाच पुत्र झाला.

केसरीनाथ –हे राशीन येथील नाथसंप्रदायांतील मठाचे मठपति होत. ज्ञानेश्वर–परंपरेंतील हे नाथ होते. यांच्या गुरूचे नांव उद्बोधनाथ होतें. उद्बोधांच्या अनेक शिष्यांतून हेच राशीनमठाचे अधिकारी झाले. पूर्वाश्रमीं हे राशीनचे मामलेदार होते. नौकरीवर असतांना हे उद्बोधांच्या गावातील कथाकीर्तनास व ज्ञानेश्वरीच्या पुराणास जात असत. पुढें नोकरी सोडून हे उद्बोधांचा उपदेश घेऊन शिष्य बनले. यांची काव्यरचना फार आहे. त्यांत सिद्धांतसार म्हणून मुख्य ग्रंथ आहे. यांनीं श. १६४६ मार्ग. शु. २ रोजीं आळंदीस समाधि घेतली. प्रख्यात मराठी कवि शिवदीन (केसरी) याचा शिष्य होय [सं. क. सू.].

केसरीय—बिहार-ओरिसातील चंपारण जिल्ह्यातील एक खेडें. १९०१ सालीं या खेड्याची लोकसंख्या ४४६६ होती. या खेड्यांत १६०० फूट परिघाची एक मोठी विटांची भिंत असून, त्यावर ६२ फूट उंच व ६८ फूट व्यासांचा एक विटांचा स्तूप आहे. बुद्धानें जीं अवतारकृत्यें केलीं त्यापैकीं एका कृत्याच्या स्मरणार्थ हा स्तूप बांधला गेला असावा असें कनिंगहॅमनें म्हटलें आहे. हा स्तूप सन २००–७०० यांच्या दरम्यान केव्हातरी बांधला गेला असावा. पण भिंत मात्र बरीच जुनी असावी असें दिसतें. ही भिंत चक्रवर्ति राजा वेन यानें बांधिली अशी दंतकथा आहे.

केसीध्वज—कृतध्वजाचा पुत्र. केसीध्वजास आध्यात्मिक ज्ञान प्राप्त झालें होतें. त्याचा खांडिक्य नामक चुलतबंधु फार दक्ष असून, धर्मकृत्याबद्दल त्याची फार प्रसिद्धि होती. या दोघामध्यें द्वेषभाव वसत असल्यामुळें खांडिक्यास आपल्या राज्यांतून हाकून लावण्यांत आलें. परंतु कालेंकरून त्याच्यात पूर्ण स्नेहभाव होऊन ते परस्परांच्या उपयोगी पडूं लागले. खांडिक्यानें आपल्या धर्माचरणाच्या योगानें केसीध्वजास गोहत्येच्या पापापासून मुक्त करविलें, व केसीध्वजानें खांडिक्यास योगधारणेच्या गूढ गोष्टी कथन केल्या.

केसो भिकाजी दातार—सवाई माधवराव यांचे कारकीर्दींत होळकर दरबारांत हे गृहस्थ पेशव्याचे वकील होते. हे निस्पृह व स्पष्टवक्ते असून, यांचें अवलोकन सूक्ष्म, बारकाईचें होतें. गुप्त बातम्या काढण्यांत यांचा हातखंडा असे. यांनीं १७८२–१७९४ पर्यंत वकिलीचें काम केलें व पेशव्यास वेळोवेळीं सरकारी व इतर बातमी दिली. यांनीं लिहिलेलीं २७६ पत्रें इ. स. मध्यें, (महेश्वर दरबारचीं पत्रें भा. २ यात प्रसिद्ध झालीं असून त्यांत तत्कालीन होळकरशाहीचा इतिहास पहावयास सांपडतो. (भा. इ. मं. ष. सं.).

केळ—या झाडास लॅटिनमध्यें मूसासापिएन्टम्, इंग्रजींत इँग्लटेन् किंवा बनाना, व मराठींत केळ, संस्कृतमध्यें कदली, गुजराथींत केरा, हिंदींत केला इत्यादि नावें आहेत.

मंगलप्रसंगीं केळींचें तोरण दारापुढें बांधण्याची वहिवाट हिंदुस्थानांत फार प्राचीन आहे. यावरून हें झाड आपल्या लोकांस फार प्राचीन कालापासून माहीत आहेसें दिसतें. आपल्या पुराणांत, काव्यग्रंथांत व नाटकांत कदलीवृक्षाचीं वर्णनें आलीं आहेत. प्राचीन ईजिप्शिअन लोकांस केळें माहित नव्हतें. मूळ मलायाद्वीपकल्पाकडील असावें असें म्हणतात.

व स्तु-क्षे त्र—हें बहुवर्षायु कंदरूप झाड आहे. त्याची उंची ८ ते १५ फूट असते. कधीं कधीं २० फूट उंचीचीं झाडें होतात. फळें ४ इंचांपासून १५ इंचांपर्यंत लांब असतात. हें झाड बिहारच्या डोंगरांत, पूर्व हिमालय आणि आसामांतील पर्वतांत, मणिपूर आणि ब्रम्हदेश या ठिकाणीं आपोआप होतें. हिंदुस्थानांत व उष्णकटिबंधांत सर्वत्र याची लागवड केली जाते या झाडाच्या ४० जाती हिंदुस्थानांत आहेत. त्यांपैकीं मुख्य खालीं दिल्या आहेत.

के ळ्या च्या जा तीः—मुसा डाक्का याचीं पानें फिक्कट हिरवीं व फळें फिक्कट पिवळीं असतात. पूर्व बंगालमध्यें याची लागवड होते.

मुसा चम्पाः-याच्या पानाचा दांडा लाल असतो. व फळ ६ इंच लांब असून तें वाळलेल्या गवताच्या फिक्या रंगाप्रमाणें असतें. याचे चम्पा आणि चिनी चम्पा असे दोन प्रकार आहेत. हे प्रकार कलकत्त्यामध्यें दिसून येतात.

मुसा सिक्किमन्सिसः—ही जात सिकिम प्रांतांत दार्जिलिंगजवळ होते.

मुसा पारेडिसैकाः—याचें फळ शिजवून खातात. कुंतेल आणि कच-केळ हे दोन्ही प्रकार यांतच येतात.

मुसा कार्निकुलाटाः—मुंबई व मद्रास इलाख्यांत ही जात सांपडते.

मुसा टेक्सटाइलीस व मुसा अरकानेन्सिसः—या दोन जातींच्या झाडापासून मजबूत व्यापारोपयोगी तंतू निघतात. ब्रह्मदेशांतील या झाडाचें फळ मुंबईच्या लाल केळ्याप्रमाणें असतें. मुंबईच्या फळाला मुसारुब्र, रामकेळें किंवा लालकेळें म्हणतात. या झाडाचा देंठ, फूल, फळ हीं तांबडीं असतात.

मुंबई इलाख्यांत आपल्याइकडे ठाणें, खानदेश, पुणें, सातारा, विजापूर, बेळगाव या जिल्ह्यांतून केळीची लागवड फार होते. ठाणें व खानदेशांत बसराई अगर बंगाली जात लावतात. ताबोळी, मुठेळी, राजेळी, गोवेगिरी, वेलची वगैरे जातींचीं लागवड ठाणें जिल्ह्यांत होते. पुणें, सातारा व बेळगाव यांत मुख्य जाती राजेळी अथवा राजापुरी व काळी अथवा जुन्नरी या होत. शिवाय सोन, वेलची, म्हशेळी याहि आहेत. प्रत्येक देशांत किंवा प्रांतांत एकच प्रकारचें झाड होत नसून लागवड केल्यामुळें पुष्कळ जातींचीं झाडें होऊं शकतात.

ला ग व ड—समुद्रसपाटीपासून ५००० किंवा ३००० फूट उंचीचा प्रदेश खेरीजकरून केळीचीं झाडें हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं होतात. कांहीं झाडें पिकल्या केळ्याकरितां व कांहीं कच्च्या केळ्याकरितां(भाजीकरितां)लावतात. कच्च्या केळ्यांची लागवड हलक्या जमीनींतहि होते. निरनिराळ्या प्रांतांत लागवडीची निरनिराळी रीत असते.

सु के ळीः—सुकेळी करण्याचा हंगाम कार्तिक, मार्गशीर्ष व पौष हा होय. केळीं सुकविण्यासाठीं काढावयाचीं असल्यास त्यांच्या शिरा पार जाऊन केळें अगदीं गोल व्हावयास पाहिजे. कच्चे काढल्यास सुकेळें कठीण व पांढरें होतें. जितकीं केळीं मिळतील तितकीं मिळवून भट्टींत ठेवून तीं पिकवितात. केळीं चांगलीं पिकल्यानंतर त्याची साल काळी पडते. केळीं पिकून काळीं पडल्यानंतर तीं सोलून समुद्रकांठीं सुमारें आठ फूट उंच माडव घालून त्यावर वाळत घालतात. याप्रमाणें रोज करीत गेल्यास तीं सात दिवसांत वाळून तयार होतात. समुद्रकिनाऱ्यावर माडव उंच असल्यामुळें खालून व वरून हवा चांगली तापते व त्यामुळें केळीं लवकर व सारखीं वाळतात. वाळतांना त्यावर केरकचरा, माती वगैरे बसूं नये म्हणून काळजी घ्यावी लागते. मुंबई इलाख्यांत फक्त आगाशी येथेंच राजेळीचीं सुकेळीं करितात. मलबारकडे केळमे, टोडो उर्फ नेंद्रबाळी, कण्णन् वगैरे जातींचीं सुकेळीं होतात असें म्हणतात. बहुधा कोणत्याहि जातीचीं केळीं उन्हांत ठेवून वाळविण्यास अडचण पडत नाहीं. परंतु जी काय मुख्य अडचण आहे, ती सुकेळें भपकेदार व स्वच्छ असून त्यावर कोणत्याहि प्रकारची कीड, आळी वगैरे कांहीं असूं नये ही होय. त्यामुळें उंची व रंगदार माल फक्त आगाशीकडील राजेळीचाच होऊं शकतो

उ प यो ग.—पिकलेलीं केळीं खातात व कच्च्या केळ्यांची भाजी करतात. एका एकरांत पेरलेल्या इतर धान्यापासून जितक्या लोकांचा निर्वाह होऊं शकतो, त्यापेक्षां एका एकरातील केळ्याच्या पिकावर जास्त लोकांचा निर्वाह होऊं शकेल. केळीं वाळवून बारीक पीठ करून त्याचे खाण्याचे पदार्थ करितात. या झाडाचीं फुलें, गाभा व कोवळे अंकुर यांची भाजी करून खातात व गुरांना चाऱ्याप्रमाणें ते घालतात. व कांदे जनावरास खाउं घातले असतां दूध वाढतें.

या झाडाच्या तंतूपासून दोऱ्या, चटया, व कागद तयार होतो. [वॅट; परांजपे-फळझाडांचा बाग.].

केळवाडा—राजपुतान्यामध्यें उदेपूर संस्थानांतील कुमलगड परगण्याचें मुख्य ठिकाण. हें उदेपूरच्या उत्तरेस ३८ मैलांवर असून कुमलगड किल्ल्याच्या दक्षिणेस २॥ मैलांवर आहे. हें अरवली पर्वताच्या मध्यभागीं वसलेलें आहे. याची लोकसंख्या १९०१ सालीं १२०४ होती. चौदाव्या शतकाच्या आरंभीं, अल्लाउद्दिनानें चितोडगडाला वेढा दिला. त्यावेळीं राणा लक्ष्मणसिंह व त्याचे सात भाऊ

ठार झाले. तेव्हां राणा अजयसिंह यानें या ठिकाणचा आश्रय घेतला होता.

केळवाडी—हें बदामीच्या उत्तरेस ११ व कट-गिरीच्या पूर्वेस चार मैलांवर एक खेडें आहे. येथें रंगनाथाचें एक देऊळ आहे. या ठिकाणीं फाल्गुनात यात्रा भरत असते. रंगनाथाच्या देवळात एक जुना कानडी सिंद घराण्याचा (१२१०--१२८०) लेख आहे. या घराण्याचा या तालुक्यावर अंमल होता. [फ्लीट—कॅनरीज डिनॅस्टीज].

केळवे माहीम—मुंबई इलाख्यातील ठाणें जिल्ह्यामधील तालुक्याचें मुख्य ठिकाण. बी. बी. सी. आय रेल्वेच्या फाटयावर पालघर म्हणून स्टेशन लागतें त्याच्या पश्चिमेस सुमारें ५॥ मैलावर हें ठिकाण आहे. येथील लोकवस्ती १९११ सालीं ५९९५ भरली. केळवें माहीम यापैकीं केळवें या बंदराजवळ एक किल्ला आहे. माहीम बंदरा-समोरहि दोन किल्ले असून ते पोर्तुगीज लोकांनीं बांधलेले आहेत. केळवे माहीम या ठिकाणीं मोठमोठ्या बागा असून येथे केळीं, ऊंस, सुंठ, सुपारी याचा मोठा व्यापार आहे. हें शहर दिल्ली येथील मोगलाच्या ताब्यात १३५० सालीं आलें. पुढें गुजराथच्या सुभेदारानीं तें आपल्या ताब्यात घेतलें. १५३२ सालीं पोर्तुगीज लोकानीं तें हस्तगत केलें. १६१२ सालीं मोगलानीं या शहराला वेढा दिला. पण पोर्तुगीज लोकानीं मोठया शौर्यानें व चिकाटीनें त्याचें संरक्षण केलें. या ठिकाणीं एका पोर्तुगीज सरदाराचें थडगें सापडलें. त्याचा अवशेष ठाणें येथील कलेक्टराच्या बागेत ठेवला आहे. १८६१ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन करण्यात आली. १९०१ सालीं या शहराचा वार्षिक वसूल ८००० रुपये होता. १८९० सालीं केळवे गाव देखील माहीम म्युनिसिपालिटीच्या ताब्यात देण्यात आलें. माहीम शहरांत एक धर्मार्थ दवाखाना असून ६ मुलाच्या व १ मुलींची शाळा आहे.

केळापुर, तालुका.—वऱ्हाड प्रांतातील यवतमाळ जिल्ह्यापैकीं एक तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ १०८० चौरस मैल आहे. १९११ मध्यें या तालुक्याची वस्ती १,३०,७९७ होती. या तालुक्यात ३१० खेडेगावें आहेत. या तालुक्याचें मुख्य ठिकाण पाढरकवडा हें आहे. या तालुक्यात गोंड लोकांची वस्ती अधिक आहे. चांदा येथील गोंडाच्या राज्यात याचा पूर्वी समावेश होत असे. या तालुक्याचा वार्षिक महसूल १३५०० येतो.

केळोद—मध्यप्रांतातील नागपूर जिल्ह्याच्या काटोल तहशिलीतील एक गांव. नागपूर छिंदवाडा रस्त्यावर नाग-पूरहून १८ मैलांवर हें गांव वसलेलें आहे. या ठिकाणीं पूर्वी केळीच्या बागा असत व त्यावरूनच याला सध्याचें नांव पडलें असावें. या गांवची लोकसंख्या १९११ सालीं ५७८५ होती. पाणी पिण्याचीं पितळीं भांडीं या ठिकाणीं चांगलीं तयार होतात. या ठिकाणीं नुकतीच एक कापूस वटव-ण्याची गिरणी निघाली आहे.

कैकाडी-कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्र येथें या जातींची वस्ती साधारणतः असून १९११ सालीं मुंबइ इलाख्यात ह्यांची संख्या ९३१८ होती. दरवडेखोरी व मुशाफरी याबद्दल कैकाड्याची प्रसिद्धि आहे. अजूनहि चोऱ्या व घर-फोडी करण्याचा त्याचा व्यवसाय चालू असला तथापि अलीकडे त्याची थोडी सुधारणा झाली आहे. आपलें मूळ ठिकाण तेलंगण होय असें ते सागतात आणि तेलगू व कानडी मिश्रित अशी त्याची भाषा ऐकलीं कीं, ते तेलंगणचे असावे हें संभवनीय दिसतें. कैकाडी जातींत भामटे व लमाण वगैरे गुन्हेगारहि शिरले असून काहींना अर्धवट मराठीहि बोलता येतें.

या जातींत नऊ पोटजाती आहेत. बोरीवाले, धन-ताळे, कामाठी, काइजी, लमाण, माकडवाले, उरूकैकाडी, वाइबेस व भामटे असे ते नऊ भाग आहेत. या सर्वांचा धंदा म्हणजे माकडें घेऊन फेरी करणें, टोपल्या करणें, जादुगिरी करणें व खिसे कातरणें, किंवा अशाच स्वरू-पाचा असतो. ओड व कोल्हाटी जातींशी त्यांचें सादृश्य दिसून येतें. उपरोक्त जातींशिवाय गोत्रांतर—विवाहामुळें झालेले काहीं भेद आढळतात. जाधव, माने, गायकवाड, माधावंत व पोवार असे पाच मुख्य वंश आहेत. जाधवांचे मधू व सपाटसर आणि मान्यांचे मानक व मालाजूर असे भेद आहेत. काहीं ठिकाणीं वरील वंशाचीं नावें हल्लीं आडनावें बनलीं आहेत. मुख्य वंशांना, सातपादी, मेल-पादी, कावाडी, मंढरेगुदी व संगाडी अशीं दुसरीं नांवें आहेत.

त्याच्यांत बालविवाह रूढ असून बहुपत्नीत्वास मुभा ठेविली आहे. मुलाचा बाप प्रथम मागणी घालतो व वधूच्या बापास २५ ते १०० रुपयेपर्यंत देतो. लग्नाचा मुहूर्त व कार्य ब्राह्मणाकडून करविण्यात येतें. पंचपालवी हें कैका-ड्यांचें देवक असून त्याची लग्नाच्या दिवशीं स्थापना करि-तात. होम, मंगळसूत्र, कंकण वगैरे समारंभ कुणब्याप्रमा-णेंच करण्यांत येतात. खानदेश व बेळगांव जिल्ह्यांत अशी चाल आहे कीं, नवऱ्यानें आपल्या बायकोच्या घरीं तीन मुलें होईपर्यंत राहून आपल्या सासऱ्याच्या कुटुंबास पोसलें पाहिजे. अशा अटीवर लग्न ठरल्यानंतर पुढें नवरा-बायकोंत कलह झाल्यास तिच्या आईबापास पोसण्याची जबाबदारी नवऱ्यावर असते. धनताळे कैकाड्यांत पंचा-कडून लग्न ठरविण्यांत येतें. पिंपळाची डहाळी एका घटांत घालून व त्यांत पाणी घालून, त्या घटापुढें वधूवरास बस-वितात. लोकांनीं अक्षता टाकल्यानंतर लग्नविधि पूर्ण होतो. या जातींत विधवाविवाहास मोकळीक आहे. एक ब्राह्मण उपाध्याय व विधवा स्त्रियाच विधवेच्या लग्नांत भाग घेतात.

एखाद्या अविवाहित पुरुषास विधवेशीं लग्न कर्तव्य असेल तर त्यास प्रथम शमी वृक्षाशीं लग्न करावें लागतें. नवराबायकोंत कलह झाल्यास काडीमोड करण्याची वहिवाट आहे.

कैकाडी हे हिंदुधर्मीय असून वारसासंबंधीं हिंदु कायद्याचाच अवलंब करितात. हिंदु देवतांनां मान देऊन हिंदु सणच ते पाळतात. बहिरोबा, भवानी, मरिआइ, फिरंगाई, तुकाई, यमाई, वगैरे देवतांची ते उपासना करतात. सोनोरीचा बहिरोबा, जेजुरीचा खंडोबा, तुळजापुरची भवानी व मारुती या त्यांच्या कुलदेवता होत. आळंदी, जेजुरी, सोनोरी, तुळजापूर, पंढरपूर वगैरे ठिकाणीं ते यात्रेस जातात. गोसावी हे त्यांचे धर्मगुरू असून शकून, जादुगारी, चेटूक, कौल इत्यादिकांवर त्यांची श्रद्धा असते. एखादी सांथ उद्भवली कीं, बकरें किंवा रेडा बळी देतात. खानदेशचे कैकाडी दावुलमलिक नांवाच्या मुसुलमान साधूस फार मान देतात. या जातीचे उपाध्ये साधारणपणें देशस्थ ब्राह्मण असतात. कैकाडी लोक मृतांस पुरतात किंवा जाळतात. दहा दिवसपर्यंत सुतक पाळण्यांत येतें व प्रेतवाहकहि सुतक पाळतात. रक्षा भरणें, क्षौर करणें वगैरे सर्व विधी करण्यात येतात. मृताची एक मूर्ति घरच्या देवात पुजेकरिता ठेवण्यांत येते. श्राद्ध करण्याची चाल या लोकांत नाहीं.

कैकाड्यांची चोर म्हणून प्रसिद्धि असल्यानें त्यांच्यावर पोलिसाची नेहमीं नजर असते. त्याचा परंपरागत धंदा टोपल्या करणें हा होय. पक्षी व हरिण पकडण्याचीं जाळीं तयार करणें, पक्ष्याचे पिंजरे करणें, मुलांचीं खेळणीं तयार करणें वगैरेहि धंदे कैकाडी लोक करतात.

टोपल्यांतील साप लोकांना दाखवून कांहीं लोक भिक्षा मागतात. वाळू, माती, विटा, कौलें वगैरे गाढवावर लादून नेआण करण्याचें कामहि कांहीं लोक करतात. कांहीं लोक शेती व मजुरी करूं लागले आहेत. बकरें, हरीण, ससे व डुक्कर यांवर उपजीविका करून ते दारूहि पितात. त्याचा सामाजिक दर्जा कुणब्याहून अत्यंत हीन आहे.

या जातीचा उल्लेख दामाजीपंत मंगळवेढेकर यांच्या वेळीं (तेरावें शतक) झालेल्या एका ऐतिहासिक महजरांत स्पष्ट आढळतो. महारांनीं गांवांतील कोणत्या लोकांपासून कोणकोणते हक्क वसूल करावेत याबद्दलच्या यादींत त्यांनीं कैकाडी लोकांपासून, प्रत्येक लग्नास सवा दोन रुपये व मर्तिकाच्या प्रत्येक मढ्याबद्दल साडेतीन रुपये वसूल करावेत असा निर्देश केलेला आहे [इति. मंड. चतु. सं. वृ. ६२].

वऱ्हाड मध्यप्रांतांतील कैकाडी.—मध्यप्रांतांत यांची वस्ती जास्त आहे. हे कान्होबा रमजानास आपला पूर्वज समजतात व त्यानें आपल्या मुलास एक फांदी दिली व त्यावर निर्वाह करण्यास सांगितलें म्हणून आम्ही टोपल्या विणन निर्वाह करतों, अशी हे जीवनवृत्ति समजावतात. नेमाड जिल्ह्यांत यांच्या दोन जाती आहेत.एक मराठी व दुसरी फिरस्ता. मराठे कैकाडी दुसऱ्या वर्गास नीच समजतात. नागपुरांत यांच्या अनेक उपजाती आहेत त्याः—कामाठी भामटी, कुणबी, तोकींवाला व बोरीवाला. यावरून अन्य जातींनीं आपल्यातून काढून दिलेले लोक कैकाडी जातींत शिरले असावे असें दिसतें. वऱ्हाडांत याच्या साडेबारा पोटजाती आहेत. नेमाडांत यांचे दोन वर्ग जाधो व गायकवाड असे आहेत व हे परस्परांशीं विवाह करतात. दक्षिण जिल्ह्यातून जाधो, माने, कुमरे, जेष्टी, फले, दाने व इतर असे अनेक वर्ग आहेत. याचा मद्रासच्या कोरवा जातीशीं पूर्वी केव्हा तरी निकट संबंध असावा.

सगोत्र विवाह याच्यांत निषिद्ध आहेत. मुलींचें लग्न ८ ते १२ वर्षांच्या वयात होतें. मुलीला वर मिळत नसला तर दुसऱ्या कोणाच्या तरी लग्नात अर्काच्या झाडाबरोबर किंवा अंगठीबरोबर तिचें लग्न करितात, व तें झाड फार जपून वाढवितात आणि ती आंगठी बोटांत घालतात. जर तें झाड मेलें किंवा आंगठी हरवली तर त्याची उत्तरक्रिया करितात. २० ते १०० रुपायापर्यंत मुलींचें शुल्क असतें. विधवेनें नवऱ्याच्या पाठच्या भावाबरोबर लग्न केलें पाहिजे व या पाठच्या भावाखेरीज इतर भावाशेबर तिला लग्न करतां येत नाहीं. जर तिनें योग्य दिरास सोडून इतरास वरिलें तर त्या माणसानें तिच्या लग्नाचा अर्धा खर्च दिरास भरून दिला पाहिजे. विधवाविवाह तिच्या नवऱ्याकडेच झाला पाहिजे. प्रथम वरानें विधवेबरोबर लग्न करण्यापूर्वी रुईच्या झाडाबरोबर प्रथम विवाह केला पाहिजे. हे पुष्कळ बायका करतात. पण पहिल्या बायकोच्या परवानगीशिवाय दुसरें लग्न करतां येत नाहीं. व पहिली बायको नवऱ्याकडून ' दुसरें लग्न केल्यावर मी चांगला वागेन ' असें कागदावर लिहून घेते. बहुधा पहिल्या बायकोचे आईबाप दुसरें लग्न करूं देत नाहींत. सबळ कारणें असलींच तर घटस्फोट करूं देतात. व पंचायतीच्या सह्यांसह एक फारखतीचा कागद तयार करतात. त्याबद्दल नवऱ्यास ८ ते १० रुपये भरावे लागतात. याचा देव नाग आहे. हे खंडोबाची व मरीमाताची पूजा करतात. हे लोक फार अपवित्र समजले जातात. ब्राह्मण, वाणी व कलारसुद्धा यांस स्पर्श करीत नाहींत. यांस मंदिरांत येऊं देत नाहींत. यांची जातपंचाइत असून ती निरनिराळ्या अपराधांबद्दल शिक्षा करते. जर कोणा कैकाडिणीनें भिन्न जातीशीं व्यभिचार केला तर तिला नदीवर किंवा विहिरीवर नेतात. तिचें संपूर्ण क्षौर करतात. मग दोन दारांचें झोपडें मुद्दाम जवळच तयार करून ठेवलेलें असतें. त्यांत ती एका दारानें जाते व बाहेरून ते झोपडें पेटवितात. तें पेटत असतांना ती कांहीं वेळ झोंपडींत बसते.नंतर दुसऱ्या दारानें बाहेर पडते. मग एका लहान मुलास प्रथम तिच्या हातचें जेवण घालतात. असाच विधि मुंबईचे कोरवा लोक करतात. [रसेल व हिरालाल].

कैकुबाद्—हा दिल्लीचा गुलाम (मुसुलमान) घराण्यांतील एक शहा (स. १२८६–८८). हा बल्बनचा नातु होय. याचा बाप व हा आजाच्या कारकीर्दीत बंगालचा सुभा होता. आजाच्या मरणानंतर हा गादीवर आला (याचा बाप आजाचा आवडता होता). हा देखणा व सौम्य होता. आजानें त्याला १७ वर्षें शिक्षण देऊन शिस्त लाविली होती. परंतु हा गादीवर आल्यानंतर त्या कडक शिस्तीचा वचपा यानें काढला. दारू व बायका यांच्या विलासांत हा फार दंग असे. सर्वदा चैनींत दंग असल्यानें राज्याचा कारभार दिवाण निजामुद्दीन पाही. दिवाणानें याला काढून राज्य बळकाविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो आयत्या वेळीं उघडकीस आला व त्यामुळें दिवाणानें आत्महत्या केली पुढें कांहीं दिवस कैकुबाद शुद्धीनें वागत असे; परंतु व्यसन पुन्हा बळावलें व सर्वत्र अंदाधुंदी माजली. तेव्हां दरबारांतील जलालुद्दीन खिलजी नांवाच्या सरदारानें आपला पक्ष प्रबळ करून एके दिवशीं कैकुबाद विलासांत गुंग असतां त्यास ठार मारून त्यानें प्रेत खालीं यमुनेंत फेंकून दिलें व आपण तक्त बळकावलें. येथें गुलाम घराण्याचा शेवट झाला. हे गुलाम शहा फार व्यभिचारी व माथेफिरू असत. कैकुबादचा बाप त्याच्या भेटीस आला असता त्या प्रसंगीं प्रसिद्ध मुसुलमान कवि अमीर खुश्रु यानें त्या प्रसंगावर एक हृदयस्पर्शी काव्य केलें आहे. तें किरान–उस्–सदइन (दोन नक्षत्रांचा संयोग) या नांवानें प्रख्यात आहे [बील–ओ. बा. डि; स्मिथ–ऑ. हि. इं.; सरदेसाई–मु. रि.]

कैकेयी—सूर्यवंशीय दशरथ राजाच्या तीन मुख्य स्त्रियांतील एक. ही केकय देशींच्या अश्वपति राजाची कन्या असून आपल्या पतीस अतिशय प्रिय असे. एकदां लढाईंत ही दशरथराजास फार उपयोगी पडली होती. दाशरथि रामास अरण्यवास आणि दशरथास मृत्यु, असे प्राप्त होण्यास हृचि कारण झाली होती. हिचा पुत्र भरत. (२) मत्स्यपति विराटाची स्त्री सुदेष्णा, ती केकयाधिपतीची कन्या म्हणून तिलाहि कैकेयी म्हणत असत.

कैकोलन—एक कोष्टी जात. यांची एकंदर लो. सं. (१९११) ३७३२९७ आहे. बहुतेक मद्रास इलाख्यांतच आहेत. तेलगू प्रांतांत व दक्षिणेकडील सर्व जिल्ह्यांत कैकोलन जातीचे तामीळ कोष्टी रहात असून ते तेलगू भाषाच बोलतात. अशी एक दंतकथा आहे कीं, मदुरेच्या नायक राजांनां कैकोलनांचें काम पसंत न पडल्यामुळें त्यांनीं उत्तरेकडून पटनूलकारन कोष्टी आणविले; व त्यांचीच संख्या पुढें जास्त झाली. संस्कृत वीरबाहु शब्दाचा समानार्थी तामीळ शब्द कैकोलन असा आहे व वीरबाहु हाच आपला मूळ पुरुष होय अशी या जातीची समजूत आहे. कैकोलन लोकांनां सेनगुंडार म्हणजे रक्तखंजीर असें म्हणतात. व त्याविषयीं दंतकथाहि आहेत. कै म्हणजे हात व कोल म्हणजे धोटा, अशी कैकोलनची व्युत्पत्ति आहे. हातमागाच्या विविध भागांनां हे लोक देवता व ऋषी समजतात. धागा हा विष्णूच्या नाभिकमलांतून प्रथम उत्पन्न झाला, बाणा म्हणजे एक देवता, ताणा म्हणजे नारद, पावटी हा वेदमुनि, फलक म्हणजेच ब्रह्म आणि ताणा बांधण्याचा मुख्य दोर म्हणजे आदिशेष होय. अशा तऱ्हेच्या श्रद्धामय कल्पना मागाविषयीं कैकोलन कोष्टयांच्या आहेत.

कित्येक ठिकाणीं खालील पोटजाती आढळून येतातः—सोझिया, रट्टु, सिरुताली, पेरुताली, शिरपरम्, सेवायहवृत्ति, इत्यादि. बहुतेक कैकोलन शैव असून कांहीं लिंग धारण करितात व कांहीं वैष्णवहि आहेत.

या जातीच्या मुख्य पुढाऱ्यास पेरिदानकारन् अथवा पट्टकारन् असें म्हणतात. त्याच्या हाताखालच्या मुख्यास ग्रामणी व उरल असें म्हणतात. कांजीवरम् येथें राहणारा त्यांचा पुढारी देणग्या स्वीकारतो व जातीसंबंधीं तंटे मिटवितो. त्यास महानाट्टन् असें म्हणतात त्याची अनुज्ञा उल्लंघन केल्यास तो अपराध्यास जातिबहिष्कृत करितो. नट्टुकट्टाद नायनमार नांवाचा एक भिक्षुक वर्ग कैकोलन जातीस जोडलेला आहे. देशांतर करताना,कोठेंहि जातीचा तंटा असल्यास, सभा बोलावून व कांजीवरम्च्या महानाडचे प्रतिनिधी म्हणून हजर राहून ते वादाचे निकाल कसे होतात हें पाहतात. जातिविषयक वाद संपेपर्यंत आपलें काम तहकूब ठेवण्याची पद्धति या लोकांत आहे. ते कामाक्षी देवीची उपासना करितात. वरील भिक्षुकवर्ग एका वेळूवर चढून कांहीं शकुनात्मक धार्मिक विधि व कसरती करितो. या दोन्ही गोष्टींनां एका दंतकथेचा आधार आहेसें दिसतें. नट्टुकट्टाद नायनमार हे आपण वीरबाहूचे वंशज आहों असें हक्कानें प्रतिपादन करितात. कैकोलनांपेक्षा हे भिक्षुक लोक हलक्या दर्जाचे असून त्यांचा कैकोलनाशीं बेटीव्यवहार होत नाहीं. पोन्नम बालाधार व ओंटीपुली नांवाचे दोन भिक्षुक वर्गहि यांत असलेले आढळून येतात.

कैकोलन जातीचे नाडू अथवा देश असे ७२ विभाग असून ४२ पश्चिमेकडील नाडू व २८ पूर्वेकडील नाडू असे मुख्य आहेत. या सर्वांत बहुधा परस्पर लग्नें होतात. सर्व नाडूंचे वरिष्ठ ४ थिसाइनाडू असतात व सर्वांत श्रेष्ठ कांजीवरम्चा नाडू असतो. थिसाइ नाडूंचे चार प्रकार शिवपुरम्, धोंडिपुरम्, विरंचीपुरम् व शिवलिंगपुरम् असे आहेत. ७२ नाडूपैकीं, प्रत्येक नाडूचे किलइग्राम, पेरूरग्राम व सिथुरग्राम असे पोट प्रकार आहेत. सध्यां कांजीवरम् येथें कैकोलनचे दोन मुख्य विभाग आहेत व ते अय्यमपेट्टइ व पिलइपालयम् असे आहेत. आपला पूर्वापार कोष्टयांचा धंदा सोडून सध्यां कैकोलनांनीं शेती, व्यापार, गाडी हांकणें व हमाली करणें असले धंदे स्वीकारले आहेत.

प्रत्येक कैकोलन कुटुंबांतील एक मुलगी देवास वाहण्याची चाल त्यांच्यांत रूढ आहे. देवदासी जातीशीं ते संबंध

ठेवीत नाहींत; तथापि कांहीं समारंभाच्या प्रसंगीं ते दासींच्या घरीं खुशालि जेवतात. स्टुअर्ट म्हणतो कीं कुटुंबाचा पुढारी जर पुत्रहीन मेला व त्यास जर मुली असल्या तर त्यापैकीं एकीला दासी करतात. अशा दासी केलेल्या व देवांस वाहिलेल्या मुलीस नृत्य गीतहि शिकविण्यांत येतें. एका देवळांत मूर्तीसमोर त्या दासीला बसवून ब्राह्मणद्वारा तालिबंधन करण्यांत येतें व नंतर तिची मिरवणूक काढतात. जिचें देवाशीं लग्न झालें आहे अशी एखादी दासी मृत झाल्यास देवावरील वस्त्र व फुलें तिला अर्पण करून तिचा अंत्य विधि होईपर्यंत ते देवाची पूजा करीत नाहींत.

काहीं कैकोलनामध्यें सिरुतालकिट्टू नांवांचा एक लग्नविधि आहे. त्यात वरानें वधूचें तालीबंधन केलें कीं लग्न ठरलें असें मानतात. नंतर वडिल मनुष्याना तें लग्न मोडता येत नाहीं. संतति नसेल तर स्त्रियाना पुनर्विवाह करण्याची मुभा देण्यात येते. या जातीविषयीं बऱ्याच म्हणी उपलब्ध आहेत. अंत्य विधीची त्याच्यांत अशी एक चाल आहे कीं, शेवटच्या दिवशीं एक झोपडी बांधून व न्हाव्यानें आणलेल्या दगडांची तेथें रास करून त्या दगडांनाच सर्व पदार्थ समर्पण करितात. देवीची साथ येऊं नये म्हणून माणसांनीं देवीचा रथ ओढणें, आकडे टोचून घेणें इत्यादि प्रकार त्याच्यात रुढ होते. [थर्स्टन]

गंगम्मा देवीप्रीत्यर्थ होणारा तिरुपति येथील वार्षिकोत्सव कैकोलन आनंदानें करितात. या उत्सवाचा विशेष स्टुअर्टच्या मताप्रमाणें असा कीं, उत्सवदिन सुरू झाल्यानंतर रोज सकाळीं व सायंकाळीं लोक कपडे बदलतात. रविवारीं सकाळीं दिसून येणारा मातंगी वेष पाहण्यासारखा असतो. त्यावेळीं भक्त देवीपुढें नाचूं लागतो. तो रंगात आला कीं, जिभेंत एक सळई मारून घेतो. हा वेषसमारंभ एका ब्राह्मणाकडे व महंताच्या मठात होतो. ' पीरंतालू-वेष ' नांवाचा समारंभ उत्सवाच्या अखेरीस होतो; त्यावेळीं स्त्रीवेष घेऊन एक कैकोलन जातीचा मनुष्य घोड्यावरून कुंकुम वाटीत गावातून फेरी मारून येतो.

कैटभ—कैटभ आणि मधु या नावाचे दोन क्रूर दानव होते. विष्णु निद्रित असता त्याच्या कानापासून हे दानव निर्माण झाले. विष्णूच्या नाभीपासून जन्मलेल्या कमळात वास करणाऱ्या ब्रह्मदेवाचा वध करण्यास ते उद्युक्त झाले असें वर्णन महाभारतात व पुराणातून आढळतें. विष्णूनें दोघानांहि ठार केल्यामुळें, त्यास ' कैटभजित् ' व 'मधुसूदन' अशीं अभिधानें मिळालीं. कैटभवधाचें श्रेय मार्कंडेय पुराणाप्रमाणें उमेस मिळतें; म्हणून उमेस ' कैटभा ' असें विशेषण लावितात. या दानवाचा मेद साडल्यामुळें पृथ्वीस मेदिनी असें नाव पडलें असें हरिवंशांत सांगितलें आहे. हरिवंशात एके ठिकाणीं असा उल्लेख आहे कीं, वरील दोघा दैत्याचे देह समुद्रांत टाकले जाऊन तेथें त्यांच्या शरीरापासून प्रचंड मेद तयार झाला व नारायणानें त्या मेदाचा उपयोग करून पृथ्वी निर्माण केली. या दानवाच्या मेदानें सबंध पृथ्वी झांकून टाकल्यामुळें पृथ्वीस ' मेदिनी ' हें नांव पडलें असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. पृथ्वीच्या उत्पत्तिविषयक अनेक कल्पनांपैकीं ही एक कल्पना आहे.

कैथल, तहशील—पंजाब इलाखा. कर्नाळ जिल्ह्याची पश्चिमेकडील तहशील. उ. अ. २९° २२' ते ३०° १२' व पू. रे. ७६° ११' ते ७६° ४७'. क्षेत्रफळ १२७३ चौरस मैल. लो. सं. (इ. स. १९११) २,५०,९१७. या तहशिलींत कैथल व पुंडी हीं गांवें व ४१३ खेडीं आहेत.

शहर—कैथल तहशिलीचें मुख्य ठिकाण. उ. अ. २९. ४८' व. पू. रे ७६' २९' सदर्न पंजाब रेल्वेच्या कर्नाळ फाटयावरील हें अखेरचें स्टेशन आहे. लो. सं. (१९११) १२९१२. हा गांव एका विस्तृत तलावाभोंवतीं वसलेला आहे. या तलावास ठिकठिकाणीं पायऱ्याचे घाट बांधले आहेत. कैथल गांव कुरुक्षेत्रात असून युधिष्ठिरानें बसविला असें म्हणतात. याचें संस्कृत नाव कपिस्थल असें असून हनुमानाची मातोश्री अंजनी हिचें येथें देऊळ आहे. मुसुलमानी अमलाच्या आरंभीं या गावास थोडें फार महत्व होतें व तैमूरनें दिल्लीवर स्वारी करण्यापूर्वी इ. स. १३९८ सालीं येथें मुक्काम केला होता. त्यावेळीं येथील लोक अग्निपूजक होते असा उल्लेख करून ठेवलेला आहे. येथें बल्खचा शेख सलाउद्दीन (इ. स. १४२६) याचें थडगें आहे. त्या थडग्याचा जीर्णोद्धार अकबर बादशहानें केला. इ. स. १७६७ सालीं भाइ देसुसिंग या शीख सरदारानें येथें आपला अंमल बसविला. इ. स. १८४३ सालीं शिखाकडून ते ब्रिटिश मुलुखात समाविष्ट झालें. भाईचा राजवाडा अद्यापि पडक्या स्थितींत दिसतो. इ. स. १८६७ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. कैथल येथें सोरा शुद्ध करण्यांत येतो. शिवाय लाखेचें वार्निश केलेलें लाकूड तयार होतें.

कैफेंगफु—चीन देशातील होनान प्रांताची कैफेंगफु ही राजधानी आहे. ही उ. अ. ३४' ५२' व पू. रे. ११४' ३३' यावर आहे. ही पेकिंग-हंनकौ रेल्वेच्या एका फांटयावर आहे.

सध्याचें शहर ड्यूक च्वाग (इ. स. पूर्वी ७७४-७००) यानें आपल्या जहागिरीची (फेंग) मर्यादा ठरवण्यासाठीं (कै) बांधिलें. यावरून याचें कैफेंगफु नाव पडलें असावें. चिनी इतिहासांत कैफेंगफूला बरींच टोपण नांवें मिळालीं. चौ, सुइ व तंग या घराण्याच्या वेळेस (इ.स.५५७-९०७) पिएनचौ, पुताई घराण्याच्या वेळीं (९०७-९६०) तुंग किंग, संग व किन यांच्या वेळेस (९६०-१२६०) पिएन किंग, अशीं नावें मिळालीं. युआन अथवा मोंगल घराण्याच्या वेळीं (१२६०-१३६८) ह्या शहराला पिएनलिंग म्हणत व मिंग घराण्यानें याला मूळचें म्हणजे कैफेंगफु शहर हें नाव दिलें.

कैफेंगफु शहर होआंगहो नदीच्या दक्षिणेस कांहीं मैलांवर असून त्याला पुरानें वाहून जाण्याची बरीच भीति आहे.

१६४२ त महापुरानें या शहराचा फार नाश झाला. हें शहर मोठें आहे. रस्ते रुंद असून बऱ्याच प्रेक्षणीय इमारती आहेत. येथील मोठी प्रसिद्ध इमारतः म्हणजे एक बारा मजली मंदिर ही होय. याची उंची ६०० फूट आहे. तसेंच एक २०० फूट उंचीचा पाहऱ्याचा बुरूज आहे. तसेंच या शहराच्या आसमंतांतील प्रदेशांत चिनी लोकांनी अति प्राचीन काळीं केलेल्या वसाहतीपैकीं एक वसाहत होती. यामुळें कैफेंगफूला एका तऱ्हेचें महत्व आलें आहे. चीन देशांत आलेले यहुदी लोक १६६३ सालीं याच शहरीं प्रथम येऊन राहिले होते.

इ. स. १८५३ सालीं तैपिंग बंडवाल्यांनीं हें शहर हल्ला करून मोठया शिकस्तीनें घेतलें. त्यांनीं शहराची लूट करून कांहीं भागाचा नाश केला.

येथील व्यापार फारच थोडा आहे. पाश्चात्य पद्धतीवर झालेल्या कांहीं शाळा कैफेंगफूमध्यें आहेत. त्यात एक सरकारी विद्यालय व लष्करी शाळा आहे. १९०५ सालीं येथें एक टांकसाळ सुरू झाली. येथील लोकसंख्या १९०८ सालीं सुमारें २,००,००० होती. बहुतेक लोक मुसुलमान आहेत. सुमारें ४०० लोक यहुदी धर्माचे आहेत.

कैमगंज, तहशील—संयुक्त प्रात.फरुक्काबाद जिल्ह्याची उत्तरेकडील तहशील. हींत कंपील व शमसाबाद हे परगणे आहेत. उ. अ. २७° २१′ ते २७° ४३′ व पू. रे. ७९° ८′ ते ७९° ३७′. लो. सं. (१९११)१,६९,०४५. क्षे. फ.३६५ चौरस मैल. हींत २ गावें व ४०५ खेडीं आहेत. कैमगंज हें मुख्य ठिकाण आहे. या तहशिलींत बराच भाग सखल आहे. गंगा नदीचा लोअर कालव्याचा फत्तेगड फाटा या तहशिलींतून गेला आहे.

गाव.—कैमगंज तहशिलीचें मुख्य ठिकाण. उत्तर अ. २७° ३०′ व पू. रे. ७९° २१′. हें कानपूर अछनेडा रेलवेचें एक स्टेशन आहे.

लोकसंख्या (१९११) ७४३०. फरुक्काबादचा पहिला नबाब महंमदखान यानें इ. स. १७१३ सालीं हा गांव वसविला. सतराव्या शतकाच्या आरंभीं या गांवाच्या आसपास पुष्कळ पठाणांनीं वसाहत केली. येथें तंबाखूचा बराच व्यापार आहे. पूर्वी येथें तलवारी तयार होत असत. हल्लीं त्याऐवजीं साध्या सुऱ्या व अडकित्ते तयार होतात.

कैमुर—विंध्य पर्वताचा पूर्वेकडील भाग. उ. अ. २३° २६′. पू. रे. ७९° ४८′. मिर्झापूर जिल्ह्यात विजयगड नावाचा पुरातन किल्ला आहे. येथील लेण्यात व डोंगरातील खबदाडांत प्रागैतिहासिक कालांतील माणसांचीं चित्रें दगडांवर खोदलेलीं आढळतात.

कैय्यट—महाभाष्यप्रदीप ग्रंथाचा कर्ता. काव्यप्रकाशटीकाकार भीमसेन अशी माहिती देतो कीं,जय्यटाला त्याच्या पत्नीपासून कैय्यट उवट, व मम्मट असे तीन मुलगे झाले. ऑफ्रेक्ट हा काश्मीरी पंडितांच्या आधारें कैय्यट व मम्मट हे दोघे बंधू होते असें म्हणतो. कय्यट काश्मीरच्या अजितापीड राजाचा समकालीन होता.

कैराण, तहशील:—संयुक्तप्रात मुझफरनगर जिल्ह्याची वायव्येकडील तहशलि. उत्तर अक्षांश २९° १९′. आणि २९° ४२′. व पूर्व रेखांश. ७७° २′. आणि ७७° ३०′. क्षेत्रफळ ४७१ चौरस मैल. लोकसंख्या इ. स. (१९११) २०४५८५. या तहशिलींत पांच गांवें व २५१ खेडीं आहेत. या तहशिलीच्या पश्चिमेस यमुना नदी असून आसपासचा प्रदेश सखल आहे. तथापि वरच्या कांहीं भागास यमुनेच्या पुर्वेकडील कालव्याचें पाणी मिळतें. इ. स. १९०३-४ सालीं २९१ चौरस मैल जमीन लागवडीखालीं होती. पैकीं १३१ चौरस मैल बागाइती होती.

गाव:—संयुक्त प्रांत. मुझफरनगर जिल्हा. कैराण तहशिलीचें मुख्य ठिकाण. उत्तर अक्षांश २९° २४′. व पूर्व रेखांश ७७° १२′. लोकसंख्या (१९११) १६,२९३. जहांगीर व शहाजहान बादशहाचा हकीम मुकारब खान यास हें गाव व सभोवतालचा प्रदेश इनाम मिळाला होता. यानें एक दरगा बांधला व एक तलाव बांधून सुंदर बाग तयार केला. येथील बाजार पेठ चांगली वसलेली आहे. इ. स. १८७४ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. इ. स. १९०३-४सालीं तिचें उत्पन्न १६,००० रुपये व खर्च १८,००० रुपये होता. येथें व्यापार बराच चालतो.

कैलास—तिबेटात मानससरोवराच्या उत्तरेस २१,८३० फूट उंचीचा हा पर्वत आहे. हिंदू याला मेरु पर्वत समजतात. (' मेरू ' पहा).

बंधुवर्म्याच्या मंदसोर येथील लेखात याला एक कुक्षि म्हटलें असून सुमेरुला दुसरी कुक्षि असें नांव दिलें आहे. शिवपार्वतींचें निवासस्थान म्हणून कैलासपर्वत हिंदूंनां पूज्य वाटतो. वस्तुतः हा पर्वत शिखरविरहित हिंदु देवळाप्रमाणेंच किंबहुना लिंगाच्या आकाराचा दिसत असल्यानें त्याचा शिवाशीं संबंध जोडून दिला असावा. कैलासावर कुबेरहि रहातो. असा पुराणांत उल्लेख आहे याला गणपर्वत व रजतगिरी अशीं नांवें आहेत.

पुराणांतून कैलासाला जाण्याचा मार्ग दिलेला आहे. प्रवासाच्या दगदगीमुळें यावर कोणी जात नसत.पण ल्हासाच्या तहान्वयें पश्चिम तिबेट आतां हिंदुस्थानवासियांना खुलें झाल्यानें पुष्कळ लोक आतां कैलासावर जाऊं लागले आहेत. हिंदूप्रमाणें बौद्धानांहि हें स्थान पवित्र वाटतें. या दोन्ही धर्मांचे यात्रेकरू २५ मैलांची कैलासाची प्रदक्षिणा सुमारें ३ दिवसांत आटपतात. मार्गांत गौरीकुंड असून तें नेहमीं भिजलेलें असतें. [शेरिंग-वेस्टर्न तिबेट अँड दि ब्रिटिश बॉर्डरलंड; अट्किन्सन—हिमालयन गॅ; वाडेल—बुद्धिझम् ऑफ तिबेट].

कैवर्त जात -(केवट पहा) याची वस्ती बंगाल, बिहार, ओरिसा व आसाम या प्रांतांतून आहे. सर्वांत जास्त बंगाल्यांत आहे.

इ ति हा स—बंगालच्या पाल राजापैकीं दुसरा महिपाल गादीवर आला असतां (१०८०) त्यानें आपल्या भावांनां कैदेंत टाकून प्रजेवर जुलूम केला; त्यामुळें प्रजेनें दिव्य किंवा दिव्योक या चासी-कैवर्त (केवट) जातीच्या मुख्य नायकाच्या प्रमुखत्वाखालीं बंड केलें. या सुमारास उत्तर बंगाल्यांत ही कैवर्त जात शूरपणामुळें प्रख्यात झाली होती. बंडखोरांनीं महिपालास ठार मारून देश काबीज केला. दिव्योकाच्या नंतर त्याचा मुलगा भीम हा राजा झाला. पुढें महिपालाचा भाऊ रामपाल यानें राष्ट्रकूटांची मदत घेऊन भीमावर स्वारी केली; तींत भीम मेला व पालांच्या राज्या-वर पुन्हा रामपाल राजा आला (१०८८). पुढें बल्लाळ-सेन यानें याच कैवर्तांच्या मदतीनें उत्तर बंगाल काबीज केला. व त्यांची सुधारणाहि केली. (११७१).

[एपि. इंडि २. ३५५; संध्याकराचें रामचरित; हरप्रसाद— मॉ. बुद्धिझम अँन्ड. फॉ. ओरिसा स्मिथः— प्रा. हिं.]

कैवर्त लोकांची उत्पत्ति शोधण्याचे प्रयत्न व्यर्थ आहेत असें रिसले साहेबाचें मत आहे. परंतु हे लोक बंगालचे मूळचे रहिवासी असून बिहारमधील केवट लोक यांच्याच पैकीं असावे असें हे साहेब म्हणतात. कामरूपमध्यें केवट व कैवर्त हीं नांवें सारखींच समजलीं जातात. कैवर्त लोकांचे धंद्यावरून चासी व जलिया असे दोन पोटभेद झाले आहेत. १९११ च्या खानेसुमारींत एकंदर जलिया कैवर्त ३,७५,९३६ व चासी कैवर्त २२,३९,२१८ होते. अवर्गीकृत कैवर्त १०,४८,०६ नमूद केले आहेत.

चासी कैवर्त शेतकरी असून, जलिया मासे धरण्याचा व विकण्याचा धंदा करितात. या दोन वर्गांत लग्नसंबंध किंवा अन्नव्यवहार मुळींच होत नाहीं.

सुशिक्षित व सुधारक चासी कैवर्तांची गणना महिष्य या नावाखालीं होते. हे स्वतः विक्रीचा धंदा करीत नाहींत. त्यामुळें महिष्य व जुन्या पद्धतीचे चासी कैवर्त यात खिंड पडत चालली आहे. महिष्यांनें चासी कैवर्तांशीं लग्नसंबंध केला तर त्याला वाळींत टाकितात. जलिया कैवर्तांशीं संबंध घडवून आणण्याची तर गोष्टच बोलावयास नको. कारण महिष्य त्यांनां फारच हलक्या जातीचे व मासेविके म्हणून समजतात. जलिया कैवर्तांतहि सध्यां सुधारणा दिसत आहे. थोडा सुशिक्षित जलिया आपणाला चासी म्हण-वितो व इतर जलियांशीं संबंध ठेवीत नाहीं. बंगाल्यांत आणखी एक हलवा(हलिया)दास जात असून तिच्यातील लोकांनीं आपणाला महिष्य म्हणवून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु कांहीं तंटे बखेडे झाल्यावर हलवादास जातीच्या लोकांनीं तो प्रयत्न सोडून दिला. पूर्व बंगालांत असा मत-भेद नसून कैवर्तकाचे फक्त वर दिलेले दोनच पोटभाग आहेत. [सेन्सस रिपोर्ट, १९११ पु. ५].

कैसर गंज—संयुक्तप्रांत. बहरैक जिल्ह्याची नैर्ऋ-त्येकडील तहशील. हींत फखरपुर व हिसामपुर हे दोन परगणे आहेत. उ. अ. २७०४' ते २७ ° ४६,' पू. रे. ८१ ° १३' ते ८१ ° ४६'. क्षेत्रफळ ६८३ चौरस मैल. या तहशिलींत ६३७ खेडीं आहेत.

कोइनिग, कार्ल रुडाल्फ (१८३२-१९११) या जर्मन पदार्थविज्ञानशास्त्रवेत्याचा जन्म प्रशियांतील कोइनिग्जबर्ग नावाच्या शहरीं झाला. व तेथील विश्वविद्यालयात शिक्षण घेऊन त्यानें पी एच. डी ची पदवी संपादन केली. सन १८५१ सालीं तो पारिसला गेला व त्यानें प्रसिद्ध सारंगीकार जे. बी व्हुइलाम याच्या हाताखालीं कांहीं कालपर्यंत काम केले; पुढें सुमारें सहा वर्षांनीं त्यानें स्वतःचा धंदा सुरू केला. त्यानें जे संगीत चिमटे (टयूनिंग फोर्क) तयार केले आहेत त्यामुळें त्याची फार प्रसिद्धि झाली आहे. त्याच्या वस्तू अगदीं शास्त्रशुद्ध असत. ध्वनिशास्त्रातील शोध लावणें हा त्याचा एक फार महत्वाचा व आवडता विषय होता. याच्या करिता त्याला आपल्या धंद्यातून जितके पैसे खर्च करणें शक्य होते तितके त्यानें खर्च केले. सन १८६२ सालीं लंडन येथें जें प्रदर्शन झालें त्यात त्याला सुवर्णपदक मिळालें व सन १८७६ सालीं फिलाडेल्फिआचें प्रदर्शन झालें त्यात त्यानें एक स्वरमापक यंत्र ठेविलें होतें. या यंत्रात त्यानें सुमारें ६७० संगीत चिमटे वापरले होते. या यंत्राच्या साहाय्यानें वाटेल त्या संगीतातील सुराचें मापन करिता येत असे. पेन्सिल्व्हानिआच्या विश्वविद्यालयाकरिता हे यंत्र विकत घेण्याचे ठरलें. हे यंत्र विकत घेतलें जाईल या सम-जुतीवर तो फ्रान्सला परत आला. परंतु तें यंत्र न विकलें गेल्याकारणानें त्याचें द्रव्यदृष्टया पुष्कळ नुकसान झालें. त्या यंत्रातील कांहीं संगीत चिमटे त्यानें टोरॅन्टोच्या विश्वविद्या-लयास दिले व राहिलेल्या चिमट्याचा उपयोग करून त्यानें एक दुसरें यंत्र बनविलें; जुन्या यंत्रात १२८ ते ४०९६ प्रकंपनें (दरसेकंड) मापलीं जात असत, परंतु या नव्या यंत्रांत १६ प्रकंपनापासून ऐकूं न येतील इतकीं प्रकंपनें मापलीं जाऊं शकतील अशी योजना केली होती. याशिवाय यानें दुसरीं कित्येक ध्वनिशास्त्रातर्गत उपयुक्त यंत्रें तयार केलीं. सांगीतिक ज्वाला (मॅनोमेट्रिक फ्लेम), व्हेटसन याचे ध्वनिशास्त्रातर्गत ध्वन्याकृति वगैरे स्वकल्पित गोष्टीविषयीं त्यानें पुष्कळ परि-श्रम करून नवीन ज्ञान उपलब्ध करून दिलें आहे. एच. व्हान हेल्महोल्टझ यानें निरनिराळ्या सुरांच्या होणाऱ्या व्यतिकरणयुक्त बेरजेसंबंधानें जो सिद्धान्त मांडला आहे, त्याच्या विरुद्ध यानें एक प्रतिसिद्धांत प्रतिपादिला आहे.

कोइंबतूर, जि ल्हा.— हा मद्रास इलाख्यामधील दक्षिणेकडील एक जिल्हा असून याचें क्षेत्रफळ ७२२५ चौ. मै. आहे. याच्या पश्चिमेस व दक्षिणेस नीलगिरी व अनाई

मलाई पर्वत आहेत. यांपैकीं अनाई मलाई पर्वत कित्येक पठारांचा बनला असून याची उंची समुद्रसपाटीपासून ७००० फूट आहे व त्यावर महत्वाचीं जंगलें आहेत. पूर्वेस पूर्वघांटाच्या टेंकड्यांच्या रांगा असून मध्यावर सपाट मैदान आहे. हें सपाट मैदान कावेरी नदीपर्यंत पसरलें आहे. उत्तरेस पूर्वघांटाच्या बिलीगिरी व बारगूर नांवाच्या रांगा आहेत. या जिल्ह्यांत आलियार, कावेरी, भवानी, अट्टपादी, नोयील, अमरावती वगैरे नद्या आहेत. या जिल्ह्यांत हत्ती, चित्ते वगैरे जनावरें सांपडतात.

या जिल्ह्यांतील सखल प्रदेशांतील हवा रोगट असून इतर ठिकाणची शुष्क व प्रकृतीस मानवण्याजोगी आहे. सखल प्रदेशांतील हवामान उष्ण व उंचवट्यावरील प्रदेशाचें थंड आहे. कोइंबतूर शहराचें साधारण हवामान ८० आहे.

या जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं कमी अधिक प्रमाणांत पाऊस पडतो. कोल्लेगाल तालुक्यांत बरीच वृष्टि होते. सपाट मैदानांत मात्र पावसाचें प्रमाण फार कमी आहे. सर्व जिल्ह्यांत दरवर्षी एकंदर २६ इंच पाऊस पडतो. या जिल्ह्यांतील पावसाचें प्रमाण नियमित व निश्चित नाहीं.

इतिहास.—पूर्वी या जिल्ह्याची कोंगू प्रदेशांत गणना होत असे. ९ व्या शतकात हा प्रदेश चोल घराण्यातील राजांनीं जिंकून त्यावर २०० वर्षेपर्यंत राज्य केलें. पुढें याचे तुकडे झाल्यावर ११ व्या शतकांत म्हैसूरच्या होयसलबल्लाळ राजांनीं हा प्रदेश काबीज केला. १४ व्या शतकांत या प्रदेशावर विजयानगर साम्राज्याची स्थापना झाली. पुढें १५६५ त विजयानगर साम्राज्य लयास गेल्यावर विजयानगरच्या श्रीरंगपट्टम् येथील कामगारानें कोइंबतूर जिल्हा आपल्या ताब्यांत घेऊन तो त्यावर स्वतंत्र रीतीनें राज्य करूं लागला. पुढें मदुरा येथील सरदारानें हा जिल्हा हस्तगत केला. यानंतर १७०४ मध्यें म्हैसूरच्या चिक्कदेव राजाच्या मरणापूर्वी हा जिल्हा राज्यास जोडला गेला. म्हैसूरच्या राजांनीं पाळेगाराच्या मार्फत याच्यावर राज्य केलें. पुढें १७६१ त हैदर अल्लीनें म्हैसूरचें राज्य घेतल्यावर त्याच्यात व इंग्रजात झटापट सुरू झाली. १७९९ त टिपूचा पाडाव झाल्यावर हा जिल्हा इंग्रजांच्या ताब्यांत आला.

या जिल्ह्यात मातीचीं भांडीं, अलंकार, पंचरंगी धातूच्या मूर्ती, चिमटे, छापाचीं नाणीं वगैरे जुन्या वस्तू सांपडतात. यांशिवाय येथें आगस्टसच्या वेळचीं कांहीं रोमन नाणीं सांपडलीं आहेत. कोठें कोठें जैन देवळेंहि आढळतात.

या जिल्ह्याची लोकसंख्या १९२१ सालीं २२,१९,८४८ होती. यात वेल्लाळ म्हणजे शेती करणारे, किलियान म्हणजे चांभार, शानान (ताडी काढणारे), पराया (शेतांत काम करणारे), ओढ (मातीचें काम करणारे) व ब्राम्हण असे वर्ग आहेत. याशिवाय या जिल्ह्यांतील इतर जाती म्हटल्या म्हणजे कानडी व कलिंग, तेलगू, कम्म, तोत्तिय वगैरे शेतकी करणाऱ्या व पल्लान (पल्ली शेतांत काम करणारे) कैकोलन देवंग व जनप्पन या विणकाम करणाऱ्या जाती होत. यांशिवाय कोइंबतूरच्या उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशांत शोलग व अनाई मलाई पर्वतावर मलसर या रानटी जाती अढळतात.

शेती:—या जिल्ह्यांत खरीप व रब्बी हीं दोन्हीहि पिकें होतात. या जिल्ह्यात बहुतेक रयतवारी पद्धति चालू असून फक्त ६८४ चौरस मैल प्रदेशांत इनाम व जमिनदारी आहे. यांत चोलम, कंबू, तांदूळ, कापूस, तंबाखू, ऊंस; कॉफी यांचें पीक होतें. यांत मेंढ्या बोकड, घोडे, अलंबडी, बरगूर, कांगयम वगैरे गुरेंढोरें आहेत.

जंगलें:—जंगलांत साग, शिसवी, जाल वगैरे जातवान झाडें आहेत. या शिवाय मध, मेण, चामडें कमविण्याकरितां लागणारी झाडाची साल वगैरे जिनसांचें उत्पन्न होतें. दक्षिणभागांतील जंगलांत शिसवीचीं झाडें आहेत.

धा तू —या जिल्ह्यांत भवानी व सत्यमंगलम् येथें लोखंडाच्या रेतीपासून लोखंड तयार होतें. कोल्लेगाल व सत्यमंगलम येथें सोनें सांपडतें. शिवाय सोरा व पन्ना नांवाचा मौल्यवान दगड क्वचित् सांपडतो.

व्या पा र व द ळ ण व ळ ण.—या जिल्ह्यांत रेशमी व सुती कापड व सतरंज्या तयार होतात. रेशमी कापड सुबक असतें. सेत्तीपालयम् व तिरुप्पूर येथें गारेचे चष्मे तयार होतात. याच गारेचीं लिंगें व इतर मूर्तीहि तयार करितात. अनईपालयम् येथें घुंगरू तयार होतात.

या जिल्ह्यात एकंदर कापसाच्या ८ गिरण्या आहेत. यांच्या शिवाय येथें कातडें कमावलें जाऊन त्याच्या पाणी काढण्यासाठीं मोटा तयार होतात.

या जिल्ह्यांतून बाहेर जाणाऱ्या मुख्य जिनसा म्हटल्या म्हणजे धान्य, कडधान्यें, मिरच्या, मिरीं, मसाला, कापूस, तंबाखू, तूप, चंदन, केळीं, तांब्याचीं व पितळेचीं भांडीं, गुरेंढोरें व कमावलेलें कातडें वगैरे होत. तसेच बाहेरून येणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे तांदूळ, मीठ, कापड व सूत, धातू, खोबऱ्याचें तेल वगैरे होत.

या जिल्ह्यातून आगगाडीचे दोन तीन फांटे गेले आहेत. याशिवाय १२६९ मैल लांबीचे पक्के रस्ते असून कच्च्या रस्त्यांची लांबी ४५९ मैल आहे.

या जिल्ह्याचे ५ पोटविभाग व त्यात एरोड, धरमपूर, भवानी, पोलाची, पलदम, उदमलपेठ, कोइंबतूर, अवनाशी कोलगेल व गोबिचेट्टिपालयम असे १० तालुके आहेत.

या जिल्ह्याचें साऱ्याचें उत्पन्न सुमारें ३५ लाख रुपये असून एकंदर उत्पन्न ५५ लाख आहे. इ. स. १९०४ सालीं या जिल्ह्यात एकंदर १०६५ प्राथमिक, ३० दुय्यम प्रतीच्या, ५ विशेष प्रतीच्या शाळा व दोन कॉलेजें होतीं. जिल्ह्यांत १२ दवाखाने व १२ इस्पितळें आहेत.

ता लु का:—हा मद्रास इलाख्याच्या कोइंबतूर जिल्ह्यांतील पश्चिमेकडील तालुका असून याचें क्षेत्रफळ ५२० चौरस मैल आहे. १९२१ मध्यें याची लोकसंख्या २,७१,३०९.

आहे. या तालुक्यांत एकंदर २६३ खेडीं असून कोइंबतूर हें मुख्य ठिकाण आहे. १९०३–४ सालीं सान्याचें उत्पन्न सुमारें ३ लाख रुपये होतें. या तालुक्याच्या पश्चिमेस नीलगिरि पर्वत असून पूर्वेस उंचवट्यावरील खुलें मैदान आहे. या मैदानाचा ½ भाग जंगलानें व्यापिला आहे. या तालुक्यांत कालवे व तळीं आहेत. यात चोलम् , काबू व कापूस पिकतो.

शहरः—हें मद्रास इलाख्यातील कोइंबतूर जिल्हा व तालुका यांचें मुख्य ठिकाण असून नोयील नदीच्या डाव्या तीरावर वसलें आहे. १९२१ सालीं येथील लोक संख्या६५७८८ होती. हैदर अल्ली व टिपू याची इंग्रजांशीं झटापट चालू असता या शहरास बरेंच लष्करी महत्व प्राप्त झालें होतें. १७६८ त इंग्रजानीं हें हस्तगत केलें होतें, परंतु पुढे लवकरच पुन्हा हें हैदराच्या ताब्यात गेलें. या नंतर सन१७९९ त इंग्रजांनीं हे कायमचें हस्तगत केलें. इ. स. १८६५ त या शहरास जिल्ह्याचें मुख्य ठिकाण करण्यात आलें. हें समुद्र सपाटीपासून १३०० फूट उंचीवर वसलेलें असून फार हवाशीर आहे. येथें दरवर्षी २२" पाऊस पडतो. येथें जिल्ह्यातील सर्व मोठमोठे अधिकारी राहतात.

१८६६ त येथें म्युनिसिपालटी स्थापना झाली. हें शहर जिल्ह्यांतील उद्योगधंद्याचें व शिक्षणाचें केंद्रस्थान आहे. येथें ४ कापसाच्या गिरण्या, २ कातडें कमावण्याचे कारखाने, ४ कॉफी शुद्ध करण्याचे वाफेनें चालणारे कारखाने एक खत तयार करण्याचा वाफेचा कारखाना आणि एक सोरा शुद्ध करण्याचा कारखाना वगैरे निरनिराळ्या धंद्याचे कारखाने आहेत. बारीक तलम सुताच्या व जरीच्या कापडाची पैदास येथें पुष्कळ होते. येथें शेतकी कॉलेज कोइंबतूर कॉलेज व बरींच हायस्कुलें आहेत. याशिवाय जंगलखात्याचें काम शिकविणारें एक कॉलेज आहे.

कोइंब्रा—हें पोर्तुगालच्या एका जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. हें मान्डेगो नदीच्या काठीं असून लिस्बन्–ओपोर्टो रेल्वेवर आहे. येथील लोकसंख्या १९०० मध्यें १८,१४४ होती. येथें असलेल्या विश्वविद्यालयामुळें याला महत्व आलें आहे. या विद्यालयात ईश्वरशास्त्र, कायदा, वैद्यकी, गणित व तत्त्वज्ञान ह्या पांच शाखा आहेत व त्याच्या ग्रंथशाळेंत सुमारें १,५०,०००पुस्तकें असून, त्याची एक मोठी प्रयोगशाळा आहे. कोइंब्रा येथें लष्करी विद्यालय, कलांचें विद्यालय, शास्त्रीय व वाङ्मयात्मक संस्था आहेत.

पुष्कळ वर्षें पावेतों हें शहर मूर लोकांच्या ताब्यांत होतें परंतु १०६४ मध्यें पहिल्या (कॅस्टाईलचा) फार्डिनांडनें घेतलें १२६०पर्यंत ही त्या देशाची राजधानी होती. येथें ६ राजांचा जन्म झाला. " फ्रान्सिस्को सा डि मिरान्डा " या कवीचा येथें जन्म झाला.१७५५त भूकंपानें या शहराचें बरेंच नुकसान झालें.मार्शल मामेनाच्या आधिपत्याखालीं सन१८१० मध्यें फ्रेंच लोकांनीं हें शहर लुटलें. १८३४मध्यें डान मिग्वेल यानें हें शहर आपलें मुख्य ठिकाण केलें. येथें १८४६ मध्यें मिग्युएल बंड झालें.

कोइरी—एक शेतकरी जात. याची वस्ती बिहार-ओरिसा, संयुक्तप्रात, बंगाल व आसाम यातून आहे. १९११ त याची संख्या १७,६६,७९६ होती. कोइरी, कोरी हा शब्द संस्कृत कृषिकारी यावरून झाला असावा. कोइरी म्हणजेच सुधारलेले कोल जातीचे लोक हा नेस्फील्डचा तर्क असंभवनीय दिसतो. कुर्मी जातीशीं या लोकाचे बरेंच साम्य असून, डॉ. वाइजच्या मतें बंगाल्यात कोइरी हे कुर्मीबरोबर रोटीव्यवहार करीत नाहींत. उलट कुर्मी हे कोइऱ्याच्या लग्नास जाऊन मेजवान्याहि झोडू शकतात व त्यात त्यानां जात बाटली असें वाटत नाहीं. कर्नल डाल्टनच्या मतें कोइरी लोक हे बंगालमधील प्राचीन आर्यांचे वंशज असावे. या लोकात काहीं अनार्यसंबंध असणें शक्य आहे पण या प्रश्नासंबंधींहि वाद आहेत.

या लोकाच्या अनेक पोटजाती असून निरनिराळ्या जिल्ह्यातील त्यांचीं नावें भिन्न प्रकारचीं आहेत. काहीं पोटजाती स्थानिक आहेत. सर्वारिया, प्रयाग, कनौजिया, इलाहाबादी, ब्रिजवासी, पुरभैया, दक्षिणी, बनारसीया, मगही, कच्छवाह, नाराइगण, तोरिकोरीय, हर्दिष, वर्डावार, भक्तिया, साक्रिया, इत्यादि पोटजाता मुख्य आहेत. एकंदर पोटजातींची संख्या खानेसुमारीवरून पाहता १४०च्या वर आहे व हे सर्व भेद स्थानिक स्वरूपाचे आहेत. त्याचप्रमाणें बैरागी, बैश्वर, हुराकीया, राठोड व सुरजवंशी इत्यादि नावें इतर प्रसिद्ध जातींवरून पडलेलीं आहेत.

पोटजातीमध्यें चटई नांवाचे एक बंधुमंडळ असतें व त्यामध्यें ज्ञातिविषयक सभा होतात. मिर्झापूर येथें साक्रिया पोटजातीच्या १४ चटई आहेत. प्रत्येक चटईचा चौधरी उर्फ पुढारी असतो लग्नप्रसंगीं विशिष्ट चटईच्या लोकांनांच निमंत्रण असतें व त्यामुळें बराच खर्च वाचतो. चौधऱ्याकडे लग्नचिठ्या पाठविण्याचें काम असतें व त्याप्रसंगीं पंचायती ताट व पंचायती हंडा ठेवितात. नंतर पंचायतीपुढें कोणत्या चटईच्या मनुष्याचा कोणाशीं विवाह व्हावयाचा हें ठरते. पंचायतीनें निकाल दिल्यानंतर ब्राह्मणाकडून मुहूर्त वगैरे ठरविण्यात येतात. नंतर वधूवर पक्षाकडील लोकासमक्ष चौधरी त्या लग्नास परवानगी देतो. यानंतर ब्राह्मणास दक्षिणा देऊन वधूवराचे बाप तंबाखू ओढतात व या एकंदर विधीस 'रका उठावणी' असें म्हणतात. लग्नविधि ढोला पद्धतीनेंच होतो. तिलक लावल्यानंतर वराच्या कपाळास अक्षता लावितात व वधूस नूतन वस्त्र देण्यात येतें. लग्नसमारंभात स्त्रिया गाणीं गातात. कन्यादान, तेलहळदी इत्यादि सर्व विधी करण्यात येतात. लग्नें चालविण्याचें काम ब्राह्मणांचें असतें व त्याना दक्षिणाहि मिळते गैरवर्तनाबद्दल स्त्रीला पंचायतीकडून चांगलें शासनहि करण्यांत येतें.

जन्मसंस्कार व मृत्युसंस्कार हेहि या जातींत आढळून येतात. षष्ठि व बारसें हे समारंभ रूढ असून मुलांचीं नखें काढण्याचा समारंभहि करण्यांत येतो. या सर्व विधींस विशेषतः स्त्रियाच महत्व देतात. मृताचें दहन करून पिंडदान करण्यांत येतें. वर्षश्राद्ध करण्याची त्याच्यांत रीत नाहीं.

साधारणपणें कोइरी लोक वैष्णव संप्रदायाचे आहेत. भक्त नांवाच्या पोटजातीचे लोक आपल्या मुलांना भगत अथवा शाकाहारी बनवितात. पाचोपीर व महावीर या देवताचे उपासक परस्परात लग्नव्यवहार करीत नाहीत.

कोइरी लोक उत्तम शेती करणारे असून अफू, तंबाखू सर्व धान्यें व भाजीपाला याची ते लागवड करितात. त्याच्या सामाजिक चारित्र्यात बरीच शुद्धता आढळून येते. फक्त प्रयागा जात दारू पिते व भक्त नांवाची पोटजात मांसाशन करीत नाहीं. ब्राह्मणाच्या हातची पक्की रसोई प्रयागा हे खातात व धोबी आणि चांभारहि ब्राह्मणाच्या हातची पक्की रसोई खातात. कोइरी जात मोठी उपयोगी व सुशील असून स्वावलंबी आहे. हे लोक सेवाधर्म फारसा स्वीकारीत नाहींत.

कोइरी व चाभार या जातींचा गोरखपूर भागात फार निकट संबंध आहे. या भागात कोरी अशी स्वतंत्र जात नाहीं. सर्व लोक कोइरी चाभार आहेत. तरी पण कोइरी चाभार या नांवाऐवजी ते आपल्याला कोरीच म्हणवितात. त्याचप्रमाणें जेस्वर चाभार हे लोक आपल्याला फक्त जेस्वर असेंच म्हणवितात. आसामातील या जातीची लोकसंख्या १४,००० आहे. ब्राह्मणांना या जातीच्या लोकाच्या हातचें पाणी चालतें. [सेन्सस रिपोर्ट. क्रूक].

कोइल कुंतल—मद्रास इलाख्यातील कर्नूल जिल्ह्यातील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ५७२ चौरस मैल आहे. १९२१ मध्यें या तालुक्याची वस्ती ८३,४२० होती. या तालुक्यांत ८५ खेडीं आहेत. या तालुक्याचा जमीनमहसूल व इतर कर मिळून ३ लाख रुपये उत्पन्न होतें. या तालुक्याच्या मध्यभागांतून कुंडेरु नदी वहात गेली असून या नदीच्या दोन्ही तिरावरील शेतें फारच सुपीक आहेत. येथें वार्षिक पर्जन्यमान २२ इंच आहे. पण या तालुक्याच्या पश्चिम भागात पाऊस सरासरी १७ इंच पडतो. या तालुक्यातील लोक संपन्न व दणकट असून त्यांची कज्जेदलालीबद्दल व भाडखोरपणाबद्दल ख्याति आहे. या तालुक्यात दळणवळणाचीं साधनें मात्र चांगलीं नाहींत.

कोकटनुर.—मुंबई इलाखा. बेळगाव जिल्हा. अथणीच्या आग्नेयीस बारा मैलावर हा एक गाव आहे. येथें अडकित्ते तयार होतात. गांवाच्या पूर्वेस एका मैलावर पापनाशिनी नदीच्या तीरावर येल्लम्मार्चे देऊळ असून दरवर्षी डिसेंबर महिन्यात तेथें जत्रा भरते. इ. स. १५६४ सालीं तालीकोटच्या लढाईत विजयानगर राज्याचा नाश झाला. त्यावेळीं इब्राहिम अदिलशाहाच्या हाताखालीं चांगली कामगिरी केल्यावरून शिरसिंगीच्या हल्लींच्या देसायांच्या मूळपुरुषास कोकटनूर परगणा इ. स. १५३५ सालीं बहाल करण्यांत आला होता.

कोंकण—चतुःसीमा.—सामान्यतः दमणगंगानदीच्या दक्षिणेकडील व सह्याद्रीच्या पश्चिमेकडील खालील चतुःसीमेचा जो प्रदेश तो कोंकण होय. पश्चिमेस आरबी समुद्र, पूर्वेस सह्याद्रि, उत्तरेस दमण व दक्षिणेस गोव्याच्या सरहद्दीवरील तेरेखोलपर्यंतचा प्रदेश अशी याची चतुःसीमा आहे. डफनें तापी नदी ते सदाशिवगड अशी याची उत्तरदक्षिण सरहद्द दिली असून या भागास त्यानें थळ कोंकण असेंहि म्हटलें आहे. कोंकणांत हल्लीं मुंबई शहर, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी हे जिल्हे, उत्तर कानड्याची पट्टी, जंजिरा व सावंतवाडी हीं संस्थानें व गोवें प्रांत इतक्यांचा समावेश होतो. या प्रदेशाची रुंदी साधारण २५।३० व मैल लांबी सुमारें ३२० मैल असून, लोकसंख्या जवल जवळ ५७ लाख आहे.

प्राचीन उल्लेख.—कोंकण हा शब्द फार प्राचीन आहे. परंतु वरील भूप्रदेशाला हें नाव का व कसें देण्यांत आलें. याचा समाधानकारक उलगडा अद्याप झालेला नाहीं. निरनिराळ्या काळीं कोंकणच्या मर्यादा बऱ्याच भिन्न असाव्यात असें उपलब्ध झालेल्या तत्कालीन उल्लेखावरून दिसतें. महाभारतात (भी. प. अ. ९) अपरान्त व कोंकण हीं दोन्हीं नावें आलीं आहेत. हरिवंश व विष्णुपुराण आणि वराहमिहिर यांनीहि कोंकणचा नामनिर्देश केला आहे. अपरातातील शूर्पारक हें शहर फार जुनें असून बौद्ध वाङ्मयात त्याचा अनेकदां प्रामुख्याते उल्लेख येतो. शूर्पारक म्हणजे हल्लींचें सोपारें (ठाणें जिल्हा, वसईजवळ बी. बी. सी. आय. रेल्वेचें स्टेशन) असून येथें थोड्या वर्षापूर्वी बुद्धाचा एक स्तूप व अशोकाची धर्मशासनाकित एक लेखशिला सांपडली होती. महाभारतात शातिपर्वाच्या ४९ व्या अध्यायात या शूर्पारकाचा उल्लेख आहे; तसेंच सहदेवाच्या दक्षिण विजयात कोंकण देशाचें नांव आलें आहे. बृहत्संहितेंत (१४.१२) देखील दक्षिण विभागातील देशात याची गणना असून एके ठिकाणीं तर 'सप्तकोंकण' असाहि याचा उल्लेख आला आहे. दशकुमार चरित्रांत कोंकण असा शब्द आला आहे. ख्रि. पू. तिसऱ्या शतकात यास अपरात म्हणत; रघुवंशांत अपरांत हेंच नांव आहे. संस्कृत वाङ्मयांत त्रिंबक ते कन्याकुमारीपर्यंतच्या पश्चिमकिनाऱ्यावरील प्रदेशास कोंकण हें नाव येतें.' अपरान्त' याची व्युत्पत्ति कांहीं जण पुढीलप्रमाणें देतातः—अपरा म्हणजे पश्चिमदिशा, तिचा जेथें अंत होतो (म्हणजे पुढें समुद्र लागतो) तो प्रदेश. परंतु काहींचें म्हणणें कीं सोप्पार (सोपारे) प्रांताचा अंत या शब्दावरून ' अपरांत ' शब्द झाला असावा.' महावंशो ' या बौद्ध ग्रंथांत सोपाऱ्याच्या दक्षिणेकडील देशास अपरांत म्हटलें आहे, व अशोकानें तेथें आपले धर्मप्रचारक पाठविल्याचाहि निर्देश केला आहे. राजतरंगिणींत व चालुक्याच्या

शिलाशासनांत वरील सप्तकोंकण हा शब्द आलेला आहे. खि. पू. चौथ्या शतकांत कोंकण हें नांव प्रसिद्ध झालें होतें. रा. रा. भागवत यांनीं या शब्दाची व्युत्पत्ति अशी दिली होती की, चेर देशास काग किंवा कोंग (कोंगु ?) असें म्हणण्याची बरीच जुनी वहिवाट आहे. कांग आणि गंग हे दोन्ही शब्द एकार्थी आहेत व ते एका राजघराण्याचेंहि नाव आहे. यावरून कोंगवत हा शब्द तयार झाला असावा व कोंगवत याचा कोंकण शब्द बनला असावा (वि. ज्ञा. वि. पु. २२ पृ. ९९). कालिदास आणि भारवी याच्या कोंकणवर्णनांत थोडासा फरक आहे. शके ४२६ मधील पंचसिद्धांतिका या ग्रंथांत कोंकण हा शब्द आला आहे इ. स. ८० मधील पेरिप्लसच्या कर्त्यानें कोंकणाचा व ख्रिनोल (चौल बंदर)चा उल्लेख केला आहे. कदंबराजवंशाच्या लेखावरून खि. श. पूर्वी बौद्धधर्मप्रसारकांचे पाय कोंकणास लागल्याचें स्पष्ट होतें. खि. पू. १ ल्या शतकात मलबारावर सत्ता गाजविणाऱ्या पेरमाल राजाची एक मोठी सभा कोंकणांत भरल्याचा उल्लेख आढळतो. रेवदंड्याबद्दल एक दंतकथा अशी सांगतात कीं, श्रीकृष्णानें (आपली भावजय जी रेवती हिला निर्वाहार्थ रेवतीक्षेत्र म्हणून जी भूमि दिली होती, तेंच हल्लींचें रेवदंडा होय (वि. ज्ञा. वि. पु. २१ अं. १-२). टॉलेमीनें कोंकणाचा निर्देश लारिका (लाटदेश [सं.] = गुजराथ व उत्तर कोंकण) व आरिका (दक्षिण कोंकण) असा केला आहे (इ. स. १५०). पेरिप्लसमध्यें लारिका हें नाव नसून बरुगझ (भरुकच्छ = भडोच) हें नांव येतें व आरिका देशांत चांचे लोकांचा फार उपसर्ग होता असें त्यात म्हटलें आहे; हे चाचे म्हणजे अरब लोक होत. या चांच्याचा उल्लेख स्ट्रॅबोनेंहि केला आहे. तत्कालीन कल्लिएन म्हणजे हल्लींचें कल्याण (जी. आय. पी. रेलवेचें स्टेशन) व सेसेकिएनी म्हणजे वेंगुर्ला होय असें स्मिथ म्हणतो (स्मिथ. पु. २. ४२२); पैकीं कल्याण हें नाव बरोबर आहे; सेसेकिएनी म्हणजे वेंगुर्ला हें संशयित दिसतें. या दोन बंदरांच्या दरम्यान टॉलेमी व पेरिप्लस पुढील गावें देतातः— ओपार (सोपारें), सेमुल्ल (चेऊल ?) मंदगोर, पलपोटम किंवा बलपाटण, मेलिझिगर व तोपरोन. टॉलेमीनें ओपार व सेमुल्ल यांच्यांत बिंद ही नदी दिली आहे, प्लिनीचें झिझेरस व टॉलेमीचें मेलिझीगर हें सुवर्णदुर्ग किंवा जयगड असावें असें लासेन व स्मिथ हे म्हणतात. (झिझेरस या शब्दाचें जंजिरा या शब्दाशीं बरेंचसें साम्य आहे). प्लिनीचें बायझँटियम हें विजयदुर्ग व निट्रिअस हें (मालवण व वेंगुर्लें यांच्यामधील) निवती होय असें रेनेल म्हणतो (व्हिन्सेन्ट पु. २).पेरिप्लस व टॉलेमीचीं तत्कालीन ग्रामनामें हल्लीं स्पष्ट ओळखतां येत नाहींत; याचें कारण तीं हल्लीं नष्ट झाली असून नवीनच बंदरें पुढें आली आहेत. खि. पू. तिसऱ्या शतकांत अशोकानें आपले प्रेषित बौद्ध धर्माच्या प्रसारासाठीं अपरांतांत पाठविल्याचा उल्लेख, त्याच्या गिरनार खालशी व शहाबाज गढी येथील शिलालेखात आढळतो. यावरून खि. पू. दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत अपरांत मौर्यांच्या ताब्यांत होतें व त्या काळीं शूर्पारक ही त्यांची राजधानी होती असें ठरतें. बायबलातील ऑफीर हेंच सोपारा होय असें कांहींचें म्हणणें आहे. अलबेरुणीनें समुद्राजवळील कोंकण असा कोंकणाचा निर्देश केला आहे.

भू प्र दे शः—सामान्यतः किनाऱ्याजवळचे प्रदेश सुपीक, बऱ्याच लागवडीचे व दाट वस्तीचे असून किनाऱ्यापासून लांबचे प्रदेश खडकाळ रुक्ष असे आहेत. येथील हवा थंड असून पाऊस फार पडतो. उष्ण वारे क्वचित् वाहतात. हवेंत घडोघडी फेरफार होत नाहींत; ती सामान्यतः निरोगी असते. मुंबईच्या उत्तरेस किनारा सखल व वालुकामय असून नद्या उथळ व बंदरें कमी महत्वाचीं अशीं आहेत. मुंबईच्या दक्षिणेकडील किनारा चागला असून त्याच्या बाजूनें टेंकड्याच्या रांगा आहेत. तसेंच या भागांत पुष्कळ नद्या व मोठीं बंदरेंहि आहेत. जमिनीपासून पाव मैलाच्या आत दर्यामध्यें अर्नाळा, कुलाबा, दंडाराजपूर व सुवर्णदुर्ग यासारखी लहान लहान खडकाळ बेटें असल्यानें, त्यावर मराठी साम्राज्यात किल्ले बांधले गेले व त्यामुळें त्यांना महत्व आलें. उत्तरकोंकणांत वस्ती पातळ असून दक्षिण कोंकणात मात्र दाट आहे. दक्षिण कोंकणातली जमीन सामान्यतः खडकाळ व नापीक आहे; परंतु तींत नद्या व खाड्या पुष्कळ असल्यानें त्याच्या काठचा प्रदेश सुपीक आहे. उत्तरकोंकणात झाडी बरीच असून त्यात ताड व खजूर पुष्कळ आहेत. दक्षिणकोंकणात फारशी झाडी नाहीं; येथें ताडाऐवजीं नारळीचीं झाडें पुष्कळ आहेत. खेड्यातील लोकाना या नारळींच्या बागापासून बरेंच उत्पन्न मिळते. सह्याद्रीमुळें पावसाचे वारे अडले जाऊन कोंकणात पाऊस फार पडतो म्हणून तेथें अवर्षण व दुष्काळ याची भीति कधीं नसते. मुख्य पीक तांदूळ हें असून नागली, वरी, वाल वगैरे धान्य साधारण प्रमाणात होतें. नारळ, सुपारी, कलमी आंबे, काजू, कोकंबा, फणस वगैरे फळें व सर्वसाधारण शाकभाज्या उत्पन्न होतात. माशांचा व्यापार बराच चालतो. वाघ, चित्ते, सर्प हे प्राणी फार आहेत. पर्वताच्या पायथ्याशीं मलेरियाचा रोग विशेष जाणवतो. खनिज संपत्ति बहुतकरून मुळींच नाहीं.

लो क.—मुख्यतः महाराष्ट्रीय लोकांचीच वस्ती जास्त आहे. उत्तरकोंकणात गुजराथी व नरसम लोक आणि मूळचे लोक थोडेफार आहेत. मात्र दक्षिकोंकणात शुद्ध महाराष्ट्रीय आहेत. कोंकणातील बहुतेक लोक शेती करितात. इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वी पुष्कळ लोक (मुख्यतें मराठा, भंडारी, कुणबी व थोडेफार ब्राह्मणहि) लष्करी पेशा स्वीकारीत असत. हल्लीं थोडेफार कोंकणी मराठे लष्करांत दाखल होतात. अलीकडे या १५१२० वर्षांत मुंबईस गिरण्यात मजूर म्हणून या कोंकणी (बालू) लोकांची भरती सपाटून होऊं लागली आहे.

कोंकणी लोक पोटाकरितां घर सोडून बरेच दूरवर जातात खरे. परंतु म्हातारपणीं ते घरीं येतात. इकडील गांवें फार लहान लहान असतात; मोठ्या गावची लोकसंख्या १५ हजारांच्या वर क्वचित्च जाते. किनारा विस्तृत व बंदरें सोईचीं असल्यानें पूर्वी दूरदूरचे परदेशी लोक येथें उतरत असत. अरबस्तानापासून कोंकण जवळ असल्यानें प्रथम अरबांचा उपसर्ग कोंकाणास झाला. प्रदेश सुपीक असल्यानें या प्रांताला महत्वहि चढलें. बौद्धांनीं व पुढें ब्राह्मणांनीं आपापले मठ साष्टी येथें स्थापून इतरत्र लेणीं कोरलीं होतीं. पूर्वी येथें आलेले फारशी, ज्यू, हबशी व अरब याचे वंशज अद्यापिहि आढळतात. यापैकीं बेनेइस्रायल व पारशी यांचें आगमन कोंकणच्या इतिहासांत महत्वाचें गणलें जातें. बेनेइस्रायल हे बहुतेक उत्तरकोंकणांत राहतात.पारशानीं व्यापारात बराच पुढाकार मिळविला असून ते बहुतेक सारे श्रीमंत आहेत. पंधराव्या शतकांत पोर्तुगीज येथें येऊन त्यानीं चौल, वसई वगैरे ठाणीं घेऊन आपले पाय पसरले. सोळाव्या शतकात त्यांनीं वरीलप्रमाणें अंमल पसरवून हिंदू लोकावर धार्मिक बाबतींत अतिशय जुलूम केला. अठराव्या शतकांत आग्रयांनीं यांचा व इंग्रज आणि डच यांचा पुरता नक्षा उतरविला. त्यानीं सतराव्या शतकांत येथें आपल्या वखारी घातल्या होत्या. व मराठी राज्यांत व्यापाराच्या सवलती मिळविल्या होत्या. मराठी साम्राज्यात तर कोंकण किनाऱ्याचें महत्व फारच वाढलें होतें. इंग्रजी राज्य झाल्यानंतर तें हळू हळू कमी होत चाललें व बंदरांचें व किल्ल्याचें अस्तित्व नाममात्र भासूं लागलें आणि व्यापार बसत चालला. ठाणें जिल्ह्यात तेवढी आगगाडी सुरू आहे. कोंकण व देश यांत सह्याद्रीची प्रचंड भिंत असल्यानें (जरी मधून मधून पुष्कळसे घांट व वाऱ्या जाण्यायेण्यास आहेत तरी) परस्परांत व्यापार जोरांत चालू नाहीं; त्यामुळें कोंकण हें खालावलेलें व दरिद्री झाले आहे. फक्त तेथें सृष्टिशोभा पहावयास सापडतें. व कोकणी लोक बुद्धीनें हुशार असतात एवढाच फरक आहे.

प्रा ची न व्या पा र व द ळ ण व ळ ण.—एल्फिन्स्टन म्हणतो कीं भडोच व अरिका येथून आफ्रिकेला पहिल्या शतकाच्या सुमारास तांदूळ व इतर धान्य,लोणी,तिळीचें तेल, जाड व बारीक कपडा, साखर, वगैरे माल रवाना होई. हा व्यापार कच्छी व अरबी लोक करीत. प्राचीन इजिप्शियन लोकाशीं हिंदुस्थानचा व्यापार होता. तसेंच रोमन लोकांचा व्यापारहि अरबांमार्फत हिंदुस्थानशीं असे,असें स्मिथ व एलफिन्स्टन म्हणतात. पेरिप्लसचें मुझीरीस (हल्लींचें मंगळूर) हें अशा व्यापाराचें मोठें बंदर होतें. याकाळीं अरिका हा देश तगरच्या राजांच्या अंमलाखालीं होता. तगर म्हणजे हल्लींचें निजामशाहींतील तवरगिरी असें रा. राजवाडे म्हणतात. पेरिप्लसनंतर सहाव्या शतकांत कॉस्मस नांवाच्या ग्रीक व्यापाऱ्यानें तत्कालीन व्यापाराची माहिती पुढीलप्रमाणें दिली आहेः—कल्याण हें व्यापाराचें मोठें ठिकाण असून तेथून जहाजें परत जातांना, पितळ, तीळ, लांकूड व कापड हे जिन्नस नेत. सातव्या शतकांत आलेला बौद्धभिक्षु ह्युएनत्संग हा परत जातांना कल्याण किंवा बाणकोट येथें जहाजावर चढला असें म्हणतात. यानें कोंकणपुर या राज्याचा घेर ४०० कोस असून तो प्रदेश पूर्वी कदंबाच्या राज्यांत मोडे असें म्हटलें आहे. कास्मसच्यानंतर आरबानीं कोंकणचा उल्लेख केला आहे. त्यानीं कोंकणाला केमकेम, कोमकम, कंकन, कोंकण वगैरे नांवें दिलीं आहेत. इब्न बतुता यानें कोंकण ठाणें व एका इटालियन प्रवाशानें कोसिंटण म्हटलें आहे. इ. स. ६३६ त खलीफ उमर यानें ठाण्यास फौज पाठविली होती असें एक अरब ग्रंथकार म्हणतो (रीनाड—फ्रॅग्मेंटस्. १८२६). इ. स. ८५१ त एक सुलेमान नावाचा व्यापारी इकडे आला होता. त्यानें कोंकण हें बलहार राजांच्या अंमलाखालीं असल्याचें नमूद केलें आहे; बलहार म्हणजे शिलाहार असावेत. अबुरिहाननें कोंकणचीं मैदानें दंडका या प्रदेशात दिलीं आहेत. अल्बेरुणी हा कोंकणची राजधानी तालह (तळें ?) असल्याचे लिहितो. त्यानें भडोच, सिंदन (संजान ?), सौबर, टाणा (ठाणें), लारण, दिजमौर, मलाय, कंदजी, दवीर वगैरे मोठ्या गावाचीं व प्रातांचीं नावें दिलीं आहेत. यातील अंतरें त्यानें परसंग या इराणी मापानें दिलीं आहेत. (एक परसंग म्हणजे साडेतीन मैलापेक्षा थोडें अधिक अंतर होय). पुढें स. १३०० च्या सुमारास रशिदुद्दीन हा कोंकण व गुजराथचा उल्लेख, खंबायत, कंकन, टाणा, मलबार या नांवासह करतो. याच्यापूर्वी एक शतक अल् इद्रिसी हा प्रवासी आला होता. त्यानें आपलें वृत्त असें दिलें आहेः—बरूक (भडोच) पासून सिंधापूर हें किनाऱ्यानें चार दिवसांच्या मजलीवर असून तेथून बन (ठाणें ?) चार दिवसाच्या वाटेवर आहे. हें एका मोठ्या आखाताच्या किनाऱ्याला असून येथें मोठमोठीं गलबतें राहूं शकतात. ठाण्याच्या खाडीच्या पूर्व व पश्चिमेकडील टेकड्यांच्या मधील भागांत व ठाणें आणि वसई या दरम्यानच्या प्रदेशावर थोड्या काळापूर्वी पाणी असावे हें लक्ष्यांत घेतल्यास, आठ शतकापूर्वीच्या ठाण्यासंबंधाचीं वरील वर्णनें चुकीचीं नसावींत असें वाटतें. या अरब प्रवाशांपैकीं शेवटचा इब्न बतुता हा होय. त्यानें ठाण्याहून मोठमोठीं जहाजें व्यापारानिमित्त एडनला जात असत असें म्हटलें आहे. मार्कोपोलो या व्हेनिसच्या प्रवाशानें कोंकणचें वर्णन (स. १२९०) दिलें आहे; परंतु तें फार संदिग्ध आहे. त्यानें कोंकणावर त्यावेळीं ठाणें व लार (लाट) अशीं दोन राज्यें होतीं असें म्हटलें आहे. ठाणें भरमराटीस आल्यावेळीं साहजिकच कल्याण मोडकळीस आलें.त्यामुळें पुढील प्रवाशांच्या वर्णनांत कल्याण येत नाहीं. तसेंच दाभोळ व चेऊल यांचींहि नांवें त्यावेळीं आढळत

नाहींत. कारण हीं पोर्तुगीज व मुसुलमानांच्या रियासतींत नांवारूपास चढलीं.

प्रा ची न इ ति हा सः—हा इतिहास शिलालेख ताम्रपटादि साधनांवरून देता येतो. कोंकणांत बौद्ध किंवा ब्राह्मणी लेणीं व खोदकामें बरींच असून तीं पुढील ठिकाणीं आहेतः—कान्हेरी, कोंदिवटे, जोगेश्वरी, मंडपेश्वर, मागाठण, घारापुरी, करंज, जेंबुग, कोंडाणे व चंदनसार हीं ठाणें जिल्ह्यांत असून पाल व कुडा हीं कुलाबा जिल्ह्यांत आहेत; आणि रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूग, खेड, दाभोळ, संगमेश्वर, गव्हाणें, वेळगांव व वाडेपाडेल हीं आहेत. यांत असलेल्या शिलालेखावरून तत्कालीन पुष्कळ माहिती निघते. कान्हेरी लेण्यांत शिलाहार व आन्ध्रभृत्य राजांचीं नांवें येतात. हीं पुष्कळशीं लेणीं बौद्धधर्मीयांचींच आहेत. त्यावरून एके काळीं साष्टी व मुंबईच्या दक्षिणेकडील कांहीं भागांत बौद्धांचें ठाणें असावें असें दिसतें. कोंकणावर निरनिराळ्या काळीं निरनिराळे (म्हणजे मौर्य, आंध्र, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, मुसुलमान, पोर्तुगीज व मराठे इ.) राजे झाले. ख्रि. पू. तिसऱ्या शतकांत अशोक मौर्याचा अंमल होता. सोपारें येथें सांपडलेल्या स्तूपात गोतमीपुत्र शातकर्णी याचें एक नाणें आढळलें; सोपारें ही अशोकाची या भागाची राजधानी होती. मौर्याचें राज्य ख्रि. पू. २ ऱ्या शतकांतहि होतें. पुढें इ. स. च्या पहिल्या शतकांत शातवाहनांचें राज्य कोंकणावर झालें. हेच आन्ध्रभृत्य होत. नाशिक जिल्ह्यातील एका (त्रिरश्मि पर्वताच्या) लेण्यात पुलुमायी शातवाहनाच्या राज्यविस्तारात अपरांतकाचें नांव आलें आहे. हा शातवाहनाचा अंमल बहुधा इ. स. ३ ऱ्या शतकापर्यंत टिकला असावा. यापुढें इ. स. च्या चौथ्या शतकांत कलचुरी घराण्याचा अंमल कोंकणावर बसला. या घराण्यातील कृष्णराज (इ. स. ३७५–४००) याचीं कांहीं नाणीं मुंबई व साष्टीस आढळलीं. हें घराणें ५ व्या शतकापर्यंत कोंकणचें अधिकारी असावें. तसेंच इ. स. च्या ६ व्या शतकापर्यंत मौर्यांचा अंमल इकडे असल्याचाहि पुरावा मिळतो. या वेळीं नळ नांवाचें एक घराणेंहि कोंकणांत राज्य करीत होतें. सहाव्या शतकात चालुक्य घराण्यातील कीर्तिवर्मा यानें (इ. स. ५६७–५९१) उत्तर कोंकणवर स्वारी करून मौर्यांचा पराभव केला. त्याचा नातू दुसरा पुलकेशी यानें (६११–६४०) तर मौर्यांचें उच्चाटण करून कोंकण प्रांत खालसा केला. या मौर्यांची राजधानी पुरी (हल्लींचें घारापुरी किंवा त्याच्या शेजारचें मोरे बंदर असावें) हें शहर होतें. तें पुलकेशीच्या चंडदंड या सेनापतीनें १०० जहाजांच्या आरमारानिशीं लढाई करून काबीज केलें. हे चालुक्य उत्तर कोंकणावर साधारणतः इ. स. ८१० पर्यंत राज्य करीत असावेत. यापुढें शीलाहारांचा अंमल कोंकणावर बसला. वरील चंडदंडाची हकीकत वाडें येथील एका शिलालेखांत सांपडते. त्यावेळीं सुकेतुवर्मा नांवाचा मौर्यराजा होता. इ. स. ६३७च्या सुमारास अरबांनीं ठाण्याजवळील कोंकण किनाऱ्यावर चढाई केली होती. शिलाहारराजे हे इ. स. ८१० ते १२६० पर्यंत कोंकणवर अधिकार गाजवीत होते. या अवधींत वीस राजे होऊन गेले. परंतु त्याचा इतिहास चांगलासा उपलब्ध नाहीं. याचीहि राजधानी पुरी हें शहर असून संजाण, ठाणें, चौल, लोनाड, सोपारें, चेमुलो व उरण हीं शहरें राज्यांत प्रमुख होतीं म्हणजे हल्लींच्या ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील बराच भाग त्यांच्या ताब्यांत होता. हे राजे स्वतःस तगरपुराधीश्वर असें बिरुद लावून, जीमूतवाहनाचे वंशज म्हणवीत. यांचा पहिला पुरुष कपर्दि होय; त्याचा मुलगा पुलकेशी. याच्या बद्दल कान्हेरीच्या एका शिलालेखात " कोंकणांतील मंगलपुरीचा अधिपति " असें म्हटलें आहे. तो अमोघवर्ष राष्ट्रकूटांचा मांडलिक असावा असेंहि त्या लेखावरून दिसतें. कान्हेरी लेण्यांतील दुसऱ्या एका शिलालेखावरून या पुलकेशीचा मुलगा दुसरा कपर्दि (८५३–८०) हा देखील राष्ट्रकूटाचा अंकित होता असें दिसतें. या कपर्दीचा नातू झांझ हा सैमूर (चौल?) प्रांताचा राजा असल्याबद्दल समसुद्दी हा अरब इतिहासकार (इ.स. ९१६) सांगतो; पुढें या झांझचा नातू अपराजित (स. ९२०–९४०) हा मात्र स्वतंत्र बनला. कारण, त्याचा सार्वभौम जो कक्कल राष्ट्रकूट त्याचा वध चालुक्य तैलप यानें परभारें केल्यामुळें (भिवंडी तालुक्यातील भेरगावचा शिलालेख पहा) यास फावलें. त्याचा (अपराजिताचा) पुत्र अरिकेसरी (इ. स. ९४०–१०१७) हा कोंकणांतील १४०० गांवावर राज्य करीत असून, त्यात पुरी व श्रीस्थानक (ठाणें) हीं मुख्य गावें होतीं असें (स. १०९७ च्या) एका शिलालेखांत म्हटलें आहे. या घराण्यातील १७ वा राजा (अरिकेसरीचा पणतू) जो दुसरा अपरादित्य त्याचा नातू) मल्लिकार्जुन (स. ११५६–६०)हा मोठा बढाईखोर असून स्वतःस राजपितामह म्हणवीत असे. त्याच्या एका भाटानें गुजराथच्या कुमारपाल सोळंखी (स. ११४३–७४ राजाच्या देखत मल्लिकार्जुनाला राजपितामह म्हणून त्याची स्तुति केली असतां, ती ऐकून त्यानें आपला सेनापति आनंद यास मोठ्या सैन्यानिशीं मल्लिकार्जुनावर पाठविलें. पहिल्या लढाईत आनंदाचा पराभव झाला, परंतु दुसरींत त्यानें मल्लिकार्जुनास ठार मारिलें. याच्या वेळचे दोन शिलालेख (वसई व चिपळूग) उपलब्ध आहेत. कुमारपालाचा अंमल थोडे दिवस ठाणे कोंकणावर होता; परंतु पुढें थोड्याच दिवसांत ठाणेकर शिलाहार हे कोल्हापुरकर शिलाहारांच्या मदतीनें स्वतंत्र बनले. मल्लिकार्जुनाचा पणतू सोमेश्वर हा या वंशातील शेवटचा–विसावा–पुरुष होय (स. १२५० ते १२६०). त्याच्यावर १२६० मध्यें महादेव यादव देवगिरीकर यानें स्वारी केलीं; तेव्हां सोमेश्वर हा नौकागमन शास्त्रांत प्रवीण असल्यानें, त्यानें दर्याचा आसरा धरला; परंतु महादेवानेंहि अनेक समुद्रयानें जमा करून त्याचा सर्वस्वी विध्वंस केला. हेमाद्रीनें हें सर्व वर्णन आपल्या ' राज्यप्रशस्तींत ' दिलें असून सोमेश्वरास कुकुंणेश म्हटलें

आहे. याप्रमाणें इ. स. १२६० सालीं कोंकणप्रांत देवगिरीकर प्रौढप्रताप चक्रवर्ती यादवांच्या साम्राज्याखालीं गेला, तो इ. स. १३१८ पर्यंत त्यांच्याकडेच होता. शिलाहारराजे हे आपला राज्यकारभार निरनिराळ्या मंत्र्यांच्या सल्लयानें चालवीत असत. त्यांनां देवालयें, तलाव वगैरे बांधण्याची फार आवड असून तें त्यांचे भक्त होते. यादवांनीं कोंकणावर राज्य चालविण्यास आपले प्रतिनिधी नेमिले होते; त्यांनां सर्वाधिकारी किंवा महाप्रधान म्हणत. अशा प्रकारचा एक अच्युत नायक नांवाचा यजुर्वेदी ब्राह्मण महाप्रधान (गव्हर्नर)इ. स. १२७२ सालीं कोंकणात कारभार करीत होता. सार्वभौम रामचंद्रदेव यादव याच्या या महाप्रधानांनीं दिलेले दोन ताम्रपट(इ. स. १२७३व इ. स. १२९१ चे) ठाणें जिल्ह्यात सापडले असून, भिवंडी व वसईस खुद्द रामदेवरायाचे शिलालेखहि आढळले आहेत. कृष्ण कावळे हा भारद्वाजगोत्री ब्राह्मण महाप्रधान इ स. १२९० त सर्व कोंकणप्रांतावर राज्य करीत होता. पुढें अल्लाउद्दीन खिलजीनें रामदेवरायावर स्वारी केली असतां (इ. स. १२९४)त राजानें वंशरक्षणासाठीं आपला दुसरा मुलगा भीमदेव (बिंब देव) यास त्याच्याबरोबर राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे व इतर सरदार दरकदार देऊन उत्तरकोंकणांत पाठविलें. बिंबाख्यान व कौस्तुभचिंतामणि या ग्रंथावरून असें दिसतें कीं भीमदेव हा अनहिलवाड्यावरून जलमार्गानें कोंकणांत उतरून व कृष्ण कावळ्यापासून सर्वाधिकार हस्तगत करून महिकावती (माहीम) ही आपली राजधानी करून तेथें राहिला. त्यानें उत्तर कोंकणचे १५ विभाग केले होते; त्यात १६२८ खेडीं होतीं. भीमदेवाच्या मागून प्रताप देव व त्याच्या मागून नागरदेव हे राजे झाले. नागरदेवाच्या वेळीं स. १३४७ त गुजराथच्या मुसुलमान शहाचा सेनापति मलिकनाईक यानें एकाएकीं नागरदेवावर स्वारी केली; तींत नागरदेव व त्याची राणी मारली जाऊन उत्तरकोंकण मुसुलमानांच्या ताब्यात गेलें. दक्षिण कोंकणांतील शिलाहारांच्या वंशात दहा राजे होऊन त्यांनीं सुमारें इ स. ८०८ ते १००८ पर्यंत राज्य केलें. ते प्रथम राष्ट्रकूटांचे व मग चालुक्याचे आणि शेवटीं देवगिरांकर यादवाचे मांडलिक होते.

मु सु ल मा नी अं म ल.—मुसुलमान कोंकणांत घुसल्याचा पहिला उल्लेख १३१२ तील आहे. त्या वर्षी मलिक काफर यानें दाभोळ व चेऊलवर स्वारी कली होती.पुढें इ.स. १३१८ त देवगिरी घेऊन मुबारकशहानें समुद्रकिनाऱ्यावर नवे किल्ले बांधण्याचा प्रारंभ केला;व साष्टी आणि माहीमचे जुने किल्ले काबीज केले. कोंकणांत मुसुलमान जाण्यापूर्वी उत्तर कोंकणात वसई, कल्याण, कर्नाळा, चौल आणि दक्षिण कोंकणांत दाभोळ, राजापूर व कुडाळ हे प्रांत मोडत असत. ब्राह्मणी राज्य स्थापन झाल्यानंतर (१३४७) कोंकण त्यांच्या राज्यांत समाविष्ट झालें. त्यांत चौल व दाभोळ हे दोन निरनिराळे प्रांत होते. याच सुमारास जव्हारचें संस्थान निर्माण होऊन दिल्लीकर मोंगलानें त्याला मान्यता दिली होती. यावेळीं म्हणजे १३४७–१४०० पर्यंत जरी कोंकण हें अविंधाच्या सत्तेखालीं होतें तरी तेथें हिंदूंचीं कित्येक मांडलिक राज्यें होतीं. त्यांपैकीं कांहीं विजयानगरकराचे व कांहीं गोंवळकोंडेकरांचे मांडलिक म्हणवीत. अर्सकिन म्हणतो कीं, अहंमदशहानें (गुजराथचा शहा) पंधराव्या शतकात बराच कोंकण प्रांत काबीज केला होता.त्यावेळीं त्याच्या राज्यांत वसई, मुंबई, दमण, दांडाराजापूर हे प्रांत व वसई आगाशी, दाभोळ, चौल, दांडा, पनवेल, कल्याण, भिवंडी गोंवे हीं शहरें प्रमुख होतीं असें मिरात-ई-अहमदी म्हणते याच्या कारकीर्दीत मलिक-उल्-तुजार यानें कोंकण लुटलें (१४२९). माहीम (मुंबईकडील) व साष्टी हीं बेटें घेतलीं तेव्हां त्याच्यावर वरील अहंमदशहानें खुष्कीनें व जलमार्गानें सैन्य पाठवून व त्याचा पराभव करून तीं परत मिळविलीं. पुढें १४३६ त व १४५३ त ब्राह्मणी राजांनीं कोंकणावर स्वाऱ्या केल्या; त्यापैकीं शेवटच्या स्वारींत विशाळगडच्या शिरके या आडनावाच्या घराण्यांतील एका मराठा सरदारानें आपल्या शंकरराय नावाच्या राजाविरुद्ध मलिक-उल्-तुजार यास बोलाविलें. वास्तविक हें बेबनावाचें सर्व ढोंग असून मुसुलमानांचा नायनाट करण्याकरितां त्यावेळच्या प्रमुख मराठ्यांनीं ही युक्ति योजिली होती. शिरक्यानें मलिकास सह्याद्रीच्या अत्यंत अडचणीच्या जागेंत नेऊन सोडल्यानंतर पूर्वी ठरल्याप्रमाणें शंकरराय व इतर मराठे सरदारांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याचा सपशेल धुव्वा उडविला. या शिरक्यांची राजधानी प्राचीन काळापासून विशाळगड व भैरवगड येथें असून त्याच्या ताब्यात (डफच्या मतें) पुण्यापासून वारणेपर्यंतचा घाटमाथा व पलीकडील कोंकण होतें. वरील प्रसंगानंतर १६ वर्षें मुसुलमान भीतीनें कोंकणात फिरकले नाहींत. उलट शिरके हे आपल्या आरमाराच्या बळावर त्याना भेडसावीत होते. पुढें महंमद गवान यानें १४६९ त दाभोळ व चौल येथील सैन्याच्या व आरमाराच्या मदतीनें शिरक्यावर स्वारी केली. परंतु ५ महिने विशाळगडास वेढा देऊनहि तो किल्ला पाडाव झाला नाहीं. तेव्हा तो परत फिरला. मात्र दुसऱ्या वर्षी गवाननें विश्वासघातानें विशाळगड घेतला. फेरिस्ता म्हणतो कीं यापूर्वी हा किल्ला मुसुलमानाच्या हातीं लागला नव्हता. इ. स- १४७८ त दख्खनच्या चार सरकाराचे (प्रांताचे) आठ सरकार झाले तेव्हा उत्तर कोंकणचा प्रांत जुन्नर सरकारात जोडला गेला. यानंतर लगेच गोंव्याच्या सुभेदाराचा मुलगा बहादुर गिलानी यानें माहीम, साष्टी, दाभोळ, वसई वगैरे कोंकणचा भाग (हा गुजराथच्या शहाचा प्रदेश होता) जिंकला (१४९०). तो एक वर्ष त्याच्या ताब्यांत होता. इकडे जुन्नर प्रांताचा सुभेदार अहंमद यानेंहि कोंकणांतील बरेच किल्ले सर करून दांडाराजपुरास वेढा दिला. पण तेथें त्याची डाळ शिजली नाहीं. तिकडे बेदरकडे गडबड झाली

त्याचा फायदा घेऊन अहंमद यानें अहमदनगर येथें निजामशाही स्थापन केली व १४९० त दांडाराजापूर घेतलें. याच वेळीं गिलानीनेंहि (मुंबई) माहीम जाळून गुजराथच्या शहाच्या आरमाराचा पराभव केला.तेव्हा महंमद बेगडा गुजराथकर यानें विजापूरकर व बेदरकर यांच्या मदतीनें दाभोळवर स्वारी केली,त्यांत त्याचें आरमार वादळांत सांपडून नाश पावलें, परंतु सैन्यानें गिलानीशीं कोल्हापुराजवळ लढाई दिली. तींत गिलानी ठार झाला. यावेळीं गुजराथकर शहाच्या ताब्यांत उत्तरकोंकण व ठाणें (राजधानी) होतें. पण पुढें कांहीं वर्षांनीं पोर्तुगीजांनीं हळूं हळूं तो प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. बहामनी राज्य मोडल्यावर कोंकणप्रांत आदिलशाही व निजामशाही यांच्यात वांटला गेला. त्या दोहोंमधील सरहद्द सावित्री नदी होती असें म्हणतात; त्यामुळें चौल व दाभोळ हीं बंदरें दोन्ही रियासतींत विभागलीं गेलीं. यावेळीं कोंकणची स्थिति खालावलेली होती. ती सुधारण्याचा प्रथम प्रयत्न युसुफ आदिलशहानें केला. शेतकऱ्यांच्यावरील सारा कमी करण्यात येऊन देसाई, देशपांडे. व कुळकर्णी यांचीं वतनें त्यानें कायम केलीं. हबशी हे जंजिऱ्यांत राहावयास केव्हां आले हें निश्चित समजत नाहीं. ते १४९८ त आले अशी एक दंतकथा आहे. मलिकंबरच्या वेळीं निजामशाहीच्या आरमारात दोन हबशी आरमाराचे अधिकारी होते, त्यांपैकीं एकाच्या ताब्यांत रायरी हें ठिकाण होतें असें डफ म्हणतो. मुसुलमानी सैन्यांत व मोठमोठ्या हुद्यांच्या जागीं बरेच हबशी होते सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं कोंकणचे विभाग व महत्त्वाचीं ठिकाणें याबद्दलची माहिती पोर्तुगीज लेखांवरून पुढीलप्रमाणें आढळतेः—नागोठण्यापर्यंत गुजराथच्या शहाचा अंमल असून, श्रीवर्धन किंवा बाणकोटपर्यंत निजामशाहीचा ताबा होता आणि बाणकोटच्या दक्षिणेकडील गोव्यापर्यंतचा भाग आदिलशाहीच्या राज्यांत मोडत असे.चौल व दाभोळ हीं मोठीं बंदरें असून तीं सुरत व गोवें यांच्या बरोबरीचीं समजलीं जात. या वेळचीं दुसरीं महत्त्वाचीं गांवें म्हणजे डहाणू, तारापूर, केळवेमाहीम, अगाशी, वसई, वांद्रें, माहीम, नागोठणें, श्रीवर्धन, जैतापूर व खारेंपाटण हीं होत. चौल व दाभोळ या मोठ्या व्यापारी पेठा असून इराण व तांबडा समुद्र यांजबरोबर त्यांचा बराच व्यापार चालत असे. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील सर्व ठिकाणचे लोक दाभोळ येथें जमत असत असें निकितिन म्हणतो. सोळाव्या शतकांत तेथील वस्ती बरीच असून इमारती सुंदर होत्या आणि देवालयें व मशिदीहि बऱ्याच होत्या असें पोर्तुगीज इतिहासकार म्हणतात. इ. स. १५४७ त तेथें तटबंदीचे दोन किल्ले होते. ते पुढें पोर्तुगीजांनीं पाडून टाकले. त्यानीं गुजराथच्या शहाच्या ताब्यांतील कोंकणचा बराचसा भाग हाताखालीं घातल्यामुळें दिल्लीकर मोंगलाला कल्याणखेरीज महत्वाचा दुसरा भाग मिळाला नाहीं. निजामशाहीचें व फिरंग्यांचें (पोर्तुगीजांचें) बहुधा सख्य असे; आदिलशाहीची मात्र फिरंग्यांशीं नेहमीं कटकट होई. मलिकंबरच्या जमीनमहसुलीच्या पद्धतीनें कोंकणच्या शेतकऱ्यांनां पूर्वींच्या मुसुलमानी अमदानीपेक्षां जास्त सुखाचे दिवस गेले. त्याच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनीं हा कोंकणीप्रांत आदिलशाहींत समाविष्ट झाला. त्यापूर्वीच निजामशाहींत शहाजी राजांनीं उत्तरकोंकणांत स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला होता व बरेचसे किल्लेहि स्वतःच्या ताब्यांत आणले होते. त्यामुळें आदिलशाही व दिल्लीकर मोंगल हे एक होऊन त्यांच्या मागें लागले. त्यांनीं बरेच दिवस त्या दोघानांहि दाद दिली नाहीं. पण अखेरीस निजामशाहींतील फितुरीमुळें त्यांनां स्वतंत्र सत्ता स्थापण्याचा प्रयत्न सोडून आदिलशाहीचे नोकर रहावें लागलें. या आदिलशाहींत कोंकणची व्यवस्था पुढीलप्रमाणें होती. दाभोळ, अंजनवेल, रत्नागिरी व राजापूर हे प्रांत व तेथील कोट हे प्रत्यक्ष मध्यवर्ती सरकारच्या अंमलाखालीं असत. याशिवाय उरलेल्या प्रांताचा कारभार देशमुखादि वतनदार हे वंशपरंपरेनें पहात असत. कुडाळचे सावंत हे अशा देशमुखांत ठळक होते. दाभोळची सुभेदारी (जिल्हा) बरीच मोठी असून, तिचें मुख्य ठाणें विशाळगडजवळील प्रभानवल्ली या गांवीं होतें; येथील ब्राह्मण सरदेसाई यांचें घराणें पुष्कळ वर्षांपासून तेथील वतनदार होतें. याशिवाय आणखी दोन सुभेदाऱ्या होत्या. कल्याणप्रांत (सुभेदारी) वैतरणी नदीपासून नागोठण्यापर्यंत असून तिच्यावर विजापुराहून सुभेदाराची नेमणूक होई. याशिवाय उरलेल्या सावित्रीनदीपर्यंतचा सर्व प्रदेश जंजिरेकर हबशाकडे असून त्याच्या ताब्यांत तळें, घोसाळें, रायरी हे किल्ले होते. मोंगलांचे (दिल्लीकर) व फिरंग्यांचें विशेषसें तंटा भांडण होत नसे. एकदां मोगलांनीं सन १५८२ त फिरंग्यांच्या दमण, डहाणु, व तारापुर या ठाण्यावर हल्ले केले होते. परंतु अकबराच्या जनानखान्यांतील एका फिरंगी नाटकशाळेच्या वजनानें त्यांच्यांत लवकरच तह घडून आला असें जर्व्हिस म्हणतो (पृ.८४). या नाटकशाळेच्या मार्फत फिरंग्यांनां मोंगलांकडून बराच मुलुख मिळाला असेंहि तो सांगतो. पुढें पुन्हां एकदां स. १६१२ त मोंगलानें दमण, वसई व चौल यांनां वेढा देऊन आसपासचा प्रांत उध्वस्त केला. तेव्हां फिरंग्यांनीं त्यानां बराचसा नजराणा देऊन व कांहीं प्रांत सोडून त्यांच्याशीं तह केला. यापुढें मात्र त्यांचा परस्पर बेबनाव फारसा झाला नाहीं. अकबराप्रमाणेंच शहाजहाननें फिरंग्यांशीं भांडण उकरून काढलें नाहीं. कोंकणांत मुसुलमानी अवशेष फारच थोडे आहेत व तेहि महत्त्वाचे नाहींत. कोंकणांतील बहुतेक मुसुलमान बाटलेले हिंदु असल्यानें त्यांचा पेहराव व भाषा सुद्धां अर्धवट मराठी आहे. कांहीं मुसुलमानांत तर हिंदूंचे देव पूजेस ठेविलेले असून लग्नप्रसंगींहि ते हिंदु विधि बराचसा पाळतात.

पोर्तुगीज अंमल.--हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढल्यानंतर पोर्तुगीज लोकांनी गोव्याच्या उत्तरेस १५०२ च्या सुमारास पहिली सफर केली असें म्हणतात. पुढें १५०८ त कांहीं पोर्तुगीज गलबतें लॅरेन्झो आल्मिडाच्या हाताखालीं चौल येथील मुसुलमानी आरमारावर चालून गेलीं. व त्याचा पराभव करून येथून तो दाभोळास गेला असतां तेथें निझामशाही अधिकाऱ्यानें त्याला व्यापाराची परवानगी दिली. मात्र गुजराथ व ईजिप्त येथील आरमारें एकत्र होऊन त्यांनीं त्याचा पराभव केला. याप्रमाणें पोर्तुगीज लोकांनां त्यांच्या पूर्वेकडील सर्व व्यापार काबीज करण्याच्या महत्वाकांक्षेमुळें प्रथमपासूनच शत्रू उत्पन्न झाले. कोंकणांतील चौल व दाभोळ या महत्वाच्या बंदरांवर त्यांचा डोळा होता. यावेळीं आदिलशाही व निजामशाही यांच्यात भांडणें सुरू होतीं. कोंकण प्रांत त्यांच्या दोघांत विभागला गेल्यानें तिकडे त्यांचा धुमाकूळ चाले. व त्याचा फायदा पोर्तुगीज घेत. निजामशहानें चौल येथें त्यांनां वखार घालण्याची परवानगी देऊन बंदरात येणाऱ्या जहाजांचें संरक्षण करण्याचें कामहि त्यांना सांगितलें. आदिलशहानें फिरंग्यांना ही सवलत दिली नसल्यानें त्यांच्या दाभोळ बंदराला फिरंगी हे वारंवार त्रास देत. लुटालूट करण्याकरितां उत्तर कोंकणच्या किनाऱ्यावर हल्ले चढवीत. स. १५१७ त डीमटारोयो यानें वाड्यावर हल्ला करून तेथील मुसुलमान सुभेदाराचा पराभव केला. स.१५२९तील एका स्वारींत त्यानें नागोठणें, वसई, आगाशी हीं बंदरें जाळून ठाणें, वांद्रें, कारंजें व साष्टी हीं गांवें काबीज केलीं. गुजराथच्या शहाबरोबरहि याच्या वारंवार चकमकी होत. यांचा सन १५२१ त व १५३० त असा दोन वेळां गुजराथकरांनीं चौल येथें त्याचा पराभव केला. पुढें १५३३ त फिरंग्यांनीं ८० जहाजें घेऊन वसईवर हल्ला करून तेथील तटबंदी पाडली. व तारापुरापर्यंतचीं ठाणीं जाळून टाकलीं. तेव्हां गुजराथच्या शहानें निजामशहाप्रमाणेंच त्यांच्या संरक्षणाखालीं आपलें आरमार ठेवून त्यांनां वसई देऊन टाकली. परंतु या दोघांतील स्नेह फारसा दृढ झाला नाहीं. पुढें १५४७ त फिरंग्यांनीं आदिलशहाविरुद्ध निजामशहाशीं व विजयनगरकरांशीं तह केला आणि १५४८त स्वारी करून गोवें ते श्रीवर्धन यांच्या दरम्यानचीं पुष्कळ गांवें लुटलीं व जाळलीं. त्यांत दाभोळचें विशेष नुकसान केलें. तेव्हा आदिलशहानें कांहीं बंदरें त्यांच्या हवालीं करून तह केला. तरी सुद्धां फिरंग्यांनीं तो न पाळता त्याच्या मुलुखाची पुष्कळशी नासाडी केली. त्यांनीं १५४८ मध्येंच वसई येथें एक धर्मशिक्षणाची पाठशाळा काढून आपले धर्मोपदेशक वसई, ठाणें व चौल येथें पाठविले. स. १५६० त फ्रान्सिसकन् धर्मोपदेशकांनीं कान्हेरी व मंडपेश्वर येथें रहाणाऱ्या हिंदु साधु व योगी यांनां घालवून तीं ठिकाणें आपल्या ताब्यांत घेतलीं. घारापुरी, कान्हेरी व मंडपेश्वर हीं स्थानें हिंदू लोक पवित्र मानीत, म्हणून तेथील खोदकामाचा नाश करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. मंडपेश्वर येथाल गुहेच्या जागीं त्यांनीं ख्रिस्ती देऊळ बांधलें आणि साष्टी येथें जुलमानें ख्रिस्ती केलेल्या लोकांच्या मुलांनां धर्मशिक्षण देण्याकरितां एक पाठशाळा स्थापिली व तिच्या खर्चास त्या प्रांतांतील हिंदुधर्माच्या संस्थेचें पूर्वापार चालत आलेलें वतनांचें उत्पन्न लावून दिलें. पुढें क्रमाक्रमानें बहुतेक सर्व सत्ता या ख्रिस्ती भटांच्या हातांत आली. इकडील या ख्रिस्ती धार्मिक संस्थांचें उत्पन्न इकडील फिरंगी राज्याच्या एकंदर उत्पन्नापेक्षांहि जास्त झालें. गोवें येथील यांच्या धर्मविचारणी सभेची (इन्क्विझिशन) सत्ता उत्तर कोंकणांत सर्वत्र चालत असे. वाटेल त्या माणसाला पकडण्याचा तिला अधिकार असे. हा तिचा अधिकार इतका अमर्यादित होता कीं प्रसंगीं त्याला लिस्बन येथील दरबारची व मुख्य धर्मविचारिणी सभेची मंजुरी मिळाल्यास खुद्द गोव्याचा फिरंगी सुभेदार (गव्हर्नर) व ख्रिस्ती जगद्गुरु (आर्चबिशप) यांनांहि तिला पकडता येई. या अमर्याद सत्तेमुळें ख्रिस्ती भटांनीं पुष्कळ हिंदुलोकांत जुलमानें बाटविलें व त्याच्यावर अनेक अत्याचार केले. अशा बाट्या लोकांची संख्या (१८ व्या शतकात) ५० हजारापेक्षां जास्त होती असें म्हणतात. इ. स. १५५५ त फिरंगी सुभेदारानें हुकूम काढून वसई प्रांतांतील सार्वजनिक व खासगी देवळांत हिंदूस पुजेची मनाई करून ब्राह्मणाकडून होणारें वेदपठण, होमहवन, सणांचे सार्वजनिक उत्सव वगैरे बंद केले. हिंदु लोक मूर्तिपूजा करितात कीं काय व मनाई केलेले धार्मिक विधी पाळतात कीं काय हें पहाण्याकरितां त्यांच्या घराच्या झडत्या घेत. त्यावेळीं जर एखाद्याच्या घरांत मूर्ति सापडली किंवा कोणी मनाई केलेला धार्मिक विधि पाळतांना आढळला तर त्या माणसाला फाशीं देत आणि त्याची सारी मालमत्ता जप्त करून ती अर्धी पाद्री भटांस व अर्धी अशी बातमी देणारास वांटून देत. यापुढें तर इ. स. १५९४ त रोमचा पोप व पोर्तुगालचा राजा यानीं हिंदुलोकांस जुलमानें बाटविण्याचे हुकूम पाठविले. त्यामुळें इकडील पाद्रीभटांनीं अनेक देवळांचा नाश करून वसई प्रांतांतील लोकांस लुटण्याचा व अनेक युक्त्या प्रयुक्त्या करून त्यांनां बाटविण्याचा धूमधडाका सुरू केला. एखाद्या विहिरींत पावाचा तुकडा टाकून सबंध गांवचा गांव बाटवीत असें म्हणतात. अशा प्रकारें धर्मच्छलाचा अतिरेक झाल्यामुळें सर्वत्र असंतुष्टता उत्पन्न झाली. त्यामुळें पुढें फिरंग्यांचें जें उच्चाटन या भागांतून झालें, त्यास हे एक विशेष कारण होतें असें इतिहासकारांचें म्हणणें आहे. फिरंग्यांनीं किनाऱ्यावरील बहुतेक प्रांत १५६० पर्यंत काबीज केला. फार आंत जाण्याचा त्यांचा बेत नव्हता, कारण त्यांची आयात थोडी होत असे. यासाठीं अल्बुकर्कनें एक युक्ती काढिली; त्यानें गोव्यांतील हलक्या जातींतील बायकामुलींनां बाटवून व त्यांनां जमिनी देऊन त्यांचीं लग्नें आपल्या

फिरंगी शिपायांबरोबर लावून दिली. या बाटग्यांच्या वंशजांचा धर्म ख्रिस्तीच बनला आणि अधिकाराच्या जागा वगैरे कारणांमुळें त्यांचा ओढाहि फिरंग्याकडेच वळला. या वेळीं फिरंग्यांच्या ताब्यांतील प्रांतांत सुपीक भाग पुढील ठिकाणीं होता. रेवदंडा (नवें चौल), वसई व आगाशीमधील भाग वगैरे. दाभोळास त्यांची फक्त वखारच होती. इ. स. १५५६ त अशेरी व मनोर हे किल्ले त्यांनीं घेऊन पुढें लवकरच पुष्कळ दिवसांपासून डोळा असलेलें दमण व तारापूरचा किल्ला (व गांव) घेतला. इ. स. १५५९ त हबशांनीं संजाण व तारापुरावर हल्ला केला. परंतु त्यांत त्यांचा पराभव झाला. फिरंग्यांनीं १५६९ व १५७३ त दोनदां कोळी लोकां (जव्हार) वर स्वाऱ्या केल्या; परंतु दोन्ही वेळां त्यांचें फार नुकसान होऊन परास्त होऊन परत यावें लागलें. यावेळीं ते वैतरणीच्या कांठावरून घांटाच्या पायथ्यापर्यंत गेले होते असें म्हणतात. १५६० त आदिलशहा व निजामशहा एक होऊन त्यांनीं फिरंग्यावर चढाई करून गोवें व चौल येथें वेढे दिले, परंतु त्यांना यश आलें नाहीं. रेवदंड्यास मुर्तुजा निजामशहानें वेढा दिला असतां, त्याच्याच अधिकाऱ्यांनीं फितूर होऊन फिरंग्यांनां समुद्राकडून वसईच्या सैन्याची कुमक मिळूं दिल्यामुळें निजामशहानें वेढा उठविला. फिरंग्यांनीं निजामशहाच्या कल्याणवर याच वेळीं हल्ला चढविला होता व त्या सर्व भागांत जाळपोळ व लुटालूटहि केली होती. त्यामुळें या वेळीं तह होऊन निजामशहा परतला; पण पुन्हां १५९२ त या दोघात लढाई सुरू होऊन मुसुलमानांनीं रेवदंड्यावर वारंवार हल्ले केले. तेव्हां फिरंग्यांनीं त्यांनां चौलखाडीच्या तोंडावरील कोर्ले किल्ल्यात कोंडून त्यांचा पराभव केला व चौलखाडी ताब्यात घेतली. यानंतर आदिलशाही व निजामशाही यांच्याकडून फिरंग्यांनां विशेष त्रास झाला नाहीं; तथापि इ. स. १६०९ त चौलच्या मुसुलमान सुभेदारानें एक छोटेंसें आरमार त्यांच्यावर पाठविलें होतें. इ. स. १५६० पर्यंत हिंदुस्थानांत फिरंगी सत्तेची बाल्यावस्था इ. १५६०–१६०० पर्यंत तारुण्यावस्था व पुढें वृद्धावस्था झाली, असें फिरंगी इतिहासकार म्हणतात. त्यांचा उत्कर्ष जितका जलद व आश्चर्यकारक रीतीनें झाला तितकाच त्यांचा ऱ्हासहि लवकर झाला व एकदा ऱ्हासास प्रारंभ झाल्यावर त्यांची स्थिति पुन्हा सुधारली नाहीं. सतराव्या शतकानंतर त्यांनीं चढाईचें धोरण स्वीकारल्याचें अथवा नवीन प्रदेश मिळविल्याचें ऐकण्यात नाहीं. आसपासच्या सत्ताधाऱ्यांनीहि त्याच्याकडे कानाडोळा केला. त्यामुळें सांप्रत वा प्रांत त्यांच्या ताब्यांत राहिला. येथपर्यंत कोंकणच्या व्यापारांत त्यांचें वर्चस्व होतें. यापुढें मात्र इतर यूरोपियन लोक व मलबारी चाचे यांचा त्यांनां उपसर्ग होऊं लागला. इ स. १६१५ त जहांगीर बादशहाशीं त्यांनीं केलेल्या तहांत दोघांनींहि इंग्रज व डच यांनां शत्रू समजून चाच्याचा नाश करावा असें एक कलम होतें. त्यावेळीं गोव्यांच्या अधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय कोणालाहि इराण व तुर्कस्तानच्या मार्गानें यूरोपला जातां येत नसे असें म्हणतात (डी ला व्हॅले. पु. ३. पृ. ४०२–०६). डच लोकांनीं नवीन वसाहती स्थापण्यापेक्षां पोर्तुगीजांच्या असलेल्या वसाहतीच काबीज करण्याकडे विशेष लक्ष घातलें व तें त्यांनां सोपें गेलें. कारण फिरंग्यांच्या अतीशय धार्मिक छळानें हिंदुलोक त्रासून गेले होते व ते त्यांचे द्वेष्टे बनले होते. डचांनीं स. १६३९ ते ४२ पर्यंत गोव्यास वेढा दिला होता. परंतु तिकडे यूरोपमध्यें त्या राष्ट्रांत संधि झाल्यामुळें त्यांनीं तो उठविला. या डचांनीं स. १६४१ पूर्वी वेंगुर्ले येथें एक वखार उघडली होती. आदिलशहानें त्यांनां आपल्या दाभोळ वगैरे बंदरांतील आरमाराचें संरक्षण करण्याचें काम सांगितलें होतें. परंतु तें त्यांनीं पत्करिलें नाहीं. साधारणतः डच लोकांनां कोंकणांत वसाहत करण्याची विशेष उत्सुकता वाटली नाहीं. स. १६६१ त फिरंग्यांनीं मुंबई बेट हें इंग्रजास (आंदण) दिलें. पुढें १६६३ त डच लोकांनीं फिरंग्यापासून कोचीन घेतल्यानंतर झालेल्या तहान्वयें फिरंग्याचें व्यापारी वर्चस्व समूळ नष्ट झालें; आणि डच लोकानांहि त्यानंतर इंग्रजापुढें हार खावी लागली. कोंकणांत फिरंग्याचे मुख्य अवशेष वसई व खालचें चौल (रेवदंडा) येथें आहेत. साष्टी बेटांत व वसई, रमेदी, ठाणें येथें त्यांचीं वरीचशीं प्रार्थनामंदिरें असून ठाणें व कोर्लें येथें त्यांनीं बांधलेले किल्ले आहेत; याशिवाय अरब व चाचे आल्याची सूचना देण्याकरितां उंचवटयाच्या जागीं ठिकठिकाणीं त्यांनीं बुरूज बांधलेले अद्यापि कायम आहेत; असला एक मोठा बुरूज मुंबईच्या मलबार टेकडीवरून दिसतो.

म रा ठ्यां ची का र की र्द:—कोंकणाला अलीकडील काळात जें महत्व आलें. तें शिवाजीमहाराजांच्या वेळीं प्राप्त झालें. या सुमारास दक्षिणेस सावंतवाडी व उत्तरेस जव्हार हीं (जंजिरा धरून) संस्थानें होतीं. महाराज हे जरी कोंकणचे रहिवासी नव्हते तरी मुसुलमानी सत्तेला तोंड देतांना सह्याद्रीची पाठ व कोंकण याचा उपयोग करून घेतल्यास पुष्कळ फायदा होईल हें त्यांनीं थोड्याच दिवसांत ताडलें. त्यांचा सरदार राघोबल्लाळ यानें बहुतेक कोंकण हस्तगत केलें होतें; व अण्णाजी दत्तो सचीव यांनीं कोंकणच्या जमीनीची मोजणी करून सुव्यवस्थित धारे बसवून प्रजेस सुखी केलें होतें. महाराजांनीं आपल्या वयाच्या २०–२१ व्या वर्षीच कोंकणाकडे हालचाली सुरू केल्या. प्रथम रायरी घेऊन तेथें रायगड हा मजबूत किल्ला बांधून ती आपली राजधानी केली. नंतर कल्याणप्रांत (आदिलशहाचा) युक्तीनें काबीज केला व पुढें बिरवाडी आणि लिंगाणा हे दोन किल्ले बांधले. दख्खनमधून कोंकणांत येण्याचा प्रसंग आल्यास सुरक्षित येतां यावें म्हणून त्यांनीं वाई-महाड रस्त्यावर प्रतापगड बांधून औरंगझेबाकडून सर्व कोंकण ताब्यांत घेण्याच्या परवानगीच्या मिषानें १६५८ च्या सुमारास किनाऱ्यावरील ओसाड किल्ले व माऱ्याच्या जागा काबीज करण्याचा सपाटा चालविला.

नंतर शिद्दीच्या मुलुखावर व सावंतावरहि स्वारी केली. तेव्हां सावंतांनीं महाराजांशीं तह केला. परंतु अबजलखानाच्या धामधुमींत सावंत हे आदिलशहास मिळून खालून त्यांनीं व वरून शिद्दीनें व उजवकिडून आदिलशहानें महाराजावर चढाई केली. तेव्हां त्या सर्वांना त्यांनीं नामोहरम केलें; मात्र सावंत शरण आल्यानें त्यानां त्यांचा प्रांत बहाल केला. पुढें सर्व कोंकणकिनाऱ्याची पहाणी करून आरमार वाढविलें व तें ठेवण्यास मालवण ही जागा सुरक्षित पाहून तेथें किल्ला व गोदी बांधली. नंतर सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, जयगड, अंजनवेल, विजयदुर्ग व कुलाबा येथें कोठें नवीन किल्ले बांधले व कोठें जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती केली आणि कुलाबा येथेंहि आरमाराचें मुख्य ठाणें करून सिदोजी गुजर यास आरमारी सुभा सांगितला. रायगडची मात्र फार मजबुती केली. त्यामुळें तो किल्ला त्यावेळीं अजिंक्य म्हणून समजला जाई. डफनें तर त्याला पौर्वात्य जिब्राल्टर असें म्हटलें आहे. पुढें १६६३-६४ मध्यें महाराजांनीं कोंकणवर स्वाऱ्या करून वेंगुर्लें जाळून लुटलें व मालवणचें आरमार जमवून व स्वतः आधिपत्य स्वीकारून बार्सिलोर पर्यंत स्वारी केली व बरीच लूट मिळविली. परत येतांनां वारा प्रतिकूल लागल्यानें आरमाराला येण्यास बराच काळ लागला, इकडे त्याच सुमारास देशावर मोंगलाची स्वारी झाली तेव्हां (जयसिंगाशीं) जो तह झाला त्यांत कोंकणामधील बरेचसे किल्ले महाराजांनीं मोंगलाला दिले. आग्र्याहून परत आल्यानंतर पुन्हां त्यांनीं कल्याणप्रांत व मोंगलांचा उत्तर कोंकणांतील प्रांत हस्तगत करून इ.स. १६६८ त गोवें व जंजीरा प्रांतावर चढाई केली. माहुली किल्ल्यास मोरोपंतांनीं दोन महिने वेढा देऊन तो घेतला. तेव्हां कर्नाळाहि सहज हस्तगत झाला. याच वेळीं मोंगल व हबशी यांच्याशीं महाराजांच्या बऱ्याच दर्यावर्दी लढाया झाल्या. पुढें १६७० त त्यांनीं उत्तर कोंकणांत मोठें आरमार पाठवून पोर्तुगीजांचें एक मोठें जहाज पकडून आणिलें. शिद्याचा डोळा दांडाराजपुरावर होता. त्यामुळें त्यानें महाराजांच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन (१६७२) त्या स्थळावर हल्ला करून तेथील तटबंदी मोडून आसपासचे कांहीं किल्ले सर केले. या कामीं त्याला मोंगलांचें पाठबळ होतें, म्हणून महाराजांनीं आरमार देऊन मोरोपंतांनां सुरतेवर पाठविलें. त्याचवेळीं त्यांनीं वसई-डहाणूच्या भागांतील जव्हारकराकडील बरींचशीं ठाणीं काबीज करून फिरंग्यांचा घोडबंदर किल्लाहि घेण्याचा प्रयत्न केला. पुढें १६५३ त शिद्दी व मोंगल नागोठण्याच्या आसपासचीं गांवें उध्वस्त करून लोकांनां गुलाम करून नेत असतां, महाराजांनीं अचानक त्यांच्यावर सैन्य धाडून त्यांचा पुरा मोड केला. बहुधा १६६१ पासून मधून मधून महाराजांनीं जंजिऱ्यास वेढा घालण्याचा उपक्रम सुरू केला होता. त्याप्रमाणें १६७५ तहि घातला असता दुसरीकडेहि गोव्याकडील फोंडा किल्ल्यावर त्यांनीं स्वारी केली. कर्नाटकांत महाराज गेले त्यावेळीं सर्व कोंकणचा राज्यकारभार त्यांनीं आण्णाजी दत्तो सचिवाकडे सोंपविला असतां त्यानें जिल्ह्यानिहाय अधिकारी नेमून जमाबंदी केली; ती न्यायाच्या व समतेच्या तत्वावर केली होती असें इंग्रज इतिहासकारहि म्हणतात (जर्व्हिस ९३, मुंबई ग्याझे. पु. १ भा. २. ७१). या वेळीं सुद्धां मराठयाच्या दर्यावरील हालचाली सुरूच होत्या. पुढें १६७१ त महाराजांनीं मोंगलाचा सुरतेपर्यंतचा प्रदेश लुटून खांदेरी बेट घेतलें. त्या बेटावर इंग्रज व पोर्तुगीज हे दोघेहि हक्क सांगत. इंग्रजी आरमार तेथें असतांना त्याचा डोळा चुकवून मराठयानीं बेट घेतलें. तेव्हा इंग्रज चालून आले असतां मराठयानीं त्याचा सर्वांचा फन्ना उडविला (मराठे व इंग्रज २८). या वेळीं इंग्रजास गुप्तपणें मदत करणारा शिद्दी त्यानां उघडपणें मिळाला होता. त्या दोघानीं पुष्कळ दिवस खांदेरीस वेढा दिला, परंतु त्यांचा प्रयत्न निष्फळ झाला; इकडे उलट १६८० च्या जानेवारींत एकदम महाराजांनीं शिद्याचें उंदेरी बेटहि काबीज केलें व तेथें तटबंदी बांधली. शेवटीं नाइलाजानें इंग्रजानें महाराजाशीं तह केला व शिद्याला मुंबई बेटावर येऊं न देण्याचें कबूल केलें. स. १६७२ त दाभोळ व कल्याण हीं गांवें बरीं होतीं असें फ्रायर लिहितो. या वेळीं वसई व राजापूर हीं बंदरें भरभराटीचीं होतीं; तसेंच महाड हें रायगड राजधानीजवळ असल्यानें बरेंच वाढून व्यापाराची मोठी पेठ बनलें होतें. कल्याण ते रायगडमधील प्रांताला मात्र लढायाच्या मुळें बराच उपसर्ग पोहोंचे, परंतु बाकीचें कोंकण सुस्थितींत होतें, असें इंग्रज इतिहासकार कबूल करतात (बॉबे ग्याझे. व्हा. १ भा. २. पृ. ७३) महाराजाची जमीनमहसुलपद्धति पूर्वीच्या पद्धतीपेक्षा श्रेष्ठ प्रकारची होती; तसेंच बहुतेक सर्व प्रकारच्या लोकानां लष्करात दाखल होऊन उदयास येण्याची संधि मिळे. नुसत्या किल्ले बांधण्याच्या कामावर हजारों लोक कित्येक वर्षेपर्यंत पोट भरीत. महाराजाच्या समकालीन असलेल्या ख्रिस्ती अथवा मुसुलमान राजापेक्षां ते श्रेष्ठ असून त्याच्या कारकीर्दींत कोंकण जितकें भरभराटीतें होतें तितकें तें ऐतिहासिक काळात बहुधा केव्हांहि नव्हतें, ही गोष्ट इंग्रज इतिहासकार व कार्फीखान यानींहि कबूल केली आहे. कोंकणांतील किल्ल्यांचा व महाराजाचा बराच संबंध येत असल्यानें त्याच्याबद्दल येथें त्रोटक वर्णन सांगतों. बहुतेक सर्व किल्ले निसर्गसिद्ध सोई पाहून बांधलेले असत. समुद्राकिनाऱ्यास असलेला किल्ला जलवेष्टित कड्यावर असे. मैदानी किल्ला नदीच्या किंवा घांटाच्या जवळील एखाद्या उंच पहाडावर असे व सह्याद्रीच्या रांगेंतील किल्ला त्याच्या एखाद्या दुर्गम कड्यावर किंवा सोंडेवर असे. किल्ल्यांची रचना बहुतेक सारखीच असे. भोंवतीं मोठा तट व तटास बरेचसे बुरूज असत. तटास बहुधा एकच वेस असून वेशीजवळील तटाचा भाग फार मजबूत असे. वेशीपाशीं दोन बुरूज असून तेथून

आंतील दुसऱ्या वेशीपर्यंत अरुंद, वळणावळणानें गेलेली व दोन्ही बाजूला उंच तट असलेली अशी वाट असे. त्यावेळीं हल्लींप्रमाणें महांकाळी (हॉवित्झर) तोफा नसल्यानें या किल्ल्यांचा फार उपयोग होई. मुख्य तटाच्या आंत एक बालेकिल्ला असे व त्या भोंवती शिपायांच्या कोठड्या, दारूगोळ्यांचीं कोठारें व पागा वगैरे असत. महाराजांनीं बांधिलेल्या बहुतेक किल्ल्यांत एक देवीचें व मारुतीचें अशीं देवळें असत. अशा किल्ल्यांत विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, मालवण, पद्मगड, रायगड, विशाळगड,वगैरे किल्ले महत्वाचे असून पद्मगडास महाराजांचा जहाजें बांधण्याचा कारखाना होता. कुलाबा व मालवण येथें आरमाराचीं मुख्य ठाणीं होतीं. महाराजांच्या मृत्यूनंतर वाडीच्या सावंतानें कर्ली नदीच्या दक्षिणेकडील मुलूख काबीज केला परंतु संभाजीराजे गादीवर आल्यानंतर त्यांनीं सावंतानें घेतलेला प्रांत परत मिळविला. कलुशाला कोंकणच्या जमीनमहसुलाचें काम मिळालें असतां त्यानें कांहीं नवीन कर बसवून मामलती मक्त्यानें देण्याची रीत पाडली. खादेरीउंदेरीबद्दल संभाजीराजे व शिद्दी यांत पुष्कळ दिवस भांडण चालू होतें. औरंगझेबाचा मुलगा अकबर हा राजे याच्या आश्रयास आला होता. त्यामुळें औरंगझेबानें १६८२ च्या सुमारास संभाजीराजाच्या कोंकण किनाऱ्यावर आरमार पाठवून धुमाकूळ घालण्यास सुरवात केली; पण त्यांत त्याचाच पराभव झाला. तेव्हां औरंगझेबानें पुन्हां १६८४ त बहादुरखान व सुलतान मुअज्जिम यांच्या बरोबर प्रचंड सैन्य (नुसतें घोडदळ ४० हजार असून बाकी पुष्कळ पायदळ होतें असें आर्म म्हणतो) देऊन दक्षिण कोंकणांत पाठविलें. एवढी थोरली स्वारी दक्षिणकोंकणांत यापूर्वी व यानंतर क्वचितच झाली असेल. संभाजीराजांनीं या स्वारीला समोरासमोर तोंड न देतां गनिमी पद्धतीनें लढाई सुरू ठेविली. आपण स्वतः विशाळगडीं राहून शत्रूची रसद लुटून त्यांच्या एकटया दुकटया टोळीचा फन्ना पाडण्याचा उपक्रम सुरू केला. मुसुलमानांनींहि किल्ले घेण्याच्या अवघड कामास हात घातला नाहीं. कारण प्रत्येक किल्ल्यावर शिबदी वगैरे तयारी जय्यत असे. वाटेंत मुसुलमानांचे बहुतेक घोडे, गुरें ढोरें मेलीं व अन्नाची टंचाई फार झाली. शिवाय त्यांची सगळीकडची रसद मराठयांनीं मारल्यामुळें त्यांनां नारळ व कुडु नांवाच्या अगदीं हलक्या धान्यावर निर्वाह करावा लागला. सुरतेहून येणारी सामानसुमानाचीं व धान्याचीं जहाजेंहि मराठयांनीं लुटलीं.तेव्हां मोठया नामोशीनें कांहीं एक कार्यसिद्धि न होता मुअज्जिमला परत फिरावें लागलें. या संधीस फिरंग्यांनीं कारंजे अशेरी व सांताक्रूस हीं ठिकाणें मराठयांपासून घेतलीं. म्हणून संभाजीराजे व शहाजादा अकबर यांनीं फिरंग्यांचा कल्याणजवळील मुलुख उध्वस्त करून वसईस वेढा दिला. तेव्हां त्यांनीं तह केला. यापुढें तीन चार वर्षें कोंकणांत विशेष कांहीं घडलें नाहीं. आदिलशाही नामशेष झाल्यानें तिच्या ताब्यांतील कोंकण मोंगलांकडे आलें. संभाजीराजे यांच्या फिरंगी, हबशी व सावंत यांच्याशीं नेहमीं झटापटी होत असत. शेवटीं इ. स. १६८९ त शिरके यांनीं कांहीं गडबड केल्यामुळें ती मोडण्यास कलुशा संगमेश्वरास गेला असतां त्याच्या मदतीस म्हणून संभाजीराजे खेळण्याहून तेथें गेले त्यावेळीं शेख निजामानें त्यानां दग्यानें पकडून औरंगझेबाकडे पाठविलें. संगमेश्वर येथें कलुशाचा वाडा होता. हल्लीं त्याचा नुसता चौथरा दृष्टीस पडतो. संभाजीराजांचा शेवट झाल्यानंतर मोंगलानें सात महिने वेढा देऊन शेवटीं फितुरीनें रायगड घेतला व येसुबाईसाहेब व शाहुराजे यानां औरंगझेबाकडे पाठविलें. यापुढें रायगडचें महत्व नाहींसें झालें तें झालेंच. या सुमारास औरंगझेबानें शिद्दीला कोंकणातील त्याच्या प्रांताची सनद करून दिली. शिद्यानें सुवर्णदुर्ग, अंजनवेल, राजपुरी व रायगड हे किल्ले इ. स. १६९९ च्या सुमारास घेतले. परंतु मराठयांचें आरमार या वेळीं प्रबळ झाल्यानें व त्याचा आरमाराधिपति कान्होजी आंग्रे हा असल्यानें त्यानीं शिद्याकडील बराचसा प्रांत परत मिळविला. आंग्र्यांचें मुख्य ठिकाण कुलाब्यास असून सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे त्याचे मुख्य सुभे होते. तेथें दारूगोळ्याची मुख्य कोठारें, आरमारी लष्कर, जहाजें बांधण्याच्या गोद्या वगैरे असत. या काळीं मराठयांचें आरमार सर्व आरमारात प्रबळ असून यूरोपीय अगर मुसुलमानी कोणत्याहि व्यापारी गलबतास मराठयानां झडती दिल्याशिवाय किनाऱ्यावर फिरकतां येत नसे; कान्होजीला हे यूरोपियन व मुसुलमान चळचळा कांपत असत. मोंगलांच्या ताब्यांतील प्रांतात सामान्यतः जुलूम, पुंडाई व बेबंदशाही होती. इ. स. १६९० त काकाजी या पाळेगारानें तिकडे लुटालूट चालविली होती व शिद्दी हा इंग्रजांच्या मागें लागला होता. आणि औरंगझेबानें फिरंग्याचा पिच्छा पुरविला होता. परंतु पुढें त्यांच्याकडून बंदुका घेण्याच्या अटीवर त्यानें तह केला. मराठे व फिरंगी यांचेंहि इ. स. १६९५ त कडाक्याचें युद्ध झालें. याच सुमारास (विशेषतः इ. स. १६९७ सालीं) कप्तान किड या नांवाचा एक इंग्रज सर्व कोंकणभर चांचेगिरी करीत होता. तो अतिशय दुष्ट व जुलमी होता.

राजाराम महाराजांनीं कोंकणांत सुव्यवस्था लावण्याचा प्रयत्न केला; परंतु शिद्दी व मोंगल यांच्या स्वाऱ्यामुळें व देशांत स्वस्थता नसल्यानें त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. फिरंग्याच्या अंगीं स्वतःचा मुलुख सांभाळण्याची ताकद नव्हती. शिद्याला आपल्या प्रजेच्या हालअपेष्टाची दाद नसे. यामुळें त्याच्या प्रांतात व्यापार मंदावला. त्यावेळचा एक उल्लेख असा आढळतो कीं, मुंबईहून निर्गत होणाऱ्या मालावर इंग्रज शें ५ टक्के, ठाण्यास फिरंगी शें. ८ टक्के व कल्याणास मोंगल आपल्या लहरीप्रमाणें वाटेल तशी जकात वसूल करीत. शाहू महाराज देशीं आल्यावर व रांगण्यावर चालून गेल्यावर ताराबाई या मालवणास जाऊन राहिल्या

होत्या. यावेळीं कान्होजी आंग्रे फार प्रबळ होता. त्यानें सर्व युरोपियनांचा नक्षा पार उतरून टाकला होता. मुंबई ते सावंतवाडीपर्यंतचें सारें कोंकण त्याच्या ताब्यांत होतें. तो प्रथम शाहूराजे यांच्या विरुद्ध होता. परंतु पुढें इ. स. १७१३ त पेशव्यांनीं त्या दोघांचा समेट करून दिला. त्यावेळीं कान्होजीला सरखेल हा किताब व बराच सरंजाम मिळाला. लागलीच तो व बाळाजी विश्वनाथ यांनीं मिळून शिद्दीवर स्वारी करून त्यानें बळकाविलेला सारा मुलुख सोडविला. इंग्रजानें कान्होजी विरुद्ध इ.स.१७१७च्या एप्रिलांत विजयदुर्गास वेढा घातला. त्यावेळीं इंग्रजांचें आरमार.मोठें करोल होतें. त्यावर १४८ तोफा व व्हिक्टरी, रिव्हेंज, हंटर अशीं याच स्वारीसाठीं २ वर्षे खपून बांधलेलीं मजबूत लढाऊ जहाजें व सुसज्जित असें ६ हजार सैन्य होतें.परंतु कान्होजीनें त्याचा खरपूस समाचार घेतला. तेव्हां त्याच्या माऱ्यापुढें "नामोहरम होऊन (इंग्रजांस) मुठींत नाक घेऊन आरमारासह मुंबईस परत यावें लागलें" (सरदेसाई. मरा. रिया. मध्य विभा. पृ. ६५). पुढें पुन्हां प्रचंड तयारी करून फिरंग्याची मदत घेऊन इ. स. १७२१ त इंग्रज कुलाब्यावर चालून आला. "परंतु पूर्वीप्रमाणेंच त्यास याहि प्रसंगीं हार खावी लागली. कान्होजी आंग्रे जिवंत असेपर्यंत या पाश्चात्यांचा शिरकाव पश्चिम किनाऱ्यावर झाला नाहीं" (कित्ता). स. १७२० सालीं मराठयांचे स्वराज्य दिल्लीकर मोंगलानें कबूल केल्यामुळें कोंकणचा समावेश स्वराज्यांत झाला आणि त्यापुढें मुसलमानांची त्यावर सत्ता उरली नाहीं. मराठयांचे निरनिराळे अधिकारी कोंकणचे निरनिराळे सुभे पाडून त्यावर नेमण्यांत आले. कोल्हापुर व सातारा या राज्यांची वांटणी झाली. त्यात विजयदुर्गच्या दक्षिणेकडील कोंकण कोल्हापुरकरांच्या ताब्यात गेलें. कान्होजी आंग्रे यावेळीं वारला असल्यानें व त्याच्या मुलांत तंटे सुरूं झाल्यामुळें, त्याच्या प्रातांत अव्यवस्था माजली. इ. स. १७३३ त मराठयांनीं शिद्दीवर स्वारी केली तेव्हा शिद्याचा व इंग्रजाचा दोस्तीचा तह झाला. एकंदर मराठी साम्राज्या विरुद्ध हा तह केला नव्हता. बाह्यात्कारीं मराठयांपासून शिद्यांचें संरक्षण करणें असा त्यांत हेतु दर्शविला होता खरा; परंतु शिद्यांच्या मुलुखांतून गोमांस बिनहरकत आपणास मिळावें (कारण आसपासच्या हिंदुराजांच्या राज्यांतून तें मिळणें अशक्य होतें) हा त्यांत इंग्रजाचा अंतस्थ हेतु असावा. यानंतर शिद्यांच्या घरांत तंटे सुरू झाले. त्याचा फायदा घेऊन पेशव्यानीं रायगड, तळें, घोसाळें वगैरे गेलेला बराच मुलूख परत मिळविला. यावेळीं इतर शत्रू नाहींसे होऊन फक्त फिरंगी काय ते उरले होते; त्यांनां नामोहरम करून सर्व कोंकण मराठी साम्राज्याखालीं आणण्याची संधि आली होती व तिचा फायदा पेशव्यांनीं घेतलाहि. फिरंग्यावर हल्ला करण्यास कारणेंहि भरपूर होतीं; ते मराठयांची वारंवार आगळीक करीत, आंग्र्याच्या घरगुती भांडणांत हात घालीत आणि सर्वांत महत्वाचें कारण म्हणजे आपल्या ताब्यांतील व मराठी हद्दींतील हिंदुलोकांवर जुलूम करून त्यांनां बाटवीत, आणि गांवांची जाळपोळ व लुटालूट करीत. या सर्व कारणांमुळें पेशव्यांनीं त्यांची खोड मोडण्याच्या प्रयत्नास यावेळीं हात घातला. इ. स. १७३९ पूर्वी ८।१० वर्षे मराठी दरबारांत फिरंग्यापासून वसई व साष्टी प्रांत काबीज करण्याचे खलबत चालूं होतें, असें उपलब्ध पुराव्यावरून दिसतें. रा. ब. पु. बा. जोशी आपल्या लेखांत म्हणतात. कीं, "मालाड परगण्याचे सरदेसाई व सरदेशमुख अंताजी रघुनाथ कावळे यांनीं फिरंग्यांचा धर्मच्छलाचें गाऱ्हाणें थेट पेशवे व शाहुमहाराज यांच्या कानीं घातलें होतें. वसई प्रांत काबीज केल्यास आपण मदत करण्यास तयार आहों, असें या कावळ्यांनीं थोरल्या बाजीरावसाहेबांनां कबूल केलें होतें. स. १७२९ सालीं श्रीमंतांनीं अंताजीपंतांशीं खलबत सुरू केलें. पुढें चिमाजी आप्पांनीं अंताजीस कळविलें कीं "अवघा प्रसंग तुम्हीं आणून दिला आहे. कार्येहि कर्तव्य आहेच आहे." परंतु त्या वेळीं श्रीमंत दुसरीकडे गुंतल्यानें हें काम झालें नाहीं; तें १७३७ त फुरसत सापडल्यावर त्यांनीं हातीं घेतलें." त्या वर्षी आप्पासाहेब यानीं साष्टींवर स्वारी करून घोडबंदर व वसईची खाडी काबीज करून ठाणेंहि घेतलें. तेव्हां मराठे हे मुंबईवरहि चालून येतील अशी भीति वाटून इंग्रजांनीं फिरंग्याच्या अनुमतीनें वांद्र्याचा किल्ला पाडला. त्यांनीं फिरंग्यास दारूगोळयाची व सैन्याचीहि मदत केली. परंतु मराठयांपुढें तिचा उपयोग झाला नाहीं. पुढें १७३९ चे जानेवारींत आप्पासाहेब हे सेनापति होऊन फिरंग्यावर चालून आले व त्यांनीं एका सपाटयात डहाणू, केळवे, शिरगांव, तारापुर, खत्तलवाडा हीं ठाणीं किल्यासुद्धां जिंकलीं तें पाहून वेसावा व धारावी येथील किल्लेदारांनीं शरण येऊन ते किल्ले आप्पासाहेबांच्या हवालीं केले. या वेळीं उत्तरेस नादिरशहावर चालून जाण्यास श्री. नानासाहेबांनीं आप्पांनां बोलाविलें होतें; परंतु त्यांनीं इकडे वसईस वेढा दिला असल्यानें ते तिकडे गेले नाहींत; मध्यें वेढा १७ फेब्रुवारी १७३९ स बसला. तेव्हां फिरंग्यानें इंग्रजांची मदत मागितली; परंतु मदत पाठविण्यास इंग्रजाची छाती झाली नाहीं. समुद्राकडील बाजू मानाजी आंग्र्यानें रोंखून धरली व जमीनीवरून सर्व बाजूनें आप्पांचा वेढा बसला त्यामुळें फिरंग्यांची उपासमार होऊन त्यांनीं किल्ला १६ मे रोजीं मराठयांच्या हवालीं केला. तेव्हां मुंबईचा इंग्रज फार भ्याला व त्यानें आपले वकील कॅ. गॉर्डन यास शाहुमहाराजांकडे व कॅ. इंचबर्ड याला चिमाजीआप्पाकडे स्नेहयाचना करण्यास पाठविलें. त्यावेळीं तह होऊन असें ठरलें कीं, इंग्रजानें फिरंग्यास मदत करूं नये. मराठयांस दारुगोळ्याचा पुरवठा करावा; त्यांच्या गलबतांस मोहीम व वांद्रे येथील दर्यांत बिनहरकत येऊं द्याव वगैरे. मराठयांनीं या वेळीं डहाणु,

तारापूर व वसई येथील किल्ल्यांची डागडुजी करून केळवें येथें नवीन किल्ला बांधला. येथून फिरंग्यांची उत्तर कोंकणांतील सर्व सत्ता मावळली. पुढल्याच वर्षी (१७४०) मानाजी आंग्र्यानें त्यांच्या आरमाराचा नाश केला व इ.स.१७४१ त खंडोजी माणकरानें चौल घेतलें; तेव्हां सारा फिरंगी गोव्यास पळून गेला. बहुतेक सारें कोंकण (शिद्दी व जव्हारकर सोडून) मराठ्यांच्या ताब्यांत आलें. शिद्याचा प्रांत अगदींच थोडा होता व जव्हारकराचा सारा डोंगराळ होता म्हणून मराठ्यांनीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. यापुढील काळ शांततेचा व भरभराटीचा गेला.मराठ्यांनीं प्रजेच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था ठेविली होती (बॉंबे ग्या. पु.१७व्हॉ. १भा. २). फिरंग्यांनीं ज्याप्रमाणें हिंदूंचा धार्मिक छळ केला, त्याप्रमाणें मराठ्यांनीं मुसुलमान व ख्रिस्ती प्रजेचा छळ केला नाहीं. एवढेंच नव्हे तर उलट त्यांच्या देवस्थानांना इनामेंहि दिलीं. याबद्दल इंग्रज इतिहासकारांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत. पुढें इ. स. १७६० त रामाजीपंत (कोंकणचे) सर सुभेदार यांनीं फिरंग्याच्या मदतीनें जंजिऱ्यास वेढा दिला, तेव्हां इंग्रजानें शिद्यास मदत केली; इतक्यांत पानिपत झाल्यामुळें पंतांनीं वेढा उठविला. इ. स. १७६६ मध्यें इंग्रजानें साष्टी वगैरे बेटें घेण्याचा प्रयत्न चालविला, परंतु थोरल्या माधवरावांच्या अखेरपर्यंत त्याच्या हुषारीमुळे तो सफल झाला नाहीं. इंग्रजानें १७७१ मध्यें पुण्यास वकील पाठवून, मुंबईला धान्य पुरवठ्याकरितां साष्टी बेट व कंपनीची जहाजें बांधण्याच्या कामास लाकूड पाहिजे म्हणून वसई आम्हांस द्यावी असें बोलणें लाविलें. पण तें चार वर्षे तसेंच लोंबकळत राहिलें. इ.स. १७७४ त फिरंग्यानीं साष्टी घेण्यासाठीं मोठी तयारी केली. तेव्हां मुंबईजवळ दुसरे कोणीहि यूरोपियन राहूं नयेत म्हणून इंग्रजानें ६०० गोरे व १२०० हिंदी सैन्य ठाणें किल्ल्यावर पाठविलें. किल्ल्यांत मराठे फक्त ५०० च होते पण त्यांनीं इंग्रजाचे १०० गोरे पहिल्याच दिवशीं ठार केले व निकराची लढाई दिली. अखेर कांहीं दिवसांनीं उपासमारीनें त्यांनीं किल्ला सोडला. थोड्या काळानें वेसाव्याचा किल्लाहि इंग्रजानें घेतला. पुढें तर रघुनाथराव दादा यांनीं भाऊबंदकी माजवून १७७५ च्या मार्चांत सुरतेच्या तहान्वयें वसई व साष्टी इंग्रजास देऊन टाकिलीं. परंतु पुन्हां १७८२ त सालबाईच्या तहाप्रमाणें साष्टी, घारापुरी व करंजा यांशिवाय वसई आदिकरून सर्व प्रांत इंग्रजानें मराठ्यांनां परत दिला. मध्यंतरीं १७७६ त तोतयाचें बंड माजलें. तो रत्नागिरीच्या किल्ल्यांतून सुटून मोठ्या सैन्यानिशीं कोंकणांतील २० किल्ले हस्तगत करून बोरघाट्यावर आला. तेथें कारभाऱ्यांनीं पाठविलेल्या सैन्यानें त्याचा पराभव केला तेव्हां तो पळून गेला. त्याला मिळण्यासाठीं दादासाहेब हे सुरतेहून निघाले. परंतु वरील बातमी समजतांच ते तारापुरावरून दर्यानें मुंबईस गेले. पुढें १७७८ त इंग्रजांनीं दादासाहेबांचा पक्ष घेऊन त्यांच्याकडून वसई व खांदेरी उपटली व ते पुण्यावर चालून गेले; परंतु त्यांचा वडगावांस पुरा मोड झाला. अखेर हो नाहीं करितां करतां सालबाईच्या तहात वर सांगितल्याप्रमाणें इंग्रजास वसई प्रांत ओकावा लागला. यापुढें सुमारें ३१ वर्षें कोंकणच्या राज्यकारभारांत फरक झाला नाहीं. जव्हारकराचा बराचसा मुलूख मात्र मराठ्यांनीं घेतला. विशाळगडास बंड झाल्यानें सन१७७७ त कोल्हापूरकरांनीं मालवण घेतलें. वाडीकरावर १७८३ त स्वारी केली. पुढें सन १७८६ त कोंकणात (कोल्हापुरकराच्या प्रांतांत) बंड उद्भवल्यानें कोल्हापूरकरांनीं वेंगुर्लें, निवती, विशाळगड इत्यादि ठिकाणावर हल्ले केले. तेव्हा सावंतानें फिरंग्याची मदत घेऊन वेंगुर्लें व निवती हीं गावें परत मिळविलीं; आणि शिद्याच्या मध्यस्थीनें इतर प्रांतहि परत मिळविला. यानंतर इसवी सन १८०३-१२ पर्यंत सावंत व कोल्हापूरकर याच्यात नेहमीं कटकटी चालू होत्या. पुढें १८१२ त कोल्हापूरकर व पेशवे याच्यामध्ये झालेल्या तहाचा फायदा घेऊन इंग्रजानें कोल्हापूरकरांकडून मालवण व सावंताकडून वेंगुर्लें घेऊन तेथें आपली फौज ठेविली. तथापि त्या मुलुखाच्या वसुलावर पेशवे, कोल्हापूरकर, सावंत, बावडेकर यांचे निरनिराळे हक्क होते इकडे१८०२ मध्यें होळकरानें पुण्यावर स्वारी केल्यानें रावबाजी हे महाडास व तेथून चौलास आणि तेथून इंग्रजांच्या मदतीनें वसईस गेले. ते तेथें गेल्याबरोबर इंग्रजानें कर्नल क्लोज व एल्फिन्स्टन यांनां तेथें पाठवून श्रीमंतांशीं तह केला (३१ दिसेंबर १८०२). या तहानेंच श्रीमंतांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. मात्र या तहानें कोंकणच्या वाटणींत फरक झाला नाहीं. इ. स. १८१७ त कोंकणांत पेंढाऱ्याचा दंगा उसळला. या वर्षाच्या जूनमध्यें पेशव्याचा व इंग्रजांचा तह होऊन त्या तहान्वयें इंग्रजास सर्व उत्तर कोंकण मिळालें. पावसाळ्यानंतर रावबाजीनीं कोळी-भिल्ल-रामोशाकरवीं कल्याणावर हल्ला करवून बोरघांट घेतला व सह्याद्रींतील सर्व घाट रोखले. त्यामुळें पुण्याच्या (रेसिडेंट) इंग्रजाला मुंबईस बातमी पाठविणें ती बाणकोटवरून पाठवावी लागे. रावबाजीनीं पुढें कोथळा घेतला; परंतु इंग्रजानें तो व अवचितगडादि इतर किल्ले घेतले.याच सुमारास पंतसचिव हे इंग्रजाला शरण गेले ता. १० मे १८१८ रोजीं रायगड पडला व सप्टेंबर अखेर कोंकण इंग्रजानें घेतलें. चिमाजीआप्पा हे त्याच्या हातीं लागले. त्यांस त्यांनीं वसई, ठाणें येथें प्रथम ठेवून नंतर काशीस रवाना केलें. पेशवाई गेल्यावर इंग्रजानें पेशव्याच्या मांडलिक संस्थानांशीं (कोंकणांतील) स्वतंत्रपणें तह करून त्यांचे हक्क निश्चित केले. सावंतवाडीकरापासून मालवण ते पोर्तुगीज सरहद्दीपर्यंतचा प्रांत घेतला. इ. स. १८२२ त आंग्रे हे मांडलिक बनले;परंतु १८४० त संस्थानिक निपुत्रिक वारल्यामुळें त्याचें संस्थान खालसा केलें. याप्रमाणें यावेळीं सर्व कोंकण इंग्रजांनीं हस्तगत केलें.

उ त्त र कों क णां ती ल लो क व स्ती.—रा. ब. पु. बा. जोशी आपल्या लेखांत म्हणतात "या भागांत मूळचे रहिवासी म्हणजे आगरी, कोळी (डोंगरी व दर्यावर्दी), वारली, कातकरी व ठाकूर हे होत. कुणब्यांत वैरी, कोंकणी, मराठे व चौशेळे हे जुने आहेत. पूर्वी सांगितल्याप्रमाणें कोंकणावर मौर्य, क्षत्रप, आंध्रभृत्य, पश्चिमचालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य, शिलाहार, यादव वगैरे राजघराणीं झालीं; तेव्हां या प्रत्येक घराण्याबरोबर महाराष्ट्र, गुजराथ व मद्रास इकडील लोकहि कोंकणांत आले. इ. स. १३४७ त मुसुलमानी सत्ता झाल्यावर गुजराथेंतून बरेचसे मुसुलमान खालीं उतरले; तत्पूर्वी थोडे फार अरब आले होते. या अर्वाचीन मुसुलमानानां कोंकणी मुसुलमान असें म्हणतात; ते मराठीच बोलतात. सातव्या शतकांत इराणच्या यझ्दगर्दराजाचा पराभव अरबानी केल्यामुळें, तेथील पारशी लोक संजाण, तारापुर, ठाणें, नवसारी इकडे येऊन राहिले. नंतर फिरंगी आले व त्यांनीं आपली संख्या हिंदूंना बाटवून जास्त वाढविली. कोंकणात पूर्वी कानडी भाषा बोलली जात असे. शिलाहार हे मूळचे द्रविड देशांतील असल्यानें त्याच्या संसर्गानें कानडी भाषा इकडे आली असावी यांच्या वेळेत काहीं कायस्थ प्रभूंची वस्ती इकडे झाल्याचें प्राचीन लेखावरून आढळतें. ब्राम्हणात सामवेदी व गोवर्धन हे प्राचीन रहिवासी होत; चिंचणी, सोपान्याकडील कांहीं इनाम जमिनी शातवाहनानीं या ब्राह्मणांना दान केल्या होत्या. त्याचे पुरोहित कात्यायनसूत्री शुक्लयजुर्वेदी होते. यादव राजवटींत माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मण, सोमवंशी क्षत्रिय व पाठारे प्रभु हे इकडे आले देवगिरीकर या नांवाचे यजुर्वेदी ब्राह्मण पुरोहित असत. इ. स. १२८० च्या सुमारास कृष्ण नावाचा यजुर्वेदी ब्राम्हण उत्तरकोंकणचा महाप्रधान (गव्हर्नर) असल्याचें मागें सांगितलेंच आहे. पुढें भीमदेवानें माहीमकडे स्वतंत्र सत्ता स्थापिली. तेव्हां पुरुषोत्तम कावळे हा यजुर्वेदी ब्राह्मण पुरोहित इकडे आला होता; त्याच्या बरोबर आलेल्या ब्राह्मणाचेच वंशज हल्लींच्या मुंबई बेटांत आढळणारे यजुर्वेदी ब्राह्मण होत. इ. स. १७३९ तील अंताजी रघुनाथ हा वरील कावळे घराण्यातील होय. यानें पेशव्यांना मदत केल्यानें त्याची मालाडची जहागीर फिरंग्यानें जप्त केली होती. पुढें पेशव्यांनीं ती त्याला दिली नाहीं असें म्हणतात. यानंतर पळशीकर ब्राह्मण व कोंकणस्थ ब्राह्मण यांच्यात अग्निहोत्रासंबंधीं भांडणतंटे सुरू झाले व पेशव्यानीं तो तंटा निकालासाठीं नाशिकास पाठविला असता तेथें पळशीकरांसारखा निकाल झाला. परंतु पळशीकरांच्या अन्यायी लोकानां शिक्षा न झाल्यामुळें ते मुंबईस इंग्रजांच्या आश्रयास गेले. या कालापासून वसई व साष्टी प्रांतीं राहणाऱ्या पळशीकरांनां पळशे या नांवानें त्याचे प्रतिस्पर्धी लोक संबोधूं लागले. हे सर्व लोक माध्यंदिन शाखी शुक्लयजुर्वेदी असून त्यांच्याकडे उत्तर कोंकणांतील ज्योतिष व पौरोहित्य वंशपरंपरेनें चालू आहे. सोमवंशी क्षत्रियाचे पूर्वज हे भीमदेव यादवाबरोबर आलल्या मूळच्या देवगिरी (पैठण) प्रांतांतून इकडे आले. यानां पाचकळशी असेंहि एक नांव आहे. हें नांव लग्नांत वराच्या चौरंगास असलेल्या पांच कळसावरून निघालें असें काहीं म्हणतात परंतु हें नाव 'पंचकुल-वंशी या शब्दत्रयांपासून साधलें गेलें असावें. असें रा. ब. पु बा. जोशी हे म्हणतात. प्राचीन काळीं क्षत्रियराजांच्या दरबारात निरनिराळया खात्यांचे पाच प्रधान असत. त्यांनाच पंचकुळ म्हणत. या लोकाची वस्ती मुंबई, साष्टी, वसई, माहीम, उरण इकडे फार असून त्याच्यांत वसईकर, साष्टीकर, उरणकर असे अनेक पोटभेद पडले आहेत. यांच्या प्रमाणेंच पाठारे प्रभु लोकाचीहि वस्ती मुंबई, माहीम साष्टी, ठाणें, वसई इकडे आढळते. याना पाताणे किंवा पैठणेप्रभु असेंहि म्हणतात. पाठारे हें नांव जातिवाचक नसून (रा. ब. पु. बा. जोशी यांच्या मतें) जातिसुचक असावें. पाठारे हा शब्द प्रतिहार या संस्कृत शब्दापासून निघाला आहे (प्रतिहार = पडिहार = पाठारा). पुराणांतरीं प्रतिहार शब्द परिहार-परिहर असा आढळतो. प्राचीन इतिहासातील प्रतिहार राजे पराक्रमी असून त्याचीं चार घराणीं होतीं. पैकीं कनोजचें घराणें मुख्य होतें. त्या घराण्याचा संस्थापक नागभट असून त्यानें इ. स.च्या ९ व्या शतकात हर्षाच्या चक्रायुध नावाच्या वंशजाचा पराभव करून आपली सत्ता स्थापिली. या घराण्यातील महेंद्रपाल हा फार पराक्रमी राजा झाला होता. त्याच्या पदरीं राजशेखर कवि होता; हा महाराष्ट्रीय यजुर्वेदी ब्राह्मण होता. या घराण्यांतील शेवटचा राजा राज्यपाल. याचा गझनीकर महंमदानें १०१८ त पराभव केला व राजधानींतील लोकाची कत्तल केली; त्यावेळीं तेथील प्रजा पळाली. बहुधा याच सुमारास प्रतिहार किंवा पाठारे याचे पूर्वज कनोजहून देवगिरीकर यादवाच्या आश्रयास पैठणप्रांतीं आले असावेत. पाताणे हा पैठणे या शब्दाचा अपभ्रंश होय (असें रा. ब. जोशी म्हणतात.). सह्याद्रिखंडांतहि "पैठणे पत्तनें शप्त्वा मया कोपवशात्किल । पाठारीयाः प्रसिद्धा ये पैठणाख्या भवंतु ते॥" असा उल्लेख आहे. पाताण्याबरोबर पैठणहून आलेल्या कावळे आदिकरून यजुर्वेद्यानांहि पैठणकर म्हणत असत. गोव्याच्या सुभेदाराचा मुलगा बहादुर गेलानी यानें स. १४९० त साष्टीकडील कांहीं ब्राह्मणांस ज्या सनदा दिल्या आहेत त्यांत त्यांनां पैठणकर असेंच म्हटलें आहे. कांहींचें म्हणणें कीं, पाठारे हे गुजराथेंतून आले असावेत. परंतु हें म्हणणें टिकण्यासारखें नाहीं कारण त्यास सबळ आधार नाहीं." (या लेखांत रा. ब. पु. बा. जोशी यांनीं आमच्याकडे पाठविलेल्या लेखांतील घेतलेला भाग अवतरणचिन्हांकित आहे.)

[संदर्भग्रंथः—वि.ज्ञा. वि. पु. २१. अं. १-२; पु. २२.पृ.९९; बृहत्सं.; राजतरं. रघुवंश; महावंशो; भारतवर्षीय भूवर्णन;

शिकंदरी भाषांतर; कौस्तुभचिंतामणि; मराठे व इंग्रज; डफ; एशि. रिसर्चेस. व्हॉ. १५; हीरेन-व्हॉ. २; टॉड-पृ. १८७; स्मिथ-व्हॉ. १-२; बॉम्बे ग्याझे. व्हॉ. १३, १४, आणि १६; भा. २, ३; एलफिन्स्टन-१६६; रॉबर्टसन-३८; बर्ड-हिस्टरी गुजराथ; इंपी ग्याझे. व्हॉ. १५; इलिअट. व्हॉ. १, ७; यूल-क्याथे. १; जर्न्हिल-कोंकण; ब्रिग्ज-व्हॉ. २, ३, ४; रासमाला-१; अर्सकिन व्हॉ. २; सदर अदालत रिपोर्ट १८२५; केर-व्हॉ. ८; हॉग, १; ऑम; एचिसन; ट्रीटीज-फॉरेस्ट सिलेक्शन्स. व्हॉ १. भा. १, २, ३; डॉ. जोशी-अर्ली हिस्टरी. बॉम्बे; एड्वर्ड्स-राइज् ऑफ बॉम्बे; आर्कि-आलॉ. सर्व्हे रिपोर्ट व्हॉ. ३, ९; इंडि. अँटि. व्हॉ. ५, ७, ८; फ्लीट. डिनॅस्टिज्-कानडी; फॉरेस्ट-ऑफि. रायटिंग्ज].

कोंकणपुर—ह्युएनत्संग या शहरीं गेला होता. त्यानें हें शहर द्रविडदेशापासून १६६ कोसावर असल्याचें लिहिलें आहे. त्यावरून तें तुंगभद्राकांठचें अनागोंदी असावें असें एक मत आहे व दुसरें मत, तें हल्लीचें बनवासी असावें असें आहे. विजयानगरचें राज्य स्थापण्यापूर्वी अनागोंदी ही यादवराजांची राजधानी होती. कोंकणप्रांताची ही राजधानी ह्युएनत्संगच्या वेळीं होती व त्याचा कोंकणप्रांतहि (हल्लींच्या पेक्षा जास्त) मोठा होता (कोंकण पहा). अनागोंदी हीच किष्किंधा असूनहि एक प्राचीन समज आहे [भार. भूवर्ण; विलक्स-म्हैसूर १. १४].

कोंकणस्थ वैश्य, इ ति हा स.—वैश्यसमाज हा वैदिक त्रैवर्णिकांपैकीं एक आहे. या समाजाची मूळ वस्ती गोदावरीतीरीं मुंगीपैठण येथें होती. दुर्गादेवीच्या दुष्काळामध्यें या समाजाची पांगापांग होऊन निरनिराळ्या घांटांनीं हे लोक कोंकणांत उतरले आणि त्यावरून त्यांनां " कोंकणस्थ वैश्य " असें म्हणतात. महाराष्ट्रांत हल्लीं " वैश्य " या नांवानें संबोधिले जाणारे पुष्कळ समाज आहेत. त्यांतील बहुतेकांचा आज आपापसांत रोटीबेटीव्यवहारहि नाहीं. कोंकणांत जे दोन प्रमुख व्यापारी वैश्य-समाज आहेत. त्यांपैकीं प्रस्तुत समाज हा एक होय. हा समाज प्रथम रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रभानवल्ली व संगमेश्वर या दोन ठिकाणीं उतरला. आणि नंतर रत्नागिरी व कुलाबा या दोन जिल्ह्यांत व करवीर संस्थानांत पसरला अशी माहिती मिळते. हल्लीं कुलाबा जिल्ह्यांतील महाड, माणगांव, रोहें व अलिबाग या तालुक्यांत; रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर व राजापूर या तालुक्यांत आणि करवीर संस्थानांत कोल्हापूर व मलकापूर या ठिकाणीं या समाजाचा बराच भरणा आहे. सुमारें पाउणशें वर्षांपूर्वी या समाजाचे लोक मुंबईस आले व तेथेंहि १० हजारावर त्यांची वस्ती आहे. एकंदर सर्व कोंकणस्थ वैश्यसमाजाची लोकसंख्या एकलक्षावर आहे.

आजकाल महाराष्ट्रांत जे इतर पांढरपेशे समाज आहेत त्यांचा कित्येक वर्षांपासूनचा इतिहास उपलब्ध आहे त्या प्रमाणें प्रस्तुत समाजाचा पूर्वकालीन सायंत इतिहास पूर्ण स्वरूपांत नाहीं. याला अनेक कारणें आहेत. मुख्य कारण एवढेंच सांगतां येईल कीं ब्राह्मण, सारस्वत, प्रभु इत्यादि समाजाचा ऐतिहासिक कालांत राजकारणाशीं प्रत्यक्ष संबंध आला. पण हा समाज व्यापारी वर्ग असून या समाजाचा व्यापाराबाहेर फारसा संबंध आला नाहीं आणि त्यामुळें वरील समाजाप्रमाणें या समाजाचा सायंत इतिहास टिकणें शक्य झालें नाहीं. तरीपण मुसलमानी अमदानींत, अव्वल मराठेशाहींत व पेशवाईंत हा समाज जिवंत स्वरूपांत व भरभराटींत होता याबद्दल कागदोपत्रीं आधार आहेत. विजापूरच्या दरबारांतून मुसुलमानी अमदानींत मिळालेल्या सनदा, शिवाजीच्या वेळीं व अव्वल पेशवाईच्या वेळीं निरनिराळ्या शेट्ये घराण्यांना मिळालेल्या शेटजीच्या सनदा त्या त्या घराण्यांत आज अस्तित्वांत आहेत. विशालगड संस्थानापैकीं वागकूळ घराण्याच्या जुन्या दप्तरांत अजूनहि पुष्कळ सनदा आहेत.

कोंकणांत या समाजाचा साधारण जम बसल्यावर समाजांतील कित्येक प्रमुख पुढाऱ्यांनां मुख्य मुख्य ठिकाणीं पेठ वसवून तेथें जलमार्गानें व खुष्कीच्या मार्गानें येणाऱ्या मालावर कर बसविण्याच्या सरकारांतून सनदा मिळाल्या. या करास " शेटजी " म्हणतात. आणि हा हक्क ज्यानां मिळाला त्यांनां आज शेट्ये या नांवानें ओळखतात. ह्याप्रमाणें महाड, खेड, चिपळूण, रत्नागिरी, संगमेश्वर राजपूर वगैरे ठिकाणीं मोठमोठ्या पेठा वसून खुष्कीनें व जलमार्गानें निरनिराळ्या प्रांतांशीं दळणवळण सुरू झालें. या ठिकाणचा बराच व्यापार पुष्कळ वर्षें वैश्यांच्याच हातांत होता. रेल्वे सुरू झाल्यापासून घाटावरील माल पहिल्याप्रमाणें कोंकणांत उतरेनासा झाला व गुजराथ मारवाड येथील व्यापारी कोंकणांत शिरले त्यामुळें या समाजाचा कित्येक वर्षें असलेला व्यापार आज मंदावला आहे. तथापि अद्यापहि महाड, चिपळूण, रत्नागिरी, खेड, संगमेश्वर राजापूर या ठिकाणीं कित्येक प्रमुख व्यापारी वैश्यच आहेत.

मुंबईमध्यें आल्यावर प्रथम छापखाना व तंबाखू या दोन व्यापारामध्यें या समाजांतील कांहीं लोक पडून त्यांत ते चांगले नावारूपास आले. देवळेकर, हेगिष्टे, खातु, मापुस्कर यांचे छापखाने चांगल्या भरभराटींत आले होते व त्यांनीं संस्कृत भाषेंतील अनेक जुने ग्रंथ छापून वाङ्मयाची चिरकाल टिकणारी अशी सेवा बजावली आहे. त्यांचे एजंट काशी, प्रयाग, दिल्ली, लखनौ, कराची, अहमदाबाद, वऱ्हाड, नागपूर, खानदेश, गोकर्ण, महाबळेश्वर, निजाम हैद्राबाद, वगैरे ठिकाणीं पसरलेले होते. दुसऱ्या कित्येक मंडळींच्या तंबाखूच्या वखारी उत्तम प्रकारें चालल्या होत्या. कित्येक लोक कमिशन एजंटच्या धंद्यांत पडले होते. सांप्रतहि या सर्व धंद्यांस हे लोक चिकटून आहेत. पान, तंबाखू,

टेंभुरणीचीं पानें, किराणा माल व कापड या धंद्यांत बरेच लोक आहेत.

साराश कृषि, गोरक्षा, वाणिज्य हीं जीं वैश्यवर्गाचीं विविध कर्तव्यें आहेत तीं अद्याप या समाजाची सुटलीं नाहींत.कोंकणांत या समाजांतील सर्वच लोक प्रामुख्यानें शेतकी, गोरक्षण आणि व्यापार करीत आहेत. जिनिंग प्रेस, तांदुळाची गिरणी वगैरे धंदे ज्ञातींतील सधन गृहस्थांनीं चालविले आहेत. मुंबई, अहमदाबाद, हैद्राबाद वगैरे ठिकाणीं बुकसेलरचा धंदा करणारे देखील कांहीं वैश्य आहेत. शिवाय सरकारदरबारीं मोठमोठ्या हुद्द्यावर या समाजांतील कित्येक मंडळी चढली आहेत. इतर सार्वजनिक कार्यांत भाग घेणारेहि या समाजात आहेत. तसेंच ग्रंथकार व लेखक वगैरेहि आहेत.

कोंकणस्थ वैश्य समाजांत मुंबईंत कोंकणस्थ वैश्यजाति फंड, वैश्यविद्यावर्धक समाज, वैश्य संघ इत्यादि संस्था आज वैश्य समाजाच्या उन्नतीकरितां झटत आहेत. बाहेर गांवींहि अशा अनेक संस्था आहेत. कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंड हा सन १८८१ मध्ये स्थापन होऊन आजपर्यंत शक्त्यनुसार समाजसेवा बजावीत आहे. या फंडांतून लग्नकार्यादि शुभ कार्याकरितां महाजनवाडी, और्ध्वदेहिक कार्याकरितां धर्मशाळा मुंबईत उघडल्या असून एक दत्तमंदिर बांधलें आहे.फंड एक लक्षाच्या वर आहे.'वैश्य विद्यावर्धक समाज' सन १९०४ या सालीं स्थापन झाला व विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देऊन शिक्षणा सारखें पवित्र काम समाज करीत आहे. 'वैश्य विद्यार्थी संघ' ही संस्था सन १९१७ सालीं स्थापन होऊन विद्यार्थ्यांची सर्वतोपरी उन्नति करण्याकरिता अविश्रांत काम करीत आहे. शिवाय मुंबई येथें कों. वैश्य ज्ञातिफंडाचें एक 'मोफत वाचनालय,' माखजण येथें वैश्य मंडळींचें 'श्रीराम वाचनालय,' रत्नागिरी येथें 'बकुल' नावाचें एक साप्ताहिक पत्र, मुंबई येथें 'वैश्य मासिक' व 'वैश्य-धर्मोन्नतिमाला' वगैरे सुरू आहेत, कुलाबा जिल्ह्यात सासवनें येथें वैश्य विद्याश्रम नांवाचें विद्यालय ज्ञातीनें चालविलें आहे.

मुंबई येथें कों. वैश्य समाजाची एक पंचायत सभा आहे. या सभेकडून ज्ञातिविषयक कित्येक गोष्टींचा निकाल देण्यांत येतो व तो बहुशः समाजाकडून पाळण्यांतहि येतो. बाहेरगांवीं कोंकणांत याच पद्धतीवर समाजविषयक काम चालत असतें. गांवोगांव पंचायती असून तालुक्यावारी शेटये, महाजन असतात व त्यांच्याकडून झालेल्या निकालास सामान्यतः सर्व समाजाकडून मान देण्यात येतो.

सर्वसाधारणतः अशा प्रकारची कोंकणस्थ वैश्य समाजाची आज स्थिति आहे. शिक्षणाच्या बाबतींत दिवसेंदिवस प्रगतीच होत चालली आहे. निरनिराळ्या व्यापारांत पडण्याकडे मंडळीच्या मनाची प्रवृत्ति होत असून त्याप्रमाणें औद्योगिक उन्नतीचे प्रयत्न होत आहेत. धार्मिकोन्नतीचा प्रश्नहि ज्ञातींतील प्रमुख संस्थेनें हातीं घेतला असून त्या दृष्टीनें शक्य ते प्रयत्न चाललेले आहेत. [बाळकृष्ण अनंत बेर्डे यांजकडून आलेल्या माहितीवरून.]

कोंकणी—हें प्रादेशिक नाव आहे. कोंकणातून आलेले ते कोंकणी. गुरव, कलावंत व गान, खारवे, न्हावी, शिंपी, गवळी, कुंभार, कुणबी, सुतार, लोहार, सोनार, चांभार, कोळी, यासारख्या जातींतून कोंकणी आहेत. या जातीची विशेष वस्ती मुंबई-कानडा जिल्ह्यात आहे. गुजराथेंतहि हे लोक आहेत.त्यानां कोंकणी असे म्हणतात. सुरत जिल्ह्याच्या दक्षिण भागांत व धरमपूर आणि बाडा संस्थानांत या लोकांची मुख्यतः वस्ती असून १९११ सालीं त्यांची संख्या ७१,६७८ होती. ठाण्याच्या वार्ली लोकाप्रमाणें ही जात दिसते.नांवावरून ते कोंकणातून आले असावे हें उघड आहे. शिवाय त्यांच्या भाषेत गुजराथी व मराठीचें मिश्रणहि आढळून येतें. इ. स. १३९६-१४०८ सालात पडलेल्या दुर्गा देवीच्या दुष्काळामुळें त्यानां उत्तरेकडे जाणें प्राप्त झालें असें म्हणतात.

बहुपत्नीत्वाची चाल त्याच्यांत असून विधवाविवाहहि रूढ आहे. लग्न ठरवितांना उभय पक्षाकडून सुरापान केलें जाते व देणग्याहि दिल्या जातात. हुंड्याची रकम ८ किंवा १० रुपयापेक्षा जास्त नसते.लग्नापूर्वी वधूवरानां त्या त्या वेळेप्रमाणें व प्रसंगाप्रमाणें मिरवीत नेण्याची चाल असल्याचें आढळून येतें. लग्नांत त्याना एका बैठकीवर बसवितात व त्यावेळीं एक स्त्री त्याच्या पदरास गाठ मारते. परस्परानीं नावें घेतल्यानंतर ती सोडण्यात येते. लग्नानंतर भात, रोटी व दारू याची मेजवानी वधूच्या बापानें द्यावी अशी पद्धत आहे.

ब्रह्मा व वाघदेव याची कोंकणी लोक पूजा करतात. एखाद्या शमी वृक्षाजवळ ब्रह्मा नांवाच्या देवाची स्थापना केलेली असते. एका लांकडी स्तंभावर वाघाचें चित्र कोरलेलें असतें व त्यांवर शेंदूर फांसतात. कोंकणी लोकास ब्राह्मण उपाध्याय लागत नाहीं.

मृतास स्नान घालून नंतर त्यास स्मशानाकडे नेतात. प्रेतसंस्कार केल्यानंतर नदींत स्नान करून नंतर घरीं येऊन दारू पिण्याची त्याची वहिवाट आहे. मृताची राख भरून चौथ्या दिवशीं आप्तास जेवण घालतात व वर्ष अखेरीस मृताची रौप्य मूर्ति करून तिच्यापुढें दीप लावतात.

हे लोक मजुरी करतात व शेतीहि करतात. ज्यांनां शेतीकरतां बैल घेण्याचीहि ऐपत नसेल असे कोंकणी स्वतःच नागर ओढतात व अशा लोकांनां 'हाथोडिया' असें म्हणतात. महाराष्ट्रांतील कोंकणी लोकांत गोमांतकी कोंकणी म्हणून एक वर्ग आहे. त्याची वस्ती विशेषेंकरून मुंबई शहरांत आढळते.

ठाणें.—ठाणें जिल्ह्यांतील कोंकणी गंभीरगडचा डोंगरी किल्ला राखण्याकरितां आपले पूर्वज कोंकणांतून या भागांत आले असें हे सांगतात.यांची राहाणी गलिच्छ असून हे आपला

परंपरागत शेतकीचा धंदा करतात. लग्नविधि ब्राह्मण चालविती.लग्नाप्रीत्यर्थ ब्राह्मणाला दक्षिणा व जातिप्रमुख पाटलास शेलापागोटें देतात. उत्तरक्रियेच्या प्रसंगीं ब्राह्मणाची जरूरी नसते. खंडोबा, देवी,चंद्र,सूर्य, चेदा, हिरवा वगैरेंना पुजतात. उपाध्याय ब्राह्मण असतो. हिंदूंची व्रतं व उपोषणें पाळतात. पाटील तंटयांचा निवाडा करतो.हे मिश्रभाषा बोलतात. त्यांत मराठीचा भरणा जास्त असतो.यांच्यांत मुलाना शिक्षण देत नाहींत.

कानडा.--येथील कोंकणे आपणाला मराठे क्षत्रिय समजतात. इतर लोकहि त्यांना शूद्रापेक्षां उच्च वर्णाचे मानतात. यात सावंत, देसाई, साइल अशीं आडनावें असून हे नांवापुढें नाईक हें पद जोडतात. या कोंकण्यांचीं नांवें महाराष्ट्रीय वाटत नाहींत. उदा. फकिरो,चौडो,काडलो. इत्यादि हे कोंकणी भाषा गोवॅनीज लोकांप्रमाणें हेल काढून बोलतात. निरंकार, महामाई, राऊळनाथ,खेत्री या देवताना बळी देतात. हे महालय, श्राद्ध वगैरे करतात.गोवा, गोकर्ण, काशी व पंढरपूर या ठिकाणीं हे यात्रेला जातात.कऱ्हाडे ब्राह्मण याची भिक्षुकी करतात. बावा नावाचे याच्या जातीचे उपाध्यायहि आहेत. सदाशिवगडाजवळील कृष्णापूरच्या विठोबाला हे भजतात व भजनांत तुकारामाचे अभंग म्हणतात. याचे आचारविचार सावंतवाडीकर मराठयांप्रमाणें दिसतात. प्रत्येक गावांत पंचायत असून बुधवंत हा त्याचा मुख्य असतो. हे लोक मुख्यतः शेतकरी पेशाचे आहेत.

त्रावणकोर.—येथेंहि याची वसाहत आहे. व्यापार हा यांचा सर्वसाधारण धंदा आहे.इतर वेळीं मलबारी लोकांप्रमाणें याचा पोषाख असतो. परंतु धार्मिक किंवा सणाच्या दिवशीं पूर्वकिनाऱ्यावरील ब्राह्मणाप्रमाणें असतो. याच्या जातींत बरींच गोत्रें आहेत.होतां होईल तों आतेच्या किंवा मामाच्या मुलीला वरण्याचा याचा प्रघात आहे. याचे वैवाहिक विधी जवळ जवळ ब्राह्मणासारखेच आहेत. [सेन्सस रिपोर्ट, (मुंबई व त्रावणकोर) मुं. गॅ. एन्थोवेन].

कोंकणी भाषा—कोंकणांत बोलण्यांत येणारी मराठी भाषा. ही जास्त अनुस्वारयुक्त असते. याशिवाय तिच्यात (कांहीं शब्दपर्याय सोडल्यास) विशेष फरक होत नाहीं. कोंकणी असें विशेष नांव ज्या भाषेला आहे, ती गोव्याकडे आणि मालवणकडील भागांत बोलली जाते. तिला गोमांतकी असेंहि म्हणतात. ही मराठीहून थोडीशी निराळी आहे. पहिल्यानें इकडे सारस्वती म्हणून एक भाषा प्रचारात होती; पुढें कदंबराजवटींत तिची हळूं हळूं कानडी झाली. विजयानगरकराचें राज्य झाल्यावरहि इकडे कानडीच सुरू होती. पुढें फिरंग्याच्या अंमलांत व मुसुलमानी रियासतींत त्या त्या भाषेची छाप बसून मूळच्या महाराष्ट्री भाषेंत बराच फरक पडला. सांप्रत ही भाषा बरींच चमत्कारिक झाली आहे. शुद्ध मराठी भाषा बोलणाऱ्याला ती एकाएकीं समजत नाहीं. गोव्यांत ती सर्वत्र सारखी आहे असें नाहीं. अंतराअंतरानें तिच्यांत फरक पडतो. बुक्यानन म्हणतो कीं, गोवेप्रांतांत ५५ मैलांच्या टापूंत ही भाषा बोलतात. मोग्लींगचें म्हणणें असें आहे कीं, कोंकणी भाषा बोलणारे लोक ही भाषा मराठीहून निराळी मानून तिचें व्याकरणहि निरळें मानितात. परंतु व्याकरणाबद्दल मर्फी हा पुढीलप्रमाणें माहिती देतोः— ' कोंकणी भाषेचें व्याकरण मराठीप्रमाणेंच आहे असें निश्चितपणें सिद्ध होतें. नामें व क्रियाविशेषणें हीं एकाच विभक्तीनें चालतात. या भाषेंतील विशेष लक्षण म्हणजे, जे शब्द हिंदी व मराठी भाषेत आकारान्त असतात ते कोंकणांत ओकारान्त होतात. हा प्रकार गुजराथी व मारवाडी या भाषांत दिसून येतो. मराठींतील कांहीं अडचणी या कोंकणीवरून समजून येतात. हिच्यांत कांहीं नियम अपूर्ण आहेत. या भाषेंत सामान्य व्यवहारांत संस्कृत शब्द बरेच आढळतात. हे शब्द शेणवी ब्राह्मण शुद्ध रीतीनें उच्चारतात आणि गोमांतकांतील साधारण किरिस्ताव लोक त्यांचा अपभ्रंश करून बोलतात उदा० उदक, वृक्ष, तृण असे शब्द शेणवी ब्राम्हण बोलतात व उदीक, रुख, तण हे शब्द किरिस्ताव बोलतात" हल्लीं पोर्तुगिज भाषा फार प्रसार पावली आहे, त्यामुळें या कोंकणी भाषेकडे सुधारण्याच्या दृष्टीनें कोणी फारसें पहात नाहीं.

या भाषेंत पूर्वी कांहीं कथा व काव्यहि झालेलें आहे. नायकस्वामी, सातबानायक, सोहिरोबा आंबिये इ. कवींनी या भाषेंत काव्यरचना केली आहे. हल्लीं गोव्याकडे जुनीं कोंकणी लौकिक गीतें फार कमी ऐकण्यांत येतात. या गीताचा संग्रह करणें अत्यावश्यक आहे. भाषाशास्त्रदृष्टीनें या संकलनाचा बराच उपयोग होईल. कोंकणी भाषेंत ग्रंथरचना अगदींच अल्प आहे; ती वाढविली पाहिजे पूर्वीचा एखादा मोठा ग्रंथ या भाषेंत रचलेला ऐकण्यात नाहीं. कांहीं लोक स्टिफेनच्या ख्रिस्तपुराणास कोंकणी भाषेंतील ग्रंथ म्हणतात आणि याप्रमाणेंच आणखी कांहीं ग्रंथास कोंकणी भाषेचे म्हणतात; परंतु स्टिफेनचा ग्रंथ हा कोंकणी नसून मराठी भाषेंतील आहे असें विद्वान लोकांचें म्हणणें आहे. हल्लीं मुंबईस असलेले किरिस्ताव लोक ह्या कोंकणी भाषेला पारखे होत चालले आहेत. मात्र पत्रव्यवहारात हे लोक कोंकणी भाषा वापरून ती रोमन लिपींत लिहितात. गोमांतकांतील उच्च वर्गाची ओढ मराठीकडे फार आहे. कोंकणी भाषेची प्रगति म्हणजे मराठीचा अपकर्ष असें जें त्यांचें मत दिसतें तें वास्तविक नाहीं. परंतु ही प्रगति होण्यास फार प्रयास पडतील. मुंबईस आलेले किरिस्तांव इंग्रजी भाषा जास्त उचलीत चालले आहेत. त्यांच्यांत इंग्रजी, हिंदी व कोंकणी या तीनहि भाषा प्रचारांत आहेत. पुन्हां या त्यांच्या कोंकणीवर पोर्तुगीज भाषेचीहि छाप पडतेच. गोव्यांत तर या पोर्तुगिज भाषेचें दडपण फार पडल्यानें तेथें कोंकणी भाषेचें विकसन न होतां तें मुंबईस होतें या

भाषेची थोडी कल्पना येण्यास पुढें एक छोटासा उतारा देतों.

इन्दिरेच्यो शिरवळ्यो (सौ. शान्ताबाय वर्दे हिणे सांगिल्ली काणी):—एक असलो म्हाळपै. ताची असली एक बायल. तिचें नांव इन्दिरी. ती मोटी करनखरी, पाडी, उंवाळळेली आसली. घोवान एक सांगल्यार ती दुसरेंच करताली. एक फावट म्हाळपैक शिरवळ्यो खायनशो दिसल्यो. ताका सामकी गांठ लागली. सुकून सुकून ताचो सामको भातकुटो जालो. तो मरचे तडीक पावलो. पुण सभागी करतलो किते? वायले फुडें ताचें शाणपण चालता? तिचेकडन उलशी माणुसकी आसं म्हाळपैच्यो हाडांक काती लागिल्लचो पळौन, शेजान्नीन ताका एकदीस विचार्लें, ' आरे म्हाकू. हाली तुझी सामकीच अवस्ता जाली ती किते ! ' ताणे म्हळें, ' कितें सागूं? व्हडले वा, म्हाका पिडा-रोग वी कायचना. म्हाका शिरवळ्या खायनशो दिसल्यात. पणून करून घालना कोण? आम गेले करनखरेक तूं वळखना? ' शेजान्नीन म्हळें, ' तर तुका शिरवळ्यो मेळपाची आस्ता ना तूं तिका सागः तुजो म्हणचे वेय यवेपाचो आसं. ताका तूं जाय जाल्ली पोळी करून घाल. शिरवळ्यो मात नाका '. म्हाळपैक घरा गेलो आनी बायलेक तार्णे तशेंच सागलें, इन्दिरी दळूंक बसली. तेन्ना घोवान तिका म्हळें ' आज चंडशे तांदूळ दळटा तूं ? ' तिर्णे बोंचो मुड्डून जाप केली, ' तुज्यो त्यो लातबडायो म्हाका नाकात. शिरवळ्यो करूं नाका म्हणून सागूंक, तूं कोण ? म्हजे सोयरूं म्हाकां फार्टी सागताले, आपल्या मांवाक आसं तो शिरवळ्याचे, मोटो धोस्त. त्योच हाव करतलीं. तूं आपलो सागशीः सान्ना कर; वडे कर; पोळे कर. पणून हांव खैं आयकूंक आयल्या ? '

[दणाईत व वागळे-गोमांतकाचा प्रा. अ. इतिहास; स्वयंसेवक व ४ अं. ५; विद्यासेवक व. १ अं. २]

कोकनाडा, तालुकाः— मद्रास इलाख्याच्या गोदावरी जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील हा एक तालुका असून याचें क्षेत्रफळ २९७ चौ. मैल आहे. १९२१ सालीं याची लोकसंख्या २,२९,१५१ होती. यात कोकनाडा व सामलकोट या दोन शहरांचा व ९९ खेड्याचा समावेश होतो. जमीन महसुलाचें उत्पन्न सुमारें ५ ३/४ लाख रु. आहे. याच्या किनाऱ्यावर कोरिंग व इंजरम हीं यूरोपियन वसाहतीच्या वेळीं प्रसिद्ध असलेलीं बंदरें आहेत. कोरिंग जवळ तल्लारेवू येथें जहाजें बांधण्याचें काम होतें. येथील मुख्य पीक म्हटलें म्हणजे तांदूळ होय. या पिकास गोदावरी नदीच्या कालव्याचें पाणी देण्यात येतें.

गांव.—मद्रास इलाख्याच्या गोदावरी जिल्ह्याच्या कोकनाड तालुक्याचें हें मुख्य ठिकाण व बंदर आहे. एम्. एस्. एम्. रेल्वेच्या सामलकोट जंक्शनपासून या शहराला एक फांटा गेला आहे. हें मुंबईपासून ८५० मैलांवर आहे. हें गोदावरी नदीच्या पूर्वेकडील शाखेच्या मुखाजवळ कोकनाड उपसागराच्या वरच्या बाजूस आहे. तैलंगणांत हें गांव फार स्वच्छ आहे.

इ. स. १९२१ सालीं याची लोकसंख्या ५३,३४८ होती. रामायणातील काकासुराचें हें निधनस्थान समजलें जातें. म्हणून तेलगूंत यास ' काकिनाडा ' (कावळ्याचें स्थान) म्हणतात. हें इतिहासदृष्ट्या महत्वाचें नाहीं. याच्या जगन्नाथपुरम् नावाच्या भागात पूर्वी डच लोकांनीं वखार बांधली होती परंतु ती १८२५ त ब्रिटिशांच्या ताब्यात दिली गेली. १७५९ त कर्नल फोर्डनें मच्छलीपट्टण सर केल्यानंतर फ्रेंच लोकांनीं आपलें सैन्य दोन वेळां या ठिकाणीं उतरविलें होतें. परंतु त्यांना सहज रीतीनें तेथून हुसकविण्यात आलें.

कोरिंगचा उपसागर जेव्हां माती जमून जमून निरुपयोगी झाला तेव्हां कोकनाडास महत्व आलें. यात दौलेश्वरम् पासून दोन कालवे काढिले आहेत. एक सालमकोट मधून व दुसरा रामचंद्रपुरम् तालुक्यामधून जाऊन दोन्हीहि एका खाडींत नेऊन सोडले आहेत व अशा रीतीनें जिल्ह्यांतील जल मार्गाशीं याचा संबंध जोडिला आहे. येथें म्युनिसिपालिटी १८६६ त सुरू झाली.

मद्रासच्या उत्तरेस कारोमांडलच्या किनाऱ्यावर हें मुख्य बंदर आहे. यात रेल्वे सुरु झाल्यापासून व उपसागरात मातीचे पुष्कळ थर जमल्यामुळें याचें महत्व बरेंच कमी झालें आहे. हें बंदर घेतांना, वकलप्पुडीच्या दीपस्तंभापासून कांहीं अंतरावर असलेल्या बंदरात शिरण्याच्या मार्गापासून सुमारें पावणे पांच मैल दूर व ३० फूट खोलीच्या पाण्यात जहाजें नांगरलीं जातात. यातून इंग्लंड, फ्रान्स आणि बेल्जम येथें कापूस, फ्रान्सांत आणि इंग्लंडांत तीळ वगैरे आणि सीलोन व मारिशस बेटांत तांदूळ जातो. रंगूनास तंबाकू जाते व तेथें तिचे चिरूट बनवितात. तूप, कडधान्यें व एरंडीचें तेल बाहेर गांवीं पाठविण्यात येतें. यात यूरोपियन व इंडियन याच्या चेंबर ऑफ कॉमर्स संस्था व एक पोर्ट कॉन्झर्वन्सी बोर्ड आहे.

यात एक खाजगी मिठाची वखार आहे व पेनुगुडूरु जवळ कांहीं मैलावर सरकारी मिठागरें आहेत. यांत धान्य दळण्याच्या गिरण्या, तेल काढण्याच्या चक्या, एक लोखंड ओतण्याचा कारखाना आणि चुट्टे वळण्याच्या कांहीं वखारी आहेत. गांवांत तेलाचे, तंबाकूचे, तांदूळ सडण्याचे, सरकी काढण्याचे व कापूस दाबण्याचे बरेच कारखाने आहते परंतु मुख्य धंदा म्हणजे दर्यावरील व्यापार होय.

यांत १८५२ सालात मिठापुरम्च्या राजानें एक कॉलेज स्थापिलें. दुसरें पी. आर. कॉलेज व दोन हायस्कूलेंहि आहेत. सरकारी ट्रेनिंग कॉलेज व मुलींच्या शाळाहि आहेत. येथें छापखाने पुष्कळ असून छपाईहि स्वस्त असते. १९२३ त अडतिसावी राष्ट्रीय सभा येथें भरली होती.

कोकंब—कोकंबाच्या बियांपासून तेल काढतात. हें शेंकडा तीस पर्यंत निघतें. तेल दोन तऱ्हेनें काढतात. बिया

फोडून वरचीं टरफलें काढून टाकतात. नंतर आंतील गर उखळांत कुटून पाण्यांत उकळतात थोडा वेळ उकळल्यावर पाणी गार होऊं देतात म्हणजे तेल वर येतें. त्याचे लहान लहान गोळे किंवा वड्या करितात. दुसरी रीत अशी कीं, वरीलप्रमाणेंच बिया कुटून त्या पाण्यात टाकून तें पाणी रात्रभर तसेंच ठेवून देतात. सकाळीं तेल वर येईल तेवढें काढून घेऊन राहिलेले पाणी रवीनें ताकासारखें घुसळतात म्हणजे लोण्याप्रमाणें पाण्यावर तेल येतें. थंडीच्या दिवसांत तेल चागलें (पुष्कळ) निघतें घुसळून काढलेलें तेल स्वच्छ असतें. तेलाचा उपयोग आमाशावर, थंडीनें आग फुटतें त्यावर व पावसाळयात चिखलानें पाय कुजतात त्यावर लावण्यासाठीं चागला उपयोग होतो. कोकंब तेलाच्या मेणबत्या करण्यासाठीं उपयोग होईल परंतु तेल मात्र भरपूर मिळालें पाहिजे.

कोंकंबाच्या फळापासून कोकमसालें (आमसोले) तयार करतात. एप्रिल महिन्यात फळें चागलीं पिकल्यावर तीं फोडून बिया वेगळ्या काढतात आणि रस व सालं एके ठिकाणीं एका भाड्यात वाटतात. बिया पिळून त्यांचं पाणी यांत टाकतात. बिया वाळवितात. सालें उन्हात वाळवितात; व तीं वाळल्यानंतर पूर्वी काढलेल्या रसात ऊकळून पुन्हा वाळवितात. याप्रमाणें त्याना चार पाच पुटें दिल्यानंतर तीं विकण्यास तयार होतात. मालवण, गोवा वगैरे ठिकाणीं कोकमसालें तयार करतात. आमसुलांचें सार व चटणी करतात. त्यांचा उपयोग चिंचेऐवजीं भाजींत घालण्याकरिताहि करतात. आमसुलें वैद्यकात उत्तम पित्तशामक म्हणून वर्णिलीं आहेत.

कोका--इरिथ्रॉक्सिलॉन ह्या वर्गातील झाडाच्या एकंदर पन्नास जाती आहेत. हीं झाडें उष्ण प्रदेशांत होतात. हिंदुस्थानात या वर्गाच्या सहा जाती आहेत.

पहिली इ. कोका. या जातीचीं झाडें दक्षिण अमेरिकेच्या निरनिराळ्या भागांत आढळतात. परंतु हीं झाडें मूळचीं पेरु व बोलिव्हिया येथील आहेत.

हिंदुस्थानांतील लागवड.—इ. स. १८७० त सिलोनमध्यें कोका जातीच्या झाडांची लागवड करण्यात आली. पुढें कोकेनच्या उपयोगाचा शोध लागल्यामुळें युरोपांतून कोकाच्या पानास बरीच मागणी होऊं लागली. याच सुमारास कोका झाडाची लागवड चहाच्या मळ्यांतून सुरूं होऊं लागली. व हिंदुस्थान सरकारने कोकाचीं पानें तयार करण्याबद्दलची माहिती दक्षिण अमेरिकेंतून मागविली. निलगिरी पर्वताची उतरण, मद्रास इलाख्यांतील कांहीं भाग, आसाम, सिलहत व हिमालयपर्वताचा १०० पासून २००० फूट उंचीचा प्रदेश या ठिकाणीं या झाडांची लागवड करण्याचे प्रयोग केले आहेत. या झाडास थोड्या धुक्यापासून सुद्धां इजा होते व त्यास पाऊस बराच लागतो.

काहीं जातींच्या झाडांपासून निघणाऱ्या कोकेनचें स्फटिकीभवन होत नाहीं; याकरिता झाडाची जात नीट निवडून घ्यावी लागते. याच्या लागवडीला जमीन ओलसर व सुपीक लागते. व पीक काढल्यानंतर जमिनींतील कस निघून जात असल्यामुळें नवीन खत घालणें जरूर असते. रोप लावल्यानंतर १८ महिन्यानीं पानें काढता येतात व एकदा लावलेल्या झाडाचीं पानें ४० वर्षपर्यंत काढतां येतात.

झाडाचीं पानें जेव्हा कडक होऊन वाकविलीं असता मोडतात तेव्हा तीं काढतात. सुपीक जमिनींतील झाडापासून एका वर्षात दोन अथवा तीन वेळा पानें काढता येतात. वाळलेलीं पानें एक दोन दिवस ठेऊन नंतर (वातागम्य) डब्यात तीं भरतात. हीं पानें होता होईल तितक्या लवकर जहाजावर चढवावीं, कारण तीं उष्णकटिबंधापेक्षा समशीतोष्ण कटिबंधात जास्त दिवस टिकूं शकतात. या पानांतील आल्कलॉईड व क्षार व्यापाराकरिता वेगळें करण्याचा प्रयत्न हिंदुस्थानात आजपर्यंत झाला नाहीं. या पानातील आल्कलॉईड व क्षार हीं दोन्हीं मादक असून तीं शरीराच्या कोणत्याहि भागास लाविलीं असता तो भाग बधिर होतो.

व्यापार.—सर्व जगास कोकेनचा पुरवठा दक्षिणअमेरिकेंतून होतो. इ. स. १९ ३ मध्यें पहिल्यानें १४०० औंस कोकेन हिंदुस्थानात आलें. त्याची किंमत १८४४२ रुपये होती. कोकेनचा उपयोग लोकानीं करूं नये म्हणून सरकारने कायदे केले आहेत. परवान्याशिवाय कोकेन विकणे कायद्यानें मना केलें असून त्याची गणना मादक पदार्थांत केली आहे.

कोकिल—कोकिलपक्ष्याकडे हिंदुस्थानात व पाश्चात्य देशांतहि प्राणिशास्त्रकोविदांचें तसेंच इतर लोकांचेंहि कोणत्याहि पक्ष्यापेक्षा अधिक लक्ष वेधलें आहे. या पक्ष्यासंबंधीं पुष्कळ दंतकथा प्रचलित आहेत. पुष्कळ विद्वानांनीं याच्यावर पुस्तकें व लेख लिहिलेले आहेत. आपलीं अंडीं दुसऱ्याच्या घरट्यांमधून ठेवून तीं उबवून घेण्याची याची विचित्र पद्धतीच विद्वानांचें लक्ष्य वेधून घेण्याला कारणीभूत झाली आहे. हिंदुस्थानात कोकिलाला संस्कृतात परभृत, अन्यभृत अशीं नावें दिलेलीं आढळतात. शाकुंतलमध्यें, स्त्रियाचें अशिक्षितपटुत्व सिद्ध करण्याकरिता, दुष्यंत हा दुसऱ्याकडून आपल्या पिलाचें संगोपन करून घेणाऱ्या कोकिलाचा दाखला देतो. त्यावरून आपल्याकडेहि कोकिलासंबंधीं पाश्चात्यांप्रमाणेंच कल्पना होती हें सिद्ध होतें. याशिवाय कोकिलाचा आवाज, त्याचें मधुर कूजित यामुळेंहि त्याला विशेष प्रकारचें महत्व प्राप्त झालें आहे. वसंतऋतूच्या आगमनाबरोबरच कोकिल हा आपलें आगमन आपल्या मधुर वाणीनें सूचित करतो. यूरोपमध्यें व ध्रुवप्रदेशांतहि उन्हाळ्याच्या दिवसांत म्हणजे एप्रिल महिन्याच्या प्रारंभापासून कोकिलांचें कर्णमधुर आलाप ऐकूं येऊं लागतात.

वर्षाच्या इतर ऋतूंमध्यें तो आफ्रिकेंत असतो असें पाश्चात्यांचें म्हणणें आहे. प्रथमतः उन्हाळ्याच्या सुरुवातीस, पुंस्कोकिल आपलें आगमन जाहीर करतो; व थोड्याच दिवसांनंतर स्त्रीकोकिलहि त्याच्या पाठोपाठ येते. या पुंस्कोकिलांच्या मध्यें स्त्रीकोकिलाबद्दल भाडणें सुरू होतात व शेवटीं ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाप्रमाणें ज्याला त्याला एखादी कोकिला मिळते. दिवसाप्रमाणेंच रात्रींहि यांचें गाणें चालूंच असतें. वर्षाऋतु प्राप्त झाला कीं हे कोकिलपक्षी कोठें गडप होतात कोणास ठाऊक! यूरोपमध्येंहि अशीच स्थिति नजरेस येते. जसजसा ग्रीष्म ऋतु संपण्याच्या बेतात येतो तसतशी या कोकिलाच्या आवाजातील माधुरी कमी कमी होऊं लागते. नंतर पुढें ग्रीष्मऋतु संपला कीं यांचें कूजन बंद होतें व जुलैच्या मध्याला व फार झालें तर जुलै अखेरनंतर याचा पत्ताहि लागत नाहीं

कोकिलामध्यें प्रजोत्पत्ति कशी होते यांचें यथार्थ ज्ञान अद्यापीहि कोणाला नाहीं. तरी पण पाश्चात्य शोधकानीं यासंबंधीं पुष्कळच प्रयत्न केले आहेत व अद्यापीहि त्याचे प्रयत्न चालू आहेत. कोकिला ही आपलीं अंडीं ज्याच्या घरट्यात ठेवते त्या पक्ष्याचीं अंडीं तीं बाहेर फेंकून देते व त्या जागीं आपलीं अंडीं ठेवते व नंतर त्या अंड्यांचे ते पक्षी आपलीं अंडीं समजून संगोपन करतात असें आढळून आलें आहे. सप्टेंबरच्या सुमारास हीं पिलें उडूं लागतात व नंतर तीं आपल्या आईबापाच्या निवासस्थानाकडे जातात. कोकिला ही आपलें अंडें दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यांत ठेवण्याच्या कामीं आपलें चातुर्य व्यक्त करते. डर्मस्टॅट परगण्यातील ॲडाल्फ मुल्लर नावाच्या एका जंगली मनुष्यानें दुर्बिणीच्या सहाय्यानें यासंबंधींचा प्रकार पाहिला. कोकिला ही आपलें अंडें हळूंच आपल्या चोंचीत धरून दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यांत कशी ठेवते यासंबंधींची साग्र हकीकत त्यानें दिली आहे. कधीं कधीं या पक्ष्याचे व कोकिलेचें भाडण होतें; पण शेवटीं हरप्रयत्नानें ती आपलें अंडे त्या घरट्यात घुसडतेच. आपल्या अंड्यासारख्याच रंगाचीं अंडीं घालणाऱ्या पक्ष्याच्या घरट्यांमध्यें कोकिला ही आपलीं अंडीं ठेवते असें कांहीं शोधकाचें मत आहे पण त्यासंबंधीं विद्वानांत मतभेद आहे. तथापि आपल्या अंड्यांसारखींच अंडीं असणाऱ्या पक्ष्याच्या घरट्यांत कोकिला ही अंडीं ठेवते हें विधान पुष्कळ अशीं खरें आहे असें मानण्यास पुष्कळ पुरावा आहे. हिंदुस्थान व इतर जगाचे भाग यांमध्यें सापडणाऱ्या कोकिलामध्यें स्वरभिन्नत्वापेक्षा दुसरा फरक नाहीं व आहे तोहि फरक फारच सूक्ष्म आहे.

कोकिलाव्रत—आषाढ अधिक महिना आला असतां सौभाग्यवृद्धीसाठीं हें पौराणिक व्रत करण्याची त्रैवर्णिक स्त्रियांत चाल आहे. हें व्रत आषाढ पौर्णिमेपासून श्रावण पौर्णिमेपर्यंत करावयाचें असतें. महिनाभर नक्तभोजन व तें कोकिलेचा शब्द ऐकून करावयाचें असें याचें विधान आहे. दक्षाच्या यज्ञास आमंत्रणावाचून पार्वती गेल्यानंतर तेथें तिचा अपमान झाल्यावर त्याठिकाणीं दक्ष व वीरभद्र यांच्या युद्धामुळें यज्ञविध्वंस झाला. पार्वतीनें यज्ञविध्वंस केल्यामुळें 'तू तिर्यक् योनींत कोकिला होशील' असा शंकरांनीं तिला शाप दिला व सौभाग्यप्राप्त्यर्थ स्त्रिया तुझी पूजा करतील' असा उःशाप दिला अशी वराहपुराणात कथा आहे.

कोको—हें झाड मूळचें मध्य व दक्षिण अमेरिकेंतील आहे; परंतु अलीकडे पुष्कळ ओलसर उष्णप्रदेशात याची लागवड झाली आहे.

यांचें बीं ऊन करून अथवा भाजून पिवळसर रंगाचें घट्ट तेल काढतात. त्याला चॉकोलेटसारखाच वास असून तोंडात टाकल्यावर तें लोण्यासारखें वितळतें म्हणून याला "कोकोचें लोणी" म्हणतात. तें खावयास फार चांगलें लागतें. या झाडापासून तयार होणारा मुख्य पदार्थ म्हणजे ज्यापासून चॉकोलेट करतात तीं फळें होत.

कोकोचें बीं लावल्यापासून पांचव्या किंवा सातव्या वर्षी झाडास फळें येऊं लागतात. फळें शेंगेसारखीं ६ ते ९ इंच लाब असून त्यात ४० किंवा अधिक बिया असतात; त्यांनाच "निब" असें नाव आहे. प्रत्येक झाडापासून दरवर्षास सुमारें ? ते ५ शेरांपर्यंत वाळलेलें बीं अथवा निबें निघतात. चॉकोलेट तयार करण्याकरिता बीं भाजून दळतात, व चव आणण्याकरिता त्यात साखर किंवा दुसरा एखादा पदार्थ मिसळतात. चॉकोलेटपासून तयार केलेल्या पदार्थांची किंमत त्यांतील चॉकोलेटच्या प्रमाणावर अवलंबून असते.

व्या पा र.—चाकोलेटचीं झाडें हिंदुस्थानात आणण्याचे कित्येक प्रयत्न झाले; मलबार व निलगिरी डोंगरांवर त्याची थोडीबहुत लागवडहि होते. परंतु ती सिलोनइतकी यशस्वी नाहीं. कच्चीं निबें अथवा बिया मुख्यतः ब्रिटिश वेस्ट इंडीज, पोर्तुगाल, सिलोन, फ्रान्स, इक्वेडोर, ब्राझील व ब्रिटिश वेस्ट आफ्रिका या देशातून येतात; व चॉकोलेटच्या निरनिराळ्या जिनसा व चॉकोलेटची मेवा मिठाई पुष्कळशीं बेल्जममधून येते.

कोकोनॉर—मध्यएशियामधील सरोवर. हें तिबेटच्या ईशान्येस ३७ उत्तरअक्षांश, १०० पूर्वरेखांशावर ९९७५ फूट उंचीवर आहे. या सरोवराच्या उत्तरेस नान—शान पर्वत व दक्षिणेस दक्षिणकोकोनार पर्वत आहेत. याची लांबी ६६ मैल व रुंदी ४० मैल असून त्यांत ६ बेटें आहेत. यापैकीं एका बेटावर बौद्ध लोकांचा मठ आहे. त्यामुळें येथें यात्रेकरू येतात. सरोवराचें पाणी खारें आहे. तथापि त्यांत मासे पुष्कळ आहेत. हिवाळ्यांत सरोवराचें पाणी तीन महिने गोठलेले असतें. सरोवराला पश्चिमेस बुहेनगोल ही नदी मिळते.

कोकोबेटें—कोको हीं बंगालच्या उपसागरांतील दोन बेटें असून अंदमान बेटांच्या ईशान्येस ४५ मैलांवर

वसलीं आहेत. यांचा दक्षिण ब्रह्मदेशांतील हंतवड्डी जिल्ह्यांत समावेश होतो मोठया बेटाचें क्षेत्रफळ १४ चौरस मैल असून लहान २॥ मैल लांब व एक मैल रुंद आहे. हीं बेटें सपाट असून त्यांत पाण्याची टंचाई आहे व त्यावर लोकवस्ती नसून तीं नारळाची झाडें व जंगलें यांनीं व्यापिलीं आहेत. या बेटांतील वनस्पतींचें उत्पन्न सरकार मक्त्यानें देतें.

कोगनोळी—मुंबई इलाख्यांतील बेळगांव जिल्ह्याच्या चिकोडी तालुक्यांतील एक खेडें याचें जुनें नांव कोगुलवल्लि आहे. बेळगांवाहून कोल्हापुरकडे जो रस्ता गेला आहे त्या रस्त्यावर हें वसलेलें आहे. १९०१ मध्यें याची वस्ती ५५९७ होती हें व्यापाराचें गांव असून येथील तांदूळ बेळगांव, कोल्हापूर इत्यादि ठिकाणीं जातो. येथें कापड, खजूर, मीठ, साखर इत्यादि जिनसांची आयात होते. येथें दर गुरुवारीं बाजार भरतो, व त्या वेळीं कापूस, तंबाखू, गुरें इत्यादींचा मोठा व्यापार चालतो. लुगडीं तयार करणें, हलक्या प्रकारच्या घोंगड्या विणणें हे येथील मुख्य धंदे होत. १८७६ पूर्वी येथें पुठ्ठे तयार करण्याचा कारखाना होता, पण १८७६ च्या दुष्काळात पुठ्ठे तयार करणारे लोक हें गांव सोडून गेल्यामुळें हा धंदा बसला.

कोंगाळव—हे कूर्ग प्रांताचे नामांळ जहागीरदार. यांचा व होयसळ राजांचा नेहमीं खटका उडत असे. नृपकाम होयसळनें (१०२२),बिट्टीदेवानें (११३०),बोकण्णाने (११५५),व वरिबल्लाळानें (११६८) याच्यावर हल्ले करून त्यांना आपल्या ताब्यात आणण्याचे प्रयत्न केले; परंतु हे लोक कायमचे त्यांच्याकडून जिंकले गेले नाहींत. [अय्यर प्रा. हिं.].

कोंगू देश—या देशास कोंगु, कोंगुमंडलम्, कोंगुनाडु अशींहि दुसरीं नावें आहेत. दक्षिणेकडील हल्लींचे कोइंबमतूर व सालेम या जिल्ह्याचा समावेश या प्रदेशांत होतो. प्रथमतः हा प्रदेश पल्लवांच्या ताब्यात होता. त्यांच्यापासून पाण्ड्यांनीं तो (९८०) घेतला. आदित्य पाण्ड्याला कोंगुदेश राजाकल अशी पदवी होती. चोलांनीं (राजराज ९८५–१०१६) तो जिंकून घेतला. नंतर होयसळांनींहि त्याचा ताबा घेतला (११३०). याचा उल्लेख केरळ देशाबरोबर करीत असत. चेर राजांचीं नाणीं अत्यंत दुर्मिळ असून तीं या कोंगुदेशांत सांपडतात. [अय्यर व स्मिथ प्रा. हिं.].

कोच जात—यांची वस्ती आसाम, बंगालांत, बिहार व ओरिसा यांतून आहे. आसाममधील या जातीची लोकसंख्या २,३१,५७३ आहे. आसामांतील ही राष्ट्रजात नसून ती एक हिंदु लोकांची जात आहे व तिच्यांत इतर राष्ट्रजातींतून हिंदुधर्म स्वीकारलेल्या लोकांनां घेतात असें गेटचें मत आहे. या लोकांच बोडो जातीच्या लोकांशीं साम्य असल्यामुळें ते मंगोलियन लोक असावे असेंहि पण त्याचें मत आहे. वरील ब्रह्मपुत्रा खिंडींत त्यांना शूद्र समजतात व ब्राह्मणांनां त्यांच्या हातचें पाणी चालतें. परंतु मध्य व पश्चिम आसामांतील जिल्ह्यांतून या लोकांचा इतका वरिष्ठ दर्जा समजला जात नाहीं. या जातीचे निरनिराळे पोटभाग आहेत व त्या प्रत्येकांतून धर्मांतर केलेल्या घराण्याला जावें लागतें.

बंगाल्यांत कोचांचे निरनिराळे वर्ग असून प्रत्येक वर्गावर एक पुढारी (महंत) नेमिला असतो. महंताची जागा वंशपरंपरा चालते महंतावरचा मुख्य दिगरी महंत किंवा परमाणिक महंत नांवाचा असतो. या महंतांच्या निकालावर साहेब गोसैन याच्याकडे अपील करावयाचें असतें. [से. रि. १९११. बंगाल व आसाम].

कोचाबंबा—हें बोलिव्हियातील एक शहर आहे.दक्षिण अक्षांश१७°–२७' व पश्चिम रेखांश ६५°४६' याच्यावर हें आहे. लोकसंख्या (१९००) २१,८८६ आहे. बहुतेक लोक इंडियन व मेस्टिझो आहेत. हवा सौम्य व समशीतोष्ण आहे व सभोंवारचा प्रदेश सुपीक व लागवडीस योग्य आहे. हें बोलिव्हियातील मोठें प्रगतीचें शहर मानले जातें. परंतु हें तुटक असल्यामुळें आता मागें पडलें आहे. येथील वखारींत परकी माल बराच आहे. या शहराचें ओरूरोशीं तारेनें दळणवळण आहे. याची मांडणी व्यवस्थित असून बगीच्यांनीं युक्त अशीं बरींच मनोहर घरें येथें आहेत. येथें एक विश्वविद्यालय व दोन विद्यालयें आहेत. परंतु त्याना सरकारी मदत नाहीं. हें शहर सोळाव्या शतकात वसविलें गेलें व कांहीं वेळ याला ओरोपेसा म्हणत असत. स्वातंत्र्य युद्धांत या शहरानें बराच पुढाकार घेतला होता. यावेळीं स्त्रियांनीं देखील स्पॅनिश लोकावर हल्ला केला होता.

कोचिन,संस्थान.–हें एक देशी संस्थान असून तें मद्रास सरकारच्या ताब्यात आहे. याला कोचिन हें नाव त्याच्या पूर्वीच्या राजधानीच्या शहरावरून पडलें. हल्लीं हें शहर इंग्रजाच्या ताब्यात आहे. याचें क्षेत्रफळ १४१७ चौरस मैल आहे. या संस्थानाचे एकामेकांपासून विभक्त असे दोन मुख्य भाग आहेत. त्यापैकीं मोठया भागाच्या उत्तरेस मद्रास इलाख्यातील मलबार जिल्हा, पूर्वेस मलबार व त्रावणकोर संस्थानें, दक्षिणेस त्रावणकोर संस्थान व पश्चिमेस मलबार व अरबी समुद्र असून धाकटा भाग ईशान्य दिशेस आहे. व याला मद्रास इलाख्यातील मलबार व कोईंबतूर या दोन जिल्ह्यांचें वेष्टण आहे. याला चित्तूर म्हणतात. याशिवाय या संस्थानाचे त्रावणकोर संस्थानांतहि कांहीं प्रांत आहेत.

स्वरूपवर्णन:—या संस्थानचे डोंगराळ, सपाट व समुद्रकिनारा असे निश्चित मर्यादेचे तीन भाग आहेत. यांपैकीं पूर्वेकडील डोंगराळ भाग म्हणजे पश्चिम घटपर्वताचेंच एक अंग असून यानें या संस्थानचा अर्धा अधिक प्रदेश व्यापिला आहे. व या भागांत लांब लांब डोंगरांच्या ओळी, मोठमोठया दऱ्या, खिंडी, दाट झाडी, निबिड अरण्यें व

एकमेकालगत व समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीची डोंगरसपाटी अथवा पठारें आहेत. या भागांत साग व इतर जातवान झाडांचीं वनें असून तो पालवी व फुलें यांनीं प्रफुल्लित दिसतो. या भागाच्या पश्चिमेस मैदान आहे. यांतून पुष्कळ नद्या, ओढे वहातात. मैदानांतील बहुतेक सर्व प्रदेश लागवडीस आणलेला दृष्टीस पडतो. हें मैदान समुद्रकिनाऱ्यावरील आखातापर्यंत पसरलें आहे. आखात व समुद्र यांमध्यें लांबट व अरुंद असा वालुकामय प्रदेश आहे. या सर्व प्रदेशभर नारळाच्या झाडांची दाटी असून नैसर्गिक अथवा कृत्रिम बांध असलेल्या कांहीं भागांत भाताचीं शेतें दृष्टीस पडतात. हा प्रदेश सखल पाणथळ असून पर्जन्यकाळांत याच्या कित्येक भागांत पूर येतात. कोचीन संस्थानांतील मुख्य नद्या अलवाये, चालकुडी, कुरुमाली अथवा कुरुव्हनूर, पोन्नानी व अनइमलाई या आहेत. या संस्थानच्या नैसर्गिक स्वरूपासंबंधानें लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे समुद्राशीं समांतर असलेली आखाताची साखळी ही होय.

शिवाय या संस्थानात एकमेकालगत अशी एनमाकल व मनकोडी नांवाचीं दोन मोठीं गोड्या पाण्याचीं सरोवरें असून तीं एनमाकल व चिरकल या ठिकाणीं आखातास मिळालीं आहेत. या संस्थानची एकंदर ७००० पेक्षा आधिक एकर जमीन लागवडीस आणली आहे.

या संस्थानांतील नेलिपथिस टेंकड्यांवर वेलदोडे व कॉफी यांचें उत्पन्न होतें. मैदानांत फणस, अंबा, सुपारी व केळीं हीं उत्पन्न होतात. व समुद्रकिनाऱ्यावर नारळाचे उत्पन्न होतें. या संस्थानांतील जंगलात हत्ती, गवे, वाघ, माकडें वगैरे जनावरें आढळतात.

या संस्थानची हवा दमट असून तिच्या योगें उत्साह व तरतरी वाटत नाहीं. पण एकंदरींत ती प्रकृतीस मानवते उत्तर भागापेक्षा दक्षिण भाग फार दमट आहे. चित्तूर तालुका पालघांटावर असल्यामुळें तेथील हवा कोरडी असून ती प्रकृतीस फार मानवते. लहान टेंकडयावरील व चित्तूरच्या कांहीं भागांतील हवा विशेषेकरून उन्हाळ्यांत रोगट असते. तेथील उष्णमान एप्रिल महिन्यांत ९६ ° व डिसेंबरांत ६९ ° असून त्याचें सर्वसाधारण प्रमाण ८२ ° आहे.

या संस्थानांत पर्जन्यवृष्टि नियमित असून बरीच आहे व तिचें प्रमाण सर्वत्र सारखें आहे. या सस्थानात दोन्हीही वाऱ्यांचा पाऊस पडतो. येथील पर्जन्यवृष्टीचें प्रमाण त्रिचूर येथें १३६" एर्नाकुलम येथें १०८" व तत्तमंगलम् येथें ६६" या प्रमाणें आहे.

इतिहास.—इ. स. ८५० पर्यंत या संस्थानाचा केरलच्या राज्यांत समावेश होत होता. याच सुमारास चेरमान पेरुमाल या शेवटच्या राजानें मुसुलमानी धर्माचा स्वीकार करून आपलें गोकर्णापासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेलें राज्य आपल्या नातेवाइकाच्या स्वाधीन केलें व आपण अरबस्तानांत तीर्थयात्रेस निघून गेला. त्याचें थडगें त्याच देशांत सांपडल्याचें ऐकिवांत आहे. सध्यांचे राजे त्याचेच वंशज होत. येथील राजाची शेजारच्या इतर राजांशीं व विशेषेकरून कालिकतच्या झामोरिनशीं नेहमीं झटापट सुरू असे. इसवी स. १५०२ मध्यें पोर्तुगीज लोकांस कोचीन शहरीं राहण्याची मोकळीक मिळाली व त्याच्या पुढच्याच वर्षी त्यांनीं तेथें किल्ला बांधून सभोंवतालच्या प्रदेशांत व्यापार करण्यास सुरवात केली. पोर्तुगीज लोकांनीं झामोरिन विरुद्ध कोचीनच्या राजास चांगली मदत केली. १५९९ त मेनेझस नांवाच्या रोमन कॅथोलिक पाद्रयाने कोचीनपासून १२ मैल अंतरावर असलेल्या उदयम्पेरूर या खेडेगावीं एक धार्मिक सभा भरवून सीरियन ख्रिश्चन लोक पाखंडी आहेत असें ठरविलें; व त्याच्या प्रार्थनेच्या पुस्तकात दुरुस्ती केली. १६६३ साली डच लोकांनीं पोर्तुगीज लोकांस कोचीन शहरातून घालवून दिलें. पुढें डच लोकांनीं सलगीनें कोचिनच्या राजापासून समुद्रकिनाऱ्यावर कांहीं गावांच्या मालकीची सवलत मिळविली. १७५९ त डच लोकाच्या वैभवास उतरती कळा लागल्यावर कालिकतच्या झामोरिननें कोचिनवर स्वारी केली. पण कोचिनच्या राजानें त्रावणकोरच्या राजाच्या मदतीनें त्यास परतवून लाविलें. या कामगिरीबद्दल कोचिनच्या राजानें त्रावणकोरच्या राजास कांहीं मुलुख बक्षीस दिला. १७७६ त म्हैसूरच्या हैदरअल्लीनें कोचीनवर स्वारी केली व तेथील राजास आपले सार्वभौमत्व कबूल करावयास लावून तो त्याजपासून खंडणी घेऊं लागला. १७९१ पर्यंत कोचिनचा राजा म्हैसूरचा माडलिक होता. याच वर्षीं त्यानें इंग्रजाशीं तह करून त्यांचे स्वामित्व कबूल केलें व एक लक्ष रुपये खंडणी देऊं लागला. १८०८ सालीं पालीयथ अचन या पिढीजाद प्रधानानें त्रावणकोरच्या प्रधानाशीं इंग्रजाच्या रेसिडेंटास मारण्याचा कट केला व राजाच्या नकळत इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड केलें. हें बंड मोडून इंग्रजांनीं राजाशीं नवा तह केला. त्यास पावणेतीन लाख रुपये खंडणी द्यावयास लाविली. याशिवाय इतर राजाशीं पत्रव्यवहार न करण्याचें व आपल्या पदरीं इंग्रजांच्या संमतीशिवाय कोणत्याहि यूरोपियनास न ठेवण्याचें कबूल केलें. इंग्रजांस संस्थानांतील कोणत्याहि किल्ल्यास तटबंदी करण्याचा अथवा न करण्याचा अधिकार होता. उलटपक्षीं इंग्रजांनीं संस्थानचें सर्व शत्रूंपासून संरक्षण करण्याची हमी घेतली. १८१८ त खंडणीची रकम २ लाख ठरविण्यांत आली. पुढें या संस्थानांत पुष्कळशा सुधारणा होऊन तें चांगलें भरभराटीस आलें. १८६२ त लार्ड कॅनिंग या गव्हर्नर जनरलनें येथील राजास वारस नसल्यास दत्तक घेण्याची सनद दिली. सध्याचे महाराजे सर रामवर्मा हे १९१४ त गादीवर बसले. यानां १७ तोफांच्या सलामीचा

मान आहे. १९२१ साली संस्थानिकाला महाराजा ही पदवी ब्रिटिश सरकारनें दिली.

प्राचीन अवशेष.—या संस्थानातील काहीं प्रदेशात व विशेषेंकरून उंचवट्यावरील भागात पुरातन थडगीं व त्याचप्रमाणें कोरीव लेणीं आढळतात. कोरीव लेण्यात तिरु-बिलवामल व त्रिचूर येथील मुख्य होत. याशिवाय क्रांगूर येथील डच लोकांच्या किल्ल्याचे अवशेष, टिपूस थांबवून धरण्याकरितां बांधलेल्या भिंती व त्रिचूरचा किल्ला हे अद्यापि अस्तित्वांत आहेत या संस्थानात पुष्कळ पुरातन देवळेंहि आहेत. त्यामध्यें यांत त्रिचूर येथील वदकुन्नाथन व क्रांगूर जवळील तिरुवंचिकुलम् हीं मुख्य होत. मत्तांचेरी येथील घड्याळाचा मनोरा असलेले ज्यू लोकांचें देऊळ ३०० वर्षांचें आहे. या शिवाय पुरातन वस्तूंतील काहीं महत्वाच्या वस्तू म्हटल्या म्हणजे ज्यू लोकांचे ताम्रपट व ख्रिश्चन लोकांची देवळें हीं होत इ. स १९२१ साली या संस्थानची लोकसंख्या ९,७९,०८० होती.

शेती.—दरवर्षी पाऊस नियमित रीतीने व पुष्कळ पडत असल्यानें येथील शेतीस कालवे वगैरेंची फारशी गरज नाहीं. चित्तूर तालुका व इतर काहीं भागात मात्र कालवे वगैरेंची जरूर भासते. चित्तूर तालुक्यांत अनिमलईचे कालवे असून इतर ठिकाणीं लहान नद्या अडवून त्याचें पाणी शेतीच्या उपयोगांत आणतात. या संस्थानात मुख्यत्वेंकरून साळीचें पीक होतें. येथील तांदुळाच्या निरनिराळ्या पन्नास जाती आहेत. सखल प्रदेशात तांदुळाचीं दर वर्षी दोन पिकें व उंच प्रदेशात फक्त एकच पीक निघतें व कांहीं कालव्याचें पाणी मिळणाऱ्या अथवा अडवलेल्या नदीचें पाणी मिळ-णाऱ्या चांगल्या जमीनींत दरवर्षी तीन पिकेंहि निघतात. या संस्थानातील रब्बीचीं पिकें म्हटलीं म्हणजे नेहमींचीं कडधान्यें, केळीं व इतर भाजीपाला, विड्याचीं पानें, सुपारी, सुंठ, ऊस मिरीं वगैरे होत. या शिवाय येथील वाळवंटात नारळाचे पीक होतें. या संस्थानातून नारळाची निर्गत फार आहे. नेलिम्प-थिस टेंकड्यावर ३१८२ एकर जमीन कॉफीची लागवड कर-ण्यात गुंतली आहे. खरीपाच्या पिकाकरिता या संस्थानची १,३७,००० एकर जमीन उपयोगात आणतात. या संस्था-नात म्हशीशिवाय इतर गुरे ढोरें अथवा मेंढ्या याची मूळ उत्पत्ति होत नसून गाई व बैल अनुक्रमें कोईंबतूर व म्हैसूर येथून आणविलीं जातात.

या संस्थानात कायमचे कालवे फक्त चित्तूर तालुक्या-तच आहेत. एकंदर कालव्याची संख्या ६ असून त्यांपैकीं २ संस्थानिक सरकारनें बांधले आहेत आणि बाकीचे चार लोकांनीं बांधले आहेत व याशिवाय संस्थानांत पाणी अड-विण्याकरितां १६९ बांध आहेत. हे कालवे १७,००० एकर जमीनीस पाणी पुरवितात. प्रतिवर्षी संस्थानिक सरकार १७,००० रु कालव्यांचा कर म्हणून वसूल करतें.

१९२२ सालीं अभिरापल्लीचें धरण बांधण्यासंबंधीं त्रावण-कोर व कोचीन सरकार या दोहोंमध्यें एक योजना ठरली गेली. छलकुडी नदीचा ओघ बळवून त्रावणकोर सरहद्दी-नजीक असलेल्या अरण्यातील पांच हजार एकर जमीनीस पाणी पुरविणें हा हेतु असल्यामुळें अर्थात् हें सर्व त्रावण-कोर सरकारनें करावें असें ठरलें. सुमारें वीस हजार एकर कोचीनमधील पिकास पाणी पुरविलें जावें म्हणून इचिप्पुराचे खालीं १२ मैल लांबीचे धरण कोचीन सरकारनें बांधावें असें ठरलें. कोचीनमधील जमीनींची लागवड उन्हाळ्यांत होते. त्यावेळीं कोचीन सरकारनें सर्व पाणी घ्यावें. परंतु राहिलेल्या ऋतूंत त्रावणकोर संस्थानानें सर्व पाण्यावर हक्क सांगावा, असें ठरलें गेलें. १९२३ जून मध्यें कोचीन सरकारनें एका इंग्रजी कंपनीचा अर्ज विचारांत घेतला. निलगिरींतील पैकारा नदीच्या पाण्याचा पुरवठा करणारा प्रांत आपल्या ताब्यांत असावा व तेथें सर्व पाणी जमा करण्याचा सर्व हक्क आपणास असावा असें या इंग्रज कंपनीचें मागणें होतें. विद्युच्छक्तीची वाढ करण्याकरिताच या कंपनीला पाण्याचा सर्व हक्क हवा होता.

संस्थानातील जंगलें.—या संस्थानचा जवळ जवळ ६०५ चौरस मैल प्रदेश जंगलानीं व्यापिला असून तीं संस्थानच्या उत्पन्नाची मुख्य बाब आहे. जंगलाचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग असून त्या प्रत्येकावर एक असिस्टंट कॉन्झरव्हेट-रची नेमणूक केली आहे व या दोघावर कॉन्झरव्हेटर देखरेख ठेवितो. पहिल्या भागात मचाड व चित्तूर या दोन डोंगर ओळींचा समावेश होत असून दुसऱ्या भागात कोदास्सेरी व परंबिकोलम् या दोन रांगा आहेत. या दोन्हींहि भागात साग, शिसवीचें लांकूड व टेंबुरणींचें लांकूड व इरूल, अईनी व्हेगाई वगैरे सर्पण उत्पन्न होतें. परंबिकोलम, नेलिंपथिस व कोदास्सेरी या रांगात उत्तम इमारती लांकडाची पैदास होते. याशिवाय जंगलाचें इतर उत्पन्न म्हटलें म्हणजे वेलदोडे, मध, मेण वगैरे जिन्नस होत. संस्थानांतील लोकास जंगलांतून सर्पणाच्या मोळ्या, बांबू, कुंपणाचे कांटे, खताकरिता पालवी, शेतकीचीं आउतें करण्याकरितां लांकूड, चारा, झोपडीचें गवत हीं फुकट घेऊन जाण्याची मोकळीक आहे. १९०३-४ सालीं संस्थानास जंगलाचें उत्पन्न ५८४००० रु. झालें. या संस्थानात चुनखडी, ग्रानाइट व लॅटराइट या दग-डाच्या खाणी असून लोखंड व अभ्रक या धातूहि सापडण्या-सारख्या आहेत.

व्यापार व उद्योगधंदे—या संस्थानांतील चित्तूर व तलपिल्ली तालुक्यांत सुती कापड निघतें. सुबक कापड विणणें झाल्यास परकीय सुताचा उपयोग करतात. वदकाचेरी येथें निरनिराळ्या रंगाच्या उत्तम गवती चटया होतात. एर्नाकुलम व मत्तांचेरी येथें काथ्याच्या चटया व गालीचे तयार होतात.

या संस्थानांतील मुख्य औद्योगिक कारखाने म्हटले म्हणजे खोबऱ्याचें तेल काढण्याचे होत. याशिवाय येथें रोजच्या उपयोगांतील मातीचीं भांडीं तयार होत असून त्रिचूर व मुकुंदपुरम् तालुक्यांत दोन दोन कवलें व विटा तयार करण्याचे कारखाने आहेत. विपिन येथें व सोरानपूर जवळ लांकूड कापण्याच्या गिरण्या आहेत. मत्तांचेरी येथें नारळाच्या काथ्याचे दोर करण्याचे विजेचे कारखाने आहेत. विणकामाच्या धंद्यांत साधारण प्रगति झालेली असून त्रिचूर येथील कातण्याच्या व विणण्याच्या सिताराम गिरणीचें भांडवल १९२० मध्यें वीस लाख रुपये इतकें वाढलें. १९२३ सालीं एकंदर ३०० माग यांत्रिक शक्तीनें चालणारे असे होते खोबरेल तेलाचा व्यापार एवढा वाढला आहे कीं, व्यापाराकरितां समुद्रांतून जाणारीं मोठालीं जहाजें थेट बंदरांत येतात. इ स. १९२१ च्या खानेसुमारी प्रमाणें यंत्रानें चालणाऱ्या तेलाच्या गिरण्या ९ आहेत. तीन चिरकामाच्या गिरण्या असून, तेथें ४०० लोक काम करितात. कौल व विटांचे पांच कारखाने असून तेथील कामकऱ्याची संख्या ४०० आहे. सहा रबराचे कारखाने आहेत. व तेथील कामकऱ्यांची संख्या १४०० आहे. उपरिनिर्दिष्ट कारखानेच संस्थानांतील मोठया औद्योगिक संस्था होत. इ. स. १९२२-२३ सालीं छलकुडी येथें ६०,०००रुपये भांडवलाचा एक मातीच्या भांड्याचा कारखाना स्थापण्यांत आला आहे.

या संस्थानातून खोबऱ्याचें तेल, सूत, दोर, नारळाच्या दोऱ्या व चटया, खोबरें, सुपारी, सुंठ, मिरीं, मासे इत्यादि जिन्नस बाहेर पाठविले जातात; व बाहेरून तांदूळ, कापूस, सुती कापड, चाकू, कात्र्या, साखर वगैरे जिन्नस येतात

१९०२ सालीं मद्रास रेल्वे कंपनीनें शोरानूरपासून एर्नाकुलमपर्यंत एक आगगाडीचा रस्ता बांधला. एक ६५ मैल लांब असलेला व ७० लाख रुपये खर्च लागलेला रस्ता संस्थानिक सरकारनें बांधला असून तो मद्रास रेल्वे कंपनी उपयोगांत आणीत आहे. शोरानूर—नीलाबर रेल्वे काढण्याची वाटाघाट चालू आहे संस्थानातील पक्क्या रस्त्यांची लांबी ३९१ मैल; कच्च्या रस्त्यांची लांबी ५६ मैल आहे. याशिवाय समुद्रालगत जलमार्गानें व्यापार चालतो.

नवीन रस्ते बांधले जात असून सध्याची ट्राम्वेगाडी, संस्थानच्या रानांतील उत्पन्नाच्या वाहतुकीकरिता अपुरी पडत असल्यामुळें तिचें क्षेत्र वाढविण्यांत येत आहे. वाहतुकीकरितां कायमच्या खुल्या असलेल्या रस्त्यांची लांबी वळणाचे दोन्ही रस्ते धरून ५२ मैल आहे

राज्यव्यवस्था—कोचीन संस्थानाचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग केले असून त्याचीं मुख्य ठिकाणें अनुक्रमें त्रिचूर व एर्नाकुलम् हीं आहेत. यापैकीं प्रत्येक भाग एका अंमलदाराच्या ताब्यांत असून त्यास पेशकार अशी संज्ञा आहे. हा अंमलदार जिल्ह्याचा न्यायाधीश असून त्याचा हुद्दा इंग्रजी मुलुखांतील कलेक्टराच्या बरोबरचा असतो. उत्तर भागांत त्रिचूर तलपिल्ली व चित्तूर, हे तालुके असून दक्षिण भागांत कनयन्नूर, कोचीन, क्रांगनूर व मुकुंदपुरम् हे तालुके आहेत. या प्रत्येक तालुक्यावर एका तहसिलदाराची नेमणूक केली असून त्याला दुय्यम प्रतीच्या न्यायाधिशाचा अधिकार असतो. याशिवाय नेम्मारकुन्नमकुलम् व अदूर येथें तीन स्थायिक व मदतगार न्यायाधीश नेमले आहेत. तालुक्याचे आणखी ४४ विभाग आहेत. या सर्वांवर दिवाण हा मुख्य प्रधान असून त्याच्यावर सर्व राज्यव्यवस्थेची जबाबदारी असते.

संस्थानचे एकंदर उत्पन्न सुमारें ३० लाख आहे. ब्रिटिश सरकारला खंडणी २ लाख रु. द्यावी लागते. सध्या संस्थानांत इंग्रजी अमलाखालील प्रदेशात प्रचलित असलेलीं हिंदी नाणीं प्रचारात आहेत.

१८६५ त इंग्रज सरकारानें १,१०,५०० रु. उत्पन्नाची हमी घेतल्यावर संस्थानिक सरकारनें तंबाखूच्या मक्त्याची वहिवाट बंद केली. संस्थानातील इकडून तिकडे जाणाऱ्या मालावरील जकात उठविली; आपल्या बंदरावरील जकात इंग्रजी बंदराबरोबर आकारण्याचें ठरविलें व मलबार जिल्ह्यांतील भावानें आपल्या मुलुखांत मीठ विकण्याचें ठरविलें.

दिवाणी न्याय देण्याचें काम सहा मुन्सफकोर्टें, दोन जिल्हाकोर्टें व एक मुख्य कोर्ट यांजवर सोपविलें आहे. फौजदारी न्याय देण्याचें काम मुख्य कोर्ट, दोन सेशन कोर्टें, दोन पहिल्या प्रतीचे जिल्हान्यायाधीश दहा दुय्यम प्रतीचे अथवा तिसऱ्या दर्जाचे न्यायाधीश याजवर सोंपविलें आहे. मुख्य कोर्टाचा निकाल कायम असतो. पण फांशीच्या शिक्षेस मात्र राजाची संमति लागते. मुख्य कोर्टांत तीन न्यायाधीश असून त्यापैकीं एक यूरोपियन बॅरिस्टर असतो.

कायदे करण्याकरितां ७ सभासद व एक अध्यक्ष यांची एक सभा नेमली असून तिची मुदत तीन वर्षेपर्यंत असते. कायदा करावयाचा झाल्यास पहिल्याने या सभेस कायद्याचा मसुदा करण्याविषयीं विनंति करण्यांत येते; व मसुदा तयार झाल्यावर दिवाण त्यात योग्य ते फेरफार करून तो रेसिडेंटामार्फत मद्राससरकाराकडे पाठवितो. मद्रास सरकारानें तो पसंत केल्यावर तो राजापुढें सादर करण्यांत येतो व त्याची संमति मिळाल्यावर त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. कधीं कधीं कायदेमंडळाला न विचारतां देखील मसुदा तयार करण्यांत येतो. विशेष प्रसंगीं राजा आपल्या नांवानें हुकुमनामे काढतो व हे हुकुमनामे कायदेच समजले जातात. संस्थानचें लष्कर २७६ शिपायांचें आहे. संस्थानात एकंदर ५९३ पोलिसशिपाई आहेत. १९२०—२१ सालीं एकंदर १७१ सरकारी व २७३ निमसरकारी संस्था होत्या. जुलै १९२३ मध्यें शाळेंतील मुलांनां अनेक सवलती

देऊन, मागसलेल्या वर्गामध्यें शिक्षणप्रसार करण्याचा कोचीनसरकारनें प्रयत्न केला. शैक्षणिकदृष्ट्या 'मागसलेले' व 'खालावलेले' असा भेद करून, संस्थानांतील इंग्रजी शाळांतून शिक्षण मोफत देण्याची संस्थाननें तजवीज केली. कारण लोकांच्या वाढत्या दारिद्र्यामुळें अर्धी फी ठेऊनहि शाळेंतील मुलांची संख्या कमी होऊं लागली होती एर्नाकुलम येथें एक कॉलेज आहे. संस्थानात एकंदर ३३ दवाखाने व इस्पितळें आहेत.

ता लु का—हा एक समुद्रकिनाऱ्यावरील विभाग व तालुका असून मद्रास इलाख्यातील मलबार जिल्ह्याच्या दक्षिणेस आहे.याचें एकंदर क्षेत्रफळ ९ चौरस मैल आहे. याची लोकसंख्या १९०१ सालीं २५८५९ होती या तालुक्याचें मुख्य ठिकाण कोचीन बंदर आहे.

श ह र.—हें कोचीन संस्थानच्या सरहद्दीतील समुद्र किनाऱ्यावर वसलें आहे. शहराच्या उत्तर भागात कित्येक डच घरें दृष्टीस पडतात. हे शहर एक उत्तम बंदर असून तेथील पाण्याची खोली ७ पासून ९ पुरुष आहे. मध्या आगबोटी या बंदराच्या दोन मैल अंतरावर उभ्या राहतात.

पहिल्यानें हें शहर एका लहानशा नदीच्या काठीं होतें. पुढें १३४१ त या नदीस महापूर आला व महापुराच्या योगानें जवळच्या प्रदेशाचें स्वरूप अगदीं बदलून जाऊन पूर्वीच्या ठिकाणीं बंदर व व्हिपीन बेट हीं अस्तित्वांत आलीं अशी दंतकथा आहे.

इ ति हा स.—या शहराचा स्वतंत्र इतिहास पोर्तुगीजांच्या आगमनापासून सुरू होतो. इ. स. १५०० सालीं येथें कॅब्राल आला होता.याचा येथील राजानें चागला सन्मान केला. हा मिरी घेऊन पोर्तुगाल देशास परत गेला. १५०२ मध्यें येथें व्हास्को-ड-गामा येऊन त्यानें एक वखार स्थापन केली. १५०३ मध्यें अलबुकर्क येथें येऊन त्याने येथील राजास झामोरिन विरुद्ध मदत केली.पुढें झामोरिनला परतवून लावल्यावर अल्बुकर्कनें येथें मॅनुअल कोट्टा नांवाचा एक किल्ला बांधला. १५०४ मध्ये झामोरिननें या किल्ल्यावर चाल केली. पण पॅचेकोनें त्याचा हल्ला परतवून लाविला. १५०५ सालीं या शहरीं अलमेडा नावाचा पोर्तुगीज गव्हर्नर येऊन त्यानें किल्ल्याची डागडूज केली. १५३० मध्यें येथें संट फ्रॅन्सिस झेबियर येऊन त्यानें पुष्कळ लोकास ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली. १५७७ त जीसस नामक मंडळाने एतद्देशीय लिपींतील पहिलें पुस्तक प्रसिद्ध केलें. १५८५ त येथें राल्फ फिश नांवाचा पहिला इंग्रज प्रवासी आला होता. १६३४त ईस्ट इंडिया कंपनीनें येथें आपलें ठाणें वसविलें. १६६३ त हें शहर डच लोकानीं काबीज केलें. डच अमदानींत येथील व्यापार बराच वाढला व येथील जकाती-वसुलाचा आंकडा ३०००० रु. यावर येऊन ठेपला. डच लोकानीं या शहराच्या रचनेंत बरेच फेरफार केले. १७९५ त इंग्रज लोकांनीं हें शहर हस्तगत केलें. १८१४ त हें शहर पूर्णपणें इंग्रजांच्या ताब्यांत आलें.

हें शहर मलबार किनाऱ्यावरील तिसऱ्या दर्जाचें बंदर आहे. १९०७-८ सालीं येथील आयात व निर्गत व्यापार अनुक्रमे ८२ व २०८ लाख किंमतीचा होता. येथून मुख्यत्वेंकरून खोबऱ्याचे तेल व नारळाचे दोर बाहेरगावीं जातात. येथे बाहेरून येणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे ब्रह्मदेश व बंगाल प्रातातून येणारा तादूळ होय. येथील व्यापाराचे इतर जिन्नस म्हटले म्हणजे मिरी, इमारती लाकूड, सूत, सुती कापड व घासलेट तेल हे होत.

मद्राससरकारच्या योजनेप्रमाणें १९२१ मेमध्यें कोचीन येथे बंदर करण्याच्या कामास आरंभ झाला. १९२३ त प्रयोगात्मक काम बहुतेक पुरें झालें. या कामाचा मूळ अंदाज ६ लाख होता तो ९लाख झाला. कारण बंदराच्या आतील भागातील गाळ काढून खोली वाढविणें जरूर झालें होतें. काम लवकर व्हावें म्हणून १९२२ त एक नवीन गाळ काढण्याचें यंत्र आणलें. या योजनेच्या दुसऱ्या विभागाचा अंदाज ५५ लाख झाला. १९२३ मध्यें या योजनेचा प्रयोगात्मक भाग यशस्वी झाला. कारण मूळच्या कोचीन बंदरातील गाळ यंत्राच्या साहाय्याने नाहींसा झाला. या बंदराचा अंतर्बाह्य छेद करण्यात आल्याने इष्ट परिणाम झाला. कारण बंदरातील खोल पाण्यामुळे वेणदुरटी नावाचे बेट व एनाकुलम् या दोहोंमधील खोल पात्र जोडले गेले व नियोजित दिशेनें पाण्याची भरती-ओहटी सुरू झाली.

येथील हवा दलदलीत उष्ण असून पाणी विकारी आहे. येथें ५।६ हायस्कुलें व तितक्याच मिशनरी संस्था आहेत. इंग्रजी व मल्याळी भाषेतली मासिके, वर्तमानपत्रें निघतात.

२ फ्रेंच-इंडो-चीनच्या अगदीं दक्षिण टोकाला ही एक फ्रेंचाची वसाहत आहे. याच्या पश्चिमेस सयामचें आखात वायव्य व उत्तर-कॅम्बोडिया, पूर्वेस-अनाम, आग्नेयीस चीनचा समुद्र आहे.क्षे. फ. २५६०००चौरस मैल.लोकसंख्या१९९९०२९.

भू व र्ण न—हा देश एक सुपीक मैदान आहे. अनाम हा पर्वत आहे. मेकाग, डोनाय, सायगॉन, आणि वैको या मुख्य नद्या आहेत याची हवा उष्ण व सर्द आहे. पावसाळा एप्रिल ते आक्टोबरपर्यंत असून पाऊस अति पडतो. उन्हाळा एप्रिल ते जूनपर्यंत असतो. यात वाघ, चित्ता, मुंगुस, डुकर, हरीण, रेडा, गेंडा, हत्ती, वानर इ. बदकें, जलचर पक्षी सर्प वगैरे प्राणी आढळतात.

उ त्प न्न आ णि धं दे.—तांदूळ,मिरी, ऊंस, बुंद,कापूस, तंबाखू आणि ताग. शेतीकडे रेडे आणि घोडे यांचा उपयोग विशेष करतात. तांदुळाच्या गिरण्या, साखर, तांदुळाची दारू, रेशीम, मासे आणि मीठ हे मुख्य धंदे आहेत. येथून तादूळ, वाळलेले अथवा खारे मासे, मिरी, कापूस वगैरे माल निर्गत होतो. येथील आयात-पका माल, धातू, लोखंडी सामान, यंत्रसामुग्री, चहा, मद्यें, खनिज तेलें, अफू, कागद,

हत्यारें आणि बंदुकींची दारू. या देशात सायगान आणि मिथो हीं मुख्य बंदरें आहेत.

राज्य व्य व स्था.—कोचीन चायना येथें एक लेफ्टेनंट गव्हर्नर नेमला असून तो इंडो-चायना येथील गव्हर्नर-जनरलच्या हुकमतीखालीं असतो. त्याचें एक १६ जणांचें मंडळ असतें. पैकीं ६ सभासद फ्रेंच नागरिक ६ तद्देशीय आणि ४ सायगॉन येथील व्यापारी मंडळ आणि सल्लागार मंडळ यांनीं निवडलेले असतात. या मंडळाकडे सर्व प्रकारचीं कामें सोपविलेलीं असतात. कौन्सिलप्रिव्हीं हें सल्लागार मंडळ असून यांत २ तद्देशीय सभासद असतात. वसाहतीचे ४ भाग केले आहेत. प्रत्येक भागाच्या अधिकाऱ्याला इन्स्पेक्टर म्हणतात. या भागाचे २० प्रांत आहेत. प्रत्येक प्रांतावर एक ॲडमिनिस्ट्रेटर व प्रांतिक कौन्सिल असतें. प्रांताचे जिल्हा आणि काम्यून असे भाग असतात काम्यूनमधील सर्व व्यवस्था तद्देशीय लोकांच्या हातीं असते. प्रत्येक काम्यून एक मेंबर प्रांतिक कौन्सिलाकरितां निवडते. मेयर व दोन सल्लागार हे सर्व गावची व्यवस्था ठेवतात. जमीनमहसूल आणि डोईपट्टी ही उत्पन्नाचीं साधनें आहेत. ९ मुख्य शहरात फ्रेंच न्यायकोर्टे असून ४ शहरात फौजदारी कचेऱ्या आहेत. या कचेऱ्यात फ्रेंच किंवा अनामी कायद्याप्रमाणें निकाल देण्यात येतो. दोन अपीलकोर्टें आहेत. जवळ जवळ ६०० प्राथमिक शाळा आहेत. सायगॉन राजधानी असून तीनचार मोठीं शहरें आहेत

इ ति हा स.—कोचीनचीनचा प्राचीन इतिहास ज्ञानकोश वि. १ यांत आलेला आहे (पा. १९६-१९७). ९ पासून १२ व्या शतकापर्यंत कोचीनचीन हा ख्मेर राष्ट्राचा भाग होता. नंतर १५ व्या शतकापर्यंत चंपा राज्याच्या सत्तेखालीं आला १७ व्या शतकात याचा पूर्वभाग आणि १८ व्यात पश्चिम भाग अनामी लोकांनीं घेतला. १८६७ मध्यें अनामी लोकांपासून फ्रेंचांनीं कोचीन-चायना घेतला. १८८७ मध्यें याचा इंडो-चायना यात समावेश करण्यात आला.

कोचिनील किडे—या किड्यापासून किरमिजी, शेंदरी व नारिंगी रंग तयार होतो. याना लॅटिन नांव कोकस कॅक्टि असें असून इंग्रजींत कोचिनील असे म्हणतात. आणि आपल्याकडे किरमदाणा, किरमझ, किरंदा, अथवा किर्मि असें संबोधितात. याच्यांतील माद्यापासून रंग बनवितां येतो. हा किडा कोसिडेश्रेणींतील आहे. हा मूळचा मेक्सिको व पेरु आणि दाक्षिण व मध्य अमेरिका या देशांतील असून याची उपजीविका मुख्यतः फड्या निवडुंग (आणि त्याच्या निरनिराळ्या जाती)यावर होते. यूरोपात हा किडा इ.स.१५१८ च्या सुमारास मेक्सिकोंतून स्पॅनिश लोकांनीं आणला. मेक्सिकोमध्यें याच्या पासून होणाऱ्या रंगाचा समावेश राजेरजवाड्यांना करावयाच्या नजराण्यांत करीत असत. रंगकला इटलीमध्यें इ.स. १५४८ च्या सुमारास जरी वाढत्या प्रमाणांत होती, तरी त्याकाळीं या किडयांची इकडे माहिती नव्हती असें दिसतें. तिकडे इ स. १६५० त शेंदरी रंग करण्याच्या वेळीं याचा प्रथम उपयोग करण्यात आला. इ. स. १७२५ पर्यंत तर या किडयाच्या सजीवपणाबद्दलच शंका होती. ते एखाद्या झुडुपाचें बीं असावें असेंच समजलें जाई. कारण ते किडे अतिशय सूक्ष्म असतात. सूक्ष्मदर्शक यंत्रानेंहि त्यांच्यातील नर व मादी याची ओळख पटत नाहीं. नर हा मादीच्या निम्म्यानें लहान असून त्याला पांढरे पंख असतात. त्याचा रंग तांबडा लाल असतो. मादीला पंख नसतात व तिचा रंग पिंवळसर असतो आणि त्यांची संख्या (नरापेक्षा) जास्त असते. एका नरामागें २०० ते ३०० माद्या असें हे प्रमाण पडतें. अंडीं घातल्यावर मादी मरते व तिचेंच मेलेलें शरीर अंडयांना पुरेशी ऊब मिळण्याच्या उपयोगी पडतें. हल्लीं स्पेन व अल्जिअर येथेंहि याची जोपासना करितात. तिकडे वर्षांतून तीन वेळा याचा संग्रह करितात. त्याना फडया निवडुंगावरून हळूच काढून पिशव्यात घालून पिशव्या ऊन पाण्यात अगर वाफेत सोडतात किंवा नुसत्या उन्हातहि ठेवतात. अशा कृतीनें किडयाना मारतात. ह्या मेलेल्या किडयाचा आकार चमत्कारिक वाकडा तिकडा बनतो. एक पौंड कोचिनील रंग तयार करण्यास असले सत्तर हजार किडे लागतात. याच्या मुख्य दोन जाती आहेत. त्या रुपेरी व काळ्या रंगाची या होत. रुपेरी रंगाचा किडा करडा—तांबूस रंगाचा असून त्याच्या अंगावर चकचकीत पांढऱ्या रंगाच्या वळ्या असतात. काळ्या जातीच्या किडयाचा रंग पिवळसर तांबूस असा काळा असतो व त्याला चकाकी नसतें. पहिल्याची पैदास करावी लागते व दुसऱ्या जातीचा किडा आपोआप उत्पन्न होतो. ग्रॅनिला नावाची एक हलकी तिसरी जात आहे. पहिल्या वेचणीचे किडे फार उत्तम असतात. कारण त्यातील माद्या गाभण नसतात. पुढील वेच्यातील किडे लहान मोठे व मेलेल्या किडयाचे सांगाडे यांचें मिश्रण असल्यानें त्यातून थोडाच रंग उत्पन्न होतो. काळ्या रंगाच्या किडयावर अभ्रक भस्मासारखी पांढरी पूड वगैरे टाकून ते रुपेरी म्हणून लुच्चेगिरीनें बाजारात विकतात. परंतु सूक्ष्मदर्शक यंत्रानें ही लबाडी समजून येते. या किडयाच्या अंगातच असलेल्या कोचिनिएलीन किंवा कर्मिनिक या(कृ उ. प्र.) आम्लापासून दिलेले रंग उत्पन्न करतात. या किडयापासून मेणहि तयार करिता येतें हिंदुस्थानातहि याची पैदास करितात. रुपेरी किडे हे जास्त मौल्यवान असतात. याची आपल्याकडे पैदास करण्याचे येथील सर्व प्रयत्न निष्फळ झाले आहेत. सतराव्या शतकात पोर्तुगीजांनीं हा किडा हिंदुस्थानांत आणण्याचा प्रयत्न केला असें म्हणतात. कारण मद्रासेहून त्यावेळीं डॉ. अंडरसन यानें असल्या रंगाचें किडे सर बँक्स याला पाठविले होते पुढें ईस्ट इंडिया कंपनीनें कॅ. नेलसनकडून ब्राझिलमधून हे किडे (बसलेल्या नाग फणीसह)इ. स. १७९५ मध्यें आणलें. हे दुसऱ्या(काळ्या)जातीचे होते. आपल्याकडे कांहीं किडे फड्या निवडुगाचीं लाल फुलें तर कांहीं किडे

पिवळीच फुलें खातात. यावरून या दोन जाती असाव्यात असें म्हणतात. लाल फुलें खाणारे हे अधिक दिवस जगतात असें डॉ. बोर्नेला म्हणतो. हे जन्मल्यानंतर कांहीं दिवसांनीं निवडुंगास चिकटून बसतात. जेव्हां त्यांची चलनशक्ति जाते तेव्हां रुपेरी किडय़ाच्या भोंवती एक पांढरा कोशेटा (लवी) गुंडाळला जातो. या वेष्टनांत नर व मादी दोन्ही असतात. नराच्या खालीं एक उघडया तोंडाची पिशवी बनत जाते. ती पुरी झाली कीं, नर बाहेर पडतो. तो दूर न जाता जवळच्या गुरफटलेल्या माद्यांच्या आसपास फिरतो व तो थोडयाच दिवसांत मरतो. मादी कोशेटयाबाहेर पडतच नाहीं. ती आंधळी होऊन तिच्या शरीराचा आकारहि बदलतो. मात्र ती निवडुंगांतील रस आपल्या नागीवजा नळींतून मिळवून आपलें पोषण करिते. बहुतेक तीन महिन्यांनीं तिला संतति होते. ती गाभण होण्यापूर्वीच तिला उत्तम रंग करण्यासाठीं वेचून मारावी लागते हें वर सांगितलेंच आहे. स्टोव्हवर किडे वाळविल्यास कोशेटा राहूनहि भारी कोचिनील तयार होते. वाफेनें अगर ऊन पाण्यानें किडे मारल्यास कोशेटा नाहींसा होऊन काळें कोचिनील बनतें. या कोचिनीलचा उपयोग पूर्वी, लोंकर, रेशीम व कापूस रंगविण्यांत फार होई. परंतु अलीकडे अनिलीन (डामरा)पासून होणारे रंग निघाल्यामुळें याचा उपयोग फक्त औषधें मेवामिठाई आणि चित्रकाराचे कांहीं रंग यांच्याच कामीं होतो. रुपेरी किडयाचा कोशेटा हा सुद्धा मौल्यवान असतो. कारण तो कोसेरीन नावाच्या मेणापासून बनलेला असतो. लोंकरीला शेंदरी रंग देतांना कोचिनीलबरोबरच रंगबंधकारक कथलाचा क्षार वापरतात; त्याच वेळीं तुरटीहि वापरल्यास किरमिजी रंग तयार होतो. यावरील क्षाराचें व अल्युमिनाचें मिश्रण कोचिनीलबरोबर करून त्यापासून तयार केलेला रंग व लाल शाई आणि चित्रकारांचे रंग अलीकडे बरेच विकत मिळतात. याच जातींपैकीं नाकाराट कार्माइन नांवाचा एक उत्तम रंग मिळत असतो. फ्लोरेन्टाइन नांवाचा रंगहि कोचिनीलपासून तयार होतो. फार वेळ उन्हांत राहिल्यास हे सर्व रंग फिक्के पडतात. अनिलीन रंगामुळें यांचा खप कमी होत चालला आहे. इ.स. १८९९-१९०१या वर्षांत हिंदुस्थानांत सरासरी १५८३ हंड्रेडवेट कोचिनीलची आयात झाली होती. हल्लीं ती कमी होत चालली आहे. ही आयात बहुतेक फ्रान्स व अमेरिका या देशांतून होते [वॅट-कमर्शि. प्राडक्ट्स्. पृ. ३४७]

कोट—पंजाबांतील अटक जिल्ह्याच्या फत्तेजग तहाशिलींतील एक जहागीर. हिचें क्षेत्रफळ ८८ चौरसमैल आहे. पूर्वी या ठिकाणीं घेबा जातीचें स्वतंत्र राज्य होतें. या जातीचे मुख्य बाह्यतः शिखांचे मांडलिक म्हणून म्हणवीत. पण वस्तुतः त्यांची सत्ता अबाधितच होती. १८३० मध्यें सैयद अहमद नांवाच्या एका धर्मवेड्या मुसुलमान पुढाऱ्याविरुद्ध रणजितसिंगाला येथील राय महंमद नांवाच्या एका मुख्य अधिकाऱ्यानें मदत केली. त्यामुळें रणजितसिंगानें त्याला ही जहागीर दिली. इ.स. १८५७ सालच्या बंडांत रायमहंमद याच्या फत्तेखाननामक मुलानें ब्रिटिशांनां मदत केली. व त्यामुळें इंग्रज सरकारनें खूष होऊन त्याला कांहीं जहागीर बक्षीस दिली. फत्तेखान हा १८९८ सालीं मरण पावला. त्यानंतर १९०३ पर्यंत सरदार महंमदअलीखान यानें राज्य केलें. नंतर त्याचा मुलगा गादीवर आला. तो सज्ञान होईपावेतों त्याच्या जहागिरीची व्यवस्था कोर्ट ऑफ वार्डसच्या ताब्यांत होती. कोट जहागिरींत ६७ खेडीं आहेत व या जहागिरीचें सालीना उत्पन्न ४४०० रुपये आहे. कोटचे जहागिरदार घोड्यांचे फार शोकी असल्यानें त्यांच्यापाशीं चांगले जातिवंत घोडे असतात, व चांगल्या घोड्यांची निपज करण्याच्या बाबतींत ते अतिशय काळजी घेतात.

कोंट, ऑगस्ट (१७९८-१८५७)—हा प्रत्यक्षज्ञानवादी फ्रेंच तत्ववेत्ता मॉंटपेलियर येथें जन्मला. त्या शहरांतल्या शाळेंत त्याचें शिक्षण प्रथम झालें व १८१४ मध्यें इकोल पॉलिटेक्निक या विद्यालयात तो गेला. १८१६ मध्यें पॅरिस येथें राहून गणितविषय शिकवून तो पोटास मिळवूं लागला. या वयांत बेंजामिन फ्रँक्लिनला तो अगदीं देवाप्रमाणें मानीत असे. पॅरिसमध्यें त्याला वार्षिक प्राप्ति ८० पौंड होत असे; आणि तारुण्यांतील सुखोपभोग घेण्याची आवड असूनहि अधिक पैसा मिळविण्याकरिता स्वातंत्र्य गमावण्यास तो तयार नव्हता. म्हणून थोडक्या खर्चांत तो रहात असे.

१८१८ मध्यें सेंटसायमन ह्या विद्वानाशीं त्याचा परिचय होऊन त्याच्या आचारविचारांवर महत्वाचा परिणाम झाला. राजकीय गोष्टींनाहि नियमबद्ध शास्त्र असूं शकतें, आणि तत्वज्ञानाचें अंतिम ध्येय मानवसमाजाचें कल्याण होय, या दोन मूलभूत कल्पना कोंटनें सेंट सायमनपासूनच घेतल्या. व त्याच्याच शिकवणुकीनें समाजाची नैतिक, धार्मिक व राजकीय पुनर्घटना कोणत्या तत्वानुसार व्हावयास पाहिजे त्याचा विचार करण्यास तो प्रवृत्त झाला.

१८२५ मध्यें कोंटनें कॅरोलाइन मॅसिनबरोबर लग्न केलें. पण हा संबंध त्याला सुखावह झाला नाहीं. १८२६ मध्यें प्रत्यक्षज्ञानवादी तत्वज्ञाना(पॉझिटिव्ह फिलॉसफी)संबंधानें त्यानें आपले विचार पॅरिसमधील लोकांपुढें व्याख्यानमालेद्वारा मांडले. हीं पहिलींच त्याचीं व्याख्यानें इतकीं सरस झालीं कीं, विश्वरचनाशास्त्रज्ञ हंबोल्ट, भूमितिशास्त्रज्ञ पॉइनसॉट, इंद्रियविज्ञानशास्त्रज्ञ ब्लेनव्हिल वगैरे थोर विद्वान तीं ऐकण्यास येत असत. दुर्दैवानें या मालेंतल्या तिसऱ्या व्याख्यानानंतर कोंटचा मेंदू एकाएकीं बिघडला. या आजारीपणात त्यानें त्रासून सीननदींत उडी टाकली. पण वेळेवर मदत पोहोंचल्यामुळें तो वांचला. १८२८ मध्यें त्यानें आपली व्याख्यानमाला पुरी केली व १८३० मध्यें आपल्या "प्रत्यक्षज्ञानवादी तत्वज्ञान" या ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध केला. त्याचा शेवटचा सहावा भाग १८४२ मध्यें प्रसिद्ध झाला.

ही मध्यंतरीची बारा वर्षे त्याची सतत दीर्घोद्योगांत गेली, व सांपत्तिक दृष्ट्या सर्व ह्यातींत हाच त्याचा काळ साधारण बरा गेला. १८३३ मध्यें पॅरिस येथील इकोल पॉलिटेक्निक विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेचा परीक्षक त्याला नेमण्यांत आलें. त्याचें व दुसऱ्या गणिताच्या शिकवण्यांचें मिळून त्याला सालीना ४०० पौंड वेतन मिळूं लागलें.

१८३१ पासून १८४८ पर्यंत कामाचा बोजा फार असतानाहि तो ज्योतिषशास्त्रावर मोफत सार्वजनिक व्याख्यानें देत असे. याच भावनेखातर त्यानें राष्ट्रीयसंरक्षक सैन्यांत नोकरी करण्याचें नाकारून तुरुंगवास पत्करला व जुलै महिन्यात स्थापन झालेल्या राजसत्तेविरुद्ध शस्त्र धरण्याचें नाकारलें. उलटपक्षीं तो लोकसत्ताक राज्याचा पुरस्कर्ता असल्यामुळें त्यानें राजसत्तेचें संरक्षण करण्याची शपथ घेण्याचेंहि नाकारलें. त्याच्या आयुष्यातला करमणुकीचा एकच विषय संगीत नाट्यप्रयोग पाहणें हा होय. तारुण्यारंभी दुःखपर्यवसायी नाटकाचा तो शोकी होता, नंतर तो सुखपर्यवसायी नाटकांना जात असे. शेवटीं संगीत नाटकांनाच तो फक्त जाऊं लागला. पण अखेर सांपत्तिक स्थिति इतकी खालावली कीं या सुखसाधनाला लागणारा खर्चहि त्याला झेपेना.

१८४२ मध्यें प्रत्यक्षज्ञानवादी तत्वज्ञान या त्याच्या ग्रंथाचा शेवटचा भाग बाहेर पडला. बारा वर्षांच्या दीर्घ परिश्रमांचा मोबदला म्हणून कसलेंहि समाधान न होता उलट कित्येक त्रासदायक गोष्टीच उपस्थित झाल्या. पहिली गोष्ट म्हणजे त्याचें बायकोशीं पटत नाहींसें होऊन अखेर १८४२ मध्यें त्यांनीं एकमेकांना सोडचिठ्ठी दिली. दुसरी गोष्ट ही कीं, त्याच्या ग्रंथाच्या प्रकाशकानें ६व्या भागांत त्याच्या परवानगीवांचून काहीं मजकूर छापला त्याबद्दल फिर्याद लावून स्वतःच्या तर्फे निकाल त्यानें करून घेतला. तिसरी गोष्ट म्हणजे ६व्या भागाच्या प्रस्तावनेंत पॉलिटेक्निक स्कूलच्या व्यवस्थापक मंडळीवर त्यानें टीका केली, व त्यामुळें परीक्षकाची जागा जाऊन त्याची वार्षिक प्राप्ति निम्म्यानें कमी झाली. १८४२ च्या पूर्वीपासूनच जे. एस्. मिल्ल व कॉट याचा पत्रव्यवहार चालू झालेला होता. आणि कॉटचा प्रत्यक्षज्ञानवादी तत्वज्ञान हा ग्रंथ वाचल्यानें मिल्लला स्वतःचा तर्कशास्त्रावरील ग्रंथ लिहिण्यात बरीच मदत झाली होती हें स्वतः मिल्लनें लिहून ठेवलेलें आहे. स्त्रीपुरुषाच्या समानतेबद्दलहि दोघांचा बराच वादविवाद चालू असे. मिल्ल वगैरे इंग्रज लेखक त्याला पैशाची नेहमीं मदत करीत. कॉटच्या ठिकाणीं फारशी कृतज्ञताबुद्धि नव्हती असें म्हणावें लागतें.

१८४५ मध्यें मॅडम क्लॉटिल्ड डी व्हॉक्स या स्त्रीशीं त्याचा परिचय झाला. तिचा नवरा आमरण गलबतावरील नोकरींत गुंतला होता. तिच्या पत्रांवरून पाहतां ती फार हुषार व सुस्वभावी होती व ती अखेरपर्यंत जगली तर कॉटच्या उत्तरवयातील कार्यावर तिचा फार चांगला परिणाम झाला असता असें म्हणतात. परंतु एक वर्षानंतर ती मरण पावली. मॅडम डी व्हॉक्सच्या मरणानें कॉटची मनःस्थिति काय झाली होती हेंहि प्रसिद्ध आहे. तिच्या मरणानंतर दर बुधवारीं कॉट तिच्या थडग्याच्या दर्शनास जात असे; व त्यांच्यामधील प्रेमसंबंधाला कॉटच्या शिष्यांनीं डान्टे-बियाट्रिसची उपमा दिलेली आहे.

पॉझिटिव्ह फिलॉसफी हा ग्रंथ पुरा झाल्यावर १८५१ पासून १८५४ पर्यंत कॉटनें आपला सिस्टिम ऑफ पॉझिटिव्ह पॉलिटी (प्रत्यक्षज्ञानवादी राजनीतिशास्त्र) हा ग्रंथ चार भागात प्रसिद्ध केला. १८४८ च्या राज्यक्रांतीमुळें तयार झालेल्या राजकीय वातावरणाचा फायदा घेऊन त्यानें पॉझिटिव्ह सोसायटी या नावाची संस्था काढली व तिला जॅकोबिन क्लबाप्रमाणें सामर्थ्यवान बनविण्याची आकांक्षा धरली. त्यानें १८४९त पॉझिटिव्हिस्ट कॅलेंडर प्रसिद्ध केलें. त्यात ख्रिस्ती साधूंच्या नावाऐवजीं ज्यांनीं जगांतलि सुधारणेच्या प्रगतीस मदत केली अशा थोर पुरुषांचीं नावें दिलेलीं आहेत. १८४९, १८५० व १८५१ या तीन सालीं त्यानें तीन व्याख्यानमाला गुंफून आपला 'साक्षात् वाद' श्रोत्यापुढें जोरदार भाषेत मांडला. तिसऱ्या व्याख्यानमालेच्या अखेरीस त्यानें पुढील प्रमाणें सडेतोड उद्गार काढले. "अखिल भूत व भविष्य काळ याना साक्षी ठेऊन अखिल मानव जातीचे कल्याणकर्ते—तात्विक व व्यावहारिक दोन्ही बाबतींतील लोकसेवक—या जगाची अखिल नियंत्रणसत्ता आपल्या हातीं घेण्याकरिता पुढें येत आहेत. नैतिक, बौद्धिक व भौतिक या तिन्ही प्रकारच्या व्यवसायांची सर्व खात्यामध्यें ईश्वरी शक्ति म्हणून म्हणतात ती त्याना स्वतः आपणच बनावयाचें आहे. आणि म्हणून ईश्वराचे प्रेषित असल्याचा बहाणा करून जे कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट किंवा डीइस्ट वगैरे धर्मपंथी लोक आजपर्यंत राज्यसत्ता बळकावून बसलेले आहेत ते सर्व मागासलेले व समाजांत विनाकारण बखेडा माजविणारे असल्यामुळें त्यांचें तेथून कायमचें उच्चाटण करावयाचें आहे."

१८५२ मध्यें कॅटेकिझम ऑफ पॉझिटिव्हिझम हें पुस्तक त्यानें प्रसिद्ध केलें, व त्याच्या प्रस्तावनेंत लुई नेपोलियननें पार्लमेंटरी राज्यव्यवस्था बाजूस सारून एकतांत्रिक लोकसत्ताक पद्धति स्थापन केल्याबद्दल अभिनंदन केलें. पुढें तो निकोलस बादशहाला अखिल ख्रिस्ती जगातला अद्वितीय मुत्सद्दी मानूं लागला. १८५७ सप्टेंबर ५ रोजीं कॉट चाळपुळीच्या रोगानें मरण पावला.

कॉटची विलक्षण बुद्धिमत्ता व प्रतिकूल परिस्थितींतहि काम करण्याची जबरदस्त चिकाटी यांबद्दल कोणालाहि आदर वाटतो. त्याची भाषा अवजड, कंटाळवाणी व कृत्रिम असे. त्याच्या सर्व ग्रंथांत वाचकांना चित्ताकर्षक वाटणारी गोष्ट म्हणजे फक्त त्याचे विचार व ग्रंथांतला

अत्यंत महत्वाचा व व्यापक विषय. त्याच्या विचारांतहि उतारवयांत वैयक्तिक दुराग्रहाची व केवळ तात्विकपणाची छटा फार असे. कारण त्यानें 'पॉझिटिव्ह फिलॉसफी' हा ग्रंथ संपल्यापासून स्वतःचें ज्ञानभांडार परिपूर्ण असल्याचें ठरवून वृत्तपत्रें, मासिकें, शास्त्रीय ग्रंथ व नवे शोध याविषयींचें कोणतेंहि नवें पुस्तक वाचण्याचें अजीबात बंद केलें होतें. कोटचें समाजशास्त्र 'अर्थशास्त्र' या लेखांत (ज्ञानकोश, विभाग ७ पा ४६२) संक्षेपानें दिलेंच आहे. त्याच्या मध्यवर्ती प्रमुख कल्पना म्हणजे पुढील होत.

व्यक्तीप्रमाणें मानववंशहि ऐश्वरिक, आध्यात्मिक व प्रात्यक्षिक अशा तीन बौद्धिक अवस्थांतून जातच असतो. या प्रत्येक कल्पनावस्थेंत विश्वचमत्काराचें कर्तृत्व निरनिराळ्या कर्त्यांकडे दिलें असतें. एका कल्पनेचा जगावरचा पगडा उठल्यानंतर दुसरी आपला पगडा बसविते. आज प्रत्येक सिद्ध केलेल्या गोष्टींवरच मनुष्याचा विश्वास बसतो. कोट देव वगैरे जाणत नाहीं. आपल्या 'फिलासॉफी पॉझिटिव्ह' मध्यें त्यानें सामाजिक स्थितिशास्त्र व सामाजिक गतिशास्त्र यामध्यें मोठा भेद पाडिला आहे. पहिलें सामाजिक सह-अस्तित्वाचे तर दुसरें सामाजिक प्रगतीचे नियम अभ्यासितें. कोट समाजशास्त्राला सर्व शास्त्रांत पहिलें स्थान देतो. तथापि त्याला या शास्त्राचें फारच थोडें ज्ञान होतें.

कोटकपुरा—पंजाबच्या फरीदकोट संस्थानातील तहसिलीचें मुख्य ठिकाण. हें फरीदकोटपासून ७ मैलावर असून येथें नॉर्थ वेस्टर्न (वायव्येकडील) रेल्वेचें व राजपुताना माळवा रेल्वेचें स्टेशन आहे. लो. सं. (१९११) १०६४. प्रथमतः हें अगदीं खेडें होतें; पण चौधरी कपूरसिंग यानें नजीकच्या कोट इसाखान गावातून लोक बोलावून येथें वस्ती करविली. १८४७ त हें गाव महाराजा रणजितसिंगानें फरीदकोट संस्थानास परत दिलें. येथें धान्याचा मोठा व्यापार चालत असून एक बाजारहि आहे.

कोटगड—पंजाबांत सिमला जिल्ह्यातील कोटखाई व कोटगड हे दोन प्रदेश मिळून एक पोटतहसील होते. लो. सं. (१९११) १०८४३. मुख्य ठिकाण कोटखाइ. या तहसिलीच्या सर्व बाजूला सिमल्याचीं डोंगरी संस्थानें आहेत. बहुतेक भाग डोंगराळ आहे. कोटगड 'हातु' डोंगराच्या एका ओळीवर आहे.

कोटगळ—वऱ्हाड मध्यप्रांत. जिल्हा चांदा. उत्तरेस आणि पूर्वेस दुग जिल्हा, दक्षिणेस मुरमगांव जमीनदारी, पश्चिमेस पलासगड. एके ठिकाणीं ही जमीनदारी जवळच असलेल्या अंबागड चौकीचा एक भाग होता. परंतु सुमारें २५० वर्षांपूर्वी ही जमीनदारी निराळी झाली. हींत एकंदर २१ खेडीं असून पैकीं बारा खेड्यांचीं अद्याप पाहणी झाली नाहीं. लो. सं. (१९०१) १९३८. लागवडीखालीं जमीन एकंदर ४००० एकर असून भाताचें पीक मुख्य आहे. एकंदर उत्पन्न २३०० रु., टाकोळी ९० रु, इतर ६६ रुपये. जमीनदार खातुलवार गोंड असून त्याचें नांव फतेरग बापू आहे. जमीनदारीची स्थिति बरी आहे [चांदा गॅ.]

कोटगिरी—मद्रास इलाख्यांतील निलगिरी जिल्ह्याच्या कुनूर तालुक्यांतील एक हवा खाण्याचें ठिकाण. हें निलगिरीच्या पठाराच्या ईशान्येस उटकमंडपासून १८ मैलांवर व कुनूरपासून १२ मैलांवर आहे. याची लोकसंख्या १९०१मध्यें ५१०० होती. पंधरा दिवसांतून एकदां या ठिकाणीं कुनूरचा तहशिलदार आपलें फौजदारी कोर्ट भरवतो. उटकमंडपेक्षां येथील हवा अधिक चांगली असें कित्येकांचें मत आहे. याच्या नजीकच दिम्हट्टीचें आरोग्यस्थान आहे. पण हल्लीं तें मोडण्यांत आलें आहे

कोटचांदपूर—बंगाल्यातील जेसोर जिल्ह्याच्या झेनिद पोटविभागातील कबादक नदीच्या तीरावरील गांव. लो. सं. (१९११) ८०७६. हें गांव जिल्ह्यांतील साखरेच्या व्यापाराचें सर्वांत मोठें ठिकाण आहे.

कोटद्वार—संयुक्त प्रांताच्या गढवाल जिल्ह्यातील 'खो' नदीच्या कांठीं मोठ्या व्यापाराच्या पेठेचें गांव. या जिल्ह्यातील दक्षिण भागात मैदानातील प्रदेशातून सुती कापड, साखर, मीठ, भाडीं वगैरे माल या गांवांतून पुरविला जातो. तसेंच तिबेटातील मालाच्या देवघेवीचें हें मध्यवर्ती गांव असून येथून मैदानी मुलुखात मोहरी, शिरसीचें बीं, हळद, मिरच्या वगैरे जिन्नस जातात. भोतिया लोक सवागी वगैरे खनिज द्रव्यें येथें आणून येथून कापड, तंबाखू, साखर व द्विदल धान्यें घेऊन जातात येथें पोलिस ठाणें, दवाखाना व अमेरिकेच्या मेथॉडिस्टांचें मिशन आहे

कोटपुतळी.—राजपुतान्यांत जयपूर संस्थानच्या टोरावति निझामतींत जयपूरच्या ईशान्येस सुमारें ६० मैलांवर वसाबी किंवा साहेबी नदीजवळ याच नांवच्या परगण्याचें मुख्य ठिकाण. कोट व पुतळी हीं दोन गावें मिळून कोटपुतळी गांव झालें आहे. लो. सं.(१९०१) ६८७९. हें मराठ्याच्या ताब्यात होतें त्यावेळीं येथें एक किल्ला व दुसरी तटबंदीचीं महत्वाचीं ठिकाणें होतीं तीं अद्याप कायम आहेत. येथें पोष्ट व तार कचेरी. कित्येक शाळा व व्हिक्टोरिया ज्युबिली इस्पितळ हीं आहेत. जवळच ८ मैलांवर काळ्या संगमरवरी दगडाची खाण आहे.

कोटा संस्थान.—राजपुतान्याच्या आग्नेय भागांतील एक संस्थान. या संस्थानचें क्षेत्रफळ, ५६८४ चौरस मैल व लो. सं. (१९२१) ६,३०,०६०. उत्तरेस जयपूर संस्थान व अलीगड जिल्हा; पश्चिमेस बुंदी व उदेपूर हीं संस्थानें; नैर्ऋत्येस इंदूर संस्थानचे रामपूर मानपूर जिल्हे. झालवाडा व ग्वाल्हेरचा अगर तहशील; पूर्वेस ग्वाल्हेर संस्थान व छप्रा जिल्हा; दक्षिणेस खिलचीपूर व राजगड संस्थानें हीं आहेत. या संस्थानची लांबी ११५ मैल व रुंदी ११० मैल आहे. माळव्याच्या पठारीपासून जी उतरण लागते त्या उतरणीवर हा प्रदेश वसलेला आहे. या प्रदेशांतून चंबळा व तिला

मिळणाऱ्या नद्या या उत्तरवाहिन्या होऊन वहात जातात. या संस्थानच्या दक्षिण भागांतून वायव्य दिशेकडून आग्नेय दिशेकडे मुकुंदवार नांवाची एक टेकड्यांची माळ पसरलेली आहे व त्या रांगेची उंची समुद्राच्या पृष्ठभागापासून १४०० ते १६०० फूट आहे. या टेकड्यांवर खुजीं झाडें असून शिवाय झाडझुडपांची रेलचेल आहे. यांतून शिकारीला योग्य अशीं पुष्कळ हिंस्र जनावरें आहेत. संस्थानच्या उत्तर भागात इंद्रर गडानजीकहि पुष्कळ टेकड्या असून त्यांची उंची १५० फूट आहे. शहाबाद जिल्ह्याच्या पूर्वभागांतील टेकड्यांची उंची सर्वांत अधिक म्हणजे १८०० फूट आहे. चंबळा,काळी सिंद व पार्वती या या संस्थानांतील तीन मुख्य नद्या होत. पार्वती नदीला अद्रू नावाच्या खेड्याजवळ अंधेरी नदी मिळाली असून या ठिकाणीं पार्वती नदीला एक मोठें धरण बांधण्यात आलें आहे व या धरणापासून कालवे काढण्यांत आले आहेत. या कालव्यांच्या योगानें जवळ जवळ ४० खेड्यांनां अगर ६१७ हजार एकर जमीनीला पाणीपुरवठा होतो. या तीन नद्यांशिवाय परवान, उजर, सुकी, बाणगंगा, कूल व कुनू या दुय्यम नद्या आहेत. संस्थानच्या उत्तर भागात मळीची जमीन असून कोटा-जवळ विंध्य पर्वतांतील रेताड दगडासारखे दगड सांपडतात. वाघ, चित्ते, काळे अस्वल, तरस, लांडगे, रानटी कुत्रे, हीं हिंस्र जनावरें येथें आहेत. याशिवाय, सांबर, चितळ, नीळ-गाई, काळवीट, हरिण हींहि जनावरें आढळत. महादीर रोझी, लांची, गुंच इत्यादि माशाच्या जाती आहेत.

हवा व पर्जन्यमानः—नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महि-न्यांत हवा फार सुखकारक असते. मार्च महिन्यात उका-ड्याला सुरुवात होते व जूनमध्यें तर फारच कडक उन्हाळा पडतो. जुलै महिन्यापासून बरसातीला आरंभ होतो व आक्टोबरपर्यंत पावसाळा असतो. या दिवसातील हवा रोगट असते. १९०५ मध्यें मे महिन्यातील उष्णमान ११५° व डिसेंबर मधील मान ४९° होते. संस्थानांतलि निरनिराळया भागांत पर्जन्यमान निरनिराळें आहे. संस्थानचें साधा-रण पर्जन्यमान ३७ इंच आहे.

इतिहासः—कोटा संस्थानचें राजघराणें हें चव्हाण रज-पूत जातीच्या हाडा नामक शाखेचें आहे. १३४२ मध्यें बुंदीचा राजा रावदेव यानें प्रथम कोटाच्या टापूंत आपल्या हाडाघराण्यांचें नांव गाजविलें. कोटे नांवाच्या एका भिल्ल जातीपासून त्यानें हा प्रदेश जिंकून घेतला. याच्या वंश-जांच्या ताब्यांत हा मुलुख १५३० पर्यंत होता व नंतर तो प्रदेश बुंदीच्या राव सुरजमल्लानें आपल्या ताब्यात आणिला. १७ व्या शतकाच्या प्रारंभीं राव राजा रतनसिंग यानें कोटा व त्याच्या आसपासचा मुलुख आपला दुसरा मुलगा माधवसिंग याला जहागिर दिला. जहांगिरच्या विरुद्ध त्याचा मुलगा कुरम यानें बंड उभारलें. त्यावेळीं रावराजा रतनसिंग व माधवसिंग या पितापुत्रांच्या जोडीनें हें बंड मोडण्याच्या कामीं बादशहाला मदत केली. त्यामुळें जहां-गिर यानें रतनसिंगाला बऱ्हाणपूरची सुभेदारी व माधवसिं-गाला कोटा शहर व ३६० खेडीं अशीं मिळून अडीच लाखाची जहागीर वंशपरंपरा तोडून दिली. शहाजहाननें सुद्धां ती तशीच पुढें चालविली. माधवसिंगाच्या कारकीर्दीत कोटा हें स्वतंत्र संस्थान बनून त्या संस्थानचा राजा माधव सिंग झाला. माधवसिंगाच्या मागून त्याचा मुलगा मुकुंद-सिंह हा गादीवर आला. १६५८ मध्यें औरंगझेबाशीं फत्ते-हाबाद येथें जी लढाई झाली तींत मुकुंदसिंह व त्याचे चार भाऊ यांनीं फार पराक्रम गाजविला. या लढाईंत सर्वांत कनिष्ठ भाऊ किशोरसिंग हा सोडून बाकी सर्व भाऊ मारले गेले. पुढें १६५८ सालीं जगतसिंह हा गादीवर आला. तो निपुत्रिक असल्यानें त्याच्या मागून प्रेमसिंह हा गादीवर बसला. पण हा दुर्वर्तनी व नालायक असल्यानें अवघ्या सहा महिन्याच्या आंत त्याला पदच्युत करण्यात आलें. पहिला किशोरसिंग हा १६७० मध्यें राज्यारूढ झाला. औरंगझेबाच्या सैन्याबरोबर दक्षिणेच्या स्वारींत तो गेला होता. या स्वारींत त्यानें चांगलें नाव गाजविलें तो अर्काटच्या वेढ्यांत मारला गेला. त्याचा मुलगा पहिला रामसिंग यानें औरंगझेबाच्या मरणानंतर शहाअलम बहादुर शहा व अजमशहा यांच्यामध्यें राज्यासंबंधी भांडण चाललें असता अजमशहाचा पक्ष उचलून धरला. १९०० मध्यें जाजौ येथें जी लढाई झाली तींत तो पडला. त्याच्या मागून भीमसिंग हा गादीवर आला. यानें सय्यद बंधूंचा पक्ष घेतल्यामुळें त्याला पंचहजाराची मनसबी मिळाली. त्यानें आपल्या संस्थानाचा बराच विस्तार केला. यानें प्रथमतः आपल्याला महाराव हा किताब धारण केला. निझाम उल्मु-ल्कानें दक्षिणेवर स्वारी केली असता त्यानें निझामउल्मुकाला विरोध केला पण तो त्या लढाईंत १७२० सालीं मारला गेला.

त्याच्या मागून त्याचा मुलगा अर्जुनसिंग व अर्जुनसिंगा-नंतर दुर्जनसिंग हा गादीवर आला. यानें १७२४ ते १७५६ इतक्या अवधींत राज्य केलें व आपल्या राज्याचा मुलुख वाढविला. (१७५६–१७५९). अजितसिंगानें राज्य केल्या-नंतर १७५९ मध्यें पहिला छत्रसाल हा राज्यावर आला. १७६१ सालीं जयपूरच्या राजानें या संस्थानांवर स्वारी केली.पण त्यात जयपूरच्या सैन्याचा पूर्णपणें पराभव झाला.या लढाईंत झालिमसिंह नावाच्या एका तरुण सरदारानें चागला पराक्रम गाजविला. महाराज छत्रसाल याच्यामागून त्याचा भाऊ गुमानसिंग हा राज्यावर आला. याच्या अमदानींत मराठयांनीं कोटाच्या दक्षिण भागावर स्वारी केली. पण झालिमसिंगाच्या मध्यस्थीनें मराठयांनीं ६ लाख रुपये खंडणी घेण्याचें कबूल करून कोटामधून आपला पाय मार्गे घेतला.

गुमानसिंगाच्या मागून उमेदसिंग हा गादीवर बसला. त्यानें १७७१-१८१९ पर्यंत राज्य केलें. पण झालिमसिंग

हाच खरा राजा होता. राजपुतान्यांत त्याचें वजन फार असे. त्यानें कोटा संस्थानांत उत्तम शासनपद्धति अंमलांत आणली. सैन्यांत उत्कृष्ट कवाइतीची पद्धत अस्तित्वांत आणली. जमीनमहसुलाची नवीन व उपयुक्त अशी पद्धत काढून त्यानें कोटा संस्थानाला चांगलें भरभराटीचें स्वरूप प्राप्त करून दिलें. १८१७ मध्यें झालिमसिंहाच्या मध्यस्थीनें तहनामा होऊन कोटा हें ब्रिटिशांच्या ताब्यात आलें व मराठयांनां कोटा संस्थान खंडणी देत असे ती यापुढें ब्रिटिशांना मिळावयाची असें ठरलें. झालिमसिंग व त्याच्या वंशजाना प्रधानकीची जागा कायमची देण्यांत आली व त्याच्या हातांत संस्थानचा राज्यकारभार रहावा असें ठरलें. पण कांही काळ लोटल्यानंतर दुसरा किशोरसिंग हा (१८१९ ते २८) गादीवर आला त्यानें झालिमसिंगाच्या वंशजाला राज्यकारभारात भाग घेऊं देण्याचें नाकारलें त्यामुळें ब्रिटिश सरकाराला किशोरसिंगाविरुद्ध युद्ध पुकारणें भाग पडलें. मंगरोल येथें १८२१ मध्यें जी लढाई झाली तींत किशोरसिंगाचा पराभव होऊन त्यानें झालिमसिंगाच्या वंशजाना राज्यकारभाराचा अधिकार देण्याचें कबूल केलें. पुढें दुसऱ्या रामसिंगाच्या कारकीर्दींत पुनः एकदा रामसिंग व झालिमसिंगाचा वंशज मदनसिंग याच्यामध्यें तंटाबखेडा उत्पन्न झाला. शेवटीं झालिमसिंगाच्या वंशजासाटीं झालवाडाची स्वतंत्र जहागीर देण्यात येऊन हा लढा मिटविण्यात आला.

अर्थातच १८३८ मध्यें झालवाडाची स्वतंत्र जहागीर निर्माण झाल्यावर पुनः एकदा ब्रिटिशाचा व कोटाचा करारमदार ठरला व त्यात कोटा संस्थाननें पूर्वींच्या खंडणीपैकीं ८०००० रुपये कमी द्यावे असें ठरलें. ब्रिटिशाच्या मदतीसाठीं म्हणून एक स्वतंत्र तुकडी कोटाच्या खर्चानें उभारण्यात यावी म्हणून एक अट घालण्यात आली. १८५७ मध्यें या तुकडीनें इंग्रजाविरुद्ध बंड केलें.व पोलिटिकल एजंट व त्याच्या मुलाची या सैन्याने कत्तल केली.रामसिंगानें या एजंटाचा जीव वाचविण्याच्या कामीं कांहीं खटपट केली नाहीं. या सबबीवर त्याचा १७ तोफांचा मान कमी करून १३ तोफांचा करण्यात आला. पण पुढें १८६६ मध्ये पुनः १७ तोफांचा मान रामसिंगास देण्यात आला. १८६६ मध्यें दुसरा छत्रसाल हा गादीवर आला. याच्या कारकीर्दींत राज्यकारभारात फार गोंधळ माजून राहिला व कर्जाची रक्कम ९० लाखापर्यंत गेली.तेव्हा छत्रसालच्या विनंतीवरून ब्रिटिशसरकारनें १८७४ सालीं संस्थानची व्यवस्था पाहण्याकरिता सर फैझअलीखान यास प्रधान नेमलें व त्यानें राजपुताना एजंटाच्या साहाय्यानें संस्थानचा कारभार चालवावा असें ठरलें. या फैझअलीने थोड्याच वर्षांत संस्थानचें कर्ज फेडून चांगली सुधारणा घडवून आणली. छत्रसालच्या मरणानंतर १८८९ मध्यें त्याचा मुलगा महाराजा उमेदसिंह हा गादीवर बसला. त्याला १८९६ मध्यें मुखत्यारी मिळाली.१९०० मध्यें त्याला के. सी. एस. आय. हा किताब देण्यांत आला. लेफ्टनंट कर्नल हा लष्करी बहुमानाचा किताबहि त्याला मिळालेला आहे. झालवाडा जहागिरीच्या १७ जिल्ह्यांपैकीं १५ जिल्हे याला पुनः परत मिळाले व झालवाडाच्या जहागिरीकडे २ जिल्हे देण्यांत आले. ही याच्या कारकीर्दींतली महत्व ची गोष्ट होय. याशिवाय याच्या कारकीर्दींतील सुधारणा म्हणजे ब्रिटिश पोस्ट ऑफिसाची स्थापना, ब्रिटिश चलनी नाण्यांनां मिळालेली मान्यता इत्यादि होत. १८१७ च्या तहान्वयें २,९०,००० रुपये खंडणी म्हणून संस्थानकडून ब्रिटिश सरकारास मिळत असत. पण हल्ली २,३४,७२० रुपये खंडणी मिळते.

शासन—पद्धति.—शासनपद्धतीच्या दृष्टीनें संस्थानचे १९ निझामत व ६ तहशिली असे भाग पाडण्यात आले आहेत. प्रत्येक निझामतीवर एक नाझीम नावाचा अधिकारी व तहशिलीवर एकेक तहशीलदार असतो व त्याच्या हाताखालीं नायब निझाम व नायब तहशीलदार नेमलेले असतात. संस्थानचा सर्व कारभार महाराजा आपल्या दिवाणाच्या साहाय्याने पहातो. तहशीलदाराना तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे अधिकार असतात. नाझिमाना दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचा अधिकार असतो. याच्यावर फौजदार म्हणून पोटजिल्हा अधिकारी नेमलेले असून त्याच्याकडे अपीलें करावयाचीं असतात.फौजदारावरचा अधिकारी सेशन्स जज्ज हा असतो. व सर्वांत वरिष्ठ कोर्ट म्हणजे ' महकम खास ' असून त्याचा मुख्य स्वतः महाराजा असतो. महाराजाला फाशी देण्याचा अधिकार असतो. संस्थानचें वार्षिक उत्पन्न अंदाजे ४२ लाखाचें असून खर्च ३४ लाख आहे. संस्थानात जहागीर, मुआफी व खालसा असे तीन जमीनीचे प्रकार आहेत संस्थानातील एकंदर जमीनीपैकीं एकचतुर्थांश जमीन पहिल्या दोन्ही प्रकारची मिळून आहे. जहागिरदारांनां महाराजाच्या संमतीनें दत्तक घेण्याचा अधिकार आहे. जहागिरदारांपैकीं बऱ्याच जहागिरदारानां संस्थानला कर द्यावा लागतो व कांहींनां संस्थानासाठीं लष्कर पुरवावें लागते. मुआफी जमीनी या नोकरी इनाम म्हणून देण्यांत येतात व देवस्थान अगर सार्वजनिक कार्यासाठीं देण्यात येतात. त्याच्यावर कर नसतो. खालसा जमीनीवर संस्थानचा पूर्ण ताबा असतो. कोरड्या जमीनीपाठीमागें एकरी ४ आणे ६ पै ते ५ रु. ८ आणे व पाण्याखालील जमीनी मागें एकरी सवारुपयापासून १७॥ रुपयांपर्यंत सारा असतो. १५००० सैन्य पदरीं ठेवण्याचा महाराजाला अधिकार आहे. १९०५ सालीं महाराजाचें सैन्य अंदाजें ८००० होतें. या सैन्यावर १९०५ सालीं ४,८०,००० रुपये खर्च करण्यात आले. दरबारला ब्रिटिशांचें सैन्य ठेवल्याबद्दल २० लाख रुपये द्यावे लागतात. पोलिसांत शहरपोलीस व जिल्हापोलीस असे दोन भेद आहेत.कोतवाल शहरपोलिसांचा मुख्य असतो. जिल्ह्याचे सहा भाग पाडून प्रत्येक भागावर एकेक असिस्टंट

सुपरिंटेंडेंट नेमलेला असतो. १९०५ सालीं संस्थानांतील पोलीस ठाण्यांची संख्या ३९ होती. प्रत्येक जिल्ह्यामध्यें एक एक छोटा तुरुंग असून राजधानींत एक मध्यवर्ती तुरुंग आहे. १९०४–५ सालीं संस्थानांत २१ दवाखाने होते.

लो क.—१९२१ च्या खानेसुमारींत कोटाची लो. सं. ६,३०,०६० होती. दहा सालामागची लो .सं. सुमारें ९ हजारानें जास्त होती.संस्थानात ८ शहरें व २५५४ खेडीं आहेत. कोटा, बारण, मांग्रोल व संगोड हीं शहरें आहेत. संस्थानांत निझामत व तहशील मिळून २३ भाग आहेत. संस्थानांतील मुख्य भाषा राजस्थानी असून हारोटी, माळवी, ढुंढारी याहि भाषा प्रचारांत आहेत. या संस्थानात चमार जातीची लोक सं. अधिक आहे. १८११ सालीं ही लोकसंख्या ६८,३०१ इतकी होती. याचा धंदा चामडीं रंगविणें, चामड्याचें काम करणें व शेतकी करणें हा असे.त्यांच्या खालोखाल मीना लोकाची वस्ती ५०,४७० होती. हे धिप्पाड व साहसी आहेत. पूर्वी त्याचा धंदा लुटालूट करण्याचा असे पण हल्लीं त्यांनीं शेतकी करण्यास सुरुवात केली आहे. धाकर लोकाची संख्या ४३,१४७ इतकी असून ते शेतकीवरच आपली उपजीविका करतात. ब्राह्मणांची वस्ती ३९४७० असून त्यांचा धंदा उपाध्येगिरी व नोकरी करण्याचा आहे. माळी लोकाची संख्या ४८,६७० इतकी असून त्यांचा धंदा बागाइतीचा आहे. याशिवाय त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक शेतकीवर सुद्धां आपली वृत्ति चालवितात. गुजर हे गुराढोरांच्या क्रयविक्रयाचा धंदा करतात. इ. स १९११ सालीं त्याची संख्या ३८९६३ होती याशिवाय महाजन (२,०६,५८५) व रजपूत (१४,७४७) या जाती आहेत. महाजन लोक व्यापार व सावकारी वगैरे धंदे करतात. रजपुताचा धंदा म्हणजे लष्करी नोकरीचा आहे व इतर धंदा करणें त्यांना कमीपणाचें वाटतें.

या संस्थानची जमीन फार सुपीक असून जमीनीला पाणी मिळण्याचीहि या ठिकाणीं चांगली सोय आहे. काळी व उतरमाल व बरी अशा जमीनींच्या तीन जाती आहेत. काळी व उतरमाल या जाती फार सुपीक आहेत व कालव्याच्या अगर विहिरीच्या पाण्याशिवाय सुद्धा केवळ पर्जन्याच्या साहाय्यानें या जमीनींतून गहूं, चणे इत्यादि धान्यें चांगलीं पिकतात. १९०५ सालीं ३३१५ चौरस मैल जमीन शेतकीसाठीं उपयोगात आली. त्यांत ३८१ चौरस मैलात ज्वारी,३५९ चौ. मैलांत गहू, तसेंच ३९७ चौरस मैलांत चणे आणि ३३ चौरस मैलांत कापूस पेरण्यात आला. सुद संस्थानात होणारी गुरांची निपज फार हलक्या दर्जाची असते. चांगल्या गुरांची आयात माळव्यामधून होते. येथील घोडे फार खुजे असतात. मेंढ्यांची व शेळयाची पैदास पुष्कळ होते. पार्वती नदीला धरण्यांत आलेलें धरण मोठें आहे. शिवाय संस्थानात एकंदर ३५० तळीं आहेत. अक्रोरासागर तलाव हा सर्वांत मोठा असून क्षेत्रफळ ३॥ चौरस मैल आहे संस्थानांतील जंगलांत सागवान फार थोडें आढळतें. बाभूळ, वड, बेल धाक, ढोंका, गूलर, जामुन जम्बोलण, कदंब, महू, निम्ब, पिंपळ, साल, सेमल व तेंडू हीं झाडें या जंगलांत आढळतात. इ. स. १९०४–५ सालीं जंगलाचें उत्पन्न ३३३०० रुपये आलें.

व्यापार व दळणवळण.—कापड विणण्याचा धंदा येथें मोठया प्रमाणांत आढळतो. कोटा येथें तयार होणारी मलमल फार प्रसिद्ध आहे. मलमल पांढरी, रंगीत व जरीची सुद्धां तयार करण्यांत येते. चित्रेंहि उत्तम प्रकारचीं तयार होतात. बारण येथील रंगाचे कारखाने व खेळणीं प्रसिद्ध आहेत. या शिवाय हलक्या दर्जाचा कागद, घोड्यावर व हत्तीवर घालण्याचें कलबतूचें कापड, हस्तिदंती काम, भांडीं वगैरे जिन्नसहि या संस्थानात तयार होतात.

संस्थानची मालीना सरासरी आयात २०० लाखांची व निर्गत ३॥ लाखाची होते. धान्य, अफू, कापूस व कातडीं इत्यादि जिन्नस संस्थानातून बाहेर जातात व परदेशी कापड मीठ, तांदूळ, साखर, गूळ, लोखंड, फळें, कागद इत्यादि जिनसाची आयात होते. या संस्थानचा मुंबई कलकत्ता, कानपूर, राजपुतान्यातील संस्थानें इत्यादि प्रदेशाशीं व्यापार चालतो.येथील अफू माळव्यांतील अफूच्या तोडीची असते व ती चीनकडेहि पाठवण्यात येते. कोटा शहर व बारण शहर हीं संस्थानातील व्यापाराचीं शहरें आहेत. संस्थानात जी. आय. पी. रेल्वेचा बीना–बारण हा फाटा गेला असून या फाटयाचा भाग दरबारच्या मालकीचा आहे. या फाटयाचीं संस्थानांत चार स्टेशनें आहेत. याच्या शिवाय नागड्यापासून मथुरेपर्यंत जाणारी रेल्वे तयार होत असून ती कोटामधून गेली आहे. १९०४ मध्यें, संस्थानातील खडीच्या रस्त्याची लांबी १४३ मैल होती व साध्या रस्त्याची लांबी ४१० मैल होती. बारण, बुंदी झालरापाटण या शहराकडे जाणारे रस्ते खडीचे आहेत.

साक्षरता:—१९११ सालीं संस्थानांतील साक्षर लोकांची संख्या१९३७७ होती. त्यापैकीं ७९४ बायका होत्या; म्हणजे साक्षरतेचे प्रमाण शेकडा २ हें पडलें. १९२०—२१सालीं संस्थानात १०५ मुलांच्या, व १७ मुलींच्या शाळा होत्या. मुलांच्या शाळांपैकीं १ हायस्कूल, ३ आंग्लोव्हर्न्याक्युलर, १ मिडल, १ संस्कृत, १ ट्रेनिंग, १ उच्च प्राथमिक व ९७ व्हर्न्याक्युलर शाळा होत्या. शिक्षणाप्रीत्यर्थ संस्थान सरकार१॥ लाख रुपये खर्च करितें. संस्थानात शिक्षण मोफत दिलें जातें एवढेंच नव्हे तर पुस्तकें, कागद, शाई इत्यादि देखील मोफत पुरविण्यात येतात; तरी पण शिक्षणाच्या बाबतींत संस्थानांतील लोक घ्यावी तितकी काळजी घेत नाहींत.

श ह र.—कोटा संस्थानच्या राजधानीचें शहर. हें चंबळा नदीच्या कांठीं वसलेलें आहे. चौदाव्या शतकाच्या आरंभीं बुंदीच्या रावदेव राजानें येथील भिल्ल

लोकांचा पराभव करून हें शहर वसविलें. माधवसिंगाच्या कारकीर्दीत, कोटा संस्थानची हें शहर राजधानी बनलें. कोटा हें भरभराटीचें शहर असून, राजपुतान्यात जीं आठ प्रमुख शहरें आहेत त्यात या शहराची गणना होते. याच्या पूर्व, दक्षिण व उत्तर दिशेला तटबंदी असून पश्चिमेस समोरून चंबळा नदी वहात गेली आहे. शहराभोंवतीं सहा मोठे बुरुजी दरवाजे असून ते रात्रीं ११ वाजता बंद करण्यात येतात. या शहराचे कोटा, लाडपूर व रामपूर असे तीन भाग पडतात. शहरामध्यें पुष्कळ देवालयें असून मथुराजीचे देवालय फार प्रसिद्ध आहे. यातील मूर्ति गोकुळातून आणलेली आहे असे म्हणतात. येथील नीलकंठ महादेवाची मूर्ति ही सर्वांत जुनी आहे असें दिसून येतें. येथील लोकसंख्या वाढण्याऐवजीं कमीच होत आहे असें खानेसुमारीवरून दिसून येत. याचीं मुख्य कारणें म्हटली म्हणजे कोटा हें रेल्वेपासून बरेंच दूर आहे व येथें असणाऱ्या किशोरसागर तलावाचें पाणी जमीनींत गुरून हवा दमट झाल्यामुळें रोगराईचा येथें फार त्रास होतो हीं होत.

येथें पांढरी व रंगीत उत्कृष्ट मलमल तयार होते. दर फेब्रुवारी महिन्यात येथें औद्योगिक प्रदर्शन भरतें. त्यामुळें शहरात कोणकोणते धंदे चालू आहेत याची माहिती आपोआपच मिळूं शकते. १८७४ मध्यें या शहराला म्युनिसिपॅलिटीचे हक्क देण्यात आले. या ठिकाणी दरबारनें चालविलेल्या शिक्षणसंस्था आहेत. महाराव हायस्कूल व सरदारासाठीं असलेलें हायस्कूल हीं दोन्हीहि अलाहाबाद विश्वविद्यालयाला जोडलेलीं आहेत. हायस्कूलला जोडून पटवारी(क्षेत्रमापन)चें शिक्षण देण्याचा वर्ग निघाला आहे. येथें २ इस्पितळें आहेत. त्यापैकीं 'व्हिक्टोरिया हॉस्पिटल' हें स्त्रियाकरता आहे. येथील पहाण्याजोगीं स्थळें म्हणजे महाराजांचा राजवाडा (उमेरभवन), मोठमोठीं उद्यानें, अमरनिवास, ब्रिजविलास व छत्तरपूर हीं होत.

कोटा ता लु का.—वऱ्हाड–मध्यप्रांत. बस्तर संस्थानातील दक्षिणेकडील तालुका. १७° ते ४८' व १८° ते ५७' उ. अक्षांश आणि ८०° ४७' ते ८२° २'. पू. रे. क्षेत्रफळ ९६८ चौरस मैल. लोकसंख्या (१९११) ७७३६. दक्षिण व पश्चिम भाग डोंगराळ असून मुख्य नदी सावरीनाला ही आहे. यांत कोट्याच्या वर दोन मैलापासून गोदावरीच्या संगमापर्यंत नाव चालविता येते या तालुक्यात ताडाचीं झाडें फार असून त्यांपासून ताडी काढितात. या तालुक्यांत ३० चौ. मैल क्षेत्रफळाचा एक सपाट प्रदेश चोहोंकडून टेंकड्याच्या रागांनीं वेष्टिला आहे. मुरिया लोकाची वस्ती जास्ती असून तांदूळ व ज्वारी ही मुख्य पिकें आहेत. तालुक्याचें मुख्य ठिकाण कोटा गांव आहे. [छत्तिसगड फ्युडेटरी स्टेट्स ग्या.].

कोटापल्ली जमिनदारी.—वऱ्हाड, मध्यप्रांत, उत्तर अक्षांश १८° १२' ते १८ २६' व पूर्वरेखांश ८१ १५ ते ८१ ४६. क्षेत्रफळ २२८ चौरस मैल. लोकसंख्या १०८०. बस्तर संस्थानांत ही जमिनदारी असून हिचा सारा ५२७ रुपये आहे. हिच्या उत्तरेकडून दक्षिणेकडे एक टेकड्यांची ओळ गेली आहे. मुख्य पीक ज्वारी. जंगलांतलि सागांच्या झाडावर जमीनदारांचा हक्क नाहीं.

कोटी—पंजाबांतील केओन्थल संस्थानातील लष्करी जहागीर. लो. सं. (१९२१) ५२२८. वार्षिक उत्पन्न ४४,१५४ असून १०० रु. केओन्थल संस्थानास मोकाशीबद्दल दिले जातात. येथील संस्थानिकास सर्व तऱ्हेच्या न्यायाधिकाराची सत्ता असून फक्त देहांतशिक्षेच्या बाबतीत सिमालापहाडी संस्थानच्या सुपरिंटेंडेंटची मंजुरी लागते.

कोट्टमचगी—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. गदगच्या ईशान्येस १५ मैलावरचें एक खेडें. येथें एक पडका किल्ला असून सोमप्पाच्या देवळांत इ. स. १११२ आणि ११४२ सालचे दोन शिलालेख आहेत.

कोटेश्वर—मुंबई. कच्छमधील कोरी नदीच्या मुखाजवळील लहान बंदर येथील काही देवळें कोटेश्वरच्या प्राचीन भरभराटीची साक्ष देतात. एका देवळातील चार फूट उंचीच्या स्वयंभू लिंगाच्या टोंकाला लोखंडी खिळे मारलेले आहेत. अल्लाउद्दीन खिलजीनें (१२९५–१३१५) हे खिळे मारले अशी दंतकथा आहे. हल्लीं नवी देवळें असलेल्या जागेवरील एका जुन्या दगडातील लेखावरून येथील प्राचीन देवळें घोलेच्या केर लोकानीं बाधलीं असें अनुमान निघतें.

कोट्टापट्टम्—मद्रास इलाखा गुंटुर जिल्हा ओंगोल तालुक्यातील समुद्रकांठचें गांव. एके काळीं व्यापाराच्या भरभराटीचें हें ठिकाण होते. गावातील रस्ते व घरें पद्धतशीर रीतीनें बाधलीं असून गावाची रचना फार सुंदर आहे. बकिंगहॅम कालवा तयार झाल्यापासून या गावाचें व्यापारी महत्व नष्ट झाल्याकारणानें येथील कित्येक रहिवासी मद्रास व इतर ठिकाणीं रहावयास गेले. येथील लोकसंख्येंत कोमटी लोकांचा बराच भरणा आहे. येथें एक शिवालय व एक विष्णुमंदिर असून त्याच्या उत्सवासाठीं भव्य व सुंदर रथ केलेले आहेत.

कोट्टायम्, ता लु का.—मद्रास प्रातातील मलबार जिल्ह्याचा उत्तरेकडील तालुका. क्षेत्रफळ ४८१ चौ. मै. यात २८ अमसम किंवा विभाग आहेत. लोकसंख्या (१९२१) २,३२,२८५. यांतील महत्वाचें गांव तेलीचरी (तहसिलचें गांव) हेंच आहे. या तालुक्याच्या पूर्वेस उंच असा सह्याद्रि पर्वत असून त्यापासून हिंदी महासागरापर्यंत या तालुक्याचा पृष्ठभाग एकदम उतरत गेला आहे.

गां व.—मद्रास इलाख्यात त्रावणकोर संस्थानातील याच नांवाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें गाव कोचिनच्या मोठ्या नदीमुखास जोडलेल्या वेम्बनाद सरोवरास मिळणाऱ्या 'मीनचिल' नदीच्या तीरावर आहे. लो. सं. (१९११) १५,१४१. लोकसंख्येत हिंदु व ख्रिस्ती

याचें प्रमाण जास्त आहे. हें सिरियन ख्रिस्ती समाजाचें मध्यवर्ती ठिकाण असून येथील चर्च फार प्राचीन आहे. इ. स.१८१६ पासून येथील चर्चची मिशनरी संस्था काम करीत असून तिच्या ताब्यात दोन महाविद्यालयें व एक विद्यालय आहे. शिवाय येथील सिरियन बिशपच्या ताब्यातहि दोन हायस्कुलें आहेत. येथें ७८ नियतकालिकें प्रसिद्ध होतात.

कोट्टारु—मद्रास इलाख्यांत त्रावणकोर संस्थानच्या अगस्तिवरम् तालुक्यांतील नागरकोईल गावचें उपनगर. त्यास प्रसिद्ध भूगोलशास्त्रज्ञ टॉलेमीनें कोटियारा व्यापारी पेठ असें म्हटलें आहे. हें प्युटिंजरच्या तक्त्यात कोट्टार म्हणून निदर्शित केलें आहे व याला चोळ राजाच्या वेळीं मुमुदीचोळपुरम् असें नाव होतें. कूलोत्तुंग चोलानें हें पाड्य राजापासून घेतलें. कन्याकुमारीचें कोट्टारु हें नाव होय असे कूलोत्तुंगाच्या राज्याभिषेकाच्या १४ व्या व १५ वर्षी खोदलेल्या लेखावरून दिसतें (अय्यंगार-एन्शट इंडिया). प्राचीन काळीं हें मोठ्या व्यापाराचें स्वतंत्र गांव होतें. या ठिकाणीं दूरदूरचे व्यापारी लोक येत असत. अद्याप दक्षिण त्रावणकोरमधील व्यापाराचें हें मुख्य ठिकाण असून येथें विणकामाचे कारखाने आहेत व उत्तम पोताचें कापड येथें तयार होतें. येथें रोमन कॅथॉलिक चर्च व इंग्रजी हायस्कूल आहे.

कोट्टूरु—मद्रास इलाख्यांत बल्लारी जिल्ह्याच्या कुडिलगी तालुक्यांतील गांव.हें लिंगायत समाजाचे केंद्रस्थान असून येथील लोकवस्तींत लिंगायतांचें प्रमाण बरेंच आहे. लिंगायताचा धर्मगुरु बसाप्पा लिंगस्वामी याने येथें केलेल्या महत्कृत्यामुळें हें गांव पवित्र झालें आहे असें ते समजतात. गांवाच्या पूर्वेस या गुरूचें समाधिमंदिर असून त्याच्या भोंवतीं काळ्या दगडाची क्वचित् रंगीत व क्वचित् साध्या अशा कोरीव कामाची भिंत असून देवळाचे खांब कोरीव दगडाचे आहेत. मुख्य द्वाराच्या पश्चिमेस गजलक्ष्मीची मूर्ति आहे. गावांतील मुलामुलींस कोत्री, कोत्रव, कोत्रप्पा वगैरे उपनावें प्रचलित आहेत. बसाप्पा लिंगस्वामींनीं येथील जैनांस वादात हरवून लिंगायत बनविलें व देवळांत लिंगाची स्थापना केली असें सांगतात. हें देऊळ मरुकल्लमठ या नांवानें प्रसिद्ध आहे. येथें सुती कापड विणण्याचा धंदा चालत असून हें व्यापाराचें महत्वाचें ठिकाण आहे.

कोट्रा किंवा सांगानी—काठेवाड पोलिटिकल एजन्सीमधील चौथ्या वर्गाचें लहान माडलिक संस्थान. क्षेत्रफळ ७४ चौरस मैल व लोकसंख्या (१९०१) ८,८३५ असून यांत २० खेडीं आहेत. गोंडलच्या कुंभोजीचा मुलगा सांगोजी हा या संस्थानचा संस्थापक होय. पुढें याचे नातु जासोजी व सर्तनजी यानीं कोट्रा हें ठिकाण काठी लोकांपासून जिंकून घेतलें (१७५०) व तेथेंच राजधानी स्थापिली.

कोठारिया—राजपुतान्याच्या उदेपूर संस्थानांतील एका इस्टेटीचें मुख्य गाव. हें बनारस नदीवर असून उदेपूर शहरापासून ३० मैल आहे. या इस्टेटींत अथवा जहागिरींत ८१ खेडीं असून जहागिरदार मेवाडचे पहिल्या वर्गाचे सरदार आहेत. ते चव्हाण रजपूत असून त्यांस 'राउते' असें म्हणतात. राणा संग्रामसिंगाच्या बाजूनें (१५२७) बाबराविरुद्ध लढणाऱ्या माणिकचंदानें हें स्थापन केलें. जहागिरीचें वार्षिक उत्पन्न ३२,००० रु. असून दरबारास १,२०० रु. खंडणी द्यावी लागते.

कोठी—मध्यहिंदुस्थानात बाघेलखंडाच्या पोलिटिकल एजन्टाच्या देखरेखीखालीं असलेलें एक सनदी संस्थान आहे. येथील संस्थानिक बाघेल रजपूत असून त्यानें येथील मूळच्या भार राजाला हाकलून देऊन येथें जहागीर स्थापिली. येथील संस्थानिकाच्या राजनिष्ठादि गुणांचें बक्षीस म्हणून त्यास इंग्रजाकडून राजा बहादूर ही पदवी मिळाली आहे. येथील जमीन चांगली सुपीक असून तींत साधारणतः सर्व धान्यें पिकतात.

कोठी—अठरा कारखान्यांत कोठी हा एक कारखाना असे. कोठींत धान्यसंग्रह निक्षेपकरून करीत. परंतु जुन्या कागदपत्रांत खजिना, वखार, किंवा कापडचोपड अथवा इतर सरकारी सामान साठवण्याची जागा या अर्थीहि हा शब्द येतो. लष्कराची रसद पुरविणारें खातें यासहि कोठी म्हणत. उ. ' लष्कराची कोठी चालली किंवा लुटली ' वगैरे. सामान्य अर्थ धान्यागार. या कोठीवरील अधिकारी तो कोठावळा. यावरूनच कोठवळे हें आडनाव प्रचारांत आलें आहे. प्रत्येक किल्ल्यावर धान्याची अशी कोठी असे. दारूच्या कोठारासहि काहीं जागीं कोठी शब्द इंग्रज लावीत. तसाच वखार या अर्थी हा शब्द इंग्रज किंवा फिरंगी वगैरे टोपीवाल्याच्या फ्याक्टरींना लावीत असत कोठवळ्याकडे मुदबखखान्या(स्वयंपाक) वरील देखरेखीचें काम असे. राजाच्या मुदबखखान्याची व्यवस्था त्यानेंच पहावयाची असे.पेशवाई अखेर इंग्रजाच्या रेसिडेन्सीलाहि कोठी म्हणूं लागले होते. कोष्ट या संस्कृत शब्दापासून कोटी हा शब्द बनला आहे.

कोठूर—मुंबई. नाशिक जिल्हा. निफाडच्या दक्षिणेस तीन मैलावर असून येथें एक मल्हारेश्वराचें देऊळ आहे. यामध्यें दोन (इसवी १७१७ व १७२७) शिलालेख आहेत. बाळाजी विश्वनाथ पेशवे याचे मेव्हणे (पत्नी राधाबाई यांचा भाऊ) मल्हारराव बरवे यांनीं दोन वाडे, दोन घाट, दोन धर्मशाळा व बाणेश्वराचें देवालय येथें बांधिलें आहे. मल्हारराव बरव्याचे वंशज येथें रहातात. [बाँबे. ग्या.].

कोड, तालुका.—मुंबई इलाख्यांतील धारवाड जिल्ह्याच्या अगदी दक्षिण भागांतील एक तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ सुमारें ४०० मैल आहे. या तालुक्यांत १७३ खेडीं आहेत. १९११ मध्यें या तालुक्याची वस्ती ९६,३४५ होती. १९०३-४ या सालांत या तालुक्याचें उत्पन्न २,१८,००० होतें. या तालुक्याचें मुख्य ठिकाण हिरेकेर हें होय. या तालुक्यांत ठिकठिकाणीं टेंकड्या व झाडीं आढळून येतात. या तालुक्यांत मुख्यतः ऊसाची

लागवड होते. तसेच सुपारीची झाडेंहि येथें पुष्कळच आहेत. येथील जमीन मुख्यतः तांबडी आहे. या तालुक्याच्या आग्नेय दिशेनें तुंगभद्रा नदी गेली आहे व पूर्वेकडून कुमद्वती नदी वहात येऊन या तालुक्यांतून गेली आहे. उन्हाळ्यामध्यें या तालुक्यांतील हवा फार थंड व निरोगी असते; पण पावसाळ्यात मलेरियल असते. या तालुक्यात मडग नावाचे एक तळें असून त्यांत कुमद्वती नदीचें पाणी येतें.

गां व.—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हिरेकरूच्या ईशान्येस सुमारे ६ मैलांवर एक खेडें. येथें तांदूळ व मिरच्या यांचा मोठा व्यापार आहे. येथील हनुमानाच्या देवळात एक जुना कानडी शिलालेख आहे.

कोंडका—मध्यप्रांतातील एक संस्थान. (छुइखादन पहा).

कोंडगल, ता लु का.—हैद्राबाद संस्थानांतील गुलबर्गा जिल्ह्याच्या पूर्वभागातील एक तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ ६२२ चौरस मैल असून १९११ मध्यें या तालुक्याची लोकसंख्या १,१९,९४४ होती. या तालुक्यांत २ शहरें असून १६३ खेडीं आहेत. या खेड्यापैकीं ३५ खेडीं जहागीर होतीं. या तालुक्याचा जमीनमहसूल १९०१ सालीं १,०१,००० होता. १९०५ मध्यें गुरुमलकाल तालुक्यांतील ५९ खेडीं कोइलकोंडा तालुक्यात समाविष्ट करण्यात आलीं. या तालुक्यांत तांदूळ पुष्कळ पिकतो व तो मुख्यतः तलावाच्या पाण्यामुळें पिकतो. या तालुक्यात जहागीर म्हणजे तांडूर व कोसगी हे छोटे तालुके होत व यांत अनुक्रमें ६२ व ११ खेडीं आहेत.

श ह र.—कोंडगल तालुक्याचें हें मुख्य ठिकाण होय. हें तांडूर स्टेशनापासून १२ मैलावर आहे. या गांवाची लोकसंख्या १९११ सालीं ६०६२ होती. या गावीं तालुकाकचेरी, पोलीस इन्स्पेक्टरची कचेरी, तालुका पोस्टऑफिस इत्यादि कचेऱ्या असून एक शाळा आहे. या गांवांत एक मशीद असून ती ३०० वर्षांची जुनी आहे असे म्हणतात.

कोंडगांव, ता लु का.—चन्द्राड-मध्यप्रांत. बस्तर संस्थानातील ईशान्येकडील तालुका. उ. अक्षांश १९ ° १५' ते २० ° १०' व पू. रेखांश ८० ° २५' ते ८२ ° १०'. क्षेत्रफळ १९३१ चौरस मैल. लोकसंख्या ४७,७८२. याचा तीन चतुर्थांशापेक्षां जास्त भाग अरण्यांनीं व्यापिला आहे. व सालाची झाडें अरण्यात फार आहेत. एकंदर ५३४ खेड्यांपैकीं ८ खेडीं उजाड आहेत. ३५ खेडीं हल्लीच्या संस्थानिकाच्या चुलत्याकडे सारामाफीनें आहेत. तालुक्यांतील जमीनींत खरीपाचें पीक होत असून यांत दोन पोलिसठाणीं, सहा पोलिस चौक्या व दोन इन्स्पेक्शन बंगले आहेत.

गां व.—कोंडगांव तालुक्याचें हे ठाणें. हें धरमतरीपासून व राजनांदगांवापासून येणाऱ्या सडकांच्या संगमावर वसलें असून येथें पोलिस ठाणें, डांकघर व शाळा आहे. [छत्तिसगड फ्यु. स्टे.]

कोंडचाद्री—म्हैसूर इलाख्यातील शिमोगा जिल्ह्यामधील नगर तालुक्यांतील एक पर्वत. याची उंची ४४११ फूट आहे. या पर्वताच्या पठारावर पुष्कळ सुंदर अरण्यें आहेत. या पर्वताचें शिखर म्हणजे एक अगदीं अरुंद असा सुळका असून तो दोन्ही बाजूंनीं तुटलेला आहे. पश्चिमेस हा पर्वत ४००० फूट उंच असून त्याच्या पायथ्याशीं दाट अरण्यें आहेत. याच्या समोरच कुंडापूरची सामुद्रधुनी व कुंडापूर गाव आहे. या पर्वतावर 'हुलीदेव' नांवाचें एक देवालय असून त्यांतील देवाला ३२ हात आहेत.

कोंडपल्ली—मद्रास इलाख्यातील कृष्णा जिल्ह्याच्या बेझवाडा तालुक्यांतील एक गाव. याच्या जवळच एक डोंगरी किल्ला असून त्याला कोंडपल्लीचा किल्ला असें म्हणतात. १९०१ मध्यें येथील किल्ल्यामुळें व उत्तरसरकारच्या राजधानीचें हें एक शहर असल्यामुळें, पूर्वी या गांवाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. १३६० मध्यें कोंडउविडूच्या रेड्डी राजांनी, हा किल्ला बांधला. १४७१ मध्यें, बहामनी सुलतानानें ओरिसाच्या राजापासून हा किल्ला जिंकून घेतला पण पुढें पुन्हां तो ओरिसाच्या राजानीं परत मिळविला. १५१५ सालीं विजयानगरच्या कृष्णदेवानें तो ओरिसाच्या राजापासून जिंकून घेतला. १५३१ मध्ये तो सुलतान कुलि कुतुबशहाच्या हातात पडला. १६८७ सालीं औरंगझेबाच्या ताब्यांत तो येऊन सुमारें ७५ वर्षे तो मोंगलाच्या ताब्यांत होता पण १७६६ मध्यें निझामपासून जनरल कैलाडनें तो जिंकून घेतला. इ. स. १८५९ पर्यंत त्या ठिकाणीं ब्रिटिशांनीं आपलें लष्कर ठेवलें होतें. येथील किल्ल्याच्या आसमंतांतील भागांत हल्ली जिकडे तिकडे जंगल वाढलेलें आहे तरी अशा स्थितींतहि किल्ला अद्यापि प्रेक्षणीय आहे. या ठिकाणीं डोंगरावर एक प्रकारचें हलकें लाकूड मिळतें व त्या लांकडापासून येथील लोक खेळणीं तयार करतात.

कोंडभगी—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. कोडच्या दक्षिणेस अकरा मैलांवर एक खेडें आहे येथील बयल बसप्पाच्या देवळांत इ. स. ११५८ सालचा एक शिलालेख व सिद्धरामेश्वराच्या देवळांत दोन शिलालेख आहेत. पैकीं एक इ. स. १०८० सालचा असून दुसऱ्यावरील तारीख लागत नाहीं. [धारवाड ग्या.].

कोंडविडु—मद्रास इलाख्यातील गुंटूर जिल्ह्याच्या नरसेरावपेट तालुक्यांतील एक खेडें. या ठिकाणीं एक डोंगरी किल्ला आहे. प्राचीनकाळीं कोंडविडू नांवाचा कृष्णानदीपासून गुंडलकम्म गांवापर्यंत पसरलेला एक प्रांत असून त्या प्रांताची हें गांव राजधानी होतें. येथील किल्ला १२ व्या शतकांत बांधला असावा. रेड्डीराजांचे चवदाव्या व पंधराव्या शतकांत हें रहाण्याचें ठिकाण होतें. १५१६ मध्यें विजयानगरच्या कृष्णदेवरायानें हा किल्ला जिंकून घेतला. पण थोड्याच वर्षांनीं तो गोंवळकोंड्याच्या सुलतानांनीं आपल्या ताब्यांत आणिला. मुसुलमानांनीं या गांवाचे मूर्तिझानगर हें

नाव ठेवलें होतें. १७५२ मध्यें फ्रेंचानीं हा प्रांत काबीज केल्यावर १७८८ सालीं तो प्रदेश इंग्रजांच्या ताब्यांत आला. येथील किल्ला टेंकडीवर बांधलेला असून तो दगडाच्या योगानें बांधल्यामुळें त्याला मजबुती आली आहे. या किल्ल्याचा घेर पुष्कळ मैल असून किल्ला अद्यापहि बऱ्या स्थितींत आहे. या किल्ल्याच्या आत दाट जंगल वाढलेलें असून येथें पूर्वी दारुगोळ्याचें कोठार असावें असें तेथें सापडलेल्या अवशेषांवरून दिसतें. हा ज्या टेंकडीवर बांधला गेला आहे त्या टेंकडीची उंची समुद्राच्या पृष्ठभागापासून १७०१ फूट असून हिची आरोग्यस्थान म्हणून प्रसिद्धि होती. कोंडविड्डु गांवाची लोकसंख्या १९०१ सालीं १९७९ होती.

कोंडवीडू गाणदेव—हा कोंडवीडू देशाचा गाणदेव नांवाचा राजा शके १३७७ च्या सुमारास होऊन गेला. याचा आजा चंद्रदेव व बाप गुहिलदेवपाल हा होय. हुल्श यानें याला ओरिसाच्या कपिल गजपतीचा समकालीन मानला आहे. परंतु तो त्याचा समकालीन नसून कपिलाचा वंशज असावा असें म्हणतात [गाणदेवाचा ताम्रपट.].

कोंडाणे—मुंबई इलाख्यातील कुलाबा जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील एक खेडें. हें कर्जतच्या आग्नेयीस ४ मैलांवर आहे. हे राजमाची टेंकडीच्या पायथ्याशीं वसलेलें आहे. याची लो. सं. १९०१ सालीं १५८ होती. येथें ख्रिस्तपूर्व २०० वर्षांच्या सुमारचीं बौद्धाचीं लेणीं असून तीं प्रेक्षणीय आहेत. हीं लेणीं एकंदर चार असून यात एक बुद्धाची मुर्ति आहे. येथें एक ख्रिस्तपूर्व २ ऱ्या शतकांतील शिलालेख असून त्यावर ' कन्हाचा (कृष्णाचा) शिष्य बलक यानें तयार केलेली ' असा मजकूर आहे.

कोंडाणे किल्ला—' सिंहगड ' पहा.

कोडीनार—बडोदा संस्थानांतील अमरेली प्रांतातील कोडीनार तालुक्याचें मुख्य ठिकाण. या गावची लोकसंख्या १९११ मध्यें ६०७५ होती. हे ठिकाण समुद्रापासून तीन मैलांवर सिंगबद नदीच्या दक्षिण तीरावर वसलेलें आहे. या गावाचा कारभार म्युनिसिपालिटीमार्फत चालतो. या म्युनिसिपालिटीला संस्थानाकडून वार्षिक देणगी मिळते. येथें मुनसफ कोर्ट, मॅजिस्ट्रेट,कोर्ट व इतर कचेऱ्या आहेत. गांवांत एक मोफत दवाखाना व मोफत शाळा आहे. या गांवाचा व्यापार मुंबई, कराची, पोरबंदर, मंगरोळ या बंदराशीं जलमार्गानें चालतो व कापूस, धान्य व तूप हे जिन्नस बाहेरदेशीं जातात. गहूं, ज्वारी, कापड, इत्यादि जिन्नसाची आयात होते.

कोडैकानल, तालुका.—मद्रास इलाख्यांतील मदुरा जिल्ह्याच्या डिंडिगळ नांवाच्या पोटजिल्ह्यांतील एक छोटासा तालुका. या तालुक्याचें मुख्य ठिकाण कोडैकानल हें असून या तालुक्यांत १५ लहान मोठीं डोंगराळ खेडीं आहेत. या तालुक्याची वस्ती १९२१ मध्यें २,३१,१३६ होती. जमीन महसूल व सारा मिळून या तालुक्याचें उत्पन्न सुमारें ४३,००० रुपये आहे. हा डोंगराळ तालुका असल्या कारणानें डोंगराच्या दरीच्या बाजूबाजूनें असलेल्या जमीनींची पेरणी करण्यांत येते. गहूं, लसूण, कॉफी, दालचिनी हें या तालुक्यातील मुख्य उत्पन्न आहे. येथें पिकणारा तांदुळ हलक्या जातीचा असल्याकारणानें त्याचें पीक यावयाला आठ ते दहा महिने लागतात. पलनी टेंकड्याच्या आसमंतात केळीं पिकतात व या भागांत गुरांची निपज फार मोठ्या प्रमाणात होते. शिक्षणाच्या बाबतींत हा भाग फार मागसलेला आहे व जें काहीं थोडें शिक्षण मिळतें तें जेसुइट व अमेरिकन मिशनकडून दिलें जातें. या तालुक्याच्या सर्व भागात अस्वच्छता दिसून येते.

गाव—कोडैकानल तालुक्याचें हें मुख्य ठिकाण असून पूर्वी हें अगदीं लहानसें खेडें होतें. पण हल्लीं मद्रास इलाख्यातील आरोग्यस्थान म्हणून या भागाची ख्याति आहे. अर्थातच उन्हाळ्यामध्यें या ठिकाणीं राहण्याकरिता पुष्कळ लोक येतात. या गांवाची लोकवस्ती १९२१ सालीं ४२८३ होती. सन १८९९ मध्यें या गावाला म्युनिसिपॅलिटीचे हक्क देण्यात आले. या गांवाला कायमची पाण्याची व्यवस्था करण्याबद्दलची योजना घाटत आहे. या गावात ३ प्रार्थनामंदिरें असून एक यूरोपियन मुलामुलीकरता अमेरिकन मिशनतर्फे शाळाहि चालू आहे. तसेंच म्युनिसिपॅलिटीतर्फे या गावांत एक मोफत दवाखानाहि आहे.

येथील आरोग्यभुवन (सॅनिटोरियम)समुद्रसपाटीपासून ७०००फूट उंचीवर आहे. हें ज्या टेंकडीच्या वर वसलेलें आहे, त्या टेंकडीच्या पायथ्याशीं एक सुंदर कृत्रिम तलाव आहे. येथील हवा जवळ जवळ उटकमंडच्या सारखी आहे. शिवाय उटकमंडपेक्षा याठिकाणीं पर्जन्याचें मान कमी असल्याकारणानें तर तेथील हवा फारच सुंदर असते. या आरोग्यभुवनाच्या सभोंवार गवतानें आच्छादलेलीं मैदानें व लहान अरण्यें असून अरण्यातून लहान पाण्याचे झरे वहात असतात. या स्थानापासून जवळचें स्टेशन म्हणजे अम्मयनायकनूर असून हें कोडकैनलपासून ३३मैल आहे. व आरोग्यभुवनाच्या पायथ्याशी आल्यावर नंतर आरोग्यभुवनाला ११ मैलांचा चढ घोड्यावरून अगर खुर्च्यांवरून चढावा लागतो. या आरोग्यभुवनाच्या अगदीं जवळच घोड्याशा उंचीवर एक वेधशाळा आहे. १८९९ सालीं उटकमंड येथील वेधशाळा काढून या ठिकाणीं तिची स्थापना झाली. या आरोग्यभुवनाच्या पासून १००० फूट खालीं शेंबगनूर येथें एक जेसुइट लोकांचें कॉलेज आहे.

कोडौंग—अप्पर ब्रह्मदेशांतील रूबीमाइन्स जिल्ह्यामधील एक डोंगराळ तालुका. हा मोंगमीट संस्थानच्या ईशान्येस असून याची व्यवस्था डेप्युटी कमिशनरमार्फत चालविली जाते. या तालुक्याचें क्षेत्रफळ ७६० चौरस मैल आहे. हा तालुका मुख्यतः टेंकड्यांवर वसला असून समुद्राच्या सपाटीपासून ७००० फूट उंच आहे. हा डोंगराळ मुलूख

असून सुद्धां येथें दळणवळणाची सोय चांगली आहे. एके-काळीं या तालुक्यांत पलैग लोकांचीच वस्ती असे. पण सुमारें शंभर वर्षांपूर्वी काचिन नांवाच्या डोंगरी लोकांनीं, त्यांनां हुसकून लावून आपली वस्ती करण्यास सुरवात केली. हल्लीं येथील वस्ती या दोन्ही जातींची मिळून आहे. १९११ मध्यें येथील लोकसंख्या २४,४५७ होती. या तालुक्यांत १४३ खेडीं आहेत. तालुक्याचें मुख्य ठिकाण मोलो हें आहे. या ठिकाणीं अंमलांत असलेला कायदा म्हणजे १८०५ सालचा काचीन हिल्स ट्राइब्स रेग्युलेशनचा होय.

कोण्णूर—मुंबई इलाख्यांतील बेळगाव जिल्ह्याच्या गोकाक तालुक्यातील खेडेंगाव. हें गोकाकच्या वायव्येस ५ मैलांवर घटप्रभेच्या तीरावर वसलेलें आहे. याची लोक-संख्या इ. स. १९११ मध्यें ५६९७ होती. येथें एक मुलांची शाळा असून तथें जवळ जवळ १००मुलें शिकतात. या खेडे-गावच्या हद्दींत गोकाकच्या धबधब्यानजीक बरींच जीर्ण देवळें असून तीं अकराव्या शतकाच्या सुमारास बाधलेलीं असावींत असें दिसतें. या गांवाच्या दक्षिणेस एका टेंक-डीच्या पायथ्याशीं पुष्कळ थडगीं असून त्या थडग्यांभोंव-तालच्या इमारतींत लहान लहान अशा तीस चाळीस खोल्या आहेत. यापैकीं बरीचशीं थडगीं जीर्णावस्थेंत आहेत. या थड-ग्याच्या भोंवतालील इमारती दगड लोकांनीं आपल्या घरासाठीं येथून उचलून नेलेले आहेत. येथील खोल्या पांडवांनीं बाधल्या आहेत अशी समजूत आहे. कोण्णूर हा शब्द " कोन्ने+ऊरु' या दोन कानडी शब्दापासून झाला आहे. कोन्ने म्हणजे खोली व ऊरु म्हणजे गाव. कोण्णूर याचा अर्थ खोल्याचा गाव असा होतो व हें नाव सार्थ आहे असें तेथील थडग्यां-जवळील खोल्या पाहिल्यावर वाटल्याशिवाय रहात नाहीं. या ठिकाणीं असलेल्या एका थडग्यात एक मनुष्याचा दात, हाडें व काहीं भांडीं असलेलीं आढळलीं.

कोतवाल—मराठी साम्राज्यांत कोतवाल म्हणजे सर्व पोलिसखात्यावरील मुख्य अंमलदार असे. परंतु हल्लींच्या इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस याच्या कामापेक्षां या कोतवालच्या तत्कालीन कामात बराच फरक होता. राज्यां-तील मोठमोठया शहरीं असे कोतवाल असत. त्यांच्या हाताखालील कोतवालींत शिपाई असत. सातारा, पुणें, नगर, ब्रह्मणपुर, नाशिक, सोलापूर वगैरे ठिकाणीं हे कोतवाल असत. राज्यातील या निरनिराळ्या कोतवालीवर मुख्य अधिकारी (पुण्याचा राजधानीचा कोतवाल नसून) तत्तत् प्रांतीय सुभेदार असे. खात्यांच्या एकीकरणाची रीत ही फार अलीकडील आहे. कोतवालांच्या कामाचें स्वरूप पुढीलप्रमाणें असेः-

पुणें येथील कोतवालासंबंधाचीं कलमें अशीं:-(१)कसबा व शहर येथील पेठामधील मोठमोठे कज्जे व न्यायमनसुभे कोतवालानें तोडावे (किरकोळ कज्जे पेठांच्या मामलेदारांनीं तोडावे); व शिक्षा वगैरे करावी. (२) बाजा-रांतील वस्तूंचे (धान्य, कापड वगैरे व्यापारी मालाचे) बाजारभाव ठरवावे आणि त्यांची रोजची यादी (रिपोर्ट) सरकारांत धाडावी (३) वेठ, बिगार सरकारी कामास लागेल तिची व्यवस्था करावी. (४) सरकारास कारा-गिरांचें काम लागल्यास त्यांचा पुरवठा करावा. (५) जमीनीची खरेदी विक्री शहरांत ज्यानां करावयाची असेल त्यांनीं कोतवालाच्या हुकुमानें ती करावी आणि योग्य तो सरकारी दस्तूर (फी) घेऊन कोतवालानें खरेदी विक्रीचे दस्तऐवज सरकारी सहीशिक्यानिशीं करून द्यावेत. (६) गांवांतील रयतेपासून पुढील कर वसूल करावे (अ) पाट व मोहतूर करणारापासून सव्वा रुपया व एक शेला; (आ) कापड वगैरे मोजण्याचा गज तपासून अगर नवा करून देतांना शिरस्त्याप्रमाणें रकम घेणें (इ) नवीन वजनें करून त्यांवर छाप मारणें व त्याचा दस्तूर (फी) घेणें व जुनीं मापें नेहमीं तपासणें; (ई) पेंढारी लोकांपासून त्याच्या ताकदीप्रमाणें दरेक घरामागें सालीना आठ आणे ते एक रुपयापर्यंत कर घेणें; (उ) दरेक तेल्या-पासून दरेक घाण्यामागें दररोज ३ रुके घेणें (एक रुका एक पै); (ऊ) नागेश्वर पीरदर्गा (शेखसल्ला ?) व कसब्यातील चावडी येथें दरमहा अनुक्रम ८३, ८६ व ८३ चें तेल दिवाबत्तीकरिता जाळणें. हा खर्च वजा जातां (बाकी वरील तेल्याच्या टुकानांतील कराची जी बाकी) राहील त्यात वरकड चौथरे (पोलीसचौक्या) व दिवटया वगैरेस खर्च करावा, (ए) गावात ठिकठि-काणीं दुतन्यास गोंधळ होतो अगर बकरें मारितात त्या वेळीं या प्रत्येक कृत्यामागें ६ रुके सरकारात घ्यावेत(ऐ) भाग, गाजा वगैरेवरील कर दरमहा वसूल करावा; (ओ) लोकाची खानेसुमारी करावी (वार्षिक); (औ) शह-रातून रोज जाणाऱ्या येणाऱ्या एकूणएक लोकाची नावनिशीचीं यादी ठेवावी; (७) रस्ते, गल्ल्या व घरें याचे कज्जे तोडावे; (८) जुवाबाजानीं कोतवालाच्या परवानगीशिवाय जुवे खेळूं नयेत व त्या लोकांपासून कोतवाल्यानें सरकारी ठराविक कर वसूल करावा. (९) कोतवाली (खात्याचा) हिशेब दरमहाचे दरमहा सरकारात दाखल करावे. (१०) गावांत दौंडी फिरविण्याची व्यवस्था करावी. (११) शहरातील सरकारी किरकोळ कर (भाजी पाला धान्य वगैरे आयात मालावरील) जमा करावेत.(१२) पुण्यात कोतवालीचे कामाचे चावडीस बुधवारात जागा नेमून दिली. (१३) शहराचा चौकीपहारा सतत करणें व रयतेवर जुलूम न करितां रयत आबाद राखणें. (१४) सरकारी वसूल वेळेवर सरकारात जर भरला नाहीं तर कोतवालानें त्यावर आपल्या पदरचे दरमहा दर शेकडा १ रुपया प्रमाणें व्याज दिलें पाहिजे. (१५) सरकारी वसुलांतून नौक-रीस ठेविलेल्या शिबंदीचा (पोलिस घोडेस्वार व पायदळ

वगैरेंचा) खर्च काढून घेऊन बाकीचा भरणा सरकारांत दरमहा भरावा.

एखादेवेळीं कोतवालावर सदर अमीन(मुख्य न्यायाधीश) ची हुकमत असे. साधे अमीन कोतवालाच्या हाताखालीं असत. पुण्याच्या सबंध कोतवालीची सालीना नेमणूक तीन ते साडेतीन हजारांपर्यंत असे. खासा कोतवाल याचा पगार सालिना३०० ते३५०रु. असून त्याच्या फडणिसास व दप्तरदारास अनुक्रमे २०० व दिडशे रु. पगार असे. प्रत्येक कारकुनास सालीना १२५ रु. व प्रत्येक प्याद्या (शिपाई) ला सालिना ४८ रुपये असत. कोतवालाला एक दिवटया देत व एक सरकारचावडीवर असे; यानां सालीना ६० रु. हरकामी आसामी (ऑर्डर्ली) दोन असत, त्यांना सालिना ५० रु. दोन नाईक, दोन दंडिये व दोन पानसारे याना प्रत्येकास सालीना २४ रु. असा पगार असे. या सर्वांची बेरीज वरील ३ । ३॥ हजारांच्या बेहड्यात(नेमणूक पत्रांत) होई. आकास्मिक गोष्टींत भोजनखर्च, दप्तरखर्च, ऐवजखर्च वगैरे येई. त्याचा खर्च वेळेवर कोतवालानं आपल्या हुकमतींत करून सालअखेरीस मात्र सरकारी मंजुरी घ्यावी लागे. तसेंच एखादा कायद्याचा नियम अगर सरकारी हुकुम अन्यायाचा असल्यास तो बदलणें झाल्यास अगर प्रजेच्या फायद्याचे नवीन नियम वगैरे करणें झाल्यास ते कोतवालानें प्रथम सरकारांत समजवावे म्हणजे सरकार योग्य ती तजवीज करीत असे. [वाड. पु. ७ भाग २; पु. ८ भा. ३].

कोन्नग—बंगाल प्रातांत हुगळी जिल्ह्याच्या श्रीरामपूर पोटविभागांत हुगळीच्या उजव्या किनाऱ्यावरील गाव. लोकसंख्या ६५७४. येथें विटा व कौलाचे कारखाने असून दोऱ्याचेहि कारखाने आहेत. येथें १८६९ त म्युनिसिपालटी स्थापन झाली.

कोत्रा—राजपुतान्यात उदेपूर संस्थानच्या वायव्य भागांत उदेपूर शहराच्या नैर्ऋत्येस ३८ मैलांवर वाकल व साबरमती या नद्यांच्या संगमाजवळ दरींत हें लष्करी छावणीचें ठिकाण आहे. हें राजपुतानामाळवा रेल्वेवर आहे. कोत्रा जिल्ह्यात ४१२ गांवें असून एकंदर लो. सं. २०,४८० आहे. पैकीं दोन तृतीयांश भिल्ल आहेत या खेड्यावर ज्युरा, ओघना व पनर्वा येथील तीन गिरासिया सरदाराची मालकी आहे. ते मेवाडच्या दरबारात थोडीशी खंडणी देतात.

कोत्री, ता लु का.—मुंबई इलाख्यात सिंध प्रांतामध्यें कराची जिल्ह्यांतील एक तालुका क्षे. फ. ३१०७ चौ. मै. यांत ७९ खेडीं आणि२ मोठीं गावें आहेत. त्यांची लो. सं (१९११) ८०९८३. याचे स्पष्ट असे दोन विभाग आहेत.(१)'बंद विरह' टप्पा नावाचें पठार हें कोहिस्तानांत आहे. (२) डोंगराळ मुलूख व सिंधु नदी यांच्यामधील सुपीक व अरुंद प्रदेश (यांत शेतांस पाणी पुरविणारे ५ कालवे आहेत). मुख्य पीक जवारी, बाजरी, तांदूळ, तीळ, कापूस आणि गहूं. यांतील मुख्य गांवें कोत्री, (तालुक्याचें मुख्य ठिकाण) व मानझंद हीं आहेत.

गां व.—मुंबई इलाख्यात सिंध प्रांतामध्यें कराची जिल्ह्यांत याच नांवाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें सिंधु नदीच्या कांठीं असून नार्थवेस्टर्न रेल्वेचें जंक्शन आहे. लोकसंख्या (१९११) ६२५६. पूर्वी सिंधु नदींतून व्यापार चालत असे, परंतु आगगाड्या सुरू झाल्यापासून तो व्यापार बराच कमी झाला आहे. हें गांव 'नुमरिया' किंवा नऊ इसमांच्या कुळाचा अधिपति मलिक मादरखान याच्या जहागिरींत आहे. इंग्रजांच्या अंमलाखालीं येण्यापूर्वी ह्या गांवाला लष्करी दृष्टीखेरीज इतर दृष्टीनें मुळींच महत्त्व नव्हतें. इ. स. १८३९ त अफगाण वर जाणाऱ्या मुंबई तुकडीच्या सैन्याचा तळ या गावीं होता. इ. स. १८५४ त येथें म्युनिसिपालिटी अस्तित्वांत आली. उत्पन्न सुमारें १६००० रु. आहे. १८७९ च्या महामारीच्या साथीपासून गावच्या आरोग्यविषयक बाबतीकडे बरेंच लक्ष दिलें जातें. येथें सबॉर्डिनेट जज्ज कोर्ट ६ मुलांच्या व २ मुलींच्या शाळा आहेत व एक दवाखानाहि आहे.

कोथिंबीर—ह्याला लॅटिनमध्यें अंब्रेलीफेरी, इंग्रजींत कोरिअँडर, संस्कृत भाषेंत धान्यक किंवा धन्यक व मराठींत धणें, धन्या, धनिया, कोथिंबिर इत्यादि नांवें आहेत.

इ ति हा सः—हें एक मसाल्याचें झाड आहे. धन्यांची माहिती यूरोपखंडांत फार प्राचीन कालापासून आहे. हिंदुस्थानांतून मसाल्याचे जिन्नस ईजिप्तमध्यें गेल्या शतकापर्यंत रवाना होत. परंतु हल्लीं कोथिंबिरीची लागवड रशिया, हंगेरी, हॉलंड, मोरक्को इत्यादि देशात झाल्यामुळें आतां ते हिंदुस्थानातून ईजिप्तला रवाना होत नाहींत.

ला ग व डः—हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रातांत याची लागवड निरनिराळ्या वेळीं करितात. व ती बहुधा मिश्रपीक म्हणून केली जाते. बंगाल व संयुक्त प्रांत यांमध्यें हिवाळ्यांत मुंबईप्रांतात पावसाळ्यांत व मद्रास इलाख्यात शरदृतूंत याची लागवड करितात. नेपाळमध्यें धन्याचें मोठें उत्पन्न होतें. पंजाबांतहि याची लागवड प्रत्येक जिल्ह्यांत आहे. कोथिंबिरीच्या पानांचा भाजींत, कढींत स्वाद येण्याकरितां व धन्यांचा उपयोग मसाल्यांत करितात. मद्याकोला चव आणण्याकरितांहि हिचा उपयोग केला जातो. यूरोपमध्यें त्यापासून एक बाष्पभावी तेल काढितात. ह्या झाडापासून तेल निघतें असें पोर्टानें १६ व्या शतकांत लिहून ठेविलेलें आहे. या तेलाचें विशिष्टगुरुत्व ०.८७० पासून ०.८८५ पर्यंत आहे. या तेलाचा विशिष्ट वास त्यामधील कोणत्या पदार्थापासून येतो हें निश्चित झालेलें नाहीं. हिंदुस्थानांत होणाऱ्या धन्यापासून निघणाऱ्या तेलाचें मान शेंकडा ०.१५ ते ०.२ म्हणजे अतिशय कमी असल्यामुळें मोठया प्रमाणावर तेल काढण्याकडे हिंदुस्थानांतील धन्याचा उपयोग करीत नाहींत. हिंदुस्थानांतून १९१८–१९१९ या

साली धन्याची निर्गत ४८३९ टन झाली. व त्याची किंमत सुमारें १ लाख रुपये झाली. तुतिकोरिन व नेगापट्टम् या बंदरांतून याची निर्गत जास्त होत असून थोडाबहुत मुंबई व कलकत्ता बंदरांतूनहि माल बाहेर जातो.

हिंदुस्थानांतून मारिशस बेटाला सुमारें १०० टन माल दरवर्षी जातो. १९१७त १८ साली युनायटेड स्टेट्सकडे अजमासें ७०० टन धन्याची निर्गत झाली. कोथिंबिर पुष्कळ प्रमाणावर करणें असल्यास धने फेकून पेरतात. धने पेरण्यापूर्वी जोड्यानें कठिण जमिनीवर खरडतात. जोड्यानेंच खरडले पाहिजेत अशी कित्येकांचा समजूत आहे. हेतु हा कीं धन्याची दोन शकलें झालीं म्हणजे दोन बियांचीं दोन रोपें उगवतात. तीं छकलें कोणत्याहि हलक्या वस्तूनें खरडल्यास त्या छकलांतलि बियांचें उगवणारें टोक चिरडलें जाणार नाहीं. दुसऱ्या पिकांत मोकळया जागीं तीन अगर पाच बोटांच्या चिमटीनें धने टोंचतात. दुसऱ्या पिकात दुय्यम भाजी म्हणून कोथिंबीर लावण्याची पुष्कळ वहिवाट आहे. जेथें धने करण्याकरितां लागण करितात तेथें नुसती कोथिंबीरच करितात. मुंबईसारख्या शहरीं रोज एक वॅगनभर कोथिंबिरीचा सहज खप होतो. इतकी कोथिंबीर पुणें व नाशिकच्या शेजारीं बागाईत जमिनींत करितात. तेथे नुसती कोथिंबीरच पेरतात. कधीं एकाच वेळीं पुष्कळ लागण झाल्यानें बाजारात कोथिंबीर फारच स्वस्त होते व मळेवाल्यास कांहीं उत्पन्न होत नाहीं. परंतु उन्हाळयांत कोथिंबीर बहुशः महाग असते. अशा वेळीं तयार होणाऱ्या कोथिंबिरीस चांगला भाव येतो. बेलवाग्याप्रमाणेंच भाव मिळाल्यास कोथिंबिरीचे चागले पैसे होतात. न मिळाल्यास कधीं कधीं नुकसानहि होण्याचा संभव आहे.

चिमटीनें बीं लावतात. एकाच ठाणात पुष्कळ बीं पडतें व तें सर्व उगवलें तरी त्यांतलें अर्धें कुचंबतें अथवा मरून जाते. म्हणून चिमटीनें बीं न लाविता खुरप्यानें ४-६इंच रेघ ओढून तींत बीं टाकून खुरप्यानें पुन्हां त्यावर माती ओढल्यानें सर्व बियापासून उगवण्यास वाव मिळतो. थोडें परूस असून पाण्याची सोय असल्यास घरात निघणारी राख वगैरेचें खत घालून उद्योगी बायका घरकामापुरती कोथिंबीर नेहमीं घरींच पिकवितात. त्याकरितां दर १५।२० दिवसानीं आपणांस कोथिंबीर लागते त्या मानानें धने पेरल्यास कोथिंबिरीस तोटा पडत नाहीं. कोथिंबीर उगवण्यास १५ पर्यंत दिवस लागतात. ती उगवून वर आल्यावर झपाझप वाढते. नुसत्या कोथिंबिरीचें शेत, ओली कोथिंबीर विकल्यास तीन महिन्यातच खालीं होतें. धने करावयाचे असल्यास जमीन ५।६ महिने अडते. धन्यांच्या हळवे (गावरानी) व गरवे (बदामी) अशा दोन जाती आहेत. गावरानी धान्याचा दाणा लहान व काळसर असतो. बदामी धन्याचा दाणा गावरानीपेक्षा दुप्पट मोठा व पिंवळा असतो. बदामी धन्यास जास्त दिवस स्वाद रहातो; दुय्यम पिकाकरितां गांवरानी बीं वापरतात. धन्याकरितां कोरडवाहू शेतात हळवे व गरवे अशीं दोन्ही पिकें शेंकडों एकर करतात. धन्याचें उत्पन्नहि चांगलें होतें.

औ ष धी गु ण ध र्म.—धने गोड, थंड, पित्तकफनाशक, वातघ्न, अंगग्रहनाशक व अग्निदीपक आहेत. याचे औषधी उपयोगहि अनेक आहेत. विशेषतः शरीरातील उष्णता काढण्यास, ताप, खोकला, तहान, ओकारी वगैरे विकारांवर त्याचा उपयोग होतो. ओलें झाड (कोथिंबीर) मूत्रल असून कृमिनाशक आहे. आमाशावर धने व सुंठ यांच्या काढ्यांत एरंडमुळाचें चूर्ण द्यावें. अरुचीवर धने, वेलची व मिरीं यांचें चूर्ण तूपसाखरेंतून द्यावें. शरीरात दाह झाल्यास धने रात्रीं पाण्यात भिजत घालून सकाळीं तें पाणी गाळून त्यात खडीसाखर टाकून प्यावें. जेपाळाच्या विषावर धन्याचें चूर्ण, साखर व दहीं एकत्र करून द्यावे. मूत्रघातावर धने व गोखरूं याचा काढा तूप घालून द्यावा तृषा कमी होण्यास धने पाण्यांत भिजत घालून नंतर त्या पाण्यात मध व पिठीसाखर घालून ठेवावी व तें पाणी वारंवार देत जावें.

कोंदिवटी लेणीं—हीं लेणीं बी. बी सी. आय. रेल्वेच्या अंधेरी स्टेशनपासून दोन कोसावर (ठाणें जिल्ह्यांत) सह्याद्रीच्या एका ठेंगण्या रांगेंतील टेकडीमध्यें आहेत. याना महाकाळाचीं लेणीं असें दुसरें नांव असून तीं एकंदर १९ आहेत. हीं बौद्धानीं ख्रिस्ताच्या दुसऱ्या ते सहाव्या शतकाच्या दरम्यान कोरलेलीं असून तीं साधारणतः छोटीं, पडकीं व भुयारवजा अशीं आहेत. मरोळ अगर मूळगांव या पायथ्याच्या गावातून पहाडावर जाण्यास चांगली वाट आहे. मूळगावच्या तलावाच्या पूर्वेस एक ११-१२व्या शतकातील ब्राह्मणी (धर्माचें) देऊळ, एक बौद्धकालीन (स. १००-५००) पाण्याचें कुंड व पुष्कळशा बौद्धकालीन इष्टिका पडलेल्या आहेत. लेण्याच्या अलीकडे ५० कदमांवर उत्तरेस एका खडकाखालीं एक छोटेंसें कुंड आहे. लेण्याचें मुख समुद्राच्या बाजूस असल्यानें वसईच्या खाडीचा व त्या भागाचा सुंदर देखावा तेथून दिसतो. पहिल्या समूहात फक्त चारच व तींहि चौथ्या ते पाचव्या शतकातील लेणीं आहेत. पहिल्या लेण्यांत नेहमींप्रमाणें, पडवी, टाकें, दगडी ओटा, दिवाणखाना व निजण्याच्या खोल्या आणि ओटे वगैरे आहेत. दुसरें लेणें म्हणजे जेवण्याचें माजघर असावेंसे दिसतें. तिसरें लेणें कान्हेरी लेण्याप्रमाणें आहे. त्यात एक आंगण, टांकें, पडवी, अडोशाची भिंत, अष्टकोणी खांब दरवाजा, दगडी ओटे, दिवाणखाना, निजण्याच्या खोल्या, मागल्या बाजूस एक गाभारा व त्यात एका भिंतीवर कोरलेलें एक स्थंडिल वगैरे आहेतें. तिसऱ्या व चौथ्या लेण्याच्या दरम्यान एक दागोबा आहे. चौथें लेणें हें रहाण्यासाठीं बांधलेलें असून त्यांत दहा खांबी पडवी व दिवाणखाना आहे. हीं चारही लेणीं एकाच वेळचीं आहेत. या लेण्याच्या उत्तरेस १५० कदमावर बरींवर्शीं (२ फूट औरस चौरस) पाण्याचीं

टाकीं भुयारांत आलेलीं असून पश्चिमेस १० कदमांवर ३।४ जुनाट थडगीं आहेत. दक्षिणेस एक चार फूट उंचीचा खांब उभा आहे. जवळच एक स्तूप किंवा स्मशानभूमि असून त्याचा घुमुट दगडविटांनीं बांधलेला आहे. त्याचें तोंड उघडे केलेलें असून त्याच्या विटा भोंवतीं पडल्या आहेत याच्याचजवळ दुसरा एक पडका स्तूप असून पलीकडे एका कोरलेल्या रस्त्यांत दोन दगडी आसनें (गुरुशिष्यासाठीं) आहेत. या आसनांवरून पर्वताच्या उत्तर दक्षिणेकडील देखावा फार उत्तम दिसतो. दक्षिणेस पायथ्याशीं सर्पाळें तलाव, देवळाचा तलाव व कोंदिवटी गांव दिसतो. मोठ्या स्तूपाच्या पश्चिमेस असलेल्या ८।९ पायऱ्या चढून दक्षिणेकडे वळल्यास लेण्यांचा दुसरा समूह लागतो. प्रथम एक पडकें बौद्ध देवालय असून त्यापलीकडे हीं १५ लेणीं आहेत. हीं लहान व पडकीं असून पहाण्यासारखें विशेष असें त्यात काहीं नाहीं. त्याचा क्रम पश्चिमपूर्व असा आहे. पहिल्या लेण्याचें दार अर्धवट बुजलेलें असून पडवींत चार खांब आहेत. दुसरें लेणें मोठें असून आत एक नकशी कोरलेली पडवी, चार खांब,एक टाकें,एक खोली पंचकोनी खांब, एक गाभारा (बिनखांबी) त्यांत एक मूर्तीसाठीं कोरलेलें असून व मागील भिंतींत लांकडी खुंट्या बसविण्यासाठीं खोदलेली तीन इंची चौरस चौरस भोंकें आहेत. या भोंकात हल्लीं माप बसलेले असतात म्हणून तेथें जाताना काळजी घ्यावी असें मि. कझिन्स म्हणतो. हें लेणें बहुधां ५ व्या किंवा ६ व्या शतकांतील असावें. तिसरें लेणें पडकें असून तें रहाण्यासाठीं बांधलेलें आहे. चौथें लेणें हें देवळासारखें आहे. आंगणांतील उजव्या बाजूच्या एका भिंतीवर एक कोरलेला मोठा (साडेचार फूट लांब व पाऊणेदोन फूट रुंद फण्याचा) सात मुखांचा नाग आहे. याच्याच खालीं पर्वताच्या पायथ्याशीं सर्पाळें तलाव येतो. बहुधा या सर्पावरून हें नाव तलावास मिळालें असावें. नागाजवळ एक टाकें असून, पडवीच्या आंतील खांब अष्टकोणी आहेत. पडवीला २ खिडक्या व २ दरवाजे असून त्यातून पलीकडे मोठ्या गाभाऱ्यात जातां येतें. गाभाऱ्याच्या बाजूच्या पाख्यात तीन खोल्या आहेत. गाभाऱ्याच्या मागील भिंतींत दाघोब्याची जागा कोरलेली आहे; हें लेणें ३ ऱ्या किंवा ४ थ्या शतकातील असावें. पाचवें लेणें छोटेंसें व रहाण्याचें आहे. सहाव्यांत ३।४ खोल्या व दगडी ओटे आहेत. सातव्यांत एक दिवाणखाना, बाजूस खोल्या व मागें एक गाभारा आहे. आठवें लेणें पडून गेलें आहे. नववें लेणें हें सर्वांत जास्त जुनें व पहाण्यासारखें असून त्यांत पडवीच्या नंतर एक भव्य सभामंडप लागतो; येथें हल्लीं एक शिवलिंग असून त्याला महाकाल म्हणतात, त्यावरूनच या लेण्याना महाकालाचीं लेणीं म्हणतात. ब्राह्मणधर्माच्या भरभराटींत हें येथें स्थापन केले गेलें असावें; सभामंडपाच्या उजव्या बाजूच्या भिंतींत कोरलेल्या मूर्ती आहेत. मागील भिंत ही कोरून तिला गोल व निमुळत्या गोपुराप्रमाणें बनविली असून, तिच्यांत दोन जाळीच्या खिडक्या आहेत. ह्या भिंतींतच गाभारा कोरला असून त्याचा आकार अर्धचंद्रकार वीस फूट लांबीचा आहे. यावरील शिखर १५ फूट उंच असल्यानें गाभाऱ्याचा सर्वसाधारण आकार झोपडीसारखा दुपाखी दिसतो. त्याच्या मधोमध पांढऱ्या रंगाचा दाघोबा (२३ फूट घेराचा व ८ फूट उंचीचा) असून, खालून चार फूट उंचीवर एका सहा इंच रुंदीच्या पट्टिकेवर बौद्ध नमुन्याचें कोरीव काम आहे. आणि वर छत्रीसाठीं चार भोंकें आहेत. दाघोबाच्या भोंवतीं प्रदक्षिणेसाठीं मार्ग आहे. दाघोबाच्या माथ्यावर मधोमध हल्लीं एक थेट खालीं जमिनीपर्यंत गेलेला तडा पडला आहे. वरील जाळीदार खिडक्यांपैकीं पूर्वेकडील उजव्या खिडकीवर एक दोन ओळींचा पाली शिलालेख (तिसऱ्या शतकांतील) असून त्याची अक्षरवटिका गिरनार येथील रुद्रदामाच्या अक्षरवटिकेसारखी आहे. आणि त्यांत " पंचीकम (भगवान लाल इंद्राजीच्या मतें नागपुराकडील पंचमढी) च्या पितिम्ब नांवाच्या गौत्तमगोत्री ब्राह्मणानें हा विहार बांधविल्याचा " उल्लेख आहे.या झोपडीच्या आकाराच्या गाभाऱ्यासारखाच एक गाभारा बिहार प्रांतातील बर्बर डोंगरातील (गयेजवळ) अशोकाच्या एका लेण्यांत (खि. पू. २५०) आढळतो; तसेंच गयेजवळील लोमशऋषींचें व सुदाम्याचें अशा या बर्बर पहाडातील फक्त दोनच लेण्यांत असे गाभारे आहेत. बाकी मग साऱ्या हिंदुस्थानात असले गाभारे कोणत्याहि लेण्यांत नाहींत. वरील गाभाऱ्यांतील पूर्वेच्या भिंतीवरील नक्षीकाम सहाव्या शतकातील आहे. त्यांत मुख्य म्हणजे बुद्ध हा दोघां शिष्यांना उपदेश करीत असलेलें चित्र होय. पांच फण्यांच्या नागानें त्याचें कमलासन उचललें असून त्याच्या दोन्ही बाजूंस दोन नागकन्या व दोन सेवक असून वरती दोन विद्याधर आहेत. जवळच वरती सहा उपदेश करणाऱ्या बुद्धाच्या मूर्ती आहेत व शेजारीं एक अवलोकितेश्वर उभा असून, त्याच्या नजीकच आणीक एक बसलेला बुद्ध आहे. खालीं एक उपासक बसला आहे, तो बहुधा हें लेणें कोरविणारा उपर्युक्त पितिम्ब असावा. दहावें लेणें पडकें व भिक्षूंची राहण्याची खोली असून, त्यांतील उजव्या बाजूच्या भिंतीवर थोडें फार कोरीव काम आहे. अकराव्या लेण्यात पहाण्यासारखे काहीं नसून तें पडलेलें आहे; बारावेंहि तसेंच असून पडवींतील कठंजनवरील एका पट्टिकेवर थोडेसें कोरीव काम व डाव्या कोपऱ्यात एक मूर्ति आहे आणि आंत ३।४ खोल्या आहेत. तेराव्यांत एक आंगण व पडवी असून पडवींत एक टाकें,दगडी ओटे व चार खांब आहेत. त्यापुढें सभामंडप असून त्याला तीन दरवाजे व आंत तीन खोल्या आहेत. त्याच्या पाठीकडील भिंतींत गाभारा व अष्टकोणी खांब असून जवळच कोरीव शिलापट्टिका आणि एक सिंहासन व त्यावर एक मूर्ति आणि शेजारीं दोन खोल्या आहेत. चौदावें लेणें म्हणजे एक लहान खोली

आहे. पंधराव्याचा रस्ता दगडमाती पडून बुजून गेला असून, आंत दोन पडव्या व खांब आणि एक कोरीव कामाची पट्टी आढळते. जवळच भुयारांत एक व पहाडावरून खालीं उतरण्याच्या डाव्या हाताकडील रस्त्यापाशीं एक अशीं दोन टांकीं आहेत. याप्रमाणें या पर्वतांतील पहाण्यासारखीं सर्व लेणीं व ठिकाणें होत. पहाडाच्या पायथ्याशीं देवळाच्या तलावानजीक एक जुनाट पडकें चर्च आहे. त्याचे दगड ब्राह्मणी देवळाच्या (इसवी सन १२ व्या शतकांतील) बांधकामापैकीं आणिलेले आहेत. जवळच तत्कालीन एक मोडकें देऊळ व देवळाचे अवशेष असून, तलावास पडका घाट आहे. शेजारच्या विहरगाव व मारोळ येथेंहि ब्राह्मणीधर्मांच्या बांधकामाचे अवशेष आढळतात. पूर्वेस पावमैलावर दोन पाण्याचीं कुंडें आहेत. याप्रमाणें हीं कोंदिवटी येथील लेणीं आहेत [ठाणें ग्याझेटिअर].

कोद्रु—यास लॅटिनमध्यें पास्मारम स्क्रोबिक्युलेटम, संस्कृतमध्यें व मराठींत कोद्रु, हरीक वगैरे नांवें आहेत. या धान्याची सर्वांत जास्त लागवड मध्यप्रांतांत होते असें म्हणतात. परंतु त्या ठिकाणीं या पिकानें किती क्षेत्र व्यापलें आहे यासंबंधीं आकडे मिळत नाहींत. १९०४–५ मध्यें कुटकी व हें पीक यांनीं एकंदर २०३९३४५ एकर क्षेत्र व्यापलें होतें. मुंबई इलाखा व संयुक्त प्रांत यातहि याची लागवड होते. विशेषतः संयुक्त प्रांतात ज्वारी, बाजरी वगैरे प्रकारच्या धान्यांमध्यें याची पेरणी विशेष करतात. कारण याला कितीहि निकस जमीन चालते. पावसाळ्याच्या आरंभीं पेरणी होते. व आक्टोबरांत पिकाची कापणी होते. तण वगैरे काढून शेताची मशागत चांगली झाल्यास एकरी १० ते १२ मण धान्य निघते. सर्व धान्यात हें अगदीं हलक्या प्रतीचें धान्य समजलें जातें. गरीब लोकाशिवाय हें धान्य बहुधा कोणी खात नाहींत. यांत ४ जाती आहेत. रामेश्वरी, शिवेश्वरी, हरकिणी व माजरा. माजरा ही जात फार अपायकारक आहे. माजरा जातीस शुद्ध न करता तिचा खाण्यात उपयोग केल्यास वांति, जुलाब वगैरे विकार होतात, घेरी येते, मन भ्रमिष्ट होतें, ग्लानि येऊन कैफ चढतो व कधीं कधीं प्राणहानि सुद्धां होते हिंदुस्थानांत पुष्कळ लोक याचा खाण्याकरितां उपयोग करतात.परंतु अन्न या दृष्टीनें तें फारसें हितकारक नसून कांहीं ऋतूंत तर अपायकारक होतें. कापणीच्या वेळीं हवा सर्द व आकाश मेघांनीं व्याप्त असल्यास त्याचप्रमाणें सर्द दिवसांत व सर्द जमिनींत हें धान्य विषारी बनतें. विषारी व तादितर धान्याला गुजराथेंत मिठा व मिना अशीं नांवें आहेत.

माजरा कोद्रु शुद्ध करण्याची रीत.—हा कोद्रु एक दिवस शेणपाण्यांत भिजत घालतात. मग तो स्वच्छ धुवून एकदोन दिवस उन्हांत वाळत घालतात. असें केल्यानें त्याचा दोष जाऊन तो खाण्यास योग्य होतो. हरीकाचा भात, पेज, वगैरे करतात. हें धान्य फार शीतल आहे.[वॅट. पदे]

कोनारक—विहार—ओरिसा इलाख्यांतील पुरी जिल्ह्याच्या पोटविभाच्या मुख्य ठिकाणीं असलेलें देवालय. हें देवालय पुरी शहरापासून पूर्वेस २१ मैलांवर आहे. या देवालयापासून अडीच मैल लांबीवर समुद्र आहे. ओरिसाच्या गंग घराण्यातील पहिल्या नरसिंह देवानें हें सूर्यदेवतेचें देवालय बाधलें (ओरिसा पहा). कोनारक याची व्युत्पत्ति कोन येथील अर्क म्हणजे सूर्यदेवता अशी आहे. याचें प्राचीन नांव कोनाकोन असें होतें. या देवालयाचा कळस १८० फूट उंच असून समोर १४० फूट उंचीचा एक सभामंडप आहे. या देवालयाचें महाद्वार पूर्वाभिमुख असून द्वाराजवळ हत्तीवर बसलेल्या दोन सिंहांच्या मूर्ती आहेत. उत्तर व दक्षिण द्वारापाशीं दोन हत्तींच्या मूर्ती असून हत्तीने आपल्या सोंडेनें एका मनुष्याला वर उचलेलें आहे असा देखावा आहे. याशिवाय याच द्वारापाशीं उत्तम सजविलेल्या दोन घोड्यांच्या मूर्ती असून, त्या घोड्याजवळ पुष्कळ योद्धे उभे राहिले आहेत असा देखावा आहे. प्रत्येक दरवाजावर खोदकाम असून तें चागलें साधलेलें आहे. पूर्वदरवाजावरील हे खोदकाम अद्यापि जसेंच्या तसें पहावयास मिळतें. या दरवाज्याच्या वरच्या बाजूला एक शिळा असून तीवर नवग्रहांचें चित्र खोदलेलें आहे. या शिलेचीहि भाविकपणानें पूजा करण्यात येते. या शिलेमध्यें पाडलेल्या कोनाड्यात आसनमांडी घालून बसलेली एक सूर्यदेवतेची मूर्ति होती. या देवळाच्या जोत्यावर आठ चाकें व यात घोडे कारलेले आहेत. सर्व देवालयास रथाचा आकार दिला असून त्यांत सूर्यदेवता बसलेली आहे व तो रथ या सात घोड्याकडून ओढला जात आहे अशा तऱ्हेची ही देवालयाची रचना आहे. मंडपाच्या पूर्वेस एक चौकोनी इमारत असून, या इमारतीवर, नाचणाऱ्या देवदासींच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. त्यावरून ही इमारत नाचासाठीं बाधली असावी असें दिसतें. या देवळाच्या भोंवती एक पटांगण असून त्या पटांगणाच्या भिंतीची लांबी रुंदी ५००×३०० फूट आहे. या भिंतीमध्यें पूर्वी पुष्कळ लहान मूर्ती, व ओऱ्या होत्या असे अवशेषांवरून दिसते. आतापावेतों या पटागणांत जिकडे तिकडे वाळू साचलेली होती. पण १९०२ सालापासून सरकारनें ही जागा खणण्यास सुरुवात केली व त्यामुळें या देवालयाच्या पटांगणातील इतके दिवस बुजून राहिलेले भाग आतां उघडकीला आले आहेत. देवलयाचा कळस पडलेला असून तोहि शोधण्याचें काम चालू आहे. हें देवालय जरी अगदीं जीर्ण झालेलें असलें तरी, हिंदूमूर्तिकलेचा व वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना या देवालयाकडे बोट दाखवतां येण्यासारखें आहे.

कोनिग्जबर्ग—जर्मनींतील पूर्वप्रशियाची राजधानी व पहिल्या प्रतीचें तटबंदी शहर. लोकसंख्या (१९१०) २,४५,९९४, हें प्रेजेल नदीच्या दोन्ही बाजूस तिच्या मुखापासून साडेचार मैलावर उंच जागीं वसलेलें आहे. हें बर्लिनच्या ईशान्येस ३९७ मैलांवर असून प्रेजेल नदीने दोन्ही प्रवाह शहरामधून वहात जातात. नदीच्या पूर्वेस एक, पश्चिमेस एक व दोन्ही प्रवाहाच्या मध्यें एक असे शहराचे मुख्य तीन भाग असून सर्व शहराचा घेर साडेनऊ मैल आहे. ह्या नदीची शहरांतील अधिकांत अधिक रुंदी ८०–९० यार्ड असून दळणवळणाकरिता तिच्यावर पुष्कळ पूल बांधलेले आहेत. नोव्हेंबर ते मार्च महिन्यापावेतों ही बहुधा गोठलेली असते. गॉथिक इमारतीजवळ कॅटचें थडगें आहे. येथें शहरांत बारा एकर असलेलें एक तळें आहे. कवाइतीच्या मैदानाच्या वायव्येस विश्वविद्यालयाच्या इमारती आहेत. त्यांचें व प्रेजेलच्या दक्षिणेस असलेल्या हुंडीबाजाराच्या इमारतीचें काम नमुनेदार आहे. येथील विश्वविद्यालय गणिताच्या व तत्वज्ञानाच्या अभ्यासाकरितां प्रसिद्ध असून त्याला जोडूनच एक नावाजलेली वेधशाळा, २,४०,००० पुस्तकें असलेलें एक ग्रंथसंग्रहालय, प्राणिसंग्रहालय, वनस्पतिबाग, प्रयोगशाळा आणि गणितशास्त्राच्या अध्ययनास उपयुक्त अशा वस्तूंचा संग्रह आहे. येथच्या अध्यापकात कँट, बेसेल, न्यूमन व जे. एफ. हर्बर्टसारखे प्रसिद्ध लोक होऊन गेले. कँटचा जन्म येथें १७२४ त झाला. व १८६४ त त्याचें स्मारक बांधलें गेलें. येथें असलेल्या इतर शिक्षणसंस्थांत व्यायामशाळा, तीन व्यापारीशाळा, चित्रशाळा व संगीतशाळा याचा समावेश होतो. येथें शिलायुगापासून व्हायकिंगच्या काळापावेतोंच्या सांपडलेल्या प्रशियन पुरातन वस्तूंचा संग्रह असलेला एक अजबखाना आहे.

कोनिग्जबर्ग हें लष्करी व आरमारी तटबंदीचें पहिल्या प्रतीचें शहर आहे. १८४३ मध्यें ह्या शहराची तटबंदी करण्यास सुरुवात करून ती १९०५ मध्यें संपविली गेली. पूर्वीच्या काळीं देखील ह्या शहराभोंवतीं भिंत होती; परंतु आतां आंतल्या बाजूस कोट असून त्यात संरक्षणाकरितां तयार केलेल्या बाहेरच्या बांधकामाशीं संबंध ठेविता येईल अशा सोई केलेल्या आहेत. नदीच्या उजव्या किनाऱ्यावर सहा व डाव्या किनाऱ्यावर सहा असे बारा वेगवेगळे किल्ले बांधले असून शिवाय नगरकोटाच्या आत बेटांत एक व शहरच्या पूर्वेस एक असे मोठे किल्ले आहेत. बंदरास संरक्षणाचीं साधनें असल्यामुळें येथील व्यापार फारच वाढला आहे. २९ मैलांवर असलेल्या पिलाउ नांवाच्या बंदरापासून शहरापावेतों नुकताच एक कालवा खणून काढल्यामुळें ज्या जहाजाचा भाग पाण्याखालीं ३० फूट रहातो अशीं जहाजें सुद्धा धक्क्यापावेतों येऊं शकतात. ह्यामुळें शहराच्या व्यापारास आणखी उत्तेजन मिळालें आहे. येथें मोठमोठीं मुद्रणालयें, यंत्राचे कारखाने, आगगाडीचे डबे व इंजिनें तयार करण्याचे कारखाने आणि रासायनिक द्रव्यें व खेळणीं, साखर, मद्य, तंबाखू, पियानो, सिगार, अंबरचें सामान वगैरेंचे कारखाने आहेत. येथून धान्य, पीठ, गुरें, घोडे, जवस, साखर, इमारती लाकूड व पेंड ह्या जिनसा बाहेरगांवीं जातात.

येथला किल्ला प्रथम १२५५ त बोहीमियाच्या राजानें बांधल्यावर नदीच्या पश्चिमेस असलेलें पूर्वीचें जुनें शहर त्याभोंवतीं वाढलें. ह्याला १२८६ त नागरिक हक्क मिळाले. कोनिग्जबर्ग हें १३४० त हॅन्सिॲटिक संघास मिळालें. उत्तरेकडच्या मोठ्या युद्धामुळें ह्याच्या व्यापारास बराच अडथळा आला; परंतु १७ व्या शतकाच्या अखेरपासून ह्याची पुन्हा भरभराट होऊं लागली. १७२४ त शहराचे तीनहि स्वतंत्र भाग एक झाले. हें इ. स. १८०७ मध्ये फ्रेंचानीं घेतलें; परंतु १८१३ त येथें कट होऊन नेपोलियनच्या विरुद्ध प्रशियानें बंड केलें व त्यात लोकास यशहि आलें. १९ व्या शतकात पूर्वप्रशियात व रशियात आगगाडी झाल्यानें रशियातील धान्य, जवस, बियाणा, आणि सण ह्या बंदरातून परदेशात जाऊं लागले; व त्यामुळें येथला व्यापार वाढला. येथून आता मेमेल, स्टेटिन, कील, अमस्टर्डाम व हल येथें आगबोटी नेहमीं जात येत असतात.

कानोली कालवा—हा कालवा मद्रास इलाख्याच्या मलबार जिल्ह्यातील कालिकत तालुक्यात आहे. हा कोनोली नांवाच्या कलेक्टरानें इ स. १८४८ त बांधला. याची लांबी ३ मैल असून हा इलत्तूर अथवा कोरपुल व कल्लायी या दोन नद्या जोडतो. हा बदगर व बेयापूर दळणवळणाच्या जलमार्गाचा एक फाटा आहे.

कोन्नूर—मुंबई इलाखा. बेळगाव जिल्हा. शिलालेखात ‘कोंडनुरु’ असा उल्लेख या गावासंबंधानें केलेला आढळतो. गोकाकच्या वायव्येस सुमारें पाच मैलांवर घटप्रभा नदीकांठीं हें गांव आहे. गोकाकच्या धबधब्याजवळ या गांवाच्या शिवेत सुमारें अकराव्या शतकातील कित्येक पडकीं देवळें आहेत. गावाच्या दक्षिणेस टेकडीच्या पायथ्याशीं पुष्कळ किस्त्वएन आहेत. हीं थडगीं आहेत याविषयीं हल्लीं वाद नाहीं. हीं फार प्राचीन काळांतील आहेत. हीं उन्हापासून बचाव व्हावा म्हणून पांडवांनीं बांधलीं असा स्थानिक समज आहे. (बेळगांव गॅ.)

कि स्त्व ए न—कोन्नूर गांवाच्या दक्षिणेस डोंगरपायथ्याशीं हीं दिसतात दक्षिण हिंदुस्थान व दक्षिण हैद्राबादजवळ ज्या प्रकारचीं किस्त्वएन आहेत तशींच येथें पहावयास सांपडतात. यांपैकीं पुष्कळ थडगीं असून मैदानावर तीं इतस्ततः पसरलीं आहेत. याकरितां लागलेल्या शिला जवळच्या डोंगरातून आणलेल्या आहेत. त्या शिलांनां कोणत्याहि हत्यारानें घडवून योग्य आकार देण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाहीं; तथापि त्या अगदींच गैरमापी दिसत नाहींत. प्रत्येक खोली अथवा किस्त्वएन हें बहुशः सहा

शिलांचें केलेलें आढळतें.चार सहा फूट लांब आणि चार सहा फूट उंच अशा मापाच्या दोन शिला दक्षिण उत्तर दिशेस समांतर असून चार पाच फुटांच्या अंतरानें ठेविल्या आहेत. उत्तरेकडच्या शेवटास त्या दोन शिलांच्या मध्यें तितक्याच उंचीची एक उभी शिला असते. ही शिला उपर्युक्त शिलांची पूर्व पश्चिम टोंकें झांकीत नाहीं हू लक्षात ठेवण्यासारखे आहे. खोलीच्या दक्षिण दिशेस वरच्यासारखी एकच आडवी व मोठी शिला नसते. मध्यें साधारण दोन फूट जागा राहील अशा बेतानें दोन लहान शिला उभ्या केलेल्या आढळतात. या उभ्या पाच शिलावर सुमार आठ इंच जाडीची एक मोठी शिला टाकलेली असते. याप्रमाणे ही खोली तयार केलेली असते. बहुतेक खोल्याकरतां आत जाण्यास एक रस्ता केलेला असतो. सुमारें तीन ते पाच फूट लांब व सुमार दोन फूट उंच अशा दोन शिला एक ते दीड फुटांच्या अंतराने मुख्य खोलीच्या दक्षिणेकडील उघड्या तोंडाशीं काटकोन करून ठेविल्या असतात व या दोन शिलावर एक शिला ठेवलेली असते. अशीं किस्त्वएन्स येथें सुमारें ५० आहेत. बरींच पडकीं आहेत. काहीं किस्त्वएन्सच्या शिला कोणी तरी घेऊन गेले असावे. काहीं अद्यापि सुस्थितींत आहेत. कांहींच्या सभोवतीं कांहीं अंतरावर दगडी बांध घातलेला अद्यापि दिसतो. आंत काय असावें हें पाहण्याचा पूर्वी कोणी प्रयत्न केला नाहीं अशी एक खोली उकरली असता आत कठीण तांबडी माती सांपडली. वरच्या शिलेपासून सुमार अठरा इंच माती खणल्यावर माणसाचा एक मोठा दात व हाडाचे कांहीं तुकडे सापडले. तीन फूट आठ इंच व तीन फूट दहा इंच खोलीवर मडक्याचा चुरा सापडला. ज्या स्थितींत दात सापडला त्यावरून प्रेत बसलेल्या स्थितींत दक्षिणाभिमुख पुरलें असावें असें अनुमान काढतां येतें. [बा. ग्या.]

कोन्हेराम कोल्हटकर—रत्नागिरीजवळील नेवरें गावीं रामजी नारायण कोल्हटकर हे रहात असत. पेशवाईंत त्यांनीं वाईजवळ पाडवगड येथें वतन संपादिलें. पाडवगडाहून नेवऱ्यास जाण्याची वाट कोयना काठानें दक्षिणेस भैरवगडावरून चिपळुणाकडे जाते. भैरवगडाखालीं बापूजी, साबाजी व परसोजी हे भोंसलेबंधु रहात असत. त्यांचा व रामाजीपंतांचा परिचय झाला होता. एकदा हबशानें भैरवगडावर स्वारी करून भोंसल्यांना कुटुंबासुद्धा पकडून जंजिऱ्यावर कैदेंत ठेवलें. त्यावेळीं ३ हजार रु. दंड भरून पंतांनीं यांची सुटका केली. त्यामुळें भोंसल्यांनीं आपलें उपाध्येपण पंतास वंशपरंपरा करून दिलें. पंतांचा प्रवेश शाहूछत्रपतींकडेहि होता; त्यांच्यामार्फत भोंसलेबंधु छत्रपतींकडे आले. छत्रपतींचे वांकनीस ठोसर यांची मुलगी शाहुमहाराजांनीं वाढविलेली होती. त्यांनीं तिचें लग्न पंतांचा मुलगा कोन्हेर याच्याशीं लाविलें. या कारणानें कोन्हेरवर महाराजांचा लोभ विशेष जडला. त्याला भास्करराव म्हणून एक भाऊ होता. रघूजी भोंसल्यास महाराजांनीं सेनासाहेबसुभापद दिल्यावर त्याची मुजुमदारी कोन्हेरपंतास दिली. कोन्हेरपंतानें कान्होजी भोंसल्यास वऱ्हाडांतून पकडून साताऱ्यास आणलें होतें. छत्रपतींनीं भास्करपंतास रघूजीची बक्षीगिरी दिली. या दोघां बंधूंच्या मदतीनें रघूजीनें पुढें बंगालपावेतों प्रदेश काबीज करून अनेक पराक्रम गाजविले. भोंसल्याचें राज्य असेपर्यंत नागपुरास कोल्हटकरांचा लौकिक होता. कोल्हटकर व पेशवे यांचें मात्र चांगलें नसे.ते उभयता सर्वस्वीं पेशव्यांच्या विरुद्ध राहून रघूजीस मदत करीत. मराठेशाहींत दुही माजविणाऱ्या ज्या कांहीं व्यक्ती झाल्या त्यांत रघूजी भोंसले हे एक प्रमुख होते. इ. स. १७४९ त कर्नाटकच्या सुभेदारीच्या भानगडींत भोंसले हे बाबूजी नाईकाच्या बाजूचे होते व कोन्हेरपंत हा साताऱ्यास राहून त्या बाबतींत खटपट करीत होता. कोन्हेरपंत यानें भोंसल्याच्या घरच्या भाऊबंदकींतहि भाग घेतला होता. भास्करपंत हा बंगाल्यावर स्वाऱ्या करी. तिकडे त्याला अलीवर्दीखानानें दगा देऊन मारलें असतां (भास्कर राम कोल्हटकर पहा) कोन्हेरपंतांस दुःख होऊन त्यानें देशीं जाण्याचा हट्ट घेतला. तेव्हां भोंसल्यांनीं त्याना दरसाल २५ हजाराची जहागीर देऊन खेरीज लग्नकार्य व स्वारीशिकारीस सरकारी मदत देण्याचें शपथपूर्वक कबूल केलें. याशिवाय कर्नाटकातील भोंसल्याच्या सुभ्याबद्दल कोन्हेरपंतांस १० लक्षाचें उत्पन्न अर्काटच्या नबाबानें इ. स. १७४८ त करार करून दिलें होतेंच. तरीहि पंतांची उदासीनता दूर झाली नाहीं. तेव्हां रघूजीनें कष्टानें त्यांना निरोप दिला. पंतांना सहा पुत्र होते. त्यांपैकीं चौघांना रघूजीनें सरंजाम करून दिला व बापूराव कोन्हेर याला मुख्य करून जवळ ठेवलें (१७५२). रघूजीची मर्जी पंतांवर फार होती. त्यानें त्याना एका स्वदस्तूरच्या पत्रांत लिहिलें आहे कीं "आमचाहि वृद्धापकाळ व तुमचाहि वृद्धापकाळ, अशा प्रसंगीं तुम्ही व आम्ही विभक्त असावें हें ईश्वरास मानत नाहीं...हें पत्र लक्ष पत्रांचे जागा मानून तुम्ही चि. बाबूरायास घेऊन यावें. ...तुम्ही यावयास अनमान कराल तर तुम्हाला आमच्या गळ्याची आण असे." सारांश, भोंसले व कोल्हटकर या कुटुंबाचा घरोबा एकजीवी होता.हिंदुस्थानच्या ईशान्येकडील मराठेशाहीची प्रचंड दौलत उभारण्यांत या दोन कुटुंबांचे श्रमच कारणीभूत झाले होते. पुढें या दोघांची भेट झाली कीं नाहीं हें आढळत नाहीं. भोंसल्यामुळे कोल्हटकरांचे व पेशव्यांचें सूत चागलें नव्हतें. रघूजी व कोन्हेरपंत मेल्यावर नानासाहेब पेशव्यांनीं भोंसल्याच्या भाऊबंदकींत हात घालून ती मिटविली व त्याच वेळीं कोल्हटकरांच्या घराण्यास दूर करून देवाजीपंत चोरघड्यास भोंसल्याचा कारभारी नेमलें. कोल्हटकरांच्या घराण्यातील पुरुष होतकरू व पराक्रमी होते. त्यांची भोंसल्यांच्या दौलतीविषयीं निष्ठा असून तिच्यासाठीं ते सर्वस्वावर पाणी सोडण्यास तयार असत. पण पुढें देवाजीपंतानें सर्व कारभार हळूहळू ताब्यांत घेतला व कोल्हटकर

कुटुंब जे मागें पडलें तें कायमचेंच. कोन्हेरपंतास सहा पुत्र बाबूराव, यशवंत, रामचंद्र, बळवंत, गोविंद आणि लक्ष्मण ग्ग नावाचे होते. पैकीं बाबूरावाकडे मुख्य वडिलकीचा सरंजाम पुढें चालला [ना. भो. का. २; इ. सं. ऐ. गो. पु. २. राज. खं. ३; इति. मंड. अह. १८३५; मरा. रिया.]

कोन्हेरराव फांकडे.—पहिले फाकडे कोन्हेरराव त्रिंबक एकबोटे. हे बाळाजी बाजीराव पेशवे याच्या कारकीर्दीमध्यें एक प्रसिद्ध शिलेदार होते. हे पुरंदरचे रहिवासी होते. ह्यानीं अनेक युद्धामध्यें शत्रूच्या फौजेवर चढाई करून फार मर्दुमकीचीं कामे केली; त्यामुळें त्याचें शौर्य श्रीमंतांच्या नजरेस येऊन त्यास शिलेदारीचें स्वतंत्र पथक मिळालें. इ. स. १७५१–५२ मध्यें मोंगलाचें व मराठ्याचें जे तुमुल युद्ध झालें त्यामध्यें कोन्हेर त्रिंबक ह्यानीं आपल्या शौर्याचे असे कांहीं चमत्कार दाखविले कीं, त्या योगानें त्याची रणागणावरील कीर्ति अजरामर झाली असें म्हटलें तरी चालेल. ह्या वेळीं मराठ्याचा प्रतिपक्षी सलाबतजंग हा असून, त्याच्या बाजूस सुप्रसिद्ध फ्रेंच सरदार बुसी हा आपल्या कवाइती सैन्यासह मिळाला होता. ह्यावेळीं मोंगलांचा विचार पुण्यावर चढाई करून मराठ्यांची मुख्य राजधानीच हस्तगत करावी असा होता. त्याप्रमाणें ते ढमढेऱ्याचें तळेगाव व राजणगाव येथपर्यंत चढाई करून आले. तारीख २१ नोव्हेंबर रोजीं बुसीनें ग्रहणाच्या दिवशीं हिंदू लोक धर्मकृत्यांत गुंतलेले असताना. त्याच्यावर छापा घालून त्यांनां सैरावैरा पळावयास लाविलें व त्यांच्या लष्करातून त्यानें बरीचशी लूट नेली. त्यामध्यें पेशव्याचे देव व पूजेचीं उपकरणींहि गेलीं असें म्हणतात. हिला कुकडीची लढाई म्हणतात. त्यामुळें बुसीस मोठा विजयानंद वाटून तो आधिकच जोरानें पुढें चाल करून आला. ह्या बिकट प्रसंगीं मराठ्यांचे सरदार बिलकुल न डगमगता ते मोठ्या आवेशानें शत्रूशीं युद्ध करण्यास सिद्ध झाले. ह्यावेळीं मराठी सैन्याचे मुख्य सेनापति महादजीपंत पुरंदरे हे असून त्यांच्या हाताखालीं दत्ताजी शिंदे व महादजी शिंदे हे दोन नवीन जोमाचे तरुण सरदार आणि कोन्हेरराव त्रिंबक एकबोटे हे होतकरू शिलेदार हजर होते. मराठ्यांचें व मोंगलांचें ह्या समयीं मोठें हातघाईचें युद्ध झालें (२७ नोव्हेंबर). ह्या युद्धामध्यें कोन्हेरराव त्रिंबक एकबोटे ह्यानीं आपल्या शौर्याची अगदीं सीमा करून दाखविली. त्यांनीं प्रतिपक्षाकडील फ्रेंचांच्या तोफांचा एकसारखा भडिमार होत असतांना शत्रूंवर निकराचे हल्ले करून त्यानां नेस्तनाबूत करून सोडिलें. "महादजीपंत, दत्ताजी व महादजी शिंदे बारगीर व कोन्हेर त्रिंबक एकबोटे वगैरे अकरा असामींनीं (मोंगलाची) ढोलाची अंबारी खाली केली... अंबारी लुटली. मोंगल शिकस्त जाहला... सारा लुटला" त्यानंतर ९ डिसेंबरीं मांडवगण येथें कजारवींची लढाई झाली. ह्यावेळीं कोन्हेर त्रिंबक ह्यानीं दाखविलेल्या युद्धकलाकौशल्याची फार तारीफ होऊन त्यांस 'फांकडे' अशी शौर्यदर्शक पदवी पेशव्यांनीं दिली. तेव्हांपासून त्यांची कोन्हेर त्रिंबक फांकडे ह्या नांवानें प्रसिद्धि झाली व त्यांस पेशवे सरकारांतून मोठा बहुमान (पालखीचीं वस्त्रें व नेमणूक) व इनाम मिळालें. आणि त्यांच्या बहादुरीबद्दल त्यांच्या घोड्याच्या पायांत चांदीचा वाळा घालण्याचा मान मिळाला (१७५४). हा बहुमान फारच थोड्या सरदारास पूर्वी मिळत असे. या मानाचा अर्थ असा कीं, हा घोडेस्वार एक तर समरागणात जय मिळवील किंवा आपला देह धारातीर्थीं अर्पण करील, पण शत्रूस पाठ दाखवून रणातून जिवंत परत येणार नाहीं. कोन्हेर त्रिंबक फाकडे हे होळीहुनूरच्या लढाईमध्यें हजर होते. तेथें त्यानीं शत्रूंवर जवानमर्दीनें चालून जाऊन आपलें रणशौर्य चागलें व्यक्त केलें. होळीहुनूरच्या लढाईमध्यें ते मोठ्या पराकाष्ठेनें बचावले. पुढें ते श्रीमंत सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे ह्यांच्याबरोबर इ. स १७५६ मे मध्यें सावनूरच्या स्वारीवर गेले. तेथें भाऊसाहेब व फांकडे हे बुसीच्या बातेऱ्याच्या माऱ्यात उभे असता त्याच्या डोक्यावर बुसीच्या तोफखान्यातील तोफेचा एक गोळा पडून त्याचा रणभूमीवरच अंत झाला. श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे ह्यांस त्यांच्या मरणानें फार दुःख झालें. परंतु त्यानीं त्याच्या वंशजास चागलें इनाम देऊन ह्या शूर पुरुषाची निस्सीम स्वामिभक्ति आणि पराक्रमपटुत्व या गुणाचें योग्य चीज केलें. पेशवाईमध्यें कोन्हेरराव फाकडे ह्याची कीर्ति फार असून त्यांच्या शौर्यकथा तरुण वीरानां फार प्रोत्साहन देत असत. हें घराणें पेशव्याच्या अत्यंत घरोब्यातील व ढेऱ्यांप्रमाणें विश्वासांतील होतें [इति. सं. पु. ४ अं. १०–१२; इफ. पु २; वि. ज्ञा. वि. पु.५३. अं. १;राज. खं. ६.ले.२३२; का. इ. सं. श. १३; मरा. रिया. म. वि.].

कोपनहेगन—कोपनहेगन हें शहर डेन्मार्कच्या राज्याची राजधानी असून झीलंड बेटाच्या पूर्वे किनाऱ्यावर साउंड सामुद्रधुनीच्या दक्षिणकिनाऱ्यावर आहे. याची लोकसंख्या ६,७०,००० आहे. हें हॉलंड बेटाच्या पूर्वकिनाऱ्यावर समुद्र व लहान लहान बेटें यांच्यामध्यें आहे. दोन बेटामधील नैसर्गिक खाडीमुळें एक छान बंदर बनलें आहे, व या दोन बेटांमध्यें दळणवळण लँगेब्रो व निपेल्सब्रो या दोन पुलांच्या योगानें चालतें.

आतील शहरानें व्यापिलेल्या प्रदेशास गॅमेलशोन म्हणतात पाचव्या ख्रिश्चियनच्या पुतळ्याला हेस्टन (घोडा) म्हणतात. याभोंवतीं पाहण्यालायक इमारती आहेत. पूर्वेस शार्लोटेन्बर्ग हा राजवाडा आहे. दक्षिणेस रॉयल नांवाचें नाटकगृह आहे. लडाव्हिग होल्बर्ग व ॲडाम ओहलेन्श्लागर या कवींचे पुतळे प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस आहेत व समोरच्या बाजूस ॲपोलो, पेगॅसस व हिपोक्रिनीचा झरा हे आहेत. इतर शिल्पकामें म्हटलीं म्हणजे ओफेलियाची उठावदार आकृति होय. कॉन्गेन्स नॅम्हिटरमधील इतर

इमारती परराष्ट्रीय कारभाराची कचेरी, कित्येक व्यापारी गृहें व्यापारी पेढी व थॉर्ट्स राजवाडा ह्या होत. नायहेव्हनच्या धक्कयावर जुनीं घरें आहेत.

कोन्जेन्स नायटोर्व्हपासून होल्मेन्स कॅनाल नांवाचा रस्ता नॅशनल बँकेवरून होल्मेन्स कर्क अथवा बादशाही आरमाराच्या चर्चला जातो. ख्रिश्चियन्स्बोर्गचा राजवाडा १७९४ व १८८४ या वर्षी दोन वेळा जळला. यांतील कलाकौशल्याचें काम बचावण्यांत आलें. शक्ति, ज्ञान, आरोग्य व न्याय या देवतांचे पुतळे आगींतून बचावले गेले. ५,४०,००० पुस्तकें व २०,००० हस्तलिखित लेख असलेलें पुस्तकसंग्रहालय आगींतून बचावलें गेलें. धक्कयावर सराफकट्टा (बोर्सेन) ही एक सुंदर इमारत आहे.

थॉर्व्हाल्डसन संग्रहालयाच्या दुमजली इमारतींत ईजिप्शियन व एट्रुस्कन शिल्पपद्धतींचें मिश्रण सांपडतें. या संग्रहालयांत थॉर्व्हाल्डसनचीं सुमारें ३०० पुस्तकें आहेत व एका खोलींत १८४४ मध्यें त्याच्या मृत्यूसमयीं जसें सांपडलें होतें तसेंच व्यवस्थित माडलेलें असें त्याचें सामान त्याच्या बसावयाच्या खोलींत आहे.

स्लॉटशोमच्या पश्चिमेस मुख्य जमिनीवर प्रिन्सेस पॅलेस आहे. यांत पूर्वी पांचवा ख्रिश्चियन व सहावा फ्रेडरिक रहात असत. यांमध्यें राष्ट्रीय पदार्थसंग्रहालय आहे. व्हॉर फ्रू कर्क हें कोपनहेगन येथी ' कॅथेड्रल चर्च आहे. यामध्यें जॉन बॅप्टिस्ट, मोसेस ख्रिस्त व बारा साधु याचे पुतळे आहेत

व्हॉर फ्रू कर्कच्या उत्तरेस पहिल्या ख्रिश्चियननें स्थापिलेलें विश्वविद्यालय आहे. येथें सरासरी २००० विद्यार्थी आहेत. या विश्वविद्यालयाला जोडून वेधशाळा, नायव्हेस्टर गेडमधील रसायनशास्त्रप्रयोगशाळा, तसेंच ब्रेडगेड मधील शास्त्रप्रयोगशाळा व वनस्पतिबाग हीं आहेत. विश्वविद्यालयाचें पुस्तकालय व क्लसनचें पुस्तकालय या दोहोंमध्यें २,००,००० ग्रंथ व ४०००हस्तलिखितें आहेत. आणि प्राणिसंवर्धक उद्यान आहे. जवळच सेंट पिटरचें चर्च व क्रिस्टल गेडवर टिनिटी चर्च हा आहे. याचा १११ फूट उंचीचा गोल मनोरा यूरोपांत अद्वितीय आहे.या चर्चपासून निघालेला जोबर मेयरगेड हा रस्ता दक्षिणेकडे जातो. यावर दुकानाची फार दाटी झाली आहे. यावर बिशप ॲबलल्लोनचा पुतळा आहे. या ॲबलालोननेंच हें शहर वसविलें.

कॉन्जेन्स नायटोर्व्हचा ईशान्येकडील भाग हा श्रीमंत लोकांनीं व्यापला आहे. ॲमालियनबोर्गेचे राजवाडे, किल्ला, रोझेनबोर्गेचे बगीचे व इतर सरदारांचे वाडे हे या भागात आहेत. मोल्टके पॅलेसमध्यें १८ व्या शतकातील डच चित्रांचा संग्रह आहे. याच्या जवळच ग्रीसचा राजा जॉर्ज याचा राजवाडा आहे. या राजवाड्याच्या मागें ॲमालियन बोर्ग ग्लेड्स आहे. याच्या मध्यभागीं पांचव्या फ्रेडरिकचा पुतळा आहे.

अंतर्दुर्गाच्या पश्चिमेस ओस्टननेगार्डे अथवा पूर्वेकडील रेल्वेचें स्टेशन आहे. याच्या नैर्ऋत्येस बगीचे पसरलेले आहेत. ऑस्ट्रे ॲन्लागेगमध्यें कोरीव चित्रें व खोदीव कामाचें शिल्पकलासंग्रहालय आहे. याच्या समोर नववा ख्रिश्चियन व राणी लुईसा यांच्या लग्नाच्या स्मरणार्थ बांधलेलें डेन्मार्क नांवाचें स्मारक आहे. यात इंग्लंडचा राजा सातवा एडवर्ड व राणी अलेक्झांड्रा यांच्या विवाहप्रसंगाचीं उठावदार चित्रें आहेत. वनस्पतिसंवर्धक उद्यानांत टायकोब्रॅहीचा पुतळा व यांतच वेधशाळा, रसायनशास्त्रप्रयोगशाळा तसेंच खनिजपदार्थसंग्रहालय, विविध धंदेशिक्षण देण्याच्या शाळा व दवाखाना या इमारती आहेत. ऑस्टेव्होल्डगेडच्या आंतल्या बाजूस रोझेनबोर्ग पार्क व राजवाडा हीं आहेत. डॅन्स्कफोक पदार्थसंग्रहालयामध्यें १६६० पासून शेतकऱ्यांच्या खासगी चारित्र्याचें वर्णन करणाऱ्या वस्तूंचा संग्रह आहे. स्वातंत्र्यस्तंभ १७९८ मध्यें बांधलेला आहे. उत्तरेस मुख्य रेल्वे स्टेशन (बॅनेगार्डे) आहे. पश्चिमेकडील भागांत फ्रेडरिक बर्गचें उद्यान आहे. यांत एक राजवाडा असून याचा लष्करी शाळेसारखा उपयोग करतात.या उद्यानांत एक प्राणिसंग्रह आहे. बंदराच्या लगतच्या भागास ख्रिश्चनशाव्हन म्हणतात. यांत व्हॉर फ्रेलसर्स कर्क आहे. ॲमागरचें बेट सुपीक असून यात भाजीपाला होतो. येथें डच लोकांची वसाहत आहे.

कोपनहेगनच्या आसपासचा उत्तरेकडचा व पश्चिमेकडचा भाग मनोवेधक आहे क्लॅम्पनबोर्ग व स्कोड्स्बोर्ग हीं समुद्रकांठचीं हवा खाण्याचीं ठिकाणें आहेत. येथेंच डायरेहॅव्हबर्ग (मृगालय) व स्कोहन (अरण्यें) आहेत. राजवाड्यात राष्ट्रीय ऐतिहासिक संग्रहालय आहे. व्हिडोरचा व्हिला अलेक्झांड्रा राणीला १९०७ मध्यें मिळाला.

कोपनहेगन येथील साहित्य व शास्त्रीय मंडळामध्यें इ. स. १७४२ मध्यें स्थापलेली डॅनिश रॉयल सोसायटी, इ. स. १८२५ स्थापलेली रॉयल अन्टिक्केरियन सोसायटी, डॅनिश वाङ्मयवर्धक सोयासटी, रॉयल आग्रिकल्चरल सोसायटी, डॅनिश चर्च-हिस्टरी सोसायटी, इ. स.१८३८त स्थापिलेली इंडस्ट्रियल असोसियेशन, इ. स. १८७६ मध्यें स्थापिलेलीं रॉयल जिऑग्रफिकल सोसायटी व इतर संगीत विषयक संस्था या फार नांवाजलेल्या आहेत. इ. स. १७५६ मध्यें पांचव्या फ्रेडरिकनें व्यापारी लोकांत कलाभिरुचीचा प्रसार करण्याकरतां ॲकॅडेमि ऑफ आर्ट्स (कलाभुवन) स्थापित केली. इ. स १८२६ मध्यें आर्ट युनियन व इ. स. १८७० मध्यें संगीत सार्वजनिक शाळा स्थापल्या. विश्वविद्यालयाशिवाय, पशुवैद्यकी व शेतकी विद्यालयें, लष्करी शाळा व आरमारी शाळा या दुसऱ्या शिक्षणसंस्था आहेत. धंदेशिक्षण हें हुन्नरकला शाळा व विशिष्ट कलाविषयक संस्था या नांवाच्या सोसायटीच्या शाळेंत दिलें जातें. या सर्व शाळा खासगी आहेत. प्राथमिक शिक्षण निरनिराळ्या पंथांचे लोक आपापल्या पंथाच्या शाळेंतून देतात.

पूर्वीच वर्णन केलेला प्रार्थनामंदिरें लुथेरियन चर्चेचीं आहेत. इतर कांहीं महत्वाचीं रिफार्मड् चर्चेचीं आहेत. सेंट अँन्सॉरियसचें कॅथॉलिक चर्च इ. स. १८४२ मध्यें बांधलें. क्रिस्टलगेडमधील यहुदी लोकांचें प्रार्थनामंदिर इ. स. १८५३ मध्यें बाधलेलें आहे. सध्याच्या रस्त्याच्या नावावरून पूर्वी कोपनहेगनमध्यें मठ वगैरे इमारती होत्या हें स्पष्ट होतें.

कोपनहेगन हें डेन्मार्कमधील सर्वांत मोठें व्यापाराचें शहर आहे. आउटर साउंड व कॅलेबोस्ट्रॅंड यांच्या मधील अरुंद सामुद्रधुनीवर हें बंदर आहे. १८९४ मध्यें शहराच्या उत्तरेस फ्रिहॅव्हन (स्वतंत्र बंदर) बांधण्यात आलें, व कांहीं वखारी व इतर सोयी करण्यात आल्या. त्यामुळें व्यापारांत बऱ्याच सोयी झाल्या. हें बंदर मुख्यत्वेंकरून रेल्वेच्या स्टेशनला वर्तुळाकार रेल्वेनें व जकातीच्या कचेरीच्या धक्क्याला एका फाट्यानें जोडण्यात आलें आहे. व्यापारी बंदर व लढाऊ जहाजाचें बंदर (ऑर्लोगशॅव्हन) यांच्यामध्यें एक बंधारा आहे व समुद्रकिनाऱ्यावर दहा धक्के बाधून समुद्राला हटविलें आहे. हें औद्योगिक शहर नाहीं. रॉयल चायना फॅक्टरी ही थोरव्हॅल्डसनच्या कामाच्या नमुन्याबद्दल प्रसिद्ध आहे. येथें लोखंडी जहाजें, एंजिनें वगैरे बनाविण्याचा एक मोठा कारखाना आहे. बाहेर देशांतून आणविलेल्या कच्च्या मालाचा पक्का माल बनविण्याचे कांहीं कारखाने फ्रीपोर्टच्या आवारात आहेत.

इतिहास.—कोपनहेगन (म्हणजे व्यापाऱ्यांचें बंदर) या शहराचा उल्लेख प्रथम १४०३ मध्यें इतिहासात सापडतो. हें पूर्वी केवळ मच्छीमार खेडें होतें व बाराव्या शतकाच्या मध्यापर्यंत हें असेंच होतें. यावेळीं पहिला व्हाल्डेमार यानें हें एक्सेलव्हाइड याला नजर केलें. यानें येथें एक किल्ला बाधला. नंतर येथे व्यापाऱ्यांची वस्ती झाली व याला कॉपमनाहोफन हें नाव प्राप्त झालें. १२४५ मध्यें डॅनिश राजा चौथा एरिक यानें बिशप नील्स स्टिग्सन याला हांकून लाविलें. परंतु १२५० मध्यें राजाच्या मरणानंतर बिशप जेकब अर्लँडसेन यानें हें शहर पुन्हा घेतलें व १२५४ मध्यें नगरवासीयांना प्रथम नागरिकपणाचे हक्क दिले. यानंतर जुन्या सनदांच्या मनाईस न जुमानता व्यापारी संघ स्थापन करण्यात आले. ते शहराच्या अधिकाऱ्याच्या सत्तेखालीं होते. १२४८ मधील लूबेकच्या लोकांच्या व १२५९ मधील रूगेनच्या प्रिन्स जॅरोमिरच्या हल्लयामुळें कोपनहेगनच्या भरभराटीस प्रतिबंध झाला. १३०६ मध्यें या शहरानें नॉर्वेजियन लोकाना हांकून लाविलें. परंतु १३६२ व १३६८ मध्यें व्हाल्डेमारच्या प्रतिस्पर्ध्यांनीं हें शहर पुन्हां काबीज केलें. पुढल्या शतकात हॅन्सियाटिक लीग (संघ) हा नवीन शत्रु उत्पन्न झाला व राणी फिलिप्पा हिनें याचा बेत फसविला. रोस्किल्डे येथील बिशपांच्या ताब्यातून हें शहर घेण्याचा पुष्कळ राजांनीं प्रयत्न केला परंतु १४४३ पर्यंत हें शहर परत करण्यात आलें नाहीं. नंतर कोपनहेगन हें राजधानीचें ठिकाण बनलें. १५२३ पासून १५२४ पर्यंत दुसऱ्या ख्रिश्चियननें हें शहर पहिल्या फ्रेडरिकविरुद्ध लढविलें. अखेरीस फ्रेडरिकनें तें घेतलें व त्याची तटबंदी मजबूत केली. १५३६ मध्यें एक वर्षभर वेढा दिल्यानंतर हे शहर तिसऱ्या ख्रिश्चियनला शरण आलें. १६५८ ते १६६० पर्यंत स्वीडनचा चार्लस गस्टव्हस यानें निरर्थक या शहराला वेढा दिला होता व पुढल्या वर्षी मोठ्या शौर्यानें स्वसंरक्षण केल्याबद्दल या शहरास कित्येक हक्क देण्यात आले. ज्या तहाच्या योगानें तिसऱ्या फ्रेडरिकच्या स्वीडिश लढाईचा शेवट झाला होता त्या तहाला या शहराचें नाव १६६० मध्यें मिळालें. १७०० मध्यें इंग्लंड, हॉलंड व स्वीडन याच्या संयुक्त आरमारानें या शहरावर हल्ला केला. १७२८ मधील एका मोठया आगींत येथील १६४० घरें व ५ प्रार्थनामंदिरें जळालीं. १७९५ मधील दुसऱ्या आगींत ९४३ घरें व सेंट निकोलस व राधस हीं देवालयें जळून फस्त झालीं. १८०१ मध्यें ब्रिटिश आरमारानें डॅनिश आरमाराचा रोडस्टेडमध्यें नाश केला. १८०७ मध्यें लॉर्ड कॅथकार्टच्या नेतृत्वाखालीं एका ब्रिटिश आरमारानें या शहरावर गोळ्याचा पाऊस पाडून विश्वविद्यालयाच्या इमारती, मुख्य प्रार्थनामंदिर व इतर इमारती याचा नाश केला. कोपनहेगनची लढाई १८०१ मध्यें झाली.

कोपरगाव—मुंबई इलाख्याच्या अहमदनगर जिल्ह्यातील एक तालुका. या तालुक्याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ५१९ चौरस मैल होतें. या तालुक्यांत पुणतांबें नावाचें एक शहर असून १२५ खेडीं आहेत. या तालुक्याचें मुख्य ठिकाण कोपरगांव हें आहे. १९०१ मध्यें या तालुक्याची लोकसंख्या ५,८९० इतकी भरली. या तालुक्याचा वसूल १९०३-४ सालीं २,४०,००० होता. या तालुक्याच्या अगदीं वायव्य टोंकाकडील भागांतून गोदावरी नदी प्रविष्ट होऊन मध्ये तालुक्यांतून वहात गेली आहे. कोपरगांव तालुक्याची जमीन काळी आहे.गोदावरी नदीला या तालुक्यांतील लहान लहान असे पुष्कळ ओढे मिळालेले आहेत. पण हे ओढे उन्हाळयांत आटून जातात. त्यामुळें येथील जमीनींनां विहिरींचेंच पाणी देणें भाग पडतें या तालुक्यांतील शेतकरी वर्ग बराच कंगाल आहे. कारण येथें पाऊस फार क्वचित् पडतो. कोपरगांवांत पेशव्यांचा वाडा असून राघोबादादा १७८४ त येथें मरण पावला.

कोपर्निकस निकोलस —(१४७३-१५४३) प्रशियन ज्योतिर्वेत्ता. याचें लहानसें चरित्र व ज्योतिःशास्त्रांतील सिद्धांत 'विज्ञानेतिहास' (ज्ञानकोश वि. ५ पा. ३२९-३४२) या ग्रंथांत दिले आहेत. त्या ठिकाणीं त्याच्या सूर्यकेंद्रसिद्धांताचें विस्तृत विवेचन केलें आहे.

कोपळ—हा मूळचा आदिलशाहीचा एक कर्नाटकांतील प्रांत. शिवाजीमहाराज तंजावरकडे गेले असतां जिंजी वगैरे प्रांत त्यांनीं त्यावेळीं जिंकिले. त्याचवेळीं हाहि प्रांत त्यांनीं काबीज केला. तेव्हांपासून आदिलशहानें त्यावरील आपला हक्क कायमचा सोडला. हा प्रांत व महाराजांनीं त्यावेळीं जिंकलेले इतर प्रांत यांचा समावेश कर्नाटकांतील 'स्वराज्यांत' होत असे. पुढें मुसुलमानांच्या ताब्यात सदर प्रांत गेला होता. तो शाहुछत्रपतींच्या कारकीर्दीत परत मिळविला. याच स्वराज्यासाठीं श्री. नानासाहेब व थोरले माधवरावसाहेब यांनीं मोहिमा करून ते प्रांत पुढें सोडविले आहेत. हैदरच्या लढायात या स्वराज्या(प्रदेशा)चा उल्लेख वारंवार येतो [मरा. रिया; ऐति. ले. सं.].

कोपागंज—संयुक्तप्रांताच्या अझमगड जिल्ह्याच्या घोसी तहशिलींतील एक शहर. गाझीपुराहून गोरखपुराकडे जो रस्ता गेला आहे त्या रस्त्यावर हें वसलेलें आहे. गोरखपूरहून बनारसकडे जो बंगाल आणि नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचा फाटा गेला आहे त्या फाट्यावरील हें जंक्शनचें ठिकाण आहे. या शहराची लोकसंख्या १९११ मध्यें ५६०४ होती. अझमगडचा राजा इरादतखान यानें १७४५ च्या सुमारास हें वसविलें. पण या शहरात जें एक लहानसें हिंदु देवालय आहे त्यातील शिलालेखावर १४७२ सालाचा उल्लेख आहे. १८५६ च्या २० व्या कलमान्वयें या शहराचा कारभार चालविला जातो. या ठिकाणीं ५०० माग असून कापड चांगल्या तऱ्हेनें तयार होतें. विशेषतः रेशमी किनारीचीं पागोटीं या ठिकाणीं उत्कृष्ट तयार होतात. साखरेचा व धान्याचा व्यापार चालतो. शहरात दोन शाळा आहेत. येथें सोरमीठ शुद्ध करण्याचा एक छोटा कारखाना आहे.

कोप्प—म्हैसूर संस्थानांतील कडूर जिल्ह्याचा पश्चिमेकडील तालुका. या तालुक्यांत, येडेहळ्ळी महाल व शृंगेरीची जहागिरी यांचा समावेश होतो. या तालुक्याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ६५७ चौरस मैल होतें व त्याची लोकसंख्या ५१,६५३ होती. या तालुक्यात येडहळ्ळी व कोप्प हीं दोन गांवें असून १६६ खेडीं आहेत. कोप्प हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण होय. कोप्पच्या पश्चिमेस 'पश्चिमघांट' पर्वत आहे. शिवाय पश्चिमेकडून तुंगानदी वहात गेली असून पूर्वेकडून भद्रा नदी वहात गेली आहे. हा सर्व तालुका सुपीक असून येथील देखावा फारच बहारीचा आहे. या तालुक्यात उंच उंच टेंकड्यांचें व खोल दऱ्यांचें जाळें पसरलें असून या टेंकड्यांवर दाट अशीं जंगलें आहेत. या जंगलानजीक गेल्या तीस वर्षांत यूरोपियन लोकांनीं काफीचे मळे केलेले आहेत. खोल दऱ्यामध्यें तांदूळ पिकत असून सुपारीचीं पुष्कळ झाडें आहेत. येथील वार्षिक पर्जन्यमान सर्वसाधारण १२० इंच आहे. घाटामध्यें दालचिनी फार पिकते. याशिवाय या तालुक्यातील मुख्य उत्पन्न तांदूळ व ऊंस यांचें होय. येथील टेंकड्याच्यामध्यें सर्वांत उंच शिखर मर्तीचें असून त्याची उंची ५४५१ फूट आहे. या तालुक्याच्या पश्चिमभागात आद्य शंकराचार्यांनीं स्थापलेला शृंगेरीमठ आहे. पूर्वेकडील भागात लिंगायतांचा एक प्रमुख मठ आहे.

पूर्वी कोप्प हे चोल व चालुक्य या राज्याच्या सरहद्दीवर असल्यानें येथें त्याच्या नेहमीं कटकटी होत. राजाधिराज चोल व सोमेश्वर चालुक्य यांच्यांत अशीच एक मोठी लढाई येथें १०५२ त होऊन तींत राजाधिराज पडला; परंतु राजाधिराजाचा धाकटा भाऊ राजेंद्र यानें थोड्याच दिवसात येथेंच चालुक्य याचा पराभव केला. आणि त्याच्या या पराक्रमामुळें त्याला कोप्पमच्या रणांगणावरच राज्याभिषेक करण्यात आला. याचाच दुसरा भाऊ वीरराजेंद्र हा राजा झाल्यानंतर या प्रदेशातच विक्रमादित्य चालुक्यानें त्याच्यावर स्वारी केली. साराश पेरार (तुंगभद्रा) नदीवरील या गावीं अनेकवार लढाया झाल्या आहेत. [अय्यर प्रा. हिं].

कोपल—हैद्राबाद संस्थानांतील रायचूर जिल्ह्यातील एक गाव. या ठिकाणीं एक प्राचीन डोंगरी किल्ला आहे. याची लोकसंख्या १९११ सालीं ७५५८ होती. १७८६ मध्यें टिपू सुलतानानें हें गाव जिंकून त्या ठिकाणीं एक किल्ला बांधविला. १७९० मध्ये ब्रिटिशांच्या व निझामच्या सैन्यानें या गावाला वेढा देऊन तें सर केलें. १८५७ च्या बंडामध्यें भीमराव नावाच्या एका शूर गृहस्थानें हें गाव आपल्या ताब्यात आणलें, पण थोड्याच दिवसात तें गाव त्याला सोडून द्यावें लागलें; व तेथें झालेल्या चकमकींत तो मारला गेला. या गावात दोन किल्ले आहेत. एक टेंकडीवरचा जुना किल्ला व टिपूनें बांधवलेला नवा किल्ला. टेंकडीवरील किल्ला पायथ्यापासून ४०० फूट उंच आहे. हा किल्ला हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि किल्ल्यापेक्षा दुर्गम आहे असें सर जॉन मालकम म्हणतो. सर सालरजंगच्या घराण्याकडे जी जहागिरी आहे त्या जहागिरीचें हें मुख्य ठिकाण आहे. या ठिकाणीं एक पोस्ट ऑफिस व एक शाळा आहे.

कोंबड्या—कोंबड्याच्या मूळ उत्पत्तीविषयीं शोध लावतांना डार्विननें कोंबड्याच्या सर्व जाती 'गॅलसबॅकिव्हा' नावाच्या कोंबड्यापासून झाल्या असाव्यात असें म्हटलें आहे. परंतु ब्रह्मदेश व कोचिन या जातींची उत्पत्ति त्या जातीपासून झालेली नाहीं एवढेंच नव्हे तर त्या कोणापासून झालेल्या असाव्यात याचाहि अद्याप शोध लागलेला नाहीं. कसेंहि असो. सध्याच्या पाळींव कोंबड्या या रानटी कोंबड्यापासून पैदा झालेल्या आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. रानटी कोंबड्यांची पाळींव कोंबड्याशीं तुलना केल्यास त्यांमध्यें पुष्कळच फरक दिसून येतो. रानकोंबड्याचीं नखें फार तीक्ष्ण असून त्या कोंबड्या मुळींच माणसाळत नाहींत. त्या फार थोडीं अंडीं घालितात व तीं लहान असतात. परंतु पाळींव कोंबड्यानें एकंदर वाढण्याचें वातावरण

निराळें असल्यामुळें त्याच्या प्रकृतिमानांत व इतर गोष्टींतहि पुष्कळ फरक झालेला आहे. कोंबडया, बदकें वगैरे प्राणी काळजीपूर्वक बाळगून त्यांची जोपासना केल्यास तो एक फायदेशीर धंदा होईल ही कल्पनाहि आपल्याकडील लोकांना अद्यापि नाहीं परंतु पाश्चात्य देशांत या विषयाचा बराच अभ्यास झाला असून तेथील तज्ज्ञांच्या अनुभवाप्रमाणें तो कित्येक ठिकाणीं पूर्ण यशस्वी तर कित्येक ठिकाणीं नुकसानकारक झालेला आहे. सदरहू धंदा नुकसानकारक होण्याचीं मुख्य कारणें (१) या विषयासंबंधीं अज्ञान, (२) अपुरी जागा, (३) मजुरीची महर्घता वगैरे होत. परंतु हिंदुस्थानांत शेवटच्या दोन अडचणी विशेष आड येऊं शकत नाहींत. परंतु विषयाचें ज्ञान पुरें नसल्यामुळें हा धंदा मोठया प्रमाणावर करण्याचें धाडस कोणास होत नाहीं. म्हणून हा धंदा सध्या अडाणी शेतकरी वर्गाच्या हातीं राहिला आहे.

कोंबडयांचा धंदा काळजीपूर्वक केल्यास तो फायदेशीर आहे एवढेंच नव्हे तर त्यापासून मनाची करमणूकहि होते. दुय्यम धंदा या दृष्टीनें तर त्याचें महत्व फारच आहे कारण भाडवल फारसें न लागतां नेहमीं खेळती रक्कम हातीं रहाते व त्यामुळें कोणतीहि अडचण येत नाहीं. सदर पाळींव पक्ष्याचा उपयोग तीन तऱ्हेनें होतो. पहिला उपयोगः त्याचें मांस फार रुचकर असल्यामुळें बहुतेक सर्व जाती त्याचा उपयोग खाण्याकडे करितात. दुसरा उपयोगः निव्वळ अंडी विकण्यास मिळावींत या हेतूनेंसुद्धा सदर पक्षी बाळगले जातात. तिसरा उपयोगः हे पक्षी पुष्कळ प्रमाणात बाळगल्यास त्यांच्या शिटीचा उपयोग खताकडे चागला होतो.

फ्रान्स, इंग्लंड वगैरे यूरोपियन राष्ट्रामध्यें सदर पक्षी व त्यांचीं अंडीं यांची आयात व निर्यात दरवर्षी लाखों रुपयांची होत असते. या सर्व पक्ष्यांची उत्पत्ति अंडयापासूनच होते. व ज्या मानानें अंडयाची निगा घेतली जाते त्या मानानें त्यातून पिलें कमी जास्त बाहेर पडतात. अंडीं घालण्यापूर्वी सृष्टिनियमाप्रमाणें नर व मादी यांचा संयोग होतो व नंतर मादी रोज एक याप्रमाणें अंडीं घालते. कोंबडयांचीं पिलें नऊ दहा महिन्यांचीं झालीं म्हणजे तीं वयांत येतात व नंतर अंडीं घालतात. अंडयाचा उपयोग दोन प्रकारें करतात. (१) खाण्याकडे व (२) उबवून पिलें काढण्याकडे. यांपैकीं कोणताहि उपयोग झाला तरी अंडीं उत्तम ठेवावीं लागतात. अंडीं उत्तम ठेवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे एखादी पेटी किंवा स्टॅन्ड करून त्यास भोंकें (अंडयांच्या परिघाएवढीं) पाडून त्यात अंडीं निमुळता भाग खालीं करून ठेवणें हा होय. अंडीं अशा रीतानें ठेवल्यानें त्यास भरपूर हवा मिळते व आंतील गर्भास धक्का लागत नाहीं. अंडीं स्टॅन्डवर ठेवतांनां त्यांजवर तीं ज्या दिवशीं घातलेलीं असतील ती तारीख घालून ठेवावी म्हणजे तीं किती दिवसांचीं आहेत हें समजण्यास सोपें जातें व शिळीं होऊन चाललेल्या अंडयाचा अगोदर खप करितां येतो कोंबडीनें अंडीं घातलीं म्हणजे प्रथमतः त्यांचे दोन वर्ग करावे. विकावयाचीं असतील तीं अंडीं निराळीं काढून ठेवावींत व उबवावयांचीं अंडीं निराळीं असावींत. उबवावयाकरितां ठेवावयाच्या अंडयांचा आकार लंबवर्तुलासारखा असावा तीं फार मोठीं अगर फार लहान नसावींत. त्यांच्या वरचें कवच फार जाड किंवा फार पातळ असूं नये.अंडीं ८-१० दिवसांपेक्षां जास्त शिळीं नसावींत. अंडीं घालणें झाल्यावर त्या कोंबडया इतर कोंबडयानां सोडून निवांत ठिकाणीं विश्रांतीसाठीं जाऊन बसतात व त्या जागेतून त्या सहसा हालत नाहींत. अशा रीतीनें कोंबडया बसल्या म्हणजे त्यास खुडका आला असें म्हणतात. उबविण्याकरितां त्याच्या खालीं अंडीं ठेवण्यास हीच वेळ योग्य होय. अंडीं उबविण्यास कोंबडया निवडणें त्या चांगल्या, मोठया व पुष्कळ पिसांच्या अशा असाव्यात. पहिलटपणाची कोंबडी सहसा निवडूं नये. कारण त्या अस्थिर असल्यामुळें अंडीं सारखीं उबलीं जात नाहींत. ज्या कोंबडया गरीब व शांत स्वभावाच्या असतील त्यांसच अंडीं उबविण्याकरिता निवडावें. अंडीं उबवून त्यातून पिलें बाहेर येण्यास २१ दिवस लागतात. व इतके दिवसपर्यंत कोंबडयाचा खुडका टिकतो. या अवधींत त्यांना जें अन्न द्यावयाचें तें चांगलें, पौष्टिक व उष्णता उत्पन्न करणारें असावें. होता होईल तो सुकें अन्न द्यावें, ओलें देऊं नये.

अंडीं उबवावयास ठेविलीं म्हणजे त्यांतील गर्भ दिवसें दिवस वाढूं लागतो व त्यातून २१ दिवसानीं पिलें बाहेर पडतात. सर्वच अंडयामधून पिलें येतात असें नाहीं. तर कांहीं अगदींच वांझ ठरतात व कांहींत अर्धवट गर्भ वाढून तीं नासतात. थंडीच्या व पावसाळयाच्या दिवसांत विशेषतः अंडीं उबविण्यास चांगलें. उन्हाळयाच्या दिवसात अंडीं जशीं उबलीं जावींत तशीं उबलीं जात नाहींत.

अंडीं बरोबर उबलीं कीं नाहींत हें पहाण्याची सोपी युक्ति म्हणजे एक चौरस फूट लांबीचा जाड कार्डबोर्ड घेऊन त्याच्या मध्यभागीं अंडयांच्या आकाराचें लंबवर्तुळाकृति भोंक पाडावें; त्या भोंकावर अंडें धरून त्यांतून दिव्याचा प्रकाश पहावा. ज्या अंडयांत गर्भ वाढत नाहीं त्या अंडयांतून दिव्याचा प्रकाश स्वच्छ दिसतो व पातळ पदार्थाखेरीज त्यात दुसरें कांहीं दिसत नाहीं. जातिवंत कोंबडयांची पैदास करणें झाल्यास ती त्या जातीचे पक्षी आणून त्यांपासून करण्यापेक्षा अंडीं विकत आणून केलेली चांगली. मात्र अंडी खात्रीलायक व ताजीं असावींत. परदेशाहून अंडीं आणणें झाल्यास तीं आगगाडींतून आणलीं असतां कमी धोक्याचें असतें. मनुष्याच्या हातीं आणणें शक्य असेल तर फारच उत्तम. अंडीं लांबून आणल्यानंतर त्यांस २४ तास विश्रांति द्यावी व नंतर तीं कोंबडीखालीं उबविण्यास ठेवावीं. परदेशीं अंडीं पाठविणें झाल्यास तीं

पेटींतून पाठवावीं. १५ इंच लांब, बारा इंच रुंद व सऊ इंच उंच एवढ्या पेटींत सुमारें एक डझन अंडीं चांगलीं राहूं शकतात. हीं अंडीं एकमेकांस न चिकटतील अशीं ठेवावींत. नंतर पेटीचें तोंड स्क्रूनें बंद करून आगगाडीनें पाठवावीं. उबण्यास ठेविलेलीं अंडीं २१ दिवसांनीं फुटून त्यांतून पिलें बाहेर येतात. बाहेर आल्यानंतर प्रथमतः त्यांनां अन्नापेक्षां उबाऱ्याचीच जास्त जरूर असते; म्हणून त्यास २४–३६ तास पर्यंत कोंबडीखालून काढूं नये. या अवधींत त्यास थोडथोडें खाणें घालावें लागतें. पहिले कांहीं दिवसपर्यंत खाणें घालणें तें सुकें, कुटलेलें व अगदीं साधें असें असावें. परंतु पुढें पिलें वाढूं लागलीं म्हणजे त्यास चांगलें पौष्टिक अन्न खावयास घालावें लागतें. त्यास खाणें घालावयाचें तें केव्हांतरी एकदाच सर्व न घालतां दिवसांतून ३।४ वेळ थोडथोडें घालावें. गहूं, हरभऱ्याची डाळ, अर्धें कच्चें शिजविलेलें मांस, ताक वगैरे पदार्थ सवडी प्रमाणें मधून मधून देत जावें. वाळू, चुना व गारेचे लहान लहान खडे याची आवश्यकता कोंबडयांना फार असते. इतर पदार्थांबरोबर हे पदार्थहि तीं खातात व याचा उपयोग त्यास अन्न पचविण्यास होतो. कोंबडयांनां दात नसल्यामुळें अन्न चावून बारीक करण्याचें त्यास दुसरें कांहीं साधन नाहीं. परंतु वाळू, गार वगैरे पदार्थांचें गिळलेल्या पदार्थांशीं घर्षण होऊन अन्न पचन होतें. यावरून या पदार्थांची अवश्यकता किती आहे हें सहज कळून येईल. चुन्याचा उपयोग अंडयावरील कवची बनण्याकडे होतो म्हणून त्यास चुन्याचा पुरवठा केला पाहिजे. ज्यावेळीं कोंबडया पाळणारांचा कोंबडया बाळगण्यामध्यें कांहीं विशिष्ट हेतु असतो तेव्हां त्या हेतूस अनुसरून त्यास पिलांच्या अन्नामध्यें फेरफार करावा लागतो. उदाहरणार्थः–कोंबडया विक्रीकरिता तयार करावयाच्या आहेत असें असेल तर त्या जितक्या लठ्ठ व वजनदार होतील व ज्या मानानें त्याचें मांस नाजुक, मऊ व चवदार होईल त्या मानानें त्यांस किंमत अधिक येईल म्हणून ज्या अन्नाच्या योगानें त्यांच्या अंगात हे गुण वाढतील तेंच अन्न त्यास द्यावें लागेल निरनिराळ्या पदार्थांच्या अंगीं मांस वाढविण्याची शक्ति असेल त्याच पदार्थांचे अंगीं जास्त अंडीं घालण्याचें सामर्थ्य वाढविण्याची शक्ति असेलच असें नाहीं व त्याकरितां निराळ्याच अन्नाची योजना करावी लागेल. म्हणून प्रथमतः कोंबडया कोणत्या उपयोगाकरितां तयार करावयाच्या तो हेतू ठरवून नंतर अन्नाची योजना केली पाहिजे.

पिलें तीन महिन्यांचीं झालीं म्हणजे त्यांची वाढ झपाटयानें होऊं लागते. ती वाढ तीन महिन्यांपासून ८ महिने पर्यंत जास्त जोरांत असते म्हणून या वेळीं त्यांस चांगलें कसदार अन्न खाऊं घालावें. खालीं दिलेलें अन्न तयार करून तीन महिन्यांच्या पिलांस खाऊं घातल्यास त्यापासून त्यांच्या शरीराची वाढ झपाटयानें होईल तें अन्न येणेंप्रमाणें:––

धान्याचें नांव	वजन	धान्याचें नांव	वजन
बारीक कुटलेले गहूं	२ पौंड.	तांदुळांचें पीठ	३ पौंड.
सातूचें बारीक पीठ	१ पौंड	गव्हांचा कोंडा	३ पौंड
हरभऱ्याचें व		जवसाची पेंड	½ पौंड.
वाटाण्याचें पीठ	१ पौंड.		

पि लां क रि तां घ रें व आ वा र.––पिलें एक दोन आठवडयाचीं होईपर्यंत तीं आईस सोडून फारशीं दूर जात नाहींत. म्हणून त्यांना हिंडण्यास लागणारें आवार मर्यादित असलें तरी चालतें. हें आवार सहा फूट लांब तीन फूट रुंद व दोन फूट उंच एवढें ठेवून चारी बाजूंनीं तारेच्या जाळ्यानें बंद करावें व त्यास जोडूनच एक लहानसें म्हणजे तीन फूट लांब तीन फूट रुंद व दोन फूट उंच एवढें फळ्याचें घर असावें. एवढ्या आवारांत एक कोंबडी व आठ दहा पिलें सहज राहूं शकतात. निव्वळ पिलेंच ठेवल्यास १५।१६ पर्यंत राहूं शकतात. हें घर वरचेवर निरनिराळ्या ठिकाणीं उचलून ठेवावें म्हणजे फुसरें, कृमी वगैरेंचा त्रास होणार नाहीं.

पिलें साधारण मोठीं झाल्यावर त्यास चरावयास आवार मोठें लागतें. तसेंच त्याचें कावळे, घारी, मुंगुस, वगैरे प्राण्यापासून रक्षण करावें लागतें. हवेंतील फेरफाराचा पिलांच्या प्रकृतीवर पुष्कळ परिणाम होतो म्हणून त्यावेळीं त्यास फार जपलें पाहिजे.

नियमित खाणें, बेतशीर व व्यवस्थित व्यायाम आणि पुरेशी स्वतंत्रता या गोष्टी जशा पिलांना अवश्य आहेत तसेंच त्यांचीं घरें स्वच्छ ठेवणें अवश्य आहे. कोंबड्यांचा धंदा यशस्वी न होण्याचें कारण बऱ्याच अंशीं त्यांचीं घरें व आवारें स्वच्छ नसतात हें होय. तरी या बाबतींत शक्य ती खबरदारी घेणें जरूर आहे. कोंबड्यांचें संवर्धन उत्तम प्रकारें व्हावें व त्याजपासून शक्य तितका फायदा व्हावा अशी कोंबडी बाळगणाराची इच्छा असल्यास त्यांनीं कोंबड्यांची संख्या अगदीं मर्यादित ठेविली पाहिजे कोंबड्या बाळगणाऱ्या लोकांचे साधारणपणें दोन वर्ग करितां येतील. (१) निव्वळ धंदा या दृष्टीनें कोंबडी बाळगणारे. व (२) केवळ शुद्ध जातींचीं पैदास करण्याची आवड म्हणून कोंबडी बाळगणारे. पैकीं पहिल्या वर्गांतील लोक पिलांना अगर कोंबड्यांनां चांगली किंमत येत असल्यास शक्य तितकीं विकून टाकण्यांत कसूर करीत नाहींत. मग त्याच्या संग्रहांतील उत्तम जात नाहींशी झाली तरी हरकत नाहीं. आणि दुसऱ्या वर्गांतील लोक आपल्या संग्रहांतील पिलें पुढें कदाचित् उत्तम निघतील या आशेनें तीं मुळींच विकीत नाहींत. तात्पर्य, एक वर्ग फाजील उधळेपणा करितो तर दुसरा फार काटकसर करितो; पहिल्या वर्गाची दृष्टि द्रव्यसंचयाकडे असते तर दुसऱ्याची दृष्टि पिलांशीं निकट संबंध, त्यांचे लाड वगैरे गोष्टींमुळें प्रेम उत्पन्न होऊन

अंध झालेली असते. त्यामुळें कोंबड्याचा धंदा जसा व्यवस्थित चालावयास पाहिजे तसा चालत नाहीं.

कोणतीं पिल्लें अगर कोंबड्यी विकावींत ते पुढें दिलें आहेः- (१) जीं पिलें अशक्त असतील तीं विकून टाकावींत.(२) कम अस्सल जातीचीं पिल्लें विकून टाकावींत; व (३) कोंबडी ४ । ५ वर्षांचीं मोठीं झाली म्हणजे विकावींत.

पि ल्लां ची कृ त्रि म उ त्प त्ति व त्यां चें सं व र्ध न.—सामान्यतः व्यवहारात कोणताहि धंदा मोठ्या प्रमाणावर करणें झाल्यास निव्वळ नैसर्गिक साधनांवरच अवलंबून राहून चालत नाहीं. त्यास यांत्रिक साधनाची जोड झाल्यास तो धंदा पुष्कळ किफायतशीर होऊन कामहि पुष्कळ होतें. तीच गोष्ट कोंबड्याच्या धंद्याची आहे. कोंबड्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर करणें झाल्यास अंडीं उबविणें, पिलाचें संवर्धन करणें, वगैरेकरिता पाश्चात्य देशात निरनिराळीं यंत्रें तयार झालेलीं आहेत; त्यापासून नैसर्गिक पद्धतीपेक्षां काम पुष्कळ होऊन परावलंबन कमी झाल्यामुळें त्रासहि बराचसा वांचतो. अंडीं उबविण्याकरिता जें यंत्र शोधून काढलें आहे त्यास इन्क्युबेटर असें म्हणतात. याच्या सहाय्यानें एका खेपेस पुष्कळ अंडीं उबवितां येतात. हें वर्षांतील कोणत्याहि ऋतूंत चालतें व पिल्लें निघण्याचें प्रमाण पुष्कळ अंशानें समाधानकारक पडतें. हें यंत्र वापरताना मुख्यत्वेंकरून पुढील गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. (१) उबवावयास ठेवावयाचीं अंडीं ताजीं असावींत. तीं उन्हाळ्यांत तीन दिवसांपेक्षां व हिंवाळ्यात सात दिवसांपेक्षां जास्त शिळीं नसावींत. शिळीं अंडीं उबविण्यास ठेविलीं असता त्यांतून खात्रीपूर्वक पिलें निघतीलच असें नाहीं. (२) यंत्रातील उष्णता अगदीं नियमित अंशावर ठेवणें; उष्णतेचें मान १०१° पासून १०३° अंशापर्यंत असावें. त्याच्यावर जाऊं देऊं नये. (३) यंत्रामध्यें जरूर तितकी हवा राहील अशी खबरदारी घेतली पाहिजे. (४) दिवसांतून यंत्राचें खण दोन वेळ उघडणें. पहिले दहा दिवसपर्यंत अंडीं दहा मिनिटें उघडीं ठेवावींत, दहा दिवसानंतर अंडीं वीस मिनिटें अगर थंड होईतोंपर्यंत उघडीं ठेवावींत व खण पुन्हां झांकावा (५) उष्णता १०२° अंशांपेक्षा जास्त असल्यास दिवा मालवावा व १०२° अंशांपेक्षा कमी होऊं लागल्यास पुन्हां लावावा. (६) उन्हाळ्यांत अंडीं उबविणें झाल्यास यंत्रांतील हवेंत आर्द्रता असावी लागते म्हणून अंड्यांवर जरूर भासल्यास थोडें पाणी शिंपडावें. पावसाळ्यांत याची मुळींच जरूर लागत नाहीं. (७) अंडीं उबविण्याचें काम झाल्यावर यंत्रांतील खण, पाण्याची बशी, आणि कॅनव्हस हीं सर्व ऊन पाण्यानें व साबणानें स्वच्छ धुवावीं. (८) अंड्यांतून पिलें बाहेर निघत असताना खण वरचेवर उघडल्यानें पिलांस थंडी होण्याचा संभव आहे. सबब ते वरचेवर उघडूं नयेत. इतक्या गोष्टींकडे लक्ष पुरविल्यास अंडीं चांगलीं उबून पिलांचें प्रमाणहि चांगलें पडेल व कोंबडीस खुडका येण्याची वाट पहाती लागणार नाहीं. यंत्रात अंडीं २१ दिवसपर्यंत ठेवावीं लागतात व २१ व्या दिवशीं पिलें बाहेर येऊं लागलीं म्हणजे त्यास तेथून काढून 'शुष्कीकरणमंजूषें'त ठेवावीं लागतात. ही मंजूषा अंडीं उबविण्याच्या यंत्रासच जोडलेली असते. येथें तीं ठेवलीं म्हणजे त्यास भरपूर उष्णता मिळून तीं चांगलीं कोरडीं होतात. तेथें तीं १२ पासून १६ तास ठेवल्यानंतर त्यास 'धात्रीमंजूषे'त ठेवतात. धात्रीमंजूषेंतील व शुष्कीकरण मंजूषेंतील उष्णतेचें प्रमाण ६०° पासून ९०° अंशापेक्षां जास्त असूं नये. धात्रीमंजूषेचा उपयोग कोंबडीखालीं अंडीं उबवून निघालेल्या पिलांचें संगोपन करण्याकडेहि होतो. हीं पिलें तीन दिवसपर्यंत कोंबडी खालीं ठेऊन चवथ्या दिवसापासून धात्रीमंजूषेंत ठेवावींत. मंजूषा हें यंत्र म्हणजे एक प्रकारची पेटी असून त्यात ठराविक उष्णता राहील अशी व्यवस्था केलेली असते. या यंत्रास किंमत अधिक पडते. व ज्या मानानें त्यात सोई अधिक त्या मानानें त्याची किंमत अधिकाधिक वाढत जाते. अर्थात् असलें यंत्र विकत घेणें शेतकऱ्यास परवडणार नाहीं, परंतु याच्या ऐवजीं खालीं सांगितलेल्या पद्धतीनें पेट्या तयार करून त्यांचा उपयोग धात्रीमंजूषेसारखा करता येईल व त्या फारच कमी खर्चात करता येतील. ती पद्धत येणेंप्रमाणेः—अडीच फूट लांब, दीड फूट रुंद व दीड फूट उंच अशी एक पेटी तयार करावी. तिच्या तिन्हीं बाजूस एक लहानसें दार असावे पेटीची वरील बाजू तारेच्या जाळ्यानें बंद करावी म्हणजे आत हवा व उजेड भरपूर जाईल. या जाळ्यापासून खालीं तळापर्यंत लोंबतील अशा दोन बोटें रुंदीच्या फल्यानेलच्या पट्या दोन दोन इंचावर लावाव्यात. या पेटीच्या तळाशीं स्वच्छ बारीक वाळूचा एक इंच जाड थर पसरावा व त्यावर बारीक तोडलेलें गवत पसरावें. गवताऐवजीं लांकडाचा भुसा असला तरी चालेल. पिलाना या पेटींत ठेवलें असता तीं फल्यानेलच्या पट्यात जाऊन बसतील व त्यास आपण जणूं काय आईच्या पंखाखालीं बसलों आहों कीं काय असा भास होईल. ही पेटी वरचेवर कढत पाण्यानें किंवा फिनाइलनें धुण्याची व्यवस्था केली पाहिजे. धात्री मंजूषेचा उपयोग पिलें लहान आहेत तोंपर्यंतच होत असतो. पिलें मोठीं होऊं लागलीं म्हणजे त्यास तेथून काढून एखाद्या खोलींत अगर लाकडी घरात ठेवावें. येथपर्यंत पिलें अंड्यातून बाहेर निघाल्यापासून तों तीं जाणतीं होईपर्यंत त्यास काय खाणें घालावें व त्यांची निगा कशी राखावी यासंबंधीं विवेचन झालें. आतां पिलें मोठीं झाल्यावर त्याचें खाणें काय असावें, त्यांचीं घरें कशीं असावींत वगैरे गोष्टीसंबंधीं विचार केला पाहिजे.

कोंबड्यांना जें खाणें घालावयाचें त्याचे शास्त्रदृष्ट्या पांच वर्ग करतां येतील ते असेः—(१) धान्य, (२) हिरवें अन्न, (३) मांसल अन्न, (४) अन्नपचनसाहाय्यक द्रव्यें

कोंबडी.

कोंबडयाच्या जाती.

अन्नमार्ग.
चुनाळ.
पहिला कोठा.
स्नायुमय कोठा.
काळीज.
पित्ताशय.
लिबलिब.
दुओदीनम् (आंतडयाचा भाग).
लहान आंतडें.
सीका. (आंतडयाचा एक भाग).
मूत्रवाहिनी.
अंडाशयाचा नळ.
क्लोएका (मलद्वार)

कोंबडयाचीं पचनेंद्रियें.

४ कोचिन चीन कोंबडी

६ गेम कोंबडी

८ मुलवान कोंबडी

१० पेन्सिली हॅम्बर्ग कोंबडी

५ डार्किंग कोंबडी

११ ठिपकेदार हॅम्बर्ग कोंबडी

१२ गिनी कोंबडी.

व (५) द्रव पदार्थ. यापैकीं धान्य हा पहिला वर्ग होय. यांत जे पदार्थ येतात त्यांच्या गुणधर्माप्रमाणें तीन पोटवर्ग करता येतील.

पो ट व र्ग प हि ला.—या वर्गांतील धान्येंः गहूं, सातू, जव, हरभरे, वाटाणा, गव्हाचा कोंडा, उडीद, तूर वगैरे. त्यांचे गुणधर्म सत्वदृष्टया उच्च. यानें मासवृद्धीस मदत होते. हें अन्न पिलाना किंवा कोंबड्यानां घालणें झाल्यास ताकात, दुधांत किंवा पाण्यांत भिजवून ओलें करून घालावें.

पो ट वि भा ग दु स रा--यांतील धान्यें.-भात, तांदूळ, कण्या, तांदुळाचा कोंडा, बाजरी, ज्वारी वगैरे. हीं शरीरांतील उष्णता राखण्यास उत्तम व प्रकृतीस थंडावा आणणारीं आहेत. यात सत्व कमी असतें. लहान पिलानां बारीक करून घातलें असतां चांगलें. अशक्त व आजारी कोंबड्यांना चांगलें.

पो ट वि भा ग ति स राः-धान्य मकाः-हें मेदोवृद्धि व मासवृद्धि करण्यास उत्तम होय. हें टेंचून किंवा भरडून भिजवून घालणें. ज्या कोंबड्या लठ्ठ करून विकावयाच्या असतील त्यांसच हें द्यावें. अंडीं घालणाऱ्या कोंबड्यांस देऊं नये.

यानंतर दुसरा मुख्य वर्ग म्हणजे " हिरवें अन्न " हा होय. यांत पुढील पदार्थ येऊं शकतातः–कोंवळें गवत, कांदे, लसूण, घास, कोबीचीं पानें, वटाटे, वेलाचे कोंवळें शेंडे, कायाच्या हिरव्या पानी वगैरे. हें अन्न कोंवडयास खावयास घातलें असतां त्यांची प्रकृति सुदृढ व निरोगी रहते. या अन्नाच्या अंगीं मलावरोध नाहींसा करण्याची शक्ति असते. शिवाय अंडीं मोठ्या आकाराचीं होऊन त्यांचें प्रमाण वाढतें व वांझपणा कमी होतो. मलावरोध नाहींसा झाल्यानें आमाश, हगवण वगैरेंसारखे रोग होण्याची भीति नसते. असे अनेक फायदे या वर्गांतील अन्नापासून आहेत.

पावसाळ्यांत जिकडे तिकडे हिरवें गार रान असल्यामुळें कोंवडयांना कोंवळें गवत पुष्कळ मिळतें आणि म्हणून त्यास इतर पदार्थांची विशेष जरूर नसते. परतु उन्हाळ्यात ज्यावेळीं सर्व गवत सुकून जातें त्यावेळीं वर सांगितलेल्या इतर पदार्थांचा उपयोग करणें अवश्य असतें.

कोंबड्यानां बटाटे खाण्यास घातले असतां चरबीचें प्रमाण जास्त वाढतें व तीं जास्त लठ्ठ होतात. तरी ज्या कोंबडया अगर पिलें विकावयाचीं असतील त्यांस हें खाणें घालावें. बटाटे घालावयाचे झाल्यास ते पाण्यांत उकडून साल काढून गव्हाच्या कोंड्यांत अगर पिठांत मिसळून द्यावे. कोंबडयास बटाटयांची साल कधींहि खावयास घालूं नये.

कोबी, गाजर, लसूण घास वगैरे घालावयाचें झाल्यास तें कच्च्या स्थितींत घातलेलें चांगलें. तें शिजविण्याचें अगर उकडण्याचें प्रयोजन नाहीं.

याखेरीज कोंवडयांना कधीं कधीं मोहरी व अंबाडीचें बीं आणि पेंड खावयास घालतात. थंडीच्या दिवसांत कोंवडयांचे पंख गळत असतात. त्या वेळीं मोहरी व अंबाडीचें बीं खावयास घातलेलें चांगलें

तिसरा वर्ग म्हणजे मांसल अन्न हा होय. या वर्गांत निरनिराळ्या जनावरांचें मांस,बारीक केलेलीं ताजीं हाडें किंवा हाडाचा चुरा, किडे, आळ्या हे पदार्थ येतात. या अन्नाच्या अंगीं मासवृद्धि व उष्णता उत्पन्न करण्याची शक्ति असल्यामुळें कोंबड्या चांगल्या तयार होतात. उन्हाळ्यांत या अन्नाची विशेषशी जरूर नसते; परंतु हिवळ्यात मात्र हें अन्न मधून मधून दिलेलें चांगलें. पावसाळ्यात कीटकोत्पत्ति फार होत असल्यानें कोंबड्यांचें चरावयाचें आवार पुष्कळ असल्यास त्यास हें भक्ष आपोआप मिळतें. परंतु मर्यादित जागेंतच आणि घातलेल्या अन्नावरच कोंबड्या पाळलेल्या असतील तर मात्र मधून मधून हें अन्न घालणें जरूरीचें आहे. कोंवडयाचा सर्वसाधारण नित्यक्रम पाहिल्यास असें दिसेल कीं, वरील अन्न मिळविण्यासाठीं त्या स्वाभाविकपणें फार खटपट करीत असतात. झाडावर किंवा जमिनींत असलेल्या आळया, वाळवी, मुंगळे वगैरे दृष्टीस पडल्यास तीं त्याचा इतका फन्ना उडवितात कीं, त्या ठिकाणीं एकहि कीड रहात नाहीं. काहीं काहीं कोंवडीं इतकीं धीट असतात कीं, तीं आपल्या जिवाची पर्वा न करितां सर्पाच्या जातींतील काहीं प्राण्यावर हल्ला करून त्यास सबंध गिळून टाकतात. लहान लहान बेडूक, उंदराचीं लहान पिलें, मासळीचे वगैरे तुकडे, त्याच्याच पैकीं मेलेलीं पिलें वगैरे पदार्थ त्यास मिळाल्यास त्याची सुसती चंगळ उडते. यावरून हें अन्न कोंवडयांच्या आवश्यक अन्नापैकीं एक आहे हें सागणें नकोच.

कोंवडया अन्नशोधार्थ इकडे तिकडे हिंडत असताना गारेचे खडे, जाडी रेती वगैरे पदार्थ खात असताना पुष्कळानीं पाहिलें असेल. कोंवडयाना दात नसल्यामुळें त्यास आपलें अन्न सबंध गिळावें लागतें व पोटात गेल्यावर बारीक होण्याचें एखादें साधन पाहिजे म्हणून त्यांना वरील पदार्थ खावे लागतात.पदार्थ पोटात गेल्यावर पोटातील अन्नाशीं त्याचें घर्षण होऊन ते बारीक होतें व म्हणून तें पचविण्यास सोपें जातें. प्रत्येक प्राण्यात खाल्लेलें अन्न बारीक करण्याची काहीं तरी व्यवस्था परमेश्वरानें केलेली असतेच. त्याचप्रमाणें कोंवडया वगैरे पाळींव पक्ष्यांच्या बाबतींतहि केलेली आहे. कारण जरी यांनां दात वगैरेसारखीं साधनें अन्नाचें चर्वण करण्यास नाहींत तरी तें काम वाळूचे व गारेचे खडे बजावतात. तात्पर्य इतर पदार्थांप्रमाणें या पदार्थांचीहि कोंबडयाचे जीवनास अवश्यकता आहे हें उघड होतें.

वाळू, गार या पदार्थांबरोबरच कोंवडया चुन्याचे खडेहि शोधून खात असतात. कोंवडयाची अंडीं तपासून पाहिलीं तर त्यांची कवची चुन्याची बनलेली असते असें दिसून येईल. हा चुना कोंवडया बाहेरूनच मिळवितात. तो त्याच्या शरीरांत उत्पन्न होत नाहीं. चुना भरपूर प्रमाणात न मिळाल्यास अंड्यावरील कवची पातळ होते व अंडीं जरा धक्का

लागला तरी फुटतात. म्हणून अंडीं चांगलीं व पुष्कळ मिळवींत अशी इच्छा असेल तर कोंबड्यांस भरपूर चुना मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे.

पांचवा मुख्य वर्ग म्हणजे द्रव पदार्थ होत. यात दूध, ताक, पाणी वगैरे पदार्थ येतात. पाण्याची आवश्यकता प्रत्येक प्राण्यास आहे त्याप्रमाणें ती पक्ष्यासहि आहे. कोंबड्यांनां पाणी ठराविक वेळेस पाजून चालत नाहीं. त्यांनां येतां जातां वरचेवर थोडथोडें पाणी पिण्याची संवय असते; म्हणून त्यांच्या आवारात पाण्याची सोय करून टेविली पाहिजे. पाण्याचें भांडें व आंतील पाणी स्वच्छ ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागते; कारण कोंबड्यास बरेचसे रोग घाणेरडे पाणी पाजल्यानें होतात. पाण्याच्या भांड्यात कोंबड्यांनीं पाय बुडवूं नयेत व त्यास स्वच्छ पाणी प्यावयास मिळावें या करिता पाण्याच्या भांड्यावर पत्र्याचें झाकण घालून त्यास कोंबड्याची चोंच जाईल येवढाली वाटोळी भोकें पाडावींत. म्हणजे त्यास त्यांतील पाणी सहज पिता येईल. या पाण्यात थोडासा कापूर मिसळल्यास पाण्याच्या स्वच्छतेबद्दल वादच रहाणार नाहीं.

मलई काढून घेतलेलें दूध शहरात पुष्कळ स्वस्त मिळतें तरी मधून मधून तें कोंबड्याना घातल्यास फार हितकर होतें. तसेंच ताक, दहीं वगैरेसारखे पदार्थ खेडेगावातील लोकानां बऱ्याच स्वस्त भावानें मिळतात. ते मधून मधून कोंबड्याना घातल्यास त्याजपासून उत्पन्न चांगलें मिळून त्या निरोगी बनतात. ताकाच्या योगानें कोंबड्याचें मास फारच रुचकर व नाजूक होतें. तसेंच त्यास अंडीं घालण्याची इच्छा जास्त उत्पन्न होते. म्हणून तो पदार्थ सवि सापडल्यास त्यास घालण्याविषयीं हयगय करूं नये. येथपर्यंत शास्त्रदृष्ट्या कोंबड्यांना घालावयाचे खाण्याचे किती वर्ग करतां येतील व त्याचे गुणधर्म काय याविषयीं सांगितलें; परंतु सर्वसाधारण मानानें पाहिलें तर कोंबड्याच्या खाण्याचे मुख्य दोन वर्ग करता येतील:—एक सुकें अन्न व दुसरा ओलें (भिजवलेलें अन्न), सुकें अन्न, धान्य वगैरे देणें झाल्यास ते भाताच्या पेंढ्यांत, गवतात किंवा रेतींत पसरून टाकावें म्हणजे तें खाणें शोधून काढण्यास कोंबड्यास बरीच मेहनत करावी लागेल व त्याचा परिणाम अर्थातच शरीरावर चांगला होईल परंतु अन्न ओलें असल्यास तें जमिनीवर न टाकतां भांड्यांतून घालावें व हीं भांडीं नेहमीं स्वच्छ ठेवावींत. कोंबड्यांना अन्न किती व कोणतें घालावयाचें हें बहुताशीं ऋतुमानावर, कोंबड्यांच्या भोंवतालच्या परिस्थितीवर व त्यांजपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून राहील जास्त उत्पन्न देणारीं जीं कोंबडीं असतील त्यास चागलें व भरपूर खाणें घालावयाचें व इतर कोंबड्यांस साधारण मानानें घालावयाचें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तसेंच कोंबड्यास चरण्याकरितां भरपूर आवार असेल तर त्या मानानें खाण्याचें मान कमी करावयाचें व त्यांस अगदीं मर्यादित जागेंत ठेवावयाचें असेल तर खाणें भरपूर घालावयाचें हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रत्येक खेपेस दर कोंबडीस जें खाणें घालावयाचें त्याविषयीं सर्वसाधारण नियम म्हणजे 'तीं जेवढें अन्न उत्सुकतेनें व अधाशीपणानें खाईल तेवढेंच अन्न दर वेळेस घालावयाचें" हा होय. पुढें टाकलेलें अन्न खाण्यांत कोंबडीकडून दिरंगाई दिसूं लागली कीं अन्न घालणें बंद करावें. कोंबड्यानां मर्यादित जागेंत ठेविलें असें धरून चालल्यास त्यास भरपूर खाणें द्यावें लागेल असें वर सांगितलें आहे. हें खाणें दिवसातून तीन वेळ दिलें पाहिजे. मात्र हें देताना तें पचविण्यास कोंबड्या काहीं मेहनत करतात कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे नाहींतर चागलें पौष्टिक अन्न भरपूर मिळून त्या मानानें मेहनत न झाल्यास कोंबड्याच्या शरीरात मेद वाढून त्या अंडीं घालण्याच्या कामीं अगदीं निरुपयोगी ठरतील. सकाळीं द्यावयाचें खाणें बऱ्याच अंशानें सात्विक असावें व त्यात पाचहि वर्गांतील पदार्थ थोडथोड्या प्रमाणात मिसळलेले असावेत. उदाहरणार्थ गहूं, यव किंवा सातु याचा भरडा दुधात अगर ताकात भिजवून साधारण ओलसर करावा. त्यात थोडे मासाचे शिजलेले तुकडे, कांद्याचे किंवा इतर वनस्पतींचे तुकडे, थोडें मीठ, ताज्या कोळशाची थोडी पूड, हाडाचा चुरा वगैरे जिन्नस घालावेत. हें अन्न फार देऊं नये. कारण तें जास्त दिल्यास आमांश, हगवण वगैरे रोग होण्याचा संभव असतो. मधून मधून हें अन्न बंद करून त्याच्या ऐवजीं नुसतें भात अगर अशा प्रकारचें एखादें धान्य द्यावें. दुसरें खाणें निवळ धान्याचेंच असावें. व वरचेवर निरनिराळें धान्य मिसळून द्यावें. दुकानदाराच्या दुकानात मोजताना सांडलेलें निरनिराळें मिसळलेलें धान्य पुष्कळ स्वस्त दरानें मिळण्याचा संभव आहे. तरी त्याचा उपयोग केला तरी चालेल. हें अन्न सुकेंच खावयास घालावें. तिसरें खाणें संध्याकाळीं घालावयाचें तें मात्र पुन्हा कसदार असावें. कारण त्या अन्नावर त्यास सबंध रात्र काढावयाची असते. प्रत्येक कोंबडीस साधारण मानानें एक औंस पासून दोन औंस पर्यंत खावयास घालण्यास मुळींच हरकत नाहीं.

कोंबड्याकरितां जागा व घरें.—कोंबड्यांचा धंदा मोठ्या प्रमाणावर करावयाचा असल्यास ज्याप्रमाणें त्याच्या अन्नासंबंधीं काळजी घेतली पाहिजे त्याचप्रमाणें त्यांनां ज्या ठिकाणीं ठेवावयाचें ती जागा त्यांच्या वाढीस योग्य आहे कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानातील हवामान साधारण मानानें कोंबड्यांच्या वाढीस हितावह आहे. फक्त त्यानां ज्या जागीं ठेवावयाचें ती जागा व त्यांजवर बांधावयाचीं घरें हीं नीट विचारपूर्वक बांधलेलीं असलीं म्हणजे झालें. मुख्यत्वेंकरून ज्या जागेंत पाण्याचा निचरा चांगला होतो व जी जागा उंचवट्यावर असते, तसेंच ज्या जागेंत चुना, कंकर वगैरे फार सांपडतो ती जागा घरें बांधावयास चांगली. दलदलीची व चिकणवट जमीन कोंबड्यांच्या

वाढीस विघातक आहे. कोंबड्यांच्या घरास उत्तम जागा पसंत करावयाची असल्यास एखाद्या टेंकडीची दक्षिण अगर आग्नेय बाजू पसंत करावी, कारण कोंबड्यांना उत्तरेकडून व पूर्वेकडून वहाणारा थंड वारा मानवत नाहीं. कोंबड्या व इतर पाळीव पक्षी हे जात्या फार नाजुक असल्यामुळें त्यांचें थंडी, ऊन, पाऊस वगैरे पासून संरक्षण करणें अवश्य आहे; व याकरितां कोंबड्यांच्या घरास जोडून एखादी पडवी (निवासस्थान) काढावी. या पडवीची पश्चिम बाजू बंद करावी म्हणजे पाऊस, ऊन वगैरेपासून कोंबड्यास बाधा होणार नाहीं. तसेंच कोंबड्यांच्या घरापुढील चरावयाचें अंगण विस्तृत असल्यास त्यांत लहान झाडें लावावींत म्हणजे त्यांच्या आश्रयास कोंबड्या येऊन बसतील. झुडपें लावणें शक्य नसेल तर कळकाच्या ६।७ फूट लांब व ४।५ फूट रुंद ताटया करून त्यास बांबूचे टेंकू देऊन त्या ठिकठिकाणीं उभ्या कराव्यात म्हणजे त्यांच्या आसऱ्यास कोंबड्या येऊन बसतील. येणेंप्रमाणें कोंबड्याच्या घराकरिता जागा पसंत करून झाल्यावर त्यावर घर दक्षिणाभिमुख बांधावें. ज्या मानानें कोंबड्यांची संख्या ठेवावयाची असेल त्या मानानें घरें लहान अगर मोठीं बांधावीं लागतील. पांच फूट लांब, पांच फूट रुंद व सहा फूट उंच येवढ्या जागेंत मोठीं पांच कोंबडीं चांगल्या रीतीनें राहूं शकतात. कांहीं लोक एवढ्या जागेंत वीस पर्यंत कोंबडीं कोंडून ठेवितात परंतु त्यायोगानें त्यांच्या प्रकृतीस अपाय होतो आणि अंडीं घालण्याचें प्रमाणहि फार कमी होत जातें. तसेंच इतकीं कोंबडीं एके ठिकाणीं ठेवल्यास त्यांच्यांत मारामाऱ्या होऊन अशक्त कोंबड्यांस व पिलांस त्याचा परिणाम भोगावा लागतो. असो. कोंबड्याकरितां घरें बांधावयाचीं तीं ज्या मानानें द्रव्याची सोय असेल त्या मानानें विटांचीं, फळ्यांचीं किंवा मातीचीं बांधावींत. विटाचीं बांधलेलीं घरें पुष्कळ काळपर्यंत टिकतात. परंतु प्रथमतः खर्च पुष्कळ करावा लागतो. विटाच्या भिंतींना आतून व बाहेरून सिमेंटाचा गिलावा करावा म्हणजे कोंबड्याच्या शरीरावरील कृमींस रहाण्यास. जागा मिळणार नाहीं. फळ्यांचीं घरें कमी खर्चाचीं असून तीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं ओढून नेण्यास सांपडतात. या घरास वरचेवर डांबर, चुना वगैरे लावल्यास तीं पुष्कळ वर्षे पर्यंत टिकतात व त्यात कृमींची उत्पत्ति होत नाहीं. मातीचीं घरें फार दिवस टिकत तर नाहींतच परंतु त्यांत उलट उंदीर, घुशी, साप वगैरे प्राण्यांस रहाण्यास जागा मिळते. हे प्राणी लहान पिल्लांनां मारण्यास कमी करीत नाहींत. तसेंच अंडीं वगैरे घरांत ठेवलेलीं असल्यास ते तीं उचलून नेतात. म्हणून होतां होईतों मातीचीं घरें बांधूं नयेत. कोंबड्यांना कधींकधीं संसर्गजन्य रोग होतात व त्यांस उपाय म्हणजे रोगानें पछाडलेल्या कोंबड्यास निरोगी कोंबड्यांपासून निराळें ठेवणें हाच होय. म्हणून एक मोठें घर बांधण्याऐवजी लहान लहान घरें एकमेकांपासून अंतरावर बांधल्यास उत्तम. कारण आजारी कोंबड्यांस एका घरांतून काढून दुसरीकडे नेऊन ठेवण्यास सोपें जातें व अशा रीतीनें संसर्गजन्य रोगाच्या वाढीस पुष्कळ प्रतिबंध होतो.

पक्षिगृहाचें छप्पर कौलारू किंवा फळ्यांचें असावें, पत्र्याचें असूं नये, कारण दोनप्रहरीं उन्हानें पत्रे तापून आंत उष्मा फार होतो. पत्र्यांचाच उपयोग करणें झाल्यास निदान त्यांजवर गवत वगैरे घालावें छप्पर व भिंत यांमध्यें रहाणारी फट बंद करावी; नाहींतर तीतून उंदीर, मांजर, सर्प वगैरे प्राण्यांस आंत जाण्यास मार्ग मिळतो. पक्षिगृहांतील हवा खेळती रहावी व त्यांत भरपूर उजेड असावा म्हणून त्यांस खिडक्या ठेऊन त्या तारेच्या जाळीनें बंद कराव्यात. पक्षिगृहाचा दरवाजा लांकडी चौकटीचा व एक मनुष्यास आंत जातां येईल एवढा मोठा असावा. त्याचें दारहि तारेच्या जाळीचेंच केलेलें असावें. पक्षिगृहांतील जमीन चांगली पक्की असावी व त्याजवर सिमेंट केलेलें असावें. या जमिनीवर नेहमीं वाळू किंवा दोन इंच जाडीचा मातीचा थर असावा. यांवर पडलेली शीट दररोज काढून एके ठिकाणीं सांठवावी. म्हणजे तिचा खतासारखा उपयोग करता येईल. ही वाळू अगर माती दर १५ दिवसांनीं बदलावी. पक्षिगृहांत एकंदर तीन किंवा चार निरनिराळे भाग करावे. एका भागांत फक्त मोठे पक्षीच ठेवण्याची व्यवस्था असावी. या भागांत कोंबड्यांना बसण्याकरितां बांबूच्या काठ्या भिंतीत बसविलेल्या असाव्यात. जमिनीवर माती हांतरणें व काढणें त्रासाचें वाटत असेल तर काढतां घालतां येतील असे पत्रे खालीं जमिनीवर हांतरावे व ते रोज सकाळीं बाहेर काढून झाडून धुवून नंतर पुन्हा आंत ठेवावे. दुसरा भाग अंडीं उबवणाऱ्या कोंबड्याकरितां राखून ठेवावा. या भागांत एक फूट लांब, व एक फूट रुंद व एक फूट उंच अशीं लहान लहान घरटीं त्यात पेंढा किंवा माती घालून ठेवलेलीं असावींत. त्यात अंडीं उबविण्याकरितां मांडावींत. खुडका आलेल्या कोंबड्या आपल्या घरट्यात जाऊन अंड्यावर बसून तीं उबवितील. या भागास जोडून एक स्वतंत्र आवार असावें व तें सर्व बाजूंनीं बंद असावें.म्हणजे त्यात फक्त खुडका आलेल्या व अंडीं घालणाऱ्या तेवढ्याच कोंबड्या ठेवतां येतील व त्यास इतर कोंबड्यापासून विनाकारण त्रास होणार नाहीं.

तिसरा भाग पिलांकरितां राखून ठेवावा. व त्यात महिन्यापासून दीड महिना वयापर्यंतचीं कोंबडीचीं पिलें ठेवावींत. पिलांना बांबूचे काठीची जरूर लागत नाहीं. या भागास जोडून असणारें आवारहि स्वतंत्र असावें. व याची वरची बाजूहि जाळ्यानें झाकलेली असावी. कारण पिल्लांना कावळे घारी वगैरेपासून फार भीति असते. याच भागात धान्यमंजूषा, शुष्कीकरणमंजूषा वगैरे असाव्यात. प्रत्येक भागांतील आवारात धूलिकास्नानाकरितां सोय केलेली असावी. तसेंच पाणी, चुना, गारेचे खडे, जाडी रेती वगैरेंचाहि भरपूर पुरवठा असावा. पक्षिगृह बांधणें झाल्यास तें खालीं दिलेल्या प्लॅनवर बांधावें.

पक्षिगृह

पिलांची खोली १०'×१०'	+ / ÷	पडवी १०'×२०'	मोठ्या पक्ष्यास × १०'×१०'
अंगण १००'×१०'	अंगण १००'×१०'	पांचपासून दहा कोंबडी अंगण. १००'×३०'	

खुणांचें स्पष्टीकरण:-*=खिडकी; ×=दरवाजा; +=अंडीं उबविण्याचीं घरटीं; ÷=अंडीं उबविण्याची खोली १०'×१०'.

वर दिलेल्या घरात दहा कोंबड्या चांगल्या रीतीनें राहूं शकतात. सदर रीतीनें घरें बांधणें फारच खर्चाचें आहे. म्हणून यापेक्षां स्वस्तांत घरें पाहिजे असल्यास तीं खालील प्रमाणें करावीत. सहा फूट लांब तीन फूट रुंद व चार फूट उंच एवढा एक खोका घ्यावा. त्याच्या तळास व तीन बाजूंस फळ्या असाव्यात व पुढची बाजू व वरची बाजू तारेच्या जाळीनें बंद करावी. वरच्या व जुन्या तारेच्या जाळीची चौकट करून ती बिजागऱ्यांनीं बसवून टाकावी. म्हणजे तें झांकण ट्रंकच्या झांकणासारखें उघडतां येईल. या पेटीच्या पुढील बाजूसहि एक लहानसें दार असावें म्हणजे कोंबड्यांनां त्यातून आत बाहेर जातां येईल. या पेटींत सहा इंच उंचीवर एक बांबूची काठी बसविलेली असावी. ही पेटी कोठें तरी सावलींत ठेवावी. असल्या एका पेटींत ५-६ कोंबड्या राहूं शकतात. पेट्या स्वच्छ ठेवण्याची फार खबरदारी घेतली पाहिजे.

पक्षिगृह बांधल्यानंतर तें स्वच्छ ठेवण्याविषयीं फार खबरदारी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणें पक्षिगृहांतील इतर वस्तु, कोंबड्यांचीं घरटीं, पाखरें, बासयष्ट्या, खाण्याचीं व पाणी पाजण्याचीं भांडीं वगैरे सामान रोजच्या रोज धुवून स्वच्छ ठेविलें पाहिजे म्हणजे कृमींचीं उत्पत्ति किंवा वाढ फार होणार नाहीं.

कोंबड्यांचे मुख्य शत्रू म्हणजे उंदीर, साप वगैरे होत. घरें बरोबर रीतीनें बंद केलेलीं नसल्यास ते आंत शिरून अंडीं पळवितात व लहान पिलांनां मारून खातात. भिंती वगैरे चांगल्या बांधलेल्या असल्यास ते आपला मार्ग जमिनींतून काढतात. यास आळा घालण्याकरितां पक्षिगृहांतील जमीन खालील पद्धतीनें करावी.

जमिनीत व सभोंवतालच्या भिंतीस तीन फूट पुरेल एवढें तारेचें जाळें घेऊन तें पक्षिगृहांत पसरावें व त्यावर चार इंच जाडीचा मातीचा किंवा वाळूचा थर द्यावा व सभोंवतालच्या भिंतीस सिमेंटचा गिलावा करावा. जाळ्याच्या ऐवजीं पत्रे घातले तरी चालतात. जमीन करण्याची दुसरी पद्धत आहे ती अशीः- जमीन एक फूटपर्यंत खोल खणून तींतील माती बाहेर काढून ठेवावी. नंतर सहा इंच जाडीचा वाळू व कोळसे यांचा थर करावा व पुष्कळ पाणी घालून तो ठोकून काढावा. नंतर त्यावर बारीक मुरूम पसरून त्यात डांबर ओतावें व ती जमीन कठिण व गुळगुळीत होईपर्यंत ठोकावी. म्हणजे तींत उंदरांना बिळें करतां येणार नाहींत.

येणेंप्रमाणें घरें बांधून झाल्यावर कोंबड्यांचीं अंडीं उबविण्यास लागणारीं साधनें, त्यांना खाणें व पाणी यांसाठीं लागणारीं भांडीं, तसेंच त्यांचें खाणें सांठवून ठेवण्याचें कांहीं तरी साधन वगैरे गोष्टींची तजवीज करावयास पाहिजे. अंडीं उबविण्याचें काम यंत्राच्या सहाय्यानें करावयाचें असेल तर त्याकरितां स्वतंत्र खोली असावी. या खोलींत हवा, उजेड वगैरे विपुल असावा. तसेंच उष्णतामानमापक यंत्र व हवेंतील सर्दपणा मापण्याचें यंत्र हीं या खोलींत असावींत. खाणें घालण्याचीं भांडीं नेहमीं रुंद तोंडाचीं व लांकडी असावींत व त्यांस आतून पत्रा मारलेला असावा. त्यांजवर झाकणाची सोय असावी. कोंबड्यांना खाणें घालण्याची खोली स्वतंत्र असून खोलींत जें खाणें घालावयाचें तें सुकें असल्यास चोंहोंकडे फेंकावें व ओलें असल्यास भांड्यात घालावें. पाण्याच्या बादल्या, फवड्या, टिकाव वगैरे साधनें नेहमीं तयार असावीं. भाज्या वगैरे पदार्थ शिजवून घालावे लागतात तरी त्यांचीहि व्यवस्था असावी.

पुंस्त्वहरण.—कोंबड्यांचें जननेंद्रिय काढून घेणें यास 'पुंस्त्वहरण' असें म्हणतात. जनावरांमध्यें याचा प्रघात बराच आहे आणि त्याजपासून फायदा होत असल्यामुळें आजकाल सर्व शेतकरी लोक बैलाच्या बाबतींत त्यांचा फार उपयोग करीत आहेत. पक्ष्यांच्या बाबतींत सुद्धा पुंस्त्वहरणक्रिया साध्य होते ही गोष्ट कदाचित् कांहींनां चमत्कारिक वाटेल परंतु पाश्चात्य देशामध्यें याचा अनुभव पुष्कळांनीं घेतलेला आहे व त्याजपासून द्रव्यदृष्टीनें इतर बाबतींतहि बराच फायदा होतो असाहि अनुभव आहे. असो. पुंस्त्वहरण केल्यानें कोंबडे लठ्ठ होतात, त्यांचें वजन वाढतें आणि त्याचें मांस रसदार व अधिक नाजूक बनतें. अर्थात् त्यांची किंमत अधिक येते. जे कोंबडे पांचसहा महिन्यांचे झालेले असतील व ज्यांनां विकून टाकावयाचा आपला बेत असेल अशाच कोंबड्यावर ही क्रिया करावी. ही क्रिया करण्यास योग्य काळ म्हणजे हिंवाळा होय ही क्रिया करण्यापूर्वी तीस लागणारीं हत्यारें, पाणी वगैरे जिन्नस जवळ घेऊन बसावें व नंतर क्रियेस आरंभ करावा. ही क्रिया करावयास जें शस्त्र घ्यावयाचें तें तीक्ष्ण असावें. डॉक्टर लोकांचा एक बांकड्या

पातीचा चाकू असतो तो या कामीं फार चांगला. याखेरीज एक बळकट टांके घालण्याची सुई व मेण लावलेला दोरा किंवा वकऱ्याची तात या वस्तू सन्निध ठेवाव्यात शस्त्रप्रयोग करतांना दोन मनुष्यांची जरूर लागते. शस्त्रक्रिया करणारा मनुष्य एका खुर्चीवर बसतो व कोंबड्याला आपल्या मांडीवर त्याच्या (कोंबड्याच्या) उजव्या बाजूवर निजवितो. असें केल्यानें कोंबड्याची पाठ शस्त्रक्रिया करणाऱ्या मनुष्याकडे वळते व कोंबड्याची डावी बाजू वरच्या बाजूस येते. (कोंबड्यास मांडीवर घेण्याच्या ऐवजीं एखाद्या टेबलावर निजवावें. या टेबलाच्या फळीस लहान भोकें पाडलेलीं असावीत. कोंबड्यास निजविल्यावर त्याचे पंख एका बाजूस करून त्यावरून दोरी बांधावी व ती पंखाजवळ असलेल्या भोंकातून ओवून तीस खालीं वजन असावें. अशीच एक दोरी पायावरून व मांड्यांवरून घेऊन तेथें असलेल्या भोंकांतून ओवून घ्यावी म्हणजे कोंबडा जागच्या जागीं बांधला जाऊन दुसऱ्या मनुष्याची जरूर लागणार नाहीं.) नंतर दुसरा मनुष्य कोंबड्याची उजवी तंगडी व मांडी त्याच्या छातीबरोबर ओढून दुसरी तंगडी शेपटीकडील बाजूस ओढून धरतो. कोंबड्याचें 'वृषण' त्याच्या आतड्याखालीं पाठीच्या कण्याजवळ असतें व तें त्यास चिकटलेलें असतें हें काढून घेण्याकरितां शेवटच्या 'बरगडी' जवळ तिला समांतर अशी एक चीर पाडावी लागते. ही चीर पाडण्यापूर्वी डाव्या कुशीवरील सर्व पिसें काढून टाकावींत. नंतर शेवटच्या बरगडीच्या पाठीमागें सुई टोंचून तिच्या योगें तेथील कातडें वर उचलावें व शेवटच्या बरगडीस लागून चाकूनें चिरावें. कातडें वर उचलल्यानें आंतील आंत्रानां धक्का लागत नाहीं. ही जखम आंत बोट शिरेल एवढी मोठी असावी. जखम रुंद रहावी व आंतील भाग स्पष्ट दिसावे म्हणून स्प्रिंग असलेलें चिमट्यासारखें एक हत्यार वापरावें. या जखमेंतून आंत्राचा एखादा भाग वर आल्यास तो काळजीपूर्वक आंत जागच्या जागीं बसवावा. नंतर या जखमेंत करांगुळी किंवा करांगुळीच्या ऐवजीं कित्येक वेळां एक प्रकारचा पुढें चीर असलेला चमचा वापरण्यांत येतो. हा चमचा आंत वृषणाच्या खालीं घालावयाचा व वृषणास जोडून असलेली रक्तवाहिनी चमच्याच्या भेगेंत येईल अशी खटपट करावयाची; आणि नंतर चमचा एका बाजूस फिरवून आंत पीळ पाडून वृषण तोडावयाचें. करांगुलीनें वृषण काढण्यापेक्षा ही पद्धत चांगली. कारण यांत वृषण निसटून जाण्याची भीति नसते. वृषणाची योग्य जागा सांपडल्यास तें बोटाला लागतें. व तें चार महिन्याच्या वयाच्या कोंबड्याचें साधारणपणें घेवड्याच्या मोठ्या बियाएवढें असतें. तें इकडेतिकडे हालण्यासारखें असतें व बोटानें धरावयास गेल्यास निसटून जाण्याचा संभव असतो. हें वृषण करांगुलीला लागलें म्हणजे हलकेंच ओढावें व कण्यापासून वेगळें करावें. वृषण बाहेर काढतांना तें हातांतून निसटून आंत्रांत न जाईल अशी खबरदारी घेतली पाहिजे. वृषण शरीरांत राहिल्यास फारसा अपाय होत नाहीं. परंतु तें काढून टाकलेलें चांगलें. कारण त्यापासून शरीर सुजण्याचा संभव असतो. येणेंप्रमाणें डावीकडील वृषण काढल्यावर त्याच पद्धतीनें उजवीकडील वृषण काढावें. दोन्ही बाजूंचीं वृषणें काढून झाल्यावर जखमेचें तोंड सारखें जोडून त्यास ठिकठिकाणीं टांके मारावेत. प्रत्येक टाका निरनिराळा मारण्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. तसेंच ते मारतांना आंतील आंत्रांना धक्का न लागेल अशी काळजी घेतली पाहिजे. शस्त्रक्रिया पुरी झाल्यावर कोंबड्यास स्वतंत्र व शांत अशा ठिकाणीं तारेच्या पिंजऱ्यात ठेवावें व त्यास पाणी व मऊसर अन्न खावयास घालावें. भाकरी दुधात भिजवून घातली असता चांगली. कांहीं थोडे तास लोटल्यानंतर त्याची त्यास पूर्ण मुभा द्यावी; मात्र त्यास इतर कोंबड्यांत मिसळूं देऊं नये आणि त्यास रात्रीं एखाद्या टोपलीखालीं अगर पाटऱ्याखालीं झाकून ठेवावा. अशा रीतीनें चारपांच दिवस गेल्यानंतर त्यास लठ्ठ करण्याकरितां पीवरीकरणमंजूषेंत (फॅटिंग बॉक्स) ठेवावें. ही मंजूषा खालीलप्रमाणें करावी. सहा फूट लांब, सवा फूट रुंद व दोन फूट उंच एवढा एक खोका घेऊन त्यांत सारखे चार कप्पे पाडावेत. त्यांच्या तिन्ही बाजूस फळ्या असून चवथ्या बाजूस तारेची जाळी किंवा लोखंडी सळ्या माराव्या. पेटीच्या बुडाशीं फळ्या न बसविता लोखंडी गज बसवावेत. व त्याच्याखालीं एक खण काढतां घालतां येण्याजोगा कोंबड्याची शीट गोळा करण्याकरितां असावा. प्रत्येक कप्प्यांत एक कोंबडा ठेवावा. ही पेटी एका अंधाऱ्या खोलींत ठेवावी. किंवा उजेडात ठेवल्यास तीवर झांकण घालावें. या पेट्या नेहमीं स्वच्छ ठेवण्याची खबरदारी ठेवली पाहिजे. या कोंबड्यानां जें खाणें घालावयाचें तें अंगात चरबी उत्पन्न करणारें असलें पाहिजे. मका, सातूचें पीठ, शिजलेला भात, तांदुळाचा अगर गव्हाचा कोंडा, बटाटे, लाक व इतर ताज्या व कोंवळ्या वनस्पति यांच्या अंगीं वरील गुण असल्यामुळें वरील पदार्थ आलटूनपालटून खावयास घालावेत. तांदुळाचा अगर गव्हाचा कोंडा पाण्यांत कालवून त्यांत भिजलेले बटाटे घालून द्यावा. कधीं कधीं कोंड्यामध्यें सातूचें किंवा मक्याचें पीठ मिसळून तें पाण्यांत चांगलें शिजवितात व थंड झाल्यावर कोंबड्यांस खाऊं घालतात. सदर खाणें खाऊं घालण्याची एक विशिष्ट पद्धत आहे ती अशीः—एका वाटोळ्या उंच किंवा फनेलच्या आकाराच्या भांड्यात सातूचें व इतर कांहीं पदार्थांची पिठ घालून तीं दुधांत कालवून पातळ करून नंतर त्यांत थोडी चरबी घालतात. सदर दूध किंचित आंबलेलें असावें. हें मिश्रण चांगलें ढवळून तयार करतात. या भांड्यास एक तोटी लावलेली असते व तीस एक रबराची नळी एक फूट लांब लावून तिच्या तोंडास पितळेची नळी बसविलेली असते. कपडे शिवण्याच्या यंत्रांत जशी पायानें यंत्र फिरविण्याची योजना

केलेली असते. तशी योजना यांतहि केलेली असते. पाय दाबूं लागले म्हणजे भांडयास जोडलेल्या पंपाच्या सहाय्यानें भांडयांतील अन्न नळींत उतरतें. कोंबडयाचें डोकें डाव्या हातानें धरून उजव्या हातानें रबराच्या नळीस लावलेली पितळेची नळी त्याच्या गाज्यांत (क्रॉप) तोंडातून घालतात. व यंत्र फिरविण्यास आरंभ करतात. अर्थातच भांडयांतील पातळ अन्न एकदम नळीच्या वाटे गांजांत जातें. गांजा भरला म्हणजे त्या कोंबडयास पुन्हां त्याच्या जागीं ठेवतात. याप्रमाणें प्रत्येक कोंबडयास खाणें ते घालतात.

कोंबडयास दिवसातून चार वेळ खाणें घालावें लठ्ठ होण्याकरितां ठेवलेल्या कोंबडयानां पाणी फार लागतें. म्हणून त्याचा पुरवठा नेहमीं केला पाहिजे. कोंबडयांना व्यवस्थित रीतीनें खाणें घातल्यास त्यांचें वजन दर आठवड्यास एक दोन पौंड तरी वाढलें पाहिजे. दोन तीन आठवडे कोंबडयांस पीवरीकरणमंजूषेंत ठेवलें म्हणजे ते विक्रीस तयार होतात

सर्वच कोंबडे पीवरीकरणमंजूषेंत लठ्ठ होतात असें नाहीं; तर कांहींची उलट स्थिति होते. म्हणजे ते लठ्ठ न होता कृश होत जातात. म्हणून कोंबडयाचें वरचेवर वजन घेतलें पाहिजे. ही पीवरीकरणाची पद्धत पुंस्त्वहरण केलेले व तरुण कोंबडे यानां जितकी लवकर लागू पडते तितकी ती म्हाताऱ्या किंवा अशक्त कोंबड्यांनां लागू पडत नाहीं म्हणून ही ज्यास मानवेल असेच कोंबडे पसंत केले पाहिजेत.

वृषण काढलेले कोंबडे अगदीं गरीब व मंद होतात. त्यांस भांडण वगैरे आवडत नाहीं. त्याची शिंगोरी (शेंडी) व गलुल (कल्ले) हीं कमी कमी होत जातात व त्यांचा लाल रंगहि नाहींसा होतो. यांचें मांस फार नाजूक बनतें व ते चांगले लठ्ठ होतात. अर्थात् त्यांस किंमतहि जास्त येते. ते चांगले तयार झाले म्हणजे त्याचा पिसारा फार चकचकीत व सुंदर दिसतो. कधीं कधीं हे कोंबडे इतके माणसाळतात कीं त्यांचा पिलें संभाळण्याकडे उपयोग करून घेतात येतो. याचा मुख्य उद्योग सगादून खाणें व शक्य तितकें वाढणें हा असतो. खालील जातींच्या पिलानां वृषण काढणें विशेष मानवतें.

(१) ससेक्स; (२) बफ ऑरपिंग्टन; (३) प्लायमैाथ रॉक. (४) लाइट ब्रह्मी.

जातीची निवड व सुधारणा.--कोंबडया व इतर पाळीव पक्षी बाळगणारे लोक धंदा सुरू करण्यापूर्वी कांहीं तरी विशिष्ट हेतूनें हे पक्षी बाळगीत असतात. उदाहरणार्थ कांहीं लोक धंदा या दृष्टीनें कोंबडया वगैरे न बाळगता त्यांच्या दिखाऊपणामुळें व नाजुकपणामुळें त्या बाळगितात. अर्थात् मग ते या प्रकारच्या कोंबडयांपासून फायदा होतो कीं नुकसान होतें इकडे मुळींच लक्ष देत नाहींत. दुसरा एक वर्ग असा निघेल कीं त्या लोकाचा हेतु दुहेरी असूं शकेल. म्हणजे ते साधल्यास दिखाऊ कोंबडयाहि बाळगतील व उत्पन्नहि घेतील. तिसरा असा एक वर्ग आहे कीं त्यातील लोक निव्वळ फायद्याच्याच दृष्टीनें कोंबडया बाळगितात. त्यांत सुद्धां जे लोक फक्त अंडयांचाच धंदा करणारे असतील ते अंडी घालणाऱ्या कोंबडयांचाच तेवढ्या बाळगतील व जे कोंबडया तयार करून विकणारे लोक असतील ते लठ्ठ होणाऱ्या कोंबडयांच्या जाती बाळगतील. तात्पर्य ज्या हेतूनें कोंबडया पाळावयाच्या असतील त्यास योग्य अशा जातींचीच निवड होणें अवश्य आहे.

कोंबडयांच्या एकंदर जाती किती, त्यांतील हिंदुस्थानांत बाळगण्यास लायक किती आहेत वगैरे गोष्टींचा विचार करण्यापूर्वी वर सांगितलेल्या निरनिराळ्या हेतूंस योग्य अशा कोणकोणत्या जाती आहेत. त्यासंबंधीं प्रथम विचार करूं.

दिसण्यात सुंदर व नाजुक जातीः—(१) स्पॅनिश कोंबडी (२) पोलिश जातीची कोंबडी (३) ब्यांटम्स (४) डॉर्किंग. (५) हौडन. या जाती दिसण्यांत जरी फार सुंदर असतात तरी त्याच्या नाजुकपणामुळें त्याचे संगोपन करणें हिंदुस्थानात फार कठीण जातें. पहिल्या दोन दोन जातींच्या कोंबडयाची अंडीं अगदीं कमी प्रतीचीं व पांढऱ्या कवचीचीं असतात. ब्याटम कोंबडयांचीं अंडीं जरी लहान असतात तरी तीं फार स्वादिष्ट असतात. ब्यांटम कोंबडया जात्या फार गरीब असल्यामुळें अंडीं उबविण्यास फार योग्य असतात. हौडन जातीच्या कोंबडया हिंदुस्थानात विशेषेंकरून जेथें कोरडी हवा आहे अशा ठिकाणीं वाढूं शकतात. याना खुडका लौकर येत नाहीं. म्हणून यांचीं अंडीं दुसऱ्या कोंबडयाखालीं उबवावीं लागतात.

(२) हौसची हौस व घरची गरज भागेल एवढें उत्पन्न मिळावें अशी इच्छा असल्यास खालील जातींपैकीं कोणत्याहि पसंत कराव्यात. (१) ब्रह्मी (बर्मा), (२) कोचीन, (३) लॅंगशान, (४) ऑरपिंग्टन, (५) प्लायमौथरॉक, (६) वायंडाट (७) सिल्कीज. नंबर एक, दोन, तीन व पाच या जाती स्थूलदेही असल्यामुळें जरी शांत व गरीब स्वभावाच्या असल्या व अंडीं उबविण्यास योग्य असल्या तरी त्याचा अवजडपणाच या कामीं आड येतो. कारण त्यांच्या वजनानेंच पुष्कळ वेळां अंडीं फुटतात. नंबर सहा व सात या तितक्या अवजड नसल्यामुळें व त्यांचा स्वभाव शांत असल्याकारणानें व त्यांस खुडका धरतो म्हणून त्यांचा अंडीं उबविण्याचे कामीं फार उपयोग होतो. नंबर चारच्या कोंबडया खुडका मुळींच धरीत नाहींत यामुळें त्यांची अंडीं दुसऱ्या कोंबडयाखालीं उबविणें भाग पडतें.

(३) विक्रीकरितां कोंबडीं तयार करावयाचीं अशा हेतूनें जेव्हां कोंबडीं बाळगावयाचीं असतील तेव्हां खालील जातींपैकीं निवड करावी. (१) चितागॉंग (२) लॅंगशान (३)

ऑरींपग्टन. (४) प्लायमौथरॉक (५) ब्रह्मा व (६) वायंडाट. यांच्या पिलांना पीवरीकरण मंजूषेत घालून खाणें घातलें असतां तीं ताबडतोब तयार होतात. चितागाँग जात फार रागीट असते. व रागाच्या भरांत आपलें पोर जवळ असलें तरी मारण्यास मागें पुढें पहात नाहीं. वरील जातींतील कोणत्याहि कोंबड्याचें तो दोन महिन्याचा असतांना पुंस्त्व हरण केल्यास तो लौकर तयार होतो.

(४) अंडीं पुष्कळ घालणाऱ्या व विक्रींत पुष्कळ किंमत येईल अशा कोंबड्या बाळगावयाच्या असतील तर खालील जातींपैकीं पसंत कराव्या. (१) ऑर्पिंग्टन, (२) लँगशन, (३) वायंडाट, (४) प्लायमौथ, (५) ब्रह्मा, (६) चितागाँग. यापैकीं कांहीं जाती अंगानें फार स्थूल असतात व कांहीं अगदीं लहान असतात. या जातींतील कोंबड्या अंडीं घालण्याच्या कामीं चांगल्या असें जरी सर्वसाधारण मानानें ठरलें आहे तरी सुद्धा त्यांमध्यें कधीं कधीं अपवाद दिसून येतात. तसेंच ज्या जातींचीं अंडीं घालण्याबद्दल मुळींच प्रसिद्धि नाहीं त्या जातींतील कोंबड्या अंडीं पुष्कळ घालतात असें आढळून येतें. परंतु साधारण मानानें विचार केल्यास असे दिसून येईल कीं अस्सल व शुद्ध जातीच्या कोंबड्या सहसा आपल्या जातीच्या ठरलेल्या गुणावगुणास अपवाद होत नाहींत, असो. वर जे एकंदर निरनिराळे वर्ग सांगितले आहेत त्या सर्वांचा एकसमयावच्छेदें विचार केला तर कांहीं जाती अशा आहेत कीं त्या वरील सर्व वर्गांत येतात असें दिसून येईल उदाहरणार्थ; लँगशन, ऑरपिंग्टन, ब्रह्मा, चितागांग, प्लायमौथ रॉक, वायंडाट वगैरे जाती थोडथोडया प्रमाणांत सर्व हेतु साध्य करतात व म्हणून कोणाहि साधारण मनुष्यास निवड करणें झाल्यास त्यानें वरील पैकीं कोणतीहि एखादी निवडावी.

हिंदुस्थानांतील कांहीं जाती.—हिंदुस्थानात ज्या जातींचा प्रसार विशेषेकरून झालेला आहे, त्यापैकीं लँगहॉर्न व हँबर्ग याच्या एवढ्या आहेत. ऑरपिंग्टन् ही जात अंडीं घालण्याच्या कामीं चांगली असल्यामुळें ती पुष्कळ पारशी व यूरेजिअन लोक घरच्या उपयोग करिता म्हणून बाळगतात. तसेंच कांहीं शोकी लोक लढवय्ये कोंबडे हौसेनें बाळगतात. चितागांग व गेम ह्या त्या जाती होत.बंगालमध्यें कोंबडयांची जी एक विशिष्ट जात दृष्टीस पडते ती आकारानें वायंडाट व प्लायमौथरॉक यांसारखी असते. परंतु ती जराशी लहान असते व निरनिराळ्या रंगांचा असते. या कोंबडया व चितागाँग कोंबडया यांचा संयोग केला असता होणारी प्रजा फार चांगली, मोटी व नाजूक अशी निपजते.

हिंदुस्थानच्या पश्चिम भागांत म्हणजे कोंकण, मुंबई वगैरेकडे साधारणपणें पावसाचें मान जास्त असल्यामुळें सर्व जातींची पैदास होणें शक्य नाहीं. अर्थातच बंगालच्या हवा मानास टिकणारी जात कदाचित् मुंबई व कोंकणांत टिकण्याचाहि संभव आहे. परंतु हल्लीं प्रचारांत अशी जी एकच जात दृष्टीस पडते ती वसरा ही होय. या जातीच्या कोंबडया अंडीं पुष्कळ घालतात; तीं आकारानें मोटीं असून त्याचा रंग तांबूस काळसर असतो व वजन सुमारें चार ते सहा तोळे पर्यंत असतें. कोणतींहि अंडीं चार तोळ्यापेक्षां वजनात कमी भरत असतील तर तीं चांगलीं नाहींत असें समजावें. वसरा जातीच्या कोंबडया अंगानें स्थूल असल्यामुळें त्यानां विशेष प्रकारचें खाणें दिल्यास तीं लठ्ठ होतात व त्यास किंमतहि बरी येते.

कोंबड्याच्या साधारणपणें बऱ्याच जाती असतांना हिंदुस्थानातील लोक त्यापैकीं निदान कांहीं जाता तरी पूर्ण काळजी घेऊन वाढवीत नाहींत; याचें कारण एक तर असें कीं, उच्च व अस्सल जाती घेणें सर्वसाधारण लोकाच्या आटोक्याबाहेरचें असते व दुसरें कारण म्हणजे चांगली व सशास्त्र पद्धतीनें कोंबड्याची पैदास कशी करावी याबद्दल कोंबड्या पाळणाऱ्या लोकांचें अज्ञान हें होय. स्वाभाविकपणें हलक्या किंमतीचीं कोंबडीं विकत घेण्याकडे त्याची प्रवृत्ति दिसून येते आणि कोणीकडून तरी थोडीशीं अंडीं व पिलें विकावयास मिळालीं म्हणजे तेवढ्यात समाधान मानतात. परंतु त्यानीं जर खालीं सांगितल्याप्रमाणें थोडेसे श्रम घेतले तर त्यास अस्सल जात सहज तयार करता येईल. व त्या मानानें त्यास अर्थातच किंमत जास्त मिळेल. ती पद्धत अशी:—उत्तम जातीचा व अस्सल बीजाचा कोंबडा व त्याच जातीच्या कांहीं कोंबड्या व इतर जातीच्या फक्त कोंबड्याच बाळगाव्यात. अस्सल जातीपासून मिळणारी अंडीं अर्थातच अस्सल असणार त्याजपासून पाहिजे तर जास्त उत्पत्ति करावी. इतर कोंबड्यांपासून निघणारीं अंडीं विकून टाकावींत अगर पिलांकरितां उबविण्यास ठेवावींत. मात्र पिलें साधारण मोटीं झालीं म्हणजे लगेच विकून टाकावींत. कारण त्या पिलापैकीं एखादा कोंबडा असल्यास तो वाढूं दिल्यास कदाचित् भेसळ होण्याचा संभव आहे. असे केल्यानें उत्तम जात कायम राखली जाईल

आपण जर खेडोंखेडीं हिंडून अस्सल जातीच्या कोंबड्या कोणाजवळ आहेत कीं काय याचा तपास करूं लागलों तर आपली अगदीं निराशा होते व जिकडे तिकडे गांवठी लहान व खुज्या कोंबड्या दृष्टीस पडतात. जास्त वजनाच्या कोंबडीस जास्त किंमत येते, तसेंच मोठ्या अंड्यास जास्त किंमत येते, या गोष्टी शेतकरी लोकांस माहीत असतांहि अंडीं किंवा कोंबड्या कशा सुधारतां येतील या गोष्टीकडे त्यांचें मुळींच लक्ष जात नाहीं. तरी खालील पद्धत अंमलांत आणल्यास कोंबड्यांची अवलाद सुधारून शेतकरी लोकांचाहि फायदा होईल: गांवठी कोंबड्यांचा चितागाग, लँगशन, आरपिंग्टन, वायंडाट किंवा ब्रम्ही या कोंबड्याशीं संयोग केल्यास होणाऱ्या प्रजेंत पुष्कळच सुधारणा होते. या गावठी कोंबड्यांपैकीं दहा बारा उत्तम कोंबड्या निवडून

त्यांच्या कळपांत वर निर्दिष्ट केलेल्या जातींपैकी कोणत्याहि जातीचे दोन कोंबडे सोडावेत. या कोंबड्यांपासून जी प्रजा होईल त्या प्रजेपैकीं कोंबडे तेवढे विकून टाकावेत. त्याचप्रमाणें बाकीचीं पिलें मोठीं झालीं म्हणजे पहिल्या कोंबड्याहि विकून टाकाव्यात. म्हणजे नवीन झालेलीं पिलें व कोंबडे शिल्लक रहातील. हीं पिलें पुढें वयात आल्यावर त्यांचा पुन्हा त्या कोंबड्यांशीं संयोग होईल व त्याच्या अंड्यापासून होणाऱ्या पिलामध्ये बापाचे बरेच गुण उतरतील. अशा रीतीनें वरचेवर संयोग करून कोंबड्याचे पूर्ण गुण कोंबडींत येईपर्यंत ही क्रिया चालू ठेवावी. म्हणजे अखेरीस सर्व प्रजा अस्सल जातीच्या वळणावर जाईल. कोंबड्यांचे संयोग दाखविणारें कोष्टक पुढें दिलें आहे:—

संयोगनंबर १:—

अस्सल कोंबडा × गांवटी कोंबडी.

मिश्रकोंबडे (विकावे) — मिश्रकोंबड्या.

संयोगनंबर २:—

अस्सल कोंबडा × मिश्रकोंबड्या.

मिश्रकोंबडे (विकावे.) — मिश्रकोंबड्या.

संयोगनंबर ३:—

अस्सल कोंबडा × मिश्रकोंबड्या.

मिश्रकोंबडे — मिश्रकोंबड्या.

संयोगनंबर ४:—

अस्सल कोंबडे × मिश्रकोंबड्या.

मिश्रकोंबडे — मिश्रकोंबड्या.

संयोगनंबर ५:—

अस्सल कोंबडा × मिश्रकोंबड्या.

मिश्रकोंबडे — मिश्रकोंबड्या.

याप्रमाणें संयोग केल्यावर निघणारी प्रजा मोठी व वजनानें भारी व अंडीं घालण्यात उत्तम निघेल हें सांगणें नको. इतर पाळींव पक्ष्यांच्या धंद्याचें महत्व इतर राष्ट्रांतील लोकांनां नुकतें कांहीं वर्षांपासून कळूं लागलें आहे. इंग्लंड, फ्रान्स, स्कॉटलंड, आयर्लंड, कानडा, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, बेल्जम, डेन्मार्क, स्वीडन, साउथ आफ्रिका वगैरे राष्ट्रांमध्यें हा धंदा मोठ्या प्रमाणांत करण्यांत येऊन तिकडे यासंबंधीं दर वर्षी प्रदर्शनेंहि भरतात. या प्रदर्शनांत उत्तम व अस्सल जातीच्या कोंबड्यांनां तसेंच उत्तम अंड्यांनां पदक वगैरे कांहीं तरी बक्षीस मिळतें. अशा तऱ्हेचीं प्रदर्शनें तिकडे वारंवार भरत असल्यामुळें कित्येक हौशी व श्रीमंत लोक पुष्कळ द्रव्य खर्च करून अस्सल जातींचें संगोपन करतात. इंग्लंडमध्यें सर्व श्रीमंत लोक, तसेंच लॉर्ड लोक यांनीं सुंदर व दिखाऊ जाती बाळगिल्या आहेत. एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष राजे साहेबांनींहि कोंबडी बाळगली आहेत. यावरून तिकडे लोकानां या धंद्याची किती गोडी लागली आहे तें सहज कळून येतें.

यूरोपखंडांतील बहुतेक लोक मांसाहारी असल्यामुळें या धंद्यास जास्त जोर आलेला असावा व मालाचा नेहमीं खप होत असल्यानें जितका माल अधिक उत्तम तितकी त्यास मागणी अधिक आणि अर्थातच किंमत अधिक. ही गोष्ट लक्षात आल्यामुळें लोकांचें मन या धंद्याकडे वळणें साहजीकच आहे. एकट्या ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल १५ कोटी रुपयाचा सदर माल खपतो. फ्रान्समधील एका प्रधानानें या धंद्यापासून देशात एकंदर किती पैसा उत्पन्न होतो याचा अंदाज केला तेव्हा तो १,३४,९६,००० पौंडपर्यंत झाला असें आढळून आलें. यावरून हे धंदे तिकडे मोठ्या प्रमाणावर चालतात असें दिसून येतें.

हिंदुस्थानांतील लोकात या धंद्याचा प्रसार हळू हळू होऊं लागला आहे. तो विशेषकरून आंग्लोइंडियन व रेल्वेकामगार यामध्यें दिसून येतो शेतकरीवर्ग म्हणजे ज्याच्या ताब्यात हा धंदा सदोदीत राहिला पाहिजे, त्या वर्गात या धंद्याचा प्रसार मुळींच झालेला नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. याचीं मुख्य कारणें म्हटलीं म्हणजे:—(१) अस्सल जातींचा अभाव; (२) भांडवलाचा अभाव व (३) पैदास कशी करावी याविषयीं अज्ञान.

हिंदुस्थानांत अस्सल जाती फक्त तीन किंवा चार सांपडतील (१) चितागांग (२)असील (३) बसरा व (४) गेम. याखेरीज पुष्कळ निरनिराळ्या रंगाच्या व आकाराच्या गावटी कोंबड्या आढळून येतात व त्यास सर्वसाधारण "मुरगी" हें नांव आहे. या जातींहि निकटसंबंधोत्पत्ती(इनब्रीडिंग)मुळें पुष्कळ ऱ्हास पावल्या आहेत याखेरीज दुसऱ्या जाती आणावयाच्या म्हणजे परदेशातून आणल्याखेरीज गत्यंतर नसत. व परदेशांतून कोंबडी आणण्यापासून कोंबडी बाळगणारांनां विशेषसा फायदा होत नाहीं, एवढेंच नव्हे तर कधीं कधीं नुकसान होतें. कारण परदेशांतून कोंबड्या आणवल्या असतां प्रवासांतच त्यांतील कित्येक मरतात व ज्या थोड्याशा जगून इकडे येतात त्यांस येथील हवामान मानवल्यामुळें कांहीं दिवसांनीं त्यांचाहि अंत होतो. किंमत जास्त यामुळें परदेशांतून कोंबड्या आणण्याचें धाडस कोणी सहसा करीत नाहीं. बरें इतक्या दूर ठिकाणाहून अंडीं आणावयाचीं म्हटलें तरी तेंहि तितकें सुकर नाहीं कारण एक तर इतक्या लांबून आणलेल्या अंड्यांतील गर्भास बराच त्रास पोंचून

त्यामुळें तो तयार होत नाहीं व बहुतेक अंडीं फुकट जातात. अशा स्थितींत हा धंदा ऊर्जितावस्थेस कसा आणावा हा एक प्रश्न आहे परंतु स्वतः सरकारनें अगर आमचेकडील मोठमोठया व श्रीमंत लोकांनीं मनावर घेतल्यास हा प्रश्न सुटण्याजोगा आहे सरकार शेतकीखातें काढून निरनिराळ्या पिकांसंबंधीं प्रयोग करून ज्याप्रमाणें लोकांवर उपकार करीत आहे, त्याचप्रमाणें शेतकीखात्यातर्फेंच ठिकठिकाणीं कोंबड्यांच्या पैदासेच्या शाखा ठेवून त्या ठिकाणीं निरनिराळ्या जातींच्या कोंबडयांचा संयोग करून उत्तम व हिंदुस्थानांतील हवेस योग्य अशी अवलाद तयार करणें, ती स्वस्त दरानें विकून तिचा प्रसार होता होईतों चहूंकडे करणें, खेडेगांवांतील कोंबडीं सुधारण्याकडे लोकांचें लक्ष लावणें, सहकारी तत्वांवर कोंबडयांचा धंदा काढून त्याच तत्वांवर त्यांचा क्रयविक्रय करणें वगैरे गोष्टींस लागणारें भांडवल सरकार जितकें खर्च करूं शकेल तितकें इतर लोकांच्या हातून होणें शक्य नाहीं. कांहीं तरी नियम करून खेडेगांवांतील लोकांस गांवठी कोंबडे बाळगण्याची मनाई केली व त्याऐवजीं ८।१० महिन्याचे चितागांग ऑरपिंग्टन, किंवा लॅंगशन जातीचे कोंबडे आणून सरकार मालक या नात्यानें त्या कोंबडयाची जबाबदारी गांवकऱ्यांवर घातल्यास कोंबडीं सुधारण्यास फारसे दिवस लागणार नाहींत. एकदां अस्सल जात तयार झाल्यावर त्यापासून होणारी प्रजा मोठी, बळकट व अंडीं घालण्याचे कामीं उत्तम होईल आणि पूर्वींच्या गांवठी कोंबडयांपेक्षां किंमतहि दुप्पट येईल. तात्पर्य, खर्च फार न येतां थोडासा वेळ खर्च करून चिकाटी दाखविल्यास हें काम सहज होण्याजोगें आहे. चितागाग जातीचे ५० लहान लहान कोंबडे विकत घेतल्यास त्यांना १५० रुपयांहून अधिक किंमत पडणार नाहीं व खेडेगांवाचे मानानें हा खर्चहि कांहीं फार होणार नाहीं. सरकारनें आपण भांडवल पुरवून सदर कोंबडे आणून दिल्यास व पुढें आपल्यातर्फे एक माणूस ठेवून त्याजकडून गांवांतील सर्व गावठी कोंबडे व मिश्र कोंबडे नाहींसे करण्याचें ठरविल्यास त्या गांवांत या धंद्याच्या बाबतींत मोठी क्रांति घडून येईल. तात्पर्य, भांडवल व ज्ञानाच्या अभावीं दिसणारी उणीव सरकारनें भरून काढली म्हणजे या धंद्याचा प्रसार होण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं. पुष्कळ वेळां असें आढळून येतें कीं, अस्सल व कमअस्सल जात यांच्या संयोगांपासून होणारी प्रजा कणखर, जोमदार व काटक निघते. उदाहरणार्थ, घोडा व गाढवी याच्या संयोगापासून खेचर तयार होतें. यांत गाढवाच्या काटकपणाचे गुण येऊन घोडयाच्या शरीरासारखा बांधा होतो. त्यामुळे याचा घोडयासारखा बसण्यास व गाढवासारखा ओझें वहाण्यास असा दोन्हीं कामांकडे उपयोग होतो. अशाच प्रकारचे कोंबडयांच्या कांहीं जातींचे संयोग केल्यास त्यांजपासून निघणारी प्रजा जास्त देखणी, काटक व पुष्कळ अंडीं देणारी अशी निघते. परंतु हे संयोग करण्यापूर्वी खालील गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेतः—

(१) दोन जातींचें मिश्रण करावयाचें असल्यास होतां होईतों कोंबडा व कोंबडी एकाच रंगाचीं, निदान जवळ जवळ त्याच रंगाचीं असावींत. (२) लांब पायाच्या कोंबडयाचा आखूड पायांच्या कोंबडीबरोबर व आखूड पायांच्या कोंबड्याचा लांब पायाच्या कोंबडीबरोबर संयोग करावा. (३) संयोगाकरितां निवडावयाची कोंबडीं सशक्त असावींत. येणेंप्रमाणें नर व मादी निवडल्यानंतर खालीं दिलेल्या कोणत्याहि दोन जातींचा संयोग करावा. (१) ब्रह्मी अगर कोचीन कोंबडया व गेम किंवा चितागाग कोंबडे यापासून पिलें लठ्ठ होऊन त्यांचें मांस खाण्यास रुचकर लागतें. (२) लॅंगशन, प्लाय मौथरॉक, वार्यंडाट किंवा ऑरपिंग्टन कोंबडे याचा गेम किंवा चितागांग कोंबडयाशीं संयोग केल्यास पिलें मोटीं व विकण्यास योग्य अशीं होतात. (३) काळी ब्रह्मी कोंबडी व काळा आरपिंग्टन अगर काळ लॅंगशन किंवा प्लायमौथरॉक कोंबडे याच्या संयोगानें प्रजा अंडीं घालणारी व खाण्यास योग्य होते. (४) फिकट रंगाची ब्रह्मी कोंबडी व पांढरा वार्यंडाट अगर पांढरा लॅंगशन अगर पांढरा प्लायमौथ रॉक अथवा पांढरा ऑरपिंग्टन यापासून उत्तम अंडीं घालणारी प्रजा तयार होते. (५) करडया रंगाची कोचीन कोंबडी व करडा किंवा पांढरा ऑरपिंग्टन अगर पांढरा वार्यंडाट किंवा लॅंगशन अगर प्लायमौथ रॉक याच्यापासूनची प्रजा कोचीन कोंबडीपेक्षां अधिक अंडीं घालते व खाण्यास लायक होते. (६) करडी किंवा पांढरी लॅंगशन कोंबडी व पांढरा ऑरपिंग्टन किंवा पांढरा प्लायमौथरॉक अगर पांढरा वार्यंडाट याची प्रजा अंडीं घालणारी व खाण्यास लायक अशी होते. (७) काळी लॅंगशन कोंबडी व काळा ऑरपिंग्टन किंवा काळा मिनोर्का अथवा काळा वार्यंडाट याचीं पिलें व (८) इंडियन गेम आणि चितागांग कोंबडीचा लॅंगशन ऑरपिंग्टन, ब्रह्मी किंवा कोचीन या कोंबडयाशीं संयोग केल्यास त्याचीं पिलें खाण्यास योग्य व अंडीं घालणारी होतात.

कि र्ता जा ती पा ळा व्या.—बऱ्याच लोकांनां निरनिराळ्या प्रकारच्या जाती आपणाजवळ असाव्या असें वाटत असतें; परंतु त्या कायम राखण्याकडे व निर्भेळ ठेविण्याकडे त्यांचें लक्ष नसतें; याचा परिणाम अर्थातच वाईट होतो. निरनिराळ्या जातींच्या कोंबडया व कोंबडे एके ठिकाणीं मिसळल्यानें त्यापासून मिश्र जाती उत्पन्न होतात व एकदां भेसळ झाली म्हणजे मूळ जातींत असलेले गुण हळूहळू कमी होऊं लागतात. निरनिराळ्या जाती बाळगावयाच्या झाल्यास त्यांचा परस्परांशीं कोणत्याहि प्रकारें संबंध न येईल अशा रीतीनें त्या ठेविल्या पाहिजेत. ही खबरदारी घेणें शक्य नसेल तर पुष्कळ जाती ठेवून सर्वच बिघडविण्यापेक्षां एकच जात उत्तमशी निवडून ठेवणें फार

चांगले. अशा जातीच्या पंचवीस ते चाळीस कोंबडया विकत घेऊन पांच सहा कोंबडे त्याच जातीचे त्यांत मिसळावे. कोंबडयांकरितां एकच घर बांधलेलें असल्यास हीं सर्व कोंबडीं एकाच घरांत ठेवावीं लागतील. परंतु असें करण्यांत एक मोठी अडचण येते ती ही कीं, कोंबडया कोंबडयांचें भांडण होण्याचा नेहमीं संभव असतो; म्हणून त्या सर्वांना एकाच ठिकाणीं ठेवण्यापेक्षां पांच सहा कोंबडया व एक कोंबडा यांचा एक कळप याप्रमाणें निरनिराळे कळप करून ठेवावे व आपला सर्व वेळ, पैसा व श्रम वगैरे खर्च करून जी काय सुधारणा करावीशी वाटत असेल ती या जातींत घडवून आणावी; म्हणजे श्रमांचें व पैशाचें चीज होऊन फायदाहि बराच राहील. सर्व जातींच्या कोंबडया बाळगून त्यांची जात कायम ठेवणें हें फार कठिण काम आहे. कारण हें करण्यास पुष्कळ पैसा, हिंमत, शहाणपण व श्रम खर्च करावे लागतात व इतका खर्च करणें एका व्यक्तीच्या आटोक्याबाहेरचें असतें. जर एखाद्या मनुष्याची सर्व जातींच्या कोंबडया बाळगण्याची इच्छा असेल तर त्यानें प्रत्येक खेपेस एक एक जात घेऊन तिचा पूर्ण अभ्यास केल्यावर त्या जातींत ज्या कांहीं सुधारणा करणें शक्य असेल त्या केल्यानंतर मग दुसरी जात घ्यावी. येणेंप्रमाणें ज्यास जितक्या जाती बाळगावयाच्या असतील तितक्या त्यानें बाळगाव्या. कोणत्याहि जातीचें संवर्धन करण्यांत यश येणें किंवा न येणें हें त्या जातीसंबंधीं जें ज्ञान असेल त्याजवर अवलंबून असतें. निरनिराळ्या जातींची राहणी व जीवनक्रम हीं अगदीं भिन्न भिन्न असतात. जी गोष्ट एका जातीस अपायकारक होईल तीच दुसरीस हितकारक असूं शकेल. त्याचप्रमाणें निरनिराळ्या जातींस खाणें निरनिराळ्या प्रकारचें द्यावें लागेल. उदाहरणार्थ कांहीं कोंबडया जात्याच फार चपळ असतात व त्याना मेहनतीची व व्यायामाची आवश्यकता असते. त्या लवकर स्थूल होत नाहींत व त्यांना मांसवर्धक खाणेंहि फार लागतें. परंतु त्यांच्या अगदीं उलट दुसऱ्या कोंबडयांचा जीवनक्रम असतो. उदाहरणार्थ, कोचीन कोंबडया या फार स्थूलदेही असून त्यांस व्यायाम फारसा नको असतो. यांस उष्णताजनक अन्न फारसें लागत नाहीं, परंतु मांसवर्धक अन्न फार लागतें. तात्पर्य या गोष्टी अनुभवावांचून कळत नाहींत. पुस्तकें वाचून अर्थातच कांहीं थोडीशी मदत होते. परंतु विशेषतः स्वतःस मिळालेल्या अनुभवावर जितकें यश संपादन करतां येईल तितकें तें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींपासून साध्य होणें शक्य नाहीं.

आतांपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून (१) निवळ जाती बाळगणें व (२) जाती बाळगून त्यांत कांहीं विशिष्ट सुधारणा करणें या दोन हेतूंपैकीं कोणता तरी एक हेतु मनांत धरून कोंबडया बाळगणारे लोक जाती बाळगतात हें उघड आहे. पैकीं दुसरा हेतु मनांत धरून जे लोक जाती बाळगणार असतील त्यांनीं प्रथमतः त्यांच्यांत काय सुधारणा करावयास पाहिजेत व त्या कोणत्या तऱ्हेनें करतां येतील याचा पूर्ण विचार करून व तें ध्येय सदैव डोळ्यापुढें ठेवून त्या दृष्टीनें आपली खटपट चालू ठेवली पाहिजे एकच जात पाळल्यानें काय काय फायदे होतात तें वर सांगितलेंच आहे. परंतु या फायद्यांखेरीज आणखीसुद्धा कांहीं फायदे एकच जात बाळगल्यानें होतात. पहिला फायदा म्हणजे कोंबडे विकत घेण्यांत बचत. एकच जात असल्यास त्या त्या जातीचे एकदोन कोंबडे विकत घेतले तरी पुरतात. परंतु चारपांच जाती ठेवल्यास प्रत्येक जात शुद्ध राखण्याकरितां म्हणून प्रत्येक जातीचे कांहीं कोंबडे विकत घ्यावे लागतील. अर्थात त्या मानानें खर्च जास्त पडेल. दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे त्याच्याजवळ नेहमीं अस्सल जात राहिल्यानें त्यास पुष्कळ गिऱ्हाईक मिळतें. पुष्कळ जाती बाळगणाऱ्या मनुष्याकडे तितकें गिऱ्हाईक जात नाहीं, कारण तेथें कदाचित भेसळ असेल अशी गिऱ्हाइकास शंका येते. तशी स्थिति एकच जात बाळगणाऱ्या मनुष्याची होत नाहीं. शिवाय प्रदर्शनामध्यें त्याचें नांव होऊन त्यास बक्षीस मिळतें; व हें एक त्याचें नाव वाढविण्यास कारण होतें. असो; येथपर्यंत साधारणपणें जातींची निवड कशी करावी, निरनिराळे हेतु साध्य होण्यास कोणत्या जाती योग्य आहेत, मिश्र संयोगापासून फायदे, उत्तम मिश्रसंयोग कोणते, व जाती किती बाळगाव्या यासंबंधीं विवेचन केलें. आतां साधारण शेतकरी वर्गास बाळगण्यास फायदेशीर अशा जाती किती, त्यांची शरीर रचना कशी व इतर गुणधर्म याविषयीं थोडक्यात विचार करूं.

(१) ब्र ह्मीः—ही जात उच्च जातीपैकीं असून प्रत्येक कुटुंबानें बाळगण्यास योग्य आहे. ही स्थूलदेही असून काटक असते. यांचीं अंडीं मोठीं व सतेज असतात. अंडीं घालण्याच्या कामीं ही जात चांगली असून त्याची वाढ लवकर व झपाट्यानें होत असल्यामुळें त्यांनां लठ्ठ केल्यास त्याची किंमतहि चांगली येते. या जातीच्या कोंबडया अगदीं शांत स्वभावाच्या आणि माणसाळलेल्या असतात; या स्थूलदेही असल्यामुळें यांना फार उंच उडतां येत नाहीं. चरण्याला थोडें आवार असलें तरी चालतें. अंडीं उबविण्याच्या कामीं व पुढें पिलांचा सांभाळ करण्याच्या कामीं या फार योग्य आहेत. यांचें वजन जात्याच जास्त असल्यामुळें त्यांच्या भारानें कधीं कधीं अंडें फुटण्याचा संभव असतो. या जातीचे कांहीं कोंबडे फारच जलद वाढतात व वजनांत ७ ते १४ पौंड पर्यंत भरतात. यांच्या पायांवर कोचीन कोंबडयांप्रमाणें पिसें असतात. यांचा पिसारा फार मऊ असून फार तुकतुकीत असतो. त्यामुळें तीं फार सुंदर दिसतात यांच्यांत त्यांच्या रंगावरून आणखी उपजाती झालेल्या आहेत.

शरीरवर्णनः—यांचें डोकें लहान व सरळ असून त्यावर मखमाली शिंगोरी (शेंडी) असते. छाती रुंद व पुढें आलेली असते. शेपटाचीं पिसें सरळ असून पंख्यासारखीं पसरलेलीं असतात. चोंच बळकट व पिंवळी किंवा काळी असते. मानेवरील पिसें पुष्कळ असून मानेवर लोळत असतात. कोंबडीच्या मांडीवरील व पाठीवरील पिसें पुष्कळ असून पाय आंखूड व पिंवळया रंगाचे असतात व त्यास मधल्या नखीपर्यंत पिसें असतात. पायांवर पिसें असणाऱ्या कोंबडयांना ओलसर जागेंत ठेवल्यास थंडीची बाधा होते.

या जातीच्या काळ्या रंगाची, भुरकट रंगाची व हा पांढुरक्या रंगाची अशा तीन उपजाती आहेत. या जातीची मूळची उत्पत्ति हिंदुस्थानांतील असून पुढें तिचा प्रसार अमेरिका व इंग्लंड या देशांत झाला असावा असें कांहीं लोकांचें मत आहे.

अमेरिकेंतील ब्रह्मी कोंबडया इंग्लंडमधील ब्रह्मी कोंबडयां पेक्षां अंडीं अधिक घालतात. या जातीची उत्पत्ति मलाया व कोचीन कोंबडयापासून झाली असावी. कारण हींत दोनही जातींचे गुणधर्म दिसून येतात. याना किंमत फारच पडते. कधीं कधीं दोन कोंबडया व एक कोंबडा यांस २५।३० रुपये पडतात.

(२) को ची न कों ब ड्याः—यांचा स्वभाव बहुतेक ब्रह्मी कोंबडयासारखा असतो. याहि शरीरानें अवजड असून त्यांच्याचप्रमाणें लवकर माणसाळणाऱ्या व पिलांचा सांभाळ करणाऱ्या असतात. यांचीं पिलें काटक असून त्याचें संगोपन करणें फारसें कठिण नसतें. याना इतर पिलांपासून निराळे ठेवल्यास यांची वाढ झपाटयानें होते. याचीं पिलें वाढविण्यास सोईचीं असतात. परंतु त्यांचें मांस रुचकर नसतें. तें फार लवकर जून होतें. यांचा गेम किंवा चितागांग कोंबड्यांशीं संयोग केला असता त्यांची अंडीं घालण्याची शक्ति वाढते. यांची शेंडी लहान असून तिला एकच आरी असते. डोळे काळे, पिंवळे किंवा तांबडे असतात. मानेवरील पिसें लांब व पुष्कळ असून छाती रुंद व खोल आणि शेंपूट लहान, खालीं वांकलेलें, पाय आंखूड व त्यावर पिसें असतात.

इंग्लंडमध्यें रंग व आकार या दोन बाबतींत या जातीची पूर्ण सुधारणा झाली आहे पण हा सुधारणा करण्यांत त्याच्या अंगचे अंडीं घालण्याचे व नाजुक मांस असण्याचे मूळ गुण नाहींसे झाले आहेत. कोचीन जातीच्या पाच उपजाती आहेत. (१) पार्ट्रिज,(२) ककू,(३) पांडुवर्ण,(४) पांढरी, (५) काळी या होत.

पार्ट्रिजः—यांच्या शरीराचा खालचा भाग, मांड्या आणि शेपटया काळ्या रंगाच्या असतात; आयाळ सोनेरी रंगाची असून प्रत्येक पिसाच्या मध्यभागीं एक काळी रेषा असते. मादीची आयाळ गडद पिंवळ्या रंगाची असते.

ककूः—या जातीचा पिच्छकलाप किंचित् नीळसर रंगाचा असतो व त्यावर काळसर रंगाच्या रेषा असतात.

बफ्ः—या जातीचा रंग दालचिनीच्या रंगासारखा व कधीं कधीं गडद पिंवळा असतो. दुसऱ्या दोन उपजाती त्यांच्या नावाप्रमाणें अगदीं शुभ्र किंवा अगदीं काळ्या असतात. या जातीची मूळ उत्पत्ति चीन देशांतील आहे परंतु अलीकडे इंग्लड, अमेरिका येथें यांचें संवर्धन फारच मोठया प्रमाणावर केलें जातें. दोन कोंबड्या व एक कोंबडा यांस सरासरीनें पंचवीस तीस रुपये किंमत पडते.

(३) लॅं ग शॅं न.—ही जात देखणी असून फार उपयोगी आहे. ही उत्तम व पुष्कळ अंडीं घालणारी असल्यानें व त्याचप्रमाणें या जातीचें मांसहि खाण्यास अत्यंत रुचकर असल्यानें ही बाळगल्यानें हौसेच्या हौस भागून शिवाय दुहेरी फायदा होतो. अंडीं घालण्याच्या कामांत तर हिची बरोबरी करणारी दुसरी कोणतीहि जात सांपडणार नाहीं. यांचीं अंडीं फार सत्वपूर्ण असून काळसर रंगाचीं असतात. ही जात हिंदुस्थानांत कोरड्या हवेच्या प्रदेशांत व कमी पाऊस असणाऱ्या प्रदेशांत कोठेंहि बाळगली असता चांगली तयार होते. या जातीचे पंख फार लांब असल्यामुळें एके ठिकाणीं स्वस्थ बसणें हीस आवडत नाहीं. आवारांत कोंडून ठेविलें असतां ही उंच उडून बाहेर पाडण्याचा पयत्न करतात व त्यांस पूर्ण स्वतंत्रता भोगूं दिली नाहीं तर ती चांगली वाढत नाहींत. यांचें आवार एवढ्याकरितां मोठें ठेवावें लागतें. यांचीं पिलेंहि तशींच काटक असतात. त्यानां सुद्धां आईबरोबर चरण्यास सोडावें लागतें. अगर अन्य तऱ्हेनें त्यांस भरपूर व्यायाम होईल अशी व्यवस्था करावी लागते. या पिलांस चांगलें खावयास घातलें असता तीं लवकर व लठ्ठ विक्रीस योग्य अशीं होतात. याच्या वाढीच्या मानानें त्यांच्या अंगावर पिसें येत नाहींत. काळ्या लॅंगशन जातीचीं पिलें उपजल्याबरोबर फारच चमत्कारिक दिसतात. त्यांच्या डोक्यावर काळे केंस असतात तर त्यांची छाती आणि तोंड ही पांढऱ्या, काळ्या आणि इतर मिश्र रंगाच्या केंसानीं झांकलेलीं असतात. कांहीं पिलांच्या पिसांचे रंग अगदीं गडद असतात. तीन चार महिने झाले म्हणजे हळूहळू हे रंग बदलून तकतकीत काळा रंग जिकडे तिकडे पसरतो.

शरीरवर्णनः—नराची शिंगोरी (शेंडी) एक आरीची व मध्यम आकाराची असते. मादीची शिंगोरी लहान असते. ही शिंगोरी नेहमीं ताठ असते. छाती रुंद, भरलेली व पुढें आलेली असते. पाय मध्यम आकाराचे, काळे असून त्यांवर थोडीं पिसें असतात. शेंपूट भरीव व उंच असतें. नराचें वजन नऊ ते अकरा पौंड व मादीचें सहा ते आठ पौंड भरतें. ही जातहि मूळची चीन देशांतील असून पुढें तिचा प्रसार यूरोपखंडांत झाला. या जातीच्या रंगावरून तिच्या चार उपजाती केल्या आहेत. त्याः—(१) काळी लॅंगशन, (२) पांढरी लॅंगशन ,(३) पांडुवर्ण लॅंगशन व(४) निळी लॅंगशन या होत.

(४) प्ला य मौ थ रॉ कः—ही जातहि वरीलप्रमाणेंच उपयोगी आहे. कारण ही देखणी असून पुष्कळ अंडीं घालण्याच्या व स्वादिष्ट आणि रुचकर मांसाच्या बाबतींत या जातीचा हातखंडा आहे. याचाहि स्वभाव वरील जातीप्रमाणेंच शांत व माणसाळणारा असतो. यांसहि स्वतंत्रता आवडते. यांचें चरावयाचें आवार विस्तृत असेल त्या मानानें त्यांची वाढ फार झपाट्यानें होते. ही जात काटक आहे. ही मूळ अगदीं शुद्ध जात नसून मॅले व काळी लँगशन यांजपासून झालेली आहे; कारण या जातींत कांहीं पक्ष्यांच्या पायावर पिसें असलेलीं व कांहींचीं शिंगोरी मखमली असलेली अशीं कोंबडीं अद्यापि सांपडतात. शरीरवर्णनः—शिंगोरी एक आरीची व लहान, छाती रुंद, शेपूट आंखूड, पाय आंखूड, बळकट, स्वच्छ व पिवळ्याचे रंगाचे. या जातीच्या चार उपजाती आहेत त्याः—(१) पाडुवर्ण, (२) ककू, (३) पांढरी व (४) काळी या होत. पैकीं नंबर दोन व तीन उपजाती उत्तम समजतात. या जातींच्या दोन कोंबड्या व एक कोंबडा याची किंमत तीस पस्तीस रुपये येते प्रदर्शनाकरिता तयार केलेल्या कोंबड्यांची किंमत पन्नास रुपये किंवा जास्तहि पडते. या जातींतील नराचें वजन साधारणमानानें आठ दहा पौंड भरतें व मादीचें वजन सहा ते आठ पौंडपर्यंत भरतें. या जातीचीं पिलें पीवरीकरणमंजूषेंत घातल्यास चांगलीं तयार होतात.

(५) वा यं डा टः—ही जातहि लँगशनप्रमाणें सर्वोपयोगी आहे; परंतु हिचा वर सांगितलेल्या जातींपेक्षां जरा खाली नंबर लागेल. याचीं पिलें लहानपणीं फार नाजूक असल्यामुळें त्याचें संगोपन करणें फार कठीण जातें. परंतु पुढें मोठेंपणीं हीं फार काटक होतात. हीं वजनांत इतर कोंबड्यापेक्षा फार कमी भरतात. कोंबडयाचें वजन ७ ते ९ पौंडपर्यंत व कोंबडी पांच ते सात पौंडपर्यंत भरते. शिंगोरी गुलाबी रंगाची असून डोक्यास चिकटलेली असते. पाय आंखूड व पिवळ्या रंगाचे असून त्यावर पिसें नसतात. छाती भरींव असते. ही आकारानें प्लायमौथरॉकसारखींच दिसतात. या जातींत उपजाती चार आहेत. पैकीं दोन फार दिखाऊ आहेत. ही जात मूळची अमेरिकन असून तिची उत्पत्ति ब्रह्मी, हॅमबर्ग व इंडियन गेम यांच्यापासून झालेली असावी. कांहीं वायंडॉट कोंबड्यांच्या शिंगोऱ्या एक आरीच्या असून त्यांच्या पायांवर पिसें असल्याचें आढळून येतें. परंतु हे गुण नसून दोष असतात हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सशास्त्रपद्धतीनें संयोग घडवून आणल्यास हे दोष नाहींसे होतात. या जातीचा कोंबडा व दोन कोंबडया यांची किंमत पंचवीस ते पन्नास रुपयेपर्यंत असते.

(६) हौ ड नः—ही जात दिखाऊ असून उपयोगी आहे. या कोंबडया साधारणपणें अंडीं बरीं घालतात व यांचें मांसहि खाण्यालायक असतें. कोरडया हवेंत व जमिनीवर त्यांचें संवर्धन चांगलें होतें. परंतु अतिवृष्टीच्या ठिकाणीं ही जात टिकाव धरीत नाहीं. या जातीच्या माद्या अंडीं उबवीत नाहींत म्हणून त्यांचीं अंडीं दुसऱ्या कोंबडयांखालीं उबवण्याकरितां ठेवावीं लागतात यांची शिंगोरी पानाच्या आकाराची असून ती मध्यभागीं जाड व दोन्ही बाजूंस लोंबती असते. चोंच काळी असते. शेपूट भरलेली, उंच व सरळ असते. तंगडया बारीक व पांढऱ्या रंगाच्या आणि मांडी भरलेली व आंखूड असते. यांच्या पायास स्पष्ट दिसणारें एक पांचवें बोट असतें. पिसारा काळा व शुभ्र वर्णाचा असून त्यांत हिरव्या रंगाची थोडी झांक मारीत असते.

शुद्ध हौडन जातीचे पक्षी बाळगणें धोक्याचें आहे म्हणून ही जात बाळगणेंच असेल तर त्यापैकीं मिश्र पक्षीच बाळगलेले बरे. यांचा कोचीन, लँगशन किंवा ब्रह्मी कोंबडयाशीं संयोग केला असता होणारी प्रजा काटक व अंडीं घालण्यास योग्य होऊन त्यांचें मांसहि चवदार असतें. ही जात मूळची फ्रेंच आहे. या जातीच्या कोंबडयाचें वजन पांच ते सात पौंड व मादीचें ४ ते ५ पौंड भरतें. दोन कोंबडया व एक कोंबडा यांची वीस ते चाळीस रुपयेपर्यंत किंमत असते.

(७) मॅ ले किं वा चि ता गॉ गः—हिचें नांव, तिची मूळ उत्पत्ति मॅले पेनिनशुलामध्यें झाल्यामुळें व नंतर तिचें संवर्धन चितागागमध्यें झाल्यामुळें मॅले किंवा चितागॉंग असें पडलें आहे. या जातीचे पक्षी फार धिप्पाड असे असतात. कांहीं कांहीं पक्ष्यांची उंची दोन अडीच फूटपर्यंत सुद्धां भरते. ही जात भारी रागीट आहे, त्यामुळें हिचें दुसऱ्या जातीशीं किंवा तिच्या पिलांशीं पटत नाहीं; म्हणून त्यांस नेहमीं निराळें ठेवणें भाग पडतें. या जातींतील माद्या फारशीं अंडीं घालीत नाहींत परंतु या पक्ष्यांचें मांस रुचकर असल्यामुळें व ही जात जात्या काटक असल्यामुळें पुष्कळ लोक ही घरच्या उपयोगाकरितां व विक्रीकरितां म्हणून बाळगतात. ही जात स्वातंत्र्यप्रिय असल्यामुळें तिला लहानसें आवार पुरत नाहीं. या जातीचीं पिलें लहानपणीं फार नाजूक असतात, त्यांची फार निगा ठेवावी लागते. पिलांचा स्वभावहि फार भांडखोर असल्यामुळें त्यांना इतर जातीच्या पिलांत मिसळल्यास त्यांची डोकीं फोडण्यापर्यंत भाडणें होतात. या पिलांनां सुद्धां नेहमीं मोकळेपणानें रहाणें आवडतें. पूर्ण स्वातंत्र्य देऊन भरपूर खाणें दिल्यास हीं पिलें फार झपाट्यानें वाढतात. यांना मांसल अन्नाची फार आवड आहे व तें त्यांस पुष्कळ द्यावें लागतें. कोंबडी व तिचीं पिलें स्वतंत्र ठेवण्याचें साधन असल्यास कोंबडीस अंडीं उबविण्यास बसविलें तरी चालतें. परंतु तशी सोय नसेल तर अंडीं उबविण्याचें काम दुसऱ्या शांत स्वभावाच्या कोंबडयांकडून करून घेतलेलें चांगलें. अंडीं उबविण्यास योग्य वेळ म्हणजे जूनपासून डिसेंबरपर्यंत असते. या जातीच्या नराचें वजन आठ दहा पौंड भरतें व मादीचें सहा ते आठ पौंड भरतें.

शरीरवर्णनः—शिंगोरी लहान, सरळ व मऊ असून तीवर मांस असतें. कांहीं कोंबडयांनां मखमाली शिंगोरी असते. डोकें व चोंच लांब असते. गलस्तन (कल्ले) अगदीं लहान व मादीचें तर अदृश्य असतें. डोळे पांढरे किंवा किंचित् पिंवळसर असतात. छाती रुंद व खोल असते. पृष्ठभाग शेंपटीकडे उतरता होत गेलेला असतो. शेंपूट लहान व भरलेलें असतें. तंगडया पिंवळ्या, सरळ, लांब व भरलेल्या असतात. पिसारा दाट व तकतकीत असतो. या जातींत रंगास विशेष प्राधान्य नाहीं तथापि सोनेरी रंगाचे पक्षी उत्तम गणले जातात. उत्तम अशा दोन कोंबड्या व एक कोंबडा यांची किंमत दहा पंधरा रुपयेपर्यंत असते.

अॅ सि ल किं वा झुं ज णा रे कों ब डे.—अॅसिल म्हणजे अस्सल व अॅसिलपक्षी म्हणजे शुद्ध व अस्सल 'गेम' जातीचें पक्षी होत. या जातींतील कोंबडे विशेषेंकरून लढण्यासंबंधी प्रसिद्ध आहेत. मोठमोठे श्रीमंत व शोकी लोक हौसेनें हे कोंबडे बाळगतात. आपल्याकडे पूर्वींचे राजेरजवाडे झुंजणारे कोंबडे बाळगीत असल्याचीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. दशकुमार चरितांत कोंबडेझुंज उल्लेखिली आहे. या जातींतील माद्यांची अंडीं घालण्यासंबंधी फारशी प्रसिद्धि नाहीं; परंतु या जातींतील कोंबडयाचें मांस फारच रुचकर असल्यामुळें यांचा खाण्याकडे पुष्कळ उपयोग करितात. चितागॉंग कोंबड्याप्रमाणें हे पक्षीहि धिप्पाड व उंच असतात. याच्या पिलांना सुद्धां स्वातंत्र्य आवडतें. तीं लहानपणीं फार नाजूक असल्यामुळें त्यांची फार काळजी घ्यावी लागते. यांस मांसल अन्न मुद्दाम द्यावें लागतें. चितागॉंग पिलांप्रमाणें याचीं पिलेंहि कलहप्रिय असतात म्हणून यांना इतर पिलांत मिसळूं न देता स्वतंत्र ठेवावें लागतें. हैद्राबाद, म्हैसूर वगैरे ठिकाणीं या जातीचे अस्सल कोंबडे मिळतात. हे वजनात बरेच भरतात. नराचें वजन नऊ दहा पौंडपर्यंत व मादीचें वजन सात आठ पौंडपर्यंत भरतें. शरीरवर्णनः—या जातीची शिंगोरी लहान आणि मखमली व डोकें लहान, चिंचोळें व लांब असतें. भिंवया जाड असतात; छाती अतिशय रुंद व कठिण असते, तंगडया थोड्या आंखूड असतात शेंपटाचा पिसारा लहान व खालीं पडलेला असतो. साधारणमानानें चितागॉंग व ही जात यांत बरेंच सादृश्य असतें व दोघांचे गुणधर्महि बहुतेक सारखेच असतात. हे पक्षी निरनिराळ्या रंगाचे असतात. परंतु शुद्ध पांढरा किंवा शुद्ध काळा रंग असलेले पक्षी फार उत्तम दिसतात. दुसऱ्या कोणत्याहि जातीचा आकार किंवा शक्ति वाढवावयाची असल्यास या जातींतील कोंबडयांशी संयोग करावा. या पक्षांना मुंबईत "कुल्लम" असें म्हणतात. यांचा कोचीन कोंबडयांशीं संयोग केला असतां त्यांपासून होणारी प्रजा खावयास योग्य अशी होते. व त्यांस किंमत फार येते. या जातीचीं अंडीं जरी थोडीं मिळतात तरी तीं सत्वपूर्ण असतात. या जातीच्या दोन कोंबडया व एक कोंबडा यांची किंमत तीसपासून शंभर रुपयेपर्यंतहि येते. मिश्र जातीच्या कोंबडया इतरत्रहि पुष्कळ सांपडतात त्या "सुरती" या नांवानें ओळखल्या जातात.

घागूः—ही जात मिश्र असून हिची उत्पत्ति हिंदुस्थानातच झालेली आहे. मॅले किंवा असील जातीचा कोंबडा व ब्रह्मी किंवा लॅंगशन जातीची कोंबडी यांच्या संयोगापासून ही जात झाली असावी. अलीकडे ही जात फारशी आढळण्यांत येत नाहीं. या जातीचें मांस खावयास बरें असतें व अंडींहि साधारण मानानें बरीं मिळतात. ही जात काटक असते. हिला बंदिवास मुळींच खपत नाहीं. अंडीं उबविण्यास व पिलांचा सांभाळ करण्यास ही जात फार चांगली आहे. शरीरवर्णनः—शिंगोरी मखमली अगर एक आरीची व लहान; मान जाड,गळा पिशवीसारखा सैल व लोंबता. तंगडया धुरकट पिंवळया रंगाच्या व लांब असतात. हे पक्षी निरनिराळ्या रंगाचे आढळतात. उत्तम दोन कोंबडया व एक कोंबडा यांची किंमत दहा पंधरा रुपयेपर्यंत येते.

ऑरपिंग्टनः—ही जात प्लायमौथरॉक, लॅंगशन व मिनोर्का यांच्या संयोगापासून झालेली आहे. या जातीचा विशेष हा कीं, तिजपासून पुष्कळ अंडीं मिळतात एवढेंच नव्हे तर तिचें मांसहि रुचकर व स्वादिष्ट असतें. निरनिराळ्या रंगांवरून तिच्या तीन उपजाती केलेल्या आहेत. (१) काळी ऑरपिंग्टन. (२) करड्या रंगाची ऑरपिंग्टन व (३) पांढरी ऑरपिंग्टन. करडया रंगाची ऑरपिंग्टन जात फार लोकप्रिय झालेली आहे. हिची उत्पत्ति करडया रंगाची कोचीन,सोनेरी हॅंबर्ग व डार्किंग यांच्यापासून झालेली आहे. ही जात अंडीं घालण्यांत सरस ठरलेली आहे. पांढरी ऑरपिंग्टन ही प्लायमौथरॉक, आणि लेगहॉर्न (सर्व श्वेतवर्णाची) यांजपासून झालेली आहे. काळी ऑरपिंग्टन ही लॅंगशन, प्लायमौथरॉक व मिनोर्का याच्यापासून झालेली आहे. या जातीचा आकार साधारणपणें लॅंगशन जातीसारखाच असतो. आरपिंग्टन जात साधारणपणें प्लायमौथरॉक किंवा लॅंगशन कोंबडीच्या सारखी दिसते. या जातींतील पक्ष्यांच्या पायांवर जरी कोठें कोठें पिसें असलेलीं आढळतात तरी अस्सल जातीच्या पक्षांच्या पायावर पिसें दिसत नाहींत. या पक्ष्यांची छाती रुंद व पाय आंखूड असतात. शिंगोरी एक आरीची किंवा गेंजी दिसून येते. पायाचा रंग पांढरा किंवा किंचित् गुलाबी असतो. पिसारा पाठीमागें झुकलेला व सरळ असतो. या जातीचीं पिलें काटक असून फार जलद वाढतात. परंतु त्याची काळजी घ्यावी लागते. ऑरपिंग्टन व प्लायमौथरॉक या जाती ओळखण्याची मुख्य खूण म्हणजे ऑरपिंग्टनचे पाय पांढरे व प्लायमौथचे पिंवळे असतात. तीन कोंबडयांची किंमत पंचवीस ते पन्नास रुपये असते.

सिलेकीः—ही जात विशेषेंकरून दिखाऊपणा व मऊ पिसारा या गुणांबद्दल प्रसिद्ध आहे. फायद्याच्या दृष्टीनें ही

कोंबडी बाळगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अंडीं उबविणें व पुढें पिलांचें संगोपन करणें या कामीं ही कोंबडी फार चांगली असतात. हीं जात्या काटक असल्यामुळें यांचें संगोपन करणें फारसें कठिण जात नाहीं. या जातीस व तिच्या पिलांना स्वतंत्रता लागते. पिलांना आईबरोबर हिंडूं दिल्यास तीं चांगलीं वाढतात. शिंगोरी गेजी (रोझ कोंब) नीळसर रंगाची व वाटोळी असते. गलस्तन(कल्ले)लांब व नीळसर रंगाचे असतात. पायास नख्या कांहींस पांच तर कांहींस चार सापडतात पांच नख्या असणें उत्तम जातीचें लक्षण नव्हे. पायावर पिसें मुळींच असूं नयेत; किंवा असलींच तर थोडीं असावीत. तीन पक्ष्यास किंमत दहा पासून पंधरा रुपये पर्यंत पडते.

डार्किंग.—ही जात नाजूक असल्यामुळें हिंदुस्थानांत फारकरून आढळत नाहीं. या जातीचीं अंडीं थोडीं असतात. याचें मांस फार रुचकर असतें. याचीं पिलें फार नाजूक असून त्यांचें संगोपन करणें फार कठिण जातें. शरीरवर्णनः—या जातीची शिंगोरी एक आरीची किंवा गेजी (रोझ कोंब) असून नराची ताठ व मादीची पडलेली व डोकें मोठे असतें. नराचे गलस्तन (कल्ले) मोठे व लोंबणारे व मादीचे तितके मोठें नसून वाटोळे असतात. तंगड्या आखूड, बळकट व नखें आतल्या बाजूस वळलेलीं असतात.

मिनोर्काः—ही जात दिसण्यांत लेगहॉर्नसारखी दिसते परंतु नराची शिंगोरी मोठी असून तोंड व चेहेरा तांबडा असतो. याच्या पायावर पिसें नसतात. यांच्या दोन उपजाती आहेत. एक काळी मिनोर्का व दुसरी पांढरी मिनोर्का. पैकीं दुसरी फार क्वचित आढळते. पहिली जात तिच्या काळ्या तकतकीत पिसाऱ्यामुळें फार शोभिवंत दिसते. या जातीच्या कोंबड्या अंडीं पुष्कळ व फार मोठीं घालितात; परंतु याचें मांस खाण्यास तितकें रुचकर नसतें. यांचीं पिलें फार नाजूक असल्यामुळें त्यांचें संगोपन करणें फार कठिण जातें. मिनोर्का कोंबडीचा लँगशन कोंबड्यांशीं संयोग केल्यास होणारी जात फार काटक होते. दोन कोंबड्या व एक कोंबडा याची किंमत पंचवीसपासून पन्नास रुपयेपर्यंत येते.

लेगहॉर्नः—या जातीचीं कोंबडीं साधारणतः गांवठी कोंबड्यांसारखींच लहान लहान असतात. अंडीं घालण्याच्या कामीं ही जात फारच प्रख्यात आहे; परंतु तिचें मांस खाण्यास मुळींच लायक नसतें. इंडियन गेम, चितागांग अगर लँगशन जातींशींहि हिचा संयोग केल्यास यापासून होणाऱ्या पिलांचें मांस खाण्यास बरें लागतें. निरनिराळ्या रंगाप्रमाणें या जातीच्या पुष्कळ उपजाती आहेत; परंतु त्यात पांढरी व पिंगट लेगहॉर्न या दोन प्रख्यात आहेत. यांचीं अंडीं साधारण मध्यम व पांढरीं असतात. यांची शिंगोरी एक आरीची व ताठ उभी असते. आणि तिजवरील दांते सारख्या आकाराचे असतात. मादीची शिंगोरी एका बाजूस पडलेली असते. कांहीं कोंबड्यांनां गेजी शिंगोरीहि असते. यांचे पाय पिंवळे असतात; तोंड तांबडें असतें. उत्तम नराचें वजन पांच सहा पौंड भरतें व मादीचें तीन पासून चार पौंड पर्यंत भरतें. यापेक्षां सुद्धां कमी वजनाचींच कोंबडीं या जातींत फार आढळतात. उत्तम तीन कोंबड्यांची किंमत पंचवीसपासून पन्नास रुपयेपर्यंत येते. निव्वळ अंड्यांचाच धंदा करणाऱ्यांस ही जात बाळगण्यास चांगली.

गिनी कोंबडीः—हीं फार खादाड असून नेहमीं कळप करून रहातात. दिवसाचा बहुतेक वेळ इकडे तिकडे अन्नशोधार्थ घालवून संध्याकाळच्या वेळीं सर्वांनीं एकत्र जमावयाचें असा याचा कालक्रम असतो. हे पक्षी उडण्यांत जरी फारसे पटाईत नसतात तरी पळण्यात फारच चपळ असतात. यांनां नेहमीं शांत ठिकाणीं रहाणें आवडतें. अंडीं घालण्याच्या कामीं हे पक्षी चागले असून त्यांचीं अंडीं सत्वपूर्ण असतात. साधारण कोंबड्यापेक्षा हे अंडीं जास्त घालतात. यांचें मांसहि खाण्यास चागलें असतें. त्याच्या माद्या इतर कोंबड्यासारख्या खोलींत जाऊन आपल्या घरट्यांत अंडीं घालीत नाहींत; तर त्या आपलीं घरटीं शेताच्या कुंपणात किंवा अशाच कोठें तरी गुप्त ठिकाणीं करितात व तेथें अंडीं घालतात. मादी अंडीं घालीत असतांना नर तेथें उभा राहून आसपास कोणी येतें कीं काय तें पहात असतो त्यावरून मादी अंडीं घालीत आहे असें ओळखता येतें. नर व मादी ओळखावयाची मुख्य खूण म्हणजे नरास एक तुरा असतो व त्याचे गलुल (कल्ले) नीळसर तांबड्या रंगाचे असतात. याच्याकरितां घरें करावयाचीं तीं एक मोठें छपर काढून त्याच्या सभोंवती तारेचें जाळें लावून बंद करावयाचें व आत पुष्कळ बाबूंच्या काठ्या, त्यास बसण्याकरिता मेढी पुरून त्यांवर बसवावयाच्या. याचीं पिलें फार नाजूक असल्यामुळे खाण्याच्या व इतर बाबतींत त्यांची थोडी जास्त काळजी घ्यावी लागते. मादी दर खेपेस तीस पासून चाळीस अंडीं घालते. अंडीं उबवणें झाल्यास तीं कोंबड्याखालीं उबविण्यास ठेवणें चांगलें. अंडीं उबून पिलें बाहेर येण्यास सव्वीस दिवस लागतात. पिलें बाहेर आल्यावर त्यांनां कोरड्या हवेंत ठेवावें. त्यांस पहिल्या आठवड्यात प्रत्येक तासास खाणें घालावें लागतें. उत्तम खाणें म्हणजे शिजविलेलीं अंडीं, बारीक केलेले कांदे, वाळवी, शिजविलेलें मांस व तांदुळाचें व गव्हाचें पीठ. जसजशीं पिलें मोठीं होत जातील तसतसें त्यांस बाहेर फिरूं द्यावें व खाण्याचें मान कमी करावें. पूर्ण वाढ झाल्यावर दिवसांतून दोन वेळ गहूं, तांदूळ वगैरेसारखें धान्य खाण्यास घातलें म्हणजे झालें. बाकी सर्व व्यवस्था इतर कोंबड्यांप्रमाणेंच करावी.

गिनी कोंबडीं जात्या क्रूर पण भित्री असतात. त्यांस इतर कोंबड्यांत मिसळून ठेवल्यास तीं त्यांस त्रास देतात म्हणून

त्यांस निराळें ठेवावें. गिनी कोंबडी जरी इतर कोंबड्यांपेक्षां मोठी दिसतात तरी त्यांची पिसें काढून टाकल्यावर त्यांचें वजन इतर कोंबड्यांपेक्षां जास्त होत नाहीं. गिनी कोंबडी जास्त काटक असल्यामुळें त्यांना सहसा रोग होत नाहींत. व झाल्यास उत्तम उपाय म्हणजे त्या मारून टाकणें हा होय. तीं फार भित्री असल्यामुळें त्यास धरावयास गेलें असतां तीं फार तडफड करितात व त्यामुळें त्यांस फार इजा होते. म्हणून आजारी गिनी कोंबड्यांना होतां होई तों निराळें ठेवावें व बरीं नच झाल्यास शेवटचा उपाय अमलात आणावा.

टर्की कोंबडीः—यांना वयात यावयास तीन वर्षे लागतात व त्याचें वजन चांगली काळजी घेतल्यास तीस ते चाळीस पौंड भरतें. नर तीन वर्षांचा व मादी दोन वर्षांची झाली म्हणजे संयोग होऊं द्यावा. निकटसंबधोत्पत्ति होणें श्रेयस्कर नाहीं म्हणून होता होईतो ती होऊं देऊं नये. चार माद्यास एक नर याप्रमाणें ही कोंबडी ठेवावींत. मादीला गिनी कोंबड्याप्रमाणेंच आपलीं घरटीं चोरून एकांतात करण्याची संवय असते; परंतु त्याच्याकरिता पानाचें वगैरे घरटें करून तेथें एखादें कृत्रिम अंडें ठेवल्यास ती तेथें जाऊन आपलीं अंडीं घालते.

टर्की कोंबड्यातील नर जात्या फार क्रूर असतात. ते वेळप्रसंगीं मुलें व मोठीं माणसें यावरहि हल्ला करण्यास भीत नाहींत. तसेंच दुसऱ्या कोंबड्याशीं किंवा टर्की नराशीं झुंज लागल्यास ते मरेपर्यंत मागें हटत नाहींत. त्याच्या या क्रूर स्वभावाचा परिणाम मादीवर सुद्धा झालेला असतो आणि म्हणून नर आपलीं अंडीं फोडून खाऊन टाकील या भीतीनें ती नरास अगदीं कळणार नाहींत अशा रीतीनें अंडीं घालते. अंडीं घालण्याचा प्रसंग आला म्हणजे मादी एक विशेष प्रकारचा आवाज करते. त्यावेळीं मालकानें जपून राहून तीं अंडीं कोठें घालते इकडे लक्ष द्यावें. मादी एक दिवसाआड व कधीं कधीं दररोजहि अंडीं घालते व दर खेपेस १५ ते वीसपर्यंत अंडीं घालते. ही अंडीं त्याच मादीखालीं उबवावयास ठेवल्यास ती त्यांची काळजी घेते. अंड्यावर बसली असता तिला वरचेवर खाणें लागतें व तिला बाहेर सोडावें लागतें. ती स्वतः खाण्याकरिता म्हणून अंडीं सोडून जात नाहीं व खाणें न मिळाल्यास ती उपाशी मरते. हीं अंडीं कोंबड्याखालींहि उबवितात. अंडीं उबून पिलें बाहेर येण्यास २८ दिवस लागतात. पिलें बाहेर आल्यावर कांहीं दिवस त्यांची काळजी घ्यावी लागते. पिलांचें खाणें गिनी कोंबड्यांच्या पिलांप्रमाणेंच असावें. आईला मात्र गव्हाचा कोंडा व तांदुळाचें पीठ खावयास घालावें. पिलांना प्रत्येक दोन तासास खाणें घालावें लागतें. यांचीं घरें गिनी कोंबड्यांप्रमाणेंच साधीं बांधावींत. त्यांस इतर कोंबड्यांपासून निराळें ठेवावें. यांच्या जाती आहेत त्याः—(१) ब्रॉंझ टर्की, ही सर्वांत मोठी आहे. (२) काळी टर्की, ही लवकर लठ्ठ होते. (३) करडी टर्की, ही नाजूक असते. (४) पांढरी टर्की, ही फारच सुंदर व मोठी असते.

टर्की कोंबडी एकदा मोठीं झालीं म्हणजे त्याना सहसा रोग होत नाहींत. पण झालेच तर इतर कोंबड्याच्या रोगावर सांगितलेल्या उपायाचीच योजना करावी.

टर्की कोंबडी लठ्ठ करणें झाल्यास त्याना एका स्वतंत्र खोलींत वाळू, चुना, विटांचा भुकटी वगैरेंचा पुरवठा करून तींत ठेवावें. त्यास दिवसांतून चार खेळ खाणें घालावें व तें मका, सातु, तांदूळ, गहूं वगैरेंपैकीं असावें. बटाटे, कांदे, कोबी वगैरे इतर पदार्थ भरपूर घालावे. त्यास लठ्ठ होण्यास दीड महिना लागतो.

हंस.—हे पक्षी ज्याच्याजवळ पुष्कळ माळ वगैरे चरावयास आहेत त्यास बाळगण्यास चांगले. ते जात्या काटक असून आजारी क्वचितच पडतात. ते पुष्कळ वर्षं पर्यंत (कधीं कधीं वीस वर्षेपर्यंत सुद्धा) जगतात. यांच्या पोटजाती पुष्कळ आहेत. त्यांपैकीं टौलौज, एम्डेन आणि आफ्रिकन अशा तीन मुख्य आहेत. इन्डियन किंवा चायना म्हणून जी एक जात आहे ती इकडे पुष्कळ आढळते. ही जात फार ओरडणारी असून त्रासदायक असते. याना जागा पुष्कळ लागते म्हणून यांचीं घरें नेहमीं मोठीं बांधावींत. बारा फूट लांब व नऊ फूट रुंद एवढ्या जागेंत बारा पक्षी राहूं शकतात म्हणजे प्रत्येकाला नऊ चौरस फूट (स्केअर) जागा लागते. यानाहि बदकाप्रमाणें पाण्याच्या टाकीची अवश्यकता आहे. यांचे कळप ठेवावयाचे झाल्यास प्रत्येक नरास तीन माद्या या प्रमाणांत ठेवावे. अंडीं उबविण्याकरिता मादीखालीं ठेवणें चांगलें. कोंबडीखालींहि तीं उबविण्यास ठेविलीं तरी चालतात. अंडीं उबविण्यास मादी बसली म्हणजे तिच्या खाण्याची तजवीज पाहिली पाहिजे. कारण ती सहसा अंड्यावरून उठत नाहीं व वेळेवर खाणें न मिळल्यास उपाशी राहून मरते. अंडीं २९ व्या दिवशीं फुटून पिलें बाहेर येतात. त्याना २४ तासपर्यंत खाणें वगैरे देऊं नये. नंतर सातूचें पीठ, गव्हाचें पीठ, तांदुळाचें पीठ, थोडेसे बारीक केलेले गवत वगैरे दुधांत मिसळून खावयास द्यावें. प्रथमतः वरचेवर खाणें घालावें लागतें. परंतु पुढें हळूहळू तीं हिंडतीं फिरतीं झाल्यावर तें कमी करावें. मोठ्या पक्ष्यानां गव्हाचा कोंडा, सातू, भात वगैरे खाणें घालावें. या पाखरास रोग वगैरे फारसे नाहींत; व ते एकदां झाले म्हणजे बरे करणें शक्य नाहीं.

कोंबड्यांचे रोग व त्यावर उपाय.—कोंबड्यांना होणाऱ्या रोगांचे मुख्यत्वेंकरून तीन वर्ग करतां येतील (१) सर्वसाधारण किरकोळ रोग; (२) भयंकर परंतु सांसर्गिक नसणारे रोग व (३) सांसर्गिक रोग. यांपैकीं पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील रोग तावडतोब उपाय केला असता बरे

होतात. तिसऱ्या वर्गांतील रोग सांसर्गिक असल्यामुळें त्यात पुष्कळ वेळां यश येत नाहीं. शिवाय कोंबडयांची काळजीहि फार घ्यावी लागते, व कधीं कधीं तर सर्व कोंबडयांचा नाश होईल या भीतीनें आजारी असलेल्या कोंबडया ठार मारून टाकाव्या लागतात. असो; वर सांगितलेल्या निरनिराळ्या वर्गांतील रोगांविषयीं आतां थोडासा विचार करूं. (१) पिसें जाणें:—यावर उपाय, त्यांनां स्वतंत्र ठेवणें, मऊ अन्न देणें; गव्हाचा किंवा सातूचा भरडा दुधांत भिसळून देणें, स्वच्छता राखणें व हिरवें अन्न खावयास घालणें. (२) मऊ अंडीं घालणें:— याचीं कारणें फार खाणें, व चुन्याची कमतरता. यावर उपाय, कारणें नाहींशीं करणें. (३) पायावरील खवले वाढणें:—कारण कृमी. यावर उपाय-रोज सकाळीं कोंबडयांचे पाय रॉकेल व जवसाचें तेल यांच्या मिश्रणांत बुडवावे व त्यावर पोल्ट्री पावडर चोळीत जावी. (४)मऊ गांजा किंवा पेटारा.–याचें कारण अजीर्ण. चिन्हें:— गांजा हातास विलबिलित लागणें व त्यांत पाणी आहे असा भास होणें. उपाय—कोंबडयास उलटें धरून गांजा हातानें चिवडून सर्व अन्न पोटावाटे काढावें. गांजातील अन्न कठिण झालेलें असल्यास शस्त्रक्रिया करणें अवश्य आहे. (५) पिसें खाणें:-उपाय, थोडा हिंग किंवा रॉकेल पिसें तोडलेल्या जागेस लावावा. लसूण पुष्कळ खावयास घालावा (६) अंडीं खाणें:—कारण–चुना, वाळू व मासल अन्न भरपूर न मिळणें. यास उपाय, कारणें दूर करणें; तेवढ्यानें संवय गेली नाहीं तर अंडें एका बाजूनें फोडून त्यांत फिनाईल व मोहरी घालावी. कोंबडीनें एकदां हें खाल्लें म्हणजे पुन्हा ती अंडीं खाण्याच्या भानगडींत पडणार नाहीं. याशिवाय शेवटचा उपाय म्हणजे ठार मारणें हा होय. (७) फिकट बळस— नर व मादी अशक्त असतील तर अंडीं वरील प्रकारचीं निघतात. उपायः—कोंबड्यास हिरवें अन्न पुष्कळ खावयास घालणें व त्यास पूर्ण स्वतंत्रता देणें. (८) फेंपरें:—याचीं कारणें (१) अतिशय खाणें, (२) नेहमीं कोंडून ठेवणें, व (३) ऊन लागली असतांहि हा रोग होतो. यास उपायः—पंखाखालील हाडाजवळची एखादी रक्तवाहिनी कापून काढणें, एप्सम सॉल्ट थोडथोडें देणें, नेहमीं अंधारांत ठेवणें व सातू खावयास घालणें. (९) पायफुगीः—पायाचा तळवा सुजून त्यांमध्यें पू होतो व कोंबडयांना चालतां येत नाहीं; उपायः—पोटीस लावून पिकविणें; नंतर सगळा दर्द काढून टाकून जखम धुवून त्यात आयडोफॉर्म व व्हॅसेलिन हीं भरणें. (१०) पेटके येणें:—कारण–सर्द व थंड हवा. यावर उपाय-कारण नाहींसें करणें; लिंबाचा पाला पाण्यांत मीठ टाकून त्यांत उकळावा व त्यानें पाय चोळावेत. उष्णता उत्पन्न करणारे व पौष्टिक असें अन्न खाऊं घालावें. (११) पोटफुगी:—याचीं कारणें:-(१) अति खाणें, (२) कातडें वगैरे गिळणें अगर कागद, हाड वगैरे खाणें. यास उपाय–मऊ गांजा झाला असता करतात तांच. याखेरीज ऊन पाणी वरचेवर पाजून किंवा सॅलड तेल पाजून आंतील पदार्थ निघाले तर पहावें. (१२) मेंदूची सूज–यावर कांहीं उपाय नाहीं. (१३) अर्धांगवायु किंवा पक्षाघातः-कांहीं उपाय नाहीं; पक्ष्यास ठार मारणें बरें. (१४) अंडीं घालतांना त्रास होणें, कारणें:–(१) अंडी मोठीं असणें, (२) कोंबडा लठ्ठ असल्यामुळें, व (३) अंडीं येण्याचा मार्ग सुजल्यामुळें. चिन्हें–अस्वस्थता. उपायः-गुदद्वारास एरंडेल लावावें व आत पिचकारी मारावी, आधण आलेल्या पाण्यावर कोंबडीस धरावें. एप्समसॉल्ट एक चमचाभर यावें.खाणें थोडें व हलकें घालावें.(१५)संधिवातः–हा पेटकयासारखाच रोग आहे. सर्व साध्यांस सूज येते व कोंबड्यास चालतां येत नाहीं.उपाय पेटक्या प्रमाणें (१६) कृमी.–हे तीन प्रकारचे आहेत. (१) फुसरे, हे अगदीं बारीक असून पिसांत पुष्कळ भरलेले असतात. कोंबड्याच्या कातडयाचा जो कोंडा वरचेवर निघतो त्यावर हे आपली उपजीविका करतात.यापासून पिलांना त्रास होतो. (२) चपटे—हे उवांसारखे असतात. पंखाच्या मुळात लहान लहान भोंकें पाडून त्यांत हे रहातात.यांची उपजीविका कातडयावरच होते. (३) टोकें हे तांबडे लाल असून मुख्यत्वें करून डोकें, डोळे, कल्ला, शिंगोरी वगैरे भागावर असतात. हे त्या भागास इतके चिकटून बसतात कीं ते मेल्याशिवाय निघत नाहींत. ते आतले रक्त शोषून घेतात व त्यामुळें कोंबडीं मरतात. कारण–मुख्यत्वेंकरून कोंबडयांच्या घरात अस्वच्छता असल्यामुळें हे किडे होतात. याच्या नाशाचे उपाय–घरें दर आठ अगर पंधरा दिवसानीं फिनाइलच्या पाण्यानें स्वच्छ धुवावीं. तीं विटांचीं बांधलीं असल्यास शेण, व रॉकेल एके ठिकाणीं करून त्यानें सारवावीं व घरांत कॅर्बोलिक पॉवडर टाकावी. कोंबडीं व पिलें यास वरचेवर नॅपथेलिन किंवा गंधक चोळावा व त्यांच्या खोलींत अगर. शेजारी कोरडया मातीचें किंवा राखेचें घमेलें भरून ठेवलेलें असावें. कोंबडयांच्या घरांतील जमीन वर्षांतून एकदा तरी करावी. टोके झालेल्या कोंबडयांस इतर कोंबडयापासून निराळें ठेवावें व सर्व टोंके हातानें काढून टाकावे. फुसरें, चपटे यांस नॅपथेलिनची पूड चांगली लागू पडते. याखेरीज पाहिजे असल्यास पुढें दिलेलें मिश्रण थोडथोडें चोळावें टरपेनतेल २ भाग, कापूर १ भाग व खोबरेल १२ भाग. जखमा झाल्याबरोबर त्या स्वच्छ धुवून त्यांत हळद किंवा आयडोफार्म भरावा झिंक ऑक्साइडचाहि उपयोग करावा. (१७)मोड.–कोंबडयाचें शेपटाजवळ एक गांठ असते तीस मोड म्हणतात. ही सुजली म्हणजे हळकुंड किंवा कारवी पेटवून भाजतात. परंतु हें करणें क्रूरपणाचें आहे तरी असें करूं नये. [ले. रा. आर्. डी. खांडेकर]

कोबर्ग–जर्मनींतील एक शहर सॅक्सोबर्ग-गोथा नांवाच्या संस्थानाच्या हें व गोथा अशा दोन राजधान्या आहेत. रजन नदाला मिळणाऱ्या इत्झ नांवाच्या एका लहान नदीच्या

काठीं वसलेलें असून गोथाच्या आग्नेयीस ४० मैलांवर आहे. लोकसंख्या(१९१०)२३७८९. शहर पुरातन असून येथें ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाच्या अशा बऱ्याच गोष्टी पहावयास सांपडतात. बाजारचौकांत महाराणी व्हिक्टोरिया यांचे पति राजपुत्र आलबर्ट यांचा धाकटया विल्यम थीडर्नें तयार केलेला पुतळा आहे. येथें १६०४ मध्यें स्थापलेली एक व्यायामशाळा असून औद्योगिक व शेतकी शिक्षणाकरितां कित्येक शाळा आहेत. येथील ड्यूकच्या ग्रंथसंग्रहालयात एक लाख पुस्तकें आहेत.

येथील कोबर्ग नांवाचा पुरातन किल्ला शहरच्या वस्तीपेक्षा बऱ्याच उंच जागेवर बाधलेला आहे. हा ११ व्या शतकात बाधला गेला असावा असा अंदाज आहे. इ. स. १७८१ त वेडयाच्या इस्पितळाकडे या किल्लयाचा उपयोग करूं लागले. परंतु १८३५–३८ त याचा जीर्णोद्धार केला गेला व आता येथें प्राणिशास्त्राचे पदार्थसंग्रहालय आहे. प्रॉस्टेस्टंट धर्माचा संस्थापक मार्टिन ल्युथर हा इ. स. १४३० मधें ह्या किल्लयाच्याच एका खोलींत रहात असे.ज्या बिछान्यावर तो निजत असे तो बिछाना व ज्या व्यासपीठावरून तो उपदेश करीत असे तें व्यासपीठ अजून तेथें दाखवितात. येथें रंगाचे, यंत्रे तयार करण्याचे दारू गाळण्याचे, लोखंडाचें ओतींव काम करण्याचे, चिनई मातीची भांडीं तयार करण्याचे व लाकडाचे तक्ते पाडण्याचे कारखाने असल्यामुळें या शहरास औद्योगिक दृष्टयां महत्व आहे. जवळच ड्यूकचे राजवाडे असून त्यापैकीं एकात राजपुत्र ऑलबर्टचा इ. स. १८१९ त जन्म झाला होता.

ह्या शहराचा १२०७ मध्यें प्रथम उल्लेख केलेला आढळतो. येथे असलेल्या किल्लयावरूनच या शहराचें नाव कोबर्ग असें पडलें. यूरोपमधील ३० वर्षांच्या युद्धात ह्या किल्लयाभोंवती ३ वर्षं (१८३२–३५) वेढा पडला होता इ. स. १८३५ पासून सॅक्सकोबर्गचे ड्यूक येथें राहूं लागले.

कोबी—गड्डागोबी. कोबीची भाजी विलायतेकडून हिंदुस्थानात आलेली आहे.कोबीचें बीं कालीफ्लावरच्या बियासारखेच असतें. पण तें मोहोरीपेक्षा मोठें व काळसर असते. कोबी थंडींत चांगली होते. पावसाळ्यात पानें वाढतात पण त्याचा गड्डा बनत नाहीं. थंडी संपताच लागण केल्यास कडक उन्हाळा नसेल तर उन्हाळ्यातहि कोबी होते. पण थंडीच्या पिकाप्रमाणें गड्डे मोठे होत नाहींत. महाबळेश्वरासारख्या हवेंत वैशाखांतहि चांगले गड्डे होतात.कोबीचा योग्य मोसम म्हणजे थंडी असतांनाच गड्डे तयार झाले पाहिजेत.थंडींत गड्डे मोठाले होतात व त्यांस स्वाद चागला असतो.उन्हाळ्यांतील कोबीस उग्र वास येतो व भाजी खाण्यास बेचव लागते. कोबीला जमीन फार उत्तम पाहिजे. तिला पाणी मुबलक पाहिजे. खत चांगलें कुजलेलें, एकरीं सुमारें लावणीच्या वेळीं २५।३० गाडया व पुढें जमीन चाळून गळेभरणीच्या वेळीं १०।१५ गाडया लागतें. जमीन दोनतीन वेळ नांगरून खत पसरावें व २।३ वेळ कुळवून सरीचे वाफे करावे. सऱ्या सुमारें २ फुटांच्या अंतरानें पाडाव्या. कोबीचें बीं दर एकरीं सुमारें ५ औंस लागतें. एक औंस बीं पेरण्यास सुमारें ८ चौरस यार्ड म्हणजे २ हात रुंद व ४ हात लांबीचे ४ वाफे इतकी जागा पाहिजे. बी पेरण्याचा हंगाम गोकुळअष्टमीपासून दसऱ्यापर्यंत मुख्य आहे. पुढें ज्यावेळीं कोबी तयार पाहिजे त्याच्या अगोदर ६ महिने बीं पेरावें लागतें. रोप दाट झाल्यास तें सुमारें चार पानांवर येताच दुसऱ्या वाफ्यात बदलावें म्हणजे तें जोरांत वाढेल. रोपास पहिल्यानें रोज झारीनें पाणी घालावें. रोप चागलें वर आल्यावर वहातें पाणी देण्यास हरकत नाहीं. रोप दोन वेळ खुरपून काढावें. बीं खुरप्यानें रेघा काढून चिमटीनें पेरलेलें असल्यास रोप खुरपण्यास सोपें जातें. बीं फेंकून पेरलें असल्यास तें खुरपण्यास अवघड जातें व शिवाय वेळ जास्त लागतो. रोपावर तें लहान असताच काळतर हिरव्या अळीची कीड पडते त्या किडीबद्दल रोप उगवल्यापासून रोज उजाडताच तपास ठेवून कीड थोडी नजरेस पडताच उपाय केला पाहिजे. मुख्य उपाय रोपाचीं पानें विपारी केलीं पाहिजेत, म्हणजे तीं खाऊन कीड मरून जाईल. ' हेलिबोर पावडर ' संध्याकाळीं रोपावर टाकल्यानें रात्रीं कीड पानाबरोबर विपहि खाते व मरून जाते. कीड वाचलीच तर उजाडताच वेंचून मारून टाकावी. किडीनें पहिलींच पानें खराब केलीं तरी अंकुर खाल्लेला नसतो; म्हणून दुसरीं पानें येऊन रोप जोरावतें. तंबाखूचें पाणी, तंबाखूचा साबण, गोमूत्र, सुतारीचें पाणी, साबण व घासलेटाचे पाणी, कडुनिंबाच्या सालीचा काढा वगैरे कडू व विपारी पाणी शिंपल्यानें कीड मरते. या किडीबद्दल आळस केल्यास रोप हातीं पडणें कठिण आहे. ही कीड पडत नाहीं असें क्वचितच होतें. जेथे कोबीच्या वर्गाचें पीक अगदीं नवीनच केलें असतें अशा नव्या ठिकाणींहि ही कीड तयार होते. रोप सुमारें दीड महिन्यात लावण्याजोगें वाढतें. रोप लावण्यासाठीं काढण्याच्या अगोदर त्यास आदल्या दिवशीं पाणी द्यावें म्हणजे रोप उपटताना मुळ्या तुटत नाहींत. कोरड्या वाफ्यात एक हातावर सरीच्या तळाशीं खुरप्यानें अगर कुदळीनें माती उकरून केलेल्या उथळ खाचेंत डाव्या हातानें रोप धरून त्याच्या मुळावर उजव्या हातानें माती ओढावी व दोन्ही हाताच्या बोटांनीं ती दाबावी. म्हणजे पाणी सोडल्यावर रोप आडवें पडत नाहीं. जमीन कसदार असल्यास रोपें दोन फुटांवर लावावीं म्हणजे दाटी होत नाहीं. दर खाचेंत एकेक रोप लावावें. लावताना रोपाच्या मुळ्या खोल जातील अशा ठेवाव्या, आडव्या करूं नयेत.पहिलें पाणी जपून द्यावें. दुसरें पाणी जरूरीप्रमाणें ४।३ दिवसांनीं द्यावें. नंतर ८।१० दिवसांनीं पाणी देत जावें.

वाफ्याच्या चहूं बाजूंच्या वरंब्यास बीटचें बीं लाविलें असता त्याचे कांदे कोबीबरोबरच तयार होतात. सऱ्यांच्या दोन्ही बाजूच्या वरंब्याच्या बगलेस सालटाचें रोप चांगलें वाढलेलें

लावल्यास चाळणीच्या अगोदर सालटे तयार होतात. रोप बारीक लावल्यास चाळणी करून गळेभरणीच्या वेळीं अड-थळा होईल. तण उगवलें असेल त्या मानानें दोन तीन वेळ खुरपणी करून रोपाच्या मुळाजवळील माती भुसभुशीत करावी.

लावणीनंतर सुमारें अर्धाच महिन्यांनीं पेंड, कुटी (मासळी)अगर शेणाचें खोडखत देवून चाळणी करावी व सऱ्या मोडून वाफे सपाट करावे. यानंतर वेळच्यावेळीं पाणी देणे व जुनीं पानें काढणें याशिवाय कांहीं करावें लागत नाहीं. कोबीचे गड्डे तयार होण्यच्या वेळी तीवर मावा पडत असतो. मावा पडलेली कोबी तिजवरील मावा जमिनीवर न पडूं देतां हलकेच उपटून जाळून टाकावी व त्या जागेवर घासलेटमिश्रित साबणाचें पाणी मारावें. म्हणजे जमिनी-वरील किडे मरून जातील. माव्याचा वेळींच प्रतिकार न केला तर सर्व कोबींवर तो पसरतो व मग चांगले गड्डे होत नाहींत.

कोबीच्या गड्डयात एक प्रकारची अळी पानाच्या खालच्या बाजूनें देंठाकडून गाभ्यात प्रवेश करते. ही कीड नजरेस येताच किडलेले गड्डे उपटून जाळून टाकावे उन्हाळ्याच्या तापानें गड्डे कमजोर होतात व वरून करपावयास लागतात. अशा गड्डयात आंतून कीड असते. असे गड्डे दृष्टीस पडताच उप-टून उपयोगांत आणावे अगर किडले असल्यास जाळून टाकावे. चांगल्या गड्ड्यांचा भाजीकडे उपयोग होतो. जून पानें जनावरें खातात. किडलेलीं पानें अगर गड्डे जनावरास खाण्यास घालूं नयेत. तसेंच कित्येक लोक गैरसमजुतीनें किड-लेलीं पानें खताच्या खड्डयांत टाकितात. पण तसें करण्यानें ते किडीचा संचय करितात, बीमोड करीत नाहींत. नेहमीं पिकाचे रोगट भाग जाळून टाकीत गेल्यानेंच किडीचा बीमोड होतो. [वनौषधि गुण.]

कोम-मौजे-कसबा—कोम म्हणजे लहान गांव किंवा वाडी असें मॅट डफ म्हणतो; पण तसा अर्थ इतरत्र आढळत नाहीं. कोम म्हणजे समाज किंवा जात अशा अर्थानेंहि हा शब्द हिंदुस्थानींत वापरला जातो. मौजे म्हणजे खेडें. मूळ शब्द मौजा. येथें बाजार भरत नसे. कसबा म्हणजे महालातील अथवा परगण्यांतील मुख्य ठाण्याचें गाव; गावातील जुना वसाहतीचा भाग; बाजारचा गाव. प्रत्येक कसब्याखालीं साधारणतः ५ ते २५ दुसरीं खेडीं असत. परंतु कसब्याचें गाव फारच मोठें असलें, तर तेवढें एकच गांव देखील त्या कसब्यांत असे. [मोल्स्वर्थ-कोश; डफ म्हा. १].

कोमटी—ही व्यापारी जात मुंबई, मद्रास इलाखा, वऱ्हाड व मध्यप्रांत, संयुक्त प्रात, म्हैसूर इत्यादि प्रदेशांत आढळते. हा आध्रांतील मुख्य वैश्य वर्ग होय याची वस्ती बऱ्याच ठिकाणी असल्यानें त्यांच्यांतील धार्मिक व सामाजिक संस्कारांत मोठी विविधता आलेली आहे.१९११ साली हिंदुस्थानांत एकंदर ७,६५,५३५ कोमटी होते. त्यांपैकीं सर्वांत जास्त मद्रासेंत (४,९८,२९५) होते. कोमटी हें नांव या जातीस कसें पडलें याविषयीं भिन्न भिन्न मतें दिसून येतात. को–मति (खोंकडस्वभावी) गो–मति (गाईवाला), कु–मति (दुष्ट स्वभावाचा) अशा तऱ्हेच्या उपपत्त्या पुढें आलेल्या आहेत. कोमटयांच्या कन्यकापुराणात शिवानें यांना गाईप्रमाणें वागविलें म्हणून गो–मति असें नांव दिल्याचें लिहिलें आहे. पूर्वी गोदावरीच्या तीरीं हे रहात असत असें म्हणतात; अद्यापहि मुख्य वस्ती तेथें आहे. व गो–मति किंवा गोमती असे यांचें त्या ठिकाणचें एक नाव आहे; तेव्हां गोमतीचें तेलगूंत कोमटी असें अपभ्रष्ट रूप झालें असावें अशी मांडणी करतात. सर्व ठिकाणचे कोमटी तेलगू बोलतात. ती त्यांची मातृ-भाषा होय. याखेरीज ज्या देशात ते रहातात त्या देशची भाषा चांगली मुखोद्गत करितात. त्यांची एक निराळी व्यापारी भाषा असते.

कोमटयात मुख्य दोन जाती आहेत. एक गवर (गौर) आणि दुसरी कलिंग. विजयानगरच्या उत्तरेस असणारे गौर व दक्षिणेस असणारे कलिंग होत. गौर कोमटयात पुन्हां अनेक पोटजाती आहेत. कोणी शैव, कोणी वैष्णव व कोणी माध्वपंथी आहेत. धंद्यावरूनहि अनेक पोटजाती उत्पन्न झाल्या आहे. गौर व कलिंग याच्यामध्यें परस्परात लग्में होत नाहींत गौर मद्यमास खात नाहींत. कलिंग खातात. धंद्यावरून पडलेल्या जातींत रोटीबेटी व्यवहार होत नाहींत. यांचीं देवकें प्राणी व वनस्पती असतात. कोमटी आपणाला वैश्य समजतात व आपलीं गोत्रें व प्रवर सागतात. ही जात बरीचशी ओबडधोबड चेहऱ्याची असते.

'मेनरिकम' चालीप्रमाणें कोमटी तरुणाला आपल्या मामेबहिणीशीं लग्न करता येतें. कन्यकापुराणातील कन्य-कम्मानें १०२ गौर कोमटयांसह (हे पुढें गोत्रपुरुष झाले.) अग्निप्रवेश केल्याची कथा फार लोकप्रिय असून ती थोड्या फार फेरबदलांनें तेलगू मार्कंडेय पुराणात (१४ वें शतक) सुद्धां आलेली आहे. म्हणजे कोमटयांचा उल्लेख इतका प्राचीन' आहे. संस्कृत मार्कंडेय पुराणांत ही कथा नाहीं, तेव्हा ती कन्यकापुराणांतूनच घेतली असावी. कनिष्ठ व जवळ जवळ अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मादिगांचा व यांचा संबंध पुरातनचा आहे. त्याचा उलगडा करण्यासाठीं अनेक कथा सांगतात. मदिग स्त्री व ब्राह्मण पुरुष यांच्यासंबंधापासून कोमटी जात बनली आहे असा एक आक्षेप कोमटयांवर करण्यांत आला आहे.

कोमटयांत बालविवाहाची चाल आहे. लग्न ब्राह्मण चालवितो. बहुपत्नीकत्वाची यांच्यांत चाल आहे. पण पहिल्या बायकोला मूल होत नसेल तर दुसरें लग्न करा-वयाचें. वेदोक्त संस्कारांनीं ब्राह्मण हरकत घेऊं लागल्या-कारणानें पुष्कळ तंटे माजले आहेत. वेदोक्त व पुराणोक्त अशा

दोन्ही पद्धतींनीं लग्नें होतात. मद्रासकडे प्रथम वरांची मुंज करितात, मग काशीला जाण्याचा आव आणिला म्हणज वधूचा बाप त्याला घरीं नेतो व आपल्या मुलीशीं लग्न करून देतो. कलिंग कोमटी गंजमच्या उत्तरेस राहात असून आपली मातृभाषा बहुतेक विसरले आहेत. त्यांचे उपाध्याय उरिया ब्राह्मण असल्यानें त्यांच्यांत उरिया चाली शिरल्या आहेत.

यांच्यांत विधवाविवाह रूढ नाहीं. शैवांखेरीज कोणाहि विधवेचें मुंडण सक्तीनें करण्यांत येत नाहीं. अंगावर दागीने घालणें, पान खाणें विधवा निषिद्ध मानीत नाहींत. शैव कोमटयांत देखील बालविधवांचें मुंडण होत नाहीं. वैष्णव विधवा तर नेहमीं सकेशाच असतात. सजीव आणि मृत या दोघांचें जें लग्न लावण्यांत येतें तें मात्र फार विलक्षण दिसतें. एखाद्या स्त्रीपुरुषाचा संबंध असेल व तो पुरुष कदाचित दिवंगत झाला तर त्याच्या प्रेताशीं त्या स्त्रीचें लग्न खऱ्या लग्नाप्रमाणें लावितात. वधू खोबऱ्याच्या विड्या तोडून त्याच्या तोंडावर थुंकते; त्याच्यापुढें बसून पुष्कळ वेळ भाषण करिते; नंतर प्रेताला न्हाऊं माखूं घालून विडा खावयास देतात व या तऱ्हेचे लग्नसोहळे संपल्यावर त्याची प्रेतयात्रा निघते उत्तरसरकारांत रहाणाऱ्या लिंगायत कोमट्यांमध्यें वरील चाल आहे.

सर्व ठिकाणीं कोमटीकन्यका 'परमेश्वरी' या कुमारी देवतेला भजतात. तिची जागजागीं देवळें आहेत. या देवीखेरीज इतर देवताचीहि ते पूजा करितात. विझगापट्टम् येथील कोमटी किनाऱ्यावरील डोंगरावर पुरलेल्या एका मुसुलमान साधूची फार आराधना करितात. त्या बंदरात येणारें जाणारें प्रत्येक जहाज आपलें निशाण तीनदा वाकवून त्याला सलामी देतें. प्रवास सुरक्षित व्हावा म्हणून हिंदु बोटींचे मालक त्याला चांदीची डोणी अर्पण करीत. हल्लीं बोटींचे मालक कोमटी नाहींत तरी ते या साधूला भजतात. व खटल्यांत यश यावें, दुखणीं बरीं व्हावीं म्हणून याला नवस करतात. धार्मिक विधि करण्यास हे लोक ब्राह्मणानां बोलावतात व त्यांनां आपले गुरु करतात या ब्राह्मणाला भास्कराचार्य असें म्हणतात. सोळाव्या शतकापूर्वी होऊन गेलेल्या संस्कृत कन्यकापुराणाच्या तेलगु भाषांतरकाराचें हें नांव होतें. त्यानें कोमट्यांनां दैनिक आचारांचे कांहीं नियम घालून दिले आहेत. हा वैश्यगुरु भास्कराचार्य व त्याचे वंशज गृहस्थाश्रमी असून त्यांनां या ज्ञातीकडून वर्षासन असे. हल्लीं निरनिराळ्या ठिकाणीं गुरुपीठें असून धार्मिक कारभारांत यांचा अधिकार मानला जातो.

मोठे व्यापारी, वाणी आणि सावकार म्हणून कोमटी प्रसिद्ध आहेत. मद्रास शहरांत सर्व आयात मालाचे ते घाउक व्यापारी आहेत. बहुतेक कोमटी विद्यासंपन्न असतात व त्यामुळें यांचा कारभार चांगला चालतो. येथून तेथून सर्व कोमटी हुषार, मेहनती, मितव्ययी व गबर असतात अशी म्हण आहे ती कांहीं खोटी नव्हे. जर एखादा कोमटी धंद्यांत बुडाला तर त्याचे जातभाई त्याला मदत करून पुन्हां मार्गाला लावतात. यांचा दानधर्म व्यवस्थित असतो. प्रत्येक कन्यकापरमेश्वरीचें देऊळ म्हणजे एक दानगृह होय. या पैशातून कोमटी स्त्रीशिक्षण, अनाथसंगोपन यांसारख्या संस्था चालवितात. वैश्यज्ञातीची नैतिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक उन्नति करण्यासाठीं १९०५ सालीं "दक्षिणहिंदुस्थान वैश्यसंघ" नावाची एक संस्था यांनीं स्थापिली. लायक कोमटी विद्यार्थ्यांना यातुन इंग्रजी व स्वभाषा शिकण्यासाठीं शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. शेट्टी, चेट्टी (श्रेष्ठीचीं अपभ्रष्ट रूपें) हीं बहुमानार्थक नांवें कोमट्यातहि आहेत. हल्लीं कोणी कोणी आपणाला अय्या म्हणवितात. [थर्स्टन].

त्रावणकोरमध्यें यांची संख्या सुमारे दोनशें आहे. व म्हैसूरमध्यें जवळ जवळ दहा हजार आहे. यांची भाषा तेलगूच आहे. मुंबई इलाख्यात यांची संख्या २१,८६५ असून हे विशेषतः बेळगांव, विजापूर व धारवाड जिल्ह्यांत आढळतात. नाशिक जिल्ह्यातहि याची थोडी वस्ती आहे. हे जुन्या कपड्याचा व्यापार करतात. यांचा धर्मगुरु कृष्णाचार्य नांवाचा असून निझाम हैदराबादनजीक बसुवागल येथें त्याचा मठ आहे. याच्यात जातिसभा असून ती आचार्यांनीं नेमलेल्या मानकऱ्याच्या संमतीनें जातीचे प्रश्न सोडविते. मध्यप्रांतात याची वस्ती सुमारें ११०००आहे. याच्यांत यज्ञ, पट्टी, जैन व बिट्टर अशा जाती आहेत. यांची रहाणी मद्रासेंतील कोमटयाप्रमाणेंच आहे. [सेन्सास रिपार्ट; रसेल व हिरालाल].

कोमारपाइक— एक जात. यांची लोक संख्या १०,०५९. फक्त कानडा जिल्ह्यात हे लोक आढळतात. अलीकडे हे लोक आपल्याला "खत्री कोमारपंथ" म्हणवूं लागले आहेत. आम्ही क्षत्रिय आहों असें हे आता म्हणतात. अ.मचें मूळचें वसतिस्थान गुलबर्गा असून तेथून आम्ही कानडयात आलों असें ते सागतात. हे पूर्वी सोंडा सरदाराच्या सैन्यात असावे असा अंदाज आहे. इ. स. १७६३ ते १७९९ पर्यंत हे लुटारू म्हणून प्रसिद्ध होते. इ.स. १७९९ मध्यें ब्रिटिशांनीं या लुटारूंचा नायनाट केला व तेव्हांपासून हे लोक शांतताप्रिय झाले आहेत. ते पूर्वी सैनिक होते असे ते म्हणतात. परंतु आता पुष्कळसे शेतकरी व ताडी काढणारे आहेत. यामध्यें हिंदू व लिंगायत असे दोन पोटभाग असून त्यांमध्यें बेटीव्यवहार होत नाहीं. हिंदू कोमारपाइक हे घाटांत रहातात व लिंगायत कोमारपाइक हे घांटाच्या वरच्या प्रदेशांत रहातात. हिंदु कोमारपाइकांमध्यें १८ कुळें आहेत. मावसभाऊ व मामेबहिण यांचें लग्न होतें. साटेलोटें करण्याची चाल यांमध्यें आहे. मुलींचीं लग्नें ८ ते १० व मुलांचीं १४ ते २० वर्षांपर्यंत होतात. पुनर्विवाहाची चालहि आहे. पहिल्यानें मुलाचे केळीच्या झाडाशीं व मुलीचें

कोंबड्याशीं लग्न होऊन नंतर तिसरें लग्न करण्याची परवानगी आहे. घटस्फोटाची मनाई आहे. हे लोक मांसाहारी आहेत व अलीकडे दारूहि पिऊं लागले आहेत. फक्त ब्राह्मण व वाणी यांच्या हातचें हे जेवतात. यांचा वारसासंबंधीं कायदा हिंदूप्रमाणेंच आहे. हिंदु कोमारपाइक पुष्कळ बाबतींत लिंगाइतांप्रमाणेंच वागतात. बसव, व्यंकटरमण, कालभैरव, म्हास्ती इत्यादि यांच्या देवता आहेत. जोशी, हविक, गौडसारस्वत ब्राह्मण यांचे उपाध्याय असतात. जंगमानांहि ते मान देतात.

शंभर वर्षांपूर्वी हिंदु कोमारपाइक लोक लिंगायतांप्रमाणें आपलीं प्रेतें पुरीत असत परंतु आतां ते जाळूं लागले आहेत. कोमारपाइकाच्या प्रत्येक पंचायतीवर "बुधवंत" हा अधिकारी नेमलेला असतो. त्याचप्रमाणें खेड्यांच्या एका गटावर एक कल्ला नावाचा वरिष्ठ अधिकारी असतो. महत्वाचे प्रश्न जातीच्या सभेंत येतात व तेथें त्याचे निकाल दिले जातात. निकालाप्रमाणे न वागल्यास जातीबाहेर टांकण्यांत येतें. बारीकसारीक अपराधांबद्दल दंड होतो. परंतु अपराध मोठा असला तर पंचगव्य देऊन प्रायश्चित्त देतात. खालच्या जातीच्या पक्तींत जेवण्याबद्दल गोकर्णाला जाऊन क्षौर व स्नान करावें लागते व त्यानंतर पंचगव्य घ्यावें लागतें. शृंगेरी येथील स्मार्त मठाधिपति हा विशेष महत्वाच्या प्रश्नाचे निकाल देतो व ह्याचे निकाल कायमचे व अखेरचे समजले जातात. [एन्थॉवेन. से; रि. मुंबई १९११].

कोमिल्ल गाव—हें बंगाल इलाख्यांतील टिप्पेरा जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून गोमती नदीवर वसलें आहे. डाक्यापासून चितागॉंगला जाणारा रस्ता याच शहरावरून जातो. इ. स. १९०१ सालीं या शहराची लोकसंख्या१९१६९ होती. या शहरीं १८६४ सालीं म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. गोमती नदींचें पाणी पुराच्या वेळीं गावांत शिरूं नये म्हणून येथें एक बांध घातला आहे. येथें टिप्पेराच्या राजानें१५ व्या शतकात बांधलेला धर्मसागर नावाचा एक तलाव असून त्याचा घेर १ मैल आहे. येथे कोमिल्ला व्हिक्टोरिया कॉलेज व वरीचशीं हायस्कुलें आहेत.

कोयी—एक डोंगरी जात. याची वस्ती मद्रास व हैदराबाद संस्थान यांतून आहे. एकंदर लो. सं (१९११) २,०३,७६३. गोदावरी जिल्ह्याच्या उत्तरेकडील डोंगरांत राहणारी कोयी अथवा कोया नांवाची एक जात असून जेयपूर जमीनदारीच्या मालकांगिरी नावांच्या तालुक्यांतहि कोयी जातीची वस्ती आहे. लोक गोंड वंशाचे आहेत असें म्हणतात व ग्रियर्सनच्या मतें गोंडी भाषेचीच कोयी भाषा ही एक पोटभाषा आहे. वरील प्रांतांतील कोयी भाषेंत बरेच शब्द असतात. तेथील लोकांनां बस्तरकडून आलेल्या कोयांची भाषा समजत नाहीं. रेव्हरंड जे. केन. म्हणतो कीं, गोंड व तेलगू भाषाचा पगडा बऱ्याच प्रमाणात कोयी भाषेवर बसलेला आहे.

कोयांच्या पंचवीस खेड्यांस मिळून 'समुतु' म्हणतात. व एकट्या भद्राचलम् तालुक्यांत एकंदर दहा 'समुतु' आहेत. गोदावरीनजीक रहणाऱ्या कोयांस गोम्मू कोई म्हणतात. पेरंबोयुडू, माडोगुट्टा, पेरेगट्टा, भातामुषायो व विडोगट्टा असे कोयी जातीचे पांच विभाग आहेत. एफ. आर. हेमिंगच (कास्ट्स ॲंड ट्राइब्ज ऑफ इंडिया पा. ४०) म्हणतो कीं, गोत्रांतर विवाहामुळें झालेला 'गट्टा' नांवाचा वर्ग या जातींत असलेला आढळून येतो. कपाळावरील निरनिराळ्या चिन्हांवरून मुडो, नालो व ऐडो वगैरे नांवाचा गट्टा किंवा वर्ग ओळखिता येतो. रावा अथवा दोरा नावाचे कोयी इतर सर्व पोटजातींपेक्षां फार श्रेष्ठ आहेत. जे. केन. म्हणतो कीं, बासावा व कोयी हे लोक एकच होत. बासावा हा शब्द भाषा या शब्दापासून झालेला आहे. त्या जातीचे गोल लोक इतरांपेक्षां निराळी भाषा बोलूं लागले म्हणून त्यांस हें नाव मिळालें असावें. एरागोल व काकागोल अशाहि जाती असून ह्यांच्याबद्दल मोठ्या दंतकथा आहेत.

गोदावरी जिल्ह्यांतील कोयी अगदीं साध्या वृत्तीचे लोक आहेत. ते दिसण्यांत गरीब व हीन दिसतात. अरण्यात रानटी लोकांसारखे राहून ते समाज व शहरें यांपासून अलिप्त रहातात. या एकान्तवासामुळें असो वा अन्यकारणानें असो त्यांच्या चरित्रांत प्रामाणिकपणा व शुद्धता हे सद्गुण असलेले दिसून येतात. खोंड जातहि खरेपणा व साधेपणा याबद्दल प्रसिद्ध आहे. बस्तर प्रदेशांतील कोयी स्वतःस भूमि राजुलु असें म्हणवून घेतात. त्यांचीं राहण्याचीं ठिकाणें बहुतेक अरण्यांत व डोंगरावर असतात. एकाच ठिकाणीं कायम वस्ती करून राहण्याची प्रवृत्ति कोयी लोकांत नाहीं. ते झोपड्या बांधतात, शेती करितात व चार वर्षांनीं देशांतरहि करितात. ते एखादें रान सर्व जाळून त्यांत बीं पेरून शेती करतात व ती जमीन नापीक झाल्यावर दुसरीकडे जातात. बालविवाह या जातींत फारसा नाहीं. वर श्रीमंत असेल तर त्याला तडजोड करून बायको मिळवितां येते. परंतु साधारणतः नवऱ्याकडील मंडळी वधूला जबरदस्तीनें पळवून नेतात व लग्नाच्या वेळीं मात्र तिच्या दुःखित आईबापांस निमंत्रण पाठवितात. यांच्यात बहुपत्नीत्वाची चाल असून विधवांनांहि लग्नार्थ पळवून नेतात. वधूवराना एकत्र स्नान घालून त्याच्यासह व ज्ञातीसह भोजनसमारंभ उरकण्यांत आला कीं, लग्न झालें असें समजतात. त्याच्या नंतर गाणें व बजावणें व नाच वगैरे समारंभ करण्यांत येतात. कोयी स्त्रिया अत्यंत काटक व स्वतःसंबंधीं फार निष्काळजी असतात. वयानें लहान असलेल्या मृतांस पुरण्याची व मोठ्यांस जाळण्याची त्याची रीत आहे मृतांची अशी वाट लाविल्यानंतर एखादा पशु मारून ते लोक मेजवानी करितात.

कोमालम्मा, कादूरूडू, आडादाराज्जु अशा त्यांच्या देवता आहेत. मामिलो व पेली या देवतांची पीकपाण्याकरितां प्रार्थना करून त्यांनां नवसकी देतात. पांडवांनां सर्व कोयी

भजतात. परंतु त्यांतील भीम व अर्जुन यांच्यावर त्यांची फार भक्ति असते. रानटी कुत्रीं हीं पांडवांचीं दूतांचीं कामें करणारीं असतात असा ह्यांचा समज आहे. भीम व हिडिंबा यांपासून आपली उत्पत्ति झाली असावी असें कोयी लोक मानतात. पिडा नांवाची दुसरी एक त्यांची देवता मुख्य आहे. या देवतेस बकरें व कोंबडा बळी देतात. देयामुत्तु म्हणजे पर्वतावरील राक्षस, यास ते पूज्य मानतात. कोराराशा ही एक देवता असून तिचें स्वामित्व व्याघ्रादि पशूंवर असतें. कित्येक कोयी कुटुंबात शिवपूजा सूरू झालेली आहे व कित्येक स्वतःस सिंग–कोयी असें म्हणवून घेतात. भीमाचा उत्सव पांच दिवस चालतो व त्यांत नाच होतो. लोखंडासारख्या धातूचे एक फूट लांबीचे तुकडे वेळूमध्यें घालून त्याची पूजा करण्यात येते. त्यास 'वेलपू' म्हणतात व ते मुख्य उपासकानाच फक्त गुप्तपणें दाखविले जातात. बस्तर येथील 'वेलपू' फार प्रसिद्ध आहे. प्रत्येक कुटुंब एखादा वेलपू पूजेकरिता बाळगतें. त्या वेलपूस सोन्यारुप्याचे डोळे लाविलेले असतात. जेव्हा एखादी साथ उद्भवते तेव्हा वेलपूस जनावरें बळी देतात व साथ गेली की त्यास गुप्तस्थानीं ठेवतात. केव्हां केव्हा त्यांची मिरवणूकहि काढण्यात येते. भूदेवीपंडागा नावाचा एक समारंभ दर वर्षी पिकें आल्यानंतर करण्यात येतो. त्या वेळीं सर्व पुरुष शिकारीस बाहेर पडतात. ज्यास शिकार साधणार नाहीं त्याची फार विटंबना करण्यांत येते. चेडीप नावाची चेटकी अथवा जादूगारीण मध्यरात्रीं व्याघ्रारूढ होऊन फिरत असते. ती ज्यांच्या गृहांत प्रवेश करिते तेथील लोकांस मूर्च्छा व केव्हा केव्हा मृत्यूहि येतो असें म्हणतात. एजुगाडू नावाचा एक वैद्य वरील चेटकीप्रमाणेच गोदावरी जिल्ह्यांत लोकांनां उपद्रव देतो. हा वैद्य देवतानां आळवून व एखाद्या झाडाखालीं काहीं मंत्र म्हणून कोणत्याहि ठराविक मनुष्यास ठार करूं शकतो. कोयी जातीचा मुख्य पुढारी सामाटू दोरा या नावानें ओळखला जातो; व त्याचे दोन सहकारी पेद्दन दारुलु या नावानें संबोधले जातात. सामाटू दोरु याचीं कर्तव्यें अनेक असून त्याचें स्थान परंपरागत नाहीं. सर्व सभाचे अध्यक्ष होणें, ज्ञातिसंबंधानें तंटे मिटविणें, दंड करणें, वगैरे अनेक कर्तव्यें त्यांस करावीं लागतात. सामाटू दोराची नेमणूक बहुधा जमिनदाराकडून करण्यांत येत असते. या जातीचा आवडता विषय म्हणजे नाच हा होय. ते तालावर नाचतात व गाणीं म्हणत असतांना मागें पुढें असा निरनिराळ्या गिरक्या घेऊन नाच करितात.

कोरकई—हें पाण्डय राजघराण्याच्या वेळीं त्यांच्या राज्यांतील एक मोठें बंदर असून त्यांच्या एका मोठ्या प्रांताचा सुभेदार येथें राहत असे. कारोमांडल किनाऱ्यावर हें बंदर फार प्राचीन काळापासून समुद्रगुमाच्या व्यापाराकरितां म्हणून प्रख्यात आहे. मॅकिंडल व टॉलेमीहि याचा नामनिर्देश करितात (अय्यर प्रा. हिं). हें बंदर हल्लीं तिनेवल्ली जिल्ह्यांत ताम्रपर्णीच्या काठीं आहे. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी ही पांड्यांची राजधानी होती. दक्षिण हिंदुस्थानच्या सुधारणेचा पाळणा म्हणजे हें बंदर होय. दंतकथोल्लेखित चेर, चोल व पांड्य या तीन भावांचें हें मूळ गांव होय. पांड्यांच्या वेळीं येथें मोत्याचा फार मोठा व्यापार चाले. पांड्यांनीं पुढें आपली राजधानी जरी मदुरेस नेली तरी येथें त्यांचा युवराज राही व व्यापारावर व वसुलावर नजर ठेवी. कांहीं शतकांनीं येथें वाळू भरून भरून हें गांव बंदर म्हणून नालायक झालें व तेव्हांपासून त्याचें वैभव नष्ट झालें [प्लिनी; पेरिप्लस; तामीळ लोक; इंडि. अँटि. १९१३].

कोरपूट तहशील—हा विजगापट्टण एजन्सींतील एक तालुका आहे. याचें क्षेत्रफळ १९२१ सालीं ६११ चौरस मैल होतें. याची लोकसंख्या ५६५४८ होती. यांत ६११ खेडीं आहेत. हा सर्व मुलुख डोंगराळ आहे. येथील जंगल बरेंच नाहींसें करून टाकण्यांत आलेलें असून त्या ठिकाणीं लागवडीला योग्य अशी जमीन करण्यात आली आहे. हा तहशील जेयपूरच्या राजाच्या ताब्यांत आहे. कोरपूट गावीं जेयपूरचा पोलिस सुपरिंटेंडंट, व एक स्पेशल असिस्टंट एजंट असे अधिकारी रहातात. येथें बरेच जर्मन मिशनरी आहेत. या ठिकाणीं एक पोलिसाची रिझर्व तुकडी असते.

कोरफड—या वनस्पतीला लाटिनमध्यें आलो बार्बडेन्स, आलो व्हेरी, संस्कृतमध्यें घृतकुमारी, कन्यकाकुमारी, अमरा, अजरा; मराठींत कोरफड, कुवारकाडे, गुजराथींत कुंवार, हिंदींत कुवारी, कुवारपाठा, थुगुवार; बंगालींत घृतकुमारी इत्यादि नांवें आहेत.

या वनस्पतीचे अनेक पोटभेद आहेत.त्यांपैकीं काहीं वन्य स्थितींतले आहेत. हिचें जन्मस्थान उत्तरआफ्रिका असावें असा समज आहे. वेस्ट इंडिज बेटें, जमेका, बारबाडोझ या बेटांत फार दिवसांपासून हिची लागवड करीत आले आहेत.

कोरफड हिंदुस्थानात बहुतेक सर्व ठिकाणीं उत्पन्न होते. हिच्या एकंदर तीन मुख्य जाती मानल्या आहेत. त्यांपैकीं दोन हिंदुस्थानात सांपडतात. तिसरी जात जिच्यामधून "आलो सो कोट्रिना" नांवाचा बोळ बनवितात ती आपल्या देशांत सांपडत नाहीं. या जातीचें वर्णन खालीं दिलें आहे.

आफ्रिकेच्या दक्षिणेस नाताळ व केपकॉलनी प्रांतात किनाऱ्यापासून२००–३००मैल पावेतों कोरफड उगवते. तिकडील लोक बकऱ्याच्या किंवा माकडाच्या कातड्याच्या पिशव्या करून त्याचीं तोंडें झाडाच्या बुडाशीं लावून ठेवितात व पानांच्या बुडाशीं आडवे काप पाडून तो रस \/ या आकाराच्या लाकडी घमेल्यांत गळूं देतात. पुढें तो हवेनें सुकतो. ही कृति कोरफडीच्या सर्व जातींनां लागू आहे. काठेवाडच्या पश्चिम किनाऱ्यावर जाफराबाद संस्थान आहे. तेथें ही

पिंवळया फुलांची कोरफड उत्पन्न होते. या कोरफडीस अलोस बार्बाडेन्सेस हें नांव तज्ज्ञांनीं दिलें आहे हिचीं पानें १॥ पासून २॥ फूट लांब असून दळदार असतात. त्यांची जाडी अर्ध्या इंचापासून पाऊण इंचापर्यंत असते. पानें हिरव्या रंगाचीं तलवारीच्या आकाराचीं असून त्यांवर पांढरे ठिपके असतात. फुलांचा बाह्य कोश पिंवळया रंगाचा १४ ते १६ इंच लांबीच्या पुष्पदंडावर असतो. त्यांपैकीं खालचीं फुलें नारिंगी रंगाचा मधलीं फिक्या रंगाचीं व शेंडयाकडील हिरवीं असतात. त्यांतमधील परागकोश लाल रंगाचा असतो. फुलांचा दांडा मार्गशीर्षाच्या सुमारास येऊन पौषाच्या अखेरीस झडून जातो.

(२) हबशी कोरफड (अलोस व्हलगॅरिस) ही जात खंबायत व काठेवाडच्या किनाऱ्यावर आपोआप उगवलेली आढळते. हिचा बुंधा टणक असून १-२ फूट उंचीचा व २-३ इंच व्यासाचा असतो. पानें खड्गाकार असून दीडपासून २॥ फूट लांबीचीं पसरट असतात. तीं टोंकाकडे निमुळतीं हिरव्या रंगाचीं असून त्यांच्या पाठीवर सफेत रंगाचे ठिपके असतात. पुष्पदंड बराच लांब असून उपपत्रें अरुंद भाल्यासारखीं असतात. फुलें पिंवळीं असून बुडाशीं हिरवीं असतात. त्याची अंतर्वेटिका आखूड गळयाची असून तिचे दाते लांब असतात व नरकेसर वटिकेच्या बाहेर बरेच आलेले असतात. कोरफडीच्या पात्यांतील गीर पार-दर्शक व कडू असतो. गुजराथमध्यें कोरफडीचें लोणचें करि-तात. कोरफड आढ्यास टांगून ठेविली तरी न सुकतां जशीच्या तशीच रहाते वरील पात्या सुकल्यास नवीन पात्या फुटून ही वनस्पति सदासर्वकाळ ताजी रहाते म्हणून हिला "कुमारी" हें अन्वर्थक नांव मिळालें आहे. कित्येक ठिकाणीं कोरफडीचीं मोठालीं रानें सांपडतात. कोरफडीच्या रसापासून येळयाबोळ म्हणजे काळा बोळ तयार करतात. तो सारक, रेचक व आर्तवशुद्धिकर आहे.

औ ष धी उ प यो ग.—खोकल्यास कोरफड फुपाटयात भाजून तिचा रस व आडुळशाचा रस अथवा मध, पिंपळी व लवंगाची पूड घालून ती घ्यावी, किंवा कोरफडीचा रस मध, सैंधव व हळद मिळवून घ्यावा. डोळे दुखूं लागल्यास कोरफडीच्या कापा पाण्यांत धुऊन त्या पाण्यात तुरटीची लाही व अफू मिसळून तें पाणी गाळून पोथेंडीनें डोळयावर फिरवीत जावें. [वॅट; पदे]

कोरा—संयुक्तप्रांत. फतेपूर जिल्ह्याच्या खाजुआ तह-सिलींतील एक जुनें शहर. उ. अ. २६° ७' व पू. रे. ८° २२'. लोकसंख्या (१९०१) २८०६. हें शहर बरींच शतकें अगोदरच्या गौतम राजांच्या ताब्यांत होते व मुसल-मानांच्या वेळीं हें प्रांताचें मुख्य ठिकाण होतें. मोठया बागें-तील 'बारादरी' व त्याच्या भोंवतालच्या उंच भिंती व भव्य तलाव हे पुरातन काळचे मुख्य अवशेष आहेत. हें काम बहुतेक १८ व्या शतकांतील असावें.

कोरिंग—मद्रास इलाख्यांत गोदावरी जिल्ह्यांतील कोक-नाड तालुक्यांतील एक खेडें. गोदावरीस उत्तरेकडून येऊन मिळणाऱ्या पहिल्या नदीच्या तीरावर कोकनाडपासून ८ मैलांवर वसलेलें आहे. कोरिंग हें पूर्वी डच व्यापाऱ्यांचें वसा-हतीचें स्थान होतें व एके काळीं हें एक प्रमुख बंदरहि होतें. जवळच्या तल्लरेवू खेड्यात जहाजें बांधण्याचें काम चालतें. येथून जवळच ९ मैलावर निलपल्ली येथें भात सड-ण्याचा मोठा कारखाना आहे.

कोरिया—आशिया खंडांतील पूर्वेकडचा एक देश. क्षेत्रफळ सुमारें ८४००० चौ. मै. असून लोकसंख्या (१९११) १६९९८१९१ आहे. परकीय लोकात मोठा भरणा चिनी लोकांचा (१८९७२) आहे त्याखेरीज ब्रिटिश प्रजाजन (२२३), अमेरिकन (५९७), फ्रेंच (१०७) व जर्मन (५७) आहेतच. अलीकडे जपानी लोक फार येऊं लागले आहेत.

कोरियाची हवा कोरडी व उत्साहवर्धक असून जपानां-तल्याप्रमाणें या ठिकाणीं भूकंप अगर प्रचंड झंझावात सुटणें अशा प्रकारचे चमत्कार दृष्टीस पडत नाहींत. उत्तरेकडील कोरियाचा प्रदेश डोंगराळ आहे पण दक्षिण व पश्चिम या दिशांच्या मुलुखात सपाट मैदानें, मोठया नद्या असून फ्यूसन, मोक्यो, चेमुलपो आणि छिनांपो अशीं चांगलीं बंदरें वसलेलीं आहेत. उत्तरेकडील भागांत खनिजपदार्थांची समृद्धि आहे, तर नैर्ऋत्येकडील टापूंत शेतकीला अनुकूल अशी जमीन आहे. कोरिया हें भौगोलिक दृष्टया फार चांगल्या ठिकाणीं वसलेलें आहे व त्यामुळें चीन, जपान, सायबेरिया या भागांत कोरियाला आपला व्यापार सुलभ रीतीनें चालवितां येतो. कोरिया व उत्तर आशिया यांच्यामध्यें हल्लीं आगगाडी चालू झाली आहे.

भा षा व ध र्म.—कोरियन लोकांची भाषा मोंगोलो-तार्तर व जपानी यामधली आहे. हींत चिनी शब्दांचा पुष्कळ भरणा असून लिहिण्याकरितां लिपीची योजना आहे. सरकारी दप्तर जपानी भाषेंत असतें. लोकांत धार्मिक भावना कमी आहे तथापि चीन देशांतल्याप्रमाणेंच पूर्वजांची उपासना मोठया नेमानें पाळली जाते. कोरियांत बरेचसे बौद्धमठ आहेत, पण याकडे कोणी फारसें लक्ष देत नाहीं.

शि क्ष ण—चिनी साहित्य व कन्फ्यूशियन तत्त्व यांचें ज्ञान उच्च दर्जाच्या लोकांत जें पूर्वी अवश्य मानलें जाई तें आतां जपानी वर्चस्वामुळें लोपत चाललें असून त्याची जागा चांगल्या व्यावहारिक शिक्षणानें पटकाविली आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या चळवळी या ठिकाणींहि आहेतच. त्यामुळें बाटलेले ख्रिस्ती कोरियांत पुष्कळ दिसतात. तसेंच मुलांमु-लींच्या अनेक मिशनरी शाळा देशभर पसरल्या आहेत. पण या सर्व शाळा सरकारी शिक्षणखात्याच्या देखरेखीखालीं असतात. यांत्रिक व औद्योगिक संस्थाहि झपाटयानें निघत आहेत. सुइजेन येथें एक शेतकी शाळा स्थापन झाली आहे.

इ. स. १९१४ साली सर्व तऱ्हेच्या एकंदर ४०५ सरकारी शाळा होत्या. खासगी शाळा १०३० होत्या. सेवुलमध्यें १ कोरियन दैनिक व २ जपानी पत्रें निघतात. चेमुल्पो येथें आणखी कांहीं निघतात. सेवुलला एक सरकारी इंग्रजी दैनिक प्रसिद्ध होतें. वृत्तपत्रांवर जपानी सरकारचा मोठा कटाक्ष असतो. त्यामुळें स्वतंत्र विचारांचा फारसा प्रादुर्भाव होत नाहीं.

म हू सू ल व ख र्च. सन १९१६-मध्यें कोरियाचा महसूल ४७६४ ५५९ व जादा महसूल २३,४३,७५४८ येन झाला व १९२०-२१ साली साधा महसूल ६९३४७८२० व जादा ५४४६२१२३ येन इतका झाला. १९१६-१७ मध्यें कोरियाचा वार्षिक खर्च ५७५६२७१० येन व १९२०-२१ साली ११,३३,२८,३३४ येन इतका झाला.

व्या पा र.—चेमुल्पो, फुसन, वौसन, चिन्नंपो, मोकपो, कुन्सन, सॉंग्चिन, पिंगयंग वगैरे बंदरें होत. १९१०-२० सालांच्या दरम्यान कोरियाची परराष्ट्रीय व्यापार बऱ्याच मोठ्या प्रमाणांत झाला. याला मुख्य कारणें म्हणजे जलमार्गानें व पायमार्गानें वाहतुकीची उत्तम सोय, जकातीची सवलत, व महायुद्धामुळें वाढलेली मागणी हीं होत. इ. स. १९१२ साली कोरियांतून जपान. मध्यें ५६१६६०८ येन किंमतीच्या मालाची व परराष्ट्रात १५३६९००५ येन इतक्या किंमतीच्या मालाची निर्गत झाली. तर १९१९ मध्ये अनुक्रमें १९८१६९१७ व १९९८४८८५४ येन इतक्या किंमतीच्या मालाची निर्गत झाली. १९१२ त जपानमधून व परराष्ट्रामधून अनुक्रमें २६३५९४३४ येन, ४०७१६०१३ येन किंमतीची आयात झाली व १९१९ मध्यें अनुक्रमें ९५८६८६४० व १८४९१७९७८ येन किंमतीच्या मालाची आयात झाली.

शे त की व उ द्यो ग धं दे.—कोरिया हा केवळ शेतकीचा प्रदेश आहे. लागवडींत आलेली जमीन सरासरी ७७७०००० एकर आहे. पण शेतकी करण्याची पद्धत सुधारलेली नाहीं. तांदूळ, गहूं व इतर धान्यें होतात. कोरियांतून जिनसेंग नांवाची वनस्पति विपुल प्रमाणांत होते. त्याची अधिक वाढ करण्याकरतां इ. स. १९०८ साली जपाननें एक खास अधिकारी नेमला. तसेंच पिकांतील रोगांचा नाश करण्यासाठीं व शेतकीची वाढ करण्यासाठीं शेतकरी मंडळें स्थापण्यांत आली. इ. स. १९०८-२० या अवधींत शेतकीला उपयुक्त जमीनीची इ. स. १९०८ सालापेक्षां पंधरापट वाढ झाली व इ. स. १९२० साली चिनसंग वनस्पतींचें उत्पन्न २०००००० येन झालें. मीठ तयार करण्याचें कामहि सरकारनें आपल्याच ताब्यांत घेतलें इ. स. १९१८ साली १०२३९६१४१ पौंड मीठ तयार झालें. १९२० साली याहीपेक्षां अधिक मीठ तयार करण्याचें सरकारनें प्रयत्न चालविले. तंबाखूचा व्यापार कोरियामध्यें फार प्राचीन काळापासून आहे; त्यांतहि बरीच प्रगति झाली आहे. इ. स. १९१९ मध्यें तंबाखूची लागवड ४२५२५ एकर जमीनींत होत होती; व १४०११६९ येन इतक्या किंमतीची तंबाखू त्या साली तयार झाली.

मलबेरी झाडांची लागवड व रेशमी किड्यांची जोपासना याहि बाबतींत सरकारनें बरीच खटपट चालविली आहे. १९१८ रेशमी किड्यांचे कोषे (९० ९०४२०)५०००००० येन किंमतीचे बाहेर गेले. तरी पण रेशमाचा व्यापार कोरियामध्यें अद्यापि बाल्यावस्थेंत आहे.

गु रें ढो रें—गुराढोरांचीहि जोपासना कोरियांत सर्व ठिकाणीं केली जाते. शेतकीच्या कामीं बैलांचा उपयोग करण्यांत येतो. कोरियातील गाई दूध कमी देतात व यांचा मांसाकडेच उपयोग करण्यांत येतो; गाईची कातडी बाहेर देशात मोठ्या प्रमाणांत पाठवण्यांत येतात. कोरियांत चांगल्या प्रकारचे घोडे उत्पन्न होत नाहींत. पण त्याबद्दल सरकारनें बरेच प्रयत्न चालविले आहेत. तसेंच खेचरें, गाढवें, कोंबडीं, मेंढ्या इत्यादि जनावरांचाहि चांगल्या प्रकारची निपज व्हावी याबद्दलहि सरकारची खटपट चालू आहे.

फळांच्या लागवडीसंबधानें समाधानकारक स्थिति आहे. इ. स. १९१३ मध्यें पेअर, जांभळें, चेसनट यांच्या झाडांची जितकी संख्या होती त्याच्या दुप्पट वाढ १९१८ त झाली आहे.

ख नि ज प दा र्थ.—कोरिया जपानला जोडण्याच्या पूर्वी खनिज पदार्थ काढण्याचें काम बहुतेक परकीय राष्ट्रेंच करीत असत. इ. स. पूर्वी चार अमेरिकन, २ इंग्लिश व इतर राष्ट्रांच्या एक दोन कंपन्या यांनीं खाणींचा धंदा व्यापून टाकला होता. कोरियांत सोन्याच्या खाणींच मुख्यतः आहेत. इ. स. १९१६ च्या एप्रिल १ तारखेपासून जपाननें परकीय लोकांनां खाणीसंबधाचे हक्क देण्याचें बंद केलें. इ. स. १९१६ पूर्वी ज्या कंपन्यांकडे खाणी होत्या त्या कंपनींनां मात्र हांकलून देण्यांत आलें नाहीं. सोनें, चांदी, जस्त तांबें, शिसें, लोखंड कोळसा इत्यादि खनिज पदार्थ कोरियांत सांपडतात. इ. स. १९१९ मध्यें खाणींपासून होणारें उत्पन्न २५४१४५१० येन झालें.

का र खा नें.—कारखान्यांची कोरियांत वाण आहे. तरी पण नवीन धंदे अस्तित्वांत येऊं लागले असून कापूस वटण्याच्या गिरण्या, तांदुळाचा भुसा काढण्याचा गिरण्या, विजेचे कारखाने अस्तित्वांत येऊं लागले आहेत. वनगाई प्रांतांत क्युनिपो या ठिकाणीं लोखंडाचा कारखाना निघाला आहे. त्यांतून निरनिराळा लोखंडाचा माल २३५००० टन बाहेर पडतो. पल्प तयार करण्याचा कारखाना शिनविडर येथें निघाला असून कमरपट्टे, घोड्याच्या जिनाचें कातडें इत्यादि कातडी चांगली तयार होतात.

द ळ ण व ळ णा चीं सा ध नें.—इ. स. पूर्वी कोरियांतील रस्त्यांची स्थिति अगदीं समाधानकारक नव्हती. पण

जपानने कोरिया आपल्या ताब्यांत घेतल्यावर जवळ जवळ ५००० मैलांचा रस्ता तयार केला. १९१९–२० मध्यें कोरियात ११५३ मैल रेल्वेचें जाळें होतें. १९१० पासून टपालगृहांचीहि वाढ बरीच झाली आहे. इ. स. १९२० सालीं कोरियांत ५६२ पोस्टें होतीं. ४८७० मैल इतक्या टांपूत तारा चालू झाल्या आहेत.

इतिहास:—पूर्वी कोरिया देशांतले लोक अगदीं रानटी स्थितींत असून, दऱ्या खोऱ्यांत श्वापदाप्रमाणें रहात असत. या लोकांत अगदीं पहिल्यानें सुधारणा घडवून आणणारा पुरुष किटसेनामक चिनी गृहस्थ असून तो इसवी सनापूर्वी ११२२ मध्यें हजारों चिनी लोकांसह कोरियामध्यें आला व त्यानें येथील रानटी लोकांवर आपलें वर्चस्व प्रस्थापित करून त्यांच्यांत चिनी तऱ्हेची संस्कृति घडवून आणली. याच्या वंशजांनीं इसवीसनापूर्वी चवथ्या शतकापर्यंत राज्य केलें. पुढें इसवीसनानंतर १० व्या शतकापर्यंत अंतःकलहामुळें व परराष्ट्रीयांच्या स्वाऱ्यामुळें हा देश त्रस्त झाला. तरी अशा अंदाधुंदीच्या काळांतहि लेखनकलेचा प्रादुर्भाव, वाङ्मयाची अभिवृद्धि, बौद्धधर्माचा प्रसार इत्यादि सुधारणा अबाधितपणे होऊं शकल्या. इ. स. ९१३ मध्यें या देशांतील यादवीचा नायनाट 'वँग' नामक एतद्देशीय वीरानें करून, यात राष्ट्रीय घटना घडवून आणली व याला 'कोरिया' हें नाव देवून यांतील बौद्धधर्माला राष्ट्रीय स्वरूप दिलें. याच्या वेळीं कोरियाची राजधानी 'सौंगडो' नामक शहरीं होती.

पुढें इ. स. १३९२ मध्यें 'वँग' च्या घराण्याचें वर्चस्व लोपलें, व 'नि तैजो' अथवा 'लिटन' नामक राजाचा अंमल सुरू झाला. कोरियांत इ. स. १९१० पर्यंत जे राजे राज्य करीत आले, त्यांचा मूळ पुरुष हाच होय. यानें चीन देशाच्या त्या वेळच्या 'मिंग' नामक बादशहाशीं सख्य केलें, व त्याचें मांडलिकत्व पत्करून त्याच्याकडून 'कोरिया देशाचा सम्राट्' अशी मान्यता मिळविली. यानें सुरळीत राज्यव्यवस्थेकरितां जी योजना अमलात आणली तीच इ. स. १८९५ पर्यंत या देशांत चालू होती; व सध्याहि काहीं अंशी चालू आहे. यानें बऱ्याच चांगल्या सुधारणा घडवून आणल्या. मानवयज्ञाच्या व वृद्धांना जिवंत गाडण्याच्या दुष्ट चाली बंद केल्या. चिनी वाङ्मयांत परिक्षा घेणें सुरू करून त्यांत जे उत्तीर्ण होत त्यांना राज्यांतील मोठमोठ्या हुद्याच्या नोकऱ्या देण्याची पद्धत सुरू केली आणि चीनमधील 'कन्फ्यूशियस' धर्मगुरूंची शिक्षणविषयक, शासनविषयक व सामाजिक पद्धती अमलांत आणून 'कन्फ्यूशियस' पंथासच राष्ट्रीय धर्माचें स्वरूप दिलें. कोरियावर या सुधारणांचा पगडा पुढें पांच शतकांपर्यंत चांगला टिकला व येथील प्रजा सुखानें वास्तव्य करीत होती. पण नंतर कोरियाचें दुर्दैव ओढवलें आणि त्यावर इ. स. १५९२ मध्यें जपानचें परचक्र आलें. त्यास कोरियानें चीनच्या साहाय्यानें ६ वर्षेपर्यंत तोंड दिलें. पण अखेरीस यांतील 'स्किल' व बरींच जुनीं शहरें जपानच्या हस्तगत झालीं; जवळ जवळ सर्व देश ओसाड झाला आणि यांतील कलाकौशल्याचें भांडार व कलानिपुण पुरुष जपानमध्यें नेण्यांत आले. शेवटीं इ. स. १५९८ त कोरियाच्या 'फुसन' नामक बंदरांतील माशांचा व्यापार करण्याचा हक्क जपानला असावा आणि याशिवाय कोरियानें जपानला दरवर्षी मोठी खंडणी द्यावी, या अटीवर हें भयंकर युद्ध थांबलें. या जबरदस्त आघातामुळें कोरियाची घडी जी एकदां बिघडली तिचा जम पुन्हां कधींच नीट जमला नाहीं.

नंतर, इ. स. १८६६, १८६७ व १८७१ या वर्षी फ्रेंच व अमेरिकन लोकांनीं या देशांत येऊन, धर्मप्रसाराच्या मिषानें काहीं राजकीय धोरण लढवून आपली तुंबडी भरण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनां मुळींच दाद मिळाली नाहीं. पुढें इ. स. १८७६ मध्यें चीन देशाच्या संमतीनें जपाननें कोरियाशीं तह घडवून आणला, व तहान्वयें 'फुसन' मध्यें आपली वसाहत करून व्यापाराचें बस्तान नीट बसविलें आणि इ.स. १८८० मध्यें 'वॉनसन' (गेनसन) व 'चेमुलयो' हीं दोन बंदरें व्यापाराकरितां करवून घेतलीं. इ. स. १८८२ मध्यें चीननें आपले व्यापाराचे व सरहद्दांसंबंधीं नियम प्रसिद्ध केले, आणि अमेरिकेनें कोरियाशीं व्यापारी तह जुळवून आणला. कोरियाच्या पडत्या काळाचा इतर राष्ट्रांनीं असा फायदा घेतला, असें पाहतांच यूरोपीय राष्ट्रांनीं आपले घोडें पुढें दामटलें. इ. स. १८८३ मध्यें जर्मनी व 'ग्रेट ब्रिटन' इ. स. १८८४ मध्यें इटली व रशिया, इ. स. १८८६ मध्यें 'फ्रान्स', आणि इ. स. १८९२ मध्यें 'ऑस्ट्रिया' या राष्ट्रांनीं कोरियाशीं व्यापारी तह केले; आणि 'सिऊल' राजधानीचें बंदर व्यापाराकरितां खुलें करवून घेतलें. इ. स. १८९७ व १८९९ च्या दरम्यानच्या अवधींत यांच्या कारस्थानाचें वजन कोरियावर चांगलेंच पडलें व आणखी काहीं बंदरें या परकीय व्यापाऱ्यांस खुलीं झालीं. एवंच सर्व कोरिया देश आतां परराष्ट्रियांस मोकळा झाला.

आतां या राष्ट्रांशीं एकामागून एक झालेल्या व्यापारी घडामोडींत जो काळ निघून गेला त्या अवधींत म्हणजे इ. स. १८८२ ते १८९७ च्या दरम्यान कोरियाची अंतःस्थिति कशी काय होती इकडे आपण वळूं. इ. स. १८८२ त येथील बादशहाच्या बापानें म्हणजे तैवोन कुनानें कट करून जपानी वकीलाच्या ठाण्यावर हल्ला केला; पण तो यशस्वी न झाल्यामुळें त्याच्या नुकसानीच्या भरपाईदाखल कोरियाला बरीच मोठी रक्कम जपानला द्यावी लागली. नंतर यादवी बोकाळून तींत काहीं मुत्सद्दी बळी पडले व पुढें इ. स. १८९४ मध्यें तर मोठें बंड झालें. तें मोडण्याकरितां बादशहाला चीनची मदत मागावी लागली चीननें मदत पाठविली.

व पूर्वीच्या चीन व जपानमध्यें झालेल्या तहान्वयें जपानला आपला हेतु कळविला. जपाननेंहि ही संधि साधून आपलें सैन्य कोरियांत उतरविलें; सिऊल राजधानी व तहांत नमूद केलेलीं सर्व बंदरें आपल्या ताब्यांत घेतलीं; आणि तें बंड कायमचें मोडण्याकरिता ज्या कांहीं राजकीय सुधारणा पाहिजे होत्या, त्याचा मसुदा चीननें व जपाननें मिळून करावा अशी सूचना पुढें आणली. पण त्या सुधारणा कोरियानेंच कराव्या, त्यात कोणीहि ढवळाढवळ करूं नये आणि ही तडजोड होण्याच्या पूर्वी जपाननें आपलें सैन्य कोरियांतून काढून घ्यावें असें त्या सूचनेस चीननें उत्तर मिळालें. जपानला चीनची ही योजना पटली नाहीं,म्हणून ती त्यानें अमान्य केली व राजाच्या महालावर हल्ला करून तो आपल्या ताब्यात घेतला. याचा परिणाम असा झाला कीं, पुढें चीन व जपान यांमध्यें युद्ध जुंपलें. या युद्धांत जपानला विजय मिळाला, व कोरियातील चीनचें वर्चस्व पार नष्ट होऊन त्याच्या जागीं जपानचें वर्चस्व प्रस्थापित झालें. तेव्हांपासून पुढें कोरियांमध्यें जपानी सल्लागारांच्या मदतीनें बऱ्याच चागल्या सुधारणा अमलात आल्या; आय व व्यय खातें सुधारण्यांत आलें, इतर खात्यांतील अवाढव्य खर्चाची योग्य छाटाछाट करण्यात आली. करांची आकारणी समतेच्या तत्वावर झाली, टपालाची व शिक्षण देण्याची पद्धत अमलात आली, लग्न करण्याची वयोमर्यादा वाढविण्यात आली आणि आणखी इतर बारीक सारीक सामाजिक सुधारणा घडून आल्या. एकूण कोरियाच्या राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे सर्व बाबींत सुधारणा घडून आल्या व त्यात जपानचा हात होता.

पण हें जपानचें वजन फक्त १८ महिनेच टिकलें. कारण इ. स. १८९५ च्या आक्टोबर महिन्यात "तैवन कुननें" जपानी सैन्याच्या साहाय्यानें राजवाड्यावर छापा घातला व बादशहास कैद केलें. परंतु पुढें चार महिन्यांनीं बादशहा तुरुंगांतून निसटला व रशियाच्या वकिलाचें जेथें ठाणें होतें तेथें पळून गेला. तो तेथें इ. स. १८९७ पर्यंत राहिला. याचा परिणाम असा झाला कीं जपानचें कोरियामधील वजन कमी झालें, प्रतिगामी चळवळ सुरू झाली आणि बादशहानें रशियाच्या मदतीनें आपल्यावरील जपानचा दाब पार झुगारून देऊन आपली सत्ता पूर्ववत् अनियंत्रित करून घेतली. या रशियाच्या ढवळाढवळीमुळें बादशहाच्या वाढलेल्या अनियंत्रित सत्तेचा परिणाम असा झाला कीं कोरियांत अंदाधुंदी माजली. पुन्हा रशियाची जपानच्या कोरियामधील व्यापाराचा नाश करण्याची कावेबाज मसलत जारीनें चालूंच होती. यामुळें जपानला शेवटीं रशियाचे विरुद्ध हातीं शस्त्र धरावें लागलें. या रूसोजपानी युद्धांत (१९०४-५) जपान विजयी झाला व तेव्हांपासून त्यांचें कोरियांत पूर्ववत् वजन प्रस्थापित झालें. पण कोरियांतील लोकांनां जपानचें वजन नको होतें. त्यामुळें येथें वारंवार दंगे होत असत व बादशहाहि जपानविरुद्ध कट करीत असे. पण शेवटीं इ. स. १९०६ मध्यें बादशहाला अपयश येऊन आपले अधिकार आपल्या मुलाला द्यावे लागले. एवढें झालें तरीहि कोरियाचें जपानला प्रतिगामी असलेलें वातावरण निवळेना. तेव्हा इ. स. १९१० मध्यें हा देश जपाननें आपल्या पूर्ण ताब्यांत घेऊन राजाला पदच्युत केलें. आतां कोरिया सर्वस्वी जपानचा आहे.

१९१० च्या ऑगस्ट महिन्याच्या २२ व्या तारखेस कोरिया हें जपानी साम्राज्यांतर्गत संस्थान म्हणून ठरलें व त्याला पुरातन काळीं लावण्यांत येत असलेलें 'चोसेन' हें नांव पुन्हा देण्यांत आलें. जपानी साम्राज्याचा एक भाग झाल्यामुळें कोरियाचें स्वातंत्र्य नष्ट झालें तरी पण जपानी लोकाच्या राज्यपद्धतीशीं व प्रागतिक धोरणाशीं कोरियन लोकांचा निकट संबंध येऊं लागल्यामुळें कोरियाचीहि सर्वांगीण प्रगति आस्ते आस्ते होऊं लागली. याच वेळीं कोरियांतील व कोरियाच्या बाहेरील इतर लोकांचा असा एक पक्ष होता कीं, जो कोरियाचें स्वातंत्र्य नष्ट केल्याबद्दल जपानी लोकांवर एक सारखा जळफळत होता. स्वातंत्र्यापुढें किरकोळ सुधारणा तुच्छ आहेत, स्वातंत्र्याशिवाय राष्ट्राची प्रगति व्यर्थ होय, अशा प्रकारची विचारसरणी हा पक्ष मांडीत होता व त्यात पुष्कळ तथ्य होतें ही गोष्टहि निर्विवाद आहे. तथापि पारतंत्र्याच्या स्थितींतहि इतर कांहीं दृष्टींनीं कोरियाची प्रगति होत होती हेंहि नाकबूल करून भागणार नाहीं. कोरिया जपानला जोडण्यात आल्यावर त्याची राज्यव्यवस्था पहाण्याकरतां जनरल टेरायुची याला व्हाइसराय म्हणून नेमण्यात आलें व त्याच्या मदतीला यमागाटा याची नेमणूक झाली. १९१६ मध्यें जनरल टेरायुची याच्या जागीं जनरल काउंट हसेगवा हा आला. कोरियामध्यें या सुमारास बरेच दंगे होत होते. चोर व दरवडेखोरांच्या टोळ्या चहूंकडे पसरल्या होत्या. त्यामुळें रहिवाश्याच्या जीवाला व मालमत्तेला वारंवार धोका पोंचत असे. याचा बंदोबस्त करण्याकरता, काउंट हसेगवा यांनीं पोलिस शिपाई व लष्करी शिपाई यांचें एकीकरण करून चोर, दरवडेखोर वगैरे लोकावर धाक घालण्याची तरतूद केली. १९१९ पर्यंत म्हणजे कोरिया जपानशीं जोडण्यांत आल्यापासून सुमारें ८।९ वर्षे कोरियामध्यें अराजक लोकाचा विशेषसा त्रास नव्हता. पण १९१९ सालीं मात्र अराजक लोकांच्या दंग्याला सुरुवात होऊन असंतोषाचा वणवा चहूंकडे थोडक्या काळांत पसरला. या दंग्याला व असंतोषाला दोन तीन कारणेंहि होतीं. एक तर महायुद्धांत समता व स्वातंत्र्य इत्यादि जीं उदात्त तत्वें विल्सन साहेबांनीं पुढें मांडलीं त्याचा परिणाम कोरियन लोकांच्या मनावर होऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळावें अशी कोरियनांची साहजिकच प्रवृत्ति झाली.

दुसरें कारण म्हणजे जपानी लोकांनी राज्यकर्त्यांच्या नेहमींच्या वहिवाटीला अनुसरून कोरियामध्यें सुधारणा करण्याच्या व कोरियन लोकांना राज्यकारभारांत हक्क देण्याच्या बाबतींत हळू हळू मागचें पाऊल घेण्यास सुरुवात केली. यामुळें अधिक असंतोष पसरून बऱ्याच ठिकाणीं दंगेधोपे झाले. पण जपाननें सैन्याच्या जोरावर ते दंगे मोडून टाकले व कोरियन लोकांनां सुधारणेचा हप्ता देण्याची त्यांनीं तजवीज केली. या हप्त्यांत तीन चार प्रमुख गोष्टी होत्या. (१) त्यावेळेपावेतों एखादा सेनापति हा कोरियाचा व्हाइसरॉय म्हणून राज्यशकट हांकीत असे; ती पद्धत यापुढें बंद होऊन सिव्हिलियन नेमण्याचें ठरलें. (२) कोरियाचा व्हाइसरॉय यानें जपानच्या मुख्य प्रधानाला जबाबदार रहावयाचें ठरलें. (३) सेनापतींचें काम स्वतंत्र अधिकाऱ्याकडे देण्यांत यावयाचें ठरलें; (४) व लष्करी शिपायांच्या बदली साधे पोलिस हे शांतता ठेवण्याच्या कामीं नेमावयाचे ठरलें; त्याप्रमाणें जनरल हसेगवच्या जागीं बॅरन सॅटो याची नेमणूक व्हाइसराय म्हणून झाली व त्याच्या मदतीला डॉ. मिझूनों याला देण्यात आलें. याशिवाय शिक्षण, उद्योगधंदे व सिव्हिल सर्विस, या बाबतींत जपानी लोकाना जे हक्क होते तितकेच हक्क हळू हळू कोरियन लोकानांहि देण्यात येतील असें फर्मान जपानच्या त्यावेळच्या प्रधानानें (हारानें) प्रसिद्ध केलें. अशा रीतीनें पुन्हा कोरियामध्यें कशीबशी शांतता प्रस्थापित झाली. मधून मधून, जाळपोळ, मारामारी इत्यादि प्रकार स्वातंत्र्येच्छू उर्फ अराजक लोकांनीं चालू ठेवलेच होते; व १९२० सालीं तर जपानी वकिलाला, त्याच्या परिवाराला व इतर जपानी लोकांनां कोरियन बंडखोरांनीं ठार मारलें तरी पण हळू हळू हा असंतोष कमी होत होता.

महात्मा गांधींनी जशी हिंदुस्थानांत असहकारिता पुकारिली तद्वत् कोरियन राष्ट्रीय पक्षानेंहि जपान सरकारशीं असहकारिता करण्याचें ठरविलें. १९२३ च्या अखेरीस जपानात मोठा भूकंप झाला. तेव्हां तेथील कोरियनांनां या अनर्थाचे जबाबदार धरून त्यांचा अनुमाष छळ केला पण कोरियनाची मुस्कटदाबा केली गेल्यानें त्याचा जगांत गवगवा झाला नाहीं. या सर्व गोष्टींवरून कोरिया शांतपणें जपानच्या कक्षेत फार दिवस राहीलसें वाटत नाहीं. [चोसेन (कोरिया) राज्यपद्धतीचे वार्षिक अहवाल; ॲलनथिंग्स कोरियन:मिसेस बिशप–कोरिया ॲंड हर नेबर्स; ग्रिफ्स-दि हर्मिट नेशन; हॅमिल्टन–कोरिया; लॉंगफोर्ड-दि स्टोरि ऑफ कोरिया.]

कोरिया संस्थान–मध्यप्रांतांतील एक मांडलिक संस्थान याचें क्षेत्रफळ २६६१ चौरस मैल आहे. १९०५ पर्यंत या संस्थानचा अंतर्भाव बंगाल प्रांतांतील छोटा नागपूर संस्थान समूहांत होत असे. पण अलीकडे याचा समावेश मध्यप्रांतांत होतो. सीमाः उत्तरेस रेवा संस्थान, पूर्वेस सुरगुजा, दक्षिणेस विलासपूर जिल्हा व पूर्वेस चांगभकार व रेवा संस्थान आहे. स्वरूपः––हें संस्थान डोंगरपठारावर वसलेलें आहे. या पठाराची उंची समुद्रसपाटीपासून १८०० फूट उंच आहे. या पठाराच्या पूर्वभागांत या पठारापेक्षांहि उंच असे सोनहाट नावाचें पठार असून त्याची उंची २४७७ फूट आहे. या पठाराच्या उत्तरभागांतील पठार सर्वांत अधिक उंच असून, त्याची उंची ३३६७ फूट आहे. पश्चिमेकडील भागांत बऱ्याच लहान मोठ्या टेंकड्यांची माळ गेली असून त्यांपैकीं एका टेंकडीचें देवगड नांवाचे शिखर सर्वांत उंच असून त्याची उंची ३३७० फूट आहे. सोनहाटच्या पठारावर पाण्याचे पुष्कळ प्रवाह असून ते निरनिराळ्या दिशेनें गेले आहेत. यापैकीं एक प्रवाह पश्चिमेकडे गोपथ नदीकडे गेला आहे. ही गोपथ नदी देवगडच्या शिखरामध्यें उगम पावून कोरियाच्या व चांगभकारच्या हद्दीच्या मधून वहात गेली आहे. दुसरा एक प्रवाह ईशान्येस शोणनदीकडे वहात गेला आहे. तिसरा एक प्रवाह दक्षिणेकडे हेस्दो अथवा हसडो नदीला मिळाला आहे. ही नदी कोरियांतील सर्वांत मोठी अशी असून ती कोरियाच्या उत्तरदक्षिण भागांतून वहात जाऊन महानदीला जाऊन मिळाली आहे. ही नदी खडकाळ प्रदेशांतून वहात गेली असून किरवाही येथें तिचा एक धबधबा आहे. या संस्थानात पूर्वी रानटी हत्ती, वाघ इत्यादि हिंस्र पशूंचा भरणा असून त्यांचा त्रास या संस्थानांतील खेड्यानां होत असे व त्यामुळें कित्येक खेडीं ओस पडलीं. पण हल्लीं हे हिंस्र पशू बरेच कमी झाले आहेत. गवे, रानम्हशी, साबर, नीलगाई, निरनिराळी हरिणें, अस्वलें ही येथें नेहमीं आढळतात.

इ. स. १८१८ सालीं हें संस्थान ब्रिटिश सरकाराला मिळालें. तत्पूर्वी, सुरगुजा संस्थानचें मांडलिक संस्थान म्हणून कोरिया नांदत होतें. येथील संस्थानिक आपल्यास चव्हाण रजपुताचे वंशज म्हणवितात. कित्येक शतकापूर्वी चव्हाण कुलांतील एका राजानें कोरिया जिंकून घेतलें व याच्या कुलांतील आपण आहों असें ते म्हणतात. इ. स. १८९७ मध्यें हें कुल वास्तविक नष्ट होऊन हल्लीं त्या कुलांशीं संबद्ध अशा एका कुलांतील वंशज या संस्थानांत राज्य करितात. या संस्थानिकाना ब्रिटिश सरकाराकडून राज्य करण्याची सनद इ. स. १८९९ सालीं मिळाली. येथील संस्थानिकांवर छत्तीसगडच्या कमिशनरची देखरेख असते. जमीन महसूल, कर, न्याय, अबकारी इत्यादि खात्यांचा कारभार कमिशनरच्या सल्लयानें त्यांनां करावा लागतो. संस्थानिकाचे न्याय देण्याचे अधिकार नियमित आहेत.

इ. स. १९११ सालीं या संस्थानची लोकसंख्या ६०,१०७ होती. संस्थानांत एकंदर ३०१ खेडीं आहेत. सोनहाट पठाराच्या पायथ्याशीं असलेल्या सोनहाटगांवीं येथील संस्थानिक रहातो.

संस्थानांत लोखंड सर्वत्र आढळतें. पण खाणींवर संस्थानचा ताबा नसून ब्रिटिश सरकारचा आहे. साखर, तंबाखू, मीठ, कापड, इत्यादि जिन्नस परठिकाणांहून या संस्थानांत येतात व संस्थानांतून तांदूळ, इतर धान्य व लाख या वस्तू निर्गत होतात. संस्थानांत सडकांचा अभाव आहे म्हटलें तरी चालेल. पायवाटा पुष्कळ आहेत. बैलावरून मालाची नेआण करण्यात येते. संस्थानातील खालच्या वर्गाचे बहुतेक सर्व लोक शेतकीवरच रहातात. संस्थानिकाच्या खालोखाल जमीनदार लोकांचा वर्ग असून जमीनदार ठराविक कर संस्थानिकाला देतात. जमिनी वंशपरंपरा देण्याची पद्धत या ठिकाणीं आढळून येत नाहीं. इ. स. १९०४-५ सालीं या संस्थानचा वसूल १८५० रुपये झाला व संस्थानचा खर्च १२३५० रुपये होता.

कोरी—एक कोळी जात. यांची वस्ती संयुक्तप्रांत (८,६०,८३४) व वऱ्हाड-मध्यप्रांत (३९,३२८) यांतून आहे. एकंदर लो. सं. (१९११) ९,१८,८२० आहे. कौलिक म्हणजे परंपरा त या संस्कृत शब्दावरूनहि कोळी हा शब्द बनलेला असावा. अशी एक दंतकथा आहे कीं, कबीर गंगास्नानास जात असतांना त्याला वाटेंत एक कुमारी आढळल्यामुळें 'पुत्रवती भव' असा त्यानें तिला आशीर्वाद दिला. परंतु ती कुमारी असल्यामुळें, कबिराची वाणी निराळ्याच रीतीनें खरी झाली. त्या कुमारीच्या हातावर एक फोड झाला व त्यातून एक पुत्र निर्माण झाला. तिनें त्यास गंगाकिनारी ठेविलें व तेथील एका कोळ्यानें त्या मुलास मोठें केलें. हा कोळी मुलगाच कोरी जातीचा मूळ पुरुष होय असे ते मानतात. कारण तो 'कोरी' पासून झालेला होता. या कथेसंबंधीं एक दोहराहि या लोकांत प्रसिद्ध आहे. खानेसुमारीवरून कोरी लोकांची मोठी संख्या असल्याचें दिसून येते. अहारवार, बैस, भडौरिय, भाइनहार, गंकार, धामन्, जइसवार, जाटवा, ज्युरीया, करीरवन्सी, कैथिया, कामारिया, कनौजिया, कोरचामरा, कुष्टा, माहुरे, परतूतिया, साकरवार, रुखवार, इत्यादि मुख्य पोटजाती आहेत. यांशिवाय आणखी बऱ्याच पोटजाती आहेत. खानेसुमारींत त्यांच्या जातिनामांची संख्या १०४० पेक्षां कमी नाहीं.

चालीरीती व एकंदर वागणूक या बाबतींत कोरी लोक चामारां(चाभार)च्या दर्जाचेच आहेत. हमिरपूर येथें वधूगृहप्रवेशाचा एक निराळाच प्रकार आढळून येतो. घरांतील वृद्ध मनुष्य कांहीं पोळया तयार करतो व डुकरासह त्याचा नैवेद्य बालताई देवीस दाखवितो. नंतर 'निहारन' समारंभ झाल्यावर तीन पोळया वधूवरांनीं पायाखालीं तुडवून गृहप्रवेश करावयाचा असतो. हमिरपूर येथें लग्नाचे दलाल असतात व त्यांना एखादी धोतरजोडी बक्षीस देण्यात येते. बालविवाह रूढ असून वराचें लग्न त्याच्या बहिणीच्या नवऱ्यानें जुळवून आणावयाचें असतें. हा जुन्या मातृकन्यापरंपरेचा अवशेष असावा. काराओ-विधीनें लग्न झालेल्या स्त्रीला राजरोस आपल्या नवऱ्याच्या घरीं जातां येत नाहीं. काराओ-विधीनें विधवेला पुनर्विवाह करतां येत नाहीं. ब्राह्मण, रजपूत, वाणी, कायस्थ, अहीर, गदारिया, कच्छा, कहार, भूर्जी, बारहाइ, खाटी व कूर्मा, इत्यादिकांना कोरी लोक आपल्या जातींत घेतात; परंतु चांभार, तेली, धोबी, बारा, धानुक इत्यादिकांना मनाई आहे. एटावा येथें विधवेला नवऱ्याच्या ज्येष्ठ अगर कनिष्ठ बंधूशीं लग्नाची मुभा असते असें म्हणतात. अखिल कोरी समाज हिंदु आहे. फैजाबाद येथील कोरी रामदासी अथवा शिवनारायणी पंथाचे असून बिजनोर येथील कोरी लोक कबीरपंथाचे आहेत हीच स्थिति हमिरपूर येथें आढळून यते त्या ठिकाणीं सर्व धार्मिक विधी दुहितेच्या नवऱ्यानें करावयाचे असतात. मातृकन्यापरंपरेचें हें दुसरें उदाहरण होय पश्चिमप्रांतांतील कोरी, झाहिरपीरदेवाची व अम्रोहा आणि जालेसर येथील मियाणाची उपासना करितात. पूर्वेकडील कोरी पंचावन पीर व सीतला माता यांना भजतात. कोरी लोकांचा सामाजिक दर्जा फार हलका आहे. मिर्झापूरचे ब्राह्मण, काहार—कोऱ्यांच्या हातचें पाणी पितात पण चामार(चांभार)कोऱ्यांचें पाणी वर्ज समजतात. धोबी चामार हे कमारकोऱ्यांच्या हातची कच्ची व पक्की रसोइ खातात. व कालवारखेरीज सर्व वैश्यांच्या हातचीहि पक्की रसोइ खातात. कोऱ्यांचा धंदा म्हणजे जाडाभरडीं खादी विणणें हाच होय. कांहीं कोरी नोकरी करतात व कांहीं जमिनीचे मालकहि असतात. कुष्ट अथवा कोष्टा ही कोऱ्यांची एक पोटजात दक्षिणेंत विणकऱ्यांचा धंदा करून उपजीविका करीत आहे. मध्यप्रांतात याची वस्ती सागर, दमो, जबलपूर वगैरे जिल्ह्यांत आहे. यास कोणी कोल लोकांची शाखा असें म्हणतात. [कूक; रसेल व हिरालाल; सेन्सस रि.]

कोरूना शहर—स्पेनमध्यें कोरूना प्रांताची राजधानी आहे. येथील लो. सं. १९११ सालीं ६०,८८३ होती. येथून माद्रिड व ओपोर्टो या शहरांशीं प्रत्यक्ष दळणवळण आहे. या शहराचा वरचा भाग व खालचा भाग असे दोन भाग आहेत. वरचा भाग जुना असून त्याच्या भोंवतीं भिंती आहेत. बंदर पूर्व भागांत आहे व तें अनेक दुर्गांमुळें सुरक्षित आहे. हरक्युलिस टावर उत्तरेस असून त्याची उंची ४०० फूट आहे. त्यावर एक उत्तम फिरता दिवा आहे. शेतींतील माल, दारू आणि मासे हे येथील निर्गत मालाचे पदार्थ आहेत. कारखान्यांत सरकारी तंबाखूचा कारखाना मुख्य असून बरेच लोक हेरिंग व सार्डाइन मासे धरण्याच्या कामांत गुंतलेले असतात. मध्ययुगांत अथवा बहुधा त्यापेक्षांहि पूर्वी याला 'कारोनियम' म्हणत असत. हें बंदर पूर्वीपासून नेहमींच फार महत्वाचें आहे. परंतु इतिहासांत तें अलीकडेच दिसूं लागलें. इ. स. १५८८ मध्यें 'अजिंक्य आरमार' (इनव्हिन्सिबल आरमाडा)' ला या बंदरानें आश्रय दिला. १५९८ मध्यें ब्रिटिशांनीं हें शहर काबीज केलें. १७४७ व १८०५या सालीं ब्रिटिशांनीं फ्रेंच लोकांवर या ठिकाणीं जय मिळविला.

१८२३ सालीं तें फ्रेंचांच्या ताब्यांत गेलें. १८३६ मध्यें कारलिस्टनी तें आपल्या ताब्यांत घेतलें. स्पॅनिश अमेरिकन युद्धामुळें जेव्हां क्युबा व पोर्टोरिको ह्या वसाहती स्पेनच्या ताब्यांतून गेल्या तेव्हां कोरूनाचें फार नुकसान झालें. कारण या वसाहतींशीं कोरूनाचा बराच व्यापार होता.

कोरेगांव(१) ता लु का—मुंबई इलाख्यांतील सातारा जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ३४५ चौरस मैल होतें. या तालुक्यांत एक गांव व ७३ खेडीं आहेत. रहिमतपूर(लो.सं.'१८०६)हेंच मोठें गाव आहे कोरेगांव हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. १९११ मध्यें या तालुक्याची लो. सं. ७८,१५६ होती. १९०३–४मध्यें जमीनीचा वसूल २,२०,०००रुपये व सारा १९,०००रुपये होता. या तालुक्याचा दक्षिण भाग कायतो सपाट असून बाकीचा भाग उंचसखल आहे. या तालुक्याची हवा निरोगी आहे. पर्जन्यमान ३० इंच आहे.

कोरेगांव(२)-मुंबई इलाख्यातील पुणें जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यांतील एक खेडें. हें पुण्याच्या ईशान्येस १६ मैलावर भीमा नदीच्या कांठीं वसलेलें आहे. या ठिकाणीं १८१८ सालीं जानेवारी तारीख १ ला इंग्रज व पेशवे यांच्यामध्यें युद्ध होऊन त्यात पेशवे व इंग्रज यांत चकमक होऊन तींत मेलेले इंग्रज शिपाई यांचें स्मारक म्हणून इंग्रजांनीं तेथें एक जयस्तंभ उभारला आहे. येथें एक लहानशी शाळा आहे.

कोर्कू जात—संयुक्तप्रांतांतील एक मूळची जात. १९११ सालीं सर्व हिंदुस्थानात मिळून या जातीचे लोक जवळ जवळ २००००० होते. त्यापैकीं मध्यप्रातात व वऱ्हाडात मिळून १,५२,३६३ इतके होते. ही जात सातपुडा पर्वताच्या पश्चिमेस होशंगाबाद नेमाड व बैतुल जिल्ह्यात रहाते. कोर्कू याचा मूळ अर्थ ' मनुष्य जात ' एवढाच आहे. पण रूढीमुळे ते नाव एका विशिष्ट जातीलाच पडलें आहे. छोटानागपूरमधील कोरवा जात व ही कोर्कू जात एकच होय असें काहींचें मत आहे व तसें असण्याचा पुष्कळ संभवहि आहे. राजकोर्कू लोक हे आपणाला रजपुतांचे वंशज मानतात. एका हरिणीच्या पाठीमागें लागून उज्जनी सोडून पंचमडीच्या डोंगरांत याचे पूर्वज आले अशी आख्यायिका आहे. कोर्कू जातीच्या ४ पोटजाती आहेत त्या म्हणजे मोवासी, बावरिया, रूम व बोंडोय या होत. त्यांपैकीं पहिल्या दोन पोटजाती उच्च मानण्यात येतात. या दोन पोटजातींनां राजकोर्कू असेंहि टोपण नाव आहे. राजकोर्कू हे मुख्यतः जमीनदार असून त्याची उच्च वर्गांत गणना होत असल्यामुळें ब्राह्मण लोकांना त्यांच्या घरचें पाणी सुद्धा प्यावयास चालतें. मोवास हें नाव सातपुड्याच्या पश्चिम भागाला मराठ्यानीं दिलें. मोवास याचा अर्थ ' त्रासदायक मुलूख ' असा आहे. या पश्चिम भागांतील कोर्कू लोक हे फार साहसी व लुटारूपणांत फार तरबेज होते. यामुळें त्यांना मोवास प्रदेशांत राहणारे ते मोवासी हें नांव पडलें. बैतल जिल्ह्यांत भोवारगड येथें राहणारे जे लोक त्यांना बावरिया असें नांव आहे. गोत्रांतरविवाहामुळें या प्रत्येक पोटजातीचे पुन्हां ३६वर्ग झालेले आहेत; व या वर्गांची नांवें झाडांच्या नांवांवरून बनलेलीं दिसतात. या वर्गांतील लोकात देवकपूजा प्रचारांत होती. पण हल्लीं एकदोन वर्गांशिवाय इतर वर्गांत ही चाल अगदीं लुप्तप्राय झालेली दिसते.

या वर्गांतील १० वर्ग असे आहेत कीं त्यांच्यामध्यें विधिपूर्वक विवाह ही अमंगल गोष्ट मानतात. पण या दहाशिवाय इतर वर्गांत लग्नें विधिपूर्वक करण्यांत येतात. मुलाचा बाप मुलीच्या बापाला मुलीची मागणी करतो. नंतर मुलीच्या बापानें वर्ष-सहा महिने जाणूनबुजून ती मागणी नाकारावयाची व तेवढी मुदत टळल्यावर मग ती मागणी कबूल करावयाची अशी याच्यात विचित्र चाल आहे कन्यादानाबद्दल मोबदला म्हणून कन्येच्या पित्याला ५० रुपये दक्षिणा दिली जाते. एकदा का मुलीच्या लग्नाचा वाङ्निश्चय ठरला कीं मग लग्नाच्या अगोदर जरी मुलगी मेली तरी ही दक्षिणा वधूच्या पित्याच्या हातांत पडलीच पाहिजे असा प्रघात आहे. वरात निघावयाच्या पूर्वीं वर व वराच्या थोरल्या भावाची बायको हे एका कांबळ्यावर उभे राहून एकमेकांना सात वेळा अलिंगन देतात. पूर्वीच्या बहुभर्तृक विवाहाचा हा अवशेष असावा असे दिसतें. नंतर वराच्या हातात एक चाकू अगर सुरी देण्यात येते व त्या सुरीच्या टोंकाला एक लिंबू टोंचलेलें असतें. अमंगल अशा भुताखेतांना भिवविण्याकरिता ही चाल आहे असें म्हणतात. नंतर आपल्या आप्तेष्टासमवेत वर गावाच्या बाहेर जातो. तेथें बोरीच्या झाडाखालीं वर व त्याचे आईबाप बसतात. नंतर 'भुमका' (जातीचा भटजी) हा त्या तिघांभोंवतीं व बोराच्या झाडाभोंवतीं मिळून एक दोरी बाधतो. नंतर या झाडाला एका कोंबडीचा बळी, सूर्य, चंद्र याच्यासाठीं दिला जातो. एवढा प्रकार झाल्यानंतर वरपक्ष हा वधूच्या गावाला जाण्यास निघतो. वधूच्या गांवाच्या नजीक आल्यावर गावाबाहेर वधूपक्षाची मंडळी एका ठिकाणीं एक चामड्याची वाडी बाधतात. त्या ठिकाणीं वरपक्षाची व वधूपक्षाची मंडळी जमतात. नंतर वधूपक्षाकडील मंडळी वरपक्षाचें स्वागत करते. वरपक्षाला वधूपक्षातील मंडळींनां प्रत्येकाला या सत्काराबद्दल दोन पैसे दक्षिणा द्यावी लागते. नंतर गांवांत आल्यावर वधूवरांचा विवाहसमारंभ साजरा केला जातो

मृत्यूनंतर मृत मनुष्याला त्याच्या पूर्वजांच्या निवासस्थानांत रहाता यावें म्हणून कांहीं विशिष्ट संस्कार करण्याची पद्धत आहे. मृत मनुष्याचे पितर हे मृत मनुष्याच्या खेड्याच्या आसपासच अदृश्य रहात असतात अशी यांची समजूत आहे. मृताला एका खड्डयांत ठेवून त्याच्या अंगावर दोन पैसे ठेवून नंतर त्या शवास पुरण्यांत येतें. यांच्यांत सुतक पाळण्याची चाल नाहीं. मरणानंतर कांहीं दिवस लोटल्यावर मताचे आप्तेष्ट मताला पुरलेल्या जागेपाशीं येतात

तेथें आल्यावर एका हळकुंडाचे लहान तुकडे करून त्यांपैकीं एक तुकडा त्या जागेवर ठेवतात व उरलेले तुकडे एका फडक्यांत बांधून ते घरीं घेऊन येतात. नंतर घराच्या मुख्य तुळईखालीं हें गाठोडें ठेवण्यात येतें. कारण या ठिकाणीं पितर राहतात अशी यांची समजूत आहे. सेडोली नांवाचा एक और्ध्वदेहिक विधि करावयाचा असतो तो १५ वर्षांच्या आंत केव्हांहि करतां येतो.

कोर्कू लोक आपणाला हिंदुधर्मीय म्हणवितात. यांचें उपास्य दैवत महादेव हें आहे. पंचमढीच्या डोंगरात या महादेवाचें एक देवालय असून त्याची व्यवस्था पहाण्याचें काम या जातींतील दोन जमीनदारांकडे वंशपरंपरागत आहे. याशिवाय डोंगरदेव, मुठादेव, कुनवरदेव इत्यादि पुष्कळ जातिदेवता आहेत. प्रत्येक जातीचे उपाध्याय निरनिराळे असून या उपाध्यायांना भुमका असें नांव आहे. यांनां वाघ वश असतात अशी समजूत आहे.कोर्कू जातीचे लोक बांध्यानें मजबूत, उंच व काळया वर्णाचे असतात. हे प्रामाणिक व सचोटीचे असल्यानें शेतावर काम करण्यासाठीं त्यानांच पाट-विण्यात येतें ते दरिद्री असून त्यांच्या अंगावर पुरेसा कपडाहि नसतो. त्यांची राहणी गलिच्छ आहे. कोर्कू नांवाची यांची एक स्वतंत्र भाषा आहे. या जातींतील शेंकडा ६० लोक ही भाषा बोलणारे आढळतात. पण ही भाषा बोलणाऱ्यांची संख्या हल्लीं हळूहळू कमी होत चालली आहे.

कोर्ट—कोर्ट या इंग्रजी शब्दाचा मूळ अर्थ कुंपण घातलेली खुली जागा असा आहे. हल्लीं याचा अंगण हा एक व न्यायसभा हा दुसरा असे दोन अर्थ प्रचारांत आहेत.

इंग्लंड—पूर्वी इंग्लंडमध्यें सर्व न्यायसभा नुसता न्याय निवाडा करणाऱ्या नव्हत्या. परगणान्यायसभा म्हणजे जमीनदार व कांहीं अधिकारी अशाचें एक निवडक मंडळच होतें व या मंडळाचा राजकीय, न्यायसभा व कायदेमंडळ या तिन्ही बाबतींत अधिकार चालत असे. परंतु आतां न्यायसभांना न्यायनिवाड्याशिवाय दुसरे कोणतेहि अधिकार राहिले नाहींत न्यायकचेरींतील प्रत्येक खटल्यांत तीन पक्ष असलेच पाहिजेत. एक वादी, दुसरा प्रतिवादी व तिसरा न्यायाधीश. कायदेपंडिताच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे न्यायाच्या बाबतींतील सर्व अधिकार राजाचे असतात आणि तो प्रत्येक न्यायकचेरींत हजर राहतो. परंतु एकाच वेळेस निरनिराळ्या ठिकाणीं हजर राहणें अशक्य असल्यामुळें, तो आपले प्रतिनिधी नेमतो. तेच न्यायाधीश होत. त्यांचे अधिकार पार्लमेंट सभा अथवा लेटर्स पेटंट् याजकडून मिळालेले असोत किंवा परंपरागत असोत, त्याना राजाची संमति मिळालेली असते ही गोष्ट निर्विवाद आहे. पूर्वी न्यायनिवाडा करणें हें राजाच्या कामापैकीं एक काम असे. आणि चवथ्या एडवर्डच्या कारकीर्दीपर्यंत राजा त्याकरितां दौऱ्यावर जात असे. पुढें स्वतंत्र न्यायसभा स्थापन झाल्यानंतरदेखील राजा व त्याचें सल्लागार मंडळ यांकडे कांहीं अधिकार राखून ठेवले होते. इंग्लंडच्या राजाचें प्रत्यक्ष न्यायदानाचें शेवटलें कृत्य म्हणजे पहिल्या जेम्सनें चान्सरी व कॉमन लॉ या दोन कोर्टांतील तंटा तोडल्याचें होय. पार्लमेंटरी राज्यपद्धति सुरू झाल्यापासून कोर्टांच्या अधिकारावर कायदेमंडळाचें नियंत्रण असतें व राजा त्या मंडळाचा सभासद असल्यामुळें त्याचा न्यायखात्याशीं अप्रत्यक्ष संबंध येतो.

न्यायकचेऱ्यांचे निरनिराळ्या दृष्टीनें निरनिराळे भाग पडतात (१) पहिला भाग म्हणजे वरिष्ठ व कनिष्ठ हा होय. कॉमनलॉ, चान्सरी व हायकोर्टें हीं वरिष्ठ कोर्टें होत व जिल्हा व परगणा हीं कनिष्ठ कोर्टें होत. (२) दुसरा प्रकार म्हणजे दप्तरा व बिनदप्तरी कोर्टें. पहिल्या प्रकारच्या कोर्टांतील निवाडे व्यवस्थित व सविस्तर लिहिलेले असतात आणि ते नेहमीं कायम ठेवतात. त्या निवाड्यास कोणी हरताळ लावूं शकत नाहीं. आणि ते निवाडे अबाधित असल्यामुळे त्याबद्दल कोणी शंका घेतल्यास त्यास शिक्षा करण्याचा त्या कोर्टास अधिकार आहे. (३) कोर्टाचा तिसरा प्रकार म्हणजे दिवाणी व फौजदारी (४) चवथा प्रकार म्हणजे मुख्य खटले चालविणारीं कोर्टें व निवाड्याचा विचार करणारें हायकोर्ट. हे नवे खटले चालवितें व कनिष्ठ कोर्टांच्या निवाड्याचा फेर विचार करतें. त्या कोर्टावर दुसरें अपील कोर्ट आहे व त्यावर लॉर्डांची सभा ही होय. (५) याच्या शिवाय वरील कोणत्याहि विभागात न पडणारीं किरकोळ कामाचीं कोर्टें होत. उदाहरणार्थः—डरहॅम, लॅंकेस्टर येथील किरकोळ कामाचीं कोर्टें.

फौजदारी कोर्टें.—(१) सर्वांत खालच्या दर्जाचीं फौजदारी कोर्टें म्हटलीं म्हणजे जस्टिस ऑफ् दि पिस ही पदवी मिळालेल्या लोकांनीं चालविलेल्या कचेऱ्या. त्याना बारीक सारीक गुन्ह्याची चौकशी करण्याचा अधिकार दिलेला असतो. लंडनसारख्या मोठ्या शहरात पगारी मॅजिस्ट्रेट नेमलेले असतात. जस्टिस ऑफ दि पीस हे मोठाले गुन्हे चौकशीकरिता वरिष्ठ कोर्टाकडे पाठवूं शकतात. (२) त्रैमासिक अदालतींना मोठया गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार दिलेला असतो. या कोर्टांना जे खटले चालविता येत नाहींत त्याची एक यादी प्रसिद्ध केलेली असते. (३) या अदालती वर्षांतून फक्त दोनदा एकेक परगण्यात काम करितात. परंतु १८७६ व १८७७ च्या कायद्यानें एकापेक्षां अधिक परगण्याकरिता एक अदालत काम करूं शकते. न्यायाच्या बाबतींत लंडन शहराचा एक विशिष्ट दर्जा असल्यामुळें त्याठिकाणीं इ. स. १८३४ च्या फौजदारी कोर्टाच्या कायद्यान्वयें फौजदारी स्वरूपाचें एक वरिष्ठ कोर्ट आहे. या कोर्टाचे न्यायाधीश निरनिराळ्या दर्जाचे निवडलेले असतात. व हें कोर्ट इ. स. १९०७ सालीं बांधलेल्या लंडन कोर्टाच्या इमारतींत भरतें. फौजदारी वरिष्ठ कोर्टाकडे

कायद्याच्या किंवा वस्तुस्थितीच्या मुद्यावर अपील करता येतें.

दिवाणी कोर्टें.—कांहीं किरकोळ बाबी सोडून दिल्यास दिवाणी स्वरूपाचे सर्व दावे परगणाकोर्ट व हायकोर्ट यांपुढें चालतात. ज्युडिकेचर कायद्यानें फेरफार केल्यामुळें आतां दिवाणी कोर्टाची रचना खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. वरिष्ठ दर्जाचें एक कोर्ट आहे; त्याचें हायकोर्ट व अपील कोर्ट असे दोन कायमचे भाग आहेत पहिल्या म्हणजे हायकोर्टात आरमारी, वारसा, घटस्फोट, किरकोळ व चान्सरी कोर्टातील दावे वगैरे स्वरूपाचें काम चालतें. आणि अपील कोर्टाकडे सर्व दर्जाच्या कोर्टाकडील अपिलाचें काम असतें. लॉर्डांच्या सभेंत इंग्लंडच्या कोर्टावरील अपिलाचा विचार केला जातो (१८७६ च्या कायद्यान्वयें) आणि ज्यावेळेस पार्लमेंट सभा बरखास्त किंवा अनिश्चित कालपर्यंत तहकूब झाली असेल त्यावेळेस स्कॉटलंड व आयर्लंडमधील अपिलें ऐकण्याचें काम चालतें. इंग्लंडमधील न्यायखात्याचा हा एक विशेष आहे कीं, तथील सर्व कोर्टें एकाच सत्तेपासून म्हणजे राजा व त्याचें सल्लागार मंडळ यापासून उत्पन्न झालीं. इतर कामात राजा व त्याचें मंडळ हेंहि काम करीत असे. पुढें क्युरिआ रेजिस म्हणून एक मंडळ निर्माण झालें व त्याला फक्त न्यायाचेंच काम दिलें. जमीनमहसुलाच्या बाबतींत उत्पन्न होणाऱ्या तंट्याचा निवाडा करणारें एक्सचेकर नावाचें स्वतंत्र कोर्ट निर्माण झाले. मॅग्नाचार्टाच्या योगानें राजा नसेल अशा ठिकाणीं देखील कोर्टें भरविण्यास सुरवात झाली व किरकोळ दाव्यांचीं कोर्टें स्थापन झाली. क्युरिआ रेजिस याची वसूली आणि किरकोळ हीं दोन उपांगें झाल्यावर राजाचें म्हणून एक स्वतंत्र कोर्ट झाले, त्याला किंग्ज बेंच म्हणतात. अशा रीतीनें एकाच सत्तेपासून सारख्या अधिकाराचीं तीन कोर्टें अस्तित्वात आलीं. परंतु राजाचा न्यायाच्या बाबतींत वरिष्ठ अधिकार शिल्लक राहिलाच व तो न्यायाध्यक्षाकडे गेला. याच पद्धतीवर इ.स. १८३२ सालीं स्थापन झालेले प्रिव्हीं कौन्सिल होय. याकडे वरिष्ठ कोर्टाचे सर्व अधिकार आहेत. लॉर्डांच्या सभेला जो अपिलें ऐकण्याचा अधिकार आहे तो पूर्वीच्या राष्ट्रीय मंडळाचा अवशेष आहे.

अमेरिकन संयुक्त संस्थानें.—या ठिकाणची न्याय पद्धति तेथील राज्यघटनेनें कायदेमंडळ आणि अम्मल बजावणी खातें यापासून स्वतंत्र अशी केला आहे. तेथील कोर्टें तीन प्रकारचीं आहेत (१) मुख्य कोर्ट, (२) फिरतीं कोर्टें (३) व जिल्हा कोर्टें पहिलें तेथील शासनपद्धतीनें निर्माण केलें आहे. त्या कोर्टात इ. स. १९०९ सालीं नऊ न्यायाधीश होते ते अध्यक्षाच्या शिफारशीनें मुख्य सभेनें नेमले होते. त्यांची नेमणूक तहाहयात असते व फक्त गैर वर्तणुकीमुळेंच कायर्तें त्यांनां कामावरून दूर करता येतें. या दृष्टीनें त्यांच्या नेमणुका इंग्लंडमधील न्यायाधिशाच्या नेमणुकांपेक्षां जास्त भक्कम पायावर केल्या असतात. हे कोर्ट वाशिंगटन येथें आक्टोबर ते जुलईपर्यंत दरवर्षी भरतें. सेशन्स-राजधानीच्या ठिकाणीं भरविंतात. या ठिकाणीं असा एक नियम आहे कीं, कोणताहि निकाल सहा न्यायाधिशानीं मिळून सांगितला पाहिजे. यामुळें कोर्टामध्यें एकापेक्षां जास्त न्यायासनें होऊं शकत नाहींत. या नियमामुळें प्रत्येक खटल्याची जरी कसून चौकशी केली जाते तरी न्यायदानाच्या बाबतींत दिरंगाई होते. प्रत्येक खटल्याचा दोनदा विचार केला जातो. प्रथम मताधिक्य कोणत्या बाजूस आहे हें ठरविण्याकरिता प्रत्येकास विचार करावा लागतो व तें निश्चित झाल्यावर कोर्टानें तें कायम करण्याच्या वेळीं त्याचा पुन्हा विचार केला जातो.

शासनपद्धतीनें दिलेल्या अधिकारान्वयें तेथील राष्ट्रीय सभेनें कनिष्ठ कोर्टें निर्माण केलीं आहेत. एकंदर एकोणतीस न्यायाधीश मिळून निरनिराळ्या नऊ टापूंत काम करतात. आणि प्रत्येक टापूवरची देखरेख वरिष्ठ कोर्टाच्या एकेका न्यायाधिशाकडे दिलेली असते. या कोर्टावरील अपील कोर्टात तीन न्यायाधीश असतात. (१) वरिष्ठ कोर्टातील, (२) परगणा कोर्टातील व (३) फिरत्या कोर्टातील. कांहीं खटल्यावर खालच्या कोर्टातून वरिष्ठ कोर्टात अपील करता येतें व कांहींत खालच्या अपीलकोर्टाच्या निकालाविरुद्ध वरिष्ठ कोर्टाकडे अपील करता येतें. जिल्हाकोर्टें एकंदर नव्वद आहेत. बहुतेकात एकच न्यायाधीश असतो. त्या ठिकाणीं स्थानिक सरकाराविरुद्ध असलेल्या तक्रारी ऐकण्याकरिता एक निराळें कोर्ट निर्माण केलें आहे. हें एक न्यायखात्याचा भाग नसून राष्ट्रीय सभेनें न्यायखात्याचें काम कमी करण्याकरिता निर्माण केलें आहे.

अधिकाराच्या बाबतींत संयुक्त कोर्टें व संस्थानी कोर्टें यांत फरक आहे. संयुक्त कोर्टाकडे फक्त पुढीलप्रमाणें कामें असतातः—(१) संयुक्त संस्थानाचे कायदे, त्याच्या संमतीनं केलेले तहनामे व याच्या बाबतींत उद्भवणारे कायद्याचे प्रश्न;(२) वकिलाती किंवा सार्वजनिक प्रधान; (३)समुद्रमर्यादा; (४,ज्या भांडणात संयुक्तसंस्थानें हा एक पक्ष आहे; (५) दोन संस्थानें एक संस्थान व दुसऱ्या संस्थानाची प्रजा, निरनिराळ्या संस्थानातील प्रजा, संस्थान किंवा त्यातील प्रजा, संस्थान किंवा त्याची प्रजा आणि परराष्ट्र किंवा त्यांतील प्रजा यामध्यें असलेले खटले. परराष्ट्राबरोबर असलेल्या खटल्याचे बाबतींत हल्लीं वरील कोर्टाचे अधिकार जरा संकुचित केले आहेत. वरिष्ठ कोर्टाचा अधिकार हा वकिलाती आणि संस्थानासंस्थानांतील तंटे याच्या बाबतींत मुख्य चौकशीकोर्टासारखा आहे व इतर बाबतींत अपील कोर्टाचा आहे. जर एकाद्या संस्थानीकोर्टापुढें चाललेल्या खटल्यात कायद्यासंबंधी कांहीं प्रश्न उपस्थित झाला व त्या कायद्याचें म्हणणें अमान्य झालें तर पक्षकारास आपला खटला फेडेरल् कोर्टाकडे वर्ग करून घेतां येतो. जर एखाद्या खटल्यात एखादा तह, संयुक्त संस्थानांचे अधिकार, एखादा कायदा, किंवा त्याची

युक्तायुक्तता किंवा राज्यघटनान्वयें मिळालेली पदवी, अधिकार वगैरे यासंबंधीं वाद असेल त्या वेळेस सर्व खटले वरिष्ठ कोर्टाकडे वर्ग करण्यांत येतात.

राष्ट्रीय सभेचा एखादा कायदा किंवा संस्थानी कानू बरोबर किंवा चूक म्हणण्याचा जो अधिकार फेडरेशनच्या घटनेनें वरिष्ठ कोर्टाला दिलेला आहे हेंच अमेरिकेंतील न्यायपद्धतीचें वैशिष्ट्य आहे कारण असा अधिकार त्या कोर्टास लोकांनींच दिला आहे. फेडरेशनच्या घटनेशीं विसंगत असलेले सर्व कायदे रद्द आहेत असें म्हणण्याचा अधिकार वरिष्ठ कोर्टाला आहे व तो असणें जरूर आहे. फेडरल् कोर्ट घटनेसंबंधीं प्रश्नावर कधींहि आपलें मत देत नाहींत. कोर्टापुढें जर तोच प्रश्न असेल तर चालू खटल्यापुरतेंच मत देतात.

हिंदुस्थानः— हायकोर्टें हीं हिंदुस्थानसरकारच्या हुकमानें स्थापन झालीं आहेत. त्याचा अधिकार त्या त्या प्रांतातील दिवाणी किंवा फौजदारी वगैरे सर्व कोर्टांवर चालतो. हायकोर्टांना इलाख्याच्या शहराच्या हद्दींतील दिवाणी अगर फौजदारी स्वरूपाचे सर्व दावे अगर खटले चालविता येतात. त्या मर्यादेच्या बाहेरील पाच हजारावरील दाव्यातील सर्व अपिलें व त्याच्या आंतील दाव्यातील जिल्हा जज्जाकडील अपिलाच्या निकालाविरुद्ध अपिलें करण्याचा अधिकार आहे व त्या मर्यादे बाहेरील फौजदारी खटले इच्छा अगर जरूर असल्यास आपल्याकडे घेता येतात. इलाख्याच्या ठिकाणीं सुद्धा दिवाणी अगर फौजदारी स्वरूपाच्या खटल्याशिवाय आरमारी, नादारी, घटस्फोट मृत्युपत्रें वगैरे सर्व स्वरूपाचे दावे चालविण्याचा अधिकार आहे. सर्व हायकोर्टांत जास्तींत जास्त पंधरा न्यायाधीश नेमण्याचा अधिकार विलायतच्या राजाकडे आहे. त्यापैकीं एक सर न्यायाधीश असतो. त्यापैकीं एकतृतीयांश इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील असावे लागतात, एकतृतीयांश विलायतेंतील बॅरिस्टरपैकीं असावे लागतात व बाकीचे त्या त्या हायकोर्टांतील पांच वर्षे काम केलेल्या बॅरिस्टरांतून किंवा दहा वर्षे काम केलेल्या वकिलांतून निवडतात. हे न्यायाधीश हिंदुस्थानांतील सरकारास जबाबदार नसतात. हायकोर्टाच्या कामाकरिता निरनिराळे भाग केलेले असतात. एका न्यायाधिशाकडे हायकोर्टाच्या दिवाणी स्थलमर्यादेंतील दिवाणी दावे ऐकण्याचें काम दिलेलें असतें. मुंबई इलाख्यात ते दावे दोन हजारापेक्षा जास्त किंमतीचे असावे लागतात. त्याच्या निकालाविरुद्ध अपील प्रिव्ही कौन्सिलकडे असतें. एकाकडे मृत्युपत्रें, आरमारी, वारसा वगैरे संबंधी कामें असतात. इलाख्यातील दुसरीं अपिलें ऐकण्याकरिता सर न्यायाधीश व एक मदतगार असे असतात. एकाकडे मधून मधून फौजदारी सेशन ऐकण्याचें काम दिलेलें असतें वरील स्वरूपाच्या एकेका कोर्टानें काम होत नसेल तर एकेका स्वरूपाचीं दोन दोन तीन तीन कोर्टें सुरू करण्याचा अधिकार सरन्यायाधिशास आहे. त्याचप्रमाणें इलाख्याच्या ठिकाणीं व जेथें जरूर आहे अशा मोठाल्या व्यापाराच्या शहरीं किरकोळ दाव्यांचें एक निराळें कोर्ट स्थापन केलेलें असतें. त्या कोर्टांत फक्त पैशाच्या देवघेवीचे खटले संक्षिप्त पद्धतीनें चालतात. मुंबईस याची आर्थिक मर्यादा दोन हजार रुपये आहे, पुणे व अहमदाबाद या ठिकाणीं एक हजार रुपये आहे. ही मर्यादा इतर जिल्ह्यात सबजज्जास पांचशे रुपयेपर्यंत देवघेवीचे दावे संक्षिप्त पद्धतीनें चालविण्याचा अधिकार हायकोर्ट जरूर तेथें देते. त्याच्या निकालावर अपील नसते. हायकोर्टामार्फत फेर चौकशी होते. मध्यप्रांत व सिंधप्रांत या ठिकाणीं ज्युडिशिअल कमिशनरचीं कोर्टें आहेत. त्याचे निकालाविरुद्ध अपील प्रिव्ही कौन्सिलकडेच होतें. परंतु त्यांना हायकोर्ट म्हणत नाहींत रंगून येथें चीफ जज्जाचें कोर्ट आहे. प्रिव्ही कौन्सिलचे निकाल हिंदुस्थानातील सर्व कोर्टांवर बंधनकारक असतात. हायकोर्टाचे निकाल त्याच्या अधिकारांतील सर्व कोर्टांवर बंधनकारक असतात परंतु एकाचे दुसऱ्यावर बंधनकारक नसून शिफारसीपुरते असतात. प्रत्येक हायकोर्टाचा त्या त्या प्रांतातील वकीलावर धंद्याचे बाबतींत अधिकार चालतो व वाईट वर्तणुकीकरितां सनदा रद्द करता येतात. योग्य न्यायाकरिता कोणत्याहि मनुष्यास कोर्टांत येऊन जबानी देण्यास भाग पाडण्याचा अधिकार कोर्टास असतो. त्याचप्रमाणें कोर्टांत काम चालू असता कामास अडथळा केल्यास किंवा जबानी देण्याचें नाकारल्यास किंवा जबानी देताना उद्दामपणा केल्यास त्यास दोनशे रुपये दंड व दंड न दिल्यास एक महिना शिक्षा देण्याचा अधिकार दिवाणी, फौजदारी व मुलकी या सर्व कोर्टांस आहे. हायकोर्टाची न्यायदानाच्या बाबतींत बेअदबी केली गेल्यास गुन्हेगारास अनियमित शिक्षा देण्याचा अधिकार हायकोर्टास आहे.

दिवाणी कोर्टेः-हिंदुस्थानात हल्लीं कलकत्ता, मद्रास, मुंबई, अलाहाबाद, पाटणा, लाहोर (सिंधप्रांत, मध्यप्रांत) या ठिकाणीं हायकोर्टें आहेत. हीं निरनिराळ्या वेळीं स्थापन झालीं आहेत. त्याच्या मर्यादेत त्याच्या अधिकाराखालीं निरनिराळीं कोर्टें आहेत प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा कोर्ट, एक सबजज्ज कोर्ट (पहिला वर्ग मुन्सफ) व जरूर तेवढीं मुन्सफ कोर्टें असतात. (बहुतकरून प्रत्येक तालुक्यात एक) व तीं स्थापण्याचा प्रांतिकसरकारास अधिकार आहे.

अधिकार.—जिल्हाकोर्टाला कांहीं विशिष्ट फिर्यादी चालवितां येतात व पालन करणार नेमणें वगैरे किरकोळ कामें करता येतात. बाकीच्या म्हणजे ज्यांची किंमत पांच हजार रुपयाच्यापेक्षां कमी आहे अशा दाव्यावरील अपिलें ऐकण्याचा अधिकार त्यास आहे. सबजज्जाला (यास कांहीं प्रांतांत मुन्सफ वर्ग एक असें म्हणतात) दिवाणी स्वरूपाचे वाटेल त्या किंमतीचे दावे चालविता येतात. मुंबई इलाख्यात सबजज्ज वर्ग दोन यास पाच हजार रुपये किंमतीपर्यंत

दिवाणी स्वरूपाचे कोणतेहि दावे चालवितां येतात. मद्रास इलाख्यांत ही मर्यादा अडीच हजार रुपये आहे व बंगालमध्ये एक हजार रुपये आहे. त्याची क्षेत्रमर्यादा ज्या तालुक्याकरितां ते नेमलेले असतात त्या तालुक्यापुरती असते. सबजज्जाच्या अधिकाराची क्षेत्रमर्यादा सर्व जिल्ह्याइतकी असते. ज्या दाव्याच्या निकालावर कायद्यानें अपील आहे अशा पांच हजार रुपये किंमतीच्या दाव्याच्या निकालावर जिल्हाजज्जाकडे अपील करतां येतें. पांच हजारापेक्षा जास्त किंमतीच्या दाव्यांतील अपिलें त्या त्या इलाख्याच्या हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध विलायतेतील प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करता येतें. परंतु त्यांत दाव्याची किंमत दहा हजार रुपयांपेक्षां जास्त पाहिजे किंवा कायद्याचा महत्वाचा प्रश्न असून हायकोर्टानें शिफारस केली पाहिजे.

फौजदारी कोर्टें:—हिंदुस्थानात प्रत्येक इलाख्यांत एक एक हायकोर्ट आहे. त्याच्या देखरेखीखालीं पुढील फौजदारी कोर्टें आहेत, (१) सेशन कोर्ट,(२) इलाखा मॅजिस्ट्रेट कोर्ट, (३) पहिला, दुसरा व तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट कोर्ट हीं होत. प्रत्येक प्रांताला एक सेशन कोर्ट असते. प्रांत म्हणजे बहुतेक सर्व ठिकाणीं जिल्हा होय. परंतु काहीं ठिकाणीं दोन जिल्हे मिळून एकच सेशन कोर्ट असते व त्याला प्रांत म्हणतात. इलाख्याचें ठिकाण हें एक जिल्हाच समजले जातें व स्वतंत्र जिल्ह्याप्रमाणें त्या ठिकाणीं कोर्टें असतात. प्रांतिक सरकारास हिंदुस्थान सरकारच्या परवानगीनें जिल्ह्याची संख्या किंवा मर्यादा ठरविता येते. जिल्ह्याचे भाग मात्र स्वतंत्रपणें पाडता येतात. प्रत्येक सेशनच्या विभागात एक एक सेशनजज्ज नेमण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे. त्याचप्रमाणें सेशन जज्जास जोडीदार किंवा मदतगार देण्याचाहि किंवा एकास दुसऱ्या भागातील सेशन जज्जाचा मदतगार नेमण्याचा अधिकार आहे.

प्रत्येक जिल्ह्यामध्यें एक पहिल्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट प्रांतिक सरकार नेमते व त्यास जिल्हामॅजिस्ट्रेट म्हणतात. हाच अधिकारी मुलकी खात्यातील कलेक्टर असतो. त्याच्या हाताखालीं पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट प्रांतिक सरकार नेमते. विशिष्ट कामाकरितां किंवा दोन अथवा दोहोंपेक्षा जास्त पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटाचे अधिकार देऊन बेंच नेमण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे. त्याच्या पैकीं ज्याचे अधिकार सर्वांत जास्त असतील तितके अधिकार सर्व बेंचास प्राप्त होतात. जिल्ह्याचें ठिकाण मोठें असल्यास त्या ठिकाणीं एक शहरमॅजिस्ट्रेट असतो व तो बहुतेक पहिल्या वर्गाचा असतो. जिल्हा मॅजिस्ट्रेटचा अधिकार जिल्ह्यातील सर्व मॅजिस्ट्रेटांवर व बेंचावर चालतो. परंतु अपील किंवा फेरचौकशी याच्या बाबतींत सेशन जज्जाचा जिल्हा मॅजिस्ट्रेटासुद्धा सर्वांवर अधिकार चालतो. इलाख्याच्या ठिकाणीं वरच्या प्रमाणें जे मॅजिस्ट्रेट नेमलेले असतात त्यांना इलाखामॅजिस्ट्रेट म्हणतात. त्यांपैकीं एक मुख्य असतो. त्याची नेमणूक प्रांतिक सरकार करतें. त्यांच्या अधिकाराची क्षेत्रमर्यादा इलाख्याचे शहर, त्या ठिकाणीं बंदर असल्यास तेथें व एखादी जहाजें चालण्यासारखी नदी जर त्या ठिकाणीं येऊन मिळत असेल तर तिच्या खाडींत इतकी आहे. अशां पैकीं दोन किंवा दोहोंपेक्षां जास्तजणांचें बेंच नेमतां येते. याचप्रमाणें इलाखा शहराच्या ठिकाणीं हिंदुस्थान सरकार किंवा प्रांतिक सरकार यांनीं नेमलेले जस्टिस ऑफ दि पीस असतात.

अधिकार:—हिंदुस्थानच्या फौजदारी गुन्ह्याच्या कायद्यात दिलेल्या सर्व गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार हायकोर्ट व सेशन कोर्ट यांना व गुन्ह्याच्या चौकशीच्या कायद्याच्या २ऱ्या परिशिष्टात दिलेल्या एखाद्या कोर्टास आहे. ब्रह्मदेश, औध, मध्यप्रांत, कुर्ग—आसाम आणि सिंध या ठिकाणीं फाशीच्या शिक्षेशिवाय इतर शिक्षा असलेल्या सर्व गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार पहिला वर्ग मॅजिस्टेटास देण्यात येतो. हायकोर्टाला फौजदारी गुन्ह्याच्या कायद्यात सांगितलेली वाटेल ती शिक्षा देण्याचा अधिकार आहे. सेशन जज्जालाहि तितकाच अधिकार आहे; परंतु फाशीच्या शिक्षेला मात्र हायकोर्टाची परवानगी लागते. त्याच्या मदतगारास फाशी, सात वर्षे काळेपाणी किंवा तुरुंग याशिवाय बाकीची कोणतीहि शिक्षा देता येते.

इलाखा मॅजिस्ट्रेट किंवा पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांना दोन वर्षे तुरुंग, एक हजार रुपये दंड किंवा फटके इतकी जास्तींत जास्त शिक्षा देता येते. दुसरा वर्ग मॅजिस्ट्रेटाना सहा महिने तुरुंगवास, दोनशे रुपये दंड व कायद्यानें देता येण्याइतका एकांतवास इतकी जास्तींत जास्त शिक्षा देता येते. पण तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटास एक महिना तुरुंग आणि पन्नास रुपये दंड इतकी जास्तीत जास्त शिक्षा देता येते. वरील सर्व मॅजिस्ट्रेटांना गुन्हेगारानें दंड न दिल्यास शिक्षा देता येते. मात्र ती त्याच्या अधिकारापेक्षां जास्त असता कामा नये. सेशन कोर्टातील खटले काहीं जिल्ह्यांत पंचाच्या व काहीं जिल्ह्यांत सल्लागाराच्या मदतीनें चालतात. पंचांनीं एकमतानें दिलेला निकाल न्यायाधिशांस बंधनकारक असतो तसा सल्लागारांचा नसतो. त्याचें जर पंचाच्या मताशीं जुळत नसेल तर त्याला ती गोष्ट हायकोर्टाकडे कळवावी लागते व हायकोर्टालाहि प्रत्यक्ष अन्याय होतोसें वाटेल तरच पंचाच्या निकालाविरुद्ध जाता येतें. प्रत्येक महत्वाच्या खटल्यात खालच्या कोर्टाविरुद्ध वरच्या कोर्टांत अपिल करतां येतें. त्या कोर्टाला अपील रद्द करण्याचा, पुन्हां चौकशीचा हुकूम करण्याचा, गुन्हेगारास सोडून देण्याचा, आरोप किंवा शिक्षा बदलण्याचा अधिकार आहे.परंतु खालच्या कोर्टानें दिलेली शिक्षा अपिलानंतर वाढविण्याचा अधिकार नाहीं. दुसरा किंवा तिसरा वर्ग मॅजिस्टेटाच्या निकालाविरुद्ध अपील जिल्हा मॅजिस्ट्रेटाकडे असतें पहिला वर्ग मॅजिस्टेटाच्या किंवा मदतगार सेशन् जज्जाच

निकालाविरुद्ध अपील सेशन जज्जाकडे असते. सेशनजज्ज किंवा इलाखा मॅजिस्ट्रेट यांचे निकालाविरुद्ध अपील हायकोर्टाकडे व हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्याचा हक्क अलीकडे बंद केला आहे. [ले. रा. इ. गो. फडके].

कोर्टरॉय—बेल्जम. या शहराची लोकसंख्या १९०४ साली ३४,५६४ होती. येथें उत्तम मलमल तयार होते. शिवाय फीतकामसुद्धां येथें बरेंच होतें. जुन्या कोर्टरॉय शहराची लोकसंख्या २,००,००० होती. १३०२ मध्यें येथें मोठी लढाई झाली, तींत फ्रेंचांचा पराभव झाला. या लढाईत सातशें सोन्याचे (नाइटांचे) मंत्रेज सांपडले. येथील फार प्रसिद्ध इमारत नात्रेडेम ही आहे. ही १२११ मध्यें बांधली. येथें वॅन डिक याचें उत्तम चित्र आहे. कोर्टरॉय हें शहर रोमन कोरट्राकमपासून झालें आहे. हें शहर नॉर्मन लोकांनीं उध्वस्त केलें. पण तिसरा बाल्डीन यानें हें पुन्हां वसविलें व वाढविलें. पण रुजबेकच्या लढाईनंतर फ्रेंचांनीं हें शहर पुनः जाळून पोळून फस्त केलें. परंतु बरगंडीचा ड्यूक फिलिप दि बोल्ड यानें तें पुन्हां बांधलें.

कोर्डोफान—हा ईशान्य आफ्रिकेंतील आंग्लो ईजिप्शियन सुदानचा एक प्रांत आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ १,३०,००० चौरस मैल असून याच्या पश्चिमेस डारफुर, उत्तरेस बायुडाचें माळरान, पूर्वेस व्हाइट नाइल प्रांत आणि दक्षिणेस शिलुक्स लोकांचा व इतर निग्रो जातींचा देश आहे.

कोर्डोफानचा बराचसा भाग उन्नतावनत मैदानांचा बनलेला असून, निर्जन, रुक्ष व ओसाड असा आहे. हत्ती, गेंडे, सिंह, चित्ते, चाळवीट, म्हशी, ससे इत्यादि प्राणी येथें आहेत. येथील पुष्कळ जिल्ह्यांतून लोखंड सांपडतें पण सर्पणाच्या अभावामुळें तें सांपडून न सांपडून सारखेंच आहे.

रहिवाशी.—इ. स. १९०३ सालीं येथील लोकसंख्या ५,५०,००० होती. रहिवाशांचे साधारणतः दोन वर्ग करितां येतील; (१) मैदानांवरील अरब लोक व (२) डोंगरांवरील न्युबाज. मैदानांवरील बरेचसे गांवकरी संमिश्र रक्ताचे आहेत. कित्येक लहान लहान खेड्यांतील जाती मूळच्या निग्रो रहिवाशांच्या वंशज आहेत असें सांगतात. गोवामा ही एक महत्वाची जात होय. डार हमीद व बेडेरिआ या जाती हिच्या खालोखाल येनात. फिरत्या व कळपवाल्या अरबांचेहि दोन वर्ग करितां येतील. उंटवाले अरब व गुरांचे कळप बाळगणारे अरब यांपैकीं उंटवाले अरब उत्तरेकडे रहातात व दुसरे म्हणजे बागारा हे दक्षिणेंत राहतात. बागारा हे उत्तम शिकारी आहेत. भाले व रुंद पात्याच्या तलवारी हीं यांचीं शस्त्रें होत. न्युबाज लोकांच्या पुष्कळ पोटजाती आहेत. प्रत्येक जात आपल्या राजाच्या अंमलाखालीं असते. न्यूबाज लोकांचा वंश फार प्राचीन होय. हे लोक काळे, ठेंगण्या बांध्याचे व स्पष्ट निग्रो अवयवांचे आहेत. उत्तरेकडील डोंगरांतहि कृष्णवर्णाचे व लोंकरीसारख्या केसांचे लोक आहेत, पण यांचे अवयव निग्रो लोकांसारखे नाहींत. हे आरबी भाषा बोलतात व यांनां न्यूबाअरब लोक अशी संज्ञा आहे. एल ओबेद हें या प्रांताच्या राजधानीचें शहर होय. निरनिराळे व्यापारी रस्ते या शहरीं येऊन मिळतात. खार्टुमपासून सेभारमधून येथें रेल्वे आलेली आहे.

इतिहास.—कोर्डोफानच्या प्राचीन इतिहासाविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. येथें केव्हांहि स्वतंत्र राज्य नव्हतें. १६ शतकाच्या सुरुवातीस हा प्रांत फुंज साम्राज्याच्या अमलाखालीं होता. त्या शतकाच्या अखेरीस डारफुरच्या सुलतानानें हा प्रांत जिंकिला. १७७५ च्या सुमारास तो फिरून फुंज साम्राज्याकडे आला. यावेळीं अरबांच्या पुष्कळ टोळ्या येथें येऊं लागल्या. १७८४ त हा प्रांत फिरून डारफुर सुलतानाकडे गेला. १८२१ त महमद यानें हा प्रांत जिंकला. १८८२ पर्यंत तो ईजिप्तच्या अंमलाखालीं होता. या वर्षी हा प्रांत माहदीच्या ताब्यांत गेला. खलीफ अबदुल्ला हा १८९९ त येथेंच मरण पावला. पुढें नूतन सुदान सरकारच्या ताब्यांत हा देश गेला. अडदांड न्युबाज व अरब यांनां वठणीवर आणून शांत करण्यास सुदान सरकारला फारच श्रम पडले.

कोयार्क लोक—ईशान्य सैबेरियांतील मंगोल जातीच्या लोकांनां कोयार्क म्हणतात. चुकची लोकांशीं त्यांचे साम्य आहे. ते शूर, बुद्धिमान व स्वावलंबी असून कोणाचेंहि स्वामित्व कबूल करीत नाहींत. लढाईच्या वेळीं शत्रूंची संख्या अधिक असल्यास ते आपल्या बायकापोरांनां मारून जिवावर उदार होऊन लढतात. त्यांच्यांत बहुपत्नीत्वाची चाल असून राक्षसविवाह प्रचलित आहे. दुःसह वेदनांपासून होणारा त्रास वांचविण्याकरितां पंगु व म्हातारे यांनां ठार मारण्यांत येत असून पूर्वी बालहत्याहि प्रचारांत होती. मृताला जाळण्यांत येतें. हे लोक शामनपंथी आहेत.

कोर्वइ—हें मध्यहिंदुस्थानांतील भोपाळ जहागिरींतील छोटेसें संस्थान आहे. हें खास ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील संस्थान आहे. याचें क्षेत्रफळ १९११ मध्यें १४४ चौरस मैल होतें. याच्या उत्तरेस व पूर्वेस मध्यप्रांत असून पश्चिमेस व दक्षिणेस ग्वाल्हेर संस्थान आहे. माळव्याच्या डोंगरपठाराच्या एका टोंकावर हें वसलेलें असून याच्या पश्चिम भागांतून बटवा नदी वहात गेली आहे. इ. स. १७१३ मध्यें महंमद दिलेरखान यानें कोर्वइ व त्याच्या आसपासचा मुलूख आपल्या ताब्यांत आणला. मोंगल बादशहाला साहाय्य केल्याबद्दल त्याला ३१ परगण्यांची जहागीर मिळाली. मोंगल साम्राज्याच्या ऱ्हासकालीं या संस्थानाचा विस्तार भोपाळ संस्थानाइतका होता. मराठ्यांच्या अमदानींत मात्र या संस्थानला उतरती कळा लागली. पण अशाहि परिस्थितींत या संस्थाननें कसेंबसें आपलें स्वातंत्र्य राखलें. १८१८मध्यें शिंद्यांनीं या संस्थानाला उपद्रव देण्यास सुरुवात

केली तेव्हां भोपाळ येथील पोलिटिकल एजंट यानें या संस्थानाला मदत केली. पुढें १८२०मध्यें इरादत महंमदखान यास त्याच्या बापाला एका दासीपासून झालेल्या मुलानें पदच्युत केलें. पण यावेळीं ब्रिटिशांनीं त्याला मदत देण्याचें नाकारलें व त्यामुळें त्याला पेन्शनवरच स्वस्थ बसावें लागलें. १८९५ सालीं महंमद याकुबखान हा गादीवर बसला. त्यानें १९०६ पर्यंत राज्य केलें. त्याच्यामागून सखर अलीखान हा गादीवर आला व तोच हल्लीं या संस्थानचा नबाब आहे.

या संस्थानची लोकसंख्या १९११ मध्यें १८४५६ होती. संस्थानांत एकंदर ८८ खेडीं आहेत. संस्थानामध्यें विशेषतः मालवी भाषा प्रचारांत आहे. संस्थानांतील शेंकडा ४३ लोक शेतकीवर आपली वृत्ति चालवितात. येथें लागवडीसाठीं असलेली एकंदर जमीन २३ चौरस मैल आहे. तीपैकीं अवघ्या ९३ एकरांनां पाणीपुरवठा होतो. ११ चौरस मैल जंगल आहे. ज्वारी, धनें, गहूं व मका हीं मुख्य पिकें होत. या संस्थानांत दोन खडीचे रस्ते आहेत. एक रस्ता जी. आय. पी. रेल्वेच्या कॅथोरा स्टेशनपर्यंत व दुसरा बमोरास्टेशनापर्यंत जातो. संस्थानिकास फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार आहेत.त्याच्या अधिकाराबाहेरच्या गुन्ह्यांची चौकशी पोलिटिकल एजंट करतो. ब्रिटिश कायदे संस्थानाला लागू आहेत. संस्थानचा खजिना हा पोलिटिकल एजंटाच्या ताब्यात असतो.संस्थानचा वटवसूल १९०४ मध्यें ३७००० रुपये झाला. संस्थानची राजधानी कोर्वाई गांव ही आहे. हें गांव घटना नदीच्या कांठीं वसलेलें आहे. या गांवाच्या पूर्वेस एका टेंकडीवर एक किल्ला असून तो जंबूर नांवाच्या दगडांनीं बांधलेला आहे. हा दगड या संस्थानांत मुबलक सांपडतो. याच दगडानें बांधलेलीं संस्थानांतील घरें आहेत. येथें एक पोस्ट ऑफिस व एक इस्पितळ आहे.

कोन्हा—संयुक्त प्रांतांतील मिर्झापूर जिल्ह्याच्या वायव्य भागांतील तहशील. १९११ सालीं हिचें क्षेत्रफळ ३९६ चौरस मैल होतें. १९११ मध्यें या तहशिलीची लोकसंख्या २,७५,८६२ होती. या तहशिलींत एक गांव व १०५६ खेडीं होतीं. ही तहशील गंगेच्या अगदीं उत्तरेस असून या तहशिलीची उत्तर हद्द वर्णा नांवाची नदी आहे. हा प्रदेश बनारस जहागिरींत मोडत असून फार सुपीक आहे. १९०३-४ मध्यें सुमारें २५० चौरस मैलांच्या टापूंत लागवड करण्यांत आली. त्यांपैकीं ११२ चौरस मैलांनां विहिरी इत्यादिकांच्यामुळें पाणी पुरवठा होत होता.

कोल—ही एक द्रविड जात असून विन्ध्या कैमूर पठारानजीक या कोलांची संख्या जास्त असल्याचें आढळून येतें. कोल हा एक निंदाव्यंजक शब्द असून तो अनार्यासंबंधीं आर्यांकडून उपयोगिला जात असे अशी समजूत आहे. मुंडारी हो, होरे व होरो या मनुष्यवाचक शब्दांवरून कोल असा शब्द बनला असावा असें म्हणतात. छोटा नागपूर येथें कोल जात मुंडारी अथवा मुंडा या नांवानें ओळखली जाते. लोहारगडाचे मुंडारी मिर्झापुरच्या कोल जातीसारखे दिसतात. व त्यांची उंची ५॥ फूट असते. त्यांच्या चेहऱ्या रून पहातां, आर्यांच्या रक्ताची बरीच भेसळ त्यांच्या पुष्कळ कुटुंबांत झाली असावी असा प्रत्यय येतो. त्यांच्या चेहऱ्यांत वैचित्र्यहि बरेंच दिसून येतें. सरळ नाक व लांब चेहरेपट्टी पुरुषवर्गांत असलेली आढळते. त्यांच्यांतील तरुण स्त्रियांचे अवयव मृदु व रेखीव असून हनुवटी, तोंड व नाक इत्यादि अवयव यथोचित व अरुंद आणि सुंदर असे असतात. कोल स्त्रीपुरुषाची चालण्याची ढब मोठी ऐटदार असते असें डाल्टननें म्हटलें आहे. कोल जातीच्या उत्पत्तीविषयीं अनेक दंतकथा रूढ आहेत. सोमवंशीय ययाति राजा यानें आपल्या राज्याची पांच मुलांत वांटणी केली. हरिवंशावरून असें दिसतें कीं, ययाति-पुत्र तुर्वसु हा दक्षिणेंत रहात असून त्याच्या राजवंशांत पांड्य, कोरल, चोल व कोल असे पुरुष निर्माण झाले. कोलांचे वंशज हेच प्रस्तुतचे कोल होत. त्यांचा रजपुतांशीं संबंध आहे असें म्हणतात, परंतु द्राविड वंशाशीं त्यांचा संबंध जोडणाऱ्या दंतकथा ज्यास्त विश्वसनीय अशा आहेत. कियूतालीहून आपण देशांतर केलें असें मिर्झापुरचे कोल म्हणतात. रेवा संस्थानांतील बार्डि राजाच्या मुलुखांत वरील स्थान आहे. नानहू हा त्यांचा पूर्वज होता. चूनारनजीक पिप्रि येथें त्यांचें एक देवस्थान असून ते बिरमह देवीची उपासना करितात. राजा लाखन अथवा लाखनदेव हें त्यांचें उपास्यदैवत होय.

रउतीय, दहैत, महतीयान, ठाकुरीय, बनाज, पहारीय, बरवार,बिन,हर्वरिय, राजवारीय,हनरियाना असे कोल जातीचे वर्ग आहेत. त्यांची एक पंचायत असून तेथें विवाहाचे व कांहीं नैतिक आचरणाचे निवाडे दिले जातात. पंचायतीच्या मुख्यास चौधरी म्हणतात. व त्याची जागा वंशपरंपरागत असते. जातिबहिष्कार व दंड या शिक्षा तेथें फर्माविल्या जातात. कोलांचीं लग्नें वधु पक्षांत होत नाहींत. बहुपत्नीत्वाच्या तत्वाविरुद्ध त्यांचा प्रह असतो. परंतु अनेक बायका करण्याची त्यांच्यांत रूढि आहे. या जातींत कोणाचींहि लग्नें रहात नाहींत. विधवाविवाहास मोकळीक असते. काडीमोड करण्याचा प्रघात कोलांमध्यें असलेला आढळून येतो. मिर्झापुरच्या कोलांमध्यें दत्तकासंबंधीं अनेक नियम आहेत. निपुत्रिकानें आपल्या भावाच्या मुलास दत्तक घ्यावें किंवा एखाद्यानें आपल्या मुलीच्या मुलासहि पुत्र नसल्यास दत्तक घ्यावें असा नियम आहे. एखाद्यानें भयंकर गुन्हा केलेला असल्यास किंवा त्यानें धर्मांतर केलें असल्यास त्याच्या पित्यास एखादा मुलगा दत्तक घेण्याचा अधिकार असतो. एक दत्तक जिवंत असतां दुसरा घेतां येत नाहीं. दत्तक घेणाऱ्याचें व देणाऱ्याचें एकच कुल असलें पाहिजे. साधू अथवा फकीर यांनां दत्तक घेण्याचा अधिकार नाहीं. या जातींत वारसासंबंधींहि अनेक नियम असून नात्या-

विषयीं पाहिलें तर असें आढळतें कीं, वधूचे सर्व नातेवाईक हे वराचेहि नातेवाइक होऊं शकतात, व लग्नामुळें अशीं अनेक नातीं जडतात.' ओरावन ' व ' मुंडा ' हे लेख पहा. [कृक].

कोलकई—मद्रास इलाख्याच्या तिनेवेल्ली जिल्ह्यांतील श्रीवैकुंठम् तालुक्यामधील एक खेडें. श्रीवैकुंठशहरापासून पूर्वेस १२ मैलावर हें आहे. १९०१ मध्यें या खेड्याची लोकवस्ती २५१८ होती. द्राविडी संस्कृतीचें हें एक प्राचीन पीठ होतें अशी आख्यायिका आहे. चेर, चोल व पांड्य या घराण्यांचे संस्थापक पुरुष जे चेर, चोल व पांड्य हे तिघेहि मिळून या खेडयावर राज्य करीत होते असें म्हणतात. पुढें चेर व चोल यांनीं अनुक्रमें पश्चिमेस व उत्तरेस आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन केल्यानंतर पांड्य घराण्याची त्यावर सत्ता सुरु झाली व त्यांनीं हें खेडेगांव आपली राजधानी केली. मोतीं काढण्याचा धंदा या गांवीं फार मोठा असे असें टॉलेमीनें म्हटलें आहे. पण पुढें कोलकईजवळ असलेला समुद्र बराच मागें हटल्यावर कोलकई व समुद्र यांच्यामध्यें कायल नांवाचें एक खेडें वसलें व तेथें हा धंदा सुरू झाला.

कोलगांग—हें बंगाल इलाख्यामधील भागलपूर नांवाच्या जिल्ह्यांतील एका विभागांतील गांव आहे. हें गंगा नदीच्या दक्षिण तीरावर वसलें असून येथें ईस्ट इंडियन रेल्वेचें एक ठाणें आहे. १९०१ सालीं या गांवाची लो. सं. ५७३८ होती. बंगालचा शेवटचा स्वतंत्र राजा घियासउद्दीन महंमूद हा १५३८ त येथें गौर शहर लुटून आल्यावर मरण पावला. येथें विचित्र तऱ्हेनें कोरलेलें एक लेणें आहे. या शहरीं ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी आला होता. हें गाव व्यापाराकरितां प्रसिद्ध असून येथें पूर्वी ठग लोक रहात असत. येथें १८६९ सालीं म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

कोलघा—एक मजुरांची जात. सुरतेच्या आग्नेय दिशेकडील संस्थानांत या जातीची वस्ती असून १९११ सालीं याची संख्या ५८४९ होती. ते ब्राह्मणांनां पूज्य मानीत नाहींत, व त्यांचे स्वतःच्या जातीचे उपाध्यायहि नाहींत. हे देवतांचे उपासक असून त्याचे समारंभहि अत्यंत साध्या स्वरूपाचे असतात. त्याच्यांत बहुपत्नीत्व व विधवाविवाह रूढ आहे. मुलाच्या बापाकडून तीन रुपयास वधूची मागणी केली जाते. ढोलगी वाजवून मिरवणुकी काढतात व उभयपक्षीं देवघेवहि बरीच होते. एका जाजमावर बसून वधूवरांच्या पदरांस गांठ मारून व उभयतांनां नावें घ्यावयास लावून लग्नसमारंभ आटोपतात. त्यानंतर उभय पक्षांतील जोडप्यांचा नाच होतो व त्यांत वधूवर हेहि भाग घेतात. नंतर भोजनास इष्टमित्र बोलावून वधूवराच्या पदराची गांठ सोडली जाते व वधूचा गृहप्रवेश होतो. हनुमान, भिल्लदेव व काकाबालिया या देवतांची उपासना कोलघा लोक करतात. यांच्यांत उपाध्यायाचा वर्ग नाहीं. मृताचें दहन करून घरीं आल्यावर सुरापान करण्याची यांची वहिवाट आहे. त्यांचा परंपरागत धंदा म्हणजे नोकरी करणें, लांकडे तोडणें व मजुरी करणें अशा प्रकारचा आहे. त्यांची आर्थिक स्थिति अत्यंत निकृष्ट असल्यामुळें कांहीं कंदमुळांवर गुजारा करतात व काहीं लोकांना दोनदोन तीनतीन दिवस उपवासहि करावा लागतो. बडोदें संस्थानांत कोलघांची लोकसंख्या सुमारें एक हजार आहे. [एन्थोवेन].

कोलचिस—हा प्राचीन भूगोलांत काळया समुद्राच्या पूर्वेस असलेला त्रिकोणाकृति जिल्हा आशियामायनरमध्यें होता. मर्यादाः—उत्तरेस काकेशस, पूर्वेस आयबेरिया, दक्षिणेस मॉंटेस–मास्चिसी, आर्मेनिया, आणि पाटसचा कांहीं भाग व पश्चिमेस युक्झिन. सांप्रतच्या जिल्ह्याला कुतैस (यापूर्वी मिंग्रेलिया) म्हणतात. येथें कांहीं जाती रहात असत. स्त्रियांच्या प्रेतांनां मूठमाती देत असत व पुरुषांच्या प्रेतास झाडाला लटकावीत असत. किनाऱ्यावरील मुख्य शहर म्हणजे डायोस्कुरियसची मिलेशियन वसाहत होय (आधुनिक सुखुम कॅले). येथील मुख्य नदी फॅसिस (आधुनिक–रिआन) होती. ग्रीक पुराणांत या स्थानाची महती होती, व याच ठिकाणीं आरगोनाटांना जावयाचें होतें. प्राचीन काळीं इराणी साम्राज्यांत याचा समावेश होत होता. रोमन स्वारीच्या वेळीं मोठया मिथ्रिडाटीझच्या ताब्यात हें होतें. परंतु त्याचा पांपेनें पराभव केल्यावर हा रोमन प्रांत बनला. यानंतर ६ व्या शतकांत येथील राजा गोबाझेसनें अबास्की अथवा अबास्गी सह बंड केलें व इराणचा पहिला खुश्रु (५४१) याला मदतीस बोलावलें. खुश्रूनें किनाऱ्यावरलि पेट्रा हें मुख्य रोमन ठाणें घेतलें. सर्व जिल्हा इराणी बनणार असें गोबाझेसनें पाहून रोमन मदत बोलावली व पेट्रा पुन्हां परत घेतलें. गोबाझेसचा खून झाला; परंतु इराणी सेनापति नाकोरागनचा पराभव फेसिस येथें झाला (५५३). ५६२ च्या तहानें कोलघा रोमन लोकाच्या ताब्यांत आलें. ५९७ त रोमच्या विरुद्ध बंड झालें. दुसऱ्या जस्टिनियननें अबास्गी लोकांवर हल्ला करण्यास ॲलन लोकांस चिथावण्यासाठीं इसारियन लिओ (हा नंतर बादशहा झाला) यास पाठविलें. परंतु सारासन लोकाच्या मदतीमुळें हा प्रयत्न निष्फळ झाला. १४ व्या शतकारंभापासून १७ व्या शतकाच्या अंतापर्यंत यावर मिंग्रेलिया नांवाखालीं डेडियन या स्वतंत्र घराण्याची सत्ता होती. नंतर चिकोन्द्यान घराण्याची सत्ता सुरू झाली. व १८३८ त त्यांनीं रशियाचें सार्वभौमत्व कबूल केलें. १८६५त हा जिल्हा रशियानें खालसा केला.

कोलचेस्टर—इंग्लंडांतील एसेक्सचें कोलचेस्टर हें बाजार शहर, नदीवरील बंदर, म्युनिसिपालटीचा व पार्लमेंटरी विभाग आहे. लंडनच्या पूर्वईशान्येस ग्रेटईस्टर्न रेल्वेनें हें ५२ मैल आहे. १९२१ सालीं येथील लोकसंख्या ४३,३७७ होती. हें कोल्ने नदीवर आहे. दुसऱ्या विल्यमनें बांधलेला किल्ला मोडकळीस आला आहे. एसेक्स पुराणवस्तुसंशोधन मंडळाच्या पदार्थसंग्रहालयांत रोमन प्राचीन वस्तू व राउंड

घराण्याचें वाचनालय आहे. सेंट बोटाल्फ व बेनिडिक्टाइन या दोन मठांशिवाय होली ट्रिनिटी, सेंट मार्टिन व सेंट लिओनार्ड प्रार्थनामंदिरें येथें आहेत. मोफतवाचनालय व काउन्टी रुग्णालय येथें आहे. कांहीं काळपर्यंत येथें लष्करी छावणी होती. मोफत व्याकरणशाळा, धंदेशिक्षणाची शाळा आणि इतर बऱ्याच वैद्यकी संस्था येथें आहेत. कॅसल रमणबाग येथें आहे. धान्याच्या व गुरांच्या बाजाराकरितां हें प्रसिद्ध आहे. कापडाचे, बुटाचे व शिल्पकलेचे वगैरे कारखाने येथें आहेत. कोल्ने नदीवरील मासे पकडण्याचें ठिकाण म्युनिसिपालिटीच्या मालकीचें आहे. प्रतिनिधिविभागांतून पार्लमेंटांत एक सभासद पाठविला जातो. म्युनिसिपालिटींत एक मेअर, ८ सनदी शहरचे अधिकारी व २४ सभासद असतात. शहराचें क्षेत्रफळ ११,३३१ एकर आहे. क्लॉडिअसनें हें शहर वसविलें. बोडेशिआ राणीच्या कारकीर्दींत तद्देशीय लोकांनीं शहर जाळून वसाहतवाल्यांची कत्तल केली. ११८९ सालीं पहिल्या रिचर्डनें दिलेल्या सनदेमुळें येथील लोकांस पुष्कळ हक्क मिळाले. १६३५ सालीं पहिल्या चार्लसच्या सनदेप्रमाणें बेलिफच्या जागीं मेयरची नेमणूक करण्यांत आली. आपल्या पक्षाच्या लोकांची संख्या जास्त असावी म्हणून क्रॉमवेलनें १६५३ सालीं ही सनद बदलली. गेलेलें स्वातंत्र्य १७६३ सालीं ३ ऱ्या जॉर्जनें येथील लोकांस दिलें. १२९५ पासून १८८५ पर्यंत येथून पार्लमेंटांत दोन सभासद जात असत. फ्लेमिश वसाहतवाल्यांनीं येथें पट्टू कापडाचे कारखाने काढले. १६३८ सालीं फेअरफॅक्सनें शहराला वेढा दिला. उत्तरेकडील भागांत झालेल्या क्रॉमवेलच्या जयामुळें तर फेअर फॅक्सचा चांगलाच मोड झाला. आठव्या हेनरीनें हें मदतनीस बिशपचें राहण्याचें ठिकाण केलें.

कोलंब, चार्लस आगस्टिन (१७३६-१८०६).—चार्लस आगस्टिन कोलंब या फ्रेंच शास्त्रज्ञाचा जन्म फ्रान्सांतील अंगोलीमी नांवाच्या गांवीं झाला. प्रथमतः त्यानें लष्करी एंजिनिअरचा पेशा स्वीकारला. व कांहीं काळ याप्रमाणें त्यानें नोकरी केली. परंतु १७८९ सालीं फ्रेंच राज्यक्रांतीला सुरुवात झाली व त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला व तो ब्लॉई एथील आपल्या लहानशा मिळकतीवर जाऊन राहिला. क्रांतिकारक सरकारनें त्याला नवीन मापें व वजनें तयार करण्याकरितां पारीस येथें बोलाविलें. सन १८०२ सालीं त्याला सार्वजनिक शिक्षणखात्यावर तपासनीस (इन्स्पेक्टर) नेमिलें. परंतु त्याची शरीरप्रकृति अगोदरच खालावली होती व पुढें चार वर्षांनीं तो पारीस येथें मृत्यु पावला. यंत्रशास्त्र, विद्युच्छास्त्र आणि चुंबकत्वशास्त्र यांच्या इतिहासांत कोलंब याचें नांव फार प्रसिद्ध आहे. सन १७७९ सालीं त्यानें घर्षणाविषयीं महत्वाची माहिती पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. यानंतर सुमारें २० वर्षांनीं त्यानें प्रवाही द्रव्यांच्या घर्षणाविषयीं माहिती प्रसिद्ध केली. सन १७८५ सालीं त्यानें एक महत्वाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत त्याच्या नांवानें प्रसिद्ध असलेली (पिळाची) तुला व तिच्यापासून चुंबकशास्त्र, विद्युच्छास्त्र यांत होणारा उपयोग यांचें वर्णन केलें होतें. पदार्थांच्या पृष्ठभागावर विद्युत् कसकशी पसरलेली असते याची माहिती या तुलेच्या साहाय्यानें सुलभतेनें संपादन करतां येते. त्यानें गणितविषयक सिद्धान्त (विद्युत् आणि चुंबकत्व यांच्यासंबंधानें) प्रस्थापित केले आहेत. विद्युत्तेच्या व्यावहारिक एकम् परिमाणास कोलंब हें नांव दिलें गेलें आहे.

कोलंबस.—(१४५१-१५०६)—ख्रिस्तोफर कोलंबस हा डोमेनिको कोलंबो याचा मुलगा होय. हा जिनोवा येथें १४५१ मध्यें जन्मला. कांहींच्या मतें तो १४४६ मध्यें जन्म पावला. त्याला पेविया येथील विश्वविद्यालयांत विद्याभ्यासासाठीं त्याच्या बापानें पाठविलें. विश्वविद्यालयांत असतांना त्यानें भूमिति, भूसृष्टिविद्या, ज्योतिष व नकाशे काढण्याची कला यांचा अभ्यास केला. वयाच्या १४ व्या वर्षीच त्यानें नाविकाचा धंदा पत्करला. तरी पण आपल्या धंद्यांतून वेळ सांपडतांच, तो विणकामाचा वडिलार्जित धंदा पहात असे. लहानपणापासूनच त्याला नाविकविद्येचा फार नाद असे. त्यामुळें त्यानें नाविकाचा धंदा पत्करून निरनिराळ्या देशांच्या सफरी केल्या. १४७७ मध्यें तो ऐस्लंडसारख्या उत्तरसमुद्रांतील बेटापर्यंतदेखील जाऊन आला. नंतर तो पोर्तुगालमध्यें रहाण्यास आला. तेथें त्यानें पेरेस्त्रेलो नांवाच्या एका सरदाराच्या फेलिपा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. पेरेस्त्रेलो हा प्रिन्स हेनरीच्या पदरचा एक दर्यावर्दी सरदार होता. अर्थात् यामुळें त्याला नौकानयन कलेचें सांगोपांग ज्ञान झालें. पेरेस्त्रेलोनें शोधून काढलेल्या नवीन नवीन स्थळांचीं वर्णनें, त्या देशांचे नकाशे यांचा त्यानें सूक्ष्म अभ्यास केला. पोर्तुगीज लोकांनीं शोधून काढलेल्या सर्व देशांपर्यंत त्यानें सफरी केल्या. त्यामुळें त्याच्या शोधक मनाला नवीन नवीन देश शोधून काढण्याची तळमळ लागली. पश्चिमेच्या मार्गानें आशियाखंडाला आपणाला जातां येईल असें त्याच्या मनांत येऊं लागलें. अर्थातच त्या दृष्टीनें त्यानें मार्कोपोलो, पीरे द ऐली या धाडशी संशोधकांचीं प्रवासवर्णनें बारकाईनें वाचून पाहिलीं. या प्रवासवर्णनापासून व त्यांत स्वतःच्या कल्पनेची भर घालून त्यानें कांहीं सिद्धांत बसविले. त्या सिद्धांतांच्या आधारानें नवीन अज्ञात देश सांपडणें शक्य आहे असें त्याच्या मनानें घेतलें. पण मनांत पुष्कळ कल्पना आल्या तरी कल्पना व सिद्धि यांच्यामध्यें साता समुद्राइतकें अंतर असतें. शिवाय अशा प्रकारच्या धाडसी कल्पनांनां प्रोत्साहन देणें म्हणजे जाणूनबुजून पैशाचा अपव्यय केल्यासारखेंच होतें. आपल्या या धाडसी पण विचारपूर्वक बनलेल्या कल्पनांनां सहज मोठमोठे लोक मान्यता देतील अशी कोलंबसाची कल्पना होती. पण त्या बाबतींत त्याला

जो प्रत्यक्ष अनुभव आला त्याच्यामुळें कोलंबसाची पूर्ण निराशा झाली. पोर्तुगालच्या राजानें त्याला मदत देण्याचें नाकारलें. स्पेनच्या फर्डिनंड राजानें व इसाबेला राणीनें प्रथम त्याला बरीच आशा दाखविली. पण त्यांनींहि शेवटीं त्याला अर्धचंद्रच दिला. तरी पण इसाबेला राणीचे ज्यांचें वजन अशा लोकांनीं जिवापाड मेहनत करून एकदां कशीबशी कोलंबसाला मदत देण्याचें स्पेनच्या राजाराणीकडून आश्वासन घेतलें व कांहीं करार उभयतांमध्यें झाल्यानंतर कोलंबसानें शुभ मुहुर्तावर आपल्या चिरवांछित पर्यटणाला सुरुवात केली. ता. ३ आगस्ट १४९२ ला त्यानें पर्यटणाला सुरवात केली. प्रथम दोन महिने जमीनच दृष्टीस पडली नाहीं. जहाजावरील लोक घाबरून गेले. कोलंबसाला त्यांनीं दोष देण्यास सुरवात केली. पण ‘ धैर्याचा महामेरू ’ कोलंबस यानें आपलें धैर्य व शांतता ढळूं दिली नाहीं. परमेश्वरावर विश्वास ठेऊन त्यानें आपला मार्ग तसाच चालू ठेवला होता. शेवटीं आक्टोबरच्या १२ तारखेला त्याला जमीन दिसली. तो सर्वांच्या अगोदर त्या बेटावर उतरला; व त्यानें त्या बेटाला सॅन सॅल्व्हडोर असें नांव दिलें. तेथील लोकांशीं मैत्री जोडून त्यानें सँटा मेरिया फर्नेडिना, कुबा, हिस्पॅनियोला, हटी इत्यादि बेटें शोधून काढलीं. हिस्पॅनियोला येथें त्यानें एक वसाहत स्थापन केली व तो यूरोपला परत आला. स्पेनमध्यें राजाराणींनीं त्याचा अतिशय चांगल्या रीतीनें सत्कार केला; व त्याच्या या सफरीनें यूरोपखंडभर त्याची कीर्ति पसरली. कांहीं काळ विश्रांति घेतल्यानंतर सप्टेंबर १४९३ च्या २४ व्या तारखेस कोलंबस पुन्हां सफरीला निघाला. वाटेंत त्यानें डोमिनिका, मादिगलांते, ग्वाडलूप, मॉन्टेसराट, अँटिग्वा, सेंन मार्टिन, सँटाक्रुझ, व्हर्जिन इत्यादि बेटें शोधून काढलीं. नंतर तो हिस्पॅनियोला येथें येऊन पोहोंचला. तेथील वसाहतींत बेबंदशाही माजलेली दिसली त्यामुळें त्याला फार वाईट वाटलें. पण त्यानें तेथील कशी बशी व्यवस्था लावली. सोन्याच्या खाणी खोदण्याचें काम सुरू करविलें व नंतर तो पुन्हां कुबाच्या दक्षिणदिशेनें निघाला. वाटेंत जमेका वगैरे निरनिराळ्या बेटांचा शोध करून तो १४९६ च्या जून महिन्यांत स्पेन येथें आला. त्याचा राजाराणीनें चांगल्या तऱ्हेनें सत्कार केला; व त्याच्या मुलांनां चांगल्या मानाच्या जागा देण्यांत आल्या. पुन्हां कांहीं काळ विश्रांति घेऊन कोलंबसानें तिसरी सफर काढली. या सफरींत त्याला दक्षिण अमेरिकेचा शोध लागला. तेथून तो हिस्पॅनियोला येथें आला पण त्याच्या गैरहजेरींत अव्यवस्था माजलेली त्याला आढळून आली. हें पाहून त्याला फार वाईट वाटलें. शिवाय खुद्द स्पेनमध्यें राजाराणीच्या मनांत कोलंबसाविरुद्ध भलतें सलतें भरवून देण्याचा त्याच्या हितशत्रूंनीं जोराचा प्रयत्न चालविला होता; व त्या प्रयत्नांत त्यांनां यशहि येत चाललें होतें. राजानें बोवडिला नांवाच्या एका गृहस्थाला हिस्पॅनियोलाच्या वसाहतींची देखरेख करण्याकरितां पाठवलें. त्यानें तेथें येऊन कोलंबसाला बंदिवान केलें व स्पेनला पाठवून दिलें. पण पुढें राजाराणीला खरी हकीकत कळतांच त्यांनीं त्याला मुक्त केलें व पुन्हां त्याचा योग्य बहुमान केला.

पुन्हा कोलंबसानें चवथ्या सफरीवर जाण्याचा निश्चय केला. या सफरींत त्यानें बेथलेहेम बेट शोधून काढलें. तेथें सुवर्ण विपुल सांपडतें असें त्याला समजल्यामुळें तेथें त्यानें वसाहत स्थापन केली. तो पुन्हां जमेका येथें परत आला. तेथें एक वर्ष विश्रांति घेऊन तो पुन्हां स्पेनला परत आला. त्याला तेथें पुष्कळ मानमरातब मिळाला. पण त्याची प्रकृति अगदीं अशक्त झाली होती. अशा रीतीनें कांहीं काळ कंठल्यावर तो १५०६ मध्यें मरण पावला. कोलंबस हा शरीरानें उंच व सुदृढ होता. त्याचा परमेश्वरावर दृढ विश्वास असे. प्रचंड संकटांत देखील तो मनाची समता ढळूं देत नसे. त्याच्या मुलीनें त्याचें चरित्र लिहिलेलें आहे. त्यावरून त्याच्यासंबंधीं पूर्ण माहिती आपणाला उपलब्ध होते.

[संदर्भ ग्रंथ.—वॉशिंग्टन आयर्व्हिंग—हिस्ट्री ऑफ दि लाईफ अँड व्हॉयेजेस ऑफ ख्रिस्तोपर कोलंबस(१८२०-१८२८) महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर—कोलंबसाचा वृत्तांत (सन १८८२) मुंबई].

कोलंबस राजधानी.—उत्तरअमेरिका संयुक्त संस्थानांतील ओहिओ संस्थानची राजधानी. हें बंदर असून फ्रांक्लिन काउंटचें मुख्य स्थान आहे. हें स्किओटो व ऑलेंटांगी नद्यांच्या संगमावर वसलें आहे. लोकसंख्या(१९१७)२,२०,१३५. हे तीन रेल्वेंचें केंद्रस्थान असून यांत ९ विजेच्या गाड्याचे फांटे आहेत. याचें क्षेत्रफळ १७चौ. मैल आहे. मुख्य कामकाजाचा रस्ता शंभर फूट रुंद आहे व ब्रॉडस्ट्रीट रस्ता १२० फूट रुंद आहे. स्टेट कॅपिटोल, सिटी, हॉल कोर्ट हाऊस, विश्वविद्यालय वगैरे इमारती आहेत. फ्रांक्लीन गूडेल,चिलर यांसारखे कांहीं बगीचे गांवांत आहेत. ओहिओ विश्वविद्यालयांत निरनिराळ्या शास्त्रांचे अभ्यासक्रम आहेत. हें विश्वविद्यालय सरकारी खर्चांतून चालतें व कालेजांतील शिक्षण मोफत देण्यांत येतें. याशिवाय कॅपिटल विश्वविद्यालयाचीं विद्यापीठेंहि येथें आहेत. कोलंबस हें ओहिओ येथील कोळशाच्या व लोखंडाच्या खाणींजवळ असल्यामुळें येथें कोळशाचा व्यापार बराच आहे. पण याशिवाय लोखंडी वस्तूंचा व्यापारहि येथें मोठा आहे. जोडे, औषधें, गाड्या व दुसऱ्या अशाच वस्तू करण्याचे कारखानेहि येथें आहेत. १७९७ मध्यें येथें वस्ती पहिल्यानें झाली. १८३४ त हें शहर झालें.

कोलंबिया—हें दक्षिण अमेरिकेच्या वायव्य कोंपऱ्यांत एक प्रजासत्ताक राज्य आहे. याच्या उत्तरेस कॅरिबियन समुद्र व व्हेनेझुएला, पूर्वेस व्हेनेझुएला व ब्राझील, दक्षिणेस ब्राझील, पेरु व इक्वेडोर व पश्चिमेस इक्वेडोर, पॅसिफिक

महासागर, पनामा व कॅरिबियन समुद्र आहेत. याची लांबी १०५० मैल असून रुंदी ८६० मैल आहे. क्षेत्रफळ ४,८१,९७१ चौरस मैल आहे. पनामाचा भाग गेल्यामुळें या देशाच्या सीमा प्रत्येक बाजूंनीं अनिश्चित झाल्या आहेत.

स्व रू प व र्ण न.--कोलंबिया हा अतिशय डोंगराळ प्रदेश आहे. सरासरी निम्मा प्रदेश अँडीज पर्वताच्या आग्नेयेस असून विस्तीर्ण लॅनॉस व जंगली मैदानांचा बनलेला आहे. व यामधून अॅमेझॉन व ओरिनोको नद्यांनां मिळणाऱ्या कित्येक पश्चिमेकडील नद्या वाहतात. या भागांत निरनिराळ्या वनस्पती दाट वाढलेल्या आहेत व कांहीं भाग उष्णकटिबंधांतील निरनिराळ्या प्रकारच्या लागवडीस लायक आहे. मैदानांत कित्येक ठिकाणीं कमी ठेंगण्या अशा टेंकड्या आहेत व येथेंच उद्योगधंद्यांच्या वसाहती आहेत. सखल सपाटीचा प्रदेश दलदलीचा असून गोरे लोकांच्या वसाहतीस अयोग्य आहे. दुसरा भाग ह्या राज्याचें ⅕ क्षेत्रफळ व्यापतो. हा अतिशय डोंगराळ असून यामधून मॅगेलेना, कॉका व ॲट्राटो नद्यांच्या दऱ्या गेलेल्या आहेत. या भागांतील पर्वतश्रेणी अँड्रियन पर्वताच्या उत्तरेकडील मध्यभागाच्या ओळी आहेत. सखल दऱ्या, डोंगरपठार व पर्वताच्या ओळी यांवर चांगली कॉफी होते व दळणवळणाचे मार्ग चांगले झाल्यास या व्यापारानें देशाची उन्नति अँटिओकिआच्या सोन्याच्या खाणींपेक्षां वाढेल.

कोलंबियाच्या डोंगराळ प्रदेशांत ज्वालामुखी पर्वताचे स्फोट व धरणीकंपाचे धक्के-विशेषतः दक्षिण भागांत वारंवार बसतात. परंतु हे धक्के व्हेनेझुएला व इक्वेडोरमधील धक्क्यांएवढे भयंकर नाहींत.

बे टें --कोलंबियाचे किनाऱ्यावर फार थोडीं बेटे आहेत. यांपैकीं बहुतेक नेहमींच्या उपयोगांतील नकाशावर दाखविण्याइतकी मोठीं नाहींत. गार्गोना हे पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील मोठें बेट आहे. माल्पेलो बेट व पानामा आखातांतील मोत्याचीं बेटं कोलंबियाच्या ताब्यात आहेत. सर्वांत मोठें व महत्वाचें बेट व्हिएजा प्रॉव्हिडेन्सिया हें आहे.

न द्या—पॅटिआ, कॅका, मॅग्डेलेना, कॅक्वेटा व पुटूमायो मुख्य नद्या आहेत. मिरा, पॅटिआ, इस्कुआंडे, मिकाइ, व्रेनाव्हेंटूरा, सॅनज्वान व बॉडो या पॅसिफिक किनाऱ्याच्या मुख्य नद्या आहेत. ॲट्रॅटो, बॅकुबा, सिनु, मॅग्डेलेना, ग्वुलिआ या कॅरिबियन सिस्टिमच्या नद्या आहेत. ग्वायाबेरो व्हिचाडा, मेटा व ॲरॉकचा वरचा भाग या पूर्वेकडील मैदानांतलि नद्या आहेत.

स मु द्र कि ना रा—समुद्रकिनारा पॅसिफिक महासागर व कॅरिबियन समुद्र यांच्या लगत असून पानामाच्या कालव्याच्या योगानें याचे दोन भाग झाले आहेत. टुमाको व व्रेनाव्हेन्टुरा हीं दोन व्यापारी बंदरें आहेत. मिरा, पॅटिआ सॅनज्वान नद्यांतून लहान बोटी जातात. पॅसिफिक किनाऱ्याचीं मुख्य आखातें टुमाचो, चोको, मॅग्डेलेना, कॅबिटा, कोर्की, प्युर्टो, उट्रिय, सोलॅनो, कुपिका, ओक्टाव्हिआ हीं आहेत. कॉरिबियन किनाऱ्यावर बॅरन किला, कार्टाजेना, सँटा मार्टा, वरिओहाचा हीं मुख्य बंदरें आहेत. युराबाचें आखात, मोरोस्किलो, सायनेगा डिसँटा मार्टे हीं मुख्य आखातें आहेत.

ह वा:—हा देश बहुतेक उत्तर उष्णकटिबंधांत आहे. अॅमेझॉनच्या जंगली मैदानांचा थोडासा भाग भूमध्यरेषा ओलांडून दक्षिण उष्णकटिबंधांत गेलेला आहे. अँडीज पर्वत दक्षिणोत्तर या देशांतून गेल्यामुळें अटलांटिक महासागराचे पूर्वेकडे वहाणारे वारे थंड होऊन पूर्व उतरणीवरील अॅमेझानच्या जंगली मैदानावर पुष्कळ पाऊस पडतो. समुद्र किनाऱ्यावरील मैदान दलदली व अरण्यें यांनीं व्यापलें असून तेथील हवा फार रोगट आहे. वर्षांत अॅमेझान प्रदेशांतील हवेंत विशेष फेरबदल होत नाहींत.

लो क सं ख्या.—१९१२ सालीं पनामा वगळून कोलंबियाची लोकसंख्या ५०,७२,६०४ होती. पैकी १,५०,००० इंडियन लोक होते. येथील सध्याचे गोरे लोक, कोलंबियाचा शोध लागून तो जिंकल्यावर पुढें ३ शतकात आलेल्या गोऱ्या वसाहतवाल्यांचे वंशज होत. इंडियन व मेस्टिझो हे येथील जुने रहिवाशी होत.

रा ज की य वि भा ग व श ह रें.—याचे १७ विभाग पाडलेले आहेत. लहान शहरांमध्यें सांगण्यालायक अम्बालेमा असून तें तंबाकू व विड्यांकरिता प्रसिद्ध आहे. शिवाय ब्युनाव्हेन्टुर चॅपारेल, होंडा, गिरार्डोट रेल्वे ठाणें व क्विब्डो हीं दुसरीं शहरें आहेत.

द ळ ण व ळ णा चे मा र्ग.—कोलंबियामध्यें रेल्वे करण्याचा प्रश्न फार मुष्कीलीचा आहे. वस्तीचा व पिकाऊ प्रदेश बहुतेक डोंगराळ भागांत असल्यामुळें मॅग्डेलेना नदी हीच काय ती दळणवळणाच्या सोईची आहे. स्पॅनिश लोकांनीं बोगाटापासून मॅग्डेलेना नदीच्या खोऱ्यात जाणारे दोन रस्ते बांधले होते. सध्यां ते नादुरुस्त स्थितींत आहेत. कॉका व नेची नद्यांतून लहान बोटी चालतात. मॅग्डेलेना नदीला जोडलेल्या नऊ रेल्वे लाइनी व तीन न जोडलेल्या लाइनी आहेत. १९०७ मध्यें बोगोटा, बॅरनकिला व कॅर्टाजिनामध्यें रेल्वे चालू होत्या. खडकाळ उष्ण कटिबंधांतील प्रदेशातून डाका नेण्यास फार अडचण पडत असल्यामुळें तार व डाकखात्यांची व्यवस्था बरोबर नाहीं. पॅसिफिक समुद्रकिनाऱ्यावर ब्युनाव्हेन्टुरा येथें समुद्रांतून तार जाते. कॅरिबियन समुद्रावरील मुख्य बंदरें व प्रांतांच्या राजधान्या यांचे मध्यें व बोगोटामध्यें टपालाचें दळणवळण आहे. परंतु त्यांत वारंवार अडथळे येतात ब्युनाव्हेन्टूरा, बॅरनकिला कॅर्टाजिना, सॅटामार्टा व रिओहॅचा या बंदरातून सरकीचा व्यापार चालतो. टुमाको व व्हिलामाक्षार या बंदरांचा इक्वेडोर व व्हेनेझुएलाशीं थोडा व्यापार चालतो. लहान बोटी व नावा नद्यांतून देशाच्या अंतर्भागांत मालाची नेआण करतात. किनाऱ्याचा व्यापार मुळींच नाहीं. परकी

व्यापार जर्मन व ब्रिटिश लोकांच्या हातांत आहे. कॅरिबियन समुद्राचीं बंदरें व युनायटेड स्टेट्स व यूरोपचीं बंदरें यांमध्यें दळणवळण आहे. १९१४ मध्यें कार्टाजेना, संटामार्टा व सान ॲंड्रिज येथें बिनतारी विद्युत्संदेशगृहें स्थापण्यात आलीं. याचप्रमाणें युनैटेड स्टेट्सशीं चालू असलेल्या दळणवळणाच्या बाबतींतहि पुष्कळ सुधारणा करण्यात आल्या आहेत.त्याचप्रमाणें चागल्या सडका बांधण्यांत आल्या.१९२० मध्यें कोलंबियाच्या मालकीची८००मैलाची रेल्वे होती. प्यूटो विलचीसपासून व्यूकरमांगापर्यंत रेल्वे करण्याचें काम चालू झालें. कार्टोगो ते काचीपर्यंत पॅसिफिक रेल्वे करण्याचें कामहि सुरू करण्यांत आलें. याशिवाय इतर किरकोळ रेल्वे तयार करण्याचीं कामें सुरू करण्यात आलीं.

शे ती.—कोलंबियाचे बरेच लोक शेती व गुरेढोरें बाळगून उपजीविका करतात. मका, गहूं, इतर गाळिताचीं धान्यें भाज्या व फळें उंचवटयाच्या मैदानांतून पिकवितात. मैदान व सखल दऱ्यात काफी व समशीतोष्ण कटिबंधातील प्रदेशात होणाऱ्या पदार्थांची लागवड होते. काकाव, कापूस, साखर, तांदूळ, तंबाखू, बनाना (केळीं), यॅम, कसाव्हा, ॲराकाचा, बटाटे व गोड बटाटे हे पदार्थ येथें उत्पन्न होतात. गुरें चारण्याचा धंदा फार महत्वाचा नाहीं. लोंकर व चामडीं काढण्याकरिता शेळया पाळतात. सॅटान्डोर प्रांतांत घोड्यांची पैदास होते. डुकरें सर्वत्र आढळतात.

ख नि ज प दा र्थ—कोलंबियामध्यें खनिज पदार्थांची पुष्कळ समृद्धता आहे. सोनें, रुपें, पाच, रत्नें, प्लॅटिनम्, तांबें, लांखेड, मॅंगनीज, शिसें, जस्त, पारा, कोळसा, शुद्ध रॉकेल (पेट्रोलियम) व मीठ हीं येथील खनिज द्रव्यें आहेत.

प क्का मा ल.—बोगोटाजवळील प्रॅडेरा लोखंडी कारखान्यात साखरेच्या कारखान्यांत उपयोगी पडणारीं बॉयलरें व शेतकीचीं आउतें होतात. इस्पिनाल येथें मातीचीं भांडीं होतात. पोपायान व पॅस्टो येथें लोंकरीच्या गिरण्या आहेत. अंबालेम व पामिरा येथें विड्या तयार होतात. साहेबी टोप्या करण्याचा धंदा बहुतेक सर्व ठिकाणीं चालतो. आगपेटया, रम नावाची दारू व साखर येथें तयार होतात.

व्या पा र—कणीक, तांदूळ, जव, तयार केलेलें अन्न, साखर, कोळसा, घासलेट, बीर, दारू, लिकर, रेल्वेचें सामान, यंत्रें, साधारण लोखंडी सामान, कुंपणाची तार, कापसाचें व इतर कापड, औषधी, इमारतीकरतां करवतलेलें लांकूड, सिमेंट व कागद इत्यादि पदार्थ या देशांत येतात. व काफी, बनाना (केळीं), चामडीं, तंबाखू, मौल्यवान धातू, रबर, कॅबिनेट लांकूड, डिव्हिडिव्हि, रंगाचें लांकूड, हस्तिदंत, टोप्या, ऑर्चिड, व्हॅनिला इत्यादि पदार्थ बाहेर रवाना होतात.

इ. स. १९१६ मध्यें कोलंबियात परराष्ट्रांतून जवळ जवळ ५९३२०४१ पौंडांची आयात झाली. आयात वस्तूंत कापड, मीठ, धातू, औषधी, कागद, शेतकीची व खाणींला लागणारीं हत्यारें, मादक पेयें व तेलें या प्रमुख वस्तू होत्या. इ. स. १९१६ मध्यें कोलंबियांतून ७२०१३६५ पौंडांचा माल निर्गत झाला. निर्गत वस्तूंमध्यें खाणींतील द्रव्यें कातडीं, गुरें ढोरें, इत्यादि वस्तू होत्या. शेंकडा ७५ टक्के माल फक्त युनैटेड स्टेटसमध्येंच निर्गत झाला.

रा ज्य व्य व स्था— कायदे करण्याचें मंडळ, राज्यकार्यकारी मंडळ व प्रतिनिधिसभा यांचें बनलेलें असतें. हें मंडळ बोगोटा येथें दोन वर्षांतून एकदां फेब्रुवारी पहिलीपासून नव्वद दिवसांकरिता भरत असतें. सीनेटमध्यें ४८ सभासद असतात. प्रत्येक प्रांताकरितां तीन सभासद गव्हर्नर व त्याचें सल्लागार मंडळ निवडतें. अध्यक्ष व त्याचे दोन प्रधान संयुक्त जिल्ह्याकरिता तीन सभासद निवडतात. यांची मुदत चार वर्षांची असते. चेंबरमध्यें ९७ मेंबर असतात. प्रत्येक ५०,००० लोकांना एक प्रतिनिधि निवडून देता येतो. इंटेंडेन्सियाकरता एक मेंबर प्रत्येकी असतो. काँग्रेसनें चार वर्षांकरतां निवडलेल्या एका प्रेसिडेंटाच्या हातीं कार्यकारी सत्ता असते. राज्यकारभाराचीं सर्व कामें पाहण्याची सत्ता प्रेसिडेंटला दिलेली असते. याचे मदतीस अंतरराष्ट्रिय, परराष्ट्रीय, जमाबंदी,लष्कर, सार्वजनिक शिक्षण, लोकोपयोगी कामें वगैरे खात्याच्या मंत्र्याचें एक मंडळ असते. हे सहा मंत्री प्रेसिडेंट निवडतो व बडतर्फ करतो. प्रांताचे गव्हर्नर राज्याचे प्रांताध्यक्ष, परराष्ट्रीय मंत्री, कोर्टाचे न्यायाधीश नेमण्याचा अधिकार प्रेसिडेंटला आहे. याचा पगार सालीना ३६०० पौंड व मंत्र्याच्या १२०० पौंड आहे. राष्ट्रसभा मोडून सीनेटला कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा अधिकार दिलेला आहे. बोगोटा येथें सात मेंबराचे एक वरिष्ठ कोर्ट व प्रत्येक न्यायविषयक जिल्ह्यात एक कोर्ट अशी येथील न्यायव्यवस्था आहे. कनिष्ठ कोर्टें व मॅजिस्ट्रेट आहेत.

१९१० च्या कोलंबियाच्या कॉंग्रेसनें १८८६ च्या कोलंबियाच्या राज्यशासन घटनेमध्यें महत्वाचे फेरफार केले. १९१० च्या जून महिन्याच्या ६ व्या तारखेस असा एक कायदा पसार करण्यात आला कीं जर अध्यक्षाची जागा रिकामी पडेल तर त्याच्या बदलीं कॉंग्रेसनें निवडलेल्या दोघां इसमांनीं मिळून कोलंबियाची राज्यव्यवस्था पहावी. कॉंग्रेसनें जर दोघा इसमाची निवड केली नाहीं तर अध्यक्षाच्या दिमतीस असलेल्या कार्यकारी मंडळानें सर्व राज्यव्यवस्था पहावी. १९१० मध्यें आक्टोबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस दुसरा एक कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यान्वयें, कॉंग्रेसच्या व अध्यक्षाच्या निवडणुकीच्या बाबतींत फक्त लिहितांवाचतां येणाऱ्या अगर काहीं स्थावर जिंदगी असणाऱ्या पुरुषांनाच मत देण्याचा अधिकार असावा असें ठरविण्यांत आलें. देहांतशिक्षा रद्द करण्यात आली. अध्यक्षाची मुदत ४ वर्षें करण्यांत आली. राष्ट्रीय सभेनें एखादा कायदा बेकायदेशीर आहे असें ठरविलें तरी तो कायदा अमलांत आणावा किंवा नाहीं हें

ठरविण्याचा पूर्ण अधिकार वरिष्ठ न्यायकोर्टाला देण्यांत आला. १९१४-१८ च्या दरम्यान कोंच हा अध्यक्ष होता. त्याच्या कारकीर्दीत ८ जणांचें कौन्सिल ऑफ स्टेट हें पुन्हां निर्माण करण्याचें ठरलें व या मंडळाचें काम अध्यक्षाला राज्यकारभाराच्या बाबतींत सल्ला देणें हें होतें. १९१६ च्या कायद्यानें खडया सैन्याची संख्या ६००० ठरविण्यांत आली. १९२० च्या जाहीरनाम्यानें पायदळाची मुदत १५ महिने, व घोडदळाची १८ महिने सक्तीची करण्यांत आली. १९२१ मध्यें आरमारखात्याच्या ताब्यांत कांहीं क्रुझर्स व बोटी होत्या. वैज्ञानिक शिक्षण देण्यासंबंधीं एक शाळा काढण्यासंबंधींहि १९०० मध्यें वाटाघाट सुरू होती.

शि क्ष ण—राज्यकर्त्यांचें दुर्लक्ष असल्यामुळें शिक्षणप्रगती मुळींच नाहीं. मोठमोठ्या शहरांतून दुय्यम शिक्षणाच्या शाळा आहेत. कोलंबियांत एकंदर चार कॉलेजें आहेत. प्राथमिक शिक्षण मोफत आहे. परंतु सक्तीचें नाहीं. १९१६ सालीं सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांची संख्या ५८३९ होती. पैकीं ५३८७ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा होत्या. शेंकडा ५ लोकांनां शिक्षण मिळत आहे.

ध र्म—येथें रोमन कॅथोलिक धर्म चालतो. ख्रिस्ती धर्मतत्त्व व कायदा यांचे विरुद्ध नसलेल्या कोणत्याहि धर्मास येथें मज्जाव नाहीं. सर्व दर्जाच्या लोकांवर ख्रिस्ती धर्मोपदेशकांचें वर्चस्व आहे व शिक्षणविषयक ताबा त्यांचे हातीं आहे.

ज मा बं दी—परकी माल देशांत आल्यावर त्यांच्यावर बसविलेला कर व देशात उत्पन्न होणाऱ्या पदार्थांवरील कर, लिकर, दारू, सिगारेट, तंबाखू, आगपेट्या, कातडीं, मीठ, सरकारी पाचेच्या खाणी, मोत्यांचे कारखाने, स्टँप, टपाल व तारखातें यांचें उत्पन्न व कर या उत्पन्नांच्या बाबी आहेत.

ना णें—सोन्याची नाणीं-डबल कोंडोर = २० डॉलर. कोंडोर = १० डॉ. अर्धा कोंडोर = ५ डॉ. डॉलर = १०० सेंट. चांदीचीं नाणीं-अर्धा डॉलर = ५० सें. पेसेटा = २० सें. रिअल = १० सेंट. निकल = ५ सेंट. ब्रॉझ = २ सेंट. व १ सेंट चांदीचें नाणें शेंकडा १० व निकल आणि ब्रांझचें नाणें शेंकडा २. सोन्याच्या नाण्याचें आहे. जकात सोन्याच्या नाण्यांत अथवा चालू भावाप्रमाणें कागदी नाण्यांत द्यावी लागते.

व ज नें व मा पें.—आंतरराष्ट्रीय व्यापरात मेट्रिक सिस्टिम पद्धतीचीं वजनें व मापें चालतात. परंतु व्यवहारांत जुनीं स्पॅनिश मापें चालतात. द्रव पदार्थांचें माप. लिटर आहे.

इ ति हा स.—स्पॅनिश दर्यावर्दी लोक अमेरिका खंडांतील कोलंबियाच्या किनाऱ्यावर प्रथम आले. आलोंझोडिओजेडा १४९९ व १५०१ मध्यें कित्येक ठिकाणीं उतरला व कोलंबसनें १५०२ मध्यें व्हेरॅग्वा, पोर्टोबेलो व इतर ठिकाणें पाहिलीं. १५०८ मध्यें ओनेडोला स्पॅनिश सरकारपासून केपव्हेलापासून डारियनच्या आखातापर्यंतच्या प्रदेशांची देणगी मिळाली, व डारियन आखातापासून केप ग्रॅसियस एडिओसपर्यंतचा मुलूख निक्वेसाला मिळाला. १५३६-१५३७मध्यें गोंझालो जिमेनेझ डिकेसाडा याच्या हाताखालीं एक स्वारी सँटामार्टाहून मॅग्डेलेना नदीच्या काठानें गेली होती व केसाडानें या भागाला न्यू ग्रानाडा हें नांव दिलें. यानंतर येथें स्पॅनिश सत्ता बरीच स्थापित झाली व समुद्रकिनाऱ्याचे बाजूनें भरभराटीच्या वसाहती झाल्या. राज्यव्यवस्थेकरतां स्पॅनिश सरकारनें न्यू ग्रानाडाचा प्रांत १५६४ मध्यें बनविला. १७१८ मध्यें यावर एक राजप्रतिनिधि नेमण्यांत आला. या प्रांतांत सध्याचा कोलंबिया, व्हेनेझुएला व इक्वेडोरचा समावेश होत असे. १८१९ मध्यें बोलिव्हारनें हे तीन विभाग एकत्र करून त्याला कोलंबियाचें प्रजासत्ताक राज्य असें नांव दिलें. परंतु १८२९ मध्यें व्हेनेझुएला अलग झालें व १८३० मध्यें इक्वेडोर अलग झालें. १८३१ मध्यें न्यूग्रॅनाडाचें प्रजासत्ताक राज्य स्थापित होऊन १८३२ मध्यें राज्यव्यवस्था ठरविण्यांत आली. प्रेसिडेंटची नेमणूक चार वर्षें ठरविण्यांत आली. पहिला प्रेसिडेंट जनरल फ्रॅंसिस्को डि पॉला सॅन्टॅन्डर झाला.

१९०९ च्या ऑगस्टमध्यें जनरल होजनें अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळें जनरल रॅमॉन गोंझालेस व्हेलेनिया याला एक वर्षपर्यंत अध्यक्ष नेमण्यांत आलें. १९१० च्या जुलै १५ मध्यें कार्लोस रेस्ट्रेपो याला अध्यक्ष निवडण्यांत आलें. यानें कोलंबियाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न केले. त्याचप्रमाणें पनामा प्रकरणाचीहि योग्य तऱ्हेनें विल्हेवाट लावण्यासाठीं त्यानें आटोकाट प्रयत्न केले. अध्यक्षपदाची मुदत संपताच त्याला पुन्हां दुसऱ्या खेपेस अध्यक्षाचे जागेकरतां उभे रहाण्याची विनंति करण्यांत आली. पण त्यानें ती नाकारली. त्याच्यामागून १९१४ मध्यें जोसे व्हिसेंटे कोंचा याची निवड करण्यांत आली. कोंचा हा हुजुरपक्षाचा होता. तरी पण त्यानें आपल्या कार्यकारी मंडळांत उदारपक्षाच्या दोघां तिघां गृहस्थांनां नेमलें. परराष्ट्रीय खात्यावर मार्को फायडेल सुजराज या उदारमतवादी व सुप्रसिद्ध विद्वान अशा मुत्सद्याची नेमणूक केली. त्याचप्रमाणें डीजो मेंडोसा या उदारमतवादी गृहस्थाला फडणीस नेमलें पण त्याचें व मेंडोझाचें पुढें न पटल्यामुळें मेंडोझा यास राजीनामा द्यावा लागला. कोंचाच्या कारकीर्दीतच महायुद्धाला सुरुवात झाली व त्यामुळें जे नवीन नवीन सांपत्तिक व इतर अवघड प्रश्न उद्भूत झाले त्याला तोंड देण्याचें अवघड काम कोंचा यालाच करावें लागलें. १९१८ मध्यें कोंचाची मुदत संपल्यानंतर सुआरेझ याला अध्यक्ष निवडण्यांत आलें.

१९०३ मध्यें पनामा हें स्वतंत्र संस्थान बनल्यापासून कोलंबिया, पनामा व युनायटेड स्टेट्स यांमध्यें बरेच भानगडी व गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित झाले होते. १९०९ मध्यें हीं भांडणें मिटविण्याचा प्रयत्न कोलंबियाकडून करण्यांत आला;

पण त्याला यावें तसें यश आलें नाहीं. तरी पण त्यावेळीं कसाबसा तह करण्यांत आला. या तहान्वयें कोलंबियानें पनामा हें स्वतंत्र आहे असें कबूल करावें, १९०३ पूर्वी कोलंबियाकडून पनामा संस्थानानें जें कर्ज घेतलें असेल त्यापासून पनामाला मुक्त करण्यांत यावें व कोलंबियाच्या नुकसान-भरपाईबद्दल पनामानें १० वर्षेपर्यंत दरवर्षी २५००० डॉलर्स कोलंबियाला द्यावे असें ठरलें. वास्तविक कोलंबिया या तहाला राजी नव्हताच. त्यामुळें १९१४ मध्यें या तहावर पुन्हा चर्चा होऊन त्यांत युनायटेड स्टेट्सनें कोलंबियाला पनामाच्या स्वातंत्र्याबद्दल २,५०,००,००० डॉलर्स द्यावे असें ठरलें. पुढें १९१४ च्या बैठकींत कोलंबिया काँग्रेसनें या ठरावाला आपली मान्यता दर्शविली. महायुद्ध सुरू झाल्यानंतर लगेच सुआरेझ यानें कोलंबियातील सर्व वृत्तपत्रकारास महायुद्धाच्या बाबतींत तटस्थ धोरण राखण्याची विनंति केली. त्याचप्रमाणें १९१७ मध्यें ज्यावेळीं अमेरिका ही दोस्त राष्ट्राच्या वतीनें महायुद्धात पडली त्यावेळींहि कोलंबिया या युद्धांत तटस्थ रहाणार असें सुआरेझ यानें पुन्हा जाहीर केलें. पुढें राष्ट्रसंघामध्यें सामील होण्यासाठीं ज्यावेळीं कोलंबियाला आमंत्रण करण्यात आलें त्यावेळीं कोलंबिया काँग्रेसनें राष्ट्रसंघात सामील होण्याचें ठरविलें. पण सामील व्हावयाच्या वेळीं पनामा हें स्वतंत्र राष्ट्र मानावयाला कोलंबिया तयार नाहीं ही अट कोलंबियानें दोस्त राष्ट्रांना कळवून नंतरच मग राष्ट्रसंघात कोलंबियानें भाग घेतला. १९२० च्या डिसेंबरमधील राष्ट्रसंघाच्या जिनीव्हा येथील बैठकीला कोलंबियानें आपले दोन प्रतिनिधी धाडले.

कोलबेर (१६१९-१६८३)—या फ्रेंच मुत्सद्याचा जन्म ऱ्हीम्स शहरीं झाला. लहान हुद्यावरून चढत चढत अखेरीस तो फ्रान्समधील अतिशय थोर मंत्र्यापैकीं एक मंत्री झाला. इ. स. १६६१ मध्यें तो कंट्रोलर-जनरलच्या जागेवर गेला. टॅली अथवा संपत्तीवरील कर कमी करणें व डिपार्टमेंटल कचेरी स्थापणें ह्या त्याच्या प्रथम सुधारणा होत. उद्योगधंदे व व्यापार यांमध्यें शिस्त व नियमितपणा असावा असें त्यास मनापासून वाटे. त्यानें केलेले ठराव नेहमीं अतिशय कडक असत. उद्योगधंदे वाढविणें, जकातचौक्या स्थापून व्यापार चिरस्थायी करणें व मोठया रकमा किंवा हक्क देऊन नमुनेदार कारागिरांच्या कामाची निपज करणें ह्या गोष्टी त्यानें केल्या. वसूल गोळा करण्यात येणाऱ्या लबाड्या बंद करण्याकरिता त्यानें कसून प्रयत्न केला व या कामीं फार निष्ठुरपणा दाखविला. तथापि पूर्णपणें नवीन अशी पद्धत अमलांत आणण्याजोगें त्याचें मन विचारी व खोल नव्हतें. त्याला मार्गांत पुष्कळ अडचणी आल्या; परंतु त्यानें शहाणपणानें व धैर्यानें त्यांस तोंड दिलें. जहाजांच्या व्यापाराची त्याला फार आवड होती. त्याचप्रमाणें कला व शास्त्रें हे त्याच्या आवडीचे विषय होते. कारागिरांना उदार देणग्या देऊन त्यानें कलेस उत्तेजन दिलें. इ. स. १६६३ मध्यें त्यानें दि ॲकॅडमी ऑफ इन्स्क्रिप्शन्स' आणि 'बेल्स लेटर्स' यांची स्थापना केली. स. १६६८ त 'ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' ही संस्था त्यानें स्थापन केली. स. १६८३ त पॅरिस येथें तो मरण पावला.

कोलंबो—कोलंबो ही सीलोनची राजधानी व मुख्य बंदर आहे. हें सीलोन बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. येथील लोकसंख्या सन १९०१ मध्यें १,५४,६९१ होती. ह्या मोठ्या व कृत्रिम बंदराच्या दक्षिणेस एक लहानसें भूशिर आहे. येथें पूर्वी किल्ला होता. परंतु १८६९ मध्यें तो पाडण्यात आला. येथें एक "रॉयल कॉलेज", धंदेशिक्षणाचें विद्यालय व सेंट जोसेफ रोमन क्याथोलिक विद्यालय आहे. या शहरांत बहुतेक ठिकाणीं ग्यासचे दिवे आहेत व कांहीं ठिकाणीं विजेचे दिवे आहेत. शिवाय येथें विजेच्या ट्रामगाड्या आहेत. शिवाय मद्रासप्रमाणें रिक्शा हें लोकप्रिय वाहन उपयोगात आहेच. शहरात ३० मैलावरून पाण्याचा पुरवठा होतो. सीलोनमध्यें सुरू झालेल्या चहाच्या व कॉफीच्या लागवडीमुळें कोलंबोची बरीच भरभराट झाली. या शहरात जहाजांतून पाठविण्यास कॉफी बंद करण्याकरिता व स्वच्छ करण्याकरिता सुमारें १०,००० लोक कामावर आहेत. कोलंबोचें वाढत्या महत्त्वाचें कारण तें पूर्वेकडील आगबोटी लागण्याचें बंदर आहे हें होय. १८७५ सालीं येथील सुंदर धक्क्याच्या पायाचा दगड बसविला. या बंदराला आता पहिल्या प्रतीचें महत्त्व आलें आहे. हल्लीं जगांतील उत्तम कृत्रिम बंदरापैकीं हें एक आहे. आगगाडीच्या वाढीमुळें सीलोन बेटाचा सर्व व्यापार येथें आला व अशा रीतीनें त्याची भरभराट झाली.

कोलंबो हें प्रथम कालनी या नावानें प्रसिद्ध होतें. अरब लोकांनीं याचें गांव बदलून कोलंबु असें ठेविलें. १३४६ मध्यें इब्नबतूता यानें या शहराचा सेरेन्दिब(सुवर्णद्वीप)मधील सर्वांत मोठें व सुंदर शहर असा उल्लेख केला आहे. १५१७मध्यें पोर्तुगीज लोकांनीं येथें वसाहत केली व १५२० मध्यें त्यांनीं आपल्या बंदराला तटबंदी केली. १५८६ मध्यें राजसिंह यानें या शहराला वेढा दिला. परंतु त्यास तें घेता आलें नाहीं. १६५६ मध्यें हें डच लोकांनीं काबीज केलें. तेव्हां हें भरभराटींत होतें, व येथें पाच धर्मपंथाचे मठ होते. ९०० पेक्षां जास्त सरदार घराणीं व १५०० व्यापार व राजकीय धंद्यात असलेल्या लोकाची घराणीं येथें होतीं. १७९६ मध्यें हें ब्रिटिशांनां देण्यांत आलें.

कोलब्रुक—हेन्री थॉमस कोलब्रुक या पौरस्त्यभाषा-कोविद इंग्रज गृहस्थाचा जन्म १७६५ त झाला. त्याचें शिक्षण घरींच झालें असून वयाच्या पंधराव्या वर्षीच त्यानें ग्रीक व लॅटिन भाषा आणि गणित या विषयांत बरेंच प्रावीण्य मिळविलें. १७८२ सालीं हिंदुस्थानांत एका कारकुनाच्या जागेवर त्याची नेमणूक झाली व पुढें लवकरच त्याची बढती होऊं लागली. हिंदुस्थानांत आल्यानंतर अकरा वर्षांनी

त्यानें संस्कृत भाषेचा अभ्यास केला. भाषा जाणणारांपैकीं हा एक विद्वान गृहस्थ बनला.' डायजेस्ट ऑफ दि हिंदु लॉ' (हिंदुकायद्यांचें वर्गीकृत संग्रहपुस्तक)चें अपुरें राहिलेलें भाषांतराचें काम याजकडे देण्यांत आलें होतें. १८०५ सालीं फोर्ट विल्यम येथील विद्यालयांत हिंदु कायदा व संस्कृत विषयाचा त्याला अध्यापक नेमिलें. याच सुमारास त्यानें संस्कृत व्याकरण, हिंदुधर्मसंस्कारांची माहिती व वेदावर निबंध लिहिले. तो १८१४ सालीं इंग्लंडला परत गेला व १८३७ सालीं मार्चच्या १८ व्या तारखेस मरण पावला. मरणापूर्वी कांहीं दिवस तो एशियाटिक सोसायटीचा डायरेक्टर होता.

कोलम—वऱ्हाड-मध्यप्रांतांतील एक असंस्कृत जात. यवतमाळच्या वणी तालुक्यात विशेषतः राहणारे हे लोक असून यांची एकंदर संख्या २५००० आहे. हे लोक गोंड वंशातले आहेत व यांची भाषा कोलामीच आहे व तिचें स्थान गोंडीप्रमाणेंच कानडी, तामीळ व तेलगु यांच्यामध्यें आहे. कोलामी, भीली व चांद्याची नायकी भाषा या तिन्ही बहिणींसारख्या आहेत. पण गोंडी भाषेपेक्षां ही फारच भिन्न आहे. या भाषेचा व नीलगिरींतल्या उपभाषेचा संबंध आहे. यांचीं कुलनावें मराठी आहेत. यांचीं गाणीं देखील मराठी आहेत. यांची राहणी कुणब्यांसारखी आहे. वऱ्हाडांत ज्या बायकास नवरा लौकर मिळत नसे त्या अन्य पुरुषांवर झडप घालीत आणि लग्नें करावयास लावून त्यांनां आपल्या ताब्यात ठेवीत.

यांच्यांत उपजाती नसून एकाच विभागांत लग्नें न करणारे कांहीं विभाग पडले आहेत. स्त्रिया शेतांत किंवा रानांत असतांना वधूला हे लोक पळवून नेतात. कधीं कधीं पुरुषांनां पत्ता मिळाल्यास ते काठया घेऊन युद्ध करावयास येत आणि त्या युद्धात वराचे लोक हरले तर वधूच्या बापास कांहीं रुपये देऊन वधू घेत. आजकाल तर या युद्धाचें नुसतें सोंग करतात. लग्नविधि कुणब्यासारखाच असतो. विधवांचें लग्न त्यांच्या आईबापाच्या परवानगीशिवाय होत नाहीं. पण एखाद्या विधवेला कोणी पुरुष फारच आवडला तर आपल्या डोक्यावर पाण्याचें मडकें घेऊन त्याच्या घरांत तिनें शिरावें म्हणजे तिला बाहेर घालविता येत नाहीं काडी मोडणाऱ्या जोडप्यानें मद्याचें भांडे घेऊन पंचाइतीसमोर उभें रहावें. त्या भांड्यावर एक काडी ठेवावी, तिचें टोंक दोघांनीं धरावें व नवऱ्यानें बायकोस बहीण म्हणावें व बायकोनें नवऱ्याला भाऊ म्हणावें म्हणजे काडी मोडली. हे लोक प्रेतें पुरतात. या लोकांची मुख्य देवी सीता आहे. हे लोक जगाचा उत्पन्न व रक्षणकर्ता कोणी देव आहे असें मानीत नाहींत. गांवाचें मोठया रोगांपासून रक्षण करण्याची यांची रीत फार मनोरंजक आहे. गांवाच्या चारी दिशांस चार दगड ठेवतात. नाईक सीतेला बकरा व कोंबड्यांचा बळी अर्पण करतो व चारी दिशांच्या दगडास जोडणाऱ्या मिठाच्या ओळी गांवाभोंवतीं काढतो. फक्त एक वाट मोकळी ठेवतो. त्याच वाटेनें सर्वांनीं गेलें व आलें पाहिजे. या ओळीला बंदेश म्हणतात. या ओळींत रोगराईचा प्रवेश होत नाहीं असें समजतात. हे लोक गोंडांच्या हातचें जेवतात पण गोंड यांच्या हातचें जेवीत नाहींत. हे उंदीर, वाघ, सर्प, गाढवें व कोल्हे खातात. पूर्वी नायकास जमीनीचे वाटे करण्याचा अधिकार होता. व अद्यापपर्यंत हे कोर्टांत न जाता पंचाइतीकडूनच तंटे तोडून घेतात. प्रायश्चित देऊन जातींत परत घेण्याचा विधि असा:—पतितानें नदींत डोकें भिजवावें व क्षौर करावा. आगटीजवळ बसून सर्व दोष जळाला असें लोकांना सांगितलें म्हणजे स्नान करून जातभाईच्या आंगठ्याचें चरणतीर्थ घ्यावें. स्त्रियांस देखील जातींत पावन करून घेण्यास क्षौर करावेंच लागतें. कापूस चोरण्याविषयीं यांची प्रसिद्धी आहे. यांना निरनिराळ्या वनस्पती व त्यांचा उपयोग फारच चांगला ठाऊक आहे. [रसेल व हिरालाल.].

कोलाचल—मद्रास इलाख्यांतील त्रावणकोर संस्थानांमधील इरेनियल तालुक्यांतील एक बंदर. याची लोकसंख्या १९०१ सालीं १००० होती. पावसाळ्यांत अगर सप्टेंबर ते एप्रिल या महिन्यांत १५ ते २० जहाजें व ४०।५० बोटी या बंदराला लागतात. येथून कॉफी, खारें मांस, सागवान, गूळ इत्यादि जिन्नस बाहेर जातात. व तांदूळ, बंगाली चणे, लोखंड इत्यादि जिन्नसांची आयात होते. येथें पूर्वी निळीचा कारखाना होता. हें प्राचीन काळीं चांगले बंदर असून एका वेळीं डच लोकांच्या ताब्यांत होतें असें बार्थोलोम्यूनें म्हटलें आहे. १७४० मध्यें त्रावणकोरच्या सैन्याचा सेनापति राम अय्यन दलव यानें डच लोकांचा पराभव केला व हें बंदर ताब्यांत घेतलें.

कोलायन—एक जात. याची वस्ती मद्रास व कूर्ग प्रांतांत असून संख्या (१९११) २२२४१ आहे. मलबारच्या उत्तरेस व दक्षिण कानडांतील कासारगड तालुक्यांत कोलायन जात बहुधा आढळून येते. दक्षिण मलबारांत या जातीस उराली म्हणतात. गाई राखणें व कांहीं हिंदू देवळांस दुधतुपाचा पुरवठा' करणें हाच त्यांचा वंशपरंपरागत धंदा असला तथापि सध्यां बहुतेक कोलायन गवंड्याचें काम करतात. त्यांच्या ज्ञातिसंबंधीं दोन विभाग आहेत. आयन अथवा कोल-आयन हा एक भेद व मारियन अथवा एरुमन हा दुसरा भेद होय. कोलायन हा शब्द गोल्ला व अयन या शब्दांपासून झाला आहे. गोल्ला हा तेलगू शब्द असून त्याचा अर्थ गवळी असा आहे. कोलायन व एरुमन या दोन मुख्य पोटजाती परस्परांत लग्नें करीत नाहींत. परंतु दोन्ही ज्ञातींतील स्त्रिया नायरांशीं मात्र संबंध ठेवतात. अशा लोकांच्या संततीला कोलायनपेक्षां हलके लोक म्हणून समजण्यांत येतें. कोलायनांच्या उपाध्यायांस मूथावन अथवा पोडुवन असें म्हणतात व त्यांची नेमणूक राजाकडून होते. वयांत येण्यापूर्वींच कोलायन

वधूंची लग्नें ' तालिकेट्टू ' विधीनें करण्यांत येतात. कानिसन (ज्योतिषी) जेव्हां मुहूर्त पाहून देतो तेव्हां तालिसमारंभ होतो व नंतर तिच्यावरून तांदूळ, नारळ इत्यादि साज-सकाळ ओवाळून टाकण्यांत येतात. मृताचें दहन करण्यांत येते व पहिले दहा दिवसपर्यंत मृतात्म्यास थोडें अन्न मिळावें म्हणून तें बाहेर ठेवलें जातें. बाराव्या दिवशीं वाथियन नांवाचा उपाध्याय मृताच्या जागेवर जाऊन व विभूति घेऊन एक मनुष्याकार आकृति काढतो तेथें पूजा व नैवेद्य करतात व तो नैवेद्य मृतास अर्पण करतात. हा विधि झाल्यावर स्नान करून ते शुद्ध होतात. [थर्स्टन].

कोलार, जिल्हा.—म्हैसूर संस्थानच्या पूर्वभागांतील एक जिल्हा. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ १९११ सालीं ३,१९६,४१२ चौरस मैल होतें.

सीमा:—उत्तरेस, अनंतपूर व कडाप्पा जिल्हे; पूर्वेस कडाप्पा व उत्तर अर्काट हे जिल्हे; दक्षिणेस सालेमचा जिल्हा; व पश्चिमेस, बंगलोर व तुंकूर जिल्हे.

स्वरूपवर्णन:— पूर्वघांटाच्या दक्षिणेस व ईशान्येस हा जिल्हा विकटला आहे. या घाटांतून पालार व पेन्नेर नद्या वहात गेल्या आहेत. वायव्येस, नंदिदुर्गच्या भोंवतालच्या प्रदेशांत अर्कावती, चित्रावती, पेन्नेर, पालार, पापघ्नी व पोनोर या नद्या उगम पावल्या आहेत. नंदिदुर्ग पासून उत्तरेस एक पर्वताची रांग गेली असून तिची उंची ४८५१ फूट आहे. या पर्वताचें पेनुकोंड हें सर्वांत उंच शिखर होय. या जिल्ह्याच्या मध्यभागांतून, टयाकल, रेवाकेलरो, कोलार (४०२६ फूट), रहमानगड (४२२७) अंबाजी दुर्ग (४३८९) व डोकूलकोंड या रांगा उत्तरेस पसरलेल्या आहेत. पूर्वेस व ईशान्येसहि लहान लहान टेंकड्यांचें जाळें पसरलेलें आहे; व त्यामुळें पुष्कळ खोरीं बनलेलीं आहेत. जिल्ह्याच्या पूर्व व मध्य भागांत पालार नदीचीं खोरीं असून त्यांमधील जमीन सुपीक आहे.

भूस्तर:—या जिल्ह्यांतील दगड जम्बूर जातीचा असून त्यांत अभ्रकाचे दगड मधून मधून विखुरले आहेत. नंदिदुर्ग मधील दगड हे ग्रानाइट (वज्रतुंड) दगडाच्या जातीचे आहेत. बौरिंगपेट तालुक्यांतून जी टेकड्यांची मालिका गेली आहे तींत ठिसूळ दगड सांपडतात. हे वरून चपटे असतात. या जिल्ह्याच्या दक्षिणभागांत कोलार गोल्ड फील्डस् आहेत.

वनस्पती:—बंगलोर जिल्ह्याप्रमाणेंच या जिल्ह्यांतहि बरेच तलाव असल्यानें, वनस्पतींची समृद्धि आहे. पाण्यांत व पाण्याच्या बाजूनें पुष्कळ प्रकारचीं गवतें व मुळ्या सांपडतात. नंदिदुर्गच्या टेंकड्यावरहि अनेक प्रकारच्या वनस्पती व झाडें आहेत. या टेकड्यांवरील झाडें खूपच उंचच्या उंच असतात. या झाडांच्या आश्रयानें निरनिराळ्या प्रकारच्या लता व वेली उगवलेल्या असतात.

हवा व पर्जन्यमान:—येथील हवा बंगलोर जिल्ह्यांतील हवेसारखीच आहे. पण बंगलोरपेक्षां येथील पर्जन्याचें प्रमाण थोडें कमी आहे. सर्व जिल्ह्यांचीच हवा निरोगी आहे. त्यांतल्या त्यांत, चिकबल्लापूर व कोलार या शहरांनी व त्यांच्या आसपासची हवा फार सुरेख आहे. पण चिकबल्लापूर येथें प्लेगचा त्रास वारंवार सोसावा लागतो. या जिल्ह्यांत बाहेरगांवच्या लोकांची नेहमी येजा असल्यानें कॉलरा व इतर सांसर्गिक रोगाचा येथें बराच फैलाव आहे; पण हे साथीचे रोग बंद करण्यासाठीं आरोग्यसंरक्षक खात्यानें शक्य ती व्यवस्था करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. येथील पर्जन्याचें सरासरी मान २९ इंच आहे.

इतिहास:—या जिल्ह्याचा जो इतिहास उपलब्ध आहे त्यावरून या जिल्ह्यावर अगदीं प्रथम महाबली अगर बाण या लोकांची सत्ता होती. हे महाबली आपल्याला बलीचे वंशज असे मानीत. यांची राजधानी उत्तर अर्काट मधील पंडुवी पुरी ही होती. हा जिल्हा धरून सर्व तेलगु मुलुखावर, पल्लवांचें राज्य पसरलेलें होतें; व हे महाबली अगर बाण राजे हे पल्लवाचे मांडलिक होते. त्यानंतर वैदुंब घराण्याचीहि या जिल्ह्यावर सत्ता असावी असें दिसते. दुसऱ्या शतकापासून ते दहाव्या शतकापर्यंत, या जिल्ह्याचा पश्चिमभाग गंग घराण्याच्या ताब्यात होता. नंतर ९९८ मध्यें कोल लोकांनीं गंगघराण्याची सत्ता नाहींशी करून आपलें वर्चस्व बसविलें. त्याच्या कारकीर्दींत या जिल्ह्याला निकरिलि चोलमंडल हे नाव पडलें. १११६ च्या सुमारास या कोलांची सत्ता संपुष्टांत येऊन, होयसळ घराण्याची सत्ता या जिल्ह्यावर पसरली. १२५४ मध्ये या घराण्याची दोन घराणीं होऊन, सोमेश्वराचा मुलगा रामनाथ याच्या कडे हा जिल्हा आला. पण ही वाटणी फार दिवस टिकली नाहीं. होयसळ घराण्याचा राजा तिसरा बल्लाळ याच्या कारकीर्दींत पुन्हां पूर्वीचा सर्व प्रांत एकट्या बल्लाळाच्याच ताब्यांत आला. विजयानगरची सत्ता ज्या वेळीं या जिल्ह्यावर पसरली त्यावेळीं मुलबागल ही या राज्याची राजधानी झाली. १५ व्या शतकाच्या अखेरीस बहामनी सुलतानानें विजयानगरच्या मुलुखात धुमाकूळ घातला असता साळुव नरसिंह नावाच्या विजयनगरच्या सेनापतीने या बहामनी सुलतानाची स्वारी मोठ्या शौर्यानें परतविली व स्वतःच विजयानगरचें सिंहासन बळकावलें. पुढे बऱ्याच वर्षांनीं तम्मे गौडा नांवाच्या एका मांडलिक राजानें सुगतूर येथें आपली सत्ता स्थापन केली व या त्याच्या कृत्याबद्दल विजयानगरच्या राजानें त्याला कोलार जिल्ह्याचा पूर्वभाग बक्षीस दिला. १४७६ मध्यें दुसऱ्या एका मांडलिक राजानें पश्चिमेस चिकबल्लापुर नांवाचें संस्थान स्थापन केलं. १७ व्या शतकांत कोलार जिल्हा विजापूरच्या ताब्यांत जाऊन विजापूरकरांनीं या मुलुखावर शहाजीची नेमणूक केली. हा जिल्हा मोंगलांच्या ताब्यांत जवळ जवळ ७० वर्षे होता. नंतर तो

मराठ्यांच्या ताब्यात आला. पुढें अनुक्रमें कडाप्पाचा नबाब, अडोनीचा नबाब, सलाबतजंग यांच्या तो ताब्यांत गेला. १७६१ मध्यें सलाबतजंग यानें हा जिल्हा हैदर अल्लीला दिला. १७६८ मध्यें ब्रिटिशाच्या ताब्यांतहि कांहीं काळ हा किल्ला होता, पण १७७० मध्यें मराठ्यांनीं पुन्हां तो जिंकून घेतला. पुढें हैदरानें पुन्हां तो आपल्या ताब्यांत घेतला पण १७९१ मध्यें ब्रिटिशांनीं तो जिंकून घेतला. शेवटीं १७९२ मध्यें ब्रिटिशांनीं तो म्हैसूरकरांनां देऊन टाकला. या जिल्ह्यांतील अवनी, बेटमंगल व टेकल या ठिकाणीं प्राचीन काळचे अवशेष सांपडतात. नोनमंगल येथें १८९७ मध्यें एक जैनांचें देवालय सांपडलें. त्यामध्यें चौथ्या अगर पांचव्या शतकांतील शिलालेख आढळून आले. तसेंच त्या देवळांत वाद्यें, लहान लहान मूर्ती व इतर वस्तूहि सांपडल्या. नंदी येथील नंदीश्वराचें देवालय व कोलार येथील कोलारम्माचें देवालय हींहि जुनीं आहेत. नंदीश्वराच्या देवळांतील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. हीं दोन्हीं देवळें कोलाच्या काळचीं म्हणजे ११ व्या शतकांतील दिसतात. कोलार शहरांत हैदरअल्लीच्या घराण्यांतील एका प्रसिद्ध पुरुषाचें थडगें आहे. सर्व जिल्ह्यात जे शिलालेख सांपडले आहेत ते हल्लीं छापण्यांत आले आहेत.

शेतकी:—पठारावरील जमीन तांबडी व रेवाळ असून त्यात अंबूर व ग्रानाईट दगड पसरलेले आहेत. दऱ्याखोऱ्यांतील जमीन सुपीक आहे. या जिल्ह्यांत बागाइत जमीनहि पुष्कळ आहे. रागी, तांदूळ, धान्यें, ऊंस व बटाटे हीं मुख्य पिकें आहेत. १९०३-४ सालीं जंगलाचें क्षेत्रफळ १३५ चौरस मैल होतें व त्याचे कराचें उत्पन्न ४७,००० रुपये झालें.

व्यापार व दळणवळण:—कोलार येथील सोन्याच्या खाणी वगळून दिल्यास इतर धंदेहि येथें पुरेच आहेत. गोरीबिदनूर येथें साखरेचा कारखाना आहे. कोलार येथें धंदेशिक्षणाची शाळा आहे. कोलार, चिकबल्लार, सिद्लघट्ट तालुक्यांत रेशमाचे कारखाने पुष्कळ आहेत. १९०४ मध्यें १४२१ लहान कारखाने ब्लँकेट तयार करण्याचे होते. याशिवाय लांकडी काम, लोखंडी काम, तांबे पितळेचीं भांडीं तयार करण्याचें काम इत्यादि पुष्कळ प्रकारचीं कामें येथें होतात. जिल्ह्यांत १९०४ सालीं २९३ तेलाच्या चक्क्या व २०९ साखरेचे कारखाने होत्या. मुलबागल या शहरीं साखर उत्कृष्ट तयार होते. मद्रास रेल्वेच्या बंगलोरचा फांटा या जिल्ह्यांतून सर्व ठिकाणीं गेला आहे.

साक्षरता:—१९११सालीं लोकसंख्येपैकीं ४०,९१० लोक साक्षर होते. म्हणजे साक्षरतेचें प्रमाण शेंकडा ५ असें पडलें. इंग्लिश जाणणाऱ्या लोकांची संख्या २६८९ होती. १९०३-४ मध्यें या जिल्ह्यांत ४१३ शाळा होत्या.

ता लु का.—कोलार जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ २,८२,०५४ चौरस मैल आहे. १९११ सालीं या तालुक्याची लोकसंख्या ८०,९६१ होती. तालुक्यांत कोलार नांवाचें शहर व २९२ खेडीं आहेत. १९०३-४ सालीं जमिनीच्या वसुलाचें उत्पन्न १,७१,००० रुपये होतें. या तालुक्याच्या पूर्व भागाच्या हद्दीवरून पालार ही नदी वहात जाते पश्चिमेस कोलार व वोक्कलेरी या टेंकड्या आहेत. या तालुक्यांत व विशेषतः दक्षिणभागांत पुष्कळ मोठे तलाव व विहिरी आहेत. तालुक्यांतील व कोलारच्या टेंकड्यांवरील पठारांतील जमीन सुपीक आहे. पुष्कळ खेड्यांतून रेशमी किड्यांच्या संवर्धनाचा धंदा आढळून येतो.

श ह र.—कोलार जिल्ह्याचें व कोलार तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें शहर बोरिंगपेट स्टेशनापासून उत्तरेस ११ मैलांवर आहे. या शहराची लोकसंख्या १९११ सालीं ८१९३ होती. कोलार हें फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. याचें पूर्वीचें नांव कुवलालपूर असें होतें व त्याचें पुढें कोलाल व कोलार असें रूपांतर झालें. येथील कोलारम्माचें प्रसिद्ध देवालय ज्यावेळीं अकराव्या शतकांत कोलांनीं गंग घराण्याचें वर्चस्व नष्ट केलें त्यावेळचें असून तें राजेंद्र कोल नावाच्या राजानें बांधलें असें म्हणतात. १२ व्या शतकांत कोलांची सत्ता होयसळ राजानें बळकावली व कोलांना म्हैसूर मधून हांकलून दिलें. या संबंधीचा इतिहास कोलार जिल्ह्यावरील लेखांत दिलेला आहे. या शहरीं हैदरअल्लीच्या बापाचें एक थडगें असून त्याची व्यवस्था ठेवण्याबद्दल स्वतंत्र इनाम आहे. या शहराच्या भोंवतालचा तट कांहीं वर्षांपूर्वी पाडण्यात आला व शहराभोंवतीचा खंदकहि बुजविण्यांत आला. त्याच सुमारास पुष्कळ रस्ते बांधण्यात आले. रेल्वे सुरू होण्यापूर्वी मद्रासच्या रस्त्यावरील कोलार हें रहदारीचें शहर होतें. या शहरांत विंचू फार आहेत. कोरम्मा देवळाच्या प्रवेश द्वाराखालीं जें भुयार आहे त्यात विंचू आहेत असें म्हणतात. देवाला नैवेद्य म्हणून जे जिन्नस देण्यात येतात त्यांत रुप्याचा तयार केलेला एक विंचू नेहमीं अर्पण करण्यांत येतो. रेशमाच्या किड्यांसाठीं मलबेरी वृक्षांची लागवड येथें फार करण्यांत येते. लोंकरी बुरणुसें करण्याचा येथें धंदा आहे. येथें दोन हायस्कुलें आहेत व मेथॉडिस्ट एपिस्कोपल संस्थेनी अनाथांसाठीं एक धंदेशिक्षणाची शाळा आहे. १८७० मध्यें या शहराला म्युनिसिपालिटी देण्यांत आली.

गो ल्ड फी ल्ड (सोन्याच्या खाणी)—कोलार जिल्ह्याच्या आग्नेय भागांतील एक शहर. बोरिंगपेट स्टेशनापासून हें १० मैलांवर वसलेलें आहे. बोरिंगपेटपासून येथपर्यंत कोलार गोल्डफील्ड रेल्वे आहे. याच्या पश्चिमेस लहान मोठ्या बऱ्याच टेंकड्या पसरलेल्या आहेत. याचें क्षेत्रफळ १९११ सालीं १४.८८ चौरस मैल असून लोकसंख्या ११,१८४ होती. या प्रदेशांतील सोन्याच्या खाणीविषयीं प्राचीन काळापासून प्रसिद्धि होती. टिपू सुलतानानें या खाणी खणण्याचा प्रयत्न केला होता पण तो निष्फळ झाला. १८०२ सालीं लेफ्टनंट वारन यानें

प्रथमतः इंग्रजांच्या नजरेस ही गोष्ट आणली. १८७३ मध्ये मेजर लावेल यानें म्हैसूरसरकारपासून या खाणी खणण्याचा वीस वर्षांचा मालकी हक्क मिळविला. पण हें काम एकट्याच्या भांडवलावर निभावणार नाहीं असें पाहून त्यानें म्हैसूर सरकारच्या संमतीनें कोलार कनसेशनेरीयर्स नांवाच्या एका मंडळाला ३० वर्षांच्या मुदतीनें २० चौरस मैलांचा प्रदेश कौलानें दिला. १८८१ मध्यें या मंडळाला लंडन येथील प्रसिद्ध खाणीशास्त्रांतील पारंगत अशा मेसर्स टेलर अँड को या शास्त्रज्ञ एंजिनियरांची मदत मिळाली. नंदिदुग येथील खाणी खणण्यास काम कॅप्टन प्लूमर या अनुभविक खाणी-तज्ज्ञानें सुरू केलें. पण भांडवलाच्या अभावीं १८८३ सालीं तें काम बंद पडलें. पण त्याच सालीं कॅप्टन प्लूमर यानें जॉन टेलरच्या प्रोत्साहनानें तें काम आपल्या अंगावर घेतलें व त्याच्या नशिबानें त्याला यांत यश आलें. १८८५ मध्यें कोलार येथील खाणींची सोन्या-बद्दल चोहोंकडे प्रसिद्धि झाली. म्हैसूरदरबारनें आपला त्यात हिस्सा ठेवून खाणींच्या वरील कौलाचे दर कमी केले. १९०४ च्या अखेरीस एकंदर ४१० लक्ष पौंडांच्या किंमतीचें सोनें या खाणींतून बाहेर पडलें. त्यापैकीं दहा लक्ष पौंड म्हैसूरसरकारला व ९० लक्ष डेव्हिडंड म्हणून वाटण्यांत आलें. १९०४ मध्यें या खाणींत ११ कंपन्या काम करीत होत्या. त्यांपैकीं म्हैसूर, चँपियनरीफ, उरेगम, नंदिदुग व बालाघाट या पांच कंपन्या डिव्हिडंडवाटीत असत. या निरनिराळ्या कंपन्यातर्फे खाणीवर ५१० यूरोपियन, ४१५ यूरेशियन व २७,००० हिंदु लोक काम करीत होते. १९१८ सालीं हिंदुस्थानात निघालेल्या सोन्यापैकीं ९४ टक्के कोलार गोल्डफील्डचे होतें व त्याची किंमत २९० लक्ष रुपये होती. या खाणींच्या धंद्याला प्रोत्साहन देण्यासाठीं म्हैसूर संस्थाननें अनेक साधनें निर्माण केलीं. १८९४ मध्यें बोरिंगपेट जंक्शन पासून खाणींकडे जाणारा एक रेल्वेचा फांटा बांधण्यांत आला. १८९९ मध्यें आरोग्यसंरक्षक खातें निर्माण करण्यांत येऊन ७ लोकांचें एक मंडळ नेमण्यांत आलें. १९०० सालीं म्हैसूर सरकारनें या खाणींच्या संरक्षणार्थ पोलीसठाणेंहि निर्माण केलें. १९०२ मध्यें कावेरी नदीच्या पाण्याच्या सहाय्यानें खाणींच्यासाठीं विजेच्या प्रकाशाची सोय करून देण्यांत आली. प्रथम ४१८५ हॉर्स पावरची वीज उत्पन्न होत होती. पण १९०५ मध्यें ती जवळ जवळ ८००० पर्यंत वाढविण्यांत आली व हल्लीं आणखी २००० पावर वाढविण्याची योजना चालली आहे. खाणींतील लोकांनां पाण्याची सोय म्हणून पालार नदीच्या काठांवर असलेल्या बेटमंगल तलावापासून पाणी नेण्यांत आलें आहे. प्रार्थनामंदिरें, क्लब, मोठमोठीं दुकानें हीं या ठिकाणीं स्थापन झालीं आहेत. १८९५ सालापासूनच येथें एक स्वतंत्र शहर वसविण्याची कल्पना संस्थानच्या डोक्यांत घोळत होती. १९०१ सालीं तिला मूर्त स्वरूप देण्यांत आलें. नवीन शहराला राबर्टसनपेट हें नांव देण्यांत आलें. या शहराच्या आसपास खाणींतील मजुरांच्या चाळी आहेत. या शहरांत मोठमोठे रस्ते बांधण्यांत आले असून विहिरी वगैरे खणण्यांत आल्या आहेत.

कोलार सरोवर:-हें मद्रास इलाख्यांतील गोड्या पाण्याचें सरोवर असून हें कृष्णा जिल्ह्यामध्यें आहे. याच्या अर्ध्या भागांत पाणी असून अर्धा भाग दलदलीचा आहे. हें सरोवर प्रथम बंगालच्या उपसागराचा एक फांटा असावा याचा आकार अंड्यासारखा असून याच्या दोन्ही बाजूस अनुक्रमें गोदावरी व कृष्णा या नद्या वाहतात व या नद्यांच्या मुखाशीं गाळ सांठून ज्या नव्या जमीनी तयार झाल्या त्यांच्या एकमेकांशीं झालेल्या संमेलनानें या सरोवराचा समुद्राशीं असलेला संबंध तुटला. या सरोवरांत आतां नद्या व जलप्रवाह वाहत असल्यामुळें यांतील पाणी गोडें आहे. परंतु या जलप्रवाहाबरोबर वाहात येणारा गाळ दरवर्षी या तलावास भरून काढतो. पावसाळ्यात या सरोवराची लांबी १००मैलाहून अधिक असते पण उन्हाळ्यात ती बरीच कमी होते या सरोवराच्या उत्तरेस २० पासून ५० मैलावर पूर्व घाटांच्या टेंकड्या असून सभोंवारच्या २००० चौरस मैल प्रदेशांतील जलप्रवाह या सरोवरास येऊन मिळतात. या रीतीनें सांचलेलें पाणी पेरंतलकनम व जुविरकनम या दोन सांडवाटे सरोवराच्या बाहेर पडतें. या सरोवरात पुष्कळ मासे असून सरोवराच्या तिरावर सर्व तऱ्हेचे पाणबुडे पक्षी राहतात. सरोवरांत पुष्कळ बेटें असून त्यांवरील जमीन सुपीक आहे. ही जमीन दरवर्षी नांगरण्याकरितां ठेक्यानें दिली जाते.

कोलिकेर, रुडोल्फ आलबर्ट व्हॉन—(१८१७ ते १९०५) हा स्विस् शारीरशास्त्रज्ञ व इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ता झूरिच येथें ता. ६ जुलै इ. स. १८१७ रोजीं जन्मला. त्याचे आईबाप झूरिचचे रहिवासी असून त्याची बायकोहि तेथीलच असल्यामुळें, जरी त्यानें आपलें आयुष्य जर्मनींत घालविलेलें असलें तरी वास्तविक त्यास स्वित्झरलंडचाच नागरिक म्हणणें योग्य होईल. झूरिचच्या शाळेंत प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्याचा १८३६ मध्यें तेथील विश्वविद्यालयांत प्रवेश झाला. पुढें बॉन व बर्लिन येथील विश्वविद्यालयांत शिक्षण संपादून त्यानें जोहानस मुल्लर व एफ. जी. जे. हेन्ले यांचें शिष्यत्व पत्करिलें १८४१ त झूरिच येथें तत्वज्ञान विषय घेऊन व१८४२ त हायडेलबर्ग येथें वैद्यकीचा अभ्यास करून तो उत्कृष्ट पदवीधर झाला. हेन्लेच्या हाताखालीं शारीरशास्त्रांतील प्रेतच्छेदक शिष्य म्हणून तो प्रथम नोकरीस राहिला. परंतु १८४४ त तुलनात्मक शारीरशास्त्राचा व इंद्रियविज्ञानशास्त्राचा अध्यापक म्हणून त्यास स्वदेशी विश्वविद्यालयांकडून निमंत्रण आलें. परंतु तेथें तो फार दिवस राहिला नाहीं. कारण १८४७ त व्हूर्झबर्ग येथील विद्यालयाकडून त्यास सूक्ष्मदर्शक यंत्राच्या तुलनात्मक शारीरशास्त्राचा व इंद्रियविज्ञानशास्त्राचा प्रसिद्ध अध्यापक म्हणून नेमण्यांत आलें. त्यानंतर, सर्व व्यामोहाचा परित्याग करून

बव्हेरियन शहरांतील शांत असा विद्यापीठीय जीवनक्रम आमरण घालवीत असतांना तेथेंच त्यानें २ नोव्हेंबर १९०५ तारखेस इहलोक सोडला. सूक्ष्मदर्शक यंत्र व कोलिकेर हें नांव यांचें साहचर्य सतत राहील यांत शंका नाहीं. 'सजीव प्राण्यांचा सूक्ष्मदर्शक यंत्रानें शोध' हा विषय पुनरुज्जीवित होण्याचा काल व कोलिकेरच्या एतद्विषयक शोधांचा काल या गोष्टी अगदी एकदम व एकाच वेळीं घडून आल्या. परंतु यापूर्वी दोन शतकें प्रसिद्ध इटालियन मालपिधी यानें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें प्राणी व वनस्पती यांचें निरीक्षण केलें होतें. मालपिधीनंतर संयुक्त सूक्ष्मदर्शक यंत्राची सुधारणा व थिओडराशिव्हान आणि मॅथिअस यांनीं सूक्ष्मपिंड अथवा गोलकसिद्धांत यांचें केलेलें प्रसिद्धीकरण, या दोन गोष्टींमुळें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या शोधांत एक नवें मन्वंतर घडून आलें. तारुण्योचित उत्साहामुळें कोलिकेर यानें या नवीन विद्येच्या क्षेत्रांत ताबडतोब प्रवेश केला. तेथें त्यानें जे दीर्घकालीन व विविध असे परिश्रम केले त्याला मूळ कारण म्हणजे त्याचे गुरु हेन्ले व जोहानेस मुल्लर हेच होत. तत्कालीन प्रवृत्तीचाहि त्याच्यावर परिणाम झाला.

झूरिच येथें व नंतर वूर्झबर्ग येथें तुलनात्मक शारीरशास्त्र शिकवीत असतांना त्यानें कांहीं टिपणें प्रसिद्ध केलीं. १८४१ मध्यें त्याचा पहिला निबंध प्रसिद्ध झाला. त्याचें नांव 'ऑन दि नेचर ऑफ दि सो-कॉल्ड सेमिनल ॲनिमल-क्युलिस' असें असून त्यांत सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्यानें विविध जातींच्या प्राण्यांची अंतर्गत रचना पाहण्याचा प्रयत्न केलेला होता. वनस्पतिशास्त्रासंबंधीं ज्ञान मिळविण्याकरितां भूमध्यसमुद्राकडे व स्कॉटलंडच्या किनाऱ्याकडे त्यानें सफर केली. सी. टी. ई. व्हॉन साइबोल्ड नावाच्या आपल्या मित्राबरोबर वनस्पतिशास्त्राच्या मासिकाचा सह-संपादक म्हणून काम करून त्यानें मोठें नांव मिळविलें.

कोलिकेरच्या खऱ्या जीवनवृत्तांतास सुरवात होत होती त्या वेळीं कार्ल अर्नेस्ट व्हॉन बेअर याची पिंडशास्त्रासंबंधाची माहिती लोकप्रिय झाली होती व बाह्यस्वरूपविषयक ज्ञान व वनस्पतिशास्त्रासंबंधीं माहिती या दोन गोष्टींचें महत्त्व लोकांस पटूं लागलें होतें. अशा वेळीं कोलिकेर या विषयाकडे वळला अपृष्ठवंशी प्राण्यांसंबंधीं शोध लावण्याचा प्रथम प्रयत्न करून नंतर सपृष्ठवंशी प्राण्यांबद्दल तो विचार करूं लागला. भूजल-वासी प्राणी व कोंबड्या यांचाच अभ्यास करून न थांबता सस्तन प्राण्यांच्या पिंडांनींहि त्यास विचारांत गर्क करून सोडलें. जीवनशास्त्राचा शोध या विषयांत सूक्ष्मदर्शक यंत्राच्या उपयोगांतील दृढीकरण, परिच्छेदन, सवर्णीकरण इ. सर्व कृती पूर्णपणें जाणणारा कोलिकेर हाच पहिला शास्त्रज्ञ होय. १९ व्या शतकाच्या मध्य व उत्तर पादांत झालेल्या पिंडशास्त्राच्या विलक्षण प्रगतीशीं कोलिकेरचें साहचर्य सतत राहील यांत शंका नाहीं. १८६१ मध्यें त्यानें 'लेक्चर्स ऑन् डेव्हलपमेंट' हा या विषयावरील आपला प्रमाणभूत ग्रंथ प्रसिद्ध केला.

परंतु प्राणिशास्त्र व पिंडशास्त्र यांवरच त्याची कीर्ति अधिष्ठित झालेली नसून सूक्ष्मपिंडरचनाशास्त्राबद्दलहि त्यानें नांव मिळविलें आहे. मऊ व रेषारहित स्नायू हा स्नायु-गोलकांच्या भिन्न घटकांचा बनलेला असतो या सिद्धांताचें दिग्दर्शन त्यानें १८४७ मध्यें केलें. या विषयांत त्यानें हेन्लेचेंच अनुकरण केलें आहे. गुळगुळीत स्नायु, रेषारहित स्नायु, त्वचा, अस्थि, दंत, रक्तवाहिन्या व आंतडीं या सर्वांचें त्यानें संशोधन केलें व कांहीं तरी नवीन माहिती त्यानें त्यासंबंधीं दिली आहे. कांहीं शोध स्फुट टांचणांमध्यें, कांहीं 'सूक्ष्मदर्शक यंत्राचें शारीरशास्त्र' या आपल्या ग्रंथामध्यें व कांहीं निबंधांमध्यें अशा विविध स्थळीं त्यानें आपले शोध ग्रथित केले आहेत. मज्जातंतु-रचनाशास्त्रामुळें कोलिकेरची कीर्ति अढळ झाली आहे. १८४५ मध्यें झूरिच येथें असतानाच मज्जातंतूचें मज्जा-गोलकांशीं साहचर्य असतें असें सिद्ध करून मध्यवर्ती मज्जा-तंतुरचनेसंबंधीं होणाऱ्या विचाराचा जणुंकाय त्यानें पायाच घातला असें म्हणतां येईल. त्यानंतर त्यानें मज्जातंतुरच-नेच्या सूक्ष्मपिंडरचनाशास्त्राबद्दल अत्यंत परिश्रम करून मेंदू व पृष्ठरज्जू यांत एकत्र विणले गेलेले गोलक व तंतु ज्यामध्यें सांपडतात असे गुंतागुंतीचे नमुने पाहिल्यामुळें उत्पन्न झालेले कठिण प्रश्न सोडविण्याच्या कामीं त्यानें फार परिश्रम केले व त्यांत यशहि मिळविलें. अगदीं म्हातारपणीं सुद्धा विश्रांति घ्यावयाचें सोडून देऊन त्यानें मज्जातंतु-विज्ञानशास्त्रासंबंधीं शोध लावले. वृद्धावस्थेंत असूनहि गॉल्गी पद्धतीचें महत्त्व कळतांच पुनः नव्या साधनांचा अव-लंब करून मज्जातंतुरचनेच्या शोधास तो प्रवृत्त झाला. आपल्या हयातीच्या पूर्वार्धांत कोलिकेर हा शारीरशास्त्राचा व इंद्रियविज्ञानशास्त्राचा अध्यापक होता. सूक्ष्मपिंडरचना-शास्त्रासंबंधीं त्यानें जे परिश्रम केले त्यांतून इंद्रियविज्ञान शास्त्राबद्दल नवीन शोध निष्पन्न झाले एवढेंच नव्हे तर प्रयोगानें सिद्ध होणारे नवीन शोध करून त्यानें त्या शास्त्रांत भर टाकिली. खरोखर इतक्या अष्टपैलू व्यासंगाचा मनुष्य पाहावयाचा असेल तर आपणास कित्येक शतकें फार मागें जावें लागेल. जोहानेस मुल्लरच्या काळीं इंद्रिय-विज्ञानशास्त्र व शारीरशास्त्र यांचा व्यतिरेक करावा असें कोणासच वाटलें नाहीं. कोलिकेरनें त्यांचा अन्वय घडवून आणला व हीं दोन्हीं शास्त्रें अगदीं भिन्न अशीं मानलीं जाऊं नयेत असें प्रतिपादन केलें. एवढ्या योग्यतेच्या पुरुषाला मानमरातब मिळाला नाहीं असें कसें होईल! पूर्वी नुस्ता कोलिकेर असा त्याचा उल्लेख होत असे; परंतु पुढें व्हॉन ही पदवी त्याच्या नांवास जोडली गेली. अनेक देशां-तील विद्वान् लोकांच्या मंडळांचा तो सदस्य झाला होता. इंग्लंडांत त्याची प्रसिद्धि झाली व १८६० मध्यें त्यास

रॉयल सोसायटीचा फेलो करण्यांत आलें. पुढें १८१७ मध्यें बहुमोल ' कॉपले पदक " देऊन सोसायटीनें कोलिकेरचा अत्यंत सन्मान केला.

कोलेगल, ता लु का—मद्रास इलाख्यांतील कोइंबतूर जिल्ह्याचा एक तालुका. उ. अ. ११° ४६' ते १२° १८' व पू. रे. ७६° ५९' ते ७७° ४७. १९११ सालीं याचें क्षेत्रफळ ११६७ चौरस मैल होतें. या तालुक्याच्या तिन्ही बाजूंनीं कावेरी नदी वहात गेली आहे. १९११ सालीं या तालुक्याची लोकवस्ती १,१८,०१७ व १९२१ सालीं ९५,३५६ होती. या तालुक्यांत एक शहर असून १५६ खेडीं आहेत. १९२१-२२ मध्यें या तालुक्याचा वसूल १,३२,००० रुपये झाला. या तालुक्यांतील लोकवस्ती क्षेत्रफळाच्या मानानें फार कमी आहे; म्हणजे दर चौरस मैलीं १०० लोक हें प्रमाण पडतें. कोइंबतूर जिल्ह्याच्या इतर तालुक्यांपेक्षां या तालुक्यांत पर्जन्याचें प्रमाण जास्त आहे. येथील सरासरी मान ३५' आहे. पूर्वघांटांतील पर्वताचीं दक्षिणटोंकाकडील शिखरें या तालुक्यांमधून गेली आहेत. इतर तालुक्यांपेक्षां हा तालुका थोडासा उंचावर वसलेला असून याचें हवामान म्हैसूर इलाख्यांतील हवामानाप्रमाणें आहे. जवळ जवळ अर्धा तालुका जंगलमय असून हीं जंगलें राखीव आहेत. या जंगलामध्यें गुरांना चारा खूप मिळतो. कोलेगल तालुक्यांतील रयत लोकांचा धंदा मुख्यतः शेतकीचा नसून गुराची निपज करण्याचा आहे. या ठिकाणीं अलमबादी नांवानें प्रसिद्ध असलेल्या ओझी वाहणाऱ्या गुरांची निपज होते.

श ह र.—कोलेगल तालुक्याचें हें शहर व मध्यवर्ती ठिकाण आहे. उ. अ. १२ ° १०' व पू. रे. ७७ ° ७'. १९११ सालीं या शहराची वस्ती १२,५६६ होती. या शहरीं जरीचें कापड व रुमाल चांगल्या तऱ्हेनें तयार होतात. येथें जें रेशमी कापड तयार होतें त्यापैकीं बरेंच ३०० रुपायाच्या वरच्या किंमतीचें असतें व अशा प्रकारचा रेशमी जरीचा माल फारच सुबक होतो.

कोलेरिज सॅम्युअल टेलर—(१७७२-१८३४) हा सुप्रसिद्ध इंग्लिश कवि, तत्वज्ञ व मार्मिक टीकाकार होता. जॉन कोलेरिज नांवाच्या एका पाद्याचा सर्वांत हा धाकटा मुलगा होय. हा डेव्हनशायर परगण्यामधील ओटरी सेंट मेरीज या ख्रिस्तालयाच्या आवारांत जन्मला. लहानपणींच त्याचा बाप वारल्यामुळें त्याला ख्राइस्ट हॉस्पिटल येथें ठेवण्यांत आलें. या ठिकाणीं चार्लस लँब हा त्याचा शाळासोबती होता. १७९१ मध्यें केंब्रिज येथील जीजस कॉलेजमध्यें त्याला धाडण्यांत आलें. येथें असतांना त्यानें निरनिराळ्या विषयावरील पुस्तकें वाचून काढलीं. येथें असतांना लोकशाहीचीं तत्वें त्याच्या मनावर पक्कीं ठसलीं होतीं. पुढें विश्वविद्यालयांतील रहाणीचा त्याला कंटाळा आल्यामुळें व तेथें असतांना प्रणयाच्या बाबतींत त्याची निराशा झाल्यामुळें त्यानें केंब्रिजला रामराम ठोकला व सैन्यामध्यें आपलें नांव दाखल केलें. पण तेंहि काम त्याला झेपेना. शेवटीं मोठ्या खटपटीनें त्याला सैन्यांतून रजा मिळाली व तो १७९४ मध्यें केंब्रिज येथें परत आला. नंतर तो ऑक्सफोर्ड येथें आला. तेथें त्याचा व सौदे कवीचा परिचय झाला. येथें असतांना त्याची सारा फ्रिकर या कुमारिकेवर प्रीति जडली व त्यानें १७९५ मध्यें तिच्याशीं लग्न केलें. केंब्रिजमध्यें असतांनाच त्यानें 'रॉबेसपीयर ए ड्रामा' नांवाचें एक नाटक छापलें होतें. लग्न झाल्यानंतर तो प्रथम क्लीवडन व नंतर नेदर स्टोवे येथें रहावयास आला. येथें असतांना त्याची वर्डस्वर्थ या सुप्रसिद्ध कवीशीं ओळख जडली; व ती मरेपर्यंत कायम टिकली. समानधर्मी अशा या दोन कवींची थोडक्याच काळांत दाट मैत्री जडावी यांत आश्चर्य नाहीं. १७९६ त 'पोएम्स ऑन व्हेरियस सब्जेक्ट्स', 'ओड टु दि डिपार्टिंग इयर' इत्यादि कविता त्यानें प्रकाशित केल्या. १७९७ त वर्डस्वर्थच्या सहवासांत असतांना, 'दि एनशंट मॅरिनर', 'ख्रिस्ताबेल'चा पहिला भाग, व 'कुबलारवान' हीं काव्यें त्यानें लिहिलीं व वर्डस्वर्थच्या मदतीनें 'लिरिकल बॅलड्स' हें काव्य लिहिण्यास आरंभ केला.

यूरोपखंड पहाण्याची त्याला फार उत्कंठा असे. त्यामुळें १७९८ त वर्डस्वर्थ व त्याची बहिण यांच्या समवेत तो हॅंबर्ग येथे आला. तेथून तो एकटाच रटझेबर्ग येथें व नंतर गाटिजन येथें गेला. जर्मनींत असतांना त्यानें जर्मन भाषेचा अवघ्या नऊ महिन्यांत उत्कृष्ट अभ्यास केला. जर्मन वाङ्मयाचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला. १७९९ त तो लंडन येथे परत आला. तेथें आल्यावर अवघ्या सहा आठवड्यातच त्यानें शिलरचे 'वॅलेन्स्टीन' काव्याचें भाषांतर केलें. १८०० त त्यानें ख्रिस्ताबेल काव्याचा दुसरा भाग लिहिला. फ्रान्समधील बंडाला तो प्रथम जरी अनुकूल होता तरी पुढें पुढें या बेशिस्त स्वातंत्र्याविरुद्ध झाला. १८०० त तो 'लेक्स' या भागांत रहावयास गेला. तेथें सौदे हा कवि त्याच्याबरोबर रहात असे. कोलेरिज याला अफूचा नाद अतिशय असे. त्यामुळे त्याची शरीरप्रकृति फार नाजूक असे. १८०१ त त्याची प्रकृति ढासळूं लागली. त्यामुळें त्याला विश्रांति घेणें जरूर पडलें. १८०४ मध्यें तो प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं माल्टा येथें गेला. तेथे असतांना त्याची व माल्टाचा गव्हर्नर सर अलेक्झांडर बाल यांची मैत्री जमली व बालनें त्याला आपला सेक्रेटरी नेमलें. पण लवकरच तो या नोकरीला कंटाळला व त्यानें तिचा राजीनामा देऊन इटलींत प्रवास करण्यास सुरवात केली. इटलींत असतां टीक, हंबोल्ट, बेन्सन इत्यादि मोठमोठ्या विद्वानांशीं त्याचा परिचय झाला. तो १८०६ त इंग्लंडांत परत आला. १८०८ त त्यानें रॉयल इन्स्टिटयूशन या संस्थेतर्फे शेक्सपीयरवर व्याख्यानें दिलीं. नंतर तो वर्डस्वर्थकडे रहावयास गेला. येथें असतांना त्यानें 'फ्रेंड'नांवाचें एक पत्र सुरू केलें व अवघे ९ महिनेच टिकलें. १८१२ मध्यें त्यानें पुन्हा

शेक्सपियरवर व्याख्यानें दिलीं. १८१३ त त्यानें लिहिलेल्या 'रिमोर्से' या नाटकाचा डरुअरीलेन थिएटरांत प्रयोग झाला व तो यशस्वीहि वठला. १८१७ त बायॉग्रफीया लिटरेरिया सिबिलाइन लीव्हज व स्वतःचें आत्मवृत्त अशीं तीन पुस्तकें त्यानें प्रकाशित केलीं. १८१८ त पुन्हां त्यानें कांहीं व्याख्यानें दिलीं. पण पुढें मात्र त्याची प्रकृति फारच बिघडूं लागली. तरी पण त्याचा व्यासंग अखेरपर्यंत चालूच होता. त्याच्या काव्यावर लुब्ध झालेले कित्येक लोक त्याच्याशीं चर्चा करण्याकरतां, व त्याच्या तोंडून मननीय विचार ऐकण्याकरता जमत असत. १८२४ त रॉयल सोसायटी ऑफ लिटरेचरचा ॲसोशिएट म्हणून त्याची निवड करण्यांत आली व त्यामुळें त्याला १०० गिनींचा तनखा मिळूं लागला. १८२५ त त्याचें 'एड्स टु रिफ्लेक्शन' हें काव्य व 'दि कॉन्स्टिटयूशन ऑफ चर्च ॲंड स्टेट' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. १८३४ त तो मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर १८३५ त 'टेबलटॉक्स', १८०० त 'कन्फेशन्स ऑफ ॲन एनक्वायरिंग स्पिरिट, 'लेटर्स ॲंड ॲनिमा पोएटा' हे ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आले. कोलेरिज हा असाधारण बुद्धिमत्तेचा माणूस होता. त्याची प्रतिभा उच्च दर्जाची होती. त्याची कल्पनाशक्ति दांडगी होती. त्यानें लिहिलेल्या काव्यावरून तो किती उच्च दर्जाचा कवि होता हें दिसून येतें. पण तो केवळ पहिल्या प्रतीचा कवि होता एवढेंच नाहीं तर तो उत्कृष्ट टीकाकारहि होता. शेक्सपियर अगर वर्डस्वर्थवरील त्याचे लेख वाचले असता अगर काव्याच्या सिद्धांतावरील त्याचें विवेचन वाचलें असता वरील म्हणण्याची सत्यता पटल्याशिवाय रहात नाहीं. तत्वज्ञानाचा व धर्माचा अभ्यास त्यानें खोल रीतीनें केला होता व त्याच्या मताची छाप तत्कालीन इंग्लिश तत्वज्ञानाच्या वाङ्मयावर पडलेली आढळून येते. खासगी भाषणें करण्यांत तर त्याचा हातखंडा असे. तो आपल्या संभषणानें श्रोतृवृंदास भारून टाकीत असे. त्याला दुष्ट व्यसन नसतें तर त्यानें वाङ्मयांत आणखी पुष्कळच भर टाकली असती. तरी पण आहे त्या काव्यावरून व लेखनावरून त्यानें इंग्लिश वाङ्मयांत फार उच्च दर्जाचें स्थान त्यानें पटकावलें आहे व तें यथायोग्य आहे यांत वाद नाहीं.

[संदर्भग्रंथ—जे. डी. कॅंपबेल-सॅम्यूअल टेलर कोलेरिज-ए नॅरेटिव्ह १८९३; एच. डी. ट्रेल-कोलेरिज (मेन ऑफ लेटर्स सिरीज १८८४)].

कोलेरून—कोलेरून हा कावेरी नदीच्या उत्तरेकडील एक फांटा असून तो त्रिचनापल्लीच्या पश्चिमेस ९ मैल अंतरावरून फुटला आहे. हा प्रथम १७ मैलपर्यंत कावेरीशीं समान्तर राहून नंतर तिच्याकडे वाहत जातो व जवळजवळ तिला जाऊन मिळतो. या त्याच्या वळशानें बनलेल्या बेटास श्रीरंगम हें नांव आहे. हें बेट त्रिचनापल्ली जिल्ह्यांत आहे. या बेटाच्या खालच्या टोंकाशीं वरील फांट्याची दिशा बदलून तो ईशान्येस तंजावरच्या उत्तरसरहद्दीवरून वहात जातो व देवीकोटईजवळ समुद्रास जाऊन मिळतो. या फांटयांचा कालव्याकडे चांगला उपयोग होतो. या फाटयाला ठिकठिकाणीं पाणी अडविण्याकरितां बांध बांधले असून त्यांपैकीं उगमाजवळील व मुखाजवळील मुख्य होत. या फाटयाच्या मुखाजवळ कांहीं मैलपर्यंत होडया चालतात. फाटयाची लांबी९४ मैल असून त्यापासून १४०४ चौरस मैल जमीनीस पाणी मिळतें.

कोलोन—प्रेशियाच्या ऱ्हाइन नदीच्या प्रांतातील पहिल्या प्रतीची तटबंदी असलेलें शहर. हें एक्सला चॅपेलच्या ईशान्येस आगगाडीच्या रस्त्यानें ४४ मैलावर ऱ्हाइन नदीच्या डाव्या तटीं अर्धवर्तुळाकार वसलेलें आहे. ह्या ठिकाणीं ऱ्हाईन नदीचें पात्र नौकानयनास सोईचें असल्यामुळें, व ह्या शहराभोंवतीं लोहमार्गांचें जणूं काय जाळेंच पसरलेलें असल्यानें येथून युरोपमधील कोणत्याहि महत्वाच्या शहराशीं दळणवळण फार सुलभ झालें आहे. येथील सर्वांत प्रेक्षणीय इमारत म्हणजे कॅथेड्रल होय. ही इमारत गॉथिक शिल्पकलेचें एक उत्तम स्मारकच म्हटलें असतां चालेल. हिच्यात १७६४ मध्यें फ्रेंच तोफ गाळून तयार केलेला ५४३ हंड्रेडवेट वजनाची एक सर्वांत मोठा घंटा आहे. ह्या शहरांत इतकीं देवालयें आहेत कीं प्राचीन काळीं त्याला कांहीं लोक जर्मन रोम असें म्हणत असत. येथें तिसऱ्या फ्रेडरिक विल्यमचें स्मारक म्हणून उभारलेला एक २२१ फूट उंचीचा अश्वारोही पुतळा आहे. हें शहर ऱ्हाइन नदीवरील व्यापाराचें एक मुख्य केन्द्रस्थान असून औद्योगिकदृष्टया देखील या शहरास फार महत्व आहे. प्रसिद्ध कोलनवाटर येथेंच तयार होतें. येथें प्रसिद्ध होत असलेल्या 'कोलोन गॅझेट' चा जर्मनींत सर्वांत जास्ती खप आहे. येथील लोकसंख्येपैकीं शेकडा ८० लोक रोमन कॅथोलिक धर्माचे आहेत. धर्मासंबंधीं तंटयामुळें ह्या शहराचें बरेंच नुकसान झालें आहे. १७६४ मध्यें जेव्हां हें शहर फ्रेंचानीं घेतलें तेव्हां त्याची लोकसंख्या सारी ४०००० होती. परंतु १८१५ त व्हिएन्नाच्या तहानें जेव्हां तें प्रशियाकडे आलें तेव्हांपासून आतापर्यंत त्याची सारखी भरभराट होत आहे. १८८५ मध्यें त्याची लोकसंख्या सुमारें १। लाख होती; आणि पुढील वीस वर्षांत ती आणखी एक लाखानें वाढली. १९१० सालीं याची लोकसंख्या ५,१६,५५७ होती.

कोलोफान—कोलोफोन हें प्राचीन शहर आयोनियांतील होय. एफेससच्या उत्तरेस १५ मैलांवर हें होतें. यांचें बंदर नोटियम अथवा नवीन कोलोफोन होतें. सांप्रत या जागेला ट्रॅंचा नांव असून ती डीयरमिर्डायरच्या जवळ आहे, व स्मर्ना ऐडीन रेल्वेवरील डेव्हेलिक्वी स्टेशनच्या दक्षिणेस ५ मैलांवर हें आहे. मालकाजिकच्यापासून २ मैलांवर आहे. पायलारूच्या कॅंड्राबमानानें हें स्थापिलें ? इ. स.

पूर्वी ८ व्या व ७ व्या शतकांत हें शहर भरभराटीच्या शिखरास पोहोंचलें होतें. ६६५ त लिडियाच्या जायजेसनें लुटलें. येथें होमरचा जन्म झाला असें येथील लोकांचें म्हणणें आहे. परंतु मिम्नरमस नांवाच्या कवीचा जन्म येथें झाला. श्रीमंत जहागीरदारांची सत्ता येथें होती. २८७ त लिसिमॅकसनें येथील लोकवस्ती एफेससला नेली. नोटियम अथवा नवीन कोलोफोन येथें क्लेरियन अपोलोचें मंदिर होतें.

कोलोरॅडो—अमेरिका संयुक्त संस्थानांतील एक ठिकाण. याचें क्षेत्रफळ १,०३,९४८ चौ. मैल असून येथील लो. सं. (१९१८)१०,१४,५८१ आहे. १९१० सालीं तेथें भिन्नदेशीयांची लो. सं. १,२६,८५१ इतकी होती. तीपैकीं १२९२६ इंग्रज, ४२६९ स्कॉच, ८७१० आयरिश १७,०७१ जर्मन, १२,४४५ स्विडिश आणि ५५३३ इतके कॅनेडियन लोक होते. १९१६सालीं डेनव्हर या राजधानीची लो.सं.२,६८,४३९ होती. या संस्थानांत रोमनकॅथेॉलिक, मेथॉडिस्ट, प्रेसबिटेरियन, बॅप्टिस्ट व कॉंग्रेगेशनॅलिस्ट इत्यादि धर्मपंथ आहेत. तथापि कॅथोलिक पंथाचे अनुयायी जास्त आहेत. १९१५ सालीं १८८५ प्राथमिक शाळा व १७ हायस्कुलें या दोहोंत मिळून ४१२१शिक्षक होते.व विद्यार्थ्यांची संख्या १,८४,८७१ होती. १९१६–१७ सालीं स्टेट टीचर्स कॉलेजांत ७० अध्यापक व १८३२ विद्यार्थी होते. १९१५ सालचा एकंदर शैक्षणिक खर्च ७९,४०,१७४ डॉलर्स झाला आहे. शिक्षणाकरितां कित्येक कॉलेजें आहेत. कोलोरॅडो कॉलेज, युनिव्हर्सिटी ऑफ कोलोरॅडो, युनिव्हर्सिटी ऑफ डेनव्हर, चेंबरलिन ऑब्झर्व्हेटरी वगैरे शिक्षणसंस्था प्रसिद्ध आहेत. फोर्ट कॉलिन्समधील शेतकी कॉलेज व स्कूल ऑफ माइन्स या संस्थाहि नांवाजलेल्या आहेत. ता. ३० नोव्हेंबर १९१८ रोजीं संस्थानचें कर्ज ४७,३५,८०० डॉलर्स होतें. १९१८ मध्ये जमीनसाऱ्याचें उत्पन्न १३०५२८६४०९ डॉलर्स होते. नॅशनलगार्ड नांवाच्या लष्कराचें मुख्य ठाणें डेनव्हर येथें असून पायदळ, घोडेस्वार, तोफखाना, स्थापत्यपथक, वैद्यकीय पथक, वगैरे अनेक प्रकार सैन्यांत आहेत. १९१० सालीं ४६,१७० इतकी शेतनंबरांची संख्या असून एकंदर क्षेत्रफळ १,३५,३२,११३ एकर होतें. पाटबंधाऱ्यामुळें संस्थानची बरीच जमीन लागवड करण्यास योग्य झाली आहे. मुख्य पीक म्हणजे गहूं, ज्वारी, बटाटे, ओट, गवत व मका हें होय. फळें व भाज्याहि विपुल होतात. खाणीच्या व धातूच्या ओतकामाबद्दल कोलोरॅडो फार प्रसिद्ध आहे. सोनें, चांदी, तांबें, पेट्रोलियम, शिसें, जस्त, ग्रॅनाइट, सँडस्टोन, लाइमस्टोन व कोळसा इत्यादि अनेक पदार्थांची निपज या ठिकाणीं बरीच मोठी होते. येथील उद्योगधंद्यांत १९१४ च्या खानेसुमारीवरून १८,१७,७६,००० डॉलर्स इतकें भांडवल गुंतलें असून मजुरांची संख्या २७,२७८ होती. सोनें, रुपें, शिसें व जस्त वगैरे पदार्थ शुद्ध करण्याचे मोठे कारखाने येथें आहेत. १९१६ सालीं संस्थानांत ५८०३ मैल मेनटॅक रेल्वे होती. १९१७ सालीं संस्थानात एकंदर ८ सेव्हिंग्ज बँका होत्या. आगस्ट १ सन १८७६ रोजीं संस्थानचा यूनियनमध्यें अंतर्भाव करण्यात आला. जनरल असेंब्लींत एक सीनेट असतें व तेथील चार वर्षांकरितां निवडलेल्या सभासदांची संख्या ३५ असते. त्यापैकीं अर्ध्या सदस्यानां दर दोन वर्षांनीं आपली जागा सोडावी लागते. सीनेटशिवाय हाउस ऑफ रिप्रिझेंटेटिव्हज म्हणून एक ६५ सदस्यांचा संघ असतो व त्यातील लोकांची निवड फक्त दोन वर्षांपुरतीच असते. जेथून निवडणूक व्हावयाची त्या जिल्ह्यांत एक वर्ष राहणारे व २५ वर्षांच्या वर असलेले सर्व स्त्रीपुरुष उपर्युक्त उभय संस्थांचे सभासद होऊं शकतात. संस्थानतर्फे फेडरल कॉंग्रेसला २ सीनेटर व ४ प्रतिनिधी पाठवितां येतात [यू. एस. जिऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट; हाल–हिस्टरी ऑफ कोलोरॅडो].

कोलेंगड—मद्रास इलाख्यातील मलबार जिल्ह्याच्या पालघाट तालुक्यातील एक शहर. येथील लो. सं. १९०१ सालीं ९८०० होती. कोलेंगडचे नंबिदी जहागीरदार येथें राहतात. यांनीं येथें एक हायस्कूल स्थापन केलें आहे. या शहराच्या दक्षिणेस २ मैलांवर कचंकुरुची नांवाचें एक मोठें हिंदु देवालय आहे. कोलेंगड व नेलियांपथी या डोंगराळ प्रदेशात कॉफीची लागवड झाल्यापासून या शहराचा व्यापार वाढला आहे.

कोलमशक—हा शक ख्रिस्त शकाच्या ८२४ किंवा ८२५ या वर्षीं सुरू झाला. [अय्यर–प्रा. हिं.] हा मलबारांत चालू आहे.

कोलैमलई.—मद्रासमधील सालेम जिल्ह्यांतील नामकल व अत्तुर तालुक्यांतील पर्वताची ओळ. ही ओळ उत्तर अक्षांश ११° १०' ते ११° २७' व पूर्व रेखांश ७८° १८' ते ७८° ३०' यांमध्यें आहे. सपाटीच्या भागांत ही ओळ एकदम उंच वाढलेली आहे व तिचीं शिखरें सपाट असावीं असा भास होतो. परंतु खरोखर शिखरांतून अरुंद व खोल अशा अनेक दऱ्या असून त्यांच्यामुळें सुमारें १७ मैल लांब ओळींत सृष्टिसौंदर्य फार मजेदार आहे. उत्तरेकडील ४००० फूट उंच गेलेल्या सुळक्यावरून खालील अत्तुरच्या सुपीक सपाट प्रदेशाची शोभा दिसते. पलीकडील दक्षिणेकडच्या कड्यांवरून गवताचीं कुरणें व त्यांमधून वाढलेली तुळतुळीत फणसाची व साबुदाण्याची उंच झाडें, खोल दऱ्या व खिंडी आढळतात. अगदीं दक्षिणेकडील उंच कड्यावरून कावेरीचा देखावा दिसतो. शेव्हरॉय, पाचायमलेइस, कलरायण येथें जे लोक राहतात त्याचपैकीं कांहीं लोकांची वस्ती या पर्वतावर आहे. हे लोक बऱ्याच क्षेत्रफळावर लागवड करतात परंतु त्यांनीं पूर्वी फार उपयुक्त असलेल्या जंगलाचा नाश केला आहे.

कोल्हटकर, भाऊराव—एक महाराष्ट्रीय नट. भाऊराव १८८२ सालीं किर्लोस्कर कंपनींत शिरले त्या वेळेस त्यांचें वय सुमारें १९ वर्षांचें होतें. त्यांनीं प्रथम रंगभूमीवर

प्रवेश केला त्या दिवशीं मंडळीस १५०० रुपयांची प्राप्ति झाली. इतकी प्राप्ति यापूर्वी कधीं झाली नव्हती. भाऊराव हे पूर्वी कंपनीकडून पगार घेत असून पुढें भागीनेंच होते. यांनां पात्रांनां शिकविण्याचा किंवा आपलें स्वतःचें काम करण्याचा कंटाळा नसे. एवढेंच नव्हे तर, नाटकास कितीहि कमी उत्पन्न होवो व मंडळी कितीहि कमी येवो आपलें काम कसोशीनें करीत असत. यांनीं चांगलेच पैसे मिळविले, व धर्मादाय आणि सार्वजनिक कामें यांसहि त्यांनीं चांगली मदत केली. १८९९ सालीं मुंबईस गुजराथेंतील दुष्काळ-पीडित गुरां करिता मंडळीच्यातर्फे भाऊरावांनीं २५०० रुपये दिले. या वेळीं मुंबईकरांनीं यास सर भालचंद्र यांच्या हस्तें एक मानपत्र दिलें. विलायतेंत कांचेच्या कारखान्यांत शिका-वयास गेलेले गृहस्थ रा. वागळे यांनीं मुद्दाम यांस तिकडे बोलाविलें होतें; व तुम्ही इकडे आल्यास मोठमोठ्या लॉर्ड्स वगैरे लोकांत तुमची ओळख करून देऊन तुमच्या गुणाची चीज करून देईन असें त्यांनीं आश्वासन दिलें होतें. परंतु त्यांची प्रकृति या वेळीं ठीक नसल्यामुळें ही विनंति त्यांनां मान्य करतां आली नाहीं. भाऊराव याची उत्तम गवयांत जरी गणना होणार नाहीं तरी आपल्या मधुर कंठरवानेंच त्यांनीं सर्व लोकांस वश करून घेतलें होतें. आवाजी तयार करून त्यांनीं तीस ताब्यांत ठेविलेंच होतें पण त्यांत जें माधुर्य होतें तें पुष्कळांशीं ईश्वरदत्त देणगीच म्हटली पाहिजे. १९०१ सालीं भाऊराव वारले. मरणसमयीं त्यांचें वय ३८ वर्षांचें होतें.

भाऊराव दिसण्यांत सुरेख होते. यांचें सुभद्रेचें व मंथ-रेचें काम फार अप्रतिम वठे. ते 'भावड्या' ह्या टोपण नांवानें सर्वांनां परिचित असत. अण्णा किर्लोस्कर वारल्या-पासून (१८८५) पांच वर्षेपर्यंत रा. नाटेकर, वाघोलीकर व भाऊराव यांनीं कंपनी चालविली होती. पुढें भाऊराव एकटेच राहिले. या वेळीं ते पुरुषपार्टें करीत असत. ते अण्णांच्या तालमींत कसलेले नट असून, सर्व महाराष्ट्राला त्यांनीं आपल्या सुस्वर गायनानें मोहून टाकिलें होतें. [रंगभूमि.]

कोल्हा—कोल्हा हा प्राणी कुत्र्याच्या वर्गांतच मोडतो. कुत्रा व लांडगा यांच्यांत व कोल्ह्यामध्यें पुष्कळसें साम्य आप-ल्याला दृष्टीस पडतें. यांच्या संवयी बहुतेक सारख्याच आहेत. शिवाय दंतरचना, गर्भधारणकाल, डोळ्यांतील गोलाकार बाहुल्या इत्यादि बाबतींतहि या त्रिवर्गांचें सादृश्य नजरेस येतें. यूरोपमधील कोल्ह्यांची उंची १५ इंच व लांबी जवळ जवळ २ फूट असते. यांच्या अंगावरील मऊ केस भुरट्या रंगाचे असतात पण पाठीवरचे मात्र काळे असतात. कोल्हे पृथ्वीवरील सर्व भागांत आढळतात. पण देशभिन्न-त्वाप्रमाणें यांच्यामध्येंहि थोडेंफार भिन्नत्व आढळून येतें. ईजिप्तमधील कोल्हा बराच मोठा असतो व त्याला ईजिप्शि-यन लांडगा अशा टोपण नांवानें संबोधण्यांत येतें. आफ्रिकेंतील कोल्हे निरनिराळ्या प्रकारचे असतात; कांहीं काळ्या पाठीचे असतात तर कांहीं ठिपक्याचे असतात व कांहीं भुरकट रंगाचे असतात हिंदुस्थानांतील कोल्हे ईजिप्तमधील कोल्ह्यांसारखे असतात. कोल्हे हे रात्रिंचर प्राणी आहेत. दिवसा ते झाडीमध्यें अगर इतर जागीं दडून बसतात. संध्या-काळ झाली की मग त्यांच्या झुंडीच्या झुंडी बाहेर पडतात. एकेक टोळी दोनशेंची सुद्धां क्वचित प्रसंगीं दृष्टीस पडते. रात्रीस या टोळ्या भक्ष्य शोधण्यासाठीं बाहेर पडतात. शेतामध्यें, बागेमध्यें अगर खेड्यांपाड्यांतहि भक्ष्यशोधनार्थ याची स्वारी होते. हरिण, मेंढ्या यांची देखील हे शिकार करतात. द्राक्षें, व इतर फळें यांची यांनां भारी आवड असते. वरीलपैकीं कांहींच भक्ष्य मिळालें नाहीं तर मग मेलेल्या जनावरांचें मांस अगर इतर मलयुक्त पदार्थ यांचाहि फन्ना उडवण्यास हे मागेंपुढें पहात नाहींत. कोल्ह्याचें ओरडणें फारच कर्कश असतें. एखादा कोल्हा कर्कश आवाज काढूं लागला कीं जवळपास असणारे सर्व कोल्हे लगेच कर्कश आवाज काढूं लागतात. व हें ओरडणें रात्रभर चालूं असतें. "कोल्हेकुई" हा वाक्प्रचार यावरून पडलेला दिसतो. कोल्ह्यांच्या कांहीं जाती लवकर माणसाळतात. पण कांहीं कांहीं जाती अजीबाद माणसाळत नाहींत. पण माणसाळ-लेले कोल्हे देखील कुत्र्याप्रमाणें आपल्या धन्यावर प्रेम करीत नाहींत. कोल्ह्याची जात ही कुत्र्याप्रमाणें इमानी नसते. यांची जात धूर्ततेबद्दल व लुच्चेगिरीबद्दल फार प्रसिद्ध आहे. पण जात्या हे फार भित्रे असतात. त्यांच्या जिवावर प्रसंग बेतला कीं ते मरून पडल्याचें सोंग आणतात. निरनिराळ्या अडचणींतून हरएक युक्ति योजून पार पडण्याची कला यांनां उपजतच आहे. अशा प्रकारच्या चातुर्याच्या गोष्टी सर्व देशाच्या वाङ्मयांत आपल्याला आढळून येतात. इसॉपच्या गोष्टींत याला प्रामुख्यानें स्थान दिलेलें आढळतें. आपल्या इकडेहि पंचतंत्रांत कोल्ह्याच्या धूर्तपणाची गोष्ट आढळते. कोल्हा याला वेदांत क्रोष्टृ म्हणजे गळा काढून रड-णारा असें नांव दिलें आहे. हे रानडुकराप्रमाणेंच स्वभावतः भित्रे असतात असें ऋग्वेदांत (१०. २८, ४) म्हटलेलें आहे. हा प्राणी शवभक्षक आहे असें अथर्व-वेदांत (११. २, २) म्हटलेलें आढळतें. बौद्धवाङ्मयांत शृगाल-सुत्त नांवाचें सूक्त आढळतें. कोल्ह्यामध्यें ६० ते ६५ दिवस गर्भधारणेचा काल आहे. त्यानंतर साधारणतः एप्रिल महिन्यांत प्रजोत्पत्ति होते. कोल्ह्याचीं पिलें फार चपल व खोडकर असतात. कोल्ह्याचें वयोमान साधारणतः १४।१५ वर्षांचें असतें. आपल्या पिलांची जोपासना कोल्हे फारच काळजीपूर्वक करतात असें नजरेस आलें आहे. हिंदुस्थानांत व इतर देशांतहि कोल्ह्यांची शिकार कर-ण्याचा प्रघात पूर्वीपासूनच आहे. शिकारी कुत्र्यांच्या साहा-य्यानें शिकारी लोक कोल्ह्याची शिकार करतात. तशांत कोल्हे हे स्वभावतः धूर्त व कावेबाज असल्यानें ते लवकर सांपडतच

नाहींत व त्यामुळें शिकारीला फारच मजा येते असें म्हणतात.

कोल्हाटी—मुंबई इलाख्यांत याची वस्ती महाराष्ट्र, कर्नाटक, कानडा, कुलाबा व ठाणें या भागांतून आहे. १९०१ मध्यें यांची संख्या ४६११ होती; पैकीं बायका २६८९ होत्या. कर्नाटकांत यानां डोंबारी म्हणतात व अहमदनगर जिल्ह्यांत खेळकरी असें यांचें नांव आहे. तथापि डोंबाऱ्यांनां कोल्हाटयांपेक्षां हलक्या दर्जाचें मानण्यांत येतें. अनेक जातींतून या जातींत भरती होत असते. व बहुधा स्त्रियांच्या वेश्यावृत्तीवर कोल्हाटयांचा निर्वाह आहे.

मराठी गुजराथी, डुकरे किंवा पोटरे, पाळ किंवा काने, हरका, वले किंवा वलियर (महार डोंबार), गोपलगणी, अरे व मुसुलमान या पोटजाती कोल्हाटयांत आहेत. जातीजातींत लग्नव्यवहार होतो. या पोटजाती निरनिराळ्या भागांत रहातात.

कोल्हाटी किंवा डोंबारी हे लोक अतिशूद्रातच गणता येतील. ह्यांचा मूळ पुरुष नट, त्यास 'कोला' असें टोपण नांव होतें. व त्यावरून त्याच्या वंशजांस कोल्हाटी ही संज्ञा पडली आहे. बारशी तालुक्यांतील माणकेश्वर हें त्यांचें मूल वसतिस्थान होय. परंतु हे लोक एके ठिकाणीं असे क्वचित रहातात. ते फिरस्ते असून गांवाबाहेर चटयांच्या झोंपड्यातून मुक्काम करतात. त्यांच्या भार्षेत मराठी व गुजराथी ह्यांचें मिश्रण आहे. ह्यांचीं उपनांवें, अंधारे, जाधव, पवार आणि सांकेश्वर अशीं असून ह्या सर्व कुटुंबामध्ये रोटीबेटीव्यवहार चालतात. दोरावरून चालणें, नाचणें, गाणें, कोल्हाटया मारणें, शिंगांच्या फण्या, चाकें व फडक्याच्या बाहुल्या करणें हे ह्या लोकांचे धंदे होत. ह्यांची चालचलणूक वाईट असते. पुष्कळ स्त्रिया कसबीणपणा करून रहातात; व तसे करण्यास त्यांस जातीची संमतीहि मिळते. मुलगी वयांत आली म्हणजे कसबीण किंवा घरधनीण होणें ह्या दोहोंपैकीं एक मार्ग तिला पतकरण्यास सांगतात. आपल्या आईबापांच्या संमतीनें घरधनीण होणें हें जर पसंत असलें तर ती तसें सागतें. म्हणजे तिचें लग्न करून तिजवर सक्त नजर ठेवितात. पण तिनें जर कसबीण होण्याची आपली खुषी दर्शविली तर तिला जातिबांधवांच्या पंचायतीपुढें आणून रुजू करतात. ती पंच लोकांस एक मेजवानी देते, व त्यांच्या संमतीनें कसबीण ठरविली जाते ! असें झालयावर तिच्याशीं जातिबांधवांचा अन्नपानादि व्यवहार तुटतो. तथापि कालगतीनें तिचा कसबिणीचा धंदा चालेनासा झाला म्हणजे तिचा परामर्ष घेतात. लग्न करणें झाल्यास मुलीच्या बापास मुलाच्या बापानें १०० पासून २०० रु. पर्यंत हुंडा द्यावा लागतो. इतका हुंडा देण्याचें सामर्थ्य नसल्यास दोन कुटुंबांत परस्पर बेटीव्यवहार (साटेलोटें) करितात.

लग्नांत मागणी, हळद, देवकार्य, गडगनेर, तेलसाडी व लग्न हे मुख्य विधी होत. विधवेला तिसऱ्यांदा लग्न करावयाचें झाल्यास लग्नाच्या वेळेस जवळ एक कोंबडा घेऊन बसावें लागतें. प्रथम रुइशीं विवाह करून मग प्रथम वरानें विधवेशीं विवाह केलेला चालतो. घटस्फोटाला या जातींत परवानगी नाहीं. पुणें जिल्ह्यांत एखाद्या कोल्हाटणीनें जर व्यभिचार केला तर तिचे केस व नवऱ्याच्या मिशा व केस काढून टाकावयास लावितात व सोनें तापवून त्याच्या जिभेला डाग देतात. नवराबायकोंचें पटत नसल्यास नवरा कांहीं रक्कम घेऊन बायकोवरील हक्क सोडून देतो.

महादेव व मारुति यांची कोल्हाटी पूजा करितात; खंडोबा मरीआई, भैरोबा, जानाई, जोखाई, म्हसोबा वगैरे ग्रामदेवतांनां भजतात. मृतांना पुरतात व त्याचें और्ध्वदेहिक विधी करतात.

यांच्यांतील पुरुष व बायका कसरत व भिक्षा यावर उपजीविका करितात. बहुतेक स्त्रिया वेश्याचार करितात. उच्च वर्गातील मुली पळवून आणून त्यांनां वेश्या बनवितात. गोपालगणी कोल्हाटिणी पुरुषांनां फार मोहून टाकतात अशी ख्याति आहे. त्या याकरितां उत्तम मुली निवडून काढितात. त्यांनां सोनचेडी म्हणतात. पुणें जिल्ह्यांत कांहीं कोल्हाटयांनां पेशव्यांकडून इनामें मिळालीं आहेत.

वऱ्हाडात या जातीचे दोन भेद आहेत. एकाचें नाव डुकरकोल्हाटी व दुसऱ्याचें खाम किंवा पालकोल्हाटी. पहिल्या वर्गाचे लोक रानडुकरें पुष्कळ उपद्रव देऊं लागलीं म्हणजे त्यांस भाले टोंचून मारतात. हे मोठमोठे दरवडे घालतात पण गुरें चोरीत नाहींत. खामकोल्हाटी फारच आळशी आहेत हे फण्या करतात व आपल्या बायकांच्या वेश्यापणावर निर्वाह करतात. हे लोक मोठ्या मेळ्यांतून लहान झोंपड्या बांधून आपल्या बायकांस नटवून झोपडीच्या दारावर बसवितात व स्वतः कोठेंतरी झोपडीच्या पाठीमागें असतात. डुकरकोल्हाटी गांवांत राहून वेश्यापण करतात. याच्यांत मरेठी, वांसवेडिया, सुवरवाले, व मुसुलमान कोल्हाटी असे चार वर्ग आहेत. परस्परांत अन्न किंवा लग्नव्यवहार नाहीं. यांच्यांत कोणाचाहि प्रवेश होतो. यांचें लग्न वऱ्हाडांत वधुवरांस नवीं वस्त्रें नेसवून जातींतल्याच नाचणाऱ्या तरुण मुलीकडून नाच करवून व मंडळीस दारू पाजून होतो. विलासपुरांत तर हिंदुविधीनें लग्नें होतात. यांच्यांतले सुंदर व नाजूक लोक मुसुलमान होतात. हे प्रेतें जाळतात किंवा पुरतात. जमल्यास तिसऱ्या दिवशीं मयताच्या अस्थी गोळा करून एका सलीत्यांत भरून गाढवावरून मिरवितात आणि कोल्हाटणी त्याच्यासमोर नाचत जातात आणि समारंभानें त्या कोठें तरी पुरून त्यांवर थडगें बांधतात व त्यास शेंदूर फासतात. यांच्या जातींत

पुरुषांपेक्षां बायका पुष्कळ आहेत. व्यभिचारिणी बायकाकडून कांहीं दिव्यें करवून त्यांनां दोषी किंवा निर्दोषी ठरवितात. डुकरकोल्हाटी रानडुकरें भाल्यानें मारण्यांत फार कुशल व शूर आहेत पण ते कधीं कधीं डुकरें मारण्याच्या मिषानें चोऱ्या मात्र करतात.आणि आपल्या हा बायकांच्या जारांजवळ हे चोरीचा माल लपवून टेवतात. हा जार बहुधा पाटील किंवा कोणी तरी श्रीमंत शौकीनच असतो. लहान मुलांस व मुलींस नाचणें व कसरत करणें शिकवितात. मुंबई इलाख्यांत उच्च जातींच्या मुली चोरून पळवितात व त्यांस वेश्या बनविण्याकरितां विकतात किंवा बाळगितात. [एन्थोवेन,रसेल व हिरालाल; अलोनि–लग्नविधि व सोहाळे].

कोल्हाण–बिहार-ओरिसा इलाख्यांतील सिंगभूम जिल्ह्यांतील सरकारी इस्टेट. कोल्हाणचें क्षेत्रफळ१९०१ सालीं१९५५ चौरस मैल होतें. कोल्हाणचा प्रदेश उंचसखल असून दक्षिणेस कांहीं ठिकाणीं त्याची उंची समुद्रपृष्ठभागापासून ७५० फूट, तर कांहीं ठिकाणीं १००० फूट आहे. उत्तरेस व पूर्वेस मात्र हा प्रदेश बराच सपाट आहे. या प्रदेशांत पुष्कळ संपन्न खेडीं असून या प्रदेशांतील जमिनींत तांदूळ, खाद्यधान्यें, डाळ इत्यादि जिन्नस पिकतात. या प्रदेशाचा आग्नेय भाग खडकाळ असून यांत जंगल आहे. पश्चिम व नैर्ऋत्य भागांत टेंकड्या असून या ठिकाणींहि पुष्कळ जंगलें आहेत. या ठिकाणची वस्ती अर्थात् फार पातळ आहे. या भागांतील खेडीं झोपडया झोंपड्याचीं मिळून झालेलीं आहेत. या प्रदेशांत हो जातीचे लोक राहतात. १८०० च्या सुमारास या प्रदेशांत छोटानागपूरमधील लुटारूंच्या टोळ्या आश्रयास येत असत. हो लोकहि आपल्या शेजारच्या प्रदेशांत लुटालुटी करीत असत व त्यामुळें पोराहाटच्या राज्याला व सिंगभूमच्या उत्तरेस असलेल्या छोटया संस्थानांनां यांचा फार उपद्रव होत असे. यांचा बंदोबस्त करण्यासाठीं ब्रिटिशसरकारनें या संस्थानिकांनां मदत करण्याचें कबूल केलें. पण तेवढ्यानें निभाव लागेना. तेव्हां यांच्या बंदोबस्ताचें काम ब्रिटिशसरकारनें स्वतः आपल्याकडेच घेतलें. कर्नल रिचर्डनें आपलें सैन्य या भागांत नेऊन हो लोकांना जेरीस आणलें; व त्यांना शरण येणें भाग पाडलें. त्यानंतर सिंगभूमसंस्थानांतील २० परगणे व मयूरभंज संस्थानांतून चार परगणे वेगळे या चोवीस परग यांचा एक स्वतंत्र भाग बनविला. यालाच कोल्हाणचा प्रदेश असें नांव आहे. १८५७ च्या बंडांत पोराहाटच्या राजाला या प्रदेशांतील हो लोक इंग्रजाविरुद्ध जाऊन मिळाले. पण पुढें १८५९ मध्यें या राजाचा व या लोकांचा इंग्रजांनीं पराभव केला.

या प्रदेशांतील खेड्यांचे लहानमोठे संघ बनविण्यात आले आहेत.प्रत्येक संघावर एक मुंडा अगर पाटील हा अधिकारी असतो;व अशा खेड्यांच्या संघावर एक माणकी अगर तालुकापाटील असतो. प्रत्येक मुंड्याला आपल्या खेडयाचा वसूल गोळा करावा लागतो व आपल्या खेड्यांतील गुन्हेगारांची पाळत राखून त्यांनां पकडण्याची जबाबदारी असते. या त्यांच्या कामगिरीबद्दल मुंडयांनां वसुलापाठीमागें १६ टक्के व माणक्यांना १० टक्के कमिशन मिळतें. प्रत्येक मुंड्याला जातींतील व इतर तंटेबखेडे मिटविण्याचा अधिकार दिलेला आहे. पण हो जातीहून भिन्न अशा लोकांमधील तंट्याची व्यवस्था करण्याचें काम डेप्युटी कमिशनराच्या परवानगीशिवाय मुंड्यांनां करता येत नाहीं. या प्रदेशाची मोजणी १८९७ सालीं झाली;व या प्रदेशाचा वसूल१,७७,००० व्हावा असें ठरलें. त्यांत ४९,००० रुपये मुंडे, माणकी व तहशीलदार ऊर्फ कारकून यांच्या पगारासाठीं तोडून देण्यांत आले. या प्रदेशांतील ५२५ चौरस मैल जमीन १९०३–४ सालीं पेरण्यांत आली होती. सिंगभूम जिल्ह्याचें मुख्य ठिकाण चैबास या प्रदेशाच्या हद्दींत असून त्यांतील जमिनीची आकारणी निराळी करण्यांत आली आहे.

कोल्हापूर, संस्थान.—हें मुंबई इलाख्यांतील दक्षिणमहाराष्ट्र संस्थानांपैकीं एक मराठी संस्थान आहे. याचें क्षेत्रफळ ३२१७ चौरस मैल आहे.

सीमा—कोल्हापूर संस्थानच्या उत्तरेस वारणा नदी आहे. पूर्वेस कृष्णानदी व दक्षिणेस बेळगांवचा जिल्हा आहे. पश्चिमेस सह्याद्रिपर्वत व रत्नागिरी जिल्हा आहे.

स्वरूप—कोल्हापूर संस्थानच्या टापूंत महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रांतांतील थोडा थोडा देश आहे. दख्खनच्या सपाट प्रदेशापैकीं कोल्हापूर संस्थान ही एक वांकडीतिकडी पट्टी आहे. ही पट्टी सह्याद्रीच्या शिखराच्या पूर्वेस उत्तरदक्षिण ६५ मैल व पूर्वपश्चिम ८ पासून ५० मैलांवर आहे उत्तरेस सुमारें. ८ पासून १२ मैल रुंदीची पट्टी सह्याद्रीच्या बाजूनें १६ मैल लांबीची आहे. पुढें ती पूर्वेस पसरत जाऊन तिची रुंदी सुमारें ५० मैलपर्यंत वाढली आहे. व असा प्रदेश दक्षिणेस सुमारें १६ मैलांपर्यंत आहे. पुढें पुन्हां चिंचोळी होऊन दक्षिणटोंकापासून १० मैलांपर्यंत रुंदी ३०–४० मैलपर्यंत आहे. आणि तेथून सह्याद्रीच्या पूर्व बाजूस रुंदी सारी १६ मैल अगदीं दक्षिण टोंकांपर्यंत आहे. कोल्हापुरच्या सृष्टिसौंदर्यांत तेथील डोंगर हे मुख्य होत. त्यांत उत्तरदक्षिण सुमारें १०० मैल असलेला सह्याद्रीपर्वत हा मुख्य होय. यापासून थेट ईशान्येस, थेट पूर्वेस सुमारें ५० मैल जाणारे त्याचे सहा फांटे आहेत. सह्याद्रीचा देखावा जंगली पण रमणीय आहे. पायथ्याजवळच्या उतरणीवर व दऱ्यांत दाट झाडी आहे. पर्वताच्या माथ्यामधून सुळक्यांसारखीं उंच शिखरें आहेत. या शिखरापैकीं कित्येकांवर मोठे दुर्घट असे किल्ले बांधलेले आहेत. कोल्हापूर प्रांताच्या सरहद्दींत सह्याद्रीच्या शिखरावर किंवा त्याच्या नजीक असलेले ९ पहाडी किल्ले आहेत. ते म्हणजे प्रचीतगड, बाहिरगड महिपतगड, विशाळगड, शिवगड, भैरवगड, रांगणा उर्फ प्रसिद्धगड, वाडीमाचाळ व बावडा हे होत. कोल्हापूरच्या हद्दींत सह्याद्रीपासून खालीं कोंकणांत उतरण्याचे सुमारें ९०

घांट आहेत. त्यांपैकीं उत्तरेस आंबाघांट, मध्यभागीं फोंडाघाट व दक्षिणेस अंबोलीघांट हे तीन मात्र गाड्या जाण्यायेण्याजोगे चांगले बांधलेले आहेत. याशिवाय आणखी १४ घांट ओझीं वाहणारीं जनावरें येण्याजाण्याजोगे आहेत व बाकीचे थोडेसे दुर्घट असे रस्ते आहेत.

सह्याद्रीच्या पूर्वेस व ईशान्येस ज्या शेंकडों टेकड्या आहेत त्यांत सह्याद्रीचे सहा मोठे फांटे पूर्वेस व ईशान्येस ३० ते ५० मैलांपर्यंत कोल्हापुरच्या हद्दींत आले आहेत. या टेकड्यांच्यामुळें या प्रांताचीं सहा मुख्य खोरीं बनलीं आहेत. या टेकड्यांच्या माथ्यांवर कित्येक ठिकाणीं उंच शिखरें व सुळके आहेत व त्यावर कोठें किल्ले व कोठें देवस्थानें आहेत. या टेकड्यावर पन्हाळगड, पावनगड, विशाळगड यांसारखे किल्ले व जोतीबा, शिदोबा, धुळोबा, अलंप्रभु, रामलिंग इत्यादि देवळें आहेत.

कोल्हापूर प्रांतांत एकंदर लहानमोठ्या मिळून आठ नद्या आहेत त्या बहुतेक पूर्ववाहिनी आहेत. यांपैकीं मुख्य नदी कृष्णा ही असून ती कोल्हापूर प्रांताच्या ईशान्यसरहद्दीवरून सुमारें २५ मैलपर्यंत वाहात गेली आहे. याशिवाय वारणा, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी, घटप्रभा व मलप्रभा याहि नद्या या प्रांतातून वहात गेल्या आहेत. कासारी, कुंभी, तुळशी, भोगवती व सरस्वती (ही गुप्त आहे) अशा पांच नद्या एकत्र मिळून ही पंचगंगा नदी झाली आहे. या सर्व नद्यांना ज्यावेळीं पावसाळ्यात पूर येतो त्यावेळीं या नद्यांमधून नावा चालू शकतात; पण उन्हाळ्यांत मात्र यांतून नावा चालत नाहींत.

कोल्हापूर संस्थानात पाण्याचा पुरवठा एकंदरींने चांगला आहे. जमिनीच्या पृष्ठभागाखालीं २०।२५ फूट पाण्याचे झरे बहुतेक सर्व भागीं लागतात. एकंदर १२।१५ हजार विहिरी कोल्हापूर संस्थानांत आहेत. तसेंच यात जवळजवळ १२५ तळीं आहेत. त्यांपैकीं रंकाळें, पद्माळें, अतिग्रें व रायबाग हीं मोठीं तळीं अगर तलाव आहेत. सर्वांत मोठा तलाव रंकाळ्याचा होय. हा तलाव कोल्हापूर शहरांत आहे. याचा परीघ जवळ जवळ ३ मैलांचा असून त्याची खोली साधारण ३३ फूट आहे.

भूस्तरः कोल्हापूरच्या दक्षिणेस मात्र रेताड व गारेच्या दगडांच्या कांहीं शिरा आहेत. बाकी सर्व प्रांत दक्षिणेंतील ट्रापच्या मोठ्या प्रदेशाच्या क्षेत्रांत येतो. या ट्रापच्या बसाल्ट, अभिगुलाइट्राप, कणदारट्राप व चिकण मातीचा ट्राप अशा चार जाती आहेत. कोल्हापूरच्या दक्षिण भागांत ट्रापची जाडी २००० ते २५०० फूटपर्यंत आढळते. सह्याद्रीच्या पश्चिम भागांतील कड्यांमध्यें या ट्रापचे थर दृष्टीस पडतात. फोंडा व अंबोली घाटांत हे थर बऱ्याच जाडीचे आहेत व त्यांवर लोहमिश्रित मातीचे थर आढळतात.

हवाः—कोल्हापूर हें संस्थान समुद्रसपाटीपासून जवळजवळ १८०० फूट उंच असल्यानें येथील हवा साधारणपणें समशीतोष्ण असते. सह्याद्रीच्या घाटमाथ्यांत झाडी पुष्कळ असल्यामुळें व त्याठिकाणीं पाऊसहि पुष्कळच पडत असल्यानें त्या भागांतील या प्रांताची हवा थंड असते. पण इतर भागांत पाऊस बेताचाच असतो. पावसाळा जून ते आक्टोबरपर्यंत असतो व यावेळीं पावसाचें प्रमाण सरासरी ४० इंच असतें. बावडा येथें पावसाचें प्रमाण पुष्कळ म्हणजे २०७ इंच आहे तर शिरोळ येथें अवघें २१ इंचच आहे. कोल्हापुरास पावसाचें प्रमाण ३८ इंच असून अजऱ्यास ७७ इंच आहे. उन्हाळ्यांत देशावरील हवा बरीच उष्ण असते व अशा वेळीं डोंगरावरील किल्ल्यांमधील हवा बरीच गार व सुखदायक असते. नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत हिंवाळा असतो.

खनिज पदार्थः—सह्याद्रीचे कोल्हापूरच्या हद्दींत जे फाटे गेलेले आहेत त्यांत इतर प्रकारच्या दगडांशीं मिसळलेले असे लोखंडाचे दगड सांपडतात.या दगडांपासून लोखंड काढण्यांत येतें. याशिवाय या प्रांतात इमारतीला लागणाऱ्या दगडांची समृद्धि आहे. दक्खन हा टापू ट्राप दगडांनीं युक्त असल्यानें कोल्हापूर प्रांतांतहि या दगडांचें वैपुल्य असावें यांत नवल नाहीं. ट्राप म्हणजे काळ्या अगर करड्या रंगाचे दगड. अजरें व तोरगल परगण्यांत तांबूस पांढऱ्या रंगाचा ग्रानाइट दगडांचा उपयोग करतात. तसेंच या प्रांतांत बहुतेक सर्व ठिकाणीं चांगला मुरूम सापडतो. या मुरुमाचा खडींचे रस्ते करण्याच्या कामीं चांगला उपयोग होतो. याशिवाय चुन्याचे दगड येथें खूप आढळतात. इमारतीच्या उपयोगाकरिता ज्या प्रकारची वाळू लागते तीहि या प्रांतातील नद्यांच्या व ओढ्यांच्या पात्रांत पुष्कळ आढळून येते.

लोकसंख्या.—कोल्हापूर संस्थानची लोकसंख्या १९२१ च्या खानेसुमारींत ८,३३,७२६ इतकी होती. त्यात ४,२८,५४३ पुरुष व ४,०५,१८३ स्त्रिया होत्या. या संस्थानांत ९ शहरें व १०६० खेडीं आहेत. १९११ सालीं लोकसंख्येपैकीं ३४३३४ लोक साक्षर होते.म्हणजे साक्षरतेचें प्रमाण जवळजवळ शेंकडा ४ (पुरुष ७.२, स्त्रिया ०.२) हें प्रमाण पडतें. १९०३–४ सालांत कोल्हापूर संस्थानात २५० शाळा होत्या. त्यांत एक हायस्कूल व एक टेक्निकल स्कूल होतें.

शेतकी—कोल्हापूर प्रांतांत काळी, तांबडी, मळी व खारी अथवा पांढरी अशा प्रकारच्या जमीनी आहेत. त्यांपैकीं काळी व तांबडी या जमिनी उत्तम प्रकारच्या आहेत. एकंदर लागवडीस आलेल्या जमिनीपैकीं तिसरा हिस्सा चांगली जमीन असून तींत बागाईत पिकें होतात. बाकीची जमीन मध्यम प्रकारची आहे. कोंकणघांटमाथ्यावरील जमीन अगदीं साधारण आहे. लागवडीस योग्य अशा २३५४ चौरस मैल एकरांपैकीं २०१९ चौरस मैल लागवड झालेली जमीन आहे. १९०३–४ मध्यें १५५ चौरस मैलांतच लागवड झाली. बाकीची जमीन पडित होती जिराईत जमीनींत खरीप आणि रब्बी अशीं दोन पिकें येतात.

जंगल—कोल्हापूर प्रांतांतील जंगलांचें क्षेत्रफळ सुमारें ५०० चौरस मैल आहे. त्यांत राखीव जंगल ३४१ व संरक्षित जंगल १८२ मैल आहे. या जंगलांत शिसवी, साग, खैर, किंजल, ऐन, हिरडा, जांभळ, करमळ, शेवरी इत्यादि पुष्कळ प्रकारची झाडें आहेत. यांची लांकडें इमारतीच्या कामाला उपयोगी पडतात.

गुरेंढोरें:—पाळीव जनावरांत, बैल, म्हशी, रेडे, घोडे, उंट, गाढवें, शेळ्या, बकरी, मांजरें व कुत्रीं हीं मुख्य होत. बैलांचे हुणम, सुरती, देशी असे तीन प्रकार आहेत. हुणम बैल उभ्या शिंगांचे, दिसण्यांत सुरेख, आकारानें मध्यम, बळकट व काटक असतात. सुरती बैल हुणम बैलांपेक्षां उंच असून ते हुणम बैलांइतके चपळ नसतात. मेंढरें बहुधा काळी, किंवा काळीं पांढरीं असतात. धनगर लोक दूध, लोणी, लोंकर आणि मांस मिळविण्याकरितां मेंढरें पाळतात. पूर्वीइतकीं हल्लीं या प्रांतांत जरी हिंस्र जनावरें आढळून येत नाहींत तरी वाघ, चित्ते, तरस, अस्वलें, डुकरें हीं अद्यापि कोल्हापूरच्या पश्चिमेकडील जंगलात आढळतात. कोल्हापूरच्या डोंगराळ प्रदेशात विषारी व दुसरे असे नाना प्रकारचे सर्प आढळतात.

व्यापार व दळणवळण:—कोल्हापूर प्रांतात तेल काढण्याच्या धंद्यांतलि प्रमुख पदार्थ करडी, तीळ, भुइमुग, आंबाडी हे होत. हे येथें पुष्कळ पिकतात. याशिवाय भांडीं करणें, विणकाम, लोंकरकाम, सुगंधी पदार्थ तयार करणें, बांगड्या, सोन्याचांदीचे दागिने इत्यादि धंदे या प्रांतांत चालतात. कोल्हापूर येथील स्त्रियांचा अलंकार 'कोल्हापुरीसाज' हा प्रसिद्ध आहे. गूळ, तंबाखू, कापूस, धान्य हे जिन्नस बाहेरदेशीं जातात; व साखर, नारळ, रेशीम, मीठ, गंधक इत्यादि माल बाहेरून येतो. कोल्हापूर, शाहुपुरी, वडगांव, इचलकरंजी, कागल, या मुख्य बाजारपेठा आहेत.

१८९१ पासून मिरज ते कोल्हापूर सदर्नमराठा रेल्वेचा फांटा सुरू झाला. हा फाटा कोल्हापूर संस्थानच्या मालकीचा आहे. याशिवाय या प्रांतातून मुख्यतः सहा सडका जातात. त्यांत पुणें ते बेळगावपर्यंत जाणारी सडक महत्वाची आहे. याशिवाय कोल्हापूरापासून रत्नागिरीपर्यंत, राजापुराकडे, इत्यादि चारपांच वाटा चांगल्या आहेत.

शासनपद्धति:—कोल्हापूर संस्थानांत, विशाळगड, बावडा, इचलकरंजी, हिंमतबहादूर, कागल, (मोठी पाती व धाकटी पाती), कापशी, सरलष्कर या सात जहागिरी असून, त्या त्या जहागिरदाराच्याकडून त्यांचा कारभार चालविला जातो. खुद्द कोल्हापूर संस्थानांत करवीर, पन्हाळा, आळतें, शिरोळ, गडहिंग्लज, भुदरगड हे सहा पेटे व चनवड, रायबाग व कटकोळ असे तीन महाल आहेत. या सर्वांचा राज्यकारभार कोल्हापूरचे महाराज, कोल्हापूर व दक्षिणमहाराष्ट्र जहागिरीवर देखरेख ठेवण्याकरितां नेमलेल्या पोलिटिकल एजंटच्या सल्यानें चालवितात. कोल्हापूरच्या महाराजांनां दिवाणी फौजदारीचे पूर्ण अधिकार आहेत. त्यानां फांशी देण्याचाहि हक्क आहे. पण ब्रिटिश नागरिकांच्या गुन्ह्यांचां इनसाफ पोलिटिकल एजंटच्या परवानगीशिवाय त्यांनां करतां येत नाहीं. १९०३-४ साली संस्थानांत सेशन्सजज्जापासून तो थर्डक्लास मॅजिस्ट्रेटच्या दर्जापर्यंतची एकंदर ६४ फौजदारी कोर्टे होतीं. मांडलिक जहागिरदारानां डिस्ट्रिक्ट जज्जाचे अधिकार व सात वर्षेपर्यंत शिक्षा देण्याचा अधिकार आहे. या संस्थानांत कोल्हापूर, नरसोबाची वाडी, इचलकरंजी, वडगांव, हातकलंगडें, शिरोळ, गडहिंग्लज, काटकोळ व मलकापूर या ठिकाणीं म्युनिसिपालिट्या आहेत. जमीनधाऱ्याची पद्धत तीन प्रकारची आहे; इनामी, शेरी व रयतवारी. इनामांपैकीं कांहीं बक्षीस म्हणून, कांहीं नोकरीबद्दल व कांहीं देवस्थान इनाम आहेत. सरकारी जमीनी सर्व महाराजांच्या ताब्यांत असतात व त्या खंडानें देण्याचें काम रेव्हेन्यू अधिकाऱ्याकडे असतें. रयतवारीचे मिराशी, उपरी व चालखंड असे तीन पोटभेद आहेत. संस्थानांतील जमीनीचा महसूल गोळा करण्याकरितां एक मुख्य अधिकारी नेमला असतो. तांदुळाच्या पिकापाठीमागें दर एकरी ५ रु. एक आण्यापासून १० रुपये पर्यंत, बागायती जमीनीस एकरामागें ८-१० रु. व कोरडया जमीनीमागें दर एकरी १ ते चार रु. चार आणे सारा द्यावा लागतो. १९०३-४ मध्यें संस्थानचें एकंदर उत्पन्न ४४ लक्ष झालें. त्यापैकीं १२ लाख जमीनीपासून उत्पन्न झालें. खर्च एकंदरींत ४३लक्ष रुपये झाला. त्यापैकीं ३ लक्ष रुपये महाराजांच्या खासगी खर्चाकडे, ३ लक्ष पब्लिक वर्क्स खात्यावर व २ लक्ष लष्करकडे खर्च झाले. अफू, अबकारी खातें व मीठ यांच्यावर सरकारी ताबा आहे. १८३९ पासून कोल्हापूर संस्थानांत ब्रिटिश नाणींच प्रचलित आहेत. कोल्हापूरच्या महाराजांजवळ सुमारें ७०० ते ८०० लोकांचें लष्कर असतें. याशिवाय पोलिसांची संख्या ८०० ते ९०० आहे. कोल्हापूर येथें एक तुरुंग असून तेथें जवळ जवळ २५० कैद्यांची सोय होऊं शकते. याशिवाय संस्थानात १७ लहान तुरुंग आहेत. कोल्हापूर येथें पाऊस नेहमीं बरा पडत असल्यानें दक्षिण महाराष्ट्रांतील इतर ठिकाणांपेक्षां कोल्हापूर संस्थानांत दुष्काळाच्या फेऱ्या फार कमी होतात. दर दहा बारा वर्षांपाठीमागें सर्वसाधारण एकदां दुष्काळ पडतो असें दिसून येतें. दुष्काळ पडला असतांना दुष्काळग्रस्त लोकांसाठीं सरकारांकडून व्यवस्था करण्यांत येते. स्वस्त धान्याचीं दुकानें उघडण्यांत येतात. १८९६-१८९७ च्या दुष्काळात दुष्काळग्रस्त लोकांनां मदत म्हणून संस्थाननें जवळ जवळ ७ लक्ष रुपये खर्च केले. १८९९-१९०० या सालच्या दुष्काळांत ५१,००० रुपये खर्च केले.

इतिहास:—कोल्हापूरच्या इतिहासाचे प्राचीन हिंदू कारकीर्द (इ. स. १३४७ पर्यंत), मुसुलमानी कारकीर्द (१३४७-१७०० पर्यंत) व मराठी कारकीर्द (१७०० पासून आतांपर्यंत) असे तीन विभाग करतां येतील.

प्राचीन इतिहासः—कोल्हापूर अगर व संस्थान फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. १८ कोल्हापुरास खणीत असतां बौद्ध लोकांच्या ए देवळाचा अवशेष सांपडला. त्याच्या मध्यभागीं ए चौरस दगडी पेटी सांपडली. तिच्या चौकोनी झा आंतल्या बाजूस ख्रिस्ती शकाच्या पूर्वीच्या शतकांतील लिपींत, धम्मगुत्तानें ब्रम्ह यास दिले विषयीं लेख होता. याशिवाय कोल्हापुरास जीं त अगर शिशाचीं नाणीं सांपडलीं आहेत त्यांरूवनहि दिसतें कीं, ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांत नच्या उत्तरभागाचे जे शातकर्णी अगर आंध्रभृत्य राजे त्यांच्या वंशांतील कांहीं पुरुषांच्या व त्यांच्या प्र धीच्या अंमलाखालीं कोल्हापूर प्रांत होता व या रा पैकीं एकाचें नांव विळिवायकुर होतें. टॉलेमीनें ज्या व ओकूर राजांचा उल्लेख केला आहे तेच हे विळीवायकु होत असे डॉ. भांडारकर यांचें म्हणणें आहे. आंध्रभृत्या पासून ५०० च्या सुमारास कदंब राजांनीं हा प्रांत जिंकून घेतला असें दिसतें. पुढें पन्नास वर्षाच्यानंतर हा प्रांत पश्चिमेकडील चालुक्यांच्या ताब्यात गेला. चालुक्य राजांनीं या प्रांतावर शंभर सव्वाशें वर्षे आपला अंमल गाजविल्या-वर राष्ट्रकूटानीं या प्रांतावर राज्य केलें. पण पुन्हां चालुक्यांनीं हा प्रांत राष्ट्रकूटांकडून बळकावून घेतला. पुढें शिलाहार राजांनीं साधारण इ. स. ११८० पर्यंत या प्रांतावर राज्य केलें. हे शिलाहार राजे जैनपंथाचे असूनहि त्याची कुलस्वामिनी कोल्हापूरचीं महालक्ष्मी ही होती. या शिलाहार वंशांतील,जट्टिग, चंद्रादित्य, मारसिंह, भोज (पहिला) गंडरादित्य, विजयादित्य व भोज दुसरा या राजांनीं कोल्हापुरावर राज्य केलें. त्यांमध्यें दुसरा भोज हाच प्रसिद्ध राजा होऊन गेला. याच्या वेळीं याच्या राज्याचा विस्तार साताऱ्याच्या उत्तरेस शंभुमहादेव पर्वत आहे, तेथून ते कोल्हापूरच्या दक्षिणेस हिरण्यकेशी नदीपर्यंत होता. यानें आपल्या अमदानींत १५ किल्ले बांधले असें म्हणतात. त्यांपैकीं बावडा, भूदरगड, खेळणा, पन्हाळगड, पावनगड समानगड हे किल्ले कोल्हापूरच्या हद्दींत आहेत. दुसऱ्या भोजानंतर हा प्रांत देवगिरिच्या यादवांकडे आला. यादव वंशांतील दुसरा सिंघणदेव यानें भोजराजाकडून हा प्रांत जिंकून घेतला. हा ११६० मध्यें या प्रांतावर राज्य करीत होता असें तत्कालीन शिलालेखांवरून सिद्ध होतें. या देवगडच्या यादव वंशांतील राजानीं १५० वर्षांहून अधिक वर्षें राज्य केलें. पुढें या यादवांपासून मुसुलमान लोकांनीं हा प्रांत जिंकून घेतला.

मुसुलमानी कारकीर्द—इ. स. १३४७ पासून या प्रांताचा पूर्व भाग दक्षिणेंतील बहामनी राज्याच्या अंमलाखालीं आला. या वंशांतील दहावा राजा दुसरा अल्ला-उद्दीन १४३५ सालीं या प्रांतावर राज्य करीत होता. त्यानें प्रथमतः या प्रांताचा पश्चिम भाग जिंकण्याचें मनांत आणिलें पण त्याचा यत्न सिद्धीस गेला नाहीं. पुढें सुमारें पस्तीस वर्षांनीं दुसरा महमदशाहा बहामनी यानें महंमद गवान नांवाच्या आपल्या एका मुख्य सरदाराला खेळणा किल्ला घेण्यास पाठविलें. यानें अनेक युक्त्यांप्रयुक्त्या लढवून हा किल्ला काबीज केला; व या काबीज केलेल्या मुलुखावर कीश्वरखान नांवाच्या एका इसमास सुभेदार म्हणून नेमलें. पुढें कांहीं वर्षांनीं बहादुर गिलानी या एका सरदारानें कोल्हापूर व त्याच्या आसपासचा प्रांत बळकाबला. त्यामुळें महमदशाहा बहामनी याला त्याचें पारिपत्य करण्याचें काम अंगावर घ्यावें लागलें. महंमदशहाच्या बरोबर झालेल्या लढाईंत गिलानी हा मारला गेला व या प्रांताचें स्वामित्व ऐनउलमुल्ख गिलानीस देण्यांत आलें. पुढें १४९८ सालीं बहामनी राज्य मोडकळीस आलें त्या वेळीं तत्कालीन शूर सरदारांनीं मेळेल तेवढा प्रदेश आपल्या ताब्यांत आणला व अशा तीनें ते स्वतंत्र सरदार बनले. कोल्हापूर व आसपासचा ख मात्र विजापूरच्या सुलतानाच्या ताब्यात गेला. या तानाच्या वंशांतील दोघां इब्राहिमानीं पन्हाळगडच्या दीकडे लक्ष्य देऊन त्या गडाला मजबुती आणली.

मराठी अम्मल—:मराठी साम्राज्याचे संस्थापक श्री छत्रपति महाराज यानीं आपल्या राज्याची स्थापना ना या प्रांतांतील किल्ल्यांचा उपयोग करून घेण्याचें यांनीं अनेक कारस्थानें करून पन्हाळगड, पावन शाळगड, रांगणा इत्यादि किल्ले हस्तगत करून घेतले. तीनें हा प्रांत शिवाजी महाराजांच्या व त्यांच्या घरा-ताब्यांत आला. छत्रपती राजारामाच्या मरणानंतर ताराबाई इनें आपला पुत्र शिवाजी या बाल-राजास गादीवर बसविलें व पंत अमात्य, सेनापति व परशुराम त्र्यंबक यांच्या सहाय्यानें ती राज्यकारभार करूं लागली. पण पुढें १७०७ सालीं औरंगझेबाच्या मरणानंतर शाहु हा मोंगलांच्या कैदेंतून सुटून आल्यावर त्यानें सर्व राज्यावर आपला हक्क सांगितला. त्यामुळें या दोन वारस-दारामध्यें कलागती उपस्थित होऊन शेवटीं १७३० मध्यें या दोन घराण्यांमध्यें सलोख्याचा तह झाला. या तहान्वयें शाहूनें ताराबाईचा कोल्हापूरच्या मुलुखावरील हक्क मान्य केला. १७६० मध्यें राजारामाचा धाकटा मुलगा संभाजी मरण पावला. त्यामुळें राजारामाचा वंश खुंटला. तेव्हां त्याची वडील बायको जिजाबाई इनें आपल्या नवऱ्याच्या इच्छेप्रमाणें शिवाजीच्या घराण्याचा एक दूरचा वंशज खानवटचा शहाजी भोंसला याच्या मुलास दत्तक घेण्याचें ठरविलें. याला प्रथम पेशव्यांनीं आडकाठी आणली पण पुढें त्यांनीं रुकार दिला या दत्तक मुलाचें नांव शिवाजी असें ठेवण्यांत आलें व त्याच्या अल्पवयांत त्याच्या नांवानें जिजाबाईनें राज्यकाभार चालविला. या जिजाबाईच्या कारकीर्दींत या राज्यावर अनेक संकटें आलीं. कोल्हापूर

प्रांतांतील प्रजेचा बंडखोरपणा बेसुमार वाढल्यामुळें व तो ईस्ट इंडिया कंपनीला बाधक होऊं लागल्यानें, कंपनीनें कोल्हापुरकराच्या पश्चिम किनाऱ्यांवरील मालवण बंदरावर आपलें आरमार पाठविलें व मालवणचा किल्ला ताब्यांत घेतला. पुढें कोल्हापूरकर व कंपनीसरकार यांच्यामध्यें तहनामा होऊन त्यामुळें कोल्हापूर प्रांतांत इंग्रजी व्यापाऱ्यांनां व्यापार करण्यास सवलत मिळाली. कोल्हापूरकरांवर आपला दाब ठेवण्यासाठीं सुमारें ८०० स्वार ठेवतां येण्याजोगा सरंजाम देऊन पेशव्यांनीं कोल्हापूरच्या पूर्व सरहद्दीवर पटवर्धन जहागिरदाराची स्थापना केली. पुढें जिजाबाई मरण पावल्यानंतर, शिवाजी राजा हा अद्यापि अल्पवयी असल्यामुळें त्याच्यावतीनें दिवाण यशवंतराव शिंदे हे राज्यकाभार पाहूं लागले. पेशवे, पटवर्धन, इत्यादिकांनां कोल्हापूरकर हे नेहमीं त्रास देत. ते पेशव्याविरुद्ध निजाम, हैदर, टिपू, दादासाहेब पेशवे वगैरेंनां नेहमी सामील होते. पुढें इ. स. १७८२ मध्यें यशवंतराव मरण पावले. त्यानंतर रत्नाकरपंत आ[illegible] यांची दिवाणगिरीच्या कामावर योजना झाली. य[illegible] आपल्या अमदानींत सर्व बंडाळी मोडून कोल्हापुरांत व[illegible] वर्षें शांतता प्रस्थापित केली. पण ती पुढें फार वर्षें टि[illegible] नाहीं. कोल्हापूरच्या प्रजेचा पश्चिम किनाऱ्यांवरील लु[illegible]पणा अद्यापि मोडला नाहीं. नाना फडणवीस वारल[illegible] सर्वच मराठी राज्यांत अंदाधुंदी माजली होती. छोटे [illegible]गीरदार स्वतंत्र होण्याच्या प्रयत्नास लागले. त्यामुळें [illegible]पूरकरांनीं इंग्लिशाबरोबर तह करून त्यांनां मालव[illegible] व त्याखालील मुलुख दिला. इंग्रजांनींहि कोल्हा[illegible] त्यांच्यावर कोणी चाल करून आल्यास [illegible] कबूल केलें. हा तह इ. स. १८१२ च्या आक्टोबर महिन्यांत झाला. शिवाजी इ. स. १८१२ सालीं मरण पावला होता. त्याच्या पाठीमागें त्याचा ज्येष्ठ पुत्र संभाजी उर्फ आबासाहेब हे गादीवर बसले. यांचा स्वभाव फार शांत होता. यांच्या कारकीर्दींत पेशवे व इंग्रज यांच्यामध्यें युद्ध उपस्थित झालें. त्यावेळीं संभाजी महाराजांनीं इंग्रजांचा पक्ष धरिला. त्यामुळें इंग्रजांनीं चिकोडी व मनोली हे तालुके त्यांनां दिले. इ. स. १८२१ सालीं आबासाहेबांचा निर्दय रीतीनें वध झाला. त्यांच्यामागून त्यांचे कनिष्ठ शहाजी उर्फ बुवासाहेब हे गादीवर आले; हे बदफैली, साहसी व क्रूर असल्यानें प्रजेवर फार जुलूम होऊं लागला. आपल्या दुर्वर्तनामध्यें व चैनीमध्यें आडकाठी येऊं नये म्हणून त्यांनीं वाटेल तसे पैसे उकळण्यास सुरवात केली. कागलकर, इचलकरंजीकर यांसारख्या जहागिरदारांच्या जहागिरी उध्वस्त करून त्यांनां त्रास देण्यास त्यांनीं सुरवात केली. इंग्रजांच्या प्रदेशाला त्यांनीं त्रास देण्यास आरंभ केला तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं ब्रिटिशांनीं कोल्हापुरावर फौज पाठविली. पण कोल्हापुरकरांनीं त्या फौजेला तोंड न देतां ब्रिटि[illegible] करण्याचें कबूल केलें. तहान्वयें आपल्या ताब्यांगिरदारांनां व ब्रिटिशांच्या मुलुखाला कोणत्याहि [illegible]स न देण्याचें बुवा महाराजांनीं कबूल केलें. पण इंग्र[illegible]ज दूर होतांच महाराजांनीं पुन्हां पूर्वक्रम सुरू [illegible]ामुळें इंग्रजानां पुन्हां फौज पाठविणें भाग पडलें. १८२[illegible] च्या आक्टोबर महिन्यांत पुन्हां महाराजांनीं [illegible] तह केला व आपली फौज कमी करण्याचें मोठ्या [illegible]नें कबूल केलें. पण याहि तहान्वयें हातून वागणूक [illegible]्यामुळें पुन्हां इ. स. १८२९ सालीं नवा तहनामा [illegible]. व या नवीन तहनाम्यानें कोल्हापूरच्या राज्यावर [illegible] कारभारी नेमणें, त्या[illegible] कायम करणें, बडतर्फ करणें वगैरे सर्व अधिकार ब्रिटिश सरकारनें आपल्याकडे [illegible]ले. बुवासाहेब हे इ. स. १८३७ सालीं मरण पावले.

बुवासाहेबांच्या मागून त्याचे अल्पवयी चिरंजीव शिवाजी [उर्]फ बाबासाहेब यास गादीवर बसवून रीजन्सीमार्फत कोल्हापूरचा राज्यकारभार चालविण्यांत येऊं लागला. पण या अमदानींतहि दंगेधोपे होऊं लागल्यामुळें ब्रिटिश सरकारनें दाजी कृष्ण पंडित यांस कारभारी नेमलें. तरी पण याच्या कारकीर्दींत कांहीं गडकऱ्यांनीं बंडें केल्यामुळें व पंडित यास तुरुंगात टाकल्यामुळें ब्रिटिश सरकारनें फौज पाठवून तीं बंडें मोडलीं व मेजर ग्रॅहॅम यास कोल्हापूरच्या राज्यकारभाराची व्यवस्था पाहण्याकरितां कोल्हापूर येथें पोलिटिकल सुपरिंटेंडंट म्हणून नेमिलें. त्यामुळें कोल्हापूरचा राज्यकारभार पुन्हां सुरळीतपणें चालूं लागला. इ. स. १८६६ सालीं बाबासाहेब हे मरण पावले. तत्पूर्वी त्यांनीं आपल्या मांडीवर दत्तक घेतला होता. यांचें नांव राजाराम असें ठेवण्यात आलें. यांनां चांगलें शिक्षण मिळण्याची सरकारनें खबरदारी घेतली होती. पुढें हे यूरोपमध्यें प्रवास करण्यास गेले असतां परत येतांना त्यांनां वायूचा विकार जडून फ्लॉरेन्स शहरी त्यांचा अंत झाला.

राजाराम महाराजांनां औरस संतति नसल्यानें त्यांच्या वडील बायकोस दत्तक घेण्याची परवानगी मिळाली. दत्तक पुत्राचें नाव शिवाजी महाराज असें ठेवण्यांत आलें. इ. स. १८८२ सालीं हे भ्रमिष्ट झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यामुळें राज्यकारभारासाठीं एक रीजन्सी ठेवण्यांत आली. हे १८८३ सालीं मरण पावले यांनांहि औरस संतति नसल्यानें त्यांच्या बायकोनें दत्तक घेतला, व त्याचें नांव शाहु असें ठेवलें. हे अल्पवयी होते तोंपर्यंत कोल्हापूरचा कारभार रीजन्सीमार्फत चालविला जात असे. यांचा विवाह बडोद्याचे गणपतराव गायकवाड यांच्या नातीशीं झाला होता यांचें शिक्षण राजकोट येथील राजकुमार कॉलेजमध्यें फ्रेझर यांच्या देखरेखीखालीं झालें. इ. स. १८९४ सालापासून यांना मुखत्यारी मिळाली. यांनीं आपल्या कारकीर्दींत राज्यकारभार बरा चालविला. निकृष्ट वर्गांतील लोकांबद्दल यांनां फार सहानुभूति असे व ब्राह्मण वर्गाबद्दल तिटकारा असे. यांनां

२१ तोफांचा मान होता. हे १९२२ च्या मे महिन्यांत मरण पावले. त्यांच्या पाठीमागें त्यांचे ज्येष्ठ पुत्र राजाराम छत्रपति हे राज्यावर आहेत. यांनां के. सी. आय. ई. ही पदवी नुकतीच मिळाली आहे.

श ह र.—कोल्हापूर संस्थानची राजधानी. उ. अ. १६° ४१' व पू. रे. ७४° १७'. १९११ सालीं या शहराची लोकवस्ती ८९४८१ होती व हल्लीं या शहरांत चांगल्या इमारती झालेल्या आहेत. यांपैकीं कॉलेज, हायस्कूल, टेक्निकल स्कूल, दवाखाना या इमारती प्रेक्षणीय असून राजाराम कॉलेज व पांच हायस्कुलें येथें असून विश्वबंधु, ज्ञानसागर हीं वर्तमानपत्रें निघतात.

कोल्हापूर शहर दक्षिण काशी या नांवानें पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं पुष्कळ देवालयें आहेत. त्यापैकीं अंबाबाईचें देऊळ तर फारच भव्य व उत्कृष्ट आहे. त्यांत चार शिलालेख आहेत. पूर्वी हे धर्माचें क्षेत्र होतें असें म्हणतात. या शहराजवळच जें करवीर नांवाचें खेडें आहे तें पूर्वी संस्थानचें मुख्य ठिकाण होतें. पण पुढें कोल्हापूर हें राजधानीचें शहर बनलें.

याचें कोल्लापुरम् म्हणूनहि दुसरें नांव असून तें चोलाच्या इतिहासांत येतें. दुसरा राजेंद्र चोल यानें चालुक्यांवर स्वारी करून त्यांचा पराभव केल्यानंतर या गांवीं एक विजयस्तंभ उभारल्याचें (सुमारें १०६० त) एके ठिकाणीं नमूद केलेलें आहे [अय्यर—एन्शंट इंडिया]. कोल्हापूर शहराचा यापुढील इतिहास संस्थानच्या इतिहासांत अंतर्भूत झाला आहे.

कोवनो—हें शहर रशियांत आहे. येथें एक किल्ला असून हें याच नांवाच्या प्रांताचें मुख्य ठिकाण आहे. हे नेमेन व व्हिलिया या नद्यांच्या संगमावर असून लेलिनग्राड (पेट्रोग्राड = पीटर्स बर्ग) पासून ५५० मैलावर आहे. हें प्रशिअन सरहद्दीपासून ५५ मैल आहे. कोव्हेनोचा किल्ला पहिल्या प्रतीचा आहे. २॥ मैलाच्या अंतरावर ११ किल्ल्यांच्या वेढ्यानें ह्याचें रक्षण केलेलें आहे. येथील कारखान्यांत खिळे, तारेचें काम व दुसऱ्या धातूचीं कामें तयार होतात. हें शहर ११ व्या शतकांत वसविलें गेलें. १३८४ पासून १३९८ पर्यंत हें टयूटॉनिक सरदाराच्या ताब्यांत होतें १६५५ मध्यें रशियाच्या झारनें हें शहर लुटलें. या ठिकाणीं रशियन लोकांनीं पोल लोकांचा १८३१ च्या जूनच्या २६ तारखेला पराभव केला.

कोवेलंग.—मद्रास इलाख्यांत चिंगलपुट जिल्ह्यांतील चिंगलपुट नांवाच्या तालुक्यांतील एक खेडें. मद्रास शहरापासून दक्षिणेस वीस मैलांवर पूर्व किनाऱ्यावर वसलेलें आहे. प्रथमतः हें डच लोकांचें ठाणें होतें. पुढें ओस्टेंडच्या ईस्ट इंडिया कंपनीनें येथें एक वसाहत स्थापिली व किल्ला बांधिला. पण सध्यां कांहीं त्याचा मागमूस नाहीं. सन १७४४ ते १७४९ पावेतों कर्नाटकचा नबाब असलेल्या अन्वरुद्दीनखानच्या वेळीं बांधलेला पण सध्या मोडकळीस आलेला सादत बंदर नांवाचा किल्ला येथें आहे सन १७५० सालीं फ्रेंच लोकांनीं हें गांव मोठ्या युक्तीनें काबीज केलें. १७५२ सालीं क्लाइव्हनें ही जागा व किल्ला घेतला. पण त्यानें किल्ल्याचा तट सफा उडवून दिला. येथें मिठागरें पुष्कळ आहेत. येथून जवळच विड्याच्या पानांचे मळे आहेत.

कोश.—कोश याचा मूळचा अर्थ एखाद्या भाषेतील अक्षरानुक्रमानें अगर दुसऱ्या कोणत्या तरी ठराविक पद्धतीनें शब्दांचा संग्रह करून त्या शब्दाचें त्याच भाषेत अगर दुसऱ्या एखाद्या भाषेत विवरण करणारा ग्रंथ असा आहे. कोशामध्यें त्या त्या भाषेतील सर्व प्रकारच्या शब्दांचा भरणा असतो. प्रथमतः अशा प्रकारचे सर्व शब्द कोशांत देण्याची वहिवाट असे. पुढें जेव्हां भाषेमध्यें नवीन नवीन शब्दाचा अंदाजाबाहेर भरणा होऊं लागला, त्यावेळीं अशा सर्व शब्दाचें सांगोपांग रीतीने विवरण करणारा कोश करणें फार जड जाऊं लागलें. तेव्हां निरनिराळ्या विषयामधील शब्दाचा स्वतंत्र कोश करण्याची कल्पना उदयास आली. त्याप्रमाणें निरनिराळ्या विषयाला वाहून घेणारे स्वतंत्र कोश निर्माण होऊं लागले. बायबलचा कोश, तत्वज्ञानाचा कोश, स्थळांचा कोश असे कोश प्रत्येक भाषेंत निर्माण झाले. कोशाचें विस्तृत स्वरूप म्हणजे ज्ञानकोश होय. अशा प्रकारच्या ज्ञानकोशामध्यें सर्व महत्वाच्या विषयांची विस्तृत माहिती आलेली असते.

भा र ती य —भारतीय कोशकल्पनेचा उगम आपल्याला प्रथमतः निघंटुमध्यें पहावयास सांपडतो. धातुपाठ, उणादिसूत्रें, गणपाठ व लिंगानुशासन अशा क्रमानें कोशाला हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें आहे. निघण्टूमध्यें धातूंचाच विचार केलेला आहे तर कोशामध्यें केवळ नामें व अव्ययें यांचाच समावेश झालेला आढळतो. निघण्टूमध्यें वैदिक ऋचांचाच स्पष्ट उल्लेख आलेला आहे तर कोशामध्यें सर्वच वाङ्मयांतील शब्दाचा संग्रह केलेला आढळतो.

आज आपल्याला हिंदुस्थानांत जे प्राचीन कोश पहावयास मिळतात त्यांच्या रचनेचा हेतु, वैदिक निघण्टूच्या रचनेच्या हेतूहून भिन्न आहे असें दिसून येतें. वैदिक निघण्टु हा वैदिक ऋचांच्या स्पष्टीकरणार्थ रचिण्यांत आला, तर कवींनां काव्यरचनेला उपयोग व्हावा यासाठीं कोशांची कल्पना उदयास आली. काव्य व कोश यांचा फार निकट संबंध आहे. कवींच्या उपयोगासाठीं कोशरचना केल्याबद्दलचे उल्लेख कोशकार वारंवार करतात. बरेचसे कोश खुद्द कवींनींच निर्माण केले असल्याचें आपल्याला दिसून येतें. मुरारि, मयूर, बाण, श्रीहर्ष व बिल्हण या कवींनीं स्वतः स्वतंत्र कोश लिहिले आहेत. श्रीहर्षानें श्लेषोपयोगी शब्दांचा कोश लिहिला असून त्याचें नांव श्लेषार्थपदसंग्रह असें आहे. अमरकोशाचा कर्ता अमरसिंह हा

स्वतः कवीच होता. हे कोश बहुधा श्लोकांत लिहिलेले असत. या कोशांत सर्व शास्त्रांमधील शब्दांचा संग्रह केलेला असे. त्यामुळें कवीला मुद्दाम त्या त्या शास्त्राचा स्वतंत्र अभ्यास करण्याचें कारणच पडत नसे. शिवाय हे कोश बहुधा श्लोकांतच लिहिलेले असल्यामुळें ते पाठ करण्यास फार सोपे जात. असे भारतीय कोशांचे मुख्यतः दोन वर्ग पडतात. (१) समानार्थी शब्दांचा ज्यांत संग्रह केला आहे असा कोश, (२) अनेकार्थवाची शब्दाचा ज्यांत संग्रह आहे असा कोश. पण अशा प्रकारचे हे दोन भिन्न वर्ग जरी आहेत तरी बहुतेक कोशांत या दोन्ही वर्गांची सरमिसळ झालेली दिसते. कोशांमधील शब्दांची व्यवस्था मात्र निरनिराळ्या पद्धतींनें केलेली आढळते. ज्या वस्तूला पर्यायशब्द पुष्कळ असतील ती वस्तु अगोदर व जिला पर्यायशब्द कमी असतील ती वस्तु नंतर अशी पद्धत कांहीं कोशात आढळते, तर कांहीं कोशांत अक्षरविल्हे-वारीनें रचना केलेली दिसते. कांहींत अक्षरांच्या कमीअधिक संख्येवरून कोशांतील शब्दांची मांडणी करण्यात येते. पण बऱ्याच कोशांमध्यें या निरनिराळ्या पद्धती एकसमयाव-च्छेदेंकरूनच उपयोगात आणलेल्या दिसतात. अनेकार्थवाची शब्दकोशांत एक शब्द व त्याचे निरनिराळे अर्थ हे प्रथमा विभक्तींत दिलेले आढळतात, तर क्वचित् शब्दाने अर्थ सप्तमी-विभक्तींत दिलेले असतात. कांहीं कोशांत शब्दांचे अर्थ व शब्दांचीं लिंगें अशीं दोन्ही दिलेलीं आढळतात. कांहीं कोशांत लिंगानुशासन हें शेवटीं परिशिष्टांत दिलेलें दिसून येतें. क्वचित् प्रसंगीं लिंगांप्रमाणें शब्दांची मांडणी केलेली पहावयास सांपडते.

अगदीं प्राचीन कोश हल्लीं संपूर्ण असे उपलब्ध नाहींत. शिवाय खण्डशः का होईना जे उपलब्ध आहेत त्यांमध्यें शब्दांची मांडणी एका विशिष्ट पद्धतीनें झालेलीहि आढळून येत नाहीं. शब्दांचे अर्थ फार संक्षिप्त तऱ्हेनें दिलेले असतात. अगदीं प्राचीनातला प्राचीन कोश म्हणजे मध्य आशियांत काशगर येथें सांपडलेलें आठ पानांचें एक चोपडें होय. हें चोपडें संपूर्ण उपलब्ध नाहीं. या अपूर्ण चोपड्याचा कर्ता बौद्धधर्मीय असावा असें दिसतें. याशिवाय निरनिराळ्या ग्रंथांमधून जे उल्लेख आढळून येतात त्यांवरून पूर्वी पुष्कळ कोश असावेत असें दिसून येतें. काशिकेमध्यें नानार्थ कोशाचा उल्लेख आलेला आहे. याशिवाय कात्यायनाची नाममाला, वाचस्पतीचा शब्दार्णव, विक्रमादित्याचा संसारावर्त, व्याडीची उत्पलिनी, इत्यादि फार प्राचीन काळच्या कोशांची नांवें आपल्याला आढळून येतात. पण या सर्वांना मागें टाकणारा कोश म्हणजे अमरसिंहविरचित नामलिंगानुशासन ऊर्फ अमरकोश होय. हा अमरसिंह जरी बौद्धधर्मीय होता तरी अमरकोशांत बौद्ध नांवांचा म्हणण्यासारखा भरणा आढळून येत नाहीं. या अमरसिंहाचें विक्रमादित्याच्या दरबारांतील नवरत्नांमध्यें जरी नांव आलेलें आढळतें तरी त्यावरून त्याच्या कालाचा नक्की निर्णय होऊं शकत नाहीं. कालिदासाच्या काव्यांतून त्यानें बरेच शब्द घेतले आहेत. त्यावरून तो कालिदासानंतरचा असावा हें उघड होतें. हा बहुतेक सहाव्या ते आठव्या शतकाच्या दरम्यान झाला असावा असें दिसतें. अमरकोश हा समानार्थवाची शब्द-कोश असून त्याचीं तीन कांडें आहेत. पहिल्या कांडांत आकाश, देव,अंतरिक्ष, तारे, काल,नाद, भाषा, शब्द, गायन, नृत्य, पाताळ, सर्प, समुद्र, पाणी, इत्यादि शब्दाचे पर्याय-शब्द आले असून दुसऱ्या कांडात, पृथ्वी, नगर, पर्वत, अरण्य, वृक्षलता, प्राणी, मनुष्य, नातीगोतीं, रोग, अवयव वस्त्र, आभरण, वर्ण, जाति, धंदे इत्यादींच विवेचन आहे. तिसऱ्या कांडांत, विशेषणे, अन्वये, अनेकार्थवाची शब्दसंग्रह यांचा समावेश झाला आहे. अग्निपुराणांत जो कोशसदृश भाग आला आहे त्याची मांडणी अमरकोशासारखीच असून, अमरकोशावरूनच तो भाग उध्दृत करून घेतला असावा असें दिसतें. अमरकोशाच्या धर्तीवरच इतर कोशांची मांडणी झालेली आढळून येते. अमरकोशावर जवळ जवळ ५० टीका झाल्या, पण त्यापैकीं फारच थोड्या उपलब्ध आहेत. क्षीरस्वामीची टीका विशेष महत्वाची आहे. १५ व्या शतकात बृहस्पतिराय मुकुटमणि यानें अमरकोशावर फार मोठी टीका लिहिली. त्या टीकेच्या आरंभीं त्याने आपण ही टीका आपल्या अगोदर होऊन गेलेल्या १६ टीकांच्या आधारें लिहिला असें म्हटलें आहे व आपल्या टीका-ग्रंथांत त्यानें जवळ जवळ २७० ग्रंथ व ग्रंथकाराचा उल्लेख केला आहे.

या अमरकोशाला पुरुषोत्तमदेवानें त्रिकांडशेष नांवाची एक पुरवणी जोडली. या पुरवणीमध्यें बौद्धसंस्कृतवाङ्मय-यांतील महत्वाचे शब्द आलेले आहेत. शिलालेखात आढळणारे शब्द व प्राकृत शब्दहि या पुरवणींत आलेले आढळतात. याशिवाय याच पुरुषोत्तमदेवानें हारावली नांवाचा एक कोश लिहिला असून यात पूर्वीच्या पुरवणी कोशांतल्यापेक्षां देखील अधिक महत्वाच्या शब्दांचा संग्रह केलेला आहे. हा कोश लिहिण्याला आपणाला १२ वर्षें खपाव लागलें असें पुरुषोत्तमदेव म्हणतो. याचा काळ नक्की ठरवितां येत नाहीं; तरी पण महायानपंथाच्या भर-भराटीच्या कांळीं हा झाला असावा असें वाटतें.

अनेकार्थवाची शब्दकोशांत, शाश्वताचा अनेकार्थसमुच्चय हा कोश प्राचीन व महत्वाचा आहे. या कोशाची रचनाहि प्राचीन तऱ्हेची आहे. ज्या शब्दांच्या अर्थाला एक संबध श्लोक लागेल ते शब्द अगोदर; त्याच्या खालोखाल अर्धी ओळ ज्याला पुरेल असे शब्द, अशा तऱ्हेची विचित्र मांडणी त्याच्यांत आढळते. कोशाच्या शेवटीं परिशिष्ट असून अव्ययासंबंधीं एक स्वतंत्र प्रकरण आहे. शाश्वताच्या काळासंबंधीं नक्की कांहींच सांगतां येत नाहीं.

शाश्वताच्या खालोखाल दुसरा महत्वाचा कोश म्हटला म्हणजे हलायुधाचा अभिधानरत्नमाला हा होय. हलायुध हा दहाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला असावा. हा कोश फार छोटा असून त्याचे ९०० श्लोक आहेत. हलायुधानंतर सुमारें शंभर वर्षांनीं रामानुजाचार्यांचा समकालीन यादवप्रकाश यानें वैजयंती नांवाचा एक विस्तृत कोश लिहिला. हलायुधाप्रमाणेंच यादव प्रकाश हा दक्षिणहिंदुस्थानाचा रहिवाशी होता. या वैजयंती कोशात प्रथमतः अक्षराच्या कमी अधिक संख्येप्रमाणें शब्दांची मांडणी केली आहे. नंतर लिंगपद्धतीनें शब्दांची मांडणी केली असून, शिवाय प्रत्येक प्रकरणांत अक्षरविन्यासानें क्रम ठेवलेला आहे. हा कोश अत्यंत महत्वाचा आहे. यात पुष्कळच नवीन शब्दांचा भरणा झालेला आढळतो. १२ व्या शतकाच्या पूर्वार्धांत दिगंबर जैन पंथाच्या धनंजय कवीनें नाममाला नावाचा एक कोश लिहिला. ११११मध्यें महेश्वर कवीनें विश्वप्रकाश नांवाचा शब्दकोश लिहिला. विसाव्या शतकाच्या मध्यभागात मंखक कवीनें अनेकार्थकोश नांवाचा सटीक कोश लिहिला. त्यांत त्यानें हलायुध, अमरसिंह, शाश्वत, धन्वंतरी यांच्या कोशांचा आपण फायदा घेतला असें म्हटलें आहे. कोशांत भल्लट नांवाच्या काश्मीर कवीचा व हर्षचरिताचा वारंवार उल्लेख आलेला आढळतो. या कोशांत पुष्कळच नवीन शब्दांचा भरणा आलेला आहे. हेमचंद्रानें लिहिलेल्या कोशांविषयींहि पुष्कळच महत्व आहे. आपल्या व्याकरणाच्या ग्रंथाच्या पुरवणीखातर त्यानें हे कोश तयार केले. अभिधानचिंतामणि नाममाला हा समानार्थ शब्दांचा कोश आहे. या कोशाचे सहा भाग आहेत. पहिला भाग जैनदैवतात्मक असून दुसऱ्या भागांत ब्राह्मणधर्मांतील देवता, तिसऱ्या भागांत मानुषधर्म, चवथ्यात प्राणी, पाचव्यांत पाताळांतील प्राणी, सहाव्यांत भाववाचक नामें, विशेषणें, अव्ययें इत्यादिकांचा समावेश झाला आहे. याशिवाय प्रस्तावनेंत शब्दांच्या जातीसंबधानें विवेचन आलें आहे. या कोशावर स्वतःच हेमचंद्रानें टीका लिहिली आहे. त्याबरोबरच या कोशाला परिशिष्टेंहि बरींच आहेत. या कोशाला पुरवणीदाखल निघण्टुशेष या नावाचा ३९६ श्लोकांचा वनस्पतिविषयक एक छोटासा कोश हेमचंद्रानें लिहिला. अनेकार्थसंग्रह नांवाचा हेमचंद्राचा दुसरा कोश आहे. याचे सात भाग आहेत. त्यांपैकीं पहिल्या सहा भागात, नामें व विशेषणें यांचा समावेश असून सातव्या भागात अव्ययांचा संग्रह केला आहे. या कोशांतील शब्दरचना पद्धतशीर अतएव फार उपयुक्त अशी आहे. या कोशावर महेंद्रसूरी नामक हेमचंद्राच्या शिष्याची विस्तृत टीका आहे.

१२ व्या शतकाच्या अखेरीस अगर १३ व्या शतकाच्या प्रारंभीं केशवस्वामीनें नानार्थार्णवसंक्षेप नांवाचा कोश लिहिला. या कोशात शब्दांची मांडणी, अक्षरांच्या संख्येच्या क्रमानें, अक्षरक्रमानें व लिंगानुक्रमानें केलेली आहे. चौदाव्या शतकांत मेदिनीकार यानें लिहिलेला नानार्थशब्दकोश हा फार प्रसिद्ध कोश आहे. यालाच मेदिनी कोश अगर मेदिनी असें संक्षिप्त नांव आहे. वर सांगितलेल्या निरनिराळ्या कोशांशिवाय एकाक्षर कोश, द्विरूपकोश, त्रिरूपकोश तसेंच वनस्पतिविषयक व ज्योतिषविषयक असे पुष्कळ कोश आहेत. याशिवाय, बौद्ध संस्कृत ग्रंथाच्या स्पष्टीकरणार्थ त्यातील शब्दांचे कोशहि बरेच लिहिले गेले. या कोशांपैकीं महाव्युत्पत्तिकोश हा फार प्रसिद्ध आहे. या विस्तृत कोशात बुद्धाचीं सर्व नांवें आलीं असून, बुद्धधर्मांतील विशिष्ट संज्ञांचें स्पष्टीकरण आलेलें आहे. तसेंच या कोशांत शरीराचे अवयव, प्राणी, वनस्पती, रोग, सर्वनामें इत्यादींचा समावेश झालेला आहे. प्राकृत कोशातील सर्वांत प्राचीन कोश म्हणजे धनपालाचा पैयलच्छी नाममाला हा होय. हा २७९ त आर्यामध्यें रचिलेला आहे. हा कोश ९७२ सालीं लिहिला गेला. हा कोश धनपालनें आपली बहीण सुंदरी इच्छ्यासाठीं लिहिला. या कोशाचें नाव नाममाला असें जरी आहे तरी त्यामध्यें क्रियाविशेषणें, धातुसाधितें, अव्ययें इत्यादिकांचा संग्रह झालेला आहे. या ग्रंथाचा उपयोग हेमचंद्रानें देशीनाममाला कोशाच्या बाबतींत बराच करून घेतला. या देशीनाममाला कोशात अथवा देशी शब्द संग्रहात देशीशब्दांचा संग्रह केला गेला आहे. या देशी शब्दाचे हेमचंद्रानें तत्सम, तद्भव, व देश्य असे तीन भाग पाडले आहेत. हेमचंद्रानें आपल्या कोशांत विशेषतः देश्य म्हणजे संस्कृतीशीं ज्याचा कांहीं संबंध नाहीं अशा शब्दांचाच संग्रह केला आहे. या दृष्टीनें हा हेमचंद्राचा कोश अत्यंत महत्वाचा आहे. या कोशात त्यानें आपल्या पूर्वी झालेल्या प्राकृत कोशांचा उल्लेख केलेला आहे. पण ते प्राकृत कोश सध्या उपलब्ध नाहींत. या कोशावर हेमचंद्रानें स्वतःच टीका लिहिली आहे. प्राचीन पाली कोशांपैकीं, मोग्गलान यानें लिहिलेला अभिधानप्पदीपिका हा कोश तेवढा उपलब्ध आहे. हा ग्रंथ १२ व्या शतकाच्या अखेरीस लिहिला गेला असें दिसतें. हा ग्रंथ श्लोकबद्ध असून अमरकोशाच्या धर्तीवर आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं अमरकोशांतील उताऱ्यांचेंच बरोबर भाषांतर केलेलें आढळतें. अकबराच्या कारकीर्दींत कृष्णदासानें पारसीप्रकाश नांवाच्या पारशीसंस्कृत कोश लिहिला. शहाजहानच्या कारकीर्दींत वेदांगराय नावाच्या गृहस्थानें ज्योतिषविषयक शब्दांचा पारसीसंस्कृत कोश इ. स. १६४३ मध्यें रचिला; त्या कोशाचें नावहि पारसीप्रकाश असेंच आहे. क्षेमेंद्राचा लोकप्रकाश हा ग्रंथ धड कोशहि नाहीं व धड अर्थशास्त्रहि नाहीं. या ग्रंथापैकीं कांहीं भागाला कोश ही संज्ञा लावता येईल बाकीचा बहुतेक भाग व्यवहारोपयोगी माहितीनें भरलेला आहे. कोश संज्ञेला पात्र असलेल्या भागांतील शब्द व वस्तु याहि व्यवहारोपयोगी तेवढ्याच संगृहीत केल्या आहेत. या कोशात संस्कृत,

पारशी व देशी भाषांची खिचडी झालेली आढळते. या ग्रंथांत मुसुलमानी नांवें आलेलीं आहेत व शहाजहान बादशहाचें नांव वारंवार आलेलें आढळतें. कोशाच्या प्रस्तावनेंत क्षेमेंद्र हा आपल्याला व्यासाचा शिष्य म्हणवितो पण व्यास हें व्यासदासानें संक्षिप्त स्वरूप असावें असें दिसतें. हा व्यासदास म्हणजे ११ व्या शतकांतील क्षेमेंद्र होय. या क्षेमेंद्राच्या शिष्यानें क्षेमेंद्राच्या कोशामध्यें आपणांस वाटेल तसा फरक करून हा लोकप्रकाश रचिला असावा असें दिसतें. [विंटरनित्झ].

म रा ठीः—कोशाची कल्पना इतर वाङ्मयांप्रमाणें आपल्या मराठी वाङ्मयांतहि होती. इंग्रजी राज्य झाल्यावर मराठी भाषेचा कोश तयार करण्याचें काम सरकारनें अंगावर घेतलें. सरकारनें मोलस्वर्थ व मेजर कँडी यांची या कामीं नेमणूक केली व त्यांच्या मदतीकरतां एक शास्त्रीमंडळ दिलें. या शास्त्रीमंडळानें एक उत्कृष्ट मराठी कोश तयार केला व त्याच्या आधारें मोलस्वर्थ व कँडी यांनीं इंग्रजीमराठी कोश व मराठीइंग्रजी कोश हे तयार केले. हे कोश चांगले झाले आहेत. त्यानंतर रा. रानडे यांनीं इंग्रजी मराठी कोश तयार केला व तो त्याचा प्रयत्न बरा साधला आहे. पण चांगल्या लोकाश्रयाच्या अभावीं तो व्हावा तितका चांगला झालेला नाहीं. वासुदेव गोविंद आपटे यांचा शब्दरत्नाकरहि बरा झाला आहे. वास्तविक मराठीभाषेचा उत्तम कोश करण्याची आज वेळ आलेली आहे व मोठमोठ्या विद्वानांनीं मिळून हें काम केल्यास मराठी भाषेवर त्यांचे उपकार होतील असें म्हणावयास हरकत नाहीं.

शालिवाहनाच्या १२व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत मराठी भाषेंत जे कोश झाले आहेत त्यात अत्यंत जुना महानुभाव ग्रंथकारांनीं रचलेला मध्यकालीन मराठी शब्दांचा कोश होय. यांत जुन्या मध्यकालीन मराठी शब्दांना सुबोध प्रतिशब्द किंवा शब्दसमूह दिलेले आहेत. हा कोश पद्य नसून गद्य आहे. महानुभावांच्या कोशाहून किंचित अलीकडचा असा एक मराठी कोश रा. राजवाडे यांस मिळाला आहे. यात ज्ञानेश्वरींतील दुर्बोध म्हणजे मध्यकालीन शब्दांचे अकारविल्हानें मराठी प्रतिशब्द दिले आहेत. हा कोश सुमारें ३०० वर्षांचा जुना असून हा दोन चार स्थलीं याहून प्राचीन मराठी कोशाचा हवाला देतो. [प्राचीन मराठी कोशाचा हा उल्लेख खरा असावा असें समजण्यास एक प्रमाण आहे. हेमाद्रीच्या रघुवंशाच्या टीकेंत (नंदर्गीकराची रघुवंशाची आवृत्ति पहा) कित्येक संस्कृत शब्दांनां सार्वलौकिक मराठी शब्द देण्याचा प्रयत्न शके ११६० तल्या हेमाद्रीसारख्या जाड्या पंडितानें करणें म्हणजे द्वैभाषिक कोश रचण्याची प्रस्तावनाच करणें आहे. ११६० त मराठी प्रौढत्वाप्रत पोंचली होती व त्यावेळीं तींत अनेक ग्रंथ झाले होते. तेव्हां त्याबरोबर कोशरचनाहि होणें स्वाभाविक आहे. शके १२३९ पर्यंत महाराष्ट्रात यादवांचें राज्य होतें, तोंपर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांत शुद्ध मराठी व संस्कृत–मराठी असे दोन प्रकारचे कोश झाले असावे असें राजवाडे यांचें अनुमान आहे व यापैकीं शुद्ध मराठी कोश महानुभावांनीं, नाथपंथीयांनीं किंवा हेमाडपंतीच्या आज्ञानुवर्ती ब्राह्मणांनीं केले असावेत असा त्यांचा तर्क आहे].

शके १२३९ पासून १५३९ पर्यंत मुसुलमानांचा अंमल होता. त्या अवधींत फारशी–मराठी कोश मराठींत निर्माण होऊं लागले. त्यांतील कांहीं प्रकार येणेंप्रमाणें; (१) हेमाडपंताच्या जमाखर्चाच्या पद्धतींची फारशी भाषांतरें. हे एक तऱ्हेचे कोशच होत. (२) हिंदुमुसुलमानांच्या सामान्य व्यवहारांत दळणवळण सुकर होण्यासाठीं केलेले व्यवहारी शब्दांचे कोश; त्यांत एक श्लोकबद्ध आहे व दुसरा यादी सारखा आहे. (३) वेदांत परिभाषेचा सुफींनीं केलेला कोश, यांत संस्कृतला प्रतिशब्द फारशी किंवा अरबी दिले आहेत. पुढें मराठी राज्यांत पुनः कोशघटना झाली त्यांत (१) राज्यव्यवहार कोश (रघुनाथ पंडित कृत) हा प्रमुख होय. फाजील शिरलेले फारशी व अरबी शब्द राज्यव्यवहारांतून काढून टाकण्यासाठीं याची योजना होती. (२) याच वेळेस जमाखर्चांतील फारशी शब्दांनां मराठी पेहेराव देण्याचा एक श्लोकबद्ध कोशरूपानें प्रयत्न झाला. (३) अमरकोशाचें मराठी भाषांतरहि झालें. (४) ज्ञानेश्वरींतील कठिण शब्दांच्या कांहीं याद्या याच वेळेस निर्माण झाल्या. (५) पेशव्यांच्या व इतर सरदारांच्या दप्तरखान्यांत फारशी, इंग्रजी, कानडी, तामिळ वगैरे भाषांतील शब्दांचे कोश असत. पोर्तुगीज फ्रेंच व इंग्रज यांच्याहि दप्तरखान्यांत मराठी शब्दांच्या याद्या असाव्यात. इ. स. १८१० त श्रीरामपुरास क्यारेनें मराठी शब्दांची यादी उर्फ कोश छापला. इ. स. १८२४ त केनडीनें एक मराठी कोश प्रसिद्ध केला. इ. स. १८२९ मध्यें जगन्नाथ शास्त्री क्रमवंतानें एक मराठी कोश प्रतिशब्द देऊन संपविला. १८३१ त मोलस्वर्थचा इंग्रजी मराठी कोश बाहेर पडला. १८४७त क्यांडी व मोलस्वर्थचा इंग्रजी मराठी कोश प्रकाशला. रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं हंस कोश १८६३ त मराठी भाषेचा सुबह कोश १८७० त छापला. १८९१ मध्यें बापट व पंडित यांनीं शुद्ध मराठी कोश तयार केला. इंग्रजीमराठी कोश शालोपयोगासाठीं तळेकर, बाबा पदमजी कृत, रानडे यांचा इंग्रजीमराठी कोश राजवाडे यांचा राष्ट्रीय मराठी कोश अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. इत्यादि.

पा श्चा त्य.—पाश्चात्त्य देशांत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कोश तयार करण्याच्या कार्याची फार भरभराट झाली. कोश तयार करतांनां मुख्यतः तीन गोष्टींकडे प्रामुख्यानें लक्ष्य देण्यांत येत असे. पूर्वीच्या कोशांत कोशाचें सर्वसामान्य स्वरूप काय असावें इकडे दुर्लक्ष्य करण्यांत येत असे. पण या शतकांत, कोशाचें सर्वसाधारण स्वरूप काय असावें यासंबंधीं चर्चा सुरू होऊन त्यासंबंधीं

निश्चित रूपरेषा आखण्यांत आली. त्यानंतर कोशास लागणारें साहित्य कोणत्या तऱ्हेनें मिळवावें,त्यांत कशाकशाचा अंतर्भाव व्हावा यासंबंधीचेंहि निश्चित धोरण ठरवण्यांत आलें व त्याच्या बरोबर त्याची मांडणीहि कशा पद्धतीची असावी याचेंहि सामान्य स्वरूप आखण्यांत आलें. जुन्या कोशामध्यें मुख्यत्वेंकरून त्या भाषेंत त्या त्या काळीं प्रचलित असलेले व वाङ्मयामध्यें नेहमीं येणारे तेवढेच शब्द ग्रथित करण्याची वहिवाट असे. अशाप्रकारचा कोश म्हणजे जॉन्सननें केलेला कोश होय या जान्सनच्या कोशामध्यें तत्कालीन समाजांत व वाङ्मयांत रूढ असलेल्या शब्दांचाच संग्रह केला गेला आहे. जान्सननें आंखून दिलेली ही कोशाची कल्पना जवळ जवळ एक शतकभर अस्तित्वांत होती. पण त्यानंतर या संकुचित कोशकल्पनेच्या विरुद्ध चळवळ सुरूं झाली. १८५७ मध्यें आर्चबिशप ट्रेंचनें फायलालॉजिकल सोसायटीच्या पुढें एक निबंध वाचून त्यात त्या वेळची कोश तयार करण्याची पद्धत किती संकुचित होती हें त्यानें सप्रमाण सिद्ध केलें. या निबंधांत तो म्हणतो. 'कोश' या शब्दाचा खरा अर्थ भाषेंतील सर्व शब्द एके ठिकाणीं ग्रथित करणें हा होय. भाषेंतील उपयुक्त शब्दांचाच संग्रह करणें ही कल्पना कोशकारानें आपल्या डोळ्यांपुढें ठेवून चालावयाचें नाहीं. उपयुक्त शब्दांचा संग्रह करणें, अगर अनुपयुक्त अशा सर्व शब्दांचा संग्रह करणें एवढेंच कोशकाराचें काम आहे. तो भाषेचा इतिहासकार आहे. अमका शब्द घेणें, तमका शब्द न घेणें हे त्याचें काम नव्हे. ही ट्रेंचची कल्पना जर्मनींत त्याच्या पूर्वीपासूनच प्रचारांत येऊं लागली होती. या ट्रेंचच्या तत्वाप्रमाणेंच जर्मनींत जेकब व विल्हेल्म ग्रिम यांनीं कोश तयार करण्यास सुरुवातहि केली होती.

दुसरें एक जें तत्व ट्रेंचनें आपल्या निबंधात ग्रथित केलें होतें तें म्हणजे कोशात केवळ शब्दाचा अर्थ न देता त्या शब्दाची सागोपांग माहिती देण्यात यावी हें होय. पूर्वींच्या कोशांत शब्दाचा ऐतिहासिक दृष्ट्या कसकसा अर्थ बदलत गेला याचें विवरण करण्यांत येत नसे. पण तुलनात्मक भाषाशास्त्राचा उदय झाल्यापासून शब्दाच्या इतिहासाला महत्व प्राप्त होऊं लागलें. व त्या कल्पनेला अनुसरून ट्रेंचनें आपली कल्पना आपल्या निबंधात पुढें मांडली.

शब्दाचा इतिहास देण्याचें तत्व मान्य केलें कीं त्याबरोबर शब्दाच्या निरनिराळ्या अर्थाचीं बोधक अशीं वाक्यें देण्याची पद्धत पाडण्याचें श्रेय डॉक्टर जॉन्सनलाच देणें जरूर आहे. त्यानंतर रिचर्डसननें १८३५-३६ सालीं तयार केलेल्या कोशांत कल्पना विकास पावल्याचें दृष्टोत्पत्तीस येंत. अशा प्रकारचीं अर्थबोधक वाक्यें उध्दृत केल्यानें विशिष्ट काळीं विशिष्ट शब्दांचा विशिष्ट अर्थ कसा होता हें समजणें फार सुलभ होतें.पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे शब्दाचा धात्वर्थ देणें ही होय. शब्द कसा निर्माण झाला, कोणत्या धातूपासून तो तयार झाला हें सांगितल्याशिवाय शब्दाची माहिती पूर्ण झाली असें म्हणतां येणार नाहीं. या शब्दाच्या उत्पत्तिशास्त्रानें तत्समान अशा शब्दावर चांगला प्रकाश पडतो. एकाच धातूपासून निरनिराळे शब्द कसे बनले याचें आपल्याला उत्कृष्ट ज्ञान होतें. याशिवाय शब्दाचा उच्चार देणें वगैरे किरकोळ गोष्टीहि कोशात येणें जरूर आहे. पण वर सांगितलेल्या सर्व तत्वांचा समावेश करून त्याबरहुकूम कोश तयार करणें हें अशक्य नसलें तरी अतिशय अवघड काम आहे यात शंका नाहीं. अशा प्रकारचा नमुनेदार कोश अद्यापि कोणत्याहि भाषेंत झाल्याचें दिसून येत नाहीं. शिवाय अशा प्रकारचा कोश तयार करणें एकट्या दुकट्याचें काम नाहीं. त्याला निरनिराळ्या विषयांत पारंगत असलेली अशीं विद्वान मंडळीं एकत्र झालीं पाहिजेत हल्लीं कोश तयार करतांना निरनिराळे विद्वान नेमण्यांत येतात व अशीं पद्धत अमलांत येणें अगदीं स्वाभाविकच आहे.

अशा प्रकारच्या तत्वाबरहुकूम तयार झालेला कोश म्हणजे ऑक्सफोर्ड न्यू इंग्लिश डिक्शनरी होय. हा कोश तयार करण्याची कल्पना ट्रेंचच्या निबंधावरून उदयास आली व त्याप्रमाणें कोश तयार करण्याचें काम सुरू झालें. हर्बर्ट कॉलेरिज याला मुख्य संपादक नेमण्यात आलें. हर्बर्ट कॉलेरिज हा १८६१ सालीं वारला. त्याच्यानंतर मुख्य संपादकाच्या जागीं डॉ. फर्निव्हल याची नेमणूक झाली. १८७८ पर्यंत या संपादकीय मंडळाकडून २०,००,००० अर्थबोधक वाक्यें गोळा करण्यापलीकडे कांहींच झालें नाहीं. पुढें १८७८ सालीं ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीनें हा कोश प्रसिद्ध करण्याचें काम अंगावर घेऊन डॉ. मरे याच्याकडे तें काम सोंपविण्यात आलें. १२ व्या शतकानंतरचे जे जे शब्द असतील ते सर्व या कोशात ग्रथित करावयाचे असें ठरविण्यात आलें. या कोशाचे दहा विभाग करावयाचे असें ठरलें, व त्याप्रमाणें १९८४ मध्यें या कोशाचा पहिला विभाग प्रसिद्ध झाला.

या कोशाइतका जवळ जवळ पूर्णतेस पावलेला दुसरा कोश नाहीं असें म्हटलें असता वावगें होणार नाहीं. जर्मनींमध्यें जेकब आणि विल्हेल्म ग्रिम यानीं जो कोश तयार केला तो देखील न्यू इंग्लिश डिक्शनरीप्रमाणेंच नमुनेदार झाला आहे. तरी पण न्यू इंग्लिश डिक्शनरीपेक्षां यांत अधिक दोष आहेत. उदाहरणार्थ, या जर्मन डिक्शनरींत शब्दांचे उच्चार दिलेली नाहींत व व्युत्पत्तीसंबंधानें बिनचूक माहिती दिलेली आढळत नाहीं. अर्थबोधक वाक्यें उत्कृष्ट प्रकारचीं नाहींत व एकंदर कोशाची रचनाहि जितकी व्यवस्थित असावी तितकी नाहीं.फ्रेंच भाषेंतील लिट्रे यानें तयार केलेला कोश जर्मनीमधील कोशापेक्षां अनेक बाबतींत अपूर्ण आहे. पण एकट्यानं तयार केलेला कोश या नात्यानें त्याचें महत्व आहे. बर्लिन,

गॉटिंजन, लैप्झिक, म्यूनिच व व्हिएन्ना या विद्यापीठांच्या देखरेखीखालीं तयार झालेले 'थेसारस लिंग्वा लॅटिना' हा महत्त्वाचा कोश आहे. यांत दुसऱ्या शतकापर्यंत सर्व लॅटिन ग्रंथकारांच्या ग्रंथांतील प्रत्येक शब्द व त्याचीं अर्थबोधक वाक्यें उद्धृत केलीं आहेत. त्याचप्रमाणें दुसऱ्या शतकापासून तो सातव्या शतकापर्यंतच्या सर्व लॅटिन ग्रंथांतील वचनें उध्दृत करण्यांत आलीं आहेत. हे सर्व कोश तयार करतांना कोशकारांनीं आपल्यापुढें लोकांची गरज व त्याचबरोबर विद्वानांचीहि गरज भागविण्याचें ध्येय ठेवलें होतें. या दृष्टीनें कोशाचा विकास ज्ञानकोशांत होऊं लागला. अशा प्रकारें कोश व ज्ञान कोश या दोनहि प्रकारांचें संमिश्रण पिरे लरौसे याच्या 'ग्रँड डिक्शनेएर युनिव्हर्सेल डु सियेक्ले' यामध्यें सापडतें. या कोशाचे १५ भाग प्रसिद्ध झाले. अशाच प्रकारचा इंग्लिश भाषेंतील प्रयत्न म्हणजे सेंचरी डिक्शनरी हा होय. हा कोश अमेरीकेंत डॉ. व्हिटनें यांच्या देखरेखीखालीं तयार झाला. याचे सहा भाग असून ते १८८९-१८९१ सालांत प्रसिद्ध झाले. यांत न्यूइंग्लिश डिक्शनरीपेक्षा देखील, शब्दांचे अधिक बरोबर अर्थ दिले आहेत.

चिनीः-या भाषेंत कोशाचा सुकाळ आहे. 'खोवन' हा डु शीन याचा कोश सर्वांत जुना असून ख्रि. श. १५० मध्यें लिहिलेला आहे. त्यानंतर ५३० मध्यें कु ये वंग यानें यू पीन नावाचा एक कोश तयार केला. पी वन यव फू हा प्रचंड कोश हन लिन या विद्यापीठाच्या ६६ विद्वानांनीं मिळून लिहिला. यांत अर्थबोधक वचनांची रेलचेल आहे. या कोशाचें इंग्लिश भाषेंत भाषांतर करावयाचें म्हटल्यास अष्टपत्री १००० पानाचे ४० भाग काढावे लागतील. हा कोश १७११ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यानंतर १७१६ मध्यें, हन लिन विद्यापिठाच्या तीस विद्वानांनीं मिळून कांघी ह्से तीन हा कोश तयार केला. व त्याला स्वतः कांघी बादशहानेंच प्रस्तावना लिहिली आहे. हा कोश अद्यापि चीनमध्यें प्रमाणभूत गणला जातो.

कोशिंब--या झाडास लॅटिनमध्यें श्लचेरा ट्रिजुगा; मराठींत कोशिंब, लाखेचें झाड, हिंदींत कोसुंबा; संस्कृतमध्यें कोशाम्र, लाक्षावृक्ष इत्यादि नांवें आहेत हिंदुस्थानच्या बऱ्याच प्रदेशांत, ब्रह्मदेशामध्यें व सिलोनमध्यें हें एक मोठें झाड आहे. बंगालप्रांतांत व विशेषतः छोटानागपूर भागांत हीं झाडें पुष्कळ आढळतात. परंतु आसामांत हीं झाडें नाहींत. या झाडांपासून उत्पन्न होणारा अतिशय मौल्यवान पदार्थ म्हटला म्हणजे याच्या बियांचें तेल होय. हें तेल खाण्याकरितां व दिव्यांकरितां वापरतात. केसांनां लावण्याच्या कामीं व देशी औषधांत देखील याचा उपयोग करतात. या तेलाच्या अंगीं केसांना साफ करून त्यांची वाढ करण्याचा उत्कृष्ट गुण आहे असें म्हणतात, व हें मूळचें मॅकास्सार तेल आहे अशीहि समजूत आहे. अलिकडे याच्या बियांस परदेशाहून फार मागणी आहे. परंतु याचा खाण्याच्या कामीं उपयोग होत असल्यामुळें बंगालांतील लोक दुष्काळांत या झाडाचीं फळें व्यापारापेक्षां खाण्याकरितांच गोळा करितात. व हें फारसें निर्गत होत नाहीं. या झाडाच्या कोंवळ्या फांद्यांवर लाखेच्या किड्यांपासून पुष्कळ लाख उत्पन्न होतें. मध्य प्रांतांतील रायपुर व बिलासपुर जिल्ह्यांत हें लाख उत्पन्न करणारें झाड म्हणून फार प्रसिद्ध आहे. याचें लांकूड कठिण, मजबूत व टिकाऊ असून याचीं मुसळें, गाड्यांचीं चाकें, आंस, नांगर, साखरेच्या व तेलाच्या घाण्यांच्या व कापसाच्या रेच्यांच्या लाटा देखील बनवितात. [वॅट]

कोशी (कुशी)—उत्तरबंगाल व नेपाळमधील एक नदी. पूर्वनेपाळमधून जी हिमालयाची रांग गेली आहे तेथें सप्तकौशिकी नावानें प्रसिद्ध असलेला एक प्रदेश आहे. या प्रदेशांत ही नदी उगम पावते. नंतर ती नैर्ऋत्येस ६० मैल वहात गेल्यावर पुढें १६० मैलपर्यंत ती दक्षिणेस व आग्नेयीस वहात गेली आहे. दक्षिणेस व आग्नेयीस वहात असतांना तिला अरन व तांबर या दोन नद्या मिळाल्या आहेत. चत्रा पर्वतातून ती वहात असता तिचे अनेक धबधबे झाले आहेत. अशाच रीतीनें ती दक्षिणवाहिनी होऊन वहात असतां भागलपूर जिल्ह्याच्या ईशान्येकडील प्रदेशांत तिचा संचार झाला आहे. या ठिकाणीं तिचें पात्र एक मैल रुंद आहे नंतर ती अनेक ठिकाणीं वळणें घेत घेत, वाटेत घोग्रा नदीला आपल्या पोटात घेऊन, शेवटीं पुर्निया जिल्ह्यात ती गंगेला जाऊन मिळाली आहे. बंगालमध्यें ही जवळ जवळ ८८ मैल वहात गेली आहे.

गाधी देशाचा राजा कुशिक याची ही कौशिकी नांवाची मुलगी होय अशी पुराणांतरीं कथा आहे. या कौशिकीचा एका ब्राह्मणपुत्राशीं विवाह झाला. त्याच्यापासून तिला मुलगा झाला. नंतर तिला नदीचें स्वरूप प्राप्त झालें अशी कथा आहे. या नदीचा प्रवाह फार वेगाचा असून ती क्षणोक्षणीं आपले प्रवाह बदलते व त्यामुळें ती फार घातकी नदी आहे अशी तिची बंगालमध्यें प्रसिद्धि आहे. हिला ज्या वेळीं पूर येतो त्यावेळीं ती आसपासचा प्रदेश उध्वस्त करून टाकते. अशा रीतीनें भागलपूर जिल्ह्याच्या मधीपूर पोटजिल्ह्याचा बराचसा भाग तिनें उध्वस्त करून टाकला आहे. १८ व्या शतकात ती पुर्निया शहराच्या जवळून जात असे पण पुढें तिचा प्रवाह बदलून तो बराच पश्चिमेकडे गेलेला आहे. पुर्नियाच्या प्रदेशाच्यामधून नदी वहात गेली असता त्या ठिकाणीं तिच्यामधून नावा चालतात पण त्यादेखील मोठ्या मुष्किलीनें चालतात. याचें कारण ती नेहमी आपला प्रवाह बदलत असते. शिवाय तिचा प्रवाह फार जोराचा असल्यानें देखील तिच्यांतून बोटी नेणे फार धोक्याचें असतें. हल्लीं काथेहार जवळ या नदीवर एक मोठा पूल बांधण्यांत आलेला आहे व शिवाय अंत्रा घांटापासून तो खव्वाघाटापर्यंत नावाहि सुरु आहेत.

कोशी—संयुक्त संस्थानांतील मथुरा जिल्ह्याच्या छाट तहशिलींतील एक गांव. आग्रा ते दिल्लीच्या मार्गावर हे

गांव वसलेलें आहे. इ. स. १९११मध्यें यांची लोकसंख्या ७१८८ होती. येथें एक सुंदर धर्मशाळा असून ती अकबराच्या कारकीर्दीत ख्वाजा इतिबारखान नांवाच्या सुभेदारानें बांधली असें म्हणतात. इ. स. १८५७ च्या बंडांत मथुरा जिल्ह्याचे अधिकारी या ठिकाणीं दडून राहिले होते. पण ही गोष्ट शत्रुसैन्याला समजल्यामुळें त्यानां तेथून पळ काढावा लागला. या ठिकाणीं एक दवाखाना व बॅप्टिस्ट लोकांची एक मिशनरी संस्था आहे. हें गाव खोलांत वसलेलें असून याच्या आसपास पाण्याचीं डबकीं आहेत. त्यांतलि पाणी संथ व वाईट असल्यामुळें रहिवाश्याच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम घातुक होतो. येथें हल्लीं एक चागलें तळें बांधण्यात आलें आहे. इ. स. १८६७ सालीं या गावाला म्युनिसिपालिटीचें हक्क देण्यात आले. येथून धान्य व कापस मथुरा जिल्ह्यात जातो. येथें कापसाच्या सहा गिरण्या आहेत. हें गाव विशेषतः गुराच्या व्यापाराबद्दल प्रसिद्ध आहे. येथें दरवर्षी ३०,००० गुराची विक्री होते. येथें चार पाच शाळा आहेत.

कोष्टी—या जातीची मोठी वस्ती वऱ्हाड-मध्यप्रातात आहे. तेथील मराठी व तेलगू कोष्टी नागपूर व छत्तीसगडात रहातात. याची संख्या (१९११) १,५४,१९९ आहे. तेलगू कोष्ट्यांस सालेवार म्हणतात. हे मार्कंडेय ऋषीस आपल्या धंद्याचे ऋषि समजतात. कारण या ऋषीनें कमलतंतूपासून कपडे तयार करून देवास दिले. यास सूर्याची मुलगी दिली होती. तिजबरोबर भवानी नांवाचा राक्षस व एक वाघ आदण दिला होता. राक्षस फार उन्मत्त झाल्यामुळें ऋषीनें त्यास मारलें. पण वाघ अगदीं आज्ञाधारक होता. राक्षसाच्या हाडापासून ऋषीनें कपडे विणण्याचें सामान तयार केलें अशी आख्यायिका हे लोक आपल्या प्राचीनत्वाबद्दल सांगतात. कोष्टी लोकाची वाघावर फार भक्ति आहे. आजपर्यंत वाघानें एक देखील कोष्टी मारला नाहीं. वाघ यांस भेटला तर हे मार्कंडेयाच्या स्मरणानें त्याचा शक्तिपात करतात. तेव्हा तो निमूटपणें आपल्या वाटेनें जातो अशी यांची समजूत आहे. लग्नप्रसंगी हे वाघाची मूर्ति संनिध ठेवतात.

याच्यातील उपजातींचे निरनिराळे प्रकार आहेत ते. हळबी, लाड, कोष्टी, गधेवाल, देशकर, देवंग, पटवी, इत्यादि होत, औंकुले हे गोलक संततीचे आहेत. पूर्वीचे जैन कोष्टी हे आतां हिंदू झाले आहेत. साळेवारांत सूतसाळे व पद्मसाळे असे दोन वर्ग आहेत. सगूणसाळे वर्ग हा गोलक आहे.

नागपुराकडे लग्नात वधूवरांभोंवती सणाचा दोरा सातदां गुंडाळतात. वधूची आई वरास ओंवाळते व वराची आई जमीनीवर पाणी टाकते. साळेवारांत लग्न वराच्या घरीं होतें. वधूस मध्यरात्रीं आणतात. विणकामांतील एका लांकडावर वराचा उजवा व वधूचा डावा पाय ठेवतात व त्याच्यावर कांबळें गुंडाळतात. मध्यें अंतर्पाट धरतात. वधूवर एकमेकांवर पांचदा अक्षता टाकतात व मग दोघे त्या लांकडावर बसतात, म्हणजे लग्नविधि आटपला. विधवांनां लग्न करण्यास परवानगी आहे. चांयांत विधवा बापाकडे रहात असली तर त्यास ४० रुपये हुंडा द्यावा लागतो. तिच्या पुनर्विवाहाच्या दिवशीं तिची ओटी नवरा नारळानें भरतो व तिला कुंकू लावतो. रात्रीं ती नवऱ्याकडे जाते त्याला ती ओटी देते व त्याच्या पायां पडते. हे लोक होताहोईतोपर्यंत घटस्फोट करीत नाहींत. जितक्या बायका त्यास मिळतील तितक्या त्यास हव्याच असतात. हे कधीं कधीं बायका चोरतात, विकतात व गहाणसुद्धां टाकतात. लिंगायत व कबीरपंथी लोक प्रेतें पुरतात; इतर दहन करतात. ५ व्या दिवशीं विधवेच्या बांगड्या फोडून कुंकू पुसतात. मयताच्या मुख्य वारसाच्या डोक्यास ५ व्या दिवशीं जातीचे पंच पागोटें घालतात. हे लोक श्राद्धें करीत नाहींत. अक्षयतृतीयेला मित्रास बोलावतात व त्यास विचारतात कीं तुम्ही माझे कोण आहांत ? तो सांगतो कीं मी तुझा आजा किंवा पणजा आहे. अशा रीतीनें मित्रास बोलावून जेवण घालतात. गणपति हा यांचा मुख्य देव आहे. कबीरपंथी कोष्ट्याचा स्वतंत्र पुरोहित असतो. गुरुमुखी म्हणून नागपूरच्या कोष्ट्यांत एक पंथ आहे ते धापेवाड्याचे कोळीबाबाचे शिष्य आहेत. हे आपल्या गुरूच्या नांवानें घरीं एक नारळ देऊन त्याची पूजा करतात. हे आपल्या विणण्याच्या यंत्रास पवित्र समजतात. विटाळशा बायका त्यास शिवत नाहींत. यांपैकीं कांहीं लोक मद्यमांस खातात व कांहीं खात नाहींत. हे लोक ब्राह्मणांस पौरोहित्य देतात. डाक्याची मलमल विणणारे कोष्टीलोक अपवित्र समजले जात नाहींत. ब्राह्मण त्यांच्या हातचें पाणी पितात. नागपूरच्या भागांत हे फार चागले कपडे विणतात धोतरें व लुगडीं यांची नागपुरास प्रसिद्धि आहे. गिरण्यांमुळें याची स्थिति फार खालावली आहे. महाराष्ट्रीय व कर्नाटकी कोष्ट्यांची माहिती ' देवांग ' या लेखांत सांपडेल. [रसेल व हिरालाल. एन्थोवेन].

कोष्ठ—या वनस्पतीस लॅटिनमध्यें सोस्सुरिआलाप्पा व भरतखंडात कुट, पाचक, कोष्ठम इत्यादि नावें आढळतात. ही काश्मीरच्या दरीच्या उतरणीवर ८००० ते ९००० फूट उंचीवर होते. झेलम व चिनाब यांच्या खोऱ्यांतहि ही आढळते.

पु रा त न मा हि ती —प्राचीन काळापासून कोष्ठाच्या मुळ्यांची औषधी गुणांबद्दल फार ख्याति आहे, परंतु बराच काळपर्यंत याच्या उत्पत्तीची माहिती नव्हती; व म्हणून चुकीनें कोस्टस स्पेसिओसशीं याचा संबंध जोडला असत. याच्या मुळ्यांचे काप काढून कलकत्ता व मुंबई बंदरांत व तेथून चीन, तांबडा समुद्र वगैरेंकडे पाठवितात. औषधाशिवाय या मुळ्यांचा अत्तर काढण्याकडे व केसांचा कलप करण्याकडे उपयोग होतो.

कोस—हिंदुस्थानांत रस्ता मोजणीचें माप कोस हेंच फार प्राचीन काळापासून प्रचारांत आहे. चंद्रगुप्त मौर्याच्या

काळींहि कोस उपयोगांत होता. हल्लींप्रमाणें रस्त्याच्या कडेला हे कोसांचे दगड पुरलेले असत. रोमन स्टेडिआ व कोस यांचें प्रमाण म्हणजे २० स्टेडिआबरोबर एक कोस होय. मोंगल राज्यांतहि हेंच कोसाचें मोजमाप होतें. चंद्रगुप्ताच्या काळीं प्रत्येक अर्ध्या कोसावर एक एक दगड पुरीत; परंतु मोंगली राज्यात दरेक कोसास एक दगड असे. मोंगल कोस म्हणजे इंग्रजी ४५५८ यार्ड होत. अशोकाच्या ८ व्या शिलाशासनांतील "अढकोसिक्य" याचा अर्थ फ्लीट आठ कोस धरितो; परंतु पुष्कळाच्या मतें अढ म्हणजे अर्धा असा अर्थ होतो. स्टेडियाचेंहि तीन प्रकार (६५०, ६०० व ५२० इंग्रजी फूट) पहिल्या ख्रि. शतकांत होते. पेरिप्लसच्या वेळीं एक स्टेडिआ म्हणजे हल्लींचा एकदशांश इंग्रजी मैल असावा. चंद्रगुप्ताच्याहि आधीपासून कोस हें माप हिंदुस्थानात प्रचलित होतें एवढें नक्की होय. [स्ट्राबो. १५. २; इलियट; ज. रा. ए. स. १९०६; शॉफ पेरिप्लस. ५८].

कोसगी—हैद्राबाद संस्थानांतील गुलबर्गा जिल्ह्यामध्यें सर सालरजंगच्या घराण्याकडे जी जहागिरी आहे त्या जहागिरीचें मुख्य ठिकाण. याची लोकसंख्या १९०१ सालीं ८२२८ होती. या ठिकाणीं एक पोलीस ठाणें, एक दवाखाना व एक सरकारी शाळा आहे. या ठिकाणीं सुमारें दीड हजार माग असून सुती व रेशमी लुगडीं मोठया प्रमाणावर तयार होतात.

कोसम—संयुक्त प्रांतांतील अलाहाबाद जिल्ह्याच्या मंझनपूर तहशिलींतील एक खेडेंगाव. वास्तविक हें गाव कोसम इनाम व कोसम खिराज या दोन छोट्या खेड्यांचें मिळून बनलेले आहे. हें गाव यमुना नदीच्या कांठीं वसलेलें आहे. १९०१ मध्यें याची लोकसंख्या २३७४ होती. प्राचीन हिंदुस्थानात प्रसिद्धीस आलेलें कौशाम्बी नगर हें या खेडेंगावाच्या खालीं पुरलें गेलें असावें असें तज्ज्ञांचें मत होतें. पण हुएनत्संगाचें म्हणणें गृहीत धरल्यास कौशाम्बी हें कोसमच्या नैऋत्येस थोडया अंतरावर होतें असें मानावें लागतें कोसम येथें जे अवशेष सापडले आहेत त्यावरून पूर्वी तेथें चार मैलांचा घेर असलेला व ३०।३५ फूट उंचीवर बांधला गेलेला असा एक तटबंदी किल्ला असावा असें दिसतें. येथें एक एकसंधि, असा मोठा दगड असून त्यावर यात्रेकरूंनीं लिहिलेले ५।६ व्या शतकातील शिलालेख आढळतात. १५६४ मधील एक शिलालेख येथें आढळतो. त्यांत कौशाम्बी या नांवाचा उल्लेख आलेला आहे. या खेडयाच्या आसपास दगडी मूर्ति, नाणीं इत्यादि सांपडलेलीं आहेत व तेथील नाण्यामध्यें अगदीं अर्वाचीन नाणीं देखील सांपडलेलीं आहेत. यापैकीं कांहीं नाण्यांवर पहिल्या दुसऱ्या शतकांतील राजांचीं नांवें आढळून येतात. या किल्ल्याच्या वायव्येस तीन मैलांवर पभोसा नांवाची एक टेंकडी असून तेथें लेणीं आहेत; या लेण्यांमध्यें पुष्कळ शिलालेख सांपडलेले आहेत.

कोसल—याचा उल्लेख वैदिकवाङ्मयांत येतो. (ज्ञानकोश विभाग ३ पृष्ठ २१० पहा). कोसल या या नांवाचे दोन देश प्राचीनकाळीं प्रख्यात होते; एक उत्तरकोसल व दुसरा दक्षिणकोसल. उत्तरकोसल हा फार प्राचीन होता. तो म्हणजे हल्लींचा घोगरानदीच्या उत्तरेकडील अयोध्याप्रांत होय. जैन, बौद्ध व ब्राह्मण या तिन्ही वाङ्मयांत या कोसलाचा उल्लेख येतो. रामायणाच्या पूर्वीपासून हा देश प्रख्यात आहे. कोसलराजकन्या कौसल्या ही रामाची आई होय. वायुपुराणावरून लवानें या प्रदेशावर राज्य केले असल्याचे ठरतें. बौद्धवाङ्मयांत येथील राजांची सत्ता कपिलवस्तूवरहि होती असें म्हटलें आहे. त्यांत कोसल व मगध यांचा नेहमीं संबंध येतो. या प्रदेशांतच बुद्धाचें पूर्वचरित्र झालें व तेथेंच त्यानें आपल्या धर्माची ध्वजा प्रथम फडकविली. पौराणिक काळांत काशीच्या राज्याची प्रसिद्धि होती. परंतु, त्यानंतर ऐतिहासिक काळाच्या प्रारंभींच कोसलच्या राज्याच्या ख्यातीस (ख्रि. पू. ६ वें शतक) सुरुवात झाली. त्या वेळीं साऱ्या उत्तरहिंदुस्थानांत कोसलाचेंच राज्य महत्वाचें होतें. या कोसलची राजधानी श्रावस्ती होय. ही नेपाळात हिमालयाच्या पायथ्याशीं होती. ह्युएनत्संग याच्या मतानें व फाहियान याच्या तर्कावरून हल्लींचें साहेट माहेट (हल्लीच्या उत्तर अयोध्या प्रांतांतील गोंड बहिरच जिल्ह्याच्या सरहद्दीवरील गांव) हीच पूर्वीची श्रावस्ती होय असें म्हणतात. ही रापती (रावती) नदीच्या कांठीं आहे. महाभारतात सभापर्वांत उत्तरकोसल देश भीमानें जिंकल्याचा उल्लेख आहे. इक्ष्वाकु(सूर्यवंशी)चा आठवा पुरुष (वंशज) श्रावस्त यानें श्रावस्ती स्थापिली. अश्वमेधपर्वांत कोसलाचें नांव आलें आहे. वराहमिहिरानेंहि कोसल (फक्त एकच) उल्लेखिला आहे. कालिदासानें अयोध्येस उत्तरकोसलाची राजधानी म्हटलें आहे. वर दिलेल्या साहेटमाहेट येथें व निंगहॅमला एक बुद्धाचा पुतळा आढळला. त्यावरील लेखांत श्रावस्ती अशीं अक्षरें होतीं. त्यावरून हेंच गांव श्रावस्ती असें ठरलें. येथें जुने अवशेष पुष्कळ आहेत. ह्युएनत्संगच्या वेळीं हें मोडकळीस आलेलें शहर रामाच्याहि पूर्वीचें आहे. बुद्धाच्या वेळीं ही प्रसेनजित् राजाची राजधानी होती. बुद्धाच्या बऱ्याच कथा या प्रांतांत घडलेल्या आहेत. बिंबिसार राजाची राणी कोसलराजकन्या होती. बुद्धानंतर ५ शतकें या शहराचा इतिहास सांपडत नाहीं. तदनंतरचा तेथील विक्रमादित्य नांवाचा एक राजा बौद्धधर्मद्वेष्टा म्हणून प्रख्यात आहे. याचा काल (अजमासें) इ.स. १०० चा आहे. नंतर तिसऱ्या व चवथ्या शतकांतील खिरधार राजे यांचीं नांवें आढळतात. परंतु हे स्वतंत्र नसून गुप्तांचे (मगधच्या) मांडलिक असावेत. तदनंतर श्रावस्तीचें महत्व कमी झालें. फाहिआनच्या वेळीं येथें फक्त २०० घरें होतीं. याचीं शेवें, सेबेट, सावथ्थी, साहेट, सावित्री अशीं निरनिराळीं नांवें आहेत. हल्लीं येथें जंगल आहे. ह्युएनत्संगनें या कोसलराज्याचा

घेर ३३४ कोस सांगितला होता. यावरून हा दक्षिणउत्तर घोगरा, हिमालय व पश्चिमपूर्व कर्णाला, धवलगिरीपर्यंतचा प्रदेश होय. चंद्रगुप्त मौर्यानें हा देश जिंकिला होता. कांहीं ठिकाणीं इंद्रप्रस्थ मध्य धरून पूर्वकोसलाचेहि ईशान्य कोसल व आग्नेय कोसल असे दोन पोटभाग होते असा उल्लेख येतो. ब्राह्मणकाळीं व महाभारतकाळीं सूर्यवंशी क्षत्रियांचीं राज्यें हिंदुस्थानांत फक्त पूर्वेस होतीं. त्यांपैकींच कोसल-विदेह हें एक होय. ब्राह्मणग्रंथांत याचा उल्लेख अभिमानपूर्वक येतो. कुरुपांचालाहून हे लोक भिन्न होते. हे तत्त्वज्ञानी होते. ग्रीयर्सन व मॅक्डोनेल यांच्या मतें यांची भाषा जवळ जमळ पंजाबी भाषेसारखी असून ते सूर्यवंशी क्षत्रिय होते.

आतां दक्षिण कोसल म्हणून दुसरा एक प्रांत आहे, त्याची माहिती अशीः-हा महानदीच्या खोऱ्यांत, गोदावरी व महानदी यांच्यामधील पूर्वेकडील (हल्लींचा छोटानागपूर) प्रांत होय. रामायण, महाभारत यांतहि या दक्षिण कोसलाचा उल्लेख येतो. रामानें कुशाला (रामाचा पुत्र) हें राज्य दिलें होतें व त्याची राजधानी कुशावती ही या प्रांतांत विन्ध्यतटे-प्रांतीं होती. महाभारतात दक्षिणापथात सहदेव विजयात या कोसलाचा उल्लेख आहे. रत्नावली नाटकांत व ह्युएन-त्संगाच्या वर्णनांतहि याची राजधानी मणिपूर होती असें एकेठिकाणीं म्हटलें आहे. हा प्रांत समुद्रगुप्तानें जिंकिला होता, त्यावेळीं येथील राजा महेंद्र नावाचा होता. कांहींच्या मतें हल्लींचा छत्तीसगड, अमरकंटक व कांकर हा प्रांत म्हणजे दक्षिणकोसल होय. यांतच गाजिहाना नगरी होती असें म्हणतात.

या प्राचीन दक्षिण कोसलाचे प्राचीन राजे हैहय होत. हे सहस्रार्जुनाचे वंशज होते. ते रामायणकालीन होते. यांचीं व अयोध्येच्या सगर राजांचीं युद्धें झालेलीं आहेत. या हैहयांनां कांहीं (विशेषतः परकीय) इतिहासकार हूण नावाचे बाह्य शक समजतात. परंतु तें खोटें आहे असें रा. वैद्य म्हणतात. हे शुद्ध सोमवंशीय क्षत्रिय होते. ह्युएनत्संगहि त्यांना स्पष्ट क्षत्रियच म्हणतो. ते उंच व रंगानें काळे होते. सोमवंशांतील बहुतेक लोक काळे (श्रीकृष्णासारखे) असत. या हैहयाचीं दोन मोठीं राज्यें होतीं. एक मणिपूरचें महाकोसलाचें व दुसरें त्रिपूरचें चेदींचें. त्रिपूरचे राजे कलचुरी हैहय होते. त्यांनीं पुढें शिशुपालाच्या चेदी वंशाचें राज्य जिंकल्यामुळें त्यांना चेदी असें म्हणूं लागले. वास्तविक ते कलचुरी हैहय होत. पुढें चेदी राज्यांतील प्रख्यात किल्ला कलिंजर हा त्यांनीं जिंकल्यामुळें यांनां 'कलिंजरपुरवराधीश्वर' म्हणत. यांचा उल्लेख ह्युएननें महाकोसलासारखा स्पष्ट केला नाहीं. बाली जिल्ह्यांतील हैहय रजपूत हे सोमवंशी व रंगानें काळे असून मध्यप्रांतांतील साऱ्या क्षत्रियांत त्यांचा दर्जा पहिल्या प्रतीचा आहे. रतनपूर येथें या हैहयांची राजधानी बऱ्याच कालापासून होती. हीच बहुधा ह्युएननें पाहिली असावी. मंडळाच्या ताम्रपटावरून रतनपूरच्या राजांचें राज्य छत्तीसगडावर इ. स. १४४ पासून सुरू होतें तें अठराव्या शतकापर्यंत(मराठ्यांच्या मुलुखगिरीपर्यंत)अव्याहत होतें. जबलपूरच्या ताम्रपटांत येथील काहीं राजांचीं नांवें येतात.त्यांच्यात प्रख्यात असा पहिला कोकलदेव होऊन गेला. त्याच्या आधीचे छत्तीसगडचे हे हैहय बौद्धधर्मी होते. ह्युएनचा राजा बौद्धधर्मी होता. सुप्रसिद्ध बौद्धधर्माचार्य नागार्जुन या कोसलदेशचा होता. सारांश हर्षाच्या आधीं व नंतरहि कोसलांत बौद्धधर्म प्रचलित होता. आठव्या शतकात येथें धर्मक्रांति होऊन बौद्धधर्माचें उच्चाटन झालें. या हैहय घराण्यांतील राजांच्या वंशावळी बिनचूक सांपडत नाहींत. कोकल हा सनातनधर्मी होता. त्रिपूरचे चेदी उर्फ कलचुरी हैहय यांनीं आपला स्वतःचा एक शक इ. स. २४८ च्या सप्टेंबरच्या पांचव्या तारखेस सुरू केला. हैहयांचीं हीं राज्यें पर्वतांनीं वेष्टित असल्यामुळें एक हजार वर्षे बिनधोक टिकलीं होतीं. त्यांनां पहिला व शेवटचा तडाखा मराठ्यांनीं दिला. त्यांच्या बखरी साधारण सांपडतात;परंतु त्यांत खरी माहिती थोडीच असते.

छत्तीसगड प्रांत म्हणजे महाकोसल. या छत्तीसगडांत एक एक गड असलेले ३६ भाग आहेत. त्यांत पुढील चार भाग मुख्य आहेत. (१)शिवनाथ नदीचें खोरें, (२) हसदा नदीचें खोरें, (३) महा नदीचें खोरें व (४)रायपूर प्रांत. येथील मुख्य धान्यें तांदूळ,गहूं,कडधान्य व गळिताचीं धान्यें होत.जंगलात वाघ,डुकर व रेडे फार आहेत;बंगालच्या बाजूस हत्तीहि पुष्कळ आहेत. जंगलांत गोंड, भूम्ये व आबीग हे रानटी लोक राहतात. हे घांटावरील लोकांत मिसळत नाहींत. घांटावर बहुतेक चांभार लोक असून ते शेतकी करतात. याचा धर्म सत्नामी आहे. याशिवाय ब्राह्मण, रजपूत कूर्मी व राऊत या येथील प्रमुख जाती आहेत. या प्रांतांत आगगाडी फार थोडी आहे. पूर्वी इकडे प्रांत सुपीक असल्यानें अतोनात धान्य पिके. व वाहतुकीचे रस्ते कमी असल्यानें तें तेथेंच पडून कुजे. त्यावेळीं वाहतुक वंजारी लोक करीत असत.

पूर्वी येथें (बखरीच्या माहितीवरून) सत्याग नावाच्या हैत्यत्य राजा होता. त्याच्या नंतर सुद्युम्नराजा झाला. त्याला तीन पुत्र होते. त्यानें तिघांनां आपलें राज्य माहिष्मती (माडला), चंद्रपुर (चांदा), मणिपुर (रतनपुर) याप्रमाणें वांटून दिलें. रतनपुर म्हणजेच छत्तीसगड. येथील हहवा राजा कर्णपाल यानें स. ११५-१९४ पर्यंत राज्य करून व अमरकंटक येथें शहर वसवून देवळें बांधिलीं. स. ३०० च्या सुमारास मदनपाल नांवाच्या राजानें अमरकंटकाजवळ धनपुर शहर व अजमीर किल्ला बांधला. व किल्ल्याचे अवशेष अजून आहेत. पुढें आठव्या शतकांत सुरदेव व ब्रह्मदेव या भावांनीं हें राज्य वाटून घेतलें. रतनपुरची थोरली पाती व रायपुरची धाकटी पाती होय. बिलासपुर सुरगुजाव, संबळपुर येथील संस्थानिक रतनपुरचे मांडलिक

असून रायपुरचे मांडलिक बस्तर व कंकरचे राजे आहेत मराठ्यांच्या स्वाऱ्यांपर्यंत हीच परिस्थिति होती.

मणिपुर हें (जुनी राजधानी) रतनपुरचे उत्तरेस ७॥ कोसांवर, लफा पर्वतांच्या माथ्यावर वसलेलें आहे. त्याची उंची ३२०० फूट आहे येथें किल्ला, टांक्या, देवळें व वाडे यांचे अवशेष अद्यापि आहेत- संवत ८९५ ते १६२० पर्यंतच्या तेथील ब्राह्मणी कथात, राज्यांतील बांधलेली देवळें व वसविलेली नगरें यांच्या नामावलीखेरीज, निरनिराळ्या राजांच्या कल्पित गुणांचें वर्णन आढळतें. या कथा अद्यापि छापलेल्या नाहींत. स. १५६३ त, अकबराचे कारकीर्दीत येथें मुसुलमान घुसले; तेव्हां रतनपुरचा राजा कल्याणसिंग हा अकबराचा मांडलिक बनला. या वेळेपासून मराठ्यांच्या वेळेपर्यंत याच्या वंशजानीं तेथें राज्य केलें. मराठ्याच्या स्वाऱ्यात रतनपुर व रायपुर हीं दोन्हीं राज्यें मंडिली व नागपुरची भोसलेशाही झाली. हल्लीं एक दोन लहान संस्थानिक (हैहयवंशीय) या प्रांतांत आहेत. हैहयघराण्यांत फार पराक्रमी राजे झाले नाहींत व त्यांचीं घराणींहि हल्लीं फारशीं उरलेलीं नाहींत. इकडील राज्यांच्या पूर्व वैभवाची व सामर्थ्याची साक्ष, इकडलि प्रांतांतील राजीम, सुपूर व कवरीनारायण या ठिकाणच्या मोठमोठ्या देवळांच्या अवशेषांवरून व तेथील शिलालेखांवरून पटतें. या हैहयवंशांतील एक सुरदेव नांवाचा राजा पराक्रमी निपजला होता. त्यानें स. ९९८ त तैलंगण जिंकला होता. स. ११६५ तील एका शिलालेखांत, श्रीकल्ल चेदीश्वर, रत्नराज, पृथ्वीदेव, जज्जलदेव अशीं राजांची नांवें आढळतात. या प्रांतांतील आतांपर्यंत सांपडलेलीं फार जुनीं नाणीं या पृथ्वीदेवाचीं असून, तीं बहुतेक सोन्याचीं व फार थोडीं तांब्याचीं आहेत. तांब्याच्या नाण्यांवर हनुमानाची मूर्ति असून, सोन्याच्या नाण्यांवरील आकृति अस्पष्ट आहे. जज्जलदेव व रत्नदेव याचीहि कांहीं नाणीं आढळलीं आहेत. त्यावरून त्याचा काल अनुक्रमे स. ११२० व स. ११४० येतो. यापेक्षां, हैहय राजांचा व त्याबरोबरच या दक्षिणकोसल देशाचा देण्याजोगा इतिहास आढळत नाहीं. [स्मिथ-अय्यर-वैद्य. मध्य. भा. पु. १-२; इं. ॲ. पु. १५ ; ज. रा.ए. सो. १९००,०९, १८; वायुपुराण वाल्मी. रामायण; महाभारत; रघुवंश; भा. भु. व; प्रा. कोश; अ. कोश; त्रिकांडशे; हंटर-ओरि. इति; म. प्रां. ग्याझि; कुक; ग्रँट-ग्याझि; कनिंगह्याम]

कोसीगी--मद्रास इलाख्यांतील बल्लारी जिल्ह्याच्या आधवानी तालुक्यातील एक शहर. हें मद्रास रेल्वेच्या वायव्य फांट्यावर वसलेलें आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ६,९०७ होती. ४००--५००फूट उंच अशा एका टेंकडीच्या पायथ्याशीं हें वसलेलें आहे. या शहराच्या बाजूस ग्रानाइट (वज्रतुंड) दगडाचे ढीगच्या ढीग अस्ताव्यस्त रीतीनें पडलेलें आहेत. शहराच्या सभोंवतालीं छोट्या टेंकड्यांची माळ असून त्यांत ग्रानाइट दगडांची समृद्धि आढळते. या टेंकड्यांवर स्वयंभू दगडाच्या मूर्ती आढळतात. कोसीगी स्टेशनच्या दक्षिणेस तीन मैलांवर एका टेकडीवर एक ८० फूट उंचीचा दगडाचा गुंडा असून त्यावर दोन दगडी स्त्रियांच्या मूर्ती आहेत. त्या 'अक्कचेल्लु' या नावानें प्रसिद्ध आहेत. प्राचीनकाळीं हें ठिकाण येथील एका जातीच्या मुख्याच्या ताब्यांत होतें. याच्या घराण्यांत गोषांची चाल असे. या जातिमुख्याच्या घराण्यांतलि वीरपुरुषांच्या पराक्रमाचीं वर्णनें ज्यावर खोदलेलीं आहेत असे मोठ मोठे दगड (वीर-कल) या शहरच्या आसपास सांपडतात. शहराच्या दक्षिणेस एका मैलावर तीन टेकड्यांच्या योगानें झालेल्या एका त्रिकोणाकृति भागांत ५ दगडी मूर्ती आहेत; त्यांपैकीं एकच अगदीं जशाच्या तशी शाबूत आहे. येथें एक चामड्यांना रंग देण्याचा कारखाना असून शिवाय कापड विणण्याचा धंदाहि येथें मोठ्या प्रमाणांत आहे.

कोस्टारिका--मध्यअमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्य. त्याच्या उत्तरेस निकाराग्वे; पूर्वेस कॅरिबियन समुद्र; आग्नेयीस व दक्षिणेस पनामा; नैॠत्येस, पश्चिमेस व वायव्येस पॅसिफिक महासागर. क्षेत्रफळ २३००० चौ. मै. हा एक उंच पठार असून त्यात उंच पर्वताच्या रांगा गेलेल्या आहेत. यांत सहा प्रांत आहेत.

स्व रु प व र्ण न.--- कोस्टारिकांत ज्वालामुखी पर्वतांच्या रांगा असून त्या एकमेकांपासून सॅनजोसे व कॅर्टागोया पठारामुळें विभक्त झाल्या आहेत. यापैकीं मुख्य शिखरें:---पोआस (८८९५ फूट), इराझु (११,२००), टुरिआल्बा (१०,९१०). दुसऱ्या दोन पर्वतांच्या रांगा निकोया आखाताच्या दक्षिणेकडून पनामाकडे गेल्या आहेत. यांचें नाव कॉर्डिलेरा द टालामाका असून त्यांची मुख्य शिखरें चिरिपोग्रांद (११,४८५), बुएनाव्हिस्टा (१०,८२०), पिकोब्लॅन्को (९६४५) हीं होत. या प्रदेशात धरणीकंप वारंवार होतात. मुख्य नद्या सॅनजॉन रिओफ्रायओ या होत.

ह वा मा न.---सर्व देशांत उष्ण, थंड व समशीतोष्ण अशा तीन तऱ्हेचे हवामान असतें. दरसाल पाऊस सुमारें ८० इंच पडतो. संधिवात व हिंवताप समुद्रकांठीं विशेष आढळतो. एकंदरींत उष्ण कटिबंधांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांपेक्षां कोस्टारिका अत्यंत निरोगी प्रदेश आहे असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

लो क.---१९१७ मध्यें लोकसंख्या ४५४९९५ होती. बहुतेक स्पॅनिश व तिच्या उपभाषा यांचा प्रचार आहे. १६ व्या शतकांतील गॅलिशियन लोकांचें (स्पॅनिश) वंशज आहों असें बहुतेक लोक मानितात. मिश्र लोकांची संख्या जास्त आहे. मूळचे इंडियन लोकसंख्येनें कमी आहेत ते निकाराग्वेची सरहद्द व टालामांका यांत राहतात. संस्थानचा धर्म रोमन कॅथॉलिक आहे पण सर्वत्र धर्मस्वातंत्र्य आहे. प्राथमिक शिक्षण सरकारचें व मोफत आहे. १९१५ त

४१९ प्राथमिक शाळा होत्या. शिवाय उच्च शिक्षणाकरितां ४ कॉलेजें होतीं. (इंडियन संस्कृति मध्यअमेरिका पहा).

शहरें व दळणवळणाचीं साधनें.—राजधानी सॅन जोसे, आलाजुएलो, कॅर्टागो, हेरिडिसा, लिंबरिआ अथवा ग्वानाकॅस्टेल, पुंतारेनासबंदर हीं मुख्य शहरें आहेत. ट्रॅन्सकाँटिनेंटल रेल्वे १८७१ मध्यें सुरू होऊन ती लिमानपासून पुंतारेनासपर्यंत आहे. येथील सडका वाईट असून बैलगाड्या किंवा खेंचरें यांचा उपयोग करतात. एकंदर रेल्वे ३४७ मैलांची आहे सॅन जोसे येथें विजेच्या ट्राम्वे आहेत. १९१६ त कोस्टारिकांत २०८ पोस्टऑफिसें होतीं. तारायंत्रें, टेलेफोन, बीनतारी तारायंत्रें बहुतेक ठिकाणीं आहेत.

शेतकी व उद्योगधंदे:—प्रकाश, हवा व पाणी हीं योग्य प्रमाणात असून शिवाय येथील जमीन अत्यंत सुपीक आहे. येथील जंगलांत देवदार, महोगनी, रबर, एबनी वगैरे विपुल सांपडतात. शेतकी हा मुख्य धंदा असून येथें बहुतकरून शेतकरीच जमिनीचा मालक असतो. कॉफी व केळीं हीं मुख्य पिकें होतात. तांबें व चांदी याच्या खाणी २० व्या शतकारंभीं संपल्या. सोन्याच्या खाणी चालू आहेत.

व्यापार:—निर्गत (१९१७) २४४७७७७ पौ. असुन त्यात कॉफी, केळीं, कातडीं, लांकूड, सोनें व चांदी याचा समावेश होतो. त्याचवर्षी खाण्याचे पदार्थ, कापूस, गुरे, औषधें, लोखंडी सामान वगैरे पदार्थांची आयात १२०३२७७ पौ. ची झाली

जमाबंदी.—वसूलापैकीं निम्में उत्पन्न जकातीपासून मिळतें. १९१७ सालीं वसूल ६८५१३५ पौ. व खर्च १२३७३६७ पौ. झाला. खर्चांत शिक्षण, अंतर्गत सुधारणा, कर्जाची फेड ह्या मुख्य बाबी असतात.

पैसा व पत:—या देशात तीन पेढ्या आहेत. सोन्याचें कोलन नांवाचें नाणें प्रमाणभूत आहे. स्पॅनिश पद्धतीचीं वजनें चलतात. ३१ डिसेंबर १९१६ रोजीं रिपब्लिकचें परदेशांतलें कर्ज २९५०४५६ पौंड असून देशांतलेंच निवळ १२१३२७८ पौंड होतें.

राज्यव्यवस्था.—१८७०, १८८२ व १९१७ च्या राज्यघटनेप्रमाणें राज्यकारभार चालतो. ४३ सभासदांच्या प्रतिनिधीगृहाच्या हातीं कायदेसत्ता असते. एक अध्यक्ष व तीन उपाध्यक्ष मिळून कार्यकारी मंडळ होतें. वेगवेगळी खातीं ६ सेक्रेटरींच्या ताब्यांत असून ते वरील कार्यकारी मंडळास सहाय्यक म्हणून असतात. प्रत्येक प्रातावर गव्हर्नरची नेमणूक होते. न्यायासाठीं एक वरिष्ठ कोर्ट असतें. १९१३ च्या कायद्यान्वयें वयांत आलेल्या सर्व पुरुष प्रजाजनांना मतदानाचा हक्क असतो.

पारमार्थिक साधनें व शिक्षण—रोमन कॅथोलिक पंथाचे लोक येथें पुष्कळ असून शिवाय धर्मस्वातंत्र्य या देशांत आहे. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असतें. दुय्यम शिक्षणाकडे जरा दुर्लक्ष आहे.

संरक्षण:—युद्धप्रसंगीं १८ ते ५० वर्षें वयाच्या लोकांनां लष्करी नोकरी सक्तीची असते. कायमचें सैन्य ६०० असून युद्धप्रसंगीं ३६००० लोक येऊं शकतील.

इतिहास:—कोस्टारिका या नांवाच्या व्युत्पत्तीसंबंधीं बराच वाद आहे. कोस्टारिका १८२१ पर्यंत स्पेनचा अंकित होता. हा प्रदेश १५३० मध्यें स्पेनच्या पूर्णपणें ताब्यात आला. जॉन व्हॅझक्वेझ कोरोनाडो नांवाच्या सुस्वभावी व हुषार गव्हर्नरानें ह्या प्रांताच्या मर्यादा ठरविल्या त्यावेळीं इंडियनांनां गुलाम करून त्यांचा सोनें मिळविण्याकडे उपयोग करून घेण्याची विशेष प्रवृत्ति होती. १६६६ त व त्याच्या नतर दोन्ही किनाऱ्यावरच्या लोकांकडून फारच उपद्रव होत असे. यामुळे इंडियनांची स्थिति फार वाईट झाली. ते झाडांच्या साली नेसत असून कित्येक वेळीं त्याना या साली सुद्धा उसन्या आणाव्या लागत. त्यावेळीं कोकोबिन प्रचलित नाणें होतें.

१८२१ त इतर मध्यअमेरिकेतील प्रांताबरोबर बंड करून कोस्टारिका हे इटुरबाईड घराण्याच्या सत्तेखालीं असलेल्या मेक्सिकन साम्राज्यांत सामील झालें. परंतु १८२३ नंतर लोकसत्तावादी व उदारमतवादी यांच्यामध्यें लढाई होऊन लोकसत्तावादी विजयी झाले. कोस्टारिका हे १८२४–३९ पर्यंत मध्यअमेरिकेतील संयुक्त संस्थानाच्या प्रजासत्ताक राज्यांपैकीं एक होतें. हें १८४८ त स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य झालें. मध्यंतरीं १८९७–९८ त हें मध्य अमेरिकेतील मोठ्या प्रजासत्ताक राज्यांत होतें. परंतु लवकरच ह्या राज्याचे तुकडे झाले. [सरकारी रिपोर्ट स्टेटसमन्स इयरबुक. काल्व्हे-दि रिपब्लिक ऑफ कोस्टारिका.].

कोहइबाब—ही एक लांबच्या लांब पर्वताची ओळ आहे. ही अफगाणिस्तानच्या मध्यभागातून गेलेली असून अफगाणिस्तानच्या संरक्षणाचे मुख्य साधन झालेली आहे. ही हिंदुकुशपर्वताची एक रांग आहे असें म्हणतात. व तें खरेंहि आहे. शिबर घाटापासून ही पर्वताची रांग पश्चिमेकडे गेली असून यक व लंगच्या जवळ या रांगेच्या चार उपरांगा झाल्या आहेत. यापैकीं अगदीं दक्षिणेकडे जी रांग गेली आहे तिला बंद-इ-दुआर-बान, बंद-इ-बैयान, अशीं बरींच नांवें आहेत. ही रांग हरीरुद दरीपासून गेली असून हिरातपर्यंत गेली आहे. या रांगेला हिरातमधील लोक बंद-इ-बोर असें म्हणतात. दुसऱ्या उपरांगेला सफेद कोह असें नाव आहे. या उपरांगेच्या उत्तरेस सियाह बुबाक ही बंद-इ-बियानच्या समांतर रेषेत हरिरुद दरीच्या उत्तरेकडून गेली असून हरीरुद व मुरघाब याच्या दरम्यान तिच्यापासून एक धबधबा होतो. चौथी उपरांग वायव्येकडे पसरली असून तिचे हात सर्व बाजूला पसरलेले आहेत. व ही उपरांग अफगाण तुर्कस्तानची नैसर्गिक

सरहद्द झाली आहे. या रांगेच्या पश्चिमेकडील ओळींस बंद इ तुर्कस्तान असें म्हणतात. कोह इ बाबची पश्चिम शाखा शिखरांनीं युक्त असून तींतील सर्वांत मोठीं शिखरें १६००० फूट उंचीचीं आहेत. कोह इ बाबच्या दक्षिणेस बेसूर नांवाचा एक डोंगराळ जिल्हा आहे. उत्तरेस अफगाणिस्तानचें सपाट मैदान पसरलें आहे. या पर्वतांतील, इराक (१३००० फूट), हजीगक (१२००० फूट), व झर्दसंग (१३००० फूट) हे मोठे घाट आहेत.

कोहली—वऱ्हाड मध्यप्रांतांतील एक शेतकरी जात. वैनगंगेच्या खोऱ्यांत मराठी भाषा चालू असलेल्या भागांत भंडारा व चांदा जिल्ह्यांत यांची वस्ती आहे. यांचा धंदा आजकाल शेतकी करणें हाच आहे. यांची संख्या २६००० आहे. वैनगंगेच्या खोऱ्यात यांनीं आजपर्यंत मोठीं तळीं बांधलीं आहेत; व त्यामुळें शेतकीला पाण्याचा पुरवठा झाला आहे. उसाची लागवड करणें हा यांचा फार आवडीचा उद्योग असे. हे स्वतःबद्दल असें सांगतात कीं चांदाच्या गोंड राजानें आह्मास काशीहून आणिलें यांच्या चालीरीती व भाषा सर्व मराठी प्रांतांतली दिसते.

यांचीं कांहीं कुळें व उपजाती बनल्या आहेत. त्यांचीं नावें बहुतेक स्थलांवरूनच पडलीं आहेत. यांच्यांत भावाची मुलगी बहिणीच्या मुलानें केलेली चालते पण उलट संबंध करता येत नाहीं. यांची शेती कुदळीनें खोदूनच होते. यांस शेताची रखवालदारी करण्याची फार गरज पडते.म्हणून एकापेक्षा अधिक बायका करणें यांस फायदेशीर आहे. सापत्न बायका भांडू लागल्या तर नवरा त्यांचीं घरें निरनिराळीं बांधून देतो. ब्राह्मणानें मंत्र म्हणून वराकडून वधूच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधवावें व परस्परांनीं एकमेकास माळा घालाव्या म्हणजे झालें. यांचें लग्न ब्राह्मण नसला तर जातीचा वृद्ध माणूसहि चालवितो. विधवांचीं लग्नें मध्यरात्रीं लागतात. कधीं कधीं विधवेचा नवरा लग्नांत स्वतः हाजर न रहाता तलवार किंवा कट्यार ठेवितो. व त्याबरोबर विधवेचें लग्न लागतें. नाहीं तर पांच विधवा तिला नवऱ्याच्या गावाकडे नेतात. वाटेंतील नदीवर पहिल्या नवऱ्याच्या नावानें असलेल्या बांगड्या फोडाव्या मंगळसूत्र तोडावें म्हणजे झालें.कोहली लोकास नेहमी घराबाहेर रहावें लागत असल्यामुळें त्याच्या बायकांनीं व्यभिचार केला तर ते क्षमा करतात. पण घटस्फोट कधींच करीत नाहींत कारण त्याबद्दलचा जबर दंड भरावा लागतो.

कोहली लोकास लग्नाच्या बायकोखेरीज इतर बायका राख म्हणून ठेवतां येतात. कोहली बायकांस मिळालेल्या देणग्या किंवा बापानें दिलेली आणखी कांहीं संपत्ति खुद्द तिच्याच मालकीची असते. या स्त्रीधनास खमोरा म्हणतात. यांनां परवडल्यास हे प्रेतें जाळतात. तळीं बांधण्याचा यास अजून पुष्कळ नाद आहे. हे फार चांगले मालगुजार असतात.

यांच्याकडे कोणी पाहुणा आला तर त्याचे पाय धुतात व ब्राह्मण असला तर पाय धुण्याचा हक्क घेतात. पशु पक्ष्यांचें मांस खातात पण दारू पीत नाहींत. यांचा दर्जा माळी लोकांच्या बरोबर असून कुणब्यांपेक्षा नीच आहे.

कोहलू—बलुचिस्तानांतील सिबी जिल्ह्याच्या सिबी पोटविभागांतील एक तहशील. हिचें क्षेत्रफळ ३६२ चौरस मैल असून, लोकसंख्या १९०१ सालीं १७४३ होती. समुद्रसपाटीपासून ही तहशील ३९०० फूट उंचीवर असून येथील हवा फार चांगली आहे. तहशिलीचें मुख्य ठिकाण कोहलू हें आहे. या तहशिलींत ९ खेडीं आहेत. जमीनमहसुलाचें उत्पन्न १९०३–४ मध्यें १४१५४ झालें.

कोहळा.—लॅटिन नांव बेलिनकास सेरिफेरा; मराठींत कोहळा, हिंदुस्थानांत सफेद कद्दु, कोहोला इत्यादि नांवें आहेत. ही एक भोपळ्याची जात आहे.संस्कृत ग्रथांत कुमरा किंवा कूष्मांड याचा उल्लेख पुष्कळदा केलेला आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व भागांत याची लागवड करितात. याची शेतांत मोठ्या प्रमाणावर लागवड करीत नाहींत. दक्षिण हिंदुस्थानांत याची लागवड पावसाळ्याच्या आरंभीं करावी लागते. बंगालांत आक्टोबर अखेरेपासून डिसेंबर मध्यापर्यंत याची लागवड करतात. पहिलीं चार पानें आल्यावर या वेलांना किडा लागतो व या वेळेस त्यांचा बचाव झाल्यास पुढें किडा लागण्याची भीति नसते. या वेलांनां भरपूर पाणी लागतें व कधीं कधीं प्रवाही खतहि द्यावें लागतें. कोहळे लवकर वेलांवरून काढले पाहिजेत कारण ते लवकर जून होतात. फळें पुष्कळ आलीं तर फुलें तोडून टाकावीं लागतात. तसें न केल्यास फळें चांगलीं पोसत नाहींत. संयुक्त प्रांतांत हिंवाळ्यांत हे वेल होत नाहींत; व त्यामुळें यांची लागवड फेब्रुवारीनंतर करतात. डोंगरावर एप्रिलमध्यें बीं पेरल्यास जुलैमध्यें फळें येतात. मसूरीमधील कोहळे शेंदरी रंगावर असतात. हे मूळचे काश्मीर प्रांतांतले आहेत असें म्हणतात. यूरोप खंडांतील व अमेरिकेंतील शेतांत या पिकाच्या रांगा १२ फुटाच्या अंतरावर करून एक एक वेल १५ फुटांच्या अंतरावर लावतात. एक एकर जमिनींत सुमारें १५ ते २० टन वजनाचीं फळें निघतात. हिंदुस्थानात याच्या बियापासून स्वच्छ खाण्याचें तेल काढतात. हें तेल औषधीहि असतें. या फळाची भाजी करतात. गाईंनां याचीं कच्चीं फळें दिल्यास त्यांनां तीं चांगलीं मानवतात. तो औषधी असतो. कोहळ्याच्या बिया भागेंत घालतात. कोहळ्याच्या फळांवर पक्व होण्याच्या सुमारास पांढरी पिठासारखी पूड येते ती अंगास लागल्यास पांढरे कोड उत्पन्न होतें. तसेंच कोहळ्याचा रस केंसास लागला तर केंस पांढरे होतात अशा समजुती आहेत पण त्या भ्रामक आहेत. हा वेल वाढण्याकरितां झुडुपांचा किंवा मांडवांचा आधार लागतो. किंवा मळ्यांत कुंपणाच्या बाजूस अळी घालून वेल कुंपणावर जाऊं देतात.

कोहळयाची भाजी करतात. कोहळयाच्या पाण्यात पापडाचे पीठ भिजवून केलेले पापड हलके होतात. कोहळयाच्या मगजाचा किसून अगर फोडी करून साखरेच्या पाकांत मुरंबा करतात.

भुईकोहळा.—हीं एक भोंवरीच्या वेलाची जात आहे. या वेलाचीं फुलें जांभळया रंगाचीं असून तीं पावसाळयांत येतात. हा वेल पुष्कळ वर्षे टिकतो. यांस फळें मधून मधून लागतात व तीं वेलाच्या मुळाशीं सुरणासारखीं जमिनींत येतात. तीं निरनिराळया आकारांचीं असतात व त्यांसच भुईकोहळे म्हणतात.

या झाडांस संस्कृतांत भूमिकूष्माड, विदारीकंद, मराठींत भुईकोहळा; लॅटिनमध्यें इपोमीआ डिजिटाटा, हिंदींत वेलाईकंद इत्यादि नांवें आहेत. याची भाजी करून खातात. तसेंच कोहळा कुटून पीठ करून त्याची दुधांत लापशी केली तर ती फार स्वादिष्ट, अतिशय गोड व पौष्टिक होते. हें फळ भाजून खाण्यासहि उपयोगी पडतें. [वंट; पदे].

कोहाट, जिल्हा.—वायव्य सरहद्दीवरील प्रांतातील एक जिल्हा. याचें क्षे. फ.इ. स.१९११सालीं २६९५ चौ. मैल होतें. उत्तरेस पेशावर जिल्हा, जोवाकी पर्वत; वायव्येस ओरकैझ तीराह; नैर्ऋत्येस वझीरिस्तान; आग्नेयीस, बन्नू व मियानवाली जिल्हे; पूर्वेस सिंधु नदी. या जिल्ह्याची जास्तींत जास्त लांबी १०० मैल व रुंदी ५० मैल आहे. या जिल्ह्यांत तृतीय युगातील पाषाणांचे थरच्या थर आढळतात. हे पाषाण रेताड दगडाचे असून त्या दगडांच्या थरात चपटया खडूचा दगडांचेहि कण सापडतात. रेताड दगडाची दक्षिण भागात समृद्धि आहे व उत्तर भागांतहि समृद्धि आहे. व उत्तरभागांत खडूच्या दगडांचें वैपुल्य आहे. या चपटया खडूच्या थराखालीं शेंदेलोण मुबलक सापडतें. हें शेंदेलोण विशेषतः बहादुर खेल येथें पुष्कळ सापडते. येथें याचे थर १००० फूट जाडीचे आहेत. याचा रंग तांबूस असून हें शेंदेलोण फार शुद्ध असतें.

हा जिल्हा उंचीवर असल्यानें येथें उन्हाळा थोडा काळ असतो. पण तेवढ्या काळांत आपली चुणूक भासविल्याशिवाय तो रहात नाहीं. वसंत व शरद हे ऋतु फार बहारीचे असतात. हिंवाळयांत थंडी कडक असते व मीराझी पर्वताच्या दऱ्यांतून थंड वाऱ्याचे प्रवाह सारखे येत असल्यामुळें, ते अंगाला झोंबून फार त्रास होतो. उन्हाळा व थंडी दोन्हीहि कडक स्वरूपाचीं असल्यामुळें न्युमोनियाची साथ येथें वरचेवर येते. शिवाय मलेरियाचा रोग तर येथें कायमचाच तळ देऊन बसलेला आहे.

बाबर बादशहानें आपल्या आयुष्यांतील आठवणी लिहिल्या आहेत त्यात प्रथमतः या जिल्ह्याचा उल्लेख केलेला आढळतो. हल्लींप्रमाणेंच त्यावेळींहि या जिल्ह्यांत पठाण लोकांच्या बंगष व खट्टक या दोन जातींची मुख्यत्वेंकरून वस्ती होती. या बंगष जातींच्या लोकांना, गर्देझहून गिलझैच्या प्रदेशांत हाकून लावण्यांत आल्यानें त्या लोकांनीं १४ व्या शतकाच्या सुमारास कुरम खोऱ्यांत आश्रय घेतला; व तेथून मिराझी व कोहाटच्या मुलुखात तेथील मूळचे लोक जे ओरकैझ यांच्याशीं लढाया करून त्यानां हळू हळू मागें वायव्यसरहद्दीवरील टेंकड्यापलीकडे हाकून लावून मिरांझी व कोहाट या मुलुखावर आपली सत्ता प्रस्थापित केली अशी आख्यायिका आहे. खट्टक लोक हे मूळचे सुलेमान पर्वतात रहाणारे पण तेराव्या शतकाच्या सुमारास त्यानीं आपलें वसतिस्थान सोडून बन्नू जिल्ह्यात वस्ती केली. पण बन्नू जिल्ह्यातील मूळचे रहिवाशी जे बन्नूची त्यांच्याशीं याचें पटेनासें होऊन त्यानीं सुमारे १५ व्या शतकाच्या सुमारास कोहाट जिल्ह्यांत वस्ती केली. इ. स. १५०५ सालीं लूट करण्याच्या इच्छेनें बाबरनें या जिल्ह्यावर स्वारी केली व कोहाट व हंगू हे प्रान्त लुटले. पण अशा रीतीनें कोहाट जिल्हा जरी मोंगलाच्या ताब्यात गेला तरी, मोंगलांचा या जिल्ह्यावरील अंमल नावापुरताच होता. अकबराच्या कारकीर्दीत मलिक अकोर नांवाच्या एका खट्टक जातीच्या सरदारानें काबूल नदीच्या दक्षिणेस असलेल्या मुलुखाचें लुटालुटीपासून रक्षण करण्याचें अकबराजवळ कबूल केलं व याचा मोबदला म्हणून अकबरानें त्याला अकोरच्या प्रदेशावर कर बसविण्याचे अधिकार दिले व इतर थोडासा मुलूखहि त्याला तोडून दिला; एवढेंच नव्हे तर या प्रांतावर अकोरच्या वंशजांचाहि हक्क चालावा ही गोष्टहि त्यानें मान्य केली.

सन १७४७ मध्यें दुराणी साम्राज्याच्या सत्तेखालीं कोहाट प्रांत आला, तरी पण त्या प्रांताचा कारभार बंगष व खट्टक जातींच्या लोकांच्याच ताब्यांत असे. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं सरदार समदखान नावाच्या बारकझै जातीच्या एका सरदाराने, कोहाट व हंगू हा देश आपल्या ताब्यांत आणिला. पण १८२८ मध्यें या सरदाराच्या वंशजानां पेशावरच्या सरदार लोकांनीं हांकून लाविलें. या पेशावरच्या सरदारांत सुलतान महंमदखान हा प्रमुख सरदार होता. टेरी तहशील ही अहमदशहा दुराणीच्या ताब्यात आल्यावर अकोरच्या घराण्याचा कनिष्ठ पुत्र हा या तहशिलीचा कारभार पहात असे व हीच पद्धत रूढ झाल्यामुळें या तहशिलीवर राज्य करणारे मांडलिक घराणें अकोरच्या मुख्य घराण्याशीं तुटकपणानें वागूं लागलें व त्या घराण्यांतील राजानीं स्वतंत्र होण्याचा यत्न आरंभिला. पण यामुळें अकोरच्या मुख्य घराण्यांत व या मांडलिक घराण्यांत टेरी तहशिलीवर कोणी सत्ता चालवावी यासंबंधात वरचेवर भांडणें, खून, मारामाऱ्या होऊं लागल्या व अशा रीतीनें जिकडे तिकडे अंदाधुंदी माजली.

पण लवकरच या प्रांतावर शिखांचें वर्चस्व प्रस्थापित झालें. तरी पण या प्रांतांतील लोकांपासून नियमानें कर वसूल करण्याची या शिखांच्या अंगीं धमक नव्हती. तेव्हां

रणजितसिंगानें सुलतान महंमुदखान नांवाच्या एका इसमाला पेशावरचा सुभेदार नेमून त्याला कोहाट, हंगू व टेरी हे प्रांत बक्षीस दिले. महमदखानानें टेरी तालुक्याची व्यवस्था रसूलखान नांवाच्या एका माणसाकडे सोपविली; व बाकीच्या दोन्ही प्रांतांचा कारभार तो स्वतः आपल्या मुलाच्या साहाय्यानें पाहूं लागला. १८४३ मध्यें रसूलखान वारल्यानंतर त्याचा दत्तक मुलगा ख्वाजा महंमदखान हा गादीवर बसला. दुसरें शीख युद्ध ज्या वेळीं सुरु झालें त्यावेळीं पेशावर येथील शिखांनींहि इंग्रजाविरुद्ध हत्यार उपसलें. त्यावेळीं, पेशावर येथील अंमलदार जॉर्ज लॉरेन्स याने कोहाट येथें आश्रय घेतला; पण सुलतान महंमदखान यानें त्याला शिखांच्या स्वाधीन केलें. सुलतान महंमदखानानें शिखांचा पक्ष धरला होता. पण ख्वाजामहंमदखान हा मात्र इंग्रजांच्या पक्षास मिळाला. पुढें या युद्धांत इंग्रजांची सरशी झाल्यामुळें सुलतान महंमदखान हा आपल्या अनुयायांसह काबूल येथें पळून गेला व त्यामुळें कोहाट व पंजाब हे प्रदेश ब्रिटिश राज्याला जोडण्यांत आले. ख्वाजा महंमदखानानें मात्र ब्रिटिशांचा पक्ष धरला होता म्हणून टेरी तहशील ही त्याच्याकडेच ठेवण्यांत आली व १८७२ मध्यें त्याला नबाब व के. सी. एस्. आय. हे हुद्दे देण्यांत आले. हा १८८९ मध्यें वारला व त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा खान बहादूर अबदुल गफूरखान हा गादीवर आला. १८५१ मध्यें ब्रिटिशसरकारनें जाहीरनामा काढून मिरांझी पर्वताचा टापू आपल्या राज्याला जोडल्याचें जाहीर केलें. पण या टापूंत रहाणाऱ्या पहाडी जाती अतिशय बाणेदार असल्यानें त्या इंग्रज लोकांचें वर्चस्व कबूल करीनात व त्यांना करहि देईनात. तेंव्हा १८५५ मध्यें इंग्रजांनीं ४००० लोकांची एक तुकडी त्यांच्यावर पाठविली. त्यामुळें डोंगरांतील मिरांझी लोकांनां इंग्रजांना शरण येणें भाग पडलें. अशा रीतीनें कुरम नदीपर्यंतचा सर्व मुलूख पादाक्रांत केल्यावर, कोहाट ते पेशावरपर्यंतचा, व बहादूरखेलच्या मार्गानें, बन्नूपर्यंतचा रस्ता असे दोन रस्ते तयार करण्याचें काम सुरू करण्यांत आलें .या कामांत डोंगराळ जातींनीं बरींच विघ्नें आणलीं. पण शेवटीं ते रस्ते कसेबसे पुरे करण्यात आले.

कोहाट जिल्ह्यांत कोहाट, टेरी व हंगू अशा तीन तहशिली आहेत. जिल्ह्यांत एक गांव व २९० खेडीं आहेत. [लो. सं. (इ.स. १९११)२,१४,१२३]. १९११ सालीं या जिल्ह्याची लोकसंख्या २,२२,६१० होती; त्यापैकीं १,१९,०८१ पुरुष व १,०३,९०९ स्त्रिया होत्या. कोहाट तहशिलीची लोकसंख्या ७४१६२० असून टेरी व हंगू यांची १०४४६२ व ४४०६६ इतकी लोकसंख्या होती. कोहाट हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. या जिल्ह्यांत मुसलमान (२०८८६८), हिंदु (१०८४८), शीख (२७३९) व खिश्चन(२२१) असे चार वर्गांच मुख्यतः लोक आहेत.

धंदे.—जिल्ह्यांतील शेंकडा ६८ लोकांचा धंदा शेतकीचा आहे. या जिल्ह्यांतील दऱ्याखोऱ्यांच्या पायथ्याशीं असलेली जमीन चिकण मातीची असून ती सुपीक आहे. जमीनींतून दरवर्षी आक्टोबर ते जानेवारी व जून ते आगस्ट अशीं दोन पिकें काढण्यांत येतात. १९०३-४ सालीं ४६१ चौरस मैल जमीन लागवडीखालीं होती व त्यांपैकीं ६१ चौरस मैलांनां कालवे, तलाव अगर विहिरी इत्यादि साधनांनीं पाणीपुरवठा केला जात होता. जमिनींतील मुख्य पीक म्हणजे गव्हाचें व बाजरीचें होय. याशिवाय चणे, मका, कडधान्यें व ज्वारी इत्यादींचेंहि उत्पन्न होतें. तांदूळ व कापूस यांचें फारच थोडें उत्पन्न आहे. गुरांची निपज चांगली नसते. तीं मुख्यतः पंजाबांतून आणिलीं जातात. उंटाची निपज येथें मोठ्या प्रमाणांत आढळते. जाड शेपटींच्या व साध्या या दोन्हीं प्रकारच्या मेंढ्या व शेळ्या या जिल्ह्यांत पुष्कळ आहेत. येथील घोडे पांढऱ्या वर्णाचे असतात. या जिल्ह्यांत डिस्ट्रिक्ट बोर्ड व म्युनिसिपालिटी यांनीं घोड्याच्या व गाढवाच्या दोन पागा ठेवल्या आहेत जिल्ह्यांतील जंगल सुमारें ७४ चौरस मैल आहे व त्याच्यावर एक स्वतंत्र अधिकारी नेमण्यात आला आहे. जंगलात मझ्री उर्फ देवदारू झाडांची बरीच समृद्धि आढळते; याशिवाय शिशवी, बकैन, पलोसी इत्यादि झाडेंहि आहेत. जट्ट, मालगीन, खरक व बहादूरखेल या ठिकाणीं सैंधवाच्या खाणीच्या खाणी आहेत. यांनीं जवळ जवळ ५० मैल लांब व २० मैल रुंदीचा टापू व्यापिला आहे १९०३-४ सालीं १५,३०७ टन सैंधवाचा खप झाला. तसेंच या जिल्ह्यात पेट्रोलियमचे तीन लहानसे झरे आहेत. कोसट नदीच्या दक्षिणेकडील भागांत गंधक सापडतें. कलाकौशल्याच्या बाबतींत हा जिल्हा मागसलेला आहे. पूर्वी येथें रायफल्स (एक प्रकारची बंदूक) तयार होत असत पण त्याला उत्तेजन न मिळाल्यामुळें तो धंदा बसला आहे. कापड विणण्याचें काम सर्व भागांतून होते. कोहाट गावांत व त्याच्या आसपास रेशमाचीं अगर सुतीं पागोटीं फारच उत्तम तऱ्हेचीं तयार केलीं जातात. देवदारूच्या दोऱ्या, चटया, टोपल्या इत्यादि वस्तू करण्याच्या कामीं उपयोग करण्यांत येतो. उंटावर ठेवण्याकरतां लागणाऱ्या लोंकरी पिशव्याहि येथें चांगल्या तयार होतात. तसेंच कातडी वहाणा अगर जोडेहि येथें उत्तम तऱ्हेचे तयार होतात या जिल्ह्याचा तीराह व काबूलशीं खुशालगड-कोहाट-थल रेल्वेनें बराच मोठा व्यापार चालतो. सैंधव, धान्य, चटया, दोऱ्या, इत्यादि वस्तू बाहेरगांवीं जातात कापड व लोखंड यांची आयात होते. कोहाट, थल, व नर्याद हीं तीन व्यापारी ठिकाणें आहेत. खुशालगड ते थलपर्यंतची रेल्वे १९०३ सालीं सुरू झाली. पेशावर ते कोहट व बन्नू येथपर्यंत टांग्यानें टपालाची नेआण होते. १७९ मैल खडीचा रस्ता असून ५७९ मैल साधा रस्ता आहे. याशिवाय खुशालगडापासून कोहाटच्या मार्गानें थलपर्यंत व खुशालगडापासून ते अटकपर्यंत असे दोन रस्ते आहेत.

शासन पद्धति.—या जिल्ह्याच्या राज्यकारभारासाठीं तीन तहशिली पाडण्यांत आल्या असून त्या प्रत्येकीवर एक तहशिलदार व एक दुय्यम तहशिलदार असे अधिकारी नेमलेले आहेत. डेप्युटी कमिशनरला डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचे फौजदारी अधिकार व डिस्ट्रिक्ट दिवाणी अधिकार असतात. याच्या हाताखालीं एक दुय्यम न्यायाधीश असून त्याला अपील चालविण्याचेहि अधिकार असतात. याशिवाय कोहाट येथें एक मुन्सफ व टेरी येथें एक दिवाणी न्यायाधीश असतो. या जिल्ह्यांत गुन्ह्यांचें प्रमाण अधिक आहे.

टेरी तहशिलीनें कोहाट जिल्ह्याचा अर्धा भाग व्यापिला आहे. ब्रिटिश राज्याशीं ही तहशील जोडण्यात आल्यानंतर तेथील खानानें ३३००० रुपये वसूल ब्रिटिश सरकारला द्यावा असें ठरलें. पण पुढें तो वसूल २०००० पर्यंत करण्यात आला. १९०० त मिराझी टापूचीहि आकारणी ठरविण्यांत आली. अशा रीतीनें इ. स. १९०१–४ त या सर्व जिल्ह्याचा एकंदर वसूल ८३००० रुपये झाला. या जिल्ह्यात फक्त कोहाट या एकाच गावात म्युनिसिपालिटी आहे. १९०४ त या गावाचा वसूल १४१०० रुपये व खर्च १६००० रुपये झाला. १९११ सालच्या खानेसुमारींत एकंदर लोकसंख्येंत शेकडा तीन या प्रमाणांत म्हणजे ६९१२ लोकांना लिहितां वाचतां येत होतें. कोहाट येथें एक दवाखाना व खास स्त्रियांसाठीं एक औषधालय असून शिवाय हंगू व टेरी या ठिकाणीं एक एक दवाखाना आहे.

त ह शी ल.–कोहाट जिल्ह्यातील तहशील. हिचें क्षेत्रफळ १९११ सालीं चौरस मैल होतें. या तहशिलीचे दोन भाग आहेत. पैकीं पश्चिम भागात कोहाट शहर व कॅंटोनमेंट असून या भागातून कोहाट नदी वहात गेली आहे. दुसरा भाग म्हणजे एक सपाट मैदान आहे. या तहशिलीची लोकसंख्या ७४,१६२ होती. १९०३–४ सालांत या तहशिलीचा वसूल ९०००० रुपये होता. या तहशिलींत कोहाट हे तहशिलीचें मुख्य ठिकाण व ८५ खेडीं आहेत.

गां व.—कोहाट जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. खुशालगडाहून ३० मैलांवर हें आहे. इ. स. १९११ सालीं या शहराची वस्ती २२६५४ असून त्यापैकीं कँटोनमेंटची ७५०३ होती. त्याच्या पैकीं १५९३० मुसुलमान;४८५० हिंदू १६९३ शीख. व १३८ ख्रिश्चन धर्माचे लोक होते. ब्रिटिश राज्याला कोहाट जिल्हा जोडण्यांत आल्यानंतर हें शहर अस्तित्वांत आलें. हें शहर उंचसखल जागीं वसलें आहे. लष्कर व पोलीस ठाणें ही उंच जागेवर वसलीं आहेत. येथें लष्करी शिपायांच्या चार तुकड्या व तोफखाना आहे. इ. स. १८७३ मध्यें या शहराला म्युनिसिपाटी देण्यांत आली या शहराचें सर्वसाधारण उत्पन्न ४१००० असून खर्च ३६००० रुपये आहे. या ठिकाणीं एक आंग्लोव्हर्नाक्युलर हायस्कूल, एक पुरुषांसाठीं व एक स्त्रियांसाठीं दवाखाना आहे. या शहराला व्यापारी दृष्ट्या मुळींच महत्व नाहीं. या शहराच्या नजीक जंगलखेल या खेड्यांत बंदुका तयार करण्याचा धंदा पूर्वी होता तो हल्लीं नामशेष झाला आहे.

येथें इ. स. १९२४ च्या सप्टेंबर मध्यें हिंदु मुसुलमानांत दंगा झाला त्यावेळीं सरकारास हिंदूंचें संरक्षण करतां न आल्यामुळें बऱ्याच लोकांस स्थानत्याग करावा लागला

कोहिस्तान—मुंबई इलाख्यांतील सिंधप्रांताच्या कराची जिल्ह्यांतील एक डोंगराळ प्रदेश. हा किरथार पर्वताच्या ओळीच्या सुळक्यांनीं बनलेला आहे. या प्रदेशाच्या दक्षिण भागांत सपाट मैदान आहे व येथें गुरांना मुबलक चारा मिळतो. कोहिस्तान येथील जमीनीला पावसाची अत्यंत जरूरी भासते. अथवा जमीनीजवळ पाण्याचे ओहोळ तरी असावे लागतात. असे ओहोळ ज्या जमीनीजवळ असतात, तेथील जमीन चांगली पिकते. अशा ओहोळांना ' नै ' असें नाव आहे. बारण नावाचा या प्रदेशात एक प्रमुख झरा असून तो कोट्रीच्या नजीक सिंधूला मिळालेला आहे.

कोहिस्तान हा एक महाल असून १९११ सालीं तेथील लोकसंख्या १८,४८३ होती. येथील लोक रानटी असून त्यांत सिंधी व बलूची लोकांचा भरणा बराच आहे. हे लोक उंट, गुरे, शेळया व मेंढ्या यांची जोपासना करून त्यांवर आपली उपजीविका करितात.

कोहीम—आसामांत नागा टेंकड्यां जिल्ह्याच्या कोहिमा पोट विभागाचें मुख्य ठिकाण. हें समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीवर आहे. ब्रह्मपुत्रा दरींतील दिमापूर गांवापासून मणिपूरकडे जाणारा रस्ता या गांवावरून जातो. या गावाची लोकसंख्या १९११ सालीं २४२३ होती. येथील पर्जन्यमान ७६ इंच आहे. येथील हवा थंड व सुंदर आहे. या ठिकाणीं एक धर्मार्थ रुग्णालय आहे. येथे काळ्या लोकांच्या दोन पलटणी व एक लष्करी तुकडी आहे.

कोहीर—हैद्राबाद. बेदर तालुक्यातील एक गाव. हें बेदर शहरापासून आग्नेयीस २४ मैलांवर आहे. या गांवाची लोकसंख्या १९११ मध्यें ६४८६ होती. या गांवात पुष्कळ माशिदी असून दोन प्रसिद्ध मुसलमान साधूंचीं थडगीं आहेत. येथील जुम्मा मशीद ही बहामनी राजांच्या अमदानींत बांधली असें म्हणतात. येथें एक प्राथमिक शिक्षणाची शाळा असून एक मुलींची शाळा, पोस्टऑफिस व पोलिसइन्स्पेक्टरचें ऑफिस आहे. कोहीर गाव आंब्यांकरितां फार प्रसिद्ध आहे.

कोळसा (द ग डी)—यास इंग्रजींत कोल, मराठीत दगडी कोळसा, हिंदींत पत्थरका कोयला अशीं नावें आहेत. हा खनिज पदार्थ व्यापारी दृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. आपण लांकडें जाळून तयार केलेला कोळसा लोणाऱ्याकडून घेतो त्यांत व या दगडी कोळशांत रासायनिक दृष्ट्या फारसा फरक नाहीं. पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यप्राण्यांचा संचार होण्यापूर्वी हजारों वर्षे दलदलीच्या प्रदेशांत उगवणाऱ्या वनस्पती व निबिड अरण्यें हीं भूकंपादि आपातांनीं जमिनींत गाडलीं जाऊन त्यांच्यावर नाना प्रकारची रासायनिक

क्रिया होऊन त्यापासून दगडी कोळशाच्या खाणी बनतात. दगडी कोळसा येथील लोकांनां फार प्राचीन काळापासून माहीत होता याबद्दल मुळींच शंका नाहीं. परंतु यूरोपियन लोकांनीं येथें येऊन खाणी खणून त्याचा व्यापार सुरू करी-पर्यंत कोळशाचा व्यापार येथें चालत नसे. याचा किरकोळ स्थानिक धंद्यांत किंवा घरगुती कामात फारसा उपयोग करीत नाहींत. इंग्लंडमध्यें तिसऱ्या हेनरीनें इ. स. १२३९ त पहिल्यानें दगडी कोळशाची खाण खणण्यास परवाना दिला. दगडी कोळशाला तेव्हां समुद्रकोळसा म्हणत असत. इ. स. १३०६ सालीं दगडी कोळशाच्या उपयोगाला इंग्लंडांत प्रति-बंध केला होता. परंतु १३२५ त इंग्लंड व फ्रान्समध्यें पर-स्पर दगडी कोळसा व धान्य यांची देवघेव होत असे. न्यू कॅसलच्या कोळशाची प्रसिद्धि त्याच वेळेस झाली. यानंतर दोन शतकेंपर्यंत इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड व जर्मनी येथे न्यू कॅसलहून कोळशाचा पुरवठा होत असे. १७७६ च्या सुमा-रास न्यू कॅसलप्रमाणेंच सेंडरलंड, हार्टले, डरहॅम व ब्लिथ हीं ठिकाणें कोळशाकरितां प्रसिद्धीस आलीं. अशी स्थिति अस-ताना हिंदुस्थानातील यूरोपियन लोकानां १८ व्या शतकात येथेंहि कोळशाचा व्यापार शक्य असल्यास सुरू करावासा वाटणें साहजिक होतें.

इ. स. १७७४ त वॉरन हेस्टिंग्जनें ईस्ट इंडिया कंप-नीच्या दोन नोकरानां कोळशाच्या खाणी खोदण्याकरिता परवाना दिला.त्यांच्यापैकीं हीटलेनें काढलेला कोळसा इंग्लंड-मधील कोळशापेक्षां कमी दर्जाचा ठरला. लॉर्ड कॉर्नवॉलिसनें या धंद्याकडे बरेंच दुर्लक्ष केल्यामुळें कोळशाच्या व्यापाराची पहिल्यानें भरभराट झाली नाहीं. (विल्यम-वाइल्ड स्पोर्टस इन् दि ईस्ट, १८०८, पृ. ७८).

हिंदुस्थानांत मिळणाऱ्या कोळशापेक्षा कंपनीच्या बोटींतून भरताड म्हणून विलायती दगडी कोळसाच आणून तो येथील तोफखान्यांच्या कारखान्यांकरितां पाठविणें सोईचें होतें असें आढळून आलें. परंतु १८०८ च्या सुमारास कंपनीच्या लंडन येथील डायरेक्टरानीं हिंदुस्थानातील प्रतिवर्षी वाढत जाणाऱ्या कोळशाच्या मागणीमुळे जास्त येणाऱ्या खर्चाविरुद्ध कुरकुर केली व दगडी कोळशाच्याऐवजीं लांकडी कोळसा वापरतां येईल किंवा नाहीं याची चौकशी करण्याबद्दल सूचना आणली. तसें करणें शक्य नसल्यास कंपनीनें तोफा करण्याचे कारखाने हिंदुस्थानांतून काढून इंग्लंडमध्यें आणावे अशीहि सूचना केली होती. याच सुमाराला अर्ल ऑफ मिंटो हा गव्हर्नर जन रल होता. त्यानें येथील कोळशाची परीक्षा करण्याकरितां कर्नल हार्डविक् याला सांगितले. हार्डविक्नें हिंदुस्थानांतील कोळशाची शिफारस केली नाहीं व कांहीं काळपर्यंत कोळ-शाचा प्रश्न मागें पडला. परंतु १८१४ त लॉर्ड हेस्टिंग्जनें कोळशाचा प्रश्न पुन्हा हातीं घेऊन काळजीपूर्वक त्याचा निर्णय करण्याचें ठरविलें. या वेळेस एका तज्ञ मनुष्या-कडून कोळसा तपासविण्याचें त्यानें ठरवून त्याला लागणारी सर्व सामुग्रीहि देण्याचें त्यानें जाहिर केलें त्या हुकुमान्वयें जोन्स नांवाच्या तज्ञानें येथील कोळसा पुष्कळ सरस अस-ल्याचें प्रसिद्ध केलें (एशियाटिक रिसर्चेस १८३३. पृ. १६३ ते ७५) हा अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून येथील कोळशाच्या खोदकामाला पुन्हां चलन मिळालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१८२० सालीं सरकारांतून ४००० पौंड जोन्स यास खाणी खणण्याकरितां आगाऊ मिळाले. परंतु या कामांत त्याला यावें तसें यश आलें नाहीं. यूरोपियन लोकांच्या देख-रेखीखालीं व भांडवलानें १८२० सालीं बंगाल प्रांतांत राणी-गंज येथें पहिली खाण सुरू केली. १८३९ त या खाणींतून ३६००० टन कोळसा निघाला. इ. स. १८५४ त ईस्टइंडिया रेल्वे सुरू होईपर्यंत कोळशाचा व्यापार फार मंद असे, परंतु रेल्वे कंपनी निघाल्यापासून व कलकत्यामधील ज्यूटचे कार-खाने व इतर पक्का माल तयार करण्याचे धंदे निघाल्यापासून कोळशाच्या व्यापाराला भरभराट आली व इकडील लोकहि आपलें भांडवल त्या धंद्यांत घालूं लागले. इ. स. १८५७–५८ सालीं हिंदुस्थानांत २,९३,४४३ टन कोळसा निघाला व ९२,९८३ टन कोळसा परदेशांतून आला. या सालापासून कोळशाच्या व्यापाराला कायमचें स्वरूप प्राप्त झालें. दरवर्षी किती कोळसा निघाला हें पुढील कोष्टकांत दिलें आहे. (वजनाचे आंकडे टनाचे आहेत.)

वर्ष	वजन
१८६८	४५९४०८
१८७८	९२५४९४
१८९८	४६०८१९६
१९०४	८३४८५६१
१९०६	९७८३२५०
१९१८	२०४२२५००

यांपैकीं शेकडा ८८ हिस्से कोळसा बंगालमध्यें निघतो. राणीगंजच्या खाणींची फार प्रगति झाली आहे. कारण कल-कत्यापासून त्या फक्त १२० ते १४० मैल अंतरावर आहेत. कलकत्यापासून सुमारें १८० मैल लांबीवर असलेल्या झेरिया येथील खाणी मात्र अलीकडे राणीगंजच्या खाणींनां मागें टाकूं लागल्या आहेत. गिरिधी येथील खाणींचीहि तशीच स्थिति आहे. हिंदुस्थानांत लागणारा सर्व कोळसा अलीकडे येथेंच उत्पन्न होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण कोळशाची आयात दर वर्षी कमी होऊं लागली आहे. परदेशांतून येणाऱ्या कोळशापैकीं बराचसा कोळसा मुंबई येथेंच खपतो. हिंदुस्थानला इंग्लंड, आस्ट्रेलिया व जपान येथून दगडी कोळशाचा पुरवठा होतो. हिंदीमहासागरांतील बंदरांनां कोळसा पुरविण्याचा व्यापार नवीन सुरू झाला आहे. यूरोप व जपानमधील संप व इतर कांहीं आकस्मिक कारणांनीं कोळशाचा भाव वाढल्यामुळें या व्यापाराला तर जास्तच महत्व आलें आहे.

याशिवाय आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे येथील कोळसा जगांतील सर्व कोळशापेक्षां स्वस्त मिळतो हा होय. १९१८ साली खाणीच्या तोंडाशींच कोळसा विकत घेतल्यास एका टनाला ४ रु. ६ आणे पडत. इंडियन मायनिंग असोसिएशन व बंगाल चेंबर ऑफ कॉमर्सच्या दर वर्षाच्या अहवालावरून आपणाला कोळशाच्या व्यापाराची स्थिति कळून येते.

हॉलंडनें या बिषयावर आपल्या रिव्ह्यूमध्यें चांगली माहिती दिली आहे. त्यांपैकीं कांहीं पुढें दिली आहे.— हिंदुस्थानांतील बहुतेक कोळसा गोंडवण येथील खाणींतून निघतो. या खाणी किनाऱ्याजवळ व मुख्य रेल्वे फांट्यांच्या जवळ असल्यामुळें येथील कोळसा फायदेशीर पडतो.

गोंडवण—कोळसः—राणीगंज येथील खाणीची पहिल्यानें भरभराट होऊन सर्वांत जास्त कोळसा तिच्यांतून निघत असे. परंतु १९०६ पासून झेरियाच्या खाणींनीं अघाडी मारली आहे. ईस्ट इंडिया रेल्वे व बंगाल नागपूर रेल्वे कंपन्या या खाणींतील कोळसा वापरतात.

राणीगंज येथील कोळसा मुख्यत्वेंकरून डामुडा सेरिजच्या वरच्या थरांतून काढलेला असतो. बराकर सेरिजचा कोळसा राणिगंज येथील कोळशाइतका चांगला झालेला नाहीं. परंतु झेरिया येथें वरील थरापासून हलका कोळसा निघतो व बराकर सेरिजपैकीं कोळसा चांगला असतो.

गि रि धी ये थी ल खा णी.— गिरिधीजवळील गोंडवणाच्या दगडी कोळशाच्या खडकांपैकीं कोळसा ईस्टइंडिया रेल्वे कंपनी व बंगाल कोल कंपनी वाटून घेतात. येथील खाणीचा मुख्य भाग म्हणजे 'डामुडा सेरिज' च्या पायथ्याशीं असलेला १५ फूट जाडीचा थर हा होय. तेथील उरलेला कोळशाचा पुरवठा ७.७ कोटि टनांपेक्षां जास्त होणार नाहीं असा अंदाज आहे.

म ध्य प्रां तां तील पे च खो ऱ्यां ती ल खा णीः १९१८ साली येथील खाणींतून २६७३०० टन कोळसा निघाला. मुंबई व दक्षिण प्रांतातील कारखान्यांना या खाणींचें महत्व फार आहे.

मध्यप्रांतांतील नरसिंगपूर जिल्ह्याच्या मोहपाणी येथील खाणीः—नर्मदाकोल व आयर्न कंपनी या खाणींतील कोळसा १८६२ सालापासून काढीत आहे. या खाणींची कांहीं विशेष प्रगती झालेली दिसत नाहीं. परंतु तिच्या पश्चिमेस सुमारें दोन मैलांवर नवीन कोळसा सांपडला असून तो काढण्याचें काम सुरू झालें होतें.

चांदा (मध्यप्रांत) जिल्ह्यांतील खाणीः—ह्या नागपूरच्या दक्षिणेस सुमारें ६२ मैल असून तेथील कोळसा १८७१ पासून काढीत आहेत. या खाणींतून निघणाऱ्या कोळशापैकीं सुमारें अर्धा कोळसा जि. आय. पी. रेल्वे कंपनी विकत घेते व बाकीचा मध्यप्रांतांतील कापसाचे कारखाने व कापडाच्या गिरण्या यांनां लागतो. वरोड्याचा कोळसा लवकर पेट घेणारा असल्यामुळें आगीनें खाणीपैकीं बराच भाग जळून फार नुकसान झालें. बंगालपेक्षां वरोडा येथील खाणीच्या कामांत पुष्कळ नैसर्गिक अडचणी आल्या होत्या. कोळसा काढण्याच्या नवीन पद्धतीमुळें वरोडा येथें पाणी व आग यांपासून आतां फारसें नुकसान होत नाहीं. व अपघातानें प्राणहानींहि कमी होते. लवकरच वरोड्याच्या खाणींतील कोळसा संपण्याचीं चिन्हें दिसत आहेत. पण बेलापूरजवळील खाणींतून कोळसा निघूं लागल्यापासून आतां ही भीति बाळगण्याचें कारण राहिलें नाहीं.

नि जा म च्या रा ज्यां ती ल सिं गा रे णी ये थी ल खा णीः—वरोड्याच्या आग्नेयीस असणाऱ्या गोंडवणचे दगडी कोळशाचे खडक गोदावरी खोऱ्यातील राजमहेंद्रीपर्यंत आहेत. वरच्या गोंडवणच्या खडकातून बंगालमधील दामुदासेरीजपैकी कोळसा कोठें कोठें सापडतो. निझामच्या राज्यांतील येलांडुजवळील खाण प्रसिद्ध आहे. गोंडवणच्या खाणीपेक्षां सिंगारेणी येथें अपघातानें फार लोक मरतात वाफ तयार करण्याकरितां सिंगारेणी येथील कोळसा हलक्या प्रतीचा असून तो जाळल्यानंतर कांहीं अदाह्य भाग शिल्लक रहात नाहीं असे तज्ज्ञांचें मत आहे. या सर्व कारणामुळें सिंगारेणी येथील खाणींची फार मंद प्रगति झाली आहे.

उ मा रि या (रेवा स्टेट, मध्य हिंदुस्थान) ये थी ल को ळ शा च्या खा णीः—बंगालनागपूर रेल्वेचा बिलासपूर कटनी फाटा या खाणीवरून जातो. या खाणींतून सुमारें २ कोटी ४० लक्ष टन कोळसा निघेल असा अंदाज आहे. आजपर्यंत कोळसा काढलेले चार थर ३ ते १२ फूट जाड होते. खाणींतील कोळसा काढण्यास सुरवात १८८२ त मि. टी. डब्ल्यू. एव्. ह्यूजेस यांच्या सूचनेवरून करण्यांत आली व १९०० सालच्या जानेवारीच्या पहिल्या तारखेपर्यंत खाणीची देखरेख सरकार करीत असे. परंतु तेव्हांपासून रेवा संस्थानाला सर्व सत्ता दिली गेली. येथील बहुतेक कोळसा जी. आय. पी रेल्वे व बंगालनागपूर रेल्वेला विकतात.

२ खडूमिश्रित व भूस्तरांतील तृतीयावस्थाक कोळसाः— अर्वाचीन कोळसा बहुतेक सर्व खडूमिश्रित व तृतीयावस्थाक आहे. खडूमिश्रित कोळसा आसामच्या खांशिया व गारो टेंकड्यातून सापडतो. आसामांतील या कोळशांत प्रास्तर राळेचे पुंज आढळतात. इतर कोळशांपेक्षा यांत हें वैशिष्टय आहे. तृतीयावस्थाक कोळसा सिंध, राजपुताना, बलुचिस्तान, आसाम, ब्रह्मदेश, हिमालयाच्या पायथ्याजवळच्या टेंकड्या व अंदमान आणि निकोबार बेटांतून सांपडतो.

अर्वाचीन कोळसा एकंदरींत गोंडवणच्या कोळशाहून फार भिन्न आहे. त्यांत गोंडवणच्या कोळशापेक्षां आर्द्रता जास्त असून उडून जाणारे बाष्पभावी उत्कर्षहि जास्त असतात. या कोळशांच्या थरांच्या जाडीचें प्रमाण व त्यांच्यामधील

मांपडणाऱ्या द्रव्याचें प्रमाण ठरीव नसतें. यांच्यापासून राख कमी होते व जळतांना तो फार उष्णता देतो.

आ सा म च्या ई शा न्ये क डी ल मा कु म खा णीः— आसामांतील व्यापारी व रेल्वे कंपनीनें या खाणींतून कोळसा काढण्यास १८८१ त सुरुवात केली. ब्रह्मपुत्रा नदीवरील डिब्रूगडला या खाणी रेल्वेनें जोडिल्या आहेत. ब्रह्मपुत्रा नदी जहाजें जाण्यास योग्य असल्यामुळें कोळसा पलीकडे पाठविणें फार सोपें जातें. तिरप व नामडांग ओढ्यांच्यामधील भागांत फार मौल्यवान थर सांपडतात. पांच मैल दूरवर आसमंतात यांची जाडी १५ ते ७५ फूट आहे. जाळण्याकरितां हा कोळसा चांगला असल्याबद्दल त्याची ख्याति आहे व यापासून उत्तम कोक बनतो.

ब्र ह्म दे शां ती ल श्वे बो जि ल्ह्यां ती ल खा र्ण.— ब्रह्मदेशाच्या बहुतेक भागांत कोळसा सांपडतो. अलीकडे नामार्वजवळ १० फूट जाड थराचा कोळसा असल्याचें निश्चित समजलें आहे.

ब लु चि स्ता न च्या खा णीः— पश्चिमहिंदुस्तानांतील बहुतेक सर्व कोळसा मुख्यत्वेंकरून बलुचिस्तानांत सांपडतो. परंतु येथील खडक अस्थिर असल्यामुळें खाणी खणणें खर्चाचें व धोक्याचें झालें आहे. सोर, बोलन व खोस्ट येथील खाणी चांगल्या आहेत. खोस्टच्या खाणींतून १९१८ सालीं २९०० टन कोळसा निघाला.

झे ल म जि ल्ह्यां ती ल (पं जा ब) डॉ न्डो ट ये थी ल खा णीः—येथील मौल्यवान थर १८ ते ३९ इंच जाड असतात व 'नुम्युलिटिक' चुनखडीखालीं ते पसरलेले असतात. नॉर्थ वेस्टर्न रेल्वे कंपनी १८८८ पासून या कोळशाचा उपयोग करीत आहे.

मा ग न वा ला ये थी खा णी.—मिठाच्या डोंगरांच्या ओळींच्या पूर्वेस कोळशाचे थर आहेत. त्यांची जाडी ठिकठिकाणीं कमी जास्त आहे. येथील कोळसासुद्धां नॉर्थ वेस्टर्न रेल्वे कंपनीच काढिते.

मि आ न वा लीं जि ल्ह्यां ती ल खा णी.— कालाबागच्या उत्तरेस सुमारें दोन मैलांवर या खाणी आहेत. येथील कोळशाला 'जूरासिक' कोळसा म्हणतात. पश्चिमेस सुमारें २४ मैलांवर असलेल्या मैदानांतून चांगला कोळसा येतो. तो तृतीयावस्थाक आहे

का श्मी र ये थी ल खा णीः—जम्मूच्या खाणींतील कोळसा १९०३ पासून काढण्यास सुरुवात झाली. लाङ्घा कोळसा बंगालच्या कोळशाइतकाच चांगला निघूं शकेल परंतु किंमतीस त्याजबरोबर स्पर्धा करणें लाङ्घा कोळशाला कठिण आहे.

रा ज पु ता न्यां ती ल बि का ने र ये थी ल खा णी—येथील कोळसा गर्द तपकिरी रंगाचा असून ज्या लांकडापासून तो झालेला आहे त्याची रचना यांत स्पष्ट दिसते. तसेंच प्रास्तर राळहि यांत सांपडते. ज्या ठिकाणीं २० इंच जाड थर असेल अशी कल्पना होती. तेथें खाण खणण्यास १८९८ सालीं सुरुवात केली. जळाऊ लांकडें एंजीनमधून वापरणें फायदेशीर होत नाहीं. परंतु अलीकडे कोळशाच्या चुऱ्याचे गोळे बनवून वापरणें किफायतशीर असल्याचें सिद्ध झालें आहे. असें केल्यानें त्यांतील आर्द्रता कमी होते व हवेचा परिणाम त्याच्यावर फारसा होत नाहीं. रेल्वे कंपन्यांना याचा सहज पुरवठा करतां येण्यासारखा असल्यामुळें त्याचा हलकेपणा कोणी फारसा लक्षांत घेत नाहीं. १९१८ सालीं या खाणींतून ११३०० टन कोळसा निघाला.

हिंदुस्थानातील निरनिराळया कोळशाच्या क्षेत्रांतून १९१८ सालीं किती कोळसा निघाला त्याचा टनवार तपशील.:—

स्थानें.	टन.
गोंडवणकोल फील्ड्स्	
बंगाल, बिहार व ओरिसा—	
डाल्टनगंज	८१८००
गिरिधी	८४६६००
झेरिया	१०९५२०००
जेन्टी	१४०४००
रामगड बोकारो	५४२०००
राणीगंज	६३६८५००
संबळपूर	५१०००
मध्यहिंदुस्थान—	
उमरिया (रेवा)	२०००००
मध्यप्रांत—	
मोहपाणी	७८८००
पंचव्हॅलि	२६७३००
बल्लारपूर (चांदा)	१३५४००
हैद्राबाद—	
सिंगरेरी	६५९१००
एकूण	२०३२२९००

टर्शिअरी (तृतीयावस्थाक) कोलफील्डस्—	
बलुचिस्तान—	
खोस्ट	२९०००
सोररेंज माक्, इत्यादि	१४१००
आसाम—	
माकुम इत्यादि	२९४५००
वायव्य सरहद्दप्रांत—	
हझारा	२००
पंजाब (सॉल्टरेंज)—	
झेलम जिल्हा	३९७००

(कोष्टक पृ. १२६ वरून पुढें चालू)

मियानवाली	५२००
शाहापुर	५६००
राजपुताना—	
बिकानेर	११३००
एकूण	३९९६००
एकूण सर्व	२०७२२५८०

हिंदुस्थानांतील व जगांतील कोळशाच्या पैदाशीचें तुलनात्मक टिपण पुढें दिलें आहे यांतील आंकडे १९१८ सालचे आहेत (आंकडे हजार टनी आहेत):-

हिंदुस्थान (अदमासें) २०७२२ अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें ६,११,९२'१; युनायटेड किंगडम् २,२७,७४९; जर्मन साम्राज्य १५,७९२८; फ्रान्स २४,५३७; रशियन साम्राज्य ३०,४७३ (१९१७ सालांतील); जपान २७,५७९; ऑस्ट्रिया हंगेरी १७,३१९ (१९१६ सालांतील); बेलजिअम १३,६००; कानडा १५,१८०; ऑस्ट्रेलिया १०,२३७ (१९१७ सालांतील); साउथ आफ्रिका ९२७१; स्पेन ६४०८; न्यूझीलंड २०३४.

येथेंच हिंदुस्थानांत १९१८ सालीं कशाप्रीत्यर्थ किती कोळसा खर्च झाला त्याचें तपशीलवार टिपण देणें उपयोगी होईल (आंकडे हजार टनी आहेत):-

रेल्वे ५८८१; अॅडमिरॅलिटि व रॉयल इंडियन मॅरिन शिपिंग अकाउंटस्. १३५८; बंकर कोळसा ११८०; जूटच्या गिरण्या १०४५; कापडगिरण्या ९६८; लोखंड व पितळ यांचे कारखाने (एंजिनिअरिंग वर्कशॉप्स सुद्धा) १३०७; अन्तर्देशीय आगबोटी ४८५; विटा व कौल कारखाने (पॉटरी व सिमेंट कामा सुद्धां) ४७७; चहाच्या बागा २२५; पोर्ट ट्रस्ट्स १६३; कागदाच्या गिरण्या १६६; कोळशाच्या खाणींस लागणारा व फुकट जाणारा २४८७; औद्योगिक व घरगुती व्यय वगैरे ४९६०.

खा णीं चें खो द का म.—मजुरीः-कोळशाच्या खाणींतून मजुरांच्या बाबतींत हिंदुस्थाननें इतर खाणी खोदण्याच्या तऱ्हांपेक्षां फार अघाडी मारली आहे. १८९८ ते १९०३ पर्यंत दररोज सरासरी ८४८०५ मजूर खाणीवर काम करीत. १९०५ सालीं ९२७४० मजूर कामावर असून त्यांपैकीं ७५७४९ मजूर बंगालमध्यें काम करीत होते. १९१८ त एकंदर १९१३२५ मजूर कामावर होते. पैकीं बिहार-ओरिसांतच११८८४९मजूर काम करीत होते. ब्रिटिश साम्राज्यात फक्त केपकॉलनी खेरीजकरून हिंदुस्थानमध्यें मजुरांच्या कामाचें प्रमाण इतर भागांतील मजुरांच्या कामापेक्षां कमी पडतें. १९१८ सालीं हिंदुस्थानांतील खाणींतील प्रत्येक मनुष्यानें सुमारें १७२ टन कोळसा काढला, परंतु ब्रिटिश साम्राज्याच्या इतर भागांत प्रत्येक मजुरानें २८७ टन कोळसा काढला. खाणींत काम करावयाचें म्हणजे अपघातानें मरण येण्याची फार भीति असते, परंतु यूरोपपेक्षां हिंदुस्थानांत प्राणहानि फार कमी होते असें आढळून आलें आहे. १९१८ त दर हजारी मृत्यूंचें प्रमाण १·११ आहे.

को ळ सा का ढ ण्या च्या री ती.—कोणच्याहि एखाद्या नवीन ठिकाणीं दगडी कोळशाची खाण व्यापारीदृष्ट्या फायदेशीर पडेल किंवा नाहीं हें पहाण्याकरितां भूगर्भशास्त्र जाणणारे लोक गिरमिटाच्या आकाराचें जमीनींत भोंक पाडण्याचें यंत्र असतें. त्याच्या सहाय्यानें ४।५ ठिकाणीं छिद्रें पाडून त्यायोगानें भूपृष्ठापासून किती अंतरावर व किती खोलीपर्यंत कोळशाचा पुरवठा आहे व त्याचें क्षेत्र किती लांबवर आहे हें समजतें. फायदेशीर वाटल्यासच खाण उघडण्याचा यत्न करितात. कित्येक खाणींची खोली१००० पासून १५०० फुटांहूनहि अधिक असते व तिचा घेर ४०० ते ५०० मैल पर्यंत असूं शकतो एवढया सर्वच भागांत कोळसा सारखा भरलेला सांपडत नाहीं. तर एक एका थराची जाडी फार तर २५।३० फूट असते. असे कित्येक थर खणून काढावे लागतात. कारण ह्या थरांच्या मध्यें रेतीचे, दगडांचे किंवा मातीचे थर असतात कोळशाची खाण म्हणजे एक विस्तीर्ण शहरच असतें. भूपृष्ठावरच्या शहरांतील सर्व रस्ते व गल्ल्या बहुतकरून एकाच भूपृष्ठावर असतात. परंतु खाणींतील रस्त्याचे एकावर एक असे पांचपांच दहादहा मजले असतात. खाणींतील मजूर व इतर कामकरी लोक यांस आत उतरण्याकरितां पाळणे असतात. कोळसा व कामकरी माणसें वर येण्याकरितां, तसेंच पवनचक्कीच्या सहाय्यानें सर्व खाणींत हवा खेळविण्याकरितां एंजिनचा उपयोग करावा लागतो.

कोळसा काढण्याच्या तीन चार पद्धतींपैकीं ' लॉगवॉल ' व ' बोर्ड अॅन्ड पिलर ' या दोन प्रमुख पद्धती आहेत. पैकीं दुसऱ्या पद्धतीलाच ' स्टूप अॅन्ड रूम ' व ' पोस्ट अॅन्ड स्टॉल ' अशींहि नांवें आहेत. ' बोर्ड अॅन्ड पिलर ' ही पद्धत ' लॉगवॉल ' पद्धतीपेक्षा प्राचीन आहे. हींत शॅफ्ट उर्फ खड्ड्यापासून वरच्या भागापर्यंत दोन सरळ अशा मुख्य वाटा खोदतात. नंतर या मधल्या बोगद्याशीं लंब (आडवे) असे लहान लहान बोगदे खोदून पुन्हा पहिल्या बोगद्याशीं समांतर व आकारानें तेवढाच असा दुसरा बोगदा खोदतात व तेथील कोळसे काढतात. पुन्हां आडव्या अशा लहान वाटा खोदून तिसरा समांतर बोगदा खोदतात व तेथील कोळसे काढतात. याप्रमाणें खोदीत व कोळसे काढीत गेले म्हणजे खाणींतील या बोगद्यांची व वाटांची रचना बुद्धिबळाच्या पटासारखी दिसते. या(लॉगवॉल) पद्धतीप्रमाणें कोळसा निरनिराळ्या स्वतंत्र बोगद्यातून न काढता एकदम काढण्यांत येतो. कोळशाच्या पहिल्या थरापासून तो खालपर्यंत भिंतीच्या आकाराप्रमाणें खोदाई करण्यांत येते व अशा तऱ्हेनें पहिली भिंत खणून झाल्यावर लगेच त्याच्या मागची भिंत खणण्यास सुरुवात होते. अशा प्रकारचें खोदण्याचें काम एकाच दिशेनें होतें असें नाहीं तर एकदम चारी दिशांनींहि कामाला सुरवात करण्यांत येते. कोळसा वर नेण्यासाठींहि निरनिराळीं यंत्रें

उपयोगांत आणतात. जलपीडन यंत्राच्या साहाय्यानें दहा टन वजनाचा डबा ४५ फूट उंचीवर एका मिनिटांत नेण्यांत येतो. अशा रीतीनें कोळसा खाणीबाहेर काढण्याचें काम झटपट उरकण्यांत येतें. हिंदुस्थानांत सामान्यतः 'बोर्ड ॲन्ड पिलर' पद्धतीनें कोळसा काढण्यांत येतो. यूरोपमध्यें 'लाँगवॉल' नांवाची कमी खर्चाची नवीन पद्धत उपयोगांत आणतात. परंतु हिंदुस्थानांतील कोळशांचे थर जाड असल्यामुळें येथें नवीन सोईस्कर पद्धत चालू करणें सोपें नाहीं. गोंडवणच्या टेंकड्यांचीं मजबूत शिखरें, क्षुब्धतेचा अभाव व पृष्ठभागावरील वजनाचा हलकेपणा ही परिस्थिति खाणीला फार चांगली आहे. गिरिधीच्या खाणींतून वॉर्डनें सुचविलेल्या दक्षिण स्टॅफोर्डशायर पद्धतीनें कोळसा काढतात. माकम खाणींतील ७५ फूट जाडीच्या थरापासून दक्षिस्टॅफोर्डमधील 'स्क्वेअर वर्क' पद्धतीनेंच कोळसा काढतात. डॅनूडॉट व खोस्टच्या खाणींतून 'लाँगवॉल' पद्धत उपयोगांत आणतात. सर टामस हॉलंड साहेबांच्या मताप्रमाणें झरियामधील कोळसा राणीगंजमधील वाराकर सिरीजच्या कोळशासारखाच असून दोहोंतहि आर्द्रतेचें प्रमाण जवळ जवळ सारखेंच आहे. इंग्लंड व वेल्समधील कोळशापेक्षा हिंदुस्थानी कोळसा फारसा कमी दर्जाचा नसतो. कोळशांतील राखेचें प्रमाण शेंकडा ६.७ असल्याचें ग्रेव्हर साहेबांनीं सिद्ध केलें आहे.

प र दे श चा व्या पा रः—इ. स.(१८८८-१८८९) साली परदेशांतून ८,७७,८४३ टन कोळसा हिंदुस्थांत आला व त्याची किंमत २,००,९५ १०५ रुपये द्यावी लागली. यानंतर कोळशाची आयात दर वर्षी कमी कमी होत गेली. १९०६-०७ सालीं तर ४९,४७,४४५ रु. किंमतीचा २,६२६,८६ टन कोळसा आला. १९१८ मध्यें ५४,३४६ टन वजनाचा २०,२०,८३६ रु. किंमतीचा कोळसा इकडे आला. यावरून हिंदुस्थानात दरवर्षी खाणींतून जास्त कोळसा काढूं लागल्याचें सिद्ध होतें. आयातींतील पुष्कळसा कोळसा ग्रेटब्रिटनमधून येत असे पण हल्लीं पोर्तुगीज ईस्ट आफ्रिकेंतून फार येतो. मुंबई इलाख्यांतच १९०६-०७ सालीं आलेल्या २,६२,२८६ टन कोळशापैकीं २,२०,५९१ टन कोळसा खपला. १९१८ सालच्या ७,८५.१५३ टन निर्गत कोळशापैकीं ५२,०४० टन सिलोन व १०,२७९ टन स्टेट्स् सेटलमेंटमध्यें खपला. बंगालमधील खाणींना कलकत्ता हें अतिशय जवळचें बंदर असल्यामुळें येथून कोळशाची वांटणी होते. हिंदुस्थानचा कोळशाचा व्यापार जरी कितीहि वाढला तरी बंगाल किंवा न्यूइंग्लंड इंग्लंडला लवकरच मागें टाकतील हें होरेस वॉलपोलाचें भविष्य खरें होईलच असें वाटत नाहीं. लॉर्ड कर्झननें झेरियाच्या खाणींची तपासणी केल्यानंतर पुढील उद्गार काढिले– "पश्चिमेस सुवेझ व पूर्वेस सिंगापूर यापलीकडे हिंदुस्थानांतील कोळसा जाणें शक्य नाहीं. कारण त्या ठिकाणीं अनुक्रमें इंग्लंड व जपान येथील कोळशाबरोबर हिंदुस्थानच्या कोळशाला टक्कर द्यावी लागेल. तथापि त्यांच्या दरम्यान हिंदी कोळशाचा पुष्कळ खप होण्यासारखा आहे हें मला दाखवावयाचें आहे. व येथील बाजार पुरा काबीज करण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे असें मला वाटतें."

हिंदुस्थानांतील सर्व कोळशाच्या खाणींतून इ. स. १९००, १९०५, १९२०सालीं किती टन कोळसा निघाला तें खालील कोष्टकांत दिलें आहेः—

वर्ष	१९००	१९०५	१९२०
आसाम	२१६७३६	२७७०६५	३२५५३५
बलुचिस्थान	२३२८१	४१७२५	३३९४१
बंगाल बिहार व ओरिसा	४९७८४९२	७२३४१०३	४२०७४५२
ब्रह्मदेश	१०२२८	... ...	...
मध्यहिंदुस्थान	१६४४८९	१५७७०१	१५८०५१
मध्यप्रदेश	१७२८४२	१४७२६५	४९१२०५
हैद्राबाद	४६९२९१	४५४२९४	६९४०८०
पंजाब व काश्मीर	७४०२८	६२६२२	५८०७८
राजपुताना	९२५०	४२९६४	१८२१६

द ग डी को ळ शा पा सू न दि वे ला व ण्या चा ग्या स व डा ब रः—गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या १९०४ सालीं प्रसिद्ध झालेल्या सांपत्तिक व व्यापारी आंकड्यांत मुंबई व कलकत्ता येथील दगडी कोळशांच्या धुराच्या कारखान्यांचा उल्लेख केला आहे. या कारखान्यांतून एकंदर ५८१ मजूर काम करीत होते. या कारखान्यांशिवाय इतर कांहीं खासगी लहान कारखाने असावे असा समज आहे. ग्यासच्या कारखान्यांतून बहुतेक इंग्लिश कोळसाच वापरतात व या कारखान्यांतून यूरोपसारखे आड उत्पन्नाचे पदार्थ तयार करीत नाहींत.

बत्तीचा धूर व कोळशाची उर्ध्वपातन क्रिया करतांना कांहीं उडून जाणारें द्रव्य निघतें. तें थिजतांना त्यापासून पाण्यासारखा पातळ व डामरासारखा काळा असे दोन पदार्थ निघतात. पातळ पदार्थापासून ॲमोनिया व त्याचे क्षार बनतात व घन पदार्थापासून डांबर होतें. डामरापासून बेन्झीन, नॅपथेलिन, फिनॉल, कांहीं अत्तरें व तसेंच पुष्कळ रंग तयार होते.

द ग डी को ळ सा व त्या पा सू न हो णा रा को क.—दगडी कोळशास उष्णता देऊन धूर काढून टाकल्यानंतर राहिलेल्या कोळशाच्या भागाला कोक म्हणतात. दिव्याच्या धुराच्या कारखान्यांत हलक्या प्रकारच्या कोकचें आडउत्पन्न निघतें. घरगुती कामाकरितां व सिमेंट व चुनखडीची भट्टी लावण्यास त्याचा उपयोग करितात. कोकमध्यें

जास्त उष्णता देण्याची शक्ति असल्यामुळें त्याचें महत्व जास्त आहे. जळून भाकरीसारखा होणारा कोळसा कोक करण्यास फार चांगला असतो. बऱ्याच वर्षांपासून राणीगंज झेरिया व गिरिधी येथील खाणींत कोक तयार करितात. कोक तयार करणें म्हणजे दगडी कोळशाच्या फुकट जाणाऱ्या भागाचा उपयोग करणें होय व अशा रीतीनें त्याचा पुरवठा वाढल्यावर धातूंच्या कारखान्यांची सहज भरभराट होणें शक्य आहे. कोकचे दोन प्रकार आहेत. (१) कठिण व (२) मऊ. कोक तयार करण्याच्या कोळशांत शेंकडा ७५ हिस्से नायट्रोजन असतो असें गृहीत धरल्यास उघड्या भट्टींत कोक तयार करावयाच्या सध्याच्या पद्धतीनें दर वर्षी हजारों टन नायट्रोजन व्यर्थ जातो असें म्हटलें पाहिजे. या नायट्रोजिनपासून अमोनिया सल्फेट तयार केलें असतें तर त्याची किंमत जवळ जवळ २०॥ लक्ष रुपये झाली असती. जान्हाबेटांत उसांची वाढ करण्याकरितां १९०२ सालीं २३,४०० टन अमोनिया सल्फेट लागलें. या आंकड्यावरून या पदार्थाचें महत्व लक्षांत येईल. जर्मनी व अमेरिकेंतील प्रयोगांवरून वरील अमोनियाचें महत्व सिद्ध झालें आहे. व त्याप्रमाणें गिरिधी, राणीगंज व झेरिया या खाणींतून अमोनिया तयार करून त्या आड उत्पन्नाचा फायदा करून घेण्याची सोय केली आहे. अमोनियम सल्फेटचा हिंदुस्थानांतच खप व्हावा म्हणून येथील शेतकी खात्यानें येथील उसांच्या व इतर पिकांत त्याचा उपयोग होतो हें प्रयोग करून सिद्ध केलें आहे.

उत्तम प्रकारच्या भाजलेल्या दगडी कोळशावर सर्व ठिकाणीं सारखी झाक मारते. त्यास जडपणा व टणकपणा असतो. हा फोडला असतां लांबट रेषा निघतात. याचें विशिष्ट-गुरुत्व बरेंच असावें लागतें. कारण भट्टींत यावर लोखंडाचें वजन पडावयाचें असतें. विशिष्टगुरुत्व कमी असेल तर लोखंडाच्या वजनाखालीं चुरून भट्टींतील वायूंची हालचाल होण्यास अडथळा होईल. हा साठवून ठेवण्यास कोरडी जागा लागते. याच्या दोन जाती आहेतः—पहिली जातः दिवे लावण्याकरतां धूर तयार करणाऱ्या कारखान्यांतील भट्टयांतून शिल्लक राहिलेला. दुसरी जातः लोखंड व बीड तयार करण्याच्या भट्टयांमध्यें वापरण्यांत येणारा. याला भट्टीचा भाजलेला दगडी कोळसा असेंहि म्हणतात. चांगल्या जातीच्या भाजलेल्या दगडी कोळशांत असलेल्या घटकांचें प्रमाण शेंकडा कार्बन ९३ ते ९४, राख ३ ते ५, ओलावा १, गंधक .७ ते १, असें असतें. वरील प्रमाणांत गंधकाचें प्रमाण जरी फारच थोडें आहे तरी तितक्यानें देखील लोखंडास व बिडास अपाय होतो. गंधक लोखंडांत मिसळल्यानें त्यास ठिसूळपणा येतो. व रस करून ओतलें असतां त्यांत सोस रहातात.

दगडी कोळसा भाजण्याच्या भट्टया.—यांत मुख्य दोन जाती आहेत. यांत दगडी कोळसा तापवून भाजतात. (१) या जातीच्या भट्टयांना "मधपोळें भट्टया" असें म्हणतात. यांत उपपदार्थ हातीं लागत नाहींत. फक्त भाजलेला कोळसा तयार होतो. या तयार करण्यास खर्च फार थोडा पडतो. या फार ठिकाणीं प्रचारांत आहेत. (२) दगडीकोळसा तापविला असतां त्यांतून निघणाऱ्या वाफा जमवून त्या एका भाड्यात एकत्र करून त्या वाफांवर रासायनिक क्रिया करून त्यांतून निरनिराळे पदार्थ काढून घेतात. हें काम ज्या भट्टयांत होतें त्यांना उपपदार्थजनक भट्टया असें म्हणतात. या भट्टयांमध्यें उपपदार्थ फुकट जाऊं न देता धरून ठेवण्याच्या कामात फार सुधारणा झाल्या आहेत. या जातीच्या भट्टयांची मूळ किंमत जास्त पडते व शिवाय उपपदार्थ काढण्यासाठीं आणखी यंत्रेंहि घ्यावीं लागतात. त्यांची किंमतहि अधिक पडते.

भाजलेल्या दगडी कोळशांचे आडउत्पन्न.—डांबर आणि नवसागरः—नवसागर कोरडा हातीं लागत नसून जलमिश्रित नवसागर हातीं लागतो. हें मिश्रण तापविलें म्हणजे नवसागराची वाफ होते व ती सलफ्युरिक ॲसीडमध्यें मिसळली म्हणजे सल्फेट ऑफ अमोनिया नांवाचें खत तयार होतें. डांबरापासून नॅफ्था, बेंझोल क्रीओसोट तेल, रंगाचीं तेलें, रंग पिच, इत्यादि जिन्नस तयार होतात.

जळण व कोळशाच्या विटाः—बिकानेर, काश्मीर व इतर ठिकाणच्या हलक्या जातीच्या कोळशाच्या जळाऊ विटा किंवा गोळे करतात. असें केल्यानें त्यांमधील आर्द्रता कमी होते. युरोप व अमेरिकेंतील कोळशाच्या विटा व गोळे निराळ्याच तऱ्हेनें व इतर पदार्थांपासून तयार केलेले असतात. हिंदुस्थानातलि हलका कोळसा व चूर याचा उपयोग करण्यासाठीं कोळशाच्या विटा व गोळे तयार करण्याकडे अलीकडे लोकांचें बरेंच लक्ष लागलें आहे.

कोळिंजन.—यास लॅटिनमध्यें अल्पीनिया गलंगा मराठींत कोळिंजन अथवा कोष्टकोळिंजन व इतर भाषांतर बरकुळिंजन, मोठा कोलंजन, इत्यादि नांवें आहेत. हें हिमालयाच्या पायथ्यापासून सिलोनपर्यंत सर्व हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत आढळतें. याचे गड्डे व फळ बाजारांत विकले जातात. संयुक्तप्रांतांत चीट छापण्याच्या कामीं याच्या कांबींचा उपयोग करतात व हा औषधीहि आहे. ऑफिसिनेरम म्हणून याची एक जात आहे. हें बाजारांत कोळिजन नांवानें विकलें जातें. याला छोटा मानकीजर किंवा छोटी कुळिंजन शित्तरत्तई, खुलो दारु ही नांवें आहेत.. चिनी भाषेंत यास लिआंग कियांग हें नांव आहे. हें मूळचें चीनमधील असून तेथून याचे गड्डे हिंदुस्थानांत व थोडेबहुत इंग्लंडांत जातात. याला मुख्य मागणी रशियांतील आहे. कोळिंजन हें मज्जातंतुपौष्टिक व कामोद्दीपक आहे असें म्हणतात.

कोळी—कोळी संधिपाद प्राण्यांच्या वर्गांत मोडतात. या प्राण्यांच्या वर्गांतील अष्टपाद प्राण्यांच्या उपवर्गांत

यांचा अंतर्भाव होतो. या उपवर्गांतील प्राण्यांनां स्वतंत्र असें डोकें नसतें. डोकें व छाती यांचा एकजीव असून डोळे साधे असतात. कोळ्यांचें पोट व छाती यांमध्यें कमर असते. यांच्या शरीरांवर शृंगमय कवच असून पोट मऊ असतें. कोळ्याला आठ पाय असून ते फार बारीक, लांब व केंसाळ असतात. यांच्या पायांस पेरीं असून शेवटीं नख्या असतात. कोळी हा प्राणी डोकें खालीं करून चालतो. त्याचें तोंड डोक्याखालीं असतें. त्याच्या तोंडास जबड्यासारखे भाग असून शेवटीं नांगीसारखे आंकडे असतात. या आंकड्यांमध्यें विष असतें. या विषारी आंकड्यांनीं तो कृमिकीटकांनां दंश करतो व त्यांनां मारून टाकतो. कोळ्यांचें हृदय नळीसारखें असून तें पाठीच्या भागाकडे असतें. पोटाखालीं दोन भोंकें असून त्यांतून आंतील पडद्यांत हवा शिरते. कोळ्यांतील नर हा मादीपेक्षां लहान आकाराचा असतो. मादीचा आहार नरापेक्षां मोठा असतो व प्रसंग पडल्यास ती नरालाहि खाऊन टाकण्यास मागें पुढें पहात नाहीं. त्यामुळें नर हा मादीजवळ घाबरत घाबरतच येतो. नराचा आकार लहान असल्यामुळें मादीनें त्याच्यावर हल्ला केल्यास त्याला सुटून जाण्यास या लहान आकाराचा फार फायदा होतो. कोळ्यांची जात बहुप्रसव आहे. मादी ही वेळेस सहापासून शेंकड्यापर्यंत अंडीं घालते. हीं अंडीं मादी आपल्या कोळीष्टकांत जपून ठेवते.

कोळी आपलें जाळें मोठ्या कुशलतेनें विणतो. या जाळ्याचें दोन प्रकार आहेत. स्वतःला राहाण्याकरिता जें जाळें तो बनवितो तें नळीसारखें असून त्याला झडप असते. भक्ष्य पकडण्याचें जाळें चक्राकार असतें. कोळ्याच्या पाठीवर सहा टेंगळें असतात व या टेंगळांना पुष्कळ छिद्रें असतात. या छिद्रांतून चिकट रस बाहेर येऊन तो वाळतो. पुढें त्याचा तंतु बनतो व त्या तंतूंना पीळ पडून धागा बनतो. हा धागा काढतांना एखाद्या पदार्थावर तो आपली टेंगळे दाबतो व रस चिटकवितो व आपण दूर जाऊं लागतो. त्यामुळें धागा निघतो. आपलें जाळें बनविण्याच्या कामीं कोळ्याला आपल्या पायांचा फार उपयोग होतो.

'थेरीडिडी' जातीच्या कोळ्याचें विष फार जहाल असतें. त्यामुळें तो कृमींनां तावडतोब मारूं शकतो. या जातीचा कोळी मनुष्याला चावला तर त्यामुळें मनुष्याच्या अंगाचा दाह होतो. क्वचित् माणसें दगावतातहि. खूप नाचल्यानें हें विष उतरतें असें म्हणतात. या जातीचा कोळी उष्ण प्रदेशांत सांपडतो. ऑस्ट्रेलिया, चिली, न्यूझीलंड, दक्षिण यूरोप इत्यादि देशांतील लोक या जातीच्या कोळ्यांनां फार भितात.

कोळी उपद्रवी कीटकांनां आपल्या जाळ्यात पकडून ठार करतो. हा प्राणी मांसाहारीहि आहे. कांहीं जातींचे कोळी आपल्या जाळ्यांत पक्ष्यांनांहि पकडून ठार मारतात. पण कोळी हा जसा दुसऱ्यांनां मारतो तसें याला मारण्याकरितांहि पुष्कळ प्राणी टपलेले असतात. कीटकभक्षकप्राणी साप, जिवाणू हे तर या कोळ्यांचा फन्ना उडवतातच, पण त्यापेक्षांहि त्वक्पक्ष कीटक वर्गाच्या कांहीं जातींच्या प्राण्यांकडून यांचा फार संहार होतो. गाधीलमाशी तर यांनां त्राहि त्राहि करून सोडते. कोळी हे बहुप्रसव असल्यानें त्यांचा संहार करणारे प्राणी आहेत म्हणूनच ठीक आहे.

कोळ्यांच्या जाती पुष्कळ आहेत. कांहीं कोळी जमिनीवर रहातात, काहीं पाण्याच्या कडेस खडकांवर रहातात व पाण्यावर तरंगून तेथील कृमींचा नाश करतात. कांहीं कोळी रेशमाचीं जाळीं विणणारे असतात. कांहीं साधीं जाळीं विणणारे असतात. कांहीं जातीचे कोळी अजीबात जाळीं करीत नाहींत. उष्ण प्रदेशांतील एक जातीचा कोळी जमिनीला भोंक पाडून आंतून तें जाळ्यानें लिंपतो, व वर झडप लावतो.

कोळीजात—हिंदुस्थानांत कोळी जातीची एकंदर लो. सं. ३१॥ लाख आहे. मुंबई इलाख्यांत ती २२ लाखांच्यावर असून त्याची वसति दक्षिण हिंदुस्थान, गुजराथ, ठाणें कुलाबा, वऱ्हाड, खानदेश इकडे आहे. यांचा दर्जा कुणब्यांहून खालच्या प्रतीचा आहे (रे. जे. विल्सन—फ्रयाग्मेंटस् १८७६). महाराष्ट्रांत साधे कोळी व डोंगरी कोळी असे दोन प्रमुख भेद असून पुन्हां त्यांत सोनकोळी, महादेवकोळी वगैरे आणखी पोटभेद आहेत. त्यांची त्रोटक माहिती त्याच्या वसतीच्या व इतर माहितीसह खालीं दिली आहे.

कोळी हे बारा बलुत्यांपैकीं असून बलुत्याचा हक्क त्यांना मिळतो. हे उच्च वर्गांतील लोकांकडे पाणी भरतात व मासे पकडून त्यांवर उदरनिर्वाह करतात. कोणी कोणी नदीवरच होड्यांतून अगर नदीकांठीं झोपड्यांतून रहातात. डोंगरीकोळी हे मावळ (सह्याद्रींतील) व कोंकण इकडे आहेत. हे जंगलांतील कंदमुळें व शिकार यांवर उपजीविका करतात; काहीं शेतीहि करतात. त्यामुळें हे इतर हिंदु शेतकरी जातींत मिसळले गेले आहेत. डोंगरी कोळ्यांत, धुडिया, चौधरी, वारली, कातकरी, दुबळा, ठाकुर या पोटजाती आहेत असें रे. विल्सन म्हणतो. यांच्यापैकीं ढोरकोळी म्हणून एक पोटजात आहे, तिला (ती मेलेल्या जनावराचें मांस खात असल्यामुळें) सर्वांत हलक्या दर्जाची मानतात. महादेव व मल्हार कोळ्यांचें मराठ्यांशीं साम्य आढळतें. काश्मीर प्रांतांत ही जात थोडी असून ती शेतकी करते व तिकडे तिला कोहली असें नांव आहे. ते आपल्याला पूर्वीचे क्षत्रिय समजतात. नर्मदेच्या उत्तरप्रांतींहि यांची बरीच वसती आहे.

संस्कृतांत कोल शब्द येतो; तोच या कोळी जातीचा निदर्शक असावा असें विद्वानांचें म्हणणें आहे. कोलापुर, कोलवन वगैरे प्रांत हा यांचा मूळ देश असून हे येथीलच

मूळचे (अनार्य) रहिवासी असावे असा कांहींचा तर्क आहे. (वि. ज्ञा. विस्तार पु. २३. पृ ११०).

कोळ्यांतहि कदम, पोवार, क्षीरसागर, दळवी, गायकवाड, शिरके, जाधव, भोइटे, शेलार वगैरे मराठ्यांप्रमाणेंच आडनांवें आहेत. मराठ्यांमध्यें व कोळ्यामध्यें पूर्वी शरीरसंबंध होत असत अशी दंतकथा कोळ्यांत प्रचलित आहे. कोंकणातलि जे कोळी शेतकी करतात त्याना 'आगरी कोळी' व जे मळा लावितात त्यांना 'माळी कोळी' म्हणतात. (वि. ज्ञा. वि. पु. ११ अं. २)

वऱ्हाडांतील कोळी म्हणात कीं "मासे पकडून अगर विकून निर्वाह करणारी कोळ्यांची एक पोटजात आहे; तिचा इतर पोटजातींशीं अन्नोदकाचा संबंध नाहीं; तसेंच पोषाख वगैरेंत कोळ्याच्या इतर पोटजातींशींहि तिचें साम्य नाहीं. वऱ्हाड, मध्यप्रांत व महाराष्ट्रांत मासे धरून व ते विकून निर्वाह करणारी भोई या नावाची एक स्वतंत्र जात आहे. तिच्यातहि अनेक पोटजाती आहेत. ही भोई जात सर्वच बाबतींतहि मागसलेली आहे. कोळी जातीचा भोई जातीशीं कांहीं संबंध नाहीं. " (रा. उ. के. जाधव-एलिचपूर याच्या कडून आलेल्या माहितिवरून) महाराष्ट्रातील मराठी-भाषा बोलणाऱ्या कोळ्याची लो. सं. ३ लाख आहे. याच्यातील मुख्य जाती पुढील भागांत रहातात. मराठे कोळी–वस्ती निजाम इलाख्यातील मराठवाडा व मुंबई इलाख्यातील सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रातात. रहाणारी याच्यात वतनदार देशमुखादि लोक आहेत पण फार थोडे. धंदेः–शेती, पाणी भरणें व नावा हांकणें. मराठेखार कोळी–वस्ती वऱ्हाडातील पूर्णा नदीकाठचा प्रदेश व खानदेश. याच्यात बरेचसे वतनदार असून ते शेती व इंग्रजी होण्यापूर्वी मीठ पिकविण्याचा धंदा करीत. त्यावरूनच त्यानां खार हें नाव मिळालें असावें. सोनकोळी–वस्ती उत्तर व दक्षिण कोंकणात असून याचा मुख्य धंदा मासे मारणें व जहाजें चालविणें हा होय. महादेव, मराठे व मराठेखार या पोटजातींत अन्नोदक व्यवहार आहे. सर्व पोटजातींचे विवाहादि संस्कार ब्राह्मणभिक्षुकच करतात. जातिसंबंधाचे कांहीं नियम मोडल्यास त्याचा निकाल पंचायतीमार्फत होतो. परंतु धार्मिक नियम मोडल्यास त्यांचा निकाल ब्राह्मणभिक्षुक शास्त्राधारें करतात. सर्व पोटजातींच्या सामान्य व गांवपंचायती आहेत. महादेव, सोन व मल्हार या पोटभेदांत सामान्यपंचायतीचा हक्क वंशपरंपरागत चालतो. पंचांनां पाटील, मेहतर किंवा महाजन म्हणतात. कांहीं पोटजातींत निवाड्याचीं देवळें किंवा मठासारखीं स्थळें असून त्याना इनाम जमिनी मिळालेल्या आहेत. सर्व पोटजातींत पुनर्विवाहाची चाल असून राखेपासून झालेल्या संततीची जात कोळीच धरली जाते; मात्र त्या जातीस लहानताटे, अक्रामासे किंवा कडु म्हणतात. या कोळी जातीचा स्वतंत्र इतिहास नाहीं. मालुतारण ग्रंथांत म्हटलें आहे कीं शालिवाहन राजाच्या एका कोळी सरदारानें पंढरपूर हें वसाविलें. त्याच सरदाराचे वंशज तेव्हांपासून आतांपर्यंत पंढरपुरच्या पुंडलिक व मल्लिकार्जुन या देवांची पूजा करून तेथील उत्पन्नहि घेतात. या जातीचा एक प्राचीन मठ 'ऋषिमठ' नांवाचा वऱ्हाडांत दर्यापूर तालुक्यांत सामदे या गांवीं आहे. मराठी राज्यांत मावळे लोकांच्या फौजेंत व आरमारांतहि कोळी लोक पुष्कळ होते. कोळ्यांचीं बहुतेक कुलदैवतें देवी, महादेव व मल्हारीमार्तंड हीं आहेत. जातींतील सूज्ञ लोकाचा आपण क्षत्रिय आहों असा समज आहे " (उ. के. जाधव यानीं दिलेली माहिती).

वऱ्हाडातील कोळी हे भील लोकाचे संबंधी असावेत असें मे. रसेल व हिरालाल म्हणतात. हे लोक पूर्वी डोंगरांतील मार्गांचें रक्षण करीत असत. चौदाव्या शतकात मुसलमानाच्या त्रासामुळें इकडे आलेल्या बऱ्याच रजपुतांनीं याच्या मुली केल्या. त्यांची संतति आपल्यास राजपूत म्हणविते. मध्यप्रातात याच्या जाती आहेत त्या सूर्यवंशी, मल्हार, भिलावाफोड व शिंगगाडे या होत. बऱ्हाणपूर भागात कांहीं कोळी मुसलमान झालेले आहेत. यांच्या लग्नात एका पाटयाभोंवती वधुवरांनीं सात प्रदक्षिणा घातल्या कीं लग्न पुरें होतें. वाङ्निश्चयाच्या दिवशीं वराच्या बापास वधूगृहीं उंबरठयात ठेच लागणे हा एक शुभमुहूर्त मानितात. बायकोच्या व्यभिचारामुळे काडी मोडता येते; नंतर तिनें जर आपल्या जाराबरोबर पाट लाविला तर जाराने १०० रु. दंड जातीस दिल्याखेरीज त्या दोघाना जातींत घेत नाहींत. विवाहित स्त्रीनें व्यभिचार केल्यास तिला सवासन म्हणतात. नेमाडातील कोळ्याचीं कुलदेवता इच्छापुरची देवी असून त्या ठिकाणीं पूर्वी गळ घेत असत. याच्यात प्रेतें पुरतात. हे लोक गोमास सोडून वाटेल तें खातात व दारूहि पितात (कास्ट्स् ट्राइब्ज. सी. पी—रसेल व हिरालाल).

नाशिक जिल्ह्यात मल्हार, ढोर व राज या तीन जाती आहेत. याचा निर्वाह बहुतेक शेतीवर असून हा वर्ग खाऊन पिऊन सुखी आहे. जात्या चपल व धाडशी असल्याने याच्यात चौर्यकर्माची लालसा एके काळीं बरीच वाढली होती. इ. स. १८४५ साली राघोजी भागऱ्या यानें या जिल्ह्यात सर्वत्र लुटालूट करून धुमाकुळ माजविला होता. त्यानें मारवाड्यांनां लुटण्याचा व त्यांची नाकें कापण्याचा सपाटा लाविला होता. शेवटीं त्याला पंढरपुरास पकडून पुढें फाशीं दिलें. इकडील कोळ्यांचा लग्नविधि व आचार कुणब्यांप्रमाणेंच असतो. मुलीला माहेरकडून मिळालेले दागिने हे हक्काचे व नवऱ्याकडून मिळालेले हे उसने असतात अशी एक विचित्र समजूत यांच्यांत आहे. (नाशिक ग्याझे.).

ठाणें जिल्ह्यात मुख्यतः महादेव कोळी हे प्रमुख आहेत. जिल्ह्यांतील जव्हार संस्थान महादेव कोळ्यांचेंच आहे. मुबारक खिलजीनें इ. स. १३४७ त येथील कोळ्यास संस्थानिकपण कबूल केलें असें म्हणतात. परंतु कालदृष्टया तें संश-

यास्पद वाटते. यांची इकडील सत्ता पोर्तुगीज या भागांत येई-पर्यंत अबाधित होती व फिरंगी इकडे आले तरी त्यांना या जव्हारकरांचें थोडें फार भय असे. अठराव्या शतकांत-मात्र पेशव्यांनीं जव्हारकरांचा बराचसा मुलूख घेतला. आगरी व सोन याखेरीज आणीक बारा (कोळ्यांच्या) पोटजाती या जिल्ह्यांत आहेत. त्या पुढीलप्रमाणें (१) बांड (२) चांची (३) ढोर किंवा टोकरे (४) डोंगरी (५) खार (६) महादेव (७) मल्हारी किंवा चुंबळी ऊर्फ कुनम अथवा पानभरी (८) मारवी (९) डोंगरी किंवा मेटा (१०) राज अथवा थेन (११) सोलेसी ऊर्फ बाब्या किंवा काष्टी, लाललंगुटी (१२) ठाणकर. यांची थोडी माहिती पुढें दिली आहे. बांडः–धंदा शेती किंवा मजुरी. हे लोक चोरीहि करतात. चांचीः—हे काठेवाडांतील मूळचे असावेत; व्यवसाय शेती व मजुरी. हे मेहनती असून याचे कुलदैवत ठाकुरजी व महालक्ष्मी होय. ढोरः—हे गोमांस खातात म्हणून याना ढोर म्हणतात. बांबू तोडण्याच्या धंद्यावरून यांना टोकरे नांव मिळालें. हे पक्के दरवडेखोर आहेत. याचें लग्न ढोर कातकऱ्याप्रमाणें ज्ञातींतील माणसें लावितात. डोंगरीः—उपजीविका शेतकी व मजुरी; हे इतर पोटजातींच्या हातचें पाणी पित नाहींत. महादेवः–निजामच्या राज्याच्या पश्चिम सरहद्दीवरील महादेव व बालाघाट हें याचें मूलस्थान असावें. तेथून ते पुण्याकडे येऊन तिकडून कोंकणांत पश्चिम व उत्तर भागाकडे चौदाव्या शतकाचे सुमारास पसरले. पापेरा नांवाचा त्याचा एक नाईक एका सिद्धाच्या आज्ञेनें जव्हारास येऊन तेथील वारली राजाकडे येऊन तेथील वारली राजावर स्वामित्व मिळवून जव्हार संस्थानचा मूळपुरुष झाला. यानें गंबीरगड घेऊन दिल्लीवर मोंगलांकडून या भागांतील बावीस किल्ले व त्याखालील प्रांत जहागीर मिळविला अशी एक दंतकथा आहे. या जातींत एकंदर २४ घराणीं असून त्याच्या शाखा दोनशेंवर आहेत. यांच्यांत देशमुख जहागीरदार पाटील वगैरे आहेत. पूर्वी इकडे मराठे व कोळी यांच्यांत लग्नें लागत. हे लोक काटक व मजबूत असून याच्या स्त्रिया नाजूक व रेखीव अवयवांच्या आणि कुणबिणीपेक्षांहि सुरेख असतात. हे पोषाखाचे फार शोकी आहेत. यांचा मुख्य धंदा शेतीचा व शिपायीगिरीचा आहे. हे हुषार, चाणाक्ष तीव्र स्मरण शक्तीचे असून बोलण्यांत म्हणी व अलंकार वापरतात. हे स्वातंत्र्यप्रिय असल्यानें त्यासाठीं धडपडहि करतात. पूर्वी मराठी राज्यांत यांच्यांतील स्त्रियांनींहि लष्करी बाणा पाळल्याचें ऐकण्यांत आहे. इ. स. १८३१ मध्यें लक्ष्मी घाटगे या स्त्रीनें रामोशांशीं पुष्कळ दिवस टक्कर दिली होती. पेशवाईपूर्वी हे लिंगायतधर्मी असून पेशवाईंत हे सनातधर्मीय झाले. याचे कुलदैवत खंडोबा, भैरोबा व भवानी आहे. यांचा जादुमंत्रटोणा यांवर भरवंसा आहे. धायकोनें नवरा सोडून परजातींत प्रवेश केल्यास तिची उत्तर क्रिया करून मग नवरा दुसरें लग्न करतो. आकस्मिक मेलेल्यास किंवा रोगानें फार दिवस खितपत पडून मेलेल्यासच जाळतात. यांच्यांतील पंचायतीस गोतरणी म्हणत. त्याचे सहा सभासद असून मुख्याला रगतवान उपाध्यक्षाला मेतल व इतरांना साबला, ढाल्या, हुडक्या व मडक्या अशीं नांवें असत. मल्हारीः—हे सर्व कोळी जातींत उच्च व निर्मळ समजले जातात. यांच्यांत जाधव, पोवार, गायकर, केरव वगैरे आडनांवें आहेत. गांवकऱ्यांना व प्रवाशांना हे पाणी पुरवितात म्हणून यांना पानभरी, डोक्यांवर पाण्याची घागर वाहतानां चुंबळ घेतात म्हणून चुंबळी व कुणब्यांशीं क्वचित रोटीव्यवहार करतात म्हणुन कुनम अशीं दुसरीं नांवें आहेत. हे शेतीहि करतात. मारवीः–पूर्वी हे पालखी, मेणे वगैरे वाहत असत; सध्यां हे मजुरी व पाणी भरण्याचें काम करतात. मेटाः–यांना डोंगरीहि म्हणतात. मराठी राज्यांत हे खलाशी व नाविक होते. स. १८३६ पर्यंत सुद्धां यांच्यापैकीं सधन लोक मलबार किनाऱ्याशीं व्यापार करीत होते. हे फार दारूबाज आहेत. राज.–पूर्वी हे कोळीराजाच्या पदरीं नौकर असल्यानें व याच्याशीं त्यांचा बेटीव्यवहार होत असल्यानें यांना राज हें नांव मिळालें. पूर्वी यांच्या जातीचा मुख्य नाशिक जिल्ह्यातील वाघदरा गांवीं रहात असून त्यास सरनाईक म्हणत असत. सोलेसीः–धंदा मजुरी व शेतकी. ठाणकरः– हे फिरंग्याच्या कारकीर्दींत बाटले गेले. स. १८२०–२१ सालीं पटकीची साथ आली असता, त्यावेळीं यांच्यापैकीं बरेचजण पुन्हा हिंदु होऊन खंडोबा व भवानीची पूजा करूं लागले आणि विवाहविधि वगैरे ब्राह्मणाकडून करवूं लागले. याप्रमाणे ठाणें जिल्ह्यांतील पोटजाती आहेत. यांची एकंदर लो. सं. ८ हजार असून हे कोळी दिसण्यात सर्वसाधारण कुणब्यांप्रमाणें असतात कांहीं (विशेषतः स्त्रिया) कुणब्यांपेक्षां गौर असतात. हे मराठी साम्राज्यांत नांवाजलेले दर्यावर्दी असून मराठी आरमारांत नोकर असत. यांच्यांत देवकेंहि आहेत व लग्नें देवकावरून लावितात. यांच्या जातीचा मुख्य अलिबागेस रहतो, त्यास वाघपाटील असें नांव आहे. (ठाणें ग्याझे).

गुजराथेंत कोळ्यांच्या जाती व पोटजाती अनेक असल्यानें त्यांचें वर्गीकरण करणें कठिण आहे. उच्चवर्गांत पाटाची चाल नसून ते आपल्या मुली रजपुतांना देतात. पागी, कोतवाल, पाटणवाडिया अशा हलक्या कुळांत ते शरीरसंबंध करीत नाहींत. धाराळ, तालब्द इ. सर्वसाधारण कुळ्या यांच्यांत आहेत. मात्र दिराशीं पाट लावण्याची चाल यांच्यांत रूढ असून सर्वसाधारण चालीरीती स्थानिक हिंदूंप्रमाणेंच आहेत. पालनपूर, महिकांठा, पंचमहाल व कच्छ या भागांतील लोकांत कुळें आहेत. मात्र लग्नें कुळांवरून किंवा आडनांवांवरून होतात हें नक्की समजत नाहीं.

इकडे अनेक पोटजाती असून एका पोटजातींतील लोक दुसऱ्यांतील लोकांशीं लग्नें लावीत नाहींत. खांत, बारीआ, पटेलिया या पोटजाती पंचमहालांत व पाटणवाडिया धाराळ या सुरत व भडोचकडे आहेत. या लोकांमध्यें भिल्ल व रजपूत यांचा भरणा विशेष असून पुष्कळ जातींच्या मिश्रणानें ही जात बनली असावी. काठेवाडांत खांत कोळ्यांची एक मोठी पंचायत असून, अहमदाबाद जिल्ह्यांत नालकंठ येथें तळबद व पटेलिया यांच्या पंचायती आहेत आणि कापडवंज व थराड येथेंहि कांहीं पोटजातींच्या पंचायती आहेत. (सेन्सस ऑफ इंडिया. बॉम्बे व्हॉ. ७).

कच्छ ते दमण या समुद्रकिनाऱ्यांवरील कोळ्यांनां मच्छी म्हणतात. आगगाडीचे पूल बांधण्याच्या कामीं यांचा फार उपयोग होतो. श्रावण वद्य नवमी रोजीं ते गुगोपीर याचा उत्सव करून त्या दिवसास छडी नोत्र (नवमी) असें म्हणतात. गुजराथेंत एकंदर लोकसंख्येशीं कोळ्यांचें प्रमाण शेंकडा २३ प्रमाणें पडतें. भिल्ल व रजपूत या दोघांत आणि इकडील कोळ्यांत फारसा भेद दिसून येत नाहीं. कांहींचें म्हणणें कोळी व मेर हे एकच होत. रेवाकांठ्याकडे बामनीआ, बारिया वगैरे २१ पोटजाती आहेत. इकडे चुंवालिया म्हणून जी एक जात आहे ती गौरवर्णी असून ती मूळची चाळीस खेड्यांच्या एका प्रदेशांतील रहिवासी असल्यानें तिला चुंवालिया नांव मिळालें;तिच्यातहि २१पोटजाती आहेत. हे लोक लुटारू म्हणून पेशवाईपासून प्रसिद्ध आहेत. ते लोकांशीं फटकून वागतात. पूर्वी याच्यात एक प्रकारची शिस्त असे; ते पुढाऱ्याला ठाकोरदास म्हणत. आसपासच्या खेडेगांवांतून धमकीनें हे पैसा गोळा करीत व गांवानें न दिला तर दरवडा घालीत. या प्रसंगीं घोडे खिंकाळून लोक सावध होऊं नयेत म्हणून हे घोड्या(माद्या) वापरीत; तोड्याची बंदुक, तरवार व भाला हीं यांचीं शस्त्रें होतीं; पुढारी अंगांत चिलखतेंहि घालीत. हे आपल्या वस्ती भोंवती निवडुंगानें दाट कुंपण घालीत व क्वचित् तटबंदीहि करीत. हल्लीं यांचा लुटारूपणा कमी झाला आहे. खाट ही एक मोठी पोटजात काठेवाड व रेवाकांठा इकडे आहे. हे साधारण रानटी असून दऱ्याखोऱ्यांतून रहातात. कंथी (कच्छी) या टॉलेमीनें योजलेल्या शब्दाचें व खाटचें थोडेंसें साम्य दिसतें मात्र ते स्वतःस भाटी लोकांचे वंशज म्हणवितात. त्यांच्या नायकास मेर म्हणतात. क्षत्रिय पुरुष व भिल्ल स्त्री यांपासून खाट जात झाली असें म्हणतात यांचा एक पुढारी धांधलखाट यानें धंधुकाप्रांत जिंकून धांदलपुर वसाविलें व दुसरा एक पुढारी पाटलखाट यानें पेटलाद प्रांत जिंकला असें सांगतात. महंमद तघलखाच्या वेळीं यांच्यांतलि जेस किंवा जयसिंग या नायकानें मुसुलमानांना जुनागड घेण्याच्या कामीं मदत केली व त्याबद्दल त्याला गिरनार पर्वतावरलि प्रदेश व बिलख चोवीसी म्हणून चोवीस खेडीं मिळालीं. हे लोक महंमुद बेगड्यानें गुजराथ घेईपर्यंत गिरनारकडेच राहत होते. यांच्यांतलि विधवा आपल्या धाकट्या दिराशीं लग्न लावते. पाटणवाडिया ही जात अनहिलपाटणप्रांतांत रहातें; तिला कोहोड (खेडवळ) किंवा कुऱ्हाडे असेंहि दुसरें नाव आहे. मराठी राज्यात हे सैन्यांत शिरत असत. तत्पूर्वी ते लुटालूट करीत. दिल्लीच्या हुमायून बादशहाचें सामानसुमान यांनीं खंबायतजवळ एकदां लुटलें होतें. अठराव्या शतकाच्या आरंभीं ते दर्यावर्दीपणा करीत करीत थेट इराणच्या किनाऱ्यापर्यंत जात असत. बहुधा मराठी साम्राज्य नाहींसें झाल्यावर हे लोक लष्करांतून कमी झाल्यामुळें हल्लीं दुसऱ्या धंद्याऐवजीं हे लुटालुटीकडे वळले असावेत. खेडा जिल्ह्यांत तर १८३२ मध्यें यांनीं दंगा आरंभला असतां सरकारकडून पुरा बंदोबस्त झाला नाहीं. पुढें १८५७ सालीं मात्र त्यांनां निःशस्त्र केल्यामुळें यांची दंग्याची प्रवृत्ति पुष्कळ कमी झाली. तलबदा ही एक कोळ्याची जात असून ती इकडील भागांत श्रेष्ठ आहे. तलबदा म्हणजे तलपति (जमीनदार) होय. यांनां धाराळे (खडगधारी) असेंहि म्हणतात. ते आपल्यास धारच्या परमार रजपुतांचे वंशज म्हणवितात. धार नगरीच्या राजानें गुजराथेंतील भिल्ल राजकन्येशीं लग्न लाविलें व या दोघांस जी संतति झाली तिला धाराळ असे ते मानतात. दोही नांवाच्या फळांवरहि ते उपजीविका करीत असतात. म्हणून त्याना दोही असेंहि एक नांव आहे. हे शरीरानें मजबूत असून मितव्ययी आहेत. यांच्यांत कुलीन व अकुलीन असे भेद असून ते आपल्याला सर्व कोळ्यांत श्रेष्ठ मानून इतर कोळ्यांशीं रोटीबेटीव्यवहार करीत नाहींत; मात्र रजपुतांशीं करितात. यांच्या २२ पोटजाती असून त्यांपैकीं चुडासाम व जादव आणि सर्वाय या श्रेष्ठ गणल्या जातात. चावडा चोहान, बारीया, दाभी, जालिया, दलवाडी, गेडिया, शिआल, बलकिआ, खांट, कोतवाल, पागी, अशीं यांच्या शाखांचीं नांवें असतात; पागी व कोतवाल हे पहारेकऱ्याचें काम करतात. हल्लीं या धाराळ कोळ्यास तीन नांवें असतात; एक रजपूत वंशावरून पडलेलें, दुसरें कोळी जातींतलि आडनांव व तिसरें स्थानिक नांव असतें. यांच्यांतील दाभी व ताक्वान हे वंश फार प्राचीन आहेत. बारीया हे बारिया संस्थान व रेवाकांठा प्रांतांत आहेत. बारिया हेंच त्यांचें मूलस्थान असून मध्यंतरी चोहोन रजपुतांनीं त्यांनां हुसकावून दिलें होतें, परंतु महंमूद बेगड्याच्यावेळीं ते परत इकडे आले. दलवाडी हे खेडा जिल्ह्यांतील रहिवासी असून त्यांचें खरें नांव तलवारी (खोदणारे) असें आहे. हे विहिरी खोदून विटाहि पाडतात. गेडिया हे काठेवाडांत राहतात; कच्छ प्रांतांतील गेडी या शहरावरून यांनां गेडिया म्हणूं लागले. चालीरीती व पेहरावांत हे वर्दे येथील भेदांप्रमाणें

आहेत. हे मांसाहार करीत नाहींत. गुजराथेंतील सर्व कोळ्यांत यांची जात श्रेष्ठ समजली जाते. हे फक्त आपापल्या जातींतच लग्नें लावितात. शिआल म्हणून जी जात आहे ती काठेवाडच्या दक्षिणकिनाऱ्यालगतच्या शिआल बेटांत रहाते. वलकिया हे काठेवाडांतील नलक जिल्ह्यांत रहातात. याप्रमाणें गुजराथेंतील बहुतेक कोळ्यांच्या जातींची विशेष माहिती दिली आहे. त्यांची सामान्य माहिती पुढें देत आहों:—

यांचा जीवनक्रम निरनिराळा असल्यानें व रजपुताशीं कित्येकांचा संबंध येत असल्यानें यांच्या चर्येत बराच फरक आढळतो. तलबदांची चर्या व चालीरिती कुणब्यांप्रमाणें सर्वसाधारण आहेत. पुंख्वाळी यांचे शरीरसंबंध उच्च वर्गाशीं झाल्यानें तेहि तलबदाप्रमाणें गौरवर्ण आहेत. कोळी राजे हे बहुधा रजपूत पुरुष व कोळी स्त्री यांचे वंशज असून धष्टपुष्ट, चपळ, धूर्त व कारस्थानी असतात. या जातींतील बहुतेक स्त्रिया सडपातळ व सुरेख असतात. यांची भाषा अशुद्ध गुजराथी असते. यांचा पेहराव दर्जाप्रमाणें निरनिराळा असतो. दागिन्यांपैकीं ताईत हा पुरुष वापरतात व बायका हस्तिदंती बांगड्या, सोन्याची नथ, चांदीच्या वेळा वापरतात. सुखवस्तु लोक ज्वारी व बाजरी खातात; कधीं कधीं खिचडीहि खातात. डोंगरांतील कोळी हंगामाप्रमाणें आपला आहार बदलतात बहुतेक सर्व कोळी मद्यमांससेवी आहेत. पाटणावाडिया हे म्हशींचें मांस खाणारे असल्यानें त्यांसाठीं ते म्हशींची चोरीहि करितात. कांहीं कोळी अफीमबाजहि आहेत. यांचा धंदा मासेविक्रीचा व शेतीचा आणि कांहींचा लुटालूट करण्याचा आहे. पूर्वी बहुतेक कोळी दर्यावर्दीपणा करीत असत. स्वराज्यांत हे आरमारीखात्यांत नौकर असत. स्वराज्य गेल्यानंतर अंगातील शौर्यधाडसाचा उपयोग नाइलाजानें चौर्यकर्माच्या ठिकाणीं होऊं लागला असावा. यांची मुख्य दैवतें इंद्र व हातमल हीं आहेत. शिवाय हिंगलाजदेवी, खोदिआर, कुंकुडी वेराई, मेराडी या त्यांच्या देवता आहेत. महिकाठ्याकडे गाईची पूजा करितात. एकादशी व त्रयोदशीस यांचा सुट्टीचा दिवस असतो. यांचा गुरु पाटण येथें रहातो. काहींजण बीजकपंथा रामसनेही व स्वामीनारायण पंथाचे झाले आहेत. अलीकडे स्वामीनारायणांत जातिभेदाचें महत्त्व वाढल्यानें कांहीं कोळ्यांनीं तो पंथ सोडला आहे. काठेवाडी कोळी मोहोतीमार्गी असून ते द्वारका, प्रभासपाटण वगैरे ठिकाणीं यात्रेस जातात. ते ब्राह्मणांनां पूज्य मानून त्यांनां लुटीत नाहींत. त्यांच्याकडून राखीपौर्णिमेस राखी बांधून घेतात. ते खळ्याजवळ आल्यास त्यांनां धान्य देतात. यांचे उपाध्याय श्रीमाळी व औदीच ब्राह्मण असतात. हे धर्मभोळे असून भुताखेतांवर व जादुटोण्यांवर आणि पंचाक्षऱ्यांवर विश्वास ठेवितात. मूल जन्मल्यावर त्याला गुळाची एक लहान गोळी देऊन सर्वत्रांस गूळ वाटतात. षष्ठीपूजनाच्या दिवशीं सटवीबरोबर ब्रह्मदेवाचीहि पूजा करून त्याच दिवशीं मुलाचें नांव ठेवतात. सुखवस्तु कोळ्यांत सोहेर सव्वा महिना धरतात

यांच्यांत लग्नाचे चार प्रकार आहेत. (१) कुमार व कुंवारीण यांचा प्रथमविवाह. (२) विधुर व विधवा यांचें नात्र. (३) सोवासन म्हणजे पहिला नवरा जिवंत असतां दुसरा करणें. (४) दिअर्वतु(दीरवधु) म्हणजे धाकव्या दिराशीं लग्न करणें. रेवाकांठ्याकडे वाङ्निश्चय झाल्यानंतर जोंपर्यंत देवीपक्षी उजव्या हाताकडे दिसत नाहीं तोंपर्यंत लग्न लावीत नाहींत. मध्यप्रांतातल्याप्रमाणें इकडेहि वराच्या बापास वधूगृहीं उंबरठ्यावर ठेंच लागणें शुभकारक समजतात. लग्नमंडपांत प्रवेश करण्यापूर्वी वरावरून नांगर, रवी, बाण वगैरे जिन्नस नवरीची आई ओवाळते. लग्नसमयीं नवरीच्या एका हातांत बाण व एका हातांत माळ असते. ठाकूरकोळ्यांत रजपुतांप्रमाणें मुलीचें लग्न प्रथम तलवारीशीं लावितात. नात्रलग्नांत नवरदेव विधुर असावा लागतो. ब्रह्मचाऱ्यानें विधवेशीं लग्न केल्यास तो जातिबहिष्कृत होतो. नात्राचा समारंभ साधा असतो. तो विधवेच्या बापाच्या घरीं होतो. वधूवर समोरासमोर बसतात व ब्राह्मण उपाध्याय त्यांचे हात नात्रा—नाडा(तांबडा दोरा)नें बांधून त्यांनां मधोमध ठेवलेल्या मडक्यांतील दिव्याकडे पाहण्यास सांगतो, म्हणजे हा समारंभ आटपतो. सोवासन म्हणजे एक पति जीवंत असतांना दुसरा करणें; यांत पहिल्या नवऱ्याला पंचायत ठरवील त्याप्रमाणें पैसा द्यावा लागतो. पहिल्या नवऱ्यानें काडी मोडून दिल्यावर विधवा आपल्या डोकीवर पाणी भरलेले दोन तांबे घेऊन भावी नवऱ्याच्या घरीं जाते व तो ते तांबे उतरून दाराबाहेर ठेवतो, इतकें झालें कीं लग्नविधि संपतो. दिअर्वतुविवाह फार प्रचारांत नाहीं. त्याला आप्तेष्टांची संमति घ्यावी लागते. विधवेस लहान मुलें असल्यास तिऱ्हाईत पुरुषाशीं लग्न लावण्यापेक्षां धाकट्या दीराशीं लग्न लावणें बरें, असें त्यांनां वाटतें. मात्र तो दीर तिच्याहून वयानें मोठा व विधुर असला पाहिजे. पुरुषाप्रमाणें बायकोलाहि काडी मोडून देतां येते व नवरा सोडतां येतो.

गुजराथेंतील कोळी प्रेतें जाळतात. मृताचा पुत्र लहान अगर दरिद्री असल्यास दहाव्या, अकराव्या व बाराव्या दिवशीं श्राद्धादि विधी न करितां, तो दाराबाहेर येऊन नुसते हात चोळतो. एक वर्ष होईपर्यंत मृताच्या घरांतील वडील स्त्री, तोंडावर ओढणी घेऊन रोज सकाळीं पांच दहा मिनिटें रडते. जातींतील सर्व भांडणें पंचायत अगर पुढारी तोडतात. [गुजराथी कोळ्यांची सर्व माहिती बाम्बे ग्याझेटियर व्हॉ. ९ भा. १ यांतून घेतली आहे.]

सो न को ळी.—या जातीबद्दल वेसावें ता. साष्टी जि. ठाणें येथील रहिवासी व सोनकोळी सार्वजनिक परिषदेचे चिटणीस रा. पोशा गोविंद नाखवा यांनीं आमच्याकडे जी माहिती पाठविली आहे, तिचा थोडक्यांत

सारांश पुढीलप्रमाणें आहे. "या जातीचें मुख्य ठिकाण चंपावती (चेऊल, जि. अलिबाग) हें होय. यांची वस्ती रत्नागिरी, कुलाबा, ठाणें व मुंबई बेट या चार भागांतील समुद्र कांठच्या सुमारें दीडशें गांवीं आहे. यांचा मुख्य धंदा मासे धरण्याचा. मोठे मासे फक्त दर्यांत सापडतात. म्हणून हे दर्याकाठींच राहतात. यांची लो. सं. ३५ हजार आहे. हे लोक जाळ्यांनीं मासे धरतात व यांच्या बायका ते मासे ताजे किंवा वाळवून बाजारांत विकतात. यांच्या जाळ्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेतः—डोलें, बोकशी, जाळ, पास, तिबोर्टे,वागूर,कानजावळें,जावळें,हेडा,पाग,घोळवें, खादा वगैरे. सोनकोळी नांवाबद्दल शिवनिबंध नामक ग्रंथांत पुढलि कथा आहे. परमेश्वराच्या सोहंध्वनीपासून एक पुरुष निर्माण झाला, त्याला सोहं अगर सोम किंवा मयात-ऋषि असें नांव मिळालें. त्याची मुलगी अचिंता ही कश्यपास दिली, तिला मार्धेन म्हणून मुलगा झालाः याच्या वंशजास सोम नांव पडलें. त्याची प्रवृत्ति तपापासून सुटून हिंसेकडे होऊं लागल्यानें मयातऋषीनें त्यास मासे मारून निर्वाह करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो करूं लागल्यावर त्यांचें सोम नांव जाऊन सोन अगर सोनकोळी हें नांव पडलें. सोनकोळी जात कोणत्या वर्णाची आहे याबद्दल निश्चित सांगतां येत नाहीं. कांहींचें म्हणणें हे वैश्य व कांहींचें म्हणणें हे शूद्र आहेत. ": ही जात मासे मारण्यासारखें हिंसाकर्म करीत असल्याकारणानें प्राचीनकाळापासून या लोकास गायत्री व यज्ञोपवीत यांचा अधिकार राहिला नाहीं व त्याचें या जातीच्या लोकांकडून आजपर्यंत ग्रहण व धारणहि झालेलें नाहीं आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्यांत जो पंचमहायज्ञ करण्याचा नित्यक्रम आहे, तोहि यांच्यांत नाहीं, अतएव ही सोनकोळी जात शूद्र वर्णांत गणिल्यास काय वावगें होणार आहे ? रा. नाखवा यांची माहिती अशी. "यांची प्रथम वस्ती कुलाबा जिल्ह्यांत होती. नंतर तेथून ते ठाणें व रत्नागिरी जिल्ह्यांत पसरले. ज्यावेळीं आंग्र्यांचें प्राबल्य कोंकणांत होतें, त्यावेळीं त्यांनीं सोनकोळ्यांच्या बायकांवर एक ' जोबनपट्टी ' किंवा ' चोळीपट्टी ' बसविली बायकांनीं अंगांत चोळ्या न घालतां अंगावरून लुगड्याचा पदरच घ्यावा व ज्यांनां चोळ्या घालावयाच्या असतील त्यांनीं कांहीं ठराविक कर आंग्रेसरकारांत भरावा असा या कराचा अर्थ होता. त्यामुळें बायांचा छळ होऊं लागला. म्हणून कुलाबा जिल्ह्यांतील थळ वगैरे गांवांतील वस्ती उठून मुंबई, ठाणें, चिंबई, वेसावें इकडे येऊन राहिली. हे लोक हल्लीं आपणांस थळकर सोनकोळी म्हणवितात. यांचीं कुलदैवतें जेजुरीचा खंडोबा व कार्ल्याच्या लेण्यांतील एकवीरा देवी हीं होत. या पंथाचा प्रवर्तक कुलाबा जिल्ह्यांतील मौजे वरसोली गांवचा पूर्वीचा कोणी कान्हो नांवाचा भगत होता. हा स्मार्तपंथांतर्गत खंडोबाचा पंथ असून याच्या धर्मगुरूची गादी वरील वरसोली गांवीं आहे व गादिवर वरील भगताचाच वंशज अधिष्ठित आहे. सोनकोळ्यांहून भिन्न अशा कोळ्याच्या जाती पुढीलप्रमाणें आहेतः-गांवकर सोन-कोळी, वैती, मागेली, मेंद्री, खारबी, ढोरलेकर, न्हटाळकर, गावीट, पान, राज, मार्तंड, डोंगरी, भिल्ल, भोईर, कराडे व क्रिस्तांव. या जाती बहुतेक मासळी मारून त्यावर निर्वाह करणाऱ्या व थोड्या शेती वगैरे दुसरे धंदे करणाऱ्या आहेत. क्रिस्ताव हे जरी ख्रिस्ती धर्म पाळतात तरी ते हिंदू धर्महि थोडाफार आचरतात. सोन, गांवकरसोन, वैती व मार्तंड या चौघांत परस्पर अन्नोदकव्यवहार चालतो. मात्र हे चाऱ्ही इतर कोळयाच्या घरीं जेवीत नाहींत. लग्नव्यवहारा-विषयीं म्हटल्यास ज्या जातींतील स्त्रीपुरुषांचा त्याच जातीं-तील स्त्रीपुरुषांबरोबर विवाह होत असतो, मध्यंतरीं सोन व गांवकरसोन यांच्यात लग्नें होत; परंतु हल्लीं ही चाल बंद होत चालली आहे. मात्र कुलाब्याकडील करंजे मुळुखांड व ठाण्यांकडील साबार्से, दिवाळें इकडे ही चाल सुरू आहे.

सोनकोळी जातींत पंचायतीसंघ आहेत. प्रत्येक गांवात एक किंवा अनेक तट अथवा थळें किंवा जमाती असतात. त्या प्रत्येकास गांवपंचायत म्हणतात. कित्येक गांव मिळून एक संघ होतो. सार्वजनिक निवाडे अशा संघांच्या पंचायतीपुढें येऊन निवडले जातात. आणि खासगी निवाडे फक्त गांवा-तील पंचायतींत चालतात. जे निवाडे गावपंचायतींत तुटत नाहींत ते कोकणांतील चार भागांची जी सोनकोळी सार्व-जनिक परिषद हल्लीं स्थापित झाली आहे तिच्यापुढें जातात. या परिषदेचें ठिकाण वेसावें येथें असून तिच्या कार्यकारी मंडळांत (१९१९) रा. अ. बा. शिंदे हे अध्यक्ष, रा. क. श्रा. पाटील हे उपाध्यक्ष व रा. पो. गो. नाखवा हे चिटनीस होते. प्रत्येक जमातीच्या मुख्यास पाटील म्हणतात. गांवच्या लोकवस्तीच्या मानाप्रमाणें तट एक किंवा अनेक असून त्याप्रमाणें पाटीलहि असतात. पाटलाचा अधिकार वंशपरं-परेचा असतो. पाटील घराण्यांत कोणीच पुरुष हयात राहिला नाहीं तर पाटिलकीचा अधिकार घराण्यातील मुख्य व वडील बाईकडे देण्यांत येतो व तिच्या नावानें तटांतील कर्ते गृहस्थ तटाचा कारभार चालवितात. एकाद्या घराण्याचा निर्वंश झाल्यास तटांतील कर्ते पुरुष आपल्या संगनमतानें आपल्याच पैकीं एखादा सर्वमान्य कर्ता पुरुष अधिकारी नेमून त्याला "अमुक मयत पाटलाचा कारभारी" असें म्हणतात. हा अधिकार वंशपरंपरेचा नसून तो लोकसमाधानावर अवलंबून असतो. वादाचा निकाल बहुमतानें देण्यात येतो. पंचायती-पुढें नित्य व नैमित्तिक प्रश्नांचे वाद येतात; नित्य म्हणजे-शिव्यागाळी, मारामारी वगैरे व नैमित्तिक म्हणजे-जाती-जातींत सुधारणा, शिक्षणप्रसार वगैरे. अपराध्यास बहुमता-प्रमाणें शासन करण्यांत येतें. तें शासन गुन्ह्याच्या सौम्य व तीव्र स्वरूपाप्रमाणें थोडेफार दंड करणें असें असतें. दंड न दिल्यास त्याला वाळींत टाकतात. शासनाच्या या दोन प्रका-रांखेरीज तिसरा प्रकार सोनकोळी जातीच्या पंचायतींत

रूढ नाहीं. प्रत्येक फिर्यादीमागे वादीप्रतिवादीकडून सव्वा- रु. घेऊन त्यांतील चार आणे पाटलांस वतन म्हणून व बाकीचे सव्वादोन रु. पंचायतींत हजर असणाऱ्या इसमांस वांटण्यांत येतात. शिवाय प्रत्येक लग्नांत वरपक्षाकडून पाट- लास सव्वा रु. बिदागी मिळते. गुन्हेगारास शासन करण्याची रीत जातींत पूर्वापार चालत आलेली आहे. या अधिकारासाठीं ब्रिटिशसरकारकडून मंजुरी मिळालेली नाहीं. तथापि ब्रिटिश अंमलापूर्वी अशी मंजुरी सोनकोळी जाती- तील दोन सरपाटील घराण्यांना मोंगल बादशहाकडून मिळा- लेली असून, तिजप्रमाणें अंमल सदरहु सरपाटील घराणी आजपर्यंत चालवीत आहेत. यांचा अंमल चेऊलच्या व जंजि ऱ्याच्या आसपासच्या प्रांतांवर आहे. यांचा मूळपुरुष जानू पटवारी ऊर्फ जाया पाटील होता व त्यास बिज्री- कर व विजापुरकर शहांनीं हा अधिकार दिला होता. खटल्यांच्या निवाड्यांचीं टिपणें पूर्वी लिहून ठेवीत नसत. हल्लीं सोनकोळी ज्ञातिपरिषदेच्या दप्तरांत निवाडे लिहून ठेवण्यांत येतात. प्रत्येक पंचायतीला थोडीफार स्थावर- स्वरूपाची (देवळें, घरें, जमीन, वगैरे) मालमत्ता व नक्त ऐवजहि असतो. या मिळकतीवर त्या पंचायतीची सत्ता असते. पंचायतीच्या खर्चासाठीं प्रत्येक घरापासून दरवर्षी कांहीं रकम घेतात. या जमातीच्या करावर तटाच्या लोकांचा हक्क असून तो तटाच्या तिजोरींत जमा होतो.या जातीचे उपाध्याय गोवर्धन, क्रमवंत, पळशे, देशस्थ व चित्पावन ब्राह्मण असून त्यांच्याचकडून विवाहादि धार्मिक संस्कार करतात व रीतीभाती आणि गोतासंबंधींचे व्यावहारिक प्रश्न जात आपल्या मतानें सोडविते. हल्लीं यांच्यापैकीं शिकलेल्याचा पोशाख पांढरपेशांसारखा असतो. मुलें व मुली मराठी शिक्षण घेऊं लागल्या असून क्वचित् मुलें इंग्रजीहि शिकूं लागलीं आहेत. मुंबई बेटांत रहाणाऱ्या पैकीं ½ लोक मासळी मारण्याचा धंदा करीत असून ¼ लोक सरकारी व्यापारी नौकरी व धंदे करू लागले आहेत. विधवेचा विधुराबरोबरच पुनर्विवाह होतो. विधवा स्वतःच मासळी विक्रीचा धंदा करीत असल्यानें तिचा भार कोणावर पडत नाहीं.अनाथ मुलाची काळजी त्याचे नात- लग घेतात. स्वजातीय अगर परजातीय राख ठेवण्यास निर्बंध आहे. तो मोडणाऱ्यास राखेचा त्याग करवून विधियुक्त पावन करून घेतात. हाच न्याय स्त्रियांस लागू आहे. स्त्रियांस अधर्मव्यवहारानें सजातीय पुरुषांपासून झालेल्या संततीस स्वजातींतच मिळवून घेत असतात. " (रा. पो. गो. नाखवा यांची लिहून आलेली माहिती). महाभारतांत कोळगिरीपर्वत दक्षिणेंत असल्याचा (सहदेव दिग्विजय), कोलिसर्प नांवाचे लोक शूद्रवर्गांत घातल्याचा (अनुशासन पर्व) आणि कोलवगिरेय लोकांनां अर्जुनानें अश्वमेधयज्ञाच्या दिग्विजयांत हांकलून लावल्याचा असे तीन उल्लेख आले आहेत. [सेन्सस रिपोर्ट १९११. व्हॉ. २०; कास्टस् अँड ट्राइब्ज. सी. पी.; रसेल, हिरालाल; बॉंबे ग्याझे. व्हॉ. ९ भा. १].

कोळ्ळीप्पाकई—हें गांव चालुक्यांच्या राज्याच्या दक्षिण सरहद्दीवर होतें. म्हैसूर प्रांतांतील चित्रदुर्ग जिल्ह्यांत हल्लीं हें आहे. दाक्षिणेकडील प्रदेशाची ही वेस होय असें चालुक्य राजे मानीत असत म्हणून या गांवीं आपल्या राज्यांतील एक विश्वासू सरदार ते नेहमीं लष्करी तळ देऊन ठेवीत. पुढें गंगईगोंड राजेंद्र चोल यानें हें तटबंदीचें शहर चालुक्यापासून काबीज केलें (१०१५). दक्षिणेंतून वर उत्तरेस चालुक्यांच्या राज्यात घुसण्याच्या या वेशी(शहरा)चा सुभेदार हा बहुधा राजवंशीय अगर राजवंशाचा आप्त असे. इ. स. १०६० त येथें सिंघणदेव म्हणून एक रट्टवंशीय सुभेदार होता. त्याचें वर्णन ' महामंडलेश्वर, त्रैलोक्यमल्ल, कोळ्ळीप्पा- कई प्रभु, दक्षिणचें महाद्वार, चोलकमलवनगजराज ' इत्यादि शब्दांनीं केलेलें आहे. [एपि. कर्ना; अय्यर–प्रा. हिं.]

कौटिल्य—याचें नांव विष्णुगुप्त. आर्य चाणक्य, कौटिल्य अशींहि याचीं आणखी दुसरीं नांवें आढळतात. यानें नंदराजांचा, त्यांनीं याचा अपमान केल्यामुळें आमूलाग्र उत्खात करून धनानंदाचा दासी (मुरा)पुत्र चंद्रगुप्त मौर्य याला मगधाच्या राज्यावर बसविलें. हा अत्यंत निस्पृह पण तापट ब्राह्मण होता. यानें लिहिलेला अर्थशास्त्रावरील ग्रंथ नुकताच सांपडला आहे. हा ग्रंथ पुष्कळ दिवसांपासून माहीत होता, परंतु त्याची उपलब्धि मात्र आतांच झाली आहे. त्यावर भट्टस्वामीची टीकाहि आहे. पं. शामशास्त्री यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस नाट- काचा हा नायक आहे. [अर्थशास्त्र पहा]. याचा काल ख्रि. पू. ३२० ते ३०० असा आहे.

कौण्डिन्य—वैदिक वाङ्मयात बृहदारण्यकांतील वंशांत शांडिल्यचा शिष्य म्हणून याचा उल्लेख येतो. हा गोत्रप्रव- र्तक ऋषि होता. याच्या नांवाचें गोत्र रूढ आहे. पौराणिक वाङ्मयात (महाभारत सभापर्व अध्याय ४ श्लो. २२) मयासुरकृत धर्माच्या सभेंतील एक सभासद म्हणून याचा उल्लेख येतो.

कौण्डिन्यपुर–वऱ्हाड. जिल्हा उमरावती. तालुका चांदूर वर्धा नदीच्या तीरीं हें गांव आहे. दर कार्तिक पौर्णिमेस विठ्ठल-रुक्मयाची एक मोठी जत्रा येथें भरते. तिला सुमारें ५०,००० यात्रा जमते असें म्हणतात. येथील महादेवाचें देऊळ फार पूर्वी बांधलेलें होतें, परंतु हल्लींचें काम सुमारें १०० वर्षांपूर्वी झालेलें आहे. रुक्मिणीच्या बापाचें येथें राज्य असून त्याची राजधानी हें शहर होतें.त्यावेळीं येथें देवलवाडा नांवाचें शहर होतें, परंतु हल्लींच्या गांवाखालीं तें पुरलें आहे असें म्हणतात.

कौपर, वि ल्य म (१७३१–१८००).—इंग्लिश कवि. या कवीचा जन्म बर्खामस्टेड येथें १७३१ त झाला. याचें लहानपणचें शिक्षण मार्किएट येथील शाळेंत झालें. ' टिरोसिनिअम ' मध्यें या शाळेंतील आयुष्यक्रमाचें त्यानें वर्णन केलें आहे. तो मोठा झाल्यावर त्याला वेस्ट मिन्स्टर

येथील शाळेंत पाठविलें व तेथें वॉरनहेस्टिंग्ज, चर्चिल, इंपे वगैरे प्रसिद्ध मंडळी सहाध्यायी होती. त्याच्या घराण्यांत कायद्याचा अभ्यास करणारी बरीच मंडळी होऊन गेली. अर्थात् त्यांना अनुसरून यानेंहि कायद्याचा अभ्यास सुरू केला. १७५४ मध्यें त्याला वकीलीची सनद मिळाली. व १७५९ मध्यें त्याला 'कमिशनर ऑफ बॅकरप्ट्स' ची जागा मिळाली. त्या जागेवर त्यानें ५ वर्षे काम केलें. पुढें इंग्लंडमधील उमरावाच्या सभेतील कारकुनाच्या जागेकरितां कौपरचें नांव सुचविण्यात आलें. ती जागा मिळण्यापूर्वी त्याला उमरावांच्या न्यायसभेपुढें जाणें जरूर होतें. पण तें कौपरला पसंत न पडून त्यानें आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला व त्याला कांहीं दिवस वेडहि लागलें होतें. कांहीं दिवसानीं तो बरा झाला व नंतर त्याची व लेडि ऑस्टेन नावाच्या एका विधवेची फार मैत्री जमली. कौपरनें सर्वां पुस्तकांतून प्रसिद्ध केलेल्या 'दि टास्क' नावाच्या प्रसिद्ध काव्याचा विषय हिनेंच सुचविला व तसेंच 'जॉन गिलपिन' व 'दि रॉयल जॉर्ज' या कविता लिहिण्यास हीच कारण झाली. त्यानें होमरच्या 'इलियड' ग्रंथाचें भाषांतर १७८९ त छापून प्रसिद्ध केलें. ह्या कवीनें इंग्लिश काव्याला एक निराळेंच वळण दिलें. कवितांतील कृत्रिमपणा व भाषाशैलीचे दोष त्यानें बरेच कमी केले. बर्नस्, शेले, वर्डस्वर्थ वगैरेच्या काव्यांतून आढळणारी निसर्गप्रियता व प्राणिमात्राबद्दलची सहानुभूति हीं प्रथम कौपरच्याच काव्यांत आढळून येतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लिश कवींच्या काव्यातून विनोद फार क्वचित प्रसंगीं आढळतो. परंतु कौपर या नियमाला अपवाद आहे. उत्तम पत्रें लिहणाऱ्यामध्यें याची गणना केली जाते. कौपर हा जगप्रसिद्ध कवि होता असें जरी म्हणतां येणार नाहीं, किंबहुना इंग्लंडमधील असामान्य कवींमध्येंहि जरी त्याची गणना करतां येणार नाहीं तरी पण वाङ्मयामध्यें एक नामांकित कवी या नात्यानें त्याचें स्थान अढळ राहील यांत मात्र शंका नाहीं. 'टु मेरी' 'दि रिसीट ऑफ माय मदर्स पोर्ट्रेट' व 'ऑन दि लॉस ऑफ दि रॉयल जॉर्ज' या त्याच्या कविता इंग्लिश वाङ्मयांत कायमच्या राहातील अशा आहेत. पोपप्रभृति कवींच्या बर्नस्, वर्डस्वर्थ, शेले या कवींच्या मधला हा साखळीचा दुवा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. वर्डस्वर्थच्या काव्यांत व याच्या काव्यांत बरेंच साम्य आढळून येतें. हा सन १८०० मध्यें मरण पावला

कौरव—एक राष्ट्र (कुरु पहा).

कौल.—हा शब्द अरबी असून त्याचा मूळ अर्थ परवाना किंवा खात्री देणें असा आहे. मनुष्यांनीं विचारलेल्या प्रश्नांनां मिळणारें दैवी उत्तर, शकून, कौल, दिव्य वगैरेंनीं ओळखितां येतें असा सार्वत्रिक समज आहे. प्राचीन इजिप्शीस, रोम वगैरे पाश्चात्य राष्ट्रांतहि या गोष्टी फार चालत. अथर्ववेद, अद्भुतब्राह्मण, कौशिकसूत्र, अथर्ववेदपरिशिष्टें यांत ज्योतिष, जातक, शकुन यांची माहिती मिळते तर गृह्यसूत्रांतून लक्षण विज्ञानाचे विषी सांगितले आहेत. तथापि कौल हा दैवी उत्तरें ओळखण्याचा एक प्रकार असल्यानें दैवी शकुन, लक्षणें यांचें व्यापक विवेचन येथे न करितां केवळ कौल लावण्याच्या चालीकडे वळूं.

ग्रीसमध्यें कौल लावण्याची पद्धत ईजिप्तमधून आली. हिरोडोटस या प्रकाराच्या विरुद्ध होता व त्यानें ग्रीक देवळांतील कौल लावण्याच्या प्रकारांतील लबाडी उघडकीस आणिली आहे; तथापि हा प्रकार बंद झाला नाहीं. डेल्फायच्या कौलाचें महत्व राज्यकारभारांत अतोनात होतें. राष्ट्राचे राजकीय व खासगी व्यवहार एवढ्याशा यःकश्चित् गोष्टीवर अवलंबून असलेले इतिहासांत क्वचितच आढळतात. ग्रीक लोकांचा व पुढें रोमन लोकांचाहि असा समज होता कीं, ह्या कौलाच्या द्वारें देव आपली इच्छा प्रगट करतात. प्राचीन काळीं ग्रीस देशांतच नव्हे तर, त्या वेळच्या मूर्तिपूजक राष्ट्रांत अपॉलोचें प्रस्थ मोठें होतें. त्याचें देऊळ डेल्फायच्या बेटावर एका राईत असून आंत सोन्याची मूर्ति होती. देऊळ फुलांच्या माळांनीं सदैव शृंगारिलेलें असे. तेथें नेहमीं सहा पुजारी असत. सर्वांच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें काम ह्या पुजाऱ्याकडे असल्यामुळें त्यांस अतिशय महत्व आलें होतें. सर्व ग्रीक लोकाची अशी पक्की समजूत होती कीं हीं उत्तरें खास अपॉलोकडूनच येतात. परंतु हे पुजारी राज्यांतील प्रमुख लोक असल्यामुळें त्याच्या मर्जीस येईल त्याप्रमाणें लोकांस ते प्रश्नांचीं उत्तरें देत ह्यांत कांहीं संशय नाहीं. आधीं तें देऊळच एका अवघड ठिकाणीं बांधिलेलें होतें. त्यांत खालीं एक मोठें भुयार होतें; त्यांतून दुर्गंधयुक्त हवा वर येत असे. पण प्रश्न विचारावयाचा असे तेव्हां त्याच्या तोंडावर एक तिवई ठेवीत; व तिजवर एक बाई बसवीत. ह्या बाईला पायथिया असें म्हणत. तिला तिवईवर बसविल्यावर मग भुयाराचें द्वार उघडीत, त्याबरोबर ती दुर्गंधीनें घुसमटून चमत्कारीक हातवारे व वडबड करूं लागे, कीं मग तिच्या अंगांत देव आला असें लोकांस वाटे. अंगात आल्यावर ती जे शब्द उच्चारी ते सर्व शब्द पुजारी लिहून घेत व मागून, त्याची कविता बनवून ती पृच्छकांच्या हवालीं करीत. ह्या कवितेंतील शब्दरचना अशी घोंटाळ्याची असें कीं, त्यांतून वाटेल तो अर्थ निघावा. तेणेंकरून पुढें कसाहि प्रकार घडून आला तरी भविष्य खरें झालें अशी लोकांची खात्री करण्यास अडचण पडत नसे. म्हणून देवाचा कौल खोटा ठरण्याचा प्रसंग व कधीं येत नसे.

ह्याप्रमाणें डेल्फायच्या कौलाचें महत्व अतिशय वाढलें होतें. पायथियाचे काम करण्याकरितां आरंभीं एखादी हलक्या कुळांतील बाई आणीत. एकवार तिचा देवळांत प्रवेश झाल्यावर तिला देऊळ सोडून जाण्याची किंवा लग्न करण्याची मनाई असे. एकदां अशी एक तरुण स्त्री वरील

नियम मोडून पळून गेली. तेव्हां असा कायदा करण्यांत आला कीं, पन्नास वर्षांखालील बाईस देवळांत घेऊं नये. आरंभीं पुष्कळ दिवस पायाथियाचें काम एकच बाई करीत असे; पण पुढें पुढें पृच्छकांची संख्या अतोनात वाढल्यामुळें दोन बाया ठेवण्यांत आल्या, व दुर्गंधयुक्त हवेनें एखादी बाई क्वचित् प्रसंगीं आजारी झाल्यास काम बंद पडूं नये म्हणून तिसरी एक बाई देवळात आणून तयार ठेवीत असत. डेल्फायच्या देवाकडे वकील पाठविण्यासाठीं आथेन्सच्या लोकांनीं सरकारी गलबतें बांधिलीं होतीं. तीं फार पवित्र समजत.

आपल्याकडेहि हा प्रकार अजून चालतो. तांदूळ, सुपारी, पानें, फुलें किंवा दगडी लहान गोटे मूर्तीच्या छातीच्या डाव्या अगर उजव्या बाजूस चिकटवितात. यांनां कळे असें म्हणतात; व देवानें हो म्हणावयाचें असल्यास अमकीकडील कळा पाडून हा कौल दे असें म्हणतात. हा कौल लावावयाचा तो देवाचा पुजारी लावतो. त्याबद्दल त्यास थोडी फार दक्षणा द्यावी लागते. कौल लावावयाच्या देवता बहुधा देवी आणि मारुती ह्याच असतात. ही चाल कोंकणांत फार आहे.

कौशांबी—ही प्राचीन वत्स देशाची राजधानी. कौशांबी येथें अशोकचा शिलालेखस्तंभ आहे. त्याचें भाषांतर सेनार्टनें व बुह्लरनें केलें आहे (इंडि. ॲंटि. १८८९; १८९०). उज्जनीच्या उत्तरेस हें प्राचीन शहर आहे (ज. रा. ए. सो. १८९८). हें शहर वैदिक व बौद्ध दोन्हीं पंथांत प्रसिद्ध आहे. बृहत्संहितेंत (१६. ३) याचा उल्लेख आहे. पुरूरव्याचा १० वा वंशज कुशांब यानें हें स्थापिलें; त्यानंतर अर्जुनाचा आठवा वंशज निमिचक्र येथें (हस्तिनापूर वाहून गेल्यामुळें) राहूं लागला. रामायणांतहि याचा उल्लेख आहे. येथील पाडववंशीय उदयन राजाची कथा सर्वत्र प्रसिद्ध आहे. मेघदूतांत, बृहत्कथेंत, रत्नावलींत याचा नामनिर्देश आहे. उदयनाचें दुसरें नांव वत्सराज; त्यावरून याला वत्सपत्तनहि म्हणत. बौद्ध भिक्षु यस हा येथें पळून आला होता. महावंसो, ललितविस्तर व इतर सिंहली आणि तिबेटी बौद्धग्रंथात याचें नांव आढळतें. गौतम हा बुद्ध झाल्यानंतर येथें त्यानें सहावें व नववें वर्ष घालविलें. बुद्धाची चंदनी मूर्ति उदयनानें केलेली. ह्युएनत्संगाच्या वेळीं येथील राजवाड्यांत होती. बेलच्या मतें अलाहाबादेच्या उत्तरेस १५ कोसांवरील यमुनाकांठचें कोसाम खेडें म्हणजेच कौशांबी होय. कनिंगहॅमनेंहि तेंच ठरविलें असून अद्यापीहि तेथील लोक त्याला कौशांबीच म्हणतात. बौद्धकथात बकुल अर्हताच्या कथेंत तो कौशांबीस जन्मला व लहानपणीं त्याची आई तेथें यमुनेंत स्नान करीत असतां हा यमुनेंत पडल्याची कथा आहे. त्यावरून यमुना कांठचें कोसल म्हणजेच कौशाबी होय. ह्युएनत्संगनें याचा घेर अडीच कोस दिला आहे. येथें अकबराच्या वेळचा एक शिलालेख असून त्यांत यास कौशांबी नगर असें म्हटलेलें आहे. खरा-शिलालेखांत कौशांबीमंडल राज्याचा उल्लेख आहे. यावरून त्यावेळीं (१०३५) तें कनोजपासून स्वतंत्र होत होतें असें दिसतें [स्मिथ; कनिंगहॅम दीक्षित—भा. भू.].

कौषीतकी, ब्राह्मण.—कौषीतकी ब्राह्मण हें ऋग्वेदाचें एक ब्राह्मण आहे. याला शांखायन ब्राह्मण असेंहि दुसरें नांव आहे. कौषीतकी ब्राह्मणाचे तीस अध्याय असून ऐतरेय ब्राह्मणाच्या पहिल्या सहा पंचिकांचा जो विषय तोच या ब्राह्मणाचाहि विषय आहे. कौषीतकीच्या पहिल्या एक ते तीन अध्यायांत आग्न्याधान, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास याग असून चौथ्या अध्यायात दाक्षायणयज्ञ, इळादधयज्ञ, सार्वसेनियज्ञ, शौनकयज्ञ वसिष्ठयज्ञ, साकंप्रस्थयाग, तुरायणयज्ञ इत्यादि काम्य याग दिले असून नंतर आग्रयण याग दिला आहे. पाचव्या अध्यायांत चातुर्मास्यें सांगितलीं असून सहाव्यांत ब्रह्मा नामक ऋत्विजानें यागांत करावयाचें सर्वसाधारण कर्म दिलें आहे. येथपर्यंत दिलेलीं हीं सर्व कर्में ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलेलीं नाहींत. सातव्या अध्यायापासून पुढें सोमयागासंबंधीचें वर्णन आलें आहे.

कौषीतकी ब्राह्मणात हौत्र विषयासंबंधींचें पद्धतशीर व सुस्पष्ट असें विवेचन आलें आहे. या विषयाच्या पलीकडे जाऊन इतर विषयासंबंधींचा यांत उहापोह केलेला नाहीं. सोमयागाचें मात्र यांत सविस्तर विवेचन आलें आहे. ऐतरेयांत ज्याप्रमाणें प्रस्तुत विषयाशिवाय राजसूय यज्ञाचें व राज्याभिषेकाचें वर्णन आलेलें आहे तसें यांत नाहीं. यावरून व इतर अंतर्गत पुराव्यावरून कौषीतकी ब्राह्मण हें ऐतरेयानंतर रचिलें गेलें असावें असें दिसतें. ऐतरेय ब्राह्मणात आप्तवाक्यांचीं प्रमाणें फारशीं आढळत नाहींत पण कौषीतकीमध्यें 'तस्योक्तं ब्राह्मणानाम' अशा शब्दांनीं कौषीतकी, पैंग्य इत्यादि ब्राह्मणांचा निर्देश केलेला आहे. कौषीतकीमध्यें शिवाचीं 'ईशान' महान्देव हीं नावें आलेलीं आहेत तशीच तीं शुक्लयजुर्वेद, शतपथ ब्राह्मण यामध्येंहि आलीं आहेत. यावरून कौषीतकी ब्राह्मणग्रंथ ऐतरेयानंतरचा व शतपथकालीन असावा असा वेबरचा अभिप्राय आहे. आणि आरंभीं अध्याय १ ते ६ यामध्यें आलेल्या सूत्रसदृश विषयावरून व पुरुषमेधाचा मुळींच उल्लेख नाहीं यावरून ही गोष्ट संभवनीय वाटते. कौषीतकी ब्राह्मण असें जरी या ब्राह्मणाचें नांव आहे तरी हा ब्राह्मणग्रंथ कौषीतकीनेंच रचला असावा असें दिसत नाहीं. याचें कारण या ब्राह्मणामध्यें कौषीतकीचा मोठ्या आदरपूर्वक उल्लेख केला गेला आहे व कौषीतकी स्वतः अशा तऱ्हेनें आपला आदरपूर्वक उल्लेख करील हें संभवत नाहीं. बोडलियन लायब्ररींत जी कौषीतकी ब्राह्मणाची हस्तलिखित प्रत आहे तीवर 'कौषीतकी मतानुसारी शांखायन ब्राह्मण' असें लिहिलें आहे त्यावरून शांखायनानें कौषीतकी संप्रदायानुसारें हा ग्रंथ रचिला असावा असें दिसतें.

कौषीतकी ब्राह्मणांतील सहाव्या अध्यायांतील १-९ हीं खंडें प्रक्षिप्त आहेत असें वेबरचें मत आहे. या खंडांत रुद्रदेवतेची स्तुति करण्यांत आली आहे, व त्या स्तुतीचा कौषीतकींतील मूळ विषयांशीं संबंध नाहीं, तसेंच इतर अध्यायांत रुद्राला विशेषसें प्राधान्य दिलेलें आढळत नाहीं असें त्याचें म्हणणें आहे. पण हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. ऐतरेय ब्राह्मणाच्या पांचव्या पंचिकेंतहि रुद्रदेवतेसंबंधींचा उल्लेख आहे व रुद्राची स्तुतीहि केली आहे. कौषीतकीनेंहि त्याचेंच अनुकरण केलें असावें. या देवतेची स्तुति मूळ विषयाला सोडून नवीन त्याकाळीं रुद्रदेवतेचें महत्व वाढलें असल्यामुळें ऐतरेय, कौषीतकी व शतपथ या तिन्ही ब्राह्मणांत रुद्राची स्तुति आली असावी असें वाटतें. तिसाव्या अध्यायांत वाजपेय व अप्तोर्याम या विधींचा उल्लेख आलेला असून इतर अध्यायांत याचा उल्लेख येत नाहीं. त्यावरून हा तिसावा अध्याय प्रक्षिप्त आहे असें कीथचें म्हणणें आहे. परंतु वाजपेय व अप्तोर्याम हे याग सप्तसोमसंस्थेपैकीं असल्यामुळें यथानुक्रमच आलेले आहेत म्हणून त्यांस प्रक्षिप्त म्हणता येत नाहीं. ऐतरेय ब्राह्मणाचा जो काळ तोच कौषीतकीचा काळ होय. ऐतरेयानंतर जरी कौषीतकी ब्राह्मणाची रचना झाली तथापि यांत काळाचें फारसें अंतर नसून दोन्हीहि ब्राह्मणग्रंथ जवळ जवळ एकाच काळचे असावेत असें म्हणावयास हरकत नाहीं. ऐतरेय ब्राह्मणाचा काल ख्रि. पू. ६०० च्या पूर्वींचा ठरला आहे व तोच कौषीतकीचा ठरावयास कांहीं हरकत नाहीं. काळ ठरविण्याचीं प्रमाणें ऐतरेय ब्राह्मण या लेखांत सांपडतील. ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणेंच कौषीतकी ब्राह्मणाचीहि भाषा बोजड, तुटक व संक्षिप्त अशी आहे. त्यांतल्यात्यांत कौषीतकी ब्राह्मणाची फारच संक्षिप्त आहे. कौषीतकीमध्यें ज्या आख्यायिका आल्या आहेत त्या देखील फारच संक्षिप्त रीतीनें सांगितल्या आहेत. त्यामुळें त्या समजावयाला क्लिष्ट वाटतात. सुलभ रीतीनें कळेल अशी भाषा वापरण्याऐवजीं सूत्रमय भाषा वापरण्याचा यांत प्रयत्न जास्त दिसतो. ऐतरेयांत ज्याप्रमाणें कांहीं पद्यमय गाथा आहेत त्याप्रमाणें कौषीतकीमध्यें आढळून येत नाहींत. कोणत्या कारणानें असेल तें असो, पण कौषीतकी ब्राह्मणाला लोकप्रियता फारच कमी मिळाली असें दिसतें. लाट्यायन श्रौतसूत्रावरील आपल्या टीकेंत अग्निस्वामिन् असें म्हणतो, कीं कौषीतकींना कोणत्याहि महत्वाच्या प्रश्नाचें चांगल्या समाधानकारक रीतीनें विवरण करतां येत नसे म्हणून ते मागें पडले. कौषीतकी हे अकुशल व व्याहत आहेत असें धनंजयाचें मत होतें असें निदानसूत्रावरून दिसतें. महार्णव ग्रंथांत कौषीतकी शाखेची जी हकीकत आली आहे तीवरून कौषीतकी ब्राह्मणाची रचना उत्तर गुजराथमध्यें झाली असावी असें दिसतें व अशा दूरच्या भागांत याची रचना झाल्यानें याला लोकप्रियता मिळाली नसावी असाहि संभव आहे.

आरण्यक.—कौषीतकी ब्राह्मणाला जोडलेल्या या आरण्यकाचे १५ अध्याय असून त्यांपैकीं पहिले दोन अध्याय ऐतरेय आरण्यकाच्या पहिल्या व पांचव्या आरण्यकाशीं जुळते आहेत. सातव्या व आठव्या अध्यायाचें तिसऱ्या अरण्यकाशीं साम्य आहे. तीन ते सहा असे चार अध्याय मिळून कौषीतकी उपनिषद झालें आहे हें बरेंच मोठें असून अध्यात्म विषयानें भरलेलें आहे.

[संदर्भग्रंथ—ऋग्वेदान्तर्गत शाखायन ब्राह्मणम् (आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलि ग्रंथांक ६५); कीथ—ऋग्वेद ब्राह्मणाज ट्रॉन्सलेटेड (हर्वर्ड ओरिएंटल सीरिज व्हॉल्यूम२५); मॅकडोनेल–हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर.]

कौसल्या—कोसल राष्ट्रावरून हें व्यक्तिनाम पडलें. या नांवाच्या अनेक पौराणिक स्त्रिया होऊन गेल्या उदा. पुरूची बायको व जनमेजयाची आई (म. भा. आदि. अ. ९५); दशरथ राजाची बायको व रामचंद्राची आई ('राम' 'दशरथ' पहा). धृतराष्ट्र व पंडु यांच्या आया ज्या काशी राजाच्या कन्या त्यांनाहि हेंच नांव आहे.

क्यबिन—उत्तर ब्रह्मदेशांत उत्तर चिंद्विन् जिल्ह्यांतील दक्षिणेचा तालुका. याचें क्षेत्रफळ ६४० चौरस मैल. खेड्यांची संख्या ४७. लो. सं. १९११ सालीं ११२२४. तालुक्याचें मुख्य शहर क्यबिन याची लो. सं. ३३८०. सन १९०३–४ सालीं लागवडीचें क्षेत्रफळ १८ चौ. मै. असून कालीचें उत्पन्न १६००० झालें होतें.

क्यवक्कू—ब्रह्मदेशांत दक्षिणेकडील शान संस्थानांतील म्येलत भागांतलें एक लहान संस्थान. याचें क्षेत्रफळ ७६ चौ. मै. आहे. सदरहु संस्थान डोंगराळ असून पनलुंथ नदी संस्थानच्या सरहद्दीवरून जाते. येथें तांदुळाचें मुख्य पीक असून १००० एकरांमध्यें त्याची पेरणी होत असते. इ. स. १९११ सालीं याची लो. सं. ४०,६३६ होती. यांत खेडीं ४२ आहेत. सन १९०४–५ सालीं उत्पन्न रुपये ३९०० झालें. इंग्रज सरकारला खंडणी २००० रुपये दिली जाते

क्यान्र्डी, मेजर टी—(इ. स. १८०२–१८७७) मराठीचे इंग्रज ग्रंथकार हे इ. स. १८२२ त हिंदुस्थानांत आले व ईस्ट इंडिया कंपनींत अंमलदार झाले. कॅप्टन मोलस्वर्थनी जो मराठी–इंग्लिश कोश लिहिला त्यांत ह्यांनीं त्यांस साहाय्य केलें. नंतर इंग्लिश–मराठी कोश करण्याच्या कामीं त्यानां साहाय्य करूं लागले. कॅप्टनसाहेब विलायतेंत गेल्यामुळें तो ग्रंथ तसाच अपूर्ण राहिला होता. तो ह्यांनीं इ. स. १८४० त हातीं घेऊन सात वर्षांत पूर्ण केला. इ. स. १८७३ त त्याची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति काढली इ. स. १८५१–५७ मध्यें हे पुना कॉलेजचे–जें पुढें इ. स. १८६८ त डेक्कन कॉलेज झालें–प्रिन्सिपाल होते. भाजी मराठी क्रमिक पुस्तकें यांच्याच हातचीं होत. इंडियन पिनलकोड आणि सिव्हिल प्रोसिजर कोडचें मराठी पहिलें भाषांतर यानींच केलें. हे इ. स. १८७६ पर्यंत मराठी

ट्रान्स्लेटर होते. इ. स. १८७७च्या जाहीरनाम्यांत यांनां सी. एस. आय. ही पदवी मिळाली.

क्युरी,पेरी व मॅडम—पेरी क्युरी हा एक फ्रेंच पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता होऊन गेला. याचा जन्म तारीख १५ मे १८५९ रोजीं पारीस येथें झाला. सार्बोन येथें याचें शिक्षण झालें व पुढें तो त्याच ठिकाणीं प्रोफेसर झाला. उष्णताजन्य विद्युत, भिन्न भिन्न उष्णमानावर भिन्न भिन्न द्रव्याची चुंबकस्थिति इत्यादि विषयावर त्यानें कांहीं शोध लावले आहेत. रेडिअम नावाच्या मूल द्रव्याचा शोध त्यानें व त्याच्या पत्नीनें लावला व यामुळें त्याची प्रसिद्धि झाली आहे. त्याची बायको मेरी स्क्लोडोस्का हिचा जन्म तारीख ७ नोव्हेंबर १८६७ सालीं वार्सा येथें झाला. ही एक उत्तम विदुषी होती. हेन्री बिक्वेरल यानें सन १८९६ सालीं असें सिद्ध करून दाखविलें कीं युरेनिअम धातुपासून जे किरण विसर्जन होतात त्यापेक्षा जास्त तीव्र प्रतीचे किरण या धातूच्या अशोधित मृत्तिकेपासून विसर्जन होतात. या प्रकाराविषयीं उभयता पतिपत्नींनीं असें अनुमान बसविलें कीं, या अशोधित मृत्तिकेंत युरेनिअम धातूपेक्षा एखादें जास्त तीव्रतर किरणविसर्जक द्रव्य असलें पाहिजे. याकरितां त्यांनीं पिच ब्लेन्ड नावाची कित्येक खंडी अशोधित मृत्तिका घेऊन तिचें अत्यंत परिश्रमानें आणि युक्तीनें पृथक्करण करून त्यांतून पालोनिअम आणि रेडिअम नावाचीं दोन द्रव्यें त्यांनीं सन १८९८त निराळीं काढलीं. या सालानंतर त्यांनीं पुढील कित्येक वर्षेपर्यंत या दोन द्रव्यांवर प्रयोग केले व त्या प्रयोगाच्या सहायानें त्यांनीं असें सिद्ध केलें कीं, रेडिअम नावाच्या मूल द्रव्यापासूनच पोलोनिअम नांवाचें द्रव्य तयार होत असतें. सन १९०३ सालीं त्या उभयतांना रॉयल सोसायटीनें त्याच्या या शोधाबद्दल डेव्ही नावाचें पदक बक्षीस दिलें. पुढें याच सालीं हेन्री बिक्वेरल आणि क्युरी पतिपत्नी याच्यात नोबल प्राइझ नावाचें पारितोषक निम्में निम्में वाटून देण्यात आलें. सन १९०५ सालीं ॲकॅडमी आफ सायन्सेस नांवाच्या संस्थेचा प्रोफेसर क्युरी याला सदस्य करण्यात आलें. तारीख १९ एप्रिल १९०६ रोजी क्युरी हा पारीसच्या रस्त्यांतून जात असतांना त्याच्या अंगावरून एक गाडी गेली व त्याचा तात्काळ मृत्यु झाला.

क्युरेषी—क्युरेषी ही पंजाबांतील एक जात आहे. लो. सं. ७८२२२. महंमद पैगंबर हा क्युरेषी वंशांतील होता म्हणून त्या वंशास मोठा मान दिला जातो. ते मुख्यतः जालंदर, लाहोर, रावळपिंडी, मुलतानप्रांत व भावलपूर संस्थान यांत आढळतात. शेतकी हा त्यांचा मुख्य धंदा आहे; परंतु त्यांचा उदरनिर्वाह पुष्कळ अंशीं आपल्या शिष्यवर्गाकडून मिळालेल्या देणग्यांवर चालतो. वायव्यसरहद्द प्रांतांतहि सुमारें २१ हजार क्युरेषी आहेत. [कूक; से. रि. (पंजाब) १९११].

क्यूबा—हें वेस्ट इंडीज बेटांपैकीं सर्वांत मोठें बेट आहे. हें पश्चिम रेखांश७४° ७' ते ८४०° ५७ व उत्तर अक्षांश १९° ४८' २३ १३' यांत वसलेलें आहे. हें बेट चिंचोळें असून चंद्राकृति आहे. क्यूबाचें क्षेत्रफळ ४१६३४ व आसपासचीं बेटें धरून ४४१६चौ. मैल आहे. ह्या बेटाच्या किनाऱ्यावर नांगरवाडे व बंदरें आहेत. यांपैकीं कांहीं पहिल्या प्रतीचीं बंदरें आहेत.

क्यूबा बेटाचे स्वाभाविक भाग होतात ते असेः—सँटिआगो, (सध्याचा ओरिएन्ट); कॅमाग्वे;सँटाक्लारा; सँटाक्लाराचा पश्चिम-भाग व मॅटाझास, हॅव्हाना, आणि पिनारडेल रिओ. पूर्व, मध्यम पश्चिम अशा तीन मुख्य पर्वताच्या ओळी आहेत. पूर्व ओळींत मांटे टर्किनो नांवाचें ७७०० ते ८३२० फूट उंचीचें एक सर्वांत उंच शिखर आहे. काटो नांवाची एक मोठी नदी अही ओरिएन्ट प्रांतांत आहे. ॲरिग्वानाबो नावाचें एक अतिशय सुंदर सरोवर हॅव्हानाच्या जवळ आहे. क्यूबाबेट रूपांतर झालेल्या व ज्वालामुखी पासून बनलेल्या खडकांचें बनलेलें आहे. ह्या बेटांत खनिज पदार्थांची समृद्धि आहे. क्यूबाबेटांत उत्कृष्ट वनस्पतीहि सांपडतात. निरनिराळ्या तऱ्हेचीं मधुर व रुचकर फळें ह्या बेटांत होतात. ह्यापैकीं अननस, चिंच, केळीं, आंबे व लिंबें सर्वत्र आढळतात. प्राणिवर्गांत पक्षी, सरपटणारे प्राणी व मासे हे अतिशय व निरनिराळ्या तऱ्हेचे आहेत. क्यूबाबेटांतील हवा उष्ण परंतु सर्द अशी आहे. येथें अवर्षणें नेहमीं पडतात. आठ अथवा दहा वर्षांनीं एकदां तरी एखादें मोठें वादळ होतें. क्यूबा बेटांत १६४७ पासून पीतज्वर नांवाच्या तापाच्या सांथीनें फार कहर करून सोडला होता. परंतु अलीकडे ह्या रोगानें तेथून पाय काढला आहे. देवी, महारोग व क्षय हे सर्वत्र असून देवीच्या सांथीनें पुष्कळ प्राणहानि होते.

या बेटांत चार तऱ्हेच्या जमिनी आहेत. एकंदरींत सर्व जमिनी अतिशय सुपीक आहेत. मुख्य पीक साखरेचें आहे. १९१७–१८ या वर्षी १३,८४,८१२ एकर जमीन उंसाच्या लागवडीखालीं होती. त्यांतून ४०,४८,४८०टन साखर काढण्यांत आली. या बेटांतील तंबाखू जगांत अतिशय नांवाजलेली आहे. पिनाल डेलरिओ, हॅव्हाना व सॅन्टाक्लारा या प्रांतांतून बहुतेक तंबाखू येते. तंबाखूचे मळे गोरे लोकांच्या मालकीचे आहेत. १९०७ मध्यें २,०१,५५२ गांठी म्हणजे १,०९,५६२ पौंड (वजनी) तंबाखूचें पीक झालें. कॉफीचें एका काळीं फार भरभराटीचें पीक होतें. १९०७ मध्यें ६५,९५,७००पौंड वजनाची कॉफी झाली. केळीं, नारळ, संत्रीं व अननस हीं प्रसिद्ध फळें होतात. याशिवाय याम, रताळीं, तांदूळ वगैरे पिकें होतात. गुरेंढोरें बाळगणें हा एक महत्वाचा धंदा आहे. उद्योगधंद्यांत विशेष महत्वाचे असे सिगार, तिगारेट, साखर, रम व व्हिस्की तयार करण्याचे धंदे होत.

खनिज पदार्थांमध्यें तांब्याच्या खाणीबद्दल क्यूबाची प्रसिद्धि आहे. याशिवाय लोखंड व मँगनीज याच्या खाणी अलीकडे खणण्यास सुरुवात झाली आहे. या बेटांतील व्यापार महत्वाचा समजला जातो. साखर, तंबाखू व फळें यांची निर्गत होते. आयात मालांत कापड, खाण्याचे पदार्थ, लांकडी सामान व यंत्रसामुग्री हीं मुख्य आहेत. संयुक्त संस्थानांशीं बहुतेक व्यापार चालतो. १९१७ सालीं आयात ५,४२,५५,९६३ पौंड व निर्यात ७,३३,५४,३८९ पौंडांची होती. या बेटांत दळणवळणाच्या बाबतींत मात्र दैन्यावस्था आहे. १९१६ सालीं २३५९ मैल रेल्वे होती.

क्यूबाची लो. सं. १९१६ सालीं२६,२७,५३६ होती.कांहीं चिनी मजूर या बेटांत आहेत.ओरिएंट प्रांतांत निग्रो लोकांचें प्राबल्य आहे. निग्रो लोकांची स्थिति चांगली आहे. राजकीय बाबतींत व थोडेंबहुत सामाजिक बाबतींत निग्रो लोकांचा गोऱ्या लोकांबरोबर मान असतो.रोमन कॅथॉलिक धर्म सर्वत्र आहे. अशिक्षितांची संख्या जास्त आहे. संयुक्त संस्थानन्नें लष्करी दृष्टीनें ज्यावेळीं या बेटाचा ताबा घेतला त्यावेळीं या बेटाच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यांत आला. या बेटातील प्रजासत्ताक पद्धति संयुक्त संस्थानच्या पद्धतीवर आहे. अध्यक्षाची मुदत चार वर्षांची असते. याशिवाय कॉंग्रेसमध्यें एक मंत्रिसभा व प्रतिनिधिसभा अशा दोन सभा असतात कॉंग्रेसची बैठक वर्षांतून दोनदा होते. ह्या बेटाचे सहा प्रांत केले आहेत. त्यांचीं नांवें:— पिनारडेलरिओ, हंव्हॅना, मॅटान्झाअ, सांन्टाक्लार, कॅमाग्ले अथवा प्युर्टो प्रिंसिप आणि ओरिएन्ट. प्रत्येक प्रांताला एक गव्हर्नर व लोकनियुक्त प्रतिनिधिमंडळ असून प्रांताचा कारभार स्वतंत्र रीतीनें चालविण्याचा त्यांनां अधिकार असतो. अध्यक्षालाच फक्त यांच्या कामांत ढवळाढवळ करतां येते. २१ वर्षे वयाच्या प्रत्येक कुटुंबांतील पुरुष रहिवाशास मत देण्याचा अधिकार असतो. या राष्ट्राचा वसूल १९१८–१९ सालीं १२,८९,२००० असून खर्च १,०८,७८,९७३ होता.

क्यूबा बेटांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत आहे. दुय्यम व वरिष्ठ शिक्षण सरकारच्या हातीं आहे. हंव्हाना येथें एक विश्वविद्यालय आहे. याशिवाय कलाकौशल्य, धंदे-शिक्षण व व्यापार ह्यासंबंधीं सोय आहे. प्रजासत्ताक राज्या-पूर्वीं या बेटांवर स्पेनचा अंमल होता. ह्या बेटातच एक मुख्य मुलकी व लष्करी अधिकारी असून त्याला गव्हर्नर व कॅप्टन जनरल असा हुद्दा होता. त्याची अनियंत्रित सत्ता चालत असे. क्यूबाच्या पूर्वेतिहासाची फार थोडी माहिती मिळते. येथें पूर्वी ताम्रवर्णी परंतु उंच असे लोक रहात असत. ते चलाख व धिम्या स्वभावाचे असून शेतकीवर आपली उपजीविका चालवीत असत. १५५० च्या सुमारास त्यांचा अगदींच नायनाट झाला असावा असा समज आहे.

इतिहास:—कोलंबसाला आपल्या पहिल्या सफरींत हें बेट १४९२ सालीं सांपडलें. वसाहतीस १५११ पासून सुरुवात झाली व १५१५ पर्यंत मुख्य मुख्य शहरांची स्थापना झाली. क्यूबा हें मुख्य ठिकाण होऊन ह्या ठिकाणाहून युकॅटन, मेक्सिको व फ्लोरिडा वगैरे देश शोधण्यासाठीं टोळ्यांची रवानगी होत असे. १५३३ सालापासून गुलामांच्या व्यापारास सुरवात झाली. १६ व्या शतकांत ह्या बेटांत फार अंदाधुंदी होती. इंग्लिश व फ्रेंच चाच्यांच्या चांचेगिरीची सुरवात १६ व्या शतकांत होऊन १७ व्या शतकांत तिचा कळस झाला. हंव्हाना हें ब्रिटिशांनीं १७६२ त घेतलें परंतु लगेच दुसऱ्या वर्षी तें फ्लोरिडा बेटाच्या मोबदला स्पेनला मिळालें. ह्या वेळेपासून या बेटांत ब्रिटिशांचा शिरकाव झाला. १८ व्या शतकाच्या शेवटीं व १९ व्या शतकारंभीं क्यूबा बेटाचा गव्हर्नर उदारमतवादी असल्या-मुळें, व्यापार व राजकीय बाबतींत फायदा झाला. यानंतर पक्षभेद होऊन सर्व बेटभर अशांतता माजली. १८६६ सालीं येथील दशवार्षिक युद्धाला सुरवात झाली. झांजानच्या तहानें (१८७८) बंडखोरांनां सरसकट माफी, गुलामांचें दास्यविमोचन, राज्यकारभारांत सुधारणा व वसाहतस्वातंत्र्य या गोष्टी अमलात आल्या. परंतु स्पॅनिश एकतंत्री राज्यव्यवस्थेविरुद्ध पुन्हां १८९५ त बंड झालें. उत्तम अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांनीं १८९८ त क्यूबाबेटात सैन्य उतरविलें. इसवी सन. १८९९ जानेवारींत स्पेनची सत्ता नाहींशीं झाली व संयुक्त संस्थानांचा लष्करी अंमल सुरू झाला. प्रजासत्ताक राज्याचा पुरस्कार १९०१ मध्यें करण्यात येऊन स्वतःच्या हक्काची पायमल्ली होऊं नये म्हणून संयुक्त संस्थानाने ' प्लॅट अमेंडमेन्ट ' चीं कलमें क्यूबाकडून कबूल करून घेतलीं. एस्ट्रॅडअपाल्मा हा प्रजासत्ताक राज्याचा पहिला अध्यक्ष होय. सर्व पक्षांच्या लोकांचें एकमत न होता अध्यक्षाला इ. स.१९०६ त राजीनामा देणें भाग पडलें. पुढें बंडें झाल्यामुळें पुन्हां संयुक्त-सरकारनें क्यूबा बेटांत सैन्य पाठवून शांतता प्रस्थापित केली. १९०९ पासून पुन्हां प्रजासत्ताक राज्याचा पुरस्कार करण्यांत येऊन सेनापति जोस मिग्वेल गोमेझ हा अध्यक्ष व आल्फेडो झयास हा उपाध्यक्ष झाला.

क्यूमी—प्राचीन रोम (इटाली) हें शहर कॅपानियात होतें. यापासून निआपोलीस १२ मैल आहे. हें एओलियन किंवा खाल्डियन यांपैकीं कोणत्या लोकांनीं स्थापलें याबद्दल निश्चित कांहींच सांगतां येत नाहीं. इ. स. पूर्वी ५२४ मध्यें एट्रुस्कन लोकांनीं या शहरावर हल्ला केला. पण त्यांचा पराभव झाला. पुन्हां इसवी सनापूर्वी ७७४ या वर्षी या शहरावर एट्रुस्कन लोकांनीं हल्ला केला. परंतु यावेळीं या शहरानें सायराक्यूजच्या हीरोची मदत घेतली व क्यूमेच्या लढाईंत एट्रुस्कन लोकांचा पराभव केला. व एट्रुस्कन लोकांचें आरमार हांकून लावून त्यांची सत्ता मोडून टाकली. हें

रोमच्या छत्राखालीं ३१८ मध्यें आलें. हॅनिबॉलिक युद्धांत तें रोमच्या बाजूनें लढलें.याला पुढें नागरिकत्व मिळालें.

क्यैकटो, ता लु का.—दक्षिण ब्रह्मदेशांस थेटन जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ५०८ चौ. मै. तालुक्याचें मुख्य ठिकाण क्यैकटो. याची लो. सं. इ. स. १९११ सालीं ६१२७ होती. या तालुक्यामधून सितंग-क्यैकटो कालवा गेलेला असून तालुक्याचा उत्तर व पूर्व भाग पहाडी परंतु सुपीक आहे. १९०३-४ सालीं लागवडीचें क्षेत्रफळ १२० चौ मै. होतें. व सान्याचें उत्पन्न १,२५,५०० होतें.

गां व—दक्षिण ब्रह्मदेशांत थेटन जिल्ह्यांतील क्यैकटो पोटविभागाचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें कदत नदीच्या काठीं आहे. कड्याच्या पायथ्याशीं क्यैकटो शहर मार्ताबानच्या आखातापर्यंत दक्षिणेस पसरलेलें आहे. याची लो. सं. सालीं १९११ ६१२७ असून येथील व्यापार भरभराटींत आहे. इ. स. १८८९ सालीं येथें म्यु. क. स्थापना झाली. तिचें १९०३-४ सालीं उत्पन्न २०,३०० रु. झालें. व खर्च २२३०० रु. झाला होता.

क्यैकमराव—दक्षिण ब्रह्मदेशात अमहर्स्ट जिल्ह्यांतील एक तालुका. पूर्वी त्याला अतरन असें नाव होतें. याचें क्षेत्रफळ २८१७ चौ.. मै असून लो. सं. १९११ सालीं ८७,८६९ होती.खेड्यांची संख्या ११३. क्यैकमरावची लो. सं. १५९७ असून तें अतरन् नदीच्या डाव्या तीरावर वसलेलें आहे. लागवडीखालीं १९०३-४ सालीं १४० चौ. मै. जमीन असून सान्याचें उत्पन्न १, ३८,६०० होतें.

क्यैकलत ता लु का-दक्षिण ब्रम्हदेश. पेपन जिल्ह्यातील उत्तरेकडील तालुका. याचें क्षेत्रफळ २८४ चौ. मै. लो सं. (१९११) ७५६७६. खेडीं ११७ असून इ. स. १९११ सालीं त्यांची लोकसंख्या ८, ४३८ होती. तालुक्याचें मुख्य ठिकाण क्यैकलत तालुका सपाट व सुपीक आहे. लागवडीचें क्षेत्रफळ २१९ चौ. मै. असून सान्याचें उत्पन्न २,३७,००० होतें.

गां व.—क्यैकलत पोटविभाग व तालुक्याचें मुख्य शहर असून क्यैकलत नदीच्या उजव्या किनान्यावर वसलेलें आहे १९११ सालीं या गांवची लो. संख्या ८४३८ होती. येथें मामुली सरकारी इमारती असून शिवाय १ दवाखाना आहे. इ. स. १९०० सालीं म्यु. कमीटीचा स्थापना झाली. तिचें उत्पन्न इ. स. १९०३-४ सालीं ५१००० रुपये असून खर्च ३९००० रुपये झाला.

क्यैकमी—दक्षिण ब्रह्मदेश. अमहर्स्ट जिल्ह्यातील एक तालुका. याचें क्षे.फ.९२८ चौ. मै.लो.संख्या(१९११)२३१०५ क्यैकमी (अथवा ॲमहर्स्ट) हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. पहिलें ब्रम्ही युद्ध संपल्यावर थोडा वेळ येथें जिल्ह्याचें ठाणें होतें. अलीकडे त्याचें महत्व सर्व जाऊन तें साधारण गांवांत मोडलें जातें. इ. स. १९०३-४ सालीं ३३ चौ. मै . लागवडीखालीं क्षेत्रफळ असून सान्याचें उत्पन्न २७,६०० झालें होतें.

क्यैंगटन, सं स्था न.—ब्रह्मदेशांतील दक्षिणशान संस्थानांपैकीं एक संस्थान. ब्रह्मदेशांत जीं संस्थानें आहेत त्या सर्वांत हें मोठें संस्थान आहे. या संस्थानचें क्षेत्रफळ १२,४०० चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस चीनची सरहद्द, पूर्वेस चीन, दक्षिणेस सियाम व फ्रेंचांच्या ताब्यांत असलेला लीओचा प्रदेश, व पश्चिमेस दक्षिणशानसंस्थानांतील मोंगपन, मोंगने इत्यादि संस्थानें आहेत.या संस्थानचीं मांडलिकसंस्थानें सेन्यावत, सेनमॉंग, मोंगपू, मोंगसन व केंगचेंग हीं होत. १८ व्या व १९ व्या शतकांमध्यें सियाम आणि चीन या दोन देशांनीं या संस्थानावर अनेक स्वाऱ्या केल्या; व त्याचा मुलूख उध्वस्त केला. या संस्थानचा पुष्कळ भाग डोंगराळ असून, हें संस्थान मेकांग व सालवीन या नद्यांच्या दरम्यान वसलेलें आहे. पावसाळ्यांत या प्रदेशांतील हवा दमट व अनुत्साहकारी असते. हिवाळ्यांत या ठिकाणीं दाट धुकें पसरलेलें असतें. या संस्थानचें तांदूळ हें मुख्य उत्पन्न आहे. पण येथें पुष्कळ बागा असून निरनिराळ्या फळांचीहि लागवड येथें केली जाते. याशिवाय कापूस, चहा, तीळ इत्यादि जिन्नस येथें पिकतात. या संस्थानांत मोठीं जंगलें असून जंगलांचें उत्पन्न १९०४ मध्यें ३४,००० रुपये झालें. १९११ सालीं या संस्थानची लोकसंख्या २००३४४ होती. हे लोक मुख्यतः शानजातीचे असून याशिवाय येथें काव, अरव, मुहसो इत्यादि डोंगराळ जातीहि आहेत. ५७०५८ लोक शानभाषा बोलतात तर ४२१६० कुनभाषा बोलतात. याशिवाय अरब, लू या भाषाहि बोलणारे पुष्कळ लोक येथें आहेत. या संस्थानात २३३८ खेडीं असून, क्यैंगटन हें मोठें गांव व या संस्थानचें मुख्य ठिकाण आहे. संस्थानचें सालीना उत्पन्न १,१०,००० आहे व त्यापैकीं ३०,००० ब्रिटिश सरकारला खंडणीबाबत द्यावे लागतात.

श ह र —हे क्यैंगटन संस्थानच्या राजधानीचें शहर आहे. हें शहर १९ व्या शतकामध्यें वसलें. १९०१ सालीं या शहराची लोकसंख्या ५६९५ होती. या राजधानींत या संस्थानचा मुख्य रहातो. या संस्थानिकाला सवबा असें नांव आहे. हें व्यापाराचें शहर म्हणून प्रसिद्ध आहे. या शहरापासून क्यैंगटन स्टेशन हें दोन फर्लांगावर असून तेथें पोलिसांची रहाण्याची सोय केली आहे. या शहरापासून कँटोनमेंट ७ मैलांवर आहे.

क्यैंगलोन—ब्रह्मदेशांतील दक्षिणशानसंस्थानांतील पूर्वभागांत असलेलें एक छोटेखानी संस्थान. या संस्थानचें क्षेत्रफळ ५४ चौरस मैल आहे. या संस्थानचा कांहीं भाग उंचवट्याच्या जागीं तर कांहीं सखल जागीं वसलेला आहे. संस्थानांत एकंदरींत १०१ खेडीं असून संस्थानची लोकसंख्या १९११ सालीं ५२९१ होती. संस्थानचें वार्षिक उत्पन्न १९०३-४ सालांत ४००० रुपये होते व त्यापैकीं १५०० रुपये ब्रिटिशसरकारास खंडणी म्हणून द्यावे लागत. या

संस्थानचें मुख्य ठिकाण क्यैंगलोन आहे. संस्थानचा प्रदेश सुपीक असून या भागांत तांदूळ खूप पिकतो.

क्यैंघकम—ब्रह्मदेशांतील दक्षिणशानसंस्थानच्या पूर्व भागांतील एक छोटेंसें संस्थान. या संस्थानचें क्षेत्रफळ १९६ चौरस मैल आहे. या संस्थानामधून नमपंग नदी वहात गेली आहे. उत्तरेस मोंगनाग संस्थान, दक्षिणेस व पश्चिमेस मोंगनाईसंस्थान व पूर्वेस सलवीन नदी अशा संस्थानच्या मर्यादा आहेत. या संस्थानची लोकवस्ती १९११ साली ५९३६ होती. या संस्थानात एकंदर ४२ खेडीं आहेत. या संस्थानचा संस्थानिक म्योझा हा या संस्थानचें मुख्य ठिकाण क्यैंघकम या ठिकाणीं राहतो. हें शहर नमपंग या नदीच्या कांठीं फारच सुंदर जागीं वसलेलें आहे. या संस्थानचें मुख्य उत्पन्न तांदुळाचें आहे. संस्थानचें वार्षिक उत्पन्न ४००० रुपये असून, त्यांपैकीं २००० रुपये ब्रिटिशसरकारला खंडणी म्हणून द्यावे लागतात.

क्योनपिआव—दक्षिण ब्रह्मदेशांत बेसिन जिल्ह्यामध्यें गथेंग्यौंग पोटविभागांतील एक तालुका. क्षेत्रफळ ३२०चौ.मै. खेड्यांची संख्या ११८. लो. सं. (१९११). ९०७०८. तालुक्याचें मुख्य ठिकाण कोनपा.(लो सं. ५४२९). हें तालुक्याच्या पश्चिम सीमेवर दगा नदीच्या कांठीं आहे. १९०३–०४ सालीं लागवडीचें क्षेत्रफळ १७१ चौ. मै. होतें. काळीचें उत्पन्न २२९००० रुपये.

क्यौकपदौंग—उत्तर ब्रह्मदेशांत म्यिंग्यन जिल्ह्यातील एक तालुका. क्षेत्रफळ ७७१ चौ. मै. १९११ सालीं लो. सं. ८९६८१. खेड्यांची सं. १९५. तालुक्याचें मुख्य ठिकाण क्यौकपदौंग. लो. सं.९०७. लागवडीचें क्षेत्रफळ(१९०३-४) १९६ चौ. मै. साऱ्याचें उत्पन्न १,१६,०००. तालुक्याच्या पूर्वभागांत ज्वारीचें मुख्य पीक असून तिळाचा पेरा मोठा असतो.

क्यौकप्यू जिल्हा.—दक्षिण ब्रह्मदेशांत आराकान विभागाच्या मध्यभागीं असलेला एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ ४३८७ चौ. मै आहे. चतुःसीमाः—पूर्वेस अराकान योमा; पश्चिमेस बंगालचा उपसागर; दक्षिणेस संडोवे जिल्हा; उत्तरेस अक्यब जिल्हा. या जिल्ह्यांत अराकानयोमा हा मुख्य पर्वत असून महत्वाची अशी एकहि नदी नाहीं. अन व दलेत हे दोन प्रवाह मोठे असून त्यांत गलबतें व नावा चालतात. चेदूब बेटावर काहीं राखेचे ज्वालामुखी आहेत. चेदूब बेटावरील एका ज्वालामुखीखेरीज या जिल्ह्यांतील इतर ज्वालामुखींचा स्फोट अलीकडे झाला नाहीं. १९०३–४ सालीं बेटावरील ज्वालामुखीचा स्फोट झाला होता. त्यावेळीं पेट्रोलियनच्या बाजूनें पेट घेतल्यामुळें २००० फूट उंचपर्यंत ज्वाला गेलेल्या होत्या. समुद्रकिनाऱ्यापासून ५० मैल अंतरावर ज्वालामुखींची लीला दिसत होती. समुद्रकिनारा फार रमणीय असून सर्व जिल्ह्याचा किनारा जंगल व झाडांनीं अतिशय सुंदर दिसतो. या जंगलांत वाघ, जंगली डुकर, हरिण, व अस्वलें विपुल आढळतात. अराकान योमा पर्वतावर जंगली हत्ती निर्धास्त इतःततः संचार करतात. जिल्ह्याची हवा अतिशय रोगट आहे. पावसाळ्यांत आरंभीं सांथीचा ताप (मलेरिया) व पुढें कोठ्यासंबंधीं बद्धकोष्ठता वगैरे विकार सर्वत्र दिसतात पारा जून महिन्यांत ९७° अंशपर्यंत चढतो व जानेवारींत ७४° पर्यंत उतरतो. पावसाळा मे पासून आक्टोबरपर्यंत असतो. जुलै, आगष्ट व सप्टेंबर महिन्यांत पाऊस अतिशय पडतो.

इतिहास.—एके काळीं, आराकानच्या बलिष्ठ राज्यांत या जिल्ह्यांचा समावेश होत असे. त्यामुळें आराकान विभागाच्या इतिहासांत या जिल्ह्याचा इतिहास आलेला आहे. ब्रह्मी लोकांनीं आराकान जिंकून घेतल्यावर 'क्यौकप्यू' जिल्हा खुद्द आराकानला जोडण्यांत आला. व रमरी व चेदूब बेटांवर निराळे सुभे झाले. पुढें इंग्रजांनीं तीं बेटें व क्यौकप्यू मिळून क्यौकप्यू हा एकच जिल्हा बनविला. ब्रह्मी भाषा ४२,२०२ लोक बोलतात, व आराकानी भाषा १,०९,५९९ लोक बोलतात. अराकानी लोक १,२८,३०० असून क्यौकप्यू, चेदुब व रमरी येथें त्यांची वस्ती विशेष आहे. म्येबन व अन तालुक्यात ब्रह्मी लोक विशेषेंकरून राहतात. चिनी लोक १३,३०० असून अन व म्येबन तालुक्याच्या डोंगराळ प्रदेशात वस्ती करतात. चितागाग मधील कांहीं लोक शेतकी वगैरे करण्याकरता येतात. त्यांची म्हणण्या सारखी संख्या नसते. मुसुलमानांची संख्या १९०१ मध्यें ३२०० होती व हिंदु ४२० होते. शेतीवर उपजीविका करणारे १,२४,२०० म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या शेंकडा ७३ प्रमाणात होते. ख्रिस्ती लोक फार अल्प (१२१) होते. जिल्ह्यात कालवे, पाट वगैरे मुळींच नाहींत. तांदुळाचें पीक पावसावर येतें. नद्यांच्या आसपासचा भाग खेरीज करून बाकी जिल्ह्याची जमीन चांगली नाहीं. क्यौकप्यू व रमरी येथील जमीन रेताड आहे. १९०१ सालीं लागवडी खालील क्षेत्रफळ २४२ चौ. मै. होते.

या जिल्ह्यांत पेट्रोलिअम, लोखंड, दगडी कोळसा हे खनिज पदार्थ आढळतात. समुद्रापासून मीठ तयार करतात. मातीचीं भांडीं व चटया तयार होतात. क्यौकप्यू बंदर म्हणून महत्वाचें नाहीं. येथून तांदूळ, इमारतीचें साग, मीठ, मच्छी, चामडी, शिंगें वगैरे पदार्थ बाहेर गांवीं विशेषेंकरून अक्यब येथें पाठविले जातात. बाहेरून कापूस, रेशीम, लुंग्या, कापड वगैरे जिन्नस या जिल्ह्यात येतात. व्यापार मुख्यत्वें करून इंग्रज कंपन्यांच्या हातीं आहे.

येथें शिक्षणाकडे चांगलें लक्ष दिलें जात नाहीं. प्रत्येक जिल्ह्यात शाळा तपासणारा एक अधिकारी असतो. त्यानें जिल्ह्यांतले पोंगी (पंतोजी)वर नजर ठेवावयाची असते. पोंगी लोक घ्यावी तशी काळजी घेत नाहींत. १९०३–०४ सालीं ५ दुय्यम, ८३ प्राथमिक व १५५ खासगी शाळा असून मुलांची संख्या ४६२८ व मुलींची २२२ होती.

तालुका—दक्षिण ब्रह्मदेश क्यौकप्यु जिल्ह्यांतील तालुका. याचें क्षेत्रफळ ५९४ चौ. मै. १९११ साली लो. सं. ४६,१९५. तालुक्याचें मुख्य ठिकाण क्यौकप्यु (व जिल्ह्याचेंहि मुख्य ठिकाण) हेंच असून येथील लो. सं. (१९११) ३३२३. खेड्यांची संख्या १३१. १९०३-०४ साली लागवडीखाली क्षे. फ. ५५ चौ. मै. साऱ्याचें उत्पन्न ५१००० रुपये.

गांव.–दक्षिण ब्रह्मदेशांत क्यौकप्यू जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. सन १८२६ साली आराकान इंग्रजांच्या ताब्यात गेलें. त्या वेळेस क्यौकप्यू साधारण मच्छी धरण्याचें खेडेंगांव होतें. तें १८३८ पर्यंत तसेंच राहिलें. गांव चांगलें म्युद्राकिनाऱ्यावर वसलेलें आहे. येथें पाऊस मनस्वी पडतो. सर्व बाजूंनीं टेंकडया आहेत. बंदराची हद्द रमरीबेटापर्यंत आहे. परंतु खडक मध्यें असल्यानें आगबोटी निर्वेधपणें बंदरांत येऊं शकत नाहींत. येथील लो. सं. १९०१ साली ३३२३ असून त्यांत आराकानीं व ब्रह्मी लोकांचा भरणा जास्त आहे. मुसुलमान ७७६, हिंदु १६४, व चिनी ६०० होते.

क्यौकप्यू जलमार्गानें १९०३ व ४ साली आयात व निर्यात मिळून ५॥ लक्ष रुपयांचा व्यापार झाला होता. तीन चतुर्थांश आयात माल इतर ब्रह्मी बंदरांतून व एकचतुर्थांश कलकत्त्याहून आलेला होता. सर्व निर्गत माल ब्रह्मी बंदरा-तच जातो. सन १८८५ साली म्यु. क. ची स्थापना झाली. तिचें १९०३-०४ साली उत्पन्न ११,००० रु. खर्च १०,००० रु. होता.

क्यौकूक्यी—दक्षिण ब्रह्मदेशात टोंगु जिल्ह्यांतील दक्षिणे-कडील तालुका. क्षेत्रफळ १०४८ चौ. मै. १९११ साली लो.सं. ४०४४७. खेड्यांची सं. २४५. तालुक्याचें मुख्य शहर कयकी (लो. सं. १६५०). लागवड क्षेत्रफळ ५५ चौ. मै. काळीचें उत्पन्न ९२००० रुपये. हा तालुका मोठा असून पश्चिमेस सित्तंग नदीपासून पूर्वेस सालवीन जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंत पसरलेला आहे.

क्यौक्तन—दक्षिण ब्रह्मदेशांत हंथवड्डी जिल्ह्यांतील एक तालुका. हा रंगून नदी व मार्ताबान आखात यांच्यामध्यें असून याचें क्षेत्रफळ ३०४ चौ. मै. आहे. थोडा कड्याचा प्रदेश खेरीजकरून बाकी तालुका सपाट आहे. क्यौक्तन हें तालुक्याचें मुख्य ठिकाण ह्मव्वून नदीच्या कांठीं असून येथून ५ मैलां-वर ह्मव्वून रंगून नदीला मिळते. तालुक्याच्या पश्चिमेस सिरियम नांवाचें एक ऐतिहासिक गांव असून त्याची लो. सं. १९११ त १०८९७ होती. १९११ साली सदर तालुक्याची वस्ती ६८८८७ होती. खेड्यांची संख्या ९० आहे. १९०३-०४ साली लागवडीखाली २३७ चौ. मै. क्षेत्रफळ होतें. साऱ्याचें ४५९००० रु. होतें.

क्यौक्ता—दक्षिण ब्रह्मदेशांत अक्यब जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ५६२ चौ. मै. असून उत्तर आरा-कान जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे. याची लो. सं. १९११ साली ५५८२० असून खेडीं ११७ होतीं. क्यौकताव हें तालुक्याचें मुख्य ठिकाण कलदन नदीच्या तीरावर वसलेलें आहे. १९०३-०४ साली लागवड क्षेत्रफळ ११६ चौ. मै. असून साऱ्याचें उत्पन्न १४०००० होतें.

क्यौक्से— उत्तर ब्रह्मदेशांत मेइकतील विभागांतलि उत्तरेकडील हा जिल्हा असून याचें क्षेत्रफळ १२७४ चौ. मै. आहे. याची चतुःसीमा. उत्तरेस म्यिटांगे नदी; पूर्वेस शान संस्थानें; दक्षिणेस मेइकतिल जिल्हा; पश्चिमेस—म्यिंग्यन व सैगेंग.

जिल्ह्याचा स्वाभाविक देखावा चमत्कारिक आहे. ज्या भागांतून कालवे गेले आहेत तो भाग बहुतकरून सपाट असून त्याचा पृष्ठभाग नेहमीं हिरवागार असतो. एक पीक काढून घेतल्यावर दुसऱ्या पिकाची तयारी करण्याकरितां शेतकऱ्यांची धांदल उडत असते. टेंकड्यांच्या उतर-णींवरून जंगलांतील लहान मोठीं झाडें दुरून पहाणारास सारखीं उतरत आलीं आहेत अशीं दिसतात. उत्त-रेकडून म्यितंगे नदी जिल्ह्याची सरहद्द बनून शान संस्था-नांत उगम पावून ६० मैलपर्यंत दक्षिणेकडे वहात येऊन आवाजवळ इरावती नदीला मिळते. ही पूर्वपश्चिमवाहिनी असून टेंकड्यांच्या पायथ्याशीं तिची खोली इतकी आहे कीं, नावा सहज चालू शकतात. हिची रुंदी २०० पासून ३५० यार्ड आहे. जिल्ह्याच्या अगदीं उत्तरेस तिजवर रेल्वेचा पूल आहे. दुसरी इरावतीला मिळणारी नदी पनलौंग नांवाची आहे. यामेथिन जिल्हा व शान संस्थान यांच्या सरहद्दीवर तिचा अगम होतो.

क्यौक्से जिल्ह्यांत सरोवरें मुळींच नाहींत. पाण्याच्या मोठ्या दलदली कित्येक आहेत. सपाट प्रदेशावर लहान झुडुपें व मोठीं झाडें असून जंगलांतून बांबू क्वचित आढळून येतात. पहाडी प्रदेशांत फळभाजी विपुल असून पहाडावर ओक व पाइन झाडें पुष्कळ आहेत. उतरणीवर सारा सापडतो.

इतिहास.—इंग्रज अंमलापूर्वीचा इतिहास विशेष महत्वाचा नाहीं. हा जिल्हा इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यानंतर लवकरच (१८८६ त) मिनझैंगच्या राजपुत्रानें बंड केलें होतें; व तें मोडण्याकरितां अधिकाऱ्यांस बरेच श्रम पडले. १८८७ साली दंगेखोरांनीं शानसंस्थानचे आसपास आश्रय करून पुंडेगिरी चालू ठेविली. दोनदां त्यांची दाणादाण झाली. १८८९ साली सर्वत्र शांतता झाली. या जिल्ह्यांत जुनी प्रसिद्ध देवालयें बरींच आहेत. त्यांपैकीं बहुतेक अकराव्या शत-कांत अनवरत राजांनीं बांधलेलीं आहेत. क्यौक्से टेंक-डीच्या पायथ्याशीं एक देवालय आहे तें अशोक राजानें बांधलें असें म्हणतात. या सर्व देवालयांचे वार्षिक उत्सव करण्यांत येऊन मेळेहि मोठमोठे भरतात. क्यौक्से जिल्ह्याच्या दक्षिणेस पिनले व मेटकाथ येथें शानसंस्थानच्या राजधान्या होत्या. क्यौक्से जिल्ह्याची लो. सं. १९०१ साली १,४१,२५३ होती. संबंध जिल्ह्यांत क्यौक्सी हें एकच शहर

असून जिल्ह्याचें ठाणें तेथेंच असतें. उत्तर ब्रह्मदेशांत या जिल्ह्याची लोकसंख्या अतिशय दाट आहे. याचें मुख्य कारण क्यौक्से जिल्ह्यात पाटस्थळ असल्यामुळें मंडाले, मेकटिला सैगँग वगैरे गांवांतून शेतकी करण्याचे उद्देशानें पुष्कळ लोक येतात. एकंदर लोकसंख्येंत शेकडा ९८ बौद्धधर्माचे आहेत. मुसलमान ३४००, खिस्ती ४३८ व हिंदु ७०० होते. (१९०१). ब्रम्ही भाषा सर्वत्र प्रचारांत असून हिंदुस्तानांतलि भाषा बोलणारे शेकडा १ आहेत. ब्रम्ही एकंदर १,३५,४०० (१९०१) होते. शानवदनु लोक पूर्वेकडील भागांत कांहींसे आढळतात. बाहेर देशांतून आलेल्या हिंदुलोकाची संख्या १२०० होती. या जिल्ह्यांतील जमीन फारच सुपीक व पाण्याखालीं असल्यामुळें भात वगैरे पिकें अनेकवार घेतां येतात. या जिल्ह्यांत राखीव जंगलहि बरेंच आहे. लोकांचा मुख्य धंदा शेतकी हा आहे. वीणकामहि थोडें फार होतें. जिल्ह्यांत रेलवे आहे व व्यापार वाढता आहे.

राज्यकारभार.— क्यौक्से जिल्ह्याचे २ पोटविभाग आहेत. क्यौक्से व मिंझा. त्यांवर स्वतंत्र अधिकारी आहेत. येमन प्रदेश क्यौक्सेखालीं येत असून मुलकी कामदार व जिल्हा खजिनदार यांचीं ठाणीं तेथेंच आहेत. जंगलचा कन्सरव्हेटर मंडाले येथें रहात असून इरिगेशनचा ए. इं. क्यौक्सेला असतो. दिवाणी व फौजदारी कचेऱ्या मामुली जिल्ह्यांप्रमाणें असून मुख्य अधिकारी ऐ. क. असतो. जिल्ह्यात दिवाणी व फौजदारी काम फार असतें. ब्रह्मी लोकांच्या अमदानींत जमीनमहसूल भाताच्या रूपानें वसूल केला जात असे.

ता लु का.—उत्तर ब्रह्मदेशात क्यौक्से जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ १८० चौ. मै. असून १९११ सालीं लो. सं. ५२,३४८ होती. सबंध ब्रह्मदेशांत अतिशय दाट वस्तीचा तालुका हाच होय. जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठि. क्यौक्से येथें असून १९११ सालीं त्याची लो सं.५८७७ होती. तालुक्यांत खेडीं ११७ आहेत. तालुका सपाट असून पूर्वेकडे शान संस्थानची हद्द आहे. झावगी नदीचा पाट मधून गेलेला आहे.१९०३—४सालीं साऱ्याचें उत्पन्न ३,३४,००० रु. होतें.

गां व.—उत्तर ब्रह्मदेशात क्यौक्से जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. हें झावगी नदीच्या उजव्या तीरावर वसलेलें असून रेल्वेनें मंडालेपासून २१ मैल व रंगूनपासून ३५९ मैल आहे. १९११ सालीं याची लो. सं. ५८७७ होती. गावाच्या पश्चिमेस सरकारी कामदार लोकांचे बंगले असून रेल्वेच्या पूर्वेस बाजार आहे. टेंकडीवर अनवरत राजानें बांधलेलें एक देवालय असून टेंकडीच्या पायथ्याशीं अशोक राजानें बांधलेलें एक देऊळ आहे. उद्योगधंद्यांचे कारखाने या ठिकाणीं कांहींच नसून किरकोळ व्यापार तेथील रहाणारे लोक करतात. १८८८ सालीं म्यु. कमिटीचीं स्थापना झाली. १९०३ सालीं तिचें उत्पन्न २१,०००रुपये झाले असून खर्च २२०००रु. झाला होता.

क्यौगोन—दक्षिण ब्रह्मदेशांत बेसिन जिल्ह्यामध्यें गथॅग्यौंग (गथैंगंग) पोटविभागांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ २६३ चौ. मै. यांत ७९ खेडीं आहेत. १९११ सालीं लो. सं. ५५,७९९. तालुक्याचें मुख्य ठिकाण (कंगन) क्यौगोन (लो. सं. १७१७). हें बेसिन शहरापासून ईशान्येस ४० मैलांवर दशा नदीच्या कांठीं आहे. १९०३—४ सालीं लागवड क्षेत्रफळ १२० चौरस मैल व काळीचें उत्पन्न ३,३८,००० होतें.

क्रॅको—हें शहर आस्ट्रियांमधील गॅलिशिया प्रांतांत आहे. याची लो. सं. (१९१४) १,७१,०००. या शहरांत पुष्कळ जुन्या व ऐतिहासिक इमारती नजरेस येतात. हें शहर व्हिस्त्युला नदीच्या डाव्या बाजूस वसलें आहे. यामुळें या शहरास बरेंच लष्करी महत्व प्राप्त झालें आहे. येथें एक स्टॅनिस्लॉस नावाचें एपिस्कोपेलियन पंथाचें देवालय आहे. याच देवालयांत पोलंड देशाच्या राजास राज्याभिषेक होत असे. याशिवाय या शहरीं आणखीहि पुष्कळ देवालयें आहेत.या शहरीं जॅगेलोन लोकांचें एक मोठें विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची इमारत भव्य असून तिची रचना गॉथिक पद्धतीनुरूप आहे. या विद्यापीठात १९१६–१७ सालीं१८५८ विद्यार्थी व१९५शिक्षक होते.या संस्थेत पोलिश भाषेंत शिक्षण दिलें जातें.या शहरीं शेतकीचीं आउतें,रासायनिक द्रव्यें,साबण, तंबाखू वगैरे जिन्नस तयार होतात. येथें मुख्यत्वेंकरून इमारती लांकूड, मीठ, कापड, दारू व सर्व प्रकारचें शेतकी उत्पन्न याचा बराच व्यापार चालतो. हें शहर इ. स. १८४६ पासून १९१६ पर्यंत ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होतें. पोलंडला स्वराज्य मिळाल्यानें गॅलिशिया व त्याबरोबर क्रॅकौहि पोलंडच्या अमलाखालीं आलें.

क्रतु—स्वायंभू मन्वंतरांतल्या ब्रह्ममानसपुत्रांतील एक. हा ब्रह्मदेवाच्या करापासून उत्पन्न झाल्यामुळें यांस असें नाव पडलें. कर्दमप्रजापतीच्या नऊ कन्यांतील एक जी क्रिया ती याची स्त्री असून वालखिल्य नांवाचे ६० सहस्र पुत्र होते. संपूर्ण ब्रह्मपुत्र महादेवाच्या शापानें मरण पावले असता वैवस्वत (चालू)मन्वंतरारंभीं ब्रह्मदेवानें त्यांस पुनः उत्पन्न केलें. त्यात जरी याचें नांव नाहीं तरी हा 'क्रतुः खल्वनपत्यो भूद्राजन् वैवस्वतेंतरे' या वाक्यावरून उत्पन्न झाला होता असें प्राचीन कोशकार आधार न देतां म्हणतात.

क्रप, आल्फ्रेड—(१८१२—१८८७)जर्मन धातुविद्यावेत्ता. १८१० चे सुमारास इसेन या त्याच्या जन्मगांवीं त्याचा बाप फ्रेडरिच क्रप यानें लोहाराचें एक दुकान खरेदी करून पोलादाच्या ओतकामाचा कारखाना काढला. परंतु विक्री न झाल्यामुळें कारखाना वाढीस लागेना. फ्रेडरिचच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोनें कारखाना चालूच ठेविला. आल्फ्रेड हा वडील मुलगा असल्यानें चौदाव्या वर्षींच

शाळा सोडून देऊन त्याला कारखान्याकडे लक्ष्य द्यावें भाग पडलें. कित्येक वर्षेपर्यंत आल्फ्रेडला धंद्यांत यशच येईना. १८४७ साली त्यानें तोंडानें दारु भरण्याची एक अवजड तोफ तयार केली व १८५१ च्या लंडनच्या प्रदर्शनांत त्यानें दोन टन वजनाचा व ओतीव पोलादाचा भरभक्कम व निर्दोष गट लोकांपुढें ठेविला. यामुळें औद्योगिक जगांत क्रांति झाली व इसेनचा माल प्रसिद्धी पावूं लागला; व आगगाडीकरितां एकसंधी पोलादी धांवा तयार करण्यांचा नवा शोध त्यानें लाविला. अशा प्रकारें जो मोठा फायदा झाला त्याचा विनियोग कारखाना वाढविण्याकडेच करून तोफखाना तयार करण्याकडे त्यानें लक्ष्य लाविलें. क्रप कारखान्याच्या नमुनेदार योजनेला १८६० च्या सुमारास सुरुवात झाली. कच्चा माल आपल्या हुकमतींत असावा म्हणून लोखंडाच्या व कोळशाच्या खाणीहि पैदा करण्यांत आल्या. पुढें 'कॅनन किंग' म्हणून प्रसिद्ध झालेला आल्फ्रेड क्रप १४ जुलै १८८७ रोजीं वारला. त्याचा मुलगा फ्रेडरिच आल्फ्रेड क्रप (१८५४—१९०२) यानेंहि कारखाना वाढविला. स.१८९६ साली त्यानें कील येथील 'जर्मानिया' नांवाचा जहाजें बांधण्याचा कारखाना कौलानें घेतला व तो १९०२ सालीं क्रप कारखान्याच्या मालकीचा झाला. त्याच्या अमदानींत कारखान्यांत एकंदर चाळीस हजार मजूर होते. त्याची वडील मुलगी बर्था ही त्याच्या मागून वारस झाली व तिचें लग्न डॉ. गस्टाव व्हॉन बोहलेन हालबॅच याच्याशीं झालें. पुढें त्यास क्रप व्हॉन बोहलेन हालबॅच हें नांव धारण करण्याचा हक्क मिळाला. जर्मन आरमाराची बेसुमार वाढ होऊं लागताच क्रपचा कारखानाहि वाढला व त्या ठिकाणीं नव्या जहाजांकरिता जाड पत्रे व तोफा होऊं लागल्या; व १९०८ सालीं कारखान्याचें भाडवल नव्वद लक्ष पौंड इतकें होतें तें पुढें पंचवीस लक्ष पौंडानीं आणखी वाढलें.

क्रपचा कारखाना—जेव्हां जुलै १ सन १९०३ रोजीं या जर्मनींतील अत्यंत मोठया पोलादी कारखान्याचें व जगांतील प्रचंड तोफकारखान्याचें स्टॉक कंपनींत रूपांतर झालें त्यावेळीं कारखान्यात ४१६०० कामकरी वर्ग होता. इसेनजवळ मुख्य कारखाना असला तरी या कंपनीच्या पोटकंपन्या पंधरा असून एकंदर ५०० शाखा जर्मनींत व यूरोपांत पसरल्या होत्या. कामकऱ्यांना रहाण्याकरितां कंपनीच्या अनेक वसाहती होत्या. त्यांतून वृद्ध, विधवा वगैरेंनां फुकट घरें मिळण्याची व स्वच्छता व आरोग्य राखण्याच्या तजविजी केल्या आहेत.

प्रत्येक वसाहतींत बाजार, गुत्ते, सहकारी भांडार, उपवन व संगीतशाला असे. तेथें स्नानगृहाचीहि व्यवस्था केलेली असे. भोजनगृहें, उपहारगृहें व क्लब ठिकठिकाणीं असत. शाळा असत. सरकारी कायद्याप्रमाणें मुलांनां सक्तीचें प्राथमिक शिक्षण दिलें जाई; परंतु गणित, चित्रकला वगैरे विषय मुलांनां व शिवणकाम, कपडेलत्ते करणें, स्वयंपाक, इत्यादि गृहशिक्षण मुलींनां दिलें जाई. आजार, अपघात व म्हातारपण, या गोष्टींची तरतूद योग्य पेन्शन, वेतन वगैरे देऊन केली जात असे. दरवर्षी २५०००० मार्क केवळ पेन्शन देण्यांत खर्च होत.तज्ज्ञ वैद्यांचें एक मंडळ नेमून त्याच्या द्वारा कामकरी व त्यांचीं कुटुंबें यांच्या आरोग्याची काळजी घेतली जात असे. १८८७ सालीं १०००००० मार्क पेन्शन देण्याकरितां किंवा ज्यांचें पेन्शनांत भागत नसेल अशा कामकऱ्यांकरितां मुद्दाम राखून ठेवले गेले. मजुरांची भौतिक व नैतिक प्रगति व सुधारणा व्हावी म्हणून ५०००० मार्क इतकी रक्कमहि यांप्रीत्यर्थ देणगी म्हणून दिली गेली.

आपल्या लोकांची बौद्धिक व सामाजिक प्रगति व्हावी व त्यांची करमणूक व्हावी म्हणून क्रपनें निरनिराळया दर्जाच्या लोकांकरितां क्लब काढले होते. तसेंच एक वाङ्मय मंडळ व दोन वाचनालयें त्यानें स्थापन केलीं. एका वाचनाळयांत ३८००० ग्रंथ असून दुसऱ्यांत पारिभाषिक किंवा कलाविषयक ग्रंथ सुमारें ४०००० होते. निरनिराळया वाचनालयात ११०० वृत्तपत्रें व नियतकालिकें होती. एवढ्या बहुविध साधनांचा फायदा सर्वांनां सारखा घेतां यावा म्हणून क्रप कंपनीनें स्वेच्छेनें कामाचे तासहि कमी केले होते. ही स्थिति १९०७–०८ सालची होती. गेलें महायुद्ध सुरू झाल्यावेळीं जर्मनीला या कारखान्याचा फार मोठा आधार मिळाला. दारूगोळा व तोफा या कारखान्यातून वाटेल तशा व वाटेल तितक्या तयार होऊं लागून दोस्त राष्ट्रांवर मोठें संकट ओढविलें होतें. महायुद्धानंतर साऱ्या जर्मन उद्योगधंद्यांबरोबर याहि कारखान्याला वाईट दिवस आले. पण १९२३ सालापासून हा कारखाना वाढीस लागला आहे.

क्रमवंत ब्राह्मण.—यांनां किरवंत असेंहि म्हणतात. या जातीचे लोक मुख्यतः कुलाबा, रत्नागिरी जिल्ह्यात व सावंतवाडी संस्थानात आढळतात. सुपाऱ्याच्या बागांत काम करीत असतांना त्यांना पुष्कळशा कृमींचा नाश करावा लागतो यासाठीं त्यानां कृमि मारणारे अगर कृमिवंत असें म्हणतात. कृमिवंत यांनांच पुढें क्रमवंत असें नांव वापरण्यांत येऊं लागलें असें सेन्ससकार म्हणतात. यांच्या नांवाची दुसरी एक व्युत्पत्ति अशी आहे कीं या जातीचे लोक मुख्यतः मृताच्या उत्तरक्रियेवर आपली उपजीविका करीत असत त्यावरून त्यांना ब्राह्मण लोक कमी लेखूं लागले. क्रिया करणारे म्हणून यांनां क्रियावंत असें संबोधण्यांत आलें व त्यावरून किरवंत अगर क्रमवंत असें नाव पडलें. हे लोक मूळचे साष्टी प्रांतांतील सारस्वत जातीचे असावेत अशी एक दंतकथा आहे. हे सारस्वत लोक उपाध्येगिरीचा धंदा करीत पण या सारस्वतांतील कांहीं लोक खालच्या जातींचें उपाध्येपण स्वीकारीत नसत, पण कांहींनां खालच्या जातींचीहि

पाध्येपण स्वीकारण्यांत कमीपणा वाटत नसे. अशा या सऱ्या वर्गाला पुढें क्रियावंत असें स्वतंत्र नांव पडलें. पूर्वी ारस्वतांत मिश्रविवाहाची पद्धत रूढ होती; पण हल्लीं ती नामशेष झाली आहे. या क्रमवंत लोकांत देखील पोटभेद आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांतील व सावंतवाडी संस्थानांतील क्रमवंत लोक व कुलाबा जिल्ह्यांतील क्रमवंत लोक यांच्यांत एकळच फरक आहे. कुलाबा जिल्ह्यांतील क्रमवंत लोक देशस्थांशीं व क्वचित चित्पावनांशींहि बेटीव्यवहार करतात. क्रमवंतांमध्यें उपाध्येपण, सावकारी व शेतकी हे तेन्ही धंदे करणारे लोक आहेत.

रा. ज. रा. टुल्लु यांनीं 'वनाचें उपवन' नांवाचें एक मनोरंजक आत्मचरित्र लिहिलें आहे. त्यांत क्रमवंत जातीचा थोडा प्राचीन इतिहास दिला आहे. शके १६८१ च्या संमतिपत्रात वेदमूर्ति अप्पाभट्ट क्रमवंत यांनीं आपलें कुलवृत्त जें दिलें आहे त्यावरून त्याचे पुरातन स्थान जोगाईचें आंबे असून एक पुरुष पुण्यस्तंभीं (पुण्यास?) राहिला होता. त्यास 'टुल्लु' असें उपनांव पडलें. दुसरा खेरड्यात राहिला त्याचें 'खेरडे' नांव पडलें. क्रमविद (वेदपाठपद्धति जाणणारे क्रमाध्यायी) नांवाच्या मूळ पुरुषावरून क्रमवंत हे आडनाव पावलें. गागाभट्टास बाळकृष्ण भट्ट क्रमवंत व रघुनाथ भट्ट क्रमवंत असे दोन शिष्य होते. संभाजीने बाळकृष्णभट्टास मौजे मुळें, तर्फ खंडाळें सुभा, प्रांत चेऊल हा गांव इनाम दिला. कान्होजी आंग्र्यानें क्रमवंतानां अपंक्त ठरवून त्याची वृत्ति रद्द केली. पेशव्यांनीं या बाबतींत क्रमवंताची बाजू घेऊन मध्यस्थी केली; त्याना संमतिपत्रें दिलीं, पण फारसा उपयोग झाला नाहीं. "श्रीमंताच्या घरीं शिष्टांनीं तुम्हाशीं पंक्तिव्यवहार केला असेल तर आम्ही करतां," असें आंग्र्याचें म्हणणें पडल्यावरून श्रीमंतांनीं शिष्ट ब्राह्मणांसह पंढरपुरी क्रमवंतांस पंक्तिपावन करून त्यास परत पाठविलें. याप्रमाणें अष्टागर प्रांतातील क्रमवंत ग्रामण्य मिटलें, तें दुसरीकडे कल्याण प्रांतीं उद्भवलें पण लवकर मिटलें. अव्वल इंग्रजींत साखरेच्या खाडींत बुडून मेलेल्या ब्राह्मणाची क्रिया कुलाब्याच्या कलेक्टरानें एका क्रमवंत ब्राह्मणाकडून करविली. इंग्रजी अमदानींतील क्रमवंतांतील पहिले प्रमुख गृहस्थ वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री हे १८२९-३७ त प्रसिद्ध झालेल्या 'महाराष्ट्र भाषेच्या कोशा' च्या संपादकीय वर्गांत प्रमुख होते. कर्नल जर्विसला यांची बरीच मदत असे. टुल्लु, मुळेकर, शेंडे, क्रमवंत यांसारखीं आडनावें क्रमवंतांत आहेत.

क्रायसीन (का च नी न)–($क_{१८}$ $उ_{१२}$)उच्च उत्क्वथनांकाचा(बॉइलिंग पॉइंट)हा एक उज्जकर्ब(हायड्रोकार्बन,आहे. दगडी कोळशाच्या डांबराचें पातन (डिस्टिलेशन) केलेल्या भागाचे (डिस्टिलेट) पुनः पातन केल्यावर जो उच्च उष्णमानावर पात येतो त्या पातांत कांचनीन असतो. अंबर (तृणमणी)चें निर्जल पातन केलें म्हणजे त्याच्या पातांत कांचनीनाचा थोडासा अंश असतो. याचे (ऊर्विन म्हणजे बेंझिनमधून) चपटे अष्टपैलू स्फटिक होतात. यांस जांभळी रंगकांति असते. ते २५०° वर वितळतात. कांचनीन अल्कशीं युक्त करून त्यास रसभावना दिली म्हणजे कांचनाम्ल $क_{१}$ $उ_{१२}$ $प्र_{३}$ (क्रायसेनिक ॲसिड) होतें. अशुद्ध कांचनीनें सुवर्णासारख्या पिंवळया रंगाचें असतें ॥ यावरूनच यांस कांचनीन हें नांव पडलें आहे.

क्रॉय सेंट—सांटा क्रुझ. वेस्ट इंडीजमधील सर्वांत मोठें बेट. उ. अ. १७° ४०' व पू. रे. ६४° १४'. हें २२ मैल लांब, १ ते ६ मैल रुंद असून याचें क्षेत्रफळ ८४ चौ. मैल आहे. लो. सं. १९०१ त १८,५९० होती. साखर हें मुख्य उत्पन्न आहे.इंग्लिश मळेवाले व इंग्रजी भाषा यांचें वर्चस्व सर्वत्र दृष्टीस पडतें. राजधानी क्रिश्चनस्टॅड (स्थानिक गाव–बॅसिन) उत्तर किनाऱ्यावर आहे. येथें गव्हर्नर ६ महिने राहतो. कोलंबसानें हें बेट १४९३ मध्यें शोधून काढलें. नंतर परंपरेनें हें डच, ब्रिटिश व स्पॅनिश यांच्या ताब्यात गेलें. १७३३ त हें डेन्मार्कनें विकत घेतलें. १८४८ त येथील गुलामगिरी मोडली.

क्रॉन्स्टाट—क्रॉन्स्टाट हें रशियातील उत्तम तटबंदीचें बंदर व शहर आहे. उत्तर समुद्रांतील आरमाराचें मुख्य ठिकाण असून रशियाच्या आरमारखात्याचें मुख्य ठिकाण आहे. येथील लो. सं. सुमारें ७० हजार आहे. हें फिनलंडच्या आखातांत कोटलिन बेटात वसलेलें आहे. हें लेनिनग्राड (पीटर्सबर्ग)पासून २० मैलांवर आहे. हें फार मजबूत आहे. या शहराची तटबंदी पूर्वीपासून मजबूत असून अलीकडे आधुनिक पद्धतीवर केली आहे. क्रिमियन युद्धाच्या वेळीं अँग्लोफ्रेंच आरमाराला न जुमानणारे जुने पांच किल्ले आतां कमी महत्वाचे झाले. हल्लीं कान्स्टंटाइन नावाचा नवीन किल्ला बांधण्यांत आला आहे.हें शहर सपाट जाग्यावर वसलेलें असल्यामुळें त्याला पुरापासून नेहमीं धोका असतो. येथील बंदर वर्षांत १४० पासून १६० दिवसपर्यंत बर्फामुळें बंद असतें. येथील रहिवाशापैकीं बरेच नाविक आहेत. क्रॉन्स्टाट हे १७१० मध्यें पीटर दि ग्रेटनें वसविलें. त्यानें कोटलिन बेट स्वीडनपासून १७०३ मध्यें घेतलें.

क्रियावाद—क्रिया, विकार इत्यादि गोष्टी आत्म्यावर आपला पगडा बसवितात असे मानणारें हें एक मत आहे. वैशेषिक पंथानें व जैन तत्वज्ञान्यांनीं याचा प्रसार केला. क्रियावादाच्या उलट अक्रियावाद असून तो वेदांत, सांख्य, योग आणि बौद्धसंप्रदाय यांतून दिसतो.

क्रिसा-ग्रीसमधील प्राचीन शहर. हें फोसीस या प्रांतांत असून पारनेस पर्वताच्या एका शिखरावर वसलें आहे. होमरनें या शहराचा उल्लेख केला आहे. पुढें क्रिसिआच्या आखातावर सीऱ्हा बंदर बांधलें जाऊन त्याचें महत्व जसजसें वाढत गेलें तसतशी या शहराची महती कमी होत गेली. अम्फीसीटी येथील मंत्रिमंडळानें क्रिसिअनांबरोबर युद्ध करून क्रिसा शहर धुळीस मिळविलें. इ. स. पूर्वी ३२९

त मॅसिडोनच्या फिलिपशीं फिरून युद्ध उपस्थित होऊन क्रीसाचा मागमूसहि राहिला नाहीं. अर्वाचीन क्रिसा म्हणजे प्राचीन क्रिसा असावेंसें वाटतें.

क्रीट—भूमध्यसमुद्रांतील बेटांत सिसिली व सार्डिनिया यांच्या खालोखाल क्रीट हें महत्वाचें बंदर आहे. या बेटाचा आकार लांबट असून त्याची पूर्व पश्चिम लांबी १६० मैल आहे व रुंदी ३५ ते ७॥ मैल आहे. क्रीटचें क्षेत्रफळ ३३३० चौरस मैल आहे. या बेटाचा बराच भाग पर्वतांनीं व्यापलेला असून त्यापैकीं सिलोरिति पर्वताचें स्टाव्ह्रॉस नांवाचें शिखर ८१९३ फूट उंच आहे. व्हाइट पर्वताच्या हॅगिआस थिओडोरस शिखराची उंची ७८८२ फूट आहे.

क्रीट बेटांत मेट्रोपोलि, पोटॅमस, अनापोथिआरि व लॅटनस या नद्या आहेत. क्रीट बेटांत संत्रीं व लिंबें यांचा सुकाळ असून ग्रीस व कान्स्टांटिनोपल येथें बहुतेक येथूनच त्यांचा पुरवठा होतो. याशिवाय येथें तंबाखू, कापूस वगैरेहि होतात. इ. स. १८९० च्या खानेसुमारीच्या वेळीं येथील लोकसंख्या ३०१२७३ असून त्यापैकीं नऊदशांश लोक ख्रिस्ती होते व बाकीचे मुसुलमान होते. हे सर्व लोक मूळचे ग्रीक असून ते ग्रीक भाषा बोलतात. क्रीट बेटांत लोखंड, शिसें, मॅगनीझ हे धातु व गंधकहि बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सापडेल असा शोध अलीकडे लागला आहे. ऑलिव्ह झाडाच्या राईपासून होणारें उत्पन्न महत्वाचें असून त्याच्या लागवडीच्या रीतीमध्यें सुधारणा करण्याकडे सरकारनें लक्ष दिलें आहे. येथील शेती अद्याप प्राथमिकावस्थेंतच आहे. या बेटांत थोडे कारखाने असून त्यात साबणाचे कारखाने महत्वाचे आहेत. १९०५ सालीं ४१९६४२ पौंडाचा माल परदेशीं गेला व ५८९६६५ पौंडाचा माल परदेशाहून येथें आला. येथील माल तुर्कस्तान, इंग्लंड, इजिप्त, ऑस्ट्रिया व रशिया देशांत जातो.

राज्यव्यवस्था.—इ. स. १८९७ पर्यंत बेटांत अनेक बंडे झालीं. १८९७ च्या बंडाच्या वेळीं ग्रीसला मध्यस्थी करावी लागली. या बंडामुळें क्रीटमधून तुर्क अधिकाऱ्यांची हकालपट्टी होऊन सुलतानाच्या अधिकाराखालीं क्रीटन स्वराज्याची स्थापना झाली. या १८९९ च्या राज्यव्यवस्थेप्रमाणें ग्रीसचा राजा जार्ज हा संरक्षक राष्ट्रांचा मुख्य प्रतिनिधि असून त्याचे अधिकार श्रेष्ठ समजले जात असत. हे अधिकार फक्त व्यक्तिविषयक असल्यामुळें त्याच्यानंतर ते कमी करण्यांत आले. १९०७ च्या राज्यव्यवस्थेप्रमाणें मुख्य प्रतिनिधीला प्रतिनिधिसभा बोलावणें, बरखास्त करणें, कायद्याला अनुमति देणें वगैरे अधिकार असून परराष्ट्रीयसंबंधांत तो या बेटातर्फे प्रतिनिधि समजला जातो व तोच लष्कराचाहि मुख्य समजला जातो. ५००० स एक या प्रमाणांत प्रतिनिधिसभेचे सभासद निवडले जातात. ही सभा वर्षांतून एकदां भरते व तिची बैठक दोन महिनेपर्यंत असते. या सभेचा क्रीट बेटाच्या जमाखर्चावर पूर्ण ताबा असून तिच्या अनुमतीशिवाय कर बसवितां येत नाहींत. मुख्य प्रतिनिधि आपल्या अधिकाराच्या बाबतींत बेजबाबदार असतो; परंतु त्याच्या आज्ञापत्रावर सल्लागार मंडळाच्या एका सभासदाच्या सहीची जरूर असते. मुख्य प्रतिनिधीला मदत करण्याकरितां तीन सभासदांचें मंत्रिमंडळ असतें. मुख्य प्रतिनिधीच हे सभासद नेमतो व काढतो हें मंत्रिमंडळ प्रतिनिधिसभेला जबाबदार असतें. या मंडळाच्या ताब्यांत न्याय, जमाबंदी, शिक्षण वगैरे खातीं आहेत. आपल्या कामांत हयगय अगर बेकायदा वर्तन केल्यास त्यांच्यावर खटला होतो. क्रीट बेटांत नांवाला मात्र सक्तीचें शिक्षण आहे. शिक्षणाकरिता दरसाल २००० पौंड दिले जातात. येथील बरेच लोक ख्रिस्ती आहेत.

इतिहास.—अलीकडे सांपडलेल्या प्राचीन वस्तूंवरून पहातां डोरिअन सत्तेपूर्वी २००० वर्षांपासून क्रीट बेटास एजिअन समुद्रांत बरेंच महत्व होतें असें दिसतें. ९ व्या शतकापर्यंत हें बेट बायझन्टाइन साम्राज्याचें एक घटक होतें; पुढें तें चांचे लोकांचें व गुलामाच्या बाजाराचें आगर बनलें. नंतर तें ग्रीक लोकाच्या ताब्यांत गेलें व ग्रीक सरकारनें तें व्हेनिसच्या सरकारास विकलें. १७ व्या शतकाच्या शेवटीं या बेटाच्या रहिवाशांच्या इच्छेनुरूप तुर्क सरकारानें हें बेट घेण्याचा प्रयत्न केला. इ. स १७१८ मध्यें हें बेट तुर्क लोकांच्या ताब्यांत गेलें. यानंतर ग्रीसमध्यें राज्यक्रांति होईपर्यंत तें तुर्कांच्याच ताब्यांत होतें. १८२१ त जेव्हां ग्रीसमध्यें राज्यक्रांतीला आरंभ झाला तेव्हांच या बेटांतील लोकांनीं सुद्धां बंड केलें. तें इजिप्तच्या मदतीनें तुर्क सरकारानें मोडलें. ग्रीसमध्यें शांतता होऊन फ्रान्स, इंग्लंड व रशिया या मित्रसंघाच्या मदतीनें जेव्हां ग्रीसची राज्यव्यवस्था झाली, तेव्हांच क्रीट बेट तुर्कांच्या ताब्यांत रहावें असें ठरविण्यांत आलें(१८३२). नवीन अमलाखालीं या बेटाची भरभराट झाली. मुस्ताफापाशाच्या अमलाखालीं येथील शेतीची सुधारणा होऊन रस्ते वगैरे बांधले गेले. १८४० मध्यें क्रीट बेट पुन्हां तुर्क लोकांच्या ताब्यांत गेलें. इ. स. १८५६ जाहिरनाम्यानें ख्रिस्ती लोकांनां धर्मस्वातंत्र्य व मुसुलमान प्रजेच्या इतकेच हक्क देण्यांत आले. परंतु या जाहिरनाम्यांतलि वचनें पाळलीं गेलीं नाहींत म्हणून ख्रिस्ती प्रजेनें बंड केलें. यानंतरहि तुर्क सरकारनें ख्रिस्ती प्रजेवर जुलूम केले. शेवटीं बंडें होऊन ख्रिस्ती लोकांनां जास्त हक्क द्यावे लागून या बेटाला कांहीं स्वातंत्र्य द्यावें लागलें. प्रतिनिधिसभा अस्तित्वांत आली. नवीन राज्यव्यवस्था खर्चाची व भानगडीची असल्यामुळें पुन्हां बंड उभें होऊन इंग्लंडच्या मदतीनें इ. स. १८७८ मध्यें तुर्क सरकार व बेटाचे कांहीं लोक यांजमध्यें समेट झाला. त्याला "पॅक्ट ऑफ हॅलेपा" म्हणतात. या कराराप्रमाणें अंमलबजावणी खात्यांतून न्यायखातें वेगळें काढून स्वतंत्र करण्यांत येऊन प्रतिनिधि

समेंत ४९ ख्रिस्ती व ३१ मुसुलमान असावे असें ठरलें. इ. स.१८८९ मध्यें क्रीटच्या प्रतिनिधिसभेंतील पक्षांमध्यें तंटा होऊन त्याचें ख्रिस्ती मुसुलमान युद्धांत पर्यवसान झालें. त्यांत ख्रिस्ती लोकांनां अपयश आलें. तुर्क सरकारनें ख्रिस्ती लोकांचे हक्क काढून घेतले. यानंतर क्रीट बेटाची सांपत्तिक व राजकीय स्थिति फार असमाधानकारक झाली. इ. स. १८९६ मध्यें कांहीं असंतुष्ट ख्रिस्ती लोकांनीं बंड केलें. पुढें त्यांनां इतर ख्रिस्ती येऊन मिळाले. हें बंड तरवारीच्या जोरावर मोडण्याचा तुर्कस्तानचा निश्चय झाल्यामुळें परदेशाच्या वकिलांच्या मध्यस्थीचा उपयोग झाला नाहीं. पुढें इतर राष्ट्रें या गोष्टींत लक्ष घालीत आहेत असें पाहून व याच वेळीं आर्मेनियांत बंड होत आहे असें पाहून तुर्क सरकारनें समेट केला. 'हॅलेपा पॅक्ट'मध्यें दिलेले अधिकार देऊन क्रीटमधील सैन्य परत बोलावण्यांत आलें व पैशाची मदत करण्याचें अभिवचन देण्यांत आलें.

ख्रिस्ती पुढाऱ्यांनीं सुधारणायोजना तयार केली व तुर्क सरकारनें ती बहुतेकांशीं मान्य केली. परंतु ती योजना अमलांत आणण्याचें लांबणीवर टाकण्याचा तुर्क सरकारचा बेत पाहून ख्रिस्ती लोक फार असंतुष्ट झाले. इ. स. १८९७ मध्यें पुन्हां बंड झालें. या वेळेस ग्रीसनें ख्रिस्ती लोकांची बाजू घेऊन त्यांच्या मदतीकरितां राजपुत्र जॉर्ज याला त्याच्या हाताखालीं सैन्य देऊन पाठविलें. त्यानें क्रीट बेटाचा कांहीं भाग घेतला. तेव्हां यूरोपच्या राष्ट्रांनीं सैन्यें पाठवून कॅंडिया वगैरे शहरें घेतलीं व आपल्या निकालाचा खलिता ग्रीस व तुर्कस्तान यांना पाठविला. त्यांतील निकाल खालीं दिल्याप्रमाणें होताः—

(१) कांहीं झालें तरी ग्रीसला क्रीट बेट जोडता येत नाहीं. (२) सुधारणायोजना अमलांत आणण्यास तुर्कस्ताननें उशीर लावला म्हणून आतां क्रेटि बेटांत स्वायत्त राज्यपद्धति सुरू करावी व तेथील राज्यकारभार स्वतंत्र करून तुर्क साम्राज्यांत त्याची गणना व्हावी. (३) ग्रीस व तुर्कस्तान यांनीं आपआपलीं सैन्यें परत न्यावी. इ. स. १८९८ मध्यें ग्रीसचा राजा जार्ज याला क्रीट येथें तेथील सत्तेचा मुख्य प्रतिनिधि नेमण्यांत आलें. इ. स. १८९९ मध्यें आंतरराष्ट्रीय अधिकाऱ्यांनीं क्रीटच्या रहिवाशी अधिकाऱ्यांनां स्थानिक कारभार दिला.

मागील बंडांत एम. व्हेनेझोला याचें अंग होतें म्हणून जार्ज यानें त्याला सल्लागार मंडळांतून काढून टाकिलें. पुढें क्रीटच्या प्रतिनिधिसभेंत विरोधी पक्षाचा तो पुढारी बनला. नंतर त्यानें बंड केलें परंतु तें मोडलें गेलें. जार्जच्या कारकीर्दींत राज्यव्यवस्थेंत कांहीं सुधारणा झाल्या. जार्ज नंतर अलेक्झांडर झेमिस याला मुख्य प्रतिनिधि नेमिलें; त्याच्या कारकीर्दींत शांतता होती. म्हणून यूरोपच्या पहिल्याप्रतीच्या राष्ट्रांची असलेलीं क्रीटमधील सैन्यें परत नेण्यांत आलीं. झेमिस यानें निःपक्षपातानें कारभार केला व मुसुलमानांना सुद्धां राज्यकारभारांतील मोठ्या जागा दिल्या तरी त्यांच्या तक्रारी असत. सर एडवर्ड ग्रे यानें पार्लमेंटमध्यें ह्या तक्रारी फुगवून सांगितल्या जातात असें सांगितलें. सैन्यें परत नेण्यापूर्वीं यूरोपच्या राष्ट्रांनीं कांहीं अटींची पूर्तता करून घेतली. त्या अटी अशाः,(१) तद्देशीय लोकांच्या सैन्याची उभारणी-(२) बेटांत शांतता राखणें व(३) मुसुलमान प्रजेला कोणतीहि भीति नसणें. झेमिस हा अथेन्सला जाऊन ग्रीसला क्रीट बेट जोडण्याचा प्रयत्न करूं लागला. तो बाहेर असतांनाच क्रीटच्या प्रतिनिधिसभेनें क्रीट बेट ग्रीसला जोडण्याचा ठराव पास केला व ग्रीसच्या राजाच्या नांवानें कारभार सुरू केला. मुसुलमान प्रतिनिधींनीं इंग्लंडकडे याच्या विरुद्ध तक्रार केली तेव्हां मुसुलमानांच्या हितसंबंधाचें रक्षण आपण करूं असें त्यांनां कळविण्यांत आलें. तदनंतर ग्रीसच्या राजाच्या नांवानें शांततेनें कारभार चालला. १९०९ त यूरोपांतील राष्ट्रांनीं आपलीं राहिलेलीं सैन्यें क्रीटमधून नेलीं. या बेटांच्या आसपास चार लढाऊ जहाजें मात्र ठेवण्यांत आलीं. मुसुलमान प्रजेचें संरक्षण व आटोमन साम्राज्याच्या अधिकारांचें संरक्षण हाच त्यांचा उद्देश होता. ही व्यवस्था तात्पुरती होती व तिच्या योगानें दोन्ही पक्षांचें समाधान झालें नाहीं व ग्रीसमध्यें तर तिच्यामुळें इ. स. १९०९ व १० मध्यें लष्कर व राज्यव्यवस्थेसंबंधीं संकट ओढवलें. १९१२ त तुर्कस्तानशीं बल्गेरिया, ग्रीस, सर्व्हिया व मॉंटेनिग्रो या दोस्तराष्ट्रांचें युद्ध सुरू झालें. १९१३ त लंडन येथें तह होऊन मिडिया एनॉसशीं जोडणारी जी रेषा तिच्या पश्चिमेकडचा यूरोपियन मुलुख तुर्कस्ताननें दोस्तांनां देऊन टाकिला. तेव्हांपासून क्रीट कायमचें ग्रीसकडे आलें.

क्रूगर—(१८२५—१९०४). स्टेफॅनस, जोहॅनस-पॉल क्रूगर, हा ट्रान्सव्हाल रिपब्लिकचा प्रेसिडेंट; केप कॉलनींतील कोलसबर्ग येथें १८२५ आक्टोबर ता. १० रोजीं जन्मला. क्रूगर घराण्याचा मूळ पुरुष जेकब क्रूगर नांवाचा जर्मन असून त्या घराण्यांतील मंडळी डच ईस्ट इंडिया कंपनीच्या मदतीनें केपकडे सन१७१३ सालीं रहावयास गेलेली होती. इ. स.१८३५–४०च्या सुमारास पॉल क्रूगर आपल्या आईबापाबरोबर केपकॉलनी सोडून ऑरेंजच्या उत्तरेकडील प्रदेशात रहावयास गेला. लहानपणापासूनच तो धाडसी होता. रानटी व सुधारलेल्या अशा दोन्ही जातींच्या संमिश्र समाजांत तो वाढला होता त्यामुळें सतत लढाया, शिकारी असल्या व्यवसायांत तो गुंतलेला असल्यानें त्याचें शिक्षण लिहिणें-वाचणें व डच प्रेस्बिटेरियनपंथाचें धार्मिक ज्ञानसंपादन यापलीकडे फारसें झालें नव्हतें.

क्रूगर लहानपणींच मेटॅबेल व झुलु यांच्याबरोबर होणाऱ्या लढायांत भाग घेई; त्याच्या चवदाव्या वर्षी त्याच्या घरची सर्व मंडळी व्हॉलनदीच्या उत्तरेस रहावयास गेली. (ट्रान्सव्हाल स्टेट स्थापन करणारांपैकीं ते होते)] तेव्हांपासून सैन्यांत त्याचा दर्जा वाढता वाढता सत्ताविसाव्या

वर्षी बेच्युआनाच्या, मेंहिर्मन तो सैन्याचा कमांडर झाला. लढाया नसतील त्यावेळीं तो दूरवर (झांबेरी नदीपर्यंत) शिकारीवर जात असे. १८५२ मध्यें ट्रान्सव्हालचें स्वातंत्र्य ग्रेटब्रिटननें मान्य केलें. येथपासून पुढें अनेक वर्षे तेथें अराजकता माजलेली होती. शिवाय ऑरेंज फ्रीस्टेटचें राज्य मोडून दोन्ही देशांचा राज्यसंघ स्थापण्याचा प्रयत्न प्रेटोरियस–क्रूगर-पक्ष करीत होता. यापुढील या देशाच्या इतिहासांत क्रूगरचें नांव अगदीं प्रामुख्यानें येतें. १८६४ मध्यें प्रेटोरियस प्रेसिडेंट होता व क्रूगरला सैन्याचें कमांडर जनरल नेमण्यांत आलें. १८७० मध्यें डच व ब्रिटिश यांच्यांतील एका सरहद्दीसंबंधींच्या वादग्रस्त प्रश्नाचा निकाल असमाधानकारक लागल्यामुळें प्रेटोरियसचा पक्ष पदच्युत होऊन थॉमस बर्गर्स नांवाचा इसम प्रेसिडेंट झाला. त्या कारकीर्दींत क्रूगरनें बर्गर्सच्या विरोधीपक्षांत सामिल होऊन कर न देण्याविषयींहि बोअर लोकांस उपदेश करण्यास सुरुवात केली. अशा विरोधी धोरणानें राज्यकारभार बंद पडून शेवटीं १८७७ मध्यें ब्रिटिश लोकांनीं तो प्रांत आपल्या प्रांतास जोडून टाकला. या कृत्यास ट्रान्सव्हालचा देशभक्त क्रूगर यानें विरोध केला खरा; परंतु ती गोष्ट चुकत नाहीं असें ठाम दिसल्यामुळें नंतर त्यानें ब्रिटिश सरकारची एक मोठया पगाराची नोकरी पत्करली. यावरून यावेळीं ट्रान्सव्हालांतील बोअर लोकांना देशभक्तीची व्याख्या बरोबर कळतच नव्हती असें म्हणावें लागतें. तथापि नोकरी पत्करल्यावरहि क्रूगरनें ट्रान्सव्हाल पुन्हां स्वतंत्र करण्याची चळवळ उघड चालवून, इंग्लंडमध्यें ट्रान्सव्हालचा ब्रिटिशाशीं जडलेला नूतन संबंध तोडून टाकण्याची खटपट करण्याच्या दोन डेप्युटेशन्समध्यें सदस्य पाकरिलें ! तेव्हां या राजद्रोही कृत्यांबद्दल अर्थात क्रूगरला नोकरींतून काढून टाकण्यांत आलें. १८८० मध्यें बोअर लोकांनीं बंड केलें त्या बंडांतील नेतृत्रयींपैकीं जनरल जौबर्ट व प्रेटोरियस हे दोघे व क्रूगर हा तिसरा होता. १८८३ मध्यें क्रूगरला बहुमतानें ट्रान्सव्हालचा प्रेसिडेंट निवडलें. १८८३ मध्यें प्रेसिडेंट क्रूगर पुन्हां इंग्लंडमध्यें गेला व ब्रिटिशसरकारपासून लॉर्ड डर्बीमार्फत लंडन कन्व्हेन्शन नामक करारपत्र त्यानें मिळविलें. त्यायोगें ट्रान्सव्हालचा राज्यकारभार पुन्हां पूर्णपणें बोअर लोकांच्या हातीं गेला. परंतु तेव्हांपासून पुन्हां राष्ट्राची स्थिति खालावत चालली. स्वतः क्रूगर फारसा लोकप्रिय नव्हता;राज्यकारभाराच्या कामांतहि तो बराच नालायक ठरत चालला होता. फक्त ब्रिटिशसरकारबरोबरच्या कारभारांत यश आल्यामुळें देशांत त्याला साधारण पाठिंबा होता इतकेंच. १८८८ मध्यें क्रूगर दुसऱ्यांदा प्रेसिडेंट निवडून आला. १८८९ डॉ. लिडस हा तरुण हॉलंडर स्टेट सेक्रेटरी नेमला गेला. त्यानें कुलमक्तेपद्धतीला फार उत्तेजन दिलें. व्यापारांत सरकारलाहि हक्क घेऊं देण्याचें तत्व मान्य करण्यांत आलें. १८९० ते १८९२ व १८९४ या सालांत मताधिकारासंबंधींच्या कायद्यांत फेरबदल करून क्रूगरनें सर्व यूटलंडर लोकांना त्या अधिकारांतून वगळून टाकलें. त्या त्याच्या कृत्यामुळें इतर समाजाचें मत क्रूगर विरुद्ध इतकें बळावलें होतें कीं, १८९३ च्या निवडणुकींत क्रूगरच्या ऐवजीं जौबर्ट प्रेसिडेंट निवडून येणार असें बहुतेक लक्षण दिसत होतें. तथापि निवडणुकीच्या वेळीं प्रतिनिधि सभेच्या सभासदांशीं समेटाचें धोरण ठेवून कित्येक विरोधक मतदारांच्या मतांचा हक्क कायद्याच्या फालतू सबबींवर काढून टाकून व मतें मोजण्याच्या कामांतहि कांहीं लटपटी करून जौबर्टपेक्षां अधिक मतें मिळवून निवडणूकींत आपला विजय झाल्याचें क्रूगरनें जाहिर करविलें. त्या निकालाविरुद्ध जौबर्टनें प्रतिनिधिसभेकडे अपील केलें, पण त्याचा कांहीं उपयोग न होता क्रूगर तिसऱ्यांदा प्रेसिडेंटच्या जागीं कायम झाला. बर्गर्स व जौबर्ट यांच्याबरोबर क्रूगरनें केलेल्या वर्तनावरून व तसेंच यूटलंडर्सना मताधिकारांतून वगळण्याच्या त्याच्या कृत्यावरून असें दिसतें कीं, ट्रान्सव्हालचें सरकार विशिष्ट मंडळाच्या हातांत ठेवून आपण स्वतः त्या मंडळाचा आमरण प्रेसिडेंट रहावें, अशी त्याची महत्वाकांक्षा होती.

१८७७ पासून क्रूगरनें आपलें परदेशी राजकारण सतत ब्रिटिशविरोधक ठेवलें आणि बेच्युआनालँड, ऱ्होडेशिया व झुलुलँड या तिन्ही ट्रान्सव्हालची सरहद्द वाढविण्याचा व ब्रिटिश मुलुख आपल्या राज्यांत सामील करण्याचा क्रम चालविला. या गोष्टींत १८९५ पर्यंत क्रूगरला यशच येत गेलें; पण त्या सालीं मात्र त्याला पाहिजे होतें तें बंदर मिळालें नाहीं. अंतर्गत कारभारांतील त्याचें धोरणहि विचारशून्यपणाचें, बेफिकीरीचें व बेदिक्कती असे. त्यामुळें शेवटीं अनर्थ गुदरले. यूटलंडर्स लोकांच्या डेप्युटेशनला त्यानें जें उत्तर दिलें त्यांत त्याच्या एकंदर वागणुकीचें स्पष्टीकरण चांगलें होतें. तो म्हणाला " हा माझा देश आहे व हे या देशाचे कायदे आहेत; ज्यांनां हे कायदे पाळावयाचे नसतील त्यांनीं हा माझा देश सोडून खुशाल चालतें व्हावें. " यूटलंडर्स लोकांशीं सलोख्यानें तो वागला असता तर त्याच्या राज्यास चांगली बळकटी आली असती. शिवाय जेमसनच्या हल्ल्याच्या प्रकरणावरूनहि त्यानें कांहीं एक बोध घेतला नाहीं. आणि ब्रिटिश सरकारनें मध्यस्थी केली तरीहि यूटलंडर्स लोकांच्या तक्रारी दूर करण्याचें क्रूगरनें साफ नाकारलें. १८९८ मध्यें क्रूगर चवथ्यांदा ट्रान्सव्हालचा प्रेसिडेंट निवडून आला. १८९९ मध्यें परकीयांवर जो जुलूम चालला होता त्याचा विचार करण्याकरितां ब्लोएमफाँटेन येथें सर मिलनर व प्रेसिडेंट क्रूगर यांची एकत्र बैठक भरली. पण त्या बैठकींत क्रूगर आपलीं तत्वें तिळमात्र सोडण्यास तयार नव्हता. येथपर्यंतच्या सर्व प्रसंगीं क्रूगरनें स्वतःच्या व आपल्या समाजाच्या करितां सर्व फायदे मिळवून इतरांना तो काडीची सवलत देण्यास तयार नसे. यामुळेंच फ्री स्टेटचा प्रे. सर जॉन ब्रँड याच्या

बरोबर क्रूगरचें कधीं पटलें नाहीं. ब्रँडनंतर रीट्झ प्रेसिडेंट झाला. त्यावेळीं क्रूगरनें सर्व बोअर लोकसत्ताक राज्यानीं त्यांच्या स्वातंत्र्यावर घाला आल्यास एकमेकांना परस्पर मदत करण्याचा बंधनपर ठराव केला; पण त्या ठरावानें फ्रीस्टेटला कांहीं मदत न होतां क्रूगरनें मात्र ब्रिटिशांविरुद्ध त्यांची वारंवार मदत घेतली. याप्रमाणें क्रूगरनें आपला एक कावा तर साधलाच. पण त्याच्या मुळें चढून जाऊन मिल्नर बैठकींत कोणतीहि सवलत इतरांनां द्यावयाची नाहीं अशा निश्चयानें तो आला. त्या बैठकींत मताधिकार देण्याचें त्यानें वरकरणी कबूल केलें पण त्याला दुसऱ्या इतक्या अनेक अटी घातल्या कीं तें सर्व ढोंग होतें हें उघड दिसत होतें. मिल्नरनें जी जी म्हणून सूचना पुढें मांडली तिला ट्रान्सव्हालच्या स्वातंत्र्यास यानें धक्का पोहोंचेल असें क्रूगरचें ठराविक उत्तर मिळत गेलें. अर्थात् ही बैठक अयशस्वी झाली. पुढें १८९९ आक्टोबरमध्यें ग्रेट-ब्रिटनबरोबर पत्रव्यवहार होऊन शेवटीं ट्रान्सव्हाल सरकारनें निर्वाणीचा खलिताहि पाठविला व तावडतोब ट्रान्सव्हाल व फ्रीस्टेट यामधील बोअर लोकानीं नाताळ व केप कॉलनी यांवर स्वारी केली. १९०० मध्यें ब्रिटिश फौजेनें ब्लोएम फॉंटिन व प्रेटोरिया हे प्रदेश व्यापले. त्यावेळीं स्वतः वृद्धपणामुळें रणांगणावर जाण्यास असमर्थ असल्यामुळें क्रूगर आपल्या कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानें यूरोपांत जाऊन तिकडील राष्ट्रांची मध्यस्थीरूपी मदत मिळविण्याच्या खटपटीस लागला. परंतु त्यांत त्याला बिलकुल यश आलें नाहीं. यापुढें राजकारणात त्याचें महत्व उरलेंच नाहीं. तेव्हां तिकडेच युट्रेट येथें राहून त्यानें स्वतःचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें. १९०४ जुलै १४ रोजीं तो जेनेवा सरोवरानजीक क्लेरेन्स येथें मरण पावला. प्रिटोरिया येथें त्याच्या तिसऱ्या बायकोच्या थडग्यांतच त्याचें शव पुरण्यांत आलें. त्याच्या एकंदर तीन बायका झाल्या. त्याचें कुटुंबहि मोठें होतें. प्रिटोरिया येथें क्रूगरचा एक पुतळा स्थापला. त्यावेळीं क्रूगरच्या बायकोच्या इच्छेवरूनच क्रूगरच्या डोक्यावरील टोपी उताणी ठेवण्यांत आली; कारण असें कीं, तींत पावसाचें पाणी आपोआप सांचावें व तें पक्ष्यांनां पिण्यास उपयोगीं पडावें.

क्रून्स्टाड—हें ऑरेंज रिव्हर कॉलनीचें शहर असून रेल्वेनें ब्लोएमफॉंटेनच्या ईशान्येस १२७ मैल व जोहान्सबर्गच्या नैर्ऋत्येस १३० मैल आहे. १९०४ सालीं येथील लोकसंख्या ७१९१ होती. हें शहर व्हालसानदीच्या तीरावर असून समुद्रसपाटीपासून ४४८९ फूट उंच आहे. हिऱ्याच्या व कोळशाच्या व्यापाराचें हें केंद्रस्थान आहे. येथील हवा आरोग्यकारक आहे. बाजारचौकांत डच रिफॉर्म्ड प्रार्थनामंदीर आहे. १९०२ च्या अँग्लो बोर युद्धांत ब्रिटिशांनीं ब्लोमेफॉंटेन काबीज केल्यावर ऑरेंजफ्रीस्टेच्या बोर लोकांनीं हें राजधानीचें शहर केलें. लवकरच लॉर्ड रॉबर्ट्सनें हें काबीज केलें. लेस येथें हिऱ्याच्या व व्हीर फॉन्टेन येथें कोळशाच्या खाणी आहेत.

क्रेक—इ. स. ६३९ या वर्षी सयाममध्यें बौद्ध धर्माचा प्रसार होण्यास सुरुवात झाली असें म्हणतात. ज्या राजाच्या अमलाखालीं या प्रसारास सुरुवात झाली त्या राजाला पुराणकथेमध्यें क्रेक हें नांव दिलें आहे. बौद्ध धर्माच्या सन्मानार्थ त्यानें इ. स. ६८२ पासून सुरुवात होणारा लोकांमध्यें चाललेला शक स्थापन केला.

क्रेसी—फ्रान्सच्या उत्तरभागांतील सोमी भिभागांतील एक शहर. हें मेई नदीच्या काठांवर वसलें आहे. येथें १३४६ च्या आगष्ट महिन्याच्या २५ व्या तारखेस तिसऱ्या एडवर्डच्या नेतृत्वाखालीं इंग्रज व व्हॅलाइजचा फिलिप राजा यांच्या नेतृत्वाखालीं फ्रेंच लोकांमध्यें युद्ध होऊन इंग्रजांस मोठा जय मिळाला.

क्रोपॉटकिन—(१८४२–१९२१) हा रशियन भूगोलशास्त्रवेत्ता, ग्रंथकार व क्रांतिकर्ता पुरुष इ. स. १८४२ मध्यें मास्को येथें जन्मला. त्याचा बाप सरदार होता. त्याची आईहि मोठया कुलांतील असून तिला विद्येची फारच अभिरुची होती. वयाच्या पंधराव्या वर्षी क्रोपॉटकिन याला त्याच्या बापानें सरदारांच्या मुलांकरितां स्थापन झालेल्या लष्करी शिक्षणाच्या शाळेंत दाखल केलें. लष्करी शिक्षण घेत असतांना त्यानें इतर विषयाचा आस्थापूर्वक अभ्यास केला. विशेषतः फ्रेंच वाङ्मय इतिहास यांकडे त्यानें लक्ष्य पुरविलें. रशियांतील शेतकरी वर्गाच्या स्थितीबद्दल त्याला फार वाईट वाटत असे व शेतकऱ्याच्या हितसंबधाविषयीं त्याचें लक्ष्य शेवटपर्यंत वाढतच गेलें. याच सुमारास रशियांत एक नवीन प्रकारची क्रांतिकारक चळवळ उदयास येऊं पहात होती. त्या चळवळीमध्यें क्रोपॉटकिन हा उत्साहानें भाग घेऊं लागला. इ.स. १८६२ मध्यें त्यानें आपलें नांव कोसाक स्वाराच्या तुकडींत दाखल केलें. पुढें कांहीं दिवस ट्रॅन्सबैकेलियाच्या गव्हर्नराचा सेक्रेटरी या नात्यानें काम केलें. इ. स. १८७४ मध्यें भूगोलशास्त्रवेत्यांची उत्तर मँचूरियाची पहाणी करण्याकरितां एक कमिटी नेमली गेली, त्याचा हा अध्यक्ष झाला. ही पहाणी झाल्यानंतर मध्य मँचूरियाची पहाणी करण्याचें कामहि यानें अंगिकारिलें. यामुळें त्याचा फार फायदा झाला. पुढें इ.स. १८६७मध्यें त्यानें सैन्यांतील कामाचा राजीनामा दिला. सेंटपीटर्सबर्ग येथील विश्वविद्यालयांत त्यानें आपलें नांव दाखल केलें. १८७३ मध्यें त्यानें एक विद्वत्तापूर्ण निबंध प्रसिद्ध करून त्याकाळचे आशीया खंडांतील नकाशे कसे चुकीचे होते हें त्यानें सप्रामाण सिद्ध केलें. इ. स. १८७१ मध्यें त्यानें फिनलंड व स्वीडनमधील हिमकालीन प्रस्तरावशेष शोधून काढले, पण आणखी नवीन लावण्यापेक्षा पूर्वी झालें आहेत तेच शोध जनतेंत फैलावण्याचें काम त्याला अधिक प्रिय वाटूं लागल्यामुळें तो सेंटपीटर्सबर्ग येथें परत आला व त्यानें क्रांतिकारक पक्षाची बाजू स्वीकारली

इ. स. १८७२ मध्यें तो जीनिव्हा येथील सार्वराष्ट्रीय मजूर संघाचा सभासद झाला. पण या संघाचीं मतें त्याला मवाळ वाटल्यामुळें त्यानें रशियांत अधिक जहाल मतांचा प्रसार करण्यास सुरुवात केली. इ. स. १८७४ मध्यें त्याला पकडण्यांत आलें. पण इ. स. १८७६ मध्यें त्यानें आपली कशीबशी सुटका करून घेतली व तो इंग्लंडमध्यें आश्रयार्थ आला. थोडक्याच दिवसांनीं तो स्वित्झर्लंडमध्यें गेला. तेथील जूरा फेडरेशनचा तो सभासद झाला.या संस्थेतर्फे त्यानें एक वर्तमान पत्र सुरू केलें. मधून मधून तो क्रांतिकारक चळवळीसंबंधींचीं छोटीं पत्रकेंहि प्रसिद्ध करीत असे. इ. स. १८८१ मध्यें रशियाचा झार दुसरा अलेक्झांडर याचा खून झाला. त्यामुळें स्वित्झर्लंड सरकारनें त्याला आपल्या देशांतून हद्दपार केलें. लंडन येथें एक वर्ष काढल्यावर तो थॉनान येथें परत आला. पण तो सार्वराष्ट्रीयमजूरसंघाचा सभासद आहे या सबबीवर फ्रेंच सरकारनें त्याला पकडून पांच वर्षांची शिक्षा ठोठावली. पण फ्रेंच राष्ट्रसभेंत त्याच्या तर्फे पुष्कळांनीं त्याच्या सुटकेबद्दल चळवळ केल्यामुळें त्याची सुटका झाली. सुटका झाल्यानंतर तो लंडन येथें राहण्यास आला. एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकांत त्यानें रशियासंबंधीं बरेच लेख लिहिले. याशिवाय दि स्टेट इट्स पार्ट इन् हिस्टरी (१८९८) फील्ड्स, फॅक्टरीज अँड वर्कशॉप्स (१८९९), मॉडर्न सायन्स अँड अनार्किझम (१९०३), रशियन लिटरेचर इत्यादि पुष्कळच ग्रंथ त्यानें लिहिले. लंडन येथें पुष्कळ वर्षें काढल्यानंतर क्रोपॉटकिन हा रशियामध्यें इ. स. १९१७ मध्यें परत आला. इंग्लंडमध्यें असतांना इंग्रज लोकांनीं त्याला चांगल्या रीतीनें वागविलें होतें. रशियामध्यें येतांच लंडन टाईम्सला एक पत्र लिहून त्यानें त्याबद्दल गौरवपर उद्गार काढले. रशियामध्यें मात्र तो ज्या आशेनें परत आला ती आशा फलद्रुप होण्याचें बाजूला राहून त्यास निराशेचें जीवित कंठावें लागलें. बोल्शेविकांच्या अंमलाविरुद्ध तो कडक टीका करीत असे. याबद्दल रशियांतील जहाल पक्ष त्याला पाण्यांत पहात होता. त्यामुळें त्याला फार वाईट वाटत असे. अशा स्थितींत फेब्रुवारी ता. ८ इ.स.१९२१ मध्यें तो मास्को येथें मरण पावला.

क्रोमाइट—क्रुमित (क्रोमियम) व लोहस (लोखंड) यांचें प्राणिद. ह्याला क्रुमिक लोह किंवा क्रुम लोहाची अशोधित धातू असेंहि नांव असून क्रोमियम व त्याचे संयुक्त पदार्थ मुख्यतः ह्यापासूनच मिळतात. त्याचे समकोन अष्टकोनाकृति स्फटिक असतात. परंतु ते बहुधा लहान लहान गोळ्यांच्या रूपांत आढळतें. दिसण्यांत तें लोहचुंबकीय लोखंडासारखें दिसतें, परंतु त्याच्या अंगीं लोहचुंबकीय गुण असलाच तर फार थोडा असतो. त्याचें विशिष्टगुरुत्व ४.५ आहे. औपपात्तिक संकेताप्रमाणें त्यामध्यें क्रुम प्राणिदाचें प्रमाण शें. ६८ व लोहस प्राणिदाचें प्रमाण शें. ३२ असावयाचें परंतु बहुतकरून लोहस प्राणिदाच्या ऐवजीं अंशतः म्याग्नेशिया व क्रुमप्राणिदाऐवजीं अल्युमिना व लोहप्राणिद आल्यामुळें खनिज धातूंत क्रुमप्राणिदाचें प्रमाण शें. ४० तें ५० पेक्षां ज्यास्त नसतें. उल्कापातांतून पडलेल्या लोहांत व दगडांत हें द्रव्य सांपडतें. हल्लीं कॅलिफोर्निया, तुर्कस्तान, उरलपर्वत व न्युझीलंडमध्यें डून डोंगर व शेटरलंडांत उन्स्ट येथें खाणींतून हें खनिज काढतात.

रंग व रंगीत चिटें करण्याला लागणारें क्रुमसंयुक्त पदार्थ तयार करण्याकडे, त्याच प्रमाणें क्रुम पोलाद करण्याकरितां या द्रव्याचा पुष्कळ उपयोग केला जातो.

क्रौंचद्वीप—पृथ्वीच्या सप्तमहाद्वीपांत पाचवें. हें घृतोदाच्या पलीकडे असून याचा विस्तार अथवा रुंदी सोळा लक्ष योजनें आहे व यास तितक्याच रुंदीच्या क्षीरसमुद्राचें वेष्टण आहे. येथील अधिपति प्रियव्रत राजर्षीचा पुत्र घृतपृष्ठ असून त्यांत क्रौंच नामक एक अत्यंत मोठा पर्वत आहे. त्यावरूनच यास क्रौंचद्वीप असें नांव पडलें आहे. यांत शुक्ल, वर्धमान, भोजन, उपबर्हिण, नंद, नंदन आणि सर्वतोभद्र असे सात पर्वत आहेत आणि अभया, अमृतौघा, आर्यका, तीर्थवती, वृत्तिरुपवती, पवित्रवती आणि शुक्ला अशा सात नद्या आहेत. घृतपृष्ठानें या द्वीपाचे वर्ष संज्ञक सात भाग करून, आपल्या सात पुत्रांस यांचींच नांवें ठेवून विभागून दिले असत. [भाग स्कं. ५ अ. २० देवी भा. स्कं. ८ अ. १२]

क्लाइव्ह—(१७२५–१७७४) रॉबर्ट क्लाइव्ह हा इंग्लंडांत श्रॉपशायर परगण्यांत स्टिचे येथें ता. २९ सप्टेंबर १७२५ रोजीं जन्मला. याचा बाप वकील होता. हा लहानपणीं धाडशी व हूड असे. फारशी विद्या नसल्याकारणानें त्याला त्याच्या बापानें खटपट करून ईस्ट इंडिया कंपनींत कारकुनीची जागा देवविली. तो इ.स. १७४३ त मद्रासेस आला. त्यावेळीं कारकुनीच्या जागेला व्यापाराची चांगली माहिती लागे पण ती याला मुळींच नव्हती व त्यामुळें पैसाहि त्याला फारसा मिळेना. हा काळ विपत्तींत एकलकोंड्यासारखा त्यानें घालविला. पिस्तुलानें आत्महत्या करण्याचाहि त्यानें दोन वेळां प्रयत्न केला परंतु प्राण गेला नाहीं हें पाहून, माझ्या जगण्याचें कांहीं तरी प्रयोजन आहे असें त्यानें ठरविलें. शेवटीं

त्याला घरीं जावेसें वाटलें. त्यावेळचा मद्रासचा गव्हर्नर त्याला चांगलें वागवी. इ. स. १७४३ त फ्रेंचांनीं मद्रास घेतलें, तेव्हां पळून गेलेल्या इंग्रजांत हा होता. पळतानां त्यानें मुसुलमानी वेष घेतला होता. याच सुमारास डेव्हिडच्या किल्ल्यावर फ्रेंचांनीं हल्ला केला पण त्यांत त्यांचा मोड झाला. या चकमकींत क्लाइव्हनें प्रथम हातांत शस्त्र घेतलें. नंतर इंग्रजांनीं पांडेचरीस वेढा दिला. त्यावेळीं यानें तरवार गाजविली. इंग्रजानें यानंतर देवीकोटा घेतला तेव्हां हा लेफ्टनंट बनला. पुढें वालकोंड्यावरील हल्ल्यांत याचें व कॅप्टन जिंजेनचें जमलें नाहीं म्हणून तो मद्रासला परतला. पुढें इ. स. १७५१ त त्रिचनापल्लीच्या वेढ्यांत यानें कारकुनाची जागा कायमची सोडून लष्करांत नौकरी धरली. त्रिचनापल्लीस महंमद अल्ली हा फ्रेंचांनीं (चंदासाहेबानें) अडकवून ठेविला होता. तेथील इंग्रजांच्या सैन्यांत अत्यंत बेशिस्ती होती. तेव्हां क्लाइव्हनें चंदासाहेबास तेथें तसाच सोडून एकदम अर्काटवर (चंदासाहेबाच्या राजधानीवर) ता. ११ आक्टोबर सन १७५१ रोजीं हल्ला केला व किल्ला काबीज केला. तेथें मुसुलमानी फौज थोडी होती; शिवाय चंदासाहेबानें पाठविलेली कुमक उशीरां आली. त्यामुळें राजधानी सहजासहजी पडली. चंदासाहेबानें आपला मुलगा राजेसाहेब याला अर्काटवर पाठविलें. त्यानें अर्काटला वेढा दिला तेव्हां क्लाइव्ह आंत कोंडला गेला. तटाला खिंडारें पडलीं पण राजेसाहेब आंत घुसेना, अन्नसामुग्री संपल्यावर आपोआप इंग्रज शरण येईल असें त्याला वाटलें. ही ढिलाई त्याला नडली. पुढें मोहरमच्या एके दिवशीं जोराचा हल्ला करावयाचा त्यानें बेत केला, तो फितुरीमुळें क्लाइव्ह यास समजला. त्यामुळें राजेसाहेबाच्या लढाईचें काम बिनसलें; शेवटीं त्यानें ५० दिवस चालविलेला वेढा उठविला. या वेढ्यामुळें फ्रेंचांच्या वजनास उतरती कळा लागून इंग्रज वरचढ बनूं लागले याच वेढ्यात हिंदी लोकांनीं आपण पेज पिऊन इंग्रजांस भात दिला. या व पुढील मोहिमांत मराठे (मुरारराव घोरपडे व तंजावरकर) यानीं इंग्रजांचा पक्ष घेतल्यामुळें अखेर त्यांचा जय झाला. मद्रासहूनहि क्लाइव्हला मदत आली. त्यामुळें त्यानें अरणी येथें राजेसाहेबाचा पराभव केला (१७५१). नंतर तो मद्रासेस परत गेला. तेव्हां राजेसाहेबानें परत सर्व प्रांत काबीज केल्याचें ऐकून तो मागें फिरला. कावेरीपाक येथें दोघांची गांठ पडली व मोठ्या युक्तीनें क्लाइव्हनें जय मिळवला, आणि कवळंग व चिंगलपट हे दोन किल्ले त्यानें घेतले. मद्रासला परत आल्यावर आपल्या एका स्नेह्याच्या मास्कलिन नांवाच्या बहिणीशीं त्यानें लग्न केलें व अखेर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें १७५३त तो विलायतेस गेला. या वेळीं दोन लाखांची माया त्यानें जमविली. इ. स १७५६ मध्यें इंग्रजांचें व सिराजउद्दौल्याचें वांकडें आलें होतें. कलकत्तेकर इंग्रज फार संकटांत होते. अशा वेळीं इंग्लंडहून आलेला वाटसन व क्लाइव्ह यांस बंगाल्यांत पाठविलें. क्लाइव्ह नुकताच मद्रासला विलायतेहून गव्हर्नर म्हणून आला होता. सिराजशीं मिटतें घ्यावें असा मद्रासकरांचा हेतु होता. परंतु क्लाइव्हनें हुगळीस उतरल्याबरोबर लगेच सिराजला चढाईचीं पत्रें लिहिण्यास सुरुवात केली. त्यानें कलकत्याचा विल्यम किल्ला काबीज केला. यावेळीं तत्रस्थ इंग्रजांत भांडणें सुरू होतीं. क्लाइव्ह त्यांस अप्रिय झाला होता. तो कंपनीचा व वॅाटसन हा राजाचा नोकर असल्यानें त्यांची आपसांत चुरस लागली होती. क्लाइव्हनें हुगळी घेतली तेव्हां सिराजनें त्याच्याशीं तहाची वाटाघाट सुरू केली, पण त्यानें ती टाळली व दोघांची लढाई कलकत्यास होऊन उभय पक्षांचें सारखेंच नुकसान झालें. तेव्हां अलीनगर येथें तह झाला (९ फेब्रु. १७५७). यूरोपांत १७५७त फ्रेंच-इंग्रजांचें युद्ध सुरू झालें यामुळें चंद्रनगरच्या फ्रेंच गव्हर्नरानें इंग्रजांची कांहीं एक खोडी काढली नसतांहि क्लाइव्हनें त्याच्यावर एकाएकीं हल्ला केला. फ्रेंचांनीं शर्थीनें बचाव केला. यावेळीं क्लाइव्हचा पराजय झाला असता पण वॅाटसननें आयत्या वेळीं मदत केल्यानें त्याला जय मिळाला. तो धाडशी असला तरी कठिण प्रसंगीं त्याची तारांबळ उडे. त्याच्या आयुष्यांतील सर्व मोठे प्रसंग अशा धरसोडीनेंच पार पडले आहेत. ऐन आणीबाणीच्या वेळीं त्यानें स्वतःच्या हिंमतीनें मनाचा निश्चय करून पराक्रम गाजविला असें घडलें नाहीं. या लढाईंत नंदकुमार व एक फ्रेंच या दोघांच्या फितुरीनें इंग्रज विजयी झाले. याच वेळीं पातशहा आपल्यावर चालून येत आहे असें समजल्यावरून सिराजनें क्लाइव्हला मदतीस बोलाविलें. तो या संधीची वाट पहात होता. अलीनगरच्या तहाचा वाटेल तसा अर्थ करून क्लाइव्हनें आपल्या मागण्या वाढविल्या व स्वतः सिराजच्या प्रजेस त्रास देऊं लागला. कांहींतरी कुरापत काढून सिराजचें राज्य स्वाहा करण्याचा घाट त्यानें घातला. सिराजनें इंग्रजास भेटण्यापूर्वी नजराणे द्यावे, फ्रेंचांच्या सर्व वखारी इंग्रजांस द्याव्या, त्यांनां सर्व बंगाल्यांत व्यापारास परवानगी असावी वगैरे अटी क्लाइव्हनें घातल्या; त्या सिराजनें अमान्य केल्या. त्यावेळीं सिराजला पदच्युत करण्याचा बेत त्यानें केला व त्यास सिराजचा सेनापति मीरजाफर हा फितूर होऊन मिळाला. सिराजच्या दरबारीं वॅट हा इंग्रजी वकील होता, त्यानें व क्लाइव्हनें हीं सर्व कारस्थानें रचलीं. वरून त्यानें सिराजास गोड पत्रें लिहून कटाचा सुगावा लागूं दिला नाहीं. या कटांत उमीचंद हा सावकार होता. त्याला क्लाइव्हनें अगदीं हातोहातीं फसविलें (उमीचंद पहा). मीरजाफर फितूर झाल्याचें सिराज याला कळलें तरी त्यानें त्याला बडतर्फ केलें नाहीं. क्लाइव्हची लबाडी मात्र त्याला समजली व तुम्ही तह मोडला असें त्याला पत्र लिहून तो प्लासीस आला. यावेळीं क्लाइव्ह धरसोडीनें वागत होता, कोणावरहि त्यानें पुरा विश्वास टाकला नाहीं. त्यानें पांच हजार फौज पाठविण्याचें मीरजाफरास वचन दिलें होतें, परंतु त्याच्याजवळ सारे बावीसशें लोक व थोड्याच तोफा होत्या.

सिराजवर आपण एकदम हल्ला करावा असें त्यानें ठरविलें. त्यानें आपलें सैन्य आंबराईत सुरक्षित ठिकाणीं ठेविलें होतें. सिराजचा मुख्य सेनापति मीरमदन मेल्यावर व मीरजाफर फितूर झालेला पाहून सिराजनें मुर्शिदाबादेस परत फिरण्याचा हुकूम केला व त्यामुळें सर्वत्र गोंधळ माजला. खरी लढाई येथें झालीच नाहीं. सिराज उगाच घाबरून पळाला (२३ जून १७५७). पुढें दोन तीन दिवसांनीं क्लाइव्हनें फितुरी मीरजाफरास मुर्शिदाबादेस नेऊन गादीवर बसविलें व गुप्त कराराप्रमाणें बक्षिसाची मागणी केली. एकंदर रक्कम सव्वादोन कोटी रुपयांची होती. मोठ्या कष्टानें मीरनें ती भरली. त्यांत खुद्द क्लाइव्हला तेवीस लाख, चाळीस हजारांची रक्कम मिळाली. ही निव्वळ लूट असल्यानें इंग्लंडांत याबद्दल मोठा गवगवा झाला. परंतु आपण हें गैर केलें असें क्लाइव्हला कधींच वाटलें नाहीं. हिंदी लोकांत फूट पाडून आपला कावा साधण्याची युक्ति प्रथम क्लाइव्हनेंच अंमलांत आणून, इंग्रजी राज्याचा पाया घातला. मीरजाफरासहि पुढें क्लाइव्हनें छळलें. बाकीच्या उगवणीबद्दल त्यानें त्याच्याकडून पंचवीस लक्षांचा मुलूख लुबाडला (इ. स. १७५८), साऱ्या बहार प्रांतांतील सोन्याचा मक्ता कंपनीस देवविला आणि स्वतःस सहा हजारांची मनसबदारी मिळविली व आपण पातशाही अमीर बनला. त्यानें सहा हजार पायदळ व पांच हजार घोडदळ ठेवावें व त्याबद्दल पातशहानें त्याला सात लक्षांची नेमणूक द्यावी असा याचा अर्थ होता. परंतु त्यानें फौज न ठेवतां रक्कम मात्र मागितली व मीरजाफरनें परभारे कंपनीच्या जहागिरींतून वसूल करण्यास त्याला परवानगी दिली. यामुळें कंपनी व क्लाइव्हमध्यें याबद्दल तंटा उत्पन्न झाला. या सुमारास तो कलकत्त्याच्या कौन्सिलचा अध्यक्ष झाला होता. इ. स. १७५९ त शहाजाद्यानें मीरजाफरवर स्वारी केली तेव्हां हा त्याच्या मदतीस गेला होता. नंतर आपल्या मनाप्रमाणें कलकत्त्यास व्यवस्था लावून तो १७६० च्या फेब्रुवारींत स्वदेशीं परत गेला. तेथें त्याला प्लासीचा लॉर्ड बनविलें गेलें. त्यानें तेथें कंपनीच्या कारभाराची थोडीशी सुधारणा केली. इकडे मीर कासीमला इंग्रजांनीं गादीवर बसविलें व त्याच्यापासून पुष्कळ पैसा उपटला. "कंपनीच्या मुलकी व लष्करी साऱ्या नौकरांनीं लाच खाल्ला." तेव्हां ही स्थिति सुधारण्यास क्लाइव्हला गव्हर्नर म्हणून तिसऱ्यानें हिंदुस्थानांत पाठविलें (१७६५). या वेळीं इंग्रजांवर आयोध्येचा नबाब व दिल्लीचा बादशहा हे चालून गेले. परंतु त्यांचा बक्सार येथें पराभव झाला. याचा फायदा घेऊन क्लाइव्हनें बंगाल, बहार व ओरिसा या तीन प्रांतांची प्रख्यात दिवाणी सनद शहाअलमपासून मिळविली. या सनदेनें कंपनी ही या प्रांताची (४ कोटी उत्पन्नाची) मालकीण झाली. कर्नाटक व दक्षिण या प्रांतांतील इंग्रजांच्या प्रदेशाचीहि दुसरी फर्मानें त्यानें या वेळीं मिळविलीं. नंतर कंपनीच्या नौकरांचे पगार त्यानें वाढवून त्यांनीं नजराणे घेऊं नयेत व खासगी व्यापारांत भाग घेऊं नये असें ठरविलें, सैन्यांत सुधारणा केली, तोफखान्याचे सर्व गोलंदाज युरोपियन नेमले; एकहि हिंदी नेमला नाहीं. हल्लींहि हीच पद्धत अंमलांत आहे. यानंतर तो परत विलायतेस कायमचा गेला. तेथें त्यानें फार पैसे खाल्ले या आरोपावर त्याची चौकशी पार्लमेंटांत सुरू झाली (मीरजाफरनें आपल्या मृत्युपत्रात त्याला ७ लक्ष रु. देऊन ठेविले होतेच). पुष्कळ वादविवाद होऊन व त्यानें बंगालच्या पहिल्या सफरींत २३ लक्ष ४० हजारांची माया जमविली खरी परंतु ती कशी जमविली त्यावर वाद न घालतां अखेर एकमतानें "त्याच वेळीं त्यानें स्वदेशांची मोठी व स्पृहणीय कामगिरी केली" असा निकाल देण्यांत आला व त्याला निर्दोषी ठरविलें. त्यावेळीं क्लाइव्हनेंहि आपलें समर्थन केलें. तो उमीचंदाच्या फसवणुकीबद्दल म्हणाला कीं "मला त्याबद्दल यत्किंचितहि वाईट वाटत नाहीं. एवढेंच नव्हे तर वेळ आल्यास शंभरदां मी पुन्हा असेंच करीन." यानंतर लवकरच १७७४ च्या नोव्हेंबरमध्यें त्यानें आत्महत्या केली. याला अफूचें जबरदस्त व्यसन लागलें होतें. [अर्बुथनाट, सर विल्सन, मॅलेसन, कॅरसिव्नोली यांचीं क्लाइव्हचीं चरित्रें]

क्लासिअस, रुडाल्फ जुलिअस इम्यान्युएल (इ.स. १८२२-१८८८).—एक जर्मन पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता. याचा जन्म जर्मनींतील कास्लिन गांवीं झाला. इ. सन १८४० ते १८४४ पर्यंत त्यानें बर्लिन विश्वविद्यालयांत अभ्यास केला. इ. सन १८४८ सालीं त्यानें विश्वविद्यालयाची पदवी मिळविली. झ्युरिच येथील विविध कलाशाळेंत त्याला इ. सन १८५५ सालीं प्रोफेसर नेमण्यांत आलें. इ. सन १८६७ सालीं त्यांची बॉन येथें प्रोफेसरच्या जागेवर नेमणूक झाली. फ्रांको-जर्मन युद्धात त्यानें वाहतुकीच्या तुकडीचें आधिपत्य स्वीकारून बरीच कामगिरी बजाविली. १८८८ मध्यें बॉन येथें तो मृत्यु पावला.

त्या चे शो ध:—प्रयोग करून शास्त्रीय शोध लावणारा या नात्यानें क्लासिअस यानें विशेष महत्त्वाची कामगिरी केली नाहीं. परंतु तो उत्तम गणिती होता, व त्यानें गणिताच्या साहाय्यानें अणुसंबंधानें कित्येक सिद्धान्त प्रस्थापित केले. त्यानें कार्नोचें तत्व पुन्हां शास्त्रज्ञांपुढें मांडलें व गत्युष्णतेचे सिद्धान्त या तत्वाच्या सहाय्यानें भक्कम पायावर रचले. इसवी सन १८५० सालीं यानें गत्युष्णतेचा दुसरा सिद्धांत प्रस्थापित केला. हा सिद्धान्त यानें पुढील शब्दांत मांडला. "थंड पदार्थांतून उष्णपदार्थांत स्वयंप्रेरणेनें उष्णता जाऊं शकत नाहीं". वाफेच्या यंत्रासंबंधानें त्यानें सिद्धान्तरूप बरेच शोध लावले. क्लार्कम्याक्सवेलचें असें मत आहे कीं वायुरूप द्रव्याच्या अणूंच्या गतीचा सिद्धान्त क्लासिअसनें बसविला, किंबहुना तो त्या सिद्धान्ताचा आद्य जनक आहे. वायुरूप

द्रव्याच्या अणूचा मध्यमपथ किती असावा यासंबधाची गणना त्यानेंच प्रथमतः केली. " विद्युद्विश्लेषणाविषयीं त्यानें अशी कल्पना पुढें मांडली कीं, विश्लेषणधर्मी द्रावणांत अणूंच्या जोड्या बदलत असाव्यात व विद्युद्बलाच्या योगानें या अणूंनां एका विशिष्ट दिशेनें गति प्राप्त होत असावी. " ही कल्पना शास्त्रज्ञांस इ. सन १८८७ सलापर्यंत पटली नाहीं परंतु १८८७ साली एस. ए. आर्‍हेनस यानें ही कल्पना विद्युद्विश्लेषणास उत्तम प्रकारें लागू पडते असें दाखवून दिलें.

क्लोजपेट—म्हैसूर संस्थान. बंगलोर जिल्ह्याच्या चन पट्टण तालुक्यांतील एका लहान विभागाचें मुख्य ठिकाण. हें अर्कावती नदीवर वसलें आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ३५०६ होती. हें गांव इ. स. १८०० त सरबारी क्लोज या इंग्रजी रेसिडेंटानें वसाविलें त्यावेळीं येथें बारगीर अथवा घोडेस्वारांचें ठाणें होतें. येथील मुसुलमान रेशमाचे किडे पोसण्याचा व रेशीम काढण्याचा धंदा करितात. येथें १८७० त म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

क्लोरोफार्म—मधुर वास व रुचकर चव असलेलें रंगहीन व झोंप आणणारें द्रवरूप औषध. हें इथिल अल्कोहल किंवा ॲसिटोन(सारख्या कार्बनाच्या एखाद्या संयुक्त पदार्था)वर विरंजन चूर्णाची क्रिया झाली असतां मिळतें. थंडीनें क्लोरोफार्म गोठतो व तो ६२° सें. ला वितळतो; व ६१.२° सें. ला उकळतो. त्याचें विशिष्टगुरुत्व १.५ आहे. चरबी, अल्कलॉइड्स, आयोडिन वगैरे पदार्थ त्यांत लवकर द्रवतात.

वै द्य की य.—क्लोरोफार्म भूल येण्यासाठीं हुंगविण्याची पद्धतिः—शस्त्रक्रिया करण्यासाठीं रोग्यास तास अर्धा तास बेशुद्ध अवस्थेंत ठेवणें ही जबाबदारीची गोष्ट आहे. ज्या माणसानें पूर्वी रोग्यास क्लोरोफार्म हुंगविला नाहीं त्यास तो देण्यास सांगू नये. कारण रोगी दगावण्याचा संभव असतो. रोगी हृदयक्रिया बंद पडून दगावतो किंवा श्वसनक्रिया थांबून दगावतो याबद्दल मतभेद आहे. तो हुंगविणारानें पुढील सूचना ध्यानांत ठेवाव्या म्हणजे सहसा अपघात होणार नाहींतः—(१) रोग्यास आदले दिवशीं संध्याकाळीं एरंडेल अगर बस्ती द्यावा. (२) शस्त्रक्रियेच्या दिवशीं त्यास भूल देण्याच्या अगोदर ४–६ तास कांहींहि खाण्यास देऊं नये. दिलेंच तर जडान्न देऊं नये. पातळ अन्न (दूध, चहा वगैरे) थोडेंच द्यावें. (३) क्लोरोफार्म हुंगविण्यासाठीं फुगा, बाटली व नाकाशी धरावयाची टोपी असलेलें यंत्र मिळतें. परंतु तें महाग असून त्याची आवश्यकता असतेच असें नाहीं. तागाच्या कापडाची दुहेरी घडी द्रोणाच्या आकाराची, नाक व तोंड यांवर धरतां येईल येवढी मोठी करून तींत थेंबथेंब चोहोंकडे असा ३० पर्यंत थेंब क्लोरोफार्म घालावा व नाकापासून जरा अंतरावर तो द्रोण धरून रोग्यास सावकाश अंक मोजण्यास सांगावें; म्हणजे सहज भूल येण्यास मदत होते. (४) ही प्रथमावस्था होय. यांत रोगी—विशेषतः दारूबाज रोगी—धडपड करण्याचा संभव असतो म्हणून धडपड होते असें वाटल्यास मदतनिसाकडून हातपाय अंमळ दाबून धरावे व द्रोण नाकाशीं आणखी जवळ धरावा व आणखी थोडे थेंब द्रोणांत पाडावे म्हणजे धडपड थांबेल. (५) नाडी व श्वसनक्रिया नीट चालत आहेत हें कानशिलाजवळची नाडी व पोट अगर छातीच्या हालचालीकडे अविरत लक्ष ठेवून पहाता येतें. (६) एखादेवेळेस श्वास थांबतो. त्यावेळीं रोग्याचा कृत्रिम श्वासोच्छ्वास सुरू केला पाहिजे. (७) गुंगी आल्यावर कांहीं रोग्यांची जीभ घशाशीं गोळा होऊन गुदमरा होतो. तो होऊं नये म्हणून गुंगी आल्यावर एका विशिष्ट चिमट्यानें जीभ पकडून तोंडाबाहेर तो चिमटा लोंबत ठेवतात. ही सावधगिरी घेणें फार प्रशस्त आहे. (८) तसेच रोग्याची छाती, पोट व कमर यांसभोंवतीं घट्ट वस्त्रें असतील तीं सैल केलींच पाहिजेत. (९) शस्त्रक्रिया कोंदट जागेंत करूं नये. (१०) शस्त्रक्रियेस आरंभ करण्याइतकी गुंगी आली कीं नाहीं हें पहावें. डोळ्याची पापणी उघडून बुबुळास स्पर्श करूं लागलें तर पूर्ण बेशुद्धि असल्यास रोगी पापण्या गच्च मिटून घेत नाहीं. (११) रोग्यास दर पांच सात मिनिटांनीं क्लोरोफार्मचे २० ते ३० थेंब द्रोणांत पाडून हुंगवीत जावें, म्हणजे रोगी मध्येंच शुद्धीवर येऊन धडपडून शस्त्रक्रियेस व्यत्यय आणणार नाहीं. (१२) नकोशीके डाक्टर कमी क्लोरोफार्म देतात तें चांगलें नाहीं व क्लोरोफार्म अधिक दिल्यानें धोका असतो. डोळ्याची कनीनिका गुंगीमध्यें जी अति बारीक झाली असते ती फार मोठी होते. अशा वेळीं अधिक हुंगविणें बंद अगर जपून करावें. (१३) चांगली गुंगी असली म्हणजे रोगी झोंपेप्रमाणें अगर त्याहून बऱ्याच मोठ्यानें अकाळ विकाळ घोरतो. (१४) तोंड, घसा, दांत या ठिकाणीं शस्त्रक्रिया असल्यास जबडा उकललेला ठेवण्याच्या योजनेचें यंत्र अगर दातांच्या कवळीमध्यें दोन्ही बाजूस मोठीं बुचें घालून कांहीं वेळ शस्त्रक्रिया थांबवून मधून मधून क्लोरोफार्म हुंगविण्यास अवसर द्यावा लागतो. (१५) शस्त्रक्रिया आटोपतांक्षणीं ताबडतोब हुंगविणें बंद करावें व त्या अर्धवट गुंगींत त्याची जखम व पट्टया बांधणें उरकून घ्यावें. (१६) रोगी पूर्ण शुद्धीवर येईपर्यंत त्यापासून भूल देणारानें जाऊं नये. (१७) शस्त्रक्रियेनंतर ३।४ तास अन्न देऊं नये. अन्न खाऊं घातल्यास शस्त्रक्रिया चालू असतां अगर नंतर वांतीचा संभव फार असतो म्हणून उपासमारच बरी. (१८) सर्व रोग्यांचें हृदय भूल देण्याच्या अगोदर तपासावें. तें विकृत असल्यास अगर रोगी फार वृद्ध व अशक्त असल्यास फारच जपून भूल हुंगवावी. येणेंप्रमाणें मुख्य गोष्टींविषयीं दक्षता ठेविल्यानें अपघात होण्याचा संभव टळतो.

क्विटो—इक्वेडोरची राजधानी. दक्षिणअक्षांश १४' व पश्चिम रेखांश ७९° ४५' यांचेवर ही आहे; ही पासिफिक महासागराच्या किनाऱ्यापासून सुमारें ११४ मैलांवर व ग्वायाकिलच्या

ईशान्येस सरळ रेषेंत १६५ मैलांवर आहे. ग्वायाक्विलशीं हें शहर रेल्वेनें जोडलेलें आहे. लोकसंख्या (१९१५) सुमारें ७०,०००. परकी लोक विशेषतः कोलंबियन आहेत. हें शहर पश्चिमेस पिंचिंचा ज्वालामुखी पर्वत; पूर्वेस प्वेंगासी उंचवटा व दक्षिणेस व उत्तरेस पिंचिंचाचे उंचवटे यांनीं बनलेल्या डोंगरपठारावर आहे. या शहराचा पृष्टभाग उंचसखल असून त्याच्यामधून दोन खोल दऱ्या पश्चिमेकडून पूर्वेकडे गेल्या आहेत. शहराचे चौकोनी चौक पाडलेले आहेत. तेथील घरें जुन्या स्पॅनिश व मूरिश पद्धतीचीं आहेत.घरें साधारणतः उन्हानें वाळविलेल्या विटांचीं असतात. चांगल्या घरांना गिलावा केलेला असतो. सार्वजनिक इमारती स्पॅनिश पद्धतीच्या आहेत. मुख्य चौकाच्या समोर दक्षिणेस कॅथेड्रल, पश्चिमेस सरकारी राजवाडा; उत्तरेस धर्माध्यक्षाचा राजवाडा व पूर्वेस म्युनिसिपालिटीच्या इमारती आहेत. जेसुईट लोकांचें चर्च ही प्रेक्षणीय इमारत आहे. येथें एक विश्वविद्यालय, वेधशाळा, अकरा मोठाले मठ या सार्वजनिक संस्था आहेत. येथें मोठाल्या व्यापारी वखारी नाहींत. येथून कातडीं व जंगलांतील लांकूड हीं बाहेर देशीं रवाना होतात. मध्ययुगांतील धार्मिक चित्रें पुष्कळ बनतात व हीं बाहेर देशीं पाठविलीं जातात. कमावलेलें कातडें, खोगीर, जोडे, लॉकरीचें व कापसाचें कापड, पोतीं, चटया व जाड्या लोंकरीच्या घोंगड्या बनविणें हे देशी धंदे आहेत. येथें उंची गालीचे तयार करतात, लांकडी खोदींव काम व सोन्यारुप्याचीं कामें यांत येथील कारागीर बरेच तरबेज आहेत. बायका छानदार कशिद्याचें व फितीचें काम करतात.

स्पॅनिश लोकांनीं हें जिंकण्याच्या बरेच पूर्वी क्विटसनें येथें वस्ती केली त्यावरून या शहराला क्विटो नांव प्राप्त झालें आहे. १५३३ मध्यें सेबॅस्टियन बेबॅल्काझरनें या शहराचा शांततेनें ताबा मिळविला व १५४१ त याचें स्पॅनिश शहर बनलें. याचें पूर्ण नांव सेन डेल क्विटो असून हें क्विटो प्रांताची राजधानी होतें याचें भूकंपामुळें वारंवार नुकसान झालें आहे. १७९७ व १८५९ मधील धक्क्यांमुळें याचें अतिशय नुकसान झालें.

क्विबेक—कानडामध्यें याच नांवाच्या प्रांताचें मुख्य शहर. सेंट लॉरेन्स व सेंट चार्लस या दोन नद्यांच्या संगमावर हें वसलें आहे. पश्चिम रेखांश ७१° १२'व उत्तर अक्षांश ४६° ४८'वर हें आहे. लो. सं. (इ. स. १९११) ७८,७१०. या शहराचे अप्परक्विबेक व लोअरक्विबेक असे दोन भाग असून अप्पर क्विबेकमध्यें मोठे लोक राहतात. पश्चिमेस सेंट जॉन व सेंट रॉज असे उपांत भाग आहेत. सेंट जॉनजवळ अब्राहाम म्हणून रणभूमि आहे. येथें जनरल वूल्फ मरण पावला त्या ठिकाणीं एक ४० फूट उंच स्तंभ आहे. आणि स्टेफाय रस्त्यावर एका लोहस्तंभावर त्याचा कांशाचा पुतळा बसविला आहे. क्विबेकच्या स्वाभाविक रचनेमुळें त्याला लष्करी महत्त्व आलें आहे. येथील वस्ती बहुधा रोमन कॅथोलिक आहे. व 'नॉत्र दामे दे विक्टॉयर' नांवाचें त्यांचें एक मोठें चर्च आहे. त्याचप्रमाणें लाव्हल नांवाचें येथें एक विश्वविद्यालय आहे. या शहरांत विजेचे दिवे व ट्राम आहे. ग्रांड ट्रंक कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेचें व इंटर कलोनियल रेल्वेचें हें स्टेशन आहे. कॅनेडियन हाऊस ऑफ कॉमन्समध्यें या शहराचे प्रतिनिधी जातात. त्याचप्रमाणें प्रांतिक मंडळांत (प्रॉव्हिन्शियल हाऊस) तीन प्रतिनिधी पाठविण्यांत येतात. येथील व्यवस्था मेयर व आल्डरमेन पाहतात. त्यांना दर दोन वर्षांनीं पुनः निवडण्यांत येतें. येथील मुख्य व्यापार लांकडाचा आहे. त्याचप्रमाणें जोडे, कागद, रबर, तंबाखू, दोरखंडें,वार्में व चाकू-कात्र्या इत्यादि सामान येथें तयार होतें. जॅक्स कारटियर या फ्रेंच नांवाड्यानें हें१५३५शोधून काढलें. चांप्लेन यानें हें शहर १६०८ त वसविलें. १६२९त इंग्रजांनीं तें घेतलें.१६३२त फ्रेंचांनां तें परत देण्यांत आलें.यानंतर तें परत घेण्याचे प्रयत्न इंग्रजांनीं दोनदां केले पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. शेवटीं १७५९ तें ब्रिटिशांनीं घेतलें. १७६३ च्या पॅरीसच्या तहानें तें ब्रिटिशांस कायमचें देण्यांत आलें. १७७५ त अमेरिकन जनरलनें तें घेण्याचा प्रयत्न केला पण तो फसला.

क्विलान (कोल्लम)—मद्रासमधील त्रावणकोर संस्थानांतील क्विलान तालुक्याचें मुख्य शहर, व बंदर. हें ८° ५३'उत्तर अक्षांश व ७६° ३६' पूर्व रेखांशांवर वसलें आहे. साउथ इंडियन रेल्वेच्या शेणकोट्टा–क्विलान–त्रिवेंद्रम या फांट्यावर क्विलान आहे. लोकसंख्या (१९११) १८,८३९. याला पूर्वी देसिंगनाडू म्हणत. हें संस्थान त्रावणकोरला अठराव्या शतकांत जोडलें. हें पूर्वी पश्चिम किनाऱ्यावर एक उत्तम बंदर होतें. त्रावणकोरच्या महाराजांचा राजवाडा क्विलान सरोवरावर आहे. शहरांत एक रेसिडेन्सी, पेशकार दिवाणाची कचेरी, डिस्ट्रिक्ट व त्याच्या खालील कचेऱ्या, शाळा, रुग्णालयें, आणि इतर संस्था आहेत. तीन चार मल्याळी नियतकालिकें येथें निघतात. सुताच्या कापडाचे व विटांचे मुख्य कारखाने येथें आहेत. बाहेरगांवीं जाणारा माल कॉफी, चहा, मासे, लांकूड, मिरीं आणि काथ्या हा असून बाहेरून येणारा माल मीठ, तंबाखू वगैरे होय. ह्या शहरांत इ. स. ७५१ या वर्षी चीनहून जहाजें येत असत. ह्या ठिकाणीं पोर्तुगीज लोकांची वखार होती ती १६६२ मध्यें डच लोकांनीं घेतली. पुढें ती डच लोकांकडून ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत गेली. हल्लीं ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालीं असलेल्या भागाला तंगासेरी असें नांव आहे.

क्विन्स्टौन (१)—हें कॉर्क परगण्यांतील दर्यावर्दी ठाणें, समुद्र कांठचें आरोग्यकारक स्थळ आणि बंदर, ग्रेट आयर्लंड (मोठें बेट) याच्या दक्षिण बाजूवर वसलें आहे. येथील लोकसंख्या १९०१ सालीं ७९०९ होती. हें शहर कॉर्कच्या पूर्व–आग्नेय दिशेकडे १२ मैलांवर आणि ग्रेट सदर्न ॲन्ड वेस्टर्न रेल्वेनें डब्लिनच्या नैर्ऋत्येस १७७

मैकांवर आहे. अमेरिकन युद्धापूर्वी हें एक लहान खेडें असून येथील लोक मासे धरण्याचा उद्योग करीत असत. या शहरास पूर्वी ' कॉर्केंच कोव्ह ' असें नांव होतें. १८४९ मध्यें व्हिक्टोरिया राणी आयर्लंडमध्यें आली त्यावेळीं प्रथम येथेंच उतरली म्हणून या शहरास क्वीन्स्टौन म्हणूं लागले. येथें अमेरिकन मेल आगबोट थांबते व येथून एक्सप्रेस आगगाड्यांनीं डाक रवाना करतात. हें वसाहतींचें लष्कर उतरण्याचें व परदेशगामी लोकांस चढविण्याचें ठिकाण आहे. संयुक्त राज्यांतील सर्वांत जुन्या याट क्लबाचें येथें मुख्य ठाणें आहे. सेंट कॉलमनचें कॅथॉलिक मंदिर व प्रॉटेस्टन्ट एपिस्कोपल देऊळ या मुख्य इमारती आहेत. येथून रश-ब्रूकपावेतों एक सुंदर रस्ता गेला आहे.

(२) हें दक्षिण आफ्रिकेच्या केप प्रांतांतील शहर असून केइ नदीच्या कांठच्या प्रदेशांत आहे. १९०४ मध्यें येथील लोकसंख्या ९६१६ होती. पैकीं ४१५७ गोर-वर्णाचे होते. हें १८५३ मध्यें वसविलें गेलें व त्याला व्हिक्टो-रिया राणीचें नांव दिलें. येथील हवा आरोग्यकारक असून हें शहर हवा खाण्याचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. हें ३५०० फूट उंच वसलेलें आहे. येथें गहूं पिकतात. व येथील लोक मेंढ्या पाळतात. हें व्यापाराचें शहर आहे.

क्वीन्सलंड—आस्ट्रेलियाखंडाचा सबंध ईशान्य भाग क्वीन्सलंडनें व्यापिला आहे. याचें क्षेत्रफळ सुमारें६,७०,५०० चौ. मै. असून मूळचे रानटी लोक सोडून लोकसंख्या सात लाखांपर्यंत भरते. राजधानी ब्रिस्बेन आहे. येथें प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असून लग्न झालेल्या लोकां-पैकीं शेंकडा ९८८३ लोकांनां १९१७ सालीं लिहितां वाचतां येत होतें. क्वीन्सलंड युनिव्हर्सिटी इ. स. १९११ त ब्रिस्बेन येथें स्थापन झाली. शेतकी व गुरचराइ या कामीं बऱ्याच जमीनींचा उपयोग होतो. गहूं, मका, गवत या उत्पन्नाच्या विशेष बाबी होत. संस्थानांत कोळशाच्या बऱ्याच खाणी आहेत. १८५८त सोन्याच्या खाणींचा शोध लावून १९१७ सालापर्यंत ८२११११९७९ पौंड किंमतीचें सोनें निघालें. सोनें चांदी, तांबें, कोळसा, मांस, कातडीं लोंकर, व साखर यांची मोठ्या प्रमाणांत निर्गत होते. संस्थानचें उत्पन्न १९१७-१८ सालीं ८१९१४८२ पौंड असून खर्च ८९,००,९३४ पौंड होता. यापैकीं रेल्वेपासून होणारें उत्पन्न निम्यानें होतें. रेल्वे करण्याच्या कामीं खर्चहि तितकाच करावा लागला. जून ३० सन १९१८ या दिवशीं संस्थानेंच एकंदर सरकारी कर्ज ६३११०७८६ पौंड होतें. १८५९ त स्वतंत्र वसा-हतीचा दर्जा मिळण्यापूर्वी क्वीन्सलंड हा न्यू साउथ वेल्सचा एक भाग म्हणून होता. लोजिस्लेटिव्ह कौन्सिल व असेंब्ली या दोन मंडळांकडे कायदे करण्याचे व कर बसविण्याचे अधिकार आहेत. या वसाहतीचा इतिहास आस्ट्रेलियांत अंतर्भूत झालेला आहे. [क्वीन्सलंड स्टॅटिस्टिक्स, सरकारी रिपोर्ट. वीडन क्वीन्सलंड पास्ट ॲन्ड प्रेझेन्ट].

क्वीलहानी-मद्रासमधील मलबार जिल्ह्याच्या कुंरुम्ब्रनाड तालुक्यांतील बंदर. हें उत्तरअक्षांश ८ ° ५३'व पूर्वरेखांश ७६ ° ३६'वर वसलेलें आहे. लोकसंख्या(१९०१)५८७०. ह्या ठिकाणीं सबमॅजिस्ट्रेटचें व मुनसिफचें कोर्ट आहे. याचे जवळ १४९८ सालीं वास्कोदगामानें आपलें जहाज आणिलें होतें.

क्वेकर पंथ—" सोसायटी ऑफ फ्रेंड्स् " नामक एका ख्रिस्ती धर्मपंथाच्या अनुयायांना क्वेकर अशी संज्ञा देतात. मनुष्याचा परमेश्वराशीं निकट सहवास व त्यापासून होणारे योग्य फायदे ह्याच्या खरेपणाबद्दलचा त्यांचा आग्रह, शपथ-विधीस विरोध, युद्धाचा तिटकारा, धंदेवाईक पुरोहितवर्ग न ठेवण्याची पद्धत, आचार्यवर्गाची निवड ह्या मतभेदामुळें हा पंथ इतर ख्रिस्ती पंथांपासून अलग दिसतो. हे क्वेकर लोक मुकाट्यानें प्रार्थना करतात; उद्देश हा कीं, उपासना अंतःस्फूर्तीनें व्हावी. अर्थात् एखाद्या स्त्रीला किंवा पुरुषाला स्फूर्ति झाली असतां मोठ्यानें प्रार्थना करण्याला, धर्मग्रंथ वाचण्याला किंवा जशी स्फूर्ति होईल तसा उपदेश करण्यालाहि मोकळीक असते. खालील गोष्टींवर याचा भर असतो:-(१)जमलेल्या लोकाचे स्वास्थ्य राखणें व त्याची उपा-सना अन्तःकरणपूर्वक होऊं देणें यांसंबंधीं जबाबदारीचा अंश प्रत्येक व्यक्तीकडे-मग त्या व्यक्तीला वाचिक उपास-नेचें काम दिलें नसो वा नसो-येतो. (२) प्रत्येक उपास-काला बोललेल्या (किंवा ऐकलेल्या)शब्दांवर किंवा इतर बाह्य गोष्टींवर अवलंबून न राहतां स्वतः परमेश्वराची सेवा करण्याच्या वैयक्तिक हक्क आहे. (३) क्वेकर असो वा नसो, प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्याच्या साह्यासाठीं वाटेल त्याप्रमाणें ईश्वराजवळ प्रार्थना करण्याची आहे. (४) ज्याविषयीं पूर्वी विचार केला आहे अगर नाहीं अशा कोणत्याहि बाबतींत स्फूर्ति होईल त्याप्रमाणें प्रार्थना करण्याची मोकळीक आहे ते संस्काराच्या तत्त्वार्थाला महत्व देतात. क्रियाना देत नाहींत. म्हणून ते बाप्तिस्मा, लाईस् सपर वगैरे बाह्य संस्कार पाळीत नाहींत. जेव्हां एखादी स्त्री किंवा पुरुष समाजाचें पौरोहित्य पत्क-रण्यास सर्वतैव लायक असा दिसून येईल. तेव्हां मासिक सभा त्या व्यक्तीला पुरोहितत्व करण्याविषयीं ईश्वरी आव्हान आहे असें समजून त्या व्यक्तीला तिच्या ईश्वरी देणगीचा उपयोग करण्यास लागेल ती मदत करण्याचा ठराव करते. स्त्रियांनां सुद्धा ईश्वरेच्छा स्फुट करण्याचा व उपदेश कर-ण्याचा ईश्वरी प्रसाद होतो म्हणून स्त्रियाहि पुरोहित होण्याला अपात्र ठरत नाहींत. महत्त्वाकांक्षा,अभिमान,लोभ, शत्रुत्व वगैरे ख्रिस्ताच्या मनाविरुद्ध गोष्टींचा परिणाम व ह्या गोष्टींचें कारण युद्ध असल्यामुळें तें सर्वथा निंद्य होय. खरें बोलण्याकरितां कोर्टांतून वगैरे शपथविधि जो ठेवला असतो तो त्याज्य आहे. शपथ घेऊन बोलणें म्हणजेच खरें बोलणें असें नेहमीं होत नाहीं.

ह्या केकर पंथ व इतर ख्रिस्ती धर्मपंथ ह्यांतील मूलाधारभूत ख्रिस्ती धर्मतत्त्वें बहुधा सारखींच आहेत. बाप्तिस्मा वगैरे धर्मसंस्कारांनां फांटा देणें व आपल्या सांप्रदायिक मताची अमुक अमुक व्याख्या आहे असें सांगून आपल्याला बांधून न घेणें इत्यादि त्यांच्यांतील प्रकारामुळें केकर पंथाविषयीं बराच गैरसमज उत्पन्न होतो.

इ. स. १६४७त जॉर्ज फॉक्सनें मूळ इंग्लंडांत ह्या पंथाची स्थापना केली. त्या वेळच्या धर्मविचाराला अंतःस्फूर्तीची किंवा आध्यात्मिक ज्ञानाची जोड ह्या पंथानें दिल्यामुळें ह्याला पुष्कळ अनुयायी मिळाले. त्यांनीं अमेरिका, आफ्रिका वगैरे देशांतून आपल्या मताचा प्रसार केला. पहिल्यानें कांहीं वर्षे ह्या लोकांचा फारच छळ करण्यांत आला. हे शपथा घेण्याच्या विरुद्ध असल्यामुळें राजनिष्ठेची सुद्धां शपथ घेण्याचें नाकारीत, म्हणून त्यास जास्त छळ सोसावा लागे. त्या वेळीं राजमान्य धर्मविरुद्ध असलेल्या सर्व पाखंडी लोकांस कडक शिक्षा देण्यांत येत असे. इ. स.१६८९ त जेव्हां धर्मसहिष्णुतेचा कायदा पास झाला तेव्हां हा छळ बंद पडला. पुढें (इ. स. १८३२) ह्यांना पार्लमेंट, युनिव्हर्सिटी वगैरे संस्था खुल्या झाल्या. ह्यांची परोपकाराविषयींची चळवळ प्रसिद्ध आहे. अमेरिकेंत मॅसाचुसेटस् परगण्यांत केकर लोकांनां येण्याची बंदी असे. त्याकरितां कडक कायदे केले होते. त्यांस केकरनीं सत्याग्रहानें तोंड दिलें. त्यांनीं ओसाड पडलेल्या जागांतून वसाहती करण्यास सुरवात केली व इ.स. १६७७ त ' न्यू जर्सी ' ही वसाहत स्थापली. सर्वांत महत्वाची व केकर पंथाला अभिमानाची गोष्ट म्हणजे विल्यम् पेननें पेन सिल्वानियाची स्थापलेली वसाहत होय. तेथील राज्यकारभार ह्या पंथाच्या तत्त्वाप्रमाणें चालूं लागला. ह्यांत गुलामांच्या व्यापाराची बंदी केली. ह्यांतील प्रमुख मंडळींनीं हा अश्लाघ्य व्यापार अजीवात बंद पाडावा म्हणून अतोनात खटपट केली; त्याला इ. स. १८६३ त यश आलें. पंथातून कांहीं लोक फुटून त्यानीं नवीन पंथ काढले. अंतःस्फूर्तीचा कडेलोट होऊन, ख्रिस्त, बायबल इत्यादि ख्रिस्ती संप्रदायाला आवश्यक गोष्टी खोट्या म्हणून ठरल्या. तथापि एकंदर प्रत्येक केकर संस्थेतून परोपकाराची आवड उघड दिसून येते.

क्वेटापिशीन जिल्हा.–बलुचिस्तानांतील डोंगराळ जिल्हा. उ. अ. २९° ५२' ते ३१° १८' व पू. रे. ६६° १५' ते ६७° ४८' मध्यें वसलेला आहे. क्षेत्रफळ ५१२० चौरस मैल आहे. या जिल्ह्यांत भूकंप फार होतात. आक्टोबर १८९२ व मार्च १९०२ मध्यें फार मोठे भूकंप झाले. या दऱ्यांत अप्रिकॉट, डाळिंब, अक्रोड, बदाम वगैरे निरनिराळीं फळें होतात. या ठिकाणीं मेंढ्यांकरितां मोठालीं दाट जंगलें वाढवून ठेवतात. या जंगलांत चित्ते, लांडगे, कोल्हे व ससे नेहमीं सांपडतात. येथील हवा साधारण उष्ण असते. व उन्हाळ्याच्या महिन्यांत चक्रवात होतात. क्वेटा याला पूर्वी शॉल व पिशीन याला फुशंज व पशंग म्हणत. याची १९२१ मधाल लो. सं. १,३७,०८२ होती. सरासरी शेंकडा ८४ लोक मुसुलमान, शेंकडा १० हिंदु आणि शेंकडा तीन इंग्लिश आहेत. बहुतेक सर्व पुश्तु भाषा बोलतात. कांहीं ब्राहुई व फारसी भाषा बोलतात. पिशिनमधील अफगाण लोक घोड्यांचा व्यापार करतात. क्वेटा व पिशीन या दोन तहशिलींत एकंदर ७०६ चौरस मैल जमीन लागवडीची असून तींपैकीं २२१ चौरस मैल जागा नेहमीं पिकाऊ असते. या ठिकाणीं गहूं, भात, बार्ली, मका, बटाटे आणि इतर धान्य व भाजीपाला फार चांगला पिकतो. नांगराला उंट जुंपतात व हेच प्राणी माल नेण्याआणण्याकरितां उपयोगांत आणतात. क्वेटाच्या पूर्वेस कोळसा पुष्कळ सांपडतो. फेल्टच्या कापडाचा व चटयांचा मोठा व्यापार आहे. क्वेटामधील कंदाहारी लोक तांब्यांचीं भांडीं उत्तम करतात. अफगाणिस्तानांतून तूप, ताजीं व सुकीं फळें येतात. आणि सतरंज्या, धान्य व धातु हीं हिंदुस्थानांतून क्वेटामध्यें येतात व क्वेटामधून हिंदुस्थानांत लोंकर व फळें आणि अफगाणिस्तानांत धातु रंग वगैरे पाठवितात. व्यापाराकरितां रेल्वे व मोठाले रस्ते केलेले आहेत. त्या ठिकाणीं दुष्काळ क्वचितच पडतो. राज्यव्यवस्थेकरितां जिल्ह्याचे तीन भाग केलेले आहेत. चामन, पिशीन आणि क्वेटा. यांपैकीं पिशीन, चामन, आणि शोरारूड हीं ब्रिटिश बलुचिस्तानच्या ताब्यांत आहेत व क्वेटा तहशील हा निराळाच प्रांत आहे.

क्वेटा, त ह शी लः—बलुचिस्तानमधील क्वेटापिशीन जिल्ह्याची तहशील व पोटविभाग. हा उत्तरअक्षांश २९° ५२' ते ३०° २७' आणि पूर्वरेखांश ६६° १५' ते ६७° १४' यांवर वसलेला आहे. राज्यव्यवस्थेकरतां याला शोरारूड जोडलें आहे. १९११ मधील दोन्हींची लोकसंख्या ५८१०१ होती. यांत क्वेटा शहर व ५४ खेडीं आहेत. गुरांकरतां भोंवताली सरलेत नांवाचा टेंकड्या आहेत. जवळच सोर पर्वताच्या ओळींत कोळसा सांपडतो.

श ह र— क्वेटापिशीन जिल्ह्याचें मुख्य ठिकाण व बलुचिस्थानची राजधानी. हें क्वेटा तहशिलींत उत्तरअक्षांश ३०° १०' आणि पूर्वरेखांश ६७° १' यांवर वसलेलें आहे. लोकसंख्या (१९२१) ४९,००१ हिंदुस्थान व क्वेटा हीं नॉर्थ वेस्टर्न रेलवेनें जोडलेलीं आहेत. पहिल्या अफगाण युद्धाच्या वेळेला हें इंग्रज लोकांच्या ताब्यांत होतें आणि त्यानंतर कांहीं दिवस खाकर लोकांच्या अंमलाखालीं गेलें. शहरांत शीख लोक फार आहेत व मुसुलमान, हिंदु व युरोपियन फार थोडे राहतात. शहराची व्यवस्था म्युनिसिपालिटीकडून होते. शहरांत बायकांचा एक दवाखाना, दोन मिशन हॉस्पिटलें, तीन हायस्कुलें, मुलींची शाळा व सँडेमन लायब्ररी या संस्था आहेत. बलुचिस्तान गॅझेट आठवड्यांतून दोनदां निघतें.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

ख

ख—व्यंजनांतील दुसरें अक्षर. खचे संस्कृत अर्थ अनेक आहेत; उदा:-आकाश, इंद्रिय, देहछिद्र, दोन (संख्या), सुख, ब्रह्म, ज्ञान, इ.

अ क्ष र वि का स.—पहिल्या अवस्थेंत हा वर्ण खालसी

ख = येथील इ. स. पू. ३ ऱ्या शतकांतील शिलालेखांत

आढळतो. या ठिकाणीं खालची गांठ वाटोळी व बरीच मोठी आहे. इ. स. पहिल्या शतकांतील कुशान राजांच्या वेळच्या मथुरेंतील लेखांत दुसरी अवस्था तीन स्वरूपांत दाखविली आहे. इ. स. ६८९ तील राजा दुर्गगणाच्या झालरापाट-लेखांत तिसऱ्या अवस्थेंतला ख दिसेल. अर्वाचीन अवस्थेच्या मागील म्हणजे चवथी अवस्था हैहयवंशी राजा जाजल्लदेव याच्या वेळच्या (इ. स. १११४) लेखांत अंकित झालेला आहे. आजचा ख व त्या वेळचा ख यांत फरक म्हणजे ख' मधील पहिला अर्ध जो 'र' तो अर्ध्या ग सारखा (काना सोडून ग, ग) दिसतो. [प्राचीन लिपिमाला].

खगरिया—बिहार ओरिसा. मोंघीर जिल्हा. एका पोट-विभागांतलि शहर. उ. अ. २५ ° ३०' व पू. रे. ८६ ° २९'. लो. सं. (१९११) १०८०४. हें शहर गंडकी नदी-तीरीं असून बेंगाल ॲन्ड नॉर्थ वेस्टर्न रेल्वेवरचें स्टेशन आहे.

खंगार—कंगार; खागार, उत्तरहिंदुस्थानांत यांची विशेष वस्ती आहे. ही एक चोरट्याची जात असून या जातीच्या लोकांचें जास्त वास्तव्य बुंदेलखंडांत असतें. हे लोक खेडेगांवांतील पहारेकऱ्यांचें काम करतात. या लोकांचा रजपूत वंशाशीं निकट संबंध असल्यामुळें त्यांस रावत अथवा राव खंगार असेंहि म्हणतात. खेडे-गांवांत त्यांनां कोतवाल अथवा कोतवार म्हणून ओळखतात. खंगार शब्दाची व्युत्पत्ति हिंदी खंख व संस्कृत खड्ग या शब्दावरून लावण्यांत येत असते. खंगार जाती-संबंधीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत व त्या कितपत विश्वसनीय आहेत याविषयीं प्रश्नच आहे. आपण क्षत्रिय कुलोत्पन्न आहोंत असें ते म्हणतात व याला आधार असा कीं रजपुतांप्रमाणेंच लग्नकार्यांत तरवार बक्षीस देण्याची त्यांची सध्याहि चाल आहे. जेव्हां दतियाचा नवीन बुंदेल राजा सिंहासनारूढ होतो तेव्हां कुरारचा किल्ला व शेवटचा खंगार राजा यांच्या मृण्मय प्रतिमा करून बुंदेला त्या फोडून टाकतो. खंगार हे पूर्वी एका काळीं राज्यकर्ते होते व त्यांचा रजपुतांशीं निकट संबंध होता हें निश्चित आहे. परंतु त्यांच्या गोत्रपद्धतीकडे पाहिलें तर ते द्रविडी वंशाचे असावे असा तर्क होतो. पूर्वी खंगारलोक बुंदेलखंडाचे राजे होते त्यांस बुंदेले रजपुतांनीं मारून त्यांनीं राज्य घेतलें ही गोष्ट खरी असेल.

स्वर्दू, भार्तो, पर्सतिया, बिसोरा, हटगोतिया, मालनिया, कुररीया, धोरगोतिया, भिलगोतिया, विजानिया, भारद, नाहरगोतिया, नागगोतिया, कुसुमगोतिया व भर्गोतिया इत्यादि खंगार जातीच्या पोटजाती आहेत. देवकांवरूनहि त्यांच्यांत अनेक विभाग पडले आहेत. आजहि त्यांच्यांत अनेक देवकें दिसून येतात. या दोन गोष्टींवरून ते द्रविड कुलोत्पन्न असावे असें प्रतिपादन केलें जातें.

यांच्या जातींत चार वर्ग आहेत. राय,मिरधा किंवा नकीब, करवाल व दहाइत.राय वर्गाचे लोक इतर खंगारांशीं अनुलोम संबंध करतात. मिरधा लोक राजाचे रक्षक असत. करवाल लोक शूर होते. दहाइत लोक नीच समजले जातात. कुळाच्या नांवाचा पदार्थ त्यांचा देवक असतो.यांच्या कुळाचीं नांवें बच्छा, वराह, बेलगोटिया, चंदन, चिरई, घुरगोतिया, ग्वा, हकमान, हार्या, कसगोतिया, महियर, मांडगोतिया, तांबागोतिया वगैरे. गोत्रांतरविवाह या जातींत रूढ असून उच्च वर्गाचे खंगार, रजपुतांचें अनुकरण करितात. कोतवाली-सारखे धंदे करणाऱ्या हलक्या वर्गावर प्राथमिक अवस्थेचा ठसा उमटलेल दिसून येतो. उच्च वर्गानें अलीकडे विधवा-विवाह मान्य केला आहे. तथापि यांच्यांत फार जुन्या चाली दिसून येतात. जन्मसंस्काराच्या वेळीं घरांत स्वस्तिकें काढून षष्ठीपूजन करण्यांत येतें. लग्नें एकाच कुलनांवाच्या लोकांत होत नाहींत व आतेमामेभावंडांचीं लग्नें यांच्यांत निषिद्ध मानलीं आहेत. मुलगी १० वर्षांची झाली कीं तिचें लग्न करतात. लग्नतिथि ब्राह्मणांकडून ठरवितात. वराला पिवळा झगा घालून लाल पायजमा घालतात व शेला पांघरावयास देतात. डोक्यावर खजूराचा मुगुट घालतात.त्याच्या गळयात बायकाची चांदीची सरी घालतात. तसेच रुपयांची माळहि घालतात. कपाळास काजळाची तीट लावतात. मुगाच्या झाडाभोंवतीं ६ प्रदक्षिणा व बहोल्याला एक प्रदक्षिणा घालतात. जर वधू अगदींच लहान असली तर गौना किंवा दुसरता(गर्भाधान)च्या वेळीं वरील विधी करतात. वराच्या बापास लुगडें नेसवून वधूच्या आईबरोबर नाचवि-तात व एकमेकांवर हळदीचें पाणी ओततात. विधवाविवाह यांत संमत आहे. विधवेनें कोणासहि वरावें. बुधवारीं रात्रीं विधवेच्या हातांत बांगड्या घालून विवाह करतात. जाती

पंचायतीसमोरच काडी मोडावी अशी चाल आहे. आणि काडी मोडल्यावर जातीस भोजन द्यावें असेंहि आहे. हे यूल्हा देवास फार मानतात. हिंदू देवांचीहि पूजा करतात. पचघर देवाची स्थापना, डांगी लोकांनीं पांचदां खंगरियांबरोबर पोळी खाल्ली त्याच्या स्मरणार्थ केली आहे. खंगार लोक देवीची उपासना करितात व नागबाबा आणि कानेरिया बाबा या संतांनां भजतात. कुरार येथें यात्रेस जाऊन तेथील गिडवाणसा माता नांवाच्या देवीचें ते दर्शन घेतात. रात्रीं पूजा करण्यांत येऊन प्रसाद वाटला जातो. लग्नाच्या वेळीं स्त्रिया 'गूढ मेहेरा पूजा ' म्हणून एक पूजा करितात. वृक्षपूजेचें माहात्म्य यांच्यांत बरेंच आहे. गुंज, नेढी, बेल, वड वगैरे वृक्षांची पूजा करण्यांत येते.

खंगार लोक इतर लोकांस जातींत घेत नाहींत. पण खंगार बाप व उच्च जातीच्या स्त्रियेची संतति मात्र जातींत घेतात. विजातीयांबरोबर व्यभिचार करणाऱ्या स्त्रियेस बहिष्कार घालतात. यांच्या ब्राह्मण उपाध्यायांच्याच हातची कच्ची रसोई हे खातात. इतर उच्च जाती जसें बनिया, सुनार व तमेरा यांच्या हातची पक्की रसोई खातात. चौकापद्धतीप्रमाणें भोजन करतात. हे आपल्या नांवामागें सिंग शब्द लावतात व जातीनियम जरी फार कडक रीतीनें पाळतात तरी ब्राह्मण लोक यांच्या हातचें पाणी घेत नाहींत.

आपले पूर्वज पूर्वी चांगले शिपाई असत असें हे म्हणतात. पण आजकाल तर हे शेती व मजुरीहि करतात. चोरी करण्यांत यांची पूर्वी फार ख्याति असे. झांशी संस्थानांत शहरच्या रखवालदारीचें काम यांच्याकडे असे व चोरी झाल्यास ते जबाबदार धरले जात. म्हणून महाराज गंगाधर रावांच्या राज्यांत सावकार व इतर दुकानदार आपलीं दुकानें रात्रीं उघडीं ठेवीत असत. खंगारांची ज्ञातिविषयक पंचायत असून जातींतील तंटे पंचायतीच्या पुढें मिटविले जातात. उच्च वर्णाचे खंगार रजपुतांस जें अन्न चालतें तें खातात. तथापि खाण्यासंबंधीं त्यांचे निर्बंध निश्चित नाहींत. हलके लोक जंगलांतील प्राण्यांवर उपजीविका करितात, बुंदेल्यांची नोकरी करितात व कोतवाल म्हणूनहि खेडेगांवांत त्यांनां महत्त्व असतें. बऱ्याच जणांच्या मालकीच्या जमिनी नसल्यामुळें ते मजुरीहि करितात. हलक्या खंगारांनां जरी गुन्हेगार जात असें म्हणतां येणार नाहीं तरी बऱ्याच जणांची चोऱ्या व लूट करण्याकडे प्रवृत्ति असलेली दिसून येते. मध्यप्रांतांत यांची वस्ती सागर, दमो, नरसिंगपूर, जबलपूर वगैरे जिल्ह्यांत आहे. मुंडा लोकांतील एका वर्गाचें नांव खंगार असें आहे. [क्रूक; रसेल व हिरालाल].

खगौल—बिहार-ओरिसा. पाटणा जिल्ह्याच्या दिनापुर पोटविभागांतील शहर. उ. अ. २५° ३५' व पू. रे. ८५° ३'. लो. सं. (१९११) ६०१५. दिनापुर रेल्वे स्टेशन जवळ यांच्या जवळ असून रेल्वे झाल्यामुळेंच या गांवाला महत्त्व आलें.

खजुराहो—मध्य हिंदुस्थान. छत्तरपुर संस्थानांतील एक गांव. या ठिकाणीं बरींच मध्ययुगीन देवस्थानें आहेत. उत्तर अक्षांश २४° ५१' व पूर्व रेखांश ७९° ५६'. लो. सं. (१९११) १२४२. हें छत्तरपूर शहरापासून २५ मैल दूर आहे. शिलालेखांतलें याचें नांव खजुरवाहक आहे. चांदभाट याला खजुरपुर म्हणतो. खजुरीच्या झाडावरून या गांवाला हें नांव पडलें हें उघड दिसतें. यासंबंधीं बऱ्याच कथा आहेत. जिझोटी (अर्वाचीन बुंदेलखंड) राज्याची ही राजधानी होती. ह्युएनत्संगनें याचा उल्लेख केलेला दिसतो. या ठिकाणीं बौद्ध अवशेष एखादवुसरा सांपडतो.

महंमद गिझनीबरोबर कालिंजरच्या स्वारीवर (१०२१) आलेला अबु रिहान हा 'कजुराहा' चा उल्लेख करितो. इब्नबतूता (१३३५) याला ' कजुरा ' म्हणतो. त्याच्या वेळीं हें ठिकाण हिंदूंच्या ताब्यांत असावेसें दिसतें. शिकंदर लोदी या प्रदेशात आल्यावेळेपासून (१४९४–९५) याच्या नाशास सुरुवात झाली असावी.

आज खजुराहोचें महत्व त्यांतील देवस्थानाकरितां आहे. दोन सोडून बाकीचीं सर्व देवालयें ९५०–१०५० या काळांत बांधिलेलीं दिसतात. यावरचे शिलालेख ऐतिहासिक महत्वाचे आहेत. या देवळाचे तीन वर्ग पडतात, पश्चिम, उत्तर आणि आग्नेय. प्रत्येक वर्गांत मुख्य देऊळ व अनेक लहान लहान देवळें येतात. पश्चिम वर्गांत सर्व शैव व वैष्णव देवळें आहेत. उत्तर वर्गांत एक मोठें व कांहीं लहान वैष्णव देवळें व नष्ट झालेल्या इमारतींचे अनेक ढिगारे दिसतात. आग्नेय वर्गांत सर्व जैन देवळें आहेत.

चौनसत (चौसष्ट) जोगिनी व घंटाई यांखेरीज बाकीचीं सर्व देवळें कुरुंदाच्या दगडाचीं एकाच धर्तीवर बांधलीं आहेत. पश्चिम वर्गांतील सर्वांत जुनें देवालय चौसष्ट जोगिनींचे होय. याचें फक्त मधलें पटांगण शिल्लक आहे. हें जंबूर (नीस) दगडाचें बांधिलें आहे. याचा काल ८ व्या शतकाची अखेर किंवा ९ व्या शतकाचा प्रारंभ असा सांगण्यात येतो. बाकीच्या देवळांत कंदर्य महादेवाचें देऊळ विशेष सुंदर आहे. या वर्गांतलि आणखी एक मोठें देऊळ रामचंद्र किंवा लक्ष्मणजचें होय. ९५४ सालचा चंदेल घराण्याचा यावर लेख आहे. शिवाय याच वर्गांतल्या विश्वनाथाच्या देवळावर १००१ आणि १११७ सालचे चंदेलवंशीय शिलालेख आहेत.

उत्तरवर्गांत वामनाचें मोठें देऊळ आहे. पण पश्चिम वर्गांतल्या सर्वोत्कृष्ट देवळांहून हें कमी शोभिवंत आहे. या वर्गांतलि अवशेषांवे डोंगर कनिंगहॅमच्या मतें पडलेल्या संघारामांचे असावेत. आग्नेय वर्गांतील जैन देवालयांत सर्वांत जुनें घंटाईचें असून त्याच्या आंत फक्त बारीक खांब कांयते उरले आहेत. या देवळाच्या अवशेषांवरून तें ६ व्या

किंवा ७ व्या शतकांतील असावेतसे दिसतात. या वर्गांतील मुख्य देवस्थान जिननाथाचें होय. आंतील नक्षीकाम फारच सुंदर आहे व देवालयाची बांधणीहि विचित्र आहे. यांत सन ९५४ सालांतील एक चंदेल लेख आहे.

खजुराहो गांवापासून जवळच कुरारनाल्यावर कुंवरनाथाचें भव्य देवस्थान आहे. [कंनिंगहॅम—आर्किऑ. सर्व्हे रिपोर्ट; पु.२, ७ १० व २१. एपिग्राफिआ इंडिका पु. १].

खजुवा—हा एक वेल आहे. यास लॅटिनमध्यें ग्लिसिनेसाजा, इंग्रजींत सॉयबीन, देशी भाषेंत खजुवा, भट, रम, गरिकुले, होरेक, वगैरे नांवें आहेत.

खजुवा वेल दरवर्षी नवीन लावला जातो. हा मूळचा चीन, कोचीनचीन, जपान व जावा या ठिकाणचा असून अलीकडे हिंदुस्थानांत याची लागवड करण्यास सुरुवात झाली आहे, आणि हा वेल येथील जमीनींत येऊं लागला आहे असें म्हणतात. याची लागवड विशेषतः बगीच्यांत करतात. हा वेल विशेषतः पूर्वबंगाल, असाम,खासिया पर्वत, मणिपूर संस्थान, नागा पर्वत व ब्रह्मदेश येथें आढळतो. मद्रास व मुंबई इलाखा येथें याची लागवड प्रयोगाच्या पलीकडे गेलेली नाहीं.

याच्या काळ्या व पांढऱ्या अशा मुख्य दोन जाती असून सपाट प्रदेशात याची लागवड खरीप पीक म्हणून करतात. जूनपासून सप्टेंबर महिन्यापर्यंत याची पेरणी होते व नोव्हेंबर पासून डिसेंबरपर्यंत पीक काढतात. पालाश गंधकिद हें खत या वेलानां चांगलें मानवतें. असाममध्यें आहू धान्याच्या पिकाबरोबरच याची पेरणी एप्रिल व मे महिन्यात करतात. आहूच्या झाडांचा या वेलानां आश्रय मिळतो. पीक डिसेंबर व जानेवारी महिन्यांत काढतात.

उ प यो ग.—या धान्याची डाळ करून अथवा पीठ करून खातात. ज्यांच्या शेंगा पक्व झाल्या आहेत असे वेल व दाण्याची पेंड गुरांनां चांगली मानवते. या झाडांचें बीं करडईच्या बियाप्रमाणें दिसण्यांत असून त्याचें तेलहि तळण्याकडे करडईच्या तेलाप्रमाणें उपयोगांत आणतात. चीन व जपानांत याची मोठया प्रमाणांत लागवड होते. [वॅट]

खजुहा, त ह सी ल.—संयुक्तप्रांत, फत्तेपूर जिल्ह्यांतील पश्चिम तहसील. क्षे. फ. ५०४ चौ. मै. व लो. सं. (१९०१) १,९९,२२२. यांत ३ शहरें व ३८५ गांवें आहेत. बिंडकी हें सर्वांत मोठें शहर आहे. गंगानदीपासून यमुनेपर्यंत ही तहसील पसरली असून हींतून रिंद नदी वाहाते. गंगेच्या कालव्याची एक शाखा तहसिलीच्या एक तृतीयांशाहून जास्त प्रदेशाला पाणी पुरविते.

श ह र.—खजुहा तहसिलीचें मुख्य ठिकाण. उ. अ. २६° ३' व पू. रे. ८०°. ३२' फत्तेपूर शहराच्या पश्चिमेस २१ मैलावर हें शहर आहे. लो. सं. (१९०१) २९४४. १६५९ त सुजावर विजय मिळविल्याचें स्मारक म्हणून औरंगजेबानें याला औरंगाबाद असें नांव ठेविलें होतें पण तें टिकलें नाहीं. त्या काळीं बांधिलेल्या येथील सराई व बारदरी या सुंदर आहेत. १८५६ च्या २० व्या कलमान्वयें येथील कारभार चालतो. येथला बराचसा जुना व्यापार बिंडकी या शहरामुळें बुडाला, तरी येथील पितळी भांडीं व गंजिफा अद्याप प्रसिद्ध आहेत.

खजूर—खारकेचीं अगर खजुरीचीं झाडें सेनेगॉलपासून सिंधू नदीपर्यंतच्या टापूंत होतात. हें झाड मूळचें उत्तर आफ्रिका अगर अरबस्तानांतलें असावें. तेथून तें ग्रीस व युफ्रेटिसच्या बाजूला म्हणजे मेसापोटेमिया व इजिप्तमध्यें गेलें असावें. अरब लोकांनीं तें मोराक्कोमध्यें नेलें व येथून तें स्पेनमध्यें गेलें. हल्लीं खजुरीची लागवड अमेरिकेचा कांहीं भाग, क्वीन्सलंड, आस्ट्रेलिया, ट्रिनिदाद इकडे होते. इराण व बलुचिस्तान वगैरे देशांतहि ही लागवड होते. मुलतान, मुझफरगड, वगैरे ठिकाणीं पंजाबांत खजुरीची लागवड बरीच आहे. सिंधमध्यें हल्लीं खजुरीची लागवड बरीच होऊं लागली आहे.

खजुरीला अतिशय उष्ण व कोरडी हवा लागते. यामुळें दुसऱ्या कोठें हीं झाडें झालीं तरी तेथें त्यांनां फळें येत नाहींत. त्याप्रमाणें यांस पाऊसहि फारस थोडा पाहिजे. अल्जीरिया, अरिझोना, अलेक्झांड्रिया वगैरे ठिकाणीं ७ ते ९ इंचपर्यंत पाऊस पडतो. त्या ठिकाणीं खजूर तितका चांगला होत नाहीं. परंतु बगदाद, केरो व अल्जीरियाचा कांहीं भाग या ठिकाणीं पाऊस ५ इंचापेक्षां कमी पडतो; तेथील खजूर, खारीक फार नामांकित आहेत. फूल येण्याच्या सुमारास म्हणजे मार्च ते मे महिन्यांत व फळ पिकण्याच्या म्हणजे आगष्ट ते नोव्हेंबर महिन्यांत पाऊस असल्यास फळ धरत नाहीं किंवा तें कुजूं लागतें. पाऊस थोडा पाहिजे असला तरी झाडें तेवढ्या पावसावर टिकाव धरीत नाहींत; यासाठीं त्यांना पाणी दिलें पाहिजे. ज्या वेळीं पानें कोंवळीं नसतात त्या वेळीं हवेचें उष्णमान फार खालीं म्हणजे २०° अंशांपर्यंत उतरलें तरी हरकत नसते. खजुरीला उष्णता किती सहन करवते हें अद्याप समजलें नाहीं. परंतु पृथ्वीवरील कोणत्याहि ठिकाणची अत्यंत प्रखर उष्णता व ऊन सहन करण्यास या झाडास कोणतीहि अडचण पडत नाहीं असें दिसतें. झाड लहान असतांना देखील त्याला ऊन पाहिजे.

जमिनीसंबंधानें खजुरीचें झाड फारसें चिकित्सेखोर नाहीं. परंतु रेताड अगर पुळणवट जमीन असेल तर झाड लवकर लागास येतें व फळहि लवकर पिकतें. वरच्या मातीमध्यें क्षाराचें प्रमाण शेंकडा ३-४ पर्यंत असलें तरी झाड बिघडत नाहीं; पण त्याला फळ मात्र येत नाहीं. फळ येण्यासाठीं झाडाच्या मुळ्या बऱ्याच खोल जाऊन तेथील क्षाराचें प्रमाण शेंकडा अर्धा इतकें उतरावयास पाहिजे.

खजुरीचीं झाडें बीं लावून किंवा त्यांच्या मुळ्यापासून जीं पिलें फुटतात तीं लावून करतात. खजुरीचीं नर व मादी

अशी भिन्न झाडें असतात. यामुळें बी लावलें असतां अर्धी नर झाडें निघण्याचा संभव असतो म्हणून चांगल्या मादी झाडांचीं पिल्लें लावणें हा उत्तम मार्ग होय. मादीच्या पन्नास झाडांस एक नर पुरे होतो. मादीझाडाला सोळा वर्षे पर्यंत बहुधा पिल्लें फुटत असतात. तीं लहान असतांना त्यांवर ओला काथ्या घालून पेटींत भरून तीं परगांवी पाठवितां येतात व त्या स्थितींत तीं तीन महिनेपर्यंत रहातात. झाडें २५ फुटांवर लावावीं. खड्डे तीन फूट हमचौरस घेऊन अर्धा खड्डा, ४ पौंड शेणखत व पेंड अशा खतानें भरावा. झाड लावतेवेळीं शेंड्यावर खत, माती वगैरे कांहीं पडणार नाहीं अशाबद्दल काळजी घ्यावी. झाडें लावल्यावर महिनाभर दररोज, दुसऱ्या महिन्यांत चार दिवसांनीं एकदां व नंतर महिन्यांतून एकदां असें पाणी द्यावें. फुलें येण्याच्या सुमारास (फेब्रुवारी व मार्च महिन्यात) पाणी मुळींच देऊं नये. फळ धरल्यापासून तें पिकेपर्यंत पाणी वेळनेवेळेवर द्यावें. झाडें मोठीं होईपर्यंत गहूं, लसूण, घांस वगैरे पिकें घ्यावींत. नंतर अंजीर, डाळिंबें, द्राक्ष वगैरे झाडें लावावींत. दोन अगर तीन वर्षांनीं शेणखत द्यावें. वाळलेलीं पानें वर्षास काढून टाकलीं पाहिजेत. खालचीं पिल्लें दोन वर्षांनीं एकदां काढावीं.

सिंध प्रांतांत झाडें चार किंवा पांच वर्षांचीं झालीं म्हणजे त्यांनां फूल येतें. परंतु झाडें ८–१० वर्षांचीं होईपर्यंत त्यांनां भरपूर पीक येत नाहीं. हीं झाडें १०० वर्षेपर्यंत चांगलें उत्पन्न देतात. नरफुलांचे तुरे असतात. तुऱ्यांची एक एक लहानशी फांदी घेऊन ती मादीफुलांच्या तुऱ्यांवर सैलसर बांधून ठेवतात. नरफुलांचे तुरे काढून ते कागदाच्या पुडींत घालून चांगले बंदोबस्तानें ठेविले तर वर्षभर टिकतात. त्यांचा उपयोग एखादें मादीझाड भलतेच वेळीं फुललें तर त्या झाडासाठीं होतो. घड वाढूं लागले म्हणजे त्यांतील कांहीं काढून टाकतात या योगानें बाकीचे चांगले पोसतात. एकेका झाडावर ८–१० घड येतात. एकेका घडापासून १० ते १४ पौंड पर्यंत खजूर येतो. दर झाडाचें सरासरी उत्पन्न १२० पौंड समजतात. घडांतील सर्व फळें एकदम पिकत नाहींत; यासाठीं जात उत्तम प्रकारची असली तर फळ जसजसें पिकेल तसतसें हातानें एक एक वेंचून काढतात. पण जात बेताचीच असेल तर अर्धी फळें पिकलीं म्हणजे सबंच घड उतरून त्यांतील वाईट फळें काढून टाकून तो सावलींत टांगून ठेवतात.

खझर—एक प्राचीन राष्ट्र. फिरदोसीच्या महाकाव्यांत इराणचे उत्तरेकडील शत्रू म्हणून या लोकांचा उल्लेख आहे. पण खझर हे युरोप आणि आशिया यांच्या सरहद्दीवर कमींत कमी ९०० वर्षे (इ. स. १९०–१२००) चमकत होते असें म्हणणें ऐतिहासिक सत्यास सोडून नाहीं. त्यांच्या उत्कर्षाचा काल इ. स. ६०० पासून ९५० पर्यंतचा होय. कास्पियन समुद्राचा किनारा व कॉकेशस पर्वताचीं शिखरें हें त्यांचें वसतिस्थान असून त्यांच्यावरून कास्पियन समुद्राला मुसुलमान भूगोलज्ञ बहर–अल–खझर (खझरांचा समुद्र) असें म्हणत. व्होल्गा नदीच्या मुखप्रदेशावरील इटिल सेमेंडर, खम्लिडजे, बेलेंडश्वर (आर्मेनिया) आणि डॉनवरील सर्केल हीं त्यांचीं शहरें चांगल्या भरभराटीचीं व्यापारी केंद्रें होतीं. कास्पियन व युक्रेनवर त्यांचें साम्राज्य होतें व पूर्व आणि पश्चिम खंडातील सर्व वाहतुक त्यांच्याकडे असे. इराण, बिझान्शिअम, आर्मेनिया, रशिया आणि बल्गेरिया देशांतील व्यापारी इटिल या ठिकाणीं जमत. खझर साम्राज्याची मर्यादा वरचेवर बदलत असे; तरी त्याची साधारण मर्यादा म्हणजे कॉकेशस, व्होल्गा व डॉन यांमधील प्रदेश होय. याशिवाय क्रिमिया प्रांत यांत मोडत असे. इराण आणि बिझान्शिअम हे या साम्राज्याचे बलाढ्य शत्रू होते. उग्रियन व स्लाव्ह यांनां खझर लोक सहज दडपून टाकीत. राज्याचा जास्तींत जास्त विस्तार म्हणजे नीपर ते मध्य व्होल्गावरील बोलगारी आणि कास्पियनच्या पूर्वकिनाऱ्यावर आन्ट्राबा येथपर्यंत झाला होता.

खटाव—मुंबई इलाख्यांतील सातारा जिल्ह्यांत याच नांवाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण. या तालुक्यांत भूषणगड व वर्धनगड हे किल्ले आहेत. मराठी रियासतींत खटाव हा एक परगणा होता. गावास तट व वेशी आहेत. जुनीं दोन तीन सरदार घराणीं येथें आहेत. गांवाबाहेर एक महादेवाचें हेमाडपंती देऊळ असून त्याच्या सभामंडपांत छतावर थोडीफार नकशी आहे. तेथील कटिंजनवरची नकशी फारच उत्तम असून ती परळी व माहुली येथील देवळासारखी आहे. जवळच नारायणाचें एक जुनें देऊळ आहे. दुर्गादेवीचा दुष्काळ पडला असतां व ब्राह्मणी राज्यांतील तत्कालीन देशमुख देशपांडे वगैरे दुष्काळाचा फायदा घेऊन स्वतंत्र होऊं लागले असतां मलिक उल् तुजार यानें या प्रांतांतून मुसुलमानी सत्ता पुन्हां प्रस्थापित करण्यासाठीं दौरा काढून खटावच्या कांहीं रामोशांनीं बंड केलें होतें तें मोडिलें असें ग्रांट डफ म्हणतो (पृ. २६). प्रसिद्ध कृष्णराव खटावकर हा येथील रहाणारा होता (कृष्णराव खटावकर पहा)[सातारा ग्याझे.].

खटौली—संयुक्तप्रांत मुझफरनगर जिल्ह्याच्या जानसथ तहशिलींतील एक शहर. नॉर्थ वेस्टर्न रेलवेच्या मीरत ते रूरकी रस्त्यावर हें स्टेशन आहे. लोकसंख्या (१९११) ४७५१. पण १० वर्षांखालीं ती ८६९५ होती. शहर प्राचीन असून त्यांत चार मोठीं जैन देवालयें व शहाजहानानें बांधलेली एक सराई आहे. १८७४ त बिहारांत दुष्काळ पडल्यावेळीं या स्टेशनहून जिल्ह्यांतील शिलकी धान्य बाहेर पाठविण्यांत येई. त्यामुळें हें प्रसिद्धीस आलें. शहरांतील रस्ते फरसबंदी आहेत. बाहेर धान्य व साखर पाठविण्याचा मोठा व्यापार चालतो. बहुतेक मोठे व्यापारी जैन आहेत.

खट्वांग—एक इक्ष्वाकुकुलोत्पन्न राजा. यास दिलीप असें नामांतर असून क्वचित् ऐलविल म्हटलें आहे. हा मोठा

यज्ञ करणारा होता. एकदां देवांनीं यास युद्धांत आपलें सहाय्य करावें म्हणून स्वर्गी नेलें होतें. त्याप्रमाणें त्यानें सहाय्य केल्यामुळें देवांत जय प्राप्त झाला असतां ते यास वर माग असें म्हणूं लागले. यानें आधी माझें आयुष्य किती आहे ते सांगा म्हणजे वर मागेन म्हणतांच त्यांनीं मुहूर्तमात्र आहे असें सांगितलें. मग हा कांहींच न मागतां शीघ्रगामी विमानांत बसून त्वरेनें अयोध्येस आला आणि आपल्या दीर्घबाहु नांवाच्या पुत्रास राज्यावर स्थापून विष्णुलोकाला गेला. [भारत द्रोण. अ. ६१; शांति. २९. वन ९]. शंकराच्या एका गदेसारख्या आयुधाला खट्वांग असें नांव आहे.

खंड—महाद्वीपाच्या लहान भागास जशी वर्षे म्हणून संज्ञा आहे तशी वर्षातील लहान भागांस खंड संज्ञा आहे. आपण रहातो या भारतवर्षांत कुशावर्त, इलावर्त, ब्रह्मावर्त, मलय, केतु, भद्रसेन, इंद्रस्पृक्, विदर्भ आणि कीकट असे नऊ खंड आहेत. हींच नांवें मत्स्यपुराणांत इंद्रद्वीप, कसेर, ताम्रपर्ण, गभस्तिमान्, नाग, सौम्य, गंधर्व, वारुण आणि भरत अशीं आहेत. [मत्स्य. अ. ११३ श्लोक ९–१०; देवी भाग. ११ स्कं. अ. २१].

खडक, ओ ळ ख.—खडक ओळखण्याला त्याच्या गुणधर्मांची माहिती असली पाहिजे. खडकांचे गुणधर्म तीन तऱ्हांनीं ठरवितात त्या तीन तऱ्हा अशा आहेतः— (१) खडकांचें ढोबळ परीक्षण. यांत सूक्ष्मदर्शक यंत्राचा वगैरे उपयोग न करतां वरवर दिसणाऱ्या व थोड्या सामुग्रीनें शोधून काढतां येणाऱ्या गुणधर्मांचें वर्णन असतें. (२) प्रयोग शाळेतील परीक्षण. (३) सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें परीक्षण.

ढोबळ परीक्षणः—खडक शोधण्याकरितां बाहेर हिंडावयास जातांना बरोबर मोठा हातोडा, छत्री, लोहचुंबक महत्कारी कांच (मॅग्निफाइंग ग्लास), खडकांचे तुकडे गोळा करून आणण्याकरितां पिशवी, थोडें उदहराम्ल (हैड्रोक्लोरिक ॲसिड) इत्यादि जिन्नस बरोबर ठेवले पाहिजेत. प्रत्यक्ष जागेवर दिसणाऱ्या गोष्टींची नोंद येथेंच एका वहींत करून ठेवण्याची पद्धत आहे. खडक मूळ स्थितींत दिसल्यास ओळखावयास सोपें जातें परंतु खडकावर त्याच्या पिष्टाचा थर असल्यास किंवा खडकांत फेर होऊन खरपुडी सांठल्यास ओळखण्यास जड पडतें. अशा ठिकाणीं कित्येक वेळां वरचा भाग काढून खालच्या खडकाचा तुकडा तपासण्यास घ्यावा लागतो. खडक पाहून त्याच्या ढोबळ गुणधर्मांवरून तो कोणत्या प्रकारचा आहे हें कसें ओळखावें तें पुढें दिलें आहे.

(अ) खडकाचा नवीन तुकडा पडल्यावर त्या बाजूस बारीक एकमेकाला चिकटून कण असले, त्यावर कोणत्याहि प्रकारची चकाकी नसली व विशिष्ट प्रकारची रचना नसली तर खालीं दिल्याप्रमाणें गुणधर्म पाहून खडक कोणता तो ठरवावा.

(१) काठिण्य (हार्डनेस) ०.५ ते १ आहे; मऊ असून नखानें किंवा चाकूनें सहज खरडला जातो; मातीसारखा वास येतो; अम्ल (ॲसिडनें) टाकल्यानें कोणताहि वायु निघत नाहीं; रंग राखी, पांढुरका, तांबूस, पिंवळट असेल तर एखादा मातीचा दगड, शेल, विस्तवानें न बदलणारी माती किंवा ठिसूळ झालेला फेलस्पार असलेला खडक असण्याचा संभव असतो. शेल किंवा स्लेट असल्यास खडक थोडा कठिण असतो.

(२) काठिण्य १.५ ते २, विशिष्ट गुरुत्व २.२ ते २.४: रंग पांढरा, पिंवळट किंवा तांबूस; थर अथवा भेगांत सांपडतो; ॲसिड घातल्यास कोणताहि वायु निघत नाहीं तर तो बहुतकरून ' जिप्सम ' असेल.

(३) हातानें मोडला जातो; रंग पांढुरका किंवा पिंवळट असून ॲसिड घातल्यास कर्बद्विप्राणिद (कार्बन डाय–ऑक्साइड) वायु निघत असेल तर तो चुनखडीच्या दगडापैकीं असेल.

(४) काठिण्य ३ ते ४ आहे. विशिष्टगुरुत्व २.५ ते २.७, रंग हिरवट व तांबडा याचें मिश्रण, पुडीचा रंग पांढरा, हाताला साबणासारखा गुळगुळीत लागतो; ॲसिडनें वायु निघत नाहीं तर सर्पेंटाइन असेल.

(५) काठिण्य ३. विशिष्टगुरुत्व २.६ ते २.८, रंग पांढरवट, निळसर, पिवळट, काळा, भुकटीचा रंग पांढरा, ॲसिडनें कर्बद्विप्राणिद(कार्बन डाय–ऑक्साइड) वायु निघतो तर तो चुन्याचा खडक असेल.

(६) काठिण्य ३.५; ते ४.५; विशिष्टगुरुत्व २.६ ते २.८;. रंग पांढरा पिंवळट; ॲसिड खडकावर घातल्या फारसा परिणाम होत नाहीं परंतु पूड करून त्यावर घातल्यास थोडथोडा कर्बद्विप्राणिद वायु निघूं लागेल, तर तो डॉलोमाइट असेल.

(७) काठिण्य ३ ते ४; विशिष्टगुरुत्व ३ ते ३.९; रंग काळसर तपकिरी, काळा; पुडीचा रंग पिंवळा किंवा तांबडा; ॲसिडमध्यें थोड्या प्रमाणांत विरघळून ॲसिडला पिवळट रंग येतो. खडकांत किंवा थरांत सांपडतो तें एखाद्या लोहाचें प्राणिद (ऑक्साइड) असेल.

(८) रंग पांढुरका, पिंवळट, निळसर; हातोड्यानें नाद निघतो व चकत्या निघतात; ॲसिडनें वायू निघत नाहीं तर बहुतेक तो फोनोलाइट किंवा फेल्साइट असेल.

(९) विशिष्ट गुरुत्व २.९ ते ३.२; रंग काळा किंवा काळसर हिरवा, भुकटी तपकिरी असल्यास बेसॉल्ट किंवा ॲम्फिबोलाइट असेल.

(१०) काठिण्य ७; विशिष्टगुरुत्व २.५ ते २.९; रंग पांढरा, तांबूस, पिंवळट. तपकिरी, चाकू ओढल्यास

चाकूची लोखंडी रंगाची रेघ उठते तो भाग, चकमक वगैरे असण्याचा संभव आहे.

(आ) खडकाचा फोडलेला भाग काचेसारखा असल्यास कांचमणी, चकमक सैंधव वगैरेसारखीं खनिज द्रव्यें किंवा आबसिडियन व पिच्स्टोन सारखे खडक असतील.

(इ) खडकाच्या तुकड्यांत खनिजद्रव्यें स्फटिक स्थितींत आहेत, अशा वेळीं स्फटिक स्पष्ट दिसत असल्यास खडक ओळखण्याचा त्रास पडत नाहीं. परंतु स्फटिक स्पष्ट दिसत नसेल तर चाकूनें खडक खरवडला जातो का पहावा. खरवडला जाऊन ॲसिडनें कार्बन डाय ऑक्साइड निघाल्यास तो चुन्याचा खडक असणार. ॲसिडचा परिणाम फक्त पूड केल्यावर झाल्यास डॉलोमाइट पण ॲसिडचा परिणाम न झाल्यास जिप्स्म समजावा. चाकूनें खरवडला जात नसल्यास त्याच्या व त्याच्यांतील खनिज द्रव्यांच्या रंगावरून खडक ठरवावा. एकच खनिज पदार्थ असून हिरवट रंग आहे तर ॲम्फिबोलाइट असेल. पांढरा व हिरवट असे दोन खनिज पदार्थ नसल्यास डायओराइट असेल.

(ई) खडकांत पल्लवी रचना असल्यास त्याला पल्लवीभूत खडक (शिस्ट फॉलिएटेड) असें म्हणतात व खडकांत जें खनिजद्रव्य प्रामुख्यानें असेल त्यावरून खडकाचें विशिष्ट नांव ठरवितात. या वर्गांत सर्व प्रकारचे शिस्ट किंवा ज्यांनां फॉलिएटेड खडक म्हणतात ते येतात.

(उ) खडक निरनिराळया प्रकारच्या तुकड्यांच्या एकीकरणानें झाला असल्यास ते तुकडे तपासून खडक कोणत्या प्रकारचा आहे हें शोधून काढणें झाल्यास तुकड्यांचा आकार व त्याची आकृति व त्याचप्रमाणें ज्या लुकणानें हे तुकडे चिटकून राहिले असतील तें लुकण याची तपासणी केली पाहिजे. जलजन्य खडक तुकड्याचे किंवा कणाचे झालेले असतात व त्यांचें वर्गीकरण तुकड्यांच्या आकृतीच्या आकारमानाप्रमाणें केलेलें असतें.

(२) खडकतपासणीच्या प्रयोग शाळेंतील पद्धतिः—प्रयोग शाळेबाहेर खडक तपासण्याकरिता काय करावें हें वर सांगितलें आहे. आता प्रयोगशाळेंतील उपकरणाच्या मदतीनें खडक ओळखण्याचें काम कसें करावयाचें हें खालीं थोडक्यात दिलें आहे.

(अ) विशिष्टगुरुत्वः—खडकाचें विशिष्ट गुरुत्व माहिती असलेल्या माणसाला खडकाचा तुकडा हातांत घेऊन अंदाजानें सांगता येतें. परंतु नक्की माहितीकरिता व विशिष्टगुरुत्वाकरितां मुद्दाम केलेल्या ताजव्यावर वजन करून काढलें पाहिजे किंवा पदार्थविज्ञानशास्त्रांत दिलेला कोणत्यातरी एखाद्या पद्धतीनें काढलें पाहिजे.

(आ) बाह्यपृथक्करणः-रासायनिक पृथक्करण न करतां बाह्य पृथक्करणावरून पुष्कळ खडक व त्यांतील खनिजद्रव्यें ओळखतां येतात. बाह्यपृथक्करणाकरितां खडकाचा तुकडा घेऊन हातोड्यानें त्यांतील कणांचा भुगा न करितां ते सुटे करावे; नंतर एकासारखे एक दिसणारे कण इतर कणांपासून निराळे काढून ते महत्कारिकाच्या खालीं व लोहचुंबकानें तपासावे; त्याचप्रमाणें निरनिराळ्या विशिष्टगुरुत्वाचे द्रवपदार्थ घेऊन त्यांच्यांत वरील कण टाकावे. हलक्या द्रव्यावर टाकल्यास ते तळीं जाऊन बसतील व जड द्रव्यावर टाकल्यास त्यावर तरंगतील. परंतु त्याच्या इतक्याच विशिष्टगुरुत्वाच्या द्रवांत टाकल्यास ज्याठिकाणीं सोडावे त्याच ठिकाणीं राहातील. आपल्याजवळ निरनिराळ्या विशिष्टगुरुत्वाचीं बरींच द्रव्यें तयार ठेवल्यास कणांचें विशिष्ट गुरुत्व तेव्हाच काढतां येतें. कित्येक वेळां खडकाची पूड करून त्यावर पाण्याचा ओघ सुरू ठेवल्यास जड व हलकीं द्रव्यें वेगळीं होतात.

(इ) रासायनिक पृथक्करणः—कोणत्याहि खडकाचें रासायनिक पृथक्करण करणें भूस्तरशास्त्रज्ञाचे काम नसल्यामुळें खडक रसायन शास्त्रज्ञाकडे पाठवून त्याचें पृथक्करण करून आणण्याची पद्धत आहे. परंतु अगदी सोप्या तऱ्हेचे रासायनिक प्रयोग भूस्तरशास्त्रज्ञ करितात. उद्‌हराम्ल (हायड्रोक्लोरिक ॲसिड), दिव्याची जोत, कोळशावर तापविणें, काचेच्या नळींत तापविणें वगैरेंचा परिणाम खडकावर किंवा त्यांतील द्रव्यावर काय होतो हें नोंदून ठेवणें अत्यंत आवश्य आहे.

(ई) सूक्ष्मदर्शकाच्या सहाय्यानें परीक्षणः—सूक्ष्मदर्शकाच्या सहाय्यानें खडक तपासण्याची पद्धत जास्त जास्त प्रचारांत येऊं लागली आहे, म्हणून त्याबद्दलची थोडी माहिती येथें देणें अवश्य आहे. प्रथमतः सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं घालून तपासतां येईल इतका पातळ खडकाचा तुकडा करावा लागतो. लेथच्या सहाय्यानें किंवा पुष्कळ वेळां नुसत्या हातोड्यानें खडकाचा पैशायेवढा जितका पातळ निघेल तितका तुकडा पाडावा व तो लाकडी मूठ करून त्यावर एका टोंकाला चिकटवावा. तुकडा लाकडास चिटकण्याकरितां मेण व राळ एकेठिकाणीं ऊन करून त्याचें लुकण तयार करावें व त्यामध्ये तो बसवावा. नऊ इंच चौरस व अर्धा इंच जाडीच्या लोखंडाच्या तकटावर जाड इमरीची किंवा कुरुंदाची पूड पसरावी आणि त्यावर पाणी घालून लांकडावर चिकटविलेल्या खडकाच्या तुकड्याची एक बाजू घासावी व जितक्या समपातळींत ती आणता येईल तितकी आणावी. एक बाजू वर सांगितल्याप्रमाणें तयार झाली म्हणजे लुकण दिव्यावर ऊन करून तुकडा सोडवावा व तो उलटा करून चिकटवावा आणि एमरीवर घांसावा. याप्रमाणें जाड एमरीवरचें घासणें झालें म्हणजे तुकड्याच्या दोन्ही बाजू अगदीं गुळगुळींत होण्याकरितां तुकडा काचेच्या तुकड्यावर ' कानडा बालसम ' नें चिकटवून मऊ एमरीवर घासावा व तो पारदर्शक झाला म्हणजे सुटे झालेले कण धुवून काढावे व धारेच्या मऊ दगडावर घांसून साफ करावा. नंतर सूक्ष्मदर्शक यंत्रानें तपासण्याकरितां मुद्दाम केलेल्या काचेवर हा तुकडा कानडा बालसममध्यें चिकटवावा व त्यावर काचेचा पातळ तुकडा बसवावा. अशा तऱ्हेनें तयार केलेला

खडकाचा पातळ तुकडा सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं तपासतां येतो. वरील सांगितलेली कृति फार काळजीपूर्वक करावी लागते. नाहींतर खडकाचा पातळ झालेला तुकडा तेव्हांच मोडण्याचा संभव असतो.

सूक्ष्मदर्शक यंत्रः—भूस्तरशास्त्राचा अभ्यास करताना खडक किंवा खनिज पदार्थ तपासण्याकरितां जें सूक्ष्मदर्शक यंत्र उपयोगांत आणितात त्यास पेट्रॉलॉजिकल अथवा प्रस्तर-निर्णायक सूक्ष्मदर्शक यंत्र असें म्हणतात. या यंत्रांत दोन निकोलचे समपार्श्व (प्रिझम) असतात. त्यांत पदार्थांच्या खालच्याला, ज्यांतून आलेला प्रकाश पदार्थांतून घेतात त्याला, ध्रुवकारक (पोलरायझर) व वरच्याला पृथक्कारक (ॲनलायझर) म्हणतात. याशिवाय क्वार्टस वेज जिप्सम व अभ्रक यांचे पातळ तुकडे वगैरे साहित्य या सूक्ष्मदर्शक यंत्रांत अवश्य असतें.

परावर्तित प्रकाशः—प्रस्तरनिर्णायक सूक्ष्मयंत्रानें वर सांगितल्याप्रमाणें तयार केलेले खडकाचे पातळ तुकडे तपासतात. प्रथमतः परावर्तित प्रकाशांत हा तुकडा तपासल्यास पुष्कळ खनिज पदार्थ ओळखता येतात. पदार्थांतून येणाऱ्या उजेडापेक्षां या प्रकाशानें अपारदर्शक खनिज पदार्थांच्या रंगातील सूक्ष्म छटा व पदार्थांवरील रेषा वगैरे स्पष्ट दिसतात.

पारप्रकाशः—अपारदर्शक खनिज पदार्थ ओळखण्यास परावर्तित प्रकाश उपयोगी पडतो. परंतु प्रस्तरनिर्णायक सूक्ष्मदर्शक यंत्रांत विशेष उपयोग पारभूत प्रकाशाचाच होतो. कारण बहुतेक पारदर्शक खनिज पदार्थच खडकातून पुष्कळ असतात. पारभूत प्रकाशांत खडक तपासीत असतांना निरनिराळ्या कणाचा वक्रीभवनांक (रिफ्रॅक्टिव्ह इंडेक्स) काढण्याची पद्धत आहे ती अशीः—ज्या पदार्थाचा वक्रीभवनांक काढावयाचा असेल तो पदार्थ ज्याचा वक्रीभवनांक ठाऊक आहे अशा पदार्थाला लागून असतांना काढितात. सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं हे दोन्ही पदार्थ असतांना यंत्राची नळी थोडथोडी वर उचलावी म्हणजे ज्या पदार्थांना वक्रीभवनांक जास्त असतो त्या बाजूस त्या दोन पदार्थांतील रेषा सरकते आहे असें दिसतें. याप्रमाणें तो पदार्थ कोणत्याहि खनिज पदार्थाचा वक्रीभवनांक दोन तीन माहीत असलेल्या पदार्थांबरोबर तपासल्यास ठरवितां येतो.

ध्रुवीभूत (पोलराइझ्ड) प्रकाश—ध्रुवीभूत प्रकाशात पदार्थ तपासण्याकरतां प्रस्तरनिर्णायक सूक्ष्मदर्शक यंत्रांत ध्रुवकारक व पृथक्कारक असे दोन समपार्श्व (प्रिझम) असतात. ध्रुवकारकामधून आलेला प्रकाश तपासण्याच्या पदार्थांतून पाठवून नंतर पृथक्कारकामधून प्रकाश न घेतां पहिल्यांदा पदार्थ तपासावा व नंतर पृथक्कारकामधून प्रकाश घेऊन तपासावा. ध्रुवकारक यंत्राच्या खालच्या बाजूस बसविलेला असतो व त्याची जरूर नसल्यास तो एके बाजूस सारतां येतो. पृथक्कारक यंत्राच्या नळींत किंवा नळीवर बसविला असतो, परंतु हा सुद्धां नको असेल तेव्हां एका बाजूस काढितां येतो. ध्रुवकारकामधून व तपासण्याच्या पदार्थांतून आलेला प्रकाश पृथक्कारकामधून न घेता पहात असतांना पोलरायझर (ध्रुवकारक) फिरवावा किंवा तपासण्याचा पदार्थ ज्यावर ठेविला असतो त्या सूक्ष्मदर्शक यंत्राची बैठक फिरवावी. असें करीत असतांना तपासण्याच्या पदार्थाचा रंग पालटत राहिला तर याला प्लिओक्रोइक असें म्हणतात. ध्रुवीभूत प्रकाश पदार्थांतून आल्यावर पृथक्कारकामधून घेऊन तपासण्याचा प्रकार खालीलप्रमाणें आहेः— ध्रुवकारक (पोलरायझर) व पृथक्कारक (ॲनलायझर) समांतर किंवा एकाच दिशेनें न ठेवतां एकमेकास आडवे ठेवावे. ध्रुवकारक व पृथक्कारक आडवे करून ठेवल्यास त्यांतून प्रकाश येत नाहीं. आतां खडकांतील जो खनिज पदार्थ तपासावयाचा असेल तो मध्यें ठेवावा आणि अशा स्थितींत त्यातून प्रकाश न आल्यास तो खनिज पदार्थ आयसोट्रॉपिक आहे असें म्हणतात. क्रास्ड निकोलच्या मध्यें खनिज पदार्थ ठेवला असतां त्यांतून प्रकाश आल्यास त्याला ॲनिसोट्रॉपिक म्हणतात. ॲनिसोट्रॉपिक पदार्थ असल्यास त्याची पुढे तपासणी करावी. वरचा किंवा खालचा परंतु बहुतेक वेळां वरचा सोईचा असल्यामुळें तोच निकोल म्हणजे पृथक्कारक सावकाश फिरवावा व प्रकाश येण्याचें बंद झाल्याबरोबर थांबवावें. असें करताना कोणत्या कोनातून पृथक्कारक फिरविला तें नोंदावें व अशा तऱ्हेनें दहा पंधरा वेळा फिरविल्यावर त्या कोनांची सरासरी काढावी. या सरासरी काढून आलेल्या कोनास त्या पदार्थाचा अदृश्यीभवनकोन किंवा पिधानकोन (ॲंगल ऑफ एक्स्टिंक्शन) असें म्हणतात. निरनिराळ्या खनिज पदार्थांचे पिधानकोन निराळे असल्यानें ते पदार्थ ओळखण्यास पिधानकोन काढल्यानें मदत होते. सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्यानें परावर्तित प्रकाशांत, पारभूत प्रकाशांत व ध्रुवीभूत प्रकाशांत खडकांचे पातळ केलेले तुकडे तपासून त्यांच्यांतील खनिज पदार्थांचें वक्रीभवनांक काढणें, ते प्लिओक्रोइक आहेत किंवा नाहींत, आयसोट्रॉपिक आहेत किंवा ॲनिसोट्रॉपिक आहेत व ॲनिसोट्रॉपिक असल्यास त्यांचा पिधानकोन कोणता आहे वगैरें टिपण केल्यास नेहमींचे बहुतेक खनिज पदार्थ ओळखता येतील. याखेरीज आणखी विशेष विस्तृत तऱ्हेनें प्रस्तरनिर्णायक सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्यानें तपासणी करितात. परंतु ती सर्व देणें या ठिकाणीं शक्य नाहीं. त्याकरितां त्या विषयावर स्वतंत्र लिहिलेले ग्रंथ पहावे.

खडकांची ओळख होण्यासाठीं अवश्य असणाऱ्या परीक्षणाच्या तीन प्रकारांचें (ढोबळ परीक्षण, प्रयोगशालीय परीक्षण व सूक्ष्मदर्शकीय परीक्षण) वर्णन येथवर झाल्यानंतर आतां खडकांच्या वर्गीकरणाकडे वळूं.

व र्गी क र ण.— खडकांचें वर्गीकरण पुष्कळ तऱ्हांनीं करतां येईल; त्यांच्यांतील खनिज द्रव्यावरून, त्यांच्या

आकारावरून, ते ज्या पद्धतीनें तयार झाले असतील तिजवरून किंवा ते ज्या काळांत झाले असतील त्यावरून यापैकीं कोणत्याहि पद्धतीनें वर्गीकरण करणें शक्य आहे परंतु सर्वसम्मत खालील तीन मुख्य वर्ग केले जातात.

(अ) जलजन्य खडकः—पहिल्या वर्गात पाणी, हवा, वनस्पती किंवा प्राणी याच्या योगानें तयार होऊन सांठलेले खडक येतात. हे खानिज पदार्थांचे असोत वा सेंद्रिय असोत, जमीनीवर सांठलेले असोत, पाण्यांत साठलेले असोत, वनस्पतींच्या किंवा प्राण्याच्या वाढीनें झालेले असोत, ते सर्व या वर्गांत येतात. हे वाळू, माती वगैरे गाळाच्या योगानें तयार झालेले असतात व त्यांचे थर असतात. या वर्गांतील खडकानां जलजन्य, गाळाचे किंवा थराचे खडक असें म्हणतात.

(आ) अग्निजन्य खडकः—हे खडक पृथ्वीच्या उदरांतील खडकाचा रस वर येऊन झालेले असतात. हा रस आतल्या आत थंड होतो किंवा बाहेर ज्वालामुखी वगैरेच्या मार्गानें जमीनीवर पसरून थंड होतो. या खडकात खनिज पदार्थांचे स्फटिक तयार होतात. या वर्गांतील खडकाना अग्निजन्य खडक असें म्हणतात. यांचे बहुतकरून थर नसतात.

(इ) रूपांतरित खडकः—वरील दोन वर्गांखेरीज आणखी एक तिसरा वर्ग आहे. त्यांतील खडक कसे झाले असतील हें नेहमींच सांगता येत नाहीं. त्याच्यांत अग्निजन्य खडकांप्रमाणें स्फटिक असतात व जलजन्य खडकाप्रमाणें त्यांचे थरहि असतात. हे मूळ अग्निजन्य किंवा जलजन्य असलेल्या खडकावर पाण्याचा, दाबाचा किंवा उष्णतेचा परिणाम होऊन तयार झालेले असतात. या खडकांची किंवा त्यांतील खनिज पदार्थांची पल्लवी (फॉलिएटेड) रचना असते. या वर्गांतील खडकाना रूपांतरित (मेटामॉर्फिक) खडक म्हणतात.

(अ) जलजन्य खडक.—या वर्गापैकी कांहीं खडक वाऱ्याच्या वाहण्यानें समुद्रकिनारी किंवा वालुकामय प्रदेशात होतात, कांहीं वाहत्या पाण्याच्या योगानें नद्यांच्या पात्रातून किंवा समुद्रकांठीं होतात, तर कांहीं मृत वनस्पती व प्राणी यांच्या अवयवाचे झालेले असतात. याशिवाय ज्वालामुखी पर्वताच्या तोंडांतून फेंकून दिले गेलेले कण एके ठिकाणीं जमून झालेले खडकहि याच वर्गात घालतात. खडक या संज्ञेमध्यें फक्त कठिण व घट्ट झालेले दगड येतात असें नव्हे तर मोकळे कण, गाळ, रेती, वगैरे सर्वांचा खडक या संज्ञेत अंतर्भाव होतो.

वाळूचे खडकः—(ग्रॅव्हल ऑर सँड रॉक्स) हवा, पाऊस, नद्या वगैरेंचे जुन्या खडकावर आघात होऊन त्यांचे तुकडे झाल्यामुळें होतात. त्यांच्यांत जुन्या खडकांतील खनिज पदार्थ असतात परंतु अमुकच प्रकारचे खनिज पदार्थ असतील असें म्हणता येणार नाहीं. बहुधा क्वार्ट्सचे प्रमाण जास्त असतें. कारण बाकीचे खनिज पदार्थ अगदीं बारीक भुगा होऊन धुवून जातात परंतु क्वार्ट्स तसा जात नाहीं (क्वार्ट्सशिवाय फेल्स्पार, अभ्रक, हॉर्नब्लेंड वगैरेंचे तुकडेहि सांपडतात). साधारणतः सारख्या आकाराचे व एकाच विशिष्टगुरुत्वाचे खडे एके ठिकाणीं येऊन त्यांचे थर होतात. थरांतून कित्येक वेळां वनस्पती व प्राणी यांचे अवशेष पुरले जाऊन त्यांच्या खुणा शिल्लक राहतात. पुष्कळ वेळां खड्यांमध्यें व थरांमध्यें क्वार्ट्स् लाइम किंवा लोहाचें ऑक्साइड यांचें लुकण सांठून ते एकजीव होतात. खड्यांचा किंवा थरांचा एकजीव न झालेल्या खडकांत खालील प्रकारचे खडक येतात.

डोंगरांतील खडकांचा भुगाः—मूळ खडकांचा चुरा होऊन वाऱ्यानें व पाण्यानें वाहून पायथ्याशीं सांठतो त्यात बहुतेक अणकोचीदार व सुटे निरनिराळ्या आकाराचे तुकडे असतात.

माती अथवा जमीनः—खडकांचा भुगा होऊन त्याच्यापासून माती तयार होते. मूळ खनिज पदार्थांतील मूळ द्रव्यें मातींत रूपांतरित स्वरूपांत असतात. खडक व माती यांमध्यें एक अधोमृत्तिका अथवा अधोभूमीचा थर (सबसॉइल) असतो. खडकांचा अर्धवट भुगा होऊन अधोमृत्तिका होते व तिजपासूनच पुढें माती तयार होते. जमीनीवर उगवणाऱ्या वनस्पतींच्या कुजलेल्या सेंद्रिय पदार्थांचा कांहीं अंश मातींत असतो व त्यांतीलच थोडा भाग अधोमृत्तिकेंत सापडतो. जसजशी माती वाहून जाते तसतशी अधोमृत्तिकेची माती होते. ज्या मूळ खडकापासून माती होते त्याच खडकावर ती सांपडते असें नाहीं. कित्येक वेळां ती वहात जाऊन दुसऱ्याच खडकावर आढळते.

वाळूः—वाळूचे कण लहान तर असतातच, परंतु ते कित्येक वेळा इतके बारीक असतात कीं, ते स्पष्ट दिसण्यास सूक्ष्मदर्शक यंत्राचें साहाय्य लागतें. वाऱ्याच्या योगानें खडकांचे बारीक कण एकेठिकाणीं साचून त्यांच्या लहान लहान टेंकड्या होतात व त्या वाऱ्यानेंच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेल्या जातात. यांमध्ये बारीक व मोठाल्या कणाचे कित्येक वेळां थर असतात. नदीच्या व समुद्राच्या पाण्याच्या तडाक्यानें वाळू मोठ्या प्रमाणांत तयार होते. समुद्रांत तयार झालेली वाळू त्यांत सांपडणाऱ्या शिंपांच्या कणांवरून ओळखतां येते. बारीक कण पुष्कळ वेळा घर्षणांत न सांपडता पाण्यांत तरंगत राहतात व त्यामुळें त्यांचीं टोंकें घांसली न जातां अणकोचीदार राहतात. मोठाल्या कणांचीं टोंकें मात्र घांसून कणांना वाटोळेपणा येतो. वाळूचे जाड खरबरीत कण असल्यास त्यास रेंव (ग्रॅव्हल) म्हणावे. परंतु सुपारीपेक्षां मोठे खडे असल्यास त्यांनां गोटे (शिंगल) म्हणावे. वाळूचे जसे वर सांगितलेले प्रकार आहेत तसेच वाळूच्या कणांचा एकजीव होऊन झालेल्या कठिण खडकांचे प्रकार आहेत. मोठाले गोटे एकेठिकाणीं सांठल्यावर त्यांच्यांत एखाद्या तऱ्हेचें लुकण बसून कठिण खडक तयार होतो. गोटे साधारणतः

वाटोळे झालेले असतात. बरेचसे गोटे क्वार्ट्झचे असतात. कित्येक गोटे इतर खनिज द्रव्यें किंवा मूळ खडकाचे असतात. अशा तऱ्हेनें तयार झालेल्या खडकांनां गोट्यांचे खडक (कॉंग्लोमरेट) म्हणतात. गोटे सर्व बाजूंनीं झिजून वाटोळे झालेले नसले व त्यांचीं टोंकें कोंचदार असलीं म्हणजे त्या खडकांनां (ब्रेकिआ) म्हणावें. बारीक कणांचा जो खडक होतो त्याला सिकताश्म किंवा वाळूचा खडक म्हणतात. वाळूच्या खडकांत बहुतेक क्वार्टझ्चेच कण असतात तरी गोट्याच्या खडकाप्रमाणें यातहि इतर खनिज द्रव्यें असतात; परंतु हीं द्रव्यें अगदीं थोडक्या प्रमाणांत असतात. वाळूच्या खडकाना पुष्कळ तऱ्हेचे रंग असतात. तांबडा, पिवळा वगैरे रंग लोहाच्या प्राणिदा-(आक्साइड)मुळें वाळूच्या खडकांना येतात. खडकांत एखादें विशिष्ट खनिज द्रव्य किंवा त्याचे लुकण असल्यास त्याचें नांव खडकाच्या नांवास जोडतात. उदाहरणार्थः—एखाद्या वाळूच्या खडकांत लोहाचें प्राणिद (ऑक्साइड) असल्यास त्याला लोही वाळूचा खडक (फेरुगिनस सॅंडस्टोन) असें म्हणतात व त्यांत अभ्रक असल्यास अभ्रकी वाळूचा खडक (मायकेशिअस सॅंडस्टोन) असें म्हणतात. विंध्याद्रीवर व दक्षिणेंत बेळगांव, विजापूर जिल्ह्यांत व मद्रास इलाख्यांतील कडाप्पा जिल्ह्यांत वाळूचे खडक मोठ्या प्रमाणांत सांपडतात. इमारती बांधण्यास हे फार चांगले व भक्कम असतात. यामुळें उत्तरहिंदुस्थानांतील पुष्कळ इमारती या खडकाच्या दगडांच्या बांधल्या आहेत. वाळूच्या खडकाचे फळयासारखे तुकडे काढून त्याचा जमीनीवर बसविण्याकरितां उपयोग करितात. त्याचप्रमाणें त्यांचीं जातीं वगैरे जिन्नस करितात. विजापूर जिल्ह्यांतील बदामी गांवची प्रसिद्ध लेणीं वाळूच्या खडकांत आहेत. गोकाकचा धबधबा वाळूच्याच खडकावर आहे. वाळूच्या खडकापासून होणाऱ्या जमीनीस रेताड किंवा वाळूची जमीन म्हणतात.

मातीचे खडक.—निरनिराळ्या खडकांचा पिठासारखा भुगा होऊन त्यापासून तयार झालेल्या चिखल, गाळ वगैरेंच्या खडकांस मातीचे खडक म्हणतात. त्यांच्यांत पुष्कळ तऱ्हेच्या खनिज द्रव्यांची भेसळ असते व त्याचे प्रकारहि पुष्कळ आहेत.

चिकण मातीः—हा एक प्रकारचा चिखलच आहे. याच्यावर वाफ सोडली असता त्याला मातीचा वास येतो. त्याच्यांत चिकणाई असते व पाण्यांत ओला केल्यास चिकट गोळा होतो.

चिनी माती.—फेल्स्पार नांवाचा जो खनिज पदार्थ आहे त्याच्यावर पाण्याची व कार्बन डाय-आक्साइडची क्रिया होऊन ॲल्युमिनियम सिलिकेट निराळें निघतें तें पांढऱ्या रंगाचें व भुसभुशीत असतें. चिनीमातीचीं भांडीं करण्याकडे याचा विशेष उपयोग होतो. हिंदुस्थानांत ज्या ठिकाणीं ग्रनाइट खडक आहेत त्या ठिकाणीं अशा तऱ्हेची माती कांहीं ठिकाणीं आढळते. हीच माती अगदीं स्वच्छ पांढरी व लोहविरहित असल्यास त्याला पाइपक्ले (चिलमीची माती) म्हणतात. चिनीमातीचा उपयोग उत्तम पांढरीं मातीचीं भांडीं करण्याकडे होतो. ही कांहीं ठिकाणीं फेल्स्पारपासूनच तयार झालेली असते. तींत थोडासाच लोहाचा अंश असतो परंतु चुना किंवा अल्कलीचा मुळींच अंश नसतो. या मातीला फायरक्ले (अग्निमृत्तिका) म्हणतात. गोंडवनांत कोळशाच्या खाणींत फायरक्लेची माती पुष्कळ सांपडते. फायरक्लेचा उपयोग भट्टया बांधण्याकडे करतात. कांचेच्या वगैरे कारखान्यांत मातीचीं भांडीं विस्तवावर पुष्कळ तापवावयाचीं असतात म्हणून हीं भांडीं फायरक्लेचीं करतात. उत्तम फायरक्लेमध्यें असलेले पदार्थ त्यांच्या शेंकडा प्रमाणासह पुढें दिले आहेत. सिलिका ७३.८२; ॲल्युमिना १५.८८; लोहाचें आक्साइड २.९५; पाणी ६.४५; अल्कली ०.९ असून तिचें विशिष्ट गुरुत्व २.५ असते.

विटाची मातीः—विटा करण्यास उपयोगी पडणारी पुष्कळ तऱ्हेची माती सांपडते. त्या सर्व प्रकारांना विटाची माती म्हणतात. या मातीचीं मडकीं, रांजण, खुजे वगैरे जिन्नस करतात. या मातींत लोहाचा अंश बराच असतो. विटांच्या मातीचें साधारण पृथक्करण पुढें दिलें आहे. सीलिका ४९.४४; ॲल्युमिना ३४.२६; लोहाचें ऑक्साइड ७.७४; चुना १.४८; मॅग्नेशिआ ५.१४ व पाणी १.९४.

फुलरची मातीः—मध्यप्रांत, राजपुताना वगैरे ठिकाणीं हिरवट रंगाची मऊ माती सांपडते. ती गुळगुळीत असते परंतु चिकट नसते. या मातीचा उपयोग अंगाला व कपड्याला साबणाप्रमाणें लावण्याकडे करितात. तिच्यांत शेंकडा सिलिका ५३; ॲल्युमिना १०; लोहाचें ऑक्साइड ९.७५; मॅग्नेशिआ १.२५; लाइम ०.५०; मीठ ०.१० व पाणी २४ असतें.

बॉक्साइट.—यामध्यें शेंकडा ४५ ते ८० भाग ॲल्युमिना,१५भाग पाणी आणि लोहाचें आक्साइड वगैरे असतात. बॉक्साइट कसें होतें या संबंधानें मतभेद आहे. कांहींच्या मतानें उष्णता व पाणी यांच्या योगानें जुन्या खडकांत फरक होऊन तें झालें असावें असें आहे. इतर कांहीं जणांचें म्हणणें असें आहे कीं ग्रानाइट, नीस, बसाल्ट वगैरे खडकांवर पाणी व कार्बन डाय-ऑक्साइड यांचा परिणाम होऊन बॉक्साइट झालें असावें. बॉक्साइटपासून ॲल्युमिनियम काढतात किंवा ॲलम (फटकी) तयार करतात. यावर उष्णतेचा फारसा परिणाम होत नसल्यानें भट्टीच्या आंतल्या बाजूनें लेप देण्याकरिता त्याचा उपयोग करितात.

लॅटराइटः—किंवा जांभळा दगड. हा तांबडा, पिवळट किंवा पांढुरक्या रंगाचा छिद्रमय मातीचा दगड असतो. हा बॉक्साइटप्रमाणें ग्रानाइट, नीस, डायोराइट, बसाल्ट वगैरे खडकांपासून झाला असावा अशी कल्पना आहे. यामध्यें ॲल्युमिना, लोहाचे ऑक्साइड व थोडा सिलिका असतो.

उष्ण कटिबंधांत दमट हवेंत विशेषतः हा खडक तयार होतो. डेक्कन ट्रॅप म्हणून जो खडक आहे त्यावर हा पुष्कळ ठिकाणीं सांपडतो. हा प्रथम खणून काढला म्हणजे ओलसर व मऊ असतो परंतु कांहीं दिवस हवेंत राहिला कीं कठीण होतो. घरें बांधण्याकडे याचा पुष्कळ उपयोग करितात. मुंबई इलाख्यांत बेळगांव, रत्नागिरी, कुलाबा व कारवार जिल्ह्यांत लॅटराइट पुष्कळ सांपडतो.

मातीचा दगड—माती घट्ट होऊन दगडासारखी झाली म्हणजे मातीचा दगड होतो.

शेल.—ज्याप्रमाणें वाळूचे कण एके ठिकाणीं दाबले जाऊन वाळल्यावर त्यापासून वाळूचे खडक होतात त्याचप्रमाणें अगदीं बारीक कण एकेठिकाणीं दाबले जाऊन त्यांपासून जो खडक होतो त्याला शेल असें म्हणतात. शेलचे नेहमीं थर असतात थरांतील पातळ पापुद्रे सुटे निघतात. मातीच्या दगडासारखा एकच गोळा नसतो. निरनिराळ्या थरांचे तांबडा, पांढरा, पिवळा वगैरे कोणतेहि रंग असूं शकतात. अगदीं तांबडा रंग असल्यास त्यास काव व पिवळा रंग असल्यास पिवडी म्हणतात. भिंती, पत्रे वगैरेंना रंग देण्याकडे यांचा चांगला उपयोग होतो.

ज्वालामुखींतून निघालेल्या तुकड्यांचे व गाळाचे खडक.—ज्वालामुखींतून खडकाचा रस वर येऊन त्यापासून होणारे खडक अग्निजन्य असतात व म्हणून ते त्या वर्गांत जातात परंतु रस बाहेर येण्यापूर्वी खडकाचे गोळे, तुकडे, बारीक कण व राखेसारखी भुकटी जोरानें वर उडून खालीं पडल्यावर त्यांचे खडक बनतात. ते गाळाच्या खडकांच्या वर्गांत येतात. ज्वालामुखीच्या धक्क्याच्या योगानें जमीनीवरील खडकांचे तुकडे होऊन पुन्हा खडक बनतात. ते ज्वालामुखींतून बाहेर आलेल्या तुकड्यांच्या खडकांसारखेच दिसतात. परंतु बारकाईनें तपासणी केल्यास त्यांचा उगम कळण्यास कठीण पडत नाहीं. ज्वालामुखीच्या तोंडातून वर आलेले तुकडे सुटे असले म्हणजे त्यांच्या आकारावरून त्यांना जीं निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत त्यांचें वर्णन ज्वालामुखी या सदराखालीं दिलेलें आहे. या ठिकाणीं तुकडे एके ठिकाणीं येऊन त्यांचे जे खडक तयार होतात त्यांचा निर्देश केला आहे. कित्येक वेळां ज्वालामुखींतून निघालेले तुकडे समुद्रांत किंवा सरोवरांत पडतात. त्या ठिकाणीं नदींतून वाहून आलेल्या तुकड्यांचे या तुकड्यांत मिश्रण होतें. जलजन्य खडकांना त्यांतील तुकड्यांच्या आकारावरून कांग्लॉमरेट, ब्रेशिआ वगैरे संज्ञा दिलेल्या आहेत, त्याच संज्ञा ज्वालामुखींतून बाहेर आलेल्या तुकड्यापासून तयार झालेल्या खडकांनां त्यांतील तुकड्यांच्या आकारमानावरून देतात.

सजीव पदार्थांपासून झालेले खडक.—या सदराखालीं वनस्पती, प्राणी यांची वाढ होऊन ते नष्ट झाल्यावर जागच्याजागीं तयार झालेले खडक किंवा ते वाहून जाऊन एके ठिकाणीं सांठवल्यावर झालेले खडक येतात. त्यांचें वर्गीकरण त्यांच्यांत जें विशिष्ट द्रव्य असेल त्यावरून करतात. ते वर्ग येणेंप्रमाणेंः-(१)चुन्याचे अथवा कॅलकेरियस. (२) सिकयुक्त अ. सिलीशियस.(३) स्फुरयुक्त उर्फ फॉस्फॅटिक. (४) कर्बयुक्त उर्फ कार्बोनेशियस. आणि (५) लोहयुक्त.

(१)चुन्याचे खडकः-हे दोन तऱ्हेनें तयार होतात. जुन्या खडकांत असलेला चुन्याचा अंश पाण्यानें वाहून जाऊन एके ठिकाणीं सांठला म्हणजे चुन्याचा खडक होतो याबद्दलची विशेष माहिती दुसरीकडे दिली आहे. पुष्कळ चुन्याचे खडक सजीव पदार्थांपासून झालेले आहेत. सजीव पदार्थांपासून झालेले चुन्याचे खडक कित्येक वेळां स्फटिकमय होतात त्यांची सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें नीट तपासणी केल्याखेरीज ते इतर चुन्याच्या खडकापासून निराळे असे ओळखतां येत नाहींत. सजीव पदार्थांपासून झालेले चुन्याचे खडक जेथें तयार होतात. ते त्या ठिकाणीं सांठतात किंवा वाहून जाऊन दुसरीकडे सांठतात. चुन्याच्या खडकांत बहुतेक सर्व खटकर्बित (कॅलशियम कार्बोनेट) असतो. तो उदहराम्लांत (हायड्रोक्लोरिक ॲसिड) विरघळतो व त्यांत वाळू, माती वगैरे असल्यास न विरघळल्यानें वेगळे होतात. थोड्या प्रमाणांत ममकर्बित (मॅग्नेशियम कार्बोनेट) हि सांपडतो. हे खडक कठिण व भक्कम असतात किंवा अगदीं ठिसूळहि असतात. यांचें काठिण्य ३ व विशिष्टगुरुत्व २.५ ते २.८ पर्यंत असतें. यांचे रंग निरनिराळ्या तऱ्हेचे असून ते अगदीं पातळ थरापासून तों कित्येक यार्ड उंचीच्या ढिगापर्यंत आढळतात. फोरॅमिनीफेरा जातीच्या बारीक प्राण्यांच्या शरीरापासून झालेल्या चुन्यांच्या खडकाचे थर अटलांटिक वगैरे महासागरांच्या तळाशीं पुष्कळ सांपडतात. ज्याला आपण खडू म्हणतों त्या प्रकारचा खडक या व अशाच तऱ्हेच्या बारीक प्राण्यांच्या शरीरांचे ढीग साठून झालेला असतो. उष्णकटिबंधांतील समुद्राच्या उथळ पाण्यांत प्रवाळ नामक प्राण्यांची पुष्कळ वाढ होते. त्यांनीं राहण्याचीं घरं कॅलशियम कार्बोनेटचीं असतात व या घरांची वाढ येवढी होते कीं, त्यांचीं मोठमोठालीं बेटें हिंदीमहासागरांत पुष्कळ आहेत.

(२) सिकयुक्त अथवा सिलिकाचे खडक.—पाण्यांत थोड्या प्रमाणात शिलीका असतात. ते कांहीं सूक्ष्म वनस्पती व प्राणी यांचें शोषण करून आपलीं शरीरें तयार करतात ते मेले म्हणजे त्यांच्या मृत शरीरांचे थर सांठतात व त्यांपासून खडक तयार होतात. ट्रिपोलीची पूड झिलईकरितां व स्फोटक द्रव्यें करण्याकरितां उपयोग करतात. ही ट्रिपोलीची पूड समुद्रांत किंवा सरोवरांत सांठलेल्या एक प्रकारच्या सिलीकाच्या खडकापासून तयार केलेली असते.

(३)फॉस्फॅटिक खडक—बहुतेक प्राण्यांच्या शरीरांत खटस्फुरित (कॅलशियम फास्पेट) असतो. कित्येक प्राण्यांचीं शरीरें जुन्या खडकांत पुरलीं जाऊन त्यांचे खडक बनलेले आहेत.

त्यामध्यें कॅलशिअम फास्फेट बऱ्याच प्रमाणांत असतो. दक्षिण अमेरिकेंत व आफ्रिकेंत ग्वानो नांवाचा एक पदार्थ सांपडतो. हा पदार्थ समुद्रपक्ष्यांची विष्ठा, मृत शरिरें, त्यांनीं खाद्य म्हणून आणलेले मासे वगैरे सांठून झालेला असतो. ज्या ठिकाणीं पाऊस नाहीं अशाच ठिकाणीं हा सांठतो. हें उत्तम खत आहे व त्याप्रमाणेंच त्याचा पुष्कळ उपयोग होतो. पूर्वकालीन प्राण्यांचीं हाडें पुरलीं जाऊन त्यांचाहि स्फुरयुक्त (फॉस्फॅटिक) खडक होतो. त्याचप्रमाणें पूर्वकालीन प्राण्यांची विष्ठा पुरली जाऊन त्याचेंहि खडक होतात.

(४) कर्बयुक्त अथवा कार्बोनेशियस खडक— वनस्पती वाहून जाऊन एके ठिकाणीं सांठल्यावर पुरल्या जाऊन, किंवा वनस्पती उगवल्या जागीं वाळून वगैरे पुरल्या जाऊन त्यांचे जे खडक होतात ते सर्व या वर्गांत येतात. दगडी कोळसे अशाच प्रकारानें तयार झालेले आहेत.

पीट—दलदलीच्या जागीं, उथळ पाण्यांत वनस्पती वाहून गेल्यावर कुजतात व त्यांचेवर पुन्हां वनस्पती उगवत राहतात यामुळें कुजलेल्या वनस्पतींचे मोठाले थर होतात. यांना पीट म्हणतात. दलदलीच्या प्रदेशांत पुष्कळ ठिकाणीं हा पीट सांपडतो. पीट ज्या ठिकाणीं सांपडतो त्या ठिकाणीं वाळवून जाळण्याकडे त्याचा उपयोग करितात. पूर्वी अशाच तऱ्हेचा पीट पुरला जाऊन त्यापासून दगडी कोळशाचे निरनिराळे प्रकार तयार झालेले आहेत.

लिग्नाइट— पीट दाबला जाऊन त्यापासूनच पुढें लिग्नाइट तयार होतो. लिग्नाइट ही पीट व दगडी कोळसा यांच्या मधली स्थिति आहे. कारण लिग्नाइटमध्यें बदल होऊन त्याचाच दगडी कोळसा तयार होतो. लिग्नाइटचा रंग पिवळट, तपकिरी किंवा काळा असतो. त्याचें विशिष्टगुरुत्व ०.५ ते १.५ असते व त्याच्यांत शेंकडा ५५ ते ७५ कार्बन असतो. लिग्नाइट भुरभुर जळतो व यांतून पुष्कळ धूर निघून त्याचा जळकट किंवा धुरकट वास येतो.

दगडी कोळसा— याचा रंग काळा किंवा काळ्याचा एखादा प्रकार असतो. कोळशांत शेंकडा ७५ ते ९० कार्बन, ३ ते २० ऑक्सिजन, ०.५ ते ५.५ हैड्रोजन, २.५ पर्यंत नैट्रोजन आणि १ ते २० पर्यंत राख असतें. हा कोळसा चांगला जळतो व जळतांना त्याला एक प्रकारचा वास येतो. दगडी कोळशाचे पुष्कळ प्रकार आहेत. मूळ वनस्पती निरनिराळ्या प्रकारच्या असल्यास असे प्रकार होणें साहजिक आहे. वाळूचे खडक, व यांत शेलवगैरे खडकाचे थर कोळशाचे थर सापडतात.

ॲन्थ्रसाइट—अति दाबाखालीं कठीण झालेला असा हा दगडी कोळशाचाच प्रकार आहे. हा लवकर जळत नाहीं व जळत असतांना त्यांतून ज्वाला किंवा धूर निघत नाहीं व त्याला कोणत्याहि प्रकारचा विशिष्ट वास येत नाहीं. याचा रंग अगदीं काळा कुळकुळीत असून कांचेसारखा चकाकतो. त्याच्यांत शेंकडा ९० कार्बन असतो व त्यांचे विशिष्ट गुरुत्व १.३५ ते १.७ असतें.

ऑइल शेल—ज्या शेल खडकांतून राकेल तेल काढतां येते त्यांनां ऑइल शेल म्हणतात. या शेलचे थरच असतात आणि चांगला शेल असल्यास त्यांतून एका टनांतून ३० ते ४० गॅलन राकेल पूर्वीच्या वनस्पति व कांहीं प्राणी शेलमध्यें पुरले जाऊन दाबाखालीं कुजून त्यांच्यापासून हें तेल तयार होतें. शेलचें ऊर्ध्वपातन केल्यास तेल निघतें.

पेट्रोलियम—या सदराखालीं सर्व तऱ्हेचीं खनिज तेलें येतात. हीं खडकांतून सांपडतात. प्रथमतः तीं एके ठिकाणीं मिसळलेलीं असतात, परंतु उर्ध्वपातनानें तीं वेगळालीं करितात.

ॲंबर—हें खडकांत पुरल्या गेलेल्या जुन्या झाडांतील राळेपासून होतें.

(५)लोहमिश्रित माती—दलदलीच्या जागीं कुजत असलेल्या वनस्पतींच्यापासून आम्लें निघतात त्यांचा व कर्बाम्लाचा (कार्बोनिक ॲसिड) आसपासच्या खडकांतील लोहावर परिणाम होऊन लोहाचे क्षार व ऑक्साइड यांचें मिश्रण होऊन सांठतें. यांत पुढें माती मिसळली जातें व त्याचप्रमाणें वनस्पतींचे अंश मिसळले जातात या सर्वांच्या मिश्रणानें तयार झालेले थर लोहमिश्रित माती या सदराखालीं येतात.

रासायनिक क्रियेनें तयार झालेले स्फटिकमय खडक.—पाण्याच्या साहाय्यानें होणाऱ्या खडकांचें वर्णन वर दिलें आहे. ते खडक वाहून आलेल्या गाळापासून झालेले असतात. परंतु याशिवाय पाण्यांत विरघळलेल्या पदार्थांची एकमेकांवर रासायनिक क्रिया होऊन त्यांचे थर तयार होतात. हे पदार्थ बहुतेक स्फटिकमय असतात. अशा प्रकारें तयार झालेल्या पदार्थांत विशेष महत्वाचे म्हणजे सैंधव, पापडखार, चुन्याचे दगड, जिप्सम व इतर खार हे होत.

(आ) अग्निजन्य-स्फोटित-थररहित खडक.—या वर्गांतील खडक पृथ्वीच्या उदरांतील खडकाच्या रसापासून झालेले आहेत. खडकांचें रासायनिक पृथक्करण, त्यांतील खनिज द्रव्यें, त्यांची घटना, उत्पत्तीची पद्धति, ठिकाण व वय वगैरे वरून या खडकांचें वर्गीकरण निरनिराळ्या तऱ्हेनें करतां येण्यासारखें आहे. परंतु यांपैकीं कोणत्याहि एका गोष्टीकडे लक्ष देऊन वर्गीकरण केल्यास त्याचा विशेष उपयोग नाहीं म्हणून यांपैकीं जितक्या गोष्टी एके ठिकाणीं आणतां येतील तितक्या आणून केलेलें वर्गीकरण खालीं दिलें आहे त्यांमध्यें अग्निजन्य खडकांतील खनिजद्रव्यें व त्यांचें रासायनिक पृथक्करण या गोष्टींवरून पोटभाग पाडले आहेत. अग्निजन्य खडकांत दोन किंवा अधिक खनिज द्रव्यें असतात. त्यांमध्यें स्फटिक (ॲल्युमिना), मग्न(मॅग्नेशिआ), चुना (लाइम), पालाश (पोटॅश) व सिंधू (सोडा)यांचे सिलिकेट, मग्नलोह (मॅग्नेटिक आयर्न) व (चुन्याचें स्फुरित)

(लाइमचें फॉस्फेट) असतात. कांहीं खडकांत सिकाम्ल (सिलिसिक ॲसिड) इतकें असतें कीं त्यामध्यें मोकळा क्वार्टस् सांपडतो. त्याचप्रमाणें ज्या खडकांत आर्थोक्लेज फेल्स्पार सांपडतो त्यांत प्लॅजिओक्लेज फेल्स्पार सांपडणाऱ्या खडकांपेक्षां अधिक सिकाम्ल (सिलिसिक ॲसिड) सांपडतें. अग्निजन्य खडकांचे पांच भाग आहेत ते असेः— (१) आम्लयुक्त (ॲसिड) खडक-यांत सिकाम्लाचें (सिलिसिक ॲसिडचें)प्रमाण शेंकडा ६५ते ८० असतें. व त्यांतील मुख्य खनिज द्रव्यें आर्थोक्लेज फेल्स्पार, मायका (आभ्रक)व क्वार्टस हीं असतात. (२) उपाम्ल (सबॲसिड)खडक- यांत सिलिसिक ॲसिडचें प्रमाण शें .६० ते ६५ असते. आर्थोक्लेज फेल्स्पार व हार्नब्लेंड हीं मुख्य द्रव्यें त्यांत असतात. (३) उपअनाम्ल (सब बेसिक) खडक–यांत शेंकडा ५५ ते ६० सिलिसिक ॲसिड व प्लॅजिओक्लेज फेल्स्पार, आणि हार्नब्लेंड ही खनिज द्रव्यें असतात. (४) अनाम्ल (बेसिक) खडक–यांत शेंकडा ४५ ते ५५ सिलिसिक ॲसिड व प्लॅजिओक्लेज फेल्स्पार, पायरॉक्झीन, मॅग्नेटाइट आणि ऑलिव्हिन हीं खनिज द्रव्यें असतात. (५) अति अनाम्ल (अल्ट्राबेसिक) खडक–यात शेंकडा ४५ पेक्षां कमी सिलिसिक, ॲसिड ऑलिव्हाइन आणि पायराक्झीन हीं खनिज द्रव्यें असतात.

(१)पहिल्या पोटभागांत ग्रनाइट व ऱ्हयोलाइट जातीचे खडक येतात. ग्रनाइट जातीचे खडकांत आर्थोक्लेज फेल्स्पार, क्वार्टस व मायका हीं द्रव्यें असतात. मायकाच्या ऐवजीं कित्येक वेळां हार्नब्लेंड असतें. ग्रनाइटमध्यें टोपॅझ टुरमलिन, गार्नेट वगैरे दुय्यम खनिज द्रव्यें सांपडतात. ग्रनाइटमध्यें फेल्स्पारचे मोठाले स्फटिक असून बाकीचे लहान स्फटिक असल्यास त्याला पारफिरिटिक ग्रनाइट म्हणतात. सर्वच स्फटिक अगदीं लहान असल्यास त्याला मायक्रोग्रनाइट म्हणतात. ग्रनाइट खडक फार जुने आहेत परंतु कित्येक तृतीयावस्थाक (टरशरी) वगैरे युगांत बाहेर आलेल्या खडकाच्या रसापासून तयार झालेले आहेत ग्रनाइट दुसऱ्या खडकांत घुसून बॉस, डाइक, व्हेन वगैरे प्रकारानें सांपडतो. ऱ्हायोलाइट जातीचे खडक ज्वालमुखींतून बाहेर आलेल्या रसापासून झालेले असतात. या जातीच्या खडकातच ऑबसीडियन अथवा डोंगरी काच व पिच स्टोन म्हणजे राळे सारखा दिसणारा दगड वगैरे खडक सांपडतात.

(२) दुसऱ्या पोटभागांत सेनाइट व त्याचे पोटवर्ग आणि ट्रकाइट खडक येतात. सेनाइटमध्यें आर्थोक्लेझ, फेल्स्पार व हार्नब्लेंड बहुतेक असतात. परंतु कित्येक वेळां हार्नब्लेंडच्या ऐवजीं मायका किंवा कुचित प्रसंगी दुसरा एखादा खनिज पदार्थ सापडतो. ट्रकाइटमध्यें सेनाइटचेच खनिज पदार्थ सापडतात. परंतु यामध्यें स्फटिक चांगले तयार झालेले नसतात व खडक हाताला खरखरीत लागतात.

(३) तिसऱ्या पोटभागांत डायोराइट ॲंडेसाइट वगैरे खडक येतात. त्यांत प्लॅजिओक्लेज फेल्स्पार व हार्नब्लेंड हीं खनिजद्रव्यें असतात. कित्येक डायोराइटमध्यें मायका किंवा क्वार्टस् हीं द्रव्यें सापडतात. ॲंडेसाइट दिसण्यास ट्रकाइट सारखाच असतो. त्यांत पुष्कळ वेळां मायका, एन्स्टटाइट, ऑगाइट, क्वार्टस् वगैरे द्रव्यें आढळतात.

(४) चवथ्या पोटभागांत गॅब्रो, डॅलेराइट वगैरे खडक व त्याच्याच पोटजाती येतात. या खडकांत, प्लॅजिओक्लेज फेल्स्पार, पायरॉक्झीन व मॅगनेटाइट आणि कित्येक वेळां ऑलिव्हाइन हीं खनिज द्रव्यें असतात. बेसॉल्ट, टॅचिलाइट, डायाबेस्, ग्रीनस्टोन वगैरे खडक याच पोटभागांत येतात व ते डॅलेराइटचेच प्रकार आहेत असें म्हटल्यास हरकत नाहीं.

वरील चार पोटभागांत दिलेल्या खडकांखेरीज आलिव्हाइन, ऑगाइट वगैरे खनिज द्रव्यें असलेले पेरिडोटाइट, पिक्राइट, सर्पेंटाइन, फोनोलाइट इत्यादि खडक अग्निजन्य खडकाच्या वर्गांत येतात.

(३)रूपांतरित खडक.—मूळ जलजन्य किंवा आग्निजन्य खडक असून कोणत्याहि कारणानें त्यांत फरक होऊन जे नवीन खडक होतात त्यांना रूपांतरित खडक असें म्हणतात. पाण्याच्या योगानें मूळ खडक पुष्कळ वेळा बदलतो. वाळूच्या खडकावरून पाणी वहात राहिल्यास वाळूचे कण एके ठिकाणीं घट्ट बांधले जातील असे पदार्थ सांठले जाऊन वाळूचा खडक फार कठिण होतो तेव्हां त्याला क्वार्टझाइट म्हणतात. उष्णतेनें सुद्धां मूळ खडकांत फरक पडतो. उदाहरणार्थ चुन्याच्या खडकावर किंवा शेजारी ज्वालामुखीचा रस पसरल्यास मूळच्या चुन्याच्या खडकाचा संगमरवरी खडक होतो. त्याचप्रमाणें पृथ्वीच्या कवचाच्या हालचालीनें खडक दाबले जाऊन मूळ शेल खडक असल्यास त्याचा स्लेट खडक तयार होणें वगैरे फरक होतात. शिस्ट नांवाचे खडक असतात त्यांतील खनिजद्रव्यें स्फटिकमय असतात परंतु अग्निजन्य खडकांत व या खडकांत पुष्कळ फरक आहे. शिस्ट खडकांतील स्फटिक चपटे झालेले असतात. ते पानाप्रमाणें मध्यें जाड व कडेला पातळ असतात. प्रत्येक स्फटिकाचा पातळ भाग दुसऱ्या दोन स्फटिकांच्या पातळ भागांत चिपेसरखा असतो. या मांडणीमुळें शिस्ट जलजन्य खडकाप्रमाणें थरमय दिसतो. दोन्ही तऱ्हेच्या खडकांच्या थरांत पुष्कळच फरक असतो. जलजन्य खडकांचे थर लांबपर्यंत स्पष्ट असे सांपडतात परंतु रूपांतरित खडकांचें थर तुटक असतात व. कित्येक वेळां स्फटिकांच्या चपटेपणामुळेंच ते थरमय आहेत असें वाटतें. रूपांतरित खडक स्फटिकमय असल्यानें त्यांच्यांत व अग्निजन्य खडकांत थोडेसें साम्य आहे; त्याचप्रमाणें ते थरमय असल्यामुळें त्यांच्यांत व जलजन्य खडकांत थोडेसें साम्य आहे. हे खडक मूळ कशा प्रकारचे होते हें सांगणें कठिण असतें. त्याचप्रमाणें सगळा खडक सारख्या प्रमाणांत स्फटिकमय

व थरमय नसतो. ज्या ठिकाणीं थर अगदीं संदिग्ध रीतीनें दिसतात व स्फटिक फार चपटे झालेले नसतात त्या खडकांना शिस्टच्या ऐवजीं नीस संज्ञा वापरतात. रूपांतरित वर्गातील महत्वांच्या खडकांची पुढें माहिती दिली आहे.

स्लेट अथवा पाटीचा दगड.—मूळ मातीचे जे खडक असतात ते दाबले जाऊन त्याचे कठिण, पातळ व सुटे थर तयार होतात त्यावेळीं त्याला पाटीचा दगड म्हणतात. दाबल्यामुळें झालेले थर मूळ थरांच्या अनुरोधानेंच होतात असें नाहीं तर बरेच वेळां त्यांच्या लंबरेषेंत होतात. मूळ मातीचेच खडक असल्यानें त्यांमध्यें स्फटिक बहुधा नसतात. परंतु कित्येक वेळां अगदीं लहान व पातळ अभ्रकाच तुकडे किंवा इतर कांहीं खनिज द्रव्यांचे स्फटिक सापडतात. हे खडक फार दाबले जाऊन शिस्टसारखे झाल्यास त्यांनां 'मातीचे शिस्ट,' 'फायलाइट, वगैरे नांवें देतात. कायास्टोलाइट वगैरे द्रव्यें खडकांत असल्यास 'कायास्टोलाइट स्लेट वगैरे नांवें खडकांना देतात. धारवाड, बेळगाव व विजापूर जिल्ह्यांत निरनिराळ्या तऱ्हेचे पुष्कळ स्लेट सापडतात.

क्वार्टझाइट.—मूळ वाळूचे जे खडक असतात त्यापासून क्वार्टझाइट खडक तयार होतो. मूळ खडकावरून व खडकांतून पाणी वाहतांना पाण्यांतील चुन्याचा, लोहाच्या आक्साइडचा किंवा सिलिकाचा भाग वाळूच्या कणांत बसून त्याचें लुकण तयार होतें व त्यामुळें खडक फार कठीण होतो तेव्हां त्याला क्वार्टझाइट म्हणतात. आसपास खडकाच्या रसाचे प्रवाह येऊन वाळूचे कण अर्धवट वितळतात व पुन्हां निवाल्यावर त्यापासून जो खडक होतो तो मूळ वाळूच्या खडकापेक्षां फार कठिण होतो. तेव्हां त्यालाहि क्वार्टझाइट म्हणतात. वाळूचे खडक दाबले जाऊन त्यापासून क्वार्टझाइट खडक तयार होतो. हाच क्वार्टझाइट आणखी पुढें जास्त दाबला जाऊन त्याचे स्फटिक किंवा कण चपटे झाल्यास शिस्ट तयार होतो व त्याला क्वार्टझ् शिस्ट असें म्हणतात. कित्येक वेळां मध्यभागीं क्वार्टझाइट व त्याच्या एका बाजूस वाळूचा खडक व दुसऱ्या बाजूस क्वार्टझ् शिस्ट सांपडतात त्यामुळें मूळ खडकापासून रूपांतरित खडक कसे झाले असावे हें लक्षांत येतें.

संगमरवरी दगड—मूळ चुन्याचे दगडाचे आसपास खडकांच्या रसांचे उष्ण प्रवाह आल्यानें किंवा खडकावर दुसरे थर येऊन त्यामुळें मूळ खडकांत उष्णता उत्पन्न होऊन चुन्याच्या कणांचे लहान लहान स्फटिक तयार होतात. अशा स्फटिकमय चुन्याच्या खडकास संगमरवरी दगड म्हणतात. हे पांढऱ्या, काळ्या, हिरव्या व तांबड्या रंगाचे असतात. ते घासल्यास त्यांना चकाकी येते व म्हणून ते बांधणीच्या कामांत महत्वाचे समजले जातात. संगमरवरी दगडांत अभ्रक व संगजिऱ्याचे कण सापडतात व त्यावरून त्यांना निरनिराळीं नांवेंहि कित्येक वेळां दिलीं जातात. जबलपूरपाशीं संगमरवरी दगड मोठ्या प्रमाणांत सांपडतात व त्याचा उपयोग पुष्कळ ठिकाणीं होतो. मूळ खडकापासून कित्येक वेळां संगमरवरी दगड न होतां अर्धवट स्फटिकमय खडक होतो. त्याचा चुना उत्तम होतो व बांधण्याच्या कामाला त्याचा फारसा उपयोग नसल्यानें चुना करण्याकडेच त्याचा खप होतो.

नीस.—नीस खडक स्फटिकमय असून थरमयाहि असतात. यांतील स्फटिक स्पष्ट असतात परंतु थर मात्र सुटे होण्यासारखे नसतात. मूळ ग्रनाइट, सेवाइट वगैरे खडक दाबले जाऊन त्यांपासूनच बहुतेक नीस झालेले असतात.त्यांत सांपडणाऱ्या खनिज द्रव्यावरून त्याचें इतर खडकांशीं साम्य पाहून त्याला निरनिराळीं नांवें देतात.ग्रनाइटमध्यें सांपडणारीं द्रव्यें असल्यास त्यास ग्रनाइट नीस, सेनाइटमधील द्रव्यें असल्यास सेनाइट नीस व त्याचप्रमाणें इतर नांवें नीसला दिलीं जातात. नीस व शिस्ट हे दोन्हींहि रूपातरित खडक आहेत. दोहोंमध्यें थोडेसें साम्यहि आहे. तरी त्यांतील मुख्य फरक म्हणजे शिस्टमध्यें स्फटिक जितके दाबले जाऊन चपटे झालेले असतात तितके नीसमध्यें नसतात व यामुळें नीस व शिस्ट हे खडक ओळखतां येतात. मद्रास इलाख्याचा बराच भाग, मुंबई इलाख्याचा दाक्षिण भाग,बुंदेलखंड वगैरे ठिकाणीं नीस खडक सापडतो. तेथें ग्रनाइट व नीस असे दोन्हीहि खडक शेजारीं शेजारीं सांपडतात यामुळें ते नीस मूळ कोणत्या खडकापासून झाले असावे याची कल्पना होते. प्रथमतः नीस हा शब्द ग्रनाइटपासून झालेल्या खडकांनाच विशेषतः लावीत असत. परंतु आता नीस शब्द अधिक व्यापक अर्थानें वापरतात म्हणून नीस या शब्दाखालीं निरनिराळया प्रकारचे खडक येतात. नीस खडकात हॉर्नब्लेंड, टूरमलीन, गार्विट, एपिडोट, ॲपटाइट वगैरे पुष्कळ प्रकारचीं दुय्यम द्रव्यें सापडतात. मूळ अग्निजन्य खडकापासून नीस खडक झाल्याचीं उदाहरणे पुष्कळ आहेत.परंतु नीस खडक नेहमींच अग्निजन्य खडकापासून होतो असें नाहीं. जलजन्य खडकापासून नीस झाल्याचीं सुद्धां उदाहरणें आहेत. कित्येक वेळां नीस, क्वार्टझाइट चुन्याचे खडक यांचे आळीपाळीनें एकावर एक थर सापडतात, त्याचप्रमाणें कांग्लामोरेटचे थरहि सांपडतात त्यावरून त्या ठिकाणचा नीस मूळ जलजन्य खडकापासून झाला असण्याचा संभव आहे. खडक कोणत्याहि मूळ खडकापासून होवो व तो कशाहि प्रकारानें होवो शेवटीं त्यांतील कण चपटे होऊन तो अर्धवट थरमय असला म्हणजे त्याला नीस ही संज्ञा लावतां येईल.

शिस्ट.—शिस्ट खडक म्हणजे काय, ते कसे होतात, व कसे असतात याबद्दलची माहिती वर दिलीच आहे. त्यावरून असें स्पष्ट कळून येईल कीं, शिस्ट म्हणजे नीसच्या पुढची पायरी आहे. नीस अधिक दाबला गेल्यास त्यापासून शिस्ट होतो. शिस्टमधील खनिज द्रव्यें इतकीं दाबलीं गेलेलीं असतात कीं तीं अगदीं चपटीं होतात. त्यांचे थरहि अगदीं पातळ असून लवकर सुटे होतात कांहीं शिस्ट खडकाचें

वर्णन खालीं दिलें आहे त्यावरून असें दिसून येईल कीं, शिस्ट खडकांत जें मुख्य व महत्वाचें खनिज द्रव्य सांपडतें त्यावरून शिस्ट खडकांना निरनिराळीं नांवें दिलीं आहेत.तीं:– (१) ग्रफाइट शिस्टः—पूर्वीचे कार्बोनेशियस शेल दाबले जाऊन त्यांपासून ग्रफाइट शिस्ट तयार होतात. यांमध्यें दुसरीं खनिज द्रव्यें असतात. परंतु काळे ग्रफाइटचे पट्टे किंवा थर त्यांत बरेच असतात म्हणून त्याना ग्रफाइट शिस्ट म्हणतात. (२) ऑगाइट शिस्टः—हे हिरवट रंगाचे खपल्या निघणारे खडक असतात.त्यांमध्यें लहानमोठे ऑगाइटद्रव्याचे कण असतात. ऑगाइटशिवाय कित्येक वेळा या खडकांत क्वार्ट्स,फत्स्पार, मॅग्नेटाइट किंवा क्लोराइट वगैरे द्रव्यें थोड्याफार प्रमाणांत सांपडतात. (३) हार्नब्लेंड शिस्टः—हा काळ्या रंगाचा खडक असतो. यांतील मुख्य द्रव्य हार्नब्लेंड असतें परंतु त्याशिवाय इतर नेहमीं सांपडणारीं द्रव्यें सांपडतात. (४) क्लोराइट शिस्टः–काळसर हिरव्या रंगाचा खडक असतो. तो मऊ व ठिसूळ असून हाताला थोडासा गुळगुळीत लागतो. (५) टाल्क शिस्टः—हा पांढरा, पिंवळट किंवा थोडासा हिरवट रंगाचा खडक असतो. तो फार मऊ, ठिसूळ असून हाताला गुळगुळीत लागतो. (६) मायका शिस्टः—मायकाचे पातळ थर एकेठिकाणीं या खडकात सापडतात. यात इतर द्रव्यें असल्यास फारच थोड्या प्रमाणात असतात. खडकाचा रंग पांढुरका, पिंवळट, काळसर किंवा तांबूस असतो. कित्येक शिस्ट खडकाला दोन किंवा अधिक खनिज द्रव्यें प्रामुख्यानें सापडतात. तेव्हां खडकाला नांव देतांना या द्रव्यांचीं नांवें त्यांत घालतात. उदाहरणार्थ एखाद्या शिस्टामध्यें मायका व क्वार्टस् अशीं दोन्हीं नांवें असल्यास त्याला मायकेशियस क्वार्ट्स् शिस्ट म्हणतात. याप्रमाणें जोडनांवाचे शिस्ट पुष्कळ असतात.

खडकवासलें तलाव—पुण्याच्या नैर्ऋत्येस पुण्यापासून सुमारें ११ मैलांवर असलेल्या खडकवासलें नांवाचें खेडें आहे तेथें मुठा नदीस बांधलेला एक तलाव आहे. सन १८७९त या तळ्याचें काम पुरें झालें.या तळ्याची लांबी ११ मैल असून रुंदी पाऊण मैलापेक्षां जास्त नाहीं. पुणें शहराला या तळ्यांतूनच मुख्यतः पाणीपुरवठा होतो. तळ्याच्या अनियमित उंचसखलपणावरून तळ्याच्या विस्ताराचा नक्की अंदाज करता येत नाहीं. तळ्याच्या कांठचा प्रदेश अगदीं निर्जन असून, तेथें पक्षीहि आढळत नाहींत. कॅनॉटबोट क्लबाच्या मालकीच्या तीन चार लहान होड्या तळ्याच्या खडकाळ कांठावर असतात. याचे दोन कालवे काढले असून पहिला हडपसरावरून पाटसपर्यंत व दुसरा कोथ्रूडवरून खडकीपर्यंत गेला आहे.

खडकी—मुंबई इलाख्यांतील पुणें जिल्ह्याच्या हवेली तालुक्यांतील एक गांव. हें गांव पुण्याच्या वायव्येस ४ मैलांवर आहे. याची लोकसंख्या १९११ सालीं १४०२८ इतकी भरली. या ठिकाणीं १८१७ च्या नोव्हेंबरच्या ५ व्या तारखेस इंग्रज व पेशवे यांच्यामध्यें लढाई झाली. इंग्रजांचा सेनापति कर्नल बर असून पेशव्यांचा सेनापति बापू गोखले होता. या लढाईंत पेशव्यांचा पूर्ण पराजय झाला. मुंबई इलाख्यांतील हें प्रमुख लष्करी ठिकाण असून या ठिकाणीं तोफखाना व पलटणी आहेत. हत्यारें व दारूगोळा तयार करण्याचा येथें एक कारखानाहि आहे. या गांवचें उत्पन्न १९०३–४सालीं २८००० रुपये असून खर्च २२००० रुपये आहे. येथें एक इंग्लिश शाळा आहे. येथें एक मिशनरी संस्था असून ती हवेली तालुक्यांत मतप्रसाराचें काम करीत असते. खडकी एज्युकेशन सोसायटीनें खडकी व आजुबाजुचीं गांवें यांत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां १३ शाळा काढल्या आहेत.

खंडगिरी—बिहार–ओरिसा. पुरी जिल्ह्याच्या खुर्दा पोटविभागांतील एक डोंगर. हा भुवनेश्वराच्या पश्चिमेस ४ मैलांवर आहे. उ. अ. २०° १६' व पू. रे ८५° ४७'. याला दोन वेगळीं शिखरें असून उत्तरेकडील शिखराला उदयगिरि व दक्षिणेकडील शिखराला खंडगिरि म्हणतात. तथापि खंडगिरि हें नांव सबंध डोंगराला हि लावितात. यावरील लेणीं जैन भिक्षूंचीं आहेत. सर्वांत जुनें लेणें खारवेला राजाच्या वेळचें आहे. पृथ्वीगुंफा लेण्यावरील या राजाचा मोठा लेख ख्रि. पू. १५५ तला आहे. या लेण्यांतील अनेक जैन लेख व शिल्प यांवरून १२ व्या किंवा १३ व्या शतकापर्यंत हीं जैनांकडे होतीं असें दिसतें. अगदीं जुन्या लेण्यामध्यें पुढील महत्वाचीं आहेत. उदयगिरी शिखरावरीलः– (१) राणी गुंफा; (२) गणेश गुंफा (यांतील देखावे नवव्या विभागांत दिले आहेत); (३) हाथी गुंफा, यांत राजा खारवेलांचा प्रसिद्ध शिलालेख आहे.; (४) बाघ गुंफा, (५) स्वर्ग गुंफा; (६) मौजपुरी आणि (७) पाताळ गुंफा; हीं शेवटील तीन लेणीं एकापेक्षा एक उंच असल्यामुळें स्वर्ग, पृथ्वी व पाताळ हीं नांवें त्यांनां शोभतात. खंडगिरीवरील सुप्रसिद्ध लेणें अनंत गुंफा होय. तेंतुली गुंफा, तंतुआ गुंफा पहिली आणि दुसरी, नवमुनि व सातघर हीं बाकीचीं लेणीं होत. नवमुनींत राजा उद्योत केसरीचा लेख आहे.[रिपोर्ट. आर्कि. सर्व्हे ऑफ इंडिया १९०२–३].

खंडायत—ओरिसा प्रांतांतील एक लढवय्यी जात. हिंदुस्थानांत १९११ सालीं एकूण८०७१०६खंडायत होते.त्यांपैकीं निवळ बिहार ओरिसांतच ७६९३५३ भरले. ओरिसाच्या राजाच्या सैन्यांत या जातींतील बरेच लोक हलक्या दर्जावर असत. 'श्रेष्ठ' वर्ग राजपूतांच्या खालोखाल गणतात. या जातीच्या मध्यप्रांतांतील कांहीं लोकांमध्यें काश्यप, नाग वगैरे गोत्रें आढळतात. पण त्यांवर विवाह अवलंबून नसतो. सामान्यतः एकाच पूर्वजाच्या संततीची आठवण आहे तोपर्यंत विवाह करीत नाहींत. बालविवाहाची चाल यांच्यांत रूढ आहे. वर मिळाला नाहीं व मुलीस न्हाण आलें तर बाणाबरोबर तिचें लग्न करतात. बहुपत्नीत्व रूढ आहे पण अशा

मनुष्यास ' मैपखिया ' म्हणजे पत्नीभक्षक म्हणतात. लग्नाचा मुख्य विधि वधूवरांचे हात कुशानें एकत्र बांधणें व वधूला कडेवर घेऊन वरानें भोल्याभोंवतीं सात प्रदक्षिणा घालणें हा आहे. धर्मविधीकरितां ब्राह्मणांस बोलावण्याची चाल आहे [रसेल व हिरालाल. सेन्सास रिपोर्ट.]

खंडाळ—गुजराथ. महीकांठांतील एक संस्थान. वात्रक कांठा जिल्ह्यांत या संस्थानचीं बारा गांवें आहेत. खंडालचे मिया बाटलेले मुसुलमान आहेत. त्यांनां गायकवाडास दरसाल खंडणी द्यावी लागते.

खंडाळा—पुण्याचे वायव्येस ४२ मैलांवर सह्याद्रीचे पहाडांत हा एक गांव आहे. आसपास आंबा, बाम्बू, जांभूळ व इतर झाडांचीं जंगलें आहेत. ठिकठिकाणीं पहाडांत घरें व यूरोपियनांचे व पारशांचे बंगले दृष्टीस पडतात. नवीन वसलेल्या गांवाच्या व पश्चिमेकडील डोंगराच्या मध्यें मोठा तलाव आहे. अगदीं नैऋत्यभागीं उंबरीच्याहि पलीकडे ड्यूकस नोझ किंवा नागफणी किंवा विंचवाची नांगी अशा आकारावरून निरनिराळ्या नांवांनीं संबोधिलें जाणारें शिखर आहे. प्रातःकाळीं किंवा सायंकाळचे वेळीं खंडाळा घाटांतील शोभा फार मनोहर असते.

ह्या घाटांत कांहीं कांहीं ठिकाणीं लेख असलेले दगड व कोरीव मूर्ती आढळतात. येथून बेडसा, भाजा, लोहगड, विसापूर येथें जाण्यास वाटा आहेत. येथून साकर पठारासहि जातां येतें. ईशान्येस राजमाचीकडे जाण्याकरितां पूर्वेकडे एक मोठा वळसा घेऊन जावें लागते. जवळच फोर्स्बे येथें टाटाच्या विजेच्या कारखान्याच्या कालव्याचा आरंभ आहे.

खडीचा दगड—हा एक मऊ अभ्रकाच्या जातीचा खनिज पदार्थ आहे. हा हातास मऊ व गुळगुळीत लागतो, त्यावरून याला इंग्रजींत सोपस्टोन असें म्हणतात. याची एक हलकी जात आहे; तिचा भांडीं वगैरे करण्याकडे उपयोग होतो म्हणून तिला पॉटस्टोन असें म्हणतात. खडीच्या दगडाचीं देश भाषांतील इतर नांवें सिलखडी, अघ्रकटुम, संग-इ-पत्थैन, बुलयुम इ. आहेत. हिंदुस्थानांत दरसाल सुमारें ३५००० टन हा दगड निघत असावा असा हॉलंडचा अंदाज आहे. यापैकीं चांगल्या प्रकारचा अभ्रक मद्रास, मध्यप्रांत, राजपुताना व ब्रह्मदेशमध्यें निघतो. या प्रत्येक प्रांतांतील पुरवठ्यासंबंधानें त्रोटक माहिती येणेंप्रमाणेः—

मद्रासः—कर्नूल जिल्ह्यांत मधुवरम् गांवाजवळ बेट्टमचेर्लमधील अभ्रक सर्वांत उत्तम असतो. त्याच्या खालोखाल अनंतपूर, उत्तरअर्काट, बल्लारी, कडाप्पा, सालेम, मलबार, वेल्लोर व दक्षिण कानडा हे जिल्हे आणि पदुकोट्टई संस्थान येथील अभ्रक चांगला असतो. १८९९ त मद्रासमध्यें १०३ टन अभ्रक निघाला होता.

मध्यप्रांतः—जबलपूर जिल्ह्यांत संगमरवरी दगडांच्या खाणींत व भंडारा जिल्ह्यांत कन्हेरी येथें अभ्रकाचे उत्तम दगड सांपडतात. कन्हेरी येथें (१९०० सालीं) या दगडाचे पेले, भांडीं, वगैरे जिन्नस करण्याचे १० कारखाने होते. १९०० सालीं ८२ टन दगड निघाला होता.

राजपुताना व मध्य हिंदुस्थानः—राजपुतान्यात जयपूर संस्थानामध्यें मोर, रैवळ व गिसगड येथें या अभ्रकाचे दगड सांपडतात. पैकीं मोर येथील दगड हिरव्या रंगाचे व पैलूदार असून आग्रा येथें नक्षीचें काम करण्याकरितां त्यांचा उपयोग करतात. बुंदेलखंडांतहि हा दगड सांपडतो. मध्यहिंदुस्थानात१९००सालीं६८टन दगड निघाला असें म्हणतात.

ब्रह्मदेशः—प्रोम, पकोकू, कठा, भामो, चौक्पू व मिंबू जिल्ह्यांत अभ्रकाच्या खाणी असून १९०० सालीं ५१ टन दगड निघाले होते.

उ प यो गः—पेले, बशा, नक्षीच्या पेट्या, टांकांचे दांडे, कागदावर ठेवण्याचीं वजनें वगैरे करण्याकरिता या दगडांचा पुष्कळ उपयोग होतो. या दगडांच्या मूर्तीहि करतात. म्हणून याला म्हैसूरकडे प्रतिमा कल्लेर म्हणजे मूर्ति पाषाण असें म्हणतात. पुष्कळ देवळांत व राजवाड्यांत या दगडावरील सुंदर खोदकाम दिसून येतें. याची पूड करून तिचा पांढऱ्या शाईप्रमाणें उपयोग करतात अथवा चुना चकचकीत दिसण्याकरितां त्यांत घालतात. ब्रह्मदेशांत या दगडाच्या दुध्या पेन्सिली करतात. याचा रंग दिला असता लोखंड गंजत नाहीं. या गुणामुळें हिंदुस्थानाबाहेरहि या दगडाचा उपयोग होऊं लागला आहे. उत्तकर वाळणाऱ्या वार्निशांत याची पूड मिसळल्यास तयार होणारा रंग चांगला पक्का असतो. हा दगड वितळण्यास कठिण असल्यामुळें मुशी व धुराच्या दिव्याचीं तोंडें (गॅसबर्नर) करण्याकरितां उपयोगी पडतो. वातावरणांतील वायूंचा यावर बहुधा कांहींच परिणाम होत नाहीं. यामुळें, चीनमध्यें वाळूच्या दगडासारख्या ज्या दगडाचें काम हवेंत खराब होण्याचा संभव असतो त्यावरून हा दगड लावतात. [वॅट].

खडीचें काम—हिंदुस्थानांत, विशेषेंकरून महाराष्ट्र व गुजराथ प्रांतामध्यें बायकांच्या साड्या, चोळ्या, पातळें यांवर ठशानें खडी काढण्याचा पुष्कळ प्रघात आहे. कारण खडीच्या योगानें कापड ज्यास्त शोभिवंत दिसतें. खडी काढण्याकरितां लागणारें सामान फार खर्चानें नसून हा धंदा पुष्कळ लोकांस करतां येईल. पुणें, मुंबई, पंढरपूर, नाशिक, सातारा, सोलापूर वगैरे ठिकाणीं खडीचें काम फार उत्तम होतें.

ख डी च्या धं द्या ची कृ ति.—जवसाचें तेल व राळ एकत्र करून तें मिश्रण शिजवून रोगण तयार करून ठेवावें. मग पाहिजे त्या वेळेस ह्या रोगणांत सफेता कालवून तो पांच दिवस झाकून ठेवावा आणि सहाव्या दिवशीं कामासाठीं घ्यावा. कुरुक्या घालण्याचा जसा शेवगा (सोऱ्या) असतो त्या प्रमाणेंच पितळेचे निरनिराळ्या आकृतीचे व नक्षीचे छाप

किंवा आंत पोकळ असलेले ठसे असतात. ते घेऊन त्यांच्या आंत वर सांगितलेले सफेत्याचे मिश्रण घालून त्या ठशांत दांडा बसवून कापडावर खडीचा छाप उठवितात. हा ठसा एक इंच लांबीचा व सुमारें अर्धा इंच घेराचा आंतून पोकळ पंचपात्रीप्रमाणें असतो. ठशाच्या खालच्या (बुडाच्या) पत्र्यावर आरपार भोकें पाडून नक्षी, फुल्या, मोर, राघू वगैरे तयार केलेले असतात. ज्या खणावर किंवा कपड्यावर खडी काढणें असेल तो खण डाव्या हातांत घेऊन क्रमानें प्रत्येक भाग मधलें बोटावर घेऊन त्या जागीं ठसा चेपतात. याप्रमाणें खडीची नक्षी काढल्यावर त्याजवर कोणी कोणी ती ओली आहे तोंच अभ्रकाची वस्त्रगाळ पूड टाकून खण झाडून नक्षी वाळवितात.

अभ्रकाची पूड करण्याची कृति.—अभ्रकाचे बारीक तुकडे व राळ (भात) एका पिशवींत घालून ती पिशवी एका पातेल्यांतील पाण्यांत उजव्या हातानें बुडवून डाव्या हातावर कुसकरावी म्हणजे बारीक बारीक कण पाण्यांत उतरतात. मग तें पाणी फार बारीक कापडांतून गाळावें म्हणजे कपड्यावर बारीक कण पुष्कळ जमा झालेले सांपडतात. ते वाळवून खडीवर टाकण्यासाठीं उपयोगांत आणावे. हा धंदा सोपा व फायदेशीर आहे. कोणी सोनेरी वर्खाची वस्त्रगाळ पूड वर टाकतात, कोणी खडीचे ठिपके उठवून त्यावर भिंगाच्या टिकल्या बसवून वाळवितात. कोणी सरस व साखर यांच्या बलकांत सफेता कालवून त्याची खडी तयार करून छाप उठवितात. [कलावैभव].

खंडेपरा—बिहार-ओरिसा. ओरिसांतील एक मांडलिक संस्थान. क्षेत्रफळ २४४ चौ. मै. उत्तरेस महानदी, पूर्वेस कटक आणि पुरी जिल्हे, दक्षिणेस पुरी आणि नयागड संस्थान व पश्चिमेस दसपल्ला संस्थान आहे. मूळचें हें संस्थान नयागडचा एक भाग होता. पण २०० वर्षांपूर्वी नयागड राजाच्या एका भावानें हें आपल्यासाठीं विभक्त करून घेतलें. संस्थानचें उत्पन्न सुमारें ३०,००० रुपये असून ब्रिटिशांना ४२१२ रुपये खंडणी जाते. या संस्थानची जमीन चांगली सुपीक असून सबंध ओरिसांत या सारखी उत्तम लागवडींत असणारी जमीन सांपडणार नाहीं. डोंगराळ प्रदेशांतून साल वृक्ष पुष्कळ आहेत, तसेंच वड व आंबा मैदानांत जागजागीं आढळतात. महानदीला मिळणाऱ्या कुआरिया व दौका यातून वाहतात. लो. सं. (१९०१) ६९४५०. संस्थानांत एकंदर गांवें ३२५ असून सर्वांत महत्वाचें गांव कंतिलो आहे. तीसचाळीस प्राथमिक शाळा व एक दुय्यम शाळा संस्थानाच्या खर्चानें चालते.

खंडेराव गायकवाड—हे दुसरे खंडेरावमहाराज होत. गायकवाडींतील पहिले खंडेराव हे कडीच्या गायकवाड जहागिरीचे मूळ संपादक असून त्यांचा काल श्री. थोरले बाजीरावांपासून थोरले माधवरावांपर्यंतचा होता. या दुसऱ्या खंडेरावमहाराजांचे वडील दुसरे सयाजीराव होत. यांच्या आईचें नांव चिमणबाई होतें. यांचे वडील बंधु गणपतराव हे गादीवर असतां या दोघा भावांचे विशेष रहस्य नसे. गणपतराव हे इ.स. १८५६ च्या नोव्हेंबरांत वारल्यावर त्यांना संतति नसल्यामुळें त्यांच्या मागून खंडेराव हे गादीवर बसले. त्या वेळचा बडोद्याचा रेसिडेंट यांच्याबद्दल पुढीलप्रमाणें लिहितो. " खंडेराव हे शरीरानें धिप्पाड, मोठे उत्साही, धूर्त, दूरदर्शी, जातीनें राज्यकारभार पहाणारे, दयाळू व उदार होते. " यांना सर्व मर्दानी खेळांचा मोठा शोक असून शिकारीचीहि फार आवड होती. यांनीं ४० लाख रु. खर्च करून मकरपुरा नांवाचा राजवाडा बांधून त्या बाजूस हरणें पाळण्याची (शिकारीसाठीं) व राखण्याची व्यवस्था केली. हे आठवणीचे मोठे धड होते. त्यांनीं सैन्य, जमाबंदी व न्यायखातें यांत बऱ्याच सुधारणा केल्या व लोकोपयोगी कामें सुरू केलीं.

ते उदार होते तरी पण फारसे उधळे नव्हते. प्रजेचे ते आवडते झाले होते. इंग्रज सरकारावर त्यांनीं इ. स. १८५७ सालीं जे उपकार केले त्याबद्दल त्यांचे मोठे आभार मानले आहेत. साऱ्या हिंदुस्थानांत यांच्या इतकी इंग्रजांस मदत करण्याची तांतड व राजनिष्ठा दुसऱ्या कोण्याहि संस्थानिकानें दाखविली नाहीं असें इंग्रजांनीं म्हटलें आहे. मोठ्या बंडांत बडोद्याचें सैन्य बंड मोडण्याच्या कामगिरीवर गेलें असतां त्या संधीचा फायदा घेऊन महिकांठा व रेवाकांठा या प्रांतात तिकडील दंगेखोरांनी बंड उभारलें व तें थोडक्याच काळांत साऱ्या उत्तरमंडळांत पसरलें. त्या वेळीं या वाघरे लोकांच्या बंडाचा नायनाट खंडेराव महाराजांनीं केला. त्याबद्दल त्या वेळचा रेसिडेंट शेक्सपियर यानें त्यांचे आभार मानले आहेत. शिपायांच्या बंडांत महाराजांनी दिलेल्या मदतीबद्दल हिंदुस्थानसरकारनें स्वतंत्र ठराव करून त्यात म्हटलें आहे कीं " खंडेराव महाराजांनीं जी अपूर्व राजनिष्ठा व तात्कालिक साहाय्य दिलें. तें जर दिलें नसतें तर इंग्रजांचा अंमल पश्चिम हिंदुस्थानावर क्वचितच राहिला असता. "याप्रमाणें लिहून या कामगिरीबद्दल बडोदेसरकारकडून घेण्यांत येणारी शिबंदी फौजेच्या खर्चाची वार्षिक तीन लाखांची रक्कम इंग्रज सरकारनें त्यांना बहाल केली. आणि त्यांना मोरचेल वापरण्याचा मान दिला, व १८६२ त त्यांनां दत्तक घेण्याची परवानगीहि दिली. इंग्रजांनीं संस्थानांतलि सैन्य नालायकीच्या सबबीवर कमी करण्यास महाराजांनां पुष्कळदां सांगितलें होतें, परंतु ते स्वतः शिपाईबाण्याचे असल्यानें त्यांनीं सैन्याच्या सुधारणेंत फार लक्ष घातलें होतें. बडोद्यास बंदुका तोफा ओतण्याचा व दारूगोळा करण्याचा कारखाना होता एवढेंच नव्हे तर मैदानी मोठ्या तोफा (यूरोपांत तयार झालेल्या)हि त्यांनीं विकत घेण्याचें सुरू केलें होतें. परंतु इंग्रजसरकारांनीं त्या तोफा त्यांच्याजवळ राहू न देतां स्वतः खरेदी केल्या. इजारदार पद्धती त्यांनीं काढून टाकली. व सदर अदालत

वगैरे कोर्टे स्थापून नवीन कायदे केले त्यामुळें जमाबंदी व न्यायखात्यांत सुधारणेस प्रारंभ झाला. त्यांची कुतबख्खानी नांवाची एक पेढी (सरकारी) होती. तिचें भांडवल २१॥ लाखांचें होतें. पुढल्या वर्षी मौलाअली नांवाची दुसरी एक २१ लाखांची भांडवलाची पेढी काढली. आणखीहि दोन लहान पेढ्या त्यांनीं काढिल्या होत्या. त्यांच्या योगानें सरकारी पैशाची व्यवस्था चांगली लागली. त्यांनीं इनाम जमीनीविरहि थोडा बहुत सारा बसविला होता. पोलीस खात्यांतहि त्यांनीं याच सुमारास सुधारणा केली. हिंदूस खिचडी व मुसुलमानांस(ग्यारमीच्या दिवशीं) अन्न वाटण्याच्या कामीं महाराज बरीच रकम दरसाल खर्चीत असत. याप्रमाणें १४ वर्षे राज्य केल्यावर खंडेराव महाराज हे मकरपुऱ्याच्या राजवाड्यांत ता. २० नोव्हेंबर सन १८७० रोजीं जलोदरानें मरण पावले. यांच्या विरुद्ध १८५७ त कोळ्यांचें बंड उभारलें गेलें होतें. व इ. स. १८६३ त आणि इ. स. १८६७ त तर दोनदां यांच्या खुनाचाहि प्रयत्न करण्यांत आला होता. याच्या राणीचें नांव जमनाबाई असून त्यांनां ताराबाबा नांवाची एक मुलगी झाली होती. यांच्या नंतर यांचे धाकटे बंधु मल्हारराव हे गादीवर बसले होते; ते इ. स. १८७५ त पदच्युत झाले. त्यानंतर जमनाबाई यांनीं गोपाळराव नांवाच्या मुलास दत्तक घेतलें. तोच मुलगा हल्लीचे बडोद्याचे महाराज सयाजीराव होत. यांनीं १८७५ त मेच्या २७ तारखेस राज्यारोहण केलें. खंडेराव महाराजांनां मल्लविद्येचा फार शोक होता. त्यामुळें बडोद्यास त्यांच्या वेळीं हिंदुस्थानांतले प्रख्यात अकरा मल्ल रहात असत. त्यांच्या प्रीत्यर्थ सालिना २५४६७० रु. खर्च होई. यांचा मल्लविद्येचा वस्ताद टोंकचा राहणारा अबदुल कादर नांवाचा एक मुसुलमान होता महाराजांनीं आपल्या राजवाड्यांत लाल आखाडा नांवाचा तालीमखाना बांधला होता. तीरंदाजींतहि हे फार प्रवीण होते. त्यांच्या हौद्यांतील मार्तीत बरेच मण अत्तर टाकलें होतें असें म्हणतात. तालीमबाजीमुळें त्यांचें शरीर भव्य व पीळदार बनलें होतें. ते मद्याला कधीं शिवले नाहींत. त्यांचा पोषाखहि साधा (चक्रीवजा सफेत मांडचोळणा मलमलीचा सदरा व डोकीस दिल्लीशाई सफेत टोपी)असे. मुंबईच्या सेलर्सहोमला त्यांनीं २ लक्ष व व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला १ लक्ष ८० हजार रु. दिले. आगगाडीहि बडोदे राज्यांत यांच्या वेळीं सुरू झाली. [दि रूलर्स ऑफ बडोदा प्रो. माणिकराव. खंडेराव महाराज व बडोद्यांतील मल्ल विद्या].

खंडेराव गुजर—शिवाजीमहाराजांचे सेनापती प्रतापराव गुजर यांचा खंडोजी उर्फ खंडेराव हा पुत्र होय.झुल्फिकारखानानें रायगड फितुरीनें घेतल्यानंतर येसूबाईसाहेब व शाहुमहाराज यांनां औरंगझेबाकडे पाठविण्यांत आले,त्यावेळीं गडावर असलेली कांहीं मानकरी मंडळीहि (केसरकर, गुजर वगैरे) पकडलीं जाऊन औरंगझेबाच्या छावणींत गेली. त्यांत हा खंडोजीहि होता. या सर्व मंडळींस बाटवून मुसुलमान करण्याची इच्छा औरंगझेबास नेहमीं होई. परंतु तिच्या आड त्याची मुलगी येत असे. एके दिवशीं मात्र त्यानें आज शाहूस बाटवावयाचेंच असा आग्रह घेतला. तेव्हां तोहि त्याच्या कन्येनें मोडला. परंतु शाहूच्या ऐवजीं दुसरा कोणी तरी मोठा सरदार बाटविण्याचाच जेव्हां त्यानें हट्ट घेतला, तेव्हां खंडोजी हा आपखुषीनें मुसुलमान होण्यास तयार झाला. त्यानें असें धर्मांतर केल्यामुळें शाहूवरील हा प्रसंग टळला. पुढें शाहूमहाराज गादीवर बसल्यानंतर त्यांनीं खंडोजीस या त्याच्या कृत्यासाठीं, परळ खोऱ्यांतील साठ गांवाचें देशमुखी वतन इनाम करून दिलें. हें वतन त्यापूर्वी सुभानजी लावघरे याला,त्यानें साताराचा किल्ला फितूर होऊन औरंगझेबास दिल्यामुळें त्याच्याकडून इनाम मिळालें होतें. तें त्याच्याकडून जप्त करून शाहूमहाराजांनीं खंडोजीस दिलें. या खंडोजीचा मुसुलमानी वंश हल्लीं परळीनजीक कामथी येथें रहात असून त्यातील लोकांनां या गोष्टीची सर्व माहिती आहे. यांचीं नावें मुसुलमानी नसून हिंदूंचींच असतात. नवरात्रादि सर्व हिंदु सण हे पाळतात. खंडोजीस हिंदु धर्मांत परत घेण्यास त्यावेळीं मंडळी तयार झाली होती. परंतु त्याचें मुसुलमान बायकोवर फार प्रेम असल्यानें तिच्यासह मला पावन करून घ्या असा त्याचा आग्रह पडल्यावरून ती गोष्ट तशीच राहिली. [इति. संग्रह. पु. १. अं.४; मराठी रियासत भा. २].

खंडेराव दाभाडे—दाभाड्यांचा मूळपुरुष येसाजी हा तळेगाव (दाभाडे) (तालुके मावळ जिल्हा पुणें) येथील रहिवासी व मुकदम होता. दाभाडे क्षत्रिय असून यांचें गोत्र शांडिल्य व देवक कळंबाचें आहे. येसाजी हा शिवाजीमहाराजांचा हुजऱ्या होता. महाराज आग्र्यास गेले असतां येसाजीनें इकडे राजकुटुंबाची सेवा केली. येसाजीचा थोरला मुलगा खंडेराव होय. राजारामछत्रपती हे जिंजीस जातांना येसाजीसह खंडेराव हा त्याच्याबरोबर गेला होता. जिंजीस राजाराम यानां संभाजी हा पुत्र झाला, तेव्हां त्यानीं येसाजीस तळेगांव, इंदुरी, धामणें आणि उरसें हीं गांवें इनाम करून दिलीं. राजाराम हे जिंजीहून परत येत असतां मागें जनान्याच्या बंदोबस्तास येसाजी यास ठेवलें होतें. त्यानें मोठ्या युक्तीनें जनानखाना किल्ल्यातून काढून अनेक संकटांतून पन्हाळ्यास आल्यावर येसाजी मेला. राजाराम हे जिंजीस जात असतां मोंगल मागें लागला होता. तेव्हां (खंडेरावाचा धाकटा भाऊ) शिवाजीनें त्याला पाठीवर घेऊन दौड मारली असतां त्याची छाती फुटून व रक्ताच्या गुळण्या होऊन तो मेला होता. पन्हाळ्यास आल्यावर छत्रपतींनीं खंडेरावास सेनाधुरंधर हें पद देऊन गुजराथ व बागलाणकडे मुलुखगिरीवर पाठविलें आणि वस्त्रें व पोषाख देऊन निशाण आणि जरीपटका हवाली केला. शिवाय जुन्नर, पुणें व हरि-

थेड या तीन प्रांतांची व अकोले आणि जावळे या महालांची सरपाटिलकी (दर शेंकडा २ रु.) व चाकण परगण्यांतील आणि पारनेर परगण्यांतील १६४गांवांची सरदेशमुखी दिली. शाहुछत्रपती सुटून आल्यानंतर खंडेराव ताराबाईला सोडून त्यांनां जाऊन मिळाला. मध्यंतरीं चंद्रसेनानें खंडेरावास ताराबाईकडे ओढण्याचा प्रयत्न केला होता. पुढें १७१७ त खंडेरावास सेनापतींचें पद शाहुछत्रपतीनें दिलें, तें पुढें त्याच्या कुटुंबांत कायम झालें. याच वेळीं दिल्लीच्या बादशहानें दख्खनचा सुभेदार हुसेनअल्ली याच्याविरुद्ध उठण्यास शाहूमहाराजांस कळविलें असतां, त्यांनीं तें काम खंडेरावावर सोंपविलें. त्यानें खानदेश गुजराथवर स्वाऱ्या करून हुसेनचा रस्ता अडविला, तेव्हां त्यानें झुल्फिकारबेग यास त्याच्यावर पाठविलें. खंडेरावानें त्याची सारी फौज (झुल्फिकारसुद्धां) अडचणींत गांठून कापून काढली.तेव्हां हुसेननें आपले दिवाण मोहकमसिंग व चंद्रसेन जाधव यांनां रवाना केलें. त्यांची लढाई नगरजवळ झाली व पुढें खंडेरावानें निंबाळकर व सोमवंशी यांच्या मदतीनें मोंगलांचा पुरता मोड केला. यापुढें खंडेरावानें गुजराथ काठेवाडकडे मराठी अंमल बसवावा असा हुकूम छत्रपतींनीं त्याला केला व श्रावणमासची दक्षिणा आणि कोटिलिंगार्चन विधी सेनापतीनें करावा असें ठरविलें (१७१७).पुढें सय्यद बंधूंच्या मदतीस जी मंडळी दिल्लीस गेली तींत खंडेराव हा सेनापती म्हणून गेला होता (१७१९). दिल्लीहून परत आल्यावर बाळाजी विश्वनाथ यांनीं जी सरंजामी पद्धत निर्माण केली, तींत खंडेरावास खानदेश देऊन गुजराथ काबीज केल्यास तीहि जहागीर देऊन टाकूं म्हणून त्याला आश्वासन दिलें. सय्यदांचा हस्तक अलमअल्ली व निजाम यांच्यांत (१७२०) बाळापूरची जी लढाई झाली, तींत सय्यदांच्या विनंतीवरून खंडेरावास लढण्यासाठीं म्हणून छत्रपतींनीं पाठविलें होतें. यानंतर फत्तेसिंग भोसल्यांच्या अधिपत्याखालीं कर्नाटकांत (१७२५-२६) झालेल्या स्वारींत खंडेराव हा हजर होता. बाळाजी विश्वनाथ व खंडेराव यांचें एकमत असे. त्यामुळें बाळाजीपंतांनीं ठरविलेल्या राज्यव्यवस्थेस अमलांत आणण्याचें लष्करी काम खंडेराव करी. महाराष्ट्राच्या उत्तर सरहद्दीवर राहून तो खानदेश, वऱ्हाड व गुजराथ या तिन्ही प्रांतावर नजर ठेवी. यापुढें तो वृद्ध झाल्यामुळें त्याचा मुलगा त्रिंबकराव मोहिमेवर निघूं लागला. खंडेरावानें वसई ते सुरतपर्यंतचें कोंकण काबीज केलें होतें. त्याच्याबद्दल ' बडे सरदार, मातबर, कामकरी हुषार होते ' असा उल्लेख आहे (शाहु म. बखर). शाहुछत्रपतींची मर्जी त्याच्यावर पुष्कळ होती.तो एकदां पोटशुळानें आजारी पडला असतां महाराजांनीं त्याचा समाचार मुद्दाम घेतला होता.थोरले बाजीराव यांच्या वेळीं खंडेराव वृद्ध झाल्यानें व खुद्द श्रीमंतांनीं सेनानायकाचें काम हातीं घेतल्यानें त्याची विशेषशी हकीकत आढळत नाहीं. कदाचित खंडेराव मत्सरानें अलिप्त राहिला असावा. मात्र त्याबद्दल शाहुमहाराजांनीं त्याला समजुतीचीं पत्रें अनेकदां पाठविलीं होतीं. अखेर १७२९ त खंडेराव मूतखड्याच्या विकारानें मरण पावला. इतिहासप्रसिद्ध उमाबाई दाभाडे ही याची बायको होय. याला त्रिंबकराव, यशवंतराव व बाबूराव असे तीन पुत्र होते. [शाहुमहाराज रोजनिशी; शाहु म. बखर; दाभाडे घराण्याचा इतिहास; मराठी रियासत. म. वि. इति. संग्रह. पेशवे दप्तर. ले. २३].

खंडेराव हरि—हे महादजी शिंद्यांच्या प्रमुख सरदारांपैकीं एक होते. यांचें आडनांव मालेराव असून यांनां खंडेराव आप्पा असेंहि म्हणत; त्यावरून इंग्रज लेखकांनीं यांनां आप्पा खंडेराव असें नांव दिलेलें आहे. यांचा उल्लेख स. १७८० त आढळतो. त्या सालीं गोहदकरराणा, इंग्रज व महादजी शिंदे यांच्यांत जें युद्ध झालें त्यांत खंडेराव हे शिंद्यांतर्फे लढत होते. या युद्धांत गोहदकराचा जय होऊन त्यानें ग्वालेर किल्ला घेतल्यामुळें खंडेराव हे झांशीकाल्पीकडे मोहिमेस गेले. हें गोहदकराचें युद्ध तीन वर्षें चालू होतें. खंडेरावांनीं पुष्कळ पराक्रमाचीं कामें केलीं.पुढें १७८५ त पाटीलबावा दिल्लीच्या बादशहाच्या मदतीस गेले व त्यांनीं त्याला आपले अंकित केले; या प्रसंगीं आग्र्याचा किल्ला घेण्याच्या कामीं रायाजी पाटलाबरोबर खंडेराव यांनांहि पाठविलें होतें याच वर्षी दिल्लीस मराठ्यांचें वर्चस्व प्रथम स्थापित झालें होतें. त्यामुळें त्या प्रसंगीं जीं अनेक राजकारणें व युद्धप्रसंग घडले त्यांमध्यें अंबोजी इंगळे, रायाजी पाटील व खंडेराव यांनीं महत्वाची कामगिरी केली यानंतर त्यांनां मेलसे प्रांताचे सुभेदार नेमून पुढें बुंदेलखंडांत तेथील संस्थानिकाचा बंदोबस्त करण्याकरितां पाठविलें (१७८६). या वेळीं पन्ना येथील राजा मेला असून त्याच्या पुत्रांत गादीबद्दल तंटे लागले होते, त्याचा फायदा घेऊन तेथील दिवाण बेणीहुजुरी यानें सर्व सत्ता बळकाविली होती. तेव्हां खंडेराव यांनीं पन्न्यावर चाल केली. प्रथम बेणीनें खंडणी कबूल केली, परंतु पुढें त्यानें अटकळ केल्यामुळें खंडेरावांनीं त्याचेवर हल्ला केला व शेवटीं तो पराभव पावून पळून गेला. आणि सर्व लढाऊ सामानासह पन्न्याचा किल्ला खंडेरावाच्या हातीं लागला ही बातमी पाटीलबावामार्फत दिल्लीस बादशहास कळली असतां, त्यानें पेशव्यांनां व पाटीलबावांनां पोषाख पाठवून पाटीलबावांनां नौबत वाजविण्याची परवानगी दिली. नंतर खंडेराव यानें कलिंजर किल्ला लढाई करून काबीज केला.येथें पन्न्याच्या राजाचा दुसरा मुलगा राहात होता. बाळाजी गोविंद बुंदेले यांनीं मध्यस्थी करून ३५ लक्ष रुपये देऊन तह घडविला. तेथून खंडेराव ओरछास आले; आणि तेथील राजापासून दीडलाख रु. खंडणी घेऊन पुढें दतियास आले. येथील राजाकडे दोन लाख रुपये खंडणी द्यावी अगर सेवंढा किल्ला द्यावा अशी मागणी केली असतां राजानें खंडणी कबूल केली. पुढें १७८७ मध्यें जयपूरचा राजा प्रतापसिंग व महादजी

शिंदे यांची लढाई सुरू झाली. तेव्हां त्या लढाईत राणेखान-भाई, अंबाजी इंगळे वगैरे सरदारांबरोबरच खंडेराव हेहि हजर होते. या सालच्या अखेरीस खंडेराव हे ग्वाल्हेर, गोहद, भदावर वगैरे प्रांताचे कमावीसदार होते व त्याचे बद्दल त्यांनीं दहा लक्ष रुपये सरकारांत भरणा केला होता. दोन वर्षे खंडेराव ग्वाल्हेर प्रांतीं होते; पुढें सैन्याचा खर्च वाढल्यानें व रसदेचा भरणा वेळेवर होईनासा झाला होता म्हणून मध्यंतरीं त्यांचे व पाटीलबावांचें वितुष्ट आलें होतें. परंतु पैशाची व्यवस्था त्यांनीं लवकर केल्यानें तें नाहींसें झाले. पुढें १७८७-८९ त गुलामकादरार्चे बंड मोडण्याचे कामीं खंडेरावांनीं पुष्कळ मेहनत केली व आग्र्याचा किल्ला काबीज केला. या परिश्रमाबद्दल दिल्लीची बादशाही हस्तगत झाल्यावर पाटील बावानीं याला रेवाडी प्रांती बावीस महालांची मामलत सांगितली आणि १७९० त दिल्लीच्या किल्लेदारीचीं वस्त्रें बादशहाकडून देवविलीं. खंडेरावांनीं दिल्लीच्या किल्ल्याचा बंदोबस्त करून तेथें आपल्या वतीनें भवानीकुंवर यांस नेमलें. यापुढील खंडेरावाचे बहुतेक पराक्रम व राजकारणें दिल्ली प्रांतात घडून आलीं. नजीबखान या सालीं मेल्यानंतर खंडेरावांनीं कानोडचा किल्ला काबीज केला. त्याबद्दल बादशहानें त्यांनां पुष्कळ जडजवाहीर व वस्त्रें दिलीं. खंडेरावांनीं कानोड येथें आपल्या जहागिरीचें मुख्य ठिकाण करून तेथून सर्व उलाढाली चालविल्या. डी. बॉयन म्हणून एक फ्रेंच सेनापति, जो पुढें शिंद्याच्या लष्करांत प्रसिद्धीस आला, तो प्रथम खंडेरावाच्या पदरीं होता. त्याच्याकडून त्यांनीं कवायती पायदळें करविलीं. पुढें १७९३ त जॉर्ज टॉमस नांवाचा एक यूरोपियन त्यांनीं नोकरीस ठेवला व त्याला खर्चाकरितां आपल्या जहागिरीप्रमाणें तिजारा, फिरोजपुर वगैरे गांवें नेमून दिलीं. त्यांची जहागीर जी रेवाडीप्रांत त्याच्यां रक्षणाच्या कामीं या सैन्याचा बराच उपयोग झाला. पाटिलबावा १७९४ त मरण पावल्यानंतर दिल्लीप्रांताच्या बंदोबस्ताचें काम खंडेराव, डी. बॉइन, गोपाळराव भाऊ वगैरे सरदारांवर पडलें. पुढें या सरदारांत आपापसांत तंटे सुरू झाले. त्यांत खंडेराव व जॉर्ज टॉमसचें वांकडें आलें. टॉमस हा पुढें बराच प्रबळ होऊन त्यांनीं झाजर येथें स्वतःची जहागीर स्थापन केली. खंडेरावांचे सोनपत, पानपत व कर्नाळ हे तीन तालुके फौजेच्या खर्चाकरितां नवीन तोडून घेतले. पुढें खंडेराव वृद्ध झाल्यामुळें त्यांच्या हातून स्वाऱ्या शिकाऱ्या होईनातशा झाल्या. शेवटीं प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें उदास होऊन त्यांनीं स. १७९७ त यमुनेंत जलसमाधि घेतली. त्यांनां औरस पुत्र नसल्यानें, वामनराव नावाच्या पुतण्यास त्यांनीं दत्तक घेतलें. परंतु तो तितका दूरदर्शी नसल्यामुळें शिंद्याच्या इतर सरदारांचें व त्यांचें वांकडें आलें. याचें नांव १७९९ च्या जयपूरकरांच्या युद्धांत ऐकूं येतें. याच्या ताब्यांत १८०३ पर्यंत (सुर्जी अंजनगांवचा तह) कानोड, इस्माइलपुर, कोटपुतली, बिजवाडा वगैरे प्रांत होते; परंतु वरील तहाअन्वयें त्यांचें स्वामित्व इंग्रजांकडे आलें आणि त्यापुढें कानोडच्या जहागिरीचें नांव देखील ऐकूं येईनासें झालें. [इतिहास संग्रह पु. ४ अं. १०. ११. १२].

खंडेराव होळकर—मल्हारराव होळकराचा मुलगा व अहिल्याबाईचा पति. याचा जन्म १७२३ त झाला होता. इ. स. १७५४ त राघोबा दादा यांनीं अजमेरकडे मोहीम केली त्यांत खंडेराव हजर होता. सुरजमल जाट ठरलेली खंडणी देईना म्हणून त्याच्या कुंभेरीस मराठ्यांनीं वेढा दिला. (१७५४ जाने.) हा वेढा चार महिने चालू होता. दीड महिना झाल्यावर एके दिवशीं भोजन करून बेसावधपणें मोर्चांत निशाणापाशीं येऊन उभा राहिला असतां किल्ल्यांतून जाटाकडील जेजालाची गोळी एकाएकीं हाताला लागून ठार झाला. मल्हाररावास फार दुःख झालें. दादासाहेबांनीं उत्तरक्रियेकरितां १० हजार रु. सरकारांतून लगेच दिले. रागानें मल्हाररावानें सुरजमल्लाच्या वधाची व कुंभेरीच्या किल्ला पाडून टाकण्याची प्रतिज्ञा केली होती, परंतु जाटानें सल्ला केल्यानें ती शेवटास गेली नाहीं. [म. रियासत. मध्य विभाग; पुरुषोत्तम अहिल्याबाई चरित्र].

खंडेलवाल—एक ब्राह्मण जात. यांची वस्ती राजपुतान्यात सर्वांत जास्त आहे. शेखावटीच्या सीमेवर असलेल्या जयपूर प्रांतांतील खंडेला शहरावरून यांचें नांव पडलें. आदिगौड अथवा उच्च वर्गाचे गौड ब्राह्मण यांची आपण एक शाखा आहों असें ते प्रतिपादन करतात.

२. या शिवाय खंडेलवाल म्हणून बनियांची एक पोटजात असून तिच्या हिंदु व जैन अशा दोन शाखा आहेत. वरील खंडेला शहरावरूनच त्याचेहि नांव खंडेलवाल असें पडलें आहे. बरेचसे प्रसिद्ध मथुराशेट याच जातीचे आहेत. त्यांची एकंदर ७२ गोत्रें असून ती कांहीं इतर जातीवरून, कांहीं स्थानिक नांवांवरून व कांहीं धंद्यावरून बनलीं आहेत. या जातींत पुनर्विवाहास परवानगी नसते.

हे लोक साधारणतः वैष्णवपंथाचे असून त्यांचे गुरुघराणें म्हणजे जयपूरचे साधुबारा होय. गौड ब्राह्मण हे त्यांचे उपाध्ये असतात. त्यांच्या २४ व १३ अशा कुलदेवता आहेत. त्यांनां मिठाई, माळा वगैरे अर्पण करून होमहि करण्यांत येतो. गाव्रन, नागिन, बाबुरी, जियान, आतन्, कल्याणी, मुक्ता, सकाइमाता, तांबी, लोहा, झलाइ अशा एकंदर ११ देवतांचीं नांवें मिर्झापुर येथें असलेलीं आढळतात.

या जातींत मद्यमांसाची मनाई आहे. स्वज्ञातीच्या व गौड ब्राह्मणांच्या हातची कच्ची रसोई ते खाऊं शकतात. अगरवाला, ओसवाला व महेश्वरी बनिया यांनीं तयार केलेली पक्की रसोई ते खातात.

१९११ सालीं खंडेलवालांची संख्या एकंदर ८२४१४ होती; पैकीं ७१८७० हिंदु व १०५४४ जैन होते. [क्रूक].

खंडेला—राजपुताना. जयपुरसंस्थान, तोरावटी निझामतींतील खंडेला जहागिरीचें मुख्य ठिकाण. जयपुरापासून हें ५५ मैल दूर आहे. लो. सं. (१९११) ९१५६, लाखेचे जिन्नस व खेळणीं यांबद्दल खंडेला प्रसिद्ध आहे येथें एक किल्ला आहे खंडेला जहागीर दोन राजांच्या मालकीची असून जयपुर दरबाराला७२५१०रुपये खंडणी द्यावी लागते.

खंडोजी माणकर—हा खरवलीचा रहाणारा असून फिरंग्यांशीं १७३७ ते ४० पर्यंत मराठयांच्या ज्या लढाया झाल्या त्यांत एक प्रमुख लढवय्या होता. मानाजी व संभाजी आंग्रे यांच्या भांडणांत पेशव्यांनीं शंकराजी फडक्याबरोबर यास मानाजीच्या मदतीस पाठविलें होतें. साष्टीबेट काबीज करण्याच्या कामीं खंडोजीनें बरीच मेहनत केली. पटवर्धन, जोशी व खंडोजी यानीं रात्रीचे चोरून छापे घालून ठाण्याचा किल्ला काबीज केला (२७।३।३७). त्या वेळीं तेथील किल्लेदारी खंडोजीकडेच सोंपविण्यांत आली. पुढें वसईच्या मोहिमेच्या वेळीं खंडोजीनें वादरे, वेसावें व धारावी वगैरे ठिकाणें हस्तगत केलीं (फेब्रु. १७३९). वसई पाडाव करतांना खंडोजीनें वेष पालटून गुराखी म्हणून किल्ल्यांत नौकरी धरून भेद काढला होता. याचे वंशज कुलाबा जिल्ह्यांत माणगांव तालुक्यांत खरवलीस रहातात, त्यांनां खरवली वगैरे गांवें इनाम आहेत [पेशव्यांची बखर; म. रियासत, मध्यविभाग].

खंडो बल्लाळ—खंडो बल्लाळ हा शिवाजीचा आवडता व विश्वासू चिटणीस बाळाजी आवजी याचा दुसरा मुलगा होय. (बाळाजी आवजी पहा). याचा जन्म इ. स. १६६६ च्या सुमारास झाला असावा. खंडोबास घोड्यावर बसणें, तरवार मारणें व अक्षराचें वळण उत्तम वळवणें इत्यादि तत्कालीन उपयुक्त असें शिक्षण मिळालें होतें. खंडोबल्लाळाचा बांधा मजबूत असून हा अंगानेंहि धिप्पाड होता.

शिवाजी महाराजाच्या मृत्यूनंतर जो शिवशाहींत सोयराबाईच्या कारस्थानानें घोंटाळा माजला त्यांत संभाजी राजे यांनां कोणी गैरवांका समजाविल्यामुळें बाळाजी आवजीवर त्यांची इतराजी झाली व त्याचा फायदा घेऊन कलुशानें बाळाजी आवजी व त्यांचे बंधू शामजी बाळा व वडील चिरंजीव आवजी यांस इ. स. १६८१ च्या आगष्ट महिन्यांत परळीखालीं उरमोडीच्या कांठीं मारिलें व खंडो बल्लाळ व निळोबल्लाळ यांस व्याघ्राकडून खावविण्यासाठीं म्हणून सातान्याजवळील ‘ अजिमतारा ’ गडावर नेऊन सदरेस उभे केले. परंतु इतक्यांत कांहीं राजकारण आलें म्हणून कबजी बावाची मजालस उठली व या दोन लहान मुलांनां शिक्षा सांगण्याचें काम तहकूब राहिलें. या वेळीं संभाजी महाराजाबरोबर येसूबाईहि साताऱ्याचे मुक्कामीं होती. तिला जेव्हां बाळाजीच्या वधाची वगैरे ही हकीकत समजली तेव्हां तिनें संभाजीची चांगलीच कानउघाडणी केली, व संभाजीलाहि झाल्या गोष्टीबद्दल फार पश्चाताप झाला. तेव्हां खंडोबल्लाळ व निळो बल्लाळ यांस येसूबाईनें सोडवून त्यांनां व त्यांचे मातुश्रीला दिलदिलासा देऊन आपल्या जवळ ठेऊन घेतलें. व विसाजी शंकर राजापूरकर, बाळाजी आवजीचे मामा व लक्ष्मण आत्माजी व इतर कारकून पूर्वापार होते त्यांपासून चिटणीसाचें कामकाज संभाजी घेऊं लागले. परंतु यापूर्वीच कलुशानें बाळाजीची चीजवस्त लुटून गांव इनाम जप्त करण्याचे हुकूम दिले होते. ते सोडवून घेण्याचें तसेंच राहिलें. येसूबाईनें या दोघ मुलांनां आपल्या जवळ ठेऊन घेतलें व त्यांच्या खर्चालाहि आपल्या खर्चांतून देऊं लागली. तिनें खंडो बल्लाळाला धीर देऊन त्याच्याकडून कामकाज घेऊन संभाजीच्या नजरेस खंडो बल्लाळ येईल असें करूं लागली. तथापि संभाजीच्या हाताखालीं काम करणें बरेंच धोक्याचें होतें. यापुढें संभाजीनें चौलास वेढा दिला व गोवेकरांवर स्वारी केली त्यावेळीं खंडो बल्लाळ जवळ होते, व त्यांस पुष्कळ श्रम व साहस करावें लागलें.

“एका गांवास कौल लिहून द्यावयास सांगितला तो तरी धावता लिहितां नये म्हणून मार्गी बसोन कागद लिहिला. तो तीन चार कोश स्वारी गेली. निःसंग धावोन स्वारी आटोपिली कागद वाचोन दाखवून पालखीत सिके होते. राजश्रींनीं सिका केला. कागद जाबकरी यांचे हातावर देतांच आपास कलमल येऊन रगत वमन जालें. राजश्रींनीं मागें फिरोन दृष्टीस पडिल्यावरी पालखी उभी करून जवळ बोलाऊन नेलें आणि मेहेरबान होऊन बारीचा कोतवालपैकीं घोडा बसावयास दिला. पुढें राजश्रींनीं कुंभारजुवेंवर हल्ला केला व फिरंग्याची व संभाजीची लढाई झाली त्यात राजश्रीचे पुढें चहू हातावर आपाचा घोडा, केव्हां राजश्रीचे घोड्याचे तोंड आपाच्या घोड्याचे दांडीस” अशा तऱ्हेनें खंडोजीची निष्ठा व कामगिरी पाहून संभाजीनें परत रायगडी आल्यावर इ. स. १६८३ च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीस चिटनिसीचीं वस्त्रें वगैरे मान देऊन चिटनीसी त्याचे हातें घेऊ लागले. व यामुळें कलुशाच्या कारभाराला आळा बसला. याप्रमाणें कारभार चालत आहे तोंच इ. स. १६८८ च्या नोव्हेंबरांत संभाजी कलुशाच्या मदतीस गेला व संगमेश्वरीं शिर्क्यांचा मोड करून खेळण्यास जाऊन राहिला. कबिला बरोबर होता तो पुढें रवाना करून संभाजी संगमेश्वरास एक दिवस मुक्काम करून राहिला. येथें शेख निजाम उर्फ तकरीबखान यानें त्यास अचानक पकडलें. हें वर्तमान कबिल्याबरोबर असणाऱ्या खंडोजीस कळतांच त्यानें येसूबाईच्या मेण्यांत आपली मावसबहीण संतुबाई इला ठेऊन आपण व संताजी घोरपडे येसूबाई व शिवाजी यांनां घेऊन जलदीनें मजलीवर मजली मारीत रायगडास येऊन पोहोंचले. इतक्यांत मोंगलानीं हा कबिला पकडला व ‘ संतुबाईला ’ येसूबाई म्हणून पकडून नेली. तिनें खंडोजीनें दिलेली हिरकणी खाऊन प्राण दिला असें म्हणतात. पुढें राजारामाबरोबर चंदीस गेलेल्या मंडळींत खंडो बल्लाळहि होता व त्या

सर्व मंडळींस त्या प्रवासांत अनेक संकटें व हाल सोसावे लागले. एक प्रसंगीं त्याच्या मुलास (बहिरोजीस) त्याजबद्दल कैदेंत रहावें लागलें व पुढें बाटविल्यामुळें त्यानें आत्महत्या केली. एका प्रसंगी त्यास तटावरून तडी टाकावी लागल्यामुळें त्याचा पाय कायमचा अधु झाला.

झुल्पिकारखानानें चंदीस वेढा घातला असतां राजारामास तेथून काढून लावण्याच्या कामीं खंडो बल्लाळानें शिर्के मोहिते यांजबरोवर कारस्थान केलें व त्या कामीं त्यास दाभोली व कुचरी गांवचा आपली सरदेशमुखीची वतनें सोडावीं लागलीं. नंतर ही चंदीहून निघालेली मंडळी कांहीं काल कर्नाटकांत गनीमी लढाया करीत राहून पन्हाळा व विशाळगडीं येऊन राहिली व तेथून पुढील कार्यक्रम चालू केला. इतक्यांत राजाराम महाराज निवर्तले. त्यावेळीं राजारामानें शाहूवरच लक्ष ठेवून आजपर्यंत ज्याप्रमाणें कारभार केला तसाच करावा असें सांगून आणाभाका घेतल्या. परंतु ताराबाईनें तें न ऐकतां शिवाजीस गादीवर बसविलें. त्यामुळें व इतर कारणामुळें खंडोजी व ताराबाईचें पटलें नाहीं.

" राजश्री चंदीस असतां, राजश्रींचा व आप्पांचा ऋणानुबंध चांगलाच पडला. नित्य प्रहरा दिवसांत भोजन करून जावें, तें राजश्रींनीं निद्रा केलियावरी मध्यरात्रीस घरास जावें कारभार व वाडियांत जाणें येणें खेळणें, राजवाडियांतील कजिया खोकला जाहला तरी समजाविशी आप्पाशिवाय होत नव्हती. कोण येके गोष्टींचा पडदा नव्हता. आठांचौ दिवसीं अंगावरील पोशाख आप्पास द्यावे " तेच ताराबाईचें अमलांत बोलावल्यास जावें, विचारल्यास उत्तर द्यावें, असें होत होतें. इतक्यांत शाहु महाराज सुटून आले. खंडोजीचा ओढा पहिल्यापासून येसूबाई व तिच्या मुलाकडे असणें साहजीक होतें. संताजी घोरपडे याच्याशीं खंडोबाचा अति स्नेह होता. तेव्हां खंडोबा व संताजी घोरपडे यांनीं शाहूला राज्यांत आणण्यांत जितकी कष्ट मेहनत करवली तितकी केली. ताराबाईचा लकडा पाठीशीं होता. परंतु त्याला या कार्यकुशल माणसांनीं दाद न देतां लटकीच लढाई केलीशी दाखवून शाहूला राज्यांत आणलें. ताराबाई व राजसबाई यांच्यांतील वैमनस्याचाहि फायदा यांनां चांगलाच घेतां आला. शाहूची स्थापना राज्यावर केल्यानंतर रामचंद्रपंत व संकाजीपंत सचीव हे ताराबाईकडे गेले व प्रल्हाद निराजीचा अंत आधींच झाला होता त्यामुळें खंडोबा याच्याच तंत्रानें सर्व कारभार होऊं लागला. ताराबाईच्या अमदानीपासून खंडोबा हा संताजीबरोबर लढाईवर जात असे व जी कांहीं प्राप्ति होत असे, त्यांतील पांचोत्रा खंडोबास मिळे. शाहूच्या अमदानींत तर कोणचीहि गोष्ट खंडोबास नापसंत असेल तर ती करू देत नसत. एकदां परशुरामपंतास त्याचे छातीवर तक्ते ठेवून त्यावर मल्ल बसवून त्यांनां मारण्याचा हुकूम शाहूनें दिला, ही बातमी खंडोबास कळतांच खंडोबानें त्या मल्लास ओढून काढून पंतास सोडविलें. बाळाजी विश्वनाथाचा व खंडोबाचा विशेष लोभ होता. आणि खंडोबाच्या उत्तर वयांत बाळाजीनें सर्व तोल सांभाळला. खंडो बल्लाळ शके १६४८ अश्वीन शु ५ स वारला.

चिटणिसी वतन खंडोबाकडे आलें होतें; परंतु तें चालविण्यास जीं गांवें दिलीं होतीं, तीं त्याच्याकडे शेवटपर्यंत चालली नाहींत. संभाजीच्या वेळीं तर इनामती उजू होणें शक्य नव्हतें; आणि संभाजीनंतर राजाराम चंदीस जाऊन पडल्यामुळें पैसा कोठूनहि मिळेनासा झाला. त्यामुळें खंडोबा नेहमीं कर्जबाजारी राहून त्याच्या घरीं नेहमीं सावकारी धरणीं बसलेलीं असत. खंडोबाचा भाऊ निळोबा हाच घरचा कारभार पाहत असे. परंतु तो भयंकर उधळ्या असे. त्याला कधीं खर्चाबद्दल बोलल्यास तो आम्हाला ब्राह्मणी वेष नको म्हणून वर्दळीवर येई. म्हणून खंडोबानें त्याच्याजवळ खर्चाबद्दल बोलणें सोडून दिलें होतें. खंडोबाची प्राप्ति म्हणजे पूर्वी येसूबाईकडून मिळालेला व नंतर राजारामाकडून मिळालेला ऐवज हीच होती. खंडोबा घराच्या व्यवस्थेकडे कधींच पहात नसे. त्याच्या पहिल्या बायकोचें नाव म्हाळसाबाई असून तिला बहिरवजी नांवाचा पुत्र व पुतळाबाई नावाची कन्या होती. ही बायको चंदीस गेल्यानंतर एक वर्षाच्या आंत वारली म्हणून दुसरें लग्न केलें. तिचेंहि नाव म्हाळसाबाई असेंच होतें. ती किंचित कुरूप होती म्हणून राजाराम महाराजानीं तिसरें लग्न करून दिलें. तिचें नाव तुळजाबाई असें होतें. दुसऱ्या म्हाळसाबाईला जिवाजी, बापूजी, गोविंदराव व सदाशिव हे चार पुत्र व बायजाबाई ही कन्या होती. तुळजाबाईस एक पुत्र व सात कन्या अशीं आठ अपत्यें झालीं. मुलाचें नांव भैरवजी व मुलींचीं संतु, आमा, अनु, सुंदरा, तुकाबाई, राणू आणि येसू अशीं होतीं.

चंदीहून निघतांना खंडोबा खासाच निघाला होता. गणोजी शिर्क्यानें त्याचा कबिला पोहोंचता करावयाचा. परंतु निळो बल्लाळानें जर खंडोबाचा सर्वच कबिला येथून नेला तर आमची वाट काय म्हणून हट्ट धरला. तेव्हां म्हाळसाबाई व तिचीं मुलें काय तीं गणोजीनें पोहोंचविलीं. नंतर किल्लेदाराची सरसबाई हिला मूल नव्हतें म्हणून पुतळाबाईची तीन वर्षांची एक कन्या ठेवून घेऊन तिची सुटका केली. खंडोबानंतर जिवाजी खंडेरावास चिटणिसी दिली. [लेखक—वा. सी. बेन्द्रे].

खंडोबा—एक अर्वाचीन ज्ञातिविशिष्ट देवता. खंडोबा उर्फ मल्हारी मार्तंड किंवा मार्तंड भैरव हा बहुधा सर्व देशस्थांचा कुलस्वामी असतो. दक्षिणेंत जेजुरीस याचें प्रसिद्ध स्थान आहे. त्याचें माहात्म्य जयाद्रि माहात्म्यांत वर्णिलें आहे. देशस्थांप्रमाणें रामोशी धनगर हे खंडोबाचे उपासक असतात. खंडोबा देव बनण्यापूर्वी लिंगायत वाणी होता असें रामोशी समजतात. त्याला दोन बायका एक वाणी

व दुसरी धनगर जातीची असून त्यांसमवेत तो घोड्यावर बसलेला असतो, हातांत तलवार असते. वनस्पतिवर्गांत भंडारांत खंडोबाचें अस्तित्व आहे असें समजून भंडार पवित्र मानण्यांत येतो. रामोशी तर भंडाराची शपथ वहातात. प्राणीवर्गांत कुत्र्याच्या रूपांत खंडोबा वास करितो. घरांतून खंडोबाच्या धातूच्या मूर्ती असतात. कोणी मूल-बाळ होण्याकरितां खंडोबास नवस करितात व मूल झालें म्हणजे ते त्याच्या पायावर घालतात. मुलगा असल्यास वाघ्या बनतो व मुलगी असल्यास मुरळी होते. अशा वाघ्यामुरळ्या महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात. भक्तांच्या कपाळीं भंडार लावून हे पैसे मागतात व अनाचारांत आयुष्य कंठितात. [मुरळी, देवदासी पहा]. हेमचंद्र हरस्कंदौ या संस्कृत द्विवचनाचें हरखंडा असें प्राकृत रूप देतो. खंडा हें अनेकवचन आहे. प्राकृतांत प्रायः द्विवचन नाहीं. तात्पर्य स्कंद या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप खंड असें होतें. त्याचें ममतादर्शक मराठी रूप खंडू व प्राशस्त्यदर्शक मराठी रूप खंडोबा. म्हणजे महाराष्ट्रांत जेजूरी, पाली वगैरे ठिकाणचे जे खंडोबा आहेत ते मूळचे स्कंद होत. स्कंद म्हणजे कार्तिकस्वामी. कार्तिकस्वामीचें देऊळ पुण्याच्या पर्वतीस आहे. तें स्कंदाचें म्हणजे खंडोबाचेंच होय. इतकेंच कीं पर्वतीवरच्या त्या देवाचें नांव संस्कृत आहे व जेजूरीच्या देवाचें नांव प्राकृत आहे. स्कंद ही देवता वीरांची व योध्यांची फार पूर्वीपासून आहे. स्कंदाला सेनानी हें अपरनाम आहे. त्याची उपासना वीर करतात. महाराष्ट्रांतील सर्व जातीचे मराठे (ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य शूद्र, रामोशी वगैरे) खंडोबा हें आपलें कुलदैवत कां समजतात हें वरील उद्घाटनावरून समजणार आहे. खंडोबा हें शिवदैवत आहे असें कित्येक समजतात, तें अर्थात् निराधार आहे. स्कंदपुराणांत स्कंदोपासकांची म्हणजे खंडोबाच्या उपासकांची माहिती सांपडते (भारत इ. संशोधक मंडळ १८३२).

खतें—जो जिन्नस जमिनींत घातला असतां तींत पोषक द्रव्यांची वाढ होते, त्याला खत असें म्हणतात. खत व पाणी या दोहोंची पिकाचें उत्पन्न वाढण्यास जरूरी आहे. व हीं दोन्ही एकमेकांवर अवलंबून आहेत. ज्या ठिकाणीं पुष्कळ व पुरेसा पाऊस पडतो त्याठिकाणीं फक्त खताचाच विचार केला पाहिजे; व ज्या ठिकाणीं नवीन जमीन काढिली असेल किंवा ज्या ठिकाणीं दरवर्षी गाळ येऊन बसत असेल तेथें फक्त पाण्याचाच विचार केला पाहिजे. पण असा जोड क्वचितच आढळून येतो. खताचा विचार करण्यापूर्वी झाडांचें अन्न कोणतें व तें कोठून येतें याचा विचार करणें जरूरीचें आहे. सतराव्या शतकाच्या अखेरपावेतों पोषक द्रव्यें झाडांस वातावरणांतून अगर जमिनींतून मिळतात असा समज होता. व्हानहेल्मॉंट हे सतराव्या शतकाच्या सुरवातीस झाडांचे सर्व घटक हे पाण्यांतून मिळतात असें म्हणत होते. इ. स. १६६० या वर्षी सर केनेल्डिग्बी यानीं आपल्या पुस्तकांत असें प्रतिपादिलें आहे कीं, झाडांची वाढ ही सर्वस्वीं हवेंतील बाल्सम् नामक पदार्थावर अवलंबून असते; झाडाचा बरेवाईटपणा व मरण हीं त्या पदार्थावर अवलंबून आहेत. पुढें इ. स. १७३० साली जेथ्रोटल् यांनीं असा शोध लावला कीं झाडांचीं मुळें जमिनीचे कण खातात व जमिनीची जास्त मशागत करून जितके ते बारीक करावे तितकीं तीं झाडें जास्त जोरानें वाढतात, म्हणून टल्नी घोड्यांच्या सहाय्यानें कोळपणी यावर एक पुस्तक लिहिलें. त्यांत ते असें प्रतिपादूं लागले कीं जमिनीची मशागत चांगली केल्यास जमीन खतविण्याची किंवा पिकांत फेरपालट करण्याची मुळींच जरूरी नाहीं. त्यांची अशी समजूत होती कीं, जमिनींत खत घातलें म्हणजे तीं पिकत (कुजत) असतां त्याचा परिणाम जमिनीवर होऊन तिचे कण बारीक होतात. पुढें १७२० ते १८०९ पावेतों जास्त शोध लागत चालले. बोनेट व जेन सेनीबायर-स्वित्झर्लंडमधील शास्त्रज्ञ यांनीं असा शोध लावला कीं, झाडांच्या अंगीं हवेंतील कॅर्बॉनिक् ॲसिड् गॅस घेऊन-उन्हाचे वेळीं कॉर्बन् टेऊन ऑक्सिजन वायु बाहेर सोडून देण्याची शक्ति आहे. इ. स. १८०४ सालीं डी. सासुरे शेतकीरसायनशास्त्रवेत्ते यानीं झाडांतील खनिज द्रव्यांचा शोध लाविला. फ्रान्स देशांतील शास्त्रज्ञांनीं झाडांना खनिज द्रव्यांची फारच जरूरी आहे व हीं जर नसतील तर झाडें वाढावयाचीं नाहींत असें सिद्ध केलें; व पोषक द्रव्यांचा बराच मोठा भाग हवा व पाणी यांतून मिळत असून खनिजद्रव्यें मात्र जमिनींतून मिळतात असें ठरविलें.

इ. स. १८०२ ते १८१२ पावेतों सर हंफ्रे डेव्ही रसायनशास्त्रज्ञ यानीं व्याख्यानद्वारा असें प्रतिपादिलें कीं, झाडांत सांपडणारे पदार्थ जमीन, वातावरण व पाणी यांतून मिळतात; व या तिन्ही तत्वांचा बारकाईनें विचार (शोध) केला म्हणजे झाडांचें अन्न कोठून मिळतें, तें कसें तयार होतें व तें झाडांस कसें जातें हें सर्व कळून येईल. ते म्हणतात कीं, प्राणिजन्य, व वनस्पतिजन्य पदार्थ जे जमिनींत सांपडतात ते व पाणी हेंच झाडांचें खरें अन्न होय. जमिनीचे कण पाणी राखून ठेवण्यास उपयोगी पडतात व तें पाणी तेथून झाडांच्या मुळांस जसजसें लागेल तसतसें मिळत जातें. इ.स. १८३४ सालीं बॉसिंग्व्हाल्ट या फ्रेंच रसायनशास्त्रज्ञानीं आपल्या शेतीवर रासायनिक व शेतकीचे प्रयोग सुरू केले; व शेतकी क्रिया व शास्त्र या दोहोंतील प्रयोग बरोबरीनें करण्यास सुरुवात झाली. पुढें सर जोसलेन लॉज यानें रादेमस्टेड् येथें प्रयोगक्षेत्र काढिलें व तें अद्यापि चालू आहे. इ. स. १८४० सालीं लीबीग यानें शेतकी रसायनशास्त्र या विषयावर ब्रिटिश संस्थेकडे एक रिपोर्ट पाठविला; त्यांत त्यानें आपल्या बऱ्याच गोष्टींचा ऊहापोह केला आहे